Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृतिकोश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Y73(P15):1k 8417
155M2J.6
Joshi, Mahadev Shastri,
ed.
...skriti kosha

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

8416

Y73(P15):1k
155M2J·6

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi .
Acc. No. 6

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृतिकोश

सहावा खंड

(बंगाल ते मराठी भाषा व साहित्य)

संपादक

पं. महादेवशास्त्री जोशी

सहसंपादक

तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, एम्. ए.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. ....

भारतीय संस्कृतिकोश मंडळ

४१० शनिवार पेठ, पुणे ३०

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकाशक :
पं. महादेवशास्त्री जोशी, कार्यवाह
भारतीय संस्कृतिकोश मंडळ,
४१०, शनिवार पेठ, पुणे ३०

प्रथमावृत्ती:
शके १८९२ - बलिप्रतिप्रदा
(इ. स. १९७०)

पुनर्मुद्रण :
शके १९१३
(इ. स. १९९२)

Y73(P15):1k
155M2J.6

© पं. महादेवशास्त्री जोशी

मुद्रक :
अजय गुजराथी
अजय ऑफसेट
१११३/ब, शुक्रवार पेठ, पुणे २

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No 6

फोटो प्रोसेसिंग :
ब. शं. दाते
कलाप्रतिमा, पुणे ३०

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 8417

वितरक :
अनमोल प्रकाशन,
६८३, बुधवार पेठ,
अप्पा बळवंत चौक, पुणे २

मूल्य : २५० रुपये

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रस्तावना

भारतीय संस्कृतिकोशाचा सहावा खंड गेली दोन वर्षे दुर्मिळ झाला होता. ती उणीव पुनर्मुद्रणाने आज भरून निघत आहे. कोशाचा संकल्प, योजना आणि व्याप्ती याविषयी प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत सविस्तर लिहिलेच आहे. म्हणून त्याची पुनरुक्ती इथे टाळीत आहे. मात्र काही गोष्टींचा खुलासा दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या खंडाच्या प्रस्तावनेत केला आहे, तोच इथे पुन्हा उद्धृत करणे आवश्यक आहे.

शुध्दलेखन : कोशाच्या पहिल्या खंडात महाराष्ट्र साहित्य परिषदेने केलेले शुध्दलेखनाचे नियम आम्ही पाळले. त्यानंतर मराठी साहित्य महामंडळाने शुध्दलेखनाचे नवे नियम केले आणि ते महाराष्ट्र राज्य सरकारने मान्य केले. त्या नियमांना अनुसरून दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या खंडाचे मुद्रण केले आहे. तेच नियम या सहाव्या खंडाच्या मुद्रणातही पाळले आहेत.

तिथी : प्रस्तुत कोशातील व्रते, सण व उत्सव यांतील तिथी अमान्त मास धरून लिहिलेल्या आहेत. पुर्णिमान्त मास मानणाऱ्या प्रदेशात त्यांच्या मासनामात फरक पडेल हे ध्यानात घ्यावे. उदा. धुलीवंदनाच्या तिथीला अमान्त मास पध्दतीने फाल्गुन वद्य प्रतिपदा असे म्हटले जाते. पणे पूर्णिमान्त मासात तीच तिथी चैत्र वद्य प्रतिपदा ठरेल. कारण पूर्णिमान्त मासाचा प्रारंभ वद्य प्रतिपदेपासून होत असतो.

जाती-जमातींची माहिती : गेल्या शतकात व चालू शतकाच्या प्रारंभी अनेक पाश्चात्य संशोधकांनी भारतातील बहुसंख्य जाती-जमातींचे संशोधन करून मोठमोठे ग्रंथ लिहून ठेवले आहेत. अशा अनेक ग्रंथांचा उपयोग करून आम्ही जाती-जमातींची माहिती संकलित करून तिचा उपयोग केला आहे. पण त्यांतील बरीच माहिती आता जुनी झाली आहे. कालमानाप्रमाणे बहुतेक जाती-जमातींच्या व्यवसायात, राहणीत व चाली-रीतीत पुष्कळ फरक पडले असणे शक्य आहे, पण त्याची प्रत्यक्ष पहाणी करून त्यांच्याविषयी अद्ययावत माहिती मिळवणे आम्हाला शक्य झाले नाही. अर्थात् प्रत्येक गोष्टीची समक्ष पहाणी करून एखादा ज्ञानकोश निर्माण करणे शक्यच नसते. संपादकाला उपलब्ध ग्रंथांच्या आधारेच आपला कार्यभाग साधावा लागतो. आम्हीही तेच आणि तसेच केले.

मात्र शक्य होतील तेवढे अलिकडील ग्रंथ मिळवून आम्ही त्यांचा उपयोग केला आहे. इ. स. १९६१ च्या जनगणनेचे अहवाल आणि भारतातील अनेक जिल्ह्यांचे जिल्हानामे (गॅझेटिअर्स) यांचाही शक्य तेवढा उपयोग केला आहे.

गेली कांही वर्षे भारतीय संस्कृतिकोशाचे तिसरा, चौथा, पाचवा व सहावा हे खंड दुर्मिळ झाले होते. ग्राहकांना पुरा संच मिळत नव्हता. हे दुर्मिळ खंड पुनर्मुद्रित करावयाचे तर त्यासाठी लागणारी मदत मिळविण्यासाठी मला अनेक उदार दात्यांकडे याचना करण्यासाठी भ्रमंती करावी लागली असती. पण माझ्या उतारवयामुळे आणि शारिरीक दुर्बळतेमुळे मला हे काम सर्वथैव अशक्य होते. माझी ही परिस्थिती लक्षांत घेऊन अनमोल प्रकाशनाचे श्री. पद्माकर नांदुरकर व कलाभुवन पुणे, या संस्थेचे श्री. ब. शं. दाते हे माझे मित्र कोशाचे हे खंडित झालेले काम पुढे चालविण्यासाठी माझ्या मदतीला आले आणि त्यांनी सर्व आर्थिक जबाबदारी उचलण्याचे ठरवून खंड तिसरा, चौथा, पाचवा व सहावा पुनर्मुद्रित करण्याचे काम तडीला नेले. याच क्रमाने उर्वरित सर्व खंड संपतील तसतसे ते पुनर्मुद्रित करण्याचा मनोदयही त्यांनी व्यक्त केला आहे.

तसेच अजय गुजराथी, अजय ऑफसेट, शुक्रवार पेठ, पुणे या संस्थेचे मालक व सहकारी यांनी छपाईची जबाबदारी घेतली. त्यांच्या या उदार सहाय्याबद्दल मी कोशमंडळातर्फे त्यांचे हार्दिक आभार मानतो. वरील सद्‌गृहस्थांच्या या सहकार्यामुळे आता ग्राहकांना कोशाचा समग्र संच उपलब्ध होऊ शकेल.

सर्वांचा नम्र
पं. महादेवशास्त्री जोशी
संपादक व कार्यवाह

पुणे
मार्गशीर्ष
शके १९१३
जानेवारी १९९२

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृतिकोश

खंड सहावा

बंगाल (पाचव्या खंडातील अपूर्ण विषय पुढे चालू) **महत्त्वाची शहरे व स्थाने** – बंगालमधील काही ठिकाणें वेगवेगळ्या कारणांसाठी प्रसिद्ध आहेत, ती अशी–

कलकत्ता – ही बंगालची राजधानी होय. इ. स. १९११ साली दिल्ली येथे हिंदुस्थानची राजधानी नेण्यात आली, तोपर्यंत कलकत्ता हीच ब्रिटिश हिंदुस्थानची राजधानी होती. हे शहर हुगळी नदीच्या पूर्व तीरावर, तिच्या मुखापासून ८० मैल आंत वसलेले आहे. याची दक्षिणोत्तर लांबी सुमारे दहा मैल असून, रुंदी ३ ते ५ मैल आहे. मराठा-खंदक ही याची पूर्वसीमा होय. इथल्या बंदरातून उ. प्रदेश, म. प्रदेश, बिहार, बंगाल, ओडिसा व आसाम या प्रदेशांचा प्रचंड व्यापार चालतो.

या शहराच्या जागी पूर्वी सुटानाती, गोविंदपूर व कलीकाता ही गावे होती. इंग्रजांनी ती विकत घेऊन तिथे प्रथम वसाहत केली आणि वखारी उघडल्या. इ. स. १७०० साली हुगळी नदीच्या किनाऱ्यावर विल्यम फोर्ट बांधण्यात आला. हा कोट पुढे ब्रिटिश साम्राज्याचा आधारस्तंभ ठरला. इ. स. १७७३मध्ये तो पुन्हा संपूर्ण बांधला गेला, तेव्हा त्यासाठी २० लक्ष पौंड खर्च झाला. या मोठ्या किल्ल्यात १०,००० सैनिक राहू शकत. इंग्रजांना या किल्ल्यातून शेवटपर्यंत एकही तोफगोळा सोडावा लागला नाही, हे त्याचे वैशिष्टच होय.

विल्यम फोर्टच्या जवळ एक विस्तीर्ण मैदान असून, त्याच्या दक्षिण भागात व्हिक्टोरिया राणीचे स्मारक आहे. हे शुभ्र संगमरवराचे भव्य शिल्पकाम १९२१ साली पुरे झाले. त्यात असंख्य सुंदर चित्रे व पुराणवस्तू यांचे प्रदर्शन मांडलेलें आहे. तिथून जवळच धाकुरिया नामक दोन तलाव असून, ते फार प्रेक्षणीय आहेत. मैदानाच्या आग्नेय सीमेवर चौरिंगी भागात सेंट पॉलचे भव्य कॅथेड्रल दिसते.

कलकत्त्याचे वस्तुसंग्रहालय अत्यंत प्रेक्षणीय आहे. त्यात प्रागैतिहासिक युगापासूनच्या असंख्य वस्तू मांडून ठेवलेल्या आहेत.

कलकत्ता शहराच्या मध्य भागात कॉलेज स्ट्रीटवर कलकत्ता युनिव्हर्सिटी व प्रेसिडेन्सी कॉलेज या इमारती आहेत. हिंदुस्थानात प्रथमच उच्च इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाला तो या प्रेसिडेन्सी कॉलेजातच होय.

कॉलेज चौकाच्या पूर्वेला महाबोधी सोसायटीच्या कलकत्ता शाखेचे सभागृह आहे. महाबोधी सोसायटी ही सर्व जगात बौद्ध संस्कृतीचा प्रसार करणारी संस्था आहे.

तिथून वायव्येला सुमारे १ मैलावर एक संगमरवरी प्रासाद आहे. त्यात चित्रांचे मोठे प्रदर्शन असून, त्याच्या भोवती विस्तीर्ण व सुंदर बगीचा आहे.

शहराच्या पूर्वसीमेवर शिआलधा स्टेशन असून त्याच्या उत्तरेला बद्रीदास मंदिररस्त्यावर चार प्रसिद्ध जैन मंदिरे



जैन मंदिर.– कलकत्ता

आहेत. यांतील सर्वांत प्रेक्षणीय मंदिर १० वा तीर्थंकर शीतलनाथ याचे असून, ते इ. स. १८६७ साली बांधलेले आहे. त्याच्या भोवतालची बाग अत्यंत सुंदर आहे.

चितपूर रस्त्यावर नखोदा मशीद आहे, ती खूपच भव्य आहे. तिच्या भव्य घुमटाजवळ १५१ फूट उंचीचे दोन मिनार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. ईडन गार्डनमधील ब्रह्मी पगोडा फारच सुंदर दिसतो. तो इ. स. १८५६ साली प्रोमहून तिथे आणलेला आहे.



ब्रह्मी पागोडा – ईडन गार्डन

हावडा स्टेशन हे कलकत्त्याचे प्रवेशद्वार आहे. तिथे हुगळी नदीवर बांधलेला प्रचंड पोलादी पूल हे शहराचे एक भूषणच मानले जाते. त्याची लांबी २१५० फूट असून त्याचा मधला ५६४ फूट लांबीचा झुलता भाग बाजूच्या दोन स्तंभांवर आधारलेला आहे. त्या स्तंभांची उंची सुमारे २७० फूट आहे.

काशीपूर, माणिकतला, एन्टाली, बाळीगंज, किदरपूर, अलीपूर भवानीपूर, कालीघाट व टॉलीगंज ही कलकत्त्याची उपनगरे होत. अलीपूर भागात प्रसिद्ध राष्ट्रीय ग्रंथालय आहे.

हावड्याच्या उत्तरेला ४ मैलांवर हुगळीच्या पश्चिम तीरावर बेलूर येथे रामकृष्ण मिशनचे केंद्र असून, तिथेच रामकृष्ण मठ आहे. त्याची स्थापना स्वामी विवेकानंदांनी केली. तिथले रामकृष्ण मंदिर अतिशय सुंदर आहे. तिथून जवळच हुगळीच्या पैलतीरी दक्षिणेश्वर येथे कालीमंदिर आहे. श्रीरामकृष्णपरमहंस यांनी तिथे देवीची आराधना केली.

तिथून उत्तरेला काही अंतरावर सेरामपूर व चंद्रनगर ही गावे आहेत. सेरामपूर येथे केरे व मार्शमन या बॅप्टिस्ट मिशनऱ्यांनी प्रथम पाश्चात्य शिक्षण व ख्रिस्ताची शिकवण यांचा प्रचार सुरू केला. चंद्रनगर हे फ्रेंच लोकांचे ठाणे होते. जवळच चुनसुरा, हुगळी व बांदेल ही स्थाने आहेत. तिथे डच, फ्रेंच, पोर्तुगीज व इंग्लिश लोकांनी व्यापार सुरू केला होता. हुगळी येथे इमामबारा नावाचा दर्गा प्रेक्षणीय आहे. हुगळीच्या बन्सबेरिया भागात इ. स. १६७९ साली बांधलेले एक विष्णुमंदिर अजून चांगल्या स्थितीत आहे.

गौड – माल्दह जिल्ह्यातले हे शहर पूर्वी लक्ष्मणावती किंवा लखनौती या नावाने प्रसिद्ध होते. सेन राजवंशाची राजधानी तिथे होती. बख्त्यार खिलजीने ते शहर जिंकल्यावर मुसलमानांनी त्याला गौड हे नाव दिले. मुसलमान सुभेदारांनी तिथे अनेक भव्य इमारती बांधल्या होत्या. त्यांचे अवशेष आजही तिथे आढळतात. (गौड पाहा)

मुर्शिदाबाद – इंग्रजांच्या आधी बंगालवर राज्य करणाऱ्या नवाबांची ही राजधानी होय. तिथले भग्नावशेष पाहून नबाबांच्या वैभवाची काहीशी कल्पना येते. तिथले रेशमी कापड प्रसिद्ध आहे.

दार्जिलिंग – हिमलयाच्या पायथ्याशी ७००० फूट उंच डोंगरावर वसलेले हे शहर कलकत्त्यापासून ४१६ मैलांवर आहे. तिथून एव्हरेस्ट व कांचनगंगा या शिखरांचे दर्शन होते.

कुचबिहार – या भागातील घनदाट अरण्ये वाघ व हत्ती यांच्या शिकारीसाठी फार प्रसिद्ध आहेत.

शांतिनिकेतन – कलकत्त्यापासून वायव्येला सुमारे १०० मैल अंतरावर हे नगर आहे. कविश्रेष्ठ रवींद्रनाथ ठाकूर यांच्यामुळे ते प्रसिद्ध आहे.



रामकृष्णमठ – बेलूर

पंडुआ – माल्दह शहरापासून ६ मैल अंतरावर या प्राचीन नगराचे अवशेष आढळतात. तिथली आदिना मशीद फार भव्य व प्रेक्षणीय आहे.

विष्णुपूर – हे कलकत्त्यापासून १२५ मैल अंतरावर असून, तिथे असंख्य मंदिरे आहेत. त्यांतील मल्लेश्वरमंदिर, मदनमोहनमंदिर, राधेश्याममंदिर, श्यामरायमंदिर, मदनगोपालमंदिर व जोरबंगलामंदिर ही विशेष उल्लेखनीय आहेत. विष्णुपूर नावाचे मल्लांचे राज्य इ. स. च्या ८ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत प. बंगालमध्ये नांदत होते, त्याची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही राजधानी होती. इथल्या मंदिरात रामायण, महाभारत व पुराणे यांतील प्रसंगांची सुंदर चित्रे कोरलेली दिसतात.

नडिया (नवद्वीपधाम) — कलकत्यापासून ६६ मलांवर हे तीर्थक्षेत्र आहे. हे चैतन्यप्रभूचे जन्मस्थान होय. नव्य न्याय, ज्योतिष, इ. शास्त्रांच्या अध्ययन — अध्यापनाचे हे मोठे केंद्र होते.

तारकेश्वर — हावडा स्टेशनापासून ३६ मैलांवर हे शैव क्षेत्र आहे. तिथे जवळच असलेल्या दुग्धसरोवरात स्नान करून यात्रेकरू तारकनाथाचे दर्शन घेतात.

जाती–जमाती — बंगालमध्ये ज्या प्रमुख जाती — जमाती आढळतात, त्यांची नावे व माहिती अशी—

ब्राह्मण-बंगालमध्ये सप्तशती व वैदिक या नावांनी ओळखले जाणारे काही ब्राह्मण होते. ते समाजात कनिष्ठ समजले जात. सप्तशतींपैकी आता कोणी शिल्लक नाहीत. ते बहुधा अन्य जमातीत मिसळून लुप्त झाले असावे. वैदिकांपैकी फक्त चार घराणी शिल्लक आहेत. बंगालमध्ये जे कनौजी ब्राह्मण आहेत ते आदिसुर राजाने इ. स. च्या ११ व्या शतकात कान्यकुब्ज देशाहून आणवले, असा इतिहास आहे. या ब्राह्मणांत पुढील पाच गोत्रे आहेत—(१) भट्टनारायण—शांडिल्य (२) दक्ष — काश्यप (३) छंदर — वत्स (४) श्रीहर्ष — भारद्वाज (५) वेदगर्भ — सावर्णी.



बंगालमधले ब्राह्मण सुशिक्षित व सुसंस्कृत असून, त्यांपैकी बरेच उद्योगपती व वरिष्ठ अधिकारी आहेत. काही ब्राह्मण शेतीचाही व्यवसाय करतात. पौरोहित्य करणारे मात्र फारच थोडे आहेत. जे तो व्यवसाय करतात ते रूढीवादी व त्याबरोबरच अशिक्षित आहेत.

क्षत्रिय-बंगालमध्ये राजपूत लोक हे क्षत्रिय वर्गामध्ये मोडतात. त्यांची लोकसंख्या मात्र थोडी आहे. त्यांच्या ३४ कुळघा असून, आडनावेही चौहान, राठोड, चंदेल, वाघेल, बाइस, इ. राजस्थानी आडनावांप्रमाणेच आहेत. छोटा नागपूरमधील नागवंशी, शिखर आणि राक्षेल या जातीही स्वतःला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्षत्रिय म्हणवून घेतात. राजपूत घराण्याशी त्यांचा शरीर-संबंधही होतो.

राजपुतांत बरेच जमीनदार आहेत. त्यांचे वैशिष्टय हे, की ते आपल्या रयतेला वात्सल्याने वागवतात. आदरसत्काराच्या बाबतीतही ते उदार व खर्चिक असतात. ते आपल्या नैतिक मर्यादाही बऱ्याच प्रमाणात पाळतात. त्यांना विविध प्रकारच्या खेळांची व स्पर्धांची आवड असते. घोडदौड आणि तिरंदाजी यांत ते निष्णात असतात. ते आपल्यापाशी मूल्यवान बंदुका, उत्कृष्ट घोडे व शिकारी कुत्रे बाळगतात. ते स्वतःला द्विज समजत असल्यामुळे त्रैवर्णिकांची कृत्ये आस्थेने करतात किंवा ब्राह्मणांकडून करवून घेतात. यांच्यांत जावयाला सर्वश्रेष्ठ अतिथी मानले जाते. तो येत आहे, असे कळताच ते आपल्या जवळच्या घोडदळातील व पायदळातील माणसे त्याला सामोरी पाठवतात. वाड्याच्या महाद्वारावर केशरी पोशाख केलेल्या सुवासिनी त्याला पंचारती ओवाळतात.

वैश्य – बंगालमधले बहुतेक वैश्य हे पश्चिम भारतातून तिकडे गेलेले आहेत. बंगालमध्ये कित्येक ब्राह्मण व त्यांच्या खालोखाल कित्येक राजपूत हेही वैश्यांचा व्यवसाय करतात. साहू, मोदी, बनिया, इ. लोकांचा क्रमांक त्यांच्या खाली लागतो.

कायस्थ – बंगालमधील कायस्थ हे सर्वसामान्य लोकांमध्ये स्वतःला पहिल्या श्रेणीचे समजतात. आपल्यालाही आदिसुर राजाने कनोजी ब्राह्मणांबरोबरच बंगालमध्ये आणले, असे ते सांगतात. एक मत असे आहे, की बंगालमध्ये इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर मोठ्या प्रमाणात कारकुनांची गरज निर्माण झाली. ते काम करायला तिथल्या ब्राह्मण किंवा वैश्य यांना वेळ नव्हता किंवा त्यांना तो पेशा आवडण्यासारखा नव्हता. तेव्हा साहजिकच शूद्रांमधल्या एका वर्गाने तो पेशा पत्करला. धूर्तपणा, तरल बुद्धी आणि शरीरश्रमाची नावड या निकषावर पहिल्या प्रथम अशा कारकुनांची भरती करण्यात आली. अशा तऱ्हेने हळूहळू तो एक वर्गच बनला. बुद्धिमत्तेच्या बळावर आजही त्याने समाजात आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. सांप्रत वरिष्ठ सरकारी अधिकारी व मोठमोठे वकील याच वर्गातले आढळतात. लेखणीने त्यांना हे सामाजिक श्रेष्ठत्व मिळवून दिल्यामुळे, ते तिला आपली देवता मानतात व श्रीपंचमीच्या दिवशी समारंभपूर्वक तिची पूजा करतात. त्यांची विवाह, और्ध्वदेहिक, श्राद्ध, इ. धर्मकृत्ये ब्राह्मणांसारखीच केली जातात. विधवा–विवाह त्यांना निषिद्ध आहे. (कायस्थ पाहा)

गोप – शूद्रांमध्ये गोपांचे स्थान फार वरचे आहे. सिंगभूम जिल्ह्यात हे लोक मोठ्या संख्येने आढळतात. यांच्यांतही श्रेष्ठ-कनिष्ठ भेद आहेत. त्यांपैकी मथुरावासी गोप स्वतःला श्रेष्ठ समजतात व मथुरेची यात्रा करतात. हे सुस्वरूप असतात. मागध गोप हे सर्वसाधारण लोकांसारखे कृष्णवर्णीय आणि हाडापेराने मोठे असतात. ते कोलांमध्ये मिसळले तर त्यांना त्यांच्यातून वेगळे काढता येणार नाही. यावरून ते गोपालनाचा व्यवसाय पत्करलेले कोलच असावे, अशी शंका काही शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. गोप लोक गायी–म्हशी पाळतात व दुधा–तुपाची विक्री करतात. यांची वस्ती मुख्यतः खेड्यात असते. त्यांच्या पंचायती असतात व त्यांमध्ये त्यांच्या जातीय गुन्ह्यांचा न्यायनिवाडा होतो. गोपांमध्येच सद्‌गोप नावाचा एक वर्ग आहे. हे स्वतःला सर्वश्रेष्ठ गोप समजतात. त्यांनी सांप्रत शेतीचा व्यवसाय पत्करला आहे. अन्य गोपांप्रमाणेच तेही कृष्णभक्त आहेत.

गदेरी अथवा धनगर– यांचे सामाजिक स्थानही गोपांसारखेच आहे. हे मेंढ्या पाळतात व घोंगड्याही विणतात.

कुणबी – बंगालमधले कुणबी मूळच्या आर्य वसाहतकारांपैकी असावे, असा अंदाज आहे. हे लोक कष्टाळू शेतकरी आहेत. मात्र बंगालमध्ये त्यांना वरिष्ठ वर्गात स्थान नाही. हे काळसर, पीतवर्णी असतात. त्यांची उंची व शरीरयष्टी प्रमाणबद्ध असते. त्यांची मुखाकृती ब्राह्मणांपेक्षा कमी रेखीव व राजपुतांपेक्षा कमी उग्र असते. त्यांचे डोळे सामान्यपणे करडे व केस उदी रंगाचे असतात. स्त्रियांचे हात-पाय लहान पण रेखीव असतात. कुणब्यांच्या धार्मिक व सामाजिक चालीरीती सर्वत्र सारख्या नाहीत. जिथे ते आर्येतरांच्या विशेष संपर्कात आले, तिथे त्यांनी आर्येतरांच्या चालीरीती उचललेल्या आहेत. हे विवाह सोडून अन्य धार्मिक कृत्यांसाठी ब्राह्मणांना बोलावतात. जुन्या काळात त्यांच्यांत पुष्कळ बायका करण्याची चाल होती. कुणबी कुठल्याही वयात लग्न करीत असे. त्यांच्या स्त्रियांच्या हातात सौभाग्यचिन्ह म्हणून एक लोखंडी बांगडी असते. लग्न-विच्छेद करायचा झाल्यास नवरा तिच्या हातातून ती बांगडी काढून घेतो. सामान्यपणे लग्नकार्यात वराचा मान सर्वात मोठा असतो; पण कुणबी लोकांत वधूचे भाऊ त्याला अपमानाने वागवतात व उर्मटपणाने बोलतात. सिंगभूमसारख्या काही ठिकाणी वधू-वर एकमेकांच्या कपाळी रक्ताचे टिळे लावतात. बंगालमध्ये सिंदूर-दान या नावाचा जो एक लग्नातला विधी आहे, तो या प्रथेतूनच उगम पावला, असे समजतात.

कुणबी लोक बहुतेक सर्वसामान्य वार्षिक सण पाळतात; पण अख जत्रा हा त्यांचा खास सण असतो. पौष महिन्याच्या अमावास्येला तो येतो. या दिवशी कुणबी स्त्री-पुरुष नवीन वस्त्रे परिधान करून गावाबाहेर गोळा होतात व नृत्य करतात. त्यानंतर त्यांचे नेमबाजीचे प्रयोग होतात. एक कोंबडा हवेत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उडवणे व तिरंदाजाने बाणाने त्याचे विंधान करणे, असे त्या तिरंदाजीचे स्वरूप असते. त्या दिवशी ते दोन्ही बाजूंना टोके असलेल्या पोळ्या बनवतात.

कोइरी – या जातीचे लोक कुणब्यांपेक्षाही संख्येने अधिक आहेत. कोइरी आणि कुणबी यांच्यामध्ये फरक एवढाच, की कोइरी हे शेतकरी आणि माळीही असतात. ते भाजीपाला, तंबाखू, अफू आणि इतर अनेक प्रकारची झाडे यांची लागवड करतात. आपली जात महादेव आणि पार्वती यांनी वाराणशीच्या उद्यानात निर्माण केली, असे हे सांगतात व स्वतःला सत्शूद्र म्हणवतात. संकियार ही त्यांचीच एक पोटजात आहे. कोइरींच्या धार्मिक व सामाजिक चालीरीती इतर शूद्रांहून वेगळ्या आहेत व त्या वरिष्ठ वर्गांच्या चालीरीतींना जवळच्या आहेत. हे लोक सहाव्या महिन्यात ब्राह्मणांच्या हस्ते नवजात शिशूचे उष्टावण करतात. मुला-मुलींचे कान पाचव्या किंवा सहाव्या वर्षी गोसाव्याकडून टोचतात. मुलांना गुरुमंत्रही त्याच वेळी देतात, जुन्या काळी यांच्यांत मुलामुलींची लग्ने अगदी अल्पवयात होत. त्यांच्या लग्नात सप्तपदी असते व विवाहविधी ब्राह्मण चालवतो. सिंदूरदान एवढाच ज्यात विधी असतो, त्या विवाहाला सगोई असे म्हणतात. या संबंधापासून जन्मलेली मुले औरस समजली जातात. शुक, परमेश्वरी आणि हनुमान ही कोइरींची दैवते होत. या देवांसाठी प्रत्येक घरात एक चौथरा असतो. आदिवासींचा करमा हा सण हे लोकही साजरा करतात व कोलांच्या मारांग बुरू या देवालाही ते भजतात.

कलित – ब्रह्मपुत्र नदाच्या खोऱ्यात पहिल्या प्रथम वसाहती स्थापन करणाऱ्या आर्यांचे हे वंशज आहेत. तिथून ते आसाम व बंगाल या प्रदेशात सर्वत्र पसरले. शेती हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. आपण रामाच्या काळात मिथिलेहून इकडे आलो, असे ते सांगतात. राम हाच त्यांचा मुख्य देव आहे. कलित हे मूळचे आर्य असले, तरी पुढच्या काळात त्यांच्यामध्ये आर्येतर रक्त मिसळले असावे, असे वाटते.

कलितांचा वर्ण काळसर पिवळा असतो. जिवणी रुंद असली तरी चेहरा घाटदार असतो. त्यांचे डोळे मोठे किंबहुना हरिणाक्ष असतात. मुवया राठ व पापण्या मोठ्या असतात. त्यांचे भालप्रदेश रुंद पण कानशिले अरुंद असतात. त्यांच्यांत काही स्त्रिया सुस्वरूप आढळतात. काही भागात यांचे कलिततास किंवा ओडतास असे पोटभेदही आहेत. कलितांची लग्ने प्रौढ वयात होतात.

अघरिया – ही बंगालमधील एक छोटी पण महत्त्वाची जात आहे. हे लोक आग्र्याहून तिकडे गेले म्हणून त्यांना अघरिया असे नाव पडले, असे सांगतात. आपण मुळात क्षत्रिय होतो; पण इकडे आल्यावर क्षात्रकर्मांना फाटा दिला आणि नांगर हाती धरला, असे हे सांगतात. ते उंच आणि प्रमाणबद्ध असतात. त्यांचा वर्ण निमगोरा असतो. त्यांचे केस काळेभोर व तुकतुकीत असतात, डोळे सतेज आणि दात पांढरे असतात. लांब पापण्या हा त्यांचा मुख्य शारीरिक विशेष आहे. यांच्या बायका घराबाहेरच्या कामाला जात नाहीत. त्या घरी सूत कातून ते विणकऱ्यांना देतात व त्याच्या बदली कपडे घेतात. त्या दिसायला तर चांगल्या असतातच; शिवाय त्यांची वेषभूषाही नीटनेटकी असते. हे लोक लग्नकार्याला पंजाबकडील ब्राह्मणांना बोलावतात. ते प्रेते पुरतात आणि त्यांच्या अस्थी वाळल्यावर त्यातला काही भाग गंगेत नेऊन टाकतात. (अघरिया पहा)

अघरियांच्या बऱ्याच बायका चेटकिणी असतात, असा त्यांच्याविषयी प्रवाद आहे. सगळ्याच अघरियांचा जादूटोण्यांवर विश्वास असतो.

इतर व्यवसायिक वर्ग – बंगालमध्ये विविध हस्तव्यवसाय व कारागिरीची कामे करणाऱ्या तीस– चाळीस जाती आढळतात. संगतरश, थाथेरा, कासार, तांबूळी, माळी, बराई, कंडू, लोहार, सुतार, कुंभार, कोष्टी, छाई, कोळी, तेली, पासी, दबगार, मोची, इ. बंगालमधील कारागीर जाती होत. यांपैकी बऱ्याच जातींचे लोक मूळचे आर्य आहेत; पण त्यांनी हीन व्यवसाय पत्करल्यामुळे त्यांची गणना शूद्रातिशूद्रात होऊ लागली.

बेदिया ही बंगालमधील एक भटकी जमात होय. इंग्रजांच्या अमदानीत त्यांची गणना गुन्हेगार जमातीत होत असे. त्यांची चौर्यकर्मात उपयोजिली जाणारी एक स्वतंत्र बोली आहे. हे मूळचे बाजीगर वर्गातले असले, तरी सांप्रत ते मुसलमान बनले आहेत. मात्र त्यांच्या बऱ्याचशा चालीरीती हिंदूंच्याच आहेत. ते प्रसंगी मूर्तिपूजा करतात व शकुनप्रश्न पाहण्यासाठी ब्राह्मणांकडेही जातात. ठिकठिकाणी त्यांच्या जमातीची केंद्रे आणि पंचायती असतात.

दुसरी एक गुन्हेगार ठरविली गेलेली जमात म्हणजे राजवाड ही होय. यांची गणना आदिवासींमध्ये केली जाते. हे लोक शेतीचा व्यवसाय करतात; पण स्वतःला अधःपतित क्षत्रिय म्हणवतात. आपला जन्म कुणबी आणि कोल यांच्या वर्णसंकरापासून झाला, असेही काही लोक सांगतात. त्रैवर्णिक हिंदू यांना अतिशूद्र मानतात.

बागडी ही एक अशीच आदिवासींसारखी जमात आहे. हे लोक मासेमारी, पालख्या वाहणे आणि मजुरी हे व्यवसाय करतात. परंतु पूर्व बंगालमध्ये या जमातीचे काही जमीनदारही आहेत. बगळा हे या जमातीचे देवक आहे. हे लोक कुत्र्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पवित्र समजतात व त्याची हत्या करणे पाप मानतात. हे लोक गोमांसही खातात.

वेषभूषा – बंगाली पुरुष सामान्यपणे धोतर नेसतात व निऱ्या पुढे सोडतात. वर लांब सदरा घालतात व खांद्यावर शाल घेतात. पूर्वी ते डोक्यावर पागोटे घालीत असत. सांप्रत अनेक लोक पाश्चात्य पद्धतीचा पोषाख करू लागले आहेत. बंगाली स्त्रिया पाचवारी साड्या एका विशिष्ट पद्धतीने नेसतात. कमरेभोवती आतला पदर खोचून तीच बाजू पुढच्या बाजूने एकीकडून दुसरीकडे दोन-तीनदा खोचतात व भलामोठा पदर डाव्या खांद्यावरून उजव्या हाताच्या खालून घेऊन पुढच्या बाजूने पुन्हा डाव्या खांद्यावर त्याचे टोक टाकतात. त्यामुळ पदराचा रंगीत नक्षीचा भाग पुढच्या बाजूला सबंध उभा दिसतो. लाल काठ असलेली पांढरी साडी त्यांना विशेष प्रिय आहे. प्रत्येक गृहिणीच्या पदराच्या टोकाला किल्ल्यांचा एक जुडगा बांधलेला असतो. विवाहित स्त्रिया डोक्यावरून पदर घेतात. विधवा स्त्रिया काठ-पदर नसलेल्या पांढ्या साड्या नेसतात. विवाहित स्त्रिया हातात सोन्याच्या अनेक बांगड्या घालतात. त्याचबरोबर शंखाच्या बांगड्याही घालतात. शंखाच्या बांगड्या हे त्या सौभाग्यचिन्ह समजतात. त्या कानांत कर्णफुले व दंडावर अनंत नावाचे सोन्याचे कडे घालतात. ते नागाच्या आकाराचे असते. पायांना अळिता लावणे, हे बंगाली स्त्रियांचे खास वैशिष्ट्य आहे.

बंगाली स्त्रीची वेषभूषा

विवाहप्रथा – सर्वसाधारणपणे विवाहसमारंभ मुलीच्या घरी होतो. लग्नाचा मुहूर्त नेहमी गोरज असतो. या लोकांत वधू पक्षाने वराला हुंडा देण्याची पद्धत आहे. त्याशिवाय वधूला कपडे, दागिने, सजावट सामान वगैरे वस्तूही द्याव्या लागतात. लग्नात मुलीची आई वराचे मुख पाहत नाही. लग्नाच्या मुहूर्ताच्या वेळी वराला वधूगृही आणतात. त्याच्यासाठी केळीच्या खुंटांचा मांडव बनवतात, त्यात पाट मांडतात व त्याच्याभोवती अलिपना काढतात. मग नवरा मुलगा त्या पाटावर उभा राहतो. नंतर त्याचे उत्तरीय काढून घरात नेतात व ते एका पाटावर अंथरून त्यावर वधूला बसवितात. वधूचे भाऊ तो पाट उचलून बाहेर आणतात व वराच्याभोवती पाच प्रदक्षिणा घालतात. नंतर वधू आणि वर आपल्या गळ्यातील हारांची अदलाबदल करतात. या विधीला शुभ दृष्टी असे नाव आहे. त्यानंतर होमहवनादी धार्मिक विधी होतात. मग नवरामुलगा सर्व उपस्थितांच्या साक्षीने वधूच्या भांगात सिंदूर भरतो. याला सिंदूरदान असे म्हणतात. याच वेळी वधूला सासरकडून पहिले लज्जावस्त्र मिळते.

रात्री वधूच्या घरी मेजवानी होते. दुसऱ्या दिवशी वधू सासरी निघाली, की अंगणात दूध उतू जाऊ देतात. सासरच्या घरात प्रवेश केल्यावर ती धान्याने भरलेले माप पायाने लवंडते. त्यानंतर तिच्या हातात लोखंडाची एक बांगडी घालतात. तिला वज्रचुडा असे नाव असून, ते एक सौभाग्यचिन्ह मानतात. या दिवशी मुलाकडे मेजवानी होते. लग्न, मुंज किंवा कोणत्याही मंगलप्रसंगी बंगाली लोकांत शंख फुंकण्याची पद्धत आहे.

बंगालमधील उच्चवर्णीय हिंदूंत स्त्रीच्या गरोदरपणी दोन धार्मिक संस्कार करण्याची पद्धत होती. एक पुंसवन व दुसरा सीमंतोन्नयन. सांप्रत हे संस्कार फारसे करीत नाहीत. याशिवाय पंचामृत नामक एक विधी पाचव्या महिन्यात करतात. थोडे पंचामृत घेऊन पुरोहित मंत्र म्हणून ते शुद्ध करतो व गरोदर स्त्रीला प्यायला देतो. त्यामुळे मूल निरोगी निपजते, अशी समजूत आहे. असाच विधी सातव्या व नवव्या महिन्यात करतात. त्याला अनुक्रमे सप्तामृत व नवामृत अशी नावे आहेत. डोहाळे–जेवणे करण्याची प्रथाही बंगाली लोकांत आहे. ही जेवणे पाचव्या महिन्यापासून सुरू होतात. पहिल्या डोहाळेजेवणाला कंचसाध व नंतरच्या जेवणांना पक्कासाध किंवा साधभक्षण असे म्हणतात. जेवणाच्या वेळी गरोदर स्त्रीच्या पंगतीला लहान मुलांना बसवतात व एक लहान मुलगा तिला प्रथम एक घास भरवतो. तिला प्रथम मुलगाच व्हावा, हा हेतू त्यामागे असतो.

प्रसूतिप्रथा – साधारणपणे घरातील अंधाऱ्या खोलीत गरोदर स्त्रीची प्रसूती होते. प्रसूतीच्या वेळी सुईण तिला मदत करते. मुलगी झाली तर जननाशौच तीस दिवस व मुलगा झाल्यास एकवीस दिवस पाळतात. कनिष्ठ जातीच्या लोकांमध्ये ते सहा ते बारा दिवस पाळले जाते. बाळंतिणीच्या खोलीत सतत शेगडी पेटलेली असते. त्यामुळे बाळ-बाळंतिणीला ऊब मिळते. लहान मुलाला मोहरीचे तेल लावून थोडा वेळ उन्हात ठेवतात. त्यामुळे मुलाची हाडे बळकट होतात, अशी समजूत आहे. सहाव्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवशी षष्ठी देवतेची पूजा करतात. त्यासाठी षष्ठी देवतेची शेणाची किंवा मातीची प्रतिमा बनवितात. त्या दिवशी ब्रह्मदेव मुलाच्या कपाळावर त्याचे भवितव्य लिहितो, अशी समजूत असल्यामुळे खोलीच्या दारात दौत-टाक ठेवतात. बाळ-बाळंतिणीला भुताखेताची बाधा होऊ नये, म्हणून बैलाच्या कवटीला शेंदूर फासून व शिंगांना लाल फडके गुंडाळून ते मुंडके घराच्या भिंतींवर टांगून ठेवतात. बंगालमधील ग्रामीण भागात ही प्रथा विशेष आढळते.

मूल साधारण सहा किंवा आठ महिन्यांचे झाले, की त्याचा अन्नप्राशनाचा संस्कार करतात. या दिवशीच मुलाचे नाव ठेवतात. त्यासाठी शुभ दिवस पाहतात. पुरोहित सकाळी होम करतो. नंतर एका ताटात सोने, चांदी, मातीचा गोळा, लेखणी व धान्य या वस्तू ठेवून ते मलापुढे ठेवतात. मुलगा ज्या वस्तूला हात लावील, त्यावरून तो मोठेपणी कोण होणार, याचा अंदाज करतात. मुलीच्या बाबतीत हा अंदाज घेत नाहीत. या दिवशी आप्तेष्टांना जेवायला बोलावतात. ते मुलासाठी अहेर आणतात.

बंगाली पुरुष

शंख फुंकणारी स्त्री

सण व उत्सव – बंगाली लोकांचे वर्ष वैशाखात सुरू होते व चैत्रअखेर संपते. 'बारो माशे तारो परबन'= बारा महिने तेरा पर्वे, अशी त्यांच्यांत एक म्हण आहे. म्हणजे वर्षात तेरा सण बंगाली लोक पाळतात.

कोजागरीच्या दिवशी ते लक्ष्मीची पूजा करतात. हा सण ते फार महत्त्वाचा मानतात. या दिवशी घरात सर्वत्र लक्ष्मीची पावले, रुपया व भाताची लोंबी यांच्या आकृत्या काढतात. एक जलपूर्ण कलश घेऊन त्यावर आंब्याचे टाळे व असोला नारळ ठेवतात. कलशावर शेंदराचे ठिपके देतात. हा कलश हे लक्ष्मीचे प्रतीक असते. त्याची पूजा करतात व लोकांना भोग नामक प्रसाद, खिचडी व खोबऱ्याची मिठाई हे पदार्थ वाटतात. सरस्वतीपूजेच्या दिवशी मुले पुस्तकांची पूजा करतात व उपवास करतात.

भाऊबीजेला ते भाई फोटा किंवा भात्री द्वितीया असे म्हणतात. त्या दिवशी बहीणभावंडे एकत्र जमतात. बहीण भावाला स्नान घालते व त्याच्या कपाळी चंदनाचा टिळा लावून म्हणते, 'माझा भाऊ यमासारखा अमर होवो. यमाच्या वाटेत अडसर येवो.' नंतर ती दुर्वा व भाताच्या लोंब्या मोठ्या भावाच्या पायांवर व धाकट्या भावाच्या मस्तकावर वाहते. या दिवशी बहीण–भाऊ उपवास करतात. बहीण भावाच्या हातावर दूध व मध घालते आणि मग सर्वजण उपवास सोडतात.

नवरात्रात नऊ दिवस लोक दुर्गापूजेचा उत्सव मोठ्या उत्साहाने व धूमधडाक्याने साजरा करतात. दिवाळीच्या दिवसांत ते कालीची पूजा करतात. कार्तिकाच्या शेवटच्या दिवशी घरात नवे भात भरतात व त्याची पूजा करतात.

ज्येष्ठ महिन्यातील जामाय-षष्ठी किंवा जामातृषष्ठी हा बंगाली लोकांचा एक महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी जावयाचा सन्मान करून त्याला यथाशक्ति अहेर देतात.

संक्रांतीचा सण बंगाली लोक व्रतासारखा पाळतात. या दिवशी सर्व घर झाडून स्वच्छ करतात आणि तांदळाचा रवा, नारळ यांपासून पीठा नामक पक्वान्न करतात.

याशिवाय कृष्णजन्माष्टमी, होळी, रामकृष्ण – उत्सव, इ. सणही ते साजरे करतात. बंगालमधील आदिवासी जमाती करमा, बंदन, तुषू व बारमपुजा हे उत्सव साजरे करतात. त्या वेळी ते गातात व नाचतात.

हिंदू स्त्रिया व मुली अनेक व्रतवैकल्येही करतात. त्यांपैकी हरिचरण, जयमंगलबर, मादुली, लक्ष्मीपुकुर, हरीश – मंगलचंडी, जंपुकुर, सेजुती, तारा, माघमंडल, बिपत्तारिणी, त्रिभुवनचतुर्थी, पुर्निपुकुर, पृथ्वी, इ. व्रते प्रमुख होत.

बंगाली लोकांच्या घरात काही वस्तू हमखास आढळतात. त्यांपैकी एक म्हणजे उत्तम आवाजाचा शंख. कोणत्याही मंगल प्रसंगी या शंखाचा तीन किंवा पाच वेळा नाद करणे, हे शुभ समजतात. संध्याकाळच्या वेळी धूप–दीप लावून हा शंख फुंकतात. विशेष महत्त्वाचे पाहुण व जावई यांचे शंखाच्या निनादाने स्वागत करतात. त्यांच्या घरात लक्ष्मीसरा नामक एक कलश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठेवलेला असतो. दर गुरुवारी त्या कलशात ऐपतीप्रमाणे ठराविक पैसे टाकतात व पान, सुपारी, नारळ, इ. वस्तूंनी त्याची पूजा करतात.

देवधर्म— बंगालमधील आदिवासी जमातींत वृक्षपूजेला बरेच महत्त्व आहे. वृक्षांमध्ये पिंपळ हा सर्वांत पवित्र मानतात. कारण त्याच्या खोडावर ब्रह्मदेव, फांद्यावर विष्णू आणि पानांवर इतर देव वास्तव्य करतात, अशी समजूत आहे. पिंपळाला वसुदेव असेही म्हणतात. वैशाख महिन्यात आणि संकटाच्या काळी, लोक त्याला पहाटे पाणी घालतात.

काही आदिवासी लोक शेतकापणी झाल्यावर केळीची पूजा करतात व तिला बकरा व डुक्कर बळी देतात. तसेच, विवाह-संस्कारापूर्वी तिची पूजा करण्याचाही प्रघात काही ठिकाणी आहे. काही आदिवासींत वधूचा प्रथम एखाद्या वृक्षाशी विवाह लावतात. असे करण्यामागे हेतू हा असतो, की लग्नामध्ये काही अमंगल घडल्यास त्याचा दोष वृक्षावर जावा.

आदिवासी जमाती बहुश: रानावनातच राहतात. त्यामुळे रानटी श्वापदांपासून त्यांना भय असते. पर्वतावरील घळींत अशी श्वापदे राहतात. तसेच पर्वतावरील मोठमोठ्या शिळा काही वेळा खाली कोसळतात व त्यामुळे प्राणहानी होते. म्हणून ते पर्वताचीही पूजा करू लागले. पर्वतावर देव निवास करतो, अशीही त्यांची समजूत आहे. गिरिकंदरातील देवाला ते नारंग-बरू असे म्हणतात व त्याला रेडा बलिदान करतात.

बंगालमधील काही उच्चवर्णीय लोक सूर्याचे उपासक आहेत. ते रविवार पवित्र मानतात आणि त्या दिवशी मांसभक्षण करीत नाहीत. कार्तिक शुद्ध षष्ठीला ते मोठा उत्सव करतात. त्याला छटपूजा असे नाव आहे. त्या दिवशी ते नदीत किंवा तळ्यात स्नान करतात आणि मावळत्या सूर्याला अर्घ्य देतात. दुसऱ्या दिवशी सकाळी घरातील वडीलधारी स्त्री सूर्याला पांढरी फुले, गंध, सुपारी, तांदूळ, दूध, केळी वगैरे पदार्थ अर्पण करते. अनेक आदिवासी जमातीही सूर्याला भजतात. उरांव लोकांचा तो सर्वश्रेष्ठ देव असून, ते त्याला धर्मेश म्हणतात. मुंडा, भूमिज, हो वगैरे लोकांचाही तो प्रमुख देव असून, ते त्याला कोंबडी व दारू अर्पण करतात. शपथ घ्यायची झाल्यासही त्याच्याच नावाने घेतात. बीरभूममधील हारी त्याला बकऱ्याचा बळी देतात; तर राजशाहीमधील आदिवासी त्याला छटमाता नामक पत्नी देतात. छटमाता म्हणजे षष्ठीदेवी होय.

अनेक आदिवासी लोक चंद्रालाही भजतात. त्याला ते सुपीकतेचे प्रतीक मानतात. त्याच्यामुळे जखमा आणि विशेषत: डोळ्यांचे रोग बरे होतात, अशी समजूत आहे. चंद्र हे कित्यक आदिवासी स्त्रियांचे खास उपास्य दैवत आहे.

उच्चवर्णीय बंगाली हिंदूंमध्ये सर्व ग्रहांत शनीची उपासना अधिक प्रमाणावर होते. जलपूर्ण कलश हे त्याचे प्रतीक असते.

देशबंधू चित्तरंजनदास

त्याच्यासमोर पाच प्रकारची फळे व पाच प्रकारची फुले मांडून ठेवतात. शनीची पूजा पुरोहित करतो. पुरोहिताने आणि जमलेल्या लोकांनी देवाचा प्रसाद तिथल्या तिथेच खाऊन तोंड धुतले पाहिजे, असा नियम आहे. पूजा चालू असता, एखादा परकी इसम घरात आल्यास त्याने पूजा आटोपेपर्यंत थांबले पाहिजे व देवाचा प्रसाद भक्षण केला पाहिजे; अन्यथा, त्याच्यावर शनीचा कोप होतो, असे समजतात.

दोसाध आणि ढांगर हे लोक राहूला भजतात. त्याच्या पूजेच्या दिवशी त्याचे भक्त जळत्या निखाऱ्यांवरून चालतात. राहूसाठी ते धारदार पायऱ्या असलेली एक शिडी बनवितात व तिच्या टोकाला एक पांढरा कोंबडा बांधतात. मग पुजारी त्या शिडीवर चढून तो कोंबडा कापतो.

याशिवाय, बंगालमधील लोक भूदेवी, शीतलादेवी व तिच्या कंकरमाता, फूलमाता, बडीमाता, इ. सहा बहिणी यांना भजतात. घंटाकर्ण, ज्वरनारायण, इ. ग्रामदेवतांनाही ते भजतात.

श्रेष्ठ पुरुष — बंगाल प्रदेशाने विश्वविख्यात अशा अनेक नररत्नांना जन्म दिलेला आहे. श्री. चित्तरंजन दास हे एक अग्रगण्य स्वातंत्र्ययोद्धे होते. सर्वस्वाचा त्याग करून ते स्वातंत्र्याच्या चळवळीत उतरले. त्यांनी बंगालवरच नव्हे तर अखिल भारतावर राजकीय कर्तृत्वाचा प्रभाव गाजवला. देशाने त्यांना देशबंधू या उपाधीने गौरविले. योगी अरविंद घोष हेही प्रथम स्वातंत्र्यसंग्रा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मात आघाडीवर होते. पुढे त्यांनी पांडेचेरीला योगाश्रम स्थापून योगसाधनेत अलौकिक यश मिळविले. भारतीय तत्त्वज्ञानाची स्वतंत्रपणे उभारणी करणारे अनेक ग्रंथही त्यांनी लिहिले. नेताजी सुभाषचंद्र बोस हे आझाद हिंद सेनेचे जनक होत. आपल्या निर्भय आणि त्यागमय नेतृत्वाने त्यांनी लक्षावधी भारतीयांवर आणि परदेशी लोकांवरही प्रभाव पाडला. आझाद हिंद सेनेला 'चलो दिल्ली' असा हुकूम देऊन त्यांनी इंग्रज सरकारला फार मोठे आव्हान दिले. त्यांच्या या लोकोत्तर नेतृत्वामुळे ते अखिल भारताचे नताजी बनले. रामकृष्ण परमहंस हे बंगालमधले महान संत व साक्षात्कारी होत. त्यांचे महान शिष्य स्वामी विवेकानंद यांनी हिंदू धर्माचे उज्ज्वल स्वरूप सर्व जगाला दाखवून दिले. राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना करून हिंदू धर्मात आमूलाग्र सुधारणा करण्याच्या दृष्टीने बरेच प्रयत्न केले. रवींद्रनाथ ठाकूर हे विश्वकवी म्हणून प्रसिद्धी पावले. त्यांच्या गीतांजली या काव्यग्रंथाला नोबेल पारितोषक मिळाले. बंगाली साहित्याच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपली पदचिन्हे उमटवून ठेवली आहेत. ते विश्वमानव्याचा आमरण पुरस्कार करीत राहिले. मानवेंद्रनाथ रॉय हे स्वतंत्र विचारांचे क्रांतिकारक पुरुषश्रेष्ठ होत. अमेरिकेत असताना मेक्सिकोच्या क्रांतीत सामील होऊन त्यांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली. ते केवळ आचारानेच क्रांतिकारक नव्हते, तर विचारानेही क्रांतिकारक होते.

योगी अरविंद घोष

त्यांची ग्रंथसंपदा विपुल आहे. जगदीशचंद्र बसू यांना एक थोर वनस्पतिशास्त्रज्ञ म्हणून जगातले शास्त्रज्ञ ओळखतात. प्रफुल्लचंद्र रॉय हे भारतातील अर्वाचीन रसायनशास्त्राचे जनक मानले जातात. त्यांनी भारतीय संशोधकांची एक परंपराच निर्माण केली. नंदलाल बसू हे विख्यात चित्रकार होऊन गेले. त्यांनी भारतीय चित्रकलेचे श्रेष्ठत्व जगाला पटवून दिले. एका नव्या चित्र-परंपरेचे ते पुरस्कर्ते मानले जातात. [हि. क. बें., हि.

नेताजी सुभाषचंद्र बोस

क. इं. पी. १०; वे. बें. आ.; एन्सा. रि. ए.; स्ट. जॉ. ए. मे. इं.; से. इं. १९५१; स्त्री मासिक, बंगाल विशेषांक, फेब्रुवारी १९६१; एन्सा. सो. सा.; इं. स्ट. पा. प्रे.– एप्रिल १९६०]

बंगाली भाषा व साहित्य

बंगाली ही भारतीय प्रादेशिक भाषांमधली एक समृद्ध भाषा आहे. सुमारे पाच कोटींच्यावर लोक ही भाषा बोलतात. अन्य भाषांप्रमाणे बंगालीचीही वेगवेगळी रूपे वेगवेगळ्या भागांत प्रचलित आहेत. त्यांतल्या साहित्यिक रूपाला साधुभाषा म्हणतात. बंगालीचे सर्व गद्य-पद्य साहित्य आणि वृत्तपत्रीय साहित्यही या साधुभाषेत आहे. कलकत्ता व गंगेची दोन्ही तीरे या ठिकाणच्या शिष्ट समाजात प्रचलित असणाऱ्या बंगाली भाषेलाच शिक्षित समाजाने साधुभाषा अर्थात साहित्याची भाषा म्हणून स्वीकारले आहे.

बंगाली भाषेची उत्पत्ती इ. स. १००० वर्षांच्या आसपास झाली, असे मानतात. ती प्राकृत भाषेतून उगम पावली आहे. मागधी किंवा गौडी प्राकृत यांतून बंगालीचा विकास झाला, हे मत बहुतेकांना मान्य आहे. तिने पृथक रूप घेतल्यावरच तिच्यामध्ये गीते व पदे रचली जाऊ लागली. बंगालीमध्ये खास तिचे असे प्राकृतोद्भव शब्द आहेत, तसेच शुद्ध व विकृत संस्कृत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शब्दही आहेत. बरेचसे आर्येतर भाषांचे शब्दही सुरुवातीच्या काळातच तिच्यामध्ये प्रविष्ट होऊन मिसळून गेले आहेत. फारसी, पोर्तुगीज व इंग्रजी शब्द आवश्यकतेनुसार तिच्यात दाखल होऊन रूढ झाले आहेत.

बंगाली लिपी – बंगाली लिपी भारताच्या पूर्व विभागात प्रचलित असलेल्या नागरी लिपीतून निघाली आहे. त्या दोन्ही लिप्यांत थोडेबहुत साम्यही आहे. नागरीप्रमाणेच बंगालीमध्येही १४ स्वर व ३३ व्यंजने आहेत. इ. स. च्या १० शतकापर्यंत बंगालमध्ये नागरी लिपीचाच प्रचार होता. त्या शतकातला राजा नारायणपाल याच्या लेखात ए, ख, इत्यादी काही अक्षरांमध्ये बंगाली वळण आढळते. ११ व्या शतकात विजयपाल राजाच्या देवपारा येथील लेखात ए, ख, ञ, त, म, र, ल आणि स ही अक्षरे नागरीपासून भिन्न झालेली आढळतात. अशा प्रकारे



बंगाली लिपी (श्री. नरवणे यांच्या भारतीय व्यवहारकोशावरून)

क्रमशः अक्षरवटिकेत परिवर्तन होत होत प्रस्तुत बंगाली लिपी निर्माण झाली. बंगालीत व चा उच्चार प्रायः ब होतो; तर कधीकधी उ किंवा भ यांच्यासारखाही होतो. बंगाली आत्मा, लक्ष्मी, महाशय, इ. शब्द अनुक्रमे आप्ताँ, लख्खी, मोशाय अशासारखे उच्चारले जातात.

बंगाली साहित्याचे सामान्यपणे तीन कालखंड पाडता येतात, ते असे —

(१) प्राचीन काल – इ. स. ९५० ते १२००

(२) मध्य काल – इ. स. १२०० ते १८००

(३) आधुनिक काल इ. स. १८०० ते २० व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत.

प्राचीन काल – प्राचीन कालच्या उपलब्ध बंगाली साहित्यामध्ये बौद्ध सिद्धांच्या चर्यापदांना विशेष महत्त्व आहे. चर्यापदे ही गीते असून, ती आठ किंवा त्यांहून अधिक ओळींची व रहस्यमय असतात. ही गीते महायान बौद्धपंथ व नाथपंथ यांच्याशी संबद्ध अशा एका गुप्त संप्रदायाची आहेत. बंगाली भाषेचे प्राचीनतम रूप या चर्यागीतांवरून कळते. त्यांचा वाच्यार्थ वेगळा व व्यंग्यार्थ वेगळा असतो. चर्यागीतांतील लुईपाच्या एका गीताचा काही भाग असा –

काआ तरुवर पंच विडाल
चंचल चीअ पईठो काल,
दिढ करिअ महासुह परिमाण
लुई भणई गुरु पुच्छिअ जाण,

अर्थ – कायारूपी तरुश्रेष्ठाच्या पाच शाखा आहेत. त्या वृक्षावर चंचल चीत्ह (घुबड) रूपी काल बसला आहे. तू महासुखाचे परिमाण दृढ कर. लुईपा म्हणतो, गुरूला ज्ञान विचार

चर्यापदातले दुसरे एक उदाहरण असे–

उंचा उंचा पावत तहिं बसइ शबरीवाली ।
मोरंगी पीच्छ परहिन शबरी गीबत गुंजरीमाली ।।
उमप्त शबरो पागल शबरो माकर गुलिगेहाडा तो हरि ।
निअ घरनी नामे सहज सुंदारी ।
नाना तरुवर मौलिलरे गअनत लागेली डाली ।
एकेली शबरी ए बन हिण्डई कर्नकुंडल वज्रधारी ।
तिअ धाऔ खाट पडिला शबरो महासुहे सेजि छाइली ।
शबरो भुजंग नैरामनि दारी पेन्ह पोहाइली राति ।।

अर्थ – उंच उंच पर्वतावर व्याधबालिकेचा निवास आहे. ती मयूरपिच्छ नेसली आहे. तिच्या गळयात गुंजमाला आहे. हे उन्मत्त शबरा, हे वेडया शबरा, तुला शपथ आहे गडबड करू नकोस. मी तुझी गृहिणी आहे. माझं नाव सहजसुंदरी नाना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकारचे वृक्ष कळ्यांनी बहरले आहेत. त्यांच्या शाखा गगनाला भिडल्या आहेत. कर्णकुंडले व वज्र धारण करणारी शबरी एकटी धुंदीत फिरत आहे. तीन धातूंची खाट मांडली होती. हे शबरा, तू परम आनंदाने तिच्यावर शेज अंथरलीस. नायक शबरा, तू नैरामणी नायिकेसह प्रेमाने रात्र घालवलीस.

जयदेव हा कवी बाराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. त्याने गीतगोविंद हे सयमक संस्कृत काव्य लिहिले आहे. संस्कृतात प्राय: यमके आढळत नाहीत. त्यावरून काही विद्वानांचे मत असे आहे, की गीतगोविंद हे काव्य मुळात प्राचीन बंगालीत असावे आणि पुढे त्यात काही परिवर्तने करून त्याला संस्कृत रूप दिले गेले असावे. हे मत खरे मानल्यास जयदेव हा बंगालीचा प्राचीन कवी ठरतो. नाथ, मनसा, चंडी व धर्म हे संप्रदाय बंगालमधले लोकसंप्रदाय होत. या संप्रदायांच्या कवींनी आपापल्या उपास्य दैवतांवर कथा-काव्यात्मक रचना केल्या आहेत. धर्मसंप्रदायाने शून्यपुराण नावाचे एक सांप्रदायिक पुराणही निर्माण केले आहे.

मयनामतीर गान, गोरक्षविजय, भरथरीगोपीचंद. इ. बंगालमधली काही ग्रामगीते बरीच प्राचीन आहेत. गोपीचंद संन्यास घ्यायला निघाला आहे आणि त्याची राणी अदुना त्याला तसे न करण्याबद्दल विनवीत आहे, अशा त्या गीतांतल्या काही ओळी पुढीलप्रमाणे —

ना जाइयो, ना जाइयो राजा दूर देशांतर ।
कारे लागिया बांदिलाम सीतल मंदिर घर ।
निंदेर स्वपने राजा हब दरसन ।
पालंगे फेलाइब हस्तनाइ प्रानेर धन ।
दासगिरिर माओ बइन रबे स्यामि लइबे कोले ।
आमि नारि रोदन कोरिबो खालि घर मंदिरे ।
आमाके संगे करि लइया जाओ ।
जीयब जीवन धन आमिकन्या संगे गेले ।
रोधिया दिमु अन्न दुधार काले ।
पिपासार काले दिमु पानी ।

अर्थ — राजा, दूर देशांतरी जाऊ नको, जाऊ नको. मी हे शीतल घर खरोखर कोणासाठी बांधले ? आता तर मला तुझे स्वप्नातच दर्शन घ्यावे लागेल ! जेव्हा मी पलंगावर हात पसरीन, तेव्हा मला प्राणधन नाहीसे झाल्याचे दिसून येईल. सर्वांच्या मायबहिणी आपापल्या पतींच्या गळामिठी घालून राहतील; पण मी एक अभागी नारी एकटी घरामध्ये रडत राहीन. राजा, मला तुझ्याबरोबर घेऊन जा; तरच मी जिवंत राहीन. भूक लागल्यावर मी तुला शिजवून वाढीन, तहान लागल्यावर पाणी देईन.

गोरक्षविजयातल्या काही पंक्ती अशा—

प्रदीप निबिले गुरु कि करिबे तेले ।
आइल बाँधिया किवा फल जल आगे गेले ।
मूल काटा गेले गुरु ना जीयये गाछ ।
बिनि जले कथात शुनिछ जीयये माछ ।

अर्थ — ज्योत विझल्यानंतर तेलाचा उपयोग काय ? शेतातले पाणी निघून गेल्यावर बांध बांधून फायदा काय ? हे गुरो, मूळ कापल्यावर फांदी कशी जिवंत राहील ? पाणी सुकल्यावर मासळी जिवंत राहिली आहे, असे कोणी ऐकले आहे का ?

या बंगाली ग्रामगीतांबरोबरच प्राचीन काळात काही व्रतकथा व रूपकथा निर्माण झाल्या. त्यांच्या प्राचीनतेचे लक्षण हे, की त्यातले देव इंद्र, वरुण, राम, कृष्ण, इ. नसून ते थूया, मादाली, धाता, इ. ग्रामदेव आहेत. रूपकथा म्हणजे स्त्रीचरित्रात्मक कथा होत. त्यात स्त्रियांच्या कोमल हृदयाचे, त्यागाचे, तपस्येचे, चारित्र्याचे जिते—जागते स्वरूप पाहायला मिळते. शंखमालेची कहाणी ही अशीच एक रूपकथा आहे.

मध्य काल — इ. स. १२०३ मध्ये बंगालवर तुर्कांचे आक्रमण झाले. त्यांनी लूटमार, स्त्रियांचे अपहरण, कत्तली, ग्रंथालयांचा विध्वंस, इ. दुष्कृत्ये तिथे फार मोठ्या प्रमाणात केली. त्यांनी अनेक हिंदूंना बाटवून मुसलमान केले. अनर्थ आणि विनाश यांचाच तो काळ होता. अशा काळात वाङ्मयनिर्मिती अशक्यच म्हटली पाहिजे. बंगालची सुमारे १५० वर्षे अशा अनर्थावस्थेंत निघून गेली. त्यानंतर थोडे स्थिरस्थावर झाल्यावर मग तिथे संस्कृत भाषेचे अध्ययन सुरू झाले. तो जणू पुनर्जागृतीचा काळ होता. त्या काळात ज्याच्याविषयी काही माहिती मिळू शकते, असा एक महाकवी निर्माण झाला, तो म्हणजे कृत्तिवास ओझा हा होय. त्याने संस्कृत रामायण बंगालीत अनुवादिले आणि त्यात रामाचे चरित्र भगवंताचा करुणामय अवतार या रूपात चितारले. त्यानंतरच्या काळात (इ. स. १४७३ – १४८०) मालाधर बसूने भागवताच्या दशम व एकादश या स्कंधांचा बंगालीत अनुवाद केला. पंचगौड देशाचा राजा सुलतान हुसैनशाह याच्या प्रेरणेने त्याने हे कार्य केले. याच हुसैनशाहाचा सेनापती परागलखान या नावाचा होता. त्याच्या प्रेरणेने कवींद्र परमेश्वराने महाभारताचा अनुवाद स्त्रीपर्वापर्यंत केला. परागलखानाचा पुत्र छूटीखान याच्या प्रेरणेने श्रीकर्णनंदी याने पुढची पर्वे अनुवादून ते महाभारत पुरे केले. पुढे रामायण, महाभारत व भागवत यांचे छोटे-मोठे किंवा अंशत: अनेक अनुवाद बंगालीत झाले.

याच कालात विजयगुप्त व विप्रदास पिपलाई या दोघांनी बिहुला नामक एका पतिव्रतेवर कथाकाव्य लिहिले— बिहुलेचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाह झाला आणि पहिल्या रात्रीच मनसादेवीने एक सर्प पाठवून तिच्या पतीचा जीव घेतला. बिहुला पतीचे शव घेऊन देवलोकी जाण्यास निघाली. वाटेत तिच्यावर अनेक अरिष्टे कोसळली; पण जिने पतीचा मृत्यू घडवून आणला, त्या मनसेचीच भक्ती करीत बिहुला पुढे पुढे जात राहिली. अखेरीस मनसादेवीला तिचा पती जिवंत करणे भाग पडले.

चंडीदास हा चैतन्यपूर्व मोठा कवी होय. याच्या नावावर १२०० पद्ये प्रचलित आहेत. पण ही सगळी पदे एका चंडीदासाचीच असतील, असे म्हणवत नाही. बंगालमध्ये चंडीदास नामक कमीत कमी तीन कवी होऊन गेले. चैतन्यपूर्वकालातला तो बडू चंडीदास, चैतन्योत्तरकालात द्विज चंडीदास व त्यानंतर दीन चंडीदास हे कवी झाले. चंडीदासाच्या १२०० पद्यांपैकी तीन चतुर्थांश पद्ये या दीन चंडीदासाची असावी, असे म्हणतात. या संग्रहातली बहुतेक पद्ये कृष्णकीर्तन आणि राधाकृष्णांचे परस्पर प्रेम या विषयांवर आहेत. त्यांतील राधा ही कृष्णभेटीसाठी किती व्याकुळ झाली होती, त्याचे दर्शन घडवणारे एक पद असे–

ए घोर रजनी मेघेर घटा
केमने आइले वाटे
आँगिनार माझे बंधुया भिजिछे
देखिया पराण फाटे
सइ कि आर बलिव तोरे
बहु पुण्यफले से हेन बंधुया
आसिया मिलल मोरे
घरे गुरुजन ननदी दारुण
बिलंबे बाहिर हेतु
आहा मरि मरि संकेत करिया
कतना यातना दिनु
बंधूर पीरिति आरति देखिया
मोर मने हेन करे
कलंकेर डालि माथाय करिया
आनल भेजाइ घरे
आपनार दुख सुख करिभाने
आमार दुखेर दुखी
चंडीदास कहे बंधूर पीरित
शुनिया जगत सुखी ।

भावार्थ – आकाश मेघांनी भरून आले आहे. अशा स्थितीत तू कोणत्या वाटेने आलास ? अंगणात उभा राहून माझा प्रियकर भिजतो आहे आणि हे पाहून माझे हृदय फाटून जात आहे. हे सखी, मी तुला कसे सांगू, की केवढे पुण्य पदरी पाडून घतल्यानंतर माझा प्रियकर मला येऊन भेटत आहे ? घरात सासू, नणंद आणि वडिलधारी मंडळी बरीच आहेत. त्यामुळे प्रियकराची भेट घेणे मला कठीण होते आणि त्या कामी विलंब लागतो. हाका मारून आणि संकेत करून मी माझ्या प्रियतमाच्या मनाला किती कष्ट दिले आहेत ! माझ्या प्रियकराचे प्रेम आणि त्याची माझ्या भेटीविषयीची उत्कंठा पाहून मला असे वाटते, की कोणी तरी फूल डोक्यावर ठेवून त्यावर स्वच्छ जलाचा शिडकाव करीत आहे. तो मला दुःखी आणि उदास अशी पाहू शकत नाही. चंडीदास म्हणतो, की आमच्या या प्रेमकथेने सर्व जग आनंदविभोर होऊन उठेल.

या कालखंडात चंडीदासाव्यतिरिक्त ज्ञानदास, गोविंददास, बलरामदास, नरोत्तमदास, इ. वरेच कवी बंगालमध्ये निर्माण झाले. त्यांच्या रचनेला पदावलीसाहित्य म्हणतात. या कालखंडातली ही मौलिक साहित्यसंपदा होय. मनोहरदास याने संकलित केलेला पदसमुद्र, राधामोहन ठाकुराचा पदामृतसमुद्र, वैष्णवदासाचा पदकल्पतरू, इ. पदावलीसंग्रह बंगाली साहित्यात प्रसिद्ध आहेत. हे सर्व पद्यवाङ्मय वैष्णवधर्माने अनुप्राणित आहे. या वाङ्मयाबरोबरच कित्येक मंगलकाव्येही प्रस्तुत कालखंडात निर्माण झाली. धर्ममंगल, चंडीमंगल, मनसामंगल अशी त्यांची नावे आहेत. माणिक गांगुली व खेलाराम यांची धर्ममंगले आणि माधवाचार्य आणि मुकुंदराम चक्रवर्ती यांची चंडीमंगले विशेष प्रसिद्ध आहेत.

इ. स. च्या १५ व्या शतकाच्या अखेरीस चैतन्यमहाप्रभूचा आविर्भाव झाला. त्या काळी बंगाल फार हवालदिल होता. सर्वत्र राजकीय अशांतता माजली होती. सामान्य जनता धार्मिक आचार–विचारांना पराङ्मुख झाली होती. वरिष्ठ समाजात स्वेच्छाचार बोकाळत चालला होता. हिंदू लोक मोठ्या संख्येने मुसलमान होऊ लागले होते. सारा बंगाल महान सांस्कृतिक संकटात सापडला होता. अशा त्या काळी लोकांची श्रद्धा व भक्ती दृढ करील, हताश अंतःकरणांना दिलासा देईल आणि हिंदू धर्मात नवचैतन्य निर्माण करील अशा कोण्या तरी महापुरुषाची अत्यंत गरज होती. चैतन्यमहाप्रभूच्या अवतरणाने ती गरज पूर्ण झाली. त्याने कृष्णभक्तीच्या छत्रछायेखाली बंगालमधील जनतेला एकत्र आणले आणि कृष्णप्रेमाच्या सागरात सुस्नात केले.

तत्कालीन कवी आणि विचारवंत यांच्यावर चैतन्याच्या चरित्राचा आणि त्याच्या कीर्तनभक्तीचा विलक्षण प्रभाव पडला. चैतन्यप्रभूला साक्षात कृष्ण मानून त्याच्या अनेक भक्तांनी त्यांची चरित्रे लिहिण्याचा जणू पुढे विडाच उचलला. वृंदावनदासाने चैतन्यभागवत, लोचनदास व जयानंद यांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चैतन्यमंगल व कृष्णदासाने चैतन्यचरितामृत लिहिले. गोविंददासाने चैतन्यप्रभूवर कडछे लिहिले. चैतन्य हरिप्रेमात तल्लीन होऊन कसा बेभानपणे गात–नाचत असे, त्याचे वर्णन गोविंददासाने एका कडछात केले आहे, ते असे –

नाचिते लागिला प्रभु बलि हरि हरि,
लोमांचित कलेवर अश्रु ढर ढरि ।
गियाछे कोपीन खसि कोथा बहिर्वत्स ।
उलंग हइया नाचे धन बहे श्वास ।
हरिनामे मत्त हये नाचे गौरा राय ।
अंग हइते अद्भुत तेज बाहिराय ।

अर्थ – हरी–हरी बोलत चैतन्यप्रभू नाचू लागला. त्याचे शरीर रोमांचित झाले. डोळ्यांतून अश्रू झरझर वाहू लागले. कधी त्याच्या कमरेची लंगोटी सरकली, कधी अंगावरचे वस्त्र अस्ताव्यस्त झाले. उल उल करीत तो नाचत राहिला होता. त्याचा श्वास जोरजोराने चालला होता. हरिनामाने मत्त झालेला चैतन्यप्रभू नाचत होता आणि त्याच्या अंगातून अद्भुत तेज बाहेर पडत होते.

याच कालातला आणखी एक कृष्णकवी म्हणजे बलरामदास हा होय. याने आपल्या कृष्णविषयक कवितेतून सूरदासाप्रमाणे यशोदेचे वात्सल्य चित्रित केले आहे. पण त्याच्या प्रतिभेला आणि शब्दकळेला खरा बहर आला तो राधेच्या प्रेमवर्णनात. कृष्णप्रेमाच्या बाणानी नवोढा राधेची काय दशादशा झाली, त्याचे वर्णन तो राधेच्या मुखाने पुढीलप्रमाणे करतो –

किशोर वयस कत बैदगधि-ठाम
मूरति मरकत अभिनव काम
प्रति अंग कोन विधि निरमिल किसे
देखिते देखिते कत अमिया बरिखे ।
मलुं मलुं किवा रूप देखिलुं स्वपने
खाइते शुइते मोर लागियाछे मने ।
अरुण अधर मृदु मंद मंद हासे
चंचल नयन कोणे जाति-कुल नासे ।
देखिया बिदारे बुक दुटि भरु-भंगी ।
आइ आइ कोथा छिल से नागर रंगी ।
मंथर चलन-खानि आध आध जाय
पराण जेमन करे कि कहिब काय ।

भावार्थ – किशोरवय पण किती शहाणपण ! मरकतमण्यासारखी त्याची कांती किती कमनीय ! विधात्याने त्याचा प्रत्येक अवयव कोणत्या पदार्थाने निर्माण केला आहे, ते कळत नाही. पाहता पाहता तो अमृताची किती बरसात करतो हे समजत नाही. त्याचे हे स्वप्नदर्शन मला व्याकुळ करते. मी खात असले, झोपत असले तरी माझे मन त्याच्या ठिकाणी जडून जाते. लालचुटुक ओठ, मृदु-मंद हास्य आणि चंचल कटाक्ष म्हणजे ते जाति– कुलाच्या मर्यादेचा नाश करणारेच होत. त्याच्या दोन्ही भुवयांची वक्रता पाहताच हृदय विदीर्ण होते. हा रंगीला नागरकुमार कुठून आला कोण जाणे ! त्याची मंदमंथर गती पाहून प्राणांमध्ये काही तरी व्हायला लागते. काय होते ते कोणाला आणि कसे सांगायचे ?

चैतन्यप्रभूच्या साधनेत कीर्तनाला फार महत्त्व होते. चैतन्यसंप्रदायातल्या कित्येक प्रतिभाशाली कवींनी त्यांच्या कीर्तनपद्धतीला प्रभावशाली बनवले. बंगालमध्ये या कीर्तनप्रणालीची चार रूपे दिसून येतात – (१) गरनहाटी (२) रेनेती (३) मंदरणी व (४) मनोहरशाही.

या चारही शैलींत मनोहरशाही अधिक लोकप्रिय ठरली. ही शैली लोकप्रिय करण्यात गंगानारायण चक्रवर्ती व मंगल ठाकूर या दोघांच्या रचना प्रामुख्याने कारणीभूत आहेत. खरे तर चारही शैलींत वैष्णव भावनेचे उच्चतम सौंदर्य प्रतीत होते. कीर्तनप्रणालीत बंगाली काव्याचे पंचप्राणच साठवले आहेत, असे म्हणतात.

बंगालच्या मुसलमान कवींना थोड्याच दिवसांत प्रतीती आली, की आपण याच भूमीचे पुत्र आहो. त्यामुळे त्यांनीही मूळ बंगाली परंपरांचा स्वीकार करून अनेक काव्ये लिहिली. त्यांना संस्कृत भाषेविषयी आणि हिंदू देव– देवतांविषयी द्वेष नव्हता. संभवतः दौलत काझी हा बंगालचा पहिला मुसलमान कवी होय. त्याने लोरचंद्राणी व सती मयनावती ही दोन कथात्मक खंडकाव्ये लिहिली. त्या कामी त्याने कालिदास व जयदेव यांचे ऋण स्वीकारले. सय्यद सुलतान याने रसुल– विजय हा ग्रंथ लिहिला. या कवीने अनेक कृष्णभक्तीची पदे रचली आणि योगावरही एक ग्रंथ लिहिला. आलाओल, नासिर महमूद, सय्यद मूर्तजा, अलिरजा, शेख फैझुल्ला, सय्यद जाफर, शेख चाँद, इ. अनेक मुसलमान कवी बंगालमध्ये होऊन गेले. त्यांनी इस्लामी परंपरेतील चरित्रे आणि प्रसंग जसे लिहिले, तशीच राधा–कृष्ण, काली, नाथसंप्रदाय, इ. विषयांवरही तितक्याच आत्मीयतेने पद्यरचना केली.

कवियाल म्हणजे ग्रामीण कवी होत. यांच्या काव्याला कविसंगीत या नावानेही ओळखतात. हे लोक फारसे शिकले–पढलेले नसत, पण त्यांना प्रतिभेचे देणे असे. चार-दोन कवियाल एकत्र आले, की त्यांच्यामध्ये सवाल– जबाब सुरू होत. आजवरच्या संशोधनात रभू मोची हा पहिला कवियाल ठरला आहे. त्याच्या गीतांना अध्यात्माचा स्पर्श आहे. त्याच्या नंतर राम बसू हा कवियाल लोकप्रिय झाला. त्याच्या काव्यात गृह

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि गृहिणी यांचे यथार्थचित्र पाहायला मिळते. गोंजलागुई, रसू नृसिंह, हरी ठाकूर, इ. चौतीस कवियाल १६ व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत होऊन गेले. या कवियालांची काव्यसामग्री बरीच आहे. आश्चर्याची गोष्ट ही, की अँटनी नावाचा एक पोर्तुगीज साहेबही कवियाल बनला होता. तो सूटबूट टाकून धोतर-कुडत्यात राहत असे. तो जवळ जवळ बंगाली हिंदूच बनला होता. एका सभेत ठाकुरसिंह नावाच्या कवियालाशी त्याची गाठ पडली. ठाकुरसिंहाने त्याला ललकारले –

बलो हे एंटुनि आमि एक टिक कथा जानते चाइ।
एसे ए देशे ए वेशे तोमार गाये केनो कुर्त्ति नाइ॥

भावार्थ– हे एंटुनी, आम्हांला एक गोष्ट जाणायची आहे, की तुमच्या अंगात कोट का नाही ? अशा या देशात तुमचा हा वेष कसा काय ?

त्यावर अँटनी तत्काळ उत्तरला –

एइ बांगालाय बांगालीर वेशे आनंदे आछि।
होये ठाकुर सिंहेर बापेर जामाइ, कुर्त्ति टुपि छेड़ेछि॥

भावार्थ – मी बंगालमध्ये बंगाली बनून आनंदाने राहत आहे. ठाकूरसिंहाच्या बापाचा जावई बनल्यामुळे कोटटोपी टाकून दिली आहे.

दाशरथी राय हाही एक कवियाल बंगालमध्ये लोकप्रिय झाला. त्याने ज्या एका नव्या गीतशैलीला जन्म दिला, तिला पांचाली असे नाव मिळाले आहे.

सतराव्या शतकात काशीरामदास, कृष्णकिंकर व गदाधर यांनी अनुक्रमे पद्यात्मक महाभारत, श्रीकृष्णविलास आणि जगन्नाथमंगल ही काव्ये रचली. भारतचंद्र या कवीने याच कालात अन्नदामंगल नावाचे एक काव्य रचले. हा कवी फार लोकप्रिय झाला. त्याच धर्तीवर रामप्रसाद याने कालिकामंगल रचले. त्याने श्यामासंगीत या नावाचे आणखी एक काव्य लिहिले असून, त्याला अध्यात्माची डूब आहे. आजही बंगालमध्ये त्याची गीते प्रेमादराने गातात. याच गीतांतून प्रेरणा घेऊन पुढे बंगाली बाउलांनी आपली विशिष्ट काव्यशैली निर्माण केली.

अठराव्या शतकात राजा जयनारायण याने काशीखंडाचा बंगाली अनुवाद केला. हलकीफुलकी आणि समस्यापूर्तीच्या रूपात लिहिलेली पुष्कळ गीते या अनुवादात आहेत. मध्यकालीन बंगाली गद्याचे काही नमुने इ. स. १५५० नंतरच्या पत्रात आणि दस्तऐवजात उपलब्ध होतात. त्यानंतरच्या काळात काही विदेशी मिशनऱ्यांनी कॅथॉलिक धर्मासंबंधी लिहिलेली काही गद्य पुस्तके आढळतात. इ. स. १७७८ साली नॅथेनियल ब्रासी हालहेड याने बंगाली व्याकरण तयार करून ते प्रसिद्ध केले.

आधुनिक काल– एकोणिसाव्या शतकात बंगालमध्ये इंग्रजी भाषेचा बराच प्रसार झाला. त्यामुळे बंगाली लेखकांत एक नवी जागृती आणि नवा उत्साह आला. कंपनी सरकारचे अधिकारी बंगाली शिकायला उत्सुक असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी पाठ्य पुस्तके तयार करू लागले. बॅप्टिस्ट पंथाच्या पाद्रयांनी कृत्तिवासी रामायण छापले व बायबलाचा बंगाली अनुवाद प्रसिद्ध केला. बंगाली लोकही कित्येक गद्य ग्रंथ लिहिण्याच्या तयारीस लागले. या प्रारंभीच्या कालात रामराम बसूने राजा प्रतापादित्याचे चरित्र व मृत्युंजय विद्यालंकार याने पुरुषपरीक्षा ही पुस्तके बंगाली गद्यात लिहिली. इ. स. १८१८ साली समाचारदर्पण हे बंगालमधले पहिले साप्ताहिक सुरू झाले. राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्म समाजाची स्थापना करून कित्येक उपनिषदांचे बंगाली अनुवाद केले, बंगालीचे व्याकरण इंग्रजीत लिहिले आणि बरीच छोटी छोटी धार्मिक पुस्तकेही लिहिली. भवानीचरण चतर्जी यांनी कलकत्त्यातील समाजावर उपहासगर्भ अशी काही पुस्तके याच काळात लिहिली.

प्रारंभीच्या गद्यलेखकांची भाषा संस्कृतप्रचुर व विद्याजड होती; पण इ.स. १८५०च्या सुमारास बंगाली गद्याने बाळबोध वळण घेतले. या कामी ईश्वरचंद्र विद्यासागर, प्यारीचंद्र मित्र, इ. लेखकांनी विशेष आस्था दाखविली. विद्यासागरांनी कित्येक इंग्रजी व संस्कृत ग्रंथांचा बंगालीत अनुवाद केला व सरससुंदर अशा गद्य शैलीचा विकास केला. अक्षयकुमार दत्त यांनी विविध विषयांवर कित्येक निबंध लिहिले. राजनारायण बसू, ताराशंकर तर्करत्न, तारकनाथ गांगुली असे काही लेखक त्या काळात पुढे आले. गांगुली यांनी स्वर्णलता नावाची स्वतंत्र सामाजिक कादंबरी लिहून बंगाली कादंबरीचा पाया घातला.

मायकेल मधुसूदन दत्त हा त्या काळातला तरुण बंगालचा प्रतिनिधी मानला जातो. त्यांचा उदय ज्या काळी झाला, त्या काळी बंगाली भाषा यमक-अनुप्रास व बोजड शब्दरचना यांनी जखडल्यासारखी झाली होती आणि इंग्रजी शिकणाऱ्या तरुण पिढीला तिच्यात काही स्वारस्य दिसत नव्हते. त्यामुळे ते बंगालीला निखंदून इंग्रजीचेच गोडवे गात. अशा वेळी मायकेल हे आपली असामान्य प्रतिभा घेऊन बंगाली साहित्यात अवतरले. त्यांनी इंग्रजी साहित्यातले विविध प्रकार आत्मसात करून ते बंगालीत आणले आणि बंगालीला परिपुष्ट केले. त्यांनी अनेक काव्ये आणि नाटके लिहिली. त्यांचे मेघनादवध हे खंडकाव्य रामायणाच्या आधारावर लिहिलेले आहे.

त्यांच्या नंतर बंगाली काव्यक्षेत्रात हेमचंद्र बंद्योपाध्याय व नवीनचंद्र सेन ही दोन नावे उल्लेखनीय ठरतात. हेमचंद्रांनी वृत्तसंहार, वीरबाहू, इ. लहानमोठी बरीच काव्ये लिहिली. नवीन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंद्रांनी पलाशीर (प्लासी) युद्ध या नावाचे काव्य लिहून आपले उत्कट देशप्रेम व्यक्त केले. इंग्रजी साहित्याच्या धर्तीवर गीतिकाव्य रचणारे पहिले कवी विहारीलाल चक्रवर्ती हे होत. ते सौंदर्यवादी होते. त्यांचे शारदामंगल हे काव्य त्यांच्या सौंदर्यसाधनेची मोठीच साक्ष आहे. त्यांनी जननी, नंदिनी, प्रणयिनी अशा अनेक रूपांत शारदेला पाहिले आहे. नारीजातीला ते सौंदर्य, आनंद आणि प्रेम यांच्या समन्वित स्वरूपात पाहतात. एका ठिकाणी ते आपल्या प्रेयसीला म्हणतात--

तोमार मूरति धोरे के एसे छे मोर घरे ?
के तुमि सेजे छे नारि, चिनेओ चिनिते नारि
उदार लावण्य तव भरिया रोये छे भव
तुमिइ विश्वेर ज्योति हृद्पद्मे सरस्वती
प्रेम स्नेह भक्ति भावे देखि
अनिवार प्रेयसी आमार

भावार्थ– तुझे रूप धारण करून माझ्या घरी हे कोण आले आहे बरे ? जिने नारीरूप धारण केले आहे, अशी तू कोण बरे आहेस ? ओळखायचा प्रयत्न करूनही ओळखले जात नाही.

मायकेल मधुसूदन दत्त

तुझ्या उदार लावण्याने सारे विश्व भरून राहिले आहे. या विश्वाची ज्योती दुसरी कोणी नाही; तर तूच आहेस ! तू सरस्वतीसारखी माझ्या हृदयकमलावर विराजित हो ! हे प्रेयसी, प्रेम, स्नेह आणि भक्ती यांनी हृदय भरून घेऊन मी तुला पाहत आहे !

विहारीलाल यांनी जो कविमार्ग प्रवर्तित केला, त्यावरूनच रवींद्रनाथांनी आपला वाङमयीन प्रवास सुरू केला, असे रेवतीरंजन सिन्हा म्हणतात. रवींद्रनाथांची प्रतिभा विश्वतोमुखी होती. त्यांनी कथा, काव्य, नाटक, निबंध, समीक्षा, कादंबरी, इ. सर्व क्षेत्रांत चमत्कार करून दाखवले. विचार आणि शैली या दोन्ही दृष्टींनी बंगाली साहित्याला त्यांनी नवे वळण दिले. त्यांच्या वाङमयात अज्ञाताच्या अनुभूतीची उत्कंठा जागोजाग प्रतीत होते. जगातल्या रहस्यवादी लेखकांत त्यांची गणना होते. आपल्या प्रचंड वाङमयसंभारातून त्यांनी विश्वमानवाचे अर्थात मानवमात्राच्या ऐक्याचे तळमळीने समर्थन केले आहे.



रवींद्रनाथ ठाकूर

रवींद्रांच्या उदयापूर्वी बंगालमध्ये जे सिद्धहस्त लेखक झाले, त्यांत बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांचे नाव अग्रगण्य आहे. त्यांनी

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय

दुर्गेशनंदिनी, कपालकुंडला, विषवृक्ष, आनंदमठ, राजसिंह, सीताराम, चंद्रशेखर, इ. अनेक सामाजिक व ऐतिहासिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांनी त्यांना बंगाली साहित्यात अजरामर केले आहे. त्यांच्या आनंदमठ या कादंबरीतील 'वंदे मातरम्' हे गीत स्वातंत्र्य-संग्रामाच्या काळात अत्यंत लोकप्रिय झाले व त्याला राष्ट्रगीताचा मान मिळाला. स्वातंत्र्यपूर्वकालात क्रांतिकारकांची ती एक विजय-घोषणा होती. तो शब्द उच्चारून अनेक देशाभिमानी नवयुवकांनी ब्रिटिशांच्या हातचे फटकेही खाल्ले होते.

आधुनिक बंगाली कादंबरीकारांत शरच्चंद्र चतर्जी यांचे नाव सर्वश्रेष्ठ आहे. देवदास, चरित्रहीन, श्रीकांत, गृहदाह, सव्यसाची, इ. अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्या बंगालभर तर गाजल्याच, शिवाय हिंदी, मराठी, इ. अनेक भाषांतही त्यांचे अनुवाद झाले. बंगाली भावनांविषयी आस्था, देशभक्ती आणि प्रभावी भाषा, इ. लोकोत्तर गुणांनी कादंबरीक्षेत्रात शरदबाबू चिरंतन झाले. त्यांच्या देवदास कादंबरीला अमाप लोकप्रियता लाभली. तिच्यावर चित्रपटही निघाले. चरित्रहीन कादंबरीबद्दल त्यांना जितकी प्रशंसा मिळाली, तितकीच निंदाही सहन करावी लागली. त्या कादंबरीत प्रेम, अधःपतन आणि चारित्र्यहीनता यांचे जेवढे प्रसंगनिष्ठ कथन आहे, तेवढेच त्या घटनांमागील पात्रांच्या मनाचे विश्लेषणही आहे. श्रीकांत ही त्यांची कादंबरी जणू आत्मकथेवरच उभारलेली आहे. गृहदाह कादंबरीत पातिव्रत्य, भ्रष्टता आणि पूर्वप्रेम यांचा त्यांनी अद्भुत संघर्ष उभा केला आहे. सव्यसाची ही त्यांची कादंबरी क्रांतिकारकांच्या जीवनावर उभारलेली आणि देशप्रेमाने रसरसलेली आहे. ब्रिटिश सरकारने ती जप्त केली, यावरून तिचा जहालपणा कळून येण्यासारखा आहे.



शरच्चंद्र चतर्जी

शरच्चंद्रांना स्त्रीचरित्राचे विशेष आकर्षण आहे. स्त्रीचरित्राचे विविध आविष्कार दाखविण्यासाठीच जणू त्यांनी आपल्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. शरीर आणि मन यांच्या संघर्षात स्त्रीचे मन हीच त्यांनी तिच्या सतीत्वाची कसोटी मानली आहे.

शरच्चंद्रांशिवाय रामेंद्रसुंदर त्रिवेदी, प्रभातकुमार मुखर्जी, जलधरसेन, मनमोहन चट्टोपाध्याय, नरेशचंद्र, राखालदास बंद्योपाध्याय, अनुरूपादेवी, शांतादेवी, सीतादेवी, गिरिबाला, सरसीबाला, सुरुचिबाला. प्रभावतीदेवी, हुसेन, नजीबुर्रहिमान, इ. लेखक– लेखिका बंगाली कादंबरीकारांत नामवंत ठरल्या आहेत.

याच काळात नजरुल इस्लाम नावाचा एक कवी बंगालमध्ये निर्माण झाला. हा पूर्व बंगालचा रहिवासी होता. याने आपल्या कवितेने बंगाली तरुणांची मने तेजस्वी भावनांनी भारून टाकली. त्याच्या कवितेत तारुण्याचा जोम आणि आत्मप्रकाश यांचा पदोपदी प्रत्यय यतो. आपल्या अग्निवीणा या कवितेत तो लिहितो –

बल बीर ! आमि चिर उन्नत शिर
शिर नेहारि आमार नतशिर
ओर शिखर हिमाद्रिर ।
बल महाविश्वेर महाकाश फाड़ि
चंद्र सूर्य ग्रह तारा छाड़ि
भूलोक द्युलोक गोलोक भेदिया
खोदार आरस आसन छेदिया
उठियाछि आमि चिर उन्नत शिर ।
आमि बंधन, हारा कुमारीर वेणी, तन्वि
नयने वन्हि
षोड़शीर हृदि सरसिज प्रेम उदाम, आमि धन्यि ।
आमि उन्मन मन उदासीर
आमि विश्ववार बुके क्रन्दन श्वास, हा हुताश
आमि हुताशीर

अर्थ– वीरहो बोला ! आमचे शिर चिरकाल उन्नत आहे. आमच्या उंचावलेल्या मस्तकापुढे हिमालयाचे शिखर नम्र झाले आहे. या महान विश्वाच्या महाकाशाचा व सर्व ऊर्ध्व लोकांचा भेद करून आणि खुदाच्या आसनाला चीर पाडून आमचे मस्तक वर उठले आहे. आम्ही कुमारीची मुक्त वेणी आहो. तरुणीच्या नजरेतले अंगार आहो. षोडशवर्षा युवतीच्या हृदयकमलातले प्रेम आहोत. आम्ही धन्य आहोत. उदास, उन्मन असे मन आहो. विधवेच्या हृदयातले अश्रुहत श्वास आणि निराशांचे निःश्वास आहो.

रवींद्रनाथांच्या अस्ताने बंगाली साहित्याचे एक युग समाप्त झाले. तिथून नवचेतनेने युक्त अशा एका नव्या युगाचा प्रारंभ होतो. या युगाचे वैशिष्ट्य हे, की त्यात साहित्यविषयक अनेक वाद निर्माण झाले. रवींद्र आणि शरच्चंद्र यांच्या नंतर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बंगालमध्ये उच्च दर्जाचे साहित्यिक म्हणून पुढील मंडळी ख्याती पावली– ताराशंकर, प्रबोध संन्याल, बुद्धदेव वसू, अन्नदाशंकर, जीवनानंददास, नृपेंद्रकृष्ण चट्टोपाध्याय. पवित्र गंगोपाध्याय, जसिमुद्दीन, प्रेमेंद्र मित्र, विश्वपती चौधरी, विष्णू दे, गोकुल नाग, माणिक बंद्योपाध्याय, यतींद्रसेन गुप्त, विश्राम चक्रवर्ती, यतींद्र बागची, राधारानीदेवी, शैलजानंद मुखोपाध्याय, सरोजराय चौधुरी, सुनिर्मल बसू, हुमायून कबीर इत्यादी.

यांपैकी बहुतेक लेखक या ना त्या प्रकारे कल्लोल या नियतकालिकाशी संबद्ध होते. गोकुल नाग यांच्या संपादकत्वाखाली निघणारे हे नियतकालिक इ. स. १९२३ साली सुरू झाले. श्री. नाग यानी आपल्याभोवती साहित्यिकांचा एक गटच तयार केला होता. त्यांतले बहुतेक साहित्यिक हे प्रगतिवादी होते. बंगाली साहित्यात त्या काली जो ठाकूरवाद प्रतिष्ठित झाला होता, त्याला या लोकांचा विरोध होता. त्यांना वाटे, की रवींद्रनाथांची वाङ्मयीन दृष्टी ही वाङ्मयाच्या प्रगतीला पायबंद घालणारी आहे. साहित्यातल्या नैतिकतेबद्दलही रवींद्रनाथांशी त्यांचा मतभेद होता. ते जीवनातील सत्यांवर यथार्थपणे प्रकाश टाकू इच्छित होते. त्यांच्या या प्रवृत्तीमुळे बंगाली साहित्याच्या क्षेत्रात परंपरावादी व प्रगतिवादी असे दोन तट निर्माण झाले. उभयपक्षी वादही हिरीरीने खेळले गेले.

या नव्या प्रगतिवादी लेखकांमध्ये बुद्धदेव बसू हे विशेष उल्लेखनीय आहेत. ते कथा व कादंबरी या दोन्ही क्षेत्रांत सिद्धहस्त आहेत. प्रगतिवादाला त्यांनीच प्रतिष्ठा मिळवून दिली. विभूती बंद्योपाध्याय हे शैलीदार कथालेखक समजले जातात. अनुभूतींचे सुबोध वर्णन करण्यात ते पटाइत आहेत. ताराशंकर यांचे जीवनदर्शन स्वतंत्र वृत्तीचे, पण काही अंशी नियतिवादी आहे. जीवनाच्या सुरूप व कुरूप अशा दोन्ही बाजू त्यांनी यशस्वीपणे रंगविल्या आहेत. विभूतिभूषण मुखोपाध्याय हे विनोदी कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. अन्नदाशंकर यांच्या कथा-कादंबऱ्यांतून एक प्रकारची अतृप्ती जाणवते. बनफूल हे विज्ञान आणि इतिहास यांच्या पार्श्वभूमीवर वर्तमान जीवनाचे चित्रण करतात. सूक्ष्म उपहास हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. परशुराम या लेखकाने सर्वथा नवी शैली अनुसरून परिहासकथा लिहिल्या आहेत. त्यांच्या क्षेत्रात ते अद्वितीय समजले जातात. शैलजानंद यांनी खाणीत काम करणाऱ्या मजुरांच्या जीवनावर पुष्कळ कथा लिहिल्या आहेत. प्रभातकुमार मुखोपाध्याय हे रवींद्रपरंपरेला धरून कथा लिहिणारे आहेत. शरदिंदू बंद्योपाध्याय हे कल्पनाचतुर म्हणून प्रसिद्ध आहेत. मराठीप्रमाणेच बंगाली साहित्यातही लघुकथेला खूप महत्त्व मिळाले आहे.

रामेंद्रसुंदर त्रिवेदी, योगेशचंद्र रॉय, जगदानंद रॉय, भगवती-

चरण बंद्योपाध्याय, अक्षयकुमार मैत्रेय, हे बंगालीचे प्रसिद्ध निबंधकार होत. जदुनाथ सरकार, रामप्रसाद गुप्त, रेयाजुद्दिन

बलाईचांद मुखोपाध्याय 'बनफूल'

अहमद, शेख अबदुर जब्बार, हरिसाधन मुखोपाध्याय, प्रमथ चौधुरी, इ. लेखकांनी इतिहासावर पुष्कळ लिहिले आहे. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी हे भाषा व प्राच्यविद्या या शास्त्रांचे प्रकांड पंडित असून, त्यांनी आपल्या विषयांवर विद्वत्तापूर्ण लेखन केले आहे.

आधुनिक काळात कित्येक बंगाली लेखकांवर समाजवाद व साम्यवाद यांचा प्रभाव दिसतो. कित्येक लेखक उघडा नागडा वास्तववाद प्रकट करतानाही दिसतात.

बंगालची फाळणी होण्यापूर्वीही तिथल्या कित्येक मुस्लिम लेखकांना वाटत असे, की मुस्लिम भावनांवर आधारलेल्या अशा स्वतंत्र मुस्लिम साहित्याचा विकास बंगालमध्ये व्हावा; पण श्रेष्ठ मुस्लिम साहित्यिकांना मात्र भाषेत अशा प्रकारचे पार्थक्य यावे, असे कधीही वाटले नाही. बंगालमध्ये कित्येक शिक्षित मुसलमान लेखकांनी कथा, कादंबरी, निबंध, समीक्षा, इ. वाङ्मयप्रकारांत खूप प्रसिद्धी मिळवली आहे. काजी अब्दुल वदूद हे कादंबरीकार तर आहेतच; शिवाय त्यांनी रवींद्रसाहित्यावर एक विवेचनात्मक ग्रंथही लिहिला आहे. वर्तमानकालीन मुस्लिम लेखकांत प्रा. हुमायुन कबीर यांचे नाव उल्लेखनीय आहे. निबंध आणि कविता या दोन्ही क्षेत्रांत ते सव्यसाची आहेत.

वृत्तपत्रव्यवसाय– बंगाली भाषेचा प्रायोगिक छापखाना इ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स. १७७८ साली अस्तित्वात आला. हालहेड नावाच्या एका इंग्लिश गृहस्थाने बंगाली लिपीच्या मुद्रा (टाइप) बनवून बंगाली व्याकरण छापून काढले. इ. स. १८१८ साली एका ख्रिस्ती मिशनने दिग्दर्शन नावाचे एक नियतकालिक व जे. मार्शमेन यांनी समाचारदर्पण नावाचे साप्ताहिक सुरू केले. इ. स. १८२१ साली संवादकौमुदी नावाचे दुसरे साप्ताहिक राजा राममोहन रॉय यांच्या मदतीने निघू लागले. हिंदू धर्माला बलवान करणे ही त्यांची मूल प्रेरणा होती. त्या पुढच्या वर्षी भवानी चरण बंद्योपाध्याय यांचे समाचारचंद्रिका नावाचे साप्ताहिक उदयास आले. इ. स. १८३१ साली संवादप्रभाकर निघू लागले. ईश्वरचंद्र गुप्त त्याचे संपादक होते. खऱ्या अर्थाने तेच वंगीय पत्रसृष्टीचे जनक होत. त्यानंतर देवेंद्रनाथ ठाकूर यांनी तत्त्वबोधिनी नावाचे एक मासिक ब्राह्म समाजाच्या तत्त्वांच्या प्रचारासाठी चालू केले. इ. स. १८५१ साली विविधार्थसंग्रह नावाचे एक सचित्र मासिक राजेंद्रलाल मित्र यांच्या संपादकत्वाखाली व इ. स. १८७२ साली वंगदर्शन हे बंकिमचंद्रांच्या संपादकत्वाखाली निघू लागले. बंकिमचंद्र हे हिंदुत्व आणि मूर्तिपूजा यांचे समर्थक होते. त्यांनी आपल्या पत्रातून ब्राह्म समाजाला सतत विरोध केला. याच एका गोष्टीमुळे रवींद्रनाथ व बंकिमचंद्र हे परस्पर विरोधी बनले. त्या दोघांच्या नेतृत्वाने बंगालमध्ये दोन विरोधी पक्षच निर्माण झाले.

इ. स. १८१८ पासून ते इ. स. १८५० पर्यंत बंगालमध्ये सुमारे २५ पत्र–पत्रिका प्रकाशित होऊ लागल्या. यातील काही पत्रे साहित्यसमीक्षक होती, काही सांप्रदायिक होती, तर काही जातिविषयक होती. इ. स. १८९९ साली ऐतिहासिक चित्र नावाची एक त्रैमासिक पत्रिका अक्षयकुमार मैत्रेय यांनी सुरू केली. इ. स. १९१४ साली नारायण नावाचे एक पत्र प्रकाशित होऊ लागले. चित्तरंजन दास व बिपिनचंद्र पाल यांचे त्या पत्राला प्रोत्साहन होते. त्या पत्राच्या संपर्कात येऊन कित्येक निबंधकार प्रसिद्धी पावले. इ. स. १९२३ साली कल्लोल नावाचे एक पत्र आधुनिक विचारांचे कंकण बांधून निघू लागले. कल्लोलच्या पक्षाला पोषक अशी कालीकलम व प्रगती ही दोन नियतकालिके पुढच्या तीन चार वर्षांत निर्माण झाली.
[हि. बें. लें. लि.; बं. सा. सं. इ.; बं. उ. सा.; बं. सा. क.]

बंगाली रंगभूमी प्राचीन कालात बंगालमध्ये यात्राशैलीवर नृत्य व गीत यांचा अभिनय होत असे. तीन चार स्त्री-पुरुषपात्रे गीताच्या साहाय्याने अभिनय करून एखादा पौराणिक प्रसंग नाटयरूपाने दाखवीत. त्यातला काछ (वृद्ध) नट विनोदी भाषण व अभिनय करून लोकांना हसवीत असे. पुढे इ. स. च्या पंधराव्या सोळाव्या शतकांत कृष्ण-कीर्तन-विषयक पदांतून नाटयाभिनय सुरू झाला. त्यांतले संवाद पद्यरूपच असत. बडू चंडीदासाच्या कृष्ण-कीर्तनात असा एक प्रसंग आहे, की यमुनेच्या घाटावर राधा पाणी भरण्यासाठी आली आहे. तिथे तिला कृष्ण भेटतो. मग त्या दोघांमध्ये पद्यरूपाने बातचीत होते, ती अशी–

कृष्ण– **काहार बहु तों काहार रानी**
केन्हे यमुनात तोलसी पानी

अर्थ – तू कोणाची सून आहेस ? तू कोणाची राणी आहेस ? यमुनेवर पाणी कशासाठी भरीत आहेस ?

राधा – **बडार बहु मो बडार झि**
आम्हें पानि तुलि तों तोम्हार कि

अर्थ – मी मोठयाची सून, मोठयाची बेटी आहे. मी पाणी भरते, त्यात तुझे काय जाते ?

कृष्ण – **काखेर कलस नाबा ओ तोम्हे**
कथा चारि पांचि कहिब आम्हें

अर्थ – कमरेवरची घागर उतरून ठेव. मला तुझ्याशी चार पाच गोष्टी करायच्या आहेय.

राधा – **ज्यार कांधे बोसे दोसर माथा**
से हि आम्हा समे कहिबे कथा

अर्थ – ज्याच्या मानेवर दोन शिरे आहेत, त्यानेच माझ्याशी गोष्टी कराव्या.

चैतन्यमहाप्रभूने लिहिलेले रुक्मिणीहरण नामक कीर्तन नाटयरूपाने केले जात असे. एकदा तर चैतन्यांनीच त्यात रुक्मिणीची भूमिका केली होती. या यात्रा किंवा कीर्तननाटकांना रंगमंच नसे व पडदाही नसे. मंगलकाव्ये लिहिणाऱ्या कवींनी आपल्या कृतींना नाट म्हटले आहे. ही मंगलकाव्येही नाटयरूपाने प्रदर्शित करीत. पण खऱ्या अर्थाने बंगाली नाटकाचा उगम झाला तो इंग्रजी नाटकांच्या परिचयातून.

इ. स. च्या अठराव्या शतकाच्या अखेरीस बंगाली लोकांत आधुनिक नाटकाबद्दल अभिरुची निर्माण झाली. पण तिची पूर्ती करण्याची साधने मात्र त्या काळी उपलब्ध नव्हती. यात्रानाटके सर्वत्र होत; पण शिक्षित लोकांना आता त्यांचा कंटाळा आला होता. नेमका याच काळात हेरासिम लेवेड्राफ नावाचा एक रशियन कलावंत कलकत्त्यात आला आणि त्याने ' दि डिसगाइस् ' व ' लव्ह इज दी बेस्ट डॉक्टर ' ही दोन रूपांतरित नाटके रंगभूमीवर सादर केली. लोकांना ती आवडली. पुढे काही वर्षे नाटयक्षेत्रात काही घडले नाही. इ.स. १८३१साली प्रसन्नकुमार ठाकूर यांनी एक नाटयशाला उभारून शेक्सपीअरचे एक व भवभूतीचे एक अशी दोन नाटके करून दाखविली. १८३५साली नवीनचंद्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बसू यांनी शेक्सपीअरची आणखी काही नाटके रंगभूमीवर आणली. पुढे थोड्याच दिवसांत ओरिएंटल थिएटर व जोडासांको थिएटर अशा दोन नाट्यसंस्था स्थापन झाल्या. रामचंद्र तर्कालंकार, नंदकुमार रॉय व नीलमणी पाल हे नाटककार त्या काळात निर्माण झाले. त्यांनी आपली कित्येक नाटके रंगभूमीवर आणली. पण अजून स्वतंत्र असे बंगाली नाटक निर्माण झाले नव्हते. योगेंद्र चंद्रगुप्त, ताराचरण शिकदार व हरचंद्र घोष यांच्या नाटकांत काही अंशी मौलिकता दिसली, पण त्यांची नाटके आख्यायिका व विदेशी कथावस्तू यांवर आधारलेली होती. रामनारायण तर्करत्न हे त्याच काळातले एक समर्थ नाटककार होत.

बंगालमध्ये त्या काळात समाजसुधारणेची लाट आली होती. तिला अनुसरून विधवाविवाहविषयक कितीतरी नाटके रंगभूमीवर आली. ती प्रयोगक्षम असली, तरी त्यांत नाट्यविषयक कलागुणांचा बराचसा अभाव होता. ही उणीव मायकेल मधुसूदन दत्त यांना जाणवली आणि त्यांनी चार नाटके लिहिली. त्या नाटकांत बरेचसे नावीन्य होते. त्यांच्या सर्व नाटकांत कृष्णकुमारी हे नाटक उत्तम वठले. पुढील नाटककारांवर त्याचा बराच प्रभाव पडला. दत्त यांनी दोन प्रहसनेही लिहिली आणि त्यांच्या अनुकरणाने अनेक कलाकार प्रहसने लिहू लागले.

त्यानंतर एक नवी प्रेरणा घेऊन दीनबंधू मित्र हे नाटककार पुढे आले. त्यांनी नीलदर्पण नावाचे नाटक लिहिले व ते यशस्वी ठरले. त्यांनी बरीचशी प्रहसनेही लिहिली. मनोमोहन बसू, हरलाल रॉय, ज्योतिरिंद्र ठाकूर, गिरीशचंद्र घोष, क्षीरोदप्रसाद विद्याविनोद, अमृतलाल बसू व द्विजेंद्रलाल रॉय हे दीनबंधू मित्र यांच्या नंतरचे यशस्वी नाटककार होत.

इ. स. १८७३ साली नॅशनल थिएटर नावाची नाट्यसंस्था निर्माण होऊन काम करू लागली. तिने एक नवे नाट्ययुगच सुरू केले. त्याच सुमारास ओरिएंटल थिएटर नावाच्या आणखी दोन नाट्यसंस्था निर्माण झाल्या. ज्योतिरिंद्र ठाकूर यांनी काही अनुवादात्मक आणि काही मौलिक नाटके व काही प्रहसनेही लिहिली. देशभक्ती, ऐतिहासिक घटनांमधून भारताच्या माहात्म्याचे प्रतिपादन आणि आदर्श नारी-चरित्राविषयी प्रेमादर, हे तीन विशेष त्यांच्या नाटकांत आढळतात. प्रयोगाच्या दृष्टीनेही त्यांची नाटके यशस्वी ठरली. त्या पुढच्या काळात दत्त यांचे मेघनादवध, हेमचंद्रांचे वृत्रसंहार, ईश्वरचंद्रांचे सीता-वनवास, बंकिमचंद्रांचे दुर्गेशनंदिनी, इ. सुप्रसिद्ध काव्ये आणि कादंबऱ्या यांचे नाट्यांत रूपांतर करण्यात आले. गिरीशचंद्र घोष, अमृतलाल बसू व द्विजेंद्रलाल रॉय हे बंगाली रंगभूमीचे नाटककार त्रिमूर्ती ठरले. गिरीशचंद्रांनी आपल्या नाटकांतून पौराणिक उच्चतम आदर्श उभे केले. ऐंशीहून अधिक नाटके त्यांनी लिहिली. अमृतलाल बसू हे स्वतः नटही होते. त्यांच्या नाटकांना विनोदाची झालर होती. तत्कालीन परिस्थिती आणि सामाजिक दुर्बलता यांच्या आधारावर त्यांनी आपली नाट्यसृष्टी उभी केली. त्यांनी जे जे लिहिले ते ते सरस होऊन अवतरले. द्विजेंद्रलाल यांच्या नाटकात कलात्मक दोष दिसत असले, तरी त्यांच्या नाटकांनी रंगभूमी मात्र गाजवून सोडली.

पुढे रवींद्रनाथ ठाकूर यांच्या प्रतिभेने बंगाली नाट्यसृष्टीला एक नवे वळण लावले. काव्यात्मकतेतून उमलून आलेले जीवनदर्शन त्यांच्या नाटकांतून घडते. वाल्मीकी, प्रतिमा, कालमृगया, मायार खेला, प्रकृतीर प्रतिशोध, चित्रा अचलायतन, डाकघर, इ. नाटके रवींद्रांनी लिहिली आणि त्यांच्या द्वारे अल्पातून महताचा, सान्तातून अनंताचा आणि आत्म्याच्या दिव्य स्वातंत्र्याचा शोध घेतला. रवींद्रांची ही नाटके सामान्य जनतेला कळण्याजोगी नव्हती, पण सुशिक्षित, वरिष्ठ वर्गाने त्यांचा आस्वाद रसिकपणे घेतला.

शिशिरकुमार भादुडी हे अलिकडच्या काळातले अभिनयकुशल कलावंत होत. अभिनय व नाट्यनिर्मिती या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी फार मोठी कीर्ती मिळवली. परिचय व दुखीर ईमान, या त्यांनी सादर केलेल्या नाट्यकृती रंजक तशाच उद्बोधक ठरल्या. त्यांचा बंगला नाट्यशाला ही एक अग्रगण्य नाट्यसंस्था होती. या संस्थेने सादर केलेल्या अनेक नाटकांमुळे स्वातंत्र्यपूर्वकाळात लोकांना स्फूर्ती आणि आत्मविश्वास मिळाला. राष्ट्रीय रंगमंचाची स्थापना हे शिशिर कुमारांचे एक स्वप्न होते. ते म्हणत– मला विश्वास आहे, की माझ्या मृत्यूनंतरही माझी अभिनयकला चिरंजीव राहील. माझी नाट्य सादर करण्याची पद्धतही अमर राहील. तीच लोकांना अनुकरणीय वाटेल. व्यक्तिगत वैभवासाठी मी रंगमंचाचा वापर केला नाही; तर बंगाली रंगभूमी वैभवाप्रत पोचावी, याचसाठी माझा सर्व प्रयत्न आहे.

बंगालमध्ये सांप्रत अनेक नाट्यसंस्था काम करीत आहेत. त्यांना समृद्धीही लाभली आहे. नवी नवी नाटके घेऊन नवे नवे नाटककार बंगाली रंगभूमीवर येत आहेत. नेपथ्य, प्रकाशयोजना, तांत्रिक चमत्कृती, दिग्दर्शन, इ. नाट्याच्या अंतरंगबहिरंगात नवे नवे प्रयोग वंगीय रंगभूमीवर होऊन राहिले आहेत. बंगाली आणि मराठी अशा दोनच रंगभूमी भारतात सर्व बाजूंनी आघाडीवर आहेत. [मा. ना. सा.; श्री. प्रबोधचंद्र सेन–मार्च ऑफ इंडिया, मे १९५७; श्री. मोहनसिंह सेंगर–आजकल, ऑक्टोबर १९५९; बं. उ. सा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बंगाली लोककला बंगालमधील लोककलांचे क्षेत्र व्यापक असून, बंगाली लोकांच्या समाजजीवनात नाना प्रकारच्या कलांना बराच अवसर मिळालेला आहे. 'हा वंग रंगला कलापूजनी' अशी बंगालची ख्याती आहे.

बंगालमधील प्रौढ स्त्रिया फावल्या वेळात कंथा किंवा गोधड्या शिवतात. जुन्या साड्या एकावर एक ठेवून आपल्याला हव्या तेवढ्या जाडीच्या कंथा त्या बनवतात. या कंथांचे सात प्रकार आहेत, ते असे —

(१) लेप — हिवाळ्यात पांघरण्यासाठी केलेली कंथा. ही जाड असून, सुमारे सहा फूट लांब व चार फूट रुंद असते.

(२) सुजनी — समारंभप्रसंगी वापरायची किंवा अंथरुणावर पसरायची कंथा. ही बहुधा सहा फूट लांब व तीन फूट रुंद असते.

(३) बेतन — पुस्तकांना व किमती वस्तूंना आच्छादन म्हणून वापरायची कंथा. हिची लांबी व रुंदी बहुधा तीन तीन फूट असते. अशा प्रकारच्या कंथेला रुंद काठ असतात व तिच्यावर माणसांच्या किंवा प्राण्यांच्या आकृत्या काढलेल्या असतात. तिच्या मध्यभागी कमळाची नक्षी असते व कमळाभोवती इतरही काही आकृत्या असतात. तिच्या चारही कोपऱ्यांवर पाने-फुले किंवा कुयऱ्या काढलेल्या असतात.

(४) ओआर — उशीच्या अभ्र्यासारखी कंथा. ही दोन फूट लांब व दीड फूट रुंद असते. हिच्यावर पाने, फुले, पक्षी, इ. आकृत्या काढतात.

(५) आरसीलता — आरसा व कंगवे यांच्यावर आच्छादन घालण्यासाठी सुमारे अकरा इंच लांब व सहा इंच रुंद बनवलेली कंथा. लता, पाने, किंवा कमळे अशा आकृत्या तिच्यावर काढलेल्या असतात.

(६) दुर्जनी — पिशवी किंवा छोटी चामड्याची पिशवी, हिच्यावर आच्छादन करणारी कंथा. हिच्या मध्यभागी कमळ असते आणि काठांवरही नक्षी काढलेली असते.

(७) रुमाल — रुमालासारखी कंथा. ही रुमालाप्रमाणे लहान चौरस असते. तिच्यावर मध्यभागी कमळ व कमळाभोवती लहान लहान नक्षी असते.

धार्मिक प्रसंगी वापरायच्या कंथांवर कलश, मंडल, कमळ, शंख, इ. आकृत्या काढतात. काही वेळा, कापडाचे निरनिराळ्या प्राण्यांचे आकार कापून ते कंथेवर रंगीत दोऱ्याने शिवतात. तसेच निरनिराळ्या रंगांच्या तुकड्यांनीही मासे, भाताच्या लोंब्या, शंख, कमळ अशा आकृत्या जमवतात. काही वेळा साध्या पांढऱ्या कंथेवर रंगीत दोऱ्याने फुले, वेली, पाने, हत्ती, घोडा, अशा आकृत्या काढतात. काही छोट्या कंथा व्याह्यांना भेट देतात; तर काही कंथा वस्तू पाठवताना ताटावर झाकण्यासाठीही वापरतात.

सणावारी किंवा उत्सवप्रसंगी मुली भिंतींवर, खांबांवर, घरात व अंगणात अलिपना रेखाटतात. भिजवून वाटलेल्या तांदळाचे पातळसर पीठ कापडाच्या पुरचुंडीत घेऊन अलिपना काढतात. घराच्या दारासमोर तुळशीपुढे शंखलता व भाताच्या लोंब्या यांच्या आकृत्या व मध्यभागी विकसित कमळात लक्ष्मीची आकृती काढतात. अलिपनेच्या काही आकृत्या पारंपारिक असतात. काही व्रतांच्या विशिष्ट अलिपना ठरलेल्या आहेत. व्रतकथेशी संबंधित अशा त्या लहान लहान आकृत्या असतात. माघमंडल व्रताच्या अलिपना रंगीत असतात. त्यांत पाच वर्तुळे असतात आणि त्यांच्या वरच्या बाजूला सूर्य व खालच्या बाजूला चंद्र असतो. या अलिपनेचे वैशिष्टच असे, की ती जमिनीत कोरतात आणि त्या खाचा वेलांच्या पानांची पूड, हळद, भाताच्या तुसाची राख, विटकरीची पूड यांनी भरून काढतात. सूर्य विटकरीच्या पुडीने व चंद्र तांदुळाच्या पिठाने रंगवतात.

ओआर कंथा

बंगाली लोककलांमध्ये चित्रविद्येचाही अंतर्भाव होतो. तिला पट असे नाव आहे. कागदावर किंवा कापडावर काढलेल्या चित्राला पट असे म्हणतात. ही चित्रे काढणाऱ्यांना पटुवा अशी संज्ञा आहे. चित्रे काढण्यासाठी प्रथम गुळगुळीत पोत असलेले कापड घेतात आणि त्याच्यावर चाळलेली माती व शेण पाण्यात कालवून त्याचा पातळ थर देतात. तो वाळला, की घासून गुळगुळीत करतात आणि त्यावर चित्रे काढतात. काही वेळा कापडावर कागद चिटकावतात आणि चुना किंवा खडू यांची पाण्यात कालवलेली वस्त्रगाळ पूड त्याच्यावर फासतात. नंतर त्याच्यावर व्यक्तींची चित्रे काढतात. चित्रांसाठी पांढरा, पिवळा, काळा, लाल व हिरवट तपकिरी रंग वापरतात. क्वचित सोन्याचांदीचा वर्खही उपयोगात आणतात. चित्रे बहुधा पौराणिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कथांची असतात. मुख्यत्वे रामलीला व कृष्णलीला त्यावर रेखाटलेल्या असतात. चित्रे पटावर एकाखाली एक काढतात. तो पट इतका लांब असतो, की तो उलगडून एकापुढे एक अशी चित्रे दाखवावी लागतात. लोकांना चित्रे दाखवताना पटुवा त्याबरोबर आपण रचलेली गाणीही म्हणतो. या पटात वाघ आणि सिंह या प्राण्यांची चित्रे प्रामुख्याने असतात. कालीघाटचे पटुवा व पश्चिम बंगालचे पटुवा रंगांचा उपयोग करण्यात मोठे हुशार आहेत. त्यांचे रंग जिवंत व ताजे वाटतात. कालीघाटचे पटुवा दैनंदिन जीवनातील घटनांवर व्यंगचित्रे काढण्यात पटाईत असतात.

बंगालमधील कुंभार निरनिराळ्या प्रकारची मातीची मांडी बनवतात व त्यांवर स्त्री, पुरुष, पाने, फुले, पक्षी वगैरे निरनिराळ्या प्रकारची नक्षी काढतात. तसेच मंगलघट, मनसाघट, लक्ष्मीसरा अशा घटांवर आधी चुन्याचा पांढरा हात देतात व त्यांवर पिवळा, लाल, काळा, हिरवा, असे रंग भरतात.

मनसाघट

कुंभार मातीच्या बाहुल्या, खेळणी व देवदेवतांच्या मूर्तीही बनवतात. काही वेळा त्या हाताने करतात, तर काही वेळा त्यासाठी साचे वापरतात. या मूर्तींची पाठीमागची बाजू सपाट असते. शीतला, षष्ठी, इ. देवतांच्या मूर्ती अगदी साध्या, ओबड-धोबड व नग्न असतात. मूर्तिकारांची वाडी नाही, असे खेडे बंगालमध्ये आढळणार नाही. दुर्गा व सरस्वती यांच्या सुंदर मूर्ती तिथले मूर्तिकार बनवतात. मूर्तींच्या भोवती आरास म्हणून इतरही देवदेवतांच्या किंवा ऐतिहासिक स्त्री-पुरुषांच्या कलात्मक मूर्ती मांडतात.

बंगालमधील फुलमाळी नावाचे कारागीर सणकाड्या व भेंड यांपासून सजावटीचे सुंदर सामान बनवतात. अत्यंत हलक्या लाकडात कातर काम करून त्याचे कंगवे, फुंकण्या, गोंडे व नवरदेवाला घालायचे मुकुट ते तयार करतात. तसेच दाराला


मातीच्या बाहुल्या

लावायची तोरणे, गळ्यात घालायचे हार, समारंभस्थळी लावायच्या माळा व पताकाही ते बनवतात.

लाकडी बाहुली व वृषकाष्ठ

सुतार लोक चांगल्या लाकडापासून देव-देवतांचे रथ, गजसिंहासने, वृषकाष्ठ, इ. कोरीव काम असलेल्या वस्तू तयार करतात. रथांवर पुराणांतील कथाप्रसंग कोरलेले असतात. वृषकाष्ठ हे कोरीव खांब असून, मृतांचे स्मारक म्हणून तिठ्यावर उभारताना या खांबावर खालच्या बाजूला स्त्रीची किंवा पुरुषाची आकृती, त्याच्यावर वृषभ आणि अगदी वर शिवलिंग किंवा शिवपार्वतींच्या आकृत्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोरलेल्या असतात. याशिवाय लाकडापासून बाहुल्या व खेळणीही बनवतात आणि त्यांना लाल, काळा, निळा, पिवळा, असे भडक रंग देतात. लाकडाचे मुखवटेही करतात. बंगालमध्ये धार्मिक उत्सवांच्या वेळी देवदेवतांचे व निरनिराळ्या प्राण्यांचे मुखवटे घालून नृत्य करण्याची पद्धत आहे. हे मुखवटे लाल, काळ्या व पिवळ्या रंगाने रंगवतात. त्यामुळे त्यांचे दर्शन भयानक असते.

बंगाली कारागीर अनेक प्रकारच्या नावा बनविण्यात कुशल आहेत. साग, बाभूळ, साल, कदंब, जांभूळ, इ. वृक्षांचे लाकूड त्यासाठी वापरतात. नौकाबांधणीला शुभ दिवस पाहून प्रारंभ करतात. नावेच्या पुढच्या टोकाला सिंह, वाघ, हत्ती, मोर, शुक, इ. प्राण्यांच्या मुखाचा आकार दिलेला असतो. त्यावरून नावांना मयूरपंखी, शुकपंखी, इ. नावे दिलेली असतात. प्रवासी नेणाऱ्या नावा, मच्छिमारीच्या होडचा, स्पर्धेसाठी धावणाऱ्या नौका, मालवाहू नौका अशा प्रकारच्या अनेक नावा बंगाली कारागीर तयार करतात.

निरनिराळ्या वेली, बांबू, वेत, गवत, ताडाची पाने, इ. सामग्रीपासून बंगाली बुरूड चटया, टोपल्या, करंड्या, टोप्या, परड्या, सुपे, इ. वस्तू बनवतात. बांबू, वेत वगैरेंच्या कामट्या करतात व त्या चिखलाच्या पाण्यात काही दिवस बुडवून ठेवतात. त्यामुळे वस्तू जास्त दिवस टिकते व तिला वाळवी वगैरे लागत नाही. टोपल्या, करंड्या, चटया वगैरे वस्तूंना रंग देतात आणि त्यांवर पानाफुलांची किंवा त्रिकोण, चौकोन वगैरे भूमितीच्या आकाराची व नागमोडी नक्षी काढतात.



वेताची करंडी

चटया विणण्याचे काम स्त्रियाही करतात. मादुर आणि शीतलपाटी नामक गवतापासून या चटया विणतात. शीतलपाटी गवतापासून विणलेल्या शीतलपाटी चटया नावाप्रमाणेच शीतल असतात. उन्हाळ्यात त्यांचा शीतल स्पर्श आल्हादकारक वाटतो. या चटया बारीक धाग्यापासून विणलेल्या असल्यामुळे तलम असतात. त्यांच्यावरची नक्षीही मोहक असते. शीतलपाटी चटया विणणाऱ्या मुलीचे आईबाप मुलगी लग्नानंतर घरातून जायची असल्यामुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी भावी जावयाकडून भरपूर पैसे घेतात.

विष्णुपूर व डाक्का येथे शंखापासून चित्र-विचित्र बांगड्या बनवतात. बंगाली स्त्रिया मोठ्या आवडीने त्या वापरतात. [फो. आ. बें.; श्रीमती माया गुप्त - संमेलनपत्रिका, कला अंक १९५८; बंगाली लोककला, स्त्री, फेब्रुवारी १९६१]

बंजारा भारतात सर्वत्र आढळणारी एक भटकी जात. या लोकांना वंजारी, बंजारी, वनजारा, ब्रिजारी, लमाण, लमाणी, लवाडी, लंबाडा, लंवाडोडू, सुकलीर, इ. अनेक नावे आहेत. आपसांत बोलताना हे स्वतःला गोर म्हणून संबोधतात. महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास, राजस्थान व मध्य प्रदेश या भागांत यांची वस्ती बरीच आहे.

संस्कृतातील वाणिज्य म्हणजे व्यापार या शब्दावरून बनज किंवा वनज हा शब्द निघाला व त्यावरून या लोकांना बंजारा किंवा बनजारा हे नाव मिळाले. तसेच हे लोक लवण म्हणजे मीठ वाहून नेत असत. म्हणून त्यांना लमाणी असेही नाव पडले.

बैलांच्या पाठीवर धान्य, नारळ, खजूर मीठ, इ. माल लादून तो भारतात जवळजवळ सर्वत्र पोचविणे, हा त्यांचा परंपरागत धंदा होता. कधी कधी त्यांच्या तांड्यात एक लाख बैल असत, असे म्हणतात. ऐतिहासिक पुराव्यावरून असे दिसते, की या लोकांनी इ. स. १३९६ ते १८९६ या प्रदीर्घ कालखंडात हा धंदा केला. इ. स. १३९६ पासून पुढे बारा वर्षे उत्तर भारतात मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळी या लोकांनी नेपाळ, चीन, तिबेट, ब्रह्मदेश, इराण, वगैरे भागांतून धान्य वाहून आणले व लोकांचे प्राण वाचवले, असे सांगतात. युद्धाच्या काळातही त्यांनी मोगल, मराठा व युरोपियन सैन्याला धान्य, कापड व इतर आवश्यक वस्तू पुरविल्या. मोगल राजांनी त्यांना त्याबद्दल वंशपरंपरा किताब व जहागिरी दिल्या आहेत. पण पुढे इंग्रजांच्या अमदानीत रेल्वे व रस्ते ही नवी वाहतुकीची साधने अस्तित्वात आली आणि त्यांचा हा धंदा जवळजवळ बसला. त्यामुळे ते शेती, पशुपालन, मजुरी, इ. व्यवसाय करू लागले. त्यांच्यांतले काही लोक गुन्हेगारीकडे वळले व त्यांची गणना गुन्हेगार जातीत होऊ लागली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूर्वी बंजारा लोक प्रवासाला निघण्यापूर्वी एखादे मूल पळवून आणीत व त्याला खांद्यापर्यंत जमिनीत पुरीत. मग त्याच्यावरून सामान लादलेले बैल चालवीत. त्यामुळे मूल मरून जाई व आपला प्रवास निर्विघ्न पार पडणार असा त्यांना विश्वास वाटे, असे श्री. थर्स्टन यांनी म्हटले आहे.

मुळात हे लोक राजस्थानातील असून, मुसलमानांच्या फौजांना रसद पोचविण्याच्या निमित्ताने ते दक्षिणेत आले व मग तिथेच स्थायिक झाले. या जातीत हिंदू, शीख, जैन व मुसलमान या धर्मांचे लोक असून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्णांच्या लोकांचाही भरणा आहे. त्यांपैकी ब्राह्मणांना मथुरिया, वैश्यांना लमाण, राजपुतांना गोरबंजारे आणि भाटांना चारण व धाडी अशी नावे आहेत. गोरबंजारा लोकांचे भुकिया, बाळनोत, चव्हाण, पवार, वडतिया व तुंवर असे सहा पोटभेद आहेत. मथुरिया लोकांचे पांडे, दुबे, तिवारी व चौबे असे चार पोटभेद आहेत. मथुरा–वृंदावनातून इकडे आल्यामुळे त्यांना मथुरिया असे नाव मिळाले. हे लोक मुंज करतात व जानवे घालतात. तसेच ते शाकाहारी असून, मद्यमांसाला स्पर्शही करीत नाहीत.

भाट किंवा धाडी लोक राजाश्रयाने राहतात. ते राजांच्या वंशावळी ठेवतात व त्यांच्या स्तुतिपर कवने रचून गातात. बंजाऱ्यांतील स्त्रिया व मुली यांच्या पाठराखणीसाठी भाटांना पाठविण्याची प्रथा आहे. लग्नकार्याच्या प्रसंगी हे लोक डफ वाजवतात.

पळवून आणलेले किंवा नायकांनी विकत घेतलेले असे इतर जातीचे लोक बंजाऱ्यांत आढळतात. त्यांना कोरिया किंवा जांगड म्हणतात. त्यांना तीन किंवा सात पिढ्यांनंतर मुख्य जातींत घेतात.

याशिवाय प्रांतपरत्वे बंजाऱ्यांचे मराठा, कानडी व गुजराती असेही भेद आहेत. त्यांतही पुन्हा आणखी भेद असून, त्यांच्यांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होत नाहीं.

वेषभूषा—बंजारा लोक उंच, गोरे किंवा सावळ्या वर्णाचे, काटक व बळकट असतात. पुरुष धोतर किंवा चोळणा, वर अंगरखा आणि डोक्याला पांढरे किंवा रंगीत पागोटे असा पोषाख करतात. बंजारा स्त्रिया रूपाने चांगल्या असतात. त्या लाल किंवा निळा घागरा किंवा लहंगा, भिंगे, मणी किंवा शिंपा बसवलेली त्याच रंगाची ओढणी आणि कशिदा काढलेली व कवड्या, भिंगे वगैरे बसवलेली भडक रंगाची चोळी असा वेष करतात. त्या हातात कोपरापर्यंत हाडकांच्या, हस्तिदंताच्या, शिंगांच्या किंवा पितळेच्या बांगड्या घालतात आणि दंडात वाकी घालतात. नाना प्रकारची फुलेही त्या माळतात. केसांच्या बटांत गुंफलेली अग्रफुले त्यांच्या कानशिलांवर लोंबत असतात. त्यांच्या गळ्यातही पुतळ्यांच्या व इतर माळा असतात. नाकात त्या गोलाकार नथनी व पायांत वाळे व पितळी पैंजण घालतात.

बंजारा युवक

मथुरिया स्त्रिया लहंगा नेसतात, चोळी घालतात आणि वर पदर घेतात. विवाहित स्त्रिया माथ्यावर केस उंच बांधून त्यात एक फणी खोचतात. शिवाय, त्या केसांतून एक चांदीची साखळी अडकवून, ती कपाळावरून कानामागे लोंबती ठेवतात. त्या पायांत जोडवी व गळ्यात सरी घालतात. मुली सहा–सात वर्षांच्या झाल्या, की त्यांच्या ओढणीच्या दोन्ही टोकांना तांदूळ, कवड्या व सुपारी यांची एकेक पुरचुंडी बांधतात व ती खांद्यांवरून एक पुढे व एक मागे अशी सोडतात. ही अविवाहित मुलींची खूण आहे. लग्न झाल्यावर त्या पुरचुंड्या कमरेला बांधतात. त्या अंगावरून केव्हाही काढायच्या नसतात.

काही चारण सौभाग्यवती स्त्रिया माथ्यावर सुमारे नऊ इंच लांबीचे शिंग अगर काठी खोवतात व त्यावरून ओढणी घेतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घरे – पूर्वी हे लोक पावसाळयात नायकाच्या झोपडीच्या आसपास लहान लहान झोपड्या उभारून राहत असत. अशा वस्तीला कुडी किंवा छावणी म्हणत. दसरा झाल्यावर हे लोक आपापले बैलांचे तांडे घेऊन तिथून निघून जात व दुसरीकडे निरनिराळ्या तात्पुरत्या वसाहती उभारीत. अशा वसाहतींना तांडा असे म्हणत. सांप्रत त्यांच्या कायम स्वरूपाच्या वसाहतींनाही तांडा किंवा लमाण तांडा असे म्हणतात. प्रवासात हे लोक पाले उभारून राहतात.

बंजारा स्त्री

प्रत्येक तांड्याचा एक मुख्य असतो. त्याला नाईक असे नाव आहे. त्याचे पद वंशपरंपरा असते. तो तांड्यातील लोकांना अडचणीच्या वेळी मदत करतो, तांड्यात येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था करतो व प्रवासात तांड्याला मार्गदर्शनही करतो. तांड्याच्या पंचायतीचाही तो अध्यक्ष असतो. तांड्यातले भांडणतंटे सोडवणे हे त्याचेच काम असते.

भाषा – या लोकांची भाषा मारवाडी भाषेसारखी असून, तिच्यात हिंदी व गुजराती शब्दांची भेसळ आहे. याशिवाय, बंजारा ज्या प्रांतात राहतात, तिथली भाषाही त्यांना बोलता येते.

गुन्हेगार बंजारा – सर्वसाधारणपणे कर्नाटकात राहणारे बंजारा गुन्हेगार म्हणून प्रसिद्ध आहेत. घरफोडी, दरोडे घालणे, गुरे व शेळ्यामेंढ्या चोरणे आणि बेकायदा दारू गाळणे, हे त्यांचे मुख्य गुन्हे होत. याशिवाय ते पेवे फोडतात, रात्री चालणाऱ्या गाड्यांत चोऱ्या करतात व कधी स्त्रिया व मुलेही पळवतात.

गुन्हे करण्यासाठी ते तांड्यापासून तीस ते साठ मैल दूर जातात. ढोरवाड्यातून किंवा मैदानात चरणाऱ्या कळपातून ते गुरे व शेळ्यामेंढ्या पळवतात व त्यांना आपल्या जनावरांत मिसळवून टाकतात; किंवा पळविलेल्या जनावरांची शिंगे खुडून, त्यांच्या कानांचा आकार बदलून आणि डागण्या देऊन ते त्यांचे स्वरूपही बदलून टाकतात.

अशा वेळी ते सगळे टोळीच्या नायकाच्या हुकमतीत वागतात. एकजण टेहळणी करून डाका घालायचे घर ठरवतो. डाका घालायला जाताना ते वाटेतल्या झाडांच्या काठ्या, गोफणगुंडे, कोयते व कधी कधी तलवारी व बंदुकाही बरोबर नेतात. दरोडा घालण्यापूर्वी ते दगडांचा वर्षाव करतात व गोफण गुंड्यांनी आसपासचे रस्ते रोखतात आणि कोणी प्रतिकाराला आल्यास दीन दीन म्हणत काठ्या व इतर हत्यारे त्यांच्यावर चालवतात. दरोडा घालून झाल्यावर माग चुकविण्यासाठी ते टोळी फोडून जातात. साधारण एक मैल गेल्यावर थोडा वेळ थांबून ते लूट नीट तपासून घेतात.

पहाटेच्या वेळी राखणदाराला झोप लागली, की ते खळ्याची किंवा पिकाची चोरी करतात. उभी पिके ते बहुधा रात्री चोरतात. रोकडीशिवाय बाकीचा माल ते तांड्यानजीकच्या नाल्यात किंवा जुन्या विहिरीत पुरतात. धान्य वगैरे गवताखाली किंवा पाल्यापाचोळ्यात दडवितात. चोरीचा माल ते नंतर आपल्या सावकारांना विकतात.

चारण बंजारा युवती

गुजरातमधील गोवरियांचा आणखी एक धंदा आहे. ते चोरून अफू आणतात व मग किरकोळीने ती विकतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाहप्रथा – चारण व लमाण यांच्या मुली वीस ते तीस वर्षांपर्यंत अविवाहित राहतात. पण दक्षिणेतील बंजारा मुलींची लग्ने दहा ते बारा व मुलांची बारा ते वीस या वर्षांच्या दरम्यान होतात. कानडो मुलखातील बंजाऱ्यांचे विवाह मोठेपणी होतात आणि त्यांच्यापैकी काही मुली जन्मभर अविवाहित राहतात. अशा मुलींच्या डाव्या पायात काळे मणी बांधलेले असतात.

मुलाचा बाप वधूला मागणी घालतो. पंधरा ते दीडशे रुपये व काही बैल वरपिता वधूपित्याला देज म्हणून देतो. देज देणे शक्य नसल्यास, वराला भावी सासऱ्याच्या घरी दोन किंवा तीन वर्षे काम करावे लागते. काही सुखवस्तू नाईक भावी जावयाला लग्नापूर्वी पाच-सहा महिने आपल्या घरी ठेवून घेतात व त्याला चांगले जेवायला खायला घालतात.

बंजाऱ्यांच्या निरनिराळ्या पोटजातींतील विवाहविधींत थोडाफार फरक आढळतो.

सर्वसाधारणपणे नायकाची परवानगी घेऊनच सोयरिकीचे बोलणे होते. नंतर साखरपुडा किंवा गूळ नामक एक विधी होतो. त्यानंतर वाङ्‌निश्चय होतो. त्या वेळी दोन्ही पक्षांतील लोक एकमेकांना ठराविक प्रश्न विचारतात. त्यांत भोजराजा व भोपाळ ही नावे येतात. नंतर मेजवानी होते. त्या वेळी एक मनुष्य उभा राहून पुढील दोहा म्हणतो–

राधा-मीठी घोडली रण–मीठी तलवार ।
सेज-मीठी कामिणी सुरा–मीठी सांग ॥

अर्थ – (राधा म्हणजे वीर) वीराला घोडो प्रिय असते. रणांगणात तलवार प्रिय असते. शेजेवर कामिनी प्रिय असते आणि शिकारीत भाला प्रिय असतो. (त्याप्रमाणे, तुम्ही हे जेवण गोड करून घ्या.)

लग्नाच्या आदल्या दिवशी वराच्या उजव्या दंडावर तापविलेल्या सुईने डाग देतात. त्या दिवशी गोडाचे जेवण करून पितरांना नैवेद्य दाखवतात व लग्नमंडप उभारतात.

लग्नाच्या आदल्या दिवशी नवरामुलगा पंच हत्यारांनी सज्ज होऊन वधूगृही जायला निघतो. तिथे त्याला गोडाचे जेवण वाढतात. या दिवशी वरपक्षाकडून वधूला चोळीचा खण व चांदीच्या बांगड्या मिळतात.

लग्नाच्या दिवशी वधू-वर उपवास करतात. लग्नाचा मुहूर्त नेहमी रात्रीचा असतो. त्या दिवशी नवरामुलगा एक कुऱ्हाड घेऊन ती एका शेणाच्या राशीवर मारतो. मग वधू-वर दोघेही शेणाला सात वेळा डाव्या पायाच्या अंगठ्याने स्पर्श करतात. त्या दिवशी वधू-वरांना मेंदी व हळद लावून स्नान घालतात. मग वधूच्या चार बाजूंना पाणी, गूळ, ज्वारी व गहू घातलेले चार घट मांडतात. त्या घटांभोवती वराने आणलेल्या कच्च्या सुताचे सात वेढे देतात. नंतर ते सूत काढून त्याला सात गाठी मारून ते वधूच्या गळ्यात बांधतात. याच पद्धतीने वराच्याही गळ्यात सूत बांधतात. मग वधू-वरांना उभे करून त्यांच्या वस्त्रांना गाठ मारतात व होम करतात. यानंतर सप्तपदी होते. त्यासाठी पाच हातांच्या अंतरावर दोन खांब उभे करतात व त्यांच्याभोवती वधू-वर सात प्रदक्षिणा घालतात. नंतर खांबांच्या मध्ये रांगोळी घालून तिच्यावर वधू-वरांना बसवतात. मग साखर व कणिक मिसळून केलेले पदार्थ सात वेळा वराच्या हातावर ठेवून वधूला खायला देतात. तसेच ते वधूच्या हातावर ठेवून वरालाही देतात. यानंतर वधू-वरांकडून काही खेळ करून घेतात. मग त्यांना एकाच थाळीत जेवायला वाढतात. दुसऱ्या दिवशी वधूला सौभाग्यचिन्ह म्हणून घुघरी नामक एक अलंकार व हस्तिदंती बांगड्या देतात. नंतर ती दोघे वरगृही जातात.

मथुरिया लोक मुलीचे लग्न सात वर्षांपूर्वी करतात. तसे न केल्यास कुळाला कलंक लागतो, अशी त्यांची समजूत आहे. देजाची रक्कम पक्की झाल्यावर वधूपक्षाकडून सात सुपाऱ्या, सात हळकुंडे, तांदूळ, कुंकू व एक रुपया एवढा नजराणा घेऊन दोन माणसे वरपक्षाकडे येतात. वराच्या घरातील एखादी विवाहित स्त्री रेशमी साडीच्या पदरात हा नजराणा घेते, तो एका थाळीत ठेवून तपासून पाहते व बरोबर असल्यास कुडीतल्या (वस्ती) सर्व विवाहित स्त्रिया थाळीभोवती जमून गाणी गातात.

मुलाचा बाप कुडीला घीवर, कढी, भात, इ. पदार्थांचे जेवण देतो. तसेच वधूकडील दोन मुलींना साडेतेरा रुपये व जमातीतील लोकांकरिता काही रुपये देतो. एवढे झाले म्हणजे मागणी पक्की झाली, असे समजतात व मग ती मुलगी नियोजित वराशिवाय दुसऱ्याला देत नाहीत. मुलीच्या कुडीतही जेवण, पैशांची वाटणी वगैरे गोष्टी होतात.

लग्नाच्या आदल्या दिवशी वराला प्रत्येक कुटुंबातील पुरुष एक रुपया अहेर करतो. मग काही पुरुष वराला घोड्यावर बसवून वधूच्या कुडीत नेतात. तिथे वधूपिता वराला एक पागोटे व उपरणे देतो आणि वर वधूसाठी रेशमी साडी, दुल्लडी, मणी व कंकण पाठवतो. वधू दुल्लडीशिवाय सर्व अलंकार घालते. दुल्लडी मात्र लग्नाच्या वेळी पुरोहित तिच्या गळ्यात बांधतो.

दुसऱ्या दिवशी वर वधूगृही जातो व होमकुंडापुढे चौरंगावर बसतो. वधूपिता वधूला त्याच्यासमोर आणून बसवतो आणि वधू-वरांचे हात एकमेकांच्या हाती देऊन कन्यादान असे म्हणतो. नंतर ब्राह्मण त्यांच्या वस्त्रांत एक रुपया, हळकुंड व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तांदूळ बांधतो व त्यांच्या पदरांची गाठ मारतो. नंतर वधू-वर अग्नीला तीन व घरातील एका पडद्याला चार, अशा सात प्रदक्षिणा घालतात. मग वधूकडील लोक वधूला अहेर करतात. त्यातून वधूला दागिने करतात. वरगृही आल्यावर वधू दोन तांब्यांत पाणी आणते. ते पाणी घरातील पाण्यात मिसळतात व नंतर त्या पाण्याने स्वयंपाक करतात. याचा अर्थ त्या कुळातील लोकांनी वधूचा आपल्या कुळात स्वीकार केला, असा होतो.

काही बंजारा लोकांत, सप्तपदीच्या वेळी सहा प्रदक्षिणा झाल्यावर वधू बोहल्यावरून पळून जाते व पुरोहित तिला धरून घेऊन येतो. अशा वेळी वधूकडील लोक पुरोहितावर तांदूळ, सुपाऱ्या किंवा लहान लहान दगडही फेकतात. पुरोहिताला जर यामुळे दुखापत झाली व तो ओरडू लागला, तर तो शुभशकुन मानतात. पुरोहिताने जर वधूला पकडून आणले, तर त्याला उच्चासनावर बसवून त्याची संभावना करतात.

काही ठिकाणी लग्नसमारंभ संपल्यावर वधू-वरांना बैलावर उभे करतात व बैल पळवितात. वधू-वरांपैकी जो कोणी प्रथम पडेल, तो प्रथम मरेल, असे समजतात.

काही बंजारा लोकांत, लग्न लागल्यानंतर रात्री वधू-वर दोन शेर डाळ-तांदुळाची खिचडी करतात. शिजविताना तिचा वास येऊ नये, म्हणून ते पदराने तोंड झाकून घेतात. शिजल्यावर खिचडी फक्त पुरुषांना वाढतात व उरलेली नदीत टाकतात किंवा गाईला खायला घालतात. या विधीला वाढी म्हणजे वृद्धीचा विधी असे नाव आहे.

दक्षिणेकडील काही बंजारा लोकांचा लग्नविधी पुढीलप्रमाणे असतो–

लग्नाच्या दिवशी वर मिरवीत वधूगृही जातो. तिथे भोजन केल्यावर वधू-वर रांगोळीने काढलेल्या चौकात समोरासमोर उभी राहतात. ब्राह्मण पुरोहित मंत्र म्हणतो व लोक त्यांच्यावर अक्षता टाकतात. ब्राह्मण न मिळाल्यास जातीतील एखादा पुरुष पौरोहित्य करतो. त्यानंतर वधूपिता सर्वांना मटणाचे जेवण देतो. वर वधूसह आपल्या घरी जातो. रात्री वर घराच्या एखाद्या रिकाम्या भागात उशाला नारळ घेऊन जमिनीवर झोपतो. वधू घरात दुसरीकडे एखाद्या वृद्ध स्त्रीजवळ बसलेली असते. नंतर वराची एखादी नातेवाईक स्त्री वधूजवळ जाते व नवऱ्याने तिला बोलावले आहे, असे सांगून त्याच्याजवळ तिला घेऊन जाते. त्याबद्दल तो त्या स्त्रीला नारळ देतो.

खानदेशात वराकडील लोक घोड्यावरून किंवा चालत वधूगृही जातात. लग्नमंडप आंब्याच्या आणि निंबाच्या पानांनी झाकलेला असतो. मंडपात पळसाचा किंवा उंबराचा एक खांब पुरलेला असतो व त्यावर दिवा पेटवून ठेवलेला असतो. त्या खांबाजवळ लग्नविधी होतो. लोक वधू-वरांवर हळदीच्या पाण्याने रंगवलेले जोंधळे टाकतात. नंतर होम होतो. वधू-वरांनी अग्नीभोवती पाच प्रदक्षिणा घातल्या, की विवाहविधी पुरा होतो.

मथुरिये आणि लमाण यांच्याशिवाय इतर बंजाऱ्यांत विधवा-विवाह होतो. चारण विधवेने दिराशी लग्न न करता दुसऱ्या कुणाशी लग्न केले, तर तिला दंड होतो. विधवाविवाहाचा विधी अगदी साधा असतो. वधू-वरांना एका रात्री एका खोलीत कोंडून ठेवले किंवा त्यांनी एका ताटात जेवण केले, की त्यांचे लग्न झाले, असे समजतात.

प्रसूतिप्रथा —— स्त्री गरोदर असता पतीने प्रेतवहन किंवा साहसकृत्ये करू नयेत, असा या लोकांत नियम आहे. भटक्या बंजारा लोकांत स्त्रीची प्रसूती वाटतच कुठेतरी होते. त्या वेळी इतर स्त्रिया तिला मदत करतात. या तांड्याला पुढे कुठेतरी ब्राह्मण भेटला, की त्याला मुलाची जन्मवेळ सांगून त्याच्याकडून मुलाची पत्रिका तयार करून घेतात. स्थायिक झालेले लोक प्रसूत होणाऱ्या स्त्रीसाठी निराळी झोपडी बांधतात. पाच दिवस जननाशौच पाळतात. सहाव्या दिवशी ती स्त्री कुडीतील सर्व मुलांना बोलावून त्यांचे पाय धुते व त्यांना जेवायला वाढते. नंतर ती आपल्या नवऱ्याच्या घरी जाते. काही लोक मूल जन्माला आले, की ढोल वाजवतात, बंदुका उडवतात आणि नातेवाइकांना साखर वाटतात. पाचव्या दिवशी सटीची पूजा करतात. या दिवशी पाच मुले व बाळंतीण यांच्या गळ्यांत व पायांत गव्हाच्या माळा बांधतात. घरापासून थोड्या अंतरावर होम करतात. काही स्त्रिया वाटेने गहू टाकीत टाकीत बाळंतिणीला होमापर्यंत नेतात.

देवधर्म —— शंकर, तुळजाभवानी व बालाजी ही बंजारांची कुलदैवते होत. यांशिवाय ते राम, मारुती, अंबाबाई, मरीअम्म, महाकाली, सती, शीतलादेवी, कालिका, आसावरी, बंजारीदेवी सेवाभाया व मिठुमुकिया या दैवतांनाही भजतात. बालाजीच्या नावाने ते आपल्या घरासमोर झेंडे उभारतात व त्यांची पूजा करतात. संकटाच्या वेळी किंवा नवसपूर्तीच्या निमित्ताने ज्येष्ठ पौर्णिमेला व दिवाळीत ते जुने झेंडे काढून नवीन लावतात. या दिवशी ते बैलांची व शेतीच्या अवजारांची पूजा करतात. प्रत्येक घरात उंच ठिकाणी एक खोगीर ठेवलेले असते. त्याला वंजारीदेवी म्हणतात व प्रवासाला निघताना तिची पूजा करतात. छत्तीसगडमध्ये दिवाळीत एका दगडाला शेंदूर फासून, त्याची बंजारीदेवी म्हणून पूजा करतात. सेवाभाया हा बंजाऱ्यांपैकी एक साधू होऊन गेला. त्याची समाधी अकोला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जिल्ह्यातील वाशीम तालुक्यातील पहूर गावी आहे. दर वर्षी दसऱ्यानंतर हजारो बंजारा प्रथम इथे येऊन समाधीची पूजा करतात व मग आपापले कामधंदे सुरू करतात. एक हात मुलाच्या मस्तकावर व दुसरा हात गायीच्या शेपटीवर धरून एखाद्या बंजाऱ्याने सेवाभायाची शपथ घतली, तर तो कधीही खोटे बोलत नाही. मिठुभुकिया हा पूर्वीच्या काळी प्रसिद्ध दरोडेखोर होऊन गेला. त्याच्या नावाने एक रिकामी झोपडी असते. गुन्हा करायला निघण्यापूर्वी ते त्याचा प्रसाद घेतात. पितरांनाही देवासमान मानून दर वर्षी त्यांच्या नावाने बकरा बळी देतात. चारण बंजारा गुरू नानकाला भजतात. मध्य भारतातील बंजारा बालाजीच्या नावाने एक बैल सोडतात. त्याच्या पाठीवर कधीही ओझे लादीत नाहीत. त्याच्या पाठीवर झूल व पायांत साखळ्या, घुंगरू वगरे घालून त्याला सजवतात. तो बैलांच्या तांड्याच्या पुढे चालतो. तो जिथे बसतो, तिथे तांड्याचा मुक्काम पडतो. तांड्यातली जनावरे आजारी पडली असता किंवा इतर संकटाच्या वेळी ते त्या बैलाची पूजा करतात व त्याला नवस बोलतात. बहुतेक तांड्यांत एखादा भगत असतोच. तो मांत्रिक असतो आणि कोणी आजारी पडल्यास तो मंत्र घालून रोग्याला बरे करतो. बंजाऱ्यांचा भुताखेतांवर फार विश्वास आहे. हे लोक होळी, दसरा व गोकुळाष्टमी हे सण विशेषत्वाने पाळतात.

धार्मिक व इतर गीते – लाखा बंजारा नावाचा एक परोपकारी पुरुष राजस्थानात होऊन गेला. दुष्काळाच्या वेळी आपल्याकडच्या धान्याचा सर्व साठा त्याने दुष्काळपीडित लोकांना वाटला व अनेकांचे प्राण वाचवले. त्याच्या औदार्याविषयी संबंधी काही गीते रचलेली आढळतात.

बंजारा लोकांना नृत्य व संगीत यांची फार आवड असते. नगारानृत्य, साप व मोर यांची नृत्ये, दोन्ही हातांचे नृत्य, एकटागेरो, उडारा, इ. त्यांची नृत्ये प्रसिद्ध आहेत.

गुरुकी आरदास, तुळजामारी ओ आरदास, बालाजीरो, आरदास इ. त्यांची धार्मिक गीते असून, ती लग्नप्रसंगी गातात.

मुलगी सासरी निघाली, की माहेर सोडताना तिला जे दुःख होते, ते त्यांच्या पुढील गीतात व्यक्त झाले आहे –

छुट गियायें मारी बापुरी हवेली
खायेशी पिवेशी नांगरी
मारी नायक बापुरी नांगरी
गुजराथनी थाडी उमरियाव बापु
केसरीया विरण्णा हवेल छोडीयाली थाडी

अर्थ – माझ्या बापाचे घर सोडून मी जाते. तिथे मला चांगले खायला प्यायला मिळत होते. माझ्या नायकाची व बापाची नगरी सोडून मी जाते. माझी आई गुजराथीण आहे. माझा पिता उमराव आहे. माझा भाऊ वीर आहे. त्या सर्वांना मी इथे सोडून जात आहे.

बंजारा स्त्रियांचे लोकनृत्य

महानवमी किंवा दसरा या दिवशी भवानीला उद्देशून ते पुढील गाणे म्हणतात –

अंधा दियें उमाभवानी तारे दारे
गडपर नौबत बाजे
आंधा दियें आंखी सदर भवानी तारे वारे
गडपर नौबत बाजे
वांझिया उमाभवानी तारे दारे
वारी गोदे

अर्थ — हे भवानी, तुझ्या दारी आंधळा उभा आहे. मी तुझ्या नावाने नौबत बाजवतो. आंधळ्याला डोळे दे. हे भवानी तुझ्या दारी मी नौबत वाचवतो. हे भवानी, तुझ्या दारी वांझ स्त्री आली आहे. तिला मूल होऊ दे.

मर्तिकप्रथा – विवाहित मृतांना जाळतात व अविवाहित मृतांना कोणताही विधी न करता पुरतात. विवाहित मृताच्या अंगावर नवीन वस्त्र घालतात. त्याच्या मुखात थोडे तूप व गूळ घालतात आणि त्याच्या वस्त्रात एक तांब्याचे नाणे बांधतात. मग प्रेत तिरडीवर ठेवून नेतात. अर्ध्या वाटेत तिरडी खाली वाकवतात व मृताच्या वस्त्राला बांधलेली गाठ सोडून त्यातले नाणे खाली पाडतात. मृताचा उत्तराधिकारी चितेला अग्नी देतो. मृतदेह जळल्यावर रक्षा व अस्थी गोळा करून पाण्यात टाकतात व सर्वजण मृताच्या घरी जातात. तिथे त्यांच्यासमोर जमिनीवर पाणी ओततात. तिसऱ्या दिवशी मृताचे नातेवाईक स्मशानात जातात व नंतर एखाद्या जलाशयाजवळ बसून गव्हाची खीर खातात. काही ठिकाणी या दिवशी जेवणावळ घालतात. गुजरातेतील बंजारा मृताच्या रक्षेवर व अस्थींवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुधाची धार सोडतात. काहीजण बाराव्या दिवशी आप्तेष्टांना जेवण घालतात. काहीजण शिमग्यात वार्षिक श्राद्ध करतात व त्या वेळी कावळ्यांना खायला घालतात किंवा सर्वजण मिळून एखाद्या पडिक जागी जाऊन तिथे माकऱ्या भाजून खातात; आप्तेष्टांना मेजवानी व ब्राह्मणांना दाने देतात. श्राद्धाच्या जेवणात मद्य व मांस नसते, म्हणून मार्गशीर्षपौर्णिमेला लोकांना मांसाचे भोजन देतात. काही ठिकाणी, तेराव्या दिवशी ज्ञातिबांधव मृताच्या मुलाला अर्धा बोकड देतात. त्याचे मांस शिजवून तो त्यांना मेजवानी देतो. असे न केल्यास, ज्ञातिबांधवांना त्याच्या घरी बारा वर्षेपर्यंत मांसभक्षण करता येत नाही. खानदेशातील बंजारा भाद्रपद महिन्यात महालय करतात. हे लोक मृताशौच पाळीत नाहीत. जे काही पाळतात, ते तीन दिवसच असते. पूर्वी ते एकसारखा प्रवास करीत असल्यामुळे त्यांच्यांत अशी पद्धत पडलेली असावी. [एन्सा. रि. ए.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; ट्रा. का. बॉं.; गु. जा.; गोर बंजारे लोकांचा इतिहास– बळीराम हिरामण पाटील, १९३६]

बंजिग कन्नड व तेलुगू व्यापाऱ्यांची एक जात. या लोकांची वस्ती म्हैसूर राज्यात आहे. संस्कृत वणिक् म्हणजे व्यापारी या शब्दापासून बंजिग हा शब्द निघाला आहे. हे लोक धान्य, मसाल्याचे पदार्थ, कापड, इ. वस्तूंचा व्यापार करतात. याशिवाय ते सावकारी व शेतीही करतात.

कन्नड बंजिगांचे शीलवंत किंवा चिलमी अग्नी, होलिआचिबाल्की, धूळपावड, चलगेरीबाल्की व लोकबाल्की असे भेद आहेत. कन्नड भाषेत होली म्हणजे नदी आणि आची म्हणजे पलीकडे. कृष्णा नदीच्या दक्षिणेकडे असलेल्या गावात होलिआचिबाल्कींची वस्ती आहे. धूळपावड हे आपल्या कपड्यांवर जंगमांची पायधूळ टाकतात. चलगेरीबाल्की हे शेतकरी आहेत. या सर्व लोकांचे धार्मिक विधी लिंगायतांप्रमाणे होतात.

तेलुगू बंजिगांमध्येही बरेच पोटभेद आहेत. त्यांतील कांहींची माहिती अशी –

(१) दास – हे लोक मुख्यत्वे चन्नपाटण इथे आढळतात आणि आपण जैनांतून वैष्णवांत आलो, असे सांगतात.

(२) एलु किंवा टोटा–हे लोक मुख्यत्वे विड्याच्या पानांची लागवड करतात.

(३) इदी – हे कापसाचा व्यापार करतात.

(४) गझुल किंवा शेट्टी – हे बांगड्या विकतात.

(५) राऊत किंवा ओप्पाना – हे आपण जुन्या विजयनगर राज्यातल्या सैनिकांचे वंशज आहो, असे सांगतात.

(६) मन्नूर – हे फिरते विक्रेते आणि भिकारी आहेत.

एलु आणि दास बंजिग कानडी भाषा बोलतात. राहिलेल्या लोकांची भाषा तेलुगू आहे.

यांच्यांत मुलीचा विवाह बहुधा ती वयात आल्यावर होत असला, तरी बालविवाहही रूढ आहे. घटस्फोट व विधवाविवाह निषिद्ध आहेत.

यांच्या जातप्रमुखाला देसादा शेट्टी असे म्हणतात. त्याला समाजात फार मान असतो. त्याची एक कचेरी असते. कचेरीत घंटा व पळी ही त्याची सन्मान चिन्हे असतात. ती उचलण्याचे काम होलेय जातीतले लोक करतात.

हे लोक मृतांना पुरतात. [म्हैसूर गॅझे.]

बंट द. कानडा जिल्ह्यातील एक जात. तुळू भाषेत बंट या शब्दाचा अर्थ शक्तिमान पुरुष किंवा शिपाई असा आहे. यावरून, हे लोक मुळात सैनिकी पेशाचे होते, हे कळते. सांप्रत या लोकांच्या मालकीच्या मोठमोठ्या जमिनी असून, हे लोक शेतीबागायतीचा व्यवसाय करतात. सुपारी व नारळ ही त्यांची मुख्य उत्पन्ने होत. बंट स्त्रियांना शेतीबागायतीची सगळी माहिती असते आणि आपल्या देखरेखीखाली त्या सर्व कामे करून घेतात.

बंट लोकांच्या चार मुख्य शाखा आहेत, त्या अशा–

(१) मासादिक– तुळुव प्रदेशातील बंट लोकांना हे नाव आहे.

(२) नाडव किंवा नाड – द. कानडा जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागात हे राहतात व कन्नड भाषा बोलतात.

(३) परिवार – यांच्यांत पैतृक वारसापद्धती चालते.

(४) जैन – यांनी जैन धर्म स्वीकारला आहे.

बंट लोकांच्या उत्पत्तीविषयी निश्चित माहिती मिळत नाही. पण इ. स. च्या पहिल्या काही शतकांत तुळुव प्रदेशात सारखी लढाई चालू असली पाहिजे व त्यासाठी अनेक लढाऊ लोकांची जरुरी असली पाहिजे, असे अनुमान करता येते. पुढे हेच लढाऊ लोक त्या प्रदेशातील जमिनीचे मालक बनले. पुरुषवर्ग लढाईत गुंतल्यामुळे त्यांच्या स्त्रियाच शेतीची देखभाल करू लागल्या आणि या कारणामुळेच त्यांच्यांत मुलीकडे वारसा जाऊ लागला. हे लढाऊ लोकच पुढे बंट म्हणून ओळखले जाऊ लागले असावे.

बंट लोक मांसाशन करतात. त्यांच्यांतली जी कुटुंबे प्रतिष्ठित होतात, त्यांना बल्लाळ असे म्हणतात. अशा कुटुंबांतील प्रमुख मांसभक्षण करीत नाहीत. ते गळ्यात जानवेही घालतात.

बंट लोकांना मैदानी खेळांची विशेष आवड आहे. फूटबॉल, रेड्यांच्या शर्यती व कोंबड्यांच्या झुंजी हे त्यांचे आवडते खेळ आहेत. दिवाळी, संक्रांत, गोकुळाष्टमी, इ. सणांच्या अनुषंगाने हे लोक मोठ्या प्रमाणावर कोंबड्यांच्या झुंजी लावतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाहप्रथा – सर्वसाधारणपणे मुलींचे विवाह त्या वयात आल्यानंतर होतात. वधूची पसंती झाल्यावर निश्चयतांबूल नामक एक समारंभ करतात. त्या वेळी वराकडील मंडळी मुलीच्या घरी जातात. तिथे त्यांना मेजवानी मिळते. मग उभय पक्षांचे प्रमुख लग्नाची बोलणी करतात आणि एकमेकांना पानसुपारी देतात. विवाहसमारंभ वधूच्या किंवा वराच्या घरी होतो. प्रथम नवरा मुलगा लग्नमंडपात येतो आणि एका ठिकाणी बसतो. तिथे गावचा न्हावी त्याची हजामत करतो. मग तो स्नान करतो. त्यानंतर वधू-वरांना लग्नमंडपात नेतात. ती दोघे मग त्यांच्या बसायच्या जागेभोवती तीनदा प्रदक्षिणा घालतात आणि एकमेकांशेजारी बसतात. विवाहाचा मुख्य विधी धारे पद्धतीने करतात. वधू आपला उजवा हात वराच्या उजव्या हातावर ठेवते. त्यावर चांदीचा कलश ठेवतात. मग त्याला वधू-वरांचे आई-बाप, दोन्ही कुटुंबांचे प्रमुख व ग्राममुख्य हात लावतात आणि वधू-वरांच्या हातांसह तो कलश तीनदा खाली वर करतात. काही ठिकाणी कलशातील पाणी वधू-वरांच्या हातांत ओततात. हे कन्यादानाचे द्योतक मानतात. त्यानंतर जमलेली मंडळी वधू-वरांना बारा मुलगे व बारा मुली होवोत, असा आशीर्वाद देतात. वधू-वरांसमोर मग एक तांदळांनी भरलेले व दुसरे रिकामे ताट ठेवतात. त्यांचे आप्तेष्ट एका ताटातील अक्षता त्यांच्या मस्तकांवर टाकतात व रिकाम्या ताटात चार आणे ठेवतात. नंतर नवरा मुलगा वधूला काही रोख रक्कम देतो. पत्नीने पुढे पतीला सोडले किंवा घटस्फोट घेतला, तर तिला ही रक्कम परत करावी लागते. लग्नानंतर काही दिवसांनी वधूला नवऱ्याच्या घरी नेतात. तिथे ती नवऱ्याला जेवायला वाढते आणि तो तिला काही रक्कम देतो. त्यानंतर ती दोघे पति-पत्नी म्हणून एकत्र राहू लागतात.

काही बंट लोकांचा विवाहविधी जरा निराळा आहे, तो असा–न्हावी पाण्याऐवजी दूध लावून नवऱ्या मुलाची दाढी करतो आणि त्या वस्तऱ्याने वधूच्या कपाळाला स्पर्श करतो. मग वधू-वर स्नान करतात व नवे कपडे घालतात. लग्नमंडपात एक पाट मांडलेला असतो. त्याच्यावर धोबिणीने धुवून आणलेले कापड अंथरतात. जवळच तांदूळ, दिवा व पानसुपारी यांचे एक ताट असते. एक मुलगी हातात दिवा व तांदळांनी भरलेले माप ठेवलेले ताट घेते. तिच्या मागून नवरा मुलगा, त्याचा भाऊ, त्याची बहीण आणि वधू अशी मंडळी लग्नमंडपात येतात. तिथे तांदूळ व दिवा असलेल्या ताटाभोवती वधू-वर पाच वेळा प्रदक्षिणा घालतात व पाटावर बसतात. नंतर जातिप्रमुखाच्या कुटुंबातील वडीलधारी स्त्री वधू-वरांच्या समोर तांदुळांनी भरलेले एक ताट आणून ठेवते व त्यातले थोडे तांदूळ त्यांच्या मस्तकावर टाकते. नंतर जमलेले स्त्री-पुरुष वधू-वरांना काही रक्कम देतात. जातिप्रमुख व वधूचा चुलता हे तिचा उजवा हात वराच्या उजव्या हातात देतात आणि त्यांच्या हातांत तीनदा जलकलश ठेवतात. नंतर एका माडाच्या बुंध्याशी तो कलश रिकामा करतात.

विधवाविवाहाच्या वेळी वधू-वरांच्यामध्ये अंतरपाट धरतात. वधू-वरांचे हात जुळवणे, एवढाच विधी त्या वेळी करतात.

मुलगी प्रथम ऋतुमती झाली, की एक समारंभ करतात. त्यासाठी अंगणात पाच असोले नारळ ठेवतात व त्यांवर बांबू बसवतात. मग त्या बांबूंवर ऋतुमतीला बसवतात. तिच्या भोवती पाणी, विड्याची पाने, सुपाऱ्या यांनी भरलेली चार पात्रे ठेवतात व सुवासिनी ती पात्रे तिच्या मस्तकावर ओततात. मग तिला एका स्वतंत्र खोलीत ठेवतात. जमलेल्या स्त्रियांना कोंबडी व मासे यांची मेजवानी देतात. असोले नारळ धोबिणीला देतात. चौथ्या दिवशी मुलगी स्नान करून शुद्ध होते. त्या वेळी जमलेल्या लोकांना गूळपोहे वाटतात.

मर्तिकप्रथा – हे लोक सर्वसाधारणपणे मृतांना जाळतात. पण लहान मुले, कुष्ठरोगी व साथीच्या रोगाने दगावलेले यांना पुरतात. मृत्यूची बातमी होलेय जातीचा माणूस लोकांना कळवतो. मग सुतार काही गायकांसह आंब्याचे लाकूड तोडायला निघतो. कारण तिरडीला आंब्याचेच लाकूड असले पाहिजे, असा त्यांच्यांत नियम आहे. मृताला स्नान घालून व नवे कपडे नेसवून गात गात स्मशानात नेतात. न्हावी अग्नीचे मडके धरतो. स्मशानात गेल्यावर मृताच्या अंगावरील नवे कपडे न्हावी, धोबी, सुतार, बिल्लव व होलेय यांना वाटून देतात. बिल्लव चितेला अग्नी देतो. तिसऱ्या दिवशी मृताचे नातेवाईक स्मशानात जातात आणि न्हावी व धोबी मृताच्या रक्षेवर पाणी शिंपडतात. काही दिवसांनी मृताला जाळलेल्या जागेवर न्हावी, धोबी व सुतार बांबू व पोफळी यांचे एक स्मारक बांधतात. कापड, फळे, शहाळी, ऊस, फुले, आंब्याचे टाळे, इ. वस्तूंनी ते स्मारक सजवतात. मग त्याच्या भोवती कुंपण उभारतात. मृताचे पुत्र व नातेवाईक हळदीने रंगवलेले तीन पिंड फडक्यात बांधून घेऊन व हळदीने पिवळे केलेले तांदूळ, हिरव्या केळ्याचे काप, भोपळा व नारळ हे पदार्थ घेऊन तिथे जातात. स्मारकाभोवती तीन प्रदक्षिणा घालतात व पिवळे तांदूळ स्मारकावर टाकतात. सर्वजण स्नान करून घरात येतात. घरात एका कापडावर मृताचे कपडे व दागिने ठेवतात. जवळच आढ्याला एक हळकुंड टांगून ठेवतात व त्याच्याखाली हळदीने रंगवलेल्या पाण्याचे पात्र ठेवतात. त्याच्याभोवती स्त्रिया बसतात. मग एक नारळ फोडतात व त्याचे पाणी न्हावी आंब्याच्या पानाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या स्त्रियांच्या अंगावर शिंपडतो. दुसऱ्या दिवशी अनेक पदार्थ शिजवून ते एका खोलीत पानांवर वाढतात. जवळच नवे कापडही ठेवतात. हे कापड घरात दुसरा मृत्यू होईपर्यंत दर वर्षी बदलतात. नवव्या, अकराव्या किंवा तेराव्या दिवशी मोठी जेवणावळ घालतात. दर वर्षी श्राद्ध करतात.

नाडव किंवा मासादिक बंट एखाद्या शेतात मृताला जाळतात. ते मृताच्या खोलीत पाण्याचा तांब्या व दिवा ठेवतात. नवव्या, अकराव्या किंवा तेराव्या दिवशी मृताचे श्राद्ध होईपर्यंत दिवा सतत पेटत ठेवतात व तांब्यातले पाणी दिवसातून दोनदा बदलतात. श्राद्धाच्या दिवशी तांब्याची व चांदीची नाणी आणि सोन्याचे लहानसे तुकडे त्या शेतात पुरतात. मृत मनुष्य प्रतिष्ठित असेल, तरच जाळलेल्या जागेवर त्याचे स्मारक उभारतात. [का. ट्रा. स. इं.]

बंडलम्म द. भारतातील एक ग्रामदेवता. बंडलचा अर्थ तमिळनाडमध्ये बैलगाडी असा होतो. प्रवासात बैलगाड्यांचे रक्षण करणारी देवता म्हणून तिला हे नाव प्राप्त झाले आहे. मुळात ती चंदलूर गावची देवता होती. पुढे ती एका गाडीवानांच्या ताफ्याबरोबर निघाली आणि रावुरू येथे आली. रावुरू येथे हिची वार्षिक जत्रा भरते. जत्रेच्या वेळी भक्त मंडळी पूर्वी गळ टोचून घेत असत. पण अलिकडे ही प्रथा बंद पडत चालली आहे. त्याचबरोबर या देवतेचे माहात्म्यही कमी होत चालले आहे. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

बंदनपरब बंगालमधील एक लोकोत्सव. हा उत्सव प्रामुख्याने गुरांशी संबंधित आहे. बंगालमधील लोढा महतो व कोरा या वन्य जमाती दिवाळीच्या पाडव्यापासून पुढे दोन–तीन दिवस हा उत्सव साजरा करतात. अन्य जमातीही या उत्सवात भाग घेतात. उत्सवाच्या पहिल्या दिवसाला म्हणजे पाडव्याला जागन किंवा जागायचा दिवस म्हणतात. सर्व स्त्री-पुरुष त्या रात्री जागरण करतात आणि माडल नावाच्या वाद्याच्या साथीवर गाणी म्हणत नाचतात. यावेळी तांदुळापासून केलेली दारूही ते पितात.

त्या रात्री स्त्रिया तांदुळाच्या जाड भाकरी करतात आणि दिवस उजाडण्याच्या बेतात त्या घेऊन गोठ्यात जातात. तिथे प्रत्येक गायीच्या तोंडात भाकरीचा घास देत देत, त्यांचे दावे सोडतात. 'तू गरीबाच्या घरी आली असलीस तरी पोटभर खावेस अशी आमची इच्छा आहे' असे त्या वेळी त्या म्हणतात. घरातील कर्ता पुरुष दिवसभर उपवास करतो. तो दुपारी स्नान करून नवीन कपडे घालतो व गाईंची भगवती देवी म्हणून पूजा करतो. पूजा झाल्यावर तो देवीच्या नावाने कोंबड्याचा बळी देतो आणि देवीची प्रार्थना करतो. 'आई भगवती ! मुले-बाळे, गायी–गुरे, सुखी असू देत. क्रूर श्वापदांपासून, सापांपासून व साथीच्या रोगांपासून तू आमचे रक्षण कर.'

सायंकाळी गुरे गोठ्यात येण्याच्या वाटेवर रांगोळ्या घालतात, दूर्वा पसरून ठेवतात आणि त्या वाटेने गुरे गोठ्यात आली म्हणजे देवीचे आगमन झाले, असे समजतात.

नंतरचा दिवस हा खास नाचण्याचा दिवस असतो. त्यासाठी गावातील लोक एका मैदानात जमतात, तिथे बांबूचे काही खुंट पुरून त्यांना घष्टपुष्ट बैल बांधतात आणि त्यांच्या भोवती फेर धरून नाचतात. [इं. फो. लो., सप्टें.- डिसें. १९५६]

बंदासिंह (१६६० – १७१६ इ. स.) शीख पंथातील एक शूर पुरुष व गुरू गोविंदसिंहाचा उत्तराधिकारी याचा जन्म काश्मीरातील राजौरी नामक एका लहानशा गावी राजपूत कुलात झाला. याच्या पित्याचे नाव रामदेव असून, याचे मूळ नाव लक्ष्मणदेव असे होते. याला शिकारीचा नाद होता एकदा याने ज्या हरिणीची शिकार केली, ती हरिणी गर्भवती होती. लक्ष्मणदेवाचा बाण पोटात घुसल्यामुळे ती अवेळीच प्रसूत झाली व तडफडत मेली. ते करुण दृश्य पाहून लक्ष्मणदेवाला उपरती झाली. त्या क्षणापासून त्याने वैराग्य धारण केले. मन:शांतीसाठी भटकत असतानाच जानकीप्रसाद नामक एका साधूने त्याला गुरूपदेश दिला व त्याचे नाव माधवदास असे ठेवले. यानंतर तो रामथम्मन नावाच्या दुसऱ्या गावी जाऊन एकांतात राहिला.

पुढे तो साधू-बैराग्यांबरोबर नासिक पंचवटीच्या यात्रेला गेला. पंचवटी येथे त्याने १२ वर्षे तप केले. तिथल्या वास्तव्यात त्याने औघडनाथ नामक एका नाथयोग्याची खूप सेवा केली व त्याच्याकडून जादूविद्या शिकून घेतली.

पंचवटी सोडल्यानंतर माधवदास नांदेड येथे आश्रम बांधून राहिला. याच वेळी गुरु गोविंदसिंह तिथे वास्तव्याला आले होते. माधवदासाची कीर्ती ऐकून एक दिवस ते त्याच्या भेटीला आले. परस्परांचा परिचय झाल्यावर दोघांनाही एकमेकांविषयी जिव्हाळा निर्माण झाला. गोविंदसिंहांनी हिंदुत्वरक्षणार्थ इस्लामी राज्यकर्त्यांशी घेतलेल्या कडव्या झुंजीचा वृत्तांत ऐकून माधवदास प्रभावित झाला व आपणही असे काही भव्य दिव्य करावे, असे त्याला वाटू लागले. गोविंदसिंहांना त्याने आपली इच्छा सांगितली आणि त्यांनी आपल्याला मार्गदर्शन करावे म्हणून त्यांची सेवाही आरंभिली. स्वत:ला तो त्यांचा बंदा (दास) म्हणवून घेऊ लागला. गोविंदसिंहांनाही या वेळी आपले कार्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुढे चालवायला कोणी वारस हवा होताच. माधवदासाची निष्ठा पाहून त्यांनी त्याला आपला उत्तराधिकारी केले. यापुढे माधवदासाचे नाव बंदासिह किंवा बंदा बैरागी असे रूढ झाले.

बंदासिह

त्यानंतर गोविंदसिंहांनी त्याला इस्लामी अत्याचाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी व शीख पंथाच्या प्रसारासाठी पंजाबकडे पाठवले. आपल्या सर्व अनुयायांनी या कामी बंदाला साहाय्य द्यावे, अशा आशयाची पत्रेही त्यांनी बंदाबरोबर दिली.

बंदा प्रथम दिल्लीकडे निघाला. दिल्लीजवळ पोचल्यावर त्याने आसपासच्या सर्व शीख सरदारांना एकत्र करून गोविंदसिंहांची पत्रे दाखविली व आपल्या भावी मोहिमेची योजना त्यांना सांगितली. मग तो सरहिंदवर चालून गेला. या वेळी त्याच्याजवळ चाळीस हजार शीख सेना होती.

सरहिंदच्या वझीरखान नामक सुभेदाराने पूर्वी गोविंदसिंहाच्या दोन मुलांना भिंतीत चिणून ठार मारले होते. त्यामुळे सरहिंद येथे पोचताच बंदाने प्रथम वझीरखानावर हल्ला चढवून त्याचा शिरच्छेद केला. वझीरखानाच्या मृत्यूने मुसलमानी सैन्यात एकच हलकल्लोळ झाला व जो तो जीवभयाने पळू लागला. परंतु बंदा व त्याचे सैनिक यांनी त्यांचा पाठलाग करून त्यांची कत्तल केली.

यानंतर जिंकलेल्या मुलखाचा बंदोबस्त करण्यासाठी बादसिंह नामक एका सरदाराला बंदासिहाने सरहिंदचा सुभेदार नेमले व तो पुढे निघाला. साधुरा गावाजवळ एक डोंगरी किल्ला होता. बंदाने त्याला लोहगड असे नाव देऊन ते आपल्या राजधानीचे ठिकाण केले. इथेच त्याने नवी नाणी पाडली. स्वतःला तो राजा न समजता गुरू नानक आणि गोविंदसिंह यांचा प्रतिनिधी समजत असल्यामुळे त्याने नव्या नाण्यावर 'नानकांची तलवार विजयी आहे' अशा अर्थाची अक्षरे कोरून घेतली. नाण्यांप्रमाणेच त्याने स्वतःची राजमुद्राही बनवली. या राजमुद्रेवर कढईचे आणि तलवारीचे चित्र, तसेच विजय, आशीर्वाद व गुरू गोविंद ही अक्षरे त्याने कोरली. कढई म्हणजे अन्नदान व तलवार म्हणजे अभय व विजय अशी या दोन प्रतीकचित्रांमागची कल्पना होती.

त्या काळी पंजाबातले जमीनदार आपल्या कुळांवर अत्यंत जुलूम करीत बंदाला हे कळताच त्याने तत्काळ जमीनदारीची पद्धती नष्ट केली व तीही मोठ्या नाट्यपूर्ण रीतीने. गोष्ट घडली, ती अशी– एकदा साधुरा गावातले बरेच शेतकरी बंदाकडे येऊन जमीनदारांच्या जुलुमाविषयी तक्रारी करू लागले. तेव्हा बंदा एकदम संतापला व त्याने आपल्या सरदारांना त्यांच्यावर गोळ्या झाडण्याचा हुकूम केला. बंदाच्या या अनपेक्षित वागणुकीने शेतकरी घाबरले. त्यांच्या नेत्याने बंदाची पायधरणी केली. तेव्हा बंदा म्हणाला, 'तुम्ही सगळे नामर्द आहात तुमची संख्या सहस्रांची असूनही तुम्ही मूठभर जमीनदारांच्या अन्यायाविरुद्ध तक्रार करीत इथे आला, त्यापेक्षा परस्पर आपल्या गाऱ्हाण्यांचा निकाल का केला नाही?' बंदाच्या या सूचक उद्गारांचा त्या शेतकऱ्यांना योग्य तो बोध झाला व त्यानंतर त्यांनी केलेल्या असहकारामुळे त्या सर्वच प्रदेशातील जमीनदारी बंद झाली.

सरहिंदच्या विजयामुळे कर्नाळपासून लुधियानापर्यंतचा छत्तीस लक्षांचा मुलूख बंदाच्या ताब्यात आला. बंदाने त्या सर्व प्रदेशाची चोख शासन व्यवस्था लावली. बंदाच्या विजयाने ठिकठिकाणचे शीख सैनिक बंड करून उठले व त्यांनी त्या त्या प्रदेशांतली मुसलमानी सत्ता मोडून टाकली दि. १२ ऑक्टोबर १७१० या दिवशी जालंधरजवळच्या रेहा गावी शीख–मुसलमानांची मोठी लढाई होऊन तीत मुसलमानांचा पराभव झाला व यमुनेपासून सतलुजपर्यंतचा पंजाबचा विस्तीर्ण भूभाग बंदाच्या अमलाखाली आला. यानंतर बंदाच्या सैनिकांनी लाहोरपर्यंत मुसंडी मारली; पण त्यांना लाहोर मात्र जिंकता आले नाही.

अशा प्रकारे शीख सैन्य विजयी होत असता मुसलमानही स्वस्थ बसले नव्हते. लौकरच दिल्लीचा मोगल बादशाहा बहादूरशाहा हा सुमारे साठ हजार सेनेनिशी शिखांच्या पारिपत्यासाठी पुढे सरसावला. आरंभी त्याला शिखांनी दाद दिली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाही. परंतु शेवटी त्याने बंदा आणि त्याचे सैन्य यांना लोहगडाजवळ गाठले व लोहगडाला वेढा घातला. त्यामुळे बंदाची चांगलीच कोंडी झाली. त्याला बाहेरून सैन्याची किंवा अन्नधान्याची कोणतीच मदत होईना; त्यामुळे काही दिवस जवळची जनावरे मारून त्यांच्या मांसांवर त्याला आपला व सैनिकांचा उदरनिर्वाह करावा लागला. परंतु हेही फार दिवस चालण्यासारखे नसल्यामुळे शेवटी तो गुप्त वेषाने आपल्या निवडक सहकाऱ्यांसह तिथून निसटला व मागे उरलेले सैनिक शरण गेले. बहादुरशाहाला हा मोठाच विजय मिळाला. तथापि बंदा हाती न लागल्यामुळे तो संतापला व त्याने बंदाचा वेगाने पाठलाग चालविला. पण बंदाने या वेळी शेजारच्या डोंगरी राजांच्या मदतीने गनिमी युद्धाचा अवलंब करून पार जम्मूपर्यंत धडक मारली होती. इ. स. १७११ च्या जूनमध्ये त्याने जम्मू जिंकले व आसपासची रायपूर, बेहरामपूर, बटाला ही शहरेही हस्तगत केली. मग बंदाच्या या आंदोलनाला कायमचा पायबंद घालावा या उद्देशाने बहादूरशाहाने जम्मूकडे बरेच सैन्य पाठवले. पण थोड्याच दिवसांत बहादूरशाहा मृत्यू पावला.

त्याच्या नंतर दिल्लीचा बादशाहा झालेल्या फरुखशायरने अबदुर समदखान किंवा दिलेरजंग याला बंदाच्या पारिपत्यासाठी पाठवले. इ. स. १७१५ साली त्याची व बंदाची गुरुदास नंगल या गावी मोठी लढाई झाली. परंतु शिखांचा मोड झाला नाही. सतत आठ महिने मोगलांच्या वेढ्यात कोंडून पडल्यावरसुद्धा बंदा शरण येण्याचे लक्षण दिसेना. शेवटी ७ डिसेंबर १७१५ रोजी मोगल सैन्य गढीत घुसले व त्याने बंदासह उरलेल्या शीख सैनिकांना कैद केले. दुसऱ्या दिवशी त्यांपैकी तीनशे शिखांची रावीच्या तीरावर कत्तल करण्यात आली. बंदा आणि इतर शेकडो शीख सैनिक यांची लाहोरच्या रस्त्यातून उंटावरून धिंड काढून झाल्यावर शेवटी त्यांना दिल्ली येथे नेण्यात आले.

दिल्लीत प्रतिदिवशी १०० याप्रमाणे सतत ७ दिवस शिखांचा नरमेध चालू झाला. शेवटच्या दिवशी बंदाला लोखंडी पिंजऱ्यातून मिरविण्यात आले. शेवटी त्याच्या मुलाला त्याच्या समोर क्रूरपणे ठार मारण्यात येऊन त्याचे मांस बंदाच्या मुखात कोंबण्यात आले. पण बंदा स्थिर होता, शांत होता. मुसलमान धर्म स्वीकारण्याच्या अटीवर त्याला मुक्त करण्यात येणार होते. परंतु त्याने ते नाकारले व प्राप्त झालेला मृत्यू धीरोदात्तपणे स्वीकारला.

शिखांच्या शौर्यशाली इतिहासात बंदाचे स्थान अत्यंत श्रेष्ठ आहे. कित्येक तत्कालीन इतिहासकारांनी त्याचे चित्रण एक क्रूरकर्मा म्हणून केलें असले, तरी तो निर्दय नव्हता, तर अत्यंत शूर, स्वाभिमानी व निष्ठावंत असा धर्मवीर होता, यात तिळमात्र शंका नाही. [शि. इ.; सि. इ.; शी. लो. सं. इ.]

बंदिशाळा याला तुरुंग असेही म्हणतात. सर्व तुरुंग राजरस्त्यावर असावे, असे मनूने सांगितले आहे (९·२८८). अशा मोक्याच्या जागी तुरुंग असले म्हणजे बंदिजनांचे तिथे होणारे हाल जनतेला दिसतील व जनता गुन्हेगारीपासून परावृत्त होईल, असेही मनूने म्हटले आहे. बंदिखान्यात पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी स्वतंत्र जागा असावी, असे कौटिल्याचे मत आहे (२·५). पूर्वी राज्याभिषेक, पुत्रजन्म, युद्धात विजय मिळणे, इ. विशेष प्रसंगी राजेलोक कैद्यांना बंधमुक्त करीत. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला व राजाच्या जन्मदिवशी कैद्यांना मुक्त करावे; त्याचप्रमाणे बाल, वृद्ध किंवा व्याधिग्रस्त कैद्यांना, तसेच ज्यांचे वर्तन चांगले आहे त्यांनाही शिक्षेची मुदत भरण्याआधी सोडावे, असे कौटिल्य म्हणतो (२·३६). प्राचीन काळी बंदिवानांचा फार छळ केला जात नसावा. मध्ययुगात मात्र सत्तासंघर्षांत अपयशी ठरलेल्या पुरुषांना खडतर कारावास भोगावा लागत असे. तिथे त्यांचा गुप्तपणे व क्रूरपणे छळ होत असे. त्यासाठी इतिहासकाळात किल्ल्यांचा तुरुंगासारखा उपयोग करीत. [हि. ध.]

बंदूक गोळी वेगाने फेकून मारण्यासाठी वापरले जाणारे नळीचे शस्त्र. बंदूक हा शब्द अरबी भाषेतून आला आहे. अग्नियुक्त शस्त्र असा त्याचा अर्थ आहे. नळीच्या एका भागात स्फोटक पदार्थ ठासून भरलेला व त्याच्यापुढे शिशाची गोळी, असे या शस्त्राचे सामान्य स्वरूप आहे. दारूच्या स्फोटामुळे गोळी नळीतून वेगाने बाहेर पडून लक्ष्यावर आघात करते. अग्निचूर्ण बनवून ते अशा प्रकारे वापरण्याची रीत भारतीय लोकांना प्राचीन काळी माहीत होती, असे काही पंडितांचे मत आहे. अथर्ववेदातील चोरनाशन सूक्तात (१·१६·१–४) सीस म्हणजे शिसे वापरून चोरांना मारण्याची कल्पना आहे. पं. सातवळेकरांच्या मते सीस म्हणजे शिशाची गोळीच त्या काळी वापरली जात असावी.

ऐतरेय ब्राह्मणात (१·४·८) अग्निबाणाचे, त्याचप्रमाणे रामायणात व महाभारतात अग्न्यस्त्राचे वर्णन आढळते. शुक्रनीतिसार या ग्रंथात अग्निचूर्ण व नालास्त्र यांचा उल्लेख आहे. परंतु तो भाग कालांतराने त्यात घुसडलेला असावा, असे पंडितांचे मत आहे. इ. स. च्या १२ व्या शतकातील वासिष्ठ धनुर्वेदात नाराच, नालिका, इ. आयुधांचे वर्णन आढळते; पण ते भिन्न प्रकारचे बाणच होते. प्राचीन काळी भारतात भिन्न प्रकारची अग्नियुक्त शस्त्रे व अग्न्यस्त्रे वापरली जात असली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तरी इ. स. १४०० च्या पूर्वी बंदुकीचा उपयोग केला गेल्याचा उल्लेख कुठेही आढळत नाही. रंजक किंवा अग्निचूर्ण म्हणजे स्फोटक पदार्थ ज्ञात असला, तरी त्याच्या साहाय्याने नळीतून गोळी मारण्याचा शोध लागला नव्हता.

बंदुकीचा शोध युरोपात इ. स. १३२५ च्या सुमारास लागला. इ. स. १४०६ साली एक चिनी प्रवासी भारतात



बंदूक

आला होता. त्याने आपल्या प्रवासवर्णनात बंगालमध्ये बंदुका पाहिल्याचा उल्लेख केला आहे. त्यानंतरच्या १००–१५० वर्षांतील ग्रंथांत स्फोटक दारूची वर्णने आहेत, पण बंदुकीचा उल्लेख कुठेही नाही. इ. स. १५५० च्या नंतरच्या आकाशभैरवतंत्र नामक ग्रंथात विजयनगरच्या राजांच्या शस्त्रसंभारात नालिकास्त्र असल्याचा उल्लेख आहे. पोर्तुगीजांच्या आगमनानंतर भारतात बंदुकीचा उपयोग सुरू झाला.

तोफा– रामायण, हरिवंश, अर्थशास्त्र, इ. ग्रंथांत शतघ्नी नामक शस्त्राचा उल्लेख आढळतो. श्री. रामचंद्र दीक्षितार यांच्या मते शतघ्नी म्हणजे शंभर माणसांना ठार मारायला समर्थ असे यंत्र होय. लोखंडी खिळचांनी मढवलेला दगडाचा किंवा लाकडाचा मोठा खांब, असे त्याचे स्वरूप होते. कौटिल्याने याच अर्थाने शतघ्नी हा शब्द वापरला आहे. कालांतराने अग्नियुक्त शस्त्र असा अर्थ त्याला प्राप्त झाला. त्यावरून शतघ्नी म्हणजे तोफ असे मानले जाते.

मोगल बादशाहा बाबर याने प्रथम इ. स. १५२६ मध्ये भारतात तोफा वापरल्या, अशी समजूत होती. पण इ. स. १३६५ त राक्षसतंगडीच्या युद्धात विजयनगरच्या राजाने शेकडो तोफा वापरल्या होत्या, असे मुस्लिम इतिहासकारांचे मत आहे. बाबरापूर्वी हिंदुस्थानात तोफांचा वापर झाल्याची अनेक उदाहरणे नद्वीने दिली आहेत. इ. स. १५९६च्या सुमारास रुद्रकवीने रचलेल्या राष्ट्रोढ्ध्वंस महाकाव्यात तोफातून सुटलेल्या लाल गोळयांचे वर्णन केलेले आहे. पुढे शिवाजीमहाराज आणि पेशवे यांनी महाराष्ट्रात तोफांचे कारखाने सुरू केले. गडांच्या संरक्षणार्थ त्याच्या बुरुजांवर प्रचंड तोफा कायमच्या बसवीत. रणक्षेत्रासाठी मात्र गाडीवर वाहून नेण्याजोग्या हलक्या तोफा बनवीत. [प. कृ. गोडे – न्यू इं. अँ. जून १९३९; त्रिपथगा – ऑगस्ट १९६४; हि. क. इं. पी. ६; वे. रा. द.]

बंध

(१) संसारपाश म्हणजे बंध होय. सर्वदर्शनसंग्रहात अविद्येलाच बंध म्हटले आहे. या अविद्येमुळे जीव स्वतःला स्थूल–कृश, उच्च–नीच, सत्कृत–तिरस्कृत अशा प्रकारे मानतो आणि इंद्रियादिकांच्या धर्मांचा आरोप स्वतःवर करून त्यामुळे सुखी अगर दुःखी होतो. हे सारे अविद्येतून निर्माण झालेल्या अध्यासामुळे घडते. अध्यास हा कर्तृत्व आणि भोक्तृत्व यांचा प्रवर्तक आहे. जेव्हा जीवाला आत्मज्ञान होते, तेव्हा देहादिसंबंधाने उत्पन्न झालेली सुख-दुःखे त्याला बाधा करू शकत नाहीत. यावरून आत्मज्ञानाचा अभाव हा बंध आणि आत्मज्ञान हा मोक्ष, असे ठरते. समस्त दर्शने आत्म्याच्या बंधाचे स्वरूप सांगून, त्याला मुक्त करण्यासाठी प्रवृत्त झाली आहेत. त्यासाठी वेदान्तशास्त्रात नित्य कर्मांचे अनुष्ठान, नित्यानित्यवस्तुविवेक, ऐहिक व पारलौकिक फलभोगांविषयी विरक्ती गुरुशास्त्राधिगम, इ. साधने सांगितली आहेत.

वायू पुराणात प्राकृत, वैकारिक आणि दक्षिण असे तीन बंध मानले असून, त्यांची उत्पत्ती अज्ञानातून होते, असे सांगितले आहे (१०२.५९–६०). जैनांनी प्रकृती, स्थिती, अनुभाव व प्रदेश हे बंधाचे चार प्रकार मानले असून, हा बंध आत्म्याच्या मिथ्या दर्शनातून होतो, असे सांगितले आहे. [भा. द. सं.]

(२) हठयोगशास्त्रात आसनांच्या प्रकारातले काही बंध सांगितले आहेत. योगबंध, महाबंध, महावेध, उड्डियान, मूलबंध, जालंधरबंध, इ. त्यांची नावे आहेत. कुंभकाच्या वेळी प्राणनिरोध करीत असता नवद्वारांपैकी काही द्वारे बंद करावी लागतात. त्यासाठी या यौगिक बंधांचा फार उपयोग होतो. शरीरातील एखाद्या विशिष्ट भागातून वायू खेचून घेऊन दुसऱ्या एखाद्या भागात स्थिर करण्यासाठीही बंधांचा उपयोग होतो. प्राणायामात सिद्धी मिळायला हवी असेल तर बंधांचा अभ्यास आवश्यक आहे. [योगविद्या]

(३) काव्यशास्त्रात वर्णरचनेचे काही बंध सांगितले आहेत. ते शब्दालंकारांत गणले जातात. दंडीने काव्यादर्शात गोमूत्रिका, अर्धभ्रम, सर्वतोभद्र, असे काही बंध तपशीलवार सांगितले आहेत (३. ३८. ८२). अग्नी पुराणात बाण, बाणासन, व्योम, खड्ग, मुद्गर, शक्ती, मृदंग, पद्म, मुसल, अंकुश, इ. बंधांचे वर्णन देऊन बंध हे अनंत आहेत, असे सांगितले आहे. मम्मटाने खड्ग, मुरज, पद्म व सर्वतोभद्र या बंधांची उदाहरणे दिली आहेत. विशिष्ट प्रकारे वर्णरचना करून बाण, खड्ग, इ. आकृती बनविणे, असे बंधाचे स्वरूप असते. अशा काव्याला मम्मटाने कष्टकाव्य म्हटले आहे. [हिं. सा. को.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बंधमोक्षणयंत्र बंदीत पडलेल्या माणसाच्या सुटकेसाठी मांत्रिक लोक हे यंत्र तयार करतात. एका भूर्जपत्रावर कापूर-केशराच्या मिश्रणाने साध्यनाम लिहितात. त्याला वर्तुळ करून वर्तुळाबाहेर ' मां मोचय ' हा मंत्र लिहून त्या भोवती दुहेरी चौकोन काढतात. त्याची पूजा करून सोने, रुपे, तांबे या मिश्र धातूंच्या डबीत ते यंत्र घालून साध्य व्यक्तीच्या दंडात अथवा कंठात बांधतात. [यं. चि.]

बंधार गुजरातेतील एक जात. काही ठिकाणी यांना गलिआर असेही म्हणतात. कपडे रंगविणे हा यांचा धंदा आहे. बांधणे या धातूवरून बंधार हे नाव पडले आहे. एखाद्या रंगवायच्या कापडाला हे गाठी बांधतात. त्यामुळे गाठींचा तेवढा भाग रंगविला जात नाही व निरनिराळ्या आकृती असलेले कापड तयार होते. गलिआर हे नाव गली म्हणजे नीळ यावरून पडले आहे. कारण कापड रंगवायला निळीचा उपयोग होतो. याशिवाय ते विणकाम करणे, औषधे, तंबाखू व सुपाऱ्या विकणे, तांब्याची भांडी घडविणे, इ. व्यवसायही करतात.

यांचे ग्रामपरत्वे पटोरिआ, गवरिआ, हंसोटिआ, मंडिक, इ. अनेक पोटभेद असून, त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाहीत. मुळात आपण क्षत्रिय किंवा ब्राह्मण असल्याचे व आपली परंपरा जनमजयाच्या काळापर्यंत जात असल्याचे हे सांगतात.

बंधेरा स्त्री

जानवे घालण्याचा आपला अधिकार कसा काढून घेण्यात आला, या विषयीच्या त्यांच्या काही दंतकथाही आहेत. राजस्थानात यांना बंधेरा असे म्हणतात.

विवाहप्रथा – मुलींची लग्ने अकराव्या वर्षापर्यंत करतात. आईबाप लग्ने जमवतात. लग्नाचे पौरोहित्य ब्राह्मण करतो. लग्नापूर्वी पाच-सहा दिवस वधू-वरांच्या घरी गणपतीस्थापना करतात आणि वधू-वरांना आपापल्या घरी हळद लावतात. नंतर मातृस्थापन नामक विधी होतो. त्या वेळी चुन्याने रंगलेल्या भिंतींवर माता व गणपती यांच्या आकृत्या रेखाटतात. मग शमी वृक्षाची एक फांदी व आंब्याची एक फांदी रोवून मंडप घालण्याचा मुहूर्त करतात. त्यानंतर गाणी गात तांदुळांनी जमिनीवर आकृत्या काढतात. त्याला उकरडी नोतरवी असे म्हणतात. अग्नीला प्रदक्षिणा घालण्यापूर्वी वधू-वरांचे हात जुळवणे, हा लग्नातील आवश्यक विधी असतो.

बंधेरा पुरुष

विधवेला धाकटचा दिराशी लग्न करता येते. विधवाविवाह मंगळवार, गुरुवार किंवा रविवार या दिवशीच करावा लागतो. एखाद्या अविवाहित तरुणाला विधवेशी लग्न करायचे असल्यास प्रथम त्याचे शमीशी लग्न लावतात. एकमेकांवर अक्षता टाकणे व मडक्यांत लपवलेल्या आरशात पाहणे, एवढाच विधी विधवाविवाहात असतो.

देवधर्म – हे लोक राधावल्लभसंप्रदायी वैष्णव आहेत. दर महिन्याच्या अष्टमीला ते मातृदेवता, पिंपळ आणि तुळस यांची पूजा करतात.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात व मृताचे श्राद्ध करतात. अपघाती मृत्यू आलेल्या माणसाचे प्रेत न सापडल्यास दर्भाची प्रतिमा करून ती जाळतात. [ट्रा. का. बॉं.]

बंधुल एक प्राचीन जात. मैत्रेय पुरुष आणि जांधिल स्त्री यांच्या संततीला हे नाव आहे. हल्ली यांना झारेकरी असे म्हणतात. सोनाराच्या दारात धुळीत पडलेले सोन्याचे कण वेचण्याचे काम हे लोक करतात. [हि. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बंधुविद्वेषण यंत्र भावाभावांत वैमनस्य यावे या हेतूने मांत्रिक लोक या यंत्राचा प्रयोग करतात. त्यासाठी ते स्मशानातील एखादे फडके आणतात व त्यावर मेंढयाच्या रक्तात स्मशानातील राख मिसळतात. मग त्या मिश्रणात कावळयाच्या पिसाची लेखणी बुडवून एका त्रिकोणात साध्यनाम लिहितात. त्याच्या भोवती चतुष्कोण काढून त्यावर चार त्रिशूळ काढतात. त्रिकोण व चौकोन यांच्यामधल्या जागेत चार रकार लिहितात. हे यंत्रलेखनाचे काम कृष्ण पक्षात रात्री करतात. मग यंत्राची पूजा करून सात अंगुळे खोल खड्डा करून त्यात ते पुरतात. भावांच्या जाण्यायेण्याच्या वाटेत हा खड्डा करतात. त्यावर पाय पडला की त्यांच्यांत वितुष्ट येते, असे समजतात. [यं. चिं.]

बंधू गौपायन एक सूक्तद्रष्टा. याला लौपायन असेही म्हणतात. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील चोविसावे सूक्त याच्या नावावर आहे. याने आपल्या सूक्तात अग्नीची स्तुती केली आहे. [प्रा. च. को.]

ब देवनागरी लिपीतील तेविसावे व्यंजन व प वर्गातील तिसरा वर्ण. या वर्णाच्या पाच अवस्था आढळतात. त्यांपैकी पहिली अशोकाच्या गिरनार येथील शिलालेखात, दुसरी कुंडेश्वरच्या लेखात (इ. स. ६६१), तिसरी प्रतिहार बाडकच्या जोधपूर येथील लेखात (इ. स. ८३७), चौथी उष्णी-



बच्या रूपाचा विकासक्रम

षविजयधारणीच्या ताडपत्री ग्रंथात व पाचवी चालुक्य भीमदेवाच्या दानपत्रात आढळते. या शेवटच्या अवस्थेतील व आणि ब यांत काहीच फरक नसल्यामुळे, व पासून ब चा भेद दर्शविण्यासाठी व च्या पोटात एक टिंब देऊ लागले. त्याच टिंबाची तिरकी रेघ बनून सांप्रतचा ब तयार झाला.

कामधेनू तंत्रात याचे स्वरूप पुढीलप्रमाणे दिले आहे –

बकारं शृणु चार्वङ्गि चतुर्वर्गप्रदायकम् ।
शरच्चन्द्रप्रतीकाशं पंचदेवमयं सदा ।
पंचप्राणात्मकं वर्णं त्रिबिन्दुसहितं सदा ।।

अर्थ – हे सुंदरी, बकार हा चतुर्वर्गप्रद, शरद ऋतूतील चंद्राप्रमाणे धवल, पंचदेवमय, पंचप्राणमय व त्रिबिंदुयुक्त असा वर्ण आहे.

याचे उच्चारणस्थान ओष्ठ आहे. [श. क.; म. ज्ञा. को.]

बऊड ओडिसामधले एक गाव. हे एका काळी महायान आणि तांत्रिक बौद्ध यांचे महत्त्वाचे केंद्र होते. या ठिकाणी बुद्धाचा एक प्रचंड पुतळा आहे. इ. स. च्यां ८ व्या शतकात हा पुतळा उभारला गेला असावा. एका मोठ्या दगडी चबुतऱ्यावर हात जोडून बसलेली अशी ही मूर्ती आहे. या पुतळ्याला तिथले लोक बुद्धराज म्हणून ओळखतात व त्याची पूजाही करतात.

याच्या परिसरात एक रामेश्वराचे देवालय असून, त्यात अनेक मूर्ती आहेत. त्यांतील उग्रतारा या देवतेची मूर्ती कलाकौशल्याच्या दृष्टीने रेखीव व सुंदर आहे. [बु. इ. ओ.]

बऊ नाच वधूनृत्य असा याचा अर्थ आहे. द. आसामातील बंगाली भाषाक्षेत्रात हे नृत्य विशेष प्रसिद्ध आहे. घराच्या अंगणात हे नृत्य करतात. या नृत्यात दोन प्रकार असतात. पहिल्या प्रकारात गावातल्या काही स्त्रिया राधाकृष्णाची गीते गातात व नववधू ढोल आणि सनई यांच्या साथीवर नृत्य करते. दुसऱ्या प्रकारात वधू लज्जाशील रमणीचा अभिनय करते आणि वृद्ध स्त्रियांच्या पायांवर फुले वाहते. मग ती एका गीताच्या चालीवर लास्यपूर्ण नृत्य करते. [भा. लो. नृ.]

बकपंचक एक व्रत. कार्तिक शुद्ध एकादशीपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंतच्या काळात विष्णू निद्रेतून जागा होतो. या पाच दिवसांना बकपंचक म्हणतात. या पाच दिवसांत बगळासुद्धा मासा खात नाही, म्हणून माणसांनीही मांसाशन वर्ज करावे, असे सांगितले आहे. [हि. ध.]

बकरा मुख्य यज्ञीय पशू. याचा जन्म ब्रह्मदेवाच्या मुखातून झाला, असे मानतात. हा ग्राम्य पशू आहे. ऋग्वेद आणि तदुत्तर ग्रंथ यांत बकऱ्याला अज म्हटले आहे. बकरी एका वेळी दोन किंवा तीन कोंकरे प्रसवते, असा तैत्ति संहितेत उल्लेख आहे. अंत्येष्टीत बकरा हा पूषाचा निदर्शक मानला आहे.

पशुयागात बकऱ्याला मारून त्याच्या विविध अंगांचा विविध देवतांच्या उद्देशाने याग करतात. देवीला व ग्रामदेवतांना बकऱ्याचा बळी देण्याची प्रथा भारतभर आहे. बकरीदच्या दिवशी मुसलमान लोक हजारो बकऱ्यांचे बलिदान करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बकरीद मुसलमानांचा एक सण. बकर या मूळ अरबी शब्दाचा अर्थ गाय किंवा बैल आणि ईद म्हणजे आनंद किंवा प्रसन्नता होय. ज्या दिवशी अल्लाच्या प्रीत्यर्थ गाय किंवा बल यांचा आनंदाने बळी दिला जातो, त्या दिवशी साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणाला बकरीद असे म्हणतात. याचे मूळ नाव ईद उल् अज़्हा (बलिदानाचा उत्सव) असे आहे.

या दिवशी कोणत्या प्राण्याचा बळी द्यावा, याविषयी इस्लामी धर्मशास्त्रात निश्चित विधान नाही. त्यामुळे जिथे ज्या प्राण्याचे वैपुल्य असते तिथे त्या प्राण्याचा बळी द्यावा, अशी पद्धती रूढ झाली.

हा सण मूळचा इस्लामी नाही. इस्लामच्या स्थापनेपूर्वीही तो मध्यपूर्वेत प्रचलित होता. इस्लाममध्ये त्याचा समावेश कसा झाला, याविषयी विभिन्न मते आहेत. काहींच्या मते, मुहंमद पैगंबर मक्केहून मदिनेला गेला, तेव्हा तिथल्या यहुदी लोकांत एक उपवासव्रत प्रचलित असल्याचे त्याने पाहिले व ते जसेच्या तसे आपल्या अनुयायांसाठी स्वीकारले. परंतु पुढे यहुदी-इस्लामी यांच्या संघर्षात या व्रताचे स्वरूप बदलून त्याला आनंदोत्सवाचे रूप प्राप्त झाले व उपवासाऐवजी बलिदानाची प्रथा पडली. उलट काहींच्या मते हज़रत इब्राहीम यांच्या काळापासून हा सण इस्लाममध्ये प्रचलित असून, बलिदानप्रथा हीही तेव्हापासूनच त्यांच्यांत रूढ आहे. त्याविषयी एक कथा सांगितली जाते, ती अशी—

एकदा हज़रत इब्राहीम यांना खुदाने स्वप्नादेश दिला, की खुदासाठी त्यांनी आपल्या मुलाचे बलिदान करावे. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी हज़रतसाहेब आपल्या मुलाला घेऊन मक्केजवळ एका विशिष्ट स्थानी गेले. तिथे गेल्यावर त्यांनी आपल्या मुलाला खुदाचा स्वप्नादेश सांगितला. तो ऐकून तो मुलगा लव–मात्र घाबरला नाही; उलट स्वेच्छेने मरणाला सिद्ध झाला आणि आपल्या शिरच्छेदाचे दुःख आपले वडील सहन करू शकणार नाहीत, हे जाणून त्याने त्यांना डोळ्यांवर पट्टी बांधायला सांगितले. मग हज़रतसाहेबांनी आपल्या डोळ्यांवर कापडाची पट्टी बांधली व मन घट्ट करून आपल्या मुलाच्या मानेवर सुरी चालविली. परंतु त्याच वेळी तिथे जिबरील नामक एक देवदूत उपस्थित झाला. त्याने त्या मुलाच्या जागी एक बकरा उत्पन्न करून मुलाऐवजी त्याचा बळी देण्याची आज्ञा केली. मग हज़रतसाहेबांनी तसे केले व तेव्हापासून या दिवशी पशुबली देण्याची प्रथा पडली.

हा सण हिजरी कालगणनेच्या ज़िलहिज्जा नामक बाराव्या महिन्याच्या दहा दिनांकाला येतो.

या दिवशी सकाळी सर्व मुसलमान स्त्री-पुरुष शुचिर्भूत होऊन व नवे कपडे परिधान करून शहराबाहेर असणाऱ्या प्रार्थनास्थानावर (ईदगाह) जातात. तिथे सर्वजण एका रांगेत उभे राहून इमामाच्या (प्रार्थनासंचालक उपाध्याय) मार्गदर्शनानुसार नमाज पढतात. त्यानंतर इमामाचे खुदामाहात्म्य वर्णन करणारे प्रवचन होते. प्रवचन संपल्यावर सर्वजण परस्परांना गळामिठी घालून ' ईद मुबारक ' या शब्दात सदिच्छा व्यक्त करतात. मग पशूचे बलिदान होते. बलिपशूचे तोंड मक्केच्या दिशेला करून धार्मिक मंत्रोच्चारात बलिदान केले जाते. बळी दिलेल्या पशुमांसाचे तीन भाग करून त्यांतला एक बलिदानकर्त्याच्या नातेवाईकांना, दुसरा गरीबांसाठी व तिसरा तिथे जमलेल्या लोकांना खुदाचा प्रसाद म्हणून देण्यात येतो. त्यानंतर मिष्टान्नभोजन होते. [मु. स. सं.]

बक्सर उ. भारतातील एक तीर्थस्थान. हे ठिकाण उत्तर रेल्वेच्या मुगलसराई ते दिल्ली फाट्यावर बिंदकी-रोड स्टेशनपासून पूर्वेला सात मैलांवर उन्नाव जिल्ह्यात आहे. इथे वागीश्वर महादेवाचे एक प्राचीन मंदिर आहे. बकासुर इथेच राहत होता, असे सांगतात. इथले महेश्वरनाथ मंदिर बकासुराने बांधले, अशी समजूत आहे. दुर्गासप्तशतीमध्ये वर्णन केलेल्या सुरथ राजाची तपोभूमी हीच होय.

विश्वामित्र ऋषींचा आश्रम इथेच होता व मारीच, सुबाहू, इ. राक्षसांना मारून राम-लक्ष्मणांनी विश्वामित्राच्या यज्ञाचे रक्षण केले ते इथेच, असे सांगतात.

चंडिका, सोमेश्वर, चित्ररथेश्वर, रामेश्वर, सिद्धनाथ, गौरीशंकर, इ. देवतांची मंदिरे इथे आहेत.

या क्षेत्राची परिक्रमा करण्याची पद्धत आहे. मार्ग० कृष्ण पंचमीला गंगास्नान करून या परिक्रमेला प्रारंभ करतात. इथे वाघेसर नावाचे एक सरोवर असून, त्यात स्नान केल्याने सर्व रोग दूर होतात, अशी समजूत आहे.

मकर संक्रांती व माघ अमावास्या या दिवशी इथे मोठ्या यात्रा भरतात. [कल्याण तीर्थांक]

बकासन एक योगासन. याची प्रक्रिया अशी – जमिनीवर ताठ बसावे. उजवा गुडघा उजव्या व डावा गुडघा डाव्या काखेत घ्यावा. पायांचे चवडे जोडावे. हातांचे पंजे जमिनीवर टेकवावे व शरीर थोडे वर उचलावे. मस्तक उंच करावे. छाती फुगवावी. थोडा वेळ तशा स्थितीत स्थिर राहावे. मग श्वास फुप्फुसांत घेऊन शरीर सावकाश जमिनीला टेकवावे आणि आसन सोडावे. असे चार-पाच वेळा करावे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या आसनाने शरीराचे वजन यथायोग्य राहते, चालण्याची



वकासन

शक्ती व गती वाढते. आणि सांधेदुखी थांबते. [उ. यो. द.]

बकुर एक प्राचीन रणवाद्य. बकुर म्हणजे तुतारी होय, असे ग्रिफिथ या पंडिताचे म्हणणे आहे; तर इतर काही पंडितांच्या मते बकुर हा एक प्रकारचा कर्णा होय. दस्यूंबरोबर चाललेल्या युद्धात, आपल्या सैनिकांचा उत्साह वाढावा, म्हणून अश्विनीकुमारांनी या वाद्याचा उपयोग केला होता, असे ऋग्वेदात (१.२८) सांगितले आहे. [वे. रा. द. उत्तरार्ध]

बकुल अमावास्या पौष महिन्यातील अमावास्येला हे नाव आहे. या दिवशी दुधात तांदुळाची खीर करून पितरांना वाढतात. त्यामुळे पितर संतुष्ट होतात अशी समजूत आहे. [हि. ध.]

बखर वाङ्मय मराठी गद्य साहित्याचा एक प्रकार. अरबी भाषेतील खबर = वार्ता, माहिती, या शब्दावरून वर्णविपर्यासाने बखर हा शब्द तयार झाला असावा. गद्यात लिहिलेला ऐतिहासिक वृत्तांत असा अर्थ पुढे त्याला प्राप्त झाला. आंध्रभृत्य सातवाहन राजांची माहिती सांगणारी 'शालिवाहनाची बखर' ही राजवाड्यांच्या मते सर्वांत जुनी बखर होय. तिच्या दोन प्रती उपलब्ध आहेत. तिच्या प्रास्ताविक विवेचनात चार युगे व युधिष्ठिर-विक्रमादी शककर्ते राजे यांची माहिती दिली आहे. नंतर शालिवाहनाचे चरित्र पौराणिक पद्धतीने सांगितले असून, त्यात अद्‌भुताचा भाग बराच आहे.

महानुभावांनी सिंघणादी यादवांच्या बखरी लिहिलेल्या होत्या; पण त्या उपलब्ध नाहीत. त्यांची काही पाने इतिहासाचार्य राजवाड्यांना पाहायला मिळाली होती. त्यावरून त्यांची भाषा बरीच जुनी असावी, असे त्यांचे मत बनले. हेमाडपंताची बखरही उपलब्ध नाही. ती हितोपदेशात्मक असावी, असे अनुमान राजवाड्यांनी केले आहे.

या बखरी कोणत्या काळी लिहिल्या गेल्या, ते कळण्यास मार्ग नाही. महिकावतीची किंवा बिंबस्थानची बखर १३ व्या शतकात लिहिलेली दिसते, असे वि. ल. भावे म्हणतात. पण त्या बखरीतली सहा प्रकरणे वेगवेगळ्या काळी लिहिलेली आहेत. पहिले प्रकरण भविष्योत्तर पुराणांतर्गत सह्याद्रिखंडाच्या आधारे इ. स. १५७८ च्या सुमारास रचलेले आहे. पूर्व परंपरा, वंश, उत्पत्ति, वर्णावर्ण-व्याख्या हे त्याचे विषय आहेत. दुसरे राजवंशावळी हे प्रकरण इ. स. १४४८ मध्ये केशवाचार्यांने लिहिल्याचे दिसते. तिसऱ्या प्रकरणात निवाडे-हकीकती आहेत. चौथ्या प्रकरणात कौस्तुभचिंतामणी या ग्रंथाच्या आधारे भगवान दत्ताने माहिमचा इतिहास सांगितला आहे. हे प्रकरण इ. स. १५९४ च्या सुमाराचे असावे. पाचव्या व सहाव्या प्रकरणांत वंशावळी आहेत. यांतील पहिले व चौथे ही प्रकरणे पद्यात्मक असून, दुसरे व तिसरे ही गद्यात आहेत. कोकणचा अज्ञात इतिहास या बखरीवरून कळतो. अलाउद्दीन खिलजी व यादव यांच्या युद्धाचे सविस्तर वर्णन चौथ्या प्रकरणात केलेले आहे. या बखरीतील कालनिर्देश काटेकोरपणे दिलेले असून, हकीकती तवारिखांशी जुळत्या आहेत. प्रसंगवर्णने व स्थलवर्णने आकर्षक आहेत आणि व्यक्तिचित्रेही सरस आहेत. यथार्थ घटनावर्णन हा या बखरीचा विशेष होय. त्यावरून तत्कालीन चालीरीतींचीही माहिती मिळते.

इ. स. १५६५ साली तालिकोटची लढाई झाली. तिची हकीकत राक्षसतंगडीच्या बखरीत लिहिलेली आहे. ती बखर घटनेनंतर लगेच रचलेली असून, तिच्यातील वर्णने चित्तवेधक आहेत. भाषेच्या व आशयाच्या दृष्टीने या बखरीला मराठी बखरींमध्ये विशेष स्थान आहे.

महिकावतीची बखर व राक्षसतंगडीची बखर या दोन बखरींत शिवपूर्वकालातील समाजाचे चांगले दर्शन जसे घडते, तसे ऐतिहासिक लेखनाचे मूळही सापडते.

शिवकालासंबंधी बखरी – इ. स. च्या १७ व्या शतकात महाराष्ट्रात स्वराज्यस्थापना झाल्यानंतर शिवचरित्रावर अनेक बखरी लिहिल्या गेल्या. त्यांतील सभासदाची बखर महाराजांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृत्यूनंतर १५–२० वर्षांत (इ. स. १६९७) लिहिलेली असल्यामुळे ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची ठरते. बखरकार कृष्णाजी अनंत सभासद हा शिवाजीमहाराजांना समकालीन व राजनीतिनिपुण असल्यामुळे, त्याने लिहिलेले चरित्र विश्वसनीय वाटते. त्यात अफजलखानाचा वध, दिल्लीला प्रयाण, राज्याभिषेक, इ. प्रसंगांचे विस्तृत वर्णन आणि अठरा कारखाने, खजिना, शिलेदार, जंजिरे, गड-कोट इत्यादिकांची भरपूर माहिती आहे. शिवरायांबद्दल निष्ठा असल्यामुळे ही चरित्रकथा भावनोत्कटतेने रंगलेली आहे. सभासदाची भाषा संस्कृत–फारसीमिश्रित, जोरकस व ओघवती आहे. साध्या व सरळ निवेदनशैलीमुळे हे चरित्र मराठी वाङ्मयाचे लेणे ठरले आहे.

खंडो बल्लाळ चिटणीस याने इ. स. १७१८ साली रचलेली बखर 'श्रीशिवदिग्विजय' या नावाने प्रसिद्ध आहे. ती सविस्तर असून, तिची भाषा प्रौढ व संस्कृत वळणाची आहे. या बखरीत मागाहून काही माहिती घुसडली गेल्याने ती विश्वसनीय राहिली नाही. तिच्यात काही कालनिर्देश व व्यक्तिनिर्देशही चुकीचे दिलेले आहेत.

खंडो बल्लाळाचा पुतण्या रघुनाथ यादव चित्रे (चित्रगुप्त) याने इ. स. १७६१ मध्ये लिहिलेली शिवाजीमहाराजांची बखर स्वतंत्र नसून, सभासदाच्या बखरीचीच विस्तृत आवृत्ती आहे. डौलदार व अलंकारिक भाषा आणि सुंदर वर्णने यांमुळे हे शिव–आख्यान पुष्कळच रंगले आहे.

दत्ताजी त्रिंबक वाकेनवीस हा शिवाजीमहाराजांच्या मंत्रिमंडळात असून, त्यांच्याबरोबर प्रवास करीत होता. त्याने लिहिलेली दैनंदिनी हीच बखर असल्यामुळे, शिवचरित्राच्या दृष्टीने ती महत्त्वाची ठरते. मलेकर बंधू यांनी इ. स. १७६०–१७७० या काळात लिहिलेली ९१ कलमी बखर मूळ वाकेनिशी बखरीवरून रचलेली आहे.

तंजाऊर येथील बृहदीश्वराच्या देवालयातील शिलालेखांत भोसलवंशचरित्र लिहिलेले आहे. इ. स. १८०३ मध्ये सरफोजी राजांच्या आज्ञेवरून बाबुराव चिटणिसांनी भोसले घराण्याचा सर्व इतिहास त्यात दिला आहे; मात्र तो पौराणिक थाटाचा आहे. सातारच्या प्रतापसिंहमहाराजांचा चिटणीस मल्हार रामराव याने इ. स. १८१० च्या सुमारास सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र, मराठ्यांची बखर व इतर पाच छत्रपतींची चरित्रे रचली आहेत. चिटणीसी दप्तराचा उपयोग केल्यामुळे त्याचे हे ग्रंथ मोलाचे वाटतात. पण त्याची लेखनशैली पौराणिक असून, त्याने स्थलकालांचा व घटनाक्रमांचा विपर्यास केला आहे. समर्पक उपमादृष्टांतांमुळे त्याची वर्णने आकर्षक वाटतात. त्याची भाषाही प्रौढ व ओजस्वी आहे.

श्रीशिवाजीप्रताप हा ग्रंथ श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या आज्ञेवरून इ. स. १८२९ मध्ये रचला गेला. या बखरीत भोसले घराण्याची सविस्तर माहिती असली, तरी तीत बऱ्याच चुका असल्यामुळे तिचे ऐतिहासिक महत्त्व नष्ट झाले आहे. मात्र काव्यमय वर्णने व अलंकारिक भाषा यांमुळे तिचे वाङ्मयीन मूल्य वाढले आहे.

पेशवेकालासंबंधी बखरी – पेशवाईत बखर वाङ्मयाचा पुष्कळ विकास झाला आणि त्यात विविधता आली. तत्कालीन घटनांसंबंधी विपुल कागदपत्रे उपलब्ध असल्यामुळे, त्यांच्या आधारे लिहिलेल्या त्या बखरी अधिक विश्वसनीय झाल्या आहेत. त्यांत अद्भुत किंवा पौराणिक वर्णने आढळत नाहीत. बहुतेक सर्व वर्णने वास्तव आहेत. वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीनेही पेशवेकालीन बखरी अधिक सरस वाटतात.

शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर लगेच इ. स. १७४९ साली गोविंद खंडेराव चिटणीस याने रचलेली श्रीशाहूमहाराज यांची बखर माहितीपूर्ण असून, तिची निवेदनशैली साधी आणि भाषा मारदस्त आहे. बखरकाराची स्वामिनिष्ठा त्याच्या वर्णनात दिसून येते.

चिमाजी आप्पाने वसईसाठी जो रणसंग्राम केला, त्याच्याविषयी दोन बखरी उपलब्ध आहेत. साष्टीची बखर व वसईचा दुर्धर धर्मसंग्राम अशी त्यांची नावे असून, दोन्हींतील मजकूर बहुतेक सारखाच आहे. साष्टीच्या बखरीत फिरंग्यांच्या जुलमाचे आणि युद्धाचे चांगले वर्णन केलेले आहे.

पानिपतच्या रणसंग्रामावर तर सात-आठ बखरी लिहिल्या गेल्या आहेत. त्यांतील रघुनाथ यादव चित्रगुप्ताने लिहिलेली पानिपतची बखर म्हणजे एक गद्य पोवाडाच वाटतो. त्याची युद्धवर्णने काव्यात्मक असून, भाषा अलंकारिक व चटकदार आहे. संग्रामानंतर दोन वर्षांच्या आतच लिहिलेली असल्यामुळे ही बखर बरीच विश्वसनीय वाटते. काशीराजाची बखर मूळ फारसी भाषेत लिहिलेली असून, तिच्या इंग्रजी भाषांतरावरून मराठीत भाषांतर करण्यात आले आहे. काशीराजाने समक्ष पाहिलेली हकीगत त्या बखरीत दिली आहे. 'परमेश्वराने मराठ्यांचा गर्व व दांभिकपणा हरण करण्याकरिता आमदशहा दुराणी हे पात्र उत्पन्न केले, कारण ईश्वराला गर्व सहन होत नाही' असा निष्कर्ष त्याने शेवटी काढला आहे.

त्रिंबक सदाशिव पुरंदरे यांनी इ. स. १७६३ च्या सुमारास लिहिलेली भाऊसाहेबाची कैफियत ही बखरही ऐतिहासिक दृष्टीने विश्वसनीय वाटते. सुंदर वर्णने, डौलदार भाषा व चांगला भावनाविष्कार यांमुळे ही कैफियत वाचनीय झाली आहे.

कृष्णाजी शामराव याने लिहिलेली भाऊसाहेबांची बखर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पानिपतच्या युद्धावरील सर्व बखरींत उत्कृष्ट आहे. राजवाड्यांच्या मते ती इ. स. १७६३ पूर्वी लिहिलेली असावी. त्यामुळे तिला ऐतिहासिक महत्त्व पुष्कळ आहे. पानिपतपूर्व सातआठ वर्षांतील घडामोडींचे व उत्तरेकडील राजकारणाचे इत्थंभूत वर्णन तिच्यात समकालीन माहीतगाराने केलेले आहे. बखरकाराची निवेदनशैली अस्खलित व ओजस्वी असून, निरनिराळ्या प्रसंगांची व राजकारणी व्यक्तींच्या स्वभावांची शब्दचित्रे रेखाटण्याचे त्याचे कसबही अप्रतिम आहे. पल्लेदार वाक्ये, म्हणी, उपमा-दृष्टांत, उपरोध यांच्या उपयोगामुळे ही रचना वाङ्मयीन दृष्टीने फार सरस झाली आहे.

मल्हारराव होळकरांची थैली ही पानिपतची बखर भाऊसाहेबांच्या बखरीला पूरक असून, वाङ्मयगुणांच्या दृष्टीनेही तिच्या खालोखाल येते.

मराठे व हैदर यांच्या सांवसी-कुंदगोळच्या लढाईत सरदार पटवर्धनांनी पराक्रमाची शर्थ केली, तरी त्यांना शेवटी अपयश आले व पानिपतसारखेच मराठ्यांचे हत्याकांड तिथेही झाले. त्या प्रसंगाची हृदयद्रावक हकीकत पटवर्धनी वाका नावाच्या बखरीत आहे. बखरकाराची वर्णनशैली चटका लावणारी आहे. खर्ड्याच्या स्वारीची बखर म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातील सोनेरी पानच होय. कारण त्या विजयामुळे मराठ्यांचे वैभव कळसाला पोचले. मनोरंजक वर्णने, ठाशीव वाक्ये आणि उत्तम स्वभावचित्रण यांमुळे ही बखर वाचनीय झाली आहे.

धावडशीकर यांच्या चरित्राची बखर त्यांच्या शिष्यांपैकी कोणीतरी सांप्रदायिक भावनेने लिहिलेली दिसते. त्या चरित्रात अनेक चमत्कारकथा आहेत. लेखकाची भाषा रसाळ व भावनापूर्ण आहे. हनुमंत स्वामीकृत समर्थांची बखर इ. स. १७९३ मध्ये लिहिलेली आहे. शिवाजी व रामदास यांची व्यक्तिचित्रे बखरकाराने तिच्यात चांगली रेखाटली आहेत. या बखरीत बरेच वाङ्मयीन गुण आढळतात. रामदासांचे समकालीन जयरामस्वामी वडगावकर यांच्या चरित्राची बखरही सांप्रदायिक असून, पौराणिक पद्धतीने लिहिलेली आहे.

नाना फडणवीस व गंगाधरशास्त्री पटवर्धन यांनी आत्मचरित्रपर बखरी लिहिल्या आहेत, त्या अनेक दृष्टींनी महत्त्वाच्या आहेत. नानांचे आत्मचरित्र अपूर्ण असले, तरी प्रामाणिक कथन, वास्तव वर्णने, सुंदर शैली व प्रौढ भाषा यांमुळे ते सरस झाले आहे. त्यात नानांच्या कुळाची माहिती मिळते आणि पानिपतच्या पराभवानंतर परत येताना त्यांच्यावर ओढवलेल्या विविध प्रसंगांची हृदयद्रावक वर्णनेही वाचायला मिळतात. गंगाधरशास्त्री यांनी आपल्या आत्मचरित्रात पेशवाईच्या अखेरच्या काळातील राजकीय घडामोडींचे संगतवार व साधार वर्णन केले आहे. त्यांची भाषा साधी पण प्रत्ययकारी वाटते. ऐतिहासिक व वाङ्मयीन दोन्ही दृष्टींनी या बखरीला विशेष स्थान प्राप्त झाले आहे.

इ. स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात होळकरांची कैफियत, पेशव्यांची बखर, मराठ्यांची बखर, हरिवंशाची बखर, नागपूरकर भोसल्यांची बखर वगैरे बखरी, घराण्यांचा इतिहास या स्वरूपात लिहिल्या गेल्या. त्यांत त्या त्या घराण्यांची माहिती अतिशयोक्तिपूर्ण दिलेली आहे. मराठ्यांची व पेशव्यांची या बखरी तेवढ्या महत्त्वाच्या आहेत.

बखरवाङ्मयाची परंपरा शिवकाळात सुरू झाली. त्यानंतरच्या काळात निरनिराळ्या प्रकारच्या दोन अडीचशे बखरी लिहिल्या गेल्याचे राजवाडे सांगतात. पण त्यांनी त्यांत टिपणे, याद्या, रोजनिश्या, निवाडे, संतचरित्रांची बाडे या सर्वांचा समावेश केला आहे. मानवदर्शनाचा प्रयत्न या गुणामुळे मराठी वाङ्मयात बखरींना विशेष स्थान मिळाले आहे. समकालीन कवींपेक्षा बखरकारांची अभिरुची उच्च वाटते.

बखरींचा लेखनकाल व लेखक यांची नोंद सर्व बखरींत आढळत नाही. अंतर्बाह्य पुराव्याच्या आधारे लेखक व काळ निश्चित करावा लागतो. बखरकारांनी कोणासाठी तरी पत्ररूपाने हकीकती लिहिल्यामुळे, त्यांना नावे दिलेली नव्हती. बखरींचे नामकरण मागाहून झाले आहे. बखरींचे ऐतिहासिक मूल्यमापन करताना प्रा. शेणोलीकर लिहितात—

बखरकारांची भूमिका इतिहासचिकित्सकाची नाही. इतिहासाची लेखनपद्धती किंवा इतिहासशास्त्र यांची त्यांना कल्पनाही नव्हती. त्यांच्यापुढे राजतरंगिणी, विक्रमांकचरित्र यांसारखे प्राचीन इतिहासग्रंथ व अठरा पुराणे हेच आदर्श होते. त्यांना अनुसरून कल्पित गोष्टींचा मालमसाला घालून त्यांनी आपली हकीकत रसाळ करण्याचा प्रयत्न केला. कारकुनी पेशाच्या त्या मंडळींनी आपल्या मालकांच्या आज्ञेवरून विवक्षित प्रसंग, व्यक्तीचे कर्तृत्व किंवा घराण्यांचे इतिहास यांच्या संबंधीच्या हकीकती, उपलब्ध कागदपत्रे व दंतकथा-आख्यायिका यांच्या आधारे लिहून काढल्या. बहुतांशी त्या हकीकती संबंधी माणसाच्या गुणवर्णनपरच असत; अर्थात त्यांमधून निर्दोष, शास्त्रशुद्ध व समतोल ऐतिहासिक विवेचनाची अपेक्षा करणेच अप्रस्तुत होईल. त्यांना इतिहास न म्हणता ऐतिहासिक कथा असे म्हणणेच जास्त सयुक्तिक ठरेल. त्यांच्या लेखनात तत्कालीन लोकांच्या श्रद्धा, संकेत, चालीरीती, त्यांच्या आशा-आकांक्षा व त्यांचे हर्षविषाद यांचे स्पष्ट प्रतिबिंब पडले आहे. त्यामुळे बखरींना समाजशास्त्रीय संशोधनाचे एक ऐतिहासिक साधन म्हणून स्वतंत्र मूल्य आहे, यात शंका नाही. [प्रा. म. वा. स्व.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बगडावत राजस्थानी भाषतले एक फार मोठे लोककाव्य. बगडावत नावाचे २४ वीर पुरुष मेवाडमध्ये होऊन गेले. त्यांनी जो काही इतिहास घडवला तो अतिरंजित व कल्पनारम्य करून या काव्यात वर्णिलेला आहे. सेसूं भाट हा याचा कर्ता असून, यात पंधरा हजार छंद आहेत, असे सांगतात. गुजर लोक या काव्याला गीता – भागवताप्रमाणे पवित्र मानतात व भक्तिभावाने त्याचे गायन करतात. मेवाड-मध्ये व माळव्यामध्येही या काव्याचा खूप प्रचार आहे. या लोककाव्याचे शृंगार व वीर हे दोन प्रधान रस आहेत. कित्येक स्थळीं या काव्याने ओजस्वितेची चरम सीमा गाठली आहे. त्यामुळे हे काव्य सकाळी गायल्यास त्या दिवशी कोणाशीतरी मांडणतंटा हमखास होतो, अशी तिकडच्या लोकांची समजूत आहे.

आजतागायत हे काव्य मौखिकच राहिले आहे. ते लिपिबद्ध करण्याचा एक प्रयत्न झाला; पण तो जमला नाही. प्रस्तुत लोककाव्याची संक्षिप्त कथा अशी—

अजमेर येथें बीसलदेव चौहान हा राजा राज्य करीत होता. त्याच्या राज्यात एकदा वाघाचा उपद्रव सुरू झाला. रोज तो दोनचार माणसे मारू लागला. कोणत्याही उपायाने त्याचा बंदो-बस्त होईना, असे दिसताच राज्यातला एक मनुष्य त्याला रोज खायला द्यायचा, असा राजाने त्याच्याशी करार केला. एके दिवशी माळिणीच्या मुलावर पाळी आली. तो वाघाच्या गुहेकडे गेला. एवढ्यात हरराम नावाचा एक गृहस्थ माळिणीकडे आला. तिचा एकुलता एक पुत्र बळी जात आहे, हे त्याला बरे वाटले नाही. त्यामुळे तो वाघाच्या गुहेकडे गेला व माळिणीच्या मुलाला बाजूला सारून त्याच्या जागी उभा राहिला. रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी वाघ आला, पण त्याने उडी घेण्याच्या आतच हररामने तलवारीने त्याचे मस्तक तोडले. ते घेऊन तो पुष्कर क्षेत्री जात असता त्याला लीला नावाची एक तपस्विनी कुमारिका भेटली. ती त्याच्या शौर्यावर लुब्ध झाली. तिने हररामला म्हटले. 'तू आता राज्यात गेलास, की या वीर कृत्याबद्दल राजा तुझा सन्मान करील व वर माग असे तुला म्हणेल. त्या वेळी तू मला मागून घे.' हररामाने तसे केले. राजाने कोकाशाह या तिच्या बापाला सांगून त्या दोघांचे लग्न लावून दिले. त्यांना पुत्र झाला. त्याचे शिर होते सिंहाचे व धड होते माणसाचे. तो विद्रूप मुलगा न आवडून त्यांनी त्याला रानात नेऊन टाकले. ही गोष्ट राजाला समजली. राजाने रानातून त्या मुलाला आणून व सर्व चौकशी करून त्याला हररामाच्या स्वाधीन केले. राजाज्ञेमुळे हररामाला त्याचे पालनपोषण करावे लागले.

त्याने त्या मुलाचे नाव वाघला असे ठेवले होते. हळूहळू वाघला मोठा झाला. त्याने गुजरांच्या चौवीस मुलींशी लग्न केले. त्यांना प्रत्येकी एक असे चौवीस पुत्र झाले. ते बगडावत या नावाने ओळखले जाऊ लागले.

त्या चौविसांत भोजा नावाचा एक बगडावत होता. तो रानात गाई चारत असे. त्या कालात त्याने एका योग्याची खूप सेवा केली आणि त्याच्या कृपेने त्याला अमाप धन मिळाले. मग त्याने नोकर-चाकर ठेवले; घोडेही खरेदी केले. तो आपल्या भावासह दारूच्या भट्टया चालवू लागला. त्या उद्योगातूनही त्याचे धन अमाप वाढले. त्याने पडिहार राणाजी या राजाशी दोस्ती केली. राणाजीने त्या चौवीसही भावांची गुजरांच्या मुलींशी लग्ने लावून दिली.

भोजाच्या दारूच्या भट्टया सदैव धगधगत असत. त्या उष्ण-तेने पृथ्वीच्या खाली वासुकी नागाचे मस्तक जळू लागले. त्याने चामुंडेची प्रार्थना केली. ती म्हणाली, की 'मी भोजाचा बंदो-बस्त करते.' तिने ईढ़ळ सोळंकी याच्या पोटी अवतार घेतला. आईबापांनी तिचे नाव जेलू असे ठेवले. ती मोठी झाली. तिने भोजाशी लग्न करण्याचे ठरवले. सोळंकीने त्याप्रमाणे भोजा-कडे सगाईचा नारळ पाठविला. आपण विवाहित असल्याचे सांगून भोजाने तो नारळ राणाजीकडे पाठविला. मग राणा-जीशी जेलूचे लग्न ठरले. राजाचे वरप्रस्थान निघाले, तेव्हा त्याने भोजालाही आपल्याबरोबर घेतले. राणाजीशी लग्न करणे ही गोष्ट जेलूला नको होती. तिने भोजाची गाठ घेऊन 'मला तुझ्याशीच लग्न करायचे आहे' असे त्याला सांगितले. त्यावर भोजा म्हणाला. 'तू आता ठरल्याप्रमाणे राणाजीशी लग्न कर. मागाहून मी तुला पळवून नेईन.' जेलूने ते कबूल केले. तिचे राणाजीशी लग्न झाले.

पुढे एके दिवशी राणाजी शिकारीला गेला आहे, असे पाहून जेलू राजवाड्यातून निघून बगडावतांकडे आली. भोजाने तिचा स्वीकार केला. शिकारीहून परतल्यावर राणाजीला ही गोष्ट कळली. तो भोजावर चालून गेला. त्या दोघांचे युद्ध झाले. जेलूही भोजाबरोबर लढाईत उतरली. राणाजीने तेवीस बगडावतांना ठार केले. उरला तो भोजा. लढाईच्या ऐन गर्दीत जेलूने भोजाचे मस्तक तोडले आणि ती आकाशात उडाली. राणाजीने हा प्रकार पाहिला आणि त्याला आश्चर्य वाटले. ते मस्तक घेऊन ती भोजाची पत्नी साढू हिच्याकडे आली. घडला वृत्तांत तिने साढूला सांगितला. साढू सती जाण्यासाठी तिच्या-कडे पतीचे शिर मागू लागली. त्यावर जेलू म्हणाली. 'तू सती जाऊ नको. मी शक्तिदेवी आहे. माझ्या कृपेने तुझ्या घरी एक मुलगा जन्माला येईल. तो देवाचा अवतार असेल.' जेलू निघून गेल्यावर साढूला तलावातल्या एका कमळात एक बालक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिसला. तो तिने आपल्या घरी आणला. तिने त्याचे नाव उदयराव असे ठेवले. आपल्या घरी तो सुरक्षित राहणार नाही, अशा कल्पनेने त्याला घेऊन ती उज्जैन येथे आपल्या भावाकडे राहायला गेली. उदयराव आपल्या मामाकडे घोड्या चारू लागला.

एक दिवस तो सिद्धवटाजवळ गेला असता तिथे त्याला जलाशयात योगिनी स्नान करताना दिसल्या. उदयरावाने त्यांची वस्त्रे लपवली. स्नान झाल्यावर त्या उदयरावाकडे आपली वस्त्रे मागू लागल्या. त्यावर तो म्हणाला. 'मला काही वर देत असाल तर वस्त्रे देईन.' योगिनींनी मग त्याला वर दिला.

एके दिवशी एक भाट उदयरावाकडे आला आणि त्याने त्याच्या पूर्वजांची म्हणजेच चौवीस बगड़ावतांची वीरगाथा गायली. आपले पूर्वज पडिहार राणाजीने ठार केले, हा इतिहास भाटाकडून समजताच त्याने त्याबद्दल राणाजीचा सूड घ्यायचे ठरवले. आपल्या काही मित्रांसह तो उज्जैनहून निघाला. वाटेत त्यांना धारानगरी लागली. तिथे जयसिंहदेव परमार यांच्या मुलीने उदयरावाशी स्वयंवर केले. तिथून तो अजमेर येथे आला. तिथे आल्यावर त्याने नाना प्रकारचे उत्पात सुरू केले. राणाजीकडे कागाळ्या जाऊ लागल्या. उदयरावाने एक दिवस राजाच्या सगळ्या गाई भरलेल्या शेतात सोडून दिल्या. राजाची धोबीण तलावावर राजाचे कपडे धूत होती, त्या कपड्यांवरून त्याने गाय-बैल चालवले. ती भांडायला येताच तिचे मस्तकच उडविले. राणाजीला ही बातमी समजली. त्याने उदयरावावर सैन्य पाठविले. उदयरावाने त्या सैन्याचा फडशा पाडला. मग स्वतः राणाजीच त्याच्यावर चालून गेला. दोघांची गाठ पडताच उदयरावाने राणाजीला पकडले व त्याचे मस्तक तोडले. राणाजी मरून पडला. उदयरावाने आपल्या पूर्वजांच्या वधाचा सूड उगवला. त्याला कृतकृत्य वाटले.

उदयराव जेव्हा तिथून जायला निघाला, तेव्हा त्याच्या राणीने उदयरावाचे उत्तरीय वस्त्र पकडून त्याला म्हटले, 'आता माझी गती काय?' त्यावर उदयरावाने तिला दोन फुले दिली. त्या फुलांतून एक कन्या व एक पुत्र अशी दोन बालके निघाली. 'ही दोन मुले तुझा सांभाळ करतील व तुझा वंश चालवतील' असा वर देऊन उदयराव तिथून अदृश्य झाला.

बगड़ावत हे ऐतिहासिक पुरुष आहेत. त्यांचा काल इ. स. १२४७ च्या सुमाराचा मानला जातो. भोजाचा पुत्र उदयराव हा राणा हमीरचा समकालीन मानला जातो. मेवाडमधल्या आसींद या जहागिरीत त्या काळी बगड़ावतांचे वास्तव्य होते, असे सांगतात. त्या जहागिरीतून वाहणाऱ्या खारी नदीच्या दुसऱ्या तीरावर भोजाचे मंदिर आहे. गुजर लोक त्याला पवित्र क्षेत्र मानतात व तिथल्या मूर्तीवर मद्याच्या बाटल्या ओततात. तिथेच जेलूचीही एक मूर्ती असून, ती बगड़ावतांच्या शिरांची माळ गळ्यात घालून बसली आहे.

मेवाडातील गायकवर्ग जंतर नावाच्या एका वाद्याच्या साथीवर या काव्याचे गायन करतो. हजारो लोक देहभान हरपून ते ऐकतात. अजून त्याची लोकप्रियता कमी झालेली नाही. [श्री. आगरचंद भंवरलाल नाहटा– मरुभारती, जुलै १९५०; श्री. लक्ष्मीकुमारी चुंडावत– मरुभारती, जुलै १९६१]

बगत तेलुगू कोळ्यांचा एक वर्ग. गोवळकोंडा व माडुगुळ येथील राजांची या लोकांनी भक्तीने सेवाचाकरी केली, म्हणून आपल्याला भक्त हे नाव मिळाले, असे ते सांगतात. या भक्ताचेच बगत झाले. याच राजांनी त्यांना जमिनी दिल्या होत्या. लांब भाल्याने नदीतील मासे पकडण्यात हे फार पटाईत आहेत. यांच्यापैकी काही विजगापट्टण जिल्ह्यात डोंगरांच्या उतरणीवर शेती करतात. त्यांच्यापैकी काहीजण डोंगरावरील खेड्यांचे प्रमुख आहेत. गावाच्या प्रमुखाला पडाल व पडालांच्या मुख्याला नायक किंवा राजू असे म्हणतात.

हे लोक दसऱ्याला आपल्या जाळ्यांची, टोपल्यांची व त्रिशूळाची पूजा करतात. विजगापट्टण जिल्ह्यातील येंद्रिक डोंगरांच्या पायथ्याशी असलेल्या मठम गावाजवळ माचेरू नदीत एक मत्स्यकुंड आहे. त्यात लहान-मोठे अनेक मासे आहेत. ते माणसाळलेले आहेत. तिथे जवळच असलेल्या एका मंदिरात शिवरात्रीला जत्रा भरते. त्या वेळी बगत पुरुष पौरोहित्य करतो. मत्स्यकुंडातल्या माशांना खाऊ घालणे हा त्या वेळच्या धार्मिक विधीचा एक भाग असतो.

विवाहप्रथा – यांच्यांत काही गोत्रे असून, त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाही. मुलींची लग्ने लहानपणी किंवा त्या वयात आल्यावरही होतात. सर्वसाधारणपणे मामेबहिणीशी लग्न करतात. वधूपित्याला देज देण्याऐवजी, तेवढ्या किमतीचे अलंकार वधूच्या अंगावर घालतात. लग्नाच्या वेळी वधूचा भाऊ वराला ताडन करतो व त्यानंतर त्याला दोन नवी वस्त्रे वरपक्षाकडून मिळतात. ओडिया किंवा तेलुगू ब्राह्मण लग्नाच्या वेळी पौरोहित्य करतो.

देवधर्म – बगत हे शैव व वैष्णवही आहेत. वैष्णव लोक आपल्या गुरूकडून दंडांवर तप्तमुद्रा घेतात.

मृतिकप्रथा – वैष्णव बगत प्रेते जाळतात व शैव ती बसलेल्या स्थितीत पुरतात. सर्व बगत श्राद्ध करतात. [का. ट्रा. स. इं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बगलामुखी महाविद्येचे एक रूप. शाक्त तंत्रातली ही एक उपास्य देवता आहे. हिचे रूपध्यान असे –

मध्ये सुधाब्धिमणिमण्डपरत्नवेदी–
सिंहासनोपरिगतां परिपीतवस्त्राम् ।
पीताम्बराभरणमाल्यविलेपनाढ्यां
देवीं स्मरामि धृतमुद्गरवैरिजिह्वाम् ।।

अर्थ – सुधासागरातल्या मणिमंडपात रत्नाच्या वेदीवर सिंहासनाधिष्ठित झालेली, पीतवस्त्र नेसलेली, अलंकार, माला व उटी धारण करणारी आणि एका हाती मुद्गर व दुसऱ्या हाती शत्रूची जीभ धारण करणारी अशा बगलामुखी देवीचे मी स्मरण करतो.

बगलास्तव या स्तोत्रात तिला ब्रह्मरूपिणी व विश्वव्यापक महाशक्ती असे म्हटले आहे.

दुष्टांचे स्तंभन करणारा व त्यांची बुद्धी निकामी करणारा असा तिचा एक मंत्र मंत्रमहोदधीत दिला आहे, तो असा–

ॐ ह्रीं बगलामुखि सर्वदुष्टानां वाचं मुखं पदं
स्तम्भय जिह्वां कीलय बुद्धिं विनाशय ह्रीं स्वाहा ।।

एक लक्ष जप केल्याने वरील मंत्र सिद्ध होतो, असे सांगितले आहे.

चैत्रातले नवरात्र, आश्विनातले नवरात्र व शिवरात्र या दिवसांत तंत्रोक्त विधीने शाक्त लोक या देवीची पूजा करतात. जारण, मारण करणारे लोकही तिची उपासना करतात. संकट-निवारणार्थ विधिपूर्वक यंत्र बनवून ते दंडात बांधतात.

या देवीची मंदिरे क्वचित आढळतात. होशंगाबाद येथे हिचे नव्यानेच निर्माण केलेले एक स्थान आहे. काश्मीरात क्षीरभवानीच्या मंदिराजवळ बगलामुखीचे एक मंदिर असून तेच तिचे आदिस्थान आहे, असे शाक्त लोक मानतात. आंध्राची राजधानी हैदराबाद इथे जे चारमिनार शिल्प आहे, ते बगलामुखीचेच स्थान आहे. मिनाराच्या वरच्या अंगी एका कोनाड्यात देवीची सुवर्णमूर्ती असून, निजाम ब्राह्मणाकरवी तिची नित्य पूजा करीत असे. तो या देवीचा उपासक असून, त्याचे निदर्शक म्हणून आपल्या मस्तकावर तो पिवळ्या रंगाचा मंदिल वापरीत असे, असे देवीकोशात म्हटले आहे. पाहा–धूमावती. [मं. म.; भा. प्र. वि.; दे. को.]

बगाउती मुंडा लोकांचे एक भूत. वाघाने ठार केलेल्या माणसाचे हे भूत आहे. वाघाने जिथे माणसाला मारले असेल त्या जागेच्या आसपास हे भूत वावरत असते. याची उंची कमी असून, केस मात्र जमिनीवर लोळण्याइतके लांब असतात. रात्रीच्या वेळी हे भूत अंगात आलेल्या माणसा-प्रमाणे बोलते. याचा वाघावर विशेष ताबा असतो. शिवाय पशुपक्ष्यांचा राखणदार म्हणूनही लोक त्याला ओळखतात.

मुंडा लोक विवाहापूर्वी बळी देऊन याला संतुष्ट करतात. काही प्रसंगी मुंडा लोक या भुताला कौलही लावतात. एखाद्याला वाघाकडून मृत्यू येण्याची शक्यता असल्यास हे भूत त्याला आगाऊ सूचना देऊन अपमृत्यू टाळते, अशीही मुंडांची समजूत आहे. [एन्सा. मुंडा.]

बगाड मानेला किंवा कमरेला गळ टोचून घेऊन तशा स्थितीत एका उंच सोटावर बसविलेल्या लाकडाला टांगून घेणे, याला बगाड घेणे असे म्हणतात. महाराष्ट्रात जेजुरीच्या खंडोबाला असे बगाड घेण्याचे नवस केले जात. सांप्रत ही प्रथा कायद्याने बंद आहे.

बगाडासाठी जेजुरीच्या खंडोबापुढे एक दगडी चाक असे. त्या चाकात एक खांब उभा करून त्याच्या टोकाला गळ बांधीत. तो गळ नवस करणाराच्या पाठीत टोचून त्याला लोंबकळत ठेवीत. मग त्याच्यावर बेलभंडार उधळीत. बगाड एका गाड्यावर ठेवून त्याला आठ ते बारापर्यंत बैल जुंपीत. मग माणूस लोंबकळत असलेल्या स्थितीत तो गाडा प्रदक्षिणे-साठी पळवीत. बंगालमध्ये चरक पूजेच्या प्रसंगीही अशी गळ घेण्याची प्रथा होती. [म. चा. दै.; हिं. क. इं. पी. १०]

बगुली बिहार प्रदेशातील स्त्रियांचे एक गीतिनाट्य. आश्विन महिन्यातील एखाद्या निरभ्र सायंकाळी मोकळ्या मैदानावर काही स्त्रिया हे गीतिनाट्य सादर करायला जमतात. मग त्यांच्यांतली एक स्त्री आपल्या डोक्यावरून मोठे थोरले घुंघट घेते व त्यातून नाकासमोर आपला एक हात चोचीसारखा धरून हालवते. या वेळी तिच्या दोन्ही बाजूंना सारख्याच संख्येने दुसऱ्या स्त्रिया उभ्या राहतात. घुंघट घेतलेल्या व चोचीसारखा हात हालवणाऱ्या स्त्रीला बगुली असे म्हणतात. बगुली मग एका दिशेकडून दुसऱ्या दिशेकडे धावत जाते व 'दीदिया' नावाने आपल्या सखीला हाक मारते. नंतर दीदियाचा व तिचा संवाद होऊन बगुली लटक्या रागाने नदीच्या दिशेने धावू लागते. इथे या गीतिनाट्याचे प्रथम दृश्य समाप्त होते.

दुसऱ्या दृश्यात नदीतीरावर आलेली बगुली आपल्याला घराकडे पोचविण्यासाठी नावाड्याची विनवणी करताना दिसते; परंतु नावाडी तिची विनवणी मानीत नाही. उलट तिच्याकडे काही गोष्टींची मागणी करतो व जसजशी बगुली त्याची विनवणी करीत जाते तसतशी आपली मागणी तो वाढ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वीत जातो. शेवटी तो तिच्याशी संभोग करण्याचीही इच्छा व्यक्त करतो. परंतु बगुली निर्धारपूर्वक त्याला झिडकारते व नाटक संपते. [हिं. सा. बृ. इ. १६]

बघेलखंड

मध्य भारतातील एक प्रदेश. यात रेवा, नागोद, मेहर व सोहवाल (कोटी) या संस्थानांचा समावेश होत असे. याचा विस्तार सुमारे १४ हजार चौ. मैल होता. या प्रदेशाच्या पश्चिमेला बुंदेलखंड, उत्तरेला उत्तर प्रदेश, पूर्वेला छोटा नागपूर आणि दक्षिणेला बालाघाट हे प्रदेश आहेत. या प्रदेशात कैमूर पर्वताची रांग असून, तिच्या पश्चिमेकडील भाग उंच व सपाट आहे आणि पूर्वेकडील भाग डोंगराळ व जंगली असून, त्यातून शोण नदी वाहते. अमरकंटक, चित्रकूट, गोलकी, माडा, सिलहारा, बैजनाथमंदिर, विराटमंदिर (सोहागपूर), भरहूत, कालिंजर व बांधवगड ही बघेलखंडातील धार्मिक व ऐतिहासिक क्षेत्रे होत. अमरकंटक येथील मंदिरे बघेलखंडाच्या कारागिरीचे सुंदर नमुने आहेत. बघेलखडाला कलचुरी व वाघेल या दोन राजवंशांनी महत्त्व मिळवून दिले.

अगरिया, वैगा, भूमिया, गोंड, कंवर, खैरवार, मवासी, पनिका पाव, बडिया, बिघार, इ. आदिवासी जमाती बघेलखंडात नांदतात. हे लोक बडकादेव, निंगोदेव, धनमासदाऊ, दुल्हादेव, मसानदेव, बघौत, भैंसापूर, काली, सीतला, शारदा, फूलमती, लोढामाई, इ. देवतांना भजतात. हे सर्व लोक दरिद्री व अडाणी असून, मिळेल त्यात संतोष मानून आपले जीवन कंठतात. नृत्य–गीत हे त्यांच्या आनंदाचे एकमेव साधन होय. करमा, सैला, सुआ, अटारी, झूमर, लहकी, ढिमरा, चमका, चक्रमार, डंडा, या नावांचे त्याचे बरेच नृत्यप्रकार आहेत. [सा. इं. ए.; म. ज्ञा. को.; हिं. सा. बृ. इ. १६]

बघेली लोकसाहित्य

बघेलखंडातील सामान्य लोकांच्या बोलीला बघेली असे नाव आहे. अवधी भाषेप्रमाणेच बघेली ही हिंदीची एक शाखा असून, अवधी व बघेली यांत विशेष भेद नाही. बघेली भाषा बोलणाऱ्यांची संख्या सांप्रत दीड कोटीपेक्षा अधिक आहे. या बोलीचा प्रभाव धरमदास, कबीर, जायसी, तुलसीदास, रहीम, इ. महाकवींच्या रचनांवर पडलेला दिसून येतो.

बघेली भाषा अद्यापि बोलीच्याच स्वरूपात राहिली आहे. त्यामुळे तिच्यात विदग्ध साहित्य फारसे आढळत नाही. गद्यपद्यात्मक लोकसाहित्य मात्र बरेच आहे. सांप्रत अनेक कवी बघेली बोलीत काव्यरचना करू लागले आहेत. त्यांमध्ये त्या प्रदेशाच्या भावना व सांस्कृतिक संकेत व्यक्त होताना आढळतात. त्या प्रदेशात शिक्षणाचे माध्यम सुरुवातीपासूनच खडी बोली हे असल्यामुळे बघेली कवींची व ग्रंथलेखकांची संख्या फार मर्यादित आहे. या थोडया साहित्यिकांत मधुर अली, पं. हरिदास, नजीरुद्दीन सिद्दिकी, हाफिझ मुहमद खाँ, बैजनाथप्रसाद अग्निहोत्री, रामेश्वरप्रसाद मिश्र, सैफुद्दिन सिद्दिकी, ब्रजकिशोर निगम, जगदीशप्रसाद द्विवेदी, मोहनलाल श्रीवास्तव, रूपनारायण दीक्षित, समबेटा पांडेय, कुंतिदेवी अग्निहोत्री, इ. नावे प्रसिद्ध आहेत. पं. भवानीदीन शुक्ल यांनी रामायणाची काही कांडे बघेलीत अनुवादिली आहेत.

बघेली पद्याचे लोकगाथा (पवाडे) व लोकगीते असे मुख्य दोन वर्ग पडतात. पवाडे कथात्मक असतात. लोकगीतांचे पुष्कळ प्रकार आहेत. त्यांत संस्कारगीते, देवतागीते, ऋतुगीते, प्रेमगीते व बालगीते हे प्रकार मुख्य होत. संस्कारगीतांतील सोहर, दादरा, बनरा, सोहाग, बिदा आणि ऋतुगीतांतील कजली, फाग, बारहमासी ही गीते विशेष लोकप्रिय आहेत. त्या गीतांत बघेलखंडातील लोकांच्या जीवनाचे चित्र विविध अंगांनी उमटलेले दिसते, त्याचप्रमाणे त्यांच्या भावनाही व्यक्त झालेल्या आढळतात.

बघेली गद्य साहित्यही विपुल असून, त्यांत मुख्यतः पशुपक्षी, देवता, राजा-राणी, भुतेखेते, साधुसंत, जादूटोणा, यांसंबंधी कथा आहेत. काही कथा उपदेशात्मकही आहेत. या कथांच्या अध्ययनामुळे बघेली लोकांच्या संस्कृतीची पुष्कळ माहिती मिळते. बघेली भाषेचा लोककथेतला एक नमुना असा—

एकै रहै बाम्हन । उनके एक ठे लड़के भर रहे, बस । एक रोज बाम्हन कहिन कि ‘ चल दादू, कहौं दुसरे देस माँ चली हुँअई रहब ’।

चलत चलत जब उँई एक जंगल माँ पहुँचे, त बहुत कसके पियास लाग । ओहिन जंगल माँ एक ठे तालाब रहे, जेमा खूब चिरई बोलती रहें ।

या सोचके उँई दूनों जन चल दिहिन । हुँआ देखिन कि एक ठे मंडिल बनी रहे ।

मंडिल माँ देखें त कोऊ न रहे । जब केमरा खोलके भितरे गे, त देखिन कि खूब कुठिला भरे हैं । उनमा घी, दूध, दार, चाउर, दाख, मुनक्का सब भरा रहे ।

पुन हुँअई चुल्हवा माँ आई सुलगाइन अउर खाए का दार भात बनाए के खूब पेट भर खाईन ।

भावार्थ – एक होता ब्राह्मण. त्याला एक होता मुलगा. एक दिवस तो आपल्या मुलाला म्हणाला, की ‘ आपण दूर देशी वास्तव्याला जाऊ. ’ मग ते निघाले; चालत चालत एका जंगलात पोचले. तिथे त्यांना तहान लागली. ते रानातल्या पक्ष्यांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आवाजाने गजबजलेल्या एका तलावावर गेले व पाणी पिऊन पुढे निघाले. वाटेत त्यांना एक रिकामे घर दिसले. ते दार उघडून आत गेले. तिथे त्यांना दुधा-तुपाचे आणि डाळतांदुळांचे रांजण भरलेले दिसले. मग त्यांनी चूल पेटवून डाळ-भात शिजवला आणि यथेच्छ खाल्ला.

विंध्य प्रदेशातल्या अनेक नियतकालिकांतून बघेली लोक-साहित्यावर संकलनात्मक व समीक्षात्मक असे विपुल लेखन आजवर झालेले आहे. [हिं. सा. बृ. इ. १६; भा. भा. स.; विन्ध्यभूमि, लोकसंस्कृति – अंक, ऑगस्ट १९५५]

बच्च नग्म एक लोकनृत्य. हे काश्मीरमध्ये प्रचलित आहे. बच्च म्हणजे मिसरुड न फुटलेली मुले व नग्म म्हणजे नृत्य. वास्तविक नग्म याचा अर्थ गान किंवा राग असा आहे. पण या नृत्यात गीतांचा समावेश असल्यामुळे या नृत्याला हे नाव मिळाले आहे. सुगीच्या दिवसांत गल्लोगल्ली हे नृत्य होते. पूर्वी धंदेवाईक मुस्लिम नर्तकी हाफिझ नग्म नावाचे नृत्य करीत. त्यातून हे नवे नृत्य पुढे आले व लोकप्रिय झाले. नाजुक गोरीगोमटी मुले स्त्रियांप्रमाणे लांब लांब केस राखून व स्त्रीवेष

बच्च नग्म – वेषभूषा

धारण करून या नृत्यात भाग घेतात. मुख्य नर्तक लेहेंगा व दुपट्टा वापरतो आणि पायांत घुंगरे बांधतो. रंगभूमीवर येऊन तो प्रथम सलामीचे नृत्य करतो. मग त्या नृत्यपथकातले लोक विविध वाद्ये वाजवून गाऊ–नाचू लागतात. हे नृत्य कथक नृत्याशी मिळतेजुळते आहे. या नृत्यातील एक गीत असे–

हा गुलो ! तो हि मासह वुछवन यार म्योन
बुलबुल तो हि छेन्डतोन दिलदार म्योन
उलफ़त्नुक सौदा कुनुम गाह मिल ह्योतुम
अथ तरीकिस प्यठ्चल्यौ बाज़ार म्योन
रोश प्यठ् वल् पोश बागुक हिथ करिथ
चान्यि यिन फ्वल्य दिलबरो गुलज़ार म्योन
दानपोशोजोश् वल् वज़लाब बाग
लंज अविज गवनि गुबजाह बार म्योन
चूरि ललवुम लोलज़ार तस छा ख़बर
छाह छाए जाह गव उमार म्योन
ख़स्तअ दिल महजूर सारि सपनिय वनान
तस मदन वारसति आवना आर म्योन

अर्थ – हे फुलांनो, तुम्ही माझ्या प्रेयसीला पाहिले तर नाही? बुलबुलांनो, तुम्ही माझ्या दिलदार प्रेयसीला शोधा ना! प्रेमाचा सौदा करून त्याच्या बदल्यात मी व्यथा विकत घेतली आहे. अशा तऱ्हेने माझ्या प्रेमाचा बाजार झाला आहे. हे प्रिये, प्रेमाची चादर लपेटून व हातात फूल घेऊन तू आलीस तर माझे उपवन बहरून जाईल. तू भावनांच्या पूर्ण आवेगाने ये आणि माझ्या हृदयाचे उद्यान तुझ्या प्रेमाच्या लालीने रंगवून टाक. प्रेमाच्या झुलत्या फांदीला माझ्या हृदयाचे ओझे काही जड होणार नाही. मी माझे प्रेम मनातच लपवून ठेवले व ते आतल्या आत गुदमरून निष्फळ झाले याची तिला काय कल्पना? भग्नहृदयी मजहर (कवी) म्हणतो, की माझ्या प्रेयसीला माझी यत्किंचितही दया आली नाही.

अनंतनाग येथील गोपीनाथ हा बच्च नग्माचा कुशल नर्तक समजला जातो. मुहियुद्दिन व श्रीनगर यथील अब्दुल गनी या दोन कलावंतांनीही या नृत्यात बरीच प्रसिद्धी मिळविली आहे. [भा. लो. नृ.; ए. हो. रा.; योजना, ऑगस्ट-सप्टेंबर १९६२]

बजाणिया गुजरातेतील एक जात. या लोकांना ढोली असेही नाव आहे. लग्नसमारंभाच्या वेळी हे लोक ढोल व बासरी बाजवतात, म्हणून यांना हे नाव मिळाले आहे. हिंदू व मुसलमान अशा दोन्ही धर्मांचे लोक यांच्यात आहेत. हे लोक भटके असून, भाटगिरी व दोरीवरची कसरत करतात. दहा-बारा लोकांची टोळी करून ते हिंडतात. त्यांच्या मुख्याला नाईक असे म्हणतात. एका ठिकाणी ते पंधरा दिवस राहतात. जातपंचायतीने प्रत्येक टोळीला तिच्या संचाराचा प्रदेश वाटून दिलेला असतो. दुसऱ्या टोळीच्या प्रदेशात कुणी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गेल्यास, त्याला त्याचे टोळीवाले जातिबहिष्कृत करतात.

याशिवाय ते सुया, बटणे, लाकडी पळच्या, उखळे, इ. वस्तू विकतात, लाकडी पलंगाच्या पायांवर कोरीव काम करतात, टोपल्या विणतात, वाखाच्या दोऱ्या वळतात व शेतकाम करतात. माळवी बजाणिये दोरीवरच्या कसरती करून पैसे मिळवतात.

यांचे खास बजाणिया व माळवी बजाणिया असे दोन पोटभेद आहेत. त्यांच्यांत परस्पर रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही. याशिवाय यांच्या परमार, घोडिया व नाघोर अशा शाखा असून, त्यांच्यांतही परस्पर लग्नसंबंध होत नाही. घोडिया, रखेर, बवल, देशीवाला, देवराणू, थोरी, इ. आडनावे त्यांच्यांत आहेत.

विवाहप्रथा – या जातीत मुलामुलींची लग्ने सहा महिन्यांपासून वीस वर्षांपर्यंत केव्हाही होतात. आते, मामे, किंवा मावस बहिणीशी लग्न करता येत नाही. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो व देज म्हणून बारा रुपये मुलीच्या बापाला देतो. यांची लग्ने बहुधा पावसाळ्यात होतात. लग्नासाठी गुरुवार व शुक्रवार हे दोन दिवस अत्यंत शुभ मानतात. लग्नाचे पौरोहित्य मुलीचा काका किंवा तिच्या घरातील एखादा पुरुष करतो. लग्नाच्या दिवशी वधू-वरांना आपापल्या घरी हळद लावल्यावर वराला मिरवीत वधूगृही नेतात, तिथे वधू-वरांचे हात जुळवतात, त्यांच्या वस्त्रांच्या टोकांची एकत्र गाठ मारतात आणि त्यांना अंगणात, चार रिकामी गाडगी चार कोपऱ्यांत ठेवून तयार केलेल्या चौकोनात नेतात. तिथे त्यांना खायला देतात व चौकोनाभोवती चार प्रदक्षिणा घालायला लावतात. लग्नातील हा आवश्यक विधी असतो.

विधवेला धाकट्या दिराशी किंवा पतीच्या कुटुंबातील एखाद्या पुरुषाशी लग्न करता येते. विधवेचा विवाह बहुधा रविवारी, मंगळवारी किंवा गुरुवारी शिकोतरिया मातेच्या मंदिरात होतो व त्या देवीचा पुजारी लग्नात पौरोहित्य करतो. व्यभिचारी स्त्रीला बारा रुपये दंड भरून जातीत राहता येते.

देवधर्म – हे बीजमार्गी पंथाचे अनुयायी आहेत. शिकोतरिया आणि खोडिआर या देवतांना ते विशेष भजतात. साथीच्या रोगाच्या वेळी खोडिआर मातेला अन्न अर्पण करतात व जातीच्या लोकांना प्रसाद वाटतात.

मृतकप्रथा – हे मृतांना पुरतात. चार ढोल वाजवीत प्रेत स्मशानात नेतात. दहाव्या व अकराव्या दिवशी मृताला पिंडदान करतात. बाराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात व एक पलंग आणि मृताचे काही कपडे बहिणीच्या मुलाला देतात. हे लोक श्राद्ध करीत नाहीत. [ट्रा. का. बाँ.]

बटीक कुटुंबातली दासी व्यभिचारिणी बनली की ती बटकीच्या दर्जाला पोचे. हिलाच कुणबीण असेही म्हणत. छिनालपणा केलेल्या बायका व कुणबिणी, बटीक या सदरात येत. पेशवाईतील राजेरजवाडे, सरदार, श्रीमंत लोक आपल्या पदरी बटकी किंवा कुणबिणी बाळगीत. हेडे, चारण, इ. लोकांचा बटकी विकण्याचा धंदा असे. बटकीची किंमत साठ रुपयांपर्यंत असे. तिला मूल असल्यास त्याच्यासह दीडशे रुपयांपर्यंत तिची किंमत येई.

पूर्वी दुष्काळ पडला म्हणजे माणसे मुलेबाळे विकीत व भाकर किंवा कोंडा मिळवीत. अशा विकत घेतलेल्या मुलींना लहानाचे मोठे करून बटीक या नात्याने विकून टाकीत. बहुधा कोणाही सुखवस्तू मनुष्याशी कुणबीण ही असायचीच, अशी प्रथा होती.

इंग्रज, फ्रेंच, इ. युरोपीय लोकही हिंदुस्थानात राहिल्यावर आपल्या पदरी बटकी बाळगीत. मि. मॅलेट याने पुण्यास ६५ रुपयांस एक कुणबीण खरेदी केली होती, असा उल्लेख आहे. हिंदुस्थानात अँग्लो-इंडियनांचा एक वर्ग या संकरामुळेच उत्पन्न झाला आहे.

बटीक घेताना ती निरोगी व संस्कारक्षम अशी पाहून घेत. कारण तिला थोरामोठ्यांत वागायचे असे व मुदपाकखान्यातही वावरायचे असे. पुष्कळदा बटकी किंवा कुणबिणी राजेरजवाड्यांना व सरदारांना नजराणा म्हणूनही दिल्या जात. अशा लोकांकडे त्यांना आपुलकीने वागविले जाई. मंगल कार्यप्रसंगी व सणासुदीस त्यांना खणलुगडे किंवा बक्षीस देऊन संतुष्ट केले जाई. बटीक घरातली चाकरी करून म्हातारी झाली म्हणजे तिला सेवानिवृत्त करून तिला तिचे उरलेले आयुष्य निश्चिंतपणे घालविता यावे, अशी तरतूद करून ठेवीत.

बटकी किंवा कुणबिणी हा विनावेतन चाकरवर्ग उपलब्ध झाल्याने श्रीमंत लोकांना अल्प खर्चात सत्तेचे नोकर मिळविता येत. बटकीचा उपयोग व्यवहारांत घरातल्या बायकांनाच अधिक होत असे. त्या घरधनिणीची सर्व बारीकसारीक कामे करीत व त्यांच्या मुलांनाही सांभाळीत.

बटकीला कोणी वारस नसल्यास सरकार तिचे मालक असे. सांप्रत बटीक किंवा कुणबीण विकत घेणे व तिला आपल्या घरांत राबविणे ही प्रथा कायद्याने बंद झाली आहे. पाहा – दास-दासी [पे. का. म.; चा. सं. प्र.]

बटुकभैरव शिवाचे एक बालरूप. याची सात्त्विक, राजस व तामस अशी त्रिविध रूपे आहेत. त्यांपैकी सात्त्विक रूपाचे ध्यान असे –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वन्दे बालं स्फटिकसदृशं कुन्तलोद्भासिवक्त्रं
दिव्याकल्पैर्नवमणिमयैः किङ्किणीनूपुराद्यैः ।
दीप्ताकारं विशदवदनं सुप्रसन्नं महेशं
हस्ताब्जाभ्यां बटुकमनिशं शूलदण्डौ दधानम् ।।

अर्थ – स्फटिकवर्णाचा, केसांनी ज्याचे मुख उद्भासित होत आहे असा, नाना प्रकारच्या विद्या हे ज्याचे मणिनिर्मित किंकिणी, नुपुर इ. अलंकार आहेत असा, दीप्ताकृती, विकसित मुख, सुप्रसन्न, हातात शूल व दंड धारण करणारा अशा बाल-रूप बटुक महेशाला मी सतत नमस्कार करतो.

याची राजस व तामस ध्याने उग्र व भयानक आहेत. उ. भारतात भैरवाचे सामान्यपणे भयानक असे तामस रूपच आढळते. त्याच्या हातात खट्वांग, शूल, कपाल, इ. वस्तू असून पायात खडावा असतात. वाराणसी येथे त्याची एक चतुर्भुज मूर्ती असून, त्याच्या उजव्या हातात नरमुंड आहे. गळ्यात व कमरेत कवट्यांच्या माळा आहेत. बटुकभैरवाबरोबर सर्वत्र एक कुत्रा दाखवलेला असतो. [भा. प्र. वि.; डे. हिं. इ.]

बटुकोपनिषद एक नव्य उपनिषद. याला वटुकोपनिषद असेही म्हणतात. हे अथर्ववेदाशी संबंधित असून गद्यपद्यात्मक आहे. बटुक किंवा वटुक हे शिवाचेच दुसरे नाव होय. यात ब्रह्मा, विष्णू, इंद्र इ. सर्व देव ही बटुकाचीच रूपे आहेत असे सांगून, त्याला नमस्कार करण्याचे अनेक मंत्र दिले आहेत. प्रस्तुत उपनिषदात बटुकाचा एक माला मंत्र दिला आहे, तो असा –

स ओङ्कारो य ओङ्कारः स प्रणवो यः प्रणवः स सर्वव्यापी यः सर्वव्यापी सोऽनन्तो योऽनन्तस्तत्तारं यत्तारं तत्सूक्ष्मं यत्सूक्ष्मं तच्छुक्लं यच्छुक्लं तद्वैद्युतं यद्वैद्युतं तत्परं ब्रह्म यत्परं ब्रह्म स एको य एकः स रुद्रो यो रुद्रः स ईशानो य ईशानः स भगवान् महेश्वरो यो भगवान् महेश्वरः स भगवान् बटुकेश्वरो यो भगवान् बटुकेश्वरः ।

बटुक हा प्रणव आहे. चतुर्वेद त्याच्यापुढे विनम्र होतात. तो सर्वव्यापी, अनंत व तार (संसारभयातून तारणारा) आहे. त्याचा उच्चार करताच तो सूक्ष्म रूपाने प्राणिमात्राच्या शरीरांत प्रवेश करतो. तो परात्पर आहे, सर्वातीत आहे, एक आहे. योगिराज महेश्वर तो हाच. तो ओषधी, वनस्पती व जल यांत प्रवेश करून सर्व जगाचे रक्षण करतो. बटुक म्हणजेच परमात्मा होय.

त्यापुढे भस्मधारणाचे महत्त्व सांगून, भस्मात पंचमहाभूतांची शक्ती प्रतीकरूपाने राहते व ते लावल्याने मुक्ती मिळते, असे या उपनिषदात सांगितले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

बडगीत आसाममधील वैष्णव कवींच्या आध्यात्मिक गीतांना हे नाव आहे. या मायामय संसारातून मुक्त होण्यासाठी श्रीकृष्णाची भक्ती करून त्याला सर्वभावे शरण जाणे, हा एकच मार्ग आहे, असे या बडगीतांचे सार आहे.

शंकरदेव आणि माधवदेव या कवींनी मुख्यतः बडगीते रचली आहेत.

शंकरदेवाची बहुतेक बडगीते अत्यंत सरळ, साधी व सहज असून, त्यांत कृष्णभक्ती वर्णिलेली आहे. अनेक प्राचीन रूपकांच्या साहाय्याने भक्तीच्या विविध छटा त्याने दाखविल्या आहेत. शंकरदेवाने २४० बडगीते लिहिली होती; पण त्यांतली बरीचशी आगीच्या भक्ष्यस्थानी पडली, असे सांगतात.

माधवदेवाने बडगीतांच्या कक्षेचा विस्तार केला आणि कृष्णाच्या बहुढंगी जीवनातील निरनिराळे भाव त्याने वर्णिले. त्याची जागनर गीते कोमल आहेत; तर कृष्णाच्या बाललीलांच्या प्रसंगाने चित्रित केलेले मातृप्रेम मधुर आहे. माधवदेवाने आपल्या काही बडगीतांत गोपींची विरहव्यथाही वर्णिली आहे.

ही बडगीते मुख्यत्वे ब्रज बोलीत व काही असमिया भाषेत लिहिलेली असून, ती भारतीय संगीतातील केदार, आसावरी, वसंत, इ. अनेक रागांत बसविलेली आहेत. त्याच रागांत ती पूजेच्या वेळी गायिली जातात.

माधवदेवानंतर रामचरण ठाकुर, गोपालदेव, इ. काही कवींनीही पारंपारिक पद्धतीने बडगीते रचली; पण त्यांच्या नंतरच्या कवींनी मात्र त्यांत राधा-कृष्णांच्या कामक्रीडेला प्राधान्य देऊन त्यांचे पावित्र्य नष्ट केले. [अ. सा.]

बडनावर एक शहर. हे मध्य प्रदेशातल्या धार जिल्ह्यात आहे. प्राचीन काळापासून याची प्रसिद्धी आहे. जुन्या शिलालेखांतून याला वर्धनापूर किंवा वर्धमानपूर अशी नावे दिलेली आढळतात. पुराणवस्तुसंशोधनाच्या दृष्टीने या शहराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, असे शहराच्या चोहोबाजूस जे भग्नावशेष आढळतात त्यावरून दिसून येते.

मोगल काळात उज्जैन सरकारच्या राज्यातील हे एक महत्त्वाचे वसुलीचे ठाणे होते, असे ऐने अकबरीत म्हटले आहे. येथे एका जुन्या किल्ल्याचे अवशेषही आढळतात.

इथले वैजनाथ महादेवाचे मंदिर प्रचंड आहे. नागेश्वरमंदिरही उल्लेखनीय आहे.

या ठिकाणी १९५० साली उत्खनन झाले. त्यात पुराणवस्तूंचे अनेक अवशेष आणि जैन तीर्थंकरांच्या मूर्ती आढळल्या. या तीर्थंकरांच्या मूर्ती भग्नावस्थेत असल्या, तरी पुराणवस्-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संशोधनाच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या आहेत. या मूर्ती साधारणपणे इ. स. च्या तेराव्या शतकातील असाव्या. [जै. सि. भा.]

बडा ओसा एक व्रत. कार्तिक शुद्ध चतुर्दशीच्या दिवशी ओडिसामध्ये हे व्रत करतात. त्या दिवशी उपवास करून महानदीच्या पात्रात बेटासारख्या असलेल्या डोंगरावर जातात व तिथल्या धवलेश्वर नावाच्या शिवाची पूजा करतात. त्या दिवशी या डोंगरावर जत्राच भरते. दुसऱ्या दिवशी महानदीला दीपदान करतात. पूर्वी या दिवशी जलपर्यटनास सुरुवात करण्याची प्रथा ओडिसात होती. [स्ट. ओ. फो.]

बडा देव गोंडांचा प्रमुख देव. बडा देव याचा अर्थ मोठा देव असा आहे. गोंड राहत असलेल्या मध्य प्रदेशात निरनिराळ्या प्रादेशिक संस्कृतींचे एकीकरण झालेले आढळते. बडा देवावरही त्याचा परिणाम झालेला आहे. कुणी बडा देव हा परम पुरुष आहे, असे मानतात; तर कुणी त्याला परम पुरुषाने उत्पन्न केलेला पहिला देव किंवा मानव समजतात. कधी त्याला सूर्यदेव तर कधी गृहदेव असेही मानतात. कोणी त्याला गोंडांचा पहिला कुलपुरुष म्हणूनही संबोधतात. गोंडांशिवाय बैंगा, आगरिया, परधान, ओझा, सवर, इ. अनेक जातीही त्याला आपला देव मानतात. बडा देवाला बरा पेन, बुधा देव, फारसा पेन किंवा फारशी पेन, बिंगो, बडियाल पेन, इ. अनेक नावे स्थानपरत्वे आहेत.

भक्तांच्या हाकेला ओ देऊन हा देव त्यांचा सांभाळ करतो, अशी समजूत आहे. एकदा त्याने वाळवीचे रूप धारण करून गोंड राजाच्या शत्रूचा किल्ला पोखरून टाकला; तर दुसऱ्या वेळी एक गोंड राजपुत्र शत्रूच्या कैदेत असता, त्याने उंदरांची फौज घेऊन एक मोठे भुयार खणले व तुरुंगातून त्या राजपुत्राची मुक्तता केली, अशा त्याच्याविषयीच्या कथा आहेत.

बडा देवाविषयी गोंडी भाषेत अनेक भक्तिगीते आहेत. प्रत्येक गोंडाच्या घरी याची रोज पूजा होते आणि तीन किंवा नऊ वर्षांनी त्याचा सार्वजनिक उत्सव होतो. त्याचे प्रतीक म्हणून सागाची फांदी एका झाडाखाली पुरतात. नंतर होमकुंड पेटवून त्यात तूप, तांदूळ, नारळ, फुले इत्यादींच्या आहुती देतात. या वेळी बोकड बळी देतात. या प्रसंगी सामुदायिक भोजन व नृत्यगायन होते. स्त्रियांना मात्र याचे दर्शन वर्ज्य आहे. [श्री. दुर्गा भागवत – नवभारत, जुलै १९५६]

बत्तीस लक्षणे याचा अर्थ माणसाच्या शरीरावरची बत्तीस शुभ लक्षणे असा आहे. काशीखंड, बौद्ध धर्मसारसंग्रह, इ. ठिकाणी यांची यादी दिलेली आहे.

बौद्धांनी महापुरुषाची अर्थात बुद्धाची बत्तीस लक्षणे मानलेली आहेत. ही लक्षणे बुद्धाच्या शरीरावर दिसत होती, असे सांगितलेले आहे. ती लक्षणे अशी–

(१) उष्णीष (केसांचा उंचवटा). (२) कुरळे केस (डावीकडून उजवीकडे वळलेले) (३) विशाल भाल (४) ऊर्णा (दोन्ही भुवयांच्या मध्यभागी केसांचा झुपका (५) बैलाच्या पापण्यासारख्या पापण्या (६) डोळे काळे आणि तेजस्वी. (७) समान आकाराचे चाळीस दात (८) दात एकमेकांना चिकटून असणे (९) दात शुभ्र (१०) आवाज ब्रह्मदेवासारखा (११) उत्तम रुचिज्ञान (१२) जीभ मोठी आणि लांब (१३) सिंहासारखा जबडा (१४) खांदे पुष्ट (१५) हात पुष्ट (१६) दोन खांद्यांमधला भाग भरीव (१७) सुवर्णकांती (१८) आजानुबाहू (१९) शरीराचा ऊर्ध्व भाग सिंहासारखा (२०) आकृती वटवृक्षासारखी (२१) देहाच्या प्रत्येक छिद्रातून एकच केस उगवणे (२२) केसांची अग्रे कुरळी होऊन उजवीकडे वळणे (२३) जननेंद्रिय निसर्गतःच झाकलेले असणे (२४) मांड्या पुष्ट व गोल (२५) तंगड्या हरणासारख्या (२६) बोटे आणि नखे लांब (२७) चवडा उंच (२८) टाचा लांबट (२९) हात-पाय नाजूक (३०) हातापायांच्या बोटांमध्ये पातळ पडदा (३१) तळपायावर सहस्रार चक्राचे चिन्ह व (३२) पाय पसरट आणि पदक्षेप दृढ. [गॉ. नॉ. बु.]

बत्तीस विद्या ज्ञानप्राप्तीसाठी उपासनेचे जे विविध प्रकार सांगितले आहेत, त्यांना विद्या असे म्हणतात. यांची संख्या ३२ असून, त्या विविध उपनिषदांत आढळतात. या विद्यांची नावे अशी–

(१) ईश्वर (२) परपुरुष (३) सद्विद्या (४) आनंदमय (५) परंज्योती (६) शांडिल्य (७) पर्यंक (८) उद्दालक (९) अक्षराक्षर (१०) भूम (११) गार्गीअक्षर (१२) सत्यकाम (१३) दहर (१४) अंगुष्ठमात्र (१५) ज्योतिष्यज्योती (१६) मैत्रैयी (१७) गायत्री (१८) उषस्ति कहोळ (१९) अंतरादित्य (२०) अकोशल (२१) मधू (२२) बलाकी (२३) आकाश (२४) प्राण (२५) प्रातर्दन (२६) नचिकेत (२७) वैश्वानर (२८) संवर्ग (२९) पंचाग्नी (३०) अक्षी (३१) भृगुवारुणी व (३२) श्रीमन्यास.

याशिवाय उद्गीथ व पुरुष अशा आणखीही दोन विद्या सांगितल्या आहेत. यांपैकी बहुतेक विद्या निर्गुण ब्रह्माची या ना त्या स्वरूपात उपासना सांगतात. वेदान्तसूत्रांनुसार दुरितक्षय, ऐश्वर्यप्राप्ती व क्रममुक्ती असे विद्येचे त्रिविध फल आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या विद्यांच्या उपासकांचे दोन वर्ग आहेत. ज्यांना केवळ स्वतःसाठी मोक्ष मिळवायचा आहे, अशा लोकांचा एक वर्ग आणि ज्यांना मोक्षाचा संभव असूनही या जगात राहून लोककल्याण करायचे आहे, अशांचा दुसरा. या सर्व विद्यांत गायत्री विद्या प्रमुख असून, ती सर्व विद्यांची गुरुकिल्ली आहे, असे मानतात. [बत्तीस विद्या– श्री. के. नारायणस्वामी अय्यर]

बत्तीस शिराळे महाराष्ट्रातील एक गाव. हे गाव सांगली जिल्ह्यात आहे. श्रीयाल हे या गावाचे प्राचीन नाव असल्याचे सांगतात, पण त्याला ऐतिहासिक आधार नाही. नागपंचमीचा सण हे या गावाचे प्रमुख आकर्षण आहे. या दिवशी इथे मोठी जत्रा भरते. तिथले काही लोक नाग धरतात; पण ते त्यांना चावत नाहीत अशी समजूत आहे. पूर्वी या गावी मातीचे नाग पूजण्याची पद्धत होती. या गावाला बत्तीस शिराळे हे नाव कसे पडले, यासंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी –

एकदा संत गोरखनाथ या गावी भिक्षेला आला. एका बाईच्या घरी तो भिक्षा मागायला गेला असताना तिला भिक्षा वाढायला उशीर झाला. त्याने बाईला विचारले, 'बाई! उशीर का झाला ?' बाईने सांगितले, की 'आज नागपंचमी असल्यामुळे मी मातीच्या नागाची पूजा करीत होते.' ते ऐकून गोरखनाथाने लगेच एक जिवंत नाग पकडून आणला आणि तिला त्याची पूजा करायला सांगितले. नागपंचमीच्या दिवशी इथे कोणाला नाग चावणार नाही असा आशीर्वादही दिला. गोरखनाथाने नागाचा हा चमत्कार दाखविल्यावर बत्तीस गावचे लोक त्याचे शिष्य झाले, म्हणून तेव्हापासून या गावाला बत्तीस शिराळे असे म्हणू लागले.

शिराळ्यापासून जवळच गोरखनाथाचे एक प्राचीन मंदिर आहे. [म. जि. सांगली]

बदग नीलगिरीवरील एक शेतकरी जमात. बदग शब्दाचा अर्थ उत्तरेकडील असा आहे. बदग हे म्हैसूर प्रदेशातील कानडी लोकांचे वंशज असून, दुष्काळ किंवा राजकीय परिस्थिती, या कारणाने त्यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी नीलगिरीवर स्थलांतर केले, असे सांगतात.

यांच्या उत्पत्तीविषयी पुढील दंतकथा प्रचलित आहे –

सात भाऊ आपल्या बहिणीसह तलमलै टेकड्यांवर राहत होते. एकदा एका मुसलमान राजाने त्यांच्या बहिणीला पळवण्याचा प्रयत्न केला; पण तो साध्य झाला नाही. कारण त्या सर्वांनी बहिणीसह पलायन केले व ते सध्याच्या बेथलहड गावाजवळ येऊन राहिले. काही कालानंतर सर्व भाऊ वेगळे झाले आणि नीलगिरीच्या निरनिराळ्या भागांत जाऊन स्थायिक झाले. त्यांच्यापैकी दुसऱ्या भावाचे नाव हेथप्प असे होते. त्याला दोन मुली होत्या. एक दिवस हेथप्प घरात नाही, असे पाहून दोन तोड पुरुष त्याच्या घरात शिरले आणि त्यांनी त्याच्या बायकोला भ्रष्ट केले व त्याची सर्व मालमत्ता लुबाडली. हेथप्पाने मग त्या तोडांवर सूड उगविण्याची कामगिरी दोन बलयारू पुरुषांवर सोपवली. त्यांनी त्याच्याकडे त्याबद्दल त्याच्या मुली मागितल्या. हेथप्पाने ते मान्य केले. मग बलयारूंनी त्या दोन तोड पुरुषांना ठार मारले व ठरल्याप्रमाणे हेथप्पाच्या दोन मुलींशी लग्न केले.

सांप्रतच्या हुलिकल्लू गावच्या रहिवाशांना बलयारू पुरुष व बदग मुली यांची संतती मानतात. त्या सात भावांची हेथप्प किंवा हेथ या नावाने बदग लोक पूजा करतात.

यांच्यांत प्रमुख सहा शाखा आहेत. त्या अशा –

(१) उदय – हे लिंगायत असून इतर सर्व लिंगायत बदगांचे पौरोहित्य करतात. ते आपल्याला इतर बदगांपेक्षा श्रेष्ठ मानतात व त्यांच्याशी बेटीव्यवहार करीत नाहीत. ते शाकाहारी आहेत.

(२) हारुव – उदयांच्या खालोखाल यांचा दर्जा आहे. हे जानवे घालतात. त्यावरून, एके काळी हे बदगांचे ब्राह्मण पुरोहित असावे व त्यांच्यासाठी नीलगिरीवर येऊन राहिले असावे, असे वाटते. मात्र सांप्रत ते बदगांत पूर्ण मिसळून गेले आहेत. अजूनही ते बदगांचे पौरोहित्य करतात. ते शाकाहारी व शैव आहेत.

(३) अधिकारी – यांच्यापैकी काहीजण शाकाहारी आहेत. हे लिंगायत आहेत.

(४) कनक – हे लिंगायत आहेत.

(५) बदग – हे शैव आहेत.

(६) तोरेय – वरील पाच श्रेष्ठ दर्जाच्या बदगांची तोरेय ही संतती असून, वरिष्ठांकडे नोकर म्हणून ते काम करतात. हे शैव आहेत. तोरेय हा गावाचाही नोकर असतो. तो गावातील मृत्यूची वातमी इतरांना कळवतो, प्रेत स्मशानात वाहून नेतो आणि एखाद्या बाईला सासरी किंवा माहेरी जाताना सोबत करतो.

बदग लोक कन्नड भाषा बोलतात. बदगांची खेडी एखाद्या डोंगराच्या पठारावर वसलेली असतात. खेड्यासभोवती त्यांची शेते असतात. बदगांची घरे एका ओळीत असतात. एका लांबच लांब छपराखाली मधे मधे भिंती घालून ही घरे बनवलेली असतात. काही वेळा समोरासमोर अशा घरांच्या दोन किंवा तीन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ओळी असतात. प्रत्येक घराला बाहेरची एक आणि आतली एक अशा दोन खोल्या असतात. एखाद्या कुटुंबाकडे दुभत्या

बदग कुटुंब

गाई-म्हशी असल्यास आतल्या खोलीत आणखी एक लहानशी खोली तयार करतात व तिच्यात दूधदुभते ठेवतात. या खोलीत स्त्रियांना प्रवेश करायला बंदी असते. कोटा किंवा परैयन लोकांचा विटाळ झालेल्या किंवा आशौचात असलेल्या पुरुषांनाही या खोलीत शुद्धि झाल्याशिवाय जाता येत नाही. काही घरांना धान्य साठविण्यासाठी पोटमाळा काढलेला असतो.

• बदग पुरुष सकाळी उठून प्रथम सूर्याला नमस्कार करतो. मग गोठ्यात जातो आणि धारा काढतो. संध्याकाळी घरात आल्यावर तो दिव्याला नमस्कार करतो.

उद्योगधंदे – शेती हा बदगांचा प्रमुख व्यवसाय आहे. याशिवाय ते शिक्षक, कारकून, गवंडी, सुतार, माळी, शिंपी, न्हावी, रस्ता दुरुस्त करणारे मजूर व चहा-कॉफीच्या मळ्यांतले मजूर म्हणूनही काम करतात. काही लोकांच्या मालकीचेही चहा-कॉफीचे मळे आहेत. मातीतून जास्तीत जास्त पीक काढण्यात बदग शेतकरी कुशल आहेत. ते प्रगतिशील शेतकरी असून गहू, सातू, कांदे, लसूण, बटाटे, इ. अनेक पिके काढतात. प्रत्येक बदग कुटुंब एका ठराविक कोटा कुटुंबाकडून शेतीची अवजारे उसनी घेते व त्याबद्दल त्याला थोडे धान्य देते. शेतीची बहुतेक सर्व कामे स्त्रिया करतात आणि पुरुष मजुरीसाठी बाहेर काम करतात. बदग स्त्रिया एकूणच फार कष्टाळू असतात. त्यामुळे बदग पुरुषाला लग्नाच्या वेळी वधूपित्याला बरेच देज द्यावे लागते.

वेषभूषा – बदग पुरुष अंगभर एक लाल-निळ्या पट्ट्यांचे कापड पांघरतात. पुरुषांच्या कमरेला फडके गुंडाळलेले असते. ते कानांत सोन्याचे वलय, कमरेत चांदीची साखळी, हातात चांदीचे कडे आणि बोटांत चांदी, तांबे किंवा पितळ या धातूंच्या अंगठ्या घालतात. स्त्रिया कमरेभोवती एक पांढरे फडके व वक्षस्थळाभोवती एक पांढरे कापड गुंडाळतात. वर एक पांढरेच वस्त्र पांघरतात. डोक्यावर पांढरे कापड टोपीसारखे ठेवतात. त्यांच्या डाव्या नाकपुडीत सोन्याचा दागिना असतो. त्या गळ्यात मण्यांच्या माळा, उजव्या दंडात चांदीची एक वाकी, डाव्या दंडात तांब्याच्या चार वाक्या, डाव्या हातात चांदीच्या चार व मिश्र धातूच्या सात बांगड्या आणि बोटांत चांदीच्या व स्टीलच्या अंगठ्या घालतात. तोरेय स्त्रियांना हातात फक्त बांगड्या घालण्याची परवानगी असते. बदग स्त्रिया कपाळावर व हातांवर गोंदून घेतात. बदग मुलांच्या खांद्यांवर व बाहूवर कोलिताने डाग दिलेले असतात. त्यामुळे त्यांना दूध काढताना त्रास होत नाही, अशी समजूत आहे.

कुरुंब लोक चेटूक करतात, अशी समजूत असल्यामुळे बदग लोक कुरुंबांना फार भिऊन असतात. तसेच ते तोड चेटक्यांनाही घाबरतात आणि त्यांना वार्षिक धान्य देऊन संतुष्ट राखतात.

बदग मुलगा सात किंवा नऊ वर्षांचा झाला, की त्याला प्रथमच दूध काढायला शिकवतात. त्या वेळी एक समारंभ करतात. एका शुभ दिवशी संस्कार्य मुलगा सकाळी लवकर स्नान करून नवे कपडे घालतो. मग त्याच्या घराच्या दारात एक म्हैस व तिचे पारडू गोठ्यातून आणून बांधतात. मुलाचे आईवडील व जमलेले लोक मुलाला त्या म्हशीजवळ नेतात व मुलाचे वडील त्याच्या हातात ताज्या दुधाने जवळजवळ भरलेले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक बांबूचे पात्र देतात. मग कोणीतरी त्याला दूध कसे काढायचे ते दाखवतो. त्याप्रमाणे तो चार धारा त्या मांडयात

बदग स्त्री

पिळतो, ते भांडे घरात घेऊन जातो आणि घरातल्या स्वयंपाकाच्या भांड्यांत त्यातले थोडे दूध ओततो. याचा अर्थ, त्या दिवसापासून घरातल्या लोकांना दूध पुरवायची जबाबदारी त्याने घेतली, असा होतो. नंतर तो आईवडिलांच्या आणि जमलेल्या लोकांच्या तोंडावर दुधाचे काही थेंब उडवतो व भांडे दूधघरात नेऊन ठेवतो. त्यानंतर त्याला केव्हाही त्या घरात प्रवेश करता येतो.

गाय किंवा म्हैस प्रथमच व्याली असता तीन किंवा पाच दिवस तिचे दूध काढीत नाहीत. मग दूध काढण्यासाठी एखाद्या मुलाची निवड करतात. अशा मुलाने चटईवर झोपता कामा नये, मांस भक्षण करता कामा नये, अस्पृश्य लोकांशी बोलता कामा नये, इ. नियम पाळायचे असतात. ठरलेल्या दिवशी मुलगा स्नान करून नव्या बांबूपात्रात दूध काढतो व नदीवर जातो. पानांच्या तीन द्रोणांत त्यातले थोडे दूध घालून, ते द्रोण तो नदीत सोडतो व उरलेले सर्व दूध नदीच्या प्रवाहात ओततो. ज्या ठिकाणी माडेश्वराचे मंदिर असेल, तिथे ते दूध पुजाऱ्याला नेऊन देतात. तो थोड्या दुधात केळी कुस्करून ती शिकरण एका उदय पुरुषाकडे देतो आणि तो ती शिकरण झऱ्यात टाकून देतो. दूध काढणाऱ्या मुलाला कुटुंबात त्या दिवशी जास्त मान मिळतो व त्याला सर्वांच्या आधी जेवायला मिळते.

लिंगायत बदगांच्या मुलांना पंथदीक्षा सर्वसाधारणपणे तेराव्या वर्षी देतात. गावातील त्या वयाच्या सर्व मुलांचा दीक्षाविधी एकाच दिवशी करतात. त्यासाठी पुढीलप्रमाणे विधी करतात – त्या दिवशी गावातील सर्व लोक उपवास करतात. त्या दिवशी गावातील गाई-म्हशींचे सर्व दूध, लहान मुलांना सुद्धा न देता एकत्र करतात. दुपारी उदय पुरोहित आपल्या गावातून येऊन या गावाजवळच्या नदीकिनारी थांबतो. मग मुलांचे नातेवाईक तांदूळ, उडीद, तूप, इ. पदार्थांनी भरलेली नवी टोपली व चार आणे दक्षिणा घेऊन तिथे जातात. पुरोहित तिथे अग्नी प्रज्वलित करतो व लोक त्यात सुगंधी द्रव्ये टाकतात. अग्नीजवळ एक केळीचे पान ठेवतात व त्यावर मुलांच्या वडिलांनी आणलेली लिंगे मांडतात. दीक्षार्थी मुले नदीत स्नान करून आपापल्या लिंगाला दूध व पाणी यांनी स्नान घालतात. या वेळी खूप दूध वापरतात. नंतर पुरोहित ती लिंगे त्यांच्या डाव्या हातात ठेवतो व त्यावर उजवा हात ठेवून शिवस्तुतिविषयक मंत्र म्हणतो. मंत्र म्हणत असताना मधून मधून तो दीक्षार्थींच्या लिंगांवर व अग्नीभोवती दूध व पाणी शिंपडतो. नंतर ती लिंगे फडक्यात गुंडाळून मुलांच्या हातात देतो. लिंग हातात धरून मुले पाच वेळा मंत्र म्हणतात व प्रत्येक वेळी हात थोडा थोडा गळ्याजवळ नेतात. मग मुलगा खाली वाकून पुरोहिताचे पाय धरतो व पुरोहित ते लिंग मुलाच्या गळ्यात बांधून त्याला आशीर्वाद देतो. ज्या मुलाने लिंग धारण केले असेल, त्याचे आईवडील मोठी जेवणावळ घालतात.

बदगांचा एक ग्रामप्रमुख असतो. गावातील सर्वांत श्रीमंत पुरुषालाच हा मान मिळतो व तो वंशपरंपरेने चालू राहतो. गावातील तंटेबखेडे तो सोडवतो व गुन्हेगारांना शासनही करतो. मुलामुलींच्या लग्नाबाबतही गावचे लोक त्याचा सल्ला घेतात. आपल्या मनाप्रमाणे तो गावावर हुकमत गाजवतो.

बदग लोक पेरणीच्या व कापणीच्या वेळी समारंभ करतात. पेरणीचा समारंभ फाल्गुन महिन्यात होतो. त्यासाठी अमावास्येच्या आधीचा मंगळवार हा दिवस मुक्रर करतात. त्या दिवशी भल्या पहाटे देव्वे मंदिराचा पुजारी पाच किंवा सात प्रकारच्या धान्याने भरलेली टोपली, विळा, नांगर, बैलजोडी व एक कुरुंब पुरुष यांच्यासह ठरलेल्या शेतात जातो. तिथे तो कुरुंबाच्या फडक्यात टोपलीतील धान्य ओततो व बैल नांगराला जुंपून नांगराने तीन चऱ्या पाडतो. मग कुरुंब बैलांना थांबवून नांगरलेल्या ठिकाणी पूर्वेकडे तोंड करून बसतो. डोक्यावरचे पागोटे खाली काढून व हातांनी कान झाकून तो तीनदा धो धो असे म्हणतो. नंतर तीनदा धान्य पेरतो. मग पुजारी व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 8417

तो घरी परत जातात. पुजारी उरलेले धान्य आपल्या कोठीत टाकतो. नंतर पाण्याने भरलेले एक नवे पात्र तो दूधघरात ठेवतो व त्यात उजवा हात बुडवून ते भरलेले आहे, असे म्हणतो. हा समारंभ झाल्याशिवाय बदगांना पेरणी करता येत नाही. या दिवशी बदग लोक गोडाधोडाचे जेवण करतात.

शेतीसंबंधीच्या दुसऱ्या सणाचे नाव देव्वे हब्ब किंवा तेनई असे असून, तो ज्येष्ठातल्या किंवा आषाढातल्या सोमवारी करतात. महालिंगस्वामी आणि हिरिय उदय या देवतांच्या सन्मानार्थ हा समारंभ असतो. अनेक गावांत या देवतांची मंदिरे असतात. पण एकाच गावात हा उत्सव करतात आणि आसपासचे लोक त्या ठिकाणी जमतात. दुपारी पुजारी इतर लोकांसह हिरिय उदयाच्या देवळातून महालिंगस्वामीच्या मंदिरात जातो. त्यांच्या अग्रभागी कुरुंब पुरुष असतो आणि तो तुड झाडाच्या सालीचे व लाकडाचे तुकडे वाटेने टाकत जातो. पुजाऱ्याने महालिंगस्वामीची पूजा केल्यावर सर्वजण पुन्हा हिरिय उदयाच्या मंदिरात जातात व तिथे सर्व देवतांना दूध-भाताचा नैवेद्य दाखवतात. दुसऱ्या दिवशी पुष्कळ लोक तिथे जमतात व देवाला नारळ वाहतात. या दिवशी मधवे गोत्राच्या, प्रथमच अपत्य झालेल्या स्त्रिया मुलासह देवळात येऊन पूजा करतात. हा उत्सव झाल्यावर शेतकरी कापणीला सुरुवात करतात व पहिल्या दिवशी कापलेल्या धान्यापैकी काही धान्य महालिंगस्वामीला अर्पण करतात.

देवधर्म – हे लोक हेथ्थेस्वामी, महालिंगस्वामी, हिरिय उदय, माडेश्वर, महांकाली, जडेस्वामी, रंगस्वामी, इ. देवतांना भजतात. बैरेगन्नी येथे पौष महिन्यात हेथ्थेस्वामीचा उत्सव होतो. हा सोमवारी सुरू होतो आणि आठ दिवस चालतो. एक देवांग कोष्टी आपला लहान माग घेऊन या गावी येतो आणि एका ठरलेल्या घरात राहून देवाला नेसण्यासाठी वस्त्र आणि पागोट्यासाठी कापड विणतो. आसपासच्या गावांतून लोक इथे येतात व देवाला तांदूळ, पैसे, फळे, सोन्याची छत्री, कापड, म्हशी, इ. वस्तू अर्पण करतात. लोक मंदिरापुढे गातात, नाचतात; पण देवाचे दर्शन मात्र घेत नाहीत. शेवटच्या दिवशी पुजारी लोकांसह नदीवर जाऊन देवांगाने विणलेले कापड धुतो व ते वाळल्यावर परत येऊन देवाला ते नेसवतो. मग सर्वजण देवाचे दर्शन घेतात. यात्रेकरू आपापल्या गावी परत जात असताना वाटेत त्यांना कॉफी, फळे व जेवण फुकट मिळण्याची व्यवस्था केलेली असते.

जडेस्वामीचा उत्सव निडुगल येथे पौष महिन्यात होतो. या वेळी पीकपाण्यासंबंधीचा अंदाज घेण्यासाठी एक विधी करतात, तो असा – दोन चुलींवर दोन भांड्यांत दूध ठेवतात. जर दूध सर्व बाजूंनी उतू गेले, तर सगळ्या गावांत पिके चांगली येणार व एकाच बाजूस उतू गेल्यास, त्या बाजूच्या गावात तेवढे पीक चांगले येणार, असे समजतात. त्यानंतर जळत्या निखाऱ्यांवरून चालत जाण्याचा विधी होतो.

उदयांशिवाय सर्व बदग खेड्यांत रजस्वला स्त्रियांसाठी एक झोपडी उभारलेली असते. एखाद्या मुलीला ऋतुप्राप्तीच्या आधी काही महिने अमावास्येपूर्वीच्या शुक्रवारी त्या झोपडीत पाठवतात. तिथे ती रात्रभर राहते व दुसऱ्या दिवशी सकाळी जुने कपडे झोपडीतच ठेवून व नवे कपडे लेवून घरी जाते. नंतर रविवारी ती नातेवाइकांकडे जेवायला जाते. ऋतुप्राप्ती अशुभ वारी झाल्यास, दोष लागू नये म्हणून ही योजना करतात. बदग स्त्री मासिक पाळीचे तीन दिवस त्या झोपडीत राहते. चौथ्या दिवशी स्नान करून घरी गेली तरी संध्याकाळपर्यंत घराच्या सोप्यातच राहते.

विवाहप्रथा – यांच्यांत सगोत्र विवाह होत नाही. सर्वसाधारणपणे विवाह मोठेपणी होतात. त्याला मातापित्यांची संमती लागते. विवाहापूर्वी थोडे दिवस तरुण-तरुणींचे प्रणयाराधन चालते. उदयांशिवाय इतर लोकांचा विवाहविधी अगदी साधा असतो. विवाहाच्या आदल्या दिवशी वर आपल्या बंधूंसह वधूच्या गावी जायला निघतो आणि वधूगृही पोचल्यावर तिथे जमलेल्या सर्व लोकांना नमस्कार करतो. नंतर तो वधूला वाजत गाजत आपल्या घरी नेतो. तिथे पोचल्यावर वधू घराच्या दारात उभी राहते आणि सासू किंवा नणंद तिच्या ओंजळीत तीनदा पाणी घालून तिच्या गळ्यात मण्यांची माळ बांधते. नंतर तिला बाहेरच्या खोलीत बसवून खायला देते. ती वाढलेले खाल्ल्यासारखे करते आणि हात धुते. नंतर ती आणखी दोन स्त्रियांसह वाजत गाजत झऱ्यावर जाऊन स्वयंपाकासाठी पाणी घेऊन येते आणि घरातील सर्वांना नमस्कार करते. मग जेवणावळ होऊन समारंभ संपतो.

उदयांचा लग्नविधी मात्र याहून जास्त मोठा असतो. लग्नाच्या आदल्या दिवशी भल्या पहाटे वराचे भाऊ इतर लोकांसह वाजत गाजत रानात जाऊन विशिष्ट झाडाच्या दोन काठ्या दूधखांब म्हणून तोडून आणतात. प्रथम पुजारी दूधखांबांची पूजा करतो आणि त्यांना दोन दोऱ्या बांधतो. नंतर वधूवरांचे आईवडील व पुरोहित असे पाचजण ते खांब खड्ड्यात पुरतात. या खांबांच्या जवळच मंडप व बोहले घालतात. वरपक्षाकडील मंडळी वधूगृही जातात व तिथे जेवणावळ होते. नंतर वधूला मिरवीत वरगृही आणतात. घराच्या दाराशी आल्यावर वधूचे डोळे बांधतात व सासू तिच्या पायांवर पाणी घालते. मग वराच्या नातेवाईक असलेल्या तीन सुवासिनी तीन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. ....

घडे भरून झऱ्याचे पाणी आणतात. त्यांतील पाणी बोहल्यावर ठेवलेल्या तीन पात्रांत प्रत्येक सुवासिनी तीनदा ओतते. नवरा मुलगा मंडपाला तीन प्रदक्षिणा घालून आत येतो व त्या पात्रांतील पाण्याने स्नान करून नवे कपडे घालतो. वधूही नवे कपडे घालते. मुहूर्ताच्या वेळी वधू-वरांना समोरासमोर उभे करून मध्ये अंतरपाट धरतात. पुरोहित दोघांच्या वस्त्रांना गाठ मारतो. वधू-वरांनी आपल्या करंगळ्या जुळवल्यावर अंतरपाट बाजूला करतात. वधू-वर खाली बसतात आणि वर, वधूच्या गळ्यात सोन्याचे पदक असलेली ताळी बांधतो. वधू-वर मग एकमेकांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालतात, त्याला संबंधमाला असे म्हणतात. मग कंकणबंधन, घास देणे, ध्रुवदर्शन, इ. विधी होतात. दुसऱ्या दिवशी वधू-वर झऱ्यावर जातात व तोरेयाने शेण घालून तयार ठेवलेल्या दोन पात्रांत भात व कपाशी पेरतात.

उदय विधवेला पुनर्विवाह करता येतो, पण तो दिराशी नाही. विधवाविवाहाच्या वेळी पुरोहित वधू-वरांच्या कपाळी भस्म लावतो व त्यांचे लग्न लागल्याचे घोषित करतो. इतर बदग लोकांत विधवेला दिराशी पुनर्विवाह करता येतो. बदग पुरुषाला अनेक बायका करता येतात. त्यांचा त्याला शेतीच्या कामी उपयोग होतो.

लग्न झाल्यावर मुलगा वेगळे घर बांधून राहतो. सर्वांत धाकटा मुलगा आईवडिलांना सांभाळतो व त्यांच्या मृत्यूनंतर ते घर त्याच्या मालकीचे होते.

प्रसूतिप्रथा – प्रथमच गर्भवती असलेल्या स्त्रीचा सातव्या महिन्यात एक विधी करतात. हा विधी महत्त्वाचा असतो. कारण त्यामुळे विवाहसंबंधावर शिक्कामोर्तब होते आणि त्यानंतर पंचायतीमार्फतच घटस्फोट मिळू शकतो. तसेच हा विधी केला नाही तर पित्याला आपले पितृत्व सिद्ध करता येत नाही. या समारंभाच्या वेळी पति-पत्नी शेजारी बसतात. मग पती आपल्या सासऱ्याला, मी बायकोच्या मानेभोवती हा दोरा टाकू का, असे विचारतो. त्याने संमती दिल्यावर तो तसे करतो. त्या वेळी पत्नीच्या मुद्दाम मोठ्या बनवलेल्या अंबाड्यात जर दोरा अडकला, तर त्याला तीन रुपये दंड भरावा लागतो. या दिवशी पति-पत्नी आशौचात आहेत, असे मानतात आणि ती दोघे घराच्या सज्जात बसून आप्तेष्टांचे अहेर स्वीकारतात. दुसऱ्या दिवशी स्नान केल्यावर हे आशौच संपते.

स्त्रीची प्रथम प्रसूती घरात होता कामा नये, असा नियम आहे. म्हणून त्यासाठी सज्जाला आडोसा करतात व तिथे प्रसूती होते. प्रसूतीनंतर जननाशौच असेपर्यंत तिला बाहेरच ठेवतात. प्रतिपदेच्या चंद्रकोरीचे दर्शन घेतल्यावर जननाशौच संपते. मुलाचे बारसे सातव्या, नवव्या किंवा अकराव्या दिवशी करतात. त्या वेळी मोठे ज्ञातिभोजन घालतात. त्या वेळी मुलाला झऱ्याच्या पाण्याने स्नान घालतात, त्याच्या कपाळी भस्माचा टिळा लावतात, हळदीने रंगवलेला दोरा त्याच्या कमरेत बांधतात, चांदीची किंवा लोखंडाची बांगडी हातात घालतात व गळ्यांत चांदीचा मणी बांधतात. गावातील सर्वांत वृद्ध पुरुष मुलाला मांडीवर घेतो व त्याचे नाव ठेवतो. नंतर मुलाचे आई-बाप व आप्तेष्ट त्याच्या तोंडात थोडे दूध घालतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात. मृतासाठी ते पाच किंवा अकरा कप्पे असलेली तिरडी तयार करतात. गरीब लोक एक खाट कापड्याने झाकतात व त्यावर पाच छत्र्या लावतात. एखाद्याच्या मृत्यूची बातमी तोरेय पुरुष घरोघर जाऊन सांगतो व त्याबद्दल त्याला एक रुपया मिळतो. तिरडीवर ठेवण्यापूर्वी मृताची खाट अंगणात आणतात व एका म्हशीला त्याच्याभोवती तीनदा फिरवतात. मग मृताचा उजवा हात उचलून तिच्या शिंगावर फिरवतात व तिचे थोडे दूध त्याच्या तोंडात घालतात. मग मृताला स्नान घालून व नवीन वस्त्रे चढवून तिरडीवर खालच्या कप्प्यात ठेवतात. त्याच्या कपाळावर दोन रुपये चिकटवतात. त्याच्या जवळ भाकऱ्या, लाह्या, गूळ, तंबाखू, इ. पदार्थ असलेल्या टोपल्या ठेवतात. मग त्याच्या आप्तेष्ट स्त्रिया एकेका घोळक्याने त्याच्याभोवती बसून रडतात. नंतर जमलेले लोक तिरडीभोवती नाचतात. मृताची पत्नी नाकातील नथ व इतर दागिने काढून ठेवते. जमातीतील एक-जण मृताच्या डोक्याशी उभा राहून त्याने केलेल्या पापांचा पाढा वाचतो. त्या वेळी तो एका वासरावर हात ठेवतो. त्यामुळे मृताची पापे वासरात संक्रांत होतात, अशी त्यांची समजूत आहे. एकूण तिघेजण हा पाढा वाचतात. नंतर मृताला स्मशानात नेऊन अग्नी देतात. दुसऱ्या दिवशी मृताच्या घरातील लोक गावातील लोकांना तांदूळ वाटतात. मृताच्या अस्थी गावातच त्यासाठी केलेल्या खड्ड्यात टाकतात. मृताचे श्राद्ध रविवारी करतात.

उदय लोक मात्र मृताला बसलेल्या स्थितीत पुरतात व त्याच्या शेजारी दोन दिवे ठेवतात. याशिवाय ते म्हशीऐवजी गोऱ्हा व कालवड घेतात व त्यांच्या मांडीवर डाग देतात. त्यांना वस्त्रालंकारांनी सजवून मृताजवळ नेतात व त्यांची पूजा करतात.

बदग लोक मधून मधून सर्व पितरांसाठी श्राद्ध करतात. त्या वेळी ते बांबू व लाकूड यांचा सात मजली रथ तयार करतात. अगदी खालच्या मजल्यावर एक खाट ठेवतात व त्यावर अंथरूण, उशी व केळीचा खुंट ठेवतात. पितरांचे आत्मे त्या पलंगावर पडून केळी खातात, अशी बदगांची समजूत आहे. शेवटी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा रथ जाळून टाकतात. [का. ट्रा. स. इं.]

बदरीनाथ हिमालयातील एक प्रसिद्ध पुण्यक्षेत्र. याला बदरी धाम किंवा बदरी विशाला असेही म्हणतात. हे स्थान समुद्रसपाटीपासून १०२४४ फूट उंच आहे. एका काळी तेथे बोरींचे वन होते, त्यावरूनच त्याला बदरी असे नाव पडले आहे. जोशीमठ, विष्णुप्रयाग, बलदौडा चट्टी, पांडुकेश्वर, शेषधारा, हनुमान चट्टी, कांचनगंगा, देवदेखनी असे मुक्काम करीत व त्या त्या ठिकाणची स्नाने आणि दर्शने करीत बदरीनाथाला जायचे असते. देवदेखनीहून बदरीनाथाच्या मंदिराचे दर्शन होते; म्हणूनच त्याला ते नाव मिळाले आहे.

हे क्षेत्र अलकनंदा नावाच्या नदीच्या तीरावर वसले आहे. पण तिथे अलकनंदेत स्नान करणे अत्यंत कठीण असते. म्हणून यात्रेकरू तिचे दर्शन घेऊन तप्तकुंडात स्नान करतात. स्नान करून व पूजासाहित्य घेऊन मग ते बदरीनाथाच्या दर्शनाला जातात.

अलकनंदेच्या उजव्या तीरावर गावाच्या मध्यभागी बदरीनाथाचे भव्य मंदिर आहे. रस्त्यापासून ते दीड-दोन पुरुष उंचीवर असून, तिथवर जाण्यासाठी प्रशस्त पायऱ्या आहेत. त्याच्यापुढे महाद्वार लागते. त्याच्या आतल्या अंगास दोन्ही अंगी देवड्या आहेत. त्यांच्या खाली तळघरात देवाचे कोठार आहे. माडीवरची जागा धर्मशाळेसारखी मुक्तद्वार आहे. तिथून पुढे थोडी मोकळी जागा सोडून बदरीनाथाचे मंदिर आहे. पुढे सभामंडप व मागे गाभारा अशी त्याची रचना आहे. सभामंडप शंभर



बदरीनाथाचे मंदिर

माणसे बसू शकतील, असा असून, त्याच्या मोठमोठ्या कमानीतून हवा–उजेड भरपूर आत येतो. हे सबंध मंदिर दगडी आहे. सभामंडपावर डेरेदार उंच कळस आहे. गाभाऱ्यावर पागोडा पद्धतीचे दुछपरी शिखर आहे. हे शिखर सोन्याच्या पत्र्याने मढवलेले आहे. देवळाभोवती प्रदक्षिणेचा मार्ग आहे. आवारातच डाव्या व उजव्या हाताला सोपे व घरे आहेत. त्यांत पाकशाळा, कचेऱ्या व रावळजीचे (मुख्य पुजारी) वास्तव्यस्थान आहे.

बदरीनाथ पंचायतन

गाभाऱ्यात कंबरभर उंचीच्या सिंहासनावर शाळिग्राम शिळेची नारायणाची मूर्ती आहे. बदरीनारायण म्हणतात तो हाच होय. मूर्ती पद्मासनावर ध्यानमुद्रेत विराजित आहे. ती चतुर्भुज असून, उंचीला २॥–३ फूट आहे. तिच्या चार हातांपैकी दोन हात जोडलेले असून, दोहोंत शंखचक्र आहेत. नारायणाला नेहमी सुवर्णाचा मुखवटा चढविलेला असतो. डोक्यावरचा मुकुटही सुवर्णाचा असून तो हिरेजडित आहे. नारायणाच्या डाव्या हाताला लक्ष्मी चवरी ढाळीत असून, तिच्या पलिकडे नरनारायणांच्या शंख-चक्र-पद्म-गदाधारी मूर्ती आहेत. उजव्या अंगाला कुबेर व गणपती आहेत. या मूर्तींच्या खालच्या पायरीवर उजव्या बाजूला गरुड, डाव्या बाजूला नारद व मध्ये उद्धव आहे. नारायणाच्या पलिकडे अक्षय्य नंदादीप आहे.

सांप्रत बदरीनाथ हे क्षेत्र वैष्णव असले, तरी त्यापूर्वी ते शैव स्थान असावे, असे पुढील कथेवरून वाटते–

शिवाने ब्रह्मदेवाच्या कोणत्या तरी घोर अपराधाबद्दल त्याचे शिरच्छेदन केले; पण ते शिर खाली न पडता शिवाच्या हाताला चिकटून बसले. त्यातून मुक्त होण्यासाठी शिव बदरी विशाला या क्षेत्राला आला. तिथे अलकनंदेच्या तीरी ते शिर शिवाच्या हातापासून गळून पडले. त्यामुळे ब्रह्महत्येचे पाप अंशतः दूर झाले. पण ते पूर्ण नष्ट होण्यासाठी शिवाने मग तिथेच वास्तव्य केले.

यापुढची कथा गढवाली लोकगीतांत मिळते, ती अशी–

शिव बदरी वनाच्या निर्जन एकांतात पार्वतीसह वास्तव्य करीत असता ऋषिगंगेच्या दक्षिण तीरावर पार्वतीला एक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नवजात शिशू रडत असलेला दिसला. ते नारायणाचे बाल रूप होते; पण पार्वतीला ते कळले नाही. तिने शिवाच्या विरोधाला न जुमानता त्या बालकाला उचलले आणि ती आश्रमात आली' तिथल्या गुहेत तिने त्याला स्नान घालून झोपविले. नंतर शिव-पार्वती तप्तकुंडावर स्नान करण्यासाठी निघून गेली. परत येतात तो गुहेचे द्वार आतून बंद झालेले. पार्वतीने बरेच प्रयत्न केले; पण तरीही ते उघडले नाही. त्यावर शिव म्हणाला. 'पार्वती, मी तुला सांगितले होते, की या बालकाच्या फंदात तू पडू नकोस; पण तू ऐकले नाहीस.'

बिचारी पार्वती खाली मान घालून उभी राहिली, एवढ्यात गुहेतून गंभीर वाणी उमटली. 'शिवमहाराज, तुमच्या इथल्या वास्तव्याचा उद्देश पुरा झाला आहे. तुम्ही दोघे आता केदार-क्षेत्री जाऊन निवास करा. माझे भक्त प्रथम तुमचे दर्शन करतील आणि मग माझ्या दर्शनाला येतील.'

नारायणाचे हे देऊळ गढवालच्या महाराजांनी इ. स. च्या १३ व्या शतकाच्या अखेरीस बांधले व अहल्याबाई होळकर यांनी त्यावर सोन्याचा कळस चढविला, असे सांगतात.

इथली नारायणाची मूर्ती फार प्राचीन आहे, असे पुराणांवरून कळते. इथे नर-नारायणांनी उग्र तपश्चर्या केली. त्यामुळे अलकनंदेच्या उभय बाजूंच्या पर्वतांना नर-नारायण अशी नावे पडली. बदरीनाथाचे मंदिर त्यांपैकी नारायण पर्वताच्या छायेत आहे. कलियुग सुरू झाल्यावर नारायण हे स्थान सोडून गेला. जाताना त्याने ब्रह्मादी देवांना तिथे आपली मूर्ती स्थापन करायला सांगितले. मग देवांनी शाळिग्राम शिळेची एक मूर्ती बनवून ती इथे स्थापली. पण ही मूर्ती अनेकदा स्थानभ्रष्ट झाल्याच्या कथा व आख्यायिका आहेत.

बौद्ध धर्माच्या उदयानंतर व तो धर्म तिबेटात प्रसार पावल्यानंतर तिबेटी लोकांनी या क्षेत्रावर आक्रमण केले आणि हे क्षेत्र नष्टभ्रष्ट करून इथली नारायणाची मूर्तीही नारद-कुंडात टाकून दिली. पुढे शंकराचार्यांनी जेव्हा वैदिक धर्माची पुनःप्रतिष्ठा केली, तेव्हा त्यांनी बदरीक्षेत्रात एक मठ स्थापन केला आणि नारदकुंडातली नारायणमूर्ती वर काढून पुनश्च तिथे तिची स्थापना केली.

दुसरा प्रकार याहून वेगळा आहे. कोण्यातरी काळी बदरी-नाथाला यात्रेकरूच येईनासे झाले. त्यामुळे पुजाऱ्याला उपवास पडू लागले. म्हणून त्याने नारायणमूर्ती. तप्तकुंडात फेकून पांडुकेश्वराचा रस्ता धरला. कालांतराने घंटाकर्ण नामक एका कोण्या भक्ताच्या अंगात देवाचा संचार झाला आणि त्याने सांगितले, की नारायणमूर्ती तप्तकुंडात आहे. मग रामानुजी संप्रदायाच्या एका आचार्याने ती मूर्ती तप्तकुंडातून काढून पुनश्च तिची मंदिरात प्रतिष्ठा केली.

इथे प्रतिदिवशी नारायणाच्या मूर्तीसाठी दोन-तीन मणांचा भात शिजतो. भाताबरोबरच आमटीही असते. तिसऱ्या प्रहरी या भाताचा देवाला नैवेद्य दाखवतात. त्याला राजभोग म्हणतात. या नैवेद्यानंतर तोच भात प्रसाद म्हणून यात्रेकरूंना विकतात. श्राद्धाकरता लागणारे पिंडही त्याच भाताचे तयार मिळतात.

शंकराचार्यांच्या काळापासून इथला पुजारी नंपूतिरी ब्राह्मण असतो. त्याला रावळ म्हणतात. परंपरेने त्यांच्याच वंशात पूजेचा व सबंध देवस्थानाचा अधिकार चालत आला आहे. पूर्वी हे पुजारी ब्रह्मचारी असत. पण कालांतराने तिथे गृहस्थ पुजारी आले. देवस्थानाचा कारभार रावळाच्या हातात असला, तरी त्यावर सरकारी देखरेख आहे. देवस्थानाचे वार्षिक उत्पन्न २ ते २॥ लाखांचे असते. देवस्थानाच्या संपूर्ण मालकीची सुमारे २०० व अंशतः मालकीची १५० खेडी आहेत.

या क्षेत्रात पाच तीर्थे असून यात्रेकरूला त्यांत स्नान करावे लागते. त्या तीर्थांची नावे अशी – (१) ऋषिगंगा (२) कूर्म-धारा (३) प्रल्हादधारा (४) तप्तकुंड व (५) नारदकुंड.

तप्तकुंडातले पाणी नेहमी गरम असते. या कुंडाच्या खालच्या अंगाला गरुडशिला, नारदशिला, मार्कंडेयशिला, नरसिंहशिला व वाराहीशिला अशा पाच शिला आहेत.

बदरीनारायणापासून सहा मैलांवर लक्ष्मीवन नावाचे एक स्थान आहे. त्याच्या जवळच अलकापुरी आहे. तिथे सत्यपथ पर्वतातून आलेले हिमप्रवाह एकत्र मिळतात. त्यातूनच अलक-नंदेचा उगम होतो. हे स्थान १४४०० फूट उंचीवर आहे. उगमापासून पुढे पाच-सहा मैलांवरील केशवप्रयागापर्यंत अलक-नंदा पूर्वाभिमुख वाहते. तिथून पुढे ती दक्षिणवाहिनी होऊन विष्णुप्रयागापर्यंत जाते.

याच अलकनंदेच्या उजव्या तीरावर ब्रह्मकपाल नावाचा एक प्रशस्त मुईसपाट खडक आहे. त्या ठिकाणी जाऊन पितरांचे श्राद्ध अवश्यमेव करावे, असे सांगितले असून, बदरीमाहात्म्यात त्याचे फल सांगितले आहे, ते असे –

दद्यात् ब्रह्मकपालेऽस्मिन् पिण्डं पुत्रोऽथवा परः ।
नाम्ना यस्य स वै ब्रह्मलोकं याति सनातनम् ।।

अर्थ – पुत्राने अथवा दुसऱ्या कोणा आप्तस्वकीयाने ब्रह्म-कपालावर पितरांना पिंड द्यावा. ज्याच्या नावाने तो पिंड दिला असेल, तो सनातन अशा ब्रह्मलोकाला जातो.

केशवप्रयागाच्या जवळच माणा नावाचे एक गाव आहे. हे गाव समुद्रसपाटीपासून १०५६० फूट उंच आहे. तिथे जवळच सरस्वती नदीच्या तीरी बदरिकाश्रमात व्यासगुंफा आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यासांनी या ठिकाणी भारत हा ग्रंथ लिहिला व भागवत हे पुराण लिहिले. शंकराचार्यांनी आपले भाष्यग्रंथही इथेच बसून लिहिले, असे सांगतात. वैष्णवमतप्रवर्तक मध्वाचार्य यांनीही आपले कार्य संपल्यावर शेवटी याच आश्रमात येऊन समाधी घेतली, असेही सांगतात. तिथे त्यांचे समाधी–वृंदावनही बांधलेले आहे. वैष्णवपंथी यात्रेकरू तिथे जाऊन त्या वृंदावनाचे दर्शन घेतात.

माण गावापासून थोड्याच अंतरावर मुचकुंदाची गुंफा आहे. मुचकुंदाने तिथे तपश्चर्या करून विष्णुपदाची प्राप्ती करून घेतली, अशी कथा आहे. माणाच्या वायव्येस अलकनंदातीरी मातामूर्ती हे स्थान आहे. दक्षप्रजापतीची मूर्ती नावाची मुलगी धर्माला दिली होती. तिच्या पोटी नर–नारायणच पुढे कृष्णार्जुनरूपाने अवतरले. त्यांच्या मातेचे हे स्थान असल्यामुळे त्याला मातामूर्ती असे नाव मिळाले. तिथे तिचे मंदिर आहे. गोकुळाष्टमीपासून वामनद्वादशीपर्यंत तिथे मोठी यात्रा भरते. त्या वेळी बदरीनाथाहून उद्धवाची मूर्ती मिरवणुकीने तिथे नेली जाते.

बदरीनाथाच्या पश्चिमेस पाच मैलांवर २१६४० फूट उंचीचे नीलकंठ शिखर आहे. ते सदैव बर्फाच्छादित असते. त्या बर्फात नारायणाच्या चरणपादुका आहेत. श्रावणात त्या बर्फातून मोकळ्या होतात. त्याच्या वरच्या अंगाला उर्वशीकुंड आहे. तिथेच नारायणाने आपल्या मांडीतून उर्वशी नामक अप्सरेला जन्म दिला, असे सांगतात.

जोशीमठाहून जो मार्ग नीतिघाटावरून कैलासाला जातो, त्या मार्गावर जोशीमठापासून सहा मैलांवर तपोवन नावाचे एक क्षेत्र आहे. तिथून तीन मैल पुढे एक विष्णुमंदिर आहे. त्या स्थानाला भविष्यबदरी म्हणतात. तिच्याविषयीची एक आख्यायिका सांगतात, ती अशी – जोशीमठ येथे नरसिंहाची एक चतुर्भुज मूर्ती आहे. तिची एक भुजा अत्यंत क्षीण आहे. असे वाटते, की पूजा करता करता पूजकाचा हात लागून ती सहज गळून पडू शकेल. कधी तरी एक दिवस ती गळून पडणार आहे, मग विष्णुप्रयागाच्या पुढचे सांप्रत जवळ जवळ दिसणारे नर-नारायण हे पर्वत एकमेकांना चिकटणार आहेत. मग बदरीनाथाच्या यात्रेचा मार्ग कायमचा बंद होईल. तेव्हापासून यात्रेकरू भविष्यबदरीची यात्रा करू लागतील.

बदरीनाथापासून पुढे काही मैलांवरच भारताची सीमा संपून तिबेटची सीमा लागते. बदरीनाथाची यात्रा पूर्वी फार कष्टमय होती. यात्रेकरूंना पायी किंवा कंड्यात बसून जावे लागे. पण आता तिथवर पक्की सडक झाली असून, यात्रेकरूंना हा सगळा वास बसमधून करता येतो.

या क्षेत्रात कालीकंबलीवाल्याच्या अनेक धर्मशाळा आहेत. तिथे यात्रेकरूंना पांघरण्यासाठी कांबळी मिळू शकतात. गरीब यात्रेकरूंच्या भोजनासाठी तिथे सदावर्तही आहे. या क्षेत्रात हिवाळ्यामध्ये दहा ते पंधरा फूट उंचीचे बर्फ पडते. त्यामुळे मार्गशीर्ष ते वैशाख या काळात तिथे कोणीही राहू शकत नाही. म्हणून तेवढ्या काळात तिथले देऊळ बंद करून नारायणाची उत्सवमूर्ती खाली जोशीमठात आणतात व तिथे तिची पूजाअर्चा चालू ठेवतात. वैशाखात बर्फ वितळून गेल्यावर उत्सवमूर्ती परत बदरीनाथाला नेतात. त्या दिवसापासून बदरीनाथाची यात्रा सुरू होते. [हिमालयदर्शन]

बद्दन

एक भटकी जमात. हे लोक मुसलमान असून, मूळचे अरब आहेत. वाहले, धार आणि बलारे अशा यांच्या तीन प्रमुख टोळ्या आहेत. पंजाबमधील सतलज आणि बियास या नद्यांच्या खोऱ्यांत यांची वस्ती आढळते. हे इमाम शरीफाचे अनुयायी आहेत. इतर मुसलमान यांना जातिबाह्य मानतात. गवताची खेळणी व इतर वस्तू बनविणे हा यांचा प्रमुख धंदा आहे. यांच्या स्त्रिया तुंबड्या लावतात आणि काही वेळा फेरीवालीचेही काम करतात. [पं. का.]

बधोयी

ओडिसातील एक जात. ओडिया सुतारांना हे नाव आहे. संस्कृत भाषेतील वर्धकी या शब्दावरून ओडिया भाषेतील बर्धकी = (लाकडाचे) आकार बदलणारा, हा शब्द निर्माण झाला आणि त्यावरून बधोयी हा शब्द बनला आहे.

ओडिसातील जमीनदारांनी व सरकारनेही त्यांच्या कारागिरीबद्दल खूष होऊन त्यांना काही जमिनी इनाम दिल्या आहेत. त्याबद्दल दरवर्षी गावच्या देवीच्या जत्रेच्या वेळी ते देवीला एक रथ तयार करून देतात. पुष्कळ ठिकाणी जत्रा संपल्यावर तो रथ जाळून टाकतात. त्यामुळे तो दरवर्षी तयार करावा लागतो. गावातल्या लोकांना ते शेतीची अवजारेही बनवून देतात.

त्यांच्या प्रमुखाला महाराणा असे नाव असून, ते पद वंशपरंपरा असते. काही ठिकाणी महाराणा, दोंडोपाटो महाराणा आणि सांगसो महाराणा असे तीन अधिकारी असतात. त्यांना भलोभय्या किंवा दोलोबेहरा नावाचा एक मदतनीस असतो.

यांची पंचायत असते. ती गुन्हेगारांचा न्यायनिवाडा करते व त्यांना दंडही करते. दंडाची रक्कम लहान असल्यास जातिप्रमुख घेतो व मोठी असल्यास गरीब लोकांच्या लग्नप्रसंगी खर्च करण्यासाठी ठेवून देतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाहप्रथा – लग्नासाठी वधूच्या घरी जाताना वराच्या कपाळावर दोन बाशिंगे बांधतात. वाटेत वधूपक्षाचा पुरोहित व नातेवाईक त्याला सामोरे येतात. त्या वेळी वधूपक्षाकडील न्हावी त्याचे पाय धुतो आणि त्याला पिवळे वस्त्र, फुले व दूर्वा देतो. वधूगृही पोचल्यावर पुरोहित मंत्र म्हणतो. वादक वाद्ये आणि शंख वाजवून त्याचे स्वागत करतात आणि स्त्रिया तोंडाने हुलुहुली असा आवाज करीत त्याच्यावर दर्भ उधळतात. मग तो बोहल्यावर जाऊन बसतो. वधूचा मामा वधूला घेऊन मांडवात येतो. ती वराच्या मस्तकावर मीठ, पिवळ्या अक्षता आणि लाह्या ओतते व त्याच्या शेजारी बसते. मग वराच्या कपाळाचे एक बाशिंग काढून तिच्या कपाळावर बांधतात. यांचे लग्नातील बरेचसे विधी ब्राह्मणांच्या सारखेच असतात. ते झाल्यावर वधूचा पिता तिचा हात वराच्या हातात देतो. मग गवताचा एक भारा वेदीवर ठेवतात आणि त्याच्यावर वधू पश्चिमेला व वर पूर्वेला तोंड करून बसतात. पुरोहित थोडा गूळ वराच्या उजव्या हाताला चोळतो व वधूचा हात त्याच्या हातात देऊन दोघांचे हात दर्भाच्या दोरीने बांधतो. नंतर वधू-वरांच्या वस्त्रांना एक पिवळे वस्त्र बांधून ते त्यांच्या खांद्यावर टाकतात. एक सुवासिनी त्यांचे बांधलेले हात सोडते. पितृश्राद्ध झाल्यावर पुरोहित वधू-वरांवर पिवळ्या अक्षता टाकतो व त्यांना आशीर्वाद देतो. सहाव्या दिवशी नवरामुलगा रुसल्याचे सोंग करून सासऱ्याच्या घरून निघून दुसऱ्या एखाद्या नातेवाईकाकडे जातो. नंतर त्याला शोधतात व त्याच्या तोंडाला थोडा गूळ फासून घरी घेऊन येतात.

देवधर्म – हे चैतन्य मताचे अनुयायी आहेत. ते अनेक ग्रामदेवतांनाही भजतात.

मर्तिकप्रथा – ते मृतांना जाळतात. जाळण्यापूर्वी स्मशानात मृतांना स्नान घालतात. [का. ट्रा. स. इं.]

बनगर

एक जात. यांची वस्ती प्रामुख्याने पुणे जिल्ह्यात आहे. आमचां मूळ माहिती बसवपुराणात आहे आणि आम्ही सुमारे तीनशे वर्षांपूर्वी आमची मूलभूमी सोडून महाराष्ट्रात आलो, असे हे सांगतात. हे व्यापारी आहेत.

यांच्यांत पोटभेद नाहीत. जिरसाळे, खटावकर, फुटाणे, म्हसूरकर, तांबे, वाईकर ही आडनावे असलेल्या मंडळींत यांचा रोटीव्यवहार होतो, परंतु बेटीव्यवहार मात्र होत नाही. हे गळ्यात लिंग घालतात व भस्म आणि गंधही लावतात. हे महादेवाला भजतात. जंगम हा त्यांचा धर्मगुरू असतो.

यांच्यांत जातपंचायत असते. जाति–प्रमुखाला शेट्या असे म्हणतात. तो जातीच्या तंट्याचा निवाडा करतो.

विवाहप्रथा – मुलगी वयात येण्यापूर्वीच तिचा विवाह करतात. मुलगी पाहून लग्न ठरले, की वरपक्ष मुलीला पायातले चांदीचे दागिने देतो. मुहूर्त ठरल्यावर नवरीला हिरवी साडी-चोळी आणि नवऱ्या मुलाला उपरणे व पागोटे यांचा अहेर करतात. लग्न लागण्यापूर्वी मातीचे दोन रंगीत घडे आणून ते फोडतात. मग त्याचे खालचा व वरचा असे दोन भाग करतात. वरच्या भागावर खालचा भाग ठेवून त्यात राख भरतात. या राखेत तेलाने भिजलेल्या वाती ठेवून त्या पेटवतात. नंतर घड्याभोवती पंधरा पताका लावतात. या सर्व प्रकाराला कुलधर्माचा दिवा असे म्हणतात. नवरा मुलगा व त्याची आई हे दिवे डोक्यावर घेऊन महादेवाच्या मंदिरात जातात आणि तिथे देवाला ओवाळतात. नंतर नारळ फोडून त्याच्या पाण्याने दिव्याच्या वातो विझवतात. यानंतर देवक बसवून मग लग्न लावतात.

प्रसूतिप्रथा – मूल जन्मल्यावर पाचव्या दिवशी सटवाईची पूजा करतात. सातव्या दिवशी जंगमाला बोलावून त्याच्या पायाचे तीर्थ घेतात. त्या वेळी जंगम मुलाच्या उशागती लिंग ठेवतो. बाराव्या दिवशी मुलाचे नाव ठेवतात. हे जननाशौच मानीत नाहीत.

मर्तिकप्रथा – मृताला बसलेल्या स्थितीत पूर्वेकडे तोंड करून पुरतात. त्याची प्रेतयात्राही बसलेल्या स्थितीतच झोळीतून काढतात. या वेळी जंगम पुढे शंख वाजवीत जातो. पुरताना शंखातून पाणी आणून ते व बेलाचे पान मृताच्या तोंडात घालतात. प्रेत पुरल्यावर त्या जागेवर उभा राहून जंगम काही मंत्र म्हणतो व त्या जागी बेलाची पाने पसरतो. हे लोक सुतक पाळीत नाहीत. तिसऱ्या अथवा पाचव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. प्रतिवर्षी श्राद्धही करतात. [पूना गॅझे.]

बनशंकरी

एक शैव देवता. हिचे मूळ नाव शाकंभरी असे आहे. बादामी येथे तिचे मंदिर आहे. तिथे तिला बनशंकरी असे म्हणतात.

ही देवी अष्टभुजा असून, तिच्या आठही हातांत आयुधे आहेत. ती सिंहावर बसलेली असून, त्या सिंहाच्या पायांखाली दोन हत्ती आहेत. देवीच्या प्रमुख मूर्तीच्या डाव्या उजव्या बाजूस वाहुल्यांप्रमाणे चार मूर्ती आहेत.

गर्भागारात देवीजवळ नंदादीप तेवत असतो. दर शुक्रवारी तिची पालखी निघते. देवीची नित्य त्रिकाळ पूजा होते.

हिचा रथोत्सव मोठा होतो. रथ ओढण्यात भाग घेणे हे पुण्यकृत्य मानतात. अनेक लोकांची ही कुलदेवता असून, ती नवसाला पावते, असे समजतात. [पुरुषार्थ, जून–जुलै, १९६३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बनवासी उत्तर कानडा जिल्ह्यात शिरसीपासून १५ मैलांवर हे गाव आहे. पूर्वी याचे नाव बनवासी किंवा वैजयंती असे होते. कुंतलाधिपती कदंब वंशाची ती राजधानी होती. मौर्य सम्राट अशोक व सातवाहन नृपती शातकर्णी यांच्या शिलालेखांत बनवासीचा उलेख आहे. रक्खिन नामक भिक्षू सनपूर्व ३ ऱ्या शतकात बौद्ध धर्माचा प्रचार करण्यासाठी बनवासीला गेला होता, असे महावंश या ग्रंथात सांगितले आहे. महाभारतात या प्रदेशाला वनवासक म्हटले आहे (भीष्म. ९.३६६). पांडवांचा वनवास या प्रदेशातच घडला. बनवासीपासून सुमारे १६ मैलांवर हनगल नावाचे गाव आहे. तिथे विराट राजाची राजधानी होती. पुराणांत ज्या वनवासक जनपदाचा उल्लेख आहे, ते याच प्रदेशात असावे, असे म्हणतात.

सातवाहनांची सत्ता दुबळी झाल्यानंतर कुंतल देशावर चुटू वंशाचे राज्य होते. बनवासी ही त्यांची राजधानी होती. त्यानंतर काही काळ या प्रदेशावर पल्लवांची सत्ता आली. पुढे इ. स. च्या चौथ्या शतकात तिथे कदंबांचे राज्य सुरू झाले. इ. स. च्या सातव्या शतकाच्या प्रारंभी बादामीच्या चालुक्य राजाने कदंबांचा पराभव करून बनवासी नगरी जिंकली. त्यानंतर कदंब वंशातील राजांनी बनवासी येथे अनेक शतके राज्य केले. मात्र ते स्वतंत्र नसून मांडलिक होते. या गावात कदंब वंशातील कीर्तिवर्मा राजाचे दोन शिलालेख सापडले आहेत.

इथे मधुकेश्वराचे मंदिर आहे. मधुकेश्वर हा कदंबांचा संरक्षक देव होता. या मंदिरात एक प्राचीन शिलालेख आहे, त्यात हारीतीपुत्र शातकर्णीचा उल्लेख आढळतो. बनवासी गावात असे अनेक शिलालेख आहेत. त्यांतून पुष्कळ ऐतिहासिक माहिती मिळते. [हि. जॉ. ए. इं.; क. द.; जॉ. पु.]

बनारसीदास (१५८६ ते १६४३ इ. स.) एक कवी व ग्रंथकार. याचा बाप खरगसेन हा जैन असून जवाहिऱ्याचा धंदा करीत असे. बनारसीदासाचा जन्म जैनापूर येथे झाला. त्याचे पाळण्यातील नाव विक्रमाजित असे होते. हा नवसाचा असल्याने पुढे पार्श्वनाथाच्या आदेशानुसार याचे नाव बनारसीदास ठेवण्यात आले. याच्या गुरूचे नाव भानुचंद्र असून तो खरतरगच्छाचा होता. त्याशिवाय पंडित देवदास व अभयधर्म या दोन गुरूंकडूनही त्याने विद्या मिळवली. हा प्रथम श्वेतांबरपंथी होता; पण पुढे त्याने दिगंबर पंथाचा स्वीकार केला. याचे एकूण तीन विवाह झाले. आचारापेक्षा तत्त्वज्ञानाकडे याचा ओढा अधिक असल्यामुळे आचाराचे स्तोम माजविणाऱ्यांचा याच्यावर राग झाला. मेघविजय नामक श्वेतांबरपंथी उपाध्यायाने युक्तिप्रबोध नावाचे प्राकृत नाटक लिहून त्यात बनारसीदासावर सडकून टीका केली आहे.

बनारसी दासाचे रूपचंद, कुंवरपाल, इ. पाच साथीदार होते. ते सगळे मिळून रात्रंदिवस अध्यात्माची चर्चा करीत व तदनुसार लेखनही करीत. बनारसीदासाचे बनारसीविलास, नाटकसमयसार, अर्धकथानक व नाममाला हे चार महत्त्वाचे ग्रंथ असून, त्याशिवाय नवरसरचना, मोहविवेकयुद्ध, मांझा, इ. ग्रंथही त्याने रचले आहेत. वयाच्या १५ व्या वर्षी त्याने नवरसरचना हा ग्रंथ लिहिला. त्यातला मुख्य रस शृंगार हा होता, पण पुढे अध्यात्माची गोडी लागल्यावर त्याने तो ग्रंथ गोमती नदीत बुडवून टाकला.

अर्धकथानक हे त्याचे आत्मचरित्र असून, हिंदी साहित्याला ती मोठी देणगी आहे, असे समजतात. प्राचीन व मध्यकालीन साहित्यातील हे पहिलेच आत्मचरित्र मानले जाते. चरित्रलेखनसमयी लेखकाचे वय ५५ वर्षांचे असल्याने या आत्मचरित्राला अर्धशतक असे नाव ठेवण्यात आले आहे. तीन बायका व नऊ मुले यांचा वियोग, व्यवसायात अपयश, कुष्ठ रोगाची असह्य व्यथा, प्रेमाचे चटके, भोळेपणा व व्यवहारशून्यता या सगळ्या गोष्टींमुळे त्याला जगात जे नाना प्रकारचे ताप सोसावे लागले त्यांचे प्रतिबिंब त्याच्या आत्मचरित्रात दिसते. तो म्हणतो–

यह संसार विडंबना, देखि प्रगट दुख खेद ।
चतुर चित्त त्यागी भये, मूढ न जानहि भेद ।

भावार्थ – हा संसार म्हणजे शुद्ध विटंबना आहे. त्यात दुःखे व खेद भरलेले दिसतात. चतुर माणसाचे मन त्यागी बनते. परंतु मूर्खाला मात्र त्यातील भेद कळत नाही.

याने आत्मचरित्रात माणसांच्या तीन श्रेणी सांगितल्या असून, तो स्वतःला मध्यम श्रेणीचा मानतो–

जे पर दोष छिपाइके, परगुन कहे विशेष ।
गुन तजि निज दूषन गहै, ते नर उत्तम भेष ।।
जे भाखहि पर दोष-गुन, और गुन-दोष सुकीऊ ।
कहहि सहज ते जगत में, हमसे मध्यम जीउ ।।
जे परदोष कहै सदा, गुन गोपहि उर बीच ।
दोस लोपि निज गुन कहै, ते जग में नर नीच ।।

भावार्थ – जे दुसऱ्यांच्या दोषांवर पांघरूण घालून फक्त त्यांचे गुणच पाहतात व दोष टाकून गुण घेतात, ते नर उत्तम होत. जे दुसऱ्यांच्या गुण-दोषांची चर्चा करतात आणि गुण-दोष शिकतातही, त्यांना जगात आमच्यासारखे मध्यम पुरुष म्हणून म्हणतात. पण जे केवळ दुसऱ्यांचे दोषच पाहतात आणि गुणावर पडदा पाडतात आणि स्वतःचे दुर्गुण लपवून ठेवून गुणांचेच वर्णन करतात, त्यांना नीच नर असे म्हणावे.

केवळ सांसारिक अनुभवच नाही, तर त्या काळच्या राज

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नैतिक व साहित्यिक परिस्थितीचे प्रतिबिंबही त्या ग्रंथात उमटले आहे. ग्रंथाची भाषा सुंदर आणि वर्णने स्वाभाविक व हृदयस्पर्शी आहेत.

नाटकसमयसार ही बनारसीदासाची सर्वोत्कृष्ट कृती आहे. कुंदकुंदाचार्यांच्या समयसार नावाच्या ग्रंथावर अमृतचंद्राचार्यांची टीका आहे. या दोहोंच्या आधारे बनारसीदासाने एक नाटक रचले आहे. दिगंबर-श्वेतांबर या दोन्ही संप्रदायांमध्ये या ग्रंथाला मान्यता आहे. याने आपल्या नाटकात आत्मानुभवाला मुख्य नायक बनवले आहे. आत्म्याचे क्षेत्र ज्ञान नसून भावजगत आहे, असे तो म्हणतो.

नाममाला हा याचा ग्रंथ धनंजयाच्या नाममाला व अनेकार्थनाममाला या ग्रंथांच्या आधारावर रचलेला आहे. हा १७६ दोह्यांचा एक लहान शब्दकोश आहे. हिंदी जैन कोशग्रंथांत याला प्रथम शब्दकोश म्हणून मान आहे. याची फुटकळ रचना बनारसीविलास या नावाने संग्रहीत आहे. [म. ज्ञा. को.; हिं. जै. भ. क.; हिं. सा., द्वितीय खंड.; हिं. नी. वि.]

बनिया

एक व्यापारी जात. यांना वाणी, वाणिया, बंजिग अशीही नावे आहेत. संस्कृतमधील वणिज् = व्यापारी या शब्दावरून वरील नावे आली आहेत. या लोकांची सर्वांत जास्त वस्ती उत्तर प्रदेशात असून, त्याच्या खालोखाल महाराष्ट्र, गुजरात, बिहार, ओडिसा, मध्यभारत, काश्मीर व राजस्थान या भागात आहे. व्याजाने पैसे देणे व धान्य, किरणामाल, कापड, इ. वस्तूंचा व्यापार करणे हा यांचा प्र ख व्यवसाय आहे.

काही बनिये मुसलमानही आहेत. हिंदू बनिये स्वतःला वैश्य समजतात व काहीजण जानवेही घालतात.

या लोकांच्या खंडेलवाल, लाड, मोढ, नागर, काठी, अद्वास, मिसरी, कसेर उमरा, वागरिया, धुसार, अग्रवाल, ओसवाल, परवार, लिंगायत, मराठा, माहेश्वरी, गहोई, श्रीमाळी, जैसवाल, इ. अनेक पोटजाती आहेत. या बहुतेक पोटजातींची नावे गावावरून पडली आहेत. त्यांच्यांत उच्च-नीच असे भेदही आहेत. मात्र यांच्यांत परस्पर रोटीव्यवहार चालतो व क्वचित बेटी- व्यवहारही होतो. बहुतेक बनिया हे मूळचे राजस्थान, बुंदेलखंड व गुजरात या भागातले आहेत. राजस्थानमध्ये पूर्वी बनिया जातीचे बरेच प्रधान होऊन गेले. बरेच बनिया जैन असून, बाकीचे वैष्णव आहेत. पण त्यांच्या चालीरीतींत फारसा फरक नाही. जैनांचे उपाध्याय ब्राह्मण असतात. त्यांच्यांत वीसा व दसा असे आणखीही भेद आहेत. वीसा हे श्रेष्ठ व दसा हे कनिष्ठ समजले जातात. कारण दसा वर्गात पुनर्विवाहाची संतती, गांधर्व विवाहाची संतती व कडक जातिनियमांपासून च्युत झालेले, अशांचा समावेश होतो. या दोन वर्गांत विवाहसंबंध होतो. आणि श्रीमंत व मानमरातब मिळालेल्या दसा लोकांना वीसा वर्गात जाता येते. असे दसा पुनर्विवाहाच्या संततीवर बहिष्कार घालतात. त्यामुळे अशा लोकांचा पंचम नामक एक नवा वर्ग निर्माण झाला आहे. बनिया लोकांत बहुतेक बारा गोत्रे आहेत. मातृवंश किंवा पितृवंश यांच्या पाच पिढ्या तुटल्याशिवाय परस्पर लग्नसंबंध होत नाही. जैन बनियांच्या लग्नात वधू अग्नीऐवजी वराच्याच भोवती सात प्रदक्षिणा घालते. प्रत्येक प्रदक्षिणेच्या वेळी, वर तिच्या मस्तकावर साखर टाकतो. उत्तर भारतात, वधूची पाठराखीण म्हणून अनेक स्त्रिया वरातीबरोबर वरगृही जातात. घरात मुलगा झाल्यास आनंद प्रदर्शित करण्यासाठी थाळा वाजवतात व मुलगी झाल्यास शोकप्रदर्शनार्थ मडके फोडतात.

मध्यप्रदेशातील बनिया, शिराळशेटासारखी नाथूरामाची एक मूर्ती शिमग्यात मिरवतात. तिच्याभोवती स्त्रीपुरुष फेर धरतात व एकमेकांवर धूळ आणि गुलाल फेकतात. येथील बनियांच्या लग्नात वराने कुंभाराच्या गाढवाला लाथ मारण्याची पद्धत आहे.

नेमाडात लग्नानंतर स्त्रीला अपत्यप्राप्ती होईपर्यंत ज्वारी खावी लागते. मूल झाल्यावर दिल्लीजवळच्या महाऊरच्या देवीचे दर्शन घेतल्यावर तिला गहू खायला परवानगी मिळते.

जबलपूर-रायपूर या भागातील काही बनिये नानकपंथी आहेत. त्यांच्यांतअ औधिये, साघी, चरणाग्री, भार्गव, गहोई, गोलपूरव, कसखानी, कसौंधन वगैरे पोटजाती आहेत. माहेश्वरी लोकांत लग्नाच्या वेळी वराची सासू त्याच्या गळ्यात दावे बांधते व त्याचे नाक धरून त्याला मांडवात नेते. तिथे ती त्याला जोडचाची पूजा करायला लावते. माहेश्वरी हे बहुतेक शैव आहेत. यांचा पोषाख साधा असतो. कमरेत चांदीची साखळी घालण्याची त्यांना फार आवड आहे. सकाळी देवदर्शन घेऊन ते आपल्या कामाला सुरुवात करतात.

बनियांच्या काही पोटजातींची माहिती पुढीलप्रमाणे –

गहोई – बुंदेलखंड व मोरादाबाद या ठिकाणी यांची वस्ती आहे. एकदा भूकंपाच्या वेळी बियापानरी नामक एका ब्राह्मण शिक्षकाने गहोई लोकांची बारा मुले वाचविली व बारा गोत्रांत त्यांची विभागणी केली. त्याचे स्मरण म्हणून लग्नकार्यप्रसंगी भिंतीवर त्याचे चित्र काढून त्याची पूजा करण्याची प्रथा या लोकांत आहे. लग्नाच्या वेळी वधू वराभोवती सात प्रदक्षिणा घालते. यांच्यांत सगोत्र विवाह होत नाही. हे लोक वैष्णव असून, श्रीकृष्ण किंवा बिहारीलाल ही त्यांची उपास्य देवता आहे. मृताच्या तेराव्या दिवशी श्राद्ध करतात व पितळेची किंवा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मातीची तेरा पात्रे त्यांत पीठ भरून ब्राह्मणांना दान देतात.

औधिया – यांचे मूळ स्थान औध हे असल्यामुळे यांना हे नाव मिळाले आहे. हे लोक खोटी रत्ने विकतात. त्यासाठी ते ब्राह्मण, बैरागी, फेरीवाले, इ. सोंगे घेतात. यांचे विवाह उच्चवर्णीय हिंदूंच्या पद्धतीने होतात. हे व्यभिचारी स्त्रीला जातिबहिष्कृत करतात. हे देवीला भजतात व दसऱ्याला तिला बकरा बळी देतात. मृताला जाळतात किंवा पुरतात. प्रेताला प्रथम मीठ, तूप, हळद व दूध लावतात आणि मग पुरतात. पुरलेल्या जागेवरील थोडी माती नदीत नेऊन टाकतात. सांसर्गिक रोगाने मेलेल्या माणसाला गंगेच्या प्रवाहात टाकतात. नंतर वर्षाच्या आत त्याची पिष्टमय मूर्ती करून तिचे विधिपूर्वक दहन करतात.

असाथी – बुंदेलखंडातील टिंकमगढ जिल्हा हे यांचे मूळ स्थान आहे. यांच्यापैकी काही जैन आहेत. पूर्वी हे लोक प्रेत अर्धे जाळीत असत व अर्धे पुरीत असत.

दोसन – यांची वस्ती मुख्यत्वे गंगायमुनांचा दुआब व औध या ठिकाणी आहे. हे वैष्णव आहेत. हे सोन्याचांदीचे दागिने विकतात; तसेच तंबाखू, धान्य वगैरे वस्तूंचाही व्यापार करतात.

परवार – जबलपूर व नर्मदेच्या काठचा प्रदेश, यात या लोकांची मुख्य वस्ती आहे. ते राजपूत वंशाचे असून, बुंदेली व मारवाडी या बोली बोलतात. ते जैन असून मंदिरांत तीर्थंकरांऐवजी जैन ग्रंथांची पूजा करतात. यांची बेनाइकिया नामक एक निकृष्ट दर्जाची शाखा असून, पुनर्विवाहित स्त्रियांची संतती व अनैतिक संबंधांतून निर्माण झालेली संतती यांचा या शाखेत अंतर्भाव होतो. यांच्यांत बारागोत्रे असून, सगोत्र विवाह होत नाही. विवाहाच्या वेळी वधू वराभोवती सात प्रदक्षिणा घालते. विवाहाच्या पाचव्या दिवशी वधूपिता नव्या पलंगावर लालवस्त्र अंथरतो. नूतन दांपत्य त्यावर बसते व नातेवाईक त्यांना अहेर करतात. हे लोक ब्राह्मणाला विचारून मुलाचे नाव ठेवतात. हे जननाशौच पाळीत नाहीत.

हे लोक मृताला जाळतात. प्रेत दहनानंतर जवळच्या जलाशयात स्नान करून घरी जातात. दुसऱ्या दिवशी मृताचे कुटुंबीय पार्श्वनाथाच्या मंदिरात जाऊन त्याच्यासमोर थोडी ज्वारी ठेवतात. मध्य प्रदेशातील परवार लोक घराला पांढरा रंग देतात. घरातील मातीची मडकी फेकून देतात व ज्ञातिभोजन घालतात.

गुजराती वाणिया – हे स्वतःला वैश्य समजतात. यांच्यांत अगरवाल, बगरिया, बाज, देशावाल, गुर्जर, जेलवाल, नागर, पल्लीवाल, उम्मद, इ. चाळीस पोटजाती आहेत. यांच्यापैकी काही जैन असून, त्यांना श्रावक व बाकीच्यांना मेश्री असे म्हणतात. बहुतेक पोटजातींचे वीसा व दसा असे भेद आहेत. वीसा हे स्वतःला दसांपेक्षा शुद्ध रक्ताचे समजतात. यांच्यांत पंच असाही एक भेद असून, तो निकृष्ट दर्जाचा मानला जातो. इतर बनिया त्या लोकांशी रोटीव्यवहार करीत नाहीत. उ. गुजरात, कच्छ आणि काठियावाड या भागातील मेश्री व श्रावक यांच्यांत रोटीव्यवहार चालतो. गुजरातेतील पोटजातींत लग्नाच्या दृष्टीने गोल किंवा विभाग पाडलेले असतात आणि त्या त्या गोलातील मुली त्या गोलातील तरुणांसाठी वधू म्हणून राखून ठेवलेल्या असतात. एखाद्या तरुणाला त्याच्या गोलातून मुलगी मिळाली नाही, तर त्याला दुसऱ्या गोलातील पंचायतीच्या संमतीने त्या गोलातील मुलीशी लग्न करता येते.

मेश्री आणि श्रावक यांच्यांत वेषभूषा व आचारविचार या बाबतींत साम्य आहे. हे लोक धोतर, जाकिट, अंगरखा, उपरणे व पागोटे असा पोषाख करतात. त्यांच्या स्त्रिया घागरा, साडी व चोळी हे कपडे वापरतात. त्यांचे कपडे भडक रंगाचे व उंची असतात. श्रीमंत बनिया पुरुष कमरेत चांदीची साखळी, दंडात सोन्याचे कडे, कानात भिगबाळी, गळ्यात सोन्याचा किंवा मोत्याचा हार व हातांच्या बोटांत अंगठ्या घालतो. बनिया स्त्री सोने व मोती यांची कर्णभूषणे, नाकात नथनी, सोन्याचा किंवा मोत्यांचा हार, बांगड्या, पायांत चांदीच्या साखळ्या अंगठ्या वगैरे अलंकार घालतात.

यापैकी मेश्री वाणिया यांच्यासंबंधी विशेष माहिती अशी–

विवाहप्रथा–सर्वसाधारणपणे मुलाचे आईबाप मुलीला मागणी घालतात. मुला-मुलींच्या पत्रिका जुळल्यास साखरपुडा करतात. त्यानंतर लगेच किंवा काही वर्षांनी प्रत्यक्ष विवाह होतो. साखरपुड्यानंतर मुलीचा बाप एका शुभ दिवशी ज्ञातिफंडाला एक रुपया देतो. त्यानंतर मुलाचा पिता मुलीच्या घरी जाऊन तिच्या बापाला दोन किंवा तीन रुपये देतो. यानंतर मुलाला व मुलीला परस्परांच्या घरून पाच ते दहा रुपयापर्यंत अहेर मिळतो. दसरा, दिवाळी, होळी यांसारख्या सणाच्या वेळी मुलीला भावी सासरहून नवे कपडे मिळतात.

मुलींचा विवाह साधारणपणे अकरा वर्षांपर्यंत होतो. लग्नाचा मुहूर्त एका कागदावर लिहितात व मुलीकडचा पुरोहित तो कागद मुलाच्या घरी घेऊन जातो. तिथे त्याला मिष्टान्नभोजन व बक्षीस मिळते. लग्नापूर्वी तीन किंवा पाच दिवस वधू-वरांच्या घरी मांडव घालतात. त्या वेळी मांडवाच्या एका कोपऱ्यात सहा इंच खोल खड्डा खणतात. मुलाचे किंवा मुलीचे आईबाप व आप्तेष्ट त्यात कुंकू, दूध, दही, सुपाऱ्या व पैसा टाकतात आणि एका विशिष्ट झाडाचा एक फूट लांब ओंडका वाद्यांच्या गजरात त्यात पुरतात. वधूच्या व वराच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घरच्या स्त्रिया स्वतंत्रपणे वाजतगाजत कुंभाराच्या घरी जातात, त्याच्या चाकाला गंध-फुले वाहतात आणि लग्नसमारंभात लागणारे मातीचे घडे घेऊन घेतात. मुलाला व मुलीला आपापल्या घरी हळद लावतात. लग्नाच्या दिवशी घराच्या दारापुढच्या मांडवात साधारण चार चौरस फूट जागेवर चार खांब पुरून आडोसा करतात. या आडोशाच्या प्रत्येक कोपऱ्यात आणखी तीन खांब उभारून त्यांत सात घटांची उतरंड रचतात. या उतरंडीच्या मधल्या चौरसाला चोरी असे म्हणतात. तिथे लग्नविधी पार पाडतात. लग्नाच्या दिवशी मुलाचा व मुलीचा मामा त्यांच्यासाठी वाजतगाजत अहेर घेऊन येतो. तो दिल्यावर वधूकडील स्त्रिया वरगृही रुखवत घेऊन जातात. मग वधू-वरांना आपापल्या घरी चार सुवासिनी स्नान घालतात आणि मामाने दिलेले वस्त्रालंकार त्यांना घालायला देतात. संध्याकाळी वधूगृही जाण्यासाठी वराचा मामा त्याला घोड्यावर बसवितो. वराच्या ओंजळीत सात विड्याची पाने, सात सुपाऱ्या, नारळ व रुपाया असतो. वधूगृही आल्यावर तो खाली उतरतो व वधूची आई त्याच्या कपाळी कुंकू लावते, त्याचे उत्तरीय ओढते आणि त्याला नांगर, मुसळ, रवी आणि बाण यांच्या प्रतिकृती दाखवते. मग दह्याची दोन गाडगी एकांवर एक ठेवून ती त्याच्या भोवती सातदा ओवाळून जमिनीवर ठेवते. नवरामुलगा त्यांच्यावर पाय देऊन ती फोडतो व मांडवात जातो. नंतर वधू-वर चोरीत पाटावर समोरासमोर उभे राहतात. त्यांच्या मध्ये अंतरपाट धरतात व पुरोहित मंगलाष्टके म्हणतो. मुहूर्ताच्या वेळी वधू-वरांचे हात जुळवतात आणि त्यांच्या वस्त्रांच्या पदराची गाठ मारतात. आप्तेष्ट त्यांना अहेर करतात. मग विवाहहोम होतो व वधू-वर अग्नीभोवती चार प्रदक्षिणा घालतात. नंतर एकमेकांना लाडवाचे चार घास देतात. त्यानंतर अरुंधतीदर्शन व एकीबेकी हा खेळ होतो. मग वधूचा सासरा तिला दागिने भेट देतो. वधू-वराकडील मंडळी परस्परांना अहेर करतात. दोन्ही पक्षांतील वडीलधारी पुरुषमाणसे एकमेकांच्या हनुवटीला व गालांना कुंकू फासतात आणि कुंकवाच्या पाण्यात हात बुडवून त्याचा छप्पा कोटाच्या पुढच्या व मागच्या बाजूला उमटवतात. मग वरात वरगृही जाते व विवाहसमारंभ समाप्त होतो.

प्रसूतिप्रथा – प्रथम गर्भवती असलेल्या स्त्रीचा पाचव्या महिन्यात पंचमासी व सातव्या महिन्यात सीमंत नामक संस्कार करतात. पंचमासी संस्कारात तिची ओटी भरून तिला नवी वस्त्रे देतात व पुरोहित तिच्या उजव्या हाताला लाल दोरा, लोखंडी वलय, शेंदूर, ज्वारीचे पाच दाणे, काळ्या रेशमाचा तुकडा, इ. वस्तू बांधतो.

सीमंत संस्काराच्या आधी चार दिवस रोज संध्याकाळी गर्भवतीला हळद लावतात व वस्त्रालंकारांनी सजवून तिला एका चौरंगावर बसवतात. मग तिच्या भोवती बसून अनेक स्त्रिया दोन - तीन तास गीते गातात. चौथ्या दिवशी गर्भवती माहेरी जाते व तिथे स्नान करून सासरी येते. त्या वेळी तिला पायघड्या घालतात. मग ती पतीसह घरातल्या देवांची पूजा करते. त्यानंतर माहेरची माणसे तिला अहेर करतात. संध्याकाळी आप्तेष्टांना जेवण देतात. नंतर ती प्रसूतीसाठी माहेरी जाते. स्त्री प्रसूत झाल्यावर ज्योतिषी मुलाची पत्रिका तयार करतो. मुलाचा बाप व इतर नातेवाईक त्याला पाहण्यासाठी येतात व मुलाला काही पैसे देतात. तसेच दहा दिवस बाळंतिणीच्या आप्तेष्ट स्त्रिया तिच्यासाठी तूप, गूळ व इतर पदार्थ पाठवतात. सहाव्या दिवशी षष्ठीपूजन होते. बाराव्या दिवशी बाळंतीण तांदुळाच्या बारा लहान ढिगांची पूजा करून ते पुरोहिताला देते. तसेच ती विहिरीची व दाराच्या खांबाचीही पूजा करते. बाराव्या दिवशी मुलाची आत्या त्याचे नाव ठेवते.

देवधर्म – हे लोक वल्लभपंथी वैष्णव आहेत. ते रोज देवाची पूजा करतात. स्त्रियांच्या व पुरुषांच्या गळ्यात तुळशीची माळ असते.

मर्तिकप्रथा – एखादा मनुष्य आसन्नमरण झाला असता गाय दान देतो किंवा त्याबद्दल सव्वा रुपया देतो. नंतर तो, माझ्या मृत्युनंतर इतकी रक्कम दानधर्मात खर्च केली जाईल, असे म्हणून उदक सोडतो. त्याचा मृत्यू जवळ आला आहे असे दिसताच त्याला स्नान घालून व त्याचे डोके उत्तरेला करून त्याला जमिनीवर ठेवतात. मग त्याच्या तोंडात गुरूचे चरणामृत, गंगाजल, तुलसीदले व लाडू घालतात आणि त्याच्या जवळ दिवा लावून ठेवतात.

प्रेत तिरडीवर घालून स्मशानात नेतात. अर्ध्या वाटेवर तिरडी फिरवून जमिनीवर ठेवतात व मृताचे पाय पुढच्या बाजूला येतील, अशा रीतीने तिरडी उचलतात. मग त्या जागी तांदूळ, सुपारी व पैसा ठेवतात. स्मशानात पुन्हा प्रेताला स्नान घालून चितेवर ठेवतात. मृताचा उत्तराधिकारी चितेला अग्नी देतो. प्रेत जळल्यावर रक्षा गोळा करून नदीत किंवा समुद्रात टाकतात. दहनाची जागा स्वच्छ करून तिच्यावर एका गाईची धार पिळतात. नंतर प्रेतवाहक मोठ्याने रडतात व तिथून निघून जातात. मृताच्या घरी दहा दिवसपर्यंत नातेवाईक येऊन शोक करतात. दहाव्या, अकराव्या, बाराव्या व तेराव्या दिवशी मृताचे अंत्यसंस्कार करतात. अकराव्या दिवशी गोऱ्हा व पाडी यांचे लग्न लावतात. बाराव्या दिवशी कावळ्याला अन्न घालतात व तेराव्या दिवशी ब्राह्मणाला शय्या दान देतात. वर्षभर मृताचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मासिक श्राद्ध करतात. वार्षिक श्राद्धाच्या वेळी ज्ञातिभोजन घालतात.

श्रावक वाणिया या लोकासंबंधी विशेष माहिती अशी– हे लोक जानवे घालीत नाहीत. देवाची पूजा करताना ते रेशमी दोरा किंवा सोन्याची साखळी जानव्यासारखी गळ्यात घालतात.

विवाहप्रथा – यांच्यातील लग्नविधी मेश्री वाणियांतील लग्नविधीसारखाच आहे. ओसवाल नवरामुलगा डोक्यावर मुगुट घालतो आणि बाकीचे पागोटे घालतात. नवरदेवाच्या हातात तलवार असते. श्रावक वाणियात वरात वरगृही आल्यावर वधू–वर जोडीने गणपतीची पूजा करतात. लग्नाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी वधूपिता वराला व त्याच्या आप्तांना अहेर करतो.

प्रसूतिप्रथा – सर्वसाधारणपणे स्त्रीची पहिली प्रसूति माहेरी होते. अपत्यजन्माची वार्ता कळताच पिता आपल्या घराच्या दारावर तोरण बांधतो. नंतर आप्तेष्टांना धने व गूळ वाटतात. सहाव्या दिवशी षष्ठीपूजा होते. मुलाचे नाव बाराव्या किंवा चाळिसाव्या दिवशी ठेवतात. मुलाची आत्या प्रथम घरातील कुलदेवतेची पूजा करते आणि मग मुलाचे नाव ठेवते. मुलाच्या नावाच्या शेवटी बहुधा चंद किंवा जी असते. चाळिसाव्या दिवशी स्त्री स्नान करून विहिरीची पूजा करते. मुलगा तीन, पाच किंवा सात वर्षांचा झाला, की त्याचे जावळ करतात. मुलीच्या बाबतीत तिच्या डोक्याच्या पाठीमागची एक बट कापतात. मुलाला प्रथम शाळेत पाठवताना वाजत गाजत पाठवतात आणि त्या वेळी आप्तेष्टांना मेजवानी देतात.

देवधर्म – श्रावक जैन असून, त्यांचे श्वेतांबर व दिगंबर असे दोन भेद आहेत. गुजरातेत श्वेतांबर लोक अधिक संख्येने आहेत. श्वेतांबरांमध्ये चौऱ्यायंशी गच्छ असून, त्यांपैकी लोंका गच्छाचे अनुयायी प्राणिहिंसा न करण्याबाबत विशेष दक्ष असतात. श्रीपूज्य म्हणजे या गच्छाचा प्रमुख, बडोदा येथे राहतो आणि दर वर्षी दौरा काढून आपल्या शिष्यांना भेट देतो. याच गच्छातून निघालेल्या ढूंढिया गच्छाचे लोक काठियावाडात बहुसंख्येने आढळतात. हे लोक मूर्तिपूजा व मंदिर बांधणे याच्या विरुद्ध आहेत. या गच्छातील मुनी भिक्षा न मागता लोकांनी आपण होऊन दिलेले अन्नवस्त्र स्वीकारतात. ते प्राणिहत्या होऊ नये, म्हणून तोंडावर पट्टी बांधतात. यासाठीच ते पावसात फिरत नाहीत, कपडे धूत नाहीत व स्नानही करीत नाहीत. श्रावक वाणिया तीर्थंकरांची पूजा करतात. त्यांच्या मंदिरातले पुजारी बहुधा श्रीमाळी ब्राह्मण असतात. पर्युषण व सिद्धचक्रपूजा हे यांचे मुख्य उत्सव आहेत. श्वेतांबरांचे पर्युषण पर्व श्रावण वद्य द्वादशीला सुरू होऊन भाद्रपद शुद्ध पंचमीला समाप्त होते; तर दिगंबरांचे पर्युषण पर्व भाद्रपद शुद्ध पंचमीला सुरू होऊन भाद्रपद वद्य पंचमीला संपते. या पर्वकाळात उपवास करायचा असतो. पण थोडे भक्त वगळल्यास बाकीचे सर्व फक्त शेवटच्या दिवशी उपवास करतात. सिद्धचक्रपूजा वर्षातून दोनदा, चैत्र व आश्विन या महिन्यांत शुद्ध सप्तमीला सुरू होऊन पौर्णिमेला संपते.

मृतिकप्रथा– एखादा मनुष्य आसन्नमरण झाला असता, त्याला पुण्य-प्रकाश या ग्रंथातील काही भाग वाचून दाखवतात आणि मंदिरांतून तीर्थंकराची एखादी मूर्ती आणून त्याला तिचे दर्शन घडवतात. नंतर तो ब्राह्मणांना धान्य व पैसे दान देतो. ओसवाल व श्रीमाळी लोकांत मृत्युशय्येवर असलेल्या माणसाला पूर्ण पोषाख चढवतात आणि शेणाने सारवलेल्या भूमीवर ठेवतात. त्याचा प्राण गेला म्हणजे रस्त्यावरील कुत्र्यांसाठी लाडू फेकतात. प्रेत तिरडीवर घालून स्मशानात नेतात आणि चितेभोवती तीनदा प्रदक्षिणा घालून प्रेत चितेवर ठेवतात. प्रेतदहन झाल्यावर लोक स्नान करून मृताच्या घरी जातात, तिथल्या विहिरीत डोकावतात आणि माती लावून हात धुतात. मृताशौच पाच ते दहा दिवस असते. या दिवसांत ओसवाल लोकांतील मृताचा उत्तराधिकारी बैल व रेडे यांना खाऊ घालतो. भावसार, साळवी व इतर कारागीर लोक सोडल्यास इतर लोक दहा ते तेरा दिवसांत श्राद्ध न करता धान्य, तूप, गूळ व पैसा ब्राह्मणाला दान देतात. तेराव्या दिवशी मृताचा उत्तराधिकारी मंदिरात जाऊन पूजा करतो आणि शक्य असल्यास देवाला वस्त्रालंकार अर्पण करतो. नंतर तो मृताच्या स्मरणार्थ आप्तेष्टांना, ज्ञातीला किंवा सर्व गावाला जेवण घालतो. मृताचे मासिक किंवा वार्षिक श्राद्ध करीत नाहीत.

बनियांच्या काही पोटजाती आपल्यांत गोत्रे असल्याचे सांगतात. त्यांच्यांत सगोत्र विवाह होत नाही. जवळच्या नातेवाईकांत व आते, मामे किंवा मावस भावंडांत विवाह होत नाही. ओसवालांपैकी काही लोक सोडल्यास, यांच्यांत पूर्वी विधवाविवाहाला बंदी होती. घटस्फोटही त्यांना मान्य नव्हता.
[एन्सा. रि. ए.; म. ज्ञा. को.; ट्रा. का. बाँ.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

बभ्रू आत्रेय एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील तिसावे सूक्त याच्या नावावर असून, इंद्रस्तुती हा त्या सूक्ताचा विषय आहे. त्याने त्यात स्वतःसंबंधीही बरीच माहिती दिली आहे. अकराव्या व चौदाव्या ऋचेत त्याचे नावही आले आहे. हा ऋणंचय नामक राजाच्या आश्रयाला होता. राजा एकदा संकटात सापडला असता, बभ्रू त्याच्या मदतीला धावून गेला व त्याने राजावरील संकट दूर केले,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणून राजाने याला बऱ्याच गाई दान दिल्या. ऋणंचय हा रुशम लोकांचा राजा होता. या रुशम लोकांनीही बभ्रूचा मोठा गौरव केला. इंद्राच्या पराक्रमाचे वर्णन करताना तो म्हणतो –

प्र नु वयं सुते या ते कृतानीन्द्र ब्रवाम यानि नो जुजोषः।
वेददविद्वाञ्छृणवच्च विद्वान् वहतेऽयं मघवा सर्वसेनः ।।
(ऋ. ५.३०.३)

अर्थ – सोमरस पिळून सिद्ध झाला असता ज्या महत्कृत्यांनी हे इंद्रा, तू आम्हांला आनंदित केलेस, त्या सर्व पराक्रमांचे वर्णन आम्ही करू. जे पराक्रम ज्याला अजून विदित नसतील, त्याने ते अवश्य माहीत करून घ्यावे आणि ज्याला ते विदित असतील त्याने ते पुनः पुनः श्रवण करावे, म्हणजे हा सकलैश्वर्यसंपन्न सर्व सैनिकांसह त्याच्याकडे वेगाने येईल.

एकदा अश्विनींनी कोणत्या तरी प्रसंगात याचे रक्षण केले होते. (ऋ. ८.२२.१०) [प्रा. च. को.]

बमलाई एक ग्रामदेवता. मध्य प्रदेशातल्या छत्तीसगढ भागातील डोंगरगढ नामक पर्वतश्रेणीतील एका पर्वतावर ही देवी एका लहानशा घुमटीत आहे. हिची उपासना तांत्रिक पद्धतीने चालते. त्या भागातले लोक या देवीला भजतात.

बमलाई हे विमलादेवीचे ग्रामीण रूप असावे, असे पंडितांचे मत आहे. कालिका पुराणात विमलादेवीला वासुदेवाची नायिका म्हटले आहे. देवी पुराणातही हिचा उल्लेख आहे. हिचे मूलस्थान बालाघाट जिल्ह्यातले कौहरगढ हे असून, तिथून ही देवी डोंगरगढावर आली, असे तिथले लोक मानतात. गुप्त राजांच्या काळात या देवतेचे माहात्म्य वाढले असावे.

बमलाई देवीच्या मागच्या अंगाला छुहनी बमलाई नावाची आणखी एक देवता आहे. तिची पूजा फक्त नवरात्रातच होते.

या डोंगरावर भग्न मूर्तींचे विपुल अवशेष आहेत. त्यांत दत्तेश्वरी नावाची एक मूर्ती आहे. या देवीला एकशे आठ हात आहेत. साऱ्या भारतात इतक्या हातांची देवी नाही, असे म्हणतात. तंत्रशास्त्रातही अशा देवीचे पूजाविधान कुठे मिळत नाही.

बमुनी संप्रदाय आसामातला एक वैष्णव संप्रदाय. शंकरदेवाचा शिष्य हरिदेव याने या पंथाची स्थापना केली. पाहा – हरिदेव. [सो. हि. का. २]

बयाबाई (इ. स. चे १७ वे शतक) रामदासी संप्रदायातली एक संत कवयित्री. हिला बयाबाई रामदासी असेही म्हणतात. लहानपणीच तिच्यावर रामकृपा झाली व तिला रामदर्शनही झाले असे सांगतात. तिचे जन्मस्थान, माहेर, सासर, इ. कोणत्याही गोष्टींचा उल्लेख वाङ्मयात सापडत नाही. बयाबाईची अल्पशीच काव्यरचना आहे. मात्र ती रामदासी थाटाची नसून स्वतंत्र आहे. तिच्या कवितेवरून रामदासचरित्रावर काही प्रकाश पडतो, असे श्री. राजवाडे म्हणतात. पतिव्रतेची पतीवरही नसेल इतकी बयाबाईची गुरूवर भक्ती होती. गुरूला तिने आई, बाप, नवरा, परमेश्वर, श्रीकृष्ण, इ. शब्दांनी आळवले आहे. गुरूविषयक तिचे एक पद्य असे–

या गुरुनं मज वेडची लाविलं ।
अहो मन हें तत्पदीं तन्मय जालें ।।धृ.।।
सांवळी सुरत नयनांत बैसली ।
पाहतां पाहणें समूळचि गेलें
पश्चिमपंथ हे अवघड वाट ।
ब्रह्मगिरीच्या शिखरीं नेलें
सत्रावीचा पाजुनि पान्हा ।
नेऊनियां निर्जी निजविलें
रामदास गुरुराजकृपेनें
दास बया हें मीपण गेलें

मिरज येथील वेणाबाईच्या मठाचे अधिकार बयाबाईकडे असावे, असे गिरिधर या तिच्या शिष्याच्या ग्रंथावरून अनुमानता येते. हिला ८४ वर्षांचे आयुष्य लाभले व तिने ते सर्व परमार्थात व्यतीत केले. [म. सं. क.]

बरगा एक जात. उ. प्रदेश, मध्य प्रदेश, बंगाल, इ. ठिकाणी या लोकांची वस्ती आढळते. उ. प्रदेशातील बरगा हे अहीर गवळ्यांशी आपला नातेसंबंध जोडतात; तर इतर ठिकाणचे बरगा आपण राजपूत असल्याचे सांगतात. हे आपल्या जातीची उत्पत्तिकथा सांगतात, ती अशी–

श्रीकृष्ण गोकुळात गुरे चारीत असता एके दिवशी ब्रह्मदेवाने त्याची गायी-वासरे चोरून नेली. बरोबरच्या गोपालांनाही अदृश्य केले. कृष्णाने ब्रह्मदेवाचे हे कृत्य जाणले व त्याचा गर्वभार उतरवण्यासाठी नव्या गायी व नवे गोपाळ निर्माण केले. हे जे नवे गोपाल तेच या जातीचे पूर्वज होत.

या जातीत चंदेल, बुंदेल, बाघेल, राणा, राठोड, चौहान, इ. राजपूत आडनावे असून, त्यांच्यांत व राजपुतांत विवाहसंबंध होतो. हे लोक मुख्यत्वे शेतकरी पेशाचे आहेत. शेतीवरच हे सधन झाले असल्यामुळे यांचा सामाजिक दर्जा उच्च आहे.

विवाहप्रथा – या जातीत मुलींची संख्या कमी असल्यामुळे मुलीसाठी बरेच देज द्यावे लागते. विवाहमंडपाच्या द्वारात गवताची चटई टांगतात व नवरा मुलगा तिच्यात खंजीर खुपसून आत प्रवेश करतो. त्या वेळी त्याच्या हातात गवताचेच एक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कडे असते. वधूच्या तळहातावर वराचा तळहात ठेवून ते दोन्ही हात दोऱ्याने बांधणे हा लग्नातला मुख्य विधी असतो. हे लोक विवाहबंधन अत्यंत पवित्र मानतात. स्त्रीने अगर कुमारीने व्यभिचार केल्यास तिला जातिबहिष्कृत करतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

बरड एक भटकी जमात. या लोकांची वस्ती हिमाचल प्रदेश, पंजाब व उत्तर प्रदेश या भागात आहे. पूर्वी हे लोक कांगडा जिल्ह्यात राहत होते. कांगडाच्या बरडवाड नामक एका राजाने त्यांना आश्रय दिला होता. त्याच्या नावावरूनच या लोकांना बरड असे नाव मिळाले. आतापर्यंत भीक मागणे, हा यांचा मुख्य धंदा होता. सांप्रत हे लोक गवत कापणे, चाळण्या बनवणे, गवताच्या टोपल्या, पेटचा, सुपे, चुंबळी, इ. वस्तू तयार करून विकणे हे धंदेही करतात. विविध रंगांचे मणी व रंगीबेरंगी सूत वापरून ते चुंबळी अत्यंत आकर्षक बनवतात. नवऱ्यामुलाची शिरोभूषणेही ते भिंगे वगैरे बसवून कलात्मक अशी तयार करतात. ढोल, नगारा, तबला, इ. वाद्ये तयार करणे व वाजवणे हे कामही त्यांना अवगत आहे.

राजाश्रय सुटल्यावर यांच्यापैकी काही लोक भीक मागत, फिरत फिरत हिमाचल प्रदेशातील सलोगडा गावी येऊन राहिले. तिथे भीक मागणे व चोरी करणे हे त्यांचे मुख्य धंदे होते. पण भारतीय आदिम जातीय सेवकसंघाने सलोगडा येथे आपली एक शाखा उघडली व या लोकांची खूप सुधारणा केली. त्यांच्यासाठी संघाने पक्की घरे बांधली आणि त्यांचे भटके जीवन संपुष्टात आणले. त्यांना काम दिले आणि शिक्षण द्यायलाही सुरुवात केली. बरड लोक सांप्रत सरकारी कचेऱ्या, रेल्वे व गिरण्या यांत काम करतात, शेती करतात, फळबागा लावतात, फळांचा व्यापार करतात व पहाडी प्रदेशात खेचरांवरून लोकांच्या सामानाची ने-आणही करतात. त्यांच्या स्त्रिया टोपल्या, पेटचा वगैरे बनवतात आणि वनौषधी गोळा करून दुकानदारांना विकतात.

वेषभूषा – पूर्वी बरड पुरुष केवळ एक लंगोटी, जाकिट व टोपी एवढाच पोषाख करीत असत. आता ते पायजमा किंवा विजार, कुडता, कोट व पगडी असा वेष चढवतात. त्यांच्या स्त्रिया रंगीबेरंगी सलवार, कुडता व दुपट्टा असा पोषाख करतात व दागिने घालतात.

बरड स्त्रिया पूर्वी दाईकाम करीत असत. बाळंतिणीच्या अंगाला तेल लावणे व लहान मुलांना औषधपाणी देणे, यासाठी पूर्वी लोक त्यांना बोलावीत असत.

बरड लोकांची बोली कांगडी भाषेशी मिळतीजुळती आहे.

विवाहप्रथा – बरड लोकांत चांदला, पालमू, सीमार, इ. नऊ गोत्रे असून, समान गोत्रांत विवाहसंबंध होत नाही. मुलीचे लग्न सात ते बारा व मुलाचे दहा ते चौदा या वयात होते. मुलाचा बाप मुलीच्या घरी जाऊन तिला मागणी घालतो व तिच्या घरच्या लोकांना मद्य देतो. त्यांनी मद्याचा स्वीकार केला, तर त्यांना हा संबंध पसंत आहे, असे समजतात. मग मेजवानी होते. त्यानंतर ज्योतिषी मुहूर्त काढून देतो. विवाह उन्हाळ्यातच होतात आणि गावातील सर्व लोक लग्नाला जमतात. लग्नाच्या आधी वधू-वरांना सात वेळा तेल-हळद लावणे व सात वेळा स्नान घालणे, हा विधी होतो. लग्नासाठी वर मांडवात येण्यापूर्वी वधूचे आई-बाप जेवून घेतात. कारण नंतर वधूचे कन्यादान करीपर्यंत त्यांना जेवता येत नाही. वर मंडपात आल्यावर वधूची आई त्याच्यावरून काही पदार्थ ओवाळून टाकते. त्यानंतर जलपूर्ण कलशात स्त्रिया पैसे टाकतात व जलाची पूजा करतात. हा शुभ शकुनात्मक विधी मानतात. मग वराला मांडवात नेऊन एका टोपलीत किंवा एका खाटेवर घोंगडी पसरून तिच्यावर बसवतात. वधू त्याच्या शेजारी बसते. पुरोहित मंत्र म्हणतो. वधू-वर प्रदक्षिणा घालतात व विवाहविधीपूर्ण होतो. विवाहानंतर सर्व लोक पाच-सहा दिवस तिथे राहतात व मग आपल्या गावी परततात. यानंतर नवीन वधूला घराण्यातील रीतिरिवाज समजावून देण्याचा एक विधी होतो.

प्रसूतिप्रथा – हे लोक मुलीपेक्षा मुलाला अधिक मान देतात. मुलगा जन्मला तर स्त्रिया तिथे जमून गीते गातात व सर्व नातेवाईक स्त्रियाही त्या घरी गोळा होतात. जननाशौच दहा दिवस असते. मूल चार-पाच महिन्यांचे झाले, की उष्टावण व वर्षाचे झाले, की जावळ करतात. त्या वेळी जमलेल्या लोकांना मद्य वाटतात.

देवधर्म – हे लोक सर्व देवदेवतांना मानतात. पण सिद्धबाबा, ज्वालादेवी व गुरू नानक यांना विशेष भजतात. यांनी सांप्रत भीक मागण्याचे सोडून दिले असले, तरी अजूनही रविवारी ते सिद्धबाबाचे नाव घेऊन भीक मागतात. संकटकाळी त्याला बकरा बळी देतात. हे लोक देवतांना मद्याचा नैवेद्य दाखवतात व आपणही नंतर खूप मद्य पितात. हे गाईची पूजा करतात व गाय दान देतात. नागपंचमी, रक्षाबंधन, दसरा, दिवाळी, होळी, रामनवमी, कृष्णजन्माष्टमी हे सर्व सण व उत्सव हे लोक पाळतात.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात. माणूस आसन्नमरण झाला, की त्याच्या मुखात गंगाजल व तुलसीदल घालतात. मृताला तूप लावून स्नान घालतात व नवे कपडे नेसवतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दहनापूर्वी त्याच्या तोंडात थोडे तूप घालतात. मृताशौच दहा दिवस पाळतात. तेराव्या दिवशी श्राद्ध करतात व लोकांना जेवण देतात. मृताच्या अस्थी गंगेत टाकतात. मृतात्मा एकशे एक वेळा निरनिराळ्या योनीत जन्म घेतो व आपल्या शुभ कर्मांनी अंती मुक्त होतो, अशी यांची समजूत आहे. [श्री. ज. ह. चिंचाळकर– वन्यजाती, जुलै १९६३]

बरलंगिया एक आदिवासी जमात. हे छोटा नागपूरच्या पठारावर वसले आहेत. दाट जंगलात यांची लहान लहान गावे दिसतात. शिकार हा यांचा प्रमुख व्यवसाय असून, कधी कधी ते शेतीही करतात. या लोकांना नृत्याची फार आवड असून, सणावारी व लग्नकार्यादी मंगल प्रसंगी ते नृत्य करतात. किरीट, दुर्गा, संथाळी, करमा, इ. काही त्यांच्या नृत्यांची नावे आहेत. हातात ढाल-तलवार घेऊन ते वीररस-प्रधान नृत्ये करतात. त्यांच्या नृत्याला ढोलाची साथ असते. फो. डा. इं. – इं. नॅ. थि., १९५६]

बरसाने लाल एक प्राचीन नगर. याला बरसानू, ब्रह्मसानू आणि वृषभानुपूर अशीही अन्य नावे आहेत. गोकुळात वास्तव्य करीत असता श्रीकृष्णाचा या नगराशी संबंध येत होता. राधेचे माता-पिता कीर्ती व वृषभानू यांची ही राजधानी होती. वृषभानूच्या नावावरूनच या नगराला वृषभानुपूर असे नाव मिळाले आहे. इथे एक लहान डोंगर असून, त्याला चार शिखरे आहेत. या डोंगराला ब्रम्ह्याचे प्रतीक मानतात आणि त्याची चार शिखरे ही त्याची चार तोंडे समजतात. भाद्रपद शुद्ध अष्टमीपासून चतुर्दशीपर्यंत इथे मोठी यात्रा भरते. त्याचप्रमाणे फाल्गुन शुद्ध अष्टमी, नवमी आणि दशमी या तिथींना इथे होलिकोत्सव होतो. इथेच राधा व गोपी यांच्या-सह कृष्ण होळीचा रंग खेळला होता, अशी लोकांची श्रद्धा आहे. [अ. अ.; सू. सा. श.]

बराडी नटी एक लोकनृत्य. जौनसार बावर या भागात धार्मिक व सामाजिक उत्सवांच्या प्रसंगी भडक पोषाख घातलेले स्त्री-पुरुष वेगवेगळ्या अर्धगोलाकार रचनेत उभे राहून प्रश्नोत्तरात्मक गीते गात नाचतात. स्त्रिया बोटावर परात फिरवतात. पाहा – थाळी नृत्य.

बराबर टेकड्या बिहारमध्ये गयेच्या उत्तरेस सुमारे १६ मैलांवर जो एक टेकड्यांचा समुदाय आहे, त्याला बराबर असे नाव आहे. या टेकड्यांमध्ये काही प्राचीन गुहा आहेत. या गुहांचे दक्षिणेचा व उत्तरेचा असे दोन गट आहेत. त्यांपैकी दक्षिणेकडच्या चार गुहा इतर गुहांहून अधिक प्राचीन आहेत या गुहा वज्र जातीच्या (ग्रॅनाईट) एका मोठ्या खडकात खोदल्या आहेत. हा खडक सुमारे १२० फूट लांब व १५ फूट उंच आहे. यातली सुदामा किंवा न्यग्रोध ही गुहा दक्षिणाभिमुख आहे. गुहेतल्या शिलालेखांवरून असे समजते, की अशोकाने ती गुहा खोदवून आजीवकांना दान केली. दुसरी सुदामा गुहा दोन खोल्यांची असून, त्यांपैकी आतली खोली वाटोळी आहे. प्रवेशद्वारावरच्या शिलालेखावरून ही गुहाही अशोकनिर्मितच असल्याचे कळते.

लोमश ऋषी ही गुहा सुदामा गुहेसारखीच असून, तिचा बाहे-रचा भाग नक्षीदार असला, तरी अंतर्भाग खडबडीत आहे. ही गुहा म्हणजे चैत्यविहाराचे प्रारंभिक स्वरूप समजतात. विश्व-झोपडी अर्थात विश्वामित्राची पर्णकुटी ही गुहा अनेक खोल्यांची असून, त्यांच्या आतले खोदकाम अपूर्ण आहे. तिची बाहेरची बाजू अत्यंत गुळगुळीत आहे. ही गुहाही अशोकनिर्मितच आहे. या गुहांचे काम पाहिल्यानंतर सन पूर्व ३ ऱ्या शतकातली भारतीय कला किती पुढे गेली होती, हे कळून येते. या गुहांचा शोध

लोमश ऋषीची गुहा

लागल्यापासून बौद्ध क्षेत्रात त्या स्थानाला महत्त्व लाभले आहे पण बौद्धांच्याही पूर्वी हे हिंदूंचे पुण्यक्षेत्र होते, असे तिथल्या सिद्धेश्वराच्या मंदिरावरून कळून येते. हे शिवमंदिर असून, त्याच्या बाजूस ब्रह्मदेवाच्या काही मूर्ती खोदल्या आहेत. सिद्धे-श्वराच्या दक्षिणेस टेकडीच्या पायथ्याशी दोन जलप्रवाह वाहत असून, ते एका ठिकाणी भूमीत गुप्त होतात व दुसऱ्या ठिकाणी वर येतात. त्या प्रवाहाला पाताळगंगा म्हणतात. त्या पात्रात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्नानं करण्यासाठी भाद्रपद महिन्यात येथे मोठी यात्रा भरते. [गया गॅझे.; हि. जॉ. ए. इं.]

बरू एक सूक्तद्रष्टा. हा आंगिरस कुळातला होता. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ९६ वे सूक्त याच्या नावावर आहे. इंद्र आणि त्याचा अश्व असे दोन विषय या सूक्तात आले आहेत. त्यातील एक ऋचा अशी –

आ त्वा हर्यन्तं प्रयुजो जनानां रथे वहन्तु हरिशिप्रमिन्द्र ।
पिबा यथा प्रतिभृतस्य मध्वो हर्यन् यज्ञं सधमादे दशोणिम् ॥
(ऋ. १०.९६.१२)

अर्थ – हे हरितमुकुटधरा इंद्रा, सर्व जनतेच्या आकांक्षा तुज भक्तप्रेमी देवाला रथातून इकडेच घेऊन येवोत आणि नंतर तू हर्षप्रद (सोमाच्या) सवनप्रसंगी (हाताच्या) दहा अंगुलींनी धरलेली आहुती देऊन संपादिलेला यज्ञ मान्य करून घे आणि अर्पण केलेला मधुर रस प्राशन कर.

ऐतरेय ब्राह्मण (६.२५) व शांखायन ब्राह्मण (२५.८) या दोन्ही ठिकाणी बरूचा उल्लेख आहे.

बर्बर एक प्राचीन रानटी जमात. यब्बल, बब्बल हो याचीच अपभ्रष्ट रूपे असावी. हे लोक संकीर्णयोनी आहेत. महाभारतात शक, शबर यवन, इ. आर्येतर टोळ्यांबरोबर यांचा उल्लेख आलेला आहे.

सगर राजाने शक इत्यादी ज्या जमातींचा पराभव केला, त्यांत बर्बरांचाही निर्देश आहे (भाग. पु ९.८५). कौटिलीय अर्थशास्त्र, राजनिघंटू या ग्रंथांतही त्यांचा उल्लेख आहे.

सिंधू नदीच्या त्रिभुज प्रदेशातील बार्बरिआ व पाटल ही त्यांच्या राजधानीची शहरे होती. पेरिप्लसचे बर्बरीकम व टॉलेमीचे बर्बराई म्हणजेच ब र्बरिआ होय. पण बृहत्संहितेत, यांची वस्ती वायव्य प्रदेशात होती, असे म्हटले आहे; तर ब्रह्मांड, मत्स्य व वायू या पुराणांत बर्बरांना उदीच्य देशान्तर्गत एका म्लेच्छ देशातील मानलेले आहे श्री. त्र्य. गु. काळे यांच्या मते हे लोक मूळ शाकद्वीपातील होत. तिकडून ते सन पूर्व ६०० च्या सुमारास इलावृत वर्षात आले. चक्षू नदी या देशाला पाणीपुरवठा करते व ती सिंधु-मरू या देशांतून वाहते, असा उल्लेख वायू पुराणात आहे. अष्टाध्यायीतही (४.३.९३) बर्बरांचा एक जनपद म्हणून उल्लेख आहे. [ट्रा. ए. इं.; पा. का. भा.; क. हि. वा. पु.; पु. नि.; पु. इं.; पु. वि.]

बर्हिषद पितरांचा एक वर्ग. बर्हिषद हे अनेक आहेत. पितरांचे मूर्तिवान व अमूर्तिवान आणि यज्वान व अयज्वान असे जे दोन भेद आहेत, त्यांतले बर्हिषद हे दुसरे होत. ऋ. १०.५.४, अथर्व. १८.१.५१ व तै. सं. २.६.१२.२ यांत यांचा उल्लेख आहे. जे गृहस्थ अग्निहोत्रादी हविर्यज्ञ करून मृत्यू पावतात ते मेल्यानंतर या गणात प्रवेश करतात. बर्हिषदांना इच्छेनुरूप हवे ते रूप घेता येते. हे देदीप्यमान असून, स्वर्गातील या वैभ्राज नामक प्रदेशात राहतात (विष्णू पु. १.१०-१८; मत्स्य पु. १५.१). यांना काही ठिकाणी अत्रिपुत्र, तर काही ठिकाणी पुलस्त्यपुत्र म्हटले आहे. या सर्वांना मिळून पीवरी नावाची एक मानसकन्या होती. तीच पुढे शुकाची भार्या झाली. हिच्याशिवाय अच्छोदा नावाची आणखी एक कन्या त्यांना होती. तीच पुढील जन्मी मत्स्यगंधा (व्यासमाता) झाली. हे पितर यमसभेत बसतात व देव, यक्ष, गंधर्व, इ. सर्व त्यांना पूज्य मानतात. त्यांच्याजवळ विमाने असतात, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे (१५.२).

बर्ही हा शब्द बृह् = वाढणे याच्यापासून झाला आहे. यज्ञभूमीवर निमंत्रित देवांना आसन म्हणून जे दर्भ पसरतात, त्यांना बर्ही असे म्हटले आहे. ऋग्वेदात व यजुर्वेदात याचा उल्लेख आढळतो (ऋ. १.६३.७; तै. सं. ६.२.४.५). 'सवितृ देवाच्या आज्ञेने देवांना बसण्यासाठी हे दर्भा, मी तुला कापतो,' असे मैत्रायणी संहितेत म्हटले आहे (१.१ २). दर्शपूर्णमास यागात बर्हिराहरण (= दर्भ आणणे) असा एक विधी असतो. अग्निमुखात ज्या दर्भांवर पात्रास दन करतात, त्यात इध्म्याच्या जोडीने बर्ही म्हणून दर्भाची जुडी ठेवतात. अग्निमुख पुरे झाल्यावर बर्ही आपल्यापुढे पसरून आचार्य त्यावर प्रोक्षणी पात्र ठेवतो आणि स्वतःवर अभिषेक करतो. [वे. इं.]

बलदेव रथ (इ. स. चे १८ वे शतक) ओडिसा प्रदेशातील एक भक्तकवी. याचा जन्म गंजाम जिल्ह्यातील आठगढ राज्यात झाला. याला दैवी सामर्थ्याने असाधारण पांडित्य व कवित्वशक्ती प्राप्त झाली होती, अशी समजूत आहे. त्याचे संगीतज्ञानही उच्च कोटीचे होते. तो स्वत. उत्तम गायक म्हणूनही प्रसिद्ध होता. हा जलंतर, आठगढ, इ. राजांच्या आश्रयाला होता. ओडिया भाषेच्या मध्यकालात झालेल्या कवींत संगीतकार कवी म्हणून याची ख्याती होती.

चंद्रकला हे त्याचे एक अपूर्ण काव्य आहे. याशिवाय किशोर चंदानन चंपू, रत्नाकर चंपू, इ. अनेक खंडकाव्ये त्याच्या नावावर आहेत. त्याची भाषा अनुप्रासयुक्त आहे. त्याची पदविन्यासपटुता अन्य कोणत्याही कवीच्या ठिकाणी आढळत नाही, असे ओडिया सारस्वताचे इतिहासकार म्हणतात. किशोर चंदानन चंपूतील नाट्यात्मकता आणि कथा-कथन सुंदर आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यामुळे त्याची ही काव्ये तिथल्या जनतेच्या मनी-मुखी सदैव असतात. राधा-कृष्णांचा लीलाविलास हा त्या काव्यांचा विषय आहे. [उ. सा. इ.]

बलदेव विद्याभूषण (इ. स. च्या १८ व्या शतकाचा पूर्वार्ध.) चैतन्य संप्रदायाचा एक प्रचारक व महापंडित. याचा जन्म बंगालमध्ये झाला. हा जातीने वैश्य होता. याचे घराणे वैष्णव नव्हते; पण गौडीय वैष्णव संप्रदायाचे आकर्षण वाटून त्याने वैष्णव धर्म स्वीकारला. रसिकानंदाच्या शिष्यपरंपरेतला हा चौथा पुरुष होय. याने पीतांबरदास याच्याकडे राहून शास्त्राध्ययन केले, पुढे वृंदावनात जाऊन विश्वनाथ चक्रवर्ती या पंडिताचे शिष्यत्व स्वीकारले व वैष्णवांच्या भक्तितत्त्वाचा विशेष अभ्यास केला. वृंदावनात विश्वनाथ चक्रवर्ती यांचा एक स्वतंत्र पंथ होता. त्यांच्या नंतर त्यांचा उत्तराधिकारी म्हणून बलदेवाची नियुक्ती झाली.

बलदेवाच्या काळी वृंदावन हे चैतन्य संप्रदायाचे महत्त्वाचे केंद्र बनले होते. मात्र तोवर त्या संप्रदायाचा अधिकृत असा ग्रंथ निर्माण झाला नव्हता. बलदेवाने ते काम केले. त्या काळी वृंदावन हे जयपूरनरेशाच्या आधिपत्याखाली होते. काही लोकांनी चतन्यमताविरुद्ध राजाचे कान फुंकल्यामुळे त्याचे मत त्या संप्रदाय विषयी कलुषित झाले; पण त्याने स्वतःच्या मताने काहीही न ठरविता त्या मताच्या योग्यतेचा विचार करण्यासाठी एक पंडितसभा बोलावली. बलदेवाने त्या सभेत जाऊन चैतन्यमत हे वेदविरुद्ध नसून वेदानुसारी आहे, असे सप्रमाण प्रतिपादन केले. त्यावर तिथल्या पंडितांनी विचारले, की 'तुमच्या मताचे ब्रह्मसूत्रभाष्य आहे काय ?' त्यावर बलदेव म्हणाला, 'आतापर्यंत नाही; पण मी ते निर्माण करीन.'

ही भगवान गोविंदाचीच प्रेरणा आहे, असे समजून नंतर त्याने ब्रह्मसूत्रावर स्वमतानुसारी भाष्य केले. गोविंदप्रेरित म्हणून त्याला गोविंदभाष्य असे नाव दिले. प्रस्तुत गोविंदभाष्यात बलदेवाने ईश्वर, जीव, प्रकृती, काल व कर्म या पाच तत्त्वांवर आपल्या सांप्रदायिक तत्त्वाची उभारणी केली आहे. याशिवाय सिद्धांतरत्न, प्रमेयरत्नावली, साहित्यकौमुदी, वेदांतस्यमंतक, काव्यकौस्तुभ, छंदकौस्तुभभाष्य, इ. ग्रंथ लिहून त्याने आपले बहुमुखी पांडित्य प्रकट केले आहे. [हिंदुत्व; चै. म. ब्र. सा.]

बलराम श्रीकृष्णाचा थोरला सावत्र भाऊ. वसुदेव आणि रोहिणी यांचा पुत्र. याला शेषनागाचा अवतार समजतात. पांचरात्र मतात संकर्षण या नावाने भगवंताच्या चतुर्व्यूहात त्याची गणना केलेली असून, त्याला जीवाचे प्रतीक मानले आहे (चतुर्व्यूह पाहा). याची बलदेव, बलभद्र, हलायुध, संकर्षण, इ. अन्यही नावे आहेत. निरनिराळ्या पुराणांतून याचे चरित्र आढळते ते असे –

कंसाने देवकीचे सहा पुत्र मारल्यानंतर सातव्या खेपेला तिच्या उदरात जो गर्भ राहिला, त्याचा घात होऊ नये म्हणून भगवंताने योगमायेला आदेश दिला, की 'तू हा गर्भ देवकीच्या गर्भातून काढून रोहिणीच्या गर्भात ठेव.' योगमायेने तसे केले आणि तो रोहिणीच्या उदरी जन्मला. त्यामुळे कंसापासून तो सुरक्षित राहिला. त्याचे नाव बलराम. सुभद्रा ही बलरामाची सहोदर बहीण होय.

बलरामाचा जन्म गोकुळात झाला आणि कृष्णही जन्मताक्षणीच गोकुळात आला. हे दोघे बंधू तिथे एकत्र खेळले, वाढले. कंसाने कृष्णास मारण्यास जे असुर पाठविले, त्यांतल्या धेनुक व प्रलंब या असुरांना बलरामाने मारले. शंखचूडाच्या वधाच्या वेळी त्याने कृष्णाला साहाय्य केले व गोपींचे रक्षण केले. नांगर व मुसळ ही दोन त्याने आपली आयुधे केली होती. राम-कृष्णांचा घात करण्याच्या इच्छेने कंसाने अक्रूराला गोकुळात पाठवून त्या दोघांना मथुरेस नेले. तिथे बलरामाने मुष्टिक या कंसाच्या मल्लाला मल्लयुद्धात ठार केले. कंसवधानंतर वसुदेव-देवकी कंसाच्या कारागृहातून मुक्त झाली. मग त्यांनी राम-कृष्णांचा उपनयन संस्कार केला. पुढे विद्याध्ययनासाठी श्रीकृष्णाबरोबर बलरामही सांदीपनीच्या आश्रमात गेला.

आनर्त देशाचा राजा रैवत ककुद्मी याने आपली कन्या रेवती ही बलरामाला दिली. तिच्या ठिकाणी त्याला निशित व उल्मुक असे दोन पुत्र झाले (भाग. पु. ९.३.२९). हा पुष्कळसा आपल्या सासुरवाडीसच राहत असे. कृष्णाने जरासंधाचा सतरा वेळा पराभव केला, त्यात बलरामाची फार मदत झाली. पुढे श्रीकृष्णानेही आनर्त देशातच द्वारका येथे यादवांची नवी वसाहत उभारली.

लाक्षागृहात पांडव जळून मेले, अशी खोटी वार्ता समजताच श्रीकृष्णाबरोबर बलरामही हस्तिनापुरास गेला. स्यमंतक मण्यासाठी कृष्णाने शतधन्व्याला मारले; पण त्याच्या जवळ मणी मिळाला नाही. कारण तो त्याने अक्रूराजवळ देऊन ठेवला होता. पण बलरामाला वाटले, की कृष्णानेच तो मणी मिळवून चोरून ठेवला असून, तो आपणांस खोटे सांगतो आहे. मनात असा अविश्वास धरून त्याने श्रीकृष्णाला धनलोभी म्हटले. कृष्णाने त्याला खूप समजावले; पण त्याचा राग गेला नाही. त्या रागाच्या भरातच तो मिथिलेस जनक राजाकडे गेला. जनकाने त्याचा यथोचित सन्मान करून त्याला गौरविले.

बलराम हा गदायुद्धात प्रवीण होता. दुर्योधन व भीम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्याकडूनच गदाविद्या शिकले. कृष्णपुत्र सांब याने दुर्योधनाची कन्या लक्ष्मणा हिचे हरण केले, तेव्हा कौरवसेनेने त्याला घेरून बंदिवान केले. त्या वेळी बलराम पुढे झाला आणि त्याने सांबाला मुक्त केले. याच वेळी बलरामाने हस्तिनापुराला आपल्या नांगराने ओढले आणि त्याची रचनाच बदलून टाकली.



बलरामाची चतुर्भुज मूर्ती

रुक्मीची नात रोचना हिचा विवाह कृष्णपुत्र अनिरुद्ध याच्याशी निश्चित झाला असता, द्वारकेतले वऱ्हाड भोजकट नगरात गेले. तिथे रुक्मी व बलराम यांच्यांत द्यूत झाले. त्या द्यूतात बलराम प्रथम हरला; पण पुढच्या डावात त्याचा जय झाला. पण रुक्मी त्याचा डाव कबूल करीना. रुक्मीचे हे खोटेपण सहन न होऊन गदेच्या एका प्रहारानेच त्याने रुक्मीला ठार केले.

बलराम अतिरिक्त मद्यपी होता. एकदा तो रैवतक पर्वतावर अनेक सुंदर स्त्रियांसह मद्यपानाचा आनंद लुटीत असता भौमासुराचा मित्र द्विविद याने तिथे जाऊन त्याच्या आनंदात व्यत्यय आणला. बलरामाला त्या गोष्टीचा राग आला आणि त्याने त्याचा वध केला.

कौरव–पांडव युद्धाच्या वेळी कोणत्याही पक्षाला मदत करायची नाही, असे त्याने ठरवले व तो तीर्थक्षेत्रांच्या यात्रेला निघून गेला. या यात्रेत त्याने प्रभास, पृथूदक, बिंदुसर, ब्रह्मतीर्थ, चक्रतीर्थ, इ. तीर्थे केली व तो नैमिषारण्यात पोचला. तिथे रोमहर्षण हा सूत ऋषिसमुदायाला पुराण सांगत होता. बलराम सभास्थानी येताच सर्व ऋषींनी त्याला उत्थापन दिले; पण रोमहर्षण मात्र बसूनच राहिला. बलरामाला तो आपला अपमान वाटला आणि त्याने मद्याच्या धुंदीत रोमहर्षणाला ठार केले. पुढे त्याने त्या हत्येबद्दल प्रायश्चित्तही घेतले. नंतर तो भारतातली इतर सर्व तीर्थक्षेत्रे करून कुरुक्षेत्रात आला त्या वेळी कौरव–पांडव युद्ध संपत आले होते आणि भीम व दुर्योधन यांचे अखेरचे गदायुद्ध चालू होते. त्यात गदायुद्धाचे नियम मोडून भीमाने दुर्योधनाच्या मांडीवर प्रहार केल्याने बलराम चिडला व भीमाला मारण्यासाठी धावला. पण श्रीकृष्णाने त्याला कसेबसे आवरले.

प्रभास क्षेत्री यादवांनी परस्परांचा संहार केल्यानंतर बलराम समुद्रतीरावर चित्त एकाग्र करून बसला आणि योगबलाने त्याने आपला देह ठेवला. त्या प्रसंगी बलरामाच्या मुखातून एक नाग बाहेर पडून समुद्रात शिरला, अशी कथा आहे. त्याच्या मृत्यूनंतर रेवतीने सहगमन केले.

जैन पुराणात त्रिषष्टी (६३) महापुरुष किंवा शलाकापुरुष मानलेले असून, त्यांत नऊ बलभद्र आहेत. बलराम त्यांपैकी एक मानलेला असून, त्याचा संबंध नेमिनाथ या तीर्थंकराशी दाखविला आहे.

बलराममूर्ती – हेमाद्रीने बलरामाचे मूर्तिध्यान पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

सीरपाणिर्बलः कार्यो मुशली चैव कुण्डली ।
श्वेतोऽतिनीलवसनो मदादञ्चितलोचनः ।।

अर्थ– हातात नांगर व मुसळ धारण करणारा, कानांत कुंडले असलेला, गौरवर्णाचा, अती नीलवस्त्रे परिधान केलेला आणि मद्यप्राशनाने ज्याचे डोळे धुंद आहेत, असा बलराम करावा.

बलरामाची द्विभुज मूर्ती–तिरुचेंदूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बलरामाच्या प्राचीन मूर्ती मथुरा व ग्वाल्हेर या प्रदेशांत सापडत असून, त्या शुंग कालातल्या आहेत. कुषाण कालातल्या मूर्ती व्यूहसंबंधित असून, त्या चतुर्भुज आहेत. त्यांमध्ये त्याचा शेषाशी संबंध स्पष्टपणे दाखवलेला आहे. त्याच्या काही मूर्ती द्विभुज असून, त्यांचे मस्तक नागफणांनी अलंकृत दाखवलेले आहे. द्विभुज मूर्तींत त्याचा उजवा हात अभय मुद्रेत असतो. बहुधा मूर्तींच्या मागील अंगाला सर्प दाखवलेला असतो. कुषाण कालाच्या मध्यात व्यूहमूर्ती आणि अवतारमूर्ती हा भेद जवळजवळ नष्ट झाला आणि नागफणीबरोबरच हल–मुसलयुक्त अशा त्याच्या मूर्ती बनू लागल्या. गुप्तकाळातल्या काही मूर्तींत त्याच्या नांगराला सिंहमस्तक जोडले गेले. त्याच्या कानांतली कुंडलेही सिंहशीर्षाकृती दाखवली जाऊ लागली. त्याशिवाय नेमिनाथाबरोबर, एकानंशेबरोबर आणि कधी कधी दशावतारांच्या पंक्तीत त्याच्या मूर्ती दिसू लागल्या. काही मूर्तींत बलराम समपद अवस्थेत दिसतो; तर काही मूर्तींत त्याचा एक गुडघा पुढे झुकलेला दिसतो. क्वचित त्याच्या बरोबर रेवतीही असते. [पु. वि. म.; प्रा. च. को.; हिं. वि. को.]

बलरामी उ. भारतातील एक धर्मपंथ. बलराम हाडी नावाच्या पुरुषाने या धर्मपंथाची स्थापना केली, म्हणून या पंथाला हे नाव मिळाले. बलरामाचा जन्म बंगालमधल्या नवद्वीपातील मेहरपूर गावी एका हीन कुळात झाला. हा सुरुवातीला मलिक नावाच्या कुटुंबात पहारेकऱ्याचे काम करीत असे. तिथे त्याच्यावर सोन्याच्या चोरीचा आळ आला. या घटनेमुळे तो उदासीन झाला. नोकरी सोडून तो साधुवृत्तीने राहू लागला. मग हळूहळू त्याच्या भोवती शिष्यपरिवार जमा झाला. त्याने मग एक धर्मपंथच चालू केला. त्याचे अनुयायी त्याला विष्णूचा अवतार समजू लागले. या पंथाला जातिभेद व मूर्तिपूजा मान्य नाही. त्याचा सारा भर निर्गुणोपासनेवर आहे.

बलरामाच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी ही पंथप्रमुख झाली. तिच्या मृत्यूनंतर या पंथात तंटे निर्माण होऊन अनेक तट पडले. [वै. शै. म. व.; हि. हिं. सि.]

बलसने धुळे जिल्ह्यात बुराई नदीच्या उत्तर तीरावर हे गाव असून, तिथे इ. स. च्या ११ व १२ व्या शतकांत बांधलेली अनेक देवालये आहेत. यादवकाळात हे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असले पाहिजे. शिल्पकलेच्या दृष्टीने तिथली मंदिरे भिन्न प्रकारची असून, त्यांतली काही विशेष उल्लेखनीय आहेत. एका मंदिरात मध्यभागी मंडप आणि त्याच्या तीन बाजूंना तीन गाभारे आहेत. प्रत्येकाला वेगळे अंतराळ आहे. पूर्वेकडील गाभाऱ्यात शिवलिंग आहे. दक्षिणेकडील गाभाऱ्यात विष्णूची मूर्ती असावी व उत्तरेकडील गाभाऱ्यात पार्वतीची मूर्ती असावी, असे वाटते. कारण सध्या तिथे फक्त पीठे उरली आहेत. या देवालयाच्या बाह्य अंगावरील शिल्पकाम व गाभाऱ्यांच्या द्वारांवरील गणेशमूर्ती यांवरून हे प्रारंभापासून शिवमंदिर होते, असे दिसते.

सर्व गाभाऱ्यांच्या द्वारांवर विपुल नक्षीकाम कोरलेले असून, दोन्ही बाजूंच्या स्तंभांवर कीर्तिमुखे आहेत. भिंतीवरील चित्रांत भिन्न देवता, नर्तक, सिंह, हत्ती वगैरे पशू यांच्या सुंदर आकृती कोरलेल्या दिसतात. मुख्य गाभाऱ्याच्या समोर द्विदल पद्मस्वरूप अर्धचंद्रशिला आहे.

मधल्या मंडपाची लांबी-रुंदी प्रत्येकी १७ फूट असून, त्याच्या मध्यभागी चार स्तंभ आहेत. त्यांवर घुमटाकृती छत आहे. कडेच्या भिंतींमध्ये आठ स्तंभ आहेत. मधले चार स्तंभ अर्ध्या उंचीपर्यंत चौकोनी, वरचा भाग अष्टकोनी आणि शेवटी गोल असून, त्यांवर गोल बैठका आहेत. त्या बैठकांवर कीचक आणि त्यांवर छताच्या तुळया आधारलेल्या आहेत. भिंतीतले स्तंभ मात्र खालपासून वरपर्यंत चौकोनीच आहेत. मंडपाचे छत अंबरनाथ येथील शिवमंदिराच्या छतासारखे वाटते.

या देवालयाची विमाने साधारणपणे अंबरनाथ येथील मंदिराच्या विमानासारखीच असली, तरी त्यांवरील नक्षीकाम मात्र अंबरनाथमंदिरापेक्षा प्रगत अवस्थेतले वाटते. मंदिराच्या बाह्यांगावर अनेक कोनाडे बनवलेले असून, त्यांत निरनिराळ्या देवतांच्या मूर्ती आढळतात. त्यांतील बहुतेक मूर्ती शैवपंथी आहे.



बलसने येथील एक मंदिर

वरील मंदिरापासून जवळच दुसरे एक मंदिर आहे. त्याचे गर्भगृह तारकाकृती दिसते. त्याची खूपच पडझड झालेली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंबरनाथ व बलसने येथील मंदिरांची विमाने माळव्यातील परमारांच्या देवालयांच्या विमानांसारखी आहेत, असे तज्ज्ञांचे मत आहे. त्याचप्रमाणे या मंदिरांची पीठे, स्तंभ व छते गुजरातमधील चौलुक्य मंदिरांच्या धर्तीवर बनवलेली असावी, असे वाटते.

बलसने येथे पुष्कळ देवालये आहेत. त्यांतील आणखी एक देवालय त्याच्या भिन्न रचनेमुळे प्रेक्षणीय वाटते. त्याचे मुख्य गर्भगृह उत्तराभिमुख असून, त्याच्यापुढे एक अंतराळ, नंतर एक गूढ मंडप आणि शेवटी पडवी आहे. मंडपाच्या भोवती दहा लहान गर्भगृहे असून, पडवीच्या दोन्ही बाजूंनाही दोन गर्भगृहे आहेत. मंडपाच्या मध्यभागी चार उंच स्तंभ आणि कडेला भिंतीतले आठ स्तंभ आहेत. त्यांवर छत आधारलेले आहे. या देवालयाची रचना अगदी प्रमाणबद्ध व समतोल आहे. अजंटा येथील महायान बौद्धांच्या काही विहारांसारखे त्याचे स्वरूप आहे.

हे मंदिर विष्णूचे असावे, असे तज्ज्ञांचे मत आहे. मुख्य गाभाऱ्यात विष्णूची मूर्ती आणि मंडपाभोवतालच्या दहा गाभाऱ्यांत त्याच्या दहा अवतारांच्या प्रतिमा असाव्या. सांप्रत मुख्य गाभाऱ्यातली मूर्ती कल्कीची आहे, असे म्हणतात. या सर्व गर्भगृहांच्या प्रवेशद्वारांवर पुष्कळ नक्षीकाम व त्यात देवतांच्या मूर्ती आहेत. [श्री. नाईक–न्यू इं. अँ. ९, जुलै-डिसेंबर १९४७]

बला जैन दैवतसमूहातली यक्षिणी. कुंथुनाथाची सेविका. हिला अच्युता किंवा विजया असेही म्हणतात. हिचे कुंथुस्वामी चरितात केलेले वर्णन असे–

तत्तीर्थभूर्बला देवी गौरांगी केकिवाहना ।
बिभ्राणा दक्षिणौ बाहू बीजपूरकशूलिनौ ।
भुशुण्डीपङ्कजभृतौ बिभ्रती दक्षिणेतरौ ।।

अर्थ – कुंथुनाथाच्या तीर्थातून उत्पन्न झालेली, शुभ्रवर्णाची, मोरावर बसलेली, चतुर्भुज, उजव्या दोन हातांत मातुलिंग व भाला धारण करणारी आणि डाव्या दोन हातांत भृशुंडी (दगड फेकण्याचे यंत्र) आणि कमल धारण करणारी (दिगंबर मते काळ्या डुकरावर बसलेली व शंख, खड्ग, चक्र व वरदमुद्रा धारण करणारी) आहे.

ही देवता बौद्ध मारीची किंवा ब्राह्मणी वाराही या देवतांसारखी दिसते. हिचा तोंडवळा सरस्वतीशीही जुळतो. [जै. इ.]

बलाई राजस्थानमधील एक पूर्वास्पृश्य जात. या लोकांची वस्ती प्रामुख्याने झालावाड जिल्ह्यातील काही भागांत आढळते. मुख्यत्वे शेती व विणकाम हे त्यांचे परंपरागत व्यवसाय आहेत. त्याशिवाय इतर काही व्यवसायही ते करतात.

हे गणेश, भैरव, गंगा व गाय यांची पूजा करतात. बुधवार व रविवार हे शुभ वार व पौर्णिमा, एकादशी व अमावास्या या शुभ तिथी मानतात. या दिवशी ते उपवास करतात. त्यांच्या प्रत्येक वस्तीसाठी एक एक पुरोहित किंवा गुरू असतो.

सवर्ण हिंदूंच्या हातचे अन्न यांना चालते; परंतु कंजार, खाटिक, भंगी यांच्या हातचे चालत नाही. या नियमांचा भंग करील त्याला शिक्षा होते. गाय, गाईचे वासरू, मोर, हंस, कुत्रा व मांजर यांना हे मारीत नाहीत. कोणी यांना मारले किंवा त्यांचे मांस खाल्ले, तर त्याला ते जातिबहिष्कृत करतात. स्त्रियांचा अपमान करणारा व परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवणारा यांनाही त्यांच्या पंचायतीकडून दंड होतो.

विवाहप्रथा – हे पंचायतीच्या सभासदांसमोर लग्न निश्चित करतात. नंतर मुलीच्या ओटीत एक टोपली व एक रुपया घालून दोन्ही पक्षांकडील लोक तिला अहेर करतात. यांच्यांत देज देण्याची चाल आहे. पहिला पती जिवंत असताना स्त्रीने दुसरा पती केला, तर पहिल्या नवऱ्याला दंड द्यावा लागतो.

प्रसूतिप्रथा – हे जननाशौच पंधरा दिवस पाळतात. मुलाच्या नामकरणासाठी ब्राह्मणाला बोलावतात. एक महिन्यानंतर सूर्यपूजन व गूळ वाटण्याचा कार्यक्रम करतात. नंतर बाळंतिणीला नव्या बांगड्या भरतात.

बलाई लोकांमध्ये दत्तक घेण्याची प्रथा आहे. दत्तकासाठी त्यांना सगोत्र मुलगा लागतो. परंतु कधी कधी जावयालाही दत्तक घेतात. दत्तक विधानाच्या वेळी मुलाला पगडी घालून दत्तक पित्याच्या मांडीवर बसवतात. नंतर जेवण घालतात.

या जातीतील बहुतेक लोक दरिद्री व अशिक्षित आहेत. शिक्षणाचे त्यांना महत्त्वच वाटत नाही. न्हावी यांची हजामत करीत नाहीत व यांच्याकडे वाजवायला येत नाहीत. त्यामुळे ही दोन्ही कामे त्यांची त्यांनाच करावी लागतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात; परंतु लहान मुलाला पुरतात. अकराव्या दिवशी नातेवाईक व अन्य माणसे मुंडण करतात. नंतर सर्वांना जेवण घालतात. [सो. ला. रा.]

बलातिबला बला व अतिबला या दोन विद्यांचा उल्लेख वाल्मिकी रामायणात आला आहे (बाल. २२). मंत्रशास्त्रात या दोन विद्यांचे कार्य पुढीलप्रमाणे सांगितले आहे–

उत्साहबलयोर्वृद्धिः परशस्त्रसहिष्णुता ।
न बाधा क्षुत्पिपासाभ्यां यतः सा कथिता बला ।।
यतः परस्मात् स्खालित्यं दृङ्मनःकायकर्मणाम् ।
स्वोपायानाममोघत्वं भवेत्सातिबला मता ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – उत्साह व बल यांची वृद्धी, शत्रूचे शस्त्राघात सहन करण्याची ताकद आणि क्षुधा, तृष्णा यांची बाधा न होणे याच गुणांमुळे त्या विद्येला बला म्हटले आहे. शत्रूची दृष्टी, मन, देह व कर्म ही स्खलित होणे आणि आपले शस्त्रादी उपाय अमोघ ठरणे ही कार्ये ज्या विद्येमुळे होतात, तिला अतिबला म्हणतात.

विष्णूने या दोन्ही विद्या निर्माण करून मधु-कैटभांना मारले व विश्वामित्राने या दोन विद्या रामाला देऊन राक्षसांशी युद्ध करण्याच्या कामी त्याला सामर्थ्यसंपन्न केले, अशी कथा आहे. विश्वामित्राला या विद्या ब्रह्मदेव आणि सूर्य यांच्याकडून मिळाल्याचा संदर्भ ऋग्वेदात आला आहे (३.५).

बला व अतिबला या विद्या अनुक्रमे भौतिक व आध्यात्मिक शक्ती देणाऱ्या विद्या असून, तो विशिष्ट वैदिक मंत्रांचा समुदाय असावा. बला विद्येत जादूटोण्याचा संबंध होता व अतिबला विद्येत दार्शनिक ज्ञान, बुद्धीची तीव्रता व वादविवादात नैपुण्य या गोष्टी अंतर्भूत होत्या. पाहा – ससर्परीविद्या.

बलाही मध्य प्रदेशाच्या निमाड व हुशंगाबाद जिल्ह्यांतील एक पूर्वास्पृश्य जात. हे लोक विणकर असून, काहीजण पहारेकरी व शेतमजूर म्हणूनही काम करतात.

यांच्यांत बाघमार, भगोरिया, इ. अनेक कुळे असून, त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाहीत. कुत्रा व अस्वल ही त्यांची देवके आहेत. यांची जातपंचायत आहे.

विवाहप्रथा – मुलामुलींची लग्ने बहुधा लहान वयात होतात. लग्न ठरल्यावर साखरपुडा करतात. लग्न शनिवारी किंवा रविवारी मुलीच्या घरी होते. वधू-वरांचे हस्तमीलन हा लग्नातील महत्त्वाचा विधी असतो. लग्नानंतर वधू-वर एकमेकांना पाच वेळा घास देतात. वरात वरगृही निघाल्यावर वाटेत वधू एका रिकाम्या घरात रात्रभर राहते. पतिगृहात प्रवेश करताना ती पाण्याचे दोन घडे बरोबर घेते. ते घडे सृजनशक्तीचे प्रतीक मानतात. कुटुंब मोठे असणे, ही त्यांना देवाची कृपा वाटते.

विधवेला पुनर्विवाह करता येतो, पण दिराशी किंवा अन्य नातेवाईकाशी लग्न करता येत नाही.

या लोकांना नृत्य-गायनाची अत्यंत आवड आहे. पण यांची नृत्ये सामुदायिक किंवा स्त्री-पुरुषसंमिश्र नसतात. एकेकजण स्वतंत्रपणे किंवा जोडीने ते नृत्य करतात.

देवधर्म – भगवान हा त्यांचा प्रमुख देव असून, ते राम, कृष्ण, गणेश, हनुमान, इ. देवतांनाही भजतात.

मुसलमानांबरोबर राहिलेल्या बलाही स्त्रियांना किंवा इतरांनाही ते आपल्या जातीत घेतात. एखाद्या पुरुषाला जातीत घेण्यापूर्वी त्याचे क्षौर करवतात. मग त्याला एका बाजेखाली निजवतात. बाजेवर बसून काही बलाही पुरुष तो माणूस पूर्ण भिजेपर्यंत स्नान करीत राहतात. नंतर तो सर्वांना मेजवानी देतो. एवढे झाल्यावर तो बलाही झाला, असे समजतात.

या लोकांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

बलिघाटम एक प्राचीन क्षेत्र. हे ठिकाण आंध्र प्रदेशातील विशाखापट्टम जिल्ह्यात व्हाल्टेरपासून थोड्या अंतरावर आहे. पेंडरू नावाची नदी इथून वाहते. या नदीकाठी ब्रह्मेश्वर नामक एक शिवमंदिर आहे. ही नदी या मंदिराजवळ उत्तरवाहिनी झाल्यामुळे तिला तीर्थरूपता आलेली आहे. इथल्या लोकांची अशी श्रद्धा आहे, की बळी राजाने या नदीकाठी महायज्ञ केला होता. माघ शिवरात्रीला इथे मोठी यात्रा भरते. [स. भा. प्र. व.; कल्याण तीर्थांक]

बलिज द. भारतातील एक व्यापारी जात. मुळात हे लोक आंध्र प्रदेशातील तेलुगू व्यापारी असून, धंद्यानिमित्त द. भारतात सर्वत्र पसरले आहेत. यांचे देश किंवा कोट व पेठ असे मुख्य दोन विभाग आहेत. देश बलिज हे मदुरा, तंजाऊर व विजयनगर येथील नायक (बलिज) राजे किंवा त्या त्या प्रांतांचे राज्यपाल यांना आपले पूर्वज मानतात. पेठ बलिजांत गाझुलू आणि पेरिके असे आणखी भेद आहेत. गाझुलू हे बांगड्या व पेरिके हे मीठ विकतात. तमिळभाषी प्रदेशात बलिजांना वडुगन व कवरै असे म्हणतात. बलिज स्वतःला क्षत्रिय म्हणवून घेत असले, तरी इतर लोक त्यांना कम्म किंवा कापू यांची एक शाखा मानतात. ही जात मिश्र आहे, असेही काहींचे मत आहे. कारण इतर जातींनी बहिष्कृत केलेले लोक हे आपल्या जातीत घेतात. गाझुलू, गंडवल्लू, कवरै, लिंग, पंचम, मुसू कम्म, पूस, राज, जक्कुल, आडपाप, इ. बलिजांच्या पोटजाती आहेत. यांच्यांत कुळे व गोत्रेही आहेत. समान कुळांत व गोत्रांत विवाहसंबंध होत नाही.

बलिज या नावाची व्युत्पत्ती संस्कृतातील बलि+ज= यज्ञातून उत्पन्न झालेला, या शब्दापासून सांगतात. त्यासंबंधी एक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी –

पार्वती स्वतःच्या रूपावर संतुष्ट नव्हती. आपण आकर्षक दिसण्यासाठी काय करावे, असे तिने आपल्या बापाला विचारले. त्याने त्या बाबतीत ब्रह्मदेवाला विचारले. तेव्हा ब्रह्मदेवाने त्याला उग्र तप करायला सांगितले. त्या तपानंतर त्याने यज्ञ केला. त्या यज्ञातून एक पुरुष उत्पन्न झाला. त्याच्याबरोबरच बांगड्या, हळद, कानांत घालायच्या ताडपत्राच्या गुंडाळ्या, काळे मणी, चंदनाचा चुरा, फण्या, सुगंधी द्रव्ये, इ. वस्तूंच्या ओझ्याने लाद-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लेले एक गाढव उत्पन्न झाले. त्या पुरुषापासूनच बलिजांची उत्पत्ती झाली.

उद्योगधंदे – बलिजांचा मुख्य व्यवसाय व्यापार हा असला,

गाझुलू बलिज

तरी काही बलिज शेती करतात. मोती व पोवळे यांचे दागिने व बांगड्या बनवण्याचे कामही हे लोक करतात.

देवधर्म – हे गौरीला भजतात. त्यांची गौरीची मूर्ती माला लोकांच्या ताब्यात असते. पूजेच्या वेळी बलिज ती मूर्ती मागून घेतात. याबाबत कथा सागतात, ती अशी –

मुसलमानी आक्रमकांनी कापू व बलिज यांना त्रास दिल्यामुळे ते पेन्नार नदी ओलांडून दक्षिणेकडे जायला निघाले. पण त्या वेळी पेन्नार नदीला पूर आला होता. म्हणून त्यांनी गौरीची प्रार्थना करून नदीतून आपल्याला वाट देण्याची विनंती केली. तेव्हा देवीने त्यांच्याकडे एखाद्या पहिल्या अपत्याचा बळी मागितला. या वेळी त्यांच्या बरोबर असलेले माला लोक पुढे आले व त्यांनी आपल्यातला एक मुलगा गौरीला बळी दिला. त्यासरशी नदीचा प्रवाह दुभंगला व त्यांना वाट मिळाली. तेव्हापासून कापू व बलिज हे माला लोकांना फार मान देऊ लागले व आपल्या मूर्ती त्यांच्याकडे ठेवू लागले.

विवाहप्रथा – मुसू कम्म लोकांत मुलीच्या विवाहापूर्वी तिचा मामा व मोठ्या बहिणीचा नवरा यांची संमती घ्यावी लागते. साखरपुड्याच्या वेळी वराकडील मंडळी मोहरी, गूळ, डाळ, चिंच, मिरी, मीठ, लाडू, पोळ्या, अकरा नारळ, फुले, कापड, काळे मणी, हळद, कुंकू, कंगवा, इ. वस्तूंनी विषम संख्येची ताटे भरून व ती रुमालाने झाकून वधूगृही नेतात. नंतर दोन्ही पक्षांकडील मंडळी एकमेकांना विडा व नारळ देतात. वधूला पाटावर बसवून तेल लावतात व नवीन साडी देतात. ती साडी नेसून ती पुन्हा पाटावर बसते. त्या वेळी तिची ओटी भरतात व एक स्त्री तिच्या गळ्यात काळी पोत बांधते. या लोकांत लग्नाच्या आधी दोन दिवस दारापुढे हिरवा बांबू उभारतात व त्याला दूधस्तंभ म्हणतात. त्याची पूजा करून त्याला कंकण बांधतात. धोब्याने आणून दिलेले तोरण वराचा मामा लग्नमंडपाला बांधतो. वराची नातेवाईक दांपत्ये नव्या घटांत पाणी भरून आणून ते बोहल्यावर ठेवतात. मग स्त्री-पितरांची पूजा करतात. नंतर वराच्या हातापायांची नखे काढतात व त्याला विघ्नेश्वराच्या मंदिरात नेतात. तिथे तो नवे कपडे घालतो. मग त्याच्या कपाळी बाशिंग बांधतात व कमरेला कटचार खोचतात. नंतर नवरा मुलगा लग्नमंडपात जातो. तिथे त्याचा मेहुणा त्याचे पाय धुवून त्याच्या पायांत जोडे घालतो. लग्नाचे पौरोहित्य ब्राह्मण करतो. कन्यादान व विघ्नेश्वरपूजन झाल्या वर नवरा मुलगा वधूच्या गळ्यात बोट्टू (काळे मोठे मणी) बांधतो.

बलिज वधूवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नंतर वधू-वर बोहले व दूधखांब यांना तीन प्रदक्षिणा घालतात व अरुंधतीचे दर्शन घेतात.

दुसऱ्या दिवशी नवरा मुलगा रुसल्याचे सोंग करतो व जवळच्या बागेत किंवा घरात जाऊन बसतो. मग वधू व इतर नातेवाईक त्याच्याकडे जाऊन त्याची समजूत घालतात व त्याला घरी आणतात. होमहवन झाल्यावर काही ठिकाणी वराची बहीण आपल्या मुलासाठी त्याची भावी मुलगी मागते. तिसऱ्या दिवशी होमहवन होते. मग नवरा मुलगा एका टोपलीत माती घालून ती काठीने नांगरल्यासारखे करतो. वधू तांदुळांची पेंज करून त्याला जेवायला वाढते.

इतर बलिज लोकांतही थोड्या फरकाने असाच लग्नविधी प्रचलित आहे.

मृतकप्रथा – हे प्रेतांना बसल्या स्थितीत पुरतात. [म. ज्ञा. को.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; का. ट्रा. स. इं.]

बलितृतीया ओसा

एक लौकिक व्रत. ओडिसातील स्त्रिया भाद्रपद शुद्ध तृतीयेला हे व्रत करतात. उमा-महेश्वर ही या व्रताची देवता होय. या दिवशी त्यांची पूजा करून उपवास करतात. उमा-महेश्वरांची प्रतिमा वाळूची अथवा मातीची करतात.

तरुण मुले या दिवशी रात्री लोकांच्या घरांवर काठ्या मारतात किंवा घरांपुढच्या पायऱ्या उखडून टाकतात. या कृत्यामुळे मुलांना शिव्या मिळाल्या, तरी त्या आशीर्वादरूप होतात, अशी त्यांची समजूत आहे. [स्ट. ओ. फो.]

बलिदान

देवतेला अर्पण करायचा उपहार किंवा राजाला द्यायचा कर, असे बलीचे दोन अर्थ आहेत. या दोन्ही अर्थी बली शब्द वैदिक वाङ्मयात अनेक ठिकाणी आला आहे. स्मार्त पूजेत देवाला अर्पण करायच्या पूजोपचारांनाही बली असेच म्हणतात. पंचमहायज्ञांतला जो भूतयज्ञ आहे, त्याला बलिहरण अशी संज्ञा आहे. हा बळी वैश्वदेव करून शिल्लक उरलेल्या चरूतून (भात) विविध देवतांना दिला जातो. याला भूतबली अशीही संज्ञा आहे. बली व हवन यांतला फरक हा की, हवन अग्नीत केले जाते, तर बली हा भूमीवर ठेवला जातो. शांतिकर्मात अष्टलोकपाल, क्षेत्रपाल इ. देवतांना भाताचा बली दिला जातो. हा बली देताना भाताचे पिंड बनवतात, त्यांत उडीद मिसळतात, त्यांवर कुंकवाचे पाणी टाकतात, एक काकडा पेटवून त्यात खोचतात आणि मग यजमान तो बली देवतांना उद्देशून समर्पित करतो.

पशुबली हा बलीचा दुसरा प्रकार होय. अश्व, बोकड, महिष, मेंढा, इ. अनेक पशू हे यज्ञीय बली म्हणून श्रौतात सांगितले आहेत. अग्निष्टोमादी पशुयागांत बोकडाचे हनन करून त्याच्या अनेक अवयवांचा याग करतात. ग्रामदेवता या पशुबलीवाचून संतुष्ट होतच नाहीत, अशी समजूत आहे. पशुबली अत्यंत प्रिय असलेली सर्वांत मोठी देवता म्हणजे काली किंवा दुर्गा ही होय. काही ठिकाणी नवरात्रातल्या नवमीच्या दिवशी, तर काही ठिकाणी दुर्गादेवीला रोज बळी देण्याचीही प्रथा आहे. देवीने महिषासुराला मारून लोकांवरचे अरिष्ट दूर केले, या पौराणिक घटनेची स्मृती या बलिदानात दिसून येते. तंत्रमार्गात रेडा, बोकड, घोरपड, डुक्कर, कृष्णसार, शरभ, वानर, इ. अनेक पशू व ऊस, कोहळा, इ. वस्तू हे बली म्हणून मानलेले आहे. कित्येक आचार्यांनी मेंढा. बोकड, इ. पशूंचे देवाप्रीत्यर्थ होणारे हनन हे तामस-कर्म मानलेले आहे; पण तंत्रमार्गात ते सात्त्विकच ठरविलेले आहे. विरतंत्र, यामल, तंत्रचूडामणी, महानिर्वाणतंत्र, वैष्णवी-तंत्र, इ. अनेक तंत्रांत पशुबलीविषयी बरीच चर्चा केलेली आहे.

बलिदानाच्या विषयात अनेक विधिनिषेध आहेत. त्यातला महत्त्वाचा नियम हा, की ज्याला बळी द्यायचे त्या पशूला पूर्वाभिमुख ठेवणे व खड्ग घेऊन बलीचे हनन करणाऱ्या पुरुषाने उत्तर भिमुख होणे हा आहे. तांत्रिक कर्मात जेव्हा बोकड बळी दिला जातो, त्या वेळी त्याची पूजा करून पुढीलप्रमाणे प्रार्थना करतात–

छाग त्वं बलिरूपेण मम भाग्यादुपस्थितः ।
प्रणमामि ततः सर्वरूपिणं बलिरूपिणम् ।।
पशुयोनिप्रसूतोऽसि पूजाहोमादिकर्मसु ।
तुष्टा भवतु सा देवी सरक्तपिशितैस्तव ।।
चण्डिकाप्रीतिदानेन दातुरापद्विनाशनः ।
चामुण्डाबलिरूपाय बले तुभ्यं नमोऽस्तु ते ।।

अर्थ – हे बोकडा, तू माझ्या भाग्यामुळे मला बलिरूपाने प्राप्त झाला आहेस. सर्वरूपी व बलिरूपी अशा तुला मी नमस्कार करतो. तू पशु जातीत जन्मला आहेस. पूजा, होम, इ. कर्मांमध्ये ती देवी तुझ्या रक्तमांसाने संतुष्ट होवो. चंडिकेला प्रिय असलेल्या तुझ्या बलिदानाने तू दात्याच्या आपत्तींचा नाश करतोस. हे चामुंडाबलिरूप अशा बले, तुला नमस्कार असो.

त्यानंतर पुढील पशुगायत्री पशूच्या कानात म्हणतात–

पशुपाशाय विद्महे । शिरश्छेदाय धीमहि ।
तन्नः पशुः प्रचोदयात् ।।

मग खड्ग आणून त्याच्यावर ह्रीं असे बीजाक्षर लिहून त्याचे ध्यान करतात. मग त्या खड्गाने बलीच्या मानेवर प्रहार करताना पुढील मंत्र म्हणतात–

ॐ कालि कालि वज्रेश्वरि लौहदण्डायै नमः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यानंतर देवीची पुढील श्लोकाने प्रार्थना करतात –

जय त्वं सर्वभूतेशि सर्वभूतसमावृते ।
रक्ष मां निजभूतेभ्यो बलिं भुङ्क्ष्व नमोऽस्तु ते ।।

अर्थ – हे देवी, तू सर्व भूतांची स्वामीनी व सर्व भूतांनी वेष्टित अशी आहेस. तुझा जयजयकार असो. तू हा बली सेवन कर आणि तुझ्या भूतांपासून माझे रक्षण कर. नमस्ते.

बलिदानाची ही प्रथा भारतात अतिप्राचीन काळापासून चालत आलेली आहे. यज्ञातल्या पशुहनना या रूपाने वैदिक संस्कृतीत ती आढळलेच, शिवाय सिंधुसंस्कृतीतही तिचा आढळ होतो. हडप्पामध्ये उत्खननात सापडलेल्या एका मुद्रेवर पिंपळाच्या फांदीच्या दुबेळक्यात एक व्यक्ती उभी असून, एक मनुष्य बोकड धरून उभा आहे आणि खालच्या बाजूलाही बरेच लोक आहेत. हे चित्र भूदेवीला दिल्या जाणाऱ्या बलीचे आहे, असे समजले जाते. तंत्रधर्म सिंधुसंस्कृतीइतकाच जुना असून, तोही बलिप्रधान आहे. बली हे तांत्रिकांच्या पूजेचे प्रधान अंग आहे. तांत्रिकांच्या बीजनिघंटूत काही बीजे रक्ताशी संबंध असलेली आणि काही बलिभक्षण करणारी आहेत. तांत्रिकांच्या वामाचार पद्धतीत देवाला मद्य आणि मांस यांचाच नैवेद्य लागतो. प्राचीन काळी तांत्रिक लोक आपल्या उपास्य देवतेपुढे नरबळीही देत, याबद्दल बराच पुरावा उपलब्ध आहे. शक्तीपुढेच नव्हे; तर शिव आणि भैरव यांच्यापुढेही नरबळी दिले जात होते.

शाक्तांचे प्राबल्य असलेल्या विभागात जी शिवाची मंदिरे आहेत, त्यांत बळी देण्यासाठी एक दगड असल्याचा पुरावा मिळतो. ओंकारमांधाता या क्षेत्रात देवळाच्या वरच्या अंगाला एक दगड दाखवितात व पूर्वी लोक तिथून स्वर्गाला जात, असे सांगतात. ते कदाचित नरबळीचे ठिकाण असावे.

शाक्तांचे प्राबल्य असलेल्या विभागात आजही पशूंचे बलिदान मोठ्या प्रमाणावर चालते. आसाम व बंगाल या प्रदेशांत दुर्गापूजेच्या उत्सवात बोकडांचे बेसुमार बलिदान होते. मारी देवता तर बलिदानावाचून संतुष्ट होतच नाही, असे म्हणतात. [श. क.; श्री. प्र. रा. देशमुख–नवभारत, आक्टो. १९५९]

बलिदान व्रत

एक काम्य व्रत. दीर्घकालीन ज्वर नाहीसा व्हावा या उद्देशाने हे व्रत करतात. याचा विधी असा– अष्टमीच्या अपराह्णकाळी तांदुळाच्या पिठाची एक मनुष्याकृती तयार करतात तिच्यात मुख, हृदय, कंठ व नाभी या अवयवांच्या जागी कवडया बसवितात. तिला हळदीचा लेप देतात. तिची वाळयाच्या आसनावर स्थापना करतात. चारही कोपऱ्यांत पिवळया पताका उभारतात व चार हळदीचे द्रोण भरून ठेवतात. मग त्या आकृतीची पूजा करतात. सायंकाळी तापकरी माणूस सात वेळा विशिष्ट मंत्र म्हणतो व त्या आकृतीला सात वेळा ओवाळतो, मग ती आकृती निर्माल्यासह एका वृक्षाच्या मुळाशी अगर स्मशानात नेऊन विसर्जित करतो. पुढे तीन दिवस तो नक्त भोजन करतो. [व्र. प.]

बलिपात्र

बली म्हणजे अर्पण द्रव्य होय. ते ज्या पात्रातून देवाला अर्पण करायचे, त्या पात्राला बलिपात्र म्हणतात. पलाश, अश्वत्थ, प्लक्ष (पिंपरी), वड, कार्ष्मरी (शिवणी), मधूक (मोहवृक्ष), फल्गू बिल्व व वेळू या वृक्षांचे बलिपात्र करावे, असे सांगितले आहे. या पात्रांमधून जो माणूस देवाला द्रव्य अर्पण करतो, त्याला सर्व यज्ञांचे फळ मिळते, असे वायू पुराणात म्हटले आहे (७४.३२; ७५.१–६). [पु. इं.]

बलिप्रतिपदा

कार्तिक शु. प्रतिपदेला हे नाव आहे. विक्रम संवताचा हा आरंभदिन होय. साडेतीन मुहूर्तांपैकी हा अर्धा मुहूर्त आहे. धर्मशास्त्रांत या दिवसाची कृत्ये सांगितली आहेत, ती अशी–

सकाळी अभ्यंग स्नान करावे. नवे कपडे परिधान करावे. गाईबैलांची पूजा करून व त्यांना सजवून त्यांची मिरवणूक काढावी. गाईचे सगळे दूध वासरालाच द्यावे. गोवर्धनाची पूजा करावी. रस्ता बांधणे, नदीवर घाट बांधणे, तलाव खोदणे, इ. लोकोपयोगी कृत्ये करावी. रस्सीखेंच हा खेळ खेळावा. सौभाग्यवती स्त्रियांनी आपल्या पतीस ओवाळावे. रात्री बळीची पूजा करून त्याला दीपदान करावे. राजेलोकांनी पंचरंगी मंडलावर बळीचे पंचरंगी चित्र काढून त्याची पूजा करावी. इतर लोकांनी गादीवर पांढऱ्या तांदुळांनी बळीची आकृती काढून तिची पूजा करावी. या दिवशी द्यूत खेळावे (द्यूतप्रतिपदा पाहा). नृत्यगायनादी ललित कार्यक्रमांत मन रमवावे. या दिवशी रथयात्रा नावाचे एक व्रत सांगितले आहे, त्याचे विधान असे–

अमावास्येला उपवास करावा. प्रतिपदेच्या दिवशी अग्नी व ब्रह्मा या देवांना रथात ठेवून तो रथ विद्वान ब्राह्मणांकरवी नगराभोवती फिरवावा. जागोजागी रथ थांबवून त्याला आरती ओवाळावी. हा रथ जे ओढतात, जे त्याला दिवे ओवाळतात आणि जे त्याचे भक्तिपूर्वक दर्शन घेतात, ते सर्वोच्च लोकाला जातात. [व्रतराज; ध. सिं.; नि. सिं.; हि. ध.]

बलिहरण

एक नित्य कर्म. याला भूतयज्ञ असेही नाव आहे. याच्या विधीनाबद्दल प्राचीन गृह्यसूत्रे व अर्वाचीन आचार यांत फरक दिसतो. याचा विधी असा –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वैश्वदेव केल्यानंतर अवशिष्ट अन्नाचा अल्पसा भाग बाहेर नेऊन त्याचा पुढील देवतांना बली द्यावा– आप, ओषधी–वनस्पती, ग्रह, ग्रहदेवता, वास्तुदेवता, इंद्र, इंद्रपुरुष, यम, यमपुरुष, वरुण, वरुणपुरुष, सोम, सोमपुरुष, ब्रह्मा, ब्रह्मपुरुष, विश्वेदेव, दिवाचारी भुते (रात्री करायचे असल्यास रात्रिचर भुते), राक्षस व पितर.

बलिहरणासाठी जमीन हाताने चक्राकार पुसून तीवर पाणी शिंपडावे. मग पूर्व दिशेला प्रारंभ करून आग्नेय, दक्षिण, इ. क्रमाने ईशान्येपर्यंत जाऊन वर्तुळ पुरे करावे. बोराएवढे अन्न घेऊन पाचही बोटांच्या अग्राने हे बली जमिनीवर ठेवावे. बली देताना प्रत्येक देवतेचे नाव चतुर्थ्यन्त घेऊन स्वाहा असे म्हणावे. बलिहरणाचे फल आचारेन्दू या ग्रंथात सांगितले आहे, ते असे –

आयुरारोग्यसौभाग्यपुत्रान्पौत्रान्बहून्पशून् ।
कामयन्धर्ममोक्षार्थं चक्राकारं बलि हरेत् ।।

अर्थ – ज्याला आयुष्य, आरोग्य, सौभाग्य, पुत्र, पौत्र, बहुत पशू, धर्म व मोक्ष यांची कामना असेल, त्याने चक्राकार बलिहरण करावे.

बलिहरण हा वैश्वदेवाचाच एक भाग आहे. स्त्रीला बलिहरण करायचे असल्यास तिने ते सर्व देवतांचे ध्यान करून अमंत्रक करावे, असे सांगितले आहे. [हि. ध.; ऋ. ब्र. स.]

बली एक दैत्य. प्रल्हादाचा नातू व विरोचनाचा पुत्र. हा एक महाबलाढ्य दैत्यराज होऊन गेला. याला विंध्यावली व अशना नावाच्या दोन भार्या होत्या. अशनेपासून त्याला बाणप्रभृती शंभर पुत्र झाले.

बलीने उग्र तपश्चर्या करून सामर्थ्य मिळवले व स्वर्ग जिंकला. त्या वेळी सर्व देव घाबरले व रूपे पालटून परागंदा झाले. मग बलीने प्रल्हादाला स्वर्गात बोलावून आणले व त्याला स्वर्गाचे राज्य स्वीकारण्यास सांगितले. पण प्रल्हादाने स्वतः राज्य न घेता बलीलाच राज्याभिषेक केला व त्याला 'धर्माने राज्य चालव' असे सांगितले. त्यानंतर बलीने स्वर्गाचा यथेष्ट उपभोग घेतला.

बलीने इंद्राची जी संपत्ती हरण केली होती, ती दैत्यलोकी नेत असता समुद्रात पडली. ती बाहेर काढण्यासाठी देवांनी समुद्रमंथनाचा उपक्रम केला. पण 'दैत्यांच्या साहाय्यावाचून तुमच्या हातून समुद्रमंथन पार पडणार नाही आणि तुमच्यामध्ये तेवढी ताकद नाही,' असे विष्णूने देवांना सांगितले व त्या कामी बलीला अनुकूल करून घेण्याविषयीही उपदेश केला.

नंतर देव बलीकडे आले आणि त्यांनी त्याचे साहाय्य मागितले. बलीने ते देण्याचे मान्य केले. मग देव–दैत्य या दोघांनी मिळून समुद्रमंथन केले. त्यातून जे अमृत निघाले, ते दैत्यांना न मिळता देवांनीच हस्तगत केले. आपण फसलो, असे समजल्यावर दैत्य खवळले व देवांवर चालून गेले. त्यात बलीने इंद्राशी युद्ध केले. त्या युद्धात इंद्राने वज्र फेकून बलीला ठार मारले. मग उरलेल्या दैत्यांनी त्या मृत बलीला अस्ताचलावर नेले. तिथे शुक्राचार्यांनी संजीवनी मंत्राने त्याला जिवंत केले. तो जिवंत होताच शुक्राचार्यांनी त्याला पुनश्च राज्याभिषेक केला व त्याच्याकडून विश्वजित नावाचा यज्ञ करवला. त्या वेळी यज्ञनारायणाने प्रसन्न होऊन बलीला दिव्य रथ, सुवर्णाचे धनुष्य, दोन अक्षय्य भाते व दिव्य कवच या वस्तू दिल्या. प्रल्हादाने न सुकणारी माळ व शुक्राने दिव्य शंख बलीला दिला. नंतर बलीने पुनश्च स्वर्गावर आक्रमण केले व स्वर्ग जिंकला. त्या वेळी आपल्याला काळ अनुकूल नाही, असे समजून देव स्वर्गातून बाहेर पडले.

नर्मदेच्या उत्तर तीरावर भृगुकच्छ (भरुच) या क्षेत्रात बलीने शेवटचा अश्वमेध केला. त्या यज्ञात त्याने मुक्त हस्ताने दान देणे सुरू केले. त्या वेळी इंद्र विष्णूकडे गेला आणि त्याने कोणत्या तरी प्रकारे बलीला नष्ट करण्याची त्याला विनंती केली. तिला अनुसरून विष्णूने अदितीच्या उदरी बटू वामनाच्या रूपाने जन्म घेतला. मग तो बलीच्या यज्ञमंडपात आला. त्याने बलीच्या कर्तृत्वाची व दातृत्वाची खूप प्रशंसा केली. बलीने त्याला आसनावर बसवून त्याची पूजा केली आणि 'तुला काय हवे' असे विचारले. वामनाने त्रिपाद भूमी मागितली. शुक्राचार्याला त्या मागणीत कपट दिसले व त्याने बलीला आग्रहाने म्हटले, की 'तू याला त्रिपाद भूमी देऊ नकोस. हा तुझा शत्रू विष्णू बटूरूपाने तुझा नाश करायला आला आहे.' त्यावर बलीही तितक्याच निर्धाराने म्हणाला. 'विष्णू जर माझ्या दारीचा याचक होणार असेल, तर त्याला मी अवश्य दान देईन.' बली आपले ऐकत नाही, असे दिसताच शुक्राचार्याला क्रोध आला आणि त्याने बलीला शाप दिला. 'तू स्वतःला शहाणा समजून माझ्या आज्ञेचा उपमर्द करतोस, त्या अर्थी तू लवकरच राज्यभ्रष्ट होशील.' पण तरीही बलीने वामनाच्या हातावर त्रिपाद भूमीचे उदक सोडलेच.

मग वामन एकाएकी मोठा झाला आणि त्याने दोनच पायांत त्रिभुवन व्यापले. 'आता तिसरा पाय कुठे ठेवू' असे विचारताच बलीने आपले मस्तक त्याच्यापुढे वाकविले. वामनाने तिसरे पाऊल बलीच्या मस्तकावर ठेवले. लगेच गरुडाने त्याला वरुणपाशाने बद्ध केले. बलीची ती अवस्था पाहून त्याचा आजा प्रल्हाद तिथे आला आणि त्याने बलीसाठी विष्णूची करुणा भाकली. मग वामनाने गरुडाला सांगून बलीला पाश-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुक्त केले आणि त्याला सप्त पातालांपैकी सुतलात जाऊन राहायला सांगितले. विष्णू पुढे म्हणाला. 'सुतलात मी तुझा द्वारपाल होईन व माझे चक्र तुझे संरक्षण करील. आजची तिथी कार्तिक शु. प्रतिपदा आहे. ही तिथी बलिप्रतिपदा म्हणून ओळखली जाईल आणि आजपासून लोक त्या तिथीला तुझी पूजा करतील.'

वामनाची आज्ञा मानून बली सुतलात गेला. मग वामनाने शुक्राकडून त्याच्या यज्ञाची समाप्ती करविली. नंतर त्याने बलीच्या अनुचर दैत्यांना हाकलून दिले व पृथ्वीचे राज्य मनुपुत्राला दिले.

बली हा असुर असला तरी तो सत्त्वसंपन्न होता. अनेक सद्‌गुण त्याच्या अंगी वास्तव्य करीत होते. रामायणात त्याचे वर्णन केले आहे, ते असे –

एष वै परमोदारः शूरः सत्यपराक्रमः ।
वीरो बहुगुणोपेतः पाशहस्त इवान्तकः ।।
बालार्क इव तेजस्वी समरेऽप्यनिवर्तकः ।
अमर्षी दुर्जयो जेता बलवान्गुणसागरः ।।
प्रियंवदः संविभागी गुरुविप्रप्रियः सदा ।
कालाकाङ्‌क्षी महासत्त्वः सत्यवाक्सौम्यदर्शनः ।।
दक्षः सर्वगुणोपेतः शूरः स्वाध्यायतत्परः ।

(वा. रा. उ. प्रक्षिप्त सर्ग १)

अर्थ – हा (बली) परम उदार, शूर, सत्यपराक्रमी, वीर, अनेकगुणसंपन्न, जणू पाशधारी यम, जणू बालरवीसारखा तेजस्वी समरांगणात शत्रूला पाठ न दाखविणारा, असहिष्णू, बलवान, गुणसागर, प्रियभाषी, धनधान्य स्वतःसाठी न ठेवता ते सर्वांना विभागून देणारा, गुरू व ब्राह्मण यांचा आवडता, योग्य समयाची वाट पाहणारा, महान सत्त्वशाली, सत्यवक्ता, दिसायला सौम्य, सर्वविषयीं सावध, सर्वगुणांनी युक्त, शूर व ज्ञानार्जनासाठी सदैव तत्पर असा आहे.

भृगुकच्छात पराभूत झालेला बली विष्णूच्या आज्ञेने सुतलात गेला म्हणजे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर केरळात त्याने राज्य स्थापन केले, असा तर्क करता येतो. केरळीय लोक आजही बलीला राजा म्हणून ओळखतात. बलीविषयी केरळातल्या जनतेत अपार आदरभाव आहे. तिथला ओणम् हा उत्सव बलीचाच उत्सव आहे. महाराष्ट्रातही बलीविषयी प्रेमादर आहे. दिवाळीत म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदेला 'इडापिडा जावो, बळीचे राज्य येवो' अशी महाराष्ट्रातल्या ग्रामीण विभागातली घोषणा असते. यावरून बळीचे राज्य हे सुराज्य होते व प्रजेचा योगक्षेम उत्तम तऱ्हेने चालविणारे होते असे दिसते. लोकमानसातल्या बलीविषयीच्या आदरभावनेतून वरील श्लोक निर्माण झाले असावे व ते रामायणात समाविष्ट केले गेले असावे. त्या दृष्टीने वरील श्लोकातील संविभागी हे विशेषण सूचक वाटते. राज्यात निर्माण झालेली धन–धान्यसंपदा तो स्वतःच्या बडेजावासाठी वापरीत नसून, प्रजेमध्ये तिचा संविभाग करीत होता, असे त्यावरून कळते.

बली व देव यांचा संघर्ष हा आर्य–असुर संघर्ष होता बलीने आर्यांशी युद्धे करून दोनदा त्यांचा प्रदेश जिंकला होता. असे जरी असले तरी बलीने विष्णूची कुठे निंदा केली नाही. प्रल्हादापासून त्या असुर घराण्यात वैष्णव धर्म प्रविष्ट झाला होता व बलीनेही त्याचा त्याग केला नव्हता, असे दिसून येते. बलिकृत विष्णुस्तुती व विष्णूकडून बलीला वरदान या गोष्टी वरील विधानाला प्रमाणभूत आहेत.

बलीची गणना सप्त चिरंजिवांत झाली आहे. कोण्या प्राचीन काळी आजच्या कन्याकुमारीच्या दक्षिणेस कित्येक कोस समुद्रांत गेलेले एक भूशिर होते आणि त्या ठिकाणी बलीची राजधानी होती, असे सूचित करणारे उल्लेख तमिळ वाङ्मयात आढळतात. तो तिथे राज्य करीत असता एक नैसर्गिक उत्पात घडला आणि खवळलेल्या दक्षिण सागराने बलीचे राज्य बुडवून तेवढी भूमी गडप केली, असेही संशोधकांनी सिद्ध केले आहे.

दक्षिणाशून्य कर्माचे फल कर्त्याला न मिळता ते बलीला मिळते, असे देवी भागवतामध्ये म्हटले आहे. याने ३० लक्ष ६० हजार वर्षे राज्य केले असे पद्म पुराणात म्हटले आहे (सृष्टी खंड १३). याला नुसते बली न म्हणता महाबली असे म्हणत. अनासक्तीचे प्रतिपादन करण्यासाठी वेदान्तशास्त्रात याच्या कथेचा उपयोग केलेला आहे (योग वासिष्ठ ५·२२·२९). पुराणांत बली नावाचे १०–१२ पुरुष आढळतात. कित्येक ठिकाणी त्यांच्या कथा व असुरबलीच्या कथा यांचा सकर झालेला आहे. पाहा – वामन. [वा. रा. को.; प्रा. च. को.; पु. इं.]

बलुची पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांत या प्रदेशातील एक मुसलमान जमात. अरबांच्या कुरेशी वंशातील मीर हमझाह याला हे लोक आपला मूळ पुरुष मानतात. पूर्वी हे बलुचिस्तानात होते. इ. स. च्या ७ व्या शतकात बलुचिस्तानात जे बौद्ध लोक होते, तेच पुढे मुसलमान झाले. इ. स. च्या ११ व्या शतकात सिंधमधील काही अरब व मुसलमान झालेले राजपूत लोक बलुचिस्तानांत गेले या भिन्न वंशांतील लोकांच्या मिश्रणामुळे जे लोक उत्पन्न झाले त्यांना बलुच हे नाव मिळाले. त्यांचा चेहरा रेखीव आणि वर्ण गोरा असतो. इ. स. च्या १५ व्या शतकात बलुचिस्तानातील पुष्कळ टोळ्या भारतात येऊन वायव्य सरहद्द प्रांतात व पंजाबात स्थायिक झाल्या.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूर्वी हे लोक भटक्ये असून, चोरी–दरोडेखोरी हा त्यांचा मुख्य उद्योग होता. त्यांची भाषा फारसीची एक शाखा आहे. सांप्रत हे पशुपालनाचा व्यवसाय करतात. ते गुरे, उंट, मेंढ्या, बकऱ्या पाळीत असले, तरी उंट हा त्यांचा मुख्य पाळीव पशू होय. त्याची जोपासना ते फार चांगली करतात. बलुची म्हणजे उंटवाला असेच मानले जाते. बुग्टी, बोलेडी, डोम्की, पणी, मगसी, रिंड व मारी या बलुची लोकांच्या मुख्य पोटजाती आहेत. [नें. नॉ. इं.; पं. का.; म. ज्ञा. को.]

बलुतेदार ग्रामीण जीवनातील निरनिराळी आवश्यक कामे करून देणारे वतनदार कारागीर व कामगार. गावातील शेतकऱ्यांची प्रापंचिक व व्यावसायिक कामे वर्षभर करून देण्याबद्दल त्यांना सुगीच्या दिवसांत शेतकऱ्यांकडून मुशाहिरा म्हणून जे धान्य मिळते, त्याला बलुते म्हणतात. पूर्वी सर्व गावे स्वयपूर्ण होती. गावातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आणि बाकीचे उद्योग शेतीला पूरक असे होते. शेतीची अवजारे व हत्यारे बनवणे व दुरुस्त करणे यासाठी सुतार, लोहार, चांभार व मांग यांची गरज असते, तर प्रापंचिक जीवनात न्हावी, परीट, कुंभार व कोळी या लोकांची आवश्यकता असते. देवधर्माची कामे गुरव, माळी, जोशी, मुलाणी, इ. लोक करतात. विणकर, सोनार, कासार, महार, रामोशी यांच्याकडे गावातली ती ती कामे सोपवलेली असतात. या सर्वांना त्यांच्या कामाच्या मानाने बलुते मिळते म्हणून त्यांना बलुतेदार म्हणतात.

ही बलुतेपद्धती फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. आर्य लोकामध्ये ती प्रचलित होती व त्यांनीच ती दक्षिणेत आणली, असे आळतेकरांचे मत आहे. बलुतेदारांना पूर्वी कारू नारू असे म्हणत.

बलुत्याचे हे उत्पन्न कायम स्वरूपाचे असल्यामुळे बलुतेदार गावातले कायमचे रहिवासी झाले आणि वतनदार बनले. ते लोकांची कामे आत्मीयतेने करीत आणि लोकही त्यांना भरपूर मोबदला देत. पूर्वी ग्रामजीवनाला अत्यावश्यक असे पाच ते सात बलुतेदार सर्वत्र असत. पण त्यांची संख्या हळूहळू वाढत जाऊन कालांतराने अठरापर्यंत गेली. लोकांच्या गरजा वाढू लागल्यामुळे काही फिरस्ते लोक त्या वाढलेल्या गरजा भागवू लागले. ते उपरे धंदेवाईक बलुत्यावर हक्क सांगू लागले व बलुतेदार बनले. इंग्रजी अमदानीत मात्र त्यांतील बारा ते चौदा बलुतेदारांना मान्यता मिळाली.

कामाच्या महत्त्वाप्रमाणे बलुतेदारांचे तीन वर्ग केलेले आहेत. पण त्यांची वर्गवारी सर्वत्र सारखी नाही. सुतार, लोहार, चांभार व मांग हे बलुतेदार बहुतेक सर्वत्र पहिल्या वर्गात येतात; न्हावी, परीट, कुंभार व कोळी हे दुसऱ्या वर्गात आणि गुरव, जोशी, सोनार व मुलाणी हे तिसऱ्या वर्गात येतात. पुष्कळ ठिकाणी न्हावी हा पहिल्या वर्गातला बलुतेदार मानला जातो, तर मांग हा तिसऱ्या वर्गातला. गुरव, जोशी वगैरे देवधर्मांच्या कामाचे बलुतेदार काही गावात दुसऱ्या वर्गात मानले जातात. महार हा बलुतेदार भिन्न भिन्न ठिकाणी पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गात समाविष्ट केला जातो. चौगुला, तराळ, बुरुड असे आणखीही काही बलुतेदार निरनिराळ्या ठिकाणी असतात.

बलुत्याचा दर किंवा निरख पूर्वी निरनिराळ्या ठिकाणी वेगवेगळा पण निश्चित ठरलेला असे. सणावारानिमित्त काही बलुतेदारांना अधिक धान्य, भाकरी किंवा तेल, मीठ, गूळ, इ. पदार्थ देण्याची पद्धत होती. लग्नसमारंभात सुतार, न्हावी, परीट, इ. लोकांना काही काम असे किंवा काही मान असे, त्यासाठी त्यांना पागोटे व जेवण मिळत असे. आता मात्र कित्येक ठिकाणी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे, शेताचे उत्पन्न येईल त्या मानाने बलुते देतो. बलुतेदारही बलुत्याची कामे हळूहळू कमी करून, बरीच कामे वेगळा मोबदला घेऊन करू लागले आहेत. तथापि अजूनही बलुतेपद्धती कमी अधिक प्रमाणात सर्वत्र चालू आहे. ग्रामीण भागात उद्योगधंदे वाढत जातील, तसतशी ही व्यवस्था लयाला जाईल असे वाटते. [हि. व्हि. क. वे. इं.; म. ज्ञा. को.; या. का. म.; म. ग्रा. स.]

बलेव एक लौकिक विधी. गुजरातमधील काही ब्राह्मणांत मुलाची मुंज झाल्यावर बलेव करतात. त्याचा विधी असा – गावकरी मंडळी जमून जलाशयावर जातात. तिथे गणपती, नवग्रह व नांगर यांची पूजा करतात. मग चार कुंभार डोक्यावर पाण्याचे घडे घेऊन उभे राहतात. त्यांपैकी प्रत्येकाला पावसाळ्याच्या चार महिन्यांपैकी एक चे नाव ठेवतात. मग त्यांची धावण्याची शर्यत होते. ती शर्यत जो जिंकील, त्याला तो नांगर बक्षीस देतात. [लौ. दं.]

बलोपासना शरीर व मन यांचे बल वाढविण्यासाठी व्यायामादी प्रकार करतात, त्या सर्वांना मिळून बलोपासना अशी संज्ञा आहे. बल म्हणजे इंद्रियांची, स्नायूंची, प्राणांची व एकूण मानवाची जीवनधारक शक्ती होय. अंगी बल असल्यावाचून माणसाला जीवनाचा उपभोग घेता येणार नाही व जीवनार्थ कलहात टिकावही धरता येणार नाही. बलहीन जीवन म्हणजे निःसत्त्व, किडलेले, खुरटलेले जीवन होय. म्हणून वैदिक आर्यांनी जे चार आश्रम कल्पिले, त्यांत बलोपासनेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जोड ब्रह्मचर्याश्रमाशी घालून दिली आहे. माणसाने ब्रह्मचर्यात म्हणजे विद्यार्जनाच्या कालात बलाचीही प्राप्ती करून घ्यावी आणि गुरुकुलातून बाहेर पडणारा युवा स्नातक, आशिष्ठ, बलिष्ठ, द्रढिष्ठ म्हणजेच महत्त्वाकांक्षी, बलवान व कणखर बनलेला असावा, अशी वैदिकांची अपेक्षा होती.

वैदिक आर्यांना बलाविषयी किती आस्था होती, हे निघंटू-मध्ये जे बलवाचक असे २८ शब्द आले आहेत, त्यांवरून कळून येते. त्यांतले काही शब्द असे –

(१) पौंस्य – याचा अर्थ पौरुष असा आहे. इंद्रादी देवांच्या पौरुषाचे वर्णन करताना वेदांत हा शब्द वापरलेला आढळतो.

(२) सहः – याचा अर्थ सहनशक्ती असा आहे. शत्रूचा हल्ला आला असताही आपली जागा न सोडता तिथे स्थिर राहणे व शत्रूचा समर्थपणे प्रतिकार करणे, या अर्थी हा शब्द आला आहे.

(३) मज्मना – हे शुद्धतेचे बल आहे. शरीर, इंद्रिये, मन व बुद्धी यांच्या पावित्र्याने हे बल प्राप्त होते. शरीराचे स्वास्थ्य व आध्यात्मिक प्रवृत्ती या गोष्टी व्यक्त करण्यासाठी हा शब्द वापरला आहे.

(४) स्पन्द्रासः – हे गतीचे बल आहे. गती व गतिसाधने यांपासून हे बल प्राप्त होते. प्रगतीचे, वेगवान बनण्याचे सामर्थ्य या अर्थी हा शब्द येतो.

(५) शर्धः – हे वाढीचे बल आहे. विचारांची, कार्याची व संघशक्तीची वाढ करून समर्थ बनणे, असा याचा अर्थ आहे.

(६) ओजः – हे शारीरिक बल आहे.

(७) वाजः – हे शरीरातील वीर्याधिक्याने येणारे बल आहे. वीर्यापासून होणारी शरीरातील सप्त धातूंची बळकटी असा याचा अर्थ आहे.

(८) त्वक्षः – शरीराची चपलता राखून बलवान होणे, असा याचा अर्थ आहे.

ऋग्वेदात अनेक देवतांच्या बलाची अनेक ठिकाणी वर्णने आली आहेत. वैदिक देवतांमध्ये मरुत, इंद्र, वरुण, वायू, इ. देव बलवान म्हणून ओळखले जातात. मरुतांविषयी ऋग्वेदात पुढील मंत्र आहेत—

मरुतो यद्ध वो बलं जनां अचुच्यवीतन ।

(ऋ. १.३७.१२)

अर्थ – हे मरुतांनो, तुमचे बळ असे आहे, की त्यायोगे तुम्ही दुष्ट लोकांना हालवून सोडता.

ऋष्टयो वो मरुतो अंसयोरधि सह
ओजो बाह्वोर्वो बलं हितम् ॥

(ऋ. ५.५७.६)

अर्थ – हे मरुतांनो, तुमच्या खांद्यावर भाते आहेत व बाहूंच्या ठिकाणी विशाल बल ठेवले आहे.

वेदातील मरुतांच्या वर्णनात घोरवर्पसः म्हणजे धिप्पाड शरीराचे असे वर्णन अनेकदा येते. मरुत व रुद्र हे लढवय्ये देव असून, वीरतेविषयी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या ठिकाणी संघटनेचेही बल होते. इंद्राच्या बल-पराक्रमाची वर्णने ऋषींनी ऋग्वेदभर जागोजाग सांगितली आहेत. एतद्विषयी सारभूत अशी पुढील एकच ऋचा सांगितली तरी पुरेशी आहे –

बलविज्ञायः स्थविरः प्रवीरः सहस्वान् वाजी सहमान उग्रः ।
अभिवीरो अभिसत्वा सहोजा जैत्रमिन्द्र रथमा तिष्ठ गोवित् ॥

(ऋ. १०.१०३.५)

अर्थ – बलिष्ठ, पोक्त, मोठा योद्धा, महापराक्रमी, समर्थ, शत्रूचा पराभव करणारा, उग्र-वीर, बहुत अनुयायी असणारा व शक्तिशाली असा तू आहेस. हे इंद्रा, तू तुझ्या विजयरथामध्ये बैस.

इंद्र हा आर्यांचा सर्वश्रेष्ठ उपास्य होता. त्याच्या बल-पराक्रमांचे वर्णन करून वैदिक आर्यांनी आपणही बलशाली होऊन सर्वत्र विजयी व्हावे अशी मनोमन आकांक्षा व्यक्त केली आहे.

ऋग्वेदापासून उपनिषदापर्यंतच्या कालाला वैदिक काल म्हणतात. या सर्व कालात बलोपासनेला प्राधान्य दिलेले आहे. उपनिषदामध्ये बलाचे महत्त्व सांगून त्याच्या उपासनेचा आदेशही दिला आहे, तो असा –

बलं वाव विज्ञानाद्भूयोऽपि ह शतं विज्ञानवतामेको बलवानाकम्पयते, स यदा बली भवत्यथोत्थाता भवत्युत्तिष्ठन् परिचरिता भवति, परिचरन्नुपसत्ता भवत्युपसीदन्द्रष्टा भवति, श्रोता भवति, मन्ता भवति, बोद्धा भवति, कर्ता भवति, विज्ञाता भवति, बलेन वै पृथिवी तिष्ठति, बलेनान्तरिक्षं बलेन द्यौर्बलेन पर्वता बलेन देवमनुष्या बलेन पशवश्च वयांसि च तृणवनस्पतयः श्वापदान्याकीटपतङ्गपिपीलकं बलेन लोकस्तिष्ठति बलमुपास्स्वेति ॥ स यो बलं ब्रह्मेत्युपास्ते यावद्बलस्य गतं तत्रास्य यथा कामचारो भवति यो बलं ब्रह्मेत्युपास्ते ॥

(छांदो. ७.८.१-२)

अर्थ – विज्ञानाहून बल अधिक आहे. शंभर विज्ञानी मनुष्यांना एक बलवान मनुष्य कांपायला लावतो. मनुष्य जेव्हा बलवान असतो, तेव्हा तो उठून उभा राहतो, परिचर्या करतो, ज्ञानी होतो, कर्ता होतो, विज्ञानयुक्त होतो. बलाने पृथ्वी राहते, बलाने अंतरिक्ष, स्वर्ग, पर्वत, देव, मनुष्य, पशू, पक्षी, गवत, वनस्पती, कृमी, पतंग, मुंग्या, इ. सर्व प्राणी राहतात. बलाने सर्व लोकांची स्थिती आहे. म्हणून बलाची उपासना कर. जो या बलरूपी ब्रह्माची उपासना करतो, त्याला जिथपर्यंत बलाची गती आहे, तिथपर्यंत संचार करता येतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बलहीन मनुष्याला जीवनातली सुखे भोगता येत नाहीत, ही तर अनुभवाचीच गोष्ट आहे.

परमात्मप्राप्तीसाठी जपतपादी अनुष्ठान करणे आवश्यक असते व ते दुर्बल मनुष्य करू शकत नाही. शरीरात बळ असले तरच योगयागादी साधने व धर्मानुष्ठाने होणार. म्हणूनच भारतीय आयुर्वेद हा मनुष्याचे बल कायम राहावे, तो दीर्घायुषी व्हावा व दीर्घायुषी होऊन त्याने परमात्मप्राप्तीची साधना करावी यासाठी प्रवृत्त झाला आहे. हे सर्व जाणूनच एक वैदिक ऋषी इंद्राकडे बलाची याचना करीत आहे –

बलं धेहि तनूषु नो बलमिन्द्रानळुत्सुनः ।
बलं तोकाय तनयाय जीवसे त्वं हि बलदा असि ।।
(ऋ. ३.५३.१८)

अर्थ – हे इंद्रा, आमच्या शरीरांमध्ये, आमच्या बैलांमध्ये व आमच्या मुलाबाळांमध्ये बळ धारण कर. कारण तूच बळ देणार आहेस.

वाजसनेयी संहितेतील बलविषयक प्रार्थना अशी–
तेजोऽसि तेजो मयि धेहि, वीर्यमसि वीर्यं मयि
धेहि, बलमसि बलं मयि धेहि, ओजोऽस्योजो मयि धेहि,
मन्युरसि मन्युं मयि धेहि, सहोऽसि सहो मयि धेहि ।।
(वाज. सं. १९.९)

अर्थ – हे प्रभो, तू तेजस्वी, वीर्यवान, बलिष्ठ, ओजस्वी, उत्साही व सहनशक्तीने युक्त आहेस. म्हणून तू माझ्यामध्ये तेज, वीर्य, बल, सामर्थ्य, उत्साह व सहनशक्ती धारण कर. अर्थात हे गुण माझ्यामध्ये विकास पावोत.

या आणि अशाच वचनांवरून वैदिक काळातल्या लोकांना शरीरसामर्थ्याविषयी तीव्र आस्था होती हे दिसते. पण त्या काळात आखाडे, व्यायामशाळा, तसेच सांघिक किंवा वैयक्तिक व्यायाम, असे काही असल्याचे एखादे प्रमाण वचन सापडत नाही कदाचित नियमित व शिस्तबद्ध व्यायामाची पद्धती त्या काळी निर्माणही झाली नसेल. पण वैदिक आर्य धावपळीची शिकार करीत, शस्त्रास्त्रे पेलीत, घोडदौड करीत, पोहत व नाचत, अशी वर्णने आढळतात. त्यांतूनच त्यांना भरपूर व्यायाम मिळून त्यांची शरीरशक्ती वाढत असावी. त्यांचे बहुतेक व्यवसाय खुल्या हवेत होत असल्याने त्यांना शुद्ध प्राणवायूचा लाभ भरपूर प्रमाणात होत असे. त्यामुळे त्यांची शरीरे काटक व बळकट होत असत.

रामायणातला हनुमान व महाभारतातला भीम हे जणू शरीर व शरीरबळ कसे असावे याची उत्कृष्ट प्रतीकेच आहेत. जन्मतःच सूर्यबिंब कवळण्यासाठी उड्डाण करणे, समुद्र उल्लंघून लंकेत जाणे, द्रोणगिरी उपटून उचलून आणणे, इ. मारुतीचे पराक्रम सर्वश्रुत आहेत. रामायणात मारुतीबद्दल लिहिले आहे ते असे –

पराक्रमोत्साहमतिप्रतापसौशील्यमाधुर्यनयानयैश्च ।
गाम्भीर्यचातुर्यसुवीर्यधैर्यैर्हनूमतः कोऽप्यधिकोऽस्ति लोके ।।
(वा. रा. उत्तर. ३६.४४)

अर्थ – पराक्रम, उत्साह, बुद्धिमत्ता, सुशीलता. माधुर्य, राजनीतिज्ञता, गांभीर्य, चातुर्य, शौर्य व धैर्य या दृष्टींनी हनुमंतापेक्षा कोण अधिक आहे !

मारुती ज्या वानरजातीत जन्मला, ती सर्व जातच शरीरबळाबद्दल प्रसिद्ध होती. किष्किंधेतला वाली हाही विलक्षण दणकट व बलाढ्य होता. सुग्रीवाने त्याची जी दिनचर्या रामाला सांगितली आहे, तिच्यावरून त्याच्या शक्तीचा बोध तर होतोच; पण तो कोणत्या तरी पद्धतीचा व्यायाम करीत असे, हे निर्विवाद अनुमानता येते. रामायणातला दुसरा महत्त्वाचा समाज म्हणजे राक्षसांचा. त्यांची अफाट शरीरे व अचाट सामर्थ्ये यांची वर्णने रामायणात आली आहेत. रावणाचे दोन हात तर एवढे प्रचंड होते, की मारुतीने त्यांना मंदर पर्वताची दोन शिखरे असे म्हटले आहे.

पाच पांडवांमध्ये भीम हा अत्यंत बलवान होता. त्याच्या शरीरबळाच्या गोष्टी महाभारतात अनेक ठिकाणी मोठ्या गौरवाने दिलेल्या आहेत. जळत्या लाक्षागृहातून कुंती आणि चौघे बंधू यांना बाहेर काढताना आणि तिथून दूर घेऊन जाताना भीमाचे जे बळ प्रत्ययाला आले, ते असे –

भीमसेनस्तु राजेन्द्र भीमवेगपराक्रमः ।
जगाम भ्रातॄनादाय सर्वान्मातरमेव च ।।
स्कन्धमारोप्य जननीं यमावङ्केन वीर्यवान् ।
पार्थौ गृहीत्वा पाणिभ्यां भ्रातरौ सुमहाबलः ।।
उरसा पादपान्भञ्जन् महीं पद्भ्यां विदारयन् ।
स जगामाशु तेजस्वी वातरंहा वृकोदरः ।।
(म. भा. आदि. १४८.२०–२२)

अर्थ – हे राजेंद्रा, भयंकर वेग व पराक्रम असलेल्या भीमसेनाने आईला व सर्व बंधूना घेऊन प्रयाण केले. त्याने आपल्या खांद्यावर कुंतीला घेतले. नकुल–सहदेवांना कमरेवर घेऊन युधिष्ठिर आणि अर्जुन यांना हातावर घेऊन तो भुयाराच्या बाहेर आला व वेगाने मार्ग आक्रमण करू लागला. त्याचे जमिनीवर वेगाने पडणारे पाऊल जणू काही पृथ्वी विदीर्ण करीत होते. मार्गातील वृक्षांना छातीचीच धडक देऊन तो भुईसपाट करीत होता. याप्रमाणे तेजस्वी भीमसेन वाऱ्याप्रमाणे वेग धारण करून वनातून जाऊ लागला.

महाभारतकाळात शरीर बलशाली करण्यासाठी मेहनत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करण्याचा प्रघात रूढ होता, असे दिसते. महाभारतात व हरिवंशात या संबंधीची वर्णने जागोजाग आली आहेत. त्या काळचे खेळांचे किंवा कसरतीचे प्रकार कोणते होते, ते मात्र निश्चित सांगता येत नाही. दंड, जोडी, इ. प्रकार असावे, असे वाटते. मल्लविद्येचा प्रसार मात्र सर्वत्र होता. मल्लांच्या कुस्त्या प्राणांतिक होत असत. गदायुद्ध व लाठीयुद्ध हे दोन प्रकारही रूढ होते. महाभारतकाळी भारतातील लोक एकंदरीत शरीराने उंच व मजबूत असत ही गोष्ट अनेक वर्णनांवरून दृष्टोत्पत्तीस येते.

त्या काळासंबंधी मेगॅस्थिनीस याने लिहिले आहे, की आशिया खंडातील लोकांत हिंदुस्थानचे लोक अधिक उंच व मजबूत आहेत, कारण हिंदुस्थानात खाण्यापिण्याची सुबत्ता आहे. पण केवळ सुबत्ता हे भारतीय लोकांच्या सुदृढतेचे कारण नसून, ब्रह्मचर्य व सुखी वैवाहिक जीवन यांना योग्य महत्त्व दिलेले असल्यामुळे सशक्त व तेजस्वी प्रजा निपजत असे.



बलोपासना – १ व २ बैठका, ३ जोडी

तत्कालीन तालिमबाज किंवा बलशाली व्यक्तींची वर्णने देताना जी विशेषणे वापरली जात, तीच कालिदासाने दिलीप राजाचे वर्णन करताना वापरली आहेत –

व्यूढोरस्को वृषस्कन्धः शालप्रांशुर्महाभुजः ।।

(रघु. १.१३)

अर्थ – (दिलीपाची) छाती रुंद, खांदे बैलाच्या खांद्याप्रमाणे व उंची शालवृक्षाप्रमाणे असून, त्याचे बाहू दीर्घ होते.

पौराणिक काळी ब्रह्मचर्याश्रमात गुरुगृही विद्यार्जन करणारे विद्यार्थी शरीरबल वाढविण्यासाठी निरनिराळी आसने व प्राणायाम करीत आणि मनोबल वाढविण्यासाठी त्रिकाल संध्या करीत.

अग्नीपुराणाच्या २८१ व्या अध्यायात व्यायाम व तत्संबंधी विधिनिषेध सांगितले आहेत, ते असे –

पोटात अन्नाचे पचन झाले नसेल तोवर कोणताही व्यायाम करू नये. जेवण होताच किंवा पोटभर पाणी प्याल्यावरही व्यायाम करू नये. दिवस उगवल्यानंतर तीन तासपर्यंत व्यायाम करावा. मात्र व्यायाम झाल्यावर लगेच गार पाण्याने स्नान करू नये. कोमट पाण्याने स्नान केल्याने थकवा जातो. व्यायामाने शीत नष्ट होते. शरीरातील वातनाशासाठी मर्दनाची जरुरी आहे. पित्तनाशासाठी स्नान फार चांगले. जे व्यायाम करतात, ते चपळ व काटक होतात. त्यांना सहसा शीतोष्णाची बाधा होत नाही व थकवाही येत नाही.

विजयनगर येथील हिंदू राज्याचा संवर्धक कृष्णदेवराय हा मोठा बलोपासक होता, असे त्याचे वर्णन आहे. तो मोठ्या पहाटेस उठून जोडी व दांडपट्टा यांचे हात करी. त्यायोगे तो आपले स्नायू व पठ्ठे भरदार व प्रेक्षणीय ठेवीत असे. त्याने आपले सर्व शरीर तयार व चपळ ठेवले होते.

शिवरायांच्या काळात बलवृद्धीकडे विशेष लक्ष दिले जात असे. बलोपासनेसाठी सूर्यनमस्काराची प्रथा समर्थ रामदासांनी सुरू केली. तत्कालीन इस्लामी संकटावर मात करायची तर शरीरबल वाढले पाहिजे, हे त्यांनी ठामपणे मनाशी धरले होते. ते अध्यात्मसार या ग्रंथात म्हणतात –

शक्तीनें पावती सुखें । शक्ती नसतां विटंबना ।
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसें ।।
कोण पुसे आशक्ताला । रोगीसे बराही दिसें ।
कळा नाहीं कांती नाहीं । युक्ती बुद्धी बुरावली ।।
साजिरी शक्ती तो काया । काया मायाचि वाढवी ।
शक्ती तों सर्वही सुखें । शक्ती आनंद भोगवी ।।

(अध्यात्मसार २६–२८)

समर्थ रामदासांनी महाराष्ट्रात मारुतीची उपासना रूढ करून गावोगावी तालमी स्थापल्या. एकंदरीत समर्थांनी महाराष्ट्रात मल्लविद्या पसरवून त्याला बलोपासनेची गोडी लावली, असे स्थूलपणे म्हणायला हरकत नाही. शिवाजीमहाराजांच्या शिक्षणाविषयी जे तुरळक उल्लेख सापडतात, त्यांवरून शस्त्र-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विद्या, अश्वारोहण, इ. गोष्टींत महाराज प्रवीण होते, एवढा भावार्थ निघतो. पेशवाईतल्या कागदपत्रांत जे फुटकळ उल्लेख सापडतात, त्यावरून लाठी, बोथाटी, दंड, बैठका, इ. अभ्यास त्या वेळचे बहुतेक तरुण करीत, असे दिसून येते. नानासाहेब पेशवे यांनी आपले बंधू रघुनाथराव हे लहान असताना त्यांना लिहिलेले एक पत्र श्री. राजवाडे यांनी प्रसिद्ध केले आहे. त्यात नानासाहेब लिहितात — नेमेकरून कंमर-दोनशे दंड निरंतर काढीत जाणे. केवळ घोडी फरावयाचे छंदास न लागणे.

सूर्यनमस्कार, प्रदक्षिणा, योग वगैरे प्रकारांनीही व्यायामाचा प्रसार समाजात बराच होत असे. भाऊसाहेब पेशव्यांची तालमीबद्दल विशेष ख्याती होती. 'पानिपतच्या रणांगणावरही सूर्योदयापूर्वी हजार नमस्कार घालण्याचा त्यांचा परिपाठ चुकला नाही,' असे श्री. चिंतामणराव वैद्य लिहितात. विश्वासराव व थोरले माधवराव यांना तर तालमीचा अभ्यास लहानपणापासूनच होता. सवाई माधवरावांच्या इतर सर्व शिक्षणाबरोबरच त्यांच्या शारीरिक शिक्षणाचीही काळजी नाना फडणीसांनी व्यवस्थितपणे घेतली होती.

थॉमस ब्राऊटन हा इ. स. १८०९ साली दौलतराव शिंद्यांच्या लष्कराबरोबर मोठ्या हुद्द्याने फिरत होता. त्याने त्याच सालात जे एक पत्र लिहिले आहे, ते पेशवेकालीन व्यायामाच्या पद्धतीवर व शिस्तीवर प्रकाश पाडणारे असल्यामुळे ते समग्र पत्र पुढे दिले आहे —

गेले काही दिवस पुष्कळ पाऊस पडून गेला. आता आमच्या शिपायांनी या हंगामात घ्यायच्या व्यायामांना जोराने सुरुवात केली आहे. सर्व हिंदुस्थानातील लोकांत तालमीचे किंवा कसरतीचे अगदी वेडच आहे असे म्हटले तरी चालेल. आखाड्यात त्यांचे काही नियम आणि समारंभ ठरलेले असतात आणि ते अत्यंत कसोशीने पाळण्यात येतात.



सूर्यनमस्कारांतील विविध अवस्था

खडक नसलेली अशी मऊ मातीची ऐसपैस जागा, शक्य तर झाडाच्या सावलीखाली निवडून, ती खणून त्यातला खडानखडा वेचून काढून ती भुसभुशीत करण्यात येते. अशा जागेला ते आखाडा म्हणतात. तो ते फार पवित्र मानतात [illegible] त्याच्या जवळ जोडे आणू देत नाहीत. त्याच्या एका टोकाला एक ओटा तयार केलेला असतो. तालमीत येणारा प्रत्येकाने [illegible] ओटाला मुजरा करून मूठभर माती त्याला वाहावयाची असते. तालमीत येणाऱ्या सगळ्या तालीमबाजांत जो विशेष सरस आणि लढाऊ पठ्ठा असेल, त्याला त्या मोसमापुरता आखाड्याचा खलिफ नेमण्यात येते. खलिफ म्हणजे व्यवस्थापक आणि शिक्षक. त्याने आखाड्याची झाडलोट करविणे, कुस्ती वगैरे खेळ शिकविणे वगैरे कामे करायची. आखाड्यात प्रत्येकजणाने लंगोट कसलेला असतो आणि एक विशि[illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जातीची पांढरी माती अंगाला फासलेली असते. पहिला व्यायामाचा प्रकार म्हणजे दंड; दुसरा व्यायाम कुस्ती. हिंदुस्थानातले लोक या कलेत अत्यंत प्रवीण आहेत. कुस्तीत अर्थात निव्वळ शक्तीपेक्षा कौशल्यावरच अधिक भर असतो. तथापि किती केले तरी ती कुस्तीच. यामुळे हाड निघणे किंवा मोडणे असे प्रकार हमेशा घडतात! दंड व कुस्तीनंतर दोन व्यायाम म्हणजे मुद्‌गल आणि लेजीम. मुद्‌गल २–२॥ फूट लांब व सुमारे २० पौंड वजनाचे असतात. लेझीम म्हणजे एका भक्कम लाकडी दांड्याला बळकट लोखंडी साखळी लावून त्याचे धनुष्य बनविलेले असते. त्या साखळीला वजन वाढविण्याकरिता पत्र्या लावलेल्या असतात. उजव्या हाताने एकदा धनुष्याची दोरी शक्य तितकी ओढायची, नंतर दुसऱ्या हाताने ओढायची असा तो खेळ आहे. हे सर्व व्यायामप्रकार उत्कृष्ट आहेत. त्याने छाती रुंद व भरदार होते. शरीराला घाट येतो. स्नायू बळकट होतात. मोसमाच्या सुरुवातीस आखाड्यात येऊ लागलेला नवीन उमेदवार पाहावा आणि मोसमाच्या अखेरीस तो पाहावा म्हणजे विलक्षण फरक दिसल्याशिवाय राहत नाही. मेहनत झाल्यावर सर्व पठ्ठे एखाद्या पहिलवानाभोवती मंडळ करून त्याने सांगितलेले कवन म्हणतात. नंतर ते प्रथम खलिफाला रामराम किंवा जयगुरू करून, मग आपापसांत करतात व एका रांगेत खलिफाबरोबर सर्वजण थोडे दंड काढतात. नंतर एका मोठ्या थाळीत प्रसाद आणून वाटण्यात येतो. असो. अशा आखाड्यात पठ्ठा तयार झाला म्हणजे त्याला पहिलवान ही संज्ञा प्राप्त होते.

त्यानंतरच्या काळात महाराष्ट्रामध्ये औंधचे अधिपती श्रीमंत भवानराव पंत प्रतिनिधी यांनी व मसूरच्या ब्रह्मचर्याश्रमातील प्रचारक ब्रह्मचाऱ्यांनी सूर्यनमस्काराच्या द्वारे महाराष्ट्रात व्यायामाचा बराच प्रचार केला. कोल्हापूरचे छत्रपती शाहूमहाराज यांनीही व्यायामाविषयी लोकांत आवड उत्पन्न केली. त्यांच्या पदरी नामवंत मल्ल होते.

सांप्रत बलोपासना ही केवळ जोर, बैठका, नमस्कार, जोडी एवढ्यापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. आता त्यासाठी विविध वैज्ञानिक पद्धती वापरल्या जातात. शाळा-शाळांतून मुलांमुलींना सांघिक कवायती शिकवल्या जातात व त्यांच्याकडून नेमाने त्या करून घेतल्या जातात. मुला-मुलींची शारीरिक ताकद वाढावी आणि त्यांच्यांत जोम, उत्साह व काटकपणा यावा हाच त्यातलाच उद्देश असतो.

सांप्रतच्या लढाया सैनिकांच्या शरीरबळावर लढल्या जात नसून, त्या वैज्ञानिक शस्त्रास्त्रांनी लढल्या जातात, पण तरीही ही वैज्ञानिक शस्त्रास्त्रे वापरणारे सैनिक सुदृढ, चपळ व काटक असले पाहिजेत, याची जाणीव आजच्या युद्धशास्त्राला आहे. म्हणूनच आजच्या लष्करी तरुणांनाही विविध प्रकारचे शारीरिक व्यायाम व कवायतीचे विविध प्रकार सक्तीने करावे लागतात. सैनिकांची नित्याची कवायत हा बलोपासनेचाच एक भाग असतो. [श्री. दा. सातवळेकर; ना. रा. पाटणकर; चिं. वि. वैद्य; गो. स. सरदेसाई; गं. के. देशपांडे; श्री. द. वा. पोतदार; श्री. य. नं. केळकर– व्या. ज्ञा. को.]

बल्ल एक प्राचीन वंश. बहुतेक सर्व प्राचीन व अर्वाचीन वंशावळीकारांनी याला राजवंश म्हणूनच उल्लेखिले आहे. भाट लोक त्यांना मुलतानचे राव म्हणतात. त्यावरून सिंधू नदीच्या खोऱ्यात त्यांचे मूलस्थान असल्याचे कळते. ते स्वतःला सूर्यवंशी समजतात. पुढे सिंधूच्या खोऱ्यातून बाहेर पडून सौराष्ट्रात ढंक येथे त्यांनी आपली वसाहत स्थापन केली. राज्य मिळाल्यावर मोंगीपट्टम येथे त्यांनी आपली राजधानी केली. त्यांनी बल्लराम ही उपाधी धारण केली आणि तिथून पुढे त्यांनी मोंगीपट्टमला बल्लकाक्षेत्र असे नाव दिले. पुढे त्यांनी मेवाडच्या गुहिलोत वंशाशी आपले नाते दाखविण्यास सुरुवात केली. कदाचित गुहिलोतांची ती शाखा असण्याचीही शक्यता आहे. बल्ल हे जसे सूर्योपासक होते, तसे गुहिलोतही महादेवाची उपासना सुरू करण्यापूर्वी सूर्योपासकच होते.

इ. स. च्या तेराव्या शतकात बल्ल हे मोठे बलशाली होते. एकदा त्यांनी मेवाडवरही आक्रमण केले होते. मेवाडचा राणा हमीर आणि बल्लांचा राजा चोटीला यांच्यामध्ये लढाई होऊन, तीत चोटीला ठार झाला होता. सांप्रतही सौराष्ट्रात बल्लांची बरीच वस्ती आहे. [अं. अं. रा.]

बल्लाळसेन (इ. स. चे १२ वे शतक) एक ज्योतिषशास्त्रविद. बंगालचा राजा विजयसेन याचा हा मुलगा होय. इ. स. ११५८ मध्ये हा गादीवर बसला. अनिरुद्ध भट्ट हे त्याच्या गुरूचे नाव होते. याने अद्‌भुतसागर, दानसागर, प्रतिष्ठासागर, आचारसागर व व्रतसागर असे पाच ग्रंथ रचले आहेत. दानसागर हा धर्मशास्त्रीय ग्रंथ आहे. स्मृतिग्रंथांतून आणि पुराणांमधून दानासंबंधी आलेली सर्व माहिती या ग्रंथात एकत्रित केलेली आहे. अद्‌भुतसागर हा त्याचा ज्योतिषशास्त्रासंबंधीचा ग्रंथ आहे. यातले विषय वराहसंहितेप्रमाणे आहेत. बुध-शुक्रांच्या आच्छादनावाचून सूर्यावर छिद्र दिसले, तर परचक्र येते, असे याने म्हटले आहे. या ग्रंथात अनेक ग्रंथकार आणि ग्रंथांची नावे आली आहेत. बल्लाळसेन हा एक पराक्रमी राजा आणि विद्वान पुरुष होता. तो स्वतः ग्रहताऱ्यांचे वेध घेत असे. [हि. क. इं. पी. ५; हि. घ.; भा. ज्यो. शा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बसंतगढ अरवली पर्वतश्रेणी व अबूची पर्वतश्रेणी यांच्या मधल्या प्रदेशाला सिरोही असे म्हणतात. या भागात बसंतगढ हा किल्ला आहे. हा एका लांब टेकडीवर उभारलेला आहे. याच्यावर ब्रह्मा, विष्णू, महेश व सूर्य यांची प्राचीन मंदिरे आहेत. गडाच्या एका टोकाला शारदापीठ असून, दुसऱ्या टोकाला शक्तिपीठ आहे. ज्या काळी हा किल्ला संपन्नावस्थेत होता, त्या काळी त्या दोन्ही देवींची पूजा-अर्चा इथे थाटामाटाने होत असे. काश्मीरमधील शारदापीठाला बृहत मानले असून, इथल्या शारदापीठाला लघू म्हटले आहे. या देवीची उपासना त्या त्या काळी अनेक वीरांनी व विद्वानांनी केलेली आहे. इथल्या शक्तिपीठातल्या देवतेचे नाव क्षेमंकरी असे असून, सांप्रत तिला खीमेलमाता असे म्हणतात.

बसंतगढाच्या परिसरात अनेक वास्तूंचे व मूर्तींचे भग्नावशेष आढळतात. त्यावरून मध्ययुगात कोणत्यातरी काळी हा प्रदेश कला व संस्कृती यांचे एक संपन्न केंद्र असावा, असे वाटते.

बसवेश्वर (इ. स.चे १२वे शतक) एक पंथसंस्थापक. याचा जन्म विजापूर जिल्ह्यातल्या बागेवाडी येथे झाला. मादरस हे त्याच्या पित्याचे व मादलांबिका हे त्याच्या मातेचे नाव होते. मादरस हा शैव ब्राह्मण होता. काही विद्वान व मठपती यांच्या मते बसवेश्वर हा मादरसाचा औरस पुत्र नसून पोषित पुत्र होता.

वयाच्या आठव्या वर्षी आईबापांनी त्याचे उपनयन करण्याचा घाट घातला; पण बसवेश्वराने त्या गोष्टीला विरोध केला. लहानपणापासूनच त्याची वृत्ती बुद्धिवादी असल्यामुळे त्याला वाटले, की उपनयनसंस्कार म्हणजे भांडे केवळ बाहेरून स्वच्छ करण्यासारखा एक निष्फळ व निरर्थक प्रयत्न आहे. त्याच्या आईवडिलांना त्याचा हा धर्मविद्रोह आवडला नाही. पण त्याही गोष्टीची पर्वा न करता बसवेश्वराने गृहत्याग केला आणि तो विरक्त बनून कृष्णाकाठावरच्या कूडलसंगम या शैव क्षेत्रात प्राप्त झाला. तिथे जातवेद मुनींच्याकडून त्याने लिंगदीक्षा घेतली व आपल्या अंगावर शिवलिंग धारण केले. पुढे काही वर्षे जातवेद मुनींच्याकडेच राहून त्याने वेद-वेदांगांचे, षड्दर्शनांचे, इतिहास-पुराणांचे व धर्मशास्त्राचे अध्ययन केले. त्या व्यतिरिक्त त्याने जैन व बौद्ध दर्शनेही समजावून घेतली. त्याने संस्कृत, तमिळ, पाली, इ. भाषांतले प्रमुख ग्रंथही वाचले. बसवेश्वर अशा रीतीने विद्यासंपन्न झाला.

विद्याध्ययनाबरोबरच तो संगमेश्वराचीही भक्ती करी. तेच त्याने आपले उपास्य दैवत मानले होते. दिवसातला त्याचा बराचसा वेळ पूजा-प्रार्थनेत जात असे. हळूहळू त्याची ईश्वरभक्ती भावोन्मत्त होऊ लागली. संगमेश्वराची भजने गाता गाता तो भावाविष्ट होऊन नाचू लागला. जातवेद मुनी त्याच्या ज्ञानाने आणि ईश्वरभक्तीने प्रसन्न झाला. पण असा हा श्रेष्ठ पुरुष संगमक्षेत्री क्षेत्रसंन्यासी होऊन राहिल्यास जनांना त्याचा उपयोग होणार नाही, हे जाणून त्याने त्याला कल्याण नगरीत जाण्याचा आदेश दिला. तिथे कलचुरी वंशातला बिज्जल नावाचा जैन राजा राज्य करीत होता. बसवेश्वर त्याच्या राज्यात मामाच्या घरी जाऊन राहिला. थोड्याच काळात बिज्जलाला बसवेश्वराची योग्यता कळून आली. त्यासाठी निमित्त घडले ते असे—

बसवेश्वर—प्रधान मंत्री

बिज्जलाला एके दिवशी एक ताम्रपट सापडला. पण त्यावरची लिपी कोणालाच वाचता येईना. त्या वेळी बसवेश्वर पुढे आला आणि त्याने त्या ताम्रपटाचे वाचन केले. त्यामुळे बिज्जल खूष झाला आणि त्याने बसवेश्वराला आपला कोषाध्यक्ष केले. त्या वेळी बसवेश्वराचा मामा बलदेव हा बिज्जलाचा प्रधानमंत्री होता. त्याच्यावरही बसवेश्वराच्या बुद्धिमत्तेचा प्रभाव पडला. त्याने गंगांबिका नावाची आपली कन्या देऊन बसवेश्वराला आपला जावई करून घेतले. सिद्दण्ण नावाचा बसवेश्वराचा दुसरा मामा होता. त्यानेही आपली नीलांबिका नावाची कन्या बसवेश्वराला दिली.

थोड्या दिवसांनी बलदेवाचा मृत्यू झाला. मग त्याची पंतप्रधानाची वस्त्रे बिज्जलाने बसवेश्वराला दिली. त्याने बिज्जलाचे राज्य शहाणपणाने सांभाळले व त्याची प्रगतीही केली. प्रजेविषयी त्याला अपार प्रेम होते, म्हणून त्याने प्रजेवरचा डोईजड करभार हलका केला आणि शेती व व्यापार यांच्या उन्नतीला प्रोत्साहन दिले.

राजकारणाप्रमाणेच लोकांच्या धार्मिक व नैतिक सुधारणेच्या कामीही त्याने आस्था दाखवली. त्याच्या पूर्वी पंचाचार्यांनी स्थापिलेला शैव संप्रदाय दक्षिणेत प्रचलित होता, पण त्या संप्रदायात अनेक विकृती निर्माण झाल्या होत्या. त्याची घडी विसकटलेली होती. बसवेश्वराने वीरशैव या नावाने तो संप्रदाय पुनरुज्जीवित व संघटित करण्याचे ठरविले. थोड्याच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवसांत त्याने संप्रदायाचे कार्य नावारूपाला आणले. त्याच्या या कार्यात बिज्जलानेही त्याला पुष्कळ साहाय्य केले.

हळूहळू बसवेश्वराचे नाव कर्नाटकात व आंध्र प्रदेशात सर्वतोमुखी झाले. अनेक ठिकाणांहून धर्मजिज्ञासू लोक कल्याणला येऊन बसवेश्वराशी धर्मचर्चा करू लागले. भक्तमंडळीही जमू लागली. बसवेश्वर त्या सर्वांना संप्रदायाची दीक्षा देऊ लागला. त्याच्याकडून दीक्षा घेणाऱ्यांत काश्मीरचा राजा महोदेव, महाराष्ट्राचा गुंडैय्य, केरळचा भद्रनायक चामराय, तमिळनाडचा मादरचन्नय, तेलंगणातले मारय्य, जोम्मय्य व सकलेश मादरस, ओडिसाचा सुज्ञानीदेव, इ. मंडळी प्रमुख होती.

नंतर त्याने शिवानुभवमंडप नावाचे एक विद्यापीठ स्थापन केले. अल्लमप्रभू या विद्वान सत्पुरुषाला त्याने त्याचे अध्यक्षपद दिले. अनेक वीरशैव त्या विद्यापीठात वीरशैव शास्त्राचे म्हणजेच शक्तिविशिष्ट शिवाद्वैत सिद्धान्ताचे पद्धतशीर अध्ययन करू लागले. वीरशैव धर्मानुसार शक्तिविशिष्ट शिव याचे जीवाशी अद्वैत मानले आहे. बसवेश्वराने त्या सिद्धान्ताला भक्तिमार्गाची जोड दिली. बसवेश्वरप्रणीत भक्तिमार्ग हा षट्स्थल सिद्धान्त म्हणून प्रसिद्ध आहे. साधकाच्या साधनावस्थेचे त्यात सहा भाग केले आहेत, ते असे – (१) भक्तस्थल (२) महेश्वरस्थल (३) प्रसादीस्थल (४) प्राणलिंगीस्थल (५) शरणस्थल व (६) ऐक्यस्थल.

या षट्स्थल सिद्धान्तात बसवेश्वराने कर्म, भक्ती व ज्ञान यांचा समन्वय केला आहे.

बसवेश्वर हा कट्टर एकेश्वरवादी होता. एका शिवावाचून अन्य कोणालाही तो मानीत नसे. आपल्या उपास्य परम शिवाविषयी त्याने अनुयायांना आदेश दिला तो असा –

नंबिन हेंडतिगे गंडनोब्बा काणिरो
नंबवल्ल भलंगे देवनोब्बा काणिरो
बेड बेड अन्य देवदसंग होल्ल
बेड बेड अन्य दैवदेंबुडु हादर काणिरो
कूडल संगमदेव कंडरे कोटव काणिरो

अर्थ – पतिव्रतेला जसा एकमेव पती, तसा खऱ्या भक्ताला एकच परमात्मा असतो. अन्य देवदेवतांचे स्मरणही पाप आहे. तो व्यभिचार आहे. देवाला ते समजले, तर तो त्याचे प्रायश्चित्त दिल्यावाचून राहणार नाही.

बसवेश्वराचा संप्रदाय अस्पृश्यांसह सर्वांना खुला होता. अस्पृश्यतेला समाजाचा कलंक मानणाऱ्यांपैकी तो होता. अस्पृश्य कोण ते तो निराळ्याच विचारसरणीने सांगतो –

आई–बापांना शिवीगाळ करतो, तो खरा अस्पृश्य. परोपकारात विघ्न आणतो, तो खरा चांडाळ. धनासाठी दुसऱ्याचे प्राण घेतो, तो मांग. परस्त्रीची कामना धरतो, तो महार, धेड! देवा, असले हे अस्पृश्य जर गावात आणि मावभर राहत असलेले दिसतात, तर मग महार–ढोरांना, गावाबाहेर का ठेवायचे ? ते काय न्यायाला धरून आहे ?

पण समाजातील अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे, या त्याच्या निर्धारातूनच पुढील महान अनर्थ घडून आला आणि त्या कामी बसवेश्वराला हौतात्म्य पत्करावे लागले.

मधुवय्य नावाचा एक ब्राह्मण व हरळय्य नावाचा एक अतिशूद्र या दोघांनी बसवेश्वराकडून वीरशैव दीक्षा घेतली होती. त्यांतल्या मधुवय्य ब्राह्मणाने आपली मुलगी हरळय्याच्या मुलाला द्यायचे ठरवले व बसवेश्वराकडे तशी अनुज्ञा मागितली. बसवेश्वराने ती दिली. हा प्रतिलोम विवाह बसवेश्वराच्या साक्षीने घडून आला. त्या काळात ही घटना म्हणजे महान क्रांती होती. त्यामुळे सर्वत्र ‘अधर्म, अधर्म’ अशी आरडाओरड सुरू झाली. बसवेश्वराच्या क्रांतिकारक मतांमुळे एका बाजूने सनातनी धर्माचार्य आणि दुसऱ्या बाजूने जैन हे अंतरात जळून होते. त्यांना बसवेश्वरावर आघात करण्यास हा मोका आयता मिळाला. त्यांनी बिज्जलाकडे तक्रार गुदरली आणि बसवेश्वराविषयी बिज्जलाचे मन सर्व प्रकारांनी कलुषित केले. बिज्जलही मनातून खवळला. तशातच बसवेश्वराचे दोन जंगम अनुयायी आपली निंदानालस्ती करीत आहेत, असे बिज्जलाच्या कानी आले. त्यामुळे बिज्जलाचा विवेक सुटला. त्याने त्या दोघा जंगमांना क्रूरपणे वधदंड दिला. त्यातून पुढे आगडोंब उसळला. जैन आणि वीरशैव यांच्यांत उघड उघड यादवी युद्ध सुरू झाले. त्या संघर्षात बिज्जलाची तर आहुती पडलीच; पण बसवेश्वरालाही देहत्याग करावा लागला.

जैन आणि वीरशैव यांच्या वाङ्मयात बसवेश्वराच्या मृत्यूविषयी भिन्न भिन्न पर्याय आहेत. जैन सांगतात, ते असे –

बसवेश्वराने एका जंगमाला जैनाचे सोंग देऊन त्याच्या हातून बिज्जलाला एक विषारी फळ देवविले. बिज्जलाने ते चाखले; पण तो मेला नाही. त्याला केवळ मूर्च्छाच आली. दोन जंगमांना वधदंड दिल्यामुळे बसवेश्वर आपल्या प्राणांवर उठला आहे, असे त्याला वाटले आणि त्याने क्रोधाविष्ट होऊन बसवेश्वराला पकडण्यासाठी आपल्या मुलाला पाठविले. बसवेश्वराला हे समजताच तो राज्यातून पळाला. राजपुत्राने त्याचा पाठलाग सुरू केला. सरतेशेवटी तो सर्वच बाजूंनी वेढला गेला. मग तो हताश झाला आणि संगमेश्वरी त्याने विहिरीत उडी टाकून जीव दिला.

पण वीरशैवांना ही जैनांची कथा कपोलकल्पित वाटते. वीरशैव ही दुर्घटना सांगतात, ती अशी –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बिज्जलराजाने दोघा वीरशैवांचा अमानुष वध केल्यामुळे वीरशैव मंडळींत प्रक्षोभ उत्पन्न झाला. ते राजाच्या सूडाला प्रवृत्त झाले. जगदेव नावाचा एक माथेफिरू वीरशैव होता. तो शस्त्र हाती घेऊन आपल्या दोन साथीदारांसह राजमहालात घुसला आणि त्याने बिज्जलाला कंठस्नान घातले. मग रस्त्यावर येऊन त्याने आपल्या त्या शतकृत्याची घोषणा केली. त्यामुळे बिज्जलाचे सैन्य खवळलें. वीरशैवही मारामारीस उद्युक्त झाले. उभयपक्षी तुंबळ युद्ध माजले. कल्याणनगरीत प्रेतांचे ढीग पडले. त्या यादवी युद्धात बिज्जलाचा राजवंशच नष्ट झाला. पण बसवाला या सर्वच दुर्घटनांचा इतका उबग आला, की तो कल्याण नगरीचा त्याग करून संगमेश्वराच्या चरणांपाशी गेला आणि त्याने शिवाच्या आत्मज्योतीत स्वतःची प्राणज्योत विलीन केली.

बसवेश्वर केवळ शिवभक्तच नव्हता; तर नवसमाजाचा नेता आणि समाजातील दुष्ट रूढींचा कट्टा शत्रू होता. त्याने स्त्रियांना धर्मद्वार उघडले आणि त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार दिले. त्याने उभारलेल्या शिवानुभवमंडपात कित्येक स्त्रिया दाखल झाल्या आणि वीरशैव तत्त्वज्ञानाचा अभ्यास करू लागल्या. अंत्यजांनाही त्याने धर्मज्ञानापासून वंचित ठेवले नाही. पण तत्वज्ञानापेक्षाही त्याचा आचरणावर विशेष भर होता. त्याचा धर्म हा वैयक्तिक नसून सामाजिक राहिला. धर्म हा समाजाच्या जीवनात रुजला पाहिजे आणि दैनंदिन आचरणातून तो प्रकाशित झाला पाहिजे, असे तो मानी.

'संसार दुःखमय आहे; अतएव त्याचा त्याग करा,' असे त्याने कधीही सांगितले नाही. त्याने आग्रहाने प्रतिपादले की, संसार हाच स्वर्ग आहे. गृहस्थाश्रम करणे हे पाप नाही. गृहस्थ असूनही जो सत्य बोलतो तो देवलोकी वास्तव्य करतो. मानवशरीर हेच शिवाचे कैलासस्थान होय. त्यासाठीच ते पवित्र राखले पाहिजे.

बसवेश्वराने राजकारणाला अध्यात्माची व नीतीची बैठक देण्याचा प्रयत्न केला. अर्थशास्त्र व समाजकारण या विषयांचाही त्याने बराच खोल विचार केला होता. या विचारांतूनच त्याचे कायक तत्त्वज्ञान उगम पावले. कायकात शरीरश्रमाला प्रतिष्ठा दिलेली आहे. श्रेष्ठवर्णियांनी जी कामे हलकी सलकी म्हणून निंद्य ठरवली होती, ती कोणत्याही प्रकारे हीन दर्जाची नसून, ती उत्कृष्टपणे करणे हीच जनसेवा व हीच ईशसेवा होय, असे त्याने प्रतिपादिले. दारिद्र्य हे पूर्वकर्मानुसार आलेले नसून, सामाजिक विघटनेचे विकृत स्वरूप आहे, असे त्याचे मत होते. म्हणून त्याने समाजाचीच पुनर्घटना करण्याचा प्रयत्न केला. निरनिराळ्या व्यवसायांतले लोक एकत्र आणून त्याने त्यांच्यांत बंधुभाव उत्पन्न केला आणि त्यांना, पुढील तीन नियम घालून दिले —

(१) प्रत्येकाने कष्ट करून निढळाच्या घामाने अर्थोत्पादन करावे व आपली उपजीविका चालवावी.

(२) प्रत्येकाने आपल्या आवडीनुसार आपला व्यवसाय निवडून त्यात प्रगती करावी; व

(३) प्रत्येकाने आपल्या गरजेनुसार जेवढे आवश्यक तेवढेच द्रव्य मिळवावे. अधिकाची हाव धरू नये व भिक्षापात्रही अवलंबू नये.

बसवेश्वराचा कायक सिद्धान्त तो हाच होय. त्याने बुद्धी, मन आणि हात यांच्यांत सामंजस्य आणले व विचाराला कृतीच्या अधिष्ठानावर बसवले.

आपले विचार सांगण्यासाठी तिथल्या लोकभाषेचा म्हणजेच कन्नडचा त्याने अंगीकार केला. पद्याला जवळची अशी छोटी छोटी गद्यवाक्ये आणि त्याच्या चार–पाच पंक्ती अशा स्वरूपात त्याने आपला उपदेश ग्रथित केला. त्याच्या या वचनांची संख्या ९७० आहे. ती थोडयाच अवधीत कर्नाटकातील सान-थोरांच्या मनी-मुखी रिगली. बसवेश्वराच्या वचनांतून त्याची एकनिष्ठ भक्ती, परम शिवावरील अढळ श्रद्धा, आत्मसमर्पणाची वृत्ती विनम्रता, निःस्पृहता व मानवमात्रावरील प्रेम या गोष्टी स्वच्छपणे दिसून येतात. त्यावरून असेही कळते, की बसवेश्वर हा विशिष्ट प्रदेशाकरिता नव्हता; तर तो मानवमात्रासाठी होता. त्याच्या अनुयायांनीही पुढे त्याच्याच शैलीत वचननिर्मिती केली. कर्नाटकाच्या सांस्कृतिक इतिहासात हे साहित्य फार मोलाचे ठरले आहे. वीरशैव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची उभारणी या वचनसाहित्यातूनच झाली आहे. बसवेश्वराच्या धार्मिक व तात्त्विक उपदेशाचे सार पुढीलप्रमाणे सांगता येईल —

बसवेश्वर

वर्णाश्रम हे पाखंड आहे. ते समाजातल्या भेदभावनेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खतपाणी घालते. लिंग, वर्ण, जाती, सारे काही तुच्छ ! व्यक्ती तेवढी समान. मूर्तिपूजेचे अवडंबर मूर्तीसहित फेकून द्या. फक्त हृदयावर शिवलिंग धारण केलेत की बस्स ! शिवभक्तीचा एक प्रकार या भावनेने शरीरश्रम करा. कष्टांना हलके लेखू नका. सोहेर-सुतक मानू नका. प्राणिहिंसा वर्ज्य ! 'एको देवः' माना आणि तो म्हणजे परम शिव.

वीरशैव लोक बसवेश्वराला शिवाचा अवतार मानतात. त्यांचा अंत असा एकाएकी आणि अनपेक्षित झाला असला, तरी त्याचा संप्रदाय मात्र कोलमडला नाही. अल्लमप्रभू व बसवेश्वराचा भाचा चेन्नबसव या दोघांनी त्याच्या संप्रदायाची धुरा समर्थपणे वाहिली. बसवेश्वराच्या चरित्रावर बरेच ग्रंथ निर्माण झाले आहेत. त्यांचे दोन वर्ग पडतात. त्यांपैकी एका वर्गात बसवपुराण येते. हे मुळात पालकुर्ती सोमनाथ याने तेलुगू भाषेत लिहिले व भीमकवि याने त्याचे कन्नडमध्ये भाषांतर केले. या पुराणातूनच पुढे प्राचीन-अर्वाचीन शिवभक्तांच्या कथा उत्पन्न झाल्या. पंधराव्या शतकातले बसवचरित्र हा दुसरा वर्ग होय. हे बसवचरित्र लक्कण्णदंडेस याने निर्माण केले. त्याचा शिष्य सिंगीराज यानेही बसवचरित्राचा प्रपंच करून त्याचे ८८ चमत्कारही निवेदन केले. पाहा – वीरशैव संप्रदाय. [श्री. काशिनाथस्वामी सारंगमल – साप्ता. हिंदुस्थान, २६ मे १९६३; कर्नाटक; इंद्रायणी; श्री. के. एस्. गुंडप्पा – द. भारत, सप्टें. –ऑक्टो. १९६१; हिं. क. भ. तु. अ.; रि. इं.; वि. स्मा. ग्रं.]

बसुली बंगालमधील एक ग्रामदेवता. हिला बिसलक्ष्मी व बसली असेही म्हणतात. चंडी म्हणूनही हिची पूजा होते. ही देवी अश्वशिर किंवा अश्वमूर्ती आहे. हिच्या काष्ठ-प्रतिमा करतात. बंगाली कवी चंडीदास याची ही स्फूर्तिदेवता होती. हिच्या पूजेसाठी त्याने कृष्णकाव्य रचले होते, असे सांगतात. ओडिसातील केवट आणि इतर जातीही घोर(ड)-मुह म्हणून या देवीची पूजा करतात.

बसू जगदीशचंद्र (१८५८ ते १९३७ इ. स.) जगद्विख्यात शास्त्रज्ञ व संशोधक. पूर्व बंगालमधील विक्रमपूर जिल्ह्यात, राणीखेल या गावी एका सधन कुळात यांचा जन्म झाला. यांचे वडील भगवानचंद्र हे फरीदपूर येथे सरकारी नोकर होते. जगदीशचंद्रांचे प्राथमिक शिक्षण गावातील पाठशाळेत शेतकरी, कोळी यांच्या मुलांबरोबरच झाले. घरात नीतीचे व रामायण-महाभारतातील विचारांचे संस्कार झाल्यामुळे त्यांच्या मनात स्वदेश, स्वधर्म आणि स्वसंस्कृती यांविषयी अभिमान जोपासला गेला. कलकत्ता येथील सेंट झेवियर कॉलेजातून बी. ए. ची पदवी घेतल्यानंतर जगदीशचंद्र उच्च शिक्षणासाठी परदेशी गेले. त्यांना वैद्यकशास्त्राचे शिक्षण घ्यायचे होते, पण प्रकृती बिघडल्यामुळे ते शक्य झाले नाही. मग त्यांनी केंब्रिजच्या ख्राइस्ट चर्च कॉलेजात विज्ञान, रसायन व वनस्पतिशास्त्र या विषयांचा अभ्यास करून इ. स. १८८३ मध्ये पदवी मिळवली. त्यानंतर एक वर्षभर त्यांनी लंडनच्या कॉलेजात संशोधन करून दुसरी पदवी मिळवली. त्या काळात त्यांना लॉर्ड रॅले, डार्विन या थोर शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

स्वदेशी परत आल्यानंतर इ. स. १८८५ ते १९१५ या काळात ते कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजात भौतिक विज्ञानाचे प्राध्यापक होते. नंतर ते इंडियन एज्युकेशनल सर्व्हिसमध्ये शिरले व तिथूनच निवृत्त झाले.

जगदीशचंद्रांचे पहिले संशोधन विद्युत्संबंधी होते. विद्युत्चुंबक लहरींचा संचायक यांनी शोधून काढला. तंतुलाघमाच्या मदतीने बिनतारी संदेश पाठवण्याची पद्धती आणि त्यावरून अणुपीडन व प्रेषसिद्धांत हे यांचेच शोध आहेत. त्यानंतरचे यांचे सर्व संशोधन-वनस्पतिशास्त्रात झाले. सर्व सृष्टीतील मूलतत्त्व एकच आहे, या कल्पनेवर त्यांनी वनस्पती व प्राणी यांच्या जीवनांतील



जगदीशचंद्र बसू

साम्य अनेक सूक्ष्म उपकरणांच्या साहाय्याने सिद्ध केले. वनस्पती संवेदनाक्षम असून, त्या झोप घेतात, वायुमय अन्न पचवितात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि मादक पदार्थांमुळे झिंगतात, हे त्यांनी दाखवून दिले.

जगदीशचंद्र बसू यांचे विशेष उल्लेखनीय कार्य म्हणजे त्यांनी स्वतःची प्रयोगशाळा सुरू केली आणि तिथे हिंदी कारागिरांच्या मदतीने अनेक सूक्ष्म व अचूक उपकरणे बनवली. त्यांचे संशोधन-कार्य लवकरच पाश्चात्य शास्त्रज्ञांनी मान्य केले आणि इ. स. १९२० साली त्यांना रॉयल सोसायटीचे फेलो निवडण्यात आले. प्रफुल्लचंद्र राय यांनी युगप्रवर्तक संशोधक म्हणून त्यांचा गौरव केला. १९१७ साली त्यांनी स्वतःच्या नावाची संशोधनसंस्था स्थापली. पुढे त्यांनी आपले सर्व शोध व संस्थाही राष्ट्राला अर्पण केली. त्या संस्थेच्या वास्तूवर दधीची ऋषीच्या आत्मार्पणाचे प्रतीक म्हणून वज्राची आकृती कोरलेली आहे.

विद्युल्लहरींच्या साहाय्याने दूरपर्यंत संदेश पाठवण्याचा प्रयोग जगदीशचंद्र बसूंना साधला असला, तरी इटालियन संशोधक मार्कोनी याने त्याच वेळी तो शोध लावून त्याचा पुष्कळ विकास केला आणि बिनतारी पद्धतीचीची यंत्रणा सिद्ध केली. जगदीशचंद्रांनी मार्कोनीचे श्रेय मोकळेपणाने मान्य केले, कारण त्यांच्या ठायी दुरभिमान नव्हता. 'विश्वातील सर्व सचेतन व अचेतन वस्तू, पृथ्वीवरील सृष्टी, नभोमंडळातील असंख्य ग्रह-गोल, प्रकाशलहरी, या सर्वांमध्ये एकच शक्ती वास करीत असते, हे सत्य माझ्या निदर्शनाला आले, तेव्हा तीस शतकांपूर्वी गंगेच्या तीरावर माझ्या पूर्वजांनी परब्रह्माची जो कल्पना विशद केली तिचा अर्थ मला कळू लागला,' असे नम्र उद्गार त्यांनी एका भाषणात काढले होते. हे उद्गार त्यांच्या भारतीय संस्कृतीच्या अभिमानाचे व निरहंकार वृत्तीचे द्योतक आहेत. [सु. वि. को.; श्री. ग. ल. चंदावरकर—नवभारत, फेब्रुवारी, १९५९]

बसू, नंदलाल (१८८३– १९६६ इ. स.) एक महान चित्रकार व एका अभिनव चित्रशैलीचा प्रवर्तक. यांचा जन्म बिहारमधील मुंगेर या गावी झाला. लहानपणापासून त्यांना चित्रकलेची आवड होती. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर विश्वविद्यालयीन शिक्षणाचा त्याग करून चित्रकलेच्या शिक्षणासाठी ते कलकत्त्याच्या आर्ट स्कूलमध्ये प्रविष्ट झाले. तिथे त्यांना श्री. अवनींद्र ठाकूर हे गुरू मिळाले. ते प्रतिभाशाली चित्रकार आणि श्रेष्ठ दर्जाचे कलावंत होते. बसूबाबूंनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकलेचा सखोल अभ्यास केला.

आर्ट स्कूलमधून बाहेर पडल्यावर त्यांना श्री. रवींद्रनाथ ठाकूर यांचा सहवास मिळाला. बसूबाबूंनी काढलेली चित्रे आणि त्यांची कलासाधना पाहून श्री. रवींद्रनाथ प्रभावित झाले. इ. स. १९१७ साली रवींद्रनाथांनी विचित्रा नावाचे एक कला-शिल्पकेंद्र स्थापन केले होते. बसूबाबूंना त्यांनी त्या केंद्रात प्राचार्य नेमले. तिथे राहून त्यांनी भारतीय चित्रकलेचे अधिक सूक्ष्म अध्ययन केले.

नंदलाल बसू

तिथून ते आपल्या एका सहकाऱ्यासह अजंटाची चित्रकला पाहायला गेले. परत येताना त्यांनी मध्य प्रदेशातली बाघ गुंफेतली चित्रेही पाहिली. भूतकालातले ते कलावैभव पाहून ते केवळ आश्चर्यचकितच झाले नाहीत, तर त्यातून त्यांनी प्रेरणाही घेतली. त्या प्रेरणेतूनच पुढे त्यांचे कलाजीवन संपन्न झाले. त्यानंतर त्यांनी अजंटा व बाघ येथील भित्तिचित्रांचे स्वतःच्या कुंचल्याने चित्रण केले. बसूबाबूंची ती चित्रे मूळ कृतीपेक्षा कुठल्याही दृष्टीने कमी नाहीत. रेखांचे मार्दव, मुखमुद्रेवरच्या भावना आणि प्रत्येक आकृतीतील सजीवता हे सारे तेच आणि त्याच प्रकारचे आहे.

इ. स. १९२२ साली श्री. रवींद्रनाथ ठाकूर बसूबाबूंना शांतिनिकेतनमध्ये घेऊन गेले आणि त्यांनी त्यांना तिथल्या कला विभागाचे अध्यक्ष केले. तिथे राहून त्यांनी रूपावली व शिल्पकथा हे दोन ग्रंथ लिहिले. या ग्रंथांत कलाविवेचन तर आहेच; शिवाय त्यांच्या बहुमूल्य चित्रांचा संग्रहही आहे. त्यानंतर रवींद्रनाथ ठाकूर जेव्हा चीन-जपानच्या दौऱ्यावर गेले, तेव्हा त्यांनी बसूबाबूंनाही आपल्याबरोबर नेले. त्या देशांतील कलासृष्टी पाहून त्यांनी आपली कलादृष्टी व्यापक करून घेतली.

वसूबाबूंचे हे कलानैपुण्य पाहून म. गांधीही प्रभावित झाले. लखनौ, फैजपूर व हरिपुरा या ठिकाणी भरलेल्या काँग्रेसच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अधिवेशनांचे मंडप कलादृष्टीने सजविण्याचे काम म. गांधींनी त्यांच्यावर सोपविले व ते कार्य त्यांनी सर्वांच्या लक्षात राहील

बुद्ध व आम्रपाली

अशा प्रकारे पूर्ण केले. इ. स. १९३९ साली बडोदे सरकारकडून त्यांना निमंत्रण आले. तिथे जाऊन त्यांनी तिथले कीर्तिमंदिर विविध चित्रांनी सुशोभित बनवले.

वसूबाबू भित्तिचित्रेही सुरेख काढीत. अशा चित्रांसाठी भिंतींना जो लेप द्यायचा, त्याची प्रक्रिया त्यांनी प्राचीन भारतीय भित्तिचित्रांवरूनच बनविली होती. अशा चित्रांसाठी रंग व कुंचलेसुद्धा विदेशी न वापरता स्वत: तयार करून ते वापरीत. देशी रंगांचे अनेक प्रयोग त्यांनी सिद्ध केले व आपल्या शिष्यांना शिकवले. ते मातीच्या मूर्ती बनवीत आणि काष्ठांवरही आकृती खोदीत. पुढे पुढे त्यांच्या चित्रकलेत कालीघाट येथील पटचित्रात दिसणाऱ्या बंगाली लोककलेचेही काही बारकावे दिसू लागले.

त्यांची चित्रकला विशिष्ट माध्यमापुरती मर्यादित नव्हती. त्यांनी भूमिचित्रे काढली, तोरणद्वारे सजविली, मुलांची पुस्तके सचित्र केली आणि नटांनाही रंगविले. वसूबाबू पोस्टकार्डांवर रेखाकृती काढीत आणि ती चित्रे आपल्या इष्ट मित्रांना भेट म्हणून पाठवीत. अशी हजारो कार्डे रेखांकित व बोलकी करून त्यांनी भारतभर अनेक रसिकांना आपल्या कलेचा आनंद दिला.

पौराणिक विषयांवरही त्यांनी अनेक चित्रे रंगविली. त्यांपैकी सती, शिवाचे विषप्राशन, शिवविलाप, शिवतांडव, उमेची तपस्या, विरहिणी उमा, युधिष्ठिराची स्वर्गयात्रा, दुर्गा, यम, सावित्री, कैकेयी, अहल्या ही चित्रे नामांकित उतरली आहेत. बुद्धजन्म, बुद्धाचा गृहत्याग, बुद्ध व आम्रपाली ही चित्रेही तितकीच गंभीर व दर्शनीय आहेत.

नुसती त्यांची रेखांकनेही अर्थपूर्ण, प्रभावी आणि बोलकी वाटतात. वसूबाबू म्हणजे रेखासम्राटच होते. वीणावादिनी, नटीर पूजा, नटीर नृत्य, इ. त्यांची काही चित्रे म्हणज रेखाचित्रकलेची परिसीमाच होय. त्यांची रेखा कधी धावती, कधी थबकती, कधी वळती, अशा विविध रूपांनी आणि गतींनी प्राणवान झाली आहे. प्रणयाचे रंग आणि रागलोभाचे विकार त्यांच्या

नटीर पूजा

रेखेतून सहज पाहून घ्यावे. बारीक बारीक रेखा किती आशयघन होऊ शकतात, हे त्यांच्या नटीर पूजा या चित्रात पाहावे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या रेखाचित्रांच्या मागे त्यांची केवढी जबर तपश्चर्या होती व त्यांची अंतःप्रेरणा किती तीव्र, किती गतिशील होती हे समजायला एखादा कलामर्मज्ञच हवा.

शांतिनिकेतनात राहून त्यांनी अनेक शिष्य तयार केले. अनेक चित्रकारांना व शिल्पकारांना मार्गदर्शन करून त्यांना उत्साहित केले. रवींद्रनाथांच्या देहावसानानंतर शांतिनिकेतनाचे तेच आधारस्तंभ बनले. शांतिनिकेतनातले सारे लोक रवींद्रबाबूंप्रमाणेच बसूबाबूंनाही मान देऊ लागले. सामान्य मानवांच्या दुःखाविषयी त्यांना कणव होती आणि त्या दुःखांचे मूळ शोधण्याचाही त्यांचा प्रयत्न होता. आपल्या शिल्पकथा या पुस्तकाच्या भूमिकेत ते म्हणतात–

मी काही कुणी साहित्यिक नाही. भाषेचे शिल्प मी जाणत नाही. त्यामुळे विस्तारपूर्वक काही सांगण्याची शक्ती माझ्यात नाही. आज या जगात जे दुर्भाग्य दिसत आहे, त्याचे कारण म्हणजे माणसाच्या भोगलोलुप व स्वार्थी वृत्तीचे प्राबल्य होय. केवळ जीवन धारण व स्वार्थसाधन यांच्या पलिकडे जाऊन माणसाने साधनेत लक्ष घालायला हवे. साहित्य आणि शिल्प यांनी माणसाच्या चित्तवृत्ती सुधारतात. वैयक्तिक व सांमुदायिक जीवनात छंद, सूर, सामंजस्य या गोष्टी कलेच्या उपासनेमुळे निर्माण होतात.

एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या चरणापर्यंत आधुनिक भारतीय कलेचा व्याप फारसा मोठा नव्हता. यद्यपि कलाकार नवा दृष्टिकोण घेऊन अग्रेसर झाले होते आणि काही मर्यादेपर्यंत पाश्चात्य कलेच्या प्रभावातून मुक्त झाले होते, तथापि भारतीय कलेचा अद्याप एखादा निश्चित मार्ग प्रवर्तित झाला नव्हता. वसूबाबूंनी आपल्या बहुमुखी प्रतिभेने तो मार्ग निर्माण करून आधुनिक कलेचे प्रवर्तन केले. इतकेच नव्हे; तर त्यांनी आपला एक कलासंप्रदायच निर्माण केला. त्यांच्या या कलावैभवाची रवींद्रनाथांना जाणीव होती आणि म्हणूनच त्यांनी बसूबाबूंचा अनेकदा आणि अनेक प्रकारे गौरव केला. त्यांच्या कलेचे रहस्यच रवींद्रनाथांनी उकलून दाखविले. [शचीरानी गुर्टु–साप्ता. हिंदुस्थान, २९ मे ६६; कुमारिल स्वामी–साप्ता. हिंदुस्थान, १२ जून १९६६; रंगल्या रेषा अशा–डॉ. प्र. न. जोशी]

बसोली चित्रशैली बसोली नामक एक प्रदेश व गाव जम्मू-काश्मीर राज्यात आहे. बसोली हे गाव जम्मू राज्याच्या कठुआ जिल्ह्यात आहे. आज एक सामान्य गाव एवढेच त्याचे स्वरूप असले, तरी तिथे आढळणाऱ्या विविध प्रकारच्या प्राचीन भग्नावशेषांवरून ते जुन्या काळी एक कलासमृद्ध नगर होते, हे कळून येते.

या बसोली प्रदेशाची राजधानी बलौर येथे होती. हे ठिकाण बसोलीपासून बारा मैल पश्चिमेस आहे. इ. स. च्या आठव्या शतकात या राजधानीची स्थापना झाली. चाल वंशीय राजे येथे राज्य करीत असत. त्यांच्या आश्रयाने इथे अनेक चित्रकारांनी आपल्या कलेचा उत्कर्ष साधला. मालिनी नावाची

बसोली चित्रशैली– राधाकृष्ण

बसोलीची एक राणी चित्रकलेची फार भोक्ती होती. तिने गीतगोविंदावरची अनेक चित्रे चित्रकारांकडून काढून घेतली. दहाव्या शतकापर्यंत बसोली हे स्वतंत्र राज्य म्हणून नांदले.

भारतीय चित्रकलेच्या सर्व प्रमुख प्रवृत्ती बसोली शैलीत आढळतात. कांगडा किंवा पहाडी या परंपरेतली जी चित्रे मिळाली आहेत, ती मुळात बसोली शैलीची आहेत. समकालीन कांगडा, गढवाल, मंडी, इ. ठिकाणच्या कलाशैलींनी रागमालेविषयी उदासीनता दाखविली; पण बसोलीच्या चित्रकारांनी संगीतातील राग–रागिण्यांची असंख्य चित्रे निर्माण केली. प्रसंगचित्रांसाठी या शैलीच्या कलाकारांनी रामायण, महाभारत, भागवत, देवीमाहात्म्य, रसिकप्रिया व गीतगोविंद या ग्रंथांचा आश्रय घेतला आणि हजारो प्रसंगचित्रे निर्माण केली.

बसोलीच्या चित्रांचे सामाजिक व धार्मिक असे दोन प्रकार मिळतात. त्यांतली काही चित्रे मोगलांच्याही पूर्वीची आहेत. बसोली चित्रशैलीचे आणखी एक रूप आढळते, त्याला तिबेटी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किंवा नेपाळी असे म्हणतात. ती चित्रे तांत्रिक व देवदेवतां-संबंधीची आहेत. या शैलीत स्त्रियांचे चित्रण फार नयनरम्य असते. लांब नाक, हरणासारखे टपोरे डोळे, छोटे मुख, फुगीर गाल व झुकलेली हनुवटी असे नारीदर्शन बसोलीचे चित्रकार घडवतात. या शैलीचा परामर्श घेऊन कलामर्मज्ञांनी बसोलीच्या चित्रशैलीची दहा लक्षणे सांगितली आहेत, ती अशी –

(१) शरीराकृती, कांगडा व गढवाली या शैलीच्या विरुद्ध व ओजस्वी. स्त्रियाही पुरुषी घाटाच्या.

(२) डोळे प्रफुल्ल कमळासारखे. त्यांत मादक आकर्षण.

(३) कपाळ मागे गेलेले, नाक लांब व झुकलेले.

(४) हस्तमुद्रांचे प्रदर्शन.

(५) स्त्रियांची वस्त्रे पारदर्शक.

(६) पुरुषांचे वरचे अंग वस्त्ररहित. क्वचित खांद्यावरून एखादी चादर. धोतराचा रंग सोनेरी. अंगावर तऱ्हेतऱ्हेचे अलंकार.

(७) सजावट आकर्षक दिसण्यासाठी एक प्रकारच्या कीट-कांच्या पंखांचे कातरकाम चित्रांत जडवलेले.

(८) चित्राची पृष्ठभूमी बहुशः समतल व कुंचलीच्या एकाच हाताने रंगविलेली, रंग गडद पिवळा, गडद व हलका हिरवा आणि वैंगणी. कधीकधी वर आकाशाचा काही भाग दाखवलेला. त्यात चंद्र चितारलेला.

(९) चित्राची किनार पिवळी, लाल किंवा शेंदरी.

(१०) स्त्रियांच्या केसांची एक वट गालावर आलेली.

इ. स. च्या सतराव्या शतकापासून एकोणीसाव्या शतकाच्या

बसोली चित्रशैली – शिवाला भिक्षादान

आरंभापर्यंत बसोली कलम चालू होते. कांगडा व बसोली या दोन शैलींतला फरक हा, की कांगडा शैलीतील चित्रे सूक्ष्माकार असतात, तर बसोलीतील चित्रे ही भित्तिचित्रांसारखी असतात. त्यांच्यावर पौराणिक कथासंकेतांचा प्रभाव अधिक असतो.

इ. स. १८४६ साली बसोलीच्या कल्याणपाल या शेवटच्या राजाला निवृत्तिवेतन देऊन जम्मूचा महाराज गुलाबसिंह याने त्याचे राज्य आपल्या राज्यात विलीन केले आणि जवळजवळ तेव्हापासून बसोली चित्रशैलीही समाप्त झाली. [श्री. राजेश्वर-प्रसाद नारायण सिंह– आजकल, सप्टें. १९५८; श्री. वाचस्पती गैरोला– योजना, ऑगस्ट–सप्टें. १९६२]

बस्तत्रिरात्रव्रत एक काम्य व्रत. बस्त म्हणजे शेळी होय. चैत्र मासात तीन दिवस सूर्याला प्रत्येक दिवशी तीन पांढरी कमळे अर्पण करणे व दत्तभोजन करणे असा याचा विधी आहे. उद्यापनाच्या वेळी सुवर्णासह पाच दुभत्या शेळ्या ब्राह्मणास दान द्याव्या असे सांगितले आहे. फल– रोगमुक्ती व पुनर्जन्मातून मुक्ती. [हि. घ.]

बहती पंजाबमधील शेतकऱ्यांचा एक वर्ग. यांना कांगडामध्ये धीरथ, पूर्वभागात बहती आणि पश्चिमेकडे चांग म्हणून ओळखतात. हे लोक मूळचे राजपूत असावे असे एक मत आहे. यांच्यांत अनेक शाखा आहेत. त्यामुळे अशी म्हणच पडली आहे, की 'तांदुळाच्या जितक्या जाती तितक्याच बहतींच्या जाती.' हे लोक काळे व ठेंगू आहेत.

बहती शेतकरी फार कष्टाळू असतात. यांच्यांतील काही पुरुष घरबांधणीच्या कामात मजुरी करतात. स्त्रिया लाकूड, दूध, भाजी यांची विक्री करतात. हे काटकसरी व प्रामाणिक असतात. यांची गणना शूद्रांत होते. [पं. का.]

बहमनी साम्राज्य बहमनी राज्याचा संस्थापक व बह-मनी वंशाचा मूळ पुरुष अलाउद्दीन हसन बहमन शाहा हा हसन गंगू या नावाने इतिहासात प्रसिद्ध आहे. इराणचा एक प्राचीन राजा बहमन याचा हा वंशज म्हणून याला बहमन शाहा हे नाव मिळाले, अशी आख्यायिका आहे. पण ती हसन गंगू सुलतान झाल्यानंतर त्याच्या स्तुति-पाठकांनी रचलेली आहे, असे फिरिश्ता म्हणतो. त्याच्या मते हसन हा गंगू नामक ब्राह्मण ज्योतिष्याचा नोकर होता व ब्राह्मण याचा अपभ्रंश करून त्याने बहमन हे नाव आपल्या कुळाला लावले. गंगू ब्राह्मणाच्या प्रभावाने हसन अमीर झाला आणि त्यानेच हसनचे भविष्य वर्तवल्याप्रमाणे तो पुढे सुलता-नही झाला. सुलतानपद मिळाल्यावर हसनने गंगू ही पदवी धारण करावी, अशी धन्याची इच्छा होती, ती त्याने पूर्ण केली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिल्लीचा सुलतान मुहंमद तुघलक याची सत्ता दुबळी झाली आहे, असे पाहून दक्षिणेतील अनेक मुसलमान सरदारांनी स्वतंत्रपणे राज्यकारभार सुरू केला व इस्माइल मुख नावाच्या सरदाराला त्यांनी सुलतानपद दिले. त्यांची ती बंडाळी मोडून काढण्यासाठी सुलतान मुहंमद मोठी फौज घेऊन दक्षिणेत आला. दौलताबादजवळ त्याने इस्माइल शाहाचा पराभव केला खरा; पण तेवढ्यात गुजरातेत बंड उद्‌भवल्यामुळे सुलतान मुहंमदाला तिकडे जावे लागले. त्याची काही फौज दक्षिणेतच सिंदतन येथे तळ देऊन राहिली होती. हसन गंगूने तळावर हल्ला करून त्या फौजेचा पराभव केला. मग इस्माइल शाहाने सुलतानपद सोडले आणि सर्व सरदारांनी हसन गंगूला सुलतान म्हणून निवडले. तो जफरखान या नावानेही ओळखला जातो. त्याने स्वतःला दक्षिणेचा सुलतान म्हणून जाहीर केले आणि गुलबर्गा इथे आपली राजधानी नेली.

बहमन शाहाने लवकरच आसपासच्या प्रदेशावर फौजा पाठवून आपली सत्ता दृढ केली. त्याच सुमारास वरंगळ व विजयनगर येथे नवीन राज्ये उदयाला आली होती. बहमन शाहाने इ. स. १३५० साली वरंगळवर स्वारी करून कापय नायक याला आपला सामंत बनवले.

बहमन शाहाची सत्ता उत्तरेस मंडूपर्यंत, दक्षिणेस रायचूरपर्यंत, पूर्वेला भोंगीरपर्यंत व पश्चिमेला दाभोळपर्यंत प्रस्थापित झाली होती. त्याने आपल्या राज्याचा कारभारही व्यवस्थित लावून दिला होता.

हसन बहमन शाहा हा इ. स. १३५८ मध्ये मरण पावल्यावर त्याचा मुलगा मुहंमद शाहा गादीवर आला. त्यालाही वरंगळच्या राजाशी अनेकदा लढाई करावी लागली. त्याने कापय नायकाचा पराभव करून त्याच्याकडून मोठी खंडणी घेतली. बहमनी व विजयनगर राज्यांचा संघर्ष मुहंमद शाहाच्या कारकिर्दीत सुरू झाला. त्यांच्या युद्धांतच प्रथम तोफखान्याचा उपयोग सुरू झाला, असे म्हणतात. सुलतानाचे गुप्तचर दल अत्यंत कार्यक्षम होते. याच्या वेळी गुलबर्गा येथे बांधलेली शाहा बजार मशिद शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना समजली जाते.

मुहंमद शाहा इ. स. १३७५ त मरण पावला आणि त्याचा मुलगा अलाउद्दीन मुजाहिद हा सुलतान झाला. त्याने विजयनगरवर स्वारी केली, पण ती अयशस्वी ठरली. तिकडून परत येताना त्याचा खून झाला. मग त्याचा चुलत भाऊ दाऊदशाहा गादीवर आला (इ. स. १३७८). पण लवकरच त्याचाही खून झाला व त्याचा भाऊ मुहंमद (दुसरा) हा गादीवर बसला. त्याने इ. स. १३९७ पर्यंत शांततेने राज्य केले. त्या काळात विजयनगरच्या राजाने पूर्वेला व पश्चिमेला बराच राज्यविस्तार केला. सुलतान मुहंमद शाहा स्वतः विद्वान व सुसंस्कृत असून, त्याने अनेक पंडितांना व धर्मनिष्ठ पुरुषांना आपल्या राज्यात आणण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्याने प्रजेच्या कल्याणासाठीही पुष्कळ प्रयत्न केले.

मुहंमद (दुसरा) इ. स. १३९७ मध्ये मरण पावला. बहमनी राज्याचा आरंभापासूनचा कर्तबगार मंत्री मलिक सैफुद्दीन घोरी तोपर्यंत राज्यकारभार पाहत होता. तोही त्यानंतर लगेच मरण पावला. त्यानंतरच्या सात महिन्यांत गियासुद्दीन व शमसुद्दीन हे दोन सुलतान होऊन गेले. त्यानंतर सुलतान मुहंमदाचा चुलत भाऊ फिरूज शाहा गादीवर आला.

फिरूज शाहाने सुमारे २५ वर्षे राज्य केले. त्याची बहुतेक कारकीर्द विजयनगरशी लढण्यात गेली. त्याने विजयनगरवर तीन स्वाऱ्या केल्या, पण त्यांत त्याला फारसे यश लाभले नाही. तिसऱ्या स्वारीत (इ. स. १४१७ ते २०) तर त्याला जबर तडाखा बसला. फिरूज शाहा विद्वान व कलेचा भोक्ता होता. त्याला अनेक भाषा अवगत होत्या व तो पुष्कळ वेळ शास्त्राध्ययनात घालवी. देशोदेशींच्या विद्वानांना आपल्या दरबारात बोलवून तो त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करीत असे. त्याने दौलताबादजवळ एक वेधशाळा निर्माण करून खगोलशास्त्राच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले. भीमा नदीच्या तीरावर त्याने फिरूजाबाद हे एक सुंदर शहर वसवले आणि चौल व दाभोळ या बंदरांची सुधारणा केली.

याच्या काळात सुप्रसिद्ध अवलिया ख्वाजा गीसू दराज दक्षिणेत आला. प्रथम फिरूज शाहावर त्याची मर्जी होती. पण कालांतराने त्यांचे बिनसले आणि गीसू दराजने फिरूजचा भाऊ अहंमद याचा पक्ष घेतला. मग इ. स. १४२२ मध्ये फिरूजने राज्यत्याग करून भावाला गादी दिली. पुढे लवकरच फिरूज मरण पावला.

अहमद शाहा याच्या कारकीर्दीत (इ. स. १४२२–१४३६) वरंगळचे राज्य बहमनी राज्याला जोडले गेले. त्यानंतर अहमद शाहाने आपली राजधानी बीदरला नेली. कारण ते स्थान राज्यात मध्यवर्ती होते. नंतर त्याने माळवा व गुजरात या प्रदेशांवर स्वारी करून तिथे आपले वर्चस्व स्थापले. विजयनगरशी त्याचा संघर्ष चालूच राहिला.

अहमद शाहा विद्या व कला यांचा भोक्ता होता. तो जसा वली म्हणजे संत म्हणून प्रसिद्ध होता, तसाच मुत्सद्दी म्हणूनही प्रसिद्ध होता.

अहमदशाहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अलाउद्दीन अहमद गादीवर आला. आपल्या कारकीर्दीत (इ. स. १४३६ ते १४५८) त्याने विजयनगरशी दोनदा युद्ध केले. खानदेश व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोकण या प्रदेशांवर त्याने आपली सेना पाठवली व तिथल्या राजांचा पराभव केला. अहमद शाहाच्या वेळी परदेशी व दक्षिणी मुसलमानांमध्ये तेढ उत्पन्न झाली होती. ती याच्या वेळी विकोपाला गेली व त्यांच्या आपसांत कत्तली झाल्या.

इ. स. १४५५ साली अहमद शाहाचा मेहुणा जलालखान याने बंड करून तेलंगणात स्वतंत्र राज्य सुरू केले; पण सुलतानाचा एक सरदार महमूद गावान याने नलगोंडाच्या किल्ल्याला वेढा घालून त्याचा पराभव केला.

अलाउद्दीन अहमदशाहाने राजधानीत एक मोठे रुग्णालय स्थापले होते. तिथे जातिधर्मनिरपेक्ष सर्व रुग्णांना उपचार केले जात. सुलतानाची एक जखम अनेक वर्षे चिघळत होती, ती स्वामी नरसिंह सरस्वती यांनी मंत्रोपचारांनी बरी केली, अशी आख्यायिका गुरुचरित्रात दिलेली आहे; पण तिला ऐतिहासिक आधार नाही.

अलाउद्दीन अहमद शाहा इ. स. १४५८ मध्ये मरण पावला. त्याच्या नंतर त्याचा मुलगा हुमायून याने केवळ तीन वर्षे राज्य केले. तेवढ्या काळात त्याच्या राज्यात अनेक बंडे झाली व ती त्याने कठोरपणे मोडून काढली. त्याचा मुलगा निजाम शाहा गादीवर आला तेव्हा आठ वर्षांचा होता व त्याने दोनच वर्षे राज्य केले. त्याची आई आणि महमूद गावान व ख्वाजा जहान तुर्क यांचे मंडळ राज्यकारभार पाहत होते. त्या दोघा मंत्र्यांनी राज्याचे रक्षण चांगले केले. इ. स. १४६३ मध्ये निजाम शाहा मरण पावला व त्याचा धाकटा भाऊ शमसुद्दीन मुहंमद हा गादीवर बसला. तोही लहान असल्यामुळे वरील मंडळच राज्यकारभार पाहत होते. इ. स. १४६६ त ख्वाजा जहान तुर्क याच्या राज्यनिष्ठेविषयी संशय आल्यामुळे राजमातेने त्याचा खून करवला मग महमूद गावान याची मुख्य मंत्री म्हणून नेमणूक झाली. त्याने ओडिसा व विजयनगर यांच्या आक्रमणांना यशस्वीपणे तोंड देऊन बहमनी राज्याचा पूर्वेला ओडिसापर्यंत आणि पश्चिमेला गोव्यापर्यंत विस्तार केला. त्याच्या कर्तबगारीमुळे राज्याचे वैभव खूप वाढले. त्याने विद्येच्या प्रसाराकडेही पुष्कळ लक्ष दिले. तो स्वतः चांगला साहित्यिक असून, त्याच्या 'रीयाज-उल्-इन्शा'नावाच्या ग्रंथाला ऐतिहासिक मोल बरेच आहे.

आपल्या विस्तृत साम्राज्यावरची सत्ता दृढ करण्यासाठी त्याने त्याचे आठ सुभे करून प्रत्येक भागातील काही प्रदेश व किल्ले मध्यवर्ती सरकारच्या ताब्यात ठेवले. जमिनीची मोजणी करून शेतसारा ठरवून दिला. दक्षिणी व परदेशी मुसलमान यांच्यांतील वैर शमवण्याचाही खूप प्रयत्न केला; पण तसे घडले नाही आणि दक्षिणी मुसलमानांचा नेता हसन निजाम-उल्मुल्क याने गावानाचा कपटाने खून करवला (इ. स. १४८१).

पुढच्या वर्षीच मुहंमद शाहा मरण पावला व त्याचा मुलगा महमूद गादीवर आला. त्याने ३६ वर्षे राज्य केले. तो लहान असल्यामुळे हसन निजाम-उल्मुल्क हा मलिक नाइब म्हणून कारभार पाहत होता; पण त्याचाही लवकरच खून झाला व राज्यकारभार परदेशी मुसलमानांचा पुढारी कासीम बरीद याच्या हाती गेला.

परंतु बहमनी राज्यातले सुभदार कासीम बरीदची सत्ता मानायला तयार झाले नाहीत. त्यामुळे लवकरच बहमनी साम्राज्य मोडकळीस आले. इ. स. १४९० च्या सुमारास मलिक नाइब याचा मुलगा अहमद निजाम-उल्मुल्क याने स्वतंत्र राज्य सुरू केले. अहमदनगर हे शहर त्यानेच वसवले व तिथे निजामशाही सुरू केली. विजापूरचा युसुफ आदिलखान व वऱ्हाडातला इमाद-उल्मुल्क यांनीही स्वतंत्र कारभार सुरू केला. मात्र ते तिघेही बीदरच्या महमूद शाहाला नामधारी सुलतान मानीत होते. त्याने इ. स. १५१८ पर्यंत राज्य केले. त्या अवधीत त्याने अनेक सरदारांना बोलावून विजयनगरवर स्वाऱ्या केल्या व त्यांत जयही मिळविला.

इ. स. १५१८ मध्ये महमूद शाहा मरण पावल्यावर बहमनी राज्याचे विभाजन पूर्ण झाले. त्यानंतर चार राजांनी इ. स. १५३८ पर्यंत राज्य केले. पण बीदरवर खरी सत्ता कासीम बरीदचा मुलगा अमीर बरीद याचीच राहिली. इ. स. १५३८ साली कलिमुल्ला हा शेवटचा राजा मरण पावला व बहमनी वंशाचा अंत झाला. त्यानंतर बहमनी साम्राज्याचे आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, बरीदशाही व इमादशाही हे पाच विभाग स्वतंत्र झाले.

बहमनी राज्याचा विस्तार नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत झाला होता. त्याचे सामर्थ्य व ऐश्वर्य दिल्लीच्या तत्कालीन बादशाहीच्या बरोबरीचे होते. या राज्याची व्यवस्था आरंभी चांगली होती. पण महमूद गावानानंतर केंद्रसत्ता दुबळी झाली व सुभेदार शिरजोर झाले. त्यामुळेच साम्राज्य लयाला गेले.

बहमनी राज्यात मुख्य वसती हिंदूंची असली, तरी त्यांना दरबारात अधिकार वा मानमरातब मिळत नव्हते. सर्व सत्ता मुसलमान अधिकाऱ्यांच्या हाती होती. हिंदू लोक हलक्या नोकऱ्या व शेतीभाती करीत. व्यापाराची भरभराट असली तरी खेडोपाडी लोक दरिद्री व दुःखीकष्टीच होते. सरकारने सर्व लोकांच्या शिक्षणाची सोय केलेली नव्हती, पण मुसलमानांसाठी मात्र प्रत्येक खेड्यात शाळा होत्या. बहमनी राजांनी बांधलेले किल्ले हे त्या साम्राज्याचे स्मारक ठरले आहेत.

बरीदशाही – (इ. स. १४९२ ते १६५६) बहमनी वंशाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंत झाल्यानंतर राजधानी बीदर येथे बरीद घराण्याची सत्ता चालू राहिली. इ. स. १४९२ पासून कासीम बरीद हाच खरा सत्ताधीश होता. पुढे १५०४ पासून १५४९ पर्यंत त्याचा मुलगा अमीर बरीद याने सत्ता गाजविली. मात्र १५३८ पर्यंत बहमनी सुलतान नामधारी राजे राहिले होते. अमीर बरीदनंतर मात्र अली बरीद याने शाह हा किताब धारण केला. पण अहमदनगरच्या निजामशहाने त्याच्या राज्याचा बराच भाग जिंकून घेतला. अली बरीदशाहानंतर इब्राहीम (१५६२–६९), मग त्याचा धाकटा भाऊ कासीम बरीद (दुसरा) (१५६९–७२) व नंतर त्याचा मुलगा मिर्झा अली यांनी बीदर येथे राज्य केले. पण हळूहळू ते राज्य लयाला गेले व इ. स. १६५६ साली मोगलांचा दक्षिणेकडील सुभेदार औरंगजेब याने बीदरचा किल्ला व शहर हस्तगत करून बरीदशाही नष्ट केली.

इमादशाही – (इ. स. १४८४ ते १५७२) फत्तेउल्ला इमादशाह हा मूळचा तेलंगी ब्राह्मण विजयनगरचा रहिवासी होता. तो मुसलमान झाल्यावर त्याला वऱ्हाडची सुभेदारी व इमादउल्मुल्क ही पदवी मिळाली. इ. स. १४८४ मध्ये तो स्वतंत्रपणे कारभार पाहू लागला. पण त्याच वर्षी तो मरण पावला. पुढे अलाउद्दीन इमादशाह (इ. स. १४८४ ते १५२७), दर्या इमादशाह, बुऱ्हाण इमादशाह यांनी तिथे राज्य केले. बुऱ्हाणशाह लहान असतानाच गादीवर आला होता. त्या वेळी तोफलखान नामक सरदाराने सर्व अधिकार बळकावला. पण इ. स. १५७२ साली मुर्तुझा निजामशहाने वऱ्हाडवर स्वारी करून इमादशाह व तोफलखान यांना ठार मारले आणि वऱ्हाडचे राज्य निजामशाहीला जोडले.

निजामशाही – (इ. स. १४८५ ते १६३७) विजयनगर येथे तिमाप्पा बहिरू नामक एक ब्राह्मण होता. त्याचा मुलगा मुसलमानांच्या हाती सापडल्यावर मुसलमान झाला. तोच मलिक नाइब निजाम–उल्मुल्क होय. त्याचा मुलगा अहमद याने निजामशाहीची स्थापना केली. त्याने शिवनेरी, लोहगड, चंदनवंदन, तोरणा वगैरे किल्ले जिंकून घेतले. तो प्रथम जुन्नर येथे राहत असे. पुढे जुन्नर-दौलताबाद मार्गावर विंकर नावाचे जे खेडे होते, तिथे त्याने अहमदनगर हे नवे शहर वसवले (इ. स. १४९४). त्याने दौलताबादचा किल्लाही घेतला.

इ. स. १५०८ साली अहमद निजामशाहा मरण पावला व त्याचा सात वर्षांचा मुलगा बुऱ्हाण हा गादीवर आला. प्रारंभी मखमलखान व नंतर कंवरसेन नामक ब्राह्मण त्याचे मुख्य प्रधान होते. त्यांनी चांगला कारभार केला. पण बुऱ्हाणची सर्व कारकीर्द (इ. स. १५०८–१५५३) लढण्यातच गेली. विजापूरचा इस्माईल आदिलशाह याच्या मुलीशी बुऱ्हाणचे लग्न झाले होते, तरी त्याने विजापूरवर अनेक स्वाऱ्या केल्या. पण त्यांत त्याचा पराभव झाला. मराठे लोक डोंगराळ प्रदेशात राहून अचानक हल्ले करीत. त्यांचा बुऱ्हाणशाहाने बंदोबस्त केला व अनेक मराठे सरदारांना दरबारात मोठमोठ्या हुद्याच्या जागा दिल्या.

बुऱ्हाणशाहाच्या मागून हुसेन निजामशाहाने इ. स. १५६५ पर्यंत राज्य केले. विजापूर, गोवळकोंडे व विजयनगर येथील राजांनी मिळून अहमदनगरवर स्वारी केली, तेव्हा हुसेनशाहाने सर्वांशी तह केला. नंतर विजयनगर साम्राज्याचा समूळ उच्छेद करण्यासाठी सर्व मुसलमान शाहांनी एक होऊन प्रचंड सेनेसह त्याच्यावर स्वारी केली. इ. स. १५६५ साली तालिकोट म्हणजे राक्षसतंगडी येथे जंगी लढाई होऊन विजयनगरचा दारुण पराभव झाला. त्या लढाईत निजामशाहाच्या तोफखान्याने उत्तम कामगिरी बजावली.

हुसेनशाहानंतर इ. स. १५९४ पर्यंत मुर्तुजा, मीरान हुसेन, इस्माईल, बुरहाण व इब्राहिम हे निजामशाह गादीवर येऊन गेले. त्यांच्या वेळी राज्यात खूपच अंदाधुंदी माजली होती. इ. स. १५९४ साली अकबर बादशाहाचा मुलगा मुराद गुजरातचा सुभेदार होता. त्याने अहमदनगरवर स्वारी केली व शहराला वेढा दिला. त्या वेळी चांदबिबी नामक एका शूर स्त्रीने मोठ्या शर्थीने शहराचे रक्षण केले. चांदबिबी ही हुसेन निजामशाहाची मुलगी, विजापूरच्या अली आदिलशाहाला दिली होती. त्याच्या मृत्यूनंतर इ. स. १५१४ साली ती अहमदनगरला परत आली. तिने मोगलांच्या सैन्याची खूप कत्तल केली व त्यांनी पाडलेला तट रातोरात पुन्हा बांधून काढला. तेवढ्यात विजापूरची फौज आल्यामुळे मुरादने तहाची बोलणी सुरू केली. त्याच्या मागणीप्रमाणे चांदबिबीने त्याला वऱ्हाड दिल्यावर तो वेढा उठवून निघून गेला. मग चांदबिबीने बहादूरशाहा नामक मुलाला गादीवर बसवून स्वतः सर्व कारभार हाती घेतला. पुढे मोगलांनी पुन्हा निजामशाहीवर स्वारी केली, तेव्हा विजापूर व गोवळकोंडा यांच्या फौजा चांदबिबीच्या मदतीला आल्या. पण इ. स. १५९७ साली सोन पेठ येथे मोगलांचा जय झाला. पुढे इ. स. १५९९ साली मोगलांनी नगरचा किल्ला घेतला. त्यापूर्वीच चांदबिबीच्या एका फितूर सरदाराने तिचा खून केला होता.

त्यानंतर मियाँ राजू व मलिकंबर यांनी मोठ्या हिकमतीने दहा बारा वर्षांत निजामशाहीचा बराच मुलूख परत मिळवला. मलिकंबरने इ. स. १६२६ पर्यंत वजीर म्हणून उत्तम कारभार चालवला. उत्तरेतील तोडरमल्लाची जमीनधाऱ्याची पद्धत त्याने दक्षिणेत सुरू केली. त्याच्या हाताखाली जाधव, भोसले, वगैरे मराठे सरदारांनी पुष्कळ कामगिरी केली. मलिकंबरने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राज्यात खूपच शांतता व सुव्यवस्था स्थापन केली. मोगलांच्या अनेक सरदारांचा त्याने पराभव करून निजामशाहीचे संरक्षण केले. त्यात शहाजीराजे भोसले यांची त्याला खूप मदत झाली. मलिकंबरच्या मृत्यूनंतर कांही काळ शहाजीने निजामशाही तगवली. पुढे इ. स. १६२८ च्या सुमारास मोगलांनी निजामशाहावर स्वारी करून त्याचा पराभव केला. त्यानंतर काही वर्षे निजामशाही कशीबशी टिकली. पण इ. स. १६३३ मध्ये मोगलांनी ती पूर्णपणे बुडवली. त्यानंतरही शहाजीने काही वर्षे मोगलांशी झुंज करून निजामशाही वाचवण्याचा प्रयत्न केला. शेवटी शहांजहान वादशाहा स्वतः दक्षिणेत आला. विजापूरकरांनी शहाजीला बरीच मदत केली. पण वादशाही फौजेपुढे त्याचा टिकाव लागला नाही व त्याने तह केला. इ. स. १६३७ त शहाजी वादशहाला शरण गेला.

आदिलशाही – (इ. स. १४८९ ते १६८६) या राज्याचा संस्थापक अबुल मुज्फर युसुफ आदिलशाह हा तुर्कस्तानातील एका सुलतानाचा पुत्र असून, इ. स. १४५९ साली हिंदुस्थानात आला. बहमनी राज्यात महमूद गावान याच्या वेळी तो विजापूरचा सुभेदार होता. गावानाच्या मृत्यूनंतर त्याने विजापूरला स्वतंत्रपणे कारभार सुरू केला. त्याचा बहुतेक काळ लढाया करण्यातच गेला. त्याने गोव्यापर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. तो शूर व राजकरणपटू असून, विद्याकलांचाही भोक्ता होता. त्याने राजधानीत अनेक सुंदर इमारती बांधल्या, तसेच शहराभोवतालचा मजबूत तटही बांधला. त्याच्या दरबारात मराठे सरदारांना बराच मान व अधिकार मिळाला. त्याच्या वेळी मुख्य दप्तर मराठीत होते. त्याने १५१० पर्यंत राज्य केले.

ईस्माईल आदिलशाहा (इ. स. १५१० ते १५३४) – विजयनगर व वरीदशाही, निजामशाही, वगैरे मुसलमानी राज्ये, यांच्याशी याचा सतत संघर्ष चालू होता. त्यात त्याला अनेकदा जय मिळाला. त्याने उत्तम राज्यकारभार केला व राज्याचे वैभव वाढवले. तो न्यायी, दयाळू व कष्टाळू असून, संगीत व काव्य यांची त्याला फार आवड होती. तो इ. स. १५३४ त मरण पावल्यावर त्याची आई व प्रमुख सरदार आसदखान यांनी वडील मुलगा मल्लू याच्या ऐवजी लहान मुलगा इब्राहीम याला तख्तावर वसवले.

इब्राहीम (इ. स. १५३४ ते १५५७) – याचा वजीर आसदखान पराक्रमी, मुत्सद्दी, प्रामाणिक व राजनिष्ठ असून, त्याने राज्याचे चांगले रक्षण केले. विजयनगर, निजामशाही, कुतुबशाही यांच्यावर त्याने विजय मिळवले. आसदखानाच्या कर्तबगारीमुळेच विजापूरचे राज्य प्रबळ झाले. तो इ. स. १५४९ साली मरण पावल्यावर राज्यात पुष्कळ बंडाळी माजली. निजामशाहाने इब्राहीमशाहाचा पराभव केला. पुढे इब्राहीमशाहाला वेड लागले व इ. स. १५५७ त तो मरण पावला.

अली आदिलशाह (इ. स. १५५७ ते १५८०) – हा विद्वान व परोपकारी होता. त्याने विजयनगरच्या रामरायाची मदत घेऊन निजामशाही मलुखावर स्वारी केली व सर्व मुलूख उद्ध्वस्त केला. विजापूर, कुतुबशाही व निजामशाही यांचे युद्ध अनेक वर्षे चालू होते. मध्यंतरी सर्वांनी एक होऊन तालिकोट येथे विजयनगरचा मोठा पराभव केला खरा; पण पुन्हा त्यांचे आपसांतले झगडे चालू झाले. पोर्तुगीजांशीही त्यांच्या लढाया झाल्या. पण त्यांत पोर्तुगीजांनी त्यांचा पराभव केला. इ. स. १५८० साली आदिलशाहाचा खून झाला.

इब्राहीम आदिलशाह (दुसरा–इ. स. १५८० ते १६२७) – अली आदिलशाहाचा पुतण्या इब्राहीम हा त्यानंतर तख्तावर बसला तेव्हा तो नऊ वर्षांचा होता. प्रारंभी काही वर्षे चांदबिबी व कामिलखान यांनी कारभार केला. पण पुढे सरदारांची कपटकारस्थाने सुरू झाली व बेबंदशाही माजली. तेव्हा अहमदनगर व गोवळकोंडा येथील शाहांनी विजापूरवर स्वारी केली. पण अबुल हुसेन नामक शूर सरदाराने त्यांचा पराभव केला. त्यानंतर दिलावरखान याने काही वर्षे वजीर म्हणून चांगला कारभार केला. मग इब्राहीमशाहाने कारभार स्वतःकडे घेतला. त्याची कारकीर्द फार भरभराटीची व प्रजेला हितावह झाली. तो पराक्रमी होता, पण त्याला शांतता प्रिय होती. तोडरमल्लची जमीनमहसुलाची पद्धत त्याने आपल्या राज्यात चालू केली. तो धर्माच्या बाबतीत अकबराप्रमाणे उदार होता. त्याच्या कारभारात ब्राह्मण व मराठे यांचा पुष्कळ भरणा होता. त्याच्या वेळी पुष्कळ मोठमोठ्या इमारती बांधल्या गेल्या. तो इ. स. १६२७ साली मरण पावला.

महंमद आदिलशाह (इ. स. १६२७ ते १६५७) – इब्राहीमच्या मागून त्याचा मुलगा महंमद तख्तावर आला. त्याची कारकीर्द दक्षिणेच्या इतिहासात फार महत्त्वाची आहे. कारण मराठ्यांचा उदय याच काळात सुरू झाला. मोगलांच्या फौजेचा विजापूरच्या सरदारांनी एकदा पराभव केला; पण इ. स. १६३५ त शहाजहान बादशाहा स्वतः दक्षिणेत आला व त्याने विजापुरावर मोठी फौज पाठविली. तेव्हा महमदशाहाने बादशाहाशी तह केला. त्यात निजामशाहीचा पुष्कळ मुलूख आदिलशाहाला मिळाला व त्याने बादशाहाला मोठी खंडणी देण्याचे कबूल केले.

त्यानंतर महंमदशाहाने दक्षिणेकडील बंदोबस्तासाठी शहाजी व रणदुल्लाखान यांना पाठविले. त्याच वेळी इकडे शिवाजीने स्वराज्याचा उद्योग सुरु केला व अनेक किल्ले जिंकून घेतले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेव्हा महंमदशाहाने शहाजीस कपटाने पकडून कैदेत ठेवले. पण शिवाजीने मोगलांचा शह आणून त्याची सुटका केली.

अली आदिलशाह (दुसरा–इ. स. १६५६ ते १६७२)– महंमदशाह मरण पावल्यावर त्याचा मुलगा अली तख्तावर आला. त्याने शिवाजीशा बंदोबस्त करण्यासाठी अफझुलखानाला पाठवले, पण तो मारला गेला. मग अली शाहाने स्वतःच स्वारी केली. पण त्यालाही फारसे यश आले नाही. मग त्याने औरंगजेब बादशहाशी संगनमत केले. औरंगजेबाने जयसिंहाला मोठ्या फौजेसह दक्षिणेत पाठवले व आदिलशाहाने खवासखानाला पाठवले. शिवाजीचे सेनाबल कमी असल्यामुळे मुसलमानांच्या प्रचंड फौजेपुढे त्याचा निभाव लागेना. म्हणून त्याने जयसिंहाशी मैत्रीची बोलणी सुरू केली व त्याला आदिलशाहीवर स्वारी करायला प्रवृत्त केले. जयसिंहाने मग आपला मोर्चा तिकडे वळवला. पण विजापूरच्या फौजेने बादशाही फौजेचा पराभव केला.

अली आदिलशाह स्वतः कवी व विद्वानांचा आश्रयदाता होता. त्याच्या दरबारात अनेक फारसी कवी व हिंदू पंडित होते. तो इ. स. १६७२ त मरण पावला.

शिकंदर आदिलशाह (इ. स. १६७३ ते १६८६)– खवासखानानें अलीचा पाच वर्षांचा मुलगा शिकंदर याला तख्तावर बसवून सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. पण त्यामुळे दरबारात असंतोष माजला. शिवाजीने पन्हाळा किल्ला परत घेतला. औरंगजेबाचा सुभेदार बहादुरखान याच्याशी खवासखानाने तह केला. पण राज्यात अंदाधुंदी माजलेली पाहून दिलेरखानाने विजापूरवर स्वारी केली. मात्र तिच्यात त्याला अपयश आले. पुढे औरंगजेब स्वतः मोठी फौज घेऊन दक्षिणेत आला व इ. स. १६८६ साली त्याने विजापूर जिंकून शिकंदरशाहाला औरंगाबाद येथे कैदेत ठेवले. इ. स. १७०१ मध्ये तर त्याला विष घालून ठार मारण्यात आले. अशा प्रकारे सुमारे २०० वर्षे चाललेली विजापूरची आदिलशाही बुडाली.

कुतुबशाही.– (इ. स. १५१२ ते १६८७) बहमनी राज्याचा पूर्वेकडील भाग म्हणजे गोवळकोंड्याचा सुभा. महमूद गावान याने कुली कुत्ब–उलमुल्क याला तिथे सुभेदार नेमले होते. तो इराणातून इकडे आला होता व आपल्या कर्तबगारीने सुलतान महंमदशाहाच्या दरबारात वर चढला होता. कासीम बरीदचा अंमल सहन न झाल्यामुळे त्याने इ. स. १५१२ मध्ये गोवळकोंडा येथे स्वतंत्रपणे राज्यकारभार सुरू केला. तो पराक्रमी असून, त्याने पूर्वसमुद्रापर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. विजयनगर, बरीदशाही व आदिलशाही यांच्याशी त्याने अनेक युद्धे केली व त्यांचा पराभव केला. इ. स. १५४३ पर्यंत त्याने चांगला कारभार केला. पण शेवटी त्याचा खून झाला. मग त्याचा धाकटा मुलगा जमशीद याने तख्त बळकावले. तो इ. स. १५५० साली मरण पावल्यावर त्याचा धाकटा भाऊ इब्राहीम हा तख्तावर बसला. तो विजयनगरच्या रामरायाजवळ काही वर्षे राहिला होता. हुसेन निजामशाह व इब्राहीम आदिलशाह यांच्याशीही त्याची दोस्ती होती. याच्या दरबारात व लष्करात बरेच मराठे सरदार वर चढले होते. पुढे सर्व मुसलमान शाहांनी एक होऊन तालिकोट येथे विजयनगरचा पराभव केल्यावर त्यांचे आपसांत झगडे झाले. इब्राहीम शाहाने दक्षिणेतील अनेक हिंदू राजांचा पराभव केला. त्याने अनेक भव्य व सुंदर इमारती, मशिदी, तलाव व पाठशाळा बांधल्या. त्याच्या राज्यात व्यापाराची भरभराट झाली. तो न्यायी व कारभारात दक्ष होता.

महंमद कुली (इ. स. १५८० ते १६११)– इब्राहीम शाह मरण पावल्यावर त्याचा तिसरा मुलगा महंमद कुली हा तख्तावर बसला. याच्या दीर्घ राजवटीत लढाया पुष्कळ झाल्या. पण राज्यविस्तार मात्र झाला नाही. याने पुष्कळ वर्षे शांततेने कारभार केला, अनेक मशिदी व इमारती बांधल्या आणि भागानगर हे नवे शहर वसवले. राजधानीतही त्याने अनेक सुधारणा केल्या.

अब्दुल्ला हुसेन (इ. स. १६११ ते १६५८)– महंमद कुलीचा पुत्र अब्दुल्ला हुसेन यानेही दीर्घ काल शांततेने राज्य केले. त्याचा वजीर मीर जुम्ला हा मोठा मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध होता. तो इराणमधून आला होता. औरंगजेब दक्षिणचा सुभेदार असताना त्याचा व मीर जुम्लाचा स्नेह जमला. पुढे कुत्बशाहाशी याचे बिनसल्यामुळे तो औरंगजेबाकडे गेला. पुढे औरंगजेबाने गोवळकोंड्यावर स्वारी केली, तेव्हा कुत्बशाह त्याला शरण गेला. मोगलांना सालीना एक कोट रुपये खंडणी देण्याचे त्याने कबूल केले. तो शेवटपर्यंत मोगलांचा ताबेदारच राहिला.

अबू हसन (इ. स. १६५८ ते १६८७)– अबदुल्ला हुसेनच्या मागून त्याचा जावई अबू हसन गोवळकोंड्याच्या तख्तावर बसला. हा आळशी व विलासी असला, तरी त्याने राज्यकारभार चांगला केला. मदनपंत नामक एक ब्राह्मण त्याचा वजीर होता. त्याने राज्यव्यवस्था चांगली ठेवली. पण सेनापती इब्राहिम खान याला त्याचे वर्चस्व सहन झाले नाही. इ. स. १६८३ साली औरंगजेब दक्षिणेत आला, तेव्हा इब्राहीम खान त्याला फितूर झाला. त्या वेळच्या गडबडीत मदनपंत मारला गेला. अबू हसन याने मोठी खंडणी देऊन मोगलांशी तह केला (इ. स. १६८६). पण पुढच्या वर्षी औरंगजेबाने त्याचे राज्य खालसा करून आपल्या राज्याला जोडले. अशा प्रकारे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकशे पंचाहत्तर वर्षे चाललेल्या कुतुबशाहीचा अंत झाला.

महाराष्ट्राच्या दृष्टीने बहमनी राज्य व नंतरच्या पाच शाखा यांचे विशेष महत्त्व आहे. इ. स. च्या १५ व्या शतकात बहमनी वंशाची सत्ता सबंध महाराष्ट्रावर प्रस्थापित झाली. बहमनी राज्यकारभारात परदेशी मुसलमानांचे वर्चस्व होते. त्या काळी बरेच मुसलमान साधुसंत महाराष्ट्रात येऊन स्थायिक झाले. त्यांचाही प्रभाव महाराष्ट्राच्या जीवनावर पडला. पुढे या राज्याची शकले होऊन पाच राज्ये सुरू झाली. खानदेशात फारुकी घराण्याचे राज्य होते. इ. स. चे १६ वे शतक या सर्व मुसलमानी राज्यांच्या आपसांतील लढायांनी भरलेले होते. विजयनगरच्या वाढत्या सामर्थ्यामुळे त्या राज्यांना शह बसला होता. पण सर्वांनी एक होऊन विजयनगरचा मोठा पराभव केल्यामुळे एक विशाल साम्राज्य नष्ट झाले आणि इतिहासाला कलाटणी मिळाली.

इ. स. च्या १७ व्या शतकात बरेच मराठे सरदार मुसलमानी दरबारात राहून कर्तबगारी दाखवू लागले. त्यांनी मुसलमानी राज्ये राखली व वाढवली. शहाजी भोसले हा त्यांतील सर्वांत थोर पुरुष होय. त्याने निजामशाही व आदिलशाही या राज्यांची मोठीच सेवा केली. तथापि मोगलांच्या जबरदस्त आक्रमणापुढे ती मुसलमानी राज्ये टिकू शकली नाहीत. [बहमनी राज्याचा इतिहास–श्री. भ. ग. कुंटे, १९६६; हि. क. इं. पी. ६; मुसलमानी रियासत भाग १ – गो. स. सरदेसाई, १९२७; अहमदनगरची निजामशाही–श्री. कुंटे, १९६२]

बहार हिंदुस्थानी संगीतातील एक राग. याची जाती औडव संपूर्ण आहे. याच्या आरोहात ऋषभ व पंचम वर्ज्य आहेत. अवरोहात निषाद कोमल आहे. वादी–मध्यम. संवादी–षड्ज. आरोह स्वर– सा, ग, म, नि, धा, नी, सा. अवरोह स्वर सा, नि, प, म, प, ग, म, री, सा. या रागाचा अन्य रागांशी संयोग होऊन भैरव बहार, बागेश्री बहार, हिंदोल बहार, मालकंस बहार, बसंत बहार इ. मिश्र राग निर्माण होतात. गानसमय– रात्रीचा तिसरा प्रहर. [क. सं.; सु. वि. को.]

बह्वृच पतंजलीने ऋग्वेदाला बह्वृच म्हटले आहे. सर्वाधिक ऋचा त्यात असल्यामुळे त्या वेदाला हे नाव मिळाले. ऋग्वेदाच्या ज्या शाखा पतंजलीच्या भाष्यात आढळतात, त्यात बह्वृच ही एक शाखा आहे. तिला बह्वृचचरण असेही म्हणतात. ऋग्वेदाचा हा एक प्रसिद्ध चरण होता. 'एकविंशतिधा बाह्वृच्यम्' या पतंजलीच्या उल्लेखावरून त्याचे एकवीस भेद असल्याचे कळते. शतपथ ब्राह्मणात (१०.५.१.१०) व आपस्तंब श्रौतसूत्रांत बह्वृचांचा उल्लेख येतो. ऐतरेय व कौषीतकी या ब्राह्मणांत मात्र बह्वृच शाखेचे एकही अवतरण मिळत नाही. आपस्तंबाच्या उल्लेखावरून असे वाटते, की त्याच्या समोर बह्वृचांचा एखादा ब्राह्मणग्रंथ असावा. पण बह्वृच शाखेची संहिता आणि ब्राह्मण ही दोन्ही सांप्रत उपलब्ध नाहीत. वसिष्ठ गृह्यसूत्र हे बह्वृचांचे होते, असे कुमारिलभट्ट सांगतो (तंत्रवार्तिक १.३.११).

अन्नेन भोजयेत् श्राद्धे बह्वृचं वेदपारगम् ।

(मनु. ३.१४५)

अर्थ – श्राद्धात वेदपारंगत अशा बह्वृचाला भोजन वाढावे.

यावरून मनूच्या कालापर्यंत बह्वृचचरणाचा बराच बोलबाला असावा, असे वाटते. [पा. का. भा.; प. का. भा.]

बहिणाबाई (१६२९–१७०० इ. स.) एक सिद्धावस्थेला पोचलेली संत कवयित्री. हिचा जन्म वेरूळच्या पूर्वेस असलेल्या देवगावी झाला. हिच्या वडिलांचे नाव आऊजी व मातेचे नाव जानकी होते. आऊजी हा मौनसगोत्री, यजुर्वेदी ब्राह्मण असून, तिथे कुलकर्णपणाचे काम करीत असे. हिचे लग्न वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षीच झाले. हिचा नवरा रत्नाकर पाठक हा गौतमगोत्री, यजुर्वेदी ब्राह्मण असून बिजवर होता. हा शिवपूर (शिऊर) येथे राहत असून, जोसपणाचा व्यवसाय करीत असे. लग्नानंतर चार वर्षांनी बहिणाबाईच्या बापाला कर्ज झाले व त्या निमित्त तो बंदिखान्यात पडला. अशा वेळी त्याने आपल्या जावयास बोलावून घेतले व एका रात्री बंदिगृहातून निसटून तो सकुटुंब देवगावाहून बाहेर पडला. नंतर ही मंडळी फिरत फिरत रहिमतपूर येथे आली. तिथे दोन वर्षे राहून पुढे त्यांनी कोल्हापूर येथे वास्तव्य केले.

कोल्हापुरात ही मंडळी हिरंभट नावाच्या ब्राह्मणाच्या ओसरीत बिऱ्हाड करून राहिली. तिथे जयराम गोसावी यांची कीर्तने होत व बहिणाबाई ती ऐकायला जात असे. हिरंभटाला एक सवत्स गाय दान मिळाली होती. ती त्याने स्वप्नदृष्टांताप्रमाणे रत्नाकराला दिली. ती दोघे त्या गायीची जिवेभावे सेवा करू लागली. त्या गायीच्या वासराला बहिणाबाईचा खूप लळा लागला. ती कीर्तनाला गेली, की ते वासरूही तिच्या शेजारी जाऊन बसे. जयरामस्वामींनी ही गोष्ट पाहिली व बहिणाबाईचे व तिच्या वासराचे कौतुक केले. रत्नाकराला हे बायकोचे कौतुक रुचले नाही. घरी येऊन त्याने तिला बेदम मारले. हिरंभटाला या त्याच्या उन्मत्तपणाचा राग आला आणि त्याने रत्नाकराला आपल्या घरातून बिऱ्हाड उठविण्यास सांगितले. बहिणाबाईला मार बसला हे त्या वासराने पाहिले आणि त्या वेळेपासून त्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चारापाणी सोडले. थोड्याच दिवसांनी त्या वासराने प्राणही सोडला. या गोष्टीचे बहिणाबाईला अपार दुःख झाले. ती तीन दिवस बेशुद्ध पडली होती. त्यानंतर सातव्या दिवशी तुकोबांनी स्वप्नात येऊन तिला दर्शन दिले आणि मंत्रोपदेश केला.

त्या दिवसापासून बहिणाबाईला तुकारामासंबंधी ध्यास लागला. पुढे थोड्याच कालात तिला गर्भ राहिला. वस्तुतः या घटनेबद्दल रत्नाकराने आनंद मानून तिचे कोडकौतुक करायचे, पण तसे काही न करता आपल्यापेक्षा आपल्या बायकोलाच लोक वाखाणतात, मान देतात, हे पाहून तो बहिणाबाईचा छळच करू लागला. तिने तुकोबांचा ध्यास घेतला आहे, हे तर त्याच्या मत्सरालाच कारणीभूत झाले. पुढे एक दिवस त्याने बहिणाबाईचा त्याग करून निघून जायचे ठरविले.

पण आश्चर्याची गोष्ट ही, की त्याच दिवशी तो आजारी पडला आणि थोड्याच दिवसांत त्याचा ताप विकोपाला गेला. एक महिनाभर त्याची तळमळ व तगमग चालू होती. कोणतेही औषध लागू पडेना आणि शरीराचा दाह कमी होईना. त्यानंतर त्याची वृत्ती पालटली. आपण तुकारामाची निंदा केली आणि सात्त्विक व भक्तिमार्गी पत्नीला छळले, त्याचाच हा परिणाम असावा, असे त्याच्या मनाने घेतले. मग अनुताप पावून त्याने तुकोबाची मनोमन क्षमा मागितली. त्यानंतर त्याच्या आजाराला उतार पडला. मग तोही बहिणाबाईसारखाच तुकोबाचा भक्त बनला. थोड्याच दिवसांत सासूसासऱ्यांना गावी परत पाठवून ती दोघे व तिसरी त्यांची गाय यांनी देहूची वाट धरली. देहूला गेल्यावर त्यांनी मंबाजीच्या वाड्यात बिऱ्हाडासाठी जागा मागितली. पण ती दोघे तुकारामभक्त आहेत, असे समजल्यावर त्याने त्यांना जागा नाकारली. पुढे तर तो त्यांचा छलकच बनला.

तुकोबाने त्यांना आपल्या देऊळवाड्यात ठेवून घेतले. बहिणा-



बहिणाबाईच्या वृंदावनावरील मंदिर

बाईला तुकोबाचे नित्य कीर्तन ऐकायला मिळू लागले. तुको-बाच्या आशीर्वादाने ती भक्तीच्या मार्गावरून सुखाने प्रवास करू लागली. मंबाजीला या दंपतीचे बरे पाहवले नाही. त्याने एक दिवस तिच्या गायीला माजघरात बांधून घातले व तिला यथेच्छ झोडपले. त्यामुळे गावातले लोक खवळले आणि त्याला मारायला धावले; पण तुकोबाने मध्यस्थी करून त्याला वाचवले. देहू येथेच बहिणाबाई प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. तिने तिचे नाव काशी असे ठेवले. त्यानंतर तिला एक मुलगाही झाला. तिने त्याचे नाव विठोबा असे ठेवले. विठोबा हा कवी व कीर्तनकार झाला.

बहिणाबाईला तुकोबाच्या आशीर्वादाने कवित्वस्फूर्ती झाली. तीही सहजपणे पारमार्थिक विषयांवर अभंगरचना करू लागली. जे जे तिने लिहिले ते ते स्वतः अनुभवले. अद्वैत वेदान्ताचे शास्त्र आणि सिद्धांत तिच्या चित्तात कसे मुरून गेले होते, त्याची प्रचीती पुढील अभंगात पाहायला मिळते –

ब्रह्म तों अद्वय श्रुतीचे संमतें । वेगळी माया ते म्हणों केसी ॥
कोणासी पुसावे मायेचे ठिकाण । सद्गुरूवांचून सत्य जाणा ॥
सुवर्ण कांकण नाममात्र भिन्न । ज्ञानदृष्टी जाण ओळखावें ।
तोय तरंग एक भेद नाममात्र । ऐक्य हे सर्वत्र ज्ञानदृष्टी ।
सूत वस्त्र दोन्ही ऐक्यता सहजे । ज्ञानदृष्टी ओजें पाहिलिया ।
बहेणी म्हणे ऐसा पाहतां विवेक । सहजचि ऐक्य मायाब्रह्मीं ॥
सूर्याचिये अंगी भासले मृगजळ । सूर्य तो केवळ नेणे तया ॥
तैसी जाण माया ब्रह्मीच आभासे । परी स्पर्श नसे ब्रह्मत्वासी ।
चुंबकासंन्निध लोहासी भ्रमण । सूर्यसत्ते जन वर्ततसे ॥
बहेणी म्हणे ऐसा अनुभव पाहिजे । स्वसुखीं राहिजे निरंतर ।

बहिणाबाईने देहूच्या मुक्कामापर्यंत आपले आत्मचरित्र अभंगरूपाने वर्णिले आहे. त्यानंतर त्या दांपत्याची हालहवाल काय होती हे कळत नाही. विठोबा या तिच्या पुत्राच्या लेखनावरून ती दोघे परत शिऊरला गेली असावी, असे वाटते. बहिणाबाईला ७२ वर्षांचे आयुष्य लाभले. आपला निर्याणाचा दिवस जवळ आला, असे कळताच तिने विठोबाला आपल्या वर्तमान जन्मासह मागील तेरा जन्मांचा वृत्तांत सांगितला. या सर्व जन्मांत तिला स्त्रीजन्मच मिळाला होता. पंढरीचा विठोबाच पुत्ररूपाने तिच्या उदरी जन्मला आहे. हे जन्म काही अपवाद सोडल्यास बहुतेक महाराष्ट्रातच झाले आहेत.

बहिणाबाईचा शिष्यसंप्रदाय असला पाहिजे, असे श्री. द. सी. बेंद्रे म्हणतात. पंचीकरण महावाक्य या ग्रंथाचा कर्ता दीन कवी हा तरी तिचा एक शिष्य होताच. बहिणाबाईचा बारा अभंगांचा कवितासंग्रह श्री. उमरखाने यांनी प्रकाशित केला आहे. बहिणाबाईचा गाथा हा ग्रंथ श्री. कोल्हारकर यांनी प्रकाशित केला आहे. या ग्रंथात पदे, अभंग, इ. ४७१ कविता आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुकारामबुवा हेच आपले गुरू व त्यांचाच उपदेश आपण घेतला, ही गोष्ट आपल्या कवितेत बहिणाबाईने निःसंदिग्ध शब्दांत सांगितली आहे. असे असता समर्थ रामदासस्वामींच्या निर्याणानंतर १००–१२५ वर्षांनी लिहिल्या गेलेल्या काही समर्थ-चरित्रांत बहिणाबाईला समर्थशिष्या ठरवले आहे. श्री. पांगारकर यांना वरील मत मान्य आहे. तुकारामशिष्या बहिणाबाई व समर्थशिष्या बहिणाबाई या दोघी एकच आहेत, अशी ग्वाही ते देतात. पण श्री. वा. सी. बेंद्रे यांनी हे मत निराधार ठरवले आहे. [म. सं. क.; तु. सं. सां.]

बहिरा जातवेद (इ. स. चे १४वे शतक) एक संतकवी. याला बहिरा पिसा असेही म्हणतात. हा दशग्रंथी ब्राह्मण पैठण येथे राहत असे. त्याला परमार्थाची आवड मुळीच नव्हती; पण ती उत्पन्न होण्याचा एक प्रसंग त्याच्या घरातच घडला. एके दिवशी तो जेवायला बसला असता बायकोने केलेली आमटी त्याला फारच आवडली. तो बायकोला म्हणाला. 'यातली थोडी आमटी रात्रीसाठी राखून ठेव.' त्यावर ती आपल्या नवऱ्याचा सौम्य शब्दात अधिक्षेप करून म्हणाली. 'इतके जिव्हालौल्य चांगले नव्हे. या जिभेचे असे चोचले पुरवण्याऐवजी तिला हरिनामाची गोडी लावाल तर तुमच्या जन्माचे सार्थक होईल.'

बायकोचे हे बोलणे बहिरंभटाच्या जिव्हारी झोंबले. तत्काळ उपरती होऊन तो ईश्वरप्राप्तीच्या मार्गाला लागला. त्याने पारमार्थिक ग्रंथांचे खूप वाचन केले व काही साधनही केले. पण एवढे करूनही देव त्याला भेटला नाही. त्यामुळे त्याची बुद्धी भ्रमिष्ट झाली. अन्य धर्मात गेल्यावर तरी देव भेटतो का ते पाहावे म्हणून तो एका काझीकडे गेला व 'मला मुसलमान करून घे' असे त्याला म्हणाला. काझी भला माणूस होता. त्याने त्याला स्वधर्म न सोडण्याबद्दल आणि प्रत्येक धर्मात ईश्वर प्राप्तीचा साधनमार्ग सांगितला असून, त्या त्या धर्माच्या लोकांनी तदनुसार वागावे, असे खूप समजावले. पण बहिरंभटाला ईश्वरप्राप्तीची अत्यंत घाई झाली होती. त्यामुळे काझीचा उपदेश त्याला रुचला नाही. इस्लामी धर्मात एक अल्ला आणि दुसरे कुराण. त्यामुळे कुराण पाठ केले की अल्ला ताबडतोब भेटेल, अशी त्याने समजूत करून घेतली होती. तो जेव्हा काही केल्या ऐकेना, तेव्हा काझीने त्याला इस्लामी धर्माची दीक्षा दिली. तो मुसलमान झाला; पण सुंता मात्र त्याने करून घेतली नाही. थोड्याच दिवसांत त्याने कुराण मुखोद्गत केले; पण देव त्याला भेटला नाही तो नाहीच. मग मात्र तो वेडापिसा होऊन भटकू लागला. अखेर तो वडवाळसिद्ध नागेश या सत्पुरुषाकडे पोचला. त्याने बहिरंभटाला उपदेश करून शांत व समाहित केले आणि यापुढे 'तू कवित्व करून जगदुद्धार कर' असे सांगितले.

मग त्याने भागवताच्या दशम स्कंधावर ओवीबद्ध टीका लिहिली. आपल्या टीकेला भैरवी टीका असे नाव त्याने दिले. भागवताचा संस्कृत टीकाकार श्रीधर याला अनुसरून तो टीका रचीत असला, तरी काही ठिकाणी श्रीधराच्या संक्षिप्त वर्णनाचा तो खूप विस्तार करतो. श्रीकृष्णचरित्र हे रसभावनिधान आहे. ते वर्णन करताना बहिरंभटाच्या कवित्वाला सूक्ष्मता आणि विशेषता आली आहे. रचनेत अलंकारांची प्रचुरता असली, तरी तिच्यातला प्रसादगुण लोप पावला नाही. बालकृष्णाचे लाड करण्यात व त्याला न्हाऊमाखू घालण्यात यशोदा व गोपी कशा रंगून जात त्याचे वर्णन त्याने पुढील ओव्यांत केले आहे –

तुळी तुळी पाणी घालिता । जननी हात दे माथा ।
ते करचरण धूता । गोळा करूनी ।
ऐसा कृष्णु न्हाणिला । करोदके वोवाळीला ।
दोन्ही कानी फुंकिला । जगन्नाथ ।।
एकी कृष्ण पाउले दोन्ही । लाविली अपुल्या वदनी ।
एकी हृदय स्पर्शुनी । कुचावरी ।।
एकी चुंबिती कृष्णस्तन । तो खदखदा हास्यवदन ।
एकी उतरती लोण । एकी नाभी चुंबिती ।।

नेवाशाच्या पंचक्रोशीत असलेल्या, गोदातीरावरच्या घोगरग्रामी आपण ही भैरवी टीका लिहिली, असे कवी सांगतो. नेवासे येथील महालसा हे बहिरंभट कवीचे कुलदैवत होते. [प्रा. म. सं. क.; म. सा. सि.]

बहिर्मातृकान्यास अ पासून क्ष पर्यंतच्या अक्षरांना मातृका म्हणतात. त्यांच्या न्यासाला हे नाव आहे. बहिर्मातृका ही या न्यासाची देवता होय. या सर्व अक्षरमातृकांची मस्तकापासून पायापर्यंतच्या सर्व बाह्य अवयवांवर विधिपूर्वक स्थापना या न्यासात करायची असते. नंतर भारती देवीचे ध्यान करतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

बहिश्चर प्राण एक कल्पनाबंध. हा कल्पनाबंध लोकसाहित्यात, तसाच संस्कृत साहित्यातही आढळतो. अत्यंत प्रिय व्यक्तीला कौतुकाने बहिश्चर प्राण म्हणून उल्लेखितात. विशिष्ट व्यक्तीला आपला प्राण किंवा जीव बाहेर कुठल्यातरी झाडात, प्राण्यात किंवा अन्य कुठेतरी ठेवून जगता येणे, असा एक संकेत लोकविद्येत गृहीत धरलेला असतो. जीव कुडीत नसून तो कुठेतरी बाहेर ठेवलेला असला, की मग त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यक्तीला मारले, कापले तरी मरण यायचे नाही, असे समजतात. विशेषतः राक्षसांच्या ठिकाणी हे सामर्थ्य असते. महिरावणाचे पंचप्राण पाच मुंग्यांमध्ये ठेवलेले होते आणि त्या मुंग्यांना मारुतीने मारल्यानंतरच त्याचा नाश झाला. लोकसाहित्यातल्या राक्षसकथांत राक्षसाने एखादी सुंदर मुलगी पळवून आणून आपल्या वाड्यात कोंडलेली असते. तिला योगायोगाने एखाद्या राजपुत्राचे खिडकीतून दर्शन होते. तोही तिला पाहतो. दोघेही एकमेकांवर अनुरक्त होतात. तो तिला मुक्त करण्याची इच्छा करतो. मग ती मुलगी त्या राजपुत्राला राक्षसाचा जीव कुठे आहे ते सांगते. तो बहुधा एखाद्या पक्ष्याच्या शरीरात – विशेषतः पोपटात – असतो. राजपुत्र त्या पक्ष्याला हुडकून ठार मारतो. इकडे राक्षसही मरून पडतो. मग त्या राजकन्येला मुक्त करून तो राजपुत्र तिच्याशी लग्न करतो.

या कल्पनाबंधात थोडा भेद होऊन प्राणाच्या जागी काळीज आलेले दिसते. एखाद्या व्यक्तीला आपले काळीज कुठेतरी दूर सुरक्षित ठेवून जगता येते, असे लोकविद्येत मानलेले आहे. वानरिंद जातकात या प्रकारची कथा आहे. एका मगराच्या बायकोला वानराचे काळीज खाण्याचे डोहाळे लागतात. ते पुरविण्यासाठी मगर आपल्या एका वानर मित्राला फसवून आपल्या पाठीवरून पाण्यात नेतो. अर्ध्या प्रवाहात गेल्यावर मगर त्याला आपला हेतू सांगतो. तो ऐकून वानर चकित होतो. पण प्रत्युत्पन्नमती असल्यामुळे त्याला संकटमुक्तीचा मार्ग सुचतो. तो मगराला म्हणतो, 'आम्ही उड्या मारणारे प्राणी. आमचे काळीज आम्ही शरीरात ठेवू तर ते फुटून जाईल, म्हणून आम्ही ते नेहमी एखाद्या झाडाला लोंबकळत ठेवतो. तुला माझे काळीज हवे असेल, तर मला तीरावर घेऊन जा, म्हणजे मी ते तुला आणून देईन.' मगर फसतो. तो वानराला परत तीरावर आणतो. वानर लगेच एका झाडावर उडी मारून स्वतःला सोडवून घेतो.

हा कल्पनाबंध मूळचा भारतीय असून, पुढे तो अन्य देशांतल्या वाङ्मयात गेला, असे काही विद्वानांचे मत आहे.

बहिष्कार एखाद्याला जातीतून बाहेर काढणे, त्याच्याशी अन्नोदकाचा संबंध तोडणे, त्याला अस्पृश्य मानणे, त्याच्या हातचा खाद्यपदार्थ न घेणे आणि त्याला पंक्तीला न घेणे, या प्रकाराला बहिष्कार किंवा वाळीत टाकणे, असे म्हणतात. गुन्हेगाराला शासन व्हावे, त्याने पश्चात्ताप व्यक्त करावा व सामाजिक किंवा नैतिक अपराध पुन्हा करू नये, म्हणून ही बहिष्काराची योजना असे. पश्चात्तापपूर्वक धर्मशास्त्रात सांगितलेले किंवा पंचायतीने सांगितलेले प्रायश्चित्त घेतल्यावरच बहिष्कृत स्त्री-पुरुष शुद्ध होऊन जातीत परत येऊ शकत असत.

त्रैवर्णिकांत एखाद्या व्यक्तीला प्रायश्चित्त सांगून त्याच्यावरचा बहिष्कार उठवणे हा अधिकार एखाद्या शंकराचार्यांच्या पीठाकडे असे.

सूत्रकाळात त्रैवर्णिकांपैकी एखाद्याचे निर्दिष्ट काळात उपनयन न झाल्यास त्याला बहिष्कृत करीत असत. अशा संस्कारहीन लोकांना व्रात्य म्हणत व त्यांच्याशी सामाजिक व धार्मिक संबंध तोडून टाकीत. यवन, म्लेच्छ, चांडाळ, इ. लोकांच्या हातचे अन्नोदक घेतल्यास किंवा पतित व्यक्तीशी संबंध ठेवल्यास किंवा व्यभिचारादी महान नैतिक अपराध केल्यास अशा व्यक्तीवर बहिष्कार टाकण्याची पद्धत अव्वल इंग्रजी अमदानीपर्यंत चालू होती. समुद्रप्रवासही बहिष्काराला कारणीभूत ठरत होता. लो. टिळक परदेशप्रवासाहून परत आल्यावर त्यांनाही पुण्यातल्या धर्मशास्त्र्यांनी प्रायश्चित्त घ्यायला लावले होते.

अशा बहिष्काराला कायद्याने बंदी असली, तरी अजूनही कित्येक जातीजमातींत ही बहिष्काराची किंवा वाळीत टाकण्याची पद्धत रूढ आहे. जातीजमातींत हा अधिकार पंचायतीकडे असतो. पंचायत अशा अपराधी स्त्री-पुरुषांना वाळीत टाकते, त्यांच्याकडून दंड वसूल करते आणि कमीअधिक कठोर प्रायश्चित्तही देते. [चा. सं. प्र.; मु. वि. को.; पु. न. सं. वृ. ३]

बहिष्पवमान यज्ञप्रसंगी गायिले जाणारे एक स्तोत्र. हे स्तोत्र अग्निष्टोमात सामगान करणारे ऋत्विज गातात. यात नऊ ऋचा असून प्रत्येक सामाचे प्रस्ताव, उद्‌गीथ, प्रतिहार, उपद्रव व निधन असे पाच भाग असतात. या स्तोत्राचे गान चालू असता, त्याचे सर्वांनी श्रवण करावे, असे श्रुतींत सांगितले आहे. [हि. ध.]

बहुचरा एक देवी. अहमदाबाद – दिल्ली लोहमार्गावरील कलोल स्थानकापासून बेचराजी गावापर्यंत एक वेगळा लोहमार्ग जातो. बेचराजीपासून जवळच बहुचरा देवीचे मंदिर आहे. ते पूर्वाभिमुख व प्रशस्त असून, एका उंच चौथऱ्यावर बांधलेले आहे. या मंदिरात देवीची मूर्ती नाही. मुख्य पीठावर बालयंत्र काढलेले आहे. मंदिरासमोर एक अग्निकुंड आहे. या मंदिराच्या मागे एका वृक्षाखाली देवीचे मूल स्थान असून, तिथे एक स्तंभ उभारलेला आहे. मंदिराजवळच एक तळे आहे, त्याला मानसरोवर असे नाव आहे. या सरोवरात स्नान करून लोक देवीच्या दर्शनाला जातात.

गुजरातेत या देवीचे माहात्म्य विशेष आहे. ती पुष्कळ लोकांची, विशेषतः औदीच्य ब्राह्मणांची कुलदेवी आहे. प्रत्येक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

पौर्णिमेला व नवरात्रात बेचराजी येथे मोठी यात्रा भरते. त्या-वेळी दूरदूरचे लोक नवस फेडण्यासाठी तिथे जातात. ही देवी



बहुचरा देवीचे मंदिर

भूतबाधा नष्ट करते, अशी भक्तांची श्रद्धा आहे. यात्रेत भवाईंचे खेळ होतात.

गुजरातेत या देवीविषयी एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी–

काही चारण स्त्रिया सुलखणपुराहून जवळच्या गावी जात असताना लुटारूंच्या तावडीत सापडल्या. त्यांच्यांत बहुचरा-नामक एक शूर स्त्री होती, तिने एका मुलाजवळून तलवार हिसकावून घेतली व स्वतःची वक्षस्थळे कापली. त्यामुळे ती तत्काळ मरण पावली. तिच्या हौतात्म्यामुळे लोक तिला देवी मानू लागले.

या देवीचे काही भक्त स्वतःला नपुंसक बनवून स्त्रीवेष धारण करतात व स्त्रियांसारखे वागतात. [कल्याण – तीर्थांक]

बहुपतिप्रथा स्त्रीला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पती असणे, या प्रथेला बहुपतिप्रथा असे नाव आहे. ही प्रथा प्राचीन काळी प्रचारात होती. त्या वेळी मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती आणि स्त्रीला लैंगिक बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य होते. वैदिक संहितांच्या काळापर्यंत ही प्रथा बंद झाली होती आणि तिची स्मृतीच काय ती उरली होती. तैत्तिरीय संहितेत (६.६.४.३) सांगितले आहे, की एका यूपाला दोन रशना बांधतात; म्हणून एका पुरुषाला दोन स्त्रिया करायला हरकत नाही. परंतु एक रशना दोन यूपांना बांधीत नाहीत; म्हणून एका स्त्रीला अनेक पती करता येत नाहीत. अशा अर्थाचे वचन ऐतरेय ब्राह्मणातही आहे (१२.११)

पौराणिक काळात बहुपतित्वाचे एकच उदाहरण सापडते आणि ते म्हणजे द्रौपदीचे. धर्म, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हे पाच पांडव द्रौपदीचे पती होते, असे महाभारतात सांगितले आहे. पण महाभारतातच या गोष्टीला तीव्र विरोधही केलेला आढळतो. पांडवांनी भिक्षा आणली आहे, असे समजून कुंतीने ती सर्व भावांना वाटून घ्यायला सांगितली. पण ती भिक्षा एका स्त्रीची आहे असे समजताच कुंतीला आपल्या आज्ञेचे फार दुःख झाले, असे तिथे म्हटले आहे. धृष्टद्युम्न हा द्रौपदीचा भाऊ त्यानेही युधिष्ठिराला म्हटले, की ' हे कुरुनंदना, एका राजाला अनेक राण्या करायला हरकत नाही, असे शास्त्रवचन आहे; पण एका स्त्रीला अनेक पती असल्याचे मात्र ऐकिवात नाही. तू धर्मज्ञ व पुण्यवान आहेस. तेव्हा लोकविरुद्ध आणि वेदविरुद्ध असे हे वर्तन तुला योग्य नव्हे '(म. भा. आदि. १९५.२७-२९). धृष्टद्युम्नाच्या या विरोधाला समर्पक उत्तर देणे युधिष्ठिराला फार कठीण गेले. तो एवढेच म्हणाला, की 'आम्हांला याची गती माहीत नाही. परंपरेने पूर्वजांनी घालून दिलेल्या मार्गाचेच आम्ही अनुसरण करीत आहो.' असे म्हणून त्याने आपल्या कृत्याच्या समर्थनार्थ दोन पौराणिक उदाहरणे दिली ती अशी–

(१) पूर्वी जटिला नामक स्त्रीने सात ऋषींशी विवाह केला होता. (२) वार्क्षी नावाच्या मुनिकन्येने प्रचेता नामक दहा भावांशी विवाह केला होता.

एका स्त्रीने पाच पुरुषांशी लग्न करणे ही गोष्ट शास्त्रविरुद्ध, तशीच लोकविरुद्धही आहे, हे महाभारतकारांना जाणवत होते असे दिसते. जेव्हा शास्त्रवचनाने द्रौपदीच्या पंचपतित्वाचे समर्थन करता येत नाही असे त्यांना दिसले, तेव्हा त्यांनी तिच्या पूर्वजन्माची एक कथा निर्माण करून तिच्यावरच्या दोषांचे परिमार्जन केले. कुमारिलभट्टाने आपल्या तंत्रवार्तिकात द्रुपदाला सदृशरूप अशा पाच कन्या होत्या आणि त्यांपैकी एकेकीचा एकेका पांडवाशी विवाह झाला होता, अशी या विवाहाची निराळीच उपपत्ती दिली आहे.

मध्ययुगात तर बहुपतित्वाची केवळ स्मृतीच राहिली होती. स्मृतिचंद्रिकेत बृहस्पतीचे एक वचनच उद्धृत केलेले आहे, की 'कुलाला कन्या प्रदान करायची हे अन्य देशांत ऐकले आहे, भारतात नाही.' यावरून, भारतातील उच्च वर्णांत बहुपतिप्रथा बंद झाली होती, हे कळून येते. पण काही जातींत त्यानंतरही ही प्रथा चालू राहिली आणि काही जातींत ती अजूनही चालू आहे.

या प्रथेचे दोन प्रकार आहेत. पहिला मातृसत्ताक कुटुंब-पद्धतीत आढळतो. या पद्धतीत स्त्री ही गृहस्वामिनी व संपत्ती-चीही स्वामिनी असते. ती अनेक पती करू शकते. या पद्धतीत

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संतती आणि संपत्ती ही दोन्ही मातेच्या नावावरूनच ओळखली जातात. केरळातील नायर लोकांत ही प्रथा प्रचलित होती. सांप्रत ती लुप्तप्राय झाली आहे. दुसरा प्रकार पितृसत्ताक कुटुंब-पद्धतीतला. या प्रकारात एका स्त्रीचा अनेक भावांशी विवाह होऊ शकतो आणि ती पतिगृही राहते. तिला झालेली सर्व संतती ही ज्येष्ठ भावाची मानली जाते. ही प्रथा कुमाऊं, गढवाल, चंबा, कुलू किंवा किन्नरदेश व जौनसारबावर, इ. हिमालयाच्या पायथ्या लगतच्या प्रदेशांत अस्तित्वांत आहे. तसेच सिक्कीम, तिबेट व लडाख या प्रदेशांतही ती प्रचलित आहे. या प्रथेची चार रूपे आढळतात, ती अशी –

(१) बावर प्रदेशात ही प्रथा शुद्ध रूपात दिसते. इथे कुटुंबातील सर्व भावांची मिळून एकच पत्नी असते आणि ती क्रमाने एकेका भावाबरोबर रात्रीचा सहवास करते. जो भाऊ परगावी गेला असेल, त्याच्या बाबतीत क्रमाचा विशेष विचार करीत नाहीत. पत्नीबरोबर रात्रीच्या वेळी सहवास करण्याचा क्रम मोठ्या भावापासून सुरू होतो.

(२) जौनसार प्रदेशातील खस लोकांत, कुटुंबातील मोठ्या मुलाचे लग्न होते व त्याची पत्नी ती त्याच्या बाकीच्या भावांचीही पत्नी होते. सर्व भावांचा पत्नीवर समान हक्क असला, तरी प्रत्यक्षात मोठ्या भावाचा तिच्यावर विशेष अधिकार असतो. मोठा भाऊ घरात असताना लहान भावांना तिच्याशी समागम करता येत नाही. ते दिवसा शेतात किंवा रानात तो समागम घडवून आणतात. मोठा भाऊही त्यांना तशी संधी देतो. काही वेळा, स्त्रीच्या लग्नानंतरही तिच्या पतींना भाऊ होतात. तेही मग तिचेच पती होतात. या लहान पतींना तिला अंगाखांद्यावर खेळवावे लागते. ते जेव्हा वयात येतात, तेव्हा कुटुंबातली कायद्याने त्यांची पत्नी असलेली स्त्री वयाने प्रौढ झालेली असते. मग त्या धाकट्यांच्या कामतृप्तीसाठी काहीतरी निराळी व्यवस्था करणे भाग पडते. अशा वेळी मग ती गृहिणी त्यांच्यासाठी दुसऱ्या मुली शोधते. पुष्कळदा सहपत्नी म्हणून ती आपल्या बहिणींचीच निवड करते. एखाद्या भावाला जरी स्वतंत्रपणे लग्न करण्याची इच्छा झाली, तरीही त्याच्या नियोजित वधूचा आधी मोठ्या भावाशी विवाह होतो व मग तो मोठा भाऊ तिला आपल्या भावाबरोबर राहायला परवानगी देतो. स्त्रीला आपल्या सर्व पतींना सारखेच संतुष्ट ठेवावे लागते. एखाद्या पतीच्या बाबतीत तिला विशेष आस्था दाखवता येत नाही. तसे केल्यास तिला घरातून घालवून देतात. कारण तिच्या अशा वागण्याने भावाभावांत फूट पडायचा धोका असतो.

कुटुंबातल्या त्या सर्वभोग्य पत्नीचा पहिला मुलगा सर्वांत मोठ्या भावाचा व दुसरा त्याच्याहून लहान भावाचा समजतात. पण मुलांना जेव्हा पित्याचे नाव विचारले जाते, तेव्हा ते आपल्या सर्व वडिलांची एक नामावळच उच्चारतात. स्त्रीला विवाहसंबंधापेक्षा अन्य संबंधाने झालेली मुले ही तिच्या मोठ्या पतीची समजली जातात.

खस लोक गावातील मुलींना किंवा माहेरवाशिणींना ध्यांटी व सासुरवाशिणींना रांटी असे म्हणतात. रांटीला आपल्या पतीं-व्यतिरिक्त इतर पुरुषांशी लैंगिक संबंध ठेवता येत नाही. पण ती माहेरी गेली, की तिला या सर्व सवलती मिळतात व तिचे पतीही त्या अवधीत गावातल्या ध्यांटींबरोबर समागमसुख उपभोगतात.

स्त्रियांच्या या स्वातंत्र्यामुळे त्यांना कुटुंबातील अस्थायी व्यक्ती मानण्याची प्रथा आहे. अनेक सवती असल्यास, एकोला घटस्फोट घेता येतो. रूपवती स्त्री जेव्हा आपल्या माहेरी जाते, तेव्हा विशेषतः ती पुत्रवती असल्यास, तिचा प्रियकर तिला घटस्फोट घ्यायला प्रवृत्त करतो. या प्रदेशात वंध्या स्त्रियांचे प्रमाण बरेच आहे. त्यामुळे लग्नानंतर बराच काळपर्यंत मूल न झाल्यास पतीही काही वेळा पत्नीचा त्याग करतो.

(३) सिरमौर प्रदेशातल्या या प्रथेत तिचे स्वरूप थोडे वेगळे आहे. घरात चार भाऊ असल्यास, पहिल्या दोन भावांची मिळून एक व दुसऱ्या दोन भावांची मिळून दुसरी पत्नी असते. तीन भाऊ असल्यास, पहिल्या दोघांची एक व तिसऱ्याची दुसरी पत्नी असते. जौनपुरातील काही गावांतही अशी प्रथा आहे. इथले लोक जौनसार बावरमधील लोकांना नावे ठेवतात. त्यांच्या मते तिथले लोक मोठ्या भावाच्या नावावरच सर्व बायका आणतात, ते बरोबर नाही. कारण लहान भावांसाठी लहान वयाच्या वधू पसंत कराव्या लागतात. पण त्यांचा विवाह मात्र वयाने खूप मोठ्या असलेल्या मोठ्या भावाशी होतो. या तीनही प्रदेशांत ब्राह्मण व राजपूत यांच्यांतही ही चाल आहे.

(४) खांई प्रदेशातील ही प्रथा फक्त गरीब लोकांतच आढळते. कारण प्रत्येक भावाला वेगळी पत्नी करण्यासाठी जो खर्च होतो, तो त्यांना परवडत नाही. इथले वधूपिते मुलींना विकतात, त्यामुळे वधू आणणे हे फार खर्चाचे काम असते. म्हणून अनेक भाऊ मिळून एकच पत्नी करतात. या प्रदेशातील मुलांचे विवाह तरुणपणीच करतात.

वरील प्रदेशात बहुपतिप्रथा का अस्तित्वात आली, त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगतात –

(१) अनेक भावांत मिळून एकच पत्नी केल्यामुळे भावा-भावांत भांडणे कमी होतात. प्रत्येक भावाला स्वतंत्र पत्नी असल्यास, जावांच्या कुरबुरीमुळे भावाभावांत सलोखा राहत नाही. ते वेगळे संसार मांडू इच्छितात व पैतृक जमिनीची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Y73(P15):1k
155M2J·6

वाटणी करण्याची वेळ येते. पहाडी प्रदेशात शेतीलायक जमीन अल्प असल्यामुळे तिचे तुकडे करण्याने कोणत्याही भावाला तिच्यावर आपली उपजीविका चालविणे कठीण होते. हे लक्षात घेऊनच इथल्या आर्थिक परिस्थितीला सर्वथैव अनुकूल अशी बहुपतिप्रथा त्या लोकांनी अस्तित्वात आणली.

(२) बहुपतिप्रथा असल्यामुळे स्त्रीला वैधव्य येण्याची भीती नसते. स्त्रीचा एखादा पती मरण पावला, तरी बाकीचे पती ह्यात असतात. काही कारणाने तिचे सर्व पती मृत्युमुखी पडले आणि तिला जर मूलबाळ नसले, तर ती दुसऱ्या एखाद्या ठिकाणी घरोबा करू शकते आणि मुलेबाळे असल्यामुळे किंवा अन्य काही कारणाने तिला आपल्या घरातच राहायचे असेल, तर पंचायत एखाद्या पुरुषाला तिचा पती म्हणून त्या घरात राहायला पाठवते. तो मग घराची सर्व व्यवस्था बघतो.

(३) सर्व भावांची एकच पत्नी असल्यामुळे स्त्रीला एक पुत्र झाला, तरी सर्व भाऊ आपल्याला पुत्रवान मानतात आणि संतुष्ट राहतात.

(४) बहुपतिप्रथा असल्यामुळे लोकसंख्येत फारशी वाढ होत नाही. पहाडी प्रदेशात शेती करण्याजोगी जमीन फारच कमी असल्यामुळे लोकसंख्या वाढली, तर सर्वांना पुरेसे खायला मिळणार नाही. शेती व तदनुषंगिक पशुपालन याशिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही. त्यामुळे लोकसंख्येत फारशी वाढ न होणे, हे इथे वरदानच मानले जाते.

इथली लोकसंख्या वाढत नाही, याचे आणखी एक कारण असे, की एकाच स्त्रीवर अधिक भार पडल्यामुळे तिची गर्भधारणेची शक्ती कमी होते. त्यामुळे स्त्रीला एखाददुसरेच अपत्य होते. गेल्या चार जनगणनांत जौनसार–बावरमधील लोकसंख्या फारच थोडी वाढली आहे, असे दिसून आले आहे..

(५) पहाडी प्रदेशातील जीवन अधिक संघर्षमय असते. इथली घरे उंच डोंगरमाथ्यावर असतात आणि घरापासून बऱ्याच अंतरावर त्यांची शेती असते. शेतात दर हंगामात खत घातले नाही, तर पीक चांगले येत नाही. हे खत स्वतः वाहून नेऊन शेतात टाकावे लागते. तसेच जमीन नांगरण्यापासून तो कापणीपर्यंत शेताची सर्व कामे घरीच करावी लागतात. त्यासाठी मनुष्यबळ अधिक लागते. त्यामुळे सर्व भावांनी एकत्र राहणे आवश्यक असते.

(६) जौनसार बावरमधील लोक स्वतःला पांडवांचे वंशज मानतात आणि त्यामुळे आपली बहुपतिप्रथा ही इतिहासप्रसिद्ध असल्याचे समजतात. त्यामुळे हे लोक आपली मुलगी अनेक भाऊ असलेल्या घरात देतात. कारण अशा घरी दिल्याने मुलीचे सौभाग्य अखंडित राहते.

केरळातील नायरांप्रमाणेच द. भारतातील ताडी काढणाऱ्या इरावन जातीतही ही पद्धत प्रचलित होती. सांप्रत त्यांच्यापैकी थोड्याच लोकांत ती उरली आहे. इरावनांत घरातील सर्वांत वडील भाऊ विवाहासाठी वधूगृही जातो. विवाहानंतर सर्व भाऊ वधूच्या उजव्या हाताला एका पंक्तीत बसतात. मग त्यांना गोड पेय देतात. त्यामुळे ते सर्वजण तिचे पती होतात. शेतातील कामे व्यवस्थित पार पाडण्यासाठी सर्व भाऊ एकत्र राहणे आवश्यक असते. कुटुंब एकत्र राहावे, म्हणून धंद्यासाठी निरनिराळ्या गावी राहणारे इरावन भाऊही एकच संयुक्त पत्नी करतात.

सांप्रत यांच्या बहुपतित्वाच्या प्रथेत थोडा बदल झाला असून साधारणपणे अनेक भावांऐवजी दोन भाऊ मिळून एक पत्नी करतात. मात्र आपल्या दुसऱ्या भावांच्या बायकांचाही ते उपभोग घेतात.

कूर्ग लोकांतही पूर्वी बहुपतिप्रथा होती. पण इ. स. च्या १९ व्या शतकाच्या प्रारंभी ती नष्ट झाली. पांडवांपासून आपण ही प्रथा घेतली, असे ते सांगत असत. काही कूर्ग लोक अद्यापही स्वतःला कोंतीदेशदवारू म्हणजे कुंतीच्या देशातले असे म्हणवतात.

नीलगिरीवरील तोड लोकांतही बहुपतिप्रथा प्रचलित आहे. काही वेळा दूरचे भाऊही एकच पत्नी वरतात. ते सर्व एका घरात न राहता वेगवेगळ्या गावी राहत असले, तरी चालते. अशा वेळी पत्नी आळीपाळीने त्यांतल्या प्रत्येकाकडे सुमारे महिनाभर राहायला जाते. मोठ्या भावाच्या संमतीशिवाय धाकटे भाऊ दुसरी पत्नी करू शकत नाहीत. साधारणपणे सर्व भावांत मिळून एकच पत्नी असली, तरी प्रत्येक भावाची पुन्हा एक स्वतंत्र पत्नी असतेच. किंवा सर्व भावांत मिळून अनेक बायका असतात.

नीलगिरीवरील कोटा लोकांत बहुपतिप्रथेसारखी दुसरी एक चाल आहे. एखाद्या कोटा पुरुषाचे सख्खे किंवा दूरचे भाऊही त्याच्या पत्नीशी लैंगिक संबंध ठेवू शकतात. एकदा एका पुरुषाने आपल्या भावाला आपल्या नवपरिणीत द्वितीय पत्नीपासून दूर व्हायला सांगितले. पण या सूचनेबद्दल त्याला फार मोठा दंड पंचायतीला द्यावा लागला व जातिबहिष्कृतही व्हावे लागले. जेव्हा स्त्रीचा पती रात्रीच्या वेळी कामासाठी बाहेर जातो, तेव्हा तो आपल्या एखाद्या भावाला तिच्याजवळ झोपण्यासाठी पाठवतो. कारण आसपासचे कुरुंब लोक आपल्यावर चेटूक करतील, अशी त्यांना भीती वाटते. तसेच एखादा पुरुष पतीचे कर्तव्य करण्यास असमर्थ असेल, तर त्याचे भाऊ त्याचे स्थान घेतात. एखादी मुलगी आईबापांनी पसंत केलेला मुलगा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

साकारूही शकते; पण आपल्या पतीच्या भावांना मात्र तिला नकारतां येत नाही. विधवा स्त्रीलाही तिच्या एखाद्या दिराशी पुनर्विवाह करायला सांगतात. तिने तसे न केल्यास नवऱ्याच्या संपत्तीवर व त्याने तिला दिलेल्या दागिन्यांवरही तिचा हक्क रहात नाही. स्त्रीला झालेली मुले वास्तविक कोणापासूनही झाली असली, तरी ती तिच्या पतीचीच मानली जातात.

कोटा लोक आपल्या आसपासच्या आदिवासी जमातींना लोखंडी अवजारे, लाकडाची भांडी व मातीचे घडे बनवून देतात. त्याशिवाय ते दुधाचा व्यवसाय व शेतीही करतात. या सर्व उद्योगांसाठी घरातील सर्व भावांनी एकत्र राहणे त्यांच्या व्यवस्थेत आवश्यक असते. [भा. वि. प.; हिं. सा. बृ. इ.; अंबादेव शास्त्री–संमेलनपत्रिका, लोकसंस्कृती अंक; आ. मा.]

बहुपत्नीप्रथा एका पुरुषाला एकाच वेळी एकापेक्षा अधिक बायका असणे, या प्रथेला बहुपत्नीप्रथा असे नाव आहे. वैदिक कालापासूनच भारतात एकपत्नीक विवाह-व्यवस्था प्रतिष्ठित झाली होती. पण असे असले, तरी बहुपत्नी-प्रथा फार प्राचीन काळापासून समाजात प्रचलित होती. मात्र सर्वसामान्य लोक ती त्याज्यच मानीत होते. बहुतेक राजेरजवाडे आणि श्रीमंत लोक एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह करीत.

प्रजेची मोठ्या प्रमाणात अपेक्षा हे अनेकभार्यात्वाचे मुख्य कारण आहे. क्षत्रियांना लढाईसाठी वीरांची आवश्यकता असे. शेतकऱ्यांना व कारागिरांना कामधंद्याकरिता पुष्कळ सह-काऱ्यांची गरज वाटत असे. भारतात वसाहतीला मुबलक क्षेत्र होते. त्याकरिता प्रजेंचा विस्तार जितका होईल, तितका पाहिजे होता. प्राचीन काळी लहान लहान राज्ये पुष्कळ असत. त्यांच्या आपसांत वारंवार लढाया होत. म्हणून राजघराण्यांवर निर्वंश होण्याची पाळी येई. त्याकरिता बहुप्रजेची वासना नित्य जागृत असे, हे बहुभार्यात्वाच्या चालीचे एक महत्त्वाचे कारण आहे, असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे.

रामायणकाली बहुपत्नीप्रथेचा बराच प्रचार होता. आर्य, वानर व राक्षस अशा सर्व राजांची विशाल अंतःपुरे होती. दशरथाला चार राण्या होत्या. त्याशिवाय त्याच्या अंतःपुरात साडेतीनशे स्त्रिया होत्या त्या वेगळ्याच. रावणालाही अनेक पत्न्या होत्या. राजा, देव व राक्षस यांच्या कन्यांनी समृद्ध अशा त्याच्या अंतःपुराला वाल्मीकीने स्त्रीवन अशी संज्ञा दिली आहे. सुग्रीव आणि वाली यांची अंतःपुरेही स्त्रियांनी भरलेली होती.

क्षत्रियांशिवाय ब्राह्मणांमध्येही कधी कधी अनेक स्त्रियांशी विवाह करण्याचा रिवाज होता. कश्यप ऋषीला आठ भार्या होत्या. विश्रवा मुनीनेंही दोन कन्यांशी विवाह केले होते. ही प्रथा धनिक वर्गातच प्रचलित होती असे दिसते. मध्यम आणि कनिष्ठ या वर्गात या प्रथेचा विशेषसा आढळ होत नाही.

अशा अनेक स्त्रिया सवती म्हणून घरात आल्या, की त्यांच्या-मध्ये कटकटी व ईर्ष्या-मत्सर सुरू होत असे. सवतीची मुले हा तर मत्सराचा मुख्य विषय असे. रामचंद्राला राज्याभिषेक होणार, हे कळल्यावर कैकेयीचा स्वार्थ एकदम वर उफाळून आला आणि मग पुढचे सर्व रामायण घडले.

आपल्या सर्व स्त्रियांना सदैव खूष ठेवणे, हे पतीला बहुधा जमत नसे. एखाद्या पत्नीने रुसून बसणे व राजाने तिची समजूत घालणे, ही अंतःपुरातील रोजचीच घटना असे. राजप्रासादात एक स्वतंत्र क्रोधागार बनविलेले असे. तिथे एखादी रुसलेली राणी अंगावरचे अलंकार फेकून देऊन आणि मलिन वस्त्र नेसून जमिनीवर आडवी पडून राही. राजा तिची समजूत घालण्या-साठी गेला, तरी ती त्याच्याकडे न बघता तशीच फुरंगटून राही. राजाने तिच्या मागण्या पुऱ्या करण्याचे शपथपूर्वक आश्वासन दिल्यावरच ती आपले तोंड उघडी.

राजघराण्यातील ही बहुपत्नीप्रथा म्हणजे राजपरिवाला एक नित्याचीच डोकेदुखी होऊन बसे. राष्ट्राच्या राजकीय जीवना-वरही तिचा वाईट परिणाम होत असे. व्यक्तिगत स्वार्थ साधण्यासाठी राजघराण्यात घात-प्रतिघात होत असत आणि त्यांची परिणती गृहयुद्ध, उत्तराधिकाऱ्यासंबंधी वाद व संघर्ष, दरबारातील कारस्थाने आणि कोणाची तरी हत्या यांत होत असे. रामचंद्राला अशी भीती वाटत होती, की एखाद्या वेळी कैकेयी आपल्या मातेला विषही द्यायला कमी करणार नाही.

इक्ष्वाकू कुलातील राजे भिन्न भिन्न परंपरा असणाऱ्या राज्यांतील राजकुमारींशी विवाह करीत. त्यामुळे अंतःपुरात परस्परविरोधी मतांच्या राण्या एकत्र येत. मग त्यांच्यांत स्वार्थासाठी संघर्ष चालत. या राण्यांच्या मागे त्यांचे हितसंबंधी लोकही असत आणि ते आपल्या मानलेल्या राजस्त्रियांना, स्वार्थासाठी करू नयेत त्या गोष्टी करायला लावीत. अशा प्रकारे अंतःपुरातील या कुटिल डावपेचांचा प्रभाव राष्ट्राच्या राजकीय जीवनावरही पडल्यावाचून राहत नसे.

महाभारतकालात आणि पौराणिक काळातही ही प्रथा पुढे चालू असलेली आढळते. पुराणातही अनेक राजांना अनेक पत्न्या असत, असे सांगितलेले आहे. मनूला दहा भार्या होत्या. बृहदश्व, कुवलाश्व, मांधाता, सोभरी काण्व, आत्रेय, प्रभाकर, ययाती, शशबिंदू, कृतवीर्य, दुर्दम, इ. राजांनीही अनेक स्त्रिया वरल्या होत्या.

राजाला एका वेळी चार स्त्रिया करायला परवानगी होती. त्यांना महिषी (पट्टराणी), परिवृत्ती (उपेक्षिता), वावाता

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(व्यक्तिश: राजाला प्रिय असलेली) व पालाकली (दरबारातील सर्वांत खालच्या अधिकाऱ्याची कन्या) अशी नावे होती.

अनेक स्त्रिया करण्याची प्राय: दोन कारणे संभवतात. एक म्हणजे प्रबल भोगेच्छा व दुसरे म्हणजे विपुल संततीची इच्छा. म्हणून पुरुषाची पहिली पत्नी ही धर्मपत्नी व त्यानंतरच्या पत्न्या या कामपत्न्या मानल्या जात असत. एकपत्नीत्व हे समाजात आदर्श मानले जात असे आणि कामभावनेने प्रेरित होऊन दुसरी स्त्री करणाऱ्या पुरुषाला समाजात मान मिळत नसे. त्याचा प्रभावही बहुपत्नीप्रथेचे थोडे नियंत्रण करीत होता. ही प्रथा ज्या ठिकाणी प्रचारात होती, तिथेही सर्वसाधारणपणे त्याचा अर्थ दोन किंवा तीन स्त्रियांपुरताच मर्यादित होता. उत्तर वैदिक काळात ही प्रथा अनुलोम विवाहाच्या रूपाने पुढे आली. पण धर्मशास्त्रकार व स्मृतिकार यांनी ती नियम म्हणून नव्हे, तर अपवाद म्हणून मान्य केली. मात्र पहिली पत्नी जिवंत असता दुसऱ्या स्त्रीशी विवाह करणे, हे स्मृतिकारांना निंद्यच वाटत असे. आपस्तंब सांगतो –

धर्मप्रजासम्पन्ने दारे नान्यां कुर्वीत ।
अन्यतराभावे कार्या प्रागग्न्याधेयात् ।

(आप. ध. सू. २.५.११-१२)

अर्थ – धर्म आणि प्रजा यांनी आपली पत्नी युक्त असता, पुरुषाने दुसऱ्या स्त्रीशी विवाह करता कामा नये. पण पत्नीच्या ठिकाणी धर्म व प्रजा या दोहोंपैकी एकाचा अभाव असता, अग्निहोत्र घेण्यापूर्वी पुरुषाने दुसऱ्या स्त्रीशी विवाह करायला हरकत नाही.

अनुकूल, मधुरभाषिणी, गृहकृत्यदक्ष, साध्वी व अपत्यवती पत्नीला टाकून देणाऱ्या पुरुषाला राजाने मोठा दंड करावा व त्याला योग्य मार्गावर ठेवावे, असे नारदानेही सांगितले आहे.

पुत्रप्राप्ती ही गृहस्थजीवनातील एक अत्यंत आवश्यक बाब आहे, असे मानून स्मृतिकारांनी पुत्रप्राप्तीसाठी पुरुषाला दुसरा विवाह करायला संमती दिली आहे व अशा विवाहाचे समर्थनही केले आहे. मनू म्हणतो, की पत्नी वंध्या असता आठ वर्षे व जिची अपत्ये जगत नाहीत, अशा पत्नीच्या बाबतीत अकरा वर्षे वाट पाहून पुरुषाने दुसरी स्त्री करावी. कौटिल्याने यात आणखी थोडी भर घातली आहे, ती अशी – जी स्त्री पहिल्या बारा वर्षांत केवळ मुलींनाच जन्म देते, अशा वेळीही दुसरी पत्नी करायला हरकत नाही.

अशा प्रकारे काही बाबतींत पुरुषाला दुसरा विवाह करायची सवलत मिळाली; पण या सवलतीचा पुढे दुरुपयोगही होऊ लागला. मध्ययुगात बहुपत्नीकत्व अधिक प्रमाणात रूढ झाले. अनेक स्त्रिया पदरी बाळगणे हे त्या काळी आर्थिक सुबत्तेचे व सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात असे. मध्ययुगातील राजांच्या अंत:पुरात शेकडो स्त्रिया असत. राक्षस व गांधर्व विवाह करून अनेक राजकुमारी व सुंदर स्त्रिया मिळवणे, हा अनेक राजांचा छंदच होता. नवसाहसांकचरित, विक्रमांकदेवचरित, बृहत्कथामंजरी, कथासरित्सागर, इ. तत्कालीन ग्रंथांत याबद्दलचे पुरावे मिळतात.

बंगालमधील कुलीन ब्राह्मणांत तर बहुपत्नीप्रथा फारच बोकाळली होती. काही कुलीन पुरुषांना पन्नास-साठ किंवा शंभरांहूनही अधिक बायका असत; तर सर्वसाधारण पुरुषाला विसापेक्षा जास्त स्त्रिया असत. पूर्व बंगालमध्ये अद्यापही ही प्रथा चालू आहे. असे असूनही कुलीन ब्राह्मणांत अविवाहित वृद्ध स्त्रियांची संख्या पुष्कळ आढळते. केरळातील नंपूतिरी ब्राह्मणांतही अनेक स्त्रियांशी लग्न करण्याची पद्धत आहे. सर्वसाधारणपणे घरातील मोठ्या मुलाचा विवाह जातीतील मुलीशी होतो आणि बाकीचे मुलगे नायर किंवा क्षत्रिय स्त्रियांशी संबंध करतात. त्यामुळे जातीत विवाह करणाऱ्या पुरुषांची संख्या थोडी राहते व जातीतील स्त्रियांची संख्या वाढून बहुपत्नीकत्वाला प्रोत्साहन मिळते आणि तरीही अनेक स्त्रियांना जन्मभर अविवाहितच राहावे लागते.

बहुपत्नीप्रथा का अस्तित्वात आली, त्याची काही मूळ कारणे पुढीलप्रमाणे आहेत – (१) अधिक पुत्रांचे धार्मिक महत्त्व. (२) बालविवाह. (३) स्त्रियांमधील शिक्षणाचा अभाव. (४) स्त्रीच्या ऋतुकालातील आशौचाचा सिद्धांत. (५) स्त्रिया या शूद्रांप्रमाणेच आहेत, हे समीकरण. (६) स्त्रियांचे पुरुषांवर नितांत अवलंबून असणे आणि (७) पुरुषांची प्रबल भोगेच्छा.

काही आदिवासी जमातींतही एखाद्या पुरुषाचा सामाजिक दर्जा त्याच्या बायकांच्या संख्येवरून ठरविला जात असे व अद्यापही जातो. मुसलमान लोकतांही एकीपेक्षा जास्त बायका करण्याची पद्धत आहे. अधिकांत अधिक चार बायका करण्याची परवानगी त्यांच्या धर्मात आहे. सांप्रत व्यक्तिस्वातंत्र्य, बदललेली आर्थिक परिस्थिती व बहुभार्याविरोधक कायदा, यांमुळे बहुपत्नीकत्वाच्या चालीला आळा बसला आहे. [हिं. सा. बृ. इ.; भा. वि. प.; वै. सं. वि.; रा. का. स.; सं. आ. सो. हिं. इं.]

बहुरूपी एक भिक्षेकरी जमात. ही मुख्यत्वे महाराष्ट्रात आढळते. हे लोक नावाप्रमाणेच बहुविध रूपे म्हणजेच सोंगे घेऊन लोकांची करमणूक करतात व त्यांनी दिलेल्या द्रव्यातून आपला निर्वाह चालवितात. हे लोक मुख्यत्वे सुगीचे दिवस साधून खेड्यापाड्यांतून हिंडतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुपार टळून गेलेली असते, पुरुष माणसे कामधंद्याला गेलेली असतात आणि त्यांच्या बायका–मुली निवडण्या–टिपण्याची कामे पुढे घेऊन बसलेल्या असतात. अशा वेळी काहीशा बायकी आवाजात 'चला काकू, चला काकू' असे गाणे म्हणत बहुरूपी दारांत येतो. कुणाचे तरी लग्न ठरलेले असते, निमंत्रणे द्यायची विसरलेली असतात आणि ऐन वेळेला ते काम बहुरुप्याकडे आलेले असते, अशासारखे त्याचे बोलणे घाईचे असते. तो आया-बायांना म्हणतो –

लग्नाला चला तुमि लग्नाला चला ।
ठकुताई, साळुताई लग्नाला चला ।
चला काकू, चला काकू लग्नाला चला ।।

एवढी घाई करूनही बायका उठत नाहीत, असे पाहून तो त्यांना जेवणाचे वर्णन करून सांगतो –

जेवायला केली चिखलाची कढी ।
दगडाची वडी, मस्करी लोणचं ।
गाढवाचं भजं, तरसाच्या पोळ्या ।
लांडग्याची खीर, जेवायला चला ।
तुमि जेवायला चला ।।

असले विक्षिप्त व बीभत्स वर्णन ऐकून श्रोत्यांमध्ये हास्याची लकेर उठते. बहुरूपी मात्र लयबद्ध हालचाल करीत पुढे गातो–

हितं काय जेवायचं बाई । तितं काय खायचं न्हाई ।
तुमि मातुर आल्याबिगर भागायचं न्हाई ।
शनवारची लग्नं आईतवारची हळद ।
सोमवारी देवकार्य, मंगळवारी वरात ।
ढेकणांची मोटार, विंचवांचे टांगे-घोडे ।
लग्नाला चला, तुमि लग्नाला चला ।।

बहुरूपी अशी विनोदी गाणी म्हणतो. ती म्हणताना त्यांतील आशय जिवंत करण्यासाठी निरनिराळी वेषांतरे करतो, त्या त्या भूमिकेला साजेसा अभिनयही करतो आणि आवाजातही चढउतार करून आणलेले सोंग यथातथ्य वठवतो. कधी गर्भवती स्त्री, कधी बाळंतीण बाई, तर कधी तिचे रडणारे लहान मूल, अशा वेगवेगळ्या भूमिका तो करून दाखवतो; पशु-पक्ष्यांचे आवाजही हुबेहूब काढतो.

बहुरुप्यांच्या चालीरीती मराठा–कुणब्यांप्रमाणे असतात. हे लोक बहिरोबा, जानाई-जोखाई, खंडोबा, इ. देवतांना भजतात.

समर्थ रामदासस्वामींचे बहुरूपी म्हणून एक भारूड प्रसिद्ध आहे, ते असे –

खेळतो एकला बहुरूपी रे । पाहतां अत्यंत साक्षपी रे ।। ध्रु. ।।
सोंगें धरितां नानापरी रे । बहुतचि कळाकुसरी रे ।।
दाखवी अनेक धाता माता रे । बोलतो अभिनव वाता रे ।।
सदा पडदे लावितसे रे । फौजा सोंगांच्या दावितसे रे ।।
गातो नाचतो वाजवितो रे । त्यागकरतो देतो घेतो रे ।।
ऐसा हा भूमंडळी थोडा रे । पाहतां तयासि नाहीं जोडा रे ।।
अखंड खेळतो प्रगटेना रे । पाहती उदंड तयां दिसेना रे ।।
पाहों जातां अंतचि लागेना रे । दास म्हणे खेळतां भागेना रे ।।

गुजरात, पंजाब, इ. प्रदेशांतही बहुरुप्यांची वसती आहे. त्यांच्यापैकी काही बहुरूपीपणाशिवाय शेती, वेतकाम यांसारखे व्यवसायही करतात. [म. लो. उ.; बाँ. बे. क्राँ.]

बहुलावन

एक प्राचीन वन. हे व्रज मंडळातल्या बारा वनांपैकी चौथे वन होय. व्रजमंडळातल्या परिक्रमेचा तिसरा मुक्काम या वनात करावा लागतो. श्रीकृष्णाच्या गो-समूहातील बहुला गाईवरून या स्थानाला हे नाव मिळाले आहे. धर्माने सिंहाचे रूप घेऊन बहुलेची सत्त्वपरीक्षा ज्या ठिकाणी पाहिली ते हे ठिकाण, अशी समजूत आहे. या घटनेची स्मृती जिवंत राहावी म्हणून इथे बहुलेचे एक मंदिर बांधले आहे. या मंदिराजवळच कृष्णकुंड नावाचा एक तलाव आहे.

आज हे वन नष्ट झालेले असून, त्या जागेवर बाटी नावाचे गाव वसले आहे. हे गाव मथुरेपासून सात मैल अंतरावर येते. या गावाच्या पूर्वेला बलरामकुंड, दक्षिणेला मानसरोवर आणि मध्यभागी लक्ष्मीनारायणाचे मंदिर आहे. हे श्री संप्रदायाचे मंदिर आहे. इथे एका वृक्षातळी वल्लभाचार्यांची बैठक आहे.

या वनाच्या मार्गावर गणेशरा, दतिया, फेंचरी, इ. स्थाने लागतात. या भागात यक्ष, गंधर्व आणि दैत्य यांची वस्ती होती, अशी समजूत आहे. गणेशरा यथे एक गणेशमंदिर आहे. श्रीकृष्णाने आपल्या सवंगड्यांसह या गणपतीला गंधलेपनाचा कार्यक्रम केला, म्हणून या गणेशाला गंधेश्वर असे नाव मिळाले. दतिया किंवा दतिहा या ठिकाणी श्रीकृष्णाने दंतवक्त्राचा वध केल्याची किंवदंती आहे. फेंचरीला पूतना मावशी राहत होती, असे सांगतात. [ब्र. सां. इ.]

बहुलाव्रत

एक काम्य व्रत. भाद्रपद वद्य चतुर्थीला बहुला असे नाव आहे. त्या दिवशी हे व्रत करतात. त्याचा विधी असा – लहान मुली आणि स्त्रिया दिवसभर उपवास करतात आणि सायंकाळी नदीवर अथवा तलावावर जाऊन स्नान करतात. नंतर बहुला नामक सवत्स गाईची आणि एका सिंहाची वालुकामय प्रतिमा तयार करून त्यांची पूजा करतात. सायंकाळी सांतू आणि गूळ खाऊन उपवास सोडतात. व्रताचे फल – पुत्र व ऐश्वर्य यांची प्राप्ती. या व्रताची कथा अशी –

बहुला नावाची एक गाय होती. ती रानात चरत असता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एका सिंहाने तिच्यावर झडप घातली. तेव्हा गाय त्या सिंहाला म्हणाली. 'माझे तान्हे वासरू माझी वाट पाहत असेल, तेव्हा मी त्याला एकवार पाजते आणि परत येते. मग तू मला खा.' सिंहाने तिच्या शब्दावर विश्वास ठेवून तिला जाऊ दिले. गाय घरी आली आणि वासराला पाजून सिंहाकडे परत गेली. तिच्या या प्रामाणिकपणावर सिंह खूष झाला आणि त्याने तिला जीवदान दिले. [व्रतचंद्रिका]

बहेलिया एक प्राचीन फासेपारधी जमात. यांची बहुसंख्य लोकवस्ती उत्तर प्रदेशात आणि बंगालमध्ये आहे. बहेलिया हे नाव व्याध या संस्कृत शब्दावरून बनले असावे, असा पंडितांचा कयास आहे. हे लोक एखाद्या अनार्य टोळीचे वंशज असावे, असे म्हणतात. शिकार करणे, जाळे टाकून पाखरे पकडणे व कंदमुळे गोळा करणे हा त्यांचा उपजीविकेचा व्यवसाय आहे. हे काळूवीर, परिहार, हरदौल लाला, काळेदेव आणि मियाँ या देवांना भजतात. कोंबडी, बकरी अथवा डुक्कर यांचे बलिदानही करतात. कनिष्ठ दर्जाचे ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात. [एन्सा. रि. ए.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

बह्वृचोपनिषद एक नव्य उपनिषद. हे गद्य असून अत्यंत छोटे आहे. यात महात्रिपुरसुंदरी या देवीचे माहात्म्य वर्णिले आहे. एकटी महात्रिपुरसुंदरीच प्रारंभी होती. तिच्यापासून ब्रह्मा–विष्णु–महेश उत्पन्न झाले व चारही खाणी आणि चौऱ्यायंशी लक्ष योनी निर्माण झाल्या. सारे ब्रह्मांडच तिच्यापासून उत्पन्न झाले. ती सच्चिदानंदरूपिणी आहे. तिला बालांबिका, बगला, मातंगी, इ. अनेक नावे आहेत. ती म्हणजेच आत्मा व इतर सर्व अनात्मा होय.

'वाङ्मे मनसि' = वाणी माझ्या मनाच्या ठिकाणी आहे, हा या उपनिषदाचा शांतिमंत्र आहे. [श्री. सी. ग. देसाई]

बळाई एक जात. यांची वस्ती उ. भारतात आणि विशेषतः माळव्यात आहे. या जातीची संख्या फार मोठी आहे. हे शेतकरी गुलाम असावे, असे एक मत आहे. काही लोक यांना पूर्वास्पृश्य मानतात. यांच्यापैकी पुष्कळांनी वैष्णव धर्माची दीक्षा घेऊन मांसाहार वर्ज्य केला आहे. [भा. अ. प्र.]

बळिराणा महाराष्ट्रीय ब्राह्मणांतील एक लौकिक आचार. बाळंतिणी स्त्रिया अपत्यप्राप्तीच्या अकराव्या किंवा बाराव्या दिवशी हा आचरतात. यात एका पाटावर तांदूळ पसरून दोन बाहुल्या काढतात, त्यांना बळीराणा असे म्हणतात. त्याची पूजा करून, ज्या स्त्रीला मूल होत नसेल, तिला ते तांदूळ व थोडे तूप देऊन तिच्या ओटीत तो बळिराणा घालतात.

बळीनृत्य एक लोकनृत्य. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टमच्या परिसरातले कोंड व खोंड आदिवासी लोक हे नृत्य करतात. या नृत्यात केवळ पुरुषच भाग घेतात. देवीला रेडा बळी दिल्यानंतर त्याच्या भोवती फेर धरून हे नृत्य करतात. नर्तकांच्या केसांमध्ये पिसे खोवलेली असतात आणि प्रत्येकाच्या हातात झाडाची फांदी किंवा चाकू असतो. ही फांदी व चाकू ते नाचताना हवेत फिरवितात आणि मोठमोठ्याने किंचाळतात. [ए. हो. रा.]

बक्षी हंसराज (इ. स. चे १८ वे व १९ वे शतक) एक संतकवी. याचा जन्म बुंदेलखंडातल्या पन्ना राज्यात झाला. हा कायस्थ होता. पन्ना राज्यात गाजविलेल्या कर्तबगारीमुळे त्याच्या पूर्वजांना बक्षी ही मानाची पदवी मिळाली होती आणि तीच वंशपरंपरेने चालू राहिली. बक्षी हंसराज हा पन्नाच्या अमानसिंह महाराजांच्या दरबारातला एक सरदार होता.

लहानपणापासूनच त्याचा ओढा भक्तिमार्गाकडे होता. मोठेपणी तो सखीसंप्रदायात प्रविष्ट झाला आणि वृंदावन येथील संप्रदायाच्या मठाचा महंत बनला. विजयसखी नावाचा एक महंत त्याचा गुरू होता. त्याच्या आदेशानुसार हंसराजाने प्रेमसखी या टोपण नावाने अनेक ग्रंथ रचले. त्याच्या ग्रंथांची काही नावे अशी – सनेह – सागर, विरह – विलास, रायचन्द्रिका, बारमासा, चुनहारिनलीला, फागतरंगिनीलीला, मेहराजचरित्र, श्रीकृष्णजूकी पाती, जुगल स्वरूप पत्रिका.

सखीसंप्रदायाचे श्रीकृष्ण हे उपास्य दैवत हंसराजानेही आपले उपास्य दैवत मानले आणि आपल्या सनेह–सागर ग्रंथांत त्याच्या बाललीलांचे सरस व भावपूर्ण वर्णन केले. आचार्य शुक्ल यांनी हा ग्रंथ भाषेच्या दृष्टीने आदर्श असल्याचे म्हटले आहे. यशोदेचे वात्सल्य वर्णन करताना कवी म्हणतो–

तनक-तनक बछरन को लै के
तनक दूर तुम जइयो ।
जो मे दिन्ही कान्ह कलेऊ बैठ
जमुन तट खइयो ॥

भावार्थ – हे कृष्णा, रानावनात जाताना जपून जा. वासरांपासून फार दूर जाऊ नकोस. जेव्हा तुला भूक लागेल, तेव्हा मी दिलेली शिदोरी यमुनेच्या तीरावर बसून खा.

सनेह-सागर हे काव्य अशा अनेक भावनांनी भरलेले अतएव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

हृदयंगम आहे. [हिं. सा. को. २; श्री. वासुदेव गोस्वामी– विंध्यभूमी, जून, १९५६; भारती, डिसेंबर १९५९]

बांक एक जात. या लोकांची वस्ती बंगालमधील कालहंडी भागात आहे. ही जात लष्करी पेशावरून बनली आहे. यांच्यांत ब्राह्मण बांक, कुहार बांक अशांसारखे पोटभेद आहेत. हे लोक पूर्वी लुटारू म्हणून प्रसिद्ध होते; पण अलिकडे ते शेती करू लागले आहेत. तथापि यांच्यापैकी प्रत्येकजण आपल्याजवळ तलवार किंवा सुरा बाळगतोच. शस्त्र बाळगण्यासाठी त्यांना परवाना लागत नाही. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

बांकावती (इ. स. चे १८ वे शतक) उत्तर भारतातील एक हिंदी कवयित्री. हिला ब्रजदासी म्हणूनही ओळखतात. हिचा जन्म राजस्थानमधील जयपूर राज्याच्या लिवाण भागात कछवाह राजवंशात झाला. आनंदसिंह हे हिच्या पित्याचे नाव होय. कृष्णगढच्या राजसिंहाबरोबर वृंदावनात हिचा विवाह झाला.

बांकावतीने भागवताचा छंदोबद्ध अनुवाद दोहा व चौपाई या छंदांत केला आहे. काव्यदृष्टया या ग्रंथाचे फारसे महत्त्व नसले, तरी संपूर्ण भागवताचा अनुवाद म्हणून हिंदी साहित्यात त्याला महत्त्व आलेले आहे.

आजपर्यंत बांकावतीच्या नावावर एवढी एकच रचना होती, परंतु अलिकडे झालेल्या संशोधनावरून असे समजते, की सालवयुद्ध या नावाचा एक ग्रंथ व काही स्फुट पदेही हिने रचली आहेत. सालवयुद्ध या ग्रंथाला महाभारताचा आधार असून, तो ग्रंथ १७३ पदांत समाप्त झाला आहे. या ग्रंथावरून कळते, की बांकावती निंबार्क संप्रदायाची अनुयायी होती. कृष्णगढच्या समीप असलेल्या निंबार्क मठातील नारायणदेव हे तिचे दीक्षागुरू होत. [म. हिं. क.; मरुभारती, जानेवारी १९६६]

बाँकीदास (१७७१–१८३३ इ. स.) राजस्थानातला एक कवी. हा आशिया शाखेचा चारण होता. याचा जन्म जोधपूर राज्यातल्या भाडीवाबास या गावी झाला. वयाच्या १५ व्या वर्षापर्यंत त्याने आपल्या बापाकडे काव्याचे अध्ययन केले व नंतर जोधपुरातल्या अनेक गुरूंकडून काव्यशास्त्राचे अध्ययन केले. तो संस्कृत, फारसी, ब्रज व डिंगल या भाषा चांगल्या जाणत होता. त्याचे इतिहासज्ञानही विशाल होते. तो शीघ्रकवी होता. कोणतेही पद्य एकदा ऐकल्याने त्याला पाठ होत असे. त्याचे असे अनेक गुण जोधपूरचा महाराजा मानसिंह याच्या निदर्शनाला आल्यावरून, त्याने त्याला दरबारी कवी म्हणून आश्रय दिला; शिवाय एक जहागीरही दिली. त्याने बाँकीदासाला गुरू करून त्याच्याकडे काव्याचे अध्ययन सुरू केले. मानसिंहाने बाँकीदासाला आपल्या लेखावर उमटविण्यासाठी मुद्रा बनविण्याची आणि तिच्यावर मानसिंहाचा गुरू म्हणून स्वतःचा उल्लेख करण्याचीही अनुज्ञा दिली होती. त्याप्रमाणे बाँकीदासाने बरवै छंदात जी आपली मुद्रा निर्माण केली, ती अशी–

श्रीमन मान धरणि पति, बहु गुन रास।
जिन भाषा गुरु कीनौ, बाँकीदास ।।

बाँकीदास हा निर्भय आणि स्पष्टवक्ता होता. एके दिवशी त्याने मानसिंहाला सांगितले. ' तुम्ही राजकुमार छत्रसिंह याला शिकवण्याचे काम माझ्याकडे सोपविलेत; पण तुमचा मुलगा कुपुत्र आहे. तो विद्या शिकणार नाही आणि मला मात्र अपयश देईल. ' त्याची ही वाणी खरी ठरली. पुढच्या काळात छत्रसिंहामुळे मानसिंहाला अनेक आपत्ती सोसाव्या लागल्या.

बाँकीदासाची कीर्ती ऐकून उदेपूरच्या महाराण्याने त्याला आपल्याकडे येण्याचे आमंत्रण धाडले. त्या वेळी त्याने उत्तर दिले की ' त्रैलोक्याचे राज्य मिळाले तरी मानसिंह राजाला सोडून मी दुसरीकडे जाणार नाही. '

सूरछत्तीसी, सीहछत्तीसी, वीरविनोद, धवलपच्चीसी, नीतिमंजिरी, मावडिया मिजाज, संतोषबावनी, इ. २७ ग्रंथ बाँकीदासाने लिहिले असून, ते दोहे, सोरठे, इ. छंदांत आहेत. त्याची कविता डिंगल भाषेत असून, वीर हा त्याच्या कवितेतील प्रधान रस आहे. डिंगल कवींमध्ये बाँकीदासाची गणना प्रथम श्रेणीत होते. त्याच्या वीररसात्मक काव्यातले एक उदाहरण असे–

सूतौ थाँहर नींद सुख, सादूळौ बळवंत ।
वन कांठै मारग बहै, पग-पग हौल पड़न्त ।।
घाल घणाँ घर पातळा, आयौ थह में आप ।
सूतौ नाहर नींद सुख, पौहरौ दियै प्रताप ।।
केहर कुम्भ बिदारियौ, गजमोती खिरियाह ।
जाँणै काळा जळद सूँ, ओळा ओसरियाह ।।

अर्थ – बलवान सिंह आपल्या गुहेत सुखाने झोपला आहे. पण तेवढ्यानेच त्या वनाजवळून जाणाऱ्या मार्गावरून चालणाऱ्या हत्तीच्या मनात पावला पावलाला धडक भरते. अनेक घरांतल्या मनुष्यांचा नाश करून सिंह आपल्या गुहेत आला आणि सुखाने झोपला. तो झोपला असता त्याच्या प्रतापाने पहारा केला. सिंहाने हत्तीचे गंडस्थळ विदीर्ण केले आणि त्यातून गजमुक्ता बाहेर पडल्या. जणू काळ्या ढगातून बर्फाचे शुभ्रकण खाली गळत आहेत, अशा.

त्याच्या बहुतेक ग्रंथांत आणि विशेषेकरून नीतिमंजिरी

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS.

ग्रंथात नीतिविषयक विचार विखुरलेले आहेत. उदा०—

दाता धन जेतौ दिये, जस ते तो घर पीठ ।
जेतौ गुड़ लँ थाड़ियाँ, तेतो जीमण मीठ ।।

अर्थ— दाता जितके धन दानरूपाने देतो, तितकी त्याला यश-कीर्ती प्राप्त होते. जेवढा गूळ थाळीत घालावा तेवढे भोजन मिष्ट होते.

जीव दया पाली जकाँ, उजवालि निज आव
बनमाली कीधो बलू, पड़ी सुराली पाव ।

अर्थ— प्राण्यांवर दया करणाऱ्या माणसाचा श्रीकृष्ण सखा होतो आणि इतर देव त्याच्या पाया पडतात.

बांकीदासाच्या कवितेत प्रसाद गुण विशेषत्वाने आढळतो. [हिं. नी. वि.; ओ. नि. सं.; श्री. मदनमोहन शर्मा – अजंता, मे १९५७; रा. मा. सा.]

बाँडजश्न एक सामूहिक लोकनृत्य. या नृत्याचे प्रयोग काश्मीरमध्ये होतात. बाँड लोक मोठ्या जनसमुदायासमोर याचे प्रयोग करतात. ते रात्रभर निरनिराळी सोंगे आणतात आणि गातात व नाचतात. या नाचाला सनई व ढोल यांची साथ असते. यात भाग घेणारे लोक बहुतेक शेतकरी असतात. बाहथोर या गावी या नृत्याचा उगम झाला, अशी समजूत आहे. [म. क.]

बांडी द. कानडा जिल्ह्यातील एक जात. या जातीत युद्धात पकडलेल्या लोकांच्या मुलांचा, बाहेरून आयात केलेल्या गुलामांच्या वंशजांचा व वेश्यांच्या आणि व्यभिचारी स्त्रियांच्या मुलांचा भरणा आहे. या जातीतील लोकांनी आता उच्चवर्णीय लोकांच्या रीतिरिवाजांचा स्वीकार केला असून, ते स्वतःला कोकणी, देवडिग, भंडारी, काड-हविक किंवा काड-कोकणी असे म्हणवितात. उच्चवर्णीय लोकांकडे हे गडी म्हणून घरातली निरनिराळी कामे करतात. काही लोक शेती व सुतारकामही करतात.

यांच्यांपैकी बऱ्याचशा मुली वेश्यावृत्तीने राहत असल्यामुळे, यांच्यांत लग्ने करण्याचे प्रमाण फारच कमी आहे. यांचा लग्नविधी देवळ्यांप्रमाणे असतो. वारसा स्त्रियांकडून चालतो. यांच्यांत घटस्फोट रूढ आहे.

हे उच्चवर्णियांच्या देवदेवतांना व भुताखेतांना भजतात. शृंगेरी येथील स्मार्त मठाचा अधिपती हा त्यांचा गुरू असतो. हविक ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात.

पूर्वी हे लोक मृतांना पुरत असत, पण आता प्रेते जाळतात. यांच्यांत श्राद्धही करण्याची प्रथा आहे. [ट्रा. का. बाँ.]

बांदकर कृष्णंभट्ट (१८४४ ते १९०२ इ. स.) एक संतकवी. यांचा जन्म गोमंतकातील डोंगरी या गावी झाला. यांच्या वडिलांचे नाव जगन्नाथ व आईचे नरसाई असे होते. बांदकर सव्वा वर्षाचे असतानाच त्यांचे वडील वारले. त्यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या चुलत्याने केले.

बांदकरांना शिक्षणाची संधी मिळाली नाही. पण रामायण, भागवत व गीता यांच्या सतत वाचनाने त्यांनी संस्कृत भाषेचे थोडेबहुत ज्ञान करून घेतले. मराठीतले संतवाङ्मय अभ्यासून त्यांनी मराठीवर अधिकार मिळविला. लहानपणापासूनच भक्तिमार्गाकडे त्यांचा ओढा होता. मोठेपणी ते निरनिराळ्या देवस्थानांतून कीर्तने करू लागले. बायका-मुलांचा प्रपंच मोठा आणि निर्वाहाचे साधन तोकडे, यामुळे त्यांच्या जमा-खर्चाला मेळ बसेना. त्यामुळे त्यांनी वैराग्य घेतले. लगेच गुरूच्या शोधार्थ ते घराबाहेर पडले. वेंगुर्ले येथे विष्णुबुवा नावाचे एक सत्पुरुष त्यांना भेटले. त्यांनी बांदकरांना सांप्रदायिक पद्धतीने महावाक्याचा उपदेश केला. 'यापुढे तू आश्रमधर्म चालवून रामप्रभूच्या भजन-पूजनात निमग्न राहा,' असा गुरूचा आदेश मिळाल्यामुळे बांदकर परत आपल्या घरी आले. परत आल्यावर त्यांनी स्वतःच्या घरी रामाची मूर्ती स्थापन करून तिची नित्य सेवा सुरू केली. रामनवमीच्या उत्सवात ते पौराणिक नाटके स्वतः लिहून त्यांचे प्रयोग करवीत असत. शुकरंभासंवाद, लोपामुद्रासंवाद, नटसुभद्राविलास व अहिल्योद्धार अशी चार संगीत नाटके लिहून ती त्यांनी देवापुढे रंगभूमीवर आणली. त्यांच्या या संगीत नाटकांचा गोमंतकात खूप बोलबाला झाला.

कृष्णंभट्ट बांदकर

बांदकर गाण्याची कला जाणत होते. ते सुस्वर व प्रेमळ असे भजन करीत. भजनात ते स्वकृत पदेही म्हणत. त्यांची कविता सरस, सुबोध व परिणामकारक आहे. त्यांनी स्वात्मतत्त्वामृत-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शतक नावाचा एक पद्यग्रंथ लिहिला असून, तो वेदान्ताचा गाभा आहे, असे म्हटले तरी चालेल. घटपटादी खटपट न करता व पारिभाषिक शब्दांना महत्त्व न देता त्यांनी वेदान्तातील सिद्धान्त सोप्या भाषेत सांगितले आहेत. जीव हा आनंदस्वरूप असूनही त्याला भ्रम कसा होतो व तो सुख-दुःखाच्या द्वंद्वात कसा अडकतो या विषयी बांदकर सांगतात –

आनंद आपण असें न कळे मनातें ।
घेऊनि विस्मृति धरी विषयासि नातें ।।
की होय सौख्य तुज तें विषयांत आहे ।
वाटे उगा भ्रम तुझा तुज बाधताहे ।।
विषय कल्पुनि जें सुख भोगिसी ।
स्वरुप तेंचि तुझें परि नेणसी ।।
म्हणुनि दुःख अनावर वाटलें ।
तुजवरीच तुझें तम दाटलें ।।

गोमंतकात बहुतेक ठिकाणी देवाच्या उत्सवाची सांगता म्हणून गौळणकाला करतात. त्या काल्यासाठी बांदकरांनी दोन काले रचले असून, त्यांत त्यांनी गोकुळातल्या कृष्णलीलांचा अध्यात्मपर अर्थ सांगितला आहे. 'तू नाना प्रकारच्या खोड्या करून गोपींना व्यर्थ का सतावतोस ?' असे यशोदेने विचारल्यावर कृष्ण तिला सांगतो–

निर्विकल्प सच्चिदानंद मी नेणती या मातें ।
केवळ जडतनु शाश्वत मानुनि कल्पिति कामाते ।। ध्रु. ।।
मन्मूर्तिवरि बळकट प्रेमें लंपट मन करिती ।
विषयदृष्टिनें दिननिशि हा आकार हृदयिं धरिती ।।
दृश्य चराचर चिन्मय ऐसी वृत्ति न तिळभर ती ।
आत्मसुखास्तव आळविती बहुमत निष्कामाते ।।
यद्यपि चिद्घन तो मी या अबलांसि नसे ठावा ।
केवळ सगुणी पूर्ण जयांही धरिलें सद्भावा ।।
जाणुनि मी अवतारि होय मद्भक्तांच्या गांवा ।
माया ब्रह्मी सहज घडे हा स्फुरण धर्म मातें ।।
अवस्थात्रयातीत हरिन नवनीत कसा यांचें ।
जसा तसा असतांचि स्फूर्तिरूप जग नटलों साचें ।।
तंतूपट मृद्घट दृष्टांतें कारण कार्याचें ।
कर्ता कृष्ण जगन्नाथ नसुनि घे नामाते ।।

बांदकरांची एकंदर पद्यरचना ८०० च्या घरात जाईल. त्यांत कीर्तनाची आख्याने, अभंग, स्फुट श्लोक, इ. प्रकारांचा समावेश आहे. त्यांनी मानवी जीवनाची पंचसूत्री सांगितली आहे, ती अशी – (१) हवे असते ते मिळतेच असे नाही. (२) नको असते ते टळतेच असे नाही. (३) कर्तव्य करीत राहावे. (४) ईश्वरेच्छेने जे घडायचे ते घडेल. व (५) जे जाणायचे (ज्ञेय आत्मतत्त्व) ते जाणून घ्यावे. [सा. र. मा.]

बांदेकर वाणी एक जात. यांची वस्ती मुख्यतः रत्नागिरी, सावंतवाडी, गोवा व कारवार या भागात आहे. कुडाळ व बांदे ही सावंतवाडी तालुक्यातील दोन गावे होत. तिथे यांची बरीच वस्ती असल्याने ते आपणांला कुडाळे किंवा बांदेकर असे म्हणवून घेतात. याशिवाय यांना आर्यदक्षिणी वैश्य किंवा आर्य वैश्य असेही म्हणतात. या लोकांची मूळ वस्ती गोव्यात होती. तिथून ते सावंतवाडी भागात येऊन राहिले असेही सांगतात.

बांदेकर लोक आपणांस वैश्य म्हणवीत असले, तरी त्यांचे मराठ्यांशी रोटीबेटीव्यवहार होतात. त्यामुळे ते मूळचे मराठेच असावे, असे एक मत आहे. त्यांची अठरा गोत्रे आहेत. यांच्यांत सगोत्र विवाह होत नाहीत. वधूपित्याला पन्नास रुपयांपासून एक हजार रुपयां पर्यंत वरदक्षिणा द्यावी लागते. यांच्यांत विधवा-विवाह व घट स्फोट रूढ नाही. लग्नाच्या वेळी जानवे घालून मुंज झाली, असे समजतात. कऱ्हाडे, कोकणस्थ किंवा हविक ब्राह्मण यांचे उपाध्येपण करतात. यांना मांस-मासे चालतात; पण हे मद्य पीत नाहीत.

हे लोक प्रेते जाळतात. यांच्यांत श्राद्ध करण्याचीही प्रथा आहे.

बांबू एक वनस्पती. भारताच्या पूर्व भागात, विशेषतः बंगालमध्ये, मकर संक्रांतीच्या दिवशी वास्तुदेवता म्हणून बांबूची पूजा करतात. एखादे विघ्न किंवा संकट आल्यास ते निवारले जावे, म्हणूनही त्याची पूजा करतात.

पूजेच्या आदल्या दिवशी गाईच्या शेणाने जागा सारवून घेऊन त्या ठिकाणी पाने–फुले असलेला एक बांबू पुरतात. त्याच्याभोवती रांगोळी घालतात. बांबूला शेंदूर लावून त्याच्या भोवती नवे वस्त्र वेढतात. दूध आणि फळे यांचा नैवेद्य दाखवतात. गंभीर नामक उत्सवाच्या वेळी केलेल्या पूजेला अहर पूजा म्हणतात.

आसाम आणि छोटानागपूर या विभागांतील डोंगरी आदिवासी बांबूला देव मानतात. काही टोळ्यांमध्ये विवाहाच्या वेळी वधूवर बांबूला प्रदक्षिणा घालतात. काहीजण जमिनीत पुरलेल्या एका बांबूची, काही तीन बांबूंची आणि काही ज[illegible] बांबूच्या तुकड्याची पूजा करतात. उत्तर भारतातील खेड्यांत बहुतेक देवळांपुढे जमिनीत एक बांबू पुरलेला असतो. देवाला जेव्हा कंटाळा येईल, तेव्हा त्याला बसण्यासाठी म्हणून या बांबूची योजना असते. काही आदिवासी सीमेवरचा देव म्हणून गावाच्या सीमेवर एक बांबू पुरतात व दरवर्षी तिथे जत्राही भरवतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आसाममधील लुशाई लोक पावसाळ्यात बांबूच्या वनातून प्रवास करण्याचे टाळतात. [फोक लोअर, जून १९६५]

बांसफोड उत्तर प्रदेशातील एक जात. बांस म्हणजे बांबू; तो फोडून ते त्याच्या टोपल्या, पंखे, पेटचा वगैरे वस्तू बनवितात, म्हणून त्यांना हे नाव मिळाले आहे. ते भंगी-कामही करतात. बासोड आणि बासुहा या त्यांच्या दोन पोट-जाती आहेत.

देवधर्म – विंध्यवासिनी ही त्यांची मुख्य देवता असून कालिका, समाई, इ. स्थानिक देवतांनाही ते भजतात. विवाह आणि जन्म या प्रसंगी ते कालिका देवीला फुले, डुकराचे पिलू, दारू आणि दुधात व काकवीत शिजवलेला भात अर्पण करतात. समाई देवीलाही ते डुक्कर बळी देतात.

होळी आणि पावसाळ्यातील कजरी या सणांत ते खूप मजा करतात. स्त्री–पुरुष दारू पिऊन बेहोष होतात व हवा तसा गोंधळ घालतात. नागाला ते फार मान देतात. गुरिया नामक एका सणात मुली चिंध्यांच्या बाहुल्या बनवतात व त्यांना नागाचे प्रतीक मानतात. मुले त्या नागांना काठीने बडवतात व तळ्यात फेकून देतात. असे केल्याने सापांमधील दुष्टपणा निघून जातो, अशी त्यांची समजूत आहे. यांना भुताखेतांची फार भीती वाटते. म्हणून त्यांना संतुष्ट करण्यासाठी ते त्यांच्या नावाने अन्न ठेवतात. पितरांसाठी ते डुक्कर कापतात व घरा-तील माणसे तो शिजवून किंवा भाजून खातात. तसे न केल्यास पितरांचा कोप होतो, अशी त्यांची समजूत आहे. पिंपळ हे त्यांचे देवक असून, ते त्याची फांदी तोडीत नाहीत.

मूल जन्माला आल्यावर ते विहिरीची पूजा करतात. त्यांच्या धार्मिक विधींच्या वेळी कुटुंबातील किंवा जातीतील एखादा पुरुष पौरोहित्य करतो. [एन्सा. रि. ए.]

बाउरभाग एक शक्तिपीठ. एकावन्न शक्तिपीठांत याची गणना होते. हे स्थान आसाम प्रदेशातील शिलाँगपासून तेहतीस मैलांवर जयंतिया पर्वतावर आहे. इथे जयंती नामक देवीचे मंदिर आहे. या ठिकाणी सतीची डावी मांडी गळून पडली, अशी कथा आहे. त्या जागीच हे मंदिर बांधलेले आहे. [कल्याण–तीर्थांक]

बाउरी ओडिसाच्या गंजाम जिल्ह्यात व बंगालमध्ये आढळ-णारी एक अस्पृश्य जमात. हिला बाउरी किंवा बाथुरी असेही म्हणतात. तथापि खोडालो या नावाने हे लोक जास्त प्रसिद्ध आहेत. एके काळी पालखी वाहणे हा यांचा परं-परागत व्यवसाय होता, म्हणून ते स्वतःला भोई म्हणवून घेतात. त्यांच्याविषयी दोन दंतकथा प्रचलित आहेत, त्या अशा–

(१) देवांना नैवेद्य म्हणून दाखवलेल्या अन्नातील काही अन्न यांनी चोरायचा प्रयत्न केला; म्हणून यांना खालच्या जातीत जन्म मिळाला.

(२) वाहक नावाच्या ऋषीचे हे वंशज होत. एकदा एका लग्नाच्या मिरवणुकीत पालखी वाहण्याचे काम यांच्याकडे होते. ते काम आटोपून परत येताना त्यांनी रिकामी पालखी विकून टाकली व मिळालेल्या पैशांतून यथेच्छ मद्यपान केले. गुरूने त्यांना जाब विचारला. तेव्हा ते गुरूवरच हल्ला करायला धावले. तेव्हा गुरूने त्यांना शाप दिला, की तुम्ही नीच जातीत जन्माला याल.

बाउरींचे दुलिया व खंडी असे दोन विभाग असून, दुलिया स्वतःला खंडींपेक्षा श्रेष्ठ समजतात. दुलियांना खोडालो हे नाव अधिक आवडते. त्यांच्यापैकी काहींनी गोमांसभक्षण सोडले असून, ते स्वतःला दास खोडालो म्हणवतात व बल्लिगदास या साधुपुरुषाचे आपण वंशज असल्याचे सांगतात. याच विभागा-तील लोक इतर बाउरींचे पौरोहित्य करतात.

बंगालमधील बाउरींचे नऊ पोटभेद असून, त्यांच्यांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होतो. बगळा आणि कुत्रा ही दोन त्यांची देवके असून, ते त्यांची हत्या करीत नाहीत. एखाद्याच्या हातून त्यांची हत्या घडल्यास ते त्याला जातिबहिष्कृत करतात.

बंगालमधील बाउरी हे शाक्तपंथी आहेत. पश्चिम बंगाल-मधील बाउरी हे मनसा, भादू, मानसिंग, बडा पहाडी, धर्म, कुद्रासिनी, इ. देवतांना भजतात. मानसिंगाला बोकडाचा आणि बडा पहाडीला कोंबडयाचा बळी देतात. कुद्रासिनीला शनि-वारी किंवा रविवारी डुक्कर, कोंबडी, भात, साखर, तूप, इ. वस्तू अर्पण करतात. ओडिसामधील बाउरी ठाकुराणीला भजतात.

उद्योगधंदे – ओडिसामधील बाउरी सुपे, टोपल्या विणणे, शेती व शेतमजुरी करणे, इ. व्यवसाय करतात. बंगालमध्ये ते लाकूड तोडणे, गवंडीकाम, मजुरी, राखणदारी, घरकाम, इ. कामे करतात. काहीजण व्यापार व सावकारीही करतात.

ओडिसामध्ये काही बाउरी खेडयांच्या एका गटावर बेहर नामक एक प्रमुख असतो. त्याला दोघे मदतनीस असतात. तसेच प्रत्येक गावावरही भलोभय्या नामक एक मुख्य असतो. दोन किंवा तीन वर्षांनी एकदा सर्व ग्रामप्रमुखांची बैठक भरवतात व त्या वेळी व्यभिचार, नीच जातीच्या लोकांबरोबर सहभोजन, इ. गुन्ह्यांबद्दल गुन्हेगारांना दंड करतात. बेहराला प्रत्येक गावातून किंवा कुटुंबांतून वर्षाला काही रक्कम नियमितपणे मिळते व लग्नाच्या वेळी काही दक्षिणा मिळते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती झाली, की नव्या चटईवर बसवतात आणि एका विशिष्ट झाडाची पाने तिच्यावर टाकतात. सहा दिवस तिला गोडाचे जेवण घालतात आणि नातेवाईक स्त्रिया तिच्यासाठी अहेर आणतात. सातव्या दिवशी तिला तळ्यावर नेऊन स्नान घालतात.

विवाहप्रथा– बाउरी लोकांत मामेबहिणीशी लग्न करतात. लहान मुलामुलींचा लग्नसमारंभ सात दिवस, तर मोठ्या मुलामुलींचा चार दिवस चालतो. मुलाच्या आईवडिलांनी मुलगी पसंत केल्यावर, त्यांचा विवाह यशस्वी होईल का नाही, ते ब्राह्मणाला विचारतात. त्याने होकारार्थी उत्तर दिल्यास मुलीच्या घरी जाऊन साखरपुडा करतात. वरपित्याला वधूसाठी देज द्यावे लागते व वधूच्या आजीला नवीन वस्त्रे द्यावी लागतात. लग्नमुहूर्त नेहमी रात्रीचा असतो. लग्नाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी वधूवरांचे नातेवाईक गावातील ठाकुराणीच्या मंदिरात जातात. परत येताना सात घरांतून पाणी मागून आणतात आणि त्याचे पात्र विवाहवेदीवर टांगून ठेवतात. दुसऱ्या दिवशी सकाळी वधू–वर ते पाणी स्नानाला घेतात. लग्नाच्या दिवशी नवरा मुलगा आल्यानंतर वधूकडील मंडळी त्याचे स्वागत करतात व वधूचा भाऊ त्याला विवाहवेदीवर आणून बसवतो. मग भलोमय्या वधूपक्षाला वरपक्षाने द्यायचे ठरवलेले सर्व मिळाले का नाही, याची चौकशी करतो आणि ते मिळाल्याचे कळल्यावर वधूला आणायला सांगतो. मुलीचा मामा वधूला वेदीवर आणतो. तिच्या हातात थोड्या अक्षता व मीठ असते. त्या वस्तू ती वराच्या मस्तकावर टाकते आणि त्याच्या शेजारी बसते. वधू–वरांचे आजोबा किंवा धियानी नामक पुरोहित लग्नाच्या वेळी पौरोहित्य करतात. वधू–वरांचे हात पिवळ्या दोऱ्याने एकत्र बांधतात. लग्नातील हा आवश्यक विधी असतो. मग त्यांच्या हातांवर शंखाने हळदीचे पाणी घालतात. सात सुवासिनी त्यांच्या मस्तकांवर पिवळ्या अक्षता व एका विशिष्ट झाडाची पाने टाकतात. हा विधी सर्वच मंगल कार्यांच्या वेळी करण्याची पद्धत आहे. नवरा मुलगा वधूचा हात धरतो आणि भावजय त्यांना वेदीभोवती सात प्रदक्षिणा घालायला लावते. वधू–वरांचे नाते हे सात जन्म टिकणारे असते, असे या वेळी पुरोहित सांगतो. यानंतर वधू–वरांना घरात नेऊन जेवायला वाढतात. एवढे झाल्यावर लग्नविधी समाप्त होतो.

पुरुषाला अनेक बायका करता येतात. विधवा धाकट्या दिराशी पुनर्विवाह करते. त्याचा विधी अगदी साधा असतो. वराने वधूच्या बापाला सव्वा रुपया दिला व जातिबांधवांना भोजन दिले, की काम भागते. घटस्फोटही सुलभपणे मिळतो.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात किंवा पुरतात. गावाची हद्द ओलांडल्यावर मृताची पत्नी थोडे तांदूळ व निखारे तीनदा ओवाळून त्याच्या डोळ्यांवर टाकते. वृद्ध स्त्री मृत झाल्यास तिची सून हा विधी करते. पुरण्यापूर्वी प्रेत खड्ड्याभोवती सातदा फिरवतात आणि मग खड्ड्यात ठेवतात. त्या वेळी जमलेले लोक म्हणतात, की ' हे आकाशा, हे भूमी, हे वृक्षांनो, आम्ही याला खड्ड्यात ठेवीत आहो. पण हा काही आमचा दोष नाही.' नंतर प्रेतावर माती लोटल्यावर त्याच्यावर एका स्त्रीची व पुरुषाची आकृती काढतात. तिच्यावर माती टाकून म्हणतात, तू आम्हांला आता सोडून गेला आहेस; तर लोकांना त्रास देऊ नकोस. ' परत आल्यावर मृताच्या घराभोवती व आपल्या पायांवर शेणपाणी शिंपडतात आणि ताडी पितात. दुसऱ्या दिवशी घरातील जुनी मडकी फेकून देतात व मृताला अन्न अर्पण करतात. दहाव्या दिवशी तळ्याच्या काठी एक झोपडी उभारून तिच्यात सात वेळा अन्न शिजवतात व सात वेळा सात खापरांवर ठेवून मृताला अर्पण करतात. एका नव्या कापडावर अन्न, फळे, शंख, इ. वस्तू ठेवून त्याही त्याला अर्पण करतात. मग एका मडक्यात काही वस्तू ठेवून मृताचा पुत्र तळ्यात उतरून गळ्यापर्यंत पाण्यात शिरतो आणि ते मडके वर फेकून फोडतो. नंतर सर्वजण घरी येतात. धियानी पुरोहिताने हातांना दूव चोळल्यावर त्यांचे मृताशौच संपते. बाराव्या दिवशी मृतासाठी बारा पानांवर अन्न वाढतात.

बंगालमधील बाउरी प्रेत पालथे पुरतात. तसे केल्याने ते भूत होऊन लोकांना त्रास देत नाही, अशी त्यांची समजूत आहे.
का. ट्रा. स. इं.; से. इं., १९३१]

बाउल बंगालमधील एक पंथ. इ. स. च्या १४ व्या शतकाच्या अंती किंवा १५ व्या शतकाच्या आरंभी या पंथाचा उदय झाला. काही संशोधक नित्यानंदप्रभूला या पंथाचा संस्थापक मानतात; तर काही त्याचा मुलगा वीरभद्र हा या पंथाचा प्रवर्तक असल्याचे समजतात. वीरभद्राने माधवबीबी नामक एका मुस्लिम साधिकेला दीक्षा देऊन या पंथाची स्थापना केल्याचे या संदर्भात नमूद आहे. प. बंगालातले नदिया किंवा नवद्वीप हे ठिकाण चैतन्य संप्रदायाप्रमाणेच बाउल पंथाचेही प्रधान केंद्र आहे. वैष्णव आणि सूफी अशा उभयपंथीय विचारधारांनी बाउल पंथाचे पोषण केले आहे, असे कळून येते. इ. स. च्या सोळा ते अठरा या शतकांत बंगालमध्ये सर्वत्र त्याचा प्रसार झाला. आणि १९ व्या शतकात त्याने शिक्षित जनांचेही लक्ष आपणाकडे ओढून घेतले.

अंगात कफनीसारखे एखादे पायघोळ वस्त्र, हातात एकतारी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किंवा कमरेवर डुग्गी नामक वाद्य, मुखात देहतत्त्वाची, राधा-कृष्णांची किंवा गौरांगप्रभूची गाणी, अशा थाटात हे बाउल साधक बंगालच्या खेड्यापाड्यांतून फिरताना दिसतात.

बाउल या शब्दाच्या अनेक व्युत्पत्त्या प्रचलित आहेत. काहींच्या मते तो संस्कृतातल्या वातुल या शब्दावरून आला आहे. वातुल म्हणजे पागल किंवा वेडा. बाउल साधकाचे वागणे सर्वसामान्य माणसांपेक्षा वेगळे अतएव चमत्कारिक असल्यामुळे विद्वानांनी त्याची अशी व्युत्पत्ती केली असावी. काहींच्या मते आतुर किंवा व्याकुल या शब्दावरून बाउल शब्द आला. बाउल



बाउल साधक

पंथाचे एक अभ्यासक आचार्य क्षितिमोहन सेन यांच्या मते बाउल शब्द वायूपासून उद्‌भवला आहे. अर्थात हा वायू म्हणजे योगशास्त्रातला प्राणवायू होय. त्यावरून देहाच्या स्नायूंमध्ये प्राणशक्तीचा संचार करून साधना करणारा तो बाउल, अशी बाउल शब्दाची व्याख्या केलेली आहे. बाउल कोणाला म्हणावे, यासंबंधी नरहरी बाउलाने म्हटले आहे–

अरे भाई, मी बाउल आहे असे एवढ्यासाठीच म्हणतो, की मी कोणा धन्याची आज्ञा किंवा कोणाचे शासन मानीत नाही. कोणत्याही विधि-निषेधांचे रूढि-नियमांचे किंवा आचार-विचारांचे बंधन मी स्वीकारीत नाही. मानवसमाजात प्रचलित असलेल्या कोणत्याच भेदांना मी जुमानीत नाही. मी स्वतः माझ्या अंतःकरणातून उचंबळत राहणाऱ्या भूतमात्रांविषयीच्या प्रेमधारेत डुंबत राहतो. प्रेमाच्या विषयात कोणत्याही प्रकारचा वेगळेपणा संभवत नाही. तिथे नित्य सम्मीलनभावच (एक-रसत्व) वास्तव्य करतो. मी सर्वांच्या समवेत आनंदगीत गात व नाचत धुंद होऊन राहिलो आहे.

बाउलांना संसारधर्माशी काही कर्तव्य नसते. त्यांच्या पंथात सर्व जातिधर्मांचे स्त्री-पुरुष समाविष्ट होऊ शकतात. त्यांना स्वर्ग, मोक्ष किंवा पुण्य यांची अथवा कोणत्याही ऐहिक–पार-लौकिक लाभालाभांची अपेक्षा नसते. त्यांच्या साधनेचे प्रमुख उद्दिष्ट ' मनेर मानुषा 'चा शोध घेणे हा आहे. मनेर मानुष म्हणजे मनुष्याच्या अंतःकरणात स्थित असलेला माणूस. रूढ व्यवहारात जिला आपण माणुसकी किंवा सद्‌भावना म्हणतो, तिचे हे उच्च रूप आहे. मनेर मानुष ही कल्पना खास बाउलांची आहे. बाउल साधक सदैव या मनेर मानुषाचे चिंतन करण्यात व त्याचा शोध घेण्यात निमग्न राहतो. त्याच्या साधनेचे प्रमुख उद्दिष्ट जसे या हृदयस्थ मानवाचा शोध घेणे हे आहे, तसे साधनेचे प्रधान अंग गायन हे आहे. गायनामध्येच मनुष्य आपला भाव पूर्णपणे प्रकट करू शकतो, असा बाउलांचा विश्वास आहे. बाउल साधकाचे साधे संभाषणही गीतबद्ध असते. ही गीते चिंतनात्मक असतात. हृदयस्थ मानवाच्या शोधासाठी तो कसा अष्टौप्रहर तळमळत असतो, हे पुढील बाउलगीतात सांगितले आहे–

आमि कोथाय पाबो तारे, आमार मनेर मानुष जेरे ।
हाराये सेई मानुषे, तार उद्देशे देशविदेशे बेडाई घुरे ।
लागि सेई हृदय-शशि सदा प्राण हय उदासी ।
पेले मन होतो खुशी, दिवानिशि देखताम नयन भरे ।।

अर्थ – माझा तो हृदय–मानव मला कुठे मिळेल ? त्याच्यासाठी मी देशोदेशी फिरत आहे. त्या सौंदर्यशशीच्या शोधात माझे मन उदासी झाले आहे. डोळे भरून त्याला पाहावे म्हणून माझ्या हृदयाला परम व्याकुळता आली आहे.

कोणतीही साधना यशस्वी व्हायची, तर त्यासाठी साधकाला गुरूची आणि गुरुदीक्षेची नितांत आवश्यकता असते. बाउल साधकालाही ती आहेच. मात्र बाउल साधक गुरूच्या शोधार्थ मुद्दाम प्रयास करीत नाही. एक बाउल आपल्या गीतात गुरूविषयी म्हणतो ते असे–

गुरु बोले कारे प्रणाम करबि मन ?
तोर आथिक गुरु, पथिक गुरु,
ओ तोर गुरु अगणन, ओ तोर गुरु सर्वजन !
गुरु रे तोर बरण-डाला ! गुरु रे तोर मरण-ज्वाला !
गुरु रे तोर हृदय-व्यथा, जे झराय दुनयन ! !

अर्थ – हे मना, गुरू म्हणून तू कुणाला प्रणाम करशील ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुझ्या पावलापावलाला जाणारे येणारे तुझे गुरू आहेत. अरे, तुझे गुरू असंख्य आहेत. सगळे मानव तुझे गुरू आहेत. फुलांची परडीही तुझा गुरु आहे आणि मरणज्वालाही तुझा गुरूच आहे. हृदयव्यथेमुळे डोळ्यांतून वाहणारे अश्रू तुझे गुरू आहेत.

बाउलाला गुरुदीक्षा जन्मतःच त्याच्या आईकडून मिळालेली असते. एका गीतात तो म्हणतो–

आमार-जे दिन जनम से-दिन आमि दीक्षा पेयेछि ।
एक अक्षरेर मंत्र मायेर भिक्षा पेयेछि ।।
दीक्षा विना चाले ना जे एकही प्राणेर श्वास ।
सेइ कथाते गभीर आमार रये छे विश्वास ।।
आमि नीर पेयेछि, क्षीर पेयेछि, पराण पेयेछि ।
तारि साथे मायेर शिक्षा पेयेछि ।।

अर्थ – माझा ज्या दिवशी जन्म झाला त्या दिवशीच मला दीक्षा मिळाली. मातेची भिक्षा एका अक्षराच्या मंत्राने मिळवली. प्राणाचा एकही श्वास दीक्षेवाचून चालणार नाही, असा माझा दृढ विश्वास आहे. मातेचे अश्रू मिळविले, मातेचे दूध मिळविले, मातेमधून प्राण मिळविला, त्याबरोबरच मी मातेकडून शिक्षणही मिळविले.

बाउल साधक रसिक असतो. जीवनातल्या सर्वच शुभ आणि सुंदर गोष्टींविषयी त्याला प्रेम असते. हारामणी नामक एक बाउल म्हणतो–

फलेर आशा करे ना से, फुलेर मधुपान करेसे ।

अर्थ – मी फळाची आशा करीत नाही; पण फुलातला मधू प्राशन करावा, असे मला वाटते.

खेड्यात राहावे, साधुवृत्तीने वागावे आणि स्वच्छंदीपणाने जीवन जगावे, हा बाउलांचा बाणा आहे. ग्रांथिक शिक्षण–संस्कारांचा गंध नसलेले लोकच पूर्वी बहुतांशी या पंथाचे अनुयायी असत; परंतु त्यांची वैचारिक उंची कोणत्याही उच्च शिक्षिताला स्तिमित करून टाकणारी असे. एकोणिसाव्या शतकापासून मात्र सुशिक्षित लोकही या पंथात दाखल झाले.

बाउलांची गीते वैदिक ऋचांसारखी मौखिक परंपरेने चालत आली आहेत. इतराज सांई, लालन शाह, शेख मदन, पागला कान्हाई, गंगाराम, नरहरी, फिकिरचांद, इ. बाउलांची पदे मोठ्या संख्येने मिळतात. उत्तर बंगालमध्ये या गीतांना शब्दगान अशी संज्ञा आहे. या गीतांचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही, की बाउलांची स्वतःची अशी एक स्वच्छ, स्पष्ट विचारधारा आहे. या मताचे वैशिष्ट्य हे, की प्रत्येक बाउल मानवी देहाला एक पवित्र मंदिर व त्यात वास करणाऱ्या मनाला परमेश्वर मानतो. मनुष्यशरीराला एवढे महत्त्व देण्याची ही कल्पना बौद्ध सिद्धांपासून वैष्णव सहजिया संप्रदायापर्यंत अनेकांनी मांडली आहे. उत्तर भारता- तले निर्गुण संतही ती कल्पना स्वीकारताना आढळतात. पर[ंतु] बाउल केवळ शरीराला महत्त्व देऊन थांबत नाहीत; तर त्यापु[ढे] जाऊन ते त्या शरीरात वास करणाऱ्या ईश्वराचाही शो[ध] घेतात. बाउलांच्या मते हा मनेर मानुष म्हणजे सर्व दलांनी आणि कलांनी प्रफुल्ल झालेले ब्रह्मकमलच आहे.

सांप्रत मात्र हा पंथ हळूहळू अस्तंगत होऊ लागला आहे. [म. प्रे. सा.; मे. मि. इं.; सा. हिंदुस्थान, २४ जून १९६२; श्री. ना. ग. जोशी – नवभारत, ऑगस्ट १९४९]

बाकड

एक जात. यांची वस्ती कर्नाटक प्रदेशात आहे. हे लोक आपणास बंट म्हणजे योद्धे असे समजतात. बंट नावाची एक जात आहे. त्या जातीतून बहिष्कृत झालेले लोक म्हणजे बाकड असावे, असे वाटते. या जातीत इतर जातींचाही भरणा आहे. यांच्यांत आठ पोटभेद असून विधवा- विवाह व सोडचिठ्ठी रूढ आहे. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. व्यंकोबा हा यांचा कुलदेव आहे. हविक ब्राह्मण यांचे उपाध्येपण करतात. यांना मद्यमांस चालते. हे मृतांना जाळतात अथवा पुरतात. [मुं. इ. जा.]

बाकेश्वर

एक प्राचीन शक्तिपीठ. एकावन्न शक्तिपीठांत याची गणना होते. बंगालमधील पूर्व रेल्वेच्या मुख्य फाटचावर ओंडाल नावाचे जंक्शन आहे. तिथून एक फाटा सैंथियाकडे जातो. या फाटचावर ओंडालपासून बावीस मैलां- वर दुब्राजपूर स्टेशन आहे. तिथून उत्तरेकडे सात मैलांवर हे स्थान आहे. इथे उष्ण पाण्याचे अनेक झरे आहेत. या झऱ्यां- पैकी एका झऱ्याकाठी जे शिवमंदिर आहे, त्याला बाकेश्वर म्हणतात. हेच इथले मुख्य मंदिर आहे. सतीचे मन इथे पडले, अशी कथा आहे. इथल्या कुंडाला पापहरणकुंड म्हणतात. या ठिकाणी अष्टावक्र ऋषीचा आश्रम होता, असे सांगतात. [कल्याण–तीर्थांक]

बागडिया

एक जात. हे लोक राजस्थानात आढळतात. त्यांच्यांतले काही लोक पहाडी भागात वस्ती करून राहिले आहेत. त्यांचा मुख्य धंदा ताडाच्या पात्यांच्या झाडण्या करून विकणे हा आहे. बरेचसे बागडिया कायमची वस्ती कुठेच न करता गावोगावी भटकत राहतात. ते भीक मागतात. त्यांच्या बायका भीक मागताना चंग नामक वाद्याच्या साथीवर नाच करतात. होळीच्या उत्सवात तर त्या दारोदार जाऊन नृत्य करतात व पैसा मिळवतात. [रा. लो.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बागडी (१) महाराष्ट्रातील एक जात. कोल्हापूर जिल्ह्यात यांची वस्ती असून, तिथून ते आसपासच्या प्रदेशात फिरत असतात. घोंगडया विणणे, मासे पकडणे, भविष्य सांगणे व भीक मागणे हे यांचे व्यवसाय आहेत.

हे लोक स्वतःला कोळी म्हणवून घेतात व आपण वाल्मीकीचे वंशज असल्याचे सांगतात. कोळ्यांशी त्यांचे बरेच साम्य आहे; त्यावरून मुळात ते महादेव कोळी असावे, असे एक मत आहे. गालफाडे, करंडे, मोळे, चव्हाण, गरड, सासने, इ. त्यांची आडनावे आहेत. एकाच आडनावात विवाह होत नाही. पण समान देवकात होतो.

विवाहप्रथा– लग्ने लहानपणी किंवा मोठेपणीही होतात. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. देज म्हणून तो वधूपित्याला बारा ते पंचवीस रुपये देतो. लग्नापूर्वी तीन किंवा चार दिवस वधू-वरांना आपापल्या घरी तेल–हळद लावून स्नान घालतात. नंतर वरच्या हातात एक सुरा देतात. लग्नसमारंभ संपेपर्यंत तो त्याने जवळ बाळगला पाहिजे, असा नियम आहे. लग्नाच्या दिवशी संध्याकाळी वर मिरवीत वधूच्या गावी जातो आणि मारुतीच्या मंदिरात थांबतो. तिथे वधूपक्षाकडील लोक त्याचे स्वागत करून त्याला पागोटे देतात व वधूगृही नेतात. लग्नमंडपात तो पूर्वेला तोंड करून उभा राहतो व वधू त्याच्या समोर उभी राहते. प्रथम मंगलाष्टके व त्यानंतर कंकणबंधन, कन्यादान, इ. विधी आणि नंतर जेवणावळ होऊन लग्नसमारंभ संपतो.

एखाद्या मुलीने लग्नापूर्वी जातीतील एखाद्याशी अनैतिक संबंध ठेवल्यास तिला दंड भरावा लागतो किंवा ज्ञातिभोजन द्यावे लागते. त्या वेळी दोघांनाही राख खायला लावून शुद्ध करून घेतात. परजातीतील मुलाशी अनैतिक संबंध ठेवल्यास मुलीला जातिबहिष्कृत करतात. यांच्यांत एका पुरुषाला अनेक बायका करता येतात. विधवेला आते किंवा मामे भावाशी लग्न करता येते. पत्नीची वागणूक नीट नसल्यास पंचायतीला सात रुपये भरून पती घटस्फोट घेऊ शकतो.

देवधर्म– म्हसोबा हा यांचा कुलदेव आहे. याशिवाय ते खंडोबा, शिदोबा, जाखाई, जोखाई, इ. देवतांनाही भजतात. चांदीच्या पत्र्यांवर पूर्वजांच्या प्रतिमा उठवून त्यांची सणावारी व लग्नकार्यप्रसंगी पूजा करतात. त्या दिवशी बकरा कापतात व लोकांना जेवण घालतात. दर वर्षी आषाढाच्या कृष्ण पक्षात मरीआईला बकरा बळी देतात. त्या वेळी प्रत्येक कुटुंबात गोंधळ घातला जातो.

मर्तिकप्रथा– ज्यांना ऐपत आहे, ते प्रेते जाळतात, बाकीचे पुरतात. अविवाहित, कुष्ठरोगी व लहान मुले यांना पुरतात. पुरलेल्या जागेवर एक दगड ठेवतात. बाराव्या किंवा तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. [ट्रा. का. बाँ.]

(२) आसाम, ओडिसा व पश्चिम बंगालमधील एक द्रावीड जमात. शेती, मासेमारी आणि घरकाम हे यांचे प्रमुख व्यवसाय आहेत. या लोकांच्या उत्पत्तीविषयी अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. त्यांपैकी एकीत त्यांची उत्पत्ती शिव-पार्वतींपासून मानलेली आहे. मिदनापुरी जिल्ह्यातील बागडी या प्रदेशावरून या लोकांना हे नाव मिळाले, असे गेट या मानववंशशास्त्रज्ञाचे मत आहे. बागडींच्या अनेक पोटजाती असून, त्यांच्यांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होत नाही.

विवाहप्रथा– बंगालमधील बांकुरा व मानभूम या जिल्ह्यांतील आणि ओडिसातील बागडी लोकांत प्रौढ विवाह प्रचलित आहे. कनिष्ठ जातीचे ब्राह्मण यांच्या लग्नात पौरोहित्य करतात. खरा विवाह होण्यापूर्वी बागडी तरुणाचा प्रथम महुवा वृक्षाशी विवाह लावतात. त्या वेळी त्याचा उजवा हात सुताने त्या वृक्षाला बांधतात, नंतर तो हात सोडवतात व त्याच सुताने त्याच्या हाताला महुवाची पाने बांधतात. त्यानंतर वरपक्षाकडील मंडळी वधूच्या गावी जायला निघते. वधूच्या मंडपात शिरताना दोन्ही पक्षांत लुटपुटूची लढाई होते व लढाईत वरपक्षाचा विजय होतो. त्यानंतर वर पाटावर बसतो. पाटाच्या चार बाजूंना चार घट ठेवलेले असतात. त्यांतील दोन तेलाचे, तिसरा धान्याचा व चौथा शेंदराचा असतो. वधू मांडवात आल्यावर बोहल्याभोवती सात प्रदक्षिणा घालून वराच्या शेजारी बसते. त्या दोघांच्या मध्ये पाण्याचा एक लहानसा खड्डा असतो. त्यानंतर वधू, वर आणि वधूपिता यांचे उजवे हात पुरोहित सुताने एकत्र बांधतो. या विधीचा अर्थ वधूच्या आप्तांनी तिला वराच्या स्वाधीन केले व वराने तिचा स्वीकार केला, असा होतो. नंतर वर वधूच्या भांगात शेंदूर भरतो. याला सिंदूरदान असे नाव आहे. हा विधी फार महत्त्वाचा मानतात. कारण यांच्यांत सप्तपदी नाही.

देवधर्म – बरेचसे बागडी वैष्णव आहेत. ते शिव, धर्मराज (यम), दुर्गा, गोसाई इरा व बडा पहाड या देवतांनाही भजतात. पण या सर्वांपेक्षा मनसा ही त्यांची प्रिय देवता आहे. तिचा उत्सव ते मोठ्या थाटामाटात करतात. आषाढ, श्रावण, भाद्रपद व आश्विन या चार महिन्यांत तिला बोकडाचा बळी देतात व भात, मिठाई, फळे, इ. पदार्थांचा नैवेद्य दाखवतात. नागपंचमीच्या दिवशी तिची चतुर्भुज मूर्ती बनवून तिची मिरवणूक काढतात व नंतर एखाद्या जलाशयात तिचे विसर्जन करतात. पावसाळ्यात तिकडे सर्पदंशाची भीती असते. तो होऊ नये, म्हणून बागडी मनसेला भजतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाद्रपद अमावास्येला बांकुरा आणि मानभूम जिल्ह्यांतील बागडी भादू देवीची पूजा करतात. भादू ही पाचेत राजाची कन्या होती व तिने आपल्या लोकांसाठी मृत्यू पत्करला, अशी कथा आहे. तिच्या पूजोत्सवात गाणेबजावणे व नृत्य हे कार्यक्रम होतात आणि त्यात आबालवृद्ध स्त्री-पुरुष भाग घेतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृताला जाळतात व रक्षा नदीत टाकतात. देवी, पटकी, वगैरे रोगांनी दगावलेल्यांना, अपघाती मृत्यू आलेल्यांना व लहान मुलांना मात्र पुरतात. ओडिसातील बागडी, मृताचे मस्तक उत्तरेला करून त्याला डाव्या कुशीवर पुरतात. मृत्यूनंतर महिन्याने श्राद्ध करतात. [से. इं. १९३१]

(३) राजस्थानातील एक जात. बागड शब्दाचा अर्थ जंगल असा आहे. या जातीचे लोक पूर्वी जंगलात राहत असल्यामुळे त्यांना बागडी हे नाव मिळाले आहे. टॉडच्या मते या लोकांची उत्पत्ती राजपुतांपासून झाली असून, त्यांच्यांत पंवार, पडिहार, कोळी, चारण, भाटी, ओरी, डाबी, इ. अनेक उपजाती आहेत.

शेती हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. काही ठिकाणी, हे पशुचिकित्सेचे कामही करतात. यांच्यापैकी काही लोक बावरी लोकांबरोबर मध्य प्रदेशात आले व त्या भागात चोर व लुटारू म्हणून प्रसिद्धी पावले. हे लोक धडधाकट असून, हिरव्या रंगाचे कपडे घालतात. हे शिपाई बाण्याते असून, त्यांच्या जवळ नेहमी एक बंदूक असते.

देवधर्म – बहुतेक सर्व देवतांना हे भजतात व त्यांचे सणही साजरे करतात. हे शक्तीचीही उपासना करतात. गाय, म्हैस, मोर व हंस ही यांची देवके आहेत. त्यांची हत्या करणाऱ्या व्यक्तीला जातपंचायतीकडे दंड भरावा लागतो.

राजस्थानातील बागडी पुरुष

विवाहप्रथा – एकाच देवकात विवाह करीत नाहीत. वधूच्या मनगटात एक दोरा बांधून लग्न पक्के करतात. पूर्वी लग्नाच्या वेळी मुलीचे वय दहा ते बारा वर्षे व मुलाचे सोळा ते अठरा वर्षे असे. लग्नाच्या वेळी जातपंचायतीला आठ रुपये व मुलीचे देज म्हणून वधूपित्याला पन्नास – साठ रुपये देतात. काही वेळा शेळ्यांच्या स्वरूपातही देज देतात. लग्नात गुर्रा पौरोहित्य करतो. सप्तपदी हा लग्नातील मुख्य विधी असतो.

प्रसूतिप्रथा – मुलाच्या जन्माच्या वेळी सवन लोक आप्तेष्टांना जेवण देतात. मुलाची पत्रिका ब्राह्मण तयार करतो व त्याचे नावही तोच ठेवतो. जननाशौच पाच ते दहा दिवस पाळतात.

मर्तिकप्रथा – हे मृतांना जाळतात; लहान मुलांना मात्र पुरतात. तिसऱ्या व बाराव्या दिवशी श्राद्ध करतात. वार्षिक श्राद्धही करतात. [रा. जा.; सो. ला. रा.]

बागवान

मुसलमानांची एक जात. महाराष्ट्रात आणि कर्नाटकात यांची वस्ती आढळते. हे लोक मूळचे कुणबी, माळी असून औरंगजेबाने यांना बाटवले, असे एक मत आहे. हे हनफी सुनी पंथाचे अनुयायी असले, तरी यांचा हिंदूधर्माकडे ओढा आहे. हे लोक गोमांस वर्ज्य मानतात आणि हिंदू देवतांना भजतात; हिंदूंचे सणही पाळतात. फळांची विक्री हा त्यांचा धंदा आहे. [मुं. इ. जा.]

बागेश्री

हिंदुस्थानी संगीतातील एक राग. याची जाती ओडव-षाडव व षाडव-संपूर्ण अशा दोन्ही प्रकारची आहे. याच्या आरोहात पंचम वर्ज्य असून, अवरोह मात्र सातही स्वरांनी होतो. वादी – मध्यम. संवादी – षड्ज. आरोह स्वर – सा, ग, म, ध, नि, सा. अवरोह स्वर- सा, नि, ध, म, ग, रे, सा. (षाडव) किंवा सा, नि, ध, प, ध, म, ग, रे, सा (संपूर्ण). गानसमय – मध्य रात्र. [क. सं.; सु. वि. को.]

बाघगुंफा

मध्य प्रदेशातल्या धार जिल्ह्यात बाघ नावाच्या गावाजवळ ज्या काही गुंफा डोंगरात खोदलेल्या आहेत; त्यांना त्या गावावरूनच बाघगुंफा असे नाव पडले आहे. संस्थाने विलीन होण्यापूर्वी हे ठिकाण ग्वाल्हेर संस्थानात मोडत होते. नर्मदा नदीची एक साहाय्यक नदी इथे जवळूनच वाहते. तिलाही बाघ किंवा बाघिनी म्हणतात. तिच्या तीरावरच्या एका वालुकामय खडकाच्या डोंगरात नदीपासून १५० फूट उंचीवर या गुफा खोदलेल्या आहेत. हा डोंगर छोटासाच असून, विंध्यश्रेणीचा एक भाग आहे. आसपासचा प्रदेश टेकड्या आणि राने यांनी भरलेला आहे. बाघच्या नैर्ऋत्येस एका प्राचीन नगरीचे अवशेष पाहायला मिळतात. तिथे कोणी मोर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ध्वज नावाचा राजा राज्य करीत होता, अशी आख्यायिका आहे. बाघच्या पूर्वेस अर्ध्या मैलावर दुसऱ्या काही गुहांचे अपुरे



बाघगुंफा – दर्शनी भाग

प्रयत्न पाहायला मिळतात. बाघगुंफांचा विस्तार दक्षिणोत्तर २२५० फूट आहे. त्यांची संख्या ९ असून त्या सगळ्या पश्चिमाभिमुख आहेत. त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे—

गुंफा क्र. १ — हिला गृहगुंफा असे म्हणतात. ही २३ × १४ फूट लांबीरुंदीची आहे. ती चार खांबांवर उभारलेल्या दालनासारखी आहे. सांप्रत हिच्या प्रवेशद्वारात दगडगोट्यांचा ढीग पडलेला असल्यामुळे तिच्यात शिरता येत नाही.

गुंफा क्र. २ — हिला पांडवांची गुहा म्हणतात. हिची लांबी पूर्वपश्चिम १५० फूट आहे. हिच्या मध्यभागी एक मोठा मंडप असून, त्याच्या तीन्ही बाजूंना खोल्या आहेत. मंडपाच्या समोर पडवी असून, पडवीचा पुढचा भाग तुटला आहे. पडवीतून मंडपात प्रवेश करायला तीन दरवाजे आहेत आणि हवा—उजेडासाठी दोन खिडक्या आहेत. या बौद्ध विहारात एकूण २० खोल्या आहेत. प्रत्येक खोली ८ फूट उंच आणि तितकीच लांबरुंद आहे. प्रत्येकीत दिवा ठेवण्यासाठी कोनाडा आहे. मंपपाला वीस स्तंभ असून, त्याच्या मध्यभागी चार मोठे स्तंभ आहेत. ते कोरीव कामाने अलंकृत आहेत. मंडपाच्या मागच्या अंगाला स्तूपमंदिर आहे. त्याच्या द्वारावर दोही अंगी बोधिसत्व आहेत. मंडप आणि स्तूपमंदिर यांच्यामध्ये अंतराळ मंडप असून, त्याच्या भिंतीवर चित्रकारी आहे.

गुंफा क्र. ३ — हिला हत्तीखाना म्हणतात. हिच्यातल्या खोल्या मोठ्या व सजावटीने युक्त आहेत. बहुधा हिच्यात वरिष्ठ दर्जाचे भिक्षू निवास करीत असावे. हिच्या भिंतीवर वेलपत्तीच्या नक्षीदार पट्ट्या असून, त्यांत हत्ती व सिंह यांच्या पंक्ती चित्रित आहेत. सांप्रत या गुहेची पडझड झालेली आहे; पण मूर्तिकला व चित्रकला या दोन्ही दृष्टींनी ती अत्यंत समृद्ध होती, असे म्हणतात.

गुंफा क्र. ४ – हिला रंगमहाल असे म्हणतात. तिसऱ्या गुंफेपासून ही २५० फूट अंतरावर आहे, पण दुसऱ्या बाजूने ती पाचव्या क्रमांकांच्या गुंफेला जोडलेली आहे. हिच्या समोर २२० फूट लांबीचे दालन होते व ते २० खांबांवर आधारित होते; पण त्याचा बराचसा भाग सांप्रत पडला आहे. हिच्या सभामंडपात प्रवेश करण्यासाठी तीन द्वारे आहेत. मध्यभागी चौकोनी सभामंडप आहे. मागच्या अंगाला स्तूपमंदिर आहे. मात्र ते दुसऱ्या क्रमांकाच्या गुंफेतल्या मंदिरापेक्षा ओबडधोबड आहे. त्याच्या समोर अंतराळमार्ग नाही व आत मूर्तीही नाही. हिला चौकोनी गवाक्षे आहेत. तीन बाजूंना खोल्या आहेत. ही गुंफा चांगली सजवलेली आहे. हिच्या एका द्वारावर दोहीं अंगीं मकरवाहिनी देवीच्या मूर्ती आहेत. विचित्र आकृतींचे पशू निर्माण करून तिचे अलंकरण केलेले आहे. हिच्यात कोरीव नक्षीकाम आहे आणि काही कथाप्रसंगही कोरलेले आहेत. दालनाच्या भिंतीवर अनेक सुंदर चित्रे रंगविलेली आहेत.

भित्तिचित्र – रंगमहाल, बाघगुंफा

गुंफा क्र. ५ — ही गुंफा ९५ फूट लांब व ४४ फूट रुंद आहे. हिच्यात खोल्या नाहीत. या गुंफेचा उपयोग भिक्षूंनी एकत्र जमून प्रवचन किंवा धर्मोपदेश ऐकणे, यासाठी होत असावा. हिचे दालन, भिंती, खांब, छत, दरवाजे आणि खिडक्या या सर्व ठिकाणीं मनोरम चित्रकलेचा विलास आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गुंफा क्र. ६ — ही गुंफा पाचव्या गुंफेला जोडलेली असून, त्या दोहोंमध्ये एक विस्तृत मार्ग बनविलेला आहे. हिच्यातला सभामंडप ४६ फूट चौरसाकार आहे. हिच्यात पाच खोल्या असून, तीन मागच्या अंगाला व दोन दक्षिण-पश्चिमेच्या अंगाला आहेत. हिचे अष्टकोनी खांब प्रेक्षणीय आहेत. भिंतींवर पाना-फुलांची नक्षी आहे.

गुंफा क्र. ७, ८ व ९ — या तीन्ही गुंफांची सांप्रत खूप पड-झड झालेली आहे आणि त्यांच्या प्रवेशद्वारांत दगडगोट्यांचा मोठा ढीग पडला आहे.

मूर्तिवर्णन – क्र. २ च्या गुंफेत जी बुद्धमूर्ती आहे, ती १० फूट ४ इंच उंच आहे. हा बुद्ध एका कमलात उभा आहे. त्याचा उजवा हात वरद मुद्रेत असून, डाव्या हाताने वस्त्राचा पदर पकडून खांद्याच्या समोर धरलेला आहे. त्याच्या मस्तकावर उष्णीष असून, त्यावर महापुरुषांच्या ३२ लक्षणांच्या द्योतक अशा तितक्याच रेखा कोरल्या आहेत.

बुद्धाच्या उजव्या अंगाला एक बोधिसत्व असून, तोही कमल-पुष्पावर उभा आहे. त्याची उंची ९ फूट आहे. उजव्या हातात चवरी आहे. डावा हात वस्त्राच्या कटिग्रंथीवर आहे. डावा पाय किंचित पुढे आहे. अधोवस्त्र मणिमुक्तायुक्त कटिबंधाने कटीला जखडून टाकलेले आहे. त्याने किरीट कुंडल, दुहेरी मणिमाला, हस्तवलय, इ. आभूषणे घातलेली आहेत.

डाव्या हाताची बोधिसत्वाची मूर्ती ८ फूट ३ इंच आहे. त्याच्या उजव्या हातात कमलकळ्यांचा गुच्छ असून, डावा हात कमरेवर आहे. एक किरीट सोडल्यास बाकीचे सर्व अलंकार उजव्या हाताच्या बोधिसत्वाप्रमाणेच आहेत. इथे ८–९ फूट उंचीच्या द्वाररक्षकांच्या प्रतिमाही खोदलेल्या असून, त्यांना मैत्रेय व अवलोकितेश्वर यांच्या प्रतिमांचे अविकसित असे पूर्वरूप मानतात. या सर्व मूर्तींवर गांधार, कुशाण व गुप्त या तीन्ही कालांतल्या मूर्तिकलेचा प्रभाव दृष्टीस पडतो. बौद्धकालीन जनतेत नाग व यक्ष यांची पूजा मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती. इथे क्र. २ च्या गुंफेत एक मोठी नागमूर्ती होती व तिच्या दोहीं अंगीं चामरग्राहिणी होत्या. इथेच दुसऱ्या एका ठिकाणी आकाश संचारी यक्षही खोदलेले आहेत. क्र. ४ च्या गुंफेच्या द्वारावर खोदलेल्या मकरवाहिनीच्या मूर्ती अप्रतिम सुंदर आहेत. या देवीतूनच पुढे गुप्तकालात गंगा–यमुनांच्या मूर्ती निर्माण झाल्या.

मूर्तिकला ही हीनयान व महायान या बौद्ध संप्रदायांमधील कडी आहे. हीनयानी बौद्ध बुद्धाच्या मूर्तीऐवजी स्तूपाची पूजा करीत आणि महायानी बौद्ध बुद्धाच्या मोठमोठ्या मूर्ती बनवून त्यांची पूजा व उत्सव करीत. स्तूप व बुद्धप्रतिमा हे दोन्ही प्रकार इथल्या शिल्पकलेत दिसतात.

चित्रवर्णन – बाघ गुंफांतली बरीचशी चित्रे पुसून किंवा खर-वडून निघालेली आहेत. जी आहेत त्यांच्या प्रतिकृती कार, आपटे, मांड, नंदलाल बसू, असितकुमार हलदार, भोसले, जग-ताप, आर्मेनियन चित्रकार सारकिस कचडोरियन यांनी केलेल्या असून, त्या ग्वाल्हेरच्या गुजरी महालातील संग्रहालयात आहेत. इथल्या चित्रकारांनी दगडाचे चूर्ण, चुना व विशिष्ट प्रकारची माती यांच्या मिश्रणाचा लेप दगडी भिंतींवर देऊन त्यांवर चित्रे काढली आहेत. काही ठिकाणीं या लेपाचे कपचे पडलेले दिसतात, त्यावरून इथली लेपप्रक्रिया प्रयोगावस्थेत होती, असे दिसते. अजंट्याच्या कलाकारांनी तिच्यात अनेक सुधारणा करून ती यशस्वी आणि वज्रलेप केली. इथल्या चित्रकलेत तांबडा, काळा व निळा या तीन रंगांना प्राधान्य आहे. त्यांतही तांबड्या रंगाचा वापर अधिक आहे.

क्र. ३ च्या गुंफेत बुद्ध व बोधिसत्व यांची अनेक चित्रे आढ-ळतात. मात्र पुढच्या काळात वेगवेगळ्या नावाचे बोधिसत्व

बोधिसत्व – बाघगुंफा

ओळखता यावे म्हणून जी विशिष्ट लांछने वापरीत, त्यांचा इथे अभाव आहे.

दुसऱ्या ठिकाणी एका झरोक्यात दोन स्त्रिया बसलेल्या दिसतात. त्यांतली एक शोकग्रस्त असून, तिने आपले मुखमंडल उजव्या हाताच्या वस्त्राने झाकून घेतले आहे. दुसरी स्त्री तिची शोककथा ऐकून तिचे सांत्वन करीत आहे. हिच्या अंगा-वरच्या अलंकारांवरून ती प्रतिष्ठित कुलातली असावी, असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाटते. तिच्या मुखावर करुणेचा भाव स्पष्ट दिसून येतो. दोन्ही चित्रे सजीव वाटतात. त्यांच्या वरच्या छतावर कपोत पक्ष्यांचे जोडपे एका वृक्षाच्या फांदीवर बसलेले दाखविले आहे.

दुसऱ्या एका दृश्यात चार पुरुष एकत्र बसून कसलीतरी गंभीर चर्चा करीत आहेत, असे दिसते. ही चौकडी जंगलात बसल्याचे कळते. त्यांतल्या दोघांच्या मस्तकावर मुकूट आहेत, त्या अर्थी ते राजपुरुष असावे, तसेच अंगावरच्या वस्त्रभूषणांवरून ते वेगवेगळ्या सामाजिक स्तरांतले असावे, असे वाटते.

तिसऱ्या एका दृश्याचे दोन विभाग आहेत. पहिल्या चित्रांकनात आकाशसंचारी सहा यक्ष किंवा गंधर्व दाखवलेले आहेत. त्यांच्या आकृती ढगांतून नुकत्याच बाहेर पडत आहेत, असे ते दृश्य आहे. खालच्या अंगाला काही पुरुष हात पसरून पुढे जात आहेत. ते बहुधा भिक्षू किंवा श्रमण असावे.

दुसऱ्या विभागातल्या चित्रांकनात काही स्त्रिया बसलेल्या आहेत. त्या सगळ्याच गायिका असून, मधल्या स्त्रीच्या हाती वीणा आहे. वीणावादिनीच्या शुभ्र काचोळीवर हिरवे बिंदू आहेत. बाकीच्यांनी तंग चोळ्या घातल्या आहेत. गतीचे अंकन हे या चित्राचे वैशिष्टच आहे.

आणखी एका दृश्यात गायिकांची दोन दले आहेत. पहिल्या दलात सात स्त्रिया मूर्तींच्या सभोवती उभ्या असून, दुसऱ्या दलात सहा वादिका एका नर्तकीला घेऊन आपापली वाद्ये वाजवीत आहेत. त्यांतल्या काही स्त्रिया अर्धनग्न आहेत. या चित्रातल्या सर्व रंगांच्या सौम्य छटा मनमोहक आहेत. लय आणि लावण्य यांचे विलक्षण सामंजस्य त्यात दिसून येते.

आणखी एका दृश्यात ५–६ रांगा करून १७ घोडेस्वार डाव्या बाजूला जात असलेले दिसतात. मधल्या घोडेस्वाराच्या मस्तकावर राजछत्र आहे. त्यावरून राजा किंवा राजपुत्र याची ती मिरवणूक असावी. प्रत्येकाच्या डाव्या हातात घोड्याचे लगाम आहेत. कालिदासाच्या शाकुंतलात जसे दुष्यंताच्या घोड्याचे वर्णन आहे, तशा प्रकारचे ते घोडे दिसतात. तसेच आणखी एक दृश्य हत्तींच्या मिरवणुकीचे आहे. त्यातले हत्ती, त्यांचे माहूत, त्यांची झूल, त्यांचे छत्र, इ. साऱ्या गोष्टी आकर्षक आहेत. मिरवणुकीतल्या पहिल्या पुरुषाची आकृती धष्टपुष्ट असून, त्याचे केस कुरळे आहेत. त्याच्या मागे चवरी घेऊन एक माणूस बसला आहे. त्यावरून सदर पुरुष राजा असावा, असे वाटते.

बाघ गुंफेमधील चित्रकार हे केवळ निसर्गप्रेमीच नव्हते, तर अंतर्बाह्य निसर्गमय होते. एक जलाशय, त्यात एक वृक्ष, तो पुष्पपल्लवांनी डवरलेला, बुंध्याशी पाण्याचे बुडबुडे; एक पुष्करिणी, तिच्यात कमळेच कमळे, त्यांतले एक नाजूक कोवळे पत्र आणि त्यावर बसून चोचीत चोच घालणारे पक्षियुगुल, अशांसारखीं अनेक निसर्गचित्रे तिथल्या कलाकारांनी काढली आहेत. वृक्षवल्ली, पशुपक्षी, जलस्थल आणि मानव यांची एक असाधारण एकात्मता बाघ येथील चित्रकारीत प्रत्ययाला येते. अजंट्यात रंगवले आहेत, तसे अर्धमानव किंवा अर्धपक्षी बाघच्या चित्रकारांनी चितारले नाहीत. अजंट्याची चित्रकला जणू जातक कथांच्या आलेखनासाठी निर्माण झाली आहे; पण बाघच्या चित्रकलेने आपल्याला तसली कुठलीही मर्यादा घालून घेतली नाही. त्यांनी बुद्ध, बोधिसत्त्व, भिक्षू, भिक्षुणी, इत्यादींचे चित्रांकन केले, पण तेही नियमाला अनुसरून नव्हे; तर आपल्या रुचीला अनुसरून. त्याबरोबरच गांभीर्य, कारुण्य, आनंद, उन्माद, गीत, नृत्य, भक्ती या सर्व कलांचा व भावांचा त्यांनी यथेच्छ आविष्कार केला व तोही निसर्गाला त्यात समाविष्ट करून. बाघची कला धार्मिक कारणासाठी नसून, रसिकतेच्या तृप्तीसाठी आणि सौंदर्यदर्शनासाठी आहे. तिच्यात निसर्ग आणि मानव हे एकमेकांना जणू उराउरी भेटत आहेत.

बाघ गुंफांच्या निर्मितीच्या कालाबद्दल संशोधकांत वाद आहेत. कोणी काही गुहांचे काम इ. स. च्या पूर्वी सुरू झाले, असे मानतात; तर कोणी अजंट्याच्या नंतर या गुंफांची निर्मिती झाल्याचे सांगतात. पण क्र. २च्या गुंफेत सापडलेल्या महाराज सुबंधूच्या एका ताम्रपत्राच्या आधारावर आणि अन्यही काही कारणे जमेस धरून बाघ गुंफांची निर्मिती इ. स. ४०० ते ६०० च्या कालात झाली असावी, असे मानतात. [म. भा. इ.; अनिल कुमार – धर्मयुग, १० एप्रिल १९६६; बि. स्मृ. ग्रं.]

बाछडो गुजरात प्रदेशात आढळणारा एक लोकदेव. याला दादा असेही म्हणतात. काही चारणांवर दरोडेखोरांनी हल्ला केला असता त्यांनी एका राजपुताला मदतीसाठी पाचारिले. त्याप्रमाणे तो आला; पण दरोडेखोरांचा प्रतिकार करीत असता मारला गेला. तोच पुढे बाछडो या नावाने देव बनला.

बाछडो सोळंकी वंशाच्या अहिरांचा कुलदेव असून, ओखा आणि वराडी प्रांतांतील सर्व खेड्यांचा ग्रामदेवही तोच आहे. दगडी घोड्याच्या रूपात त्याच्या प्रतिमा असतात. चारण लोक त्याचे पुजारी आहेत. पिसाळलेला कुत्रा चावला, तर याला नवस केल्याने कुत्र्याचे विष उतरते, अशी समजूत आहे. [लौ. दं]

बाण धनुष्याला जोडून सोडायचे एक आयुध. हे एक अतिप्राचीन आयुध आहे. लक्ष्याच्या शरीराचा अवयव तोडणे, हृदयवेध करून त्याला ठार मारणे व शरीरावर नुसता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जोराचा आघात करणे, अशा विविध कारणांसाठी बाणांचा उपयोग होतो. ऋग्वेद, यजुर्वेद व अथर्ववेद या तीन्ही वेदांत बाणाचा उल्लेख येतो. बाणाचे दोन प्रकार असत–(१) शृंगाग्र व (२) अयोमुख. पहिल्याला शिंगाचे टोक बसवीत व त्याला विष लावीत. दुसऱ्याला धातूचे टोक बसवीत. बाणाच्या मागच्या अंगाला मोर, गिधाड, बहिरीससाणा, इत्यादींची पिसे लावलेली असत. बाणाची लांबी ५ विधी = ३ फूट असे. वैदिक काळी बाण तयार करणे हा चालता उद्योग होता. बाण करणाऱ्याला इषुकार म्हणत. पाते खाली घालून भात्यामध्ये बाण ठेवीत. बाण मारताना एक डोळा मिटून व दुसऱ्या डोळ्याने दृष्टी रोखून तो सोडीत. बाणावर कित्येकदा योध्याचे नावही कोरलेले असे. अशा बाणांना नामांकित बाण म्हणत. संस्कृत वाङ्मयात अशा नामांकित बाणांचे उल्लेख आढळतात. राम, कृष्ण यांचे बाण नामांकित असल्याचा उल्लेख रामायणात व शिशुपालवध या काव्यात आलेला आहे. (वा. रा. सुंदर. २१-२५; शिशु. १४-११०). पुराणकाळी असे अनेक वीरांचे नामांकित बाण असत. मद्रासमधल्या संग्रहालयाच्या शस्त्रागारात तंजाऊरच्या सरफोजी राजाचे नाव असलेले दोन बाण आहेत. पाहा– धनुर्विद्या. [वे. इं.; वे. रा. द.; के. रं. ऐ. को. व्हॉ.]

बाणभट्ट (इ. स. चे ७ वे शतक) एक महान संस्कृत कवी. विशेषतः गद्यकाव्याचा प्रणेता. कादंबरी या ग्रंथाचा कर्ता. याने आपले आत्मचरित्र कादंबरीमध्ये थोडक्यात आणि हर्षचरित या ग्रंथात त्याहून विस्तृत असे दिले आहे. त्याच्या वडिलांचे नाव चित्रभानू व आईचे नाव राज्यदेवी असे होते. त्याचे प्रीतिकूट नावाचे गाव शोण नदीच्या तीरावर होते.

बाणाच्या बाळपणीच त्याची आई वारली व तो १४ वर्षांचा असताना वडीलही वारले. मग काही वर्षे त्याने देशाटन केले. त्या काळात कुसंगतीमुळे तो स्वच्छंदी बनला. पण घरी परत आल्यानंतर त्याचे वर्तन सुधारले आणि त्याने वेद-वेदांगे व शास्त्रे यांचा प्रगाढ अभ्यास केला. बाणाने प्रत्यक्षपणे आपल्या विद्यागुरूचे नाव कुठेही सांगितले नाही. मात्र त्याच्या कादंबरीच्या नमनश्लोकात भर्चू नामक कोण्या आदरणीय पुरुषाला वंदन केले आहे. तो श्लोकार्ध असा–

नमामि भर्चोश्चरणाम्बुजद्वयं
सशेखरैर्मौखरिभिः कृतार्चनम् ।

अर्थ– मुकुटमंडित अशा मौखरींनी ज्याची अर्चना केली अशा भर्चूच्या चरणकमलद्वयाला मी नमस्कार करतो.

हा श्लोक देवनमस्कारानंतर आणि खलवर्णनाच्या पूर्वी आलेला आहे, त्यावरून भर्चू हा त्याचा गुरू होता, असे अनुमानिता येते. या अनुमानाला पुरावाही सापडतो. ज्या मौखरींनी भर्चूचा आदरसत्कार केला ते मौखरी, वर्धन राजांच्या पूर्वी उ. भारतात राज्य करीत होते. हर्षाचा बाप प्रभाकरवर्धन याने राज्यश्री नावाची आपली विदुषी कन्या गृहवर्मा नामक मौखरीला दिली होती. मौखरींचे मूलस्थान गया जिल्ह्यात असल्याचे सांगतात. हे स्थान बाणभट्टाच्या गावापासून जवळच होते. अर्थात मौखरींच्या दरबारात असणाऱ्या या महापंडिताकडे बाणभट्ट अध्ययनासाठी राहिला असावा. त्याच काळात केव्हातरी मयूरभट्ट नामक एका पंडिताच्या भगिनीशी त्याचा विवाह झाल्याची कथा आहे.

अध्ययनसमाप्तीनंतर बाणभट्टाला एकदा हर्षवर्धनाकडून निमंत्रण आले. पण बाणभट्ट हा स्वच्छंदी, स्वेच्छाचारी व स्त्रीलंपट असल्याबद्दल काही खलनिंदकांनी हर्षवर्धनाचे कान आधीच फुंकले होते. 'अहो महानयं भुजङ्गः' = हा मोठा भुजंग म्हणजे स्त्रीलंपट आहे, असे पहिल्या भेटीतच हर्षवर्धन बाणभट्टाला म्हणाला. त्या उद्गारांचे बाणभट्टाला अतीव दुःख झाले; कारण तो आरोप असत्य होता. पुढे लवकरच बाणभट्टाचा यथायोग्य परिचय झाल्यानंतर हर्षवर्धनाचे त्याच्याबद्दलचे मत बदलले. त्याची विद्वत्ता व बुद्धिमत्ता पाहून राजा प्रसन्न झाला आणि त्याने बाणभट्टाला राजाश्रय दिला. पुढे हर्षचरित नामक गद्यग्रंथ लिहून त्याने राजकृपेची अंशतः फेड केली.

कादंबरी हा बाणभट्टाचा सुप्रसिद्ध ग्रंथ होय. शृंगार, अद्भुत व करुण या तीन रसांचा तो त्रिवेणी संगम आहे. स्वर, वर्ण, पद, रस व भाव यांचा मधुर आविष्कार कादंबरीत पाहायला मिळतो. कादंबरी हे गद्यकाव्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रदीर्घ समास, कठिण वाक्ये, विस्तृत विशेषणे आणि अनेक शब्दालंकार यांचे ते जटिल वनच आहे. परंतु तरीही थोडचाशा अभ्यासानंतर व्युत्पन्न रसिकांना त्या वनात विहार करायला सोपे जाते व आनंदही वाटतो. (कादंबरी पाहा) धर्मदास नामक कवीने आपल्या विदग्धमुखमंडन या ग्रंथात बाणाच्या वरील काव्यवैशिष्ट्यांविषयी एक छेकापन्हुति लिहिली आहे ती अशी –

रुचिरस्वरवर्णपदा रसभाववती जगन्मनो हरति ।
तत्किं तरुणी न हि न हि वाणी बाणस्य मधुरशीलस्य ॥

अर्थ – तिच्या स्वराचे, वर्णांचे व पदांचे सौंदर्य काय सांगावे! रस व भाव हे तिच्या अंगी खेळत असल्यामुळे ती सर्वांची मने हरण करते. (हे ऐकून दुसरा कवीला विचारतो) अशी कोण ही तरुणी ? (त्यावर कवी म्हणतो) छे, छे, ती तरुणी नव्हे, मी मधुरस्वभावी बाणाच्या वाणीविषयी बोललो.

नंतरच्या अनेक कवींनी बाणभट्टाचे गोडवे गायिले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जयदेव त्याला कविताकामिनीचा पंचबाण (मदन) म्हणतो.

चंडीशतक नावाचे एक शतककाव्य बाणभट्टाने लिहिल्याचे कळते. या काव्यात स्रग्धरा वृ..त बाणाने चंडीचे अनेक प्रकारे स्वतन केले आहे. त्यातला एक श्लोक असा–

विद्राणे रुद्रवृन्दे सवितरि तरले वज्रिणि ध्वस्तवज्रे
जाताशङ्के शशाङ्के विरमति मरुति त्यक्तवैरे कुबेरे ।
वैकुण्ठे कुण्ठितास्त्रे महिषमतिरुषं पौरुषोपघ्ननिघ्नं
निर्विघ्नं विघ्नती वः शमयतु दुरितं भूरिभावा भवानी ।।

अर्थ – रुद्रगण भयभीत, सूर्य कंपित, इंद्राचे वज्र बोथट, चंद्र शंकायुक्त, वारा स्तब्ध, कुबेर त्यक्तवैर व विष्णूचे अस्त्र कुंठित अशा गोष्टी घडल्या असता, अत्यंत क्रोधी व महापराक्रमी अशा महिषासुराला निर्विघ्नपणे ठार मारणारी व अत्यंत पराक्रमी अशी भवानी तुमच्या दुरितांचे शमन करो.

चंडीशतकातही कवीने प्रदीर्घ समास आणि श्रुतिरम्य अनुप्रास विपुल प्रमाणात वापरले आहेत. [सं. क. पं.; क. का.; सं. क. द.; व्हॉ. स्ट. इं.; वि. स्मृ. ग्रं; सं. सा. इ.]

बाणलिंग

शिवलिंगाचा एक प्रकार. विशिष्ट आकाराच्या नर्मदेतल्या गोटचाला बाणलिंग असे म्हणतात. ही लिंगे बाणासुराने पूजेसाठी तयार करून नर्मदाकाठच्या पर्वतावर विर्सजित केली होती, तीच तिथून वाहत नर्मदेत येऊन पडली, असे याज्ञवल्क्यसंहितेत म्हटले आहे. सूत संहितेत याविषयी एक कथा आहे, ती अशी–

बाणासुर हा परम शिवभक्त होता. तो रोज शिवलिंग तयार करून त्याची पूजा करीत असे. दिव्यमानाने १०० वर्षे अशी त्याने लिंगपूजा केली. मग शिव त्याच्यापुढे प्रकट झाला. त्याने 'वर माग' म्हणताच बाणासुराने मागितले. 'हे प्रभो, मी रोजच्या रोज लिंग तयार करून फार कंटाळलो आहे, तेव्हा तू मला स्वयंनिर्मित लिंगे दे.' शिवाने त्याप्रमाणे बाणासुराला १४ कोटी लिंगे दिली. बाणाने तीन कोटी लिंगे स्वस्थानी, तीन कोटी कालिकागर्तात, तीन कोटी श्रीशैल पर्वतावर व एकेक कोटी कन्यकाश्रम, महेश्वर क्षेत्र, कन्यातीर्थ, महेंद्रपर्वत व नेपाळ या ठिकाणी स्थापली.

बाणलिंग हे शंकराचे प्रतीकात्मक रूप मानतात. नर्मदेतल्याप्रमाणेच गंगा, यमुना या नद्यांतही बाणलिंगे आढळतात.

बाणलिंगे अनेक प्रकारची आहेत. त्यांवरच्या वेगवेगळचा चिन्हांवरून त्यांना इंद्र, अग्नी, यम, निऋंती, वरुण, वायू, कुबेर, रुद्र, इ. नावे आहेत. प्रशस्त बाणलिंगाचे लक्षण याज्ञवल्क्यसंहितेत सांगितले आहे, ते असे–

प्रशस्तं नार्मदं लिङ्गं पक्वजम्बुफलाकृति ।
मधुवर्णं तथा शुक्लं नीलं मरकतप्रभम् ।
हंसडिम्बाकृति पुनः स्थापनायां प्रशस्यते ।।

अर्थ – पिकलेल्या जांभळाच्या आकाराचे, तसेच हंसाच्या अंडचाच्या आकाराचे नर्मदेतले लिंग प्रशस्त होय. ते मधाच्या वर्णाचे, पांढरे, निळे किंवा मरकताच्या रंगाचे असावे. अशा लिंगाची स्थापना करावी.

बाणलिंगाची प्रतिष्ठा करणे व त्यावर कोणताही संस्कार करणे या गोष्टीची गरज नाही, असे भविष्य पुराणात म्हटलें आहे. बाणलिंगाचे वैशिष्टच सांगण्यासाठी केदार खंडात पुढील श्लोक दिला आहे–

बाणलिङ्गात्परं नान्यत् पवित्रमिह दृश्यते ।
ऐहिकामुष्मिकं सर्वं पूजाकर्तुः प्रयच्छति ।।

अर्थ – बाणलिंगाहून दुसरे काही पवित्र आहे, असे दिसत नाही. ते पूजाकर्त्याला इहपरलोकींचे सर्व लाभ मिळवून देते.

सर्वत्र जय मिळावा अशी ज्याची इच्छा असेल, त्याने प्रातःकाळी उठून बाणलिंगाचे स्मरण करावे. शिवाचा नैवेद्य सेवन करणे ही गोष्ट यजमानाला निषिद्ध आहे; पण बाणलिंगाला अर्पण केलेले जल व अन्न सेवन करणे निषिद्ध नाही. [श. क.]

बाणेशी

एक तांत्रिक देवता. हिला बाणेश्वरी असेही म्हणतात. द्रां, द्रीं, क्लीं, ब्लूं, सः हा तिचा पंचबीजवर्णात्मक मंत्र आहे. त्याचा ऋषी संमोहन व छंद गायत्री आहे. या मंत्राचे पाच लक्ष पुरश्चरण व देवीची विधियुक्त पूजा केल्याने मनोरथ पूर्ण होतात, असे मंत्रमहोदधीत सांगितले आहे. हिचे मूर्तिध्यान असे (मं. म. ९.७)–

उद्यद्भास्वत्सन्निभा रक्तवस्त्रा
नानारत्नालङ्कृताङ्गी वहन्ती ।
हस्तैः पाशं चाङ्कुशं चापबाणौ
बाणेशी नः कामपूर्ति विधत्ताम् ।।

अर्थ – उगवत्या सूर्याप्रमाणे तेजस्वी, रक्तवस्त्रे परिधान करणारी, देहावर नाना प्रकारचे अलंकार धारण करणारी आणि चार हातांत पाश, अंकुश, धनुष्य व बाण धारण करणारी अशी बाणेशी आमचे मनोरथ पूर्ण करो.

बादरायण

ब्रह्मसूत्रांचा कर्ता. हा सन पूर्व ५०० वर्षांपूर्वी झाला असावा असे म्हणतात. याचे चरित्र उपलब्ध नाही. याने रचलेल्या ब्रह्मसूत्रांना वेदान्तसूत्रे अथवा व्याससूत्रे असेही म्हणतात. गीतेचा कर्ताही बादरायण असावा, असे लो. टिळक म्हणतात. याला व्यास अशी उपाधी होती. या उपाधीवरून बादरायण व्यास व वेद व्यास हे दोघे एकच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असावे, असा निष्कर्ष प्रो: वेबर यांनी काढला होता; पण न्यायमूर्ती तेलंग यांनी संशोधनाअंती तो चुकीचा ठरवला आहे. बादरायणाने आपल्या ब्रह्मसूत्रांत उपनिषदांतील भिन्न भिन्न सिद्धान्तांचे पद्धतशीर विवेचन केले आहे. पाहा – ब्रह्मसूत्रे, व्यास. [म. ज्ञा. को.; प्रा. च. को.]

बादरी एक प्राचीन मीमांसक. ब्रह्मसूत्रे व मीमांसासूत्रे यांत याचा अनेकदा उल्लेख येतो; पण याच्या चरित्राचा मात्र पत्ता लागत नाही. नावावरून तो कोण्या बदर नावाच्या पुरुषाचा पुत्र असावा, असे वाटते. बादरीचा कोणताही ग्रंथ उपलब्ध नाही. त्याची काही मते मीमांसाग्रंथांत दिली आहेत. पण ती सिद्धान्ताच्या रूपात नसून पूर्वपक्षाच्या रूपात आहेत. त्या मतांचे खंडन करण्यासाठीच ती उद्धृत केलेली आहेत. ब्रह्मसूत्रांच्या व मीमांसासूत्रांच्या अध्ययनातून त्याच्या ज्या मतांचा परिचय होतो, ती मते अशी –

उपनिषदांमध्ये सर्वव्यापक ईश्वराला प्रादेशमात्र (विशिष्ट स्थानी राहणारा) म्हटले आहे. या प्रादेशमात्र शब्दावर भिन्न भिन्न आचार्यांची भिन्न भिन्न स्पष्टीकरणे आहेत. बादरीच्या मते हृदयात अधिष्ठित असणाऱ्या मनाच्या द्वारे परमेश्वराचे स्मरण केले जाते. म्हणूनच परमेश्वराला प्रादेशमात्र म्हटले आहे.

छांदोग्य उपनिषदात 'स एनान् ब्रह्म गमयति' असे एक वाक्य आहे (४.१५.५). या वाक्यातल्या ब्रह्माचा अर्थ परब्रह्म समजायचा, का कार्यब्रह्म समजायचा याविषयी संदेह आहे. जैमिनी याला परब्रह्म मानतो; पण बादरीने ते कार्यब्रह्म असल्याचे सिद्ध केले आहे. कार्यब्रह्म हेच प्रदेशाने युक्त असते व तेच गंतव्य होऊ शकते, असे तो म्हणतो.

मुक्त पुरुषाच्या बाबतीत असा संदेह होतो, की त्याला शरीर व इंद्रिये असतात की नाही? जैमिनीच्या मते दोन्ही असतात. पण बादरी म्हणतो, की मुक्तावस्थेत शरीर व इंद्रिये दोन्ही असत नाहीत; तर केवळ मनच शिल्लक असते.

वैदिक कर्मांचा अधिकार कोणाला आहे, याविषयी मीमांसा म्हणते, की तो द्विजांनाच आहे. पण बादरीने स्पष्टपणे सांगितले, की शूद्रांनाही वैदिक कर्मांचा अधिकार आहे. ज्या कालात शूद्रांना वेदांचे उच्चारणही निषिद्ध होते, अशा त्या कालात शूद्रांनाही वैदिक कर्मांचा अधिकार आहे, हे स्पष्टपणे उद्घोषित करणारा बादरी हा केवढा धैर्यशाली आणि क्रांतिकारक विचारांचा होता, ते कळून येते.

याच्या कालाबद्दल निश्चित काही कळत नाही. जैमिनीने त्याचा उल्लेख केला आहे, त्यावरून तो जैमिनीच्या पूर्वकाली होता, एवढेच सांगता येते. [मी. द.; शंकराचार्य; हिंदुत्व]

बादामी विजापूर जिल्ह्यातील बादामी तालुक्याचे मुख्य ठिकाण. टॉलेमीने या गावाचा उल्लेख बादामोइ असा केला आहे. ऐहोळ, पट्टदकल इ. ठिकाणच्या, इ. स. च्या ७ व्या, ८ व्या शतकांतील शिलालेखांत याचे बादावी हे रूप आढळते. इ.स. ५४३ मधील संस्कृत शिलालेखात याला वातापी असे नाव दिलेले आहे. वातापी नामक दैत्यावरून हे नाव या नगरीला मिळाले. असे म्हणतात. त्याची पौराणिक कथा अशी–

वातापी व इल्वल हे दोघे दैत्यबंधू पूर्वी या प्रदेशात फार मातले होते. ते नरभक्षक असून, त्यांनी असंख्य ब्राह्मणांना मारून खाल्ले होते. अगस्त्य ऋषी दक्षिणापथात येऊन वैदिक धर्माच्या प्रचाराचे कार्य करू लागला, ते त्यांना रुचले नाही आणि त्यांनी त्याला ठार मारण्याचे ठरविले. पण अगस्त्याने त्यांचाच मंत्र त्यांच्यावर उलटवला व दोघांनाही ठार मारले.

विजापूरपासून सुमारे ७३ मैलांवर हे गाव वसले आहे. ते तीन बाजूंनी डोंगरांनी वेढलेले आहे. उत्तरेकडच्या डोंगरावर बावनकोट व दक्षिणेकडच्या डोंगरावर रणमंडळ कोट असे दोन किल्ले आहेत.

बादामी येथे चालुक्य वंशाची राजधानी होती. इ. स. ५५० पासून सुमारे २०० वर्षे त्या वंशातील राजांनी तिथे राज्य केले. त्यांतील पुलिकेशी (१ला), कीर्तिवर्मा (१ला), मंगलेश, पुलिकेशी (२रा) आणि विक्रमादित्य (२रा) हे विशेष प्रख्यात होते. पुलिकेशी (१ला) याने बादामीचा अभेद्य किल्ला बांधला. चालुक्यांच्या राजवटीत बादामी नगरी वैभवशाली होती. त्या राजांनी निर्माण केलेली अनेक शिल्पे तिथे अजूनही चांगल्या स्थितीत पाहायला मिळतात. गावात अनेक भव्य मंदिरे आहेत.



मालेगिट्टी शिवमंदिर – बादामी

त्यांतील मालेगिट्टी शिवालय म्हणजे माळिणीचे शिवमंदिर द्राविड शैलीचे असून, ते एका प्रचंड खडकावर बांधलेले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे मंदिर इ. स. च्या ८ व्या शतकातले असावे. त्याचे शिल्पकाम अत्यंत प्रेक्षणीय असून, त्यात जागोजागी निरनिराळ्या देवतांच्या सुंदर मूर्ती कोरलेल्या आढळतात. जंबुलिंग देवालयात ब्रह्मा, विष्णू व शिव यांची मंदिरे आहेत. हे देवालय इ. स. च्या ८ व्या शतकात विजयादित्य राजाने बांधले. त्याच्या समोरच विरूपाक्षाचे मंदिर आहे.

गावाजवळ एक मोठा तलाव आहे, तो अगस्त्यतीर्थ या नावाने ओळखला जातो. त्या तलावाच्या काठावरही पुष्कळ मंदिरे असून, त्यांतले भूतनाथाचे मंदिर फार सुंदर आहे. त्याचे विमान द्राविड शैलीचे आहे. एका लहानशा मंदिरात लकुलीशाची भग्न मूर्ती पाहायला मिळते.

भूतनाथाच्या मंदिराजवळच एका भव्य खडकावर काही शिवलिंगे आणि विष्णू, नरसिंह, महिषासुरमर्दिनी, शिव, गणपती, ब्रह्मा व वराह यांच्या मूर्ती कोरलेल्या दिसतात. खडकाच्या दुसऱ्या अंगाला अनंतशयन विष्णूचे लहानसे मंदिर असून, त्यात विष्णूच्या दहा अवतारांच्या मूर्ती दिसतात. त्या खडकातील एका गुहेसमोर एक भव्य मूर्ती आहे. ती देवतेची नसून, एका राजाची आहे. कुष्ठरोगाने ग्रस्त झालेला तो राजा तिथें गेला व अगस्त्यतीर्थात स्नान केल्याने रोगमुक्त झाला, अशी दंतकथा आहे. त्याचे खरे नाव काय होते नकळे. लोक त्याला कोष्टराय म्हणून ओळखतात व त्याची पूजाही करतात.

तलावाच्या उत्तरेचे मल्लिकार्जुनमंदिर चालुक्य शैलीचे असून, त्यात शिवलिंग आहे. तलावाच्या दुसऱ्या काठावर दत्तात्रेयाचे व एल्लम्माचे अशी दोन मंदिरे आहेत. तीही चालुक्य शैलीची असून, इ. स. च्या ११–१२ व्या शतकांत बांधलेली असावी.

बादामीजवळच्या डोंगरावर चार लेणी खोदलेली आहेत. त्यांतील एक शैव, दोन वैष्णव आणि चौथे जैनांचे आहे. शैव लेणे दक्षिणेकडील पहाडात खोदलेले आहे. त्याच्या दर्शनी भागात नटराजाचे एक सुंदर शिल्प कोरलेले असून, त्याला अठरा हात आहेत. बाजूच्या भिंतींवर महिषासुरमर्दिनी, गणपती व षण्मुख यांच्या आकृतीही आढळतात. गुहेच्या आतील भिंतीवर अर्धनारीश्वराची प्रतिमा कोरलेली आहे, ती तर अप्रतिम सुंदर आहे. समोरच्या भिंतीवर हरिहराची आकृती दिसते. बाजूला पार्वती, लक्ष्मी आणि नंदी व गरुड यांच्या मानवाकृती दिसतात. छतावर नाग, गंधर्व इ. आकृती कोरलेल्या आढळतात. मागच्या भिंतीच्या मध्यभागी शिवलिंग दिसते.

शैव लेण्याच्या पूर्वेला जरा उंचावर वैष्णव लेणी आहेत. त्यांतील एक लेणे मंगलेश याने इ. स. ५७८ मध्ये निर्माण केले. ते अत्यंत सुंदर आहे. या वैष्णव लेण्यांत विष्णूच्या भिन्न अवतारांच्या आकृती कोरलेल्या आहेत. त्यांतील त्रिविक्रम, वामन व बळी यांचे शिल्पकाम अतिशय भव्य आणि सुंदर आहे. या लेण्यांच्या दर्शनी भागात सुंदर व अलंकृत स्तंभ आहेत.

गंधर्वयुग्म – बादामी

वैष्णव लेण्यांच्याही वर एक नैसर्गिक गुहा लागते. त्या गुहेत पद्मपाणी या बोधिसत्त्वाची प्रतिमा कोरलेली आहे. पद्मपाणी कमळावर उभा असून, त्याच्या हातातही एक कमळ आहे. या गुहेच्या बाहेरील खडकावर इ. स. च्या ७ व्या व ८ व्या शतकांतील आलेख कोरलेले आहेत.

त्याच डोंगरावर सर्वांत उंच जागी जैन लेणे उत्तराभिमुख आहे. हे लेणे इ. स. च्या ७–८ व्या शतकातलेच मानले जाते. त्यात मुख्य जागी आदिनाथ तीर्थंकराची मूर्ती आहे. तो वृक्षावर, सिंहासनावर बसलेला असून, वर छत्र–चामरे आहेत. बाजूला गंधर्व–सेवक आहेत. या लेण्यांत भिन्न भिन्न तीर्थंकरांच्या अनेक सुंदर मूर्ती असून, त्यांतील महावीराची मूर्ती खूपच भव्य आहे. या गुंफेच्या दर्शनी भागात चार भव्य स्तंभ खोदलेले असून, ते सिंहावर उभे आहेत.

इल्वल–वातापींचा संहार इथे झाला. त्याचे स्मारक म्हणून त्यांच्या कंकालमूर्तीही एका गुहेत खोदून ठेवलेल्या दिसतात.

ही चार लेणी म्हणजे चार विहारच वाटतात. प्रथम खांबांची पडवी, मध्ये स्तंभयुक्त दालन आणि मागे चौकोनी गर्भगृह अशी त्यांची रचना आहे. तिथल्या कारागिरीने डोळे दिपून जातात. उत्तरेकडील डोंगरावर दोन जुनी देवळे आहेत. पण त्यात देवतांच्या मूर्ती नाहीत.

या लेण्यांत काही भित्तिचित्रांचे अवशेष पाहायला मिळतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यावरुन मूळ चित्रे अत्यंत उच्च दर्जाची व सुंदर असतील, याबद्दल संशय राहत नाही. त्यांतील शिव – पार्वतीविवाहाचे चित्र अत्यंत रमणीय आहे. चालुक्यांच्या काळात शिल्पकला व चित्रकला यांचा केवढा विकास झाला होता, याची कल्पना येथील शिल्पे व चित्रे पाहून करता येते. [क. द.; स. भा. प्र. व.; गाइड टु बादामी– ए. एम्. अण्णिगेरी, १९६०]

बान बाध्री सिंधी लोकांचा एक धार्मिक विधी. हा विधी पितरांशी संबद्ध आहे. सिंधू नदीच्या पलिकडे पितरांचे निवासस्थान आहे आणि पौर्णिमेला त्यांना मर्त्य लोकात येता येते, अशी सिंधी लोकांची समजूत आहे. भाद्रपद महिन्यात सिंधू नदीला आलेला पूर ओसरू लागतो. तेव्हा पौर्णिमेच्या दिवशी पितरांना नदी ओलांडून श्राद्धाच्या भोजनासाठी आपल्या वंशजांच्या घरी येता यावे, म्हणून भाद्रपद शुद्ध त्रयोदशीला संध्याकाळी सिंधी लोक नदीची पूजा करून नदीत बांबूच्या नावा सोडतात. त्यांत चार वातींचा आणि एक वातीचा असे दोन पिठाचे दिवे ठेवतात. या नावांत बसून पितर पौर्णिमेला आपल्या वंशजांच्या घरी पोचतात आणि श्राद्धांचे भोजन उरकून अमावस्येला पुन्हां आपल्या निवासस्थानी परततात, अशी या विधीच्या मागची कल्पना आहे. [सिं. क.]

बाना भाल्यासारखे एक शस्त्र. याचे लाकडी व पोलादी असे दोन भेद आहेत. याची लांबी पाच फूट दोन इंच असून, त्याला चार गोळे बसवलेले असतात. शेवटच्या गोळ्याला दोन लहान पोलादी पत्रे बसवलेले असतात. पूर्वकाळी युद्धात शत्रूची गर्दन उडविण्यासाठी त्याचा उपयोग करीत. याचे चक्रबेल आणि काट असे महत्त्वाचे हात आहेत. वाराणसीच्या प्राचीन राजांच्या सैन्यात हे हत्यार चालविणारी एक स्वतंत्र तुकडीच असे. सांप्रतही उत्तर भारतातील पुरमध्ये लोक हे शस्त्र बहुधा नेहमी जवळ बाळगतात. [प्रा. ऐ. श.]

बा परब मुंड व बैंगा आदिवासींचा लोकोत्सव. हा एक वसंतोत्सवच आहे. चैत्र महिन्यात जेव्हा सालवृक्ष फुलांनी बहरतात, तेव्हा हा उत्सव करतात. पितरांची तृप्ती हा या उत्सवाचा मुख्य उद्देश असतो. चैत्र पंचमी हा उत्सवाचा मुख्य दिवस मानलेला असला, तरी वेगवेगळ्या खेड्यांत सोयीप्रमाणे वेगवेगळ्या दिवशी तो करतात. त्यासाठी सोम, बुध व शुक्र हे वार प्रशस्त मानतात. उत्सवाचा दिवस निश्चित झाला, की एक आठवडा अगोदर गावात दवंडी देतात.

ज्या खेड्यात पहाण (पुजारी) असतो, त्या ठिकाणी या उत्सवाची सगळी सूत्रे त्याच्या हातात असतात. उत्सवाच्या आदल्या दिवशी गावातील मोठी माणसे उपवास करतात. पहाण काही अविवाहित मुलांना घेऊन सालवृक्षाकडे जातो. ही मुले त्या झाडाखालची जागा साफसूफ करतात; नंतर दोन मडक्यांमधून झऱ्याचे पाणी घेऊन येतात; सालवृक्षाच्या बुंध्याजवळ ती मडकी ठेवून त्यांना सूत गुंडाळतात; नंतर सालवृक्षाच्याच काठ्यांनी त्या मडक्यातील पाणी मापतात; मग मिरवणुकीने घरी परततात. स्त्रिया असेच घडे घेऊन वेशीवर उभ्या राहतात व मिरवणूक जवळ आली, की त्यांतल्या पाण्याने पहाणाचे व मुलांचे पाय धुतात. नंतर मुले नृत्यमैदानात जाऊन जपी नावाचे नृत्य करतात व मग पहाणाच्या घरी येऊन नाचतात. या नृत्यात मुलीही भाग घेतात. नृत्यानंतर पहाण त्या सर्वांना तांदुळाची दारू देतो. नंतर सगळे घरी जातात. गावातील चार निवडक घरांमधून प्रत्येकी वेगवेगळ्या रंगाचे एक कोंबडे देवाच्या बळीसाठी आणतात. बलिदानाच्या वेळी चंडी बोंगाची व इतर अनेक देवतांची पूजा करतात..

सणाच्या दिवशी दुपारी गावातील मुले पूर्वजांच्या नावाने नृत्य करतात. या नृत्याला बागिडी म्हणजे फुले टाकण्याचे नृत्य असे म्हणतात. सूर्यास्तानंतर घरोघर गोडाधोडाचे जेवण होते. त्यांत मुख्यत्वे भात, उडीद व मद्य यांचा समावेश असतो.

या सणानंतर मुंडा लोक महुआची फुले खायला, तसेच सालवृक्षाच्या नवीन पानांचे द्रोण व पत्रावळी बनवायला प्रारंभ करतात. याच दिवशी प्रथम सालवृक्षाच्या पानावर जेवतात. मग दुसऱ्या दिवशी देवाच्या निर्माल्याची साल पुष्पे घेऊन पहाण घरोघरी नेऊन देतो आणि प्रत्येक घराच्या दारावर किंवा छपरात सालवृक्षाची डहाळी खोचतो. त्याबद्दल त्याला दक्षिणा मिळते. दुपारी प्रत्येक घरातली एक स्त्री पाण्याचा तांब्या आणि थोडे तेल घेऊन पहाणाच्या घरी जाते, त्याचे पाय धुते, तेल त्याच्या अंगाला लावते आणि पुन्हा पाय धुते. पहाण त्या स्त्रियांना मद्य देतो. हे दोन दिवस मुंड लोक शेतात काम करीत नाहीत. [एन्सा. मुंडा.]

बावरिया एक जात. सौराष्ट्राच्या दक्षिण भागात या लोकांची वस्ती आहे. या जातीत अनेक जातींचे मिश्रण आहे. काठी व अहीर यांच्या मिश्रविवाहातून ही जात बनली, असे सांगतात.

ही जात लहान असूनही तिच्या बावीस पोटजाती आहेत. त्यांपैकी कोटिला, ढाकडा व वेरू या तीन मुख्य आहेत. कोटिला हे स्वतःला त्रिकम नावाच्या जैन ब्राह्मणाचे वंशज मानतात. ढाकला हे स्वतःला पांडवांचे वंशज मानतात. वेरू हे स्वतःला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हनुमानाचे वंशज मानतात आणि स्वतःला जेठवा म्हणवतात. त्यांच्या पोटजातींची नावे ते राहत असलेल्या खेड्यांवरून किंवा मूळ पुरुषांवरून पडली आहेत.

विवाहप्रथा— हे लोक आपल्या मुली काठींना देतात व अहिरांच्या मुली आपल्या मुलासाठी करून घेतात. यांच्यांत मामेबहिणीशी अथवा आतेबहिणीशी लग्न करतात; पण मावसबहिणीशी मात्र करीत नाहीत. दोन बहिणींशी एकाच वेळी अथवा एक मेल्यावर दुसरीशी त्यांना लग्न करता येते. दोन सख्ख्या बहिणी सख्ख्या जावा होऊ शकतात. लग्नाच्या वेळी मुलाचे वय १५ ते २० व मुली चे वय १२ ते १५ पर्यंत असते. मुलाचा बाप पुरोहिताच्या मध्यस्थीने लग्नाचा प्रस्ताव करतो. विवाहविधी काठियावाडमधील अन्य जातीच्या विवाहपद्धतीसारखाच असतो. विधवेला विवाहासाठी प्रथम धाकट्या दिराचा विचार करावा लागतो. त्याच्याशी लग्न करण्याचे तिने नाकारल्यास तिच्या नव्या नवऱ्याला किंवा बापाला पंचायतीकडे दंड भरावा लागतो.

देवधर्म — यांच्यापैकी काही रामदासी, काही रामानुजी; तर काही स्वामी नारायणी पंथाचे आहेत. काही शैवही आहेत. प्रत्येक पंथाची स्वतंत्र देवता असून, चामुंडा ही सर्वांची उपास्य देवता आहे. झंखर ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात. हे खोडिया, चावंद व भूतभवानी या देवतांनाही भजतात.

मृतकप्रथा — हे लोक मृतांना जाळतात. लहान मुले व महारोगी यांना मात्र पुरतात. प्रेताचे डोके उत्तरेला करतात. मृताच्या अस्थी व रक्षा यांचे नदीत विसर्जन करतात. श्राद्धही करतात. अविवाहित पुरुष मेल्यास त्याच्या अंत्यसंस्कारापूर्वी ज्यांना शक्य असेल ते लोक वृषोत्सर्ग करतात. [मुं. इ. जा.]

बाबाजी चैतन्य

(इ. स. १५५१–१६५० चा सुमार) एक साधू व तुकारामाचा गुरू. याच्या चरित्रासंबंधीची ऐतिहासिक माहिती अजून उपलब्ध झाली नाही. हा आजन्म ब्रह्मचारी होता असे म्हणतात. गुरुपरंपरा नावाच्या संस्कृत ग्रंथात याच्यासंबंधी जी माहिती आहे, ती अशी—

भेरी भांकारीची राघव, केशव व कृष्ण ऊर्फ बाबाजी अशी तीन मुले होती. राघवाने आळंदीला एक वाद जिंकला म्हणून या त्रयीला चैतन्य हे उपनाम प्राप्त झाले.

नागेशलीलामृत या ग्रंथात बाबाजीसंबंधी काही ओव्या आहेत, त्या अशा—

> बाबा चैतन्य सतेज । जाणे निजाचे निजगुज ।
> नागनाथाचा प्रिय शिष्य । सुपुण्यद्वज उपासनी ।।
> ऐसा वीतरागी प्रबळ । बाबा चैतन्य दयाळ ।
> संचार करिता निर्मळ । पावला स्थळ मान्याळ पै ।।
> भीमा नदीचे तीरी । मान्याळ नामे पवित्र नगरी ।
> तेथे वास्तव्य कांतारी । सुखे सुखांतरी सुखरूप ।।

मान्यहाळ हे गाव गाणगापूरहून दहा-अकरा मैलांवर आहे. मान्यहाळच्या बाबाजीच्या मठाला कोणी नरसप्पाचा मठ असेही म्हणतात. या मठात बाबाजीचे बसण्याचे दोन पलंग आहेत. मठांतल्या देवांबरोबर या पलंगाचीही पूजा करतात. या



बाबाजी चैतन्य याची समाधी – मान्यहाळ

मठासमोर एक मोठे आवार आहे. त्यात बाबाजीची समाधी आहे. तिथे तुपाच्या दिव्याशिवाय अन्य दिवा न्यायचा नाही, असा निर्बंध आहे. शिवाय तिथे स्त्रियांनाही प्रवेश नाही.

शेख सुलेमानसाहेब, नरसप्पय्या, तुकाराम, शिवराम कल्याणीकर हे संत त्याचे शिष्य होत. बाबाजीने मांडवी नदीच्या काठी तुकारामाला स्वप्नोपदेश दिला, असे सांगतात. तुकारामानेही आपल्या एका अभंगात तसे सांगितले आहे. [तु. म. गु.]

बाबादेवमत

एक धार्मिक संप्रदाय. फिदिया नावाचा एक जंगली माणूस याचा संस्थापक होता. इ. स. च्या ४ थ्या शतकात तो होऊन गेला. तो रानात राहून शिकारीवर उपजीविका करीत असे. अडिया व हिरिया या नावाचे त्याचे दोन शिष्य होते. त्यांनी आपल्या गुरूचे माहात्म्य आजूबाजूला बऱ्याच भागात वाढवले. त्यामुळे तातिया, बिजनिया, छितिया, भिल्ल, इ. आदिवासी समाज फिदियाला भजू लागले. फिदियाने बाबादेव नावाच्या एका देवाची उपासना आपल्या भक्तांना सांगितली.

मात्र या बाबादेवाचे मंदिर कुठेही नाही. एखाद्या डोंगरावर किंवा एखाद्या वृक्षाखाली होळी व दिवाळी या सणांत बाबादेवाचे भक्त त्याची पूजा करतात, त्याला नारळ देतात व मद्याचा नैवेद्य दाखवतात. आपले पशुधन सुरक्षित राहावे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणून ते मातीचे हत्ती-घोडे करून बाबा देवाला वाहतात.

या पंथाचे लोक रुंद लंगोटी नेसून अंगावर चादर पांघरतात व डोक्याला रुमाल बांधतात. धोतर नेसायचे झाल्यास त्यांना पंचायतीची परवानगी घ्यावी लागते. ते एकमेकांना भेटतात तेव्हा रामराम म्हणतात. बायका आपल्याहून मोठ्या स्त्रीला नमस्कार करताना दहा वेळा तिच्या पायाला स्पर्श करतात व तोच हात आपल्या कपाळी लावतात. हे लोक शमी वृक्षाला पूज्य मानतात. हे शौचशुद्धीसाठी पाणी वापरत नाहीत. एखाद्याने तसे केल्याचे आढळल्यास त्याला जातिवहिष्कृत करतात. यांच्यांत जातिबंधने अत्यंत कडक आहेत. [भा. म. द.]

बाबालाल (इ. स. चे १७ वे शतक) एक संप्रदायसंस्थापक. याचा जन्म लाहोरजवळच्या कुसूर या गावी झाला, असे काहींचे मत आहे; तर काहींचे मत तो माळव्यात जन्मला, असे आहे. हा जातीने खत्री होता. याच्या आईचे नाव कृष्णादेवी व बापाचे नाव भोलानाथ असे होते. वयाच्या १० व्या वर्षीच त्याला वैराग्य आले व तो गुरूच्या शोधासाठी निघाला. त्या भ्रमंतीत इरावती नदीच्या काठी चेतनस्वामी

बाबालाल

नावाच्या सत्पुरुषाशी त्याची भेट झाली. चेतनस्वामीने दीक्षा देऊन त्याच्यावर अनुग्रह केला. थोड्याच दिवसांत चेतनस्वामीला कळले, की आपल्या शिष्याचे योगसामर्थ्य मोठे आहे. म्हणून त्याने बाबालालला 'तू स्वतंत्रपणे धर्मप्रसार कर' अशी आज्ञा देऊन आपल्यापासून दूर केले.

बाबालाल तिथून सरहिंदनजीकच्या देशनपूर या गावी गेला आणि तिथे स्थायिक झाला. तो रामोपासक असल्यामुळे त्याने तिथे रामाचे मंदिर बांधले व एक मठही स्थापला. हळूहळू त्याची कीर्ती चहूकडे पसरली व त्याच्या भोवती शिष्यवर्ग जमू लागला. बाबा हा कबीर, दादू व अकबर या धर्मसुधारकांच्या परंपरेतला होता. त्याने भक्तिमार्ग व सूफीमार्ग यांतील काही तत्त्वे निवडून एकत्र केली आणि त्यांच्या आधारे एक नवा संप्रदाय उभारला. तोच बाबालाली या नावाने प्रसिद्ध आहे. बाबालालची आध्यात्मिक मते पुढीलप्रमाणे होती –

मानवी आत्मा हा त्या सर्वश्रेष्ठ आत्म्याचा अंश आहे. परमार्थासाठी संसाराचा त्याग उपयुक्त असला, तरी आवश्यक आहेच असे नाही. जो खरा भक्त असतो, त्याला परमेश्वराचे विस्मरण कधीही होत नाही. सर्व वस्तूंचे उगमस्थान एकच आहे, पण एका वस्तूचे दुसऱ्या वस्तूत रूपांतर व्हायचे असल्यास त्याला विधात्या परमेश्वराची मध्यस्थी आवश्यक असते. साधकाला मूर्तिपूजेची आवश्यकता नाही. त्याने योगसाधना करावी. त्या साधनेसाठी श्रद्धा आणि वैराग्य यांना जपावे. शम, दम, सत्य, दया, परोपकार यांचे आचरण करावे. बाबालाल एके ठिकाणी म्हणतो –

जाके अंतर ब्रह्म प्रतीत, धरै मौन भावै गावै गीत ।
निसदिन उन्मन रहित कुमार, शब्द सुरत जुड एको तार ।
ना गह रहे न वनको जाय, लाल दयालु सुख आतम पाव ।
देहाभीतर श्वास है, श्वास भीतर जीव,
जीवे भीतर वासना, किस विधी पाइये जीव ।

भावार्थ – ज्याच्या अंतःकरणात ब्रह्म उमटले आहे, तो इतर विषयांबाबत मौन धरून केवळ भगवंताचे गीत गातो. त्याची अवस्था उन्मन असते. परमेश्वराशी त्याच्या भाव-शब्दांची तार जुळलेली असते. तो घरातही नसतो व वनातही नसतो. लाल म्हणतो, अशा परमार्थी माणसाला आत्मानंद मिळतो. देहात श्वास आहे, श्वासात जीव आहे, पण हा जीव जोवर वासनाबद्ध आहे, तोवर त्याला परमात्म्याची भेट होणे शक्य नाही.

बाबालाल व दारा शुकोह यांच्या अनेक मुलाखती झाल्या होत्या. नादिरुन–निकात या नावाने फारसी भाषेत या मुलाखतींचा वृत्तांत लिहिलेला आहे. या मुलाखती तत्त्वज्ञानाची चर्चा करणाऱ्या असून, त्यांनाच बाबालाली संप्रदायाचा अधिकृत ग्रंथ म्हणून मान्यता आहे.

बाबालालला कायासिद्धी होती व तो ३०० वर्षे जगला, अशी आख्यायिका आहे. याचे अनुयायी मुख्यत्वे वायव्य सीमाप्रांतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. पंजाबातील श्रीध्यानपूर या गावी त्याच्या संप्रदायाचे केंद्र असून, बाबालालची समाधीही तिथेच आहे. वैशाख शुद्ध दशमी व विजयादशमी या दोन तिथींना तिथे मोठी यात्रा भरते. [रि. से. हिं.; उ. भा. सं. प.; एन्सा. रि. ए.]

बायबल ख्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ. बिब्लॉस म्हणजे महान ग्रंथ, या शब्दावरून बायबल हा शब्द बनला आहे. या ग्रंथाचे दोन विभाग असून, पहिल्या विभागाला जुनी योजना, पूर्व विधान किंवा जुना करार असे म्हणतात आणि दुसऱ्या विभागाला नवी योजना, नवविधान किंवा नवा करार असे म्हणतात. पहिल्या विभागात ३९ व दुसऱ्या विभागात २७ मिळून ६६ लहानमोठ्या पुस्तकांचा हा एक संग्रह आहे. करार हे नाव या ग्रंथाला अन्वर्थक वाटत नाही. कारण त्यात ईश्वरी योजना किंवा विधान सांगितलेले आहे, संदेश आहे; कसलाही करार त्यात नाही.

ही सर्व पुस्तके एकाच काळात रचलेली नसून, फार प्राचीन काळापासून ईश्वरभक्तांना झालेल्या प्रेरणांमुळे ती हळूहळू निर्माण झाली आहेत. सनपूर्व १४०० ते इ. स. १०० हा बायबलाचा रचनाकाल मानला जातो.

बायबल हा ग्रंथ ईश्वरी प्रेरणेमुळे निर्माण झाला असला, तरी तो ईश्वरनिर्मित किंवा अपौरुषेय नाही. कारण त्यांतील पुस्तके भिन्न भिन्न मानवांनी आपापल्या विचारांना अनुसरून, आपापल्या भिन्न शैलींनी रचलेली आहेत.

बायबलाचा पहिला भाग येशू ख्रिस्ताच्या पूर्वी रचलेला असून, तो यहुदी लोकांचा धर्मग्रंथ होता. त्यांतील बहुतेक पुस्तके मूळ इब्री भाषेत लिहिलेली होती. त्यांचे ग्रीक भाषेतले भाषांतर हेच प्रमाणभूत मानले जाते. जेरोम नामक साधूने लॅटिन भाषेत केलेले भाषांतर रोमन कॅथॉलिक चर्चमध्ये स्तोत्रवाचनासाठी वापरतात. या भागात यहुदी लोकांचा इतिहास आहे, उत्पत्तीच्या व आदिमानवाच्या कथा आहेत, इस्राएलांच्या थोर पुरुषांची चरित्रे आहेत, त्यांच्या धाडसी कृत्यांची रोमांचकारी वर्णने आहेत आणि धर्मकर्मांचे विवेचन आहे. याव्यतिरिक्त त्यात नाट्य, काव्य व नीतिविषयक सूत्रेही आहेत. या सर्वांतून परमेश्वरी योजनेचे स्वरूप दिसून येते.

जुन्या करारातील ३९ पुस्तकांची विभागणी श्री. र. पु. चव्हाण यांनी केली आहे, ती अशी–

(१) मोशेने लिहिलेली पाच पुस्तके – उत्पत्ती, निर्गम, लेवीय, गणना, अनुवाद.

(२) ऐतिहासिक बारा पुस्तके – यहोशवा, शास्ते, रूथ, १ शमुवेल, २ शमुवेल, १ राजे, २ राजे, १ इतिहास, २ इतिहास, एज्रा, नहेम्या, एस्तेर.

(३) कवितेची पाच पुस्तके– ईयोब, स्तोत्रसंहिता, नीतिसूत्रे, उपदेशक, गीतरत्न.

(४) मोठ्या भविष्यवाद्यांची पाच पुस्तके – यशया, यिर्मया, विलापगीत, यहेज्केल, दानिएल.

(५) लहान भविष्यवाद्यांची बारा पुस्तके– होशेय, योएल, अमोस, ओबद्या, योना, मीखा, नहूम, हबक्कूक, सफन्या, हाग्गय, जखऱ्या, मलाखी.

यहुदी लोकांच्या या धर्मग्रंथांत त्यांच्या लोकशासनपद्धतीचेही वर्णन केलेले आहे. त्या पद्धतीत सारे अधिकार देवाला दिलेले असून, सर्व कायदे देवाच्या मुखातून निघाले आहेत, असे मानले आहे. त्यांचे लोकराज्य तत्त्वतः देवराज्यच होते. तसे ते प्रत्यक्षात पूर्णत्वाने अवतरले नव्हते. पण कित्येक शतके त्यांच्यांत होऊन गेलेले नबी (प्रेषित) त्यांना देवाचे राज्य अद्वितीय वैभवाने युक्त होईल, असा संदेश देत आले होते. यहुदी लोक रोमी साम्राजाचे अंकित झाल्यानंतर त्यांच्या धर्माची पदोपदी अवहेलना होऊ लागली आणि त्यांच्या नशिबी गुलामगिरी आली. त्या गुलामगिरीतून त्यांना सोडवणारा मसीहा लवकरच जगात येणार आहे, असा संदेश त्यांना मिळाला होता. म्हणून ते त्याची मार्गप्रतीक्षा करीत होते.

लोकांच्या त्या आशेवर व प्रतीक्षेवर भर देऊन येशू ख्रिस्ताने आपल्या कार्याला आरंभ केला. त्याने लोकांना सांगितले, की 'तुम्ही ज्याची वाट पाहत आहात तो मुक्तिदाता आलेला आहे. पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.'

बायबलाचा दुसरा विभाग येशूच्या नंतर लिहिला गेला. येशूचे जीवन, व्यक्तिमत्त्व, आत्मबलिदान व पुनरुत्थान यांमुळे मानवाची मुक्तता कशी झाली, चर्चची स्थापना कशी झाली व त्याचा प्रभाव कसा पडला, हे त्यात सांगितले आहे. याची रचना इ. स. ५० ते १०० या कालखंडात झाली. प्रारंभी येशूचे शिष्य किंवा समकालीन पुरुष लोकांना त्याच्याविषयी तोंडी माहिती सांगत. 'प्रभू येऊन आपल्याला स्वर्गात घेऊन जाणार' हे त्याच्या तोंडचे शुभ वर्तमान लोक ऐकत होते. पुढे येशूच्या शिष्यांनी निरनिराळ्या ख्रिस्ती मंडळ्यांना पत्रे लिहिली. त्यानंतर येशूच्या शिष्यांनी त्याची चरित्रे लिहिली. त्यांतून बायबलचा दुसरा भाग निर्माण झाला. त्या भागाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे–

मत्तयकृत शुभ वर्तमान, मार्ककृत शुभ वर्तमान, लूककृत शुभ वर्तमान व योहानकृत शुभ वर्तमान ही येशूच्या चरित्राची चार पुस्तके होत. येशूच्या पट्टशिष्यांच्या कृत्यांचे वर्णन ज्यात आहे, ते पाचवे पुस्तक. योहानचा साक्षात्कार हे सहावे पुस्तक; यात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याने चर्चचे भविष्य प्रतीकात्मक शैलीने सांगितले असून, मुक्तीचे अंतिम स्वरूप वर्णिले आहे. बाकीची २१ पुस्तके म्हणजे येशूच्या शिष्यांच्या पत्रांचे संग्रह होत. या दुसऱ्या भागातली काही वचने उल्लेखनीय आहेत.

येशूच्या शिष्यांनी पश्चात्तापाला फार महत्त्व दिले आहे, असे दिसते–

Then Peter said unto them, Repent, and be baptized every one of you in the name of Jesus Christ for the remission of sins and ye shall receive the gift of the Holy Ghost (The Acts 2·38).

अर्थ – मग पीटर त्यांना म्हणाला – पश्चात्ताप करा आणि पापांची क्षमा व्हावी म्हणून तुमच्यापैकी प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या. त्यामुळे तुम्हांला पवित्र आत्म्याची देणगी प्राप्त होईल.

सेंट जॉन याने पवित्र शास्त्राचे सार सांगितले आहे, ते असे–

For God so loved the world that he gave his only begotten son that whosoever believeth in him should not perish, but have everlasting life (St. John 3 : 16)

अर्थ – देवाने जगावर एवढी प्रीती केली, की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला; जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला चिरकाल जीवन लाभावे हा त्याचा उद्देश होता.

ख्रिस्ती धर्मातील एक महनीय विचारप्रणाली सेंट मॅथ्यूच्या पुढील उपदेशात गोवलेली आहे–

Love your enemies, bless them that curse you, do good to them that hate you, and pray for them which despitefully use you, and persecute you. (St. Mathew 5.44)

अर्थ – तुम्ही आपल्या वैऱ्यावरही प्रेम करा, जे तुम्हांला शापतात त्यांचे तुम्ही भले चिंता, जे तुमचा द्वेष करतात त्यांच्याशी चांगले वागा आणि जे तुम्हांला निष्ठुरपणे छळतात त्यांच्यासाठी तुम्ही प्रार्थना करा.

जुना करार व नवा करार यांच्यामध्ये सुमारे दोनशे वर्षांचा काळ गेला. त्या कालखंडात जे धार्मिक वृत्तीचे लिखाण झाले आणि ज्याच्या बायबलात अंतर्भाव करण्यात आला, त्याला जुन्या कराराचा अपाक्रिफा म्हणतात. अपाक्रिफा म्हणजे गुप्त लिखाण होय. बायबलमधील इतर पुस्तके व अपाक्रिफा यांत ग्रीक पंडित फारसा फरक मानीत नाहीत. पण जेरोमच्या लॅटिन भाषांतराच्या प्रस्तावनेत तो म्हणतो– हिब्री भाषेतून लॅटिनमध्ये जी भाषांतरे केली आहेत, त्याव्यतिरिक्त लिखाणाचा अपाक्रिफात समावेश करण्यात यावा; पण ते धर्मशास्त्रसंमत मानू नये.

जुन्या कराराच्या अपाक्रिफाप्रमाणे पुढे नव्या कराराचाही अपाक्रिफा तयार झाला. त्यात 'यहूदा थोमाची कृत्ये' इ. पुस्तकांचा समावेश होतो. मात्र बहुतेक प्रॉटेस्टंट मंडळे या अपाक्रिफाला शास्त्रसंमत मानीत नाहीत.

इ. स. १७०६ मध्ये झिगेन्बॉल्ग नावाचा एक जर्मन मिशनरी भारतात आला व त्याने तमिळ भाषा शिकून लवकरच त्या भाषेत बायबलाच्या दुसऱ्या भागाचे भाषांतर केले. त्याने जुन्या कराराचेही भाषांतर सुरू केले होते; पण लवकरच तो मरण पावला. मग शुल्दझ नावाच्या दुसऱ्या जर्मन मिशनऱ्याने ते काम पूर्ण केले आणि तेलुगू व हिंदुस्थानी या भाषांतही बायबलाची भाषांतरे केली. इ. स. १८०७ साली कलकत्त्याजवळच्या श्रीरामपूर येथील डॉ. विल्यम केरी याने बायबलाचे पहिले मराठी भाषांतर तयार केले. त्यानेच आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सुमारे ४० भारतीय भाषांत बायबलाची भाषांतरे केली आहेत.

जगातील बहुतेक सर्व भाषांमध्ये बायबलाची भाषांतरे झाली आहेत. या ग्रंथाचा जगात सर्वांत जास्त प्रसार झाला आहे. युरोप-अमेरिकेतील साहित्यिक बायबलाला एक अद्वितीय ग्रंथ समजतात, कारण ते एक आध्यात्मिक महाकाव्य आहे. एका दैवी पुरुषाची, जगासाठी आत्मबलिदान करणाऱ्या संताची सत्यकथा त्यात आहे. ख्रिस्ती धर्माचे सारसर्वस्व त्यात असून, धर्मगुरू व सामान्य जन या सर्वांनाच तो उपयुक्त आहे. येशू ख्रिस्त हा त्याचा गाभा आहे. भक्तांच्या दृष्टीने हा ग्रंथ म्हणजे देवाचे वचन होय. त्यात मुक्तीचा मार्ग दाखवलेला आहे. त्यामुळे ख्रिस्ती लोक या ग्रंथाला जीवनाचा आधार मानतात.

[बायबलची तोंडओळख – श्री. दे. ना. टिळक, १९५७; हिं. वि. को.; ख्रिस्ती धर्म- श्री. र. पु. चव्हाण, १९५८]

बारगुंडा एक जमात. या लोकांची वस्ती प्रामुख्याने मध्य प्रदेशातील रतलाम जिल्ह्यात असून, शिवाय ते इंदूर, भोपाळ, उज्जयिनी, इ. ठिकाणीही विखुरलेले आहेत. हे लोक जी भाषा बोलतात, तिचे तमिळ भाषेशी साम्य असल्याने ते तमिळनाडमधून या भागात आले असावे, असे एक मत आहे. ते आपल्या भाषेला पारशी भाषा असे म्हणतात. काहींच्या मते ही एक भटकी जमात आहे. यांच्यापैकी कोणालाही आपले मूलस्थान कोणते ते सांगता येत नाही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांचे आचार-विचार, पोषाख, राहणी वगैरे सर्व स्थानिक लोकांप्रमाणे असते. त्यांना आपल्या परंपरा, जुनी गाणी यांची माहिती नाही. आता ते केवळ माळवी गाणी गातात.

यांची आर्थिक स्थिती निकृष्ट आहे. चटया, झाडू व टोपल्या बनवणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. पुरुषांनी बनविलेल्या या वस्तू त्यांच्या स्त्रिया बाजारात नेऊन विकतात आणि त्यातून जीवनोपयोगी वस्तू खरेदी करतात. हे लोक पाली पकडण्यात फार चतुर आहेत.

विवाहप्रथा – विवाहसमारंभ तीन दिवस चालतो. त्यात पुरुषांपेक्षा स्त्रियांचाच अधिक पुढाकार असतो. पुरुषाचे पहिले लग्न झालेले असल्याशिवाय त्याला विधवेशी लग्न लावता येत नाही. विधुराला विधवेशी किंवा कुमारिकेशी विवाह करता येतो.

यांच्या स्त्रियांना प्रसववेदना सुरू झाल्या, की त्यांचे नवरेही प्रसव-वेदनेचे नाटक करून अंथरुणावर पडून राहतात.

देवधर्म – भूत, वेताळ, पिशाच या अतिमानवी योनींवर यांची श्रद्धा आहे. ते इतर कनिष्ठ देवतांनाही भजतात आणि गंगा व तुळस यांची शपथ घेतात.

मर्तिकप्रथा – हे मृतांना जाळतात आणि तीन दिवस सुतक पाळतात. चौथ्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. [सि. इं. १९३१]

बारह-इ-वफात मुसलमानांच्या रबी उल् अव्वल या महिन्यातील बारावा दिवस. मुहंमद पैगंबराच्या मृत्यूची स्मृती म्हणून हा दिवस पाळण्याची प्रथा भारतातील मुसलमानांनी सुरू केलेली आहे. इतर देशांतील मुसलमान हा दिवस पाळतातच असे नाही. या दिवशी कुराणाचा प्रथमाध्याय व मुहंमदाची वचने म्हणतात. [डि. इ.]

बारहतपव्रत एक जैन व्रत. हे व्रत एका वर्षातील १४४ दिवसांत पुरे करतात. शुक्ल पक्षातील कोणत्याही तिथीला या व्रताची सुरुवात करतात. प्रथम बारा दिवस उपवास, नंतर बारा दिवस एकभुक्त आणि मग बारा बारा दिवस अनुक्रमे कांजीभोजन, निगोरसभोजन, अल्प आहार, एकपदार्थ भोजन, मुगांचे भोजन, मसुरडाळीचे भोजन, चवळीचे भोजन, हरभऱ्याच्या डाळीचे भोजन, जलपान आणि अखेरचे बारा दिवस तुपाविना भोजन, असा याचा विधी आहे. व्रत पूर्ण झाल्यावर उद्यापन करतात. [जै. व्र. वि. सं.]

बारहपंथ नाथपंथातला एक उपपंथ. नाथपंथी लोक प्रामुख्याने बारा निरनिराळ्या शाखांत विभागलेले आहेत. त्यांची नावे अशी – सननाथ, रामनाथ, धरमनाथ, लक्ष्मणनाथ, दरियानाथ, गंगानाथ, बैराग, रावल अथवा नागनाथ, जालंधरिया, आई, कपिलानी व धजनाथ.

या लोकांना बारहपंथी योगी असे म्हणतात. या प्रत्येक पंथाचे स्वतंत्र असे पुण्यक्षेत्र असते. या विषयी एक कथा सांगतात, ती अशी – साक्षात शिवाने नाथयोग्यांचे बारा पंथ निर्माण केले आणि गोरखनाथानेही आपले बारा पंथ निर्माण केले. मग या दोन्ही पंथसमुदायांत झगडे सुरू झाले. त्यामुळे गोरखनाथाने शिवप्रणीत सहा संप्रदाय व आपले सहा संप्रदाय कमी केले व बाकीच्या राहिलेल्या बारा पंथांचे संघटन करून बारहपंथ असा पंथसमुच्चय निर्माण केला. [हिं. सा.]

बारहमासा लोकसाहित्यातील एक गीतप्रकार. ऋतुगीते आणि ही बारहमासा गीते यांत थोडा फरक आहे. ऋतुगीते ही केवळ त्या त्या ऋतूतल्या निसर्गाचे, पशुपक्ष्यांचे आणि जीवमात्रावर होणाऱ्या त्या ऋतूंच्या परिणामाचे वर्णन करणारी असतात; पण बारहमासा काव्यात व्यक्तिगत भावनेला, विशेषेकरून विरहभावनेला, प्राधान्य असते. ही विरहभावना मुख्यत्वे स्त्रीची असते. उत्तर भारतातल्या बहुतेक सर्व भाषांमध्ये बारहमासागीतांची परंपरा आहे. ही परंपरा फार जुनी आहे. सूरदासादी हिंदी कवींनी संयोग-वियोगाचे वर्णन करताना बारहमासा काव्यपद्धतीचा उपयोग केला आहे. जायसीने आपल्या पद्मावतात नागमतीच्या विरह-वर्णनासाठी बारहमासाचे माध्यम स्वीकारून तिच्या व्यथा-वेदना बोलक्या केल्या आहेत. हिंदीच्या रीतिकालातही चार-पाच कवींच्या बारहमासाच्या रचना उपलब्ध होतात.

काही बारहमासा गीतांत महिन्याच्या नावाबरोबरच धार्मिक व भक्तिविषयक कथाही गुंफल्या गेल्या आहेत. द्रौपदीकी बारहमासी या नावाचे एक मालवी लोकगीत प्रसिद्ध आहे. नरपतिनाल्ह याने बीसलदेवरासो नावाचे एक काव्य हिंदी भाषेत लिहिले आहे. त्या ग्रंथात लोकगीतांच्या शैलीला अनुसरूनच लोकजीवन अभिव्यक्त करणारी बारहमासी अपभ्रंश भाषेत लिहिलेली आहे. विनयचंद्रसूरीच्या नेमिनाथ चडपई या ग्रंथातही बारहमासी आढळते. हा ग्रंथ इ. स. च्या १३ व्या शतकाच्या पूर्वीचा आहे.

काही प्रदेशांत बारहमासीचा प्रारंभ आषाढ महिन्यापासून होतो, काहींत चैत्रापासून होतो, तर काहींत कार्तिकापासूनही होतो. आषाढाची परंपरा विशेष रूढ आहे. आषाढ मासात उन्हाळा संपून पावसाळा सुरू होत असल्यामुळे ऋतुपरिवर्तन किंवा मास परिवर्तन स्पष्टपणे कळून येते. आषाढ हा पावसाळ्याचा प्रारंभमास मानला जातो. त्या वेळी आकाशात काळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेघ भरून आले, त्यांचा गडगडाट सुरू झाला, की विरही जीवांचे मन आपल्या जोडीदाराच्या मीलनासाठी व्याकुळ होते. त्यामुळे इथूनच प्रारंभ करून बारा महिन्यांचे चक्र या गीत प्रकारात पुरे केले जाते. प्रत्येक मासात निरनिराळे सण, उत्सव येत असतात आणि लोक ते आनंदाने साजरे करीत असतात. विरहिणीच्या दृष्टीला ती सारी दृश्ये दिसतात, पण प्रियकर सन्निध नसल्यामुळे त्या सणासुदिनांत ती उदासपणे वावरत असते. तिचे विरहदुःख हेच या गीतांचे वैशिष्ट्य होय.

बारहमासा गीतांचे दोन प्रकार असतात–(१) ज्यांत बाराही महिने विरहच कायम राहतो, अशी गीते व (२) बाराव्या महिन्याच्या अखेरीस विरहिणीचा प्रियकर परत येतो आणि तिचा विरह शृंगारात परिवर्तित होतो, अशीं गीते.

उत्तर प्रदेशातले एक बारहमासा गीत पुढीलप्रमाणे–

फुलेवो विंदिया, फुलें बुरूशी ।
सर्व फूल फूलिगो चैतोई माशा ।
वैसाखा माशा भुवा पति व्याता ।
सिरें को अंचला उड़ि उड़ि जालो ।
जेठई माशा तपकी गे घूपा ।
हुरूकें दै बिजना ठंढी सरूपा ।
आसौड़ घरतरी करिले शृंगारा ।
गिरादिमा ऐगो मेघ बहारा ।
सावन माशा गरजी गोयो मेघ
बरसना लागा सागरे तोला ।
भादोई भवन भयो घन घोरा ।
पिहु-पिहु बोले बनकाई मोरा ।
असोज माशा कुँवार कवायो ।
पंचनामा देवा करीले औतारा ।
कातिक माशा अघनी कवाई ।
घर घर दीपक जगें दिवाई ।
मंगशीर माशा शितमा ऋतु आई ।
सौड़ सुवेद को सेज बनाओ ।
पुसँई माशा पड़लो तुस्यारी ।
हियडो कम्पलौ अगनी अपारा ।
माघई माशा धरमा ऋतु आई ।
घीऊँ खिचडी लै बरमा जिवाया ।
फागुना माशा बढी गई चीरा ।
चोया चंदनी को पैरी ले अबीरा ।

भावार्थ – विंदी व बुरूँशी यांची लाल फुले फुलली आहेत. चैत्र महिन्यात सगळीच फुले फुलतात. वैशाखात वारा जोरदार वाहतो; त्यामुळे डोईवरचा पदर सारखा उडत असतो. ज्यष्ठ आपल्याबरोबर असह्य ऊन घेऊन येतो. तू विंझणवारा करून देहाला शांत कर. आषाढात धरती आपला शृंगार सुरू करते. ती फुलते तशीच फळते. आभाळात मेघांची बहार उठते. श्रावणात मेघगर्जना फार. आकाश जणू पृथ्वीवर सागर लोटीत आहे. भाद्रपदात तीच परिस्थिती. वनात मोर बोलत आहेत. आश्विनात शरदाच्या शोभेला भुलून पंचनाम देवता अवतार घेत आहेत. कार्तिकात दिवाळीचे पर्व. घरोघरी दिव्यांची रोषणाई. मार्गशीर्षात थंडीचे आगमन. लोक त्या थंडीच्या निवारणासाठी गाद्या-दुलया घेऊन आपले बिछाने सजवत आहेत. पौषातली थंडी हृदयाचा थरकाप करते. तिच्यापासून बचाव करायचा, तर शेकोटीची आवश्यकता असते. माघ हा धर्म-कर्मांचा मास. या मासात लोक ब्राह्मणांना तूप आणि खिचडी खाऊ घालत आहेत. फाल्गुनात होळीचे पर्व. या मासात मलमलींची वस्त्रे वापरायची आणि चंदन व अबीर यांनी शरीर सजवायचे.

करुणरसप्रधान बारहमासा गीते विशेषेकरून श्रावण महिन्यात गायिली जातात. अनेक स्त्रिया हिंदोळ्यावर झोके घेताना ती गातात. बारहमासाच्या जोडीलाच छमासा व चौमासा अशी ही गीते आहेत. कुमाऊं प्रदेशात बारहमासा गीते गाणारे परंपरागत पुरुष गायक आहेत. सुमधुर संगीत व सारंगी-तबल्याची साथ यांमुळे या गीतांची गोडी द्विगुणित होते आणि श्रोते तल्लीन होतात. [उ. प्र. लो.; भा. लो. सा.; हिं. सा. को.; मालवी लोकगीत; हृ. प्र. लो. सा.; त्रिपथगा – मे, १९६२]

बारा आदित्य

आदित्याची बारा नावे वेगवेगळ्या ग्रंथांत वेगवेगळी आढळतात. ती अशी–

(१) मित्र, रवि, सूर्य, भानू, खग, पूषा, हिरण्यगर्भ, मरीची, आदित्य, सविता, अर्क व भास्कर.

(२) विवस्वान, अर्यमा, पूषा, त्वष्टा, सविता, भग, धाता, विधाता, वरुण, मित्र, शक्त व उरुक्रम.

(३) धाता, मित्र, अर्यमा, रुद्र, वरुण, सूर्य, भग, पूषा, सविता, विवस्वान, त्वष्टा व विष्णू.

(४) भग, अंश, अर्यमा, मित्र, वरुण, सविता, धाता, विवस्वान, त्वष्टा, पूषा, इंद्र व विष्णू. पाहा – आदित्य.

बारा चक्रवर्ती

एक जैन संकेत. तीर्थंकरांच्या नंतर झालेल्या त्रेसष्ट महापुरुषांत बारा चक्रवर्तींची गणना होते. यांची नावे अशी – भरत, सगर, मघवा, सनत्कुमार, शांती, कुंथू, अर, सुभौम, पद्म, हरिषेण, जयसेन आणि ब्रह्मदत्त. जैन पुराणांतून यांची माहिती आलेली आहे. [म. सा. अ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बारासो चौंतीसी व्रत एक जैन व्रत. या व्रताचा प्रारंभ भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला होतो व ते दहा वर्षे, तीन महिने आणि पंचरा दिवसांनी समाप्त होते. प्रत्येक पक्षातील द्वितीया, पंचमी, अष्टमी, एकादशी व चतुर्दशी असे एका महिन्यात दहा उपवास असतात. या व्रतात एकूण बाराशे चौतीस उपवास होतात. त्यावरूनच या व्रताला हे नाव मिळाले आहे. व्रतकालात 'ॐ ऱ्हीं असि आ उसा चारित्र-शुद्धिव्रतेभ्यो नमः' या मंत्राचा १०८ जप करतात. उद्यापनाच्या वेळी झारी, कलश, लाडू, इ. वस्तू वाटतात.

उज्जयिनी नगरीचा राजा हेमवर्मा याने हे व्रत केले होते. त्यामुळे तो तिसऱ्या जन्मात विदेहातील विजयापुरी नामक नगरीच्या धनंजय राजाचा चंद्रभानू नावाचा पुत्र झाला आणि पुढे तो तीर्थंकर बनला. चंद्रभानूने पंचकल्याणक प्राप्त करून अंती निर्वाणही मिळविले. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

बारी एक जात. उत्तर प्रदेश, बिहार व महाराष्ट्र या राज्यांत यांची प्रामुख्याने वस्ती आहे. या जातीच्या लोकांना पानवाले असेही म्हणतात. पानमळे लावणे आणि विड्याची पाने विकणे, हा यांचा परंपरागत व्यवसाय आहे. पण त्यांच्या-पैकी काही सुतारकाम, मजुरी, इ. उद्योगही करतात. उत्तर प्रदेशातील हे लोक घरगडी म्हणून राहतात, मशाली धरतात व द्रोण-पत्रावळी लावतात. ठाणे जिल्ह्यातील बारी शेतीचे कामं करतात. हे लोक गुजरातेतून आले आहेत, असे सांगतात. यावरून बारींचे मूळ स्थान उत्तर भारतात असून, तिथून ते बिहार, गुजरात या मार्गाने महाराष्ट्रात आले असावे असे एक मत आहे.

बारींचे देशी, नेमाडी व वसवडे असे तीन विभाग असून, त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होतो. या लोकांत अनेक कुळे असून, समान कुळांत विवाह होत नाही.

विवाहप्रथा – मुलींचे विवाह साधारणपणे दोन ते नऊ व मुलांचे पाच ते पंचवीस या वयात होतात. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. लग्नाचा मुहूर्त ब्राह्मण काढून देतो व लग्नात पौरोहित्यही तोच करतो. सगाईच्या वेळी वरपिता काही आप्तां-सह वधूगृही जातो. तिथे वधू-वरांचे मामा एकमेकांच्या पागोट्यांवर वस्त्र फेकतात व एकमेकांना पाच सुपाऱ्या देतात. सगाईचा विधी झाल्यावर विवाह पक्का झाला, असे समजतात. यानंतर हळद, तेलवण, रुखवत वगैरे सोहळे होतात. मुहूर्ताच्या आधी वधूपिता वरगृही एक घोडा पाठवतो व वर त्याच्यावर बसून वधूगृही जातो. वधू देवघरात पश्चिमेकडे मुख करून एका टोपलीत बसलेली असते. तिथे गेल्यावर वरही तिच्या-समोर एका टोपलीत बसतो. टोपलीत सगाईच्या सुपाऱ्या व लग्नपत्रिका ठेवलेल्या असतात. नंतर दोघांच्या मध्ये अंतरपाट धरतात व मंगलाष्टके म्हणतात. अंतरपाट दूर केल्यावर दोघांच्या टोपलीतील सुपाऱ्या व लग्नपत्रिका यांची अदला-बदल करतात. रात्री जेवणावळ होते. झालझेंडा झाल्यावर लग्नविधी समाप्त होतो.

पुण्याच्या बारी लोकांचा विवाहविधी याहून बराच निराळा आहे. त्यांची कुलदेवता हेच त्यांचे देवक असते. लग्नाच्या आदल्या दिवशी ते घरातले देव सोनाराकडे उजळण्यासाठी देतात आणि तिथून वाजतगाजत घरी आणून त्यांची पूजा कर-तात. मग जेवणावळ घालतात. वधू-वरांना आपापल्या घरी हळद लावतात. लग्नासाठी वर घोड्यावर बसून वधूगृही जातो. लग्नाच्या वेळी वधू-वर पाटावर किंवा टोपलीत समोरासमोर उभे राहतात. अंतरपाट धरून मंगलाष्टके झाल्यावर ब्राह्मण त्यांच्यावर अक्षता टाकतो. मग विवाहहोम होतो. दुसऱ्या दिवशी वरात वरगृही जाते.

महिन्याच्या कृष्ण पक्षात कोणत्याही दिवशी विधवाविवाह होतो. वधू-वर शेजारी बसून तांदळाच्या राशीवर मांडलेल्या सुपाऱ्या व खारका यांची पूजा करतात. ब्राह्मण मंत्र म्हणतो. मग वधू-वर विड्या तोडतात आणि लग्नविधी संपतो.

हे लोक व्यभिचारी स्त्रीला जातिबहिष्कृत करतात

देवधर्म – बारी हे शैव असून, तुळजापूरची भवानी व खंडोबा या त्यांच्या कुलदेवता आहेत. ते पानमळ्याची पूजा करतात व पानमळ्याचा देव असलेल्या बहिरामाच्या यात्रेला खानदेशात जातात. खूप मुले असलेली स्त्री मरण पावल्यावर तिची पाषाणाची प्रतिमा करून, गावाबाहेरच्या वडाखाली स्थापतात व वटपौर्णिमेला तिचीही पूजा करतात.

मर्तिकप्रथा – हे लोक विवाहित मृतांना जाळतात व अवि-वाहित मृतांना पुरतात. प्रेताचे दहन झाल्यावर सर्व लोक स्नान करतात आणि कडुलिंबाची पाने घेऊन मृताच्या घरी जातात. तिथे मृताच्या शय्येच्या जागी एक दिवा लावून ठेवलेला असतो. लोक त्याच्या भोवती कडुलिंबाची पाने पसरतात व परत जातात. दुसऱ्या दिवशी स्मशानात जाऊन मृताला जाळलेल्या जागी गोमूत्र व पाणी शिंपडून तिथे मृतासाठी भाकरी, गूळ व तूप ठेवतात. तिसऱ्या दिवशी मृताचा उत्तराधिकारी रक्षा गोळा करून नदीत टाकतो व मृतात्म्याला लाह्या अर्पण करतो. नंतर तो मृताच्या अस्थी गोळा करून एका मडक्यात भरतो व कुठेतरी लपवून ठेवतो. मृताशौच संपल्यावर तो त्या अस्थी पुरतो किंवा पाण्यात टाकतो. यांच्यांत मृतासाठी श्राद्ध व महा-लयही करण्याची चाल आहे. [ट्रा. का. बाँ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बारेला एक आदिवासी जमात. या जमातीत आणि भिलाले जमातीत सांस्कृतिक दृष्टीने फरक नाही. बारेलांच्या उत्पत्तीसंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी – प्राचीन काळी दोन भावांपैकी एकाने रूढीविरुद्ध लग्न केले. त्यामुळे त्याला जातिबहिष्कृत केले गेले. पुढे त्याला झालेली संतती हीच बारेला या नावाने ओळखली जाऊ लागली.

विवाहप्रथा – यांच्यांत विवाहासाठी नवरामुलगा मुलीच्या घरी जात नाही; तर नवरीमुलगीच मिरवत नवरदेवाच्या घरी येते. मग तिथे त्यांचा विवाह होतो.

देवधर्म – बारेला लोक कानसूलिया आणि इंदलपूजा हे दोन प्रमुख उत्सव साजरे करतात. कानसूलिया उत्सव दर बारा वर्षांनी येतो. या दिवशी मुलांचे कान टोचण्याचा संस्कार करतात. या समारंभासाठी एक गाव निवडतात. मग तशी बातमी सर्वत्र पसरवितात. त्यानंतर आजूबाजूच्या गावांतून लोक आपापल्या मुलांना घेऊन तिथे येतात. कान टोचणारा पुरोहित या दिवशी उपवास करतो. कान टोचण्याबद्दल त्याला एक शेर धान्य आणि दारूची एक बाटली देतात. इंदलपूजा म्हणजे इंद्राची पूजा होय. या पूजेचा दिवस पाच वर्षांतून एकदा येतो. गावातील प्रमुख व्यक्तीच्या घरी या पूजेचा कार्यक्रम होतो. सगळे लोक तिथे जमून नाच-गाणी करतात आणि देवाला नवस करतात.

बारेलांची नृत्ये पुढीलप्रमाणे आहेत – (१) घमेडा – केवळ पुरुषांचा नाच. (२) पाली – केवळ स्त्रियांचा नाच. (३) बुरझुडू – पुरुषांचे टिपरीनृत्य. (४) डोहू – हा मुलींचा नाच असून, तो दिवाळीच्या मोसमात करतात. (५) गेर – पुरुषांचा तिरकमठ्यांचा नाच. (६) घोडे उघलू – लग्नातला नाच. यात नवरा-नवरीला खांद्यावर घेऊन नाचतात. [लोककला त्रै.]

बारैस एक जात. या लोकांची वस्ती बिहार प्रदेशातील पालामाऊ जिल्ह्यात आढळते. यांना राऊत असेही म्हणतात. महावीर व गौरैय या देवतांची ते पूजा करतात. त्यांना कथाकीर्तनांची फार आवड आहे. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. [पालामाऊ गॅझे.]

बार्शी महाराष्ट्रातले एक पुण्यक्षेत्र. हे सोलापूर जिल्ह्यात आहे. तिथे एक विष्णुमंदिर आहे. या विष्णूला भगवान म्हणतात. बारशी हा द्वादशीचा अपभ्रंश आहे. अंबरीष राजा एकादशीचे व्रत केल्यावर दुसऱ्या दिवशी साधनद्वादशी करीत असे. एके दिवशी दुर्वासमुनी त्याचे सत्त्व पाहण्यासाठी तिथे आला. अंबरीषाने त्याला भोजनाचे आमंत्रण दिले. दुर्वास स्नानासाठी म्हणून नदीवर गेला, तो लवकर परत आलाच नाही. त्यामुळे साधनद्वादशीची वेळ टळण्याचा प्रसंग आला. दुर्वासाचा तापट स्वभाव लक्षात घेऊन अंबरीषाने केवळ देवाचे तीर्थ प्राशन करून साधनद्वादशी सोडली. पण आपल्या आधी अंबरीषाने नुसते तीर्थ घेतले, हेही दुर्वासाला मानवले नाही. त्याने अंबरीषाला शाप दिला, की 'तू या जन्मी मुक्त होणार नाहीस. तुला दहा जन्म घ्यावे लागतील.' भगवंताला आपल्या भक्ताची ही अवहेलना रुचली नाही. त्याने आपले सुदर्शन चक्र दुर्वासाच्या मागे लावले. दुर्वास त्रिभुवनात पळाला; पण चक्र काही त्याच्या मागचे सुटले नाही. अखेर त्याला अंबरीषाचेच पाय धरावे लागले. त्याच्या विनंतीवरून ते चक्र मागे फिरले व दुर्वासाने सुटकेचा निःश्वास टाकला.

ही कथा या क्षेत्रात घडली आणि तेव्हापासून हे क्षेत्र भगवंताचे क्षेत्र म्हणून प्रसिद्धीस आले, असे सांगतात.

इथले भगवंताचे मंदिर पूर्वाभिमुख आहे. प्रवेशद्वार तीन-मजली असून दगडी आहे. सभोवती प्रशस्त ओवऱ्या आहेत. मुख्य मंदिर दगडी असून, सभामंडप लाकडी आहे. गाभाऱ्यात शाळिग्राम शिळेची विष्णुमूर्ती आहे. जवळच अंबरीषाची मूर्ती असून, भगवंताचा उजवा हात त्याच्या मस्तकी आहे. दुसऱ्या अंगाला लक्ष्मीची मूर्ती आहे.

आषाढी-कार्तिकी एकादशीला इथे मोठा उत्सव असतो. आषाढीस गरुडाची रथात स्थापना करून त्याची मिरवणूक काढतात. गोकुळाष्टमीला सात दिवस उत्सव होतो. नवरात्रातही मोठा उत्सव होतो. पंढरपूर – यात्रा केल्यानंतर बार्शीच्या भगवानाचे दर्शन घेतले पाहिजे; त्यावाचून पंढरपूरच्या यात्रेची सांगता होत नाही, असे समजतात. [स. भा. प्र. व.]

बार्हद्रथ राजवंश एक प्राचीन राजवंश. भारतीय महायुद्धापूर्वी, द्वापर युगात पौरव वंशातील वसू नामक राजाने यादवांकडून चेदी देश जिंकून घेतला आणि मगधापासून मत्स्य देशापर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली. त्याच्या पाच पुत्रांतील ज्येष्ठ पुत्र बृहद्रथ याला मगधाचे राज्य मिळाले. गिरिव्रज ही त्याची राजधानी होती.

बृहद्रथ हा बार्हद्रथ वंशाचा मूळ पुरुष होय. त्याचा पुत्र जरासंध हा महापराक्रमी निघाला. त्याने अत्यंत विशाल आणि वैभवसंपन्न असे साम्राज्य स्थापले. मथुरेचा यादव राजा कंस हा त्याचा जावई होता. त्याने जरासंधाचे मांडलिकत्व मान्य केले. कंसाने आपल्या प्रजाजनांचा फार छळ केल्यामुळे कृष्णाने त्याला ठार मारून उग्रसेनाला मथुरेच्या सिंहासनावर बसविले, तेव्हा जरासंध फार संतापला. मग त्याने मथुरेवर अनेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वाऱ्या केल्या. प्रारंभी यादवांनी त्याचा यशस्वी प्रतिकार केला. पण जरासंधाच्या एकामागून एक होणाऱ्या स्वाऱ्यांमुळे सर्व यादव त्रस्त झाले . मग कृष्णाने त्या सर्व यादवांना द्वारका येथे नेऊन वसते केले. पुढे पांडवांपैकी भीमसेनाने जरासंधाला मारले. मग जरासंधाचा पुत्र सहदेव हा मगधाचा राजा झाला. भारतीय महायुद्धात पांडवांच्या बाजूने लढत असता तो मारला गेला. त्याच्या नंतर त्याचा पुत्र सोमाधी मगधाच्या सिंहासनावर बसला. त्याच्या नंतरचा सहावा राजा पौरव, अधिसीम कृष्णाच्या समकालीन होता. रिपुंजय हा सोमाधीनंतरचा २१ वा राजा असून, तोच या वंशातला शेवटचा राजा होय. त्याचा मंत्री पुलिक याने त्याला ठार मारून आपला पुत्र प्रद्योत याला सिंहासनावर बसवले.

बार्हद्रथ वंशाचे एकूण ३२ राजे होऊन गेले व त्यांनी मगधावर १००० वर्षे राज्य केले, असे पुराणांत सांगितले आहे (मत्स्य पु. २७०.३०-३१). [हिं. क. इं. पी. १; पु. वि.]

बार्हस्पत्य वर्षचक्र

हे एकसाठ वर्षांचे चक्र आहे. त्यातील प्रत्येक वर्षाला वेगवेगळे नाव असून, त्याला संवत्सर म्हणतात. गुरूवरून हे चक्र प्रचलित झाल्यामुळे त्याला बार्हस्पत्य असे नाव मिळाले आहे. हल्लीच्या पंचांगात हेच वर्षचक्र स्वीकारलेले आहे.

गुरूला राशिचक्रातले एक भ्रमण पूर्ण करायला सुमारे बारा वर्षे लागतात. म्हणजेच गुरूचे एक वर्ष पंचांगातल्या बारा वर्षांबरोबर ठरते. अशी ५ गुरुवर्षे = ६० संवत्सरे त्या चक्रात होतात. सूर्यसिद्धांताप्रमाणे एक सौर वर्ष अंदाजे ३६५.२५८७ दिवसांचे असते; तर बार्हस्पत्य वर्ष सुमारे चारशे दिवसांचे असते. त्यामुळे बारा सौर वर्षांत गुरूची सुमारे ११ वर्षे होतात. आणि त्यामुळे या दोन्ही वर्षांचा मेळ घालण्यासाठी १२ वर्षांतून एक संवत्सर लुप्त किंवा क्षय संवत्सर मानण्याची प्रथा पूर्वी होती. अशा क्षय संवत्सराचे एक उदाहरण असे – शके १८७८ च्या आरंभी प्रभव नावाचे बार्हस्पत्य संवत्सर सुरू होते. ३.३ दिवसांनी ते संवत्सर संपवून विभव नावाचे बार्हस्पत्य संवत्सर लागले. हे सौर वर्षारंभापासून ३६४.३ दिवसांनी संपले व शुक्ल नावाचे बार्हस्पत्य संवत्सर चालू झाले. याचा अर्थ असा की शके १८७८ सुरू होताना प्रभव संवत्सर होते आणि शके १८७९ सुरू होताना शुक्ल संवत्सर चालू झाले. अर्थात मधल्या विभव संवत्सराचा क्षय झाला.

सुरवातीस उत्तरेत निरपवाद व दक्षिणेत विकल्पाने क्षय संवत्सर मानण्याची पद्धत होती; पण पुढे दक्षिणेत शके ८३० मध्ये ही पद्धत लुप्त होऊन उत्तरेत मात्र ती चालू राहिली. त्यामुळे उत्तरेतील विक्रम संवताची संवत्सरनामे व दक्षिणेतील संवत्सरनामे एकमेकांशी जुळत नाहीत.

या चक्रातील वर्षांना महाकार्तिक, महामार्गशीर्ष, इ. नावे आहेत; पण तो गणितागत प्रकार समजावा.

या वर्षचक्रातल्या संवत्सरांची नावे पुढीलप्रमाणे आहेत –

(१) प्रभव (२) विभव (३) शुक्ल (४) प्रमोद (५) प्रजापती (६) अंगिरा (७) श्रीमुख (८) भाव (९) युवा (१०) धाता (११) ईश्वर (१२) बहुधान्य (१३) प्रमाथी (१४) विक्रम (१५) वृष (१६) चित्रभानू (१७) सुभानू (१८) तारण (१९) पार्थिव (२०) व्यय (२१) सर्वजित (२२) सर्वधारी (२३) विरोधी (२४) विकृती (२५) खर (२६) नंदन (२७) विजय (२८) जय (२९) मन्मथ (३०) दुर्मुख (३१) हेमलंबी (३२) विलंबी (३३) विकारी (३४) शार्वरी (३५) प्लव (३६) शुभकृत (३७) शोभन (३८) क्रोधी (३९) विश्वावसू (४०) पराभव (४१) प्लवंग (४२) कीलक (४३) सौम्य (४४) साधारण (४५) विरोधकृत (४६) परिधावी (४७) प्रमादी (४८) आनंद (४९) राक्षस (५०) अनल (५१) पिंगल (५२) कालयुक्ताक्ष (५३) सिद्धार्थी (५४) रौद्र (५५) दुर्मती (५६) दुंदुभी (५७) रुधिरोद्गारी (५८) रक्ताक्ष (५९) क्रोधन (६०) क्षय.

दक्षिणेत केरळामध्ये हे चक्र बारा वर्षांचे धरतात. या संवत्सरचक्राचा प्रारंभ कधी झाला, याविषयी विष्णुधर्मोत्तर पुराणात (१.८२.८) पुढील श्लोक दिलेला आहे-

माघशुक्लं समारम्य चन्द्रार्कौ वासवर्क्षगौ ।
जीवयुक्तौ यदा स्यातां षष्ठचब्दादिस्तदा स्मृतः ।।

अर्थ – माघ मासाच्या शुक्लपक्षात चंद्र, सूर्य व गुरु हे धनिष्ठा नक्षत्री जेव्हा एकत्र आले, तेव्हा बार्हस्पत्य वर्षचक्र सुरू झाले.

हे वर्षचक्र फार जुने आहे. ते किती प्राचीन आहे याविषयी श्री. अ. ज. करंदीकर यांनी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे–

वैदिक आर्यांमध्ये गुरूच्या भ्रमणावरून कालमापन करणारे आंगिरस आणि आदित्याच्या भ्रमणावरून कालमापन करणारे आदित्य (म्हणजे आदित्यपंथी, पुढे रवीचे उपासक म्हणून प्रसिद्धीला आलेल्या मग ब्राह्मणांचे पूर्वज ?) यांच्यामध्ये आपापल्या पंचांगांच्या श्रेष्ठतेविषयी तीव्र स्पर्धा चालत असे. या स्पर्धेत अंती आदित्य विजयी झाले. पण या उघड उघड दिसणाऱ्या गोष्टीत आंगिरसांनी आदित्यांशी स्पर्धा करण्याचे साहस केले, तेव्हा आंगिरसांची परंपरा, आदित्यपरंपरेपेक्षा अधिक प्राचीन असली पाहिजे आणि ज्या देशात सहा सहा मास आदित्याला आपले मुखमंडल दाखविण्याची सोय नसल्याने त्याला आंगिरस बृहस्पतीपेक्षा अधिक मान मिळत नसे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशा प्रदेशातील असली पाहिजे. असा प्रदेश अर्थात ध्रुवप्रदेश होय. भारतात आदित्य दिवसाचे नियंत्रण करू शकतो. पण ध्रुवावर साऱ्या वर्षात एकच अहोरात्र असल्याने आदित्याचा दिनगणनेशी संबंधच येत नाही. ध्रुवावरील दीर्घ रात्रीत आदित्यपंथी ब्राह्मणांनाही गुरूच्या अथवा सप्तर्षींच्या ध्रुवा-सभोवती होणाऱ्या प्रदक्षिणेवरून दिनगणना करून रात्रिसत्रे करावी लागत आणि याप्रमाणे सप्तर्षी आणि गुरू यांच्या साहाय्याने केलेल्या सत्रांच्या अंती आदित्याचा उदय होई. या परंपरेच्या आधारामुळेच ध्रुवस्थानापासून भ्रष्ट झाल्या-नंतरही आंगिरस हे आदित्यांशी स्पर्धा करायला धजले. पण गुरूच्या राश्यंतरावरून वर्षे मोजताना अंती आंगिरसांची वर्षे आदित्यांच्या वर्षांपेक्षा वाढत आणि मग त्यांना संवत्सराचा क्षय मानून आदित्यांशी मिळते घ्यावे लागे. महाभारताच्या शांतिपर्वात (३०१)

क्षयं संवत्सराणां च मासानां च क्षयं तथा ।

असे जे वचन आले आहे, त्याची उपपत्ती अशा प्रकारे लागते. बृहस्पतीच सूर्यचंद्रांना भ्रमवितो आणि इतके अद्‌भुत कृत्य दुसरे कोणी करू शकत नाही, असे वर्णन वेदातही आहे.

ऐतरेय ब्राह्मणाच्या चौथ्या पंजिकेत आंगिरस आणि आदित्य यांच्या स्पर्धेसंबंधी दुसरी एक आख्यायिका आली आहे. या उभतांमध्ये स्वर्गलोकी कोण प्रथम पोचतो यासंबंधी स्पर्धा झाली असता, आदित्य प्रथम पोचले आणि आंगिरस त्यांच्या मागून साठ वर्षांनी पोचले, असे तेथे सांगितले आहे. हा उल्लेख उघड उघड आपल्या देशात अद्यापि प्रचलित असलेल्या साठ संवत्सरांच्या चक्राला अनुलक्षून आहे. हे साठ संवत्सरांचे चक्र ख्रि. पू. ३१०२ पासून चालत आले असून, आर्यभट्टाच्या काळी याचे साठ फेरे पूर्ण झाले होते. बार्हस्पत्य-मानाच्या साठ संवत्सरांचे सध्याचे चक्र प्रचलित झाले, तेव्हा सध्याप्रमाणे मेष राशी ही प्रधान राशी नसून कुंभ राशी ही प्रधान राशी होती. त्यामुळे त्या राशीत गुरूचा मध्यम राशि-योगाप्रमाणे प्रवेश झाला की द्वादशवार्षिक चक्राचा प्रारंभ होई. याचा थोडा विचार केला असता असे दिसून येते, की कुंभ राशीत उत्तरायणाचा प्रारंभ ज्या काळी होत असे त्याच काळी साठ संवत्सरांचे बृहस्पतीच्या पाच फेऱ्यांचे हे चक्र चालू झाले असले पाहिजे. अजूनही प्रयाग येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या प्रचंड यात्रेच्या निमित्ताने आपण ही परंपरा अखंडित राखली आहे. कुंभेत उत्तरायण होत असताना साठ संवत्सरांच्या चक्राचा प्रारंभ झाला, हे अनुमान खरे असल्यास, आर्यभट्टाच्या काळी त्या चक्राचे साठ फेरे पूर्ण झाल्याची परंपराही निरपवाद मानावी लागेल. [सं. मि.; हि. ध.; पं. ज्यो.; म. ज्ञा. को.; नि. सिं.; वै. आ. ज्यो. वै. दे. पु.]

बाल अली (इ. स. च्या १७ व्या शतकाचा उत्तरार्ध.) रसिक संप्रदायातील एक आचार्य. याचे मूळ नाव बालकृष्ण नायक असे होते. हा राजस्थानचा रहिवासी होता. प्रारंभी त्याने रामानुज संप्रदायाची दीक्षा घेतली होती; पण त्या संप्रदायाच्या उपासनेत संतोष न वाटून तो पुढे चरणदासाचा शिष्य बनला. पुढे हा अग्रदास गादीच्या रेवासापीठाचा अधि-कारीही झाला. त्याने ध्यानमंजिरी, सिद्धान्ततत्त्वदीपिका, नेहप्रकाश, इ. ग्रंथ रचले आहेत. त्याचे लक्ष काव्यगुणापेक्षा सिद्धान्ताच्या विवेचनाकडेच अधिक होते.

त्याचा नेहप्रकाश हा ग्रंथ रामभक्तीच्या रसिक संप्रदायात प्रतिष्ठा पावलेला आहे. सीता ही रामाची आल्हादिनी शक्ती मानून, तिचे चित्रण या ग्रंथात केलेले आहे. सीता-रामाचे प्रेमा-द्वैत आणि आत्माद्वैत यांचे वर्णन करणे, हा या काव्याचा प्रमुख विषय आहे. शिवाय रामाचा प्रेमविलास, रसविलास, इ. विषयही यात आहेत. बाल अलीच्या मतानुसार सीतेची चरण-धूल सेवन करणे, हेच भक्ताचे प्रमुख लक्षण होय.

बाल अलीच्या सिद्धान्ततत्त्वदीपिका या ग्रंथात रामभक्तीच्या सिद्धान्तांच्या व्याख्या आल्या आहेत. त्याच्या ध्यानमंजिरी या ग्रंथाला रसिक संप्रदायात फार मान्यता आहे. ध्यानमंजरीत एकूण २७३ छंद आहेत. रामाची सच्चिदानंद शोभा आणि सीतेचे अनिर्वचनीय पवित्र सौंदर्य यांचे वर्णन या ग्रंथात आढ-ळते. [रा. भ. शा.; हिं. सा. को. २]

बालक (१) सामान्यपणे पाच वर्षांपर्यंतच्या स्त्री-पुमान अप-त्याला बालक म्हणतात. बालक हे निर्व्याज असल्या-मुळे त्याला देवासारखे मानतात. बालकाविषयी काही लोक सम-जुती अशा – त्याला कोणाचा व त्याचा कोणाला विटाळ होत नाही. पारोसेपणी ते देवाला शिवले तरी चालते. त्याला जनना-शौच किंवा मृताशौच लागू नसते. रजस्वला स्त्रीचा स्पर्श झाला तरी त्याला दोष लागत नाही; मात्र रजोदर्शनाच्या चौथ्या दिवशी अशी स्त्री बालकाला शिवली, तर त्याला मुडदूस होतो. बालक हे स्वभावतःच कोमल व सुंदर असते. त्यामुळे त्याला भुताखेतांची किंवा पापी माणसांची दृष्ट लागते. त्यामुळे ते फार रडू लागले किंवा आजारी पडले तर त्याची दृष्ट काढतात. बालक शरीराचा घोडा करून मागे पाहू लागले तर, लवकरच त्याच्या पाठीवर भावंड येणार आहे, असे समजतात. बालक अशुभ योगावर जन्मले तर गोप्रसव-विधी करून, ते बालक गायीचे आहे, असे समजतात व मग त्याला पदरात घेतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बालकाचे सगळे संस्कार आणि सोहळे हे त्याच्या आयुष्यवृद्धी-साठी असतात. नवजात बालकाला इडा-पिडा होऊ नये, म्हणून काही ठिकाणी षष्ठीपूजनाच्या दिवशी बालकांना गोडधोड जेवण घालतात. एखाद्याची मुले जगत नसली, तर ती जगावी म्हणून मुलांना बोलावून भोजन घालण्याची काही ठिकाणी पद्धत आहे. वंध्या स्त्रिया अपत्यप्राप्तीसाठी बालकांना दहीभात जेवायला घालतात. आसन्नमरण व्यक्तीकडे एखाद्या बालकाने टक लावून पाहिले, तर त्या पाहण्याला देवदृष्टी म्हणतात. या देवदृष्टीने तो रुग्ण जगण्याचा संभव असतो.

भक्तिमार्गात श्रीकृष्णाच्या बालरूपाला विशेष महत्त्व दिलेले आहे. भागवताच्या दशमस्कंधात बालकृष्णाचे कौतुक खूप वर्णिले आहे. अनेक संतांनी त्याच्या बालक्रीडेवर अभंग व पदे रचली आहेत. कल्पांतीच्या प्रलयजळात एका वटपत्रावर श्रीविष्णू बालकरूपाने शयन करतो, अशी कल्पना आहे. त्या विषयी एक श्लोक असा –

करारविन्देन पदारविन्दं मुखारविन्दे विनिवेशयन्तम् ।
वटस्य पत्रस्य पुटे शयानं बालं मुकुन्दं मनसा स्मरामि ।।

अर्थ – करकमलाने पदकमल धरून त्याचा अंगठा मुख-कमलात धारण करणाऱ्या आणि वटवृक्षाच्या पानावर पहुड-लेल्या बाल मुकुंदाचे मी मनाने स्मरण करतो.

बालकाला पाळण्यात झोपविताना जी गीते म्हणतात, त्यांना अंगाई गीते म्हणतात. उत्तर प्रदेशात अशा गीतांना लोरियाँ असे नाव आहे. मराठीतल्या स्त्री-गीतांमध्ये बालकौतुकाच्या कितीतरी ओव्या सापडतात. त्यांतल्या काही ओव्या अशा –

माझे तान्हे बाळ देवाचे मंगल अमृताचे फळ संसाराचे ।।
तान्हीया रे बाळा मंगलाच्या मूर्ती संसाराची पूर्ती तुझ्यामुळे ।।
अंथरूण केले जाईमोगऱ्याचे बाळा गोजिऱ्याचें अंग मऊ ।।
तान्ह्या रे तान्हिका बाळा रे माणिका
तुझ्या रे श्रीमुखा लिंबलोण ।।
जळो जळो दृष्ट मिठाचे झाले पाणी
बाळ माझे फुलावाणी कोमेजले ।।
गोऱ्या गालांवर मुलामा लाल लाल
जणूं गुलाबाचे फूल शोभिवंत ।।
गळ्यांत हांसोळी कमरे सांखळी
मूर्त साजिरी गोजिरी तान्हे बाळाची ।।
तान्हीया रे बाळा तुझ्या पायी वाळा
तुझा डोळा काळा काजळाने ।।
शेजीनें वाहिली शिव्यांची लाखोली
पुष्पपूजा झाली बाळराजा ।।
काजवे फुलले फुलले लाख लाख
पाहावे श्रीमुख तान्हे बाळाचे ।।

वरील ओव्यांतून बालकविषयक कौतुक, तद्विषयक समजुती व संकेत यांचे निदर्शन होते. [की. पॉ.; स्त्रीजीवन]

(२) (इ. स. चे ११ वे शतक) एक धर्मशास्त्रकार. हा बंगालमधील असावा. याने धर्मशास्त्राच्या कित्येक शाखांवर एक ग्रंथ रचला होता, असे कळते. प्रस्तुत ग्रंथ उपलब्ध नाही; पण रघुनंदन व शूलपाणी या धर्मशास्त्रकारांनी बालकाची मते उद्धृत केली आहेत. जीमूतवाहनाच्या ग्रंथातही याचा उल्लेख वारंवार आला आहे. त्यावरून त्याच्या ग्रंथाचे अस्तित्व सिद्ध होते. बालकाची काही मते अशी–

विधवा पत्नी, मुलगी, आईबाप आणि भाऊ यांच्या नंतर एखाद्याच्या संपत्तीचा वारसाहक्क कन्यापुत्राला मिळावा. कुटुंबात एखाद्या भावाने आपल्या विद्येच्या बळावर काही संपत्ती मिळवली, तर तिच्यावर इतर भावांचा हक्क पोचत नाही. स्थावर मिळकत २० वर्षे एखाद्याच्या कबजात असेल, तर ती धारण करणारा तिचा मालक होतो. [हि. ब.]

बालगंधर्व (१८८८–१९६७ इ. स.) मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ गायक व स्त्रीभूमिका करणार नट. यांचे संपूर्ण नाव नारायण श्रीपाद राजहंस असे होते. यांचे वडील श्रीपादराव हे मुंबई सरकारच्या इरिगेशन विभागात होते. त्यांना गाण्याचा नाद होता आणि ते सतारही उत्तम वाजवीत. नारायणाचे एक मामा श्री. वासुदेवराव पुणतांबेकर हे त्या काळी आघाडीवर असलेल्या नाट्यकलाप्रवर्तक मंडळीचे मालक होते. त्यांच्यामुळे राजहंस कुटुंबातील मंडळींना नेहमीच उत्तमो-त्तम नाटके पाहायला मिळत.

अशा प्रकारे वडील व मामा यांच्याकडून नारायणाला गायनाभिनयाचा वारसा मिळाला. नारायणाचे प्राथमिक शिक्षण नागठाणे येथे झाले. पुढील शिक्षणासाठी त्याला जळगाव येथे त्याच्या आत्याकडे ठेवण्यात आले. परंतु नारायणाचे शाळेत अजिबात लक्ष नसून, तो अष्टौप्रहर गायनाच्याच नादात मग्न असतो, हे पाहून आत्याच्या यजमानांनी नारायणाला मेहेबूब-खान नावाच्या एका गवयाकडे गाणे शिकायला ठेवले. आत्याचे यजमान श्री. म्हाळस हेही गाण्या-नाटकांचे नादी असल्या-मुळे त्यांच्याकडे असताना नारायणाला भरपूर नाटके पाहायला मिळाली. ती पाहून त्याला आपण नाटक मंडळीत जावे, असे तीव्रतेने वाटू लागले.

याच वेळी नारायण आपल्या पुण्याच्या एका चुलत्याकडे आला व तिथे त्याचे गाणे लो. टिळकांनी ऐकले. नारायणाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुरेल आवाज व गाणे म्हणण्याची धाटणी पाहून, 'हा तर साक्षात बालगंधर्व आहे!' असे लोकमान्यांनी उद्‌गार काढले. अशा प्रकारे टिळकांनी सहज म्हणून उच्चारलेले 'बालगंधर्व' हे शब्दच पुढे नारायण राजहंसाचे विशेषनाम ठरले!

इ. स. १९०३ साली नारायण इंग्रजी दुसरीत होता. अभ्यासात लक्ष नसले, तरी गायनाचे शिक्षण चालू होते. त्याच वर्षी श्रीपादरावांना एका अपघातामुळे अंथरुणावर पडून राहण्याचा प्रसंग आला. ते अंथरुणावर पडल्यामुळे त्यांचा पगार येणे बंद झाले व घरातल्या दुखण्यांमुळे खर्च मात्र वाढला! अशातच नारायणाला कुत्रे चावले व औषधोपचार करण्यासाठी त्याला कोल्हापूरच्या एका स्नेह्याकडे ठेवण्यात आले. तेथे कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींनी त्याचे गाणे ऐकले व ते त्याच्या आवाजावर खूष झाले. पण त्याच वेळी त्याला एका कानाने कमी ऐकू येते, हेही त्यांच्या लक्षात आले. इतक्या सुंदर आवाजाचा मुलगा बहिरा असावा, याचा त्यांना विषाद वाटून त्यांनी त्याच्या कानावर उपचार करण्यासाठी त्याला मिरजेच्या युरोपियन डॉक्टरकडे पाठवले व उपचार चालू असेपर्यंत त्याची राहण्या-जेवण्याची व्यवस्था किर्लोस्कर नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी केली. अशा प्रकारे नारायणाला आयतेच नाटकमंडळीत राहायला मिळाले.

या वेळी शाहूमहाराज व किर्लोस्कर नाटक मंडळीचे चालक यांच्यांत नारायणाने नाटकात काम करावे अशी बोलणी चालू होती. पुढे त्याच्या आई-वडिलांची संमती मिळाल्यावर इ. स. १९०५ च्या गुरुद्वादशीच्या दिवशी नारायणाने किर्लोस्कर मंडळीत प्रवेश केला. नाट्याचार्य देवल यांनी त्याला शाकुंतलातल्या शकुंतलेची भूमिका शिकवण्यास प्रारंभ केला.

यानंतर यथाकाल शाकुंतलाचा प्रयोग झाला व रंगभूमीवरील आपल्या प्रथम पदक्षेपातच नारायणाने सर्व प्रेक्षकांची मने आपल्याकडे आकर्षून घेतली. लहान वय, सुडौल व गोंडस बांधा, देखणे रूप व सुरेल आवाज या गुणांमुळे त्याची पहिलीच भूमिका दृष्ट लागावी अशी सुंदर वठली. शकुंतलेनंतर सुभद्रा, वसंतसेना, नंदिनी, इ. भूमिका तो आपल्या सरससुंदर अभिनयाने व मधुर गायनाने अप्रतिमपणे वठवू लागला.

किर्लोस्कर मंडळीत प्रवेश केल्यापासून दोनच वर्षांनी म्हणजे इ. स. १९०७ साली पारगावकर कुटुंबापैकी लक्ष्मी नावाच्या एका काळ्या-सावळ्या व सामान्य स्वरूपाच्या मुलीशी नारायणाचा विवाह लावून देण्यात आला.

नारायणाच्या लग्नानंतर किर्लोस्कर मंडळीने महाराष्ट्रातल्या प्रमुख शहरीं एक प्रदीर्घ दौरा काढला. या दौऱ्यामुळे मंडळीला अफाट पैसा मिळाला, तसाच बालगंधर्वांचा कीर्तिसुगंधही दशदिशांत दरवळला. अशा प्रकारे कीर्ती, संपत्ती आणि समृद्धी यांची चहूबाजूंनी वृष्टी होत असतानाच बालगंधर्वांच्या व्यक्तिगत जीवनात एक दुर्दैवी घटना घडली व त्या प्रसंगाच्या निमित्ताने त्यांच्या अंगच्या एका नव्या सद्‌गुणाचे लोकांना दर्शन झाले. दि. १२ मार्च १९११ या दिवशी मुंबई मुक्कामी किर्लोस्कर मंडळीचे नवे नाटक 'मानापमान' रंगभूमीवर यायचे होते. त्यात बालगंधर्वांना भामिनीची भूमिका करायची होती. नाटक नवे व त्याचे लेखक श्री. काकासाहेब खाडिलकर, यामुळे त्या नाटकाबद्दल रसिकांच्या मनात अपार औत्सुक्य होते. पण नाटकाच्या आदल्याच रात्री बालगंधर्वांची मुलगी एकाएकी मरण पावली. या दुर्घटनेने सगळ्यांच्याच उत्साहावर पाणी पडले. मंडळीचे मालक शंकरराव मुजुमदार यांनी त्या दिवशीचा प्रयोग पुढे ढकलण्याचे ठरविले व त्यांनी ती गोष्ट बालगंधर्वांच्या कानी घातली. पण बालगंधर्व एकदम मान उंचावून म्हणाले. 'झालं ते झालं, नाटक बंद ठेवू नका! माझ्या एकट्याच्या दुःखासाठी हजारो प्रेक्षकांच्या आनंदावर विरजण घालू नका.' बालगंधर्वांचे ते उद्‌गार ऐकून व तो धीरोदात्तपणा पाहून मुजुमदार चकित झाले. मानापमानाचा तो प्रयोग सर्वस्वी अविस्मरणीय ठरला. त्यात बालगंधर्वांनी आपली भूमिका अत्यंत समरसून व रंगून केली.

त्यानंतर मानापमानाचे प्रयोगावर प्रयोग होऊ लागले. बालगंधर्वांची कीर्ती मध्यान्हीच्या सूर्यासारखी तळपू लागली. किर्लोस्कर मंडळीवर पैशांचा पाऊस पडू लागला. अशा प्रकारे बालगंधर्व हे किर्लोस्कर मंडळीचे एक आधारस्तंभ ठरल्यामुळे त्यांच्या चाहत्यांनी त्यांना मंडळीत भागीदारी द्यायला लावली. पण ही भागीदारी यशस्वी ठरली नाही. पुढे थोड्याच दिवसांत बालगंधर्व, टेंबे, बोडस ही नटमंडळी किर्लोस्कर मंडळीतून फुटून बाहेर पडली व त्यांनी बालगंधर्वांना अग्रस्थान देऊन मुंबई मुक्कामी गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली.

नवी नाटक मंडळी स्थापल्यावर बालगंधर्व हिरीरीने कामाला लागले. देवल, तात्यासाहेब कोल्हटकर, खाडिलकर यांसारख्या नामवंत नाटककारांना त्यांनी आपल्या मंडळीत पाचारण केले. दत्तोपंत पेठकर, दादा लाडू, राजारामबापू पुरोहित, जगन्नाथबुवा पंढरपूरकर यांच्यासारखे गुणी गायक-वादक जमविले. गोविंदराव टेंबे यांच्या मोठमोठ्या संस्थानिकांकडे ओळखी होत्या. त्यांनी संस्थानिकांकडून उंची व भरजरी शालू-पैठण्या आणल्या. याच वेळी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी गंधर्व नाटक मंडळीला राजाश्रयही दिला.

गंधर्व नाटक मंडळीच्या स्थापनेनंतर तिने मुंबईत मूकनायक, शापसंभ्रम, मानापमान, मृच्छकटिक, इ. नाटके सादर केली. सर्व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाटकांनी भरपूर उत्पन्न मिळवून दिले. नंतरच्या दोन वर्षांत मंडळीने बडोदे, इंदूर, औरंगाबाद, पुणे, जळगाव, नागपूर, इ. ठिकाणचा प्रदीर्घ दौरा करून कीर्ती व संपत्ती भरपूर मिळवली.

दिवसेंदिवस बालगंधर्वांच्या स्त्रीभूमिकांची मोहिनी वाढत होती. स्वतःच्या मालकीच्या कंपनीत त्यांना आपल्या मनाप्रमाणे सर्व प्रकारचा कलाविलास करता येत होता. त्यांच्या

स्त्रीवेषात बालगंधर्व

वेषभूषेचे व केशभूषेचे अनुकरण करायला सुधारक स्त्रीसमाजाने याच वेळी सुरुवात केली. दादा लाडू हे गंधर्व नाटक मंडळीचे तबलजी फावल्या वेळात फोटोग्राफीचा व्यवसाय करीत. बालगंधर्वांची समाजावर असलेली मोहिनी लक्षात घेऊन, त्यांनी बालगंधर्वांचे निरनिराळ्या स्त्रीभूमिकांतले सुबक व सुंदर फोटो घेऊन ते विकायला सुरुवात केली.

प्रारंभापासून बालगंधर्वांचा स्वभाव हौशी व विलासी असल्यामुळे ते वाटेल तसा पैसा उधळीत. नाटकात घालायचे दागिने आणि कपडे हेसुद्धा नकली असू नयेत, खरे असावे असे त्यांना वाटे. ते स्वतः गंधर्व नाटक मंडळीचे मालक व प्रमुख नट असल्यामुळे त्यांच्या खर्चिकपणाला कोणी प्रायबंद घालू शकत नसे. एकदा गोविंदराव टेंबे यांनी बालगंधर्वांच्या काही अनावश्यक खर्चाविषयी नापसंती व्यक्त केली. परंतु गंधर्वांच्या पाठिराख्यांनी गोविंदरावांच्या या नापसंतीचे भांडवल करून त्यांच्याविरुद्ध कारस्थाने सुरू केली व त्याचे पर्यवसान शेवटी गोविंदराव टेंबे गंधर्व नाटक मंडळातून बाहेर पडण्यात झाले.

इ. स. १९१६ सालच्या नोव्हेंबरात गंधर्व नाटक मंडळीने गोविंदराव देवलांचे संशयकल्लोळ हे हास्यरसप्रधान नाटक रंगभूमीवर आणले. त्यातील रेवतीची भूमिका बालगंधर्वांनी अतिशय यशस्वीपणे सादर केली. रेवती ही गणिका. बालगंधर्वांनी आजपर्यंत ज्या भूमिका केल्या होत्या, त्या सगळ्या राजकन्या, ऋषिकन्या यांच्या होत्या. रेवतीची भूमिका त्या भूमिकांपेक्षा वेगळी होती. पण बालगंधर्वांनी तीही भूमिका यशस्वीपणे करून आपल्या अनेकांगी अभिनयकौशल्याची प्रचीती आणून दिली. संशयकल्लोळ नाटकाच्या पाठोपाठ गंधर्व नाटक मंडळीने काकासाहेब खाडिलकरांचे स्वयंवर रंगभूमीवर आणले. यातली रुक्मिणीची भूमिका बालगंधर्वांनी एका आगळ्या ढंगाने सादर केली. रुक्मिणी नुसतीच प्रेयसी नाही, तर ती त्यागी आणि अभिमानी आहे, हे त्यांनी दाखवून दिले. एकाच महिन्यात संशयकल्लोळातल्या रेवतीची व स्वयंवरातल्या रुक्मिणीची, अशा दोन अत्यंत भिन्न स्वरूपाच्या व भिन्न व्यक्तिमत्त्वाच्या भूमिका करून बालगंधर्वांनी एक प्रकारे अभिनयाचा विक्रम करून दाखविला. यानंतर बालगंधर्व हे लोकांच्या केवळ कौतुकाचा विषय न राहता, भक्तीचा विषय बनले. यापुढे बालगंधर्व गातील ते गाणे व करतील तो अभिनय, अशी श्रद्धा प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाली.

पुण्याच्या मुक्कामात बालगंधर्वांनी राम गणेश गडकरी यांना आपल्यासाठी नाटक लिहिण्याची विनंती केली. त्यावर गडकरी त्यांना म्हणाले. ‘ हे पाहा नारायणराव, मी तुमच्यासाठी नाटक लिहीन, पण एका अटीवर. माझ्या नाटकात तुम्हांला फाटके लुगडे नेसून दळावे लागेल. ’ बालगंधर्वांचा उंची आणि भरजरी शालूपैठण्यांचा हव्यास जगजाहीर होता. त्यामुळे आपली ही अट ते मानणार नाहीत, अशी गडकरी यांची कल्पना. पण बालगंधर्व एकदम उत्तरले. ‘अहो, फाटके लुगडेच काय, गोणपाट नेसून म्हणालात तरी मी काम करायला तयार आहे. ’ कारण त्यांची गडकऱ्यांच्या लेखनावर नितांत श्रद्धा होती आणि जातिवंत नट असल्यामुळे कोणतीही भूमिका त्यांना वर्ज्य नव्हती.

बडोदे मुक्कामी सयाजीराव महाराजांसमोर एकच प्यालाचा प्रथम प्रयोग सादर झाला. त्यातली बालगंधर्वांची सिंधूची भूमिका अनेक अर्थांनी तत्कालीन समाजाला अत्यंत आवडली व ती आदर्श ठरली. त्यांच्या प्रत्येक हालचालीत, शब्दोच्चारात, हावभावात आणि गायनातल्या प्रत्येक स्वरात चारित्र्य, पावित्र्य,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कारुण्य, वात्सल्य अशा विविध रसांचा साक्षात्कार घडत असे. 'अशी सिंधू पुन्हा कधीच झाली नाही,' असा स्पष्ट अभिप्राय बालगंधर्वांचे सिंधूचे काम पाहिलेले लोक आजही देतात. कारण बालगंधर्वांनी सिंधूची भूमिका केली नाही, तर ते ती भूमिका जगले. त्यांची ती भूमिका म्हणजे त्यांच्या अभिनयमंदिरावरचा कळस होता.

बालगंधर्वांच्या उधळेपणावर गणपतराव बोडस वारंवार मर्यादा घालण्याचा प्रयत्न करू लागले व त्यामुळे त्या उभयतांत वितुष्ट आले. त्याची परिणती म्हणून बोडसांना गंधर्व नाटक मंडळीतून बाहेर पडावे लागले. आता गंधर्वमंडळीचे एकमेव मालक म्हणून बालगंधर्वांचे नाव लागले. त्यामुळे त्यांना दाबता-दडपता कोणी उरला नाही. उलट कलाविलास या नावाखाली त्यांच्या विलक्षण खर्चाचे कौतुक करणारे लोक त्यांच्या भोवती जमा झाले.

बाळासाहेब पंडित हे त्यांपैकीच एक होत. बालगंधर्वांच्या रंगभूमीवरील प्रारंभकालापासून ते त्यांचे जिवलग मित्र बनले होते. बालगंधर्वांसाठी त्यांनी आपल्या संपत्तीची अमाप उधळण केली होती; पण पुढे त्यांच्या दैवाचे फासे उलटे पडले. गंधर्व नाटक मंडळीत ते व्यवस्थापक म्हणून आले. आपल्या कारकीर्दीत त्यांनी मंडळीत खूप चैन केली व गंधर्वांचीही चैन चालू ठेवली. त्यामुळे मंडळी हळूहळू कर्जबाजारी होऊ लागली. दिवसेंदिवस कर्जाचा आकडा फुगत चालला व बालगंधर्वांना त्याची कल्पनाही आली नाही.

याच काळात खाडिलकरांनी द्रौपदी नावाचे नवे नाटक लिहून पुरे केले व बालगंधर्वांनी ते मोठ्या थाटामाटात रंगभूमीवर आणले. त्याच्या सरंजामासाठी गंधर्वांनी जवळ-जवळ पाऊण लाख रुपये खर्च केले. परंतु एवढ्या ऐश्वर्यानिशी रंगभूमीवर सादर केलेल्या या नाटकाचा प्रयोग पाहून प्रेक्षक संतुष्ट झाले नाहीत. आणि मागील कर्जात या खर्चाची भर पडून कर्जाची रक्कम चांगलीच वाढली.

इ. स. १९२१ सालच्या मे महिन्यात गंधर्व नाटक मंडळी मुंबई सोडून पुण्याला निघालेली पाहताच स्टेशनवर सावकारांच्या पठाणाने सर्व मंडळींना अडवले. याच वेळी बाळासाहेब पंडितांच्या दुसऱ्या एका खटल्याचा निकाल लागून त्यात त्यांना शिक्षा झाली. हा सर्व प्रकार पाहून बालगंधर्व अगदी हतबुद्ध झाले.

त्या कठीण प्रसंगी मुंबईचे प्रसिद्ध सॉलिसिटर श्री. पी. एस. लाड पुढे सरसावले आणि त्यांनी बालगंधर्वांना धीर दिला. नंतरच्या काळात गंधर्व नाटक मंडळीचे सर्व कागदपत्र व हिशेब त्यांनी तपासले, तेव्हा त्यांना आढळून आले की मंडळीला एकूण ७२ सावकारांचे १ लक्ष ८० हजार रुपये कर्ज होते. एकट्या काशीनाथराव खोटे यांचेच ६० हजार रुपये कर्ज होते. तेव्हा लाडसाहेबांनी त्यांच्या वतीने कबजे गहाणदार या नात्याने मंडळीची सर्व मालमत्ता आपल्या ताब्यात घेतली व काही थोड्या सावकारांचे पैसे देऊन उरलेल्यांची समजूत काढून त्यांना थोपवून धरले.

बालगंधर्वांना त्या प्रसंगात साहाय्य करावे या हेतूने मुंबईतील काही प्रतिष्ठित नेत्यांनी व विविध क्षेत्रांत गाजलेल्या मंडळींनी एक सभा घेऊन बालगंधर्वांच्या कर्जफेडीसाठी निधी उभारला. गंधर्वांवरची लोकांची भक्ती एवढी मोठी, की जागच्या जागी सुमारे एक लाख रुपये देणग्यांची आश्वासने मिळाली. बालगंधर्वांना ही आनंदवार्ता कळली तेव्हा ते गहिवरले व म्हणाले 'देवा, माझ्यासाठी फंड जमवू नका. माझ्या चुकीमुळे झालेले कर्ज माझे मलाच फेडले पाहिजे! ते फिटेपर्यंत आपणां सर्वांचा आशीर्वाद व प्रभूची कृपा कायम असावी, इतकीच माझी प्रार्थना आहे!'

सॉलिसिटर लाड यांनी जरी गंधर्व मंडळी ताब्यात घेतली तरी तिचा उद्देश मंडळीचे कर्ज फिटेपर्यंत ती सुरक्षित असावी, एवढाच होता. मंडळीची व्यवस्था पाहण्यासाठी लाड यांनी श्री. दादा काटदरे नावाच्या एका हुशार व अनुभवी व्यवस्थापकांची नेमणूक केली.

यानंतर गंधर्व नाटक मंडळीने आपले पुण्यास जाणे रहित करून मुंबईतच मुक्काम ठेवला व आपली अनेक गाजलेली नाटके नव्या उत्साहाने सादर करायला सुरुवात केली. याच वेळी म. गांधींनी टिळक स्वराज्य निधी या नावाने एक कोटी रुपये जमवायचा संकल्प सोडला. हा निधी स्वराज्याच्या चळवळीप्रीत्यर्थ खर्च होणार होता. बालगंधर्वांना ही गोष्ट समजली, तेव्हा आपणही या पुण्यकार्याला हातभार लावून, लोकमान्य टिळक व स्वराज्य यांच्याविषयीचा आपला आदरभाव व्यक्त करावा, असे वाटले. त्यासाठी त्यांनी ललितकलादर्श मंडळीचे मालक व प्रमुख नट श्री. केशवराव भोसले यांच्या समवेत मानापमान नाटकाचा संयुक्त प्रयोग करायचे ठरविले. केशवराव भोसले हे बालगंधर्वांप्रमाणेच तत्कालीन संगीत रंगभूमीवरचे एक श्रेष्ट नट होते. बालगंधर्व भामिनी व केशवराव भोसले धैर्यधर अशा स्वरूपाचा तो संयुक्त मानापमानाचा प्रयोग मुंबईत जेव्हा जाहीर झाला, तेव्हा अक्षरशः गावोगावाहून रसिक प्रेक्षकांनी मुंबईत गर्दी केली व शंभर रुपयांपासून तिकिटांचे दर ठेवले असूनही अवघ्या अर्ध्या तासाच्या आत सर्व वर्गांची तिकिटे संपून गेली. दि. ८ जुलै १९२१ या दिवशी मुंबईच्या बालीवाला नाटचगृहात हा मानापमानाचा प्रयोग झाला व तो इतका गाजला, की पुढे वर्षानुवर्षे रसिक प्रेक्षक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या एकाच प्रयोगाच्या गोड आठवणी काढीत राहिले.

यानंतर गंधर्व नाटक मंडळी स्वयंवर, मानापमान, एकच प्याला, द्रौपदी, सौभद्र, इ. जुनीच नाटके करीत राहिली व

बालगंधर्व

बालगंधर्वांच्या गायनाभिनयामुळे ती आर्थिक दृष्टचाही लाभदायक होत राहिली. या काळात एक-दोन नवी नाटके गंधर्वांनी रंगभूमीवर आणली, पण ती फारशी यशस्वी ठरली नाहीत.

इ. स. १९२७ च्या डिसेंबरअखेर गंधर्व मंडळी पूर्णपणे ऋणमुक्त झाली व पुनश्च तिची मालकी बालगंधर्वांकडे आली. परंतु मंडळी हातात येऊनही बालगंधर्व आपल्या पूर्वीच्या वैभवाला पुन्हा कधीही चढले नाहीत. आतापर्यंत त्यांची एक मुलगी व दोन मुलगे अशी तीन अपत्ये मृत्युमुखी पडली होती. त्यामुळे आधीच कोमल मनाचे असलेले बालगंधर्व आता अधिकच हळवे बनले.

त्यांना तीन मुली होत्या: त्यांतली थोरली कमला ही फार गरीब व सालस स्वभावाची होती. बालगंधर्वांचा तिच्यावर फार जीव होता. परंतु तीही एके दिवशी विषमज्वराने मरण पावली व या आघाताने बालगंधर्वांच्या जीवनातला उरला सुरला आनंदसुद्धा कोळपून गेला. पण एका नाटक मंडळीचे मालक असल्यामुळे त्यांच्यावर शेकडो माणसे अवलंबून होती आणि त्यांच्या हितासाठी व त्याचबरोबर स्वतःच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना नाटक मंडळी चालू टेवणे क्रमप्राप्त होते. तशात त्यांचा स्वभाव आता अत्यंत लहरी बनला होता. प्रत्येक नवे नाटक सादर करताना त्याच्या निर्मितीसाठी अमाप खर्च करण्याचे व प्रेक्षकांना नेत्रदीपक आनंद मिळवून देण्याचे त्यांचे वेड कमी न होता दिवसेंदिवस वाढत चालले होते. अशा प्रकारे सर्व बाजूंनी खर्चाचे प्रमाण वाढत असता, प्राप्तीचे मान मात्र वाढत नव्हते.

इ. स. १९३१ साली श्री. ना. वि. कुलकर्णी यांचे कान्होपात्रा नाटक बालगंधर्वांनी रंगभूमीवर आणले. आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी याही नाटकासाठी प्रचंड प्रमाणावर खर्च केला. नाटकातले पांडुरंगाचे मंदिरसुद्धा त्यांनी खऱ्या पंढरीच्या मंदिरासारखे तयार करवून घेतले. कान्होपात्रा नाटक भक्तिरसप्रधान असल्यामुळे त्यात अभंगांची व भजनाची लयलूट होती. बालगंधर्वांच्या मनाचा कल दिवसेंदिवस देवभक्ती कडे, भजनाकडे झुकत चालला होता. त्यामुळे कान्होपात्रा नाटक ते पूर्णपणे यशस्वी करू शकले. हे नाटक आर्थिक दृष्टचाही यशदायी ठरले. या नाटकापासूनच बालगंधर्वांनी जाहीर रीतीने भजनाचे कार्यक्रम सुरू केले; पण त्याचा परिणाम असा झाला, की ज लोक बालगंधर्वांच्या केवळ गायनासाठी पैसे टाकून रंगमंदिरावर प्रचंड गर्दी करीत, ते या फुकटच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने जाऊ लागले व त्यामुळे नाटकांच्या उत्पन्नात घट होऊ लागली. अशा स्थितीत कर्ज फिटणे तर दूरच राहिले पण व्याजही देणे शक्य होईना.

पुढे सोलापूरच्या मुक्कामात प्रभात फिल्म कंपनीचे एक मालक श्री. व्ही. शांताराम यांनी बालगंधर्वांच्या एकच प्याला नाटकातली सिंधूची करुण सुंदर भूमिका पाहिली आणि ते अक्षरशः भारावून गेले. तत्काळ ते बालगंधर्वांना भेटले व त्यांना म्हणाले, की तुम्ही जर आमच्या भागीत तीन वर्षांत सहा चित्रपट काढायला व त्यात काम करायला सिद्ध असाल, तर तुमच्या हिश्श्यासाठी तुम्हांला कमीतकमी सहा लाख रुपये तरी मिळतील अशी शक्यता आहे.

शांतारामबापूंचे ते बोलणे ऐकून बालगंधर्वांनी शांतारामबापूंना आपला होकार कळविला. यानंतर त्यांचा व प्रभात कंपनीचा रीतसर करार झाला व त्याप्रमाणे केवळ एका वर्षात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दोन चित्रपट काढण्यापुरते सहकार्य बालगंधर्वांनी प्रभात कंपनीशी करावे आणि त्यासाठी प्रभात कंपनीने त्यांना दोन लाख रुपये द्यावे असे ठरले.

बालगंधर्वांनी यापुढे प्रभात फिल्म कंपनीत जाऊन काम करायचे म्हणजे गंधर्व मंडळीचे विसर्जन अपरिहार्य ठरले. दि. ३१ डिसेंबर १९३४ रोजी गंधर्व नाटक मंडळी त्यांनी बंद केली. परंतु आरंभी अत्यंत मोहक व आकर्षक वाटणारी ही सिनेमात जाण्याची योजना अंती अत्यंत दाहक व तापदायक असल्याचे बालगंधर्वांच्या लक्षात येऊन चुकले. मग कसाबसा एक चित्रपट पुरा करून ते प्रभातच्या करारातून मुक्त झाले.

दि. ७ डिसें. १९३५ रोजी बालगंधर्वांचे एकनाथाची भूमिका असलेले 'धर्मात्मा' चित्र मुंबईला प्रकाशित झाले; पण ते चित्र सर्वथा अयशस्वी झाले !

यानंतरचे बालगंधर्वांचे आयुष्य ही भीषण परिस्थितीशी एकाकी घेतलेली झुंज आहे. गंधर्व नाटक मंडळी आपल्याच हातांनी विसर्जित केलेली, प्रभातचा करार संपलेला आणि जवळ जवळ सर्वच सहकारी कलावंत व साथीदार इतस्ततः पांगलेले, अशा भग्न व विमनस्क अवस्थेत आता ते उभे होते. या परिस्थितीत एकच आशेची ज्योत अजून तेवत होती व ती म्हणजे बालगंधर्वांच्या अनुपस्थितीत त्यांच्या काही सहकाऱ्यांनी चालू ठेवलेली गंधर्व नाटक मंडळी या नावाची एक छोटीशी नाटचसंस्था ! बालगंधर्वांना आता तिचीच कास धरणे जरूर होते. त्याप्रमाणे ते त्या नाटचसंस्थेत आले व त्यांनी पुन्हा आपल्या गाजलेल्या नाटकांचे प्रयोग करायला सुरुवात केली. काहीतरी करून आपल्या कुटुंबाचा व सहकाऱ्यांचा उदरनिर्वाह साधणे व कर्जातून मुक्त होणे, या दोन गोष्टींसाठीच आता त्यांची धडपड सुरू होती. वयाने ते पन्नाशीला येऊन ठेपले होते. वृत्तीने विरक्त बनत चालले होते. फेटा, शेरवानी व तंग तुमान यासारखा पूर्वीचा संस्थानी वेष जाऊन साधी पांढरी टोपी, शर्ट व अर्धी विजार अशा अत्यंत साध्या वेषात ते आता वावरू लागले.

आर्थिक चिंतेच्या जंजाळात असतानाच त्यांची गोहरबाई नावाच्या एका कर्नाटकी मुसलमान गायिकेशी गाठ पडली व तिने घातलेल्या लोकविलक्षण मोहिनीने ते इतके भारून गेले, की त्यानंतर त्यांनी सर्वस्वी तिच्याच तंत्राने वागायला सुरुवात केली. याचा परिणाम म्हणून त्यांचे आप्तस्वजन, सगेसोयरे व मित्र-सहकारी सर्वच जण त्यांना कायमचे दुरावले. त्यानंतर गोहरबाईला त्यांनी गंधर्व मंडळीत आणून तिच्या बरोबर काही काळ भूमिकाही केल्या. पण उताराला लागलेली गाडी सावरली नाही. तशातच त्यांना अर्धांगवायूचा आजार झाला व त्यामुळे ते पूर्णपणे पंगू झाले. गोहरबाई होती तोवर तिने त्यांना संभाळले; पण नंतर तीही निवर्तली व बालगंधर्व पुरतेच निराधार झाले. अर्धांगवायूमुळे आलेला अपंगपणा व सर्वस्व हरल्यामुळे वाटणारी एक कडवट खंत यामुळे ते सतत आजारीच राहिले आणि अखेर दि. १५ जुलै १९६७ या दिवशी त्यांचे पुणे मुक्कामी निधन झाले.

मोहक दर्शन, गंधर्वतुल्य गायन, परिणामकारक अभिनय, विपुल द्रव्यार्जन, रंगभूमीसाठी वारेमाप खर्च आणि अमर्याद लोकप्रियता हे बालगंधर्वांच्या आयुष्याचे चित्र आहे. परमेश्वराने त्यांना केवळ सुरेख रूपच दिले नव्हते, तर गौर वर्ण व त्यावरोबरच स्त्री भूमिका करायला अनुकूल असा सुडौल बांधा पण दिला होता. देवल, खाडिलकर, बोडस यांनी त्यांना अभिनय शिकवला; पण बालगंधर्व तिथेच थांबले नाहीत, तर ते ती ती भूमिका साक्षात जगले. सुभद्रेचा किंवा रुक्मिणीचा लडिवाळपणा, देवयानीचा किंवा द्रौपदीचा तेजस्वीपणा, भामिनीचा शृंगार आणि सिंधूचे कारुण्य हे प्रेक्षकांना कधीच खोटे वाटलेनाही. बालगंधर्व रंगभूमीवर ती ती भूमिका करीत असताना इकडे नाटक पाहणारे प्रेक्षकही त्या त्या भूमिकेशी तेवढेच समरस झालेले असत. त्यामुळे बालगंधर्वांचे नाटक हे प्रेक्षकांना नाटक न वाटता, एक जिवंत अनुभव वाटत असे. जे अभिनयाचे तेच गायनाचे. ते गाऊ लागले म्हणजे त्या त्या रागाचे मूर्तिमंत चित्र श्रोत्यांसमोर उभे करीत. स्वभावाने ते निष्कपट होते; दिलदार होते; भाविकही होते. द्रव्याच्या संचयाविषयी व विनिमयाविषयी ते बेफिकीर असले, तरी रूढार्थाने ज्याला आपण विलास म्हणतो, तसा त्यांनी क्वचितच केला असेल. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांनी सुपारी खाणेही सोडून दिले होते. त्यांनी पैशांची अमाप उधळण केली, ती सारी रंगभूमीसाठी, तिच्या ऐश्वर्यासाठी. म्हणून ते मराठी रंगभूमीचे राजराजेश्वर झाले. श्री. रामभय्या दाते यांनी त्यांच्याविषयी म्हटले ते सर्वस्वी खरे होते. 'बालगंधर्व हे मराठी रंगभूमीला पडलेले एक गोड स्वप्न होते !' [बालगंधर्व–व्यक्ती आणि कला, श्री. वसंत शांताराम देसाई, १९६०]

बालदोषनाशक यंत्र

अपस्मार, भूत, पिशाच, वेताळ, शाकिनी इत्यादींनी पछाडलेल्या बालकांची त्यांपासून सुटका व्हावी म्हणून या यंत्राचा उपयोग करतात. सुस्थितीत असलेल्या बालकांनाही पुढे बाधा होऊ नये म्हणून हे यंत्र बांधतात. याचे विधान असे– धोत्र्याच्या रसाने भूर्जपत्रावर एक वर्तुळ काढून त्यात साध्यनाम लिहितात. त्या वर्तुळाभोवती अष्टदल कमल काढून त्या प्रत्येक दलात 'ह्रीं' हे बीजाक्षर लिहितात. नंतर यंत्राची पूजा करून ते त्रिलोहाच्या पेटीत ठेवून साध्य बालाच्या गळ्यात बांधतात. [यं. चिं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बाल नक्खत्त एक प्राचीन लोकोत्सव. बाल नक्खत्त म्हणजे मूर्खांचा मेळा. श्रावस्ती नगरात दर वर्षी हा उत्सव सात दिवस साजरा करीत. या दिवसांत काही लोक अंगाला राख, शेण, माती यांसारखे पदार्थ फासून अश्लील बोलत रस्त्याने फिरत व प्रतिष्ठित लोकांच्या दारात उभे राहून मोठमोठ्याने आरडाओरडा व शिवीगाळ करीत. आपल्या घरासमोरून या लोकांनी निघून जावे म्हणून घरातील लोक मग त्यांना पैसे देत. काही प्रांतांतील लोक अजूनही अशा पद्धतीने होळीचा सण साजरा करतात. [ह. प्रा. लो.]

बालननृत्य नेपाळातील एक नृत्य. पशुपतिनाथासमोर महाद्वीप प्रज्वलित करताना अथवा रात्रजागराच्या प्रारंभी हे नृत्य करतात. नर्तकांचा ठराविक पोषाख किंवा ठराविक संख्या नसते. १ ते १६ पर्यंत कितीही लोक या नृत्यात भाग घेऊ शकतात. नृत्याला मांदलाची साथ असते. चारही दिशांना फिरत फिरत हे नृत्य करतात. नाचताना एक पाऊल पुढे टाकून जमिनीला हात लावून नमस्कार करतात. मग मागे सरकतात. पुन्हा दोन पावले पुढे सरकतात. जमिनीला हात लावून नमस्कार करतात आणि पुन्हा मागे सरकतात. अशा रीतीने इच्छेप्रमाणे पावले टाकून नृत्य समाप्त करतात. [ए. हो. रा.]

बालपाश एक अलंकार. कपाळावरील आणि डोक्याच्या पुढच्या भागातील केस व्यवस्थित सावरले जावे म्हणून हा अलंकार पूर्वी स्त्रिया वापरीत. सोन्याची एक लांबट पुतळी आणि तिला जडवलेले मोतीघोस असा हा अलंकार असे. अजंठा चित्रशैलीत असे बालपाश पुष्कळ दिसतात. सिंधुसंस्कृतीतही हा अलंकार आढळतो. मोहेंजोदडो येथील उत्खननात असा एक बालपाश सापडला असून, तो सुमारे दहा इंच लांब आहे. पंजाबच्या काही भागांत अजूनही हा दागिना प्रचारात असून, त्याला पात म्हणतात. [ह. च. सां. अ.]

बालमुकुंद गुरू (इ. स. चे १९ वे शतक) माळव्यातल्या माच या लोकनाट्याचा प्रवर्तक. याचा जन्म उज्जैनमध्ये झाला. त्या काळी उज्जैन शहरात ख्याल या लोकनाट्याचा विशेष बोलबाला होता. जागोजागी होणारे हे ख्याल बघण्यासाठी लोकांची खूप गर्दी होत असे. बालमुकुंदाला या खेळाचे विशेष आकर्षण होते. एके दिवशी एका ख्यालाच्या प्रयोगाला फार गर्दी झाल्यामुळे तो रंगमंचावर चढून एका कोपऱ्यात जाऊन बसला. ख्यालवाल्यांना त्याची ही धिटाई पसंत पडली नाही. त्यांनी त्याला तिथून हुसकावले. तो अपमान बालमुकुंदाच्या जिव्हारी लागला. त्याला सुखराम नावाच्या यतीकडून बटुकभैरवाचा मंत्र मिळाला होता. बालमुकुंदाने शहराच्या रुद्रसागरभागात असलेल्या बटुकभैरवाची त्या मंत्राने उपासना सुरू केली. असे सांगतात, की बालमुकुंदाच्या भक्तीने बटुकभैरव प्रसन्न झाला आणि त्याने त्याला छंद व काव्य यांचे वरदान दिले.

तिथून पुढे बालमुकुंद गुरूने माच नामक लोकनाटचे रचायला प्रारंभ केला. त्याच्या पूर्वी प्रचलित असलेल्या लोकनाटचाला त्याने आपल्या प्रतिभेने नवे स्वरूप दिले. उज्जैनमध्ये ज्या कथा–गाथा प्रचलित होत्या, त्याच त्याने माचासाठी उचलल्या. त्याच्या काव्यातून भक्ती, वैराग्य, वेदान्त, शृंगार व पौरुष यांचे स्वरूप सामान्यांना समजेल, अशा भाषेत अभिव्यक्त होते.

बालमुकुंदाने एकूण १६ माच रचले आहेत, त्यांची नावे अशी– (१) राजा हरिश्चंद्र (२) नागजी दूदनी (३) ढोला मारूणी (४) नकल गेंदापुरी (५) रामलीला (६) कुँवर खेमसिंह (७) सेठ-सेठानी (८) देवर-भौजाई (९) राजा भरथरी (१०) सुदबुर सालंगा (११) कृष्णलीला (१२) खेल रावत (१३) चारण बंजारा (१४) हीररांझा (१५) शिवलीला व (१६) वेतालपच्चीसी.

यांपैकी पहिल्या पाच माचांना बालमुकुंदाने निर्गुणीकथी असे म्हटले आहे. याचा अर्थ त्यांची पार्श्वभूमी निर्गुण संप्रदायाला अनुकूल अशी आहे. प्रत्येक माचात प्रारंभी त्याने भैरूजीकी स्तुती अर्थात बटुकभैरवाचे स्तवन केले आहे. त्यापैकी एका स्तवनाचा नमुना असा–

> रंगीला हे भैरव का ध्यान, सारदा दो हिरदा में ग्यान ।।
> बिसाल रूप छोटी सी मूरत, करो दुश्मन की हान ।
> जेसिंगपुरा में राज तुमारा ओर चारी खुंट में मान ।
> कालो गोरो मालक मेरो, खेल रच्या चोगान ।
> सांचे को सन्मान जो देवे, मार दुष्ट कू बान ।।

भावार्थ – भैरवाचे ध्यान चांगले आहे. हे शारदे माझ्या हृदयात कवित्वाचे ज्ञान दे. भैरवाचे रूप विशाल पण मूर्ती छोटीशी आहे. हे भैरवा, तू शत्रूचा नाश कर. जयसिंहपुऱ्यामध्ये तुझे राज्य आणि चारही दिशांना तुझा मान आहे. काळा-गोरा असा हा भैरव माझा स्वामी आहे. त्याच्या कृपेने मी हा छानदार खेळ रचला आहे. हे भैरवा, तू सच्च्या पुरुषाला मान दे आणि दुष्टाला बाण मार.

आपल्या लोकनाटचाच्या प्रत्येक खेळात बालमुकुंद गुरु मुख्य पात्राची भूमिका स्वतः करीत असे आणि गोविंदा नावाचा ढोलक्या त्याला साथ देत असे. जयसिंहपुऱ्यात आजही त्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वंशज राहतात. त्यांच्याकडे त्याच्या माचांच्या मूळ प्रती सुरक्षित आहेत. सांप्रतही जयसिंहपुऱ्यात बालमुकुंदाच्या परंपरेचे माच होतात. बालमुकुंदाचा मृत्यूही रंगभूमीवर अभिनय करीत असतानाच झाला. [लो. ध. ना. प.; मा. उ. सा.]

बालरूप (इ. स. चे ११ वे शतक) एक धर्मशास्त्रकार. हा बंगालमधील असावा. याने व्यवहार व काल या विषयांवर एक ग्रंथ लिहिला होता, असे कळते. आदित्यभट्टाच्या कालादर्श या ग्रंथात त्याने प्रमाणभूत मानलेल्या ग्रंथकारांच्या यादीत याचे नाव दिलेले आहे. वारसाहक्काबद्दल-बालरूपाची काही मते अशी–

निपुत्रिक इसमाच्या संपत्तीची वारस त्याची अविवाहित कन्या होऊ शकते; विवाहित नाही. पूर्वी विभक्त असून नंतर एकत्र कुटुंबात समाविष्ट झालेल्या विधवेला ती कर्कशा (अनैतिक आचरणाची) असेल तर, निर्वाहापुरते अन्नवस्त्र मिळावे; मात्र वारसा हक्क मिळू नये. [हि. ध.]

बालविवाह मुलगा व मुलगी १२ हून कमी वयांची असता त्यांचा जो विवाह करतात, त्याला हे नाव आहे. धर्मसूत्रांच्या कालापासून बालविवाह रूढ झाले व सांप्रत त्यांवर कायद्याने बंदी घातलेली असली तरी, अजूनही ते कुठे कुठे होताना दिसतात.

वैदिक काळात भारतात बालविवाहाची प्रथा नव्हती. त्या काळात मुलींचे विवाह तरुणपणी होत असत, असे दर्शविणारे अनेक उल्लेख ऋग्वेदात आढळतात. तरुणीने सुवेषा व सालंकृत होऊन पुरुषांमधून आपला जोडीदार निवडावा, असेही एका ठिकाणी सांगितले आहे (ऋ. १०. २७. १२). घोषेचा विवाह मोठेपणी झाला होता. सूर्येचा विवाहही तिला ज्या वेळी पतीची आकांक्षा झाली, त्याच वेळी म्हणजे तरुणपणी झाला होता. याशिवाय, नवविवाहित पत्नीचा पतीबरोबर सहवास झाल्याचा उल्लेखही ऋग्वेदात आला आहे (ऋ. १०. ८५. २९, ३७). हे सर्व उल्लेख प्रौढविवाहाचेच द्योतक आहेत. यावरून, वेदकाळी लग्नाच्या वेळी मुली प्रौढ असत, असे सिद्ध होते. अथर्ववेदात अशा काही मंत्रांचा व विधिनियमांचा उल्लेख आहे, की ज्यांच्या साहाय्याने स्त्रीपुरुष आपल्या इष्ट व्यक्तीच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करीत. ही गोष्ट प्रौढ स्त्रियांच्या बाबतीतच घडू शकते. वयाचा नेमका उल्लेख जरी वैदिक वाङ्मयात केलेला नसला, तरी साधारणपणे पंधरा वर्षांपासून वीस वर्षांपर्यंत मुलामुलींचे विवाह होत असावे, असे अनुमान करता येते.

दशरथाच्या चार पुत्रांचा विवाह तरुणपणी झाला व विवाहानंतर लगेच ते आपल्या भार्यांशी रममाण झाले, असे रामायणात सांगितले आहे. महाभारतातील शकुंतला, देवयानी, सत्यवती, दमयंती, कुंती, सुभद्रा, द्रौपदी या सर्वांचा विवाहही तरुणपणी झाला होता. भीष्माने तर, पुरुषाने तरुण स्त्रीशीच विवाह करावा, असे स्पष्ट सांगितले आहे.

बौद्ध साहित्यातही बालविवाहाची उदाहरणे सापडत नाहीत. जातकात विवाहयोग्य कन्येचे वय सोळा वर्षे सांगितले आहे. सुजाता, कन्हा, इरंदती यांच्या स्वयंवरांची वर्णने जातकांत आली आहेत. अशा कन्यांचे वय निदान पंधरा-सोळा वर्षांचे तरी असले पाहिजे. जातकांत गांधर्व विवाहांचेही वर्णन आहे. गांधर्व विवाह करणारे प्रेमिक प्रौढच असू शकतात. बालविवाह हा स्त्रीच्या बाबतीत महादुःखांपैकी एक आहे, असे संयुत्त निकायात सांगितले आहे (३७. ३. १-३). यावरून त्या काळी समाजातील सुशिक्षित वर्ग बालविवाहाला अनुकूल नव्हता, हे कळून येते.

सनपूर्व पाचव्या शतकापर्यंत भारतात प्रौढ विवाहाची चाल अस्तित्वात होती. कारण या काळात निर्माण झालेल्या गृह्यसूत्रांत चतुर्थीकर्म नावाचा एक विधी सांगितला आहे. चतुर्थीकर्म म्हणजे नवविवाहित दंपतीचा विवाहानंतर चौथ्या दिवशी झालेला समागम होय. यावरून त्या काळी कन्या तरुण व पतिसमागमयोग्य असे, हे सिद्ध होते. बौधायन गृह्यसूत्रांत विवाहसंस्कार चालू असता वधू रजस्वला झाली, तर कोणते प्रायश्चित घ्यावे, ते सांगितले आहे, तेही प्रौढ विवाहालाच लागू पडणारे आहे.

पण सनपूर्व ४०० च्या सुमारास समाजात एक नवीन विचारधारा उदयाला आली आणि कन्यांचे विवाहाचे वय कमी असावे, असे विचारवंतांना वाटू लागले. त्या वेळच्या धर्मसूत्रांतही या विचारांचे पडसाद उमटले आहेत. ज्या कन्येने स्वप्नातही कधी कामेच्छा केली नाही, अशा कन्येशी पुरुषाने विवाह करावा, असे काही लोकांचे मत असल्याचे महाभारतातही सांगितले आहे (अनु. ७९. १४-१५). अशा रीतीने सनपूर्व ४०० ते इ. स. १०० या कालखंडात मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा त्यांच्या ऋतुकालाच्या आसपास येऊन ठेपली. पण समाजात ही प्रथा त्या वेळी सर्रास रूढ झाली नव्हती, असे दिसते. कारण या कालखंडाच्या शेवटी निर्माण झालेल्या वात्स्यायनाच्या कामसूत्रात मुलींच्या लहानपणी झालेल्या व वयात आल्यानंतर झालेल्या अशा दोन्ही प्रकारच्या विवाहांचा उल्लेख मिळतो. कथासरित्सागरातही प्रेमविवाहाबरोबर बालविवाहांचाही निर्देश आढळतो.

इ. स. १०० च्या नंतर मात्र मुला-मुलींचे विशेषतः मुलींचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाह बालवयातच करण्याकडे लोकांची प्रवृत्ती वळावत गेली. याचे एक प्रमुख कारण असे, की या कालापर्यंत मुलींचे उपनयन करणे व त्यांना मुलांप्रमाणे शिक्षण देणे या प्रथा बंद पडल्या होत्या. त्यामुळे १५–१६ वर्षांपर्यंत मुलींना नुसते घरात बसवून ठेवण्यात काही स्वारस्य नव्हते. तेव्हा मुली वयात येण्याच्या आधी किंवा त्या वयात येण्याच्या सुमारास त्यांचा विवाह करून देऊन आपल्या जबाबदारीतून मुक्त होणे, हे पालकांना इष्ट वाटले असावे. बौद्ध धर्माच्या प्रसारामुळे संसार अनित्य आहे, मानवी जीवन क्षणभंगुर आहे, अशा तऱ्हेच्या विचारांचा लोकांच्या मनावर पगडा बसू लागला होता. त्यामुळे आपल्यावरील जबाबदाऱ्या लवकर पार पाडण्याकडे लोकांचा कल होऊ लागला. कन्यांचे विवाह ही एक पालकांची मोठीच जबाबदारी मानली जाते, हे आजही अनुभवाला येते. दुसरी गोष्ट म्हणजे त्या काळी बौद्ध विहार व मठ यांतील काही भिक्षुणी व भिक्षू आपल्या पारमार्थिक ध्येयापासून च्युत होऊन विलासी जीवन जगू लागले होते. ते पाहिल्यावर व ऐकल्यावर अशा व्यक्तींचा प्रभाव मुलींच्या व स्त्रियांच्या मनावर पडू नये, म्हणूनही समाजातील विचारवंतांनी मुलींना अधिक काळपर्यंत अविवाहित ठेवणे श्रेयस्कर नाही, असे मानले असावे. त्या काळी समाजात असाही एक वर्ग होता, की ज्याला वंशसातत्यासाठी लवकरात लवकर संतानप्राप्तीची इच्छा असे. लवकर लग्न केले, की कन्या ऋतुमती झाल्यावर काही दिवसांत पुत्रप्राप्तीची आकांक्षा बाळगता येत असे.

इ. स. २०० पासून पुढच्या कालात कन्येचा विवाह, ती वयात येण्यापूर्वी म्हणजे लहान वयातच केला पाहिजे, असा नियम रूढ झाला. तसे न करणाऱ्या पालकाला याज्ञवल्क्याने पातकी ठरवले आहे (याज्ञ. १·१३)–

अप्रयच्छन् समाप्नोति भ्रूणहत्यामृतौ ऋतौ ।

अर्थ– बालपणी कन्येचा विवाह न करणाऱ्या पित्याला तिच्या प्रत्येक ऋतुकालाच्या वेळी भ्रूणहत्येचे पाप लागते.

मुलीला रजोदर्शन होण्याच्या सुमारास तिचे लग्न करणे, नेहमीच शक्य होते, असे नाही. त्यामुळे इ. स. ५०० ते १००० या कालातील स्मृतिकारांनी ऋतुप्राप्तीच्या बऱ्याच आधी पालकाने मुलीचा विवाह करून मोकळे व्हावे, असे सांगितले. मुलीला कमीतकमी दहाव्या वर्षी ऋतुप्राप्ती होऊ शकते, असे त्यांनी मानले आणि दहाव्या वर्षाच्या पुढे कन्येचा विवाह लांबवू नये, असे सांगितले. आणि आठ वर्षांची कन्या ही लग्नाला योग्य होय, असे प्रतिपादन केले.

प्रत्येक कन्येला सोम, गंधर्व आणि अग्नी हे तिघे तिच्या मानवी पतीच्या आधी भोगतात, असे संवर्त या स्मृतिकाराने सांगितले आहे. कन्या ऋतुमती होण्याच्या सुमारास तिच्या शरीरात जे बदल होतात, त्या वेळी हे दिव्य पती तिच्यावर अधिकार गाजवतात, असे तो म्हणतो. म्हणून ती ऋतुमती होण्यापूर्वीच तिचा विवाह करून टाकावा, असे त्याने सांगितले आहे.

मात्र हा नियम ब्राह्मण समाजापुरताच मर्यादित होता, असे दिसते. कारण क्षत्रियांच्या मुली सोळा-सतरा वर्षांच्या होईपर्यंत अविवाहित असत, असे इ. स. ३०० ते १२०० पर्यंतच्या संस्कृत वाङ्मयावरून दिसते. मध्य युगातील राजपूत लोकांतही कन्यांच्या प्रौढ विवाहाची उदाहरणे आढळतात. क्षत्रिय ही लढाऊ जमात असल्यामुळे, लहानपणीच मुलींची लग्ने केल्यास त्यांना बालविधवा म्हणून जन्म घालवण्याचा प्रसंग येण्याची शक्यता असे. तसे घडू नये, म्हणून त्यांनी बालविवाहाची प्रथा स्वीकारली नाही. याउलट ब्राह्मणांनी मात्र मुलींच्या विवाहाचे वय उत्तरोत्तर कमी करण्याचा सपाटा चालवला. ब्रह्म पुराणात तर चार वर्षांनंतर दहाव्या वर्षापर्यंत मुलीचा विवाह केव्हाही करावा, असे म्हटले आहे. परंतु ब्रह्म पुराणातील या आदेशाला बरीच वर्षे लोकांनी प्रतिसाद दिला नाही. कारण इ. स. च्या ११ व्या शतकातही ब्राह्मणांच्या मुलींचे विवाह बाराव्या वर्षी होत, असे अल्‌बिरुनीने लिहून ठेवले आहे. पण समाजातील अन्य थरांतील लोकांनी मात्र या आदेशाचा फायदा घेतला आणि मुलींची लग्ने पाचव्या-सहाव्या वर्षी करायला सुरुवात केली. कारण ते वरपक्षाकडून मुलीचे देज घेत असत. समाजातील मूळ जातीत या वेळेपर्यंत अनेक उपजातींची भर पडली होती व त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध निषिद्ध मानले गेल्यामुळे विवाहाचे क्षेत्र फक्त त्या त्या जातीपुरते किंवा उपजातीपुरते मर्यादित झाले होते. त्यामुळे मुलीला योग्य वर मिळविणे, हे काम बरेच अवघड होऊ लागले होते. म्हणून योग्य स्थळ आढळल्यास मुलगी लहान असली, तरी आईबाप तिचा विवाह उरकून घेऊ लागले. त्या काळात एकत्र कुटुंबपद्धती असल्यामुळे, मुलगा लहान आणि अर्थार्जन करू न शकणारा असला, तरी त्याचा विवाह करण्यास अडचण नसे. कारण एकत्र कुटुंबपद्धतीत त्याच्या संसाराचा बोजा घरातली कर्ती माणसे तो मिळवता होईपर्यंत उचलीत असत. याशिवाय, मुलगी लहानपणीच सासरी गेली म्हणजे तिला सासरचे वळण लागते, घरच्या माणसांच्या आवडीनिवडी, स्वभाव तिला परिचित होतात आणि लहानपणापासून त्यांच्यांत राहिल्यामुळे तिला सासरच्या लोकांविषयी प्रेम निर्माण होते, अशी लोकांची समजूत झाली होती. पण या बालविवाहाच्या पद्धतीमुळे समाजात बालविधवा निर्माण होण्याचा धोका वाढला, तो मात्र लोकांनी विशेषसा मनावर घेतला नाही. तो एक ज्याच्या त्याच्या नशिबाचा भाग म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ळोकांनी त्या धोक्याकडे कानाडोळा केला असला पाहिजे.

अशा प्रकारे मध्ययुगात बालविवाह अधिकाधिक रूढ होत गेले. अकबरासारख्या काही सुधारणाप्रिय राजांनी मुलींचे विवाह रजोदर्शनानंतर करावे, असे सुचविले; पण त्याच्या उपदेशाकडे कोणी लक्ष दिले नाही. पेशवाईच्या काळात व पुढे भारतात इंग्रजी अंमल सुरू होण्याच्या सुमारासही मुलींचे विवाह आठ ते नऊ या वयातच होत राहिले.

पुढे इंग्रजी राजवटीत मात्र ही परिस्थिती बदलू लागली. जाणत्या लोकांनी बालविवाहाच्या रूढीवर आघात करायला सुरवात केली. ज्या एकत्र कुटुंबपद्धतीवर बालविवाह खपवून नेले जात, ती एकत्र कुटुंबपद्धतीही दिवसेंदिवस विस्कळित होऊ लागली. जीवनकलह उत्तरोत्तर बिकट होऊ लागला. पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्काने लोकांना स्त्रीशिक्षणाची आवश्यकता पटू लागली. बालविवाह व मुलींचे शिक्षण या दोन गोष्टी परस्परविरुद्ध होत्या. त्यामुळे शहरांतील सुशिक्षित मध्यम वर्ग मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा वाढली तरी चालेल; पण त्यांनी शिक्षण घ्यावे अशा विचारावर आला.

या सुधारणेचे श्रेय बदलत्या परिस्थितीबरोबरच तत्कालीन समाजसुधारकांनाही दिले पाहिजे. स्वामी दयानंद सरस्वती, राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, प्रा. आगरकर, न्या. तेलंग, न्या. रानडे, प्रा. रघुनाथराव मुदलियावर, न्या. मुथुस्वामी अय्यर, मलबारी वगैरे अनेक समाजधुरीणांनी बालविवाहाचे अनिष्ट परिणाम ध्यानात घेऊन, त्याच्या विरुद्ध प्रचार सुरू केला. सनातनी लोकांनी त्यांच्या या विचारांना प्रखर विरोध केला; पण या लोकांनी त्याला दाद दिली नाही. पुढे सुधारकांच्या या विचारसरणीला समाजातून वाढता पाठिंबा मिळू लागला. त्यामुळे इ. स. १८७३ मध्ये ब्रिटिश सरकारने एक विवाहविषयक कायदाच करून टाकला. त्या अन्वये मुलांच्या बाबतींत अठरा व मुलींच्या बाबतींत बारा ही विवाहाची किमान वयोमर्यादा ठरविण्यात आली. पण सदर कायदा नियंत्रक स्वरूपाचा नसून, शिफारसवजा होता. त्यामुळे या कायद्याने बालविवाहाला आळा बसला नाही. मग समाजसुधारकांनी बालविवाहापासून होणाऱ्या अनिष्ट परिणामांबद्दल लोकजागृतीचे काम हाती घेतले. बालविवाह, त्यामुळे लहान वयातच मुलींवर येणारे मातृपद व त्यामुळेच स्त्रियांचे मोठ्या प्रमाणावर होणारे मृत्यू, यांचे विदारक चित्र शिरगणतीच्या आकड्यांवरून त्यांनी लोकांपुढे उभे केले. त्यातूनच १९२९ सालचा सारडा कायदा अस्तित्वात आला. त्याअन्वये चौदा वर्षांच्या आतील मुलींच्या विवाहाला कायद्यानेच बंदी करण्यात आली. या कायद्याचाही विशेष उपयोग झाला नाही. पण पुढे आणखी काल बदलला. दुसऱ्या महायुद्धानंतर तर बालविवाहाला अनुकूल वाटणारी सर्व परिस्थिती ढासळून गेली. एकत्रकुटुंबपद्धती मोठ्या प्रमाणात नष्ट होऊ लागली. मुली शिक्षण घेऊ लागल्या. प्रपंचातल्या आर्थिक ओढघस्तीमुळे मुली नोकऱ्याही करू लागल्या. त्यामुळे साहजिकच आता शहरांतून मुलींचे लग्नाचे वय वाढू लागले आहे. खेडेगावांतूनही हळूहळू मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढत आहे. [पो. वी. हिं. सि.; भा. सा. इ.; सो. क. मु. ए.; स्त्री. का. प्र.]

बालव्रत या व्रताचे स्वरूप सामान्यतः प्रायश्चित्तासारखे आहे. ज्याने पूर्वजन्मात मुलाची हत्या केली असेल किंवा एखादे मूल वाचविणे शक्य असूनही त्याला वाचविले नसेल, त्याला या जन्मी संतती होत नाही, असे सांगितले आहे. त्यामुळे संतती नसणारे लोक हे व्रत करतात. या वेळी व्रतकर्ता एक बैल, कोहळा, सोने व एक वस्त्र दान देतो. [हि. ध.]

बालसरस्वती (१) एक सुप्रसिद्ध वैयाकरण व संस्कृत कवी. राघवयादवपांडवीय या महाकाव्याचा कर्ता म्हणून याची ख्याती आहे. हे संपूर्ण काव्य त्र्यर्थी असून, त्यात रामायण, महाभारत व भागवत यांतील कथा गुंफलेल्या आहेत. त्या काव्यातला प्रत्येक श्लोक राम, कृष्ण व पांडव या तिघांनाही लागू पडतो. अर्थात ही रचना त्यामुळेच श्लिष्ट व क्लिष्ट बनली आहे. दोन अर्थ सामान्यपणे कळतात, पण तिसरा कळणे कठीण जाते. असे काव्य रचणे हे प्रतिभेपेक्षाही परिश्रमाचे फळ आहे. म्हणूनच त्याची गणना पंडिती काव्यात होते.

हा कवी दक्षिणेतला होता. याची याहून अधिक माहिती मिळत नाही. यानेच चंद्रिकापरिणय नावाचे आणखी एक काव्य लिहिले असून, ते कोण्या वेंकटाद्री नामक राजाला अर्पण केले आहे. [म. ज्ञा. को]

(२) एक कवी. आंध्र कवी नन्नय्य भट्ट याचा शिष्य. याचा जन्म राजमहेंद्री येथे झाला. नन्नय्य भट्टाच्या आंध्रकौमुदीवर याने टीका लिहिली असून, दुसरेही अनेक ग्रंथ रचल्याचे सांगतात. [ते. वा.]

(३) एक तंतुवाद्य. याला मयूरीताऊस किंवा मयूरसतार असेही म्हणतात. कारण याचा आकार मोरासारखा असतो. धनुकलीने ते वाजवतात. वाद्य उभे धरून व त्याचे वरचे टोक मानेजवळ घेऊन ते वाजवतात. याचा स्वर मृदुमधुर असतो. तंजाऊरचे बालसरस्वती जगन्नाथ भट्ट हे प्रस्तुत वाद्य वाजवण्यात प्रवीण होते. त्यांच्यावरूनच या वाद्याला हे नाव मिळाले असावे. पाहा – ताऊस. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बालात्रिपुरा एक तांत्रिक देवता. 'ऐंक्लींसौः' हा बालात्रिपुरेचा मंत्र आहे. हा मंत्र सिद्ध केल्याने बृहस्पतीसारखी विद्या, कुबेरासारखी धनसंपदा व इतरही नानाविध इच्छित गोष्टी प्राप्त होतात, असे म्हटले आहे. हिचे ध्यान पुढीलप्रमाणे–

रक्ताम्बरां चन्द्रकलावतंसां समुद्यदादित्यनिभां त्रिनेत्राम् ।
विद्याक्षमालाभयदामहस्तां ध्यायामि बालामरुणाम्बुजस्थाम् ।।

अर्थ – रक्तवस्त्र नेसलेली, चंद्रकलेचे आभरण ल्यालेली, उगवत्या सूर्यासारखी तेजस्वी, त्रिनेत्र, तसेच विद्या, अक्षमाला, अभयमुद्रा व पाश धारण करणारी व अरुणकमलावर बसलेली अशा बालात्रिपुरीचे मी ध्यान करतो.

हिचे नवयोन्यात्मक यंत्र काढून त्याच्यात या देवतेचा मंत्र विशिष्ट पद्धतीने लिहितात व ते यंत्र दंडात बांधतात. त्यामुळे इष्ट कामना पूर्ण होतात, असे सांगितले आहे. [मं. म.]

बालाद एक पिशाचगण. ही पिशाचे ठेंगणी असून, त्यांचे डोळे जमिनीकडे वळलेले असतात. ही प्रसूतिगृहात प्रवेश करतात व मुलांना खातात, अशी समजूत आहे. [पु. इं.]

बालानाथ एक नाथसिद्ध. याचा निश्चित काल सांगता येत नाही. पंजाब प्रदेशातील नाथ परंपरेत याचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. पंजाबात नाथ संप्रदायाचा प्रसार करण्याचे श्रेय याला देतात. झेलम नदीच्या काठी गोरखलीला म्हणून प्रसिद्ध असलेला मठ हा वास्तविक बालानाथाचा मठ आहे. एवढ्या माहितीशिवाय त्याचे अन्य चरित्र उपलब्ध नाही. याच्या नावावर असलेल्या केवळ दोन रचना नाथ सिद्धोंकी बानियां या ग्रंथात समाविष्ट आहेत. [पं. हिं. सा. इ.; ना. सि. बा.]

बालासोर ओडिसा प्रदेशातील एक पुण्यक्षेत्र. हे स्थान खरगपूर-वॉल्टेर लोहमार्गावर बारावालंग नदीच्या काठी आहे. स्टेशनापासून जवळच महादेवाचे एक स्वयंभू स्थान आहे. महाशिवरात्रीला तिथे मोठी यात्रा भरते. तिथून सहा मैल पश्चिमेस रेमूना इथे गोपीनाथाचे स्थान आहे. माघ मासात तिथे मोठा उत्सव होतो. जगन्नाथाची यात्रा करताना लोक या क्षेत्राची यात्रा करतात. [स. भा. प्र. व.]

बालिघंटा ओडिसा प्रदेशातील एक लोकदेवता. तिथल्या लोकांची अशी समजूत आहे, की जंगलात अधून मधून जो प्रकाश दिसतो तो या देवतेचाच प्रकाश होय. या देवतेच्या परवानगीवाचून एखाद्या प्राण्याची शिकार करणे म्हणजे मोठे पाप आहे, असें ते समजतात. [स्ट. ओ. फो.]

बालेंदुव्रत एक काम्य व्रत. चैत्र शुद्ध द्वितीयेला या व्रताचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. सायंकाळी नदीमध्ये स्नान करणे, चंद्रकोरीचे चित्र काढून पांढऱ्या फुलांनी त्याची पूजा करणे आणि उसाच्या रसात तयार केलेल्या पदार्थांचा नैवेद्य दाखवणे, असा याचा विधी आहे. या दिवशी तेलात तळलेले पदार्थ खात नाहीत. फल – सुख, सौभाग्य व स्वर्ग यांची प्राप्ती. [हि. ध.; व्र. प.]

बाल्हीक एक प्राचीन महाजनपद. याला वाल्हीक असेही नाव आहे. मध्य आशियात, अफगाणिस्थानाच्या उत्तरेला वंक्षू (ऑक्सस) नदीच्या दक्षिण तीरावर बल्ख नावाचा जो प्रदेश आहे, तेच प्राचीन बाल्हीक महाजनपद होय. यातील लोकांनाही बाल्हीक असेच म्हणत असत.

अथर्ववेदात बाल्हीकांचा आर्येतर म्हणून उल्लेख केलेला आहे (५.२२.५). तिथे तक्मा म्हणजे ताप याला मूजवंत किंवा बाल्हीक या परकी प्रदेशांकडे जायला सांगितले आहे. बाल्हीक लोकांनी मोहेंजोदडो येथील लोकांचा धर्म स्वीकारला होता आणि ते रुद्राची भव आणि शर्व या स्वरूपांत पूजा करीत होते, असे शतपथ ब्राह्मणावरून कळते. बाल्हीक हे एके काळी झरथुष्ट्री धर्माचे केंद्र होते, असे श्री. करमरकर सांगतात.

शतपथ ब्राह्मणात बाल्हिक प्रातिपिय या राजाचा उल्लेख आलेला असून, तिथे त्याला कौरव्य राजा असे म्हटले आहे. महाभारतातही त्याचा उल्लेख आहे. हा प्रतीपाचा पुत्र होता आणि त्याला शंतनू व देवापी असे दोघे भाऊ होते. त्याला आपल्या मामाचे समृद्ध राज्य मिळाले होते. त्याच्या सात पुत्रांना बाल्हीश्वर असे म्हणत असत. भारतीय युद्धात हा राजा कौरवांच्या बाजूने लढला होता. पांडूचा विवाह माद्रीबरोबर झाला होता व धृतराष्ट्राचा गांधारीबरोबर. यावरून, वायव्येकडे असलेल्या क्षत्रिय टोळ्यांचा व कुरूंचा नात्याचा संबंध होता, हे कळून येते. किंबहुना मद्र, गांधार, कांबोज व बाल्हीक या वायव्य सरहद्दीपलिकडे असलेल्या राज्यांचा अंतर्भाव त्या काळी भारतातच होत होता, असेही महाभारतावरून समजते.

प्रजापती कर्दमाचा पुत्र ईल हा मुळात बाल्हीक देशाचा राजा होता व त्याने शेवटी वैदिक आर्य संस्कृतीचे केंद्र असलेल्या मध्य देशात राज्य स्थापन केले, असे रामायणात सांगितले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाणिनीच्या पूर्वी दारा (प्रथम) याच्या राज्यात बाल्हीक हा एक प्रांत होता. ते एक महाजनपद होते. पाणिनीच्या काळी त्यातल्या लोकांचे आयुधजीवी संघात रूपांतर झाले, असे डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी म्हटले आहे. प्राचीन काळी भारताची सीमा वायव्य सरहद्दीपलिकडे पोचत होती. युआन च्वांग हा चिनी प्रवासीही म्हणतो, की भारत देश उत्तरेकडे ऑक्सस नदीपर्यंत पसरला आहे. कालिदासाने ऑक्सस नदीला वंक्षू असे म्हटले आहे. हा केशराचा देश होता. कालिदास रघुवंशात म्हणतो, की वंक्षूच्या दिग्विजयी घोडयांनी लोळून आपला प्रवासाचा शीण घालवला आणि खांद्यांना चिकटलेले केशराचे कण झाडून टाकले (४·६७). अमरकोशात बाल्हीक देशात होणाऱ्या पिवळ्या केशराचा उल्लेख आहे, तसाच तो युआन च्वांगच्या प्रवासवर्णनातही आहे.

बाल्हीक हा देश भारतीयांच्या मते उदीच्य विभागात येत होता. वंक्षू नदीकडे जात असताना, वाटेत रघूने उदीच्यांचा पराभव केला, असे कालिदासाने सांगितले आहे. भारतात बोलल्या जाणाऱ्या सात भाषांपैकी बाल्हीक भाषा उदीच्य व खस लोक बोलत असत व ती त्यांची स्वदेशी भाषा होती, असे भरताने नाटयशास्त्रात सांगितले आहे (१७.५२).

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात बाल्हीक देशात होणाऱ्या तीन प्रकारच्या चामडयांचा उल्लेख केला आहे; तर काशिकावृत्तीत सौविर नावाचे बाल्हीकांचे एक पेय उल्लेखिले आहे.

मेहरौली येथील एका स्तंभालेखात चंद्रगुप्त (द्वितीय) याच्या दिग्विजयाचे वर्णन केलेले असून, त्याच्या साम्राज्याच्या उत्तर सीमेवर बाल्हीक नावाचा प्रदेश होता, असे म्हटले आहे.

हा बाल्हीक देश जेव्हा ग्रीक लोकांच्या ताब्यात गेला, तेव्हा तिथल्या लोकांची मूळ भारतीय संस्कृती ऱ्हास पावली, ती इतकी, की भारतीय लोकांना बाल्हीक लोक हे तिरस्करणीय वाटू लागले. त्यामुळे त्यांनी या बाल्हीक देशातील राजांची कलियुगात राज्य करणाऱ्या रानटी व पापी राजांत गणना केली आणि तिथल्या लोकांना ते पृथ्वीचा मल समजू लागले. [वे. इं.; पा. का. भा.; स्ट. जॉ. ए. मे. इं.; रि. इं.; क. हि. म. पु.]

बावकुळे वाणी लोकांची एक पोटजात. परंतु यांच्यांत व वाणी लोकांत व्यापार हा फक्त एकच समान धर्म आहे. ते एकमेकांशी रोटीबेटीव्यवहार करीत नाहीत. यांची वस्ती मुख्यतः गोवा व कारवार या भागात आहे. हे कोकणी भाषा बोलतात. यांच्यांत आडनावे नाहीत. व्यापार व शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे.

पूर्वी हे लोक मुलींची लग्ने ७ ते १२ वर्षांपर्यंत आणि मुलांची लग्ने त्यांच्या १४ ते १८ वर्षांपर्यंत करीत. लग्नाच्या दिवशी जानवे घालीत व मुंज झाली असे समजत. पूर्वी विधवांचे केशवपन करीत असत व त्यांना पुर्नविवाह करण्यास परवानगी नव्हती.

बावकुळे लोक स्मार्त असून, शृंगेरी मठाची सत्ता मानतात. कारवार जिल्ह्यातल्या अंगडी येथील शिवनाथ व गोव्यातील म्हार्दोळची म्हाळसा ही त्यांची कुलदैवते आहेत. कोकणस्थ, कऱ्हाडे किंवा कर्नाटकी ब्राह्मण यांचे उपाध्येपण करतात.

यांच्या बऱ्याच चालीरीती कुडाळेवाणी यांच्याप्रमाणे आहेत. हे प्रेतांना जाळतात. [वर्ण व जाती]

बावचा गुजरातमधील एक जात. गवत कापून विकणे व घोडयांचे मोतद्दार म्हणून काम करणे, हे यांचे मुख्य व्यवसाय आहेत. मुळात आपण वाणी असून, वर्षादुधीची फुले खाल्ल्यामुळे आपली अवनती झाली, असे हे सांगतात.

विवाहप्रथा—मुलामुलींचे विवाह सात ते पंधरा या वयात होतात. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. देज म्हणून तो बावीस रुपये वधूपित्याला देतो. लग्न बहुधा रविवारी होते. जातिप्रमुख कोतवाल हाच लग्नात पौरोहित्य करतो. लग्नाआधी तीन दिवस वधूवरांना हळद लावतात व कालीची पूजा करतात. लग्नाच्या दिवशी वधूला वराच्या समोरच्या घरात नेतात व तिला नवे कपडे नेसायला देतात. मग वराला तिच्या शेजारी आणून बसवतात. वधू-वरांचे नातेवाईक त्यांना आपल्या खांद्यावर घेतात, त्यांच्या वस्त्रांची गाठ मारतात व त्यांना सात वेळा गोल फिरवतात. त्या वेळी स्त्रिया गीते गातात. या गाणाऱ्या स्त्रियांना दारूची एक बाटली देतात. संध्याकाळी वरात वरगृही जाते. तिथे वधू-वरांना देवापुढे बसवून त्यांच्या मस्तकांवर अक्षता टाकतात. मग एक कोंबडे मारतात. आणि दुसऱ्या दिवशी आप्तेष्टांना त्याची मेजवानी देतात.

जातीच्या पंचांच्या संमतीने घटस्फोट घेता येतो. स्त्रीचा नियोजित दुसरा वर तिच्या आईबापांना बावीस रुपये देतो. यांपैकी सव्वा रुपयाचे कापड आणून स्त्रीच्या अंगावर टाकतात. नंतर त्या कापडाचा एक तुकडा कापून नियोजित वराच्या घरात टाकतात. स्त्री ते कापड अंगावर घेऊन त्याच्या घरी जाते.

देवधर्म—हे लोक बालासुंदरी पंथाचे अनुयायी आहेत. दसऱ्याच्या दिवशी ते देवीला बकरा बळी देतात व त्याचे मांस ज्ञातिबांधवांना वाटतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मर्तिकप्रथा– हे मृतांना पुरतात. तिसऱ्या दिवशी ज्ञातीच्या लोकांना जेवण घालतात. पितरांच्या तृप्तीसाठी ते कोणताही विधी करीत नाहीत. [ट्रा. का. बाँ.]

बावनी काव्य ।नागरी वर्णमालेतील बावन्न अक्षरांपैकी प्रत्येकाने सुरू होणारे जे काव्य, त्याला बावनी काव्य असे नाव आहे. मध्ययुगीन कालात काव्याचा हा प्रकार फार प्रचारात होता. धार्मिक व नैतिक उपदेश करणारी काव्ये बहुधा याच प्रकाराने रचली जात. मध्ययुगीन कालात जे स्वर व व्यंजने घेऊन ही काव्ये लिहीत, ती पुढीलप्रमाणे– स्वर– अ, आ, इ, ई, उ, ऊ, रि (ऋ), री (ॠ), लि (ऌ), ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः ।

व्यंजन–क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ, ट, ठ, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ, ब, भ, म, य, र, ल, व, श, ष, स, ह, क्ष, त्र, ज्ञ.

बावनी काव्यात ङ, ञ यांच्या ऐवजी न; ष ऐवजी क्त; य ऐवजी ज व अः ऐवजी अ ही अक्षरे वापरलेली आहेत. काहींनी ऋ, ॠ, ऌ, क्ष, त्र, ज्ञ, इ. अक्षरे वगळली आहेत.

या बावन्न अक्षरांना नादस्वरूप ब्रह्माचा अंश मानून, ती प्रत्येक पद्याच्या अरंभी योजलेली असतात. बावनी काव्य असे नाव असले, तरी बहुधा त्यात त्रेपन्न पद्ये आढळतात. हे त्रेपन्नावे अक्षर ब्रह्म होय. तेच सर्व अक्षरांना निर्माण करते, असे मानलेले आहे.

तसेच या काव्यात आरंभीच्या पाच पद्यांच्या आद्याक्षरांनी ईश्वर, गुरू किंवा अन्य अभीष्ट यांचे नाव बनवलेले असते. उदा० 'उं नमः सिद्धाय' किंवा त्याचे विकृत रूप 'उं नमः सिद्धं.' नमः शिवाय, गणेशाय नमः, इ. पदांचे एक एक अक्षर आरंभी योजलेले असते.

बावनी काव्यांचा प्रारंभ इ. स. च्या १३ व्या शतकात पृथ्वीचंद्राच्या रचनेने झाला व आजपावेतो ही परंपरा अखंडित चालू आहे. जैन कवींमध्ये बावनीरचना बरीच प्रिय होती, असे दिसते. या काव्यांपैकी जगडूची सम्यकत्व माई चडपई; पद्मकवीची डूंगर बावनी, छीहलबावनी; धर्मसिंहाच्या तीन बावनी; जिनहर्षाच्या दोन; तसेच केशव, किशन, राजलाभ, बालचंद, जिनरंगसूरी, इ. कवींच्या बावनी रचना प्रसिद्ध आहेत. ही काव्ये मुख्यत्वे गुजराती, हिंदी व राजस्थानी या तीन भाषांत रचलेली आढळतात. भूषणकृत शिवाबावनी, हीरानंदकृत अध्यात्मबावनी, कृष्णदासकृत दुर्जनसालबावनी, हंसराजकृत ज्ञानबावनी, रघुपतिरचित जैनसार, ज्ञानसारकृत निहाल, ही हिंदी काव्ये होत.

मुसलमान कवींनी बावनी काव्याला अखरावट किंवा कक्कहरा असे नाव दिले आहे. काही वेळा अशा रचनांना बारहखडी असेही म्हटलेले आढळते. त्यांतील पद्यांचा प्रारंभ क, का, कि, अशा बाराखडीने होतो.

बावनी काव्यात प्रामुख्याने दोहा, सवैया, कवित्त, छप्पय व कुंडलियाँ या छंदांचा उपयोग केलेला असतो. [हिंदीमें बावनी की परंपरा– श्री. अगरचंद नाहटा, ना. प्र. प., वर्ष ६९, संवत २०२१, अंक ४; सू. ब्र. उ. सा.]

बावन्न बंधन बंगालमधला एक लोकोत्सव. हा मकरसंक्रांतीच्या दिवशी होतो. त्यात स्त्रिया गवताची पेंडी घेऊन ती धान्याच्या कोठाराला बांधतात आणि तसे करताना बावन्नपौटी असे तोंडाने म्हणतात. धान्य बावन्न पट होवो, असा त्या शब्दाचा अर्थ आहे. ही गोष्ट केल्याने पुढील वर्ष समृद्धीचे जाईल अशी त्यांची श्रद्धा असते.

बावरी भारतात सर्वत्र आढळणारी एक गुन्हेगार जमात. हिला बाडरी, बौरी, बावरिया व बौरिया अशीही अन्य नावे आहेत. हे लोक चोरी, घरफोडी, दरोडे व खोटी नाणी तयार करणे, इ. गुन्हे करण्यात पटाईत असतात

निरनिराळ्या प्रदेशांत त्यांना निरनिराळी नावे आहेत. मध्य प्रदेशात ते बदक, बागडी, बावरी, दिल्लीवाले, मोघिया या नावांनी ओळखले जातात. उत्तर प्रदेशात त्यांना बदक, बाउरिया, गिडिया, अरुक आणि किच्छक असे म्हणतात. बंगालमध्ये त्यांना किच्छक, बदक, बागडी व बावरी अशी नावे आहेत. पंजाबमध्ये त्यांना बावरी या नावाशिवाय धंडेरिया असेही एक नाव आहे.

दिल्लीवाले, मालपुरे किंवा करौळी, खैरवाडे किंवा केरार, बदक, मारवाडी, पंजाबी, माळवी किंवा मोघिये या बावरींच्या पोटजाती आहेत. या सर्व आपली उत्पत्ती राजपुतांपासून सांगतात. त्यांच्यांत सोळंकी, कोळी, दाबी, चौहान, वघियेरे, दांडल, परमार, इ. कुळे आहेत.

उत्तर भारतातील बावरी टोळ्यांमधील लोकांचे परस्पर संबंध असतात व सरकारी पकडवॉरंट चुकवण्यासाठी ते वेगवेगळ्या प्रदेशांतील आपल्या भाईबंदांकडे आश्रय घेतात.

बावरी हे अंगाने मजबूत, बांधेसूद, चपळ व काटक असतात. त्यांचा वर्ण काळसर व उंची बेताची असते. ते धोतर किंवा पंचा नेसतात. धोतर उजव्या मांडीकडे व पंचा डाव्या मांडीकडे अपुरा असतो. ते अंगात कुडते घालतात व डोक्याला फेटा बांधतात. मारवाडी बावरी उजव्या पायात कडे घालतात उत्तर भारतातील बावरी स्त्रिया आपापल्या प्रदेशात असताना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घागरा, ओढणी व काचोळी किंवा पायजमा, चोळी व अंगरखा घालतात. द. भारतातील बावरी स्त्रिया साडी नेसतात. नाका-डोळ्याच्या कडा, हनुवटी, मनगट, हात, बोटे, इ. ठिकाणीं त्या गोंदून घेतात. घरी व बायका बरोबर असल्यास मुशाफरी-तही बावरी लोक मडक्यात स्वयंपाक करतात. पण परमुलखात साधूच्या वेषाने हिंडताना मात्र ते धातूंच्या भांडयांत स्वयंपाक करतात. ते गांजा व तंबाखू ओढतात व दारूही पितात. काही जण अफूही खातात. ते गोमांसाखेरीज सर्व प्रकारचे मांस खातात व अंत्यजाशिवाय सर्व लोक आपल्या जातीत घेतात. चोरी-घरफोडीत बराच माल मिळाल्यास ते खाण्यापिण्याची चंगळ करतात.

मारवाडी किंवा गुजराती बावरी हे वर्णाने काळे असतात. त्यांच्यांत धोतर, बंडी किंवा अंगरखा, मारवाड्याप्रमाणे किंवा गुजराथ्यांप्रमाणे बांधलेले जुने पागोटे किंवा दुपेटा हा पुरुषांचा पोषाख असतो. घागरा व ओढणी किंवा लुगडें व काचोळी हा स्त्रियांचा पोषाख असतो. बायका हातात करवंटीच्या बांगड्या, कानात तोडी, नाकात लवंग आणि पायात पैंजण व जोडवी घालतात.

अशुद्ध हिंदी व गुजराती यांचे मिश्रण असलेली भाषा ते बोलतात. त्यांच्या भाषेत स च्या ऐवजी ख येतो. बोलताना ते सूर काढून बोलतात. त्या त्या प्रदेशात प्रचलित असलेली भाषा ते अशुद्ध स्वरूपात बोलतात. धंद्याशी संबंधित अशी एक सांकेतिक भाषाही त्यांनी बनवलेली असते.

उद्योगधंदे – जगन्नाथपुरी, प्रयाग, काशी, अयोध्या, हरिद्वार, ओंकार मांधाता, द्वारका, त्र्यंबक, इ. यात्रांच्या ठिकाणी जाऊन ते गुन्हे करतात. मोघियें बावरी मात्र गुजरात व खानदेश या प्रदेशाच्या खाली उत्तरत नाहीत. बावऱ्यांच्या टोळीत दहापर्यंत इसम असतात. त्यांचा लोकांना संशय येईपर्यंत ते मोठ्या गावी एकत्र काम करतात. मोठ्या घरफोडीसाठी ते दिवसातून चाळीस-चाळीस मैल चालतात. दिल्लीवाले व मारवाडी यांच्या टोळीच्या नायकाला कमाऊ, मालपुऱ्यांच्या नायकाला काडू, वदकांच्याला उपकारे व मोघियांच्याला जमादार असे म्हणतात. दिल्लीवाले आणि मालपुरे यांच्या टोळीत कमाऊ, भंडारी (स्वयंपाकी), कोठारी (हरकाम्या) व पिटवाडी (चोरी करणारे) असे लोक असतात. मालपुरे आणि मोघियें संड असतात. दिल्लीवाल्यांच्या टोळीवरोवर कधीकधी वायकामुळे असतात: तर वदक, मार-वाड व खैरवाड.यांच्यावरोवर नेहमी बायकामुळे असतात. वदक लोक माणसे व सामान वाहून नेण्यासाठी तट्टू, गाढवें, गाई व म्हशी बरोबर नेतात. खैरवाड केवळ बैल घेऊन फिरतात. मार-वाड आणि दिल्लीवाले नुसती तट्टेच नेतात आणि मोघियांच्या टोळीबरोबर कधी कधी एखाद-दुसरा उंट असतो. मारवाड बावरी फेरीला निघण्यापूर्वी देवदेवक करतात. पावसाळ्यात ते धर्मशाळेत किंवा देवळांत उतरतात. बाकीचे बहुतेक सर्व गावाच्या सीमेजवळ मैदानात, पाण्याजवळच्या बागेत, झाडीत किंवा वस्ती नसलेल्या एखाद्या मठात किंवा देवळात उतरतात. बदक बहुधा पाले ठोकून राहतात.

बायकामुळे बरोबर असल्यास बावरी गोसाव्याच्या वेषाने व सडे असल्यास बैराग्याच्या वेषाने फिरतात. ते भगवी वस्त्रे नेसतात, कपाळाला भस्म किंवा गोपीचंदन लावतात, गळ्यात तुळशीच्या किंवा रुद्राक्षांच्या माळा घालतात व हातात चिमटा किंवा कमंडलू घेतात. काहीजण जटाही वाढवतात. ते आपल्या नावापुढे दास किंवा गिर असे लावतात. आईबापांनी ठेवलेले व गुरूने दिलेले अशी त्यांची दोन नावे असतात. शिवाय, ते आपली नावे वरचेवर बदलतात. त्यांच्या दंडावर द्वारकेच्या किंवा अयोध्येच्या तप्त मुद्रा असतात. त्यांच्यापैकी कमाऊ हा गुरू आणि बाकीचे इसम चेले बनतात. ते आपल्या तळाला आसन व टोळीला मंडल किंवा गिरोह म्हणतात. मारवाडी बावरी स्वतःला कधी कधी संजोगी बैरागी किंवा हिंदुस्थानी ब्राह्मण म्हणवितात आणि पाणक्याचे वगैरे घरकाम पत्करतात. अशा वेषाने ते वर्षानुवर्षे राहतात व रात्री चोऱ्या करतात. कधी ते गंगाजलाच्या कावडी घेऊन फिरतात. बदक बावरी रामानंदी बैराग्याचा वेष घेऊन फिरतात.

बावऱ्यांचा एक कुलस्वामी असतो. काही बावरी गहू व ममरखी नामक वेलाच्या तूप लावलेल्या बिया एखाद्या तांब्याच्या किंवा पितळेच्या डबीत घालतात; नंतर ती डबी, एक मोरपीस व घंटा एका पांढऱ्या रुमालाच्या जोडीत गुंडाळून ठेवतात; त्यावर बकऱ्याच्या रक्ताचा पंजा उठवतात; पुन्हा ही गुंडाळी दोन सारख्या रुमालांत गुडाळतात. हाच त्यांचा देव होय. मुक्कामाच्या जागी उतरल्यावर ते हा देव भितीवर टांगून ठेवतात. मैदानात उतरल्यास एखादा पुरुष ती पुरचुंडी उशाला घेऊन झोपतो. त्यांच्या बायका त्या पुरचुंडीला स्पर्श करीत नाहीत.

बावरी लोक चोरीच्या मालाचे पाच वाटे करतात. त्यांतला एक वाटा नाईक घेतो व बाकीच्या भागाचे नाईक व टोळीतील इसम यांच्याइतके भाग करतात. नाईकाला अधिक प्राप्ती होते. त्यातून त्याने ब्राह्मणदक्षिणा, आप्तांपैकी निराधार स्त्रियांना मदत, टोळीतील पुरुषांना भोजन घालून देवताराधना व डोमांचा हक्क हे खर्च करायचे असतात. बावऱ्यांना ऐवज मिळाल्याची बातमी कळताच डोम लोक भाटांच्या वेषाने प्रवास करून टोळीला गाठतात आणि आपला हक्क वसूल करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बावरी लोक आपल्या मुलखात शेती करतात किंवा शेतकाम, सरपण व गवत विकणे हे धंदे करून पोट भरतात. काही जागले व माग काढणारे म्हणूनही काम करतात. काही भीक मागतात, तर काही भागीरथीच्या कावडी आणून गंगोदक विकतात.

बावरी लोक लग्नविधीसाठी ब्राह्मण पुरोहिताला बोलावतात. [का. ट्रा. स. इं.; से. इं., १९३१; गु. जा.]

बावरी पंथ एक निर्गुणोपासक पंथ. बावरी नावाची एक संत स्त्री इ. स. च्या १७ व्या शतकाच्या पहिल्या चरणात झाली. हिच्या नावावरून या पंथाला बावरी पंथ म्हणू लागले. तिचे सविस्तर चरित्र उपलब्ध नाही. ती एक उच्चकुलीन स्त्री होती, तिला लहानपणापासूनच अध्यात्माची आवड होती आणि तिनें दिल्लीतील सगळ्या संतांशी सत्संग केला होता, एवढेच तिच्याविषयी कळते. बावरी म्हणजे वेडी-खुळी, अर्थात ईश्वरभक्तीत धुंद आणि मग्न असणारी. तिचे हे मूळचे नाव नसावे. तिच्या पुढील काव्यपंक्तीवरून तिला बावरी हे नाव मिळाले असणे शक्य आहे –

बावरीं रावरीका कहिये, मन ह्वैके पतंग भरै नित भाँवरी।
भाँवरी जानहि सन्त सुजान, जिन्हें हरिरूप हिये दरसावरी।
साँवरी सूरत मोहनी मूरत, दै करि ज्ञान अनन्त लखावरी।
साँवरी सौह तेहारी प्रभू, गति रावरी देखि भई मति बावरी।

भावार्थ – हे प्रभो, तुझ्या लीलेबद्दल मी काय बोलू ? माझे मन तर तुझ्याभोवती पतंगासारखे घिरट्या घालीत आहे. या पतंगप्रवृत्तीचे रहस्य, ज्याने तुझ्या रूपमाधुरीचे पान केले आहे, त्यालाच कळू शकेल. मी शपथेवर सांगते, की तुझे लीलाचरित्र पाहून माझी मती बावरी होऊन गेली आहे.

गाजीपूर जिल्ह्यातल्या पटवा या गावात राहणाऱ्या रामानंद या साधूपासून हा पंथ प्रवर्तित झाला. हा रामानंद आणि तुलसीदासाचा गुरू रामानंद हे दोघे भिन्न आहेत असे म्हणतात. रामानंदाचा शिष्य दयानंद, त्याचा शिष्य भागानंद आणि त्याची शिष्या बावरी, अशी ही परंपरा लागते. पहिल्या तिघांनी या पंथाच्या संघटनेकडे व प्रचाराकडे विशेषसे लक्ष दिले नाही. बावरीपासून पंथाचे संघटन सुरू झाले आणि बीरूसाहब, यारीसाहब, केसोदास, बूलासाहब, गुलालसाहब, भीखासाहब, चतुर्भुजसाहब, नरसिंहसाहब, इ. बावरीच्या परंपरेतील संतांनी प्रस्तुत पंथाचे संघटन केले व त्याचे तत्त्वज्ञान आपल्या ग्रंथरचनेतून व्यवस्थित मांडले.

या सर्वांत यारीसाहबाचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. त्याच्या कवितांचा संग्रह रत्नावली या नावाने प्रकाशित झाला आहे. केसोदासाचा अमीघूंट, बूलासाहबाचा शब्दसागर, गुलालसाहबाचे ज्ञानमुष्टी व रामसहस्रनाम, भीखासाहबाचे

संत बावरी

रामकुंडलियाँ, रामसवद, भगतवच्छावली, इ. ग्रंथ हे बावरी पंथाचे प्रसिद्ध ग्रंथ होत. याशिवाय इतरही अनेक संत कवींनी प्रस्तुत पंथाच्या आश्रयाने बरीच ग्रंथरचना केली आहे.

बावरी पंथात व्यक्तिगत सदाचार आणि चारित्र्य यांवर विशेष भर दिलेला असतो. या पंथाचे अनुयायी स्वतःच्या आचारशुद्धीकडे बरेच लक्ष देतात. पंथाच्या साधनपद्धतीत अजपाजपाच्या स्वाभाविक क्रियेला विशेष महत्व दिलेले आहे. या पंथाचे तत्त्वज्ञान असे–

सद्‌गुरुच्या कृपेने परमतत्त्वाची उपलब्धी होते. स्वानुभूती, सुरती शब्दयोग किंवा चतुर्थपद यांची प्राप्तीही गुरुकृपेचेच फल होय. सुरती या शब्दाचा संबंध कालतत्त्वाशी जोडला पाहिजे. तो शब्द ब्रह्मसाक्षात्काराला साहाय्यक होतो. सुरती शब्दाचे रहस्य समजणे सोपे नाही. योगाचे खरे ज्ञान असलेला पुरुषच ते समजू शकेल. आत्मविचार ही ज्ञानयोगाची बैठक आहे. आत्मविचारावाचून आत्मानुभूती संभवत नाही. सत्संगाचे माहात्म्य अवर्णनीय आहे. ब्रह्म चेतन आणि निरंतर शून्य आहे. त्याच एका तत्त्वाची अनेकरूपता सर्वत्र प्रतिभासित होते. तेच तत्त्व समस्त सृष्टीचा मूलस्रोत आहे.

या पंथाच्या तत्त्वज्ञानावर वेदान्त आणि सूफीमत या दोहोंचाही प्रभाव आहे. या पंथात सूफीसंस्कार यारीसाहबाने आणले व गुलाल आणि भीखा या दोन संतांनी त्याला वेदान्ताची जोड दिली. या पंथाचा प्रचार पूर्व भारतात विशेष आहे. [हिं. सा. को.; उ. भा. सं. प.; हिं. सं. बौ. प्र.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बाशिंग लग्नाच्या वेळी नवरा-नवरींच्या कपाळावर बांधायचा एक अलंकार. हा दागिना सोनेरी बेगडी कागदाचा केलेला असतो व त्याला पातळ कागदाचेच कापून तयार केलेले सर बांधलेले असतात. काही लोक फुलांचे व मोत्यांचेही बाशिंग बनवतात. ते कपाळावर बांधण्यासाठी त्याच्या दोन्ही बाजूंना दोरा किंवा तत्सम वस्तू बांधलेली असते. या अलंकारामुळे नवरा-नवरीचा बहुतेक सर्व चेहरा झाकला जातो. कदाचित त्यांना कोणाची दृष्ट लागू नये म्हणून ही चाल सुरू केलेली असावी.

काहीजण बाशिंग हा शब्द 'भालशृंग' या शब्दापासून व्युत्पादितात, तर काहींच्या मते 'द्विशृंग' या शब्दापासून तो शब्द बनला आहे. ओपश, कुरीर, कुंभ, इ. अलंकारवाचक शब्द वेदांत आलेले आहेत. पंडितांच्या मते हे शिंगासारखे डोक्यावरचे अलंकार असावे. इंद्राच्या संदर्भात ओपश शब्दाचा अर्थ मुकुट असा करतात. यावरून प्राचीन काळी मुकुटासारखा शृंगाकृती दागिना रूढ होता, असे चिं. ग. कर्वे यांचे अनुमान आहे. आजही मुडिया आदिवासी लोक बैलाच्या शिंगाचा मुकुट करून तो उत्सवप्रसंगी वापरतात.

गुरांच्या उत्सवप्रसंगी त्यांच्या कपाळावरही बाशिंग बांधण्याची प्रथा आहे.

लग्नात बाशिंग बांधण्याची ही प्रथा बहुतेक सर्व जातींत आढळते. बिजवराला मात्र हा मान नसतो. नवऱ्या मुलाला बाशिंग बांधण्याचा मान सामान्यतः त्याच्या बहिणीकडे असतो. कातकरी लोकांत बाशिंगात दोरा ओवण्याचा मान जमातीच्या नायकाकडे असतो. पाच जणांनी मिळून ते वराला बांधायचे असते. ठाकर जातीत ते मामा बांधतो. चांभार लोक नवऱ्या मुलाला दोन बाशिंगे बांधतात आणि त्यातले एक बाशिंग सोडून ते नवऱ्यामुलीकडे पाठवतात. त्याला उष्टे बाशिंग असे म्हणतात.

मराठी वाङ्मयात बाशिंगासंबंधी अनेक ओव्या व म्हणी रचल्या गेल्या आहेत. ओव्यांचा नमुना असा –

हळद कुटिता । मुसळें घुमती ।
तुला बाशिंगे शोभती । गोपूबाळा ।।
बाशिंगाची कळी । लागते तोरणा ।
नवरा मुलगा शहाणा । गोपूबाळ ।।
नवरा शिशुपाल । त्याचं बाशिंग मोडलं ।।
रुक्मिणी जितायला । त्याला अपेश घडलं ।।

एखाद्याचे लग्न लवकर होत नसले तर 'त्याचे बाशिंगबळ जड आहे' असे म्हटले जाते. अथवा कोणी लग्नासाठी उतावीळ झाला तर 'उतावळा नवरा, गुडघ्याला बाशिंग' असेही म्हणतात. तशी म्हण प्रचलित झाली आहे [सिं. ऋ. हिं.]

बाष्कल ऋग्वेदाची एक शाखा. बाष्कलाने ती प्रवर्तित केली. बाष्कल हा एक महत्त्वाचा चरण होता, असे चरणव्यूहात सांगितले आहे. पराशर हा या शाखेचा प्रमुख शिष्य होय. त्याने पाराशर्य शाखा प्रवर्तित केली. या शाखेच्या एका कल्पग्रंथाचा पतंजलीने उल्लेख केला आहे. त्याचे अध्ययन करणाऱ्यांना पाराशरकल्पिक असे म्हणत असत.

बाष्कल शाखा गुजरातेत होती. सांप्रत या शाखेचे लोक क्वचितच आढळतात.

बाष्कलांचे संहिता व ब्राह्मण असे ग्रंथ होते. बाष्कलसंहितेची शेवटची ऋचा 'तच्छंयोरावृणीमहे' ही आहे, असे आश्वलायन गृह्यसूत्रांत सांगितले आहे. ही संज्ञान सूक्तातली १५वी ऋचा आहे. [पा. का. भा.; तर्पण; प. का. भा.]

बाष्कलमन्त्रोपनिषद एक गौण उपनिषद. यात त्रिष्टुभ छंदातील २५ श्लोक आहेत. हे उपनिषद ऋग्वेदाच्या बाष्कल संहितेत अंतर्भूत झालेले असण्याचा संभव आहे. या उपनिषदातील काही पंक्ती ऋग्वेदात आढळतात. मेधातिथी व इंद्र यांच्या कथेचा उल्लेख ऋग्वेदात (८.२.४०) आहे. तीच कथा या उपनिषदात सांगितलेली आहे. मेधातिथी व इंद्र यांचा काव्यमय व तात्त्विक संवाद प्रथम दिलेला असून; त्यात इंद्राच्या सर्व महत्कृत्यांचे वर्णन केलेले आहे. त्यानंतर इंद्राला ईश्वर मानून त्याचे श्रेष्ठत्व सांगितलेले आहे आणि शेवटी इंद्र व ब्रह्म यांचे एकत्वही प्रतिपादले आहे. [श्री. बेलवलकर–ऑ. इं. ओ. कॉ. मद्रास, १९२४]

बासरी एक सुषिर वाद्य. प्राचीन वाङ्मयात याला वेणू किंवा वंशी हे नाव होते. याला मुरली किंवा फिल्लगोरी असेही म्हणतात. हे वाद्य पोकळ बांबूचा तुकडा, तसेच लाकडी किंवा धातूची नळी यांपासून बनवतात. मात्र बांबूची किंवा पितळेची बासरी सर्वांत उत्तम मानली जाते. बांबूच्या बासरीतून जसा मधुर स्वर निघतो, तसा धातूच्या बासरीतून निघू शकत नाही. पण बांबूची बासरी विशिष्ट सुराची मिळणे कठीण असते आणि उष्ण हवामानात ती तडकून बेसूर होते. त्यामुळे पितळेची व लाकडाची बासरी अधिक प्रचलित आहे.

बासरीचे दोन प्रकार आहेत; एक आडवी व दुसरी सरळ धरून वाजवायची. जी बासरी आडवी धरून वाजवतात तिला मुरली म्हणतात. ती वाजवायला प्रथम जरा कठीण असते. सरळ धरून वाजवताना बासरीचा वरचा भाग डाव्या हाताने व खालचा भाग उजव्या हाताने धरण्याची प्रथा आहे. मुरली वाजवताना हीच पद्धत सोयीची असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सप्त स्वर उत्पन्न करण्यासाठी बासरीला ६ ते ८ छिद्रे ठेवलेली असतात. हाताच्या बोटांनी पूर्णपणे बंद करता येतील,

बासरीवादन

अशी ती असतात. प्राचीन तमिळ ग्रंथांत बासरीचे जे वर्णन आहे, ते कर्नाटक संप्रदायातील बासरीच्या स्वरूपाशी बहुतेक जुळणारे आहे. त्यानुसार बासरीची लांबी २० अंगुळे (१५ इंच) असते. तिच्या मुखाकडून २ अंगुळे अंतरावर हवा फुंकण्यासाठी एक छिद्र असते. तिथून ७ अंगुळे व दुसऱ्या टोकापासून २ अंगुळे सोडून मधल्या जागेत समान अंतरावर आठ छिद्रे असतात. त्यांतील एक छिद्र हवा बाहेर जाण्यासाठी व सात छिद्रे सात स्वरांसाठी असतात. मुखरंध्रापासून जे छिद्र अगदी जवळ असते, त्यातून सप्तस्वरांचा तारस्वर उत्पन्न होतो. जेव्हा बासरीला सहा छिद्रे असतात, तेव्हा सर्व छिद्रे बंद केल्यानंतर सातवा सूर निघतो.

भारतीय संगीत परंपरेत बासरीला उच्च स्थान लाभलेले आहे, कारण कृष्णाच्या मुरलीने वृंदावनातील गायींना व गोपींनाही मोहिनी घातली होती. बासरी हे अत्यंत मधुर व सुगम वाद्य आहे. [म्यु. इं.; संगीत मासिक, हाथरस, वाद्य-संगीत अंक, जानेवारी १९५१; सं. शा.]

बाहुदा हिमालयात उगम पावलेली एक नदी. हिला बाहुका, बहुका, सैतवाहिनी अशी अन्यही पौराणिक नावे आहेत. धवला किंवा धुमेला ही हिची लौकिक नावे होत. सांप्रतची रामगंगा हीच पूर्वीची बाहुदा होय. ही अवध प्रदेशातल्या राप्ती नदीला मिळते. हिला बाहुदा हे नाव पडण्याचे जे कारण घडले, त्याची कथा अशी–

या नदीच्या काठी शंख व लिखित हे ऋषिबंधू वेगवेगळे आश्रम उभारून राहत होते. तो प्रदेश सुद्युम्न राजाच्या राज्यात मोडत होता. एके दिवशी लिखित हा शंखाच्या आश्रमात आला. शंख त्या वेळी आश्रमात नव्हता. आश्रमाभोवती अनेक वृक्ष फलसंपन्न असल्याचे पाहून लिखिताच्या तोंडाला पाणी सुटले. त्याने तिथली बरीचशी फळे तोडली व पोटभर खाल्ली. एवढ्यात शंख आश्रमात आला. भावाचे ते कृत्य पाहून शंखाला वाईट वाटले. तो म्हणाला. 'न विचारता तू ही फळे तोडलीस ही तुझ्या हातून चोरी झाली.' लिखिताला ते पटले. तो म्हणाला. 'मी काय करू ते सांग.' त्यावर शंख बोलला. 'तू सुद्युम्न राजाकडे जा, चोरीचा अपराध स्वमुखाने त्याला सांग आणि तो देईल ती शिक्षा भोग.' लिखिताने राजाकडे जाऊन सर्व वृत्तांत सांगितला. राजाने त्याला दोन्ही हात तोडण्याची शिक्षा दिली. लिखित आपले थोटे हात घेऊन शंखाकडे आला. शंख म्हणाला. "तू आता जवळच्या नदीत स्नान कर." लिखिताने तसे करताच एक आश्चर्य घडले. लिखित नदीत बुडी मारून वर येतो तो त्याचे दोन्ही हात परत जोडले गेले होते. लिखिताला त्या नदीने बाहूंचे दान केले म्हणून पुढे तिला बाहुदा असे नाव पडले.

या नदीच्या उत्पत्तीविषयी हरिवंशात (१२·५) एक श्लोक आला आहे, तो असा–

लेभे प्रसेनजिद्भार्यां गौरीं नाम पतिव्रताम् ।
अभिशप्ता तु सा भर्त्रा नदी वै बाहुदा कृता ।।

अर्थ–प्रसेनजित नावाच्या एका पुरुषाची गौरी नावाची एक पतिव्रता स्त्री होती. पण (तिच्याकडून काही अपराध घडल्यामुळे) नवऱ्याने तिला शाप देऊन नदी बनवले. तीच ही बाहुदा नदी होय.

हिच्या काठी श्राद्ध केल्याने खूप पुण्य मिळते, असे मत्स्य पुराणात सांगितले आहे (२२·५५-५६).

कार्तवीर्याने हिला हिमालयातून खाली आणले, अशी एक कथा आहे. गौतम बुद्धाने हिच्यात स्नान केले होते. जातकातही हिचा उल्लेख आहे. [हि. जॉ. ए. इं.; श. क.]

बाहुबली जैनांचा आदी तीर्थंकर ऋषभदेव याचा पुत्र. याला भरत या नावाचा थोरला सावत्र भाऊ होता. ऋषभदेवाने बरीच वर्षे राज्य केल्यावर शेवटी सत्यज्ञानासाठी राज्यत्याग करण्याचे ठरविले. तसे करण्यापूर्वी त्याने भरताला अयोध्येचे व बाहुबलीला पोदनपुराचे राज्य दिले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुढे काही कालाने भरत हा दिग्विजयासाठी बाहेर पडला. तो चक्रवर्ती असल्यामुळे त्याला एक चक्र प्राप्त झाले होते. ते चक्र भरताच्या सैन्यापुढे निघाले. ते ज्या ज्या राज्यात प्रवेशले, त्या त्या सर्व राजांचा भरताने पराभव केला. वाटेत त्याला पोदनपूर लागले. तिथे मात्र चक्राचा प्रवेश होईना. त्यामुळे आश्चर्य पावून भरताने आपल्या मंत्रिजनांना विचारले, की 'असे का व्हावे ?' मंत्री म्हणाले. 'हा प्रदेश बाहुबलीचा असून तो अजिंक्य आहे.' त्यावर भरताने राज्यावाहेर तळ देऊन वाहुबलीला निरोप पाठविला. 'तू मला भेटायला ये आणि माझे सार्वभौमत्व मान्य कर.' त्यावर वाहुवलीने उलट निरोप पाठविला. 'मी गुणांचा उपासक आहे. मी गुणांपुढे नम्र होईन; पण सार्वभौम म्हणून कोणापुढेही, इतकेच काय मोठ्या भावापुढेही नमणार नाही. भरताला ही गोष्ट मान्य नसेल तर त्याला म्हणावे, की युद्धाची तयारी कर.'

त्यानंतर थोड्याच वेळात भरत व बाहुवली हे युद्धासाठी समोरासमोर उभे ठाकले. संकुल युद्ध करून उभय पक्षांच्या सैनिकांचा संहार होऊ देण्यापेक्षा दोघांत द्वंद्वयुद्ध झालेले बरे, असा त्या दोघांनी विचार ठरविला. दृष्टियुद्ध, जलयुद्ध व मल्लयुद्ध असे द्वंद्वाचे तीन प्रकार ठरले. तीन्ही प्रकारांत बाहुबलीने भरताचा पराजय केला. त्यामुळे क्रुद्ध होऊन भरताने बाहुबलीवर आपले चक्र सोडले; पण तेही निष्प्रभ होऊन परत गेले. पण विजय प्राप्त होऊनही बाहुबलीला हर्ष झाला नाही; उलट आपण थोरल्या भावाची मानखंडना केली म्हणून त्याला पश्चात्तापच झाला. मग आपले पोदनपूरचे राज्य भरताला समर्पण करून तो तपश्चर्येसाठी बाहेर पडला. खड्गासनावर तप करीत असता त्याच्या अंगावर वेली वाढल्या आणि नागही वेटोळे घालून बसले; पण त्याला त्या गोष्टीची जाणीवही नव्हती. मात्र बरीच वर्षे असे घोर तप करूनही त्याला मुक्ती मिळेना.

त्यामुळे भरतच अधिक चिंताक्रांत झाला. त्याने ऋषभदेवाकडे जाऊन त्याबद्दल विचारले. त्यावर ऋषभदेव म्हणाला. 'आपण तुझ्या राज्यात तप करीत आहो, ही जाणीव त्याला सलत आहे. ती नष्ट झाल्यावाचून त्याला मुक्ती मिळणार नाही.' ते ऐकून भरत बाहुबलीकडे गेला आणि त्याला म्हणाला. 'ही पृथ्वी माझी आहे असे तू समजतोस, ही तुझी चूक आहे. माझ्या पश्चात अनेक राजे तिला उपभोगतील. तेव्हा तू तुझ्या मनातील शल्य काढून टाक!' भरताचे हे बोलणे ऐकून बाहुबलीच्या मनातले शल्य दूर झाले. पुढे थोड्याच कालात त्याला केवलज्ञानाची प्राप्ती झाली.

बाहुबलीच्या मूर्ती – बाहुबलीच्या अनेक मूर्ती भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशांत आढळतात. सर्वांत पहिली मूर्ती ब्राँझ धातूची असून, ती नुकतीच प्रकाशात आली आहे. ती इ. स. च्या ६ व्या शतकाच्या सुमाराची असावी. ती एका गोलाकार पीठावर असून, तिची उंची अवघी २० इंच आहे. ही मूर्ती आकृती आणि भाव या दोन्ही दृष्टींनी सुंदर आहे. तिचे पाय व बाहू लतापत्रांनी वेष्टित असून, जटा पाठीवर व खांद्यावर विखरून पडल्या आहेत. गाल व हनुवटी मांसल आहेत. मुखमंडल लंबगोल आहे. मुखावर आध्यात्मिकतेची झलकही दिसते. हिची तुलना बादामीच्या गुंफेतील बाहुबलीच्या प्रतिमेशी करता येईल. बादामीच्या गुंफेतील प्रतिमा पाषाणनिर्मित आहे. ती इ. स. च्या ७ व्या शतकात बनली असावी. तिसरी प्रतिमा वेरूळच्या इंद्रसभा नामक लेण्याच्या दक्षिण भिंतीवर कोरलेली आहे. इ. स. चे ८ वे शतक

वाहुवलीची मूर्ती—श्रवणबेळगोळ

हा तिचा काल मानतात. चौथी मूर्ती देवगड येथील शांतिनाथमंदिरात आहे. तिचे वैशिष्ट्य हे, की तिच्या अंगावर वेली व नाग याव्यतिरिक्त विंचू, पाली, इ. अनेक जीवजंतू चढलेले आहेत आणि त्यांचे निवारण करण्यासाठी एक देवयुग्म शेजारी उभे आहे. ही मूर्ती ९ व्या शतकाच्या उत्तरार्धातली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बाहुबलीची सर्वात उंच मूर्ती कर्नाटकातल्या श्रवणबेळगोळ येथील पर्वतावर असून, ती ५६ फूट ६ इंच उंच आहे. हिची निर्मिती १० व्या किंवा ११ व्या शतकातली असल्याचे मानतात. तिचे अनुकरण करून इ. स. च्या १५ व्या व १७ व्या शतकात कार्कल व वेणूर या ठिकाणीही बाहुबलीच्या मूर्ती निर्माण केल्या गेल्या. कार्कलची मूर्ती ४१ फूट ६ इंच व वेणूरची ३५ फूट उंच आहे. अलिकडच्या काळात उत्तर व दक्षिण भारतात अनेक ठिकाणी बाहुबलीच्या मूर्ती निर्माण करून त्या स्थापल्या गेल्या आहेत. जैन समाजात प्रसिद्ध तीर्थंकरांच्या खालोखाल बाहुबलीला मान आहे. पाहा– श्रवणबेळगोळ. [जै. मं.: भा. मं. जै. यो.]

बाहुमती

एक नदी. मज्झिम निकायात (१.३९) हिचा उल्लेख आहे. ही नदी म्हणजे नेपाळमधील बाघमती नदी असावी, असे एक मत आहे. बुद्ध ककुच्छंद नेपाळला गेला असता आपल्या मुखातून शब्द उच्चारून त्याने ही नदी निर्माण केली, अशी कथा आहे. या नदीला मरदारिक, मणिश्रोही, राजमंजरी, रत्नावली, चारुमती, प्रभावती आणि त्रिवेणी या नद्या मिळाल्या असून, त्यांच्या संगमावर अनुक्रमे शांता, शंकर, राजमंजरी, प्रमोदा, सुलक्षणा, जया व गोकर्ण ही तीर्थक्षेत्रे आहेत, असे वराह पुराणात सांगितले आहे. [हि. जॉ. ए. इं.]

बाहुल्या

लहान मुलींचे खेळण्याचे एक साधन. माती, कागदाचा लगदा, धातू, शिंपा, लाकूड, रबर, कापड, प्लॅस्टिक, इ. अनेक वस्तूंपासून बाहुल्या बनवतात.

भारतात सर्वांत प्राचीन बाहुल्या मोहेंजोदडो व हडाप्पा येथील उत्खननात सापडल्या आहेत. या बाहुल्या मातीच्या बनवलेल्या आहेत. पण या बाहुल्या पूजेसाठी तयार केल्या होत्या का खेळण्यासाठी, हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. कारण प्राचीन काळी या दोन्ही उद्देशाने बाहुल्या बनवीत असत व त्यांच्या रंग-रूप-आकारात काही फरक नसे.

राजघाट, कौशांबी, अहिच्छत्रा, पाटणा, मथुरा, नागार्जुनकोंडा, इ. ठिकाणी मौर्य, शुंग, कुषाण, सातवाहन व गुप्त यांच्या कालातील मातीच्या बाहुल्या सापडल्या आहेत.

भारतात लाकडी बाहुल्या मात्र इ. स. च्या १७ व्या शतकाच्या पूर्वीच्या काळातील सापडत नाहीत.

सांप्रत भारतात अनेक राज्यांत बाहुल्या तयार होतात. वेगवेगळ्या राज्यांतील बाहुल्यांचा आकार, रूप; रंग व पोषाख भिन्न भिन्न प्रकारचा असतो. त्यांच्या पोषाखावरून, त्या कुठल्या राज्यातील असतील ते सहज कळून येते.

लखनौ, वाराणसी, मथुरा, आग्रा, कलकत्ता, कृष्णनगर (बंगाल), बहरामपूर, मुर्शिदाबाद, मद्रास, म्हैसूर, पुरी, कोंडापल्ली (आंध्र), सावंतवाडी, नासिक, तिरुचिरापल्ली, इ. ठिकाणच्या बाहुल्या विशेष प्रसिद्ध आहेत.

कापडाची बाहुली—बंगाल

बंगाल व बिहार या राज्यांत मऊ लाकडाच्या एकाच तुकड्यातून बाहुल्या बनवतात व त्यांना भडक रंग देतात. बंगालमध्ये मातीच्या रंगीबेरंगी बाहुल्यांचे अनेक प्रकार आहेत.

याशिवाय, अनेक गावांत कुंभार आपल्या साच्यांतून अनेक प्रकारच्या बाहुल्या तयार करतात. साच्यातून काढल्यावर त्या उन्हात वाळवतात किंवा पक्क्या भाजतात. नंतर घरातील स्त्रिया व मुले त्यांना रंग देतात. दसरा-दिवाळीच्या सुमारास उत्तर भारतात प्रत्येक बाजारात आणि जत्रेत अशा बाहुल्या विपुल संख्येने विकण्यासाठी येतात. माता व पुत्र, गौळण, अशा बाहुल्या यांत विशेषकरून असतात.

भरतपूर, लखनौ व हैद्राबाद या ठिकाणी कित्येक गरीब स्त्रिया जुन्या कपड्यांच्या बाहुल्या करून विकतात व त्यावर गुजराण करतात. विविधरंगी पोषाख केलेल्या व दागिन्यांनी सजवलेल्या भारतीय बाहुल्यांना परदेशांतही बरीच मागणी असते. नवरा-नवरी, माता-बालक, गौळण, नर्तकी, इ. बाहुल्या परदेशांतल्या लोकांना विशेष आवडतात. भारतात बाहुल्यांचा उपयोग जादू-टोण्यासाठीही केला जातो. पाहा - खेळणी. [हिं. वि. को.; जर्नी थ्रू टॉयलँड – डोंगरकेरी, १९५४]

बाहुवृक्त आत्रेय

एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील ७१ व ७२ ही दोन सूक्ते याच्या नावावर आहेत. मित्रावरुणांची स्तुती हा त्यांचा विषय आहे. महाज्ञानी मित्रावरुणांनी आमच्या बुद्धीला परिपूर्ण करावे, अशी त्याने त्यांची आळवणी केली आहे. त्याच्या सूक्तांतील नमुन्याची एक ऋचा (५.७२.३) अशी–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मित्रश्च नो वरुणश्च जुषतां यज्ञमिष्टये ।
नि बर्हिषि सदतां सोमपीतये ।।

अर्थ — मित्र आणि वरुण असे उभयता, आमचा इष्ट हेतू पूर्ण व्हावा म्हणून, हा आमचा यज्ञ मान्य करून घेवोत. तर आता हे देवांनो, सोमरसाचा आस्वाद घेण्यासाठी तुम्ही या कुशासनावर आरोहण करा.

मित्र आणि वरुण हे संपूर्ण विश्वावर राज्य करीत असतात, अशी सूक्तद्रष्टयाची श्रद्धा आहे. [प्रा. च. को.]

बाळकराम (इ. स. चे १७ वे शतक) एक मराठी संतकवी. हा यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचा असून, कळवे हे त्याचे आडनाव आणि तुळजापूरची भवानी हे कुलदैवत होते. शिंदखेड या गावी बाळकरामाचा जन्म झाला. पुढे बाळकराम शिंदखेडचाहून पुसगावी राहायला गेला. नंतर त्याने त्रिपुरापूर इथे वस्ती केली. बाळकरामाचा मुलगा रोकडाराम हा वऱ्हाडा-तल्या कारंजे येथे कायमच्या वास्तव्याला गेला. कारंजे गावी जे दोन रामदासी मठ आहेत, त्यांपैकी एक बाळकरामाच्या परंपरेतला आहे. समर्थ रामदास हे बाळकरामाचे गुरू होते. बाळकरामाला रामठेंग असे एक टोपण नाव असावे, असे वाटते.

बाळकरामाचा स्वतंत्र मोठा ग्रंथ नसला, तरी त्याची बरीच स्फुट रचना व प्रकरणे कारंजे येथील मठात आहेत. हरिश्चंद्रा-ख्यान, पार्वतीलक्ष्मीसंवाद, चंद्रहास्यकथा, शंकरविवाह, गज-गौरीव्रत, इ. त्याच्या प्रकरणांची नावे आहेत. याशिवाय पद-संग्रह, स्फुट अभंग, श्लोक, आरत्या वगैरे त्याची विपुल कविता आहे. त्याचे एक पद असे —

रामदासें कैसें आतां केलें रे ।
ज्योतिरूपें न देखों कोण जालें रे ।
जड कोठें धन्य हें अपूर्व रे ।
अवघा मीच माझीच अवघी सत्ता रे ।। धृ. ।।
मुळरूपीं रंगलें मन माझें रे ।
दिसे चैतन्यघन सदोदित रे ।
चंचळाचें न दिसे कांहीं भान रे ।
निश्चळासी पाहतो आहे कोण रे ।।
दृश्य द्रष्टा कोणें कल्पावें तयासी रे ।
माया जड म्हणते कोण तीसी रे ।
धन्य तोचि सद्‌गुरु रामदासी रे ।
बाळकरामीं स्थापिलें प्रत्ययासी रे ।।

बाळकरामाच्या प्रकरणांपेक्षा त्याची पदे व अभंग अधिक सरस आहेत. [म. वा. इ. ३]

बाळसंतोष एक भिक्षेकरी जमात. हिला बाळछंद असेही नाव आहे. पहाटेच्या वेळी 'बाळसंतोष, बाबा बाळ-संतोष' असे तोंडाने म्हणत आणि फाटके–तुटके वस्त्र किंवा लहान मुलाचे अंगडे–टोपडे मागत बाळसंतोष दारोदार फिरतो. थोड्याशा दानानेही हा लहान मुलासारखा संतोष पाव-णारा, म्हणून त्याला बाळसंतोष ही संज्ञा मिळाली असावी.

हे लोक प्रामुख्याने दक्षिण महाराष्ट्रात आढळतात. त्यांच्या अंगावर विविधरंगी चिंध्यांचे कपडे असतात. शेतीच्या हंगा-मात हे पाऊस-पाण्याचे आणि शेतकऱ्यांच्या मुलाबाळांचे भविष्य सांगत फिरतात.

ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत अनेक प्रसिद्ध संतांनी बाळ-संतोषांवर भारुडे लिहिली आहेत. त्यावरून एके काळी महा-राष्ट्रात बाळसंतोष फार लोकप्रिय असला पाहिजे, असे वाटते. रामदासांचे बाळसंतोषावरील भारूड असे—

दाता समर्थ त्रिजगती । अचळ स्वरूपसंपत्ति ।
सर्वहि सिद्धि वोळंगती । कृष्णा याचकाची कीर्ती
बाबा बाळसंतोष ।।
बाबा बाळसंतोष । नाम घेतां हरती दोष ।
भुवनत्रयीं कीर्तिघोष । माझा पालटे हा वेष ।
बाबा बाळसंतोष ।।
मुळी उघडा मी असें । मज पांघराया नसे ।
तुझिया नगरा आलों असे । माया दिधली परियेसी ।
बाबा बाळसंतोष ।।
पिवळें शुभ्र आणि ताम्र । काळें नीळें हे अंबर ।
याचा मिरवितों बडिवार । आतां देईं चिदंबर ।
बाबा बाळसंतोष ।।
बाळसंत ध्रुव जाला । भगवंतासि शरण आला ।
सघनांबरें गौरविला । अढळ अधिष्ठानीं केला ।
बाबा बाळसंतोष ।।
बाळसंत सकळाधारा । रामदास आला द्वारा ।
रामीं निर्भर जाला पुरा । दिधलें स्वरूप अंबरा ।
बाबा बाळसंतोष ।।

काही देवतांच्या उत्सवांत शेवटच्या दिवशी तीर्थप्रसादाचे कीर्तन असते. त्या कीर्तनाच्या अंती देवता सिंहासनावर बसली आहे, अशी कल्पना करून निरनिराळे भक्त प्रसाद मागण्या-करिता येतात व आपापली कला दाखवून प्रसाद मागतात. वासुदेव, गोंधळी, गोसावी, ब्राह्मण, इ. भक्तांनंतर शेवटी बाळसंतोष येतो. कीर्तनकारच ही सर्व सोंगे घेतो. त्या वेळी बाळसंतोष सर्वांकडे वस्त्र मागतो. त्या कार्यक्रमाला ललित म्हणतात. हा कार्यक्रम मुख्यतः कोकणात प्रचलित आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बाळसंतोष या लोकांच्या चालीरीती मराठा कुणब्यांप्रमाणेच असतात. [म. लो. उ.; श्री स. गा.]

बाळापूरकर विश्वनाथ (इ. स. चे १३ वे शतक) एक ग्रंथकार व कवी. हा ऋग्वेदी आश्वलायन शाखेचा असून पैठणचा राहणारा होता. पैठण येथील कमलाकर या नावाच्या सत्पुरुषाचा याने उपदेश घेतला होता. लाड कामराज नावाच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याकडे तो कोशाध्यक्ष होता. त्याने बेदर प्रांत खंडणीने घेऊन त्याची व्यवस्था विश्वनाथावर सोपविली होती. पण पुढे काही कारणाने त्याचे विश्वनाथाविषयी प्रतिकूल मत झाले व त्याने याला बंदीत टाकले. नंतर विश्वनाथाचा गुरू कमलाकर याने कामराजाचा गुरुबंधू शिवव्यास याच्या मदतीने त्याची सुटका केली. पण घडल्या गोष्टीने उपरती होऊन विश्वनाथाने शिवव्यासाकडून संन्यासदीक्षा घेतली.

विश्वनाथाने ज्ञानचंद्रिका व ज्ञानप्रबोध या नावाचे दोन ग्रंथ लिहिले. दुसरा ग्रंथ ही भगवद्गीतेवरील टीका आहे. त्यातील अमानित्व या शब्दावर कवीने ज्या ओव्या लिहिलेल्या आहेत, त्या अशा—

> तो फेलिया वरी त्याग । वाणे देहीं संन्यास योग ।
> तेणे सानुकूल जग । महत्तत्त्वें मानी ।।
> ऐसा सन्मान्यतेचें सुख पडे । तेणे विषोचि सेविले घडे ।
> या लागीं चिन्हालागीं लपौनि दडे । दीनत्वामाजी ।।
> मग विषयमूळ मान्यता । तेथेंहि विरमता ।
> भरोनि भावी चिंता । अमानत्वे ।
> तो मानाचेनी भारें दडपे । पूजेतें भिऊनि कांपे ।
> पुरस्करलिया त्रासिपें । वर्मे जेंवी ।।

या ओव्या ज्ञानेश्वरीच्या धर्तीवर आहेत. भाषाही जवळ जवळ तितकीच जुनी आहे.

संन्यासाश्रमातला सर्व काल त्याने ईश्वरचिंतनात घालविला. याची शिष्यशाखा बाळापूर वऱ्हाड येथे आहे. तिथे त्याची गादीही आहे. [प्रा.म. सं. क.; म. म. वा.; म. सा.]

बाळा–बहिरू (इ. स. च्या १९ व्या शतकाचा पूर्वार्ध) लावणीकार व परस्पर मित्र. बाळाचा धंदा शिंप्याचा होता. बहिरू हा रंगारी होता. दोघेही राहणारे पुण्याचे व जिवलग मित्र. दोघे मिळून लावण्या रचीत व शेवटच्या कडव्यात दोघांचे जोड नाव घालीत. फडात लावणी गाण्यासाठीही दोघे जोडीने उभे राहत. दोघांचाही आवाज गोड व सुरेल असल्यामुळे त्यांच्या लावणीगायनावर रसिक श्रोते लुब्ध असत. दोघांपैकी बाळाचा होनाजीशीही मित्रसंबंध जडला. होनाजी बरोबरही बाळा लावणी गाण्यासाठी उभा राही. पाहा – होनाजी.

बाळाबोवा ज्ञानेश्वरी (१८०६ ते १८८८ इ. स) एक मराठी संत आणि ग्रंथकार. हा ज्ञानेश्वरभक्त असल्यामुळे आणि ज्ञानेश्वरांच्या परंपरेतील दीक्षित असल्यामुळे याला बाळाबोवा ज्ञानेश्वरी असे नाव प्राप्त झाले. याचे घराणे बीड जिल्ह्यातील गरुडगंगा वांझरा नदीकाठच्या वाघेबाभुळ गावचे होय. हा शुक्लयजुर्वेदी काण्वशाखीय कौशिकगोत्री ब्राह्मण असून, त्याचे उपनाम घेटे असे होते. त्याच्या घराण्याकडे वाघेबाभूळ गावाची महाजनकी होती. बाळाबोवाने आपल्या घराण्याचा हा वृत्तांत भक्तितत्त्वामृत या ग्रंथात संक्षेपाने नोंदविला आहे.

बाळाबोवाचा जन्म गोरा कुंभाराच्या तेर गावी झाला. त्याच्या बालपणीच त्याचे वडील निधन पावले. त्यामुळे त्याचे शिक्षण नीट होऊ शकले नाही. परंतु पूर्वसुकृताच्या बळावर त्याला श्रीकृष्णानंद हे गुरू लाभले. सच्चिदानंदबाबांनी रचलेला मानसपूजा हा ग्रंथ श्रीकृष्णानंदांनी त्याच्या स्वाधीन केला आणि डाकोरक्षेत्री जाऊन त्या ग्रंथाचा विस्तार करावा, अशी त्याला आज्ञा केली. गुरूच्या आज्ञेनुसार बाळाबोवा डाकोरला गेला. त्या स्थलांतरातच त्याचा विवाह झाला. बडोद्यात महिपत गिरमाजी या नावाचा एक गृहस्थ राहत होता. त्याला स्वप्नादेश झाल्यावरून महिपतने आपली कन्या गजाबाई हिचे बाळाबोवाशी लग्न लावून दिले.

आपणास शिक्षण नसल्यामुळे मानसपूजा या ग्रंथाचा विस्तार आपल्या हातून कसा होणार, याची बाळाबोवाला चिंता होती. परंतु ती त्याची चिंता डाकोरक्षेत्री दूर झाली. तिथे त्याला सहजानंदाश्रम नामक सत्पुरुष भेटला. त्याने बाळाबोवाला अनेक शास्त्रग्रंथ शिकविले. याच वेळी आणखी एक घटना घडली. बाळाबोवाची पत्नी गजाबाई ही ज्या दिवशी प्रसूत झाली, त्याच दिवशी त्याला एक संस्कृत श्लोक स्फुरला. असे सांगतात, की या श्लोकरचनेच्या समयी रणछोडरायाने कर्नाटकी ब्राह्मणाच्या रूपाने बाळोबाला आश्वासन दिले, की 'तू ग्रंथरचना चालू ठेव आणि तुला जव्हा अडचण पडेल, तेव्हा माझे स्मरण कर म्हणजे सर्व काही ठीक होईल.' यानंतर भक्तितत्त्वामृत नामक संस्कृत श्लोकबद्ध ग्रंथाची रचना बाळाबोवाच्या हातून व्यवस्थित पार पडली. यानंतर बाळाबोवा पुण्यात येऊन राहिला.

पुढे भक्तितत्त्वामृत या संस्कृत ग्रंथावर प्राकृत टीका करण्याचा त्याला स्वप्नादेश झाला. त्यामुळे बाळाबोवा परत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डाकोरला गेला. तिथे त्याची कृष्णदास माधव पंडित मुल्हेरकर या रामभक्त तरुणाशी भेट झाली. त्याने बाळाबोवाचे शिष्यत्व पत्करले व त्यानेच बाळाबोवाची प्राकृत टीका लिहून घेतली.

भक्तितत्त्वामृत या ग्रंथाचे ३१६५ संस्कृत श्लोक आहेत. त्यांवरची प्राकृत टीका ८४९८ इतक्या ओव्यांची आहे. या ग्रंथाचे एकूण त्रेचाळीस उल्हास (अध्याय) आहेत. त्यांत नवविधा भक्ती, षट्चक्रवर्णन, विश्वरूपवर्णन, इ. विषय असून, शिवाय शाक्त, शैव, वैष्णव, गाणपत्य आणि सौर या संप्रदायांची साधनापद्धती, महदादिसृष्टी, इ. विषयांची चर्चा आहे. ज्ञानदेवांचे चरित्रही या ग्रंथात आले आहे.

या ग्रंथाखेरीज चतुष्पाद उपासनेचा अभंग, व्याससमाधिभाषा, डाकुरनाथाचे अभंग, इ. अनेक ग्रंथ त्याने केले आहेत.

डाकोरचा रणछोड आणि पंढरीचा पांडुरंग एकच होय अशी बाळाबोवाची धारणा होती. [विविधा]

बाळेश्वर एक पवित्र क्षेत्र. हे संगमनेरजवळ आहे. येथील महादेवाचे लिंग स्वयंभू असल्याचे मानतात. श्रावणातल्या सोमवारी व महाशिवरात्रीस इथे मोठी यात्रा भरते.

बिंजवार एक द्रविड जमात. या लोकांची मुख्य वस्ती ओडिसात आहे. संबळपूर, रायपूर व बिलासपूर या भागांतही हे लोक राहतात. ही जमात बैगांतून निघाली आहे. विंध्य शब्दापासून त्यांच्या जमातीचे नाव बनले आहे. त्यांच्या बिझवार, सोंजहार, विर्जी व बिंजी अशा चार पोटशाखा आहेत. पूर्वी त्यांची वाघ, पोड (बैल), कामलिया अशी देवके होती. त्या जागी आता त्यांनी गजेंद्र, रामेश्वर, नागेश्वर अशी गोत्रनावे धारण केली आहेत.

यांच्यापैकी बरेच जण सधन जमीनदार आहेत. बाकीचे झांकार (ग्रामपुरोहित) असून, त्यांना जमातीत मानाचे स्थान आहे. या जमातीचे मूळ पुरुष विंध्यवासिनी देवीचे बारा धनुर्धारी पुत्र होते, अशी दंतकथा आहे. त्यांची धनुर्विद्या पाहून पुरीचा राजा खूष झाला. राजाने त्यांना पुष्कळ जमिनी इनाम दिल्या. बाण हे या जमातीचे अभिज्ञान चिन्ह आहे. ते आपल्या पशूंनाही बाणाचा डाग देतात आणि सहीच्या जागी तीच खूण करतात. एखाद्या मुलीला वर मिळत नसला, तर तिचे बाणाशी लग्न लावतात.

देवधर्म – छत्तीसगडातील बिंजवार दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजा करतात व विंध्यवासिनीची खेडोपाडी मिरवणूक काढतात. यांच्यांत गुरु करण्याची पद्धत आहे. श्रावण महिन्यात ते करमोत्सव करतात. या वेळी करमवृक्षाची पूजा व रात्री नृत्य करतात. गाय व माकड यांचे मांस ते खात नाहीत. ज्या स्त्रीने गोंदून घेतले नसेल, तिच्या हातचे अन्न खात नाहीत.

विवाहप्रथा – यांच्यांत सगोत्र विवाह होत नाहीत. प्रौढपणी विवाह करतात. विवाहसमारंभ वराकडे होतो. साधारणतः लग्ने रविवारी होतात. यांच्यांत बहुपत्नीत्वाची चाल आहे.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात. तिसऱ्या दिवशी तांदूळ व जळता दिवा जिथे प्रेत पुरलेले असेल, त्या जागी ठेवतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं., ट्रा. मि. ओ.]

बिंड एक अनार्य जमात. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि बिहार या राज्यांत यांची मुख्य वस्ती आहे. आपले मूलस्थान विंध्यपर्वत असल्याचे ते सांगतात. महादेवाने एक मातीचा गोळा तयार करून त्याला चेतना दिली. तोच आपला मूळ पुरुष होय, असे हे सांगतात. शेतकी, शिकार, मासेमारी, विहिरी खणणे, हे यांचे प्रमुख व्यवसाय आहेत. शिवाय ते सोरमीठ आणि औषधेही तयार करतात. ते भुइया, पंचपीर, गोराइया, इ. देवांना भजतात. कासीबाबा नावाचा त्यांचा एक मोठा संत होता. त्यालाही हे भजतात.

हे लोक डुक्कर, उंदीर, सुसरी अशांचेही मांस खातात. मात्र पितृपक्षात मासे खात नाहीत. काही ठिकाणी यांची गणना अस्पृश्यांत होते. मैथिली ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात. हे मृतांना जाळतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

बिंद परब बिहारच्या सिंगभूम जिल्ह्यातील घाटशिला गावी भरणारी जत्रा. दर वर्षी आश्विन महिन्यात पंधरा दिवस रंकिनीदेवीच्या मंदिरासमोर ही जत्रा भरते. दालभूमच्या राजाच्या पूर्वजांनी प्राचीन काळी ही जत्रा भरवायला सुरुवात केली.

इ. स. १८६५ पर्यंत या जत्रेत पशुहत्या होत असे. त्या वेळी देवळासमोर एका लहान जागेभोवती आडोसा करीत आणि त्याच्या जवळच राजाला व त्याच्या पुरोहिताला बसण्यासाठी एक थोडे उंच मचाण उभारीत. त्या रिंगणात मग दोन रेडे सोडीत आणि राजा व त्याचा पुरोहित मचाणावरून त्यांच्यावर बाण सोडीत. इतरही लोक त्यांचे अनुकरण करीत. बाणांच्या माऱ्याने चवताळलेले रेडे एकमेकांवर हल्ला करीत. शेवटी ते दमल्यावर लोक कुऱ्हाडीने त्यांच्यावर वार करून त्यांना ठार मारीत. पण इ. स. १८६५ पासून ही क्रूर हत्या कायद्याने बंद करण्यात आली.

या जत्रेच्या वेळी देवळासमोर मोठा बाजार भरतो. त्यामुळे संथाळ लोकांना ही जत्रा फार प्रिय आहे. [सिंगभूम गॅझे.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बिंदादीन (१८२९--१९१५ इ. स.) कथ्थक नृत्यशैलीचा एक श्रेष्ठ कलाकार. हा ठाकूर प्रसाद यांचा पुत्र होय. ठाकूर प्रसाद यांनी कथ्थक नृत्याचे लखनौ घराणे सुरू केले व त्या घराण्याला बिंदादीन यांनी प्रथितयश केले. बिंदादीन यांना नृत्यशिक्षण आपल्या वडिलांच्याकडूनच मिळाले. बाराव्या वर्षापासून संतत बारा--बारा तास मेहनत करून त्यांनी त्यात प्रावीण्य मिळविले. त्यांच्या आयुष्यात त्यांना दारिद्र्य व संकटे यांच्याशी बरेच झगडावे लागले. त्यांची ती दैन्यावस्था भोपाळच्या नबाबांच्या कानी गेली. एक श्रेष्ठ

बिंदादीन महाराज

कलाकार दारिद्र्यात पिचत राहू नये म्हणून त्यांनी बिंदादीन यांना आपल्या राज्यात बोलावून घेतले आणि त्यांना पुष्कळ द्रव्य दिले. पुढे नेपाळच्या राजाकडूनही त्यांना साहाय्य मिळाले.

कथ्थक नृत्याला शास्त्रीय आणि सुसंघटित स्वरूप देऊन, प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या कामी बिंदादीन यांनी बरेच परिश्रम केले. त्या नृत्यात नवे नवे ढंग निर्माण करून त्यांनी त्याला विलक्षण आकर्षक बनविले. त्यांचे पदलालित्य व पदन्यासावरील प्रभुत्व पाहून प्रेक्षक थक्क होत. आपल्या मुखमुद्रेवर प्रतिक्षणी वेगळे भाव उमटविण्यात त्यांचा हातखंडा होता. नृत्यासाठी त्यांनी राधा-कृष्णांच्या लीला वर्णन करणाऱ्या कित्येक ठुमऱ्या रचून त्यांच्या आधारे नवी नवी नृत्ये बसवली. ते कृष्णभक्तच होते. नृत्यकलाशिक्षक म्हणूनही बिंदादीन यांनी खूप लौकिक मिळविला. त्यांची शिष्यपरंपरा बरीच मोठी आहे. सांप्रतचे कथ्थक शैलीचे श्रेष्ठ कलावंत बिरजू महाराज हेही त्यांच्याच परंपरेतील होत. [भारती, ऑक्टोबर, १९६०]

बिंदी (१) स्त्रियांनी कपाळी लावायचा टिळा. बिंदीला सौभाग्यचिन्ह मानतात. प्रसाधनातलेही ते एक महत्त्वाचे चिन्ह मानतात. बिंदीमुळे स्त्रीचे व्यक्तित्व उठावदार दिसते, त्यामुळे तिचा वापर प्राचीन कालापासून चालत आला आहे. द. भारतात सोळा शृंगारांमध्ये बिंदीची गणना होते. बंगालमधील सौभाग्यवती स्त्रिया स्नान होताच प्रथम सिंदूराची बिंदी लावतात. सिंदूराची बिंदी ही पूर्वी सर्वांत उत्तम



बिंदीचे विविध प्रकार

समजली जात असे; पण सांप्रत विविध रंगांच्या बिंदी प्रचलित झाल्या आहेत. या बिंदी काच, मेण किंवा प्लॅस्टिक यांच्यापासून तयार करतात. काही स्त्रिया तांदळाच्या पिठात रंग टाकून ते ओले करतात व त्याची बिंदी लावतात. या ओल्या बिंदीचे सौंदर्य काही वेगळेच असते. ऋतुपरिवर्तनाप्रमाणे बिंदीच्या रंगांतही बदल करतात. सांप्रत ओठ रंगविण्याची पद्धत सुरू झाल्यामुळे त्या रंगाशी जुळता रंग बिंदी-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साठी निवडतात. शरीर व कपाळ यांचा आकार विचारात घेऊनही बिंदीचा आकार लहानमोठा करतात. गोऱ्या स्त्रीला बिंदीचा कोणताही रंग खुलून दिसतो. पाहा – कुंकू.

(२) स्त्रियांचा एक अलंकार. मोत्यांचा एक सर व त्याच्या पुढच्या टोकाला एक पदक असे याचे स्वरूप आहे. पदक सोन्याचे असून, त्यावर रत्ने जडवलेली असतात. मोत्यांचा सर भांगात बसवतात व त्याचे पदक पुढे कपाळावर लोंबते ठेवतात.

बिंदुधारी एक आध्यात्मिक संप्रदाय. या संप्रदायाचे अनुयायी लंगोटी लावून भिक्षा मागतात आणि तीर्थयात्रा करतात. तीर्थयात्रा केल्यानंतर ते इतरांना उपदेश करायला पात्र झाले, असे समजतात. या संप्रदायात अनेक जातींचे लोक आहेत.

ब्राह्मण बिंदुधारी लोकांपेक्षा इतर बिंदुधारी लोकांच्या चालीरीती भिन्न आहेत. ते मृतांना जाळतात व त्या जागी तुळशीचे रोप लावतात. मृत माणसाची राख घरी आणून ते त्या राखेची पूजाही करतात.

हे लोक आध्यात्मिक मार्गात जातिभेद मानीत नाहीत. ते कोणत्याही जातीचा गुरू करतात. गुरुदीक्षा घेताना ते फक्त गुरूची आध्यात्मिक श्रेष्ठता पाहतात. [मे. मि. इं.; वै. शै. म. व.]

बिंदुमाधव वाराणसीमधील एक देव. विष्णूच्या चौवीस मूर्तींपैकी बिंदुमाधव ही एक आहे. काशीखंडात बिंदुमाधवाची कथा दिली आहे, ती अशी –

दधीची ऋषीचा अग्निबिंदू नावाचा एक पुत्र होता. त्याने अनेक वर्षे तप करून विष्णूला प्रसन्न करून घेतले. विष्णूने वर माग म्हणताच त्याने वकुंठवास मागितला. त्यावर विष्णू म्हणाला. " इतके दीर्घ तप करूनही वर काय मागावा हे तुला कळले नाही. माझ्या भक्ता, वैकुंठवासापेक्षा काशीवास श्रेष्ठ आहे. मी तुझे बिंदुमाधव असे नाव ठेवून काशीत तुझी स्थापना करतो.' असे म्हणून विष्णूने अग्निबिंदूला आलिंगन दिले व त्या क्षणी त्या संयुक्त रूपातून बिंदुमाधव हे रूप प्रकट झाले.

त्या दिवसापासून बिंदुमाधव हा काशीतला एक दर्शनीय देव बनला. [हिं. स. का. सां. भू .]

बिंदुसर एक प्राचीन तीर्थ. शिवाने सर्व तीर्थांमधले पाण्याचे बिंदू या सरोवरात आणून टाकले, म्हणून याला बिंदुसर हे नाव प्राप्त झाले, असे ब्रह्म पुराणात म्हटले आहे (४१.५२–५४).

हे सरोवर नेमके कोणत्या ठिकाणी आहे ते सांगता येत नाही. योगिनीतंत्रानुसार हे सरोवर हिमालयात गंगोत्रीच्या दक्षिणेला दोन मैलांवर (२.५.१४१) आहे. भागवताच्या मते ते सरस्वती नदीच्या तीरावर आहे (३.२१.३३). नारद पुराणाच्या मते ते वाराणसीच्या खालच्या बाजूला आहे; तर पद्म पुराणात त्याची जागा कैलासाच्या मागच्या बाजूला दाखविली आहे (आ. खं. ३.५९.६६).

नर-नारायण, इंद्र, भगीरथ, इ. पुरुषांनी या सरोवराच्या तीरी तप केले, असे म्हणतात. शिवान या सरोवरात स्नान केल्याने त्याच्या हाताला चिकटलेले ब्रह्मकपाल गळून पडले, अशी कथा आहे. [हि. ध.; हि. जॉ. ए. इं.;]

बिंदू (१) अक्षरावरचे किंवा यंत्रातले किंवा ॐकाराच्या अर्धमात्रेतले टिंब म्हणजे बिंदू होय. हे बिंदूचे स्थूल स्वरूप आहे. याशिवाय बिंदूचे एक अव्यक्त असेही स्वरूप आहे. तांत्रिक लोक शिव, शक्ती व बिंदू अशी तीन रत्ने मानतात. ही तीन रत्ने म्हणजे समस्त तत्त्वांची अधिष्ठाने होत. यांपैकी बिंदू हा कार्यात्मक शुद्ध जगताचे उपादान, शिव हा कर्ता व शक्ती ही करण असते. बिंदू क्षुब्ध होऊन शुद्ध देह, इंद्रिय, भोग व भुवन या रूपांत परिणत होतो, त्या वेळी त्याला शुद्ध अध्वा असे म्हणतात. स्थूल बिंदूलाच शब्द असे म्हणतात. या विषयी कालोत्तर तंत्रात आलेला श्लोक असा–

स्थूलं शब्द इति प्रोक्तं सूक्ष्मं चिन्तामयं भवेत् ।
चिन्तया रहितं यत्तु तत्परं परिकीर्तितम् ॥

अर्थ – स्थूल बिन्दू म्हणजे शब्द, सूक्ष्म म्हणजे चिंतामय आणि पर म्हणजे चिंतनाने रहित.

शिवाच्या दोन शक्ती आहेत. पहिली समवायिनी व परिग्रहरूप आणि दुसरी अचेतन व परिणामशील. या दुसरीचेच नाव बिंदू होय. त्याची शुद्ध व अशुद्ध अशी दोन रूपे असतात. शुद्धाचे नाव महामाया व अशुद्धाचे माया. ही दोन्ही रूपे नित्य आहेत. परा, सूक्ष्मा व स्थूला अशा बिंदूच्या तीन अवस्था आहेत.

प्रज्ञा व उपाय यांच्या योगाने बोधिचित्ताचा उद्भव होतो, असे बौद्ध लोक मानतात. बिंदू क्षुब्ध होऊन नादाचा विकास करतो. परमेश्वरी शक्तीने हे विक्षोभकार्य होते.

शरीरात आज्ञा चक्रानंतर बिंदुस्थान येते. हा बिंदू योग्यांचा तृतीय नेत्र किंवा ज्ञानचक्षू मानलेला आहे. बिंदुभूमीत साधकाला अहंभाव असतो. या अहंभावाचे विसर्जन झाल्यावर महाबिंदू किंवा शिवभाव यांची अभिव्यक्ती होते.

नादच घनीभूत होऊन बिंदू बनतो. त्यामुळे नाद-बिंदूचे नेहमी ऐक्य असते. [तां. वा. शा. दृ.; भा. सं. सा.]

(२) एक सूक्तद्रष्टा. हा आंगिरसकुळातला असावा. ऋग्वेदाच्या नवव्या मंडलातील तिसावे सूक्त याच्या नावावर आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सोमस्तुती हा त्या सूक्ताचा विषय आहे. याच्या सूक्तातली नमुन्याची एक ऋचा (९.३०.३) अशी–

आ नः शुष्मं नृषाह्यं वीरवन्तं पुरुस्पृहम् ।
पवस्व सोम धारया ॥

अर्थ – शूरांनी आक्रमण करण्याला योग्य, वीरांनी युक्त आणि सर्वांना स्पृहणीय असे प्रतापी ऐश्वर्य, हे सोमा, तू आपल्या पवित्र धारेने आम्हांकडे वाहवीत आण.

बिएटे कुकी आसामातील उत्तर काचार टेकड्यांवरील एक जमात. बिएटे कुकी हा जुन्या कुकी लोकांचाच एक पोटभेद आहे. बिएटे कुकींच्या सांप्रत चार टोळ्या अस्तित्वात आहेत. प्रत्येक माणसाने आपल्या टोळीतील मुलीशीच लग्न केले पाहिजे, असा त्यांच्यांत नियम आहे. पण असे असूनही एका टोळीतील पुरुष दुसऱ्या टोळीतील मुलींशी अनेकदा लग्न करतात. दुसऱ्या टोळीतील व्यक्तीची फणी व केसांना लावायचे तेल यांना स्पर्श करावयाचा नाही, असाही यांच्यांत नियम आहे. जेव्हा एखादा तरुण दुसऱ्या टोळीतील मुलीशी लग्न करतो, तेव्हा तो आपल्याकडचे थोडे तेल तिच्या डोक्याला चोळून तिला आपल्या टोळीत घेतो.

यांच्या चार टोळ्यांपैकी चुंगल व डार्नेई या दोन टोळ्या प्रमुख असून, टोळीप्रमुखाची निवड याच दोन टोळ्यांतून आलटून पालटून होते. टोळीप्रमुखाचे पद हे तहह्यात असते. टोळीप्रमुखाचे आई-बाप एकाच टोळीतील असावे लागतात. प्रत्येक गावाचा एक गावप्रमुख असतो आणि तो गावातील वडीलधाऱ्यांच्या सल्ल्याने गावाचा कारभार चालवतो.

यांची घरे बांबू व लाकूड यांची असून, छप्पर केंबळी असते.

बिएटे कुकी आपल्या आवडीप्रमाणे पोषाख करतात. त्यांच्या टोळीप्रमुखाला मात्र हातात चांदीचे किंवा पितळी कडे आणि कानात विशिष्ट प्रकारची कर्णभूषणे घालावी लागतात.

पूर्वी, लग्नाआधी प्रत्येक तरुणाला शत्रूचे एक मुंडके तोडून आणावे लागत असे. अलिकडे ही प्रथा बंद पडली आहे.

सूर्य आणि चंद्र पाणी पिण्यासाठी पूर्वी पृथ्वीवर येत असत; पण एकदा कुत्र्यांनी त्यांना हाकलल्यामुळे ते आता पृथ्वीवर यायला धजत नाहीत. सूर्य किंवा चंद्र यांना पाण्याच्या अभावी जेव्हा मूर्च्छा येते, तेव्हा ग्रहण लागते. इंद्रधनुष्य हे प्रवाहात मासे शोधते, अशा यांच्या काही समजुती आहेत.

हे लोक मृतांना पुरतात व त्या जागी एक चौथरा उभारून त्यावर मृतात्म्यासाठी अन्नपाणी ठेवतात. योग्य तो मंत्र म्हटल्यावाचून मृतात्मा परलोकी जाऊ शकत नाही, अशी समजूत आहे. तिथल्या जीवनासंबंधी काही माहिती नाही. [से. इं. १९३१]

बिज्जा माडिया आदिवासींचा एक उत्सव. चैत्र शुद्ध पौर्णिमेला हा उत्सव सुरू होतो व दोन-तीन दिवस चालतो. उत्सवात प्रामुख्याने नृत्य-गीतांचे कार्यक्रम होतात. या प्रसंगी माडिया लोक आंब्याच्या पानांनी आपापली घरे सुशोभित करतात आणि देवीला कोंबड्यांचा बळी देतात. स्त्रिया डोक्यावर घागरी घेऊन रात्रभर नाचतात. [सम्मेलन पत्रिका–लोकसंस्कृति विशेषांक]

बिदेसिया एक लोकनाट्यसंप्रदाय. उत्तर प्रदेशाच्या पूर्वेकडील भागात, विशेषतः बलिया व देवरिया या जिल्ह्यांत आणि बिहारच्या आरा व छपरा या जिल्ह्यांत याचा विशेष प्रचार आहे. बिदेसिया नावाची गीतेही असून, ती भिखारी ठाकूर याने रचलेली आहेत. हा बिहारमधील छपरा जिल्ह्यात राहत असे. हा अशिक्षित असला, तरी त्याची प्रतिभा विलक्षण होती.

भिखारी ठाकूराने बिदेसिया नावाचे एक नाटकही रचले आहे. त्याचे थोडक्यात कथानक असे– एक गृहस्थ पैसे मिळवण्यासाठी घरापासून दूरच्या गावी जातो. पण तिथे गेल्यावर तो घरची सर्व आठवण विसरतो. त्याची पत्नी इकडे वियोगाने झुरू लागते. शेवटी ती पतीला आपली परिस्थिती कळवते. तेव्हा तो आपली नोकरी सोडून घरी परत येतो.

या कथेला भिखारी ठाकुराने सुंदर नाट्यरूप दिले आहे. याच नाटकातील एक गीत बिदेसिया या नावाने प्रसिद्ध आहे. कारण त्याच्या प्रत्येक ओळीत बिदेसिया हा शब्द आलेला आहे. या गीताच्या काही ओळी अशा–

गवना कराइ सइयाँ घर बइठवले से
अपने चलेले परदेस रे बिदेसिया ।
चढली जवनियाँ बैरिन भइली हमरी से
के मोर हरि हैं कलेस रे बिदेसिया ॥
दिनवाँ बीते ला सइयाँ बटियाँ जोहत तोर
रतिया बितेली जागि-जागि रे बिदेसिया ॥

भावार्थ – हे प्रियतमा, लग्न करून आणि मला घरी ठेवून तू परदेशी निघून गेलास. माझे यौवन रसरसते आहे आणि तेच मला वैरिणीसारखे झाले आहे. दिवस संपून गेला. तुझी वाट पाहत पाहत मी रात्र जागून काढली.

या नाटकात अनेक सामाजिक अनिष्ट रूढी, विशेषतः बालविवाह व वृद्धविवाह यांवर टीका केलेली आहे. नाटकाची भाषा सरस व मधुर आहे. त्यामुळे हे नाटक अत्यंत लोकप्रिय आहे. भिखारी ठाकूर तरुणपणी स्वतः त्यात भूमिका करीत असे. त्याच्या नंतर अनेक शिष्यांनी नाटक मंडळ्या काढल्या व या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाटकाची परंपरा चालू ठेवली. त्याच धर्तीवर पुढेही अनेक नाटके लिहिली गेली. [हिं. सा. को.; लो. ध. ना. प.]

बियास पंजाबातल्या पाच नद्यांपैकी एक. हिला विपाशा, विपाट्, विशाला, विमला, व्यास व महावेगा अशीही अन्य नावे आहेत. ही नदी कुलूतील रोहटांग घाटाच्या दक्षिणेस उगम पावते. त्या उगमस्थानाची उंची १३३२६ फूट आहे. पुढे राहला या भागाजवळ ती एका ठिकाणी ४० फूट उंचीवरून खाली उडी घेते व मनालीकडे वाहत जाते. ही नदी जालंधर जिल्ह्याच्या शेजारून जाऊन पुढे अमृतसर व कपुर्थळा या जिल्ह्यांत प्रवेश करते आणि शेवटी सतलुज नदीला जाऊन मिळते. चक्का व बेस या तिच्या उपनद्या होत. हिची एकंदर लांबी २९० मैल आहे.

ऋग्वेदात हिचा फक्त दोन सूक्तांत उल्लेख आहे. एका ठिकाणी विश्वामित्र तिला म्हणतो—

अच्छा सिन्धुं मातृतमामयासं विपाशमुर्वीं सुभगामगन्म ।
वत्समिव मातरा संरिहाणे समानं योनिमनुसञ्चरन्ती ।।
(ऋ. ३. ३३. ३)

अर्थ—अत्यंत श्रेष्ठ माता जी सिंधू, तिच्याजवळ मी प्राप्त झालो आहे. विशाल आणि सौख्यदायिनी अशा विपाशा नावाच्या नदीजवळ मी गेलो आहे. आपल्या वासरांना चाटण्याची इच्छा करणाऱ्या दोन व्यालेल्या गायींप्रमाणे या दोघी एका मार्गानेच धावत आहेत.

ऋग्वेदातल्या विपाश या नावापूर्वी हिला ऊरुंजिरा म्हणत, असे निरुक्तावरून कळून येते (९.२६).

हिला विपाशा हे नाव का पडले, याची एक कथा महाभारतात (म. भा. वन. १३०.९) दिली आहे, ती अशी—

विश्वामित्राने वसिष्ठाचे शंभर पुत्र मारले. त्या पुत्रशोकाने विव्हल होऊन वसिष्ठ ऋषीने स्वतःला वेलींनीं जखडून बांधले आणि या नदीत उडी घेतली; पण नदीने त्याचे पाश तोडून टाकल्यामुळे तो पाशमुक्त होऊन वर आला. त्या दिवसापासून या नदीला वि + पाशा = पाशमुक्त करणारी असे नाव मिळाले.

मार्कंडेय, वायू, ब्रह्मांड, इ. पुराणांत हिचा उल्लेख आढळतो. या नदीच्या डाव्या तीरावर चीनभुक्ती या नावाचे एक ठिकाण आहे. चिनी प्रवासी युआन च्वांग याने त्या ठिकाणी काही दिवस वास्तव्य केले होते व तिथे त्याला बौद्ध धर्माचे शेकडो ग्रंथ पाहायला मिळाले होते. हिच्या तीरी अमोघाक्षी देवीचे पीठ आहे, असे देवी भागवतात (७.३०.६५) म्हटले असून, यशस्कर नामक विष्णुमूर्ती असल्याचे नरसिंह पुराणात म्हटले आहे.

या नदीने प्राचीन काळापासून अनेकदा आपले पात्र बदलले आहे. [श. क.; वे. इं.; धर्मयुग, १३ जून १९६५]

बिरजिया एक आदिवासी जमात. हे लोक बिहारच्या पालामाऊ जिल्ह्यात आढळतात. यांना बिरिजिया असेही म्हणतात. उंच डोंगरावर यांच्या दोन–तीन कुटुंबांच्या समायिक झोपडच्या असतात. यांच्यापैकी बरेचसे लोक भटके असून, फारच थोडे स्थायिक आहेत. हे लोक झूम पद्धतीने शेती करतात. इ. स. १९६१ साली यांची संख्या सुमारे दोन हजार होती. पण सांप्रत ती झपाट्याने कमी होत आहे. अनेक भाषांच्या मिश्रणाने बनलेली एक बोली ते बोलतात.

हे लोक काळे, रुंद नाकाचे व रुंद चेहऱ्याचे आणि बळकट असतात. पुरुष कमरेभोवती एक फडके गुंडाळतात व अंगरखा घालतात. काही लोक धोतरही नेसतात. स्त्रिया साडी नेसतात व तिच्या पदराने वक्षःस्थल झाकतात. त्या गळ्यात मण्यांचे, पितळेचे किंवा तांब्याचे हार, हातात पितळी बांगड्या, बोटांत अंगठ्या, पायांत पैंजण वगैरे अलंकार घालतात.

हे लोक अनेक प्राण्यांचे मांस खातात. त्याशिवाय मका, डाळी, तांदूळ, भाज्या, कंदमुळे इत्यादींचा त्यांच्या आहारात समावेश असतो. विस्तव पेटवण्यासाठी हे चकमक वापरतात.

विवाहप्रथा— मुलाच्या पित्याचे दोन मित्र मुलीच्या घरी जाऊन तिला मागणी घालतात. मुलीच्या आईबापांना हा संबंध पसंत असल्यास ते पुढील आठ–दहा दिवसांत साखरपुड्याचा दिवस ठरवतात. त्या दिवशी नवरा मुलगा, त्याचे आप्तेष्ट व मागणी घालणारे दोन मध्यस्थ मित्र तांदळाच्या दारूचे दोन घडे घेऊन वधूगृही जातात. ती दारू तिथे जमलेल्या लोकांना वाटतात. रात्री जेवणावळ होते. यानंतर एका वर्षाने विवाहमुहूर्त धरतात. लग्नाच्या दिवशी सकाळी पाच हंडे दारू, बहात्तर शेर तांदूळ, दोन डुकरे व सहा रुपये घेऊन वराकडील मंडळी वधूगृही जातात. मुलाचे आई-बाप मात्र लग्नाला जात नाहीत. तांदूळ, डुकरे व पैसे वधूपित्याला देतात. यानंतर मध्यस्थ मित्र वधू–वरांना समोरासमोर उभे करून त्यांच्या डोक्यावर मोहरीचे तेल ओततात व लाकडी फणीने त्यांचे केस विंचरतात. लग्नातील हा आवश्यक विधी असतो. त्यानंतर ते दोघे वधू–वरांना उचलून घेऊन थोडा वेळ नाचतात व गातात. या नंतर वधू–वर जमलेल्या लोकांना नमस्कार करतात व विवाहविधी समाप्त होतो. लग्नाचा स्वयंपाक तरुण मुले करतात. स्त्रियांना तो करायला मनाई असते. पुरुषाने पत्नीला घरातून घालवून दिले, की काडीमोड होते.

मृतकप्रथा—हे लोक मृतांना जाळतात. मृताच्या अस्थी गोळा करून एका नव्या मडक्यात घालतात व ते मडके फडक्यात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बांधून पुरतात. त्यापूर्वी मृताच्या नावे एक काळे कोंबडे मारून त्याचे थोडे रक्त त्या मडक्यात शिंपडतात. मर्तिकाच्या वेळी जमलेल्या लोकांनी स्नान केल्यावर मृताचा उत्तराधिकारी त्यांच्या डोक्याला तेल-हळद चोळतो. तसे केल्याने ते शुद्ध होतात. त्यानंतर लोकांना जेवण देतात. [पालामाऊ गॅझे.]

बिरहा लोकगीतांतील एक छंद. संस्कृतमध्ये द्विपदीचे, प्राकृतात गाथांचे व उर्दूत गझलांचे जे स्थान, तेच स्थान उत्तरी लोकगीतांत बिरहा छंदाचे आहे. शृंगाराचे आणि विशेषतः विप्रलंभ शृंगाराचे वर्णन करताना याचा उपयोग करतात. याचा मूळ उगम भोजपुरी प्रदेशात झाला आहे. बिरहा छंदाचा उपयोग केलेल्या लोकगीतांना बिरहा गीते असे नाव रूढ आहे. अहीर लोक विशेषेकरून ही गीते गातात. दिवसभराच्या कामाचा शीण घालवण्यासाठी ते रात्रीच्या वेळी एकत्र जमून ही बिरहा गीते गातात. ही गीते अतिशय मधुर व कोमल भावांनी संपन्न असतात. ही गीते एवढी स्फुरतात तरी कुठून? या प्रश्नाचे उत्तर पुढील गीतात दिले आहे–

न बिरहा की खेती करं, भइया, न बिरहा करै डार;
बिरहा बसलै हिरदया में हो राम जब उमगैले तब गाव।

अर्थ – भाई, बिरहा गीते आम्ही शेतात लावीत नाही किंवा झाडांच्या फांद्यांनाही बिरहाची फळे लागत नाहीत. अरे रामा, बिरहा गीते तर हृदयात ठाण मांडून बसलेली आहेत. मनात उल्हास भरून आला आणि बिरहा गीतांचा जन्म झाला.

बिरहा ही अहीरांची गीते असली, तरी भोजपुरी प्रदेशात धोबी, गडेरिया व पासी जातीचे लोकही ही गीते गातात.

पुष्कळशा बिरहा गीतांचा विषय प्रेम व शृंगार हा असला, तरी त्यात देवदेवतांची स्तुती, कौटुंबिक जीवनातील निरनिराळे संबंध, सासवा-सुनांचे भांडण, ग्रामजीवन, इ. विषयही असतात.

प्रेमात पडलेली एक स्त्री आपल्या दयनीय दशेचे रहस्य सांगताना, आपला देह पिवळा का झाला, त्याचे कारण सांगते–

पिया पिया कहत पियर भइली देहिया,
लोगवा कहेला पिंडरोग।
गंडवा के लोगवा गरमियों न जाने ले,
भइले गवनवा न मोर।

अर्थ – पिया पिया असा जप करता करता माझा देह पिवळा पडला. लोक म्हणतात, की मला कावीळ झाली आहे. गावातल्या लोकांना हे माहीतच नाही, की मी अजून माझ्या पतीच्या घरी गेलेच नाही.

बिरहा गीतात कृष्णासंबंधीही अनेक गीते आहेत. [हिं. सा. को.; मैं. लो. अ.; श्याम– विंध्यभूमी, १५ ऑगस्ट १९५५]

बिरही छत्तीसगडमधील शेतकरी व गोंड, पंक, भरिया, इ. आदिवासी यांचा सण. हा सुगीचा सण आहे. दसऱ्यापासून याला सुरुवात होते. त्या दिवशी स्त्रिया व मुली एकत्र जमतात आणि घरोघर जाऊन साळी, कोदो, कुटकी, गहू, मका, इ. सात धान्ये मागतात. ती मागताना त्या पुढील गीत गातात–

फडकी जो मांगे आखत तेल दिया जो मांगे पस्टे
दह्यो लाइ नो न आजके दे तोर घर बठे

अर्थ – फडकी नामक पक्षी धान्य मागतो. दिवा तेल मागतो. जे लोक हे देतात, त्यांनी पश्चात्ताप करता कामा नये. आजपासून तुझ्या घराची भरभराट होईल.

संध्याकाळी मुली सात प्रकारची रानटी फुले गोळा करतात व ती दगडाने ठेचतात. मग त्यांच्या चुरगळलेल्या पाकळ्या शिव-पार्वती यांच्या मृण्मय प्रतिमांवर वाहतात.

मग ती सात धान्ये मातीच्या एका स्थंडिलावर पुरतात व त्यांना पाणी घालतात. त्यातून ज्या दिवशी अंकुर फुटतात, त्या दिवसापासून नऊ रात्री स्त्रिया अंगणात जमून रात्रभर गातात व नाचतात. नाचताना झाडाच्या हिरव्या फांद्या हातात घेतात. [फो. माँ. सा. व्हॅ.]

बिरहोर एक आदिवासी जमात. या लोकांची वस्ती बिहारमध्ये आहे. डाल्टनच्या मते हे लोक कोल वंशाचे असावे; पण बिरहोरांचे म्हणणे असे, की बिरहोर आणि खरवार एकाच वंशाचे असून, त्यांची उत्पत्ती सूर्यापासून झाली आहे. खैरगडहून बिरहोरांचे सात पूर्वज हजारीबाग जिल्ह्यात आले. हे सात भाऊ होते. त्यांच्यापैकी चौघे पूर्वेला गेले व तिघे रामगड जिल्ह्यात राहिले. एक दिवस हे तिघे रामगडच्या राजाविरुद्ध चढाई करायला निघाले असता, त्यांच्यापैकी एकाचे पागोटे झाडाला अडकले. हा अपशकुन समजून तो रानातच राहिला. दोघे भाऊ मात्र नेमेच आपल्या कामगिरीवर गेले आणि रामगडच्या राजावर जय मिळवून परत आले. त्या वेळी मागे राहिलेला भाऊ एका वृक्षाची साल काढीत होता. तेव्हा ते त्याला बिरहोर म्हणजे रानटी असे म्हणाले. तेव्हा आपण जंगलाचे राजे म्हणून जंगलात राहणे पसंत करू, असे त्याने सांगितले. त्याचे दुसरे दोघे भाऊ रामगडचे राजे झाले.

हे लोक झाडांच्या फांद्या व पाने यांच्या झोपड्या बांधून त्यात राहतात. या झोपड्या इतक्या मजबूत असतात, की त्यात पावसाचे पाणी अजिबात शिरत नाही. झोपडी सहा चौरस फूट एवढीच असते आणि पूर्वेला तिला दोन फूट उंचीचे प्रवेशद्वार असते. या दारातून सरपटतच आत जावे लागते. नवरा,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बायको आणि त्यांची लहान मुले एवढीच माणसे तिच्यात शिंदीच्या चटयांवर झोपतात.

हे लोक शेती करीत नाहीत. पूर्वी त्यांच्यापैकी एका कुटुंबाने सखल भागात जाऊन शेती करायला सुरुवात केली, तेव्हा बिरहोरांनी त्यांना बहिष्कृत केले. पुरुष माकडे व ससे पकडतात, कंदमुळे–फळे गोळा करतात आणि झाडाच्या सालींचे दोर वळतात. पुरुष कधी जंगल सोडून बाहेर पडत नाहीत; पण स्त्रिया मात्र जंगलातील लाख, डिंक, मेण, मध व वळलेल्या



दोर वळणारा बिरहोर पुरुष

दोऱ्या, इ. वस्तू घेऊन शहराच्या बाजारात विकायला जातात. वस्तूंच्या बदली त्या धान्य, कपडे वगैरे घेतात.

हे लोक काळे, कुरूप व ठेंगणे असतात. त्यांच्या स्त्रिया नीटनेटका पोशाख करतात व अंगावर गोंदून घेतात. हे लोक मुंडारी बोली बोलतात.

या लोकांचे उठलू व जोधी असे भेद आहेत. उठलू बिरहोर हे भटके आहेत. त्यांची तीन ते दहा कुटुंबे जंगलात एखाद्या ठिकाणी मुक्काम करतात. पण साधारण आठ-दहा दिवसांनी ते आपला मुक्काम हालवतात. पावसाळ्यात मात्र ते बराच काळ एका ठिकाणी राहतात. जोधी बिरहोर हे एखाद्या जंगलाच्या जवळच झोपड्या बांधून कायम राहतात. त्यांच्यापैकी काही लोक आता शेती करू लागले आहेत. उठलू बिरहोरही पावसाळ्यात एखाद्या रानातील झाडे तोडून मका वगैरे लावतात. पण शिकार आणि कंदमुळे यांवरच मुख्यत्वे त्यांचा निर्वाह असतो. उठलू लोकांच्या झोपड्या त्रिकोणी असतात व त्यांच्याजवळच बोंगा नामक देवासाठी एक लहानसे छप्पर उभारलेले असते.

बिरहोरांच्या प्रत्येक वसाहतीचा एक मुख्य असतो. त्याला निया म्हणतात. त्याला एक मदतनीस असतो. प्रत्येक वसाहतीत एक मांत्रिकही असतो. वर्षातून एकदा, सर्व वसाहतींतील पुरुष मिळून शिकारीला जातात. या शिकारीत मारलेल्या जनावरांचे मांस विकत नाहीत.

या लोकांत अनेक कुळ्या असून, त्यांची अनेक देवके आहेत. ती पशू, पक्षी, फळे व वनस्पती यांच्यावरून घेतलेली आहेत. वर्षातून एकदा समान देवकांचे लोक एकत्र जमून आपल्या वाडवडिलांच्या टेकडीवरील भुताला बळी देतात. सामाजिक व धार्मिक आचारांसंबंधीचे प्रत्येक कुळीचे नियम वेगवेगळे असतात. एका कुळीचे लोक दुसऱ्या वसाहतीतील इतर कुळींच्या लोकांकडे जेवत नाहीत. याला अपवाद फक्त नातेवाईक लोकांचा. मालमत्तेची वाटणी करताना ज्या भावाचे वय मोठे त्याला मोठा वाटा मिळतो.

विवाहप्रथा – एकाच कुळीत विवाह होत नाहीत. लग्ने आई-बाप ठरवितात. मुलाचा बाप मुलीच्या बापाला तीन रुपये देज देतो. लग्न वधूगृही होते. लग्नात पुरोहित नसतो. वधू-वरांनी आपल्या करांगुलीतून रक्त काढून त्याचा तिलक एकमेकांच्या कपाळी लावणे, एवढाच लग्नातील महत्त्वाचा विधी असतो. लग्नात नृत्य आणि मेजवानी होते. विवाहाच्या दुसऱ्या दिवशी वधू वरगृही जाते. तिथे दोन दिवस राहून ती परत माहेरी येते व गृहशिक्षण पूर्ण होईपर्यंत किंवा वयात येईपर्यंत माहेरी राहते.

धाकट्या भावाला, थोरल्या भावाच्या विधवेशी विवाह करता येतो. पुरुषाला त्याच्या भावजयीचे आणि थोरल्या मेहुणीचे नाव घेता येत नाही, त्यांना स्पर्श करता येत नाही, त्यांच्या बरोबर एका चटईवर बसता येत नाही किंवा त्यांच्याशी प्रत्यक्ष संभाषणही करता येत नाही.

प्रसूतिप्रथा – स्त्रीची प्रसूती झोपडीतच एका आडोशाला होते. तिला प्रसववेदना सुरू झाल्या, की पुरुष झोपडीतून बाहेर पडतात. सहा दिवसपर्यंत ती एकटीच झोपडीत राहते. त्या काळात तिला फक्त औषधी वनस्पतींचा रस व काढा देतात. स्त्री ज्या ठिकाणी प्रसूत झाली असेल, त्या बाजूच्या भिंतीला नवीन दार पाडतात. या दारातून बाहेर आल्याने मुलाला वाघ व साप यांच्यापासून भय राहत नाही, अशी एक समजूत आहे. बाळंतिणीने मुख्य दाराचा वापर केल्यास घरातील दोन पुरुष मरतात, अशी दुसरी समजूत आहे. जननाशौच सात दिवस पाळतात. त्यानंतर आठव्या दिवशी मुलाचे जावळ काढतात. त्या वेळी मेजवानी करतात. एकविसाव्या दिवशी जननाशौचातून शुद्ध होण्याचा शेवटचा विधी होतो. त्या दिवशी वसाहतीतील सर्व लोक आपले कपडे उकळून धुतात. कार्तिक महिन्यात मुलाचे कान टोचतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दहा वर्षांवरील मुले सामुदायिक शयनगृहात झोपतात. मुलांसाठी व मुलींसाठी वेगळी शयनगृहे असतात.

रजस्वला स्त्री सात दिवस बाजूला बसते. या काळांत वसाहतींत कोणताही धार्मिक विधी होत नाही.

देवधर्म – हे लोक स्त्रीदैवते आणि भुतेखेते यांना भजतात. देवतांमध्ये देवी ही प्रमुख असून, महामाया बुढियामाई, दूधमाई, इ. तिच्या मुली व नाती आहेत, असे मानतात. या देवतांची व भुतांची अनेक प्रतीके ते झोपडीच्या पूर्वेला व पश्चिमेला ठेवतात. त्यामुळे झोपड्यांचे संरक्षण होते, अशी त्यांची समजूत आहे.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेत जाळतात किंवा पुरतात. दहन केलेल्या प्रेताची रक्षा व अस्थी गंगेत किंवा जवळपासच्या नदीत विसर्जन करतात. अकराव्या दिवशी मृताचे नातेवाईक क्षौर करून स्नान करतात व वसाहतीतील सर्वांना जेवण घालतात. प्रतिष्ठित मृत व्यक्तीला पुरल्यास त्या जागी चबुतरा बांधतात व छप्पर उभारतात. [से. इं. १९३१; एन्सा. मुंडा.; वन्यजाति, एप्रिल व ऑक्टो. १९५३; पालामाऊ गॅझे.]

बिरोबा

महाराष्ट्रातील एक क्षुद्र पण उग्र दैवत. हा मुख्यत्वे धनगरांचा देव आहे. याच्या नावाने गावाबाहेर एक दगड पुरलेला असतो. त्यालाच धनगर लोक पुजतात व नवस करतात. बिरोबाचे संबुरान (स्मरण) मांडून हे लोक रात्रभर ढोलाच्या तालावर नाचतात व गाणी म्हणतात. बिरोबाची जन्मकथा अशी–

एका कुणब्याला शेत नांगरताना एक मुलगी सापडली. तिचे नाव गंगा सुरावंती असे होते. त्याने ती मुलगी राजाला दिली. ती वयात आल्यावर राजा तिच्या लग्नाचा विचार करू लागला. पण ती स्वतः अयोनिसंभव होती आणि तिला पुरुषाच्या सहवासाचा तिटकारा होता. अखंड व अकलंकित कौमार्य हेच जीविताचे साफल्य, असे तिला वाटे. त्यामुळे ती लग्नाला तयार होईना. मग राजाने तिला रानात एक वाडा बांधून दिला. तिथे राहत असता एक दिवस तिने एका वनगाईला आपल्या वासराला पाजताना पाहिले. ते पाहून गंगा सुरावंतीच्या मनात मातृभाव जागृत झाला. मात्र तिला पुरुषसंभोगाशिवाय मातृत्व हवे होते. त्यासाठी तिने बिनमेघाचे धान्य, बिनफुलाचे फळ व बिनभोगाचा पुत्र या गोष्टी मिळाव्या म्हणून व्रत आरंभिले. त्या व्रतामुळे शिव-पार्वती प्रसन्न झाली. आणि त्यांनी तिला बिनमेघाचे धान्य दिले. मग त्या धान्याच्या भाकरीत महादेवाच्या लिंगाने प्रवेश केला. तिने ती भाकरी खाल्ली आणि त्यामुळे तिला गर्भ राहून पुत्र झाला. तोच पुढे बिरोबा म्हणून प्रसिद्ध झाला. [लो. सा. रू.; म. लो. मा. ५]

बिलईमाता

एक देवी. रायपूर जिल्ह्यातील धामतरी नामक गावी या देवीचे मंदिर आहे. तिथे एका मोठ्या पाषाणावर देवीची मूर्ती कोरलेली आहे. ही मूर्ती स्वयंभू असून, ती सतत वाढत आहे, अशी भाविकांची श्रद्धा आहे. माघ मासात या क्षेत्रात यात्रा भरते. दसऱ्याच्या दिवशी शिलंगणाची मिरवणूक या देवीच्या मंदिरापर्यंत जाऊन विसर्जन पावते.

बलोदा बझार तालुक्यात बिलईगड नावाचा किल्ला असून, त्याच्या आसमंतात भैना नामक वन्य जमातीची वसती आहे. बिलईमाता ही भैना लोकांची देवी होय. त्या देवीविषयी त्या जमातीत एक दंतकथा आहे, ती अशी– एकदा त्या जमातीतली काही मुले पाखरे मारण्यासाठी रानात जात होती. त्यांच्या वाटेवरच या देवीचे स्थान होते. मुलांनी जाताना सहज गंमतीने देवीला नवस केला, की 'टोपलीभर पक्षी मिळाले, तर एक मुलगा तुला बळी देऊ.'

रानात गेल्यावर लवकरच त्यांना टोपलीभर पक्षी मिळाले. परत येताना देवी दिसताच त्यांना नवसाची आठवण झाली. नवस कसा फेडायचा असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. मग एका धूर्त मुलाने आपली मान देवीपुढे वाकवली आणि एक गवताची काडी तरवारीसारखी मानेवर फिरवली. त्याला वाटले गवताच्या पात्याने जखमदेखील होणार नाही, पण नवस मात्र फिटेल. पण नवलाची गोष्ट अशी, की त्याची मान कापली जाऊन, मस्तक खाली पडले. तेव्हा त्याचे संवगडी घाबरले; पण सर्वांनी भक्तिभावाने देवीची दयेसाठी याचना केली. देवी प्रसन्न झाली व तिने त्या मृत मुलाला जिवंत केले.

या देवीला पूर्वी नरबळी देण्याची प्रथा होती, असे म्हणतात. वरील दंतकथा तेच दर्शवते. [देवीकोश २]

बिलिमग्ग

द. कानडा जिल्ह्यातील एक विणकर जात. हे लोक फक्त पांढरे कापड विणतात, म्हणून यांना बिलिमग्ग (= पांढरा माग) हे नाव मिळाले आहे. मदुरेतून आपण इकडे आलो, असे हे सांगतात. ते अपभ्रष्ट तमिळ भाषा बोलतात. काही देवतांना व भुताखेतांना उत्सवप्रसंगी पांढरे कापड लागते, ते यांच्याकडून घेतले जाते.

हे लोक वीरभद्र, ब्रह्मलिंग व अम्मनोरू या देवतांना भजतात.

यांच्या ग्रामप्रमुखाला गुरिकार व ज्ञातिप्रमुखाला शेट्टी असे नाव आहे. तो बहुधा ज्ञातीच्या एखाद्या मंदिराचा व्यवस्थापक असतो. प्रत्येक दांपत्याने वार्षिक बारा आणे व अविवाहित पुरुषाने सहा आणे मंदिरनिधी द्यायचा, असा यांच्यांत नियम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. गुरिकार हे पैसे गावातील सर्व लोकांकडून वसूल करतो.

विवाहप्रथा – पूर्वी मुलीचे लग्न लहानपणी करीत व वयात येण्यापूर्वी ते न झाल्यास तिला जातिबहिष्कृत करीत. यांच्यांत साखरपुड्याचा समारंभ महत्त्वाचा असतो. कारण तो दोन्ही पक्षांना बंधनकारक असतो. या वेळी वधूपिता वरपित्याला एका तबकातून पाने व सुपाऱ्या देतो. काही कारणाने लग्न मोडल्यास, वरपित्याला पाने व सुपाऱ्या परत कराव्या लागतात.

लग्नाच्या आदल्या दिवशी वरपिता व वधूपिता एकमेकांना तीनदा पानसुपारी देतात. लग्नाच्या दिवशी सकाळी वधूपक्षाकडील मंडळी वरगृही जायला निघतात. त्या वेळी वधूपित्याच्या हातात पाण्याने भरलेली पितळी घागर असते. वरगृही पोचल्यावर त्यातले पाणी पाच किंवा अधिक सुवासिनी तांब्यांत ओतून घेतात व ते वराच्या डोक्यावर ओततात. नंतर वर नवे कपडे घालून व कपाळाला बाशिंग बांधून गणपतिपूजन करतो. त्याचा मेहुणा त्याला लग्नमंडपात नेतो. त्याच्यामागून वराची वहीण एका पात्रात वधूचे बाशिंग, ताळी व लाल वस्त्र घेऊन येते. वर मडपात एका पलगापुढे उभा राहतो. वधूपक्षाकडील व वरपक्षाकडील मंडळी वराच्या मागे–पुढे उभी राहतात व एकमेकांवर अक्षता टाकतात. नंतर वधूचा भाऊ वराचे पाय धुतो. वर पलंगाची पूजा करून त्याच्याभोवती सात प्रदक्षिणा घालतो आणि त्याच्यावर बसतो. मग वधूही त्याच्या शेजारी येऊन बसते. वराच्या वहिणीने तिच्या गळयात ताळी बांधलेली असते. मग वराच्या मामाने वधूच्या मामाला दिलेले लाल वस्त्र तो वधूच्या अगावर घालतो. नंतर वधूचे देज देतात. त्यानंतर जमलेल्या लोकांच्या संमतीने वधू-वरांचे मामा त्यांचे हात जुळवतात आणि त्यांवर प्रथम वधूपिता व नंतर गुरिकार पाणी घालतो. मग गुरिकार लग्न लागल्याचे घोषित करतो. जमलेले लोक वधू-वरांना अहेर करतात. वधू-वरांनी हळदीच्या पाण्याने स्नान केल्यावर लग्नविधी समाप्त होतो.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात. मृताचा पुत्र अग्नी नेत नाही, तर जवळचा आप्त नेतो. तिसऱ्या दिवशी मृताच्या रक्षेचा ढीग करून त्याच्याजवळ शहाळे व पाणी ठेवतात. तुळू धोब्याने कपडे दिले व अंगावर पाणी शिंपडले, की यांचे आशौच संपते. हे मृताचे श्राद्ध करतात. [का. ट्रा. स. इ.]

बिलेश्वर शंकराचे एक नाव. याचे मंदिर काठियावाडच्या पोरबंदर या भागातील सखपर स्टेशनपासून चार मैलांवर आहे. संशोधकाच्या मते हे मंदिर निदान एक हजार वर्षांपूर्वीचे तरी असावे. या मंदिराच्या जवळून विलेश्वरी नावाची नदी वाहते. मंदिराला किल्ल्यासारखा मोठा तट आहे. प्राचीन काळी तिथे पाशुपत संप्रदायाचे केंद्रस्थान असावे, असे म्हणतात. इथले शिवलिंग काळचा दगडाचे असून, ते खूप मोठे आहे. श्रावण महिन्यात इथे मोठी यात्रा भरते. [वि. मुं. रा. प.]

बिल्लव द. कानडा जिल्ह्यातील ताडी काढणाऱ्यांची एक जात. हे लोक तुळू भाषा बोलतात. प्राचीनकाळी द. भारतात राहणाऱ्या काही लोकांनी सिलोनच्या उत्तर भागावर अनेकदा आक्रमणे केली. त्या वेळी सिलोनमधील काही द्रविड लोक भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर येऊन राहिले. तेच हे लोक होत, असे सांगतात. यांच्यांत मातृसत्ताक पद्धती रूढ आहे.

बैद्य व पुजारी या विल्लवांच्या दोन उपाधी आहेत. बैद्य हा वैद्य शब्दाचा अपभ्रंश आहे. वैद्य ही उपाधी यांना कशी मिळाली, त्याबद्दल एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

उल्लाळ गावी एक गरीब स्त्री आपल्या दोन मुलांसह राहत होती. एका संन्याशाला त्यांची कीव आली आणि त्याने त्या स्त्रीचे पुत्र आपले शिष्य म्हणून स्वीकारले. मग त्याने त्या दोघांना वैद्यकी व जादूटोणा शिकवला. हेच दोन पुरुष विल्लवांचे पूर्वज होत अशी त्यांची समजूत आहे.

विल्लव पुरुष

काही विल्लव भूतस्थानात पुजारी म्हणून काम करतात. यांपैकी बरेच पुजारी भुतांच्या मदतीने रोग बरे करतात, अशी या लोकांची समजूत आहे.

यांच्यांत स्त्रियांच्या वंशाच्या बाजूने अनेक देवके असून, भिन्न देवकांच्या कुलांत परस्पर विवाहसंबंध होत नाही.

हे जातीच्या प्रमुखाला गुरिकार असे म्हणतात. त्याचे पद

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वंशपरंपरा असून, वारसा बहिणीच्या मुलाकडे जातो. जातीसंबंधीच्या प्रश्नांची चर्चा हे भूतस्थानात सभा भरवून करतात.

विवाहप्रथा – साखरपुड्याच्या वेळी वधूचे देज ठरवतात. ते दहा ते वीस रुपयांपर्यंत असते. लग्नाच्या पूर्वी काही दिवस मुलीचा मामा किंवा गुरिकार तिच्या गळयात एक मणी बांधतो. मग लग्नमंडप घालतात व जातीचा न्हावी रंगीबेरंगी कपड्यांनी तो सजवितो. नवरी मुलगी जर वयात आलेली असेल, तर लग्नापूर्वी एक-दोन दिवस तिचा एक शुद्धिविधी करतात. वधूच्या नातेवाईक सुवासिनी भूतस्थानाजवळच्या विहिरीतून पाण्याची मडकी भरून आणतात व वधूच्या डोक्यावर ओततात. एवढ्याने ती शुद्ध झाली, असे समजतात. लग्नाच्या दिवशी लागणारे दिवे, अक्षता, फुले, पानसुपाऱ्या, पाण्याचा तांब्या वगैरे सर्व सामग्री न्हावीच जमा करतो. लग्नाच्या दिवशी वधू-वर बोहल्यावर समोरासमोर बसतात. न्हावी त्यांचे हात जुळवतो व त्यांचे आई-वडील किंवा गुरिकार त्यांच्या हातांत करवलीची नाकातली चमकी ठेवतो आणि त्यांवर पाणी ओततो. लग्नातील हा आवश्यक विधी असतो. याला कै (हात) धारे असे नाव आहे.

विधवेच्या पुनर्विवाहाला बिडू धारे असे नाव आहे. यात हातांवर पाणी ओतण्याचा विधी नसतो. त्यात वधू-वरांच्या मध्ये अंतरपाट धरतात आणि त्याच्या खाली गुरिकार त्यांचे हात जुळवतो.

एखाद्या स्त्रीला एखाद्या पुरुषापासून गर्भ राहिला असता, त्या दोघांचे लग्न बिडू धारे पद्धतीने लावतात. लग्न लागण्यापूर्वी पुरुष एका केळीच्या झाडाला उजव्या हाताने पकडतो. नंतर ते झाड कापून टाकतात.

मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती झाली असता दहा किंवा बारा दिवस ती अस्पर्श्य समजली जाते. पहिल्या दिवशी एका चौकोनात, पाच किंवा सात नारळ एकत्र बांधून त्यांची बैठक तयार करतात व तिच्यावर मुलीला बसवतात. चौकोनाच्या चार कोपऱ्यांवर एकेक कोरे मडके पाण्याने भरून ठेवतात व त्यांच्या जवळ गुरिकाराच्या घरातील चार मुली बसतात. जमलेल्या स्त्रियांना पानसुपारी वाटल्यावर त्या मुली तिच्या डोक्यावर घड्यातले पाणी ओततात. पुन्हा अकराव्या किंवा तेराव्या दिवशी असाच विधी करतात. मग मुलगी स्नान करून शुद्ध होते.

देवधर्म – हे लोक भुताखेतांना भजतात. यांच्या भुतांच्या मूर्ती असतात. ब्रिम्मेरू हे श्रेष्ठ भूत समजतात. त्याचे प्रतीक म्हणून चांदीच्या किंवा दुसऱ्या एखाद्या धातूच्या पत्र्यावर मानवी आकृती कोरतात व तो पत्रा देवळात दगडी देव्हाऱ्यात ठेवतात. भूतस्थानात मात्र भुतांच्या मूर्ती नसून, एकेका भुताच्या नावाने एकेक पलग असतो. भूतस्थानाच्या उत्सवाची सर्व तयारी तिथला पुजारी करतो. उत्सवाच्या वेळी त्याच्या अंगात येते. या पुजाऱ्याच्या उजव्या हातात एक सोन्याची बांगडी असते.

मृतिकप्रथा – हे लोक बहुतकरून प्रेते जाळतात व काही वेळा ती पुरतात. प्रेताला स्नान घालून ते केळीच्या पानावर ठेवतात व त्याच्यावर नवे वस्त्र घालतात. त्याच्या डोक्याशी व पायांशी साळींचा लहानसा ढीग करतात व त्यांवर नारळाच्या करवंटयांत दिवे लावून ठेवतात. प्रेत स्मशानात नेल्यावर डोक्याच्या व पायांच्या बाजूने त्याला अग्नी दतात. दोन्हीकडच्या ज्वाला मध्यभागी एकत्र झाल्या, की त्यावर केळीचे पान, साळी वगैरे वस्तू टाकतात. पाचव्या दिवशी रक्षा गोळा करून त्याच जागी पुरतात. प्रेत पुरलेले असल्यास गवताची मानवी आकृती करून थडग्यावर जाळतात आणि रक्षा तिथेच पुरतात. त्यावर मातीचा लहानसा ढीग करून त्यात तुळशीचे रोपटे लावतात. त्या रोपटयाजवळ एक शहाळे, तंबाखूचे पान व पानसुपारी या वस्तू ठेवतात. तेराव्या दिवशी श्राद्ध करतात. त्याला बोज्जा म्हणतात. चौदाव्या दिवशी कावळयांना अन्न टाकतात आणि अंत्यसंस्कार समाप्त होतो.

एखाद्या मुलीचा कुवारपणी मृत्यू झाला असता, तिने भूत होऊन त्रास देऊ नये, म्हणून अंत्यसंस्कार करण्यापूर्वी तिचा लग्नविधी पार पाडतात. [का. द्रा. स. इं.]

बिल्वकेदार

हरिद्वारजवळचे एक पुण्यक्षेत्र. हे रानात असून तिथे शंकराचे लहानसे देऊळ आहे. जवळच हरितालिकेचे एक देऊळ आहे. तिथल्या कुंडाच्या काठी सखी व पार्वती यांच्या, तपश्चर्या करीत बसलेल्या मूर्ती आहेत. हरिद्वारच्या सुवासिनी भाद्रपदातले हरितालिकापूजन इथे येऊन करतात. इथे बेलाची झाडे बरीच असल्यामुळे या क्षेत्राला बिल्वकेदार असे नाव मिळाले आहे. [हिमालय दर्शन.]

बिल्वत्रिरात्रिव्रत

एक काम्य व्रत. ज्येष्ठ पौर्णिमेला हे व्रत करतात. व्रतावधी एक वर्ष. मोहरीचे दाणे पाण्यात टाकून त्याने स्नान करणे, बिल्व वृक्षाची पूजा करणे व वर्षभर एकभुक्त राहणे, असा या व्रताचा विधी आहे. मुख्यत्वे स्त्रिया हे व्रत करतात.

उद्यापनाच्या वेळी बिल्व वृक्षाखाली उमामहेशमूर्तींची पूजा करतात. सहस्र बिल्वपत्रांचा होम करतात. चांदीचा बिल्ववृक्ष करून व त्याला सोन्याची फळे लावून आचार्याला दान देतात. त्रयोदशी ते पौर्णिमा हे तीन दिवस उपवास व जागरण करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यथाशक्ति दंपतींना भोजन घालतात. फल – सौभाग्य, संपत्ती, आरोग्य व पुत्र यांची प्राप्ती. [हि. ध.]

बिल्वमंगल एक भक्तकवी. दक्षिण भारतात कृष्णा-वेण्णा नदीच्या तीरी एका गावात याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव दामोदर आणि आईचे नीली किंवा नीरी असे होते. जीवनाच्या पूर्वार्धात हा विषयी आणि भोगासक्त होता. चिंतामणी नावाच्या एका वेश्येवर त्याचे मन लुब्ध झाले होते. तिच्या सहवासावाचून त्याला दुसरे काहीच सुचत नव्हते. वडिलार्जित संपत्तीतला बराचसा भाग त्याने तिच्यासाठी खर्च केला होता.

एके दिवशी त्याच्या वडिलांची श्राद्धतिथी होती; पण पितृश्राद्ध करायच्याऐवजी तो चिंतामणीच्या घरी जाऊन बसला. चिंतामणीला त्या गोष्टीचे अपार दुःख झाले. आपल्याविषयीची त्याची आसक्ती तिला घृणास्पद वाटली. म्हणून ती बिल्वमंगलाला बोलली. 'महाराज, माझ्यावर अशी पराकोटीची आसक्ती धरण्याऐवजी तुम्ही ती नंदकिशोर श्रीकृष्णाविषयी धरली असती, तर तुमचा आणि तुमच्या कुलाचा उद्धार झाला असता. आज तुमच्या वडिलांची श्राद्धतिथी; पण तुम्ही श्राद्ध करायचे सोडून माझ्याकडे आलात. स्वर्गात तुमच्या वडिलांना तुमच्या या कृत्याबद्दल किती दुःख झाले असेल बरे ? तुम्ही आता निघून जा. पुन्हा माझ्याकडे येऊ नका. तुमचे प्रेम यापुढे भगवान श्रीकृष्णावर जडू दे. त्यातच तुमचे आणि माझेही हित आहे.'

त्या क्षणी त्याच्या अंतरात वैराग्य उत्पन्न झाले. तिची चरणधूळ मस्तकी लावून तो तिला म्हणाला, 'तू माझी गुरू झालीस. या पुढे मी तुझ्या उपदेशाप्रमाणे वागेन.'

बिल्वमंगल तिथून श्रीकृष्णाच्या व्रजभूमीत जाण्यासाठी मार्गस्थ झाला. वाटेत त्याला सोमगिरी नावाचा एक महात्मा भेटला. त्याने बिल्वमंगलाला वैष्णवदीक्षा दिली, लीलाशुक असे त्याचे नाव ठेवले आणि त्याला भगवंताच्या लीलांचे काव्यमय वर्णन करण्याचा आदेश दिला.

बिल्वमंगल तिथून पुढे निघाला. वाटेत त्याला अनेक विषय दिसत. अनेक प्रकारचे सौंदर्यही दिसे. मूळची वृत्ती सौंदर्यासक्त असल्यामुळे त्या अनेक गोष्टींचे त्याला आकर्षण वाटे. एक दिवस त्याने विचार केला, की आपले डोळे मोठे पापी आहेत. ते अनेक विषयांत मन खेचतात आणि भगवंताच्या दर्शनात विघ्न आणतात. या विचारासरशी त्याने एक काटा घेतला आणि तो दोन्ही डोळ्यांत खुपसून आपली दृष्टी निकामी करून टाकली. तशा अंध स्थितीतच तो रानावनातून वृंदावनाच्या दिशेने जाऊ लागला. कारण श्रीकृष्णासाठी तो तळमळत होता.

मग श्रीकृष्णाला त्याची दया आली. एके दिवशी तिन्हीसांजा एका जंगलात नंदकिशोर त्याच्याजवळ गेला. त्याने प्रथम त्याला जेवू घातले आणि मग विचारले. 'बाबा, तुम्ही कुठे जाणार आहा ?' बिल्वमंगल म्हणाला. 'मला वृंदावनात जायचे आहे, श्रीहरीचे दर्शन करायचे आहे." त्यावर बाळकृष्ण म्हणाला. 'चला, मी तुम्हांला घेऊन जातो.' बाळकृष्णाने बिल्वमंगलाचा हात धरला आणि तो त्याला वृंदावनाकडे नेऊ लागला. काही कालाने त्याने बिल्वमंगलाला म्हटले. 'बाबा, वृंदावन आले, आता तुम्ही पुढे चला, माझे काम संपले, मी आता जातो.' त्याने जाऊ नये म्हणून बिल्वमंगलाने त्याचा हात घट्ट पकडला; पण तरीही त्याच्या हाताला हिसडा देऊन बाळकृष्ण निघून गेलाच. मग त्याला उमगले, की आपल्याला हाती धरून इष्ट स्थळी पोचविणारा बालक दुसरा-तिसरा कोणी नसून साक्षात कृष्णपरमात्माच होता. त्या गोष्टीचे त्याला दुःख झाले. पण त्याच क्षणी त्याच्या मुखातून एक संस्कृत श्लोक उत्स्फूर्तपणे बाहेर पडला, तो असा–

हस्तमुत्क्षिप्य यातोऽसि बलात्कृष्ण किमद्भुतम् ।
हृदयाद्यदि निर्यासि पौरुषं गणयामि ते ।।

अर्थ – हे कृष्णा, शक्तीने हात हिसडून तू निघून गेलास, यात काय आश्चर्य ! जर तू माझ्या हृदयातून निघून गेलास तर मी तुझे पौरुष समजेन.

बिल्वमंगल पुढे वृंदावनात राहून श्रीकृष्णाच्या सरस मधुर लीला काव्यात वर्णू लागला. त्याने कृष्णविषयक असे जे ११२ श्लोक रचले, ते कृष्णकर्णामृत या नावाने प्रसिद्ध झाले. तो एक नित्य पठनीय स्तोत्रसंग्रह समजला जाऊ लागला. चैतन्यप्रभू त्याचा नित्य पाठ करीत. या ग्रंथात प्रार्थना, दर्शनाची उत्कंठा, आत्मनिश्चय, साक्षात्कार, मनाची कृष्णरूप अवस्था, श्रीहरीशी संवाद, असे अनेक विषय आहेत.

किशोरावस्थेतला मुरलीमोहन श्रीकृष्ण हा बिल्वमंगलाचा परम उपास्य आहे. श्रीकृष्णाचे मुखमंडल हे त्याला नितांत सुंदर वाटते. ते आपल्या अंतःकरणात सदैव प्रस्फुरित राहावे, ही आकांक्षा व्यक्त करताना तो म्हणतो (कृष्णकर्णामृत ६)–

मुकुलायमाननयनाम्बुजं विभोर्मुरलीनिनादमकरन्दनिर्भरम् ।
मुकुरायमाणमृदुगण्डमण्डलं मुखपङ्कजं मनसि मे विजृम्भताम् ।।

अर्थ– ज्यावरची नेत्रकमले मुकुलित, अर्थात अर्धोन्मीलित आहेत, जे मुरलीनादरूपी मकरंदाने परिपूर्ण आहे, ज्याचे मृदु, वाटोळे कपोल आरशासारखे प्रतिबिंब दाखविणारे आहेत, असे श्रीहरीचे मुखकमल माझ्या मनात प्रकाशित राहो.

बिल्वमंगलाला कृष्णदर्शनाची उत्कंठा लागलेली आहे. त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दर्शनाने त्याला आपल्या डोळ्यांचे पारणे फेडून घ्यायचे आहे. तो म्हणतो (कृष्णकर्णामृत २४)–

शिशिरीकुरुते कदा नु नः शिखिपिच्छाभरणः शिशुर्दृशोः ।
युगलं विगलन्मधुद्रवस्मितमुद्रामृदुना मुखेन्दुना ।।

अर्थ – मयूरपिच्छाचे आभरण धारण करणारा शिशू श्रीकृष्ण आपल्या जणू गळणाऱ्या मधुद्रवासारख्या स्मिताच्या मुद्रेने, मृदू अशा मुखचंद्राने आमचे नेत्रयुगुल कधी बरे शीतल करील ?

कृष्णदर्शनावाचून जाणारा एकेक दिवस बिल्वमंगलाला युगासारखा वाटतो. तो म्हणतो (कृष्णकर्णामृत ४१)–

अमून्यधन्यानि दिनान्तराणि हरे त्वदालोकनमन्तरेण ।
अनाथबंधो करुणैकसिन्धो हा हंत हा हंत कथं नयामि ।।

अर्थ– हे हरे, हे अनाथबंधो, हे करुणासागरा, तुझ्या दर्शनावाचून माझे हे विफल ठरणारे दिवस मी कसे बरे पार करू ! मला मोठा खेद होत आहे.

आपल्याला श्रीहरीवाचून दुसऱ्या कोणत्याच गोष्टीची अभिलाषा नाही, हे सांगताना तो म्हणतो (कृष्णकर्णामृत २९)–

मयि प्रसादं मधुरैः कटाक्षैर्वंशीनिनादानुचरैर्विधेहि ।
त्वयि प्रसन्ने किमिहापरैर्नस्त्वय्यप्रसन्ने किमिहापरैर्नः ।।

अर्थ– हे प्रभो, मुरलीस्वराच्या मागून जाणाऱ्या (तुझ्या) मधुर कटाक्षांनी (तू) मजवर प्रसाद कर. तू प्रसन्न झाल्यावर अन्य गोष्टींची काय मातब्बरी ! (आणि) तू प्रसन्न झाला नाहीस तर अन्य गोष्टी मिळूनही त्यांचा काय उपयोग !

बिल्वमंगलाच्या या कृष्णकर्णामृतावर कृष्णवल्लभा, सुबोधिनी व सारंगरंगदा अशा टीका आहेत. प्रस्तुत काव्याची तुलना जयदेवाच्या गीतगोविंदाशी करावी लागेल. त्यात तशीच कोमलकांत पदावली आहे, तसेच श्रुतिसुखद अनुप्रास आहेत आणि तसाच माधुर्यभाव आहे. मात्र जयदेवाची वाणी ही रसिकाची वाणी असून, बिल्वमंगलाची वाणी ही हरिदर्शनाची उत्कंठा धारण करणाऱ्या भक्ताची वाणी आहे. [भा. सं. म.; कृष्णकर्णामृतम्– श्री. एस्. के. डे; हिं. बं. वै. क.]

बिल्ववर्तिव्रत एक काम्य व्रत. हे व्रत स्त्रियांप्रमाणे पुरुषांनाही करता येते. व्रताचा प्रारंभ वैशाख, श्रावण, कार्तिक किंवा माघ या महिन्यांत करून यांतील एखाद्या महिन्याच्या पौर्णिमेला त्याची समाप्ती करतात. या व्रतासाठी कार्तिक महिना विशेष प्रशस्त मानतात.

यात कापसाचे सूत स्वतः काढून, त्याने स्वतःच्या किंवा एखाद्या ब्राह्मणाच्या तीन अंगुळांइतक्या लांबीच्या किंवा तर्जनीइतक्या लांबीच्या तीन धाग्यांच्या वाती करतात. त्यांना बिल्ववर्ती अशी संज्ञा आहे. अशा प्रकारच्या लक्ष वाती करतात व त्या तुपात अथवा तेलात भिजवतात. त्या वाती तांब्याच्या पात्रात पेटवून त्यांनी शिवाला नीराजन करणे, हा या व्रतातील प्रमुख भाग आहे. त्यासाठी गंगातीरी, देवघरात, गाईच्या गोठ्यात किंवा शिवालयात जाऊन तिथे शिवाची पूजा करतात. पूजा संपल्यावर त्या वातींनी शिवाला नीराजन करतात. शक्य झाले तर लक्ष वाती एकाच दिवशी प्रज्वलित करून त्यांनी नीराजन करतात. वातींची संकल्पित संख्या पुरी झाल्यावर पौर्णिमेला व्रताचे उद्यापन करतात.

उद्यापनाचा स्वतंत्र विधी असतो. त्यासाठी प्रथम स्वस्तिवाचन व नांदीश्राद्ध करतात. नंतर वेदिका तयार करतात. तिच्यावर वस्त्राचे आच्छादन घालतात. त्या वस्त्रावर तांदुळाची पद्माकृती काढतात. नंतर कलशावरील पात्रात नंदी, उमा व शिव यांची एकत्रित असलेली सुवर्णप्रतिमा ठेवून तिची यथाविधि पूजा करतात. पूजेनंतर रुप्याच्या दिव्यात सुवर्णाची वात करून ती कापसाच्या वातीबरोबर लावतात. रात्री उपोषण व जागरण करतात. दुसऱ्या दिवशी प्रातःकाली तर्पण करतात. नंतर तीळ व बेलाची पाने यांचे हवन करतात. मग गोदान व प्रतिमादान करून ब्राह्मणांना दक्षिणा देतात. नंतर आचार्य यजमानावर अभिषेक करितो. मग ब्राह्मणभोजन घालून व्रताची समाप्ती करतात. फल– सर्वमनोरथपूर्ती. [व्रतराज]

बिल्ववृक्ष एक पवित्र व यज्ञीय वृक्ष. या वृक्षाचा उल्लेख अथर्ववेदात, तसेच ऐतरेय व शतपथ या ब्राह्मणांत आला आहे. याला कश्यप 'सृष्टीतला वृक्ष मानतात. यज्ञातला यूप बेलाचा करीत व बेलाचे काष्ठ विशिष्ट मंत्राने मंत्रून ते ताइतासारखे दंडात बांधीत, असा उल्लेख शांखायन आरण्यकात आहे. बिल्ववृक्षाच्या उत्पत्तीसंबंधी पुढील कल्पना आहेत–

(१) लक्ष्मीच्या तपःप्रभावाने बिल्ववृक्षाची उत्पत्ती झाली.
(२) बिल्ववृक्ष हा लक्ष्मीच्या उजव्या हातातून उत्पन्न झाला.
(३) बिल्ववृक्ष आदिकल्पात ब्रह्मदेवाने उत्पन्न केला.

लक्ष्मी व बिल्वफळ याविषयी एक कथा आहे, ती अशी–

लक्ष्मी नित्यनेमाने सहस्र कमळे वाहून शिवाची पूजा करीत असे. एके दिवशी तिच्या सहस्र संख्येतली दोन कमळे नाहीशी झाली. पूजेची वेळ तर जवळ आली होती. त्यामुळे काय करावे ते तिला समजेना. तिची ही अडचण पाहून विष्णू तिला म्हणाला. 'तुझे दोन स्तन म्हणजे दोन सुंदर कमळेच आहेत. ती तू शिवाला वाहा.' लक्ष्मीने लगेच तीक्ष्ण शस्त्राने आपले दोन्ही स्तन कापून ते शिवाला वाहिले. तेव्हा शिव प्रकटला व तिला म्हणाला. 'मी तुझ्या भक्तिभावाने प्रसन्न

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झालो आहे. यापुढे तुझे स्तन वेलाच्या वृक्षांवर फळांच्या रूपाने प्रकट होतील व बिल्ववृक्ष पवित्र स्थळांच्या परिसरात राहील.'

शिवरहस्यात बिल्ववृक्षाचे माहात्म्य सांगितले आहे, ते असे–

मूलतो भवरूपाय मध्यतो मृडुरूपिणे ।
अग्रतः शिवरूपाय पत्रैर्वेदस्वरूपिणे ।
स्कन्धे वेदान्तरूपाय तरुराजाय ते नमः ।।

अर्थ – हे बिल्ववृक्षा, तू मूलभागी (शिवाचे) भवरूप आहेस, मध्यभागी मृडुरूप आहेस व अग्रभागी शिवरूप आहेस. तुझे त्रिदळ हे तीन वेदांच्या रूपाने आहे. तुझ्या शाखा उपनिषद्रूप आहेत. हे वृक्षराजा, तुला नमस्कार असो

बिल्वपत्रे शिवाला अत्यंत आवडतात यासंबंधी एक श्लोक असा–

सर्वकामप्रदं बिल्वं दारिद्रस्य प्रणाशनम् ।
बिल्वात्परतरं नास्ति येन तुष्यति शङ्करः ।।

अर्थ – बिल्ववृक्ष हा सर्व कामना पूर्ण करणारा व दारिद्र्याचा नाश करणारा आहे. बिल्वपत्रापेक्षा शंकराला प्रिय व संतोष देणारी दुसरी कोणतीच वस्तू नाही.

बिल्वपत्रावाचून केलेली शिवपूजा निरर्थक होते. ज्ञानतः किंवा अज्ञानतः बिल्वदलाने शिवपूजा करून अनेक पापी व रोगग्रस्त पुरुष उद्धरून गेल्याच्या कथा शैव पुराणांत आहेत काही ठिकाणी ग्रामीण स्त्रिया आपल्याला पतीचे प्रेम अविच्छिन्न लाभावे म्हणून बेलाची पूजा करतात. [वे. इं.; श. क.; शिवलिंगोपासना; क्रि. स्ट. ले. उ.; फोकलोअर, जून १९६५]

बिल्वोपनिषद

एक नव्य उपनिषद. हे सदाशिवाने वामदेवाला सांगितले आहे. बेलाच्या त्रिदलाने शंकराची पूजा करणे किती महत्त्वाचे आहे, हे ठसविण्याचा प्रयत्न यात केलेला आहे. त्या विषयीचा सारांश श्लोक असा–

उत्तानबिल्वपत्रं च यः कुर्यान्मम मस्तके ।
मम सायुज्यमाप्नोति नात्र कार्या विचारणा ।।

अर्थ –(सदाशिव म्हणतो) जो कोणी उताणे बिल्वपत्र माझ्या मस्तकी वाहील, त्याला शिवसायुज्य प्राप्त होईल, याविषयी शंका नको.

त्रिदल बिल्वपत्र हे त्रिकाल, त्रिशक्ती, तीन लिंगे, तीन सवने, आणि ओंकाराच्या तीन मात्रा यांचे निदर्शक असल्याचे सांगून, यात शेवटी अर्थवाद दिलेला आहे. [श्री. सी. ग. देसाई]

बिल्हण

(इ. स. चे ११ वे शतक) एक काश्मीरी पंडित व महाकवी. याचा जन्म काश्मीरमधील प्रवरपुरापासून जवळच असलेल्या खोनमुख नामक गावी, एका कौशिकगोत्री ब्राह्मण कुळात झाला. त्याच्या पित्याचे नाव ज्येष्ठकलश व मातेचे नागदेवी असे होते. त्याचे घराणे अग्निहोत्री पंडितांचे असून, त्याचे प्रपितामह व पितामह वैदिक वाङ्मयाचे प्रकांड पंडित होते. त्याचा पिता ज्येष्ठकलश हा वैयाकरण असून, त्याने पतजलीच्या महाभाष्यावर टीका लिहिली होती. बिल्हणाने लहानपणीच वेद, व्याकरण व काव्यशास्त्र यांचे अध्ययन पूर्ण केले. काश्मीरमध्ये त्याचे वास्तव्य असतानाच त्याचे काही ग्रंथ ख्याती पावले होते.

इ. स. १०६२–६५ या काळात केव्हा तरी बिल्हण देशाटण व तीर्थयात्रा करण्याच्या उद्देशाने काश्मीरातून निघाला. पंजाब व मथुरा-वृंदावन या प्रदेशांतून पुढे जाऊन तो कनौज, प्रयाग, काशी, अयोध्या, इ. नगरांत काही दिवस राहिला आणि नंतर बुंदेलखंडातील डाहलचा राजा कृष्णराज याच्या सभेत पोचला. कृष्णराजाने बिल्हणाचे मनःपूर्वक स्वागत करून त्याच्या काव्याचे श्रवण केले. डाहलच्या सभेतील गंगाधरशास्त्री याचा बिल्हणाने वादात पराजय केला.

धारा नगरी येथे जाऊन भोज राजाचा आश्रय घ्यावा, अशी बिल्हणाची आकांक्षा होती; पण बिल्हण तिथे पोचण्यापूर्वीच भोज राजा मरण पावला होता. मग बिल्हण गुजरातमधून सोमनाथाला गेला व तिथून समुद्रमार्गे कोकणच्या किनाऱ्याने रामेश्वरापर्यंत पोचला. परतीच्या यात्रेत कर्नाटकात चालुक्यांची राजधानी कल्याण येथे तो गेला. तेव्हा चालुक्य सम्राट विक्रमादित्य 'सहावा' याने त्याला एक हत्ती व नीलछत्र देऊन त्याचा सन्मान केला आणि आपल्या राजसभेत त्याला विद्यापती म्हणून आश्रयही दिला.

जीवनाच्या अखेरपर्यंत बिल्हण विक्रमादित्याच्या सभेत राहिला. तिथे त्याने विक्रमांकदेवचरित नामक महाकाव्य रचले. ते कालिदासाच्या रघुवंशाच्या धर्तीवर असून, त्यात चालुक्य वंशाचे त्रोटक वृत्त सांगितलेले आहे. कवीचे आत्मवृत्तही त्यात आढळते. विक्रमादित्याच्या आश्रयाला राहण्यापूर्वी बिल्हणाने भारतभ्रमण केले असल्यामुळे, त्याला त्या काळच्या इतिहासाचे बरेच विस्तृत ज्ञान झाले होते. ते त्याच्या महाकाव्यात जागोजागी विखुरलेले आहे. त्यामुळे इतिहास म्हणूनही या ग्रंथाचे महत्त्व आहे. यात दिलेली माहिती शिला लेख वगैरे अन्य साधनांनी प्राप्त झालेल्या माहितीशी पुष्कळ जुळते.

कवीने काश्मीरसंबंधीही पुष्कळ माहिती दिली आहे. बिल्हणाला काश्मीरविषयी फार अभिमान होता. काश्मीरातून काव्य व केशर या अत्यंत मौल्यवान वस्तू निर्गत होत असल्याचे तो सांगतो. काश्मीरी स्त्रिया प्राकृत व संस्कृत या दोन्ही भाषा सफाईने बोलतात, अशी प्रौढी त्याने मिरवली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काश्मीरी द्राक्षांच्या माधुरीचे वर्णनही त्याने अतिशय खुबीने केले आहे. नाटयकलेतही काश्मीरची बरीच प्रगती झाली होती. काश्मीरात असंख्य विद्वान ब्राह्मण होते व राजांकडून त्यांचा चांगला सत्कार होत असे. मात्र कलियुगामुळे आर्यांच्या ऐश्वर्याचा व सद्गुणांचा ऱ्हास झाल्याबद्दल त्याने जागोजागी हळहळ व्यक्त केली आहे.

विक्रमांकदेवचरित हे महाकाव्य वैदर्भी शैलीत रचलेले असून, कवीची वाणी प्रासादिक व रसाळ आहे. बिल्हण खरा विदग्ध कवी वाटतो. दीर्घ समास व अनुप्रास यांचा उपयोग त्याने फारसा केलेला नाही. त्याच्या काव्यात वीर रस हा प्रधान असला, तरी शृंगार व करुण हे रसही त्यात पुष्कळ मिसळलेले आढळतात. इंद्रवज्रा व वंशस्थ ही दोन वृत्तेच त्याला विशेष प्रिय दिसतात. मात्र बिल्हणाची कित्येक वर्णने अतिशयोक्तिपूर्ण आहेत. स्वतःचे जन्मस्थान खोनमुख याचे वर्णन त्याने केले आहे, ते असे–

ब्रूमस्तस्य प्रथमवसतेरद्भुतानां कथानां
किं श्रीकण्ठश्वशुरशिखरिक्रोडकीलाललाम्नः ।।
एको भागः प्रकृतिसुभगं कुङ्कुमं यस्य सूते ।
द्राक्षामन्य. सरससरयूपुण्ड्रकच्छेदपाण्डुम् ।।

अर्थ – अद्भुत कथांचे आदिस्थान आणि शिवाचे श्वशुर असलेल्या हिमालय पर्वताचे लीलामय भूषण अशा त्या स्थानाचे वर्णन मी कसे करावे ! त्याच्या एका भागात सहजसुंदर असे कुंकुम उत्पन्न होते आणि दुसऱ्या भागात सरयूच्या तीरावर उगवणाऱ्या कस्तुर मोगऱ्याच्या खंडाप्रमाणे पांडुवर्णाची द्राक्षे उत्पन्न होतात.

कवींच्या सामर्थ्याची थोरवी बिल्हणाने पुढीलप्रमाणे गायिली आहे–

हे राजानस्त्यजत सुकविप्रेमबन्धे विरोधं
शुद्धा कीर्तिः स्फुरति भवतां नूनमेतत्प्रसादात् ।
तुष्टैर्बद्धं तदलघु रघुस्वामिनः सच्चरित्रं
क्रुद्धैर्नीतस्त्रिभुवनजयी हास्यमार्गं दशास्यः ।।

अर्थ – हे राजांनो, सुकवींच्या प्रेमबंधाला विरोध करणे सोडून द्या. तुमची विशुद्ध कीर्ती त्यांच्या प्रसादामुळेच स्फुरित होते. संतुष्ट अशा कवींनीच रघुनाथाचे ते महान सच्चरित्र ग्रंथबद्ध केले आणि क्रुद्ध अशा कवींमुळेच त्रिभुवनविजयी दशानन उपहास्यतेला गेला.

बिल्हणाचे कर्णसुंदरी नामक नाटक व चौरपंचाशिका नावाचे लघुप्रणयकाव्य उपलब्ध आहे. कर्णसुंदरी नाटकाच्या कथानकावरून हा कवी काही काळ अणहिलपाटणच्या कर्णदेव त्रैलोक्यमल्लाच्या सभेत राहिला असावा, असे दिसते.

चौरपंचाशिका हे पन्नास श्लोकांचे एक स्फुटकाव्य आहे. कवीने एका तरुण सुंदर राजकन्येवर केलेल्या गुप्त प्रेमाच्या स्मृती त्यात व्यक्त झालेल्या आहेत. त्याविषयी एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

बिल्हणाचे एका राजकुमारीवर प्रेम जडले. त्यांचा गुप्त संबंधही अनेकवार घडला. पुढे ही बातमी राजाला कळली. राजाने त्याला पकडून देहांताची शिक्षा दिली व त्याच्या वधासाठी जेव्हा राजदूत त्याला घेऊन निघाले, तेव्हा त्याला आपल्या अनुभूत प्रेमाचे स्मरण झाले व त्याने ते प्रेम वसंततिलका छंदात श्लोकबद्ध केले. त्यात प्रकट झालेली रसिकता आणि गाढ प्रीती समजून येऊन राजाला कवीची करुणा आली. त्याने त्याला मुक्त तर केलेच, शिवाय त्याला आपली कन्याही दिली. चौरपंचाशिकेतील दोन श्लोक पुढीलप्रमाणे–

अद्यापि मे वरतनोर्मधुराणि तस्या
यान्यर्थवन्ति न यानि निरर्थकानि ।
निद्रानिमीलितदृशो मदमन्थराया–
स्तान्यक्षराणि हृदये किमपि ध्वनन्ति ।।

भावार्थ – माझ्या प्रियतमेला झोप आली होती. तिचे डोळे मिटले होते. तिची अंगेही मदाने शिथिल झाली होती. अशा स्थितीत काही मधुर अक्षरे तिने उच्चारली. ती सार्थही नव्हती व निरर्थकही नव्हती. पण तीच अक्षरे अद्यापि माझ्या हृदयात काही अंशी ध्वनित होत राहिली आहेत.

अद्यापि तन्मनसि सम्परिवर्तते मे
रात्रौ मयि क्षुतवति क्षितिपालपुत्र्या ।
जीवेति मङ्गलवचः परिहृत्य कोपात्
कर्णे कृतं 'कनकपत्रमनालपन्त्या ।।

भावार्थ – एका रात्री मला शिंक आली. (शिंक ऐकताच प्रेमाची माणसे 'चिरंजीव हो' असे मंगल वचन उच्चारतात.) पण त्या दिवशी तिला माझा राग आला असल्यामुळे तिने तसे मंगल वचन उच्चारले नाही; मात्र आपल्या कानांतले कनकपत्र उतरवून तिने माझ्या कानांत घातले. (सुवर्ण हे आयुष्यप्रद असते असा संकेत या श्लोकात व्यक्त केला आहे.) राजकुमारीचे हे कृत्य माझ्या अंतरात घुमत राहिले आहे.

कालिदासाच्या मेघदूताच्या खालोखाल चौरपंचाशिकेला रसिकमान्यता मिळाली आहे. [सं. सा. सो. इ.; सं. सा. इ.; मु. पू. म.; भा. क. विं.]

बिशू एक सण. हिमालयाच्या वायव्य भागातील जौनसार बावरमधील खस, हिमाचल प्रदेशातील कानेट आणि चिनी तहसीलमधील किन्नर या लोकांचा हा सण आहे. तो कौटुं-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बिक आणि सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारांनी साजरा करतात. हा नव्या वर्षाचा पहिला दिवस असतो आणि कौटुंबिकरीत्या तो वैशाख प्रतिपदेला साजरा करतात. सार्वजनिकरीत्या तो केव्हा पाळायचा ते प्रत्येक गावातील मंदिराची समिती ठरवते. प्रत्येक गावात हा दिवस वेगवेगळा असतो. कौटुंबिकरीत्या हा सण होतो, तेव्हा घरातील लोक सकाळी उठून देवाची प्रार्थना करतात. नंतर ते माळा व तोरणे यांनी आपली घरे सजवतात. घरांतील मोठी माणसे दिवसभर उपास करतात व रात्री जेवतात. मग भक्तिगीतांचे गायन करतात.

सामूहिक सणांत काही धार्मिक भागही असतो. सणाचा दिवस निश्चित झाला, की त्या गावातील देव आसपासच्या गावांतील देवतांना समारंभाला येण्याचे निमंत्रण पाठवतो. त्यानुसार समारंभाच्या दिवशी प्रत्येक घरातील एक व्यक्ती आपल्या गावातील देवतेबरोबर समारंभाच्या स्थळी जायला निघते. अशा प्रकारे अनेक गावांतून देवतांच्या मिरवणुका दुपारपर्यंत यजमान देवाच्या मंदिरात येऊन पोचतात. त्या सर्व लोकांची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था देवस्थानातर्फे केली जाते. त्या दिवशी भोजनोत्तर सर्व लोक विश्रांती घेतात. दुसऱ्या दिवशी सर्व आबालवृद्ध नवे कपडे व अलंकार घालून नटतात. हा दिवस नृत्य-गायनाचा असतो. प्रत्येक गावाचा नृत्याचा स्वतंत्र संच असतो. नृत्य करणारे पुरुष पांढरा लांब कोट, सलवार आणि डोक्यावर पगडी घालतात. ते एकमेकांच्या हातांत हात गुंफतात आणि अर्धवर्तुळ करून उभे राहतात. ढोलाच्या साथीवर त्यांचा पुढारी हातात चांदीची काठी घेऊन पदन्यासाला सुरुवात करतो. प्रथम तो थोडी उडी घेऊन उजवा पाय पुढे टाकतो व नंतर डावा पाय पुढे टाकतो. बाकीचे नर्तक त्याचे अनुकरण करतात. ते दमेपर्यंत हे नृत्य चालते. मग त्यांची जागा दुसरे लोक घेतात. मंदिराच्या प्राकारात रात्रीपर्यंत हा कार्यक्रम चालतो.

याशिवाय, या सणाचाच एक भाग म्हणून एक दिवस गावातील पटांगणात धनुष्य, बाण, तलवारी, इ. जुन्या शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन भरवितात आणि शती (शंभर) म्हणजे कौरव व पंशी (पाच) म्हणजे पांडव अशी नावे असलेले लोक परस्परांशी युद्ध-नृत्य खेळतात.

त्यासाठी शती व पंशी या गावांतील एकेकजण पटांगणात येतो. त्यांच्यापैकी एकजण नृत्य करतो व दुसरा त्याच्या पायावर गुडघ्याखाली बाणाने नेम धरतो. नेम चुकविण्यासाठी पहिला जलद पदन्यास करीत राहतो. त्याच्या पायाला जाड लोकरी कापड गुंडाळलेले असते. जर दुसऱ्याने नेम बरोबर मारला, तर तो आनंदाने आरोळी ठोकतो आणि विजयोन्मादाने नृत्य करतो. दिवसभर अशा तऱ्हेचा कार्यक्रम चालतो. पहाडी प्रदेशांतील लोकांच्या एकमेकांशी गाठीभेटी होऊन त्यांच्यांत एकोपा निर्माण होण्यास अशा सणांचा फार उपयोग होतो. [दिव्यदर्शी कपूर– फोक लोअर, नोव्हेंबर-डिसेंबर १९६०]

बिसन नृत्य बस्तर प्रदेशातील एक लोकनृत्य. हे नृत्य विशेषत: लग्नप्रसंगी वधू–वरांच्या अभीष्टचिंतनासाठी करतात. नृत्यात भाग घेणारे माडिया स्त्री–पुरुष तऱ्हेतऱ्हेचे पोषाख करून त्यात भाग घेतात. धरतीमाता आणि इतर देवता यांना संतुष्ट करण्यासाठी तसेच पेरणी–मळणी या प्रसंगीही हे नृत्य करतात.

नृत्यात भाग घेणारे पुरुष माथ्यावर बिसन (गवा) या जनावराची शिंगे बांधतात व त्यावर मोरपिसांचे झुबके बसवतात. त्यावर कवड्यांच्या माळा बांधतात. पुरुष नर्तकांच्या हातांत

बिसन नर्तक

मोठे ढोल असतात. एका बाजूला हाताने व दुसऱ्या बाजूला काठीने हे ढोल वाजवतात. ढोलाच्या तालावर नृत्य चालते.

नृत्यात भाग घेणाऱ्या स्त्रिया गळ्यात विविध प्रकारच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मण्यांच्या माळा व पितळेच्या चौकोनी पुतळ्या घालतात. डोक्यावर वाटोळी धातूची टोपी घालतात. हातात व पायात जाड जाड वाळे घालतात. पुरुष मंडळी ढोल वाजवू लागली, की स्त्रिया फेर धरून त्यांच्या भोवती वर्तुळाकार नाचतात. त्यांच्या उजव्या हातात एक लांब काठी असते. ती काठी जमिनीवर आपटून त्या नृत्याचा ताल धरतात. त्यांचा डावा हात जवळच्या नाचणारीच्या खांद्यावर असतो. नृत्याच्या अनेक प्रकारांत गवा पकडणे हा एक प्रकार असतो. नृत्यानंतर समुदायाने गीते गातात. [इलस. वीकली, ५ ऑगस्ट १९६२]

बिसलमरी द. भारतातील एक ग्रामदेवता. हिचे स्थान म्हैसूरजवळ आहे. बिसल म्हणजे सूर्य आणि मरी म्हणजे शक्ती, अशी बिसलमरी शब्दाची फोड आहे. त्यावरून या देवतेचा सूर्योपासनेशी संबंध असावा, असे वाटते. हिच्या देवळाला छप्पर नसते व देवळात हिची मूर्तीही नसते. एक जलपूर्ण भांडे व आरसा या वस्तू हिचे प्रतीक म्हणून मांडलेल्या असतात. या देवतेचा सात बहिणींत समावेश करतात. यात्रेच्या वेळी सुवासिनी स्त्रिया बिसलमरीच्या देवळाकडे मिरवत येतात व गावकरी त्यांना पायघड्या अंथरतात. हिचा पुजारी धोबी असतो. [हिं. गां. सा. इं.]

बिस्मिल्ला एक मुस्लिम संज्ञा. मुलाच्या शिक्षणाचा शुभारंभ असा त्याचा अर्थ आहे. हा धार्मिक संस्कार नसून, परंपरेने चालत आलेली ती एक प्रथा आहे. मुलाच्या वयाला चार वर्षे, चार महिने आणि चार दिवस पुरे झाले, की त्याच्या शिक्षणाला प्रारंभ करतात. त्यासाठी मुलाला नवे कपडे घालून मशिदीत किंवा शाळेत नेतात आणि तिथे प्रथम मुलाला 'बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम' हे वाक्य म्हणायला लावतात. मग कुराणातील काही मंत्रही त्याच्याकडून म्हणवून घेतात. त्यानंतर सर्वांना मिठाई वाटतात.

बिस्मिल्ला (ब+इस्म+अल्ला) या शब्दाचा खरा अर्थ 'ईश्वराच्या नावाने' असा आहे. कुराणातील प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी हा शब्द येतो. जेवणाला सुरुवात करताना, नवे कपडे वापरायला काढताना, कोणतेही नवे कार्य सुरू करताना मुसलमान लोक हा शब्द उच्चारतात. ग्रंथाच्या आरंभीही हा शब्द लिहिण्याची प्रथा आहे. [मु. स. सं.]

बिहाग हिंदुस्थानी संगीतातील एक राग. याची जाती औडवसंपूर्ण आहे. याच्या आरोहात ऋषभ व धैवत हे स्वर वर्ज्य आहेत. अवरोह मात्र सातही स्वरांनी होतो. वादी गंधार. संवादी–निषाद. आरोह स्वर– सा, ग, म, प, नी, सा. अवरोह स्वर– सा, नी, ध, प, म, ग, रे, सा. गायनसमय– रात्रीचा दुसरा प्रहर. [क. सं.; सु. वि. को.]

बिहागडा हिंदुस्थानी संगीतातील एक राग. याची जाती औडव–संपूर्ण आहे. वादी–मध्यम, संवादी–षड्ज. आरोहात ऋषभ व धैवत हे स्वर वर्ज्य असून, अवरोहात मात्र सातही स्वर लागतात. आरोह स्वर– सा, ग, म, प, ध, नी, सा. अवरोह स्वर– सा, नी, ध, प, म, ग, रे, सा. गायनसमय– रात्रीचा दुसरा प्रहर. यात दोन निषादांचा व दोन मध्यमांचा प्रयोग होत असल्याने हा राग बिहाग रागापासून वेगळा ठरतो. [क. सं.; सु. वि. को.]

बिहार भारतीय संघराज्यातील एक घटक राज्य. पूर्वेला बंगाल, उत्तरेला नेपाळ, पश्चिमेला उ. प्रदेश व म. प्रदेश आणि दक्षिणेला ओडिसा अशा याच्या चतुःसीमा आहेत. या प्रदेशाचे क्षेत्रफळ ६७,२०० चौ. मैल असून, सध्याची लोकसंख्या सुमारे पाच कोटी आहे. सांप्रत या राज्यात सारण, पाटणा, मुझफ्फरपूर, दरभंगा, धनबाद, मोंघीर, चंपारण, गया, भागलपूर, साहरसा, शहाबाद, पूर्णिया, संथाल परगणा, सिंगभूम, हजारीबाग, रांची व पालामाऊ या जिल्ह्यांचा समावेश होतो. पाटणा ही या प्रदेशाची राजधानी आहे. (पाटलिपुत्र पाहा.) प्राचीन काळी या प्रदेशात कारुष, मगध, अंग, वैशाली, इ. राज्ये होती. बिहार हे नाव मुसलमानी लेखकांनी दिलेले आहे. ओदंतपुरीच्या आसमंतात असंख्य बौद्ध विहार असल्यामुळे तिला विहारशरीफ हे नाव त्यांनी दिले. कालांतराने सर्व प्रदेशालाच ते बिहार म्हणू लागले.

नैसर्गिक विभाग – गंगेचे विस्तीर्ण खोरे व छोटानागपूरचे पठार असे बिहारचे दोन मुख्य विभाग झालेले आहेत. गंगेच्या उत्तरेकडचा तराईपर्यंतचा प्रदेश अगदी सपाट असून, त्यातून गोग्रा, गंडक, बागमती, कोसी, महानंदा, इ. अनेक लहान मोठ्या नद्या वाहतात. या नद्यांना पावसाळ्यात नेहमी पूर येतात व त्यांचे मार्गही सतत बदलत असतात. गंगेच्या दक्षिणेकडील प्रदेश त्या मानाने कमी सपाट असून, छोटानागपूरच्या पठारापर्यंत पुष्कळ चढ लागतो. त्या पठारापासून निघालेले अनेक डोंगर या भागात पसरलेले आहेत. बरबर, राजगिर, खरकपूर, इ. त्यांची नावे आहेत. मात्र हे डोंगर फारसे उंच नाहीत. या प्रदेशाला महापुरांचा त्रास विशेषसा होत नाही.

छोटानागपूरच्या पठाराचा विस्तार सुमारे ३४ हजार चौ. मैल असून, त्याची उंची १-२ हजार फूट आहे. या भागात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

सुमारे ३००० फूट उंचीचेही काही डोंगर आहेत, त्याचप्रमाणे समुद्रसपाटीपासून फक्त ४०० फूट उंची असलेली नद्यांची खोरीही आहेत. हजारीबाग व रांची ही मुख्य पठारे २००० फूट उंच आहेत. त्यांच्यामधून दामोदर नदी वाहते. हजारीबाग पठाराच्या पूर्व सीमेवर पारसनाथ नावाचा, बिहारमधील सर्वांत उंच डोंगर (४,४८० फूट) आहे. अगदी दक्षिणेला सिंगभूम जिल्ह्यात, पोरहट व कोल्हन हा डोंगराळ व दऱ्यांचा प्रदेश आहे.

छोटानागपूर पठारावर जागोजागी, प्रचंड वाटोळे किंवा टोकदार खडक जमिनींतून वर आलेले आढळतात. ते खूप उंच असल्यामुळे अनेक मैलांवरून दिसतात. या पठाराच्या ईशान्य भागात राजमहाल डोंगर असून, तो गंगेपर्यंत पसरलेला आहे. त्याची उंची कुठेही २००० फुटांपेक्षा जास्त नाही. पठाराच्या पश्चिमेला शोण नदाच्या पलिकडे असलेला कैमूर पर्वत हा विंध्य पर्वताचाच एक भाग आहे.



शोण नद मध्य प्रदेशात अमरकंटक येथे उगम पावतो व गंगेला मिळतो. बिहारमध्ये त्याची लांबी १४५ मैल आहे. शेवटी त्याचे पात्र २-३ मैल रुंद होते. कर्मनाशा, पुनपुन, फल्गू, साक्री व किउल या नद्या छोटानागपूरच्या पठारावर उगम पावतात व उत्तरेकडे वाहत जाऊन गंगेला मिळतात. दक्षिण कोएल व सुवर्णरेखा या दोन नद्या छोटानागपूरवरून दक्षिणेकडे वाहत जातात. पूर्वेकडे वाहणाऱ्या ज्या अनेक नद्या आहेत, त्यांतील दामोदर ही नदी सर्वांत महत्त्वाची होय. तिचा उगम पालामाऊमध्ये असून, तिला अनेक उपनद्या मिळतात. या नदीच्या महापुरांमुळे बंगालमधील मालमत्तेचे फार नुकसान होत असे. ते टाळण्यासाठी तिच्यावर अनेक धरणे बांधली जात आहेत.

शेती — बिहार हा शेतीप्रधान प्रदेश असून, गंगेचे खोरे तर अत्यंत सुपीक आहे. गंगेच्या उत्तरेकडील प्रदेशात भरपूर पाऊस पडतो; पण दक्षिणेकडे कमी पडतो. छोटानागपूर भागात मात्र पावसाचे प्रमाण अत्यल्प असते. त्यामुळे गंगेच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेशांत, पठारावर व डोंगराळ भागांतही पाटबंधारे घालून शेतीसाठी पाणी मिळविले जाते. भात हे या प्रदेशातले मुख्य पीक असून गहू, सातू, मका व कडधान्ये निरनिराळ्या भागांत पिकविली जातात. काही भागांत ऊस, ताग, तंबाखू, नीळ, बटाटे, ज्वारी, तीळ, मोहरी ही पिकेही घेतात. चंपारण व छोटानागपूर या प्रदेशांत घनदाट अरण्ये असून, त्यांत उत्तम लाकूड, बांबू, लाख, भिन्न प्रकारचे गवत, इ. अनेक पदार्थ विपुल प्रमाणांत उत्पन्न होतात.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खनिज संपत्तीच्या बाबतींतही बिहार प्रदेश समृद्ध आहे. कोळसा, लोखंड, अॅल्युमिनियम, अभ्रक, तांबे, युरेनियम, उत्तम माती, सिमेंटचे घटक, इ. पदार्थ बिहारमध्ये भरपूर सापडतात. त्यामुळे अनेक कारखाने या प्रदेशात सुरू करण्यात आले आहेत.

प्राचीन काळ – बिहारचा सर्व प्रदेश प्राचीन गोंडवन नामक खंडाचा एक भाग होता, असे मानले जाते. या प्रदेशात आर्यांच्या वसाहती स्थापन होण्यापूर्वी तिथे अनार्य आदिवासी लोक वसलेले होते. ऋग्वेदाच्या काळी आर्य लोक पंजाबात होते आणि ते पूर्वेकडील या अनार्य लोकांना संस्कृतिहीन समजत होते. अथर्ववेद व यजुर्वेद संहितांच्या काळीदेखील अंग, वंग, मगध, इ. प्रदेशांतील लोक व्रात्य (संस्कारहीन) मानले जात होते. ब्राह्मणे व आरण्यके यांच्या काळी आर्य संस्कृतीचा प्रसार पूर्वेकडील प्रदेशांत सुरू झाला. शतपथ ब्राह्मणात (१.४.१ १०) विदेह माधव राजाची कथा आहे. यज्ञाग्नी बरोबर घेऊन तो राजा आपल्या पुरोहितासह पूर्वेकडे निघाला. सदानीरा नदीपर्यंत त्यांचा प्रवास निर्विघ्नपणे झाला. पण त्याचा यज्ञाग्नी सदानीरा नदाच्या पलिकडे जाईना. शतपथ ब्राह्मणाच्या वेळी तिथवर आर्यांची यज्ञसंस्था पोचली होती, असा अर्थ या कथेतून निघतो. त्या काळी या भागाला विदेह हे नाव मिळाले. हा भाग सांप्रतच्या उत्तर बिहारमध्ये आहे.

पुराणे आणि महाकाव्ये या ग्रंथांत आर्य संस्कृतीच्या पूर्वेकडील विस्ताराविषयी जी माहिती आढळते, ती वरील माहितीशी जुळत नाही. मनूच्या काळीच आर्य लोकांची राज्ये बिहारात स्थापन झाली होती, असे पुराणांवरून कळते. मनूचा पुत्र नाभानेदिष्ट याने वैशालीचे राज्य स्थापले. दुसरा पुत्र करुष याने गंगेच्या दक्षिणेला समुद्रापर्यंत आपले राज्य स्थापले होते. मनूचा नातू निमी किंवा विदेह याने विदेह राज्याची स्थापना केली. विदेहाच्या वंशातील मिथी जनक याच्या वेळी राजधानीला मिथिला आणि त्याच्या वंशाला जनक ही नावे मिळाली. मनूची कन्या इला हिचा पुत्र पुरूरवा ऐल व त्याचा पुत्र अनू ह्यांच्या वंशाला अन्व म्हणतात. त्या वंशाचे राज्य विदेह व वैशाली यांच्या पूर्वेला होते. पौरव वंशातील वसू नामक राजाने चेदीपासून मगधापर्यंत आपली सत्ता स्थापली होती. त्याचा पुत्र बृहद्रथ याला मगधाचे राज्य मिळाले व यदूला कारुषाचे राज्य मिळाले. बृहद्रथाच्या वंशाने मगधाचे विशाल साम्राज्य निर्माण केले.

पुराणांतील या कथा विद्वानांना विश्वसनीय वाटत नाहीत. वैदिक साहित्यांत जी त्रोटक माहिती मिळते, तीच अनेक विद्वानांना मान्य झाली आहे.

भारतीय महायुद्धाच्या वेळी बिहारमध्ये, उत्तर बिहारात विदेहाचे राज्य व द. बिहारात मगधाचे राज्य अशी दोन राज्ये होती. मगधावर बार्हद्रथ वंशाचे राज्य सुमारे १००० वर्षे चालू होते. या वंशाची व नंतरच्या मगध सम्राटांची पौराणिक माहितीही सुसंगत नाही. बौद्ध ग्रंथांवरून कळते, की बार्हद्रथ वंशानंतर मगधावर बिंबिसार राजा राज्य करू लागला. तो गौतम बुद्धाचा समकालीन होता. मगधाच्या पूर्वेला अंग देश होता त्याची राजधानी चंपानगरी बिहारमध्ये भागलपूरजवळ होती. बिंबिसाराने अंग देश जिंकून मगधाला जोडला. बिंबिसारानंतर त्याचा पुत्र अजातशत्रू याने मगध साम्राज्य स्थापले. त्याच्यानंतर त्याच्या वंशातले ३–४ राजे झाले; पण प्रत्येकाने पित्याचा वध करून सिंहासन बळकावले. शेवटी प्रजेने त्या वंशाला हुसकावून लावले व शिशुनाग नावाच्या अमात्याला सिंहासनावर बसवले. शिशुनाग वंशानंतर मगधावर नंद वंशाचे राज्य आले. नंदांचा नाश करून चंद्रगुप्त मौर्याने मगधावर आपली सत्ता स्थापली व एक विशाल साम्राज्य निर्माण केले.

राजकीय इतिहास – गौतम बुद्धाच्या काळी उ. बिहारात गणराज्यांचे एक संघराज्य अस्तित्वात होते. पाली साहित्यात त्याचे नाव वज्जी (सं. वृजी) असे दिले आहे. लिच्छवींचे राज्य हे त्यांतील एक घटक राज्य होते. वैशाली ही त्यांची राजधानी होती.

मौर्य वंशानंतर शुंग व काण्व वंशांनी मगधावर राज्य केले सनपूर्व ३० च्या सुमारास काण्व वंशाचा अंत झाला. तेव्हापासून गुप्त वंशाचा उदय होईपर्यंतच्या काळातील बिहारचा इतिहास बहुतेक अज्ञातच आहे. इ. स. च्या पहिल्या व दुसऱ्या शतकांत बिहारमध्ये कुशाणांची सत्ता असावी, असे अनुमान निरनिराळ्या ठिकाणीं सापडलेल्या त्यांच्या नाण्यांवरून करता येते मात्र त्यांची सत्ता तिथे दीर्घ काळ टिकली नसावी. तिथे लिच्छवी, मौखरी, इ. घराण्यांनी राज्य केले असावे. लिच्छवींच्या साहाय्यानेच पुढे गुप्त साम्राज्य प्रस्थापित झाले.

गुप्तांची सत्ता दुबळी झाल्यानंतर बिहारमध्ये पाटलिपुत्र येथे गुप्त वंशाचे राज्य व गयेच्या आसमंतात मौखरी वंशाचे राज्य अशी दोन राज्ये नांदली. इ. स. ५८० च्या सुमारास मौखरी राजा शर्ववर्मा याने महासेनगुप्ताचा पराभव करून मगधाचे राज्य जिंकले. पण इ. स. ६०० च्या सुमारास गौडाधिपती शशांक याने मौखरींचा पराभव करून मगध देशावर सत्ता स्थापली. त्याच्या मृत्यूनंतर मौखरी वंशातील पूर्णवर्मा याने मगध परत जिंकून घेतला. पण तो मरण पावल्यावर मगधावर हर्षवर्धनाची सत्ता प्रस्थापित झाली. त्याने गुप्त वंशातील माधवगुप्त याला आपला सामंत म्हणून मगधाचे राज्य दिले.

हर्षाच्या मृत्यूनंतर गुप्त वंशातील राजे पुन्हा मगधावर स्वतंत्र-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पणे राज्य करू लागले. त्यांनी आपल्या राज्याचा बराच विस्तार केला. पण इ. स. ७२५ च्या सुमारास कनौजचा राजा यशोवर्मा याने गुप्तांचा पराभव करून मगध जिंकला. मात्र त्याची सत्ता तिथे स्थिर झाली नाही. बिहार व बंगाल या दोन्ही प्रदेशांत अराजक माजले. पुढे बंगालमध्ये पाल वंशाचे राज्य सुरू झाले व बिहारवरही त्याची सत्ता प्रथापित झाली. बिहारवर पालांची सत्ता इ. स. च्या ११ व्या शतकाच्या अखेरपर्यंत होती. प्रतीहार, कलचुरी इ. राजांनी मध्यंतरी काही वर्षे बिहारचा काही भाग जिंकला होता, पण तो पालांनी परत घेतला. इ. स. १०९७ नंतर मात्र उत्तर बिहार (तीरभुक्ती) वर मिथिलेच्या कर्नाट वंशाचे राज्य सुरू झाले. द. बिहारवर पालांची सत्ता चालू राहिली. इ. स. च्या १२ व्या शतकाच्या पूर्वार्धात गाहडवालांनी द. बिहारचा बराच भाग घेतला. पुढे बंगालमध्ये सेन वंशाचे राज्य सुरू झाले आणि त्याने पालांकडून बिहारचाही काही भाग जिंकून घेतला.

बख्तियार खलजीने इ. स. १२०० च्या सुमारास पूर्व भारतावर स्वारी केली आणि बिहारमधील अनेक ठिकाणे जिंकली. त्या स्वारीत मुसलमानांनी विक्रमशिला नगरी नष्ट केली. बिहारशरीफ येथे तळ ठेवून मुसलमानी फोजा मगधात धुमाकूळ घालू लागल्या. इ. स. च्या १३ व्या शतकात मगधावर छिंड वंशाचे राज्य होते, असे दिसते. इ. स. १२८५ पर्यंत तिथे मुस्लिम राज्य सुरू झालेले नव्हते. मुसलमानी फौजा तीरभुक्ती (तिरहुत– उ. बिहार) वर स्वाऱ्या करत होत्या, पण तिथे कर्णाट वंशाचे स्वतंत्र राज्य १३ व्या शतकाच्या अखेरपर्यंत चालू होते. त्यानंतरच्या दोन शतकांत बिहारमध्ये स्वतंत्र राज्य अस्तित्वात नव्हते. दिल्लीचे सुलतान व बंगालचे सुभेदार यांच्या सत्तासंघर्षात बिहारचा प्रदेश कधी सुलतानांच्या अमलाखाली असे, तर कधी बंगालच्या सुभेदाराकडे जाई. तुगलुक सुलतानांच्या कारकीर्दीत बिहारवर दिल्लीची सत्ता आली.

इ. स. १३९४ मध्ये महमूद तुगलक याने मलिक सरवर ख्वाजा जहान याला अवध व बिहार या प्रांतांवर सुभेदार नेमले. त्याला मलिक उस्–शर्क असेही म्हणत. पुढे त्याने स्वतंत्रपणे राज्यकारभार सुरू केला, पण इ. स. १४८४ मध्ये बहलुल लोदीने शर्की घराण्यातील नवाबाचा पराभव करून त्याची राजधानी जौनपूर घेतली व तिथे मुबारकखान नुहानी याला नेमले. मात्र बिहारमधील बराच प्रदेश शर्की सत्तेखालीच राहिला. इ. स. १४९५ मध्ये बिहारचा तो भागही दिल्लीच्या अंमलाखाली गेला. पण इब्राहीम लोदीच्या वेळी पूर्वेकडील अनेक अफगाण सरदारांनी एकत्र येऊन दिल्लीची सत्ता झुगारून दिली. मुबारकखानाचा मुलगा दर्याखान हा त्यांचा नेता होता. पुढे दर्याखानाचा मुलगा बहरखान याला सर्व अमीरांनी सुलतान मुहम्मद म्हणून गादीवर बसवले.

लोदी वंशानंतर दिल्लीवर मोगल वंशाची सत्ता सुरू झाली. बिहारमधील अफगाण सरदारांनी, नुहानी सुलतान मुहम्मदाच्या मृत्यूनंतर महमूद लोदी याला बिहारचा राजा मानून मोगलांशी लढा सुरू केला. पण बाबराने त्यांचा पराभव करून नुहानी सुल्तान मुहम्मद याचा अल्पवयी मुलगा जलाल-उद्दीन याला बिहारचे राज्य दिले. या नुहानी सुलतानांचा एक सरदार फरीदखान हाच पुढे शेरखान म्हणून प्रसिद्धी पावला व त्याने मोगलांचा पराभव करून प्रथम बिहार व बंगाल हे प्रदेश जिंकले आणि शेवटी दिल्लीचे तख्तही काबीज केले. शेरशहा व त्याचा सूर वंश दिल्ली येथे राज्य करीत असता बिहारमध्ये शांतता व स्थिरता नांदली. त्यानंतर मोगलांचा अंमल पुन्हा सुरू झाला.

अकबराच्या कारकीर्दीची पहिली बरीच वर्षे बिहारमध्ये स्थिर शासन प्रस्थापित करण्यात गेली. त्यानंतर बिहार प्रदेश हा मोगल साम्राज्यातील एक सुबा झाला. बादशहाच्या हुकुमाप्रमाणे अनेक सुभेदार तिथे राज्यकारभार करून गेले. त्या प्रदेशात मधून मधून बंडाळ्या उद्भवत; पण एकंदरीत सर्व प्रदेशावर मोगलांचीच सत्ता होती. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल बादशाही दुबळी झाल्यामुळे सर्वत्र बंडाळी माजली, तशी ती बिहारमध्येही माजली. तथापि बंगाल व बिहार या दोन्ही प्रांतांवर मोगलांची सत्ता इ. स. १७५७ पर्यंत चालू होती. प्लासीच्या लढाईनंतर बंगालवर ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाली आणि लवकरच त्यांनी बिहारवरही आपले वर्चस्व स्थापले. इ. स. १७६५ त बादशहा शाह आलम (२ रा) याने ईस्ट इंडिया कंपनीला बंगाल, बिहार व ओडिसा या प्रांतांची दिवाणी बहाल केली. बंगालचा नवाब त्या तीन्ही प्रदेशाचा कारभार पाहत होता. पण तो नामधारीच होता. त्या दुहेरी कारभारामुळे व ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या जुलुमामुळे प्रजेची दुर्दशा झाली. मराठ्यांनीही त्या प्रदेशावर स्वाऱ्या करून खूप लुटालूट केली. इ. स. १७७० मध्ये बिहारात मोठा दुष्काळ पडल्यामुळे लोकांची फारच दैना झाली. पुढे इ. स. १७७२ साली वॉरन हेस्टिंग्ज बंगालचा गव्हर्नर झाला व त्याने कंपनीच्या कारभारात पुष्कळ सुधारणा करून बिहारवर ब्रिटिशसत्ता दृढ केली. बिहारमधील डोंगराळ प्रदेशात आदिवासींच्या अनेक टोळ्या स्वतंत्रपणे वावरत होत्या. त्यांना नमवणे मोगल बादशहांना शक्य झाले नव्हते. ते काम ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आपल्या मुत्सद्दिगिरीने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पार पाडले. त्याच काळात सशस्त्र गोसाव्यांच्या टोळ्या सर्वत्र धुमाकूळ घालू लागल्या होत्या. इंग्रजांच्या सैन्याने त्यांचाही बंदोबस्त केला.

ब्रिटिश राज्य – बिहारच्या काही भागांत, काही सरदार व राजे डोंगराळ प्रदेशात ठाण मांडून ब्रिटिश सत्तेशी लढत राहिले



बाबू कुंवर सिंग

होते. इंग्रजांनी त्यांतील काही जणांचा पराभव केला, तर काही जणांशी सलोखा करून त्यांच्या राज्यांत शिरकाव करून घेतला. कालांतराने इंग्रजांच्या कुटिल राजनीतीमुळे हळूहळू ते प्रदेशही त्यांना मिळाले.

छोटानागपूर, राजमहाल, मानभूम, बाराभूम, घाटशिळा, इ. भागातील आदिवासी लोकांवर कंपनीचे अधिकारी व सावकार जुलुमजबरदस्ती करीत. त्यामुळे त्यांचे जीवन अगदी असह्य झाले होते. इ. स. च्या १९ व्या शतकात मुंड, हो, कोल, संथाळ वगैरे जमातींनी ठिकठिकाणी उठावणी केली. पण इंग्रजांनी सैन्यबळाने ती बंडे मोडून काढली. त्या संघर्षात हजारो आदिवासी मारले गेले व शेकडो मैल मुलूख उजाड झाला. शेवटी ब्रिटिश सरकारने त्या लोकांसाठी खास कायदे व शासनव्यवस्था सुरू करून, त्यांच्यावरील जुलमाला आळा घातला.

अकबराच्या काळी बिहार हा स्वतंत्र सुभा असून, त्याचे सात विभाग होते, त्यांना सरकार असे म्हणत. त्या सात सरकारांत १९९ परगणे होते. मोगलांच्या कारकीर्दीत काही वेळा बंगाल व बिहार या दोन्ही प्रांतांवर एकच सुभेदार नेमलेला असे. मोगलांकडून इंग्रजांना बंगाल, बिहार व ओडिसा या तीन्ही प्रांतांची दिवाणी मिळाली, तेव्हापासून १९१२ पर्यंत ते तीन्ही प्रांत एकत्र होते. १९१२ साली बिहार व ओडिसा हे बंगालपासून वेगळे करण्यात आले आणि १९३७ साली ओडिसा व बिहार हे स्वतंत्र प्रांत झाले.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर संस्थानांचे विलीनीकरण झाले. त्यात बिहार व ओडिसा यांच्या सीमेवरची दोन संस्थाने बिहारमध्ये समाविष्ट करण्यात आली. त्यानंतर भाषावार प्रांतरचनेच्या योजनेमुळे संपूर्ण मानभूम जिल्हा आणि पूर्णिया, संथाल परगणा व सिंगभूम या जिल्ह्यांचा काही भाग एवढा प्रदेश इ. स. १९५६ साली बंगालमध्ये समाविष्ट करण्यात आला.

इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात बिहारमध्येही पुष्कळ धामधूम झाली. या संग्रामात जगदीशपूरचा जमीनदार बाबू कुंवरसिंग याचे नाव विशेष गाजले. तो १८४५ पासून ब्रिटिशविरोधी कारस्थाने करीत होता. १८५७–५८ मध्ये त्याने ब्रिटिश फौजांचा अनेक वेळा पराभव केला. त्याच्याच प्रेरणेमुळे बिहारमधील लढा दीर्घकाळ चालू राहिला होता.

त्यानंतर बिहारमध्ये वहाबी नामक मुस्लिम पंथाने काही वर्षे इंग्रजांविरुद्ध चळवळ केली. ती चळवळ दडपण्यासाठी इंग्रजांना पुष्कळ शस्त्रबळ वापरावे लागले. इ. स. १९ व्या शतकाच्या अखेरीस बिहारमधील आदिवासी लोकांनी ब्रिटिश सत्तेशी पुन्हा लढा सुरू केला. मुंड जमातीतला बिर्सा नामक एक पुरुष त्यांचा नेता होता. जमीनदारांच्या जुलुमामुळे वैतागलेले असंख्य आदिवासी त्याचे अनुयायी झाले. तो धार्मिक प्रवृत्तीचा असल्यामुळे

बिर्सा भगवान

त्याला बिर्सा भगवान असे म्हणत चारपाच वर्षे त्या ब्रिटिश फौजां टक्कर दिली. ण शेवटी फितुमुळे तो शत्रूच्या हाती सापडला व दित अ स ता ना .०० साली मरण ला.

इ. स. ९१७ साली म ांधींनी चं पा र ध ल्या निळीच्य मळ्यांतील ांवर होत अ स ा अन्याय दूर रण्यासाठी सत्याग्रह केला आणि त्यात ते यशस्वी झाले. ळे भारतीय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वातंत्र्याच्या इतिहासात चंपारणला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कारण म. गांधींनी सत्याग्रहाच्या तंत्राचा प्रयोग भारतात प्रथमच केला तो चंपारणमध्ये होय.

धार्मिक इतिहास – बिहारमध्ये वैदिक संस्कृतीचा प्रसार होण्यापूर्वी तिथे असुर लोक वसलेले होते. गयासुर व बळिराजा यांची राज्ये याच प्रदेशात होती, असे म्हणतात. हे असुर लोक मुख्यत: शिवपूजक होते. काही अनार्य लोक नागपूजकही होते. राजगृह हे नागपूजेचे मोठे केंद्र होते. चैत्य व वृक्ष यांची पूजाही त्या काळी प्रचलित होती. निरनिराळ्या वृक्षांवर अतिमानवी शक्ती किंवा मृतात्मे वास करतात व पूजेमुळे ते प्रसन्न होतात, अशी त्या लोकांची श्रद्धा होती. चैत्य म्हणजे यक्ष किंवा दैत्य यांच्या मृत देहावर रचलेले स्मारक होय. अशा चैत्यांना नवस बोलून, ते पूर्ण करताना पशुबळी देण्याची प्रथा होती. यक्षपूजाही त्या काळी प्रचलित होती. कारण धन, आरोग्य, संतती यांची प्राप्ती यक्षांच्या साहाय्याने होऊ शकते, अशी तिथल्या लोकांची श्रद्धा होती.

विदेह माधव याने वैदिक यज्ञप्रधान संस्कृतीचा प्रसार उ. बिहारमध्ये सुरू केल्यावर दीर्घतमा या ऋषीने ते लोण द. बिहारमध्ये म्हणजे मगध व अंग या भागापर्यंत पोचवले. मिथिलाधिपती जनकाने अनेक यज्ञसत्रे केली. अशा सत्रांत तत्त्वज्ञानासंबंधी वादविवाद होत. याज्ञवल्क्य, गौतम हे ऋषी त्याच काळातले. ते मिथिलेचे रहिवासी होते. वैदिक व अनार्य या दोन्ही संस्कृतींचा संपर्क दीर्घ काळ झाल्यानंतर अनार्य लोकांनी वैदिकांचे यज्ञयाग स्वीकारले व आर्यांनी त्यांची काही दैवते स्वीकारली. त्यांच्या संपर्कात आर्य लोक चैत्यपूजाही करू लागले.

कालांतराने वैदिक यज्ञयागांतील कर्मकांडांचा अतिरेक झाल्यामुळे त्याला विरोध करणारे जैन, बौद्ध वगैरे संप्रदाय बिहारमध्येच उदयाला आले. वेदांच्या प्रारंभीच्या काळात संन्यासाश्रमाला महत्त्व दिलेले नव्हते; पण उपनिषत्काळी संन्यासधर्माचा प्रचार सुरू झाला आणि त्यातूनच पुढे बुद्ध व महावीर यांच्यासारख्या तरुणांना संसारत्यागाची प्रेरणा झाली. महावीराचा जन्म बिहारमध्ये झाला आणि जैन धर्माचा उगम व प्रसारही त्याच प्रदेशात झाला. बुद्धाचा जन्म बिहारमध्ये झाला नसला, तरी त्याचे प्रारंभिक जीवन याच प्रदेशात गेले व त्याला बिहारमधील गया नगरीतच ज्ञानप्राप्ती झाली. त्याच्या धर्मोपदेशाचे क्षेत्रही मुख्यत: बिहारच होते.

पूर्वकाळात लोकप्रिय झालेली यक्षपूजा नंतरच्या काळातही चालू राहिली. आर्यांप्रमाणे बौद्ध लोकांनीही चैत्यपूजा स्वीकारली. आर्यांनी स्तूपपूजा अंगिकारली नव्हती, ती बौद्ध संप्रदायाने मन:पूर्वक स्वीकारली आणि बुद्धाच्या देहाच्या अवशेषांवर असंख्य स्तूप बांधले गेले. बौद्ध लोकांनी अनार्यांची वृक्षपूजाही चालू ठेवली व तीच पुढे वैदिकधर्मी लोकांतही मान्यता पावली. यक्षपूजेप्रमाणे नागपूजाही बौद्ध व हिंदू लोकांनी घेतली. मगधात मौर्य वंशाची सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी तिथे वैदिक व पौराणिक धर्मांचाच अधिक प्रसार होता. अग्नी, इंद्र, रुद्र, वरुण, सूर्य, इ. वैदिक देवतांप्रमाणेच शिव, विष्णू, दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, स्कंद या देवतांचीही उपासना लोक करीत होते. हळूहळू भक्तिपंथही प्रचलित झाला. वैष्णव, शैव, बौद्ध, जैन या सर्वच पंथांनी या ना त्या प्रकारे भक्तिमार्ग स्वीकारला. पण सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे मौर्य युगात त्या धर्माचा खूपच प्रसार झाला. त्यानंतर पुष्यमित्र शुंग याने यज्ञयागात्मक वैदिक धर्माचा अंगिकार केल्यामुळे बौद्ध धर्माच्या प्रसाराला पायबंद बसला; पण जैन धर्माचा प्रसार मात्र सर्वत्र अविच्छिन्न चालू राहिला.

त्यानंतरच्या हजारबाराशे वर्षांत बिहारमध्ये पौराणिक हिंदू धर्माचे वर्चस्व होते. गुप्त सम्राट भागवत संप्रदायाचे पुरस्कर्ते असल्यामुळे बिहारमध्ये वैष्णव संप्रदायाचा बराच प्रसार झाला. तथापि शैव, शाक्त, बौद्ध, इ. पंथही तिथे सुखाने नांदत होते.

तारेची मूर्ती – कुर्किहार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हर्षवर्धनाच्या काळी बौद्ध धर्माची चलती होती. पालांच्या राजवटीतही त्याचा पुष्कळ विकास झाला, त्या काळात तंत्रमार्गाचाही खूप प्रसार झाला होता. त्याच काळी या सर्व पंथोपपंथांचा समन्वय साधून भिन्न भिन्न दैवतांची एकत्र पूजा करण्याची प्रथाही सुरू झाली होती.

इ. स. १२०० पासून विहारमध्ये मुसलमानी आक्रमणे सुरू झाली आणि १३०० नंतर तिथे मुस्लिम राज्यही सुरू झाले. हिंदूंची व बौद्धांची मंदिरे नष्ट करून मुसलमानांनी त्या जागी मशिदी व दर्गे उभारले. पुष्कळ हिंदू बाटवले गेले. अनेक सूफी साधू त्यापूर्वीच विहारमध्ये जाऊन धर्मप्रसार करू लागले होते. ते जुलूमजबरदस्ती न करता, लोकांशी सहानुभूतीने वागून, विचारांची देवाण-घेवाण करून आपले कार्य साधीत. त्यामुळे त्यांना धर्मप्रसाराच्या कामात पुष्कळ यश मिळाले.

जाती-जमाती – भारतात प्रोटोऑस्ट्रलाइड, मोंगोलाइड, मेडिटरेनियन व नॉर्डिक या चार वंशांचे लोक असून, बिहारमध्ये ते चारही वंश आढळतात. मुंड, संथाळ, हो, बिरहोर, खरिया, इ. लोक प्रोटोऑस्ट्रलाइड म्हणजे निषाद वंशाचे आहेत. थारू लोकांत मोंगोलाइड वंशाची काही लक्षणे दिसून येतात. उरांव लोक द्रविड म्हणजे मेडिटरेनियन वंशाचे आहेत. बाकीचे लोक ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे नॉर्डिक किंवा आर्य वंशाचे होत. मात्र कोणताही वंश आता शुद्ध स्वरूपात राहिलेला नाही; कारण त्या सर्व वंशांचा संकर झालेला आहे.

निषाद वंशाच्या पंचवीस-तीस भिन्न जमाती असून, त्यांची मुख्य वस्ती छोटानागपूरमधील रांची, हजारीबाग, मानभूम, सिंगभूम, पालामाऊ व संथाळ परगणा या जिल्ह्यांत आहे. इतर जिल्ह्यांतील डोंगराळ भागांतही त्यांची थोडी वस्ती आढळते. हे सर्व लोक आदिवासी या सामान्य नावाने ओळखले जातात. मुंड, हो, संथाळ, उरांव, खरिया, बिरहोर, पहाडी, बिरजिया, असुर, भूमिज, चेरो, थारू, बेदिया, खखार, लोहर, माहली या त्यांतील प्रमुख जमाती होत. त्यांच्यांतील काही टोळ्या अजूनही जंगली अवस्थेत असून, कंदमुळे व शिकार यांवरच त्या आपला जीव जगवतात. काही लोक फिरती शेती करून धान्य पिकवतात. मात्र सांप्रत बरेच आदिवासी कायमची शेती करीत असून, बरेच लोक चहाचे मळे, खाणी, कारखाने व तागाच्या गिरण्या यांत मजुरीही करतात. शहरांशी संपर्क, थोडेसे शिक्षण व ख्रिस्ती मिशनऱ्यांचा उपदेश यांमुळे या आदिवासी लोकांच्या आचारविचारांत फरक पडू लागला आहे. पूर्वी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती व अधिकारी यांचे त्यांच्यावर वर्चस्व होते. रूढी व परंपरा न पाळणाऱ्याला समाज शिक्षा करीत असे. सर्वजण पंचायतीचा अधिकार मानीत असत. आता ती स्थिती राहिली नाही. पूर्वी काही खेडेगावांची मिळून एक मोठी पंचायत असे. तिला पऱ्हा म्हणत. ग्रामपंचायतीवर पऱ्हा पंचायतीचा अधिकार चाले. जातिवहिष्काराची प्रकरणे पऱ्हाकडे अंतिम निर्णयासाठी जात. पण सांप्रत तिचे अधिकारक्षेत्र कमी झाले असून, वरीच प्रकरणे सरकार दिवाणातच निवडली जातात. पूर्वी प्रत्येक गावातील लोकांत जो एकोपा व सहकार दिसत होता, तो आता उरलेला नाही. ग्रामवृद्ध, परंपरा, रूढी यांविषयी कोणाला फारसा आदर वाटत नाही. आखाड्यातील सामुदायिक नृत्याची सर्वांना ओढ वाटत नाही. तरुण व तरुणी यांची सार्वजनिक शयनगृहेही भरलेली नसतात. शहरी जीवनातील धनमाहात्म्य त्या लोकांनही पसरले असून, त्याच्या अनुषंगाने येणारे दोषही त्यांच्यांत शिरले आहेत. तथापि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासी संस्कृतीचे पुनरुत्थान सुरू झाले असून, त्यांच्या जीवनाला पुन्हा निराळे वळण लागू पाहत आहे. त्यात पूर्वीच्या जीवनातील नृत्य, पऱ्हा वगैरे चांगल्या गोष्टी आणि नवजीवनातील सुखसोयी यांचा मिलाफ झालेला दिसून येतो.

देवधर्म – सर्व आदिवासी जमातींचे लोक सर्वशक्तिमान व दयाळू अशा परमेश्वराला मानतात. कोणी त्याला धर्मेस किंवा सिंग बोंगा म्हणतात, तर कोणी भगवान, कोणी चंदो, तर कोणी ठाकूर म्हणतात. सिंग बोंगाने सत्य धर्माच्या प्रसारासाठी चाळा पच्चो किंवा जोहर नावाच्या देवीला आणि कदलेटा, देशबली, दहाचंडी, महदनिया चुल्हा, इ. तिच्या शिष्यांना पृथ्वीवर पाठविले, असे ते मानतात. या भिन्न देवांची पूजा वेगवेगळ्या सणांच्या प्रसंगी केली जाते. याशिवाय सूर्य, चंद्र, पृथ्वी, अग्नी, जल आणि वायू याचीही पूजा हे लोक करतात. या सर्वांना ते कोंबड्याचा बळी देतात. हे लोक क्षुद्र दैवतांची व भुताखेतांचीही पूजा करतात.

सण व उत्सव – बिहारी लोकांचा धार्मिक उत्साह त्यांच्या सणांत व उत्सवांत दिसून येतो. वसंतपंचमी, होळी, दसरा, दिवाळी, छठ व त्रिपुरी पौर्णिमा हे त्यांचे महत्त्वाचे सण होत. वसंतपंचमीला सरस्वतीपूजा करतात. त्या वेळी सरस्वतीच्या शाडूच्या शुभ्र व नाजूक मूर्ती चौकाचौकांत बसवतात. मूर्तीला पिवळी साडी नेसवून खूप सजवतात. ती सजावट पाहायला लोकांची पुष्कळ गर्दी होते. सर्वांना बुंदी, केळी, खोबरे, इ. पदार्थ प्रसाद म्हणून वाटतात. दुसऱ्या दिवशी सरस्वती–विसर्जन करतात. शिमग्याचा सण फार उत्साहाने साजरा केला जातो. पण लोक होळ्या पेटवीत नाहीत. लहान–थोर, बायका–मुले, सकाळी रंग खेळतात, मग मिठाईचे भोजन करतात. संध्याकाळी सर्व लोक नवे कपडे घालून गुलाल खेळतात. दसरा हा सणही फार महत्त्वाचा आहे. बंगालप्रमाणेच बिहारमध्ये दुर्गापूजा-उत्सव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

थाटाने केला जातो. दिवाळीत घरोघर पणत्या व आकाशदिवे लावून रोषणाई करतात, फराळाचे पदार्थ करतात, मुले मातीची घरे बांधतात व फटाके उडवतात. पण दिवाळी फक्त अमावास्येला एकच दिवस असते. त्या दिवशी वहीपूजन व लक्ष्मीपूजन होते. बलिप्रतिपदेला बहुतेक देवळांत अन्नकूट होतो.

कार्तिक शुद्ध षष्ठीला स्त्रिया छठ नामक व्रत करतात. पंचमीला सकाळपासून उपवास करून संध्याकाळी घरी दळलेल्या गव्हाचे खजुरा (शंकरपाळे) खातात. षष्ठीला उपवास असतो. सूर्यास्ताच्या वेळी नदीवर किंवा तळ्यावर जाऊन स्नान करतात व सूर्याला अर्घ्य देतात. मग केळी, पपनस, ऊस, संत्री, इ. पदार्थांचा नैवेद्य दाखवतात. दुसऱ्या दिवशी पहाटे नदीवर जाऊन पूजा करून व्रताची समाप्ती करतात. मग घरोघरी प्रसाद पाठवतात. बिहारी जीवनात या व्रताला फार मानाचे स्थान आहे. त्रिपुरी पौर्णिमेला लोक पहाटे गंगास्नान करतात. सोनपूर येथे मोठी जत्रा भरते. त्या जत्रेत गुरांचा मोठा बाजार भरतो, त्यात शेकडो हत्तीही विकायला आणलेले असतात.

या व्यतिरिक्त राखीपूनम, जन्माष्टमी, तीज, इ. बारीकसारीक परब म्हणजे सण पुष्कळ असतात. भाद्रपद तृतीयेला स्त्रिया हरतालिकेची पूजा व उपवास करतात.

आदिवासी लोकांचे काही वेगळे सण आहेत. सरहूल हा त्यांतला सर्वांत मोठा सण होय. काही ठिकाणी हा सण चैत्रात साजरा केला जातो, तर छोटानागपूरमध्ये वैशाखी अमावास्येला. पुरातन काळी एक राक्षस गावातील माणसांना मारून खात असे. त्याच्या त्रासाला कंटाळून सर्वजण रोज देवाची प्रार्थना करीत. मग देव गुराख्याचे रूप घेऊन आला आणि सर्व गुराख्यांना एकत्र जमवून त्याने त्या राक्षसाला ठार मारले. तो आनंदाचा प्रसंग सर्व लोकांनी नाचून गाऊन साजरा केला आणि देवाला कोंबड्यांचा बळी दिला. दरवर्षी त्या सणाला लोक चाळा पच्चो देवीची पूजा करतात. रात्रभर नाच करतात व वृद्ध लोक उपवास करतात, लोक गावात हिंडून सरईची फुले वाटतात.

सरहूलच्या खालोखाल करमा सणाचे महत्त्व आहे. त्या दिवशी तरुण–तरुणी उपवास करतात व वृद्ध लोक कदलेटा देवाची पूजा करतात. हा सण राजी करम, जितिया करम, दशहरा करम व इन्दे करम अशा भिन्न नावांनी भिन्न ऋतूंत साजरा केला जातो.

दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी सोहराई नावाचा सण असतो. त्या वेळी सर्वजण घरातल्या गाई–गुरांना न्हाऊ घालून सजवतात व त्यांची पूजा करतात. संथाल लोक हा सण मार्गशीर्ष–पौष महिन्यांत भाताचे पीक हाती आल्यानंतर साजरा करतात.

या सर्व सणांच्या प्रसंगीं अनेक गावांतील वा टोळ्यांतील लोक एकत्र जमून नाच-गाण्याचा कार्यक्रम करतात. तिथे मोठी जत्रा भरते. तरुण–तरुणी रस्त्याने वाजत–गाजत जत्रेला जातात. सेंदरा म्हणजे शिकार हीदेखील आदिवासींना पर्वणीच वाटते. फाल्गुन महिन्यात फग्गू सेंदरा असते. कृष्ण पक्षाच्या पहिल्या आठवड्यात चंडीची पूजा करून मग शिकारीला जातात. ही शिकार होळीच्या आधी तीन दिवसपर्यंत चालते. या शिकारीत तरुणीही भाग घेतात. बिसू सेंदरा तीन वर्षांत एकदा होते. त्या शिकारीत सर्व पुरुषांना भाग घ्यावा लागतो. स्त्रिया मात्र रात्रभर नाच-गाण्याचा कार्यक्रम करतात. जनी सेंदरा ही शिकार बारा वर्षांतून एकदा होते. त्या शिकारीत स्त्रिया पुरुषवेष करून भाग घेतात. उराँव लोकांच्या गावावर



कोचेश्वरमंदिर – कांच

पूर्वी एकदा मुसलमानांची धाड आली, तेव्हा सगळे पुरुष सरहूलच्या सणामुळे दारू पिऊन बेहोश झालेले होते. मग सर्व स्त्रियांनी पुरुष-वेष व हत्यारे घेऊन गावाचे संरक्षण केले. त्यांच्या त्या पराक्रमाची आठवण म्हणून शिकारीचा हा प्रकार केला जातो. शिकारीला जाणे हा देवाचा आदेश आहे, असे आदिवासी लोक मानतात.

होळी व दसरा हे सणही आदिवासी लोक आता मोठ्या उत्साहाने करू लागले आहेत.

बिहारमध्ये असलेल्या नॉर्डिक किंवा आर्य वंशातील प्रमुख जाती अशा : ब्राह्मण – पूर्वी यांचे प्रमुख व्यवसाय पूजाअर्चा, पौरोहित्य, अध्यापन व ज्योतिषकथन हे होते. पण सांप्रत अनेक ब्राह्मण शेती, व्यापार कारकुनी व सैन्यात नोकरी करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काहीजण आचारी व पाणकेही आहेत. सारस्वत, कान्यकुब्ज, शाकद्वीपी, मैथिली, इ. त्यांच्या पोटजाती आहेत.

बभन – बिहारमधली ही एक प्रतिष्ठित जात आहे. त्यांची नावे व गोत्रे ब्राह्मणांप्रमाणेच आहेत; मात्र काही नावे राजपुतांसारखी राय, सिंग, ठाकूर अशी आहेत. त्यांची व राजपुतांची श्रेणी सारखीच आहे. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय असून, त्यांच्यांतील बहुतेक जण जमीनदार आहेत.

राजपूत – हे क्षत्रिय असून, त्यांचे प्रादेशिक पोटभेद बरेच आहेत. यांच्यांतील बहुतेकजण आता शेती, व्यापार किंवा नोकऱ्या करतात. खेतौरी, खत्री व भाट हेही आपल्याला क्षत्रिय मानतात.

वैश्य – यांच्या अग्रवाल, माहेश्वरी, पुरवार, बर्नवाल, राउनिमार, रस्तोगी, माहुरी, इ. पोटजाती आहेत. हे लोक बहुधा व्यापार करतात.

कायस्थ – ब्राह्मणांप्रमाणेच हे लोक सुशिक्षित असून, पूर्वीपासून लेखनाचे काम करतात. सांप्रत ते सर्व क्षेत्रांत यशस्वी झाले आहेत.

शूद्र – यांची संख्या सर्वांत जास्त असून, त्यांचे हलवाई, वरुई, माळी, धानुक, कंडू, भडभुंजे, कोइरी, कूर्मी, कहार, ग्वाल, कुंभार, लोहार, बढई (सुतार), हजाम (नापित), मल्ल, वलदार, तंती, तेली, धोबी, मुशाहर, दोसाध, इ. पुष्कळ पोटभेद आहेत.

चांभार व डोम या दोन पूर्वास्पृश्य जाती आहेत.

भाषा – हिंदी, बंगाली व उर्दू या बिहारमधील प्रचलित भाषा होत. शुद्ध हिंदी भाषा कुठेच बोलली जात नाही, पण शाळांतून मात्र शिकवली जाते. भोजपुरी, मैथिली व मगही या बिहारमधल्या प्रमुख बोली आहेत. बिहारच्या पश्चिम भागात भोजपुरी, दक्षिण भागात मगही व मिथिलेत मैथिली भाषेचा उपयोग होतो. त्यांतील मैथिली बोली सर्वांत अधिक समृद्ध आहे. छोटानागपूरमधील कुर्मा लोक कूर्माली बोली बोलतात. कूर्माली हे हिंदी भाषेचेच एक रूप आहे. इतर आदिवासी संथाळी, मुंडारी, मलहरा, गोंडी, इ. बोली बोलतात.

प्राचीन मगधाची राजधानी पाटलिपुत्र जिथे होती, त्याच जागी सांप्रतचे पाटणा नगर वसलेले आहे. प्राचीन नगरीचे कोणतेही अवशेष आज तिथे पाहायला मिळत नाहीत. ते भूगर्भात खूप खोल असण्याचा संभव आहे. पाल वंशाच्या राजवटीनंतर शेरशाहा सूर याच्यापर्यंतचा या नगराचा इतिहास अज्ञातच आहे. शेरशाहाने या नगराला नवा तट बांधला, त्याचा काही भाग नदीच्या पात्रात, उन्हाळ्यात पाण्याची पातळी खाली गेल्यानंतर पाहायला मिळतो. त्याच वेळी नवीन नगराची उभारणी सुरू झाली. त्यानंतर मोगल बादशाहांच्या सुभेदारांनी या नगराची शान खूप वाढवली. इ. स. च्या १८ व्या शतकात पाटणा हे एक समृद्ध व्यापारी नगर बनले होते. तिथे अनेक भव्य प्रासाद, मशिदी व बागा निर्माण झाल्या होत्या. काही मशिदींचे भग्नावशेष अजून पाहायला मिळतात. शेरशाहाने बांधलेली शाही मशीद शिल्पकलेच्या दृष्टीने फार प्रेक्षणीय होती.

त्या मध्ययुगातील नगराचे जे अवशेष उरले आहेत, त्यांवरून ध्यानात येते, की पाटणा नगर घोडयाच्या नालाच्या आकाराचे होते व त्याची दोन्ही टोके गंगेच्या किनाऱ्यावर होती. इ. स. च्या १८ व्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा हे शहर इंग्लिश लोकांच्या ताब्यात गेले, तेव्हा त्यांनी बंकीपूर ही नवी वसाहत स्थापून तिथे आपल्या वखारी घातल्या.

त्या काळात बिहारमध्ये वरचेवर दुष्काळ पडत असे, म्हणून धान्याचा साठा करून ठेवण्यासाठी वॉरन हेस्टिंग्जच्या प्रेरणेने पाटणा येथे एक गोलघर बांधण्यात आले. त्याची उंची ९६ फूट असून, त्याच्या भिंती तळाशी १३ फूट जाड आहेत. त्याची

हरमंदिर – पाटणा

दारे आत उघडणारी असल्यामुळे, वरच्या तोंडातून धान्य त्यात भरल्यानंतर ती दारे उघडणे शक्य नव्हते. मात्र त्यात कधीच धान्य साठविले गेले नाही, असे म्हणतात.

जुन्या शहरात फारसे काही उरलेले नाही. इथलेशिखांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हरमंदिर हे गुरू गोविंदसिंहाचे स्मारक म्हणून फार प्रसिद्ध आहे.

तीर्थस्थाने – गयेचे विष्णुपदमंदिर व वैद्यनाथधाम येथील शिवमंदिर ही बिहारमधली श्रेष्ठ तीर्थस्थाने होत. भारताच्या सर्व भागांतून लाखो लोक प्रतिवर्षी तिथे यात्रेला जातात. सोनपूर येथील हरिहरमंदिरही फार प्रसिद्ध असून, तिथे कार्तिकी पौर्णिमेपासून एक महिनाभर यात्रा चालू असते.

बोधगया व राजगृह ही बौद्धांची तीर्थक्षेत्रे आणि वैशाली, पावापुरी, पारसनाथ व चंपा ही जैनांची तीर्थक्षेत्रे होत.

शिल्प – बिहारमध्ये मौर्यपूर्व काळातील शिल्पकाम कुठेही आढळत नाही. कारण त्या काळी बांधकामासाठी विटा, लाकूड व मार्ती वापरीत असावे. अशा प्रकारचे प्रासाद व स्तूप नष्ट झाले असण्याची शक्यता आहे. राजगृह नगरीभोवती एक दगडी कोट बांधलेला होता, त्याचे भग्नावशेष मात्र अजूनही तिथे आहेत. त्या कोटाची लांबी ३० मैल, उंची १२ फूट व जाडी १८ फूट होती. मोठाले अवघड पाषाणखंड एकावर एक व्यवस्थित रचून तो कोट बनवलेला होता. त्याचा काही भाग अजून शाबूत आहे.

वैदिक, बौद्ध व जैन साहित्यात मौर्यपूर्वकालीन शिल्प, कोरीव काम, धातुकाम, विणकाम यांविषयी पुष्कळ उल्लेख आढळतात. प्राचीन काळी भिन्न भिन्न कारागिरांच्या संघटना होत्या. पाली साहित्यावरून नगररचनेचे शास्त्र त्या काळी किती विकास पावले होते, हे समजते. मौर्य-युगात नगररचना व शिल्पकाम यांत पाषाणाचा वापर सुरू झाला. पूर्वीच्या काष्ठकलेच्या प्राचीन परंपरेतूनच मौर्यकालीन कलेचा नवा आविष्कार झाला. मशकवती, तक्षशिला, शाकल व पाटलिपुत्र या मौर्यकालीन नगरांची सुरेख रचना आणि विलक्षण शिल्पकाम पाहून ग्रीक लोक स्तिमित झाले होते.

अशोकाने उभारलेले चार पाषाण–स्तंभ बिहारमध्ये अनुक्रमे कोल्हुआ, लौरिया अरेराज, लौरिया नंदनगड व रामपुरवा या गावी सापडले आहेत. हे स्तंभ अत्यंत चमकदार असून, त्यांतील तीन स्तंभाच्या शिरोभागी सिंह आहेत व एकावर बैल आहे. त्या काळातील यक्षमूर्ती पाटण्याजवळ सापडल्या आहेत. गयेपासून सोळा मैलांवर बराबर टेकड्या असून, तिथे पहाडात खोदलेली मौर्यकालीन लेणी आढळतात. ती लेणी म्हणजे चैत्य सभागृहे होत. त्यांचा अंतर्भाग अगदी चमकदारआहे. त्यांतील एक गुहा लोमश ऋषीच्या नावाने प्रसिद्ध असून, तिचा दर्शनी भाग कमानदार आहे. पाटणा जिल्ह्यात लोहानिपूर येथे जैन तीर्थंकरांच्या दोन मूर्ती सापडल्या आहेत. त्यांचे स्वरूप व चमक यांवरून त्या मौर्यकालीन वाटतात.

शुंग व काण्व यांच्या कालात स्तूप उभारले गेले आणि यक्ष व नाग यांच्या मूर्ती निर्माण झाल्या. मोठाले स्तूप आणि त्यांभोवती वेदिका व तोरणे हे त्या काळातल्या बौद्ध शिल्पाचे वैशिष्ट्य होय.

नागिणीची मूर्ती – मणियार मठ

गुप्तकाळात सर्वत्र समृद्धी झाल्यामुळे सर्व कलांचा खूप विकास झाला. बोधगया-येथील बुद्धाची मूर्ती इ. स. च्या ४ थ्या शतकातली आहे. भारतात व इतर देशांतही बौद्ध मूर्तिकलेच्या क्षेत्रांत ही मूर्ती आदर्श मानली जाते. पाटण्याजवळ कुम्रहर येथील उत्खननात गुप्तकालातील अनेक पाषाणमूर्ती व मातीची चित्रे सापडली आहेत. त्याचप्रमाणे राजगीर (राजगृह), नालंदा व वैशाली येथेही गुप्त-शिल्पाचे उत्कृष्ट नमुने गवसले आहेत. राजगीर येथील मणिनागाचे मंदिर मणियार मठ या नावाने प्रसिद्ध आहे. त्याची रचना विलक्षण असून, त्याच्या बाहेरच्या अंगावर, कोनाड्यात विष्णू, गणेश, नाग व नागिण यांच्या अनेक मूर्ती आहेत. त्यांतील नागिणीची मूर्ती अत्यंत सुडौल व भावपूर्ण वाटते. वैशाली येथील दोन चतुर्मुख शिवलिंगे व कार्तिकेयाची एक सुंदर मूर्ती ही शिल्पे विशेष उल्लेखनीय आहेत. नालंदा येथील बुद्धाच्या व बोधिसत्त्वांच्या मूर्ती इ. स. च्या ६ व्या शतकातल्या असून, त्यांची घडण फार नाजूक आहे. सुलतानगंज येथे सापडलेला बुद्धाचा ब्राँझचा भव्य पुतळा म्हणजे गुप्तकालीन शिल्पाचे उत्कृष्ट उदाहरण होय. मुखावरील स्मित व दिव्य भाव यामुळे ही मूर्ती अद्वितीय मानली जाते.

गुप्तकालीन साहित्य आणि चिनी प्रवाशांचे वृत्तांत यावरून असे ध्यानात येते, की त्या काळी बिहारमध्ये जागोजागी विशेषतः वैशाली, नालंदा, बोधगया, राजगीर, पाटणा, इ. नगरांमध्ये शेकडो स्तूप, विहार व मंदिरे निर्माण झाली होती. युआन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

च्वांगने ती प्रत्यक्ष पाहून त्यांचे वर्णन केले आहे. त्याला काही मंदिरे २००-३०० फूट उंच आढळली. एका जागी त्याने बुद्धाचा ८० फूट उंच तांब्याचा पुतळा पाहिला होता; पण त्या काळातली बहुतेक शिल्पे आता नष्ट झालेली असून, काहींचे भग्नावशेष तेवढे पाहायला मिळतात. बोधगया येथील शिखरयुक्त-मंदिर मात्र उत्तम स्थितीत राहिले आहे. काही पंडितांच्या मते ते इ. स. च्या ५ व्या शतकातले आहे. नालंदा येथील उत्खननात स्तूपांचे व मंदिरांचे अवशेष सापडले आहेत. त्यांत अनेक सुंदर बौद्ध व पौराणिक मूर्तिशिल्पे

बुद्धाचा पुतळा — सुलतानगंज

आढळतात. शहावाद जिल्ह्यात रामगढ येथे एका टेकडीवर जे मंडलेश्वराचे मंदिर आहे, ते इ. स. च्या ७ व्या शतकातले



मुंडेश्वरीचे मंदिर — रामगढ

असून, सांप्रत त्याला मुंडेश्वरीचे मंदिर असे म्हणतात. ते अष्टकोनी असून, त्याचा व्यास ४० फूट आहे. त्यात सर्वत्र सुरेख नक्षीकाम व दर्शनीय असे मूर्तिशिल्पकाम केलेले दिसते.

वैशाली, नालंदा, पाटणा, कुम्रहर, चौसा, इ. जागी गुप्तकालीन मातीच्या मूर्ती व विविध वस्तू मिळाल्या आहेत. त्यांत तत्कालीन लोककलेचे अनेक सुंदर नमुने पाहायला मिळतात.

गुप्त परंपरेतूनच पालयुगातील कला विकसित झाली हे खरे; पण गुप्तकालीन शिल्पापेक्षा पालयुगीन कला कमी प्रतीची वाटते. पालयुगात तंत्र व शास्त्र यांना विशेष महत्त्व दिले गेले. त्यामुळे कलेची प्रतिष्ठा अभंग राहिली, तरी तिचे आध्यात्मिक मूल्य कमी झाले, असे तज्ञांचे मत आहे.

या काळातील कलाविलास मुख्यतः बौद्ध विहारांत झाल्यामुळे बौद्ध देवतांच्या असंख्य मूर्ती विविध रूपांत तयार केलेल्या आढळतात. त्यांत तांत्रिक देवतांची संख्याही मोठी आहे. बौद्ध देव व त्यांची शक्ती यांच्या यब्युम म्हणजे आलिंगनावस्थेतील मूर्ती या काळात पुष्कळ निर्माण झाल्या. नालंदा, बिहारशरीफ, राजगीर, बोधगया, कुर्किहार, गुंडेरी, बिशनपूर, घारावत, इ. जागी अशा असंख्य मूर्ती सापडल्या आहेत. त्यांतील बुद्ध, मैत्रेय, अवलोकितेश्वर व नागार्जुन यांच्या मूर्ती अत्यंत सुरेख आहेत. त्या काळात अलंकरणाची आवड इतकी वाढली होती, की विरागी बुद्धालाही मूर्तिकारांनी मुकुट, हार, इ. आभूषणांनी नटवून टाकले. नालंदा व कुर्किहार येथील ब्राँझच्या मूर्तीही विलक्षण सुंदर आहेत. इ. स. च्या ९ ते ११ व्या शतकांत त्या निर्माण झाल्या. त्यांतील नालंदाची अवलोकितेश्वराची द्विभुज मूर्ती व कुर्किहारची तारामूर्ती अप्रतिम ठरल्या आहेत.

बौद्ध शिल्पाप्रमाणेच त्या काळात बिहारमध्ये शैव व वैष्णव शिल्पेही पुष्कळ निर्माण झाली. शैव शिल्पात उमा-महेश्वरांच्या मूर्ती विशेष लोकप्रिय होत्या. सिंगभूम जिल्ह्यात बेणुसागर येथे त्या काळातील अनेक मंदिरे व असंख्य मूर्ती यांचे भग्नावशेष सापडले आहेत.

त्या काळातील बौद्ध शिल्पकलेचा प्रभाव नेपाळ, तिबेट, ब्रह्मदेश, सयाम, इ. देशांतील शिल्पकलेवरही पडलेला दिसून येतो. बिहारमध्ये त्या काळात जे सुशोभित स्तूप निर्माण झाले, ते भारतात व इतर देशांतही नमुनेदार मानले गेले आहेत. पाल युगातील विहार व मंदिरे यांचेही भग्नावशेष जागोजागी सापडले आहेत; पण त्यांची संख्या कमी आहे. गयेपासून सुमारे १८ मैलांवर कोंच नामक गाव आहे. तिथे अनेक मंदिरांचे भग्नावशेष विखुरलेले आहेत. मात्र त्यांपैकी केवळ विटांचे बांधलेले एक प्राचीन मंदिर अजून उभे आहे. त्याची उंची सुमारे ७० फूट असून, ते दुमजली आहे. वरचा भाग म्हणजे उंच शिखरच होय. या मंदिरावरूनच बोधगया येथील महाबोधी मंदिराची रचना केली असावी, असे वाटते. पण कोंच येथील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंदिराचा काळ निश्चित समजत नाही. काहींच्या मते ते इ. स. च्या ८ व्या शतकातले असावे. बोधगयेच्या मंदिरा-



शेरशहाची कबर – ससराम

प्रमाणे कोंचच्या मंदिराच्या बाजू सरळ नसून शिखराच्या कडा वक्र आहेत. त्याच्या बाह्यांगावर कोनाडे, मूर्ती व नक्षीकाम मुळीच नाही. त्या मंदिरात कोचेश्वर महादेवाचे लिंग असून, दशावतारांची चित्रेही कोरलेली आहेत.

इ. स. १२०० नंतरच्या काळात बिहारमध्ये राजकीय परिस्थिती अस्थिर असल्यामुळे फारसे शिल्पकाम झाले नाही. शेरशाहाच्या वेळी त्याला पुनश्च चालना मिळाली. शेरशाहाचा बाप हसनखान व स्वतः शेरशाहा यांची ससराम येथील स्मारके प्रेक्षणीय आहेत. ती दोन्ही अष्टकोनी असून, दिल्ली येथील सय्यद व लोदी सुलतानांच्या स्मारकांप्रमाणे बांधलेली आहेत. शेरशाहाची कबर एका तळ्यात बांधलेली आहे. या शिल्पात विपुल नक्षीकाम व विविध प्रकारचे सुंदर रंग वापरलेले होते. ही इमारत भव्यता, सुबद्ध रचना व रेखीव सौंदर्य या तीन्ही दृष्टींनी अप्रतिम आहे. हिच्या शिल्पकामात हिंदू शिल्पपरंपरेची पुष्कळ लक्षणे दिसून येतात.

ससरामजवळच शेरगड नावाचा किल्ला एका विस्तीर्ण पठारावर बांधलेला आहे. त्याचा कोट शेरशहानेच बांधला. त्या कोटाच्या आतील इमारतींचे अवशेष पाहता असे वाटते, की या किल्ल्यावरूनच दिल्लीचा पुराणा किल्ला बांधला असावा. शेरशाहाने पाटणा येथे बांधलेली मशीदही प्रेक्षणीय आहे.

चित्रकला – पालांच्या राजवटीत या प्रदेशात हस्तलिखित पोथ्यांवर चित्रे रंगवण्याची एक पद्धती विकसित झाली. बुद्धाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे आणि निरनिराळ्या बौद्ध देवतांचे चित्रण पोथ्यांवर नाना प्रकारच्या रंगांत केलेले आढळते. त्या चित्रणावर तांत्रिक पंथाचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

भारतात मोगल वंशाची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर चित्रकलेची नवीन शैली उदयाला आली, तिला मोगल शैली म्हणतात. पाटणा–शैली ही मोगल शैलीचीच पोटशाखा आहे. या पोटशाखेचा विकास इ. स. च्या १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. शिवलाल व शिव दयाळ हे दोन चित्रकार त्या शैलीचे आधारस्तंभ मानले जातात. या पद्धतीच्या चित्रांत मुख्यतः सामान्य लोकांच्या जीवनाचे चित्रण केलेले आढळते.

सांस्कृतिक परंपरा – रामायणकालापासून बिहारची भूमी प्रसिद्ध आहे. मिथिलाधिपती जनक हा राजर्षी होता. तो शूर होता, तसाच विद्वानही होता. मिथिला नगरी विद्येचे महान केंद्र होते. महाभारतकालात मगधराज जरासंधाने एक विशाल साम्राज्य स्थापले होते. त्याच वेळी अंग प्रदेशावर दानशूर कर्णाचे राज्य होते. ऐतिहासिक काळात चंद्रगुप्त मौर्याने मगधाचे पहिले साम्राज्य निर्माण केले. त्याच मौर्य वंशात महान सम्राट अशोक जन्माला आला. यवनांचा संपूर्ण पराभव करून भारतात वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करणारा पुष्यमित्र याच भूमीचा सुपुत्र

अवलोकितेश्वर – नालंदा

होता. त्यानंतर सुमारे पाचशे वर्षांनी गुप्त वंशाचे साम्राज्य व सुवर्णयुग सुरू झाले ते याच प्रदेशात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याज्ञवल्क्य व गौतम हे महापंडित मिथिलेचे रहिवासी होते. गौतम बुद्ध व महावीर यांच्या संचारामुळे ही भूमी पुनीत झालेली आहे. सिद्धार्थाला ज्या वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधिवृक्ष बिहारमध्येच आहे. बिहारमध्ये अनेक बौद्ध पंडित होऊन गेले आणि बौद्ध परिषदाही झाल्या. बौद्ध धर्माच्या इतिहासात बिहारला सर्वोच्च स्थान प्राप्त झाले आहे. जैन धर्माचा प्रसारही प्रारंभी बिहारमध्येच झाला. अंतिम तीर्थंकर महावीर याची हीच कर्मभूमी होय. बिहारमध्ये हिंदू, बौद्ध व जैन लोकांची पुष्कळ तीर्थक्षेत्रे आहेत. शिखांच्या दृष्टीनेही बिहारची भूमी पवित्र ठरली आहे; कारण गुरू गोविंदसिंहाचा जन्म पाटणा येथे झाला होता.

मिथिलेची ज्ञानपरंपरा पुढे पाटलिपुत्र, नालंदा व विक्रमशिला या नगरांत चालू राहिली. ही विद्यापीठे बौद्ध विहारांत उगम पावली व जगद्विख्यात झाली. प्रसिद्ध गणिती आर्यभट्ट हा बिहारचा रहिवासी होता. भारतीय तत्त्वविद्येचे महान पंडित मंडनमिश्र, वाचस्पती मिश्र व उदयनाचार्य हे बिहारमध्ये होऊन गेले. कुमारिल भट्ट, प्रभाकर व मुरारी मिश्र हे मीमांसाकारही बिहारीच होते, असे म्हणतात. प्रसिद्ध बौद्ध पंडित दीपंकर श्रीज्ञान हा बिहारमध्येच जन्मला. मिथिलेची ज्ञानपरंपरा मिथिला नगरीत इ. स. च्या १५ व्या शतकापर्यंत चालू होती.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतले एक महान नेते व स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद हे बिहारच्या भूमीचेच सुपुत्र होत. [बि. थ्रू ए.; प्रा. मौ. वि.; भा. क. वि. दे.; हिं. वि. को.; टें. ली. वि.; वि. ज. स्मा. ग्रं.]

विहारिन देव

(इ. स. चे १६ वे शतक) हरिदासी संप्रदायातील एक श्रेष्ठ आचार्य आणि रसिक भक्तकवी. हा दिल्लीत राहत असे. शूरध्वज ब्राह्मण कुळात त्याचा जन्म झाला. मित्रसेन हा त्याचा बाप असून, त्याला अकबराच्या दरबारात बराच मान होता. वडिलांच्या मृत्यूनंतर विहारिन देवालाही तो मान मिळाला. परंतु विहारिन देव स्वभावतःच विरक्त असल्यामुळे त्याने तो मान सोडून वृंदावनाची वाट धरली आणि तिथे तो श्रीकृष्णाचे भजनपूजन करून राहू लागला. विठ्ठल विपुल देव हा याचा गुरू होय.

विहारिन देवाला हरिदासी संप्रदायात खूप मान आहे. या संप्रदायाचे तत्त्वज्ञान यानेच मांडले आहे.

विहारिन देवाची काव्यरचना दोन भागांत विभागली जाते. एका भागात सिद्धान्तरूप दोहे व दुसऱ्या भागात शृंगारपर पदे आहेत. सिद्धान्तरूप दोह्यांची संख्या सुमारे ८०० असून, शृंगारपर पदे सुमारे ३०० आहेत. सिद्धान्तांच्या दोह्यांत नित्यविहार आणि रसोपासना यांचे विवरण आहे. शृंगारपर पदांत राधाकृष्णांच्या नित्य लीला निबद्ध आहेत. याचा श्रीकृष्ण हा अजन्मा, नित्यकिशोर आणि नित्यविहारी आहे. राधा-कृष्णांच्या नित्य लीलांत भोजन, नृत्य, इ. सर्व विषय आहेत. सखीभावाने उपासना केली तर श्रीकृष्ण प्राप्त होतो, असे विहारिन देवाचे म्हणणे आहे. विहारिन देवाची ही सर्व पद्यरचना जवळजवळ मधुराभक्तीने भरलेली आहे. त्याच्या भाषेत सर्वत्रच तीव्रता व सरसता आहे. [ब्र. कृ. मा. म.]

बिहारी भाषा

प्रामुख्याने बिहारमध्ये बोलली जाणारी भाषा. बिहारीत भोजपुरी, मैथिली व मगही या तीन बोलींचा समावेश होतो. बिहारी भाषांची उत्पत्ती मागधी अपभ्रंशापासून झाली, असे मानतात. बिहारच्या बाहेरही बिहारी बोलली जाते. पश्चिमेला उत्तर प्रदेशाच्या गोरखपूर व बनारस या प्रदेशांत, दक्षिणेला छोटानागपूरच्या पठारावर, उत्तरेला हिमालयाच्या तराईपासून मानभूमपर्यंत व नैर्ऋत्येला मानभूमपासून वायव्येकडील प्रदेशापर्यंत ही भाषा बोलली जाते. बिहारीभाषिक प्रदेशात साहित्याची भाषा म्हणून हिंदीचाच उपयोग करतात. बिहारी लिहिण्यासाठी तीन लिप्यांचा उपयोग करतात. बिहारीच्या मुद्रणासाठी देवनागरी लिपीचा व हाताने लिहिताना कैथी लिपीचा वापर करतात आणि मैथिली ब्राह्मण आपल्या व्यक्तिगत व्यवहारासाठी मैथिली लिपीचा उपयोग करतात. पाहा – भोजपुरी भाषा, मैथिली भाषा, मगही भाषा. [भा. भा. स.; भो. भा. सा.; हिं. सा. को.]

बिहारीलाल

(१६०३ ते १६६३ इ. स.) हिंदी भाषेचा एक श्रेष्ठ कवी. याला बिहारी असेही म्हणतात. हा ग्वाल्हेर येथे जन्मला. याच्या पित्याचे नाव केशवराय असे होते. याचा विवाह मथुरेतील एका माथुर ब्राह्मणाच्या कन्येशी झाला होता. याला मूलबाळ नसल्यामुळे याने आपला भाचा निरंजन याला दत्तक घेतले होते.

वयाच्या सातव्या-आठव्या वर्षी हा वडिलांबरोबर ओरछा येथे राहायला गेला. तिथे त्याने हिंदीचे प्रसिद्ध कवी व आचार्य केशवदास यांच्याकडे काव्यशास्त्राचे अध्ययन केले. पुढे आग्रा शहरी जाऊन त्याने उर्दूचे व फारसीचेही शिक्षण घेतले. तिथे प्रसिद्ध कवी अब्दुर्रहीम खानखाना याच्याशी त्याचा परिचय झाला. खानखान्याची प्रशंसा करणारे काही दोहे याने लिहिले व त्यामुळे प्रसन्न होऊन त्याने याला पुरस्कार दिला, अशी एक किंवदंती आहे.

शाहजहान बादशहाचा याच्यावर लोभ होता. तसेच जोधपूर,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुंदी, इ. संस्थानांकडूनही त्याला पुरस्कार मिळत होता. आमेरच्या व जयपूरच्या राजांशीही त्याचा संबंध आला होता. एकदा तो तिकडे गेला असता त्याला आढळून आले, की आमेरचा राजा जयसिंह हा रात्रंदिवस आपल्या नूतन परिणीत राणीच्या सहवासात असतो व राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करतो. म्हणून त्याला ताळ्यावर आणण्यासाठी बिहारीने एक दोहा रचून तो माळणीबरोबर त्याच्याकडे पाठवला, तो असा–

नहिं पराग, नहिं मधुर मधु, नहिं विकास यहिं काल ।
अली कली ही सों बंध्यो, आगे कौन हवाल ।।

अर्थ – पराग नाही, गोड मध नाही, विकासही झालेला नाही, अशा परिस्थितीतच जर भ्रमर कमळकळीत बांधला गेला, तर पुढे कळीचा विकास झाल्यावर त्याची दशा काय होईल !

हा दोहा ऐकून जयसिंहाचे डोळे उघडले व बिहारीला त्याने भरपूर द्रव्य व एक गाव इनाम दिले. जयपूर दरबारचा तो राजकवीही बनला. जयसिंहाच्याच आज्ञेवरून त्याने बिहारी सतसई नामक ग्रंथ रचला.

बिहारी सतसई हा ग्रंथ म्हणजे हिंदी साहित्यभांडारातील एक अनमोल रत्न आहे. आजवर या ग्रंथावर पन्नासपेक्षा अधिक टीका लिहिल्या गेल्या आहेत आणि अजूनही लिहिल्या जात आहेत. या टीका संस्कृत, हिंदी, राजस्थानी या भाषांत, तशाच गद्यात व पद्यातही आहेत. डॉ. अमरनाथ झा यांनी यांतील तीनशे दोह्यांचा इंग्रजीत अनुवाद केला आहे.

या ग्रंथाला सतसई असे नाव देण्याचे कारण यात सातशे-पेक्षा अधिक दोहे आहेत, हे होय. या दोह्यांचे नीतीपर, अध्यात्म-पर आणि शृंगारपर असे तीन भाग पाडता येतात.

बिहारी हा राधा-कृष्णांचा भक्त होता. तो म्हणतो–

तजि तीरथ, हरि-राधिकातन दुति करि अनुराग ।
जिहिं ब्रज केलिनिकुंज माग पग पग होत प्रयाग ।।

भावार्थ – सर्व तीर्थांचा त्याग करून राधा-कृष्णांच्या युगल-मूर्तींची प्रेमपूर्वक उपासना करावी. व्रजातील क्रीडाकुंजांत, त्यांच्या चरणांच्या नखांची श्वेत, तळव्यांची लाल व कृष्णाच्या चरणांच्या पृष्ठभागाची श्यामल कांती एकत्र मिसळते आणि गंगा, सरस्वती व यमुना यांचा संगमच झाला आहे, असे वाटते.

राधा-कृष्णांच्या संयोगाचे वर्णन त्याने केले आहे ते असे–

मिलि परछाहीं जोन्ह-सों, रहे दुहुनि के गात ।
हरि-राधा एक संग ही चले गली में जात ।।

भावार्थ – राधा-कृष्ण जोडीने जात होते. चांदणी रात्र होती. राधेचे गौर अंग चांदण्यात मिसळून गेले होते आणि सावळा कृष्ण तिच्या सावलीत लपून गेला होता.

बिहारी हा रससिद्ध कवी होता. ब्रजभाषेवर त्याचे चांगलेच प्रभुत्व होते. सतसईतील त्याची भाषा प्रौढ, सरस, स्वाभाविक व अलंकारिक आहे. त्याने वापरलेला प्रत्येक शब्द साभिप्राय असतो. दोह्यासारख्या लहान छंदात त्याने विपुल अर्थ भरला आहे. म्हणून त्याच्याबद्दल कोण्या कवीने म्हटले आहे, ते असे–

सतसैया के दोहरा, ज्यौं नावक के तीर ।
देखन में छोटे लगें घाव करें गंभीर ।।

अर्थ – बिहारीच्या सतसईतील दोहा हा किराताच्या बाणा-प्रमाणे आहे. तो दिसायला लहान दिसतो; पण जखम मात्र खोल करतो.

बिहारीच्या सतसईचा हिंदी साहित्यावर फार मोठा प्रभाव पडला व शृंगाररसाधिष्ठित अशी मतिरामसतसई, शृंगार-सतसई, विक्रम-सतसई, इ. काव्ये निर्माण झाली. [हिं. सा. को. २; हिं. वि. को.; प्रा. क. का.; रा. पि. सा.; प्रा. क. का. सा.]

बिहू एक आसामी लोकोत्सव. या प्रसंगी केल्या जाणाऱ्या नृत्याला बिहू नृत्य व नृत्याबरोबर गायिल्या जाणाऱ्या गीतांना बिहू गीते अशी संज्ञा आहे. मूलतः हा उत्सव कृषी व पशुपालन यांच्याशी संबद्ध होता. आजही तो शेतीच्या निर-निराळ्या हंगामांत साजरा केला जात असला, तरी त्यातील मूळ कल्पना बाजूस पडून केवळ नृत्य-गीतांचा जल्लोष एवढाच त्याचा अर्थ शिल्लक उरला आहे.

रंगाली, भोगाली आणि कंगाली असे बिहूचे तीन प्रकार आहेत. यांनाच बोहाग बिहू, माघ बिहू व काती बिहू अशी अन्य नावे आहेत.

रंगाली [बि]हू वैशाख महिन्यात येतो. आसामी वर्षाचा पहिला महिना बोहाग किंवा वहाग या नावाने ओळखला जातो. हा वसंत ऋतूचा महिना आहे. या महिन्यात सारी सृष्टी तरुण, सतेज व टवटवीत असते. अशा वेळी आसामी स्त्री-पुरुष बोहाग बिहूच्या तयारीला लागतात. घरा-घरांतून चिरापीठ, पोहे व तांदूळ कुटण्याचा आवाज येऊ लागतो.

बिहूच्या आदल्या दिवशी येणाऱ्या संक्रांतीला गोरा बिहू म्हणतात. या दिवशी ज्यांच्या घरी गुरे आहेत, असे लोक आपल्या गुरांना हळद व उडदाच्या डाळीचे पीठ लावून आंघोळ घालतात, मग दुध्या अगर तांबडा भोपळा त्यांना खाऊ घाल-तात व जमिनीवर भाज्यांचे दांडे आपटून प्रेमाने गाणी म्हण-तात. त्यांपैकी एक गाणे असे –

लाव खा बेंगना खा बसरे बसरे बाढी जा ।
मार् होस बातेर् होस तयी होबी बर् गोस ।।

अर्थ – भोपळा खा, वांगी खा. वर्षावर्षाला वाढत जा. आई

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लहान, बाप लहान; पण तू मोठी होऊन जा.

नंतर गुरांच्या गळयात नव्या दोऱ्या बांधतात. या दिवशी सर्वजण भात खातात व रात्री स्वयंपाकघर धुवून व भांडीकुंडी घासून लख्ख करतात. दुसऱ्या दिवशी भात खायचा नसतो, तर केवळ पोहे, पिठा व मिठाई हेच पदार्थ खायचे असतात. सासुरवाशिणीने या वेळी स्वतः विणलेला पंचा व चादर तबकात घालून वडील मंडळींना आहेर करायचा असतो. या विधीला बिहुवान असे म्हणतात.

त्या रात्री हुकरी गीते गायली जातात. हुकरी गीते म्हणजे गटा-गटांनी लोकांच्या घरी जाऊन म्हणायची गीते होत. हुकरी गाणारे घरी आले म्हणजे यजमान त्यांचे स्वागत करून त्यांना विणलेला गळपट्टा (गामोशा), पानसुपारी व दक्षिणा देतो. तिथून जाताना हुकरीवाले आशीर्वादाचे गीत गातात.

या उत्सवाच्या निमित्ताने आप्तस्वजनांना व मित्रमंडळींना शुभचिंतनपर वस्तू भेट देण्याचीही पद्धती आहे.

भोगाली बिहू कधी मकर संक्रांतीच्या सुमाराला, तर कधी होळीच्या वेळी येतो. हा उत्सव घरी न करता शेतात करतात. त्यापूर्वी शेतात छोटी झोपडी उभारतात. मग त्या झोपडी-जवळच मोठमोठी लाकडे स्तूपाकार रचतात. याला मेजी म्हणतात. उत्सवाच्या आदल्या दिवशी लोक एकत्र जमून तिथे भोजन करतात व दुसऱ्या दिवशी पहाटे कोंबडा आरवायच्या आत उठून, शुचिर्भूत होऊन ती झोपडी व ती मेजी जाळून टाकतात. मग त्या शेकोटीवर बटाटे, रताळी यांसारखी कंद-मुळे भाजून खातात. घरातल्या स्त्रिया सुस्नात होऊन त्या होळीची पूजा करतात. मग मिठाई खातात व वाटतात. या दिवशी लहान मुले वडीलधाऱ्यांची सेवा करतात. उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी पुन्हा अग्नीची पूजा होते. या तीन दिवसांत अग्नीला पाय लावणे हे पाप मानतात. हा हंगाम सुगीचा म्हणजे भरपूर धान्याचा असल्यामुळे याला भोगाली बिहू असे नाव पडले आहे.

कंगाली बिहू कार्तिक महिन्यात येतो. या उत्सवात दारापुढे मुद्दाम तुळशीवृंदावन बांधून त्यात तुळस लावतात. तिच्यापुढे एका डब्यात एक पणती महिनाभर तेवत ठेवतात. या उत्सवात देवीची पूजा-प्रार्थना करायची असते.

बिहू उत्सवावर ऑस्ट्रोएशियाटिक लोकांच्या संस्कृतीचा दाट ठसा आढळतो. ते लोक ज्या ज्या ठिकाणी गेले व राहिले त्या त्या ठिकाणी बहुशः अशाच प्रकारची नृत्ये व अशाच प्रकारचे उत्सव आढळतात.

बिहू उत्सवाच्या निमित्ताने जी नृत्ये केली जातात, त्यांतून प्राधान्याने तरुण-तरुणींची प्रेमभावना व समागमेच्छा व्यक्त होते. धान्योत्पत्ती व प्रजोत्पत्ती या कल्पनांची त्यांनी त्या गीतांत सांगड घातली आहे. बिहू नृत्यात हात व नितंब यांना झोके

स्त्रियांचे बिहू नृत्य

देता देता मधेच छाती व पोटाखालचा भाग पुढे काढून किंवा हातांची सूचक हालचाल करून प्रेयसी आपली इच्छा प्रिय-कराला सूचित करते. ही स्त्री-पुरुषांची संमिश्र नृत्ये प्राधान्याने बोहाग बिहूच्या प्रसंगी होतात. या नृत्याचे एकूण प्रकार चार आहेत, ते असे–

(१) केवळ स्त्रियांचे- यांत पुरुषांना प्रवेश नसतो. दोन मुली आमोरासमोर उभ्या राहून नाचतात व त्यांतली एक पुरुषाची भूमिका घेऊन लैंगिक हावभावांचे सूचन करते.

(२) स्त्री–पुरुषांचे संमिश्र– यांत स्त्रिया नाचतात व पुरुष ढोल, झांजा किंवा टाळया वाजवतात.

(३) स्त्रिया व पुरुष यांचे विभक्त– यात स्त्रिया व पुरुष स्वतंत्र रांगेत एकाच मैदानात परंतु भिन्न भिन्न वर्तुळात नाचतात.

(४) स्त्री–पुरुषांचे एकत्र– स्त्रिया व पुरुष समोरासमोर स्वतंत्र रांगेत किंवा एकात एक दोन वर्तुळे करून नाचतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गाणे हा या नृत्यातला महत्त्वाचा भाग होय. नर्तकी नृत्यापूर्वी एका सवालात्मक गीताला आरंभ करते व मग नृत्य सुरू करते. तिचे नृत्य थांबले, की नर्तक पुढे येऊन गाण्यातच त्या सवालाचे उत्तर देतो व मग तोही नाचू लागतो. कधी कधी दोघांचेही नाच-गाणे एकाच वेळी चालते. शेतात काम करताना

संमिश्र बिहू नृत्य

किंवा जलाशयात मासे पकडताना ही बिहू गीते गाऊन तरुण-तरुणी प्रियाराधन करतात. मग त्यांचे आई-बाप यथावकाश त्यांचे लग्न ठरवतात.

बिहू गीते सामान्यतः चार–चार ओळींची असतात व बहुशः ती स्वयंस्फूर्त असतात. नृत्याचा ताल सांभाळणे हे त्यांचे काम. गीतातील दुसऱ्या व चौथ्या ओळींचे यमक साधलेले असते. मात्र पहिल्या दोन ओळींचा संबंध असतोच असे नाही. नमुन्याचे एक बिहू गीत असे–

बिहू मारी थाकिबोर्, मने ओऽई लाहोरी,
बिहू मारी थाकिबोर् मन् ।
बिहू मारी थाकु ते पलुवाई निनिबा
भरिबो लागिबो धन् ॥
उख-कोई बांधिला चूली-तारी
लोजते मारी गोला बान ।
चकूते सांवतेई मिसीकी हाँहिला
बोलिया करिले मूर मन् ॥

अर्थ – ढोलके वाजवून बिहू गीत म्हणत असताना हे प्रिये, माझे मन तुझ्यात अडकले आहे. पण डफ मारीत मारीत मी तुला पळवून नेत नाही, कारण (मग) मला पैसे भरावे लागतील. तू जो उंच अंबाडा बांधला आहेस, त्यामधून तू माझ्या हृदयावर प्रेमबाण सोडीत आहेस. माझी ही अवस्था जाणून तू माझ्याकडे पाहून मुद्दाम मिस्किलपणे हसत आहेस आणि (आणि) मी मात्र वेडावून गेलो आहे.

बिहू गीतांतून निरनिराळी प्रतीके वापरलेली असतात. एका बिहू गीतात सिंदूराचे प्रतीक वापरून, तरुणीच्या कपाळाचे कुंकू व भांगातील सिंदूर हे तिच्या यौवनातील पदार्पणाचे सूचक आहेत, असे म्हटले आहे. [लौ. नी.; बि. साँ. आ.; श्रीमती चौधरी, श्रीमती शर्मा– स्त्री- आसाम अंक, जुलै १९६५]

बीकानेर राजस्थानातील एक नगर. हे थरच्या वाळवंटात वसलेले आहे. प्राचीन काळी या प्रदेशात, सरस्वती नदीच्या तीरावर एक महान संस्कृती नांदत होती, असे इतिहासवेत्ते सांगतात. त्या संस्कृतीचे अवशेष आता वाळूखाली गाडले गेले आहेत. गुप्त साम्राज्याचा ऱ्हास झाल्यानंतर या प्रदेशावर अनुक्रमे गुर्जर-प्रतीहार, चौहान, भाटी, राजपूत आणि राठोड यांनी राज्य केले. मारवाडचा राजा जोधा याचा सहावा पुत्र बीका याने तीनशे राठोड साथीदारांसह, राजस्थानातील वायव्येकडील गहन मरुस्थलीत वास्तव्य करणाऱ्या मूळ रहिवाशांवर स्वारी करून तिथे एक स्वतंत्र वसाहत स्थापली. त्या ठिकाणी त्या वेळी सहा प्रजासत्ताक राज्ये होती. त्यांपैकी एका राज्यातील लोकांनी बीकालाच आपला राजा निवडले. मग त्याने हळूहळू आसपासची अनेक



बीकानेरचा किल्ला

खेडी जिंकून आपले राज्य वाढवले आणि जेसलमीरच्या भट्टी राजांचा भागोरचा किल्ला जिंकून तिथे इ. स. १४८९ मध्ये बीकानेर शहराची स्थापना केली. त्यानंतर शंभर वर्षे हे राज्य स्वतंत्र होते. नंतरच्या काळात इथल्या रायसिंह नामक राजाने अकबराचे मांडलिकत्व पत्करले. पुढे इ. स. च्या १८ व्या शतकाच्या शेवटी राज्यात अंतःकलह सुरू झाला आणि शेवटी ते ब्रिटिशांचे मांडलिक संस्थान बनले.

राजा रायसिंहाने इथे एक किल्ला बांधलेला असून, त्यात अनेक भव्य आणि सुंदर इमारती आहेत. शहरात अनेक जैन मंदिरे व मठ असून, त्यांपैकी पारसनाथ, आदिनाथ व नेमिनाथ यांची मंदिरे व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लक्ष्मीनाथमंदिर अत्यंत प्रेक्षणीय आहेत. इथे लोकरी गालिचे, हस्तिदंती बांगड्या, चिनी मातीची भांडी, इ. कलात्मक वस्तू तयार होतात. [रा. रा. उ. न्हा.; हिं. वि. को.; राजस्थान]

बीजगणित गणितशास्त्राची एक शाखा. या शास्त्रात अव्यक्त संख्यांसाठी अ, ब, य, क्ष, इ. प्रतीके वापरून गणिते सोडवण्याची पद्धत दिलेली असते. बीजगणितात समीकरण, बहुपद, विततभिन्न, श्रेणी, संख्यानुक्रम, सारणिक, समघात, इ. विषयांचा समावेश होतो.

भारतीय ज्योतिषशास्त्र अत्यंत प्राचीन काळीच विकास पावले असल्यामुळे त्याच्या अनुषंगानेच बीजगणिताचाही विकास झाला असावा, असे काही पंडितांचे अनुमान आहे. इ. स. च्या चौथ्या शतकात आर्यभट्ट (१ ला) हा थोर ज्योतिर्विद होऊन गेला. त्याच्या ग्रंथात बीजगणिताचे विकसित रूप दिसून येते. त्याच काळातला ग्रीक गणिती डायोफॅंटस याची व आर्यभट्टाची तुलना करून कोलब्रुक लिहितो, की डायोफॅंटस हा भारतीय गणितज्ञांच्या पुष्कळच मागे होता. बीजगणिताचा उगम प्रथम भारतातच झाला यात शंका नाही. अरबी पंडितांनी या विषयाचे ज्ञान भारतीय पंडितांकडून मिळवले आणि युरोपात त्याचा प्रसार केला, ही वस्तुस्थिती आता सर्वमान्य झाली आहे.

वॅलिस व कोलब्रुक यांच्या मते करणी पद्धतीचे गणित, अनेकवर्ण समीकरणाची सामान्य पृथक्करणपद्धती, एकवर्ण-समीकरणाच्या अनिर्णीत सिद्धान्ताचे सामान्य उत्तर काढण्याची रीत, अनेक वर्णसमीकरणाचे एक उदाहरण अनिश्चित पद्धतीने सोडवले असता त्यावरून अनेक उत्तरे काढण्यासाठी सर्वसाधारण नियम योजणे, द्विघात समीकरण सोडवणे, इ. प्रकार भारतीय पंडितांना माहीत होते. द्विघाताच्या वरील घाताची समीकरणे सोडवायचा प्रयत्नही त्यांनी केला होता. हे सर्व प्रकार शास्त्रशुद्ध, नित्य, सर्वसंमत असे सिद्धान्त असून, त्यांचे ज्ञान त्यांनी शास्त्रीय पद्धतीने संपादले होते, असे प्राचीन ग्रंथांवरून दिसून येते. ला ग्रांज याच्या संशोधनामुळे पाश्चात्य देशांत गणितशास्त्राची जी प्रगती कालांतराने झाली, तेवढी प्रगती भारतात पूर्वीच झालेली होती. इ. स. च्या १७ व्या आणि १८ व्या शतकांत युरोपीय पंडितांनी ज्या पद्धती शोधून काढल्या, त्या ब्रह्मगुप्त व भास्कराचार्य यांच्या ग्रंथांत आधीच दिलेल्या होत्या. प्लेफेअरच्या मते बीजगणिताची परिभाषा ज्योतिषशास्त्राच्या पुस्तकांत वापरणे व या दोन शास्त्रांचा उपयोग परस्परांच्या परिपोषासाठी करून घेणे यासाठी भारतीय पंडितांना अनेक वर्षे सतत अभ्यास व अव्याहत परिश्रम करावे लागले असतील, यात मुळीच शंका नाही.

ज्या समीकरणांत दोनापेक्षा अधिक अज्ञाते धरावी लागतात, अशी समीकरणे आर्यभट्ट (१ ला) याने सोडविली होती. इ. स. च्या ७ व्या शतकात ब्रह्मगुप्त याच्या ब्राह्मस्फुट-सिद्धान्त नामक ग्रंथात बीजगणिताचा अधिक विकास झालेला दिसतो. त्या ग्रंथाच्या कुट्टकाध्यायात एकवर्ण-समीकरण, वर्गसमीकरण, अनेकवर्ण-समीकरण, इत्यादींचे विवेचन केलेले आहे. त्याने समीकरण, सम, समकरण हे शब्द समानार्थी वापरले आहेत.

वैदिक युगात यज्ञवेदीच्या रचनेसाठी $कय^2 + खय = ग$ अशी वर्गात्मक समीकरणे सोडवणे आवश्यक असे. आर्यभट्ट व ब्रह्मगुप्त यांनी अशी समीकरणे सोडवून दाखवली आहेत. ज्योतिषशास्त्रातील समस्या सोडविण्यासाठीही अशा समीकरणांचा उपयोग होतो. वर्गात्मक समीकरणांत अव्यक्त संख्येची दोन मूल्ये असतात, हे त्यांना ज्ञात होते.

त्यानंतर श्रीधर, पृथूदकस्वामी, महावीर, आर्यभट्ट (२ रा), पद्मनाभ, श्रीपती व भास्कराचार्य हे गणिती झाले. त्यांपैकी भास्कराचार्य हा सर्वश्रेष्ठ मानला जातो. त्याने इ. स. च्या १२ व्या शतकात बीजगणिताचा पूर्ण विकास केला. त्याच्या सिद्धान्त-शिरोमणी नामक ग्रंथातील बीजगणितप्रकरण प्रसिद्ध आहे. त्यात त्याने यावत्-तावत्, कालक, नीलक, पीतक, लोहितक, इ. शब्दांतील आद्याक्षरांचा उपयोग अ, ब, क, प्रमाणे अव्यक्त संख्यांची प्रतीके म्हणून केला आहे.

$$(५ क्ष - १)\ (३ क्ष + २) = (१५ क्ष^2 + ७ क्ष - २)$$

हे समीकरण त्या काळी लिहिण्याची पद्धत अशी –

$$(या\ ५\ रु\ \dot{१})\ \ (या\ ३\ रु\ २) = याव\ १५\ या\ ७\ रु\ \dot{२}$$

या पद्धतीत याव म्हणजे याचा वर्ग. पदांच्या मध्ये + व – ही चिन्हे नाहीत. ज्ञात संख्येच्या मागे रु हे अक्षर असते व ऋण संख्येच्या वर बिंदू असतो.

मधुरादी रसांची नावे आणि माणिक, इंद्रनील, इ. रत्नांची नावे यांतील आद्याक्षरेही अव्यक्तांसाठी वापरण्याची प्रथा होती. इ. स. च्या १४ व्या शतकात नारायण नामक गणितज्ञाने क, ख, इ. अक्षरांचा उपयोग सुरू केला.

समीकरण – ब्रह्मगुप्ताने समीकरणांचे एकवर्ण, अनेकवर्ण व भावित असे तीन भेद सांगितले आहेत; तर पृथूदकस्वामीने पुढीलप्रमाणे चार वर्ग केले आहेत – (१) एकच अव्यक्त संख्या-युक्त रैखिक समीकरण (२) अनेक अव्यक्त संख्यायुक्त रैखिक समीकरण (३) एक किंवा अनेक अव्यक्त संख्यायुक्त, द्वितीय, तृतीय किंवा उच्च घातांचे समीकरण व (४) अनेक अव्यक्तांच्या गुणाकाराचे समीकरण. यांतील तिसऱ्या प्रकाराला मध्यमाहरण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असेही नाव होते; कारण त्यातील मध्यम पदाचे आहरण (लोप) करून हे समीकरण सोडवले जात असे.

दोन किंवा अधिक अव्यक्तांची दोन किंवा अधिक समीकरणे दिलेली असता, ती सोडविण्याच्या रीतीला संक्रमण असे म्हणतात. ब्रह्मगुप्त, महावीर, इ. पंडितांनी संक्रमणाच्या अनेक पद्धती सांगितल्या आहेत. महावीराने आपल्या गणितसारसंग्रह नामक ग्रंथात समीकरणे सोडवायचे नियम दिले आहेत. भास्कराचार्यांनेही समगतिक समीकरणे व ती सोडविण्याच्या रीती दिल्या आहेत.

कुट्टक – प्रथम घाताच्या अनिर्णीत विश्लेषणाला कुट्ट, कुट्टक किंवा कुट्टाकार असे म्हणतात. याच्या साहाय्याने खर – कय = ± ग अशा प्रकारची समीकरणे सोडवता येतात. आर्यभट्ट (२ रा) व भास्कराचार्य यांनी या विषयाचे विस्तृत विवेचन केले आहे.

ज्या संख्येचे पूर्ण मूळ निघत नाही तिला करणी म्हणतात. भास्कराचार्याने आपल्या ग्रंथात अशा संख्यांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग व वर्गमूळ काढण्यासंबंधी सर्व प्रक्रिया दिल्या आहेत.

यात्र्यतिरिक्त वर्गप्रकृति-समीकरणे (नय^{२} ± ग = र^{२}) सोडवण्याच्या विविध पद्धती ब्रह्मगुप्त, श्रीपती, भास्कराचार्य, नारायण, इ. पंडितांनी सांगितल्या आहेत. भास्कराचार्याने चक्रवाल विधीचे विस्तृत वर्णन केलेले आहे. शुल्व साहित्यात पूर्णांक-भुज-समकोण त्रिकोण काढण्याच्या रीती सांगितलेल्या आहेत. तसला त्रिकोण काढण्यासाठी बीजगणितातील समीकरणांचा उपयोग करण्याच्या अनेक पद्धती ब्रह्मगुप्त, महावीर, भास्कर, गणेश, इ. शास्त्रज्ञांनी दिल्या आहेत.

धन व ऋण चिन्हांचा उपयोग आणि त्या चिन्हांनी अंकित संख्यांच्या बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, इ. प्रक्रिया करण्याचे नियम भास्कराचार्याने आपल्या ग्रंथात दिले आहेत. शून्य किंवा 'ख' या संख्येसंबंधीचे नियम अंकगणितात व बीजगणितात तेच आहेत. ते भास्कराचार्यांच्या ग्रंथात आढळतात. 'ख' ला कोणत्याही संख्येने गुणिले, त्याचा वर्ग केला किंवा वर्गमूळ काढले, तरी उत्तर शून्यच येते. मात्र एखाद्या संख्येने शून्याला भागले असता 'ख' हर म्हणजे अनंत संख्या येते, असे भास्कराचार्याने लिहून ठेवले आहे. [वै. वि. भा. प.; हिं. वि. को.; प्रा. भा. सा. सां. भू.; भा. श्रे.]

बीजमंत्र

अं, यं, रं, लं, वं, इ. स्वर आणि वर्ण, त्याचप्रमाणे ह्लां, ह्लीं, क्लीं, इ. एकाक्षर शब्द यांना बीजे म्हणतात. बीज हे मंत्राचे बी असते. या बीजातूनच पुढे मंत्रशास्त्राच्या शाखापल्लवांचा विस्तार होतो. कोणत्याही मंत्राची शक्ती त्याच्या बीजात असते. योग्य बीज मिळाले, तरच मंत्राचे अनुष्ठान सिद्ध होते. बीजे ही मंत्राच्या देवतेला जागृत करतात, याविषयी बृहद्गंधर्वतंत्रात सांगितले आहे, ते असे –

शृणु देवि प्रवक्ष्यामि बीजानां देवरूपताम् ।
मन्त्रोच्चारणमात्रेण देवरूपं प्रजायते ।।

अर्थ – हे पार्वती, मी तुला बीजांची देवरूपता सांगेन. बीजमंत्राच्या उच्चारमात्रे त्या ठिकाणी देवतेचा आविर्भाव होतो.

शारीरिक व मानसिक दृष्ट्याही बीजे अतीव उपयुक्त ठरतात. बीजे उच्चारताना जे विशिष्ट प्रकारचे स्पंदन होते, त्यामुळे विशिष्ट ध्वनिलहरी निर्माण होतात. त्यांच्या प्रसरणाने शरीरातील विशिष्ट केंद्रे व चक्रे जागृत होतात. त्यामुळे नाड्यांतून प्राणांचा प्रवाह योग्य प्रकारे चालू होतो. शरीर निरोगी होणे, मन शुद्ध होणे, मनाची शक्ती वाढणे, बुद्धी तीक्ष्ण होणे, इ. लाभ बीजमंत्राच्या जपाने होत असतात, असे सांगितले आहे.

प्रत्येक बीज हे विशिष्ट तत्त्वाचे प्रतीक असते. त्याच्या जपाने शरीरातील ते ते तत्त्व कार्यक्षम व प्रभावी होत असते. शरीर हे पंचतत्त्वांचे बनलेले असते. या पंचतत्त्वांची बीजे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत –

अं = आकाश. यं = वायू. रं = तेज. लं = पृथ्वी. वं = जल.

याशिवाय विशिष्ट देवतांची बीजे, त्यांचा सांकेतिक अर्थ आणि त्यांचा उद्देश श्री. वुड्रॉफ यांनी सांगितला आहे, तो असा –

ह्रौं – प्रसादबीज. ह = शिव. औ = सदाशिव व अनुस्वारबिंदू = दुःखनाश. शिव किंवा सदाशिव याच्या कृपेने दुःखनाश, हा बीजाचा उद्देश.

दूं – दुर्गाबीज. द = दुर्गा. ऊ = रक्षण व अनुस्वारबिंदू = रक्षण क्रिया. रक्षण हा उद्देश.

क्रीं – कालीबीज. क = काली. र = ब्रह्म व ई = महामाया. अनुस्वारबिंदू = दुःखहरण. दुःखहरण हा उद्देश.

ह्रीं – शिव-शक्तिबीज. ह = शिव. र = प्रकृती. ई = महामाया व बिंदू = दुःखहरण. उद्देश दुःखहरण.

श्रीं – लक्ष्मीबीज. श = लक्ष्मी. र = धन. ई = तुष्टी व बिंदू = दुःखहरण. पुष्टी व तुष्टी हा उद्देश.

ऐं – सरस्वतीबीज. उद्देश वरीलप्रमाणेच.

क्लीं – कृष्णबीज किंवा कामबीज. क = कृष्ण अथवा काम. ल = इंद्र. ई = तुष्टी व बिंदू = सुखदायक. उद्देश सुखप्राप्ती.

हूं – वर्म किंवा कूर्चबीज. ह = शिव. ऊ = भैरव व बिंदू = दुःखहरण. उद्देश दुःखहरण.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गं – गणेशबीज. ग = गणेश. बिंदू = दुःखहरण. उद्देश स्पष्ट.

क्ष्रौं – नृसिंहबीज. क्ष = नृसिंह. र = ब्रह्म. औ = ऊर्ध्वदंत व बिंदू = दुःखहरण. उद्देश दुःखहरण

स्त्रीं – वधूबीज. स = संकटातून रक्षण. त = तारकशक्ती. र = मुक्ती. ई = महामाया व बिंदू = दुःखहरण. उद्देश दुखःहरण

ॐ हेही एक बीज आहे. सर्व बीजांच्या व मंत्रांच्या पूर्वी त्याचा उच्चार करावा लागतो. त्याला प्रणवबीज असे म्हणतात. हे वेदबीज किंवा वेदसारच आहे. सर्व बीजांची उत्पत्ती प्रणवबीजातूनच होते. हे अनादी, अद्वैत बीज आहे.

बीजें संकलित केल्याने त्यांचे अनेक प्रकार होतात. दोन किंवा अनेक बीजांचा संयोग करता येतो व त्यामुळे मंत्रशक्तीत वैचित्र्य उत्पन्न होते. उदा० ह्रीं श्रीं क्रीं हा संयुक्त बीजमंत्र आहे. ही तीन्ही बीजें एकाच शक्तीची विभिन्न रूपे होत. ह्रीं = माया, श्रीं = लक्ष्मी आणि क्रीं = काली. दार्शनिक दृष्टया या तीन बीजांचा अर्थ अनुक्रमे सृजन, रक्षण व संहार असा होतो. फेत्कारिणीतंत्रात काही संयुक्त बीजांचा यौगिक अर्थ दिला आहे. उदा० ह्रीं बीज जेव्हा दुबार जोडले जाते, तेव्हा ते लज्जाबीज बनते. हे सृष्टितत्त्वाचे बीज मानलेले असून, त्याचे उदाहरण म्हणून सृष्टिरचनेच्या प्रसंगी विधात्याला प्रथम लज्जेचा अनुभव आला होता, अशी कथा सांगितली आहे. श्रींचा अर्थ विष्णूच्या भरण–पोषणाच्या कार्यात संगती राखणे हा आहे. बीजांना कित्येकदा नमः, स्वाहा, स्वधा, वषट्, वौषट्, हुं व फट् असे शब्द जोडले जातात. हे शब्द मंत्रप्रयोगाच्या वेळी साधकाची जी मनोवस्था असते, किंवा त्या शब्दांनी त्याला जे साधायचे असते त्याचे द्योतक असतात. त्यांचे सांकेतिक अर्थ पुढीलप्रमाणे –

नमः = अंतःकरणाची शांत व समाहित अवस्था.
स्वाहा = अपकारी शक्तीचा नाश व दुसऱ्याचे हित.
स्वधा = आत्मतृप्ती, आत्मपुष्टी.
वषट् = शत्रुनाशाचा भाव.
वौषट् = शत्रूमध्ये परस्पर विग्रह किंवा विरोध.
हुं = क्रोध व वीरभाव.
फट् = शत्रूवर प्रहार करण्याचा भाव.

स, र आणि त ही बीजे अनुक्रमे सत्त्व – रज – तमोगुणांची द्योतक आहेत.

याशिवाय बीजनिघंटू या ग्रंथात स्वर व वर्णरूप सर्व बीजांचा प्रत्येकी वेगवेगळा अर्थ दिलेला आहे. तसेच विविध उद्देश साधणारी आणखी काही बीजे तिथे सांगितली आहेत, ती अशी –

आं = असाध्यसाधक. ह्रीं = सर्वभूतिप्रद. द्रां = चिरजीवन. व्रूं = संमोहन. हुं = द्वेषण. टट = स्तंभन. सौ = सकल अभिवृद्धी. खें खें = मारण. नमः = संपन्नकरण. वपट् = वशीकरण. वौषट् = आकर्षण.

शाक्त तंत्रात विष्णुप्रिया, धूम्रभैरवी, रुद्रशाकिनी, विद्युज्जिह्वा, अग्निवल्लभा, कल्पिनी, घोराक्षी, कालरात्री, ऊर्ध्वकेशी, दुर्गा, लोकमाता, इ. अनेक देवता सांगितल्या असून, त्यांच्या उपासनेची स्वतंत्र बीजेही सांगितली आहेत. शैव तंत्रात वारण, चंड, ज्वालामुख, रक्तदंष्ट्र, असितांग, वलयामुख, विद्युन्मुख, कपाली, कपर्दी, महाकाल, धूम्रध्वज, इ. शिवरूपे सांगितली असून, विविध उद्देशसाधक अशी त्यांची बीजेही दिलेली आहेत. पाहा—बीजाक्षर. [योगविद्या; मंत्रशास्त्र; – श्री. योगेश्वरानंदतीर्थ श्री शंकराचार्य, १९५७; तां. वा. शा. दृ; चिं. न. च.]

बीजसंपुटयंत्र एक वशीकरणयंत्र. याची रचना अशी — भूर्जपत्रावर गोरोचन, रक्तचंदन व केशर यांच्या मिश्रणाने तीन रेघा काढतात. पहिल्या व तिसऱ्या ओळीत चार वेळा ह्रीं हे बीज लिहितात. मधल्या ओळीत मध्यभागी साध्यनाम लिहितात. सभोवती दोन रेघांचा चौकोन काढतात. मग त्याची पूजा करतात. त्या निमित्त ब्राह्मण, सुवासिनी, कुमारिका व योगिनी यांना भोजन घालतात. मग ते यंत्र मुठीत धरून ज्याला वश करायचे त्या राजाच्या किंवा अधिकाऱ्याच्या भेटीला जातात. त्या भेटीत तो पुरुष यंत्रधारकाला वश होतो आणि अनुकूल ते करतो, असे सांगितले आहे. [यं. चिं.]

बीजाक्षर तांत्रिक पद्धतीतील एक संज्ञा. सर्व तांत्रिक पद्धतींत मंत्रांना एकेका अक्षरात घनीभूत करण्याची प्रवृत्ती आहे. मंत्राला श्रीं, ह्रीं, क्लीं, इ. अक्षरांत घनीभूत करतात, त्याला बीजाक्षर असे नाव आहे. ज्याप्रमाणे एखाद्या पदार्थाचे सूक्ष्मातिसूक्ष्म विश्लेषण केले असता, शेवटी तो पदार्थ महाशक्तिशाली परमाणू बनतो, त्याप्रमाणे बीजाक्षरातही लाखो परमाणूंची शक्ती निहित असते, असे समजतात. तंत्रशास्त्रात यंत्र, मंत्र व तंत्र यांना अत्यंत शक्तिमान व गुह्य बनविण्यासाठी बीजाक्षरांचा प्रयोग केला जातो. मीमांसकांच्या शब्दसिद्धान्तानुसार, बीजाक्षरात निरनिराळ्या अधिष्ठात्या देवतांची कल्पना केलेली आहे. हा शब्दसिद्धान्त सांगतो, की शब्द हा शाश्वत असून, तो अक्षर-रूपात सदा विद्यमान असतो. अर्थ हा शब्दात राहतो, ज्ञात्याच्या ठिकाणी नाही.

श्रीं, ह्रीं, क्लीं, ह्रौं, स्वः, इ. बीजाक्षरे लिहिण्याची एक कला आहे. ती लिहिण्यासाठी, बोलण्यासाठी व प्रयोगात आणण्यासाठी मोठी साधना व शब्दसंयमाचे ज्ञान आवश्यक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असते. बीजाक्षरे लिहिण्यासाठीच केवळ सिद्ध लिपी अस्तित्वात आली आहे. बीजाक्षरे लिहिण्यासाठी दहा नियम सांगितले आहेत. प्रत्येक बीजाक्षराची लांबी व रुंदी यांना विशेष अर्थ असतो. बीजाक्षरे लिहिल्यानेच त्यांची गुह्यता, पावित्र्य व रहस्य प्रकट होते. ज्या मंत्राशी बीजाक्षराचा संयोग होत नाही, तो शक्तिहीन व निरर्थक होतो, असे सांगितलेले आहे. पाहा – बीजमंत्र. [चि. न. च.; हिं. सा. को.]

बीड सांप्रतच्या मराठवाड्यातील एक प्राचीन नगर. हे बिंदुसरा नदीच्या तीरावर असून, त्याचे प्राचीन नाव दुर्गावती असे होते व नंतर ते चंपावती झाले, असे सांगतात. आंध्र, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव यांनी त्याच्यावर राज्य केल्यानंतर ते दिल्लीच्या मुसलमान राजांच्या ताब्यात गेले. इ. स. १३२६ च्या सुमारास महंमद तुघलकाने याचे नाव बीड असे ठेवले.

इथे यादवांच्या कालातील एक फार भव्य व रमणीय असे कंकालेश्वराचे मंदिर आहे. त्याच्या भोवती जलपूर्ण खंदक आहे. याशिवाय, इथले किल्ले व प्राचीन इमारती पुराणवस्तु-संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

इथे गिरिधर नामक महंताचे दोन मठ आहेत. प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य याचा जन्म याच ठिकाणी झाला, असे सांगतात. [प्रा. म. घा. इ.; मु. पू. म. खंड २; सु. वि. को.]

बीदर मराठवाड्यातले एक शहर. बहमनी राज्याची राजधानी इथे होती. हे शहर हैद्राबादपासून सुमारे ८० मैलांवर, एका डोंगरपठारावर वसले आहे. इथला प्रचंड डोंगरी



बीदरच्या किल्ल्याचे बुरुज

किल्ला अतिशय मजबूत असून, तो अजून चांगल्या स्थितीत आहे. बहमनी सुलतान अहमदशाह वली याने इथे नवी नगरी निर्माण करून आपली राजधानी बनवली. तिथे एक जुना किल्ला होता, तोच त्याने मोठा केला. त्याच्या तटाचा घेर सुमारे २।। मैलांचा असून त्याला ३७ बुरूज आहेत. बहुतेक बुरुजांवर मोठाल्या जुन्या तोफा ठेवलेल्या आढळतात. त्यांतील सर्वांत मोठ्या तोफेचे तोंड सुमारे पावणेदोन फूट आहे.

त्या किल्ल्याला तीन प्रवेशद्वारे आहेत. मुख्य दरवाज्यावर भव्य घुमट असल्यामुळे त्याला गुंबद दरवाजा म्हणतात. शेर दरवाज्यावर दोन सिंह कोरलेले आहेत.



गुंबद दरवाजा – बीदर

या शहरात अनेक भव्य व सुंदर महाल आणि बहमनी व बरीदशाहीच्या सुलतानांची स्मारके आहेत. त्यांतील अहमदशाहाचे स्मारक सर्वांत प्रेक्षणीय असून, त्याच्या आतील भागांवर इराणी शैलीची सुंदर चित्रे रंगवलेली आहेत. तसेच इराणी पद्धतीचे सुरेख नक्षीकामही इथे सर्वत्र दिसते आणि सोनेरी अक्षरांत लिहिलेली सूफी वचनेही आढळतात. शहराच्या पश्चिम भागातली सोळाखांबी मशीद तिच्यावरील सुंदर घुमटामुळे प्रेक्षणीय ठरली आहे. इथल्या सर्वच शिल्पकामावर इराणी कलेची छाप पडलेली दिसते.

महमूद गावान याचा मदरसा ही इथली इमारत सर्वांत जास्त महत्वाची आहे. ती भव्य आणि विशाल असून, तिच्या दर्शनी भागाच्या दोन्ही कोपऱ्यांवर दोन उंच मिनार आहेत. या वास्तूत एक मशीद, एक ग्रंथालय आणि शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी वसतिगृहे होती. त्यांतील बहुतेक भागांची आता पडझड झाली आहे. पण जो भाग चांगला आहे, त्यावरूनही तिथल्या जुन्या शिल्पकामाचे सौंदर्य चांगले दिसून येते.

बीदरची भांडी व इतर वस्तूही फार प्रसिद्ध आहेत. त्यांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काळ्या पृष्ठभागावर रुपेरी रेखांकन केलेले असते, ते अत्यंत मोहक वाटते.

बहमनी साम्राज्य नष्ट झाल्यानंतर बीदर हीच बरीदशाहीची



महमूद गावानचा मदरसा – बीदर

राजधानी होती. दोनशे वर्षांपेक्षा अधिक काल इथे मुसलमानी राज्याचे वैभव नांदत होते. [यु. हॉ. इं.; हि. सा. इं.; धर्मयुग, १३ जाने. १९५२; सा. हिंदुस्थान, २३ फेब्रु. १९६४]

वीन एक तंतुवाद्य. बीन हा वीणा या शब्दाचा अपभ्रंश आहे. याच्या दोन्ही टोकांना २५ ते ३० इंच परिघाचे भोपळे बसविलेले असतात. त्यांना खाचा पाडून त्यात गोल व पोकळ दांडी बसवलेली असते. दांडीची लांबी ४ फूट व व्यास सुमारे ४ इंच असतो. याच्या दोन्ही टोकांना ४ बोटे रुंदीच्या पितळी किंवा रुप्याच्या मायण्या बसवतात. एका टोकापासून सुमारे ६–७ इंच अंतरावर २ हस्तिदंती अटी बसवतात. दुसऱ्या



वीन

टोकात हस्तिदंती घोडी बसवतात. घोडीखाली तारदान बसवतात. दांडीच्या दोन्ही अंगी तारा आवळण्यास खुंट्या बसवतात. यात एक चिकारीची तार असते, ती दुपटीच्या षड्जात ठेवतात. खर्ज व पंचम या स्वरांच्या तारा पितळेच्या अर्थात कच्च्या असतात. बाकीच्या सर्व तारा पोलादी अर्थात पक्क्या असतात. दांडीवर २० लाकडी पडदे मेणात बसविलेले असतात. प्रत्येक पडद्याला खाच करून तिच्यात पोलादाचा पडद्याइतका लांबीचा पातळ तुकडा बसवतात. या तुकड्यावर स्वरांच्या तारा दाबल्या जातात. त्याच्या वीस पडद्यांमुळे स्वरांची अडीच सप्तके पूर्ण होतात. हे वाद्य सतारीप्रमाणे नखीने वाजवतात.

बीनला सर्व तंतुवाद्यांचा राजा समजतात. याचे स्वर मधुर व झंकारयुक्त असतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.; सु. वि. को.]

बीभत्स रस शृंगारादी आठ रसांत बीभत्स रसाचे स्थान तिसरे आहे. दुःखात्मक रसांत याची गणना होते. त्या दृष्टीने करुण, भयानक व रौद्र हे रस या रसाचे सहयोगी ठरतात. याला शांत रसाच्या जवळचाही मानतात. कारण बीभत्स रसाचे वर्णन बहुधा वैराग्याला कारणीभूत ठरते आणि अंती शांत रसाचा स्थायीभाव असलेल्या शमाचे पोषण होते. या रसाची प्रक्रिया अशी –

जुगुप्सा म्हणजे किळस येणे, वीट येणे हा या रसाचा स्थायीभाव आहे. रक्त, मांस, दुर्गंधयुक्त पदार्थ हे त्याचे आलंबन विभाव; थुंकणे, तोंड बाजूला वळवणे, डोळे मिटून घेणे हे त्याचे अनुभाव; आणि मूर्च्छा, व्याधी, डोके फिरणे, हे याचे व्यभिचारीभाव होत. असली किळसवाणी वर्णने जिथे येतील तिथे बीभत्स रस आहे, असे समजावे.

प्रा. जोग यांनी या रसाचे स्वरूप मांडले आहे, ते असे–

अगदी मूलभूत असे जुगुप्सेचे प्रकार म्हटले म्हणजे विशिष्ट पदार्थ न आवडणे, गिळगिळीत वस्तूंस हातही न लावण्याची प्रवृत्ती; बेडूक, गोगलगाय इत्यादी निरुपद्रवी प्राण्यांसही हात न लावण्याची प्रवृत्ती; इतरही जीव किंवा किडे यांच्याविषयी अप्रीती; घाण, खरूज इत्यादी रोग व रोगी यांच्यापासून दूर राहण्याची प्रवृत्ती, इ. होत. ही शारीरिक जुगुप्सा मानसिक जुगुप्सेत परिणत होऊन दुर्गुणाविषयींची स्वाभाविक प्रवृत्ती, दुष्ट मनुष्यांबद्दल द्वेषयुक्त तिरस्कार, अनीतिकारक कृत्यांविषयी पराङ्मुखता, इ. जुगुप्सेची रूपांतरे दिसतात.

अप्रिय वस्तूचे दर्शन, स्पर्श किंवा स्मरण यांतून उत्पन्न झालेला साधारणतः अपूर्ण असा मनोविकार म्हणजे जुगुप्सा होय, असे रसतरंगिणीत म्हटले आहे; तर दोषदर्शनामुळे एखाद्या वस्तूच्या ठिकाणी निर्माण झालेली घृणा म्हणजे जुगुप्सा, असे विश्वनाथाने साहित्यदर्पणात म्हटले आहे.

बीभत्स रस हा शृंगाराचा विरोधी मानलेला आहे. कारण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जुगुप्सा निर्माण करणारे प्रसंग आले, असता शृंगाररसाला रसाभासाची अवस्था येते. शृंगार हा हृद्य आहे; तर बीभत्स हा अहृद्य अर्थात हृदयद्वारा अग्राह्य आहे. " बीभत्साच्च भयानकः " = भयानकरस बीभत्सातून उत्पन्न होतो, असे भरताने म्हटले आहे (ना. शा. ६.३९). भरताने क्षोभज, शुद्ध व उद्वेगी असे बीभत्सरसाचे तीन भेद मानले आहेत (ना. शा. ६.८१). अग्नी पुराणाच्या मते उद्वेग आणि क्षोभ हे बीभत्साचे दोनच भेद आहेत.

कधी कधी बीभत्सरसाचे अन्य रसांपासून पृथक्करण करणे कठीण जाते. शांत व भक्ती या रसांच्या प्रसंगीही स्त्रीसंबंधी वैराग्य भावना उद्दीपित करण्यासाठी तिच्या मोहक शरीराचे ' मांसवसादिविकार ' असे बीभत्स वर्णन केले जाते.

पौराणिक कथांमध्ये राक्षस, दानव, नरक, इत्यादींच्या वर्णनाला बीभत्सरसाचा उपयोग केलेला दिसून येतो. लोककथांमध्येही बीभत्साचे चित्रण आढळते.

केवळ दुर्गंधी आणि घाणेरडे पदार्थ यांच्याबद्दल किळस येणे एवढ्यावरच हा रस आधारून न ठेवता दुर्गुणांबद्दल तिटकारा, नीतिबाह्य आणि दुष्ट कृत्यांचा तिरस्कार, जीवाचा वीट येऊन आत्महत्या करण्यापर्यंत त्याची मजल जाणे, इ. गोष्टी बीभत्सरसात घालून तो व्यापक केल्यास आज त्याला जे गौणत्व आले आहे, ते जाऊन रसव्यवस्थेत तो महत्त्वाचा गणला जाईल. [सु. का. शा.; भा. का. शा. प.]

वीर एक प्रकारचे भूत किंवा क्षुद्र दैवत. उत्तर प्रदेशात खरा वरवीर, गेंडावीर, केरवीर, इ. नावांचे वीर आहेत. उ. प्रदेशात बावन्न वीरांची व महाराष्ट्रात सात वीरांची कल्पना आहे. हे सात वीर रात्रीच्या वेळी एकजुटीने शेते आणि बागयांमधून हिंडतात, अशी समजूत आहे. [पॉ. रि. फो. नॉ. इ.]

वीर-चंडी मुंड लोकांचा एक भूतवर्ग. याला वीरमार, वीरमहार, विरसाबोंगा, विरसंडी, कुलगुपिणी, जोटो महार अशी विविध नावे आहेत. हे भूत म्हणजे वाघाने ठार मारलेल्या माणसाची छाया असते अशी समजूत आहे. याची उंची फार कमी असते, म्हणून याला बुटके भूत असेही म्हणतात. परंतु याचे केस मात्र जमिनीवर लोळण्याइतके लांब असतात. रानातले वाघ या भुतांच्या आज्ञेत असतात व ते त्यांना पोसतात, अशी समजूत आहे.

ही भुते ' गुतुरा ' असे मोठ्याने ओरडतात. हा आवाज ऐकू आला, की जंगलात कामासाठी गेलेली माणसे पळ काढतात कारण गुतुरा हा भयसूचक शब्द आहे. ' वाघ जवळपास आहे, तेव्हा पळ काढा ' असा त्याचा अर्थ आहे. [एन्सा. मुंडा.]

बीरबल (१५२८–१५८३ इ. स.) अकबराच्या दरबारातील तथाकथित. नवरत्नांपैकी एक. याचे मूळ नाव महेशदास असे असून, बीरबल ही त्याची पदवी आहे. महेशदास अकबराच्या दरबारात प्रविष्ट झाल्यावर त्याच्या चातुर्याबरोबरच प्रसंगपरत्वे त्याच्या शौर्याचाही अकबराला प्रत्यय आला व त्यामुळे प्रसन्न होऊन अकबराने त्याला 'वीरवर' अशी गौरवोपाधी बहाल केली. पुढे या 'वीरवर' चेच बीरबल असे रूपांतर झाले. बीरबल हा प्राधान्याने त्याच्या चातुर्यकथांमुळे सर्वपरिचित असला, तरी तो उत्तम संगीतज्ञ, रसज्ञ कवी आणि श्रेष्ठ प्रशासकही होता.

बीरबलाच्या वडिलांचे नाव गंगादास. त्रिविक्रमपूर किंवा तिकवाँपूर हे त्याचे जन्मस्थान असून, ते यमुनाकिनारी वसले आहे. व्हिन्सेंट स्मिथच्या मते बीरबल काल्पीला जन्मला. बीरबल हा जातीने कनोजी ब्राह्मण होता. बालपणीच त्याने हिंदी, संस्कृत व फारसी या भाषांचे अध्ययन पुरे करून, त्यांत प्रावीण्य संपादिले. अकबराच्या दरबारात प्रवेश केल्यानंतर थोड्याच दिवसांत तो आपल्या अंगच्या गुणांनी एकापेक्षा एक उच्च स्थानावर चढत गेला. अकबराने त्याच्या शौर्य- साहसादी गुणांवर खूष होऊन त्याला पंचहजारी मनसबदारी व सेनापतिपद दिले होते. तसेच त्याच्या न्यायदक्षतेची पारख करून काही काळ

बीरबल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला न्यायाधीशही नेमले होते. व्यक्तिगत जीवनात तर तो अकबराचा सखाच होता. अकबराला पडलेल्या अनेकविध पेचप्रसंगांवर तो बिनतोड उपाययोजना सांगत असे. चातुर्य व शौर्य या गुणांबरोबरच त्याची औदार्याविषयीही ख्याती होती. केशवदासाच्या एका कवनावर प्रसन्न होऊन बीरबलाने त्याला सहा लाख रुपये पारितोषिक म्हणून दिले असल्याचे व ओरछा नरेशाचे एक काव्य आवडल्यामुळे त्याला एक कोटी रुपयाचा दंड माफ केल्याचे सांगतात. अकबराच्या दरबारात मानाच्या स्थानावर असल्यामुळे अनेक हिंदूंच्या अडचणी दूर करण्यासाठी तो आपले वजन खर्च करी. त्याच्याचमुळे अकबर सहिष्णू वृत्तीने वागू लागला असल्याचा सर्वसामान्य मुस्लिम नागरिकांचा समज झाला व ते त्याचा द्वेष करू लागले. अखेर युसुफझई नामक शत्रूच्या विरुद्ध लढाईवर गेला असता त्याला विश्वासघाताने ठार मारण्यात आले. बीरबलाच्या मृत्यूने अकबर अत्यंत दुःखी झाला. त्याने फत्तेपूर–शिक्री येथे स्वतःबरोबरच बीरबलासाठीही एक महाल बांधून घेतला होता व आजही तो तिथे पाहायला मिळतो.

बीरबल हा व्रजभाषेचा एक श्रेष्ठ कवी असून, त्याचे कविनाम ब्रह्म असे आहे. त्याच्या काही गीतरचना उपलब्ध आहेत. या गीतांचा विषय विष्णूची स्तुती हा असल्यामुळे, तो वैष्णव असावा असे वाटते. [अ. द. हिं. क.; क. कौ.]

बीसे अग्रवाल अग्रवाल वैश्यांचा एक भेद. हे इतर अग्रवालांहून स्वतःला श्रेष्ठ समजतात. यांची वस्ती सामान्यतः दिल्ली, आग्रा, मेरठ, मुरादाबाद आणि बरेली, इ. ठिकाणी आढळते. यांच्यांत शिकलेले लोक कमी असले, तरी त्यांच्याजवळ संपत्ती बरीच असते. आपल्या प्राचीन परंपरा जतन करण्यात हे लोक फार दक्ष असतात. यांच्यांत पडदा कटाक्षाने पाळला जातो. इतर अग्रवाल लोकांहून यांची विवाहप्रथा भिन्न आहे. अन्य वैश्यांबरोबर हे विवाहसंबंध करीत नाहीत. [क. अ. वि. प्र.]

बीहंडा गीते एक गीतप्रकार. काही आदिवासी समाजांत ही प्रचलित आहेत. यांनाच जिंदवा किंवा दिडवा गीते अशीही नावे आहेत. ही लग्नातल्या उखाण्यांसारखी पण अश्लील अशी गाणी असतात. नवरा मुलगा मुलीच्या घरी आला की सारे पुरुष तिथून निघून जातात व स्त्रिया विवस्त्र होऊन ही गीते गातात. या गीतांमधून व्याही–विहीण, दीर–भावजय, आजोबा–नात आणि नवरा–करवली यांच्या अनैतिक संबंधाचे सूचन असते. [लो. सा. रू.]

बुंदेलखंड एक इतिहासप्रसिद्ध भूप्रदेश. हा प्रदेश सांप्रत मध्य प्रदेशात समाविष्ट झाला आहे. पूर्वेला विंध्यपर्वतश्रेणी, पश्चिमेला चंबळ नदी, दक्षिणेला नर्मदा व उत्तरेला यमुना या त्याच्या चतुःसीमा होत. जबलपूर जिल्ह्याचा काही भाग, हमीरपूर, जालौन, झाशी, बांदा, सागर, दमोह, इ. जिल्हे व पन्ना, छतरपूर, ओरछा, दतिया, इ. पूर्वीची संस्थाने बुंदेलखंडात मोडत. हा भाग बहुतांशी पहाडी आहे. बेतवा, धसान, केन, वीरमा, बागई, इ. काही नद्या या प्रदेशातून वाहतात. याचे क्षेत्रफळ सुमारे २१,५०० चौ. मैल आहे.

बुंदेलखंड हे या प्रदेशाचे नाव बुंदेले राजपूत यांच्यावरून पडले, असे इतिहासज्ञ सांगतात.

बुंदेलखंड हे नाव रूढ होण्यापूर्वी या प्रदेशाला चेदी देश म्हणत. याच्यावर शिशुपालाचा अधिकार होता. चंदेल राजे हे शिशुपालाचेच वंशज समजले जातात. या चंदेल वंशात जेजाक किंवा जयशक्ती या नावाचा एक प्रतापी राजा झाला. या समस्त प्रदेशावर तो राज्य करीत असल्यामुळे त्याच्या नावावरून लोक या प्रदेशाला जेजाकभुक्ती म्हणू लागले. त्या भागातल्या अनेक शिलालेखांतून या राजाचे नाव येते.

बुंदेलखंडाच्या एका भागाला प्राचीन काळी दशार्ण देश म्हणत. हे नाव तिथल्या दशार्ण (धसान) नदीवरून पडले आहे. गौतम बुद्धाच्या काळात चेदी व दशार्ण ही दोन गणराज्ये होती. गौतम बुद्ध या प्रदेशात आला होता व इथल्या लोकांनी त्याच्यासाठी एक विहारही बांधला होता, असे बौद्ध ग्रंथांवरून कळते.

मौर्यांच्या काळात बुंदेल खंड हा प्रदेश मौर्य साम्राज्याचा एक भाग होता. त्यानंतर बुंदेलखंडावर शुंगांचे आधिपत्य होते. अग्निमित्र शुंग हा बेसनगर या ठिकाणी राहून या प्रदेशाचे राज्य सांभाळी. त्यानंतर याच्यावर गुप्तांची सत्ता आली. गुप्तांच्या नंतर हर्षवर्धनाने यावर राज्य केले. इ. स. च्या ७ व्या शतकापासून इथे कलचुरींची कारकीर्द सुरू झाली. इ. स. च्या ११ व्या शतकाच्या अखेरीस चंदेलांनी हा प्रदेश जिंकून घेतला.

इ. स. च्या १६ व्या शतकात बुंदेले राजपूत हे या प्रदेशाचे सत्ताधारी बनले. हे लोक काशीच्या गाहडवाल राजवंशातल्या पंचम नामक पुरुषाचे वंशज होत. याविषयी एक दंतकथा सांगतात. ती अशी –

पंचम किंवा हेमकिरण याला त्याच्या भावांनी राज्यभ्रष्ट केले. आपले राज्य परत मिळावे या हेतूने तो विंध्यवासिनी देवीकडे गेला व तिच्या प्रसन्नतेसाठी तप करू लागला. बराच काळ झाला, तरी देवी प्रसन्न होईना म्हणून त्याने आत्मघात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करायचे ठरविले. मग मात्र देवी प्रसन्न झाली. तिने त्याचा तलवारीचा हात धरला. पण तत्पूर्वी तलवार त्याच्या मस्तकाला लागली होती व त्यातून एक रक्तबिंदू खाली जमिनीवर पडला होता. त्या बिंदूतून एक पुरुष उत्पन्न झाला. त्या बिंदूवरून त्याला बुंदेला हे नाव मिळाले.

या बुंदेले राजपुतांत इ. स. १५०७ च्या सुमारास रुद्रप्रताप नावाचा राजा झाला. रुद्रप्रतापानंतर कीरतसिंहाने तिथे राज्य केले. इ. स. च्या १८ व्या शतकात छत्रसाल हा तिथला राजा झाला. महंमदखाँ बंगष याने बुंदेलखंडावर आक्रमण केले, तेव्हा छत्रसालाने बाजीराव पेशव्यांची मदत मागितली. बाजीरावाने लगेच धाव घेऊन बंगषाचा पराभव केला व छत्रसालाला वाचविले. मग छत्रसालाने आपल्या राज्याचा काही भाग बाजीरावाला बक्षिस म्हणून दिला. तेव्हापासून या प्रदेशावर मराठ्यांची सत्ता सुरू झाली. पेशवाई बुडाल्यानंतर हा प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. [बुंदेलखंडका संक्षिप्त इतिहास– श्री. गोरेलाल तिवारी, १९३३; बुंदेलखंडकी प्राचीनता – श्री. भागीरथप्रसाद त्रिपाठी, १९६५; हिं. वि. को.]

बुंदेला बाबा

उ. भारतातील एक लोकदेव. याच्यासंबंधी प्रचलित असलेल्या आख्यायिकांवरून असे दिसते, की काशीराजाच्या वंशात वीरभद्र नावाचा जो एक राजा झाला त्याचा हा मुलगा होय. वीरभद्रानंतर राजघराण्यात राज्य कोणाला मिळावे यावरून कलह सुरू झाला, तेव्हा हा विंध्यवासिनीच्या उपासनेसाठी घर सोडून निघून गेला. तिथे याने आत्मबलिदान केले होते; पण देवीने प्रसन्न होऊन त्याला जिवंत केले. मग त्याच्या हातात एक तलवार दिली आणि उत्तर प्रदेशाचे राज्यही त्याला दिले. पुढे सर्व जातींचे लोक त्याला भजू लागले. बुंदेला बाबा नवसाला पावतो, अशी समजूत आहे. पाच रंगांचे पाच पाषाण हे त्याचे प्रतीक म्हणून पूजेसाठी मांडतात. [श्री. पीतांबरराव तैलंग देव]

बुंदेली भाषा व साहित्य

बुंदेलखंड व त्याच्या आसपासचा प्रदेश यांत बोलली जाणारी एक बोली. ही पश्चिमी हिंदीची एक बोली आहे. हिच्या शुद्ध स्वरूपात ही उत्तर प्रदेशातील झाशी, जालोन व हमीरपूर या जिल्ह्यांत आणि मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर, भोपाळ, ओरछा, सागर, नृसिंहपूर, सिवनी व होशंगाबाद या जिल्ह्यांत बोलली जाते. दतिया, पन्ना, चरखारी, दमोह, बालाघाट व छिंदवाडा या भागांत बुंदेलीचे मिश्र रूप आढळते.

बुंदेलीत भाषागत वैशिष्ट्ये फारशी आढळत नाहीत. हिच्या दोन किंवा तीन उपशाखा असून, त्यांत काही स्थानिक वैशिष्ट्ये आढळतात. पँवारी, लोधानी किंवा राठौरी व खटोला या बुंदेलीच्या उपभाषा मानलेल्या आहेत.

लोकगीते – बुंदेलखंडाचा प्रदेश लोकगीतांच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध आहे. सर्वसाधारणपणे इथल्या लोकगीतांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल–(१) उत्सवगीते (२) प्रेमविषयक गीते (३) राजनैतिक, सामाजिक व वीरप्रशंसात्मक गीते.

श्री. गौरीशंकर द्विवेदी यांनी बुंदेली लोकगीतांचे विभाजन पुढील प्रकारे केले आहे–

(१) सैरे – ही गीते आषाढ व श्रावण या महिन्यांत गातात.

(२) राछरे – ही गीते ज्येष्ठापासून श्रावणापर्यंत गातात.

(३) भलारे व सावन – ही गीते श्रावण व भाद्रपद या महिन्यांत गातात.

(४) बिलवारी व दिवारी – ही गीते आश्विनात व कार्तिकात गातात.

(५) बाबा किंवा भोला यांची गीते – माघ महिन्यात तीर्थयात्राप्रसंगी ही गातात.

(६) फागें व लेदें – माघ-फाल्गुनात गातात.

(७) गारी – विवाहादी मंगलप्रसंगी गातात.

यांशिवाय गवत कापताना व इतर मजुरीची कामे करतानाही लोक निरनिराळी गीते गातात.

उत्सवगीतांत जन्मासंबंधीच्या गीतांचाही समावेश होतो. त्यांना सोहरगीते असे नाव आहे. एखाद्या घरी पुत्र जन्मल्यावर आसपासच्या स्त्रिया तिथे जमतात आणि सोहरगीते गातात. पुत्रजन्माचा आनंद ही या गीतांची मुख्य प्रेरणा आहे. सोहरगीतांत हा आनंद सर्वत्र दिसतो. त्यांचा एक नमुना असा –

घूंघर बाले हैं बाल मोरे लला के ......
दादा जीवे, दादी जीवे, जीवे सकल परिवार मोरे लला के।

अर्थ – माझ्या लहान बाळाचे केस कुरळे आहेत. त्याच्या मातापित्यांना व कुटुंबाला उदंड आयुष्य लाभो.

जन्मानंतर दहा दिवसांनी बधावगीते गाण्याची पद्धत आहे. आप्तेष्टांकडून या दिवशी बाळंतिणीला बधावे म्हणजे भेटवस्तू येतात. पुढील गीतात बालकृष्ण नंद राजाकडे आल्यावर चाललेल्या आनंदोत्सवाचे वर्णन केलेले आहे –

नंद घरे बजन बधाये लाल हम सुनकें आये
मथुरा हरिने जनम लियो है, गोकल बजत बधाये
कौन ने जाये यशोदाने खिलाये, बाबा नंदके लाल कहाये
सोरा गऊ के गोबर मंगाये, कंचन कलस धराये
चंदन पटली धराई यशोदा, चौयक दियल जराये

भावार्थ – नंदराजाच्या घरी आज मंगलोत्सव चालला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्या बापाने त्याला शाळेत घातले; पण तिथे तो रमला नाही. उलट त्याने गुरुशोधार्थ लाहोरला प्रयाण केले.

तिथल्या मुक्कामात त्याची शाह इनायत कादरी नावाच्या एका सूफी साधूशी गाठ पडली. इनायतशाहाशी काही दिवस अध्यात्मचर्चा केल्यावर हा आपल्याला योग्य मार्गदर्शन करू शकेल, अशी त्यांची खात्री पटली व मग त्याने यथाविधि त्याचे शिष्यत्व पत्करले. इनायतशाहा हा कादरी पंथाचा प्रवर्तक होता. त्यामुळे बुल्लेशाहालाही त्याने त्याच पंथाची दीक्षा दिली.

त्यानंतर बुल्लेशाह कुसूर येथे जाऊन राहिला. तिथे असताना त्याचा आपल्या गुरूशी काही विषयांत मतभेद झाला व परिणामी गुरूने त्याचा त्याग केला. या गोष्टीचे बुल्लेशाहाला परम दुःख झाले. गुरुविरहाची ही वेदना त्याने काव्यद्वारा प्रकट केली. ती रचना गुरूच्या कानी गेली व त्यातील भावसौंदर्याने भारावून जाऊन गुरूने त्याचा पुनश्च स्वीकार केला.

नंतरचा काळ त्याने कुसूर येथेच काव्यलेखनात व पंथप्रचारात घालवला. वयाच्या बहात्तराव्या वर्षी बुल्लेशाह कुसूर गावीच मरण पावला. तिथे त्याची समाधी असून, प्रतिवर्षी त्याचा जन्मोत्सव साजरा होतो.

एक श्रेष्ठ सूफी कवी व समाजसुधारक सत्पुरुष म्हणून बुल्लेशाहाला पंजाबी साहित्यात मानाचे स्थान आहे. त्याने दोहे, काफी, सीहर्फी अठवारा, बारहमासा, इ. नानाविध प्रकारची गीतरचना केली आहे. आपली मते परखडपणे मांडण्याविषयी बुल्लेशाहाची ख्याती आहे. कुराणात वर्णिलेल्या आणि परंपरेने चालत आलेल्या अनेक भोळ्या-खुळ्या चालीरीतींवर त्याने कोरडे ओढले आहेत. या त्याच्या स्पष्टवक्तेपणामुळे चिडून जाऊन एकदा काही मुल्ला-मौलवींनी त्याच्यावर हल्ला चढविला. त्या प्रसंगी अत्यंत शांत राहून, परंतु स्वमतावरची श्रद्धा ढळू न देता तो म्हणाला–

मुंह आयी बात न रेहदीए। झूठ आख्यां ते कुछ बचदाए ।।
सच आख्यां भांबड मचदाए। दिल दोना गल्लां तो जचताए ।।
जचजचके जिह्वा केहदीए। मुंह आई बात न रेहदीए ।।

भावार्थ – (खरोखर) ओठावर आलेला विचार रोखता येत नाही. खोटे बोलेन तर काहीतरी राहून गेल्यासारखे वाटते. खरे सांगेन तर आग भडकते. मन दोन्ही गोष्टींनी घाबरे होते. पण घाबरून, बिचकूनही जीभ एकच गोष्ट सांगते, की ओठावर आलेला विचार काही रोखता येत नाही.

बुल्लेशाहाची सारीच रचना अशा जोशपूर्ण शब्दांनी आणि प्रखर विचारांनी नटलेली आहे. त्याच्या काही गीतांचे संकलन केले गेले आहे; तथापि त्याची बरीचशी कविता पंजाबी लोकांत मौखिक परंपरेने टिकून राहिली आहे. [उ. भा. सं. प.; आजकल, जून १९५६; हिं. वि. को.; हिं. सं. बौ. प्र.]

बूचराज (१४८०–१५४० इ. स.) एक हिंदी भक्तकवी. हा जैन होता. हा ब्रह्मबूचा म्हणूनही ओळखला जातो. याने आपले दुसरे नाव वल्हवील्ह किंवा वल्हव असे सांगितले आहे. कदाचित हे त्याचे उपनाम असावे. याचे फारसे चरित्र उपलब्ध नाही. हा मूलसंघाच्या भट्टारक पद्मनंदीच्या परंपरेत झाला, असे त्याच्या एका ग्रंथावरून कळते. त्याचे काव्यग्रंथ पंजाबमधील हिसार नामक गावी रचले गेले, असे संतोषतिलक जयमालेत म्हटले आहे. याच्या भाषेवर राजस्थानी भाषेचा प्रभाव आहे. म्हणून तो राजस्थानचा असावा, असेही काही पंडितांचे मत आहे.

मयणजुज्झ, संतोषजयतिलक, चेतन पुद्‌गल ढमाल, टंडाणा गीत, नेमिनाथवसंतू आणि नेमीश्वरका बारहमासा या त्याच्या काव्यकृती आहेत. याशिवाय त्याने काही स्फुट रचनाही केली आहे. मयणजुज्झ हे एक रूपककाव्य आहे. यात आदितीर्थंकर ऋषभदेव आणि कामदेव यांचे युद्ध वर्णिले आहे. ऋषभदेव मोक्षरूपी लक्ष्मी प्राप्त करू इच्छितो; पण कामदेव त्या प्रयत्नात विघ्न आणतो. त्यामुळे त्या दोघांत युद्ध होते. या युद्धात मोह, माया, राग, द्वेष हे कामदेवाचे प्रमुख साहाय्यक असतात. वसंत हा त्याचा दूत असतो. कालिदासाचे कुमारसंभव काव्य ही प्रस्तुत काव्यामागची प्रेरणा आहे, हे निस्संशय दिसते.

संतोषजयतिलकामध्ये १२३ पद्ये आहेत. या ग्रंथाची भाषा प्राचीन हिंदी असून, त्यावर राजस्थानी भाषेचा प्रभाव आहे. यात लोभ, मोह, रोष, इ. अनेक विषय असून, कवीने अखेरीला संतोषाची महती गायली आहे.

चेतन पुद्‌गल ढमाल या रचनेत १३६ पदे असून, त्यांत बूचराज त्याने चेतनाला पुद्‌गलाची संगती न धरण्याचा उपदेश केला आहे. नेमिनाथवसंतू आणि नेमीश्वरका बारहमासा या त्याच्या कृती अधिक सुंदर आहेत. पहिल्या रचनेत नवयौवना, विरहिणी अशा राजीमती नामक नायिकेच्या मनाचे चित्रण आहे, तर दुसऱ्या रचनेत राजीमतीच्या विरहावस्थेचे वर्णन आहे. [हिं. जै. भ. क.]

बूढाबाबू उत्तर भारतातील एक लोकदेव. मेरठ जिल्ह्यात व त्याच्या आसपासच्या भागांत या देवाची पूजा होते. वैशाख, भाद्रपद आणि माघ या महिन्यांतील शुद्ध द्वितीयेला या देवाचा उत्सव करतात. अनेक पंडितांच्या मते ही पूजा म्हणजे लोकपाल–पूजा किंवा कुबेरपूजा असावी. [पृथिवीपुत्र]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बूलासाहब (१६३२– १७०९ इ. स.) उत्तर प्रदेशातील एक संतकवी. गाजीपूर जिल्ह्यातील भरकुडा नामक गावचा हा रहिवासी होता. हा जातीने कुणबी असून, याचे मूळ नाव बुलाकीराम असे होते. हा एका जमीनदाराकडे जमीन नांगरणीचे काम करीत असे. एकदा तो आपल्या धन्याबरोबर दिल्ली येथे काही कामासाठी गेला असता, त्याची बावरी पंथातील प्रसिद्ध सत्पुरुष यारीसाहब याच्याशी भेट झाली. यारीसाहबाने बुलाकीरामाची आध्यात्मिक पात्रता ओळखली व अनुग्रह देऊन बूलासाहब या नव्या नावाने त्याला आपल्या शिष्यसंप्रदायात दाखल करून घेतले. गुरुकृपा झाल्यामुळे बूलासाहबाला ऐहिक जीवनाचे वैय्यर्थ पटून तो मुक्तसंचारी बनला व अध्यात्मसाधनेत निमग्न झाला.

काही दिवसांनी बूलासाहब भरकडा गावी परत गेला, तेव्हा त्याच्या धन्याने त्याची नाना प्रकारांनी समजूत काढून त्याला पुनश्च नांगरणीच्या कामाकडे वळविले. परंतु एक दिवस त्याने पाहिले, की बूलासाहब जमीन नांगरणीचे काम न करता बांधाच्या कडेला डोळे मिटून ध्यानस्थ बसला आहे. त्याबरोबर त्याला राग येऊन त्याने बूलासाहबाला लाथ मारली. त्यामुळे बूलासाहब एकदम कोलमडला व त्याच्या हातातून दही सांडले. ते दृश्य पाहून बूलासाहबाचा धनी आश्चर्यचकित झाला. कारण लाथ मारण्यापूर्वी बूलासाहबाच्या हातात तर काहीच नव्हते ! ध्यानावस्था उतरताच बूलासाहब आपल्या धन्याला म्हणाला, की मी साधुसंतांच्या भोजनासाठी दही घेऊन चाललो होतो, तर मधेच तुम्ही धक्का दिलात व माझे दही सांडले. बूलासाहबाचे हे बोलणे ऐकून त्याच्या धन्याला त्याची योग्यता पटली व त्याने बूलासाहबाचे पाय धरून त्याचे शिष्यत्व पत्करले.

यानंतरचा काळ बूलासाहबाने एका जंगलात पर्णकुटी बांधून ईशचिंतनात घालवला. त्याच्या वास्तव्याने त्या जंगलाला लोक रामबन असे म्हणू लागले.

बूलासाहब विशेषसा शिकलेला नव्हता. तथापि त्याची प्रज्ञा आणि प्रतिभा अत्यंत सामर्थ्यशालिनी होती. आपला गुरू यारीसाहब याच्याविषयीच्या भक्तीने ओथंबलेली अनेक गीते त्याने लिहिली आहेत. तसेच नामदेवापासून कबीर-नानकांपर्यंत अनेक संतांवरही त्याने पद्यरचना केली आहे. त्याची भाषा सोपी आहे. [उ. भा. सं. प.]

बृहज्जाबालोपनिषद एक नव्य उपनिषद. हे शिवाचे माहात्म्य विशद करणारे शैव उपनिषद असून, त्याची आठ ब्राह्मणे (प्रकरणे) आहेत. या उपनिषदात भस्मधारणाचे सांगोपांग विवेचन केलेले असून, रुद्राक्षधारणाचा विधीही सांगितला आहे. [श्री. सी. ग. देसाई]

बृहती सात वैदिक छंदांपैकी चौथा छंद. या छंदाच्या पहिल्या अर्ध्यात १६ व दुसऱ्या अर्ध्यात २० मिळून ३६ अक्षरे असतात. हा छंद मोठा आहे; म्हणूनच त्याला हे नाव पडले असावे. ब्राह्मण ग्रंथांत आलेल्या आहेत. या छंदासंबंधी काही कथाही याला सर्व छंदांचा तारक व स्वयंप्रकाशित म्हटले आहे. बृहतीचे एक उदाहरण असे (ऋ. ८. १. १)–

मा चिदन्यद् वि शंसत सखायो मा रिषण्यत ।
इन्द्रमित् स्तोता वृषणं सचा सुते मुहुरुक्था च शंसत ॥

हा छंद सर्व छंदांत येतो व सर्व छंद याच्या ठिकाणी एकत्रित होतात, असे म्हटले आहे. जेव्हा विधिविषयक ग्रंथांत अमुक श्लोक किंवा अमुक अनुष्टुभ आहेत, अशी संख्या दाखवायची असते, तेव्हा बृहती हे मूल परिमाण धरतात.

बृहतीच्या छत्तीस अक्षरांमुळे हा शब्द छत्तीस या संख्येचा द्योतक झाला आहे. [म. ज्ञा. को.–वेदविद्या]

बृहत्कथा एक प्राचीन कथासंग्रह. गुणाढ्य नावाच्या पंडिताने हा ग्रंथ मुळात पैशाची भाषेत रचला. त्यात सात विद्याधरांच्या प्रदीर्घ कथा आणि तदनुषंगिक अनेक उपकथा होत्या, असे कळते. पण सांप्रत तो ग्रंथ मूळ स्वरूपात उपलब्ध नाही. कथासरित्सागर आणि बृहत्कथामंजरी अशी त्याची दोन संस्कृत भाषांतरे तेवढी उपलब्ध आहेत.

गुणाढ्य हा वैदिक परंपरेचा अभिमानी असूनही त्याने आपल्या कथांना धार्मिक पार्श्वभूमी न घेता त्यांचे लौकिक स्वरूप कायम ठेवले. अद्‌भुत कथांचा हा संग्रह महाभारताच्या तोडीचा लोकप्रिय करून आपण व्यासांचे यश संपादन करू, अशी गुणाढ्याची महत्त्वाकांक्षा होती. ती पूर्णार्थाने सफल होऊ शकली नाही. त्याचे कारण म्हणजे या कथांना सांस्कृतिक किंवा नैतिक मूल्य नव्हते हे होय. डॉ. केतकर यांच्या मते हा ग्रंथ कुरुयुद्धापासून बुद्धापर्यंतच्या कालखंडाच्या इतिहासावर प्रकाश टाकतो. पाहा – गुणाढ्य; कथासरित्सागर. [लो. सा. रू.]

बृहत्कौशलखंड रसिक रामभक्तीच्या परंपरेतील एक ग्रंथ. प्रस्तुत ग्रंथात राम-सीतेचा (प्रिया-प्रीतम) उन्मुक्त शृंगार वर्णिलेला आहे. शौनकाने सूताला राम-लीला-रहस्य विचारले आणि सूताने ते विवरून सांगितले, अशी याची भूमिका आहे. रामभक्तीच्या रसिक उपासनेत प्रस्तुत ग्रंथाला वेदवत पूज्य आणि परमगुह्य मानलेले आहे. [रा. सा. म. उ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बृहत्तपोव्रत एक काम्य व्रत. या व्रताला बृहत्तपा असेही म्हणतात. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेला या व्रताला प्रारंभ करतात. शिव ही या व्रताची देवता आहे. कालावधी एक वर्ष किंवा सोळा वर्षे. फल – ब्रह्महत्यानिवारण. [हि. घ.]

बृहदारण्यकोपनिषद हे उपनिषद शुक्ल यजुर्वेदाच्या शतपथ ब्राह्मणाचा एक भाग आहे. सर्व उपनिषदांमध्ये हे विस्ताराने मोठे असल्यामुळे याला बृहत म्हटले आहे आणि याचा आरण्यकांत समावेश असल्यामुळे त्याला बृहदारण्यकोपनिषद असे नाव मिळाले आहे. याचे सहा अध्याय असून, तीन कांडे आहेत –

मधुकांड – यात आत्मा व परमात्मा यांचे ऐक्य प्रतिपादिलेले असून, आत्मा सर्वत्र कसा भरून राहिला आहे, ते स्वानुभवाच्या आधारे दाखवले आहे. याला उपदेशकांड म्हणतात.

मुनिकांड – यात आत्मा व परमात्मा यांचे ऐक्य तर्काच्या आधारे दाखवले आहे. याला उपपत्तिकांड म्हणतात.

खिलकांड – यात आत्मा व परमात्मा यांचे ऐक्य अनुभवाला येण्यासाठी आवश्यक असे अनेक मार्ग सांगितले आहेत. याला उपासनाकांड म्हणतात.

प्रस्तुत उपनिषदाचा शांतिमंत्र असा –

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

अर्थ – हे सच्चिदानंद घन परब्रह्म सर्व प्रकारे परिपूर्ण आहे. हे जगत त्या परब्रह्मापासून उत्पन्न झालेले असल्यामुळे तेही पूर्ण आहे. पूर्ण ब्रह्मातून पूर्ण जगत वेगळे काढले तरी पूर्णच शिल्लक राहते.

याच्या पहिल्या अध्यायात हिरण्यगर्भाला यज्ञीय पशू मानून त्याचे वर्णन केलेले आहे. पुढे मृत्यूपासून जगातील सर्व वस्तूंची उत्पत्ती कशी झाली, ते सांगितले आहे. मृत्यू म्हणजेच हिरण्यगर्भ होय. ज्याप्रमाणे आपल्या शरीराला जाणीव व्यापून असते त्याचप्रमाणे संपूर्ण दृश्य विश्वाला व्यापून असणाऱ्या जाणिवेला हिरण्यगर्भ अशी संज्ञा आहे. विविध प्रकारे व सुंदरपणे नटलेल्या या विश्वाचे मूळ हिरण्यगर्भात म्हणजे मृत्यूत सापडते. मृत्यू म्हणजे विनाश अर्थात वस्तूच्या नाम-रूपाचा अंत होय. नाम-रूप नाहीसे झाले, की वस्तू अदृश्यात जाते आणि तिथून नवे नाम-रूप घेऊन परत आकाराला येते. अशा प्रकारे सर्व दृश्य विश्व ज्यात विलीन होते आणि जिथून पुनश्च उत्पन्न होते तो हिरण्यगर्भ म्हणजे मृत्यू होय.

त्यापुढे सर्व इंद्रियांत प्राण हा श्रेष्ठ आहे, असे सांगून पुढील मंत्राने (१. ३. ११) प्राणाचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे –

सा वा एषा देवता एतासां देवतानां पाप्मानं
मृत्युमपहत्य अथैना मृत्युमत्यवहत् ॥

अर्थ – ती ही प्राणरूप देवता. हिने देवतांच्या पापरूप, मृत्यूला दूर करून त्यांना मृत्यूच्या पलिकडे नेले.

त्यापुढे धर्म व सत्य ही दोन्ही एकच कशी आहेत, ते सांगताना पुढील (१.४.१७) मंत्र लिहिला आहे–

स नैव व्यभवत्, तत् श्रेयोरूपमत्यसृजत धर्मं तदेतत् क्षत्रस्य क्षत्रं यद्धर्मः, तस्मात् धर्मात् परं नास्ति, अथो अबलीयान् बलीयांसमाशंसते धर्मेण, यथा राज्ञैवम्; यो वै स धर्मः सत्यं वै तत्, तस्मात् सत्यं वदन्तम् आहुः; धर्मं वदतीति, धर्मं वा वदन्तं सत्यं वदतीति, एतद् हि एवैतद् उभयं भवति ॥

अर्थ – ते ब्रह्म विलास करू शकले नाही म्हणून त्याने श्रेयोरूप धर्म उत्पन्न केला. धर्म हे क्षत्रांचे बल आहे. म्हणून धर्माहून श्रेष्ठ काही नाही. त्यामुळे एखादा अत्यंत दुर्बल मनुष्यही अत्यंत बलाढ्य मनुष्याला धर्माच्या जोरावर जिंकण्याची इच्छा करतो. व्यवहारात एखादा सामान्य मनुष्य राजाच्या मदतीने प्रबल शत्रूला जिंकण्याची इच्छा करतो, तसेच हे आहे. धर्म हेच सत्य होय. म्हणून सत्य बोलणाऱ्याला हा धर्म बोलतो, असे म्हणतात व धर्म बोलणाऱ्याला हा सत्य बोलतो, असे म्हणतात. तात्पर्य, धर्म आणि सत्य दोन्ही एकच आहेत.

दुसऱ्या अध्यायात गार्ग्य व अजातशत्रू या दोघांचा संवाद आहे. त्यात अजातशत्रूने गार्ग्याला ब्रह्माचा उपदेश केला आहे. तिथून पुढे याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी यांचा संवाद येतो. याज्ञवल्क्याच्या मैत्रेयी आणि कात्यायनी अशा दोन भार्या होत्या. तो जेव्हा गृहस्थाश्रम सोडून संन्यास घ्यायला निघाला, तेव्हा त्याने मैत्रेयीला म्हटले. ' मी आता माझ्या संपत्तीची तुम्हां दोघींमध्ये वाटणी करणार आहे.' त्यावर मैत्रेयी म्हणाली. ' बाह्य संपत्ती घेऊन मी काय करू ? तिच्यामुळे मी काही अमर होऊ शकत नाही. तरी तुम्ही मला अमृतत्वाच्या प्राप्तीचे जे साधन असेल ते सांगा.' त्यावर आत्मज्ञान हेच अमृतत्व मिळवण्याचे साधन आहे, असे सांगून आत्म्याचे श्रेष्ठत्व याज्ञवल्क्याने पुढील मंत्राने (२.५.१५) सांगितले–

स वा अयं आत्मा, सर्वेषां भूतानां अधिपतिः, सर्वेषां भूतानां राजा; यद् यथा रथनाभौ च रथनेमौ चाराः सर्वे समर्पिताः एवमेव अस्मिन् आत्मनि सर्वाणि भूतानि सर्वे देवाः सर्वे लोकाः सर्वे प्राणाः सर्व एत आत्मनः समर्पिताः ॥

अर्थ – हा आत्मा सर्व भूतांचा मालक आणि राजा आहे. ज्याप्रमाणे रथाच्या नाभीमध्ये किंवा रथचक्राच्या नेमीमध्ये चक्राचे सारे आरे केंद्रित होतात, त्याप्रमाणे सर्व देव, लोक आणि प्राण, किंबहुना सर्व जीवन आत्म्यामध्ये केंद्रित आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आत्मा म्हणजेच अमृत, तेच ब्रह्म आणि तेच सर्व काही असे मैत्रेयीला पटवून देताना दध्यङ्‌ ऋषीने अश्विनीकुमारांना ज्या मधुविद्येचा उपदेश केला, तो याज्ञवल्क्याने मैत्रेयीला सांगितला आहे.

तिसऱ्या अध्यायात् अश्वल, आर्तभाग, उषस्तचाक्रायण, कहोळ, गार्गी, उद्दालक, आरुणी, विदग्ध शाकल्य यांनी वैदेह जनकाच्या राजसभेत विचारलेल्या प्रश्नांना याज्ञवल्क्याने दिलेली उत्तरे आहेत. चौथ्या अध्यायात जनक व याज्ञवल्क्य यांची ब्रह्मविषयक चर्चा आहे.

पाचव्या अध्यायात नीतिशास्त्र, सृष्टिनिर्माणशास्त्र, परलोकशास्त्र, इ. विषयांवरील विचार असून, गायत्रीच्या स्वरूपाचे वर्णन केले आहे. अध्यायाचा समारोप करताना जे तीन महत्त्वाचे मंत्र दिले आहेत, त्यांतील (५.१५.१) एक असा–

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ।।

अर्थ – परमात्मस्वरूपाचे मुख सुवर्णमय पात्राने झाकले आहे. ब्रह्मदर्शन होण्यासाठी ते माझ्या आड येते. (म्हणून) हे देवा, ते तू दूर कर.

मनुष्य जिवंत आहे, तोवर त्याने आत्मदर्शन करून घेतले पाहिजे. आत्मदर्शनासाठी देह हेच मुख्य साधन असल्याने आणि देह केव्हा पतन पावेल याचा नेम नसल्याने शहाण्या माणसाने त्वरा करून आत्मज्ञान मिळवावे.

सहाव्या अध्यायात शरीरातल्या सर्व शक्तींपेक्षा प्राण श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे, श्वेतकेतू आरुणीची गोष्ट सांगितली आहे, प्रवाहण जैवलीची पंचाग्निमीमांसा कथन केली आहे, काही मंत्रप्रयोगही दिले आहेत. शेवटी गुरुशिष्यांची परंपरा सांगितली आहे.

'अहं ब्रह्मास्मि' व 'अयमात्मा ब्रह्म' ही महावाक्ये या उपनिषदात आली आहेत.

प्रस्तुत उपनिषदाचा संक्षिप्त सारांश असा–

हे व्यक्त जगत त्याच्या उत्पत्तीपूर्वी अव्याकृत होते, म्हणजेच त्याचे नामरूप व्यक्त नव्हते. ते व्यक्त झाल्यावर त्यात जो परमात्मा प्रविष्ट झाला तोच आत्मा होय. या आत्म्याचे ज्ञान आणि प्राप्ती हेच मानवाचे ध्येय असावे. पत्नी, पुत्र, वित्त इत्यादिकांपेक्षा आत्मा अधिक प्रिय आहे. कारण तोच तत्त्वस्वरूपाला अगदी समीप आहे. मनुष्याने त्याचीच उपासना करावी. आत्मोपासना न करणारा मनुष्य पुण्यकारक व शास्त्रोक्त कर्म करीत असला, तरी त्या अविद्वानाचे ते कर्मफल भोगल्यांती क्षय पावते. अग्नीपासून जशा लहान लहान ठिणग्या उडतात, तसे सर्व प्राण, सर्व लोक व सर्व देव आत्म्यापासूनच उत्पन्न होतात. हा आत्मा सत्याचे सत्य आहे. कर्माचे साधन असा जो देह, तो मृत्युवश आहे आणि त्या मृत्यूपासून सुटण्याचा आत्मज्ञान हाच एक उपाय आहे. हा आत्मा पूर्व शरीराला स्वप्नाप्रमाणे अचेतन करून वासनेमुळे पुढील शरीराचा आश्रय करतो व ते शरीर म्हणजेच 'मी' असे म्हणतो. असा आत्मभाव टाकणे हाच त्याचा शरीरत्याग व भावी शरीरावर आत्मभाव ठेवणे हेच याचे शरीरग्रहण होय. यासाठी मनुष्याने या देहावरील ममत्वबुद्धी टाकावी व शम, दम आणि उपरती यांनी युक्त व शांतचित्त होऊन हृदयस्थ बुद्धीने आत्म्याला पाहावे. आत्म्याला पाहणे हेच आत्मतत्त्वाचे साधन आणि हेच मानवी जीवनाचे अंतिम साध्य होय.

प्रस्तुत उपनिषदाचे माध्यंदिन व काण्व असे दोन पाठभेद आहेत. त्यांत थोडासा फरकही आहे. जनक व याज्ञवल्क्य यांची कथा मात्र दोहोंतही आहे. [उ. अ.; उ. र.; वै. सा.]

बृहदुक्थ वामदेव

एक सूक्तद्रष्टा. हा वामदेवाचा पुत्र किंवा वंशज असावा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ५४–५६ ही सूक्ते याच्या नावावर आहेत. याच्या मुलाचे नाव वाजिन असे होते. तो मेला असता त्याच्या शरीरातील भाग घेऊन जाण्याविषयी याने देवांना प्रार्थना केली आहे. (१०–५६). बृहदुक्थाने पांचाल देशाच्या दुर्मुख नावाच्या राजाला राज्याभिषेक केला होता, असे ऐतरेय ब्राह्मणावरून कळते (३९.६). सर्वानुक्रमणीत याला वामदेव्य म्हटले असून, त्याला शतपथ ब्राह्मणात आधार सापडतो (८.२.२.१४)

बृहदुक्थाची तीन्ही सूक्ते इंद्रस्तुतिपर आहेत. ती सूक्ते म्हणजे प्रतिभेची भरारी असलेली श्रेष्ठ काव्येच वाटतात. काही अंशी गूढ अशा भाषेत इंद्राचे माहात्म्य त्याने वर्णिले आहे. त्याला अंतरिक्षाचे विलक्षण आकर्षण असावे, असे वाटते. तारकांच्या समूहात भिरिभिरी हिंडणाऱ्या तरुण चंद्राला शुभ्रकेसांच्या वृद्धाने (कालपुरुष) गिळून टाकले, ही ईश्वराची अद्भुत करणी होय.

अशाच प्रकारे तो अंतरिक्षातल्या तेजोगोलकांचीही वेगळ्याच धर्तीची वर्णने करतो. नमुन्याची एक ऋचा अशी–

शाक्मना शाको अरुणः सुपर्ण आ यो महः शूरः सनादनीळः।
यच्चिकेत सत्यमित् तन्न मोघं वसु स्पार्हमुत जेतोत दाता ।।
(ऋ. १०.५५.६)

अर्थ– आपल्याच शक्तीने शक्तिमान असणारा एक लाल सुपर्ण (गरुड) आहे. तो प्रचंड आणि शूर आहे. पण त्याला पुरातन कालापासून घरटे असे नाहीच. तो जे जे मनात आणतो ते ते सत्यच होते. (शिवाय) ते निरर्थक कधीच होत नाही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि स्पृहणीय असे धन जिंकून आणणारा व भक्तांना देणारा तोच आहे.

बृहदुक्थ या नावाचा एक गोत्रकार आहे. हिरण्यकेशी तर्पणातील एक ऋषीही या नावाचा आहे. बृहदुक्थ हा सत्यामुळे ऋषी झाला, असें वायू पुराणात म्हटले आहे (५९.९३,१०१). [प्रा. च. को.; वे. इं.; तर्पण; पु. इं.]

बृहद्गौरीव्रत एक काम्य स्त्रीव्रत. भाद्रपद कृष्ण तृतीया ही व्रताची तिथी होय. याचा विधी असा — फळाफुलांनी युक्त असा बृहतीचा (रिंगणी) वेल मुळासकट आणून तो वाळूच्या वेदीत पुरतात. त्याच्या पुढे पंचसूत्री दोरा ठेवतात. मग रात्री चंद्रोदय झाल्यानंतर पाच सुवासिनींसह, त्या वेलाला गौरी मानून, त्याची पूजा करतात. पूजेनंतर तो दोरा गळ्यात बांधून चंद्राची पूजा करतात. त्याला कणकेच्या लाडवांचा नैवेद्य दाखवतात. त्यांतले अर्धे लाडू ब्राह्मणाला देतात. तसेच कणकेची रिंगणीएवढी फळे करून त्यांचे वायन देतात. मग कथा ऐकतात. या व्रताची कथा अशी —

कुंतीला बराच काळ अपत्य होईना; तेव्हा तिने पांडुराजाला त्याबद्दल विचारले. ऋषिशापामुळे आपणांस अपत्य होणार नाही, असे पांडुराजाने तिला सांगितले. पुढे एकदा तिची व व्यासांची भेट झाली. अपत्य होण्यास काय उपाय, असा तिने त्यांना प्रश्न विचारला. त्यावर व्यासांनी तिला बृहद्गौरीव्रत करायला सांगितले. मग तिने ते व्रत केले आणि त्या व्रताच्या प्रभावाने तिला तीन पुत्र झाले.

पाच वर्षे असे व्रत करून मग त्याचे उद्यापन करतात. त्या वेळी चौसष्ठ बियांनी युक्त असे रिंगणीएवढे सुवर्णफल तयार करून ते गौरीला अर्पण करतात. ब्राह्मण-सुवासिनींना भोजन घालतात. फल—अपत्यप्राप्ती. [व्रतराज]

बृहद्दिव आथर्वण एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १२० वे सूक्त याच्या नावावर आहे. या सूक्ताच्या आठव्या ऋचेत याचा उल्लेख आहे. इंद्रस्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. त्यातील नमुन्याची एक ऋचा (१०.१२०.५) अशी —

त्वया वयं शाशद्महे रणेषु प्रपश्यन्तो युधेन्यानि भूरि ।
चोदयामि त आयुधा वचोभिः सं ते शिशामि ब्रह्मणा वयांसि ।।

अर्थ — आमच्या समोर फार मोठे शत्रुसैन्य उभे आहे, असे उघड दिसत असले तरीही रणांगणामध्ये आम्ही तुझ्या कृपेने त्या (शत्रुसैन्या) चा पार धुव्वा उडवून देऊ. तुझी स्तुती केल्याने (प्राप्त झालेली) तुझी आयुधे मी शत्रूवर चालवीन, आणि तुझ्या प्रार्थनेच्या योगाने आमच्या जोमदार सैन्याला उत्तेजन देईन.

हा सुम्नयूचा शिष्य असल्याचे शांखायन आरण्यकात म्हटले आहे (१५.१). [प्रा. च. को.; म. ज्ञा. को.]

बृहद्देवता एक प्राचीन ग्रंथ. वेदांगांव्यतिरिक्त वेदांतील ऋषी, देवता, छंद, पद, इ. गोष्टींसंबंधी जे ग्रंथ लिहिले गेले, त्यांत बृहद्देवता हा एक सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. याचा कर्ता शौनक असून, त्याचा काल पाणिनीपूर्व आणि यास्कोत्तर म्हणजे सन पूर्व ८ वे शतक हा असावा, असे मानतात. सुप्रसिद्ध शौनक हा त्याचा कर्ता नसून, त्याच्या संप्रदायातला दुसरा कोणीतरी आचार्य त्याचा कर्ता असावा, असे डॉ. मॅक्डोनेल मानतो. वैदिक देवतांना त्यांची नावे कोणत्या कारणाने प्राप्त झाली त्याचा विचार या ग्रंथात झाला आहे. प्रत्येक वेदशाखेची एकेक बृहद्देवता होती असे म्हणतात. पण सांप्रत ऋग्वेदाची बृहद्देवता उपलब्ध आहे. वेदमंत्रांविषयी शौनकाचे सांगणे असे —

अविदित्वा ऋषिं छन्दो देवतां योगमेव च ।
योऽध्यापयेज्जपेद्वापि पापीयाञ्जायते तु सः ।।

अर्थ — प्रत्येक मंत्राचा द्रष्टा ऋषी, त्याचा छंद आणि विनियोग हे न जाणता जो मंत्राचे अध्ययन किंवा अध्यापन करील, तो पापी होय.

या ग्रंथात १२०० श्लोक असून, ते आठ अध्यायांत विभागलेले आहेत. पहिला अध्याय व दुसऱ्या अध्यायाचे १२५ श्लोक यांत ग्रंथाची भूमिका असून, तिच्यात प्रत्येक देवतेचे स्वरूप, स्थान व वैलक्षण्य यांचे विस्तृत वर्णन दिलेले आहे. भूमिकेच्या शेवटी निपात, अव्यय, सर्वनाम, संज्ञा, समास, इ. व्याकरणातल्या विषयांची चर्चा केली आहे. त्यातच यास्काच्या व्याकरणदृष्टंचा अपप्रयोगांवर टीकाही आहे. पुढच्या समग्र ग्रंथात ऋग्वेदातील देवतांचा क्रमशः निर्देश आहे. त्यातच काही आख्यानेही आहेत. ही आख्याने त्या त्या देवतांचे महत्त्व सांगणारी आहेत. ही आख्याने व महाभारतातील काही आख्याने यांचा जवळचा संबंध दिसतो. बहुतेक विद्वानांच्या मते महाभारतातील आख्याने बृहद्देवतेवरून घेतलेली आहेत. त्यावरून बृहद्देवता हा भारतीय वाङ्मयातला आद्य कथासंग्रह ठरतो. कात्यायनाने आपल्या सर्वानुक्रमणीत व सायणाचार्यांने आपल्या वेदभाष्यात ही आख्याने बृहद्देवतेतूनच उद्धृत केली आहेत.

बृहद्देवतेत मधुक, श्वेतकेतू, गालव, यास्क, गार्ग्य, इ. अनेक आचार्यांची मते दिलेली आहेत. इतर अनेक देवतांबरोबरच बृहद्देवतेत एक महादेवता मानलेली आहे. ही महादेवता म्हणजे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परमात्मा होय. इतर सर्व देवता ही त्याचीच भिन्न भिन्न रूपे आहेत, अशी बृहद्देवतेची धारणा आहे. अशा प्रकारे वैदिक देवतांचे रहस्य विशद करून सांगणारा बृहद्देवता हा सर्वोत्तम ग्रंथ ठरला आहे. [वै. सा.; वै. सा. सं.; हिंदुत्व; वै. सं. स.]

बृहद्देशी मतंगमुनिकृत संगीतशास्त्रावरील एक महत्त्वाचा संस्कृत ग्रंथ. इ. स. च्या ५ व्या शतकात त्याची रचना झाली. देशी संगीत हा या ग्रंथाचा विषय असून, त्याबद्दलची शास्त्रशुद्ध चर्चा यात केलेली आहे. याच्या काळापर्यंत भरताने वर्णिलेल्या जाती कालबाह्य होऊन, त्यांची जागा रागांनी घेतली होती. या रागांचे विवेचन मतंगमुनीने यात केले आहे. उत्तम स्वर आणि वर्ण यांनी अलंकृत व मनाला आल्हाद देणारा तो राग होय, अशी त्याने रागाची व्याख्या केली असून, नंतरच्या संगीतकारांनी ती मान्य केली आहे.

त्याने रागाचे शुद्ध, छायालग व संकीर्ण असे तीन प्रकार मानले आहेत. रागांची देशी लक्षणे सांगितल्यावर त्याने नादोत्पत्ती, श्रुती, स्वर, मूर्छना, वर्ण, अलंकार, गीती, जाती, राग, भाषा व प्रबंध या विषयांची चर्चा केली आहे. या ग्रंथात वाद्याध्याय नामक वाद्यांवरचा एक अध्याय असून, संगीतकारांनी त्याची फार प्रशंसा केली आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

बृहद्ब्रह्मसंहिता वैष्णवांच्या मधुर उपासनेचा आधारभूत ग्रंथ. यात ३३ अध्याय आहेत. या ग्रंथात पुष्टिमार्गी पद्धतीने हरिलीलेचे वर्णन आहे. या ग्रंथाच्या मते हरी व त्याची लीला यांत कोणत्याही प्रकारे भेद नाही. राधा ही लीलारूपिणी आहे. राधा-कृष्णांची ही लीला गोलोकात नित्य चालू असते. रसमार्गी व लीलादर्शनाला उत्सुक असा जीव हरिकृपेने गोलोकात वास्तव्य करायला जातो.

प्रस्तुत ग्रंथात गोपींना महत्त्व दिलेले असून, त्यांचे कित्येक गुण वर्णिलेले आहेत. पद्म पुराणातल्या गोपीवर्णनात व या वर्णनात बरेचसे साम्य आहे.

याच नावाचा १० अध्यायांचा आणखी एक ग्रंथ असून, त्यात राधा-कृष्ण व सीता-राम या दोहोंच्याही युगल-उपासनेचे वर्णन आहे. [रा. भ. शा.; रा. सा. म. उ.; भक्ति का विकास]

बृहद्यावक एक व्रत आणि प्रायश्चित्त. व्रतारंभी गायींना घृतमिश्रित भरपूर यव खायला घालतात. नंतर त्यांचे शेण गोळा करतात. त्या शेणात पाणी घालून जे यवाचे दाणे मिळतील ते वाळवून भरडतात. त्यात तीळ व तूप घालून ते गोमूत्रात शिजवतात. नंतर तो पदार्थ सुवर्णपात्रात किंवा पळसाच्या द्रोणात ठेवून देवांना व पितरांना त्याचा नैवेद्य दाखवितात. नंतर तो भक्षण करतात. अशा प्रकारे बारा, चौवीस किंवा छत्तीस वर्षे हे व्रत करतात. फल – पापनाश.

गुरू, बंधू, मित्र किंवा आप्त यांचा वध केल्यामुळे जे पाप लागते त्यासाठी हे प्रायश्चित्त सांगितले आहे. [हि. ध.]

बृहन्नारदीय पुराण एक वैष्णव उपपुराण. यात ३८ अध्याय व ३६०० श्लोक आहेत. इ. स. ७५० ते ९०० या कालखंडात हे उपपुराण भारताच्या पूर्व भागात, ओडिसा किंवा बंगाल या प्रदेशात रचले गेले. सांप्रत उपलब्ध असलेल्या नारदीय पुराणात या उपपुराणातील सर्व अध्याय, काही थोडे श्लोक वगळून, घेतलेले आहेत.

हे वैष्णव उपपुराण असल्यामुळे, यात सुरवातीला वृंदावनातील उपेंद्राची स्तुती केलेली आहे. त्यानंतर महाविष्णूपासून विश्वाची उत्पत्ती, विष्णूची पराशक्ती व तिची विद्या आणि अविद्या अशी दोन रूपे, सात स्वर्ग, सप्त पाताळलोक, पृथ्वीचा भूगोल, तिची सप्त द्वीपे, आश्रमधर्म, उत्तम भागवताची लक्षणे, प्रयाग व वाराणसी येथील गंगेचे माहात्म्य; गुरू, भूमिदान, सत्कार्ये यांची प्रशंसा; वर्णाश्रमधर्म, मोक्षमार्ग, चार युगे इ. विषय आले आहेत. या पुराणाचे एक वैशिष्ट्य असे, की यात विष्णूच्या उपासनेइतकाच शिवोपासनेचाही गौरव केलेला आहे.

या पुराणात सुभाषितवजा काही श्लोक आलेले आहेत, त्यांतील दोन श्लोक (१०.४४; ११.९३) असे–

यस्य माता गृहे नास्ति भार्या चाप्रियवादिनी ।
अरण्यं तेन गन्तव्यं यथाऽरण्यं तथा गृहम् ।।

अर्थ– ज्याची माता घरात नाही आणि पत्नी अप्रिय बोलणारी आहे, त्याने सरळ अरण्यात जावे. कारण, त्याला अरण्य व गृह ही दोन्ही सारखीच होत.

आत्मबुद्धिः शुभकरी गुरुबुद्धिर्विशेषतः ।
परबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयंकरी ।।

अर्थ– स्वतःची बुद्धी आणि विशेषतः गुरूची बुद्धी ही शुभ करणारी असते. दुसऱ्याची बुद्धी ही विनाशकारी आणि स्त्रीची बुद्धी तर प्रलयकारी असते.

हे श्लोक बंगालमध्ये फार लोकप्रिय आहेत. [स्ट. उ.]

बृहन्मती आंगिरस एक सूक्तद्रष्टा. हा आंगिरस कुळातला आहे. ऋग्वेदाच्या नवव्या मंडलातील ३९ व ४० ही दोन सूक्ते याच्या नावावर आहेत. ३९ व्या सूक्ताच्या पहिल्याच ऋचेत त्याचा नामोल्लेख आला आहे. सोमस्तुती हा या सूक्तांचा विषय आहे. त्यात धनासाठी प्रार्थना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केली आहे. त्यांतील नमुन्याची एक ऋचा (९. ४०. २) अशी—

आ योनिमरुणो रुहद्‌गमदिन्द्रं वृषा सुतः ।

ध्रुवे सदसि सीदति ॥

अर्थ— तो आरक्तवर्ण सोम स्वस्थानी अधिष्ठित झाला. तो वीर्यशाली रस इंद्राकडे गेला आणि आपल्या अढळस्थानीही (द्रोणकलशात) विराजमान झाला.

या पवमान सोमाची आणखी स्तुती करताना बृहन्मती म्हणतो. 'हे सोमा ! जे अपूर्ण असेल ते तू परिपूर्ण आणि अलंकृत कर. तू जनतेला कार्यप्रवृत्त कर.' [प्रा. च. को.; सी. ऋ.]

बृहस्पतिशांती मुलाच्या उपनयनप्रसंगी व मुलीच्या विवाहप्रसंगी गुरू हा ग्रह अनुकूल नसल्यास त्याची शांती करावी, असे सांगितले आहे. या शांतीचे विधान असे— गुरूची सुवर्णप्रतिमा करून ती कलशावर स्थापावी. ग्रहमखात सांगितल्याप्रमाणे मंत्राने कलशाचे अभिमंत्रण करावे. गुरूची पूजा करावी. दही व मध लावून अश्वत्थाच्या १०८ समिधा, घृतमिश्रित पायस, घृतमिश्रित यव, तीळ व तांदूळ यांच्या आहुती अग्नीत द्याव्या. नंतर गुरूला अर्घ्य द्यावे. आचार्याने बटू किंवा कन्या यांच्यासह यजमानदंपतीला अभिषेक करावा. गुरूची पुढील मंत्राने प्रार्थना करावी—

जीवो बृहस्पतिः सूरिराचार्यो गुरुरङ्गिराः ।

वाचस्पतिर्देवमन्त्री शुभं कुर्यात्सदा मम ॥

मग ती सुवर्ण प्रतिमा आचार्याला दान द्यावी. [सं. कौ.]

बृहस्पतिसव एक याग. हा अग्निष्टोमासारखाच एक एकाह सोमयाग आहे. हा फक्त ब्राह्मणांनीच करायचा असतो. वाजपेय यज्ञानंतर हा करावा, असे आश्वलायन सांगतो. जैमिनीच्या मतानुसार हा वाजपेयाचाच एक भाग आहे. ब्रह्मवर्चस मिळविणे किंवा राजपुरोहित बनणे ही इच्छा धरणाऱ्याने हा याग करावा, असे सांगितले आहे. ब्राह्मणाच्या इतिकर्तव्यतेचाच हा एक भाग आहे. या यागात शेवटी यजमानाला कृष्णाजिनावर बसवून तुपाचा अभिषेक करतात. [वै. इं.; हि. ध., म. ज्ञा. को.]

बृहस्पतिस्मृती अठरा स्मृतींपैकी एक. या स्मृतीत भूमिदान, गयाश्राद्ध, वृषोत्सर्ग, ब्रह्मस्व, वापीकूपादिकांचा जीर्णोद्धार, इ. विषय आलेले आहेत.

पण या स्मृतीचे महत्त्व आहे, ते तिच्यातील न्यायालयीन व्यवहारांच्या विषयांसंबंधी बृहस्पतीने केलेल्या विवेचनात. त्याने न्यायालयीन कार्याची चार अंगे सांगितली आहेत — पुरावा, साक्षीदार, दस्तऐवज व भुक्ती (कबजा). दाव्यांमध्ये दिवाणी व फौजदारी असा स्पष्ट भेद सांगणारा बृहस्पती हा पहिला स्मृतिकार ठरेल. धनाच्या देवघेवींच्या दाव्यांचे त्याने १४ प्रकार सांगितले असून, जीवांना दुखापत किंवा जीवहिंसा यासंबंधीचे चार असे त्याने दाव्यांचे एकूण १८ प्रकार सांगितले आहेत. न्यायाधीशाने कोणत्याही दाव्याचा निकाल केवळ शास्त्रानुसार देऊ नये, तर तो बुद्धीने कारणमीमांसा करून द्यावा. अन्यथा सद्‌गुणी मनुष्य दुर्गुणी आणि सत्कृत्य हे दुष्कृत्य ठरून धर्महानी होण्याचा संभव असतो. न्यायालयात दावा दाखल करण्यापासून दाव्याचा निकाल होईपर्यंतची कार्यपद्धती त्याने तपशीलवार सांगितली आहे. त्याने कायदेविषयक शब्दांच्या व्याख्या इतक्या सूक्ष्म केल्या आहेत, की आधुनिक कायदेपंडितांनीही क्षणभर चकित व्हावे. मृच्छकटिक नाटकातील न्यायालयीन प्रसंग आणि तिथली कार्यपद्धती, ही बृहस्पतीच्या विवेचनाशी मिळती जुळती आहे.

या स्मृतीचा मनुस्मृतीशी घनिष्ठ संबंध आहे. स्कंद पुराणात अशी दंतकथा आहे, की मूळ मनुस्मृतीचेच भृगू, नारद, बृहस्पती आणि आंगिरस यांनी चार भाग केले. मनूने जे विषय संक्षेपात दिले, ते बृहस्पतीने विस्तारपूर्वक चर्चिले. बृहस्पती व नारद या दोघांचे अनेक बाबतींत मतैक्य आहे. मात्र बृहस्पतीच्या कायद्यांच्या शब्दांच्या व्याख्या नारदापेक्षा अधिक काटेकोर आहेत. स्त्रीधनाच्या बाबतीत त्याची मते नारदमतापेक्षा प्रगतिपर आहेत. बृहस्पतीचा काळ इ. स. २०० ते ४०० या दरम्यानचा असावा, असे म. म. काणे यांचे मत आहे. [हि. ध.; म. ज्ञा. को.; हिंदुत्व]

बृहस्पती (१) ऋग्वेदातील एक देवता. 'बृहतः महतः अस्य जगतः उदकस्य वा पाता रक्षिता' = या महान जगताचे किंवा जलाचे रक्षण करणारा, तो बृहस्पती अशी दुर्गाने त्या शब्दाची व्युत्पत्ती दिली आहे. ऋग्वेदात या देवतेला बरेच महत्त्व दिलेले आहे. ऋग्वेदातील संपूर्ण अकरा सूक्ते याच्या स्तुतिपर असून, दोन सूक्तांत इंद्राबरोबर त्याचे वर्णन केले आहे. याशिवाय, अनेक वेळा त्याच्या नावाचा उल्लेख येतो, तो वेगळाच. याला सात मुखे, सुंदर जिव्हा, तीक्ष्ण शिंगे व शंभर पंख असून, त्याचा वर्ण सोन्यासारखा तेजस्वी आहे; त्याची वाणी स्पष्ट आहे; धनुष्य, बाण व सोन्याचा परशू ही त्याची आयुधे असून, त्याच्या रथाला सात लाल घोडे जोडलेले असतात; असे ऋग्वेदात त्याचे वर्णन केलेले आहे.

बृहस्पती हा उच्च अंतरिक्षातील महातेजापासून उत्पन्न झाला व त्याने आपल्या गर्जनेने अंधकार नष्ट केला. याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्वष्ट्याने उत्पन्न केले, असे एके ठिकाणी सांगितले आहे (ऋ. २.२३.१७); तर दुसऱ्या ठिकाणी तो सर्व देवांचा पिता

बृहस्पती

आहे, असे म्हटले आहे (ऋ. २.२६.३). हा देवांचा गृहपुरोहित असून, सर्व प्राचीन विद्वानांमधला प्रमुख आहे. त्याच्याशिवाय यज्ञकर्मे यथासांग पार पडत नाहीत. देवांना यज्ञातील हविर्भाग याच्याकडून मिळाले, असे म्हटलेले आहे; त्यावरून याला अग्नीचे प्रतीक मानलेले आहे, असे दिसते.

याला ब्रह्मणस्पती असे दुसरे नाव आहे. ब्रह्म म्हणजे प्रार्थना किंवा मंत्र होय. यावरून ब्रह्मणस्पती म्हणजे मंत्र किंवा प्रार्थना यांचा अधिपती, असा अर्थ होतो. तो सर्व मंत्र निर्माण करतो व त्यांचे गायन करतो; कारण तो कवींचा कवी आहे.

इंद्राबरोबर बृहस्पतीची स्तुती केल्यामुळे इंद्राची मघवा, वज्री, इ. विशेषणे यालाही लावलेली आढळतात. तो इंद्राचा मित्र व साहाय्यकर्ता आहे. इंद्राप्रमाणे तोही सोमपान करतो.

त्याची स्तुती करणाऱ्यावर तो कृपा करतो. सदाचरणी व्यक्तीला तो सर्व संकटांतून सोडवितो व त्याला संपत्तीही देतो. या त्याच्या परोपकारी वृत्तीमुळे त्याला पिता असे म्हटले आहे. तो वनस्पतींचेही संवर्धन करतो.

हिंदू धर्माच्या विकासकालात पुढे बृहस्पतीलाच गणपती असे म्हणू लागले. तो गणांचा अधिपती असल्याने त्याला गणपती ही संज्ञा मिळाली. त्याची प्रार्थना ऋग्वेदात पुढीलप्रमाणे केली आहे (ऋ. २.२४.१६) –

ब्रह्मणस्पते त्वमस्य यन्ता सूक्तस्य बोधि तनयं च जिन्व ।
विश्वं तद् भद्रं यदवन्ति देवाबृहद् वदेम विदथे सुवीराः ॥

अर्थ – हे स्तवनांच्या प्रभो, तूच आमच्या स्तवनांचा प्रेरक हो. आमच्या पुत्रपौत्रांची उन्नती कर. दिव्य विभूती ज्याच्याकडे कृपादृष्टीने पाहतात, ते सर्व मंगलमय होते. आम्ही आपल्या शौर्यसंपन्न वीरांसह तुझे महान यश वर्णन करीत राहू, असे कर.

बृहस्पती ही देवता शुद्ध भारतीय आहे. त्यातील पती या पदावरून व बृहस्पतिविषयक अनेक कथांवरून ती देवता ऋग्वेदपूर्वकालीन नसावी, असे दिसते. श्री. प्र. रा. देशमुख यांनी मात्र ब्रह्मणस्पतीला आर्यपूर्व लोकांची देवता मानले आहे. [वै. मा.; वै. सा. सं.; म. ज्ञा. को.–वेदविद्या; रि. वे. लि.]

(२) एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ७१ व ७२ ही दोन सूक्ते याच्या नावावर आहेत. त्यांपैकी ७१ व्या सूक्तावरून यानेच सर्वप्रथम वाणीचे महत्त्व जाणले, हे कळते. याच्या नावाची व्युत्पत्ती अशी – 'वाग् वै बृहती तस्या एष पतिस्तस्माद् बृहस्पतिः' = बृहती म्हणजे वाणी, तिचा पती तो बृहस्पती (बृहदा. १. ३. २०).

वाणी किंवा भाषा हिचा जन्म मानवी अंतःकरणातून झाला. याचा अर्थ मानवाच्या मनात बाह्य विश्वातील वस्तूंच्या ज्या क्रियाप्रतिक्रिया होत होत्या, त्या एक दिवस त्याच्या मुखातून वाणी बनून बाहेर पडल्या. याने आपल्या सूक्तात दिव्य वाणीचे महत्त्व सांगितले आहे, ते असे (ऋ. १०.७१.२) –

सक्तुमिव तितउना पुनन्तो यत्र धीरा मनसा वाचमक्रत ।
अत्रा सखायः सख्यानि जानते भद्रैषां लक्ष्मीर्निहिताधि वाचि ॥

अर्थ – सातू ज्याप्रमाणे चाळणीने चाळून स्वच्छ करतात, त्याप्रमाणे शुद्ध बुद्धीचे सत्पुरुष (प्रत्यक्ष न बोलता) आपल्या अंतःकरणानेच भाषण करीत असतात. अशा वेळी (ईश्वराला) जे प्रिय झालेले असतात, ते त्या भाषणातले मर्म ओळखतात आणि अशांच्याच वाणीच्या ठिकाणी मंगलरूप लक्ष्मी वास करते.

चतुर्विंशतिरात्र व इतर काही याग (तै. सं. ७. ४. १) आणि काही सामेही याच्या नावावर आहेत. याने याज्ञवल्क्याला तत्त्वज्ञान उपदेशिले अशी कथा आहे. [प्रा. च. को.]

(३) अर्थशास्त्राचा एक प्राचीन आचार्य. त्याचा ग्रंथ उपलब्ध नाही. पण कौटिल्याने सहा वेळा बार्हस्पत्य शाखेची मते उद्धृत केली आहेत. राजाला सोळा प्रधान असावे, असे त्याचे मत होते. ब्रह्म्याने धर्म, अर्थ व काम यांवर लिहिलेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रचंड ग्रंथ याने तीन हजार अध्यायांत संक्षिप्त केला, असे महाभारतात सांगितले आहे (शांति. ५९. ८०–८५). वनपर्वात बृहस्पतिनीतीचा उल्लेख आहे. तसेच, शांतिपर्वात बृहस्पतीचे म्हणून काही श्लोक व गाथा दिलेल्या आहेत.

बृहस्पती, आंगिरस, नारद व भृगू यांनी मनुस्मृतीचे चार भाग केल्याचा उल्लेख आहे. [प्रा. च. को.; हिं. ध.]

(४) सूर्यकुलातील पाचवा ग्रह. याला गुरू, ईडच, इज्य, इ. नावे आहेत. सारावली नामक ग्रंथात बृहस्पतीला माणसांचा जीव म्हटले आहे. ज्याच्या कुंडलीत केंद्रस्थानी बृहस्पती असतो, त्याला इतर ग्रह काहीही करू शकत नाहीत, असे भुजबलात सांगितले आहे. धनू व मीन या याच्या राशी होत. हा ग्रह सुख व ज्ञान यांचा स्वामी आहे. जैनमते हा हंसारूढ, चतुर्भुज व ईशान्येचा स्वामी आहे. पाहा – गुरू. [हिं. ध.]

बेंगई एक प्रकारचे फूल. द. भारतात विशेषकरून आदिवासी लोकांमध्ये या फुलाला फार महत्त्व आहे. अनेकदा लग्न ठरविताना दोन्ही पक्षांकडील मंडळी याच्या झाडाखाली बसून विवाह ठरवितात. मुरुग देवाने बेंगई वृक्षाचे रूप घेऊन वळ्ळीशी विवाह केला, अशी अनेकांची श्रद्धा आहे. त्यांच्यांत विवाहाच्या वेळी वधूला बेंगई फुलांचे हार घालतात. किंबहुना बेंगई पुष्पांचे हार घातलेली वधूच ते नववधू समजतात.

बेझंट, डॉ. ॲनी (१८४७ – १९३३ इ. स.) एक थोर विदुषी व थिऑसफिकल सोसायटीची श्रेष्ठ प्रचारिका. यांचा जन्म लंडनमधील एका आयरिश कुटुंबात झाला. यांच्या वडिलांचे नाव विल्यम वेजवुड व आईचे नाव एमिली असे होते. बेझंटबाई लहान असतानाच त्यांचे वडील निवर्तले व त्यामुळे कुटुंबपोषणाची जबाबदारी त्यांच्या आईवर पडली. त्यांची आई फार हिकमती पण धार्मिक वृत्तीची बाई होती. लवकरच तिने एक खानावळ काढली व आपल्या कुटुंबाच्या अर्थार्जनाला प्रारंभ केला. तिने ॲनीला मात्र मॅरिएट नामक आपल्या एका श्रीमंत मैत्रिणीकडे शिक्षणासाठी पाठवून दिले. मॅरिएट बाईंच्या सहवासात ॲनी अत्यंत सुसंस्कृत व भाविक बनली.

आपल्या धार्मिक वृत्तीचा आणखी विकास व्हावा व वैवाहिक जीवनही सुखात जावे, या हेतूने बेझंट यांनी इ. स. १८६७ साली रेव्ह. फ्रँक या ख्रिश्चन धर्मोपदेशकाशी विवाह केला. लौकरच त्यांना एक मुलगा झाला; परंतु दुर्दैवाने तो अल्पायुषी ठरला. या आघाताचा बेझंटबाईंच्या मनावर फार परिणाम झाला. आपण सतत सद्धर्माने वागत असताना व नित्य ईश्वराचे नामस्मरण करीत असताना, आपल्यावर हा आघात व्हावा, याचे त्यांना विलक्षण दुःख झाले व त्याच गोष्टीवर एकसारखा विचार करीत राहिल्यामुळे त्या पक्क्या नास्तिक बनल्या. त्यांच्या नास्तिकपणामुळे त्यांचे पतीशी खटके उडू लागले व अखेर त्यांना पतीचे घरही सोडावे लागले. या नंतरची त्यांची वरीच वर्षे अत्यंत हालअपेष्टांत गेली. या काळात उदरनिर्वाहासाठी त्यांना अनेक हलकी कामेही करावी लागली. याच सुमारास चार्लस ब्रॅडलॉ या विद्वान नास्तिक गृहस्थाशी त्यांची ओळख झाली व कालांतराने त्या त्यांच्या शिष्या बनल्या.

पुढे ब्रॅडलॉ व बेझंट यांनी अज्ञान व अंधश्रद्धा या दोन दुर्गुणांवर वाणी-लेखणीच्या द्वारे तुफानी हल्ले चढविले व स्वतःला शिक्षणादी लोकसेवेच्या कार्याला वाहून घेतले. संततिनियमनासारख्या लोकहिताच्या चळवळीला उचलून धरल्यामुळे

ॲनी बेझंट

बेझंटबाईंवर सामाजिक बहिष्कारापासून फौजदारी खटल्यापर्यंत अनेकविध आपत्ती कोसळल्या व त्या त्यांनी झेलल्या.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यानंतर फेबियन सोसायटीच्या द्वारे त्यांनी समाजसत्तावादाचा पुरस्कार आरंभिला. त्यासाठी त्यांनी जी व्याख्याने दिली व लेख लिहिले, त्यांतून त्यांच्या भाषेचा विलास व विचारांची उंची लोकांच्या लक्षात आली.

वयाच्या चाळिसाव्या वर्षी त्यांची थिऑसफिकल सोसायटीच्या अध्यक्ष मादाम ब्लॅव्हॅट्स्की यांच्याशी ओळख झाली व त्यांच्या सहवासाने त्या पुन्हा नास्तिकतेकडून आस्तिकतेकडे वळल्या. इथून पुढचे सर्व आयुष्य त्यांनी प्राधान्याने थिऑसफीच्या प्रचारार्थच खर्च केले.

इ. स. १८९३ सालच्या नोव्हेंबर महिन्यात बेझंटबाई भारतात आल्या. हिंदू धर्म व हिंदू संस्कृती यांच्याविषयी त्यांच्या मनात प्रारंभापासूनच आदरयुक्त कुतूहल होते. भारतात आल्यावर त्या दृष्टीनेच त्यांनी इथल्या धर्माचा व संस्कृतीचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी भारतातल्या महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्या व सर्व तीर्थयात्राही केल्या. शेवटी सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून त्या पूर्णपणे भारतीय बनल्या. गीता, उपनिषदे व रामायण-भारतादी ग्रंथ यांनी तर त्यांना एवढे वेड लावले, की त्या सर्वत्र त्याच विषयांवर बोलू व लिहू लागल्या. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही त्यांनी मनःपूर्वक भाग घेतला. लो. टिळकांच्याबरोबर स्वराज्यसंघाच्या प्रचारार्थ त्यांनी जी व्याख्याने दिली, त्यामुळे देशात सर्वत्र एक अभूतपूर्व जागृती झाली.

लोकजागृतीसाठी त्यांनी प्राधान्याने शिक्षणावर भर दिला व त्याला अनुसरून इ. स. १८९८ साली काशी येथे सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना केली. हेच कॉलेज पुढे बनारस हिंदू विश्वविद्यालय या नावाने विख्यात झाले.

इ. स. १९१७ साली बेझंटबाई कलकत्त्याच्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. आपल्या अध्यक्षपदाच्या काळात त्यांनी देशाची बहुमोल सेवा केली. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ जास्तीत जास्त विधायक व सनदशीर मार्गाने चालावी यासाठी त्या प्रयत्नशील असत. याच हेतूने त्यांनी टिळकपक्ष व मवाळपक्ष यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला. इ. स. १९२५ साली त्यांनी हिंदी स्वराज्याचे विधेयक तयार करून ब्रिटिश पार्लमेंटपुढे ठेवले व तिथे भारताची बाजू अत्यंत प्रभावीपणे मांडली.

थिऑसफिकल सोसायटीच्या त्या सतत २७ वर्षे अध्यक्ष होत्या. आपल्या अध्यक्षपदाच्या काळात त्यांनी केलेला प्रचार व लिहिलेले ग्रंथ हे त्या संस्थेच्या इतिहासात संस्मरणीय व मार्गदर्शक ठरले आहेत. आपल्या आयुष्यात त्यांनी लहानमोठे ३०० ग्रंथ लिहिले. त्यांची भाषा सोपी आणि विचार मांडण्याची पद्धती ठाशीव व आत्मविश्वासपूर्ण आहे. पूर्वजन्मी आपण हिंदूच होतो, असे त्या आग्रहपूर्वक सांगत.

त्यांचे वक्तृत्व अमोघ व लयबद्ध असे. स्वभावाने त्या प्रेमळ होत्या, तशाच कर्तव्यदक्ष होत्या. इ. स. १९०९ साली त्यांनी कृष्णमूर्ती या तेरा वर्षांच्या बालकाला दत्तक घेऊन त्याचा पुत्रवत सांभाळ केला व त्याला थिऑसफीच्या तत्त्वज्ञानाची दीक्षा दिली. हाच मुलगा आज जे. कृष्णमूर्ती या नावाने जगद्विख्यात आहे.

वयाच्या ८५ व्या वर्षी अड्यार येथे बेझंटबाई निवर्तल्या. [भा. धा. पु.; आ. थो. वि.; अ. च. को.]

बेडर द. भारतातील एक शिकारी जात. आंध्रात हिला बोया म्हणतात. हे लोक आपल्याला वाल्मीकीचे वंशज म्हणवतात. हे लोक लढाऊ असून, हैदर व टिपू यांच्या सैन्यात यांची खूप भरती होती. कुर्नूल जिल्ह्यात हे चोर व घरफोडे

बेडर पुरुष

म्हणून ओळखले जातात. यांच्यापैकी काहीजण सुतार, लोहार, पहारेकरी म्हणून काम करतात. पण बहुतेक लोक शेतकरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असून, ते स्वतःच्या जमिनी कसतात. त्यांच्या ग्रामप्रमुखाला नायडू, डोरा किंवा सिंहासनबोया असे म्हणतात. जातीतले तंटेबखेडे तो गावातील इतर वृद्ध लोकांच्या साहाय्याने सोडवतो. गुन्हेगाराला तो दंड करतो. त्यातून तो पंचायतीच्या लोकांना जेवण देतो व काही रक्कम स्वतःसाठी ठेवतो. ज्यांच्या बाबतीत अन्याय घडला असेल, त्यांनाही त्यातली काही रक्कम देतो.

बोया हे तेलुगू बोलतात व बेडर कानडी बोलतात. बोया व बेडर यांचे उरू व म्यास असे दोन भेद आहेत. त्यांचे पुन्हा अनेक पोटभेद असून, त्यांपैकी येम्मलवारू = म्हशी पाळणारे, मंडलवारू = गाई पाळणारे, पुलवरू = फुलमाळी व मीनलवारू = मासे पकडणारे हे जास्त प्रसिद्ध आहेत. उरू बोया व उरू बेडर यांच्यांत परस्पर विवाह होतात; पण उरू व म्यास यांच्यांत मात्र होत नाहीत. उरू कोंबडी खातात व दारू पितात; पण म्यास दारू व मांस यांना स्पर्शही करीत नाहीत. इतकेच नव्हे, तर ताडी देणाऱ्या ताडाच्या चटयांवरही ते बसत नाहीत.

म्हैसूर भागात बेडरांचे कन्नड व तेलुगू असे दोन मुख्य भेद असून, हालू, माची किंवा म्यास, नायक, पल्लेगार, वारीक, कन्नैयनजाती व किरातक अशा त्यांच्या मुख्य पोटजाती आहेत. माची किंवा म्यास हे बहुधा डोंगरपठारावर राहतात. ते कोंबडी किंवा डुक्कर यांचे मांस खात नाहीत. पण गोमांस खातात. हे लोक मुलांची सुंता करतात. हैदर अलीच्या सैन्यात असताना, या लोकांनी मुसलमानांकडून ही प्रथा उचलली असावी. पंचगव्यप्राशन, निंबाच्या काडीने जिभेला डाग देणे, अशांसारख्या रूढीही यांच्यांत प्रचलित आहेत.

रायदुर्ग आणि गुडेकोट या भागांत यांच्यामध्ये सुंता करण्याचा विधी पुढीलप्रमाणे आहे – मुलगा सात किंवा आठ वर्षांचा झाला, की त्या वेळी त्याच्या शिश्नावरील थोडीशी चामडी कापून काढतात. मग अकरा दिवस त्याला एका वेगळ्या झोपडीत ठेवतात व कोणीही त्याला शिवत नाहीत. त्या दिवसांत त्याला दगडाच्या तुकड्यावर जेवायला वाढतात. बाराव्या दिवशी त्याला स्नान घालतात, नवे कपडे देतात व घरी आणतात. त्याचे जुने कपडे व दगडाचा तुकडा फेकून देतात. मग त्याचे नातेवाईक त्याला तंगिडू नामक एका झुडपाकडे नेतात व त्याच्यासह ते त्या झुडपाची पूजा करतात.

मुलगी प्रथम ऋतुमती झाली, म्हणजे तिला अकरा दिवस एका स्वतंत्र झोपडीत ठेवतात. त्यानंतर ती तंगिडू झुडपाची पूजा करते. बाळंतिणीलाही अशाच स्वतंत्र झोपडीत ठेवतात.

उद्योगधंदे – बेल्लारी जिल्ह्यातील बेडर लोक बंदूक, भाला व जाळी घेऊन पूर्वी शिकारीला जात असत. अस्वले, रानडुकरे, हरणे, ससे, इ. प्राण्यांची ते शिकार करीत असत. या लोकांना व्यायामाचीही फार आवड होती. डंबेल्स व करेला घेऊन ते खूप व्यायाम करीत. कुस्त्यांचे फडही ते लावीत. तेलुगू नववर्षाच्या दिवशी, ते डुकरांची शिकार करीत. नववर्षाचा तो शुभ शकुन मानला जात असे. हरणांची शिकार करण्यासाठी ते पाळीव काळवीटाचा उपयोग करीत. हरणांच्या कळपाच्या जवळपास शिंगांना जाळे बांधलेला पाळीव काळवीट ते सोडून देत. कळपाच्या जवळ हा काळवीट पोचला, की कळपाचा नायक त्याच्याजवळ येत असे. मग दोघांची मारामारी होत असे व दोघेही जाळ्यात अडकत असत. मग शिकारी त्या रानवट काळवीटाची शिकार करीत.

वेषभूषा – हे लोक कांबळे पांघरतात. काही लोक छातीवर एक कपडा बांधतात. शेतात काम करणारे लोक कमरेच्या दोरीला एक लहानसा चिमटा अडकवतात. बोचलेला काटा काढण्यासाठी त्याचा उपयोग होतो. हे दंडावर व गळ्यात ताईत बांधतात आणि हुलिगम्म देवीचा प्रसाद म्हणून पोवळी व हस्तिदंताच्या मण्यांची माळ गळ्यात घालतात. उरू आणि म्यास स्त्रिया तोंडावर व हातांवर गोंदून घेतात. हनुमान मंदिराचा पुजारी पुरुषांच्या दंडांवर शंख व चक्र यांच्या तप्तमुद्रा उठवतो. त्यामुळे त्यांना स्वर्गात प्रवेश मिळणे सोपे जाते, अशी त्यांची श्रद्धा आहे. ज्या स्त्रियांच्या दंडांवर अशा तप्तमुद्रा उठवतात, त्या बसवी बनतात.

देवधर्म – तिरुपती वेंकटरमण हा त्यांचा मुख्य देव आहे. त्याशिवाय ते मरिअम्म, हुलिगम्म, कनिमिरय, कनकरयन, पोलेरम्म, इ. देवतांना भजतात व त्यांना फळे, भाज्या, शेळ्या व मेंढ्या अर्पण करतात. ते वर्षातून एकदा कार्तिकात नागाची पूजा करतात व त्याच्या वारुळावर दूध ओततात. यांच्यापैकी काही वैष्णव, तर काही शैव आहेत.

बेल्लारी जिल्ह्यातील काही बोयांना जमिनी इनाम मिळाल्या आहेत. भूतबली नामक विधीने जे लोक ग्रामदेवतेला संतुष्ट करतात, त्यांनाच अशा जमिनी मिळाल्या आहेत. ग्रामदेवतेच्या जत्रेच्या शेवटच्या दिवशी बोया पुरोहित मध्यरात्री हजामत करतो व मेंढी किंवा रेडा देवीला बळी देतो आणि त्याच्या रक्तात भात कालवून त्याचे पिंड गावच्या सर्व सीमांवर ठेवतो. या वेळी गावातील कोणीही मनुष्य त्याला पाहत नाही. पहाटे तो देवळात परत येतो व स्नान करतो. मग गावकरी त्याला नवी वस्त्रे देतात. या विधीने गावातील अमंगल टळते व गावाला समृद्धी प्राप्त होते, अशी समजूत आहे.

बोया लोकांना पुरोहित म्हणून ब्राह्मणांची गरज लागत नाही. पण ब्राह्मणांना लग्नकार्याच्या प्रारंभी शुभशकुन म्हणून वोंटिगडू नामक विधी करायचा असेल, तर त्यांना मात्र बोयांची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गरज लागते. या मागची कथा अशी – वोंटिगडू नामक एक निराधार बोया होता आणि तो उपासमारीने मेला. तेव्हा त्याच्या जातिबांधवांना भरपूर जेवायला घालून त्याचा आत्मा तरी संतुष्ट करावा, असे ब्राह्मणांना वाटले. म्हणून ते सांप्रत पुढील विधी करतात – एका शुभ दिवशी एका बोया पुरुषाला आपल्या घरी बोलावतात व त्याला अंगाला लावायला तिळाचे तेल देतात. तेल लावून झाल्यावर तो टोकाला लिंबू टोचलेला एक सुरा हातात घेऊन येतो. मग त्याला गोठ्यात नेतात व जेवायला वाढतात. जेवण झाल्यावर तो किंचाळचा मारीत व हातातील सुरा नाचवीत घरातून निघून जातो. घरातील लोक थोडा वेळ त्याच्या मागे जातात व त्याच्या मार्गावर पाणी शिंपडतात. या विधीने पुढचे मंगलकार्य निर्विघ्न पार पडते, अशी समजूत आहे.

विवाहप्रथा – होस्पेटमधील म्यास बेडर लोकांत, मुलांचे आईबाप त्यांची लग्ने ठरवतात. विवाहाच्या दिवशी वधू-वर बोहल्यावर बसतात. मग पाच विवाहित पुरुष वराचे पाय, गुडघे, खांदे आणि मस्तक यांवर हळदीने रंगवलेल्या अक्षता तीन वेळा टाकतात. पाच सुवासिनी वधूच्या बाबतीत हाच विधी करतात. मग जमलेल्या सर्व लोकांच्या संमतीने वर वधूच्या गळयात ताळी बांधतो. काही ठिकाणी वर ताळी ब्राह्मणाकडे देतो व ब्राह्मण तिच्या गळयात ती बांधतो.

उरु बेडर लोकांत लग्नाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी वर-पक्षाकडील मंडळी वधूगृही जातात. तिथे एक जेवणावळ होते. तिच्यासाठी वराचे आईबाप तांदूळ, नारळ, पान, सुपारी या वस्तू पुरवतात व पाच चोळया वधूला भेट म्हणून देतात. जेवण झाल्यावर सर्वजण मांडवात जमतात व देव, गुरू आणि वडीलमाणसे यांना पानसुपारी देतात. दुसऱ्या दिवशी हळद व चुना यांनी रंगवलेले चार माठ चार कोपऱ्यांत ठेवतात आणि त्यांच्याभोवती सुताचे नऊ धागे गुंडाळतात. त्या चौकोनात वर आणि दोन लहान मुली बसतात. मग त्यांना तेल लावतात व वधूसह त्या सर्वांना पाच सुवासिनी स्नान घालतात. नवरा-मुलगा व एक मुलगी अशी दोघे मिरवत मारुतीच्या देवळात जातात. मारुतीला नारळ अर्पण केल्यावर वराच्या कपाळावर विभूती लावतात. परत आल्यावर ब्राह्मण पुरोहित वधू-वरांना जात्याच्या खालच्या तळीवर उभे करतो आणि वराने स्पर्शिलेली ताळी तो वधूच्या गळयात बांधतो. संध्याकाळी भात, गूळ व दही यांनी भरलेले एक पातेले घरात वधू-वरांजवळ ठेवतात. त्यातला थोडा भात पाच सुवासिनी त्यांना वाढतात व तिथून निघून जातात. मग पाच पुरुष त्या भांड्यातील भात बकाबक आपल्या तोंडात भरतात. काही ठिकाणी स्त्रिया व पुरुष दोघेही भात खातात. खाताना जर एखाद्याला ठसका लागला किंवा नंतर काही महिन्यांनी तो आजारी पडला, तर वधूची वागणूक ठीक नव्हती, असे समजतात. दुसऱ्या दिवशी वधू-वरांना रस्त्याने मिरवीत नेतात आणि त्या वेळी गुलाल उधळतात. लग्नाच्या तिसऱ्या आणि पाचव्या दिवशी सकाळी वधू-वरांना मुसळावर बसवून तेल लावतात. मग वधूपिता जावयाला पागोटे, चांदीची अंगठी व कापड देतो.

बोया लोकांत मुलाचा बाप वधूचो निवड करतो. मग वधू-पिता त्याला एक दिवस गावच्या वृद्ध मंडळीसह आपल्या घरी बोलावतो. त्या दिवशी वरपिता सोळा शेर तांदूळ, एक शेर डाळ, दोन शेर तूप, एक शेर लाह्या, गुळाच्या दोन ढेपा, पाच हळकुंडे, खारका, लसणीचे कांदे, पान-सुपारी व जाकिट एवढ्या वस्तू आपल्या बरोबर घेऊन वधूगृही जातो. मग विवाहाचा मुहूर्त वगैरे ठरवतात. देज म्हणून २०२ रुपये देण्याची पद्धत आहे. नंतर वराकडील मंडळींनी आणलेल्या सर्व वस्तू वधूपुढे ठेवतात आणि त्यांतून तिला तीन मुठी सुपाऱ्या घ्यायला सांगतात. नंतर त्याच वस्तू आणखी दोन रुपयांसह वधूच्या आई-वडिलांना देतात. साखरपुड्याच्या वेळी जमलेल्या लोकांना जेवण घालण्यासाठी हे जिन्नस दिलेले असतात. साखर-पुड्यानंतर पंधरा दिवसांनी किंवा एका महिन्याने मुहूर्त धर-तात. लग्न बहुधा वधूच्या घरी होते. वराला मिरवीत मांडवात आणतात. वधू-वरांच्यामध्ये अंतरपाट धरतात. त्यानंतर सोन्याचा मणी असलेला काळा दोरा सर्वांच्या अनुमतीने वर वधूच्या गळयात बांधतो. वधूही वराच्या उजव्या हातात कंकण बांधते. मग वर वधूच्या ओंजळीत काही धान्याचे दाणे घालतो आणि तोही आपल्या ओंजळीत काही धान्ये घेऊन ती वधूच्या ओंजळीवर धरतो. मग वधूपिता त्याच्या ओंजळीत दूध ओततो. त्या वेळी नवरामुलगा पत्नीशी आमरण एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतो. शपथ घेऊन झाल्यावर तो ओंजळीतील दूध वधूच्या ओंजळीत सोडतो. हा विधी तीन वेळा करतात. मग पत्नीही पतीशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेते. दोघेही जवळच ठेव-लेल्या भाताला हात पुसतात. नंतर ती दोघे एकमेकांच्या मस्तकावर भात ओततात. रात्री मोठी मेजवानी होते. दुसऱ्या दिवशी सकाळी वधू-वर वराच्या गावी जातात व तिथे तीन दिवस राहून परत येतात. लग्नाच्या दिवशी संध्याकाळी मंडपात वारुळाच्या मातीवर काही धान्य पेरलेले असते, त्याला तोवर कोंब फुटलेले असतात. नूतन दांपत्य ते अंकुर गोळा करून मिरवीत गावच्या विहिरीत नेऊन टाकते. एवढे झाल्या-वर लग्नविधी पुरा होतो. यांच्या लग्नसमारंभात संगीताला बरेच प्राधान्य असते.

व्यभिचार किंवा वाईट वागणूक यांबद्दल पंचायतीकडून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्त्रीला घटस्फोट मिळतो. घटस्फोटित स्त्रीला विधवेप्रमाणे वागवतात. पूर्वी त्यांच्यांत विधवेला पुनर्विवाह करायला बंदी होती. पण तिला एखाद्या पुरुषाबरोबर पत्नीच्या नात्याने राहायला मात्र परवानगी होती. त्यासाठी त्या दोघांनी ज्ञातीला जेवण घालून आपला मनोदय व्यक्त करणे, एवढेच आवश्यक होते. तसे न केल्यास त्यांना जातिबहिष्कृत मानीत. अशांची संतती मात्र अवैध मानली जाई.

मर्तिकप्रथा – होस्पेटमधील उरू बेडर प्रेते पुरतात. प्रेतावर नवीन वस्त्र व फुले घालतात आणि प्रेत तिरडीवरून स्मशानात नेतात. मृताचे पुत्र त्याच्या तोंडात पैसा ठेवतात आणि खड्‌ड्याजवळ थोडे पाणी ओततात. मग प्रेत खड्‌ड्यात ठेवतात व नातेवाईक त्याच्यावर माती लोटतात. मृताचा थोरला मुलगा हातात पाण्याचे सच्छिद्र मडके धरून, थडग्याच्या डोक्याशी उभा राहतो. मग थडग्याभोवती तीन प्रदक्षिणा घालतो व मडके फेकून देऊन, मागे वळून न बघता घरी जातो. मृताला वारस नसल्यास, जो कोणी हा विधी करील, त्याला त्याची संपत्ती मिळते. तिसऱ्या दिवशी मृताचे डोके, पोट व पाय या ठिकाणी खड्‌ड्यावर तीन दगड ठेवतात आणि त्यांना पांढरा रंग देतात. मग एका सुपात कावळ्यांसाठी अन्न ठेवतात. नवव्या दिवशी दिवस-विधी करतात. मनुष्य मृत झालेल्या जागी पाच विड्यांची पाने व भस्माचा एक गोळा यांसह एक पितळेचा तांब्या ठेवतात. हा मृताचा आत्मा असे समजतात. त्यांच्याजवळच एक दिवा ठेवतात व मेंढी मारतात. मृताच्या घरातील पुरुषांनी जर मुद्रा घेतलेल्या असतील, तर ते आपले देव नदीवर नेतात, धुतात व त्यांची पूजा करतात. घरी आल्याबर देवांना नैवेद्य दाखवतात. मग प्रथम दासरीला जेवायला वाढतात व मग त्याच्या परवानगीने आपण जेवतात.

म्हैसूरमधील बेडर मृतांना जाळतात व दुसऱ्या दिवशी त्याची रक्षा पाच तंगिडू झुडपांवर टाकतात. [का. ट्रा. स. इं.]

बेडसे मुंबई-पुणे रस्त्यावरील कामशेतपासून ४–५ मैलांवर हे गाव असून, तिथून जवळच एका दुर्गम पहाडात प्राचीन बौद्ध लेणी आहेत. ही लेणी सनपूर्व १ ल्या शतकात खोदलेली असून, हीनयान पंथाची आहेत. या लेण्यातील चैत्यगृहांची लांबी ४५·५ फूट, रुंदी २१ फूट व उंची २८ फूट असून, त्याच्या दर्शनी भागात ३०×१२ फूट लांबी-रुंदीची आगाशी आहे. या आगाशीला मध्यभागी दोन व दोन्ही बाजूंना दोन असे चार अष्टकोनी स्तंभ आहेत. हे स्तंभ भारतात अद्वितीय गणले जातात. त्यांच्या अग्रभागी चौफळी चौकोनी बैठकीवर चोहोबाजूंना हत्ती, घोडे, बैल यांच्या जोड्या आणि त्यांवर सालंकृत स्त्री-पुरुषांच्या सुंदर व प्रमाणबद्ध मूर्ती कोरलेल्या आहेत. या सर्व मूर्ती अत्यंत सजीव वाटतात. चौकोनी



चैत्य–लेण्याचा दर्शनी भाग, बेडसे

बैठकीखाली आमलकाकार कुंभी कोरलेली असून, स्तंभांच्या तळाशी कलशाकृती घडविलेली आहे. या स्तंभांसमोरचा संपूर्ण खडक फोडलेला नसल्यामुळे चैत्याच्या अंतर्भागात अंधार आहे.

आगाशीच्या आत मुख्य चैत्यगृह असून, त्याच्या प्रवेशद्वारी भव्य कमान दिसते. चैत्याचे छतही तसेच कमानीच्या आकाराचे आहे. चैत्याचा अंतर्भाग अगदी साधा आहे व त्यातील अष्टकोनी स्तंभही साधेच आहेत. त्यांच्या तळाशी व शिरोभागी कोणत्याही आकृती खोदलेल्या नाहीत. मात्र काही स्तंभांवर बौद्ध प्रतीके कोरलेली दिसतात.

कार्ले येथील चैत्याप्रमाणेच बेडसे येथील चैत्याच्या छताला गोल लाकडी कड्या बसविलेल्या होत्या. पण आता त्या तिथे नाहीत. तिथल्या स्तंभांवर आणि स्तूपावर काही चित्रे रंगवलेली असावी, असे वाटते. पण सांप्रत ती नष्टप्राय झालेली आहेत.

चैत्याच्या दर्शनी कमानीला जो विशिष्ट आकार असतो, तो स्तूपाच्या बाह्य रेषेच्या अनुरोधाने निश्चित करण्यात आलेला आहे, असे काही संशोधकांचे मत आहे. काहींच्या मते चैत्य-गवाक्ष हे शाक्य मुनीला संबोधी प्राप्त झाली, त्याचे प्रतीक असून, ते पिंपळपानासारखे बनवलेले असते. लोमशगुंफेची कमान ही चैत्य-गवाक्षाची प्राथमिक अवस्था होय. कोंडाणे, भाजे व बेडसे येथील कमानी त्यांची मध्यम अवस्था दर्शवतात; तर कार्ले येथील चैत्याची कमान ही त्याची पूर्णावस्था

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मानली जाते. लोमशगुंफेची कमान दर्शनी भागापुरती खोदलेली आहे, तर कोंडाण्याची कमान चैत्यगृहाच्या आरपार

अष्टकोनी स्तंभावरील शिल्पाकृती, चैत्यलेणे– बेडसे

खोदलेली आहे. हीच पद्धत पुढे चालू राहिली. गवाक्षाच्या या विशिष्ट आकारामुळे चैत्यगृहाच्या अंतर्भागात सूर्यप्रकाश नीट पोचून तो स्तूपावर केंद्रित होतो. [सह्याद्रि; इं. आ.(बु. हिं.)]

बेडूक एक जलचर व स्थलचर प्राणी. याला संस्कृत भाषेत मंडूक म्हणतात. मंडूक हा शब्द मुळात मज्जूक असा असावा. मस्ज् (मज्ज्) = बुडया मारणे, यावरून मज्जूक शब्द बनला आहे. याशिवाय मंडूक शब्दाची आणखी एक व्युत्पत्ती देतात, ती अशी– मद्= हर्ष पावणे किंवा मन्द्=तृप्त होणे, या



बेडूक

धातूंवरून मद् = मन्द् = मण्ड्; मण्ड्+उक: = मण्डूक: असा शब्द निर्माण झाला. बेडकांना पाण्यामुळे हर्ष होतो, बेडूक पाणी पिऊन तृप्त होतात, हा आशय त्या शब्दात ध्वनित होतो. ऋग्वेदात मंडूकसूक्त नावाचे एक स्वतंत्र सूक्त आहे (७.१०३). या सूक्तात पावसाळ्याच्या प्रारंभी ओरडणाऱ्या बेडकांना (वेदघोष करणाऱ्या) ब्राह्मणांची उपमा दिली आहे. हे सूक्त म्हणजे पाऊस पडण्यासाठी म्हणायचे मंत्र होत, असे यास्काने निरुक्तात म्हटले आहे (९.५).

बेडकाचा पाण्याशी संबंध असल्यामुळे त्यांच्या अंगी शैत्य कल्पून, प्रेतदहनानंतर त्याला त्या ठिकाणी दाहशमनार्थ बोलावण्याची प्रथा होती, असे ऋग्वेदातील एका ऋचेवरून (१०.१६.१४) वाटते. ताप आला असताना आजाऱ्याचा दाह नष्ट व्हावा, म्हणूनही बेडकाचे आवाहन करावे, असे अथर्ववेदात म्हटले आहे (७.११६). याशिवाय तैत्ति. संहिता (५.४.४.३), वाज. संहिता (२४.३६), पंच. ब्राह्मण (१२.४.१६), इ. ग्रंथांतही बेडकाचा उल्लेख आहे. अग्निचयनामध्ये विटा मांडून झाल्यावर एका कळकाच्या काठीला बेडूक बांधून त्याला मारतात. जलाशय खणताना त्यातपाणी लागण्यासाठी तांब्याचा बेडूक करून दान द्यावा, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे (५८.१९).

लोकसाहित्यात बेडकाला मंदोदरीचे भूत अथवा तिचा आत्मा असे म्हटलेले आहे. चेटकिणी त्याचे रक्त अंगाला फासतात आणि त्यामुळे त्या आकाशात उडू शकतात, अशी एक लोकसमजूत आहे. नेपाळातील नेवार जातीचे लोक बेडकाला देव मानतात आणि राखी पौर्णिमेला शेतात त्याची पूजा करतात. पूजेनंतर त्याला भाताचा आणि नऊ प्रकारच्या डाळींचा नैवेद्य दाखवितात. नेवारांच्या मते बेडकांनी दैत्याला शेतात नेले आणि तिथे त्याला चिखलात गाडून मारले. पर्जन्यासाठी बेडकाची आळवणी करणे हा प्रकार सर्वत्र रूढ आहे. बेडूक व पाऊस यांच्या निकटतम संबंधाच्या कित्येक लोककथाही आढळतात. दिब्रूगढच्या बाजूला पाऊस पडण्यासाठी बेडकांची लग्नेही लावतात. [वे. इं.; दि नेवार्स – गोपालसिंह नेपाळी, १९६५]

बेदिया एक भटकी जमात. यांची वस्ती बंगाल, उत्तर प्रदेश, इ. ठिकाणी आढळते. या लोकांचा वर्ण पिंगट आहे. यांच्या स्त्रिया प्रमाणबद्ध अवयवांच्या असून, त्या सडपातळ असतात. यांचे कपडे मात्र ओंगळवाणे असतात. त्यांच्यापैकी काही गोंदण्याचे काम करतात, तर काही चटया विणतात. याशिवाय त्या वैदूगिरीही करतात. पुरुष गारुडी, डोंबारी, पुंगीवाले यांचे व्यवसाय करतात. भुरटया चोऱ्या आणि गुन्हेगारीचे व्यवसायही त्यांना वर्ज्य नाहीत.

त्यांच्या चर्येवरून ते डोम वा तत्सम जाती यांचे वंशज वाट-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तात. यांच्यांतील काही लोक आपल्याला मुसलमान म्हणवतात आणि आपली सुंता करून घेतात. ते ज्या लोकांमध्ये राहतात, त्या लोकांचा धर्म स्वीकारतात. काही बेदिया शीख आहेत, काही कबीरपंथी आहेत, काही मुसलमान आहेत. ते काली अथवा ज्वालामुखी या देवीला भजतात. दादजू नामक देवीला डुकरांचा बळी देतात. त्याचप्रमाणे पीरांचीही पूजा करतात.

यांची धर्मकृत्ये ब्राह्मण सहसा संपादित नाहीत. जे ब्राह्मण त्यांच्याकडे जातात, त्यांना कनिष्ठ समजतात.

बेदिया लोकांत हुंडा घेण्याची पद्धत आहे. ज्याने यशस्वीपणे अधिक गुन्हेगारी केली असेल, तो नवरामुलगा उत्तम अशी त्यांची समजूत आहे. [एन्सा. रि. ए.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

बेदी गणेशसिंह (इ. स. चे १९ वे शतक) एक संतकवी. गुरू नानकाच्या वंशात याचा जन्म झाला. याच्या वडिलांचे नाव हरदास होते. पंजाबमधील विलासपूर – नरेशाने गणेशसिंहाला आपला धर्माचार्य म्हणून आश्रय दिला होता. गणेशसिंहाचे वंशज आजही विलासपूरमध्ये राहतात.

गणेशसिंह हा एक रससिद्ध कवी होता. जन्मसाखी श्री गुरु नानकदेवजीकी आणि श्रीकृष्णचरित्रचंद्रोदय या त्याच्या दोन काव्यरचना प्रसिद्ध आहेत. दोन्ही ग्रंथांची भाषा ब्रज व लिपी गुरुमुखी आहे. भाषाशैथिल्याचा अभाव हा या ग्रंथांचा एक विशेष आहे. शीख जगतात जन्मसाखी काव्याला विशेष महत्त्व आहे. या काव्यात वंशगत संस्कार आणि दंतकथांची रेलचेल आहे. दोहा व चौपाई या छंदांत काव्याची रचना केलेली आहे. कृष्णचरित्रचंद्रोदयात वृंदावनवासी बालकृष्णाच्या सरस लीलांचे निरूपण आहे. [पं. हिं. सा. इ.]

बेने इस्राएल मुंबई, कुलाबा, ठाणे या भागात प्रामुख्याने आढळणारी एक जात. बेने इस्राएल या शब्दाचा अर्थ बेन् ए इस्राएल = इस्राएलची मुले असा आहे. या लोकांना ज्यू, यहुदी व शनवार तेली अशीही नावे आहेत. हे लोक पूर्वी तेल गाळण्याचा व्यवसाय करीत आणि शनिवारी त्यांचा विश्रांतीचा दिवस असल्यामुळे तेलाचे घाणे बंद ठेवीत. त्यावरून त्यांना शनवार तेली असे नाव मिळाले.

या लोकांच्या प्राचीन इतिहासाविषयी निश्चित माहिती नाही. पण ते एडनहून किंवा इराणी आखातातून इ. स. च्या ६ व्या शतकात भारतात आले, असे एक मत आहे. त्यांच्या आगमनाविषयी पुढील आख्यायिका सांगतात –

हे लोक दोन जहाजांत बसून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आले. त्यांपैकी एक जहाज कोचीन बंदरात लागले व त्यातील लोकांनी कोचीनच्या आसपास वस्ती केली. दुसरे जहाज अलिबागेजवळ नवगाव या ठिकाणी खडकावर आपटून फुटले. त्यामुळे त्यातील बरेच लोक समुद्रात बुडून मरण पावले. सात पुरुष आणि सात स्त्रिया तेवढ्या वाचल्या. त्यांनी किनाऱ्याला लागलेली प्रेते गोळा करून दोन मोठ्या खड्डयांत पुरली. या कबरी अजूनही नवगाव इथे आहेत. या वाचलेल्या स्त्री-पुरुषांची संतती म्हणजेच सांप्रतचे बेने इस्राएल होत.

हे लोक शेती, तेल गाळणे, सुतारकाम, अध्यापन, दवाखान्यांत काम करणे, इ. व्यवसाय करीत. त्यांच्यापैकी बरेचसे लोक पूर्वी इंग्रजांच्या सैन्यात होते. सांप्रत पुष्कळ लोक शिक्षण घेऊन नोकऱ्या करीत आहेत.

बेने इस्राएल लोक मध्यम उंचीचे, बळकट व तरतरीत असतात. त्यांचा रंग उजळ, डोळे काळे किंवा तपकिरी व केस काळे असतात. त्यांच्या स्त्रिया सर्वसाधारणपणे गोऱ्या व सुस्वरूप असतात.

पूर्वी बेने इस्राएल पुरुष थोडा मुसलमानांसारखा व थोडा हिंदूंसारखा पोषाख करीत. डोक्याला पागोटे किंवा टोपी, अंगात कोट, खाली विजार किंवा धोतर आणि पायात वहाणा असा त्यांचा पोषाख असे. त्यांच्या स्त्रिया पूर्वी नऊवारी साडी व चोळी असा पोषाख करीत आणि मध्यमवर्गीय व खालच्या स्त्रियांच्याप्रमाणे दागिने घालीत. कालमानाप्रमाणे सांप्रत या लोकांच्या पोषाखात फरक पडला आहे. आता ते पाश्चात्य पद्धतीचा पोषाख करू लागले आहेत.

हे लोक मराठी भाषा बोलतात. पण ते प्रार्थना मात्र हिब्रू भाषेत करतात. हे लोक मेंढी, बकरा व कोंबडी यांचे मांस व खवले आणि पंख असलेले मासे खातात.

बेने इस्राएल लोकांत काळे व गोरे असे दोन भेद आढळतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे गोरे हे इथे आलेल्या मूळच्या लोकांचे वंशज होत व काळे हे एतद्देशीय स्त्रियांची किंवा इथे बेने इस्राएल बनलेल्या लोकांची संतती होय. काळे व गोरे यांचा धर्म एकच असला व आचार-विचार सारखे असले, तरी त्यांच्यांत रोटीबेटीव्यवहार होत नाही.

विवाहप्रथा – पूर्वी या लोकांत मुलामुलींचे विवाह लहानपणी होत; पण सांप्रत ते मोठेपणी होतात. सर्वसाधारणपणे मुलाचे आईबाप मुलीला मागणी घालतात. साखरपुडा मुलीच्या घरी होतो. त्या वेळी तिला अंगठी किंवा सोन्याचा दागिना देतात. त्यानंतर एखाद्या रविवारी लग्न होते. लग्नाच्या आदल्या रात्री वधू-वरांना आपापल्या घरी हळद व मेंदी लावतात. दुसऱ्या दिवशी सकाळी वधू-वरांच्या घरी आप्तेष्टांना मेजवानी होते. संध्याकाळी सिनेगॉगमध्ये (प्रार्थनामंदिर)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किंवा एखाद्या सोयिस्कर ठिकाणी लग्नसमारंभ होतो. त्या वेळी पुरोहित हिब्रू मंत्र म्हणतो. नवरामुलगा वधूच्या समोर उभा राहतो. त्या वेळी त्याच्या हातात मद्यपूर्ण चांदीचा पेला असतो व त्यात चांदीची अंगठी असते. तो वधूला नावाने हाक मारून सांगतो, की 'या चांदीच्या पेल्याने तू माझ्याशी विवाहबद्ध झाली आहेस.' नंतर तो पेल्यातील अर्धे मद्य पितो व अर्धे वधूच्या हातातील काचपात्रात ओततो. मग त्यातील अंगठी तिच्या उजव्या तर्जनीत घालतो. त्या नंतर तो थोडे मद्य असलेले दुसरे एक काचपात्र व एक दागिना घेतो. तो दागिना तिच्या गळ्यात बांधतो, थोडे मद्य स्वतः पितो, उरलेले तिच्या तोंडात ओततो आणि काचपात्र फोडून टाकतो. मग दोघेही लग्नाच्या करारपत्रावर सह्या करतात. ते करारपत्र वधूपिता सांभाळून ठेवतो. पतिपत्नींपैकी कोणी कराराचा भंग केल्यास त्यांना घटस्फोट घेता येतो. जातीबाहेर लग्न केल्यास, अशा विवाहाची संतती काळे या विभागात मोडते.

प्रसूतिप्रथा – मुलगा जन्मल्यावर आठव्या दिवशी त्याची सुंता करतात व त्याचे नाव ठेवतात. मुलीचे नाव केव्हा ठेवावे, त्याबद्दल नियम नाही. पण साधारणपणे, आठव्या दिवशी किंवा त्यानंतर ठेवतात. नावे बहुधा जुन्या करारातून निवडलेली असतात. मुलांची अब्राहाम, आयझॅक, जोसेफ, मोझेस, बेंजामिन, इ. व मुलींची सारा, रेबेका, सेफिरा, हना, इ. अशी असतात. मुलाच्या जन्मानंतर चाळिसाव्या दिवशी आणि मुलीच्या जन्मानंतर ऐंशीव्या दिवशी मातेचा सुवेर फिटतो, असे समजतात.

देवधर्म – हे लोक यहुदी धर्माचे अनुयायी असून, ते एकाच देवाला भजतात. त्यांच्या प्रार्थनामंदिराला सिनेगॉग असे नाव आहे. त्यात जुन्या कराराच्या हस्तलिखित प्रती ठेवलेल्या असतात व त्यांना ते फार पवित्र मानतात. हे लोक इतरांना आपल्या धर्मात आणण्याचा प्रयत्न करीत नाहीत.

सण-उत्सव – हे लोक अनेक व्रते व उत्सव करतात. नव्याचा सण, खिरीचा सण, दारफळणीचा सण, सुक्कोथ हनुखा, सबाबी रोजा, एलिआहू हन्नाबीचा उरूस, होळीचा सण, बिरड्याचा सण, सेलिचोथ, इ. त्यांची प्रमुख व्रते व उत्सव होत. खिरीच्या सणाच्या दिवशी ते नवीन तांदुळाची खीर करतात व तिचा देवाला नैवेद्य दाखवतात. नैवेद्य दाखविण्यापूर्वी घरातील कोणीही काही खात नाही. दारफळणीच्या दिवशी ते पांढरा पोशाख करून सबंध दिवस घरात राहतात व बाहेरच्या माणसांशी बोलत नाहीत. त्यांचा पुरीम हा सण हिंदूंच्या होळीच्या दिवशीच येतो, म्हणून त्याला त्यांनी होळी असेच नाव दिले आहे. हे लोक आपल्या सणांना सण असेच संबोधतात. वरील सण इतर ज्यू लोकांच्या सणांशी तंतोतंत जुळतात. याशिवाय बेने इस्राएल लोकांत आणखी काही उपवास व सण आहेत. त्यांना ते रोजा आणि उरूस म्हणतात. त्यांच्या एका उपोषणाचे मुसलमानांच्या रमझानाच्या उपोषणाशी साम्य असल्यामुळे त्याला बेने इस्राएल रमझान असेच नाव मिळाले आहे. यात सतत वीस दिवस उपवास करायचा असतो. याशिवाय, वर्षातून दोनदा त्यांचे उपवास असतात. पूर्वी हे लोक एलिजा नामक प्रेषिताचा उरूस खंडाळा येथे भरवीत असत. पण सांप्रत तो बंद पडला आहे.

या लोकांत सिनेगॉगमधील धार्मिक मेळाव्याच्या वेळी शांतीचे चुंबन देण्याची चाल आहे. मुख्य धर्मोपदेशक प्रथम प्रतिष्ठित व्यक्तींना हे चुंबन देतो. हे लोक त्याच्या हातांवर आपला हात पालथा ठेवतात व तो त्या हाताच्या बोटांच्या टोकांचे चुंबन घेतो. हे लोक मग इतरांना चुंबन देतात. हा विधी सतत तीन-चार मिनिटे चालू असतो.

याशिवाय सिनेगॉगमधील प्रार्थना संपल्यावर आशीर्वादाचा पेला नामक एक विधी होतो. द्राक्षांच्या रसाचा एक पेला मुख्य धर्मोपदेशक हातात घेतो. तो त्या पेल्यावर आशीर्वचन उच्चारतो व त्यातील थोडा रस पितो आणि उरलेला रस दुसऱ्या एका मोठ्या, रसाच्या भांड्यात ओततो. त्या भांड्यातील रस मग सर्व लोकांना वाटतात.

बरीच वर्षे भारतात राहिल्यामुळे बेने इस्राएल लोकांच्या आचारांवर हिंदूंच्या काही आचारांचाही प्रभाव पडलेला आहे. एखाद्या बेने इस्राएल स्त्रीला मुलगा नसेल, तर ती आपल्याला मुलगा व्हावा, असा नवस करते. नवसाने मुलगा झाला, की सहा-सात वर्षांनी त्याचे जावळ काढतात. त्या जावळाची सोन्याने किंवा चांदीने, नवस असेल त्याप्रमाणे तुला करून त्याच्या किमतीइतके द्रव्य वाटतात. जावळाचे एखाद्या जलाशयात विसर्जन करतात. हे लोक धार्मिक समारंभांत सब्जाचा उपयोग करतात व बकऱ्याच्या यकृताचा किंवा कोंबड्याच्या काळजाचा नैवेद्य दाखवतात. बेने इस्राएल लोकांच्या खेड्यात मुकादम व काझी असे दोन अधिकारी असतात. हे दोघे या लोकांच्या सामाजिक व धार्मिक बाबींकडे लक्ष देतात. एखाद्या जातिबहिष्कृत व्यक्तीला पुन्हा जातीत घेताना त्याला गार पाण्याच्या थाळीत बसवतात आणि पुरोहित त्याच्या पाठीवर सौम्य असे एकोणचाळीस कोरडे ओढतो.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते पुरतात. त्यासाठी सहा फूट खोल खड्डा खणतात व मृताचे मस्तक पूर्वेला करून त्यात प्रेत ठेवतात. शुक्रवारी सूर्यास्तापूर्वी व शनिवारी सूर्यास्तानंतर प्रेत पुरायचे असा यांच्यांत नियम आहे. लहान मुलांच्या बाबतीत तीन दिवस व मोठ्या माणसांच्या बाबतीत सात दिवस मृताशौच पाळतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाद्ये वाजत आहेत. मी ती ऐकून आलो आहे. मथुरेत श्रीकृष्णाने जन्म घेतला आहे आणि गोकुळात आनंदोत्सव चालला आहे. त्याला जन्म देवकीने दिला, पण यशोदेने त्याचे संगोपन केले आणि लोक त्याला नंदाचा पुत्र असे म्हणू लागले. गाईंच्या शेणाने जमीन स्वच्छ सारवली. तिच्यावर सुवर्णकलश ठेवले. यशोदेने चंदनाचा पाळणा केला आणि चोहीकडे दिवे लावले.

मुलगा एक महिन्याचा झाला, की त्याची माता विहिरीची पूजा करण्यासाठी, विहिरीवर जाते. त्या वेळी आसपासच्या मुली व स्त्रिया तिच्या बरोबर असतात. त्या प्रसंगी जी गीते गातात, त्यांना कुआँपूजन गीते असे म्हणतात. त्यांपैकी एका गीताचा नमुना असा –

ऊपर बादल घुमडांय गोरी धन पनियाँ खों निकरी।
जाय जो कँयौ उन राजा ससुर सें अंगना में कुइया खुदाव।
तुम्हारी बहू पनियाँ खों निकरी ......
जाय जो कँयो उन राजा जेठा सों, चंदन पाटें डराव।
तुम्हारी बहू पनियाँ खों निकरी......

भावार्थ – (नूतन माता आपला सासरा व दीर यांना संदेश पाठविते,) आकाशात ढग गडगडत असतानाच मी विहिरीतून पाणी काढले. (ती पुढे म्हणते, की) राजाप्रमाणे श्रीमंत असणाऱ्या माझ्या सासऱ्याला सांगा, की अंगणातच विहीर खोदा. त्यामुळे त्यांच्या सुनेला पाणी भरण्यासाठी बाहेर जावे लागणार नाही. माझ्या मोठ्या दिराला चंदनाचा पाट बनवायला सांगा.

बुंदेलखंडातील विवाहोत्सवातील वाङ्‌निश्चयापासून कंकण सोडीपर्यंतच्या सर्व विधींवर गीते आहेत. या गीतांपैकी बनरा, वनरी, गारी, बुंदेला, रघुपत, इ. गीते प्रमुख आहेत.

वरासाठी वधू पसंत केली आहे आणि वधूपक्षाकडील लोक लग्नतिथी, देणी-घेणी वगैरे ठरवण्यासाठी वरगृही जमले आहेत. सर्व लोक अंगणात वसले आहेत. तिथे रांगोळ्या घातल्या आहेत. कलश ठेवलेले आहेत. नवरा मुलगा चांगला पोशाख करून पाटावर बसला आहे. अशा वेळी स्त्रिया उत्साहाने गायला सुरुवात करतात–

सो आज मोरे राम जू खों लगुन चढत हैं।
लगुन चढत है, आनंद बढत हैं। सो आज मोरे
कानन कुंडल मोरे राम जू खों सोहें
सो गालन बिच मुतिय लर रिरकत हैं।
केशर खौर मोरे राम जू खों सोहें,
सो गर बिच जंजीर लसत हैं।
रामजीके दर्शनको जियरा ललचत हैं।
सो आज मोरे राम जू खों लगुन चढत हैं।

भावार्थ – आज माझ्या रामचंद्राच्या विवाहाची बोलणी होत आहेत. त्यामुळे सर्वांना आनंद होत आहे. त्याच्या कानांत कुंडले शोभत आहेत. गालांवर (मुंडावळ्यांच्या) मोत्यांचे सर रुळत आहेत. भालप्रदेशावर केशरी चंदनाचा टिळा आहे. गळ्यात गोफ आणि साखळी आहे. रामचंद्राचे दर्शन घेण्यासाठी जीव आसुसला आहे.

बुंदेलखंडात वराला बनरा आणि वधूला बनरी असे म्हणतात. लग्न ठरल्यानंतर वधूच्या व वराच्या घरी लग्नाच्या तयारी-साठी बायका जमतात, तेव्हा वधूच्या घरी गायिल्या जाणाऱ्या गीतांना बनरी आणि वराच्या घरी गायिल्या जाणाऱ्या गीतांना बनरा असे म्हणतात. बनरी गीताचा एक नमूना असा –

ओरन खोरन फिरैं बेटी लडन दे कौन
बाबुल जू के बाग भलेजू।
हरी-हरी दूब बेटी फूली हैं चमेली बेई
बाबुल जू के बाग भलेजू।
बीन-बीन फूल बेटी भर लई डलियां धर लई
घरई की गैल भलेजू।
मयसें आ गये रगपत दूल्हा जे फुलवा
हमें दँय जाव भलेजू।
जे फुलवा हमरे बाबुल मंगाये पूजत और
गनेश भलेजू।
जे फुलवा अपने बाबुल खों दैं हों साके के
रचे जिन ब्याव भलेजू।
माथेकी बेंदी लाडी हमई जो ल्याहें तब हूके
साके को ब्याव भलेजू।

भावार्थ – वधूने आपल्या पित्यासाठी बागेतून हिरव्या दूर्वा व चमेली, मोगरा, इ. फुले तोडून आणलेली असतात. तेव्हा वर तिला म्हणतो, प्रिये, ही फुले तू मला देऊन टाक. तेव्हा वधू म्हणते, ही फुले मी माझ्या वडिलांच्या गणेशपूजेसाठी तोडून आणली आहेत. ते मोठ्या उत्साहाने माझ्या विवाहाची तयारी करीत आहेत. तेव्हा ही फुले मी तुम्हांला देणार नाही. त्यावर तो म्हणतो, तुझ्या कपाळावर तिलक तर मीच लावणार आहे. तेव्हाच विवाह संपन्न होईल ना?

प्रत्येक ऋतुसंबंधीची गीतेही बुंदेलखंडात गायिली जातात. वर्षभरात दर महिन्याला गायिल्या जाणाऱ्या गीतांना मिळून बारहमासा असे नाव आहे. अशी चौमासा व छैमासा गीतेही आहेत.

बुंदेलखंडातील लोकजीवन अशा प्रकारे अनेक प्रकारच्या लोकगीतांनी व्यापले आहे. ही गीते रचणारे बुंदेलखंडातील काही प्रमुख लोककवी असे –

ईसुरी – याचा जन्म इ. स. १८३८ च्या सुमारास मेंडकी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गावी झाला. याच्या गीतांचे संकलन ईसुरीकी फागें व ईसुरी-प्रकाश या नावांनी झाले आहे.

चतुर्भुज – याचा जन्म बगौरा गावी झाला. याने इ. स. १८६३ ते १९०८ या दरम्यान आपली काव्यरचना केली आहे.

गंगाधर व्यास – याचा जन्म इ. स. १८४२ मध्ये छतरपूर गावी झाला. याचे द्वारिका विहार, अष्टयाम, नीतिमंजरी, सैर-लावनी, फागें, इ. ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

मनभावन – हा इ. स. १८७२ मध्ये छतरपूर गावी जन्मला. स्फुट फागें नामक याचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे.

याशिवाय परमानंद पांडेय, रामदास नामदेव 'दास', प्यारे जू, दुर्गा, सरजू लाल, लाला वंशगोपाल, मुंशी अवघ लाल, घनश्याम पांडे, भुजबल सिंह, रसिया, इ. कवींनी अनेक स्फुट गीते रचली आहेत आणि त्यांचे संग्रहही प्रसिद्ध झाले आहेत. [भा. भा. स.; भो. भा. सा.; हिं. सा. को.; बुंदेलखंड के लोक-गीत– श्री उमाशंकर शुक्ल; विंध्यभूमि, लोकसंस्कृती अंक, १५ ऑगस्ट १९५५; श्री. शिवसहाय चतुर्वेदी–आजकल, मे १९५८]

बुचम्म

द. भारतातील एक लौकिक देवता. या देवतेच्या उत्पत्तीसंबंधी एक कथा सांगतात, ती अशी –

एक शूद्र स्त्री होती. तिचा नवरा एक दिवस परगावी गेला असता तिथेच त्याला मृत्यू आला. ही बातमी समजताच ती त्या गावी गेली आणि तिने नवऱ्याबरोबर सहगमन केले. पुढे एक दिवस माला जातीचा एक माणूस तिच्या चितेवरून जात असता त्याने, तिच्या लुगड्याचा एक तुकडा न जळता शिल्लक राहिला होता, त्याला काठीने स्पर्श केला. ती स्त्री त्या रात्री बापाच्या स्वप्नात गेली आणि तिने त्याला सांगितले, की 'मी विटाळले आहे; मला शुद्ध करा.' बाप तिच्या चितेपाशी आला आणि चिता सावडू लागला. तेव्हा त्याला त्या राखेत तिचे मंगळसूत्र सापडले. त्याने ते एका भांड्यात ठेवून प्रक्षालित केले. थोड्याच दिवसांत लोकांना कळून आले, की त्या मंगळसूत्रात दैवी सामर्थ्य आहे. मग लोकांनी त्या स्त्रीची मूर्ती बनविली व तिच्यासाठी मंदिरही बांधले. तीच ही बुचम्म होय. हिला बोकड बळी देतात; पण रेडा बळी देत नाहीत. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

बुडबुडिके

म्हैसूर प्रदेशातली एक भटकी जात. हे लोक भिक्षा मागतात किंवा पक्ष्यांच्या आवाजावरून भविष्य सांगण्याचा धंदा करतात. त्यांच्या हातात बुडबुडू असा आवाज करणारे बुडबुडकी नावाचे एक डमरूसारखे वाद्य असते. त्यावरून या लोकांना बुडबुडिके असे नाव मिळाले आहे.

जुनीपुराणी विजार, वर लांब अंगरखा, काखेत झोळी आणि डोक्याला भलेमोठे रंगीबेरंगी पागोटे असा त्यांचा वेष असतो. कधी कधी ते वाघाचे किंवा चित्त्याचे कातडेही पांघरतात.

आपल्या व्यवसायाविषयी ते पुढील कथा सांगतात–बुडबुडिके लोकांची उत्पत्ती थोडी उशीरा झाली. ते जन्माला आले, तेव्हा असंख्य मानव निर्माण झालेले होते आणि प्रत्येकाने काही ना काही उद्योग सुरू केला होता. त्यामुळे बुडबुडिके लोकांना कोणताच व्यवसाय शिल्लक उरला नाही. मग काय करावे, हे न कळल्यामुळे ते अंबाभवानीला शरण गेले. तिला त्यांची दया आली. तिने शंकराचा डमरू त्यांना दिला आणि सांगितले, की हा डमरू घ्या आणि तो वाजवून भिक्षा मागा; म्हणजे तुमची भरभराट होईल.

हे लोक भविष्य गद्यात न सांगता पद्यात सांगतात. पद्याचे पालुपद ठराविक असते. ते रानातील गाणाऱ्या पक्ष्यांच्या लकेरीवरून घेतलेले असते, असे ते सांगतात. त्यात घराला सुखशांती, वैभव, पुत्रलाभ, इ. गोष्टी मिळतील, असे सांगितलेले असते. भविष्य सांगून झाल्यावर ते तांदूळ वगैरे न मागता फाटका, जुना किंवा कसलाही कपडा मागतात आणि तो विकून त्याचे पैसे मिळवतात.

हे लोक हनुमान व अंबाभवानी या देवतांना भजतात. कुठेही फिरत असले, तरी उत्तर अर्काट जिल्ह्यातील वेल्लोर या गावी दसऱ्याला अंबाभवानीच्या वार्षिकोत्सवाला ते न चुकता हजर राहतात. [का. ट्रा. स. इं.]

बुत्तया

गुजरात प्रदेशातील एक क्षुद्र देवता. तिच्या नावाने एखाद्या टेकाडावर दगडांची एक रास घातलेली असते. तळबदा कोळी हे तिचे पुजारीपण करतात. अवर्षणाच्या वेळी तिच्या नावाने ब्राह्मणभोजन घालतात व त्या भोजनासाठी घरोघरचे धान्य गोळा करतात. [लौ. दं.]

बुदलेंदे

एक भिक्षेकरी जात. यांची वस्ती प्रामुख्याने महाराष्ट्रात आढळते. भविष्य सांगत हिंडणे हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. भिक्षा मागताना यांच्या हातांत खुणेसाठी एक खुळखुळा असतो. समोर माणूस दिसल्यावर ते बोलू लागतात. 'आजपासून पंधरा दिवसांनी तुला ऐश्वर्य प्राप्त होईल. थोड्याच दिवसांत तू पालखीत बसून फिरू लागशील. परंतु दुर्दैवाने तुझ्यावर एक संकट येणार आहे. आज सकाळी हलकी नावाच्या पक्ष्याने माझ्या कानांत ही गोष्ट सांगितली. या संकटाच्या निवारणासाठी तू उपाय कर; अन्यथा तुझ्यावर मोठीच आपत्ती कोसळेल. तो उपाय फार मोठा नाही. केवळ एक जुना अंगरखा मला दे; म्हणजे सर्व ठीक होईल.'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या प्रमाणे बडबडत हे लोक हिंडतात. हे मोठे धूर्त व मनकवडे असतात. [वाँ. बे. क्रा.]

बुद्धकपाल बौद्धांचा एक देव. याला हेरुकाचेच एक रूप समजतात. याची मूर्ती नीलवर्ण, चतुर्भुज व प्रज्ञा नामक सहचरीसहित असते. अर्धपर्यंकावर नृत्यमुद्रा, असे याचे आसन असते. क्वचित याची सहचरी चित्रसेना याला आलिंगन देत असल्याच्या अवस्थेतही याची मूर्ती आढळते. अशा वेळी त्याच्या चार हातांत खट्वांग, कपाल, कर्तरी व डमरू या वस्तू असतात. या देवाभोवती तीन मंडले असून, त्यांत प्रत्येकी २४ देवी असतात. याची एकटयाची मूर्ती क्वचितच आढळते पाहा–हेरुक. [इं. बु. इ.]

बुद्धकीर्ती (इ. स. चे १२ वे शतक) एक बौद्ध पंडित. हा नालंदा विद्यापीठात आचार्य होता. विक्रमशिला विद्यापीठातील महापंडित अभयंकर गुप्त आणि बुद्धकीर्ती हे सहाध्यायी होते. अभयंकर गुप्ताच्या तांत्रिक पुस्तकांचा याने तिबेटी भाषेत अनुवाद केला आणि त्याच्या वज्र–याना–पत्ति–मंजरी या पुस्तकाच्या निर्मितीत याने खूप मदत केली, असे कळते. [बि. ज. स्मा. ग्रं.]

बुद्धघोष (इ. स. चे ५ वे शतक) एक बौद्ध भिक्षू व प्रकांड पंडित. याचे अधिकृत॰ चरित्र उपलब्ध होत नाही, पण काही ग्रंथांतून त्याच्या चरित्राविषयी थोडीबहुत माहिती मिळते, ती अशी –

बुद्धघोष हा गयेजवळच्या घोषग्रामी एका ब्राह्मण कुलात जन्मला. श्री. धर्मानंद कोसंबींच्या मते त्याचे जन्मस्थान तेलंगणात कुठेतरी असावे. ब्रह्मी बौद्ध तो ब्रह्मदेशात जन्मल्याचे सांगतात. त्याचा बाप केशी हा मगधराज संग्राम याचा राजपुरोहित होता. त्याचे घराणे वैदिक असल्याने त्याने बुद्धघोषालाही वेदाध्ययनात घातले. तो लवकरच वेदशास्त्रात पारंगत झाला. त्याने पातंजल योगदर्शनात विशेष प्राविण्य मिळविले. त्याच्या पांडित्यावर खूष होऊन गयेच्या राजाने त्याला एक गाव इनाम दिले. पुढे तो दिग्विजयासाठी बाहेर पडला. अनेकराज्यांतल्या अनेक पंडितांना, विशेषत: जैन-बौद्धांना, त्याने वादविवादात हार खायला लावली.

पुढे त्याची रेवंत नावाच्या एका महापंडित बौद्ध भिक्षूशी गाठ पडली. त्याच्याशी त्याने पातंजल योगशास्त्रावर कडाक्याचा वाद केला. त्या वादात मात्र बुद्धघोषाला हार खावी लागली. रेवंताच्या प्रखर बुद्धिमत्तेने व वादकौशल्याने तो दिपून गेला. मग त्याने रेवंताला म्हटले, की 'तुम्ही मला शिष्य करून घ्या.' त्यावर रेवंताने म्हटले. 'शिष्य करीन; पण त्या आधीं तुला प्रव्रज्या घ्यावी लागेल.'

बुद्धघोषाने लागलीच प्रव्रज्या घेतली आणि तो रेवंताबरोबर गयेच्या महाविहारात राहायला गेला. तिथे त्याने विनय आणि अभिधर्म या बौद्ध ग्रंथांचे अध्ययन केले. मग त्याने ज्ञानोदय नावाचा एक ग्रंथही लिहिला. पुढे त्याने धर्मदेशना या ग्रंथावर अट्ठकथा लिहिण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावर रेवंताने त्याला म्हटले.

'स्वतंत्र अट्ठकथा लिहिण्यापूर्वी तू आधी लंकेत जा. तिथे राहून सिंहली भाषेचा अभ्यास कर. त्रिपिटकावरच्या अट्ठकथा सांप्रत लंकेत आणि सिंहली भाषेत आहेत. भारतातील त्यांची परंपरा लुप्त झाली आहे. तू त्या अट्ठकथांचा पाली भाषेत अनुवाद करून त्या भारतात घेऊन ये. त्रिपिटकाचे मर्म कळायला त्यांची फार गरज आहे.'

गुरूची आज्ञा बुद्धघोषाने मानली. मग तो लंकेत गेला. तिथे संघपाल या महास्थविराने त्याचे स्वागत केले. थोडयाच कालात सिंहली भाषा आत्मसात करून त्याने तिथल्या बौद्ध भिक्षूंकडे अट्ठकथांची मागणी केली. पण ते लागलीच त्या कथा द्यायला तयार झाले नाहीत. अट्ठकथा देण्याच्या आधी त्यांना बुद्धघोषाच्या पांडित्याची परीक्षा घ्यायची होती. बुद्धघोष त्या गोष्टीला तयार झाला. स्थविरांनी त्याला बुद्धाच्या दोन कूटात्मक गाथा दिल्या व त्यांचे विवरण करायला सांगितले. बुद्धघोषाने त्या गाथा वाचल्या. त्यांतले शील, समाधी आणि प्रज्ञा हे शब्द पातंजल योगदर्शनात त्याच्या परिचयाचे होते. ते शब्द उचलून त्याने बुद्धसंकेतांच्या अनुषंगाने त्यांचे विवरण करून विसुद्धिमग्ग नावाचा एक ग्रंथच लिहून त्यांना दाखविला. त्या ग्रंथात त्याने बौद्ध साधकांना उपयुक्त असा क्रमबद्ध साधनामार्गच तयार करून दिला. तो ग्रंथ म्हणजे बौद्ध साधनेचा जणू विश्वकोशच बनला.

तो ग्रंथ पाहून लंकेतले सगळे बौद्ध स्थविर एकदम खूष झाले. मग त्यांनी आपल्याजवळचे अट्ठकथांचे भांडार त्याच्या हवाली केले. बुद्धघोषाने अनुराधपूरच्या ग्रंथभुवनामध्ये बसून त्या समग्र कथा पालीत अनुवादिल्या. या अट्ठकथांचे विषयवारीने संग्रह करून त्याने त्यांना वेगवेगळी नावे दिली, ती अशी –

समंतपासादिका – ही संपूर्ण विनयपिटकावरील अट्ठकथा आहे. हिच्यात बुद्ध आणि त्यांचे अनेक शिष्य यांची चरित्रे आली आहेत. हिच्यात कित्येक भौगोलिक स्थळांचीही माहिती आहे.

कंखावितरणी – ही पातिमोक्ख या ग्रंथावरची अट्ठकथा आहे. या ग्रंथावरून तत्कालीन भिक्षुसंघाचे जीवन कळून येते.

सुमंगलविलासनी – ही दीघनिकायावरची अट्ठकथा आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दीघनिकायातल्या कठीण शब्दांची निरुक्ती व अर्थविवेचन हा या ग्रंथातला गाभा आहे. या निरुक्तीमुळेच बुद्धघोष हा बौद्ध साहित्याचा यास्क ठरला आहे.

पपंचसूदनी—ही मज्झिमनिकायावरची अट्ठकथा आहे. या ग्रंथात बुद्धघोषाने बुद्धवचनांचा क्रम लावून त्यांची व्याख्या केली आहे. पाणिनीची सूत्रे विशिष्ट क्रमाने मागेपुढे करून भट्टोजी दीक्षिताने जशी सिद्धान्तकौमुदी रचली, तशी ही अट्ठकथा आहे.

मनोरथपूरणी—ही अंगुत्तरनिकायावरची अट्ठकथा आहे. बोधी प्राप्त झाल्यानंतरच्या ४५ वर्षांत बुद्धाने कोणकोणत्या ठिकाणी वर्षावास केले, त्यांची नोंद या ग्रंथात आढळते. त्याचबरोबर राहूल, कस्सप, पुण्ण, इ. बौद्ध भिक्षूंची चरित्रेही त्यात आढळतात.

याशिवाय सारत्थपकासिनी, परमत्तजोतिकासिनी, परमजोतिका, अट्ठशालिनी, संमोहविनोदिनी, पंचप्पकरण, इ. आणखीही त्याचे काही ग्रंथ आहेत.

या साऱ्या अट्ठकथा घेऊन बुद्धघोष कित्येक वर्षांनी परत गयेला गेला आणि आपल्या गुरूला भेटला. आपल्या शिष्याची ती प्रचंड दार्शनिक कामगिरी पाहून रेवंताला धन्य वाटले.

त्यानंतर बुद्धघोष ब्रह्मदेश, सयाम, कंबोडिया, इ. पूर्वेकडील देशांच्या संचारासाठी निघाला. तिथल्या धर्मज्ञानालाही त्याने उजळा दिला. त्या सर्व देशांतल्या बौद्ध पंडितांत बुद्धघोषाबद्दल अपार पूज्यभाव आहे. बुद्धघोषाचा देहांत कंबोडियात झाला असे सांगतात.

बुद्धघोषाचा काल हा पाली भाषेचा ऱ्हासकाल होता. बुद्धाने सामान्य जनांची भाषा म्हणून पालीला आपली धर्मभाषा बनविले होते. हीनयान पंथाच्या आचार्यांनी पालीतच आपले धर्मग्रंथ लिहिले होते. पण पुढे महायानी बौद्धांनी पालीला डावलून संस्कृत भाषेला जवळ केले. त्याचा परिणाम पाली साहित्याच्या अवनतीत झाला. नेमका याच वेळी बुद्धघोष जन्माला आला. पाली भाषेतली त्याची ज्ञानसंपदा एवढी मोठी आणि अपरिहार्य ठरली, की पुढच्या सगळ्या बौद्धाचार्यांना बुद्धघोषाचा आणि त्याबरोबरच पाली भाषेचाही आदर करावा लागला. अशा प्रकारे बुद्धघोष हा पाली भाषेचा उद्धारकर्ता ठरला. बौद्ध जगातला सूर्य अशी त्याची ख्याती झाली. वैदिक वाङ्मयात जे स्थान सायणाचार्यांचे तेच स्थान पाली वाङ्मयात बुद्धघोषाचे आहे. [पा. सा. इ.; हिं. वि. को.; बौ. ध. बि.; आजकल, वार्षिक अंक, १९५६; ला. व. बु.; आचार्य बुद्धघोष, भिक्षु धर्मरक्षित, १९५६]

बुद्धचरित एक संस्कृत महाकाव्य. याचा कर्ता अश्वघोष नावाचा एक बुद्ध भिक्षू आहे. या महाकाव्यात बुद्धाचा जीवनवृत्तांत आणि बुद्धकथित सिद्धान्त यांचे वर्णन आहे. हे काव्य मुळात २८ सर्गांचे होते आणि त्यात निर्वाणापर्यंत बुद्धकथा दिलेली होती. परंतु सांप्रत त्याचे १७ सर्गच उपलब्ध आहेत आणि त्यांतही शेवटचे चार सर्ग १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात अमृतानंद नावाच्या कोण्या कवीने लिहून त्याला जोडले आहेत. 'पूर्ण ग्रंथ उपलब्ध न झाल्यामुळे मी ही स्वतःची पुस्ती जोडली' असे तो कबूल करतो. त्यामुळे प्रस्तुत काव्याचे १३ सर्गच प्रमाणित मानले जातात.

चिनी भाषेत मूळ २८ सर्गांचा अनुवाद मिळतो. त्यावरून इ. स. च्या ७ व्या व ८ व्या शतकांत तिबेटी भाषेतही त्याचा अनुवाद झाला. डॉ. जॉन्स्टन यांने चिनी अनुवादाच्या आधारे बुद्धचरिताच्या उत्तरार्धाचा अनुवाद केलेला आहे. या अनुवादावरून श्री. सूर्यनारायण चौधरी यांनी त्याचा हिंदी अनुवाद केला आहे.

इत्सिंग नावाचा चिनी बौद्ध भिक्षू या महाकाव्याची प्रशंसा करताना म्हणतो— भारताच्या पाच प्रांतांत आणि दक्षिण सागराच्या द्वीपात सर्वत्र बुद्धचरिताचे पठण चालते. या महाकाव्यात कवीने बुद्ध-जीवन आणि बुद्ध-तत्त्वज्ञान यांचे उत्कृष्ट वर्णन तर केलेच आहे; शिवाय भारताच्या अनेक पौराणिक परंपरा दिग्दर्शित केल्या आहेत. बुद्धपूर्वकालीन दार्शनिक नय, विशेषतः सांख्य तत्त्वज्ञान, यांच्याविषयी आपले विस्तृत ज्ञान कवीने त्यात दाखवून दिले आहे.

या काव्यातील विषयप्रतिपादन सुंदर आणि व्यवस्थित आहे. दृश्य वर्णने सजीव आहेत. अलंकार मोजकेच आहेत. रचनेत प्रसाद आहे. बुद्धाच्या जीवनातील चमत्कारपूर्ण घटना अश्वघोष संयमपूर्वक वर्णितो. मात्र त्याच्या या काव्यात व्याकरणदृष्ट्या अपप्रयोग बरेच आहेत.

प्रणय किंवा शृंगार यांचे वर्णन हे एक महाकाव्याचे लक्षण मानले जाते. कवीने ४ थ्या सर्गात त्याची पूर्तता केली आहे. सुंदर आणि कामुक अशा रमणींसह गौतम वनविहारार्करिता गेला असता त्या रमणींनी त्याला कसे घेरून टाकले आणि त्याच्याशी कोणकोणत्या शृंगारचेष्टा केल्या, त्यांचे वर्णन करताना कवी पुढील श्लोक लिहितो —

मदेनावर्जिता नाम तं काश्चित्तत्र योषितः ।
कठिनैः पस्पृशुः पीनैः संहतैर्वल्गुभिः स्तनैः ॥
स्रस्तांसकोमलालम्बमृदुबाहुलताबला ।
अनृतं स्खलितं काचित्कृत्वैनं सस्वजे बलात् ॥
काचित्ताम्राधरोष्ठेन मुखेनासवगन्धिना ।
विनिशश्वास कर्णेऽस्य रहस्यं श्रूयतामिति ॥
काचिदाज्ञापयन्तीव प्रोवाचार्द्रानुलेपना ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इह भक्तिं कुरुष्वेति हस्तसंश्लेषलिप्सया ।।
चूतशाखां कुसुमितां प्रगृह्यान्या ललम्बिरे ।
सुवर्णकलशप्रख्यान्दर्शयन्त्यः पयोधरान् ।।
मधुरं गीतमन्वर्थं काचित्साभिनयं जगौ ।
तं स्वस्थं चोदयन्तीव वञ्चितोऽसीत्यवेक्षितैः ।।

अर्थ– मदाने धुंद अशा काही स्त्रियांनी आपल्या पुष्ट, कठिण व सुंदर स्तनांनी त्याला स्पर्श केला. झुकत्या खांद्यावरून नाजूकपणे जिच्या मृदु बाहुलता खाली लोंबत, अशा एका युवतीने आपण घेरी येऊन पडत आहो असा बहाणा करून गौतमाला घट्ट मिठी मारली. जिच्या मुखाला मदिरेचा सुगंध येतो आणि जिचा अधर लालचुटुक आहे, अशा एका मत्त युवतीने गौतमाच्या कानांत हळूच म्हटले.' प्रणयाचे रहस्य ऐका.' आणखी एकीने आपल्या शरीरावर उटण्याचा ओला लेप लावला होता. गौतमाचा हस्तस्पर्श व्हावा या इच्छेने तिने जणू गौतमाला आज्ञा केली, ' या उटण्यावर तुम्ही लतापत्रांची नक्षी कोरा.' काही ललनांनी मोहोर आलेली आंब्याची फांदी पकडून आपले सुवर्णकलशासारखे स्तन दाखवीत तिच्यावर झोके घेतले. आणखी एकीने स्पष्टार्थयुक्त असे प्रणयाचे मधुरगीत गायिले आणि तरीही शांत, स्तब्ध असलेल्या गौतमाला जणू आपल्या कटाक्षांनी उत्तेजित करीत म्हटले. ' तुम्ही या प्रणयसुखाला वंचित होत आहा.'

त्या पुढचा तो अभिनिष्क्रमणाचा म्हणजे घरदार सोडून जाण्याचा प्रसंग. नगरातून बाहेर पडताना गौतमाने कंथक नावाचा अवलख घोडा घेतला होता. त्या वारूची पाठ थोपटून गौतमाने त्याला म्हटले (५.७५–७८)–

बहुशः किल शत्रवो निरस्ताः समरे त्वामधिरुह्य पार्थिवेन ।
अहमप्यनुत्तं पदं यथावत्तुरगश्रेष्ठ लभेय तत्कुरुष्व ।।
सुलभाः खलु संयुगे सहाया विषयावाप्तसुखे धनार्जने वा ।
पुरुषस्य तु दुर्लभाः सहायाः पतितस्यापदि धर्मसंश्रये वा ।।
इह चैव भवन्ति ये सहायाः कलुषे कर्मणि धर्मसंश्रये वा ।
अवगच्छति मे यथान्तरात्मा नियतं तेऽपि जनास्तदंशभाजः ।।
तदिदं परिगम्य धर्मयुक्तं मम निर्याणमितो जगद्धिताय ।
तुरगोत्तम वेगविक्रमाभ्यां प्रयतस्वात्महिते जगद्धिते च ।।

भावार्थ– हे कंथक अश्वा, तुझ्यावर स्वार होऊन शुद्धोदन राजाने म्हणजेच माझ्या पित्याने युद्धात अनेकवार शत्रूंना पिटाळून लावले. हे तुरगश्रेष्ठा, मीही आज तुझ्यावर स्वार होत आहे. मी ज्या अमरपदाची आकांक्षा धरली आहे, त्या पदापर्यंत मी जाऊन पोचेन, असे काही तू कर. युद्धात, विषयसुखात किंवा धनार्जनात सोबती सुलभतेने मिळतात; पण आपत्तीत पडलेल्या किंवा धर्माचा आश्रय घेऊ पाहणाऱ्या पुरुषाला मात्र सोबती दुर्लभ असतात. संसारात, पापकर्मात किंवा धर्मकर्मात जे साथ-सोबत करतात, ते माझ्या मते अवश्य त्या त्या कर्मफलाचे वाटेकरी होतात. म्हणून तुरगश्रेष्ठा, मी हे जे निष्क्रमण करीत आहे, ते धर्मयुक्त असून, ते जगताच्या हितासाठी आहे, असे तू जाण आणि आत्महित व जगाचे हित या दोन्ही गोष्टींसाठी तू वेग व पराक्रम धारण करून दौड कर.

गौतम बोधिप्राप्तीसाठी तपश्चर्येला बसला असता मार म्हणजे मदन आपल्या सैन्यासह त्याच्या समोर आला. त्याने प्रथम बुद्धिवाद करून गौतमाला तपोभ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला आणि ते जेव्हा साधले नाही, तेव्हा गौतमावर आपले उग्र, भयानक सैन्य सोडले. पण गौतमाने हात न उचलता व भुवईही वक्र न करता केवळ आत्मबलाने माराचा आणि त्याच्या सैन्याचा पराभव केला. तेवढे करून तो माराला धीरगंभीर वाणीने म्हणाला–

मोघं श्रमं नार्हसि मार कर्तुं हिंस्रात्मतामुत्सृज गच्छ शर्म ।
नैष त्वया कम्पयितुं हि शक्यो महागिरिर्मेरुरिवानिलेन ।।
अप्युष्णभावं ज्वलनः प्रजह्यादापो द्रवत्वं पृथिवी स्थिरत्वम् ।
अनेककल्पाचितपुण्यकर्मा न त्वेव जह्याद् व्यवसायमेषः ।।
तल्लोकमार्तं करुणायमानो रोगेषु रागादिषु वर्तमानम् ।
महाभिषङ् नार्हति विघ्नमेष ज्ञानौषधार्थं परिखिद्यमानः ।।
सत्त्वेषु नष्टेषु महान्धकारे ज्ञानप्रदीपः क्रियमाण एषः ।
आर्यस्य निर्वापयितुं न साधु प्रज्वाल्यमानस्तमसीव दीपः ।।

भावार्थ– हे मारा, तू मला पराजित करण्याचे व्यर्थ श्रम करू नकोस. कारण, ज्याप्रमाणे वाऱ्याने महामेरू कंपित होत नाही, त्याप्रमाणे तू मला विचलित करू शकणार नाहीस. म्हणून तू हिंसाभाव सोड आणि शांत हो. एकवार अग्नी उष्णता सोडील, पाणी द्रवत्व सोडील, पृथ्वी स्थिरता सोडील, पण ज्याने अनेक कल्पांत पुण्यसंचय केला आहे, असा हा पुरुष आपला निर्धार सोडणार नाही, हे लक्षात ठेव. रागादी रोगांनी पछाडलेल्या आर्त जगाविषयी करुणा धरून एक महावैद्य ज्ञानरूप औषधासाठी कष्ट सोशीत आहे. त्याच्या या कामात तुझ्यासारख्याने विघ्न करणे योग्य नव्हे. महाअंधकारात चाचपडणाऱ्या जीवांना माझ्या रूपाने ज्ञानदीप प्रज्वलित होत आहे. अंधारात जळणारी ज्योत जशी कोणी विझवू नये, त्याप्रमाणे हा ज्ञानदीप विझविण्याचा उद्योग करणे हे तुझ्यासारख्या आर्यपुरुषाला योग्य नव्हे.

अखेर गौतमाला बोधी प्राप्त झाली. विश्वाच्या कल्याणाचा मार्ग त्याला स्पष्टपणे दिसला. तो क्षण गौतमाच्याच नव्हे, तर अवघ्या विश्वाच्या जीवनात अत्यंत मोलाचा होता. त्या क्षणी सगळीकडे आनंद पसरला. साऱ्या दिशा उजळल्या. आकाशात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवदुंदुभी वाजल्या. सुखावह वारे वाहू लागले. निरभ्र आकाशातून जलवृष्टी झाली. वृक्षांना अकाली फल-पुष्पे बहरली. त्या क्षणी सगळ्यांचा क्रोध शमला. सगळ्यांचे रोग दूर झाले. पापमार्गाचा आश्रय थांबला. कोणाच्याही मनात मद उरला नाही. जग अज्ञानरूप अंधारातून वर उठले. ते शांत झाले. त्याला पूर्णता प्राप्त झाली. पाहा – अश्वघोष. [अश्वघोष–कृत बुद्धचरित–अनुवादक–श्री. सूर्यनारायण तिवारी, १९५३; आजकल, वार्षिक अंक, १९५६; सं. सा. सो. इ.]

बुद्धजन्ममहोत्सव बुद्धजयंतीचा उत्सव. याचा विधी असा– वैशाख महिन्याच्या शुद्ध पक्षात, चंद्र पुष्य नक्षत्रात असताना बुद्धाच्या प्रतिमेची मंदिरात स्थापना करावी. त्या वेळी शाक्याने उच्चारलेले मंत्र म्हणावे. मंदिराला पांढरा रंग द्यावा. तीन दिवस देवाला नैवेद्य दाखवावा आणि गरिबांना दानधर्म करावा. [हि. ध.]

बुद्धदत्त (इ. स. च्या ५ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक बौद्ध पंडित. याचा जन्म चोळराज्यातील उरगपूर नावाच्या गावी झाला. उरगपूर म्हणजे आजचे उरियाऊर होय. पाली साहित्याच्या आणि बुद्धवचनांच्या अध्ययनार्थ हा बुद्धघोषापूर्वीच लंकेमध्ये गेला होता. तिथले अध्ययन संपवून परत येत असताना वाटेतच त्याची व बुद्धघोषाची गाठ पडली. त्या वेळी बुद्धदत्ताने घोषाला सांगितले, की 'तुमचा ग्रंथ पुरा झाल्यावर मजकडे पाठवा, मी त्याचा संक्षेप करीन.' नंतर त्याने ती वचनपूर्ती केली.

बुद्धदत्ताने जे अनेक ग्रंथ रचले, त्यांची नावे अशी – (१) अभिधम्मावतार (२) रूपारूप विभाग (३) विनयविनिश्चय व (४) उत्तरविनिश्चय. उत्तरविनिश्चय आणि विनयविनिश्चय या ग्रंथांत बुद्धघोषकृत समन्त-पासादिका या ग्रंथांचा संक्षेप केलेला असून, अभिधम्मावतार हा ग्रंथ बुद्धघोषाच्या अभिधम्म-संबंधी अट्ठकथांवर आधारित आहे.

बुद्धदत्ताने आपली सारी ग्रंथरचना कावेरी नदीच्या काठी कृष्णदासाच्या विहारात बसून केली. [पा. सा. इ.; गु. सा. इ.]

बुद्धद्वादशी एक काम्य बौद्ध व्रत. हे व्रत श्रावण शुद्ध द्वादशीच्या दिवशी करतात. या दिवशी बुद्धाची सुवर्णमूर्ती करून तिची पूजा करतात व ती ब्राह्मणाला दान देतात. शुद्धोदनाने हे व्रत केले व त्यामुळे विष्णू स्वतः बुद्धाचा अवतार घेऊन त्याच्या पोटी जन्माला आला, अशी त्याची कथा आहे. वराह पुराणात या अवताराचा उल्लेख आहे. [हि. ध.]

बुद्धनिर्वाणशक बौद्धांची एक कालगणना. गौतम बुद्धाच्या निर्वाणाच्या तिथीपासून या शकाचा आरंभ मानतात. बौद्ध ग्रंथांत आणि काही शिलालेखांत या शकाचा वापर केलेला आढळतो. या शकाच्या आरंभाविषयी विद्वानांत मतभेद असून, सनपूर्व १०९७ ते ३५० या कालखंडातील निरनिराळी अकरा वर्षे या शकाचा आरंभ काल म्हणून सुचविलेली आहेत. पण त्यांपैकी सनपूर्व ४८७ हाच काल स्थूल मानाने अधिक बरोबर असण्याचा संभव आहे, असे पं. ओझा यांचे मत आहे. [सु. वि. को.; भा. प्रा. रा.]

बुद्धपाद गौतमबुद्धाच्या पावलाचा ठसा. याला श्रीपाद व रत्नपाद अशीही नावे आहेत. उत्तर भारतात व भारताच्या आग्नेयीकडील देशांत हा ठसा पाहायला मिळतो. बौद्ध समाजात हा ठसा पूज्य मानला जातो. सयाममधील सुखोदय इथे जो बुद्धपाद आहे, तो सर्वांत कलात्मक असून, मोठ्या परिश्रमाने तयार केलेला आहे. त्याच्या मध्यभागी दोन चक्रे असून, त्या प्रत्येक चक्रात सहा मंडले व त्यांत एकशे आठ लक्षणे आहेत. भूत, वर्तमान व भविष्य काळातील विश्वाची ती प्रातिनिधिक चिन्हे आहेत, असे मानतात. [एन्सा. हिं. आ.]

बुद्धमूर्ती आणि प्रतीके भारतीय मूर्तिकलेत आणि त्याच प्रमाणे वृहत्तर भारतातल्या बौद्ध देशांत बुद्धमूर्तींची विपुलता आढळते. सर्वत्र त्या मूर्तींची फुले, धूप, दीप, स्तोत्रे प्रार्थना, इ. उपचारांनी अर्चना होत असते. बुद्धनिर्वाणानंतर काही शतके बौद्ध धर्मात बुद्धपूजा रूढ नव्हती. बुद्ध स्वतः अशा पूजेच्या विरुद्ध होता; पण जसजसा काल मागे पडत चालला, तसतशी बुद्धाच्या अनुयायांनी त्याची भक्ती सुरू केली. सुमारे सहा शतकांचा कालावधी लोटल्यानंतर खरीखुरी बुद्धपूजा सुरू झाली. त्या काळात भारतात बौद्ध धर्माचा सर्वत्र प्रसार झाला होता.

प्रारंभी बुद्धाचे अनुयायी त्याला शास्ता अर्थात गुरू मानीत. नंतर त्यांना तो महामानव वाटू लागला आणि पुढे ते त्याला तुषित अर्थात ईश्वरांश समजू लागले.

प्राचीन बौद्ध धर्म केवळ बुद्धाच्या तत्त्वज्ञानावर अधिष्ठित होता. खऱ्या अर्थाने त्याला धर्मही म्हणता येत नव्हते. त्याचे हे स्वरूप थेरवादी किंवा हीनयानी स्वरूपात पाहायला मिळते. बुद्धघोष हा हीनयानी आचार्य होता. त्याच्या विसुद्धिमग्ग या ग्रंथात या थेरवादी मताचे विवेचन आले आहे. त्याच्या दृष्टीने बौद्ध धर्म हा आत्मनिग्रहपूर्वक आचरायचा एक आध्यात्मिक मार्ग होता. त्यामुळे बुद्धाच्या मूर्तींची पूजा, प्रार्थना, आराधना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या गोष्टींना त्याने आपल्या ग्रंथात मुळीच स्थान दिलेले नाही.



बोधिवृक्षाची पूजा—बोधगया

तथापि बौद्ध धर्माच्या प्रारंभापासूनच बुद्धाला देव मानण्याकडे त्याच्या अनुयायांची प्रवृत्ती होती, असे दिसून येते. ते बुद्धाला भगव असे संबोधीत. भगव याचा अर्थ भगवान अथवा ईश्वर असा होतो. बुद्धघोपाला ही प्रवृत्ती मान्य नव्हती. खुद्द बुद्धानेही आपल्याला देव मानण्याबद्दल नापसंती दर्शविल्याचे त्याच्या प्रवचनांवरून दिसून येते. परंतु कुठल्याही धर्म-



वज्रासनपूजा

स्थापकाची तत्त्वे पुढे विशुद्ध स्वरूपात राहत नाहीत. बौद्ध धर्मचिही तसेच झाले. हळूहळू त्याच्या अनुयायांत भक्तीची प्रवृत्ती बळावत गेली. ते त्याला शरण जाऊ लागले; त्याची प्रार्थना व आराधना करू लागले; त्याच्या करुणेवर श्रद्धा ठेवू लागले. अशा रीतीने हळूहळू त्या धर्मात पूजेला अवसर मिळाला. मात्र ती पूजा बुद्धमूर्तीची नसून बुद्धप्रतीकांची होती. ही प्रतीके पुढीलप्रमाणे—

(१) शारीरिक अवशेष—उदा० अस्थी, केश, रक्षा, इत्यादी.

(२) उद्देशिक—पद्म, धर्मचक्र, स्तूप, त्रिरत्न, श्वेत गज व स्वस्तिक.

(३) पारिभौगिक—बुद्धाने उपभोगलेल्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या वस्तू. उदा० बुद्धपाद, वज्रासन, बोधिवृक्ष, छत्र, इत्यादी.

शारीरिक प्रतीकांचे रेखांकन भरहूत व सांची येथील शिल्पांत पाहायला मिळते. सांचीच्या मुख्य स्तूपाच्या दक्षिण तोरणावर बोधिसत्त्वाच्या केशपूजेचे दृश्य अंकित आहे.

उद्देशिकातली पहिली तीन प्रतीके बुद्धजीवनातील तीन महान घटनांची द्योतक आहेत. पद्म हे जन्मप्रतीक असून, त्याचे चित्रण सांचीच्या तोरणावर अनेक जागी दिसते. चक्र हे बुद्धाने सारनाथ येथे केलेल्या पहिल्या धर्मोपदेशाचे द्योतक आहे. या घटनेला धर्मचक्रप्रवर्तन अशी संज्ञा आहे. हेही अनेक बौद्ध कलाक्षेत्रांत चित्रित झाले आहे. स्तूप हे बुद्धाच्या महापरिनिर्वाणाचे प्रतीक आहे. त्रिरत्न हे त्रिशूलासारखे असते. त्याचे तीन शूल बुद्ध, धर्म व संघ यांचे प्रतिनिधी असतात. सांचीच्या



मायादेवीचे स्वप्न

शिल्पकलेत याचा बराच आढळ होतो. बुद्धाने शुभ्र हत्तीच्या स्वरूपात मायादेवीच्या गर्भामध्ये प्रवेश केला होता. तसे तिला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वप्न पडले होते. या श्वेत गजाचे चित्रणही सांचीच्या तोरणावर केलेले आहे.

पारिभौगिक प्रतीकांत बोधिवृक्षाला महत्त्वाचे स्थान आहे. हा गयेतला पिंपळवृक्ष असून त्याच्या खाली गौतमाला बोधी प्राप्त झाली होती. म्हणून पुढे तो एक बुद्धप्रतीक ठरला. सांची व भरहूत येथे त्याचे चित्रण आहे. सांचीच्याच पूर्वेच्या तोरणावर इंद्र व ब्रह्मा यांनी बुद्धदर्शन घेतल्याचे जे चित्रण आहे, त्यात बुद्ध नसून वज्रासन हे त्याचे प्रतीकच आहे. महाभिनिष्क्रमणाच्या वेळी छंदकाने गौतमावर जे छत्र धरले, तेही पुढे त्याचे प्रतीक ठरले.

बुद्धपाद हे प्रतीक सामान्यतः वज्रासनावर दाखवतात. अशा

बुद्धपादोपासना – अमरावती

प्रकारचे एक सुंदर चित्रण मद्रास येथील संग्रहालयात आहे. त्यात चार स्त्रिया वज्रासनस्थित बुद्धपादांची उपासना करताना दिसत आहेत.

प्रतीकांच्या या उपासनेतून पुढे बौद्ध धर्मात मूर्तिपूजेचा शिरकाव कसा झाला, त्याचे समाधानकारक उत्तर अजून मिळालेले नाही. बुद्धाची पहिली मूर्ती कधी व कुठे निर्माण झाली, याविषयीही विवाद आहे. फूशे नावाच्या कलामर्मज्ञाच्या मते पहिली बुद्धप्रतिमा गांधार देशातल्या कलाकारांनी बनविली. हेच मत सामान्यपणे प्रचलित आहे; पण डॉ. आनंदकुमार स्वामी यांना हे मत मान्य नाही. त्यांच्या मते गांधार व मथुरा येथील कलाकारांनी जवळ जवळ एकाच कालात म्हणजे कनिष्काच्या कालात बुद्धाच्या मूर्ती बनवल्या. कनिष्काच्या एका शिक्क्यावर पहिल्या प्रथम बुद्धप्रतिमा अंकित झालेली दिसते. फाहियान तर म्हणतो, की 'मी एक बुद्धप्रतिमा श्रावस्तीच्या जेतवनारामात पाहिली.' डॉ. गांगुली यांच्या मते बुद्धाच्या जीवनकालातच त्याच्या प्रतिमा निर्माण होऊ लागल्या होत्या. त्यांनी या बाबतीत काही पुरावे दिले आहेत, ते असे–बुद्धाच्या आज्ञेवरूनच बिंबिसार राजाने आपल्या एका चित्रकाराकडून बुद्धाचे चित्र काढून घेतले होते. त्याचप्रमाणे बुद्धाने आपल्या धर्माच्या प्रचारासाठी स्वतःचे एक चित्र बनवून सिंधुराज रुद्रायणाकडे पाठविले होते. बुद्धाच्याच समकाली कोसलनरेशाच्या छळाने त्रस्त होऊन शाक्य लोक चिनी तुर्कस्तानात जाऊन वसले होते. ते बुद्धाची सुवर्णप्रतिमा बनवून तिची पूजा करीत असत. त्यांच्या अनुकरणाने त्या भागातले जंगली लोकही बुद्धप्रतिमेची पूजा करू लागले. तिथून पुढे बुद्धप्रतिमा चीनी सम्राटाच्या राजवाड्यापर्यंत जाऊन पोचली. सम्राटाने तिच्यापुढे धूप जाळून तिची पूजा केली.

अर्थात या बुद्धमूर्ती आकाराने लहान असल्या पाहिजेत. हीनयान व महायान या दोन मोठ्या बौद्ध संप्रदायांपैकी महायानी बौद्ध हे बुद्धमूर्तीच्या पूजेचा आग्रह धरणारे होते. त्यांनी आपल्या उपासनेत बुद्धमूर्तीची पूजा-अर्चा मांडली. त्यांच्याच

बुद्धमूर्ती – गांधार

प्रेरणेने भारतात बुद्धाच्या महाकाय मूर्ती निर्माण होऊ लागल्या. त्यांना आपला धर्म वाढवायचा होता. इ. स. च्या १ ल्या व २

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या शतकांतच पौराणिक देवतांच्या व जैन तीर्थंकरांच्या मूर्ती बनू लागल्या होत्या. त्या मूर्तींची स्थापना आणि पूजाही होऊ लागली होती. आपण जर तसे काही केले नाही, तर हिंदू आणि जैन यांच्यापुढे निष्प्रभ ठरू, असे वाटून महायानी बौद्धांनी बुद्धमूर्तींचा आग्रहाने पुरस्कार केला. त्यानंतर बुद्धाची मूर्ती कशी निर्माण करावी, तिचे ध्यान कसे असावे इत्यादीं-विषयी नियमही बनले. साधनमाला या ग्रंथात बुद्ध-मूर्तींच्या निर्मितीसंबंधाने जे नियम ठरवून दिले आहेत, ते असे–

डाव्या हाताने भूस्पर्शमुद्रा. उजवा हात मांडीवर. काषाय-वस्त्रांचे अवगुंठन. नील, गौर, रक्त आणि श्याम अशा चार वर्णांच्या चार मारांवर आणि विश्वपद्म वज्रावर बसलेला. शांत. देहावर शुभ लक्षणे आणि चिन्हे. त्याच्या दक्षिण भागी मैत्रेय बोधिसत्त्व. तो गौर, द्विभुज व जटामुकुटधारी. डाव्या हाती चवरी आणि रत्न. उजव्या हातात नागकेसरपुष्प. डाव्या भागाला लोकेश्वर. त्याच्या उजव्या हातात चवरी. डाव्या हाती कमल. मैत्रेय आणि लोकेश्वर हे दोघेही बुद्धाच्या मुखाकडे पाहत आहेत. अशा प्रकारे बुद्धमूर्तीची निर्मिती करावी.

गौतम बुद्धाचे ध्यानवर्णन पुराणग्रंथांतूनही पाहायला मिळते. अग्नी पुराणातील बुद्धमूर्तीचे वर्णन असे –

बुद्धमूर्ती गौरवर्ण व पद्मासनी असावी. एक हात वरद मुद्रेत व दुसरा अभय मुद्रेत असावा. कान लांब असावेत. मुखावर शांत वृत्ती असावी.

कनिष्काच्या कारकीर्दीच्या आरंभापासूनच बुद्ध आणि बोधि-सत्त्व यांच्या विशालकाय मूर्तींची निर्मिती होऊ लागली होती. त्या मूर्तींचे दोन प्रकार आढळतात. बोधी प्राप्त होण्यापूर्वी गौतम बोधिसत्त्व होता आणि ती प्राप्त झाल्यावर तो बुद्ध बनला. या दोन्ही अवस्थांतल्या त्याच्या मूर्ती सापडतात. बोधि-सत्त्व अवस्थेत तो मस्तकी मुकुट व गळयात विविध आभूषणे यांनी अलंकृत असा राजवेषात दाखवतात. बुद्धावस्थेत त्याच्या केसांचा जटाभार (उष्णीष) दाखवलेला असतो व त्याच्या अंगावर उपरण्यासारखे एक वस्त्र (चीवर) असते. मथुरेच्या बल नामक भिक्षूने बनवून घेतलेल्या विशाल बुद्धमूर्ती सारनाथ आणि श्रावस्ती येथे मिळाल्या आहेत. त्या बहुतेक ध्यानस्थ योगी अशा स्वरूपांत आहेत. त्यांच्या ओठांवर मिशा नाहीत. गांधार परंपरेतील मूर्तींना मात्र मिशा दाखविलेल्या असतात. कुषाणकालीन मूर्तींचे मस्तक बहुधा मुंडित असते; तर गुप्त-कालीन मूर्तींच्या मस्तकावर कुरळे केस दाखविले जातात. इ. स. ३०० ते ६०० या गुप्तसाम्राज्याच्या कालखंडात मथुरा येथील कला परमोत्कर्षाला पोचली होती. त्या कालातील बुद्ध-मूर्ती प्रमाणबद्ध आणि सौष्ठवयुक्त तर आहेतच; शिवाय त्या आध्यात्मिक भावांनीही संपन्न आहेत. बुद्धाच्या मुखमंडलावर शांती, करुणा, आनंद या भावांची अभिव्यक्ती तत्कालीन कला-कारांनी सहजपणे केलेली आहे. याच काळात निर्माण झालेली पद्मासनस्थ आणि धर्मचक्रप्रवर्तनमुद्रा धारण करणारी एक बुद्धमूर्ती सारनाथ येथे मिळाली आहे. तिचे नेत्र अर्धोन्मीलित असून, पृष्ठभागी कलापूर्ण प्रभामंडल आहे. भारतीय मूर्तिकले-तली ती एक अनुपम कलाकृती आहे. अशोकाच्या कालापासून इ. स. च्या १२ व्या शतकापर्यंत बौद्ध मूर्तिकलेचा विकास होत होता. मथुरेतले कलाकार मूर्तिनिर्माणासाठी रूपवास, बयाना, इ. ठिकाणी मिळणारा लाल दगड उपयोगात आणीत. सारनाथ इथे चुनारच्या लाल दगडातून मूर्ती बनवल्या जात.

मूर्तीच्या हातांच्या द्वारे जे अनेक भाव व्यक्त केले जातात, त्या भावविशेषांना मुद्रा असे म्हणतात. ध्यानमुद्रा, अभयमुद्रा, भूमिस्पर्शमुद्रा व धर्मचक्रपरिवर्तनमुद्रा या चार मुद्रा मथुरेच्या कलापरंपरेत आढळतात. याशिवाय आणखी एक वरद नावाची मुद्रा आहे, ती अन्यत्र आढळते. गांधार देशातील बुद्धमूर्ती ग्रीक परंपरेला अनुसरून आहेत. त्या मूर्तींत महापुरुषलक्षणे दाखव-लेली असतात. भारतातून ज्या ज्या देशांत बौद्ध धर्म गेला, त्या त्या सर्व देशांत पहिल्या प्रथम गांधार कलेने प्रवेश मिळविला. स्थानिक कलाकारांनी तो आदर्श डोळ्यासमोर ठेवला खरा; पण त्यावर प्रादेशिक आणि वांशिक संस्कार करून आपल्याला हव्या तशा मूर्ती बनवण्यास सुरुवात केली. त्याची परिणती काही बाबतींत विलक्षण घडली. उदा० चीनमध्ये हसरा बुद्ध निर्माण झाला; तर तिबेटमध्ये शिंगे असलेला राक्षसरूपी बुद्ध साकारला. पाहा – गौतम बुद्ध; बौद्ध कला. [इ. बु. इ.; मू. वि.; सं. मि.; क. प्रा. बु.; उ. प्र. बौ. वि.]

बुद्धयशस (इ. स. चे ४–५ शतक) एक बौद्ध प्रचारक हा मूळचा काश्मीरचा रहिवासी असावा. याचा जन्म एका ब्राह्मण कुटुंबात झाला. नंतर याने बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. याच्या या धर्मांतरासंबंधी एक कथा सांगतात, ती अशी –

एके दिवशी याच्या घरी एक बौद्ध भिक्षू आला असताना त्याच्या वडिलांनी त्याचा अपमान केला. तत्क्षणी त्याच्या हाताला पक्षघात झाला. या गोष्टीमुळे त्याला पश्चात्ताप झाला. त्याने लगेच त्या बौद्ध भिक्षूला परत बोलवले व त्याची क्षमा मागि-तली आणि कृतकर्माचे प्रायश्चित्त म्हणून आपला यशस नावाचा तेरा वर्षांचा मुलगा त्याच्या स्वाधीन केला. गुरूने त्याचे नाव बुद्धयशस असे ठेवले. या मुलाने आपल्या गुरूची चौदा वर्षे सेवा केली व बौद्ध धर्माचा प्रगाढ अभ्यास केला. त्यानंतर बुद्धयशस बौद्ध धर्माच्या प्रसारार्थ बाहेर पडला. सर्व प्रथम तो काशगर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मध्ये गेला. तिथे दहा वर्षे त्याचा मुक्काम होता. या काळात काशगरचा राजा त्याच्या बुद्धिप्रभावाने प्रभावित झाला. पुढे त्याने त्याला राहण्यासाठी आपल्या राजमहालात जागा दिली. त्या ठिकाणी त्याचा कुमारजीव या बौद्ध पंडिताशी सहवास घडला. इथल्या मुक्कामानंतर बुद्धयशस कुचीकडे गेला. तिथे काही दिवस राहून नंतर तो चीनमध्ये गेला. चीनच्या राजाने त्याचे चांगले स्वागत केले व त्याला अनेक वस्तू भेट दिल्या. पण याने त्यांतील काहीही स्वीकारले नाही. [बौ. सा. सां. इ.]

बुद्धवंस एक बौद्ध ग्रंथ. हा ग्रंथ पद्यात्मक असून, गौतम बुद्ध आणि त्याच्यापूर्वी बारा कल्पांमध्ये होऊन गेलेले चौवीस बुद्ध यांच्या चरित्रांचे चित्रण यात केलेले आहे. त्यांत गौतम बुद्धाचे जीवन वगळल्यास बाकी सर्व चरित्रे पौराणिक ढंगाने लिहिलेली आहेत. हा ग्रंथ भगवान बुद्धाने स्वमुखाने कथन केला व तो थेरांच्या परंपरेने तृतीय संगीतीपर्यंत व त्यापुढे गुरु-शिष्यपरंपरेने आजवर चालत आलेला आहे, अशी बौद्ध-लोकांची धारणा आहे. [पा. सा. इ.; बुद्ध-दर्शन]

बुद्धशक्ती बौद्ध धर्मात सहा बुद्धशक्ती मानलेल्या आहेत. प्रत्येक ध्यानी बुद्धाची एक अशा त्या सहा आहेत. त्यांची नावे अशी – वज्र धात्वीश्वरी, लोचना, मामकी, पांडरा, आर्यतारा आणि वज्रसत्त्वात्यिका. शक्ती व ध्यानी बुद्ध यांच्या संयोगातून दिव्य बोधिसत्त्व जन्म घेतात, असे सांगितले आहे. या मूर्ती कमळावर ललितासनात बसलेल्या असतात. प्रत्येक शक्तीच्या मूर्तीत तिच्या मुकुटावर तिच्या ध्यानी बुद्धाची मूर्ती कोरलेली असते. या शक्तींची यंत्रे शिलेवर खोदून ती बौद्ध स्थानांतून कोनाड्यांत बसवितात. [इं. बु. इ.]

बुद्धिबळ एक बैठा खेळ. याचे प्रारंभीचे नाव चतुरंग असे होते. चतुरंग म्हणजे रथ, हत्ती, घोडे व पायदळ ही सैन्याची चार अंगे होत. त्याच्या पटाला अष्टापद म्हणत. हा खेळ फाशांनी खेळत.

रावणाने बुद्धिबळाचा खेळ शोधून काढला अशी आख्यायिका सांगतात; पण रावण बुद्धिबळे खेळत असल्याचा उल्लेख रामायणात कुठेही नाही. रावणाला सैन्यव्यूहरचना समजण्यासाठी मंदोदरीने या खेळाचा शोध लावला, अशीही एक आख्यायिका आहे, परंतु तिला आधार नाही. रामायणात अयोध्येच्या रचनेचे वर्णन अष्टापदकरा (१·५·१६) असे आहे. रामायणाच्या तिलक या टीकाकाराने अष्टापदाचा अर्थ द्यूतफलक किंवा बुद्धिबळाचा पट असा केला आहे. अष्टापद म्हणजे आठ पंक्ती असलेला व प्रत्येक पंक्तीत आठ घरे असलेला एक पट होय, अशी त्याची व्याख्या बुद्धघोषाने दिली आहे. टायलर या पाश्चात्य संशोधकाने या खेळाच्या शोधाचे श्रेय हिंदूंना दिले आहे. अथर्ववेद आणि बौद्ध व जैन यांचे ग्रंथ यांत या खेळाचे संकेत मिळतात. पतंजलीच्या महाभाष्यातही अष्टापद खेळाचा उल्लेख आहे. सुबंधूचे वासवदत्ता, बाणभट्टाचे हर्षचरित अशा अन्य काही ग्रंथांतही अष्टापदाचे उल्लेख आले आहेत. या संबंधात आणखी एक कथा आहे, ती अशी –

या खेळाचा शोध एका ब्राह्मणाने लावला व त्याने तो आपल्या राजाच्या दरबारात करून दाखविला. तो पाहून राजा व दरबारी लोक खूष झाले. राजाने त्या ब्राह्मणाला वाटेल ते माग म्हटले. त्यावर ब्राह्मण म्हणाला, की एका चौकोनाबद्दल एक माप धान्य, दुसऱ्याबद्दल दोन, तिसऱ्याबद्दल चार, चौथ्याबद्दल त्याच्या दुप्पट असे करीत बुद्धिबळाचे चौसष्ट चौकोन भरेपर्यंत हिशेब करून, तेवढे धान्य मला मिळावे. पण हिशेब करता राजाला कळून चुकले, की अशा प्रकारे धान्य दिल्यास राज्यातील सबंध पीकही पुरे पडणार नाही.

ब्राह्मणाने जे पारितोषिक मागितले होते, त्यावरून त्याची गणिती बुद्धी ध्यानात येते. बुद्धिबळाचा खेळ कुठल्याही डावाची पुनरावृत्ती न करता अगणित मार्गांनी खेळता येतो.

साहित्यातील विविध उल्लेखांवरून इ. स. च्या ६ व्या शतकात भारतात हा खेळ अस्तित्वात होता, असे दिसते.

हिंदुस्थानातून तो पूर्वेला चीनमध्ये व पश्चिमेला इराण-अरबस्तानमार्गे इ. स. च्या ११ व्या शतकाच्या अखेरीस युरोपात पोचला. युरोपात या खेळाची वाढ होऊन त्याला नियमबद्धता आली. या खेळासंबंधी पाश्चात्य देशांत विपुल वाङ्मय आहे.

इराणात चतुरंग या शब्दाचा अपभ्रंश चतरंग झाला व अरबस्तानात तो शतरंज झाला.

याची भारतीय मांडणी अशी – डावीकडून चौथ्या घरात राजा व पाचव्या घरात वजीर. त्यांच्या उभय अंगी दोन उंट. उंटांच्या पलिकडे उभय अंगी दोन घोडे. त्यांच्या पलिकडे म्हणजे शेवटच्या दोन घरांत हत्ती व पुढच्या आडव्या पट्टीत आठ प्यादी. वजीर, उंट, घोडे व हत्ती यांना मोहोरी असे म्हणतात. अशी मांडणी झाल्यावर दोन खेळाडू समोरासमोर बसून हा खेळ खेळतात. हा खेळ म्हणजे दोन राजांमधील लढाई असते. दोन्ही राजांबरोबर त्यांचे चतुरंग सैन्य असते. बुद्धिबळाच्या पटावर ६४ घरे असतात व मोहरी आणि प्यादी मिळून त्यांची संख्या उभयपक्षी ३२ असते. राजा, मोहरी व प्यादी यांची चाल निरनिराळी असते. शह नसेल तेव्हा राजा कुठल्याही बाजूस एकच घर जातो. हत्ती पुढे, मागे व आडवा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कितीही घरे चालतो. उंट पुढे मागे तिरकस रेषेत कितीही घरे जातो. वजीर (प्रधान) मात्र सरळ किंवा तिरका कितीही घरे जातो. प्यादी एक घर पुढे सरकतात व दुसऱ्याची सोंगटी मारताना तिरके एक घर जातात. विशिष्ट अवस्थेत मेलेली मोहरी परत जिवंत होतात; पण प्यादी जिवंत होत नाहीत. सगळी मोहरी आपल्या चालीत मागे, पुढे येऊ शकतात; पण प्यादे मात्र पुढे गेलेले मागे येऊ शकत नाही. विरुद्ध पक्षाच्या मोहरी-प्याद्यांना मारीत व पुढे सरकत राजाला अडचणीत आणून शहात कोंडणे, हाच खेळाचा उद्देश असतो. राजाचा शह उठविण्यासाठी काटशह, नाशह, शहशह, यांसारखे कित्येक पेच असतात. खेळाचा शेवट मात, बुर्जी, प्यादी, घोडमल्ली, इ. प्रकारांनी होतो. या खेळात योगायोगाला स्थान नाहीं. तो केवळ बौद्धिक कौशल्याने खेळला जाणारा खेळ असतो.

प्यादी म्हणजे राजाला कोंडून शेवटी त्याला न निघणारा प्याद्याचा शह देणे होय. तसाच शह उंटाने किंवा घोड्याने दिल्यास त्याला उंटमल्ली किंवा घोडमल्ली म्हणतात. बुर्जी (प्रतिपक्षाची सर्व मोहरी मारणे) व मात (राजाला शहात कोंडणे) असे आणखी डाव असतात; पण ते वरील डावांपेक्षा दुय्यम दर्जाचे समजतात. भारतीय पद्धतीपेक्षा पाश्चात्य पद्धती वेगळी आहे. तिच्यात मात हेच प्रमुख उद्दिष्ट असते. त्यापद्धतीत मोहऱ्यांची नावेही वेगळी असतात.

जगातील सर्व देशांत खेळला जाणारा हा एकच खेळ आहे. प्रतिवर्षी बुद्धिबळाचे मोठमोठे आंतरराष्ट्रीय सामने होतात. हा एकच खेळ असा आहे, की जो टपालाने वा विद्युत्संदेशानेही खेळता येतो.

ब्राह्मणाबाद (सिंध) नगराच्या उत्खननात जुने बुद्धिबळाचे पट व सोंगट्या सापडल्या आहेत. भारतीय राजे व ईस्ट इंडिया कंपनी यांमधील लढाया दर्शविणारेही कितीतरी पट उपलब्ध आहेत.

बुद्धिबळ या खेळाने कितीतरी वाक्प्रचार निर्माण केले आहेत. प्याद्याचा फर्जी (वजीर) होणे, एखाद्याने एखाद्यावर मात करणे, शहाला काटशह, प्यादे पुढे सरकणे, इ. वाक्प्रकार प्रसिद्ध आहेत. [म. ज्ञा. को.; आकाशवाणी, ११ मे १९५८; श्री. प्रमोदचंद्र, टाइम्स ऑफ इंडिया ॲन्यु. १९५९]

बुद्धी

हिचे लक्षण असे – 'निश्चयात्मिकान्तःकरणवृत्तिः' = निश्चयात्मक अशी अंतःकरणाची वृत्ती म्हणजे बुद्धी होय (वेदान्तसार). सात्त्विक, राजस व तामस असे तिचे तीन भेद आहेत, असे गीतेत सांगितले आहे. त्यांपैकी सात्त्विक बुद्धीचे लक्षण असे (गीता. १८.३०) –

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये।
बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ॥

अर्थ – (श्रीकृष्ण म्हणतो) हे अर्जुना, प्रवृत्ती आणि निवृत्ती, कार्य आणि अकार्य, भय आणि अभय, बंध आणि मोक्ष हे ज्या बुद्धीला कळतात, ती सात्त्विक बुद्धी होय.

त्याचप्रमाणे जी बुद्धी धर्म आणि अधर्म, कार्य आणि अकार्य यांचे स्वरूप योग्य रीतीने जाणीत नाही, ती राजस बुद्धी होय. आणि जी तमाने व्याप्त होऊन अधर्मालाच धर्म समजते व सर्व गोष्टींचा अर्थ विपरीतच मानते, ती तामस बुद्धी होय.

शुश्रूषा (श्रवणाची इच्छा), श्रवण, ग्रहण, धारण, ऊहापोह, अर्थविज्ञान व तत्त्वज्ञान असे बुद्धीचे सात गुण हेमचंद्राने सांगितले आहेत; तर प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा व स्मृती या बुद्धीच्या पाच वृत्ती होत, असे पातंजल योगात म्हटले आहे. न्यायदर्शनात बुद्धीचे अनुभूती आणि स्मृती असे दोन भेद केले आहेत.

शोक, क्रोध, लोभ, काम, मोह, ईर्ष्या, मान, विचिकित्सा, कृपा, असूया, जुगुप्सा व परासुता हे बारा मनाचे मल असून, ते बुद्धीचा नाश करणारे आहेत.

तार्किक अनुमाने काढण्याच्या शक्तीला किंवा क्रियेला तत्त्वज्ञानात बुद्धी असे म्हणतात. मनुष्य बुद्धिमान आहे, असे आपण म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ, मनुष्य गृहीत गोष्टींपासून अनुमान काढू शकतो, असा आहे. काही उच्च दर्जाचे प्राणीही सूक्ष्म निरीक्षण करून अनुमान काढतात, हे खरे आहे. पण मानवाचे अनुमान व पशूचे अनुमान यांच्यांत महत्त्वाचा फरक असा आहे, की मानवी अनुमानात आत्मज्ञान असते, तर पशूच्या अनुमानात ते नसते. स्वतःबद्दल विचार करण्याचे सामर्थ्य फक्त माणसातच आढळते. इतर कोणत्याही प्राण्यात ते दिसत नाही. प्राणी परिस्थितीवर पूर्णपणे अवलंबून असतात. पण माणूस आपल्या बुद्धीने परिस्थितीचा अर्थ समजून घेऊन तिच्यावर मात करू शकतो. [श. क.; म. ज्ञा. को.]

बुद्धेही ओसा

ओडिसा प्रदेशातील एक पूजाव्रत. बुद्धिवामण हा या व्रताचा मुख्य देव आहे. भाद्रपद महिन्यातील प्रत्येक बुधवारी त्याचा वसा करतात. बुद्धिवामणाचे प्रतीक म्हणून एका वरवंट्याला शेंदूर फासतात व हळद, कुंकू आणि फुले वाहून त्याला सजवितात. मग त्याची पूजा करतात. अंधांना दृष्टी मिळते, निपुत्रिकांना पुत्रप्राप्ती होते आणि महारोग दूर होतो, असे याचे फल सांगितले आहे. [स्ट. ओ. फो.]

बुद्ध्यवाप्ती

एक काम्य व्रत. या व्रताचा प्रारंभ चैत्र वद्य प्रतिपदेस करतात. व्रतावधी एक महिना. नर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिंहाची पूजा हा या व्रतातील प्रमुख भाग आहे. या महिन्यातील प्रत्येक दिवशी मोहऱ्यांचा होम करावा, असेही सांगितले आहे. वैशाखी पौर्णिमेला व्रताचे उद्यापन करतात. त्यात यथाशक्ति ब्राह्मणभोजन व सुवर्णदान करतात. [हि. ध.]

बुध (१) सूर्याच्या ग्रहमालेतला चौथा ग्रह. बृहस्पतिपत्नी तारा हिला हा चंद्रापासून झाला, अशी एक कथा आहे (पद्म पु. सृ. ८२). बुधाला चंद्र व रोहिणी यांचा पुत्र मानले आहे, म्हणून त्याला रौहिणेय असे नाव मिळाले, ही दुसरी कथा. तिसरी एक कथा आहे, ती अशी– कश्यपाला धनू नावाची स्त्री होती. तिला रज नावाचा पुत्र झाला. या रजाला वरुणाने आपली कन्या वारुणी ही दिली. नंतर एकदा वारुणी पाण्यात बुडाली. तिच्या शोधासाठी चंद्र पाण्यात उतरला. एवढ्यात पाणी खूप खवळले व त्यातून एक बालक वर आला. तोच हा बुध होय. पुढे गुरुपत्नीने त्याचा सांभाळ केला आणि मग त्याला दाक्षायणीच्या हवाली केले (विष्णुधर्म. १. १०६). बुधाला इलेच्या ठिकाणी पुरूरवा नामक पुत्र झाला. तोच सोमवंशाचा मूळ पुरुष होय.

बुध ग्रहाची मूर्ती

बुध हा वेदोत्तर काली महत्त्व पावलेला ग्रह आहे. हा ग्रह सूर्याच्या अत्यंत जवळ असल्यामुळे व्यभिचार व पाणी यांच्याशी त्याच्या जन्माचा संबंध जोडला गेला असावा. सूर्यप्रकाश त्याला मारक असल्यामुळे त्याचे पितृत्व चंद्राकडे गेले.

याचा वर्ण दुर्वांकुरासारखा असून, हा नपुंसक व शूद्र आहे. उत्तर दिशा, अथर्ववेद, मिथुन राशी, पाचू व मगध देश यांचा हा अधिपती आहे, असे ज्योतिस्तत्त्वात सांगितले आहे.

सामान्यतः बुध हा शुभ ग्रह आहे, मात्र तो पापगृहाशी युक्त झाल्यास अशुभ होतो. फलज्योतिषात याचा संबंध बुद्धीशी मानलेला आहे. बुद्धिमत्ता हा त्याचा प्रधान धर्म आहे. ज्याच्या कुंडलीत बुध बलवान असेल, तो मनुष्य नामांकित वक्ता किंवा लेखक होतो, असे सांगतात.

बुध अनिष्ट असता, काळा बैल, कासे, मूग, तूप, पाचू, दासी, हस्तिदंत व सर्व पुष्पे दान द्यावी, असे सांगितले आहे. बुधाची मूर्ती विष्णूप्रमाणे करावी व मंगळाच्या रथाप्रमाणे त्याचा रथ करून त्यात तिची स्थापना करावी, असे हेमाद्रीने सांगितले आहे. जैनांच्या मते बुध हा चतुर्भुज असून, हंसावर किंवा सिंहावर आरूढ होतो.

बुधवारी जन्मलेला मनुष्य गुणी, गुणज्ञ, विलासी, बुद्धिमान, नम्र, सुंदर व कुशल असतो, असे कोष्ठीप्रदीपात सांगितले आहे.

बुध हा सूर्याला सर्वांत जवळचा ग्रह आहे. त्याचे सूर्यापासून अंतर साडेतीन कोटी मैल आहे. एक सूर्यप्रदक्षिणा करायला त्याला ८८ दिवस लागतात. या प्रदक्षिणेत तो सूर्याच्या अगदी जवळ येतो, तेव्हा त्याच्यापासून दोन कोटी एक्यायंशी लक्ष मैलांवर असतो व दूर जातो, तेव्हा चार कोटी सत्तावीस लक्ष मैलांवर असतो. पृथ्वीपेक्षा हा सूर्याच्या अधिक जवळ असल्यामुळे त्याला पृथ्वीच्या सातपट सूर्यप्रकाश मिळतो. सूर्याच्या जवळ असल्यामुळे वर्षातून फार थोडे दिवस नुसत्या डोळ्यांनी त्याचे दर्शन होते आणि तेही सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर तास दोन तासच होते.

आकारमानानेही हा ग्रह सर्वांत लहान आहे. त्याचा व्यास तीन हजार मैल आहे. सूर्याभोवती फिरताना जेव्हा तो पृथ्वीच्या जवळ येतो, तेव्हा त्याचे पृथ्वीपासून अंतर पावणेपाच कोटी मैल असते व दूर जातो, तेव्हा साडेतेरा कोटी मैल असते. [श. क.; पु. इं.; प्रा. च. को.; लो. सा. रू.; अं. अ. ग्र.]

(२) एक सूत्रकार. अपरार्क व जीमूतवाहन यांनी याचा उल्लेख केला आहे. याचे धर्मसूत्र गद्यमय असून लहान आहे. त्यात मुख्यत्वे गर्भाधानापासून उपनयनापर्यंतचे संस्कार, पंच महायज्ञ, श्राद्ध, पाकयज्ञ, हविर्यज्ञ, सोमयाग, तसेच ब्राह्मण, संन्यासी व राजा यांची कर्तव्ये, इ. विषयांचे विवेचन केले आहे. बुधाचे धर्मशास्त्र इतर धर्मग्रंथांतून माहिती घेऊन तयार केले असावे, असे वाटते. तसेच हा ग्रंथ फारसा प्राचीन नसावा, असेही दिसते. [हि. ध.; प्रा. च. को.]

बुध आत्रेय एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील पहिले सूक्त याच्या नावावर असून, अग्निस्तुती हा त्या सूक्ताचा विषय आहे. बुधाने अग्नीला तारुण्यमूर्ती, वीरपुंगव अशी अनेक विशेषणे लावली आहेत. त्याची नमुन्याची एक ऋचा (ऋ. ५.१.६) अशी –

अग्निर्होता न्यसीदद् यजीयानुपस्थे मातुः सुरभा उ लोके ।
युवा कविः पुरुनिःष्ठ ऋतावा धर्ता कृष्टीनामुत मध्य इद्धः ॥

अर्थ – परमपूज्य यज्ञसंपादक अग्नी (भू) मातेच्या सुवासित अंकावर आरूढ झाला आहे. तो तरुण व प्रतिभाप्रेरक असून,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्याचा निवास सर्वस्थली असतो, असा सद्धर्मप्रिय चराचरांचा आधार अग्नी त्या चराचरांच्याच जीवनामध्ये प्रज्वलित होतो.

बुधजन (इ. स. चे १९ वे शतक) एक जैन भक्तकवी व धर्मोपदेशक. भदीचंद्र अथवा विरधीचंद्र हे याचे मूळ नाव होय. हा राजस्थानातला रहिवासी होता. पं. मांगीलाल या गुरूजवळ याने विद्याध्ययन केले. अमीरचंद्राचा मुनीम म्हणून हा काम करीत होता.

याने तत्त्वार्थबोध, बुधजनसतसई, पंचास्तिकाय व बुधजन-विलास या चार काव्यग्रंथांची रचना केली. बुधजनसतसई हे नीतिकाव्य म्हणून विशेष प्रसिद्ध आहे. ग्रंथकाराने या काव्याला वरनविलास (वर्णविलास) असे नाव दिले आहे. या ग्रंथात एकूण ७०२ दोहे असून, ते देवानुरागशतक, सुभाषितनीती, उपदेशाधिकार व विरागभावना या चार भागांत विभागलेले आहेत. हा ग्रंथ व्रजभाषेत लिहिला असला, तरी त्यावर राजस्थानी भाषेचा प्रभाव आहे. [हिं. नी. विं.]

बुध-बृहस्पती व्रत एक लौकिक व्रत. महाराष्ट्रातल्या स्त्रिया श्रावण मासातल्या बुधवारी बुधाची व गुरुवारी बृहस्पतीची (गुरूची) पूजा करतात. पूजेसाठी बुध-गुरूंचे चित्र घेतात किंवा त्यांच्या बालमूर्ती रेखाटतात. त्यांना दही भाताचा नैवेद्य दाखवितात. हाच या व्रताचा प्रमुख विधी आहे. सात वर्षे असे व्रत केल्यानंतर काही स्त्रिया त्याचे उद्यापनही करतात. त्यात अग्निमुख करून आज्य, चरू व आघाडा आणि पिंपळ यांच्या समिधा यांचे हवन करतात. या व्रताची कथा अशी,–

एक राजा होता. त्याला सात सुना होत्या. त्यांच्या घरी कोणीतरी मामा-भाचे रोज भिक्षेला येत. त्या सुना त्यांना भिक्षा न घालता आमचे हात रिकामे नाहीत असे सांगत. पुढे त्यांना दारिद्र्य आले. त्यांतील सर्वांत धाकटी सून शहाणी होती. तिने त्या मामा-भाच्यांचे पाय धरले आणि म्हटले, की 'पूर्वी होते तरी दिले नाही. आता नाही म्हणून देता येत नाही. त्या वेळी आम्ही धर्म केला नाही, ही आमची चूक झाली. आता आम्हांला पुन्हा चांगले दिवस कसे येतील, त्याचा उपाय सांगा.' त्यावर मामा-भाच्यांनी तिला बुध-बृहस्पतीचे व्रत सांगितले. तिने ते व्रत केले, तिचा नवरा परदेशी गेला होता. त्याच वेळी त्या देशाचा निपुत्रिक राजा मरण पावला होता. आता राजा कोणाला करावे, असा प्रधानापुढे प्रश्न पडला. प्रधानाने हत्तिणीच्या सोंडेत माळ देऊन तिला सोडले. तिने या सुनेच्या नवऱ्याच्या गळ्यात ती माळ घातली. त्यामुळे त्याला राज्य मिळाले. इकडे त्याची पत्नी, सगळे माऊ, भावजया ही सर्व माणसे अन्नासाठी दाही दिशांना भटकत होती. या नव्या राजाने

बुध–बृहस्पती

एक तलाव खोदण्याचे काम चालू केले. तिथे त्याची सर्व माणसे मजूर म्हणून काम करू लागली. राजा एकदा तिथे हिंडत असताना त्याला ही माणसे भेटली. राजाने त्यांना ओळखले आणि सर्वांना राजवाड्यात आणून सुखी केले.

व्रताचे फल – धन, वैभव, बुद्धिमत्ता यांची प्राप्ती. [व्रतराज]

बुधवार सप्ताहातला चौथा वार. वारकरी लोक याला विठ्ठलाचा वार मानतात. या दिवशी विठ्ठलक्षेत्र सोडून जाऊ नये, असा संकेत आहे. या समजुतीला निश्चित पुरावा मिळत नाही. विठ्ठल हा श्रीकृष्णाचा अवतार आहे आणि श्रीकृष्णाचे निर्याण बुधवारी झाले, अशी समजूत आहे. त्यावरून कदाचित ही रूढी पडली असावी. बायका या दिवशी प्रवासाला जात नाहीत. त्याबाबत 'जाशील बुधी तर येशील कधी' अशी म्हणच पडली आहे.

शेतकरी या दिवशी कापणी व धान्यमोजणी करीत नाहीत. पैसे उसने देणे किंवा घेणे याला हा वार अशुभ मानतात. हजामत करणे, इमारतीचे लाकूड तोडणे या गोष्टींना हा शुभवार आहे. मुसलमान लोक याला भाग्याचा दिवस मानतात.

बुध हा या वाराचा इष्ट देव आहे.

बुधाचा संबंध बुद्धीशी लावून नैपुण्याच्या गोष्टी, अध्ययन, लिखाण, संधी, विवाद, इ. गोष्टी या वारी सुरू कराव्या असे ज्योतिषशास्त्र सांगते. [की. पाँ.; व्रत चंद्रिका]

बुधव्रत एक काम्य व्रत. बुध ग्रह विशाखा नक्षत्रात येतो, त्या वेळी हे व्रत करतात. सात दिवस नक्त भोजन करणे, बुधाची सुवर्णमूर्ती काशाच्या पात्रात ठेवून तिची पूजा करणे व ती मूर्ती दान देणे असा याचा विधी आहे. फल – सत्य ज्ञान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि शांती प्राप्त होणे व बुद्धी प्रखर होणे. [हि. ध.; व्र. प.]

बुधसिंह (इ. स. १८०० चा सुमार.) रणजितसिंहाच्या दरबारातला एक राजकवी. हा लाहोरचा रहिवासी होता. त्याने शीख संप्रदायाची दीक्षा घेतली होती. रणजितसिंहाच्या आज्ञेवरून याने पंचतंत्राचा व्रजभाषेत स्वतंत्र अनुवाद करून त्या ग्रंथाला बुद्धिवारिधी असे नाव दिले. यात त्याने कल्पित कथा गुंफल्या आहेत. हा ग्रंथ इतका लोकप्रिय झाला, की नाभानरेशाने खूष होऊन ग्रंथकाराला लाख रुपयांचा पुरस्कार दिला, असे सांगतात. अद्‌भुतनाटक, माधवानल, राधामानम, गुरुरत्नावली असे आणखीही काही ग्रंथ त्याने रचले आहेत. या सर्व ग्रंथांत साहित्यिक गुण व भक्तिभाव यांचा पुरेपूर आविष्कार आहे. [पं. हिं. सा. इ.]

बुध सौम्य एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशे एकावे सूक्त याच्या नावावर आहे. याला सोमपुत्र असे म्हटले आहे. विश्वेदेवांची स्तुती हा या सूक्ताचा विषय असल्यामुळे, शेतीसंबंधाने बरीच माहिती या सूक्तात आली आहे. तत्संबंधी काही ऋचा (१०.१०१.३–५) अशा –

युनक्त सीरा वि युगा तनुध्वं कृते योनौ वपतेह बीजम् ।
गिरा च श्रुष्टिः सभरा असन्नो नेदीय इत सृण्यः पक्वमेयात् ।।
सीरा युञ्जन्ति कवयो युगा वि तन्वते पृथक् ।
धीरा देवेषु सुम्नया ।।
निराहावान् कृणोतन सं वरत्रा दधातन ।
सिञ्चामहा अवतमुद्रिणं वयं सुषेकमनुपक्षितम् ।।

अर्थ – नांगर जोडून तयार ठेवा, बैलांची जुपी करून त्यांना ओळीने उभे करा आणि ज्या ज्या ठिकाणी नांगराने जमिनीला सरी पाडली आहे, त्या ठिकाणी बी पेरा. आमच्या प्रार्थनेने आमचे पीक भरघोस येणारच. पीक अगदी लागास आले म्हणजे मग कणसाला विळा लावा. त्याप्रमाणे नांगर जोडून तयार झाले; (यज्ञाची सिद्धता झाली) कविजनांनी निरनिराळी काव्ययुगुलके रचली आणि भक्तियुक्त बुद्धिमान यजमानांनी स्वकल्याणाच्या इच्छेने देवांच्या ठिकाणी ती अर्पण केली. आता (पाहा) बैलांना पाणी पिण्यासाठी थारोळी करा. रहाटमोटेची तयारी करा. ही जी विहीर, पाण्याने तुडुंब भरलेली, पाणी सहज उपसता येण्यासारखी आणि मुळीच न आटणारी आहे, तिच्यातूनच आपण भरपूर पाणी उपसून काढू.

बुधाष्टमी व्रत एक काम्य व्रत. शुक्ल पक्षातील अष्टमीस बुधवार आल्यास तिला बुधाष्टमी असे म्हणतात. त्या दिवशी हे व्रत करतात. व्रताचा प्रारंभ कोणत्याही महिन्यात करता येतो. मात्र ते क्रमाने येणाऱ्या आठ बुधाष्टमींना खंड न पडू देता करायचे असते. बुध ही या व्रताची प्रधान देवता असून, विष्णू व पुरुष या गौण देवता आहेत. प्रत्येक अष्टमीस नैवेद्यासाठी विशिष्ट पदार्थच घेणे व त्याच पदार्थाचे वायन देणे, हा या व्रताचा विशेष आहे. या व्रताचा विधी असा –

व्रताच्या दिवशी एकभुक्त राहावे. प्रातःकाळी नदीवर स्नान करून तिथून कलश भरून आणावा. पूजास्थानी तो कलश मांडून त्यावर तांदुळांनी भरलेले सुवर्णपात्र ठेवून त्यात पीतवस्त्रावृत अशी बुधाची सुवर्णप्रतिमा ठेवावी. मग तिची पूजा करावी. नैवेद्यासाठी प्रत्येक बुधाष्टमीस अनुक्रमे मोदक, साखरफेण्या, घीवर, घारगे, साखरपारा, पुरणपोळी, उसाच्या रसाची खांडवी यांपैकी एक पदार्थ करून त्याचेच वायन द्यावे. नंतर अर्घ्यदान व कथाश्रवण करावे.

या व्रताची कथा अशी –

कृत युगात इल नावाचा राजा होऊन गेला. तो एकदा आपल्या परिवारासह शिकारीस गेला असताना हिमालयाच्या परिसरात पोचला. 'जो कोणी या भागात प्रवेश करील, त्याला स्त्रीचे रूप प्राप्त होईल' असा शंकराने त्या भागाला शाप दिलेला होता. इलाला ती गोष्ट माहीत नव्हती. तो त्या प्रदेशात पोचताच त्याला स्त्रीचे रूप प्राप्त झाले. एवढ्यात बुध तिथे पोचला. तो दिवस अष्टमीचा होता. बुध त्या स्त्रीवर भाळला व त्याने तिच्याशी लग्न केले. त्यांच्यापासून सोमवंशाचा मूळ पुरुष जो पुरूरवा त्याची उत्पत्ती झाली. तेव्हापासून बुधाष्टमी व्रत प्रचारात आले.

व्रत पूर्ण झाल्यावर त्याचे उद्यापन करतात. त्यात पूजा, अर्घ्यदान, इ. गोष्टी झाल्यावर आघाडयाच्या समिधा, यव, व्रीही, तिल, घृत व गहू यांचे हवन करतात. मग गोप्रदान व ब्राह्मणभोजन करून व्रताची सांगता करतात. फल – बुद्धिप्राप्ती. [श. क.; हि. ध.; व्रतराज]

बुरूड कर्नाटकातील व महाराष्ट्रातील एक जात. या लोकांना मेडर, घांचे किंवा घाचे व बांसफोड अशीही नावे आहेत. हे लोक बांबूच्या चटया, टोपल्या, पाटया, पंखे, पिंजरे, चाळण्या, सुपे, इ. वस्तू वनवतात आणि वेताच्या खुर्च्या व पलंग तयार करतात.

या लोकांचे बुरूड किंवा मराठी बोलणारे बुरूड आणि मेडर किंवा लिंगायत आणि कन्नडभाषी बुरूड असे मुख्य भेद आहेत. यांच्यांत परस्पर रोटी-बेटी व्यवहार होत नाही. मराठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाषी बुरूड मुळात मराठा होते. ते आपल्या उत्पतीविषयी पुढील कथा सांगतात—

पार्वती ऋतुमती झाल्यावर तिची ओटी भरण्यात आली. ओटीतील गहू, नारळ, पान-सुपारी व फणी या वस्तू ठेवण्यासाठी एक सूप पाहिजे होते. म्हणून शिवाने बुरुडांना बोलावले व पार्वतीच्या बागेतील पाच बांबू तोडून त्यांचे सूप बनवायला सांगितले. पण त्यांनी पाचाऐवजी दहा बांबू तोडले, त्यामुळे

बुरूड स्त्री

शिव रागावला आणि ते मराठा जातीतून बहिष्कृत झाले.

सात अंत्यज जातींपैकी बुरूड ही एक जात आहे, असे मनूने म्हटले आहे.

मराठा बुरुडांची कुले व आडनावे एकच असून, समान आडनावात लग्न होत नाही. भोवरे, चिंचवले, जगताप, खैरे, डुकरे, गाढवे, गायकवाड, घोरपडे, मोहिते, इ. त्यांची आडनावे आहेत. प्रत्येक आडनावाला स्वतंत्र देवक असते.

विवाहप्रथा — मामेबहिणीशी लग्न करता येते. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. दोन्ही पक्षांची आर्थिक स्थिती चांगली असेल, तर मुलीचा बाप मुलाला हुंडा देतो. उलट मुलाचा बाप गरीब असला किंवा मुलात काही व्यंग असले, तर मुलाचा बाप मुलीच्या बापाला देज देतो. लग्नाचा मुहूर्त ब्राह्मण काढून देतो व लग्नात पौरोहित्यही तोच करतो. पत्रिकापूजन, कुंकू लावणे, हळद लावणे, हे सुरुवातीचे विधी असतात. हळदीनंतर तिसऱ्या किंवा पाचव्या दिवशी विवाह होतो. त्या दिवशी सकाळी देवक बसवतात, बकरा कापतात व ज्ञातिभोजन घालतात. संध्याकाळी नवरा मुलगा मिरवीत वधूगृही जातो. तिथे तो मंडपात तांदुळाने भरलेल्या टोपलीत उभा राहतो. वधू त्याच्या समोर उभी राहते. दोघांच्या मध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणतात व अक्षता किंवा रंगीत ज्वारी त्यांच्यावर उधळतात. पुढे कन्यादान, कंकणबंधन, हे विधी झाल्यावर विवाहहोम होतो. त्या वेळी वर वधूला कडेवर घेऊन अग्नीभोवती तीन प्रदक्षिणा घालतो. हा लग्नातील आवश्यक विधी होय.

यांच्यांत विधवाविवाह रूढ आहे. अमावास्येशिवाय, वद्य पक्षातील कोणत्याही रात्री हा विवाह होऊ शकतो. त्या वेळी पुरोहित व विधवा स्त्रिया उपस्थित असतात. पुरोहित वधूच्या कपाळी कुंकू लावतो व नंतर गणपती व वरुण यांची पूजा करतो. मग वधूची ओटी भरतात व वधू-वरांच्या वस्त्रांना गाठ मारतात. त्यांनी घरातील देवांना नमस्कार केल्यावर मग त्यांच्या पदराची गाठ सोडतात.

मराठा बुरूड खंडोबा, जोतिबा, भैरोबा, भवानी, राम, मारुती, विठोबा, इ. देवांना भजतात. मंगळवारी, शुक्रवारी किंवा रविवारी ते खंडोबाला व भवानीला बकरा बळी देतात. ते पितरांच्या प्रतिमा करून त्या पुजतात.

मर्तिकप्रथा — हे लोक मृतांना पुरतात किंवा जाळतात. पुरताना मृताला पूर्वेला तोंड करून बसवतात. अंत्यविधीचे पौरोहित्य जंगम करतो. तिसऱ्या दिवशी मृताचा उत्तराधिकारी गायीचे शेण, गोमूत्र, तीन लहान मडकी, तीन पोळ्या व कणकीचे तीन गोळे घेऊन स्मशानात जातो. जाताना अर्ध्या वाटेत जिथे प्रेत खाली ठेवले असेल, तिथे तो एक मडके, पोळी व कणकीचा गोळा ठेवतो. नंतर प्रेत पुरलेल्या जागी गोमूत्र व गायीच्या शेणाचा सडा शिंपडतो व त्यावर उरलेली मडकी, पोळ्या वगैरे ठेवतो. नंतर घरी येऊन मर्तिकाला उपस्थित असलेल्या लोकांना जेवण देतो.

प्रेत दहन केलेले असल्यास, वरील विधींशिवाय मृताचा उत्तराधिकारी दहाव्या दिवशी नदीकिनारी जातो व तिथे लहानशा मातीच्या ढिगावर तीन मडकी पोळ्यांनी व भाताच्या पिंडांनी झाकून ठेवतो व जवळच पिवळ्या वस्त्राचे तीन झेंडे उभारतो. कावळ्याने त्यांपैकी एखाद्या मडक्याला स्पर्श केल्यावर घरी परततो. मृताशौच दहा दिवस असते. बाराव्या किंवा तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. वार्षिक श्राद्धही करतात.

कन्नडभाषी बुरुडांच्या चालीरीती मराठा बुरुडांपेक्षा थोड्या वेगळ्या आहेत, त्या अशा — यांच्या लग्नाचे पौरोहित्य ब्राह्मणाने निवडलेली सुवासिनी करते. वधूच्या गळ्यात तिने मंगळसूत्र बांधणे, हा लग्नातील मुख्य विधी होय. बसवण्ण, हनुमंत, उदचम्म, देवम्म व येल्लम्म या त्यांच्या कुलदेवता असून, हुलसिग्रई हा प्रमुख देव आहे. आश्विन शुद्ध नवमीला व लग्नानंतर ते देवतांना बकरे बळी देतात. मोहरमच्या शेवटच्या दिवशी ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गृहदेवतांना मटण व मद्य यांचा नैवद्य दाखवतात.

लिंगायत बुरूडांच्यांत डुकरे, गाडे, गंधे, घोरपडे, हाटगे, होले, इ. आडनावे असून, एकाच आडनावात विवाहसंबंध होत नाही. लग्नात जंगम पौरोहित्य करतो. हे लोक महादेव, तुळजापूरची देवी व खंडोबा यांना विशेष भजतात. जननाशौच तीन दिवस पाळतात. यांचा अंत्यसंस्कार इतर लिंगायतांप्रमाणे असतो. [ट्रा. का. बाँ.]

बुऱ्हाणोद्दीन गरीबशहा (१२५४–१३३८ इ. स.) एक सूफी साधू. याचा जन्म पूर्व-पंजाबातील हासी या गावी झाला. याचे शिक्षण त्याच्या वडिलांच्या देखरेखीखाली झाले. शिक्षण संपल्यावर बुऱ्हाणोद्दीन दिल्लीस गेला आणि त्याने निजामोद्दीनचे शिष्यत्व पत्करले.

याची बोधवचने त्याचे तीन शिष्य इमाद काशानी, शेख हुसेनी आणि रुकनुद्दीन काशानी यांनी एकत्रित करून ती अनुक्रमे हुसलुल वसूल, हिदायतुल कुलूब आणि नफायसूल अन्फास या नावांनी प्रसिद्ध केली आहेत. दक्षिणेचे सुलतान व इतर बादशाहा यांची बुऱ्हाणोद्दीनवर बरीच निष्ठा होती. [सू. सं.]

बुलाकीदास (१) (इ. स. चे १७ वे शतक) एक जैन कवी. याचे मूळ नाव नंदलाल. हा मूळ बयानाचा राहणारा; पण नंतर आग्रा येथे जाऊन स्थायिक झाला. त्याच्या गुरूचे नाव रतन असे होते. याने लिहिलेल्या ग्रंथांची नावे व तपशील असा– (१) वचनकोष– यात जैन सिद्धांन्ताचे विवेचन आहे. (२) प्रश्नोत्तर श्रावकाचार्य – यात जैन श्रावकांच्या आचार धर्माचे विवेचन आहे. (३) पांडवपुराण – एक महाकाव्य. यात जैन परंपरेला धरून पांडवांची कथा दिलेली आहे. मातेच्या आज्ञेवरून त्याने हे काव्य रचले. यात ५५०० पद्ये आहेत. (४) जैन चौवीसी – यात चौवीस तीर्थंकरांची स्तवने आहेत. हे सर्व ग्रंथ हिंदी भाषेत आहेत. [हिं. जैं. भ. क.]

(२) (इ. स. चे १८ वे शतक) एक भोजपुरी संतकवी. याच्या पित्याचे नाव जोधराय व मातेचे कुंद कुवरी असे होते. याने प्रथम गृहस्थाश्रम स्वीकारला होता; पण पुढे थोड्याच कालात त्याला वैराग्य आले. तो अमलपूर या गावी एका झोपडीत राहू लागला व तियेच काव्य रचू लागला. त्याची काव्ये चैता किंवा घाँटो या नावाने भोजपुरी प्रदेशात लोकप्रिय आहेत. त्यांतील एक गीत असे–

छोटीमुटि ग्वालिनि सिर ले मटुकिया हो रामा, चलि भइली ।
गोकुला सहर दहिया बेचन हो रामा, चलि भइली ।।
एक बन गइली, दुसर बनें गइली, रामा तीसर बनें,
कान्हा मोर धरेला अँचरवा हो रामा, तिसरं बनें ।।
छोड़ु छोड़ु कान्हा रे हमरो अँचरवा, हो रामा, पड़ि जईहें,
दही के छिटिकवा हो रामा, पड़ि जइहें ।।
तोरो लेखे ग्वालिनि दही के छिटिकवा हो रामा, मोरो लेखे ।
अगर चनन देव बरिसे हों रामा, मोरा लेखे ।।
दास हो बुलाकी चइत घाँटो गावें हो रामा, गाइ गाई,
बिरहिन सखि समुझावे हो रामा, गाइ गाई ।।

भावार्थ – मी अटकर बांध्याची गवळण दह्याचा हंडा शिरी घेऊन दही विकायला निघाले होते. एका रानातून दुसऱ्या रानात, दुसऱ्यातून तिसऱ्या रानात. तिथे श्रीकृष्ण अचानक येऊन त्याने माझा पदर धरला. मी काकुळती केली. त्याने म्हटले. ' अगे गवळणी, जे पडतील ते दह्याचे शिडकावे नव्हेत. ते देवतेने तुझ्या साडीवर टाकलेले चंदनाचे शिडकावे असतील.' अशा तऱ्हेची लोकगीते आळवीत बुलाकीदास चैत्र महिन्यात संचार करतो आणि त्यामुळे विरहिणींची मने बहरून जातात. याची बरीचशी पद्ये लुप्त झाली, असे म्हणतात. [भो. क. का.]

बुल्लेशाह (१६८०–१७५२ इ. स.) पंजाबातील एक सूफी संतकवी. हा जातीने मुसलमान असून, याच्या पित्याचे नाव मुहंमद दरवेश असे होते. याचा जन्म लाहोर प्रांतातील पंडोल नामक एका लहानशा खेड्यात झाला. त्याच्या

बुल्लेशाह

घरचे वातावरण अत्यंत धार्मिक होते. त्यामुळे बुल्लेशाहाला बालपणापासूनच भक्तीची व अध्यात्माची गोडी लागली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आशौचाच्या शेवटच्या दिवशी मृताचे आप्तेष्ट स्मशानात जाऊन व घरीही मृतात्म्यासाठी प्रार्थना करतात. नंतर त्यांना मृताच्या घरी जेवण मिळते. अशाच प्रकारचा विधी पंधरा दिवसांनी व अकरा महिन्यांनी करतात. [एन्सा. रि. ए.; ट्रा. का. बाँ.; पूना गॅझे.; मुं. व.]

बेरड एक जात. प्रदेशपरत्वे या लोकांना बेडर, नाइकवाडी, ब्याडेरू, तलवारू, नाइकमक्कलू, काटक, इ. नावेही आहेत. यांची मुख्य वस्ती बेळगाव, धारवाड, विजापूर व कोकण या भागात आहे. (बेडर पाहा)

हे लोक वाल्मीकी मुनीला आपला जातभाई मानतात व स्वतःला वाल्मीक असेही म्हणवतात. कुठे कुठे ते स्वतःला रामोशीही म्हणवतात. त्यावरून मुळात रामोशी व बेरड एकच असावे, पण पुढे त्यांची राहण्याची ठिकाणे व भाषा वेगळी झाल्यामुळे, या दोन भिन्न भिन्न जाती मानण्यात येऊ लागल्या असाव्या. तेलुगू बोया आणि तमिळ वेदान हेही बेरडांशी संबंधित आहेत. बोया हे शिकारी आहेत. वेदान हेही शिकारी असून, पूर्वी ते सैन्यात होते व नंतर दरोडेखोर बनले. कन्नय्य या नायन्मारापासून हे आपली उत्पत्ती मानतात. मुंबई राज्यातील बेरडही कन्नय्य हा आपला मूळ पुरुष मानतात.

कन्नय्य हा शिकारी असून, शिवाचा परम भक्त होता. त्याच्या भक्तीने शिवपार्वती त्याच्यावर प्रसन्न झाले. आपण व आपले वंशज हे अचूक शरसंधान करणारे व्हावेत व आपल्या आणि आपल्या वंशजांच्या जमिनीत विशेष कष्ट न करता व फारसे पाणी न लागता धान्य पिकावे, असे दोन वर त्याने मागितले. शिवाने ते त्याला दिले. सर्व बेरड हे अचूक नेमबाजी करण्यात पटाईत असून, ते पशुपक्ष्यांची शिकार करतात. ते कमी मेहनत व कमी पाणी लागणारे रब्बी पीक तेवढे काढतात.

बुचॅननच्या मते बनवासीचे कदंब हे बेरड होते. द. कानडामधील बेरड फार क्रूर होते आणि त्यांना खुनी असेच म्हणत असत. विजयनगरच्या पाडावानंतर या बेरडांनी अनेक दिवसांपर्यंत त्याची लूटमार चालवली होती. धन्याशी किंवा प्रमुखाशी एकनिष्ठ राहण्याची त्यांची वृत्ती पाहून हैदर अलीने त्यांच्यांतल्या बऱ्याच लोकांना मुसलमान बनविले व त्यांच्या अनेक पलटणी बनविल्या.

पेशव्यांच्या काळात बेळगावजवळच्या चिकोडी येथे बेरडांचे केंद्र होते. इ. स. १८१७ च्या सुमारास नाईक नामक प्रमुखाच्या हाताखाली त्यांची मोठी संघटना होती. त्या वेळी त्यांनी इंग्रजांविरुद्ध बंडाळी केली; पण इंग्रजांनी तिचा बीमोड करून टाकला. पुढे इ. स. १८२९ व १८९५ या वर्षीही त्यांनी इंग्रजांविरुद्ध मोठा उठाव केला होता; पण त्यातही त्यांना अपयश आले.

बेरड लोक रंगाने काळे व मध्यम उंचीचे असतात. त्यांचा चेहरा गोल, ओठ पातळ, नाक रुंद आणि केस लांब किंवा कुरळे असून, त्यांच्या गालांची हाडे वर आलेली असतात. बेरड पुरुष धोतर किंवा विजार, कोट किंवा उपरणे व वहाणा किंवा बूट असा पोषाख करतात. बरेचसे पुरुष केस वाढवतात. ते कमरेत साखळी, हातात सोन्याचे किंवा चांदीचे कडे आणि कानात सुवर्णवलये घालतात. स्त्रिया विकच्छ साडी नेसतात व डोक्यावरून पदर घेतात. त्या वाकी, टीका, कमरपट्टा, नथ, कर्णफुले, बांगड्या, इ. अलंकार घालतात.

उद्योगधंदे – पूर्वी हे लोक चोर व दरोडेखोर म्हणून प्रसिद्ध होते. अजूनही त्यांच्यापैकी काही लोक चोऱ्या करतातच; पण आता पुष्कळसे लोक शेती करतात. काही वतनदार व पाटील असून त्यांना जमिनी मिळालेल्या आहेत. काही पहारेकरी म्हणून काम करतात. सांप्रत त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार झालेला असून, ते शिक्षक, पोलिस, पट्टेवाले अशा नोकऱ्या करतात.

बेरड लोक कुरब, कब्बलिगर, वक्कल, इ. आपल्यापेक्षा श्रेष्ठ जातीचे लोक आपल्यात घेतात. पुरुष असेल तर प्रथम त्याची हजामत करून त्याला स्नान घालतात. नंतर रुईची जळती काडी त्याच्या जिभेला लावतात. त्याचे पूर्वीचे क्रियाकर्म जाळल्याचे ते सूचक असते. नंतर ज्ञातिभोजन घालतात. नव्याने जातीत घेतलेल्या पुरुषांना मल्लव पोटजातीत घालतात व स्त्रियांना गुज्जल पोटजातीत घालतात. नव्या लोकांना दीक्षा द्यायची म्हणजे गवताची एक झोपडी करून ती जाळतात. त्यांचे नवे जीवन सुरू झाले, असा त्याचा अर्थ होतो.

बेरड लोकांत नाइक मक्कलू, वाल्मीक किंवा खुद्द बेरड, भिल किंवा किरात, बिले किंवा हलगे, जस, नस, म्यास किंवा कवलेट्टू, ककरमुंडी किंवा हेसी आणि करे किंवा दुर्गामुर्गी असे पोटभेद असून, त्यांच्यांत परस्पर लग्नसंबंध होतात. बेरड लोकांत अनेक बेडगू असून, एकाच बेडगूत विवाह होत नाहीत.

हे लोक भ्रष्ट कन्नड भाषा बोलतात. सोलापूर जिल्ह्यातील बेरड इतरांशी मराठी व घरात स्वतःची एक बोली बोलतात.

यांचे तंटेबखेडे कट्टिमणी हा जातिप्रमुख सोडवतो. पूर्वी व्यभिचार किंवा कनिष्ठ जातीतील लोकांबरोबर भोजन करणे अशा गुन्ह्यांबद्दल स्त्रीला जातिबहिष्कृत करीत व तिला पुन्हा जातीत घेण्यापूर्वी तिचे मुंडण करीत. पण हल्ली तिचे फक्त पाच केस कापतात व रुईची जळती काडी तिच्या जिभेला लावतात. मग तिला थोडी दारू प्यायला देतात. कारण दारूने शरीर शुद्ध होते, अशी त्यांची समजत आहे. पुरुषाला अशाच गुन्ह्याबद्दल गुरूसमक्ष दाढी, मिशा व शेंडी काढावी लागते,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गार पाण्याने स्नान करावे लागते व दारू प्यावी लागते.

विवाहप्रथा – मुलामुलींची लग्ने बहुधा लहान वयात होतात. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. वधूपित्याला देज द्यावे लागते. दोन्ही पक्षांना हा संबंध पसंत असल्यास साखरपुडा होतो. त्या वेळी गावातील अधिकारी आणि लिंगायत पुरोहित उपस्थित असतात. यानंतर एक किंवा दोन वर्षांनी लग्न करतात. विवाहमुहूर्त ज्योतिषी काढून देतो. लग्न मुलाच्या घरी होते. विवाहाच्या आधी दोन दिवस वधूपक्षाकडील लोक वरगृही जातात. त्या दिवशी वधू-वरांना हळद लावून स्नान घालतात. नंतर वधू-वर घरातल्या देवांना नमस्कार करतात. दुसऱ्या दिवशी पाच विवाहित पुरुष गावाबाहेर रानात जाऊन दोन खांब घेऊन गावाच्या हद्दीवर किंवा मारुतीच्या देवळात येतात. तिथे एक सुवासिनी त्यांना आरती ओवाळते. तिथून ते मिरवणुकीने वरगृही येतात. नंतर ते खांब घरासमोर पुरून त्यावर मांडव घालतात. त्याच दिवशी कुंभाराकडून काही गाडगी-मडकी मिरवीत आणतात. एका मडक्यात दोन काटक्यांना विड्याची पाने बांधून ठेवतात. त्यांना रामबाण असे म्हणतात. तिसऱ्या दिवशी वधू-वर बैलावर बसून गावातील मारुतीच्या मंदिरात नमस्काराला जातात. मग वर जात्याच्या तळीवर व वधू धान्य भरलेल्या टोपलीत उभी राहते. दोघांच्या मधे अंतरपाट धरतात व मंत्र म्हणून त्यांच्या मस्तकावर अक्षता टाकतात. हा लग्नातील मुख्य विधी असतो. नंतर वराने स्पर्श केलेले मंगळसूत्र पुरोहित वधूच्या गळयात बांधतो. लग्नात ब्राह्मण व लिंगायत असे दोन्ही पुरोहित असतात.

विधवाविवाहाच्या वेळी लिंगायत मठपती पौरोहित्य करतो. नवीन नवऱ्याला वधूच्या आईबापांना सुमारे शंभर रुपये देज द्यावे लागते. विधवाविवाहाच्या वेळी सुवासिनींना उपस्थित राहता येत नाही.

पत्नी व्यभिचारी, आजारी किंवा कुरूप असल्यास पतीला घटस्फोट घेता येतो. क्वचित हे लोक आपल्या मुली यल्लम्माला अर्पण करतात. मग त्या जोगती होतात व वेश्यावृत्तीने राहतात. देवाला अर्पण केलेल्या मुलींना वसवी असे नाव आहे.

प्रसूतिप्रथा – स्त्रीला प्रसूतीच्या वेळी सुईण मदत करते. जननाशौच पाच दिवस असते. बाराव्या किंवा एकोणिसाव्या दिवशी मुलाचे नाव ठेवतात. पाचव्या दिवशी षष्ठीदेवीचे पूजन करतात.

मुलगी प्रथम ऋतुमती झाल्यावर तिला मखरात बसवून तिची ओटी भरतात. त्या वेळी वाजंत्र्यांना बोलावतात.

देवधर्म – काही बेरड वैष्णव आहेत; तर काही निसर्गपूजक आहेत. थोडे लोक शैव व लिंगायतही आहेत. विजापूरमधील बेरडांच्या दुर्गव्व, मल्लिकार्जुन, मारुती, वेंकटेश व येल्लम्म या कुलदेवता असून, त्यांच्या धातुमूर्ती ते घरात ठेवतात. धारवाडच्या बेरडांचा मुख्य देव हनमप्पा हा आहे. सोलापूरमधील बेरड मुख्यतः अंबाबाई, जोतिबा व खंडोबा व पुण्यातील बेरड जनाई, जोखाई व खंडोबा यांना भजतात.

हे लोक दसरा, दिवाळी, नवरात्र, इ. सण साजरे करतात. आश्विन व मार्गशीर्ष अमावास्येला ते शेतात डांगोरा नामक एक विधी करतात. दर शनिवारी आणि मंगळवारी ते फक्त संध्याकाळी जेवतात आणि श्रावणातल्या प्रत्येक सोमवारी उपवास करतात. मंत्रतंत्र, जादूटोणा यांवर त्यांचा विश्वास आहे.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात किंवा पुरतात. तप्तमुद्रा घेतलेल्या अविवाहितांना आडवे ठेवून व विवाहितांना बसल्या स्थितीत ठेवून पुरतात. प्रेताला स्नान घालून कपडे घालतात. पुरुषाच्या कपाळी भस्म लावतात व स्त्रीच्या डोक्यावर फुलांची जाळी घालतात. तिसऱ्या दिवशी प्रेत पुरलेल्या किंवा जाळलेल्या जागी भात, कानोले व पाणी एका मडक्यात घालून ठेवतात व कावळा त्यांना शिवण्याची वाट बघतात. मृताशौच तीन दिवस पाळतात. सातव्या, नवव्या किंवा अकराव्या दिवशी रक्षा व अस्थी गोळा करून नदीत टाकतात आणि आप्तेष्टांना जेवण घालतात. बेळगावच्या बाजूला, बाराव्या दिवशी मृताचा उत्तराधिकारी ब्राह्मणाकडून पाणी आणून ते घरात शिंपडतो. मृत व्यक्ती विवाहित असेल, तर चांदीच्या पत्र्यावर तिची प्रतिमा ठोकून आणतो. तेराव्या दिवशी आणि वर्षातून एकदा भाद्रपद, आश्विन किंवा फाल्गुन अमावास्येला पितरांसाठी ज्ञातिबांधवांना जेवण घालतात. काही ठिकाणी लिंगायत मठपती त्यांची अंत्यक्रिया करतात.

मुसलमान बेरड सोलापूर, बेळगाव, धारवाड व विजापूर या भागांत विखुरलेले आहेत. हैदर अलीने त्यांना बाटवून मुसलमान केले. हैदर आणि टिपू या दोघांच्याही सैन्यात हे लोक होते. सांप्रत ते व्यापार, नोकरी, इ. व्यवसायांत आहेत. हे हनफी पंथाचे सुन्नी असून, त्यांच्या चालीरीती इतर मुसलमानांप्रमाणेच आहेत. [ट्रा. का. बाँ.; गु. जा.; कोल्हापूर गॅझे.]

बेरी चेट्टी

द. भारतातील एक जात. हे व्यापारी असून, स्वतःला वैश्य समजतात. कन्यकापुराणात यांच्या उत्पत्तीविषयी पुढील कथा दिली आहे –

एका राजाला कोमटी जातीच्या एका सुंदर मुलीशी लग्न करायचे होते. पण कोमट्यांना हा संबंध पसंत नसल्यामुळे त्यांनी राजाला नकार दिला. तेव्हा राजाने त्यांचा छळ सुरु केला. छळाच्या भयाने जे कोमटी लोक तो देश सोडून गेले,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांना बेरी किंवा बेडिरी (= भय) चेट्टी असे नाव मिळाले.

यांच्याबद्दल दुसरी एक कथा प्रचलित आहे, ती अशी— कुंभकोणमजवळच्या कावेरीपुरम नामक नगरात बेरी चेट्टींची पुष्कळशी वस्ती होती. तिथल्या राजाने त्यांच्या एका मुलीला मागणी घातली. पण बेरी चेट्टींनी ती नाकारली. तेव्हा राजाने त्यांना आपल्या राज्यातून घालवून दिले आणि इतर जातींना त्यांच्याशी रोटीबेटीव्यवहार करायला बंदी केली. ही बंदी इ. स. च्या विसाव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत तरी अस्तित्वात होती.

बेरी चेट्टी लोकांत अनेक पोटभेद असून, त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाहीत. ते राहत असलेल्या गावांच्या नावावरून हे पोटभेद पडले आहेत.

यांची जातपंचायत असून, जातीचे सर्व प्रश्न तीच सोडवते. पंचायतप्रमुखाला पेरिदनक्कारन असे नाव असून, त्याच्या मदतीला एक न्हावी असतो.

या लोकांना बालविवाह अधिक पसंत आहे. यांच्यांत मुलाचा उपनयनसंस्कार लहानपणी किंवा लग्नाच्या वेळीही करतात. सर्व पुरुष जानवे घालतात. बेरी चेट्टी व कोमटी यांच्यांत श्रेष्ठपणाबद्दल वाद असून, प्रत्येक जात आपण दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ असल्याचा दावा करते. पण सर्वसाधारणपणे कोमट्यांना बेरी चेट्टींपेक्षा श्रेष्ठ समजतात.

यांच्यांत शैव व वैष्णव या दोन्ही पंथांचे लोक आहेत. यांच्यापैकी काही लिंगायतही आहेत.

यांच्यांत प्रेते जाळण्याची चाल आहे. लिंगायत बेरी मात्र प्रेते पुरतात. [का. ट्रा. स. इं.]

बेलदार

एक मजूर जात. बेल या फारसी शब्दाचा अर्थ कुदळ असा आहे. त्यावरून या जातीला हे नाव पडले. बेलाच्या झाडावरून हे नाव पडले असावे, असेही एक मत आहे. बिहार, ओडिसा, उत्तर प्रदेश, विदर्भ, मध्य प्रदेश, राजस्थान व पंजाब या प्रदेशांत हे लोक आढळतात.

कुर्मी, गुजर, इ. जातींचे पाणी त्यांना चालते; मात्र ते ब्राह्मणाकडचे अन्नोदक घेत नाहीत.

छत्तीसगडमधील बेलदारांत ओडिया, लरिया, कूचबंधिया, कारिगर, मत्कूड असे गट आहेत. ओडिया हे स्वतःला राजपूत समजतात.

माती खणणे, विहिरी खणणे, दगडकाम करणे, विटा वाहून नेणे, बांधकामाकरिता लागणारी कामे करणे; तसेच हातमागाच्या फण्या व शिंगांच्या चौकटी तयार करणे, इ. कामे ते करतात. ते जाती, उखळे, पाटे, वरवंटे, चौरंग, इ. वस्तूही विकतात. बायका-पुरुष दोघेही जात्यांना टाक्या लावतात. ते भीक कधीही मागत नाहीत. हे लोक खूपच कष्टाळू असतात. उघाडीच्या दिवसांत गाढवावर सामान लादून ते काम शोधण्यासाठी भटकतात.

बेलदारी भाषा — बहुतेक बेलदार लोकांनी त्या त्या प्रदेशातील बोलीचा स्वीकार केला आहे. पण तरीही राजस्थान, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र या प्रदेशांतील बेलदारांची बेलदारी नामक बोली आहे. या बोलीत अनेक भाषांचे, मुख्यतः पूर्वी राजस्थानी व मराठी यांचे मिश्रण दिसते.

बेलदारांची दहा-पाच बिऱ्हाडे एखाद्या धर्मशाळेत किंवा गावाच्या सीमेजवळ पाले उभारून त्यांत उतरतात. प्रत्येक बिऱ्हाडात शेळ्या, कोंबड्या व गाढवे असतात.

देवधर्म — या लोकांचे कुलदैवत रेवा संस्थानात आहे. तिथल्या झेंड्याला इतर जातीच्या माणसाने स्पर्श केला, तर त्याला धोका पोचतो, असे समजतात. दिवाळीच्या दिवशी ते आपल्या गाढवापुढे दिवा लावून त्याला नमस्कार करतात.

विवाहप्रथा — यांच्यामध्ये लग्नात वधूचे देज म्हणून १०० किंवा २०० रुपये द्यावे लागतात. बाकी लग्नविधी सामान्य असतो.

महाराष्ट्रात परदेशी बेलदार व मराठी बेलदार असे यांचे दोन विभाग आहेत. मराठी बेलदार मराठी कुणब्यांसारखे वागतात. परदेशी बेलदारांची बोलडे, गोंधळी, कुडाळी, नवाले, पांडे अशी आडनावे असतात. हे अशुद्ध हिंदी बोलतात. पुरुषांची वेषभूषा मराठी कुणब्यांसारखी असते; स्त्रिया मात्र घागरा-चोळी वापरतात.

प्रसूतिप्रथा — महाराष्ट्रातील बेलदारांच्या बाळंतिणी पाचव्या दिवशी षष्ठी देवीची पूजा करतात. त्या वेळी घरातला वयोवृद्ध पुरुष बाळंतिणीसमोर बोकड कापतो. बाळंतिणीला जननाशौच सव्वा महिना असते मुलीचे नवव्या व मुलाचे बाराव्या दिवशी नाव ठेवतात.

मृतिकप्रथा — हे लोक मृताला पुरतात. नंतर मृताच्या घरी जातात व तिथे दिव्याला नमस्कार करतात. तिथेच एक लिंबाचे पान खाऊन मग आपल्या घरी परततात. दहा दिवस आशौच पाळतात. बाराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. [सु. वि. को.; गां. गा.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; पं. का.; पूना गॅझे.]

बेलवार

एक जमात. यांची वस्ती सामान्यपणे भारताच्या मध्यभागात, विशेषतः अवध भागात आढळते. यांना बिलवार असेही म्हणतात. ओझी वाहणे हा यांचा प्रमुख धंदा आहे. हे लोक आपल्या जातीच्या उत्पत्तीसंबंधी कथा सांगतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ती अशी – आमचे पूर्वज सनाढ्य ब्राह्मण होते व ते बैलावरून ओझी वाहण्याचा धंदा करीत होते. त्यामुळे इतर ब्राह्मण त्यांना हलक्या जातीचे मानू लागले. [द्वा. का. सें. प्रॉ. इं.]

बेला एक लोकवाद्य. उत्तर प्रदेशातले चांभार आपल्या सामूहिक नृत्याच्या वेळी हे वाद्य वाजवितात. याचा आकार छोटया थाळीसारखा असतो. ते काशाचे बनवितात. त्याच्या काठाला दोन छिद्रे पाडून त्यांतून एक दोरी ओवतात आणि धनुकलीच्या साहाय्याने ते वाजवितात. [कृ. जी. ब्र. श.]

बेलूर कर्नाटक प्रदेशातील एक प्राचीन नगर. हे स्थान बंगलोरपासून १३७ मैलांवर आणि बाणावरपासून २८ मैलांवर, यगची नदीच्या काठी आहे. याचे पूर्वीचे नाव वेलपूर असे होते. होयसळांची राजधानी द्वारसमुद्र (हळेबीड) तिथून ८–१० मैल अंतरावर येते. बेलूरच्या लगतच पश्चिमेला मालनाडचा डोंगरी प्रदेश असल्यामुळे हे स्थान अधिक सुरक्षित होते; म्हणून होयसळ राजांनी तिथे काही काळ तात्पुरती राजधानी स्थापली होती. याला 'अभिनव क्षोणिवैकुंठ' व 'दक्षिण-वाराणसी' अशीही अन्य नावे होती.

हे नगर सुमारे एक हजार वर्षांपूर्वी वसवले गेले असावे. होयसळ राजा वल्लाळ (पहिला) याच्या वेळी ते समृद्ध व प्रसिद्ध झाले. प्रख्यात होयसळ राजा विष्णुवर्धन याने इ. स. १११६ च्या सुमाराला तलकाड येथे चोळसेनेचा पराजय केला आणि त्या विजयाचे स्मारक म्हणून बेलूर येथे विष्णूचे एक सुंदर मंदिर निर्माण केले. ते विजयनारायण किंवा चेन्नकेशव-मंदिर या नावाने प्रख्यात आहे. कर्नाटकातील महान शिल्पकार डंकणाचार्य याने हे मंदिर बांधले, असे म्हणतात. इ. स. १११७ मध्ये विष्णुवर्धन राजाने या मंदिरात केशवस्वामीच्या मूर्तीची प्रतिष्ठा केली, असे तिथल्या शिलालेखांवरून कळते.

मुहंमद तुगलुकाचा एक सेनापती गंगूसालार याने हे मंदिर लुटले व त्याचे तोरणद्वार जाळून टाकले. पुढे विजयनगरच्या अधिकाऱ्यांनी त्या मंदिराचा जीर्णोद्धार करून त्याच्या महाद्वारावर विटांचे गोपुर बांधले. त्याच काळात तिथे देवीची दोन मंदिरे व नागनायकाचा सभामंडप यांची निर्मिती झाली.

चेन्नकेशवमंदिर हे होयसळ शिल्पशैलीचे एक उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. या मंदिराची लांबी १७८ फूट व उंची १५६ फूट असून, ते एका उंच दगडी चबुतऱ्यावर बांधलेले आहे. या मंदिराचा गाभारा ताराकृती असून, त्याच्या समोर एक भव्य नवरंग म्हणजे सभामंडप आहे. त्या मंडपात असंख्य स्तंभ आहेत आणि जाळीदार पाषाणाचे पडदे आहेत. बहुतेक स्तंभ आणि छते यांवर विपुल नक्षीकाम आहे. त्यांतील नरसिंह-स्तंभ व मोहिनीस्तंभ यांवरील नक्षीकाम तर अप्रतिम आहे. मंडपातले चार मध्यवर्ती स्तंभ त्यांवरील नर्तिकांच्या सुरेख



चेन्नकेशव मंदिर – बेलूर

मूर्तीमुळे फारच चित्तवेधक वाटतात. या मंडपाच्या छताची रचनाही विलक्षण आहे. ते अष्टकोणी असून त्यावर घुमट आहे. घुमटाचा व्यास दहा फूट व उंची सहा फूट आहे. त्याच्या मध्यभागी एका शिलाखंडावर हिरण्यकशिपूला मारणाऱ्या नरसिंहाची आकृती कोरलेली दिसते.

गर्भगृहात एका चबुतऱ्यावर पुरुषभर उंचीची विष्णूची सुंदर व रेखीव मूर्ती उभी आहे. ती शिल्पशास्त्रातील नियमानुसार घडवलेली असून, विविध अलंकारांनी सुशोभित आहे. विष्णूच्या दोन्ही बाजूंना भूदेवी व श्रीदेवी यांच्या मूर्ती आहेत.

चेन्नकेशवमंदिरावर विमान नसून, त्याच्या भिंती खालपासून वरपर्यंत सरळ आहेत. त्याच्या बाह्यांगावरही विपुल नक्षीकाम आहे. नवरंग सभामंडपाला पूर्व, उत्तर व दक्षिण बाजूंना द्वारे असून, त्यांवरही पुष्कळ नक्षी कोरलेली दिसते. तिथे द्वारपालही आहेत. पूर्वेकडील द्वारावर हिरण्यकशिपूच्या वधाचा प्रसंग कोरलेला आहे. उत्तरेकडील द्वाराच्या वर एक लहानसे रथाकार शिल्प बनवलेले आहे. चबुतरा आणि मंडपाच्या भिंती यांवर नाना प्रकारच्या आकृती व मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यात तळाशी गजपट्टी, त्यावर कीर्तिमुखे, त्यावर वेलपत्ती आणि त्यावर पौराणिक प्रसंग कोरलेले दिसतात.

या मंदिराच्या सभामंडपातील बेचाळीस स्तंभांवर, छताला लागून किंचित तिरकस अशा, अत्यंत सुरेख मूर्ती आढळतात, त्यांना मदनिका म्हणतात. मोहिनी स्तंभावर असलेल्या मोहिनीप्रमाणेच या मदनिका अगदी सजीव आणि कमनीय वाटतात. आकृतीचे सौंदर्य, कलेचा नाजुकपणा व कामातली सफाई या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्व दृष्टींनी त्यांना कुठे तोड नाही. त्यांतील दर्पणहस्ता, धनुर्धारिणी, नर्तिका, डमरूधारिणी, इ. मूर्ती विशेषच आकर्षक आहेत. या सर्व मदनिका कोणत्या तरी भिन्न भिन्न उद्योगात गुंतलेल्या दिसतात. त्यामुळे प्रत्येकीला वेगळेच रूप व भावसौंदर्य



नर्तिकामूर्ती, चेन्नकेशव मंदिर – बेलूर

लाभले आहे. याव्यतिरिक्त रामायण, महाभारत व पुराणे यांतील कित्येक प्रसंगांची चित्रे या मंदिरात जागोजागी कोरलेली आहेत. विपुल, नाजुक व अत्यंत रम्य नक्षी आणि असंख्य सुंदर मूर्ती यांमुळे हे मंदिर विलक्षण आकर्षक झाले आहे.

चेन्नकेशवमंदिराच्या बाह्य प्रांगणात सुमारे वीस लहानमोठी मंदिरे आहेत. त्यांच्या भोवती एक विशाल दगडी प्राकारही आहे. प्रांगणाच्या एका कोपऱ्यातील चेन्निगरायमंदिर सर्वांत प्रसिद्ध व प्रेक्षणीय आहे. होयसळ राजा विष्णुवर्धन याची पट्टराणी शांतलादेवी हिच्या आज्ञेवरून हे मंदिर चेन्नकेशवमंदिराबरोबरच बांधण्यात आले. त्यातील चेन्निगरायाची मूर्ती प्रसिद्ध शिल्पकार जक्कणाचार्य याने बनविली होती. त्याच्याविषयी एक दंतकथा प्रसिद्ध आहे, ती अशी–

जक्कणाचार्याचा पुत्र डंकणाचार्य याने चेन्निगरायाची ती मूर्ती सदोष व पोकळ आहे असे सांगून, तिला एक छिद्र पाडले. तेव्हा त्यातून एक बेडूक बाहेर आला. आतील पोकळीत थोडे पाणीही सापडले. तेव्हा जक्कणाचार्याने आपला उजवा हात तोडून टाकला व आयुष्यात पुन्हा मूर्तिकाम केले नाही.

वरील दंतकथेमुळे त्या मूर्तीला कप्पे (बेडूक) चेन्निगराय हे नाव मिळाले आहे. ही मूर्तीही भव्य, सुंदर व कलात्मक आहे. या मंदिराच्या मंडपात भिंतीतील कोनाड्यात गणपती, सरस्वती, लक्ष्मी-नारायण, लक्ष्मी-श्रीधर व महिषासुरमर्दिनी यांच्या सुंदर मूर्ती बसवलेल्या आहेत.

याव्यतिरिक्त बेलूर येथे लक्ष्मीमंदिर, आंडाळमंदिर, वीरनारायणमंदिर, शिवमंदिर, इ. अनेक मंदिरे असून, आंडाळमंदिराजवळ वासुदेवतीर्थ नामक सरोवर आहे. वीरनारायण व आंडाळ या मंदिरांत सुंदर भित्तिचित्रे पाहायला मिळतात. आंडाळमंदिराच्या एका भिंतीवर वेणुगोपाळाची एक मूर्ती कोरलेली आहे, तीही फार सुरेख आहे. शिवमंदिरात सुमारे सात फूट उंचीचे शिवलिंग आहे. [बेलूर की दीपिका – पुरातत्त्व विभाग, म्हैसूर; क. द.; कल्याण – तीर्थांक; टें. सा. इं.]

बेसतुवर्स गुजरातमधला एक सण. कार्तिक महिन्याचा पहिला दिवस म्हणजे संवत वर्षाचा आरंभ. त्या दिवशी हा सण साजरा करतात. या दिवशी नवीन धान्याचे अन्नकूट श्री डाकोरजीला वाहतात. या दिवशी सकाळीच पुरुष स्नान करून बाजारात मीठ (सबरस) खरेदी करायला जातात. हा पदार्थ सर्व पदार्थांत श्रेष्ठ अशा समजुतीने वर्षाच्या पहिल्या दिवसाची खरेदी मिठापासून सुरू करतात. यामुळे सर्व वर्ष चांगले जाते, अशी त्यांची समजूत आहे.

या दिवशी शेतकरी आपल्या जनावरांना सजवितात, त्यांची पूजा करतात आणि त्यांना चांगले खाऊपिऊ घालतात. व्यापारी लोक जमाखर्चासाठी नवीन वह्या आणून त्यांची पूजा करतात.

बेसाकी सिंधी लोकांचा एक सण. हा वैशाखी या शब्दाचा अपभ्रंश आहे. मेषसंक्रमणाच्या दिवशी हा सण असतो. या दिवशी सिंधी लोक नदीवर किंवा संगमावर स्नानाला जातात. स्नानानंतर नवीन पंचांग, द्रव्य व इतर वस्तू यांचे यथाशक्ति दान करतात. त्या दिवशी तांदुळाच्या पिठाचे लाडू करून ते इष्ट-मित्रांना वाटतात. यज्ञोपवीतधारणाचा विधीही याच दिवशी होतो. दुपारी मिष्टान्नाचे भोजन होते. मग देवदर्शन, इष्ट-मित्रांच्या गाठी घेणे, इ. कार्यक्रम असतात. सिंधी लोक या मुहूर्तावर लग्नेही लावतात. [पुरुषार्थ – एप्रिल १९६५]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बेस्ता एक जात. या लोकांची वस्ती मुख्यत्वे कर्नाटकात आढळते. या लोकांना तोरय, अंबिग, परिवर, कव्याट व गंगेमक्कळू अशीही अन्य नावे आहेत. राजू, नायक व भोयी या त्यांच्या पदव्या आहेत. ते स्वतःला सूताचे वंशज समजतात. मच्छीमारी, चुनखडी भाजणे, पालख्या वाहणे व शेती-मजुरी करणे हे त्यांचे व्यवसाय आहेत. हे तेलुगू भाषा बोलतात.

विवाहप्रथा – यांच्यांत बालविवाह व प्रौढविवाह दोन्ही रूढ आहेत. बसवीचीही चाल आहे. यांचा विवाहविधी असा – वधू-वर एकमेकांच्या कपाळावर जिरेमिश्रित कुंकू लावतात. सप्तपदी झाल्यानंतर वधू वराच्या पायाच्या बोटांत एक वळे घालते. मग वर तिच्या गळचात मंगळसूत्र बांधतो. नंतर त्या दोघांना नांगराच्या जोखडावर बसवून त्यांच्या पदरांना गाठ बांधतात. मग त्यांना अस्वल दाखवतात. त्यानंतर वधू-वर सकाळ-संध्याकाळ एकमेकांवर फुले उधळतात.

प्रसूतिप्रथा – अकराव्या दिवशी मुलाचे नाव ठेवतात. तीन महिन्यांनंतर मुलाच्या कपाळावर गोंदवून घेतात. मूल सारखे आजारी पडू लागल्यास त्याचे नाव बदलतात.

देवधर्म – यांच्यांत शैव आणि वैष्णव असे दोन्ही पंथ आहेत. बेस्तांची मुख्य देवता म्हणजे नदी होय. हनुमान, काममम्म, अशा त्यांच्या अन्यही देवता आहेत.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात. मृताचा जीवात्मा कावळ्याच्या शरीरात राहतो, अशा समजुतीने ते पाचव्या दिवशी कावळ्यांना तिलांजली देतात. [ट्रा. का. सं. प्रॉ. इं.; का. ट्रा. स. इं.; मैसोर गॅझे.; म. ज्ञा. को.]

बेहमाता राजस्थानमधील एक देवी. तिथल्या लोककथांमधून ब्रह्याचे चित्रण बेहमाता या स्त्रीरूपात झालेले आढळते. बेहमाता ही एक वृद्ध स्त्री असते आणि जीवमात्रांचे ललाटलेख लिहिण्याचे काम करते. तिने ज्या गोष्टी जीवाच्या भाळी लिहिल्या असतील, त्या अटळ असतात. 'बेह का घाल्या ना टळै' = बेहमातेने लिहिले ते टळत नाही, अशी राजस्थानात म्हणच आहे. राजस्थानातील बेहमातेचे महाराष्ट्रातील सटवीशी बरेच साम्य आहे. पण राजस्थानात ब्रह्याचे नारीरूपात दर्शन हा एक विलक्षण भाग मानावा लागेल. शक्तिमान आणि शक्ती यांच्यांतील हा अभेद समजला गेला असावा. [श्री. मनोहर शर्मा– वरदा, जुलै १९५९]

बैगा एक आदिवासी जमात. यांची वस्ती मध्य प्रदेशातील डोंगराळ भागात आढळते. हे लोक आपल्या उत्पत्तीसंबंधी बऱ्याच कथा सांगतात. त्यांतील काही कथा अशा –

(१) परमेश्वराने प्रथम स्त्री-पुरुषांचे एक जोडपे निर्माण केले. या जोडप्याला दोन मुलगे व दोन मुली अशी चार अपत्ये झाली. मुलांनी आपल्या बहिणींशीच लग्ने केली. त्यांपैकी एका भावाच्या संततीला बैगा म्हणू लागले आणि दुसऱ्या भावाच्या संततीला गोंड म्हणू लागले.

(२) भगवानाचा वसिष्ठ मुनी नावाचा एक गुरू होता. काळी नागीण नावाची स्त्री या मुनीची सेवाचाकरी करीत होती. एकदा ती वसिष्ठ मुनीचे कपडे धूत असताँ तिला त्या कपड्यांवर रेतस्खलन झालेले दिसले. मग नागिणीने ते रेत पिऊन टाकले. त्यापासून तिला गर्भ राहिला. यथाकाली प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचे नाव नंगा ठेवले. हाच बैगांचा पूर्वज होय. नंगाने ज्या स्त्रीबरोबर विवाह केला, तिला लोक बैगण असे म्हणत. त्यांना एक मुलगा झाला, त्याचे नाव उर्गण-बैगा असे ठेवले.

बैगा लोक तांबूस काळचा वर्णाचे पण देखणे व सशक्त आहेत. यांच्यांत पुरुषांपेक्षा स्त्रिया कमी सुंदर असतात. लहानपणी मुलांचे नाक व डोके माठरण्याची पद्धत असल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येतो. बैगा लंगोटी नेसतात. 'भगवान देवाने आम्हांला साडे नऊ हात कापड दिले. त्यातील दीड हात ठेवून बाकीचे निरुपयोगी म्हणून आम्ही परत केले,' अशी एक दंतकथा या लोकांत प्रचलित आहे. ते डोक्याला एक फडके व गुंडाळतात अंगात बंडी घालतात. बायका लुगडे नेसतात व बरेचसे दागिने घालतात.

बैगा युवती

बैगा लोक आपल्याला भूमिपुत्र म्हणवितात. त्यामुळेच ते शेतात नांगर चालवीत नाहीत. शेतात नांगर चालवणे म्हणजे आईची आतडी बाहेर काढणे, अशी त्यांची समजूत आहे.

बैगांमध्ये अनेक पोटजाती आहेत. परंतु बैगा हीच जात भुईया जातीची पोटजात आहे, असे काही विद्वानांचे मत आहे. बिंझवार, कुंडी, कुर्क, सावत अशी बैगांच्या पोटजातींची नावे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. यांपैकी प्रत्येक पोटजात आपल्याला इतरांहून श्रेष्ठ समजते. बैगांची चौदा गोत्रें आहेत, त्यांची नावे अशी – तातरिया, सादिया, दारिया, नादिया, साररिया, रोठोरिया, मुडाकिया, बरारिया, धंगारिया, लामोथिया, चांद्रोनिया, कुशारिया, देवाडिया व पंगारिया. समान गोत्रांत विवाह होत नाही.

बैगा लोकांच्या झोपडचा कुडाच्या असून त्या लंबचौकोनी असतात. त्यांची बसायची, जेवायची व झोपायची जागा एकच असते. धान्याची कणगी मधोमध ठेवून झोपडीचे दोन भाग केलेले असतात. निरनिराळ्या ठिकाणी राहून झाडे तोडण्याचे काम त्यांना करावे लागत असल्यामुळे ते पक्की घरे बांधीत नाहीत.

या लोकांना स्वच्छतेची जाणीव फारशी नसते. पिण्यापलिकडे पाण्याचा उपयोग असतो हे त्यांना ठाऊक नाही. शौचशुद्धीसाठीही ते पाण्याचा वापर करीत नाहीत. शौचासाठी पाणी वापरले तर साप चावतो, अशी त्यांची समजूत आहे. जे लोक अलिकडे शौचासाठी पाणी वापरू लागले आहेत, त्यांची एक निराळीच जात बनली आहे.

कंदमुळे, फळे, शिकार व मासे हे त्यांच्या उपजीविकेचे पदार्थ होत. हे लोक मध व टोपल्या विकतात; थोडचा प्रमाणात गायीही पाळतात. त्याचप्रमाणे कोंबडी, बकरी, डुकरेही पाळतात. यांना मोलमजुरी आवडत नाही. झूमपद्धतीने ते शेती करतात. दर तीन वर्षांनी शेतीची जमीन बदलतात.

बैगा स्त्रियांना गोंदून घेण्याची फार आवड असते. मेल्यानंतर गोंदणेच फक्त आपल्याबरोबर येते, अशी त्यांची धारणा आहे. मुलगी जाणती झाली म्हणजे तिच्या छातीवर व हातावर गोंदून घेतात. लग्नापूर्वी पायावर गोंदून घेत नाहीत. लग्नापूर्वीच्या व लग्नानंतरच्या गोंदण्याच्या आकृती भिन्न भिन्न असतात. बायकोच्या अंगावर गोंदण्याचे काम चालू असता नवऱ्याने ते बघता कामा नये, असा संकेत असतो. गोंदल्यानंतर दोन दिवस त्या स्त्रीला रजस्वलेप्रमाणे वागवतात.

विवाहप्रथा – यांच्यांत आतेबहिणीशी विवाह करतात. प्रौढ विवाहाची पद्धत आहे. मुलीला मागणी घातल्यावर तिच्या संमतीने लग्न ठरवतात. लग्नसमारंभ मुलीच्या घरी होतो. मुलाच्या बापाला मुलीसाठी देज द्यावे लागते. देज देण्याची ऐपत नसल्यास मुलाला आपल्या भावी सासऱ्याकडे काही काल नोकरी करावी लागते. अशा मुलाला लामसेन म्हणतात. साखरपुड्याच्या दिवशी मुलाचा बाप दोन बाटल्या दारू आणतो. त्यांतील काही दारू तो बडा देवासमोर ठेवतो व उरलेली साखरपुड्याला हजर असणाऱ्या लोकांना देतो. त्यानंतर काही दिवसांनी वरपक्षाकडील मंडळी तशीच दारू घेऊन वधूगृही जातात. तिथे त्यांना मेजवानी मिळते. तिथे विवाहाचा दिवस नक्की करतात. या विधीला बारोखी असे म्हणतात. ठरलेल्या दिवशी नवऱ्या मुलाकडची माणसे नवरीच्या घरी येतात. या वऱ्हाडाबरोबर बायका नसतात. वऱ्हाड वधूगृही आल्यावर जेवणावळ होते आणि रात्रभर नृत्य चालते. दुसऱ्या दिवशी दुपारी मांडवात एक खांब पुरतात. मग वधू-वर त्या खांबाला पाच प्रदक्षिणा घालतात. हा विधी झाल्यावर नवरीमुलगी नवऱ्या मुलाच्या घरी जाते. तिच्याबरोबर तिचे आई-वडीलही जातात. तिथेही मांडवात एक खांब असतो. तिथे वधू-वरांना त्या खांबाभोवती सात प्रदक्षिणा घालाव्या लागतात. नंतर मेजवानी व नृत्याचा कार्यक्रम होतो. वधू-वर एकमेकांवर मका उधळतात. मग नवरामुलगा नवरीच्या हातात एक आंगठी घालतो. मुलीचे आई-वडील नवऱ्या मुलाचे पाय धुतात. मग गृहप्रवेश व जेवण होते. याशिवाय त्यांच्या पोटजातीत विवाहाचे विविध प्रकार आढळतात. लग्नाला ब्राह्मणाची आवश्यकता नसते.

मुलाचा नामकरणविधी त्याच्या जन्मानंतर पंधरा किंवा वीस दिवसांनी करतात. नावाची निवड वृद्धांकडून होते.

नृत्य – या लोकांना नृत्य करणे फार आवडते. त्यांचे नृत्य विशेष कलात्मक नसले, तरी त्यात ते खूप रंगून जातात. स्त्री व पुरुष समोरासमोर रांगा करून उभे राहतात व पखवाजाच्या

बैगांचे नृत्य

तालावर मागे पुढे होऊन नाचतात. स्त्रिया पायाला घुंगुर बांधतात. नृत्य हे त्यांच्या मनोरंजनाचे एकमेव साधन असते.

बैलाला हे शुभ प्रतीक मानतात व उत्सवप्रसंगी बैलाचा मुखवटा घालून नाचतात.

हे लोक एक विचित्र छत्री वापरतात. ती बांबूची बनवलेली असते. पाण्याचा एक थेंबही तिच्यातून आत येऊ शकत नाही. ती हाताने धरावी लागत नाही, तर तिच्या मध्यभागी खोलगट भाग असतो, तो टोपीसारखा डोक्यावर बसवतात.

देवधर्म – बैगा लोकांच्या वस्तीत देवांची स्वतंत्र देवळे नस-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तात. परंतु घरोघर देवाच्या मूर्ती असतात. भगवान देव, बडा देव, ठाकूर देव, वगैरे त्यांचे पुरुष देव असून, धरित्रीमाता ही स्त्री-देवता होय. भीमसेन हा त्यांचा पर्जन्य देव आहे. मृत पूर्वजही त्यांचे देव बनतात. त्यांपैकी आजी दादी नावाची एक स्त्री-देवता असते. तिचे स्थान चुलीच्या मागे असते. नारायण देव हा उंबरठ्याचा देव आहे. जातायेता त्याला लाथाडणे हे शुभदायक मानतात. रातमाई ही रात्रीची देवता. घरात राहून ती मुलांचे रक्षण करते. हे सर्व देव कल्याणकारी असतात. भूतपिशाचांप्रमाणे ते त्रासदायक नसतात.

दसरा-दिवाळी हे सण ते पाळतात. त्यांचा महत्त्वाचा सण म्हणजे चरता हा होय. हा सण पौषात येतो. हा विशेषतः मुलांचा सण आहे. त्या सणात मुलगे साथूची सोंगे घेऊन गावात भिक्षा मागतात. भिक्षा मागताना 'चरता चरता माई मुरगी मारता कोठी की धान हरता,' असे गाणे म्हणतात. बरीच भिक्षा जमल्यावर सर्व मुले नदीकाठी जमतात. तिथे मुली त्या भिक्षेचा स्वयंपाक करतात. मग एक मुलगा कावळा होतो. त्याच्या पानावर फार थोडे अन्न वाढतात. प्रथम कावळा जेवायला बसतो. तो जेवत असता एक मुलगी जळते कोलीत त्याच्या अंगावर फेकते. त्यासरशी कावळा पळून जातो. मग बाकीची मुले जेवण करतात. आई-बाप या दिवशी घरी उपवास करतात.

या लोकांचा शकुनापशकुनावर बराच विश्वास असतो. जंगलात काम करण्यासाठी शनिवार व रविवार ते शुभदायक समजतात. ते सोमवारी तेल गाळतात. मंगळवारी प्रवासाला निघत नाहीत. लांबचा प्रवास करण्यास वुधवार प्रशस्त मानतात. प्रियकराच्या भेटीला गुरुवार शुभदिन मानतात. शुक्रवार हा त्यांचा विश्रांतीचा दिवस असतो. शनिवारी ते लग्ने लावीत नाहीत. प्रवासाला निघताना साप आडवा गेला, तर ते परत फिरतात. पाण्यामध्ये एकच कावळा अंग धुताना दिसला, तर दूरदेशी कोणीतरी आप्त मेला आहे, असे ते समजतात.

मर्तिकप्रथा—मनुष्य मरणार असे दिसू लागल्यावर त्या माणसाला अंथरुणावरून उचलून सारवलेल्या जमिनीवर ठेवतात. त्याच्या तोंडात गोड पदार्थ टाकतात. प्राण गेल्यावर मयत पुरुष असला व त्याला वायको असली तर ती मयताचे कपडे काढून त्याला स्नान घालते. वायको नसेल तर ते काम मुलगा करतो. स्त्री मयत झाल्यास तिची आई किंवा वहीण तिला स्नान घालते. स्नान घातल्यावर मृताचे शरीर तेलहळदीने माखतात व कोऱ्या कापडाने झाकतात. मनुष्य एकाएकी किंवा थोडक्या आजाराने मरण पावला तर त्याला पुरतात; अन्यथा जाळतात. मेलेल्या माणसाने भूत होऊन परत येऊ नये म्हणून, प्रेत तिरडीवरून नेताना प्रेतवाहक नागमोडी चालीने चालतात. प्रेत पुरताना त्याचे डोके दक्षिणेकडे करतात. प्रेत पुरण्यापूर्वी अगर चितेवर ठेवण्यापूर्वी खांदे देणारे लोक प्रेतासकट चितेला अगर खळ-



बैगांची काष्टकला

ग्याला तीन प्रदक्षिणा घालतात. पुरुषाचे प्रेत पालथे व बायकांचे उताणे ठेवतात. प्रेत पुरले असल्यास तिथली थोडी माती बरोबर आणून ती मयताच्या पत्नीला किंवा आईला देतात. तिने मातीला स्पर्श केल्यावर ती माती परत त्या खड्डयात नेऊ टाकतात. प्रेताशेजारी तंबाखू, थाळी, चकमक, इ. मृताच्या वस्तू ठेवतात. प्रेत जाळले असल्यास दहाव्या दिवशी राख भरतात. तिथल्या क्रिया करणारा माणूस ती राख भांड्यात भरतो आणि नदीत टाकून देतो. स्नान करून परत येताना तो भांड्यात नदीचे पाणी आणतो. मग त्या पाण्याने मृताचे नातेवाईक आचमन करतात.

बैगा लोक मृत्यूपेक्षा मृत्यूच्या कारणांना फार भितात. माणूस कशाने मेला हे शोधून काढण्याचा ते प्रयत्न करतात. त्यासाठी प्रेत नजीकच्या ओढ्यावर नेतात. तिथे एक मनुष्य पाण्यामध्ये तेलाचे तीन थेंब टाकतो. तेलाचा थेंब तांबडा झाला, तर मयताने जातिधर्म मोडण्याचे पाप केले असे समजतात. थेंब उलट गतीने वर गेला, तर मयताला भगवानाचे बोलावणे आले असे मानतात. परंतु

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तो थेंब वेडावाकडा गेल्यास पिशाच्चबाधा हे त्याच्या मरणाचे कारण समजतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; से. इं. १९३१; रज:कण.; एन्सा. रि. ए.; भा. आ.]

बैजवाप गृह्यसूत्र हेमाद्रीच्या ग्रंथावरून याचे अस्तित्व कळते. हे शुक्ल यजुर्वेदाचे असावे. मानव गृह्यसूत्राच्या अष्टावक्र या टीकाकाराने व गंगाधर नावाच्या धर्मशास्त्रकाराने त्यातले काही उतारे दिले आहेत. बैजवाप ब्राह्मण व संहिता यांचा अद्यापि पत्ता लागलेला नाही. चरक संहितेत लिहिले आहे, की हिमालयात एकत्र जमणाऱ्या ऋषीं-मध्ये एक बैजवापि नावाचा ऋषी होता. बैजवापांच्या स्मृती-चाही कुठेकुठे उल्लेख मिळतो. [इं. वे. क. सू.; वै. वा. इ.]

बैजू बावरा (इ. स. चे १६ वे शतक) ग्वाल्हेरचा एक प्रसिद्ध गवई. हा तानसेनाचा समकालीन असून, स्वामी हरिदास यांचा शिष्य होता. याच्या विषयी एक आख्या-यिका सांगतात, ती अशी —

तानसेन व बैजू बावरा यांची एकदा गायनाच्या बाबतीत स्पर्धा लागली. बैजूने आपल्या गायनाच्या प्रभावाने रानातल्या हरिणांना मंत्रमुग्ध करून आपल्यापुढे आणले व एका हरि-णाच्या गळ्यात एक माळ बांधून त्याला सोडून दिले. त्या-नंतर तानसेनाने आपल्या गायनाने त्या मालाधारी मृगाला बोलावण्याचा प्रयत्न केला; पण तो मृग परत आला नाही. मग बैजू बावराने पुनश्च गायन आरंभले. ते ऐकून तो मृग परत बैजूकडे आला. बैजूचे हे सामर्थ्य पाहून तानसेनाने आपला पराभव मान्य केला.

बैजू बावरा याचे अनेक शिष्य होते. त्यांपैकी गोपाल नायक हा पुढे प्रसिद्ध गायक झाला. बैजू बावराने बरीच ध्रुपदे रचली असून, त्यांपैकी बरीच रामकल्पद्रुम या ग्रंथात सापडतात. त्यां-पैकी एक ध्रुपद असे —

आंगन भीर भई ब्रजपति के आज नंद महोत्सव आनंद भयो
हरद दूब दधि अक्षत रोरी ले छिरकत परस्पर गावत
मंगल चार नयो ब्रह्मा ईस नारद सुर नर मुनि हरषित
विमानन पुष्प बरस रंग ठयो धन-धन बैजू संतन हित प्रकट
नंद जसोदा ये सुख जो दयो ।।

भावार्थ — व्रजपती नंदाच्या घरी आज नंदलालाचा महोत्सव आहे. सर्व अंगण भरून गेले आहे. दूध, दही, हळद, अक्षता यांची लयलूट आहे. लोक अक्षता, गुलाल उधळीतय आहेत; नाचून गाऊन उत्सव साजरा करीत आहेत. तो सोहळा पाहून आकाशात ब्रह्मा, महेश, नारद, देवगण, मुनिवर यांना अत्यंत हर्ष होत आहे. ते विमानातून पुष्पवृष्टी करीत आहेत. नंद यशोदा यांना व भक्तांना सुख देणाऱ्या श्रीकृष्णाच्या या लीला वर्णन करून बैजू धन्य-धन्य झाला.

बैरागी एक पंथ. सांसारिक इच्छा, आकांक्षा यातून मुक्त होणे आणि कामक्रोधांचे दमन करणे याला विराग म्हणतात. यावरून हा शब्द बनला आहे. बैरागी हा भारतातला एक मोठा संप्रदाय आहे. याच्या अनुयायांची संख्या लाखांनी मोजावी लागेल. बैराग्यांत शैव व वैष्णव असे दोन्ही पंथांचे लोक आहेत. शैव बैराग्यांना कानफाटे म्हणतात. (कानफाटे पाहा)

वैष्णव बैरागी बंगाल व राजस्थान या प्रदेशांत आढळतात. ते विष्णू किंवा त्याचे रामकृष्णादी अवतार यांची उपासना करतात. दक्षिण भारतात रामानुजाचार्यांमुळे व उत्तर भारतात

बैरागी

रामानंदांमुळे वैष्णव बैरागी या पंथाचा प्रसार झाला. त्यांपैकी रामाच्या उपासकांना रामानंदी व कृष्णाच्या उपासकांना निमानंदी असे म्हणतात. त्यांची चिन्हे, तीर्थक्षेत्रे, प्रमाणग्रंथ, दीक्षाविधी, या सर्व गोष्टी भिन्न असतात. शैव बैराग्यांपेक्षा वैष्णव बैराग्यांची साधना सौम्य असते. काही वैष्णव बैरागी कृष्णाला मानतात; पण राधेला मानीत नाहीत. [एन्सा. रि. ए.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बैरोंग नृत्य अंदमान बेटातील लोकांचे एक नृत्य. नव्या वर्षाच्या प्रारंभी या नृत्याचे कार्यक्रम होतात. या नृत्यात तिथले लोक राक्षसांचे व वाघांचे मुखवटे घालून मोठमोठ्या वाद्यांच्या साथीवर नाचतात. साथीला घेतलेल्या वाद्यांतून वेगवेगळ्या जनावरांचे आवाज काढून दाखवणे, हे या नृत्यातले वैशिष्ट्य होय. लामा लोकांचे सिंहनृत्य आणि हे नृत्य यांत बरेच साम्य आहे. [भा. लो. नृ.]

बैल एक पशू. शेतीच्या व इतरही अनेक कामांत उपयुक्त ठरल्यामुळे तो मानवाला प्रिय व पूजनीय ठरला आहे. संस्कृत बलीवर्द या शब्दापासून बैल शब्द बनला असावा, असे म्हणतात. बैलाचे दुसरे संस्कृत नाव वृषभ असे असून, ते वृष्= वर्षाव करणे या धातूपासून बनले आहे. वृष् धातूचा अर्थ वीर्यसेक असाही आहे. बैल हा अतिशय वीर्यवान असा प्राणी मानलेला आहे. वीर्य हे बल व पराक्रम यांचेही द्योतक आहे. त्यावरून ऋग्वेदात अग्नी, इंद्र, इ. देवतांचे बलाढ्यत्व व्यक्त करण्यासाठी त्यांना वृषभ हे विशेषण दिलेले आहे.

शेतीच्या कामी बैलाचा उपयोग कोणत्या कालात सुरू झाला, हे जरी निश्चित सांगता येत नसले, तरी जेव्हापासून शेतीसाठी त्याचा उपयोग सुरू झाला, तेव्हापासून तो शेतकऱ्यांचा जीवनसाथी बनला आहे. ऋग्वेदात बैलासाठी स्वतंत्र सूक्त नसले, तरी शेतीच्या संदर्भात त्याचा निर्देश काही ठिकाणी झालेला आहे. अथर्ववेदात मात्र त्याच्याविषयी स्वतंत्र सूक्त आहे. त्याचा आशय असा –

बैल सहस्र शक्तींनी युक्त आहे. नदीकिनारी त्याची नाना रूपे पाहायला मिळतात. तो गायींचा पती आहे. त्याच्या योगे आमचे अनेक प्रकारे पोषण होते. तो इंद्राचे रूप धारण करून आम्हांला शुभ होवो. त्याच्या ठिकाणी बृहस्पती, इंद्र, वरुण, इ. सर्व देवांची शक्ती आहे. तो साक्षात इंद्र आहे. त्वष्टा आणि वायू यांचे सत्त्व त्याच्यात आहे. त्याच्या शरीरात अनेक देवतांचा निवास आहे. बैलाचे दान करणाऱ्याला देवांच्या कृपेने गायी, प्रजा व शरीरसामर्थ्य लाभते. बैल गोशाळेत राहू दे. त्याच्यासह गायी रमू देत, बागडू देत. बैलाने युक्त असलेल्या गायी आमच्याजवळ राहोत, स्वतः पुष्ट होवोत व आम्हांलाही पुष्ट करोत (अथर्व ९.४).

बैलाच्या वयोमानानुसार त्याच्या निरनिराळ्या अवस्था दाखवणारे अनेक शब्द पाणिनीच्या अष्टाध्यायीत आहेत. बैल लहानपणी केवळ दुधावरच वाढतो, तेव्हा त्याच्या त्या अवस्थेला अतृणाद म्हणत. दूध प्यायचे सोडून तो गवत खाऊ लागला, की त्याला प्रासंग्य म्हणत. तो दोन–अडीच वर्षांचा झाला, की त्याला दित्यवाह; छकड्याला जुंपण्यासारखा झाला, की दम्य व मोठा झाला, की बलीवर्द म्हणत. पूर्ण तारुण्यात आलेल्या बैलाला महोक्ष व म्हाताऱ्या बैलाला वृद्धोक्ष म्हणत.

नांगराला किती बैल जुंपावे याविषयी मतभिन्नता आहे. अथर्ववेद (६.९१.१), तैत्ति. सं. (१.८.७.१), काठक सं. २५.२) यांमध्ये सहा, आठ, बारा व चौवीस बैल नांगराला जुंपल्याचे उल्लेख आहेत. कृषिपराशर नामक ग्रंथात यासंबंधी काही नियम दिले आहेत, ते असे –

(१) आठ बैलांचा नांगर उत्तम होय. (२) धंदेवाईक शेतकऱ्यांनी नांगराला सहा बैल जुंपावे. (३) चार बैलांचा नांगर हा निर्दयपणाचा प्रकार होय. (४) दोन बैलांचा नांगर म्हणजे गोवंशाचे निर्मूलन करणे होय.

हे नियम लोखंडी नांगरासाठी असावे. कारण लाकडी नांगर दोन बैलांना सहजपणे ओढता येतो.

शेतीव्यतिरिक्त गाडी, रथ, मोट, रहाट, ओढणे व गोण्या वाहून नेणे अशा कामीही बैलांचा उपयोग करतात. शेती व अन्य कामांसाठी वापरायचे बैल त्यांच्या वृषणाची शीर बडवून खच्ची केले जातात. प्रजोत्पादनासाठी वापरावयाचा बैल खच्ची न करता ठेवतात.

बैलाच्या अंगी उपयुक्त असे अनेक गुण असल्यामुळे गायीप्रमाणे बैलही अवध्य मानला आहे. बैलाला मारू नये, असे अथर्ववेदात (९.४.१७) व महाभारतात (शांति. २६२.४७) सांगितले आहे.

पोळ म्हणून एखादा बैल गावावर सोडून देण्याची प्रथा प्राचीन काळापासून आजतागायत चालू आहे. गावातल्या गायींना गाभण करण्यासाठी त्याला सोडीत. आश्विन व कार्तिक महिन्यांच्या पौर्णिमेला होणाऱ्या उत्सवांत मुख्यत्वे पोळ सोडीत. सोडण्यापूर्वी त्याला धुवीत, रंगवीत, सजवीत आणि त्याच्यापुढे तशाच सजवलेल्या चार गायी आणून उभ्या करीत. मग त्याच्या कानात 'तू वासरांचा पिता' अशा अर्थाचा एक मंत्र म्हणत. 'हा तुमचा पती आहे' अशा अर्थाचा मंत्र गायींच्या कानांत म्हणत. पोळ म्हणून सोडायच्या बैलाचे वशिंड मोठे, शेपटी मऊ व लांब केसांची, गाल कोवळे, पृष्ठभाग रुंद, डोळे पाणीदार, शिंगे टोकदार, बांधा डौलदार, डरकाळी मेघगर्जनेसारखी असावी व त्याच्या तोंडात अठरा दात असावे, असे मत्स्य पुराणात सांगितले आहे.

दहा गायींच्या कळपात किमान चार बैल असावे, असे अर्थशास्त्रात सांगितले आहे. बैल विकत घेताना प्रथम त्याचे वय विचारात घ्यावे. दात आणि शिंगे यांच्यावरून बैलाच्या वयाचा अदमास घेता येतो. बैल चांगला की वाईट ते ठरवण्याची अनेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लक्षणे आहेत. काळा बैल उत्तम, काळ्या-तांबड्या संमिश्र रंगाचा मध्यम व केवळ शुभ्र वर्णाचा त्याज्य समजावा. ज्याचा



खिलारी जातीचा बैल

पार्श्वभाग रोडावलेला आहे, ज्याचा कान व शेपूट तुटलेले आहे असा बैलही अग्राह्यच. ज्याचे खुर बैंगणी वर्णाचे तो बैल मजबूत व ज्याच्या खांद्यांचा वर्ण निळा, तो बैल मर्द समजावा. शेपटीचा गोंडा काळा व ज्याच्या कानावर केस असतील तो बैल भाग्यवान असतो. लांब शिंगांच्या बैलाविषयी एका लोकगीतात म्हटले आहे, ते असे —

बडसींगा जनि लीजौ मोल । कुएँमें डारो रुपिया मोल ।।

अर्थ — मोठ्या शिंगांचा बैल खरेदी करू नये. तसे करण्याऐवजी ते रुपये विहिरीत टाकावेत.

आखूड आणि आत वळलेल्या शिंगांच्या बैलाला विष्णुस्वरूप मानतात. एक शिंग वर आणि दुसरे खाली वळलेले अशा बैलाला कंसासुरी म्हणतात. करड्या रंगाचा बैल अवलक्षणी समजतात.

बैलाची काळजी कशी घ्यावी आणि त्याला दीर्घायुषी कसे करावे, याविषयी शेतकऱ्यांमध्ये बरेच संकेत आहेत. एका ठिकाणी बैलाच्या मुखानेच ती गोष्ट वदवली आहे—

ना मोंहि नाधो उलिया कुलिया, ना मोंहि नाधो दाएं ।
बीस बरसतक करौं बरदई, जो ना मिलिहैं गाए ।।

भावार्थ — जर मला उखरपाखर शेतात कामाला जुंपले नाही, नांगराच्या उजव्या बाजूला जुंपले नाही आणि जर मला गायी दाखविल्या नाहीत, तर मी वीस वर्षे (शेतकऱ्याला) काम देईन. बैल ब्रह्मचारी राहिला, तर तो गाडी ओढण्यास समर्थ बनतो असे म्हणतात. तसे अथर्ववेदातही म्हटले आहे (११.५.१८).

शेतकऱ्याच्या व्यवहारात बैलाला कुटुंबातील माणसांच्या खालोखाल स्थान असते. शेतकरी आपल्या बैलावर मुलामाणसांसारखेच प्रेम करतो. या गोष्टीचे प्रतिबिंब सर्व भारतीय लोकसाहित्यात पाहायला मिळते. शेतीशी बैलाचे नित्य साहचर्य असल्यामुळे कृषिजीवनात बैलाविषयी काही संकेत निर्माण झाले आहेत, ते असे —

नांगरताना बैल बसला तर गावातल्या जनावरांत हगवणीची साथ पसरते. नांगरट चालू असताना बैल जू मोडून पळाला, तर शेत पिकत नाही आणि शेतकऱ्याला आजार होतो. नांगराला जुंपलेला बैल डरकाळ्या फोडू लागला, तर पीक चौपट येते. नांगरटीच्या वेळी बैल एकसारखा हगत राहिला तर पीक वाढते. तो मुतू लागला तर शेतावर पूर येतो.

हडप्पा आणि मोहेंजदडो या ठिकाणी झालेल्या उत्खननात बैलाचे चित्र असलेल्या अनेक मुद्रा सापडल्या आहेत. या मुद्रांवरील बैलांची शिंगे मोठी असून, ती बाकदार आहेत. या चित्रात बैलाचा वृषण पुष्ट दाखवलेला असतो. सिंधू संस्कृतीतले लोक वृषभपूजक असावे, असे अनुमान यावरून करता येते.

वृषभपूजेचा संबंध प्रजननाशी आहे. भारतात कित्येक आदिवासी जमातींत बैलाची शिंगे मुकुटासारखी आपल्या डोक्यावर बसवून नृत्य करण्याची प्रथा आहे. बैलाच्या शिंगात अतिमानवी शक्ती, प्रजननशीलता, पावित्र्य, यश आणि समृद्धी या गोष्टी वास्तव्य करतात अशी त्यांची समजूत असल्यामुळे, धार्मिक नृत्यांच्या वेळी ते डोक्यावर शिंगे धारण करून नाचतात.

शैव संप्रदायात बैल हा शिवाचे वाहन ठरला आहे. शिवमंदिरात शिवाच्या पुढे नेहमी बसलेला बैल असतो. त्याला नंदी अशी संज्ञा आहे. त्या नंदीमूर्तीच्या वृषणाला हात लावून त्याच्या दोन्ही शिंगांच्या मधून शिवदर्शन घ्यावे, असा संकेत आहे. वीरशैव संप्रदायात नंदीचे माहात्म्य फार आहे. वीरशैव लोक नंदीला बसव म्हणतात. म्हैसूरजवळ बसवनगुडी नावाचे एक बैलाचेच मंदिर आहे. तिथे त्याची नित्य पूजाअर्चा चालते. रुद्राला तैत्तिरीय संहितेत गोमृग म्हटले आहे, त्या विशेषणावरून पुढे बैल हे शिवाचे वाहन कल्पिले असावे. शिवाला प्रजापतीकडून वृषभ हे वाहन मिळाले, असा उल्लेख महाभारतात आहे.

पावसाळ्यातली शेतीची कामे संपल्यानंतर श्रावण किंवा भाद्रपद अमावास्येला अथवा अन्य कोणत्यातरी दिवशी बैलांचा सण साजरा करण्याची प्रथा सर्वत्र आहे. त्या सणाला बैलपोळा किंवा बेंदूर असे नाव आहे. त्या दिवशी बैलांना तेल लावून आंघोळ घालतात, गोडधोड खायला घालतात, अनेक प्रकारे सजवतात व वाद्ये लावून त्यांच्या मिरवणुकाही काढतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शेतकऱ्यांच्या जीवनातला तो एक फार मोठ्या आनंदाचा दिवस असतो. कित्येक सणांच्या दिवशी बैलांच्या शर्यती लावण्याची प्रथाही भारतात सर्वत्र आहे. बैलाला सजवून व काही खुणा शिकवून दारोदार भटकणारे आणि त्यावर उपजीविका करणारे काही लोक आहेत. महाराष्ट्रातले ठाकर व कर्नाटकातले गंगेड्डू त्यांपैकीच होत. पाहा–नंदी. [पृथिवीपुत्र; अँ. भां. ओ. रि. इं., १९५५; बे. फू. आ. रा.; प. का. भा.]

बैलगाडी एक वाहन. या वाहनाला बैल जुंपलेले असतात. म्हणून याला बैलगाडी असे म्हणतात. मोहेंजोदडो येथील सिंधू संस्कृतीच्या उत्खननात बैलगाड्यांचे खेळणी या स्वरूपातील नमुने सापडले आहेत. हा भारतातील बैलगाड्यांचा अत्यंत प्राचीन नमुना होय. हडप्पा येथे एका स्मशानभूमीचे उत्खनन करीत असताना बैलगाडीच्या चाकोरीचा रस्ता सापडला आहे. यावरून सिंधू संस्कृतीचे लोक गाडीचा उपयोग जाणत होते व त्यांच्या गाड्या बैलांकरवी ओढल्या जात होत्या, हे दिसते. इथल्या उत्खननात उपलब्ध झालेल्या चाकोरीवरून गाडीच्या दोन चाकांमधील अंतर सुमारे तीन फूट आणि सहा-सात इंच असावे, असे संशोधकाचे मत आहे. अशा तऱ्हेच्या गाड्या आजही पंजाब व सिंधमध्ये दिसून येतात. शिवाय हडप्पाच्या प्राचीन वस्तूंत तांब्याच्या गाडीचा एक नमुना उपलब्ध झाला आहे. ती गाडी एका बैलाची आहे. सांप्रत या गाडीला आपण एक्का किंवा छकडा म्हणून ओळखतो. ती गाडी उघडी म्हणजे छप्पर नसलेली असते. पुढच्या बाजूला गाडीवानाला बसण्यासाठी उंच बैठक केलेली आढळते.

ऋग्वेदातल्या पुढील ऋचेत रथ या नावाने ज्याचा उल्लेख आहे, तो बैलगाडीच असावी –

स्थिरौ गावौ भवतां वीळुरक्षो मेषा वि वर्हि मा युगं वि शारि ।
इन्द्रः पातल्ये ददतां शरीतोररिष्टनेमे अभि नः सचस्व ।।

(ऋ. ३·५३·१७)

अर्थ – बैल स्तब्ध उभे राहोत. (गाडीचा) आस घट्ट राहो. तिच्या दांड्या न तुटोत आणि जू न मोडो. तिचे खिळे मोडायच्या अगोदर इंद्र तिला व्यवस्थित राखो. हे रथा, तुझ्या कुण्या शाबूत राहून तू आम्हांस वाहून ने.

ऋग्वेदकालीन सांस्कृतिक इतिहास या ग्रंथात श्री. चिं. ग. काशीकर लिहितात – बैलगाडी (अनस्) व रथ यांच्या रचनेत काय फरक होता, हे समजण्यास मार्ग नाही किंवहुना फरक होता की नाही, हेही निश्चित समजत नाही. रथाच्या चाकांच्या तुंब्यातील छिद्र हे गाडीच्या चाकाच्या छिद्रापेक्षा मोठे होते, एवढी माहिती वेदांवरून मिळते.

प्राचीन काळी शेतीचा व अन्य माल वाहण्यासाठी जसा गाडीचा उपयोग करीत, तसा युद्धोपयोगी साधने वाहून नेण्यासाठीही तिचा उपयोग करीत, असा उल्लेख महाभारतात आहे (कर्ण. ६७·६; ७६·१७). मात्र अशा गाड्यांना सहा किंवा आठ बैल जुंपलेले असत. सुतारांकरवी शिसवीच्या किंवा खैराच्या लाकडाच्या गाड्या तयार करून घेत. प्राचीन बौद्ध व जैन वाङ्मयातही बैलगाड्यांसंबंधी विपुल उल्लेख मिळतात. बैलगाडी हे प्राचीन काळापासून आजतागायत असलेले एक अत्यंत गरजेचे वाहन होय. पाहा – रथ. [ऋ. सां. इ.; सिं. ऋ. हिं.; म. का. स.; स्ट. इं. क. हि.]

बैलाटम कर्नाटक प्रदेशातील एक लोकनाट्य. बैल = मैदान किंवा पटांगण व आटम = नृत्यनाट्य. यावरून माळमैदानावरचा खेळ असा त्याचा अर्थ कानडीत होतो. महाराष्ट्रातील तमाशासारखे याचे स्वरूप असते. बैलाटम व पारिजातक हे दोन नाट्यप्रकार प्राचीन काळापासून कर्नाटकात लोकप्रिय आहेत. बैलाटममध्ये नाट्यासाठी लंकादहन, कर्णार्जुनयुद्ध, कुरुक्षेत्र, राजा हरिश्चंद्र, भक्त प्रल्हाद, इ. पौराणिक कथाभाग घेतलेले असतात; तर पारिजातकामध्ये श्रीकृष्णसत्यभामा किंवा श्रीकृष्ण-रुक्मिणी यांची कथा असते. पारिजातक या नाट्य-प्रकाराचा प्रचार महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सीमेवर विशेष असल्यामुळे त्यात भरपूर प्रमाणात मराठी संगीत आढळते. बैलाटम हा प्रकार कर्नाटक व तमिळनाडच्या सीमेपर्यंत प्रचलित आहे. त्यामुळे यावर दक्षिणी कथक नृत्याची छाया दिसते. बैलाटमचे प्रयोग मारुतीसमोरच्या किंवा चावडीसमोरच्या मोकळ्या मैदानात होतात.

या प्रयोगात स्त्रियांच्या भूमिका पुरुषच करतात. स्त्रीपात्रांचे पोषाख भडक रंगाचे असतात. त्यांच्या अंगावर दागिनेही खूप असतात. डोक्यावर किरीटही असतो. दुःखी स्त्री पाठीवर केस मोकळे सोडते. पुरुषपात्रे धोतराचा काचा मारतात. त्यांच्या अंगात रेशमी किंवा सॅटिनचा गंजिफ्रॉक असतो. ते देवदाराच्या लाकडापासून बनविलेली व सोनेरी रंग दिलेली किरीट-कुंडले घालतात व पायात घुंगरू किंवा चाळ बांधतात.

या खेळात सारथी नामक पात्र फार महत्त्वाचे असते. हा विनोदी नट असून, रंगभूमीवर येणाऱ्या नव्या पात्रांची प्रेक्षकांना ओळख करून देणे, हे त्याचे काम असते. सर्कशीतील विदूषकाप्रमाणे किंवा तमाशातील सोंगाड्याप्रमाणे सारथी सर्व कामांत तरबेज असतो. मात्र तो हे सर्व आपण अडाणी असल्याचा आव आणून करतो.

एका प्रदीर्घ कथागीताच्या आधारे बैलाटम चालते. हे गीत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सामुदायिक म्हटले जाते. त्यात सर्व पात्रे, वादक व इतर साहाय्यकही भाग घेतात. त्यामुळे ते गाणे बेसूर होते. या नाटचाची भाषा कधी विनोदी, कधी आवेशयुक्त, तर कधी भावनाप्रधान असते.

नृत्य व संगीत हे या नाटचाचे वैशिष्टच आहे. त्यात रागदारीवर भर नसला; तरी शंकरा, अडाणा, मालकंस, भूप, तिलंग, इ. रागांची छाया त्यात दिसते. स्त्रीपात्रांच्या तोंडी ठुमरीवजा पदे असतात. यात कानडीबरोबरच मराठी, हिंदी व उर्दू गाणीही गायिली जातात. गाण्याला पेटी, व्हायोलीन व मृदंग यांची साथ असते. मृदंग फार मोठा असतो. कथक नृत्याचा या नाटचावर प्रभाव असल्यामुळे 'थई तोम् ता' अशासारखे बोल म्हणत पात्रे भरपूर नृत्य करतात. स्त्रीपात्रांचा नृत्यप्रकार थोडा वेगळा असतो. त्या दोन्ही पाय समांतर रीतीने जलद लयीत आपटत व डुलत नाचतात. युद्धप्रसंगी 'धितँ धितँ' असे बोल मृदंगावर व तोंडाने काढतात. युद्धनृत्यात जोराचे पदाघात व शस्त्रांचे खणखणाट चालतात. नृत्य रंगात आले, की पडद्यामागे उखळी बार काढतात. भरपूर विनोद, पौराणिक कथा, मधेच वेदान्ताचे प्रवचन, संगीत व नृत्य यांमुळे हा नाटचप्रकार फार मनोरंजक वाटतो. रात्ररात्र याचे प्रयोग चालतात. प्रयोगाच्या शेवटी आरती होते. नंतर सर्व पात्रे 'सांब शिव, शंभो महादेव' हे भजन म्हणत गावातील मंदिरात दर्शनाला जातात.

यात काम करणारे नट बहुतेक लोहार, सुतार, सोनार, शिंपी या जातीचे असतात. हे लोक आपला व्यवसाय सांभाळून हे प्रयोग करतात. सांप्रत मात्र ही कला मागे पडत चालली आहे. [श्री. एस्. ए. कुलकर्णी—स्वराज्य, १३ मे १९६१.]

बोंगा मुंड आदिवासींचा देव. हा भूतयोनीपैकीच एक देव आहे. मुंडांच्या प्रत्येक वाडीत मूळ वसतिस्थापकाच्या घरासमोर बोंगाचे स्थान असते. त्याच्या नावाने मातीचा लहानसा चौथरा उभारून ठेवतात. त्याच्या भोवती मोकळी जागा असते. त्या जागेत नृत्ये व ग्रामपंचायतीच्या सभा होतात. प्रमुख सणांच्या दिवशी ग्रामप्रमुख बोंगाला बळी देतो.

परगन बोंगा, सिम बोंगा, बुऱ्हे बोंगा, इकरी बोंगा असे बोंगांचे अनेक प्रकार आहेत. बोंगा सुष्ट, तसेच दुष्टही असतात. मुंड लोक निसर्गशक्तीलाही बोंगाच म्हणतात. ही शक्ती प्रत्येक वस्तूत वास करते व माणसांच्या सामाजिक व वैयक्तिक आचरणांचे नियमन करते, अशी त्यांची धारणा आहे. पाऊस पाडणे; वादळे, महापूर, इ. उत्पात निर्माण करणे व त्यांवर प्रतिबंध घालणे हेही काम तिचेच होय, असे ते मानतात.

वेगवेगळे बोंगा हे तलाव, ओढे, रिकामी घरे, झाडांची खोडे, श्मशाने, पडक्या विहिरी, जंगले, इ. ठिकाणी राहतात. कित्येक ठिकाणी अनेक बोंगांचा एक गटही असतो. जे बोंगा दुष्ट असतात, त्यांना मांत्रिक व चेटकी लोक वश करतात व त्यांच्याकडून आपणांला हवी ती कृत्ये करून घेतात.

सिम बोंगा हा सर्वांत भयंकर बोंगा होय. तो महामारी व रोगराई उत्पन्न करतो. गावात अशा रोगांची साथ आली, की सिम बोंगाला बलिदान करतात. मुंडांमध्ये कुदुम नायकी नावाचा एक पुरोहित असतो. सिम बोंगाला बलिदान देण्याचा विधी तोच पार पाडतो. [एन्सा. मुंडा.]

बोंडानाच एक लोकनृत्य. सातपुडा भागात राहणारे आदिवासी लोक हे नृत्य करतात. नाच करणाऱ्या लोकांजवळ राम, सीता, रावण, हनुमान, इत्यादींचे लाकडी मुखवटे असतात. सुगीच्या दिवसांत बोंडा नाच करणारे लोक ढोल व शिंग ही वाद्ये व मुखवटे घेऊन प्रवासाला निघतात. ज्या गावात नृत्य ठरते, त्या ठिकाणी एखाद्या टेकडीवर जाऊन ते ढोल वाजवतात. त्यामुळे त्या टापूतील सर्व लोकांना त्यांच्या आगमनाची वार्ता समजते. नृत्याच्या वेळी ते तोंडावर मुखवटे चढवितात व त्याला अनुरूप असा पोषाखही घालतात. त्यांच्यांतील एक जण नृत्य करतो, दुसरा वाद्ये वाजवितो आणि तिसरा नृत्याचा इतिहास सांगतो. नृत्य संपल्यावर तिथे जमलेले लोक त्यांना यथाशक्ति धान्य देतात. हे लोक केवळ या नृत्यावरच आपली उपजीविका चालवतात. [म. लो. मा. पुष्प ४ थे]

बोंडो एक वन्य जमात. हिची वस्ती ओडिसा राज्यात आहे. ऑस्ट्रो-एशियाटिक वंशातील ही एक जमात आहे. तीन हजार फूट उंचीवरील डोंगराळ व जंगली प्रदेशात यांचे वास्तव्य असल्यामुळे सुसंस्कृत जगाशी पूर्वी त्यांचा फारसा संबंध येत नसे. खून आणि मारामारी अशा गुन्ह्यांबद्दल या लोकांची फार प्रसिद्धी होती.

हे लोक रानावनातील कंदमुळे व फळे आणि शिकार यांवरच आपली उपजीविका करीत; पण सांप्रत ते शेतीही करतात व आसाममधील चहाच्या मळ्यांत मजुरीही करतात.

या लोकांचा वर्ण काळा आणि नाक रुंद व बसके असते. पुरुष कमरेला लंगोटी लावतात. त्यांच्या हातात चांदीची कडी व गळ्यात चांदीचे अलंकार असतात. पुरुष डोक्यावर थोडे केस वाढवतात. याउलट त्यांच्या स्त्रिया मात्र डोक्याचे मुंडन करतात. डोक्याभोवती त्या ताडापासून बनवलेल्या पट्ट्या बांधतात. त्यांच्या कानात लोंबणारी कर्णभूषणे असतात व हातात चांदीची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक जाड कडी असतात. गळ्यात चांदीची अनेक गोल कडी व रंगीबेरंगी मण्यांच्या असंख्य माळा असतात. कमरेभोवती त्या लहानसे कापड गुंडाळतात. क्वचित त्या छातीवरही एखादे उत्तरीय पांघरतात. मुदार नामक एका वनस्पतीपासून त्या तंतू काढतात लाल, काळ्या किंवा पिवळ्या रंगाने ते रंगवतात व त्यांचे घरीच हातमागावर आपल्यापुरते कापड विणतात.

भात हे यांचे मुख्य अन्न होय. हे लोक उंदीर, मासे व शिकारीत मिळालेले पशुपक्षी खातात. मुख्यत्वे त्यांच्या स्त्रियाच वेताच्या लांबट टोपल्या घेऊन नदीत मासे पकडतात. धनुष्यबाण हे पुरुषांचे प्रमुख हत्यार असून, नेमबाजी करण्यात ते पटाईत असतात. पुरुषांचा बराचसा वेळ मद्यपान व शिकार यांत जातो.

डोंगरमाथ्यावर थोडी जागा साफसूफ करून हे आपल्या झोपड्या उभारतात. घराच्या एका बाजूला थोडा आडोसा केलेला असतो. तिथे ते स्वयंपाक व जेवण करतात.

विवाहप्रथा – प्रत्येक गावात तरुण अविवाहित मुलींसाठी एक शयनगृह असते. त्याला सेलानी डिंगो असे नाव आहे. संध्या-

बोंडो युवती

काळच्या वेळी सर्व तरुणी तिथे जमतात. आपल्या आवडीचा वर निवडणे हा सेलानी डिंगोत येण्याचा मुख्य उद्देश असतो. साधारणपणे एका गावातील तरुण दुसऱ्या गावातील सेलानी डिंगोत जाणे पसंत करतात. त्यासाठी त्यांना अनेक मैल जंगल तुडवीत जावे लागते. जाताना ते आपल्याबरोबर अंगठ्या, माळा व इतर भेटवस्तू नेतात. सेलानी डिंगोतील मुली भाजलेले उंदीर व ताडी देऊन त्यांचे स्वागत करतात. तिथेच ते आपली सर्व रात्र घालवतात. सर्वजण एकत्र नाचतात, गातात, चेष्टामस्करी करतात. दोन-तीन महिने सतत परिचय झाल्यानंतर एखादी तरुणी एखाद्या तरुणावर आसक्त होते. तेव्हा तिची परीक्षा पाहण्यासाठी तो तिच्या अंगाला जळते कोलीत लावण्याचा प्रयत्न करतो. अशा वेळी ती तरुणी दूर पळाली, तर तिला हा संबंध पसंत नाही, असे समजतात. उलट ती जर त्याच्या अंगावर थुंकली किंवा आपणही एक कोलीत घेऊन त्याला ते लावायला धावली, तर ती त्याच्यावर अनुरक्त आहे, असे समजतात. यानंतर शेवटची परीक्षा म्हणून तो तिच्या हातात कंकण घालतो. त्या वेळी तिने प्रतिकार केला नाही, तर ती त्याचीच आहे, असे ठरते आणि ती दोघे एकमेकांचा अधिक परिचय करून घेण्यासाठी रानात निघून जातात. त्यानंतर त्यांचा विवाह पक्का होतो.

याशिवाय, मुलीचे अपहरण करून लग्न करण्याचीही पद्धत बोंडो लोकांत आहे. एखाद्या युवकाला एखादी युवती पसंत असली, तर त्याचे मित्र तिला पळवून त्याच्या घरी आणतात. तिथे तिला भात जेवायला वाढतात. त्या तरुणाबरोबर जर तिने भात खाल्ला, तर तिला हा संबंध पसंत आहे, असे मानतात. त्या रात्री ती आपल्या भावी पतीबरोबर तिथल्या सेलानी डिंगोत रात्र घालवते आणि दुसऱ्या दिवशी आपल्या गावी परतते. नंतर मुलाची आई मुलीच्या घरी जाऊन विवाह नक्की करते. लग्न झाल्यावर वधूचे सासूसासरे तिला काही तरी सांगतात, तेव्हा ती पळून जाते. वरही कुठेतरी लपून बसतो. तेव्हा गावचे लोक त्यांना शोधून काढून एका रिकाम्या झोपडीत नेतात, त्यांच्या अंगावर बर्फासारखे थंड पाणी ओततात, त्यांची वस्त्रे काढून टाकतात व झोपडीचे दार बाहेरून बंद करून निघून जातात.

देवधर्म – या लोकांची पूर्वी स्वतःची अशी देवदैवते होती. महाप्रभू हा त्यांचा श्रेष्ठ देव होय. पण सांप्रत हिंदू लोकांशी संबंध आल्यामुळे ते हिंदू देव-देवतांना भजू लागले आहेत. रामायण, महाभारत व पुराणे यांमधील कथांचा त्यांच्यांत प्रसार झाला असून, त्यांच्या मूळ कथांना गौणत्व प्राप्त झाले आहे. ते देवतांना बळी देऊन संतुष्ट राखतात.

एखादा माणूस आजारी पडला, तर भगताला बोलावतात. तो त्याच्यावरून कोंबडे उतरून टाकतो, लोखंडी तुकड्यांनी त्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंग रगडतो व गवताची बाहुली करून तिचे कुऱ्हाडीने तुकडे करतो. मग या सर्व वस्तू लोक गावाबाहेर ठेवून येतात. असे केल्याने रोग गावाबाहेर जातो, अशी समजूत आहे.

सण–उत्सव – या लोकांत अनेक सण व उत्सव असतात. बहुतेक सणांचे विधी सारखेच असतात. प्रत्येक सणाच्या आधी धान्य जमवणे, दारू गाळणे, नृत्याचे खास वेष तयार करणे, इ. प्राथमिक कामे असतात. त्यांच्या प्रत्येक सणात नाच असतो. तो रात्री जेवणानंतर सुरू होतो व पहाटेपर्यंत चालतो. प्रत्येक सणात मुख्य देवतेबरोबर काही क्षुद्र दैवते, भूतपिशाचे व पितर यांना पुजून भात व मद्य यांचा नैवेद्य दाखवतात.

पीकपाणी विपुल यावे, म्हणून ते दरवर्षी धरित्रीची पूजा करतात. त्यासाठी गावातील एका पवित्र शिळेवर व इतर देवांच्या दगडी प्रतीकांवर, डुकराचे रक्त शिंपडतात व गावातील प्रत्येक घरातून आणलेले मूठ मूठ धान्य भगत त्या पवित्र शिळेवर रक्तात भिजवतो. मग भोजन होते. दिवाळीत ते पिकांची पूजा करतात आणि मगच नवीन धान्य खायला सुरुवात करतात.

पौष-पौर्णिमेला त्यांचा गवत कापायचा सण सुरू होतो व तो दहा दिवस चालतो. चवथ्या व दहाव्या दिवशी भगत रानात जाऊन गवत व सुतासाठी लागणाऱ्या झाडाच्या फांद्या कापण्याचा मुहूर्त करतो आणि नंतर इतरांना गवत कापायची परवानगी मिळते. या सणात गावातील पवित्र शिळेजवळ लोक जमतात व दोघेजण भगताच्या घरचा ढोल आणून वाजवू लागतात. मग दोन मुले समोरासमोर उभी राहून एकमेकांना छड्यांनी मारायला सुरुवात करतात. ती दोघे दमेपर्यंत हा कार्यक्रम चालतो. मग त्यांची जागा दुसरी जोडी घेते. मग भगत त्यांना खाऊ देतो व रागाच्या भरात एकमेकांना न मारण्याचा उपदेश करतो. एकमेकांची प्रतिस्पर्धी असलेली मोठी माणसेही या मारामारीत भाग घेतात आणि शेवटी काठ्या टाकून एकमेकांना आलिंगन देतात.

बोंडो लोकांचा सर्वांत मोठा सण चैत्र महिन्यात येतो व तो पंधरा दिवस चालतो. रोज शिकार करणे, आंब्याचे फळ प्रथमच खाणे व प्रत्येक देवतेची व पितरांची पूजा हे या सणाचे विशेष आहेत. तिसऱ्या दिवशी भगताची बायको दारू बनवते. सातव्या दिवशी ती सर्वांना वाटतात. सहाव्या व सातव्या दिवशी जंगल जाळून साफसूफ करतात व दहाव्या दिवशी बुरगांगला म्हणजे धरतीमातेला बळी अर्पण करतात. त्या दिवसापासून आंबा खायला सुरुवात करतात. हा सण चालू असेपर्यंत कुणीही परगावी जायचे नसते व बाहेरच्या माणसाने गावात यायचे नसते. सणाच्या शेवटच्या दिवशी गावातील सर्व लोकांचे धनुष्य–बाण एका टेंभुर्णीच्या झाडाखाली जमवतात व भगत त्यांची पूजा करतो.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात. मृताशौच तिसऱ्या दिवशी संपते. त्यासाठी तिसऱ्या दिवशी पुढील विधी करतात– गावचा भगत किंवा मृताच्या घरचा एखादा इसम पहाटे उठून एका द्रोणात अंडे व पाणी यांचे मिश्रण करतो व ते गवताच्या काडीने प्रत्येक घराच्या छपरावर शिंपडतो. त्यामुळे लोक आशौचातून मुक्त होतात. मृताच्या अस्थी जर ठिसूळ झाल्या असतील, तर त्याचा मृत्यू नैसर्गिक होता व त्या जर काळ्या पडल्या असतील, तर मृत्यू जादूटोण्यामुळे आला, असे समजतात.

दहाव्या दिवशी मृताचे आप्तेष्ट थोडे तांदूळ व ताडी घेऊन मृताच्या घरी जमतात. त्या दिवशी सकाळी लवकरच भगत भुताखेतांच्या नावे चुलीत थोडी ताडी ठेवतो. ती पिऊन भुतांनी संतुष्ट व्हावे व त्या दिवशीचा स्वयंपाक बिघडू नये, अशी त्यामागची कल्पना असते. त्या दिवशी एक बैल एकाच घावात मारून त्याचे मांस शिजवतात. शिजवलेला भात सात द्रोणांत घालून मृताचे आप्त तो स्मशानात नेऊन ठेवतात. नंतर भगत स्वतः स्मशानात जाऊन भुतासाठी काही अन्न ठेवतो. मग सर्व लोकांचे भोजन होते. या दिवशीच्या विधीत भाग घेतलेल्या लोकांना भूतबाधा होऊ नये, म्हणून त्याच दिवशी संध्याकाळी एक विधी करतात, तो असा – भगत काही मुलांसह विशिष्ट झाडांच्या डहाळ्या घेऊन झऱ्यावर जातो व त्याच्यावर पूल बांधतो. तो भुताखेतांना बरोबर आणलेले अन्न ठेवतो. गावकरी व मृताचे आप्तेष्टही एवढ्यात तिथे जमतात. मृताची मुलगी केरसुणी व बांबूचा पंखा घेऊन झऱ्यावर येते. भगत तिच्यावरून भात ओवाळून टाकतो व ती पुलाखालच्या पाण्यातून जाते. मग भगत आंब्याची साल कुटून भातात मिसळतो व तो भात तिच्या डोक्यावर ठेवतो. नंतर ती निघून जाते. मग इतरही गावकऱ्यांच्या बाबतीत भगत असेच करतो. त्यानंतर स्त्रियांना वगळून सर्व गावकरी झऱ्याच्या काठी भोजन करतात. [आ. भा.; प्रि. इं.]

बोंथुक

एक जात. यांचे वास्तव्य आंध्र प्रदेशातील कृष्णा व गुंटूर या जिल्ह्यांत आढळते. या लोकांना बोंथुक सवर असेही नाव आहे. हे उडिया भाषा बोलतात; पण त्यांची गोत्रनामे मात्र तेलुगू आहेत. पशुपतिरेड्डी, सिंहाद्री, दासपत्री, गेडल, कुडुमल, कोनेटी, इ. त्यांची गोत्रे असून, त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाही. लग्नप्रसंगी पशुपतिरेड्डी गोत्राचे लोक पौरोहित्य करतात व कोनेटी गोत्राचे लोक वाद्ये वाजवतात.

हे लोक जंगलातून बांबू तोडून आणतात आणि ते विकतात. विकण्यापूर्वी ते अग्नीत तापवून सरळ करतात. तसेच ते बैलगाडीत भरण्यापूर्वी सत्यम्म, दोडलम्म, मध्यालम्म व पोट्टु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राझू या देवतांना बकरा व कोंबडी बळी देतात.

विवाहप्रथा – मुलींची लग्ने लहान वयात होतात. एखाद्या मुलीचे लग्न रजोदर्शनानंतर करायचे झाल्यास ते समारंभपूर्वक करीत नाहीत. लग्नसमारंभ पाच दिवस चालतो. पहिल्या दिवशी एक सुवासिनी हळदीचे पाणी भरलेली पितळी घागर डोक्यावरून वधूगृही नेते. घागरीच्या गळ्याभोवती दोरा गुंडाळलेला असतो व तिच्यात देजाची रक्कम ठेवलेली असते. वधूगृही पोचल्यावर हळदीचे पाणी जमिनीवर ओततात व देज ग्रामप्रमुखाकडे देतात. देजाचे द्रव्य वधूचे आई-बाप, मामा, ग्रामप्रमुख व ज्ञातिबांधव यांत वाटतात. एक डुक्कर विकत घेऊन मांडवात नेतात. त्याच्या गळ्याभोवती दोरा बांधून त्याला वराच्या घरी नेतात. तिथे त्याचे दोन तुकडे करतात. एक भाग त्याच वेळी वराच्या घरी शिजवतात व खातात. वधूच्या घरी मांडव घालायला लागणारे सामान सात स्त्रिया आणतात व वराच्या घरी मांडव घालण्यासाठी लागणारे सामान नऊ पुरुष आणतात. दुपारी जेवण झाल्यावर वधू-वरांचे नातेवाईक अंगणात जातात. तिथे ग्रामप्रमुख दोन भांडी व दोन बाशिंगे घेऊन बसलेला असतो. वधू-वरांचे बाप त्यांच्याकडे बाशिंगे मागतात. लग्नात भांडण न करण्याच्या अटीवर तो ती त्यांना देतो. लग्न वराच्या घरी होते. वधू-वर बोहल्यावर बसल्यावर पुरोहित दोघांना बाशिंगे बांधतो. नऊ पुरुष व सात स्त्रिया बोहल्याजवळ उभ्या राहतात आणि वधू-वरांच्या भोवती सात वेळा दोरा गुंडाळतात. पुरोहित हा दोरा कापतो व त्याची वधू-वरांसाठी कंकणे बनवतो. पाचव्या दिवशी ही कंकणे सोडतात व विवाहविधी समाप्त होतो.

मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती होते, तेव्हा ती आठ दिवस बाजूला बसते. त्यानंतर मुलीचे आई-बाप ग्रामप्रमुखाला थोडी रक्कम भेट म्हणून देतात. मुलीचा नवरा व त्याच्या कुटुंबातील लोकही आशौच पाळतात. नवव्या दिवशी मुलगी व तिचा नवरा एकमेकांच्या अंगावर हळदीचे पाणी टाकतात व शुद्ध होतात. त्या रात्री त्यांचे मीलन होते.

मुलांना नावे ठेवण्याची या लोकांची पद्धत मजेशीर आहे. मुलाच्या जन्माच्या वेळी एखादा अधिकारी त्यांच्या गावात किंवा जवळपास आला असला, तर त्याचा हुद्दाच मुलाचे नाव म्हणून ठेवतात. त्यामुळे कलेक्टर, तहसीलदार, कर्नल, गव्हर्नर, आचार्य, इ. नावे त्यांच्यांत आढळतात. काही मुलांना त्यांच्या ग्रामांची किंवा तीर्थक्षेत्रांची नावे ठेवतात. त्यामुळे हैदराबाद, चन्नपट्टम, नेल्लोर, तिरुपती अशीही नावे त्यांच्यांत दिसतात.

यांच्या प्रत्येक गावाचा एक प्रमुख असतो. तो इतर वृद्धांच्या साहाय्याने जातीचे तंटे-बखेडे व अन्य प्रश्न सोडवतो. त्याने दिलेली दंडाची शिक्षा ज्याला मान्य नसेल, तो उकळत्या शेणपाण्यातून सुपारी काढून दाखविण्याचे दिव्य करतो. त्या वेळी त्याच्या हाताला काही इजा न झाल्यास तो निर्दोषी ठरतो.

मृतकप्रथा – मृताला बहुधा डाव्या कुशीवर पुरतात. दुसऱ्या दिवशी कावळ्यांना अन्न देतात. अकराव्या दिवशी घरात जमिनीवर एक चटई अंथरतात व तिच्यावर स्वच्छ कपडा अंथरतात. त्यावर पिंड ठेवून ते घेण्याबद्दल मृताला आवाहन करतात. नंतर जवळच्या तळ्याच्या काठी लहानशी झोपडी उभारून, तिच्यात दोन पानांवर ते पिंड ठेवतात. एक पान यमदूतांसाठी व दुसरे मृतासाठी असते. [का. ट्रा. स. इं.]

बोट्टड ओडिसातील एक जात. मुळात हे लोक म्हणजे मध्य प्रदेशात राहणारे मुडिया गोंडच होत. तिथून त्यांनी ओडिसात स्थलांतर केले. हे मुडिया बोली बोलतात. शेती आणि शेतमजूरी करणे हे त्यांचे व्यवसाय आहेत.

यांच्या तीन शाखा आहेत, त्या अशा–(१) बोड किंवा बोट्टड. (२) मध्य– बोट्टड पुरुष व बोट्टडेतर स्त्री यांची संतती, (३) सन्नो– मध्य पुरुष व मध्येतर स्त्री यांची संतती.

बोट्टड किंवा बोडो लोकांत कोच्छिमो (कासव), बाघ (वाघ), नाग, माकडो, शेळी, इ. अनेक देवके आहेत. त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाहीत.

विवाहप्रथा – मुलींची लग्ने लहानपणी किंवा मोठेपणीही होतात. मुलाला आतेबहिणीशी लग्न करता येते. मुलाच्या आई-बापांना एखादी मुलगी पसंत असल्यास, मुलाचा बाप थोडी दारू आणि पोहे घेऊन मुलीच्या घरी जातो. मुलीच्या आई-बापांना हा संबंध पसंत असल्यास, ते त्या वस्तूंचा स्वीकार करतात; काही काळानंतर पुन्हा दारू, मद्य, उडीद, डाळ, मीठ, मिरच्या व गूळ हे जिन्नस मुलाकडील लोक मुलीकडे पाठवतात. त्यांच्या बदली मुलीकडील लोक त्यांना पाने व सुपाऱ्या देतात. लग्नापूर्वी नऊ दिवस मुलाकडचे लोक साळी व दोन रुपये घेऊन मुलीकडे जातात व तिथे त्यांना मेजवानी मिळते. मुलाच्या घरच्या लग्नमंडपाला साल वृक्षाचे नऊ खांब असतात. मधल्या खांबाला हळदीच्या पाण्याचे मडके टांगतात. लग्न वराच्या घरी होते. लग्नात देसारी पौरोहित्य करतो. वधू-वर हातात हळकुंडे व तांदूळ घेऊन लग्नमंडपाला सात प्रदक्षिणा घालतात. त्या वेळी त्यांच्या वस्त्रांच्या टोकांना गाठ मारतात आणि हातांच्या करंगळ्या जुळवतात. नंतर होम होतो. त्यानंतर वधू-वरांच्या अंगाला एरंडेल लावतात आणि ती दोघे मडक्यातल्या हळदीच्या पाण्याने स्नान करतात. नंतर दोघेही नवी वस्त्रे परिधान करतात. मग ज्ञातिभोजन होते व लग्नसमारंभ समाप्त होतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विधवा बहुधा धाकट्या दिराशी लग्न करते. तिने दुसऱ्या कुणाशी लग्न केल्यास, तिच्या नवऱ्याला, ज्ञातीच्या लोकांना दारू शेळी किंवा मेंढी, तांदूळ अथवा पाच रुपये दंड द्यावा लागतो. स्त्रीने घटस्फोट घेऊन पुन्हा लग्न केल्यास, तिच्या नव्या पतीला, पहिल्या नवऱ्याला वीस रुपये दंड द्यावा लागतो. त्यातले काही पैसे तो जेवणावळीसाठी देतो. या मेजवानीच्या प्रसंगी ती स्त्री व तिचे दोन्ही पती शक्यतो उपस्थित असतात.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात. मृताशौच दहा दिवस पाळतात व त्या दिवसांत शेतीची कामे करीत नाहीत. मृताच्या कुळातील लोक त्या दिवसांत घरी अन्न शिजवीत नाहीत. दुसऱ्या दिवशी थोडी वाळू व नव्या मडक्यात पाणी भरून स्मशानात नेतात. तिथे मृताला जाळलेल्या जागी वाळू पसरून त्यात वडाचे किंवा पिंपळाचे रोपटे लावतात. मडक्याला छिद्र पाडून त्याने रोपाला पाणी घालतात. दहाव्या दिवशी थोड्या लाह्या व नवे मडके स्मशानात नेऊन ठेवतात. [का. ट्रा. स. इं.]

बोडण

एक कुलाचार. बोडण हा शब्द ब्रह्मोदन किंवा बहूधन याचा अपभ्रंश असावा. वि. का. राजवाडे व कृ. पां. कुलकर्णी यांच्या मते तो मोटन→वोडन→वोडण असा बनलेला असावा. विघ्नांचे मोटन (= चूर्ण, मोडणे) ज्या आचाराने होते, त्या आचाराचे नाव वोडण. किंवा ज्या आचारात अन्नादी संभार मोडून त्याचे चूर्ण करायचे असते, त्याला वोडण असे नाव आहे. ना. गो. चापेकरांच्या मते वर्धन या शब्दावरून बोडण हा शब्द व्युत्पादिणे योग्य ठरेल.

महाराष्ट्रातल्या कित्येक कोकणस्थ व देशस्थ ब्राह्मणांमध्ये हा कुलाचार रूढ आहे. घरात मंगल कार्य झाल्यावर त्याच्या सांगतेसाठी कुलदेवतेप्रीत्यर्थ बोडण भरतात. काही ठिकाणी ते घरातील स्त्रीच्या प्रसूतीनंतरही भरले जाते.

कोकणस्थ किंवा चित्पावन ब्राह्मण यांचा कुलाचार असा– बोडणासाठी चार सुवासिनी व एक कुमारिका बोलावतात. यजमानपत्नीसह त्या एका शुचिर्भूत जागी वर्तुळाकार बसतात. मध्ये परात ठेवून तीत पुरणा–वरणाचा स्वयंपाक ठेवतात व त्यातच देवीची मूर्ती मांडतात. मग त्या मूर्तीला दही, दूध व तूप यांचे स्नान घालतात व परातीतले सर्व अन्न त्या सुवासिनी व कुमारिका एकत्र कालवतात. या वेळी लक्ष्मीच्या स्तवनाची गाणीही गातात. निमंत्रित कुमारिकेला देवी मानतात व ती पुरे म्हणेपर्यंत बोडण कालवतात. यानंतर त्या सुवासिनींना भोजन घालतात. पुष्कळ वेळा बोडण कालविताना एखाद्या स्त्रीच्या अंगात देवीचा संचार होऊन ती घुमू लागते व सर्व मंडळी तिला हळदीकुंकू वाहून नमस्कार करतात. जिच्या अंगात संचार झाला असेल, ती दुसऱ्याचे सर्व मनोगत सांगू शकते, अशी समजूत आहे.

देशस्थ ब्राह्मणांचा बोडणविधी असा – पाच पक्वान्ने बनवतात. त्यांनी दुरडी भरतात. तिच्यात एक कणकीचा दिवा ठेवून, ती दुरडी देवीपुढे झाकून ठेवतात. याला बोडण भरणे असे म्हणतात. या निमित्ताने पाच सुवासिनी बोलावून त्यांना जेवायला घालतात व विडा–दक्षिणा देतात. त्या रात्री गोंधळ घालतात. देवीपुढे झाकून ठेवलेले बोडण दुसऱ्या दिवशी घरातल्या सुवासिनींनी खायचे असते. बोडणातला दिवा माहेरवाशिणीने पाहायचा नसतो आणि बोडणातले अन्नही खायचे नसते.

उपनयन किंवा विवाहसंस्कार करण्यापूर्वी अंबादेवीला प्रसन्न करून घेण्यासाठी कर्नाटकातील काही कुटुंबांत बोडण भरतात. महाराष्ट्रात ते संस्कार उरकल्यानंतर भरतात. आश्विन शु. प्रतिपदेच्या दिवशी देवीच्या प्रसन्नतेसाठीही कुठे कुठे बोडण भरतात. काही ठिकाणी वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारांपेक्षा वेगळ्या प्रकारेही बोडण भरतात, त्याचा विधी असा– एका परातीत विघ्नप, वटुक व कुलदेवता किंवा अंबादेवी यांच्या मूर्ती ठेवतात. त्यांच्यापुढे त्याच परातीत खाद्य, पेय, लेह्य, चोष्य, इ. पक्वान्नांचे नैवेद्य वाढतात. नंतर हरभऱ्याच्या डाळीच्या पिठात गूळ मिसळून त्याचे दिवे बनवतात व त्या दिव्यांनी पाच सुवासिनी त्या परातीतल्या देवतांना ओवाळतात. मग त्या दिव्यांसह परातीतले नैवेद्याचे अन्न मध, तूप, साखर, दूध, दही यांत मिसळून एकत्र कालवतात. मधाच्या दुप्पट तूप व तुपाच्या दुप्पट साखर असे या पदार्थांचे प्रमाण असते. मग ते सर्व मिश्रण गायीला घालतात व तिच्या तृप्तीने अंबाबाईची तृप्ती होते, असे समजतात.

बोडणाचा मुख्य विधी झाल्यावर बोडणाची कहाणी सांगतात, ती अशी –

आटपाट नगर होते. तिथे एक गरीब ब्राह्मण राहत असे. त्याला दोन सुना होत्या. एक आवडती आणि दुसरी नावडती. आवडतीला सुखात ठेवीत. नावडतीचा विविध प्रकारे छळ करीत. पुढे घरात कुळधर्म आला. त्या दिवशी ब्राह्मणाच्या बायकोने देवीची पूजा करून बोडण भरले व सर्वांची जेवणे झाल्यावर नावडतीला उष्टे अन्न दिले. तिने ते खाल्ले नाही. दिवसभर उपास केला. रात्री देवीची प्रार्थना करून झोपी गेली. झोपेत तिला एक स्वप्न पडले. स्वप्नात एक सवाष्ण आली. तिला नावडतीने आपले दुःख सांगितले. मग ती सवाष्ण नावडतीला म्हणाली. उद्या तू गोठ्यात दूध विरजून ठेव. एक खडा मांड व त्याची देवी म्हणून पूजा कर. मग तू एकटीच बोडण भर. संध्याकाळी ते गायीगुरांना खाऊ घाल. उष्टे अन्न खाऊ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नको. दुसऱ्या दिवशी नावडतीने तसें केले. देवीपुढे भरलेले बोडण झाकून ठेवले व दुपारच्या वेळी गुरे घेऊन रानात गेली. इकडे तिचा सासरा गोठ्यात आला व झाकलेले काय आहे, ते पाहू लागला. तेव्हा त्याला नावडतीने ज्यात दूध विरजून ठेवले होते, ती लाकडाची काथवट सोन्याची झालेली दिसली. तसेच काथवटीतल्या दह्याची हिरे-माणके व बाहेर उडालेल्या थेंबांची मोत्ये झालेली आढळली. सासऱ्याला मोठे आश्चर्य वाटले. एवढ्यात नावडती तिथे आली. सासऱ्याने हा सर्व प्रकार तिला दाखवला व हे असे कसे झाले, असे विचारले. नावडतीने आपला स्वप्नदृष्टांत सांगितला. मग सासऱ्याच्या मनात तिच्याविषयी ममता निर्माण झाली व तो तिला प्रेमाने वागवू लागला. [व्रतराज; चित्पावन; बदलापूर; स. क.; सु. वि. को.]

बोडो

तिबेटो-बर्मन भाषा बोलणाऱ्या लोकांना बोडो हे सर्वसामान्य नाव देतात. वांशिक दृष्टचा अस्सल बोडो वंशाचे लोक आसाममध्ये ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यात, कुचबिहारमध्ये, पश्चिम बंगालच्या उत्तर भागात व पूर्व बंगालमधील सुरमा नदीच्या खोऱ्यात पसरले आहेत. मैदानी प्रदेशात राहणारे बरेचसे बोडो हिंदू लोकांत मिसळून गेले असून, आहोम आणि इतर वंशाच्या लोकांशी ते लग्नसंबंधही करतात. काही बोडो मात्र अद्यापि तिबेटो-बर्मन भाषा बोलतात. आपल्या प्राचीन निसर्गधर्मी संस्कृतीचेही त्यांनी काही प्रमाणात जतन केले आहे. बंगालच्या उत्तर भागातील बोडो लोकांना मेच किंवा म्लेंच्छ अथवा रानटी म्हणतात. तराईच्या प्रदेशातील अस्सल बोडोंना कचारी असे नाव मिळाले आहे. बोडो लोक मात्र स्वतःला बोडो फिसा किंवा बोडो पुत्र म्हणवितात. बोडो लोक पूर्वी हिमालयाच्या उत्तरेला व चीनच्या पश्चिमेला असलेल्या प्रदेशात राहत होते. या देशाला ते बोड म्हणजे जन्मभूमी असे संबोधीत व स्वतःला बोडो देशाची मुले असे म्हणून घेत. आसामच्या टेकड्यांत दिमाछा नावाची बोडोंची एक शाखा आहे. मैदानी प्रदेशातील बोडो लोकांपासून हे पूर्णपणे अलग झाले आहेत. एके काळी या शाखेच्या लोकांनी ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात दिमापूर येथे बलाढ्य राज्य स्थापन केले होते. पण आहोम लोकांनी त्यांना तिथून हाकलून दिले. गारो आणि त्रिपुरा या टेकड्यांमध्ये गारो व त्रिपुरा या बोडोंच्या दोन शाखा वास्तव्य करतात. मोरान ही बोडो टोळ्यांची सर्वांत पूर्वेकडील शाखा असून, ती सरते शेवटी आसामात स्थायिक झाली.

देवधर्म–बोडो लोक हे निसर्गपूजक आहेत. ते नदी-नाल्यांना पवित्र मानतात. भुताखेतांची त्यांना फार भीती वाटते, म्हणून ते त्यांना कोंबडे किंवा बकरे बळी देऊन संतुष्ट राखतात. काही बोडो पौराणिक देवतांना भजतात. कुबेर हा त्यांपैकी एक होय. सण-समारंभप्रसंगी हे लोक तांदुळापासून केलेली दारू व डुकराचे मांस यांचे यथेच्छ सेवन करतात.

विवाहप्रथा–बोडो लोकांत बहुपत्नीकत्वाची व बालविवाहाची चाल नाही. सर्वसाधारणपणे मुलगी आपल्या प्रियकराबरोबर पळून जाते किंवा तिला पळवून नेले जाते. अशा विवाहानंतर वर आपल्या सासऱ्याला वधूमूल्य देतो. वराची आर्थिक स्थिती चांगली नसल्यास तो आपल्या सासऱ्याकडे नोकरी करतो.

मृतकप्रथा–हे लोक मृताला नदीकाठी पुरतात किंवा जाळतात. बोडो लोकांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. प्रेत पुरल्यावर ते त्याच्या तोंडात बांबूची एक नळी ठेवतात. त्या नळीने मृताचा आत्मा श्वासोच्छ्वास करतो, अशी त्यांची समजूत आहे. तसेच मृताच्या आवडीचे पदार्थही त्याच्या थडग्याजवळ ठेवतात. [एन्सा. रि. ए.; लौ. नी.; बॅ. आ. क.]

बोधगया

बौद्धांच्या अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक स्थान. याला बुद्धगया असेही म्हणतात. हे विहारमध्ये गयेच्या दक्षिणेला ६–७ मैलांवर निरंजना (नीलांजना) नदीच्या तीरावर आहे. या जागी सहा वर्षे खडतर तपश्चर्या केल्यानंतर सिद्धार्थाला दिव्य ज्ञान मिळाले आणि तो बुद्ध बनला, असे बुद्धचरित्रावरून कळते.

या स्थानाला पूर्वी उरुबिल्ववन म्हणत, कारण तिथे बिल्व वृक्षांचे अरण्य होते. निरंजना नदीच्या तीरावर वाळू असल्यामुळे, उरु = वाळू आणि वेला = तट, यावरून या स्थानाला उरुवेला असेही म्हणत. सांप्रत तिथून जवळच उरेल नावाचे खेडेगाव आहे, ते उरुवेलाचे स्मारक ठरते.

सहा वर्षे उपास-तापास आणि कष्टप्रद तप केल्यामुळे सिद्धार्थाचा देह अस्थिपंजर झाला, पण तरीही त्याला दिव्य ज्ञान प्राप्त झाले नाही. मग त्याने सुजाता नामक स्त्रीने अर्पण केलेला पायस भक्षून उपवास सोडला. त्यानंतर तो निरंजना नदीच्या तीरावर एका अश्वत्थ वृक्षाखाली आसनस्थ झाला. सोत्थिय नामक मनुष्याने त्याला थोडेसे गवत दिले होते, त्याचे त्याने आसन बनवले. मग तो ध्यानस्थ झाला. एवढ्यात धरणीकंप होऊन एक पाषाणखंड वर आला. मग गौतम ज्ञानप्राप्ती होईपर्यंत त्या खडकावरच बसून राहिला. त्यामुळे त्या पाषाणाला बोधिपर्यंक आणि त्या अश्वत्थ वृक्षाला बोधिवृक्ष असे नाव मिळाले. या स्थानाला महाबोधिमंडप असेही म्हणतात. ते स्थान सर्वांत पवित्र मानले जाते. आजपर्यंत जितके बुद्ध उत्पन्न झाले, त्या सर्वांनी या जागी बसूनच संबोधी प्राप्त केली आणि भविष्यकाळी जे बुद्ध जन्माला येतील त्यांनाही याच जागी ज्ञानप्राप्ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होईल, असे बौद्ध ग्रंथात सांगितले आहे. हे आसन अत्यंत स्थिर आणि अविनाशी असल्यामुळे त्याला वज्रासन असेही म्हणतात.

ज्ञानप्राप्तीनंतर गौतम बुद्धाने उरुविल्ववनातच सात सप्ताह व्यतीत केले. एक सप्ताह त्याने बोधिवृक्षाखाली बसूनच ज्ञान-प्राप्तीचा दिव्य आनंद उपभोगला. त्याच्या वास्तव्यामुळे पुनीत झालेली काही स्थाने बोधिवृक्षाच्या आसमंतात आहेत, ती अशी—

अनिमेष – आठव्या दिवशी गौतम बुद्ध वज्रासनावरून उठला आणि ईशान्य दिशेला काही अंतरावर उभा राहून बोधिवृक्षा-कडे अनिमिष नेत्रांनी पाहत सात दिवस उभा राहिला. त्यामुळे त्या स्थानाला अनिमेष असे नाव मिळाले. बुद्धभक्तांनी त्या ठिकाणी कालांतराने चैत्य व मंदिर निर्माण करून बुद्धाची लहानशी मूर्तीही स्थापली.

चंक्रमण – त्यानंतरच्या सप्ताहात गौतम बुद्ध बोधिवृक्ष व अनिमेष स्थान यांच्या मधल्या जागेत फिरत राहिला होता, म्हणून त्या जागेला चंक्रमण स्थान म्हणतात. त्या जागी आज एक पद्म-वेदिका आहे.

रत्नघर – चौथ्या सप्ताहात बुद्धाने ज्या जागी बसून अभि-धर्माचे चिंतन केले, ते स्थान रत्नघर या नावाने ओळखले जाते. तिथे एक लहानसे मंदिर आहे.

अजपाल वृक्ष – पाचव्या सप्ताहात बुद्धाने एका अजपाल वृक्षाखाली ध्यानस्थ वसून विमुक्तीचा आनंद पुनश्च उपभोगला. याच वृक्षाखाली त्याने सुजातेने दिलेला पायस भक्षिला होता, असे काही जणांचे मत आहे.

मुचलिंद ऱ्हद – बुद्धाने सहावा सप्ताह जवळच एका सरो-वराच्या काठी ध्यानस्थ वसून काढला. त्या वेळी मोठे वादळ होऊन पर्जन्यवृष्टी सुरू झाली. तेव्हा त्या सरोवरातील नाग-राज मुचलिंद याने आपली विशाल फणा बुद्धावर पसरून त्याचे रक्षण केले.

राजायतन – सातव्या सप्ताहात गौतम बुद्ध एका राजायतन वृक्षाखाली विमुक्तीचा आनंद उपभोगीत असता, ओडिसातील दोन व्यापारी तपस्सू व भल्लिक हे तिथे गेले व त्यांनी बुद्धाचा उपदेश ग्रहण केला. यावरून असे म्हणायला प्रत्यवाय नाही, की धर्मचक्रप्रवर्तन प्रथम उरुवेला येथेच झाले.

महाबोधी मंदिर – बोधगया येथे जे भव्यसुंदर शिखरयुक्त मंदिर आहे, ते महाबोधी या नावाने विश्वविख्यात झाले आहे. इ. स. च्या ७ व्या शतकात चिनी प्रवासी युआन च्वांग भार-तात आला होता, त्याच्या प्रवासवर्णनावरून या मंदिराविषयी पुष्कळ विश्वसनीय माहिती मिळते. त्याने या मंदिराला महा-बोधी विहार म्हटले आहे. सम्राट अशोकाने तिथे एक स्मारक-शिल्प निर्माण केले होते, असे तो म्हणतो. त्याचे अवशेष मात्र तिथे मुळीच आढळत नाहीत. काही पंडितांच्या मते, भरहूत येथील एका शिल्पात महाबोधी-स्मारकाचे जे चित्र कोरलेले दिसते, ते अशोकाने निर्माण केलेल्या शिल्पाचेच असावे.

युआन च्वांगने महाबोधी मंदिराचे जे वर्णन केले आहे, ते सध्याच्या मंदिराशी मिळते जुळते आहे. एका शिवभक्त ब्राह्म-णाने हा महबोधी विहार बांधला, असे त्याने लिहून ठेवले आहे. फाहियान इ. स. ४०० च्या सुमारास भारतात आला होता. त्याने बोधगयेच्या विहाराचे वर्णन केले आहे, पण या मंदिराचे वर्णन केलेले नाही. यावरून हे मंदिर गुप्त काळात इ. स. च्या ५ व्या शतकात निर्माण झाले असावे, असे अनुमान करता येते.



महाबोधी मंदिर – बोधगया

त्याची उंची सुमारे १७० फूट असून, ते दोन मजली आहे. पहिला मजला चौकोनी असून, वरचे विमान निमुळते होत गेले आहे. त्याच्या माथ्यावर एक आमलकाकार शिखर असून, अगदी वर एक स्तूप आहे. विमानाच्या चारही बाजूंवर असंख्य कोनाडे असून, त्यांत अनेक मूर्ती बसवलेल्या दिसतात. गर्भ-गृहाच्या चारही कोपऱ्यांवर, विमानाच्या कडेला मुख्य मंदि-राच्या लहान प्रतिकृती बांधलेल्या आहेत. त्यामुळे विमानाची शोभा फारच वाढली आहे. या मंदिराभोवती अश्वत्थ (पिंपळ) वृक्षाची एक सुंदर राईच निर्माण झालेली आहे आणि त्या वृक्षसमूहात लहानमोठे अनेक स्तूप आहेत. या प्रांगणाच्या पूर्व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बाजूला एक भव्य दगडी तोरणद्वार असून, त्यावर हरीण, सिंह, इ. आकृती कोरलेल्या दिसतात.

मंदिराच्या या गाभाऱ्यात पश्चिम बाजूला एका चबुतऱ्यावर बुद्धाची भव्य मूर्ती भूमिस्पर्शमुद्रेत बसवलेली आहे. या मूर्तीला सोनेरी मुलामा दिलेला आहे. याव्यतिरिक्त तिथे मायादेवीची एक मूर्ती व चार-पाच बोधिसत्त्वांच्या मूर्तीही आढळतात.

बोधिवृक्ष – महाबोधी मंदिराच्या पश्चिमेला जो पिंपळ आहे, तोच बोधिवृक्ष या नावाने प्रसिद्ध आहे. या वृक्षाच्या जवळच ज्या स्थानी सिद्धार्थाला संबोधी प्राप्त झाली, त्या जागी

बोधिवृक्षाची पूजा

वज्रासनाचे प्रतीक म्हणून एक विस्तीर्ण लाल शिलाखंड एका चबुतऱ्यावर बसवलेला आहे. अशोक बुद्धाचा अनुयायी झाला व नित्यनियमाने बोधिवृक्षाचे दर्शन घेऊ लागला, तेव्हा त्याची राणी तिष्यरक्षिता हिने मत्सरग्रस्त होऊन तो वृक्ष उपटून टाकला. पण अशोकाने तो पुन्हा लावला. अशोकाची कन्या संघमित्रा हिने त्याची एक शाखा लंकेत नली व अनुराधपुरात तिचे आरोपण केले गेले. इ. स. ६०० च्या सुमाराला गौडाधिपती शशांक याने पुन्हा बोधिवृक्षाचे मूलोच्छेदन केले. पण मगधराज पूर्णवर्मा याने त्या वृक्षाची काही मुळे वाचवून ती पुन्हा त्या जागी लावली, असे युआन च्वांगच्या प्रवासवर्णनात म्हटले आहे. त्यानंतर हा वृक्ष अनेक वेळा पडला व पुन्हा लावला गेला, असे म्हणतात.

बौद्ध लोक या वृक्षाला अतिशय पवित्र मानून त्याची पूजा करतात. भरहूत व बोधगया येथील शिल्पकामात नागराज व गजराज हे बोधिवृक्षाची पूजा करीत आहेत, अशी चित्रे कोरलेली दिसतात. त्यांवरून ही पूजा-परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली असावी, असे वाटते.

बौद्ध लोकांप्रमाणेच हिंदू लोकही बोधिवृक्षाला पवित्र मानून त्याला वंदन करतात. गयामाहात्म्य, अग्नी पुराण, वायू पुराण, इ. ग्रंथांत बुद्धगया व बोधिवृक्ष यांचा पुष्कळ महिमा गायिलेला आहे. या वृक्षाच्या पश्चिमेला दोन बुद्धपदचिन्हांकित अशा शिला पडलेल्या आहेत.

महाबोधी मंदिराच्या भोवती एक उंच दगडी भिंत बांधलेली होती, पण ती आता ढासळून पडलेली आहे. मंदिराच्या आवारात असंख्य भग्नावशेष विखुरलेले आढळतात. त्यांतील दगडी कठडे व स्तंभ विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांवरील शिलालेखांवरून कळते, की काही कठडे शुंगकालातले असून, काही गुप्तकालीन आहेत. या कठड्यांच्या स्तंभांवर जातककथांतील व बुद्धजीवनातील कित्येक प्रसंगांची सुरेख चित्रे कोरलेली दिसतात; त्याचप्रमाणे विविध पशुपक्षी, फुले, इ. आकृतींचे सुंदर नक्षीकामही आढळते. या सर्व शिल्पकामांत कमलाकृतीला विशेष स्थान मिळालेले दिसते.

मंदिराच्या आसमंतात अनेक लहानमोठी मंदिरे, स्तूप व स्मृतिस्तंभ यांचे अवशेष आढळतात. त्यांवर अगणित बुद्धमूर्ती कोरलेल्या असून, त्या अत्यंत कलात्मक वाटतात. मंदिराच्या दक्षिणेला एक विशाल तलाव आहे, त्याला बुद्धकुंड म्हणतात.



महाबोधी मंदिराच्या प्रांगणातील एक स्तूप

प्राग्बोधी–बोधगयेच्या उत्तरेला तीन मैलांवर, फल्गू नदीच्या पूर्व तीरावरील डोंगरात एक गुहा आहे. त्या गुहेत राहून शाक्यमुनीने सहा वर्षे कठोर तप केले होते, म्हणून तिला प्राग्बोधी गुहा असे म्हणतात. युआन च्वांगच्या प्रवासवर्णनात याच नावाने त्या स्थानाचा उल्लेख आहे. स्थानिक लोक मात्र त्या गुहेला डुंगेश्वरी देवीची गुंफा म्हणतात.

महाबोधी मंदिराचा जीर्णोद्धार – बंगालच्या पाल वंशाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजवटीत बोधगयेला पुष्कळ बौद्ध यात्रेकरू जात होते आणि त्या काळात मंदिराची चांगली व्यवस्था ठेवली जात होती. इ. स. च्या ११ व १२ व्या शतकांत ब्रह्मदेशाच्या राजाने आपले दूत पाठवून या मंदिराचा जीर्णोद्धार केला. इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस कनोजचा राजा जयचंद्र यानेही



महाबोधी मंदिराच्या कठड्यावरील एक शिल्पकाम

एकदा मंदिराचा जीर्णोद्धार केला, असे एका शिलालेखावरून कळते. इ. स. च्या १४ व्या शतकाच्या अखेरपर्यंत ब्रह्मदेश व लंका या देशांचे राजे आणि तिथले बौद्ध लोक या मंदिराच्या सुस्थितीविषयी दक्ष होते. मुसलमानांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर मात्र हे मंदिर दुर्लक्षित झाले.

इ. स. १५९० च्या सुमारास गोसाई घमंडी गिरी याने महाबोधी मंदिरापासून एक कोसावर आपला आखाडा सुरू केला. त्याने तिथे एक शैव मठही स्थापला. त्या वेळी तिथे सर्वत्र जंगल माजलेले होते आणि बौद्ध लोकांची वस्ती मुळीच नव्हती. क्वचित काही बौद्ध यात्रेकरू बुद्धाच्या दर्शनाला येत.

इ. स. १७२७ साली शैव मठाचा महंत लाल गिरी याने मोगल बादशाहाकडून मुस्तिपूर व तरहिद या गावांची जमीनदारी-सनद मिळवली. महाबोधी मंदिर तरहिद गावात असल्यामुळे तेही त्या महंताच्या ताब्यात गेले.

गेल्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रह्मदेशच्या राजाने आपले दूत पाठवून बोधगया येथील मंदिराचा शोध केला. त्या वेळी स्थानिक लोक त्या स्थानाला भूतगया या नावाने ओळखत होते, असे त्याला कळले. तिथे भर दिवसाही जायला कोणी धजत नसे. ब्रह्मी दूतांनी महाबोधी-मंदिर पाहिले तेव्हा त्याचा खालचा भाग मातीत गडप झालेला असून, वरच्या भागाची बरीच पडझड झाली आहे, असे त्यांना दिसले. मग त्यांनी मंदिराची थोडीशी साफसफाई केली. राजाने पाठविलेले बहुमोल पूजा-साहित्य आणि विपुल धन महंत शिवगिरीला देऊन ते निघून गेले.

त्यानंतर इ. स. १८७४ मध्ये ब्रह्मदेशचा राजा मिंदोमिन याने ब्रिटिश सरकारच्या अनुज्ञेने जीर्णोद्धाराचे काम सुरू केले. पण पुढे ते काम भारत सरकारने आपल्याकडे घेतले व ते पूर्ण केले. तिथे केलेल्या उत्खननामुळे महाबोधी मंदिराचा २५ फूट उंचीचा गाभारा मातीतून मोकळा झाला. मंदिराच्या आवारात असंख्य मूर्ती व स्तूप सापडले.

मंदिराच्या द्वारासमोर तीन मोठाल्या खोल्या आहेत. त्यांतील मधल्या खोलीत एक शिवलिंग असून, बाजूच्या दोन खोल्यांमध्ये बोधिसत्त्वांच्या व बुद्धाच्या मूर्ती आहेत. या खोल्या सांप्रत पंचपांडवमंदिर या नावाने ओळखल्या जातात. त्यात एक शिवलिंग आहे, ते गौडाधिपती शशांकाच्या आज्ञेनुसार प्रस्थापित केले गेले असावे. महंताचे शिष्य तिथल्या बौद्ध मूर्तींनाच पंचपांडव म्हणतात. तिथेच आद्य महंताची समाधी आहे. [बोधगया—श्री. लाल, डायरेक्टर ऑफ पब्लिक रिलेशन्स,बिहार, १९५६; गया गॅझे; बुद्धगया – भिक्षु शीलाचार, १९५८; प्ले. बु. इं.; भा. क. वि. दे.; बौ. ध. वि.]

बोधायन एक कल्पसूत्रकार. हा कृष्णयजुर्वेदी होता. गृह्यसूत्रांत याचा प्रवचनकार आणि काण्वायन म्हणून निर्देश केलेला आहे. याची सर्व सूत्रे उपलब्ध नाहीत. बर्नेलने त्याची पुढील सहा सूत्रे उपलब्ध असल्याचे सांगितले आहे – (१) श्रौतसूत्र – यात एकोणीस प्रश्न आहेत. (२) कर्मांतसूत्र – याचे वीस अध्याय आहेत. (३) द्वैधसूत्र – यात चार प्रश्न आहेत. (४) गृह्यसूत्र – यात चार प्रश्न आहेत. (५) धर्मसूत्र – यात चार प्रश्न आहेत व (६) शुल्बसूत्र – याचे तीन अध्याय आहेत. बौधायन शाखेचे लोक सांप्रत कृष्णेच्या मुखाजवळच्या प्रदेशात जास्त आढळतात.

बौधायन धर्मसूत्रांत गौतमधर्मसूत्रांतील उतारे दोन ठिकाणी आले आहेत. त्यावरून बोधायन हा गौतमाच्या नंतरचा पण बराच जुना म्हणजे अदमासे सनपूर्व ५०० ते २०० या काळात होऊन गेला असावा. [हि. ध.; प्रा. च. को.]

बोधिचर्या बुद्धपदाच्या प्राप्तीसाठी महायान ग्रंथांत सांगितलेली एक विशिष्ट साधना. बोधिचर्येचा प्रारंभ बोधिचित्तग्रहणापासून होतो. बोधी म्हणजे ज्ञान. सर्व जीवांच्या उद्धारासाठी सम्यक संबोधीत चित्त प्रतिष्ठित होणे याला बोधिचित्तग्रहण, असे नाव आहे. बोधिचित्ताचे बोधिप्रणिधी चित्त व बोधिप्रस्थान चित्त असे दोन प्रकार आहेत. सर्व जगाच्या परित्राणासाठी मी बुद्ध बनेन, अशी भावना जेव्हा प्रार्थनेच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वरूपात व्यक्त होते, तेव्हा बोधिप्रणिधी चित्ताचा जन्म होतो. ही व्रताची पूर्वावस्था आहे. जेव्हा साधक आणखी प्रगती करतो व शुभकार्ये करीत राहतो, तेव्हा बोधिप्रस्थान चित्ताचा उदय होतो व अंती त्याला बुद्धपदाची प्राप्ती होते. [बौ. द. मी.]

बोधिपक्खीय धम्म गौतम बुद्धाने निर्वाणप्राप्तीचा उपाय म्हणून सांगितलेले धर्म. हे सदतीस असून, सात वर्गांत विभागलेले आहेत. निर्वाणाची इच्छा असणाऱ्याने यांपैकी एका किंवा दोन वर्गांतील धर्मांचे पालन केले तरी पुरते. कारण प्रत्येक वर्गात निर्वाणाला आवश्यक असणाऱ्या सर्व धर्मांचा समावेश आहे.

धर्मांच्या प्रथम वर्गाचे नाव सतिपट्ठान (सं. स्मृत्युपस्थान) = जागरूकता असे आहे. या वर्गातील धर्मांची बुद्धाने, निर्वाणाचा एकमात्र उत्तम मार्ग अशी प्रशंसा केली आहे. सतिपट्ठानाचे पुढील चार प्रकार आहेत –

(१) **काय सतिपट्ठान** – याचा अभ्यास करताना साधकाला श्वासनिःश्वासाच्या वेळी, उठताना, बसताना, झोपताना, हात पाय पसरताना किंवा आखडताना शरीरांतर्गत काय क्रिया होते, याकडे लक्ष द्यावे लागते. आपल्या शरीरात कोणकोणते पदार्थ आहेत आणि मेल्यावर त्यांची काय अवस्था होते, यावर त्याने विचार केला पाहिजे. याबरोबरच, शरीर उत्पत्तिविनाशशील आहे, हे त्याने सतत ध्यानात ठेवले पाहिजे.

(२) **वेदना सतिपट्ठान** – याचा अभ्यास करताना साधकाने आपल्याला येणारा अनुभव सुखात्मक आहे की दुःखात्मक, का त्या दोहोंहून निराळा आहे; तसेच तो शुद्ध आहे की अशुद्ध आहे, यांकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. त्याचबरोबर आपले अनुभव हे उत्पत्तिविनाशशील आहेत, हेही त्याने सतत लक्षात ठेवले पाहिजे.

(३) **चित्त सतिपट्ठान** – याचा अभ्यास करताना साधकाला आपले मन रागद्वेषरहित आहे की नाही, तसेच त्याचे उत्थान झाले आहे, का पतन झाले आहे, याकडे लक्ष ठेवावे लागते. त्याचबरोबर, मन हे उत्पत्तिविनाशशील आहे, हे अवधान त्याला सतत बाळगावे लागते.

(४) **धम्म सतिपट्ठान** – याचा अभ्यास करताना साधकाल आपण विघ्नापासून मुक्त झालो आहो किंवा नाही, शरीराच्या स्कंधांची उत्पत्ती व विनाश कशा प्रकारे होतात, इ. गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते.

धर्मांच्या द्वितीय वर्गाला सम्मप्पधान (सं. सम्यक प्रहाण) असे नाव आहे. पापनाश आणि पुण्यवृद्धी करणारी कर्तव्ये यात सांगितली आहेत.

धर्मांच्या तृतीय वर्गाला इद्धिपाद (सं. ऋद्धिपाद) असे नाव आहे. त्यात विविध सिद्धी प्राप्त करून घेण्याचे उपाय सांगितले आहेत.

धर्मांचा चौथा वर्ग इंद्रिये असा असून, त्यात श्रद्धेंद्रिय, वीर्येंद्रिय, स्मृतींद्रिय, समाधींद्रिय व प्रज्ञेंद्रिय यांचा समावेश होतो. या इंद्रियांच्या शक्ती निरनिराळ्या साधकांत निरनिराळ्या असतात व त्यावरून साधकांच्या श्रेणी ठरवल्या जातात.

धर्मांचा पाचवा वर्ग बल किंवा आंतरिक शक्ती असा आहे; तर सहावा वर्ग संबोज्झंग (संबोध्यंग) या नावाचा आहे. यांच्या द्वारे साधकाला पूर्ण ज्ञान प्राप्त होते आणि तो अर्हंत बनतो. [उ. प्र. बौ. वि.]

बोधिसत्त्व एक बौद्ध कल्पना. ज्याच्या अंगी बोधी म्हणजे पूर्ण ज्ञान प्राप्त करून घेण्याची पात्रता असते, त्याला बोधिसत्त्व म्हणतात. या शब्दाच्या व्याख्या अशा –

(१) ज्याचे सत्त्व (स्वभाव) ज्ञानपूर्ण आहे, असा पुरुष.

(२) दश पारमितांच्या अभ्यासाने पूर्ण ज्ञान आत्मसात करण्याच्या मार्गावर असणारा पुरुष, अर्थात भावी बुद्ध.

(३) ज्याचे सत्त्व (विचार, व्यवसाय, निश्चय) पूर्ण ज्ञानाच्या ठिकाणी केंद्रित झाले आहे, असा पुरुष.

(४) ज्याची इच्छा बुद्धत्वाच्या प्राप्तीवर केंद्रित झालेली असते, असा पुरुष.

अश्वत्थवृक्षाखाली बोधी प्राप्त होण्यापूर्वी गौतम हा बोधिसत्त्वच होता. तो एका फार मागच्या पूर्वजन्मात सुमेध नावाचा ब्राह्मण होता व मोक्षमार्ग शोधण्यासाठी हिमालयात उग्र तप करीत होता. त्या तपाच्या प्रभावाने सुमेधाला गगनसंचाराची सिद्धी प्राप्त झाली. त्या सिद्धीच्या सामर्थ्याने भ्रमण करीत असता एके दिवशी तो अमरावती नगरीत आला आणि तिथे त्याला दीपंकर बुद्धाचे दर्शन झाले. सुमेधाला पाहून दीपंकराने जाणले, की हा सांप्रत बुद्धबीज किंवा बुद्धांकुर असून, भावी काळात बुद्ध होणार आहे. मग दीपंकराने तशी घोषणा केली. तो आशीर्वाद मिळाल्यानंतर सुमेधाने निर्धार केला, की भावी काळात बुद्ध बनून मी जगाला निर्वाणाचा मार्ग दाखवीन. या निर्धाराने सुमेध हा बोधिसत्त्व झाला आणि पुढे अनेक योनीत जन्म घेत घेत, साधना करीत करीत अखेर शुद्धोदनाचा पुत्र गौतम म्हणून जन्माला आला. पुढे त्या जन्मी अविश्रांत साधना करून त्याने बुद्धत्व मिळविले.

बोधिसत्त्व अनेक असतात. ते जगतातल्या प्राणिमात्रांना धर्माचा उपदेश करण्यासाठी स्वतःच्या इच्छेने जन्म घेतात. जातककथांवरून या गोष्टीचा प्रत्यय येतो. आचार्य शांतिदेव हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या धर्मचर्यावतार या ग्रंथात सांगतात – मातेच्या गर्भात भ्रूणत्वाच्या ज्या अनेक अवस्था असतात, त्या बोधिसत्त्वांना भोगाव्या लागत नाहीत. ते शुभ्र हत्तीच्या रूपाने मातेच्या गर्भात प्रवेश करतात व त्याच रात्री उजव्या कुशीतून बाहेर पडून जन्म घेतात. पुढे दश भूमिका पार करून व दहा पारमिता आत्मसात करून ते बोधी मिळवतात.

बोधिसत्त्वाची मूर्ती – त्रिपुरी

बोधिसत्त्व ही कल्पना महायान पंथाची आहे. त्याच पंथाने त्या कल्पनेचा सर्वांगीण विकास केला आणि बोधिसत्त्वाच्या रूपाने सात्त्विक, प्रज्ञावान, लोकोपकारक आणि महाकारुणिक अशा लोकोत्तर गुणांचा एक आदर्श पुरुषश्रेष्ठ लोकांच्या पुढे उभा केला.

बोधिसत्त्व हा शब्द पाली निकायात अनेक ठिकाणी मिळतो. दीघनिकायात ‘ बुद्ध होण्याच्या पूर्वी मी बोधिसत्त्व होतो ’ अशी वाक्ये मिळतात. महायान मतानुसार श्रावक, प्रत्येकबुद्ध व बोधिसत्त्व अशा साधकांच्या तीन श्रेणी आहेत. प्रत्येकाच्या बोधीही भिन्न असतात. स्थविरवादी बौद्ध अर्हत्पद श्रेष्ठ मानतात व निर्वाण हे त्याचे लक्ष्य ठरवितात; तर महायानी बौद्ध अर्हतापेक्षाही बोधिसत्त्व श्रेष्ठ मानून अनुत्तरा सम्यक संबोधी हे त्याचे लक्ष्य ठरवितात. बोधिसत्त्व हा निर्वाणासाठी प्रयत्नशील असतो, पण तो स्वतःच्या निर्वाणासाठी नव्हे; तर मानवमात्राच्या निर्वाणासाठी. या दुःखपूर्ण संसार-सागरात बुडत असलेल्या जीवांचा उद्धार करण्यासाठी मी स्वतःचे निर्वाण तुच्छ मानून प्रयत्नशील राहीन, असे तो ठरवतो. विश्वातले सर्व प्राणी मुक्त झाल्यावाचून मी परिनिर्वाणात प्रवेश करणार नाही, अशी त्याची धारणा असते. आचार्य शांतिदेव यांनी बोधिसत्त्वांच्या या धारणेचे निरूपण पुढीलप्रमाणे केले आहे –

अनाथानामहं दासः सार्थवाहश्च यायिनाम् ।
पारेप्सूनां च नौभूतः सेतुः सङ्क्रम एव च ।।
मुच्यमानेषु सत्त्वेषु ये ते प्रामोद्यसागराः ।
तैरेव ननु पर्याप्तं मोक्षेणारसिकेन किम् ।।

अर्थ – मी अनाथांचा दास, प्रवाशांचा पुढारी व भवसागरातून पार होऊ इच्छिणाऱ्यांची नौका, सेतू व वाहून नेणारा होईन. सर्व प्राणी विमुक्त होत असता अंतःकरणात जे आनंदाचे सागर उचंबळून येतात, तेवढेच सुख मला पुरे आहे. रसहीन अशा मोक्षाची मला त्याहून अधिक किंमत नाही.

जातककथा या सगळ्या बोधिसत्त्वांच्याच कथा आहेत. त्या कथा बोधिसत्त्वांच्या दया-दाक्षिण्यादी गुणांनी उज्ज्वल झालेल्या आहेत. परोपकार, लोकसेवा, अडल्या पडल्यांना मदत करणे, संकटातून तारणे इ. कार्यांसाठी हे बोधिसत्त्व अंतःप्रेरणेने पुढे होतात. प्रसंगविशेषी ते प्राणत्यागालाही प्रवृत्त होताना दिसतात.

केवळ बोधिसत्त्वांचीच नव्हे, तर सगळ्या महायान पंथांचीच ही ध्येयदृष्टी आहे. ज्या काळात महायान पंथाचा उगम झाला, त्या काळातले थेरवादी बौद्ध भिक्षू अधिक आत्मकेंद्रित झाले होते. प्रव्रज्येचा अर्थ त्यांनी स्वतःच्या उद्धारापुरता संकुचित केला होता. त्याची प्रतिक्रिया म्हणूनच महायान पंथाचा आविर्भाव झाला असण्याची शक्यता आहे, असे श्री. भरतसिंह उपाध्याय यांचे मत आहे. महायानपंथियांनी एकांतातल्या आंतरिक साधनेला गौण लेखून, परोपकार व लोकसेवा यांना अधिक

बोधिसत्त्वाची मूर्ती – चीन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महत्त्व दिले. याच कारणामुळे महायानात आध्यात्मिकतेऐवजी सामाजिकता अधिक आली व तो संप्रदाय अंतर्मुख होण्याच्या ऐवजी बहिर्मुखच अधिक झाला. महायान पंथाची ही सामाजिक भावना चीन, जपान, इ. देशांत प्रभावितपणे दिसली. लोकेश्वर बोधिसत्त्व हा तिकडचा परम उपास्य देव ठरला आहे. तो लोकानुकंपी आहे, या भावनेने त्या देशांत त्याच्या नावाने धर्मशाळा व रुग्णालये प्रस्थापित झाली. भिक्षुधर्मात सेवाधर्म मिसळून महायान बौद्धांनी फार मोठी मानवसेवा केली आहे, असे त्या देशांच्या इतिहासावरून कळून येते. [बौ. द. मी.; एन्सा. रि. ए.; आजकल वार्षिक अंक, डिसेंबर १९५६]

बोधिसत्त्वयान महायान पंथालाच हे नाव दिलेले आहे. या यानात बोधिसत्त्वाचा आदर्श लोकांपुढे उभा केला आहे. हीनयानाचे अंतिम लक्ष्य अर्हत्पदाची प्राप्ती हे आहे, तर बोधिसत्त्वयानाचे लक्ष्य बुद्धत्वाची प्राप्ती हे आहे. हीनयानी विचारसरणी अशी की, 'मी एकटाच धर्मसाधना करून निर्वाण मिळवीन'; याउलट बोधिसत्त्वयान म्हणते, की 'मी स्वतःला परमार्थसत्यामध्ये स्थापित करीन; पण त्याचबरोबर सर्व प्राण्यांनाही परमार्थसत्य लाभावे म्हणून प्रयत्न करीन. त्यासाठी मी प्रज्ञा व करुणा यांची साधना करीन. पाहा – महायान; बोधिसत्त्व. [बौ. द. मी.]

बोपदेव (१२६०–१३३५ इ. स.) एक विद्वान ग्रंथकार. हा विदर्भातील वरदा नदीच्या काठी वेदपद नावाच्या गावी राहत होता. याच्या वडिलांचे नाव केशव वैद्य. कोण्या एका धनेश नावाच्या वैद्याकडून याने वैद्यकशास्त्राचे संपूर्ण ज्ञान मिळवले होते.

बोपदेव हा हेमाद्रीचा परम स्नेही होता. हेमाद्रीच्याच सांगण्यावरून याने व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, ज्योतिषावर एक, साहित्यशास्त्रावर तीन, भागवतावर तीन, असे एकंदर सव्वीस ग्रंथ लिहिले. परंतु त्यांपैकी फारच थोडे ग्रंथ उपलब्ध आहेत. मात्र बोपदेवाच्या नावाचा उल्लेख व्याकरणावरील पुष्कळ ग्रंथांत येतो. हरिलीलामृत, मुक्ताफल आणि परमहंसप्रिया हे त्याचे तीन ग्रंथ भक्तिरसाचे माहात्म्य विशद करणारे आहेत. [प्रा. म. वा. स्व.; हिं. वि. को.; म. च. को]

बोयार एक जमात. यांची वस्ती बिहार प्रदेशातील पालामाऊ जिल्ह्यात व लिरगुजा, सिंग्रैली, भरवर आणि त्यांच्या आसपासचा भाग, यांत आहे. यांचा वर्ण सावळा व शरीरयष्टी प्रमाणबद्ध असते. उंची कमी, कपाळ लहान, नाकपुडचा रुंद, नाकाचे हाड मोठे, जिवणी रुंद, ओठ जाड व हनुवटी निमुळती, अशी सामान्यपणे त्यांच्या शरीराची ठेवण असते.

जंगले तोडून तिथली जमीन लागवडीखाली आणणे हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. हे प्रामुख्याने कडधान्यांची लागवड करतात. जंगली प्राण्यांपासून स्वसंरक्षण करण्यासाठीच ते हत्यार बाळगतात. या लोकांच्या वाडचा अगदी लहान लहान असतात. क्वचित त्यांची एक किंवा दोनच घरे असतात. त्यांची भाषा विकृत हिंदी आहे.

जर्बुद आणि बाकेश्वरी या बोयारांच्या दोन प्रमुख देवता होत. काही लोक दुल्हा देवालाही भजतात.

विवाहप्रथा – या जमातीत बालविवाहांची प्रथा आहे. मुलीसाठी पाच रुपयापर्यंत देज द्यावे लागते. विवाहात सिंदूर लावण्याचा विधी मुख्य असतो. विवाहसमारंभात भोजन व नृत्य यांचा समावेश असतो.

दवा, तेरीहा आणि कर्म ही यांची प्रमुख तीन नृत्ये होत. या सर्व नृत्यांतून स्त्री-पुरुष भाग घेतात. पुरुष स्त्रियांसमोर उभे राहून ढोल वाजवतात आणि गाणी म्हणतात. स्त्रिया एकमेकींच्या हातात हात घालून व खाली मान करून नाचतात.

मृतकप्रथा – हे लोक प्रेते पुरतात. पुरुषाच्या प्रेताबरोबर त्याची हत्यारेही पुरतात. [इं. स्ट. पा. प्रे., जानेवारी १९६०]

बोरन्हाण एक कौटुंबिक शिशुसंस्कार. मूल जन्माला आल्यानंतर प्रथम येणाऱ्या मकर संक्रांतीच्या दिवशी आप्तेष्टांच्या मुलांना बोलावून हा समारंभ करतात. त्यासाठी मुलाला काळे झबले शिवतात आणि त्यावर खडी काढतात किंवा हलव्याचे दाणे बसवतात. मुलाच्या अंगावर हलव्याचे दागिने घालतात. प्रथम औक्षण करून मुलाच्या मस्तकावर बोरे, उसाचे करवे, भुईमुगाच्या शेंगा व चुरमुरे हे सर्व पदार्थ एकत्र करून ओततात. यालाच बोरन्हाण म्हणतात. मुले खाली पडलेले हे पदार्थ वेचून खातात. मग सुवासिनींना हळदीकुंकू देतात. बोरन्हाण घातल्याने मुलाला पुढच्या उन्हाळ्याची बाधा होत नाही व त्याचे आरोग्य चांगले राहते, असे समजतात. हा संस्कार मुख्यतः महाराष्ट्रात प्रचलित आहे.

बोला एक जात. या लोकांची वस्ती राजस्थानात आढळते. बोल म्हणजे कातडी कमावणारा. हे लोक कातडी कमावण्याचा व्यवसाय करीत असल्यामुळे यांना हे नाव मिळाले आहे. कातडी कमावण्याव्यतिरिक्त जोडे बनवणे, शेती करणे, इ. जोडव्यवसायही ते करतात. माळव्यातील मांडवगड हे यांचे मूळ ठिकाण असून, चार-पाच शतकांपूर्वी ते राजस्थानात येऊन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्थायिक झाले आहेत. भक्त रैदासापासून आपल्या जातीची उत्पत्ती झाली, असे हे समजतात. म्हणून ते त्याला आपला गुरू मानतात. याशिवाय धुलिलाल नावाचाही त्यांचा दुसरा गुरू आहे. पौर्णिमा, अमावास्या व एकादशी या यांच्या पवित्र तिथी असून, बुधवार, शनिवार हे पवित्र वार होत.

माळी, धनगर, लोहार, खाटिक, वंजारी, काची, इ. लोकांच्या हातचे अन्न हे खातात; पण सुतार, छिपा, तेली, भंगी व पिंजारी यांच्या हातचे खात नाहीत.

विवाहप्रथा – यांच्यांतील मुलगा पोटापुरते मिळवीत नसेल तर त्याचे लग्न होणे कठीण असते. मुलींची लग्ने लहान वयातच करतात. लग्न निश्चित झाले, की नियोजित वराला टिळा लावून त्याला नारळ–मिठाई देतात. देज देण्याची प्रथा आहे. लग्नाला ब्राह्मण पुरोहित लागतो. ब्राह्मण मिळाला नाही, तर त्या घरचा जावई पौरोहित्य करतो. काही ठिकाणी मुलगी सासरी जाताना तिला हुंडा देण्याची प्रथा आहे. लग्न झाल्यापासून तीन ते पाच वर्षांनी वधू पतीबरोबर त्याच्या घरी जाते. विधवाविवाहाला संमती असून, या जातीत तो विवाह प्रतिष्ठित समजला जातो. स्त्री दुराचारी निघाल्यास तिला सोडचिठ्ठी देतात; पण पतीला तिचे दुराचरण पंचायतीपुढे पुराव्यानिशी सिद्ध करून द्यावे लागते. पती जिवंत असताना पत्नीने दुसऱ्याशी संबंध ठेवला, तर पंचायत तिला कडक दंड करते.

प्रसूतिप्रथा – बाळंतिणीला नव्या बांगड्या भरतात. जननाशौच एक महिना पाळतात. पहिला मुलगा झाल्यास ज्ञातिभोजन घालतात. मुलाची जन्मपत्रिका करतात.

मुलगा दत्तक द्यायचा झाल्यास दत्तक घेणाऱ्याच्या मांडीतले थोडे रक्त काढून ते दत्तक मुलावर शिंपडतात. या वेळी दत्तक बाप देवाचे मंदिर बांधण्यासाठी यथाशक्ति रक्कम समाजाच्या स्वाधीन करतो.

मृतकप्रथा – हे लोक मोठ्यांचे दहन करतात व लहान मुलांना पुरतात. प्रेताला अग्नी देण्यापूर्वी त्याच्यावर कोणताही संस्कार करीत नाहीत. तिसऱ्या दिवशी नातेवाइकांना जेवण देतात. नवव्या दिवशी सर्व नातेवाईक मुंडन करतात. या दिवशी अंत्ययात्रेला गेलेल्या लोकांना भोजन देतात. बाराव्या दिवशी गाव-जेवण असते. मृत्यूनंतर त्या घरात एका वर्षाच्या आत कोणाचे लग्न करीत नाहीत. [सो. ला. रा.]

बोस, नेताजी सुभाषचंद्र (इ. स. १८९७–१९४५) भारताच्या अंतिम स्वातंत्र्यसंग्रामाचे सेनापती आणि थोर देशभक्त. यांचा जन्म ओडिसा प्रांतातील कटक या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ व आईचे नाव प्रभावतीदेवी असे होते. जानकीनाथांना एकूण चौद अपत्ये झाली. सुभाषबाबू हे त्यांतले नववे होत.

प्रारंभापासूनच सुभाषला ईश्वरी साक्षात्कार, अध्यात्म आणि योग या शास्त्रांची ओढ होती. त्यामुळे कॉलेजमध्ये त्याने तत्त्वज्ञान हा विषय अभ्यासायला सुरुवात केली. तथापि तेवढ्याने समाधान न होऊन तो गुरूच्या शोधार्थ काही दिवस हिमालयातही जाऊन आला. परंतु तिथेही मनःशांती लाभली नाही म्हणून तो कलकत्त्याला परतला. घरी येताच प्रवासातला शीण असह्य होऊन तो विषमज्वराने आजारी पडला. त्यातून उठल्यावर त्याने व्यायाम आणि लष्करी शिक्षण या दोहोंवर लक्ष केंद्रित करून बी. ए. च्या अभ्यासाला प्रारंभ केला. याच काळात त्याने वक्तृत्वकलाही आत्मसात केली.

इ. स. १९१९ मध्ये बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर वडिलांच्या आग्रहासाठी सुभाषबाबूंनी आय्. सी. एस्. ला बसायचे ठरवले व त्यासाठी ते इंग्लंडला गेले. आय्. सी. एस्. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी सरकारी नोकरी करावी, अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. पण सुभाषबाबू त्या गोष्टीला अनुकूल नव्हते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांना उडी घ्यायची होती. त्यासाठी त्यांनी आपले थोरले बंधू शरदबाबू यांचा सल्ला घेतला. त्यांनी त्यांच्या इच्छेला संपूर्ण पाठिंबा देताच त्यांनी आपला निर्धार वडिलांना कळवून टाकला.

इ. स. १९२१ मध्ये सुभाषबाबू मुंबईला उतरले व त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सामील होण्यासाठी म. गांधींची भेट घेतली. संधी मिळताच सशस्त्र संग्राम करूनही स्वातंत्र्य हस्तगत केले पाहिजे, अशी सुभाषबाबूंची विचारसरणी होती. तथापि प्राप्त परिस्थितीत गांधीप्रणीत चळवळीशी विरोध न पत्करता तीत सामील व्हायचे व आपल्या विचाराला अनुकूल वातावरण निर्माण करायचे, असे ठरवून सुभाषबाबू कलकत्त्याला परतले. तिथे त्यांनी देशबंधू चित्तरंजन दास यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली. पुढे त्यांनी दासबाबूंच्या आज्ञेवरून कलकत्त्याच्या राष्ट्रीय महाविद्यालयाचे प्राचार्यपद स्वीकारले. त्याच वेळी ते तिथल्या काँग्रेस सेवादलाचेही काम पाहू लागले. मध्यंतरी बंगालमध्ये मोठा पूर आला. त्या वेळी सुभाषबाबूंच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या स्वयंसेवक दलाने पूरग्रस्तांना महत्त्वपूर्ण साहाय्य केले. त्यामुळे सुभाषबाबूंच्या सामाजिक कार्यामागच्या तळमळीची व कुशल नेतृत्वाची लोकांना ओळख पटली. पूरग्रस्तांच्या मदतीचे काम आटोपताच बंगाल प्रांतिक काँग्रेसचे प्रचारक म्हणून सुभाषबाबूंची नेमणूक झाली.

इ. स. १९२१ च्या शेवटी कलकत्त्याला प्रिन्स ऑफ वेल्स यांचे आगमन होणार होते. त्यांच्या स्वागतावर कडक बहिष्कार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

टाकावा, अशी योजना सुभाषबाबूंनी आखली. सरकारला या योजनेचा सुगावा लागताच सरकारने काँग्रेस सेवादल बेकायदा ठरविले. या घटनेच्या निषेधार्थ बंगालभर सविनय कायदेभंगाला प्रारंभ झाला आणि सुभाषबाबूंना पकडण्यात येऊन त्यांना सहा महिन्यांची सजा ठोठावण्यात आली. दासबाबूंनाही अटक झाली. तुरुंगामध्ये दासबाबूंच्या समवेतच सुभाषबाबूंना ठेवण्यात आले. भावी चळवळीच्या अनेक योजना इथल्या चर्चेतूनच आखल्या गेल्या.

नेताजी सुभाषचंद्र बोस

इ. स. १९२४ च्या सुमारास बंगालमधील क्रांतिकारकांच्या आंदोलनाला पुन्हा जोर चढला. या क्रांतिकारकांचा आणि सुभाषबाबूंचा निकट संबंध आहे, असा सरकारला फार दिवस संशय होता. १९२४ च्या ऑक्टोबरात सरकारने क्रांतिकारकांच्या धरपकडीसाठी एक वटहुकूम काढला आणि प्रथम सुभाषबाबूंनाच पकडून तुरुंगात डांबले. अलिपूर, बेहेरामपूर, कलकत्ता अशा विविध तुरुंगांत थोडथोडा काळ ठेवून शेवटी सरकारने त्यांना मंडालेला पाठवले.

मंडालेचा तुरुंग म्हणजे लो. टिळकांच्या गीतारहस्याची जन्मभूमी! लो. टिळक आणि गीतारहस्य या दोहोंविषयी सुभाषबाबूंच्या मनात असीम आदरभक्ती वसत होती. सरकारने त्यांना मंडालेला पाठविले ते स्वदेशापासून दूर हद्दपार करावे या हेतूने! पण सुभाषबाबूंना त्या हद्दपारीतही एक आगळे समाधान मिळाले. मंडालेच्या तुरुंगात त्यांनी इतिहास, वाङ्मय, धर्मशास्त्र, मानसशास्त्र, इ. भिन्न भिन्न विषयांचे शेकडो ग्रंथ अभ्यासले. त्यामुळे त्यांच्या मनाला स्थिरता व शांती लाभली आणि त्यांची बौद्धिक उंची वाढली.

सुभाषबाबू मंडालेतून मायभूमीला परत आले ते एक नवा उत्साह, नवी शक्ती संपादन करूनच. पुढे चार–पाच महिने त्यांनी देशातील वातावरणाचा अभ्यास केला. नोव्हेंबरमध्ये त्यांची प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षपदावर निवड झाली. त्यामुळे बंगालच्या राजकारणाची सूत्रेच त्यांच्या हाती आली.

इ. स. १९३० च्या प्रारंभापासून देशात सविनय कायदेभंगाची चळवळ चालू झाली व त्यात सुभाषबाबूंना अटक करण्यात आली. तुरुंगातून मुक्त झाल्यावर लगेच ते कलकत्त्याचे महापौर बनले. पुढे सरकारविरोधी निदर्शनांबद्दल दि. २ जानेवारी १९३१ या दिवशी सुभाषबाबूंना पकडण्यात आले, परंतु तुरुंगवासात त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे दि. ११ फेब्रुवारी १९३३ रोजी त्यांची सुटका झाली. मात्र उपचारांसाठी त्यांनी हिंदुस्थानात न थांबता युरोपात गेले पाहिजे, असे बंधन त्यांच्यावर लादण्यात आले. त्यामुळे सुभाषबाबू लगेच व्हिएन्नाला रवाना झाले.

तिथून त्यांनी युरोपातल्या अनेक राष्ट्रांना भेटी देऊन तिथल्या राज्यकर्त्यांची भारतीय स्वातंत्र्यलढ्यासंबंधीची भूमिका समजावून घेतली. हिंदुस्थानने ब्रिटिश राजवटीविरुद्ध सशस्त्र क्रांतीचे रणशिंग फुंकले, तर बाहेरची कोणती राष्ट्रे आपल्याला किती व कसे साहाय्य करू शकतील, याचा अंदाज घेणे हा त्यांच्या या भेटींमागचा प्रधान उद्देश होता. इ. स. १९३३ ते १९३६ या चार वर्षांच्या काळात त्यांनी युरोपातल्या बहुतेक सर्व राष्ट्रनेत्यांच्या व विचारवंतांच्या भेटी घेतल्या आणि त्यावरून आगामी काळात जगात युद्धाचा मोठा डोंब उसळणार अशी खूणगाठ बांधून ते मायदेशी परतले; परंतु त्यांनी या वेळी भारतात प्रवेश करू नये, असा सरकारने हुकूम काढला होता. सुभाषबाबूंनी तो अर्थातच ठोकरला. त्यामुळे भारतात उतरताच सरकारने त्यांना पकडून तुरुंगात टाकले. थोडे दिवस नजरकैदेत ठेवल्यावर दि. १७ मार्च १९३७ रोजी त्यांना मुक्त करण्यात आले.

इ. स. १९३८ च्या डिसेंबर महिन्यात हरिपुरा येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले व त्याच्या अध्यक्षपदावर सुभाषबाबूंची निवड झाली. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विविध राष्ट्रीय प्रश्नांचा ऊहापोह केला. पण त्या वेळी ते आजारी झाल्यामुळे त्यांना सबंध अधिवेशनात काहीच काम करता आले नाही. शिवाय म. गांधी व त्यांचे अनुयायी यांना सुभाषबाबूंची विचारसरणी न पटल्यामुळे त्यांनी सुभाषबाबूंना कोणत्याच बाबतीत सहकार्य दिले नाही. अशा स्थितीत, काँग्रेसचा अध्यक्ष राहून तिच्यात फूट पडण्यास कारणीभूत होण्यापेक्षा काँग्रेसच्या अध्यक्षपदाचे त्याग-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पत्र दिलेले बरे, अशा विचाराने त्यांनी तसे केले.

यानंतर महिन्याभरातच त्यांनी पुरोगामी गट या नावाचा पक्ष स्थापन केला. काँग्रेसमधील व देशामधील सर्व समाजवादी विचारसरणीच्या लोकांना एकत्र आणावे व त्यांच्या द्वारा देशात क्रांतिकारक स्वरूपाची उठावणी करावी, हा त्यांचा हेतू होता. परंतु याही प्रयत्नात त्यांना यश आले नाही. एका पाठोपाठ मिळत राहिलेल्या या अपयशाच्या फट क्यांनी सुभाषबाबू अगदी संत्रस्त होऊन गेले. तथापि स्वस्थ बसणे त्यांच्या रक्तात नव्हते. त्यामुळे त्यांनी आता काँग्रेसबाहेरील अखिल भारतीय कीर्तीच्या नेत्यांनाभेटून त्यांच्याशी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांविषयी चर्चा करण्याचे ठरविले.

ते ज्या अनेक नेत्यांना भेटले त्यांत स्वातंत्र्यवीर सावरकर हे एक होते. सावरकरांनी सुभाषबाबूंची तळमळ जाणून घेतली आणि त्यांना म्हटले. 'मला नुकतेच जपानमधून रासबिहारी बसूंचे पत्र आले आहे. त्यावरून जपान या वर्षाच्या अखेरपर्यंत युद्ध पुकारील असा संभव दिसत आहे. तसे जर झाले, तर आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी जर्मनी-जपानच्या अद्ययावत शस्त्रास्त्रांनिशी आणि लढाईत मुरलेल्या सहस्रावधी भारतीय सैनिकांनिशी हिंदुस्थानवर चाल करून येण्याची यापूर्वी कधीही न लाभलेली संधी साधता येण्यासारखी आहे. अशा वेळी इथे सापेक्षतः क्षुल्लक वाटणाऱ्या चळवळी करून बंदीगृहात अडकून पडण्यापेक्षा रासबिहारी बसूंप्रमाणे ब्रिटिशांच्या हातांवर तुरी देऊन आपणही हिंदुस्थानाबाहेर पडावे आणि तिकडे जर्मनीच्या हाती पडलेल्या सहस्रावधी भारतीय सैनिकांचे नेतृत्व करून हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेवर बाहेरून प्रहार करावा.'

सावरकरांच्या या उपदेशाने सुभाषबाबूंच्या विचारांना योग्य दिशा मिळाली आणि पुढील योजना आखण्याच्या दृष्टीने ते कलकत्त्याला परतले.

पुढे कलकत्त्याला हॉलवेलचे स्मारक उखडण्याच्या प्रयत्नांत ते पकडले गेले; परंतु तुरुंगात त्यांनी प्राणांतिक उपोषण आरंभल्यामुळे लौकरच त्यांची मुक्तता झाली. मुक्ततेनंतर त्यांनी स्वतःला आपल्या घरातच बंदिस्त करून घेतले. आप्त-स्वजनांच्या आणि सहकाऱ्यांच्या भेटी घेणेही त्यांनी बंद केले. आपण अध्यात्मसाधना करणार आहोत, असे सर्वांना भासवून त्यांनी पूर्णपणे एकांतात राहण्यास सुरुवात केली आणि अशा एकांताच्या काळातच एके दिवशी ते एकाएकी घरातून नाहीसे झाले.

त्यांचे हे गुप्त होणे आकस्मिक नव्हते. बऱ्याच दिवसांपासून ते त्याची सिद्धता करत होते. जानेवारी १९४१ च्या प्रारंभी केव्हातरी ते हिंदुस्थानातून नाहीसे झाले. दि. २६ जानेवारीच्या सुमारास ही वार्ता बाहेर पडली. पण तोपर्यंत सुभाषबाबू गुप्त हेरांना चकवून भारतातून बाहेर पडून काबूलला पोचले होते.

काबूलपर्यंतचा सुभाषबाबूंचा प्रवास हे एक दिव्य होते. ज्या अफगाण प्रदेशातून ते काबूलकडे निघाले होते, तिथली पुश्तू भाषा त्यांना मुळीच येत नव्हती. त्यांचा सहकारी भगतराम यालाही नाममात्रच पुश्तू येत होते. अशा स्थितीत सुभाषबाबूंना बहिऱ्या-मुक्याचे सोंग वठवून वाटचाल करावी लागत होती. त्यांनी पठाणाचा वेष घेतला होता आणि झियासुद्दीन या नावाने ते आपली ओळख करून देत होते. खिशात फारसे पैसे नसल्यामुळे आणि पाठीवर ब्रिटिशांचे हेर वावरत असल्यामुळे त्यांना कोणत्याही वाहनातून जाता येत नव्हते, की राजरस्त्याने चालता येत नव्हते. तथापि काबूलला सुखरूप पोचल्यावर मात्र त्यांच्या आयुष्यातले वनवासपर्व जवळ जवळ संपले.

काबूलला ते लाला उत्तमचंद नावाच्या एका भारतीय व्यापाऱ्याकडे सुमारे दीड महिना राहिले. या मुक्कामात त्यांनी प्रथम रशियाशी संधान बांधायचा प्रयत्न केला; परंतु तो अयशस्वी झाल्यावर त्यांनी जर्मनीशी संपर्क साधला. हिटलरने आपल्या हस्तकांकरवी त्यांना बर्लिनला नेण्याची व्यवस्था केली.

हिटलरने त्यांना प्रथम भेटीतच सांगितले, की 'तूर्त तरी जर्मनी तुमच्या मदतीला येऊ शकत नाही. भारताकडे जाण्यापूर्वी मार्गातला रशियन प्रदेश पादाक्रांत करणे हे आमचे सध्याचे साध्य आहे.' हिटलरच्या या स्पष्टोक्तीपुढे सुभाषबाबूंचे बोलणेच खुंटले. तथापि ते निराश झाले नाहीत.

मग त्यांनी मुसोलिनीशी संधान बांधले. त्याने हंगामी भारत-सरकार स्थापण्याची सूचना त्यांना केली. मुसोलिनीची ही सूचना सुभाषबाबूंना पसंत पडली; परंतु हंगामी सरकारच्या स्थापनेची पूर्वतयारी झाली नसल्यामुळे त्यांनी तो विचार बाजूस ठेवला व तसे मुसोलिनीला कळवून ते दुसऱ्या प्रयत्नाला लागले.

सर्वप्रथम त्यांनी हिटलर-मुसोलिनीच्या ताब्यात असलेल्या भारतीय सैनिकांच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली व मातृभूमीच्या मुक्ततेसाठी स्वतंत्र सेना उभारण्याचा आपला मनोदय त्यांनी त्या सैनिकांना सांगितला. ज्या सैनिकांना त्यांचा हा विचार पटला, त्यांना हिटलर-मुसोलिनींच्या संमतीने बर्लिनला एकत्र करण्यात आले. ड्रेस्डेनजवळच्या ॲनाबर्ग या गावी या सैनिकांची छावणी उभारण्यात आली. सुभाषबाबू अष्टौप्रहर त्यांना मार्गदर्शन करू लागले.

याच सुमारास जपानने महायुद्धात उडी घेतली व प्रशांत महासागरातील ब्रिटिश आणि अमेरिकन नौदलांवर हल्ले चढवायला प्रारंभ केला. 'शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' या राजनीतिनुसार त्यांनी आता जपानशी मैत्री जुळविण्याचे ठरविले. परंतु यापूर्वीच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला पाठिंबा देण्याविषयी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जर्मनी, इटली व जपान यांना आवाहन करणारी एक सूचना जपानचे प्रधानमंत्री जनरल टोजो यांनी केली.

लौकरच जनरल टोजो यांचे सुभाषबाबूंना चर्चेसाठी बोलावणे आले. जपानला जाण्यापूर्वी सुभाषबाबूंनी हिटलर-मुसोलिनींची पुन्हा भेट घेतली व टोजोच्या सूचनेला त्यांनी मान्यता द्यावी अशी विनंती केली. परंतु या दोघांनीही त्यांना सांगितले की,' अद्याप तशी वेळ आलेली नाही.'

जपानमधील भारतीय क्रांतिकारकांचे अध्वर्यू रासबिहारी बसू यांनी याच सुमारास बँकॉक येथे एक स्वातंत्र्यपरिषद भरवली होती. तिला शुभसंदेश धाडताना सुभाषबाबूंनी आपल्या कल्पना स्वच्छ शब्दांत मांडल्या. त्यांनी लिहिले. 'आता अशी वेळ आली आहे, की जगभर पसरलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी एकत्र येऊन स्वातंत्र्ययुद्ध पुकारले पाहिजे. केवळ इतरांवर विसंबून आपला कार्यभाग सिद्धीस जाणार नाही. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आता आपलें आपणच कटिबद्ध झाले पाहिजे.'

सुभाषबाबूंच्या डोक्यात आता एकसारखे जपानला जाण्याचे विचार येत होते; तरी त्यांना एकदम युरोपातून बाहेर पडणे शक्य नव्हते. युरोपातल्या प्रचारयंत्रणेची नीट व्यवस्था लावणे आवश्यक होते; युरोपात त्यांनी स्वतंत्र नभोवाणी केंद्र चालू केले होते. त्या नभोवाणीवरून ते आपल्या ध्येयाचा वारंवार उद्घोष करीत होते. त्यांच्या स्वतंत्र भारत केंद्राचा ध्वज तिरंगीच होता; फक्त त्यावर चरख्याऐवजी झेप घेणाऱ्या वाघाचे चित्र होते. सुभाषबाबूंच्या साऱ्या जीवनाकांक्षेचे ते प्रतीक होते.

१९४३ साली ते जपानच्या टोकियो बंदरात उतरले. दुसऱ्याच दिवशी त्यांनी प्रधानमंत्री टोजो यांची भेट घेतली. प्रथम भेटीतच टोजोने त्यांना स्पष्टपणे सांगितले, की 'आम्ही हिंदुस्थानवर स्वारी करून ब्रिटिशांना हाकलून दिल्यानंतर युद्ध संपेपर्यंत हिंदुस्थानने आमच्या बाजूनेच उभे राहिले पाहिजे. आमची ही अपेक्षा युद्धकाळापुरतीच मर्यादित आहे, हे मी मुद्दाम सांगू इच्छितो. युद्ध संपल्यावर हिंदुस्थान अर्थातच पूर्णपणे स्वतंत्र होईल. आपले भवितव्य ठरविण्यासाठी आम्ही शक्य ती सर्व मदत आपल्याला देऊ.'

त्यानंतर सुभाषबाबूंनी रासबिहारी बसूंची भेट घेतली. रासबिहारींनी चालविलेल्या इंडियन इंडिपेंडन्स लीगची व त्यांच्या आझाद हिंद सेनेची त्यांनी पूर्ण माहिती करून घेतली.

त्यानंतर रासबिहारींनी आपल्या स्वातंत्र्य-संघाची व स्वातंत्र्य-सेनेची सूत्रे सुभाषबाबूंच्या हाती दिली. इथून पुढे सुभाषबाबू नेताजी या अभिधानाने गौरवले जाऊ लागले. अशा प्रकारे स्वातंत्र्यसमराचे सर्वांगीण सूत्रचालकत्व हाती आल्यावर सुभाषबाबूंनी प्रचाराचे अक्षरशः रान उठविले. सभा, दौरे, बैठकी, भाषणे, लष्करी संचलने, या गोष्टींत ते गर्क होऊन गेले. महिन्या दीड महिन्यांच्या काळात त्यांनी जवळ जवळ सबंध पूर्व आशियातील प्रत्यक्ष युद्धकालीन अवस्थेचे निरीक्षण केले व प्राप्त परिस्थितीत भारतातल्या इंग्रजी साम्राज्यावर आपल्याला कुठून व कशी झेप घेता येईल याचे आडाखे मनाशी बांधले. मलाया व ब्रह्मदेश या दोन देशांतच त्यांना १४ लाख भारतीय नागरिक आर्थिक दृष्ट्या संपन्न असल्याचे दिसून आले. आपल्या नव्या सेनेसाठी व सरकारसाठी सुभाषबाबूंनी त्यांना मोठ्या प्रमाणावर अर्थसाहाय्य करण्याविषयी आवाहन केले. सयाममधल्या पंचावन्न सहस्र भारतीय मजुरांनी आपल्या सेनेत सामील व्हावे, यासाठीही त्यांनी प्रयत्न आरंभिले.

दि. ८ ऑगस्ट १९४३ रोजी त्यांनी लष्करी पद्धतीनुसार आझाद हिंद सेनेचे सरसेनापतिपद स्वीकारले. दि. २१ ऑक्टोबर रोजी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची प्रस्थापना झाली. या सरकारचे प्रमुख म्हणून नेताजींनी पुढील प्रतिज्ञा केली–

'परमेश्वराला स्मरून मी सुभाषचंद्र बोस अशी पवित्र शपथ घेतो, की हिंदुस्थानची आणि माझ्या देशबांधवांची पारतंत्र्यातून मुक्तता करण्यासाठी मी माझ्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत स्वातंत्र्ययुद्धाची पुण्यशील ज्वाला प्रज्वलित ठेवीन. हिंदुस्थानचा सेवक म्हणून माझ्या देशबांधवांची आणि भगिनींची सेवा करणे हे मी माझे परमपवित्र कर्तव्य मानीन. स्वातंत्र्य मिळाल्यावर त्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी मी माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब खर्ची घालीन.'

नेताजींच्या प्रतिज्ञावाचनानंतर त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनीही अशीच शपथ घेतली. या आझाद हिंद सरकारचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे होते –

सुभाषचंद्र बोस– सरकारप्रमुख, प्रधानमंत्री, युद्धमंत्री व परराष्ट्रमंत्री.

कॅ. श्रीमती लक्ष्मी– महिलाशाखाप्रमुख; एस्. ए. अय्यर– प्रचारमंत्री; ले. क. ए. सी. चतर्जी– अर्थमंत्री.

लष्कराचे प्रतिनिधी– अझीझ अहमद, एन्. एम्. भगत, जगन्नाथराव भोसले, गुलझारासिंग, एम्. झेड. किआनी, ए. डी. लोकनाथन्, एहसान कादिर व शहानवाझखान.

सल्लागार– करीम घनी, देवनाथ दास, डी. एम्. खान, ए. येल्लाप्पा, एफ्. थिवी व सरदार ईश्वरसिंह.

सर्वोच्च सल्लागार– रासबिहारी बसू.

सचिव– ए. एम्. सहाय.

कायदेशीर सल्लागार– ए. एन्. सरकार.

आझाद हिंद सरकारला जपान, ब्रह्मदेश, क्रोआटिआ, जर्मनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फिलिपाईन्स, नानकिंग चीन, सयाम, मांचुकुओ आणि इटली या नऊ राष्ट्रांनी मान्यता दिली.

या नव्या सरकारच्या स्वतंत्र नोटा टोकियो येथील टांकसाळीत छापल्या जाऊ लागल्या. हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा, जय हिंद हा परस्पर अभिवादनासाठी शब्द व तिरंगी हा

कॅ. लक्ष्मी स्वामिनाथन

राष्ट्रध्वज, असे महत्त्वाचे निर्णय पहिल्याच दिवशी घेण्यात आले.

यानंतर दि. २३ ऑक्टोबर १९४३ च्या मध्यरात्री आझाद हिंद सरकारने ब्रिटन व अमेरिका यांच्या विरुद्ध युद्धाचे रणशिंग फुंकले आणि ज. टोजोची भेट घेऊन जपानी सेनेबरोबर आझाद सेनेच्या पलटणीही आघाडीवर पाठवण्याची संमती मिळविली. जिंकलेल्या भारतीय प्रदेशावर यापुढे आझाद हिंद सरकारचा अंमल राहील, असेही सुभाषबाबूंनी टोजोला बजावले व टोजोनें ते मान्य केले. त्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून अंदमान-निकोबार ही बेटे टोजोने सुभाषबाबूंकडे देऊन टाकली.

जपानी सेनेसमवेत रणांगणाकडे निघालेल्या आझाद हिंद सेनेच्या पहिल्या तुकडीला निरोप देताना सुभाषबाबू म्हणाले – रक्त रक्ताला आवाहन करीत आहे. सिद्ध व्हा. आता आपल्याला एक क्षणही गमावून चालणार नाही. शस्त्र हाती घ्या. आपल्या पूर्वीच्या स्वातंत्र्ययोद्धयांनी बांधलेल्या रस्त्यावरून आता तुम्हांला वाटचाल करायची आहे. एक तर आपण शत्रूला चोपून काढू किंवा हुतात्म्याला साजेसे बलिदान करू तसे झाले, तर दिल्लीला जाणाऱ्या रस्त्यावरच आपला देह पडला. हे समाधानही काही कमी नाही. दिल्लीचा रस्ता हा स्वातंत्र्याचा रस्ता आहे. म्हणून आता आपणां सर्वांचा पुकार एकच असला पाहिजे 'चलो दिल्ली'!

मोहिमेच्या पहिल्याच फेरीत आझाद सैनिकांनी कित्येक ठिकाणी अतुल पराक्रम गाजविला. त्या वेळी नेताजींची कचेरी रंगूनला होती. दि. १९ मार्च १९४४ रोजी जपानी सेना व आझाद हिंद सेनेची पथके हिंदुस्थानच्या सीमेत येऊन ठाकली आणि एक-दोन दिवसांतच टोजोने घोषणा केली, की जिंकलेल्या भारतीय प्रदेशावर आझाद हिंद सेना स्वामित्व गाजवील.

यानंतर जपानी सेनेने इंफाळच्या मोहिमेला प्रारंभ केला व आझाद हिंद सेना तिला साथ करू लागली. परंतु पहिल्या अनेक लढायांपेक्षा आताच्या लढाया अधिक कठीण अवस्थेत लढाव्या लागत होत्या. प्रदेश डोंगराळ होता. पाऊस कोसळू लागला होता. रसद पोचवणे अशक्य झाले होते. आणि सगळ्यांत दुर्दैवाची गोष्ट म्हणजे जागतिक युद्धाचा रंग पालटत होता. जर्मनी, इटली, जपान या राष्ट्रांना जागोजाग मोठा पराभव पत्करावा लागत होता. सुभाषबाबूंना हे सारे दिसत होते आणि मातृभूमीच्या उंबरठ्यावरूनच आपल्याला अयशस्वी होऊन परतावे लागणार, असे त्यांना वाटू लागले.

लवकरच जपानी सेनेची विलक्षण जोमाने पीछेहाट सुरू झाली आणि त्यामुळे आझाद हिंद सेना व नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे मनोरथही धुळीस मिळाले. अखेर दि. १५ ऑगस्ट १९४५ या दिवशी जपानने अधिकृतरीत्या आपली शरणागती जाहीर केली. त्यानंतर सुभाषबाबूंनी आपल्या सैनिकांसाठी अखेरचे आदेशपत्र लिहून रशियाला जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. पूर्व आशियातल्या आपल्या भारतीय बांधवांचा निरोप घेण्यासाठी त्यांनी नभोवाणीवर भाषण केले, ते असे –

'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामातील एक गौरवशाली अध्याय नुकताच पुरा झाला आहे. त्या अध्यायातले तुमचे कार्य अमर आहे. मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी तुम्ही केलेला त्याग अतुलनीय आहे. मला या त्यागाचे कधीही विस्मरण होणार नाही.'

दि. १६ ऑगस्टच्या सकाळी सुभाषबाबू बँकॉकला गेले व दि. १७ ऑगस्टला संध्याकाळी सव्वापाच वाजता ते टोकियोला जाणाऱ्या विमानात चढले. परंतु दुसऱ्याच दिवशी म्हणजे दि. १८ ऑगस्टला दुपारी दोन वाजता त्यांचे विमान अकस्मात पेटले व त्यात सुभाबाबूंचे निधन झाले.

सुभाषबाबूंच्या निधनाने एक श्रेष्ठ श्रेणीचा देशभक्त आणि धाडसी स्वातंत्र्यवीर अस्त पावला. स्वदेशाच्या दास्यमुक्तीसाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि त्याच्या स्वातंत्र्योत्तर प्रगतीसाठी मोठमोठ्या योजना आखून त्यांची कार्यवाही करण्याकरिता त्यांनी केलेले प्रयत्न अविस्मरणीय होत. आपल्या ईप्सिताच्या प्राप्तीसाठी उपोषण–निदर्शनांपासून प्रत्यक्ष शस्त्राचारी क्रांतियुद्धापर्यंत कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्याची त्यांची सदैव सिद्धता होती. त्यामुळेच त्यांनी म. गांधींपासून स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत सर्व नेत्यांचे प्रसंगपरत्वे साहाय्य स्वीकारले. त्यांचा स्वभाव काहीसा तापट असला, तरी वागणूक सौजन्याची व सौहार्दाची असे. ते वृत्तीने अध्यात्मवादी असले तरी, बुद्धिवाद व विज्ञान यांच्या सामर्थ्यावरही त्यांचा पुरेपूर विश्वास होता. दूरदृष्टी, आत्मविश्वास, धडाडी, योजकत्व, निर्भयपणा व शूरपणा हे सेनापतीचे गुणही त्यांच्या अंगी वसत होते. त्यामुळे नेताजी ही उपाधी त्यांना सर्वस्वी साजून दिसते. [गरुडझेप–श्री. वि. स. वाळिंबे १९६८; सुभाष– श्री. भा. कृ. केळकर, १९४६]

बोसंतिया ओडिसाच्या गंजाम जिल्ह्यातील एक जात. हे लोक मुळात बसंती रंगाचा व्यापार करीत होते. एका विशिष्ट झाडाला गुलाबी फळे येतात व त्या फळांवर लाल चूर्ण असते. याच चूर्णापासून ते लाल रंग तयार करीत. गंजाम जिल्ह्यात ही झाडे मोठ्या प्रमाणावर लावलेली आहेत. सांप्रत हे लोक शेती करतात.

यांच्यांत नागशिर (नाग), कोचिमो (कासव), इ. देवके असून, त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाही.

यांच्या प्रमुखाला बिस्सोयी असे म्हणतात. त्याच्या मदतनिसाला भोलोभाय असे नाव आहे. याशिवाय जातीचा एक निरोप्या असतो, त्याला जाति-नाईक म्हणतात.

यांच्यापैकी बरेचसे लोक शैव किंवा वैष्णव आहेत. त्याशिवाय ते निरनिराळ्या ग्रामदेवतानाही भजतात. [का. ट्रा. स. इं.]

बोहले लग्नमंडपात वधू-वरांना विवाहहोमासाठी बसण्याकरिता जी चौकोनी वेदी तयार करतात, तिला बोहले किंवा बहुले असे नाव आहे. अग्नीला बहुल असे एक नाव आहे. त्यावरून अग्नीसहित बसण्याची जी वेदी, तिला बहुले असे नाव मिळाले असावे. एक हात उंच व चार हात लांबरुंद बोहले तयार करावे, त्यावर चढण्यासाठी पायऱ्या कराव्या, त्याच्या चारही कोपऱ्यांत सुशोभित स्तंभ किंवा केळीचे खांब लावावे, चारही कोनांवर रंगविलेल्या, मातीच्या घडयांची अथवा बोळक्यांची उतरंड रचावी आणि बोहल्यावर गणपती व स्वस्तिकादी शुभ चिन्हे रेखाटावी, असे सांगितले आहे.

बहुले हे व्रतबंधासाठीही घालतात. बटूच्या हाताने चार हात औरस-चौरस व हातभर उंच असे ते असावे, त्याला पायऱ्या असाव्या आणि ते पूर्वेस व उत्तरेस उतरते असावे, तसेच तोरणे व पुष्पमाला यांनी ते सुशोभित करावे, असे सांगितले आहे. व्रतबंधतिथीच्या आदल्या दिवशी ते तयार करतात. [सं. कौ.]

बोहाडा एक नृत्यनाटच. महाराष्ट्रातील खानदेश व नासिक या भागांत हे प्रचलित आहे. चैत्रापासून आषाढापर्यंत म्हणजे जेव्हा शतीच्या कामाची विशेष गर्दी नसते, अशा काळात मनोरंजनार्थ हे नृत्यनाटच सादर केले जाते. प्रत्यक्ष बोहाडयाचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी दोन-दोन महिने त्याची पूर्वतयारी चालते. या नृत्यनाटचाचे कथाप्रसंग रामायण-भारतावर आधारित असल्यामुळे यातील नटांना रावण, कुंभकर्ण, बिभीषण, राम, कृष्ण, भीम, अर्जुन, मारुती, इ. देवदैत्यांच्या हालचालींचा, हावभावांचा अभ्यास करावा लागतो. या देवदैत्यांची भाषणे आणि विनोद यांची उभारणी कोण्यातरी अनुभवी नटाने कल्पनेनेच केलेली असते. बोहाडा हे नृत्यनाटच असल्यामुळे त्यात नृत्याला प्राधान्य असते आणि पशूंचे, पक्ष्यांचे, राक्षसांचे व देवांचे नृत्य वेगवेगळ्या प्रकारे दाखवण्यासाठी त्या त्या नटाला आपापली निरीक्षणशक्ती पणाला लावून कसून मेहनत करावी लागते.

बोहाडयाचा मुख्य कथाभाग पौराणिक असला, तरी कालपरत्वे त्यात वैदू, वाळंतीण, बोहारीण, राजकीय पुढारी, इ. नानाविध माणसांची सोंगे आणली जातात. त्यामुळे बोहाडयाचे स्वरूप निव्वळ दशावतारी खेळासारखे राहिले नाही.

प्रथम कागदाचा लगदा व उडदाचे पीठ एकत्र करून त्याच्या लुकणापासून देवदैत्यांचे मुखवटे तयार करतात. देवांचे मुखवटे शांत सात्त्विक भाव दर्शविणारे व दैत्यांचे मुखवटे क्रूर-भीषण भाव व्यक्त करणारे असतात. या मुखवटयांना एकदा पक्का रंग दिला, की मग ते वर्षानुवर्षे वापरात राहिले तरी टिकतात.

यानंतर गणपती, सरस्वती, शंकर, खंडोबा, इ. देवतांसाठी उंदीर, मोर, नंदी, घोडा, इ. वाहने तयार केली जातात. या वाहनांचे मुखवटेही कागदाचा लगदा व उडदाचे पीठ यांपासूनच बनवतात. त्यांचे बाकीचे शरीर मात्र पोलादी किंवा लोखंडी पत्र्याचे करतात व त्याच्या पाठीला, एक मनुष्य कमरेइतका आत उभा राहू शकेल एवढे मोठे छिद्र ठेवतात. उदा० महादेव होणारा नट नंदीच्या पाठीवर न बसता त्याच्या पाठीत असलेल्या छिद्रातून आत उतरतो व मग नाचू लागतो. मात्र त्या वेळी त्याचे पाय दिसू नयेत व तो नंदीवरच बसला आहे असे वाटावे, यासाठी नंदीच्या पाठीवर जमिनीपर्यंत लोंबणारी मोठी झूल घालून त्यावर महादेवाचे दोन कृत्रिम पाय दोन्हीकडे लोंबते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सोडतात. महादेवाचे काम करणाऱ्या नटाला, आपल्या भोवतालचा नंदी सुटू नये म्हणून कमरेभोवती व खांद्यावरून पोलादी पट्ट्यांनी तो आवळून बांधावा लागतो. असले हे अवजड वाहन तोलीत नाचणे म्हणजे त्या त्या नटांच्या ताकदीची परीक्षाच असते.

मुख्य कार्यक्रमाला प्रारंभ होण्याअगोदर काही दिवस गावातली वृद्ध मंडळी बोहाडचात काम करणाऱ्या नवागत तरुणांची कसून परीक्षा घेतात; विशेषतः त्यांच्या नाचण्याची तयारी पाहतात. महादेवाची भूमिका करणाऱ्या नटाला नंदीसारखे आणि सरस्वतीचे सोंग वठवणाऱ्याला मोरासारखे तासन्‌तास न दमता नाचता येणे आवश्यक असते. इतकेच नव्हे तर त्या त्या नटाला त्या त्या प्राण्याचे ओरडणेही साधावे लागते. या कसोटचांना जे उतरतात, त्यांनाच कार्यक्रमात भाग घेता येतो.

प्रत्यक्ष बोहाडचाच्या दिवशी नटांना वावरण्यासाठी सडकेचा लांबलचक पट्टा आखून घेतात. या सडकेच्या दोन्ही बाजूंना प्रेक्षक दाटीवाटीने बसतात. रात्रीच्या वेळी पलिते पेटवून त्यांच्या प्रकाशात बोहाडचाचा खेळ सुरू होतो. प्रथम सूत्रधार नमन करतो. मग संबळ आणि पिपाण्या यांच्या तालावर विदूषक उडचा मारू लागतो. त्यानंतर भालदार-चोपदार गणपतीच्या आगमनाच्या ललकाऱ्या देतात आणि पाठोपाठ उंदरावर बसलेला गणपती नाचत नाचत पुढे येतो. गणपती गेला, की सरस्वती येते व नाचून आणि आशीर्वाद देऊन परत जाते.

एवढे झाल्यावर बोहाडचाचे मुख्य कथानक सुरू होते व ते ओळीने पाच पाच रात्री चालते. लोकही न कंटाळता, न थकता ते पाहतात. यात एका वेळी दोन-दोनशे नट भाग घेतात. [श्री. भा. दो. पाटील— सा. स्वराज्य, ३ फेब्रु. १९६८]

बोहोरा एक व्यापारी जात. हे लोक धर्माने मुसलमान असून, मख्यत्वे व्यापारी आहेत. गुजरातेतील सुरत, भडोच; महाराष्ट्रातील मुंबई; तसेच राजस्थान, मध्य प्रदेश आणि भारतातील इतर प्रदेशांतील व्यापारी शहरांत यांची वस्ती मोठ्या प्रमाणात आढळते. व्यवहार या संस्कृत शब्दापासून बोहोरा हा शब्द निघाला असावा, असे म्हणतात.

सर्व बोहोरा लोक हे इस्माइली पंथाच्या शिया धर्मप्रचारकांकडून इ. स. च्या ११ व्या शतकात बाटवल्या गेलेल्या हिंदू व्यापाऱ्यांची संतती आहेत. पण त्यांच्यापैकी काहीजण यमनी अरब व इजिप्तमधील अरब यांना आपले पूर्वज मानतात. शहरांतील बोहोरा हे व्यापारी असून शिया आहेत, तर खेड्यांतील बोहोरा शेतकरी असून सुन्नी आहेत. इ. स. च्या ११ व्या शतकात यमनमधील हरासमधून अबदुल्ला नावाचा एक धर्मप्रचारक खंबायत येथे आला. त्याने काही चमत्कार करून तिथल्या लोकांना आपल्या भजनी लावले व अनेकांना बाटवून मुसलमान केले. तेव्हापासून गुजरातेत इस्माइली पंथाला प्रचार निर्वेधपणे चालू झाला. पण पुढे इ. स. च्या १४ व्या शतकात गुजरातेत मुझफरशहाची सत्ता स्थापन झाली. त्याने सुन्नी पंथाला उत्तेजन दिल्यामुळे बोहोरा व इतर शियापंथी लोक यांचा छळ सुरू झाला व भारतात इंग्रजी राजवट येईपर्यंत तो चालूच राहिला. इ. स. १५३९ मध्ये बोहोरांच्या मुख्य धर्मगुरूचे केंद्र यमनमधून गुजरातेत आले. तोपर्यंत गुजरातेतील बोहोरा यमनच्या धर्मगुरूच्या आधिपत्याखाली होते.

बोहोरा पुरुष

बोहोरा लोकांचे व्यापारी किंवा शिया आणि शेतकरी किंवा सुन्नी असे दोन मुख्य भेद आहेत.

शिया बोहोरा — यांचे अलिया, दाउदी, जाफरी, नागोशी व सुलेमानी असे पाच पोटभेद आहेत. त्यांची माहिती अशी—

अलिया बोहोरा — इ. स. १६२४ मध्ये अली नामक पुरुषाने या पंथाची स्थापना केली. म्हणून या लोकांना अलिया असे नाव मिळाले.

दाउदी बोहोरा — हे लोक अत्यंत श्रीमंत, संघटित व भारतभर पसरलेले आहेत. त्यांच्या पागोटचाचा आकार लोटचासारखा दिसतो; म्हणून त्यांना लोटिया असेही म्हणतात. या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकांचा वर्ण तांबूस गोरा असतो. त्यांचे नाकडोळे रेखीव असतात. त्यांच्या स्त्रिया गोऱ्या, नाजूक व सुंदर असतात. त्या डोळ्यांत सुरमा घालतात आणि दातांना मिस्री लावतात. पुरुष डोक्याला पांढरे पागोटे बांधतात आणि अंगरखा, विजार व जोडे असा पोषाख करतात. स्त्रिया घागरा, चोळी, जाकिट व ओढणी असा वेष धारण करतात. बाहेर जाताना त्या बुरखा घेतात.

हे लोक गुजराती भाषा बोलतात. हे धार्मिक वृत्तीचे असून नियमितपणे नमाज पढतात, मक्केच्या यात्रेला जातात आणि नृत्य, गायन व मद्य यांपासून दूर राहतात. ते पुत्र-प्राप्तीनंतर अकीक नावाचा यज्ञासारखा प्रकार मुल्लाच्या घरी जाऊन करतात. लग्नाच्या वेळी वधू-वर लहान असतील तर वली त्यांचे प्रतिनिधित्व करतात. याशिवाय त्यांचे बाकीचे आचार मुसलमानांसारखेच असतात.

दाउदी बोहोरा फार संघटित असतात. इतर मुसल-मानांशी त्यांचे पटत नाही. सुरत येथील प्रमुख मुल्ला हा त्यांचा धार्मिक व सामाजिक बाबतींत पुढारी असतो. सर्व लोक त्याला फार मान देतात. धार्मिक बाबतीत हलगर्जीपणा केल्यास किंवा व्यभिचार, मद्यपान, इ. गुन्हे केल्यास, मुल्ला-कडून त्यांना शिक्षा मिळते.

निराधार व दरिद्री बोहोरांना प्रमुख मुल्ला आर्थिक मदत करतो. या मुल्लाचा खर्च भागविण्यासाठी लोक आपल्या उत्पन्नाचा पाचवा भाग त्याला देतात.

जाफरी बोहरा – गुजरातेत यांची बरीच वस्ती आहे. जाफर शिराजी नामक पुरुषाने त्यांना सुन्नी पंथाची दीक्षा दिली, म्हणून त्यांना हे नाव मिळाले. त्याला ते अजूनही पीर म्हणून भजतात. हे दाउदी बोहऱ्यांपेक्षा थोडे वेगळे असून, मेनन आणि सुन्नी मुसलमानांशी त्यांचे बरेच साम्य आहे. जाफरी फक्त आपसांतच लग्नसंबंध करतात. लग्नात मिरवणुका काढीत नाहीत. ते धार्मिक प्रवृत्तीचे असून, त्यांच्या बायकांनाही कुराण वाचता येते.

नागोशी बोहोरा – इ. स. १७८९ नंतर यांचा पंथ उदयाला आला. प्राण्यांचे मांस खाणे, हे निषिद्ध मानतात. हे लोक आता जवळजवळ नामशेष झाले आहेत.

सुलेमानी बोहोरा – सुरतेच्या एका बोहोराने इ. स. च्या १६ व्या शतकात एक मुल्ला अरबस्थानात पाठविला व त्याने तिथल्या अनेक लोकांना या पंथाची दीक्षा दिली. त्यांचेच हे वंशज होत. त्यांच्या मुल्लाच्या बिझाई या उपाधीवरून त्यांना बिझाई बोहोरी असेही नाव मिळाले आहे. सुलेमान नामक अरबस्थानातील मुल्लाला यांनी आपला प्रमुख मानले, म्हणून त्यांना सुलेमानी हे नाव मिळाले. यांची संख्या थोडी आहे.

दाउदी बोहोरा आणि सुलेमानी बोहोरा यांमध्ये फारसा फरक नाही; पण ते परस्परांशी विवाहसंबंध करीत नाहीत. ते गुजराती बोहोरांसारखा वेष न करता पाश्चात्यांप्रमाणे करतात.

सुन्नी बोहोरा – इ. स. च्या १४ व्या व १५ व्या शतकात जे हिंदू बोहोरा बनले, त्यांचे हे वंशज होत. हे लोक चिप्पाड व गोरे असून, त्यांचे नाकडोळे रेखीव असतात. पुरुष लांब दाढी वाढवतात. त्यांच्या स्त्रिया उंच, अंगापिंडाने मजबूत आणि सुंदर असतात.

उत्तर गुजरातमधील सुन्नी बोहोरा डोक्याला सैलसर असे मोठे पागोटे, अंगात बंडी, काठी लोकांसारखी विजार व व कमरेला शेला बांधतात; तर मध्य गुजरातेतील सुन्नी बोहोरा डोक्याला मोठे पागोटे, कोट व बिनकासोटचाचे धोतर असा पोषाख करतात. द. गुजरातच्या शहरांतील बोहोरा, मेमन लोकांसारखा वेष करतात. शहरांतील व त्याच्या आसपासच्या भागांतील बोहोरा मुसलमानी वेष करीत असले, तरी खेड्या-पाड्यांतील शेतकरी बोहोरा स्त्रिया हिंदू स्त्रियांसारखा घागरा, चोळी, ओढणी असा पोषाख करतात. पुरुष गळ्यात चांदीच्या साखळ्या, हातात चांदीची कडी व बोटांत अंगठ्या घालतात. त्यांच्या स्त्रियांचे दागिने फार जड व वैशिष्ट्यपूर्ण असतात.

हे लोक धार्मिक वृत्तीचे असून, नमाज पढण्यात दक्ष असतात. पीरजादा हे त्यांचे आध्यात्मिक गुरू होत. हे अजूनही हिंदूंच्या काही चालीरीती पाळतात. लग्नापूर्वी दोन–तीन दिवस, वालु-देवाप्रीत्यर्थ ते दोन प्रकारच्या डाळी एकत्र शिजवून त्यांचे पदार्थ वाटतात. घरात एखाद्याचा मृत्यू झाल्यास स्त्रिया ऊर पिटून रडतात. हिंदूंप्रमाणे ते घरात मर्तिक झाल्यावर ज्ञाति-भोजनही देतात.

जवळजवळ सर्व सुन्नी बोहोरा जमीनदार व शेतकरी आहेत. गरीब बोहोरांच्या स्त्रिया शेतात काम करून त्यांना मदत करतात. श्रीमंत शेतकरी पदरी गुलाम बाळगतात. हे लोक मांस-मासे खातात; पण दारू पीत नाहीत.

सर्वबोहोरा लोक प्रेते पुरतात. [हिं. वि. को.; ट्रा. का. बॉं. वि. मुं. रा. प.; रज:कण]

बौद्ध कला

बौद्ध धर्माने अनुप्राणित अशा कलेला बौद्ध कला म्हणतात. भारताच्या कलासंभारात बौद्ध कलेला एक स्वतंत्र स्थान आहे. मूर्ती, स्थापत्य व चित्र या तीनही प्रकारांनी भारतात आणि भारताबाहेर बौद्ध कलेचा आविष्कार झालेला दिसून येतो.

स्थापत्यकला – सनपूर्व तिसऱ्या शतकापासून बौद्ध कलेचे दर्शन सुरू होते. बुद्धाच्या अनुयायांत व्यापारी वर्ग फार मोठा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता. त्यांनी बौद्ध भिक्षूंसाठी सांची, भरहूत, अमरावती, कार्ले, भाजे, नागार्जुनकोंड, इ. ठिकाणी विशाल स्तूप आणि चैत्य निर्माण केले. स्तूप हे उपासनेसाठी व विहार हे निवासासाठी असत. प्रेताचे दहन झाल्यानंतर जे भाग न जळता शिल्लक राहतात, त्यांना बौद्ध साहित्यात शारीरिक धातू म्हटले आहे. बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर त्याचे अस्थी, रक्षा व दंत असे जे धातू शिल्लक राहिले, ते त्याच्या भक्तांनी राजगृह, वैशाली, कपिलवस्तू, अल्लकप्प, पावा, कुशीनगर, रामग्राम व वेठद्वीप या ठिकाणी नेले आणि तिथे त्या अवशेषांवर स्तूप बांधले.

बुद्धाप्रमाणेच प्रत्येकबुद्ध व अर्हत यांच्या धातूंवरही स्तूप उभारण्याची प्रथा होती. सारनाथ येथे ५०० प्रत्येकबुद्धांनी निर्वाण प्राप्त केले होते. तिथे त्यांच्या नावांनी दोन स्तूपांची स्थापना केलेली आहे. स्तूपांपैकी सांची व भरहूत येथील स्तूप प्राचीनतम समजले जातात. विटांचा बनविलेला प्राचीनतम स्तूप नेपाळच्या सीमेवर पिपरावा या ठिकाणी आहे. सनपूर्व ४५० वर्षे हा त्याचा निर्माणकाल समजतात.

सांचीच्या स्तूपाला बौद्ध कलेत एक आगळे स्थान आहे. हा अशोकाने निर्माण केला. हा स्तूप सुमेरू पर्वताचे प्रतिनिधित्व करतो. अशा प्रकारचे स्तूप नेपाळ, लंका व जावा या ठिकाणींही पाहायला मिळतात.

मध्य प्रदेशातल्या भरहूत या गावचा स्तूप चुनारच्या लाल दगडांनी बनविलेला होता. सांप्रत तो जाग्यावर नाही. त्याचे काही अवशेष कलकत्ता येथील संग्रहालयात पाहायला मिळतात. बौद्ध धर्मात नृत्य-गायनाला स्थान नाही. पण सांची व भरहूत या ठिकाणच्या कलाकारांचा लोकजीवनाशी घनिष्ठ संबंध असल्यामुळे, त्यांनी धर्माधिष्ठित कलेतही नृत्य-गायनाला स्थान दिले. भरहूतच्या अर्धचित्रांत काही ऐतिहासिक विषयांचे चित्रण झाले आहे; जातककथाही खोदल्या आहेत. कमलांचे भिन्न भिन्न प्रकार हे भरहूतकलेचे वैशिष्टच होय. तिथल्या शिल्पकारांनी कमलनिर्मितीत मौलिक प्रतिभा प्रकट केली आहे. कमळांचे इतके विविध प्रकार अन्यत्र कुठेही आढळणार नाहीत. सांची व भरहूत येथील स्तूप निर्माण होण्याच्या काळात बुद्धाची साक्षात पूजा प्रचलित नव्हती. बुद्धाच्या मूर्तीऐवजी त्याची प्रतीकेच पूजिली जात होती.

आंध्रातल्या अमरावती येथील उत्खननात एक स्तूप आढळला आहे. या स्तूपाच्या आतल्या व बाहेरच्या कठड्यावर हजारो चित्राकृती कोरलेल्या आहेत. अमरावतीचे हे आकृतियुक्त कठडे म्हणजे शिल्पकलेतले एक महदाश्चर्यच होय.

नागार्जुनकोंड हेही आंध्रातलेच ठिकाण होय. इथल्या कलानिर्मितीत स्तूप, चैत्य, विहार, स्तंभ, कमलस्थ बुद्धमूर्ती, पूर्णघट, इ. शिल्पकृती आहेत. या कारागिरीत बुद्धजीवनातील विशेष प्रसंग व जातककथा यांचे चित्रण आहे.

विहार हा बौद्ध कलेचाच एक प्रकार आहे. शुंगराजांच्या काळात सह्याद्रीच्या अनुषंगाने काही बौद्ध विहार निर्माण झाले. या विहारांनाच गुहा-मंदिरे किंवा लेणी असे म्हणतात. भाजे, कार्ले, बेडसे, कौंडिण्यगुंफा, इ. लेणी प्रसिद्ध आहेत. या सर्वांत भाजे येथील लेणे अधिक प्राचीन आहे. भिंतीवरच्या विशाल प्रतिमा हे भाजे येथील लेण्यांचे वैशिष्टच होय. भाज्याचे शिल्पविधान सांची व भरहूत यांच्याही आधीचे असावे, असे वाटते.

भाज्याच्या समोरच कार्ले येते. कार्ल्याची गुहा-मंदिरे ही सर्व लेण्यांत अग्रगण्य मानली जातात. त्यांतला स्तूपही विशाल आहे. विहाराच्या प्रवेशद्वारापासून स्तूपापर्यंत मोठे मोठे खांब दोन्ही बाजूंनी हारीने उभे आहेत. त्यांच्यावर हत्ती, घोडे आणि त्यांच्यावर स्वार यांच्या आकृती सजीवपणे कोरल्या आहेत. दुमजली-तिमजली लेणी किंवा गुहा-मंदिरे निर्माण करण्याची प्रथा कार्ल्यापासूनच सुरू झाली, असे म्हणतात.

नाशिकजवळच्या बौद्ध लेण्यांना पांडवलेणी म्हणतात. स्थापत्याच्या विकासाच्या दृष्टीने या लेण्यांतील खांबांना महत्त्व आहे. त्यांच्या मुळाशी दगडांना जलकलशाचा आकार दिलेला आहे.

मूर्तिकला – बौद्ध लेण्यांत मूर्तिकारीने आपला फार मोठा विकास साधला आहे. बुद्धाच्या धातुमय व पाषाणमय अशा मूर्ती बौद्ध धर्माच्या उत्कर्षकालात हजारोंनी निर्माण झाल्या आहेत.

गौतम शाळेला जात आहे – गांधार शैली

बुद्धाची पहिली विशालकाय मूर्ती गांधार देशातल्या कलावंतांनी निर्माण केली, असे मानतात. अशा मूर्तींची शरीरयष्टी, मुद्रा आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकूण आविर्भाव ग्रीक पद्धतीचा आहे. त्या मूर्तिकलेला गांधार शैली असेच नाव आहे. गांधार शैलीचे बहुतेक सर्व विषय बुद्ध आणि बुद्धचरित्र हेच आहेत. या शैलीत बुद्ध आणि बोधिसत्त्व यांच्या मुखमंडलाच्या मागे प्रभामंडळ निर्माण केलेले आढळते. मूर्ती अलंकृत नसून साध्याच असतात. त्यांचे ते साधेपणच उठून दिसते. गांधार शिल्पात बुद्धाचे शरीर पुष्ट व मांसल बनविलेले असते. एक दीर्घ वस्त्र बुद्धाच्या खांद्यावरून खाली आलेले असते. त्याच्यावर बारीक चुण्या दिसतात. कित्येक वेळा या चुण्या इतक्या पातळ दाखविलेल्या असतात, की जणू ते वस्त्र भिजून बुद्धाच्या शरीराला चिकटून बसले आहे. गांधार शैलीतला बुद्ध म्हणजे एखादा योगिराजच वाटतो.

गांधार शैलीच्या समकालीन अशी दुसरी शैली मथुरा शैली या नावाने ओळखली जाते. सनपूर्व दुसऱ्या शतकातल्या या शैलीच्या काही मूर्ती आढळतात. यक्ष-यक्षिणींच्या मूर्ती हा मथुरा येथील कलाकारांचा आवडता विषय आहे. मथुराशैलीतला बुद्ध हा वेगळ्या धर्तीचा असतो. त्याच्या मस्तकी केस नसतात. असलेच तर कुरळे असतात. त्याचा डावा हात मांडीवर ठेवलेला असतो व उजवा हात अभयमुद्रेत असतो. जेव्हा बुद्ध उभा असतो तेव्हा त्याचा डावा हात कमरेवर असतो. त्या स्थितीत त्याच्या दोन पायांमध्ये सिंहाची आकृती असते. तो बसलेला असला, तर त्याच्या आसनाखाली सिंह असतो. प्रभामंडल असते, पण ते साधे असते. गुप्तयुग हे संपूर्ण भारतीय कलेचे सुवर्णयुगच मानले जाते. मथुरा, सारनाथ आणि बिहार मधील कित्येक नगरे या ठिकाणच्या बुद्धमूर्ती त्या युगाच्या प्रतिनिधी ठरतात. या मूर्तींचे मुखमंडल आध्यात्मिक तेजाने प्रकाशित झाल्यासारखे वाटते. त्याची खाली वळलेली अर्धोन्मीलित दृष्टी प्राणिमात्रांवर करुणेचा वर्षाव करीत आहे, असे दिसते.

अमरावती व आसपासचा भाग या ठिकाणी बुद्धाच्या धातुमूर्ती बऱ्याच मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. ही मूर्तिशैलीही इ. स. च्या पूर्वीचीच आहे. इ. स. च्या ८ व्या शतकापासून धातुमूर्ती अधिकाधिक लोकप्रिय होऊ लागल्या. पाल राजांच्या कारकीर्दीत (९ वे ते १० वे शतक) नालंदा, कुर्किहार, इ. ठिकाणी ज्या धातुमूर्ती बनल्या, त्यांच्या मुखावर आध्यात्मिक भाव स्पष्टपणे दिसतात. या कालखंडात ज्या धातुमूर्ती बनल्या, त्यांचा प्रभाव जावा, सुमात्रा, नेपाळ व ब्रह्मदेश इथल्या कलांवरही पडला. आग्नेय आशियाई देशांतल्या साऱ्याच बौद्ध मूर्तिकलेवर नालंदा आणि अमरावती येथील कलाशैलीचा प्रभाव आहे.

चित्रकला – बौद्ध चित्रकलेचे प्राचीनतम अवशेष अजंट्याच्या लेण्यांत पाहायला मिळतात. ही बहुतेक चित्रे भित्तिचित्रे आहेत. बौद्ध आशय डोळ्यापुढे ठेवूनच ती चितारलेली आहेत. पद्मपाणी बोधिसत्त्व हे या लेण्यांतले अत्यंत प्रसिद्ध चित्र होय. त्याच्या जोडीने वज्रपाणी व अवलोकितेश्वर हे येतात. तिथले मारविजय हे चित्र कलामर्मज्ञांनी उत्कृष्ट ठरविले आहे. तिथल्या भितींवर जातकांतल्या कित्येक कथाही चित्रित झाल्या आहेत.

अजंट्यातील चित्रांच्या तीन श्रेणी आहेत. पहिल्या श्रेणीत बुद्धाचा जन्म, त्याचे महाभिनिष्क्रमण, मारविजय, धर्मचक्रप्रवर्तन, इ. चित्रांचा समावेश होतो. जातककथांतील प्रसंगांची चित्रे दुसऱ्या श्रेणीत येतात. नाग, यक्ष, गंधर्व, विद्याधर, किन्नर, राक्षस व देवगण यांची चित्रे ही तिसरी श्रेणी होय.

परदेशांतील बौद्धकला—बौद्ध कलेचा समस्त आशियावर इतका प्रभाव आहे, की त्याची तुलना कुठल्याही इतर कलाशैलीशी करता येत नाही. सम्राट अशोकाच्या शिलालेखांवरून त्याचा विदेशी राजांशी संबंध असल्याचे कळते. अशोकाच्या स्तंभशीर्षांवर इराणी प्रभाव दिसतो तो त्यामुळेच. मथुरेच्या क्षत्रप राजांच्या कालात आणि कुशाणांच्या कालात भारतीय कलाशैली आणि विदेशी कलाशैली यांचे संमिश्रण झाले. कुशाण कलेवर गांधार शैलीचा जसा प्रभाव दिसतो, तसाच अफगाणिस्तानातल्या कलाशैलीवर मथुरा शैलीचा प्रभाव दिसतो. ग्रीक व रोमन परंपरांचा प्रभाव गांधार शैलीवर पडला आणि त्याचा परिणाम म्हणूनच बुद्ध व बोधिसत्त्व यांच्या कलापूर्ण अशा विशालकाय मूर्ती निर्माण झाल्या.

हारीती ही एक बौद्ध देवता आहे. चिनीतुर्कस्तान व जावा या ठिकाणी तिचे मूर्तीकरण झाले आहे. मातृवात्सल्याचे प्रतीक म्हणून त्या मूर्ती दाखविता येतात. तिबेटमधला ग्यन-त्से स्तूप हा बोरोबुदूरच्या स्तूपाचे स्मरण करून देतो. नेपाळ व तिबेट या देशांत ध्यानी बुद्ध, मानुषी बुद्ध, मैत्रेय बुद्ध, तारा, मारीची, लोकपाल, जंभल, अवलोकितेश्वर, इ. देव-देवता यांचे चित्रण व मूर्तीकरण फार मोठ्या प्रमाणावर आढळते. या नेपाळी व तिबेटी कलेवर नालंदा येथील कलेचा विशेष प्रभाव दिसतो.

बौद्ध कलेचे काही विस्मयजनक आविष्कार लंकेतही पाहायला मिळतात. अनुराधपूर येथे एक प्राचीन बुद्धमूर्ती असून, ती ध्यानमुद्रेत आहे. इ. स. च्या १२ व्या शतकातली महापरिनिर्वाण मुद्रेतली बुद्धमूर्ती ही सिंहली लोककलेची एक अद्भुत कलाकृती समजली जाते. ब्रह्मदेशातले प्राचीनतम बौद्ध स्तूप साधे आणि भारतीय ढंगाचे आहेत. पेगन येथील गक्ये-नदौन स्तूप सारनाथच्या धमेख स्तूपाची आठवण करून देतो. क्कांगमुदाङ हा दुसरा स्तूपही सांचीच्या स्तूपाची प्रतिकृती वाटतो. ज्ञानप्राप्तीनंतर भगवान बुद्ध एका मोठ्या वादळात सापडला असता मुचलिंद नावाच्या नागाने त्याचे संरक्षण केले. या प्रसंगाचे चित्रण सयाममध्ये फार सुंदर रीतीने झाले आहे. त्रयस्त्रिंश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वर्गातून बुद्ध सांकाश्य येथे उतरतो, ते दृश्यही सयामच्य कलाकारांनी मोठ्या उत्साहाने चित्रित केले आहे.

इ. स. चे आठवे ते दहावे शतक या कालात जावामध्ये बौद्ध कलेचा सर्वाधिक विकास झाला. जावाची कलाही भारतीय कलेने

बुद्धाचे स्वर्गातून सांकाश्य येथे अवतरण

अनुप्रेरित असली, तरी तिने स्वत: विकसित होऊन नालंदा व नागपट्टिनम येथील कलाकारांवरही आपला प्रभाव पाडला. तिथल्या चंडीमेंदुत या मंदिरात बोधिसत्त्वांनी घेरलेल्या बुद्धाचे एक चित्र आहे. हे चित्र जावाची एक अनुपम कलाकृती समजली जाते. दुसरी श्रेष्ठतम कलाकृती प्रज्ञापारमितेची होय. ही मूर्ती इ. स. च्या १२-१३ व्या शतकातील असून, तिला विश्वातली एक श्रेष्ठ कलाकृती मानतात.

भारतात सर्वत्र बौद्ध कलेचा विकास झाला हे आश्चर्य नव्हे; पण भारताबाहेरही बौद्ध कला समृद्ध स्वरूपात अभिव्यक्त झाली हे खरे आश्चर्य होय. भारताबाहेरच्या कलावंतांनी निर्माण केलेल्या वस्तू भारतीय वस्तूंशी तुलना करता श्रेष्ठतर ठरतात. जिथे जिथे बुद्धाचा धर्म गेला, तिथे तिथे स्थानिक कलावंतांनी त्याला आकृतिबद्ध केले. त्यांची कल्पनाशक्ती विलक्षण होती आणि हातही सिद्धहस्त होते. म्हणूनच जगातल्या सर्व विद्वानांनी आणि कलासमीक्षकांनी बौद्ध कलेविषयी आदराने आणि गौरवाने लिहिले आहे. [भा. सं. क.; प्रा. भा. सां. कें.; आजकल वार्षिक अंक, डिसेंबर १९५६; क. प्रा. बु.; श्री. गैरोला, इलस. वीकली, १० जून १९५६]

बौद्ध दर्शन

प्रत्येक धर्माची आचार व तत्त्वज्ञान अशी दोन अंगे असतात. बौद्ध धर्म मुख्यत: आचारधर्म आहे. बुद्धाचा सिद्धान्त होता, की माणसाचे बरे-वाईट होणे, तसेच त्याला सुख किंवा दु:ख होणे, हे त्याचे कर्म व चारित्र्य यांवर अवलंबून आहे. मनुष्याचे लक्ष आपण काय करतो आणि काय जाणतो या दोहोंमध्ये पहिल्या गोष्टीवर असले पाहिजे. करणे आणि जाणणे या दोहोंमध्ये बुद्धाने कर्मालाच प्राधान्य दिले आहे. जे विषय बुद्धीला ग्रहण होत नाहीत आणि ज्यांच्याविषयी केवळ तर्क आणि अनुमानच करावे लागते, अशा विषयांवर त्याने कधीही जोर दिला नाही.

बौद्ध धर्माचे नेमके दर्शन काय, याविषयी जगातल्या पंडितांमध्ये मतभेद आहेत. ही सृष्टी कुठून उत्पन्न झाली? मनुष्यप्राणी कुठून आला आणि तो मेल्यानंतर कुठे जाईल? मनुष्य मरणोत्तर जिवंत राहतो की नाही? बुद्धाने ज्याला निर्वाण म्हटले ती चीज काय आहे? निर्वाणाचा अर्थ मृत्यू आणि विनाश हाच आहे का दुसरा काही? हे बौद्ध दर्शनाविषयीचे काही प्रश्न होत. या प्रश्नांविषयी विद्वानांत कडाक्याचे वादविवाद होतात.

कोणत्याही दर्शनात आत्मा, परमात्मा आणि सृष्टी या त्रयींचा विचार प्रामुख्याने असतो. काहींच्या मते बुद्ध हा नास्तिक होता आणि तो आत्मा आणि परमात्मा यांपैकी कोणालाच मानीत नव्हता. दुसऱ्या काहींचे म्हणणे असे, की जीवनाच्या पलिकडे काय आहे, हे बुद्ध जाणत नव्हता. तिसऱ्या काहींचे मत असे, की बुद्धाला सगळे माहीत होते; पण इंद्रियांतीत विषयांत काही सांगणे किंवा जाणून घेणे या गोष्टींची त्याला जरुरी वाटली नाही आणि म्हणून तो अशा प्रश्नांविषयी मूक राहिला.

आत्मा, परमात्मा, इ. बाबतींत त्याचे हे मूक राहणे त्याच्या ज्या काही शिष्यांना आवडले नाही, त्यांपैकी मालुंक्यापुत्त हा अग्रेसर होता. आत्मा आणि विश्व, तसेच मृत्यूनंतरची माणसाची स्थिती यांविषयी बुद्धाने स्पष्टीकरण दिलेच पाहिजे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि ते जर त्याने दिले नाही तर आपण त्याला सोडून जायचे, असे त्याने ठरविले. तो एकांती बुद्धाकडे येऊन म्हणाला. 'महाराज, मला या प्रश्नांची उत्तरे हवीत; अन्यथा मी तुमचा शिष्य राहणार नाही.' त्यावर बुद्ध मालुंक्यापुत्ताला म्हणाला. 'बाबारे, मी तुझ्या प्रश्नांची उत्तरे देईन असे कधी आश्वासन दिले होते काय?' मालुंक्यापुत्त म्हणाला. 'नाही. भगवंताने तसे आश्वासन दिले नाही.' त्यावर बुद्धाने प्रतिप्रश्न केला. 'मग तू धाक कुणाला दाखवतोस? अरे, जो मनुष्य अशा प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत वाट पाहील, तो ती उत्तरे मिळण्यापूर्वीच मरून जाईल. मालुंक्यापुत्ता, एखाद्या मनुष्याला विषलिप्त बाण लागावा, तो काढण्यासाठी त्याच्या नातेवाइकांनी शस्त्रकुशल अशा वैद्याला बोलवावे, वैद्याने पुढे यावे, पण बाणहत मनुष्याने त्याला थांबवून म्हणावे, "अहो वैद्यराज, मला ज्याने बाण मारला तो क्षत्रिय होता, ब्राह्मण होता, का आणखी कोण होता, त्याचा रंग कसा होता, उंची किती होती, हे सगळे आधी मला सांगा आणि मग माझ्या अंगातला बाण काढा." मालुंक्यापुत्ता, ही सगळी माहिती मिळेपर्यंत तो माणूस जिवंत राहील काय? मी बोलतो ते पवित्र जीवनाविषयी. तसे जीवन जगायला जग हे शाश्वत की अशाश्वत, सान्त की अनंत, आत्मा देहरूप की देहभिन्न हे समजायची मुळीच गरज नाही. ब्रह्मचर्य, वैराग्य, निवृत्ती, उपशम, अभिज्ञान, संबोध, प्रसाद व निर्वाण यांच्याशी या प्रश्नांचा संबंध येत नाही. मी दुःखाचे कारण व दुःखनिरास याविषयी ज्ञान दिले आहे. पवित्र जीवनाशी त्याचा फक्त संबंध येतो.

दुसऱ्या एका वेळी बुद्धाने वच्छगोत्ताला म्हटले, ते असे —

विश्व व आत्मा या विषयी ज्या चर्चा चालतात, त्यांची मी उपेक्षा करतो. तशी चर्चा म्हणजे ते एक विचारकांतार आहे. ते बुद्धीचे बंधन आहे. ते तापदायक असून, ते ज्ञान व निर्वाण यांच्याकडे मनुष्याला नेऊ शकत नाही. हा धोका पाहून मी त्या चर्चा सोडून दिल्या आहेत'

मानवी जीवनाचे प्रश्न, विश्वाचे प्रश्न सुटल्याशिवाय सोडवता आले पाहिजेत. कारण मानवी जीवित अल्पकालिक आहे. विश्वाचा प्रश्न सुटेपर्यंत थांबायला माणसाला अवसरच नाही. म्हणून जीवनाचा प्रश्न निश्चितपणे सोडविण्याचे बुद्धाने ठरविले व महत्त्वाची दार्शनिक तत्त्वे अव्याकृत म्हणून सोडून दिली. अव्याकृत म्हणजे अनिर्णित, ज्याचे व्याकरण अर्थात विशदीकरण सांगितलेले नाही, ते. बुद्धाने ईश्वर आहे की नाही या प्रश्नाचेही उत्तर दिले नाही. त्याने आपल्या धर्मोपदेशात ईश्वराचे कुठे नावही घेतले नाही आणि अर्थातच त्याच्या भक्तीची साधनाही सांगितली नाही. कारण जर कोणी विश्वावर सत्ता चालविणारा ईश्वरच अस्तित्वात नाही, तर भक्ती आणि प्रार्थना कुणाची करायची?

बुद्धाने हिंदू धर्मातला जन्मांतरवाद व कर्मफलवाद जसाच्या तसा स्वीकारला आहे. बुद्धाचेही निश्चित मत होते, की जीवन दुःखमय आहे आणि हे दुःख भोगण्यासाठी मनुष्याला वारंवार जन्म घ्यावा लागतो. त्याच्या अंतरात ज्या वासना शिल्लक असतात, त्या त्याला पुनर्जन्मासाठी प्रवृत्त करतात. या वासनांमुळेच मनुष्य नाना कर्मांत प्रवृत्त होतो आणि मेल्यावर कर्मानुसारच उत्तम किंवा अधम योनीत जन्म घेतो. पुनश्च त्या जन्मातले संस्कार त्याला नव्या जन्मग्रहणांसाठी विवश करतात. अशा प्रकारे जन्ममरणाचा प्रवाह सतत चालत राहतो. हा सिद्धान्त बौद्ध दर्शनात प्रतीत्यसमुत्पाद या नावाने मांडला आहे.

प्रतीत्यसमुत्पाद — हा सिद्धान्त म्हणजे बौद्ध धर्माची एक आधारशिला आहे. ज्या दिवशी गौतमाला बोधी प्राप्त झाली, त्याच रात्री त्याला या सिद्धान्ताचे ज्ञान झाले. त्या ज्ञानाला धरून त्याने स्वाभाविक क्रमाने कारणांची एक परंपरा स्थिर केली. प्रतीत्यसमुत्पाद हा हेतुप्रत्ययता यांचा सिद्धान्त आहे. हेतू शब्दाचा बौद्ध दर्शनातला अर्थ लोभ, दोष व मोह यांच्या द्वारे होणारी चित्ताची विकृती, असा आहे. कार्यकारणसंबंधाच्या कोणत्याही प्रकाराचे द्योतन करण्यासाठी प्रत्यय शब्द वापरला आहे. एक वस्तू दुसऱ्या वस्तूशी जो संबंध धारण करते तिला प्रत्यय म्हणतात. हेतू हा कार्याचे मुख्य कारण असतो, तर प्रत्यय हा गौण कारण असतो. उदा० बीज जमिनीत पुरले, की ते अंकुरित होऊन त्याचा वृक्ष होतो. पृथ्वी, सूर्य व पाऊस या गोष्टी त्या अंकुराच्या वाढीला मदत करतात. म्हणून बीज हे वृक्षाचे मुख्य कारण व पृथिव्यादी इतर गोष्टी गौण कारण होत. प्रतीत्यसमुत्पाद हा अशा प्रकारे सापेक्ष कारणतावाद आहे. या शब्दाची फोड अशी —

प्रतीत्य (प्रति + इ = जाणे, + त्यप् प्रत्यय) = एखाद्या वस्तूची उत्पत्ती होणे याला प्रतीत्यसमुत्पाद म्हणतात. 'अस्मिन् सति इदं भवति' = अमुक एक वस्तू असता अमुक एक वस्तू उत्पन्न होते, असा बुद्धाने त्याचा निर्देश केला आहे. जगतातल्या प्रत्येक वस्तूच्या किंवा घटनेच्या मागे सर्वत्र हा कार्यकारणाचा नियम जागरूक आहे. एका कारणाच्या आधारे दुसरे कार्य उत्पन्न होणे व त्या कार्याने कारणरूप बनून पुनश्च तिसऱ्या कार्याची उत्पत्ती करणे, अशा प्रकारची प्रतीत्यसमुत्पाद ही कारणांची शृंखला आहे. भूत, वर्तमान व भविष्य या तीन्ही कालांत हा नियम लागू आहे. कारणतेचे हे चक्र अनादी अनंत आहे. हा नियम सर्व विषयांना लागू आहे. अपवाद फक्त असंस्कृत धर्मांचा. आकाश, प्रतिसंख्यानिरोध व अप्रतिसंख्यानिरोध

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांना असंस्कृत धर्म मानतात. ते नित्य व अनुत्पन्न मानले गेले आहेत. बौद्ध लोक याही पुढे जाऊन म्हणतात, की साक्षात बुद्धालाही प्रतीत्यसमुत्पाद चुकला नाही. तोही कार्यकारणांच्या या नियमात बांधला आहे. तीन्ही कालातले बुद्ध या नियमात परिवर्तन करण्याला समर्थ झाले नाहीत व भविष्यकालातही समर्थ होणार नाहीत.

प्रतीत्यसमुत्पाद या नियमाची बारा अंगे असून, ती एकामुळे दुसरे अशी उत्पन्न होतात. म्हणून या बारा अंगांना भवचक्र असे नाव दिलेले आहे. त्या अंगांची नावे व विवेचन असे –

(१) अविद्या – ही पूर्वजन्माची एक दशा असून, त्या दशेत अज्ञान, मोह व लोभ यांच्या अधीन होऊन प्राणी क्लेशबद्ध राहतो. सर्व क्लेश हे अविद्येचे सहचर असतात. उदा० 'राजाचे आगमन होत आहे' या वाक्याने राजाबरोबरच त्यांच्या अनुयायांचे आगमनही सूचित होते.

(२) संस्कार – पूर्वजन्मात ज्या दशेत मनुष्यप्राणी अविद्येच्या प्रभावाने जी भली-बुरी कर्मे करतो, त्यांना हा शब्द आहे. अविद्या व संस्कार ही दोन अंगे मागच्या जन्माशी संबंधित मानलेली आहेत.

(३) विज्ञान – मातेच्या गर्भात प्रवेश करून प्राणी चैतन्य प्राप्त करून घेतो. त्या जीवनाच्या अवस्थेला हे नाव आहे.

(४) नामरूप – गर्भात भ्रूणावस्थेच्या कलल, बुदबुद, इ. अवस्था असतात. त्या अवस्थेत भ्रूणाची शारीरिक व मानसिक अशी जी अवस्था असते, तिला हे नाव आहे. विज्ञानक्षणाला धरून पुढच्या षडायतनांच्या उत्पत्तीपर्यंतची अवस्था या नावाने गृहीत आहे.

(५) षडायतन – आयतन म्हणजे इंद्रिये होत. मातेच्या उदरातून गर्भ बाहेर येतो, तेव्हा त्याची अंग-प्रत्यंगे तयार असतात. पण त्या सर्वांचा उपयोग करण्याचे ज्ञान व सामर्थ्य त्या बालकाच्या ठिकाणी नसते, अशा अवस्थेला हे नाव आहे.

(६) स्पर्श – शैशव दशेला हे नाव आहे. या दशेत शिशूचा बाह्य जगातल्या पदार्थांशी संपर्क येतो. तो आपल्या इंद्रियांचा उपयोग करून बाह्य जगताचे ज्ञान करून घेण्याचा उद्योग करतो. मात्र या अवस्थेतले त्याचे ज्ञान अंधुक असते.

(७) वेदना – सुख, दुःख व नसुख आणि नदुःख असे वेदनेचे तीन प्रकार आहेत. शिशू पाच-सहा वर्षानंतर सुख-दुःख इ. वेदनांशी परिचित होतो. दहा वर्षांपर्यंत त्याच्या शारीरिक आणि मानसिक प्रवृत्ती वाढत जातात. पण अजून त्याला विषय-सुखाचे ज्ञान झालेले नसते.

(८) तृष्णा – विषयोपभोग व स्त्रीसंग यांची कामना ज्या अवस्थेत होते, त्या अवस्थेला हे नाव आहे.

(९) उपादान – मनुष्य कामनावश होऊन व विषयांची आसक्ती धरून त्यांच्या परिपूर्तीसाठी चहूकडे धावत सुटतो, त्या अवस्थेला हे नाव आहे.

(१०) भव – आसक्तिवश होऊन मनुष्य ज्या अवस्थेत नाना प्रकारची बरी-वाईट कर्मे करतो, त्या अवस्थेला हे नाव आहे. भवामुळेच मनुष्याला पुढचा जन्म घ्यावा लागतो.

३ ते १० ही आठ अंगे जीवाच्या वर्तमान जन्माशी संबंधित आहेत.

(११) जाती – भावी जन्मासाठी मातेच्या गर्भात जीव प्रविष्ट होतो व आपल्या सुकृत-दुष्कृतांची फले भोगण्याची योग्यता प्राप्त करून घेतो.

(१२) जरा-मरण – भावी जन्मात मनुष्याला वार्धक्य आणि मरण अनुभवावे लागते, त्या दशेला हे नाव आहे.

या दोन अवस्था भावी जन्माशी संबंधित मानलेल्या आहेत.

बारा अंगाच्या या शृंखलेत पहिले कारण व दुसरे कार्य असते.

अनात्मवाद – बुद्ध हा अनात्मवादी होता. त्याने आत्मवादी लोकांचे मोठ्या आवेशाने खंडन केले आहे. तो म्हणतो, की आत्मवादी पुरुष आत्मस्वरूप न जाणताच त्याच्या कल्याणासाठी नाना प्रकारची कर्मे करीत राहतो. असे करणे म्हणजे रूप, रंग, गुण, देहयष्टी, नाम, गोत्र यांची काहीही माहिती नसताना एखाद्या सुंदर स्त्रीवर प्रेम करण्यासारखा प्रकार आहे. अशा मूढ पुरुषाचा लोक सर्वथा उपहासच करतील. तद्वतच गुण व धर्म समजल्यावाचून परलोकात सुखप्राप्ती व्हावी म्हणून जे लोक यज्ञयागादी करतात, त्यांनाही मूर्खच म्हटले पाहिजे. आत्म्याचे अस्तित्व मानणे हे सर्व अनर्थांचे मूळ आहे. आत्म्याचे अस्तित्व मानल्याने अहंकाराचा उदय होतो. मग आत्म्याला सुख देण्याच्या उद्देशाने मनुष्य नाना प्रकारे या शरीराला सुख देण्याचा प्रयत्न करतो आणि अशा सुखाचे उपाय सतत शोधीत राहतो.

बुद्धाच्या या उपदेशाचे विवेचन पुढील आचार्यांनी अनेक तर्क, युक्ती आणि उदाहरणे यांच्या साहाय्याने केले आहे. नागार्जुन हा पंडित बोधिचर्यावतारपंजिका या ग्रंथात म्हणतो –

> यः पश्यत्यात्मानं तस्याहमिति शाश्वतः स्नेहः ।
> स्नेहात् गुणेषु तृष्यति तृष्णा दोषांस्तिरस्कुरुते ।।
> गुणदर्शी परितृष्यन् ममेति तत्साधनमुपादत्ते ।
> तेनात्माभिनिवेशो यावत् तावत्तु संसारः ।।
> आत्मनि सति परसंज्ञा स्वपरविभागात् परिग्रहद्वेषौ ।
> अनयोः सम्प्रतिबन्धात् सर्वे दोषाः प्रजायन्ते ।।

अर्थ – जो आत्म्याला पाहतो, त्या पुरुषाचा अहंशी नेहमी स्नेह जडून राहतो. स्नेहामुळे सुखप्राप्तीसाठी तृष्णा उत्पन्न होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तृष्णा दोषांचा तिरस्कार करते. गुणदर्शी पुरुष, विषय माझे आहेत, या विचाराने विषयांची साधने एकत्र करतो. त्यामुळे आत्माभिनिवेश उत्पन्न होतो आणि जोवर आत्माभिनिवेश राहतो, तोवर अर्थात प्रपंच शिल्लक राहतो. आत्म्याचे अस्तित्व मानल्यावरच पराचे ज्ञान होते. स्व-पर विभागामुळे रागद्वेषांची उत्पत्ती होते. स्वसाठी राग व परासाठी द्वेष. या रागद्वेषांच्या कारणानेच समस्त दोष उत्पन्न होतात.

या अनात्मवादालाच पुद्गलनैरात्म्य असे म्हणतात. अनात्म या शब्दाचा अर्थ असा – जगातील सर्व पदार्थ स्वरूपशून्य आहेत. ते काही धर्मांचे समुच्चय मात्र आहेत. अनात्म शब्द केवळ आत्म्याचा अभावच सांगत नसून, त्याबरोबरच अन्य पदार्थांची सत्ताही सांगतो. आत्मा सोडून या जगात सर्व वस्तूंना सत्ता किंवा अस्तित्व आहे. पुद्गल, जीव, आत्मा व सत्ता हे सर्व शब्द बौद्ध दर्शनात समानार्थक आहेत. बुद्धाच्या मते या शब्दांच्या द्वारे निर्दिष्ट होणारा पदार्थ हा स्वतंत्र सत्तावान नाही. आत्मा हे केवळ नाम आहे. परस्परसंबद्ध अशा अनेक धर्मांचे एक सामान्य नाम म्हणजे आत्मा किंवा पुद्गल होय.

बुद्धाने पारमार्थिक रूपात आत्म्याचा निषेध केला; पण व्यावहारिक स्वरूपात मात्र केला नाही. लोकव्यवहारासाठी त्याने आत्म्याची सत्ता मानली; पण तो रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान या पंचस्कंधांचा केवळ समुदाय आहे, असे त्याने म्हटले आहे.

नागसेन व मिलिंद यांच्या संवादांत हा नैरात्म्य–सिद्धान्त चांगल्या रीतीने समजावून दिलेला आहे. नागसेनाने मिलिंद राजाला विचारले. " राजा, तू इथवर पायी आलास की वाहनात बसून आलास ?" राजा – " मी रथात बसून आलो. "

" मग मला दाखव, की तुझा रथ कुठे आहे ? दांडा म्हणजे रथ आहे काय ?" राजा – " नाही, महाराज."

" आस म्हणजे रथ काय ?" राजा – " नाही, महाराज. "

" चाके म्हणजे रथ काय ?" राजा – " नाही, महाराज. "

" मग, रथाचा पिंजरा, दोऱ्या, लगाम, चाबूक म्हणजे रथ काय ?" राजा – " नाही, महाराज. "

मिलिंद पुढे म्हणाला. " आता मला कळले, की रथ नावाची कोणती वस्तूच अस्तित्वात नाही. दंड, चक्र, पंजर, इ. अवयवांच्या आधारावर केवळ व्यवहारासाठी त्या सर्वांना मिळून रथ असे म्हणतात. "

नागसेन म्हणाला. ' आत्म्याच्या बाबतीतही तसेच आहे. तो केवळ समुच्चयमात्र आहे. '

बुद्धाने राहूलाला जो उपदेश दिला, तो अनत्तलक्खणसुत्तात सांगितला आहे. त्यात आत्म्याविषयी सांगताना बुद्ध म्हणतो–

देहधारी व्यक्तीच्या पंचस्कंधांना वास्तविक अस्तित्व नाही. ते तत्त्वहीन आहेत. मिथ्या आहेत. जेव्हा आयू, ऊष्मा व विज्ञान यांचा अंत होतो, तेव्हा ते पंचस्कंधही विघटित होतात. या पंचस्कंधांविरहित देहधारी व्यक्तीच्या आत आत्मा नावाचे एखादे सहावे तत्त्व नाही. जेव्हा पंचस्कंध संघटित होऊन देहधारी व्यक्ती निर्माण करतात, तेव्हा ते उपादानस्कंध बनतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर प्रत्येक स्कंध एका निश्चित मात्रेत अन्य सर्व स्कंधांशी मिश्रित होऊन देहधारी व्यक्तीची उत्पत्ती करतो. स्कंधांचे हे संघटन कोण्या सृष्टिकर्त्या ईश्वराच्या इच्छेने किंवा प्रेरणेने होत नसून, प्रतीत्यसमुत्पादाच्या सिद्धान्तानुसार होत असते. याविषयी उदाहरण असे – वनात उगवलेला वृक्ष प्रथम फुलांना व नंतर फळांना जन्म देतो. जर नवनिर्मितीसाठी आवश्यक असलेली परिस्थिती व कारणे विद्यमान असतील, तर जमिनीवर पडलेले फळ दुसऱ्या वृक्षांना पुनश्च उत्पन्न करते. या उत्पत्तिपरंपरेत आत्मा नावाच्या एखाद्या वस्तूला कसलेच स्थान नाही. या पंचस्कंधांच्या समष्टीलाही आत्मा समजणे ही भ्रांती आहे. आत्मा आणि स्कंध एकच आहेत, असे म्हटल्यास आत्मा हा स्कंधासारखाच अनित्य व नाशवान ठरतो. तो स्कंधाहून भिन्न आहे, असे मानल्यास त्याची अवस्था गाईच्या बरोबर असलेल्या गुराख्यासारखी होते. म्हणून आत्मा आणि स्कंध एक आहेत, असेही म्हणता येत नाही आणि ते दोन आहेत, असेही समजता येत नाही.

उपनिषदांत आत्मा नित्य, शुद्ध, बुद्ध व अपरिवर्तनशील मानलेला आहे. उपनिषदे असेही सांगतात, की आत्मा हा कर्मांचा कर्ता नसून, तो कर्मफलांचा भोक्ता आहे. अशा प्रकारे तो निर्गुण, निष्क्रिय असला, तरी प्रकृतीशी संयोग झाल्याने त्याच्यामध्ये काही वैशिष्ट्ये निर्माण होतात. यावर बौद्धांचे मत असे, की कोणत्याही अपरिवर्तनशील किंवा अविकारी सत्तेचा परिवर्तनशीलतेशी संयोग होऊ शकत नाही; तसेच अपरिवर्तनशील आत्मा परिवर्तनशील प्रकृतीचा भोक्ताही होऊ शकत नाही. तात्पर्य, आत्मा नावाची वस्तूच कुठेही नाही. मी आणि माझे या प्रकृतीला आधारभूत अशी ती एक केवळ धारणा आहे. दर्पणात ज्याप्रमाणे प्रतिबिंब उमटते, त्याप्रमाणे स्कंधांच्यामुळे आत्म्याची धारणा होते.

बुद्धाला पुनर्जन्माचा सिद्धान्त मान्य आहे. मग इथे प्रश्न असा येतो, की आत्मा जर अनित्य, केवळ संघातमात्र असेल तर पुनर्जन्म कोणाचा होतो ? वैदिक मतात ही अडचण नाही. तिथे आत्मा नित्य, शाश्वत मानल्यामुळे तोच पुनर्जन्म घेतो असे सांगता येते. पण बौद्ध मतात तशी परिस्थिती नाही. ज्याने कर्म केले तो अतीतात लीन होऊन गेला आणि जो जन्मला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याने ते कर्मच न केल्यामुळे त्याचे फल भोगण्यासाठी त्याने नवा जन्म घेतला, हे म्हणणे अप्रयुक्त आहे. मिलिंदांने नागसेनाला हाच प्रश्न केला होता –

'जो जन्मतो तो तोच असतो की दुसरा ?'

नागसेन म्हणाला. " तो तोच नसतो आणि दुसराही नसतो. "

त्यावर राजाने विचारले, " असे कसे ? "

" सांगतो. दिव्याचे उदाहरण घे. एखादा मनुष्य रात्रीच्या वेळी दिवा लावतो. पण तो एकच दिवा रात्रभर जळत राहतो काय ? मुळीच नाही. दिवा लावते वेळी जी दीपज्योत प्रज्वलित झाली, ती दीपज्योत वेगळी आणि दुसऱ्या, तिसऱ्या प्रहरी इतकेच नव्हे तर प्रत्येक क्षणी जी जळून गेली, ती वेगळी. पण असे असले तरी एकच दिवा जळत राहिला आहे, असे आपणांस वाटते. दिवा एक खरा; पण त्याची शिखा (ज्योत) प्रतिक्षणी परिवर्तन पावते. आत्म्याच्या बाबतीतही हाच नियम लागू आहे. कोणत्याही वस्तूच्या अस्तित्वाच्या बाबतीत एक अवस्था उत्पन्न होते, त्याच क्षणी एका अवस्थेचा लय होतो. प्रवाहाच्या या दोन अवस्थांमध्ये एका क्षणाचेही अंतर असत नाही. कारण एकीचा लय होतो न होतो तोच दुसरी उत्पन्न होते. याच कारणामुळे पुनर्जन्माच्या वेळी जीव तोच राहत नाही दुसराही होत नाही. एका जन्माच्या अंतिम आणि विज्ञानाचा लय होतो न होतो तोच दुसऱ्या जन्माचे प्रथम विज्ञान पुढे उभे राहते. प्रत्येक क्षणी कर्म नष्ट होत जाते; पण त्याची वासना पुढच्या क्षणात अनुस्यूत रूपाने प्रवाहित होते.

अशा प्रकारे आत्म्याची अनित्यता बौद्ध मानीत असूनही पुनर्जन्म तर्कसिद्ध मानतात.

अनीश्वरवाद– बुद्ध हा अनीश्वरवादी होता. त्याच्या मते ईश्वराचे अस्तित्व मानण्यासाठी कोणताही तर्क उपलब्ध नाही. दीघनिकायाच्या पाथिकसुत्तात बुद्धाने ईश्वराच्या कर्तृत्वाचा उपहास केला आहे. केवट्टसुत्तात ईश्वरालाही अन्य देवतांसमान एक सामान्य देवता म्हटले आहे. त्या देवता जितक्या अज्ञानी तितकाच ईश्वरही अज्ञानी. बुद्ध ईश्वराला सर्वज्ञ मानायला तयार नाही. ईश्वराचे अस्तित्व अशा प्रकारे नाकारून बुद्धाने आपल्या अनुयायांना त्याच्या प्रभावातून मुक्त केले. कधी न पाहिलेला, न ऐकलेला ईश्वर मानायचा, त्याच्यावर आपला सर्व भार सोपवायचा आणि आपण अकर्मण्य राहायचे, ही वृत्ती बुद्धाला पसंत नव्हती. ईश्वराच्या सर्वकर्तृत्वावर श्रद्धा ठेवल्याने मनुष्याचा आत्मविश्वास खचतो, असे त्याला वाटत होते.

पण बुद्ध अनात्मवादी आणि अनीश्वरवादी असूनही भौतिकवादी मात्र नव्हता. त्याने अनेक ठिकाणी भौतिकवादाचे जोरदार खंडन केले आहे. भौतिकवाद हा ब्रह्मचर्य (= इंद्रियनिरोध) व समाधी यांना नितांत प्रतिबंधक होतो, असे त्याचे मत होते. मनुष्याला जेव्हा परलोकीं शुभ फलाच्या प्राप्तीची अभिलाषा होते, तेव्हाच तो साधुजीवन जगण्यासाठी प्रवृत्त होतो. पण भौतिकवादी लोक तर परलोकच मानीत नाहीत. बुद्धाचा जोर धर्माच्या दर्शनावर नव्हता; तर आचारावर होता. मनुष्य मूलतः निष्पाप नाही. त्याला निष्पाप व्हायचे आहे. तो मलतः साधू नाही. त्याला त्या कोटीला जायचे आहे, असे बुद्ध मानीत असे. मनुष्याला आपले निर्मल रूप प्रकट व्हावे, असे वाटते. पण ज्याचे आचार, विचार व उच्चार निर्मल असतात, त्यालाच ते प्राप्त होते, असा बुद्धाचा आशय आहे.

बौद्ध न्याय– बौद्ध पंडितांनी आपल्या न्यायशास्त्राच्या उभारणीत अलौकिक पांडित्य प्रकट केले आहे. प्राचीन काळी न्यायशास्त्राची विशेष प्रतिष्ठा होती. वैदिक आणि जैन नैयायिक आपल्या हातून बौद्ध न्यायाचे मार्मिक खंडन झाल्यावाचून स्वतःच्या मताचे मंडन झाले, असे समजत नसत. वैदिकांचे न्यायदर्शन बौद्ध नैयायिकांशी सामना देता देताच इतके सूक्ष्म आणि गंभीर झाले आहे. बौद्ध नैयायिकांचे सिद्धान्त तर्क व प्रमाण या दोन्ही दृष्टींनी मननीय आहेत.

अभिधम्मपिटकात न्यायशास्त्राशी संबंधित असे अनेक शब्द आढळतात. उदा० अनुयोग (प्रश्न), आहरण (उदाहरण), पटिञ्चा (प्रतिज्ञा), उपनय (हेतूच्या प्रयोगस्थलाचा निर्देश) इत्यादी. या शब्दांवरून कळते, की इ. स. च्या पूर्वीच काही शतके बौद्ध न्यायशास्त्र हळूहळू प्रगत होऊ लागले होते.

इ. स. च्या ५ ते ७ या शतकांत बौद्ध दर्शनात मौलिक परिवर्तन झाले. न्याय व ज्ञानमीमांसा हे त्या काळातले अभ्यासविषय होते. या काळातल्या बौद्ध विद्येच्या नभांगणातील तीन तेजस्वी तारे म्हणजे वसुबंधू, दिङ्नाग व धर्मकीर्ती हे होत. वसुबंधूने वादविधान नामक एक ग्रंथ लिहिला असून, त्यात संक्षेपाने न्यायावरच्या काही प्रश्नांचे उल्लेख मिळतात. याहून त्याने अधिक काही लिहिले नाही. दिङ्नाग हा वसुबंधूचा शिष्य होय. आपल्या गुरूच्या मताचे वैदिकांनी खंडन आरंभले, हे त्याला सहन झाले नाही. म्हणून त्याने प्रमाणसमुच्चय नावाचा एक ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाचे खंडन करण्यासाठी उद्योतकर हा महान आचार्य उद्युक्त झाला आणि त्याने न्यायवार्तिक नावाचा एक प्रतिभासंपन्न ग्रंथ रचला. उद्योतकराच्या युक्तीचे खंडन करण्यासाठी धर्मकीर्ती पुढे सरसावला. त्याने त्यासाठी प्रमाणवार्तिक, प्रमाणविनिश्चय, इ. सात ग्रंथ लिहिले. दिङ्नागाचा शिष्य शंकरस्वामी याने न्यायवेश नावाचा एक ग्रंथ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लिहून न्यायशास्त्रातल्या पक्षाभास, हेत्वाभास व दृष्टान्ताभास यांची सूक्ष्म चर्चा केली. या न्यायशास्त्राच्या इतिहासात शंकरस्वामीचा हा ग्रंथ महत्त्वाचा ठरला आहे. याशिवाय, ईश्वरसेन, रत्नकीर्ती, असंग, रत्नाकर शांतिपद, इ. पंडितश्रेष्ठांनी बौद्ध न्यायाच्या उत्कर्षाला हातभार लावला.

न्यायशास्त्राचे प्राचीन रूप हेतुविद्या या रूपात दृष्टिगोचर होते. आर्य असंगाने हेतुविद्येचे सहा भाग कल्पिले आहेत, ते असे–(१) वाद (२) वादाधिकरण (३) वादाधिष्ठान (४) वादालंकार (५) वादनिग्रह व (६) वादे बहुकर.

बौद्ध नैयायिकांनी प्रमाणशास्त्राची विचिकित्सा विशेष रूपाने केली आहे. अज्ञात अर्थाला प्रकाशित करते व वस्तुस्थितीला विसंवादी ठरत नाही आणि ज्याचे ज्ञान अर्थक्रियेवर अवलंबित असते, ते प्रमाण होय, असे धर्मकीर्ती म्हणतो (प्र. वा. २.१). बौद्ध नैयायिक प्रत्यक्ष व अनुमान अशी दोनच प्रमाणे मानतात. दोनच प्रमाणे मानण्याचे कारण विषयही स्वलक्षण व सामान्यलक्षण असे दोनच प्रकारचे असतात हे होय. स्वलक्षण म्हणजे ज्यात वस्तूचे स्वरूप शब्दादी प्रमाणावाचून ग्रहण केले जाते, ते. सामान्यलक्षण म्हणजे अनेक वस्तूंबरोबर गृहीत वस्तूचे सामान्य रूप होय. यात कल्पनेला अवकाश असतो. पहिले प्रत्यक्षविषय व दुसरे अनुमानविषय असते. पहिला अर्थ क्रिया करण्यात समर्थ होतो व दुसरा अर्थ त्या कामी असमर्थ असतो (प्र. वा. ३.१–३).

प्रत्यक्ष – जे ज्ञान कल्पनारहित व निर्भ्रांत असते, त्याला प्रत्यक्ष म्हणतात. नाम, जाती, गुण, कर्म, द्रव्य इत्यादींचे ग्रहण न करता म्हणजेच कल्पनाविरहित असे जे ज्ञान, ते प्रत्यक्ष होय, अशी त्याची व्याख्या केली आहे.

संज्ञाभ्रांती (मृगजळाच्या ठिकाणी जलाचे ज्ञान), संख्याभ्रांती (नेत्रदोषांमुळे एका चंद्राच्या जागी दोन दिसणे), संस्थानभ्रांती (जळके कोलीत वेगाने फिरविल्यामुळे चक्र फिरत आहे, अशा प्रकारचे ज्ञान होणे), वर्णभ्रांती (कावीळ झालेल्या रोग्याला पांढऱ्या वस्तू पिवळ्या दिसणे) व कर्मभ्रांती (वेगवान वाहनात बसून जाताना रस्त्याच्या कडेचे वृक्ष मागे पळत जात आहेत, असे दिसणे), अशा प्रकारच्या पाच भ्रांतींनी स्पर्श न केलेले ज्ञान म्हणजे प्रत्यक्ष होय, असे असंग म्हणतो.

इंद्रियप्रत्यक्ष, मानसप्रत्यक्ष, स्वसंवेदनप्रत्यक्ष व योगिप्रत्यक्ष असे प्रत्यक्षाचे चार भेद आहेत.

अनुमान – कोणत्यातरी संबंधी धर्माने धर्मीच्या विषयात जे परोक्ष ज्ञान होते, ते अनुमान होय (प्र. वा. ३.६२). व्यवहारातला अनुभव असा, की एकाला पाहिले असता दुसऱ्याच्या स्थितीची कल्पना स्वयमेव उपस्थित होते. पण अशा प्रत्येक वेळी हा अनुभव प्रमाणकोटीत येऊ शकत नाही. त्यासाठी त्या दोन वस्तूंचा संबंध नित्य व उपाधिरहित असावा लागतो. यालाच व्याप्तिज्ञान असे म्हणतात आणि व्याप्तिज्ञानावरच अनुमान अवलंबित असते.

अनुमानाचे स्वार्थानुमान व परमार्थानुमान असे दोन भेद होतात. अनुमान सिद्ध करणाऱ्या हेतूचे अनुपलब्धी, स्वभाव आणि कार्य असे तीन प्रकार असतात. जे अनुमान चुकीचे किंवा भ्रांतियुक्त असते, त्याला अनुमानाभास असे म्हणतात. पक्षाभास, हेत्वाभास व दृष्टान्ताभास असे त्याचे तीन प्रकार आहेत. पक्षाभासाचे नऊ, हेत्वाभासाचे दोन व दृष्टान्ताभासाचे दोन असे आणखी पोटभेद आहेत. वैदिक नैयायिकांनी प्रतिज्ञा, हेतू, दृष्टान्त, उपनय व निगमन असे पंचावयव वाक्य परार्थानुमानात स्वीकृत केले आहे; पण बौद्ध नैयायिक अनुमानासाठी प्रतिज्ञा, हेतू व दृष्टान्त असे तीन अवयवांचेच वाक्य घेतात. प्रत्येक दर्शनाची ज्ञानमीमांसा स्वतंत्र असते. या बाबतीत आरंभवाद, संघातवाद, परिणामवाद व विवर्तवाद अशा ज्ञानमीमांसेच्या चार मौलिक दृष्टी आरंभापासूनच भारतीय दर्शनात विद्यमान आहेत. यांपैकी संघातवाद हो बौद्धांची दृष्टी आहे. त्यांच्या न्यायमीमांसेत प्रतीत्यसमुत्पाद हा सिद्धान्त आधारभूत मानला आहे.

बौद्ध दर्शनाचा विकास – बुद्धाने तत्त्वांचा ऊहापोह हा अव्याकृत म्हणून सोडून दिला. तत्त्वांच्या विचारकांतारात न शिरता प्रत्येक व्यक्तीने सम्यक जीवनाचा अवलंब करून आपले निर्वाण साधावे, असा त्याचा आशय होता. बुद्धाच्या जीवनकालात त्याच्या शिष्यांनी ती गोष्ट मानली; पण बुद्धाच्या साक्षात शिष्यांची परंपरा जसजशी कमी कमी होत गेली, तसतशी बुद्धाने अव्याकृत म्हणून सोडलेल्या तत्त्वांचा ऊहापोह करण्याची प्रवृत्ती वाढू लागली. बौद्ध पंडित बुद्धाच्या उपदेशाचे मंथन करून त्यातून सूक्ष्म सिद्धान्तांची रत्ने वर काढू लागले. पुढे पुढे तर बुद्धाचा आचारधर्म सांदीकोपऱ्यात पडला आणि तत्त्वज्ञानाचेच भेरीनगारे सर्वत्र वाजू लागले. बुद्धाच्या नंतर त्या धर्मात अनेक संप्रदाय निर्माण झाले. त्यांमध्ये वैभाषिक, सौत्रांतिक, योगाचार व माध्यमिक हे चार संप्रदाय विशेष पुढे आले. या चारही संप्रदायांना प्रतिभासंपन्न पंडित व आचार्य लाभले. त्यांनी आपापल्या संप्रदायांचे नवे दर्शन निर्माण केले. या चारही संप्रदायांनी सत्ता या सिद्धान्ताचे स्वमतानुसार विवेचन केले असून, आपापले सत्ताविषयक भिन्न मत युक्ती व तर्क यांच्या आधारे प्रस्थापित केले आहे.

यांपैकी वैभाषिकांच्या सिद्धान्ताला बाह्यार्थ प्रत्यक्षवाद असे म्हणतात. वैभाषिक लोक बाह्य व अभ्यंतर अशा समस्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्मांची स्वतंत्र सत्ता मानतात. ज्या वस्तूंच्या आधारे मानवी जीवन चालते, त्या वस्तूंचे अस्तित्व स्वयमेव स्पष्ट आहे, असे त्यांचे मत आहे. सौत्रांतिक त्यापुढे थोडे जातात. त्यांच्या मते बाह्य वस्तूंचे आपल्याला प्रत्यक्ष ज्ञान होत नाही. जगातले समस्त पदार्थ क्षणिक असल्यामुळे कोणत्याही वस्तूच्या स्वरूपाचे प्रत्यक्ष ज्ञान संभवतच नाही. प्रत्यक्ष होताच पदार्थाचे नील, पीत, इ. चित्र चित्ताच्या पटावर उमटते. ज्या प्रकारे आरशात प्रतिबिंब पाहिल्यावर बिंबाच्या सत्तेचे अनुमान होते, त्याच प्रमाणे वस्तूच्या चित्तपटावर उमटणाऱ्या प्रतिबिंबावरून आपण मूळ वस्तूच्या सत्तेचे अनुमान करतो. म्हणून बाह्य अर्थाची सत्ता केवळ अनुमानावर अवलंबून असते. सौत्रांतिकांच्या या मताला बाह्यार्थानुमेयवाद म्हणतात. योगाचारांच्या मते बाह्य भौतिक जगत नितांत मिथ्या आहे. चित्त हीच एकमात्र सत्ता आहे. त्या सत्तेच्या विविध आभासांना आपण जग म्हणतो. या चित्तालाच विज्ञान अशी संज्ञा आहे. त्यावरून योगाचारांना विज्ञानवादी असेही म्हणतात. माध्यमिक लोक चित्ताचीही स्वतंत्र सत्ता मानीत नाहीत. ज्या प्रकारे बाह्य वस्तू असत् आहेत, त्याप्रमाणेच विज्ञानही असत् आहे. सत्तावान काय असेल, तर ते शून्य होय. जगाची सत्ता व्यावहारिक आहे. शून्याची सत्ता पारमार्थिक आहे. माध्यमिकांचा हा सिद्धान्त शून्यवाद या नावाने प्रसिद्ध आहे.

बौद्ध दर्शनाचा ऐतिहासिक विकास– सनपूर्व ५ व्या शतकापासून इ. स. च्या दहाव्या शतकापर्यंतचा सुमारे १५०० वर्षांचा कालखंड बौद्ध दर्शनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. या प्रदीर्घ कालखंडात बौद्ध आचार्यांनी तीन वेळा बौद्ध दर्शनात परिवर्तन केले आहे. या तीन विभागांना त्रिचक्र असे म्हणतात. पहिल्या चक्रात आत्म्याच्या अनस्तित्वाचा सिद्धान्त प्रमुख होता. हे जगत शक्तीचा मूलसत्ताविहीन एक क्षणिक परिणाम अर्थात केवळ संतानमात्र आहे, असे त्या काळी मानीत. प्रतीत्यसमुत्पाद हा सिद्धान्त त्या कालखंडात प्रभावी होता. आचाराच्या दृष्टीने व्यक्तिगत निर्वाण हेच अंतिम लक्ष्य व अर्हत्‌पदाची प्राप्ती हेच मानवमात्राचे कर्तव्य मानले जात होते. बौद्ध दर्शनाच्या या स्वरूपाचा परिचय वैभाषिक मतात मिळू शकतो.

दुसऱ्या चक्रात पुद्गलशून्यतेची जागा सर्वधर्मशून्यता किंवा धर्मनैरात्म्यवाद याने ग्रहण केली. व्यक्तिगत कल्याणाऐवजी विश्वकल्याणाच्या भावनेने विशेष जोर धरला. या चक्रात जगताच्या सत्तेला एकदम उखडून न टाकता परमार्थदृष्टीने तिला आभासमात्र मानले. चार आर्यसत्यांच्या जागी सांवृतिक व पारमार्थिक या दोन सत्यांच्या कल्पनेने माहात्म्य मिळविले. मूळ बौद्ध धर्मातल्या बहुत्ववादाच्या जागी शून्याद्वैतवाद प्रतिष्ठित झाला. बोधिसत्त्व ही कल्पना याच काळात उगम पावून आदरणीय ठरली. त्या द्वारे विश्वकल्याणाचा मंगलमय आदर्श मनुष्यांच्या पुढे उभा केला. बौद्ध दर्शनाचा हा विकास शून्यवाद या नावाने ओळखला जातो.

तिसऱ्या चक्रात बौद्ध न्यायाची विशेष प्रगती झाली. सर्वशून्यतेचा सिद्धान्त सदोष मानून त्याचा त्याग केला गेला व त्या जागी विज्ञान-चैतन्य-चित्त या सिद्धान्ताची सत्यता स्वीकारली गेली. आलयविज्ञान ही कल्पना घेऊन हे नवीन दर्शन उदयाला आले. बौद्ध दर्शनाचा हा तिसरा विकास विज्ञानवाद व योगाचार या नावांनी विख्यात आहे. त्यानंतरच्या काळात बौद्ध दर्शनामध्ये कोणतीही नवीन कल्पना उदयाला आली नाही व त्याचा बौद्धिक विकास थांबला. [भा. द.; बौ. सं. वि.; बौ. द. मी.; उ. प्र. बौ. वि.; बौ. ध. द.; सं. चा. अ.]

बौद्ध धर्म

भगवान बुद्धाने प्रवर्तित केलेल्या धर्माला बौद्ध धर्म म्हणतात. जगातल्या मोठ्या धर्मांत याची गणना होते. गौतम बुद्ध हा अनेक सद्गुणांनी अलंकृत असा दैवी पुरुषश्रेष्ठ होता. यौवनाच्या उषःकालीच त्याला या जगाची दुःखमयता प्रतीत झाली. सारी मानवजात या दुःखरूपी सागरात बुडत आहे, असे त्याला दिसले आणि त्याच्या कोवळ्या हृदयात असीम करुणा उत्पन्न झाली. जगाचे दुःख दूर करण्याचा मार्ग शोधण्यासाठी तो मग गृह, सुत, दारा यांचा त्याग करून बाहेर पडला. त्याला प्रथम या सर्वग्रासी दुःखाचे मूळ शोधायचे होते आणि नंतर त्यावर उपायही शोधायचा होता. त्यासाठी बोधी म्हणजे सत्यज्ञान मिळवायला हवे होते. म्हणून त्याने प्रथम तप, योग, कायक्लेश, इ. खडतर मार्ग अवलंबिले. मग त्याने ध्यानाचा अवलंब केला. अखेर वैशाख पूर्णिमेच्या दिवशी उरुवेला येथे नेरंजरा नदीच्या काठी एका अश्वत्थ वृक्षाखाली त्याला बोधी प्राप्त झाली. त्या दिवसापासून त्याला बुद्ध ही उपाधी मिळाली.

त्यानंतर आषाढ पूर्णिमेस तो वाराणसीजवळच्या इसिपत्तनात (सारनाथ) गेला आणि त्याने स्वतःला ज्ञात झालेला धर्म तिथल्या कौंडिन्यादी पंचवर्गीय भिक्षूंना उपदेशिला. ही घटना धर्मचक्रप्रवर्तन या नावाने बौद्ध साहित्यात प्रसिद्ध आहे. स्वतःला झालेले ज्ञान बुद्धाने चार आर्यसत्यांच्या रूपाने त्या पंचवर्गीय भिक्षूंना उपदेशिले, ते असे –

(१) दुःख – इदं खो पन भिक्खवे दुःखं अरियसच्चं। जाति पि दुक्खा, जरा पि दुक्खा, मरणं पि दुक्खं सोक परिदेव दोमनस्सुपायासापि दुक्खा, अप्पियेहि सम्पयोगो दुक्खो, पियेहि विप्पयोगो दुक्खो, यंम्पिच्छं न लभति तम्पि दुक्खं, संख्यित्तेन पञ्चूपादानक्खन्धापि दुक्खा।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – भिक्षुगण हो ! दुःख हे पहिले आर्यसत्य होय. जन्मही दुःख, जराही दुःख, मरणही दुःख, (इतकेच नव्हे; तर) शोक, विलाप, औदासीन्य, आयास, हे सारे दुःख आहे. अप्रिय वस्तूशी समागम, प्रिय वस्तूचा वियोग, इष्ट वस्तू न मिळणे, संक्षेपात सांगायचे तर रागामुळे उत्पन्न होणारे पंच स्कंध (रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान यांचा समुदाय) दुःखमय आहेत.

तात्पर्य, या जगातले प्रत्येक कार्य, प्रत्येक घटना, यांमध्ये दुःखाचेच सर्वत्र साम्राज्य आहे. हा संसार म्हणजे एक आग



चार आर्यसत्यांचे प्रतीकचित्र

लागलेले घरच आहे. इथे कुठले हास्य आणि कुठला आनंद ! पण मूढ लोकांना हे समजत नाही आणि म्हणून ते या संसारात सुखी होण्यासाठी भोग विलासांच्या मागे लागतात, त्यासाठी धडपडतात; पण शेवटी दुःखच पदरात पाडून घेतात.

(२) **दुःखसमुदय – इदं खो पन भिक्खवे दुक्खसमुदयं अरियसच्चं। योयं तण्हा पोनब्भविका नन्दिरागसहगता तत्र-तत्राभिनन्दिनी सेयमीदं कामतण्हा, भवतण्हा विभवतण्हा।**

अर्थ – भिक्षुगण हो, दुःखसमुदय हे दुसरे आर्यसत्य होय. दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे, जी वारंवार प्राण्यांना पुनर्जन्म घ्यायला लावते. ती विषयांच्या आसक्तीने युक्त असून, विषयांकडे आकर्षित करणारी आहे. ती इथे तिथे सर्वत्र आपली तृप्ती शोधणारी आहे. कामतृष्णा, भवतृष्णा व विभवतृष्णा असे तिचे तीन प्रकार आहेत.

तात्पर्य – तृष्णा हेंच सर्व दुःखांचे मूळ कारण. ती नसेल तर विषयभोगांचा हव्यास उत्पन्न होणार नाही आणि तज्जन्य दुःखेही भोगावी लागणार नाहीत. तृष्णा हे जीवाचे सर्वांत मोठे बंधन आहे. ती जगातल्या साऱ्या विरोध-विद्रोहांची जननी आहे. तिच्यामुळेच चोर चोरी करतो, कामुक परस्त्रीगमन करतो आणि श्रीमंत गरिबांचे शोषण करतो. अशा या तृष्णेचा उच्छेद करणे प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य आहे.

(३) **दुःखनिरोध – इदं खो पन भिक्खवे दुःखनिरोधं अरियसच्चं। सो तस्सायेव तण्हाय असेसविरागनिरोधो चागो पटिनिस्सागो मुत्ति अनालयो।**

अर्थ – भिक्षुगण हो, दुःखनिरोध (नाश किंवा त्याग) हे तिसरे आर्यसत्य होय. या तृष्णेपासून पूर्णपणे विरक्त होणे म्हणजे दुःखनाश. याचीच दुसरी नावे तृष्णेचा त्याग, प्रतिसर्ग, मुक्ती आणि अनालय (स्थान न देणे) अशी आहेत.

तात्पर्य – या दुःखनिरोधाला निर्वाण असेही म्हणतात. तृष्णेचा नाश केल्याने मनुष्य याच जीवनात ज्या एका अवस्थेला पोचतो, तिला बौद्ध धर्मात निर्वाण म्हटले आहे. निर्वाणाच्या स्वरूपाविषयी बौद्ध संप्रदायांत खूप मतभेद आहेत. पण निर्वाणप्राप्त पुरुष कसा असतो व कसा होतो, त्याचे अंगुत्तर निकायात (३.५२) पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे –

सेलो यथा एकग्घनो वातेन न समीरति।
एवं रूपा रसा सद्दा गन्धा फस्सा च केवला।
इठ्ठा धम्मा अनिठ्ठा च न पवेधेन्ति तादिनो।
ठितं चित्तं विप्पमुत्तं वसं यस्सानुपस्सति ॥

अर्थ – प्रचंड झंझावात सुटला तरी तो पर्वताला स्थानभ्रष्ट करू शकत नाही. निर्वाणप्राप्त पुरुषाची अवस्थाही तशीच असते. रूप, रस, गंधादी विषयांचे प्रहार त्याच्यावर सदैव होत राहतात; पण त्याचे शांत झालेले चित्त कोणत्याही प्रहाराने क्षुब्ध होत नाही.

(४) **दुःखनिरोधगामिनी प्रतिपद – इदं खो पन भिक्खवे दुक्खनिरोधगामिनी पटिपदा अरियसच्चं। अयमेव अरियो अट्ठङ्गिको मग्गो। सेय्यथिदं। सम्मादिट्ठि। सम्मा संकप्पो। सम्मा वाचा। सम्मा कम्मन्तो। सम्मा आजीवो। सम्मा वायामो। सम्मा सति। सम्मा समाधि।**

अर्थ – भिक्षुगण हो, दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा हे चौथे आर्यसत्य होय. ते म्हणजेच अष्टांगिक मार्ग होय. त्याचा तपशील असा – सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मान्त, सम्यक आजीव, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती व सम्यक समाधी.

प्रतिपद म्हणजे मार्ग. जर गंतव्य स्थान आहे, तर त्याच्याकडे जाणारा मार्गही अवश्य असला पाहिजे. तसा तो आहेही. "मग्गानठ्ठंगिको सेठ्ठो" = भिक्षूनो, अष्टांगिक मार्ग हा या कामी श्रेष्ठ आहे.

या मार्गाची आठ अंगे पुढीलप्रमाणे –

(१) सम्मा वाचा – सम्यक अर्थात सत्य वचन. तसेच मिथ्या, अनुचित व दुष्ट अशा वचनाचा परित्याग.

(२) सम्मा कम्मन्तो – सम्यक कर्मान्त अर्थात हिंसा, परद्रव्याचे अपहरण व भोगेच्छा या गोष्टींचा त्याग करून सत्कर्मे करणे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(३) सम्मा आजीवो – सम्यक अर्थात न्यायपूर्ण उपजीविका.

(४) सम्मा वायाम – सम्यक व्यायाम अर्थात दुर्गुणांचा क्षय करून सत्कर्मांविषयी सदैव प्रयत्नशील राहणे.

(५) सम्मा सती – सम्यक चिंतन अर्थात लोभादी विकारांचा लोप करून चित्त शुद्ध करणे.

(६) सम्मा समाधी – सम्यक समाधी अर्थात चित्ताची एकाग्रता करणे.

(७) सम्मा संकल्प – सम्यक संकल्प अर्थात राग, द्वेष, हिंसा व सांसारिक विषय यांच्या परित्यागासाठी प्रयत्नशील राहणे.

(८) सम्मा दिठ्ठी – सम्यक दृष्टी अर्थात ज्ञान.

बुद्धाने या अष्टांगिक मार्गांची शील, समाधी व प्रज्ञा या तीन विभागांत विभागणी केली आहे. बौद्ध जगात ही तीन तत्त्वे त्रिरत्न म्हणून ओळखली जातात.

शील – याच्यात सर्व सात्त्विक कर्मांचा अंतर्भाव होतो. अहिंसा, अस्तेय, सत्य भाषण, ब्रह्मचर्य व मादक द्रव्यांचे वर्जन ही पाच शीले पंचशील या नावाने भिक्षू व गृहस्थ अशा सर्वांना समान आहेत. याचे पालन करणे हे प्रत्येक बौद्धाचे कर्तव्य आहे.

समाधी – यात तीन प्रकारच्या विद्या उत्पन्न होतात–(१) पूर्वजन्माची स्मृती (२) जीवांच्या उत्पत्तीविनाशाचे ज्ञान व (३) चित्तशुद्धीला बाधक ठरणाऱ्या विषयांचे ज्ञान. बुद्धघोषाचा विसुद्धिमग्ग हा ग्रंथ मुख्यत्वे समाधी व तिचे अवांतर भेद यांचे विवेचन करणारा आहे. समाधीच्या संबंधात बौद्धांचे विवेचन उपनिषद्मूलक नसूनही स्थल-कालभेदाने अनेक नवीन महत्त्वपूर्ण सूचनांचे तपशील त्यात आलेले आहेत.

प्रज्ञा – ही श्रुतमयी (आप्तप्रमाणजन्यनिश्चय), चिंतामयी (युक्तिजन्यनिश्चय) व भावनामयी (समाधिजन्यनिश्चय) अशी त्रिविध आहे. अजातशत्रू राजाशी श्रामण्य फलांची चर्चा करतेवेळी बुद्धाने प्रज्ञेच्या फलांचे वर्णन विशद केले आहे.

अष्टांगिक मार्ग म्हणजे या त्रिरत्नांचे पल्लवित रूप होय. बुद्धाचा तत्त्वज्ञानापेक्षा आचारावर विशेष भर होता. जर उपरिनिर्दिष्ट अष्टांगिक मार्ग सम्यक रूपाने पालन केला जाईल, तर तो साधकाला अवश्य निर्वाण मिळवून देईल, असा बुद्धाचा स्पष्ट उपदेश आहे. या मार्गाचे केवळ शब्दज्ञान कुचकामाचे आहे. तो मार्ग प्रत्यक्ष कृतीच्या द्वारेच चरितार्थ होऊ शकतो. जेतवनात पाच सहस्र भिक्षूंच्या समुदायापुढे प्रवचन करताना बुद्धाने आपल्या या मताचा निस्संदिग्ध उद्‌घोष केला, तो असा–

तुम्हेहि किच्चं आतप्पं अक्खातारो तथागता।
पटिपन्ना पमोक्खन्ति झायिनो मारबन्धना।।

(धम्मपद-मग्गवग्ग २०४)

अर्थ – भिक्षूंनो, (दुःखनिरोधासाठी म्हणजेच शांत निर्वाणदशा मिळवण्यासाठी) तुम्हांला उद्योग करणे भाग आहे. उपदेशाच्या केवळ श्रवणमात्रे दुःखनिरोध कथमपि होणार नाही. तथागताचे काम केवळ मार्ग दाखवणे एवढेच आहे. जे मार्गारूढ होतील, ते मुक्त होतील. ध्यानात रत होणारे पुरुषच माराच्या बंधनातून मुक्त होतात.

वर सांगितलेल्या मार्गाच्या आठही अंगांच्या मागे बुद्धाने सम्मा = सम्यक असे विशेषण जोडले आहे. सम्यक म्हणजे चांगले. या चांगलेपणाची कसोटी काय? कोणत्या अवस्थेत हे 'सम्यक' वचन कृतार्थ होईल? बुद्ध म्हणतो, की 'दोन्ही अंतींच्या म्हणजे टोकांच्या मध्यभागी राहणे म्हणजे सम्यक्ता होय. कोणत्याही वस्तूची दोन्ही टोके ही उन्मार्गगामी असतात; म्हणून कोणत्याही वस्तूच्या ठिकाणी अत्यंत आसक्ती आणि आत्यंतिक वैराग्य या दोन्ही गोष्टी अनुचित होत.' उदा० आकंठ भोजन करणे हेही दुःखकारक आणि आत्यंतिक अनशन हेही दुःखकारकच. खरा मार्ग म्हणजे या दोहोंच्या मधला, अर्थात युक्ताहार हा होय. अष्टांगिक मार्ग हा असा मध्यम मार्ग आहे.

आचाराप्रमाणेच दृष्टी (ज्ञान) चेही दोन अंत आहेत. एक शाश्वत दृष्टी व दुसरी उच्छेद दृष्टी. शरीराहून भिन्न, अपरिणामी व नित्य अशा आत्म्याची सत्ता मानणे ही शाश्वत दृष्टी आणि शरीराला आत्म्याहून अभिन्न मानून शरीर पडले, की आत्म्याचा नाश होतो, असे मानणे ही उच्छेद दृष्टी होय. या दोन्ही दृष्टी एकांगी अतएव हानिकारक आहेत. सम्यक दृष्टी ही या दोहोंच्या मध्ये आहे. दुःख शाश्वत नसल्यामुळे अजेय नाही आणि आत्महत्या करून त्याचा नाशही होत नाही. ते नित्य मानून त्याच्यापासून पळून जाणारा आळशी पुरुष जसा निंद्य, तसाच आत्महत्या करून दुःखाचा अंत करू पाहणारा कातर पुरुषही निंद्य होय. उचित मार्ग हा, की समस्त दुःखाचे कारण तृष्णा आहे हे जाणून तिचा नाश करणे. अविद्या हीच समस्त दुःखाची जननी आहे. विद्येच्या द्वारे अविद्येचा नाश केल्याने शांती किंवा निर्वाण प्राप्त होते. मात्र विद्या म्हणजे केवळ शब्दज्ञानाची चावटी नव्हे. विद्येला अर्थात ज्ञानाला आचाराची जोड पाहिजे. आचारात परिवर्तित होणारे ज्ञान हेच खरे ज्ञान आहे.

बुद्धाचा हा मध्यममार्ग म्हणजे त्याच्या जीवनाचे आणि तत्त्वज्ञानाचेही सार आहे. बुद्धाने स्वानुभवाच्या आधारावर हा मार्ग प्रकाशित केला. बुद्धाच्या या धर्मोपदेशाचे रहस्य धम्मपदात पुढील श्लोकात (१४·५) सांगितले आहे –

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसम्पदा।
सचित्तपरियोदपनं एतं बुद्धान सासनं।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – कोणत्याही प्रकारचे पाप न करणे, पुण्याचा संचय करणे आणि आपल्या चित्ताची परिशुद्धी करणे, हे बुद्धाचे अनुशासन आहे.

बुद्धाच्या धर्मप्रसाराच्या कार्याला सारनाथपासून प्रारंभ झाला. तिथे त्याने अज्ञात कौंडिन्य, भद्दिय, वप्प, महानाम व अस्सजी या पाच ऋषींना उद्देशून पहिले धर्मप्रवचन केले. त्यानंतर पूर्ण, नालक व सभीय असे तीन साधू बुद्धाचे अनुयायी होऊन बौद्ध संघात समाविष्ट झाले. त्यानंतर यश नावाचा एक श्रेष्ठीपुत्र त्याचा शिष्य बनून भिक्षू झाला. त्याच्याबरोबर विमल, सुबाहू, उण्णजी व गवांपती हे यशाचे चार मित्रही आणखी पन्नास लोकांना बरोबर घेऊन भिक्षुसंघात दाखल झाले. मग बुद्धाने त्यांना धर्मप्रचाराची आज्ञा दिली –

भिक्षूंनो, तुम्ही आता निरनिराळ्या दिशांना भ्रमण करा. एकेकटे चला. ‘ बहुजनसुखाय बहुजनहिताय ’ तुम्ही सत्य धर्माचा उपदेश करा. लोकांना शुद्ध ब्रह्मचर्याच्या पालनाचे शिक्षण द्या.

आपल्या शिष्यांना अशा प्रकारे धर्मप्रसारार्थ चारही दिशांना पाठवून बुद्ध गयाशीर्ष या ठिकाणी गेला. तिथे त्याला काश्यप, बिंबिसार, सारीपुत्त, मौद्‌गलायन, महाकाश्यप, इ. शिष्य मिळाले. बुद्धाने त्या सर्वांचे स्वागत करून त्यांना सम्यक प्रहाणाचा चतुःसूत्री उपदेश केला, तो असा –

(१) वर्तमान पापांचा नाश करणे (२) भविष्यात त्यांची वाढ होऊ न देणे (३) वर्तमान पुण्याचे रक्षण करणे व (४) जमेल त्या प्रमाणे त्या पुण्याची वृद्धी करणे.

त्यानंतर बुद्ध कपिलवस्तू येथे गेला. तिथे त्याचा पिता शुद्धोदन याने त्याचे स्वागत केले. त्या ठिकाणी आनंद, अनुरुद्ध, नंद, देवदत्त, उपाली, छंदक, अनाथपिंडिक, इ. काही त्याच्या कुलातले व काही त्या बाहेरचे शिष्य त्याला मिळाले. त्या सर्वांना बुद्धाने आपल्या भिक्षुसंघात दाखल करून घेतले. त्या वेळी बुद्धाचा पुत्र राहुल हा केवळ सात वर्षांचा होता. बुद्धाने त्यालाही श्रमणदीक्षा दिली व आपला शिष्य बनविले.

बुद्ध तिथून पुढे श्रावस्तीला गेला. तिथल्या प्रसेनजित राजाने त्याचे उत्तम स्वागत केले. तिथे महाप्रजापती गौतमी ही शाक्य व कोलिय स्त्रियांसह बुद्धाकडे आली. तिने भिक्षुसंघाप्रमाणेच एक भिक्षुणीसंघ बनवण्याची बुद्धाला प्रार्थना केली. बुद्धाने त्या प्रार्थनेचा अव्हेर करताना म्हटले, की ‘ स्त्रियांनी भिक्षुणी होऊ नये; त्यांनी उपासक बनून गृहस्थी चालवावी. ’ गौतमीला त्यामुळे वाईट वाटले. तिचे दुःख पाहून बुद्धशिष्य आनंद याने बुद्धाजवळ रदबदली केली. बुद्धाने नाइलाजाने स्त्रियांना भिक्षुणी म्हणून आपल्या संघात दाखल करण्याचे मान्य केले. मात्र त्याने भिक्षुणींवर काही प्रतिबंध लादले, ते असे – भिक्षुणींनी भिक्षूंचा सन्मान करावा. जिथे भिक्षू वर्षावास करीत असतील तिथे राहू नये, भिक्षूंकडून उपोसथाच्या तिथीला उपदेश स्वीकारावा, पवारणा करावी, इत्यादी.

त्यानंतर बुद्धाला ज्योतिष्क नावाचा एक श्रेष्ठीपुत्र, जीवक नावाचा एक वैद्य, अभय हा बिंबिसार राजाचा अनौरस पुत्र, उपाली गहपती, उटदंत नावाचा विद्वान ब्राह्मण, इ. अनेक शिष्य मिळाले. बुद्धाचा धर्म समाजात प्रसृत करण्याच्या कामी या सर्व शिष्यांनी जिवापाड परिश्रम केले.

बुद्धाने गृहस्थ व भिक्षू यांच्यासाठी वेगवेगळे नियम सांगितले. त्याने विशिष्ट साधनापद्धती निर्माण केली नाही, पण वेळोवेळी उपासक व भिक्षू यांना जे मार्गदर्शन केले, त्यावरून उपासकांचे व भिक्षूंचे आचरणीय नियम कळून येतात.

एके दिवशी कपिलवस्तूच्या महानाम या राजपुत्राने बुद्धाला प्रश्न केला, की ‘ बौद्ध उपासकांची व्याख्या काय ? ’ त्यावर बुद्ध म्हणाला. ‘ मी आता सांगणार आहे त्या नियमांचे पालन करणारी व्यक्ती, मग ती कोणत्याही जातीची वा धर्माची असो, मी तिला उपासक समजतो. ’ असे म्हणून बुद्धाने उपासकांचे काही नेमधर्म सांगितले, ते असे –

त्रिशरण – बुद्ध, धर्म आणि संघ ही तीन शरणस्थाने होत. उपासकाने त्यांचा आश्रय करावा.

पंचशील – जीवहिंसा, चोरी, व्यभिचार, असत्य भाषण व मद्यपान या पाच गोष्टी न करणे, म्हणजे पंचशील होय. उपासकाने पंचशीलांचे पालन करावे.

त्याग – उपासकाने कृपणतेचा त्याग करून सढळ हाताने धर्मकार्यात धनव्यय करावा आणि याचकांना दान देण्यासाठी सदैव तत्पर असावे.

प्रज्ञा – उपासकाने आपल्या बुद्धीने विचार करावा व दुः[illegible] मुक्त होण्याचा मार्ग जाणून घ्यावा. त्याने द्वेष, आळस व उद्ध[illegible] पणा, तसेच त्रिरत्नांविषयी संशयभाव यांचा सर्वथा त्याग करावा.

श्रुत – उपासकाने धार्मिक प्रवचने ध्यानपूर्वक ऐकावी आणि त्यांतून मिळालेल्या उपदेशांचे मनन करावे.

त्याने उपासकांचे आणखी काही धर्म सांगितले, ते असे – उपासकाने केवळ स्वतःपुरतेच पाहू नये. त्याने वरील नि[illegible] स्वतः तर पाळावेच, शिवाय इतरांनाही त्या कामी प्रो[illegible] करावे. उपोसथाच्या दिवशी नियमपालनाची प्रतिज्ञा करावी, त्या दिवशी विहारामध्ये राहून भिक्षूंना भोजन घालावे, सत्क[illegible] वर अधिक भर द्यावा आणि असे हे उपासकधर्म पाळता पाळ[illegible] जेव्हा त्याची आध्यात्मिक दृष्टी उन्नत होईल, तेव्हा [illegible] पुढील तीन शीले आचरावी – (१) रात्री भोजन न क[illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(२) पुष्पमाला व सुगंधित पदार्थ यांचे सेवन न करणे व (३) जमिनीवर साधे अंथरुण घालून झोपणे.

बुद्धाने सांगितले आहे, की गृहस्थ उपासकाने मैत्री, करुणा मुदिता व उपेक्षा या चार भावांचा आपल्या जीवनात अधिकाधिक विस्तार करावा. दान करायचे ते सत्पात्री करावे. जे आपल्या साधनेमध्ये निमग्न राहतात, अशा भिक्षूंना दान करणे उत्तम. ज्या दानात घेणारा व देणारा या दोहोंचे भाव पवित्र असतात, ते दान सात्त्विक होय. जो गृहस्थ भिक्षुसंघाला भोजन, वस्त्र व शय्या यांचे दान करतो, त्याला या जन्मात पुण्य व यश प्राप्त होते आणि मृत्यूनंतर स्वर्ग मिळतो. गृहत्यागी भिक्षूला जेवढे पुण्यफल मिळते, तितकेच अष्टांगमार्ग आचरणाऱ्या गृहस्थालाही मिळते.

गृहस्थ उपासकांच्या आध्यात्मिक प्रगतीवर बुद्धाचा विशेषसा विश्वास नव्हता. गृहत्याग करून भिक्षू बनल्याशिवाय कोणीही आपल्या धर्माचे परिपूर्ण आचरण करू शकणार नाही, असे त्याला वाटत होते. म्हणून त्याने बऱ्याचशा शिष्यांना घरदार सोडण्याच्या कामीच प्रवृत्त केले. बुद्ध प्रत्येक शिष्याच्या मनोवृत्तीचा अभ्यास करून त्याला अनुकूल असा साधनेचा क्रम निश्चित करून देई. एके दिवशी मोग्गलान नामक ब्राह्मणाने बुद्धाला विचारले, की 'आपल्या धर्मात भिक्षूंच्या साधनेसाठी एखादी क्रमिक शिक्षणपद्धती निर्धारित आहे की नाही ?' बुद्धाने त्याला होकारार्थी उत्तर देऊन भिक्षूंचे नियम व साधनाक्रम सांगितले, ते असे –

(१) भिक्षूने विनयाच्या २२७ नियमांचे व सदाचारांचे पालन अवश्य केले पाहिजे.

(२) त्याने आपल्या इंद्रियांवर संयम राखला पाहिजे. त्याचे मन एखाद्या वस्तूत गुंतून राहता कामा नये. वस्तूच्या आकर्षणाने मनात लोभ, निराशा व आणखीही काही विकार उत्पन्न होतात. म्हणून त्याचा त्याग केला पाहिजे.

(३) त्याने केवळ शरीरनिर्वाहापुरते किंवा पवित्र धर्माच्या आचरणाकरिता लागणारी ताकद शरीरात राहील इतकेच भोजन करावे. आपल्या भोजनासाठी त्याने कोणत्याही जीवाची हिंसा करू नये.

(४) त्याने परिभ्रमण करीत असताना एखाद्या ठिकाणी बसून आपले मानसिक विकार घालविण्याचा प्रयत्न करावा. रात्रीच्या पहिल्या व तिसऱ्या प्रहरी जागून मनन-चिंतन करावे.

(५) त्याने दैनंदिन जीवनातल्या, खाणे, पिणे, वस्त्र धारण करणे, उभे होणे, बसणे, झोपणे, जागणे, मौन धारण करून राहणे, इ. क्रिया ज्ञानपूर्वक व पूर्ण सावधपणे कराव्या.

(६) मध्याह्न भोजनानंतर पद्मासन घालून बसावे आणि लोभ, द्वेष, आलस्य, अभिमान व धर्माविषयी अश्रद्धा या विकारांपासून स्वतःला मुक्त करण्याचा प्रयत्न करावा.

(७) अंती जेव्हा मनोविकार प्रायः नष्ट होतील, तेव्हा ध्यानाभ्यास सुरू करावा.

विहारचर्या – भिक्षुगण मठात किंवा विहारात राहून धर्मसाधना करीत असत. असे अनेक विहार व मठ बुद्धाच्या काळातच निर्माण झाले होते. बुद्धोत्तर काळात त्यांची संख्या खूपच वाढली. नव्या नव्या भिक्षूंचे विहारात येणे, विहारातली त्यांची दिनचर्या, त्यांची काही नैमित्तिक व्रते, इ. गोष्टींसंबंधी बौद्ध धर्मात बरेच कडक नियम केलेले होते. विहाराचा प्रधान भिक्षू आपल्या अनुयायांकडून त्या नियमांचे पालन करून घेत असे व एखाद्याने नियमभंग केल्यास त्याला लहान-मोठ्या शिक्षाही देत असे. यांपैकी काही महत्त्वाचे विधी व नियम असे–

(१) दीक्षा – संघात प्रवेश करणाऱ्या पुरुषाला पहिल्याप्रथम दीक्षा घ्यावी लागे. दीक्षेपूर्वी त्याला मुंडन करून पिवळी वस्त्रे धारण करावी लागत. मग दीक्षा देणारा भिक्षू त्याला त्रिशरण वाक्यांचे उच्चारण करायला लावी.

(२) उपोसथ – बौद्धांनी प्रत्येक पक्षातली अष्टमी आणि चतुर्दशी, त्याचप्रमाणे पौर्णिमा आणि अमावास्या या उपोसथाच्या तिथी मानल्या आहेत. या दिवशी भिक्षू आपल्या हातून काही नियमभंग झाला असल्यास त्याचा स्वमुखाने उच्चार करी. मग भिक्षुसमिती तेवढ्यानेच त्याला क्षमा करी किंवा अपराधाचे स्वरूप गंभीर असल्यास त्याला अन्य काही दंड करी.

(३) वर्षावास – पावसाळ्याचे तीन महिने भिक्षूंना एका निश्चित आवासात राहावे लागे. त्या काळात ते आवासाच्या जवळपास राहणाऱ्या गृहस्थांच्या घरी भिक्षा मागत व उरलेला वेळ अध्ययन व मनन-चिंतन यांत व्यतीत करीत.

(४) टोकरी – झाडू, पंखा व मोरपिसांची चवरी एवढ्या वस्तू भिक्षूंना आपल्या जवळ ठेवता येत. शिष्यभिक्षूला आपल्या गुरुभिक्षूची अनेक प्रकारे सेवा करावी लागे. गुरूला आपल्या शिष्यावर सदैव लक्ष ठेवावे लागे. शिष्याने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे, त्याच्या शंकांचे समाधान करणे, त्याला वस्त्रपात्र मिळवून देणे, तो आजारी पडल्यास त्याची सेवा शुश्रूषा करणे, इ. गोष्टी शिष्याच्या बाबतीत गुरूला कराव्या लागत. शयनगृह, स्नानगृह व शौचकूप यांची स्वच्छता राखण्याबाबत भिक्षूंसाठी कडक निर्बंध असत.

त्रिविध यान – बौद्धमतानुसार यान म्हणजे निर्वाणप्राप्तीचा मार्ग होय. श्रावकयान, प्रत्येकबुद्धयान व बोधिसत्त्वयान असे हे तीन मार्ग आहेत. प्रत्येक यानातील बोधीची कल्पना भिन्न आहे. श्रावकयान हे हीनयानाचे दुसरे नाव आहे. गुरूकडे धर्माचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिक्षण घेणारा मनुष्य श्रावक मानला जातो. तो स्वतः अप्रतिबुद्ध असतो; पण त्याच्या ठिकाणी निर्वाणप्राप्तीची इच्छा बलवत्तर असते. श्रावकाचे अंतिम लक्ष अर्हत्‌पदाची प्राप्ती हे असते.

प्रत्येकबुद्ध ही एक विलक्षण कल्पना आहे. गुरूपदेशावाचूनच ज्याच्या प्रातिभ ज्ञानाचा उदय होतो, अर्थात् पूर्वीच्या संस्कारां-मुळे ज्याचा प्रातिभ चक्षू आपोआप उन्मीलित होतो, त्याला प्रत्येकबुद्ध म्हणतात. तो स्वतः बुद्ध होतो; पण दुसऱ्यांचा उद्धार करण्याची शक्ती त्याच्याजवळ असत नाही.

बोधिसत्त्व ही कल्पना याहून उच्चतर आहे. आपल्यालाच फक्त बोधी प्राप्त व्हावी आणि आपलेच फक्त क्लेश दूर व्हावे; असला क्षुद्र वैयक्तिक स्वार्थ त्याच्या ठिकाणी नसतो. समस्त प्राण्यांचे क्लेश नष्ट होण्यासाठी तो प्रयत्नशील राहतो व परो-पकारासाठीच बुद्धत्वाची अपेक्षा धरतो.

निर्वाण हे बौद्ध धर्माचे अंतिम साध्य आहे. निर्वाण म्हणजे जीवनमुक्तीच होय. निर्वाण हे निर्भय असते आणि सुखरूपही असते. त्याची अनुभूती स्वतःला स्वतःच्या अंतरातच होत असते. निर्वाण हा असंस्कृत धर्म आहे, त्यामुळे उत्पत्ती, विनाश आणि परिवर्तन हे विकार निर्वाणाच्या ठिकाणी कधीही नसतात. अखेर निर्वाण हे शांत असते.

निकाय – याचा अर्थ संप्रदाय असा आहे. बुद्धाने उपदेशि-लेला धर्म जातिनिरपेक्ष होता, सर्वसमावेशक होता; पण बुद्धाच्या निर्वाणानंतर त्या धर्मात संप्रदायभेद निर्माण झाले. अशोकाच्या कालापर्यंत असे एकूण १८ संप्रदाय निर्माण झाल्याचे बौद्ध ग्रंथांवरून कळते. भारताच्या वेगवेगळ्या भागांत हे १८ निकाय निर्माण झाले आणि वाढले. बुद्धाने उपदेशिलेल्या धर्म-तत्त्वांचा या प्रत्येक निकायाने आपापल्यापरी वेगळा अर्थ लावला आहे. या निकायांची नावे, स्थाने आणि परस्परसंबंध यांच्याविषयी बौद्ध ग्रंथांत ऐकमत्य नाही.

त्यांतील काही प्रमुख निकायांची माहिती अशी –

(१) स्थविरवादी – याला थेरवादी किंवा वैभाषिक असेही म्हणतात. ही बौद्ध धर्माची सर्वांत प्राचीन शाखा होय. स्थविर-वाद्यांच्या मते बुद्ध हा मानवी प्रकृतीचा होता व त्याच्या ठिकाणी मानवी दुर्बलताही होती.

या मताचे प्रतिपादक ग्रंथ फार थोडे मिळतात. बुद्धाच्या महानिर्वाणानंतर ३०० वर्षांनी कात्यायनीपुत्राने ज्ञानप्रस्थान-शास्त्र नावाचा ग्रंथ लिहून या मताचे सिद्धांत मांडले. स्थविर-वाद्यांची विचारपद्धती समजण्यासाठी वसुबंधूंचा अभिधर्मकोश हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. स्थविरवादी सारे वस्तुजात अनित्य, दुःखपूर्ण व निस्सार मानतात. या मतात तत्त्वांचा विचार विषयदित आणि विषयदत अशा दोन दृष्टींनी केला आहे. विषयदित दृष्टीने समस्त जग स्कंध, आयतन व धातू अशा तीन विभागांत विभागलेले आहेत. विषयदत दृष्टीने धर्माचे असंस्कृत व संस्कृत धर्म असे दोन भाग पडतात. नित्य, स्थायी, शुद्ध व कोणत्याही कारणाच्या साहाय्यावाचून जे उत्पन्न होत नाही, ते असंस्कृत होय. असंस्कृत धर्मात परिवर्तन होत नाही. संस्कृत धर्म अनित्य, अस्थायी व मलिन असतात. ते हेतुप्रत्य-यांच्या द्वारे वस्तूंच्या संघटनांतून उत्पन्न होतात. स्थविरवादी पुरुष असा अनुभव घेतो, की साधी सांसारिक दुःखे तृष्णेमुळे उत्पन्न होतात. ही दुःखे अष्टांगिक मार्गाच्या अनुसरणाने समाप्त होतात व साधक निर्वाणस्थितीला पोचून अर्हत बनतो. अर्ह-ताचे जीवन हे आदर्श जीवन होय. या जीवनात भावी जन्मांची परंपरा समाप्त होते.

(२) महीशासक – पाली बौद्ध वाङ्मयातील उल्लेखांवरून हा पंथ वण्णीपुत्तकांसह स्थविरवादी लोकांपासून अलग झाला. राजगृह येथे पहिल्या धर्मसभेमध्ये जे निर्णय ठरले, ते मही-शासकांना मान्य नव्हते. थेरवाद्यांप्रमाणेच महीशासकही चार आर्यसत्यांवर श्रद्धा ठेवतात. त्यांच्यामध्ये गत (भूत) नाही. अगत (भविष्य) नाही, केवळ वर्तमान आणि नऊ असंस्कृत धर्म एवढेच आहेत.

(३) सर्वास्तिवादी – ज्या बौद्ध पंथांनी धर्मग्रंथांसाठी पाली सोडून संस्कृत भाषा स्वीकारली, अशांपैकी सर्वास्तिवादी हा एक निकाय होय. हा निकाय भारतात पंजाब व वायव्य सरहद्द प्रांत या भागात विकास पावला. कनिष्क राजा या पंथाचा मोठा आश्रयदाता होता. हा पंथ 'सर्वं अस्ति' = सर्व वस्तूंचे अस्तित्व आहे, असे मानतो. त्यावरूनच त्याला हे नाव पडले. हे लोक सर्व वस्तूंचे अस्तित्व तीन्ही काळी मानतात. हे नैरात्म्य-वादी आहेत. सर्व वस्तूंची स्थायी वास्तविकता मान्य असू-नही हे लोक व्यक्तीमध्ये कोणतेही स्थिर तत्त्व मानीत नाहीत. स्थविरवाद्यांप्रमाणेच हेही विश्वामध्ये तत्त्वांची अनेकता मान-तात. अशी तत्त्वे ७५ आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

(४) हैमावत – हा संप्रदाय हिमालयाच्या प्रदेशात सुरू झाला. वसुमित्राच्या मते हैमावत लोक स्थविरवाद्यांचेच वंशज आहेत. हे बोधिसत्त्वांना विशेष महत्त्व देत नाहीत.

(५) वात्सीपुत्रीय – हा संप्रदाय पुद्गलसिद्धान्त मानणारा आहे. पुद्गल हे व्यक्तीतले स्थिर तत्त्व आहे, असे ते समजतात. पुद्गल आहे म्हणूनच पुनर्जन्म आहे, अशी त्यांची धारणा आहे. हा पंथ अवंतीमध्ये वाढला. त्याला हर्षभगिनी राज्यश्री हिचा आश्रय मिळाला.

(६) धर्मगुप्तिक – हा संप्रदाय महीशासकातून अलग झाला. बुद्धाला उपचार समर्पण करणे आणि स्तूपांचा आदर करणे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा धर्मगुप्तिकांचा प्रधान धर्म होता. हा निकाय मध्य आशिया व चीन या प्रदेशांत लोकप्रिय बनला.

(७) काश्यपीय — हा संप्रदाय सर्वास्तिवादी व धर्मगुप्तिक यांच्या काही गौण मतांतच भिन्न होता व स्थविरवाद्यांना जवळचा होता. ज्याचे फल मिळाले, ते संपले; पण जे अजून पक्व झाले नाही, ते अजूनही जीवित आहे, असे ते मानतात. सर्वास्तिवाद्यांच्या मतांमध्ये झालेली ही सुधारणा होय. सर्वास्तिवादी वर्तमानाप्रमाणेच गतालाही जीवित मानीत. या निकायाचे स्वतःचे असे एक त्रिपिटक आहे.

(८) सौत्रांतिक — यांना संक्रांतिवादी असेही म्हणतात. हा निकाय काश्यपीयातून निघाला. यांच्या मते एका जन्मातून दुसऱ्या जन्मात जाताना आपले रूप बदलते. व्यक्तीच्या पाच स्कंधामधला एक सूक्ष्म स्कंध तेवढाच जन्मांतरित होतो. प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणी बुद्धत्वाची संभावना असते. हा संप्रदाय श्रावकयान व महायान या दोहोंमधला सेतू आहे, असे समजतात.

(९) महासांघिक — हा निकाय महायान पंथाचे बीज रोवणारा संप्रदाय ठरला आहे. याने धर्म आणि संघ या दोहोंतही सर्वस्वी क्रांती करून टाकली. याने सूत्रे आणि विनयपाठ यांचे अर्थही बदलले. बरेचसे सूत्रपाठ याने अग्राह्य ठरविले. या संप्रदायाचे मूळ ग्रंथ मात्र सांप्रत उपलब्ध नाहीत. केवळ एक महावस्तू हाच ग्रंथ तेवढा उपलब्ध आहे. काहींचे चिनी अनुवाद मिळतात. या पंथाचे मूळ साहित्य प्राकृत भाषेत होते, असे सांगतात. सुरवातीच्या काळात हा पंथ विशेष प्रगती करू शकला नाही. कारण कट्टर सनातनी थेरवादी यांचा त्याला विरोध होता. या थेरवाद्यांशी महासांघिकांना मोठाच संघर्ष करावा लागला. पण हळूहळू त्यांची शक्ती वाढत गेली. पुढच्या काळात महासांघिकांनी पाटलिपुत्र व वैशाली या ठिकाणी आपली केंद्रे स्थापली व भारताच्या उत्तर-दक्षिण भागातही जम बसविला. महासांघिक निकायाचे प्रमुख सिद्धान्त असे — बुद्ध अनेक असून, ते लोकोत्तर आहेत. त्यांचे शरीर, आयुष्य व सामर्थ्य अमर्याद आहे. ते सतत समाधी अवस्थेत राहतात. बुद्धांचे सर्व काही अतिमानुष असते. साधकाला प्रज्ञेच्या द्वारे दुःखाची समाप्ती करून निर्वाण मिळविता येते. या जगात अव्याकृत असे काही नाही. प्रत्येक वस्तूचा स्वभाव एकतर चांगला असतो किंवा वाईट असतो. बरीही नव्हे आणि वाईटही नव्हे, अशी वस्तूच जगात नाही. मनाचा मूळ स्वभाव पवित्र असतो. तो उपक्लेश व आगंतुक रजस यांनी कलंकित झाल्यास विकृत होतो. मृत्यूच्या नंतर आणि पुनर्जन्माच्या पूर्वी जीवाचे कोणतेही अस्तित्व नसते.

(१०) बहुश्रुतीय—ही महासांघिकांचीच एक उपशाखा होय. बौद्ध धर्मसूत्रांत बहुश्रुत असलेल्या एका आचार्यांकडून या पंथाचे प्रवर्तन झाले, म्हणून याला हे नाव मिळाले. पंथाचे मूळ सिद्धान्त असे— बुद्धाचे उपदेश अनित्यता, दुःख, शून्य, अनात्मा व निर्वाण यांच्याशी संबद्ध आहेत. ते उपदेश मुक्ती देणारे असल्यामुळे लोकोत्तर आहेत. संवृत्ती व परमार्थ अशी दोन सत्ये आहेत. वर्तमान हे वास्तविक आहे आणि भूत व भविष्य यांचे कोणतेही अस्तित्व नाही. हे लोक बुद्धाच्या अतिमानुषतेवर श्रद्धा ठेवीत नसले तरी दशबले, चार वैशारद्ये, इ. बुद्धाच्या विशेष शक्तींवर विश्वास ठेवतात.

(११) चैत्यक — महासांघिकांची ही उपशाखा महादेव नावाच्या एका विद्वानाने सुरू केली. तो ज्या पर्वतावर राहत होता, तिथे एक चैत्य होता. त्यामुळे त्याच्या अनुयायांना चैत्यक म्हणू लागले. काही गौण बाबतींत मतभिन्नता असली, तरी हा संप्रदाय महासांघिकांच्या सिद्धान्तांना मानणारा होता. बुद्ध व बोधिसत्त्व यांना या संप्रदायाने पहिल्याप्रथम देवस्वरूप दिले. त्याचा परिणाम असा झाला, की महायानी लोकांत बुद्ध व बोधिसत्त्व यांचे पूर्णरूपाने दैवीकरण केले गेले. बौद्ध धर्म सामान्य जनतेत लोकप्रिय होण्याला या दैवतीकरणाची फार मदत झाली.

(१२) माध्यमिक — हा संप्रदाय नागार्जुनाने सुरू केला. आपला संप्रदाय सुप्रतिष्ठित करण्यासाठी नागार्जुनाने कित्येक ग्रंथ लिहिले. हा संप्रदाय मध्यमाप्रतिपद म्हणजेच बुद्धोपदिष्ट मध्यम मार्ग मानणारा आहे. अस्तित्व व अनस्तित्व, चिरंतनता व अचिरंतनता, आत्मा व अनात्मा, यांपैकी काहीही न मानणे, असा त्याने मध्यममार्गाचा अर्थ केला आहे. संसार वास्तविक नाही व अवास्तविकही नाही; ती एक केवळ सापेक्षता आहे, असे तो मानतो.

माध्यमिकांच्या तत्त्वज्ञानात शून्यतेला प्राधान्य असल्यामुळे त्या पंथाला शून्यवाद असेही म्हणतात. शून्यता हेच परमतत्त्व असल्याचे नागार्जुन सांगतो. शून्यता म्हणजे वस्तूंचे सापेक्ष अस्तित्व होय.

(१३) योगाचार — या संप्रदायाची स्थापना मैत्रेयाने केली. असंग व वसुबंधू हे या संप्रदायाचे महान समर्थक होत. असंगाने याला योगाचार म्हटले, तर वसुबंधूने विज्ञानवाद म्हटले. या संप्रदायात बोधी प्राप्त होण्यासाठी योग हे प्रभावी साधन मानलेले आहे. विज्ञप्तीला अंतिम सत्य मानीत असल्यामुळे याला विज्ञानवाद म्हटले गेले. विचार हाच सत्य आहे, असे हा संप्रदाय शिकवितो. लंकावतारसूत्र हा या पंथाचा प्रमाणग्रंथ.

संगीती किंवा धर्मपरिषद — बुद्धाच्या निर्वाणानंतर थोड्याच काळात धर्माच्या मूलसिद्धान्तांचा निर्णय करण्यासाठी बौद्ध संघाची पहिली संगीती किंवा परिषद बुद्धाच्या प्रधान शिष्यांनी राजगृह येथे बोलावली. महाकाश्यप हा या परिषदेचा अध्यक्ष

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता. उपाली व आनंद या दोघांनी या परिषदेत प्रामुख्याने भाग-घेतला. या परिषदेत उपालीच्या नेतृत्वाने विनयपिटकाचे स्वरूप निश्चित केले गेले.

पण त्यानंतर शंभर वर्षांच्या आतच विनयाच्या कठोर नियमांचा जाच सहन न होणारा एक प्रबल विरोधी मतवाद उत्पन्न झाला. हा विरोधाचा झेंडा फडकविणारे वज्जिदेशाचे भिक्षू होते. त्यांचा तो विरोध शमविण्यासाठी बुद्धनिर्वाणानंतर शंभर वर्षांनी वैशाली येथे दुसरी धर्मपरिषद बोलावली गेली. त्या परिषदेत वज्जिपुत्तिक भिक्षूंनी आपला विरोध आवेशपूर्ण शब्दांत मांडला. पण प्राचीन विनयांच्या कट्टर पक्षपाती भिक्षूंच्या पुढे त्यांची डाळ शिजली नाही. त्यांना परिषदेतून बाहेर घालविण्यात आले. नंतर ते भिक्षू वैशालीहून कौशांबी येथे गेले. त्यांच्या बरोबर १००० भिक्षूंचा महासंघ होता. त्यांनी आपली संगीती अलग केली. त्या दिवसापासून बौद्ध संघात स्थविरवादी व महासांघिक असे दोन प्रमुख भेद उत्पन्न झाले. विनयामध्ये कोणत्याही प्रकारचे परिवर्तन ज्यांना मान्य नव्हते, त्यांना स्थविरवादी म्हणू लागले व परिवर्तनवादी भिक्षूंनी महासंघ केल्यामुळे त्यांना महासांघिक म्हणू लागले.

हा मतामतांचा गलबला मिटावा आणि बौद्ध धर्माचे सिद्धान्त निश्चित करून ते सर्वमान्य करावे, या उद्देशाने अशोकाने मोग्गलिपुत्त तिष्य याच्या अध्यक्षतेखाली पाटलिपुत्र येथे तिसरी संगीती बोलावली. या परिषदेचे काम सतत नऊ महिने चालू होते. या संगीतीत त्रिपिटकाच्या संकलनाचे कार्य पुरे झाले. तिसऱ्या परिषदेची फलश्रुती ही, की तेव्हापासूनच बौद्ध धर्म विश्वव्यापनासाठी आपल्या केंद्रातून बाहेर पडला.

इ. स. च्या पहिल्या शतकात कुशाणवंशी राजा कनिष्क याच्या अमदानीत चौथी संगीती काश्मीरच्या राजधानीत भरली. या परिषदेचा अध्यक्ष वसुमित्र व उपाध्यक्ष महाकवी अश्वघोष हा होता. या परिषदेतले बहुतेक भिक्षू सर्वास्तिवाद या एकाच संप्रदायाचे होते. या परिषदेत सर्व विरोधांचा परिहार करून बौद्ध धर्माच्या विशिष्ट सिद्धान्तावर जोर दिला गेला आणि महाविभाषा नावाची त्रिपिटकावर फार मोठी व्याख्या लिहिली गेली. या संगीतीमुळेच बौद्ध धर्म सुसंघटितपणे मार्ग क्रमीत राहिला. या परिषदेचे आणखी एक वैशिष्ट्य हे, की त्या काळापासून बौद्ध दर्शनाने संस्कृत भाषेचा स्वीकार केला. या परिषदा झाल्या नसत्या, तर बौद्ध धर्मात जो बुजबुजाट झाला असता, त्याची कल्पनाही करवत नाही.

बौद्ध धर्माची वैशिष्ट्ये – बौद्ध धर्म सांप्रत जगातल्या मोठ्या धर्मांपैकी एक आहे. एक काळ असा होता, की जगाच्या फार मोठ्या भागावर बौद्ध धर्माचे विजय-नगारे वाजत होते. त्याचाच सर्वत्र बोलबाला होत होता. ज्या भूमीत वैदिक धर्म हजारो वर्षे प्रचलित होता, त्याच भूमीत बौद्ध धर्माचे बीज पडले आणि पाहता पाहता त्याचा विशाल वटवृक्ष बनला. वैदिक धर्माला त्याच्याच भूमीत त्याने ग्रहण लावले. जवळजवळ २०० वर्षे तो भारताचा राजधर्म बनून राहिला होता.

बौद्ध धर्माला एवढी सफलता आणि लोकप्रियता मिळण्याचे कारण म्हणजे त्या धर्माची बुद्ध, संघ व धर्म अशी त्रिरत्नकल्पना हे होय. बुद्ध हा या धर्माचा प्रवर्तक. त्याचे व्यक्तिमत्त्व लोकोत्तर होते. त्याग आणि तपस्या, दमन आणि शमन, तसाच शांती आणि अहिंसा यांचा एकत्र संयोग बुद्धाच्या व्यक्तिमत्त्वात जसा पाहायला मिळतो, तसा तो अन्यत्र दुर्लभ आहे. सुप्रसिद्ध विद्वान बार्थ याने म्हटले आहे, की बुद्धाचे व्यक्तिमत्त्व शांती व माधुर्य यांचा परिपूर्ण आदर्श आहे. बुद्ध ही अनंत कोमलता, नैतिक स्वतंत्रता व पापरहितता यांची मूर्ती आहे. म्हणून त्रिरत्न कल्पनेत बुद्धाचे स्थान पहिले आहे.

संघ हे दुसरे रत्न होय. आपल्या धर्माची निरंतर अभिवृद्धी व्हावी म्हणून बुद्धाने संघाची स्थापना केली. संघात राहणाऱ्या भिक्षूंसाठी त्याने ब्रह्मचर्यादी कठोर नियम बनवले. बौद्ध भिक्षूंनी पवित्र जीवन जगावे आणि पवित्र राहूनच धर्मप्रचार करावा, असे त्याने निश्चित केले.

धार्मिक विचारांच्या आचारासाठी व प्रचारासाठी आवश्यक अशी दीक्षा घेतलेला व शिस्तीत वाढलेला असा संघ बौद्ध धर्मानेच प्रथम संघटित केला. जगाला नैतिक मार्गदर्शन करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करून उभ्या राहिलेल्या व्यक्तींचा हा संघ होता. मनुष्यमात्राचे कल्याण या एकाच मूलभूत भावनेवर तो आधारलेला होता. या संघाने बौद्ध धर्मात ऐक्यभाव निर्माण केला. संघस्थापनेमुळेच बौद्ध धर्माला इतक्या अल्प कालावधीत दिग्विजय करता आला. बौद्ध धर्माला विश्वधर्माच्या रूपात परिणत करण्याचे काम बौद्ध संघानेच केले. या भिक्षुसंघात उच्च-नीच भावना नव्हती; वर्णभेद, जातिभेद किंवा लिंगभेद यांनाही अवकाश नव्हता. सर्व वर्णांच्या स्त्री-पुरुषांना योग्यतेनुसार संघात प्रवेश मिळे. सारीपुत्त मोग्गलायन, वसिठ्ठ, कश्यप, भारद्वाज, वत्स्य, इ. ब्राह्मण; आनंद, देवदत्त, सिंह सेनापती, इ. क्षत्रिय; यश, तपुस्स, भल्लिक, इ. वैश्य आणि उपाली, चुंद, इ. शूद्र समान अधिकाराने भिक्षुसंघाचे सदस्य बनले होते.

धर्म हे तिसरे रत्न होय. बुद्धिवाद किंवा युक्तिवाद हे बौद्ध धर्माचे मोठेच वैशिष्ट्य आहे. बुद्धाच्या पूर्वी प्रभावी असलेला वैदिक धर्म हा वेदांचे प्रामाण्य मानणारा होता. वेदप्रामाण्याविषयी मनात संदेह धरणे हेमुद्धा त्या धर्मात पाप समजले जात असे. 'धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः' ... ज्यांना धर्म

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जाणायची इच्छा असेल, त्याला श्रुती हे परम प्रमाण होय, असा महामंत्र वैदिक धर्माने उद्घोषित केलेला होता. कार्य कोणते व अकार्य कोणते, हे समजण्यासाठी शास्त्र प्रमाण मानावे, असे भगवान श्रीकृष्णानेही गीतेत सांगितले आहे. पण गौतम बुद्धाचे वैशिष्टय हे, की त्याने शास्त्राच्या जागी बुद्धीची प्रतिष्ठा केली. 'शास्त्रावर विश्वास ठेवू नका; बुद्धिवादाचा आश्रय घ्या; आपला धर्मोपदेशही बुद्धीला पटत असला, तरच तुम्ही तो स्वीकारा. 'तुम्ही आत्मदीप व्हा आणि आत्मशरण व्हा.' असे तो निःसंदिग्धपणे आपल्या शिष्यांना सांगे. गुरुप्रामाण्याच्या बाबतींतही त्याने शिष्यांना स्वातंत्र्य दिले होते.

सर्वांना समान अधिकार ही बौद्ध धर्माची आणखी एक विशेषता आहे. वैदिक धर्म जरी उदार आणि व्यापक असला, तरी व्यवहाराच्या कक्षेत तो सर्व मनुष्यांचा समान अधिकार मानीत नाही. स्त्री-शूद्रांना त्याने धर्माच्या बाबतीत समान अधिकार दिलेला नाही. ही असमानता हा एक महान दोष आहे, असे समजून बुद्धाने अशी स्पष्ट घोषणा केली, की सर्व माणसे समान आहेत व धर्माच्या ठिकाणी सर्वांचा समान अधिकार आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी समतेवर आधारलेल्या लोकतंत्राचा मूल सिद्धान्त बुद्धाने प्रतिपादिला, हे त्याचे असामान्य मोठेपण होय. त्यामुळे बुद्धाच्या आणि बौद्ध संघाच्या उपदेशाने लोक प्रभावित झाले.

सदाचारावर विशेष भर हे बौद्ध धर्माचे आणखी एक वैशिष्टय होय. 'सदाचाराचे पालन करा,' हे जणू बुद्धाचे ध्रुवपदच होते. मनुष्याच्या आचारांत सुधारणा व्हावी, म्हणून त्याने आर्य अष्टांगिक मार्ग शोधून काढला. म्हणूनच विद्वान लोक बौद्ध धर्माला नैतिक धर्म म्हणतात. बुद्धाचा हा अष्टांगिक मार्ग सर्वांना आचरायला सुलभ होता. बुद्धाने अहिंसेला श्रेष्ठ तत्त्व मानून, यज्ञयागात होणाऱ्या पशुहत्येविरुद्ध झेंडा उभारला. जगात जर कोणता धर्म असेल, तर तो अहिंसा हाच आहे, असे त्याने उद्घोषिले. आत्मदमन करणे म्हणजे स्वतःला स्वाधीन ठेवणे, या गोष्टीलाही त्याने फार महत्त्व दिले. मनुष्याच्या अंतरात कामक्रोधादी विकारांचा जो समुदाय आहे, त्याचे दमन केले पाहिजे आणि इंद्रिये स्वाधीन ठेवली पाहिजेत, असे तो सांगे. यालाच तो आत्मविजय म्हणे. बुद्धाचे हे उपदेश ऐकता ऐकता श्रोत्यांची अंतःकरणे भारून जात. बुद्धाच्या धर्माचा जगावर इतका खोल प्रभाव पडला, याचे कारण त्याने नीतीला प्राधान्य दिले आणि मोक्षासाठी त्याहून अधिक कोणतेही अवडंबर निर्माण केले नाही, हे होय.

वैदिकांच्या कर्मकांडालाही त्याने विरोध केला. वैदिकांच्या यज्ञयागातली पशुहिंसा, त्यासाठी श्रमिकांवर केली जाणारी सक्ती आणि त्यासाठी होणारा फार मोठा अपव्यय, या गोष्टी त्याला अमान्य होत्या. वैदिक यज्ञाहून श्रेष्ठतर आणि पुण्यकारक यज्ञ कोणता, असा त्याला प्रश्न केला असता त्याने सांगितले, की साधूंना दिलेले दान आणि त्रिरत्नशरणता हे अधिक श्रेष्ठ यज्ञ आहेत.

चार वर्णांच्या रूपाने समाजव्यवस्थेचे विभाजन वैदिक कालापासून चालू होते. प्राचीन ऋषींच्या मतानुसार हे विभाजन गुणांवर नसून जन्मावर आधारित आहे. बुद्धाने अनेक प्रसंगी या चातुर्वर्ण्यावर कडक टीका केली. चातुर्वर्ण्यात ब्राह्मणांना पहिले स्थान होते. हे ब्राह्मण अल्पसंख्य असूनही त्यांनी समाजाचे बौद्धिक व आध्यात्मिक जीवन आपल्या अधिकारात ठेवले होते. ब्राह्मणप्रणीत धर्मशास्त्रानुसार योग्यता असूनही त्रैवर्णिकांच्या बाहेर कोणाला प्रव्रज्या घेता येत नसे. त्रैवर्णिकांनाही उपनयन, स्वाध्याय, गृहस्थाश्रम या गोष्टी पुऱ्या केल्यानंतरच संन्यास घेता येत असे. बुद्धाने या सर्व अटी काढून टाकल्या आणि सर्व वर्णांना त्यांच्या इच्छेनुसार प्रव्रज्या घेण्याचा अधिकार देऊन टाकला. त्यामुळेच बुद्धाच्या भिक्षुसंघात आपणांला सर्व जातींचे लोक आढळतात.

धर्मशिक्षण – भारतात ब्राह्मणांतले ऋषी व आचार्य हे आपापल्या परीने छात्रांना विद्यादान करीत. अशा ऋषींची व आचार्यांची छोटी छोटी गुरुकुले होती. मर्यादित विद्यार्थी त्या गुरुकुलांत विद्याध्ययन करून स्नातक होत. बौद्ध धर्म प्रस्थापित झाल्यानंतर गुरुकुलांच्या जागी विहारपद्धती सुरू झाली. गुरुकुलातला विद्यार्थी हा स्नातक झाल्यावर गृहस्थाश्रमात प्रवेश करीत असल्यामुळे ही गुरुकुले छोटीच राहिली. पण बौद्ध परंपरेत भिक्षू हे यावज्जीव विहारातच राहत असल्यामुळे, त्यांच्या विद्याविहारांनी जणू विश्वविद्यालयांचे स्वरूप घेतले. बौद्ध पद्धतीत शिक्षण ही कित्येक शिक्षकांच्या सांघिक मालकीची संस्था बनली. अशा विहारांत हजारो अध्यापक आणि हजारो विद्यार्थी एकत्र राहत. नालंदा, विक्रमशीला व उदंतपुरी येथील विश्वविद्यालये या गोष्टींची साक्ष देतील. या विश्वविद्यालयांचा विकास कित्येक शतके होत राहिला.

जेव्हा बौद्धांनी मठांत किंवा विहारांत राहून संन्यस्त जीवन जगण्याचा निश्चय केला, तेव्हा बौद्ध आचार्यांच्या पुढे प्रश्न उभा राहिला, की रोज भरती होणाऱ्या या नवदीक्षित भिक्षूंना कशा प्रकारचे शिक्षण द्यावे ? विचार करून त्यांनी ठरविले, की एखाद्या उपाध्यायाच्या सहवासात नवभिक्षूने कमीत कमी पाच वर्षे राहावे आणि त्याच्याकडून धर्मशिक्षण घ्यावे.

बौद्ध धर्माच्या प्रारंभकाली धर्मग्रंथ लिखित स्वरूपात नव्हते. सारे अध्ययन मौखिक परंपरेने चालायचे.. गुरूने सांगायचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि शिष्याने ते संथा म्हणून पाठ करायचे. विनय, गाथा, जातक, प्रार्थना हे सगळे विषय विद्यार्थी उपाध्यायाकडून या प्रकारे शिकत आणि धर्माचे मूल पाठही कंठस्थ करीत.

धम्म आणि विनय ही शिक्षणाची दोन प्रधान अंगे असत. मोठ्या विद्यापीठांतून हे दोन्ही विषय शिकविणारे शिक्षक असत. धम्मशिक्षकांना सुत्तंतिक म्हणत व विनय शिकविणाऱ्यांना विनयधर म्हणत. ज्यांना मातृकांचे (मंत्रादी तांत्रिक गोष्टींचे) विशेष ज्ञान असे, त्यांना मातिकाधर असे म्हणत. भिक्षूंच्या प्रशिक्षणात कथावत्थू, अभिधम्म, इ. कथासाहित्याचा उपयोग करीत. विद्यार्थ्याला उत्तम धर्मशिक्षण देऊन त्याला दुसऱ्याशी शास्त्रार्थ करण्याइतका पंडित व प्रगल्भबुद्धीचा करणे हे गुरूचे कर्तव्य मानले जाई. शिक्षकाने एखादा चुकीचा सिद्धान्त सांगितल्यास त्याला विरोध करण्याचे स्वातंत्र्यही विद्यार्थ्याला असे. वादविवाद, शास्त्रार्थ, खंडनमंडन, स्वतंत्र बुद्धीने तर्क किंवा विचार करणे आणि त्या विचारात जे तत्त्व गवसले असेल ते सभेत निःसंकोच सांगणे, अशा प्रकारचे बौद्धिक स्वातंत्र्य मठांत आणि विहारांत प्रत्येक भिक्षूला मिळत असे. जे भिक्षू भिन्न मते धारण करणारे असतील त्यांना स्वतःचा गट बनवायलाही प्रत्यवाय नसे. या विचारस्वातंत्र्यामुळेच मूळच्या सरळ व सुबोध अशा बौद्ध धर्मात आणि दर्शनात अनेक पंथोपपंथ निर्माण झाले.

इ. स. च्या प्रारंभकालात धर्मग्रंथ लिपिबद्ध करण्याचे काम सुरू झाले. हळूहळू सर्व ग्रंथ लेखनिविष्ट होऊ लागले. पुढचे शिक्षण अशा लिखित ग्रंथांवरून सुरू झाले. ग्रंथ लिहिणे व त्यांचा सुरक्षित संग्रह बनविणे हेही शिक्षणाचे एक अंग बनले. त्यातूनच पुढे नालंदा आणि विक्रमशीला या विश्वविद्यालयांत हस्तलिखित ग्रंथांचा विशाल संग्रह निर्माण झाला.

विहारात प्रवेश करणाऱ्या नवभिक्षूंना संन्यस्त जीवन जगण्यासाठी आवश्यक ते धर्मशिक्षण देणे, हे सुरुवातीस या बौद्ध विहारांचे उद्दिष्ट होते. पण बौद्धेतर विद्यार्थी व मुमुक्षू हेही जेव्हा विद्यार्जनासाठी विहारांत येऊ लागले, तेव्हा बौद्धाचार्यांना आपली शिक्षणपद्धती व्यापक करणे भाग पडले. पुढच्या कालात इतर आस्तिक-नास्तिक दर्शने, संस्कृत भाषा, व्याकरण, ज्योतिष, वैद्यक, इ. अनेक विषयांचे अध्यापन बौद्धांनी सुरू केले. हेतुविद्या, शब्दविद्या, चिकित्साविद्या, मंत्रविद्या, इ. अनेक विद्या ते विद्यार्थ्यांना शिकवू लागले. प्रत्येक विषयाचा पाठ्यक्रमही निश्चित करण्यात आला. पाठ्यक्रम पुरा झाल्यावर विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ होत असे. त्यात विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि बुद्धिमत्ता पाहून त्यांना विशिष्ट पदव्या दिल्या जात. त्या त्या देशाचा राजा आपल्या देशातील विहारांना उदारपणे द्रव्यदान करीत असे. मात्र त्या विहारांतल्या शिक्षणपद्धतीवर त्याची कोणत्याही प्रकारची सत्ता नसे. राजाप्रमाणेच धनिक श्रेष्ठीही अशा विद्याविहारांना सढळ हाताने धन देत असत.

तांत्रिक साधना – उत्तरकालीन बौद्ध धर्मात मंत्रयान, वज्रयान, सहजयान, इ. काही उपसंप्रदाय योगाचारातून उगम पावले. हे उपसंप्रदाय तांत्रिक धर्माचार पाळणारे व त्यांनाच प्राधान्य देणारे होते. मंत्रयानात मंत्रपदांच्या द्वारे निर्वाणप्राप्ती सांगितली आहे. मंत्रपदात गुह्य शक्ती असते, असे मंत्रयानी समजतात. वज्रयानांनी शून्य व विज्ञान यांना वज्र म्हटले आहे. वज्र हे अविनाशी असून, ते निर्वाणही प्राप्त करून देते, अशी वज्रयानांची धारणा आहे. मंत्रयान व वज्रयान या दोहोंच्या साहित्याला तंत्र म्हणतात. बौद्ध तंत्रांचे चार विभाग आहेत –

(१) क्रियातंत्र – यात मंदिरनिर्माण, देवप्रतिष्ठा, इ.गोष्टींशी संबंधित अशी अनुष्ठाने वर्णिली आहेत.

(२) चर्यातंत्र – यात राग, द्वेष, मोह, श्रद्धा, बुद्धी व वितर्क या सहा चर्यांचे वर्णन आहे.

(३) योगतंत्र – यात यौगिक क्रिया सांगितल्या आहेत.

(४) अनुत्तरयोगतंत्र – यात बोधिसत्त्वाच्या उत्पादासाठी वंदना, पूजा, शरणगमन, इ. क्रिया सांगितल्या आहेत.

बौद्ध धर्मात तंत्रवाद वाढला, त्याची काही कारणे संभवतात, ती अशी – मुळात कठोर असलेल्या इंद्रियनिग्रहादी साधनेविषयी वाटणारी भीती, साधना सुलभ असावी अशी आकांक्षा आणि अलौकिक शक्तींची प्राप्ती व त्यांचे प्रदर्शन यांविषयीचा मोह.

बौद्ध धर्मात मुळापासूनच तप आणि योग यांविषयी आदर होता. गौतम बुद्ध स्वतः योगी होता. त्याच्यापाशी काही यौगिक सिद्धीही होत्या. त्याने सिद्धी आणि चमत्कार यांच्या प्रदर्शनाला विरोध केला असला, तरी त्याचे जीवन, त्याची विचारपद्धती आणि त्याची साधना, यांमध्ये काही गूढ व रहस्यमय तत्त्वे होती, यात शंका नाही. त्यांच्याच आधारावर पुढच्या आचार्यांनी तांत्रिक साधनेचा विकास केला.

इ. स. च्या सुरुवातीपासूनच बौद्ध साहित्यात तांत्रिक विचाराचा प्रादुर्भाव होतो. विद्याधरपिटक नामक महायानी ग्रंथात सर्वप्रथम तांत्रिक उल्लेख मिळतात. सुखावतीव्यूह, अमितायुपसूत्र व मंजुश्रीमूलकल्प या ग्रंथांवर तांत्रिक मतांचा बराच पगडा आहे. मंजुश्रीमूलकल्पात तांत्रिक मंत्रसाधनेचे, यक्ष-यक्षिणी साधनेचे, तसेच मुद्रा, मंडल, अभिषेक, अभिचार, इ. गोष्टींचे विस्तृत वर्णन आहे. तंत्रसाधनेत स्त्रीसमागमाची आवश्यकता आहे, असेही त्या ग्रंथात प्रतिपादिले आहे. प्रस्तुत ग्रंथावर शैव मताचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यावरून सुरवातीचे बौद्ध तंत्र शैव तंत्राच्या प्रभावात होते, असे अनुमान करता येते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ. स. च्या प्रारंभीच बुद्ध हा अवतार म्हणून समजला जाऊ लागला. सद्धर्मपुंडरीक या ग्रंथात म्हटले आहे, की बुद्ध उच्च-नीच अशा सर्वांचा उद्धार करण्यासाठी अवतार घेत असतो. हा अवतारवाद स्वीकारल्यानंतर भक्ती, मंत्र, पूजा, स्तोत्र, ध्यान, मुद्रा, मूर्तिनिर्माण, इ. गोष्टींचा संभार त्याच्याभोवती आपोआप उभा राहिला. बुद्धाच्या बरोबरीनेच देवता आणि बोधिसत्त्व यांचेही अवतार होतात, असे मानले गेले. प्रस्तुत ग्रंथात सुखावती स्वर्गाचे वर्णन आहे आणि धारणीमंत्रांचे पाठ आहेत. हे धारणी-मंत्र बुद्धप्रणीतच आहेत, अशीही कल्पना आहे. तिथे गौतम बुद्धाला भैषज्यराज म्हटले आहे. शैव, शाक्त व बौद्ध या सर्व तंत्रांत तांत्रिक साधनेचा संबंध औषधिविज्ञानाशी दाखवला आहे. तंत्राचा रसायनशास्त्राशीही संबंध आहे. शैव-शाक्त तंत्रांचा जन्म जसा शिव-उमा यांच्या संवादांतून होतो, तसाच बौद्ध तंत्रांचा उगम देव, यक्ष, राक्षस व बोधिसत्त्व यांच्या सभां-मध्ये बुद्धाने दिलेल्या उपदेशातून होतो. करणव्यूह नावाचा एक बौद्ध तंत्रग्रंथ आहे. त्यात अधिकारभेदाने साधनाभेद सांगून आसुरी साधनेचेही वर्णन केले आहे.

तथागतगुह्यक नावाचे आणखी एक बौद्ध तंत्र आहे. या तंत्राचे आचरण करणारा जो समाज तो तथागतगुह्य समाज होय. या ग्रंथावर अनेक टीका आहेत. हा ग्रंथ संध्या (रहस्यमय किंवा प्रतीकात्मक) भाषेत लिहिला आहे. त्यात प्रारंभीच सांगितले आहे, की तथागतबुद्ध हा काय, वाक, चित्त, हृदय, वज्र, स्त्री व भग यांच्या ठिकाणी विहार करीत असतो. या ग्रंथात शक्तीच्या आराधनेचा उल्लेख आहे व त्या साधनेसाठी स्त्री-साहचर्याची आवश्यकताही सांगितली आहे. या शक्तिसाधनेचे पूर्वांग म्हणून हठयोगाचेही आचरण सांगितले आहे. बौद्धांच्या तांत्रिक साधने-तील विशेष गोष्टी पुढीलप्रमाणे –

(१) आदिकर्म – साधकाला तंत्रसाधनेत प्रवेश करण्यापूर्वी पारमितांचा अभ्यास करावा लागतो. यालाच आदिकर्म म्हण-तात. स्वतः बुद्धानेही असा अभ्यास केला होता.

(२) उपासक – बुद्धपूजेसाठी उद्युक्त झालेल्या पुरुषाला उपासक म्हणतात. उपासकाला गुरुशरण होऊन त्याच्या देख-रेखी खाली काम करावे लागते. मग गुरू त्याला अभिषेक करतो.

(३) अभिषेक – ही क्रिया दीर्घ व रहस्यमय असते. गुरूने सात वेळा अभिषेक केल्यावर शिष्य साधनेला योग्य होतो. अभिषेक तीन प्रकारचा असतो – कलश, गुह्य व प्रज्ञा. कलशा-भिषेकानंतर गुरू शिष्याच्या हाती वज्र व घंटा देऊन त्याला गुह्य शिक्षा देतो. या अभिषेकात मुद्रा म्हणजे स्त्री हिची आवश्यकता असते. साधकाने मुद्रेच्या द्वारेच अंतरातल्या सुप्त शक्तींना जागृत करायचे असते. या मुद्रा शूद्री, क्षत्राणी, ब्राह्मणी, डोंबी, चांडाली, इ. अनेक असतात. आपण निवडलेल्या व गुरूने स्वाधीन केलेल्या मुद्रेशी साधकाने रममाण व्हायचे असते. त्या अवस्थेत होणारा आनंद हा शाश्वत आनंदाकडे नेणारा असतो, असे मानलेले आहे.

(४) रक्षामंडल – साधनेसाठी मंडलाची आवश्यकता असते. हे एक वर्तुळ असते. ते फुलांनी सजवतात आणि त्यात देव-देवतांची चित्रे काढतात. साधक या मंडलात बसल्यावरच गुरू मंत्र व जल यांच्या द्वारे साधकाची अंगे पवित्र करतो.

(५) न्यास – अभिषेकानंतर साधकाने नखशिखांत प्रत्येक अवयवाच्या ठिकाणी देवतेचा न्यास करायचा असतो.

(६) ध्यान – चक्र, रत्न, पद्म, रश्मिमंडल, इत्यादींचे सहा महिनेपर्यंत ध्यान करायचे असते. हे शब्द प्रतीकात्मक आहेत. उदा० – रत्न = चित्त.

(७) मंत्रजप – बौद्ध तंत्रातले प्रमुख मंत्र धारणी हे होत. याशिवाय मृतसंजीवनी, रक्षा, वशीकरण, इ. मंत्रही आहेत. तथागतगुह्यकात मंत्रजप दहा प्रकारचा सांगितला आहे. मंत्र-जपामुळे बोधिचित्त व सिद्धी यांची प्राप्ती होते.

(८) आहार – साधकाला प्रत्येक पशूचे मांस भक्षणीय आहे. वीर्य, विष्ठा, इ. चे भक्षणही पंचामृतभक्षण या नावाने सांगितले आहे. हे शब्दही सांकेतिक आहेत. मांसादी वस्तू उप-लब्ध नसल्यास ध्यानद्वारा मांसभक्षण विहित आहे.

सर्वप्रथम तथागतगुह्यक या ग्रंथात तांत्रिक उपासनेला निश्चित स्वरूप देण्यात आले. मग पुढच्या काही शतकांत त्या उपासनेत अनेक प्रकारचा तपशील भरला गेला. ध्यानीबुद्ध, देवकुल, युगनद्ध, महासुख, इ. सिद्धान्त जेव्हा तंत्रमतांत प्राधान्य पावले, तेव्हा त्या सर्वांना मिळून वज्रयान असे नाव पडले.

ध्यानीबुद्ध – बौद्ध मत हे प्रारंभी अनात्मवादी व अनीश्वरवादी होते; पण महायान मतात जेव्हा तंत्रमार्ग शिरला, तेव्हा त्या लोकांनी आत्मा व परमात्मा यांचा स्पष्टपणे स्वीकार केला. तांत्रिक बौद्ध मतावर नास्तिकतेची छायाही नाही. या मतात परमात्मा हा आदिबुद्ध या नावाने ओळखला जातो. तो अनादी, सर्वज्ञ व सर्वद्रष्टा असून, शून्यता व करुणा या दोहोंच्याही ठिकाणी त्याची अद्वैतावस्था असते. या आदिबुद्धाची विभिन्न रूपे विभिन्न लोकांत असतात. हा रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान या पाच स्कंधांचे अधिष्ठाते देव अर्थात पाच ध्यानीबुद्ध या स्वरूपात व्यक्त होतो. वैरोचन, रत्नसंभव, अमिताभ, अमोघसिद्धी व अक्षोभ्य हे ध्यानीबुद्ध होत. बौद्ध तंत्रांत हे ध्यानीबुद्ध त्यांच्या शक्तींसह वर्णिलेले असतात. त्यांच्या वर्ण, किरीट, मुद्रा, वाहन, कुल, बीजमंत्र या सगळ्या गोष्टी भिन्न असतात. हे ध्यानीबुद्ध सदैव ध्यानमग्न असतात. त्यांचीच मानवी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रूपे म्हणजे बोधिसत्त्व होत.

देवकुल – प्रत्येक ध्यानीबुद्ध हा एका देवकुलाचा जनक असतो. वैरोचनकुलात सर्व स्त्रीदेवतांचा समावेश आहे. मारीची, अशोककांता, वाराही, घोषा, इ. त्यांची नावे आहेत. याशिवाय शाकिनी, डाकिनी, इ. भयंकर देवताही याच कुलातून विकसित झाल्या आहेत. त्यांच्या वेषभूषा, वर्ण, वाहन, ध्यान, मंत्र, मुद्रा, इ. गोष्टींचे वर्णन साधनमालेत आहे. रत्नसंभवकुलात जंभल व उच्छुष्मजंभल असे दोन देव व महाप्रतिसरा व वसुधारा अशा दोन देवी आहेत. यांची उपासना धनप्राप्तीसाठी करायची असते. अमिताभकुलातून अवलोकितेश्वर, महाबल व हयग्रीव हे देव आणि कुरुकुल्ला, भृकुटी, महासितवती, इ. देवी जन्म पावल्या आहेत. कुरुकुल्ला ही त्या सर्वांत महत्त्वाची. वशीकरणासाठी तिचा उपयोग करतात. अमोघकुलातून खदिरवनी तारा, वश्यतारा, धनदतारा, महामायूरी, इ. सर्व देवता उत्पन्न झाल्या आहेत. विविध रोग, सर्पदंश, इ. गोष्टींपासून त्या मनुष्यांचे रक्षण करतात. अक्षोभ्यकुलाची संतती विपुल आहे. चंडरोषण, हेरुक, बुद्धकपाल, यमारी, इ. भयंकर देव या कुलात उत्पन्न झाले आहेत. यांतले बहुतेक देव त्यांच्या शक्तींसह युगनद्ध रूपात उपासिले जातात. महाचीनतारा, एकजटा, प्रज्ञापारमिता, नैरात्मा, इ. देवीही याच कुलातल्या होत. अक्षोभ्यकुलातल्या देवतांचे शिवपरिवारांतील देवतांशी विलक्षण साम्य आहे.

बौद्ध देवतांचे ध्यान – बौद्ध देवतांचे वर्ण, त्यांची आसने, आयुधे व मुद्रा यांना काही आध्यात्मिक अर्थ असतो. ज्या तांत्रिक विधीसाठी देवतेला आवाहन केलेले असते, त्याला अनुसरून त्या देवतेचा वर्ण ठरलेला आहे. उदा० – शांतिक विधीची देवता शुभ्र वर्णाची; पौष्टिक विधीची पीत वर्णाची; वश्य व आकर्षण या विधींची हरित किंवा रक्त वर्णाची; उच्चाटन किंवा मारण या विधींच्या देवतेचा वर्ण निळा.

आसनांचा अर्थ – वज्रपर्यङ्क = चिंतन व आत्मनिरीक्षण; अर्धपर्यङ्क = प्रसन्नता; आलीढ = वीरता; प्रत्यालीढ = नाश. देवतांची आयुधे ही बोधिचित्ताची विभिन्न रूपे आणि त्यांच्या मुद्रा म्हणजे बोधिचित्ताच्या भिन्न भिन्न अवस्था होत.

बौद्धांच्या देवदेवतांची नावे भिन्न असली, तरी त्यांपैकी बऱ्याच देवतांवर पौराणिक देवतांचा प्रभाव स्पष्ट दिसतो. त्यांचे रूप, गुण, स्वभाव हेही त्या त्या पौराणिक देवतांच्या सारखेच दिसतात. मात्र बौद्ध देवमंडलाचे वैशिष्ट्य हे, की त्यांनी साऱ्या देव-देवता कोणत्या तरी ध्यानीबुद्धाशी संलग्न केलेल्या आहेत. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या स्त्री-पुरुष देवता युगनद्ध किंवा संयुक्त अवस्थेत असतात. तांत्रिक बौद्ध हे देवांची वास्तव सत्ता मानीत नाहीत; तर केवळ मनोवैज्ञानिक आवश्यकतेसाठी त्यांची काल्पनिक सत्ता मानतात. जप, ध्यान, इ. साधनेच्या प्रारंभी बीजमंत्रातून देवतांची उत्पत्ती होते व त्या त्या देवतेशी तादात्म्य पावून साधक स्वरूपात स्थित होण्याचे शिक्षण घेऊ शकतो, असे त्यांचे मत आहे. देवतांच्या अनेक रूपांची कल्पना ही मनोवृत्तींच्या अनेकत्वातून झालेली आहे, रोगनाशासाठी विशिष्ट मानसिक अवस्थेची गरज असते, म्हणून सिंहनाद हा देव उत्पन्न झाला व त्याचे ध्यानजपादी तंत्र सांगितले गेले. शत्रुनाशासाठी महाकाल, प्रेमपूर्तीसाठी कुरुकुल्ला, इ. देवतांचे ध्यानपूजन बौद्ध तंत्रात निर्माण झाले. देवता फल देत नाहीत; तर चित्ताची तशी अवस्था हीच फल देणारी असते, हा तांत्रिक बौद्धांचा सिद्धान्त असून तो मनोविज्ञानाला धरून आहे.

ब्रह्मा, विष्णू, महेश, कार्तिकेय, चामुंडा, वाराही, गणपती, महाकाल, इ. अनेक हिंदू देवता बौद्ध धर्मात जशाच्या तशाच प्रविष्ट झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे नवग्रह, यक्ष, गंधर्व, विद्याधर यांचीही पूजा बौद्ध लोक करतात. त्यामुळे मनोरथ पूर्ण होतात, अशी त्यांची श्रद्धा आहे.

तांत्रिक बौद्धांनी पौराणिक देवतांची अवहेलनाही केली आहे. इथे त्यांचा सांप्रदायिक दुरभिमान दिसून येतो. बौद्ध लोक गणपतीला विघ्नकर्ता मानतात व विघ्नांतक नावाच्या देवाकडून त्याला पायदळी तुडवितात. बौद्ध मूर्ति-चित्रकलेत अशा प्रकारची अनेक दृश्ये आहेत. ब्रह्मा, विष्णू, शिव आणि इंद्र यांना बौद्ध तंत्रात सैतानाच्या (मार) श्रेणीत घातले आहे. नारायणाला हरिहरिवाहन नावाच्या देवाचे वाहन बनवले आहे. ब्रह्मदेवाची दशा तर अत्यंत दयनीय झाली आहे. अनेक बौद्ध देवता ब्रह्मचाचे शिर कापून त्याने आपल्या हातांची शोभा वाढवतात. निष्पन्नयोगावलीत वर्णिलेल्या गौरी, चौरी, वैताली व घस्मरी या देवता अनुक्रमे ब्रह्मा, इंद्र, उपेंद्र व रुद्र यांच्या छातीवर बसवलेल्या दाखविलेल्या आहेत. भैरव आणि कालरात्री यांना आडवे घालून संवर मंडलातला बौद्ध देव त्यांच्यावर उभा आहे. योगांबर मंडलात अनेक पौराणिक देवतांना द्वारपाल बनवले आहे.

बौद्ध देवमंडलात भयानक देवताच अधिक आहेत; पण साधनमालेत सांगितले आहे, की या सर्व देवता अंतःकरणातून दयाळू आणि कृपाळू असून, त्यांचे केवळ बाह्य रूपच भयंकर आहे. ही बाह्य भयंकरताही साधकांना भय उत्पन्न करण्यासाठी नसून, निर्दय, हिंसक, नास्तिक, व बुद्धद्रोही यांना शिक्षा देण्यासाठी आहे. बौद्ध तंत्रमार्गात या सर्व देवतांची विशिष्ट उद्देशासाठी जप, पूजा, इ. साधना सांगितली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

युगनद्ध – बौद्ध तंत्रे ही अद्वैती किंवा अद्वयवादी आहेत. साधकाला पूर्ण अद्वयावस्था प्राप्त करून घ्यायची असते. तिलाच युगनद्ध अवस्था म्हणतात. प्रज्ञा व उपाय या दोहोंचा परस्पर संयोग होणे असा त्याचा अर्थ आहे. जेव्हा जागतिक पदार्थांची शून्यता ज्ञात होऊन शरीर, मन व शब्द यांत तथतेचे ज्ञान भरून येते व साधक जगताच्या दुःखांच्या नाशासाठी संनद्ध होतो, तेव्हा त्याला युगनद्ध अवस्था प्राप्त होते. हा सिद्धान्त मूर्त स्वरूपात दाखविण्यासाठी बौद्धांच्या तांत्रिक स्त्री-पुरुष देवता आलिंगन अवस्थेत दाखविलेल्या असतात. तिबेटात ही अवस्था यब-युम् या नावाने प्रसिद्ध आहे. यब् = पिता व युम् = माता. त्यांचे मीलन म्हणजे पूर्णावस्था किंवा निर्वाण होय. हाच सिद्धान्त निराळ्या शब्दांत तांत्रिकांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे –

जागतिक पदार्थांना एक प्रतीयमान सत्ता असते. हे ज्ञान एकदा झाले, की साधक प्रत्येक अवस्थेत निर्द्वंद्व राहतो. यालाच शून्यता असे म्हणतात. शून्यता ही स्त्री असून, तिची अभिव्यक्ती हा पुरुष आहे. या दोहोंची एकता झाली, की सहज प्रेमावस्था उत्पन्न होते. ही अवस्था म्हणजेच युगनद्धता किंवा यब-युम् अवस्था होय.

चर्या, संस्कार व सण – बौद्धांनी नित्य व नैमित्तिक आचरायच्या विधींना चर्या म्हटले आहे. चर्येमध्ये चैत्यवंदना व बोधिवंदना असे दोन प्रकार आहेत. चैत्यवंदना अशी –

वन्दामि चेत्तियं सब्बं सब्बठानेसु पतिट्ठितं ।
सारीरिक धातु महाबोधिं बुद्धरूपं सकलं सदा ।।

अर्थ– सर्व स्थानांमध्ये प्रतिष्ठित शारीरिक धातू असे बुद्धावशेष, बोधिवृक्ष व बुद्धमूर्ती या सर्व चैत्यांना मी सार्वकाल नमस्कार करतो.

बोधिवंदना अशी –

यस्स मूले निसिन्नोव सब्बरि विजयं अका ।
पत्तो सब्बञ्जुतं सत्था वन्दे तं बोधिपादपं ।।
इमे हेते महाबोधि लोकनाथेन पूजिता ।
अहम्पि ते नमस्सामि बोधिराज नमत्थु ते ।।

अर्थ– ज्या बोधिवृक्षातळी बसूनच बुद्धाने सर्व शत्रूंवर (मार व त्याची सेना यांवर) विजय मिळविला, त्या सर्वप्रणत अशा बोधिवृक्षाला मी वंदन करतो. हे महाबोधिवृक्ष लोकनाथ भगवंताच्या द्वारे पूजित आहेत. मी सुद्धा त्यांना नमस्कार करतो. हे बोधिराजा, तुला माझा नमस्कार असो.

त्रिशरण – बुद्ध, धर्म व संघ या तीन वस्तूंना शरण जाणे याला त्रिशरण म्हणतात. हे त्रिशरण त्रिवार करायचे असते. त्याचे मंत्र असे–

बुध्दं सरणं गच्छामि ।
धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि, बुध्दं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि, धम्मं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि, संघं सरणं गच्छामि ।
ततियम्पि, बुध्दं सरणं गच्छामि ।
ततियम्पि, धम्मं सरणं गच्छामि ।
ततियम्पि, संघं सरणं गच्छामि ।

पंचशील – बौद्ध साधकाने अहिंसा, अस्तेय, अव्यभिचार, असत्य न बोलणे व मद्यपान न करणे या पाच शीलांचे पालन करण्याची प्रतिज्ञा नित्य करायची असते.

अष्टशील – प्रत्येक महिन्याची अष्टमी, चतुर्दशी, पौर्णिमा व अमावस्या या चार तिथी उपोसथाच्या असतात. त्या दिवशी उपासकाने उपवास करून अष्टशीलांचे पालन करायचे असते.

परित्राणपाठ – इहपरकल्याण, भूतप्रेतांचा उपद्रव शांत होणे, अधिव्याधी नष्ट होणे, इत्यादींसाठी जो पाठ करायचा त्याला परित्राणपाठ म्हणतात. या पाठात महामंगल सुत्त, करणीयमेत्त, सुत्त, महामंगल गाथा, पुण्यानुमोदन व जयमंगल अट्ठगाथा ही प्रकरणे म्हणायची असतात. गृहप्रवेश, विवाह, अन्नदान, इ. प्रसंगीं परित्राणपाठ म्हटला जातो. हा पाठ भिक्षूंनी करायचा असतो. जिथे भिक्षू नसतील तिथे अधिकारी गृहस्थ पाठ करतात. आत्मकल्याणासाठी कोण्याही व्यक्तीने परित्राणपाठ करायचा असतो. पाठ करताना किंवा ऐकताना कर्ता किंवा श्रोता एका तिहेरी सुताचे एक टोक आपल्या हाती घेतो व दुसरे एका जलकलशात सोडून त्यावर आंब्याचा टाळा झाकतो. पाठ संपल्यानंतर ते त्रिसूत्र हातात बांधून कलशातले थोडे पाणी प्राशन करतो व बाकीचे घरात शिंपडतो.

हिंदूंप्रमाणेच बौद्ध लोकही स्त्रीचे व मुलाचे काही संस्कार करतात. त्या संस्कारांची नावे अशी–

गर्भमंगल– स्त्रीला गर्भधारणा झाल्यानंतर तीन महिन्यांनी सोयीचा दिवस पाहून हा संस्कार करतात. त्या वेळी गर्भिणी आपल्या गर्भाच्या कल्याणासाठी त्रिशरण, पंचशील, बुद्धपूजा, परित्राणपाठश्रवण, इ. गोष्टी करून भिक्षूंना दान देते आणि त्यांच्याकडून उपदेश ऐकते.

नामकरण – मुलाच्या जन्मानंतर पाचव्या सप्ताहात हा संस्कार करतात. त्या दिवशी माता स्नान करून त्रिशरणादी गोष्टी करते व मुलाला मांडीवर घेऊन परित्राणपाठ ऐकते. त्यानंतर मुलाचे नाव ठेवतात.

अन्नप्राशन– हा संस्कार पाचव्या महिन्यात करतात. त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवशी माता मुलासह नवे वस्त्र नेसून त्रिशरणादी कृत्ये करते. नंतर भिक्षू किंवा आचार्य एका वाटीत खीर घेऊन ती मुलाला भरवते. त्याच दिवशी मुलाला बुध्दमूर्तीच्या दर्शनासाठी नेतात व बुद्धपूजा करतात.

केशकर्तन – मुलाच्या जन्मानंतर तीन वर्षांच्या आत हा संस्कार करतात. त्यासाठी विहारात किंवा एखाद्या पवित्र स्थळी जातात. यात प्रथम आचार्य वस्तऱ्याने मुलाच्या केसांची एक बट कापतो आणि नंतर नापित त्या मुलाचे मुंडन करतो. कापलेले केस कणकेच्या गोळ्यात ठेवतात व त्या गोळ्यानेच मुलाचे डोके पुसतात. नंतर तो गोळा माळावर पुरतात किंवा नदीच्या प्रवाहात सोडून देतात. मग मुलाला स्नान घालून त्याला नवे कपडे घालतात आणि आई किंवा बाप त्याला मांडीवर बसवून त्रिशरणादी कृत्ये करतात, भिक्षूंना दाने देतात व सायंकाळी बुद्धपूजा करतात.

कान टोचणे– हा संस्कार पाचव्या वर्षी किंवा केशकर्तन संस्काराबरोबरच करतात. यात त्रिशरणादी कृत्ये झाल्यावर मुलाचे कान टोचतात व त्यात सुंकली घालतात.

विद्यारंभ – हा संस्कार पाचव्या किंवा सातव्या वर्षी करतात. त्या दिवशी मुलाला मंदिरात नेऊन त्याच्या हस्ते बुद्धपूजा व त्रिशरणादी कृत्ये करतात. मग आचार्य एका पाटीवर मुलाच्या हाताने त्रिशरणाची अक्षरे लिहितो व मुलाकडून ती वाचून घेतो.

विवाह – या संस्कारात आचार्य वधूवरांना त्रिशरणादी कृत्ये करायला लावतो व मग उभयतांची कर्तव्ये त्यांना समजावून सांगतो. तो पतीला पुढील उपदेश करतो –

(१) सम्माननाय – तू तुझ्या पत्नीचा सन्मान केला पाहिजेस.
(२) अनवमाननाय – तू आपल्या पत्नीचा कधीही अवमान करता कामा नयेस. (३) अनतिचारियाय – तू आपल्या पत्नीचे अतिक्रमण करता कामा नयेस. (४) इस्सरियवोस्सगेन – तू धनदौलतीने आपल्या पत्नीला संतुष्ट ठेव. (५) अलंकारानुप्पदानेन – तू तुझ्या पत्नीला दागदागिने देऊन प्रसन्न ठेव.

पत्नीच्या बाबतीत पुढील पाच कर्तव्ये सांगितली आहेत –

(१) सुसंविहितकम्मन्ता – पत्नीने सर्व गृहकृत्ये उत्तम प्रकारे करावी. (२) संगहितपरिजना – कुटुंबातील मंडळी, आप्तेष्ट व नोकर–चाकर यांना प्रसन्न व स्वाधीन ठेवावे. (३) अनतिचारिणी– मिथ्याचारापासून विरत राहून पतीचा संतोष साधावा. (४) सम्भत अनुरक्खनं – पतीने मिळविलेल्या द्रव्यादी वस्तूंचे संरक्षण करावे. (५) दक्खा च अनलसा च सब्बकिच्चेसु – निरलसपणे सर्व कृत्यांत सावध राहावे.

बौद्धांचे कांही सण असे –

(१) वैशाखी पौर्णिमा – हा बुद्धजन्माचा दिवस होय. गौतमाला ज्ञान व निर्वाणही याच दिवशी प्राप्त झाले. त्यामुळे हा दिवस पवित्र ठरला आहे. या दिवशी बौद्ध लोक बुद्ध –जयंतीचा उत्सव करतात.

(२) ज्येष्ठ पौर्णिमा – या दिवशी बुद्धाने कपिलवस्तूत महासुत्ताचा उपदेश दिला होता. त्यामुळे हा दिवसही बौद्ध लोक महापर्व मानतात व त्या दिवशी अष्टशीलादी धर्मकृत्ये आचरतात.

(३) आषाढी पौर्णिमा – या दिवशी बोधिसत्त्वाने महामाया देवीच्या कुशीत प्रवेश केला. याच दिवशी बुद्धाने महाभिनिष्क्रमण केले व याच दिवशी धर्मचक्रप्रवर्तन केले. बौद्धांचे हेही त्रिगुणित महापर्व आहे. या दिवशी बौद्ध भिक्षू वर्षावासासाठी एखाद्या विहारात येतात व तीन महिने त्या ठिकाणी राहतात.

(४) नागपंचमी– या दिवशी बुद्धाला खिरीचा नैवेद्य दाखवतात, शीलग्रहण करतात व भिक्षूंना भोजन वाढतात.

(५) विजयादशमी – सम्राट अशोकाने कलिंगविजयानंतर याच दिवशी प्रतिज्ञा केली होती, की ' यापुढे मी शस्त्रद्वारा हिंसात्मक विजय न संपादिता धर्मप्रचाराच्या द्वारे अहिंसात्मक विजय संपादीन.' या प्रतिज्ञेचे स्मरण म्हणून या दिवसाला सणाचे स्वरूप आले आहे. या दिवशी बुद्धपूजा व दानधर्मादी कृत्ये करतात.

(६) आश्विन पौर्णिमा– या दिवशी बुद्धाने त्रयस्त्रिंश स्वर्गात आपली माता व देव यांना उपदेश केला होता; म्हणून या दिवशी भिक्षू प्रवारणा करून वर्षावास समाप्त करतात.

(७) वसंत पंचमी – माघ शुद्ध पंचमीस मोहरीच्या पिवळ्या फुलांनी बुद्धपूजा करतात व त्याला खिरीचा नैवेद्य दाखवतात. भिक्षूंना केशरमिश्रित खिरीचे भोजन वाढतात व इतरही धार्मिक कृत्ये करतात.

(८) माघी पौर्णिमा– या दिवशी बुद्धाने वैशाली येथे आपल्या आयुसंस्काराचा त्याग करून घोषणा केली होती, की ' आजपासून तीन महिन्यांनंतर तथागताचे परिनिर्वाण होईल.' म्हणून हा दिवसही पुण्यप्रद मानतात.

(९) फाल्गुन पौर्णिमा – या दिवशी बुद्धपूजा व अन्नदान करतात; नंतर बुद्धगीत म्हणतात. मग एकमेकांवर सुगंधी जल शिंपडून प्रेमाने एकमेकांना भेटतात व खारीकखोबरे वाटतात. कुठेकुठे या दिवशी जलक्रीडाही करतात.

बौद्ध पुण्यक्षेत्रे – बौद्ध लोकांनी पुढील आठ क्षेत्रे ही अत्यंत पवित्र मानली आहेत – लुंबिनीवन, बोधगया, ऋषिपत्तन, कुशीनगर, श्रावस्ती, संकाश्य, राजगृह व वैशाली. या आठ स्थानांचे माहात्म्य बौद्ध साहित्यात वर्णिले आहे, ते असे –

(१) लुंबिनीवन – ही बुद्धाची जन्मभूमी होय. हे स्थान नेपाळच्या तराईत येते. एके काळी इथे कित्येक विहार निर्माण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाले होते; पण सांप्रत त्यांपैकी एकही विद्यमान नाही. अशोकाचा एक स्तंभ मात्र तिथे उभा आहे.

(२) बोधगया – हे क्षेत्र गयेपासून सहा मैल दक्षिणेस आहे. इथें बुद्धाला बोधी प्राप्त झाली. भाविक बौद्धांना याहून मोठे पुण्यक्षेत्र दुसरे कोणतेही नाही. इथे अनेक बौद्ध स्मारके आहेत.

(३) ऋषिपत्तन – याला सारनाथ असेही म्हणतात. हे स्थान वाराणसीजवळ आहे. बुद्धाने आपले धर्मचक्रप्रवर्तन इथून सुरू केले, म्हणून याला महत्त्व आले आहे. इथे अशोकाने कित्येक स्मारके उभी केली आहेत. इथली बुद्धमूर्ती म्हणजे बौद्ध मूर्तिकलेतला एक महान आविष्कार होय.

(४) कुशीनगर – याला कुशिनारा असेही म्हणतात. उत्तर प्रदेशातल्या गोरखपूर जिल्ह्यातले कुसियाँ हे गाव म्हणजे प्राचीन कुशीनगर होय. इथेच बुद्धाचे परिनिर्वाण झाले. इथे अशोकाने बनविलेला एक स्तूप आहे.

(५) श्रावस्ती – याचे आधुनिक नाव सहेतमहेत असे आहे. प्राचीन कोसलाची ही राजधानी होती. इथें बुद्धाने आपले बुद्धि-प्रदर्शन केले होते. सुप्रसिद्ध जेतवन विहार इथेच होता.

(६) संकाश्य – याचे आधुनिक नाव संकिसा असे आहे. हे क्षेत्र उ. प्रदेशातल्या फर्रुखाबाद या जिल्ह्यात आहे. त्रयस्त्रिंश स्वर्गातून या ठिकाणी बुद्ध उतरला होता. चैत्य, विहार, इ. स्मारके इथेंही होती.

(७) राजगृह – हे बिहारमधील पाटणा जिल्ह्यात आहे. प्राचीन काळी ही मगध राज्याची राजधानी होती. इथे बुद्धाने कित्येक वेळा वर्षावास केले होते.

(८) वैशाली – याला सांप्रत बसाढ म्हणतात. हे क्षेत्र विहारमध्ये मुझफ्फरपूर जिल्ह्यात आहे. बुद्धाने आपल्या महापरि-निर्वाणाची घोषणा इथूनच केली.

वरील आठ धर्मस्थानांव्यतिरिक्त आणखी काही क्षेत्रेही बौद्ध साहित्यात उल्लेखनीय ठरली आहेत, ती अशी –

सांची – बौद्ध कलेचे हे एक महान क्षेत्र आहे. हे क्षेत्र मध्य-प्रदेशात भोपाळजवळ येते. प्रारंभिक बौद्ध कलेचे महनीय आवि-ष्कार इथेच दिसतात. इथे अशोककालीन एक भव्य स्तूप आहे.

तक्षशीला – हे पश्चिम पाकिस्तानात आहे. बौद्ध साहित्या-तला सुप्रसिद्ध घोषिताराम नावाचा विहार इथे होता.

नालंदा – हे ठिकाण राजगृहाजवळच आहे. इथे बौद्ध धर्माच्या उत्तर कालात एक महान विश्वविद्यालय निर्माण झाले. बुद्ध या ठिकाणी अनेकवार गेला होता.

गिरनार – हे क्षेत्र सौराष्ट्रातल्या जुनागड जिल्ह्यात आहे. युआन च्वांगच्या कालात इथे ५० विहार होते व त्यांत ३००० थेरवादी भिक्षू राहत होते.

वलभी – हे ठिकाण सौराष्ट्रातल्या भावनगरजवळ आहे. इथे १०० विहार होते आणि त्यात सम्मित्तीय संप्रदायाचे ६००० भिक्षू राहत होते.

कांपिल्य – हे क्षेत्र गुजरातमधल्या नवसारी इथे येते. इथे सिंधू देशातल्या संघाचे ५०० भिक्षू राहत होते.

अमरावती – हे आंध्रातल्या गुंटूरजवळ आहे. इथला स्तूप विशेष प्रसिद्ध आहे. इथे बौद्ध मूर्तिकलेचा एक संप्रदाय निर्माण झाला आणि तो लंका व आग्नेय आशियापर्यंत पोचला.

नागार्जुनकोंड – हे क्षेत्र आंध्र प्रदेशात कृष्णा नदीच्या तीरी आहे. इथे बरेच बौद्ध स्तूप आढळले आहेत.

कांची – हे पौराणिकांप्रमाणेच बौद्धांचेही एक मोठे क्षेत्र आहे. एका काळी हे एक बौद्ध धर्माचे महत्त्वाचे केंद्र होते. बुद्ध-घोषाने मनोरथपूरणी ही आपली अट्ठकथा इथेच राहून लिहिली. याव्यतिरिक्त जुनागड, तलाजा, भाजे, बेडसे, कार्ले, कोंडाणे, नासिक, जुन्नर, कान्हेरी, अजंटा, वेरूळ, भरहूत, इ. अनेक स्थाने तेथील बौद्ध लेणी किंवा स्तूप यांमुळे प्रसिद्ध आहेत.

धर्मप्रसार – सम्राट अशोक हा बौद्ध धर्माचा सर्वांत मोठा आश्रयदाता व प्रसारक होता. त्याने आपल्या साम्राज्यात भिन्न भिन्न श्रेणींचे धर्मप्रचारक नियुक्त केले होते. तोही स्वतः धर्मयात्रा करीत होता. त्याने ठिकठिकाणी शिलाखंडांवर धर्माज्ञा खोदून ठेवल्या आहेत. त्याने उत्तरेस यवनांचा देश, गांधार, काश्मीर हिमाचल प्रदेश; पश्चिमेला अपरांत; दक्षिणेला बनवासी; तसेच म्हैसूर, लंका, सुवर्णभूमी (मलाया, सुमात्रा) इत्यादी ठिकाणी धर्मप्रचारक पाठविले. त्याच्या तेराव्या शिलालेखावरून कळते, की त्याने सीरिया, मिसर, मॅसिडोनिया, हिपिरस, सिरेनिया, उत्तर आफ्रिका, इ. दूरदूरच्या देशांतही नामांकित धर्मप्रचारक पाठविले होते. त्याचेच कार्य पुढे कनिष्क राजाने चालू ठेवले आणि आपले धर्मप्रचारक मध्य आशिया, चीन, जपान, ब्रह्मदेश, थायलंड, कंबोडिया, तिबेट, इ. देशांत पाठवले.

बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर पहिल्या दोन शतकांत बौद्ध धर्माचे क्षेत्र मगध व कोसल या प्रदेशांपुरतेच मर्यादित होते. पुढे मौर्य कालात मथुरेला महत्त्व आले आणि ते बौद्धांचे एक महत्त्वपूर्ण केंद्र बनले. या कालात बौद्ध धर्म निरनिराळ्या संप्रदायांत विभक्त होऊ लागला. शुंगराजांच्या कारकीर्दीत त्याचा राजा-श्रय बंद झाला. पुष्यमित्र शुंग हा बौद्ध धर्माचा शत्रू असल्याचे इतिहास सांगतो. पण त्याच्याही सत्ताकालात त्या धर्माची पीछेहाट झाली नाही. कारण लोकमानसात त्या धर्माने प्रेमा-दराचे स्थान मिळवले होते. भरहूत व सांची येथील स्तूप, कार्ल्याच्या गुंफा, इ. वास्तुरचना शुंगकालातल्याच आहेत, त्या-वरून हे कळून येईल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याच काळात उत्तरेस ग्रीकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. मिलिंद किंवा मिनांडर हा ग्रीक राजाच बौद्ध बनला. त्याने सियालकोट येथे आपली राजधानी स्थापून फार मोठे धर्मकार्य केले. ग्रीकांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यावर मोग्गलिपुत्त तिस्स हा आचार्य त्या देशात गेला आणि तिथल्या प्रचारकार्यासाठी त्याने धर्मरक्षित नावाच्या एका ग्रीक स्थविराची योजना केली. थोड्या कालानंतर हाच धर्मरक्षित अपरांत (कोकण) देशात आला आणि त्याने हजारो स्त्री-पुरुषांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली.

कनिष्काची कारकीर्द ही बौद्ध धर्माच्या इतिहासात महत्त्वाची समजली पाहिजे. त्याच्याच काळात हिंदी-ग्रीक अशी एक बौद्ध कलेची मिश्र शाखा विकसित झाली. महायान पंथाचा विकास कनिष्काच्या काळातच झाला.

गुप्त सम्राटांच्या कारकीर्दीत उड्डियान, गांधार, मथुरा, कनौज, कोसल, मगध, ताम्रलिप्ती, इ. प्रदेशांत बौद्ध धर्म अनेक अंगांनी बहरला. नालंदा येथे महाविद्यालयाची स्थापना गुप्तांच्याच काळात झाली. इ. स.च्या सहाव्या शतकात सौराष्ट्रातल्या वल्लभीचा मैत्रेय राजा बौद्ध धर्माचा मोठा आश्रयदाता बनला.

इ. स. च्या सातव्या शतकात हर्षवर्धनाने स्वतः महायान पंथ स्वीकारून त्या धर्माला मोठा राजाश्रय दिला. या कालात बौद्ध धर्माने सर्वोच्च बिंदू गाठला; पण त्याच काळात त्याच्या ऱ्हासाची लक्षणे दिसून येऊ लागली.

इ. स.च्या आठव्या शतकात बौद्ध धर्म निरनिराळ्या प्रदेशांत संकोच पावू लागला. मात्र त्याच वेळी पूर्व भारतात त्याचे पुनरुत्थान झाले. तिकडच्या पालवंशी राजांनी बौद्ध धर्माला खूप वर चढविले. त्यांनी नालंदा विश्वविद्यालयाला तर मोठे अनुदान दिलेच; शिवाय विक्रमशीला, उदंतपुरी व सोमपुरी या ठिकाणी नवी विश्वविद्यालये निर्माण केली. या विद्यालयांनी ९ ते १२ या शतकात बौद्ध धर्म आणि संस्कृती यांच्या अभिवृद्धीचे कार्य आस्थेने आणि निष्ठेने केले.

परदेशांत धर्मप्रसार – अशोकाचा पणतू विजयसंभव याने खोतानमध्ये बौद्ध धर्म स्थापित केला. वैरोचन नावाचा एक बौद्ध आचार्य भारतातून खोतानमध्ये गेला आणि विजयसंभव या राजाचा प्रमुख उपदेशक बनला. खोतानमधला पहिला बौद्ध विहार इ. स. २११ पूर्वीचा आहे. तिथे विहार, चैत्य, मंदिरे, इ. स्वरूपांत सुमारे ४००० बौद्ध केंद्रे होती. चिनीतुर्कस्तानच्या उत्तर भागात चार मोठी राज्ये होती. त्यांतल्या कुच नावाच्या एका राजाने आपल्या प्रदेशात व चीनमध्ये बौद्ध धर्म प्रसृत होण्याला खूप मदत केली. चिनी इतिहासावरून कळते, की तिसऱ्या शतकात कुचाच्या राज्यात सुमारे १००० स्तूप व बौद्ध मंदिरे होती. त्या राज्यातील कित्येक बौद्ध भिक्षू चीनमध्ये गेले आणि त्यांनी बरेचसे बौद्ध वाङ्मय चिनी भाषेत अनुवादले.

बौद्ध धर्म चीनमध्ये जाण्यापूर्वी तिथे ताओ व कनफ्यूशिअन हे धर्मसंप्रदाय प्रचलित होते; पण कनफ्यूशिअसच्या धर्माशी तुलना करता बौद्ध धर्म अधिक विकसित होता आणि ताओच्या तत्त्वज्ञानाहून बौद्ध तत्त्वज्ञान अधिक सूक्ष्म होते. त्यामुळे चिनी लोकांना त्या धर्माने लगेच आकर्षित करून घेतले.

बुद्धमूर्ती – चीन

इ. स. च्या चौथ्या शतकात चीनमध्ये वेई नावाचा राजवंश प्रबल झाला. या राजवंशाच्या पहिल्या सम्राटाने बौद्ध धर्माला राजधर्म बनविले. चीनमध्ये बौद्ध कलेचा प्रारंभ याच राजवटीने केला. फाहियान, युआन च्वांग व इत्सिंग हे चिनी प्रवासी बौद्ध धर्माच्या विशेष अभ्यासासाठी भारतात आले आणि त्यांनी अनेक बौद्ध ग्रंथ चीनमध्ये नेऊन त्यांचे चिनी भाषेत अनुवाद केले. कुमारजीव, बुद्धभद्र, बुद्धयश, धर्मरक्ष, गुणवर्मा, गुणभद्र, बोधिधर्म, संघपाल, परमार्थ, उपशून्य, बोधिरुची व बुद्धशान्त हे भारतीय बौद्ध आचार्यही हिमाचलाच्या दुर्लंघ्य श्रेणी पार करून आणि प्रवासातल्या अनेक संकटांना तोंड देऊन चीनमध्ये गेले. त्यांनी तिथल्या चित्रलिपीचा व चिनी भाषेचा अभ्यास करून त्या भाषेत शेकडो बौद्ध ग्रंथ अनुवादिले. या बौद्ध आचार्यांची नावे चिनी साहित्यात गौरवाने लिहिलेली आहेत. त्यातल्या त्यात कुमारजीव व परमार्थ ही दोन नावे विशेष प्रसिद्ध आहेत. चीन देशात बौद्ध धर्माला लोकप्रिय बनविण्याचे फार मोठे श्रेय या दोघांना आहे. बौद्ध धर्माचा चिनी जीवनावर आणि विचारांवर फार मोठा प्रभाव पडला. पुनर्जन्म, कर्मफल व कार्यकारणसिद्धान्त या गोष्टींविषयीची श्रद्धा चीन देशात बौद्ध धर्मानेच निर्माण केली. बौद्ध धर्माच्या काही सिद्धान्तांचा प्रभाव चिनी कवी आणि कलाकार यांच्यावर तर विशेष प्रमाणात पडला. चीनची सौंदर्यदृष्टी बौद्ध धर्माने संस्कारित केली. त्यामुळे तिथली कलाही बौद्ध धर्मानेच अनुप्राणित झाली. बौद्ध साहित्यातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बरेचसे बौद्ध ग्रंथ सांप्रत चिनी अनुवादाच्या रूपानेच आपणांस उपलब्ध झाले आहेत. बौद्ध धर्माच्या सखोल अभ्यासासाठी चिनी भाषेतील अनवादित ग्रंथांचा फार मोठा उपयोग होतो.

चीनच्या मागोमाग बौद्ध धर्माने कोरियात प्रवेश केला. कोरियामध्ये ज्या अनेक राजवटी चालू होत्या, त्यांतल्या सिला नामक राजवटीने इ. स. च्या सातव्या शतकात बौद्ध धर्माचा स्वीकार केला. या काळात भारत व तिबेट यांमधून कित्येक लोक व्यापारासाठी तिकडे जात होते आणि कोरियातले अनेक लोक तीर्थयात्रेसाठी भारतात येत होते. या जाण्या-येण्यातून कोरियात बौद्ध धर्माला चांगले पोषण मिळाले. इ. स. च्या १० व्या शतकात तिथे वांग राजवंशाची सत्ता सुरू झाली. त्यांच्या कारकीर्दीत बौद्ध धर्माने फार मोठी उन्नती साधली. पण ही परिस्थिती फार काळ टिकली नाही. मंगोल साम्राज्याच्या युआन राजवंशाने तेराव्या शतकात वांग राजवंशाला पदभ्रष्ट केले आणि तेव्हापासून कोरियातल्या बौद्ध धर्माचा ऱ्हास सुरू झाला. आणि त्यावर लामावादाचा प्रभाव पडला. मंगोल साम्राज्याच्या पतनानंतर कोरियात जी राजसत्ता प्रस्थापित झाली, तिने कनफ्यूशिअसचा धर्म स्वीकारून बौद्ध धर्माला सर्व बाजूंनी विरोध केला; पण तरीही कोरियन जनतेतले बौद्ध धर्माचे प्रेम मात्र अढळ राहिले.

विसाव्या शतकात जपानने कोरिया जिंकल्यावर तिथे पुनश्च बौद्ध धर्माची विजयपताका फडफडू लागली. त्या धर्माच्या अध्ययन-अध्यापनासाठी कोरियात अनेक सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. कोरियातला बौद्ध धर्म झेन संप्रदायाच्या पद्धतीचा आहे. त्या संप्रदायाची अमिताभ बुद्धावर विशेष श्रद्धा आहे.

बौद्ध धर्म जपानात प्रविष्ट झाला, तो इ. स. च्या सहाव्या शतकात. प्रथम काही काल जपानी शिंतो धर्म व बौद्ध धर्म यांच्यांत संघर्ष झाला; पण तो थोडयांच काळात शमला. शिंतो धर्मात पितृपूजा महत्त्वाची होती. बौद्ध भिक्षूंनी तिचा स्वीकार केला आणि बुद्धाच्या प्रतिमेबरोबरच ते शिंतो धर्मातल्या देवतांचीही पूजा करू लागले. त्या सर्व देवता म्हणजे बुद्धाचेच विभिन्न अवतार होत, असे मत त्यांनी पुरस्कारिले आणि हळूहळू तिथल्या जनतेत बौद्ध धर्माला स्थान मिळाले. जपानातल्या सामंत सरदारांनी तर त्याचा स्वीकार केलाच; पण तिथले कित्येक सम्राटही बौद्ध बनले. राजपुत्र शोकोतू याने इ. स. च्या ७ व्या शतकात होर्युजी मठ स्थापित करून त्रिपिटकावर टीका लिहविल्या. बौद्ध धर्मासाठी सम्राट अशोकाने भारतात जशा प्रकारचे कार्य केले, तशा प्रकारचेच कार्य जपानात शोकोतूने केले.

तेंदाई व शिंगोल या पंथांच्या रूपाने जपानी बौद्ध धर्माचे राष्ट्रीयीकरण झाले. दोन्ही पंथ इ. स. च्या आठव्या शतकातच निर्माण झाले. पहिल्याची निर्मिती साईचो याने केली, तर दुसऱ्याची कुकई याने केली. त्या पंथांनी बौद्ध सिद्धान्तांचे जपानीकरण करून, तो धर्म सर्व समाजाचा धर्म बनवला. हे दोन्ही पंथ

बुद्धमूर्ती – जपान

केवळ मोक्षावर भर देणारे नव्हते, तर त्यांना ऐहिक जीवनातही परिपूर्णता हवी होती. दहाव्या शतकात एक नवी विचारधारा जपानमध्ये प्रचलित झाली. ती म्हणजे अमिताभ बुद्धाची उपासना ही होय. कित्येक लोक या नव्या पंथाचे अनुयायी बनले. अमिताभाच्या पवित्र प्रदेशात आपला पुनर्जन्म व्हावा, म्हणून ते त्याचा नामजप करीत. या अमिताभ – उपासनेतूनच जपानात अनेक नवे पंथ उत्पन्न झाले. आचार व विचार शुद्ध राखणे हे या सर्वांचे सामान्य लक्षण होते. शेतकरी व शिपाई या वर्गांत या संप्रदायांचा बराच प्रसार झाला.

इ. स. च्या बाराव्या शतकात झेन व निचिरेन असे आणखी दोन नवे पंथ अस्तित्वात आले. सगळ्या जपानभर बौद्ध धर्म पसरविण्यात या दोन नव्या पंथांना यश मिळाले. सतराव्या शतकात बौद्ध धर्म हा जपानचा राष्ट्रीय धर्म बनला, याचे सारे श्रेय तोकुग व शोगुंते या राजांना आहे. जपानी जनतेला ख्रिस्ती धर्माच्या वाढत्या प्रभावापासून दूर ठेवण्यासाठी बौद्ध धर्माला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राष्ट्रधर्माचे स्थान दिले गेले.

एकोणिसाव्या शतकात राष्ट्रीयतावादी शिंतो धर्माने उचल खाल्ली व बौद्ध धर्माला विरोध सुरू केला; पण सामान्य जनतेने बौद्ध धर्माचा त्याग केला नाही. जपानमधून बौद्ध धर्म उखडला जाऊ नये, म्हणून तिथल्या भिक्षूंनीही खूप प्रयत्न केले व त्यात त्यांना यशही मिळाले.

अशोकपुत्र महेंद्र आणि त्याचे चार सहकारी यांच्या रूपाने बौद्ध धर्म लंकेत जाऊन पोचला. स्थविर महेंद्राने लंकेत जाताना आपल्याबरोबर गयेतल्या बोधिवृक्षाची एक शाखाही नेली होती. ती त्याने तिथे समारंभपूर्वक लावली. ही घटना सनपूर्व तिसऱ्या शतकातली आहे. नंतर त्याने बौद्ध धर्माचे सिद्धान्त लंकेच्या राजाला समजावून दिले. त्यामुळे तो राजा प्रभावित झाला आणि बौद्ध बनला. त्याच्या बरोबरच त्याच्या प्रजेनेही बौद्ध धर्म स्वीकारला. लंकेतले हजारो पुरुष भिक्षू बनून बौद्ध संघात सामील झाले आणि त्यांच्यासाठी राजाने व लंकेतल्या धनिकांनी मठ व विहार उभारले.

दुट्ठगामणी (सनपूर्व २ रे शतक) या राजाच्या कारकीर्दीत लंकेतला महान स्तूप उभारला गेला. वट्टगामणी (सनपूर्व



बुद्धमूर्ती – लंका

१ ले शतक) च्या राज्यकालात पाली त्रिपिटक लेखबद्ध केले गेले. पाली भाषेतले बौद्ध ग्रंथ आपल्या मूळ रूपात लंकेमध्येच सुरक्षित राखले गेले. लंकेतला बौद्ध धर्म हा थेरवादी होता व आहे. त्याचा प्रभाव ब्रह्मदेश, कंबोडिया, सयाम व लाओस या देशांवरही पडला. लंकेतील लोक केवळ बौद्ध धर्माचे ग्रहण करूनच थांबले नाहीत, तर त्यांनी विविध भाष्यांच्या रूपाने त्या धर्माचा विकास करण्याचे श्रेयही मिळविले.

इ. स. च्या ५ व्या शतकात बौद्ध धर्म भारतातून ब्रह्मदेशात गेला. चिनी वृत्तान्तावरून कळते, की थेरवादी बौद्ध धर्म पाली-धर्मसूत्रांसह भारतीय धर्मप्रचारकांनीच ब्रह्मदेशात नेला व तिथे त्याचा प्रसार केला. इ. स. च्या ११ व्या शतकापूर्वीच थातोन हे ब्रह्मदेशातले बौद्ध धर्माचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले होते. त्याहीपूर्वी मराम्म नावाच्या एका तिबेटी द्रविड जातीने ब्रह्मदेशात पगन येथे एक प्रबल राज्य स्थापित केले होते. मराम्म लोक जंगली व निरक्षर होते. त्यांच्यांत एक विकृत तंत्रमार्ग प्रचलित होता. अकराव्या शतकात अनवरथ हा राजा पगनच्या गादीवर बसला. थातोन येथील एका थेरवादी भिक्षूने त्याला बौद्ध बनविले. या नव्या राजाने आपल्या समाजातल्या विकृत तंत्रमार्गी धर्माविरुद्ध लढाई उभारून पगनमध्ये थेरवादाची स्थापना केली. आता आवश्यकता होती, ती धर्मग्रंथांची. म्हणून त्याने थातोनचा राजा मनूह याच्याकडे दूत पाठवून त्रिपिटकाच्या पुऱ्या पाठाची मागणी केली. मनूहने ती मानली नाही, तेव्हा अनवरथाने मनूहवर स्वारी करून त्याला जिंकले. मनूह व थातोनचे कित्येक बौद्ध भिक्षू यांना त्याने कैद करून पगनमध्ये आणले, त्याबरोबरच कित्येक धर्मग्रंथही आणले. पगनच्या ब्रह्मी राजाने थातोन येथील मोन लोकांचा थेरवादी बौद्ध धर्म तर स्वीकारलाच; शिवाय लिपी, भाषा व साहित्यही आत्मसात केले. अशा प्रकारे अनवरथ व त्याचे वंशज यांनी थेरवादी बौद्ध धर्म सगळ्या ब्रह्मदेशात फैलावून टाकला. त्या राजांनी कित्येक मंदिरे, विहार व पागोडे निर्माण केले. पगनमधला प्रसिद्ध आनंद विहार हा अनवरथाच्या पुत्राने निर्माण केलेला आहे.

लंकेत बौद्ध धर्माची दीक्षा घेतलेल्या कपट नामक भिक्षूने बाराव्या शतकात ब्रह्मदेशामध्ये एका सिंहली भिक्षुसंघाची स्थापना केली. लंकेतील भिक्षू ब्रह्मी भिक्षूंना खरे भिक्षू मानीत नसत. त्यामुळे त्या दोन संघांत संघर्ष सुरू झाला व तो पुढे तीन शतके चालला. शेवटी त्यात सिंहली भिक्षुसंघाचाच विजय झाला.

मलाया द्वीपकल्पात जे कोरीव लेख मिळाले आहेत, ते संस्कृत भाषेत व भारतीय वर्णमालेत लिहिलेले आहेत. इ. स. चे चौथे किंवा पाचवे शतक हा या लेखांचा काल मानतात. त्यावरून त्या काळी मलाया द्वीपकल्पात बौद्ध धर्माचा प्रवेश झाला होता हे कळून येते. या प्रदेशातला बौद्ध धर्म महायान पंथाचा आहे. इ. स. च्या ८ व्या शतकापर्यंत या प्रदेशात महायान धर्म प्रभावीपणे नांदला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सयाममध्ये तर बौद्ध धर्म इ. स. च्या पहिल्या-दुसऱ्या शतकातच फैलावला. पोगंतुक व थ्रा-पाथोम येथे मिळालेल्या प्राचीन वस्तूंवरून ही गोष्ट सिद्ध झाली आहे. या वस्तूंत बुद्धाच्या प्रतिमा आहेत, धर्मचक्रे आहेत व काही बौद्ध वास्तूंचे भग्नावशेषही आहेत. इ. स. च्या ८ व्या व ९ व्या शतकात सयाम व लाओस हे दोन्ही देश राजकीय दृष्टचा कंबोडियाचे अंग होते. कंबोडियातल्या धार्मिक परिस्थितीचा प्रभाव त्यांच्यावरही पडला होता. या देशात ब्राह्मण धर्म व बौद्ध धर्म हे दोन्ही एकसमयावच्छेदाने नांदले, वाढले. तेराव्या शतकात थाय लोक सयाम व लाओस या देशांचे स्वामी बनले आणि त्यांनी कंबोडियाचे राजनैतिक प्रभुत्व झुगारून दिले. याच राजांच्या प्रभावामुळे पाली भाषा व थेरवादी बौद्ध धर्म सयाम व लाओस या प्रदेशांत सर्वत्र पसरला. सूर्यवंशराम या थाय राजाने बौद्ध धर्माला केवळ आश्रयच दिला नाही, तर स्वतःही प्रव्रज्या घेतली. त्याने महासामी संघराज नावाच्या एका पंडित भिक्षूला लंकेतून सन्मानपूर्वक बोलावून आणले व त्याच्या आधारे पाली साहित्य आणि बौद्ध धर्म या दोहोंचा आपल्या राज्यात पुरस्कार केला. त्यानंतर सयाम व त्याचे शेजारी देश यांमध्ये बौद्ध धर्माला

बुद्धमूर्ती – सयाम

अमाप लोकप्रियता मिळाली. त्या बरोबरच पूर्वीच्या तिथल्या ब्राह्मण धर्माचा ऱ्हास झाला.

इ. स. च्या ५ व्या शतकाच्या अंतापासून कंबोडियात बौद्ध धर्म वाढला, विस्तारला खरा; पण त्याला तिथे प्रमुख स्थान मिळाले नाही. कारण त्या काळात तिथे शैव मत प्रभावी होते. यशोवर्मा नावाच्या तिथल्या सम्राटाने ९ व्या शतकाच्या अखेरीस तिथे बौद्ध भिक्षूंसाठी एक आश्रम बांधला होता, असे कळते. तेराव्या शतकाच्या प्रारंभी राजा जयवर्मा तिथे राज्य करीत होता. तो आणि त्याची राणी ही दोघेही बौद्ध बनली होती. तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत बौद्ध धर्माने तिथे आपला जम बसविला. मात्र त्याला राजधर्माची प्रतिष्ठा प्राप्त झाली नाही. अंकोरवट हे कंबोडियामधले प्रसिद्ध मंदिर आहे. कलाकौशल्याचा तो एक उत्कृष्ट नमुना समजला जातो. पण बौद्ध स्वरूपात त्याचे परिवर्तन होण्याआधी त्या मंदिरात ब्राह्मणी



बुद्धमूर्ती – कंबोडिया

देव-देवतांच्या मूर्ती होत्या. पुढे त्याच जागी बौद्ध प्रतिमा आल्या. हे परिवर्तन कोणत्या कालात झाले, ते निश्चित सांगता येत नाही.

सांप्रत ज्याला व्हिएतनाम म्हणतात, त्याचे पूर्वीचे नाव चंपा असे होते. प्रारंभी हा एक हिंदू उपनिवेश होता. पण इ. स. च्या तिसऱ्या शतकाच्या आधीच तिथे बौद्ध धर्माची प्रतिष्ठा झाली. सातव्या शतकाच्या प्रारंभी चिनी लोकांनी चंपाची राजधानी जिंकली आणि परत जाताना आपल्याबरोबर १३५० बौद्ध ग्रंथ नेले, अशी माहिती मिळते. इत्सिंगच्या म्हणण्याप्रमाणे चंपामध्ये संमितीय व सर्वास्तिवादी या दोन बौद्ध शाखा काम करीत होत्या; पण आठव्या शतकाच्या सुमारास तिथे महायान पंथाने जोम धरला आणि त्याचे तांत्रिक रूपही प्रचारात आणले. अधून मधून बौद्ध धर्माला तिथे राजाश्रयही मिळाला. पंधराव्या शतकापर्यंत चंपामध्ये महायान पंथ नांदला; पण पुढे त्याची जागा चिनी बौद्ध धर्म आणि इस्लाम यांनी घेतली.

जावा द्वीपात इ. स. च्या पाचव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत बौद्ध धर्माला विशेषसे महत्त्व नव्हते. फाहियानने तिथे ब्राह्मण धर्म प्रभावी असल्याचे लिहून ठेवले आहे; पण ५ व्या शतकात गुणवर्मा नावाचा एक भारतीय भिक्षू तिथे गेला आणि मग अवघ्या २५ वर्षांत त्याने तिथे बौद्ध धर्माचे प्रभुत्व प्रस्थापित केले.

सुमात्रा द्वीपांत, विशेषतः श्रीविजय या राज्यात, बौद्ध धर्माला महत्त्व मिळाले होते. तिथला राजा स्वतः बौद्ध होता. इ. स. च्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

७ व्या शतकात श्रीविजय हे बौद्ध ज्ञानाचे फार मोठे केंद्र बनले. तिथल्या बौद्ध भिक्षूंची संख्या एक हजाराहून अधिक झाली. श्रीविजय राज्यातला धर्म थेरवादी होता, तर अन्य ठिकाणी महायानी पंथ प्रचलित होता.

आजच्या इंडोनेशियाला पूर्वी सुवर्णद्वीप म्हणत. इ. स. च्या ७ ते ११ या शतकांत सुवर्णद्वीप हे बौद्ध धर्माचे एक विशाल केंद्र होते. बौद्ध धर्माचा धर्मपाल नावाचा एक आचार्य बौद्ध ज्ञानाच्या प्रचारार्थ ७ व्या शतकात तिकडे गेला. तिथला शैलेंद्र-वंश हा सुवर्णद्वीपाच्या फार मोठ्या भागावर राज्य करीत होता. त्याने महायान शाखेला प्रोत्साहन दिले व जावामधील बोरोबुदुर, कलसन व मेदुत यांसारखी विराट बौद्ध स्मारके निर्माण केली. शैलेंद्र राजांचा बंगालशी बराच धार्मिक संबंध होता. सुवर्णद्वीपात व शेजारच्या अन्य प्रदेशांत तांत्रिक बौद्ध धर्म प्रभावी झाला, याला कारण बंगालशी असलेला त्यांचा धार्मिक संबंध हेच असावे.

सुमात्रा, जावा यांच्याव्यतिरिक्त मलेशियाच्या बाली व बोर्निओ या देशांतही बौद्ध धर्माचा बराच प्रसार झाला होता; पण त्या भागात मूळच्या ब्राह्मणी धर्माने जोर करून बौद्ध धर्माला तिथून हळूहळू नाहीसे केले.

तिबेटचा इतिहास इ. स. च्या ७ व्या शतकापासून लिखित स्वरूपात आढळतो. त्या कालात स्रोंग बत्सन त्संगपो नावाचा राजा तिथे राज्य करीत होता. त्याने तिबेटी बोलीला वर्णमाला प्राप्त करून दिली. त्यामुळे भारतातून तिथे गेलेल्या बौद्ध धर्माला चांगला अवकाश मिळाला. पण तरीही तिथल्या प्राचीन धर्माचा विरोध मोडून काढून तिथे आपला जम बसवायला बौद्ध धर्माला ३०० वर्षे लागली. स्रोंग बत्सनचा पाचवा वंशज असलेल्या राजाने बौद्ध धर्म हा तिबेटचा राजधर्म बनवला. त्याने नालंदा विश्वविद्यालयातला एक महापंडित आचार्य शांतरक्षित याला तिबेटात बोलावून घेतले आणि त्याच्या द्वारे बौद्ध धर्माचे सिद्धान्त तिबेटी लोकांना पटवण्याचे काम केले.

पुढे तिबेटात वादळे आणि महामारी यांनी थैमान घातले. तिथले जुने परंपरावादी लोक म्हणू लागले, की शांतरक्षिताच्या विकृत धर्मप्रसाराने देशावर हा महान अनर्थ ओढवला. तिथल्या प्रजेने राजावर मोठा दबाव आणून शांतरक्षिताला देशातून घालवून देण्याबद्दल आग्रह धरला. शांतरक्षिताने हे सर्व जाणले. त्याची खात्री झाली, की तत्त्वज्ञानाच्या बळावर बौद्ध धर्म या देशात मूळ धरू शकणार नाही. या लोकांना छां छूं करणारा तांत्रिक बौद्ध धर्मच रुचेल आणि मानवेल. पद्मसंभव नावाचा एक तंत्रवादी बौद्ध आचार्य शांतरक्षिताच्या माहितीचा होता. त्याला बोलावून घेण्याबद्दल शांतरक्षिताने राजाला सांगितले व तो स्वतः तिबेटमधून बाहेर पडला. मग पद्मसंभवाने तिथे जाऊन धर्मप्रसाराचे काम बरेचसे यशस्वी केले. कालांतराने बौद्ध धर्म

बुद्धाची सुवर्णमूर्ती – तिबेट

हा तिबेटचा राजधर्म झाला. दलाई लामा हा जसा तिथला राजा, तसाच तिबेटचा धर्मगुरूही होता.

इ. स. च्या ११ व्या शतकात तिबेटातील एका भिक्षूच्या निमंत्रणावरून दीपंकर श्रीज्ञान हा बौद्ध आचार्य तिकडे गेला. त्याने तिकडे शेकडो संस्कृत ग्रंथांचा तिबेटी भाषेत अनुवाद केला. पुढे या अनुवादित ग्रंथांचा विशिष्ट पद्धतीने संग्रह करून कंजूर व तंजूर या ठिकाणी त्यांची स्थापना करण्यात आली. कंजूर येथे बुद्धवचन मानले गेलेल्या ग्रंथांचा संग्रह आहे; तर तंजूरमध्ये दर्शन, काव्य, वैद्यक, ज्योतिष, तंत्र, इ. विषयांवरचे ग्रंथ आहेत. हे ग्रंथसंग्रहाचे कार्य बुस्तोन नावाच्या एका तिबेटी प्रकांडपंडिताने केले. इ. स. च्या १२ ते १४ या शतकांत तिबेटात बौद्ध धर्माचा प्रचार खूप वाढला. या कालखंडाच्या प्रारंभी चोङखप नावाच्या एका प्रसिद्ध भिक्षूने एक महाविद्यालय व महाविहार स्थापून बौद्ध धर्माचा विपुल प्रचार केला. तेराव्या शतकाच्या अखेरीस लामा तारानाथ या नावाचा एक बौद्ध आचार्य होऊन गेला. त्याने अनेक ग्रंथ रचले. त्यांतील भारतातल्या बौद्ध धर्माच्या इतिहासावरचा त्याचा ग्रंथ महत्त्वपूर्ण मानला जातो. या काळातल्या ५ व्या दलाई लामानेही धर्मप्रचारात खूप रस घेतला. दहाव्या शतकापासून तेराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत भारत व तिबेट यांचा संबंध बराच घनिष्ठ होता. याच काळात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वज्रयानी सिद्धाचार्यांनी संस्कृत व लोकभाषा यांत लिहिलेल्या ग्रंथांचा तिबेटी भाषेत अनुवाद केला. मूळ संस्कृत ग्रंथ नष्ट झाले असले, तरी तिबेटी ग्रंथांवरून आपल्याला त्या ग्रंथांचे ज्ञान होऊ शकते.

नेपाळ हे बौद्ध धर्माच्या संस्थापकाचे घरच होय. नेपाळातल्या लुंबिनी नामक वनातच गौतम बुद्धाचा जन्म झाला. सनपूर्व तिसऱ्या शतकात अशोक जेव्हा राजपुत्र होता, तेव्हा नेपाळातल्या काही जातींनी केलेले बंड मोडण्यासाठी तो तिकडे गेला व परत येताना त्याने बुद्धाच्या जन्मस्थानी एक लेखयुक्त स्तंभ उभा केला. इ. स. च्या चौथ्या शतकात आचार्य वसूबंधू याने बौद्ध सिद्धान्तांच्या प्रचारासाठी नेपाळयात्रा केली. सातव्या शतकात नेपाळमध्ये अंशुवर्मन नावाचा एक राजा झाला. तो बौद्ध धर्माचा प्रचारक व आश्रयदाता होता. आचार्य शांतरक्षिताच्या काळात म्हणजेच इ. स. च्या ८ व्या, ९ व्या शतकात नेपाळ व तिबेट या दोन देशांत सांस्कृतिक मैत्री नांदत होती. पुढच्या काळात इस्लामी आक्रमकांनी जेव्हा बंगाल व बिहार यांचा सर्वनाश आरंभला, तेव्हा तिथले बौद्ध भिक्षू नेपाळात आश्रयासाठी गेले. जाताना त्यांनी नेता येतील तेवढे हस्तलिखित बौद्ध ग्रंथ तिकडे नेले व त्यामुळेच आजवर ते सुरक्षित राहिले.

भारतात बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यावर नेपाळी बौद्ध धर्मातलेही काही मूळ गुण कमी होत गेले. सांप्रत पुढील चार संप्रदाय नेपाळात प्रचलित आहेत–

१) स्वाभाविक – जगातल्या सर्व वस्तूंत प्रवृत्ती व निवृत्ती हे दोन गुण आहेत, असे मानणारा.

२) ऐश्वरिक – एक स्वयंभू, संपूर्ण व अनंत अशा परमात्म्याचे अस्तित्व मानणारा.

३) कार्मिक – एका सचेतन नैतिक प्रभावामुळे मूळ अविद्येच्या आधारावर हे विश्वयंत्र चालते, असे मानणारा आणि

४) यात्रिक – चेतन व प्रज्ञा ही दोनच तत्त्वे मानणारा.

भारत व तिबेट या दोन देशांत हिंदू व बौद्ध यांच्याकडून ज्या दोन विभिन्न दार्शनिक विचारधारा प्रवृत्त झाल्या, त्या दोहींचे सामंजस्य नेपाळी बौद्ध धर्मात आढळते. नेपाळात धर्मोदयसभा नावाची एक सभा असून, तिच्यात बौद्ध ग्रंथांचे अध्ययन व संशोधन चालते.

बौद्ध पंडितांनी व प्रचारकांनी केवळ भारताच्या शेजारी देशांतच धर्मप्रचार केला असे नाही, तर ते बाबिलोनिया, मिस्र, इ. पाश्चात्य देशांपर्यंत जाऊन पोचले. भूमध्य सागराभोवतीच्या देशांवर भारताचा जो प्रभाव दिसतो, तो अप्रत्यक्ष रीत्या बौद्ध धर्माचाच प्रभाव होय. ख्रिस्ती धर्माच्या अनेक अंगांवर बौद्ध धर्माची छाप डोळ्यांत भरण्याइतकी स्पष्ट आहे.

अशोकाने धर्मप्रचारासाठी जे प्रचारक पाठवले, त्यांनी एंटिओकस, टॉलेमी, एंटिगोनस, मग व सिकंदर यांच्या राज्यापर्यंत बौद्ध धर्माचा ध्वज फडकवीत नेला. येशू ख्रिस्ताच्या जन्मकाळी सीरियामध्ये एसिनी नावाची एक जात होती. हे लोक मोठे त्यागी, धार्मिक व सदाचारी होते. ही शिकवण त्यांना बौद्ध भिक्षूंकडूनच मिळाली होती. येशू ख्रिस्त लहानपणी या लोकांच्या संपर्कात आला होता. त्याने सदाचार व इंद्रियनिग्रह या तत्त्वांची दीक्षा या लोकांच्याकडूनच घेतली व पुढे आपल्या धर्मात त्यांचा समावेश केला. चर्चच्या पाद्र्यांनी ब्रह्मचर्याने राहावे, असा जो ख्रिस्ताने उपदेश केला, तो बौद्ध भिक्षूंचे वर्तन पाहूनच. बायबलाचे सूक्ष्म अध्ययन केल्यास बुद्ध व येशू या दोहोंच्या उपदेशांत आश्चर्यकारक साम्य आढळते. ख्रिस्ताचे पर्वतीय प्रवचन धम्मपदातल्या उपदेशांशी मिळतेजुळते आहे.

अशा प्रकारे बौद्ध धर्माने भारताच्या केवळ पूर्वेकडील देशांनाच नव्हे, तर पश्चिमेकडील देशांनाही आपल्या उपदेशाने प्रभावित केले, अशी इतिहासाची साक्ष आहे.

ऱ्हास– सुमारे एक हजार वर्षे बौद्ध धर्माने जगाच्या फार मोठ्या भागावर आपले साम्राज्य गाजविले. सम्राट अशोकापासून हर्षवर्धनापर्यंत त्या धर्माला आधार देणारे अनेक राजे-महाराजे निर्माण झाले. मोठमोठे ब्राह्मण पंडितही भिक्षुसंघात सामील होऊन त्या धर्माचे प्रचारक बनले. पण तरीही भारतात इ. स. च्या ८ व्या शतकापासून बौद्ध धर्माला उतरती कळा लागली. या ऱ्हासाला काही बाहेरची व काही आतली अशी उभयविध कारणे घडली आहेत, ती अशी – ब्राह्मणांनी आपल्या परंपरागत श्रौत-स्मार्त धर्मावर नवा संस्कार केला. त्यांनी वैदिकेतर देवतांचा स्वीकार करून धर्मविधींतही सोयीस्कर फरक केला. अशा रीतीने त्यांनी सामान्य जनतेत आपले स्थान पुनश्च निर्माण केले. मुख्य म्हणजे ब्राह्मण हे कुटुंबसंस्थेला धरून राहिले व बौद्ध भिक्षू तिच्यापासून दूर गेले. बौद्ध धर्मात दीर्घ कालपर्यंत ईश्वराला मान्यता नव्हती आणि त्यामुळे ईश्वरभक्तीलाही स्थान नव्हते. पण अखेरच्या काळात बुद्धाला ईश्वर बनविण्याची प्रक्रिया सुरू झाली. महायान पंथाने आत्मोद्धारासाठी बुद्धाचे ईश्वररूपाने ध्यान करण्याचा उपदेश सुरू केला. पण ते ध्यानही सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेरचे होते. ज्याला सर्वभावे शरण जावे, ज्याची नित्य भक्ती करावी, ज्याने आपली आर्त हाक ऐकून आपल्याला संकटातून तारावे आणि आपल्या आधिव्याधी दूर कराव्या, असा कोणीतरी दयाळू परमेश्वर जनतेला हवा होता. शैव व वैष्णव या संप्रदायांनी ते काम केले. त्या संप्रदायांतील भक्तीपुढे बौद्धांचा ध्यानमार्ग हतप्रभ ठरला. बौद्ध धर्माची जनमनावरील पकड भक्ति-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मार्गाने सैल केली. त्यामुळे सर्व जाती-जमाती बौद्ध साम्राज्यातून बाहेर पडून शैव किंवा वैष्णव संप्रदायाकडे वळल्या. शिव, विष्णू, सरस्वती, इ. पौराणिक देवता स्वीकारून महायान पंथाने पौराणिक हिंदू धर्माच्या परंपरांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. तंत्रमार्गांचा अवलंब करून गुप्तविद्या, मंत्र-तंत्र, स्त्रीसमागमाला उत्तेजन देणारे कर्मकांड, सांघिक पूजाप्रकार, यात्रा, उत्सव यांचाही बडेजाव वाढवून पाहिला; पण अशा तडजोडीत त्यांना यश आले नाही. परिणामी भारतातून बौद्ध धर्मच नष्टप्राय झाला. डॉ. उमेश मिश्र व राहुल सांकृत्यायन यांनी भारतातल्या बौद्ध धर्माच्या या ऱ्हासाची आणखी काही कारणे दिली आहेत, ती अशी–

बौद्धांनी अनधिकारी लोकांना दीक्षा देऊन त्यांचा भिक्षुसंघात समावेश केला. संघप्रवेशाच्या बाबतींतले नियम शिथिल केले. संघाच्या सदस्यांत वैमनस्य निर्माण झाले. बौद्ध श्रमण आपण भारतीय संस्कृतीच्या अंतर्गत नसून वेगळे आहोत, असे समजू लागले. त्यांनी वेद व संस्कृत भाषा यांची अवहेलना सुरू केली; ईश्वराच्या अस्तित्वाचे जोरजोराने खंडन केले. अधिकार, सत्ता व संपत्ती यांच्यामागे ते लागले; तांत्रिक सिद्धांकडेही वळले; धर्माच्या नावाखाली मदिरा आणि मदिराक्षी यांचा उपभोग घेऊ लागले. त्यांच्या विद्वत्तेने संकुचित व सांप्रदायिक स्वरूप धारण केले. अखेरी अखेरीस तर सर्व बुद्ध भिक्षू व आचार्य सहजयानी किंवा गुह्यसमाजी बनले. स्त्रीला मुक्तिदात्री 'प्रज्ञा' मानणे, पुरुषाला मुक्तीचा 'उपाय' समजणे आणि मदिरेला 'अमृत' मानणे या गोष्टींत बौद्ध पंडित, कवी आणि तत्त्वज्ञ आपली सारी प्रतिभा आणि विद्वत्ता खर्च करू लागले. त्यांचा सारा धर्म भैरवी चक्राच्या उपासनेत साठविला गेला. ते विकृत व वाममार्गी उपासनेत निमग्न झाले. समाजावर आपला अधिकार कायम ठेवण्यासाठी ते सिद्धी आणि चमत्कार दाखवून जनतेला भोंदू लागले. आपल्या सुखोपभोगासाठी त्यांनी जनतेचे वित्तशोषण आरंभले. या आणि अशाच अनेक कारणांमुळे जनता या बौद्ध आचार्यांनाच नव्हे; तर बौद्ध धर्मालाही विटून गेली आणि तिने त्या धर्माकडे पाठ फिरवून ब्राह्मणपुरस्कृत पौराणिक धर्माचा आसरा घेतला.

पुनरुत्थान – भारतात उगवून वटवृक्षासारखा पसरलेला हा बौद्ध धर्म इ. स. च्या १३–१४ व्या शतकांनंतर भारतातच नष्टप्राय झाला. स्वीकृत धर्माचा त्याग करून हजारो-लाखोंच्या संख्येने लोक पौराणिक हिंदू धर्माच्या सावलीला आले. अशा प्रकारे समस्त बौद्ध भारत पुराणधर्मी भारत बनला. मात्र असे असले, तरी भारतात बौद्ध धर्म संपूर्णपणे नष्ट झाला, असे म्हणणे यथार्थ ठरणार नाही. भारताच्या पूर्वेकडील काही भागात आणि आसामात बौद्ध धर्म आजही विद्यमान आहे. राजस्थानातील काही भाग व नैनिताल आणि दार्जिलिंग हे जिल्हे, या भागांतही तो विद्यमान आहे. सिक्कीम आणि भूतान हे तर पूर्णरूपाने बौद्धच आहेत. नेपाळची अर्धी जनसंख्या बौद्ध आहे आणि ओडिसातही बौद्धांची संख्या बरीच आहे.

बौद्ध धर्माच्या पुनरुत्थानाला इ. स. १८९१ साली प्रारंभ झाला. लंकेमध्ये अनागरिक धर्मपाल नामक एक पुरुष उत्पन्न झाला. बोधगया येथील बौद्ध मंदिराची सांप्रत दुर्दशा झाली आहे, असे कळल्यामुळे त्याचे हृदय व्यथित झाले. त्याने मग आपले घरदार आणि सुखोपभोग सोडून अनागरिकत्व पत्करले. तो गृहहीन भिक्षू बनला. त्याने बोधगयेचे महाबोधी मंदिर पुनश्च बौद्धांच्या हाती आणणे आणि भारतात बौद्ध धर्माचा प्रचार करणे, याच दोन गोष्टींसाठी आपले आयुष्य वेचायचे ठरविले.

त्याने प्रथम बोधगयेची यात्रा केली आणि नंतर लंकेत परत जाऊन कोलंबो येथे महाबोधिसभेची स्थापना केली. या सभेचे दोन मुख्य उद्देश होते– बोधगयेत सगळ्या बौद्ध देशांचा प्रतिनिधी ठरेल असा भिक्षुसंघ निर्माण करणे आणि इंग्रजी व भारतीय भाषांमध्ये बौद्ध साहित्याचे प्रकाशन करणे.

महाबोधीसभेने इ. स. १८९१ साली बोधगया येथे एक आंतरराष्ट्रीय बौद्धसंमेलन भरवले व इ. स. १८९२ साली एक इंग्रजी मुखपत्र चालू केले. त्यानंतर धर्मपाल भिक्षूने अमेरिकेची यात्रा केली आणि एक वर्ष तिथे राहून तिथेही महाबोधीसभेची स्थापना केली. त्याच्या विद्वत्तापूर्ण भाषणांनी प्रभावित होऊन अमेरिकेतल्या अनेक जणांनी बौद्ध धर्म स्वीकारला.

इ. स. १९०० साली मद्रास, कुशीनगर आणि अनुराधपूर या ठिकाणी महाबोधीसभेच्या शाखा स्थापन झाल्या. भारत स्वतंत्र झाल्यावर बिहार सरकारने इ. स. १९४९ साली बोधगया मंदिराचा कारभार हिंदू व बौद्ध मिळून बनविलेल्या एका समितीच्या स्वाधीन केला. इ. स. १९६१ साली सारनाथ येथे मूलगंधकुटी विहार नव्याने निर्माण झाला. याच कालात गया, सारनाथ, नवी दिल्ली, लखनौ, मुंबई, मद्रास, इ. ठिकाणी महाबोधीसभेच्या आणखी काही शाखा निर्माण झाल्या. इ. स. १९४९ साली सारिपुत्र व महामौद्गल्यायन यांचे रक्षावशेष भारतात आणले जाऊन त्यांची, सांची येथे एका नवनिर्मित विहारात स्थापन करण्यात आली. भारत सरकारने वैशाख पौर्णिमा हा बुद्ध-जयंतीचा पुण्यदिवस म्हणून जाहीर केला. महाबोधीसभेने आजवर अनेक बौद्ध ग्रंथांचे विविध भाषांत अनुवाद केले असून, अजूनही ते कार्य चालू आहे. बुद्धाची धर्मभाषा पाली हिचेंही संशोधन चालू झाले आहे.

बौद्ध धर्माच्या पुनरुत्थानाच्या दृष्टीने आणखी एक अत्यंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संस्मरणीय घटना इ. स. १९५६ साली घडली. डॉ. आंबेडकर हे अस्पृश्य मानल्या गेलेल्या भारतीय जनतेचे एकमेव नेते होते. स्पृश्यांकडून अस्पृश्यांवर होत असलेला अन्याय, त्यांनी धर्मांतर केल्यावाचून दूर होणार नाही, असे त्यांच्या मनाने घेतले. हळूहळू त्यांची ती धारणा दृढमूल झाली आणि त्यांनी इ. स. १९५६ साली नागपूर येथे आपल्या एक लाख अनुयायांसह हिंदु धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारला. भारतातील बौद्ध धर्माच्या पुनरुत्थानाला त्यामुळे महत्त्वाची चालना मिळाली. [एन्सा. रि. ए.; बौ. ध. द.; बौ. का. भा.; हिंदी अनुशीलन, धीरेंद्रवर्मा-विशेषांक; भा. सा. इ.; बौ. ध. वि.; हिं. वि. को.; आजकल वार्षिक अंक, डिसें. १९५६; बुद्धचर्या; बौ. द. मी.; बौ. सं. प.; इं. बु. इ.]

बौद्ध साहित्य

बुद्धाने भिक्षूंना आदेश दिला होता, की त्यांनी आपली वचने आपापल्या भाषेत परावर्तित करावी. वैदिक भाषेत आपला उपदेश परावर्तित करायला मात्र त्याचा विरोध होता. म्हणून बौद्ध धर्माचे ग्रंथ प्राकृत भाषांमध्ये आढळतात. उत्तर भारतातल्या कित्येक बोलींमध्ये बुद्धवचने गाथाबद्ध केलेली आहेत. पाली भाषा उज्जयिनी विभागात बोलली जात असण्याचा संभव आहे. त्या भाषेत त्रिपिटक लिहिले गेले व ते लंका, ब्रह्मदेश, इ. बाहेरच्या देशांतही मान्य झाले. बौद्ध संकर संस्कृत अशी एक भाषा असल्याचे व तिच्यातही बौद्ध साहित्य असल्याचे आचार्य नरेंद्र देव सांगतात. इ. स. च्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकापासून संस्कृत भाषेची प्रतिष्ठा देशभर वाढत चालली आणि त्या गोष्टीचा बौद्ध धर्मावरही परिणाम होऊन संस्कृत भाषेतही बौद्ध ग्रंथ निर्माण होऊं लागले. तिबेटी व चिनी या भाषांमध्येही बौद्ध साहित्य पुष्कळच निर्माण झाले.

बौद्ध साहित्याच्या भांडारात पाली त्रिपिटक हा सर्वांत प्राचीन व संपूर्ण उपलब्ध असा संग्रह आहे. त्याची तीन भागांत व्यवस्थित विभागणी केलेली आहे. याशिवाय मिलिंदपन्ह, नेत्तिपकरण, बुद्धदत्तलिखित भाष्ये, त्रिपिटकावरच्या टीका, दीपवंस, महावंस, चूलवंस, जातककथा, इ. नावांनीही पाली भाषेत फार मोठे बौद्ध साहित्य उपलब्ध आहे. विसुद्धिमग्ग हा बुद्धघोषाचा ग्रंथ तर प्रारंभिक बौद्ध धर्माचा विश्वकोशच मानला जातो.

बौद्धांचे संपूर्ण सूत्रसाहित्य पालीमध्ये जसे सुरक्षित आहे, तसे ते संस्कृत भाषेत नाही. संस्कृत ग्रंथ सामान्यपणे पाली ग्रंथांशी समानता राखीत असले, तरी अनेक स्थळी ते मूळ पाली ग्रंथांपासून दूर गेलेले आहेत.

संस्कृत भाषेतले बौद्ध ग्रंथ काही हीनयानी पंथाचे, तर काही महायानी पंथाचे आहेत. त्यांपैकी महावस्तू हा ग्रंथ हीनयान पंथाचा प्रसिद्ध विनयग्रंथ आहे. त्या पंथाच्या प्राचीन महत्त्वपूर्ण ग्रंथांत याची गणना होते. महावस्तूचा अर्थ महान विषय किंवा कथा असा आहे. या ग्रंथात बोधिसत्त्वाच्या दशभूमींचे विस्तृत वर्णन आढळते. बुद्धाचे जीवनचरित्र सांगणे हा महावस्तूचा मुख्य उद्देश आहे. मात्र हे जीवनचरित्र सुश्लिष्ट व सुसंबद्ध नाही. त्यात जातक, सूत्र, कथा, विनय, इ. कित्येक अंगांचे मिश्रण आहे. या ग्रंथाची भाषा मिश्रसंस्कृत आहे. सनपूर्व २०० वर्षांच्या सुमारास मूळरूपात हा ग्रंथ निर्माण झाला आणि त्यानंतर वेळोवेळी त्यात वाढ होत गेली.

महायान सूत्रग्रंथांत ललितविस्तर या ग्रंथाला मोठे पावित्र्य आहे. वैपुल्यसूत्रांत या ग्रंथाची गणना होते. प्रारंभी हीनयानांतर्गत सर्वास्तिवादी निकायाचा हा ग्रंथ होता. बुद्धाने या भूमंडलावर ज्या क्रीडा (ललित) केल्या, त्यांचे वर्णन यात असल्यामुळे ललितविस्तर असे नाव त्याला मिळाले. प्रस्तुत ग्रंथ हीनयानांच्या कोणत्या तरी प्राचीन मूल ग्रंथाचे रूपांतर असावे, असे आचार्य नरेंद्र देव म्हणतात. या ग्रंथावरून बुद्धकथेचा कसकसा विकास झाला ते कळून येते.

त्यानंतर अश्वघोषाचे बौद्ध साहित्य येते. त्याने बुद्धचरित व व सौंदरनंद ही दोन महाकाव्ये आणि सारीपुत्तपकरण या नावाचे नाटक असे ग्रंथ लिहिले. बुद्धचरितात बुद्धकथा वर्णित आहे, तर सौंदरनंद या काव्यात बुद्धाचा भाऊ नंद हा बौद्ध धर्मात कसा दीक्षित झाला, त्याची कथा आहे. सारीपुत्तपकरणात सारीपुत्र व मौद्गलायन हे दोघे बौद्ध धर्माचे अनुयायी झाले त्याची कथा आहे.

त्यानंतर अवदानसाहित्याचा क्रमांक येतो. अवदान याचा अर्थ संकेताने कथा असा आहे. अवदानशतक हा हीनयानांचा ग्रंथ असून, तो अशा कथांचा प्राचीन संग्रह आहे. त्यात, जसे करावे तसे भोगावे, या कर्मसिद्धान्ताला धरून अनेक कथा गुंफलेल्या आहेत. दिव्यावदान, कल्पद्रुमावदानमाला, अशोकावदानमाला, द्वाविंशत्यवदानमाला, भद्रकल्पावदान, विचित्रकर्णिकावदान, अवदानकल्पलता, इ. ग्रंथ मिळून अवदानसाहित्य बनते.

निदानकथा हे पाली भाषेत उपलब्ध असलेले एकमेव बुद्धचरित्र आहे. जातककथांच्या टीकेची भूमिका या स्वरूपात ते रचले गेले आहे. दीपंकर बुद्धाच्या कालापासून गौतमाच्या जन्मापर्यंत तुषितदेवीच्या स्वरूपात बोधिसत्त्वाचे अस्तित्व हा त्यातल्या दूरेनिदान या संग्रहाचा विषय आहे. गौतम तुषितस्वर्गातून बोधगयेत अवतरला, ती कथा अविदूरेनिदान या संग्रहात आली आहे. बुद्धाच्या धर्मचक्रप्रवर्तनापासून श्रावस्तीत अनाथपिंडिक आणि विशाखा यांची भेट होईपर्यंतचा भाग हा संतिकेदान या संग्रहाचा विषय आहे. (निदानकथा पाहा.)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुद्धाच्या पूर्वजन्मांशी संबंधित असणाऱ्या कथांना जातक-कथा असे म्हणतात. हा ग्रंथ पाली भाषेत असून, तो खुद्दक निकायातला दहावा भाग आहे. या संग्रहात ५०० कथा आहेत. (जातककथा पाहा.)

महायानसूत्रे अनेक आहेत; पण त्यांपैकी पुढील नऊ ग्रंथांचा विशेषत्वाने आदर केला जातो. अष्टसाहस्रिकाप्रज्ञापारमिता, सद्धर्मपुंडरीक, ललितविस्तर, लंकावतार, सुवर्णप्रभास, गंडव्यूह, तथागतगुह्यक, समाधिराज व दशभूमीश्वर अशी त्यांची नावे आहेत. नेपाळात यांना नवधर्म म्हणतात.

सद्धर्मपुंडरीक हा वरील नवांतला सर्वोत्कृष्ट ग्रंथ होय. हा ग्रंथ चीन, जपान, इ. महायानी देशांत फार पवित्र मानला जातो. याच्या रचनेचा प्रारंभ इ. स. च्या पहिल्या शतकात झाला, असे तज्ञांचे मत आहे. याचे एकूण २७ अध्याय आहेत. त्यांत तथागताच्या माहात्म्याचे प्रधानतया वर्णन असले, तरी काही अध्यायांत बोधिसत्त्व अवलोकितेश्वराला बुद्धाच्या बरोबरीचे स्थान दिलेले आहे. कारंडव्यूहात या अवलोकितेश्वराच्या महाकरुणेची अनेक वर्णने आढळतात. 'ओं मणिपद्मे हुं' हा मंत्र पहिल्या-प्रथम कारंडव्यूहातच आढळतो. काही विद्वानांच्या मते मणिपद्मा ही अवलोकितेश्वराची अर्धांगी आहे. या ग्रंथात आदिबुद्ध व स्रष्टाबुद्ध, तसेच मंत्रतंत्रांनी युक्त असा बौद्ध धर्म यांचे माहात्म्य आढळते. त्यात भक्तिमार्गाचेही दर्शन होते.

सुखावतीव्यूह नावाच्या सूत्रात अमिताभ बुद्धाच्या सुखावती लोकाचे वर्णन आहे. सुखावती हे बौद्धांचे नंदनवन होय. या ग्रंथाची चिनी भाषांतरे झाली आहेत. आर्यबुद्धावतंसक या सूत्रात बोधिसत्त्व – उपासनेचा परम प्रकर्ष पाहायला मिळतो. गंडव्यूह या ग्रंथातही बोधिसत्त्व – उपासनेलाच प्राधान्य आहे. भाषा, वर्णनशैली आणि कथाभाग या तीनही दृष्टींनी गंडव्यूह उत्कृष्ट आहे. बोधिसत्त्वयान या प्रकारावर गंडव्यूहाने कळस चढवला आहे.

प्रज्ञापारमितासूत्र या ग्रंथात शून्यता किंवा प्रज्ञा या महायानांच्या मुख्य सिद्धान्तांचे विवेचन आहे. नेपाळी परंपरेप्रमाणे प्रस्तुत ग्रंथाचे सव्वालक्ष श्लोक होते; पण हळूहळू ते घटत जाऊन ८००० श्लोकांचा हा सूत्रग्रंथ उरला. मग त्याला अष्टसाहस्रिकाप्रज्ञापारमिता असे नाव पडले. नागार्जुनाने या ग्रंथावर टीका लिहिली आहे.

लंकावतारसूत्र हा विज्ञानवादाचा मूलग्रंथ आहे. विज्ञानच सत्य असून, तद्‌भिन्न वस्तूला सत्ता नाही, असे या ग्रंथात प्रतिपादिले आहे. याला लंकावतारसूत्र म्हटले त्याचे कारण बुद्धाने लंकाधीश रावणाला सद्धर्माचा उपदेश केला हे होय.

अन्य सूत्रग्रंथांत समाधिराजसूत्र व सुवर्णप्रभाससूत्र ही उल्लेखनीय आहेत. यांपैकी पहिल्या सूत्रात योगाचाराच्या अनेक समाधींचे वर्णन असून, दुसऱ्या सूत्रात भगवान बुद्धाच्या धर्मकार्याची प्रतिष्ठा आहे.

याशिवाय, बौद्धांच्या विविध संप्रदायांचे दार्शनिक वाङ्मयही विपुल आहे. वैभाषिक संप्रदायाच्या दर्शनाचा सर्वमान्य ग्रंथ म्हणजे अभिधर्मज्ञानप्रस्थानशास्त्र हा होय. वसुबंधूचा अभिधर्मकोश म्हणजे भारतीय दर्शनांच्या इतिहासातली एक गौरवास्पद रचना आहे. समयप्रदीपिका हा वैभाषिक सिद्धान्ताचा सारग्रंथ आहे. योगाचार संप्रदायात मध्यान्तविभाग हा मैत्रेयाचा ग्रंथ प्रमाणभूत आहे. याशिवाय महायान सूत्रालंकार, महायान संपरिग्रह, इ. आर्य असंगाचे ग्रंथ; तसेच प्रमाणसमुच्चय, न्यायप्रवेश, इ. दिङ्‌नागाचे ग्रंथ; त्याचप्रमाणे प्रमाणवार्तिक व न्यायबिंदू हे धर्मकीर्तीचे ग्रंथ योगाचारदर्शनाला परिपुष्ट करतात. नागार्जुनाच्या माध्यमिकशास्त्र या ग्रंथावर माध्यमिकांच्या शून्यवादाची उभारणी झालेली आहे. दशभूमिविभाषाशास्त्र हा तर महायानदर्शनाचा विश्वकोशच होय. शांतरक्षिताचा तत्त्वसंग्रह हा ब्राह्मण दार्शनिकांच्या मतांचे खंडण करून बौद्ध सिद्धान्तांचे मंडण करणारा आहे. [बौ. सा. सां. ज्ञ.; आजकल वार्षिक अंक, डिसेंबर १९५६; बौ. द. अ. भा. द.]

बौधायन गृह्यसूत्र

हे सूत्र चार प्रश्नांत विभागलेले असून, त्यांमध्ये गर्भाधानापासूनचे षोडश संस्कार, सप्तपाकसंस्था, गृहस्थ व ब्रह्मचारी यांच्या धर्मांचे विवेचन, इ. विषय आले आहेत. या सूत्रामध्ये पुष्कळशा अध्यायांच्या शेवटी बोधायन या आचार्याचे नाव येते. या गृह्यसूत्राचे परिभाषासूत्र आणि शेषसूत्र असे दोन परिशिष्ट ग्रंथ आहेत. त्यांमध्ये अतिथिधर्म, पितृमेध, उदकशांती; तसेच दुर्गाकल्प, प्रणवकल्प, ज्येष्ठाकल्प, इ. कल्पांचे विधान आहे. या दोनही परिशिष्टांसह बौधायन गृह्यसूत्र शामशास्त्री यांनी संपादित करून छापले आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

बौधायन धर्मसूत्र

हे चार प्रश्नांत विभागलेले आहे. त्यांत चातुर्वर्ण्यांचे आचारनियम, पंचमहायज्ञ, विवाहाचे प्रकार, प्रायश्चित्त, नियोगनियम, श्राद्ध, प्राणायाम, अघमर्षण, संस्कार, शिष्टलक्षण, उत्तर व दक्षिण भारतातील आचारभिन्नता, आशौच, सपिंड, सकुल्य, संकरजाती, दायभाग, इ. विषय आलेले आहेत.

सांप्रत अस्तित्वात असलेल्या बौधायन धर्मसूत्रांत कित्येक ठिकाणी पुनरुक्ती असून, इतर बराच भाग गौतम धर्मसूत्र व विष्णू धर्मसूत्र यांतून घेतलेला आहे. यांतला काही भाग पद्यमय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असून, इतर गद्यमय आहे. पाठीमागून या सूत्रात बरेच प्रक्षेपही झालेले आहेत. एकंदरीत या सूत्राची रचना विस्कळीतच आहे. यात संहिता, ब्राह्मण, आरण्यके, उपनिषदे व निदानग्रंथ यांतील उतारे घेतलेले आहेत. तसेच औपजांघनी, कात्य, काश्यप, प्रजापती, इ. धर्मशास्त्रकारांचा उल्लेख आहे. या ग्रंथावर गोविंदस्वामीने टीका लिहिली आहे. [हि. ध.; प्रा. च. को.]

बौधायन श्रौतसूत्र हे एकोणीस प्रश्नात विभागलेले आहे. या सूत्रात पुढील विषय चर्चिलेले आहेत – दर्श पूर्णमास, आधान, पुनराधान, पशू, चातुर्मास्य, सोम, प्रवर्ग्य, एकादशिनीपशू, चयन, वाजपेय, अग्निष्टोम इत्यादी. या ग्रंथावर भवस्वामीची टीका आहे. हे संपूर्ण सूत्र डॉ. कलान्द यांनी संपादित करून छापले आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

व्रज (सं. व्रज) एक पुण्यप्रदेश. मथुरेच्या आसपासच्या भूभागाला हे नाव आहे. किशोर कृष्णाचा लीलाविहार याच प्रदेशात झालेला असल्यामुळे, हा प्रदेश पुण्यपावन मानला गेला आहे. व्रज अर्थात व्रज याची व्याख्या अशी – 'व्रजन्ति गावो यस्मिन्निति व्रजः' = जिथे गाई सदैव फिरतात, चरतात तो प्रदेश व्रज होय. प्राचीन काळी हा प्रदेश शूरसेन जनपदात समाविष्ट होता. शूरसेन या नावानेच तो ओळखला जात असे. पौराणिक काळात त्याला व्रजमंडळ म्हणू लागले. मत्स्य पुराणात या प्रदेशाचा विस्तार तपशीलवार सांगितला आहे. गायी, गोप आणि गोपी यांचे वास्तव्यस्थान या अर्थाने या सबंध प्रदेशालाच व्रज असे भागवत पुराणात म्हटले आहे.

इ. स. च्या १५ व्या व १६ व्या शतकांत वैष्णव संप्रदायाची लाट भारतभर पसरली. या वैष्णवांचे आराध्य दैवत श्रीकृष्ण हे होते. व्रज हे श्रीष्णाचे क्रीडास्थल असल्याने सूरदासादी भक्त कवींनी त्याचे माहात्म्य वाढवले. या प्रदेशातली मथुरा, वृंदावन, गोवर्धन, गोकुळ, महावन, बलदेव, नंदलाल, बरसाना, डीग, कामवन, इ. श्रीकृष्णाची सर्व लीलास्थळे व्रजमंडलात समाविष्ट होतात. या क्षेत्राचा विस्तार ८४ कोस होता, असे सूरदास म्हणतो. भागवत पुराणात तो २० योजने म्हणजे ८० कोस दिला आहे. वायू पुराणात तो वाढवून ४० योजने केला आहे. गर्गसंहितेत व्रजमंडलाच्या चतुःसीमा दिल्या आहेत, त्या अशा –

प्रागुदीच्यां बर्हिषदो दक्षिणस्यां यदोः पुरात् ।
पश्चिमायां शोणपुरान्माथुरं मण्डलं विदुः ।।
(वृंदा. खं. १.११)

अर्थ – पूर्व-उत्तर दिशांना बर्हिषद (बरहद), दक्षिणेस यदुपूर (शूरसेन गाव) व पश्चिमेस शोणपूर या मथुरामंडलाच्या अर्थात व्रज भूमीच्या चतुःसीमा होत.

भूरचनेच्या दृष्टीने या प्रदेशाचे तीन भाग पडतात– (१) मैदानी भाग, (२) पहाडी भाग व (३) गाळाचा भाग. मैदानी भाग मोठा असून, यमुनेच्या पूर्वेला व पश्चिमेला पसरला आहे. पहाडी भाग पश्चिमेला पसरला असून, त्यात लहान लहान टेकड्या आहेत. धार्मिक दृष्ट्या त्यांना महत्त्व आहे. गाळाचा भाग यमुनेच्या दोन्ही तीरांवर पट्टीसारखा विस्तारला आहे. व्रजमंडलात एकूण पाच पुण्यपर्वत आहेत– गोवर्धन, नंदगावची टेकडी, बरसान्याची टेकडी, कामवनाची टेकडी व चरण टेकडी.

(१) गोवर्धन – याला गिरिराज असे म्हटले आहे. वल्लभसंप्रदायाच्या कवींनी गोवर्धनाविषयी अत्यंत पूज्य भावाने लिहिले आहे. गोवर्धनाचे महत्त्व वाढवले तेही वल्लभ संप्रदायानेच. सूरदासाने तर त्याला 'गिरिवर कृष्ण की अनुहारि' = गोवर्धन हे भगवान श्रीकृष्णाचे दुसरे रूप आहे, असे म्हटले आहे. (गोवर्धन पाहा.)

(२) नंदगावची टेकडी – हिला नंदीश्वर किंवा रुद्रगिरी असे म्हणतात. नंदगाव हे नंदाचे गाव होय. टेकडीच्या माथ्यावर त्याचे मंदिर आहे.

(३) बरसान्याची टेकडी – हिला ब्रह्मगिरी असेही म्हणतात. बरसाना येथे राधेचा पिता वृषभानू याचे वास्तव्य होते. या टेकडीवर लाडिलीदेवीचे मंदिर आहे.

(४) कामवनाची टेकडी – हिला कामगिरी असेही म्हणतात.

(५) चरण टेकडी – ही नंदगावापासून ईशान्येस सहा मैलांवर आहे. इथे कृष्णाची पदचिन्हे उमटली आहेत, असे सांगतात.

व्रजमंडलात पान, मान, चंद व प्रेम या नावांची ४ सरोवरे आणि १५९ कुंडे असल्याचे कवी जगतनंद सांगतो.

मधू, ताल, कुमुद, बहुला, काम, खिदिर, वृंदा, भद्र, भांडीर, बेल, लोह व महा या नावांची बारा वने व्रजमंडलातली प्रमुख वने आहेत. त्यांतले मधुवन ही ध्रुवाची तपोभूमी आणि वृंदावन ही बाळकृष्णाची लीलाभूमी होय. भागवतादी पुराणांत याचे पुष्कळ वर्णन आहे. कृष्णाच्या शैशव काळातल्या पूतनावध, तृणावर्तवध, इ. घटना महावनात घडल्या आहेत. बाकीची वनेही अशाच काहीतरी घटनांमुळे प्रसिद्धी पावली आहेत.

पुराणकालात उद्धव व नारद यांनी व्रजयात्रा केल्याचे उल्लेख आहेत. लीलाशुक व जयदेव हे कृष्णभक्त कवी आणि वल्लभाचार्य व त्या संप्रदायाचे इतर सर्व आचार्य व्रजमंडळात वास्तव्याला आले होते. त्यांपैकी अनेकांनी व्रजाचे वर्णन मुक्तकंठाने केले आहे. चैतन्य संप्रदाय आणि निंबार्क संप्रदाय यांनी तर व्रजमंडल हे आपले केंद्रच बनविले होते. व्रजमंडळातल्या १२ वनांची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यात्रा करण्याची प्रथा वल्लभाचार्यांनी पाडली. त्यांच्या मागच्या आचार्यांनी बारा वनांव्यतिरिक्त २४ उपवनांची यात्रा सुरू केली. गोस्वामी पुरुषोत्तम यांनी व्रजाच्या यात्रेचा क्रम निर्धारित केला. मथुराकल्प, व्रजयात्राखंड, व्रजमथुराप्रकाश, व्रजयात्रा श्लोक, व्रजभक्तीविलास, इ. ग्रंथ व्रजयात्रेचे विवरण करण्यासाठी निर्माण झाले आहेत.

व्रजप्रदक्षिणेचे कित्येक प्रकार कल्पिलेले आहेत. छोट्या परिक्रमेला पंचतीर्थी म्हणतात. ही पाच दिवसांत पुरी होते. दुसरी परिक्रमा रामदल या नावाने प्रसिद्ध आहे. वैष्णवसंप्रदायी भक्त ही परिक्रमा करतात. तिसऱ्या परिक्रमेला बडी यात्रा म्हणतात. ही चाळीस दिवसांत पुरी करतात.

इ. स. च्या १५-१६ व्या शतकापासून व्रजमंडल हे वैष्णव संस्कृतीचे प्रधान केंद्र राहिले आहे. वैष्णव संस्कृतीच्या कितीतरी परंपरा या क्षेत्रात एकमेकींच्या साथसंगतीने चालत आलेल्या दिसतात. या सर्व परंपरांचा मूलाधार व्रजविहारी श्रीकृष्ण हा आहे. श्रीकृष्णांच्या चरणरजांनी ही समस्त भूमी पावन झालेली आहे. कृष्णाच्या जोडीने राधा हीदेखील व्रजमंडलाची आराध्य देवता बनली आहे. तिथले स्थापत्य, मूर्ती, चित्र, काव्य, संगीत, हे सारे राधा-कृष्णमय आहे. व्रजमंडलात किशोर कृष्णाने ज्या विविध दिव्य लीला केल्या, त्यामुळे ते स्थान वैष्णवांच्या हृदयात वैकुंठाहूनही आगळे होऊन बसले आहे. वैष्णव पुराणांत व्रजमंडलाचे आणि तिथल्या कृष्णलीलांचे विपुल वर्णन केलेले आहे. अष्टछाप कवी कृष्णदास म्हणतो—

कोटिकल्प कासी बसे, अयोध्या कल्प हजार
एक निमिष व्रजमें बसे बड भागी कृष्णदास

अर्थ — कोटिकल्प काशीत वास्तव्य होणे व हजार कल्प अयोध्येत राहणे यांपेक्षा एक निमिष व्रजात राहणे हे मोठ्या भाग्याचे आहे, असे कृष्णदासाला वाटते.

व्रजमंडल सोडून अन्य कुठेही जाऊ नये, अशीच राधा-कृष्णभक्तांची आकांक्षा असते. कारण त्यांच्या मते व्रज हे साक्षात भगवंताचे धाम आहे. पाहा — मथुरा. [व्र. सां. इ.; व्र. व्र. या.]

व्रजप्रेमानंदसागर एक हिंदी महाकाव्य. चाचा वृंदावनदास हा त्याचा कर्ता होय. हा इ. स. च्या १८ व्या शतकात होऊन गेला. या ग्रंथाची ६८ प्रकरणे असून, त्यात दोहा व चौपाई हे छंद आहेत.

राधा-कृष्णांच्या शैशव कालापासून विवाहापर्यंतची कथा या महाकाव्यात गुंफलेली असून, त्यात तत्कालीन ग्रामीण जीवनाचे चित्र पाहायला मिळते. या काव्यात वात्सल्य व शृंगार या रसांचा चांगला परिपोष झालेला आहे. मधून मधून करुण रसाचीही छटा आढळते. तुलसीदासाच्या रामचरितमानसाची छाप या काव्यग्रंथावर ठायी ठायी दिसते. [हिं. सा. को. २]

व्रजभाषा पश्चिमी हिंदीच्या पाच बोलींमधली एक प्रमुख बोली. ग्रियर्सनच्या मतानुसार हिचा प्रचार पुढील प्रदेशात आहे— उत्तर प्रदेशातले मथुरा, अलीगढ, आग्रा, बुलंद शहर, एटा, मैनपुरी, बदायूं व बरेली; पंजाबात गुडगाव जिल्ह्याची पूर्व पट्टी; राजस्थानात भरतपूर, धौलपूर, करौली व जयपूरचा पूर्व भाग आणि मध्यप्रदेशांत ग्वाल्हेरचा पश्चिम भाग.

डॉ. धीरेंद्र वर्मा हे कनौजी बोलीलाही व्रजभाषेच्या अंतर्गत मानतात. त्यांच्या मतानुसार पीलीभीत, शाहजहांपूर, फर्रुखाबाद, हरदोई, इटावा व कानपूर या जिल्ह्यांतली हिंदी भाषाही व्रजभाषाच होय. सुमारे सव्वा कोटी लोक ही भाषा बोलतात. शौरसेनी भाषेतून या भाषेचा उद्‌गम झाला आहे, असे मानतात.

व्रजभाषेची पदचिन्हे इ. स. च्या १० व्या शतकापासून उमटू लागतात. गोरख उपनिषदातल्या गद्यात तिचे प्राचीन रूप पाहायला मिळते. या गद्यावर हिंदुस्थानीमिश्रित राजस्थानी भाषेचे पुट आहे. त्या काळी व्रज व खडी या दोन बोलींमध्ये संघर्ष चालू झाला होता, असे दिसते. व्रजभाषेचे समर्थक तिच्यातून खडी बोलीची उत्पत्ती सांगतात; तर खडी बोलीचे समर्थक खडीचे प्राचीनतम रूप गोरखनाथ व सिद्ध यांच्या भाषेत दिसत असल्याचे मानतात. गोरख उपनिषद हे त्यांच्या मते व्रजभाषेचे नसून खडीभाषेचे प्राचीनतम रूप आहे. वस्तुतः खडी व व्रज या दोन्ही भाषा जोडीनेच विकसित झाल्या; पण व्रजभाषा ही अनेक कवींनी आपल्या काव्याची भाषा केल्याने काव्यक्षेत्रात व्रजभाषेचा विकास झाला आणि खडी ही बोलचालीच्या स्वरूपात लोकांत प्रसार पावली.

सूरदास हा व्रजभाषेचा सर्वश्रेष्ठ कवी होय. त्याचा सूरसागर हा पद्यसंग्रह व्रज भाषेतच लिहिलेला आहे. त्याच्या पद्यांची भाषा इतकी सरस आणि परिष्कृत आहे, की त्यावरून सूरसागर हा व्रजभाषेचा पहिला ग्रंथ मानणे कठीण जाते. त्यापूर्वी व्रजभाषेत काव्याची परंपरा प्रचलित असली पाहिजे आणि सूरसागर हा तिचा मुकुटमणी असला पाहिजे. सूरदासाच्या पूर्वी विष्णुदास छतरूमल, मानिक, ठक्करसी, थेघनाथ, धर्मदास, छीहल, सहजसुंदर इ. कित्येक कवींनी व्रजभाषेत काव्यरचना केलेली आहे. हरिव्यास, परशुराम, नरहरीभट्ट, मीरा हे व्रजभाषेचे कवीही सूरदासपूर्वच आहेत. प्रद्युम्नचरित, हरिचंद्रपुराण, लक्ष्मणसेन-पद्मावती कथा, डूंगरबावनी, छिताईवार्ता, इ. व्रजभाषेतल्या काव्यरचना सूरदासाच्या पूर्वी झालेल्या आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पण त्या काळी या भाषेला ब्रजभाषा असे नाव मात्र मिळाले नव्हते. त्या नावाचा उपयोग इ. स.च्या अठराव्या शतकात कवी भिखारीदास, कुलपती मिश्र व घनानंद या कवींनी केला. त्यापूर्वी तिला प्रदेशपरत्वे पिंगल, मध्यदेशी, ग्वालिअरी, अंतर्वेदी, भारवा, इ. नावे होती.

ब्रजभाषेची रूपगत प्रकृती औकारान्त आहे. तिची एकवचनी पुंलिंगी नामे व विशेषणे प्रायः औकारान्त असतात. उदा० खुरपौ, यामरौ, मांझौ, इ. नामे व कारौ, गोरौ, सांवरौ, इ. विशेषणे. ब्रजभाषेत हिंदीच्या अन्य बोलींप्रमाणे केवळ पुंलिंग व स्त्रीलिंग अशी दोनच लिंगे आहेत. प्राणिवाचक संज्ञा तिच्यामध्ये अर्थभेदाने निश्चित केल्या जातात. प्राणहीन वस्तूंच्या द्योतक संज्ञाही या दोन्ही लिंगांतच येतात. उदा० काठ (पुं.) व खाट (स्त्री.). छोटी छोटी जनावरे व कृमिकीटक हे स्त्रीलिंगात किंवा पुंलिंगात असतात. उदा० मूसौ (पुं) व मछरी (स्त्री.). क्रियापदाचे सामान्य भूतकालीन एकवचनाचे पुंलिंगी रूप प्रायः औकारान्त असते. उदा० काटौ छोरौ बोलौ (काळा मुलगा बोलला). काही प्रदेशांत या सामान्य भूतकालीन क्रियापदाच्या रूपाला य हा आगम होतो. उदा० काटौ छोरौ बोल्यौ.

ब्रजभाषेत ध्वनिपरिवर्तनाची प्रवृत्तीही दिसते. ऋच्या जागी अ, इ, उ व ए असे परिवर्तन होते. उदा० (सं.) कृत > (ब्रज) कत, कट, किट. (सं.) पितृ > (ब्रज) पितु. (सं.) पृथ्वी > (ब्रज) पुठवी.

इ. स. च्या ११ व्या शतकापासून हळूहळू वाढत जाणारी ब्रजभाषा सोळाव्या शतकापर्यंत मध्यदेशाची भाषा म्हणून प्रतिष्ठित झाली. साहित्यिक भाषेच्या रूपात तिच्या प्रतिष्ठेला १६ व्या शतकात प्रारंभ झाला. इ. स. १५१९ साली गोवर्धन पर्वतावर श्रीनाथजींचे मंदिर निर्माण झाले आणि वल्लभाचार्यांनी श्रीनाथाच्या समोर नियमित रूपाने कीर्तन करण्याचा संकल्प केला. या कार्यासाठी त्यांनी कवी आणि गायक शोधून ब्रजमंडलात आणले आणि त्यांना आश्रय व प्रोत्साहन दिले. या प्रोत्साहनाचे फल म्हणून सूरदास व नंददास हे श्रेष्ठ लोकप्रिय कवी वल्लभाचार्यांच्या पुष्टिमार्गाशी संबंधित झाले. त्यांनी ब्रजमंडलांतल्या स्थानिक बोलीत राधा–कृष्ण, वृंदावन, यमुनातीर, इ. विषयांवर गीते लिहिली आणि गायिली. ते दोघे एका सामान्य बोलीला साहित्यिक भाषेच्या रूपात विकसित करण्यात समर्थ ठरले.

अष्टछाप कवींपैकी विठ्ठलनाथ, गोकुलनाथ इत्यादींच्या प्रभावाने अनेक कृष्णभक्त कवी ब्रजमंडलाकडे आकृष्ट झाले. त्यांनीही ब्रजभाषेच्या आश्रयाने कृष्णकाव्यात भर घातली. इ. स. चे १७ वे आणि १८ वे या दोन शतकांत कृष्णकाव्याच्या गंगायमुना दुथडी भरून वाहिल्या. काही काळ तर ब्रजभाषा आणि कृष्णकाव्य हे एकमेकांचे पर्यायच बनले होते. त्याचा परिणाम असा झाला, की ब्रजभाषा ही केवळ ब्रजमंडलाची भाषा न राहता समस्त हिंदी प्रदेशाची एक प्रमुख साहित्यिक भाषा बनली. या दोन शतकांतले हिंदी रीतिसाहित्यही ब्रजभाषेतच लिहिले गेले. इ. स. च्या २० व्या शतकात मात्र तिचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला आणि परंपराही क्षीण झाल्या.

ब्रजभाषेतल्या काव्याचे दोन विभाग पडतात– एक मुख्यत्वे भक्तिसाहित्य आणि दुसरे लोकसाहित्य. भक्तिसाहित्यात सूरदास हा अग्रगण्य ठरला आहे. त्याने आपल्या वाणीचा प्रत्येक शब्द कृष्णभक्तीच्या अभिव्यक्तीत वेचला आहे. ब्रजभाषा म्हणजेच कृष्णकाव्य असे जे समीकरण निर्माण झाले, त्याचे फार मोठे श्रेय सूरदासाला आहे. त्याच्या कवितेचा एक नमुना असा –

हरि जू की बाल छबि कहौं बरनि
सकल सुखकी सींव। कोटी मनोज सोभा, हरनि
मंजु मेचक मृदुल तनु। अनुहरत भूषन भरनि
मनहुँ सुभग सिंगार सुरतरू फंरयो है अद्‌भुत फरनि।

भावार्थ – श्रीकृष्णाच्या बालछबीचे काय वर्णन करावे! ती छबी सकल सुखाची सीमा आहे. कोटी मदनांची शोभा तिच्यापुढे फिक्की आहे. कृष्णाची मृदुल तनू आणि त्यावर अलंकारांची शोभा. त्याला पाहून असे वाटते, की सुभग शृंगाराचा कल्पतरूच बहरला आहे.

लोकसाहित्य – ब्रजमंडलात, जर्न्म–विवाहादी संस्कार, सण, व्रते, यात्रा, ऋतू इ. विषयांवर बरेच लोकसाहित्य आहे. तिथल्या ग्रामगीतांत श्रावण महिन्याला फार महत्त्व आहे. श्रावण महिन्यात नववधू सासरहून माहेरी येत असते. काही कारणाने तिला जर माहेर भेटले नाही, तर तिच्या मनाला कशी ओढ लागते त्या विषयीचे एक गीत असे –

सामन भादों जोर कै भइया मेंने ले जाय
सामन जिन जायरे
हूँ कैसे आऊँ मेरी बेंवुली तेरो नाग ने घेरो है घाट
सामन जिन जायरे
नागन दूध पियाय भइया मेंने ले जाय
सामन जिन जायरे

भावार्थ – भाऊराया, श्रावण-भाद्रपदाने अगदी जोर केला आहे बघ. मला घेऊन जा रे. श्रावण जवळ आला बघ. ताई, कसा येऊ मी तुला न्यायला? तुझ्या घाटावर तर नाग वेढून बसला आहे. श्रावण जवळ आला आहे. भाऊराया, नागाला दूध पाज आणि मला घेऊन जा. श्रावण जवळ आला आहे.

श्रावण मासात ब्रजवधू आमोद–प्रमोद करण्यासाठी उद्यानात किंवा नदीच्या काठी एकत्र जमतात, तेव्हा त्यांच्यामध्ये

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुटुंबातल्या नातेवाईकांविषयी आणि गृहकृत्यांविषयी व्यंग-विनोदही चालतात. तशा प्रकारचे एक गीत असे—

आध पाव बाजरा कूटन बैठी
उछल उछल घर भरियो, शैतान बाजरा
कानों देवर मरियो, शैतान बाजरा
आध पाव बाजरा पकावन बैठी
खदक खदक हँडिया भरियो, शैतान बाजरा
कानों देवर मरियो, शैतान बाजरा

भावार्थ — अदपाव बाजरी कुटायला बसले, तर उसळून उसळून ती घरभर पसरली. काय द्वाड आहे बाजरी. चकणा दीर जाऊ दे तिकडे. अदपाव बाजरी शिजवायला बसले, तर खदखदून हंडा भरवून ठेवला. काय द्वाड आहे बाजरी. चकणा दीर जाऊ दे तिकडे. द्वाड आहे बाजरी.

रसिया गीते — रसिया गीते हे ब्रज संस्कृतीचे वैशिष्ट्य होय. या गीतांत लोकजीवनाचे प्रतिबिंब स्वच्छपणे दिसते. त्यांतून हास्यविनोद प्रकटतो; त्याचप्रमाणे विरह आणि कारुण्य यांचेही झरे फुटतात. समाजातल्या वाईट चालींवर व कुटुंबातल्या माणसांच्या बऱ्यावाईट वर्तनावर अशा गीतांतून कोणाला न बोचेल अशा प्रकारे टीका केलेली असते. हे रसिया साहित्य ब्रजजनांचे अत्यंत आवडते असून, ते शतकांच्या परंपरेने चालत आलेले आहे. परिस्थिती बदलते तसे त्या साहित्याचे रंगही बदलताना दिसतात. ही गीते आकाराने छोटी असतात आणि त्यामुळे ती सर्वांनाच सहजपणे कंठस्थ करता येतात. याचा एक नमुना असा—

कारी चूँदरिया रंगाय दै मेरौ जोबन लच्छेदार
जब ते आई तेरे घर में गुजर करी टूटे छप्पर में
ना देखे तेरे महल तेवारे ना सोई पलँग नेवार
मेरौ जोबन लच्छेदार

भावार्थ — काळी चुनडी रंगवून घेतली. माझे यौवन रसरसले आहे. तुझ्या घरी आले तेव्हा गळक्या छपरातून आत प्रवेश केला. नाही पाहिला तुझा महाल, की नाही झोपले नवारीच्या पलंगावर. माझे यौवन रसरसले आहे.

रसिया गीतांप्रमाणेच नारायण गीते नावाचा एक गीतप्रकार ब्रजमंडलात प्राचीन कालापासून परंपरेने चालत आला आहे. या नारायण गीतांतूनच पुढे ध्रुपद गायकीचा विकास झाला, असे म्हणतात. पाहा — मथुरा. [ब्र. लो. सा. अ.; ब्रज भाषा-धीरेंद्र वर्मा, १९५४; बे. फु. आ. रा.; हिं. वि. को.]

ब्रजवासी दास (इ. स. चे १८ वे शतक) ब्रजभाषेचा एक प्रसिद्ध कवी. हा वल्लभसंप्रदायी असून, मोहन गुसाई या गुरूचा शिष्य होता. तुलसीदासाच्या रामचरितमानसावरून स्फूर्ती घेऊन याने ब्रजविलास या महान प्रबंधकाव्याची रचना केली. या काव्यात ८८९ दोहे, तितकेच सोरठे, १०,६००० चौपाया आणि १०६ अन्य छंद आहेत. यावरून त्या काव्याच्या विशालत्वाची कल्पना येईल. प्रस्तुत काव्याची भाषा ब्रज असून, त्यात श्रीकृष्णाच्या लीला सविवरण दिलेल्या आहेत. हे काव्य शैलीदार असल्यामुळे सामान्य जनतेत त्याचा खूप प्रचार आहे. त्यातील एक नमुना असा —

ठाढी अजिर जसोदा रानी । गोदी लिये श्याम सुखदानी।
उदय भयो ससि सरद सुहावन । लागी सुत को मात दिखावन।

अर्थ — यशोदाराणी अंगणात उभी होती. तिने आपल्या कडेवर सुखदायक अशा श्रीकृष्णाला घेतले होते. एवढ्यात शरद ऋतूतील रमणीय अशा चंद्राचा उदय झाला, तेव्हा यशोदा आपल्या मुलाला चंद्र दाखवू लागली.

प्रस्तुत काव्यातल्या अधिकांश कृष्णलीलांना सूरदासाच्या काव्याचा आधार आहे. [हिं. सा. को.; क. कौ.]

ब्रतुकम्म एक देवता. तेलंगणातील लोक आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत या देवतेचा उत्सव साजरा करतात. या उत्सवालाही ब्रतुकम्म असे म्हणतात. या उत्सवाच्या निर्मितीमागे एक कथा आहे, ती अशी —

प्राचीन काळी तेलंगणात धर्मांगद नावाचा एक राजा राज्य करीत होता. त्याला शंभर पुत्र होते; पण ते सगळे दुराचारी होते. त्यामुळे प्रजेने त्यांचा नाश केला. राजा-राणींना पुत्र-वियोगाचे फार दुःख झाले. त्यांनी गौरी देवीला साकडे घातले. देवी त्यांना प्रसन्न झाली. तिच्या कृपेने त्यांना एक मुलगी झाली. तिचे नाव त्यांनी ब्रतुकम्म असे ठेवले. तिच्या स्मृती-निमित्त हा उत्सव दर वर्षी होत असतो.

ब्रतुकम्मचे प्रतीक म्हणून एका थाळीत अथवा उथळ टोपलीत तिळाची फुले, पांढरी किंवा निळी कमळे व रुद्राक्ष ठेवतात. त्यांच्यामध्ये पिवळ्या फुलांचे पराग ठेवतात. उत्सवाच्या काळात गावातील स्त्रिया रोज नटूनथटून गावाच्या बाहेरील मंदिरात अथवा मंदिर नसेल तर कोणाच्या तरी अंगणात जमून तिथे गातात व नाचतात. शेवटी अल्पाहाराचा कार्यक्रम होतो. बायका फराळासाठी नऊ दिवस नित्य नवे पदार्थ आणतात.

ब्रतुकम्म म्हणजे सर्व स्त्रियांची नणंद, अशी तेलंगणातली समजूत आहे. त्याचबरोबर तिला गृहलक्ष्मीही मानतात. उत्सवाच्या अखेरच्या दिवशी ब्रतुकम्माचे कमलपत्रावर प्रतीक-चित्र काढून ते एका मोठ्या थाळीत ठेवतात. या अखेरच्या दिवसाला सद्दुल दिनमू असे म्हणतात. शेवटची पूजा झाल्यावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रतुकम्माचे पाण्यात विसर्जन करतात. त्या वेळी तिच्याबरोबर एक दिवाही सोडतात. घरोघरी परत येताना देवीची हळदीची मूर्ती आणतात आणि घरी आल्यावर तिचा मुखलेपनासाठी उपयोग करतात. [श्री. रेड्डी–धर्मयुग, सप्टेंबर १९६५]

ब्रह्म भारतीय तत्त्वज्ञानातील एक सर्वश्रेष्ठ कल्पना. ब्रह्म हा शब्द बृह = वाढणे, मोठे होणे या धातूवरून बनला आहे. जे बृहत्तम किंवा महत्तम आहे आणि ज्यात वाढणे या क्रियेचे सर्व अर्थ समाविष्ट आहेत, ते ब्रह्म होय. शंकराचार्य, रामानुजाचार्य, इ. ब्रह्मवाद्यांनी आपल्या भाष्यांत त्याची हीच व्युत्पत्ती दिली आहे. ब्रह्म ही कल्पना भारतीय तत्त्वशोधकांच्या प्रतिभेची अत्युच्च भरारी आहे. तत्त्वज्ञानदृष्ट्या ईश्वर-कल्पनेपेक्षाही ब्रह्मकल्पना उदात्त आणि भव्य आहे. तत्त्वविवेचक बुद्धीच्या अकलुषित आणि उच्चतम विकासाचे ते एक मधुर फळ आहे.

ईश्वरकल्पना ही बहुधा सर्व लोकांत व धर्मांत व्यक्त स्वरूपाची म्हणजे मनुष्यसदृश असते; पण मनुष्यत्व बाजूला ठेवून केवळ सर्वशक्तिमान अशा निर्गुण, निराकार ब्रह्माची कल्पना करणे, हे मानवी बुद्धीच्या सूक्ष्मतेचे द्योतक होय. अशा ब्रह्माचे गंभीर व वक्तृत्वपूर्ण असे वर्णन उपनिषदांमध्ये अनेक ठिकाणी आले असून, ते मनुष्यत्वाला किंवा सगुण स्वरूपाला कुठेही शिवलेले नाही.

ब्रह्म म्हणजे जे बृहत्तम ते. शांकर मताच्या आचार्यांनी या अर्थाची व्याख्या करताना ब्रह्मस्वरूपावर पुढीलप्रमाणे प्रकाश टाकला आहे –

देश, काल व वस्तू यांनी सीमित होणारे, अनित्य, परिवर्तनशील, गुणरहित, दोषयुक्त, ज्ञानरहित, परतंत्र, असे जे जे ते सर्व अल्प होय. याच्याहून उलट अर्थात अनादी, अनंत, नित्य, शुद्ध, बुद्ध व मुक्त ते ब्रह्म होय. यालाच छांदोग्योपनिषदात भूमा म्हटले आहे. ब्रह्म व भूमा हे दोन्ही शब्द समानार्थक आहेत.

यो वै भूमा तदमृतमथ यदल्पं तन्मर्त्यम् ।

(छांदो. ७.७.२४)

अर्थ – जो भूमा ते अमृत आणि जे अल्प ते मर्त्य होय.

हे एकमेवाद्वितीय असे आहे. ते दोन होऊ शकत नाही. कोणतीही बृहत्तम वस्तू दोन असू शकत नाही. द्वितीय आले, की त्या ठिकाणी सापेक्षता व अल्पता आली.

ब्रह्मलक्षण – तटस्थ व स्वरूप अशी ब्रह्माची उभयविध लक्षणे आहेत. 'ब्रह्मणः जगज्जन्मस्थितिलयकारणत्वं।' = जगताच्या जन्म, स्थिती व लय यांना कारण असणे, हे ब्रह्माचे तटस्थ लक्षण होय. या लक्षणाला तैत्तिरीय उपनिषदात (३०१) आधार आहे, तो असा –

यतो वा इमानि भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति । यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञासस्व तद् ब्रह्म ।।

अर्थ – ज्याच्यापासून ही भूते (प्राणिमात्र) जन्माला येतात, ज्याच्यामुळे जन्मलेली भूते जीव धारण करतात (आणि) शेवटी ज्याच्या ठिकाणी लीन होतात, ते तू जाणून घे. ते ब्रह्म होय. (असे वरुणाने भृगूला सांगितले).

कोणत्याही वस्तूची, उपादान व निमित्त अशी मुख्यतः दोन कारणे असतात. घटाचे उपादान कारण माती व निमित्त कारण कुंभार असतो. उपादान कारण हे वस्तूची सामग्री असते व निमित्त कारण कार्याला गती, आकार व प्रयोजन प्राप्त करून देणारे असते. वरील ब्रह्मलक्षणांवरून सिद्ध होते, की ब्रह्म हे जगताचे उपादान व निमित्त असे उभयविध कारण आहे. जगताचा आरंभ त्याच्यातूनच होतो व त्याच्यातच जगताची स्थिती असते. त्यामुळे ब्रह्म हे जगताचे उपादान कारण ठरते. आपल्या स्वतंत्रतेने जगताची रचना करून त्याचे नियंत्रण करणे आणि स्वतःच्याच ठिकाणी त्याचा विलय करणे, यामुळे ते जगताचे निमित्त कारणही ठरते. ही दोन्ही कारणे ब्रह्माच्या ठिकाणी संभवत असल्यामुळे ब्रह्म हे प्रकृती व ईश्वर या दोहोंहून पृथक ठरले आहे. प्रकृती ही केवळ जगताचे उपादान कारण असते. प्रकृतिवादात निमित्तकारणता नसते व ईश्वरवादात उपादान-कारणता नसते. ब्रह्माच्या ठिकाणी मात्र उपादान व निमित्त ही दोन्ही कारणे अभिन्न असतात. ब्रह्माची ही अभिन्न निमित्तोपादानकारणता सर्वांना मान्य आहे.

ब्रह्माचे स्वरूप लक्षण तैत्तिरीय उपनिषदात (२·१) दिले आहे ते असे – 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म'। = ब्रह्म हे सत्य, ज्ञान व अनंत आहे.

ही तीन्ही ब्रह्माची विशेषणे आहेत. वस्तूचे जे रूप कधीही पालटत नाही, त्याला सत्य म्हणतात व व्यभिचार पावणाऱ्या वस्तूला अनृत (असत्य) म्हणतात. विकार हा अनृत असतो, कारण तो व्यभिचार पावतो. विकार हे वाचारंभण अर्थात वाणीनेच आरंभ करण्याजोगे नाव असते. उदा० गाडगी, मडकी हा विकार अर्थात असत्य असून मृत्तिका तेवढी सत्य आहे. सत्य हे विशेषण ब्रह्माला नामरूपात्मक विकारांपासून निवृत्त करते. 'सत्यं ब्रह्म' एवढेच ब्रह्माचे लक्षण केल्यास नैयायिकांनी मानलेल्या सत्तारूप जातीमध्ये त्याची अतिव्याप्ती होईल आणि त्यामुळे ब्रह्म हे जड ठरेल. त्या जडत्वाची व्यावृत्ती करण्यासाठी ज्ञान शब्दाची योजना केली आहे. 'ज्ञानं ब्रह्म' असे म्हटल्यास अंतवत असलेल्या लौकिक ज्ञानावर हे लक्षण जाईल म्हणून त्याच्या निवृत्तीसाठी अनंत असे विशेषण योजले आहे. या लक्षणा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तील सत्य शब्द अबाधित या अर्थी, ज्ञान शब्द स्वयंप्रकाश, चैतन्य या अर्थी आणि अनंत शब्द व्यापक या अर्थी प्रसिद्ध आहे.

'सत्यं ज्ञानमानन्दं ब्रह्म' असेही ब्रह्माचे स्वरूप लक्षण मानलेले आहे. तिथे अनंत या ऐवजी आनंद शब्द योजलेला आहे. ब्रह्म हे आनंदरूप आहे. वारुणी भृगू ब्रह्माचा शोध घेता घेता शेवटी 'आनन्दो ब्रह्मेति व्यजानात्' = आनंद हेच ब्रह्म, असे जाणता झाला. कारण त्याला असे कळले, की आनंदातूनच सर्व जीव उत्पन्न होतात. उत्पन्न झाल्यावर आनंदाच्या द्वारे जीवित राहतात आणि अंतसमयी आनंदातच लीन होतात.

भृगूच्या या निश्चयाशी सर्व ब्रह्मवादी सहमत आहेत. ब्रह्म हे एकमेवाद्वितीय असल्यामुळे त्याच्यामध्ये स्वगत, सजातीय व विजातीय या तीन भेदांपैकी कोणताही भेद नाही. जर ब्रह्म हे शरीरवान असते, तर अवयव-अवयवी या रूपाने त्यात स्वगत-भेद आला असता. पण ब्रह्म तसे नाही. जर ब्रह्म एकाहून अधिक असते म्हणजेच अद्वितीय नसते, तर त्यात सजातीय भेद आला असता; पण ब्रह्म हे अद्वितीय असल्यामुळे तसा भेद संभवत नाही. जर ब्रह्मभिन्न असे एखादे विजातीय द्रव्य त्याच्या बरोबर असते, तर विजातीय भेद मानावा लागला असता. पण तशी वस्तुस्थिती नसल्यामुळे तसा भेद संभवत नाही. एतावता ब्रह्म हे भेदरहित आहे.

'जन्माद्यस्य यतः' या ब्रह्मसूत्रावर भाष्य करताना शंकराचार्यांनी ब्रह्माविषयी विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा –

नामरूपांनी व्यक्त झालेल्या, अनेक कर्ते आणि अनेक भोक्ते यांनी युक्त असलेल्या, विशिष्ट कर्मांचे फल विशिष्ट व्यक्तीला विशिष्ट देशात, विशिष्टच काली, विशिष्ट निमित्ताने मिळावे अशा विशिष्ट क्रिया व फल यांचा आधार असलेल्या आणि मनानेही ज्याच्या रचनेचे चिंतन करता येत नाही अशा या अचिंत्यस्वरूप जगाचे जन्म-स्थिति-लय ज्या सर्वज्ञ व सर्वशक्ती अशा कारणांपासून होतात ते ब्रह्म होय.

ब्रह्मकल्पनेचा विकास – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी याविषयी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा –

ब्रह्म शब्द ऋग्वेदाइतका प्राचीन आहे. तिथे त्याचा अर्थ मात्र देवतांचे माहात्म्य वर्णन करणारे काव्य किंवा सूक्त असा आहे. ऋग्वेदात देवस्तुतिविषयक सूक्ताला सामर्थ्यवान् मानले आहे. देवांना उत्साह व सामर्थ्य देणे, त्यांचे पोषण व संवर्धन करणे हे ब्रह्माचे म्हणजे सूक्ताचे माहात्म्य आहे. ब्रह्माने प्रेरित झालेल्या इंद्राने विशालकाय बनून स्वर्ग व पृथ्वी यांना व्यापून टाकले, असे ऋग्वेदात म्हटले आहे (ऋ ३·३४·१).

विश्वामित्रस्य रक्षति ब्रह्मेदं भारतं जनम् ।

(ऋ. ३·५३·१२)

अर्थ – विश्वामित्राचे ब्रह्म म्हणजे स्तोत्र हे भारतजनांचे रक्षण करीत आहे.

या मंत्रात त्याचे रक्षणसामर्थ्य व्यक्तवलेले आहे. अशी स्तोत्रे व सूक्ते रचणारा जो वर्ग त्या वेळी होता, त्यालाही लक्षणेने ब्रह्म अशीच संज्ञा मिळाली. राजापेक्षाही या वर्गाचे महत्त्व अधिक मानले आहे. देवापेक्षाही देवाचे माहात्म्य कथन करणारे स्तोत्र हे अधिक सामर्थ्यशाली आहे, असा ऋग्वेदाचा आशय आहे. ऋग्वेदाच्या वातावरणात ऋषींच्या हृदयात अशी भावना दृढमूल झाली, की ब्रह्म हे विश्वशक्तीचा स्रोत आहे, त्याच्या ठिकाणी अद्‌भुत सामर्थ्य आहे आणि ते विश्वाचे प्राणभूत तत्त्व आहे. पुढच्या कालांत ब्रह्ममाहात्म्य जे एवढे वाढले त्याला ऋग्वेदाची अशी ही पार्श्वभूमी लाभली आहे.

उपनिषदांतल्या ब्रह्मविचारांवर अथर्ववेदाचे ऋण स्पष्ट दिसते. उपनिषत्पूर्व वैदिक वाङ्मयात ब्रह्म शब्द पुंलिंगी आहे, पण उपनिषदांत तो शब्द अंतिम सत्य या अर्थी नपुंसकलिंगी आला आहे.

अथर्ववेदात ब्रह्माला प्रथम म्हणजे पहिल्याप्रथम उत्पन्न झालेले व सर्वांमध्ये ज्येष्ठ असे म्हटले आहे (४·१·१). उपनिषदांत जो ब्रह्मविचार वाढला, विस्तारला त्याची चार बीजभूत तत्त्वे अथर्ववेदात दिसतात, ती अशी – (१) मानवशरीर हे ब्रह्मपुर असून, त्यात ब्रह्म प्रविष्ट झाले आहे. (२) ब्रह्म हे स्कंभ म्हणजे सर्वांचे नियत्रंण करणारी शक्ती आहे. (३) ब्रह्म सर्वांमध्ये ज्येष्ठ आहे. (४) ब्रह्म हे विश्वात्मक आहे. उपनिषदांतल्या ब्रह्म शब्दाचा भावार्थ आहे, तो असा–(१) शाश्वत स्वयंभू विश्वशक्ती (२) स्वतंत्र व संपूर्ण असे आध्यात्मिक प्रेरक तत्त्व व (३) आनंदाचे चेतन व स्वयंपूर्ण आगर. एका वाक्यात सांगायचे तर उपनिषदांतले ब्रह्म हे उत्साह, स्फूर्ती, आनंद, स्वसंवेद्यता, सामर्थ्य व स्वातंत्र्य यांचे आगर आहे. आणि या विचारावर अथर्ववेदाची छाप निश्चितपणे आहे.

ब्रह्मवर्णन – उपनिषदांनी ब्रह्माचे वर्णन होकार व नकार अशा उभय पद्धतीनी केले आहे –

तेजोमयोऽतेजोमयः, काममयोऽकाममयः, क्रोधमयोऽक्रोधमयः, धर्ममयोऽधर्ममयः, सर्वमयस्तद्यदेतत् इदंमयोऽदोमयः ।

(बृहदा. ४·४·५)

अर्थ – ब्रह्म हे तेजोमय व अतेजोमय, काममय व अकाममय, क्रोधमय व अक्रोधमय, धर्ममय व अधर्ममय असे दोन्हीही आहे. कारण ते सर्वमय आहे. ते जवळ व दूर, हे व ते दोन्हीही आहे.

नान्तःप्रज्ञं न बहिष्प्रज्ञं नोभयतः प्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् ।

(मांडूक्य ७)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – ब्रह्म अंतःप्रज्ञ नाही, बहिष्प्रज्ञ नाही व उभयतः-प्रज्ञही नाही. ते प्रज्ञानघनही नाही. ते प्रज्ञही नाही व अप्रज्ञही नाही.

वरील वर्णने एकंदरीत नकारात्मकच आहेत, हे सहज कळून येईल. पण कोणत्याही ब्रह्मवाद्याने ब्रह्माचे वर्णन नकारात्मक शब्दांनी कितीही कसोशीने केले, तरी त्या वर्णनात थोडा तरी अस्तिभाव आल्यावाचून राहत नाही. मांडूक्योपनिषदातील वरील वर्णन किंवा 'अस्थूलम् अनणु अन्हस्वं अदीर्घम्' = ब्रह्म हे स्थूल नाही, अणू नाही, ऱ्हस्व नाही, दीर्घ नाही (२·८·८) इत्यादी बृहदारण्यकातील वर्णन पूर्णपणे नकारात्मक असले, तरी कठा व मुंडक या उपनिषदांतील वर्णन अस्ति व नास्ति असे उभय भावदर्शक आहे –

अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं तथाऽरसं नित्यमगन्धवच्च यत् ।
अनाद्यनन्तं महतः परं ध्रुवं निचाय्य तन्मृत्युमुखात्प्रमुच्यते ।
(कठ. १·३·१५)

अर्थ – ब्रह्म हे अशब्द, अस्पर्श, अरूप, अव्यय, अरस, अगंध, अनादी, अनंत, मोठ्याहून मोठे व ध्रुव असून, त्याला हृदयात साठविले असता मनुष्य मृत्युमुखातून सुटतो.

यत्तद्रेश्यमग्राह्यमगोत्रमवर्णमचक्षुःश्रोत्रं तदपाणिपादम् ।
नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मं तदव्ययं तद्भूतयोनिं
परिपश्यन्ति धीराः ॥
(मुंडक. १·१·६)

अर्थ – ब्रह्म हे बोटाने दाखवता येत नाही. ते अग्राह्य, अगोत्र, अवर्ण, डोळे व कान नसलेले, हातपाय नसलेले, नित्य, विभू, सर्वव्यापी, अत्यंत सूक्ष्म, अव्यय व सर्व भूतांचे उत्पत्ति-कारण आहे.

'नेति नेति' असे जे सुप्रसिद्ध नकारात्मक ब्रह्मवर्णन आहे, त्याचा अर्थदेखील नकार व होकार अशा दोन्ही प्रकारे लावता येतो.

ब्रह्म पूर्णपणे एकजिनसी आहे. त्याच्या कोणत्याही एका भागाचे ज्ञान झाले असता निखिल ब्रह्माचे ज्ञान होते. कारण सर्वांचे आधारभूत व अंतिम तत्त्व ब्रह्म हेच एक आहे (छांदो. ६.१.२.७).

'सर्वं खल्विदं ब्रह्म' = जे आहे ते सर्व ब्रह्म आहे, या प्रसिद्ध ब्रह्मवर्णनात सर्व होकारात्मक अर्थ साठविलेला आहे. ब्रह्माचे सामर्थ्य वर्णिताना मुंडकोपनिषदात पुढील दोन मंत्र दिलेले आहेत –

यथोर्णनाभिः सृजते गृह्णते च यथा पृथिव्यामोषधयः सम्भवन्ति ।
यथा सतः पुरुषात्केशलोमानि तथाक्षरात्सम्भवतीह विश्वम् ॥
(मुंडक. १·१·७)

अर्थ – कोळी ज्याप्रमाणे आपल्या पोटातून काढलेल्या तंतूंनी आपले जाळे विणतो किंवा पृथ्वीच्या पृष्ठभागावर जशा औषधी वनस्पती उगवतात किंवा जिवंत मनुष्याच्या मस्तकावर व शरीरावर केस उगवतात, त्याप्रमाणे या अव्यय ब्रह्मापासून निखिल विश्व निर्माण होते.

तदेतत्सत्यं यथा सुदीप्तात्पावकाद्विस्फुलिङ्गाः सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः । तथाक्षराद्विविधाः सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवापियन्ति ।
(मुंडक. २·१·१)

अर्थ – हे सत्य आहे, की प्रज्वलित अग्नीपासून ज्याप्रमाणे हजारो ठिणग्या उत्पन्न होतात व त्यातच मिळून जातात, त्याप्रमाणे या अक्षर ब्रह्मापासून अनेकविध प्राणी उत्पन्न होतात व त्यामध्येच लय पावतात.

'तत्त्वमसि' या महावाक्याने मानवी जीवात्मा व ब्रह्म या दोहोंचे ऐक्यच प्रतिपादलेले आहे. या ब्रह्माचे ज्ञान करून घ्यावे, त्याच्याशी एकरूप व्हावे म्हणजे अमृतत्वाची प्राप्ती होते, असे उपनिषदांत म्हटले आहे. याच ब्रह्माचे ज्ञान मिळवून धन्य होण्यासाठी सत्यकाम जाबाल गौतम ऋषीकडे गेला. उपकोसल याने त्याच गोष्टीसाठी सत्यकामाला गुरू केले. श्वेतकेतू याच एका आकांक्षेने आरुणीला व भृगू वरुणाला शरण गेला. असे अनेक शिष्य ब्रह्मविद्या संपादण्यासाठी गुरूला शरण गेल्याच्या कथा उपनिषदांत व पुराणांत आहेत. त्या काली ब्रह्मविद्या ही सर्वश्रेष्ठ विद्या मानली जात असे.

पण ब्रह्मविद्या अवगत करायला सूक्ष्म व प्रखर अशी बुद्धि-मत्ता लागते. निर्गुण-निराकार अतएव अनिर्वचनीय ब्रह्म जाणून घेणे ही गोष्ट सामान्य मनुष्याच्या आटोक्यातली नाही. मानव हा सान्त असल्यामुळे साधारणतः अनंत ब्रह्माचे ग्रहण करण्यास तो असमर्थ असतो. वैदिक व औपनिषदिक ऋषींना या सामान्य माणसाचेही भान होते व त्याच्या शाश्वत कल्याणाचा कळवळाही होता. म्हणून त्यांनी सामान्य माणसाला ईश्वर नावाचा परम पुरुष मिळवून दिला. निर्गुण ब्रह्माची मानवी बुद्धीने कल्पिलेली मूर्ती म्हणजे सगुण ब्रह्म किंवा ईश्वर होय. या ईश्वराचे वर्णनही उपनिषदांनी आणि गीतेने ब्रह्मासारखेच केले आहे. ईश्वर हा विश्वाचा कर्ता, रक्षिता, पिता, मित्र व नियंता आहे. तो या विश्वाचे नियंत्रण करतो आणि ते बाहेरून नव्हे, तर विश्वात ओतप्रोत भरून राहून. तो सर्वांच्या अंतर्यामी आहे व सर्वांना व्यापून आहे. ब्रह्म जेव्हा उपाधीने युक्त होते, तेव्हा ते ईश्वर बनते. ईश्वर जेव्हा उपाधिरहित होतो, तेव्हा तो ब्रह्म होतो. म्हणूनच ब्रह्माला मूर्त व अमूर्त असे म्हटले आहे. ईश्वराचे सर्वातीतत्व, अज्ञेयत्व व सर्वव्यापकत्व यांच्यावर भर देण्यासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला निर्गुण-निराकार ब्रह्म म्हणतात व भक्ताच्या साधनेसाठी आवश्यक अशा सगुण स्वरूपाला ईश्वर म्हणतात.

ब्रह्मविद्या – 'ब्रह्मविद्यां सर्वविद्याप्रतिष्ठाम्' = ब्रह्मविद्या ही सर्व विद्यांची प्रतिष्ठा आहे, असे मुंडकोपनिषदात म्हटले आहे (१·१·१). इतर सर्व विद्या या माणसाला इहलोकी उत्कर्ष मिळवून देणाऱ्या असल्या, तरी त्या मनुष्याला शाश्वत आनंद व मोक्ष मिळवून देण्यास असमर्थ आहेत. मोक्ष देणारी विद्या म्हणजे ब्रह्मविद्याच होय. म्हणून तिला सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. तिचे हे महत्त्व जाणूनच श्रीकृष्णाने तिला राजविद्या आणि राजगुह्य असे म्हटले आहे (गीता ९·२). संशय व विपरीत भावना यांनी रहित अशी अखंड ब्रह्माकारवृत्ती म्हणजे ब्रह्मविद्या होय. श्रवण, मनन व निदिध्यास यांची परिपक्व अवस्था झाल्यावर या अखंड ब्रह्माकारवृत्तीचा लाभ होतो. यासाठी प्रथम गुरू व शास्त्र-वचने यांच्यावर दृढ श्रद्धा ठेवून 'अहं ब्रह्मास्मि' 'सर्वं खल्विदं ब्रह्म' इ. वचनांचा निरंतर अभ्यास करावा. त्यामुळे हळूहळू द्वैतभ्रांतीचा नाश होतो व अद्वैत ब्रह्मतत्त्वाचा प्रकाश होतो. याविषयी पंचदशीत (९·५५) सांगितले आहे ते असे –

अनुभूतेरभावेऽपि ब्रह्मास्मीत्येव चिन्त्यताम् ।
अप्यसत्प्राप्यते ध्यानान्नित्याप्तं ब्रह्म किं पुनः ।।

अर्थ– अनुभव न आला तरीही 'मी ब्रह्म आहे' अशी भावना करावी. ध्यानामुळे अविद्यमान वस्तूचीही प्राप्ती होते. मग सदा सत् (विद्यमान) असलेले ब्रह्म ध्यानाने का प्राप्त होणार नाही ?

'अहं ब्रह्मास्मि' = मी ब्रह्म आहे, या भावनेत अहंकार असून, तो बंधाला कारणीभूत होतो, मोक्षाला नव्हे, असा त्या संबधात काही लोकांचा आक्षेप आहे; पण तो खरा नाही. 'अहं ब्रह्मास्मि' हा अहंकार असला तरीही तो शुद्ध अहंकार आहे; तो बंधक ठरत नाही. 'मी देह आहे' अशा जातीचा अहंकार मात्र बंधाला कारणीभूत होतो. वस्तुजाताला ब्रह्मरूप मानणारा, अनेकांचा एकत्वात विलय करणारा आणि ब्रह्मभिन्न वस्तूची स्वतंत्र सत्ताच न मानणारा असा हा अहंकार वस्तुतः अहंकारच नव्हे. तत्त्वदर्शी व मुमुक्षू यांची 'अहं ब्रह्मास्मि' ही भावना शुद्ध, पवित्र, आनंदमय आणि संसारसागरातून तारून नेणारी भावना असते. तिलाच ब्रह्मविद्या म्हणायचे. ही ब्रह्मविद्या 'याचि देही याचि डोळा' ब्रह्मानुभव घडविणारी आहे, हे सांगताना बृहदारण्यकोपनिषदात (४·४·७) म्हटले आहे, ते असे –

यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुत इति ।।

अर्थ — जेव्हा हृदयस्थ सर्व कामना अद्वैत ब्रह्मतत्त्वाच्या अपरोक्ष ज्ञानाने छिन्नभिन्न होतात, तेव्हा मर्त्य हा अमृत होतो. जीवितावस्थेतच त्याला ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती होते.

तैत्तिरीय उपनिषदातला पुढील मंत्रही (तै. उ. २·७) हाच आशय व्यक्त करतो —

यदा ह्येवैष एतस्मिन्नदृश्येऽनात्म्येऽनिरुक्तेऽनिलयनेऽभयं प्रतिष्ठां विन्दते । अथ सोऽभयं गतो भवति । यदा ह्येवैष एतस्मिन्नुदरमन्तरं कुरुते । अथ तस्य भयं भवति ।।

अर्थ — अद्वैत ब्रह्मतत्त्वाच्या अपरोक्ष साक्षात्काराने जेव्हा मुमुक्षू द्वैतप्रपंचशून्य, स्थूलादिशरीररहित, बुद्धयादींना अविषय, सर्वांचे लयस्थान आणि मायेच्या अतीत अशा परब्रह्मामध्ये अभेदरूप व भयरहित अशी स्थिती मिळवतो, तेव्हा तो स्वतः भयरहित होऊन ब्रह्मपदी प्रतिष्ठित होतो. जेव्हा कोणी दुराग्रहीपणे त्या अद्वैतपरिपूर्ण अशा ब्रह्मालयाच्या ठिकाणी थोडीही उपास्यउपासकादी भावांनी भेदबुद्धी धारण करतो, तेव्हा त्याला भय उत्पन्न होते. (अर्थात संसारातल्या जन्म, मृत्यू, इ. भयांतून मुक्त होऊ शकत नाही.)

परब्रह्माचा अभेदरूपाने साक्षात्कार अनुभवणारा मनुष्य ज्या अवस्थेला प्राप्त होतो, तिला श्रीकृष्णाने ब्राह्मी स्थिती असे म्हटले आहे. ही ब्राह्मी स्थिती प्राप्त झाल्याने मनुष्याला कधीही मोह होत नाही. पाहा – ईश्वर, आत्मा. [उ. र.; हिं. सा. को.; वे. शा. दी.; उ. सा.; वै. सं. वि.; भा. द. सं.]

ब्रह्मकपाल एक प्रसिद्ध तीर्थस्थान. हे स्थान हिमालयातील अलकनंदा नदीत आहे. ब्रह्मकपाल ही एक उंच शिला असून तिचा काही भाग गंगेत आहे. तिच्यावर बसून श्राद्ध केल्याने माणसाच्या सर्व पूर्वजांना मुक्ती मिळते व पुन्हा कधीही श्राद्ध करावे लागत नाही, असा समज आहे. ब्रह्मकपालाविषयी एक कथा आहे, ती अशी —

एकदा शिवाने ब्रह्मदेवाच्या पाच मस्तकांपैकी एक मस्तक छेदले. त्यामुळे शिवाला ब्रह्महत्येचे पाप लागले. ते तुटलेले मस्तक शिवाच्या मस्तकावर जाऊन बसले. ते मस्तक फार जड असल्याने शिवाला त्याचा भार सहन होईना. तेव्हा ब्रह्महत्येचे पातक नष्ट होण्यासाठी व ते मस्तक आपल्या मस्तकावरून जाण्यासाठी शिव पृथ्वीतील सर्व तीर्थांत स्नान करून आला; पण काही उपयोग झाला नाही. शेवटी शिव बदरीकेदारला गेला. तिथे गंगेचे दर्शन होताच ते शिर त्या स्थानी गळून पडले आणि शिव ब्रह्महत्येच्या पातकातून मुक्त झाला. त्या वेळी ब्रह्मा, विष्णू, इ. देवांनी त्या ठिकाणी येऊन शिवाची स्तुती केली. ते सर्वजण म्हणाले, की ज्या अर्थी शिव या स्थानी येऊन पापमुक्त झाला, त्या अर्थी या शिलेवर बसून ज्याच्या नावाने पिंडदान केले जाईल, तो निरंतर ब्रह्मसदनी वास करील.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मदेवाचे हे तुटलेले मस्तक पुष्कळदा बौद्ध देवतांच्या हातात दाखवलेले असते. हिंदू देवतांसंबंधीच्या अनादराचे ते द्योतक आहे. [तीर्थयात्राप्रबंध; इं. बु. इ.]

ब्रह्मकूर्च एक काम्य व्रत. कार्तिक वद्य चतुर्दशी ही या व्रताची तिथी आहे. यात एक दिवस उपवास व दुसऱ्या दिवशी पंचगव्य प्राशन करतात. पंचगव्याची द्रव्ये शक्य तर निरनिराळ्या रंगांच्या गाईंची घेतात. दुसऱ्या दिवशी देवपूजा व ब्राह्मणपूजा करून अन्न ग्रहण करतात. फल- पापनाश. [हि. ध.]

ब्रह्मकृच्छ्र एक प्रायश्चित्त. या प्रायश्चित्ताचा कालावधी बारा दिवसांचा आहे. या कालावधीत रोज दुपारी देवालयात किंवा गोठ्यात जाऊन तिथे पंचगव्यहोम व पंचगव्य-प्राशन करायचे असते. तिथेच राहून सायंकाळपर्यंत विष्णूचे ध्यान करणे, रात्री मूर्तिसन्निध झोपणे व त्या कालावधीत अभ्यंग व तांबूलसेवन वर्ज्य करणे, असे त्याचे नियम आहेत. [हि. ध.]

ब्रह्मगिरी एक पवित्र पर्वत. हा नासिकपासून अठरा मैलांवर आहे. गोदावरी नदी याच डोंगरात उगम पावली असून, तिथे तिच्या उगमाचे एक छोटेसे कुंड आहे. याच्या पायथ्याला बारा ज्योतिर्लिंगांपैकी त्र्यंबकेश्वर हे स्थान आहे. ब्रह्मगिरीवर गौतम ऋषीचा आश्रम होता. या भूमीत भाताचे पीक काढण्याचा पहिला यशस्वी प्रयोग त्याने केला, अशी कल्पना आहे.

या डोंगराच्या कुशीतच गोरखगुंफा नावाची एक गुंफा आहे. गोदावरीच्या उगमापासून एक पाऊलवाट या गुंफेकडे जाते. या गुंफेतच गहिनीनाथ व निवृत्तिनाथ या गुरु-शिष्यांची प्रथम गाठ पडली, असे सांगतात. ब्रह्मगिरीचा माथा समुद्रसपाटीपासून सुमारे सव्वाचार हजार फूट उंच आहे. पंजाबातल्या दोन धनिकांनी इ. स. १९०८ मध्ये या डोंगराला सुमारे पाचशे पायऱ्या बांधल्या आहेत. त्यामुळे डोंगराची चढण बरीच सोपी झाली आहे.

ब्रह्मगिरीच्या पठारावर यादवकाळातला एक मोठा गिरिदुर्ग होता. इ. स. १६३० मध्ये हा किल्ला शहाजहानने घेतला. पुढे इ. स. १७२० मध्ये निजामाने त्याच्यावर स्वामित्व मिळविले. इ. स. १७५२ मध्ये मराठ्यांनी हा किल्ला काबीज केला. पेशवेकाळात तिथे मराठ्यांचा एक सैन्यविभाग होता. पुढे इंग्रजांनी हा किल्ला हस्तगत केला. पाहा – त्र्यंबकेश्वर. [ती. म.]

ब्रह्मगुप्त (५९८–६६५ इ. स.) एक प्रसिद्ध ज्योतिर्विद व गणिती. हा राजस्थानातील भिन्नमाळ या गावाचा रहिवासी होता. याच्या पित्याचे नाव जिष्णू असे होते. ब्राह्मस्फुटसिद्धान्त व खंडखाद्यक हे ब्रह्मगुप्ताचे दोन ग्रंथ फार प्रख्यात आहेत. ब्राह्मस्फुटसिद्धान्त या ग्रंथात चोवीस अध्याय असून, त्यांत ज्योतिष व गणित या दोन्ही शास्त्रांचे विवेचन केलेले आढळते. भास्कराचार्याने ब्रह्मगुप्ताला गणकचक्रचूडामणी ही पदवी दिली असून, त्याचे मूलांक सिद्धांतशिरोमणीच्या रचनेत आधारभूत मानले जातात.

ब्रह्मगुप्त हा स्वतः वेध घेऊन स्वतंत्रपणे संशोधन करणारा ज्योतिषाचार्य होता. ग्रहांची स्थाने निश्चित करण्याची स्वतंत्र रीत त्याने शोधून काढली. आर्यभटादी पूर्वाचार्यांच्या गणितावरून ग्रहांचे स्पष्ट स्थान बिनचूक मिळत नाही, पण ब्राह्मस्फुटसिद्धान्तावरून काढलेले स्पष्ट स्थान दृग्गणिताशी जुळते, असे त्याने म्हटले आहे.

ब्रह्मगुप्ताचा खंडखाद्यक हा ग्रंथ त्याने आर्यभटीय सिद्धांताच्या आधारानेच रचला. त्यात दहा अध्याय आहेत व त्यांत नक्षत्रादिकांच्या गणनेचे महत्त्वाचे नियम दिले आहेत. जैन लोक दोन सूर्य व दोन चंद्र मानतात, त्याचे ब्रह्मगुप्ताने खंडन केले आहे.

ब्रह्मगुप्ताची कीर्ती अरबस्तान व तुर्कस्तान या देशांतही पसरली होती. त्याच्या ग्रंथांचे भाषांतर अरबी भाषेतही झालेले आहे. [वै. वि. भा. प.; भा. ज्यो. इ.; म. च. को.]

ब्रह्मगुलाल (इ. स. चे १७ वे शतक) एक जैन भक्तकवी. हा उत्तर प्रदेशाच्या आग्रा जिल्ह्यातील यमुना नदीकाठच्या टापू नामक गावचा रहिवासी होय. याचा गुरू भट्टारक जगभूषण नावाचा होता. ब्रह्मगुलाल हा उत्तम बहुरूपी होता. त्याविषयी एक कथा सांगतात, ती अशी –

ब्रह्मगुलालाने एकदा सिंहाचे सोंग आणले आणि त्या सोंगात त्याच्या हातून एका राजकुमाराची हत्या झाली. त्यामुळे तो फार बेचैन झाला. मग त्या पापाच्या क्षालनासाठी तो जैन भिक्षू बनला. त्यातूनच त्याच्या वृत्तीत खरे वैराग्य बाणले आणि त्याला मुनी ही उपाधी प्राप्त झाली.

ब्रह्मगुलालाच्या सहा काव्यकृती उपलब्ध आहेत. त्यांची नावे अशी – (१) त्रेपनक्रिया (२) कृपणजगावतकथा (३) धर्मस्वरूप (४) समवशरणस्तोत्र (५) जलगालनक्रिया व (६) विवेकचौपाई. [हिं. ज. भ. क.; हिं. सा.]

ब्रह्मचर्य चार आश्रमांपैकी पहिला आश्रम. याची व्याख्या अशी – ‘ ब्रह्मणे वेदार्थं, चर्यं आचरणीयम् ’ = ब्रह्म म्हणजे वेद, त्यांच्या अध्ययनासाठी आचरणीय असे जे व्रत ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मचर्य होय. ते व्रत धारण करणारा तो ब्रह्मचारी समजावा. ब्रह्मचारी शब्दाची व्याख्या अशी–'ब्रह्म ज्ञानं तपो वा आचरति' = ब्रह्म म्हणजे वेदवेदांगादिज्ञान किंवा तप; त्यासाठी जो व्रताचरण करतो, तो ब्रह्मचारी होय. उपनयनानंतर नियम धारण करून व गुरुसान्निध्यात राहून जो सांगवेदांचे अध्ययन करतो तो ब्रह्मचारी होय, असे म्हटले आहे. महाभारताच्या नीलकंठी टीकेत ब्रह्मचर्याची व्यापक व्याख्या दिली आहे, ती अशी –

ब्रह्मण्येव चारः कायवाङ्मनसां प्रवृत्तिर्येषाम् ।

(शांति. १९२·२४ वरील टीका.)

अर्थ – जे मन, वाणी आणि कर्म यांच्याद्वारे ब्रह्माची (वेद व ईश्वर) सेवा करतात, ते ब्रह्मचारी होत.

महाभारतात ब्रह्मचर्याचे चार पाद सांगितले आहेत, ते असे – गुरुशुश्रूषा, वेदाध्ययन व क्रोध आणि अभिमान यांचा त्याग हा पहिला पाद. आचार्याच्या आवडत्या कार्यात पूर्णपणे सहभागी होणे आणि आचार्यपत्नी व आचार्य पुत्र यांची यथोचित सेवा करणे हा दुसरा पाद. आचार्यांच्या अनुग्रहाचे सदैव स्मरण ठेवून त्याच्या ठिकाणी श्रद्धा ठेवणे हा तिसरा पाद. आणि निरभिमानी व विनीत होऊन गुरूला भक्तियुक्त अंतःकरणाने दक्षिणा देणे हा चौथा पाद होय (उद्योग. ४४·२–१५).

ब्रह्मचर्याच्या पालनाने जे अनेक लाभ होतात, त्यांचे विवेचन उद्योग पर्वातल्या सनत्सुजात उपपर्वात केलेले आहे. त्याचा आशय असा – ब्रह्मचर्याच्या शक्तीनेच देवांना देवत्व मिळाले. ऋषींची ब्रह्मलोकप्राप्ती ब्रह्मचर्याच्याच आधीन आहे. जे लोक ब्रह्मचर्याचे माहात्म्य जाणतात व त्याचे आचरण करतात, ते सर्वत्र निर्भय, आत्मतृप्त व सदाप्रफुल्ल असतात. प्रत्येक अभीष्ट वस्तू ब्रह्मचर्याच्या द्वारे प्राप्त होऊ शकते.

व्यक्तीच्या बाबतीत ब्रह्मचर्याचा काल हा भावी जीवनाला अत्यंत उपयुक्त असा काल आहे. त्या कालात विद्या, शरीरबल व मनोबल यांची साधना करायची असते. हा शक्तिसंचयाचा काल असल्यामुळे संसारातल्या आमोद–प्रमोदांना विमुख होऊन श्रम साणि साधना यांची कास या कालात धरायची असते. हे सर्व जाणून गौतम, बोधायन, वसिष्ठ, मनू, इ. सर्व धर्मशास्त्रकारांनी आश्रमव्यवस्थेत ब्रह्मचर्याला पहिले स्थान दिले आहे.

ब्रह्मचर्य कल्पनेचा इतिहास – ऋग्वेदामध्ये ब्रह्मचारी शब्दाचा उल्लेख पुढील ऋचेत झाला आहे –

ब्रह्मचारी चरति वेविषद्विषः । स देवानां भवत्येकमङ्गम् ।

(ऋ. १०·१०९·५)

अर्थ – जो ब्रह्मचर्याने वागतो म्हणजेच तप आणि प्रार्थना यांत निमग्न राहतो, तो सर्वव्यापी कर्तव्यात गढून गेल्यासारखा असतो. तो देवांपैकीच एक होतो.

तैत्तिरीय संहितेत मनुष्याची तीन ऋणे सांगितली असून, त्यांपैकी ऋषींचे ऋण ब्रह्मचर्याच्या पालनाने फिटते, असे म्हटले आहे. अथर्ववेदात ब्रह्मचर्याचे अनेक नियम उपलब्ध होतात. ब्रह्मचारी आपली मेखला, समिधा व श्रमशीलता, यांनी सर्व विश्व तपोमय करतो, असे तिथे सांगितले आहे (११·८·१·६). ब्राह्मणांतल्या अनेक उल्लेखांवरून असे दिसते, की या काळात उपनयनानंतर ब्रह्मचारी आपले घर सोडून आचार्यांच्या घरी राहायला जात व तिथे अध्ययन करीत. गुरुगृहात राहत असल्यामुळे तैत्तिरीय उपनिषदात ब्रह्मचाऱ्याला अंतेवासी (जवळ राहणारा) म्हटले आहे (तै. उ. १·११·१). गुरुगृही राहून गुरूची गृहकृत्ये करणे व त्याच्या पशुधनाचे रक्षण करणे, ही त्याच्या ब्रह्मचर्याची कर्तव्ये होत, असे शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे (३·१२·१५). गोपथ ब्राह्मणात समिधा गोळा करणे व भिक्षावृत्तीवर जगणे या गोष्टी ब्रह्मचाऱ्याला आवश्यक कर्तव्ये म्हणून सांगितल्या आहेत (२·५·७). छांदोग्योपनिषदात उद्दालक आरुणी आपला पुत्र श्वेतकेतू याला ब्रह्मचर्य धारण करून गुरुगृहात जाण्याचा व तिथे विद्याध्ययन करण्याचा आदेश देताना दिसतो (६·१·१–२).

मनूने ब्रह्मचाऱ्यासाठी काही विधिनिषेध सांगितले आहेत, (२·१७५–१७९) ते असे –

सेवेतेमांस्तु नियमान्ब्रह्मचारी गुरौ वसन् ।
सन्नियम्येन्द्रियग्रामं तपोवृद्ध्यर्थमात्मनः ॥
नित्यं स्नात्वा शुचिः कुर्याद्देवर्षिपितृतर्पणम् ।
देवताभ्यर्चनं चैव समिदाधानमेव च ॥
वर्जयेन्मधु मांसं च गन्धं माल्यं रसान्स्त्रियः ।
शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनां चैव हिंसनम् ॥
अभ्यङ्गमञ्जनं चाक्ष्णोरुपानच्छत्रधारणम् ।
कामं क्रोधं च लोभं नर्तनं गीतवादनम् ॥
द्यूतं च जनवादं च परिवादं तथानृतम् ।
स्त्रीणां च प्रेक्षणालम्भमुपघातं परस्य च ॥

अर्थ – ब्रह्मचाऱ्याने गुरूसमीप राहून आणि इंद्रियनिग्रह करून स्वतःच्या तपाची वृद्धी व्हावी, यासाठी पुढील नियम आचरावे– नित्य स्नान करून व शुचिर्भूत होऊन देव, ऋषी आणि पितर यांचे तर्पण व देवतांचे पूजन करावे आणि सकाळ–संध्याकाळ अग्नीत समिधा द्याव्या. मद्य व मांस खाऊ नये. सुगंधी द्रव्ये, माला, रस व स्त्रिया यांचे वर्जन करावे. आम्लरसयुक्त पदार्थ किंवा फळे खाऊ नयेत. प्राणिहिंसा करू नये. अभ्यंगस्नान, डोळ्यात काजळ, छत्री, पादत्राण, तसेच काम, क्रोध, लोभ, नृत्य, गीत, वाद्य, द्यूत, गप्पागोष्टी, परदोषांचा उच्चार, असत्य या गोष्टी वर्ज्य कराव्या. विषयवासना मनात धरून अनुरागाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्त्रियांकडे पाहणे व त्यांची जवळीक करणे हे वर्ज्य समजावे. दुसऱ्या कोणाचा अपकारही करू नये.

मनूने ब्रह्मचाऱ्याच्या भोजन, वस्त्र, मेखला, कमंडलू, यज्ञोपवीत, इ. गोष्टींत तपशीलवार नियम सांगितले आहेत. त्याशिवाय मनूने पुढे सांगितले आहे ते असे — ब्रह्मचारी जितेंद्रिय असेल तरच त्याला विद्या प्राप्त होईल. ज्याचे भाव दूषित आहेत, जो इंद्रिये आणि विषय यांच्या जाळयात सापडला आहे आणि इंद्रियांच्या विषयास्वादामुळे ज्याला हर्ष-विषाद होतात, त्याला वेदाध्ययन किंवा ज्ञानप्राप्ती दुर्घट आहे.

वरील नियमच कमीजास्त फरकाने गौतम, गोभिल, बोधायन, इ. सूत्रकारांनी सांगितले आहेत.

वरील नियमांव्यतिरिक्त भिक्षावृत्ती स्वीकारणे म्हणजेच माधुकरी मागून जेवणे, हाही एक महत्त्वाचा नियम होता. ब्रह्मचाऱ्याने भिक्षा मागून आणावी, ती गुरूला समर्पावी व गुरूने दिलेल्या किंवा गुरू देईल तेवढयाच अन्नावर उपजीविका करावी, असे सांगितले आहे. महाभारताच्या आदिपर्वातली धौम्य व उपमनू यांची कथा या बाबतीत प्रसिद्ध आहे. त्रैवर्णिकांपैकी कोणाच्याही घरी माधुकरी मागायला हरकत नव्हती. मात्र जिथे माधुकरी घ्यायची ते घर सात्त्विक व शुचिर्भूत असावे, एवढीच अपेक्षा होती. एक वेळ पोट भरेल एवढीच माधुकरी मागायची असे. ब्रह्मचाऱ्याच्या स्वभावात नम्रतेची भावना निर्माण व्हावी, तसेच आपण अनेकांच्या घरच्या अन्नावर उपजीविका करून विद्या संपादन केली, याचा अर्थ तितक्या मंडळींचे ऋण आपल्या शिरावर आहे आणि ते दान व परंपरा यांच्या द्वारे आपण फेडले पाहिजे, ही जाणीव आयुष्यभर विद्यार्थ्याच्या मनात जागृत राहावी, या उद्देशाने शास्त्रकारांनी ही भैक्ष्यवृत्ती ब्रह्मचाऱ्याच्या मागे लावून दिली होती, हे उघड आहे. गृहस्थांनी विद्यार्थ्याला माधुकरी वाढावी आणि त्याची विद्या पूर्ण व्हायला मदत करावी, असाही नियम शास्त्रकारांनी घालून दिला आहे.

मात्र ब्रह्मचर्य भिक्षावृत्तीवरच पुरे करणे हा नियम पुढच्या काळात शिथिल झाला असावा, असे वाटते. धर्मग्रंथांतील काही वचनांवरून माधुकरीचा हा नियम पुढच्या काळात सर्वच ब्रह्मचारी पाळीत नसत असे दिसते. सप्ताहातून जो एक दिवससुद्धा माधुकरी मागत नाही, त्या ब्रह्मचाऱ्याला गोपथ ब्राह्मण (१.२.१-८) व बौधायन धर्मसूत्र (१.२.५२) या ग्रंथांत प्रायश्चित्त सांगितले आहे. यावरून प्रस्तुत नियमाचे शैथिल्य कळून येईल. बारा वर्षांच्या वयापर्यंतचे ब्रह्मचारी माधुकरी मागत नसत किंवा त्यांनी माधुकरी मागू नये असेही सुमंतूचे वचन आहे. श्रीमंत आईबापांचे मुलगे तर गुरूच्या घरी जेवून त्याच्या मुलाप्रमाणे राहत. मानवगृह्यसूत्रांत 'भैक्ष्याचार्यवृत्तिः स्यात्' असे एक सूत्र आहे (११.२) = ब्रह्मचाऱ्याने भिक्षा मागून किंवा आचार्यांच्या घरी जेवून वृत्ती चालवावी, असा विकल्प त्यात सांगितला आहे. मात्र ब्रह्मचर्य संपवून समावर्तन केल्यावर भिक्षा मागायची नाही, असाही दंडक घालून दिला आहे (बौ. ध. सू. २.१.६३). या मागे एखाद्याला भिक्षेची चटक लागू नये, त्याने स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःच्या परिश्रमाने आपला चरितार्थ चालवावा, कोणाला भारभूत होऊ नये, हा बोधायनाचा उद्देश असला पाहिजे.

ब्रह्मचाऱ्याच्या वेषाबद्दलही धर्मशास्त्रकारांनी सांगितले आहे, ते असे — ब्रह्मचाऱ्याने कमरेखालच्या भागासाठी वासस व वरच्या भागासाठी उत्तरीय अशी दोनच वस्त्रे वापरावी. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ब्रह्मचाऱ्यांसाठी अनुक्रमे ताग, रेशीम व मृगाजिन यांचे वस्त्र असावे. ब्रह्मचाऱ्याने शिराचे मुंडन करावे, जटा वाढवाव्या किंवा डोक्यावर शेंडी ठेवावी, असा विकल्प मनू व गौतम सांगतात. ब्रह्मचाऱ्याला दंडधारण ही गोष्ट आवश्यक म्हणून सांगितली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनी अनुक्रमे पलाश, उदुंबर व बिल्व यांचा दंड वापरावा, असे आश्वलायन गृह्यसूत्रांत सांगितले आहे (१.१९.१३).

ब्रह्मचाऱ्याने महानाम्नी, महाव्रत, उपनिषद्‌व्रत व गोदान ही चार वेदव्रते आचरायची असतात. प्रत्येक व्रत एकेक वर्ष चालते. शांखायनगृह्यसूत्रांत शुक्रिय, शाक्वर, व्रातिक व औपनिषद अशी चार वेगळी व्रते सांगितली आहेत. इतर गृह्यसूत्रेही वेगवेगळी चार वेदव्रते सांगतात. या व्रतांचे नीट पालन न झाल्यास किंवा व्रतभंग झाल्यास ३, ६ किंवा १२ वेळा प्राजापत्य प्रायश्चित्त करावे असे सांगितले आहे. हे प्रायश्चित्त करून पुन्हा व्रताचा प्रारंभ करायचा. नित्यकर्माचे नियम मोडल्यास कृच्छ्रत्रय प्रायश्चित्त घेऊन महाव्याहृतिहोम करावा असे सांगितले आहे. ब्रह्मचाऱ्याने एखाद्या स्त्रीशी वैषयिक संबंध ठेवणे हे अत्यंत निंद्य मानलेले असून त्याबद्दल फार मोठी शिक्षा सांगितली आहे.

ब्रह्मचर्याचा कालावधी — वैदिक ब्रह्मचर्याश्रम बारा वर्षांच्या वयाला सुरू होत होता. त्या काळात वेदाध्ययनाला प्राधान्य होते. बारा वर्षांपासून वेदाध्ययन पूर्ण होईपर्यंत किंवा ज्ञानाची इच्छा पूर्ण होईपर्यंत विद्यार्थी शिकत राहत होते. इंद्राने प्रजापतीकडे १०१ वर्षे विद्याध्ययन केल्याचा छांदोग्योपनिषदात उल्लेख आहे (८.११.३). भरद्वाजाने ७५ वर्षे वेदांचे अध्ययन केल्याचा तैत्ति. ब्राह्मणात उल्लेख आला आहे (३.१०–११). गोपथ ब्राह्मणात प्रत्येक वेदाच्या अध्ययनासाठी १२ वर्षांचा काल धरून ४८ वर्षे ब्रह्मचर्यासाठी सांगितली आहेत (२.५).

पण असे दिसते, की जे विद्यार्थी गृहस्थाश्रमात प्रवेश करू इच्छीत, ते प्रायः १२ वर्षे अध्ययन करून समावर्तन करीत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मनूने तीन वेदांच्या अध्ययनासाठी ३६ वर्षे धरली आहेत; पण त्याचबरोबर १८ किंवा ९ वर्षांचे ब्रह्मचर्यही सांगितले आहे (३·१). मनुस्मृतीच्या कालात विद्यार्थी उपनयनापासून १२ वर्षेपर्यंत विद्याध्ययन करून, सामान्यपणे २५ वर्षांच्या वयाला स्नातक होत व गृहस्थाश्रम स्वीकारीत, असे दिसते.

पौराणिक कालात हा अवधी खूपच कमी झाला. त्या कालात ब्रह्मचर्याचा अवधी एक वर्ष किंवा तीन दिवस मानला गेला. चौथ्या दिवशी समावर्तन करण्याची रूढी सुमारे २५ वर्षांपूर्वी-पर्यंत प्रचलित होती. अलिकडे मुंजीच्या दुसऱ्या दिवशीच मुलाचे समावर्तन करून त्याला मोकळे करतात.

उपनिषत्कालात आणखी एक गोष्ट दिसते, ती अशी – त्या काळी ब्रह्मचारी होण्यासाठी अविवाहित असलेच पाहिजे, असा निर्बंध नव्हता. एखाद्या गृहस्थाला ज्ञानलालसा उत्पन्न होऊन तो अध्ययनासाठी गुरूकडे गेला, तर त्यालाही ब्रह्मचारी म्हणत असत. देवयान व पितृयान यांच्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी श्वेत-केतूचा बाप ब्रह्मचर्यव्रत घेऊन प्रवाहण राजाकडे राहिला होता (बृहदा. ६.२.४). याच प्रकारे प्राचीन शाल, सत्ययक्ष, इंद्रद्युम्न, इ. गृहस्थ अध्यात्मचर्चा करीत असता, जेव्हा त्या चर्चेतून निर्णायक सिद्धान्त निघेना, तेव्हा ते सगळे समित्पाणी होऊन अर्थात ब्रह्मचर्य स्वीकारून अश्वपती राजाकडे अध्ययनासाठी गेले, अशी कथा छांदोग्योपनिषदात दिली आहे. दक्षस्मृतीमध्ये याविषयी म्हटले आहे, (१.९) ते असे –

यो गृहस्थाश्रममास्थाय ब्रह्मचारी भवेत्पुनः ।
न यतिर्न वनस्थश्च सर्वाश्रमविवर्जितः ।।

अर्थ – जो पुरुष गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर पुनश्च ब्रह्मचारी होतो, तो यतीही नव्हे आणि वानप्रस्थही नव्हे. तो कुठल्याच आश्रमातला नसतो.

ब्रह्मचारीभेद – उपकुर्वाण व नैष्ठिक असे ब्रह्मचर्याचे दोन भेद सांगितले आहेत. वर ज्याचे विवेचन केले तो उपकुर्वाण होय. जो विद्यार्थी विद्येच्या अभिरुचीने आयुष्यभर आचार्यांच्या आश्रमात राहून ज्ञानसाधना करतो, त्याला नैष्ठिक ब्रह्मचारी म्हणतात. निष्ठा म्हणजे अंत किंवा मरण होय. यावरून आमरणान्त ब्रह्मचर्य व्रत धारण करणारा तो नैष्ठिक ब्रह्मचारी समजावा. विष्णू स्मृतीत (१.२४) त्याविषयी म्हटले आहे, ते असे –

वेदस्वीकरणे हृष्टो गुर्वधीनो गुरोर्हितः ।
निष्ठां तत्रैव यो गच्छेन्नैष्ठिकः स उदाहृतः ।।

अर्थ – ज्ञानग्रहणात सदैव आनंद मानणारा, गुरूच्या आधीन राहणारा, गुरूचे हित करणारा आणि गुरूच्या आश्रमात देह ठेवणारा असा जो पुरुष, तो नैष्ठिक ब्रह्मचारी म्हणावा.

नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याची कल्पना फार प्राचीन आहे. असे लोक देहपातापर्यंत गुरूच्या गृही राहत, त्याची सेवा करीत व फावल्या वेळात अध्ययन करीत. गुरूच्या मृत्यूनंतर ते त्याच्या पत्नीची सेवा-शुश्रूषा करीत, पुत्राला गुरु-सहकार्य देत व गुरूने स्वीकारलेल्या अग्नीची परिचर्या करीत. अग्नीला समिधा देणे, भिक्षा मागणे, जमिनीवर झोपणे, इ. आचार त्यांना आयुष्यभर पाळावे लागत. कधी कधी हे नैष्ठिक ब्रह्मचारी निरनिराळ्या शास्त्रांच्या अध्ययनासाठी एका आचार्याकडून दुसऱ्या आचार्याकडे जात. काही लोक फिरत राहून लोकांना नीतीच्या व सदाचरणाच्या कथा सांगत. जे लोक आचार्य बनून शिष्यांना सतत अध्यापन करीत, अशा नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यांना सर्वश्रेष्ठ समजले जाई. कण्व मुनी हा असाच नैष्ठिक ब्रह्मचारी होता व मालिनीच्या तीरावर आश्रम स्थापून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करीत राहिला होता. प्राचीन भारतात नैष्ठिक ब्रह्मचारी होणे, हे ध्येय सर्वश्रेष्ठ मानले जाई. इंद्रियसुख हे तुच्छ असून, आत्मसुख किंवा ब्रह्मानंद हे मनुष्याचे प्राप्तव्य आहे, अशी प्राचीन भारतीयांची धारणा होती. अशा धारणेचे काही लोक गृहस्थाश्रम स्वीकारीतच नसत आणि स्वीकारल्यास थोड्याच काळात घरादाराचा त्याग करून ब्रह्मानंदाच्या प्राप्तीसाठी वानप्रस्थ बनत. याविषयी बृहदारण्यकात मंत्र आहे, तो असा (३.५.१) –

एतं वै तमात्मानं विदित्वा ब्राह्मणाः पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति ।।

अर्थ – आत्म्याचे हे रहस्य जाणून ब्रह्मज्ञानाची इच्छा करणारे लोक अर्थात नैष्ठिक ब्रह्मचारी पुत्रांची, वित्ताची व स्वर्गादी लोकांची इच्छा टाकून भिक्षाचारी बनून संचार करीत असतात.

उपनिषत्कालात अशा ब्रह्मचाऱ्यांची संख्या बरीच असावी, असे वाटते. ही परंपरा इ. स. च्या ८ व्या शतकापर्यंत टिकली होती, असे युआन च्वांगच्या वर्णनावरून वाटते. त्याने भारतात त्याला भेटलेल्या नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यांचा गौरव पुढीलप्रमाणे केला आहे –

भारतात असे काही महामानव आहेत, की ज्यांनी साहित्य व संस्कृती यांच्या सागरात अवगाहन केले आहे. ते एकांतात ब्रह्मचर्यजीवन व्यतीत करतात. निंदा-स्तुतीची त्यांना पर्वा नसते. त्यांची कीर्ती सर्वत्र पसरलेली असते. राजे लोक अशा पंडितांचा आदर करतात. हे लोक सदैव ज्ञानरत असतात. ज्ञानप्राप्तीसाठी ते शेकडो मैलांचा प्रवास आनंदाने करतात. त्यांचा परिवार समृद्ध असला, तरी ते भिक्षेवरच जगतात. ज्ञानप्राप्तीसाठी निष्कांचन राहणे, यात त्यांना स्वतःचा गौरव वाटतो.

अशा प्रकारच्या नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यांच्या ज्ञानतृष्णेने व प्रदीर्घ चिंतनाने हिंदूंची निरनिराळ्या ज्ञानशाखांमध्ये विशेषतः तत्त्व-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञानामध्ये खूप प्रगती होऊ शकली, ही गोष्ट निःसंशय होय. अशा नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यांपैकी एकाचेही पूर्ण चरित्र आपणांस उपलब्ध होऊ शकत नाही, ही मात्र दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे.

बौद्ध व जैन या संप्रदायांनीही नैष्ठिक ब्रह्मचर्य स्वीकारले होते. बौद्ध धर्माचे कित्येक आचार्य ज्ञानार्जन व धर्मप्रसार यांसाठी नैष्ठिक ब्रह्मचर्य स्वीकारून गृहत्याग करीत व भिक्षुसंघात दाखल होत. आयुष्यभर ते ज्ञानदान व धर्मप्रसार करीत देशभर हिंडत. कित्येक जैन लोक बालपणीच आपल्या मुलांना साधुदीक्षा देत व ते आमरण नैष्ठिक ब्रह्मचारी राहत. ज्ञान, तप व त्यासाठी इंद्रियनिग्रह या गोष्टी त्यांनीही उच्च आध्यात्मिक म्हणून मानल्या आहेत. [प्रा. भा. सा. सां. भू.; भा. सं.; हि. ध.; पा. का. भा.; प. का. भा.; नि. सिं.; प्रा. भा. शि. प.]

ब्रह्मचारिव्रतलोपप्रायश्चित्तं उपनयनाच्या वेळी आणि अध्ययनकाळात पाळायचे नियम हे व्रतात गणले जातात. त्या नियमांचा भंग झाल्यास हे प्रायश्चित्त सांगितले आहे. यात कृच्छ्र करून अग्नी, वायू, सूर्य, प्रजापती, विश्वेदेव, इ. अठरा देवतांसाठी घृताच्या आहुती द्यायच्या असतात. कृच्छ्राच्या ऐवजी गोदान, तिलहोम, गायत्रीजप, इ. पर्याय सांगितले आहेत.

ऋग्विधानामध्ये या व्रतलोपाचे प्रायश्चित्त सांगितले आहे, ते असे – ब्रह्मचारी व्यक्तीने शिवालयात जाऊन 'तं वो धिया' या मंत्राचा लक्ष जप करावा. त्यामुळे ब्रह्मचारिव्रतातले न्यून असेल ते दूर होते. [ऋ. व्र. स.]

ब्रह्म जिनदास (इ. स. च्या १५ व्या शतकाचा उत्तरार्ध व १६ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक जैन भक्तकवी. भट्टारक सकलकीर्ती हा याचा थोरला भाऊ आणि गुरू होय. ब्रह्म जिनदासाने संस्कृत, हिंदी, इ. भाषांमधून ग्रंथरचना केली आहे. त्याच्या प्रमुख संस्कृत ग्रंथांची नावे अशी – (१) जंबूस्वामीचरित्र, (२) हरिवंश पुराण व (३) रामचरित्र. या भाषेतच त्याने काही पूजाग्रंथही रचले आहेत.

ब्रह्म जिनदासाचा हिंदी ग्रंथसंभारही विपुल आहे. त्यात आदी पुराण, कथाकोषसंग्रह, धनपालरास, मिथ्या दुकड, यशोधरचरित्र, सम्यकत्वरास, श्रेणिकरास, इ. ग्रंथ आहेत. आदिपुराणात दोनशे पंधरा पद्ये आहेत. संस्कृत आदी पुराण हा या ग्रंथाचा मूलाधार आहे, असे पंडितांचे मत आहे. [हिं. जै. भ. क.]

ब्रह्मणदेव कोकणातली एक ग्रामदेवता. याला ब्राह्मणदेव, ब्रह्मदेव अशीही अन्य नावे आहेत. या देवाची पूजा प्रामुख्याने महाराष्ट्र व गुजरात या दोन प्रदेशांत होते. काही ठिकाणी याची मूर्ती असते, तर काही ठिकाणी नुसताच तांदळा असतो. जिथे या देवाची मूर्ती असते, तिथे त्याच्या डोक्यावर मुकुट, गळ्यात अलंकार, कानांत कुंडले, एका हातात रुद्राक्षाची माळ, दुसऱ्या हातात कमंडलू आणि पायात खडावा असतात. याच्या गळ्यात जानवेही असते. काही मूर्तींच्या एका हातात झारी व दुसऱ्या हातात कमळ असते.

या देवाचा उत्सव ज्येष्ठ व श्रावण महिन्यांत करतात. त्या वेळी जेवणावळी घालतात. काही ठिकाणी मार्गशीर्ष महिन्यात निरेश्वराची जत्रा भरते, तेव्हा या देवतेला वस्त्रे वाहतात. दिवाळीनंतर या देवाजवळ भात झोडतात व त्याची वार्षिक समाराधना करतात.

हा गुजरातमधल्या कोकण्यांचाही देव आहे. एका सागाखाली शेंदूर लावलेला एक दगड, त्याच्या शेजारी मातीचा घोडा आणि एक निशाण, असे त्याचे स्वरूप असते. हा देव ब्राह्मणांची नसूनही त्याचा पुजारी मात्र ब्राह्मण असतो. या देवाचा नैवेद्य गुरवाला देतात. ब्राह्मण तो खात नाहीत. अणसुरे व देवगड येथे या देवाचे तांदळे आहेत. [चित्पावन]

ब्रह्मदंड प्रायश्चित्तादी कर्मांचा अधिकार प्राप्त होण्यासाठी ब्राह्मणांना द्रव्यरूपाने जो दंड देतात, त्याला ब्रह्मदंड अशी संज्ञा आहे. श्राद्धप्रसंगीही कर्त्याने हा ब्रह्मदंड द्यायचा असतो. तो देताना 'समस्तसम्पत्समवाप्ति॰' इत्यादी मंत्र म्हणायचे असतात. [सं. कौ.]

ब्रह्मदत्त एक महान वेदान्ती. आद्य शंकराचार्यांनी आपल्या बृहदारण्यकावरील भाष्यात याचा उल्लेख केला आहे (बृहदा १·४·७ वरील भाष्य). ब्रह्मदत्ताची काही मते वेदान्तदेशिकाचार्याने सर्वार्थसिद्धी नामक टीकेत दिली आहेत, ती अशी– जीव आणि जगत हे ब्रह्मातून उत्पन्न होतात आणि ब्रह्मातच विलीन होतात. 'तत्त्वमसि' इ. महावाक्यांतून उपनिषदांचा खरा उद्देश स्पष्ट होत नाही, तर तो अर्थ 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः' इ. नियोग–वाक्यांतून होतो. ब्रह्म आणि जीव यांच्यांत भिन्नत्व दिसत असले तरी, वस्तुतः जीव हा ब्रह्माहून भिन्न नाही. साधक कोणत्याही अवस्थेत असला, तरी त्याच्या हातून कर्माचा त्याग होऊ शकत नाही.

सुरेश्वराचार्य व ज्ञानोत्तम या टीकाकारांनी ब्रह्मदत्ताला ज्ञानकर्मसमुच्चयवादी म्हटले आहे.

ब्रह्मदत्त ध्याननियोगवादी आहे. तो जीवन्मुक्ती मानीत नाही. मोक्ष हे त्याच्या दृष्टीने अदृष्ट फल होय. [भा. सं. सा.; हिंदुत्व]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मदेव (१) ज्योतिषावरचा एक ग्रंथकार. याने करणप्रकाश नावाचा एक करणग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात आर्यभटीयाच्या ध्रुवांकांना लल्लाचे बीजसंस्कार करून गणित केलेले आहे. ग्रंथाचा आरंभकाल चैत्र शु. प्रतिपदा शके १०१४ असा दिलेला आहे. ग्रंथात नऊ अधिकार असून, त्यांत ज्योतिषासंबंधी सर्व गोष्टींचा केलेला आहे. या ग्रंथात ४४५ शकाला शून्य अयनांशाचा काळ मानला आहे व अयनांशाची वार्षिक गती एक विकला मानलेली आहे. हा ग्रंथ आर्य पक्षाचा आहे. त्यामुळे दक्षिणेतील माध्व संप्रदायाचे वैष्णव याच ग्रंथानुसार एकादशीचे व्रत करतात. [भा. ज्यो. इ.]

(२) एक देवता. पाहा—ब्रह्मा.

ब्रह्मद्वादशी एक काम्य व्रत. पौष शुद्ध द्वादशीला ज्येष्ठा नक्षत्र असेल, त्या वेळी या व्रताला आरंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. विष्णू ही व्रताची देवता. याचा विधी असा— प्रत्येक महिन्यात द्वादशीला विष्णूची पूजा करावी आणि उपवास करावा. त्याचप्रमाणे दर महिन्यात तूप, तांदूळ आणि सातू अशा निरनिराळ्या पदार्थांचे दान करावे. वर्षाच्या अखेरीला उद्यापन करावे. फल — सर्व इच्छांची तृप्ती. [हि. ध.]

ब्रह्मध्वजपूजा चैत्र शुद्ध प्रतिपदेला जो ध्वज उभारतात, त्याला ब्रह्मध्वज हे नाव आहे. या ध्वजाची त्या दिवशी पूजा करायची असते. गुढीपाडवा या नावाने हा दिवस परिचित आहे. पाहा— गुढीपाडवा.

ब्रह्मपुत्र आसामातला एक महानद. याला ब्रह्मपुत्रा असेही म्हणतात. हा शब्द मूळ बुलुम बुथुर (बुडबुडचाची नदी) या शब्दाचे संस्कृतीकरण होऊन बनला आहे. नाम-दाओ-फी (तारकांची नदी), लौहित्य (लाल नदी), अशीही तिला अन्य नावे आहेत. हिच्या लौहित्य नावामागची एक दंतकथा अशी — परशुरामाने क्षत्रियसंहार केल्यावर आपला रक्तरंजित परशू ब्रह्मपुत्रेच्या प्रवाहात धुतला. त्यामुळे या नदीचे पाणी लाल झाले. त्यामुळेच ती लौहित्य या नावाने ओळखली जाऊ लागली.

ही नदी तिबेटात मानस सरोवराजवळ हिमालयाच्या पर्वतराजीत उगम पावते. तिबेटात तिला त्सांग-पो म्हणतात. हिंदू धर्म ग्रंथांतील काही उल्लेखांनुसार ब्रह्मपुत्रेचा उगम मिचिमी पर्वतातल्या ब्रह्मकुंडात झाला असल्याचे कळते. सदियापासून पूर्वेला ५० मैलांवर हे ब्रह्मकुंड आहे.

या नदीचा विस्तार प्रचंड असून, तीत माजुली व उमानंद नामक दोन बेटेही वसली आहेत. माजुली हे मोठे बेट असून, ते शिवसागर जिल्ह्याच्या सीमेत येते; तर उमानंद हे त्या मानाने लहान असून गौहाटी शहराजवळ येते. माजुली हे बेट ब्रह्मपुत्रा-सुवर्णश्री या नद्यांच्या संगमावर वसले असून, ते आसामी वैष्णवांचे तीर्थस्थान आहे. इथे काही प्राचीन महाविद्यालयांच्या वास्तू व मठ-मंदिरे आहेत. त्यांपैकी आउवी याटी, दक्षिणी पाट, गडमूर, कमलावारी ही विशेष प्रसिद्ध आहेत.

चैत्र शु. अष्टमीस जितेंद्रिय होऊन जो मनुष्य ब्रह्मपुत्रेत स्नान करील, त्याची सर्व पापे धुतली जाऊन, तो ब्रह्मपदी आरूढ होईल, असे भविष्य पुराणात म्हटले आहे. त्या दिवशी सर्व पवित्र नद्या व सागर ब्रह्मपुत्राच्या जलात समाविष्ट होतात, अशी कल्पना आहे. स्नानसमयी म्हणायचा मंत्र असा—

ब्रह्मपुत्र महाभाग शन्तनोः कुलसम्भव।
अमोघागर्भसम्भूत पापं लौहित्य मे हर ॥

ब्रह्मपुत्रेची एकूण लांबी १८०० मैल असून, ती जेव्हा सखल प्रदेशातून वाहते, तेव्हा तिच्यातून मोठमोठ्या बोटींचीही वाहतूक चालते. [लौ. नी.; हि. ध.; हि. जॉ. ए. इं.]

ब्रह्मपुर एक प्राचीन नगर. पंजाबमधल्या चंबा नामक संस्थानाची ही राजधानी होती. कनिंगहॅमच्या मते ब्रह्मपुर हे वैराटपट्टणचे दुसरे नाव आहे. या राज्याचा परिघ ६६३ मैल आहे, असे युआन च्वांगने म्हटले आहे. या नगरात तीन प्रमुख मंदिरे आहेत. त्यांतील सर्वांत मोठे मंदिर हे शिवाचा अवतार मणिमहेश याचे, दुसरे मंदिर नरसिंहाचे व तिसरे लाकडी मंदिर लक्ष्मणा देवीचे आहे. [हि. जॉ. ए. इं.]

ब्रह्म पुराण एक महापुराण. विष्णू पुराणातल्या सूचीप्रमाणे हे पहिले महापुराण ठरते. देवी भागवतात मात्र याला पाचवा क्रमांक दिलेला आहे. हे १३००० श्लोकांचे आहे असे मत्स्य पुराणात म्हटले आहे (५३·१३). प्रस्तुत पुराणाचा प्रारंभश्लोक असा —

यस्मात्सर्वमिदं प्रपञ्चरचितं मायाजगज्जायते
यस्मिंस्तिष्ठति याति चान्त्यसमये कल्पानुकल्पे पुनः।
यं ध्यात्वा मुनयः प्रपञ्चरहितं विन्दन्ति मोक्षं ध्रुवम्।
तं वन्दे पुरुषोत्तमाख्यममलं नित्यं विभुं निश्चलम् ॥

अर्थ— हे सर्व प्रपंचरचित मायाजगत ज्याच्यापासून उत्पन्न होते, ज्याच्या ठिकाणी स्थिती पावते आणि अंतसमयी ज्याच्या ठिकाणीच विलीन होते, तसेच ही प्रक्रिया ज्याच्यामुळे कल्पामागून कल्प चालत राहते व ज्याचे ध्यान करून मुनी मायारहित अशा चिरस्थायी मोक्षाला प्राप्त होतात, त्या निर्मल, नित्य, विभु व निश्चल अशा पुरुषोत्तमाख्य विष्णूला मी नमस्कार करतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आदिब्रह्म पुराण या नावाने आणखी एक पुराण उपलब्ध असून, त्यात ८००० श्लोक आहेत. या पुराणाचे व प्रचलित ब्रह्म पुराणाचे बहुतांशी साम्य आहे. ही दोन्ही पुराणे तपासून पाहता ती एकच असावी, असे अनुमान निघते. नारद पुराणातही तसेच म्हटले आहे. नारद पुराणाच्या वेळी हे पुराण आजच्याच स्वरूपात होते, असे कळून येते.

व्यासांनी जी पुराणे रचिली व ज्यांना आदिपुराणे अशी संज्ञा होती, त्यांपैकी ब्रह्म पुराण हे पहिले असल्याचे नारद पुराणात म्हटले आहे. म्हणून ब्रह्म पुराण हे आदिपुराण या नावानेही प्रसिद्ध आहे. यात सूर्यपूजा व सूर्योपासना सहा अध्यायांत विस्ताराने वर्णिली आहे. त्यावरून याला सौर पुराण अशीही संज्ञा लाभली आहे. मात्र आदी पुराण व सौर पुराण या नावांची जी उपपुराणे आहेत, त्यांच्याशी या पुराणांचा संबंध नाही.

ब्रह्म पुराणातील कृष्णचरित्र आणि विष्णू पुराणातील व नारद पुराणातील पुरुषोत्तममाहात्म्य यांची तुलना करता असे दिसून येते, की त्या दोन्ही पुराणांनी ब्रह्म पुराणावरूनच आपापले ते भाग वाढवून तयार केले आहेत. एवढेच नव्हे; तर ब्रह्म पुराणातील अनेक प्रसंग महाभारताच्या अनुशासन पर्वात (ब्रह्म. पु. २२३–२२५; अनु. १४३–१४५) जसेच्या तसे घेतलेले आहेत आणि ते ब्रह्मपुराणातून घेतल्याचे नमूदही केले आहे (अनु. १४३.१८).

वेदांचे उपबृंहण हे पुराणांचे एक महत्त्वाचे कार्य होय. ब्रह्म पुराणाने ते उत्तम रीतीने पार पाडले आहे. सांख्यायन ब्राह्मण, ऐतरेय ब्राह्मण, बृहद्देवता, इ. वैदिक ग्रंथांतील उपाख्याने या पुराणात वाढवून लिहिली आहेत.

पुराणांच्या पंचलक्षणांपैकी पहिल्या चार अध्यायांत सर्ग व प्रतिसर्ग, पाचव्यात मन्वंतर व पुढे चौदाव्या अध्यायापर्यंत वंश व वंशानुचरित हा भाग आलेला आहे. याशिवाय आख्याने, तीर्थक्षेत्रमाहात्म्ये, इ. गोष्टी आल्या आहेत, त्या अशा –

उत्कल प्रांतातील (ओडिसा) अनंतवासुदेव, पुरीचे पुरुषोत्तम मंदिर, कोणार्क येथील सूर्यमंदिर, एकांबर क्षेत्र, भुवनेश्वर क्षेत्र, विरज क्षेत्र, गौतमी (गोदावरी), कृत्तिकातीर्थ, चक्रतीर्थ, पुत्रतीर्थ, यमतीर्थ, आपस्तंबतीर्थ, इत्यादींची माहात्म्ये; अहल्या, पुरूरवा, उर्वशी, वृषाकपी, आत्रेय-आत्रेयी, इ. कथा व आख्याने. प्रस्तुत पुराणात कृष्णचरित्र ३२ अध्यायांत वर्णिले असून, ते भागवताच्या दशमस्कंधातील कृष्णचरित्राला अनुसरून आहे.

ब्रह्म पुराणात सांख्य तत्त्वज्ञानाला महत्त्व दिले आहे. करालजनकाने प्रश्न विचारल्यावर वसिष्ठ ऋषी त्याला महत्त्वाचे सांख्य सिद्धान्त विवेचून सांगत आहेत. प्राचीन सांख्य तत्त्वज्ञानी २५ मूल तत्त्वे मानतात; तर पुढचे सांख्य तत्त्वज्ञानी ईश्वर हे २६ वे श्रेष्ठ तत्त्व मानतात. ब्रह्म पुराण पुढच्या सांख्य तत्त्वज्ञांशी सहमत आहे.

याशिवाय मनुष्याची पाप-पुण्यानुसार मरणोत्तरस्थिती, यमलोक, नरक, श्राद्धकल्प, सदाचार, इ. गोष्टींचे वर्णनही प्रस्तुत पुराणात आले आहे. धर्मभ्रष्ट ब्राह्मण शूद्रत्वाला जातो आणि सदाचरणी शूद्र ब्राह्मणत्वाला प्राप्त होतो, असा स्पष्ट उल्लेख या पुराणात आहे (२२३.१७-३२).

प्रस्तुत पुराणात जागोजागी अनेक नीतितत्त्वे सुभाषितरूपाने सांगितली आहेत, त्यांतली काही सुभाषिते अशी –

यत्पृथिव्यां व्रीहियवं हिरण्यं पशवः स्त्रियः ।
नालमेकस्य तत्सर्वमिति कृत्वा न मुह्यति ।।

(ब्रह्म पु. १२.४१)

अर्थ – पृथ्वीवरची भात, यव, इ. सर्व धान्ये; पृथ्वीतले सगळे सोने, सगळे पशू आणि सगळ्या स्त्रिया, हे सर्व जरी एखाद्याला मिळाले, तरी त्याची तृप्ती होणार नाही, हे जाणून (विवेकी मनुष्य) कुठेही मोह धरीत नाही.

चित्तमन्तर्गतं दुष्टं तीर्थस्नानैर्न शुध्यति ।
शतशोऽपि जलैर्धौतं सुराभाण्डमिवाशुचि ।।

(ब्रह्म पु. २५.४)

अर्थ – अंतरी दोषांनी भरलेले चित्त कितीही तीर्थस्नाने केली तरी शुद्ध होत नाही. मद्याचे पात्र शेकडो वेळा पाण्याने धुतले तरी ते जसे अशुद्धच राहते, त्याप्रमाणेच या दुष्ट पनाचे आहे.

इन्द्रियाणि वशे कृत्वा यत्र यत्र वसेन्नरः ।
तत्र तत्र कुरुक्षेत्रं प्रयागं पुष्करं तथा ।।

(ब्रह्म पु. २५.६)

अर्थ – इंद्रिये स्वाधीन ठेवून मनुष्य जिथे जिथे राहील, ते ते स्थान त्याच्या वाटचाला कुरुक्षेत्र, प्रयाग किंवा पुष्कर होय.

पुंसः सर्वेषु कार्येषु भार्यैवेह सहायिनी ।
स्वल्पानामपि कार्याणां न हि सिद्धिस्तया विना ।।

(ब्रह्म पु. १.९.६०)

अर्थ – पुरुषाच्या सर्व कार्यांत भार्या ही त्याची साहाय्यक असते. अल्प-स्वल्प कार्येही भार्येच्या सहकार्याविना सिद्धीला जात नाहीत.

इ. स. च्या सात व्या किंवा आठव्या शतकापूर्वी ब्रह्म पुराण निर्माण झाले असावे, असे संशोधक म्हणतात. या पुराणात बुद्धाला अवतार मानलेले नाही. बुद्ध अवतार बनला तो काळ इ. स. ७००–८०० असा आहे. मात्र या पुराणाचे आजच्या अवस्थेतले सर्व भाग एकाच कालखंडातले नाहीत, असे डॉ. हाझरा यांनी सप्रमाण दाखविले आहे. परिवर्धित भागांपैकी काही भाग इ. स. च्या १० ते १२ या शतकांतले असावे; तर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काही भाग इ. स. च्या १५ व्या शतकात वाढविले गेले असावे. [पु. वि.; पु. नि.; श्री. बा. मो. कानिटकर–स्वराज्य, २३ जुलै १९६६; सा. हिंदुस्तान, २८ एप्रिल १९६८]

ब्रह्मपुरी (१) पुराणवाङ्मयात वर्णिलेली एक काल्पनिक नगरी. सुमेरू पर्वतावर अंतरिक्षात ही महापुरी वसली आहे. या नगरीचे क्षेत्रफळ चौदा हजार योजने आहे. ही महापुरी ब्रह्मपुरी म्हणून विख्यात आहे. या नगरीच्या भोवती इंद्रादी लोकपालांची आठ नगरे वसली आहेत.

(२) एक सांकेतिक संज्ञा. गावाच्या ज्या भागात सगळी ब्राह्मणवस्ती असे, तिला जुन्या काळी ब्रह्मपुरी म्हणत. तिथे विद्वान ब्राह्मण राहत आणि अध्ययन व अध्यापन करीत. या विद्वान ब्राह्मणांच्या घरी विद्यार्थी शिकण्यासाठी राहिलेले असत. अशा ब्रह्मपुरीला राजाश्रयही मिळत असे. [मु. पू. म.]

(३) गोवा प्रदेशातील एक तीर्थ. जुन्या गोव्यापासून सुमारे अर्ध्या मैलावर डोंगराच्या पायथ्याशी हे क्षेत्र वसले आहे. इथे पूर्वी गोमेश्वर नावाचे एक शिवमंदिर होते. आज ज्या ठिकाणी कोन्व्हेंत द घिलार नावाचे चर्च आहे, तिथेच हे शिवालय असावे असा अंदाज आहे. या क्षेत्राजवळच माधवतीर्थ नावाचे एक तीर्थ आहे. विजयनगर साम्राज्याचा सेनापती माधव याच्या नावावरून हे नाव पडले असावे.

कदंब राजा त्रिभुवनमल्ल याच्या कालातला (इ. स. ११०७) एक ताम्रपट हल्ली उपलब्ध झाला असून, त्यांत या क्षेत्राचा उल्लेख आढळतो. हा राजा राज्य करीत असता त्याचा एक अधिकारी केलीम याने गोपक (थोरले गोवे) जवळ बारा ब्राह्मण कुटुंबे आणून त्यांची ही पुरी वसविली व त्यांच्या उदर-निर्वाहासाठी काही वृत्तीही लावून दिल्या. त्याने वसविलेली ब्रह्मपुरी म्हणजेच हे क्षेत्र असावे. [श्रीक्षेत्र ब्रह्मपुरी]

ब्रह्मबंधू एक निंदाव्यंजक शब्द. जो मनुष्य केवळ नावाचा म्हणजे जन्माने ब्राह्मण आहे, त्याला उपहासाने ब्रह्म-बंधू असे म्हणतात. नावाचा उपाध्याय किंवा अपात्र उपाध्याय असा त्याचा अर्थ ऐत. ब्राह्मण (७.२७) व छांदो. उप. (६.१.१) यांत केला आहे. ब्रह्मबंधू कोणाला म्हणावे, या संबंधीचा एक श्लोक औशानस स्मृतीत आला आहे तो असा –

शूद्रप्रेष्यो भृतो राज्ञा वृषली ग्रामयाजकः ।
वधबन्धोपजीवी च षडेते ब्रह्मबन्धवः ॥

अर्थ – शूद्राचा किंवा राजाचा सेवक, शूद्र स्त्रीचा पती, ग्राम-पुरोहित, पशुहत्या करणारा किंवा पशूंना पकडण्याचा व्यवसाय करणारा यांना ब्रह्मबंधू म्हणावे.

यावरून स्मृतिकाळात वेदाध्ययन व यज्ञकर्म करणाराच खरा ब्राह्मण समजला जात असे, असे कळते. [हि. ध.]

ब्रह्मभूत एक ग्रामदेव. द. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर विशेषतः तुळूभाषिक लोकांत ब्रह्मदेव हा केवळ देव म्हणून नव्हे; तर एक विशिष्ट भूत म्हणून शेता-शेतांतून पूजिला जातो. वर्ष- कृत्यांपैकीच ते एक कृत्य असते.

पुराणकारांनी ब्रह्मदेवाची पूजा निषिद्ध ठरविल्यावर काही जाती-जमातींत तो अर्धा देव व अर्धा भूत अशा स्वरूपात राहिला. त्यांनी ब्रह्मभूत या नावाने त्याची पूजा चालू ठेवली.

उडुपीजवळच्या शिर्वा या गावी याची पंचरसी मूर्ती आहे. तो चतुर्मुख व चतुर्भुज असून, हंसावर बसला आहे. त्याच्या एका हातात अमृतकलश व दुसऱ्या हातात जपमाळ आहे. राहिलेले दोन्ही हात हृदयाजवळ असून, त्यांत शालिग्राम आहे.

या ब्रह्मभूताच्या मस्तकासंबंधी एक दंतकथा सांगितली जाते, ती अशी –

पूर्वी ब्रह्मदेवाला पाच मस्तके होती. त्यांतले एक मस्तक शिवाने तोडले. त्या तुटलेल्या मस्तकाने शिवाला विचारले, की 'माझी पुढे गती काय?' तेव्हा शिवाने त्याला सांगितले की, 'तू पृथ्वीवर जाऊन भूतयोनीत दाखल हो.' त्याप्रमाणे ते मस्तक ब्रह्मभूत झाले.

तुळू लोकांतली या संबंधीची दंतकथा अधिक तपशीलवार आहे. ब्रह्मदेवाला चार मस्तके आणि आठ हात पाहून शिवाला त्याचा मत्सर वाटला. कारण शिवाला तीनच मस्तके होती. या मत्सरातून त्याने ब्रह्मदेवाचे एक मस्तक तोडले. ते मस्तक शिवाला शरण गेले. शिव त्याला म्हणाला, की 'तू पृथ्वीवर जाऊन नागाशी संबंध जोड आणि मानवजातीला उपद्रव दे; म्हणजे लोक तुझी पूजा करतील.' यामुळे ब्रह्मभूत हा एकमुखी झाला आहे. तो हाती खड्ग घेऊन घोड्यावर बसतो अशी समजूत आहे. कित्येक ठिकाणी त्याच्या नावाने नुसतेच दगड बसविलेले असतात. त्या दगडांजवळ नाग असतो, असे समजतात. त्याच्यापुढे नारळ फोडण्याची प्रथा आहे. [ओ. इ. इं.]

ब्रह्ममुद्रा एक मुद्राप्रकार. देवतांना संतुष्ट करण्यासाठी ज्या मुद्रा केल्या जातात, त्यांत ब्रह्ममुद्रेचाही समावेश आहे. ही मुद्रा करताना प्रथम आसनावर ताठ बसतात. नंतर सावकाशपणे मानेपासून तोंड डावीकडे नेतात. तिथे क्षणकाल थांबून पुन्हा तोंड समोर आणतात. क्षणभराने तोंड उजवीकडे नेऊन तिथेही थोडा वेळ ते स्थिर करतात. या कृतीत, दत्ता-त्रेयाच्या तीन मुखांची जशी स्थिती असते, त्याप्रमाणे साधकाने आपले मुख तीन दिशांना वळवायचे असते. [योगविद्या]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मयक्ष जैन दैवतसमूहातील एक यक्ष. दहावा तीर्थंकर शीतलनाथ याचा हा सेवक होय. हा त्रिनेत्र, चतुर्मुख, कमलासन, अष्टभुज तसेच मातुलिंग, मुद्गर, पाश, अभयमुद्रा, मुंगूस, गदा, अंकुश व माला धारण करणारा (दिगंबर मते धनुष्य, दंड, खेटक, खड्ग, वरदमुद्रा धारण करणारा) आहे. याचे स्वरूप पुष्कळ अंशी ब्रह्मदेवासारखे आहे. (दिगंबर मते हा काळे डुक्कर जोडलेल्या रथात वसतो.) [जै. इ.]

ब्रह्मयज्ञ ब्राह्मणाने नित्य करायचा स्वाध्याय म्हणजे ब्रह्मयज्ञ होय. सकाळी संध्या व प्रातर्होम झाल्यानंतर व दुपारी माध्याह्न संध्येनंतर किंवा वैश्वदेवानंतर ब्राह्मणाने दिवसातून एकदा ब्रह्मयज्ञ करावा, असे धर्मसिंधूत सांगितले आहे. याचे सर्वांत प्राचीन वर्णन शतपथ ब्राह्मणात आढळते (११.५.६.३८). श्रौत यज्ञातील जुहू, उपभृत, ध्रुवा, स्रुव, अवभृथ स्नान व स्वर्ग यांची जागा ब्रह्मयज्ञात अनुक्रमे वाक, मन, नेत्र, मानसिक शक्ती, सत्य व अन्न यांनी घेतलेली आहे. ऋक्, यजुः, साम आणि अथर्व या श्रुतींची तुलना दूध, आज्य, सोम व वपा यांच्या आहुतींशी केलेली आहे. ब्रह्मयज्ञात वेद, वेदांगे, विद्या, वाकोवाक्य किंवा ब्रह्मोद्य, इतिहास-पुराणे, गाथा, नाराशंसी यांचे यथाशक्य अध्ययन करायचे असते, म्हणजेच अधीत वेदादिकांची आवृत्ती करायची असते. ज्याला वेदाचा फारच थोडा भाग पाठ येत असेल, त्याने पुरुषसूक्त व इतर काही सूक्ते म्हणावी. ज्याला फक्त गायत्री मंत्र येत असेल, त्याचा ब्रह्मयज्ञ केवळ ॐकाराच्या उच्चारणानेही होऊ शकतो.

ब्रह्मयज्ञाचा प्रयोग – गावाबाहेर पूर्वेला, उत्तरेला किंवा ईशान्येला, गावातील घरे दिसणार नाहीत अशा पवित्र जागी जावे. याचा हेतू हा, की स्वाध्याय करीत असता कोणाचा व्यत्यय येऊ नये व त्यामुळे स्वाध्याय चुकू नये. गावाबाहेर जाणे अशक्य असल्यास घरातच ब्रह्मयज्ञ करावा. क्षितिजाकडे डोळे लावून किंवा डोळे मिटून एकाग्र चित्ताने स्वाध्यायाचे पठण करावे. त्यासाठी माळेसारखे जानवे करून दर्भासनावर पूर्वाभिमुख बसावे. डाव्या मांडीवर उजवा पाय ठेवावा व संकल्प करावा. मग स्वाध्यायाला प्रारंभ करावा. प्रथम ॐकार उच्चारावा. मग स्वतःच्या शाखेचा यथाशक्ति स्वाध्याय करावा.

ऋग्वेदाचे 'अग्निमिळे पुरोहितम्' हे सूक्त प्रथम म्हणावे. मग इतर वेद-वेदांगादी ग्रंथांचे फक्त पहिले वाक्य म्हणावे. ती प्रारंभवाक्ये पुढे दिली असून, त्यापुढे ती ज्या ग्रंथांची प्रारंभवाक्ये आहेत, त्या ग्रंथांची नावे कंसात दिली आहेत –

अग्निर्वै देवानामवमो विष्णुः परमः। (ऐतरेय ब्राह्मण)
अथ महाव्रतम्। (ऐतरेय आरण्यक अ. १ ला)
एष पन्था एतत्कर्म। (ऐ. आ. अ. २ रा)
अथातः संहिताया उपनिषत्। (ऐ. आ. अ. ३ रा)
विदा मघवन्विदा। (ऐ. आ. अ. ४ था)
महाव्रतस्य पंचविंशतिं सामिधेन्यः। (ऐ. आ. अ. ५ वा)
इषे त्वोर्जे त्वा। (यजुर्वेदारंभ, शुक्ल व कृष्ण)
अग्न आ याहि वीतये। (सामवेद)
शं नो देवीरभिष्टये। (अथर्ववेद)
अथैतस्य समाम्नायस्य। (आश्व. श्रौ. सू.)
समाम्नायः समाम्नातः। (निरुक्त)
मयरसतजभनलगसंमितम्। (छंदःशास्त्र)
गौः ग्मा। (निघंटू)
पंचसंवत्सरमयम्। (वेदांग ज्योतिष)
अथ शिक्षां प्रवक्ष्यामि। (पाणिनीय शिक्षा)
वृद्धिरादैच्। (अष्टाध्यायी)
योगीश्वरं याज्ञवल्क्यम्। (याज्ञ. स्मृती)
नारायणं नमस्कृत्य। (महाभारत)
अथातो धर्मं व्याख्यास्यामः। (धर्मसूत्र)
अथातो धर्मजिज्ञासा। (जैमिनी पूर्वमीमांसासूत्र)
अथातो ब्रह्मजिज्ञासा। (ब्रह्मसूत्र)

नंतर ब्रह्मयज्ञांग तर्पण करावे. प्रथम 'प्रजापतिस्तृप्यतु' इ. वाक्यांनी सव्याने देवतर्पण करावे. मग निवीती करून 'शतर्चिनस्तृप्यन्तु' इ. वाक्यांनी ऋषितर्पण करावे. मग प्राचीनावीती (अपसव्य) करून 'सुमन्तुजैमिनिवैशंपायनपैलसूत्रभाष्यभारतमहाभारतधर्माचार्यास्तृप्यन्तु' इ. वाक्यांनी पितृतर्पण करावे. देवऋषितर्पण अक्षतांनी व पितृतर्पण काळ्या तिळांनी करावे. देवांना प्रत्येकी एक, ऋषींना प्रत्येकी दोन व पितरांना प्रत्येकी तीन पळचा पाणी द्यावे. तर्पणाच्या वेळी उजव्या हातात साग्र दर्भ असावे. त्यांच्या अग्रांनी देव, मध्यभागाने ऋषी व मूलभागाने पितर यांचे तर्पण करावे. देवतर्पण उजवा गुडघा भूमीला टेकवून, ऋषितर्पण दोन्ही गुडघे भूमीला टेकवून व पितृतर्पण डावा गुडघा भूमीला टेकवून करावे.

हिरण्यकेशी मंडळींच्या ब्रह्मयज्ञात स्वाध्यायविषयक जे मंत्र आहेत, त्यांत वेदांगांचा प्रतीकरूपाने उल्लेख नाही. 'अग्निमीळे' पासून 'शं नो देवी' इथवर चारही वेदांचे एकेक वाक्य म्हटल्यानंतर त्यांचे ग्रंथपठण संपते. चारही वेदांच्या ब्रह्मयज्ञासंबंधाने श्री. चित्रावशास्त्री यांनी आपल्या ब्रह्मयज्ञ या ग्रंथात लिहिले आहे, ते असे –

"यजुर्वेदी, सामवेदी आणि अथर्ववेदी यांच्या ब्रह्मयज्ञांत उद्धृत केलेल्या ग्रंथादिवाक्यांचाच प्रस्तुत ब्रह्मयज्ञातील वाक्याप्रमाणे बरोबर पत्ता लागू शकतो. त्याशिवाय एक गोष्ट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विशेष उपलब्ध होते ती ही, की केवळ आदिवाक्ये ऋग्वेदी लोकांप्रमाणेच यजुर्वेदी वगैरे लोक उच्चारीत नसून ग्रंथाच्या आरंभीचे व शेवटचे अशी दोन्ही वाक्ये ब्रह्मयज्ञात म्हणतात. त्यामुळे ग्रंथारंभ व शेवट हे निश्चित समजतात.

ऋग्वेदी ब्रह्मयज्ञात ऋषितर्पणात जी एक प्रकारची व्यवस्था व इतिहास दिसतो, तसा यजुर्वेदी वगैरेंच्या ब्रह्मयज्ञात उपलब्ध होत नाही. हीच स्थिती देवता, आचार्य, यांच्याही बाबतींत आहे. तथापि सर्व शाखांच्या ब्रह्मयज्ञात एक प्रकारचा इतिहास भरलेला आहे. तो इतिहास उकलण्याचे धागे मात्र अदृश्य झाले आहेत. ते अभ्यासाने दिव्य दृष्टी प्राप्त झालेल्यांस फक्त शक्य होईल. सर्व ब्रह्मयज्ञात सांख्यांचे प्राबल्य विशेष दिसते."

ब्रह्मयज्ञाच्या शेवटी भूः, भुवः, स्वः या तीन्ही वेदांच्या व्याहृती उच्चाराव्या. मग गायत्री मंत्र जपावा. सरतेशेवटी 'नमो ब्रह्मणे नमो' (तै. आ. २·१३) हा मंत्र तीनदा उच्चारून ब्रह्मयज्ञ समाप्त करावा.

आचारेंदू या ग्रंथात ब्रह्मयज्ञाचे फल सांगितले आहे, ते असे–

> **स्वशाखाध्ययनं यत्तद् ब्रह्मयज्ञं प्रचक्षते ।**
> **ब्रह्मयज्ञपरो मर्त्यो ब्रह्मलोके महीयते ।।**
> **वेदाभ्यासो यथाशक्त्या ब्रह्मयज्ञक्रियाक्षमः ।**
> **नाशयत्याशु पापानि महापातकजान्यपि ।।**

अर्थ – आपल्या शाखेच्या अध्ययनाला ब्रह्मयज्ञ म्हणतात. ब्रह्मयज्ञ करणारा पुरुष ब्रह्मलोकात पूज्य होतो. ब्रह्मयज्ञासाठी योग्य असणारा यथाशक्ति वेदाभ्यास हा महापातकातूनही उत्पन्न झालेल्या पापांचा नाश करतो.

ब्रह्म रायमल्ल

(इ. स. च्या १७ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक जैन भक्तकवी. याचा जन्म हूवड वंशात झाला. याच्या पित्याचे नाव मह्य आणि मातेचे नाव चंपा असे होते. मुनी अनंतकीर्ती हा याचा गुरू होता. याने हिंदी भाषेत अनेक रास रचले आहेत. याशिवाय भक्तामरस्तोत्रवृत्ती नावाचा याचा एक संस्कृत ग्रंथही असल्याचे कळते. [हिं जै. भ. क.]

ब्रह्मर्षी

ऋषींचा एक प्रकार. हे ब्राह्मणकुलोत्पन्न असून ब्रह्मक्षेत्रात राहतात. सर्व ब्रह्मर्षी हे वेदज्ञाते, ब्रह्मज्ञानी, तपोमूर्ती आणि अलौकिक शक्तिसंपन्न असतात, अशी समजूत आहे. आपल्या तपोबलाच्या जोरावर हे अशक्य गोष्टीही शक्य करून दाखवितात.

यांना परमर्षी किंवा विप्रर्षी असेही म्हणतात. परंतु हे दोन्ही शब्द ब्रह्मर्षी शब्दाचे पर्यायी शब्द आहेत, की अन्य ऋषिवर्गासाठी उपयोजिले आहेत, याचा निर्णय होत नाही. देवर्षी आणि राजर्षी यांच्या तुलनेने ब्रह्मर्षींचे स्थान उच्च आहे. कारण ब्रह्मलोकप्राप्ती हे त्यांचे चरम लक्ष्य असते. प्रमुख ब्रह्मर्षी सात आहेत. त्यांची नावे अशी – ब्रह्मा, वसिष्ठ, भृगू, अत्री, दक्ष, कश्यप व आंगिरस.

या नावांशिवाय अन्यही पर्याय मिळतात. वालखिल्य हे ब्रह्मर्षी असल्याचे भागवतात म्हटले आहे (१२·११·४९). त्यांनी ब्रह्मयाकडून वेद श्रवण केले आणि त्यांना काशीत सायुज्य मुक्ती मिळाली, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे (१८५·१२). ब्रह्मदेवाने कुरुक्षेत्रात स्थापन केलेले ब्रह्मक्षेत्र हे या सप्तर्षींची मातृभूमी आहे, असे वायुपुराण सांगते (५९·१०६-१०७)

ब्रह्मर्षींच्या खालोखाल राजर्षींना महत्त्व आहे. राजर्षी हा क्षत्रिय असतो. पण आपल्या कर्तृत्वाने त्यालाही ब्रह्मर्षी हे पद मिळविता येत असे, असे विश्वामित्राच्या उदाहरणावरून दिसते. वसिष्ठाने विश्वामित्राला ब्रह्मर्षी म्हणून मान्यता दिल्याचा उल्लेख रामायणात आहे (१·६३,६५.).

ब्रह्मर्षी, देवर्षी आणि राजर्षी हे ऋषींचे वर्गीकरण केव्हा झाले हे निश्चित सांगता येत नाही. वैदिक साहित्यात ते आढळत नाही. पंचविंश ब्राह्मणात राजन्यर्षी हा शब्द प्रयोग आढळतो (१२·१२·६) मनुस्मृतीत मध्य भारताला ब्रह्मर्षींची भूमी म्हटले आहे (२·१९). कुरुक्षेत्र, मत्स्य, पंचाल व शूरसेन या प्रदेशांचा ब्रह्मर्षीदेशात समावेश होत असून, तो ब्रह्मावर्ताच्या खालोखाल पवित्र मानला जात होता. [पु. इं.; क्ला. डि. हिं. मा.]

ब्रह्मलोक

एक देवलोक. हे ब्रह्मदेवाचे निवासस्थान असल्यामुळे याला ब्रह्मलोक अशी संज्ञा मिळाली आहे. ब्रह्मलोकाला शाश्वत विश्व असेही म्हणतात (मत्स्य पु. ८६·६.; भाग. पु. ४·३१ .२३; वायू पु. १०१·२७). ब्रह्मलोक पूर्णतया दोषरहित असून, जे लोक सदाचरणी व पवित्र आहेत, त्यांनाच या लोकात प्रवेश मिळतो असे छांदोग्योपनिषदात सांगितले आहे. ज्याला इथे प्रवेश मिळतो. त्याचा पुनर्जन्म सुटतो, असे वायू पुराणात म्हटले आहे (७·३२; २१·७०; २२·२०). अगस्त्येश्वरम आणि देवतीर्थंम या तीर्थांमध्ये स्नान करणाऱ्याला ब्रह्मलोक प्राप्त होतो, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे (१९१·१६-२४). ययाती देवलोकातून ब्रह्मलोकाला गेल्याचा उल्लेखही मत्स्य पुराणात आहे.

जेव्हा ब्रह्मा हा वैदिकांचा प्रधान देव होता, तेव्हा समाजमनात ब्रह्मलोकाची प्रतिष्ठा मोठी होती. कन्यादानातही 'ब्रह्मलोकावाप्त्यर्थम्' असा संकल्प असे. पण ब्रह्मयाचे देव म्हणून महत्त्व कमी झाल्यावर त्याच्या लोकाचेही महत्त्व कमी झाले व ती जागा वैकुंठ व कैलास या लोकांनी घेतली. [हि. ध.; पु. इं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मवादिनी प्राचीन काळातील मुलींचा एक वर्ग. सन-पूर्व ३०० वर्षांपूर्वीच्या काळात भारतातील मुलींचे विवाह साधारणपणे सोळाव्या वर्षी होत. तोपर्यंतचा काळ मुली अध्ययनात घालवीत. अध्ययन करणाऱ्या कुमारिकांचे ब्रह्मवादिनी व सद्योवधू असे दोन प्रकार होते. ब्रह्मवादिनी कुमारिका लग्न न करता आपले सर्व आयुष्य तत्त्वज्ञान व अध्यात्मशास्त्र यांच्या अध्ययनात घालवीत. पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा यांसारख्या दर्शनांतही त्या प्रवीण होत व राजदरबारात वादविवादासाठी भरणाऱ्या मोठमोठ्या परिषदांतून पुरुषांच्या बरोबरीने भाग घेत. काही स्त्रिया अध्यापनशास्त्राचा विशेष अभ्यास करून त्या क्षेत्रातही नावलौकिक मिळवीत. निरनिराळ्या विषयांत प्रावीण्य संपादन करणाऱ्या स्त्रियांना उपाध्याया, काशकृत्स्ना इ., पदव्या प्राचीन काळी दिल्या जात. अशा काही स्त्रियांचे उल्लेख संस्कृत साहित्यात आढळतात. गार्गी वाचक्नवी ही अशीच एक ब्रह्मनिष्ठ स्त्री होती, व जनकाच्या सभेत तिचा याज्ञवल्क्याशी वाद झाला होता (बृहदा. उ. ३·६·१). पाहा–उपनयन. [पो. वी. हिं. सि.]

ब्रह्मविद्योपनिषद एक नव्य उपनिषद. हे कृष्ण-यजुर्वेदाशी संबद्ध असून ११० श्लोकांचे आहे. यात ब्रह्मविद्येचें महत्त्व प्रतिपादिलेले आहे. त्या अनुषंगाने प्रणवाचे माहात्म्य, जीववर्णन, सगुण-निर्गुण ब्रह्म, मोक्षदाता गुरू, इ. विषय सांगितले आहेत. त्यापुढे हंसविद्येचे विवेचन केले आहे. हंस हा प्राणिमात्राच्या हृदयाच्या ठिकाणी असतो. म्हणून 'सोऽहं हंसः' या मंत्राचा जप करीत योग्याने समाधी लावावी आणि मी अच्युत, अज, अचिंत्य आहे, अशा स्वरूपात आत्मचिंतन करावे, असे सांगितले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

ब्रह्मविधी एक कुलाचार. दक्षिणेतल्या काही ब्राह्मण, लिंगायत, कोष्टी वगैरे लोकांत हा कुलाचार आढळतो. याचा विधी पुढीलप्रमाणे आहे –

आश्विन वद्य त्रयोदशीला घरातला कर्ता माणूस दिवसभर उपवास करतो. सायंकाळी स्नान करून स्वयंपाकघरात जातो. इतरांना बाहेर घालवून, दाराला आतून कडी लावून घेतो; मग नग्नावस्थेत खांबाची पूजा करतो; त्याला पुरणा-वरणाचा महानैवेद्य दाखवितो. मग तो नैवेद्य स्वतः नग्नावस्थेत खाऊन तिथेच हात धुवून व कपडे घालून बाहेर येतो. नंतर ब्राह्मण-सवाष्णींची पूजा करून त्यांना भोजन वाढतो. हा कुलाचार 'अहं ब्रह्मास्मि' या अद्वैतवाचक वचनाच्या अर्थाचा अनर्थ करण्यासाठी उत्पन्न झाला असावा. [श्री. कृ. वि. आचार्य]

ब्रह्मविहार बौद्ध धर्मातील एक कल्पना. बौद्ध साहित्यात ब्रह्मविहाराचे वर्णन अनेक ठिकाणी आलेले आहे. विशेषतः विसुद्धिमग्ग आणि करणीय मेत्तसुत्त या ग्रंथांत त्याचे वर्णन आलेले आहे. मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा या चार भावनांना ब्रह्मविहार अशी संज्ञा आहे. करणीय मेत्तसुत्तात सांगितले आहे, की ज्याप्रमाणे प्रसंगी स्वतःचे प्राणही धोक्यात घालून माता आपल्या मुलाचे रक्षण करते, त्याप्रमाणे साधकाने आपले मन सर्व प्राणिमात्रांवर अपरिमित प्रेम करून दयाळू बनविले पाहिजे. तसेच उठता, बसता, चालता, निजता किंवा शरीराची कोणतीही क्रिया करता त्याने मैत्रीची भावना सदैव जागृत राखली पाहिजे. दुःखी माणसाला सहानुभूती दर्शविणे, याला करुणा असे नाव आहे. पुण्यवान लोकांच्या दर्शनाने मनाला जो आनंद होतो, त्या भावनेला मुदिता असे नाव आहे. पापी व दुर्जन लोकांचा तिरस्कार न करता ते पुण्यवान व सज्जन होतील अशी आशा बाळगणे व त्यांच्याशी समभाव राखणे, या भावनेला उपेक्षा असे नाव आहे.

या चारही भावना म्हणजे ध्यानयोगाचेच एक अंग आहे आणि त्या आत्मचिंतनाला उपकारक आहेत. वैदिक धर्मात या ब्रह्मविहारकल्पनेशी सदृश अशी ब्राह्मीस्थिती ही कल्पना आढळते.

या भावनांचे फल म्हणून साधकाला ब्रह्मलोकात जन्म मिळतो व तिथल्या आनंददायी वस्तूंचा उपभोगही घेता येतो. ब्रह्मविहार म्हणजे ब्रह्मलोकात विहार करण्याचे साधनच होय. [बौ. द. मी.; श्री. ज. भा. दवे–श्री. वि. सू. स्मा. ग्रं.]

ब्रह्मवीणा एक तंतुवाद्य. या वाद्याचा आकार सामान्यतः तंबोऱ्यासारखाच असतो. पण तंबोऱ्याप्रमाणे याला गोल भोपळा न लावता अष्टकोनी पेटिका लावतात. त्याचप्रमाणे दांडीच्या मागच्या बाजूला बीन या वाद्याप्रमाणेच आणखी एक अष्टकोनी लहानशी पेटिका जोडतात. याला कधी चार तर कधी पाच तारा असतात. या तारांना आवळण्यासाठी तितक्याच खुंट्या असतात. दांडीचे वरचे टोक सरळ नसून मागे वळविलेले असते.

हे वाद्य बरेच प्राचीन असावे. नारदाच्या संगीतमकरंद या ग्रंथात, इ. स. च्या १४ व्या शतकात होऊन गेलेल्या हरिपाळदेवाचा संगीतसुधाकर व अहोबलाचा संगीतपारिजात या ग्रंथांत याचे उल्लेख आहेत. मात्र या सर्व ग्रंथांमधील ब्रह्मवीणेच्या वर्णनांत एकवाक्यता नाही. संगीतसारसंग्रहमू या तेलुगू ग्रंथात, ब्रह्मवीणेच्या दांडीवरील घोडीच्या आत चौवीस पडदे असतात, असे म्हटले आहे. [डि. सा. इं. म्यु. म्यु.; म्यु. इं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मवैवर्त पुराण एक महापुराण. विष्णू पुराणानुसार हे दहावे पुराण आहे; तर भागवत व कूर्म-पुराण यांच्या मते नववे आहे. याची व्याख्या अशी –

विवृतं ब्रह्म कात्स्न्येन कृष्णेन यत्र शौनक ।
ब्रह्मवैवर्तकं तेन प्रवदन्ति पुराविदः ।।

अर्थ – हे शौनका, या पुराणात कृष्णाने ब्रह्माचा संपूर्ण प्रकाश केल्यामुळे याला पुराणतत्त्ववेत्ते ब्रह्मवैवर्त असे म्हणतात.

स्कंद पुराणमते हे सौर पुराण आहे. पण प्रचलित पोथीत सूर्यमाहात्म्य कुठे दिसत नाही. यात प्रकृतिरूपाने शक्तिप्राधान्य असल्यामुळे हे शाक्त पुराण असल्याचे देवीयामल या ग्रंथात म्हटले आहे. पण एकंदर पुराण वाचल्यावर हे वैष्णव पुराण आहे असे स्पष्ट दिसते. वैष्णवांनी याला सात्त्विक पुराण म्हटले आहे.

प्रारंभी यात ब्रह्मवर्णन होते असे दिसते; पण दुसऱ्या संस्करणात याला कृष्णचरित्र जोडले गेले आणि ब्रह्मवर्णनाला गौणत्व आले. नंतर ते सौर पुराण मानले गेले. आणि शेवटच्या संस्करणात ते पूर्णतया वैष्णव पुराण बनले. वैष्णव संप्रदायाची कित्येक रहस्ये यात साठविलेली आहेत. गौडीय वैष्णवमत, वल्लभ संप्रदाय व राधावल्लभ संप्रदाय यांच्यांत ज्या साधन-विषयक रहस्यांचा प्रचार आहे, त्यांचे मूळ या पुराणात उपलब्ध होते.

प्रस्तुत पुराण प्रथम नारायण ऋषीने नारदाला सांगितले. नारदाने ते गंगाकिनारी व्यासांना सांगितले. व्यासांनी ते सौतीला पटविले. सौतीने ते नैमिषारण्यात शौनकादी ऋषींना सांगितले. सौती म्हणतो, की 'सारभूतं पुराणेषु' = हे पुराण सर्व पुराणांचे सारभूत आहे. याचा प्रारंभश्लोक असा–

गणेशब्रह्मेशसुरेशशेषाः सुराश्च सर्वे मनवो मुनीन्द्राः ।
सरस्वतीश्रीगिरिजादिकाश्च यं नमन्ति देव्यः
प्रणमामि तं विभुम् ।।

अर्थ – गणपती, ब्रह्मा, शिव, इंद्र व शेष; तसेच सर्व देव, मनू व मुनींद्र; त्याचप्रमाणे सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, इ. देवी ज्याला नमस्कार करतात, त्या विभूला मी नमस्कार करतो.

प्रस्तुत पुराणाचे चार खंड असून त्यांची नावे अशी – (१) ब्रह्मखंड (२) प्रकृतिखंड (३) गणपतिखंड (४) श्रीकृष्णजन्म-खंड. या पुराणात एकूण अध्याय २७६ असून, श्लोकसंख्या १० हजार आहे. यात आलेले विषय असे –

ब्रह्मखंड – गोलोकाचे वर्णन. गोलोक हे राधाकृष्णांचे नित्य विहारस्थान. त्याखाली विष्णूलोक. प्रलयकाली विष्णू व शिव यांच्या लोकांचा गोलोकात विलय. सृष्टचारंभी गोलोकविहारी श्रीकृष्ण आपल्या अंगापासून पंचमहाभूते निर्माण करतो. प्रथम नारायणाची उत्पत्ती. त्याच्या नाभिस्थलातून ब्रह्मदेव उत्पन्न होतो. याच्या वक्षःस्थलापासून सरस्वती, लक्ष्मी व दुर्गा या उत्पन्न होतात. श्रीकृष्णाच्या नासाग्रापासून सावित्री जन्म घेते. मनापासून काम, कामाच्या वामांगापासून रती, ब्रह्मदेवापासून वरुण, इत्यादींची उत्पत्ती होते. राधेपासून कोटी गोपींची उत्पत्ती. श्रीकृष्णाकडून शंकराला सर्वपूज्यत्वाचा वर व ब्रह्मदेवाला सृष्टिनिर्मितीची आज्ञा. नंतर ब्रह्मदेव वेदादी सृष्टी उत्पन्न करतो. विश्वकर्मा आणि घृताची अप्सरा यांच्याकडून आणखी एक वेगळी सृष्टी. उपबर्हणाची कथा. नारदाला उपबर्हणाचा शाप व त्याचा वृषलीच्या पोटी जन्म. ब्रह्मस्वरूपवर्णन. आचारधर्म. भक्ष्याभक्ष्यविचार. श्रीकृष्णमाहात्म्य व स्तुती, इत्यादी.

प्रकृतिखंड – प्रकृतीचे स्वरूप व तिच्यापासून देव आणि देवी यांची उत्पत्ती. सरस्वती, गंगा व लक्ष्मी यांचा कलह. युगवर्णन. भूमिदान. गंगोपाख्यान. गंगा व विष्णू यांचा विवाह. वेदवतीची कथा. तुलसीचा जन्म व शंखचूडाशी विवाह. सावित्रीची कथा. नरकवर्णन. लक्ष्मीची उत्पत्ती. समुद्रमंथन. दुर्गोपाख्यान. सुरथ राजाची कथा. बुद्धजन्म. समाधिवैश्याची कथा, इत्यादी.

गणपतिखंड – पार्वतीची उत्पत्ती. स्कंदजन्म. पुत्रासाठी पार्वतीने केलेले व्रत. तिला नारायणकडून वर. गणेशजन्म. शनीच्या दृष्टीमुळे गणेशाचे मस्तक तुटल्याची कथा. गणेशाला हत्तीचे तोंड. कार्तवीर्यकथा. परशुरामाचा क्षत्रियसंहार, इत्यादी.

प्रस्तुत पुराणातला गणेश हा कृष्णाचा अवतार या स्वरूपात दाखविलेला आहे.

श्रीकृष्णजन्मखंड – कृष्णाच्या बाललीला. गोपींबरोबर त्याने केलेला विहार. इंद्रयागाचा उच्छेद. गोवर्धनकथा. तिलोत्तमेची कथा. तिचे शिवप्राप्तीसाठी तप. शिव–पार्वतीसंवाद. त्यांचा विवाह. कृष्णकृत कंसवध. कृष्ण–रुक्मिणीविवाह. मदनजन्म. राधा नावाच्या अनेक व्युत्पत्ती. राधा–कृष्णांचा वियोग व पुनर्भेट.

धार्मिक उपासनेत राधेचे महत्त्व याच पुराणाने प्रथम निर्माण केले व वाढवले. कित्येक वैष्णव संप्रदायांत राधा–कृष्णांच्या युगलरूपाची उपासना इथूनच पुढे सुरू झाली. राधा–कृष्णांचे अद्वैत कसे आहे, त्याविषयी उद्धवकृत राधास्तोत्रात पुढील दोन श्लोक दिले आहेत–

नास्ति भेदो यथा देवि दुग्धधावल्ययोः सदा ।
यथैव गन्धभूम्योश्च यथैव जलशैत्ययोः ।।
यथैव शब्दनभसोर्ज्योतिःसूर्यकयोर्यथा ।
लोके वेदे पुराणे च राधामाधवयोस्तथा ।।

(श्रीकृष्णजन्म. ९२.८६–८७)

अर्थ – ज्याप्रमाणे दूध आणि शुभ्र वर्ण, गंध आणि पृथ्वी, जल आणि शीतलता, शब्द आणि आकाश व सूर्य आणि प्रकाश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांचे सार्वकालीन अद्वैत असते,, त्याचप्रमाणे लोक, वेद आणि पुराणे यांमध्ये राधा–कृष्णांचे अद्वैत आहे.

भागवत व ब्रह्मवैवर्त या दोन्ही पुराणांत कृष्णाची रासक्रीडा वर्णिलेली आहे. पण भागवतातल्या रासक्रीडेला भक्तीचे पुट आहे; तर ब्रह्मववर्तातल्या रासक्रीडेला कामुकतेचा उग्र गंध आहे. नानाप्रकारचे सुरतसंगम आणि शृंगारक्रीडा यांनी ब्रह्म-वैवर्ताची रासक्रीडा गढूळ व उत्तान झाली आहे.

गंगास्तोत्र, गणेशकवच, गर्भस्तुती, एकादशी, काशी, मुक्ती, चंपकारण्य, ब्रह्मारण्य व केदार यांची माहात्म्ये, इ. ग्रंथ या पुराणातून वेगळे काढलेले आहेत.

प्रस्तुत पुराणात सरस्वतीची थोरवी पुढील श्लोकात वर्णिली आहे (२·६·११)–

यया विना जगत्सर्वं शश्वज्जीवन्मृतं सदा ।
यया विना जगत्सर्वं मूकमुन्मत्तवत्सदा ।।

अर्थ – सरस्वती (विदग्ध वाणी) जर नसती, तर सारे जग जीवन्मृत ठरले असते व मूकवत किंवा उन्मत्तवत झाले असते.

कुटुंबातली गृहलक्ष्मी सती या पदवीला कशी चढते, त्या-विषयी श्लोक असा (२·२५·१७)–

गृहकृत्यं सुनिर्वृत्य भोजयित्वा पतिं सती ।
अतिथिं पूजयित्वा च स्वयं भुङ्क्ते सुखं सती ।।

अर्थ – जी गृहिणी गृहकृत्ये उत्तम प्रकारे पार पाडते व जी पतीला व अतिथीला भोजन घालून मग स्वतः सुखाने भोजन करते, ती सती होय.

धर्माच्या आवश्यकतेविषयीचा श्लोक (३·३४·४६)असा –

यो न रक्षति धर्मं च तस्य को रक्षिता भुवि ।
स नश्यति स्वयं मूढो जीवन्नपि मृतो हि सः ।।

अर्थ – जो धर्माचे रक्षण करीत नाही, त्याचे या जगात कोण रक्षण करील ! असा मूढ मनुष्य स्वतःच (स्वतःच्या हातांनी) नाश पावतो. तो जगत असला, तरी तो जीवन्मृतच होय.

दक्षिणेत ब्रह्मकैवर्त नावाचे एक पुराण आहे. ते व हे पुराण एकच असावे, असे काही संशोधकांचे मत आहे. प्रचलित ब्रह्म-वैवर्त आणि मत्स्य व नारद यांच्या सूचीत सांगितलेले ब्रह्मवैवर्त यांचा मेळ बसत नाही.

आद्य शंकराचार्यांनी विष्णुसहस्रनामाच्या भाष्यात प्रस्तुत पुराणातले उतारे घेतले आहेत, त्या अर्थी ते शंकराचार्यपूर्व आहे हे निश्चित ठरते. श्री. हरप्रसाद शास्त्री यांच्या सूचीवरून याचा काल सनपूर्व ८०० ते ९०० वर्षे ठरतो. अर्थात त्या-मध्ये जी वेळोवेळी वाढ झाली किंवा परिवर्तन झाले, त्याचा काळ मात्र खूप अलिकडचा आहे. [पु. वि.; पु. नि.; अ. पु. द.; श्री. वा. मो. कानिटकर– स्वराज्य, २४ सप्टें. १९६६.]

ब्रह्मव्रत एक काम्य व्रत. या व्रताचा प्रारंभ कोणत्याही शुभ दिवशी करतात. याचा विधी असा – ब्रह्मांडाची एक सुवर्णप्रतिमा करतात. नंतर तिलदान व अग्निपूजा करून ती ब्रह्मांडप्रतिमा एका दंपतीला दान देतात. फल – ब्रह्मलोक – प्राप्ती व पुनर्जन्मातून मुक्ती.

या व्रताचा दुसरा पर्याय असा – द्वितीयेच्या दिवशी वेदा-ध्ययन करणाऱ्या ब्रह्मचाऱ्याला भोजन घालणे, ब्रह्ममूर्तीची पूजा करणे व घृत आणि समिधा यांचा होम करणे. [हिं. ध.]

ब्रह्मसर उ. भारतातील एक प्राचीन तीर्थ. हे कुरुक्षेत्रात आहे सांप्रत काही लोक या सरोवराच्या स्थानालाच कुरु-क्षेत्र म्हणतात. आज संनिहित नावाचे जे एक वेगळे सरोवर आहे, ते पूर्वी याच सरोवराचा एक भाग होता आणि या सग-ळ्याची मिळून लांबीरुंदी आठ मैल होती, असे सांगतात.

हे सरोवर कुरू राजाने तयार केले, असे उल्लेख मिळतात. या सरोवराच्या मध्यभागी दोन बेटे आहेत. त्यांतील एकावर विष्णूचे मंदिर आहे व दुसऱ्यावर चंद्रकूप नावाचे आणखी एक तीर्थ आहे. [कल्याण–तीर्थांक]

ब्रह्मसावर्णी दहावा मनू. हा ब्रह्मा व दक्षकन्या सुव्रता यांचा पुत्र असून, चाक्षुष मन्वंतरात जन्मला, असे वायू पुराणात म्हटले आहे(२·८·४२). भागवतात याला उपश्लोकाचा पुत्र म्हटले आहे (८·१३·२१). दहाव्या मन्वंतराचा अधिपती होता. भूरिषेणादी त्याचे दहा पुत्र होते. [पु. इं.; प्रा. च. को.]

ब्रह्मसावित्रीव्रत एक काम्य व्रत. हे एक स्त्रीव्रत आहे. भाद्रपद शुद्ध त्रयोदशीपासून या व्रताचा प्रारंभ करतात. यात तीन दिवस उपवास करायचा असतो. ते शक्य नसेल तर त्रयोदशीला नक्त, चतुर्दशीला अयाचित आणि पौर्णिमेला उपवास करावा, असे सांगितले आहे. ब्रह्मा आणि सावित्री यांच्या मूर्ती करून त्यांची पूजा करणे, पौर्णिमेला रात्री जागरण करणे व प्रतिपदेला त्या मूर्तींचे दान करणे असा याचा विधी आहे. या व्रताची कथा म्हणजे सावित्री–सत्यवानांची कथा होय. फल– अष्टपुत्रांची प्राप्ती आणि पतीला दीर्घायुष्याचा लाभ. [हिं. ।.]

ब्रह्मसूत्रे बादरायण व्यासरचित एक ग्रंथ. यात सुमारे साडे-पाचशे सूत्रे असून, हा ग्रंथ वेदान्ताच्या सिद्धान्तांचा आकरग्रंथच मानलेला आहे. त्यामुळेच याला वेदान्तसूत्रे असेही म्हणतात. भिक्षू किंवा संन्यासी यांच्यासाठी ही सूत्रे फार उप-युक्त असल्यामुळे त्यांना भिक्षुसूत्रे असेही नाव आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मसूत्रांचे चार अध्याय असून, प्रत्येक अध्यायाचे चार पाद आहेत. पहिल्या अध्यायाचे नाव समन्वय असे असून, त्यात अनेक प्रकारच्या श्रुतींचे साक्षात किंवा परंपरेने अद्वितीय ब्रह्माच्या ठिकाणी तात्पर्य दाखवले आहे. याच्या पहिल्या पादात स्पष्ट ब्रह्मलिंगयुक्त वाक्यांचा विचार केला आहे. यातील पहिली चार सूत्रे विषयाच्या दृष्टीने फार महत्त्वाची असून, त्यांना चतुःसूत्री असे म्हणतात. दुसऱ्या पादात अस्पष्ट ब्रह्मलिंगयुक्त श्रुति-वाक्यांचा, तिसऱ्या पादात स्पष्ट ब्रह्मलिंग प्रायः ज्ञेय ब्रह्मविषयक वाक्यांचा व चौथ्या पादात अज, अव्यक्त, इ. पदांचा विचार केलेला आहे.

दुसऱ्या अध्यायाचे नाव अविरोध असून, त्यात स्मृति-तर्का-दींच्या विरोधांचा परिहार करून ब्रह्माच्या ठिकाणी अविरोध दर्शविला आहे. याच्या पहिल्या स्मृतिपादात सांख्यादी स्मृतींच्या सिद्धातांचे खंडन केले आहे. दुसऱ्या तर्कपादात सांख्य, वैशेषिक, जैन, पाशुपत, इ. मतांचे युक्तीने खंडन करून वेदान्तमताची प्रतिष्ठापना केली आहे. या दोन पादांत बादरायणाने आपल्या सूक्ष्म, समर्थ व व्यापक तर्कयुक्तींनी प्रतिपक्षांच्या सिद्धान्तांचे अत्यंत मार्मिक विश्लेषण केले आहे. ब्रह्मापासून तत्त्वांची उत्पत्ती झाली असल्याचे विवेचन तृतीय पादात केले आहे. चतुर्थ पादात भूतविषयक श्रुतींचा विरोधपरिहार केला आहे.

तिसऱ्या अध्यायाचे नाव साधन असे आहे. त्यात जीव व ब्रह्म यांची लक्षणे सांगून मुक्तीच्या बहिरंग व अंतरंग साधनांचे निरूपण केले आहे. चतुर्थ अध्यायाचे नाव फल असून, त्यात सगुण व निर्गुण विद्यांच्या फलांचे सांगोपांग विवेचन केले आहे.

ब्रह्मसूत्रांचे आध्यात्मिक सिद्धान्त कोणते होते, हे सांगणे मोठे कठीण काम आहे. ही सूत्रे इतकी स्वल्पाक्षर आहेत, की कोणत्या ना कोणत्यातरी भाष्याचे साहाय्य घेतल्याशिवाय त्यांचा अर्थ लागत नाही. डॉ. घाटे यांनी ब्रह्मसूत्रांतील निरनिराळ्या भाष्यांचे तौलनिक अध्ययन करून, मूळ सूत्रांचे संभाव्य सिद्धान्त काय असावे, ते पुढीलप्रमाणे सांगितले आहे – विभू ब्रह्मापेक्षा आत्मा अणू आहे. जीव चैतन्यरूप असून, ज्ञान हा त्याचा गुण आहे. ब्रह्म हे जगताचे उपादान व निमित्त कारण आहे. कार्यकारणसंबंधाच्या बाबतीत सूत्रकार विवर्तवादापेक्षा परिणामवादाचे पक्षपाती वाटतात.

डॉ. घाटे यांच्या मतानुसार शंकराचार्यांच्या अनेक सिद्धान्तांना ब्रह्मसूत्रांत पुष्टी मिळत नाही. ब्रह्मसूत्रांवर शंकराचार्य, भास्कराचार्य, रामानुज, मध्व, निम्बार्क, श्रीकंठ, इत्यादींची भाष्ये प्रसिद्ध आहेत. प्रत्येक भाष्यकाराच्या सिद्धान्तांतच नव्हे; तर सूत्रे आणि अधिकरणे यांच्या संख्येतही फरक आहे.

ब्रह्मसूत्रांचा रचनाकाळ सनपूर्व १५०-१०० हा असल्याचे चिं. वि. वैद्य यांचे मत आहे. [भा. द.– बलदेव उपाध्याय; हिन्दुत्व; ब्रह्मसूत्रशांकरभाष्य – संपा. श्री. का. वा. अभ्यंकर]

ब्रह्महत्या एक महापातक. ब्राह्मणाचे शरीर हे प्राचीन काळापासून फार पवित्र मानलेले असल्यामुळे, ब्राह्मणाची हत्या करणे हे महापातकांत गणले जाऊ लागले. कोणत्याही वर्गातील मनुष्याने जाणूनबुजून ब्राह्मणाची हत्या केली, तर त्याला प्रायश्चित्त-प्रकरणात देहान्त प्रायश्चित्त सांगितले आहे. मनुस्मृतीत मात्र त्याऐवजी अन्य तेरा प्रकारची प्रायश्चित्ते सांगितली आहेत. बारा वर्षे वनात राहून तप करणे, हे त्यांपैकी एक होय. अजाणता केलेल्या ब्रह्महत्येसाठी अश्वमेध, गोसव, इ. यज्ञ; तसेच तीर्थयात्रा, सर्वस्वदान, अरण्यात वेदसंहितेचे पारायण, इ. प्रायश्चित्ते आहेत. नक्षत्रपुरुष व शुभसप्तमी ही व्रते केल्याने, नर्मदास्नानाने व काशीत निवास केल्याने ब्रह्महत्येचे पातक दूर होते, असे मत्स्य पुराणात सांगितले आहे. शिवाने ब्रह्मचाचे पाचवे मस्तक तोडल्यावर तो जेव्हा काशीत वास्तव्याला आला, तेव्हाच त्या पापाची निष्कृती झाली, अशी कथा त्या संबंधात सांगितली आहे.

क्षत्रियाने ब्रह्महत्या केली असता, त्याने कोणाशीतरी युद्ध करावे. त्यात तो जखमी किंवा मृत झाला तर पापमुक्त होतो, असे सांगितले आहे. (आप. ध. १.९.२५.१२)

जेव्हा इंद्राने वृत्राचा वध केला, तेव्हा त्याच्यामागे कृत्यारूप ब्रह्महत्या लागली. पण त्याने अश्वमेध यज्ञ करताच तो शुद्ध झाला व तिच्यापासून त्याची सुटका झाली. त्यानंतर ब्रह्महत्येने देवांना विचारले, की 'मी आता कुठे राहू ?' मग देवांनी एक तिला उपाय सांगितला. त्याप्रमाणे तिने स्वतःला चार भागांत विभक्त केले. एका अंशाने ती पावसाळ्याचे चार महिने जलपूर्ण नद्यांत, दुसऱ्या अंशाने सर्व भूमीवर, तिसऱ्या अंशाने सुंदर युवतींच्या ठिकाणी प्रतिमास तीन रात्री व चौथ्या अंशाने सत्यवचनी ब्राह्मणाचा वध करणाऱ्या लोकांच्या ठिकाणी राहू लागली. [हि. ध.; पु. इं.; वा. रा. को.]

ब्रह्मक्षत्री एक जात. मुख्यतः गुजरातमध्ये यांची वस्ती आहे. परशुरामाने क्षत्रियसंहार सुरू केला, तेव्हा काही स्त्रिया आपण ब्राह्मण असल्याचे सांगून बचावल्या. ब्रह्मक्षत्री ही त्यांची संतती होय, असे सांगतात. यांच्या चालीरीती पंजाबमधील खत्र्यांप्रमाणे आहेत. त्यावरून हे क्षत्रिय असून, पंजाब प्रांतातून गुजरातेत आले असावे. यांच्यांत पाच पोटभेद असून, अनेक गोत्रे आहेत. या जातीतील पोटभेदांत रोटी–बेटी व्यवहार होत नाहीत. नात्रवळ व चुडीगर ही त्यांची नावे धंद्यांवरून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पडलेली असून, नात्रवळ लोक मूर्तीचे डोळे व चुडीगर लोक बांगड्या करतात. यांच्यांतले काही वल्लभसंप्रदायी असून, बाकीचे शैव किंवा शाक्त आहेत. यांच्या प्रत्येक कुळाची निराळी कुलदेवता असते. [सु. वि. को.; मुं. इ. /जा.]

ब्रह्मा (१) ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रयींपैकी एक देव. याला ब्रह्मदेव किंवा प्रजापती असेही म्हणतात. सृष्टीची उत्पत्ती हे ब्रह्म्याचे, स्थिती हे विष्णूचे व लय हे महेशाचे कार्य मानलेले आहे. ब्रह्मा सर्व देवतांमध्ये प्रथम उत्पन्न झाला आणि तो विश्वाचा कर्ता व रक्षणकर्ता बनला, असे मुंडकोपनिषदात सांगितले आहे. सृष्टीच्या आरंभी त्याने द्युलोकाचा विस्तार केला, असे अथर्ववेदात म्हटले आहे (११·२२·२१).

शिव व विष्णू यांच्याप्रमाणे ब्रह्म्याचीही दोन रूपे आहेत. एक म्हणजे पूर्ण ब्रह्मरूप व दुसरे रजोगुणाचा अधिष्ठाता असे देवरूप. ब्रह्मा हा स्वत: स्वयंभू असून, साऱ्या सृष्टीचा निर्माता आहे. हा सृष्टिस्वरूप आहे. जगत, विराट आणि ब्रह्मा हे तीनही पर्यायवाचक शब्द आहेत, असे योगवासिष्ठात (७४·२४–२५) सांगितले आहे.

ब्रह्मदेवाला चार मुखे असून, त्यांची व्याख्या रूपमंडनात पुढीलप्रमाणे केली आहे –

ऋग्वेदादिप्रभेदेन कृतादियुगभेदतः ।
विप्रादिवर्णभेदेन चतुर्वक्त्रं चतुर्भुजम् ।।

अर्थ – याची चार मुखे व चार बाहू हे ऋग्वेदादी चार वेद, कृतादी चार युगे व ब्राह्मणादी चार वर्ण यांची प्रतीके आहेत.

वेदांतील प्रजापतीलाच पुराणांत ब्रह्मा म्हणून स्वीकारले आहे. क्षीरसागरात शेषशायी नारायणाच्या नाभिकमलातून ब्रह्म्याचा जन्म झाला, म्हणून त्याला स्वयंभू असे नाव मिळाले. नारायणाने त्याला आकाशवाणीच्या द्वारा आदेश दिल्यावर, त्याने हजारो वर्षे उग्र तपश्चर्या केली आणि मग ब्रह्मांडाची उत्पत्ती केली, अशी पौराणिक कथा आहे.

ब्रह्म्याचे मानस, कायिक, चाक्षुष, वाचिक, श्रवणज, नासिकाज, अंडज किंवा पद्मज असे एकूण सात जन्म झाले असल्याचे महाभारतात म्हटले आहे. (शांति. ३५७.४०–४३). त्याला मुळात एकच मुख होते; पण नंतर त्याला आणखी चार मुखे निर्माण झाली. यासंबंधीची मत्स्य पुराणातली कथा अशी –

एकदा ब्रह्म्याने आपल्या अर्धांगापासून शतरूपा नामक स्त्री निर्माण केली. ती अत्यंत रूपवती होती. जन्मल्यावर ती त्याच्या भोवती प्रदक्षिणा घालू लागली. पण त्या वेळी त्याचे मानसपुत्र त्याच्या भोवती बसले होते. त्यामुळे ब्रह्म्याला तिच्याकडे तोंड वळवून पाहायचा संकोच वाटू लागला. पण पाहण्याची इच्छा तर जबर होती. म्हणून त्याने चारही बाजूंना चार मुखे उत्पन्न केली. नंतर ती आकाशमार्गाने चालली असता त्याने मध्यभागी वर आणखी एक जटाधारी पाचवे शिर उत्पन्न केले. मात्र

ब्रह्मदेवाची मूर्ती – चालुक्य शैली
(इ. स. चे ६ वे शतक) – ऐहोळ

त्याच्या या शतरूपेकडे पाहण्याने त्याने पुत्रप्राप्तीसाठी जे तप केले होते, त्याचा नाश झाला (मत्स्य पु. ३·३०–४०).

सृष्ट्युत्पत्ती करण्यासाठी ब्रह्मा व नारायण हे दोघे सिद्ध झाले असता, त्या दोघांत श्रेष्ठ कोण असा वाद उत्पन्न झाला. त्याचा निकाल लावून घेण्याकरता ते दोघे शंकराकडे गेले. तेव्हा शंकराने त्यांना आपल्या लिंगाच्या आद्यंताचा शोध लावायला सांगितले व जो शोध लावील, तो श्रेष्ठ असे म्हटले. त्याप्रमाणे ब्रह्मा ऊर्ध्व मार्गाने शोधासाठी गेला. त्याने गाय व केतकी यांना खोटी साक्ष द्यायला लावून आपण शोध लावल्याचे खोटेच सांगितले. त्यामुळे शिवाने त्याला शाप दिला, की तू नारायणा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हून कनिष्ठ व अपूज्य होईल (स्कंद पु. १.१.६; ३.१.१४).

ब्रह्मा अपूज्य ठरला त्याविषयीची दुसरी कथा अशी –

एकदा ब्रह्म्याने प्रभास क्षेत्रात यज्ञ केला. त्या वेळी यज्ञातील कामे त्याने इंद्रादी देवांकडे सोपविली. दीक्षा घेऊन यज्ञाला प्रारंभ करण्यासाठी याने सावित्रीला बोलावले. पण काही कामामुळे तिला यायला उशीर झाला. तेव्हा ब्रह्मा रागावला व त्याने इंद्राला दुसरी स्त्री आणायला सांगितले. इंद्राने एक गवळ्याची मुलगी आणली. तीच गायत्री या नावाने ब्रह्म्याची स्त्री झाली. मग ब्रह्म्याने यज्ञ केला. यज्ञसमाप्तीच्या सुमारास सावित्री तिथे आली व रागावून तिने ब्रह्मदेवाला शाप दिला, की 'यापुढे तुझी पूजा कोणी करणार नाही'. (स्कंद पु. ७.१.१६५).

ब्रह्मदेवाने प्रथम तमोगुणी, नंतर रजोगुणी व त्यानंतर सत्त्वगुणी अशी प्रजा उत्पन्न केली. तमोगुणी सृष्टीच्या नंतर त्याने

ब्रह्माणी

नाग, तिर्यक, ऊर्ध्वस्रोतस देव, अर्वाक्स्रोतस नर, अनुग्रह, भूत, प्राकृत, वैकृत व कौमार अशी प्रजा उत्पन्न केली (पद्म पु. सृष्टि. ३). यानंतर त्याने क्षुधा, क्रोध, यक्ष, राक्षस, सर्प, भूत, गंधर्व, पशू, पक्षी व वृक्ष उत्पन्न केले. याच्या पूर्वेकडील मुखापासून गायत्री छंद, ऋग्वेद, त्रिवृत्स्तोम, रथंतरसाम व अग्निष्टोम; दक्षिणेकडील मुखापासून यजुर्वेद, पंचदशस्तोम, बृहत्साम व उक्थ्य; पश्चिमेकडील मुखापासून सामवेद, सप्तदशस्तोम, वैरूपसाम व अतिरात्र आणि उत्तरेकडील मुखापासून अथर्ववेद, एकविंश आप्तोर्याम, अनुष्टुप छंद व वैराजसाम उत्पन्न झाले.

यानंतर त्याने मरीची, अत्री, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, ऋतु, दक्ष, भृगू व वसिष्ठ या मानस पुत्रांना उत्पन्न केले व त्यानंतर आपल्या अवयवांपासून धर्म, रुची, भृगू, दक्ष, इ. ऋषी निर्माण केले (ब्रह्मांड पु. २.९). याने उजव्या अंगठ्यापासून दक्ष, हृदयापासून मंदन, अधरापासून लोभ, डोळ्यांपासून मृत्यू, कंठापासून प्रमोद, तळहातापासून भरत व देहापासून शतरूपा यांना उत्पन्न केले. शतरूपेलाच सावित्री, सरस्वती, गायत्री व ब्रह्माणी म्हणतात. हिच्या ठिकाणी ब्रह्म्याला स्वायंभुव मनू झाला.

भागवत पुराणात सांगितले आहे, की कामवश होऊन स्वयंभूने वाक नामक आपल्या कन्येची अभिलाषा धरली. आपला पिता असले अधर्म्य कृत्य करायला प्रवृत्त झाला, हे पाहून त्याच्या पुत्रांनी त्यापासून त्याला परावृत्त करण्यासाठी त्याची निर्भर्त्सना केली. मुलांचे बोलणे ऐकून ब्रह्म्याला लाज वाटली आणि त्याने आपल्या शरीराचा त्याग केला.

वरवर पाहता ही कथा अनैतिक भाव दर्शविणारी आहे. पण ती वाच्यार्थाने न घेता प्रतीकरूपानेच जाणून घेतली पाहिजे. या कथेमागचा प्रतीकात्मक अर्थ असा–

प्रजांचे पालन करतो, म्हणून सूर्य हा प्रजापती आहे. पूर्वक्षितिजावर रोज सकाळी सूर्योदयाच्या आधी उषेचे आगमन होते व नंतर सूर्याचे. सूर्यामुळेच उषेचा जन्म होतो, म्हणून उषा ही सूर्याची दुहिता होय. तिच्या ठिकाणी सूर्य आपल्या अरुण किरणरूपी वीर्याचा निक्षेप करतो आणि दिवसरूपी पुत्र उत्पन्न करतो. अशा प्रकारे सूर्य व उषा यांचा दैनंदिन व्यवहार हा ब्रह्मा व त्याची दुहिता यांच्या संबंधातून होतो.

या कथेचे आध्यात्मिक स्वरूप असे – वेदांत मनाला प्रजापती व वाणीला सरस्वती अशी नावे आहेत. मनुष्य प्रथम मनात संकल्प करतो आणि तोच वाणीच्या द्वारे प्रगट करतो. अशा रीतीने मनाची सत्ता पहिली व वाणीची सत्ता नंतरची होय. यामुळे मनाला पिता व वाणीला दुहिता म्हटलेले आहे. जेव्हा मनरूपी पिता आपल्या वाणीरूपी कन्येच्या ठिकाणी प्रेरणारूपी वीर्याचे आधान करतो, तेव्हा शब्दरूपी पुत्राचा जन्म होतो.

एकदा ब्रह्मदेवाने शंकराची स्तुती केली व त्याला आपला पुत्र होण्यास सांगितले. त्यामुळे शंकर रागावला व त्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्माला सांगितले, की 'मी तुझा पुत्र होईन; पण तुझे पाचवे मस्तक तोडीन.' ब्रह्मदेव कबूल होताच शंकराने आपल्या अंगठ्याच्या नखाने त्याचे पाचवे मस्तक तोडले. मत्स्य पुराणात (१८३.८४.८६) ही कथा दिलेली आहे.

ब्रह्माचे आयुर्मान दिव्य शंभर वर्षे आहे. त्या दिव्य वर्षांचे कोष्टक असे–

१७,२८,००० मानवी वर्षे	=	कृतयुग
१२,९६,००० मानवी	=	त्रेतायुग
८,६४,००० मानवी	=	द्वापरयुग
४,३२,००० मानवी	=	कलियुग

कृत, त्रेता, द्वापर, व कली ही चार युगे मिळून एक पर्याय होतो. असे १००० पर्याय म्हणजे ब्रह्माचाचा एक दिवस किंवा कल्प; असे ३६० दिवस म्हणजे १ दिव्य वर्ष.

ब्रह्मदेवाची अशी पन्नास वर्षे सांप्रत उलटली आहेत.

ब्रह्म-मूर्ती– ब्रह्माची मूर्ती कशी करावी, ते मत्स्य पुराण, विष्णू पुराण, रूपमंडन, सुप्रभेदागम, इ. ग्रंथांत सविस्तर सांगितले आहे. त्यांपैकी मत्स्य पुराणाचे विधान असे–

ब्रह्मा कमण्डलुधरः कर्तव्यः स चतुर्मुखः।
हंसारूढः क्वचित् कार्यः क्वचिच्च कमलासनः॥
वर्णतः पद्मगर्भाभश्चतुर्बाहुः शुभेक्षणः।
कमण्डलुं वामकरे स्रुवं हस्ते तु दक्षिणे॥

(मत्स्य पु. २५९.४०-४१)

अर्थ – ब्रह्मा हा चतुर्मुख, चतुर्बाहू, हंसारूढ किंवा क्वचित कमलारूढ करावा. त्याचा वर्ण कमलाच्या अंतर्भागासारखा लाल व दृष्टी शुभ असावी. त्याच्या डाव्या हातात कमंडलू व उजव्या हातात स्रुवा असावी.

तसेच, त्याच्या डाव्या अंगी सावित्री, पुढे चार वेदधारी व सभोवती ऋषी असावे, असे अभिलषितार्थचिंतामणीत सांगितले आहे. ब्रह्याला दाढी अवश्य पाहिजे, असे रूपमंडनात म्हटले आहे. विष्णू पुराणात त्याला सात हंसांच्या रथावर आरूढ करायला सांगितले आहे.

ब्रह्मदेवाची स्वतंत्र मंदिरे फार थोडी आहेत. भारतात खेडब्रह्म, ईदर, दुदाही, अजमेरमधील पुष्कर, वसंतगड, महाबलिपुरम आणि गोमंतकातील कर्मळी या ठिकाणी ब्रह्मदेवाची मंदिरे आहेत. त्यांत ब्रह्मदेवाच्या वेगवेगळ्या ढंगांच्या मूर्ती आहेत. दुदाही येथील मंदिरात गाभाऱ्याच्या द्वाराच्या मध्यभागी हंसारूढ अशा त्रिमुखी ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. त्यात त्याला दाढी आहे. वसंतगड (राजस्थान) येथील मंदिरात त्रिमुखी ब्रह्मदेवाची पूर्णाकृती उभी मूर्ती आहे. मूर्तीला हात दोनच असून, त्यांत अक्षमाला व कमंडलू आहे. खेडब्रह्म (जि. महीकांठा) येथील मंदिरात मुख्य मूर्तीशिवाय पार्श्वदेवता म्हणून ब्रह्याचीच तीन रूपे दाखवली आहेत. म्हणजे त्यांची वाहने तेवढी नंदी, अश्व व

चतुर्मुख ब्रह्मा – श्रवणनाथ

गरुड अशी बदललेली आहेत. त्यावरून त्याचा इथे शिव, सूर्य व विष्णू यांच्याशी संबंध दाखविलेला दिसतो. गोमंतकातील ब्रह्मदेवही त्रिमुखच आहे. चौथे मुख मागच्या अंगाला आहे असे समजायचे. याशिवाय ब्रह्याच्या प्रतिमा इतरही काही ठिकाणी आढळतात. मंगळवेढे येथे महादेवाच्या विहिरीच्या कमानीत पाच फूट उंचीची ब्रह्मदेवाची उभी मूर्ती असून, तिच्या चार हातांत अक्षमाला, स्रुक्, वेदग्रंथ व कमंडलू अशा चार वस्तू आहेत. मूर्तीच्या मधल्या मुखाला दाढी आहे. मद्रास येथील वस्तुसंग्रहालयातील ब्रह्मदेवाची मूर्ती उभी असून, त्याच्या सर्व मुखांना दाढी आहे.

ब्रह्मदेवाच्या सर्वांत प्राचीन मूर्ती मथुरेच्या कलासंप्रदायात आढळतात. मथुरेत कुषाणकालापासून मध्यकालापर्यंतच्या ब्रह्मदेवाच्या अनेक मूर्ती मिळाल्या आहेत. त्या लाल किंवा मंजिठी दगडाच्या बनवलेल्या आहेत.

मथुरेच्या संग्रहालयात कुषाणकालातील एक मूर्ती आहे. तिची तीन मुखे एका ओळीत असून, चौथे मुख मधल्या मुखाच्या वर आहे. याशिवाय, ब्रह्मदेवाच्या अनेक मूर्ती तिथे असून, त्यांतली एक अत्यंत कलापूर्ण आहे. त्याचा जटाजूट, दाढी, हार व अन्य अलंकारही रेखीव व स्पष्ट आहेत. ब्रह्मा सावित्रीसह पद्मासनावर बसला आहे. त्याच्या तीन हातांत वेद, कमल व स्रुवा आहे. ब्रह्याची व सावित्रीची मुखमुद्रा प्रसन्न आहे.

स्वतंत्र मूर्तीशिवाय त्रिमूर्तीत व अन्य देवदेवतांच्या सहाय्यक म्हणूनही त्याच्या काही मूर्ती आढळतात. मथुरा, सारनाथ व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गांधार येथे त्याच्या मूर्ती असलेले अनेक शिलापट्ट सापडले आहेत.

बौद्ध धर्मात ब्रह्मदेवाची फारच अवहेलना केलेली आहे. त्यांच्या प्रसन्नतारा या देवतेच्या एका हातात ब्रह्मदेवाचे मस्तक असते आणि ती त्याच्या धडावर उभी असते. विद्युज्ज्वाला-करालो हिच्याही एका हातात ब्रह्मदेवाचे तुटलेले शिर असते.

जैन मूर्तिविधानात ब्रह्मा हा शीतलनाथ या तीर्थंकराच्या स्वरूपात किंवा दिक्कपालाच्या रूपात आढळतो.

मध्य आशिया, ब्रह्मदेश, चीन, इंडोनेशिया या ठिकाणींही ब्रह्मदेवाच्या मूर्ती सापडल्या आहेत.

संप्रदाय – श्री. तारापद भट्टाचार्य यांनी ब्रह्मसंप्रदायाविषयी संशोधन करून माहिती दिली आहे, ती अशी– फार पूर्वी शैव व वैष्णव संप्रदायाप्रमाणे ब्रह्म्याचाही एक संप्रदाय होता. त्या संप्रदायाचे दोन भेद होते. काही लोक ब्रह्मदेवाची पंच महाभूतांच्या रूपांत उपासना करीत, तर काही यज्ञयागांच्या स्वरूपात त्याला भजत. त्यांपैकी पहिल्या उपासकांना असुर असे नाव होते. त्यांच्या पंथाला पंचरात्र असे म्हणत. हा पंचरात्र पंथ मुळात ब्रह्मदेवाचा होता; विष्णूचा किंवा वासुदेवाचा नव्हता. या पंथात फक्त पाचच तत्त्वांची उपासना होत होती, असे नव्हे; तर त्यात अनेक तत्त्वांची उपासना होत होती. ती सर्व ब्रह्म्याचीच रूपे आहेत, असे समजले जाई. पण पुढे वैदिक देवतांचा बोलबाला झाला आणि वैदिक धर्माने पश्चिम भारतात या पंथाला मागे सारले. वैदिक इंद्राने प्रजापती, ब्रह्मा, शिव, इ. आधीच्या देवतांचे माहात्म्य अगदी कमी करून टाकले. पण पूर्वेच्या बाजूला ब्रह्मावर्त-कुरुक्षेत्रापासून ओडिसापर्यंत, हा पंचरात्र पंथ टिकून राहिला. मथुरेच्या प्रदेशात श्रीकृष्णासारख्या लोकोत्तर विभूतीच्या जन्मानंतर वैष्णव पंचरात्र पंथाचा उदय झाला. बौद्ध व जैन धर्मांच्या उदयानंतर हा पंथ नामशेष झाला.

ब्रह्मा ही वैदिक काळापूर्वीची देवता होती आणि निरनिराळ्या काळी भारताच्या निरनिराळ्या भागांत तिला निरनिराळी नावे होती. ऋग्वेदात प्रजापती हे ब्रह्म्याचेच दुसरे नाव होते. ऋग्वेदात ब्रह्म्याच्या संप्रदायाचा उल्लेख नाही, याचा अर्थ ती त्या काळात अस्तित्वात नव्हता असे नव्हे; पण इंद्र देवतेचे माहात्म्य वाढले आणि ब्रह्मदेवाला मुद्दाम दडपून टाकण्यात आले. ब्राह्मणे आणि पुराणे या ग्रंथांत या घटनेचा उल्लेख थोड्या वेगळ्या शब्दांत् आला आहे. त्यांत म्हटले आहे, की सृष्टी उत्पन्न केल्यावर ब्रह्मा मरण पावला. याचा अर्थ असा, की वैदिक धर्माच्या उदयानंतर पश्चिम भारतात वरच्या वर्गांतील लोकांनी ब्रह्म्याची पूजा-अर्चा करणे सोडून दिले. त्यामुळे त्या वेळी समाजात इंद्रादी वैदिक देवतांना भजणारे वैदिक लोक व ब्रह्म्याच्या तत्त्वांना भजणारे असुर लोक असे दोन भेद अस्तित्वात आले. कालांतराने या जुन्या देवतेचा प्रभाव हळूहळू वाढू लागला आणि त्या वेळच्या सूत्रवाङ्मयांत व पुराणांत ब्रह्म्याचे

ब्रह्मदेवाची मूर्ती (इ. स. चे १८ वे शतक)

नाव पुन्हा येऊ लागले. वेदांतील व उपनिषदांतील प्रजापती आणि ब्रह्मणस्पती, यांची पुन्हा ब्रह्मरूपाने उपासना सुरू झाली.

महाभारतात सांगितले आहे, की ब्रह्म्याच्या चौथ्या जन्मात वैदिक धर्माचा उदय झाला. याचा अर्थ असा, की पंचरात्रपंथापासून वैदिक धर्म उत्क्रांत झाला. ब्रह्मांड पुराणात याविषयी सांगितले आहे, ते असे–

ब्रह्मा कृतयुगे पूज्यस्त्रेतायां यज्ञ उच्यते ।
द्वापरे पूज्यते विष्णुरहं पूज्यश्चतुर्ष्वपि ।।

अर्थ – कृतयुगात ब्रह्मा हा पूज्य, त्रेतायुगात यज्ञ पूज्य, द्वापरयुगात विष्णू पूज्य व चारही युगात मी (शिव) पूज्य आहे.

या श्लोकावरून सुरवातीच्या धर्मात ब्रह्म्याची पूजा प्रचलित होती, हे कळते. त्यानंतरच्या वैदिक धर्मात यज्ञयागाला प्राधान्य मिळाले.

वैदिक धर्माने ब्रह्म-संप्रदायाला दाबून टाकल्यावर त्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असुरांचा धर्म असे समजू लागले. अनेक असुरांनी किंवा दैत्यांनी ब्रह्मदेवाकडून वर मिळविल्याच्या कथा पुराणांत आहेत. ब्रह्म-संप्रदायाच्या खुणा पुढील काळातील धार्मिकेतर ग्रंथांतही आढळतात. घर बांधायच्या वेळी जे धार्मिक विधी करतात, त्यांत ब्रह्मा हा प्रमुख पूज्य देव आहे. वास्तुमंडलात ब्रह्म्याचे स्थान मध्यवर्ती असते. घर बांधायच्या वेळी ब्रह्मशिलान्यास करणे, हा पहिला विधी असतो. ब्रह्म्याचे मंदिर गावाच्या मध्य-वर्ती असावे, असे अग्नी पुराणात सांगितले आहे. प्राचीन काळी शहराच्या प्रमुख द्वाराला ब्रह्मा-द्वार असे नाव असे. ब्रह्म्याच्या लोकप्रियतेची व प्राचीनत्वाची साक्ष महाभारतातील वनपर्वाच्या तीर्थाध्यायातही (८०–८५) सापडते. तिथे जी शंभरापेक्षा जास्त तीर्थस्थाने वर्णिली आहेत, त्यांपैकी सहा-सात विष्णुतीर्थे वगळल्यास बाकीची सर्व ब्रह्मा, पितर, धर्म व शिव यांची आहेत.

पण त्यानंतरच्या काळात पुन्हा ब्रह्म्याचे महत्त्व हळूहळू कमी होऊ लागले. याचे एक कारण म्हणजे ब्रह्मदेव, शिव व विष्णू या देवतांच्या भक्तांत स्पर्धा सुरू झाली. शिव, शक्ती व विष्णू या देवतांना त्यांचे भक्त सर्वश्रेष्ठ देव समजू लागले. त्यामुळे त्रिदेवांमध्ये ब्रह्म्याचे स्थान प्रथम असले, तरी पंच-देवांत त्याचे महत्त्व व स्थान विष्णू, सूर्य, शिव व गणेश यांच्यापेक्षा गौण ठरले. विष्णूचे महत्त्व प्रस्थापित करण्यासाठी, ब्रह्मदेवाचा जन्म विष्णूच्या नाभिकमलातून झाला, असे सांगण्यात येऊ लागले व तशा तऱ्हेची शिल्पेही निर्माण होऊ लागली. ब्रह्म्याची पूजा फक्त वैदिक ब्राह्मणांनीच करावी, असा नियम असल्या-मुळे सर्वसामान्य लोकांना त्याची उपासना दुरावली. अशा तऱ्हेने ब्रह्मदेव हा दुय्यम श्रेणीचा देव बनला. [पु. वि.; भा. प्र. वि.; प्रा. च. को.; मू. वि.; डे. हिं. इ.; कल्ट ऑफ ब्रह्मा; श्री. कृष्णदत्त वाजपेयी– मथुराकलामें ब्रह्मा–सं. अ. ग्रं.]

(२) एक प्रमुख ऋत्विज. यज्ञात चाललेल्या कोणत्याही कृत्यावर लक्ष ठेवणे, हे ब्रह्म्याचे मुख्य काम असते. ऋग्वेदात त्याला सुविप्र असे म्हणून गौरविले आहे. बहुतेक वेळी, कार्याच्या आरंभी अध्वर्यू ब्रह्म्याची अनुज्ञा विचारतो आणि ओम् असे म्हणून ब्रह्मा ती देतो. ब्रह्म्याला चारही वेदांचे ज्ञान असले पाहिजे. ब्रह्मा हा भृगू किंवा अंगिरस कुळातील असावा, असे गोपथ ब्राह्मणात सांगितले आहे (२.२.५), तर तो वसिष्ठ-गोत्री असावा, असे तैत्तिरीय संहितेत म्हटले आहे (३ ५ २). [पा. का. भा.; श्री विद्याधरशास्त्री भिडे]

ब्रह्मांड सृष्टिविस्तार किंवा भुवनकोश याला ब्रह्मांड म्हण-तात. चतुर्दशभुवनात्मक हे विश्व अंडाच्या आका-राचे मानलेले असून ब्रह्मदेवाच्या इच्छेतून ते अंडे निर्माण झाले, म्हणून त्याला ब्रह्मांड असे म्हटले आहे. ब्रह्मांडात कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो, ते सिद्धान्तशिरोमणीच्या गोलाध्यायात पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

> भूभूधरत्रिदशदानवमानवाद्या
> ये याश्च धिष्ण्यगगनेचरचक्रकक्षाः ।
> लोकव्यवस्थितरुपर्युपरिप्रदिष्टा
> ब्रह्माण्डभाण्डजठरे तदिदं समस्तम् ॥

भावार्थ – पृथ्वी, पर्वत, देव, दानव, मानव; तसेच स्वर्गात, आकाशात आणि अंतराळात आपापल्या कक्षेत फिरणारे लोक व ग्रहतारादी; अशा प्रकारे एकाहून एक वर भूर्भुवःस्वरादी लोकांची स्थिती, हे सर्व ब्रह्मांडाच्या पोटात समाविष्ट आहे.

माणसाला सभोवतालच्या सृष्टीविषयी जशी जिज्ञासा असते तशीच वायुमंडल, तारामंडल, पृथ्वीच्या वरचे आणि खालचे लोक असल्यास ते कोणते या विषयीही जिज्ञासा असते. या विशाल विश्वाचे रहस्य काय असेल, या विषयी त्याच्या मनात सुप्त किंवा जागृत असे कुतूहल वावरत असते. हे रहस्य उलगड-ण्याचा प्रयत्न सुसंस्कृत मनुष्याप्रमाणेच आदिवासी असंस्कृत लोकही करताना सर्वत्र दिसून येतात. ब्रह्मांडाच्या उत्पत्तीविषयी व रचनेविषयी सर्व देशांत व सर्व समाजांत अनेक कथा प्रचलित आहेत. विज्ञानाला अपरिचित असलेल्या मानवी मनाने विश्वो-त्पत्तीविषयी कल्पित कथा निर्माण करून प्रथम स्वतःचे समाधान करून घेतले. कालांतराने त्या कथांना धार्मिक व दार्शनिक रूप देण्याचाही प्रयत्न केला गेला. मानव जसजसा अधिकाधिक सुसं-स्कृत होऊ लागला, तसतसे त्याचे संशोधक मनही जागृत झाले आणि त्यांपैकी कित्येकांनी तर्काधिष्ठित व कित्येकांनी विज्ञाना-धिष्ठित अशी ब्रह्मांडाची उपपत्ती सांगण्याचा प्रयत्न सुरू केला. अजूनही तो चालू आहे. ब्रह्मांडरचनेविषयी अंतिम सत्य अद्यापि शास्त्रज्ञांना गवसले नाही. या कामी संशोधक व शास्त्रज्ञ अजूनही थकलेले नाहीत. नवी नवी साधने व उपकरणे उपयोगात आणून ते ब्रह्मांडाचे रहस्य उकलण्याच्या कामी अहोरात्र निमग्न आहेत.

एकमेवाद्वितीय परब्रह्म हे नाना रूपांनी नटून ब्रह्मांडरूपाने साकार झाले, अशी ब्रह्मांडाच्या बाबतीत भारतीयांची धारणा आहे. हे एकाचे अनेक होणे ही काही आकस्मिक घटना नसून, ती एक नियंत्रित घटना आहे. सृष्टी कोणत्यातरी सनातन नियमांना अनुसरून चालत आहे. ऋत व सत्य हे ते दोन नियम होत, असे ऋग्वेदात सांगितले आहे (१०.१९०).

वैदिक कालात ब्रह्मांडाचे पृथ्वी, वायू व आकाश हे तीन विभाग मानले गेले. ब्राह्मणे व उपनिषदे यांच्या कालात या तीहींना भूः, भुवः व स्वः अशी नावे दिली गेली व हे तीन लोक आहेत असे समजले गेले. कालांतराने महः, जनः तपः व सत्यं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशा आणखी चार लोकांची कल्पना पुढे आली. भूः म्हणजे पृथ्वी. उरलेले सहा हे पृथ्वीच्या वरचे लोक होत. पृथ्वीच्या खालीही असेच सात लोक कल्पिले गेले आहेत. हे वरचे व खालचे सर्व लोक मिळून चतुर्दशभुवनात्मक ब्रह्मांड निर्माण होते. हे ब्रह्मांड कसे निर्माण झाले, याविषयी छांदोग्योपनिषदात पुढील कथा सांगितली आहे–

आदित्यो ब्रह्मेत्यादेशः तस्योपव्याख्यानम्, असदेवेदमग्र आसीत्, तत्सदासीत् तत्समभवत् तदाण्डं निरवर्तत तत्संवत्सरस्य मात्रामशयत तन्निरभिद्यत, ते आण्डकपाले रजतं च सुवर्णं चाभवताम् ।

तद्यद्रजतं सेयं पृथिवी यत्सुवर्णं सा द्यौः यज्जरायु ते पर्वताः यदुल्बं स मेघो नीहारो या धमनयस्ता नद्यो यद्वास्तेयमुदकं स समुद्रः ।। (छांदो. ३.१९.१–२)

अर्थ – आदित्य हा ब्रह्म आहे असा आदेश. त्याचे हे उपव्याख्यान. जगाच्या आरंभी केवळ असत् होते, त्याचे सद् झाले. ते वाढवून त्याचे अंडे बनले. एक वर्षानंतर ते फुटले. एक सोन्याचा व दुसरा रुप्याचा असे त्याचे दोन भाग झाले. सुवर्णभागाचा स्वर्ग झाला. रौप्य भागाची पृथ्वी झाली. अंड्याच्या कठीण त्वचेचे पर्वत झाले व कोमल त्वचेचे ढग बनले. अंड्यावरील रक्तवाहिन्या नद्या झाल्या व अंड्यातील रसाचा महासागर झाला.

पुराणांत चौदा भुवनांतली पृथ्वीच्या वरची सहा भुवने यांना ऊर्ध्व लोक म्हटले असून, अतलादी सात लोकांना अधोलोक म्हटले आहे. पुराणांतील चौदा भुवनांची स्थिती पुढील तालिकेवरून कळून येईल –

ऊर्ध्व लोक–

सत्य लोक–	ब्राह्म स्वर्ग;	दिव्य स्वर्ग
तपो लोक–	अकृतक त्रैलोक्य	कृतकाकृतक
जन लोक–		
महर्लोक–	प्राजापत्य स्वर्ग	
स्वर्लोक–	माहेंद्र स्वर्ग	कृतक त्रैलोक्य
भुवर्लोक–	भौम स्वर्ग	
मध्यलोक–	भू लोक	

अधो लोक– अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल, पाताल. (बिल स्वर्ग)

वरील चतुर्दश भुवनांचे संक्षिप्त वर्णन असे –

(१) भूलोक – अर्थात् पृथ्वी. मानव, पशुपक्षी, जलचर, स्थलचर व नभश्चर यांचे निवासस्थान.

(२) भुवर्लोक – सिद्ध व मुनी यांचे निवासस्थान.

(३) स्वर्लोक – अर्थात् स्वर्ग. देवांचे निवासस्थान.

(४) महर्लोक – हा ध्रुवाच्या बाजूला असून, कल्पान्तापर्यंत आयुष्य असणारे महात्मे या लोकात राहतात.

(५) जनलोक – सनत्कुमारादी महात्म्यांचे निवासस्थान.

(६) तपोलोक – देहरहित वैराजादी देवतांचे निवासस्थान.

(७) सत्यलोक – सिद्धादी मुनिजनांचे निवासस्थान.

(८) अतल – इथे मयासुरपुत्र बिल याचे राज्य आहे.

(९) वितल – यात हाटकेश्वर शंकर भवानीसह राहतो.

(१०) सुतल – बलिराजाचे स्थान.

(११) तलातल – मयासुराचे राज्य.

(१२) महातल – क्रोधवश नामक सर्पांचे निवासस्थान.

(१३) रसातल – दैत्य-दानवांचे निवासस्थान.

(१४) पाताल – शेष नागाचे निवासस्थान.

या ब्रह्मांडाचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तीला पुराणामध्ये पुराणविद म्हटले आहे.

आगम किंवा तंत्रशास्त्र यांची दृष्टी याहून खूपच विशाल आहे. तंत्रमते पुराणवर्णित ब्रह्मांडाच्या बाहेर त्याहून अतिविशाल अशी असंख्य ब्रह्मांडे आहेत. वरील ब्रह्मांडाच्या बाहेर जे एक अंडे आहे, ते प्रकृत्यंड या नावाने विख्यात आहे. हे जलतत्त्वापासून प्रकृतितत्त्वापर्यंतच्या २३ तत्त्वांच्या समष्टीने बनले आहे. प्रकृत्यंडेही असंख्य आहेत. त्यांच्याही वर मायांड आहे. पुरुष, नियती, काल, विद्या, कला व माया या तत्त्वांच्या समष्टीने ते बनले आहे. त्याच्या बाहेर शाक्तांड आहे. ते ज्योतिर्मय व शुद्ध सत्त्वात्मक आहे. या अंडाच्या आत शुद्ध विद्या, ईश्वर व सदाशिव या तीन तत्त्वांची समष्टी विद्यमान आहे. पुराणोक्त ब्रह्मांडाचा अधिष्ठाता ब्रह्मा, प्रकृत्यंडाचा विष्णू, मायांडाचा रुद्र आणि शाक्तांडाचा ईश्वर व सदाशिव आहे. ब्रह्मा, विष्णू, रुद्र, ईश्वर व सदाशिव या पाच अधिष्ठात्या पुरुषांना तंत्रशास्त्रात पंचकारण म्हटले आहे.

ब्रह्मांडाच्या उत्पत्तीसंबंधीच्या वैज्ञानिक कल्पना अशा –

सुमारे ३०० वर्षांपूर्वी ज्योतिर्विद्येचे क्षेत्र सौर परिवारापर्यंतच मर्यादित होते. त्या काळी सौर परिवार म्हणजेच ब्रह्मांड, असे समजले जाई. वैज्ञानिक पद्धतीने ब्रह्मांडाच्या उत्पत्तीची परिकल्पना फ्रेंच वैज्ञानिक जॉर्जेस द बुफान याने मांडली. कोणत्या तरी धूमकेतूने सूर्याला धडक दिली, त्यामुळे सूर्यमंडलातून जे द्रव्य बाहेर पडले त्याचे संघटन होऊन ग्रहमाला निर्माण झाली. पण ही कल्पना थोड्याच दिवसांत रद्दबातल झाली. पुढच्या काळात कांट व लाप्लास यांनी सूर्य व ग्रहमाला यांचा जन्म एका नीहारिकेतून झाला, अशी कल्पना मांडली. ही नीहारिका मंदगतीने स्वतःभोवती फिरत होती. तिच्या अंतर्भागात अनियमित व विक्षोभात्मक अशा गती होत्या. जेव्हा नीहारिकेतले द्रव्य गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धान्तानुसार संकोच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पावू लागले, तेव्हा नीहारिकेच्या आंसाच्या भोवती तिच्या भ्रमणगतीत तीव्रता येऊ लागली. अशा अवस्थेत मंद घूर्णन असणारे द्रव्य केंद्राकडे एकत्रित होत गेले आणि त्यातून सूर्याचा जन्म झाला. उत्तरोत्तर तीव्र घूर्णन असणारे द्रव्यसमुदाय संघटित होऊन ग्रहांच्या रूपाने सूर्याभोवती प्रदक्षिणा करू लागले. पण १९ व्या शतकाच्या अखेरीस क्लार्क मॅक्स्वेल याने वरील सिद्धान्त खोडून काढला. त्यानंतर भरतीची कल्पना पुढे आली. तिचे स्वरूप असे –

कोणत्यातरी अतिप्राचीन काळी कोणता तरी विशाल तारा सूर्याजवळून अतिवेगाने निघून गेला. त्यामुळे सूर्यपिंडात भयंकर भरतीची लाट उठली. त्या लाटेच्या द्वारे सूर्यगोलातले बरेच द्रव्य त्या गोलातून बाहेर निघून सूर्याच्या सभोवती पसरले. काही कालाने त्या द्रव्यातला बराचसा अंश पुनः सूर्यावर येऊन पडला. जो शेष उरला तो जागजागी संघटित होऊन त्याची ग्रहमाला तयार झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर कार्ल फॉन विझ्रॅकर याने कांट-लाप्लास यांची कल्पनाच पुनश्च संशोधित स्वरूपात मांडली. नंतर कुइपर या डच संशोधकाने असे सिद्ध केले, की जेव्हा सूर्य आपले स्वरूप निर्माण करण्याच्या अवस्थेत होता, जवळ जवळ त्याच काळी ग्रहांचीही रचना झाली आहे. हा सिद्धान्त आज प्रायः सर्वमान्य ठरला आहे.

चालू शतकाच्या प्रारंभी अधिक शक्तिशाली वेधयंत्रे निर्माण झाली. त्यांच्या द्वारे जे वेध घेतले गेले त्यांमुळे ब्रह्मांडाच्या स्वरूपाच्या मूलभूत धारणांमध्ये महान परिवर्तन झाले. चालू शतकातल्या ज्योतिर्विदांना ब्रह्मांडाच्या नव्या नव्या समस्यांचे ज्ञान झाले आहे. त्यांनी वायुमेघ, तारांतरवर्ती वायू व धूळ, नीहारिका, तारागुच्छ, आकाशगंगा अशा अनेक नवनव्या ब्रह्मांड-घटकांचे ज्ञान करून घेतले आहे. त्यांनी त्यावरून सिद्ध केले, की आपल्याला दिसणारे तारामंडल सूर्यकेंद्रित आहे. आपणांला दिसणारी आकाशगंगा हे ब्रह्मांडातले एक बेट असून, ब्रह्मांडात अशी अब्जावधी आकाशगंगांची बेटे भरलेली आहेत. तेव्हा प्रश्न उत्पन्न झाला, की या ब्रह्मांडाची सीमा तरी काय आहे ?

त्यातूनच ब्रह्मांड हे विस्तारशील असल्याबद्दलचा आधुनिक सिद्धान्त हबल या अमेरिकी वैज्ञानिकाने मांडला. त्याने माऊंट विल्सन येथील वेधशाळेत आकाशगंगांच्या स्पेक्ट्रमांचे अध्ययन करून असे सिद्ध केले, की विश्वातल्या सर्व आकाशगंगा आपल्या-पासून दूर दूर जात आहेत. जसजसे त्यांचे अंतर वाढत जाते, तसतसा त्यांचा अपसरण वेगही वाढत आहे.

या सिद्धान्ताशी मिळता जुळता दुसरा सिद्धान्त डॉ. गेमो या संशोधकाने मांडला, त्याचा सारांश असा– ब्रह्मांडोत्पत्तीच्या आरंभी त्याचे सारे मूल द्रव्य एक विशाल पिंड या स्वरूपात होते. त्या वेळी त्या द्रव्याचे घनत्व $१०^{१४}$ प्रति घन सेंटिमीटर होते. या अती दाबामुळे त्याचे अंतर्गत तपमानही अब्जावधी अंशांमध्ये होते. हा दाब सहन न झाल्यामुळे त्या मूलपिंडात विस्फोट झाला आणि त्यातून मूलद्रव्य चोहोकडे पसरू लागले. या विस्फोटानंतर ब्रह्मांडाचे तपमान २,५०,००,००,०००° होते. जो जो मूलद्रव्य पसरत गेले, तो तो ब्रह्मांडाचे हे तपमान कमी कमी होत गेले. या प्रसरणाला प्रारंभ झाल्यानंतर २५,००,००,००० इतक्या वर्षांनी ब्रह्मांडाचे तपमान अशा प्रकारचे झाले, की त्यात भिन्न भिन्न प्रकारच्या द्रव्यांचे अणू उत्पन्न होऊ लागले. त्या वेळी मूल द्रव्यांचे मोठमोठे विशाल भाग गोलाकार वायूच्या-मेघांसारखे होते. हेच विशाल भाग कालांतराने ब्रह्मांडातल्या आकाशगंगांच्या रूपात परिणत झाले. या आकाशगंगांच्या अंत-र्भागातही अणूंच्या विक्षुब्ध गती चालू होत्या. त्यामुळे या वायु-मेघांत छोटे छोटे गोलाकार खंड निर्माण झाले व त्यांचे स्वतःचे गुरुत्वाकर्षणक्षेत्रही निर्माण झाले. कालांतराने या वायुमेघातले हे गोलाकार खंड संकुचित झाले आणि त्यांतून तारा, तारागुच्छ, इत्यादींचा जन्म झाला. या ताऱ्यांच्या जवळपास विखरून राहिलेले द्रव्य छोटचा छोटचा ग्रहांच्या रूपात परिवर्तित झाले. हे सगळे घडायला अर्धा तासही वेळ लागला नाही.

या आकाशगंगांना दोन प्रकारची गती होती. पहिली विस्फोट-जनित. या गतीमुळे या आकाशगंगा विस्फोटबिंदूपासून उत्तरो-त्तर दूर जात चालल्या आणि अजूनही जात आहेत. दुसऱ्या गतीमुळे त्या आपल्या नियत आंसांच्या भोवती फिरत राहिल्या आहेत. या अक्षभ्रमणामुळे या आकाशगंगा नागमोडी, लंबगोल, इ. आकारांत परिवर्तित झाल्या आहेत.

अशा या ब्रह्मांडाची उत्पत्ती ४-५ अब्ज वर्षांपूर्वी झाली. त्याची इतिश्री आजपासून सुमारे १० अब्ज वर्षांनी होईल. त्या वेळी ब्रह्मांडातल्या सर्व आकाशगंगा एकमेकींपासून दूर होत होत अनंतात विलीन होतील. त्या वेळी प्रत्येक आकाशगंगेतील तारे थंड होऊन मृत होतील. मग प्रकाशही असणार नाही आणि गतीही असणार नाही. सारे काही समाप्त होऊन जाईल.

डॉ. हॉइल व डॉ. जयंत नारळीकर या दोघा वैज्ञानिकांनी अलिकडेच वरील विस्फोट-सिद्धान्तावर काही आक्षेप घेऊन नवा सिद्धान्त मांडला आहे, तो असा –

ब्रह्मांडात सतत घडामोडी चालू आहेत. तिथे सतत निर्माण-कार्य होत राहिलेले आहे. संपूर्ण विश्वाचा आरंभ आणि अंत निर्धारित करणे कठीण आहे. विश्वाच्या विस्तारशीलतेमुळे जेवढे पदार्थ आपल्याला दृश्य होणाऱ्या ब्रह्मांडातून अनंताकडे निघून जातात, तितकेच पदार्थ विश्वामध्ये निर्माण होत राह-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तात. अशा प्रकारे आकाशगंगा आणि त्यांतली तारकापद्धती यांच्यामध्ये सतत निर्माणक्रम चालू राहतो.

तात्पर्य असे, की ब्रह्मांडाच्या उत्पत्तीसंबंधीचा सर्वमान्य असा सिद्धान्त आजतागायत स्थिर होऊ शकला नाही. तो स्थिर व्हायचा तर ब्रह्मांडाची आकृती आणि त्याचे सरासरी घनत्व यांचे यथार्थ ज्ञान आधी झाले पाहिजे. आता बरीच प्रभावी अशी वेधाची किंवा अन्य प्रकारची संशोधनसाधने निर्माण झाली आहेत. पण त्यांच्या शक्तीलाही मर्यादा आहे. त्यामुळेच ब्रह्मांडाचे यथार्थ ज्ञान अद्यापपर्यंत होऊ शकलेले नाही. सांप्रत अत्याधुनिक सूक्ष्म उपकरणांच्या साहाय्याने ब्रह्मांडाची गहन स्थिती समजून घेण्याचा प्रयत्न कित्येक वैज्ञानिक करीत आहेत. त्यावरून असे वाटते, की निकटच्या भविष्यकाळात ब्रह्मांडाच्या गतिस्थितीवर निश्चित असा प्रकाश पडू शकेल. [पु. वि.; कल्याण – संस्कृतिअंक; हिं. वि. को.]

ब्रह्मांडदान

एक महादान. यासाठी सोन्याचे दोन अर्धगोलाकार कलश करतात. त्यांनाच ब्रह्मांड असे म्हणतात. त्यांच्यावर मध्यभागी अष्ट दिग्गज, वेद, वेदांगे, अष्ट लोकपाल व ब्रह्मा यांच्या आकृती; वर शिव, विष्णू व सूर्य यांच्या आणि आतल्या बाजूस उमा, लक्ष्मी, वसू, आदित्य व मरुत यांच्या आकृती काढतात. ही दोन्ही पात्रे जुळवून व रेशमी वस्त्रात गुंडाळून तिळांच्या ढिगावर ठेवतात. त्याभोवती अठरा प्रकारची धान्ये पसरतात. नंतर पूर्वेकडून सुरुवात करून आठ दिशांना अनंतशयन, प्रद्युम्न, प्रकृती, संकर्षण, वेद, अनिरुद्ध, अग्नी व वासुदेव यांच्या सुवर्णप्रतिमा स्थापतात व त्यांची पूजा करतात. मग होमाजवळ दहा वस्त्राच्छादित कलश, शिंगांना सोने लावलेल्या गाई, त्यांचे दूध काढण्यासाठी तांब्याची भांडी, आसने, छत्र, चामर, पादत्राणे, आरसे, इ. वस्तू मांडतात. मग त्या वस्तुसंभाराची पूजा करून तो दान देतात. फल – पापनाश व स्वर्गात अप्सरांसह निवास. [श. क.; हिं. ध.]

ब्रह्मांड पुराण

एक महापुराण. विष्णू पुराणातल्या सूचीप्रमाणे हे अठरावे आहे. देवी भागवतात मात्र त्याला सहावा क्रमांक दिलेला आहे. याची श्लोकसंख्या १२,००० असून, प्रक्रिया, अनुषंग, उपोद्घात व उपसंहार असे याचे चार पाद आहेत. याला वायवीय ब्रह्मांड पुराण असे नारदसूचीत म्हटले असल्यामुळे काही विद्वान वायू पुराण व ब्रह्मांड पुराण ही एकच असल्याचे मानतात व वायू पुराणावर संस्कार करून ब्रह्मांड पुराण तयार केले, असे म्हणतात. पण ही त्यांची समजूत चुकीची आहे. वायूने व्यासांना हे सांगितले असल्यामुळे त्याला वायवीय हे विशेषण लावले गेले, असे श्री. बलदेव उपाध्याय म्हणतात. पण डॉ. हाजरा यांच्या मते दोन्ही पुराणांत बिंब-प्रतिबिंब भाव आहे. कारण दोन्ही पुराणांत बरेच श्लोक समान आहेत. प्रस्तुत पुराणाचा प्रारंभश्लोक असा –

नमो नमः क्षयसृष्टौ स्थितौ सत्त्वमयाय वा।
नमो रजस्तमःसत्त्वत्रिरूपाय स्वयम्भुवे ।।

अर्थ – जगताची उत्पत्ती, स्थिती व संहार करण्यासाठी रज, सत्त्व व तम ही तीन रूपे धारण करणाऱ्या सत्त्वमय अशा ब्रह्मदेवाला नमस्कार असो.

ब्रह्मांड या नावाप्रमाणेच प्रस्तुत पुराणात सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ती व त्याचा भूगोलासह विस्तार कथन केलेला आहे. भूमीवरची सर्व द्वीपे, त्यांतील पर्वत, नद्या, लोक, त्यांच्या चालीरीती, त्यांचे आयुर्मान या गोष्टींचे तपशीलवार वर्णन यात आहे. मन्वंतरे, व्यासांचे शिष्य, वेदशाखांचे विभाग, इ. गोष्टींचीही माहिती आहे. यामध्ये क्षत्रिय राजवंशांचे जे वर्णन येते, ते ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. ब्रह्मांडात ध्रुव हा सूर्याला आकर्षित करीत असतो, असे एका ठिकाणी म्हटले आहे. ही गोष्ट खरी आहे, मात्र तो तारा ध्रुव नसून शौरी (हर्क्युलस) आहे. आपल्या सूर्यमालेला शौरी (हर्क्युलस) नावाच्या ताऱ्याचे आकर्षण आहे, असे वैज्ञानिक सांगतात. पण तरीही सूर्याच्या आकर्षणाची कल्पना प्रस्तुत पुराणकर्त्याला सुचली हे विशेष आहे.

परशुरामाने तपश्चर्या करून शस्त्रप्राप्ती करून घेतली व त्या बळावर कार्तवीर्याचा वध केला, भगीरथाने गंगेला स्वर्गातून खाली आणले, धन्वंतरीला भारद्वाजाकडून आयुर्वेदाची प्राप्ती झाली, ललितादेवीने भंडासुराला मारले, इ. लहानमोठी आख्याने प्रस्तुत पुराणात आली आहेत. या सर्व आख्यानांत ललितादेवीचे आख्यान चाळीस अध्यायांत सांगितले आहे. ललितेची कथा, तिचे माहात्म्य व समुद्रमंथनाच्या वेळी देवांनी केलेले तिचे स्तवन एवढ्या सर्व गोष्टी त्या आख्यानात आहेत. याशिवाय वैदिक व तांत्रिक मंत्रही पुष्कळ आहेत. श्रीविद्या व सहस्राक्षरविद्या या नावाचेही मंत्र आहेत.

यात श्रीकृष्ण व राधा यांचे वर्णन आहे. अनेक माहात्म्ये आहेत. शूर्पारकक्षेत्राचे वर्णन आहे. शूर्पारक म्हणजे कोकणाचा प्रदेश होय. यात कामाक्षी नावाची एक देवी वर्णिलेली आहे. कोकणाचा एक भाग असलेल्या गोमंतकात शिरोडे येथे कामाक्षी देवीचे एक पुरातन स्थान आहे. पुराणात वर्णिलेली कामाक्षी बहुधा तीच असावी.

प्रस्तुत पुराणात गोदावरीचे मुख आणि त्याच्या आसपासचा प्रदेश यांच्याविषयी विशेष प्रेमादराने लिहिले आहे –

सह्यस्य चोत्तरान्तेषु यत्र गोदावरी नदी।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पृथिव्यामपि कृत्स्नायां स प्रदेशो मनोरमः ॥
तत्र गोवर्धनो नाम पुरं रामेण निर्मितम् ॥
(ब्रह्मांड पु. २.१६.४३–४४)

अर्थ – सह्य पर्वताच्या उत्तर टोकाला जिथे गोदावरी नदी उगम पावते, तो प्रदेश सगळ्या पृथ्वीवर मनोरम आहे. त्या भागात गोवर्धन नावाचे पुर पूर्वी रामाने निर्माण केले आहे.

महाराष्ट्रातल्या लोकांना महाराष्ट्र हे विशेषण याच पुराणात लावलेले आहे. या गोष्टीवरून गोदावरीच्या उगमाजवळ म्हणजेच नासिक–त्र्यंबकच्या प्रदेशात हे पुराण निर्माण झाले असावे, असे म्हणतात.

अध्यात्मरामायण नावाचा जो ग्रंथ प्रसिद्ध आहे, तो याच पुराणातून वेगळा काढलेला आहे. याशिवाय अन्यही काही भाग प्रस्तुत पुराणातून वेगळे काढले गेले, असे समजतात. त्यांची नावे अशी – गणेशकवच, तुलसीकवच, हनुमत्कवच, सिद्धलक्ष्मी-स्तोत्र, सीतास्तोत्र, ललितासहस्रनाम, सरस्वतीस्तोत्र, इत्यादी.

प्रस्तुत पुराण इ. स. ३२५ च्या सुमारास निर्माण झाले असावे. हे पुराण इ. स. च्या ५ व्या शतकाच्या प्रारंभी भारतीय ब्राह्मणांनी यवद्वीपात (जावा-सुमात्रा) नेले व ते तिथल्या लोकांना प्रिय झाले. तिथल्या स्थानिक भाषेत त्याचा अनुवाद झाला

ब्रह्माणी – कांस्यमूर्ती (इ. स. १७ वे शतक)

असून, सांप्रतही ते प्रचारात आहे. त्या अनुवादाची मूळ ब्रह्मांड पुराणाशी तुलना करता भविष्यकालीन राजवंशांच्या वर्णनाव्यतिरिक्त बाकी सर्व विषय दोहोंतही सारखे आहेत. भविष्य-राजवर्णन इ. स. च्या ५ व्या शतकानंतर त्या पुराणाला जोडले गेले असावे, असे वाटते. [पु. नि.; पु. वि.; श्री. बा. मो. कानिटकर– स्वराज्य, २६ नोव्हेंबर १९६६]

ब्रह्माणी ब्रह्मदेवाची पत्नी. हिला शतरूपा, सावित्री, सरस्वती व गायत्री अशीही नावे आहेत. ब्रह्मदेवाने आपले अर्धे शरीर फाडून स्त्री निर्माण केली, तीच ही ब्रह्माणी होय. ही ब्रह्मदेवाची शक्ती आहे. हातात अक्षमाला व कमंडलू घेऊन ती हंसयुक्त विमानावर आरूढ होते, असे मार्कंडेय पुराणात सांगितले आहे (८८.१४). हिला चार मुखे व चार हात आहेत, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे (२.६१.१४). [पु. इं.; श. क.]

ब्रह्मातिथी काण्व एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील पाचवे सूक्त याच्या नावावर आहे. अश्विनौ देवांची स्तुती हा याच्या सूक्ताचा विषय आहे. त्यातली एक ऋचा अशी (ऋ. ८.५.५)–

मंहिष्ठा वाजसातमेषयन्ता शुभस्पती । गन्तारा दाशुषो गृहम् ॥

अर्थ – अश्वी हो, तुम्ही अत्यंत दानशील आणि पूज्य आहा. तुम्ही उत्तम रीतीने सत्त्वसामर्थ्य प्राप्त करून देणारे, मनाला उत्साह आणणारे आणि मंगलाधिपती असूनही भक्ताच्या घरी स्वतः जात असता.

अश्विनौ देवांनी कण्व कुलावर केलेल्या उपकारांची नोंदही त्याने केली आहे (ऋ. ८.५.२५).

ब्रह्मानंद सरस्वती (इ. स. चे १७ वे शतक) एक अद्वैती आचार्य व मीमांसक. हा वंगदेशीय असल्याने गौड ब्रह्मानंद या नावाने प्रसिद्ध आहे. याचा निवास मात्र काशीक्षेत्री होता. नारायणतीर्थ व परमानंद सरस्वती हे याचे दोन गुरू होत. याने ब्रह्मसूत्रांवर मुक्तावली नावाची व जैमिनी सूत्रांवर मीमांसाचंद्रिका या नावाची, अशा दोन टीका लिहिल्या आहेत. परंतु याची प्रमुख पांडित्यपूर्ण कृती म्हणजे अद्वैतसिद्धीवरील अद्वैतचंद्रिका नावाची टीका ही होय. या टीकेचे लघू आणि गुरू असे दोन भेद उपलब्ध आहेत. लघुचंद्रिका सर्वत्र प्रसिद्ध आहे. या शिवाय याचा अद्वैतसिद्धान्तविद्योतन नावाचा एक ग्रंथही प्रकाशित झाला आहे.

ब्रह्मानंद सरस्वती हा भट्ट संप्रदायाचा अनुयायी होता. [मी. द.; हिंदुत्व.; अच्युत, वर्ष ३ रे, अंक ४ था]

ब्रह्मानंदस्वामी (इ. स. १७७२ ते १८४९) एक भक्त-कवी. हा स्वामी-नारायण-संप्रदायाचा अनु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यायी असून, जातीने भाट होता. याचे पूर्वाश्रमीचे नाव लाडू असे होते. याचा जन्म अबूच्या पहाडाजवळील डुंगर या गावी झाला. भूजच्या (कच्छ) पाठशाळेत याचे शिक्षण झाले. तिथे याने अलंकारशास्त्राचा व पिंगल भाषेचा चांगला अभ्यास केला. दररोज ठराविक संख्येची पदे रचल्याशिवाय हा अन्न भक्षण करीत नव्हता, असे म्हणतात.

ब्रह्मानंदाने आपली रचना चारणी, गुजराती व हिंदी अशा तीन भाषांत केली आहे. याचा काव्यसंग्रह ब्रह्मानंदकाव्यमाला या नावाने प्रसिद्ध झाला आहे. त्याशिवाय याने हिंदीत सुमतिप्रकाश, वर्तमानविवेक, ब्रह्मविलास, उपदेशचिंतामणी व छंदरत्नावली हे ग्रंथ रचले आहेत.

महात्मा गांधींच्या नित्य प्रार्थनेत याची काही पदे समाविष्ट केलेली होती. [वि. मुं. रा. प.; गुज. सा. इ.]

ब्रह्मार्पण मंत्र नित्य पूजाविधी समाप्त करताना नृत्य, गीत, ध्वज, इ. उपचार समर्पिल्यावर बुद्धी, वासना, अहंकार, मन, इंद्रिये यांसह परमेश्वराला आत्मार्पण करावे, असे सांगितले आहे, याला ब्रह्मार्पण म्हणतात. त्याचा मंत्र असा –

ॐ इतः पूर्वं प्राणबुद्धिदेहधर्माधिकारतो जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यवस्थासु मनसा वाचा हस्ताभ्यां पद्भ्यामुदरेण शिश्नेन यत् स्मृतं यदुक्तं यत् कृतं तत्सर्वं ब्रह्मार्पणं भवतु स्वाहा । मां मदीयं च सकलं हरये ते समर्पये ओं तत्सत् ।

अर्थ – यापूर्वी प्राण, बुद्धी, देहधर्म यांच्या साहाय्याने जागेपणी, स्वप्नात व झोपेत; मनाने, वाचेने, हातांनी, पायांनी, उदराने व शिश्नाने ज्याचे स्मरण केले, जे वाचेने व्यक्त केले व ज्याचे आचरण केले, ते सारे ब्रह्मार्पण असो. स्वतःसह माझे सर्वस्व हे शिवा, मी तुला अर्पण करतो. [मं. म.]

ब्रह्मावर्त एक प्राचीन प्रदेश. या प्रदेशात स्वायंभुव मनूचा निवास होता. त्याची कन्या देवहूती हिचा याच भागात कर्दमाशी विवाह झाला. मनूच्या वंशजांनी इथूनच आपला राज्यकारभार केला, असे म्हणतात. मनूप्रमाणे पृथूचाही हाच देश होता. मनुस्मृतीत (२.१७) याच्या सीमा सांगितल्या आहेत, त्या अशा–

सरस्वतीदृषद्वत्योर्देवनद्योर्यदन्तरम् ।
तं देवनिर्मितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ।।

अर्थ – सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांमधील जो देवनिर्मित प्रदेश, त्याला ब्रह्मावर्त असे म्हणतात.

या देशासंबंधी अधिक माहिती देताना मनुस्मृतीत म्हटले आहे, की या देशातील लोकांच्या पारंपरिक आचारालाच सदाचार हे नाव आहे.

आजच्या भौगोलिक विभागानुसार या प्राचीन प्रदेशात नाहन विभागातील काही भाग, टेहरी भाग, डेहराडून जिल्हा, सहारणपूर व अंबाला या जिल्ह्यांच्या सीमेवरील जगाधरी हे भाग समाविष्ट होते, असे दिसते. कनिंगहॅम मात्र ब्रह्मावर्त हे कुरुक्षेत्रांतर्गत असल्याचे मानतो. पण त्याचे हे मत विद्वानांनी अमान्य केले आहे.

या प्रदेशात अनेक अश्वमेध यज्ञ झाले, म्हणून या प्रदेशाला ब्रह्मावर्त हे नाव प्राप्त झाले असे भागवत पुराणात म्हटले आहे (१.१७.३३).

या प्रदेशातील महत्त्वाचे पुण्यक्षेत्र ब्रह्मावर्त हे बिठूर या नावाने प्रसिद्ध आहे. हे क्षेत्र कानपूर जिल्ह्यात गंगेच्या दक्षिण

वाल्मीकिआश्रम – ब्रह्मावर्त

तीरावर आहे. इथे गंगेवर उत्तम घाट बांधलेले असून, ब्रह्मघाट हा त्यांतला प्रमुख होय. हा घाट औध प्रांताचा नबाब ग्यासुद्दीन याचा सचिव राजा तिकाइटराय याने बांधला.

वाल्मीकी ऋषीचा आश्रम या क्षेत्रासन्निधच होता, असे म्हणतात. या आश्रमातील सीताप्रसूतिस्थान, कुशलवांच्या बालक्रीडेचे स्थान, अश्वमेधवारूचे स्थान, इ. स्थानांच्या खुणा तिथले लोक दाखवतात. तिथले वाल्मीकेश्वराचे लिंग वाल्मीकीनेच स्थापल्याचे सांगतात. मराठी राज्याचा अंत झाल्यावर शेवटचा बाजीराव इथे येऊन राहिला होता. [हि. ध.; स. भा. प्र. व.; पु. इं.; सां. द. इ.; वि. सं. मंडळ, वार्षिक, १९६३]

ब्रह्मासन ब्रह्म प्राप्तीसाठी सांगितलेले एक ध्यानासन. एक पाय छातीला टेकवून व शरीर दंडासारखे करून उभे राहणे, याला ब्रह्मासन म्हणतात. परशुराम हे ब्रह्मासन घालून तपश्चर्या करीत होता, असे ब्रह्मांड पुराणात (३.५७.६) सांगितले आहे. [पु. इं.; श. क.]

ब्रह्मास्त्र एक प्राचीन अस्त्र. शिवाने परशुरामाला हे अस्त्र दिले होते (ब्रह्मांड पु. ३.३२.५७). अश्वत्थाम्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गर्भस्थ परीक्षिताच्या विरुद्ध या अस्त्राचा प्रयोग केला होता (भाग. पु. १.१२.१). द्रोणाने रागाच्या भरात या अस्त्राचा प्रयोग करून अनेक लोक जाळले, असे महाभारतात सांगितले आहे. (द्रोण. ११९) कर्णाला मात्र ऐन आणीवाणीच्या वेळी ब्रह्मास्त्र आठवले नाही. [म. भा. उ.]

ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर (१६४९ – १७३८ इ. स.) एक सत्पुरुष व छत्रपती शाहूमहाराज आणि थोरले बाजीराव यांचे गुरू. विदर्भात राजुरीजवळ दुधेवाडी नावाचे एक गाव आहे. तिथे एका देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात यांचा जन्म झाला. त्यांचे पाळण्यातले नाव विष्णू असे होते.

विष्णूने आपल्या वडिलांकडेच वेदाभ्यास केला. पण त्याचे अध्ययन चालू असतां वयाच्या १२ वर्षी त्याचे आईबाप निवर्तले. त्यामुळे विष्णू पोरका झाला. थोडयाच काळात त्याला वैराग्यही उत्पन्न झाले. मग त्याने राजुरी येथे गणेशाच्या मंदिरात पुष्कळ वर्षे तप केले. त्या तपाने गणेश प्रसन्न झाला व त्याने विष्णूला स्वप्नदृष्टान्त देऊन सांगितले, की तू आता अनुष्ठान बंद कर आणि पुढच्या उद्योगाला लाग. अशा रीतीने विष्णूला तप:सिद्धी मिळाली; पण त्याची ज्ञानप्राप्तीची इच्छा मात्र अपुरी राहिली होती. ती पुरी करून घेण्यासाठी तो काशीस गेला. तिथे त्याची ज्ञानेंद्र सरस्वती नामक एका यतीशी भेट झाली. त्याने विष्णूला संन्यासदीक्षा देऊन ब्रह्मेंद्रस्वामी असे त्याचे नाव ठेवले. मग त्याने गुरूपाशी राहून विद्याध्ययन केले.

नंतर ब्रह्मेंद्रस्वामींनी भारताची तीर्थयात्रा केली. इ. स. १६८० च्या सुमारास ते महाराष्ट्रात आले. त्या काळी देशावर सर्वत्र राजकीय धामधूम सुरू होती. अशा अस्थिर वातावरणात आपल्याला मोक्षसाधना करता येणार नाही, असे वाटून ते घाट उतरून कोकणात गेले आणि चिपळूणजवळच्या पेढे या गावी मुक्काम करून राहिले. तिथून जवळच धामणी सोनगावच्या रानात एका डोंगरातील गुहेत त्यांनी आपली मोक्षसाधना सुरू केली. नंतर ते खुद्द परशुरामक्षेत्रीच राहू लागले. तिथे चिपळूणचे सुभेदार बाळाजी विश्वनाथ यांची स्वामींवर भक्ती बसली. त्यांनी स्वामींना बरीच मदतही केली. नंतर स्वामींनी लोकांकडून द्रव्य गोळा करून परशुरामाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला.

त्या काळी मराठेशाहीत गादीसाठी भांडणे सुरू होती. त्यांत स्वामींनी शाहूमहाराजांचा पक्ष न्याय्य आहे, हे जाणून त्यांना प्रसादासह आशीर्वाद पाठवला. पुढे शाहूमहाराजांना गादी मिळाली आणि त्यांनी स्वामींना आपले गुरू केले. जंजिऱ्याच्या सिद्दीचीही स्वामींवर भक्ती बसली. त्याच्याकडून स्वामींनी पेढे व अंबडस ही दोन गावे इनाम म्हणून मिळविली. नंतर कोकणात काही राजकीय घडामोडी सुरू झाल्या म्हणून स्वामींनी तिथला मुक्काम हलविला आणि ते साताऱ्याजवळच्या धावडशी या गावी वास्तव्याला आले. शाहूमहाराजांनी त्यांना धावडशी, अनेवाडी व वीरमाडे अशी तीन गावे इनाम करून दिली. त्याशिवाय निरनिराळ्या सरदारांनीही त्यांना वर्षासने चालू केली. स्वामी कोकणात व देशावर मिळून दहा गावचे जहागिरदार बनले. त्यांच्यापाशी बराच पैसाही साठला. ते मग सावकारीही करू लागले. त्यांनी पेशव्यांना व सरदार आंग्रे यांना मोठी कर्जे दिली होती. स्वामींनी जरी सावकारी मांडली असली, तरी त्यांनी लोकोपयोगी कामेही बरीच केली. त्यांनी अनेक ठिकाणी मंदिरे, तलाव, घाट, धर्मशाळा, रस्ते, पूल, इत्यादींची निर्मिती केली; अन्नसंतर्पणही बरेच केले.

ब्रह्मेंद्रस्वामी

इ. स. १७३८ साली स्वामींनी देह ठेवला. पुढे इ. स. १७५८ साली शाहूमहाराजांनी धावडशी येथे त्यांची समाधी बांधली. [ब्रह्मेंद्रस्वामींचे चरित्र व पत्रव्यवहार—द. ब. पारसनीस १९००]

ब्रह्मोत्सव व्रजमंडलात साजरा होणारा एक उत्सव. चैत्र वद्य द्वितीयेपासून एकादशीपर्यंत प्रामुख्याने वृंदावनातल्या रंगनाथमंदिरात हा उत्सव होतो. रामानुज संप्रदायातील हा सर्वांत महत्त्वाचा उत्सव होय. उत्सवाच्या या काळात रंगनाथाला निरनिराळी वाहने करतात व त्याची मिरवणूकही काढतात. वद्य नवमीला रथयात्रा असते. या उत्सवात गावातील सर्व जनता बहुसंख्येने सामील होते. [ब्र. सां. इ.]

ब्रह्मोद्य धार्मिक कूटप्रश्नांना ब्रह्मोद्य असे नाव आहे. कूट व ब्रह्मोद्य हे शब्द समानार्थकच आहेत. अश्वमेध यज्ञ किंवा दशरात्र अशांसारख्या मोठ्या यज्ञकर्मांत ब्रह्मोद्य हा एक आवश्यक भाग असतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्म हा शब्द यक्षवाचकही आहे; त्यामुळे ब्रह्मोद्यचर्चा हा यक्ष-पूजेचा एक अंश यज्ञसंस्थेत दाखल झालेला दिसतो यजुर्वेदातील ब्रह्मोद्य भाग (वाज. सं. २३·९,४५) आणि महाभारतातील यक्षप्रश्नोत्तरी (वन २९७·२६–६१) यांची रचनाशैली एकच असून, त्यांतील काही श्लोक दोन्ही ठिकाणी सारखेच आहेत. कूट प्रश्नांना आजही यक्षप्रश्न म्हणतात. पाहा – कूट. [भा. सा.]

ब्रह्मोपनिषद एक नव्य उपनिषद. हे यजुर्वेदांतर्गत असून, आकाराने छोटे आहे. हे उपनिषद शौनकाला पिप्पलाद अंगिरसाने सांगितले. 'प्राणो ह्येष आत्मा' = प्राण म्हणजेच आत्मा आहे, असा याचा सिद्धान्त आहे. प्राणावर कशाचाच परिणाम होत नाही. नाभी, हृदय, कंठ व मूर्धा ही जीवात्म्याची चार निवासस्थाने आहेत. सर्वांभूती एकरूप आत्मा, हे प्रस्तुत उपनिषदाचे सार आहे. [श्री. सी. ग. देसाई]

ब्रह्मौदन यज्ञप्रसंगी ऋत्विजांना भात शिजवून जेवायला घालतात, त्याला ब्रह्मौदन असे नाव आहे. हा भात शिजविण्यासाठी तांदूळ मोजून घेतात. चौघा ब्राह्मणांसाठी चार शराव (परळ) तांदूळ घ्यायचे असतात.

उपनयनाच्या विधीतही उपनीत बटूने अनुप्रवचनीय होमासाठी ब्रह्मौदन शिजवावा, तो शिजवल्यावर त्याचा होम करावा आणि अवशिष्ट भाताने कमीत कमी तीन ब्राह्मणांना भोजन घालून दक्षिणा द्यावी व मग आचार्यासह भोजन करावे, असे सांगितले आहे. [सं. कौ.; म. ज्ञा. को.– वेदविद्या.]

ब्राह्मण चातुर्वर्ण्यातील अग्रगण्य वर्ण. हा वर्ण आता जात म्हणूनही ओळखला जातो. ब्रह्म या शब्दाचा अर्थ मंत्र किंवा स्तोत्र असा आहे. मंत्र किंवा स्तोत्र रचणारे व म्हणणारे ते ब्राह्मण होत. ऋग्वेदाच्या काळापासून ब्राह्मण हा एक श्रेष्ठ वर्ग मानला जात होता. या वर्गाची उत्पत्ती परमपुरुषाच्या मुखापासून झाली, असे पुरुषसूक्तात (ऋ. १०.९०.१२) म्हटले आहे. मंत्र रचणे आणि यज्ञादी धार्मिक कार्यांत त्यांचा विनियोग करणे, हे प्राचीन काळी ब्राह्मणांचे मुख्य कार्य होते. वैदिक धर्मात यज्ञाला प्राधान्य असल्यामुळे यज्ञाची अंगोपांगे जाणणाऱ्या व यज्ञाचे पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मणांना वेदकाळीच सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त झाले व ते दीर्घ काळपर्यंत टिकून राहिले. ज्ञानदान व धार्मिक नेतृत्व यांमुळेच ब्राह्मणांना ही प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. ऋग्वेदात ब्राह्मणांच्या कर्तव्याचा निर्देश केलेला आहे, तो असा (ऋ. ८.३५.१६) –

ब्रह्म जिन्वतमुत जिन्वतं धियोहतं रक्षांसि सेधतममीवाः ।

अर्थ – ज्ञान प्राप्त करून घ्या, सद्बुद्धीचे संरक्षण करा व समाजातील आसुरी प्रवृत्तींचा नाश करा.

वैदिक युगात वर्णव्यवस्था दृढ झालेली नव्हती. म. म. काणे यांच्या मते त्या काळी वर्ण नसून समाजाचे वर्ग झालेले होते. क्षत्रियकुळात ब्रह्मर्षी निर्माण होत व ब्राह्मणकुळात अनेक राजपुरुषही उत्पन्न होत. ब्राह्मणकुलातला मनुष्य शेती, व्यापार कलाकुसर यांतील कोणत्याही क्षेत्रात कर्तृत्व दाखवू शके; त्याचप्रमाणे शूद्रकुलातला मनुष्यही आपल्या बुद्धिबलाने ब्राह्मणत्व मिळवू शके. व्यास, वसिष्ठ, पराशर, दीर्घतमा हे शूद्र स्त्रियांचे पुत्र होते. पण ज्ञान व तपस्या या गुणांमुळे ते ब्राह्मण ठरले. महीदास ऐतरेय हा तर दासीपुत्र होता. पण तो एका ब्राह्मण ग्रंथाचा कर्ता ठरला व ब्राह्मणांना मान्य व पूज्य झाला. सदाचाराचे पालन न करणारा ब्राह्मण शूद्र ठरतो व सदाचरण करणारा शूद्र ब्राह्मण होतो, हा विचार महाभारतात अनेक वेळा सांगितलेला आहे. भृगू ऋषीने भरद्वाजाला ब्राह्मण्याची लक्षणे सांगितली आहेत, ती अशी (म. भा. शांति. १८९.२–४)–

जातकर्मादिभिर्यस्तु संस्कारैः संस्कृतः शुचिः ।
वेदाध्ययनसम्पन्नः षट्सु कर्मस्ववस्थितः ॥
शौचाचारस्थितः सम्यक् विघसाशी गुरुप्रियः ।
नित्यव्रती सत्यपरः स वै ब्राह्मण उच्यते ॥
सत्यं दानमथाद्रोहमानृशंस्यं त्रपा घृणा ।
तपश्च दृश्यते यत्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥

अर्थ – जातकर्मादी संस्कारांनी जो सुसंस्कृत झालेला आहे, जो शुद्ध व वेदाध्ययनसंपन्न आहे, जो षट्कर्मे करतो, आचरण शुद्ध ठेवतो, यज्ञ करून उरलेले अन्न जो भक्षण करतो, जो गुरूला प्रिय असतो; नियमशील, सत्यनिष्ठ, दानशील, अद्रोही, दयाळू, सलज्ज, दुष्कृत्याची घृणा करणारा व तपस्वी असतो, त्यालाच ब्राह्मण असे म्हणतात.

धर्मराजानेही ब्राह्मणाचे वर्णन केले आहे, ते असे – सदाचार हेच ब्राह्मणाचे लक्षण आहे. चारही वेदांचे अध्ययन केलेला ब्राह्मणही जर दुराचारी असेल, तर तो शूद्रापेक्षाही हीन समजावा. जो अग्निहोत्र करतो, शमदमयुक्त, संतुष्ट व शुद्ध असतो, जो तप व स्वाध्याय करतो आणि सर्व भूतांचे हित करतो तोच ब्राह्मण होय (वन. १८.४४).

सत्य, तप, विद्या ही लक्षणे शूद्राच्या ठायी असतील, तर तो ब्राह्मण होय आणि ती ब्राह्मणाच्या ठायी नसतील, तर तो शूद्र होय, असे भृगूने व भीष्माचार्यांनीही म्हटले आहे.

वर्णभेद गुणकर्मांवर अवलंबून असल्यामुळे आंतरवर्णीय विवाहांवर त्या काळी कसलेच बंधन नव्हते. वनपर्वात नहुष व युधिष्ठिर यांचा संवाद आहे. त्यात युधिष्ठिर म्हणतो, की

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'सध्या सर्व वर्णांचा संकर झालेला असल्यामुळे अमक्याची अमुक जात आहे, हे ठरवणे कठिण आहे. ज्याच्या ठायी सत्य,

माध्व ब्राह्मण

दान, क्षमा, शील, इ. गुण आहेत, त्यालाच ब्राह्मण म्हणावे.' यावरून कौरवपांडवांच्या काळात गुणांवरून वर्ण ठरत असे, जन्मावरून नव्हे, हे स्पष्ट ध्यानात येते. वैदिक काळात वंश-भेदाचा अभिनिवेश उत्पन्न झालेला नव्हता. त्यामुळे दास किंवा अनार्य स्त्रियांच्या प्रजेलाही ब्राह्मणत्व प्राप्त होत असे. ब्राह्मण वर्णातील लोक एकाच वंशाचे नव्हते. आर्य संस्कृतीचा प्रसार दक्षिण भारतात झाल्यानंतर द्रविड लोकांनी चातुर्वर्ण्यव्यवस्था स्वीकारली आणि द्राविड ब्राह्मण निर्माण झाले.

अशा प्रकारे वैदिक युगात वर्णसंकर किंवा वर्णविपर्यय चालू असला, तरी बुद्धिजीवी ब्राह्मण वर्गाचे श्रेष्ठत्व अबाधित राहिले होते. यज्ञसंस्थेचा जसजसा विकास होत गेला, तसतसे ब्राह्मणांचे वर्चस्व वाढतच गेले. ब्राह्मणयुगात यज्ञीय कर्म-कांडाला यांत्रिक व गुंतागुंतीचे स्वरूप प्राप्त झाले. त्या पूर्वीच्या काळात केवळ भक्तिभावयुक्त प्रार्थनेनेच देवतांना प्रसन्न करून घेण्याची वृत्ती ब्राह्मणांमध्ये होती. पण कालांतराने देवतांच्या कृपाप्रसादापेक्षा यज्ञयागातील मंत्रसामर्थ्यानेच आपण इष्ट फल प्राप्त करून घेऊ शकतो, असा दुर्दम्य आत्मविश्वास त्यांच्यांत उत्पन्न झाला. तैत्ति. ब्राह्मणात (३.७.३) ब्राह्मणाला अग्निवैश्वानर मानले आहे व दिव्यवर्ण म्हटले आहे, ते या त्याच्या मंत्रसामर्थ्याला अनुलक्षूनच होय. सर्व लोकांनी ब्राह्म-णांना पूज्य मानावे, त्यांना दान द्यावे, त्यांचा छळ किंवा वध करू नये, असे शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे, तेही याच-साठी. त्याच ग्रंथात असेही म्हटले आहे, की ब्राह्मणांनी यज्ञ केले नाहीत, तर सूर्य उगवणार नाही (श. ब्रा. २.३.१.५). वैदिक वाङ्मयात ब्राह्मण हा शब्द काही जागी पुरोहित या अर्थानेही वापरलेला आढळतो (ऋ. १.१६४.४५; अथर्व. २.६.३; वाज. सं. ७.४६) पुरोहित हा राजाचा मार्गदर्शक व साहाय्यक असल्यामुळे वेदकाळात ब्राह्मणांना राज्यशासनातही श्रेष्ठत्व प्राप्त झाले होते. (पुरोहित पाहा.)

वैदिक युगानंतर धर्मसूत्रे, स्मृती, इ. धर्मशास्त्रांचे जे ग्रंथ निर्माण झाले, त्यांतही ब्राह्मणांचे पावित्र्य व श्रेष्ठत्व यांची अतिरंजित वर्णने आढळतात. ब्राह्मण हे भूलोकीचे देव आहेत, तेच विश्वाचे आधारस्तंभ आहेत व ब्राह्मणांच्या कृपे-मुळेच देव स्वर्गात वास्तव्य करतात, असे विष्णुधर्मसूत्रात (१९.२०.२२) म्हटले आहे. ब्राह्म-णाच्या प्रभावाने व्रते, वैकल्ये व यज्ञयाग यांतील दोष नष्ट होऊन त्यांचे पूर्ण



उत्तर प्रदेशातील ब्राह्मण

फल मिळते; ब्राह्मणांमध्ये देवतांचे वास्तव्य असल्यामुळे, ब्राह्म-णांचे शब्द ते देवांचेच शब्द होत, ते कधीही विफल होत नाहीत, असे पराशराने ठासून सांगितले आहे (६.५२.५३). ब्राह्मण हा सर्व लोकांचा गुरू होय, असे महाभारतात म्हटले आहे. वनपर्वात हाच आशय पुढील श्लोकात (म. भा. वन. ३०३.१६) सांगितला आहे –

> ब्राह्मणो हि परं तेजो ब्राह्मणो हि परं तपः ।
> ब्राह्मणानां नमस्कारैः सूर्यो दिवि विराजते ।।

ब्राह्मण म्हणजे परम तेज व तप होय. ब्राह्मणांच्या नमस्कारां-मुळेच सूर्य दिव्य लोकात विराजतो.

मनूने ब्राह्मणांच्या सामर्थ्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे (मनु. ९.३१५-१७)—

लोकानन्यान्सृजेयुर्ये लोकपालांश्च कोपिताः ।
देवान्कुर्युरदेवांश्च कः क्षिण्वंस्तान्समृध्नुयात् ।।
यानुपाश्रित्य तिष्ठन्ति लोका देवाश्च सर्वदा ।
ब्रह्म चैव धनं येषां को हिंस्यात्तान्जिजीविषुः ।।
अविद्वांश्चैव विद्वांश्च ब्राह्मणो दैवतं महत् ।
प्रणीतश्चाप्रणीतश्च यथाग्निर्दैवतं महत् ।।

अर्थ — जे क्रुद्ध झाले असता अन्य स्वर्गादी लोक व लोकपाल निर्माण करू शकतात, जे देवांनाही शाप देऊन मनुष्यादी योनीत जन्म घ्यायला लावतात, अशा ब्राह्मणांना पीडा देऊन कोणाचा उत्कर्ष झाला आहे ! ज्यांचा आश्रय करून लोक व देव नेहमी आपापल्या स्थानी स्थिर राहतात व वेद हेच ज्यांचे धन आहे, त्यांना जीवनाची इच्छा करणारा कोण मारील ! अग्नी; मग तो आहित असो वा अनाहित असो; तो जसा महान दैवत तसाच ब्राह्मण विद्वान असो, अविद्वान असो, तो महान दैवतच असतो.

ब्राह्मणांच्या आदर्शभूत जीवनाचे वर्णन पं. बाळशास्त्री हरदास यांनी गौरवपूर्ण शब्दांत पुढीलप्रमाणे केले आहे —

निष्कांचन अवस्थेत स्वार्थहीन मूल्योपासना या वर्णाने अव्याहत सहस्रावधी वर्षे पत्करली आणि सुख व भोग यांचा मार्ग इतरांसाठी मोकळा राखला. ब्राह्मणांनी सत्ता आणि वैभव ही फक्त विद्येनेच प्राप्त करून घ्यायची,' असा कडक निर्बंध स्वतःस घालून घेतला. अपरिग्रह, ज्ञानतपोनिष्ठा, चारित्र्य-संरक्षण व निष्काम मूल्योपासना ही ब्रह्मण्याची लक्षणे होत. सर्व इंद्रियांना स्वाधीन ठेवणारा आणि शम, दम, तप, सत्य, तितिक्षा, शांती, इ. गुणांची केवळ मूस असा हा वर्ग आयुष्य-भर सांस्कृतिक जीवनमूल्ये प्रत्यक्ष जीवनातून आविष्कृत करण्यासाठी सतत जळत होता.

जन्मनिष्ठ वर्णव्यवस्था — वैदिक युगात गुणकर्मानुसार समाजाचे वर्ग झाले होते, पण त्यांचा परस्परांशी रक्तसंकर व वृत्तिकसंकरही होत असे. त्यानंतरच्या काळात मात्र हे वर्ण जन्मा-धिष्ठित मानले जाऊ लागले. ब्राह्मण केवळ जन्मामुळे श्रेष्ठ मानावा, हा विचार धर्मसूत्रकारांनी जागोजागी सांगितला आहे. राजाची सत्ता सर्व प्रजेवर असते, मात्र ब्राह्मणांवर नाही, असे गौतम म्हणतो (९.१). त्याच्या मते ब्राह्मण कोणत्याही अपराधासाठी अवध्य व अदंड्य असतो. बोधायनही ब्राह्मणाला अवध्य मानतो. पण ब्रह्महत्या, गुरुतल्पगमन, सुरापान, इ. पापांसाठी याच्या मस्तकी डाग देऊन त्याला देशनिर्वासित करावे, असे सांगतो. ब्राह्मणाचा राजद्रोह मात्र अक्षम्य गुन्हा मानला जात होता. कौटिल्याने त्यासाठी जलसमाधीची शिक्षा सांगितली आहे. ब्राह्मण करमुक्त होता. राजाने त्याचे धन घेऊ नये, असे आपस्तंब व वसिष्ठ म्हणतात. ब्राह्मण आपल्या तपस्येचा षष्ठांश राजाला देतात, तोच त्यांनी दिलेला कर समजावा, असे कालिदासानेही अभिज्ञान शाकुंतलात म्हटले आहे (२.१३).

ब्राह्मणाची कर्तव्ये सांगताना या सर्व शास्त्रकारांनी अत्यंत उदात्त कल्पना मांडल्या आहेत. ब्राह्मणांनी सतत वेदाध्ययन करावे, एका दिवसाच्या गरजेपेक्षा जास्त धनसंचय करू नये, इ. त्यांची कर्तव्ये सांगितली आहेत. त्यांत थोडासा खंड पडला, तरी त्यांचे ब्राह्मण्य लोपेल; अशी असंख्य वचने शास्त्रग्रंथांत सापडतात. असे आचरण करणाऱ्या ब्राह्मणाला पूज्य मानावे हे योग्य होय. पण ही लक्षणे ज्याच्या ठायी दिसत नाहीत अशा ब्राह्मणांनाही पूज्य मानावे, असे धर्मशास्त्रात म्हटलेले आहे, ते अयोग्य ठरते. ब्राह्मण सच्छील असो वा दुःशील असो; सुसंस्कृत असो वा हीन असो; त्याचा अपमान करू नये, कारण तो भस्माखालच्या अग्नीसारखा असतो, असे वृद्धगौतमस्मृतीत म्हटले आहे. परीक्षा करून ब्राह्मणाला बोलवावे असे वेदवचन

दीक्षितार ब्राह्मण

आहे, हे खरे; पण परीक्षा न करणेच चांगले; परीक्षा न करता ब्राह्मण बोलावले तर पितर व देव संतुष्ट होतात, असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अपरार्क म्हणतो. अशा प्रकारची पुष्कळ वचने धर्मशास्त्रात सापडतात. चारित्र्य, तप, वेदाध्ययन यांचे महत्त्व नसून, ब्राह्मणाच्या भौतिक पिंडाला मान द्यावा, असा त्याचा अर्थ होतो.

जन्मावरून वर्ण ठरविण्याची कल्पना वैदिक युगाच्या अंती म्हणज सन पूर्व १००० च्या सुमाराला उगम पावली असावी, असे पंडितांचे मत आहे. वेदसंहितांचे शुद्ध रूपात काटेकोरपणे जतन करणे व यज्ञयागादी पवित्र कार्ये चालवणे या गोष्टी ब्राह्मणांवर सोपवलेल्या असल्यामुळे त्यांचा वंश शुद्ध राहावा, अशी आकांक्षा असणे साहजिक आहे. या आकांक्षेतूनच जन्मजात ब्राह्मण्याची कल्पना उगम पावली. शुद्धतेच्या अवास्तव कल्पना व स्वतःच्या श्रेष्ठतेविषयी अभिमान यांमुळे ती कल्पना ब्राह्मणांच्या मनात दृढ झाली. मात्र क्षत्रिय व वैश्य हे वर्णही शुद्ध राहावे, अशी त्यांची इच्छा होती. म्हणून सूत्रकारांनी त्या कल्पनेचा विस्तार केला आणि आंतर्वर्णीय विवाह व प्रत्येक वर्णाचे व्यवसाय यांवर बंधने घातली. विद्यादान, संरक्षण, व्यापार, इ. निरनिराळ्या कामांसाठी लागणारे निरनिराळे गुण भिन्न भिन्न मानवसमूहांत आढळतात व ते आनुवांशिक असतात. अशा भिन्न वर्गांतील स्त्री-पुरुषांच्या संततीत ते गुण उतरत नाहीत, तर सवर्ण दंपतीच्या मुलांत त्या वर्णाचे गुण प्रकर्षाने टिकून राहतात. या कल्पनांवर चातुर्वर्ण्यव्यवस्था आधारलेली आहे. गुणांचा क्षय होऊ नये, म्हणून ब्राह्मणांनी इतर वर्णांशी विवाहसंबंध करू नये व त्यांचे व्यवसायही करू नयेत, असे निर्बंध धर्मशास्त्रात घातलेले आहेत. शास्त्रकारांच्या मते ब्राह्मण पुरुषाने ब्राह्मण स्त्रीशी विवाह करणेच उत्तम होय. इतर वर्णांतील स्त्रीशी विवाह करायला शास्त्राची अनुमती होती; पण त्यामुळे कुलाला अधोगती प्राप्त होते, असे त्यांना वाटत होते (मनु. ३.१५). अशा विवाहाला अनुलोम म्हणतात. उच्च वर्णातील स्त्रीचा नीच वर्णातील पुरुषाशी विवाह म्हणजेच प्रतिलोम विवाह मात्र धर्मशास्त्राला मान्य नव्हता. सर्व सूत्रकार व स्मृतिकार यांनी त्याचा निषेध केला आहे. त्याचप्रमाणे ब्राह्मणांनी वेदाध्ययन व श्रौतकर्मे सोडून इतर व्यवसाय केले व धनसंचय केला, तर त्यांचा अधःपात होतो, असेही त्यांनी सांगितले आहे. अध्ययन-अध्यापन, यजन-याजन आणि दान-प्रतिग्रह ही ब्राह्मणांची विहित कर्तव्ये होत. अध्यापन, याजन व प्रतिग्रह हे त्यांचे उपजीविकेचे व्यवसाय ठरवलेले होते; पण त्यांतून त्यांना विशेषशी प्राप्ती होत नसे. म्हणून ब्राह्मणांचा योगक्षेम राजाने चालवावा, असे शास्त्रकारांनी म्हटले आहे. राजा, शिष्य व यजमान यांच्याकडून त्यांनी दान घ्यावे; पण हे दान देणारे धार्मिक वृत्तीचे असले पाहिजेत, असे त्यावर बंधन होते. विद्वान ब्राह्मणाने दान घेणे योग्य होय, त्यामुळे दात्याला पुण्य लाभते, असे सांगितले असले, तरी ब्राह्मणाने विनाकारण, आवश्यकता नसताना व पुनःपुन्हा दान घेतले, तर त्याचे आध्यात्मिक बल नष्ट होते, असेही धर्मशास्त्रकारांचे मत होते (मनु. ४.१८६; वसिष्ठ. १४.१३; विष्णु ध. सू. ५७.१३).

कुटुंबाचे भरण-पोषण करण्यासाठी अवश्य वाटल्यास आपद्धर्म म्हणून ब्राह्मणाने शेती, सावकारी, व्यापार, गोपालन, इ. अन्य व्यवसाय करायला धर्मशास्त्राची संमती होती (गौतम ७.६-७; वसिष्ठ. २.२२). ब्राह्मणाने आपत्काली शस्त्र हाती धरले तरी चालेल असे गौतम म्हणतो. वर्णाश्रमधर्माचे पालन, स्वसंरक्षण, स्त्रीचे व ब्राह्मणाचे रक्षण यांसाठी ब्राह्मणाने शस्त्र चालवायला मनूचीही हरकत नव्हती. तथापि सर्वसामान्य परिस्थितीत ब्राह्मणाने अन्य वर्णांचा व्यवसाय करणे सर्व शास्त्रकारांनी निषिद्ध मानले आहे. कारण त्यामुळे वेदाध्ययन, अध्यापन व यज्ञयाग या कार्यांकडे त्याचे दुर्लक्ष होण्याचा संभव त्यांना दिसत होता.

धर्मशास्त्रात वर्णसंकरावर अशी असंख्य बंधने घातलेली असली, तरी प्राचीन काळी त्यांचे पालन काटेकोरपणे केले जात नव्हते, असेही दिसते. अनुलोम व प्रतिलोम असे उभयविध विवाह चालू होते आणि त्यांतून जन्मलेले कित्येक पुरुष पराक्रम गाजवून थोर पदाला जात होते. त्यामुळे कुलनाश झाला असे दिसत नाही. ब्राह्मण लोक सर्व प्रकारचे उद्योग करीत होते व त्यांत यशही मिळवीत होते. इतिहासात अशा प्रकारची पुष्कळ उदाहरणे आढळतात. शुंग, कण्व, वाकाटक, कदंब, इ. ब्राह्मण वंशांनी राज्येही चालवली, असे इतिहास सांगतो. मात्र मध्ययुगात ब्राह्मणांनी शुद्धतेचे व सोवळ्याचे अतिशय स्तोम माजवून, इतर वर्णांना अगदी हीन लेखले आणि त्यांच्याशी अन्नपानादी व्यवहारही बंद केले. शूद्र व अस्पृश्य लोकांना तर ते पशुवत मानू लागले.

पोटभेद – प्रारंभी वेदाध्ययन-अध्यापन व यज्ञकर्मे करणाऱ्या ब्राह्मणांचा एकच वर्ग होता. पण व्यासांनी वेदाच्या चार संहिता निर्माण केल्यानंतर त्यांचे पृथक्पणे अध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांचे ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी व अथर्ववेदी असे उपवर्ग झाले. त्यानंतर प्रत्येक वेदाच्या अनेक शाखा झाल्या आणि त्यावरूनही ब्राह्मणांचे पोटभेद झाले. त्या पोटभेदांचे सूत्रांवरून आणखी लहान गट तयार झाले.

महाभारतात ब्राह्मणांचे एक निराळेच वर्गीकरण दिले आहे, ते असे– ब्रह्मसम, देवसम, शूद्रसम, चांडालसम, क्षत्रसम व वैश्यसम. हे प्रकार ब्राह्मणांनी स्वीकारलेल्या व्यवसायावरून झालेले दिसतात. अत्रिस्मृतीत ब्राह्मणांचे दहा प्रकार दिलेले आहेत. त्यांत देवब्राह्मण व मुनिब्राह्मण हे श्रेष्ठ प्रकार असून, शूद्र-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्राह्मण, निषादब्राह्मण, पशुब्राह्मण, म्लेच्छब्राह्मण, चांडाळ-ब्राह्मण, इ. हीन प्रकारही आहेत. जन्माने ब्राह्मण असूनही जे ब्राह्मण नव्हेत, असे सहा प्रकार अपरार्कानें सांगितले आहेत. दसब्राह्मण जातकातही ब्राह्मणांच्या दहा प्रकारांचे वर्णन आहे. हे प्रकार त्यांच्या भिन्न कर्मांवरून झाले आहेत.

ब्राह्मणांमध्ये असे पोटभेद झाल्यानंतर त्यांतही उच्चनीचता मानली जाऊ लागली. वैदिक ज्ञानोपासना व यज्ञयाग करणारे ब्राह्मण श्रेष्ठ; त्यानंतर उच्चवर्णियांची धार्मिक कृत्ये करणारे, दैवज्ञ कुटुंबांचे उपाध्याय, ज्योतिषी, पंचाक्षरी व पुजारी असा त्यांचा उतरता क्रम आहे. मर्तिकविधी करणारे ब्राह्मण सर्वांत कनिष्ठ मानले जातात.

पोटजाती – इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत ब्राह्मणांमध्ये असे पुष्कळ पोटभेद उत्पन्न झाले असले, तरी त्यांच्या पोटजाती झालेल्या नव्हत्या. ११ व्या शतकापासून मात्र ब्राह्मणांचे पंचगौड व पंचद्रविड हे दोन विभाग झालेले दिसतात. विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील प्रदेशात राहणारे ते पंचगौड आणि दक्षिणेकडील प्रदेशांतले ते पंचद्रविड होत. पंचगौड बहुतेक मांसाहारी असून, पंचद्रविड ब्राह्मण सामान्यपणे दुसऱ्या महायुद्धापर्यंत मांस खात नव्हते. या दशविध ब्राह्मणांची माहिती स्कंद पुरा-

स्मार्त ब्राह्मण

णाच्या सह्याद्रिखंडात आढळते. (पंचगौड व पंचद्रविड पाहा). या दहा पोटविभागांचे आणखी विभाजन होऊन पंचवीस-तीस पोटजाती निर्माण झाल्या. त्यांची नावे अशी –(१) सारस्वत (२) कान्यकुब्ज (३) मैथिल (४) गौड (५) उत्कल (ओडिसा पाहा) (६) महाराष्ट्रीय (महाराष्ट्र पाहा) (७) द्राविड – तमिळनाडूमधील ब्राह्मण (८) कर्नाटक– कर्नाटक प्रदेशातील ब्राह्मण (९) गुजराती– गुजरातमधील ब्राह्मण (१०) नागर (११) दायमा (१२) आसामी (१३) बंगाली (बंगाल पाहा) (१४) पुष्करण (१५) सांचौरा – यांना जोशी किंवा ज्योतिपी ब्राह्मण असेही म्हणतात. हे पंचद्रविडांपैकी असून, दक्षिण भारतातून मारवाडात सांचौर येथे जाऊन वसले. हे पंजाबात व उ. प्रदेशातही आढळतात. (१६) पालीवाल (१७) शाकद्वीपी (१८) आंध्र (१९) तेलंगी-तेलंगणातील ब्राह्मण. हे काशीहून त्या प्रदेशात जाऊन वसले. यांची गोत्रे भारद्वाज व भृगू आहेत. हे वैष्णव असून, कृष्णाचे उपासक आहेत. यांचे संस्कार आपस्तंब गृह्यसूत्राप्रमाणे होतात. (२०) पंडा (२१) भट्ट (२२) भूमिहार (२३) काश्मीरी ब्राह्मण (२४) नंपूतिरी ब्राह्मण इत्यादी. यांपैकी बहुतेक पोटजातींची माहिती स्वतंत्रपणे दिलेली आहे.

वरील पोटजातींचेही निरनिराळ्या कारणांनी विभाजन होऊन ब्राह्मणांच्या सुमारे साडेतीनशे उपजाती निर्माण झाल्या आहेत. महाराष्ट्रात पंचगौडांच्या चौदा आणि पंचद्रविडांच्या तीस-पस्तीस उपजाती आहेत. गुजराती ब्राह्मणांच्या नव्वद उपजाती आणि कर्नाटक ब्राह्मणांच्या दहाबारा उपजाती आढळतात. पंजाबात सारस्वत, गौड, गुजराती, पोखर्ण, मुहियल, घरुक, इ. पोटजाती आढळतात. उत्तर प्रदेशात कनोजिया, सनाढ्य, शरयूपारी या ब्राह्मणांच्या पोटजाती आहेत. द्रविड ब्राह्मणांमध्ये स्मार्त, वैष्णव, केसिगल, दीक्षितार, शेलिआर, गुरुक्कल, इ. पंचवीस-तीस पोटशाखा आहेत.

या असंख्य पोटजातींत उच्चनीचतेचा दुरभिमानही आढळतो. त्यामुळे ब्राह्मण समाजाचे सामर्थ्य हळूहळू कमी होत गेले. ब्राह्मण कुळात जन्मलेले सर्वजण गुणसंपन्न नसून, त्यांतले पुष्कळजण हीन वृत्तीचे निघाल्यामुळे, हिंदू समाजात ब्राह्मणाविषयी जो आदर पूर्वी वसत होता, त्याला उतरती कळा लागली. वेदशास्त्रसंपन्न, दशग्रंथी, नीतिमान अशा ब्राह्मणांना लोक अजून थोडाबहुत मान देतात. धर्मकृत्ये चालविणाऱ्या पुरोहितांचा मान खूपच कमी झाला आहे. भिक्षुक, ज्योतिषी, वैद्य, मांत्रिक अशा ब्राह्मणांचे वर्चस्व समाजावर दीर्घ काल टिकले हे खरे; पण बहुजनसमाजाचे अज्ञान हेच त्याचे प्रमुख कारण होय. गेल्या शतकापासून पाश्चात्य ज्ञानामुळे जे जागृत झाले, त्यांनी आता ब्राह्मणांची धर्मसत्ता अमान्य केली आहे. ब्राह्मणांनी स्वतःच्या श्रेष्ठत्वाचे अवडंबर माजवून शतकानुशतके इतर जातींना तुच्छ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लेखले, त्यांचे शोषणही केले; त्याची प्रतिक्रिया सांप्रत सुरू झाली असून, ब्राह्मण जातीचे भवितव्य संशयात पडले आहे.

संस्कार – ब्राह्मणांच्या जीवनात संस्कारांना फार महत्त्व असते. त्यांचे प्रमुख संस्कार सोळा असून, त्यांची नावे अशी – गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, अन्नप्राशन, चूडाकर्म, उपनयन, वेदव्रतचतुष्टय, गोदान, समावर्तन, विवाह व अंत्येष्टी. यांतील पहिले तीन संस्कार गर्भाचे आहेत. जातकर्म हा संस्कार जन्माच्या वेळी करायचा असतो. नामकरण, अन्नप्राशन व चूडाकर्म हे संस्कार बाळपणात करतात. उपनयन हा संस्कार विद्यारंभाच्या वेळी व समावर्तन हा विद्यार्जनाच्या अंती करायचा असतो. यांतील काही संस्कार आता लोप पावले आहेत, तर काहींना केवळ समारंभाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्राचीन काळी त्या संस्कारांना विशेष अर्थ होता, तो आताच्या परिस्थितीत राहिला नाही. विवाहसंस्कार मात्र अत्यावश्यक असल्यामुळे तो सर्वत्र चालू आहे.

विवाहप्रथा – इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत ब्राह्मणांमध्ये भिन्न भिन्न कारणांमुळे अनेक उच्चनीच भेद निर्माण झाले असले, तरी त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध चालू होते. आपल्या धर्मशास्त्रात स्वशाखीयांशीच विवाह करावा असा नियम किंवा भिन्न



ओडिया ब्राह्मण

शाखीयांशी विवाह करू नये, असा निषेध कुठेही सांगितलेला नाही. इ. स. च्या १० व्या शतकानंतर ब्राह्मणांच्या पोटजाती निर्माण झाल्या आणि त्यांच्यांत लग्नसंबंध बंद झाले. शुद्धतेची कल्पना पराकोटीला नेऊन कोण्या स्वयंमन्य धर्ममार्तंडाने, भिन्न शाखेतील किंवा पोटजातीतील स्त्रीपुरुषांचा विवाह करू नये, असे म्हटले असेल, म्हणून तशी प्रथा रूढ झाली आणि 'शास्त्रात् रूढिर्बलीयसी' या वचनाचा आधार घेऊन अजूनही बहुतेक ब्राह्मण लोक स्वशाखेतील वधू-वरांचा संबंध जोडण्याचाच आग्रह धरतात. पण सर्व शाखांच्या व पोटजातींच्या ब्राह्मणांनी परस्परांशी विवाहसंबंध करावे, असे पं. महादेवशास्त्री दिवेकर यांनी प्रतिपादले आहे.

धर्मशास्त्रात सगोत्र, सप्रवर आणि सपिंड विवाहाचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. तशा प्रकारचे विवाह न करण्याची प्रथा अजूनही चालू आहे. धर्मनिर्णयमंडळाने असा निर्णय केला आहे, की सगोत्र व सप्रवर विवाह निषिद्ध मानू नयेत, मात्र सापिंड्याचे निर्बंध पाळणे अत्यावश्यक आहे.

वैदिक युगात मुलगी वयात आल्यानंतर तिचे लग्न होत असे. गृह्यसूत्रे व धर्मसूत्रे यांच्या काळी मुलींची लग्ने रजोदर्शनापूर्वी किंवा रजोदर्शनानंतर लगेच करण्याची प्रथा सुरू झाली. रजोदर्शनानंतर मुलगी अविवाहित राहिली, तर ती बिघडण्याचा संभव असल्यामुळे तिचे लग्न रजोदर्शनापूर्वीच करावे, तसे न करणे हे पाप आहे, असे गौतम म्हणतो. मध्ययुगात बालविवाह रूढ झाले, ते गेल्या शतकाच्या अखेरपर्यंत चालू होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी सरकारने शारदा कायदा केल्यामुळे निदान ब्राह्मण समाजातले बालविवाह बंद झाले आणि आता परिस्थितीमुळे मुलींचे विवाह वयाच्या वीस वर्षांनंतर होऊ लागले आहेत.

ब्राह्मण पुरुषाला एकच पत्नी असणे हे उत्तम, असे धर्मशास्त्रात म्हटले आहे. पण ती व्यसनी, रोगग्रस्त, लबाड, कजाग किंवा निपुत्रिक असेल, तर पतीने दुसरी भार्या करावी, असे मनू, याज्ञवल्क्य, आपस्तंब, इ. शास्त्रकारांनी सांगितले आहे. पण एका पुरुषाला अनेक भार्या असल्याची प्राचीन काळातली उदाहरणे पुष्कळ आहेत. ही प्रथा या शतकाच्या मध्यापर्यंत चालू होती. बहुपतिकत्वाची चाल मात्र ब्राह्मणांत केव्हाही रूढ नव्हती.

एका मनुष्याच्या दोन भार्या एकीमागून एक मरण पावल्या असता, तिसरा विवाह करण्यापूर्वी अर्काशी म्हणजे रुईच्या झाडाशी त्याचा विवाह करण्याची चाल होती. त्याचे वर्णन बौधायन गृह्यसूत्रांत आहे.

वडील भावाचे लग्न होण्यापूर्वी धाकट्या भावाचे किंवा वडील बहिणीच्या लग्नापूर्वी धाकट्या बहिणीचे लग्न करणे याला परिवेदन म्हणतात. गौतम व आपस्तंब यांनी अशा लग्नाचा निषेध केला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वधू व वर यांची निवड करण्यापूर्वी त्यांच्या पत्रिका जुळवून पाहणे, गोत्र-प्रवर इत्यादिकांचा विचार करणे, त्यांचे शील व आरोग्य, कुळाची सांपत्तिक स्थिती व सामाजिक प्रतिष्ठा, यांसंबंधी चौकशी करून सर्व गोष्टी मनाप्रमाणे जुळत असल्या तर विवाहसंबंध निश्चित करणे, ही पद्धती प्राचीन काळापासून चालत आलेली असून, ती सांप्रतही बहुतांशी तशीच चालू आहे. पूर्वी ब्राह्म व दैव या विवाहप्रकारांत सालंकृत कन्यादान करण्याची प्रथा होती, तर आर्ष व आसुर विवाहांत वधूपित्याला वरपित्याकडून गाईबैल किंवा द्रव्य मिळत असे. कालांतराने मुलींची संख्या कमी झाल्यामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे वराचे मूल्य वाढले आणि मध्ययुगात वधूपित्याने वरपित्याला यथाशक्ति द्रव्य देण्याची चाल सुरू झाली. ही हुंड्याची चाल अजूनही चालू आहे. तिचे अस्तित्व हे सांप्रत फारच चिंतेचा विषय झाले आहे. कारण वधू कितीही सुस्वरूप, शिकलेली व गुणी असली, तरी तिच्या पित्याने वराला भरपूर हुंडा द्यावा, पोषाख द्यावा, लग्नसमारंभाचा सर्व खर्च करावा आणि पुष्कळ माणसांना भोजन घालावे, अशा अटी वरपक्ष घालतो. वधूपिता गरीब असला, तरी पुष्कळदा मुलीच्या कल्याणासाठी त्या अटी मान्य करतो व स्वतः कर्जबाजारी होतो.

वरपक्षाने मुलगी पाहून पसंत केल्यानंतर वधूपित्याने वराच्या घरी जायचे, वराला प्रत्यक्ष पाहून, परीक्षा घेऊन त्याला पसंत करायचे आणि उभयपक्षी देण्याघेण्यासंबंधी वाटाघाटी झाल्यानंतर वरपित्याला नारळ द्यायचा, अशी जुनी प्रथा होती. आता कालमानाप्रमाणे त्या पद्धतीत बदल झाला आहे. वरपक्ष वधूची परीक्षा घेतो; त्याचप्रसंगी बहुधा वधूपक्ष वराचीही परीक्षा करतो. वधू-वर परस्परांना पसंत असतील आणि उभयपक्षी मान्य असतील तर मग दोन्ही पक्षांतील मंडळी मध्यस्थासह बैठक भरवून वाटाघाटी करतात आणि त्या वेळी देणेघेणे ठरवतात. यानंतर तिथिनिश्चय झाल्यावर मधल्या काळात केव्हातरी साखरपुड्याचा कार्यक्रम काही पोटजातींत केला जातो. त्यासाठी वरपक्षाकडील काही मंडळी वधूच्या घरी जातात आणि तिथे वरपिता वरुण व गणपती यांचे पूजन करून वधूला सौभाग्यद्रव्ये, साडीचोळी, मुंडावळ व खाऊचा पुडा देतो. मग लग्नपत्रिकेचे पूजन करतात व शेवटी पानसुपारी वाटतात.

या कार्यक्रमानंतर विवाहापूर्वी घाणा भरणे, उष्टी हळद, केळवण, व्याहीभोजन, तेलफळ, रुखवत वगैरे लौकिक सोहळे केले जातात. विवाहाच्या पूर्वदिवशी पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, ग्रहमख, मंडपदेवताप्रतिष्ठा, इ. धार्मिक विधी करायचे असतात. विवाहसमारंभ वधूच्या घरी होतो. त्यासाठी वरपक्षाचे लोक वाजतगाजत वधूगृही किंवा मंगल कार्यालयात जातात. सीमान्तपूजन व मधुपर्क हे वराच्या स्वागताचे विधी आहेत. त्या वेळी वधू गौरीहराची पूजा करीत, आत देवकाजवळ बसलेली असते.



महाराष्ट्रीय ब्राह्मण

मधुपर्क झाल्यानंतर बोहल्यावर लग्न लागते. तिथे दोन पाट समोरासमोर मांडून त्यांवर तांदूळ पसरतात आणि त्यांवर कुंकवाची स्वस्तिके काढतात. एका पाटावर वर उभा राहतो. त्याच्या समोर एक वस्त्र आडवे धरलेले असते, त्याला अंतरपाट म्हणतात. मग मुलीचा मामा मुलीला घेऊन येतो व तिला वरासमोर दुसऱ्या पाटावर उभी करतो. दोघांच्या हातात पुष्पमाला असतात. अंतरपाटामुळे वधू-वर परस्परांना पाहू शकत नाहीत. त्या वेळी वधूच्या व वराच्या बहिणी हाती पाण्याने भरलेले कलश व दिवे घेऊन मागे उभ्या असतात. लग्नघटिका होईपर्यंत उपाध्याय मंगलाष्टके म्हणतात. त्या वेळी उपस्थित लोक वधू-वरांवर अक्षता टाकतात. सुमुहूर्ताचा क्षण येताच उपाध्याय पुढील श्लोक म्हणतात —

तदेव लग्नं सुदिनं तदेव । ताराबलं चन्द्रबलं तदेव ।
विद्याबलं दैवबलं तदेव । लक्ष्मीपते ! तेऽङ्घ्रियुगं स्मरामि ॥

अर्थ — हे लक्ष्मीपते, तुझ्या पायांचे मी स्मरण करतो. ते स्मरण हीच उत्तम लग्नवेळ, हाच उत्तम दिवस आणि हीच नक्षत्रे, चंद्र, विद्या व दैव यांची अनुकूलता होय.

हा श्लोक संपताच उत्तरेच्या बाजूचा मनुष्य अंतरपाट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दूर करतो; त्याक्षणी वधू-वर आपल्या हातातील गूळजिरे व अक्षता परस्परांच्या मस्तकांवर टाकतात आणि हातातली माला परस्परांच्या गळचात घालतात. मग करवल्या कलशातले पाणी वधूवरांच्या डोळचांना लावतात. त्या वेळी मंगल वाद्ये वाजवण्यात येतात. त्यानंतर समारंभासाठी तिथे आलेल्या निमंत्रित मंडळींना अत्तर– गुलाब, फुले, पानसुपारी व पेढे वाटतात.

हा लौकिक समारंभ झाल्यानंतर विवाहाचे धार्मिक विधी सुरू होतात. त्यांत कन्यादान, सूत्रवेष्टण, कंकणबंधन, अक्षतारोपण, मंगलसूत्रबंधन, विवाहहोम (लाजाहोम) व सप्तपदी यांचा समावेश असतो. विवाहहोम व सप्तपदी हे मुख्य विधी असून, ते झाल्यावाचून विवाह पूर्ण व कायदेशीर होत नाही.

सप्तपदीनंतर सायंकाळी वधू-वरांनी ध्रुव, अरुंधती, सप्तर्षी व नक्षत्रे यांचे दर्शन घ्यावयाचे असते. तत्पूर्वी गृहप्रवेशनीय होम व ऐरिणीपूजा हे विधी करतात. रात्री वधू-वरांची वाजतगाजत मिरवणूक वराच्या घरापर्यंत काढतात, तिला वरात असे म्हणतात.

लग्नानंतर भोजनाच्या वेळी वधूने वराला घास देऊन त्याचे नाव घेण्याचा कार्यक्रम असतो. दुसऱ्या दिवशी तोंड धुणे, सुपारी लपवणे, विडचा तोडणे, एकीबेकी, रासन्हाणे, इ. मनोरंजक कार्यक्रम करण्याची चाल आहे. पूर्वी वधू-वर वयाने लहान असल्यामुळे त्यांना असले खेळ शोभत होते. त्यांत कौतुकाचा भाग पुष्कळ असे. पण तरुणपणी विवाह होऊ लागल्यानंतर त्यांनी तसले खेळ खेळणे यात औचित्य व गांभीर्य राहिले नाही. तथापि केवळ रूढाचार म्हणून त्यांपैकी काही कार्यक्रम अजूनही काही ठिकाणी केले जातात.

ऐरिणीदानाच्या प्रसंगी उभय पक्षांतील भिन्न भिन्न व्यक्तींना अहेर देऊन त्यांचा सन्मान करण्याची चाल आहे. ती चांगल्या भावनेतून उगम पावली असली, तरी सध्या मानपानाच्या कल्पना इतक्या विकृत झाल्या आहेत, की त्यामुळे पुष्कळ वेळा धुसफुस व भांडणेही होतात. समारंभात रुसवा, फुगवा, भांडणतंटे, वधूपक्षाचा पाणउतारा करणे, यांत कित्येकांना आजही भूषण वाटते. पण त्यामुळे समारंभातील मांगल्य नष्ट होते आणि कित्येकांची गैरसोयही होते, हे त्यांना कळत नाही. अशा प्रसंगामुळे होणारा मनस्तापही दुर्लक्षणीय नसतो.

वर दिलेला विवाहसोहळा हा मुख्यत्वे महाराष्ट्रातल्या ब्राह्मण समाजात रूढ आहे. विवाहाचा सांस्कारिक विधी सर्वत्र सारखाच असला, तरी देशभेदाने त्यात भिन्न सोहळे व रूढी निर्माण झाल्या आहेत. 'जनपदधर्मा ग्रामधर्मश्च तान्विवाहे प्रतीयात् =' विवाहसंस्कारात देशाचे व ग्रामाचे धर्म (रूढी) विचारात घ्यावे, असे वचनच (आश्व. गृ. १.७.१) आहे.

हिंदू धर्मशास्त्राला विधवा-विवाह व विवाहविच्छेद अमान्य असल्यामुळे ब्राह्मणांमध्ये त्या गोष्टी चालू शतकापर्यंत कधीच रूढ झाल्या नाहीत. गेल्या शतकाच्या अखेरपर्यंत तशा विचारांनाही सनातनी ब्राह्मणांचा प्रखर विरोध होता. पती निधन पावला असता, त्याच्या चितेतच पत्नीने स्वतःला जाळून घेण्याची म्हणजेच सहगमन करण्याची पद्धतही क्वचित दिसत होती. पतिव्रता स्त्रिया असे सहगमन करीत. ते कृत्य अतिशय पुण्यप्रद मानले जाई. मात्र अशा प्रकारे सती जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अल्प होते. बहुतेक विधवा केशवपन करून व्रतस्थ जीवन कंठीत.

देवधर्म – ब्राह्मण समाजात प्राचीन काळापासून स्नानसंध्या, जपजाप्य, होमहवन, देवपूजा, तर्पण व देवदर्शन या कृत्यांना विशेष महत्त्व आहे. सूर्योदयापूर्वी एकदा व दुपारी एकदा असे दोनदा स्नान करण्याचीही प्रथा पूर्वी होती. नदीत किंवा सरोवरात स्नान करताना ते संकल्पपूर्वक व समंत्रक करावे, असे सांगितले आहे. स्नानानंतर ओलेत्याने तर्पण करावे आणि नंतर धूतवस्त्रे परिधान करावी, असेही सांगितले आहे. धूतवस्त्र पवित्र मानले जाई होते. रेशमी वस्त्र मंगल प्रसंगी व सोवळचात आणि देवपूजे साठी वापरीत. त्रिकाल संध्या करण्याची पद्धत होती. वेदकाळी प्रत्येक गृहस्थाश्रमी ब्राह्मण घरात अग्नी ठेवून रोज सायंप्रातर्होम करीत असे. कालांतराने ही अग्नीची उपासना बंद होऊन देवप्रतिमांची षोडशोपचार नित्य पूजा सुरू झाली. भक्तियुगात शिव, विष्णू, देवी, गणेश, सूर्य यांची स्वतंत्रपणे पूजाअर्चा प्रचलित झाली. शंकराचार्यांनी या पाचही देवता एकत्र आणून त्यांचे पंचायतन बनवले व त्याची पूजा रूढ केली. निरनिराळचा देवतांची उपासना करणारे वेगळे संप्रदाय असले, तरी बहुतेक लोकांच्या देव्हाऱ्यात अनेक देवतांच्या मूर्ती असतात व त्यांची नित्य पूजा केली जाते. राम व कृष्ण हे विष्णूचे अवतार म्हणून त्यांची पूजा पुष्कळ लोक करतात. दत्ताची पूजाही प्राचीन काळापासून प्रचलित आहे. काही लोक सुब्रह्मण्याची पूजा करतात, तर काही सरस्वतीची. बाणलिंग, शालिग्राम, धातुखंड, स्फटिक व लाल पाषाणखंड ही अनुक्रमे शिव, विष्णू, दुर्गा, सूर्य व गणेश यांची प्रतीके असून, त्यांची पूजा सर्वत्र प्रचलित आहे.

व्यवसाय – वैदिक युगात ब्राह्मण लोक अध्यापन, याजन व प्रतिग्रह यांवर निर्वाह करीत. कालांतराने ब्राह्मण वर्ग जन्माधिष्ठित झाला आणि त्या वर्गातील काही लोकांना इतर व्यवसाय करून उपजीविका करणे आवश्यक झाले. धर्मशास्त्रकारांनी ब्राह्मणांना आपद्धर्म म्हणून कृषी, व्यापार, इ. व्यवसाय करायला अनुमती दिली. ब्राह्मणांत गृहस्थ व भिक्षुक असे दोन उपवर्ग झाले होते. त्यांना कृषी व गोपालन हे व्यवसाय करणे सोपे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होते. उपाध्येपणा व ज्योतिष यांची गणना भिक्षुकीत होत असे.

राजांचे पुरोहित व मंत्री पुष्कळदा ब्राह्मणच असत. काही ब्राह्मणांनी सेनाधिपत्य स्वीकारले होते, तर काही स्वतःच सिंहासनावर बसले होते. राजांचे ज्योतिषी व मांत्रिक ब्राह्मण असत. वैद्यकी हा देखील ब्राह्मणांचा व्यवसाय होता. आयुर्वेदाचा अभ्यास करून औषधे बनवून ती रुग्णांना देणे आणि ते ज्ञान शिष्यांना देणे, ही कामेही ते करीत.

कोणत्या पदार्थांची विक्री ब्राह्मणांनी करू नये ते आपस्तंब, गौतम, बौधायन, वसिष्ठ, इ. धर्मसूत्रकारांनी सांगितले आहे. दूध विकल्याने ब्राह्मण तीन दिवसांत शूद्र होतो, असे वसिष्ठ म्हणतो. तथापि त्या काळी असले हे विधिनिषेध मुळीच पाळले जात नव्हते. ब्राह्मण सर्व प्रकारचा व्यापार करीत होते. अशा धनाढ्य ब्राह्मणांचा उल्लेख जातककथांत आढळतो. इतिहासातही सावकारी, युद्ध, इ. उद्योग करणाऱ्या ब्राह्मणांची पुष्कळ उदाहरणे सापडतात. ब्रिटिश राज्य सुरू झाल्यानंतर ब्राह्मणांनी सर्वच व्यवसायांत प्रवेश केला. ब्रिटिश अमदानी सुरू होताच त्यांनी काळाची पावले ओळखली आणि वेदशास्त्रांचे अध्ययन सोडून इंग्रजी शिक्षण घेण्यास सुरुवात केली. ब्रिटिश राजवटीच्या नोकर व अधिकारी वर्गांत तेच प्रथम दाखल झाले. काहींनी वकिलीच्या व डॉक्टरीच्या व्यवसायातही कीर्ती व पैसा मिळवला. काहींनी नव्या पद्धतीचे अध्यापनशास्त्र शिकून शिक्षणक्षेत्रात प्रवेश मिळवला. कित्येकांनी इंग्रजी शिक्षणाच्या संस्थाही उभ्या केल्या.

इंग्रजांच्या गुलामगिरीची चीड व स्वराज्याची आकांक्षा ब्राह्मण वर्गातच प्रथम निर्माण झाली. टिळकयुगाच्या अखेरीपर्यंत स्वराज्याच्या चळवळीत प्रामुख्याने तेच अग्रेसर राहिले. सामाजिक सुधारणेची जाणीवही प्रथम याच वर्गात उत्पन्न झाली. सनातनी वर्गाचा प्रखर विरोध सोसूनही या वर्गातले काही लोक आमरण समाजसुधारणेसाठी झटले, झगडले. कित्येकांनी कारखानदारी स्वीकारून औद्योगिक क्षेत्रातही आपली कर्तबगारी दाखवली.

अंत्यसंस्कार – प्राचीन काळी वैदिक ब्राह्मणांचा जो अंत्यसंस्कार केला जात असे, त्याला अंत्येष्टी म्हणत. (अंत्येष्टी पाहा) कालांतराने त्या संस्कारात काही परिवर्तन झाले. जातीपरत्वे आणि प्रदेशभेदाने त्यात थोडा फरक होत असेल. धर्मनिर्णयमंडळाने अखिल हिंदूंना उपयुक्त असे संस्कार तयार करण्याकरिता विद्वानांची एक समिती नेमली होती. तिने अंत्यसंस्कारात काही सुधारणा सुचविल्या, त्या अशा –

(१) प्रेत स्मशानात शक्यतो गाडीतून न्यावे. वैदिक काळी तशी प्रथा होती, असे अथर्ववेद (१८.४४.४) व आश्वलायन गृह्यसूत्र (४.२.३) यांवरून कळते. तिरडीवरून प्रेत नेताना ते भयानक न दिसेल, अशा प्रकारे आच्छादित करावे.

(२) स्मशानात नेण्यापूर्वी प्रेताला घराच्या उंबरठ्यावर किंवा अंगणात स्नान घालण्याची पद्धत योग्य नाही. स्मशानात चितेवर ठेवण्यापूर्वी प्रेताला स्नान घालावे. तसेच प्रेताबरोबर शिंकाळ्यात अग्नी नेण्याची आवश्यकता नाही. पूर्वी श्रौत किंवा स्मार्त अग्नी घरात ठेवलेला असे, तेव्हा दहनासाठी तो बरोबर नेण्याची प्रथा योग्य होती. आता ती अशास्त्रीय व हास्यास्पद वाटते.

(३) ब्रह्मचारी मरण पावला असता, त्याचा अर्कविवाह (रुईच्या झाडाशी लग्न) करणे, सकेशा विधवा मृत झाली असता तिचे क्षौर करणे, पलंगावर किंवा गादीवर मृत्यू झाल्यास प्रायश्चित्त घेणे, बाळंतीण पहिल्या दहा दिवसांत किंवा रजस्वला या अवस्थेत मरण पावली असता विशेष खटाटोपाची शुद्धी करणे, या रूढी त्याज्य होत.

(४) मृताचा पुत्र वयाने लहान असेल, तर प्रेताला अग्नी देण्यासाठी त्याला स्मशानात नेण्याचे कारण नाही. दुसऱ्या कोणीही तो देणे योग्य होय.

(५) अंत्यविधी चालवणाऱ्या ब्राह्मणाला पतित मानले जाते, ते योग्य नव्हे. तसे शास्त्र नाही.

(६) जन्मतःच किंवा नामकरण होण्यापूर्वी मेलेल्या मुलांना पुरावे आणि स्नान करावे.

(७) आठ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याही व्यक्तीचा दहनापासून सपिंडीकरणापर्यंत सर्व अंत्यविधी करावा.

(८) रजस्वला, बाळंतीण, कुष्ठी यांच्या प्रेतांना स्मशानात स्नान घातल्यानंतर तुलसीपत्रमिश्रित उदकाने तीन वेळा प्रोक्षण करून मग प्रेत चितेवर ठेवावे.

(९) बैल, रेडा, वाघ, साप, इ. प्राण्यांनी मारलेले; वीज, पाणी यांमुळे किंवा अपघाताने मेलेले; कृत्तिका, पुनर्वसू, पंचक, अमावास्या, इ. काळी मेलेले, अशांचा अंत्यसंस्कार करण्यापूर्वी विशेष प्रकारची शुद्धी अवश्य करावी, असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. पण तशी शुद्धी करणे आवश्यक नाही.

(१०) आत्महत्येमुळे मृत झालेल्या मनुष्याच्या पुत्राने किंवा क्रियाकर्त्याने ११ व्या दिवशी दोषपरिहारार्थ दशगायत्री जप हे प्रायश्चित्त करावे.

(११) मृतासंबंधी एक ते दहा दिवस आशौच (सुतक) पाळावे असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. सात पिढ्या उलटून गेल्यावर तीनच दिवस सुतक असते. पिता व जन्मदात्री माता यांचे पुत्राला आणि पुत्राचे त्या दोघांना; तसेच पतिपत्नींचे परस्परांना व अंत्यक्रिया करणाऱ्याला दहा दिवस सुतक मानावे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृतासन्निध असणाऱ्या एकत्र कुटुंबियांनी तीन दिवस आणि इतर नातेवाईकांनी स्नानमात्र आशौच पाळावे.

(१२) दहनक्रिया – स्मशानात गेल्यावर क्रियाकर्त्याने स्नान करून एक कोरडे वस्त्र नेसावे व दुसरे अंगावर घ्यावे. पूर्वेला तोंड करून बसावे व संकल्प करावा. मग चितेच्या जागी उदकाने प्रोक्षण करून तिथे मूठभर तीळ पसरावे आणि चिता रचावी. त्यानंतर प्रेताला नग्न करून स्नान घालावे. जवळच भूमीचे प्रोक्षण करून अग्नी प्रज्वलित करावा, त्याचे परिसमूहन व परिस्तरण करावे; त्याच्या भोवती प्रोक्षण करावे व तुपाच्या चार आहुती द्याव्या. मग दक्षिणेकडे मस्तक करून प्रेत चितेवर ठेवावे, अपसव्य करून त्याच्या हृदयावर तुपाची आहुती द्यावी, त्यावर लाकडे रचावी आणि तीन ठिकाणी अग्नी द्यावा. त्यानंतर अग्नीची प्रार्थना करावी. नंतर सर्वांनी सचैल स्नान करावे. मृताच्या आप्तमित्रांनी अपसव्य करून मृतासाठी तिळांनी युक्त असे ओंजळभर पाणी मृताच्या अश्म्यावर सोडावे व सव्य करावे. मग सर्वांनी घरी जावे.

(१३) दहनक्रिया झाल्यावर पहिल्या तीन दिवसांत अस्थिसंचयन आणि अकराव्या दिवशी एकोद्दिष्ट व सपिंडीकरण ही श्राद्धे करावी.

याव्यतिरिक्त सुतकाच्या अकरा दिवसांत केले जाणारे विषमश्राद्ध, वपन, पाच मडक्यांवर पोळ्या, छत्र, पादुका व पिंड देणे, पिंडाला कावळा शिवण्याची वाट पाहणे, वृषोत्सर्ग, आद्यश्राद्ध, रुद्रगणश्राद्ध, वसुगणश्राद्ध, पाथेयश्राद्ध, नग्नप्रच्छादनीय वस्त्रदान, गोदाने, शय्यादान, इ. विधी आवश्यक नाहीत. फार प्राचीन काळापासून अनेक कल्पना जमत जमत आल्या व त्यांना अनुसरून हे आचार सुरू झाले असावे. त्यांपैकी काही तर हास्यास्पदच आहेत. [भा. सा. इं.; का. क्ला. इं.; व. व. जा.; ब्रा. भि. वि.; वे. रा. द.; हि. ध.; प्रा. भा.–सां. अ.; हिं. स. सं. वि.; मु. पू. म.; ब्राह्मणधर्मदर्शिका – श्री. वा. कृ. भावे, १९३८; भा. ब्रा. जा. प्र.; कु. स. मं.; विवाहविधि – भिडे; ल. वि. सो.; अन्त्येष्टिप्रयोग – पं. रघुनाथशास्त्री कोकजे, ध. नि. मंडळ, लोणावळे १९४०]

ब्राह्मणक एक प्राचीन भूप्रदेश. पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्ये ब्राह्मणक नामक प्रदेशाचा उल्लेख आहे. पतंजलीच्या मते ते एक जनपद होते. हे जनपद सिंधच्या मध्यभागी होते. मुस्लिम लेखकांनी त्याला ब्रह्मणाबाद म्हटले आहे. ब्रह्मणस्थलनगर ही त्याची राजधानी होती. ग्रीक इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे, की या प्रदेशातील लोक दार्शनिक विद्वान होते. तसेच आयुधजीवी संघांप्रमाणे ते स्वातंत्र्यरक्षणार्थ आत्मबलिदान करायलाही सदैव सिद्ध असत. सिकंदराने त्या प्रदेशावर आक्रमण केले, तेव्हा ब्रह्मणक जनपदाने त्याला तीव्र प्रतिकार केला होता आणि शेजारच्या राज्यांनाही त्याच्याशी संग्राम करायला उद्युक्त केले होते. [प. का. भा.; पा. का. भा.]

ब्राह्मणसव ब्राह्मणांनी करायचा एक सोमयाग. यात मुख्यतः पुरोडाशांचे हवन करतात. यागाच्या शेवटी यजमानाला कृष्णाजिनावर बसवतात व सोन्याने ढवळून संस्कारित केलेल्या आज्याने अभिषेक करतात. [म. ज्ञा. को.–वेदविद्या]

ब्राह्मणाच्छंसी सोमयागातील सोळा ऋत्विजांपैकी एक. ब्रह्मगणामध्ये याचे दुसरे स्थान आहे. याच्या नावाचे स्पष्टीकरण असे —

ब्राह्मणानि शंसतीति ब्राह्मणाच्छंसी। ब्राह्मणेभ्यो गृहीत्वा आहृत्याहृत्य शंसतीति ब्राह्मणाच्छंसी।

अर्थ – ब्राह्मणे म्हणतो किंवा ब्राह्मणग्रंथांतून घेऊन, घेऊन याज्या म्हणतो, म्हणून त्याला ब्राह्मणाच्छंसी असे म्हणतात.

सोमयागातच याला काम असते. याचे स्थान ब्रह्मगणात असले, तरी त्याला होत्याप्रमाणे काही याज्या म्हणाव्या लागतात. याशिवाय, त्याला एक-दोन शस्त्रेही म्हणावी लागतात. सोमपान करण्यासाठी त्याच्या नावाचा एक चमस असतो. [प. का. भा.; श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

ब्राह्मणी पाट्टु केरळातील ब्राह्मण स्त्रियांनी म्हणण्याचा एक गीतप्रकार. तिथल्या मंदिरात काम करणाऱ्या स्त्रियांची एक विशिष्ट जात आहे. देवीच्या पूजाप्रसंगी आणि नायर जातीमधील लोकांच्या विवाहप्रसंगी गीते गाणे हे या स्त्रियांचे प्रमुख काम असते. केरळमध्ये या गीतांना वेदवत पूज्य मानतात. इ. स. च्या सोळाव्या शतकात या गीतप्रकाराला खूप लोकप्रियता लाभली. त्यातूनच विष्णुमायाचरितम, सतीपरिणयमू, नृगमोक्षम, इ. काव्ये निर्माण झाली. ही गीते म्हणजे मलयाळम भाषेचा एक वाङ्मयीन ठेवा आहे. मराठीतील धवळे किंवा गुजरातमधील धऊल ही याच प्रकारची गीते होत. [हिं. म. कृ. का.]

ब्राह्मणे वैदिक वाङ्मयाचा एक भाग. ब्राह्मण हा शब्द नपुंसकलिंगी असेल, तेव्हा त्याचा अर्थ ग्रंथ असा आहे (ब्राह्मणं ब्रह्मसङ्घाते वेदभागे नपुंसकम्।). ब्रह्म हा शब्द वेद अथवा मन्त्र अशा सामान्य अर्थानेही वैदिक वाङ्मयात उपयोजिला आहे. म्हणून ब्रह्म म्हणजे वेद यांचे ज्ञान ज्यांमुळे होते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ते ब्राह्मणग्रंथ होत. ब्राह्मण हा शब्द ग्रंथ या अर्थाने प्रथमतः तैत्ति. संहितेत (३·७·१·१) आला आहे. पुष्कळ ठिकाणी हा शब्द बहुवचनी वापरला आहे.

ब्राह्मण या शब्दाचा मूळ अर्थ यज्ञकर्मामधील एखाद्या मुद्यावरचे विद्वान याज्ञिकाने केलेले विवेचन असा आहे. या शब्दाचा समुदायविषयक अर्थ घेतल्यास तो यज्ञकर्माविरील याज्ञिकांच्या चर्चांचा व विवेचनांचा संग्रह असा होतो. मंत्राचा अर्थ स्पष्ट करून सांगणे, हे ब्राह्मणग्रंथांचे मुख्य स्वरूप असले, तरी मंत्ररूप संहितांमध्ये नसलेल्या अनेक विषयांची विधाने ब्राह्मणग्रंथात येतात. ब्रह्म शब्दाचा यज्ञ असा आणखी एक अर्थ आहे. त्यामुळेच विविध प्रकारच्या यज्ञांचे कर्मकांड सांगणे, हा ब्राह्मणांचा प्रमुख विषय ठरला आहे. या यज्ञांमध्ये कोणते मंत्र म्हणायचे ते सांगत असता मंत्रांचा त्या त्या कर्मांशी संबंध कसा आहे, हेही सांगितलेले असते. मुख्य म्हणजे कोणत्या मंत्राने कोणते कर्म करायचे याचे विधान ब्राह्मणांत असते. म्हणून ब्राह्मणग्रंथ हे एक विनियोगशास्त्र आहे. वैज्ञानिक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक विचार सांगणारा एक महान विश्वकोश असे ब्राह्मणग्रंथांचे यथार्थ वर्णन करता येईल. यज्ञांच्या अनुषंगाने अनेकविध शास्त्रांची चर्चा ब्राह्मणग्रंथांत आढळते. ब्राह्मणग्रंथांचे हे कार्य व स्वरूप न समजल्यामुळे पाश्चात्य संशोधकांनी त्यांचा अभ्यास करण्याचे टाळले आहे. ब्राह्मणग्रंथांविषयी अज्ञान प्रकट करताना माक्स म्यूलरने एके ठिकाणी म्हटले आहे, ते असे ––

भारतीय वाङ्मयाच्या क्षेत्रातील संशोधकांना हे ब्राह्मणग्रंथ कितीही हृदयंगम वाटले, तरी सामान्य सुशिक्षित लोकांना ते अगदीच नीरस वाटतात. या ग्रंथांत नुसती पारमार्थिक बडबड याखेरीच दुसरा विषय नाही.

तथापि ब्राह्मणग्रंथांतील कर्मकांडाचा अभ्यास आणि तदनुषंगिक कथा–आख्यानांचा अभ्यास केल्यास ब्राह्मणग्रंथांचे महत्त्व ध्यानात येईल. भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता, भारतीय समाजाचे जीवन, यज्ञसंस्थेचे महत्त्व, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, इ. अनेक विषयांच्या अभ्यासास ब्राह्मणग्रंथांचे अध्ययन आवश्यक ठरते. कथा-आख्यानांमुळे ब्राह्मणग्रंथांतील विषय कंटाळवाणे न होता ते अत्यंत मनोरंजक झाले आहेत.

ब्राह्मणांचे विषय – ब्राह्मणग्रंथांचा मुख्य विषय म्हणजे यज्ञकर्माचे विधान सांगणे. अग्निहोत्र व्रत स्वीकारून नित्य अग्नी धारण करणाऱ्याने करायच्या यज्ञांचे तपशीलवार वर्णन ब्राह्मणग्रंथांत आढळते. अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, चातुर्मास्य, सोमयाग, इ. यज्ञांबरोबरच अहीन, सत्रे अशा मोठमोठ्या यज्ञांचेही विवेचन ब्राह्मणग्रंथांत आले आहे. याशिवाय, अनेक काम्ययागही ब्राह्मणांत सांगितले आहेत. या सर्व यज्ञांमध्ये करायच्या वेगवेगळ्या कर्मांचे विधान या ग्रंथांत तपशीलवार केलेले आहे. या विभागाला ब्राह्मणांतील विधिभाग असे म्हणतात. या विधिरूप कर्माबरोबरच कोणती कर्मे करणे योग्य नाही, हेही सांगितलेले असते. म्हणजेच अकर्मांचा निषेध करणे हा ब्राह्मणांचा दुसरा भाग होय. परंतु यज्ञकर्मांचे विधान करणे व निंद्य कर्मांचा निषेध करणे एवढेच काम ब्राह्मणग्रंथांचे असते, तर त्यांचा एवढा विस्तार झालाच नसता; पण या ग्रंथांमध्ये जो फार मोठा भाग आहे, तो अर्थवादाचा. या अर्थवादाचे प्रामुख्याने चार प्रकार सांगितले आहेत, ते असे – स्तुती, निंदा, दुसऱ्याने केलेले कर्म आणि पूर्वीच्या कल्पांत काय घडले याच्या कथा. म्हणजे ब्राह्मणांमध्ये विधी, निषेध आणि अर्थवाद असे प्रामुख्याने तीन विषय असतात. परंतु शाबरभाष्यामध्ये ब्राह्मणांचे प्रतिपाद्य असे दहा विषय असतात, असे म्हटले असून, त्यांची नावे दिली आहेत, ती अशी (जै. सू. २·१·८ वरील भाष्य)–

हेतुर्निर्वचनं निन्दा प्रशंसा संशयो विधिः।
परक्रिया पुराकल्पो व्यवधारणकल्पना।
उपमानं दशैते तु विधयो ब्राह्मणस्य तु ॥

अर्थ – हेतू, शब्दांची निरुक्ती, काही कर्मांची निंदा, काही कर्मांची स्तुती, संशय, विधी, दुसऱ्याने केलेल्या कर्माचे प्रतिपादन, पूर्वीच्या कल्पांतील कथा, निश्चय आणि उपमान असे दहा विषय ब्राह्मणग्रंथांत सांगितलेले असतात.

मंत्रांचा अर्थ करण्याचा पहिला प्रयत्न ब्राह्मणांत असल्यामुळे त्यांना मंत्रांवरील पहिले भाष्यग्रंथ असे म्हटले आहे. कोणत्या मंत्राचा विनियोग कोणत्या कर्मासाठी करायचा, हे तर ब्राह्मणांत सांगितलेले असतेच; शिवाय मंत्रांमधील शब्दांचा अर्थ कर्माशी कसा सुसंवादी आहे, हेही त्यांत कौशल्याने सांगितलेले असते. पुष्कळ वेळा मंत्राचा अर्थ कर्माशी संबंधित असतो; पण जिथे मंत्राचा अर्थ कर्माशी सयुक्तिक नाही, तिथे त्या मंत्राचा अर्थ कर्माशी जोडून दाखविण्याचा खटाटोप ब्राह्मणकारांना करावा लागला आहे. अशा वेळी मंत्राचे आध्यात्मिक विवेचन करून त्याचा अर्थ कर्माशी अनुरूप करून दाखविलेला असतो. उदा॰ 'स नः पवस्व शं गवे' (साम. २·११·१३) या ऋचेवरील सामगान पशूंचे रोगनिवारण होण्यासाठी केल्या जाणाऱ्या यज्ञांत करावे, असे तांड्य ब्राह्मणात म्हटले आहे. या ठिकाणी मंत्रामध्ये पशूंचे रोगनिवारण होण्याचा निर्देश असल्यामुळे हा मंत्र कर्माशी अनुरूपच आहे. परंतु दीर्घ रोगाने पछाडलेला मनुष्य बरा व्हावा, म्हणून करण्यास सांगितलेल्या यज्ञांत 'आ नो मित्रावरुणा' (साम. २·१·१·५·१) या ऋचेवरील सामगान करण्यास सांगितले आहे. या ठिकाणी संबंधित मंत्रात केवळ मित्रावरुणांची स्तुती आहे आणि म्हणून मंत्राच्या अर्थाचा कर्मांशी संबंध

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाही; पण इथे हा संबंध कसा आहे, ते तांडच ब्राह्मणात पुढील-प्रमाणे सांगितले आहे –

मित्र आणि वरुण यांचा संबंध प्राण आणि अपान यांच्याशी आहे. मित्र ही दिवसाची देवता असून, ती प्राणाची प्रतिनिधी आहे. वरुण ही रात्रीची देवता असून, ती अपानाशी संबंधित आहे. म्हणून या देवतांनी दीर्घ रोगाने पछाडलेल्या मनुष्याच्या शरीरात वास करावा आणि त्याच्या प्राणापानांचे नियमन करावे, यासाठी या कर्मामध्ये मित्रावरुणांची प्रार्थना विहित आहे.

बहुतेक सर्व ब्राह्मणग्रंथांत निरनिराळ्या शब्दांच्या व्युत्पत्ती केलेल्या आढळतात. भाषाशास्त्रदृष्ट्या आणि वैज्ञानिक दृष्ट्या या निर्वचनांचा अभ्यास केल्यास त्यातूनच व्याकरणशास्त्र उदयास आले, असे म्हणता येईल; पण अशा प्रकारे ब्राह्मणग्रंथांमध्ये वेगवेगळे विषय आले असले, तरी यज्ञांचे विधान सांगणे हाच ब्राह्मणांचा प्रमुख विषय ठरला आहे. म्हणून ब्राह्मणग्रंथांचा अभ्यास म्हणजे यज्ञांचा अभ्यास असे समीकरण झाले आहे.

ब्राह्मणांचे प्रामाण्य – 'मन्त्रब्राह्मणयोर्वेदनामधेयम्' = मन्त्र म्हणजे संहिता आणि ब्राह्मणग्रंथ यांना वेद असे नाव आहे, असे आपस्तंबाने म्हटले आहे (आप. श्रौ. सू. २४.१.३१). वेद किंवा वेदाची शाखा म्हटली, की तिचे दोन भेद असतात – मन्त्ररूप संहिता आणि व्याख्यानरूप किंवा विधानरूप ब्राह्मण. कालदृष्ट्या ब्राह्मणांची रचना संहितांनंतरची मानली गेली असली, तरी ब्राह्मणांचा समावेश अपौरुषेय ग्रंथांतच झाला आहे. ब्राह्मणांचे अध्ययन गुरुपरंपरेने अविच्छिन्नपणे चालू राहिले. त्यामध्ये कालानुरूप बदल होत गेले नाहीत. ब्राह्मणांतील काही ग्रंथांत त्रैस्वर्य (उदात्त अनुदात्त स्वरित) आहे, तर काहींमध्ये दोन अथवा एकच स्वर आहे. देवतांच्या स्तुतिपर असलेल्या मंत्रांना यज्ञकर्मात स्थान देऊन यज्ञकर्माचा विस्तार केला गेला, तो ब्राह्मणग्रंथांतच. म्हणून उभयविध वेदवाङ्मयाचे प्रवर्तन यज्ञासाठी झाले आहे, असे वेदांगज्योतिषात म्हटले आहे.

यासंबंधी एक मत प्रतिपादन केलेले आहे, ते असे – ब्राह्मणग्रंथ हे ईश्वरप्रणीत नसून, ऋषिप्रोक्त आहेत. त्यामुळे ब्राह्मणग्रंथांना वेद ही संज्ञा देणे योग्य नाही. याचे उत्तर असे – संहितांमध्ये जे मंत्र आहेत, त्यांचे द्रष्टे म्हणून वेगवेगळ्या ऋषींचा उल्लेख आहे. परमेश्वराच्या निःश्वासाबरोबर उत्पन्न झालेले हे मंत्र ऋषींना दिसले आणि त्या ऋषींनी त्यांचे प्रवर्तन केले. त्या अर्थाने मंत्ररूप संहिता जशा ऋषिप्रोक्त तसेच ब्राह्मणग्रंथही ईश्वराच्याच हुंकारातून प्रसृत झाले आणि ऋषिद्वारा त्या त्या ग्रंथांचे प्रवर्तन झाले, म्हणून मंत्ररूप संहिता आणि ब्राह्मण या दोहोंनाही वेद म्हणणे योग्य आहे. ब्राह्मणग्रंथांमध्ये जे कर्मकांड प्रतिपादन केलेले आहे, त्याचे आकलन न झाल्यामुळे ब्राह्मणांना दूर सारून केवळ संहितेलाच वेद म्हणण्याचा हा काही विद्वानांचा प्रयत्न दिसतो. परंतु प्राचीन शास्त्रकारांनी ब्राह्मणग्रंथांना वेद म्हणूनच मान्यता देऊन गौरविले आहे. ब्राह्मणग्रंथांतील वेदवचनांच्या आधारावरच अनेक नियम-सिद्धान्त शास्त्रकारांनी सांगितले आहेत.

ब्राह्मणांचा काळ – वेद हे अपौरुषेय आहेत असे म्हटले, तर ते अनादी आहेत असेही म्हणावे लागते. याचा अर्थ वेद कधी रचले गेले हे सांगता येणे कठीण, इतके ते जुने आहेत. वेदांच्या अनादित्वाबरोबरच ब्राह्मणग्रंथांचेही अनादित्व मानलेले आहे. तथापि चिकित्सकदृष्ट्या आणि ऐतिहासिक दृष्ट्या ब्राह्मणग्रंथांचा काळ ठरविण्याचा प्रयत्न झाला आहे. त्या दृष्टीने विचार करता ब्राह्मणांची रचना संहितांनंतरची आहे, हे निर्विवाद. ब्राह्मणांत संहितांमधून मंत्र उद्धृत करून त्यांचा अर्थ करण्याचा प्रयत्न केलेला आहे व मंत्राचा कर्मात विनियोग सांगितला आहे, त्यावरून संहितांनंतर ब्राह्मणग्रंथ रचले गेले हे उघड आहे. तथापि काही संहिता मंत्र व ब्राह्मण अशा मिश्रित स्वरूपात असल्यामुळे या संहितांची रचना मात्र ब्राह्मणकालात झाली असेच म्हणावे लागते. भाषाशास्त्रदृष्ट्या किंवा कर्मानुष्ठानाच्या विवेचनाच्या दृष्टीने विचार करण्यापेक्षा ज्योतिषशास्त्र हे काळ ठरविण्यास अधिक योग्य, असे शास्त्र आहे. ब्राह्मणग्रंथांत कृत्तिका हे नक्षत्र पहिले नक्षत्र मानलेले आहे. कृत्तिकानक्षत्र हे पूर्व दिशेकडून कधीही च्युत होत नाही, असे शतपथात म्हटले आहे (२·१·२·३). कृत्तिकापासून विशाखापर्यंतची ती देवनक्षत्रे आणि अनुराधापासून भरणीपर्यंतची ती यमनक्षत्रे मानलेली आहेत. म्हणजे पृथ्वीच्या मध्यरेखांशापासून उत्तरार्धात देवनक्षत्रे आणि दक्षिणार्धात यमनक्षत्रे असतात, असा त्याचा अर्थ होतो. हाच अर्थ तैत्तिरीय ब्राह्मणात सांगितला आहे. या संबंधीच्या अभ्यासावरून असे अनुमान काढण्यात आले आहे, की ब्राह्मणांची रचना सनपूर्व २००० वर्षांपूर्वी झाली असावी. लोकमान्य टिळकांनी ऋग्वेदाचा काळ सनपूर्व सुमारे ४००० वर्षे मानला आहे. त्या दृष्टीने ब्राह्मणांचा रचनाकाळ सनपूर्व २००० हा सयुक्तिक वाटतो.

निरनिराळ्या वेदांचे ब्राह्मणग्रंथ पुष्कळ आहेत, असा उल्लेख असला, तरी जे ब्राह्मणग्रंथ सध्या उपलब्ध आहेत, त्यांचीच माहिती घेता येण्यासारखी आहे, ती अशी –

ऋग्वेदाची ब्राह्मणे – ऋग्वेदाशी संबंधित असे दोन ब्राह्मणग्रंथ उपलब्ध आहेत – (१) ऐतरेय व (२) शांखायन. ऐतरेय ब्राह्मणामध्ये सोमयाग, द्वादशाह, सत्रे, इ. विषयांसंबंधी विधाने आहेत. हे ब्राह्मण ऋग्वेदाशी संबंधित असल्यामुळे यज्ञकर्मांमध्ये होता या ऋत्विजाने म्हणायच्या ऋचांचे व त्याने करायच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कर्मांचे विधान यात आहे. शुनःशेपाचे प्रसिद्ध आख्यान याच ब्राह्मणात आहे. यात इंद्रमहाभिषेकाचेही वर्णन आहे. शांखायन ब्राह्मणालाच कौषीतकी ब्राह्मण म्हणतात. तथापि काही विद्वानांच्या मते हे दोन भिन्न ब्राह्मणग्रंथ असावे. उपलब्ध असलेल्या ऋग्वेदाच्या शाकल संहितेशी या ब्राह्मणाचा संबंध दाखविता येत असला, तरी या ब्राह्मणाच्या रचनाकाळी ऋग्वेदाची एखादी स्वतंत्र शाखा असावी. या ब्राह्मणात अग्निहोत्र, चातुर्मास्य, सोमयाग, अहीन, सत्रे, इ. यज्ञांमध्ये करायच्या हौत्रकर्माचे विधान आहे.

यजुर्वेदाची ब्राह्मणे – यजुर्वेदांतर्गत शुक्ल यजुर्वेदाच्या दोन शाखा उपलब्ध आहेत– (१) माध्यंदिन व (२) काण्व. या दोन्ही शाखांचे ब्राह्मणग्रंथ उपलब्ध असून, त्यांमध्ये फरक फारच थोडा आहे. शतपथ ब्राह्मण हे सर्व ब्राह्मणग्रंथांत मोठे आणि महत्त्वाचे ब्राह्मण आहे. याज्ञवल्क्याकडे याचे रचनाकर्तृत्व दिले जाते. या ब्राह्मणामध्ये यज्ञकर्माचे विधान आहेच; शिवाय त्यात अनेक कथा व आख्याने आहेत. त्यामुळे या ब्राह्मणाचा विस्तार मोठा झाला आहे. यात यज्ञकर्माचे विधान सांगताना अर्थवादाच्या द्वारा कर्मांचे माहात्म्य प्रतिपादन केले आहे. अध्वर्यू या ऋत्विजाने यज्ञकर्मात करायच्या कृत्यांची विधाने यात असल्यामुळे यज्ञविधीचे सम्यक दर्शन या ब्राह्मणात होते.

यजुर्वेदांतर्गत कृष्णयजुर्वेदाच्या चार शाखा उपलब्ध असल्या, तरी केवळ तैत्तिरीय शाखेचेच ब्राह्मण उपलब्ध आहे. हे तैत्तिरीय ब्राह्मण मंत्रब्राह्मण अशा मिश्रित स्वरूपात आहे. म्हणजे यामध्ये काही मंत्र असे आहेत, की ज्यांचे विधान संहितेत आहे आणि संहितेतील अनेक मंत्रांचे विधानही या ब्राह्मणात आहे. काम्ययाग, पशुयाग, इ. कर्मांबरोबर काठकचयनांचे विधान या ब्राह्मणात आढळते. नचिकेताची कथाही तैत्ति. ब्राह्मणात सांगितली आहे. काठकब्राह्मण या नावाने स्वतंत्र ग्रंथ असावा; परंतु त्यातील फारच थोडा भाग उपलब्ध आहे.

सामवेदाची ब्राह्मणे – सध्या सामवेदाच्या तीन शाखा उपलब्ध आहेत. त्यांपैकी कौथुमी आणि राणायनी यांच्यांत काहीच फरक नाही. त्यामुळे त्यांचे ब्राह्मणग्रंथ एकच आहेत. तिसऱ्या जैमिनीय शाखेचे स्वतंत्र ब्राह्मण आहे. कौथुमी शाखेचे आठ ब्राह्मणग्रंथ आहेत, त्यांची नावे अशी –(१)तांड्य, (२) षड्विंश,(३) सामविधान,(४) आर्षेय, (५)दैवत, (६)छांदोग्य, (७) संहितोपनिषद आणि (८) वंश. या सर्व ब्राह्मणग्रंथांवर सायणाचार्यांचे भाष्य आहे. यांतल्या तांड्य ब्राह्मणाला पंचविंश किंवा प्रौढ ब्राह्मण असेही म्हणतात. या ब्राह्मणात २५ अध्याय आहेत. त्यांमध्ये द्वादशाह, गवामयन, सोमयाग, एकाह, अहीन, इ. अनेक यज्ञांची विधाने आहेत. हे ब्राह्मण सामवेदाचे असल्यामुळे निरनिराळ्या यज्ञांत कोणती सामगाने कशी म्हणावी, वेगवेगळ्या सामांची नावे कशी पडली, यज्ञात सामगानांचे महत्त्व काय, इ. अनेक विषयांची चर्चा या ब्राह्मणात आढळते. या ब्राह्मणाच्या मानाने इतर ब्राह्मणग्रंथ लहान आहेत व त्यांमध्ये यज्ञकर्माचे विवेचन अतिशयच त्रोटक आहे. जैमिनी शाखेचे जैमिनीय ब्राह्मण किंवा तलवकार ब्राह्मण म्हणून एक ब्राह्मण आहे. तांड्य ब्राह्मणाप्रमाणे यातही सामगानांचा विनियोग वेगवेगळ्या यज्ञांत कसा असतो, ते सांगितले आहे. हे ब्राह्मण बऱ्याच अशुद्ध स्वरूपात उपलब्ध असून, त्याचा अभ्यासही फार कमी झालेला आहे.

अथर्ववेदाचे ब्राह्मण – अथर्ववेदाच्या शौनक व पैप्पलाद अशा दोन शाखा असल्या, तरी त्याचे गोपथ ब्राह्मण हे एकमेव ब्राह्मण उपलब्ध आहे. हे ब्राह्मण फारच अलिकडच्या काळातले असावे. विशेष म्हणजे वैतानसूत्र आणि कौशिकसूत्र यांच्या नंतर गोपथ ब्राह्मणाची रचना झाली असली पाहिजे, असे एक मत आहे. अथर्ववेदाचा आणि या ब्राह्मणाचा यज्ञकर्माशी संबंध कसा आला, हे पाहण्याच्या दृष्टीने या ब्राह्मणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जुन्या समजल्या जाणाऱ्या ऋग्वेदाच्या शांखायन ब्राह्मणाशी याचा संबंध कसा, हेही अभ्यासण्यासारखे आहे.

सामाजिक व सांस्कृतिक विचार – यज्ञाचा सांगोपांग विचार करणे हा जरी ब्राह्मणग्रंथांचा प्रधान उद्देश असला, तरी त्यांमध्ये अनुषंगाने शब्दनिर्वचन; राजा, आचार्य व ऋषी यांच्या वंशावळी व विविध आख्याने–उपाख्याने आली आहेत. त्यामधून ब्राह्मणकालीन ऋषींचे काही सामाजिक व सांस्कृतिक विचारही प्रकट झाले आहेत. 'यज्ञो वै श्रेष्ठतमं कर्म = ' यज्ञकर्म हे सर्व कर्मांमध्ये श्रेष्ठ कर्म आहे, हा त्यामधला मुख्य विचार होय. यज्ञ हा सूर्यसमान तेजःस्वरूप आहे, असे काही ठिकाणी म्हटले आहे, तर दुसऱ्या ठिकाणी तो प्रजापती असल्याचे म्हटले आहे (श. ब्रा. ४.३.४.३; १४.१.१.६). यज्ञाने मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतो. अश्वमेध यज्ञ करणारा ब्रह्महत्येच्याही पापातून सुटतो. यज्ञामुळे मनुष्याचे ऐहिक हेतू सफल होतात, इतकेच नव्हे तर त्याला स्वर्गही मिळतो. पुण्यकर्मे करणाऱ्या सर्वांनाच पुण्यप्राप्ती होते. पुनर्जन्म व पुनर्मृत्यू टळून मोक्ष मिळणे यासाठीही यज्ञ हेच साधन आहे. (श. ब्रा. २.३.१.६; १३.५.४.१). वैदिक मंत्रांच्या पठनाने चित्त शांत व मन सबल होते. मंत्रोच्चारणाने वायुमंडलातही परिवर्तन होऊन निखिल विश्वात धर्मचक्र फिरू लागते (ऐ. ब्रा. १.४.३).

वृष्टिविज्ञानाचे रहस्य आधुनिक विज्ञानाला पटेल अशा प्रकारे ब्राह्मणग्रंथांत सांगितले जाते. 'अग्नेर्वै धूमो जायते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धूमादभ्रमभ्राद्वृष्टिः' = अग्नी (ताप) मुळे धूम (वाफ) उत्पन्न होतो. धूमामुळे ढग बनतात व त्या ढगांतून वृष्टी होते. वायू हा या कामी साहाय्यक होत असल्यामुळे त्याला वृष्टीवर प्रभाव गाजवणारा असे म्हटले आहे.

ब्राह्मणकाली प्रजापती ही प्रमुख देवता होती. तत्कालीन ऋषींनी त्याला अनादी, अमर व लोकरक्षक मानले आहे. या सृष्टीचा कर्ताही तोच. 'प्रजापतिर्वा इदमग्र आसीत् । एक एव सोऽकामयत' = प्रजापती हा सृष्टीपूर्वी एकटा एक होता. त्याला सृष्टीची इच्छा उत्पन्न झाली. त्या इच्छामात्रे ही सकल सृष्टी निर्माण झाली (श. ब्रा. ६.१.३.१). सृष्टीत पृथिवी, अंतरिक्ष व द्यौ असे तीन लोक आहेत.

मनुष्याचे आयुष्य १०० वर्षांचे आहे व क्वचित मनुष्य १०० वर्षांहूनही अधिक जगू शकतो. माणसाला पूर्ण आयुष्य उपभोगायचे असेल, तर त्याने दिवसातून दोन वेळा मिताहार केला पाहिजे. शरीरात रोग उत्पन्न होतात, ते मुख्यत्वे ऋतू बदलण्याच्या संधिकालात होतात. शुद्ध जल हे रोगनाशक असते. सुवर्ण हे शरीरातल्या प्रतिकूल कीटाणूंचा नाश करते, असे ब्राह्मणग्रंथांत म्हटले आहे.

ब्राह्मणग्रंथांनी पत्नीला व तदनुषंगाने गृहस्थाश्रमाला फार महत्त्व दिले आहे. पत्नी ही केवळ पुरुषाचे घर-दार सांभाळणारी एवढीच नसते, तर 'अर्धो वा एष आत्मनः यत्पत्नी' = पत्नी ही पुरुषाचे अर्धांग असते (तै. ब्रा. ३.३.३.५). 'श्रिया वा एतद्रूपं यत्पत्न्यः' = गृहस्वामिनी स्त्रिया या लक्ष्मीरूपिणी असतात. 'न वै स्त्रियं घ्नन्ति' = पुरुषांनी स्त्रीला मारू नये, कारण स्त्री ही गृहाची प्रतिष्ठा आहे. ज्याला पत्नी नसेल त्याला यज्ञ करण्याचा अधिकार नाही (तै. ब्रा. ३.९.४.७; श. ब्रा. ११.४.३.२). गृहस्थाश्रम चालवून पत्नीच्या ठिकाणी पुत्र उत्पन्न करणे हे आवश्यक होय. 'नापुत्रस्य लोकोऽस्ति' = पुत्रहीनाला स्वर्ग मिळत नाही. 'तस्मादुत्तरवयसे पुत्रान् पितोपजीवति' = पित्याच्या उतार वयात पुत्रांनी त्याचे पालन करावे. अशा प्रकारचे अनेक उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आढळतात.

वैदिक धर्मात सत्यावर फार मोठा भर दिला आहे. सत्य बोलणे, सत्य संकल्प करणे आणि सत्य कर्म करणे या गोष्टी वैदिक धर्माला अपेक्षित आहेत. असत्य बोलणे व असत्याचरण करणे, हे वैदिक लोक महापातक समजत. 'ऋतेनैव स्वर्गं लोकं गमयति' = सत्य मार्गानेच स्वर्गाची प्राप्ती होते (तां. ब्रा. १८.२.१९). 'अमेध्यो वै पुरुषो यदनृतं वदति' = खोटे बोलणारा पुरुष अशुद्ध होतो. त्याचे पावित्र्य नष्ट होते (श. ब्रा. ३.१.३.१८). 'एतद्वाचश्छिद्रं यदनृतम्' = असत्य हे वाणीचे छिद्र आहे. त्यातून सर्व काही-चांगले गळून जाते, असे त्यांत म्हटले आहे.

मनुष्याने अभिमान किंवा अहंकार धारण करू नये. 'तस्मान्नातिमन्येत पराभवस्य हैतन्मुखं यदतिमानः' = अहंकार धारण करू नये. कारण ते पराभवाचे, अधःपाताचे द्वार आहे (श. ब्रा. ५.१.१.१). मूर्ख गुरूकडून उपनयन करून घेऊ नये. द्वेष व चोरी करू नये. कोणाला शिव्या देऊ नयेत. अशी काही पापे घडल्यास प्रायश्चित्त करावे. सर्व प्रायश्चित्तांत यज्ञ हे प्रधान प्रायश्चित्त होय. मनुष्याने आत्मविश्वास व दृढ निर्धार धरून निरलसपणे कार्याला लागावे, सतत प्रयत्न करीत राहावे, हे सांगताना ऐतरेय ब्राह्मण (३३.३.१५) म्हणते –

> चरन्वै मधु विन्दति चरन् स्वादुमुदुम्बरम् ।
> सूर्यस्य पश्य श्रेमाणं यो न तन्द्रयते चरंश्चरैवेति ॥

अर्थ – गतिमान मनुष्याला मधू प्राप्त होतो. (त्याचे उद्दिष्ट सफल होते.) पुढे जाणाऱ्या माणसाला स्वादिष्ट उदुंबर (फल) मिळते. सूर्य अविश्रांतपणे रात्रंदिन गतिशील राहतो म्हणून तो विश्ववंद्य ठरला आहे. म्हणून दृढ निश्चयाने तू पाऊल पुढे पुढे टाक.

हे सर्व उपदेश मानवाच्या अभ्युदयासाठी व आत्मकल्याणासाठी केलेले आहेत. वैयक्तिक व सामाजिक कल्याणाच्या उद्देशाने केलेले स्पष्ट उपदेश वैदिक वाङ्मयात पहिल्या प्रथम ब्राह्मण ग्रंथांतच आढळतात. त्यांचाच विस्तार पुढे स्मृती, शास्त्रे आणि पुराणे यांनी केलेला आहे. [वै. सा. सं.; म. ज्ञा. को.; वै. सा.; क. हे. इं.; वै. को.]

ब्राह्मण्यप्राप्ती एक काम्य व्रत. कालावधी एक वर्ष. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून चतुर्थीपर्यंत चार दिवस करायचे हे व्रत आहे. त्यात अनुक्रमे इंद्र, यम, वरुण व कुबेर या देवांपैकी एकेकाची एकेका तिथीला पूजा करतात. हे देव म्हणजे वासुदेवाची चार रूपे असे समजतात. पूजेच्या वेळी त्यांना अनुक्रमे तांबडा, पिवळा, काळा व पांढरा या रंगाची वस्त्रे समर्पण करतात. फल – स्वर्गप्राप्ती. [हि. ध.]

ब्राह्मण्यावाप्ती एक काम्य व्रत. यात ज्येष्ठ पौर्णिमेला एका ब्राह्मण दंपतीला वस्त्र व भोजन देतात. फल – सात जन्म ब्राह्मण वर्णाची प्राप्ती. [हि. ध.]

ब्राह्मतीर्थ 'अङ्गुष्ठमूलस्य तले ब्राह्मं तीर्थं प्रचक्षते' = उजव्या हाताच्या आंगठ्याच्या मुळात ब्राह्मतीर्थ समजावे (मनु. २.५९). या तीर्थाने आचमन करावे असे सांगितले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्राह्म मुहूर्त एक कालसंज्ञा. रात्रीच्या शेवटच्या प्रहराला ब्राह्म मुहूर्त असे नाव आहे. विष्णू पुराणात याची व्याख्या दिलेली आहे, ती अशी –

रात्रेः पश्चिमयामस्य मुहूर्तो यस्तृतीयकः ।
स ब्राह्म इति विज्ञेयो विहितः स प्रबोधनः ।।

अर्थ – रात्रीच्या शेवटच्या प्रहरातील जो तिसरा मुहूर्त (दोन घटकांचा काल) त्याला ब्राह्म मुहूर्त म्हणतात. या मुहूर्तावर झोपेतून जागे व्हावे.

ब्राह्म मुहूर्तावर उठून इष्टदेवतेचे स्मरण करावे, रात्री वापरलेले वस्त्र बदलावे, हात-पाय धुवावे व देवता, ऋषी, मुनी, इत्यादींचे स्मरण करावे, असे सांगितले आहे. [आचारेन्दु]

ब्राह्म विवाह विवाहाच्या आठ प्रकारांपैकी एक. ब्राह्मणांसाठी हा विवाहप्रकार योग्य समजला जात असे, म्हणून त्याला ब्राह्म असे नाव मिळाले. याचे स्वरूप असे –

आच्छाद्य चार्चयित्वा च श्रुतिशीलवते स्वयम् ।
आहूय दानं कन्याया ब्राह्मो धर्मः प्रकीर्तितः ।।

(मनु. ३.२७)

अर्थ – ज्या प्रकारात विद्वान आणि शीलसंपन्न अशा वराला स्वतः बोलावून, त्याचा सत्कार करून व त्याला वस्त्रालंकार देऊन, वधूपिता आपली कन्या देतो, त्याला ब्राह्म विवाह असे म्हटलेले आहे.

या प्रकारात वधूपिता वराकडून कन्याशुल्क घेत नाही; तर त्यालाच उलट द्रव्य देऊन संतुष्ट करतो आणि कन्येलाही यथाशक्ति वस्त्राभूषणांनी अलंकृत करून, तिचे दान करतो.

विवाहाचा हा प्रकार शुद्धतम व विकसित मानलेला आहे. कारण यात शारीरिक शक्तीचे प्रयोग, कोणत्याही प्रकारचा पण, धनाची इच्छा किंवा कामुकता यांचा संपूर्ण अभाव असतो.

ऋग्वेदातील सोम व सूर्या यांचा विवाह हा ब्राह्म विवाहाचेच पूर्वरूप आहे. भारतात हा विवाहप्रकार अद्यापही प्रचलित असून, सर्वांत अधिक लोकप्रिय आहे. मात्र सांप्रत त्यात हुंड्याची अनिष्ट रूढी शिरली आहे. सांप्रत कायद्याने हुंड्यावर बंदी घातलेली असली, तरी या ना त्या प्रकारे वरपक्षाची मंडळी वधूपित्याकडून शक्य तेवढे द्रव्य पदरात पाडून घेतातच. [हिं. सं.]

ब्राह्म समाज एक धर्मसुधारणावादी संस्था. राजा राममोहन रॉय यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी कलकत्ता येथे या संस्थेची स्थापना केली. इंग्रज अमदानीच्या प्रारंभकाळीच इंग्रजी विद्या शिकलेल्या पुष्कळ सुशिक्षित हिंदूंच्या मनात आपल्या जुन्या धार्मिक समजुती, सामाजिक रूढी व अंधश्रद्धा यांविषयी तिरस्कार उत्पन्न झाला होता. त्यांपैकी काही लोक हिंदूंच्या आचार-विचारांची बौद्धिक चिकित्सा करू लागले होते. राजा राममोहन रॉय हे त्यांपैकी प्रमुख होत. आपल्या धार्मिक समजुती व रूढी आपल्या प्राचीन धर्मग्रंथांशी विसंगत आहेत, असे त्यांना दिसून आले व तसे त्यांनी प्रतिपादनही सुरू केले. त्यांना वेदप्रामाण्य मान्य होते; पण अनेक देवतांची उपासना

राममोहन रॉय

आणि मूर्तिपूजा मान्य नव्हती. म्हणून हिंदू धर्मशास्त्राविरुद्ध बंड न उभारता बुद्धीच्या कसोटीवर टिकतील अशा धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणाव्या, अशी त्यांनी आकांक्षा धरली. जातिभेद, बहुपत्नीप्रथा, सतीची चाल, पोथीनिष्ठा, शब्दप्रामाण्य, इ. मध्ययुगीन कल्पनांचा त्यांनी निषेध केला. समुद्रपर्यटन करून त्यांनी त्यांपैकी एक रूढिबंधन तोडून टाकले. अशा प्रकारे समाजाला जागृत करून धार्मिक आचार-विचारांतील कठोरपणा नाहीसा करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

पुढे आपल्या सुधारणावादाला मूर्तस्वरूप देण्यासाठी त्यांनी ब्रह्मसभा नावाची अद्वैतवादी हिंदूंची एक संस्था स्थापली. तिलाच पुढे ब्राह्म समाज हे नाव प्राप्त झाले. प्रत्येक शनिवारी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सायंकाळी ही सभा भरत असे. त्या वेळी दोन तेलुगू ब्राह्मण शेजारच्या खोलीत, दाराला पडदा लावून वेदपठण करीत. त्या खोलीत ब्राह्मणेतरांना प्रवेश नसे. सभेत उपनिषदांचे वाचन केले जाई आणि राममोहन रॉय यांचे उपदेश वाचले जात. शेवटी प्रार्थना होत असे.

ब्राह्म समाजाच्या सभासदांची संख्या जसजशी वाढू लागली, तसतशी सनातन धर्माभिमानी हिंदूंना चिंता वाटू लागली आणि त्यांनी धर्मसभा नामक एक विरोधी संस्था निर्माण केली. भवानीचरण बानर्जी हे त्या संस्थेचे अध्यक्ष व राजा राधाकांत देव हे कार्यवाह होते. दोन्ही संस्थांची वृत्तपत्रे सुरू झाली व त्यांतून परस्परांवर टीका–प्रतिटीका होऊ लागल्या. हा संघर्ष हळूहळू कलकत्त्याच्या बाहेरही पसरला आणि त्याने बरेच उग्र रूप धारण केले.

इ. स. १८३० च्या जानेवारीत राममोहन रॉय यांनी ब्राह्म समाजाचे एक नवीन मंदिर उघडले. त्या मंदिरासंबंधी जी घोषणा करण्यात आली, ती अशी –

ब्राह्मसभेच्या या मंदिरात विश्वाचा जनिता व रक्षणकर्ता अशा एका शाश्वत, निर्विकार व अतर्क्य परमात्म्याचीच उपासना केली जाईल. कोणत्याही समाजात एखाद्या विवक्षित नावाने प्रचलित असलेल्या देवाची उपासना इथे होणार नाही. तसेच कोणतीही मूर्ती, चित्र, पुतळा किंवा कसलेही प्रतीक इथे ठेवण्यात येणार नाही. इथे कोणत्याही निमित्ताने जीवहत्या होणार नाही किंवा खाद्यपेयादी व्यवहार होणार नाहीत. तसेच कोणत्याही पंथाच्या किंवा व्यक्तीच्या उपासनामूर्तीसंबंधी किंवा पद्धतीसंबंधी इथे निंदाव्यंजक भाषण केले जाणार नाही. जेणेकरून नीती, भूतदया, पावित्र्य, परोपकार, इ. सद्‌गुणांचा विकास होईल आणि सर्व धर्मपंथांच्या लोकांत सलोखा वाढेल, असाच उपदेश व संवाद इथे केला जाईल.

एकेश्वरी उपासनेचे प्रार्थनामंदिर स्थापून अद्वैत वेदान्ताची पुन:प्रतिष्ठा करणे हेच राममोहन रॉयं यांचे ध्येय होते. त्यांच्या मते ईश्वरभक्तीचा खरा मार्ग म्हणजे मनुष्यमात्राच्या उपयोगी पडणे, हा होय. हिंदू धर्मातील कर्मकांड व व्रतवैकल्ये यांचे महत्त्व कमी करून, धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात लोकसेवेच्या व्रताचा पुरस्कार आधुनिक युगात प्रथम राजा राममोहन रॉय यांनीच केला आणि ब्राह्म समाज हे त्याचेच मूर्तरूप होय.

इ. स. १८३३ साली राममोहन रॉय निधन पावल्यानंतर ब्राह्म समाजाला अवकळा प्राप्त झाली. श्रीमान द्वारकानाथ ठाकूर यांच्या साहाय्याने पं. रामचंद्र विद्यावागीश यांनी समाजाची साप्ताहिक सभा कशीवशी चालू ठेवली होती; पण त्या संस्थेची घटना नव्हती, संघटना नव्हती किंवा तिच्या कार्यावर कोणाचे नियंत्रण नव्हते. ब्राह्म समाजाची एकेश्वरी उपासना मान्य करणारे कित्येक सदस्य घरी मात्र मूर्तिपूजा करीत. त्यांच्यांत निष्ठा व शिस्त मुळीच नव्हती. अशा परिस्थितीत द्वारकानाथांचे पुत्र देवेंद्रनाथ ठाकूर यांनी समाजाचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरवले. इ. स. १८३९ मध्ये त्यांनी तत्त्वरंजिनी सभा स्थापन केली. पं. रामचंद्र विद्यावागीश यांच्या सूचनेवरून पुढे त्या संस्थेला तत्त्वबोधिनी सभा हे नाव देण्यात आले. उपनिषदांतील ज्ञानाचा प्रसार करून धर्मजिज्ञासा वाढवावी, हा त्या संस्थेचा उद्देश होता. एक-दोन वर्षांत संस्थेच्या सभासदांची संख्या पाचशेपर्यंत गेली. बंगालमधील कित्येक विद्वान लोक आणि अनेक राजे व जमीनदारही तिचे सभासद झाले.

त्यानंतर देवेंद्रनाथ यांनी ब्राह्म समाजाची पुनर्घटना सुरू केली. शिस्त आणि व्यवस्था यांवर त्यांचा कटाक्ष असे. त्यांनी ब्राह्मोपासनेची नवीन व्यवस्थित पद्धत सुरू करून, आभारप्रदर्शन, स्तवन व प्रार्थना असा कार्यक्रम आखला. पुढे त्यात प्रार्थना, वंदन, चिंतन, ध्यान, स्तोत्र अथवा संगीत, पुन्हा प्रार्थना, पाठ व शेवटी प्रार्थना असा बदल करण्यात आला. समाजात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीने दीक्षा घेताना 'मी रोज भोजनापूर्वी गायत्री मंत्राने ब्राह्मोपासना करीन, मूर्तिपूजा करणार नाही, समाजाची वर्गणी देईन आणि राजा राममोहन रॉय यांनी उपदेशिलेल्या वेदान्ततत्त्वानुसार धर्माचरण ठेवीन,' असा प्रतिज्ञालेख लिहून दिला पाहिजे, अशी प्रथा त्यांनी सुरू केली. देवेंद्रनाथांनी अंगिकारलेली ही दीक्षापद्धती महानिर्वाण तंत्राला अनुसरून होती. दीक्षेच्या वेळी शिखासूत्राचा त्याग करावा लागे. नंतर दीक्षा घेणाऱ्या व्यक्तीला 'ॐ तत्सत्' ही अक्षरे कोरलेली एक अंगठी, संप्रदायाचे चिन्ह म्हणून देण्यात येई. त्याच वेळी मंत्रोपदेशही देण्यात येई. गायत्री मंत्र सर्वांना म्हणता येण्यासारखा नाही, असे

श्री. देवेंद्रनाथ ठाकूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाटून देवेंद्रांनी उपनिषदांतून एक नवीन मंत्र तयार केला होता.

इ. स. १८४३ साली पं. रामचंद्र विद्यावागीश यांनी देवेंद्रनाथांसह एकवीस तरुण सभासदांना अशा प्रकारे ब्राह्म समाजाची दीक्षा दिली. त्याच वर्षी ते मरण पावले आणि ब्राह्म समाजाची धुरा देवेंद्रनाथांनी आपल्या हाती घेतली. त्यांच्या खानदानी घराण्यात व्रतवैकल्ये, पूजाअर्चा व उत्सव पुष्कळ चालत होते. त्यांत भाग घेणे समाजाच्या तत्त्वांविरुद्ध असल्यामुळे त्या त्या प्रसंगी ते घराबाहेर राहत किंवा प्रवासाला जात. स्वतःच्या आचरणाने त्यांनी संस्थेत निष्ठामय जीवन उत्पन्न केले. त्यांच्या तत्त्वबोधिनी सभेने ब्राह्म समाजाच्या तत्त्वांचा प्रसार सर्वत्र करण्याचे काम स्वीकारले. त्यासाठी त्यांनी तत्त्वबोधिनी पत्रिका नामक एक मासिकही सुरू केले. राममोहन रॉय यांच्या अनेक लेखांचे पुनर्मुद्रण त्या मासिकात होऊ लागले. अक्षयकुमार दत्त, ईश्वरचंद्र विद्यासागर, राजेंद्रलाल मित्र, प्रसन्नकुमार सर्वाधिकारी, आनंद कृष्ण बोस, राजनारायण बोस, आनंदचंद्र वेदान्तवागीश, इ. अनेक विद्वानांचे सहकार्य देवेंद्रनाथांना मिळाले. मग गावोगावी प्रचार करण्यासाठी समाजाच्या शाखा अनेक ठिकाणी स्थापण्यात आल्या आणि एक ब्राह्म विद्यालयही सुरू करण्यात आले.

ब्राह्मसमाज मंदिर

ब्राह्म समाजाच्या सांप्रदायिक प्रतिज्ञालेखात वेदान्ततत्त्वानुसार वागण्याची शपथ होती. पुढे वेदान्त या शब्दाच्या जागी ब्राह्मधर्म हा शब्द घालण्यात आला. या ब्राह्मधर्मात प्रेमलक्षणा भक्तीला फारसा अवसर नव्हता. ईश्वराचे अनंतत्व, चातुर्य, योजकत्व व घटनापटुत्व या गुणांचे स्तवन व चिंतन यालाच महत्त्व होते. राजनारायण बोस यांनी त्याला प्रेमलक्षणा भक्तीची जोड दिली.

ब्राह्मसमाजी व्यक्तींचे आचार समाजाच्या तत्त्वांशी सुसंगत राहावे, या उद्देशाने देवेंद्रनाथांनी जातकर्म, नामकरण, उपनयन, विवाह, अंत्येष्टी व श्राद्ध हे संस्कार ब्राह्मधर्माप्रमाणे कसे करावे, हे ठरवले आणि त्याप्रमाणे आपल्या मुलीचा विवाह पार पाडला. आपल्या वडिलांचे श्राद्धही त्यांनी काही मंत्र म्हणून व कठोपनिषदाचा पाठ करून पूर्ण केले.

देवेंद्रनाथ यांच्या मते वेद हे अपौरुषेय, प्रमादातीत व सर्व शास्त्रांचे आधारग्रंथ आहेत; पण अक्षयकुमार दत्त यांना त्यांचे हे मत मान्य नव्हते. म्हणून देवेंद्रनाथांनी वेदांचा अभ्यास सुरू केला. तेव्हा वेद हे प्रमादातीत आहेत, हा त्यांचा विश्वास डळमळू लागला. उपनिषदांचा खोल अभ्यास केल्यावर ब्राह्मधर्माला उपनिषदांचा आधार घेण्याची कल्पनाही त्यांना सोडून द्यावी लागली. शेवटी आत्मप्रचीतीशिवाय काहीच आधार न राहिल्याने त्यांनी असे ठरवले, की आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जो शास्त्रसिद्धान्त पटेल तेवढाच आपण मानावा.

इ. स. १८५० च्या नंतर जे तरुण ब्राह्म समाजाचे सदस्य झाले, ते प्रखर बुद्धिवादी व सुधारणावादी होते. धर्मश्रद्धेचे मूलभूत सिद्धान्त बुद्धीच्या कसोटीने तपासावे आणि आपल्या धर्मात स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, इ. सामाजिक सुधारणांचा अंतर्भाव करावा, असे त्यांचे मत होते. अशा तरुणांत केशवचंद्र सेन हे प्रमुख होते. ते इ. स. १८५७ मध्ये ब्राह्म समाजात दाखल झाले, १८६१ साली त्यांनी समाजाच्या प्रसारकार्याला वाहून घेतले आणि १८६२ मध्ये ते समाजाचे प्रमुख आचार्य बनले. त्यांनी शिखांप्रमाणे संगत सभा स्थापून ब्राह्म समाजात नवचैतन्य निर्माण केले. आंतरजातीय विवाहादी काही क्रांतिकारक सुधारणा त्यांनी घडवून आणल्या. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे ब्राह्म समाजाचे संख्याबळ खूपच वाढले; पण आंतरजातीय विवाह व विधवाविवाह ब्राह्म समाजातील वयस्क लोकांना मान्य नव्हते व जुने लोक यज्ञोपवीत धारण करून प्रवचने करीत, ते युवकांना पसंत नव्हते. त्यामुळे शेवटी समाज दुभंगला आणि केशवचंद्र सेन यांच्या पक्षाने १८६६ साली भारतवर्षीय ब्राह्म समाज नामक वेगळी संस्था स्थापन केली. मूळ संस्था आदी ब्राह्म समाज म्हणून चालू राहिली.

लवकरच देवेंद्रनाथ निवृत्त झाले आणि राजनारायण बोस हे आदी ब्राह्म समाजाचे अध्यक्ष झाले. या दोन संस्थांचे मतभेदाचे मुख्य मुद्दे दोन होते, ते असे —

(१) ब्राह्मधर्म हा हिंदू धर्मच आहे, असे आदी ब्राह्मांचे मत होते; तर ब्राह्मधर्म सार्वत्रिक आहे, असे नवीन पक्षाचे म्हणणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होते. (२) मूर्तिपूजेइतकाच जातिभेदाचाही निषेध केला पाहिजे, असे नवीन पक्षाचे मत होते व ते आदी पक्षाला मान्य नव्हते.

श्री. केशवचंद्र सेन

केशवचंद्र सेन यांचे अमोघ वक्तृत्व आणि अलौकिक व्यक्तिमत्त्व यांमुळे ब्राह्म समाजाचा विस्तार बंगालमध्ये सर्वत्र झाला आणि भारतातील अनेक शहरांत संस्थेची केंद्रे निर्माण झाली. केशवचंद्र सेन राजकारणापासून अलिप्त व ब्रिटिश सरकारशी राजनिष्ठ राहिल्यामुळे सरकारने त्यांच्या चळवळीला खूप प्रोत्साहन दिले आणि १८७२ मध्ये सिव्हिल मॅरेज ॲक्ट पास करून ब्राह्म विवाहाला मान्यता दिली. त्या कायद्यात वधू-वरांचे किमान वय १४ व १८ ठरविण्यात आले.

केशवचंद्र सेन यांनी ब्राह्म समाजाचे सामर्थ्य पुष्कळ वाढवले, हे खरे; पण काही वर्षांनंतर त्यांच्यापेक्षा जहाल विचारांचे तरुण त्यांचा अधिकार मानीनासे झाले. त्याच सुमारास केशवचंद्रांनी आपली मुलगी कुचबिहारच्या राजाला दिली. त्या वेळी मुलीचे वय १४ वर्षांहून कमी असून, वराचे वय अवघे १५ वर्षांचे होते. तो बालविवाह ब्राह्म पद्धतीने न होता हिंदू धर्मशास्त्राप्रमाणेच करण्यात आला होता. त्यामुळे केशवचंद्रांचे अनुयायी फार खवळले आणि केशवचंद्रांना पदच्युत करावे, असे म्हणू लागले. पण ते शक्य न झाल्यामुळे पं. शिवनाथशास्त्री प्रभृती वरीच मंडळी भारतवर्षीय ब्राह्म समाजातून फुटून निघाली आणि त्यांनी १८७८ च्या मे महिन्यात साधारण ब्राह्म समाज ही वेगळी संस्था काढली.

शेवटी शेवटी केशवचंद्र सेन हे स्वतःला ईश्वराचा प्रेषित समजू लागले होते आणि त्यामुळे कोणाचे कसलेही नियंत्रण मानायला ते तयार नव्हते. धार्मिक संस्थेत अशा लोकोत्तर पुरुषाची अनियंत्रित सत्ताच सर्वांनी मानली पाहिजे, असे ते म्हणत. पुढे त्यांनी आपला स्वतंत्र नवविधान पंथ काढला आणि त्याचा कल ख्रिस्ती धर्माकडे राहिला.

केशवचंद्रांची अनियंत्रित सत्ता ज्यांना मान्य नव्हती, असे शिवनाथशास्त्री, आनंद मोहन बोस, शिवचंद्र देव व उमेशचंद्र दत्त यांनी साधारण ब्राह्म समाज स्थापून त्याची व्यवस्थित रचना केली आणि आध्यात्मिक, सामाजिक व शैक्षणिक असे त्रिविध कार्य अंगिकारले. ख्रिस्ती धर्माचा आश्रय न घेता सामाजिक सुधारणा घडवण्यावर त्यांचा विशेष भर होता. राजा राममोहन रॉय, देवेंद्रनाथ, राजनारायण, केशवचंद्र, प्रतापचंद्र, इ. पूर्वाचार्यांच्या धार्मिक वाङ्मयापेक्षा अधिक चिरस्थायी स्वरूपाचे व महत्त्वाचे वाङ्मय साधारण ब्राह्मांपैकी पं. सीतानाथ तत्त्वभूषण, शिवनाथशास्त्री, नागेंद्रनाथ चतर्जी, धीरेंद्रनाथ चौधरी, हेमचंद्र सरकार, इ. विद्वान गृहस्थांनी निर्माण केले.

राजा राममोहन रॉय यांना प्रचलित हिंदू धर्माचे स्वरूप पसंत नसले, तरी त्यांना हिंदू धर्माचा अभिमान होता. देवेंद्रनाथांनीही हिंदू धर्माचा अभिमान मुळीच सोडला नव्हता. मात्र हिंदू धर्मातील विधी व रूढी यांचा त्यांनी पूर्ण त्याग केला होता;

पं. शिवनाथशास्त्री

पण केशवचंद्रांनी ख्रिस्ती धर्माचा व पाश्चात्य जीवनाचा आदर्श समोर ठेवल्यामुळे ब्राह्मसमाज हा ख्रिस्ती धर्माचाच अवतार आहे, असे लोकांना वाटू लागले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सांप्रत ब्राह्म समाजाच्या तीन्ही शाखा चालू असल्या, तरी. त्यांच्यांत पूर्वीचे चैतन्य व कर्तृत्व उरलेले नाही. त्यांचे संख्या-बलही पाच हजारांहून कमी असावे. तथापि ब्राह्म समाजाच्या प्रखर आंदोलनामुळे हिंदू समाजाला नवचैतन्य लाभले, यात संशय नाही. बुद्धिवाद व विवेकनिष्ठा या तत्त्वांचा ब्राह्म समाजाने पुरस्कार केल्यानंतर हिंदू लोकांवरही त्यांचा प्रभाव पडला. ब्राह्म आचार्यांनी ज्या समाजसुधारणांचा आग्रह धरला, त्या कालांतराने हिंदू समाजानेही स्वीकारल्या आणि ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याची जी प्रवृत्ती हिंदू समाजात उत्पन्न झाली होती, ती ब्राह्म समाजाच्या प्रसारामुळे निश्चितपणे कमी झाली. [नवयुगधर्म १; हि. क. इं. पी. १०; एन्सा. रि. ए.]

ब्राह्मीप्रतिपद्लाभव्रत एक काम्य व्रत. व्रतावधी एक वर्ष किंवा बारा वर्षे. व्रतविधी असा – चैत्र शुद्ध प्रतिपदेला व्रताचा प्रारंभ. त्या दिवशी उपवास करून रंगीत रांगोळीच्या अष्टदलावर ब्रह्ममूर्तीची स्थापना व पूजा करतात. त्याच्या चार मुख्य दिशांना चार वेदांची स्थापना करतात. चार उपदिशांना वेदांगे, धर्मशास्त्रे, पुराणे व न्यायविस्तर यांची स्थापना करतात. प्रत्येक महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेला या सर्व देवतांची पूजा करतात. उद्यापनाच्या वेळी गाय दान देतात. फल – वेदपारंगतता व ब्रह्मलोकप्राप्ती. [हि. ध]

ब्राह्मी लिपी एक प्राचीन लिपी. प्राचीन काळी भारतात ब्राह्मी व खरोष्ठी या दोन लिप्या प्रचलित होत्या. त्यांपैकी ब्राह्मी लिपीचा प्रचार भारताचा वायव्य भाग वगळून बाकीच्या जवळ जवळ सर्व भारतात होता. जैनांच्या पन्नवणासूत्रात व समवायांगसूत्रात अठरा लिप्यांची नावे दिलेली आहेत. त्यांत ब्राह्मी व खरोष्ठी ही नावे आहेत. बौद्धांच्या ललितविस्तरात चौसष्ट लिप्यांची नावे दिलेली आहेत, त्यांत ब्राह्मी लिपीचा प्रथम उल्लेख आहे.

ब्राह्मी लिपी ही डावीकडून उजवीकडे लिहीत असत. तिच्यातील वर्ण साधे, मोकळे व उभट आकाराचे आहेत. त्यांना मात्रा किंवा वरची रेघ नाही. या लिपीचे वैशिष्टच असे, की तिच्यात प्रत्येक वर्णासाठी एक विशिष्ट ध्वनी व प्रत्येक ध्वनीसाठी विशिष्ट वर्ण आहे. अशा प्रकारे ही एक वैज्ञानिक लिपी आहे.

उत्पत्ती – ब्राह्मी लिपी कशी उत्पन्न झाली, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. काहीजण तिचा उगम परदेशांत समजतात, तर काही ती भारतातच निर्माण झाली, असे मानतात. विल्सन,



ब्राह्मी लिपी – सम्राट अशोकाचा गिरनार येथील शिलालेख (श्री. ओझा यांच्या भारतीय प्राचीन लिपिमाला या ग्रंथावरून)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रिन्सेप, ऑफ्रेड, मूलर, सेनार्ट, इ. पाश्चात्य विद्वान ग्रीक किंवा फोनिशियन लिपीपासून ब्राह्मीची उत्पत्ती मानतात. कस्टचे म्हणणे असे, की पश्चिम आशियात राहणाऱ्या फेनिशियन व्यापाऱ्यांशी भारताचे व्यापारी संबंध होते आणि त्यांच्यापासून भारतीय लोक लिपी शिकले असावे. विल्यम जोन्स, वेबर, टेलर, ब्यूलर, इ. विद्वानांनी सेमेटिक लिपीपासून ब्राह्मीची उत्पत्ती मानली आहे; पण श्री. गौरीशंकर हीराचंद ओझा यांनी या सर्व मतांचे खंडन केले आहे. विविध साहित्यिक व पुरातत्त्व-विषयक प्रमाणांच्या आधारे श्री. ओझा यांनी वैदिक युगातही भारतीय लोकांना लेखनकला ज्ञात होती व भारतीय आर्यांनीच या लिपीचा शोध लावला, असे प्रतिपादन केले आहे. ही लिपी प्राचीन व सर्वांगसुंदर असल्यामुळे हिचा कर्ता ब्रह्मा मानला गेला व हिला ब्राह्मी असे नाव मिळाले किंवा साक्षर ब्राह्मणांची ही लिपी असल्यामुळे हिला ब्राह्मी हे नाव मिळाले असावे, असे त्यांनी म्हटले आहे. ब्रह्मज्ञानाच्या रक्षणाचे साधन असल्यामुळे हिला ब्राह्मी असे नाव मिळाले, असेही एक मत आहे.

ब्रह्मदेवाने निर्माण केली, म्हणून या लिपीला ब्राह्मी म्हणतात, असे नारायण, शुक्र व बृहस्पती सांगतात. बृहस्पती म्हणतो —

षाण्मासिकेऽपि समये भ्रान्तिः सञ्जायते नृणाम् ।
धात्राक्षराणि सृष्टानि पत्रारूढान्यतः पुरा ।।

अर्थ — एखाद्या गोष्टीला सहाच महिने झाले, तरी लोक त्याबद्दल संशय व्यक्त करू लागतात. म्हणून विधात्याने फार पूर्वी पत्रारूढ अशी अक्षरे निर्माण केली.

डॉ. तारापोरवाला यांनी असे मत मांडले आहे, की हैद्राबादमध्ये उपलब्ध झालेल्या प्रागैतिहासिक कालातील पात्रांवर असलेली संकेत-चिन्हे, हीच ब्राह्मी वर्णाची आदिरूपे होत. परंतु या दोहोंत फारच कमी साम्य असल्यामुळे हे मत ग्राह्य धरता येत नाही.

प्रसार — ब्राह्मी लिपीतील आद्याक्षरे मोहेंजोदडो येथील चित्र लिपीपासून निघाली असून, त्यानंतर हळूहळू त्यांचा विकास झाला व सनपूर्व तीनशेच्या सुमारास ती लिपी पूर्णत्वाला पोचली, असे विद्वानांचे मत आहे. मौर्यकाळात प्रायः सर्व भारतात तिचा प्रसार झाला होता. मौर्य सम्राटांच्या वेळचे अनेक शिलालेख व ताम्रपट ब्राह्मी लिपीत आहेत. नेपाळमधील पिप्रावा नामक गावी शाक्य लोकांनी निर्माण केलेल्या बौद्ध स्तूपाच्या आत एका दगडी पात्रावर ब्राह्मी लिपीच्या चौदा अक्षरांची प्राचीन रूपे नुकतीच आढळली आहेत. बर्ली गावातही ब्राह्मी लिपीतील लेख मिळाले आहेत. अशोककालीन लिपीपेक्षा वरील लिपीत फरक एवढाच, की तिच्यात दीर्घ स्वरचिन्हांचा अभाव आहे. पूर्वी अशोकाचे शिलालेख हेच ब्राह्मी लिपीची प्राचीनतम उदाहरणे मानली जात; पण वरील दोन लेख उपलब्ध झाल्यामुळे सनपूर्व ५ व्या शतकापर्यंत तिचा काळ जातो. ब्राह्मी लिपीला तीन हजार वर्षांचा इतिहास आहे, आर्यांचे वेद प्रथम ब्राह्मी लिपीतच लिहिले गेले असावे; पण तिचे स्वरूप काय होते, ते मात्र सांगता येत नाही, असे डॉ



ब्राह्मी लिपी—स. पू. २ रे शतक (श्री. ओझा यांच्या भारतीय प्राचीन लिपिमाला या ग्रंथावरून)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुनीतिकुमार चटर्जी, प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ, सांगतात.

सनपूर्व ५०० ते इ. स. ३५० पर्यंतच्या काळात भारतातील सर्व भागांत ब्राह्मीचे एकच रूप प्रचलित होते. यानंतर तिच्यात स्थानिक वैशिष्ट्ये दिसू लागली व तिच्या उत्तर व दक्षिण अशा दोन शैली प्रचारात आल्या. सर्वसाधारणपणे विंध्य पर्वताच्या उत्तरेला प्रचलित असलेल्या लिपीला उत्तरशैली व दक्षिणेला प्रचलित असलेल्या लिपीला दक्षिणशैली म्हणू लागले.

इ. स. च्या ४ थ्या शतकात ब्राह्मी लिपीलाच गुप्त लिपी असे नाव मिळाले. कारण गुप्त वंशातील राजांच्या वेळी सर्व उत्तर भारतात हिचाच प्रचार झालेला होता. गुप्त लिपीपासून कुटिल व तिच्यापासून नागरी उत्पन्न झाली. हीच लिपी बंगाली, असमिया, कैथी, राजस्थानी, गुजराती, मैथिली, मेवाती, उडिया या लिप्यांची जननी आहे. तसेच कुटिल लिपीपासून प्राचीन शारदा व तिच्यापासून सांप्रतची काश्मीरी, टाकरी व गुरुमुखी या लिप्या निघाल्या आहेत. ही ब्राह्मी लिपी इ. स. च्या ७ व्या शतकाच्या मध्याला दक्षिणेत पल्लव लिपी म्हणून ओळखली जाऊ लागली व तिच्यापासूनच तेलुगू, कन्नड व मलयाळम, तसेच ग्रंथलिपीसह तमिळ या चार सुप्रसिद्ध लिप्यांचा उदय झाला. तात्पर्य, ब्राह्मी ही प्रायः सर्व भारतीय लिप्यांची जननीच आहे. [दे. लि.; भा. प्रा. लि.; सा. भा. वि.; डॉ. सुनीतिकुमार चटर्जी-आकाशवाणीवरील भाषण, १९६५.]



ब्राह्मी लिपी—नासिक येथील शिलालेख, स. पू. २ रे शतक (श्री. ओझा यांच्या भारतीय प्राचीन लिपिमाला या ग्रंथावरून)

भंग मूर्तीच्या उभे राहण्याच्या विविध पद्धती आहेत, त्यांना भंग म्हणतात. पाहा—मूर्तिकला.

भंगी एक जात. या जातीचे लोक महाराष्ट्र, बंगाल, उत्तर प्रदेश, राजस्थान, इ. प्रदेशांत आढळतात. त्यांत हिंदू, शीख, मुसलमान या सर्व धर्मांचे लोक आहेत. मेहतर, हारी, डोम, लालबेगी, हलालखोर, वांसफोड अशा त्यांच्या पोटजाती आहेत. बुरुडकामासाठी हे बांबूचा भंग करतात (=फोडतात) म्हणून यांना भंगी नाव पडले, असे कोणी म्हणतात.

हे लोक स्वतःला वलेंगजी ऋषीचे वंशज समजतात. पांडवांनी केलेल्या यज्ञात उष्टी काढण्याचे व साफसफाई करण्याचे काम यांनी स्वीकारले व तेव्हापासून हे लोक हलकी कामे करू लागले, अशी आख्यायिका आहे.

शूद्र बाप आणि ब्राह्मण आई यांच्यापासून ही मिश्र जात उत्पन्न झाली, म्हणून मनूने त्यांची गणना चांडालांमध्ये केली आहे. यांना अंतेवासी (गावापासून दूर, गावाच्या कडेला राहणारे) असे म्हणतात. प्रतिलोम संततीचे वंशज म्हणून मलमूत्रादी वाहून नेण्याचे काम यांच्याकडे आले असावे. निराश्रितांची प्रेते हालविणे, फाशी देणे, चोरांचा माग काढणे, बांबूपासून टोपल्या तयार करणे, गटारे-मोऱ्या साफ करणे, वगैरे कामे हे करतात.

गुजरातेत यांना ओलगण असे नाव आहे. यांच्यांत चोहाण, चुडासमा, हाफद, जेठवा वगैरे रजपूत नावे व कुळे आढळतात.

या जातीत जे हिंदू आहेत, ते लालगुरू, शामबाबा, हनुमान, बालाजी, माताजी, भैरोबा. इ. देवतांना भजतात. ते गंगा व शीतलामाता यांची शपथ घेतात आणि हिंदूंचे सर्व सण पाळतात. बद्रीनारायण, हरद्वार, रामदेव ही यांची पवित्र क्षेत्रे होत. हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सवर्ण हिंदूंच्या हातचे पाणी घेतात; परंतु ढोली, चांभार, कंजर, वलई, इ. जातींच्या हातचे घेत नाहीत.

या जातीतले काही लोक कबीर, रामानंद व नानक यांच्या पंथाचे आहेत.

या जातीतील काही मुसलमान लालबेग नावाच्या एका फकीराचे अनुयायी आहेत. ते आपणांस लालबेगी समजतात. हे अर्धमुर्धे मुसलमान आहेत. शेख भंगी मात्र पूर्णपणे मुसलमान आहेत.

विवाहप्रथा – मुलामुलींचे विवाह साधारणपणे बारा ते बावीस या वयात होतात. आईवडील मध्यस्थामार्फत मुलांचे लग्न ठरवतात. त्याबद्दल मध्यस्थाला एक रुपया मिळतो. देज साठ रुपयांपर्यंत द्यावे लागते. लग्नाचा मुहूर्त ब्राह्मणाकडून काढून घेतात. दक्षिण गुजरातेत त्यांच्या जातीचा पुरुष लग्नात पौरोहित्य करतो; तर मध्य गुजरातेत ते काम धेड ब्राह्मण करतो. लग्नापूर्वी तीन किंवा चार दिवस आधी वधू-वरांना आपापल्या घरी हळद लावतात. लग्नाच्या दिवशी नवरामुलगा वधूगृही जातो. मांडवात मध्यभागी बोहले असते, त्यावर वधू-वर समोरासमोर तोंड करून बसतात. त्या दोघांच्या मध्ये अग्नी प्रज्वलित केलेला असतो. वधू-वरांच्या भोवती सूत्रवेष्टन करतात आणि त्यांचे हात जुळवतात. ती दोघे बोहल्याभोवती चार प्रदक्षिणा घालतात आणि एकमेकांना कणीक, तूप व गूळ यांचा कंसार नामक पदार्थ भरवतात. बोहल्याभोवती दोन प्रदक्षिणा घातल्यावर लग्नगाठ मारतात. लग्नातील हा आवश्यक विधी आहे. त्यानंतर लग्नसमारंभ संपतो.

दक्षिणेत भंग्यांत अराय, वराय, चन, मडच, मंजी, मेमडावाडी, इ. आडनावे आहेत. यांच्यात मुलींची लग्ने लहान वयात होतात. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. लग्न ठरल्यावर वरपिता आणि वधूपिता एकमेकांच्या तोंडात साखर घालतात. लग्नापूर्वी काही दिवस वधूपिता वराकडील मंडळीला साखरभाताचे जेवण देतो. लग्नापूर्वी दोन दिवस, कणकेचा गणपती करून नव्या घटात ठेवतात आणि घरातील स्त्रिया त्याची पूजा करतात. मग तो घट शिंक्यावर टांगून ठेवतात. लग्नाच्या आदल्या दिवशी वधूच्या व वराच्या घरी जेवणावळ होते आणि वधू-वरांच्या उजव्या हातात गेळफळ बांधतात. लग्नाच्या दिवशी नवरामुलगा मिरवीत वधूगृही जातो. नवरामुलगा मांडवात माचोळीवर बसतो. वधू त्याच्या शेजारी बसते. त्यांच्या समोर एक चौकोन आखून त्यांच्या चारही कोपऱ्यांत एकेक कोरा घट ठेवतात आणि त्यांच्या भोवती पाच वेळा सूत्रवेष्टन करतात. पुरोहित वधूवरांच्या पुढे होम करतो. आणि वधू-वर अग्नीत अक्षता टाकतात. नंतर वधू-वरांच्या वस्त्रांना गाठ मारतात आणि ती दोघे त्या घटाभोवती चार वेळा प्रदक्षिणा घालतात. मग मंगलाष्टके म्हणतात व विवाहविधी पूर्ण होतो. वरात झाल्यावर वधूवर वधूगृही परत जातात व तिथे त्यांच्या दातांना काळे दंतमंजन लावून ते काळे करतात. नवरामुलगा आपल्या घरी येतो व नवरी दोन दिवस माहेरी राहते.

यांची जातपंचायत असते. जातीतले तंटेबखेडे तीच सोडविते. दत्तकविधान, विधवाविवाह, वगैरे प्रश्नही जातपंचायतीमार्फतच सोडवले जातात. पंचायतीचे निर्णय बंधनकारक असतात.

हे लोक मृतांना जाळतात किंवा पुरतात. पुरल्या जागी मृतात्म्यासाठी रोटी, मिठाई व पाणी ठेवतात. तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालण्याचा समारंभ करतात.

भंगी समोर आला, तर शुभ शकून व त्याचा आशीर्वाद शुभदायक मानतात. [सु. वि. को.; ट्रा. का. बाँ.; रा. जा.]

भंज राजवंश

इ. स. च्या ९ व्या व १० व्या शतकांत ओडिसा प्रदेशात राज्य करणारा एक वंश. त्याच्या दोन शाखा होत्या. एका शाखेचे राज्य खिजलीमंडल (बौधघुमसुर) या प्रदेशावर असून, त्याची राजधानी धृतिपूर येथे होती व दुसऱ्या शाखेचे राज्य खिज्जिंगमंडल (मयूरभंज व केओंझर) या प्रदेशावर असून, त्याची राजधानी खिचिंग येथे होती.

खिजलीचे भंज घराणे – या शाखेत दहा राजे होऊन गेले, असे दिसते. प्रथम त्यांची सत्ता सोनपूर व बौध या भागांवर होती; पण नंतरच्या राजांनी गंजाम जिल्ह्याच्या उत्तर सीमेपर्यंत राज्यविस्तार केला. या घराण्यातील तिसरा पुरुष शिलाभंज याने आपल्या नावापुढे भंज हे पद जोडले. त्यामुळे शिलाभंज हाच या घराण्याचा संस्थापक ठरतो.

इ. स. च्या १० व्या शतकानंतर १५ व्या शतकापर्यंत या भंज घराण्याचे राज्य स्वतंत्रपणे किंवा मांडलिक म्हणून ओडिसा प्रदेशात चालू असावे, असे अनुमान करण्याजोगा पुरावा उपलब्ध आहे. गंजाम जिल्ह्यातील आस्क व बरहामपूर यांमधील प्रदेश सांप्रतही खिजली या नावाने ओळखला जातो. त्या प्रदेशात भंज नावाची कुटुंबे राहत आहेत, ती या भंज घराण्यातील असण्याचा संभव आहे. इ. स. च्या ४ थ्या व ५ व्या शतकांत ओडिसाच्या निरनिराळ्या भागांत भंज वंशातील लहानमोठे नायक होऊन गेले असे दिसते. त्यावरून या वंशाचे राज्य इ. स. च्या ४ थ्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत मधूनमधून, वेगवेगळ्या भागांत चालू असावे.

खिज्जिंगचे भंज घराणे – या शाखेचे राज्य इ. स. ८५० ते १००० या कालखंडात खिज्जिंग (खिचिंग) येथे चालू होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या घराण्यातील वीरभद्र गणदंड या पुरुषाचा जन्म लांडोरीच्या अंड्यातून झाला व त्याचे पालनपोषण वसिष्ठ मुनीने केले, अशी दंतकथा सांगतात.

ऐतिहासिक दृष्टीने कोट्टभंज हा या शाखेचा पहिला राजा मानला जातो. या शाखेत अकरा पुरुष होऊन गेले. त्यांची फारशी माहिती उपलब्ध नाही; पण ते स्वतंत्र राजे असावे असे वाटते.

या भंज वंशाचा इतिहास अगदी त्रोटक माहीत असला, तरी मयूरभंज व खिचिंग येथे जे प्राचीन शिल्पांचे अवशेष सापडले आहेत, त्यांवरून भंज वंशाच्या राजवटीत शिल्पकलेचा बराच विकास झाला होता, असे कळते. या उत्कल शिल्पकलेचे पाल शिल्पकलेशी बरेच साधर्म्य आढळते. मयूरभंज संस्थानाचे अधिपती यांचे भंज घराणे या भंज वंशाशी संबंधित असावे, असे वाटते. [हि. क. इं. पी. ४; मयूरभंज गॅझे.]

भंटू एक भटकी जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने उत्तर व मध्य भारतात आढळते. पूर्व भारतातही यांच्या काही शाखा आहेत. या शाखांना करवाल नट असे नाव आहे. चोरी व दरोडेखोरी करीत असल्यामुळे ही जात गुन्हेगार समजली गेली आहे. त्यामुळे या जातीचे लोक आपले खरे स्वरूप लपविण्यासाठी अनेक नावे धारण करतात. हे लोक द्रविड वंशाचे असावे, असे मानववंशशास्त्रज्ञांचे मत आहे; पण चितोडगडच्या चव्हाण ठाकुरांपासून आपली उत्पत्ती झाली, असे हे सांगतात. ते मूळ राजपूत असावे, असे एक मत आहेच.

भंटूंची शरीरयष्टी सुदृढ असून ते पळण्यात पटाईत असतात. यांच्या स्त्रिया सुस्वरूप, हाडापेराने मजबूत व हुशार असतात. त्यांचा आवाज खणखणीत असतो. पुरुषमंडळी धंद्यासाठी बाहेरगावी गेल्यावर कुटुंबाची जबाबदारी त्याच पार पाडतात. त्यांचा पोषाख पुरुषांसारखाच असतो. त्या लेंगा व शर्ट वापरतात. मूल अंगावर पीत असल्यास त्या शर्ट वापरीत नाहीत. त्या गोंदूनही घेतात. गोंदण्याचे काम त्या स्वतःच करतात. पुरुषांच्या कानात सोन्याची काडी (गाडा) आणि गळ्यात क्वचित साखळी असते. भंटू स्त्री-पुरुष तेल कधीच वापरीत नाहीत. ते त्यांचे एक वैशिष्ट्यच आहे. लहान मुलांना मात्र ते तेल लावतात.

भंटूंच्या छत्तीस पोटजाती आहेत. या पोटजातींना गोट असे म्हणतात. प्रत्येक गोटाच्या चालीरीती निरनिराळ्या आहेत.

बदक, खोकड, गाय यांचे मांस तसेच मासे या लोकांना वर्ज्य आहेत; पण ते डुकराचे, बकऱ्याचे आणि रानमांजराचे मांस खातात. यांच्यांतील भंसवळे गोटातील लोक खाण्यापिण्याचे कोणतेच विधिनिषेध पाळीत नाहीत. भंटू लोक जी बोली बोलतात त्या बोलीला पपी असे म्हणतात. या बोलीचे हिंदुस्थानी भाषेशी बरेच साम्य आहे.

पंचायत – भंटूंच्या प्रत्येक टोळीचा कारभार स्वतंत्र असतो. त्यांचे महत्त्वाचे प्रश्न पंचायत सोडविते. पंचायतीत पाच वडीलधारी माणसे असतात. त्यांना सर्व चालीरीती माहीत असतात. पंचायत सहसा कुणाला दंड करीत नाही. कोणताही प्रश्न सामोपचाराने मिटविण्याकडे तिचा कल असतो. तंटयाबखेड्यांचा निवाडा करण्यासाठी पंचायतीला पैसे द्यावे लागतात. समान गोटातल्या स्त्री-पुरुषांमध्ये अनैतिक संबंध घडल्याचे उघडकीला आले, तर पंचायत त्यांना कडक शिक्षा करते.

विवाहप्रथा – हे लोक समान गोटांत लग्न करीत नाहीत. यांच्यापैकी भंसवळे गोटात तेवढी आपसात लग्ने होतात. इतर गोटांतील लोकांनी असे लग्न केले, तर त्यांना शंभर रुपये दंड होतो. मुला–मुलींची लग्ने ती वयात आल्यावर करतात. मुलीला मागणी घालावी लागते. मुलीच्या आई-बापांकडून होकार आल्यास मुलाचा बाप काही मंडळी बरोबर घेऊन मुलीच्या घरी जातो. तिथे दोन डुकरे मारतात व जमिनीवर दारू सांडतात. एवढे झाले म्हणजे लग्न ठरले असे मानतात. नंतर दोनतीन दिवसांनी देजाची रक्कम ठरवतात. तीनशे रुपयांपासून पंधराशे रुपयांपर्यंत ही रक्कम असते. मुलीला व्यंग असल्यास थोडक्या देजात भागते. यानंतर काही दिवसांनी मोरखण नावाचा एक समारंभ करतात. याही वेळी एक डुक्कर मारला जातो. नवरा मुलगा मुलीच्या घरी जाताना वाटेत बायका गाणी म्हणतात. नवऱ्या मुलाचे आप्त वाटेत भेटल्यास ते नवऱ्या मुलाला शिव्या देतात. या मिरवणुकीत दोन बायका मुलाच्या डोक्यावर रंगीत कागद धरून चालतात.

नवरा मुलगा मुलीच्या घरी आला, की दारातच त्याला दोन बायका अडवितात. त्या त्याच्या तोंडासमोर एक पडदा धरतात आणि पैसे दिल्याशिवाय तुला मुलगी दृष्टीला पडू देणार नाही, असे सांगतात. नंतर नवरा मुलगा त्यांना पैसे देतो. मग गूळ-पाण्याने भरलेले एक भांडे तो पडद्याखालून आत सारतो. नवरी मुलगी ते भांडे आपल्या तोंडाला लावते. या वेळी मुलीची आई मुलाच्या पाठीवर हळदीचे छाप उठविते. नंतर त्याच्या कपाळावर अक्षता लावते. मग पडदा काढून घेतात. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलीचे नातेवाईक मुलीच्या घरी जमून एका वर्तुळात बसतात. वर्तुळात एक चादर पसरलेली असते व तिच्याखाली एक टोपली असते. नातेवाईक दारू पिता पिता त्या टोपलीत पैसे किंवा दागिने टाकतात. त्या सर्व वस्तू नंतर वधू-वरांना मिळतात. मुलीला दोन मुले होण्यापूर्वी ती देवीच्या आजाराशिवाय अन्य आजाराने मेली, तर देजाची रक्कम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परत करावी लागते; देवींनीं मेल्यास काही द्यावे लागत नाही.

सामान्यपणे मोठ्या मुलाचे लग्न प्रथम होते. परंतु तो मुलगा परागंदा असल्यास किंवा तुरुंगात असल्यास एखादी चांगली मुलगी मिळाली, तर मोठ्या भावासाठी धाकट्या भावाबरोबर तिचे लग्न लावतात. मोठा भाऊ घरी परत आल्यावर तो तिचा पत्नी म्हणून स्वीकार करतो किंवा अन्य स्त्रीबरोबर लग्न लावतो. मोठ्या भावाने तिला पत्नी म्हणून स्वीकारले, तर तिची धाकट्या भावापासून झालेली संतती धाकट्या भावापाशीच राहते.

प्रसूतिप्रथा – प्रसूती झाल्यावर सहा दिवसपर्यंत सुवेर पाळतात. या अवधीत बाळंतीण स्वयंपाकाच्या भांड्यांना शिवत नाही. या सहा दिवसांत ती मेली, तर तिचे भूत होते, अशी त्यांची समजूत आहे. या मरणाला दुर्मरण अशी संज्ञा आहे.

देवधर्म – भंटूंचा भूतयोनीवर खूप विश्वास आहे. लग्नापूर्वी आणि बालपणी मूल मेल्यास ते पिशाच्चयोनीत जाते आणि आपल्या नातेवाइकांना त्रास देते, असे ते समजतात. व्यभिचारी माणूसही भूत होतो असे ते मानतात. अविवाहित मुलीच्या भुताला ते वलाई म्हणतात आणि मोठ्या बाईच्या भुताला चुडेल म्हणतात. मूल भुताने पछाडले आहे, असा संशय आल्याबरोबर आळीतील सर्व मुलांना जुने कपडे घालायला देतात आणि त्यांच्या केसांना तेल लावण्याचे बंद करतात.

हे लोक देवीचे उपासक आहेत. याशिवाय पूर्वजांची पूजाही त्यांच्यांत प्रचलित आहे. मेलेल्या भंटूचा आत्मा त्याच्या आधी मेलेल्या भंटूंच्या आत्म्यांना भेटू शकतो; पण त्यांना तसे भेटता यावे, यासाठी त्याच्या जिवंत नातेवाइकांना ठराविक जेवणे घालावी लागतात. जेवणांची संख्या पुरी होत नाही, तोपर्यंत मृताचा आत्मा अस्पृश्याप्रमाणे पूर्वपितरांपासून वेगळा राहतो. तीन–चार पिढ्यांच्या मृतांना ते पुर्खे किंवा पीरपुर्खे असे म्हणतात. त्याच्या पलीकडील मृतांना देवता मानतात. मुलांना फेफरे येत असल्यास ते त्यांच्या दुष्कृत्यांमुळे येते अशी त्यांची समजूत आहे. हे दरोड्यासाठी बाहेर निघाले असता अपशकुन झाला तर माघारी फिरतात; पण धंद्यासाठी महिन्यातील अमुक दिवस चांगला किंवा अमुक दिवस वाईट असे मानीत नाहीत.

मर्तिकप्रथा – काही गोटांत भंटूंची प्रेते जाळतात, तर काहींत पुरतात. ढापो गोटात प्रेतांना जाळतात. मनुष्य मरणार, असे समजल्यावर ते एक लाकूड पेटवून ठेवतात. हे लाकूड चिता पेटवीपर्यंत जळत असते. माणूस मेला, की त्याला घोंगडीवर ठेवतात. त्याच्या डोक्याजवळ व पायाजवळ जमिनीत चाकू खुपसतात. नंतर एक सदरा, पागोटे व धोतर प्रेताला नेसवतात. या कपड्यांबरोबर थोड सूतही असते. प्रेताला कपडे घातल्यावर त्याच्या तोंडात एक पैसा व सुई ठेवतात. त्याच्या उजव्या हातात पिंड देतात. मृताची बाज, विशेषतः तिची उजवी बाजू काठीने मोडतात. नंतर ती बाज उलटी करतात व मोडलेला भाग तावडतोब दुरुस्त करतात. प्रेताला त्या पालथ्या बाजेवर घालून स्मशानात नेतात. स्मशानाजवळ प्रेत येताच त्याच्या हातातील पिंड काढतात आणि तो एका झुडपात ठेवतात. मृताच्या अंगावरील कापड फाडून त्याने तो पिंड झाकतात. प्रेत चितेवर ठेवल्यानंतर त्याच्या गोटातील काही माणसे प्रेताची कवटी फोडतात. प्रेत जळाल्यावर सर्व माणसे ओढ्यावर स्नान करतात. या वेळी त्यांच्यापैकी प्रमुख स्त्री पाण्यात उभी राहून मोठ्याने काही मंत्र म्हणते व सात वेळा आपल्यापुढे पाणी टाकते. नंतर सर्व मंडळी मृताच्या घरी परत येतात. तिथे त्यांना बिन भाजलेली पोळी पानात गुंडाळून देतात. ते लोक ती तोंडाने चावून फेकून देतात. मग सर्वांवर जलप्रोक्षण होते. नंतर सर्व मंडळी घरोघर परततात. हीच प्रथा थोड्याफार फरकाने अन्य गोटांतही आहे. [रजःकण; से. इं. १९३१]

भंडार

भंडार किंवा भंडारा म्हणजे हळदीची पूड होय. खंडोबाच्या उपासनेत भंडाराला फार महत्त्व आहे. खंडोबाच्या जत्रेत भंडार उधळतात व वाघ्ये लोक भक्तांच्या कपाळी भंडार लावून दक्षिणा मागतात. बगाड घेणे व अंगावर आसूड ओढून घेणे, या गोष्टी खंडोबाच्या नवसापैकी असतात. अशा वेळी अंगावर ज्या जखमा होतात, त्या भंडारानेच बऱ्या करण्याचा प्रघात आहे.

भंडारी

कोकणपट्टीतील एक जात. यांना भावगुण असेही म्हणतात. भंडारी हा शब्द संस्कृत मंधारक म्हणजे दारू गाळणारा या शब्दावरून निघाला असल्याचे एक मत आहे. स्वतः ते लोक मात्र हा शब्द भंडार म्हणजे खजिना यावरून निघाल्याचे सांगतात. पूर्वी यांची खजिन्यावर संरक्षक म्हणून नेमणूक असे. यांची वस्ती मुख्यतः मुंबई शहरात आहे. त्याखालोखाल रत्नागिरी, ठाणे, कुलाबा, कारवार हे जिल्हे व गोमंतक यांत आहे. हे आपली उत्पत्तिकथा सांगतात, ती अशी—

पूर्वी तिलकासुर नामक दैत्य फार मातला, तेव्हा महादेवाने त्याला घाण्याला जुंपले व नंदीला आज्ञापिले, की ‘घाणा फिरव व या दैत्याला पिळून काढ.’ त्याप्रमाणे नंदी घाणा फिरवू लागला. इकडे महादेव उगीचच थकला व त्याच्या कपाळावरून एक घर्मबिंदू गळला. त्यातून तत्काळ एक पुरुष उत्पन्न झाला. तोच भंडाऱ्यांचा मूळ पुरुष होय. त्याला पाहताच शंकर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणाला. 'तुझे नाव भावगुण. कारण तू माझी स्तुती करीत उभा आहेस! जा, मला तहान लागली आहे. आधी पाणी आणून दे!' भावगुण म्हणाला. 'देवा, इथे पाणी कुठेच दिसत नाही. मग आणू कुठून?' ते ऐकून शंकराने एक माड उत्पन्न केला. त्याला मधुर फळांचे घोस लटकत होते. भावगुण लगेच त्या झाडावर चढला आणि त्याने त्या झाडावरचे नारळ खाली उतरवले. ते सोलून व त्यांच्या तोंडावरचा टवका काढून त्यांतले पाणी शंकराला प्यायला दिले. मग प्रसन्न चित्ताने महादेव भावगुणाला म्हणाला. 'जा, अलकावतीच्या भांडारावर तू अधिकारी हो.' तेव्हापासून लोक त्याला भंडारी म्हणू लागले.

ताडी व माडी काढणे, हा यांचा परंपरागत व्यवसाय आहे. याशिवाय ते शेती, मजुरी, सुतारकाम, गवंडीकाम, नावा चालवणे, इ. कामेही करतात.

यांच्यांत देवळी ऊर्फ बंदे, शेषवंशी अगर शिंदे, हेटकरी, कित्ते ऊर्फ उपरकरी, गावड, क्रियापाळ, इ. सहा मुख्य भेद आहेत. मोरे, थळे, कालव, भेरठे आणि नाईक, असे आणखी पाच वर्ग असल्याचे क्वचित ऐकू येते; पण हे स्वतंत्र वर्ग नाहीत. रत्नागिरी व सावंतवाडी येथील हेटकरी ही पोटजात विशेष नावाजलेली आहे. कित्ते जात सधन असून, ती श्रेष्ठ मानली जाते. कित्ते भंडारी स्वतःला गोमंतक ते बाणकोट या किनारपट्टीचे स्वामी समजतात. क्रियापाल ही एकदा बाटून पेशवाईत पुन्हा शुद्ध झालेली जात आहे. देवळी जात कलावंतिणीची संतती मानतात. शालिवाहन आणि कदंब या राजघराण्यांशी भंडारी आपला संबंध जोडतात व आपणांस क्षत्रिय समजतात. शिंदे, गावड आणि क्रियापाल हे आपणांस शेषवंशीय क्षत्रिय म्हणवितात. कदंब कुळीची भंडारी घराणी आपली जन्मभूमी गोमंतक समजतात. अर्वाचीन ग्रामनावांवरून प्रचारात आलेल्या आडनावांचा विचार करता असे आढळून येते, की बहुतेक भंडारी कुटुंबे मूळची सावंतवाडी व गोमंतक या प्रदेशांतीलच असावी. राजस्थानात भंडारी नावाची एक क्षत्रिय पोटजात आहे, तिच्याशीही हे लोक आपल्या जातीचा संबंध दाखवतात. इतर जाती यांना मराठ्यांच्या खालोखाल मानतात. भंडारी आणि मराठा कुणबी यांत बरेचसे साम्य आहे. यांचा दर्जा मराठ्यांच्या बरोबरीने आहे.

काही भंडारी कुटुंबे पितृपक्षाच्या वेळी एखाद्या मराठा कुटुंबाला जेवायला बोलावतात. काही मराठा कुटुंबे लग्नप्रसंगी भंडारी लोकांच्या देवांना ओटी-नारळ देतात. वेंगुर्ले तालुक्यात कुणेकरी येथे असलेले नाईक घराणे मराठा जातीचे आहे. याच नाईक घराण्याची शिरोडे येथे असलेली शाखा भंडारी जातीची समजतात. गावड, गावित, पुजारी इत्यादी जातीं-प्रमाणे भंडारी लोक आपणांस नुसते मराठे म्हणवीत नाहीत, तर हेटकरी किंवा हेटकरी मराठे म्हणवितात.

देवधर्म – भंडारी हे शैव असून त्यांच्या कुलदेवता रवळनाथ, नागनाथ, महादेव, शिवनाथ, कालिका, इ. आहेत. त्यांचे उपाध्ये चित्पावन, कऱ्हाडे किंवा कर्नाटक ब्राह्मण असतात. ब्राह्मण, शेणवी आणि खानदानी मराठे यांच्याखेरीज अन्य जातींच्या हातचे हे लोक खात नाहीत. यांचे मौंजीबंधन होत नाही; पण काही भंडारी नारळी पौर्णिमेस पोवते (यज्ञोपवीतसदृश दोरा) घालतात. त्यांना लग्नप्रसंगी पुरोहिताकडून जानवे मिळते. प्राचीन देवस्थानांतून ठिकठिकाणी भंडारी लोकांचा मान आहे. काही ठिकाणी पुजारी, वृत्तिक, इ. हक्कही आहेत. या जातीच्या मालकीचीही बरीच देवस्थाने आहेत. जातिहितार्थ निघालेल्या संस्थाही आहेत. भंडारी वाजंत्री म्हणून जी जात आहे, तिच्या महालक्ष्मी (कवळे), दुर्गा, दामोदर या देवता आहेत.

विवाहप्रथा – भंडारी लोकांत अनेक कुळे व देवके आहेत. अलिकडे ते आपली वसिष्ठ, अत्री, दुर्वास, इ. गोत्रेही सांगू लागले आहेत. भंडाऱ्यांमध्ये सर्वसाधारण देवक कदंब वृक्ष हे आहे. लग्नप्रसंगी या देवकाचे विशेष महत्त्व असते. वड, पिंपळ, उंबर, आंबा अशीही देवके आहेत. हेटकरी व उपरकरी या दोन वर्गांत अलिकडे लग्नसंबंध होऊ लागला आहे. शिंदे व गावड यांच्यांतही क्वचित्प्रसंगी तो होतो. यांच्या लग्नात लाजाहोम, सप्तपदी, शिलारोहण, इ. विधींस विशेष प्राधान्य असते. मामाच्या मुलीशी लग्न होते.

नौकानयन – नौकानयनाशी भंडाऱ्यांचे नाव प्राचीन काळापासून निगडित आहे. यांच्यांतली बौद्धकालीन महानायक ही नौकाध्यक्षाची उपाधी अपभ्रंशाने मायनाक अशी झाली आहे. कीर, पांजरी, नामनाईक (नौकानायक), सारंग, तांडेल अशी आडनावेही त्यांचा नौकानयनाशी संबंध दर्शवितात. पूर्वी हे लोक समुद्रावर चाचेगिरी करीत. शिवाजीमहाराजांनी नौदल स्थापन केल्यावर यांना मुद्दाम आपल्या नोकरीत घेतले. हे लोक सशक्त, देखणे, धाडसी व पराक्रमी असून, कलाकौशल्याचाही गुण त्यांच्यांत दिसून येतो. शिवाजीमहाराजांच्या नौकाधिकाऱ्यांत मायनाक भंडारी, दर्यासारंग, उदाजी पडवळ, सावळ्या तांडेल, इ. भंडारीच होते. मराठ्यांखेरीज इतरांच्या आरमारांतही ते असत. शिवाजीमहाराजांचे प्रसिद्ध हेटकरी भंडारीच होते. पुढे आरमार खाती बंद झाल्याने निरुपायाने या लोकांनी ताडीमाडी काढण्याचा धंदा सुरू केला. काही लोक शेतीही करतात. गायक, वादक, नट म्हणून या समाजातील बरेच लोक पुढे आलेले आहेत.

१६७२ ते १६८१च्या दरम्यानच्या एका पत्रावरून असे दिसते, की भंडारी लोक फिरंगी सरकारचे भांगळी अर्थात शिं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाजविणारे शिपाई होते. पूर्वी हे लोक माहीम येथे राहत आणि भीमराजाच्या हाताखाली साष्टीचा आणि कोकणातील काही गावांचा कारभार चालवीत. कंपनी सरकारच्या सैन्यातही ते होते. इ. स. १८७७ मध्ये माडांवरील कर वाढला म्हणून बरेच लोक शेती, व्यापार, बागायत, इ. व्यवसाय करू लागले. यांच्या जातीचे न्यायनिवाडे करणाऱ्या गाद्या केळवे, तारापूर, मिठ-गावणे, आचरे, गोमंतक, इ. ठिकाणी आहेत.

भंडाऱ्यांची एक विशेष बोली आहे. तिचा नमुना असा –

कोनी एका मनुक्षास दोन सोकर होत. त्यातना धाकला बाबाला म्हतला, बाबा इष्टकीचा जो वाटा मना यायचा हाय तो दे. मंग त्यान त्यास माल जिनगी बाटून दिली. मंग थोडक्या दिसानी धाकला मुलगा आपल समद जमा करून दूरूया मुल-खात गेला आणि थत उदलपानाने वागून आपली सर्व संपता उधलली. मंग सगली संपता उधलल्यावर, त्या मुलखात मोठा दुकाल पडला. त्या मुलं त्याला गरिबी आली. तवां तो त्या मुलकामदील एका गिरिस्ताजवळ ऱ्हाला. त्यानी त्याला शेतात डुकर चरवायला पाठविला.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात व श्राद्धही करतात. [म. जि. – रत्नागिरी; रत्ना. गॅझे.; मुं. इ. जा.; मुं. व.; म. ज्ञा. को.; म. लो. सं.; अजरायलग्राम म्हणजेच आमचं आंजर्ल – श्री. ग. बा. नित्सुरे; स. सा. वा – ३.]

भेंड्यांचा खेळ महाराष्ट्रातील मुलांचा एक आवडता खेळ. याला भेंड्यांचा खेळ असेही नाव आहे. भारतातील इतर राज्यांतही हा खेळ प्रचलित आहे. खेळणा-यांचे दोन गट करून हा खेळ खेळतात. एका गटातील मुलाने कविता म्हटली, की तिच्या शेवटी येणारे अक्षर जिच्या आरंभी आहे, अशी कविता दुसऱ्या गटातील मुलाने म्हणणे, असे याचे स्वरूप आहे. हा खेळ सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीचा असावा, असे आढळून आले आहे.

या खेळाचा इतिहास प्राचीन संस्कृत ग्रंथांत सापडतो. पुरुषोत्तम देव (इ. स. चे. १२ वे शतक) नामक एका कोश-काराने आपल्या हारावली नावाच्या कोशात याला प्रतिमाला असे नाव देऊन त्याविषयी श्लोक दिला आहे, तो असा –

शेषमक्षरमादाय प्रतिश्लोकं क्रमेण यत् ।
अन्योन्यं पठ्यते श्लोकः प्रतिमालेति सा मता ।।

अर्थ – पूर्वीच्या श्लोकातील शेवटचे अक्षर घेऊन दुसरा श्लोक म्हणणे, असे क्रमाने एकामागून एक श्लोक म्हणणे, या प्रकाराला प्रतिमाला असे म्हणतात.

प्रतिमाला, अंत्याक्षरिका किंवा भंडी यांचा उगम शृंखला किंवा कांचीयमक यासारख्या चमत्कृतिपूर्ण रचनेतून झाला असावा, असे वाटते. कामसूत्रांत सांगितलेल्या चौसष्ट कलांत प्रतिमाला या बौद्धिक क्रीडाप्रकाराचाही समावेश केलेला आहे. यावरून प्रतिमालेचा म्हणजेच भेंड्यांचा उगम कामसूत्रांच्या रचनेपूर्वी झाला, असे मानण्यास हरकत नाही.

एकमेकांवर भेंड्या लावणे किंवा चढवणे, यात मुले मोठी चुरस दाखवतात. आपल्यावर आलेले अंत्याक्षर घेऊन त्याने सुरवात होणारी कविता म्हणता न आल्यास व दुसऱ्या गटाने तशी कविता म्हणून दाखवल्यास पहिल्या गटावर दुसऱ्या गटाने भेंडी लावली किंवा चढवली, असे होते. कित्येकदा कवितेचे अंत्याक्षर ळ, ण, इ. येते. त्या आद्याक्षरांची रचना उपलब्ध नसते. अशा वेळी दुसरा गट पहिल्याकडे अक्षर मागतो. त्या अक्षराची रचनाही म्हणता आली नाही, तर पहिला गट ती स्वतः म्हणून दुसऱ्यावर भेंडी चढवतो.

विविध भाषांतील विविध प्रकारच्या कवितांचे पाठांतर करायला या छंदामुळे प्रोत्साहन मिळते. [श्री. प. कृ. गोडे, अनु-वादक, वि. म. बेडेकर–नवभारत–जुलै १९५९]

भ प वर्गातील चौथे अक्षर आणि चौविसावे व्यंजन. या वर्णाच्या पाच अवस्था पुढीलप्रमाणे दिसतात– गिरनार (अशोक-कालीन), नाणेघाट (स. पूर्व २ रे शतक), मथुरा (जैनलेख



भ च्या रूपाचा विकासक्रम

इ. स. चे १ ले शतक), प्रयागस्तंभ (समुद्रगुप्तकालीन) येथील लेख आणि हैहयवंशी जाजल्लदेवाचा शिलालेख (इ. स. १११४).

वर्णोद्धारतंत्रात भकाराचा प्रणाममंत्र दिला आहे तो असा –

त्रिशक्तिसहितं वर्णं त्रिबिन्दुसहितं प्रिये ।
आत्मादितत्त्वसंयुक्तं भकारं प्रणमाम्यहम् ।।

अर्थ – हे प्रिये, तीन शक्ती व तीन बिंदू यांनी सहित व आत्मादितत्त्वांनी युक्त अशा भकाराला मी वंदन करतो.

ओष्ठ हे याचे उच्चारणस्थान आहे. [म. ज्ञा. को.; श. क.]

भक्तचरणदास (१७०८ ते १८०५ इ. स.) ओडिसातील एक श्रेष्ठ भक्तकवी. याचा जन्म रणपूर राज्यातील सुनाखला नामक गावी झाला. याचे मूळ नाव वैरागीचरण पट्टनायक असे होते. पुढे पंचसखा वैष्णव संप्र-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वायाची दीक्षा घेतल्यावर त्याचे नाव भक्तचरणदास असे ठेवले गेले. याने मथुरामंगल, मनबोध चौतीशा, कलाकलेवर चौतीशा, इ. काव्यग्रंथ लिहिले आहेत.

मथुरामंगल हे त्याचे गाजले-नावाजलेले काव्य आहे. त्यात श्रीकृष्णाच्या मथुरागमनापासून कंसवधापर्यंत कथाभाग आला आहे. या काव्याची भाषा सरळ व रचना सुमधुर असल्यामुळे सबंध ओडिसात ते अत्यंत लोकप्रिय ठरले आहे.

भक्तचरणदासाने आपल्या आयुष्याची अखेरची वर्षे जगन्नाथ-पुरी येथे घालवली. आजही तिथे त्याचा मठ दाखवितात. [उ. सा. इ.; हि. ओ. लि.]

भक्ती भगवदकृपा व मोक्ष मिळवून देणारे एक श्रेष्ठ साधन. सुगमता व सर्वसुलभता या दोन कारणांमुळे धार्मिक जगात भक्तीचा विपुल प्रचार आहे. कर्म, ज्ञान व भक्ती ही तीन प्रमुख धर्मसाधने प्राचीन कालापासून भारतात स्वीकृत आहेत. देशकालपरिस्थितीला अनुसरून कधी या तर कधी त्या साधनाला महत्त्व मिळालेले दिसते. कधी कर्माशी भक्तीची सांगड झाली आहे, कधी ती ज्ञानाशी झाली आहे, तर कधी एकट्या भक्तीलाच सर्वश्रेष्ठ स्थान मिळाले आहे; पण सर्व-सामान्य मत असे, की कर्म, ज्ञान व भक्ती ही साधने पृथक असली तरी, ती एकमेकांना विरोधी नसून पूरकच आहेत. कर्मात भक्तीचा ओलावा हवा, ज्ञानाला कर्माचे हातपाय हवे आणि भक्तीला ज्ञानाचे डोळे हवे.

भज् = सेवायाम् या धातूवरून भक्ती हा शब्द बनला आहे. सेवा (अर्थात भगवंताची) करणे असा त्याचा अर्थ आहे. भक्तीचे माहात्म्य विस्तारून कथन करणारे अनेक आचार्य व कवी भारतात होऊन गेले आहेत. शांडिल्य, नारद, व्यास, इथपासून त्यांची नामावली सुरू होते. अशांपैकी काहींनी केलेल्या भक्तीच्या व्याख्या अशा –

सा परानुरक्तिरीश्वरे ।

(शां. भ. सू. २)

अर्थ – ईश्वराच्या ठिकाणी पराकाष्ठेचा अनुराग म्हणजे भक्ती होय.

सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा ।

(ना. भ. सू. २)

अर्थ – परमात्म्याच्या ठिकाणी परम प्रेम असणे म्हणजे भक्ती होय.

स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे ।
अहैतुक्यप्रतिहता ययाऽऽत्मा सम्प्रसीदति ॥

(भाग. पु. १.२.६)

अर्थ – भगवान कृष्णाच्या ठिकाणी भक्ती असणे, हा मानवाचा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. ही भक्ती कामरहित असावी आणि निरंतर असावी. अशा भक्तीने भक्ताला भगवत्प्राप्ती होते आणि त्याचा आत्मा प्रसन्न होतो.

माहात्म्यज्ञानपूर्वस्तु सुदृढः सर्वतोऽधिकः ।
स्नेहो भक्तिरिति प्रोक्तस्तया मुक्तिर्न चान्यथा ॥

(म. भा. तात्पर्यनिर्णय १.८६.१०७)

अर्थ – भगवंताच्या ठिकाणी, त्याच्या माहात्म्याचे ज्ञान करून घेऊन सुदृढ व सतत असा सर्वाधिक स्नेह धारण करणे, याला भक्ती असे म्हणतात. तिच्यामुळेच मुक्ती प्राप्त होते. अन्य कोणत्याही मार्गाने नाही.

मनोगतिरविच्छिन्ना हरौ प्रेमपरिप्लुता ।
अभिसन्धिविनिर्मुक्ता भक्तिर्विष्णुवशंकरी ॥

(नारद पंचरात्र)

अर्थ– प्रेमपरिप्लुत मनाची गती निःस्वार्थ होऊन श्रीहरींच्या ठिकाणी अविच्छिन्नपणे वाहणे आणि निरंतर श्रीहरीचे ध्यान करणे म्हणजे भक्ती होय. ही भक्ती श्रीहरीला वश करणारी असते.

द्रुतस्य भगवद्धर्मात् धारावाहिकतां गता ।
सर्वेशे मनसो वृत्तिर्भक्तिरित्यभिधीयते ॥

(भक्तिरसायन १.३)

अर्थ– मनाची वृत्ती आध्यात्मिक साधनेने द्रवीभूत होऊन ईश्वराकडे प्रवाहित होणे, हिला भक्ती असे म्हणतात.

वरील व्याख्या थोड्याफार फरकाने सारख्याच आहेत. भगवंताच्या ठिकाणी निर्हेतुक असे प्रेम अविच्छिन्न ठेवणे आणि त्याची सर्वभावे सेवा करण याला भक्ती म्हणावे, हाच वरील सर्व लक्षणांचा आशय आहे.

भक्तिभेद – भक्तिमार्गी आचार्यांनी भक्तीचे प्रामुख्याने दोन विभाग केले आहेत. एक गौणी व दुसरी परा. साधन आणि साध्य या भक्तीच्या दोन बाजू लक्षात घेऊन हे विभाजन केलेले आहे. मन एकाग्र करून भगवंताचे निरंतन श्रवण-कीर्तनादी करणे, ही भक्तीची साधनात्मक बाजू आणि भगवंताच्या ठिकाणी अत्यंत अनुरक्ती ठेवणे आणि त्या अवस्थेत आनंदानुभव घेणे, ही भक्तीची साध्यविषयक बाजू आहे. गौणी भक्तीचे फिरून वैधी व रागानुगा असे दोन भेद होतात. जी भक्ती शास्त्रात सांगितलेल्या नियमांनुसार केली जाते, ती वैधी होय. ज्या भावनेने भगवत्प्रेमात रसाचा अपूर्व अनुभव घडतो आणि भक्ताला शांती व आनंद यांचा लाभ घडतो, तिला रागानुगा म्हणतात.

साधनरूप भक्तीची पुढील पाच अंगे मानलेली आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(१) उपासक (२) उपास्य (३) पूजाद्रव्य (४) पूजाविधी व (५) मंत्रजप. सात्त्विक, राजस व तामस असे भक्तीचे तीन भेद भागवतात मानले असून, निर्गुण या नावाने चौथाही एक भेद सांगितला आहे. पहिल्या तीन गुणभक्ती होत. या काम्य असून, निर्गुणभक्ती ही निष्काम असते; तिला सुधासारभक्ती असेही म्हणतात (भाग. पु. ३.२९.७.१४). निर्गुण भक्ती करणारे लोक भगवत्सेवा हाच परम पुरुषार्थ मानतात. भक्तीची ही साध्यावस्था होय. नारदाने अशा भक्तांना एकान्ती अतएव मुख्य म्हटले आहे. साक्षात देवही अशा भक्तांना पाहून आनंद-विभोर होतो, असे नारद म्हणतो (ना. भ. सू. ७१).

भागवतात भक्तीचे नऊ भेद सांगितले आहेत, ते असे –

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।

(भाग. पु. ७.५.२३)

अर्थ– विष्णूचे श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन (असे भक्तीचे भेद आहेत).

या नऊ प्रकारांना मिळून नवविधा भक्ती म्हणतात. पहिले तीन प्रकार परमेश्वराच्या ठिकाणी श्रद्धा उत्पन्न करण्यास साहाय्यक ठरतात. पुढचे तीन हे भगवंताच्या सगुण रूपाशी संबंधित आहेत. शेवटचे तीन हे आंतरिक भाव आहेत. ते रागात्मिका भक्तीशी संबंधित आहेत. पहिल्या तिहींत नामाला विशेष महत्त्व आहे. भगवंताच्या यश, गुण, माहात्म्य, इ. गोष्टी सश्रद्ध मनाने ऐकणे ही श्रवणभक्ती होय. श्रवणानंतरच स्मरण आणि कीर्तन संभवते. कीर्तनात नृत्य, गीत व वाद्य या तिहींचा समावेश होतो. संगीताच्या साथीवर होणाऱ्या कीर्तनात जे वातावरण निर्माण होते, त्यात भावविवशता आणि आनंदमयता आपोआप प्राप्त होते. म्हणूनच सर्व भक्तांनी कीर्तनभक्तीचे माहात्म्य विशेष सांगितले आहे. बरेचसे भक्तिसाहित्य गेय पदांच्या रूपानेच निर्माण झाले आहे, त्याचे कारण हेच होय. भगवंताच्या नाम-गुण-लीलांचे सदैव ध्यान करणे आणि त्यातच मग्न राहणे ही स्मरणभक्ती होय. भगवंताने या स्मरणभक्तीचा आदेश देताना सांगितले, की 'जो मनुष्य माझ्या ठिकाणी अनन्यचित्त होऊन सदैव माझे स्मरण करीत राहतो, त्या नित्ययुक्त योग्याला मी सुलभ आहे' (गीता ८.३.७) पादसेवन भक्ती ही मूर्तिपूजा, गुरुपूजा व भगवद्भक्तांची पूजा या स्वरूपात होऊ शकते. श्रद्धा व आदर यांनी युक्त अशी भगवंताची पूजा करणे, याला अर्चनभक्ती म्हणतात. भक्तजनांचा असा विश्वास असतो, की मूर्ती, सद्गुरू आणि भक्त यांच्या ठिकाणी भगवान वास्तव्य करतो. भगवंताच्या पुढे नतमस्तक होऊन त्याच्या अनंत महिम्याचे अंतरात ध्यान करीत त्याची स्तुती करणे, याला वंदनभक्ती म्हणतात. श्रीहरी हा माझा मायबाप आहे, प्रभू आहे आणि मी त्याचा पुत्र व सेवक आहे, अशा भावनेने भक्ती करणे, हिला दास्यभक्ती म्हणतात. परमात्मा हा माझा मित्र आहे, साथी आहे किंवा बंधू आहे आणि माझ्या सुखदुःखांत सहभागी आहे, अशा भावनेने भक्ती करणे याला सख्यभक्ती म्हणतात. सख्यभक्तीत भक्त आणि भगवान यांच्यामध्ये कोणताही आडपडदा राहत नाही. या भक्तीत भक्ताला समानता व स्वतंत्रता प्राप्त होते.

आत्मनिवेदन ही भक्तीची शेवटची व सर्वोच्च पायरी होय. जे काही बरे अथवा वाईट, बाह्य किंवा आभ्यंतर असेल, ते सर्व प्रभूपुढे उघडून मांडणे, त्याला सर्वस्वी शरण होणे, जिथे स्वतःची असमर्थता असेल तिथे रक्षणासाठी प्रभूचा धावा करणे, आपला सर्व भरिभार प्रभूवर टाकणे, याला आत्मनिवेदन असे नाव आहे. आत्मनिवेदनाने मनोवृत्ती द्रवित होतात. प्रसंगी त्या अश्रुधारांच्या रूपाने वाहू लागतात. या अश्रुधारांत त्याची सर्व पापे, सारे मनोमल धुवून जातात. मग त्याचा अंतरात्मा आरशासारखा स्वच्छ आणि दुधासारखा पवित्र होतो. आत्मनिवेदन त्याला अशा एका अवस्थेत घेऊन जाते, की तिथून त्याला सर्व विश्वच भगवन्मय होऊन जाते. ज्याला 'आत हरी बाहेर हरी' झाला तो कोणाचा द्वेष करील आणि कुणाशी वैर धरील ! जिथे द्वेषच नष्ट होतो, तिथे सारे कामक्रोधादी विकार आपोआप नष्ट होतात आणि विश्वबंधुत्वाची भावना जागृत होते. मग जे प्रभूचे कार्य तेच भक्ताचेही कार्य होऊन जाते. तो पूर्णकाम होतो, पूर्णब्रह्म बनतो.

भागवताने जसे वरीलप्रमाणे भक्तीचे नऊ प्रकार सांगितले, त्याप्रमाणे नारदानेही आपल्या भक्तिसूत्रांत तिचे अकरा आसक्तींत विभाजन केले आहे. या अकरा आसक्ती व त्यांचे आदर्श पुढीलप्रमाणे–

(१) गुणमाहात्म्यासक्ती – प्रभूचे गुणमाहात्म्य जाणण्याची आणि ते कथन करण्याची ओढ. या आसक्तीचे नारद, व्यास, शुक, शौनक, याज्ञवल्क्य, शांडिल्य, भीष्म व अर्जुन हे आदर्श होत.

(२) रूपासक्ती – भगवंताच्या रूपावर आसक्त होणे. रामाच्या बाबतीत मिथिलेच्या नरनारी आणि कृष्णाच्या बाबतीत व्रजनारी हे या भक्तीचे आदर्श होत.

(३) पूजासक्ती – भगवंताची येनकेन प्रकारेण नित्य पूजा करीत राहण्याची आसक्ती. लक्ष्मी, पृथू, अंबरीष, भरत हे तिचे आदर्श होत.

(४) स्मरणासक्ती – सदैव प्रभूचे नामस्मरण आणि चिंतन करण्याची ओढ. ध्रुव, प्रल्हाद, सनक हे तिचे आदर्श होत.

(५) दास्यासक्ती – देवाला प्रभू मानावे आणि आपण त्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चाकर होऊन राहावे अशी ओढ. हनुमान, अक्रूर, विदुर हे तिचे आदर्श होत.

(६) सख्यासक्ती – देवाशी मैत्री करण्याची ओढ. अर्जुन, उद्धव, संजय, सुदामा हे तिचे आदर्श.

(७) कान्तासक्ती – प्रभू पती आणि आपण त्याची कांता, या भावनेचे साभिमान आकर्षण वाटणे. रुक्मिणी, सत्यभामा, इ. अष्टनायिका हे तिचे आदर्श.

(८) वात्सल्यासक्ती – भगवंताला पुत्र मानून त्याच्यावर वात्सल्याची अमृतधार ओतण्याची ओढ. कश्यप–अदिती, दशरथ–कौसल्या, नंद–यशोदा, वसुदेव–देवकी हे तिचे आदर्श.

(९) आत्मनिवेदनासक्ती – जे काही आपले असेल, ते सारे ईश्वराला समर्पण करण्याची ओढ. अंबरीष, बली, बिभीषण, शिबी हे तिचे आदर्श.

(१०) तन्मयतासक्ती – प्रभुमय होऊन राहण्याची, प्रभुपदी विलीन होण्याची ओढ. याज्ञवल्क्य, शुक, सनकादी ज्ञानी, हे तिचे आदर्श होत.

(११) परमविरहासक्ती – पराकाष्ठेच्या प्रभुविरहातही त्याच्या ठिकाणी तन्मय होऊन जाण्याची ओढ. उद्धव आणि व्रजातल्या गोप-गोपी हे तिचे आदर्श.

भारतात अनेक भक्त झाले; पण प्रत्येकाचे भाव वेगळे. कोणी दास्यावर जोर दिला, कोणी वात्सल्यावर दिला, तर कोणी माधुर्यभावावर. निर्गुण उपासकांनी सगुण, साकार परमेश्वराला बाजूला ठेवून निर्गुण ब्रह्माला आपला आधार ठरवले आणि त्या ठिकाणी दास्य, शांत, मधुर असे भाव जोडून दिले. वैष्णवांनी परमात्म्याला पुरुष मानून त्याच्याशी सारे लौकिक संबंध निर्माण केले. काही भक्तांनी युगलरूपात भगवंताला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला. कित्येक शाक्त उपासकांनी स्वतःच्या ठिकाणी मातृभाव व देवाच्या ठिकाणी पुत्रभाव धारण करून त्याची उपासना केली. सूफी भक्तांनी भगवंताला माशुक अर्थात प्रेयसी मानून स्वतःला आशक अर्थात प्रियकर बनवले आणि त्या भावनेत ते ईश्वराला आळवू लागले. कित्येक भक्त हसले, नाचले, रडले, उन्मत्त किंवा बेहोषही झाले. नारद सांगतो, की व्रजगोपिकांच्या ठिकाणी तर सारेच भाव उपस्थित होते आणि सर्वभावे त्यांनी श्रीहरीला आपलेसे केले होते.

ज्या ज्या आचार्यांनी भक्तीची व्याख्या केली, त्यांनी त्यांनी भक्तीची अंगे, साधने आणि विघ्ने या गोष्टींचेही विवेचन केले आहे. प्रायः सर्वांनी सत्संग, गुरुशरणता, शास्त्रग्रंथांचे श्रवण, सन्मार्गाचे आचरण, भोगादिकांचा त्याग, हरिक्षेत्री वास्तव्य, इ. गोष्टी भक्तीची साधने म्हणून सांगितलेल्या आहेत. दुष्टांची संगती, षड्रिपूंना मोकळीक, वादविवादप्रसंग, विषयांची ओढ, शिष्यसंप्रदाय वाढविण्याचा हव्यास, इ. गोष्टी भक्तीची विघ्ने म्हणून निर्देशिल्या असून, त्यांचा त्याग करण्याविषयी उपदेश केला आहे.

भक्तितत्त्व – निर्भेळ आनंद किंवा श्रेष्ठ प्रकारचे सुख मिळवून देण्यासाठी भक्तीचा उगम झाला आहे. जग आणि जीवन या दोहोंच्याही मुळाशी काम आहे, असे ऋग्वेदातल्या (ऋ. ८.७.१७) 'कामस्तदग्रे समवर्तताधि' या वचनावरून कळून येते. परमेश्वराला एकातून अनेक होण्याची इच्छा म्हणजेच कामना उत्पन्न झाली आणि तिच्यातून समस्त सृष्टीचा जन्म झाला, असे तैत्तिरीय उपनिषदात म्हटले आहे. यावरून काम हा विश्वाचा जनक ठरतो. जो जनक असतो, तो पिढ्यान् पिढ्या आपल्या संततीतही पाझरून येत असतो. त्या दृष्टीने काम हा सर्व प्राणिमात्राला कवटाळून बसला आहे. मनू म्हणतो, काम हा समस्त संकल्पांचे मूळ आहे. जगामध्ये अकाम किंवा कामनाशून्य अशी व्यक्ती आढळणे दुरापास्त होय. या जगात जी जी काही क्रिया होते, ती ती सर्व कामाचे चेष्टित आहे (मनु. २.२.४).

वास्तविक पाहता काम हा मंगल आहे आणि कल्याणप्रदही आहे. त्याच्यामुळे जगातील घडपड चालू राहते. त्याच्यामुळे आनंदही मिळू शकतो. मात्र त्याच्यापासून आनंद मिळायला तो शुद्ध असायला हवा आणि योग्य जागी बसायला हवा.

काम जेव्हा लौकिक प्रपंचाशी आणि बाह्य वस्तूशी निगडित होतो, तेव्हा तो अमंगल व दुःखहेतू बनतो. मानवाची बाह्य प्रवृत्ती कामाला भलत्याच वाटा दाखविते आणि त्याला कलुषित करते. बाह्य वस्तूंच्या प्राप्तीसाठी कामना धरून मनुष्य धडपड करू लागला, की त्याला कधी सुख, आणि बहुधा दुःखच भोगावे लागते. कारण कामाच्या धावेला अंत नाही आणि जोवर धाव संपत नाही तोवर सुख, स्वास्थ्य आणि आनंद या गोष्टी दुर्लभ ठरतात. ययाती याविषयी अनुभवाचे बोल सांगतो, ते असे –

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।।

(म. भा. आदि. ७५.५०)

अर्थ – कामांचा उपभोग घेऊन काम कधीही शमणार नाही; तर अग्नीत आहुती टाकल्यावर अग्नीच्या ज्वाला जशा वाढतच जातात, त्याप्रमाणे काम हा उपभोगांच्या आहुतींनी सारखा वाढतच जातो.

कामाची धाव खुंटायची, त्याची तृप्ती व्हायची, तर त्याला असे एक स्थान मिळवून दिले पाहिजे, की जिथे काम हा निष्काम बनून जाईल. असे स्थान बाह्य जगात कुठेही नाही. ते स्थान आहे अंतरात म्हणजेच परमात्म्याच्या पाशी. म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कामाला ईश्वराशी जोडून दिले पाहिजे. 'परमात्मा हा सकल-कामपूरक आहे, तो आनंदनिधान आहे व विश्वप्रपंचातून सुखरूप पैलपार नेणारा आहे, हे जाणून घेऊन आपल्या सर्व कामनांचा ओघ त्याच्याकडे वळवणे आणि त्याचीच आवड धरणे याला भक्ती असे म्हणतात. तुकोबांनी हाच आशय पुढील अभंगचरणात व्यक्त केला आहे –

कामक्रोध आम्ही वाहिले विठ्ठली ।
आवडी धरिली पायांसवे ।

भक्ती ही केवळ साधन नसून साध्यही आहे. ती साधनावस्थेत आणि सिद्धावस्थेत अशा दोन्ही ठिकाणी आनंदरूप असते. साधक जेव्हा साधनातच रस घेऊ लागतो आणि त्याच्या फलाविषयी उदासीन बनतो, तेव्हा साधन हेच साध्य बनून जाते. म्हणूनच कर्ममार्ग आणि ज्ञानमार्ग या दोहोंपेक्षाही कित्येक आचार्यांनी भक्तीला श्रेष्ठत्व दिले आहे. शंकराचार्यही म्हणतात–'मोक्षसाधनसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी' = मोक्षाच्या साधनसंभारात भक्ती हीच श्रेष्ठ आहे.

सर्वांभूती भगवद्भाव हे भक्तीचे मधुर फल होय. भक्तीत दुसरे काहीही मिळवायचे नसते, तर साक्षात भगवंतच आत्मसात करून घ्यायचा असतो. मात्र भगवंताची प्राप्ती याचा अर्थ जीवाचे जीवपण संपणे हा नव्हे. भक्तीमध्ये भक्त हा परमेश्वराचा सयुज आणि सखा बनून त्याच्या दिव्य आनंदाचा अनुभव अखंड घेत असतो. रामानुज, मध्व, निंबार्क, इ. आचार्यांनी हेच मत प्रतिपादिले आहे. स्वामी दयानंदही एका ठिकाणी असेच लिहितात –

ज्याप्रमाणे अग्नीजवळ गेल्याने शैत्याची निवृत्ती आणि उष्णतेचा अनुभव या दोन्ही गोष्टी एकसमयावच्छेदाने घडतात, त्याचप्रमाणे भगवंताजवळ गेल्याने दुःखाची निवृत्ती आणि अखंड आनंदाची प्राप्ती या गोष्टी एकाच वेळी होत असतात. परमेश्वराच्या जवळ गेल्याने भक्ताच्या ठिकाणी देवाचे गुण, कर्म व स्वभाव प्रकट होऊ लागतात. परमेश्वराची स्तुती, प्रार्थना किंवा उपासना यांनी भक्ताचे आत्मबल वाढते. तो मग कोणत्याही दुःखांना किंवा संकटांना घाबरत नाही. कशाही कठिण प्रसंगी त्याचे धैर्य विचलित होत नाही.

ईश्वराच्या ठिकाणी भक्त अनेक नात्यांनी आपला संबंध जोडतात. काहींना तो आपला स्वामी वाटतो. धनी ज्याप्रमाणे आपल्या नोकरावर निग्रह व अनुग्रह अशी उभयविध सत्ता गाजवतो, त्याप्रमाणे देव विश्वाचा नियंत्रक आहे, मनुष्याला त्याच्या अन्याय्य वर्तनाबद्दल शासन करणारा आहे आणि सर्वभावे दास्य करील, त्याच्यावर अनुग्रहही करणारा आहे. दास्यभावनेत देवाची आवड तीच भक्ताचीही होते. या सेव्यसेवकभावात भयाचाही काही अंश असतो. कारण ईश्वर हा त्याला विशेषत्वाने शासकरूपातच प्रतीत होत असतो.

काही लोक, विशेषतः ख्रिस्ती लोक, प्रभूला आपला पिता मानून त्याची उपासना करतात. पितृत्वभावना ही दास्यभावनेपेक्षा अधिक जवळची आहे. पुत्राला पित्याचे आकर्षण वाटते, तो त्याच्या जवळ जायला धडपडतो, त्याच्या शाबासकीसाठी प्रयत्नशील राहतो; पण त्याचबरोबर एक अनामिक असा संकोचही पुत्राच्या अंतरात सतत जागृत असतो. पितृभावनेत भक्तालाही असाच संकोच किंवा मर्यादा जाणवते.

मातृभावना ही त्याहून वरची आहे. देवाला मायबाप म्हणणे आणि लेकराच्या भावनेने त्याच्या कुशीत रिगणे, तसेच त्याच्या वात्सल्याचा हृद्य अनुभव घेणे या गोष्टी देवाविषयीच्या मातृभावनेत प्राप्त होत असतात. या भावनेत भय आणि संकोच यांची नावनिशाणीही उरत नाही. हे जाणूनच महाराष्ट्रातल्या संतांनी आणि भक्तांनी विठ्ठलाला अनेकदा 'विठाई माऊली' म्हणूनच संबोधिले आहे.

तू माझी माऊली मी वो तुझा तान्हा ।
पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ।।

या तुकोबांच्या उक्तीत हाच लडिवाळ भाव प्रकट झालेला आहे. तान्ह्या मुलाला रडण्याव्यतिरिक्त दुसरे काहीही करावे लागत नाही. मग त्याची तहानभूक जाणून माऊलीच त्याचे सर्व काही करते. भक्ताची ही आर्त हाक प्रभूच्या वात्सल्याला जाग आणीत असते. रामानुज संप्रदायात मार्जारकिशोराचा दृष्टांत देऊन हे वात्सल्य विशद केले आहे.

दांपत्यभावना म्हणजेच ईश्वर माझा पती किंवा प्रियकर आणि मी त्याची पत्नी किंवा प्रेयसी. ही भावना मातृभावनेहूनही वरच्या दर्जाची आणि व्यापक आहे. मधुराभक्ती या नावाच्या प्रकारात हीच भावना परिपुष्ट केली जाते. प्रेम हा या भावनेतला स्थायी धर्म आहे. प्रेमाला दुरावा मुळीच आवडत नाही. ते सदैव जवळीक साधण्यासाठी, मिठी घालण्यासाठी आसुसलेले असते. व्रजातल्या गोपी, मीरा, आंडाळ या मधुरप्रेमाच्या स्निग्ध ज्योती आहेत.

भक्तीची शेवटची अवस्था म्हणजे स्वभाव होय. ज्ञानेश्वरांनी तिला आत्मनिवेदनाच्या तळवटीची अतएव श्रेष्ठ भक्ती म्हणून गौरविले आहे. 'देवाच्या सख्यत्वासाठी पडाव्या जिवलगांच्या तुटी,' असे ज्ञानेश्वर म्हणतात, ते सख्यभावाचे महत्त्व सांगण्यासाठीच होय. जीव हा ईश्वराचा शाश्वत सखा आहे. प्रकृतीरूपी विश्वावर जीव आणि ईश्वर दोघेही बसलेले आहेत. जीव त्या वृक्षाचे फल चाखू लागतो आणि परिणामतः ईश्वराच्या सख्यापासून तुटतो. जेव्हा तो साधना करता करता भक्तीच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक पायऱ्या चढून जातो, तेव्हा त्याला पुनश्च देवाशी सख्य जोडता येते. सख्यभावात दासाचे दूरत्व नाही, पुत्राचा संकोच नाही आणि पत्नीचा अधीनभावही नाही. ईश्वराचा सखा झालेला भक्त हा स्वाधीन असतो, मर्यादांच्या अतीत असतो आणि त्याचा श्रेष्ठ असा जिवलग असतो. वल्लभाचार्यांनी भक्तीचे मर्यादा, पुष्टी, इ. चार भेद मानले असून, त्यांत ते म्हणतात, की मर्यादाभक्ती ही कृष्णाधीन असते, तर पुष्टिभक्ती ही स्वाधीन असते. ही स्वाधीनता सख्यभावाचीच होय.

एका दृष्टीने पाहिले, तर भक्तिमार्ग हाच मुळी स्वाधीन आहे. भक्ताच्या अंतःप्रेरणेतून तो प्रकट होणारा आहे. किंबहुना तो निसर्गशुद्ध आहे. ज्ञानमार्गात मनबुद्धींना शुद्ध करण्यासाठी आणि बुद्धी व्यवसायात्मिक होण्यासाठी अनेक पथ्ये पाळावी लागतात. कर्ममार्गात शास्त्राधारे वर्तायचे असते, विधिनिषेध सांभाळायचे असतात. पण भक्तिमार्गात आचार्यप्रामाण्याची गरज नाही, श्रुतिप्रामाण्याचीही गरज नाही. तिथे फक्त स्वतःच्या अंतःकरणाचे प्रामाण्य असते. संतांच्या भाषेत सांगायचे, तर भक्ती हा देवाचा प्रसाद आहे. तो सेवन करण्याचा अधिकार सर्व मनुष्यमात्रांना आहे.

अवघिया पुरते ओसंडले पात्र ।
अधिकार सर्वत्र आहे येथे ।।

असे तुकोबा स्पष्टपणे सांगतात.

भगवद्भक्ती ही भक्ताला दिव्यतेच्या स्रोताशी संयुक्त करते. म्हणून भक्तीला भक्तियोग असेही म्हणतात. भक्तीच्या सर्व अंगांत भक्ताला पावन करणारी शक्ती असते. ही शक्ती त्याला 'पवित्राणां पवित्र' अशा प्रभूच्या संपर्कामध्ये नेऊन तिथे त्याला स्थिर करते. मग तो कृपाळू प्रभू भक्ताला दिव्य रसधारांनी अभिषेक करतो. मग त्याचे अंगअंग योग्याप्रमाणे दिव्यतेने चमकू लागते. जे तेज परमेश्वराचे तेच तेज त्याचे होते. प्रकृतीने त्याला देवापासून दूर केले होते, तिने त्या दोघांमध्ये आडपडदा धरला होता; पण भक्तीने प्रकृतीचा तो पडदा दूर करून जीवाला असंग व अनावृत केले आणि पुनश्च प्रभूशी अर्थात आत्मस्वरूपाशी मिळवून दिले. भक्तीच्या द्वारे भक्त आणि भगवान एकात्म आणि एकरस झाले. या एकात्मतेत आणि एकरसतेत भक्ताचे सकल काम पूर्ण झाले, तो निष्काम झाला, सर्वांगी तृप्त झाला. भक्तीचे तत्त्व ते हेच होय.

भक्तीचे तात्त्विक विवेचन वैष्णवाचार्यांनी विशेष रूपाने केले आहे. कारण सारे वैष्णव संप्रदाय हे भक्तिप्रधान संप्रदाय आहेत. भागवत पुराण हे भक्तीचेच एक महान स्तोत्र आहे. भगवद्गीताही भक्तिमार्गाची भलावण करणारी आहे. संस्कृत भाषेत विष्णुभक्तीपर अनेक श्लोकबद्ध संहिता निर्माण झाल्या आहेत. नारद व शांडिल्य यांनी सूत्रात्मक पद्धतीने भक्तीचे विवेचन केले आहे. रूपगोस्वामी यांचा भक्तिरसामृतसिंधू आणि उज्ज्वलनीलमणी व मधुसूदनसरस्वती यांचे भक्तिरसायन हे भक्तिमाहात्म्याचे बहुमोल ग्रंथ आहेत. वल्लभाचार्यांची सुबोधिनी नावाची भागवतावरील टीका व नारायणभट्ट यांची भक्तिचंद्रिका हे ग्रंथही भक्तिमार्गाचेच पुरस्कर्ते आहेत. मराठीत एकनाथमहाराजांनी भागवताच्या एकादशस्कंधावर ओवीबद्ध टीका लिहिली, तीही भक्तिप्रधान अशा भागवत धर्माच्या समर्थनासाठी आणि तो मार्ग आबालवृद्धांना, शिक्षित-अशिक्षितांना प्रशस्त करून देण्यासाठीच होय.

भक्तीचा उद्‌गम व विकास – भारतवर्ष भक्तिरसस्निग्ध असा देश आहे. भक्तीच्या मधुर व पवित्र धारेने त्याचा प्रत्येक भाषिक प्रदेश भिजलेला आहे. भारतात भक्तीचा उगम केव्हा आणि कुठे झाला, हा एक विचारणीय प्रश्न आहे. अनेक विद्वानांनी त्यासंबंधी चर्चा केलेली आहे. पाश्चात्य विद्वानांना भारतीय धर्म आणि साहित्य यांच्याशी जेव्हा परिचय घडला, तेव्हापासून त्यांच्यापैकी अनेकजण असे प्रतिपादीत आले आहेत, की भारतातील भक्तीची कल्पना ही ख्रिस्ती धर्माची देणगी आहे. ख्रिस्ती धर्मातच प्रथम भक्तीचा उदय झाला व ती तिथून भारतवर्षात प्रविष्ट होऊन सर्वत्र पसरली. तेव्हा भक्तीच्या बाबतीत भारतवर्षाने ख्रिस्ती धर्माचे ऋणी राहिले पाहिजे. पण या प्रश्नाची सांगोपांग समीक्षा केल्यानंतर पाश्चात्य विद्वानांचे ते आग्रही मत निर्मूल, निराधार व अप्रमाण ठरते.

प्रारंभापासून शोध घेणे सुरू केल्यास भक्तीचा उगम वेदांतच स्पष्टपणे दिसून येतो. वैदिक वाङ्मय हे जसे ज्ञान-कर्माचे उगमस्थान आहे, तसेच ते भक्तीचेही उगमस्थान आहे. धर्माच्या इतिहासाचे आलोडन केल्याअंती पुष्कळदा असे आढळून येते, की एखाद्या युगात एखाद्या सिद्धान्ताची उपोद्‌बलक सामग्री विद्यमान असते; पण त्या सिद्धान्ताचा नेमका निदर्शक असा शब्द मात्र निर्माण झालेला नसतो. शब्दाचा अभाव दिसला, की कित्येकदा त्याच्या सामग्रीचीही उपेक्षा होते. भक्तीच्या बाबतीतही तसेच घडले आहे. संहिता व ब्राह्मणे यांत प्रेमसूचक भक्ती या शब्दाचा सर्वथा अभाव आहे; पण या अभावामुळे वेदकालात भक्तिसिद्धान्ताची कोणाला कल्पनाच नव्हती, असे मानणे अप्रस्तुत ठरेल.

ऋग्वेद हा प्रामुख्याने स्तोत्रग्रंथ आहे. त्यातल्या बहुतेक सूक्तांत कोणत्या ना कोणत्या तरी देवतेची स्तुती असते. त्या स्तुतीत त्या त्या देवतेविषयीचा प्रेमभाव कोमल, भावुक आणि हृदयंगम असा असतो. स्तुती करताना तो ऋषी त्या देवतेशी माता, पिता, बंधू, मित्र, इ. नाती जोडतानाही दिसतो. अंतरात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रेम किंवा अनुराग असल्यावाचून ही गोष्ट घडणे शक्य नाही. ऋषींनी केलेली ही देवाची आळवणी नि.संशय भक्तीचीच द्योतक ठरते.

वैदिक भक्तिमार्ग हा ज्ञान, कर्म व उपासना यांचा त्रिवेणी-संगम आहे. कर्मासाठी ज्ञान आणि उपासना यांची गरज असते. ज्ञानासाठी कर्म आणि उपासना यांची गरज असते. तशीच उपासनेसाठीही ज्ञान आणि कर्म यांची गरज असते. उपासनेत ज्याची उपासना करायची, त्याची स्तुती व प्रार्थना या गोष्टी येतात. स्तुतीमध्ये देवतेचे गुणसंकीर्तन असते. प्रार्थनेत पापक्षालन, पुण्यसंचय, विजय आणि अभ्युदय यांच्यासाठी देवाकडे याचना केली जाते. वैदिक भक्तीत स्तुती, प्रार्थना व उपासना ही तीन्ही अंगे दाखल आहेत.

वैदिक ऋषी जेव्हा एखाद्या देवतेची स्तुती करू लागतो, तेव्हा तो त्या देवतेला अनंत, स्वयंभू, सर्वव्यापक, सर्वशक्तिमान, इ. गुणविशेषांनी सजवतो. देवाच्या अस्तित्वावर आणि त्याच्यावरील गुणविशेषांवर बळकट श्रद्धा असेल, तरच भक्ताची त्याच्याकडे प्रार्थना संभवते. ज्याच्यापाशी ऐश्वर्य, अभ्युदय, ज्ञान, पराक्रम, संपत्ती, संतती, इ. गोष्टी मागायच्या, तो देवही तितकाच सर्वसमर्थ असायला हवा. वैदिक ऋषींनी तसे मानले आहे आणि त्याच भावनेने त्याला आळवले आहे. दात्याजवळ देण्याजोगे अमाप असले, तरी याचकाला ते देण्याविषयी त्याच्या मनात कणव असली पाहिजे किंवा उत्पन्न झाली पाहिजे. प्रभूच्या ठिकाणी दीन-दुबळ्यांविषयी, याचकांविषयी अशी कणव सदैव असते, अशीही वैदिक ऋषींची श्रद्धा आहे. सामान्य त्रयस्थ व्यक्तीला एखाद्याविषयी दया किंवा अनुकंपा उत्पन्न होणे, यापेक्षा देव जर भक्तांचा माता किंवा पिता असेल, तर त्याची भक्तांविषयीची करुणा विशेष घनसांद्र असेल. वैदिक ऋषींनी म्हणूनच देवा-भक्तांचा पितापुत्र संबंध किंवा मातापुत्र संबंध निर्माण करून पुत्रभावनेनेही त्याला हाक मारली आहे.

जिवलग मित्र आपल्या प्रत्येक गोष्टीत आपल्याला साहाय्य करू शकतो. आपल्या सुख-दुःखात सहभागीही होऊ शकतो. मित्रावर आपला एक प्रकारचा अनामिक हक्कच असतो. या हक्काच्या बळावर मित्राला आपण आपल्या मदतीसाठी ओढून आणू शकतो. वैदिक ऋषींनी देवाकडे या मित्रभावनेनेही पाहिले आहे.

वरील सर्व भावना ज्या मंत्रांतून व्यक्त झाल्या आहेत, ते वैदिक मंत्र असे –

अनुत्तमा ते मघवन्नकिर्नु न त्वावाँ अस्ति देवता विदानः।
न जायमानो नशते न जातो यानि करिष्या कृणुहि प्रवृद्ध ॥
(ऋ. १.१६५.९)

अर्थ – हे परमैश्वर्यसंपन्न प्रभो, हे सर्वप्राचीन, सनातन आणि शाश्वत अशा परमेश्वरा, तुझ्या अस्तित्वाहून मोठे अस्तित्व या जगात कोणाचेही नाही. तुझी सत्ता हीच सर्वोपरी सत्ता आहे. तुझ्यासारखा कुणी ज्ञानी देवही नाही. तू जे काही करणार आहेस, ते या जगात जन्मलेल्या आणि पुढे जन्मणाऱ्या प्राण्यांमध्ये कोणीही जाणू शकणार नाही. तुझे व्यक्तिमत्त्व आणि तुझे ज्ञान अद्वितीय आहे.

त्वं हि विश्वतोमुख विश्वतः परिभूरसि ॥
(ऋ. १.९७.६)

अर्थ – हे अग्ने, तू विश्वतोमुख असून सर्व विश्वास व्यापून आणि त्याला व्यापून उरला आहेस.

त्वं हि नः पिता वसो त्वं माता शतक्रतो बभूविथ ।
अधा ते सुम्नमीमहे ॥
(ऋ. ८.९८.११)

अर्थ – हे शतक्रतो इन्द्रा, तू आमचा पिता आहेस. तू आमची माता आहेस. तुझ्यापासूनच आम्ही आनंदप्राप्तीची आकांक्षा करीत आहो.

सखा पिता पितृतमः पितॄणां ।
कर्तेमु लोकमुशते वयोधाः ॥
(ऋ. ४.१७.१७)

अर्थ – इंद्र हा उपासकांचा केवळ सखा आणि केवळ पिताच नाही, तर तो पितरांमध्येही सर्वश्रेष्ठ आहे.

तमु स्तोतारः पूर्व्यं यथा विद ऋतस्य गर्भं जनुषा पिपर्तन ।
आस्य जानन्तो नाम चिद् विवक्तन महस्ते विष्णो सुमतिं
भजामहे ॥ (ऋ. १.१५६.३)

अर्थ – या समस्त विश्वाला कारणभूत असणाऱ्या विष्णूची आपल्या मतीला अनुसरून स्तुती करा. तो ऋताचा गर्भ अर्थात वेदान्तवाक्यांचा प्रतिपाद्य आहे. त्याची स्तुती करण्याने जन्म टळतो. स्तुती करणे शक्य नसेल, तर त्याच्या नामाचाच उच्चार करा. आम्ही लोक विष्णूच्या तेजाची आणि त्याच्या गुणातीत रूपाची प्रेमलक्षणात्मक सेवा करीत आहो.

यः पूर्व्याय वेधसे नवीयसे सुमज्जानये विष्णवे ददाशति ।
यो जातमस्य महतो महि ब्रवत् सेदु श्रवोभिर्युज्यं चिदभ्यसत् ॥
(ऋ. १.१५६.२)

अर्थ – सर्वांत प्राचीन, नित्यनूतन, जगताचा निर्माता व स्वयमेव उत्पन्न अशा विष्णूसाठी जो द्रव्य समर्पण करतो किंवा आत्मसमर्पण करतो, जो त्या पूजनीय विष्णूचे कर्म कथन करतो अर्थात त्याचे कीर्तन करतो, तो त्याचा स्तोता व कीर्तिसंपन्न होऊन सर्वांना गंतव्य अशा परमपदाची प्राप्ती करून घेतो.

अशाच प्रकारचे मंत्र यजुर्वेद (२५.१८; ३६.९; २३.३; ३२.१०; ३६.२) व अथर्ववेद (१०.८.४४; ४.१६.२;

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१९,५२,३) इ. ठिकाणीही आढळतात.

ब्राह्मणयुगात उपासनेच्या क्षेत्रामध्ये भक्तीचे संकेत आढळतात. शतपथ ब्राह्मण हे एक महत्त्वाचे ब्राह्मण आहे. त्यात ज्ञान व उपासना या दोन्ही मार्गांची सामग्री उपलब्ध होते. गोपथ ब्राह्मणात तर भक्तीला ज्ञानाचा रस मानले आहे. ब्राह्मण-ग्रंथांच्या अनुशीलनाने असे दिसते, की तत्कालीन कर्मठांच्या मनातही श्रद्धेची भावना व प्रेमात्मक वृत्ती होती. आरण्यके चित्तवृत्तिनिरोधात्मक योगाचे महत्त्व सांगतात. भक्तिमार्गात योगाची काही तत्त्वे प्रविष्ट झाली आहेत, ती आरण्यकांतूनच होत. उपनिषदे ही ज्ञानाला प्राधान्य देणारी असली, तरी त्यांतही भक्तीची थोरवी कधी प्रच्छन्न, तर कधी उघडपणे गायिलेली दिसते. कठोपनिषदात ईश्वरी प्रसादाचे महत्त्व सांगताना पुढील मंत्र (१.२.२०) लिहिलेला आहे –

तमक्रतुः पश्यति वीतशोको । धातुः प्रसादान्महिमानमात्मनः ।।

अर्थ – निष्काम पुरुष जगत्कर्त्याच्या प्रसादाने आपल्या आत्म्याचा महिमा पाहतो आणि त्यामुळे शोकरहित होतो.

वैष्णव धर्मात प्रसाद या शब्दाला आणि वस्तूला नितांत महत्त्व आहे. हा प्रसादसंकेत कठोपनिषदातूनच भक्तिमार्गात दाखल झाला आहे, असे म्हणता येईल. भगवंताच्या प्रसादाला भागवताने पोषण असे म्हटले आहे (२.१०.४). हा पोषण-सिद्धान्त वल्लभाचार्यांनी आपल्या भक्तिमार्गाचा प्रधान सिद्धान्त बनवला आणि आपल्या संप्रदायाला पुष्टिमार्ग असे नाव दिले.

श्वेताश्वतर उपनिषदात पहिल्या प्रथम भक्ती हा शब्द आढळतो. तो मंत्र (६.२३) असा –

यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ।।

अर्थ – ज्याची देवाच्या ठिकाणी श्रेष्ठ भक्ती असते आणि जशी देवाविषयी तशीच गुरुविषयीही भक्ती असते, त्या महात्म्याला हे सांगितलेले अर्थ स्वतः प्रकाशित होतात.

या पराभक्तीलाच वैष्णव मतात प्रपत्ती म्हणून गौरविले आहे. प्रपत्तीत भगवान उपायही आहे आणि उपेयही (उपायाने प्राप्त होणारा) आहे. भक्ताने त्याला सर्वभावे केवळ शरण जायचे असते. त्याव्यतिरिक्त त्याला दुसरे काही कार्य नाही. भक्त असा प्रपन्न (शरणागत) झाला, की भगवान आपल्या निर्मल दयेने त्याचा उद्धार करतो. शरणागतीचा हा सिद्धान्त श्वेताश्वतर उपनिषदात (६.१८) स्पष्टपणे सांगितला आहे, तो असा –

यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वेदांश्च प्रहिणोति तस्मै ।
तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ।।

अर्थ – ज्याने पूर्वी ब्रह्मदेवाला निर्माण केले, ज्याने त्या ब्रह्म्यासाठीच वेदांचा आविर्भाव केला आणि जो आत्मबुद्धीच्या ठिकाणी प्रकाशित होतो, अशा त्या देवाला मी मोक्षाच्या इच्छेने शरण जातो.

भगवद्गीता हा वैष्णव धर्माचा म्हणजेच पर्यायाने भक्तिमार्गाचाही मान्यवर ग्रंथ आहे. भक्तीविषयीचे गीतेतले आदेश निःसंदिग्ध व ठसठशीत आहेत. उदाहरणार्थ पुढील दोन श्लोक (गीता १८.६५-६६) सांगता येतील –

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।।
सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।

अर्थ – हे अर्जुना, तू माझ्या ठायी मन ठेव. माझा भक्त हो. माझे यजन कर आणि मला वंदन कर. (म्हणजे) तू मलाच येऊन मिळशील, हे सत्यप्रतिज्ञेने मी तुला सांगतो. (कारण) माझा तू आवडता आहेस. सर्व धर्म सोडून तू मला एकट्याला शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. तू शोक करू नको.

ज्ञानापेक्षा गीतेत भक्तीलाच विशेष महत्त्व दिले आहे, असे लो. टिळकही म्हणतात. त्यांच्या मते " गीतेत जो गोडवेपणा, प्रेमळपणा किंवा रस भरला आहे तो त्यात प्रतिपादन केलेल्या भक्तिमार्गाचाच परिणाम होय. " वैदिक साहित्य, ब्राह्मणे, उपनिषदे व गीता एवढ्या साहित्यावर दृष्टिक्षेप केल्याअंती भक्तीचा सिद्धान्त हा वैदिक सिद्धान्त आहे, हे कळून येईल. भक्ती ही वैदिक का अवैदिक या प्रश्नाकडे प्राचीन आचार्यांचेही लक्ष गेले होते. नीलकंठ नावाचा महाभारताचा एक सुप्रसिद्ध टीकाकार होऊन गेला. त्याने मंत्ररामायण व मंत्रभागवत असे दोन ग्रंथ लिहून त्यांतील आख्यानांचे मूलरूप वैदिक मंत्रांच्या आधारे प्रमाणित केले आहे. भागवताच्या दशमस्कंधात वेदस्तुती (वेदांनी केलेली भगवंताची स्तुती) नावाचा एक भाग आहे. वेदस्तुतीच्या मते कर्म व ज्ञान यांच्याप्रमाणेच भक्तीचेही प्रतिपादन श्रुतींना विवक्षित आहे. या स्तुतीत वेदांतल्या अनेक मंत्रांचा अर्थ भक्तिपर लावलेला आहे. वेद हे मंत्रद्रष्ट्या ऋषींनी अनुभविलेल्या अनेक सत्यांचे अलौकिक भांडार आहे. पुढील कालात भारतामध्ये जे धार्मिक संप्रदाय व जी दार्शनिक मते विकसित झाली, त्यांची बीजे वेदांत आढळून येतात. या नियमाला भक्तीचाही अपवाद नाही. वेद हीच भक्तिमार्गाची जननी आहे, यात कोणताही संदेह नाही.

भागवत धर्म किंवा वैष्णव धर्म यानी विष्णुभक्तीचे माहात्म्य वाढविले. भागवत धर्माचा उगम पांचरात्र मतात आहे. त्या मताचे तपशीलवार निरूपण महाभारताच्या शांतिपर्वातील नारायणीयोपाख्यानात आले आहे. त्या उपाख्यानाचा सारांश असा –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यज्ञानुष्ठान किंवा जपतप यांच्या योगाने भगवंताची प्राप्ती होणे नाही. त्यासाठी त्याची भक्ती करायला हवी. त्याला अनन्यभावे शरण जायला हवे. भक्तिमार्गाची परंपरा सांगताना महाभारतात म्हटले आहे, ते असे –

सृष्टीच्या प्रारंभी विधात्याने दक्षप्रजापतीला भक्तिधर्माचा उपदेश केला. दक्षाने आदित्य, त्याने विवस्वान, त्याने मनू व त्याने इक्ष्वाकू याला हा धर्मोपदेश केला. इक्ष्वाकूने विश्वभर त्याचा प्रचार केला. हा धर्म महान, सनातन आणि सर्वश्रेष्ठ आहे. यद्यपि या धर्माचे तत्त्व समजणे आणि ते आचरणात आणणे कठीण असले, तरी भगवंताचे भक्त हे भक्तीलाच सदैव चिकटून राहतात.

पुढे गीतेत भक्तीला निश्चित असा आकार मिळाला. त्यानंतर तो एक संप्रदायच बनला. या संप्रदायाशी श्रीकृष्ण व त्याचे नातेवाईक यांचा संबंध जोडण्यात आला. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध या चौघांच्या रूपाने पांचरात्र मतात कृष्णप्रणीत भक्तिसंप्रदाय प्रतिष्ठा पावला. पुढच्या काळात कृष्णावरोबरच दाशरथी राम व अन्य अवतार हेही भागवत धर्माचे उपास्य बनले. त्या सर्वांना धरून पांचरात्रसंहितांचे विपुल साहित्य निर्माण झाले. अहिर्बुध्न्यसंहिता, ईश्वरसंहिता, कपिंजलसंहिता, जयाख्यसंहिता, इ. शेकडो संहिता निर्माण झाल्या. या संहितांची रचना उत्तर भारतात झाली आणि तिथून त्या दक्षिण भारतात गेल्या. तिथेही त्यांचा प्रसार झाला. त्यांच्या जोडीला दाक्षिणात्यांनीही काही संहिता निर्माण केल्या. हे समग्र पांचरात्रसाहित्य भक्तिमार्गाचे महत्त्व प्रतिपादणारे आहे.

दुसऱ्या अंगाने वेदांतल्या ऋषिप्रणीत भक्तिधर्माचा व्यापक प्रचार आणि प्रसार करण्यासाठी व्यासांनी पुराणे निर्माण केली. जे परम तत्त्व इंद्रिये, मन, वाणी आणि बुद्धी यांच्याही पलिकडे असल्याचे वेदोपनिषदांनी सांगितले, तेच परम तत्त्व पुराणांनी सौंदर्यमूर्ती आणि पतितपावन भगवान अशा स्वरूपात भक्तांच्या पुढे सगुणसाकार उभे केले. अठरा पुराणांतील जवळजवळ अर्धी पुराणे विष्णुभक्तीचा गौरव करणारी आहेत. भगवान भक्तीलाच पावतो आणि भक्तीनेच वश होतो, असा समग्र वैष्णव पुराणांचा उद्घोष आहे.

या सर्व पुराणांत भक्तिमाहात्म्याच्या दृष्टीने भागवत पुराण हे मुकुटमणी ठरते. भक्तिशास्त्राचा तो एक विशाल विश्वकोशच आहे. भागवताचा सिद्धान्त असा, की ज्ञान आणि कर्म ही जर भक्तीच्या रसाने स्निग्ध झालेली नसतील, तर ती उपेक्षणीय अथवा तुच्छ समजावी. भागवत पुराण म्हणते–

श्रेयःसृतिं भक्तिमुदस्य ते विभो
क्लिश्यन्ति ये केवलबोधलब्धये ।
तेषामसौ क्लेशल एव शिष्यते
नान्यद् यथा स्थूलतुषावघातिनाम् ।।

(भाग. पु. १०.१४.४)

अर्थ – हे भगवन, कल्याण प्राप्त करून देणारी तुझी भक्ती सोडून जो मनुष्य केवळ ज्ञानाच्या प्राप्तीसाठी जीवाला क्लेश देतो, त्याला परिणामीही क्लेशच प्राप्त होतात. तूस कांडणाऱ्या मनुष्याला तांदूळ न मिळता तूसच मिळायचे, तसाच तो प्रकार आहे.

भक्ती ही मुक्तीहूनही वरचढ आहे. कित्येक लोक मुक्तीलाच जीवनाचे अंतिम फल मानतात; पण भक्तांना तसे कधीही वाटत नाही. भगवद्भक्तांच्या घरी मुक्ती दासीबटकीसारखी राबत असते; पण भक्त तिच्याकडे ढुंकूनही पाहत नाहीत. मग भक्ताला हवे तरी काय असते ? तर केवळ ‘प्रियाणां प्रियतम’ अशा भगवंताची पादसेवा. चक्रवर्तित्व, स्वर्गाचे राज्य व ब्रह्मपदही त्यांना भक्तीपुढे तुच्छ वाटते (भाग. पु. ११.१४.१४).

ही वैष्णव पुराणे म्हणजे केवळ भक्तीचीच नव्हेत; तर असंख्य भक्तचरित्रांचीही भांडारे आहेत. अज्ञानी, सज्ञानी, राव, रंक, इतकेच नव्हे तर मनुष्येतर प्राणीही, या सर्वांना भगवद्भक्तीने कसे तारले, ते समजून घ्यायचे असेल तर ही वैष्णव पुराणे वाचावी.

वेदांच्या गंगोत्रीहून निघालेला हा भक्तिमार्ग अनेक साधनमार्गांपैकी एक म्हणूनच प्राचीन काळात राहिला. त्याला सर्वसामान्य जनतेचे आंदोलन असे स्वरूप प्राप्त झाले ते मध्ययुगात. ही घटना दक्षिण भारतात घडली. इ. स. च्या चवथ्या–पाचव्या शतकापासून तो दहाव्या शतकापर्यंत दक्षिणेत भक्तीच्या जणू लाटांवर लाटा उसळून आल्या. तमिळनाडमधले वैष्णव संत आळवार आणि शैव संत नायन्मार यांनी तिकडचे हे भक्तियुग प्रवर्तित केले. आळवार संख्येने बारा होते, तर नायन्मार त्रेसष्ट होते. या संतांनी आपापल्या उपास्य देवतांवर भक्तिरसाने ओथंबलेली हजारो पद्ये रचली आणि तिकडच्या समस्त जनतेला त्या भक्तीच्या सहस्रधार कारंजाखाली न्हाऊ घातले. आळवारांच्या भक्तिविषयक भावनेचे सार असे होते – भक्ती ही भगवंताच्या कृपेनेच प्राप्त होते. भगवंताच्या कृपेने मनुष्य अजेय बनतो. भगवत्प्रेम ही माणसाची सर्वांत मोठी संपत्ती आहे. श्रीविष्णू हा जगाचे आदिकारण असून ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय ही त्रिपुटी तोच आहे आणि तोच आमचे सर्वस्व आहे.

आळवारांच्या नंतर त्यांचेच भक्तिसूत्र धरून कित्येक आचार्य पुढे आले. त्यांनी तर्क आणि युक्ती ह्यांच्या द्वारे भक्तीची उपादेयता सिद्ध केली. रंगनाथमुनी, यामुनाचार्य, राममिश्र, रामानुज, मध्व, इ. त्यांची नावे आहेत. या आचार्यांनी आळवारांची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भक्ती आणि वेदप्रतिपादित ज्ञान-कर्म यांचा समन्वय केला. आळवारांच्या ठिकाणी हृदयाची अर्थात भावनेची अथांग संपत्ती होती, तर या आचार्यांच्या ठिकाणी बुद्धीचे प्राबल्य होते.

रामानुजांचा संप्रदाय हा विशिष्टाद्वैत या नावाने ओळखला जातो. हा भक्तिप्रधान संप्रदायच आहे. साधनमार्गात भक्तीचे माहात्म्य सांगताना रामानुज म्हणतात – भगवत्प्राप्तीच्या साधनांत भक्ती हे मुख्य साधन आहे. वैदिक कर्मांचे अनुष्ठान त्या भक्तीला साहाय्यक होते. भक्तीने प्रसन्न झालेला भगवान जेव्हा जीवाचे समस्त बंध तोडतो, तेव्हा त्याला ब्रह्मज्ञान आपोआप प्राप्त होते. भक्तीतही प्रपत्ती अर्थात संपूर्ण शरणागती ही श्रेष्ठ होय. जोवर जीव भगवंताला प्रपन्न होत नाही, तोवर त्याचे परम कल्याण होऊ शकत नाही.

मध्वाचार्य भक्तीचे विशदीकरण करताना सांगतात – परमेश्वराची भक्ती अमला म्हणजे निर्दोष असावी. स्वार्थाची भावना असणे, हा भक्तीतला सर्वांत मोठा दोष होय. बहुतेक माणसे संकटकाळी देवाकडे धाव घेतात व भक्ती करतात; पण ती खालच्या दर्जाची म्हणजेच हैतुकी भक्ती होय. अहैतुकी भक्ती हीच उच्चतम भक्ती समजावी. तिलाच अनन्याभक्ती असे म्हणतात. 'भक्त्या त्वनन्यया शक्यः' या गीतेतल्या श्लोकात (११.५४) श्रीकृष्णाने याच अनन्याभक्तीचे माहात्म्य सांगितले असून, तिलाच मुक्तीचा सर्वश्रेष्ठ उपाय म्हटले आहे.

वर जी हैतुकी भक्ती सांगितली, तिचे विवेचन करताना श्रीकृष्णाने गीतेत तिचे चार प्रकार सांगितले आहेत. पैकी पहिले तीन हे स्वार्थी भावनेचे असून, चवथा निःस्वार्थ अतएव सर्वश्रेष्ठ मानलेला आहे. श्रीकृष्ण सांगतो (गी. ७.१६–१७)–

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ।।
तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ।।

अर्थ – हे भरतश्रेष्ठ अर्जुना, चार प्रकारचे सुकृती लोक मला भजतात – (१) आर्त, (२) जिज्ञासू, (३) अर्थार्थी व (४) ज्ञानी. या सर्वांत ज्ञानी हा नित्य भगवंताशी जुळून राहिलेला आणि अनन्यभक्त असल्यामुळे विशिष्ट ठरतो. ज्ञानी भक्ताला मी अत्यंत प्रिय असतो व तो मला प्रिय असतो.

उत्तर भारतात भक्तियुगाचा प्रारंभ इ. स. च्या १५ व्या शतकात झाला. पुढे थोड्याच कालात भक्तीला जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. या युगात रामाश्रयी व कृष्णाश्रयी अशा भक्तीच्या दोन शाखा पुढे आल्या. रामशाखेचा उगम काशीत झाला, तर कृष्णशाखेचा उगम वृंदावनात झाला. कबीर व तुलसीदास हे रामाश्रयी शाखेचे दोन प्रमुख प्रतिनिधी होत. कबिराने रामाच्या निर्गुण भक्तीला प्राधान्य दिले आणि तुलसीदासाने सगुण भक्तीचा महिमा वाढविला.

भक्तिमार्ग हा रामानंदाने दक्षिणेतून उत्तरेत आणला आणि त्याचा प्रसार केला, असे मानतात.; पण श्री. बलदेव उपाध्याय यांच्या मते ही गोष्ट रामानंदाचा गुरू राघवानंद याने केली. राघवानंद हा प्रथम दक्षिणेत होता. तिथून उत्तरेस येऊन तो काशीत राहिला. तो रामाचा भक्त होता म्हणून त्याने काशीतून रामभक्तीचा पंथ वाढवला.

रामानंद हा राघवानंदाचा पट्टशिष्य होय. तो 'गुरूसे चेला सवाई' निघाला. त्याच्याजवळ विद्वत्ता, कर्तृत्व, संघटना कौशल्य, इ. अनेक गुण होते. त्याने आपल्या गुरूचा रामभक्तिपंथ खूप वाढविला. त्यामुळे राघवानंदाचे नाव लुप्त झाले व उत्तरेतल्या भक्तिमार्गाचा जनक म्हणून रामानंदाचे नाव पुढे आले.

रामानंदाच्या काळात इस्लामी अत्याचारांनी उत्तर भारताची ससेहोलपट चालली होती. इस्लामच्या प्रतिदिनी वाढणाऱ्या छळवादामुळे सारी हिंदू जनता त्रस्त, उद्विग्न व घायाळ झाली होती. तिला कोणी त्राता उरला नव्हता. रामानंदाला हे सारे दिसत होते; पण तोही त्या अत्याचारांचा प्रतिकार करू शकत नव्हता. अशा वेळी त्याला वाटले, की राक्षसांचे स्वपराक्रमाने मर्दन करणारा कोदंडधारी राम यानेच आता हिंदूंना रक्षायचे, सांभाळायचे. म्हणून त्याने लोकांना रामभक्तीचा उपदेश सुरू केला. निराधार आणि पददलित अशा हिंदू जनतेला त्यामुळे धीर मिळाला, दिलासा मिळाला व लोक रामभक्तीच्या मार्गाला लागले.

रामानंद हा विशिष्टाद्वैत मताचा अनुयायी होता. रामानुज संप्रदायात विष्णूचा द्वादशाक्षरी मंत्र दीक्षामंत्र म्हणून समजला जात होता. रामानंदाने त्याच्या जागी 'रां रामाय नमः' हा षडक्षरी मंत्र निर्माण करून त्याचा उपदेश आरंभला. दक्षिणेतल्या श्रीवैष्णवांमध्ये रामभक्ती प्राचीन कालापासून सुरू होती; पण तिचा सर्वसामान्य जनतेत प्रचार नव्हता. रामानंदाने ती रामभक्ती जननेतल्या खालच्या थरापर्यंत नेऊन पोचविली. सीता व लक्ष्मण यांच्यासह श्रीराम त्याने उपास्य बनवला. त्याने रामाला ईश्वर, सीतेला प्रकृती व लक्ष्मणाला जीव मानले. रामानंदाने भक्तीचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे –

मुक्तीचे साधन होणारा एकच परम पदार्थ आहे आणि तो म्हणजे भक्ती. ज्या प्रकारे तैलधारा अविच्छिन्न रूपाने प्रवाहित होते, त्या प्रकारे भगवंताच्या ठिकाणी प्रेमप्रवाह अविरत वाहवणे आणि त्याचे नित्य स्मरण करणे म्हणजे भक्ती होय. या भक्तीची सात अंगे आहेत, ती अशी –

(१) विवेक – दूषित व निंद्य आहारापासून सात्त्विक आहार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेगळा काढणे. सात्त्विक आहाराचे सेवन करणे.

(२) विमूक – कामनांविषयी अरती धरणे व विषयविकारांतून चित्त बाजूला काढणे.

(३) आभास – जगाचा निर्माता श्रीराम याचे निरंतन ध्यान.

(४) क्रिया – पंच महायज्ञांचे नित्य अनुष्ठान.

(५) कल्याण – सत्य, आर्जव, दया, दान, इ. गोष्टींचे संपादन.

(६) भगवद्भक्तीच्या मार्गाने जात असताना कोणत्याही दुःखाने किंवा विषादाने खचून न जाणे (अर्थात उत्साहीपणे भक्तिमार्ग आक्रमिणे).

(७) अनुद्धर्ष – भौतिक वस्तू व कौटुंबिक संबंध या गोष्टींत हर्ष न मानता त्यांच्यापासून दूर होणे.

रामानंदांच्या शिष्यमंडळीत तुलसीदासाचे नाव अग्रगण्य आहे. त्याचे रामचरितमानस हे रामभक्तीच्या रसाने ओथंबलेले असे एक प्रबंधकाव्य आहे. रामप्रभूचे शील, सौंदर्य आणि सामर्थ्य यांचे प्रत्ययकारी चित्रण करून तुलसीदासाने रामाचे लोकरंजक व लोकसंग्राहक असे उभयविध रूप प्रकट केले आहे. रामचरितमानसाच्या उत्तरकांडात ज्ञान व भक्ती यांच्याविषयी तुलसीदासाने जे विचार प्रकट केले आहेत, त्यांचे वरवर अवलोकन केले, तरी त्यात ज्ञानापेक्षा भक्तीला श्रेष्ठत्व दिल्याचे कळून येईल. ज्ञानदीपकाच्या प्रकाशाने पाहिल्यावर ज्ञान किती अगम्य आणि दुरूह आहे ते कळते. जो ज्ञानदीप लावण्यासाठी पराकाष्ठेचे परिश्रम करावे लागतात, तो ज्ञानदीप विघ्नांच्या वाऱ्याची लहानशी झुळुक आली, तरी विझून जातो; पण भक्तीचे तसे नाही. तिचा परम प्रकाश रात्रंदिवस पसरत राहतो. लोभाचा वारा त्याला विझवू शकत नाही. अविद्येचा अंधकार त्याच्या उजेडाने निपटून निघतो. ज्याच्या गाठीला भक्तीचा चिंतामणी आहे, त्याला कामक्रोधादी विकार स्पर्शही करू शकत नाहीत.

भक्तीच्या कृष्णाश्रयी शाखेत कालक्रमाने निंबार्क, वल्लभ, चैतन्य आणि राधावल्लभीय असे चार प्रमुख संप्रदाय निर्माण झाले. त्यांच्या तत्त्वज्ञान आणि उपासनापद्धतीत थोडाफार फरक असला, तरी परमेश्वराची अनन्यभक्ती हेच एकमेव मोक्षाचे साधन असल्याबद्दल ऐकमत्य आहे.

निंबार्क मतात प्रपत्ती किंवा शरणागती महत्त्वाची मानलेली आहे. जीव जोवर भगवंताला सर्वभावे शरण जात नाही, तोवर त्याचे कल्याण होणार नाही. शरण जाताक्षणीच शरणागतवत्सल अशा प्रभूचा जीवांवर अनुग्रह होतो. अंतरात देवाविषयी प्रेम निर्माण होणे ही सामान्य गोष्ट नव्हे. भगवान ज्याच्यावर दया करतो, त्याच्याच हृदयात प्रेम उत्पन्न होते. प्रेम हे भक्तीचे फल आहे. जेव्हा जीवाला भगवंताचा साक्षात्कार होतो किंवा भगवंताचे दर्शन होते, तेव्हा तो भगवद्भावांनी व्याप्त होतो आणि त्याचे क्लेश कायमचे दूर होतात. मग असा भक्त शरीरसंबंधात राहिला तरी त्याचा भगवद्भाव विघडत नाही.

वल्लभाचार्यांनी भक्तीविषयी जे सांगितले आहे, त्याचा सारांश असा – श्रीकृष्ण हे एकमेव शरणस्थान आहे. भक्ताने सदैव आणि सर्वत्र त्याचेच ध्यान-स्मरण करावे. गोकुलाधीश बालकृष्ण जर हृदयामध्ये येऊन वसला, तर माणसाच्या जीवनातल्या लौकिक आणि वैदिक सर्व क्रिया सार्थकी लागतात. भक्त जेव्हा सर्वात्मभावे स्वतःला प्रभुचरणी समर्पित करतो, तेव्हा मग त्याला योगक्षेमाचीही चिंता राहत नाही. त्याचे सारे जीवन मग प्रभूसाठीच शिल्लक राहते. भक्ताने भगवद्भजनात तन-मन-धन या तीहींचाही उपयोग करायला हवा. त्याने भगवंताबरोबरच त्याच्या भक्तांचीही सेवा करायला हवी.

भक्तीचे मर्यादा व पुष्टी असे दोन भेद होतात. भगवंताच्या चरणकमलांची भक्ती ही मर्यादाभक्ती व भगवंताच्या मुखकमलाची भक्ती ही पुष्टिभक्ती होय. मर्यादाभक्तीत फलाची अपेक्षा असते; पण पुष्टिभक्तीत ती नसते. मर्यादाभक्तीने सायुज्य मिळते, तर पुष्टिभक्तीने अभेदाचे ज्ञान होते. सूरदास हा पुष्टिमार्गी भक्त होता. त्याने कृष्णभक्तीची हजारो पद्ये रचली आहेत व त्यांत वात्सल्यभक्तीला अग्रस्थान दिले आहे. तुलसीदासाच्या रामचरितमानसाने जसे रामभक्तांना वेड लावले, तसेच सूरदासाच्या रसाळ आणि मधुर पद्यांनी कृष्णभक्तांना मुग्ध केले. म्हणूनच सूरदास हा कृष्णाश्रयी शाखेचा प्रमुख प्रतिनिधी ठरला आहे.

चैतन्यमतात भगवंताला वश करण्यासाठी भक्ती हेच सर्वश्रेष्ठ साधन असल्याचे म्हटले आहे. भक्ती ही संवित व ह्लादिनी या प्रभुशक्तींचे मिश्रण आहे. अतएव ती भगवद्रूपिणीच आहे. विधिभक्ती व रुचिभक्ती असेही भक्तीचे आणखी दोन भेद होतात. विधिभक्तीत भक्तिशास्त्रात सांगितलेल्या उपायांचे अवलंबन करायचे असते. रुचिभक्तीत भक्त आपल्या प्रियतमरूपात भगवंताचे ग्रहण करतो. व्रजगोपींनी कृष्णाची जी भक्ती केली, ती रुचिभक्तीच होय. चैतन्य मतात तर भक्ती हा पाचवा पुरुषार्थच मानलेला आहे. श्रीकृष्णाच्या चरणकमलांची सेवा करताना जो आनंदलाभ होतो, तो मोक्षालाही मागे टाकणारा असल्यामुळे, भक्ती ही पाचवा पुरुषार्थ ठरते.

राधावल्लभ संप्रदायात युगलसरकारांची अर्थात राधाकृष्णांची भक्ती सांगितली आहे. या भक्तीत विधीला स्थान नाही आणि निषेधाचा निरोध नाही. राधेच्या चरणकमलांची अनन्य उपासना हेच भक्तांचे उद्दिष्ट असते आणि क्रीडाकुंजात रमणाऱ्या राधा-कृष्णांची चाकरी करणे, हे त्यांचे प्रधान कर्म

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असते. माधुर्यरसाने (प्रिया-प्रियसमागमाचा आनंद) स्निग्ध असी ही राधावल्लभीय संप्रदायाची भक्ती विषयी जीवाच्या ज्ञानाच्या आणि शक्तीच्या आटोक्याबाहेरची आहे. जो मनुष्य संप्रदायात दाखल होऊन दीक्षा ग्रहण करतो, त्यालाच अशा प्रकारची भक्ती करण्याचा अधिकार प्राप्त होतो, असे ते मानतात. राधावल्लभीय संप्रदायात शृंगाररसानेही आपली सीमा गाठली आहे. त्या संप्रदायाचा शृंगार हा संभोगशृंगारापैकी आहे.

महाराष्ट्रातला वारकरी संप्रदायही भक्तिप्रधानच आहे. ज्ञानेश्वर हे त्याचा पाया व तुकाराम हा त्याचा कळस होय. पंढरपूरचा पांडुरंग हा वारकऱ्यांचे आराध्य दैवत आहे. पांडुरंग म्हणजेच सच्चिदानंद, श्यामसुंदर श्रीकृष्ण होय. तोच विठ्ठलरूपाने पंढरपुरी 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' राहिला आहे.

या संप्रदायाचे तत्त्वज्ञान अद्वैती आहे. उपनिषदातल्या 'एकमेवाद्वितीय ब्रह्म,' 'नेह नानास्ति किंचन', इ. वाक्यांच्या द्वारे प्रतिपादिलेल्या अद्वैत ब्रह्माच्या ठिकाणी वारकरी संतांची पूर्ण निष्ठा आहे; पण अद्वैती असूनही हा पंथ भक्तिप्रधान आहे. 'अद्वैती तो नाही माझे समाधान । गोड हे चरणसेवा तुझी ।' असे तुकोबा म्हणतात.

अद्वैतज्ञान आणि भक्ती यांच्यामध्ये पूर्ण सामंजस्य असल्याचे हा पंथ मानतो. अद्वैतावरची भक्ती हे याचे सूत्र आहे. अद्वैताची सिद्धी झाल्यावाचून शुद्ध भक्ती उत्पन्नच होऊ शकत नाही, असे वारकरी संत प्रतिपादितात. अद्वैताच्या भूमिकेवरून ही भक्ती करता येते, हे ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात पुढील ओवीने सांगितले आहे.

देव देऊळ परिवारू । कीजे कोरूनी डोंगरू ।
तैसा भक्तीचा वेव्हारू । का न व्हावा ।।

अर्थ – जर दगडाचा डोंगर कोरून त्यात देव, देवालय आणि भक्तपरिवार हे दगडाचेच निर्माण केले जातात, तर ब्रह्मात्मैक्यभावावर भक्तीचा व्यवहार व्हायला काय अडचण आहे ?

या पंथाला भगवंताची सगुण–निर्गुण दोन्ही रूपे मान्य आहेत. निर्गुण ब्रह्माच्या प्राप्तीसाठी वारकरी संत सगुण रूपाची उपासना करायला सांगतात आणि भगवंताचे नामस्मरण व भजन यांच्यावर जोर देतात. या पंथात ज्ञान व भक्ती यांचा परस्पर संबंध स्वीकारलेला आहे. एकनाथमहाराजांनी तो संबंध कसा आहे, ते पुढील अभ्रंगात सांगितले आहे.

भक्तीचे उदरी जन्मले ज्ञान ।
भक्तीने ज्ञानासी दिधले महिमान ।
भक्ती ते मूळ ज्ञान ते फळ ।
वैराग्य केवळ तेथिचे फूल ।।

भक्ती हा सिद्धपंथ आहे. भक्ती ही कधी न तुटणारी स्नेहग्रंथी आहे. तो देवाचा प्रसाद आहे, अशा प्रकारे तुकोबा भक्तीचे वर्णन करतात. प्राणिमात्राच्या कल्याणासाठी हा भक्तीचा राजमार्ग प्रशस्त, सुंदर आणि विनधोक्याचा आहे, असे सांगून ते उपदेश करतात –

न करी तपसाधन रे, मुक्तीचे सायास ।
जन्मोजन्मी हाचि गोड भक्तीचा रस ।।

जीवनातल्या श्रेष्ठ अवस्था भक्तिमार्गाच्या द्वारे प्राप्त होतात, असे त्यांचे निःसंदिग्ध सांगणे आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, इ. संतांच्या उपदेशांचे आणि प्रतिपादनांचे आलोडन करून श्री. भा. पुं. बहिरट हे त्यांचे सार पुढील परिच्छेदात सांगतात –

योगातील चांगल्या गोष्टी भक्तीत लाभतातच. नैतिक विकास, दीर्घोद्योग या गोष्टी भक्तीतही आहेतच. ईश्वरी प्रेमाला विमुख असणाऱ्या योगांतील गोष्टींचा भक्तीत त्याग केल्यामुळे जीवन सर्वांगसुंदर बनण्यास भक्तीच साहाय्य करते. सबळाकरिता योग व दुर्बळाकरिता भक्ती अशी काहींची समजूत आहे, ती चुकीची आहे. भक्ती ही येरा गबाळयाचे काम नसून, शूर अशी निष्ठाच आहे. भक्तासही निरनिराळ्या मोहास तोंड द्यावे लागते. परमार्थातील अनेक कर्मधर्मांचे संस्कार तोडावे लागतात. एकनिष्ठेने भक्तीचे निशाण हाती घेऊन मार्ग आक्रमावा लागतो. 'अत्यद्भुत भजनशौर्य' दाखवून 'भक्तिप्रतापे प्रतापवंत'पणाची ग्वाही द्यावी लागते. या साऱ्या गोष्टींत प्रभू पाठीराखा असतो व पावलोपावली सांभाळतो. संतांनी सर्व गोष्टींचा अनुभव घेऊन त्यांतील खाचाखोचा, लाभहानी लक्षात घेऊन निश्चित निर्णय दिलेला आहे. त्यांनी दाखविलेल्या राजमार्गाने प्रत्येक जीवाने जाण्यात परमलाभ व परमकल्याण आहे. [भ. वि.; भ. क.; ऋ. भ.]

भग (१) एक वैदिक देवता. हिच्या स्तुतिपर ऋग्वेदात एक संपूर्ण सूक्त (७.४१) असून, इतर साठ ठिकाणी तिचा उल्लेख आलेला आहे. भग शब्दाचा अर्थ 'देणारा' असा आहे व ही देवता ऐश्वर्य देणारी असल्याचे मानलेले आहे.

भग हा आदित्यसंघातील देव आहे. वसिष्ठाने त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे (ऋ. ७.४१.२) केले आहे –

प्रातर्जितं भगमुग्रं हुवेम वयं पुत्रमदितेर्यो विधर्ता ।
आध्रश्चिद् यं मन्यमानस्तुरश्चिद् राजा चिद् यं भगं भक्षीत्याह ॥

अर्थ – अदितीचा पुत्र असा हा आदित्य भगदेव उग्र, जयशील आणि संपूर्ण जगाला धारण करणारा आहे. दरिद्री आणि संपन्न लोकही धन किंवा ऐश्वर्य मिळावे, म्हणून त्याची प्रार्थना करतात. त्या भगाला आम्ही सकाळीच आहुती देतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भगाचा संबंध सवित्याशी जोडलेला आढळतो. भग हा उदयापूर्वीच्या सूर्याचे सौम्य स्वरूप आहे. सविता व सूर्य एकच असल्यामुळे भग आणि सविता हे आरंभी वेगळे असले, तरी पुढे भग सवित्यात विलीन झाला आणि त्याचा आदित्यसंघात प्रवेश झाला. उषेला भगाची बहीण असे म्हटले आहे (ऋ. १·१२३·५).

प्राशित्र नामक पुरोडाशाच्या तुकड्याकडे सूर्याच्या आज्ञेशिवाय याने पाहिले म्हणून हा अंध झाला, असे कौषीतकी ब्राह्मणात सांगितले आहे (६·१३). [वै. वा. भा. वि.; ओ. डे. रि. वे. लि.]

(२) दक्षाच्या यज्ञातील एक ऋत्विज. दक्ष शिवाची निंदा करीत असता, याने त्याला डोळ्यांनी संमतिदर्शक खूण केली. म्हणून वीरभद्राने याचे नेत्र बाहेर काढले. (भाग. पु. ४·५ १७–२०). मग हा शिवाला शरण गेला, तेव्हा त्याने याला 'तू मित्राच्या नेत्रांनी पाहशील' असा वर दिला. याला सिद्धी नामक स्त्री होती. [प्रा. च. को.]

(३) एक आदित्य. हा माघात प्रकाशतो. याला अकराशे किरण असतात.

(४) एकादश रुद्रांपैकी एक. [प्रा. च. को.]

भगत याला देवऋषी असेही म्हणतात. वैद्य, ज्योतिषी आणि मांत्रिक या नात्यांनी काम करणाऱ्या व्यक्तीला भगत ही संज्ञा आहे. खेडेगावात भगताची बऱ्याच प्रमाणात चलती असते. बहुतेक सर्व जातींत भगत असतात. त्यांच्या अंगात निरनिराळे देव येतात, अशी समजूत आहे. अंगात आले, की भगत आपले केस पिंजारून तालावर नाचतो किंवा नुसताच बैठकीवर बसून सर्व अंग व मान घुसळीत घुमू लागतो. लोक या घुमण्याला डांक वाद्याची साथ देतात व गाणीही म्हणतात.

बराच वेळ घुमल्यावर भगत आजाऱ्याला अंगारा, धुपारा किंवा औषध देतो. रुग्ण व्यक्तीवर एखाद्या देवतेचा कोप झाला असेल, तर कोंबडे बकरे बळी देऊन त्या देवतेला संतुष्ट करायला सांगतो. कुणाची गुरे किंवा काही वस्तू हरवल्यास त्याविषयी शकुनप्रश्न पाहतो व वस्तू कुठे सापडू शकेल, त्याच्या खाणाखुणाही सांगतो. निपुत्रिकांना किंवा गरजू लोकांना तो गंडे, दोरे व ताईत मंत्रून देतो. खेडेगावातील लोकांचा त्याच्यावर फार विश्वास असतो.

भगताला परंपरा असते. कुणालाही एकदम भगत होता येत नाही. ज्याच्या अंगात एखाद्या देवाचे वारे किंवा आवेश येतो, तो भगत होऊ शकतो. अशा वेळी तो त्याच देवाचे वारे येणाऱ्या दुसऱ्या भगताकडे जातो व त्याच्याकडून भगतीची दीक्षा घेतो. या दीक्षा घेण्याला गेनमाळ टाकणे, असे नाव आहे. गेनमाळ म्हणजे ज्ञानमाळ होय. गुरू या नवीन शिष्याच्या गळ्यात एक फुलांची माळ घालतो व भगतीचे काही संकेत, काही परिभाषा व विधी यांची त्याला माहिती देतो.

भगत ही समाजाच्या प्रारंभिक अवस्थेतील एक आवश्यक बाब होती. विज्ञान आणि वैद्यक या शास्त्रांचा त्या काळी प्रारंभही झाला नव्हता. अशा वेळी माणसे काही दुखले खुपले, की देवाकडे वळत. देव आणि गरजू व्यक्ती यांच्यांत मध्यस्थीचे काम भगत करी. तेवढे छांछूचे ज्ञान त्याने पैदा केलेले असे. काही ठोकताळ्याची औषधेही त्याला माहीत असत. पुढे जसजसे वैद्यकशास्त्र प्रगत होऊ लागले, तसतसा सुशिक्षित समाजाचा भगतावरचा विश्वास कमी झाला. ग्रामीण व आदिवासी जनतेत अजून शिक्षणाचा व्हावा तसा प्रसार न झाल्याने अजूनही भगत ही संस्था चालते. आदिवासी लोकांत प्रत्येक जमातीचे भगत असतात व त्यांचे प्रस्थही बरेच असते. [श्री. भं. रं. कुळकर्णी— आजच्या हिंदू जीवनातील ध्रुव-वस्तीचे अवशेष – राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथमाला, ग्रंथ ८ वा, ऐतिहासिक लेख, चर्चा.]

भगतनृत्य उत्तर प्रदेशातील एक लोकनृत्य. नवरात्राच्या दिवसांत या नृत्याचे कार्यक्रम होतात. हे पुरुषप्रधान नृत्य आहे. उत्तर प्रदेशात दुर्गादेवीची पूजा मोठ्या प्रमाणावर चालते. या वेळी देवीचे भगत रात्रीच्या वेळी गीते गात हे नृत्य करतात. या नृत्यसंघातील एकच व्यक्ती हाताला आणि कमरेला घुंगरू बांधते व नाचते. या वेळी संघातील अन्य व्यक्ती देवीच्या स्तुतिपर गीते गातात. [भा. लो. नृ.]

भगत पंथ उ. भारतातील एक संप्रदाय. काही शीख लोक या संप्रदायाचे अनुयायी आहेत. यांची वस्ती बन्नू जिल्ह्याच्या पहाडपूर भागात आणि डेराइस्माइलखाँ या तालुक्यात आढळते. या सांप्रदायिकांमध्ये विवाह व मृत्यू यासंबंधी विशेष विधी नाहीत. लग्नप्रसंगी ग्रंथसाहेबातला काही भाग वाचल्याने त्यांचा विवाहसोहळा पुरा होतो. मृत्यूनंतर काही दिवस त्याच ग्रंथातील काही अंश वाचण्यात येतो. हे लोक मृताला पुरतात. सोवळ्या-ओवळ्याचा विचार ते कधीच करीत नाहीत. मूर्तिपूजा, श्राद्ध, व्रत, तीर्थ यांचे त्यांना वावडे आहे. नित्य प्रार्थना हेच या संप्रदायाचे प्रमुख कर्म होय. दिवसातून सहा वेळा ही प्रार्थना केली जाते. प्रार्थनेच्या वेळी आठ वेळा उठणे, आठ वेळा बसणे आणि आठ साष्टांग नमस्कार घालणे असा विधी असतो. मुसलमानांच्या नमाजाचे अनुकरण या प्रार्थनेत स्पष्ट दिसते. [उ. भा. सं. प.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भगवत मुदित (१५९३–१६६३ इ. स.) एक चैतन्यमतानुयायी भक्तकवी. हा आग्रानिवासी माधव मुदित याचा मुलगा असून, वृंदावनवासी हरिदासाचा शिष्य होता. आग्र्याचा सुभेदार शुजाउल्मुल्क याचा हा दिवाण होता, असे सांगतात. ब्रजवासी साधूसंतांना हा उदार मनाने धन देत असे. याची आपल्या गुरूवर आत्यंतिक निष्ठा होती.

हा चैतन्यमतानुयायी असूनही त्याची राधा-वल्लभीय रससिद्धान्तावर श्रद्धा होती. हा राजकीय उलाढालीत गढलेला असला, तरी त्याचा मनोधर्म भक्तकवीचा होता. याच्या नावावर पुढील ग्रंथ आहेत – (१) हितचरित्र (२) सेवकचरित्र (३) रसिक अनन्यमाल आणि (४) वृंदावनशतकटीका. पण या चारांपैकी हितचरित्र ही उत्तमदासाची कृती मानतात आणि सेवक चरित्र ही स्वतंत्र रचना नसून, रसिक अनन्यमाल या ग्रंथाचाच एक भाग असल्याचे सांगतात. याशिवाय, त्याने अनेक स्फुट पदेही रचली आहेत. या पदांमधील प्रिया म्हणजे राधा आणि प्रियतम म्हणजे कृष्ण होय. [चै. म. ब्र. सा.]

भगवती भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक ग्रामदेवता. ही देवता भग म्हणजे ऐश्वर्य देणारी आहे, असे समजतात. हिचा पुजारी बहुधा गुरव असतो. कोकणात घामापूर येथे व गोव्यात माशेल, खांडोळे, मांद्रे, तुये, पेडणे व पंचवाडी या ठिकाणी भगवतीची मंदिरे आहेत. त्यांपैकी खांडोळे व माशेल येथील भगवतीचे ध्यान महिषासुरमर्दिनीचे असून, मूर्ती काळ्या पाषाणाची आहे. गोमंतकातील भगवतीच्या सर्व देवस्थानांत अनेक उत्सव व जत्रा होत असतात.

केरळात ही देवता अत्यंत लोकप्रिय आहे. केरळातील प्रत्येक गावात हिचे मंदिर असते. हिला महालक्ष्मी, महासरस्वती, महाशक्ती, कन्याकुमारी, गौरी, अंबा, पार्वती, इ. अनेक नावांनी ओळखतात. उग्र रूपात या देवीला महाकाली किंवा चामुंडी म्हणतात. साथीचे रोग व भूतबाधा यांचे निवारण होण्यासाठी तिकडील लोक हिची उपासना करतात.

केरळात कर्क (आषाढ) महिनाभर भगवतीची पूजा करण्याची पद्धत आहे. त्याच्या आधीच्या मिथुन (ज्येष्ठ) महिन्याच्या शेवटच्या दिवशी सूर्याचे उत्तरायण संपते. त्यापूर्वी केरळी लोक साफसफाईचे काम सुरू करतात. शेतातील तण उपटणे, धान्याची कोठारे झाडणे, घर झाडून – सारवून लख्ख करणे, अशा प्रकारचे ते काम असते. महिन्याच्या अखेरच्या दिवशी संध्याकाळी घरातला नोकर एका फुटक्या मडक्यात घरातला केर भरतो व त्यात जुनी केरसुणी ठेवून, एका हातात मडके व दुसऱ्या हातात पेटलेला दिवा घेऊन घराभोवती प्रदक्षिणा घालतो आणि ते केराचे मडके फेकून देतो. ज्येष्ठादेवी (अवदसा) त्या केराबरोबर निघून जाते, अशी लोकांची समजूत आहे. त्या नोकराला त्या दिवशी घरात येऊ देत नाहीत. सर्व घरात गंगाजल शिंपडून ते शुद्ध करतात व मग देवापुढे दिवा लावतात. नंतर देवघरात देवीच्या स्वागताची तयारी करतात व तिथे दिवा, तर्पणासाठी जलपात्र, साडी, आरसा, हळदकुंकू, काजळ, अक्षता, भात, एक पोथी, आसन, देवीला वाहण्यासाठी दहा प्रकारची पत्री, इ. वस्तू मांडून ठेवतात. दुसऱ्या दिवशी स्नान वगैरे आटपून घरातील सर्व लोक घरात भगवतीची पूजा करतात व नंतर जवळच्या भगवतीच्या मंदिरात जातात. स्थानिक रीतिरिवाजांनुसार ही पूजा सात ते तीस दिवस चालते. पूजा झाल्यावर स्त्रिया रामायण किंवा देवीमाहात्म्य वाचतात. या दिवसांत स्त्रिया आपल्या केसांत दशपुष्पे या नावाने दहा प्रकारची पत्री माळतात. ती पाने विष्णू, कामदेव, लक्ष्मी, वरुण, रुद्र, पार्वती, इ. देवतांची प्रतीके असतात व ती माळल्याने त्यांचा आशीर्वाद मिळतो, अशी समजूत आहे. [भारती, ४ नोव्हें. १९५६; सो. चें. म.]

भगवती आराधना दिगंबर जैन संप्रदायाचा एक प्राचीन ग्रंथ. पूर्वाचार्यांच्या ग्रंथांचा आधार घेऊन पाणितलभोजी शिवार्य किंवा शिवकोटी यांनी हा ग्रंथ रचला. यात २१६६ (किंवा २१७०) गाथा असून, त्या ४० अधिकारांत विभागलेल्या आहेत. ग्रंथाची भाषा प्राकृत किंवा जैन-शौरसेनी आहे.

या ग्रंथात सम्यग दर्शन, सम्यग ज्ञान, सम्यक चरित्र व सम्यक तप या चार आराधनांचे विवेचन आहे. यात मुख्यत्वे मुनिधर्माचे वर्णन आहे. ग्रंथाच्या आरंभी मृत्यूचे सतरा प्रकार सांगितले असून,त्यांत पंडितपंडितमरण,पंडितमरण व बालपंडितमरण हे प्रकार श्रेष्ठ म्हणून सांगितले आहेत. लिंग अधिकारात आचेलक्य, लोच, देहाच्या ममत्वाचा त्याग व प्रतिलेखन (मयूरपिच्छधारण) ही चार निर्ग्रंथांची लिंगे सांगितली आहेत. अनियतविहार अधिकारात नाना देशांत विहार करीत असताना तियले रीतिरिवाज, भाषा व शास्त्रे यांत प्रावीण्य मिळवायला सांगितले आहे. तसेच या ग्रंथात साधूंच्या वसतियोग्य स्थानांचे लक्षण, भोजनाची शुद्धता, कषायांचा त्याग, आर्यिकांच्या सहवासाचा त्याग, इ. अनक विषय आलेले आहेत.

या ग्रंथावर अनेक प्राकृत व संस्कृत टीका लिहिल्या गेल्या आहेत. माथुरसंघीय अमितगतीने या ग्रंथाचा संस्कृत पद्यांत अनुवाद केला आहे. तसेच पं. सदासुख काशलीवाल यांनी या ग्रंथावर भाषावचनिका नामक टीका लिहिली आहे. [प्रा. सा. इ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भगवतीदास (१) (इ. स. चे १७ वे शतक) एक हिंदी जैन कवी. याचा जन्म अंबाला जिल्ह्यातील बूढिया नामक गावी झाला. याचे उपनाव अग्रवाल व गोत्र बंसल होते. हा मोठेपणी दिल्ली येथे येऊन राहिला. तिथल्या भट्टारक महेंद्रसेनाला त्याने आपला गुरू केले. आपल्या प्रत्येक काव्यात त्याने गुरूचा नामोल्लेख केला आहे. याच्या पंचवीस काव्यकृती उपलब्ध आहेत. त्यांपैकी मृगांकलेखाचरिऊ हे काव्य अपभ्रंश भाषेत असून, बाकीची हिंदी भाषेत आहेत. त्याचे काव्य आध्यात्मिक व भक्तिपर आहे. त्याच्या मुगति-रमणीचुनडी या रूपककाव्यात मुक्तिरमणीची चुनडी ज्ञान-रूपी जलात भिजवून सम्यक्त्वरूपी रंगात रंगविली असल्याचे सांगितले आहे.

लघुसीतासतू या काव्यात रावणाची पत्नी मंदोदरी व सीता यांचा संवाद आहे. मंदोदरी सीतेला रावणाशी रममाण होण्याचा उपदेश करते; पण सीता आपल्या सतीत्वावर दृढ राहून त्या गोष्टींचा इन्कार करते, असे त्यात सांगितले आहे.

त्याने अनेकार्थनाममाला नामक एक कोशग्रंथ रचला असून, त्यात अनेकार्थक बरेच शब्द पद्यबद्ध केलेले आहेत. याशिवाय मनकरहारास, जोगीरास, टंडाणारास, पखवाडारास, इ. बरीच रासकाव्येही त्याने रचली आहेत. [हिं. सा.; हिं. जै. भ. क.]

(२) (इ. स. चे १७ वे शतक) एक हिंदी जैन कवी. हा भैया भगवतीदास या नावाने प्रसिद्ध आहे. आग्रा येथे एका श्रीमंत ओसवाल कुलात याचा जन्म झाला. याचे प्राकृत व संस्कृत या भाषांवर चांगले प्रभुत्व होते. हिंदी, गुजराती, बंगाली, उर्दू व फारसी या भाषाही त्याला अवगत होत्या.

त्याने अनेक काव्ये रचली आहेत. त्याच्या काव्यात आध्या-त्मिकता व भक्ती यांचा सुरेख संगम झालेला आहे. त्याची भाषा सरल व अर्थवाही आहे. ब्रह्मविलास नामक त्याच्या ग्रंथात त्याच्या चेतनकर्मचरित्र, बावीस परीषह, मूढाष्टक, मनबत्तीसी, जिनपूजाष्टक, तीर्थंकरजयमाला, परमात्मछत्तीसी, इ. सदुसष्ट रचनांचे संकलन केलेले आहे.

भगवंताचे नामस्मरण केल्याने हृदय भगवद्गुणांनी युक्त होते, त्यात सद्वृत्ती उत्पन्न होतात आणि ते सांसारिक सुख-दुःखापासून मुक्त होते, असे तो सांगतो. [हिं. जै. भ. क.]

भगवतीसूत्र जैन आगमांतील एक अंग. या ग्रंथाला वियाह-पण्णत्ती (व्याख्याप्रज्ञप्ती) असेही एक नाव आहे. यात जीवादी पदार्थांच्या व्याख्यांचे निरूपण (प्रज्ञप्ती) असल्यामुळे याला व्याख्याप्रज्ञप्ती असे नाव मिळाले. या व्याख्या प्रश्नोत्तररूपाने आलेल्या आहेत. गौतम गणधर हा भगवान महवीराला जैन सिद्धान्तांबद्दल प्रश्न विचारतो व भगवान महा-वीर त्या प्रश्नांची उत्तरे देतो, असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. या ग्रंथात एकूण ४१ शतके असून, प्रत्येक शतकात अनेक उद्देशक आहेत. अभयदेवाच्या मते यात एकूण ३६ हजार प्रश्न व २ लाख ८८ हजार पदे आहेत. [प्रा. सा. इ.]

भगवान (१) ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान व वैराग्य या षड्गुणांना भग असे म्हणतात. ते ज्याच्या ठिकाणी आहेत, त्याला भगवान म्हणायचे. भागवत धर्मात श्रीकृष्ण आणि विष्णू यांना भगवान अशी संज्ञा आहे.

(२) गोंड आणि परधान लोकांचा सर्वश्रेष्ठ देव. त्यांच्या पुराणात भगवान हा सृष्टीचा व प्राणिमात्रांचा निर्माता असल्याचे सांगितले आहे. [प. अ. न. व्हें]

भगीरथ इक्ष्वाकू वंशातील एक राजा. हा अंशुमानाचा पौत्र व दिलीपाचा पुत्र होता. अंशुमानाचा पितामह सगर याचे साठ हजार पुत्र कपिल मुनीच्या शापाने दग्ध झाले होते. त्यामुळे त्यांना सद्गती मिळाली नव्हती. त्यांच्या रक्षेवरून गंगा वाहील, तेव्हाच ते उद्धरतील, असे कपिल मुनीने सांगितल्यावरून अंशुमान व दिलीप यांनी स्वर्गातल्या गंगेला पृथ्वीतलावर आणण्यासाठी तप केले. पण त्यांचा प्रयत्न सफल झाला नाही. त्यांच्या मागून भगीरथ त्या प्रयत्नाला लागला. त्याच्या उग्र तपाने गंगा त्याच्यावर प्रसन्न झाली. तिने दर्शन देऊन भगीरथाला सांगितले, की मी तुझ्यासाठी पृथ्वी-वर येते. पण स्वर्गातून खाली पडणारा माझा प्रवाह धारण करण्याकरता तू शंकराला प्रसन्न करून घे.

मग भगीरथाने त्यासाठी शंकराची आराधना केली. शंक-राने प्रसन्न होऊन गंगेचा प्रवाह आपल्या जटासंभारात धारण केला व आपला एक केस तोडून गंगेच्या प्रवाहाला वाट करून दिली. गंगेच्या या प्रवाहाला अलकनंदा असे नाव पडले. नंतर भगीरथाने गंगेला आपल्या मागून यायला सांगितले आणि ज्या ठिकाणी सगरपुत्रांची राख पडली होती, त्या ठिकाणी गंगाप्रवाह नेऊन त्याने त्यांचा उद्धार केला. याच्या नावा-वरूनच गंगेला भागीरथी असे दुसरे नाव मिळाले व तिला भगीरथाची कन्या मानू लागले.

भगीरथ हा अत्यंत धार्मिक व दानशील होता. त्याने भागी-रथीच्या तीरावर अनेक घाट बांधले. तसेच त्याने अनेक यज्ञ करून हजारो गाई दान दिल्या. तो अपार दक्षिणा देत असे. त्याला नभ किंवा नाभाग व श्रुत असे दोन पुत्र होते. त्याच्या नंतर श्रुत गादीवर बसला. [प्रा. च. को.; पु. वि.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भगोता सिद्ध राजस्थानमधील एक ग्रामदेव. या देवाचे मंदिर नसते. त्याचे ठाणे गावाच्या बाहेर अथवा एखाद्या जंगलात असते. निरनिराळ्या गावांतून याचे उरूस भरतात. त्या वेळी याची गाणी म्हटली जातात. या गाण्यांवरून त्याची कथा समजते, ती अशी–

भगोता सिद्ध हा एक मेंढपाळ होता. तो एकदा मेंढ्या चारीत असता सर्पदंश होऊन मृत्यू पावला. कालांतराने तोच भगोता सिद्ध या नावाचा ग्रामदेव बनला. [मरु-भारती, आक्टो. १९५५]

भजन भक्तीचा एक प्रकार. टाळ, मृदंग, वीणा, इ. वाद्यांच्या साथीवर सामुदायिक रीत्या तुकाराम, ज्ञानेश्वर, निळोबा, एकनाथ, इ. संतांचे अभंग, गौळणी वगैरे म्हणणे, याला महाराष्ट्रात भजन असे नाव आहे. गुजरात व राजस्थान या प्रदेशांत मीराबाईची भजने म्हटली जातात. भजन म्हणणारे जे निरनिराळे गट असतात, त्यांना भजनी मंडळे असे म्हणतात.

प्रत्यक संप्रदायाची भजनाची पद्धत वेगवेगळी असते. वारकरी संप्रदायात सकाळी, दुपारी व संध्याकाळी असे तीन वेळा भजन करण्याची रीत आहे. सकाळच्या भजनाची सुरुवात बहुधा 'जय जय रामकृष्णहरी' या मंत्राने करतात; पण काहीजण ती ज्ञानेश्वर माऊलीच्या उच्चारानेही करतात. मराठवाड्यात मात्र 'भानुदास एकनाथ' म्हणून भजनाला प्रारंभ करतात. त्यानंतर 'रूप पाहता लोचनी' हा ज्ञानेश्वरमहाराजांचा अभंग म्हणतात. ही पहिली मालिका असून, तिच्यात दहा अभंग आहेत. यानंतर 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी' या तुकाराममहाराजांच्या अभंगाने दुसरी मालिका सुरू होते. तिच्यातील दहा अभंग झाल्यावर भूपाळ्या आणि वासुदेव, आंधळा, पांगळा, मुका, बहिरा, जोगी, बाळछंद, जाते, दळण गौळणी इ. भारुडांतले पद्यप्रकार म्हणतात.

दुपारच्या भजनाच्या वेळी हरिपाठाचे अभंग म्हणतात व नंतर गुरुपरंपरेचे अभंग म्हणतात. 'अवघाचि संसार सुखाचा करीन' या अभंगाने ही परंपरा संपते. मग काही निवडक अभंग म्हणतात. त्यानंतर विनवणीचे अभंग व शेवटी आरत्या म्हणतात. त्यांत प्रथम पांडुरंगाची व नंतर ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ यांच्या आरत्या असतात. शेवटी ज्ञानदेव-तुकारामांच्या घोषात भजन संपते.

वारकरी संप्रदायाच्या भजनात निरूपण नसते. भजनाचा हा क्रम हैबतीबाबांनी ठरवून दिला आहे, असे सांगतात. या भजनात संगीतापेक्षा भक्तिभावाला अधिक महत्त्व असते. नित्य भजन केल्याने हरिप्रेम दृढ होते व वासना-विकारांवर जय मिळवता येतो, अशी वारकरी लोकांची समजूत आहे.

पंढरपूरच्या वारीच्या वेळी भजनाला फार महत्त्व असते. प्रत्येक दिंडीत एक वीणावारी व एक मृदंगवादक असतो. पालखी रस्त्याने चालत असता, प्रत्येक दिंडीत टाळ, मृदंग यांच्या साथीवर भजन चालू असते. या भजनातील अभंगांतूनच वारकऱ्यांचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रांत होतो. वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे ज्ञान या अभंगांच्या द्वारेच वारकऱ्यांना मिळते. अनेक अभंग रोज अनेक वेळा म्हटल्यामुळे ते वारकऱ्यांना मुखोद्गत होतात. तसेच अभंगांच्या गायनामुळे वारकऱ्यांचे मन व हृदय ही दोन्ही पंढरपूरला पोचेपर्यंत भक्तिभावाने भरून जातात. संसाराच्या काळजीतून तात्पुरती तरी त्यांची सुटका होते. त्याचप्रमाणे ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबा, जनाबाई, इ. संतांचे अभंग हे लिहितावाचता न येणाऱ्या हजारो लोकांपर्यंत पोचतात.

पालखीच्या वाटेत जे अभंग गातात, त्यांचा क्रम ठरलेला असतो. पालखी चालू असता सकाळी व दुपारी असे दोनदा भजन होते. पालखीची वाटचाल सुरू झाली, की दिंडीतील वीणाधारी पुढारी, 'रूप पाहता लोचनी' हा पहिल्या मालिकेतील पहिला अभंग सुरू करतो. त्यानंतर, 'वचन ऐका, तुज पाहता सामोरी, तुम्ही सनकादिक संत, आता तुम्ही कृपावंत, लेकुराचे हित, करुनि उचित, न करी उदास, गरुडाचे पायी व ये ग ये ग विठाबाई,' हे अभंग म्हणतात. इथे पहिली मालिका संपते. मग वारकरी थोडा वेळ 'रामकृष्ण हरी' असा नामघोष करतात. त्यानंतर 'योगिया दुर्लभ' या अभंगाने दुसरी मालिका सुरू होते. तिच्यात बारा अभंग असतात. तिसरी मालिका वासुदेव या नावाने प्रसिद्ध आहे. कारण तिच्यातील अभंग हे वासुदेवाच्या स्तुतिपर आहेत. या मालिकेत 'बाबा ममता निशी अहंकार दाता घुळघुळा वाजती टाळ' व शेवटी तुकाराममहाराजांचा 'जय जोगी' हा अभंग होतो. चौथ्या मालिकेला आंधळे पांगुळ असे नाव आहे. त्यातला 'पांगुळ झालो देवा' हा तुकाराममहाराजांचा अभंग पहिला असतो. पाचवी आणि शेवटची मालिका गौळणींची असते. त्यांत 'भरिला उलंडुनी रिता करी घट, पडिलीं भुलीं धावते सैराट,' इ. अभंग असतात. त्यानंतर पालखी थांबते आणि वारकरी आपल्या भोजनाच्या तयारीला लागतात.

दुपारच्या भजनाची सुरुवात 'सुंदर ते ध्यान' या अभंगाने होते. मग ज्ञानदेवांचे हरिपाठाचे अभंग म्हणतात. हरिपाठाचा सत्ताविसावा अभंग म्हटल्यावर दिंडी थांबते आणि त्यातील वारकरी दोन रांगा करून पालखीकडे तोंड करून उभे राहतात. मग 'ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान । समाधी संजीवन हरिपाठ ।' हे पालुपद म्हणतात. नंतर ते पादुकांना नमस्कार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करतात आणि हरिपाठाचा शेवटचा अभंग म्हणत पुन्हा मार्ग क्रमू लागतात. प्रत्येक अभंगाच्या शेवटी ' हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा, पुण्याची गणना कोण करी ' हा चरण म्हणतात. त्यानंतर गुरुपरंपरा म्हणतात. ज्ञानदेव आणि तुकाराम यांची गुरुपरंपरा या अभंगात दिलेली आहे. त्यानंतर ' अवघाचि संसार सुखाचा करीन ' हा अभंग व पालखीचा मुक्काम पडायला वेळ असेल, त्या मानाने इतर अभंग गातात. रात्रीच्या मुक्कामाचे गाव दृष्टिपथात आले, की शेवटची संतस्तुती ही मालिका सुरू करतात. नंतर रात्री पालखी ठेवण्यासाठी जो मोठा तंबू उभारतात, त्याच्या समोर सर्व वारकरी जमतात आणि ' ज्ञानबा तुकाराम 'चा घोष करतात. सुरुवातीला तो संथ लयीत सुरू होतो आणि मग त्याची लय हळूहळू वाढत जाते व पालखी तंबूसमोर ठेवण्याच्या वेळी ती खूपच वाढलेली असते. यानंतर आरती होऊन दुपारचे भजनसत्र संपते.

समर्थ संप्रदायाचीही भजनाची एक वेगळी पद्धती ठरलेली आहे.

गणेशः शारदा चैव सद्‌गुरुः सज्जनस्तथा ।
आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः ।।

या श्लोकाने समर्थसंप्रदायी नमनाचे श्लोक सुरू करतात. ते नऊ आहेत. त्यानंतर ' जय जय राम राम राम । सीता राम राम राम ' हे भजन म्हणतात. भजन संपल्यावर ' रामा हो जय रामा हो । पतितपावन पूर्णकामा हो ।' हे पद म्हणतात. त्यानंतर 'रत्नजडित सिंहासन ' व ' रामा सद्‌गुरूची कृपा ' हे दोन रामदासांचे अभंग म्हणून 'सीताराम सीताराम' असे भजन करतात. नंतर काही अभंग व पदे म्हणून ' रामकृष्ण हरी जय जय रामकृष्ण हरी ' हे भजन सुरू करतात व जमलेल्या मंडळींना बुक्का लावतात. मग त्या त्या वाराचे पद म्हणतात.त्यानंतर 'धन्य राजा राम धन्य जानकी सती, ' इ. अभंग उपसंहारान म्हणतात. मग श्रीसमर्थांच्या स्तुतिपर एखादे पद, काही अभंग व श्लोक आणि शेवटी 'सद्‌गुरू समर्थ रामदास स्वामी महाराजकी जय । महारुद्र हनुमानकी जय । श्रेष्ठ गंगाधर स्वामी महाराजकी जय, (इथे आपापल्या गुरूचे नाव घालतात), जय जय रघुवीर समर्थ,' असे म्हणून भजन संपवतात.

द. भारतातही भजन करण्याची चाल आहे. तिकडेही भजनी मंडळे असतात. भजनी मंडळाच्या प्रमुखाला भागवतर असे म्हणतात. त्याच्या जोडीने किंवा एकेकटे असे भजन म्हणणारे काही लोक भजनी मंडळात असतात. भजनाला तंबोरा, पेटी, मृदंग, झांजा या वाद्यांची साथ असते. भजन ऐकणारे श्रोते नामावली गाताना त्यात सहभागी होतात. भागवतरने दुसऱ्या एखाद्या वृद्ध धार्मिकाकडून भागवतदीक्षा घेतलेली असते व त्याचे चोनक असे सूत्र उजव्या हातात बांधलेले असते.

एखाद्या भक्ताच्या घरी, देवळात, मठात किंवा भजनमंदिरात; तसेच शुक्रवारी, शनिवारी आणि एकादशी, प्रतिपदा, पौर्णिमा, या तिथींना व कृत्तिका, रोहिणी, पुनर्वसू या नक्षत्रांच्या दिवशी भजन करतात. या भजनाचा एक ठराविक क्रम असतो. सर्व भजन पूर्ण व्हायला सुमारे आठ तास लागतात. हा क्रम असा— नामावली; गणेश, सरस्वती, इ. देवतांची स्तुती; प्रल्हाद, नारद वगैरे भक्तांची स्तुती; नाममहिम्याचे श्लोक वगैरे; तोडे मंगलम; गुरुकीर्तन; जयदेवाची अष्टपदी; नारायणतीर्थाचा तरंग; गणेश, सुब्रह्मण्य, सरस्वती, शिव आणि पार्वती यांची स्तोत्रे; उपचारकीर्तन; रामचंद्र, सीता आणि आंजनेय यांची स्तुतिस्तोत्रे व कृष्णस्तुती एवढे झाल्यावर भजनाचा अर्धा भाग पुरा होतो. यानंतर काही पदे गातात.

भजनाचा दुसरा भाग दिव्यनामसंकीर्तनाने सुरू होतो. मग देवाजवळची समई उचलून आणून खोलीच्या मध्यभागी ठेवतात व काही निवडक भक्त दिव्यनामसंकीर्तन गात हळूहळू तिच्या भोवती प्रदक्षिणा घालतात. नंतर गोपिकागीत गातात. व समई पुन्हा देवाजवळ नेऊन ठेवतात. मग दोलोत्सव होतो. त्यानंतर आणखी काही गीते व मंगल होऊन भजन संपते.

काही फिरती भजनी मंडळेही असतात. मार्गशीर्ष महिन्यात जत्रेच्या वेळी जेव्हा देवांच्या मिरवणुकी निघतात, तेव्हा त्यांच्या बरोबर ही भजनी मंडळे असतात.

उञ्छवृत्तिभजनी मंडळ हे असेच एक फिरते भजनी मंडळ आहे. त्याचा भागवतर एक विशिष्ट पोषाख करून आपल्या भजनी मंडळींसह रस्त्यावरून कीर्तने गात जात असतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या घरांतील लोक भागवतरला डाळ, तांदूळ व इतर काही वस्तू देतात. त्यांवरच भागवतर आपल्या कुटुंबाचा व शिकायला असलेल्या शिष्यांचा निर्वाह चालवतो. सकाळच्या वेळी उञ्छवृत्तीने फिरायचे व दुपारी शिष्यांना शिकवायचे आणि प्रवचन करायचे, असा त्याचा नियम असतो. त्यागराज हा एक आदर्श उञ्छवृत्ती भागवतर होता.

फिरत्या भजनी मंडळात एका जागी उभे राहून एक भजन म्हणतात व नामावली किंवा दिव्यनामसंकीर्तन सुरू करून त्याच्या तालासुरावर पुढे चालायला सुरुवात करतात. नामावली संपली, की पुन्हा एका जागी उभे राहून दुसरे भजन म्हणतात. मूळ निघालेल्या जागी परत येईपर्यंत हाच क्रम चालतो.

तंजाऊर जिल्ह्यातील तिरुवैय्यारू येथे चैत्र महिन्यात सप्तस्थान नामक एक उत्सव होत असतो. या उत्सवात सात देवस्थानांतील देवतांची पालख्यांतून मिरवणूक निघते. त्या वेळी अनेक भजनी मंडळे त्यात भाग घेतात. मुख्य पालखी तिरुवैय्यारू येथील देवतेची असून, ती सकाळी लवकर निघते. ती पुढे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चालली असता वाटेत सहा गावांतील इतर देवतांच्या पालख्या तिला येऊन मिळतात. त्या वेळी पालख्यांबरोबर निदान पन्नास हजार तरी लोक आणि शंभर तरी भजनी मंडळे असतात. त्यागराज स्वतः आपले भजनी मंडळ घेऊन त्या मिरवणुकीत सामील होत असे व समयाला अनुसरून तो भजनांच्या रागांची निवड करीत असे, असे सांगतात. कारण पालख्यांची ती मिरवणूक चोवीस तास चालत असे.

भागवताच्या काळापासून भजनाला एक पूजाप्रकार म्हणून विशेष चालना मिळाली. आधुनिक भजनपद्धतीचा मूळ पुरुष म्हणून तिरुपतीचा चिन्नय्य ताळ्ळपाकम् याचे नाव घेतात. त्यानंतर पुरंदरदास, भद्राचल रामदास, बोधेंद्र सद्‌गुरुस्वामी, अय्यावाळ, सदाशिव ब्रह्मेंद्र, त्यागराज, इ. पुरुषांनी भजनाची प्रतिष्ठा वाढवली. स्वाती तिरुनालने तर नवविधा भक्तीच्या प्रत्येक प्रकारासाठी एक एक गीत रचले आहे. त्या नऊ गीतांना नवरत्नमालिका कीर्तन असे नाव आहे. त्यांचे राग आणि तालही त्याने ठरवून दिले आहेत.

तेवारभजनात तेवारम गाणारे लोक भजनी मंडळाचे प्रमुख असतात, त्यांना ओडुवार असे म्हणतात. त्यांच्यांतही स्थिर व चर अशी भजनी मंडळे असतात.

बंगालमध्ये गौडीय संप्रदायाची भजने प्रसिद्ध आहेत. त्यांत करुण रसाला प्राधान्य असते. [क. वि.; डि. सा. इं. म्यु. म्यु.]

भटरा एक आदिवासी जमात. यांची वस्ती प्रामुख्याने मध्य प्रदेशातील बस्तर जिल्ह्यात आढळते. भटरा म्हणजे नोकर होय. हे लोक घरांच्या किंवा गावांच्या रक्षणासाठी नेमले जात असत. यांच्यांत पिट, अमनेर व शाण असे तीन पोटभेद आहेत. पैकी पिट हे उच्च दर्जाचे आणि शाण हे कनिष्ठ प्रतीचे समजले जातात. शेती व शेतमजुरी करणे हा यांचा व्यवसाय आहे.

भटरा लोक मध्यम बांध्याचे व सडपातळ असतात. त्यांचा वर्ण सावळा आणि ओठ जाड असतात. त्यांच्या डोक्यावरील केस फार दाट असतात. स्त्रियांचा चेहरा गोल अथवा उभटगोल असतो. त्यांची साडी बहुतेक कमरेखालीच गुंडाळलेली असते. त्या गळ्यात काचेच्या मण्यांच्या माळा आणि हाता-पायांत पितळेचे दागिने घालतात. भात हे यांचे प्रमुख अन्न असून, शिवाय ते रानफळे, कंदमुळे, मासे व मांस खातात. मद्य हे त्यांचे आवश्यक पेय आहे.

विवाहप्रथा – भटरा तरुण-तरुणी आपापला साथीदार निवडतात. वडीलधारी माणसे त्याला संमती देतात. नंतर नवरामुलगा, त्याचे आई-वडील व गावातील काही प्रतिष्ठित मंडळी मुलीच्या घरी मद्य घेऊन जातात व लग्नाची बोलणी करतात. लग्नात वरपक्षाला अधिक खर्च लागतो. कारण त्यांना गावजेवण द्यावे लागते. विवाहाचा दिवस व मुहूर्त मेडा गांटिया या नावाचा अधिकारी ठरवितो. वधू-वरांनी सात वेळा मधु-वृक्षाला प्रदक्षिणा घातल्या म्हणजे त्यांचे लग्न झाले, असे समजतात. यांची लग्ने बहुतेक चैत्र महिन्यात होतात. आते-मामे भावंडांची लग्ने ही विशेष प्रतिष्ठित समजली जातात.

मुलीला लग्नापूर्वी मातृत्व लाभले असल्यास तिच्या विवाहाचा उपचार करीत नाहीत. ज्याच्यापासून तिला अपत्यप्राप्ती झाली असेल, त्याच्याबरोबर राहायला तिला परवानगी देतात. अशा तऱ्हेच्या संततीचा व रीतसर संततीचा सामाजिक दर्जा सारखाच मानला जातो. एखाद्या मुलीचा विवाह होत नसला, तर तिच्या वस्त्रात फुले बांधतात आणि तिचा विवाह झाला असे समजतात.

देवधर्म – हे ग्रामदेवतांना भजतात. जादूटोणा, भुताटकी यांवर यांचा खूप विश्वास असतो. अतिमानवी योनीतील देव आपले भवितव्य ठरवितात, असा त्यांचा विश्वास आहे. हे शिकारी देवाला पूजतात, त्याच्या उत्सव प्रसंगी शिकार करतात आणि हातात धनुष्यबाण घेऊन नाचतात. आषाढी पौर्णिमा हा भतपूजेचा दिवस असतो. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; ट्रा. इं.]

भटराझू द. भारतातील भाट. ते मोठ्या व्यक्तींची स्तुतिपर गीते गातात व पोवाडेही म्हणतात. हे तेलुगू भाषा बोलतात. वैश्य पुरुष व क्षत्रिय स्त्री यांची संतती असल्यामुळे यांना राझू असे नाव मिळाले, असे सांगतात. प्राचीन राजांची माहिती, त्यांच्यासंबंधीच्या कथा, आख्यायिका वगैरे त्यांना चांगल्या अवगत असतात.

या लोकांपैकी बरेचजण सांप्रत शेती किंवा अन्य व्यवसाय करतात. त्यांचे जन्म, विवाह, मृत्यू, इ. प्रसंगींचे विधी कापू लोकांसारखेच असतात. यांच्या लग्नाला ब्राह्मण पुरोहित लागतो. अंत्यसंस्कारासाठी मात्र जंगम किंवा सातानी यांना ते बोलावतात. पूर्वी यांच्यांत विधवाविवाहाला बंदी होती.

हे लोक मूळचे उत्तरेकडचे होत. वरंगळचा राजा प्रतापरुद्र (इ. स. १२९५–१३२३) याने त्यांना प्रथम दक्षिणेत बोलावले. त्याचे राज्य नष्ट झाल्यावर ते रेड्डी आणि वेलमा या मांडलिक राजांच्या दरबारात स्तुतिपाठक म्हणून राहू लागले. दक्षिणेत आल्यावर त्यांनी तेलुगू साहित्याचे अध्ययन केले.

उत्तर अर्काट जिल्ह्यात हल्ली ते शेती करून राहतात. शूद्र लोकांच्या लग्नकार्यात ते त्यांच्या परंपरेची प्रशंसागीते गातात. त्यांपैकी बरीचशी गीते त्यांनी स्वतःच्या कल्पनेने घडवलेली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असतात. ते आपण क्षत्रिय असल्याचे सांगत असले, तरी शीघ्र-कवित्वाची देणगी असणाऱ्या अनेक जातींच्या लोकांनी सांप्रत या जातीत प्रवेश मिळवला असून, त्यांपैकी काही लोक मुसलमानही आहेत.

अनंतपूर जिल्ह्यात हे लोक गावोगावच्या श्रीमंत लोकांकडे जाऊन त्यांच्यावर तिथल्या तिथे कवन रचून गातात व त्याबद्दल त्यांना जुने कपडे, धान्य व पैसे मिळतात.

कुर्नूल जिल्ह्यात कम्मा लोक यांना लग्नकार्याच्या वेळी काही रक्कम देतात. या जिल्ह्यात भटराझूंना काही जमिनी इनाम मिळाल्या आहेत.

कापू, कम्मा व वेलमा लोकांच्या लग्नात भटराझू पुरुष नवऱ्यामुलाचा घेडा म्हणून वावरतो. लग्नाच्या वेळी तो रामायण व महाभारत या ग्रंथांतील श्लोक म्हणतो व वधू-वरांच्या जातीची स्तुती करतो. [का. ट्रा. स. इं.]

भटवाडी हिमालयातील एक पुण्यक्षेत्र. गंगोत्रीला जाताना वाटेत हे स्थान लागते. इथे बाणगंगा आणि भागीरथी यांचा संगम असून, भास्करेश्वराचे मंदिर आहे. म्हणून या स्थानाला भास्करप्रयाग असेही म्हणतात. या ठिकाणी ऋषींची वस्ती होती, असे सांगतात. यावरूनच भटवाडी हे नाव त्याला पडले असावे. [हि. द.]

भटाई घोट्टू (इ. स. चे १६ वे शतक) सिंधमधील सूफी पंथाचा एक संतकवी. हा भटशाह नावाच्या गावी राहत असे. शाह अब्दातलतीफ घराण्यात त्याचा जन्म झाला त्यामुळे लोक त्याला शाह अब्दातलतीफ भटाईवाला या नावाने ओळखीत. हा एक प्रतिभासंपन्न कवी होता. त्याच्या काव्यरचनेत प्रेम व भक्ती या दोहोंचे सुंदर आविष्करण आढळते. सिंधी कवींतला तो कविसम्राट आहे. भटाईवाचून सिंधी वाङ्मय म्हणजे चंद्रावाचून रात्र होय, असे सिंधी वाङ्मयाचे समीक्षक मानतात. शाह जो रसालो नावाचे त्याने एक महाकाव्य रचले आहे. या संतकवीला केवळ मुसलमानच मानतात असे नव्हे, तर हिंदूही मानतात. भटशाह नावाच्या गावी याचे बरेचसे आयुष्य गेले असल्यामुळे, तिथे त्याच्या स्मरणार्थ दरवर्षी जत्रा भरते. या जत्रेत हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांचे लोक भाग घेतात.

भट्टगोपाल (इ. स. चे ९ वे शतक) एक संगीतज्ञ. भट्ट लोल्लटाच्या नावाबरोबर याचेही नाव घेतले जाते. कदाचित हा लोल्लटाचा अनुयायी असावा. तालदीपिका हा याचा तालशास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथ होय. या ग्रंथाशिवाय याने भरताच्या नाट्यशास्त्रावरील काही भागांवर टीकाही लिहिली आहे. [अभिनवगुप्त]

भट्टतौत (इ. स. चे १० वे शतक) एक संस्कृत साहित्यशास्त्रकार. हा अभिनवगुप्ताच्या अनेक गुरूंपैकी एक होता. काव्यकौतुक हे त्याच्या ग्रंथाचे नाव आहे. हा ग्रंथ अद्याप अप्रसिद्ध आहे. हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यास संस्कृत साहित्यशास्त्रात मोलाची भर पडेल, असे अनेक प्राचीन व अर्वाचीन पंडितांचे मत आहे. भट्टतौताच्या काव्यकौतुकावर अभिनवगुप्ताची विवरण नावाची टीका आहे. शांतरस हा मोक्षप्रद असल्यामुळे सर्व रसांत श्रेष्ठ होय, असे त्याचे मत होते. आपल्या रससिद्धान्तात तो म्हणतो, की काव्याचा विषय श्रोत्याला किंवा वाचकाला आत्मसात झाला, की तो विषय प्रत्यक्ष पुढे असल्याची त्याला संवेदना होते आणि त्यातून रसाचा उदय होतो. भट्टतौताच्या या मतांवर शंकुकाचे काही आक्षेप आहेत. भट्टतौताने या आक्षेपांचा निरास केला आहे, असे प्राचीन साहित्यशास्त्रकार म्हणतात. क्षेमेंद्र, हेमचंद्र, सोमेश्वर, इत्यादींनी भट्टतौताचा उल्लेख केला आहे. अभिनवगुप्ताच्या विचारांवर भट्टतौताची बरीच छाप दिसून येते. [सं. सा. इ.; भा. सा. शा.; काव्यप्रकाश – संपा. श्री. अर्जुनवाडकर, श्री. मंगरूळकर.]

भट्टनायक (इ. स. चे १० वे शतक) एक संस्कृत साहित्यशास्त्रकार. हा अभिनवगुप्ताच्या समकालीन असावा असे वाटते., राजतरंगिणीत (५.५९) एका भट्टनायकाचा उल्लेख आहे. हे दोन्ही भट्टनायक भिन्न भिन्न असले पाहिजेत. कारण राजतरंगिणीतील भट्टनायक काश्मीरच्या शंकरवर्म्याच्या राजवटीत म्हणजे इ. स. ८८३ पासून ९०२ पर्यंत होऊन गेलेला आहे; परंतु याच्या संबंधात निर्णयात्मक मत देणे कठीण आहे, असे पंडितांचे मत आहे.

आनंदवर्धनाचे ध्वनितत्त्व याला मान्य नव्हते. 'रस ध्वनित होतो,' या त्याच्या मताला विरोध करण्यासाठी भट्टनायकाने हृदयदर्पण नावाचा ग्रंथ लिहिला. याच्या मते रस उत्पन्न होत नाही, अनुमित होत नाही किंवा अभिव्यक्तही होत नाही. तर भावकत्व नामक व्यापाराने रस भावित होतो आणि भोजकत्व व्यापाराने रसिक त्याचा आस्वाद घेतो. हृदयदर्पण हा ग्रंथ गद्य-पद्यात्मक आहे. या ग्रंथातील वेचे अभिनवगुप्त, हेमचंद्र इत्यादिकांच्या ग्रंथांत आढळतात. असे असले तरी त्याचा समग्र मूळ ग्रंथ उपलब्ध नाही. [सं. सा. इ.; काव्यप्रकाश – संपा. श्री. अर्जुनवाडकर, श्री. मंगरूळकर.; भा. सा. शा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भट्टनारायण (इ. स. चे ८ वे शतक) वेणीसंहार या संस्कृत नाटकाचा कर्ता. हा कान्यकुब्ज देशात राहणारा शांडिल्यगोत्री ब्राह्मण होता. बंगालच्या आदिसूर राजाच्या निमंत्रणावरून जी पाच कनोजी ब्राह्मण कुटुंबे बंगालमध्ये गेली, त्यांत भट्टनारायणाचे कुटुंब होते. राजाने नाममात्र मूल्य घेऊन त्याला काही गावे विकली. त्या गावांचा तो जमीनदार झाला. थोडयाच कालात त्याने आपली जमीनदारी वाढवली आणि तो त्या भूप्रदेशाचा राजाच बनला. काही संशोधकांच्या मते बंगालमधले ठाकूर राजघराणे त्याच्यापासून चालू झाले.

भट्टनारायण अशा प्रकारे श्रीमंत झाला, तरी त्याचा विद्याव्यासंग मात्र सुटला नाही. त्यान महाभारताचा सखोल अभ्यास केला होता. त्यामुळेच त्याच्या बुद्धीला चतुरस्रता आणि प्रगल्भता आली होती. वेणीसंहारातील अंतर्गत पुराव्यांवरून तो पूर्व व उत्तर मीमांसा, तसेच सांख्य व योग यांचा चांगला ज्ञाता होता, हे कळून येते. साहित्य व नाट्य ही शास्त्रेही त्याला अवगत होती. त्यामुळेच त्याचे वेणीसंहार हे नाटक रस व तंत्र या दोन्ही दृष्टींनी चांगले उतरले आहे. त्याने आपल्या नाटकात निरनिराळया अठरा वृत्तांचा कौशल्याने उपयोग केला आहे.

वेणीसंहार नाटकाचे कथाबीज असे – दु:शासनाने द्रौपदीची वेणी धरून तिला भरसभेत खेचून आणले आणि तिची विटंबना केली. दुर्योधनाने मांडी उघडी करून तिच्यावर तिला बसण्यास सांगितले. त्या दोघांच्या या उन्मत्त कृत्याने भीमाला विलक्षण त्वेष चढला. युधिष्ठिराने आवरल्यामुळे तो त्या दोघांचे पारिपत्य करू शकला नाही; पण त्याच वेळी त्याने प्रतिज्ञा केली, की 'मी दु:शासनाचे वक्ष:स्थळ गदेने फोडून त्यातले ऊन ऊन रक्त पिईन, दुर्योधनाची मांडी गदेने छिन्न भिन्न करून त्याच्या मस्तकावर लाथ हाणीन आणि माझ्या रक्तरंजित हातांनी द्रौपदीच्या दु:शासनाने ओढून मोकळया केलेल्या केसांची वेणी घालीन.' भीमाने आपल्या पराक्रमाने ही प्रतिज्ञा पुरी केली, असे या नाटकात दाखविले आहे. महाभारतात दुर्योधन व दु:शासन यांच्याविषयींच्या भीमाने केलेल्या प्रतिज्ञा आहेत; पण तिथे द्रौपदीची वेणी घालण्याची प्रतिज्ञा नाही. ही कल्पना भट्टनारायणाला त्याच्या प्रतिभेतून स्फुरली आणि महाभारतात नसतानाही ती लोकमानसात ठसून बसली.

वेणीसंहाराचा प्रमुख रस वीर असून, शृंगार व रौद्र हे त्याचे अंगभूत आहेत. भीम व दुर्योधन यांच्या उक्तींमध्ये कित्येक ठिकाणी वीररसाची उत्कृष्ट अभिव्यक्ती झाली आहे. कौरवपांडवांत संधी घडून आला, तर आपली वेणी सदाची मोकळीच राहील, अशा चिंतेने द्रौपदी परित्रस्त झाली आहे. तिला आश्वासन देताना भीम म्हणतो –

चञ्चद्भुजभ्रमितचण्डगदाभिघात -
सञ्चूर्णितोरुयुगलस्य सुयोधनस्य ।
स्त्यानावनद्धघनशोणितशोणपाणि -
रुत्तंसयिष्यति कचांस्तव देवि भीम: ॥

(वेणी. १.२१)

भावार्थ – हे देवी, तू निश्चिंत राहा. हा भीम अशी प्रतिज्ञा करतो, की थोडयाच काळात मी दोन्ही हातांनी आकाशात घुमविलेली कठोर गदा दुर्योधनाच्या दोन्ही जांघांवर मारीन आणि त्यां फुटलेल्या दोन्ही जांघांतून उसळणाऱ्या घट्ट आणि चिकट रक्ताने रंगलेल्या हातांनी तुझे मोकळे केस गोळा करून त्यांची वेणी घालीन.

भट्टनारायण याची लेखनरीती गौडी आहे. गौडी ही समासबहुल व ओजस्संपन्न रीती असते. भट्टनारायणाच्या लेखनात जोम व अभिनिवेश आढळतो, तो तिच्यामुळेच. त्या दृष्टीने पुढील श्लोक वाचनीय आहे–

मन्थायस्तार्णवाम्भ:प्लुतकुहरचलन्मन्दरध्वानधीर:
कोणाघातेषु गर्जत्प्रलयघनघटान्योन्यसङ्घट्टचण्ड: ।
कृष्णाक्रोधाग्रदूत: कुरुकुलनिधनोत्पातनिर्घातवात:
केनास्मत्सिंहनादप्रतिरसितसखो दुन्दुभिस्ताडचतेऽयम्॥

(वेणी. १.२२)

भावार्थ – मंथनाच्या वेळी ढवळल्या गेलेल्या सागराचे पाणी गुहेत शिरून घुसळल्या जाणाऱ्या मंदर पर्वताच्या आवाजाप्रमाणे गंभीर, काठयांचा आघात होताच गर्जना करणाऱ्या प्रलयकालीन मेघसमूहांच्या परस्पर संघटनाप्रमाणे भयानक, द्रौपदीच्या क्रोधाचा जणू अग्रदूतच, कौरव-कुलनाशरूपी उत्पातसूचक वादळी वारा आणि आमच्या सिंहनादाच्या प्रतिध्वनीचा जणू मित्रच, असा हा दुंदुभी कोण वाजवीत आहे बरें?

भट्टनारायणाची नाटयकृती निम्न कोटीची असली, तरी तिच्यात सुंदर कविता आढळते. मात्र त्याची शैली कृत्रिम व अलंकृत आहे, असे श्री. डे यांनी म्हटले आहे.

दंडीच्या दशकुमारचरिताच्या पूर्वपीठिका गहाळ झाल्यामुळे भट्टनारायणाने त्या लिहून दशकुमारचरित पुरे केले. याच्या नावावर जानकीपरिणय नावाचे आणखीही एक नाटक उल्लेखित आहे. [वेणीसंहारम् – संपूर्ण मराठी आवृत्ती – गद्रे-हातवळणे; सं. क. द.; सं. सा. इ.]

भट्टप्रभू ब्राह्मण गोमंतकातील ब्राह्मणांची एक पोटजात. हे पंचद्राविडांतर्गत आहेत. यांची पूर्वी पंचद्राविड ब्राह्मणांतच गणना होत होती. काही कारणानें त्यातला एक छोटा विभाग विभक्त झाला आणि त्याला भट्टप्रभू हे नाव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मिळाले. हे लोक ऋग्वेदी आहेत. वत्स, कौशिक, भारद्वाज, अत्री, इ. यांची गोत्रे आहेत. नवदुर्गा व मदालसा ही यांची दैवते होत. याशिवाय यांचे सण, उत्सव, व्रते ही सर्व पद्ये ब्राह्मणांप्रमाणेच आहेत. पूर्वी पद्यांशी व इतर ब्राह्मणांशी यांचे रोटी-बेटी व्यवहार होत नसत; पण संकेश्वरपीठाच्या शंकराचार्यांनी त्यांच्या ब्राह्मणत्वाविषयी अस्तिपक्षी निर्णय दिल्यामुळे, आता ते इतर ब्राह्मणांशी हळूहळू एकजीव होऊ लागले आहेत. हे लोक शाकाहारी आहेत. [ब्रा. भि. वि.; वर्ण व जाति]

भट्टभास्कर (इ. स. चे ११ वे शतक) एक प्रसिद्ध भाष्यकार. तैत्ति. संहितेवर याचे ज्ञानयज्ञ नावाचे भाष्य आहे. हा उज्जयिनीचा रहिवासी होता, अशी दंतकथा आहे. हा कौशिकगोत्री होता. आपल्या भाष्याच्या मंगलाचरणात त्याने प्रथम शिवनमन केले आहे, त्यावरून तो शैव असावा, असे वाटते. सायणाचार्य आणि देवराज यज्वा यांनी याचा वारंवार उल्लेख केला आहे. याला आपल्या भाष्याविषयी फार अभिमान होता, असे शांकरदिग्विजयात म्हटले आहे. ब्रह्मसूत्रावरही याचे भाष्य असावे. [वैं. सा.; वि. स्मृ. ग्रं.; शंकराचार्य; आचार्य सायण और माधव –बलदेव उपाध्याय, १९४७]

भट्टाकलंक देव (१५६५–१६५५ इ. स.) एक कन्नड ग्रंथकार. हा कर्नाटकात जन्मला. हा जैन असून अकलंक देव (दुसरा) याचा शिष्य होता. त्याने सोंदे येथे अनेक शास्त्रांचे अध्ययन केले. प्रथम विजयनगरच्या राजाचा व नंतर पेनगुंडीच्या व्यंकटपतिरायाचा त्याला आश्रय होता. पुढे सोंदे येथील अरसप्प नायक याने एक जैन मठ स्थापून तिथे याची अधिकारी म्हणून नियुक्ती केली.

याला संस्कृत, प्राकृत, कन्नड, इ. सहा भाषा उत्तम अवगत होत्या. सखोल अध्ययन आणि अष्टपैलूपणा या गुणांमुळे त्या काळी भट्टाकलंकाचे नाव दक्षिणेत सर्वत्र गाजले होते. कर्नाटकशब्दानुशासनम या नावाचा कन्नड भाषेच्या व्याकरणाचा एक ग्रंथ त्याने संस्कृत भाषेत लिहिला आहे. त्यातील उदाहरणे मात्र कन्नड साहित्यातून घेतली आहेत. या ग्रंथाला कन्नड साहित्याच्या इतिहासात मानाचे स्थान आहे. [जै. सा. इ.; श्री. श्री. भा. वर्णेकर–राष्ट्रभारती, सप्टें. १९५७]

भट्टारक संप्रदाय जैनांतील आचार्य व पुरोहित यांना भट्टारक अशी संज्ञा आहे. धार्मिक बाबतीत यांचा शंकराचार्यांप्रमाणे अधिकार मानला जातो. दिगंबर आणि श्वेतांबर या दोन्ही पंथांत भट्टारकांची बावीस पीठे ज्ञात आहेत. त्यांपैकी कारंजा येथे सेनगणाचे एक; जयपूर, नागोर, सुरत, लातूर, मालखेड, इ. दहा ठिकाणी बलात्कार गणाची; हिसार, सुतार, ग्वालेर व कारंजा या चार ठिकाणी काष्ठासंघाची आणि उरलेली कोल्हापूर, मुडबिद्री, कारकल, हुंबच व श्रवणबेळगोळ या ठिकाणी आहेत. इ. स. च्या आठव्या शतकापासून खंडित व पुढे १३ व्या शतकापासून आजतागायत भट्टारकांची परंपरा अखंडित चालू आहे.

व्यवहारासाठी भट्टारक वस्त्र वापरीत. पण दिगंबरत्व ते आवश्यक मानीत. भट्टारक पदाच्या प्राप्तीच्या वेळी काही क्षण ते दिगंबरत्व स्वीकारीत. काही भट्टारक मृत्यू समीप आला असता नग्न राहून सल्लेखना स्वीकारीत.

भट्टारक परंपरेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ते राहण्यासाठी मठ व मंदिरे बांधीत. त्यासाठी ते भूमिदान स्वीकारीत. त्यातूनच पुढे ते संपत्ती गोळा करू लागले. कालांतराने ते आपल्याला राजगुरू म्हणवू लागले व राजाप्रमाणे वैभवात राहू लागले. यात्रेला जातानाही नोकरचाकर, गाडीघोडा आणि इतर लवाजमा ते बरोबर घेऊ लागले. भट्टारकांचा पट्टाभिषेकही राज्याभिषेकाप्रमाणे थाटामाटात होऊ लागला. हा खर्च कोणीतरी धनिक श्रावक करीत असे. या वैभवाच्या आकांक्षेपायीच भट्टारकांची अनेक पीठे निर्माण झाली.

मंदिरे बांधणे आणि त्यांत मूर्तींची प्रतिष्ठापना करणे, हे कार्य भट्टारकांनी फार मोठ्या प्रमाणावर केले. या मूर्ती बहुधा ते पाषाण व धातू यांच्या बनवून घेत. तीर्थंकर, नंदीश्वर, पंचमेरू, सहस्रकूट, यक्षिणी व क्षेत्रपाल हे मूर्तींचे प्रमुख प्रकार असत. इ. स. १४९२ या वर्षी अक्षय्यतृतीयेच्या दिवशी, जिनचंद्र भट्टारक याने हजारो मूर्तींची प्राणप्रतिष्ठा केली आणि मग त्या भारताच्या सर्व भागांत पाठविण्यात आल्या. त्या मूर्ती शेठ जीवराज पापडीवाल याने भेट दिल्या होत्या.

प्राचीन ग्रंथांच्या हस्तलिखितांचे रक्षण हे भट्टारकांचे प्रमुख कार्य होय. त्याशिवाय, भट्टारक युगात प्राचीन ग्रंथांचे संक्षेप व रूपांतरे करण्यात आली. त्यांत पुराणे, कथा आणि पूजापाठ हे प्रकार प्रमुख होते. भट्टारकांचा शिष्यपरिवार असे आणि ते शिष्य प्राचीन जैन आचार्यांच्या व्याकरण, वैद्यक, गणित इ. विषयांवरील ग्रंथांचे अध्ययन करीत. याच कामासाठी त्या ग्रंथांच्या अनेक प्रती तयार करण्यात आल्या. व्रताच्या उद्यापनाच्या वेळी एखाद्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत तयार करून ती एखाद्या भट्टारकाला दान देण्याची प्रथा त्या काळात होती.

भट्टारकांनी मंदिरे, हस्तलिखित पोथ्या व धार्मिक उत्सव यांच्या अनुषंगाने संगीत, शिल्प, चित्र, नृत्य इ. कलांनाही उत्तेजन दिले. [भट्टारक संप्रदाय–श्री. जोहरापुरकर, १९५८]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भट्टिकाव्य (इ. स. ६ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक संस्कृत महाकाव्य. याचे मूळ नाव रावण-वध असे होते; पण ते त्याचा कर्ता भट्टी याच्या नावानेच प्रसिद्ध आहे. कित्येक टीकाकार त्याचे पुरे नाव भर्तृहरी होते असे सांगतात; पण शतकत्रयाचा कर्ता भर्तृहरी तो हा नव्हे. गुजरात देशातल्या वलभी या नगरीत त्याने या महाकाव्याची रचना केली. तिथल्या श्रीधरसेन राजाचा त्याला आश्रय होता. त्यामुळे भट्टीला गुजरातचा प्रथम कवी असे मानतात. भट्टी हा श्रीमाळी ब्राह्मण होता व तो श्रीधरसेनाचा सभापंडितच नव्हे, तर राजकुमारांचा गुरूही होता, असे श्री. भोलाशंकर व्यास यांनी सांगितले आहे. तो व्याकरण व साहित्य या दोन शास्त्रांचा प्रकांड पंडित होता. त्याने आपल्या काव्यात या दोन्ही शास्त्रांचे सर्वत्र प्रदर्शन केले आहे. खरे सांगायचे, तर त्याने कवियशाच्या प्राप्तीसाठी ते महाकाव्य रचलेच नाही. त्याला विद्यार्थ्यांना आणि पाठकांना व्याकरणशास्त्राशी परिचित करायचे होते. त्याने आपला हा हेतू पुढील श्लोकात स्पष्टच सांगितला आहे–

दीपतुल्यः प्रबन्धोऽयं शब्दलक्षणचक्षुषाम् ।
हस्तादर्श इवान्धानां भवेद् व्याकरणादृते ।।

भावार्थ – व्याकरणाचे चक्षू असलेल्या लोकांना हा काव्य-प्रबंध दीपकासमान ज्ञानप्रदर्शक आहे. मात्र व्याकरण न शिकलेल्या लोकांना हा अंधाच्या हातातील आरशाप्रमाणे (निरुपयोगी) ठरेल.

पुढच्या श्लोकात (२२·३४) तो लिहितो —

व्याख्यागम्यमिदं काव्यमुत्सवः सुधियामलम् ।
हता दुर्मेधसश्चास्मिन् विद्वत्प्रियतया मया ।।

भावार्थ – हे काव्य व्याख्यागम्य आहे. बुद्धिमान लोकांना ते भरपूर आनंद देईल. मी विद्वत्प्रिय असल्यामुळे व्याकरण-ज्ञानहीन अशा मूर्खांसाठी हे लिहिलेलेच नाही.

भट्टीच्या काळात प्राकृत भाषा हळूहळू समृद्ध होऊ लागल्या होत्या. भट्टीच्या पूर्वीच प्रवरसेनाचे सेतुबंध हे प्राकृत महाकाव्य निर्माण झाले होते. भट्टी स्वतःही त्या काव्याने प्रभावित झाला होता. प्राकृत भाषांच्या समृद्धीमुळे संस्कृत साहित्याला, विशेषतः संस्कृत व्याकरणाला, धक्का पोचू लागला होता. पाणिनीची सूत्रे, पूरक वार्तिके, पतंजलीच्या फक्किका हे सर्व मुखोद्गत करून आणि त्याची धारणा ठेवून व्याकरणशास्त्र जितेजागते ठेवणे ही गोष्ट सोपी राहिली नव्हती. संस्कृत भाषेचे विद्यार्थी व्याकरणाच्या सूत्रांना आणि तज्जन्य रूपांना घाबरू लागले होते. भट्टीला हे समजून आले आणि त्याने संस्कृत विद्यार्थ्यांना काव्याच्या द्वारे व्याकरण शिकवायचे ठरविले. त्यासाठी त्याने व्याकरणाची कित्येक कठीण, पण सिद्ध रूपे काव्यातच गुंफून टाकली. कदाचित आपल्या काव्याच्या द्वारेच त्याने राजकुमारांना संस्कृत शिकविले असेल.

काव्यातून व्याकरणाचे शिक्षण देणे, ही युक्ती भट्टीनंतर अनेक कवींनी अमलात आणली आहे. इ. स. च्या बाराव्या शतकात दामोदरकवीने उक्तिव्यक्तिप्रकरण नामक काव्य रचून काशीराज गोविंदचंद्र याच्या पुत्रांना संस्कृत शिकविले. भट्ट भौम याचे रावणार्जुनीय व वासुदेवाचे वासुदेवचरित ही काव्येही व्याकरणशिक्षणाच्या उद्देशानेच लिहिली गेली आहेत.

भट्टिकाव्य २२ सर्गांचे व १६२५ श्लोकांचे आहे. त्यात रामजन्मापासून रावणवधोत्तर रामाच्या राज्याभिषेकापर्यंतची कथा सांगितलेली आहे. कथेच्या बाबतीत तो वाल्मीकीला अनुसरला आहे. या काव्याचे कित्येक सर्ग २७ ते ३५ श्लोकांचे म्हणजेच फार लहान आहेत. तो एखाद्या प्रसंगाची किंवा दृश्याची लांबलचक वर्णने करून कथाप्रवाह अडवून ठेवीत नाही. त्याने प्रस्तुत काव्याची चार कांडे कल्पिली असून, प्रकीर्ण, अधिकार, प्रसन्न व तिङन्त अशी त्यांची नावे आहेत.

(१) प्रकीर्णकांड – यात पहिले पाच सर्ग येतात. रामजन्मापासून सीताहरणापर्यंतची कथा यात आली आहे. यात कवीने व्याकरणनियमविषयक कोणतीही निश्चित योजना स्वीकारलेली नाही. एकदोन ठिकाणी टाधिकार व आमधिकार यांचे संकेत दिसतात.

(२) अधिकारकांड – सहाव्यापासून नवव्या सर्गापर्यंत हे कांड आहे. या कांडात सुग्रीवाच्या राज्याभिषेकापासून, लंकेतल्या अशोकवाटिकेत गेलेल्या मारुतीला राक्षसांनी पकडून रावणापुढे उभे केले, इथपर्यंत कथाभाग आहे. दुहादी द्विकर्मक धातुकृत अधिकार, भावे व कर्तरी प्रयोग, आत्मनेपद, इ. विषयांची उदाहरणे यात दिलेली आहेत.

(३) प्रसन्नकांड – दहाव्या सर्गापासून तेराव्या सर्गापर्यंत हे कांड आहे. या कांडात रामाच्या सेतुबंधापर्यंतची कथा आली आहे. हे कांड व्याकरणाशी संबंधित नसून, अलंकारशास्त्राशी आहे. यात शब्दालंकार व अर्थालंकार, त्यांचे विविध भेदोपभेद, तसेच भाषासम नामक श्लेषभेद यांचे निदर्शन आहे. या कांडात कवीने एकच पद्य संस्कृतात, तसेच प्राकृतातही निबद्ध दिसावे आणि दोन्ही भाषांत प्रतिपाद्य अर्थ एकच असावा, अशी रचना केली आहे. भट्टीच्या कवित्वाचा साक्षात्कार मुख्यत्वे तिसऱ्या कांडात होतो.

(४) तिङन्तकांड – हे चौदाव्यापासून शेवटच्या सर्गापर्यंत आहे. या कांडात रावणवधापासून रामाला झालेल्या राज्याभिषेकापर्यंतची कथा येते. या कांडात संस्कृत व्याकरणातले दहा लकार व त्यांचे व्यावहारिक दिग्दर्शन केलेले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या काव्यातील बरीचशी रचना अनुष्टुभ छंदात आहे. काही सर्ग उपजाती वृत्तात आहेत. दहाव्या सर्गात मात्र कवीने इतर अनेक छंदांचा प्रयोग केला आहे.

व्याकरणविषयक कठिण रूपांची उदाहरणे असलेले या काव्यातील काही श्लोक असे –

लताऽनुपातं कुसुमान्यगृह्णात् स नद्यवस्कन्दमुपास्पृशच्च ।।
कुतूहलाच्चारुशिलोपवेशं काकुत्स्थ ईषत्स्मयमान आस्त ।।

अर्थ – रामाने प्रत्येक वेलीकडे जाऊन जाऊन (लतानुपातं) फुले वेचली. त्याने प्रत्येक नदीच्या पात्रात घुसून घुसून (नद्यवस्कन्दम्) तिच्या जलाचे आचमन केले. काकुत्स्थ वंशात उत्पन्न झालेला रामचंद्र कुतूहलाने प्रत्येक सुंदर शिळेवर बसून (शिलोपवेशं) मंद स्मित करीत राहिला.

या श्लोकाच्या द्वारे भट्टी असा संकेत सांगतो, की पत्, स्कंद, विश्, इ. धातूंना वीप्सार्थक(इच्छार्थक)णमुल् प्रत्यय लागतो.

वलिर्बबन्धे जलधिर्ममन्थे जह्रेऽमृतं दैत्यकुलं विजिग्ये ।
कल्पान्तदुःस्था वसुधा तथोहे येनैष भारोऽतिगुरुर्न तस्य ।।

अर्थ – (रामाने सुबाहू वगैरे राक्षसांना मारल्यावर ऋषी रामाची स्तुती करीत आहेत.) हे रामा, तू (वामनरूपात) बलीला बांधलेस, (विष्णुरूपात) समुद्रमंथन केलेस, (मोहिनीरूपात) अमृतहरण करून दैत्यकुलाला जिंकलेस, (वराहरूपात) प्रलयजलात बुडणाऱ्या पृथ्वीला वर काढून धारण केलेस. तेव्हा तुझ्या बाबतीत या राक्षसांना जिंकणे हे फार मोठे काम नाही.

या श्लोकात सर्व क्रिया दर्शवण्यासाठी परोक्षभूताचे (लिट्) प्रयोग केलेले आहेत.

अकराव्या सर्गातल्या प्रभातवर्णनात भट्टीच्या शृंगारी प्रवृत्तीचा प्रभाव जाणवतो. तिथला एक श्लोक असा –

सामोन्मुखेनाच्छुरिता प्रियेण दत्तेऽथ काचित् पुलकेन भेदे ।।
अन्तःप्रकोपापगमाद्विलोला वशीकृता केवलविक्रमेण ।।

अर्थ – सामोपचाराचा प्रयोग करीत असता कोण्या प्रियकराने नखक्षत केल्यावर कोणी नायिका रोमांचित झाली. तिच्या अंतरातला क्रोध शांत झाल्याने ती चंचल होऊन उठली आणि मग नायकाने तिला केवळ बलात्काराने वश करून घेतले.

दुसऱ्या सर्गातल्या निसर्गवर्णनात काही सरस श्लोक कवीने लिहिले आहेत. त्यांतले दोन श्लोक असे –

निशातुषारैर्नयनाम्बुकल्पैः पत्रान्तपर्यागलदच्छबिन्दुः ।।
उपारुरोदेव नदत्पतङ्गः कुमुद्वतीं तीरतरुर्दिनादौ ।।

भावार्थ – प्रातःकालची वेळ आहे. नदीतीरावर उभ्या असलेल्या वृक्षांच्या पानातून दवबिंदू गळत आहेत. जणू प्रियकर चंद्रमा निघून गेल्यानंतर त्याच्या वियोगाने दुःखी बनलेल्या कुमुदिनीला पाहून तीरस्थ वृक्ष अश्रू गाळीत आहेत.

विवृत्तपार्श्वं रुचिराङ्गहारं समुद्वहच्चारुनितम्बरम्यम् ।।
आमन्द्रमन्थध्वनिदत्ततालं गोपाङ्गनानृत्यमनन्दयत्तम् ।।

भावार्थ – रामाने दधिमंथन करणाऱ्या गोपींचे ते स्वाभाविक नृत्य पाहून आनंद मानला. त्या दधिमंथनात त्या गोपी आपले दोन्ही पार्श्वभाग मागेपुढे संचालित करीत होत्या आणि त्यामुळे त्यांचे सुंदर अवयव दिसत होते. त्यांचे गोल नितंब जागच्या जागी हालत राहिल्यामुळे रमणीय दिसत होते आणि त्यांच्या त्या मंथननृत्याला धीरगंभीर घुसळण्याचा शब्द ताल देत राहिला होता.

दहाव्या सर्गात कवीने अनेक अलंकार प्रस्तुत केले आहेत.

भट्टिकाव्य टीकेवाचून कळणे कठिण असले, तरी त्याच्या प्रौढतेमुळे ते विद्वज्जनांत आदरणीय ठरले आहे. प्राचीन संस्कृत अध्ययनपद्धतीत पंचमहाकाव्यांमध्ये याचा समावेश केलेला होता. सुमारे चौदा टीका या काव्यावर लिहिल्या गेल्या आहेत. त्यांमधल्या जयमंगला व मल्लिनाथी या टीका उल्लेखनीय आहेत. [सं. क. द.; सं. सा. इ.; हिं. वि. को.]

भट्टोजी दीक्षित

(१५७० ते १६३५ इ. स.) एक महान वैयाकरण. याचे पूर्वज कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे तेलंगी ब्राह्मण असून, ते आंध्र प्रदेशात राहत होते. याचा पिता लक्ष्मीधरभट्ट हा विजयनगरच्या राजाचा आश्रित होता. भट्टोजीला रंगोजी नावाचा एक भाऊ होता. भट्टोजीचे प्रारंभिक शिक्षण आपल्या पित्याकडेच झाले. पित्याच्या मृत्यूनंतर मात्र तो प्रथम जयपूरला व तिथून काशीला गेला. काशीत त्याने शेषकृष्ण नामक गुरूकडे व्याकरणाचे अध्ययन केले. आपल्या कुशाग्र बुद्धीने त्याने थोडयाच काळात व्याकरणाचा अभ्यास पूर्ण केला. त्यानंतर काही काळाने त्याचा विवाह झाला. मग त्याने सोमयाग केला. त्यामुळे त्याला दीक्षित असे नाव पडले. त्यानंतर त्याने पाणिनीच्या व्याकरणसूत्रांवर सिद्धान्तकौमुदी नामक एक वृत्ती लिहिली.

सिद्धान्तकौमुदी या ग्रंथाचे वैशिष्टय असे, की पाणिनीच्या अष्टाध्यायीतील सर्व सूत्रांचा यात संग्रह केलेला आहे आणि जुन्या ग्रंथांतील उदाहरणे न देता त्या काळी प्रचलित असलेली अशी नवी उदाहरणे त्यात दिली आहेत. सूत्रांचा अर्थ समजण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी विवेचनात्मक पंक्तीही घातल्या आहेत. या ग्रंथाचे दुसरे वैशिष्टय असे, की पाणिनी, कात्यायन व पतंजली या वैयाकरणमुनींना असंमत असलेली उदाहरणे व नियम भट्टोजीने आपल्या ग्रंथात दिलेले नाहीत. तसेच त्याने सूत्रानुसारी किंवा धात्वनुसारी विवेचन न करता विषयानुरोधाने म्हणजे संधिप्रकरण, सुबन्तप्रकरण,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिङन्तप्रकरण अशी प्रकरणे घेऊन त्यांनुसार सूत्रांचे विवेचन केले आहे. ही पद्धत विषय समजण्याच्या दृष्टीने अधिक सुलभ आहे. व्याकरणशास्त्रात प्रवेश होण्यासाठी सिद्धान्तकौमुदी-सारखा दुसरा ग्रंथ नाही, असे म्हणतात. महाराष्ट्रात तरी या ग्रंथाला व त्याच्यावरील टीकाग्रंथांना विशेष महत्त्व आहे. पाठशाळांतून अनेक वर्षे त्याचेच अध्ययन व अध्यापन चालू आहे

सिद्धान्तकौमुदीवर भट्टोजीने स्वतः प्रौढमनोरमा नामक टीका लिहिली आहे. याशिवाय त्याने पाणिनीच्या सूत्रांवर शब्दकौस्तुभ नावाचीही टीका लिहिली आहे. भट्टोजी हा वेदान्तशास्त्र व धर्मशास्त्र ,यांचाही गाढा पंडित होता. त्याने अद्वैतकौस्तुभ, आचारप्रदीप, आह्निकम्, कारिका, कालनिर्णयसंग्रह, गोत्रप्रवरनिर्णय, दायभाग, तंत्राधिकारनिर्णय, श्राद्धकांड, इ. चौतीस ग्रंथ लिहिले आहेत.

भट्टोजीला वीरेश्वर व भानू असे दोन पुत्र व हरी नावाचा नातू होता. त्या सर्वांनी ग्रंथरचना केली आहे. वरदाचार्य, नीलकंठ शुक्ल, रामाश्रम व ज्ञानेंद्र सरस्वती या त्याच्या शिष्यांनीही काही ग्रंथ रचले आहेत.

भट्टोजीच्या पुत्रांचा व नातवांचा विवाह महाराष्ट्रातील ब्राह्मण घराण्यातील कन्यांशी झाल्यामुळे त्याचे घराणे पुढे महाराष्ट्रीय मानले जाऊ लागले.

भट्टोजीने आपला गुरू शेषकृष्ण याच्या प्रक्रियाप्रकाश नावाच्या ग्रंथावर टीका केली व अशा रीतीने गुरुद्रोह केला, असे मानून जगन्नाथ पंडिताने त्याच्या प्रौढमनोरमा या ग्रंथावर प्रौढमनोरमाकुचमर्दिनी नामक खंडनपर ग्रंथ लिहिला. यां दोघांचे भांडण हा त्या काळी विद्वानांत एक चर्चेचा विषय झाला होता.

भट्टोजीला काशीतले पंडित नागाचा अवतार मानतात, असे दिसते. कारण नागपंचमीच्या दिवशी तिथले विद्यार्थी 'बडे गुरु का छोटे गुरु का नाग ले नाग' असे ओरडत नागाची चित्रे विकत असतात. इथे बडे गुरू म्हणून पतंजलीचा व छोटे गुरू म्हणून भट्टोजीचा निर्देश असतो.

भट्टोजीच्या बाबतीत एक आख्यायिका सांगतात, ती अशी– गुरुद्रोह केल्यामुळे त्याला शाप मिळाला व मृत्यूनंतर तो ब्रह्मराक्षस होऊन अनेक वर्षेपर्यंत आपल्या काशीतील वाड्यात राहिला. तिथे त्याने अनेक चमत्कार दाखविले.

या आख्यायिकेचा दुसरा पर्याय असा– भट्टोजीचा विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर त्याच्या मनात, काशीत एक विद्यालय स्थापून आपल्या पद्धतीने विद्यार्थ्यांना व्याकरणशास्त्र शिकवावे, असे होते; पण त्याचा हा हेतू सफल झाला नाही. त्यामुळे मृत्यूनंतर तो ब्रह्मराक्षस होऊन आपल्या वाड्यात राहिला. कुटुंबातील मंडळींना त्याच्यापासून त्रास होऊ लागल्यामुळे त्यांनी तो वाडा सोडला व दुसरीकडे बिऱ्हाड केले. पुढे काही वर्षांनी दोन ब्राह्मण, विद्याभ्यासाच्या उद्देशाने काशीला गेले. फिरत फिरत ते सहजगत्या भट्टोजीच्या वाड्यात शिरले. तिथे त्यांना भट्टोजी ओटीवर बसलेला दिसला. भट्टोजीने त्या ब्राह्मणांची विचारपूस केली व जेवणाखाण्याची सोय करून त्यांना आपल्या वाड्यात ठेवून घेतले. पुढे सात-आठ वर्षे त्यांना त्याने व्याकरणशास्त्रही शिकविले. त्यांचे अध्ययन पूर्ण झाल्यावर भट्टोजीची इच्छा पुरी झाली आणि त्याने आपली खरी हकीकत त्या विद्यार्थ्यांना सांगितली. मग त्यांनी गुरूच्या आज्ञेनुसार त्याचे क्रियाकर्म केले आणि भट्टोजीला सद्‌गती प्राप्त करून दिली. [वे. शा. दी.; सं. अ. ग्रं.; सा. र. मा.; हिंदुत्व; श्री. गौरीशंकर गुप्त – राष्ट्रभारती, मे १९५९]

भट्टोत्पल (इ. स. च्या १० व्या शतकाचा उत्तरार्ध) एक प्रसिद्ध टीकाकार व ज्योतिषशास्त्राचा महान आचार्य. हा काश्मीरचा रहिवासी होता. याचे जीवनचरित्र उपलब्ध होत नाही. तो शैव होता, हे मात्र त्याच्या पुढील श्लोकावरून कळून येते–

प्रणिपत्य महादेवं भुवनगुरुं च लोकेशम् ।
भट्टोत्पलो लघुतरां जातकटीकां करोति शिष्यहिताम् ॥

अर्थ– भुवनांचा गुरू व लोकेश्वर अशा महादेवाला नमस्कार करून भट्टोत्पल शिष्यांना उपकारक व लघुतर अशी जातकटीका करीत आहे.

वराहमिहिराच्या यात्रा, बृहज्जातक, लघुजातक आणि बृहत्संहिता या ग्रंथांवरील भट्टोत्पलाच्या टीका सुप्रसिद्ध, विद्वन्मान्य व महत्त्वपूर्ण आहेत. त्यांना विवृती असे म्हणतात. ब्रह्मगुप्ताच्या खंडखाद्यावरही त्याने टीका लिहिली आहे. षट्पंचाशिकेवरची त्याची टीका आजही प्रचलित आहे. कल्याणवर्म्याच्या सारावली ग्रंथाची त्याने पूर्तता केली. प्रश्नज्ञान किंवा आर्यासप्तती नावाचा ७० आर्यांचा एक प्रश्नग्रंथ त्याने रचला. भट्टोत्पलाचा हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. याशिवाय, ज्योतिषशास्त्रावर याने आणखीही काही ग्रंथ लिहिले होते, असे अल् बिरूनी सांगतो. मात्र ते उपलब्ध झालेले नाहीत. भट्टोत्पलाची विद्वत्ता, स्मरणशक्ती व विवेचनपद्धती श्रेष्ठ दर्जाची होती. साधक–बाधक सर्व विचारांचा परामर्ष घेऊन तो आपले म्हणणे मांडीत असे. त्याच्या ग्रंथांत इतरांची उदाहरणे भरपूर असतात. जिथे एखादी गोष्ट माहीत नसेल, तिथे तसे स्पष्ट सांगून इतर तज्ञांचा सल्ला घ्यावा, असे तो सुचवितो. बृहत्संहितेचे यथार्थ आकलन होण्यास त्याच्या टीकेइतका दुसरा कोणताच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ग्रंथ उपयुक्त ठरत नाही. [भट्टोत्पल—काल, जीवन तथा कृतियाँ, डॉ. अजयमित्र शास्त्री, विदर्भ संशोधन मंडळ—वार्षिक १९६२]

भडभुंजे एक जात. धान्य भाजणारा (भ्राजक) किंवा भड = कढई व भुंज = भाजणे म्हणजेच कढईत धान्य भाजणारा अशी याची व्युत्पत्ती आहे. मध्य प्रदेशात व उत्तर भारतात यांची संख्या अधिक आहे. महाराष्ट्र व गुजरात या प्रदेशांतही ते आढळतात. कहार बाप व शूद्र आई यांच्यापासून यांची उत्पत्ती झाली, असे जातिअभ्यासक इलियट, शेरिंग व विल्सन यांचे मत आहे. ते आपणांस कान्यकुब्ज ब्राह्मणांचे वंशज व कैया नामक कायस्थांचे भाईबंद म्हणवितात. भोपाळकडील कायस्थ यांच्या हातचे अन्नोदक घेतात. सक्सेना, श्रीवास्तव, झिनवार, भटियार, सुखसेनिया, चौहान अशा यांच्या पोटजाती आहेत. महाराष्ट्रात परदेशी व मराठी असे यांचे दोन भाग आहेत. मराठी भडभुंजे मराठी शेतकऱ्यासारखे वागतात. त्यांची आडनावे जाधव, पवार, शिंदे, गायकवाड, इ. असतात. परदेशी लोक कानपूर, लखनौ, मथुरा, बरेली या ठिकाणांहून इकडे आले. हे घरी हिंदुस्थानी बोलतात. ते मांसाहार करतात. पुरुष पंचा किंवा धोतर नेसतात व स्त्रिया घागरा नेसून ओढणी घेतात. यांच्यांत धान्य भाजण्याचे काम बायकांकडे असते.

राजस्थानातील भडभुंजांची उत्पत्ती यदुवंशी राजपुतांपासून असून, त्यांच्यांत हिंदू व मुसलमान दोन्ही धर्मांचे लोक आहेत. राजस्थानातील हिंदू भडभुंजांची वस्ती मुख्यतः जोधपूर जिल्ह्यात

भडभुंजा पुरुष व स्त्री

आहे. ते हलवायाचा व्यवसाय करतात व मेजवानीच्या प्रसंगी लोकांच्या घरी जाऊन मिठाई बनवितात. मुसलमान भडभुंजांची वस्ती केवळ खेडेगावांतच आहे. पंजाबात भडभुंजांना झिनवार म्हणतात. कुठे कुठे यांना भुजवा आणि चतारी असेही म्हणतात. वाराणसीमध्ये भडभुंजांच्या सात उपजाती आहेत. त्यांच्यांत बेटीव्यवहार होत नाही. गुजराती भडभुंजांमध्ये काश्यप आणि वाल्मिकी अशी दोन गोत्रे आहेत. राजस्थानमधील यांच्या स्त्रियांची नाके टोचीत नाहीत. त्यामुळे नथ हा दागिना यांच्यांत नाही. त्या गळ्यात सुवर्णालंकारही घालीत नाहीत; पिवळ्या रंगाची वस्त्रेही वापरत नाहीत. त्या हातांत लाखेचे चुडे घालतात.

देवधर्म – राजस्थानातील भडभुंजे शक्तीचे उपासक आहेत. त्यांना मद्य-मांस वर्ज्य आहे. ते आपल्या कुलदेवतेला डाळ-रोटी आणि तेल अर्पण करतात. यांचे पुरोहित सांचोर ब्राह्मण असतात. महाराष्ट्रातील भडभुंजे स्मार्तपंथी असून भैरोबा, भवानी, खंडोबा, महादेव ही त्यांची दैवते आहेत. त्यांचे धार्मिक विधी परदेशी ब्राह्मण करतात. हे लोक वयाच्या एक ते सात वर्षांच्या दरम्यान मुलांचे जावळ करतात. गुजराती भडभुंजे हे वैष्णव धर्मीय आहेत. त्यांतले काही स्वामीनारायण पंथातले आहेत; तर काही रामानंद, वल्लभाचार्य, कबीर आणि इतर उपपंथांचे आहेत. गोस्वामी महाराज हे त्यांचे गुरू होत. घरात आजार झाला म्हणजे कोणातरी पूर्वजांच्या शापामुळे तो आला, असे समजतात. मग पिठाची एक बाहुली तयार करून तिला मृताचे संस्कार करतात.

विवाहप्रथा – हे लोक विवाहाचा विधी ब्राह्मणांकडून करवितात. लग्नात नवरदेव स्त्रीवेष करून नवरीच्या मंडपात नाचतो. विधवा धाकट्या दिराबरोबर पाट लावते. पुरुषाला पाट लावण्यापूर्वी काठीशी किंवा कर्णबाळीशी लग्न करावे लागते. व्यभिचार केलेल्या कुमारिकेचे लग्न स्वजातीय जाराबरोबर झाले, तर ते पाट लावल्याप्रमाणे करतात.

महाराष्ट्रातील भडभुंजे विवाहप्रसंगी वधूच्या मंडपात एक शेगडी ठेवतात. तिच्यावर एक मातीचे भांडे ठेवतात. या वेळी ब्राह्मण मंत्र म्हणतात व मुलीचा बाप शेगडीवरील भांड्यात थोडे थोडे लाल तांदूळ टाकीत राहतो. लग्न मुलीच्या घरी किंवा क्वचित मुलाच्या घरीही होते. यांच्यांत नवरा-नवरीच्या मनगटांवर जे कंकण बांधतात, त्यात लोखंडी तुकडा असतो. लग्नात बांधलेले बाशिंग जलाशयात टाकतात अथवा दुसरे कार्य घरात होईपर्यंत जपून ठेवतात.

गुजराती भडभुंजांमध्ये आतेबहीण व मावसबहीण यांच्याशी लग्न होत नाही. पत्नी हयात असेपर्यंत मेहुणीशी लग्न करता येत नाही. दोन भाऊ दोन सख्ख्या बहिणींशी लग्न करू शकतात. भडभुंजे हे आपल्या पंचक्रोशीत ठराविक गट करतात व त्यांच्यांतच लग्नसंबंध करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूर्वी मुलींची लग्ने ११ वे वर्ष लागण्याच्या आत व मुलांची ५ ते १५ वर्षेपर्यंत केली जात. यांच्यात पूर्वी बहुपत्नीत्वाचीही चाल होती. मुलाचा बाप मुलीच्या बापाकडे मुलीसाठी मागणी घालतो आणि ५० ते १५० रुपयांपर्यंत वधूपित्याला देज देतो, त्याला पल्ला म्हणतात. लग्नविधीत सप्तपदी हा विधी आवश्यक मानला जातो. यांच्यांत विधवाविवाह प्रचलित आहे. विधवेला आपला मावसभाऊ, मामेभाऊ किंवा आतेभाऊ यांच्यांशी लग्न लावता येत नाही. दिराशी मात्र लावता येते. हा विधवाविवाह रविवार, मंगळवार किंवा शुक्रवार या दिवशी होतो. प्रथमवराचे लग्न विधवेशी लावण्यापूर्वी प्रथम त्याचे लग्न शमीशी लागते.

मर्तिकप्रथा – हे मृतांना जाळतात. देवी येऊन मृत्यू झाल्यास मात्र प्रेत पुरतात. मृताच्या उजव्या हातात एक लाडू व तांब्याचे नाणे ठेवतात. हे नाणे लाडवात घातलेले असते. स्मशानाच्या अर्ध्या वाटेवर तिरडी खाली करून लाडू जमिनीवर ठेवतात व प्रत्येकजण त्यावर पाच पाच खडे ठेवतो. स्त्रीचे सुतक नऊ दिवस व पुरुषाचे दहा दिवस पाळतात. अस्थिविसर्जन एखाद्या नदीत किंवा जलाशयात करतात. श्राद्धही करतात. [म. ज्ञा. को.; रा. जा.; ट्रा. का. बाँ.; पूना गॅझे.]

भड्डरी

शकुन आणि पर्जन्यभविष्य सांगणारा एक ज्योतिषी. हा राजस्थानातला रहिवासी असावा. याच्या कालाबद्दल निश्चित काही सांगता येत नाही, तसेच त्याचे वास्तव चरित्रही उपलब्ध होत नाही. त्याच्या जन्मासंबंधीच्या काही दंतकथा आहेत, त्यांपैकी एक अशी–

एक होता ज्योतिषी. तो काशीत राहत होता. त्याला एक दिवस असा मुहूर्त सापडला, की त्या मुहूर्तावर गर्भाधान होऊन जन्मलेला पुत्र महापंडित होणार होता. आपण तो मुहूर्त साधावा म्हणून तो घरी जायला निघाला; पण वाटेतच संध्याकाळ झाली आणि घर मात्र दूर राहिले. कुठेतरी रात्र काढायची म्हणून तो एका अहिराच्या घरात शिरला. अहिरिणीने त्याचे स्वागत केले; पण स्वयंपाक करताना व जेवायला वाढताना ब्राह्मण तिला उदास दिसला. तिने त्याला औदासीन्याचे कारण विचारले. ब्राह्मणाने ते तिला सांगितले. अहिरिणीला वाटले, की तो मुहूर्त आपण साधावा म्हणजे आपल्या पोटी महापंडित पुत्र जन्मेल. तिने तसे केले. मग ब्राह्मण आपल्या मार्गाने निघून गेला. अहिरिणीला दिवस राहिले. योग्य वेळी तिला पुत्र झाला. त्याचे नाव तिने भड्डरी ठेवले. तो ज्योतिर्विद्यापंडित झाला.

याच दंतकथेच्या दुसऱ्या पर्यायात तो ब्राह्मण म्हणजे सुप्रसिद्ध ज्योतिषी वराहमिहिर होता आणि त्याच्यापासून अहिरिणीला भड्डरी हा पुत्र झाला, असे म्हटले आहे.

राजस्थानात भड्डरी नावाची एक स्त्री होती व ती जातीने भंगीण होती, अशीही एक वेगळी आख्यायिका आहे. डंक नावाचा ब्राह्मण ऋषी तिचा पती होता. भड्डरीला शकुनविद्या अवगत होती आणि ती हवामानाचे ठोकताळे बिनचूक सांगत असे. डंक ऋषीला ज्योतिर्विद्या अवगत होती आणि तो आपल्या विद्येला धरून भविष्य सांगत असे. त्या दोघांचा वादविवादही चाले. हा वादविवाद पद्यरूप असे. ही पद्ये पुढे एकत्र करण्यात आली आणि लोक त्यांना भड्डरीपुराण म्हणू लागले.

राजस्थानी भाषेत भड्डरीच्या वर्षाविषयक काही सूक्ती प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी काही अशा –

कातिक सुदी एकादसी, बादल बिजुली होय ।
तो असाढ़में भड्डरी, वर्षा चोखी होय ।।

अर्थ – कार्तिक शुद्ध एकादशीच्या दिवशी जर आकाश अभ्राच्छादित राहील व वीज चमकेल, तर भड्डरी म्हणते की, आषाढात पाऊस चांगला होईल.

माघ सत्तमी ऊजरी, बादर मेघ करंत ।
तो असाढ़ में भड्डरी, घनो मेघ बरसंत ।।

अर्थ – माघ शुद्ध सप्तमीच्या दिवशी जर ढग भरून आले, तर भड्डरी सांगते, आषाढात अतिवृष्टी होईल.

घाघ व डाक हेही वृष्टिविषयक भविष्य जाणणारे शकुनज्ञ होते. पुष्कळदा भड्डरीचे नाव त्या दोघांच्या बरोबरीने उच्चारले जाते. [श्री. कन्हैयालाल सहल – आजकल, ऑगस्ट १९६१; मरुभारती – जुलै १९५६; भो. क. का.]

भत्र

एक आदिवासी जमात. या लोकांना भोत्तोड असेही म्हणतात. हे प्राधान्याने ओडिसा प्रदेशातील कोरापुट जिल्ह्यात आढळतात. मध्य प्रदेशातील बस्तर जिल्ह्यातही यांची थोडी वस्ती आहे. वरंगळ ही यांची मूळ भूमी असून, हे तेवीस पिढ्यांपूर्वी प्रथम बस्तरमध्ये आणि तिथून ओडिसात गेले, अशी एक आख्यायिका आहे. गोंड पुरुषापासून यांची उत्पत्ती झाली असे म्हणतात. ते ओरिया भाषेची एक अपभ्रष्ट बोली बोलतात. हिंदू समाजात यांना बरेच वरचे स्थान आहे. यांच्यापैकी काहीजण जानवेही घालतात.

ओडिसामध्ये या जमातीचे बोडो व सानो या नावाचे दोन गट आहेत. या दोन गटांत आपसात लग्नसंबंध होत नाहीत. याशिवाय, यांच्यांत अनेक घराणीही आहेत. त्यांचे एकमेकांशी लग्नसंबंध होतात; पण समान देवकांच्या घराण्यांतील स्त्रीपुरुषांची लग्ने होत नाहीत.

भत्रांना शेतीचे ज्ञान चांगले असते. ते हौसेने शिकारही करतात. हे लोक साधेसुधे आहेत. त्यांच्या लोककथांतून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाप्रभू नावाचा देव आढळतो. तो सर्व मानवांची विभागणी करतो व त्यांना लोखंडी अवजारे, हातमाग, इ. देतो अशी त्यांची समजूत आहे. बमन देई नावाचाही त्यांचा एक देव आहे. तो सर्वांना कलाकुसर शिकवितो, असे मानतात. यांचा जादूटोण्यावर बराच विश्वास आहे. जादुगिरीच्या बऱ्याच कथा त्यांच्यांत प्रचलित आहेत. [ट्रा. मि. ओ.]

भत्रे एक जमात. या लोकांची वस्ती मुख्यत्वे पंजाबात आढळते. याशिवाय ते बंगाल, महाराष्ट्र, आंध्र, इ. प्रदेशांतही तुरळक आढळतात. यांची गणना कोणी गुन्हेगार जमातींतही करतात. हा पंजाबमधील फेरीवाल्यांचा एक वर्ग आहे, असेही काहींचे म्हणणे आहे. हे स्वतःला ब्राह्मण म्हणवितात, गळ्यात जानवे घालतात आणि कपाळावर गंध लावतात. ग्रहणाच्या वेळी लोक त्यांना दाने देतात.

भत्रे लोक भारतभर भटकत असतात. हे जिथे जातात तिथे भविष्य सांगण्याचा बहाणा करून लोकांना लुबाडतात. आपल्या फेरीत हे लहान-लहान लोखंडी सामान विकतात आणि लहान मुलांचे नाक-कान टोचतात.

यांची राहणी गलिच्छ असते. ते जुवेबाज आणि दारूबाजही आहेत. पंजाबमधील रमैया आणि भत्रा यांच्यांत खूप साम्य आहे. दिल्ली आणि हिस्सार भागात यांनाच रमया म्हणतात; तर लाहोर, रावळपिंडी या ठिकाणी यांना भत्रा म्हणतात. अंबाला भागात ही दोन्ही नावे प्रचारात आहेत.

यांच्या प्रमुखाला चौधरी असे म्हणतात. [पं. का.; गु. जा.]

भद्रकार एक प्राचीन गण आणि जनपद. भद्र आणि भद्रकार ही एकाच गणाची नावे असावी, असे महाभारतावरून (सभा.१४.२६) व मत्स्य पुराणावरून (११३.३५) दिसते. नंदभद्र, बलभद्र, इ. गण या गणातच मोडतात. ऐतिहासिक काळात उत्तमभद्र या नावाने ज्ञात असलेली जमात पौराणिक काळातील भद्रकार लोकांपैकी असावी. वीरभद्र असाही यांचा उल्लेख आढळतो. कर्णाच्या दिग्विजयाचे वर्णन करताना त्याने भद्रांना जिंकल्याचा उल्लेख आहे. बृहत्संहितेत भद्राश्व लोकांचा उल्लेख आहे, ते लोक व मध्य देशातील भद्र लोक एकच असावे, असे केर्नचे मत आहे.

यांचे वसतिस्थान कुरुलोक व मत्स्यलोक यांच्या नजीक असावे. हा भाग म्हणजे पंजाबमधील रोहटक असावा.

प्राचीन काळी गुन्हेगारांना दिलेल्या शिक्षा कार्यवाहीत आणण्याचे काम यांच्याकडे असे. काही काळानंतर त्यांनी राज्य स्थापन केले. [क. हि. वा. पु.; ए. सं. ए. इं.]

भद्रकाली देवीचे एक रूप. भद्र अर्थात मंगलप्रद असे ज्या कालीचे रूप ती भद्रकाली, अशी तिची व्याख्या आहे. हिच्या उत्पत्तीविषयी वेगवेगळ्या कथा आहेत, त्या अशा –

(१) आश्विन शुद्ध अष्टमीस ही कोटयवधी योगिनींसह दक्षयज्ञाच्या विध्वंसासाठी उत्पन्न झाली.

(२) एकदा पार्वतीने शंकराचा अनादर केला म्हणून त्याने तिला शाप देऊन भूतलावर पाठविले. तीच ही भद्रकाली होय. शिवाने दैत्यांच्या बंदोबस्ताचे काम तिला दिले.

(३) रावणाच्या भक्तीला भुलून शिवाने त्याला आत्मलिंग तर दिलेच; शिवाय पार्वतीही देऊन टाकली. रावण पार्वतीला घेऊन लंकेत जात असता तिने संकटातून सोडवण्याबद्दल विष्णूचा धावा केला. विष्णूने ब्राह्मणरूपाने पुढे येऊन रावणाची वाट अडविली. तो रावणाला म्हणाला, 'ही काळीबेंद्री आणि भयानक स्त्री घेऊन तू कुठे चाललास ?' त्यावर रावण म्हणाला, 'ब्राह्मणा, उगाच काहीतरी बोलू नकोस. ही त्रिभुवनसुंदरी पार्वती आहे.' ब्राह्मण म्हणाला, 'तिला खांद्यावरून उतरव आणि नीट पाहा एकदा.' रावणाने तसे केले. त्याला ती खरोखरच काळी कुरूप दिसली. त्याने तिला तिथेच टाकले आणि तो शिवाकडे भांडायला कैलासावर निघून गेला. ती काळी कुरूप

भद्रकाली – तिरुर्वारियुर

स्त्री जिथे उभी होती तिथेच राहिली आणि भद्रकाली या नावाने प्रसिद्ध झाली. ते स्थान म्हणजे गोकर्ण महाबळेश्वर हे होय.

काली, कामाक्षी, इ. देवता या पार्वतीच्या एकेका अवयवाच्या प्रतिनिधी असतात. सांख्यायन गृह्यसूत्रात तिचा उल्लेख आहे. वास्तुयागाच्या वेळी नैर्ऋत्य कोणात हिला बली द्यावा, असे मनू सांगतो (३.८९).

भद्रकालीचे रूप कसे असते, ते विष्णुधर्मोत्तर पुराणात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुढीलप्रमाणे सांगितले आहे – सुंदर रूप. अष्टादश भुजा. त्रिनेत्र. चार सिंहांच्या रथात आलीढासनावर बसलेली. अक्षमाला, त्रिशूळ, खड्ग, चंद्र, बाण, धनुष्य, शंख, पद्म, स्रुक्, स्रुव, कमंडलू, दंड, शक्ती, अग्नी, कृष्णाजिन, जल व रत्नपात्र या वस्तू धारण करणारी. एक हात अभय मुद्रेत.

काही ठिकाणी, हिला सोळा भुजा, तर काही ठिकाणी दहा भुजा असतात, असे सांगितले आहे.

दक्षिणेत हिची नेहमी नृत्यमूर्ती बनवतात. त्या मूर्तीचे ध्यान असे – ज्वालायुक्त मुकुट. त्या भोवती सर्प. सर्वांगातून अग्नि-ज्वाला. कपाळावर भस्मचर्चन. दोन मोठे दात तोंडातून बाहेर आलेले. दशभुज. त्यांपैकी चार हात रिकामे असून, इतर सहा हातांत पाश, शुक, भाला, डमरू, शूळ व अग्नी या वस्तू. तिच्या भोवती विघ्नेश्वर, वीरभद्र व अघोर हे तीन देव असतात. काही ठिकाणी तिचे दोन हात जुळलेले दाखवतात. दक्षिणेतल्या ग्रामीण भागांत हिलाच कालीयम्म किंवा कालम्म म्हणून ओळखतात. जुन्या काळी हिला नरबलीही देत.

महाराष्ट्रात ही ग्रामदेवतेसारखीच समजली जाते. भद्र-कालीची मंदिरे सर्वत्र आढळतात. नासिक क्षेत्रात जिचे मंदिर आहे, ती भद्रकाली अष्टभुजा असून वाघावर बसली आहे. वरंगळ येथे भद्रकालीची नऊ फूट उंच आणि तितकीच रुंद अशी एक भव्य मूर्ती आहे. तिचा एक पाय प्रेतावर आहे. काकतीय राजवंशाची ही कुलदेवता होती, असे कळते. महिषा-सुराला जिने मारले त्या देवीचे रूप हेच होय, असेही काही ठिकाणी म्हटले आहे. चिदंबरम येथे शिवाने नृत्यस्पर्धेत तिचा पराभव केला, म्हणून ती मस्तकी शिवलिंग धारण करते, अशी कथा आहे. [देवीकोश २; स्कंद पु. ब्र. खं.; ओ. इ. इं.]

भद्रकाली व्रत एक काम्य व्रत. आश्विन शु. नवमीला या व्रताला प्रारंभ करतात. अष्टमीच्या दिवशी घराच्या ईशान्य दिशेला किंवा घराच्या त्याच दिशेच्या भिंती-वर किंवा वस्त्रावर भद्रकालीची मूर्ती काढतात. नवमीला उप-वास करून मूर्तीच्या शस्त्रांची पूजा करतात. या व्रतात मद्य, मांस व पशुबली हे उपचार प्रमुख असतात. कोणत्याही वर्णा-तील स्त्री-पुरुषांना हे व्रत करता येते. व्रतावधी – एक वर्ष. उद्यापनाच्या वेळी कुमारिकेला भोजन व दशदाने करतात.

हे एक तिथिव्रतही आहे. चैत्र शुद्ध नवमीला भद्रकाली हे नाव आहे. त्या दिवशी उपवास करतात आणि भद्रकालीची विविध फुलांनी पूजा करतात. वाराही महिन्यांच्या नवमीला भद्रकालीची पूजा करावी, असे नीलमत पुराणात सांगितले आहे. फल – इच्छित फलप्राप्ती. [हि. ध.; व्रतराज.]

भद्रचतुष्टय व्रत एक काम्य व्रत. हे व्रत आणि भद्रोपवास व्रत एकच आहे. भद्रचतुष्टय व्रतात चार भद्रे आहेत, ती येणेप्रमाणे – (१) फाल्गुन शुद्ध द्वितीयेपासून तीन महिने. या भद्राला त्रिपुष्कर किंवा त्रिपुष्प असे म्हणतात. (२) ज्येष्ठ शुद्ध द्वितीयेपासून तीन महिने. याला त्रिपुष्पक म्हणतात. (३) भाद्रपद शुद्ध द्वितीयेपासून तीन महिने. याला त्रिराम म्हणतात व (४) मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून तीन महिने. याला विष्णुपद असे म्हणतात.

या व्रताचा विधी असा – प्रतिपदेला नक्तभोजन. द्वितीयेला स्नान करून देव-पितृतर्पण. चंद्रोदय होईपर्यंत हसणे व बोलणे वर्ज्य. द्वितीयेपासून पंचमीपर्यंत चार दिवस अनुक्रमे कृष्ण, अच्युत, अनंत व हृषिकेश या नावांचा जप. सायंकाळी चंद्राला अर्घ्य देऊन, रात्रौ जमिनीवर किंवा दगडावर अन्न ठेवून भोजन. व्रतावधी एक वर्ष. फल – पूर्वजन्मीचे स्मरण, कीर्ती व विजय यांची प्राप्ती. [हि. ध.]

भद्रद्वादशी व्रत एक काम्य व्रत. चैत्र शुद्ध द्वादशीपासून या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. या व्रतात एकादशीला उपवास आणि द्वादशीला विष्णूची पूजा करायची असते. प्रत्येक महिन्याला केशवापासून दामोदरा-पर्यंतच्या विष्णूच्या बारा नावांपैकी एका वेगळ्या नावाने त्याची पूजा करतात. फल – इष्टप्राप्ती. [हि. ध.]

भद्रपा चौऱ्यायंशी सिद्धांपैकी एक. याला भदेपा असेही म्हणतात. श्रावस्तीच्या चित्रकार कुळात याचा जन्म झाला असे मानतात. काहींच्या मते तो ब्राह्मण होता. हा कण्ह-पाचा शिष्य होता. काही पंडित भद्रपाला गुह्यपा म्हणूनही ओळखतात. याचे एक चर्यापद मिळते. [सि. सा.; पु. त. नि.]

भद्रपाल एक बोधिसत्त्व. हा मैत्रेय गणात येतो. निष्पन्न योगावलीप्रमाणे हा रक्तवर्ण असून, त्याच्या डाव्या हातात रत्न असते व उजवा हात वरद मुद्रेत असतो. याशिवाय, त्याच ग्रंथात त्याचे दुसरे रूप सांगितले आहे, ते असे – शुभ्र वर्ण, उजव्या हातात तेजस्वी रत्न आणि डाव्या हाताची मूठ कमरेवर ठेवलेली. [इं. बु. इ.]

भद्रपीठ एक प्राचीन आसन. हे आसन वेताचे बनवीत. सांप्रत वेत किंवा बांबू यांचे बनवलेले मोढा नामक जे आसन असते, त्याच्याशी याचे बरेच साम्य आहे. भद्रपीठ हे आसन सर्वसाधारणपणे उंच व गोल असून त्यावर गादी ठेवलेली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे. काही वेळा खुर्चीप्रमाणे त्याला हात व पाठही असे.



भद्रपीठ

इतरही आकारांत हे आसन विणीत. [मै. गु. अ. ग्रं.]

भद्रपाल (एका नेपाळी चित्रावरून)

भद्रप्राप्तिव्रत एक काम्य व्रत. चैत्र शुद्ध द्वादशीला या व्रताचा प्रारंभ करतात. त्या दिवशी उपवास आणि विष्णू व लक्ष्मी यांच्या चांदीच्या मूर्ती करून त्यांची पूजा करतात. त्या मूर्तींच्या भिन्न अवयवांवर मदनाच्या विविध नावांनी न्यास करतात. दुसऱ्या दिवशी त्या मूर्तींचे ब्राह्मणाला दान देतात. अप्सरांना नारायणाच्या प्राप्तीसाठी नारदाने हे व्रत करायला सांगितलेहोते. [हि. ध.]

भद्रबाहू एक जैन आचार्य. याला अंतिम श्रुतकेवली मानतात. भद्रबाहुचरित नामक ग्रंथात याच्याविषयी पुढील माहिती आढळते –

अवंती देशात चंद्रगुप्ती नावाचा राजा राज्य करीत होता. उज्जयिनी ही त्याची राजधानी होती. एकदा चंद्रगुप्तीला भावी अरिष्टसूचक अशी सोळा स्वप्ने पडली. दुसऱ्या दिवशी सकाळी आचार्य भद्रबाहू हा नगरात आल्याची वार्ता त्याला कळली. उज्जयिनीतील एका रम्य बागेत त्याचा मुक्काम होता. राजा त्याला भेटायला गेला व त्याने आपल्या स्वप्नांचे फल त्याला विचारले. ते सांगितल्यावर राजाने त्याच्याकडून जैन धर्माची दीक्षा घेतली.

काही दिवसांनंतर एकदा भद्रबाहू जिनदासाच्या घरी गेला असता, तिथे पाळण्यात असलेल्या एका दोन महिन्यांच्या बालकाने त्याला जा जा असे म्हटले. तेव्हा याच्या ध्यानात आले, की लवकरच बारा वर्षांचा मोठा दुष्काळ पडणार आहे. तेव्हा हा पाचशे मुनींसह दक्षिणेस निघाला. चंद्रगुप्तीही त्याच्या बरोबर गेला. कर्नाटकात पोचल्यावर श्रवणबेळगोळ या ठिकाणी राजाने आपला देह ठेवला.

हा चंद्रगुप्ती कोण होता, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. कोणी त्याला सम्राट चंद्रगुप्त मानतात, तर कोणी त्याला अशोकाचा नातू सम्राट संप्रती (चंद्रगुप्त द्वितीय) मानतात.

दुष्काळ संपल्यावर जैन आगमांचे व्यवस्थित संकलन करण्यासाठी पाटलिपुत्र नगरात जैन श्रमणांची एक सभा भरली होती. त्या वेळी जैन आगमांच्या अकरा अंगांचे संकलन करण्यात आले; पण बाराव्या अंगाचे स्मरण चौदा पूर्वांचे ज्ञान असलेल्या भद्रबाहूशिवाय कोणालाच नव्हते आणि भद्रबाहू त्या वेळी नेपाळात होता. तेव्हा त्याच्याकडून ते ज्ञान मिळविण्यासाठी स्थूलभद्र नेपाळात गेला व भद्रबाहूने त्याला ते सांगितले, अशीही एक कथा आहे.

भद्रबाहूच्या कालासंबंधी मतभेद आहेत. दिगंबर संप्रदायाच्या मते भद्रबाहू नावाचे दोन आचार्य होऊन गेले. त्यांपैकी एक चंद्रगुप्त मौर्याचा समकालीन होता आणि त्याचा मृत्यू महावीराच्या निर्वाणानंतर १६२ वर्षांनी म्हणजे सनपूर्व ३६५ या वर्षी झाला. कोणी तो सनपूर्व २९७ या वर्षी मरण पावला असे मानतात; तर दुसऱ्याचा मृत्यू सनपूर्व १२ या वर्षी झाला, असे समजतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुसऱ्या भद्रबाहूने दसनिज्जुती व कल्पसूत्रे यांची रचना केली, असे म्हणतात.

याच्या मृत्यूनंतरच जैनांत श्वेतांबर व दिगंबर असे दोन भेद पडले. [वि. स्मृ ग्रं.; म. च. को.; जै. ध.; हिं. वि. को.]

भद्रविधी एक वारयुक्त तिथिव्रत. भाद्रपद शुद्ध षष्ठीला रविवार असेल, तर त्या दिवसाला भद्र असे म्हणतात. त्या दिवशी या व्रताला प्रारंभ करावा. व्रतविधी असा— व्रताच्या दिवशी नक्त किंवा उपवास करून सूर्याची मालती पुष्पांनी, पांढऱ्या चंदनाने, विजय धूपाने आणि पायसाचा नैवेद्य दाखवून मध्यान्हकाली पूजा करावी. नंतर ब्राह्मणभोजन घालावे. फल —भानुलोकप्राप्ती. [हि. ध.]

भद्रा पंचांगातील एक अंग. अकरा करणांपैकी एक. सर्व महिन्यांच्या शुक्ल पक्षात अष्टमी व पूर्णिमा यांच्या पूर्वार्धी आणि चतुर्थी व एकादशी या तिथींच्या उत्तरार्धी भद्रा नियमाने असते. तसेच कृष्ण पक्षात तृतीया व दशमी या तिथींच्या उत्तरार्धी आणि सप्तमी व चतुर्दशी या तिथींच्या पूर्वार्धी ती येते. एकंदरीने प्रत्येक महिन्यात आठ वेळा भद्रा येते. हिला विष्टी व कल्याणी असेही म्हणतात. महिन्यातील आठ भद्रांची नावे रत्नकोशात दिली आहेत, ती अशी —(१) हंसी (२) नंदिनी (३) त्रिशिरा (४) सुमुखी (५) करालिका (६) वैकृती (७) रौद्रमुखी व (८) चतुर्मुखी.

वरील नावांच्या अर्थांप्रमाणे भद्रेचे शुभत्व किंवा अशुभत्व मानायचे असते.

वर उल्लेखिलेल्या प्रहरांच्या आरंभी पाच घटिका भद्रेचे मुख असते, ते अतिअशुभ मानतात. तसेच या प्रहराच्या शेवटच्या तीन घटिका भद्रेचे पुच्छ असते, ते शुभ समजतात. मुख व पुच्छ यांशिवाय इतर भद्रा मध्यम असते.

कुंभ, मीन कर्क व सिंह या चार राशींना चंद्र असता मृत्युलोकी भद्रा असते आणि मेष, वृषभ, मिथुन व वृश्चिक या चार राशींना चंद्र असता, ती पाताळी असते. ज्या लोकी भद्रा असेल त्या लोकी तिचे फल मानतात. अन्यत्र तिचे फल नाही.

भद्रा चालू असताना कोणतीही गोष्ट करू नये, असे शास्त्रवचन आहे म्हणून पंचांगात तिचा प्रारंभ व समाप्तिकाल देण्याची पद्धत आहे. त्यांना अनुक्रमे भद्राप्रवृत्ती व भद्रानिवृत्ती अशी नावे आहेत. [सं. कौ.; मु. चिं.]

भद्राचलम आंध्र प्रदेशातील एक क्षेत्र. गोदावरी जिल्ह्यात राजमहेंद्रीपासून १०४ मैलांवर गोदावरीच्या तीरी हे क्षेत्र आहे. इथे रामाचे एक भव्य मंदिर असून, त्याच्या भोवती चौवीस मंदिरे आहेत.

भद्र नावाच्या भक्ताला दर्शन देण्यासाठी राम या ठिकाणी आला होता, अशी कथा आहे. रावणाने सीतेचे हरण या ठिकाणीच केले, असे सांगतात. इथे रामदास नावाचा एक संतकवी



राममंदिर — भद्राचलम

होऊन गेला. त्याच्यामुळेच या क्षेत्राला महत्त्व प्राप्त झाले. इथल्या रामाच्या दर्शनाला दरवर्षी हजारो यात्रेकरू येतात. रामनाम कोटिसंख्येने लिहून ते इथल्या रामाला समर्पण करण्यासाठीही कांही भक्तगण इथे येतात. [डि. सा. इं. म्यु. म्यु.]

भद्राचल रामदास (इ. स. चे १७वे शतक) एक तेलुगू संतकवी. याचा जन्म आंध्र प्रदेशातल्या नेलकोंडपल्ले नामक गावी एका नियोगी ब्राह्मणकुळात झाला. याच्या पित्याचे नाव लिंगन्न असून, आईचे कामम्मा असे होते. याचा पिता गोवळकोंडा राज्यात मंत्री होता. भद्राचल रामदासाचे मूळ नाव गोपन्न असे होते. त्याचे आई-वडील परम रामभक्त असल्यामुळे गोपन्नालाही बालपणापासून रामभक्तीचा नाद लागला. लहान वयातच त्याने रामायण, भागवत, इ. ग्रंथांचे पठण केले व तेलुगू, संस्कृत, उर्दू, फारसी, इ. भाषांतही तो प्रवीण झाला. रघुनाथ भट्टाचार्य नावाच्या एका सत्पुरुषाने त्याला कबीर पंथाची दीक्षा दिली असल्याचे सांगतात.

त्याच्याविषयी दोन आख्यायिका प्रसिद्ध आहेत, त्या अशा—

गोपन्न हा भद्राचलमचा तहसीलदार असताना एकदा त्याने गोरगरिबांना अन्नदान केले. त्याप्रसंगी त्याचा लहान मुलगा चिन्नन्ना धान्याच्या पोत्यांखाली सापडून मरण पावला. तथापि रामनामचिंतनात मग्न असलेल्या गोपन्नाला या दुःखद घटनेचे भानही नव्हते. संध्याकाळी त्याला ती गोष्ट कळल्यावर त्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या मृत पुत्राचे कलेवर राममूर्तीपुढे ठेवून, एका करुणगीतात रामाला आपले दुःख निवेदन केले. गोपन्नाच्या त्या करुणगीताने रामाचे हृदय द्रवले व त्यामुळे चिन्नन्ना पुनश्च सजीव झाला ! गोपन्नाच्या रामभक्तीचा हा साक्षात्कार पाहून लोक त्याला भद्राचल रामदास म्हणून ओळखू लागले.

यानंतर गोपन्नाने भद्राचलम येथे एक राममंदिर उभारले व त्याच्या निर्मितीसाठी सरकारी खजिन्यातला पैसा वापरला. त्यामुळे गोवळकोंडयाच्या बादशाहाचा त्याच्यावर राग झाला व त्याने त्याला तुरुंगात टाकले. भद्राचल रामदास बारा वर्षे तुरुंगात होता. या प्रदीर्घ काळात त्याची रामभक्ती पूर्वीप्रमाणेच चालू राहिली. तथापि शेवटी शेवटी त्याला तुरुंगातल्या हाल-अपेष्टांचा वीट आला व त्याने विषप्राशन करून आत्महत्या करण्याचे ठरवले. भद्राचल रामदासाचा हा निर्णय पाहताच श्रीरामांनी स्वतः गोवळकोंडयाच्या बादशाहाकडे पैशाचा भरणा केला व त्याची पावती भद्राचल रामदासाला तुरुंगात पोहोचती केली. त्यानंतर बादशाहाने त्याला तुरुंगातून मुक्त केले.

भद्राचल रामदासाने रामभक्तिपर अनेक स्फुट गीते लिहिली असून, ती आजही आंध्रात घरोघरी सकाळ-संध्याकाळ गायिली जातात. त्यांची भाषा मधुर, रचना सरळ व गेयप्रधान आहे. [श्री. विजय राघव रेड्डी– धर्मयुग, १९ एप्रिल १९६४]

भद्राजननशांती भद्रा योग असताना मूल जन्मल्यास ही शांती करतात. त्यासाठी चार दिशांना चार व मध्ये एक असे पाच कलश मांडतात. मध्यभागी ठेवलेल्या कलशावर भद्रा देवतेचे आवाहन करतात. नंतर बाकीच्या कलशांवर पूर्वादी क्रमाने सूर्य, रुद्र, गणपती आणि ऋषभ या देवतांचे आवाहन करतात. मग त्यांची यथाविधि पूजा करतात. अग्निस्थापना करून ग्रहांची स्थापना व पूजा करतात. प्रधान होमाच्या वेळी प्रमुख देवतांना समिधा, चरू, तीळ व तूप यांच्या आहुती देतात. बलिदान आणि पूर्णाहुती झाल्यावर अभिषेक करतात. नंतर आचार्याला दक्षिणा देऊन भद्राजनन शांतीचा विधी संप वितात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

भद्रावती चांद्याच्या वायव्येस अठरा मैलांवर भांडक नावाचे गाव आहे, तिथे ही प्राचीन नगरी होती. जैमिनीय अश्वमेधात भद्रावती युवनाश्वाची राजधानी होती, असे सांगितले आहे. सध्या इथे असंख्य भग्नावशेष विखुरलेले आहेत. त्यांवरून तेव्हा हे हिंदू, बौद्ध व जैन या तीन्ही धर्मांचे मोठे केंद्र होतेसे दिसते. इ. स. च्या १० ते १३ शतकांतील पन्नासपेक्षा अधिक मूर्ती इथे सापडल्या आहेत. मूर्तिविज्ञान व शिल्पकला या दृष्टीने या मूर्ती महत्त्वाच्या आहेत. इथले भद्रनागाचे प्राचीन मंदिर कलापूर्ण आहे. नाग ही भद्रावतीची अधिष्ठात्री देवता आहे. मंदिराच्या गर्भगृहात नागाची, अनेक फणा असलेली प्रतिमा आहे. तसेच इथली शेषशायी विष्णूची मूर्तीही अत्यंत सुंदर आहे. मंदिराच्या बाहेरच्या भिंतींवरील कोरीव कामही सूक्ष्म व कौशल्यपूर्ण आहे. इथून जवळच एका डोंगरात एक बौद्ध लेणे असून, त्यात बुद्धाची मूर्ती आहे. [स. भा. प्र. वं.; खं. वै.]

भद्राव्रत एक काम्य व्रत. कार्तिक शुद्ध तृतीयेपासून याचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रतविधी असा– व्रतधारी मनुष्याने गोमूत्र प्राशन करून व केवळ सातूचे अन्न खाऊन नक्त भोजन करावे. प्रत्येक महिन्यात हे व्रत करावे. उद्यापनाच्या वेळी एक गाय दान द्यावी. फल–कल्पपर्यंत गौरी-लोकात निवास. [हि. ध.]

भद्राश्व एक नगर. मेरू पर्वताच्या पूर्वेकडील मंदर पर्वताजवळ हे स्थान आहे. याच्या एका हद्दीवर गंधमादन नावाचा पर्वत आहे. सीता नावाचा जलप्रवाह इथूनच वाहतो. ही नगरी म्हणजे धर्माचा पुत्र भद्राश्व याची राजधानी होय. कदाचित त्याच्या नावावरूनच या नगरीला भद्राश्व हे नाव मिळाले असावे. भद्राश्व राजा हयग्रीवाचा भक्त होता. तो त्याच्या भजन-पूजनात सदैव निमग्न असे, असे भागवत पुराणात म्हटले आहे (भाग. पु. ५.१६. १०.) परीक्षित राजाने हा भाग जिंकला होता (भाग. पु. १. १६. १३). इथे राहणारे लोक गौरवर्णी व सुंदर असून, ते हजारो वर्षे जगतात, असे वायू पुराणात म्हटले आहे. इथे सत्य व अहिंसा नांदते आणि इथले लोक शिव आणि गौरी यांची पूजा करतात, असे सांगितले आहे. या ठिकाणी विष्णू हयग्रीव या स्वरूपात राहतो (विष्णू पु. २. २. ५०). जंबुद्वीपातील नऊ वर्षांपैकी एका वर्षाचे नाव भद्राश्व असे होते. तो चीन देश असावा. [पु. इं.; पु. वि.]

भद्रासन एक प्राचीन आसन. हे राजांसाठी असे. हे सोने, चांदी किंवा तांबे यांपैकी कोणत्या तरी एका धातूचे बनवीत. आसनाच्या उंचीच्या प्रमाणात त्याचे तीन प्रकार केलेले होते. मांडलिक राजांसाठी हे आसन एक हात (१८") उंच, विजीगीषू राजांसाठी सव्वा हात (२२½") व महाराजाधिराजांसाठी दीड हात (२७") उंच असे. [ह. च. सां. अ.]

भद्रासप्तमी एक काम्य व्रत. मार्गशीर्ष शु. सप्तमीस हे व्रत करतात. या व्रताची देवता सूर्यनारायण ही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. व्रत करणाऱ्याने चतुर्थीपासून सप्तमीपर्यंत अनुक्रमे एकभुक्त, नक्तभोजी व अयाचितभोजी राहावे आणि सप्तमीस उपवास करावा, असे सांगितले आहे. त्या दिवशी सूर्यमूर्तीला तूप, दूध व उसाचा रस यांचा अभिषेक करून महापूजा करायची असते. फल- सूर्यलोकप्राप्ती. [व्र॰ प॰]

भद्रिलपुर एक प्राचीन जैन क्षेत्र. बिहार प्रदेशातील हजारीबाग जिल्ह्यातील भदिया गाव म्हणजेच हे क्षेत्र होय. हे स्थान इंटरगंजपासून सुमारे पाच मैल दूर असलेल्या कुलुहा डोंगराजवळ आहे. आज इथे छिन्नविच्छिन्न झालेल्या अनेक जिनप्रतिमा मिळतात. मात्र जैन लोकांनी सांप्रत या क्षेत्राची उपेक्षा केली आहे. पूर्वी गयेच्या दक्षिणेला मलय नावाचे एक जनपद होते आणि भद्रिलपुर ही त्याची राजधानी होती. जैनांच्या अतिशय क्षेत्रात या क्षेत्राची गणना होते. [भा. प्रा. जै. ती.]

भनसाळी एक जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने सिंध व कच्छ-काठियावाड या भागांत आढळते. भनसाळी हे नाव भानू म्हणजे सूर्य या शब्दावरून पडले असावे. भानुसाळ म्हणून एक पौराणिक राजा होता. त्यावरून भनसाळी अथवा भन्साळी हा शब्द निघाला, असे म्हणतात. हे लोक आपणाला सूर्यवंशी राजपूत समजतात. वेगू हे यांचे दुसरे नाव आहे. इ. स. १२०० च्या सुमारास कच्छच्या रणात यांचा वेगूगड नावाचा एक किल्लाही होता.

या जातीत शहाण्णव कुळे आहेत. हे वैष्णवपंथी असून, हिंगलाज ही त्यांची कुलदेवता आहे. हे लोक शाकाहारी असून, ते लोहाणा, खत्री व कायस्थ यांच्याशी रोटीव्यवहार करतात. गुजराती सारस्वत ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात. यांच्या चालीरीती व सणसमारंभ लोहाणांप्रमाणे आहेत. शेती व मजुरी हे यांचे व्यवसाय होत. सिंधमधील भनसाळी मात्र तांब्या-पितळेचा व्यापार करतात. [मुं. इ. जा.; सिं. क.]

भयानक शृंगारादी रसांतील सहावा रस. भीती हा या रसाचा स्थायीभाव आहे. ज्याच्यापासून भीती वाटते, तो आलंबन विभाव; त्याच्या विकट कृती हा उद्दीपन विभाव; बोबडी वळणे, कंप उत्पन्न होणे, संरक्षणासाठी आजूबाजूला पाहणे, पळून जाणे, इ. अनुभाव आणि जडता, त्रास, ग्लानी, दैन्य, मूर्च्छा हे या रसाचे व्यभिचारीभाव होत.

वाघ-सिंहादी हिंस्र पशू, घनदाट अरण्य, युद्ध, संबंधित व्यक्तीचा मृत्यू या गोष्टी पाहून व गुरूचा किंवा राजाचा अपराध, इत्यादींपासून भयानक रसाची उत्पत्ती होते, असे सांगितले आहे.

स्त्री, नीचप्रकृती लोक, लहान मुले व कातर व्यक्ती हे या रसाचे आश्रय होत. या रसाचा वर्ण काळा असून, यम ही याची देवता आहे, असे विश्वनाथाने साहित्यदर्पणात सांगितले आहे.

गोविंदाग्रजांच्या 'स्मशानातले गाणे' या कवितेतील पुढील ओळी या रसाचे उदाहरण म्हणून सांगता येतील–

पवन गातसे कां बेसूर ?
हंसे भुतांचे का भेसूर ?
प्रेतांचा चौपवरी सूर
कीं प्रेतातुनि सुटला म्हणुनी आत्मा करी थैमान ?
तों सरणांतुनि अस्थिच उठती
त्यांची तुटकीं प्रेतें हातीं
स्कंधीं त्यांच्या भुतें बैसली
करिती बडबड शब्द ही न धड कवि बसवी अनुमान

भरताने आपल्या नाट्यशास्त्रात भयानक हा प्रधान रस न मानता, तो बीभत्स रसापासून उत्पन्न होतो, असे सांगितले आहे. [श. क.; हिं. सा. को.; सु. का. शा.]

भरणी अश्विन्यादी गणनेतील दुसरे नक्षत्र. भरणीच्या तीन तारका असून, आकाशात त्यांचा त्रिकोण दिसतो. यम ही या नक्षत्राची देवता आहे. उग्र आणि अधोमुख या दोन गणांत याची गणना होते. विद्या, अर्घ्य आणि भूमिखनन या गोष्टींसाठी हे नक्षत्र प्रशस्त मानलेले आहे.

भरणी ही महिषारूढ, गजवदन, दंड व पाश धारण करणारी, रक्तनेत्र व उग्र आहे, असे तिचे रूपध्यान हेमाद्रीने वर्णिले आहे.

भरणी नक्षत्रावर जन्मलेल्या माणसाची सदा अपकीर्ती होते, तो दुष्ट असतो आणि नानाविध करमणुकींत तो आपला काळ घालवतो, असे कोष्ठीप्रदीपात सांगितले आहे. [श. क.]

भरणी उत्सव केरळ प्रदेशातील एक उत्सव. फाल्गुन मासातील भरणी नक्षत्राच्या दिवशी या उत्सवाला प्रारंभ करतात. हा उत्सव कालीमातेच्या मंदिरात होतो. काही ठिकाणी बिनचाकाच्या गाडीवर एका माणसाला ठेवून आणि ती गाडी खांद्यावर घेऊन त्याची मिरवणूक काढतात. कोंडुगल्लूर नामक शहरात होणारा हा उत्सव फार महत्त्वाचा मानतात. या उत्सवासाठी गावोगावचे स्त्री-पुरुष तिथे जमा होतात. ते कालीमातेची पूजा करून तिला कोंबडीचा बळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देतात. या वेळी भजन-कीर्तनाच्या ऐवजी स्त्री-पुरुष अश्लील गीते गातात. या गीतांना भरणीप्पाट्टू असे नाव आहे. या गीतांच्या गायनाने देवी प्रसन्न होते, अशी भक्तांची श्रद्धा आहे. भरणीप्पाट्टूत स्फुट गीतांप्रमाणे प्रबंध काव्येही आहेत. केरळी लोकांचा हा शिमगाच होय. [युगप्रभात, १६ मार्च १९६४]

भरत (१) आदिप्रजापती मनूला भरत हे नाव होते. मनूने सर्वांत प्रथम धर्म व न्याय यांची मर्यादा ठरवली आणि त्या व्यवस्थेनुसार प्रजांचे भरणपोषण होऊ लागले. या भरण-पोषणाच्या कार्यामुळे मनूला भरत असे म्हणू लागले.

भरणाच्च प्रजानां चवै मनुर्भरत उच्यते ।
निरुक्तवचनाच्चैव वर्षं तद् भारतं स्मृतम् ॥
(वायू पु. ४५.७६)

अर्थ.–लोकांचे भरण-पोषण केल्यामुळे मनूला भरत असे म्हणतात. नावाच्या या निरुक्तीवरून या देशाला भरत असे नाव मिळाले.

ज्या भूप्रदेशात मनूच्या संततीने निवास केला व ज्या प्रदेशात मनूचे रीतिरिवाज प्रचलित झाले, त्या देशाला भारतवर्ष असे नाव मिळाले. [भा. मौ. ए.]

(२) ऋग्वेदकालीन एक जनसमूह. ऋग्वेदात अनेक वेळा या लोकांचे नाव येते. या लोकांची वस्ती प्रामुख्याने सरस्वतीच्या तीरावर होती. ते ज्या प्रदेशात राहत होते, त्याला भरत जनपद असे नाव होते. भरतवंशातील राजा सुदास रावी नदीच्या तीरावर राहत होता, असे ऋग्वेदात सांगितले आहे (७.८.५). त्याच कुळातील आणखी दोन राजे देवश्रवा व देववात हे मध्य देशातील सरस्वती, आपया व दृषद्वती या नद्यांच्या भूमीत राहत होते. भरत लोकांनी अनेक यज्ञ केले. त्यामुळे अग्नीला काही ठिकाणी ब्राह्मण भारत म्हणजे भरतांचा अध्वर्यू असे म्हटले आहे. भरतांचा सुदास, दिवोदास व तृत्सू यांच्याशी संबंध होता. भरत लोक मोठे पराक्रमी होते. भरतांची दिव्य संरक्षक शक्ती जिच्यात मूर्तरूप झाली होती, अशा भारती देवीचा उल्लेख आप्री सूक्तात आहे (ऋ. १.२२.१०). पुढील काळात या लोकांच्या अनेक राजांची नावे ब्राह्मणग्रंथांत आलेली आहेत. ब्राह्मणकालात भरत हे कुरुपांचालांत विलीन झाले, असे ओल्डेनबर्गने सांगितले आहे.

भरत लोकांना वैदिक वाङ्मयात महत्त्वाचे स्थान आहे. कारण यांच्यांतील दिवोदास, सुदास, विश्वामित्र हे पुरुष फार पराक्रमी होते. [वे. इं.; वै. सा.]

(३) इक्ष्वाकू वंशातील राजा. दशरथ व कैकेयी यांचा पुत्र. भरताच्या पत्नीचे नाव मांडवी. शत्रुघ्नासह हा आपल्या आजोळी असता, दशरथाने रामचंद्राला यौवराज्याभिषेक करायचे ठरविले; पण आपल्या मुलाला राज्य मिळावे, म्हणून कैकेयीने तो बेत मोडून काढला. दशरथाकडे असलेले आपले दोन जुने वर या वेळी तिने मागून घेतले. एका वराने तिने रामचंद्राला चौदा वर्षे वनवासाला धाडले व दुसऱ्या वराने भरताला राज्य मिळण्याची व्यवस्था केली. त्याप्रमाणे रामचंद्र वनवासाला गेला आणि दशरथ पुत्रवियोगाने मरण पावला. अशा वेळी भरताला आजोळाहून अयोध्येला आणण्यात आले; पण आपल्याला राज्य मिळावे म्हणून आईने केलेल्या कृत्याची त्याला फार चीड आली आणि त्याने तिची निर्भर्त्सना केली. नंतर वसिष्ठांच्या सांगण्यावरून त्याने पित्याचे और्ध्वदेहिक केले. त्यानंतर सर्व राजकारणी पुरुषांनी भरताला राजा होण्याची विनंती केली. तेव्हा भरताने ज्येष्ठ बंधू रामचंद्र यालाच राज्याभिषेक होणे योग्य आहे, असे सांगितले व राज्याभिषेकाचे सर्व साहित्य घेऊन तो रामचंद्राकडे चित्रकूटावर पोचला. त्याने रामाला राज्य स्वीकारण्याविषयी खूप आग्रह केला; पण वडिलांची आज्ञा मी मोडणार नाही, असे रामचंद्राने सांगितले आणि राज्य स्वीकारायला नकार दिला. नंतर त्याने भरताची समजूत घालून त्याला अयोध्येला परत जायला सांगितले. तेव्हा भरताने त्याच्या पादुका घेतल्या आणि त्याला सांगितले. 'मी या पादुकांच्या नावाने राज्य चालवीन, तुझ्याप्रमाणे जटावल्कले धारण करीन, फलमूलांशिवाय दुसरे काही खाणार नाही, चौदा वर्षे तुझी वाट पाहत गावाच्या बाहेर राहीन आणि चौदा वर्षे संपल्यावर तू आला नाहीस, तर मी अग्निकाष्ठे भक्षण करीन.' असे सांगून व रामाची आज्ञा घेऊन भरत परतला व रामचंद्राच्या पादुका घेऊन अयोध्येजवळच्या नंदिग्रामात राहिला. कोतेही राजोपचार हा स्वतः न घेता पादुकांना अर्पण करीत असे.

अशा प्रकारे चौदा वर्षे गेल्यावर रामाने हनुमानाला आपल्या आगमनाची वार्ता सांगण्यासाठी त्याच्याकडे पाठवले. त्या वेळी हनुमानाला तो वल्कले धारण केलेला, जटाधारी, दीन, कृश असा तपस्वी दिसला. राम येतो आहे, ही आनंदाची वार्ता ऐकल्यावर त्याने हनुमानाला अनेक बक्षिसे दिली. नंतर भरत व शत्रुघ्न यांनी सर्व नगर शृंगारून रामचंद्राचे स्वागत केले. मग मोठ्या समारंभाने रामचंद्राला राज्याभिषेक करून भरताने आपल्याजवळ ठेवीसारखे असलेले राज्य त्याला परत केले.

सबंध आयुष्यात भरतावर युद्धाचा प्रसंग एकदाच आला. रामचंद्र राज्य करीत असता भरताच्या केकयाधिपती मामाने गंधर्वांचे पारिपत्य करण्याविषयी त्याला निरोप धाडला. तेव्हा त्यासाठी रामचंद्राने भरताला त्याच्या तक्ष व पुष्कल या दोन मुलांसह तिकडे धाडले. सिंधूच्या दोन्ही बाजूंच्या प्रदेशात गंधर्व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust Funding by MoE-IKS

राहत होते, तिथे जाऊन भरताने त्यांचे पारिपत्य केले व त्या प्रदेशात दोन नगरे स्थापन केली. एका नगरीचे नाव तक्षशिला असे ठेवून, त्याने तिथे तक्षाची स्थापना केली व दुसरीचे नाव पुष्कलावती ठेवून, तिथे पुष्कलाची योजना केली.

व्यक्तीचे चारित्र्य शुद्ध व निष्कलंक असले पाहिजे, अशी भरताची धारणा होती. कैकेयीने आपल्यासाठी राज्य मागून घेतले, तेव्हा परंपरेने आपणही राज्यलोभी ठरलो, या जाणिवेने त्याला फार दुःख झाले. आपल्या कुळाचा त्याला फार अभिमान होता. तो आपल्या मातेला म्हणतो –

कुलस्य त्वमभावाय कालरात्रिरिवागता ।
अङ्गारमुपगुह्य स्म पिता मे नावबुद्धवान् ।।

(वा. रा. अयोध्या. ७३.४)

अर्थ – कुळाचा नाश करण्यासाठी तू एखाद्या काळरात्री-[प्र]माणे आलीस. आपण जळत्या निखाऱ्याला जवळ केले आहे, [हे] माझ्या पित्याच्या ध्यानात आले नाही.

अस्मिन् कुले हि सर्वेषां ज्येष्ठो राज्येऽभिषिच्यते ।
अपरे भ्रातरस्तस्मिन् प्रवर्तन्ते समाहिताः ।।

(वा. रा. अयोध्या. ७३.२०)

अर्थ – (आमच्या) या कुळात ज्येष्ठ पुत्रालाच राज्याभिषेक क[र]त असतात. बाकीचे सगळे बंधू एकजुटीने त्याच्याच तंत्राने [वाग]त असतात.

कैकेयीने भरताला राज्य मिळावे, म्हणून जे कारस्थान केले, त्या[स] त्याचीही संमती असावी, असा लोकांचा समज होता. कौसल्येचीही अशीच समजूत होती. म्हणूनच तिने तो भेटल्या-वरा[प्र]थम त्याची प्रच्छन्न निंदाच केली.

[भ]रत मोठे सैन्य घेऊन रामचंद्राला परत आणण्यासाठी निघा[ला] असता शृंगवीरपुराचा राजा गुह व भरद्वाज यांनीही त्याच्या सद्हेतूविषयी शंका घेतली. भरद्वाजासारख्या ज्ञानधन तपस्व्यालाही आपल्या मनाची खरी ओळख पटू नये, याचे [भ]रताला फार वाईट वाटले.

भरताचे रामचंद्रावर अत्यंत प्रेम होते. गुहाच्या घरी रामाच्या शय्येचे दर्शन होताच त्याला फार दुःख झाले. तो म्हणतो –

हा हतोऽस्मि नृशंसोऽस्मि यत् सभार्यः कृते मम ।
ईदृशीं राघवः शय्यामधिशेते ह्यनाथवत् ।।
अद्यप्रभृति भूमौ तु शयिष्येऽहं तृणेषु वा ।
फलमूलाशनो नित्यं जटाचीराणि धारयन् ।।

(वा. रा. अयोध्या. ८८.१७,२६)

[अर्थ] – हाय रे दुर्दैवा, मी अत्यंत दुष्ट आहे. केवळ माझ्या-साठी आपल्या प्रिय पत्नीसह रामचंद्र अशा शय्येवर अनाथा-प्रमाणे पडला. आजपासून मीही जमिनीवर किंवा तृणावर झोपेन आणि जटा व वल्कले धारण करून, फळे व कंदमुळे खाऊन निर्वाह करीन.

भरताच्या अंतःकरणाच्या या श्रीमंतीची कल्पना फक्त राम-चंद्राला होती आणि त्याच्यावर त्याचा पूर्ण विश्वास होता, हे त्यातल्या त्यात भरताचे सुदैव होय. [प्रा. च. को.; वाल्मीकी रामायण—श्री. बाळशास्त्री हरदास.]

(४) पौरव वंशातील एक राजा. हा दुष्यंत व शकुंतला यांचा पुत्र होता. याला दमन किंवा सर्वदमन असे नाव होते. पित्याच्या मृत्यूनंतर भरत राज्यावर बसला व पित्याप्रमाणे चक्रवर्ती झाला. हा फार पराक्रमी होता.

याने किरात, हूण, यवन, आंध्र, कंक, खश, इ. लोकांना जिंकून दिग्विजय केला. त्याने असुरांवरही विजय मिळवला व त्यांनी अपहार केलेल्या स्त्रियांचा उद्धार केला.

मामतेय दीर्घतम्याच्या पौरोहित्याखाली याने गंगाकिनारी पंचावन्न व यमुनातटावर अठ्ठयाहत्तर अश्वमेध केले, अशी कथा आहे. त्याच्या राज्यात प्रजा अत्यंत सुखी होती.

भरताच्या तीन पत्न्या या विदर्भाच्या राजकन्या होत्या. त्या तिघींना नऊ पुत्र झाले; पण त्यांच्यापैकी एकही भरताला अनु-रूप नव्हता. त्यामुळे त्यांच्या मातांनी रागावून त्यांची हत्या केली. अशा प्रकारे वंशाचा छेद झाल्यामुळे त्याने पुत्रप्राप्तीसाठी मरुत्स्तोम नामक यज्ञ केला. तेव्हा मरुतांनी याला बृहस्पतिपुत्र भरद्वाज हा दत्तक दिला.

याच्याच नावावरून या देशाला भारत हे नाव मिळाले, असे महाभारतात म्हटले आहे (आदि. ६९.४९). [प्रा. च. को.; पु. वि. अ.; भा. मौ. ए.]

(५) स्वायंभुव मनूचा पुत्र प्रियव्रत याच्या वंशातील ऋषभ-देव व जयंती यांचा ज्येष्ठ पुत्र. हा विष्णूचा भक्त होता, म्हणून याला महाभागवत असे म्हटले आहे. विश्वरूपाची कन्या पंच-जनी हिच्याशी याचा विवाह झाला. याला सुमती, राष्ट्रभृत, सुदर्शन, आवरण व धूम्रकेतू असे पाच पुत्र होते. याने कित्येक यज्ञ केले आणि अयुत सहस्र वर्षे चांगल्या प्रकारे राज्य केले. याच्याच नावावरून या देशाला भारतवर्ष हे नाव मिळाले, असे वायू, मार्कंडेय व भागवत या पुराणांत सांगितले आहे.

त्यानंतर तो गंडकी नदीच्या तीरावरील पुलहाश्रमात गुह्य सूर्यमंत्राचा जप करू लागला. एक दिवस एक गर्भवती हरिणी नदीवर पाणी पीत असता अकस्मात सिंहगर्जना झाली. ती ऐकून हरिणी फार घाबरली आणि तिने उडी मारली. त्या उड्डाणात तिचा गर्भ गळून नदीच्या प्रवाहात पडला. ते पाहून भरताने त्या पाडसाला आपल्या आश्रमात नेले व तिथे त्याचे संगोपन केले. या हरिणाचा त्याला फार लळा लागला. त्यामुळे त्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जप बंद पडला. मृत्युसमयीही त्याच्या मनात त्या हरिणाचीच काळजी होती. त्यामुळे 'अन्ते मतिः सा गतिः'= अंतकाळी जशी बुद्धी तशी त्याला पुढील गती प्राप्त होते, या न्यायाने त्याला पुढचा जन्म हरिणाचा मिळाला.

या मृगजन्मातही त्याला मागील जन्माची आठवण होती. त्यामुळे तो आपला कळप सोडून पुलहाश्रमात येऊन राहिला आणि मृत्युकाल जवळ येताच आकंठ तीर्थोदकात बसून त्याने त्या मृगशरीराचा त्याग केला.

त्यानंतर आंगिरसकुलातील एका ब्राह्मणाच्या दुसऱ्या पत्नीच्या पोटी जडभरत म्हणून तो जन्माला आला. यापुढे आपल्याला आणखी जन्म येऊ नये, म्हणून हा सर्वांपासून अलिप्त राही. याने आपले आचरण असे ठेवले होते, की लोक त्याला वेडापिसा समजत. याने त्या जन्मात ईशचिंतन करून कर्मबंधाचा नाश केला. हा त्याचा शेवटचाच जन्म होय. [प्रा. च. को.; पु. वि. अ.; पु. वि.]

(६) नाट्यशास्त्राचा कर्ता. याच्या काळाबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. हरप्रसाद शास्त्री त्याला सनपूर्व दुसऱ्या शतकातील मानतात. श्री. प्रभाकर भांडारकर यांच्या मते तो इ. स. च्या चौथ्या शतकात व पिशेलच्या मते सहाव्या किंवा सातव्या शतकात होऊन गेला. याचे चरित्र उपलब्ध नाही. पण त्याचा ग्रंथ प्रमाणाभूत मानला जातो. नाट्यशास्त्राशिवाय याच्या नावावर संगीतनृत्याकर नावाचाही एक ग्रंथ आहे.

भरतकाम कापडावर निरनिराळ्या आकृत्या काढून त्या रंगीबेरंगी दोऱ्यांनी किंवा जरीच्या तारांनी कलात्मक रीत्या सजविणे याला भरतकाम असे नाव आहे. याला कशिदा असेही म्हणतात. भरतकामाचे उल्लेख वैदिक वाङ्मयापासून आढळतात. मरुत् हे जरीचे काम केलेली वस्त्रे वापरीत, असे ऋग्वेदात सांगितले आहे (५.५५.६). कशिदा काढलेल्या वस्त्राला, वैदिक वाङ्मयात पेशस् हा शब्द योजलेला आहे. ही कशिदाकारी स्त्रिया करीत, असे दिसते. कारण यजुर्वेदात, पुरुषमेधातील बळींच्या यादीत पेशकारीचे म्हणजे कशिदा काढणाऱ्या स्त्रीचे नाव आढळते. पेशस्चे जे वर्णन केलेले आहे, त्यावरून त्या काळी काही वेळा कपड्यावर आकृती विणीत असत व काही वेळा ती वस्त्रावर काढून रंगीत दोऱ्याने भरत असत, असे दिसते. मोहेंजोदडो व हडाप्पा येथील अवशेषांवरून व तिथे सापडलेल्या ब्राँझच्या सुयांवरून, तिथल्या लोकांनाही भरतकामाची माहिती असावी, असे दिसते.

बौद्ध काळात मस्तकाभोवती बांधायचे दुपट्टे, नाजूक जाळीदार ओढण्या, जाकिटे, गळपट्टे, इ. वस्त्रांवर कुइरी, हंस, हत्ती, सिंह, मोर, फुलांचे तुरे आणि नागमोडी व वर्तुळाकार अशा अनेक आकृत्या भरलेल्या असत. तसेच तलम सुती कापडावर सुंदर फुलवेली, बुट्टे वगैरे आकृत्या काढून रंगीत दोऱ्याने त्या भरीत. त्या काळातील स्त्री-पुरुषांच्या पोषाखावर मौल्यवान खडे, हिरे, मोती, इ. रत्ने जरीच्या धाग्याने विणलेली असत. हे सर्व काम इतके नाजूक व सफाईदार असे, की बघणाऱ्याला



रबारी लोकांचे भरतकाम

ही चित्रकला आहे, की भरतकला, असा संभ्रम उत्पन्न व्हावा. त्यामुळेच भरतकामाला सुईची चित्रकारी, असे नाव मिळाले आहे.

गुप्तयुगात कापडावर नक्षी काढून ती रंगीत धाग्यांनी भरण्याची कला बरीच प्रगत झाली होती. चौकटी, उभ्या रेषा, हंसमिथुने, इ. आकृत्यांना त्या काळच्या भरतकामात प्राधान्य होते. बाणभट्टाची कादंबरी, हर्षचरित व जैन छेदसूत्रे यांत भरतकाम केलेली वस्त्रे व शाली यांचा उल्लेख आला आहे.

पुढी ; काळात भारताचे परदेशांशी दळणवळण वाढल्यावर भरतकामावर परकीयांच्या कलेची छाप पडू लागली. इराणी लोकांच्या आकृत्या व रंगसंगती यांचे अनुकरण भारतीय कलाकार आपल्या गालिच्यांत करू लागले. मोगलांच्या आकृत्या व भडक रंगसंगती यांचाही भारतीय भरतकलेवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परिणाम झाला. अकबराने इराणी व भारतीय कलाकारांना कारखाने काढून देऊन भरतकलेला व विणकलेला खूप उत्तेजन दिले. त्याचे वर्णन करताना फ्रेंच प्रवासी बर्निअर लिहितो –

अशा कारखान्याला प्रशस्त दिवाणखाने असत. त्यांपैकी एका दिवाणखान्यात बसून कलाकार भरतकाम करीत. त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी एक अधिकारी नेमलेला असे. नाजूक मल-

बनारसी किनखाब

मलीवर भरतकाम करणारे कारागीर एका वेगळ्या दिवाणखान्यात बसत.

स्पेन व जर्मनी या देशांतील कलाकुसरीचा परिणाम कच्छी व काठेवाडी भरतकामात विशेष दिसून येतो.

प्रदेशाचे भौगोलिक स्थान, हवामान, धर्म, संस्कृती, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती आणि इतर देशांशी दळणवळण या गोष्टींचा भरतकलेवर वेळोवेळी परिणाम झाला आहे.

काश्मीरमध्ये इ. स. च्या १५ व्या शतकात ही कला जैन उल आबदीन शाह याने आणली. त्याने इराणमधून कलाकार आणले व त्यांना काश्मीरमधील लोकांना ही कला शिकवायला लावले. इराणी कलेचा प्रभाव अजूनही काश्मिरी भरतकामावर दिसतो. मात्र सांप्रत काश्मिरी भरतकामावर सर्वाधिक प्रभाव आहे, तो तिथल्या निसर्गाचा. चिनाराची पाने, बदाम, कमळ, केशराची फुले, वेलबुट्टया, वॉलनट, पोपट, सुतार, मासा, इ. आकृत्या प्रामुख्याने तिथल्या भरतकामात आढळतात. काश्मिरी कशिदा रेशमी व लोकरीच्या अशा दोन्ही प्रकारच्या कापडावर काढला जातो. काश्मीरमधील गालिचे, शाली, साड्या या वस्तू प्रसिद्ध आहेत. काश्मिरी भरतकलेचे वैशिष्टय असे, की त्यासाठी ते लोक एकेरी धागा वापरतात. मोठ्या आकृतीसाठी काही वेळा सॅटिनचा टाका वापरतात. पश्मिन्याच्या शालींवर त्यांनी काढलेल्या आकृत्या नाजूक, तपशीलवार आणि सुबकपणे भरलेल्या असतात. रंगसंगती हे काश्मिरी भरतकलेचे दुसरे वैशिष्टय आहे. एक किंवा दोन मुख्य रंग व त्याच्या इतर छटा यांनी सर्व आकृत्या भरलेल्या असतात.



डाक्का येथील भरतकाम

काश्मिरी कलाकार शाली आणि गळपट्टे यांवर धावदोऱ्याने भरतकाम करतात. दोन्ही बाजूंनी हे काम सारखे दिसते. पण त्यासाठी फार मेहनत आणि काळ लागतो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काश्मिरी नमद्यांवर मोठमोठ्या आकृत्या साखळीच्या टाक्याने भरलेल्या असतात. काश्मिरातील सर्व कारागिरी बहुधा पुरुषच करतात.

पंजाबमधील भरतकामाच्या आकृत्या मोठ्या व ओबडधोबड असतात. त्या जाड कापडावर जाड धाग्यांनी भरलेल्या असतात. त्यासाठी पंजाबी स्त्रिया असे टाके निवडतात, की त्यामुळे उलट बाजूला धाग्यांची गुंतागुंत न व्हावी.

पंजाबी भरतकलेचा फुलकारी नावाचा एक प्रकार आहे. त्यात फुलांच्या नाना प्रकारच्या रचना असतात, म्हणून त्या प्रकाराला हे नाव पडले आहे. फुलकारीसाठी जाडेभरडे किंवा



पंजाबी फुलकारी

तलम कसलेही कापड चालते. फुलकारीत उभे, आडवे व तिरपे टाके असतात. हे सर्व टाके सारख्याच लांबीचे असावे लागतात. त्यासाठी फार दक्षता घ्यावी लागते. बहुतेक पंजाबी स्त्रिया फुलकारीसाठी स्वतःच्या आकृत्या बनवतात. त्यामुळे त्यांत वैविध्य आढळते. फुलकारीतही अनेक प्रकार आहेत. एका प्रकारात कापडाचा सर्व पृष्ठभाग बारीक धाग्यांनी विणलेल्या मोहक रचनांनी भरून टाकतात. फुलकारीचा हाच सर्वोत्तम प्रकार होय. बाघ नामक दुसऱ्या प्रकारात जवळजवळ घातलेल्या टाक्यांमुळे खालील कापड दिसतच नाही. यातील रंगसंगती विलोभनीय असते. काही वेळा अशी कलाकृती बनविण्यासाठी दहा वर्षेही लागतात. हजारा जिल्हा हे अशा भरतकामाचे प्रमुख केंद्र आहे. रचनांच्या आकाराप्रमाणे घुंघट, शालिमार, मिरचा, धुनिया, चांद, इ. प्रकार बाघ भरतकलेत आहेत.

लाल कापडाच्या किनारीवर भरलेल्या फुलकारीच्या रचनांना चोप असे नाव आहे. सोनेरी व पिवळ्या रंगांत ही कलाकुसर करतात. लग्नात वधूला आजीने चोप भेट देण्याची पद्धत आहे. वधू सुबर नावाची शाल पांघरते, तिच्यावरही



पंजाबमधील किनारी फुलकारी

अनेक आकृत्या भरायच्या असतात. ही भेटही माहेरची असते. त्यामुळे मुलगी जन्माला आली, की आई फुलकारीला सुरुवात करते.

सिंधमधील भरतकामाच्या आकृत्याही मोठ्या असून, त्या जाड कापडावर जाड धाग्यानेच करतात. सिंधी भरतकामाचे टाके वरून भरीव असतात आणि उलट बाजूला धाग्यांची गुंतागुंत अजिबात नसते. त्यांची रंगसंगती भडक असते. भरतकाम हा सिंधी स्त्रियांचा धंदाही आहे.

कच्छमधील भरतकाम हे सिंधमधून आलेल्या एका मुसलमान फकिराने तीनशे वर्षांपूर्वी तिथल्या मोची लोकांना शिकवले, असे सांगतात. कच्छी आकृत्या मोठ्या असतात. गुजरात व सौराष्ट्र येथील भरतकामात भडक रंग व बारीक आरसे हे वैशिष्ट्य आढळते. मुलांच्या टोप्या, कुंच्या, आणि स्त्रियांचे घागरे, चोळ्या आणि तोरण म्हणजे लांब काठ यांवर प्रामुख्याने हे काम केलेले असते.

राजस्थान आणि पंजाब या प्रदेशांत भरतकाम केलेल्या चोळ्या फार प्रचारात आहेत.

उ. प्रदेशातील काशी, चंदेरी, इ. ठिकाणी रेशमी कापडावर जरीने भरतकाम करण्याची पद्धत आहे. बनारसी साड्या, शालू, शेले व चंदेरी साड्या या जरीकामामुळे वैभवपूर्ण दिसतात. निरनिराळी फुले; कुइरी, मोर, पोपट, हंस, इ. पक्षी; गोल व चौकोन यांत बसवलेल्या मोगली व इराणी पद्धतीच्या रचना; या जरीने विणलेल्या असतात. सोनेरी व चंदेरी जरीचे भरत-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काम प्रथम चीनमध्ये उदयाला आले आणि मग त्याचा भारतादी देशांत प्रसार झाला, असे म्हणतात. बादला भरतकामही



घागऱ्यावरील भरतकाम– सौराष्ट्र

जरीकामात अंतर्भूत आहे. लखनौ, वाराणसी, भोपाळ, सुरत, हैद्राबाद, इ. ठिकाणी जरीकाम फार उत्कृष्ट होते,

उत्तर प्रदेशातील लखनौ हे साध्या पण आकर्षक अशा चिकनकारीबद्दल प्रसिद्ध आहे. त्यात पांढऱ्या किंवा फिक्क्या तलम कापडावर पांढऱ्या दोऱ्याने कमलपुष्प, मालतीपुष्प, कुइरी, वेलबुट्टी, इ. आकृत्या भरलेल्या असतात. छाया भरतकाम (शॅडो वर्क) व जाळीदार काम मिळून ही चिकनकारी बनते. यातील जाळीचे काम फार आकर्षक दिसते.

भोपाळ, गया, इ. ठिकाणीही चिकनकारी करतात. त्यात विविध टाक्यांचा उपयोग करतात. ते बारीक आणि सारखे असले, तरच आकृती सुंदर दिसते. लखनौ येथे जरी व चंदेरी तारांचे मखमल, सॅटिन, जाळीदार कापड आणि सिफॉन यांवर अप्रतिम भरतकामही होते. इथले किनखाबही प्रसिद्ध आहे. कामदानी नामक जरीच्या भरतकामासाठीही लखनौ प्रसिद्ध आहे.

जरीच्या एका प्रकारच्या भरतकामाला मीना असेही नाव आहे. यातील आकृतींपैकी फुला-पानांच्या बाह्यरेषा जरीने व अंतर्भाग भडक रेशमाने भरतात.

बंगालमधील कंथा व ढाकाई भरतकामाचे नमुने पुष्कळदा धार्मिक आशय व्यक्त करणारे असतात. शंख, चक्र, पद्म, शिंपले, आम्रफल, इ. रचना बंगाली स्त्रिया लाल रंगाने व इतर सौम्य रंगांनी भरतात. एखाद्या कापडावर रंगीत तुकडे जोडून त्यांच्या कमल, पाने, इ. सुरेख रचना बनवणे, या प्रकाराला कंथा असे म्हणतात. ही कंथा म्हणजे काटकसर व कलाकुसर यांचा सुंदर नमुना असतो.

हिमाचल प्रदेशातील चंबा येथील रुमाल भरतकलेसाठी प्रसिद्ध आहेत. भरतकाम करायच्या रुमालासाठी पांढरे, फिके पिवळे किंवा केशरी रंगाचे सुती कापड घेतात. मग त्याच्यावर कुशल चित्रकाराकडून आकृत्यांची बाह्यरेषा काढून घेतात किंवा स्त्रिया स्वतःच आकृत्या रेखाटतात. मग रेशमाने धावदोरा व दुहेरी सपाट टाके घालून हे भरतकाम करतात. दुहेरी सपाट टाका कापडाच्या वरून व खालून सारखाच येईल, याची दक्षता घेतात. त्यामुळे रुमालाच्या दोन्ही बाजूंना आकृतिबंध तयार होतो. या भरतकलेत कृष्णलीला, रासलीला, पौराणिक प्रसंग, दंतकथा, लोककथा, रागरागिण्या, इ. दृश्ये व मानवी आकृत्या, झाडे, पाने, फुले, पशुपक्षी, इ. रचना असतात.

या भरतकलेचे चारशे वर्षांपूर्वीचे काही नमुने सांप्रत उपलब्ध झाले आहेत. गुरू नानकांच्या बहिणीने इ. स. च्या १६ व्या शतकात भरलेला एक सुरेख रुमाल गुरुदासपूर जिल्ह्या-



चोळीवरील भरतकाम– कच्छ

तील एका गुरुद्वारात आहे. सतराव्या शतकातील एका रुमालावर कुरुक्षेत्रावरील युद्धाचे सुंदर दृश्य भरलेले आहे. दुसऱ्या एका रुमालावर रुक्मिणीहरणाची कथा भरली आहे. रुक्मिणीच्या वेषभूषेपासून कृष्णाने तिला रथात घेऊन जाण्यापर्यंतच्या सर्व क्रिया त्यात दाखवलेल्या आहेत.

हिमाचल प्रदेशातील प्रत्येक घरात असा एखादा रुमाल असणे आवश्यक असते. लग्नासारख्या प्रसंगी द्यायच्या भेटवस्तूंवर असा रुमाल टाकण्याची निकडे प्रथा आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दक्षिण भारतात कर्नाटकातील कशिदा वैशिष्टचपूर्ण आहे. कन्नड भाषेत कशिद्याला कसुती असे म्हणतात. कर्नाटकी कशिदा बहुधा गडद पार्श्वभूमीवर फिक्क्या रेशमाने काढतात. तुळशीवृंदावन, गोपुर, पाळणा, पालखी, अंबारी, रथ, मंदिर, पोपट, नंदी, इ. आकृत्या त्यांच्या कशिद्यात प्रामुख्याने आढळतात. काळ्या व पांढऱ्या इरकली साड्यांवर कशिद्याचे वेगवेगळे बुट्टे काढतात. कशिद्यासाठी गावंती, नेगी, मुर्गी, मेंथी, इ. टाके वापरतात. बऱ्याच वेळा कशिद्याची उलटी व सुलटी बाजू अगदी सारखी दिसते.

द. भारतात आधुनिक पद्धतीचे भरतकाम होते. लिनन आणि ऑरगंडी यांचे टेबलक्लॉथ, ट्रेक्लॉथ, टीकोझी वगैरे माल मिशनरी शाळा व तत्सम संस्था यांत तयार होतो. कोच्चिन

शुभ्र रेशमी भरतकाम – डाक्का

येथे लेस तयार होते. त्रिवांकुरमधील लेस व जाळीकाम प्रसिद्ध आहे. त्यावर पोर्तुगीज भरतकामाची छाप आहे.

भारतातील भरतकाम करणारा कारागीर हा बहुधा रोजगारीवर काम करतो आणि त्याबद्दल त्याला जे वेतन मिळते त्यावर तो आपला निर्वाह कसाबसा चालवतो.

भारतातील भरतकलेतही एकात्मतेचा प्रत्यय येतो. हत्ती, अंबारी, रथ, यांसारख्या वैभवनिदर्शक आकृत्या व आंबा, शंख, कमळ, बिल्वदल यांसारखी धार्मिक प्रतीके सर्व भारतीय भरतकामात दिसतात. कुइरीत बसवलेल्या वेगवेगळ्या रचना काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व सौराष्ट्रापासून बंगालपर्यंत सर्व भारतभर दिसून येतात. पाश्चात्यांच्या संपर्कामुळे सांप्रत आपल्या भरतकलेत पाश्चात्यांचे टाके, त्यांच्या आकृत्या व फिकट रंगसंगती यांची सरमिसळ झाली आहे. उलटपक्षी भारतीय आम्रफलाने त्यांच्या भरतकामात प्रवेश केला आहे. तसेच इटलीतील असिसी भरतकलेत कर्नाटकी कशिद्याचे अनुकरण केलेले आहे आणि जॅकोबिअन भरतकाम हे तर भारतीय रचनांचीच प्रतिकृती आहे.

निरनिराळे टाके व विविध रंगांचे रेशीम हे भरतकलेचे माध्यम होय. विशिष्ट टाक्यांच्या उपयोगाप्रमाणे भरतकलेची वैशिष्टचे निर्माण झालेली दिसतात. भारतीय भरतकला ही टाक्यांच्या बाबतीत समृद्ध आहे. अनेक टाक्यांची नावे आज इंग्रजी दिसत असली, तरी ते टाके मात्र मूळ भारतीय आहेत. [प्रा. भा. वे.; अनुराधा, दिवाळी अंक १९६२; कॉ. टे. इं.]

भरतनाट्यम् भारतातल्या चार अभिजात नृत्यप्रकारांपैकी एक. त्याच्या नावावरूनच भरताच्या नाटचशास्त्राशी त्याचा संबंध असल्याचे कळून येते. या नृत्यातल्या मुद्राभिनयादी बऱ्याच गोष्टी भरताच्या नाटचशास्त्राला अनुसरूनच होतात. सांप्रत या नृत्याचा दक्षिण भारताशी घनिष्ट संबंध दिसत असला, तरी प्राचीन काळी सर्व भारतभर ही नृत्यकला प्रचलित होती, असे वाङ्मयीन पुरावे आढळतात; पण उत्तर भारतावर झालेल्या परधर्मी आक्रमणांमुळे तिकडे त्याची परंपरा खंडित झाली आणि दक्षिणेत त्या मानाने परधर्मी आक्रमण उशिरा झाल्यामुळे तिकडे ती कला जिवंत राहिली.

दक्षिण भारतात ही कला जिवंत राहण्याचे दुसरे कारण म्हणजे दाक्षिणात्यांनी तिला मंदिरसंस्थेशी जोडून दिले, हे होय. त्यांनी तिची जोपासना उत्तम प्रकारे केली. या प्रकारच्या नृत्याला भरतनाटचम् हे नाव मिळण्यापूर्वी सदिरनाटच असे म्हणत. हे सदिरनाटच देवस्थानांतून आणि राजदरबारांतून देवदासी करीत. या देवदासी देवाच्या सेवेकरिणी म्हणून नेमलेल्या असत. त्यांना उपजीविकेपुरते वेतन देवस्थानातूनच मिळत असे. त्यामुळे आयुष्यभर त्या देवाच्या सेवेबरोबरच कलेचीही उपासना करीत. कलेत परिपूर्णता यावी म्हणून त्या कसून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेहनत करीत व प्रावीण्य मिळवल्यावरच लोकांपुढे नृत्यप्रयोग सादर करीत. शिलप्पधिकारम् नावाच्या तमिळ महाकाव्यात माधवी नावाच्या एका देवदासीचे व तिच्या कलागुणांचे वर्णन आहे. हे महाकाव्य इ. स. च्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकातले मानतात. त्यावरून दक्षिणेत देवदासींच्या या नृत्यकलेची परंपरा दोन हजार वर्षांइतकी तरी प्राचीन आहे, हे कळून येते.

भरतनाटचम्‌चा उगम – एकदा भरतमुनीने गंधर्व, किन्नर व अप्सरा यांचा नर्तकवृंद एकत्र करून संगीताच्या साथीसह शंकरापुढे नृत्यप्रयोग केला. शंकर तो प्रयोग पाहून प्रसन्न झाला. मग शंकराने आपल्या गणांना त्या नृत्यात सुधारणा करून ते परिपूर्ण बनविण्याची आज्ञा दिली. तंडू अथवा नंदिकेश्वर याने त्या नृत्याला आवेशयुक्त मर्दानी स्वरूप दिले. तंडूच्या नावावरून त्याला तांडव नृत्य म्हणू लागले. पार्वतीने ते नृत्य स्त्रीसुलभ अशा ललितमनोहर स्वरूपात परिवर्तित केले. त्या नृत्यप्रकाराला लास्य म्हणू लागले. मग भरतमुनीने नृत्याच्या या दोन्ही पद्धती आत्मसात केल्या व त्याचे शास्त्र बनवले.

यासंबंधी दुसरी एक आख्यायिका मंगलोर जिल्ह्यात प्रचलित आहे, ती अशी –

अर्जुन इंद्राच्या बोलावण्यावरून स्वर्गात गेला असता तिथे उर्वशीने अर्जुनाला हे नृत्य शिकवले. पुढे अज्ञातवासात अर्जुन विराटाच्या दरबारी बृहन्नडा या नावाने नृत्यशिक्षक म्हणून राहिला होता तेव्हा त्याने ते नृत्य उत्तरेला शिकविले. पुढे विराटाच्या मत्स्य देशातूनच त्याचा भारतभर प्रसार झाला.

या नृत्यकलेचा स्थायीभाव शृंगार किंवा प्रेम हा असला, तरी त्यात इतर रसांनाही बराच वाव आहे. यात जशी प्रणयगीते साभिनय सादर केली जातात, त्याचप्रमाणे भक्तिगीतेही सादर केली जातात.

भरतनाटचम्‌मध्ये प्रामुख्याने तीन प्रवाह एकत्र झाले आहेत, ते असे— (१) नटुवा मेळयाचे सदिर नाटच. देवदासींचे नृत्य म्हणतात, ते हेच होय. (२) तंजाऊर येथील भागवत संप्रदायाला अनुसरून केले जाणारे भागवतमेळा हे नृत्यप्रधान नाटच. आणि (३) कुरवंजी नामक ग्रामीण नाटच.

या तीन्ही प्रवाहांचे सुसंवादी संमिश्रण म्हणजेच भरतनाटचम् होय, असे शास्त्रवेत्ते म्हणतात.

भरतनाटचम् ही एक संमिश्र कला आहे. तिच्यात काव्य, नाटच, संगीत, ताल आणि लय या सर्वांचा समावेश होतो. नर्तिकेच्या हातापायांची हालचाल, सांकेतिक किंवा सादृश्यदर्शक हस्तमुद्रा, ताल, लय आणि काव्य ही सर्व भरतनाटचम्‌ची भावाभिव्यक्तीची साधने होत. या सर्व अंगोपांगांतून कोणतातरी दिव्य संदेश प्रेक्षकांपर्यंत पोचविणे व प्रेक्षकांना त्यांच्या वास्तव अवस्थेतून तेवढचा कालापर्यंत तरी वरच्या पातळीवर नेणे, हे या नृत्याचे उद्दिष्ट आहे. नृत्यातले कथाप्रसंग रामायण, महाभारत, पुराणे, महाकाव्ये इत्यादींतून घेतले जातात. त्या

शिव-पार्वती-नृत्य – भरतनाटचम्

त्या प्रसंगांतील त्या त्या व्यक्तीचे अनुकरण कलावंत करीत असतो आणि त्या अनुकरणातून एखाद्या गहन आशयाचा अंश प्रेक्षकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करतो. उदा० शिवपार्वतींचे नृत्य. त्यात त्या उभयतांच्या अंतरातला परस्पर प्रणय दाखवायचा असतो. त्यातून रसराज शृंगाराला मूर्तिमान करायचे असते. पण त्याच वेळी तो शृंगार ' जगतः पितरौ ' म्हणजे विश्वाचे मायबाप यांचा शृंगार आहे, हे विसरायचे नसते. कलाकाराला जास्तीत जास्त ती उंची गाठायची असते. कोणताही विकार डोकावणार नाही, अशा संयमाने तो प्रणयप्रसंग सादर करायचा असतो. म्हणून अशा नृत्यात केवळ कसब, केवळ मुद्राकौशल्य एवढेच पुरे पडत नाही; तर त्यासाठी कलावंताला दिव्य व सूक्ष्म भावांचे दर्शन स्वतःच्या ठिकाणी घेता येईल, इतकी मनाची तयारी करायला हवी असते.

म्हणूनच भरतनाटचम्‌ची साधना हा एक योग आहे, असे म्हटले आहे. योगामध्ये शरीराचे आणि मनाचे जडत्व घालवायचे असते; शरीराला चापल्य आणि मनाला भावग्रहणसामर्थ्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणायचे असते; मुद्रा आणि डोळे बोलके करायचे असतात. त्यासाठी साधकाला काही पथ्ये आणि नेमधर्मही पाळावे लागतात. पुराणांत आणि आगमांत शिव हा जसा नर्तक आहे, तसाच तो योगीही आहे. नटराज ही त्याची नृत्यकलेतली उपाधी आहे. नटराज म्हणजे कला आणि योग यांचा सुंदर समन्वय होय. तो आदर्श पुढे ठेवूनच कलावंताने आपली नृत्यसाधना करायला हवी.

भरतनाट्यम्‌मधील भाव हे अभिनयांच्या द्वारे व्यक्त करायचे असतात. आंगिक, वाचिक, सात्त्विक आणि आहार्य असे अभिनयाचे चार प्रकार आहेत. आंगिक अभिनय म्हणजे हातापायांच्या हालचाली म्हणजेच करणे होत. सगळ्या हस्तमुद्रा यात येतात. वाचिक अभिनय म्हणजे शब्दांच्या द्वारे घडविलेले भावदर्शन. भरतनाट्यम्‌च्या भागवतमेळा या नृत्यप्रकारात वाचिक अभिनय म्हणजे भाषणे नट स्वतः करीत असतात; पण भरतनाट्यम्‌मध्ये भाषण असत नाही. त्याऐवजी वादन आणि गीत असते. या पार्श्वसंगीतालाच वाचिक अभिनय म्हणायचे. सात्त्विक अभिनय म्हणजे मंदस्मित, हास्य, क्रोध, रुसवा, अनुनय, दुःख, अश्रू, इ. होय. सात्त्विक अभिनयात मनाच्या खोल कप्प्यातले तरल भाव आविष्कृत करायचे असतात. नाट्यशास्त्रात याला चंचलावस्था म्हटले आहे. ही अवस्था जाणीवयुक्त एकाग्रतेने साधावी लागते. सात्त्विक अभिनय हा भरतनाट्यम्‌चा प्राण समजला जातो, तो त्यासाठीच. आहार्य अभिनय म्हणजे पोषाखाच्या विविध तऱ्हा, अलंकार व रंगरंगोटी हे प्रकार होत. नृत्याचा पेहराव शरीरसौष्ठव सुव्यक्त दिसेल, शरीराचा मध्यभाग उघडा न पडेल आणि अभिनयाला व हालचालींना बाध न येईल, अशा प्रकारचा असावा, असे सांगितले आहे.

भावदर्शनासाठी या चारही अभिनयांचा यथायोग्य उपयोग करावा लागतो. नर्तकांचे कलावंतपण बरेचसे या चतुर्विध अभिनयावर अवलंबून असते.

आंगिक अभिनयामध्ये हस्तमुद्रा आणि मुखराग यांचा अंतर्भाव होत असतो. हातांच्या सांकेतिक व सादृश्यदर्शक हावभावांना मुद्रा म्हणतात आणि चेहऱ्यावरच्या हावभावांना मुखराग म्हणतात. या दोहोंतून केवळ कल्पनाच व्यक्त होतात असे नाही; तर अंतस्थ भावनांच्या विविध छटाही व्यक्त होतात. हस्तामध्ये एका व दोन्ही हातांचा समावेश होतो. प्रत्येक हस्तक्रियेचा किंवा हस्ताच्या अवस्थेचा विशिष्ट अर्थ असतो. ती नृत्याची एक स्वतंत्र भाषा असते. अनुकरणात्मक, सूचक आणि शास्त्रीय किंवा काल्पनिक असे हस्तमुद्रांचे तीन प्रकार सांगितले आहेत. यांतही आणखी काही पोटप्रकार आहेत, ते असे –

(१) असंयुक्त हस्त– एका हाताने एकाच वस्तूचा संकेत करणे. (२) संयुक्त हस्त– दोन हातांनी एक वस्तू सूचित करणे. (३) समान हस्त–एकाच हाताने अनेक वस्तू दाखविणे. (४) मिश्र हस्त–दोन्ही हातांनी दोन निरनिराळ्या वस्तू सूचित करणे.

नाट्यशास्त्रात असंयुक्त हस्ताचे २४ आणि संयुक्त हस्ताचे १३ प्रकार दिले आहेत. नाट्यदर्पणानुसार ते अनुक्रमे २८ व २३ आहेत. कालांतराने या हस्तांच्या संख्येत वाढ झाली व त्यांच्या आविष्कारात आणि अर्थसूचनातंही बदल झाला.

हे हस्त करताना त्यांना मन आणि चेहरा यांचीही साथ असावी लागते. लयीची साथ तर सोडताच येत नाही. सगळ्या गोष्टी कशा लयबद्ध, नाजूक, तरल व नखरेल असाव्या लागतात. मोठ्या उड्या किंवा तत्सम हालचाली यांना, तसेच रौद्र व भयानक दृश्यांना किंवा आविष्कारांना भरतनाट्यम्‌मध्ये स्थान नाही. तंत्र आणि मंत्र अर्थात कसब आणि भावदर्शन या दोन्ही गोष्टी जेव्हा सारख्याच प्रमाणात साधतात, तेव्हाच भरतनाट्यम् हे कृतार्थ होते.

भरतनाट्यम्‌च्या प्रयोगात मृदंग, वीणा, व्हायोलिन, मुरली, झांज, चिपळ्या, अशा अनेक वाद्यांची साथ असते. तिस्र, चतुरस्र, मिश्र व आदिताल, हे त्याचे मुख्य ताल असतात. ते अनुक्रमे ३, ६, ७ व ८ अशा अक्षरांचे असतात. १४ अक्षरांचा आडाताल आणि १० अक्षरांचा झंपाताल हे सामान्यपणे उपयोजितात. हे सगळे कर्नाटक संगीतातले ताल होत. त्यांचे बोल खालीलप्रमाणे आहेत–

एकपट १ थक	२ जुना	३ थक	४ दिगि	५ थक	६ जुंना	७ थक	८ दिमि
चौपट १, २, ३	४, ५, ६, ७	८, ९, १०	११, १२, १३, १४	१५, १६, १७	१८, १९, २०, २१, २२	२३, २४, २५, २६, २७	२८, २९, ३०, ३१
थम थका	कित नक	झुम तरी	कित थका	थलांग कु	थिरगिद थो	थिरगिद थो	थिरगिद थो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाटच, नृत्त व नृत्य ही भरतनाटचम्ची त्रिसूत्री आहे. हिचे स्वरूप पुढीलप्रमाणे–

नाटच– याचा अर्थ नाटक अथवा नृत्यनाटच असा आहे. गायन, नृत्य आणि अभिनय या सर्वांचा अंतर्भाव नाटचात होतो. या स्वरूपात नर्तक-नर्तिका रामायण–महाभारतादी ग्रंथांतील कथाप्रसंगामधील नायक–नायिकांच्या स्वभावरेखा व त्यांच्या जीवनातील घटना रंगभूमीवर सादर करतात. नर्तन व अभिनय या दोन साधनांच्या द्वारे हे कार्य चालते. नाटचाला राग आणि ताल यांची आवश्यकता असली, तरी भाव हे त्याचे प्रमुख अंग असते.

नृत्त– हे अभिनयशून्य पण शास्त्रशुद्ध नर्तन असते. तांडव आणि लास्य हे नृत्ताचे दोन आविष्कार आहेत. तांडव हे शिव-नृत्त अर्थात पुरुषनृत्त मानलेले असून, लास्य हे पार्वतीनृत्त अर्थात स्त्रीनृत्त मानलेले आहे. नृत्तात भावदर्शन आणि रसोत्पत्ती यांना वाव नसतो. ताल हे त्याचे प्रमुख तत्त्व होय. अंगविक्षेप आणि पदाघात यांच्या साहाय्याने या प्रकारात केवळ शास्त्र-कौशल्य दाखवायचे असते. नृत्तात अनेक प्रकारचे अंगहार ओळीने संबद्ध असतात. या शास्त्रात एकूण ३२ अंगहार कल्पि-लेले आहेत. प्रत्येक अंगहाराची अनेक करणे असतात. हात व पाय या दोन्ही अवयवांचा विशिष्ट संयोग म्हणजे करण होय. तमिळ भाषेत त्यांना आडाव म्हणतात. दोन करणे = एक मातृका व दोन किंवा अधिक करणे = अंगहार, असे ते कोष्टक आहे. नाटचशास्त्रात एकूण १०८ करणे सांगितली आहेत. स्थान, चारी व नृत्तहस्त असे प्रत्येक करणाचे तीन वेगवेगळे घटकावयव असतात. ही सर्व १०८ करणे चिदंबरम येथील मंदिराच्या प्रवेशद्वारावर शिल्परूपाने दाखविली आहेत. काला-नुसार या करणांत काही बदलही झाले आहेत. त्यांतली काही रद्दबातल ठरली आहेत, तर काही नव्याने आलेली आहेत.

तमिळ परंपरेनुसार करणे किंवा आडाव १२० असून, त्यांचे १० - १० चा एक असे बारा वर्ग कल्पिलेले आहेत. आडावचे तीन उपविभाग होतात. त्यांना थत्तुआडाव, नट्टुआडाव आणि मेट्टुआडाव अशी नावे आहेत. थत्तुआडाव म्हणजे सपाट पायांचा आघात, नट्टुआडाव म्हणजे टाचांनी केलेला आघात व मेट्टुआडाव म्हणजे केवळ पायांच्या बोटांनी केलेला भूमिस्पर्श होय. यांतूनही अनेक प्रकार संभवतात. यांतले सुमारे ७० आडाव दक्षिणेतील नृत्यशाळांमधून शिक विले जातात.

नृत्य– मुखाने अर्धस्फुट गायन, मुद्रांनी अर्थ, डोळ्यांनी भाव आणि पायांनी ताल या चार गोष्टी सुसंवादीपणे ज्यात दाख-विल्या जातात, त्याला नत्य म्हणतात. नृत्याच्या उत्कर्षाची एक श्रेणी असते. प्रथम हस्तविक्षेपांनी पुढाकार घ्यायचा. जिकडे हात जातील तिकडे दृष्टी वळवायची. दृष्टीच्या मागे मन, मनाच्या मागे भाव आणि भावातून रसोत्कर्ष हा क्रम बरोबर साधल्यास नृत्यात सूत्रबद्धता येते व फुलाची एकेक पाकळी उमलत जावी, तसे ते नृत्य उमलत जाते.

भरतनाटचम्चा प्रयोग – अलारिप्पू, जातिस्वरम्, शब्दम्, वर्णम्, तिल्लाना व नटनम् अडिनार, या अनुक्रमाने भरत-नाटचम्चा प्रयोग करायचा, असे शास्त्र व रूढी आहे.

(१) अलारिप्पू– याचा अर्थ वंदना असा आहे. यात ईश्वर, गुरू, सर्व दिशा व प्रेक्षक यांना नमस्कार करायचा असतो. याला मृदंग व इतर वाद्ये यांची साथ असते. यासाठी नर्तिका स्तब्ध उभी राहून नमनासाठी आपले हात जोडते. मग तिची आकृती अनेक हालचालींनी बहरून येते. हात, पाय, मान, डोळे यांच्या अशा काही हालचाली ती करते, की प्रेक्षकांनी मंत्रमुग्ध व्हावे. शरीररूपी कलिकेला फुलून येण्यास अवसर

अलारिप्पू – भरतनाटचम्

मिळावा आणि पुढे कराव्या लागणाऱ्या सर्व नृत्यात तन-मनाची मदत व्हावी, हा अलारिप्पूचा उद्देश असतो. याची सुरुवात धीम्या लयीत होते.

(२) जातिस्वरम् – काही आडाव एकत्र करून हे नृत्य करतात. मान, हात व पाय यांच्या तालबद्ध हालचाली असे याचे स्वरूप असते. हा एक अवघड नृत्यप्रकार आहे. राग, स्वर आणि ताल यांच्या संयोगाने तो आकर्षक करायचा असतो. हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शुद्ध नृत्य आहे. म्हणून ते नृत्त या प्रकारात मोडते. शरीरसौंदर्याचे नयनमनोहर आविष्कार एवढाच याचा उद्देश असतो. हे नृत्त चालू असताना वाद्यांवर कोणत्या तरी रागाची धून वाजविली जाते.

(३) शब्दम् – याचा अर्थ स्तुतिपर गीत असा आहे. संस्कृतात याला यशोगीती असे म्हणतात. या गीतात देवाची किंवा एखाद्या धीरोदात्त नायकाची प्रशंसा असते. गीताचा शेवट 'सालमुरे' (तुम्हाला वंदन करते) या शब्दाने होतो. तंजाऊर जिल्ह्यातील मेलातूर या खेड्यातल्या वाग्गेयकारांनी यासाठी अनेक गीते तेलुगू भाषेत रचली आहेत. या नृत्यात मुद्रांचा उपयोग करतात. भाव आणि मुद्रा यांच्या साहाय्याने यात गीतांचा अर्थ व्यक्त केला जातो. कवनाला शोभतील असे आडाव नाचण्याची यात योजना असते.

(४) वर्णम्– हे नृत्य म्हणजे भरतनाटचम्चा गाभाच होय. हा नृत्यप्रकार अतिशय गुंतागुंतीचा व अतिशय कठीण असतो. नर्तकाचे बुद्धिकौशल्य आणि अभिनयकौशल्य यातच प्रकर्षाने प्रतीत होते. नृत्य, संगीत व अभिनय यांचा कलापूर्ण संयोग म्हणजे वर्णम् होय. यात गेय पद्याचा अर्थ जसजसा बदलत जातो, तसतसा अभिनयही बदलतो. राग, ताल आणि भाव यांची सुंदर त्रिवेणी यात गुंफायची असते. हस्तमुद्रांनी कवनाचा अर्थ आणि मुखरागाने त्यातल्या अंतर्भावनेच्या विविध छटा

वर्णम् – भरतनाटचम्

दाखवायच्या असतात. हातापायांचे चलनवलन द्रुत आणि गोलाकार ठेवायचे असते. यात नर्तक, गायक, वादक, दिग्दर्शक आणि प्रेक्षक यांची एकतानता होते. निराळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे वर्णम्मध्ये तालबद्धतेची पराकाष्ठा आणि गीतांचा काव्यमय आत्मा यांचे अद्वैत साधते. अभिनयाची विविध अंगोपांगे दाखवायची असल्यामुळे हे नृत्य पूर्ण होण्यास सुमारे एक तास लागतो. साधारणतः यात वादकांना आपले कसब दाखवायला संधी मिळेल, असा एखादा राग निवडतात. एक गीतखंड पुरा झाला, की धून व बोल यांच्या संगतीने नृत्तासाठी थोडा वेळ देतात व मग पुन्हा अभिनयाला सुरुवात होते. दोन गीतखंडांमधील नृत्ताचे हे भाग म्हणजे पदाघातातून प्रवर्तित होणारे भावगीत म्हटले तरी चालेल. हातांच्या हालचाली, डोळ्यांच्या फिरक्या, शरीराची लवचिक पण मार्दवयुक्त वळणे आणि तालबद्ध गतिमान पदाघात हे सारे जणू त्या रागदारीच्या धुनीत एकजीव करून टाकायचे असतात. विलंबित, मध्य व द्रुत अशा तीन्ही लयी या नृत्यासाठी उपयोजितात. जाणकार लोक वर्णम् हा भाग कसा रंगला; यावरून भरतनाटचम्च्या कार्यक्रमाचे मूल्यमापन करतात.

(५) पदम् – वर्णम्मध्ये अंगविक्षेप आणि शारीरिक व्यायाम यांच्यामुळे नर्तकाची बरीच दमणूक झालेली असते. नर्तकाला किंवा नर्तिकेला त्यानंतर थोड्या विश्रांतीची गरज असते. म्हणून त्यासाठी पदम् हे वेगळ्या पद्धतीचे नृत्य आयोजित करतात. ज्यात मुद्राभिनयाला प्राधान्य असेल व जे शांतपणे व सावकाशपणे नाचता येईल, असे ते नृत्य असते. पदम् याचा अर्थ सामान्यतः प्रेमगीत असा आहे. या नृत्यात विविध प्रकारांनी प्रेमभावनेचा आविष्कार करायचा असतो. पदम्मध्ये राधा-कृष्ण, शिव-पार्वती, स्कंद-देवसेना या देवकोटीतल्या प्रियकर-प्रेयसींचा शृंगार वर्णिलेला असतो. काव्यातला हा शृंगार अर्थाला अनुलक्षून कलावंताने आपल्या अभिनयाने विशद करायचा असतो. संभोगशृंगारात नर्तिका आपली संगमोत्सुकता, समागमसुखाच्या कल्पनेने तिला होणाऱ्या गोड गुदगुल्या, तनुलतेवर उठलेले रोमांच, प्रीतिसंगमातला तो घसमुसळा सुखानुभव, इ. सारे भाव सात्त्विक अभिनयातून व्यक्त करते. याहीपेक्षा कठीण असतो तो विरहातला शृंगार. विरहातले ते स्पंदन, ती प्रतीक्षा, प्रियकर संकेतस्थळी न आल्यामुळे होणारा अपेक्षाभंग, दुखावलेला अभिमान, प्रियकर दुसऱ्या कोणत्या तरी प्रेमप्रकरणात गुंतला असावा की काय हा संशय, तज्जन्य दुःख, इ. भाव नर्तिकेला व्यक्त करावे लागतात. या साऱ्या भावछटा नर्तिका आपल्या नाजूक पदन्यासांनी पदम्ची अक्षरे अस्फुट उच्चारून प्रेक्षकांपुढे साकार करते.

भरतनाटचम्मधला हा भाग पुराणपरंपरेच्या गुरूंना मात्र पसंत नाही. त्यांना ते आपल्या परंपरेवर झालेले आक्रमण वाटते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(६) तिल्लाना – पदम्‌नंतर हा प्रकार करतात. हे एक पूर्ण नृत्त असते. यात गतिमानता, जोष व विविध पदाघात बसतात. त्यातले स्वर, लय आणि बोल विशिष्ट वातावरण

तिल्लाना – भरतनाटचम्

निर्माण करतात. यात लयकारीला अधिक महत्त्व असते. यात नर्तिकेच्या अंगोपांगांचे निरनिराळ्या कोनांतून व शरीरावस्थांमधून दर्शन घडविण्यात येते. संगीत हा या कार्यक्रमांचा आत्मा असतो. यात भाव कमी महत्त्वाचा, किंबहुना वर्ज्यच असतो म्हटले तरी चालेल.

(७) नटनम् अडिनार– हाही एक नृत्ताचाच प्रकार आहे. अलारिप्पू विलंबित गतीने सुरू होतो; तर नटनम् अडिनारच्या वेळी लय अत्यंत द्रुत असते. हा नटराजाचा नाच मानतात.

रंगभूमी – योग्य रंगभूमी असल्यावाचून भरतनाटचम्‌चा प्रयोग उठावदार होत नाही. रंगभूमीविषयीच्या अपेक्षा अशा– तिची लांबी-रुंदी ९६ × ४८ फूट असावी. तिच्या मागे नेपथ्यासाठी १२ × ४८ फूट स्वतंत्र जागा असावी. रंगमंच ३० फूट लांब व २५ फूट रुंद असावा. तिच्या दोही अंगी निळे पडदे असावे. त्यांच्या आत दिव्यांची योजना अशी असावी, की त्यामुळे नर्तकांचे हावभाव स्पष्ट दिसतील. सांप्रत या प्रकाशयोजनेत बरीच सुधारणा झाली आहे. हल्ली रंगीबेरंगी विद्युद्दीप लावून प्रकाशयोजना करतात व प्रसंग असेल त्याप्रमाणे दिव्यांचे रंग बदलतात. रंगभूमीच्या मागच्या अंगाला गोपूर ठेवतात. नृत्यापूर्वी नटराजाची पूजा करतात. नृत्य सुरू करण्यापूर्वी नर्तिका गुरूला नमस्कार करते. नर्तिकेच्या उजव्या कडेला रंगभूमीवर वादक व गायक बसतात. सर्वांची मिळून संख्या सहा असते. त्यांच्या अग्रभागी गुरू बसतो. नर्तिका नृत्य करू लागली, की नृत्याचे शोलुकट्टू (बोल) गुरू म्हणतो. मृदंगावरही तेच बोल वाजवले जातात. नृत्याच्या गायनात सामान्यपणे शंकरा, तोडी, कल्याणी, बसंत, भैरवी, यदुकुल कंबोडी, सावेरी, बेगडा, सिंहेंद्र-मध्यम, अशांसारखे राग उपयोजितात.

नृत्यसाधना – भरतनाटचम्‌चे शिक्षण साक्षात गुरूकडून घ्यावे लागते. गुरुसेवाही त्यात येते. गुरूचे पाय दाबणे, त्याच्या पायातील घुंगरू सोडणे, इ. कामे शिष्य आस्थेने करतात. गुरू शुद्ध नृत्य स्वतः करून अथवा हाताने पायासारखी हालचाल करून शिकवितो; भाव स्वतः किंवा दुसऱ्या शिष्याकडून शिकवितो. शिकवताना एक काठी पाटावर आपटून त्या नृत्याचा ताल धरतात. कितीही बुद्धिमान नर्तिका असो; तिला भरतनाटचम्‌मध्ये प्रावीण्य संपादायचे असल्यास सात-आठ वर्षे तरी नित्य-नेमाने अभ्यास करावा लागतो. शिल्पादिकरण या तमिळ ग्रंथात म्हटले आहे, की एखादी मुलगी पाचव्या वर्षापासून शिक्षण घेऊ लागली, तर ती बारा-तेरा वर्षांची झाल्यानंतर प्रकट नृत्य-प्रयोग करण्यास पात्र होते. नृत्यासाठी नर्तकीचे शरीर सडपातळ व लवचिक असले पाहिजे. त्यासाठी तिने नित्य शरीराला तेलमालिश करणे आणि विशिष्ट प्रकारचे व्यायाम करणे आवश्यक असते.

वेषभूषा – नृत्यासाठी नृत्यशिल्पात दिसतो तसाच पोषाख नर्तिका करितात. महाराष्ट्रातील स्त्रिया नऊ वारी लुगडे नेसतात तसेच सामान्यपणे नेसायचे; पण ओचा न घालता कासोटचाने काठ विभागून कमरेच्या दोन्ही बाजूंना काचाप्रमाणे खोचायचे. विजारीसारखे दोन्ही भाग विभागलेले दिसू नयेत म्हणून कमरेच्या पाठीमागचा भाग झाकण्यासाठी काठ लावलेला कपडा व पुढचा भाग झाकण्यासाठी जरीच्या पदराचा पंखा लावतात. त्यामुळे पोषाखाचे सौंदर्य खुलते. नर्तिका अंगात चोळी घालतात. छाती व कंबर यांमधील भाग उघडा राहू नये म्हणून त्यावर खांद्यावरून जरीकाठाचा पदर लपेटतात. या पोषाखाने नर्तिकेच्या शरीराचे सौंदर्य व हालचालींचे कौशल्य प्रेक्षकाला स्पष्ट दिसून येते. सामान्यपणे हा पोषाख शालूचा बनवितात. पूर्वी हा शालू नऊ वारी असे. पण सांप्रत सहा वारी साडी नेसणाऱ्या मुलींना हा शालू अवजड पडतो, म्हणून तशा प्रकारचे पोषाख शिवून तयार करतात. नर्तिकेला असा सभ्यतेचा पोषाख देण्याचे श्रेय तंजाऊरच्या भोसले राजघराण्याला आहे. पोषाखाप्रमाणेच नर्तिकेचे अलंकारही शिल्पकृतीप्रमाणे असतात. कपाळावर बिंदी किंवा भांगात बिंदली. समोरून डोक्याभोवती दिसेल असा गजरा. कानात लोंबती कर्णफुले. गळ्यात साज,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुतळ्या, ठुशा, असे अनेक मालासदृश अलंकार. त्यांपैकी एक माळ अगदी गळ्याजवळ, तर दुसरी कमरेइतकी लांब. इतर

जातिस्वरम्—भरतनाटचम्

माळा या दोहोंच्याहून कमी-अधिक लांबीच्या. या माळांमुळे नर्तिकेचा सर्व उरोभाग झाकला जातो. याशिवाय दंडात बाजूबंद, कमरपट्टा, हातांत पाटल्या, बांगडचा, तोडे व पायांत घुंगरू, अशा वेषभूषेत नर्तिका नटून-सजून रंगमंचावर आली, की एखादे उत्कृष्ट शिल्प सजीव होऊन पुढे आल्याचा भास होतो.

गीतकार – इ. स. च्या १६ व्या ते १९ व्या शतकांत द. भारतातील कवींनी रचलेली गीते प्रस्तुत नृत्यासाठी उपयोजितात. क्षेत्रज्ञ किंवा क्षेत्रय्या हा त्यांपैकी एक होय. त्याची पदे राधा-कृष्णांवर असून, ती नायक-नायिकाभाव परिपुष्ट करण्यास उपयोगी पडतात. धनम सिनाय हा १७ व्या शतकातला आणखी एक कवी. त्याचीही गीते नृत्यासाठी उपयोजितात. १८ व्या शतकातला त्यागराज हा सर्वांत मोठा कवी होय. त्याने संस्कृत व तेलुगू या दोन्ही भाषांत रामपर गीते रचली असून, तीही नृत्यात उपयोजिली जातात. नृत्यासाठी जयदेवाच्या अष्टपद्याही उपयोगात आणतात. गोपालकृष्ण भारती हा तमिळ कवी १९ व्या शतकात होऊन गेला. त्याने नंदचरितम नामक एक काव्य रचले आहे. नृत्यासाठी त्यातील गीतेही निवडतात. विद्वान म्हणजे गुरू गीत म्हणतो व बाकीचे त्याचे ध्रुपद धरतात. लगेच मृदंग त्याचा ताल धरून बोल उमटवू लागतो. इतर वाद्ये स्वरमेळ साधतात व त्या साथीवर नर्तिका त्या त्या गाण्यातील आशय अभिनयाच्या द्वारे व्यक्त करू लागते.

इतिहास – भरतनाटचम् ही कला सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीपासून प्रचलित आहे. देवदासींनी तिची परंपरा राखली व कित्येक नट्टुवनार (नृत्यशिक्षक) यांनी तिच्यात नवे नवे प्रकार अंतर्भूत केले. अजूनही ती नवनव्या उन्मेषांनी व आशयांनी समृद्ध होत राहिली आहे. कलेची मूळ तत्त्वे तीच राहिली असली, तरी कालानुसार व प्रेक्षकांच्या अभिरुचीनुसार त्यांत बदल झाले आहेत. अभिनयाचे प्रकार व त्यांचे अर्थही बदलत आहेत.

दक्षिणेत चोल व पांडच राजांनी आणि पुढे इ.स.च्या १६ व्या शतकात तंजाऊर येथील अच्युतप्पा नायक या राजाने या कलेच्या उत्कर्षासाठी बरेच परिश्रम केले. पुढे १७ व्या शतकात रघुनाथ नायक व विजयराघव नायक यांच्या कारकीर्दीत वेंकटमखी, क्षेत्रज्ञ व तीर्थनारायण यांनी प्रस्तुत कलेवर ग्रंथ लिहून तिच्या अभिवृद्धीत मोलाची भर घातली. १८ व्या शतकात तंजाऊर येथे प्रतापसिंह व त्याच्या नंतर तुळजाजी हे राज्यकर्ते होऊन गेले. त्यांच्या कालातही या कलेची उत्तरोत्तर वाढ होत गेली. त्यांच्या दरबारी महादेव अण्णवी व सुब्बराय नट्टुवनार नावाचे राजकवी होते. त्यांनी या कलेत विलक्षण चैतन्य निर्माण केले. अण्णवी हे नाटचशास्त्रातले विद्वान म्हणून व सुब्बराय हे उत्तम नर्तक म्हणून गाजले. सुब्बरायांना दीक्षितार व शामशास्त्री या कलामर्मज्ञांचे मार्गदर्शन लाभले होते.

सुब्बरायांना चार मुलगे असून, चिन्नय्या, पुन्नय्या, वाडिवेलू व शिवानंदम अशी त्यांची नावे होती. तंजाऊर-नरेश सरफोजी भोसले यांच्या कारकीर्दीत ते नर्तक म्हणून नावाजले. सांप्रत प्रचारात असलेल्या भरतनाटचम्चा तपशील या चौघांनी निश्चित केला. आजचे भरतनाटचम्चे परिवर्धित स्वरूप हे त्यांच्याच प्रयत्नांचे फळ होय.

भरतनाटचम्ची परंपरा अशी जरी अनेक शतकांची असली, तरी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात या कलेला दुर्भाग्याचे दिवस आले. कलामर्मज्ञांचे तिच्यावरून लक्षच उडाले. हिंदुस्थानावरची परकीय राजवट हे तिचे मुख्य कारण होय. इथल्या पाश्चात्य राज्यकर्त्यांनी असा पद्धतशीरपणे प्रचार आरंभला, की हिंदी कला ही जुनाट, गांवढळ, सामान्य आणि अनैतिक आहे. या अपप्रचाराला पाश्चात्यविद्याविभूषित असे आपले लोकही बळी पडले. त्यांनी अशी समजूत करून घेतली, की जे जे पौर्वात्य ते ते हिणकस व जे जे पाश्चात्य ते ते श्रेष्ठ व अनुकरणीय होय.

दुसऱ्या बाजूने या अवनतीला आणखीही एक कारण घडले. देवदासींनी कित्येक शतके या अभिजात कलेचे संरक्षण केले असले, तरी इंग्रजी राजवटीच्या काळापर्यंत त्यांच्या नृत्याला एक प्रकारची ठरीव आणि कलाहीन चाकोरी प्राप्त झाली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूर्वी या कलेला राजेरजवाडचांकडे आश्रय मिळत असे, तोही नाहीसा झाला. श्रीमंत लोकांनी आपल्या घरच्या लग्नसमारंभात देवदासींना बोलावून त्यांचे नृत्य करवणे, एवढेच तिचे अस्तित्व शिल्लक राहिले. त्यातही गंधर्वप्रीती या नावाने हलक्या दर्जाचे केवळ वासना-विकारांना चेतवणारे नृत्य भरतनाटचम्मध्ये अंतर्भूत झाले आणि त्यालाच वाहवा मिळू लागली.

असल्या या विकृत आणि हीन अभिरुचीच्या नृत्याविषयी साहजिकच इंग्रजी शिकलेल्या समाजसुधारकांनी विरोधी प्रचार सुरू केला. तसे करताना त्यांनी त्या कलेच्या मूळ बैठकीकडेही डोळेझाक केली. ही कला समाजामध्ये अनीतीचा फैलाव करणारी आहे, असा दावा ते मांडू लागले.

समाजसुधारकांच्या या विरोधी आणि सततच्या प्रचारामुळे ही कला पार नामशेष व्हायची; पण इ. स. १९२६ साली श्री. ई. कृष्ण अय्यर या नावाने तिचा एक उद्धारकर्ता पुढे आला. हे गृहस्थ उच्चवर्णीय व सुविद्य होते. त्यांनी वकिलीची परीक्षा दिली होती आणि मद्रासच्या हायकोर्टात वकिली करण्याचाही त्यांचा मानस होता. भरतनाटचम् या कलेत विकृती शिरली असली, तरी तिची मूळ बैठक नैतिक आहे, आध्यात्मिक आहे आणि विशुद्ध सौंदर्यवादी आहे, हे त्यांनी जाणले. अशी ही अभिजात कला मरता तर कामा नयेच; पण तिचा सर्वांगीण उद्धार

पदम्—भरतनाटचम्

झाला पाहिजे, असे त्यांच्या मनाने घेतले आणि ते वकिलीकडे पाठ फिरवून कलेच्या उद्धाराकरिता बद्धपरिकर झाले. त्यांनी तिच्या पुनरुद्धाराची मोहीम हाती घेतली. एका बाजूने कलेची उपासना आणि दुसऱ्या बाजूने तथाकथित समाजसुधारकांच्या विरोधाला तोंड देणे, अशी दोन्ही कामे त्यांना करावी लागली. पण त्या दोहोंतही ते यशस्वी झाले. त्यांनी लोकांत भरतनाटचम्ची आवड उत्पन्न केली. लोक त्यांच्या कार्यक्रमांना गर्दी करून उपस्थित राहू लागले. इ. स. १९३४ साली वाराणसी येथे अखिल भारतीय संगीत परिषद भरली होती. त्या प्रसंगी श्री. अय्यर हे आपली शिष्या बालसरस्वती हिच्यासह उपस्थित राहिले. त्या परिषदेत त्यांनी भरतनाटचम्चा प्रयोग सादर केला आणि तिथे जमलेल्या भारतीय कीर्तीच्या कलावंतांच्या मुखांतून प्रस्तुत कलेच्या श्रेष्ठत्वाविषयी प्रशस्ती मिळविली. तेव्हापासून बालसरस्वती ही उत्तर भारतात लोकप्रिय झाली. भरतनाटचम्च्या पुनरुद्धारात श्री. अय्यर यांच्याप्रमाणेच तिचाही मोठा वाटा आहे. इ. स. १९३७ साली भरतनाटचम्च्या कलाक्षेत्रात दोन सुशिक्षित व घरंदाज मुलींनी प्रवेश केला. कलानिधी आणि रुक्मिणीदेवी ही त्यांची नावे होत. या दोघीही मद्रासच्याच होत्या. या दोघींच्या नृत्यप्रदर्शनाने भरतनाटचम्च्या इतिहासात एक नवीन प्रकरण सुरू झाले. या दोन्ही मुली नृत्यक्षेत्रात कीर्तिवंत झालेल्या पाहून दक्षिणेतील मध्यम वर्गातल्या कितीतरी मुली भरतनाटचम्च्या क्षेत्रात पदार्पण करू लागल्या. रामगोपाल, कृष्णराव, चंद्रभागादेवी, कमला लक्ष्मण, यामिनी कृष्णमूर्ती, मृणालिनी साराभाई, रीतादेवी चटर्जी, शांता राव, वैजयंतीमाला, पद्मिनी, रागिणी, इ. स्त्री-पुरुष कलावंत उच्च प्रतीचे भरतनाटचम्चे नर्तक म्हणून प्रसिद्धीस आले.

आता भरतनाटचम् ही कला विस्मृतीच्या आणि लोकापवादाच्या तावडीतून बचावली आहे. इतकेच नव्हे; तर आज तिला प्रतिष्ठाही लाभली आहे. श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत सर्व थरांतले कित्येक कलावंत सांप्रत तिची उपासना करीत आहेत. जागोजाग भरतनाटचम्चे प्रयोगही होत आहेत. बुद्धिमान आणि सुशिक्षित स्त्री-पुरुष तिच्याकडे आकृष्ट होत आहेत. मध्यमवर्गीय लोक आपल्या मुलींना या कलेचे शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे या कलेचे शिक्षण देणाऱ्या नवनवीन संस्था निर्माण होत आहेत. या सर्व कलासंस्थांमध्ये अडचारचे कलाक्षेत्र आणि एग्मोर येथील इंडियन इन्स्टिटचूट ऑफ फाइन आर्टस् या संस्थांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. याशिवाय कित्येक नट्टुवनार (नृत्यशिक्षक) घरोघरी मुलींना नृत्यकलेचे शिक्षण देत आहेत, ते वेगळेच. एतावता भरतनाटचम् ही कला सांप्रत रसिकांना शुद्ध सात्त्विक आनंद देण्यात दिवसेंदिवस अधिकाधिक यशस्वी होत आहे. गेल्या अर्धशतकाच्या अल्पकाळात भरतनाटचम्ने केलेली प्रगती निःसंशय स्पृहणीय आहे. [श्रीमंत सौ. पद्मिनीराजे पटवर्धन]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust: Funding by MoE-IKS

भरतवाक्य संस्कृत नाटकाच्या शेवटी नटांच्या तोंडी जे एक आशीर्वचन नाटककाराने घातलेले असते, त्याला भरतवाक्य अशी संज्ञा आहे. भासापासून पुढे झालेल्या सर्व संस्कृत नाटककारांनी आपल्या नाटकाच्या शेवटी भरतवाक्य लिहिलेले आहे.

भरतवाक्य हे नांव कोणी व केव्हा दिले, ते समजत नाही. भरतवाक्य याचा एक अर्थ भरतांचे म्हणजे नटांचे वाक्य असा होतो. एकदा नाटकाचा आरंभ झाला, की नटांना आपल्या भूमिकेव्यतिरिक्त इतर काहीच बोलता येत नसतें. म्हणून शेवटी त्या सर्वांच्या तोंडी हे भरतवाक्य घातले गेले, असे राघवभट्टाने आपल्या शाकुंतलावरील टीकेत म्हटले आहे. सामान्यपणे नाटकाच्या नायकाच्या तोंडी भरतवाक्य घातलेले दिसते.

भरतवाक्य याचा दुसरा अर्थ, नाटयशास्त्राचे प्रणेते भरतमुनी यांच्या गौरवार्थ वाक्य, असाही करतात.

भरतवाक्यात साधारणपणे राजेलोकांचा उत्कर्ष किंवा सर्वसामान्य लोकांचे हित चिंतिलेले असते. पाऊस पडावा, धनधान्यसमृद्धी व्हावी, गायींनी पुष्कळ दूध द्यावे, लोकांना सुख लाभावे, अशी इच्छा त्यात व्यक्त केलेली असते. कालिदासाने शाकुंतलाच्या शेवटी घातलेल्या भरतवाक्यात प्रथम राजाचे कर्तव्य सांगून मग स्वतःची एक उत्कट इच्छा प्रकट केली आहे, ते भरतवाक्य असे—

> प्रवर्ततां प्रकृतिहिताय पार्थिवः
> सरस्वती श्रुतमहतां महीयसाम् ।
> ममापि च क्षपयतु नीललोहितः
> पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभूः ।।

अर्थ— राजा प्रजेच्या हितासाठी प्रयत्नशील राहो. शास्त्राभ्यासी विद्वान आणि कवी यांच्यावर सरस्वतीचा वरदहस्त राहो. ज्याचे सामर्थ्य सर्वत्र प्रकट झालेले आहे, असा शंकर माझ्या पुनर्जन्माचा क्षय करो.

संस्कृत नाटककारांनी आपल्या नाटकांत भरतवाक्ये घातली असली, तरी भरतवाक्य या शब्दाने त्याचा उल्लेख कोणत्याही नाटयशास्त्रविषयक ग्रंथात आढळत नाही. [सं. ना. सौं.]

भरतस्वामी (इ. स. चे १३ वे शतक) एक भाष्यकार. हा काश्यपगोत्री ब्राह्मण होता. याच्या वडिलांचे नाव नारायण आणि आईचे नाव यज्ञदा असे होते. हा दक्षिणेत श्रीरंगम येथे राहत होता. तिथे होयसळाधीश्वर रामनाथाच्या काळात याने सामवेदावर आपले भाष्य रचले. हे भाष्य संपूर्ण सामवेदावर आहे. ते लहान असूनही सरस आहे. मात्र ते अजून संपूर्ण छापले गेले नाही. [वै. सा. सं.; वै. सा.]

भरद्वाज (१) एक वैदिक ऋषी. बृहस्पती व ममता यांचा पुत्र. हा जन्मल्यावर ती दोघेही एकमेकांना 'भरद्वाजमिमम् = याला संभाळ, असे म्हणू लागली. त्यावरून याला भरद्वाज असे नाव मिळाले. पण दोघेही त्याला टाकून निघून गेली. तेव्हा मरुतांनी त्याला उचलून घेतले व दुष्यंतपुत्र भरत पुत्रप्राप्तीसाठी मरुत्स्तोम नामक यज्ञ करीत होता, त्याच्याकडे नेले. मरुतांनी भरताला तो पुत्र अर्पण केला. मोठा झाल्यावर त्याने भरतासाठी एक यज्ञ केला व त्याला भूमन्यू नावाचा पुत्र मिळवून दिला. तोच पुढे भरताचा वारस ठरला.

भरद्वाज हा उंच, कृश व फिकट होता; तसाच तो दीर्घायुषी, तपस्वी व विद्वान होता.

भरद्वाजाने सर्व वेदांचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला, पण ते न जमल्यामुळे त्याने इंद्राला प्रसन्न करून त्याच्याकडून प्रत्येकी शंभर वर्षांचे असे तीन जन्म मागून घेतले. तीन्ही जन्मांत हा गुरुकुलात सतत वेदाध्ययन करीत राहिला. तिसऱ्या जन्मात शेवटी भरद्वाज अंथरुणाला खिळला असता इंद्र त्याच्याकडे आला आणि त्याला म्हणाला. 'तुला आणखी एक जन्म मी दिला, तर तू काय करशील ?' त्यावर भरद्वाज म्हणाला. 'मी वेदाध्ययनच करीन'. तेव्हा इंद्राने तीन पर्वत निर्माण केले व प्रत्येक पर्वतातील एक एक मूठ माती घेऊन व त्यातील एक एक कण भरद्वाजाला दाखवून म्हटले. 'वेदांचे ज्ञान या तीन पर्वताएवढे आहे; तर तुला मिळालेले ज्ञान या तीन कणांएवढे आहे. तेव्हा आणखी शंभर वर्षे तुला आयुष्य दिले, तरी तुझ्या हातून काय विशेष होणार ?' पण तरीही भरद्वाजाने वेदाध्ययनासाठी आणखी शंभर वर्षे मागितलीच. त्याच्या या ज्ञाननिष्ठेने इंद्र संतुष्ट झाला व वेदज्ञान मिळविण्याचा सोपा उपाय म्हणून त्याने त्याला सावित्राग्निविद्या शिकवली. तदनुसार सावित्राग्निचयन करून भरद्वाज हा वेदज्ञाता व स्वर्गाचा अधिकारी झाला.

भरद्वाज हा सूक्तद्रष्टाही होता. ऋग्वेदाच्या सहाव्या मंडलात याच्या अनेक ऋचा आहेत. संपूर्ण सहावे मंडल हे भरद्वाज व त्याच्या कुलातील पुरुष यांनी रचलेले आहे. भरद्वाज हा दिवोदास राजाचा पुरोहित होता. दिवोदास व शंबरासुर यांच्या युद्धाच्या वेळी त्याने दिवोदासाचे पौरोहित्य पत्करले व त्याच्या मदतीसाठी इंद्राला बोलावून आणले. त्या युद्धात शंबराचा सपशेल पाडाव झाला व त्याची अलोट संपत्ती दिवोदासाला मिळाली. या साहाय्याबद्दल खूष होऊन दिवोदासाने भरद्वाजाला दहा घोडे, दहा कोश, दहा महावस्त्रे व दहा सोन्याचे गोळे दान म्हणून दिले (ऋ. ६.४७.२२–२३).

आणखीही दोन राजांशी भरद्वाजाचा संबंध आलेला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकदा अभ्यावर्ती चायमान व वारशिख यांच्यामधले वितुष्ट वाढून त्याचा परिणाम लढाईत झाला. त्यात वारशिखांनी अभ्यावर्ती चायमानांचा पूर्ण पराभव केला. त्याच वेळी वारशिखांनी सृंजय-पुत्र प्रस्तोक या राजाचाही युद्धात पराजय केला. भरद्वाजाचे मंत्रकौशल्य, इंद्रभक्ती व कर्तबगारी यांची चांगली जाणीव असल्यामुळे चायमान व प्रस्तोक हे दोघेही भरद्वाजाकडे गेले आणि त्यांनी त्याला आपले पौरोहित्य स्वीकारून वारशिखांचे पारिपत्य करण्याच्या कामी मदत करण्याची विनंती केली. भरद्वाजाने हे काम आपला पुत्र पायू याच्याकडे सोपविले. तेव्हा पायूने त्यांच्या निरनिराळ्या शस्त्रांची सूक्ते म्हणून ती प्रभावी केली व त्यांना युद्धात जय मिळवून दिला. भरद्वाजाचे घोष-वाक्य असे होते—

अंहांसि दुरिता तरेम ता तरेम तवावसा तरेम ।

(ऋ. ६·२·११)

अर्थ— हे अग्ने, आम्ही सर्व संकटांतून पार पडू, खात्रीने पार पडू आणि तेही तुझ्या कृपेने पडू.

आम्ही चांगल्या वीरांसह शंभर वर्षे आनंदपूर्वक राहू, ही त्याची आकांक्षा होती. (ऋ. ६·१०·७)

आमचा देह दगडाचा होवो, असे त्याने म्हटले आहे (ऋ. ६·७५·१२).

ऋग्वेदाच्या सहाव्या मंडलातील २८ वे सूक्त गोसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. त्यातली एक ऋचा (६·२८·१) अशी—

आ गावो अग्मन्नुत भद्रमक्रन् त्सीदन्तु गोष्ठे रणयन्त्वस्मे ।
प्रजावतीः पुरुरूपा इह स्युरिन्द्राय पूर्वीरुषसो दुहानाः ।।

अर्थ — अनेक जातींच्या कल्याणप्रद अशा सवत्स गाई आमच्या गोठ्यात रममाण होऊन उषःकाली इंद्राप्रीत्यर्थ दुग्ध स्रवोत.

सवत्स दुभती गाय घरोघर असलीच पाहिजे आणि कोण-त्याही सबबीवर किंवा युद्धात तिचा वध करू नये, असे भर-द्वाजाने सांगितले आहे.

गोसंरक्षण व गोसंवर्धन या दृष्टीने भरद्वाज ऋषीने वैदिक काळात बरीच वैचारिक क्रांती घडवून आणली असली पाहिजे, असे वाटते. [ऋ. आ.; ऋ. द.; प्रा.च. को.; एकता, मार्गशीर्ष पौष १८८०]

(२) रामायणात उल्लेख केलेला एक ऋषी. हा वाल्मीकीचा शिष्य होता. गंगा-यमुनांच्या संगमावर प्रयाग येथे याचा आश्रम होता (वा. रा. अयोध्या. ५४·५-९). रामचंद्र दंडकारण्यात जाताना याच्या दर्शनाला गेला होता. तेव्हा त्याने त्याचा चांगला आदरसत्कार केला. ‘मला राहण्यासाठी एखादे स्थळ सांगा’, असे रामचंद्राने त्याला म्हटले. त्यावर त्याने म्हटले. ‘तू माझ्या आश्रमातच राहा’. त्यावर राम म्हणाला. ‘हे ठिकाण अयोध्येच्या बरेच जवळ असल्यामुळे इथे राहिल्यास अयोध्येच्या नागरिकांकडून मला त्रास होईल; तेव्हा दुसरे एखादे ठिकाण सांगा.’ मग त्याने रामाला तिथून दहा कोसांवर असलेल्या चित्रकूट पर्वतावर जाऊन राहायला सांगितले. त्यावरून रामचंद्र तिकडे गेला. (वा. रा. अयोध्या. ५४-५५).

रावणवधादी कृत्ये आटोपून रामचंद्र लंकेहून अयोध्येला परत जात असता पुन्हा याच्या आश्रमात आला होता. इथूनच त्याने आपण आल्याबद्दल भरताकडे निरोप पाठवला होता.

भरद्वाजाला देववर्णिनी नावाची कन्या होती व ती त्याने विश्रव्याला दिली होती. [प्रा. च. को.; वा. रा. को.]

(३) अंगिरसकुलोत्पन्न एक ऋषी. हा गंगाद्वारी राहत असे. एकदा हा गंगेवर स्नानासाठी निघाला असता घृताची नावाची अप्सरा याच्या दृष्टीस पडली. सद्यःस्नात व तारुण्याने मुसमुसलेली ती अप्सरा पाहून त्याचे अमोघ वीर्य स्खलन पावले. ते त्याने एका द्रोणात ठेवले. त्यापासून जो पुत्र जन्माला आला त्याचे नाव द्रोण असे ठेवले गेले. (म. भा. आदि. ६३·१०६).

(४) एक सूत्रकार. याने श्रौतसूत्र व गृह्यसूत्र लिहिले आहे. विश्वरूपाने व अपरार्काने याच्या धर्मसूत्रातले उतारे दिले आहेत. यावरून याने धर्मसूत्रही लिहिले असावे, असे वाटते. भरद्वाज स्मृती नावाच्या एका ग्रंथाचाही पद्म पुराणात उल्लेख आहे.

कौटिल्याने अर्थशास्त्रकार म्हणून भरद्वाजाचा सात वेळा उल्लेख केला आहे. राजाने कसे वागावे यासंबंधी कणिक भरद्वाजाची काही मते अर्थशास्त्रातच दिली आहेत. महाभारतात (शांति. ६७) कणिकाच्या या मतांचा उल्लेख आहे. राज-नीती या विषयावरही भरद्वाजाचा एक गद्यपद्यमय ग्रंथ होता असे दिसते. कारण यशस्तिलक ग्रंथात भरद्वाजाचे षाड्गुण्यावरचे दोन श्लोक उद्धृत केलेले आहेत. [हि. ध.; प्रा. च. को.]

भरद्वाज-आश्रम हा आश्रम प्रयाग क्षेत्राजवळ होता. रामायणकाळी या ठिकाणी मोठे विद्यालय होते. या विद्यालयात धनुर्वेदाचे शिक्षण उत्तम तऱ्हेने दिले जात असे. याच्या परिसरात एक मोठे उपवन होते. त्यात अनेक जलाशय असून वृक्षांची समृद्धी होती. याचा विस्तार २० [illegible] होता, असे म्हटले आहे. [हि. जॉ. ए. इं]

भरवाड एक जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने गुजरात व महाराष्ट्र या प्रदेशांत आढळते. कृष्णाचा धर्मपिता नंद ज्या मेहेर जातीचा होता त्याच जातीचे हे लोक आहेत असे एका कथेत सांगितले आहे. काहींचे असे मत आहे, की [illegible] पुरुष आणि शूद्र स्त्री यांच्या पासून ही जात उत्पन्न झाली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मूळचे गोकुळ-वृंदावनातले असावे, असे वाटते. मानव वंशशास्त्र-दृष्ट्या भरवाड व रबरी यांच्यांत पुष्कळ साधर्म्य आहे. तथापि त्यांच्यांत रोटीव्यवहार होत असला, तरी बेटीव्यवहार होत नाही. भरवाड पुरुष कमरेभोवती, डोक्याला व खांद्यावर अशा तीन घोंगड्या घेतात.

गुरांचे व शेळ्यामेंढ्यांचे कळप पाळणे आणि दूध-तूप विकणे हा यांचा व्यवसाय आहे. यांच्यांतील काही लोक शेतकरी व मजूरही आहेत. ते घोंगड्या विणतात व विकतात. अनेकदा धनगरांचाही या जातीत समावेश केलेला आढळतो. समान व्यवसाय हे त्याचे प्रमुख कारण असावे.

विवाहप्रथा – भरवाड लोकांची लग्ने बारा, पंधरा किंवा पंचवीस वर्षांनी एकदा वैशाख मासात सामूहिक पद्धतीने होतात. त्यासाठी मोठी माळाची जागा घेऊन त्याच ठिकाणी सर्व लग्ने लावतात. एकदा लग्न लावलेली जागा पुन्हा त्याच कामाकरिता वापरीत नाहीत. ती जागा गुरे चारायला ठेवतात. त्या जागेवर एक खांब उभारतात. तिथे लग्ने झाल्याची ती खूण असते. ब्राह्मण किंवा दर्जी त्यांच्या लग्नात पौरोहित्य करतो. परंतु यांपैकी कोणी नसल्यास मुलीकडील कोणीतरी लग्न लावतो. यांच्यांत सोडचिठ्ठीची पद्धत प्रचलित असून, विधवेला धाकट्या दिराशी लग्न करता येते. या जातीमधील काही लोक पंधरा दिवस सुवेर पाळतात, तर काही लोक तो मुळीच पाळीत नाहीत.

देवधर्म – काही भरवाड मातापंथाचे अनुयायी आहेत, तर काही रामानंदी पंथाचे अनुयायी आहेत. झाला बापजी या पुण्यवान राजपुत पुरुषाला ते भजतात. जनावरे आजारी पडल्यास ते याला नवस करतात.

यांच्यांत जातपंचायत आहे. सामाजिक तंट्यांच्या निवाड्यासाठी दहा-बारा खेड्यांचा एक गट करून त्यावर एक पाटील निवडलेला असतो. तो पाच-दहा लोकांची संमती घेऊन तंट्यांचे निवाडे करतो.

मौतकप्रथा– हे लोक मृतांना जाळतात व त्यांचे श्राद्धही करतात. प्रेताची उत्तरक्रिया कायटिया ब्राह्मणाकडून केली जाते.
[मुं. इ. जा.; ट्रा. का. बाँ.; रजःकण]

भरहूत मध्य प्रदेशातील एक प्राचीन स्थान. हे गाव बघेलखंडात (मध्य प्रदेश) सतना स्थानकाच्या दक्षिणेला ८ मैलांवर आहे. इ. स. १८७३ साली कनिंगहॅमला तिथे एक बौद्ध स्तूप सापडला, तेव्हा ते विशेष प्रसिद्धी पावले. पुराणवस्तुशास्त्रज्ञांच्या मते हा स्तूप सन पूर्व ३ ऱ्या शतकातला असावा. सांप्रत त्याचे भग्नावशेष मात्र तिथे पाहायला मिळतात. तो विटांचा बांधलेला असून, त्याचा व्यास ६८ फूट होता. त्याच्या चारी बाजूंना पाषाणाचे सुंदर कठडे व तोरण-दरवाजे होते. प्रत्येक बाजूच्या कठड्यात सोळा स्तंभ असून, त्यांवर

स्तंभावर कोरलेले एक चित्र – भरहूत

फुलांचे सुंदर नक्षीकाम आणि जातकांतील निरनिराळे प्रसंग कोरलेले दिसतात. श्रावस्ती येथील जेतवन अनाथपिंडिकाने विकत घेतले, त्या प्रसंगाचे इथले शिल्पकाम तर फारच प्रेक्षणीय आहे. या चित्रावरून त्या काळातील वेषभूषा व चालीरीती यांची कल्पना करता येते. या स्तूपावर शेकडो कोनाडे असून, त्यांत उत्सवप्रसंगी दिवे लावले जात.

या स्तूपाच्या अवशेषांतील मुख्य भाग कलकत्त्याच्या पुराणवस्तुसंग्रहालयात आणि बाकीचे भाग भिन्न भिन्न संग्रहालयांत ठेवलेले आहेत.

इथला मुख्य स्तूप अशोकाच्या वेळचा असला, तरी त्याच्या भोवतालचे पुष्कळसे शिल्पकाम शुंग काळातले आहे. तिथल्या एका तोरणावर ब्राह्मी लिपीतला एक शिलालेख असून, ते तोरण शुंग वंशातील धनभूती राजाने बांधले, असे त्यात लिहिलेले आहे. आणखी दोन तोरणांवरही असे लेख सापडले आहेत. वेदिकेवरील पुष्कळ शिल्पकामांवर प्रसंगाचे नाव आणि ते चित्र दान देणाऱ्याचे नाव कोरलेले सापडते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुद्धाच्या जीवनावर जे प्रसंग कोरलेले आहेत, त्यांत धर्मचक्र, त्रिरत्न, बोधिवृक्ष, स्तूप, पदयुग्म, इ. प्रतीके दिसतात;

कुरंग-मृग जातकातील प्रसंग – भरहूत

त्यावरून त्याकाळी बुद्धाच्या प्रतिमा बनविण्याची प्रथा नव्हती, असे दिसते.



बोधिवृक्षपूजा – भरहूत

इथे अप्सरा, नाग, यक्ष यांच्या मूर्ती पुष्कळ सापडल्या आहेत. शिवाय विविध प्रकारची गृहे, मंदिरे यांची चित्रेही तिथे कोरलेली आहेत. राजे, योद्धे, सामान्य स्त्रीपुरुष यांच्या मूर्तीही इथे आढळतात. इथल्या बहुतेक मूर्ती सुंदर, सजीव आणि स्वाभाविक वाटतात. मात्र मौर्यकालीन शिल्पकामातली सफाई या शिल्पांत दिसत नाही. कारण भरहूतची शिल्पकला ही लोककला आहे. [म. ज्ञा. को.; पां. क.; प्रा.भा. सां. के.]

भराडी महाराष्ट्रातील एक भिक्षेकरी जात. हे लोक डौर (डमरू) वाजवीत असल्यामुळे व ते नाथपंथी गोसावी असल्यामुळे, त्यांना डौरे किंवा डौरे गोसावी असेही म्हणतात. यांची वस्ती प्राधान्याने पुणे, खानदेश, नगर, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांत व मराठवाड्याच्या काही भागांत विखुरलेली आहे. यांच्या बहुतेक चालीरीती मराठ्यांप्रमाणे असून, यांची आडनावेही जाधव, घोंगडे, इंगळे यांसारखी मराठा वळणाची आहेत. सोडचिठ्ठी, पाट लावणे, इ. प्रथा यांच्यांत रूढ आहेत.

डोक्याला रुमाल, अंगात सदरा, त्यावर जाकीट, धोतर, काखेत झोळी, कपाळावर विभूती, कानात मुद्रा आणि गळ्यात चांदीची शृंगी असा सामान्यपणे भराड्यांचा वेष असतो. यांच्या जातीत प्रत्येक मुलाला वयाच्या दहाव्या-अकराव्या वर्षी नाथपंथाची दीक्षा देण्याचा समारंभ साजरा होतो. ब्राह्मणांच्या व्रतबंधासारखेच त्याचे स्वरूप असते. या वेळी सर्व नातेवाईक व स्नेही मंडळी जमतात. दीक्षा देण्यासाठी भराड्यांच्या साडेतीन गाद्यांपैकी कोणत्याही एका गादीवरील गुरू अथवा तो येणे शक्य नसल्यास जातीतील ज्येष्ठ पुरुष येतो व तो मुलाच्या कपाळी विभूती लावून पुढील गायत्री म्हणतो–

कंचन काया कफनी लाया निर्गुण सगुण चिरा दिया।
उन्मनि मुद्रा कान भराया शैली शृंगी सत्यजोगका माया॥
ॐ नमो गुरुको आदेश आदेश।

ही गायत्री म्हटल्यानंतर मुलाचे कान टोचून त्यात मुद्रा घालतात. मग त्या मुलाला त्रिशूळ, डमरू, पत्तर (भोपळ्याचे भिक्षापात्र) झोळी व शैली-शृंगी देऊन उपस्थित मंडळींजवळ भिक्षा मागायला लावतात.

भिक्षा मागताना भराडी 'अल्लख' असा नाथपंथी घोष करतो. भिक्षेच्या वेळी तो जी गाणी म्हणतो, त्यांत भैरवाच्या व शिवाच्या स्तवनाबरोबर तात्त्विक विचारांनी व उपदेशांनी रंगलेली गाणीही असतात. ज्योतिबा हे ज्यांचे कुलदैवत आहे त्यांच्याकडे भराड नामक कुलाचार पाळला जातो. विवाह मंगलादी कार्यापूर्वी, सोनाराकडून देव उजळून आणल्यावर व कार्ये उरकल्यावरही हे-भराड करतात. तसेच नवरात्र उत्स-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याच्या वेळी रोज रात्री भैरवनाथाच्या मंदिरात भराड होते. भराडाचे स्वरूप गोंधळ व जागर यांच्याप्रमाणेच प्रथम गण,

मराठी लोकसंस्कृतीचे उपासक या पुस्तकावरून

त्यानंतर देवदेवतांना आवाहन, मग उपास्य देवतेच्या स्तुतिपर गीत, त्यानंतर कथानिरूपण व शेवटी आरती, असे असते.

गोंधळ्यांप्रमाणेच भराड्यांनीही पूर्वीपासून तमाशे गाजवले असून, आजही थोड्याफार प्रमाणात ते तमाशाचे फड चालवताना आढळतात. प्रथम देवांची पाच नावे घेतल्यावर भराडी थोर पुरुषांचे गुणगान करणारे पोवाडे म्हणतो. एखाद्याला सर्पदंश झाला, तर त्याला भैरवाच्या देवळात नेतात व तिथे भराडी एक कथा सांगतो. ही कथा जसजशी पुढे सरकते, तसतसे त्या माणसाचे सर्पविष उतरते, अशी समजूत आहे.

भराड्यांच्या साडेतीन गाद्यांपैकी काशी, सोनारी व ज्योतिबा (कोल्हापूर) या तीन पूर्ण गाद्या व जुन्नरजवळचे पारुंडे ही अर्धी गादी समजली जाते. ज्योतिबा हा भैरवस्वरूपच असल्यामुळे तो भराड्यांचे उपास्य दैवत बनला आहे.

मृतकप्रथा – यांच्यांत प्रेत पुरण्याची चाल आहे. पुरण्यापूर्वी प्रेताला विभूती लावतात. मग बुरुडाकडून मखर आणून ते केळीच्या खुंटांनी व फुलांनी सजवतात. नंतर प्रेताला भगवी वस्त्रे चढवून ते त्या मखरात बसते करतात आणि शंखांचा ध्वनी घुमवून प्रेत स्मशानात नेतात. तिथे त्यांचा गुरू किंवा जातीतील एखादा श्रेष्ठ पुरुष पुढील गायत्री म्हणतो–

विभूत माता विभूत पिता विभूत कुलदेवता
विभूत कुठे जन्मली ? गायीच्या कुशी अग्नीच्या मुशी
ॐ नमो गुरुको आदेश आदेश
मट्टीका आसन मट्टीका बासन मट्टीको काया कडस्तान लाया
ॐ नमो गुरुको आदेश

यानंतर गुरूकडूनच प्रेत पुरले जाते. श्राद्धप्रसंगी पितरांच्या नावाने जंगमाला शिधा देतात. [म. लो. उ.]

भराडी गौर विदर्भातील स्त्रियांचा एक पूजोत्सव. श्रावण महिन्याच्या सबंध शुक्ल पक्षात अथवा आणखीही पुढे सात दिवस हा उत्सव चालतो. या कालात शंकर-पार्वतींच्या प्रतिमांची अथवा त्यांच्या प्रतीकांची कलात्मक पद्धतीने मांडणी करून पूजा करतात. हा उत्सव गावातल्या लोकसंख्येच्या प्रमाणात एका अथवा अनेक ठिकाणी केला जातो.

गौरस्थापनेच्या आदल्या दिवशी एक मुलगी घरोघर जाऊन उत्सवाचे निमंत्रण करून येते. या मुलीला मुखरीण म्हणतात. उत्सवाच्या प्रथम दिवशी गावातील सुवासिनी स्त्रिया आपल्या मुलींसह नवी वस्त्रे नेसून वाजतगाजत नदीवर किंवा जलाशयावर जातात व तिथली थोडी वाळू आणि छोटे खडे वेचून घेतात. तसे करताना देवीची पुढीलप्रमाणे प्रार्थना करतात–

खडक फोडू, माती काढू । निघा निघा गवरी बाई

ही प्रार्थना पाच वेळा म्हटल्यावर ते वाळू-खडे घेऊन घरी परततात. येताना जी विविध गाणी गातात, त्यांपैकी एक असे–

खण खण कुदळी, मण मण माती ।
देऊळ खचलं, चांदण्या राती ।।
चांदण्या रातीचं, माणिक मोती ।
घाल घाल गवराई, आपुल्या नाकी ।।

घरी परतल्यावर आणलेल्या वाळूपासून एखाद्या पाटावर शंकर-पार्वतींच्या मूर्ती बनवितात व त्या घेऊन मिरवणुकीने मुख्य पूजास्थानी जातात. तिथे सर्व स्त्रिया व मुली विविध फुलांनी त्यांची पूजा करतात. पूजेपुढे ज्या रांगोळ्या काढतात, त्यांत निरनिराळ्या प्राण्यांची व देव-देवतांची चित्रे असतात. ही चित्रे काढताना लोकगीते गातात.

याप्रमाणे चार चार दिवसांनी पहिली पूजा विसर्जित करून नवी पूजा मांडतात. पाचव्या वेळी मोठ्या मिरवणुकीने शंकर-पार्वतींच्या मूर्तींचे जलाशयात विसर्जन करतात. मूर्तिविसर्जन-प्रसंगी जे गीत गातात, त्यातील काही भाग असा–

जा जा गवराबाई, जा जा गवराबाई ।
बाळ तुमचं भुकेलं, भुकेलं असेल माई ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सागराच्या शिंपेवरी, पाजील दूध आई ॥

मिरवणूक परतल्यावर सर्वजणी मुखरिणीला आहेर करतात. उत्सवाच्या कालात प्रतिदिवशी दुपारी झिम्मा, फुगड्या, पिंगा, इ. खेळ खेळून वातावरण गाजते वाजते ठेवतात. [देवीकोश ३]

भरिया

एक द्रविड जमात. या लोकांची वस्ती मध्य प्रदेशात आढळते. हे लोक गोंडांसारखे दिसत असले, तरी यांचा व गोंडांचा काही संबंध नाही. भरिया आपल्या उत्पत्तीसंबंधी सांगतात, की अर्जुनाने एकदा गवत दाबून एक पुरुष निर्माण केला आणि तोच आमचा मूळ पुरुष झाला. विद्वानांच्या मते भाटतेली या जातीपासून यांची उत्पत्ती झाली असावी. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे.

भरियांत अठरा पोटभेद आहेत. या जमातीची रचना अत्यंत शिथिल आहे. अगदी कमी प्रतीचे लोक सोडून अन्य कोणत्याही जातीच्या लोकांना हे आपल्यात प्रवेश देतात.

विवाहप्रथा – यांच्यांत प्रौढविवाहाची पद्धत आहे. हळदी, सप्तपदी, इ. विधी यांच्या लग्नात असतात. हे विधी संपायच्या वेळी मुलीचा बाप तिळ हुंडा देतो. मग जेवणावळी होतात. त्यानंतर वधू नवऱ्याच्या घरी जाते.

एखाद्या मुलीने व्यभिचार केल्यास तिचा विवाह विधवा-विवाहाप्रमाणे करतात. विधवा आपल्या धाकट्या दिराबरोबर लग्न करू शकते. प्रथमवराने जर विधवेशी लग्न लावले, तर त्याला काही धार्मिक विधी करावे लागतात.

देवधर्म – हे दुल्हादेव, नारायणदेव, बुढादेव, करुआ, सक्रई, इ. ग्रामदेवांना भजतात. दिवाळीच्या दिवशी देवाला काळी कोंबडी बळी देतात. सागाचे झाड हे यांचे प्रमुख देवक आहे. नारायणदेवाची प्रतिमा म्हणून एक तांब्याची अंगठी असते आणि सक्रई देवीसाठी लोखंडाची अंगठी असते.

मृतकप्रथा – हे मृताला पुरतात अथवा जाळतात. मृत्यू घातपाती असेल, तर त्याला पुरतात. एखाद्याला वाघाने मारले असेल, तर त्याच्या नातेवाइकांना जातिबहिष्कृत करतात. प्रौढ मृतासाठी दहा दिवस सुतक पाळतात. या दहा दिवसांत रोज मृताच्या नावाने घराबाहेर पिंड ठेवतात. तीन वर्षांनंतर मृताच्या स्मृति-प्रीत्यर्थ अंगठी, तार, इ. वस्तू दान देतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

भर्ग

प्राचीन लोक व जनपद. हे लोक त्रिगर्त (पंजाब) प्रदेशात राहत होते, असे पाणिनीने म्हटले आहे (अष्टा. ४.१.१११). पाणिनीने त्यांच्या जनपदाचाही उल्लेख केला आहे (४.१.१७८). भर्ग हा एक संघ होता आणि शिंशुमारगिरी ही त्याची राजधानी होती, असाही उल्लेख मिळतो. [पा. का. भा.]

भर्गप्रागाथ

एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील ६० व ६१ ही दोन सूक्ते याच्या नावावर आहेत. या दोन सूक्तांचे अनुक्रमे अग्निस्तुती व इंद्रस्तुती हे विषय आहेत. याची अग्निस्तुतिसंबंधीची एक ऋचा अशी–

शोचा शोचिष्ठ दीदिहि विशे मयो रास्व स्तोत्रे महाँ असि।
देवानां शर्मन् मम सन्तु सूरयः शत्रूषाहः स्वग्नयः ॥

(ऋ. ८.६०.६)

अर्थ – हे प्रज्वलित, उदार आणि भक्तप्रार्थित अग्ने, आम्हाला आणि आमच्या परिवाराला तू तेजस्वी, सुखी, शत्रुंजय आणि तुझा उपासक बनव.

एकसष्टाव्या सूक्तातील 'यत इन्द्र भयामहे' या ऋचेने प्रारंभ होणाऱ्या १३ ते १८ ऋचा शांतिपाठमंत्र म्हणून पठण करतात. ग्रहबाधेच्या निवारणासाठी व अपशकुनादींच्या परिहारार्थ या मंत्रांचा जप करतात. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

भर्तृप्रपंच

वेदान्ताचा एक आचार्य. याने कठ व बृहदारण्यक या उपनिषदांवर भाष्य लिहिले होते. हा शंकराचार्यांच्या अगोदर होऊन गेला. हा शंकराचार्यांप्रमाणे पूर्ण अद्वैती नव्हता. त्याचे मत द्वैताद्वैत, भेदाभेद, अनेकान्त, इ. नावांनी प्रसिद्ध होते. त्याचे प्रतिपादन असे– पारमार्थिक सत्य एकही आहे आणि अनेकही आहे. ब्रह्मरूपात ते एक आहे व जगद्रूपात नाना आहे. जीव हे नाना असून, ते परमात्म्याच्या केवळ एकदेशात राहतात. जीवांचे नानात्व हे केवळ उपाधिजन्य नसून, धर्मभेद व दृष्टिभेद यांमुळे ते वास्तविक आहे. ब्रह्म एक आहे हे खरे; पण ते समुद्र व तरंग यांच्याप्रमाणे भेदाभेदभावयुक्त आहे. समुद्ररूप असल्यामुळे तरंग व समुद्र यांत अद्वैत आहे आणि तरंगाचे वेगळेपण स्पष्ट दिसत असल्यामुळे त्यांत द्वैतही आहे. जीव हा ब्रह्माचा परिणामस्वरूप आहे. जग हे परमात्मराशी, जीवराशी व मूर्तामूर्तराशी असे त्रिविध आहे. अपरा व परा अशी दोन प्रकारची मुक्ती आहे. देहात असताना जेव्हा जीवाला ब्रह्मसाक्षात्कार होतो, तेव्हा तिला अपरा मुक्ती म्हणावे. सांसारिक विषयातली आसक्ती सोडल्याने ही मुक्ती लाभते. देहपात झाल्यानंतर जेव्हा जीव ब्रह्मात विलीन होतो, तेव्हा परा मुक्तीचा उदय होतो. ही अवस्था अविद्येची निवृत्ती झाल्यानंतरच प्राप्त होते. मोक्षासाठी किंवा ब्रह्मप्राप्तीसाठी केवळ ज्ञान किंवा केवळ कर्म हे साधन नसून, ज्ञानकर्मसमुच्चय हे साधन आहे. [शंकराचार्य]

भर्तृप्राप्तिव्रत

एक काम्य व्रत. चांगला पती मिळावा म्हणून कुमारिकांनी हे व्रत आचरायचे असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वर्गात ज्या अप्सरांना नारायण पती मिळावा अशी इच्छा झाली, त्या अप्सरांना नारदाने हे व्रत सांगितले. याचा विधी असा– चैत्र शुद्ध द्वादशीला उपवास. विष्णू व लक्ष्मी यांच्या चांदीच्या मूर्ती करून त्यांची पूजा आणि कामदेवाचा न्यास. दुसऱ्या दिवशी त्या मूर्ती ब्राह्मणाला दान द्याव्या. [हि. ध.]

भर्तृयज्ञ (इ. स. च्या ८ व्या शतकापूर्वी) एक प्राचीन भाष्यकार. मेधातिथीने (मनु. ८. ३ वरील भाष्यात) याचा उल्लेख केला आहे. अग्निहोत्राची दीक्षा कोणी घ्यावी, या संबंधीचे भर्तृयज्ञाचे मत त्रिकांडमंडनाने आपल्या आपस्तंबसूत्रध्वनितार्थकारिकांमध्ये दिले आहे, ते असे– ज्याने वेदमंत्रांचे पाठांतर केले आहे, त्याला त्यांचा अर्थ कळत नसला तरी अग्निहोत्राची दीक्षा घेण्याचा अधिकार आहे.

भर्तृयज्ञाने कात्यायनश्रौतसूत्रांवर व गौतमधर्मसूत्रांवर भाष्य लिहिले होते, असे सांगतात. प्रा. बलदेव उपाध्याय यांच्या मते भर्तृयज्ञ हा पारस्कर गृह्यसूत्रांचा सर्वांत प्राचीन टीकाकार होय. [हि. ध.; पू. म. भा.]

भर्तृहरी एक संस्कृत कवी. याच्या काळासंबंधी मतभेद असून, याचे विश्वसनीय चरित्रही उपलब्ध नाही. दंतकथा, लोकगाथा व अन्यत्र विखुरलेल्या माहितीवरून याचे चरित्र मिळते, ते असे–

भर्तृहरी हा उज्जयिनीचा राजा असून, विक्रमादित्य पदवी धारण करणाऱ्या दुसऱ्या चंद्रगुप्ताचा भाऊ होता. गोपीचंदाची माता मयनावती ही त्याची वहीण. भर्तृहरीच्या बापाचे नाव चंद्रसेन व पत्नीचे पिंगला.

एकदा भर्तृहरी पिंगलेसह शिकारीला गेला; परंतु अनेक रानेवने तुडवूनही त्याला शिकार मिळाली नाही. शेवटी संध्याकाळच्या वेळी निराश होऊन तो घरी परतत असता त्याला एक मृगांचा कळप दिसला. त्या कळपाच्या अग्रभागी एक मृग चालत होता. भर्तृहरीने तत्काळ आपला भाला सरसावला आणि तो त्या मृगावर फेकणार तोच, पिंगला म्हणाली. 'महाराज, हा मृगराज सतराशे हरिणींचा पती आणि पोशिंदा आहे. तेव्हा तुम्ही याला मारू नका.' राजाने ते ऐकले नाही. त्याने अचूक भाला फेकला आणि त्या मृगराजाला धरणीवर पाडले. प्राण सोडता सोडता तो मृगराज मनुष्यवाणीने भर्तृहरीला म्हणाला. 'मी तुझा काहीही अपराध केला नसताना तू मला मारलेस; पण हे तू बरे केले नाहीस. आता मी सांगतो, तेवढे तरी कर. मी मेल्यावर माझे शिंग शिंगीबावाला दे; माझे डोळे चंचल नारीला दे; माझे कातडे साधुसंतांना दे; माझे पाय पळून जाणाऱ्या चोराला दे आणि माझ्या शरीराची मती पापी राजाला दे.'

मृगाचे हे बोलणे ऐकून भर्तृहरीचे हृदय द्रवले. मरतानाही त्या मृगाची परार्थबुद्धी त्याला सोडून गेली नाही, ही गोष्ट तर त्याच्या मनाला फार घायाळ करून गेली. मग त्याने त्या मृगाचे कलेवर घोड्यावर घेतले व तो वाट चालू लागला. वाटेत त्याला गोरक्षनाथ भेटला. भर्तृहरीने त्याला झाला प्रकार सांगितला व त्या मृगाला पुनश्च प्राणवान करण्यासाठी विनविले. गोरक्षनाथ म्हणाला, 'मी याला जिवंत करीन; पण मग तू विरागी होऊन माझा शिष्य बनले पाहिजेस.' राजाने ते कबूल केले आणि मृग सजीव होताच त्याने गोरक्षाचे शिष्यत्व पत्करले.

भर्तृहरीला वैराग्य प्राप्त होण्याचे कारण दर्शवणाऱ्या आणखीही कथा आहेत. एकीत त्याला आपल्या पत्नीच्या शीलाविषयी संदेह निर्माण झाल्यामुळे तो संन्यास घेतो, असे दाखवले आहे; तर दुसरीत पिंगलेच्या मृत्यूमुळे त्याला अतिशय दुःख होते व त्या प्रसंगी गोरक्ष त्याला मनुष्यजन्माची नश्वरता पटवून देऊन वैराग्यदीक्षा देतो, असे सांगितले आहे.

उज्जैनपासून जवळच क्षिप्रा नदीच्या तीरावर एक गुहा आहे, तिला भर्तृहरीची गुंफा असे म्हणतात. विरक्त झाल्यानंतर भर्तृहरीने या गुहेत तपश्चर्या केली असे म्हणतात. या गुहेत प्रथम जैन विहार असावा, असे वाटते. कालांतराने नाथ संप्रदायाच्या लोकांनी ती आपली आहे असे सांगून, तिला हे नाव दिले असावे.



भर्तृहरीची गुंफा – उज्जैन

भर्तृहरी विख्यातनाम आहे, तो त्याच्या शतकत्रय या काव्यामुळे. नीती, वैराग्य आणि शृंगार या विषयांवर भर्तृहरीने तीन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शतककाव्ये लिहिली. या तीनही शतकांची भाषा सरससुंदर असून, त्यांतले दृष्टांत सर्वपरिचित आहेत. धीरोदात्त पुरुषाचे वर्णन करताना तो लिहितो–

विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ।
यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम् ।।

अर्थ – विपत्तीत धैर्य, ऊर्जित काळात क्षमा, सभेमध्ये वाक्पटुत्व, संग्रामात निधड्या छातीने झुंजणे, सत्कीर्तीविषयी अभिरुची आणि ज्ञानार्जनाची आवड, या गोष्टी महापुरुषांच्या अंगी प्रकृतिसिद्धच असतात.

भर्तृहरी हा जीवनाचा रस घेणारा आणि जीवनदर्शी असा कवी आहे. त्याची दृष्टी निर्मळ आहे, तितकीच पारदर्शक आहे. तो जीवनाच्या विविध अवस्थांतून डोळसपणे वावरला आहे. त्यामुळे त्याने व्यक्त केलेले विचार सर्वसामान्य जनांच्या हिताचे व कल्याणाचे आहेत.

शतकत्रयाशिवाय भर्तृहरीच्या नावावर वाक्यपदीय नावाचा एक व्याकरणविषयक ग्रंथ आहे. नाथपंथातील वैराग्य या उपपंथाचे प्रवर्तनही भर्तृहरीने केले असल्याचे सांगतात. चिनी प्रवासी इत्सिंग याच्या वृत्तांतावरून भर्तृहरीने बौद्ध पंथ स्वीकारला होता, असे कळते. पण तो अद्वैत वेदान्ताचार्य होता, असेही मानले जाते. हा भर्तृहरी इ. स. च्या ७ व्या शतकात होऊन गेला असला पाहिजे आणि गोरक्षनाथाचा शिष्य भर्तृहरी इ. स. च्या ११ व्या शतकातील असावा, असे विद्वानांचे अनुमान आहे. [वि. स्मृ. ग्रं.; भो. क. का.; सं. सा. इ.; शंकराचार्य; नाथसंप्रदाय; पा. पा. व्या. सं]

भलानस

एक प्राचीन गण किंवा जमात. दाशराज्ञ युद्धात पक्थ, भलानस, अलिनस, विषाणी व शिव या पाच टोळ्या सुदास राजाच्या विरोधी पक्षात लढल्या, असा उल्लेख ऋग्वेदात आहे (७·१८·७). ही टोळी अवैदिक असावी, असे एक मत आहे. पूर्व काबुलिस्तान ही भलानसांची मूलभूमी असावी असे झिमरचे म्हणणे आहे. प्रो. कीथ आणि श्री. नंदलाल यांनी ते बोलून घाटातील प्रदेशात राहत असावे, असे मत व्यक्त केले आहे. [वे. इं.; दाशराज्ञ युद्ध; वे. का. इ.]

भल्लट

(इ. स. च्या ८ व्या शतकाचा उत्तरार्ध) काश्मीरमधील एक संस्कृत कवी. अवंति वर्मा नामक राजाच्या कारकीर्दीत (इ. स. ८५५–८८३) होऊन गेलेल्या आनंदवर्धनाचार्याने याचा उल्लेख केला आहे, त्यावरून भल्लट हा इ. स. च्या ८ व्या शतकातला असावा, असे मानले जाते. भल्लटशतक ही याची एकच रचना उपलब्ध आहे. यात निरनिराळ्या छंदांतील शंभर श्लोक आहेत. भल्लटाची भाषाशैली सरळ व प्रसादपूर्ण आहे. सुंदर स्वभावोक्ती, कमनीय उत्प्रेक्षा, योग्य उपमा व उपदेशमय अर्थांतरन्यास यांमुळे याचे श्लोक मनाला आल्हाद देतात. उत्तम काव्याची उदाहरणे म्हणून मम्मट, क्षेमेंद्र, अभिनवगुप्त, आनंदवर्धन, इ. कवींनी आपल्या अलंकारग्रंथात याचे श्लोक उद्धृत केले आहेत. अन्योक्ती हे याच्या श्लोकांचे वैशिष्टय होय. याच्या काव्याचा एक नमूना असा–

विशालं शाल्मल्या नयनसुभगं वीक्ष्य कुसुमं ।
शुकस्यासीद् बुद्धिः फलमपि भवेदस्य सदृशम् ।।
इति ध्यात्वोपास्तं फलमपि च दैवात् परिणतं ।
विपाके तूलोऽन्तः सपदि मरुता सोऽप्यपहृतः ।।

अर्थ – विशाल अशा शाल्मली वृक्षावरील नयनमनोहर फूल पाहून पोपटाला वाटले, की याचे फळही असेच सुंदर असेल. या विचाराने त्याने शाल्मली वृक्षाची सेवा केली आणि दैवयोगाने त्या वृक्षाला फळही आले. पण ते पिकल्यावर आत निघाला कापूस ! आणि तोही वाऱ्याने लगेच उडवून दूर नेला.

आपल्या रचनेने लोकांना आनंद देणाऱ्या माघ, मयूर, भारवी, श्रीहर्ष, कालिदास, इ. प्रमुख संस्कृत कवींची गणना करताना, एका श्लोकात याला श्रुतिमुकुटधर असे म्हटले आहे. [सं. सा. इ.; हिं. वि. को. ; अ. हि. क. का.]

भवदेवभट्ट

(इ. स. चे ११ वे शतक) बंगालमधल्या भट्ट घराण्यातील एक ग्रंथकार. सिद्धल नावाच्या गावी याचा जन्म झाला. हा सामवेदाच्या कौथुम शाखेचा ब्राह्मण होता. हरिवर्मदेव नावाच्या राजाचा याला आश्रय होता. याने अनेक ग्रंथ रचले. त्यांतल्या प्रमुख ग्रंथांची नावे अशी–

१) व्यवहारतिलक -- न्यायालयीन कार्यपद्धती विशद करणारा ग्रंथ. हा ग्रंथ अद्याप प्रकाशित झालेला नाही.

२) कर्मानुष्ठानपद्धती, दशकर्मपद्धती किंवा दशकर्मदीपिका- या ग्रंथात सामवेदाचे अध्ययन करणाऱ्या ब्राह्मणाने करायच्या दहा मुख्य धार्मिक विधींचे विवेचन आहे.

३) प्रायश्चित्तनिरूपण – या ग्रंथामध्ये निरनिराळी प्रायश्चित्ते घेण्याच्या पद्धतीचे विवरण आहे.

४) तौतातितमततिलक – या ग्रंथात पूर्वमीमांसा दर्शनातील तत्त्वांचे कुमारिल भट्टाच्या दृष्टिकोणातून स्पष्टीकरण केले आहे. हा ग्रंथ लिहिताना त्याने बालवलभीभुजंग हे टोपण नाव घेतले होते. मीमांसा दर्शनातील हा एक प्रमाण ग्रंथ समजला जातो.

भवदेव स्थापत्यविशारदही होता. त्याने एक तलाव बांधला होता, तसेच एक देवालयही बांधले होते. [मी. द.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भवभट्ट (इ. स. चे १७ वे शतक) एक संगीतशास्त्रकार व संस्कृत पंडित. हा आभीर देशातील घवलपूर इथला रहिवासी होता. हा कृष्णात्रगोत्री ब्राह्मण होता. बीकानेरचे महाराज अनूपसिंह यांचा त्याला आश्रय होता. अनूपसिंहाच्या आज्ञेवरूनच भवभट्टाने संगीतशास्त्रावर काही ग्रंथ रचले. त्याने या ग्रंथांच्या नावाला अनूप हे पूर्वपद जोडून आपल्या धन्यासंबंधीची कृतज्ञता व्यक्त केली आहे. याच्या ग्रंथांची नावे अशी – अनूपसंगीतविलास, अनूपसंगीतरत्नाकर, अनूपसंगीतांकुश व मुरलीप्रकाश. भवभट्टाचे सारे ग्रंथ संस्कृतात आहेत. [सं. शा. क. इ.]

भवभूती (इ. स. चे ८ वे शतक) एक संस्कृत नाटककार. याने महावीरचरित, मालतीमाधव व उत्तररामचरित अशी तीन नाटके लिहिली आहेत. डॉ. मिराशी यांनी त्याच्या ग्रंथरचनेचा काळ इ. स. ७०० ते ७३० असा ठरवला आहे. भवभूतीने आपल्या महावीरचरित या नाटकाच्या प्रस्तावनेत स्वत:विषयी काही माहिती दिली आहे. तिच्या आधारे त्याचे चरित्र मिळते असे ते–

भवभूतीच्या पूर्वजांचे कुलनाम उदुंबर असे होते. ते तैत्तिरिय शाखेचे, काश्यपगोत्री, पंचाग्नी ठेवणारे, सोमयाग करणारे, ब्रह्मवेत्ते असे विद्वान व सत्त्वशील ब्राह्मण होते. भवभूतीच्या महाकवी नामक पाचव्या पूर्वजाने वाजपेय यज्ञ केला होता. भवभूतीच्या पितामहाचे नाव भट्टगोपाल, पित्याचे नाव नीलकंठ व मातेचे नाव जातूकर्णी असे होते.

भवभूतीचे पूर्वज दक्षिणापथातील पद्मपुर नामक नगरात राहत असत. विदर्भाच्या भंडारा जिल्ह्यातील आमगावाजवळचे सध्याचे पदमपूर हेच प्राचीन पद्मपुर होय, असे डॉ. मिराशी यांनी सिद्ध केले आहे. इथेच भवभूतीचा जन्म झाला.

वरील नाटकात कवीचे नाव देताना ‘ श्रीकण्ठपदलाञ्छनः भवभूतिर्नाम ’ असा शब्दप्रयोग आहे. भवभूतीच्या पित्याचे नाव नीलकंठ होते. तेव्हा त्याने आपल्या पुत्राचे नाव श्रीकंठ ठेवले असावे, असे वाटून अनेक टीकाकारांनी कवीचे मूळ नाव तेच असल्याचे मानले आहे. पुढे त्याने एक सुंदर श्लोक रचल्यामुळे त्याला भवभूती हे नाव प्राप्त झाले, अशी आख्यायिका सांगतात. तो श्लोक असा–

> कां तपस्वी गतोऽवस्थामिति स्मेराविव स्तनौ ।
> वन्दे गौरीघनाश्लेषभवभूतिसिताननौ ।।

भावार्थ –एकदा भगवान शंकराने पार्वतीला गाढ आलिंगन दिले. तेव्हा त्याच्या अंगावरच्या भस्माने पार्वतीचे स्तन शुभ्र झाले. जणू काय, ‘ या तपस्व्याची प्रेमपरवशतेमुळे काय अवस्था झाली आहे पाहा, ’ असे ते हसून सांगत होते. त्या स्तनांना माझा नमस्कार असो.

डॉ. मिराशी यांच्या मते भवभूती हे त्याचे मूळचे नाव असून, श्री म्हणजे वाग्देवी त्याच्या कंठात असल्यामुळे त्याला श्रीकंठ ही पदवी मिळाली असावी. राजशेखर, कुंतक, विद्याकर, इ. कवींनी त्याचा भवभूती या नावानेच उल्लेख केला आहे.

अलिकडे, काही विद्वानांनी, भवभूतीचे उंबेक असे आणखी एक नाव होते, असे प्रतिपादले आहे. पण डॉ. मिराशी यांच्या मते भवभूती व उंबेक या दोन भिन्न व्यक्ती आहेत.

भवभूतीने वेद व उपनिषदे, तसेच सांख्य, योग, पूर्वमीमांसा, न्याय, वेदान्त ही दर्शने व अर्थशास्त्र आणि कामशास्त्र यांचा चांगला अभ्यास केला होता.

भवभूतीचे संस्कृत भाषेवर असामान्य प्रभुत्व होते. उत्तररामचरितात म्हटल्याप्रमाणे देवी सरस्वती त्याला सर्वस्वी वश होती. म्हणून वीर, शृंगार, करुण इ. रसांतील त्याची नाटकरचना भाषाप्रभुत्वाच्या दृष्टीने सारखीच यशस्वी झाली आहे.

भवभूतीबद्दल काही आख्यायिका प्रचलित आहेत, त्यांतील एक अशी–

कालिदास आणि भवभूती हे समकालीन होते, असा एक समज आहे. कालिदास हा ज्येष्ठ व राजमान्यता पावलेला श्रेष्ठ कवी. म्हणून भवभूती आपले उत्तररामचरित हे नाटक अभिप्रायासाठी त्याच्याकडे घेऊन गेला. कालिदास त्या वेळी सारीपाट खेळण्यात गुंतला होता. म्हणून त्याने भवभूतीला नाटक वाचून दाखवायला सांगितले. नाटक ऐकल्यावर कालिदासाने त्याची प्रशंसा केली; पण त्यात एक दुरुस्ती सुचविली.

नाटकाच्या पहिल्या अंकात (१.२७), दंडकारण्यात असताना आपण सीतेबरोबर गुजगोष्टी करीत कशा रात्री घालवल्या, ते सांगताना राम म्हणतो–

> किमपि किमपि मन्दं मन्दमासत्तियोगा –
> दविरलितकपोलं जल्पतोरक्रमेण ।
> अशिथिलपरिरम्भव्यापृतैकैकदोष्णो –
> रविदितगतयामा रात्रिरेवं व्यरंसीत् ।।

अर्थ – गाढ आलिंगनात उभयतांचा एकेक हात गुंतून गेला असता, एकमेकांच्या गालाला गाल लावून अत्यंत सान्निध्यामुळे अगदी हळू स्वरांत आपण गुजगोष्टी करीत असता, रात्र अशा रीतीने संपली.

या श्लोकाच्या चतुर्थ चरणातील एवम् या शब्दातील अनुस्वार गाळावा, अशी सूचना कालिदासाने केली व भवभूतीने ती मान्य केली.

‘ रात्रिरेव व्यरंसीत् ’ या सुधारणेत रात्रच संपली, पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आमच्या गुजगोष्टी मात्र संपल्या नाहीत, असा व्यंग्यार्थ निघतो. त्यामुळे हा दुसरा पाठ सरस आहे व तोच हल्ली बहुतेक सर्व आवृत्तींत दिलेला असतो.

भवभूती हा गंभीर वृत्तीचा आणि तापट स्वभावाचा असावा, असे त्याच्या नाटकांवरून वाटते. स्वतःच्या विद्वत्व, कवित्व, रसिकत्व, इ. गुणांची त्याला यथार्थ जाणीव होती. विद्वत्तेप्रमाणे साहित्यनिर्मितीतही आपण सर्वश्रेष्ठ गणले जावे, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून त्याने महावीरचरिताचे पाच अंक लिहून झाल्यावर ते तत्कालीन विद्वानांना व रसिकांना परीक्षणार्थ दिले. पण रसिकांनी त्याचे नाटक कमी प्रतीचे लेखले व त्यातील काही दोष दाखवले. ते दोषदर्शन ऐकून भवभूतीला फार राग आला आणि तो म्हणाला–

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानन्ति ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ।।

अर्थ – जे अंहमन्य लोक आमची अवज्ञा करीत आहेत, त्यांच्यासाठी मी हे नाटक लिहिलेले नाही. माझ्याशी समानधर्म असलेला कोणी रसिक पुढे मागे उत्पन्न होईल, असा मला भरंवसा आहे. कारण काल अनंत आहे. कदाचित असा रसिक सध्याही कुठेतरी असेल. कारण पृथ्वी विशाल आहे. (असे रसिकच माझ्या कृतीचे योग्य मूल्यमापन करू शकतील.)

भवभूतीने रागाच्या भरात महावीरचरित अर्धेच टाकून दिले आणि या शास्त्राभ्यासजड अहंमन्य पंडितांची संगतच नको, असे म्हणून तो घर सोडून उत्तरेत निघून गेला. महावीरचरिताच्या पाचव्या अंकातील ४६व्या श्लोकानंतरचा भाग आणि सहा व सात हे दोन अंक सुब्रह्मण्य नामक कोण्या कवीने रचले आहेत, असे महावीरचरिताचा टीकाकार वीरराघव याने सांगितले आहे.

रागाच्या भरात भवभूती पद्मपुराहून निघाला, तो तडक मध्य प्रदेशातील पद्मावती नगरीत गेला. तिथे तो बराच काळ राहिला असावा. त्याच्या मालतीमाधव या नाटकातील कथानक या नगरीत घडले, असे दाखविले असून, त्याच्या अनुषंगाने तिथल्या नद्या, देवालये व वाडे यांचा उल्लेख व वर्णन त्यात आले आहे. तथापि, त्याचा पहिला प्रयोग पद्मावती येथे न होता कालप्रियनाथाच्या यात्रेच्या वेळ झाला, असे सूत्रधाराच्या बोलण्यावरून समजते. महावीरचरित व उत्तररामचरित ही नाटकेही त्याच यात्रेच्या प्रसंगी प्रथम रंगभूमीवर आली होती. ही तीन्ही नाटके राजाश्रयाने रंगभूमीवर आली नाहीत, तर लोकाश्रयाने आली, असे यावरून ध्यानात येईल.

हा कालप्रियनाथ म्हणजे उज्जयिनीचा महाकाल होय, असे काही विद्वानांचे मत आहे. पण डॉ. मिराशी म्हणतात, की कनोजच्या व यमुनेच्याही दक्षिणेला कालप्रिय नामक नगर होते. सध्याचे काल्पी हे ते गाव होय. इथेच कालप्रिय नामक सूर्याचे सुप्रसिद्ध देवालय होते. तिथे यात्रेच्या निमित्ताने दूरदूरच्या प्रदेशातून हजारो लोक येत. अशा प्रसंगी लोकाश्रयाकरिता नटमंडळी नवीन नवीन नाटकांचे प्रयोग करीत. अशा यात्रेच्या प्रसंगी भवभूतीची तीन्ही नाटके प्रथम रंगभूमीवर आली. हे सर्व ध्यानात घेतले असता, भवभूतीने मालतीमाधवाच्या आरंभी (१.३) सूर्यस्तुतिपर श्लोक का घातला, त्याचा उलगडा होतो.

भवभूती कालप्रिय नगरातही बराच काळ राहिला असावा. हळूहळू त्याची कीर्ती दूरवर पसरू लागली आणि ती कनोजच्या यशोवर्मा राजाच्या कानी गेली. त्याने मग भवभूतीला आपल्या सभेत कवी म्हणून बोलाविले. तिथे असताना त्याने अनेक मुक्तक श्लोक रचले असावे. यशोवर्म्याच्या राजसभेतच त्याची वाक्पतिराज नामक प्राकृत कवीशी मैत्री जमली.

भवभूतीने जी नाटके रचली, त्यांचा थोडक्यात परिचय असा–

महावीरचरित – या नाटकात भवभूतीने रामकथा वर्णिली आहे. रामाच्या चरित्रावर जे आक्षेप घेतले जातात, त्यांचे निराकरण त्याने या नाटकात केले आहे. उदा० वाली हा रावणाचा साहाय्यक बनून रामाशी लढाई करण्याकरता आला, म्हणून रामाने त्याचा वध केला, असे त्याने सांगितले आहे. या नाटकात वीररस हा प्रधान आहे. राम, परशुराम, वाली, इत्यादींच्या बाबतींत तो व्यक्त रूपात असून, वसिष्ठविश्वामित्रादिकांत तो सूक्ष्म रूपात आहे.

मालतीमाधव – हे एक दहा अंकांचे प्रकरण आहे. यातील कथावस्तू कविकल्पित आहे. मालती आणि माधव यांची ही प्रेमकथा असून, यौवनातील उन्मादक प्रेमाचे त्यात सुरेख चित्रण केलेले आहे. मात्र तसे करताना त्याने उच्च व उदात्त प्रेमकल्पनाच रसिकांसमोर ठेवली आहे. धर्माच्याविरोधी असणारे प्रेम हे समाजाला हानिकारक असल्यामुळे ते त्याज्य होय, असे त्याने मानले आहे.

उत्तररामचरित – यात सात अंक असून रामायणाचा उत्तरार्ध आला आहे. रामाच्या राज्याभिषेकापासून सीता त्यागानंतरचा सीतामीलनापर्यंतचा भाग यात आला आहे. त्यांतील काही घटना मूळ रामायणाप्रमाणे नसून काल्पनिक आहेत. मूळ रामकथेत शेवटी रामाने त्यागलेल्या सीतेला धरती आपल्या पोटात घेते असे दाखवले आहे. पण भवभूतीने नाट्यपरंपरेचे अनुकरण करून सीतामीलनाने उत्तररामचरित सुखान्त बनविले आहे. यातील चित्रदर्शनाचा प्रसंग, रामाचे दंडकारण्यात पुनरागमन, वनदेवता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वासंतीशी भेट, तेथे छायारूपाने सीतेचे अस्तित्व, या सर्व घटना त्याने कल्पिलेल्या आहेत.

'अन्तमोंदं कर्मापि भवभूतिर्वितनुते = भवभूतीची नाटके वाचताना हृदयाला एक अवर्णनीय आनंद होतो, असे एक सुभाषित आहे. याचे कारण त्याचे साहित्य श्रेष्ठ काव्यगुणांनी नटलेले आहे, हे होय.

भवभूती रससिद्ध कवी आहे. आपल्या नाटकांत त्याने वीर रसाचा परिपोष केला असला तरी, करुण रसाला त्याने प्राधान्य दिले आहे. 'कारुण्यं भवभूतिरेव तनुते' = करुण रसाचा आविष्कार करावा, तर तो भवभूतीनेच, अशी उक्ती निर्माण झाली ती त्यामुळेच. तो म्हणतो–

एको रसः करुण एव निमित्तभेदाद्
भिन्नः पृथक् पृथगिवाश्रयते विवर्तान् ।
आवर्तबुद्बुदतरङ्गमयान् विकारान्
अम्भो यथा सलिलमेव तु तत्समग्रम् ॥

(उत्तरराम. ३.४७)

अर्थ–एकच करुण रस भिन्न भिन्न निमित्तांमुळे निरनिराळी रूपे धारण करतो. भोवरे, बुडबुडे, लाटा अशी निरनिराळी रूपे दिसली, तरी त्यांच्या मुळाशी जसे पाणी हेच एक द्रव्य असते, तसेच हे आहे.

खऱ्या प्रेमाचे वर्णन करताना तो म्हणतो–

अद्वैतं सुखदुःखयोरनुगुणं सर्वास्ववस्थासु यत्
विश्रामो हृदयस्य यत्र जरसा यस्मिन्नहार्यो रसः ।
कालेनावरणात्ययात् परिणते यत्स्नेहसारे स्थितं
भद्रं तस्य सुमानुषस्य कथमप्येकं हि तत् प्राप्यते ॥

(उत्तर राम. १.३९)

अर्थ–सुखामध्ये तसेच दुःखामध्ये जे एकरूप असते, सर्व अवस्थांमध्ये जे तसेच अनुकूल राहते, ज्याच्या योगे हृदयाला विश्रांती मिळते, वार्धक्यामुळे ज्याची गोडी कमी होत नाही, कालांतराने सर्व (लज्जा, भय, इ.) पडदे नाहीसे झाल्यावर जे पूर्ण स्नेहरूपाने अवशिष्ट राहते, असे हे अनुपम प्रेम ज्याला प्राप्त होते, तोच खरा भाग्यवान !

कृत्रिमता, पाल्हाळ आणि विवेचक शक्तीचा अभाव, हे भवभूतीचे काही दोष टीकाकारांनी सांगितले आहेत. [सं. सा. इ. बलदेव उपाध्याय; भवभूति–डॉ. वा. वि. मिराशी]

भवमोचन यंत्र एक यंत्र. संसारबंध तुटून निर्वाणपदाची प्राप्ती व्हावी, म्हणून या यंत्राचा प्रयोग करतात. त्यासाठी एका भूर्जपत्रावर गोरोचन व चंदन यांच्या मिश्रणाने एकमेकांत अडकलेले दोन समभुज त्रिकोण काढतात. त्यामुळे आकृतीच्या मध्यभागी जो षट्कोन तयार होतो, त्याच्या मध्यभागी निःसार या बीजमंत्राने संपुटित केलेले साध्यनाम लिहितात. तसेच षट्कोनाला लागून असणाऱ्या प्रत्येक त्रिकोणात निःसार हा बीजमंत्र लिहितात. नंतर या भूर्जपत्राची यथाविधि पूजा करून, ते यंत्र लोखंडाच्या डबीत घालून, ती डबी नेहमी डोक्यावर राहील अशा रीतीने ठेवतात. या यंत्राच्या प्रयोगानंतर साधक हळू हळू प्रपंचातून विरक्त होतो व अंती मोक्षपद मिळवतो. [यं. चि.]

भवाई एक कलावंत जात. यांची वस्ती प्रामुख्याने राजस्थान व गुजरात या प्रदेशांत आढळते. हे आपल्या उत्पत्तीची कथा सांगतात, ती अशी–

सुमारे चारशे वर्षांपूर्वी राजस्थानातील जाट जातीत नागाजी नामक एक पुरुष उत्पन्न झाला. तो जन्मतःच नाच-गाण्याचा नादी होता. वाढत्या वयाबरोबर त्याचा तो नाद वाढत गेला. जाट लोकांना नाच-गाण्यांचा विलक्षण तिटकारा होता. त्यामुळे त्यांनी नागाजीला आपल्या जातीतून हाकलले आणि भाला, नगारा, जाजम यांसारख्या काही वस्तू देऊन त्याला सांगितले, 'आजपासून तू आमचा भांड-भवाई. आमची करमणूक करणे हे तुझे काम.' त्या दिवसापासून नागाजी भवाई झाला व त्याच्याभोवती त्याच्या मनोधर्माचे जे अनेक लोक जमा झाले, त्या सर्वांची मिळून भवाई ही जात बनली.

भवाई लोक स्वावलंबी व स्वतःच्या कलेचा अभिमान



भवाई नृत्य – गुजरात

बाळगणारे आहेत. त्यांचे वेगवेगळे संघ (तांडे) असून त्या परस्परांत सौहार्दाची भावना असते. प्रत्येक संघाची परस्परागत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गावे असतात. प्रतिवर्षी या गावांतून हिंडून तो तो भवाईसंघ आपापले नृत्य-नाटचाचे खेळ सादर करतो. प्रत्येक भवाई संघात नऊपेक्षा कमी व विसापेक्षा अधिक लोक असता कामा नयेत, असा दंडक असतो. भवाईंचा संघ एखाद्या गावात उतरला, की गावातल्या प्रत्येक घरातून चार ते आठ आणे त्यांच्या खर्चासाठी जमवले जातात. गावात खेळ चालू असेपर्यंत प्रत्येक भवाईला आळीपाळीने गावकरी जेवण देतो. याशिवाय, पावशेर तूप व पावशेर गूळ हे पदार्थही देण्यात येतात. खेळाच्या वेळी लागणाऱ्या मशालींसाठी तेल पुरविण्याचे काम गावातील श्रीमंतांचे. खेळाची सर्व व्यवस्था भवाई नर्तकांच्या स्त्रिया करतात. या कामाशिवाय त्यांनी प्रत्यक्ष खेळाच्या वेळी बाहेर यायचे नाही, खेळात भाग घ्यायचा नाही किंवा खेळ पाहायाचाही नाही, असा दंडक आहे. तसे केले तर त्यांचे शील सुरक्षित राहत नाही, असा त्यांचा समज आहे.

नृत्याच्या दिवशी दुपारी भवाई मंडळी गावातल्या लोकांना कथा सांगतात, पान-सुपारीची देवाण घेवाण करतात व त्या निमित्ताने गावकऱ्यांचा परिचय करून घेतात. संध्याकाळी एखाद्या मोकळ्या मैदानात, चौक-चवाठ्यावर, देवळाच्या पटांगणात अगर नदीकाठच्या मोकळ्या जागी एका विटकरीच्या तुकड्याने दहा फूट त्रिज्येचा जमिनीचा तुकडा पूर्णपणे स्वच्छ करतात. ही भवाई नृत्य-नाटचाची रंगभूमी. ती अत्यंत पवित्र समजली जाते. तिथे एक दिवा लावतात व तो खेळ सुरू होण्यापूर्वीपासून दुसऱ्या दिवशी खेळ संपून मुख्य पात्राने घुंगरू सोडून ठेवीपर्यंत तेवत ठेवतात. रंगदेवाच्या आसनाखाली त्रिशूलचिन्ह काढतात. आसनामागील पडद्यावर अगर भिंतीवर कुंकवाच्या शुभचिन्हदर्शक टिकल्यांची वेलपत्ती काढतात. प्रत्यक्ष रंगभूषेला बसण्यापूर्वी दोन प्रार्थनागीते गातात. मग काजळ, कुंकू, खडू यांच्या साहाय्याने चेहऱ्यावर लहान-मोठे ठिपके व पात्रस्वभावानुरूप रंगरेखा काढून रंगभूषा करतात. विदूषकाचा चेहरा उत्तान व भडक रंगांनी रंगवितात. जवळच एक दिवा तेवत ठेवलेला असतो व त्यातले तेल प्रत्येक नर्तक आपल्या चेहऱ्यावर तकाकी आणण्यासाठी लावतो.

नृत्यारंभी ५–७ गाणी देवीच्या स्तुतिपर गायिली जातात. मग दोन वादक एक मोठा कापडाचा तुकडा हाती घेऊन उभे राहतात. पाठोपाठ गणपती उजव्या हाती पितळी थाळी धरून तिच्याआड आपला चेहरा लपवीत व पदन्यास करीत येतो. नाचता नाचता तो प्रेक्षकांना सामोरा होतो व थाळी दूर करतो. त्या वेळी काकड्याचा भडक प्रकाशझोत त्याच्या चेहऱ्यावरून फिरविला जातो. मग गणपती जातो व पुढे मुख्यखेळ सुरू होतो. कोणत्याही खेळात नायक, नायिका व विदूषक अशी तीनच पात्रे असतात. स्त्रीवेषधारी नट नाचताना व अभिनय करताना आपल्या हाती एरंडीच्या तेलात भिजविलेले लहान-मोठे पेटते काकडे घेतात व ते आपल्या चेहऱ्यासमोरून मोठ्या चापल्याने व कौशल्याने फिरवीत नाचतात.

भवाईतली गीते तारस्वरात म्हटली जातात. वाद्यांचे व गायकांचे स्वर बहुशः पंचमात किंवा धैवतात असतात. शब्दांचे उच्चार व स्वर, शुद्ध व स्वच्छ आणि हावभाव नेटके असतात. भवाईतले संगीत रागदारी असते. संवाद प्राधान्याने पद्यात्मक असतात व जेव्हा ते गद्यात्मक असतात, तेव्हा ते तालासुरावर म्हटले गातात. आपल्या जिभेवर सरस्वती व मुद्रेवर शक्तीचा वास असल्याचे ते आत्मविश्वासपूर्ण शब्दांत सांगतात.

भवाई नृत्य-नाटचाला वेश अशी संज्ञा आहे. आज उपलब्ध असणाऱ्या परंपराप्राप्त अशा भवाई वेशांची संख्या ३६० आहे. त्यांतले फार थोडे वेश संकलित किंवा ग्रंथगत स्वरूपात आढळतात. बहुधा ते मौखिक परंपरेनेच आजतागायत चालत आले आहेत. भवाई वेशात झंडा, बटाऊ यासारख्या भूमिका करणारे कलावंत काही काही कुटुंबांतून पिढ्यान्पिढ्या तयार होत आले आहेत. या वेशांचा उद्देश दैनंदिन जीवनातल्या घटनांवर उपरोधिक भाष्य करून समाजाच्या डोळ्यात अंजन घालण्याचा असतो. त्यांपैकी काही वेशांची माहिती अशी–

भवाई नृत्य

बोराबोरी – यात एका कंजूष व्यापारी दांपत्याचे लोकांना लुबाडण्याचे विविध प्रकार दाखविलेले असतात.

सूरदास – यात एका स्त्रीलंपट गावगुंडाचे चित्रण केलेले असते. हा गावगुंड आंधळा असतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शंकरिया – हा भवाईंचा हातखंडा प्रयोग होय. एका गारुड्याचे एका जोगणीवर प्रेम वसते. दोघेही एकमेकांवर मनोमन अनुरक्त असले तरी, बाह्यत: ती त्याला झिडकारते व त्यामुळे त्याच्या मनाची उलघाल होते. हे सगळे नृत्यच शृंगारिक हावभावांनी नटलेले आहे. यातले पदन्यास व मुखध्वनी काहीसे अश्लील असतात.

याशिवाय मडक्यांचा नाच, तलवारींचा नाच, जळत्या बाटल्यांचा नाच, इ. कलात्मक नृत्येही ते सादर करतात.

पावसाळ्यात हे लोक आपल्या गावी राहून शेती करतात व उरलेले आठ महिने गावोगाव फिरून खेळ सादर करतात. [रा. लो. नृ.; श्री. के. नारायण काळे – भारती, १९५७.]

भवानीदास (१) (इ. स. चे १८ वे शतक) एक हिंदी जैन भक्तकवी. हा श्वेतांबर जैन असून आग्र्याचा रहिवासी असावा. गुरू मानाजी हे याच्या गुरूचे नावहोय. वाराणसीच्या रामघाटावरील जैन मंदिरात याचे सारे साहित्य संग्रहित आहे. तिथे याचे एकूण अठरा ग्रंथ असून, ते सर्व हिंदी भाषेत आहेत. याने आपल्या ग्रंथांत जिनेंद्राची स्तुती व काही ग्रंथांतून तत्त्वचर्चाही केली आहे. चौवीसजिनबोल, अध्यात्मबारहमास, ज्ञाननिर्णयबावनी, इ. त्याच्या ग्रंथांची नावे आहेत. याशिवाय याची काही स्फुट रचनाही मिळते. [हिं. जै. भ. क.]

(२) (इ. स. चे १९ वे शतक) एक पंजाबी कवी. उमादास हे याचे दुसरे नाव होते. हा पंजाबमधील पतियाळा नरेशाच्या आश्रयाला होता. याच्या चरित्रासंबंधीची कोणतीच माहिती मिळत नाही. याने महाभारताच्या स्वर्गारोहण, मौसल, प्रस्थान, अश्वमेघ आणि सौप्तिक या पाच पर्वांचा हिंदीत अनुवाद केला आहे. याशिवाय नीतिरत्नाकर, नाममाला, कुरुक्षेत्रमाहात्म्य, पंचरत्न, काव्यकुतूहल, सुदामचरित्र, बारहमासा, इ. ग्रंथही याने रचले आहेत. याची भाषा प्रौढ व आलंकारिक आहे. वीर आणि शृंगार या रसांवर याचा चांगला अधिकार होता. [पं. हिं. सा. इ.]

भवानीपूर उ. भारतातील एक शक्तिपीठ. हे स्थान पूर्व पाकिस्तानातील बोगरा स्टेशनापासून वीस मैल अंतरावर नैर्ऋत्येला आहे. इथे सतीचा डावा कान गळून पडला होता, अशी आख्यायिका आहे. [कल्याण-तीर्थांक]

भवानीव्रत एक काम्य व्रत. याचे पुढील पर्याय आहेत –

(१) प्रत्येक महिन्याच्या शुद्ध तृतीयेला पार्वतीच्या मूर्तीला तेल-उटणी लावणे आणि उद्यापनाच्या वेळी एक गाय दान देणे, असा याचा विधी आहे.

(२) प्रत्येक पौर्णिमेला व अमावास्येला उपवास करणे. उद्यापनाच्या वेळी पार्वतीची मूर्ती सुगंधी द्रव्यांसह दान देणे. फल – भवानीलोकाची प्राप्ती.

(३) प्रत्येक महिन्याच्या शुद्ध तृतीयेला पार्वतीच्या मंदिरात बसून नक्त भोजन करणे. व्रतावधी एक वर्ष. उद्यापनाच्या वेळी एका गाईचे दान देणे.

(४) चैत्र शुद्ध अष्टमीच्या दिवशी व्रताचा प्रारंभ. त्या दिवशी देवीला १०८ प्रदक्षिणा घालतात व रात्री जागरण करतात. दुसऱ्या दिवशी देवीची पूजा करून तिला वडयांचा नैवेद्य दाखवतात. फल – शोकनाश. [हिं. ध.; व्र. प.]

भविष्य पुराण एक महापुराण. यात बहुतेक भविष्यकालीन व्यक्तींची चरित्रे सांगितलेली असून, यातील श्लोकांची संख्या १४,५०० आहे.

नारद पुराणाच्या सूचीवरून यात ब्राह्म, वैष्णव, शैव, सौर आणि प्रतिसर्ग अशी पांच पर्वे आहेत, असे कळते. पण प्रस्तुत उपलब्ध पुराणात अशी पर्वरचना आढळत नाही. पं. ज्वालाप्रसाद मिश्र यांना चार प्रकारची भविष्य पुराणे मिळाली होती. या चारांतही भविष्यपुराणाची थोडी थोडी लक्षणे आढळतात, असे त्यांचे म्हणणे आहे. मुंबईतील वेंकटेश्वर मुद्रणालयाने छापलेल्या पोथीत वरील पाच पर्वे मिळतात. मूळ उपलब्ध पोथीशी ही छापील पोथी ताडून पाहता, दोहींतही सर्व विषय सारखे दिसून येतात. मात्र अनुक्रम व विस्तार यांत फरक आहे. मूळ पोथीला बराच भाग नव्याने जोडलेला आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. यात भविष्यकाळी घडणाऱ्या म्हणून ज्या कथा सांगितल्या आहेत, त्या पुराणरचनेच्या काळात घडून गेल्या असल्या पाहिजेत, असेही कळून येते. या भूतकाळी घडलेल्या कथा भविष्यकाळीही घडतील, असे पुराणकर्त्याने सांगितले आहे एवढेच. त्यावरूनच याला भविष्यपुराण असे नाव मिळाले आहे.

एक गोष्ट नि:संशय, की सूत्रकार आपस्तंबाने याचा उल्लेख केला असल्यामुळे, याचा काही भाग तरी प्राचीन असावा, असे ठरते. ब्राह्मपर्व हाच तो प्राचीन भाग असावा.

याच्याइतकी भर दुसऱ्या कोणत्याही पुराणात पडलेली नाही. ही भर अव्वल इंग्रजी अमदानीपर्यंत पडत होती, असेही पुरावे सापडतात. भविष्य पुराण म्हणजे भविष्यकालीन घटना सांगणारे पुराण, ही कल्पना सर्वत्र दृढमूल असल्यामुळे, जसजसा इतिहास घडत गेला, तसतसा भविष्यकाळी क्रियापदाच्या आधारे तो प्रस्तुत पुराणात समाविष्ट केला गेला असावा. मात्र यातील कित्येक घटनांची आणि राजवंशांची वर्णने ही इतिहासाच्या ज्ञानासाठी बरीच उपयुक्त ठरली आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रस्तुत पुराणात जे विषय आले आहेत, तें थोडक्यात असे– शतानीकाच्या राजसभेत प्रस्तुत पुराणाचा उपक्रम झाला. पूर्वी ब्रह्मदेवाने मनूला जे सांगितले तेच मी तुम्हांला सांगतो, असे म्हणून व्यासांनी पुराणकथनास प्रारंभ केला. प्रथम सृष्टीची उत्पत्ती व ब्रह्मांडवर्णन थोडक्यात केल्यावर, वर्णाश्रमधर्म थोडक्यात सांगितला. गृहस्थधर्म सांगताना पतिव्रतेचे माहात्म्य कथन केले. त्या संदर्भात च्यवन-सुकन्या ही कथा सांगितली. पुढे गणपतीपूजा व चतुर्थीव्रत सांगितले. नागपंचमीचे व्रत सांगताना नागांच्या उत्पत्तीची कथा सांगितली. पुढे कार्तिकमास व स्कंद षष्ठीव्रत सांगून झाल्यावर सूर्यमाहात्म्याला प्रारंभ केला.

प्रस्तुत पुराणात सूर्योपासनेला विशेष उचलून धरले आहे. तिच्या अनुषंगाने त्यात सूर्यमंदिरे, सौर तीर्थे व सूर्योपासक यांचे विशेष वर्णन आले आहे. सांब नावाचा श्रीकृष्णाचा पुत्र होता. तो मदनासारखा सुंदर होता. त्यामुळे अनेक कृष्णस्त्रिया त्याच्यावर भाळल्या. सांबाने त्यांचा निषेध केला नाही. ही गोष्ट कृष्णाला समजताच त्याने सांबाला शाप दिला, की 'तुला कुष्ठ रोग होईल.' त्याप्रमाणे घडले. मग सांबाला दुर्वास मुनी भेटला. त्याने सांबाला कुष्ठ रोग निवारण्यासाठी सूर्योपासना सांगितली. पण त्या वेळी भारतातली सूर्योपासनेची परंपरा लुप्त झालेली असल्याकारणाने तिचे विधिविधान त्याला समजेना. म्हणून मग दुर्वासाच्या सांगण्यावरून त्याने शाकद्वीपातून मग व भोजक नावाचे सूर्योपासक ब्राह्मण भारतात आणवले. त्यांच्या उपदेशाप्रमाणे सूर्योपासना करून तो कुष्ठमुक्त झाला. ही कथा सांगितल्यावर सूर्यचक्र, सूर्यमंत्र, सूर्यमंडळ, इ. गोष्टी सांगून हे पर्व संपविले आहे.

यापुढच्या कथाभागात भूलोकविस्तार सांगून पाताळलोकाचेही वर्णन केले आहे. यज्ञ, यज्ञकुंड, होम, आहुती, अग्नीची नावे, यज्ञफल, इ. यज्ञमहिमा त्यापुढे निवेदिला आहे. त्यानंतर देव व पितर यांच्याविषयीची कर्तव्ये, इष्टापूर्त कर्मे, वास्तू, देवालये, इत्यादींची शास्त्रशुद्ध निर्मिती, त्यांची प्रतिष्ठा, उद्यानांची निर्मिती, इ. गोष्टी सांगितल्या आहेत. माणसाने आयुष्यात एक तरी वृक्ष लावावा, असे म्हटले आहे. वृक्ष हा मनुष्याच्या अनेक पुत्रांपैकी एक पुत्र असून, तो इतर अनेक पुत्रांत श्रेष्ठ असल्याचे सांगून वड, पिंपळ, बेल, आंबा, साग हे लावण्याजोगे वृक्ष होत, असे म्हटले आहे. गायींच्या गर्भाधानासाठी बैल मोकळा सोडावा, असेही त्यात सांगितले आहे. अनिष्टशांतीचेही अनेक प्रकार सांगितले आहेत.

शेवटच्या प्रतिसर्ग पर्वात अनेक कथा आहेत. या पर्वाचे पूर्व व उत्तर असे दोन भाग आहेत. पूर्वभागात वैवस्वत मनूपासून प्रद्योतापर्यंत राजवंश सांगितले आहेत. मगध राजवंशाचे वर्णन पृथ्वीराजापर्यंत दिले आहे. पुढे तैमूरलंगाचेही वर्णन आले आहे. त्याला तिमिरलिंग म्हटले आहे. पाणिनी, पतंजली, मध्वाचार्य, शंकराचार्य, भट्टोजी दीक्षित, कबीर, नरसी मेहता यांच्याही कथा सांगितल्या आहेत. सत्यनारायणाची कथाही याच पर्वात आहे. पुढे कल्की अवताराचे वर्णन असून, त्यापुढे भारतात म्लेंछ सत्ता येईल, असे सांगितले आहे. या म्लेंछ सत्तेत इंग्रजी सत्तेचाही उल्लेख आहे. इंग्रजांना प्रस्तुत पुराणात गुरुंड म्हटले असून, इंग्रजी भाषेला गुरुंड भाषा असे म्हटले आहे. रविवार = सन् डे, फाल्गुन = फेब्रुआरी, साठ = सिक्स्टी असे काही नमुन्यादाखल इंग्रजी शब्दांचे अर्थही सांगितले आहेत. व्हिक्टोरिआ राणीला विकटावती म्हटले आहे. ही इतिहासाची भर सर्वांत शेवटची होय. प्रस्तुत पुराणात ज्या अनेक कथा आल्या आहेत, त्यांतला काही भाग बराच प्राचीन आहे. त्याचा काल इ. स. ५०० च्या सुमाराचा असावा. ब्राह्मपर्वात वर्षारंभ कार्तिक महिन्यापासून होतो, असे सांगितले असून, महिने पौर्णिमान्त सांगितले आहेत, त्यावरून हा भाग प्राचीन ठरतो.

भविष्योत्तर पुराण या नावाचा एक ग्रंथ असून, वेंकटेश्वर प्रतीत त्याला भविष्य पुराणाचे उत्तर पर्व म्हटले आहे. पण पूर्वी हे स्वतंत्र पुराण असावे. याविषयी श्री. काळे यांनी पुराणनिरीक्षण या ग्रंथात काही पुरावे दिले आहेत. हे दुसऱ्याच एका परंपरेचे स्वतंत्र पुराण असून, त्यात व्रते व दाने यांसंबंधाने उत्तरे असल्यामुळे त्याला भविष्योत्तर हे नाव पडले, असे श्री. काळे म्हणतात. [पु. नि.; पु. वि.; श्री. बा. मो. कानिटकर, सा. स्वराज्य, १७ सप्टें. १९६६]

भविसयत्तकहा अपभ्रंश भाषेतील एक जैन महाकाव्य. धनपाल धक्कड नामक कवीने हे काव्य रचले आहे. डॉ. याकोबी यांच्या मते धनपालाचा काल इ. स. च्या दहाव्यां शतकानंतरचा आहे.

या काव्याची कथा लौकिक आहे. राजघराण्यातील पुरुष हा महाकाव्याचा नायक असावा, हा संकेत याने मोडला आणि एका सामान्य माणसाला आपल्या काव्याचा नायक बनविले. या काव्याची स्थूल कथा अशी –

गजपूर नावाच्या गावात धनपाल नावाचा एक व्यापारी होता. धनपालाच्या पत्नीचे नाव कमलश्री आणि मुलाचे नाव भविष्यदत्त होते. पुढे धनपालाने सरूपा नामक दुसऱ्या स्त्रीशी लग्न केले. त्या दोघांना एक मुलगा झाला. त्यांनी त्या मुलाचे नाव बंधुदत्त असे ठेवले. बंधुदत्त वयात आल्यावर तो व्यापाराच्या निमित्ताने कांचनद्वीपाकडे गेला. आपल्या आईच्या अनुमतीने भविष्यदत्तही त्याच्याबरोबर गेला. दुर्दैवाने त्यांची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समुद्रातली वाट चुकली आणि ते मैनाक नावाच्या एका बेटावर पोचले. पुढे बंधुदत्ताने त्याला धोका दिला आणि तो एकटाच तिथून निघून गेला. नंतर भविष्यदत्त हिंडत हिंडत एका नगरात पोहोचला. तिथे गेल्यावर तिथल्या जैन मंदिरात जाऊन त्याने चंद्रप्रभ जिनाची पूजा केली. या नगरात त्याला एक सुंदर मुलगी भेटली. एका असुराने त्या दोघांचे लग्नही लावून दिले.

इकडे भविष्यदत्ताची आई, आपला मुलगा परत आला नाही म्हणून काळजीत पडली. तिने त्याच्या सुखरूप आगमनासाठी श्रुतपंचमी नावाचे व्रत सुरू केले. त्या काळात भविष्यदत्ताने अपार संपत्ती कमावली. ती घेऊन तो सपत्नीक आपल्या घरी यायला निघाला. योगायोगाने वाटेत त्याला बंधुदत्त भेटला. पूर्वीप्रमाणेच याही वेळी बंधुदत्ताने भविष्यदत्ताला फसविले आणि त्याची पत्नी व सर्व धन घेऊन तो स्वग्रामी आला. घरी आल्यावर त्याने भविष्यदत्ताच्या पत्नीबरोबर लग्न करण्याचे ठरविले. इतक्यात भविष्यदत्त तेथे उपस्थित झाला. त्याने सर्व वृत्तांत तिथल्या राजाला सांगितला. राजाने बंधुदत्ताला शिक्षा केली आणि आपली मुलगी सुमित्रा भविष्यदत्ताला देण्याचे वचन दिले.

या अवधीत पोदनपूरच्या राजाने गजपुरावर स्वारी केली आणि त्याने राजाला निरोप दिला, की 'तुझी मुलगी आणि भविष्यदत्ताची भावी पत्नी माझ्या स्वाधीन कर; नाही तर युद्धाला तयार हो.' राजाने भविष्यदत्ताच्या साहाय्याने युद्ध करून पोदनपूरच्या राजाचा पराभव केला. राजा त्याच्या पराक्रमावर प्रसन्न झाला आणि त्याने आपली कन्या तर त्याला दिलीच; शिवाय राज्यही दिले.

पुढे भविष्यदत्ताच्या प्रथम पत्नीला मैनाक द्वीपावर जाण्याची इच्छा झाली. भविष्यदत्त सर्वांसह तिथे गेला. तिथे त्याची व एका जैन साधूची गाठ पडली. त्याने भविष्यदत्ताला सदाचाराचा उपदेश केला. नंतर भविष्यदत्त आपल्या राज्यात परत आला. तिथे त्याची व विमलबुद्धी नामक मुनीची गाठ पडली. त्यांच्या चर्चेतून भविष्यदत्ताला वैराग्य प्राप्त झाले. त्यामुळे भविष्यदत्ताने आपल्या मुलाला गादीवर बसवून उपोषणाच्या मार्गाने शरीरत्याग केला.

या महाकाव्यात घटनाबाहुल्य असले, तरी त्यात वैचित्र्य नाही, असे पंडितांचे मत आहे. मात्र निसर्गवर्णने, स्वभाववर्णने व रसपरिपोष या गोष्टींत धनपाल यशस्वी झाला आहे, असे टीकाकार म्हणतात. [अ. मा.]

भव्य एक देवगण. हा आठ देवांचा समुदाय रैवत मन्वंतरात कार्य करीत होता. रश्मिनी, प्रियनिश्चय, मनी, मन, विचेतस, विजय, सुजय व स्योद अशी त्यांची नावे आहेत (ब्रह्मांड. २.३६.७१–७२). [प्रा. च. को.]

भस्म पवित्र रक्षेला हे नाव आहे. भस्म हे जसे नित्यकर्मात आवश्यक आहे, तसेच ते शैव संप्रदायाचे अत्यावश्यक अंग आहे. भस्माला शिवाचे वीर्य समजतात. अग्निहोत्री ब्राह्मणाच्या अग्निकुंडातील भस्म हे विशेष पवित्र मानलेले आहे. मृताला मंत्राग्नी देऊन जो दाहसंस्कार करतात, त्याच्या रक्षेला चिताभस्म म्हणतात. चिताभस्म शिवाला अत्यंत प्रिय आहे. वाराणशीत विश्वेश्वराला नेहमी चिताभस्माचे चर्चन केले जाते. भस्माचे शांतिकर, पुष्टिकर व कामद असे तीन प्रकार आहेत. भस्म हे पापनाशक असून, ते ब्रह्मविद्येच्या प्राप्तीसाठीही उपकारक असल्याचे जाबालश्रुतीत सांगितले आहे. भस्मधारण हे द्विजांनाच नव्हे, तर सर्व वर्णांना विहित आहे. ब्राह्मणांनी श्राद्ध, यज्ञ, जप, होम, देवपूजा आणि वैश्वदेव ही कृत्ये करण्यापूर्वी भस्म धारण करावे, असे सांगितले आहे. भस्मधारणाचा विधी ऋग्वेदीय ब्रह्मकर्मात दिला आहे, त्याचा सारांश असा–

आचमन व प्राणायाम करून, डाव्या तळहातावर थोडे भस्म घेऊन ते पाण्याने भिजवावे. मग उजव्या हाताच्या मधल्या तीन बोटांनी भस्म ललाटाला आडवे लावावे. मग मुख, हृदय, कंठ, नाभी, डावे-उजवे बाहू, दोन्ही कुशी, गुह्यांग व दोन्ही पाय यांना लावावे. 'ॐ अग्निरिति भस्म, वायुरिति भस्म,' इ. मंत्रांनी ते भस्म धारण करावे. शेवटी सर्वांगाला लावून त्रिवार शिवनामाचा उच्चार करावा.

भस्मधारणाने देह व मन यांची शुद्धी होऊन शिवाची कृपा होते, असे सांगितले आहे.

भस्ममाहात्म्याविषयी दोन कथा पुढे दिल्या आहेत –

एकदा सर्व ऋषी व सर्व देव मिळून विष्णूच्या दर्शनासाठी जात असता वाटेत वणव्यामध्ये सापडले व जळून भस्म झाले. एवढ्यात वीरभद्र तेथे आला. त्यालाही जाळण्यासाठी अग्नी पुढे झाला, पण त्याच्या स्पर्शाने तो शमला. एवढ्यात एक अग्निज्वाला वर आकाशात जात असलेली वीरभद्राला दिसली. त्याने ती पिऊन टाकली. मग तो देव आणि ऋषी यांना जिवंत करण्याचा विचार करू लागला. त्याने थोडे भस्म मंत्रून त्या राखेच्या ढिगावर टाकले. त्यासरशी ते सर्व जिवंत झाले. पुढे त्या देवांना आणि ऋषींना एका सर्पाने गिळले. वीरभद्राने त्यांना सर्पमुखातून बाहेर काढून भस्माच्या फुंकरीने जिवंत केले. पुढे त्यांना एका राक्षसाने गिळले. वीरभद्राने पुन्हा तिसऱ्यांदा भस्माच्या फुंकरीनेच त्यांना जिवंत केले. त्या दिवसापासून भस्माला त्र्यायुष असे नाव पडले. (प. पु. पा. खं. १०७).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकदा दुर्वास ऋषी स्वर्गात जात असता वाटेत त्याला कुंभीपाक नरक लागला. त्यात पिचत पडलेल्या जीवांचा आक्रोश ऐकून दुर्वासाने त्या कुंडात वाकून पाहिले. तेवढ्यात त्याच्या अंगावरच्या भस्माचे कण त्या कुंडात पडले. त्या कणांच्या प्रभावाने त्या जीवांच्या नरकयातना थांबल्या. असे का झाले, हे कोणालाच कळेना. मग शिवाने तिथे येऊन तिथे जमलेल्या इंद्रादिदेवांना सांगितले, की हा भस्माचा प्रभाव आहे.

गुरुचरित्राच्या एकोणतिसाव्या अध्यायात केवळ भस्ममाहात्म्य वर्णिलेले आहे. एका व्यभिचारी ब्राह्मणाला चोरांनी ठार करून गावाबाहेर फेकून दिले असता, भस्मात लोळून आलेल्या एका कुत्र्याने त्याच्या प्रेताला स्पर्श केला आणि तेवढ्यानेच त्याला कैलासाची प्राप्ती झाली, अशी कथा त्यात आहे. चाळिसाव्या अध्यायात चिताभस्माचे माहात्म्य सांगितले आहे.

कर्नाटकातले वीरशैव लोक नित्य भस्म लावतात. त्यांच्या बायकाही सुवासिनी असल्या तरी कपाळाला आधी भस्म आणि मग त्यावर कुंकू लावतात. दक्षिणेतील विधवा स्त्रियाही भस्मचर्चन करीत असलेल्या दिसतात. साधू-बैरागी तर मुक्त हस्ताने आपल्या अंगाला भस्म फासतात. भस्मामुळे त्यांना थंडीवाऱ्याची बाधा होत नाही आणि शरीरात आवश्यक तेवढी ऊब सदैव राहते, असे सांगतात.

भस्माला विभूती हा दुसरा शब्द आहे. विभूती ही मंत्र-तंत्र, जादूटोणा, इ. विषयांत दिशाबंधनासाठी किंवा आत्मरक्षणासाठी वापरतात. विभूती मंत्रून ती मुलांच्या किंवा रुग्णांच्या कपाळी लावतात. आयुर्वेदात लोह, सोने, मोती, हिरे इ. विविध पदार्थांची भस्मे औषधे म्हणून वापरली जातात, ती अत्यंत गुणकारी असतात. [ऋ. ब्र. स.; पू. मा. प्र.; दे. भा.; शि. पु. क.; चैतन्य, फेब्रु. १९३८; अमृत, डिसें. १९५६; श. क.]

भस्मजाबालोपनिषद एक नव्य उपनिषद. हे अथर्ववेदाशी संबद्ध आहे. शिवाने जाबाल भुसुंडाला भस्मधारणविधी व तत्संबंधी इतर व्रते सांगितली, त्यांचे वर्णन यात आहे. याचे दोन अध्याय आहेत. प्रारंभी शंकराचे सुंदर शब्दचित्र आहे. पुढे भस्म तयार करण्याचा विधी सांगितला आहे, तो असा – पहाटे गोमय ब्रह्मपर्णावर ठेवून ते ' त्र्यंबकं यजामहे ' इ. मंत्रांनी वाळवावे. नंतर अग्नी प्रज्वलित करून ते गोमय तीळ, तांदूळ आणि तूप यांच्यासह त्यात टाकावे. असे १००८ वेळा करावे. मग सर्व दिशांना समंत्रक बळी ठेवावे. तयार झालेल्या भस्मावर गायत्री मंत्राने प्रोक्षण करावे व रुद्रमंत्राच्या उच्चारात तांब्याच्या किंवा मातीच्या भांड्यात साठवावे.

दुसऱ्या अध्यायात जाबाल भुसुंडाच्या विनंतीवरून ब्राह्मणाचा दैनंदिन कार्यक्रम सांगितला आहे. शेवटी शिवमंत्राची फलश्रुती सांगून उपनिषद पूर्ण केले आहे. [श्री. सी. ग. देसाई.]

भस्त्रा चामड्याची नाव. प्राचीन काळी शेळ्यामेंढ्यांचे किंवा त्याहून अधिक मोठ्या पशूंचे चामडे घेऊन, ते हवा भरून फुगवीत आणि अशी चामडी एकमेकांना बांधून त्यांची नाव तयार करीत. त्या काळी पंजाब, वायव्य भारत आणि अफगाणिस्तान यांतील नद्या पार करून जाण्यासाठी या नावा हेच सर्वांत सुरक्षित व जलद वाहन होते. पाणिनीने या नावेला भस्त्रा व तिच्या साहाय्याने नदी पार करणाऱ्याला भस्त्रिक असे नाव दिले आहे. सांप्रतही पंजाबात हवेने फुगवलेल्या दोन बैलांच्या चामड्यांवर खाट ठेवून लोक तिच्यावर बसतात व नदी तरून जातात. या नावा सोयिस्कर असतात, कारण किनाऱ्यावर पोचल्यावर सशक्त माणूस त्या चामड्यांच्या घड्या करून खांद्यावर टाकतो व चालू लागतो. प्राचीन काळी इराण, अफगाणिस्तान, तिबेट व पश्चिम भारत या भागांत अशा नावांतून माणसांची व मालांची वाहतूक होत असे. [पा. का. भा.]

भस्त्रिका प्राणायामाचा एक प्रकार. पूरक, कुंभक व रेचक अशा तीन प्रकारांनी प्राणायाम करतात. त्यांपैकी कुंभकाचे आठ प्रकार सांगितले असून, भस्त्रिका हा त्यांतील एक प्रकार आहे. हिची प्रक्रिया अशी–

पद्मासन घालून बसावे. दोन्ही नाकपुड्यांनी पूरक करून कुंभक न करता एकदम रेचक करावा किंवा डाव्या नाकपुडीने पूरक व उजव्या नाकपुडीने रेचक करावा. कंठ व उदर एका रेषेत ठेवून, लोहार वेगाने भाता चालवतो त्याप्रमाणे प्राणवायूचे द्रुतगतीने चालन करावे. रेचक करताना पोटाला आतल्या बाजूस धक्का द्यावा. भस्त्रिका ११ पासून १२० वेळांपर्यंत करण्याचा हळूहळू अभ्यास करावा.

भस्त्रिकेने कफ, वात, पित्त या त्रिदोषांचा नाश होऊन जठराग्नी प्रदीप्त होतो आणि कुंडलिनी जागृत होण्यास मदत होते, असे सांगितले आहे. [उ. यो. द.; योगविद्या]

भक्ष्याभक्ष्य काय खावे व काय खाऊ नये, यासंबंधीचा विचार यात येतो. मनुष्यप्राण्याला जिवंत राहण्यासाठी काहीतरी अन्न हे लागतेच. हे सर्व जगत प्राणांचे अन्न होय, असे मनूने म्हटले आहे. तरीसुद्धा मनुष्य खाण्याजोगे पदार्थच खातो. अगदी प्रारंभीच्या काळात कंदमुळे, फळे, ससे, उंदीर, चिमण्या, बिळात राहणारे प्राणी, हरिणे, इ. प्राणी यांवर माणूस उदरनिर्वाह करीत असे. इतर सर्व समाजांप्रमाणे प्राचीन काळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वैदिक आर्यही मांसाहार करीत असत. वैदिक आर्यांच्या यज्ञ, श्राद्ध व मधुपर्क या प्रसंगीं मांस हे आवश्यक मानलेले होते.

ऋग्वेदात इंद्रासाठी पस्तीस बैल शिजवल्याचा उल्लेख आहे. त्या ऋचेत (ऋ. १०.८६.१४) इंद्र स्वतःच म्हणतो –

उक्ष्णो हि पञ्चदश साकं पचन्ति विंशतिम् ।
उताहमद्मि पीव इदुभा कुक्षी पृणन्ति मे ॥

अर्थ – माझ्यासाठी पस्तीस बैल शिजवतात आणि मी ते खातो व लठ्ठ होतो. त्याने माझ्या दोन्ही कुक्षी भरून जातात.

वैदिक काळी यज्ञयागात पशूंची नेहमीच हिंसा होत असे.

मधुपर्क हा विधी जावई, स्नातक, सन्मान्य अतिथी, इ. व्यक्तींच्या स्वागतासाठी करीत. 'नामांसो मधुपर्को भवति' = मांसाशिवाय मधुपर्क होत नाही, असे आश्वलायन गृह्यसूत्रांत सांगितले आहे (१.२४.२६). मधुपर्काच्या वेळी गाय मारण्याची पद्धत होती.

श्राद्धातही मांसाचा उपयोग करीत. गाईच्या दुधातुपाने पितर एक संवत्सर तृप्त होतात; माहिष मांसाने त्याहिपेक्षा अधिक तृप्त होतात आणि गेंड्याच्या मांसाने, शतवली नामक माशाच्या व वार्ध्राणस नामक एक प्रकारच्या बोकडाच्या मांसाने पितर हे अनंत कालापर्यंत तृप्त होतात, असे आपस्तंबाने सांगितले आहे.

या प्रसंगांशिवय इतर वेळीही लोक त्या काळी मांसाशन करीत असत. प्राचीन धर्मसूत्रकार आपस्तंब याने एक खुराचे पशू, उंट, गवा, गावडुकरे, शरभ, गाई, बैल, कोंबडा, तोंडाने कुरतडून खाणारे पक्षी, मोर, वदके, हंस, भास, चक्रवाक, इ. पक्षी भक्ष्य होत, असे सांगितले आहे. चिलचिम, अंगावर केस व कवच असलेले प्राणी, रोहित व राजीव या नावांचे मासे; तसेच पंचनख प्राण्यांपैकी वानरादी काही वर्ज्य करून इतर पंचनख पशू व पक्षी भक्ष्य होत, असे बोधायनाने म्हटले आहे.

वसिष्ठाने आपल्या धर्मसूत्रांत भक्ष्याभक्ष्य प्रकरणात मांसाहाराविषयी आपस्तंब, गौतम व बोधायन या सर्वांच्या विचारांचे संकलन केले आहे व भक्ष्य पशु-पक्ष्यांच्या यादीत आणखी थोडी भर घातली आहे. पण त्याच्या काळी ब्राह्मणांना मांसाहार आवडेनासा झाला होता, असे दिसते. कित्येक ब्राह्मण जेवायला गेले असता मांस टाकीत. ते त्यांनी टाकू नये, म्हणून वसिष्ठाने अशा ब्राह्मणांना नरकाचे भय दाखवले आहे.

वेदकाळीच मांसनिवृत्तीच्या कल्पनेचाही प्रादुर्भाव झाला होता. यज्ञयाग करून स्वर्गाची प्राप्ती करून घ्यायची, ही कल्पना मागे पडून तिच्या जागी मोक्षप्राप्तीची कल्पना पुढे आली. मोक्ष मिळवायचा, तर आधी चित्तशुद्धी झाली पाहिजे व चित्तशुद्धीसाठी आहारशुद्धी आवश्यक आहे. मोक्ष ही स्वतंत्र वस्तू नसून, सर्वांभूती एकच आत्मा आहे, हे ओळखणे म्हणजे मोक्ष अशी तात्त्विक कल्पना निर्माण झाली आणि पशूंना मारणे, हे त्या तत्त्वाच्या विरोधी ठरले. पण अनेक शतकांची परंपरा एकदम मोडणे शक्य नसल्यामुळे या नव्या अहिंसातत्त्वाची जुन्या हिंसेच्या तत्त्वाशी सांगड घालण्यात आली. त्या अन्वये, यज्ञात प्राणिहिंसा करायला हरकत नाही; कारण यज्ञातील हिंसा ही हिंसाच नव्हे, असा सिद्धान्त प्रस्थापित झाला. यज्ञात मंत्रपूत करून मारलेले पशू स्वर्गात जातात, अशीही कल्पना त्यासाठी करण्यात आली.

इ. स. च्या १२ व्या शतकापासून पुढच्या काळात निर्माण झालेल्या स्मृती व पुराणे या ग्रंथांत ब्राह्मणांना व इतरही लोकांना मांसाशन वर्ज्य मानण्यात आले आणि कलिवर्ज्य प्रकरणात तर मधुपर्क, श्राद्ध, इ. प्रसंगींच्या पशुवधाचाही निषेध करण्यात आला. कलियुगात युगधर्मानुसार सर्व प्रकारच्या मांसाबरोबर मद्यही वर्ज्य करावे, असे प्रजापतिस्मृतीत सांगितले आहे. पुढे माष = उडीद हे मांसप्रतिनिधी होत, अशी कल्पना करून श्राद्धादी प्रसंगी माषान्न म्हणजे उडीद घालून केलेले वडे आवश्यक ठरविण्यात आले. मांसाप्रमाणे माषही बलसंवर्धक, सुगंधी व स्वादिष्ट आहेत, अशी प्रजापतीने त्यांची भलावण केली आहे.

काठक संहितेच्या काळात सुरापानाचा त्याग होऊ लागला होता. निदान ब्राह्मण तरी सुरापान करीनासे झाले होते. 'सुरा पिऊन लहान मोठी माणसे म्हणजे सून व सासरा हेही उच्छृंखल बनतात; याकरिता पापभयाने ब्राह्मण सुरा पीत नाही, असे ब्राह्मणाने क्षत्रियाला सांगावे,' असे काठक संहितेत सांगितले आहे. (१२.१०). सौत्रामणी यागात सुरेचे हवन केल्यावर तिचा शेष भाग पिण्यासाठी, पैसा देऊन ब्राह्मण आणावा लागे. तसा ब्राह्मण काही वेळा मिळतही नसे. अशा वेळी उरलेली सुरा वारुळाच्या छिद्रात नेऊन ओतावी, असे तैत्ति. ब्राह्मणात सांगितले आहे (१.८.६.२). पुढे सुरापानही कलिवर्ज्य प्रकरणात समाविष्ट करण्यात आले.

मांसाहाराप्रमाणे शाकाहारातही भक्ष्याभक्ष्य विचार केलेला आढळतो. धर्मशास्त्रदृष्ट्या सर्व प्रकारच्या भाज्या, फळे व अन्नधान्ये ही भक्ष्य अर्थात खाण्याजोगी नाहीत.

आपस्तंब सांगतो, की बाजारात मांडलेले अन्न, सर्व तऱ्हेचे मद्य, शेळीचे दूध व एक वेळ दूध देणाऱ्या गायीचे दूध पिऊ नये. दारू ज्यापासून उत्पन्न होते अशा वनस्पती व त्यांचे पदार्थ, तांबडी व पांढरी लसूण, म्लेच्छांनी आणलेले कांद्यासारखे पदार्थ, ताकातले लोणी, हाताने घुसळलेले दही व ताक, मध, काळे उडीद, काळे हुलगे, पावटे, हरभरे, जोंधळे व शूद्रान्न ही सर्व अभक्ष्य होत. गौतमाने या यादीत आणखी थोडी भर घातली आहे. झाडांचा चीक म्हणजे हिंगासारखे पदार्थ व तांबडा डिंक हे पदार्थही त्याने अभक्ष्य ठरवले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बोधायनाने, दीर्घ कालामुळे शिळे झालेले व विटलेले सर्व पदार्थ, भाज्या, कोशिंबिरी, पक्वान्नें, दूध, तूप, मांस, गूळ, साखर, सातू, वगैरे घालून केलेले पदार्थ हे सर्व अभक्ष्य होत, असे म्हटले आहे.

वसिष्ठाने याशिवाय काळे वांगे, गाजर, भोकरे, ज्यांतून चिकट व गिळगिळीत गोड रस येतो अशी फळे, कावळा व कुत्रा यांनी हुंगलेले पदार्थ, दह्यात कालवलेले सातू, सातूमिश्रित वडे, तेलातील भाज्या आणि दूध व यवांचे पीठ यांच्या विकारापासून झालेले सर्व पदार्थ अभक्ष्य ठरविले आहेत.

मनूने या यादीत सोनखतापासून उत्पन्न होणारे सर्व पदार्थ समाविष्ट केले आहेत. शिवाय देवादिकांच्या उद्देशाने जी पक्वान्नें केलेली नसतात, तीही त्याने अभक्ष्य ठरविली आहेत.

वृद्धहारीत हा वैष्णव स्मृतिकार आहे. त्याने विष्णूच्या नैवेद्याला अनेक पदार्थ वर्ज्य सांगितले आहेत. ते सगळे जर वर्ज्य केले तर देवाला नैवेद्य कशाचा दाखवावा, याचीच पंचाईत पडेल. त्याने दिलेली पुष्कळ नावे आज अपरिचित आहेत. परिचितांपैकी पांढरा यावनाल, कुळीथ, पावटे, मसूर, राळे, सावे, नाचणे, इ. धान्ये, तसेच हिंग, गुग्गुळ, डिंक, मुळा, गाजर, शेवगा, करंज, लसूण, कांदा, हाताने घुसळलेले दही, पांढरे वांगे, नारळ, दोडका, तोंडले, भोपळा, चिंच, घोसाळे, इ. पदार्थ अभक्ष्य होत. आपस्तंबापासून वृद्धहारीतापर्यंत ही अभक्ष्य पदार्थांची यादी कमी न होता वाढतच गेलेली आहे.

याशिवाय आश्रमदुष्ट, स्थानदुष्ट, कालदुष्ट, परिग्रहदुष्ट, संसर्गदुष्ट, क्रियादुष्ट व निमित्तदुष्ट असे अभोज्य अन्नाचे आणखी भेद केलेले आहेत. मद्य, मांस, क्षार, इ. पदार्थ ब्रह्मचाऱ्याला व गावातून आणलेले अन्न वानप्रस्थाला अभक्ष्य ठरवले आहे. या पदार्थांना आश्रमदुष्ट समजायचे. बाजारातून आणलेले खाद्यपदार्थ हे स्थानदुष्ट होत. पण मांस, मद्य व मीठ हे पदार्थ बाजारातले चालतील, असे आपस्तंबाने सांगितले आहे. शिळे अन्न कालदुष्ट होय. वेश्येकडील अन्न, गणान्न व बहिष्कृताकडचे अन्न ही परिग्रहदुष्ट होत. कुत्रा, कावळा इत्यादींचा स्पर्श झालेले अन्न, पायाला लागलेले अन्न, केस किंवा कीड गेलेले अन्न हे संसर्गदुष्ट होय. गाईने हुंगलेले अन्न क्रियादुष्ट व आशौचातील अन्न निमित्तदुष्ट होय.

कोणाच्या हातचे खावे, या विषयावरही स्मृतिकारांत मतभेद असून, त्यात पुन्हा आश्रमभेद, वर्णभेद व युगभेद या कारणांनी फरक सांगितले आहेत. ब्रह्मचाऱ्याने पतित व महापातकी हे दोन सोडून कोणत्याही वर्णाच्या माणसाकडून अन्न घ्यावे, असे गौतम म्हणतो (२.४१). स्नातक आणि गृहस्थ यांनी शूद्रांशिवाय कोणत्याही धार्मिक त्रैवर्णिकांकडून अन्न घ्यावे; आणि शूद्र जर त्याचा निकटवर्ती असेल, तर त्याच्याकडूनही अन्न घ्यावे, असे आपस्तंब म्हणतो. याज्ञवल्क्याच्या मते आपला नोकर, नापित, गवळी, कुलमित्र, अर्धेलीने शेत करणारा हे सगळे शूद्र असले, तरी त्यांच्या हातचे अन्न खाण्यास हरकत नाही (१.१६६). आपस्तंबाने या बाबतीत अनेकांची मते सांगून, पवित्र व मनापासून अन्न देणाऱ्याच्या हातचे खावे, पण मनापासून न देणाऱ्याच्या हातचे खाऊ नये; आणि विशिष्ट प्रसंगी तर कोणीही आणून दिलेले खावे, असा निर्णय दिला आहे.

कोणी शिजवलेले अन्न खावे, या बाबतीतही अनेक मते आहेत. त्रैवर्णिकांनी त्रैवर्णिकांकडे जेवावे, असा पूर्वीचा प्रकार होता. पण त्यानंतर कोणाकडे जेवू नये, याची एक लांबलचक यादी तयार झाली. अग्निहोत्र न ठेवणारा, कंजूष, बद्ध, चोर, क्लीब, नट, बुरूड, पातकी, व्याज घेणारा सावकार, दीक्षित, बहुयाजक, वैद्य, असाध्य रोगाने पछाडलेला, क्रुद्ध, पुंश्चलीदत्त, द्वेष्टा, क्रूर, उग्र, पतित, व्रात्य, दांभिक, उच्छिष्टभोजी, स्वर्णकार, ग्रामजोशी, शस्त्रविक्रयी, लोहार, कोष्टी, धोबी, भाट, इ. लोकांकडे जेवू नये, असे वसिष्ठ, विष्णू, याज्ञवल्क्य, मनू, इ. स्मृतिकारांनी सांगितले आहे.

एकपंगत आणि सहभोजन हे विषयही भक्ष्याभक्ष्यविचारात येतात. सहभोजन म्हणजे एका ताटात जेवणे किंवा एकमेकांजवळ बसून जेवणे होय. ज्यांच्याशी सहभोजन करू नये, असे सांगितले आहे, त्यांच्याबरोबर एका पंक्तीत बसले असता, दोन पाटांच्या मधे अग्नी, जल, भस्म, द्वार व वाट असेल, तर पंगत तुटते व एकपंक्तीचा दोष लागत नाही, असेही म्हटले आहे.

सांप्रतच्या काळात ब्राह्मणवर्गाचा इतरांच्या घरी भोजनाला जाण्याचा फारसा प्रघात नसला, तरी सार्वजनिक समारंभप्रसंगी ब्राह्मण लोक सवर्ण हिंदूंच्या पंक्तीला बसून जेवतात व त्यात त्यांना दोष वाटत नाही. स्वच्छ असेल तर कोणाहीकडचे अन्न खावे, अशी आजमितीस प्रवृत्ती वाढत आहे व जातीपातींमधले मानसिक उच्चनीचत्व कमी होण्यासाठी ती इष्टही आहे.

शास्त्रात अभक्ष्य म्हणून जे पदार्थ सांगितले आहेत, त्यांपैकी टोमॅटो, कांदा, लसूण, गाजर, कोहळा, डिंक, इ. पदार्थ वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने शरीराला हितावह असल्यामुळे, त्यांना आता सनातनी वृत्तीचे लोक सोडल्यास कोणी, अभक्ष्य मानीत नाहीत. बदलत्या परिस्थित्यानुसार हा भक्ष्याभक्ष्यविचार समाजात राहिलेला नाही आणि प्रत्येकजण आपापल्या इच्छेप्रमाणे भक्ष्याभक्ष्य ठरवण्यास स्वतंत्र आहे. [ध. शा. वि.; ध. शा. मं.]

भांगटिळ्याचा नाच एक लोकनृत्य. महाराष्ट्रात हे प्रचलित आहे. या नृत्याला तर…

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नावाच्या वाद्याची साथ असते. नृत्यात भाग घेणारे लोक समोरासमोर दोन रांगा करून उभे राहतात. त्यांचा एक हात कमरेवर असतो आणि दुसऱ्या हाताने ते कपाळावर टिळा लावण्याचा अभिनय करतात व नाचतात. या नृत्यात नर्तकाने आपली जागा सोडायची नसते. [भा. लो. नृ.]

भांगडा नृत्य पंजाबातील एक लोकनृत्य. हे मुख्यतः शेतकऱ्यांचे नृत्य असून, धान्याची पेरणी केल्यापासून कापणी व मळणी होईपर्यंत रोज रात्री ते केले जाते. वैशाखी पौर्णिमेला या नृत्याचा हंगाम संपतो. पण सांप्रत कोणत्याही आनंदोत्सवाच्या प्रसंगी पंजाबी लोक हे नृत्य करतात. ग्रामीण लोकांच्या मनोरंजनाचे हे मुख्य साधन आहे. अंगातील जादा उत्साहाला वाट मोकळी करून देण्यासाठी आणि शरीर बळकट करण्यासाठीही त्याचा उपयोग होतो.

हे नृत्य केवळ पुरुषांचे आहे. स्त्रिया त्यात भाग घेत नाहीत. रेशमी फेटा, लांब सफेत कुडता, त्यावर चमकत्या गुंड्यांचे जाकीट आणि कमरेला लुंगी असा रंगीबेरंगी पोषाख केलेले नर्तक फेर धरून उभे राहतात आणि नृत्याचा मुखिया व ढोलवाला हे मध्यभागी उभे राहतात. ढोल वाजू लागतो व मुखिया एखादे लोकगीत गाऊ लागतो. मग सर्व नर्तक गायला व नाचायला आरंभ करतात. नाचताना ते गिरक्या घेतात, उंच उड्या मारतात, टाळ्या वाजवतात, नाना प्रकारचे अंगविक्षेप करतात आणि 'होई, ओह, बल्ले, भई' असे आवाज काढतात. कधी ते एकमेकांना खांद्यावरही घेतात. या नृत्याला काटेकोर नियम नसले, तरी ते अगदी लयबद्ध असते. ढोलाच्या गतीबरोबर नृत्याची लय वाढत जाते व नर्तकांना मस्ती चढत जाते. अशा



भांगडा नृत्य

वेळी त्यांच्या पायांतील घुंगरांचा झंकार खूप दूरपर्यंत ऐकू जातो. दिसायला हे नृत्य साधेसोपे वाटते, पण करायला कठिण आहे. त्यासाठी शरीर बलवान, दमदार व चपळ असावे लागते.

या सामूहिक नृत्यात कोणालाही केव्हाही सामील होता येते. चैतन्य व आनंदोल्हास यांनी भरलेले असे हे एक धुंद नृत्य आहे. [श्री. विद्या लाल–आजकल, १९६५; ए. हो. रा.]

भांग भरणे स्त्रिया फणीने केस विंचरून त्यांची वेणी घालीत असताना मस्तकावरील केसांचे दोन भाग करतात. त्या दोन भागांच्यामध्ये जी चीर दिसते तिला भांग असे म्हणतात. या भांगात कुंकू किंवा सिंदूर भरणे याला भांग भरणे असे नाव आहे. हा केशसंस्काराचाच एक भाग मानला जातो. भांग भरण्याचा हा प्रकार उत्तर भारतात विशेष रूढ आहे. तो बराच प्राचीन असावा. श्रीहर्षाने नैषधीयचरितात (१५·५५) आणि भारवीने किरातार्जुनीय काव्यात (७·८) याचा उल्लेख केला आहे. कालिदासाने मात्र सौभाग्यचिन्ह म्हणून भांग भरण्याचा उल्लेख केलेला दिसत नाही.

आश्विन शुद्ध तृतीयेच्या दिवशी देवीच्या केशसंस्कारासाठी सिंदुराचा उपयोग करावा, असे दुर्गाभक्तितरंगिणीत म्हटले आहे. आश्विन महिन्यातील ही तिथी सिंदूरतृतीया म्हणूनच प्रसिद्ध आहे. भांग भरणे हे सौभाग्याचे लक्षण मानतात. त्याने स्त्रियांचे सौंदर्यही वाढते. [प्रा. भा. प्र.; नि. सिं.]

भांड लोकरंजकांचा एक वर्ग. भांड हा शब्द संस्कृतातील भण्ड् (= थट्टा-विनोद करणे, अश्लील बोलणे) या धातूपासून बनलेला आहे. विदूषक, खुषमस्कऱ्या किंवा अभद्र बोलणारा असा त्याचा अर्थ आहे. महाभारतात भांडसदृ लोकरंजकांचा उल्लेख प्रहासक या नावाने आला आहे. मनस्मृतीत (१०·२२) उल्लेखिलेली झल्ल ही संकरजन्य जात भांडांप्रमाणेच अश्लील बोलून लोकरंजन करीत असे, असे शब्दकल्पद्रुमात म्हटले आहे. माधवाचार्यांच्या सर्वदर्शनसंग्रहात (१·२५) भांडांचा उल्लेख आहे.

ज्ञानेश्वर महाराजांनी (ज्ञा. १८·८०४) भांडांचा उल्लेख करून, त्यांचे बोलणे तामस असल्याचे सांगितले आहे. शिमग्याच्या सणाच्या निमित्ताने भांडांच्या अश्लील बीभत्स बोलण्याला जो ऊत येतो, त्या संदर्भात एकनाथमहाराज, म्हणतात (ए. भा. ८·२२)–

कां भांडाचे तोंडीं भंडपुराण । त्यावरी आला शिमग्याचा सण ।
मग करिता वाग्विडंबन । आवरी कवण तयासी ।।

भांडांच्या या भाषणांनी रावापासून रंकापर्यंत सर्व थरातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोक सुखावत होते. साधु-संतांनी भांडांच्या अश्लील व अभद्र बोलण्याचा कितीही धिक्कार केला असला, तरी लोकमानसावर असलेल्या त्यांच्या प्रभावाचीही त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळेच आपले नीतिपर विचार लोकमानसात रुजविण्यासाठी भांडांच्या इरसाल भाषेचा संतांनी उपयोग करून घेतला व तशी रूपके लिहिली. या संदर्भात एकनाथांचे एक रूपक उल्लेखिण्याजोगे आहे. मायेच्या नादी लागल्यामुळे ब्रह्मदेवादी श्रेष्ठ देवांचाही कसा फजितवाडा झाला व त्यामुळे मायेचा त्याग करणे कसे आवश्यक आहे, हे सांगताना एकनाथमहाराज लिहितात—

माया छांड सुनो जी । अच्छा भांड बनो जी ।।
ब्रह्मदेव ने वेद पढाया । माया मीठी लगी ।
सरस्वती के गले पडा । उसकी कीरत भगी ।।
बिष्णु के पीछे लगा है । माया का धंदा ।
खेल करते फसल पड़ी । मीठी लगी वृंदा ।।
महादेव बड़ा देव । सब देवनका बाबा ।
भिल्लिनी के पीछे लगा । करता तोबा तोबा ।।
जनार्दन साई मेरा । सब खेल खेला ।
एकनाथ भांड होके । उनके चरण मिला ।।

अश्लील व अभद्र बोलणे एवढेच भांडांचे भांडवल नव्हते, तर त्याबरोबरच दंभस्फोट करण्याची त्यांची वृत्ती व त्यासाठी ते प्रगट करीत असलेले वाक्‌चातुर्य यांचाही महत्त्वाचा वाटा भांडांच्या विशेष लोकप्रियतेत होता.

भांड पुरुष

सांप्रत या लोकांची एक भिक्षेकरी जात बनली आहे. यांची वस्ती उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, काश्मीर, गुजरात, राजस्थान, इ. प्रदेशांत आढळते. हिंदू व मुसलमान अशा उभय धर्मांचे लोक यांच्यांत आहेत. गुजरात व राजस्थान येथील भांड हिंदू असून, काश्मीर व मध्य प्रदेश येथील मुसलमान आहेत. अन्यत्र ते सरमिसळ आहेत. राजस्थानी भांड हे तिथल्या ढोली जातीपैकीच असल्याचे अनेक समाजशास्त्रज्ञांचे मत आहे. हे लोक बहुरूप्यांप्रमाणे राणी, माकड, सेठ, मुनीम, डाकीण, इ. स्त्री-पुरुषांची सोंगे घेतात आणि अश्लील व अचकट-विचकट बोलून लोकांचे मनोरंजन करतात. पौराणिक कथा व व्यक्ती यांचे विडंबन, तसेच समकालीन प्रतिष्ठित लोकांचा दंभस्फोट, हे यांच्या विनोदाचे विषय असतात. विवाहादी समारंभात व शिमग्याच्या सणात लोक आवर्जून भांडांना निमंत्रण देतात व त्यांचे खेळ-तमाशे करवतात.

राजस्थानातील भांडांत खापे किंवा गोत्रे आहेत. त्यांच्यांत सगोत्र विवाह होत नाही. मध्य प्रदेश व काश्मीर या भागांतले भांड मुसलमान असल्यामुळे त्यांचे निकाह मुसलमानी पद्धतीने होतात. त्यांच्या अन्य चालीरीती मात्र हिंदूंप्रमाणेच आहेत.

पूर्वी अनेक राजेरजवाडे आपल्या मनोविनोदनासाठी पदरी भांड बाळगीत; तसेच त्यांना इनामे व जहागिऱ्याही देत. प्रसंगविशेषी ते ख्यातनाम भांडांचे सामनेही घडवून आणीत.

इ. स. च्या अठराव्या शतकात बंगालमध्ये गोपाल नामक एका भांडाचे नाव सर्वतोमुखी झाले होते. हा नदियाचा रहिवासी असून, महाराज कृष्णचंद्राच्या आश्रयाला होता. तो जसा अश्लील बोलण्यात पटाईत होता, तसाच चतुर व बहुश्रुत होता. आध्यात्मिक क्षेत्रात तो कबीरासारखा मुक्त चिंतक होता.
[भांडांचे भंडपुराण – श्री. रा. चिं. ढेरे, सह्याद्रि, मार्च १९६७; रा. जा.; रेडिओ संग्रह, जुलै-सप्टेंबर १९५३]

भांडारकर, डॉ. रा. गो. (१८३७–१९२५ इ. स.) एक थोर विद्वान व संशोधक. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात, मालवण येथे एका सारस्वत ब्राह्मण कुळात झाला. त्यांचे वडील गोपाळराव हे मामलेदारकचेरीत कारकून होते. रत्नागिरी येथील इंग्रजी शाळेत माध्यमिक शिक्षण संपल्यावर रामकृष्णपंत इ. स. १८५३ साली मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये दाखल झाले. १८५४ मध्ये ते मॅट्रिक झाले व १८५८ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजातून बी. ए. झाले. ते अत्यंत अभ्यासू असून, गणित, इंग्रजी, इतिहास व निरनिराळी शास्त्रे या विषयांचे त्यांनी परिश्रमपूर्वक अध्ययन केले होते. गणित हा विषय त्यांना विशेष प्रिय होता. त्यांचे एक अध्यापक श्री. ओवेन यांची विद्वत्ता व कर्तव्यनिष्ठा या गुणांचा रामकृष्णपंतांच्या मनावर फार प्रभाव पडला. त्यामुळे त्यांची चिकित्सक बुद्धी व शोधक वृत्ती विकसित झाली. त्या वेळचे शिक्षण खात्याचे प्रमुख श्री. हॉवर्ड यांच्या आस्थेवाईक प्रयत्नांमुळे रामकृष्णपंतांना १८५९ मध्ये दक्षिणा फेलोशिप मिळाली. १८६० साली पुण्याच्या कॉलेजात (सध्याचे डेक्कन कॉलेज) त्यांची बदली झाली. दक्षिणा फेलोशिप त्यांना ५–६ वर्षे मिळत होती. त्या कालाव-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धीत त्यांनी संस्कृताचे सूक्ष्म अध्ययन केले. त्यांचे ते अध्ययन जुन्या पद्धतीचे नसून, पाश्चात्य संशोधक वृत्तीने केलेले होते. त्या पद्धतीमुळे त्यांना न्याय, वेदान्त, व्याकरण, इ. गहन विषयांवरील ग्रंथांचा अभ्यास स्वतःच करणे शक्य झाले. त्यामुळे लवकरच एक शोधक व चिकित्सक संस्कृत पंडित असा त्यांचा लौकिक झाला. १८६३ मध्ये ते संस्कृताचे एम. ए. झाले.

त्यानंतर इ. स. १८६५ मध्ये हैदराबाद (सिंध) येथील शाळेचे मुख्याध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. पण लवकरच हॉवर्ड यांनी त्यांना रत्नागिरीच्या शाळेचे मुख्याध्यापक नेमले. १८६८ साली त्यांना एल्फिन्स्टन कॉलेजात संस्कृतच्या प्राध्यापकाची जागा मिळाली. तिथे ते १८८२ पर्यंत होते. डेक्कन कॉलेजातील संस्कृताचे प्राध्यापक कीलहॉर्न हे निवृत्त झाल्यावर त्यांची जागा पुढे भांडारकरांना मिळाली. १८९३ साली ते निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी पुण्यातच वास्तव्य केले.

रामकृष्णपंत हे संस्कृत पंडित होते, तसेच पुराणवस्तुसंशोधक म्हणूनही प्रसिद्ध होते. इ. स. १८७० साली त्यांना एक ताम्रपट सापडला, त्यावर जुन्या देवनागरी लिपीत काही मजकूर होता. प्रिन्सेप वगैरे पाश्चात्य संशोधकांची पुस्तके वाचून त्यांनी तो

डॉ. रा. गो. भांडारकर

ताम्रलेख लावला आणि तेव्हापासून त्यांनी पुरातत्त्वसंशोधनात लक्ष घातले. प्राकृत भाषांचा आणि ब्राह्मी व खरोष्ठी या जुन्या लिप्यांचा अभ्यास करून त्यांनी त्यांवर अनेक निबंध प्रसिद्ध केले. त्यावरून निरनिराळ्या संशोधनसंस्थांनी त्यांना आपले सन्मान्य सभासदही करून घेतले. १८७९ साली सरकारने पुरातन संस्कृत लेखांच्या संशोधनाचे काम त्यांच्याकडे सोपविले. त्यासंबंधी त्यांनी जे पाच ग्रंथ संपादित केले ते संशोधकांना मार्गदर्शक ठरले आहेत. १८८५ साली गॉटिंजन (जर्मनी) युनिव्हर्सिटीने त्यांना पीएच्. डी. ही बहुमानाची पदवी अर्पण केली. पुढे १८९१मध्ये त्यांना सी. आय. इ. ही पदवी सरकारकडून मिळाली. याशिवाय इतर विद्यापीठांकडूनही त्यांना विद्वत्तादर्शक पदव्या लाभल्या. १८९३ साली ते मुंबई युनिव्हर्सिटीचे कुलगुरू झाले.

त्यांची विद्वत्ता, संशोधक वृत्ती व चिकित्सक बुद्धी या गुणांमुळे त्यांचा सर्वत्र बहुमान झाला. १९१७ साली त्यांच्या वयाला ८० वर्षे पूर्ण झाली, तेव्हा त्यांच्या शिष्यांनी भांडारकर स्मारक लेखसंग्रह तयार करून, तो त्यांना अर्पण केला. त्याच वेळी भांडारकर प्राच्यविद्यासंशोधन मंदिर नावाच्या एका संस्थेचीही स्थापना करण्यात आली. भांडारकरांच्या वाङ्मय-सेवेचे व पुरातत्त्वसंशोधनाचे ते एक जिवंत स्मारकच ठरले आहे. पुढे भांडारकरांनी आपला बहुमोल संस्कृत ग्रंथांचा मोठा संग्रह त्या संस्थेला अर्पण केला. त्या संस्थेने महाभारताच्या शेकडो हस्तलिखित प्रतींचे संशोधन करून संपूर्ण महाभारताची शुद्ध प्रत तयार करून ती छापण्याचे प्रचंड कार्य नुकतेच पूर्ण केले आहे.

'अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन' आणि 'वैष्णविझम, शैविझम अँड अदर मायनर रिलिजस सेक्ट्स' हे त्यांचे दोन ग्रंथ अत्यंत मूल्यवान ठरले आहेत. त्यांनी मालती-माधव या संस्कृत ग्रंथावर टीका लिहिली असून, शाळेतील मुलांसाठी दोन संस्कृत पुस्तकेही लिहिली आहेत.

डॉ. भांडारकर हे प्रार्थनासमाजाचे एक आधारस्तंभ होते. व्याख्याने, कीर्तने व धर्मपर लेख यांच्या साहाय्याने त्यांनी सुमारे पन्नास वर्षे समाजाचे धर्मप्रचाराचे कार्य केले. सर्वव्यापी, सर्वज्ञ, अनंत, विश्वचालक, मंगलमय अशा परमेश्वरावर त्यांचा दृढ विश्वास होता, तो कोणत्याही परिस्थितीत ढळला नाही. त्यांच्या मते प्रतिमापूजन हे पाप नव्हे; पण तो ईश्वरोपासनेचा खरा मार्गही नव्हे. माणसाने या जगात प्रपंच आणि परमार्थ या दोहोंचेही साधन करावे, असा त्यांचा उपदेश असे. ते सुधारणावादी होते. घातक रूढींचा त्याग, स्त्रीशिक्षण, जातिभेदनिर्मूलन, विधवाविवाह, अंत्यजोद्धार, इ. बाबतींत त्यांचे विचार पुरोगामी होते. त्या दृष्टीने त्यांनी समाजात जागृती करण्याचे सतत प्रयत्न केले आणि आपले विचार आचरणातही आणले. विधवाविवाहाचा विचार न्याय, नीती, दया या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दृष्टींनी केला पाहिजे, असे त्यांचे मत होते. विधवाविवाहाला अनुकूल असा शास्त्राधारही त्यांनी शोधून काढला होता. आपल्या मुलीला वैधव्य येणे हा दुर्धर प्रसंग त्यांच्यावरही ओढवला होता. पण योग्य वर पाहून त्यांनी आपल्या कन्येचा पुनर्विवाह १८९१ मध्ये घडवून आणला. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत त्यांनी आपले विचार स्पष्ट केले आहेत, ते असे – सामाजिक सुधारणा नीतीच्या, भूतदयेच्या व सत्याच्या पायावर करावयाची आहे. या गोष्टीत तडजोड मुळीच उपयोगी नाही. आपल्या विवेकवाणीला स्मरून, न्याय्य वाटणारी सुधारणा प्रत्येकाने अवश्य आणि धैर्याने अमलात आणली पाहिजे.

त्यांच्या या सत्यप्रियतेमुळे त्यांना समाजाकडून बराच छळही सोसावा लागला, पण तो त्यांनी धैर्याने सोसला. विलक्षण विद्याव्यासंग, निष्कलंक आचरण, सत्यनिष्ठा, स्पष्टोक्ती, शांतपणा, धर्मनिष्ठा, इ. गुणविशेषांमुळे पाश्चात्य पंडितही त्यांना फार मान देत. न्यायमूर्ती रानडे त्यांना आपले गुरू मानीत. [प्रा. स. इ.; म. ज्ञा. को.; अ. च. को.]

भांडीर भाषा एक प्राचीन भाषा. ही भाषा म्हणजे संस्कृत भाषेचाच एक प्रकार आहे, असे म्हणतात. कंबोजी, मागधी, गौडी, महाराष्ट्री, कलिंगी, इ. भाषांपासून ही भाषा तयार झाली. भोजाच्या व सोमेश्वराच्या काळात ही भाषा भरभराटीत होती. या कालात या भाषेत काव्यरचनाही होत असे. विश्वेश्वराने या भाषेवर एक स्वतंत्र प्रबंध रचला आहे. त्याच्या मते भांडीर भाषा ही संगीताला अनुकूल व सोयीची आहे. या भाषेची उच्चारपद्धती, स्वर-रचना, तालबद्धता, इ. गोष्टी लक्षात घेता हिचा उपयोग संगीतासाठी करायला हरकत नसावी, असे संगीतशास्त्रज्ञांचे मत आहे. पुरंदरदासासारख्या भक्तकवींनेही या भाषेत काव्यरचना केली आहे. याशिवाय अन्य कवींचीही रचना या भाषेत आढळते. दक्षिणेतल्या वाग्गेयकारांची ही आवडती भाषा होती. [डि. सा. इं. म्यु म्यु.]

भांबी राजस्थानातील एक जात. हे लोक चर्मकारांपैकी आहेत. या लोकांची वस्ती राजस्थानातील प्रत्येक गावात असते. गावाची देखभाल करणे, गावात येणाऱ्या पांथस्थांना मदत करणे आणि गावात मरणाऱ्या बेवारशी पशूंचे चामडे काढणे, असे यांचे व्यवसाय आहेत. हे कुठेकुठे विणकामही करतात. पूर्वी जेव्हा संस्थाने होती, तेव्हा प्रत्येक राजाकडून प्रत्येक गावासाठी एक भांबी नेमला जात असे. सरकारतर्फे त्याला पगडी व लाठी दिली जाई. गावाची देखभाल करणे आणि सरकारी वेठबिगार करणे हे काम त्याला नेमून दिलेले असे.

भांबी लोक मेघवाल जातीतून आपली उत्पत्ती झाल्याचे सांगतात. जेव्हा राजस्थानावर परदेशी आक्रमणे सुरू झाली, तेव्हा अनेक राजपूत, जाट व चारण हे भांबीमध्ये समाविष्ट

भांबी पुरुष

झाले व पुढे त्या जातीत मिसळून गेले. त्यातूनच भांबींचे चार पोटविभाग झाले, ते असे – (१) अदू किंवा अमिश्रित. (२) मारु - राजपूतांपैकी. (३) जाट भांबी व (४) चरनिया भांबी - चारणांपैकी.

यांपैकी पहिल्या दोन वर्गांचा घनिष्ठ संबंध असून, ते एकमेकांत विवाहसंबंध करतात. पुढच्या दोन जाती केवळ आपल्या पोटजातींतच लग्ने करतात.

भांबी लोकांना सोन्याचांदीचे दागिने घालायची परवानगी नसते. त्यांच्यांतला चौधरी आणि त्याची बायको यांनाच ही परवानगी आहे.

भांबी हे वैष्णव संप्रदायाचे अनुयायी असून, रामदेवाचे उपासक आहेत. खादामाता ही यांची कुलदेवता होय.

हे डुकराशिवाय इतर सर्व पशूंचे मांस खातात.

विवाहप्रथा – लग्न ठरवण्याच्या वेळी दोन्ही पक्षांचे लोक साखर, अफू व नारळ यांची देवाणघेवाण करतात. गुर्रा जातीचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मनुष्य त्यांचा पुरोहित असतो. विवाहवेदीला सात प्रदक्षिणा घातल्याने लग्न पुरे होते. यांच्यांत बहुपत्नीप्रथा प्रचलित होती. मात्र दोन सख्ख्या बहिणी एकाच पुरुषाच्या भार्या होऊ शकत नसत.

मर्तिकप्रथा – यांच्यांत प्रेते जाळण्याची पद्धत आहे. रामदेवाच्या भक्ताची प्रेते मात्र पुरण्यात येतात. [रा. जा.]

भाई पाचू माहेश्वरी समाजातील एक सण. भाद्रपदातल्या ऋषिपंचमीला हे नाव आहे. या दिवशी बहीण आपल्या भावाला घरी बोलावून त्याला राखी बांधते व गोडगोड जेवायला वाढते. भाऊ तिला एक रुपया आहेर करतो.

भाऊ-बहीण एकाच मातापित्यांच्या पोटी जन्म घेतलेल्या मुलामुलींना भाऊ-बहीण असे म्हणतात. हिंदू कुटुंबात भावाला अर्थात पुत्राला महत्त्वाचे स्थान आहे. छांदोग्य उपनिषदात त्याचा दर्जा माता-पित्यांच्या खालोखाल मानलेला आहे. पित्याच्या अभावी तोच बहीणींचे व इतर कुटुंबियांचे पालन करतो. मनूने तर त्याला पित्याचाच अधिकार दिला आहे. मनू म्हणतो (मनु ९.१०८)–

पितेव पालयेत् पुत्रान् ज्येष्ठो भ्रातॄन् यवीयसः ।
पुत्रवच्चापि वर्तेरन् ज्येष्ठे भ्रातरि धर्मतः ॥

अर्थ – वडील भावाने धाकट्या भावांचे पित्याप्रमाणे पालनपोषण करावे आणि धाकट्या भावांनीही त्याच्याशी पुत्राप्रमाणे वागावे.

ज्येष्ठ भ्राता हा पित्याप्रमाणेच पूज्य मानलेला आहे. पिता मृत्यू पावला असता किंवा असमर्थ असता बहिणी आपल्या पालनपोषणासाठी व लग्नासाठी भावावरच अवलंबून असत. भावांनी आपल्या वाटणीतला चौथा हिस्सा बहिणींना द्यावा, असे मनूने सांगितले आहे. भ्रातृ शब्दही भृ म्हणजे भरणपोषण करणे या धातूपासून निघाला आहे. बहिणीशी वाईट रीतीने वागणाऱ्या भावाला छांदोग्य उपनिषदात (७.१५.२) स्वसृहा म्हणजे बहिणीची हत्या करणारा असे म्हटले आहे.

प्राचीन काळी बहिणीचे पालनपोषण करणे, एवढेच भावाचे कर्तव्य नसे, तर तिच्यासाठी योग्य वर निवडून परंपरागत पद्धतीने त्याच्याशी तिचा विवाह करून देणे, हीदेखील त्याची जबाबदारी असे. भावाचे हे कर्तव्य ऋग्वेदातील यम-यमी संवादसूक्तात पुढीलप्रमाणे व्यक्त झाले आहे–

किं भ्रातासद् यदनाथं भवाति किमु स्वसा यन्निर्ऋतिर्निगच्छात् ।
(ऋ. १०.१०.११)

अर्थ – भाऊ असूनही बहीण जर पतीशिवाय राहिली, तर त्या भावाचा उपयोग काय ! तसेच बहीण असतानाही जर भावावर आपत्ती आली, तर त्या बहिणीचा तरी काय उपयोग !

अथर्ववेदात भ्रातृहीन मुलीला हतवर्चस म्हणजे तेजोहीन म्हटले आहे. भाऊ नसलेल्या मुलीचे लग्न होणे वैदिक काळी कठीण असे. कारण पुत्रहीन पिता कन्येला पुत्रिका बनवीत असे. त्यामुळे जावयाला सासऱ्याच्या घरी राहावे लागे आणि त्याच्या जनक पित्याला पिंडदान करणाऱ्या आपल्या पुत्राला मुकावे लागे.

संस्कृतमधील भगिनी हा शब्द भग म्हणजे धन, यश, श्री यावरून निघाला आहे. भाऊ असल्यामुळे तिला हे भाग्य मिळाले आहे. बहिणीने भावाशी प्रेमाने वागावे, त्याच्याशी वैर करू नये, असे अथर्ववेदात (२.१०.१; ३.३०.३) सांगितले आहे. बहीण भावाची कधी हिंसा करीत नाही, त्याला थोडाही त्रास देत नाही, उलट नेहमी त्याचा आदरसत्कार करते, असे ऋग्वेदात (१.६२.१०) म्हटले आहे.

भाऊ आणि बहीण यांचे परस्पर प्रेम हे हिंदू कुटुंबात प्राचीन काळापासून चालत आलेले आहे. हे प्रेम तसेच टिकून राहावे किंवा वाढावे यासाठी दर वर्षी रक्षाबंधन आणि भाऊबीज हे दोन सण साजरे केले जातात. राखी बांधण्याची ऐतिहासिक उदाहरणे मोगल काळापासून मिळतात. त्या संकटपूर्ण काळात हिंदू स्त्रियांना आपल्या हिंदुधर्मी भावांकडून संरक्षण मिळत असे; एवढेच नव्हे, तर अन्यधर्मीय बांधवांकडूनही ते मिळाले असल्याचे दाखले मिळतात. बहादुरशाहाने जेव्हा चितोडवर स्वारी केली, तेव्हा महाराणा सांगाची पत्नी कर्मवती हिने हुमायूनाला राखी पाठवली. त्यामुळे हुमायूनाला फार आनंद झाला. तो आपली बंगालची मोहीम अर्धवट टाकून कर्मवतीच्या मदतीसाठी चितोडगडाकडे धावला. पण तो पोचण्यापूर्वीच गडावरील स्त्रियांनी जोहार केला होता.

मोगल काळात अनेक राजपूत मुली एखाद्या शूर तरुणाला राखी बांधून स्वतःला भाऊ मिळवीत आणि संकटप्रसंगी त्यांची मदत घेत. असे भाऊ प्रसंगी आपल्या बहिणींसाठी प्राण द्यायलाही मागेपुढे पाहत नसत, अशी उदाहरणे घडली आहेत.

भावा–बहिणींच्या परस्पर प्रेमाचे प्रतीक असलेला दुसरा सण म्हणजे भाऊबीज. त्या दिवशी बहीण भावाला आपल्या घरी जेवायला बोलावते आणि त्याला ओवाळते. त्या प्रसंगी तो भाऊ तिला ओवाळणी म्हणून द्रव्य, वस्त्र किंवा एखादी वस्तू प्रेमाने देतो.

प्राचीन काळातील श्रीकृष्ण आणि सुभद्रा ही दोघे बहीण भावांच्या प्रेमाचा आदर्श मानली गेली आहेत. श्रीकृष्ण व द्रौपदी यांचे भावाबहिणींचे नाते तर सुभद्रेपेक्षाही मधुर आणि घनिष्ठ होते. श्रीकृष्ण द्रौपदीसाठी अनेक वेळा निजांगे कष्टला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक लोककथांत आणि लोकगीतांत भावाबहिणींच्या प्रेमाचे वर्णन केलेले आहे. सासरी गेलेल्या मुलीला तर आपल्या भावाबद्दल फारच ओढ वाटते. तिला माहेरी नेण्यासाठी तोच मूळ घेऊन येतो. त्यासाठी ती त्याची उत्कंठेने वाट पाहत असते. सासरी जो काही जाच ती मुकाट्याने सहन करीत असते, त्याचा पाढा भावापुढे वाचून तिला आपले मन मोकळे करायचे असते. आपले दुःख ती फक्त त्यालाच सांगू शकते. अशीच एक बहीण म्हणते—

ये रे ये रे भाऊ किती झाले दडपण।
कधी हृदय उघडीन तुझ्यापुढे ।।
ये रे ये रे भाऊ किती पहावी रे वाट।
पाण्याचा चाले पाट डोळ्यांतून ।।
जिवाच्या जीवना अमृताच्या सिंधू।
येई गा तू बंधू उठाउठी ।।
जिवाच्या जिवलगा प्रेमाच्या सागरा।
सुखाच्या माहेरा येई गा तू ।।

भावाबहिणींचे प्रेम व्यक्त करणाऱ्या अशा कितीतरी ओव्या सुशिक्षित–अशिक्षित स्त्रियांच्या मुखांत आढळतात. [हिं. प. मी.; वै. सा. ना.; स्त्रीजीवन]

भागवत तुळू

द. भारतातील एक जात. यांची वस्ती प्राधान्याने तमिळनाडू व केरळ प्रदेशांत आढळते. ही धंद्यावरून बनलेली जात असावी, कारण तमिळनाडूत यांना नट म्हणून ओळखतात. तिथे हे भागवत पुराणातील काही कथा नाट्यरूपाने करून दाखवितात. याशिवाय हे संगीत प्रवचनेही करतात. केरळात हे संगीतशिक्षकांचे काम करतात. [का. ट्रा. स. इं.; डि. सा. इं. म्यु. म्यु.]

भागवतधर्म

भागवत पुराणात सांगितलेला धर्म, भगवद्भक्तांचा धर्म आणि भगवंताने उपदेशिलेला धर्म, अशा प्रकारे या शब्दाच्या व्याख्या करता येतील. पण भगवंताने उपदेशिलेला धर्म हीच व्याख्या विषयविवेचनासाठी व्यवस्थित दिसते. या व्याख्येला पौराणिक आधारही आहे. भागवत पुराण (११·२·३४) म्हणते–

ये वै भगवता प्रोक्ता उपाया ह्यात्मलब्धये।
अञ्जः पुंसामविदुषां विद्धि भागवतान् हि तान् ।।

अर्थ – अज्ञ माणसांना सुलभपणे आत्मप्राप्ती व्हावी यासाठी भगवंताने जे उपाय सांगितले, त्यांना भागवतधर्म म्हणावे.

सामान्यपणे भगवद्भक्तांनी आचरलेला आणि भगवंताने उपदेशिलेला धर्म तो भागवतधर्म, अशी त्याची स्थूल व्याख्या समजावी. भागवतधर्माचा उपास्य भगवान हा आहे. आणि भगवान म्हणजे श्रीकृष्ण आहे, असे 'कृष्णस्तु भगवान् स्वयम्' या भागवतवचनात म्हटले आहे.

भगवंताच्या उपासकांना भागवत असे म्हणतात. त्यांच्या संप्रदायाचे व धर्माचेही नाव तेच आहे. मूळ पांचरात्र संप्रदायातून भागवतधर्मी संप्रदाय निर्माण झाला. पांचरात्र संज्ञेविषयी अनेक मते आहेत. महाभारताच्या मते चार वेद आणि सांख्ययोग ही जोडी म्हणजे पांचरात्र होय(शांति. ३३९. ११–१२). नारदमते ब्रह्म, मुक्ती, भोग, योग व संसार ही पाच मिळून पांचरात्र होते. (पांचरात्र पाहा.) या पांचरात्र मताचा नारायण हा उपास्य होता. पुढच्या काळात नारायण आणि विष्णू हे एकरूप झाले. नारायणीय उपनिषदात आणि त्यानंतर नारायण या नावाने विष्णूचाच उल्लेख होत असताना दिसतो. पुढे महाभारताच्या काळात विष्णू आणि वासुदेव कृष्ण हे एकरूप झाले. विष्णूची उपासना करणारा म्हणून या संप्रदायाला वैष्णव धर्म असेही म्हणतात.

सनपूर्व ६ वे शतक हा बुद्ध व महावीर यांचा काल होय. या दोघांनी पशुहिंसाप्रधान यज्ञाविरुद्ध बंड उभे केले. पण त्याच्याही आधी एक उपासनासंप्रदाय विकसित होऊ लागला होता आणि तो अहिंसाप्रधान असल्यामुळे त्यालाही यज्ञातली पशुहिंसा मान्य नव्हती. हा संप्रदाय सात्वत लोकांचा होता. सात्वत हे यादवांच्या वृष्णिकुलातले होते आणि त्यांनी आपल्याच कुलातल्या कृष्णाला भगवान मानून त्याची उपासना सुरू केली होती. हा संप्रदाय प्रारंभी सात्वतांपुरताच मर्यादित होता. या संप्रदायाने अहिंसातत्त्व स्वीकारले व त्याचाच आधार घेऊन पुढे ते वैदिक धर्माविरुद्ध उभे राहिले.

सनपूर्व चौथ्या शतकात निर्माण झालेल्या पाणिनीच्या अष्टाध्यायीत 'वासुदेवार्जुनाभ्यां वुन्' असे एक सूत्र आहे (४. ३. ९८). वासुदेवाचे उपासक ते वासुदेवक असा शब्द पाणिनीने मूळ शब्दाला 'क' प्रत्यय लावून बनवला आहे. त्यावरून पाणिनीच्या कालात वासुदेव कृष्णाची उपासना सात्वतकुलाच्या बाहेरही पसरली होती, असे कळते. पाणिनीचा वासुदेव शब्द कृष्ण परमात्मा या अर्थानेच घेतला पाहिजे, असे काशिकाकार व कैयट हे वैयाकरण म्हणतात. पतंजलीने आपल्या महाभाष्यात कंसवध व बलिबंधन या नाटकांचा उल्लेख केला आहे. त्यावरून कंसाचा वध करणारा वसुदेव पुत्र कृष्ण आणि बलीचे बंधन करणारा वामनरूप विष्णू या दोघांचे ऐक्य त्या काळी मान्य झाले होते, असे कळून येते. याशिवाय त्याच कालातली इतरही अनेक प्रमाणे साहित्य व पुरातत्त्व यांतून मिळतात.

जैनांच्या सलोक पुरुपात वासुदेव व बलदेव आहेत आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वासुदेवाचा अरिष्टनेमीशी नातेसंबंध निर्दिष्ट केलेला आहे. बौद्धांच्या जातकातल्या घट व महाउमग या कथांमध्ये वासुदेव कृष्णाची कथा सांगितलेली असून, चुल्लनिद्देस या ग्रंथात वासुदेवाची पूजा करणाऱ्या उपासकांचाही उल्लेख आढळतो. सनपूर्व २०० च्या काळात बेसनगर येथे होलिओडोरस या नावाच्या एका ग्रीक वकिलाने वासुदेवाच्या स्मरणार्थ गरुडस्तंभ निर्माण केला होता. होलिओडोरस हा स्वतःला भागवत समजे. सनपूर्व पहिल्या शतकातला एक शिलालेख नाणेघाटात सापडला आहे. त्यात अन्य देवतांच्या बरोबर संकर्षण व वासुदेव या देवांचाही उल्लेख आहे. चितोडगडाजवळच्या घोसुंडी या गावी याच काळातला एक शिलालेख मिळाला आहे. कण्ववंशी राजा सर्वतात याने अश्वमेघ यज्ञ केल्यावेळी संकर्षण व वासुदेव यांच्या मंदिरांसाठी पूजाशिलाप्राकार निर्माण केला, असा त्यात निर्देश आहे. त्याच कालात षोडाश नावाच्या एका महाक्षत्रपाने मथुरेत भगवान वासुदेवाचे मंदिर बनवले होते, असेही कळते. यावरून असे वाटते, की या संप्रदायाचे पहिले नाव वासुदेवधर्म असे असावे व गुप्तकालात त्याला भागवतधर्म हे नाव मिळाले असावे.

गुप्त सम्राट स्वतःला परमभागवत म्हणवीत होते. त्यांनी भागवत धर्माला बरेच प्रोत्साहन दिले. अहिंसा आणि अवतारवाद या दोन गोष्टी भागवतधर्माच्या अनुषंगानेच विस्तार पावल्या व पुराणांनी आपल्या वृद्धीच्या काळात त्या कल्पना उचलून धरल्या.

गुप्तसाम्राज्याच्या काळात उत्तर भारतात आणि त्याहून अधिक द. भारतात भागवतधर्माचा उत्कर्ष झाला. इ. स. च्या चौथ्या-पाचव्या शतकांपासून नवव्या शतकापर्यंत तमिळनाडमध्ये आळवार संतांची परंपरा अविच्छिन्न चालू होती. या आळवारांनी आपल्या पद्यरचनेच्या द्वारे विष्णूचे आणि त्याच्या भक्तीचे माहात्म्य वाढवले. त्यांच्या भक्तीत प्रपत्तीला म्हणजे शरणागतीला प्राधान्य होते. विष्णू आणि त्याचे राम व कृष्ण हे अवतार यांच्याविषयी आळवारांनी लोकांत असाधारण प्रेम उत्पन्न केले आणि भक्तिधर्म हा लोकधर्म बनविला.

पुढे आळवारांच्या या भक्तिभावपूर्ण वाङमयातून व्यवस्थित भक्तिदर्शन निर्माण करण्याचे काम इ. स. ९–१० या शतकांत अनेक आचार्यांनी केले व भक्तीला वैदिक पार्श्वभूमी मिळवून दिली. शंकरचार्यांच्या अद्वैतसिद्धान्ताचे भक्तीशी नाते जुळणे कठीण होते. कारण उपास्य व उपासक, किंवा पूज्य व पूजक असे द्वैत असल्यावाचून भक्ती सिद्ध होणे कठीण ! म्हणून रामानुजाचार्यांनी शंकराचार्यांच्या अद्वैताला विशिष्ट हे विशेषण जोडून वेगळे भागवतदर्शन उभे केले आणि भक्तीला दार्शनिक योग्यता मिळवून दिली. पांचरात्र मत हे भागवतधर्माचे उगमस्थान असल्याचे मानले असले, तरी शंकराचार्यांनी ते मत वेदबाह्य असल्याचे सांगून त्याचे खंडण केले. पण रामानुजाचार्यांनी अनेक प्रमाणे उपस्थित करून त्याचे वैदिकत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मध्वाचार्यांनी भागवतधर्माच्या प्रसारासाठी द्वैत मत प्रतिपादिले. गौडीय वैष्णव संप्रदाय ही मध्वमताचीच एक शाखा मानतात. त्या संप्रदायाने पूर्व भारतात भागवतधर्माचा प्रचार केला. अशा प्रकारे इ. स. च्या १३–१४ व्या शतकांपर्यंत दक्षिणेत भागवतधर्माने शास्त्रीय रूप धारण करून आपले महत्त्व वाढवले.

पण उत्तर भारतातील परिस्थिती याहून वेगळी होती. इ. स. च्या सहाव्या शतकानंतर भागवतधर्म त्या प्रदेशात खूपच क्षीण झाला. चौदाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत तो त्याच अवस्थेत होता. त्या कालात तिकडे स्मार्त वैदिक धर्म व बौद्ध धर्म यांची रस्सीखेच चालू होती. पुढे बौद्ध धर्माचा पुरता ऱ्हास झाल्यानंतर काही शतकांनी भागवतधर्म दक्षिणेतून उत्तरेत गेला. त्याला उत्तरेत नेण्याचे कार्य रामानंद नावाच्या सत्पुरुषाने केले. रामानंद हा विशिष्टाद्वैती होता. त्याने कृष्णाच्या जागी उपास्य म्हणून रामाची स्थापना केली आणि आपला वेगळाच संप्रदाय निर्माण केला. त्याच्या परंपरेत सगुण व निर्गुण असे दोन उपपंथ निर्माण झाले. त्यांपैकी सगुण भक्तीचा प्रतिनिधी तुलसीदास होता आणि निर्गुण भक्तीचा प्रतिनिधी कबीर होता. इ. स. च्या १४ व १५ या शतकांत कबीर, रैदास, इ. निर्गुणी संतांच्या प्रभावाने उ. प्रदेशात भक्तीचे माहात्म्य बरेच वाढले. पण पुढच्या शतकात वल्लभाचार्यांचा पुष्टिमार्ग, निंबार्काचार्यांचा सनकादी संप्रदाय, हितहरिवंशाचा राधावल्लभीय संप्रदाय, हरिदासाचा हरिदासी संप्रदाय व चैतन्याचा गौडीय संप्रदाय यांनी कृष्णभक्तीवर आणि त्याच्या सगुण रूपावर विशेष भर देऊन आपापल्या शिष्य-परंपरेने समस्त उ. भारतात कृष्णभक्तीचा जयजयकार केला.

बहुतेक सर्व भागवतसंप्रदायांनी भागवत पुराणाला आपला आधार किंवा प्रमाणग्रंथ मानले आहे. भागवत पुराणातील पुढील श्लोक त्याच्या औदार्याविषयी स्पष्ट परिचय देईल—

किरातहूणान्ध्रपुलिन्दपुल्कसा आभीरकङ्का यवनाः खशादयः ।
येऽन्ये च पापा यदुपाश्रयाश्रयाः शुध्यन्ति तस्मै प्रभविष्णवे नमः ।।

(भाग. पु. २·४·१८)

अर्थ— किरात, हूण, आंध्र, पुलिंद, पुल्कस, आभीर, कंक, यवन, खश, इ. (जंगली व विधर्मी) लोक आणि दुसरे पापी जन ज्या भगवंताच्या आश्रयाला आलेल्या भक्तांचा आश्रय करून शुद्ध होतात, त्या प्रभावशाली भगवंताला नमस्कार असो.

हेच औदार्य व हीच सहिष्णुता भागवतधर्माने स्वीकारली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. भागवतधर्मात अहिंसेला अग्रगण्य स्थान आहे. भागवत लोक वैदिक यज्ञयागांच्या विरुद्ध नाहीत. पण त्या यज्ञात जी पशुहिंसा होते, तिला त्यांचा विरोध आहे. महाभारतातल्या नारायणीय आख्यानात उपरिचरवसूची कथा दिलेली आहे. त्या राजाने अश्वमेध केला; पण त्यात पशुहनन किंवा बलिदान केले नाही (म. भा. शांति. ३३६). तेव्हापासून 'मा हिंस्यात् सर्वाभूतानि' हे श्रुतिवाक्य भागवत धर्माने शिरोधार्य मानले आहे.

भागवत पुराणाचे जे सिद्धान्त तेच भागवतधर्माचे सिद्धान्त होत. भागवत पुराणात म्हटले आहे की, अद्वैत ज्ञान हे परमार्थतः एकच आहे. ज्ञानी त्याला ब्रह्म म्हणतात, योगी परमात्मा म्हणतात व भक्त भगवान म्हणतात (१.२.११). भेद आहे तो उपासकांच्या दृष्टीत आणि उपासनेच्या तारतम्यात. षड्गुणैश्वर्यसंपन्नता ही भगवंताची शक्ती आहे. ती अनेक प्रकारची तर आहेच; त्याचबरोबर ती अचिंत्यही आहे. तिच्यामुळेच भगवान एक असूनही अनेक रूपांनी प्रतीत होतो. तो आश्रयशून्य, अगुण, अशरीर असूनही, आपल्या शक्तीच्या साहाय्याने या सगुण सृष्टीचे उत्पत्तिस्थितिसंहार करतो. हे व्यापार करूनही त्याच्या ठिकाणी विकार उत्पन्न होत नाहीत.

भगवंताचे स्वरूप तीन प्रकारांनी प्रतीत होते – (१) स्वयंरूप (२) तदेकात्मरूप व (३) आवेशरूप. या तिहींत स्वयंरूप हे मुख्य होय. सच्चिदानंदविग्रह, सौंदर्यनिकेतन, नयनाभिराम असा सगुण परमात्मा भक्ताला स्वयंरूपातच दृष्टिगोचर होतो. तदेकात्मरूप हे स्वयंरूपाशी एकता दाखवीत असले, तरी आकृती, चरित्र, इत्यादींच्या योगे ते स्वयंरूपाहून भिन्न होते. आवेशरूपात भगवान जीवांच्या ठिकाणी न्यूनाधिक रूपाने आपल्या शक्तीचे आधान करतो. हे रूप सर्वांत लहान असते.

भगवत्प्राप्तीचा एकमात्र उपाय म्हणजे भक्ती, असा भागवतधर्माचा सिद्धान्त आहे. ही भक्ती मुक्तीहूनही वरिष्ठ आहे. इतर आध्यात्मिक लोक मुक्ती हे जीवनाचे साध्य मानतात, पण भक्तांच्या दृष्टीने मुक्ती ही कःपदार्थ आहे. भगवान मुक्ती देण्यासाठी पुढे उभा राहिला, तरी त्याचे एकांत भक्त ती घेण्यासाठी पुढे होत नाहीत. त्यांना परमात्म्याची चरणसेवा हीच मुक्तीपेक्षाही मोलाची वाटते. भगवंताची कृपा हेच भक्तीचे साधन होय. मुक्तीपेक्षा भक्ती श्रेष्ठ या गोष्टीत एक रहस्य आहे. ज्ञानाच्या द्वारे जो ब्रह्मानंद लाभतो, त्यापेक्षा भक्तीतले प्रेम अधिक उच्च आणि आस्वादनीय असते. कारण ब्रह्मानंद हा रस नसून, भक्ती हा मात्र रस आहे. भगवंताच्या प्रेमातच तल्लीन होऊन राहणे, या गोष्टीला रागानुगा भक्ती म्हणतात. भागवतधर्माने या भक्तीला प्राधान्य दिले आहे.

भागवताच्या अकराव्या स्कंधात कवी, हरी, अंतरिक्ष, इ. नव-योग्यांनी भागवतधर्माचे विवरण केले आहे. त्यापुढे भगवंतानेही उद्धवाला तो साररूपाने सांगितला आहे. ते साररूप असे –

सर्व कर्मे परमेश्वरासाठी करावी. परमेश्वराच्या ठिकाणी मन जडवावे. साधूंनी वास्तव्य केलेल्या पुण्यक्षेत्रात राहावे. भगवद्भक्तांच्या आचारांचे अनुसरण करावे. सर्व भूतांच्या ठिकाणी व आत्मस्वरूपातही भगवंताचे दर्शन घ्यावे. 'सर्वं विष्णुमयं जगत्' ही भावना जोपासावी. कायावाचामने निष्ठापूर्वक भगवंताची उपासना करावी. सर्व कर्मे परमेश्वरार्पण करावी.

भगवान म्हणतो, हे उद्धवा ! हे भागवत धर्म ब्रह्मप्राप्तीला कारणीभूत होतात. त्यांनी भक्त कर्मातीत होऊन सायुज्य मुक्तीचा अधिकारी बनतो. पाहा – भक्ती. [वै. ध.; भा. सं.; पौ. भा. ध,; हिं. सा. को.; हिं. वि. को. ; ना. भा. ध.]

भागवत पुराण

एक महापुराण. बहुतेक पुराणांनी याला पाचवे पुराण मानले असले, तरी सर्व पुराणांचे हे सारभूत असल्यामुळे, पद्म पुराणाने मात्र याला शेवटचे अर्थात अठरावे पुराण मानले आहे. यात कृष्ण अर्थात विष्णू याची भक्ती प्रतिपादित असल्यामुळे याला सात्त्विक पुराण समजतात. हे व्यासांनी रचले व आपला पुत्र शुक याला निवेदिले. शुकाने ते परीक्षिती राजाला सांगितले. तिथून त्याचा जनांत प्रसार झाला. सर्व पुराणांत भागवत पुराण हे रस, भाव आणि भाषा या तीन्ही दृष्टींनी सुंदर आहे. याच्या निर्मितीविषयी एक कथा सांगितली आहे, ती अशी –

व्यास महर्षी एकदा सरस्वतीच्या तीरावर आपल्या आश्रमात खिन्नपणे बसले असता नारद त्या ठिकाणी प्राप्त झाला. व्यासांची खिन्नता दृष्टीस पडताच त्याने व्यासांना तिचे कारण विचारले. त्यावर व्यास म्हणाले. 'मी पुराणे रचली, भारत रचले आणि त्या द्वारे चतुर्विध पुरुषार्थांचे प्रतिपादन केले. पण एवढे करूनही अजून माझ्या आत्म्याला शांतीचा लाभ होत नाही, म्हणून मी खिन्न आहे.' नारदाने त्यावर क्षणभर विचार करून व्यासांना म्हटले. 'महर्षे, तुम्ही प्रचंड वाङ्मय निर्माण करून त्याद्वारे अनेक शास्त्रांचा ऊहापोह केलात हे खरे; पण तुमच्याकडून भगवंताचे भक्तियुक्त गुणगान अजून झाले नाही. तुम्ही ज्ञानमहिमा सांगितला; पण भक्तीचा महिमा सांगितला नाही. तशी एखादी काव्यकृती निर्माण करा. त्यायोगे तुमचा आत्मा शांत आणि समाहित होईल.' व्यास महर्षींना हा उपदेश पटला आणि त्यांनी मग भक्तिरसप्रधान भागवत पुराण रचले. या पुराणाच्या निर्मितीने ते शांत व कृतार्थ झाले.

प्रस्तुत पुराणातील पहिला श्लोक (१.१.१) असा–

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट्

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः ।।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ।।

अर्थ – या जगताचे उत्पत्ति-स्थिति-संहार ज्याच्यापासून होतात, त्याचप्रमाणे आकाशादी कार्यांच्या ठिकाणी अन्वय रूपाने (मण्यांच्या ठिकाणी सूत्र असते त्याप्रमाणे) व आकाशपुष्प, शशशृंग, इ. ठिकाणी व्यतिरेकाने (मण्याहून सूत्र भिन्न असते त्याप्रमाणे) जो आहे, किंवा मृत्तिका, सुवर्ण, इ. प्रमाणे जो कारणरूप व घट, कुंडल, इ. प्रमाणे जो कार्यरूप आहे, जो सर्वज्ञ म्हणजे स्वतः सिद्धज्ञानरूप आहे, ज्या वेदाच्या ठिकाणी ज्ञानी लोकही मोह पावतात, तो वेद ज्याने ब्रह्मदेवाला मनानेच प्रकाशित केला, त्याचप्रमाणे सूर्यकिरणरूप तेजाच्या ठिकाणी जशी मृगजलबुद्धी, काचेप्रमाणे असलेल्या मृत्तिकेच्या ठिकाणी जशी जलबुद्धी आणि नितळ जलाच्या ठिकाणी जशी काचबुद्धी, या गोष्टी असत्य असूनही अधिष्ठानाच्या सत्यत्वामुळे सत्य म्हणून प्रतीत होतात, त्याचप्रमाणे ज्या सत्यरूप परमेश्वराच्या ठिकाणी देहेंद्रिय देवतारूप, तसेच सत्त्व–रज–तमोगुणात्मक सृष्टी सत्यवत प्रतीत होते, अशा व आत्मतेजाने मायाकपट निरस्त करणाऱ्या सत्यस्वरूप परमेश्वराचे आम्ही ध्यान करतो.

भागवताचे विषय कोणते व त्यांचे स्वरूप काय, या विषयी त्या ग्रंथातच पुढीलप्रमाणे सांगितले (२.१०.१) आहे –

अत्र सर्गो विसर्गश्च स्थानं पोषणमूतयः ।
मन्वन्तरेशानुकथा निरोधो मुक्तिराश्रयः ।।

अर्थ – सर्ग, विसर्ग, स्थान, पोषण, ऊती, मन्वंतरे, ईशकथा, निरोध, मुक्ती व आश्रय हे भागवताचे विषय होत.

यांचे क्रमाने स्पष्टीकरण असे –

(१) सर्ग – पंचमहाभूते, पंचतन्मात्रे, पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, अहंकार, बुद्धी, इ. वस्तूंची उत्पत्ती म्हणजे सर्ग होय. याला प्राकृतिक सर्ग म्हणतात. प्रस्तुत पुराणात हा सर्ग विस्ताराने सांगितलेला आहे.

(२) विसर्ग – सत्त्व, रज व तम यांच्या न्यूनाधिक्यामुळे विराट पुरुषाने उत्पन्न केलेली स्थावरजंगमात्मक सृष्टी म्हणजे विसर्ग होय. या सृष्टीला वैकृतिक सृष्टी असे म्हणतात. या सृष्टीत वनस्पती, पशू, पक्षी, सरपटणारे प्राणी, मनुष्य, राक्षस, गंधर्व, पिशाच, इ. सर्व प्रकारच्या स्थावरजंगम वस्तूंचा आणि योनींचा अंतर्भाव होतो.

(३) स्थान – सृष्टीच्या उत्पत्तीनंतर त्या सृष्टीचा अनुल्लंघ्य अशा ईशसत्तात्मक नियमांनी उत्कर्ष होणे.

(४) पोषण – ऋत व सत्य या नियमांचे उल्लंघन न करता जे पुरुष परमेश्वराचीच भक्ती करतात, त्या भक्तांवर अनुग्रह करून त्यांचे संगोपन करणे. अशा प्रकारच्या अनेक कथा भागवतात आल्या आहेत.

(५) ऊती – कर्म-वासनांना ऊती असे म्हणतात. मागच्या बीजभूत कर्मांनी सृष्टीचा उदय होतो. पुढे ही कर्मपरंपरा अव्याहत सुरू राहते. कर्माने फल, फलाने वासना, वासनेने जन्म व जन्मात पुनश्च कर्म हे रहाटगाडगे सृष्टीत अव्याहत चाललेले आहे. याविषयीचे वर्णन भागवतात पुष्कळ ठिकाणी सविस्तर आलेले आहे.

(६) मन्वंतरे – सृष्टी ज्या नियमांनी चालायची, त्या नियमांच्या अधिष्ठात्री देवता असतात. त्यांना मनू म्हणतात. हे मनू आपापल्या कारकीर्दीत सद्धर्माचे पालन करतात व प्रजेलाही करायला लावतात. या मन्वंतरांचे वर्णन भागवतात सविस्तर आलेले आहे.

(७) ईशकथा – सृष्टिनियमांचा व्यापार सृष्टीत अव्याहत चालू असला, तरी त्यात कित्येक वेळी खंड पडतो किंवा विकृती निर्माण होते. अशा प्रसंगी निर्गुण परमात्म्याला सगुण रूपाने भूतलावर अवतार घ्यावे लागतात. अशा अवतारांच्या कथांनी भागवताचा बराच भाग व्यापलेला आहे. मुख्य अवतार म्हणजे श्रीकृष्ण होय. त्याचे वर्णन भागवतात विशेषरूपाने आणि प्रभावी पद्धतीने केलेले आहे.

(८) निरोध – याला प्रलय असेही म्हणतात. परमेश्वर आपल्या योगनिद्रेत शांत झाला म्हणजे जीव आपापल्या शक्तीसह त्याच्या ठिकाणी लीन होतात, त्याला निरोध असे म्हटले आहे. या निरोधाचे अर्थात प्रलयाचे वर्णन भागवताच्या बाराव्या स्कंधात आलेले आहे.

(९) मुक्ती – अपरोक्ष ज्ञानाने अज्ञानाचा लय होतो व भेदप्रतीती पूर्णपणे नष्ट होते. मग जीव स्वतःला आपल्या मूळ सच्चिदानंद रूपात पाहतो. याचेच नाव मुक्ती. हा परम पुरुषार्थ असून, त्याची सिद्धी हेच भागवताचे ध्येय आहे.

(१०) आश्रय – आश्रय म्हणजे परब्रह्म होय. सर्गविसर्गापासून मुक्तीपर्यंत सर्व मायावी देखावे परब्रह्मस्वरूपावरच दिसत असतात. अर्थात तेच सर्वांना आश्रय असते.

भागवतपरिचय – याचे बारा स्कंध असून श्लोकसंख्या सुमारे १८ हजार आहे. दहावा स्कंध पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन विभागांत असून, तो सर्वांत मोठा व बारावा स्कंध सर्वांत लहान आहे. भागवताचा स्कंधवारीने परिचय असा–

प्रथम स्कंध – व्यास व नारद यांची भेट. नारदाकडून व्यासाला भागवतसंहिता रचण्याचा आदेश. नारदाचे चरित्र. परीक्षिताचा जन्म. अश्वत्थाम्याच्या अस्त्रापासून कृष्णाने केलेले परीक्षिताचे रक्षण. युधिष्ठिराच्या राज्याभिषेकानंतर श्रीकृष्णाचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

द्वारकेत गमन. द्वारकेचे वर्णन. परीक्षिताला राज्याभिषेक. श्रीकृष्णाचे निर्याण. पांडवांचे महाप्रस्थान. परीक्षिताचा दिग्विजय. परीक्षित मृगयेसाठी वनात गेला असता शमीक नामक ऋषीच्या कंठात मृतसर्प अडकवतो. त्याचा पुत्र शृंगी शाप देतो, की ज्याने कोणी हे निंद्य कृत्य केले असेल, त्याला आजपासून सातव्या दिवशी तक्षक दंश करील व तो मरेल. ही वार्ता परीक्षिताला कळल्यानंतर तो आपला पुत्र जनमेजय याच्यावर राज्यभार सोपवून गंगातीरी जातो व तिथे प्रायोपवेशनाला बसतो. नंतर थोडयाच वेळात व्यासपुत्र शुक त्या ठिकाणी उपस्थित होतो.

द्वितीय स्कंध – शुकाचार्य भागवत कथेचा उपक्रम करताना प्रथम विश्वाची उत्पत्ति-स्थिती परीक्षिताला सांगतो. पुराणलक्षण. योगवर्णन. ब्रह्मदेवाने सृष्टी उत्पन्न केली ती कथा. वराह अवतारापासून कृष्णावतारापर्यंत सर्व अवतारांचे थोडक्यात वर्णन. चतुःश्लोकी भागवताचा परीक्षिताला उपदेश.

तृतीय स्कंध – उद्धवाला झालेला श्रीकृष्णविरह. विदुर–मैत्रेय संवाद. ब्रह्मकृत विष्णुस्तुती. कल्प, युग, इत्यादींचे कालमान. स्वायंभुव मनू व शतरूपा यांची उत्पत्ती. यज्ञवराहाचा जन्म. वैकुंठस्थित जय-विजय यांना सनत्कुमारांचा शाप. तेच दोघे हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू या नावाने दैत्य कुलात जन्म घेतात. त्यांचा दिग्विजय. हिरण्याक्ष व यज्ञवराह यांचे युद्ध. हिरण्याक्षाचा वध. पृथ्वीचा उद्धार. स्वायंभुव मनूच्या वंशाचे वर्णन. कपिलाचा जन्म. कपिल मुनी आपल्या देवहूती नामक मातेला सांख्यशास्त्राचा उपदेश करतो.

चतुर्थ स्कंध – दक्षयज्ञ व सतीचा देहत्याग. शिव वीरभद्राची उत्पत्ती करतो. वीरभद्र दक्षयज्ञाचा विध्वंस करून दक्षाचा वध करतो. दक्षाचा पुनर्जन्म. ध्रुवाची कथा. वेन राजाची कथा. वेनाच्या दक्षिण बाहूपासून पृथूचा जन्म. पृथू पृथ्वीला समतल करतो व सर्व लोक तिचे दोहन करतात. सनत्कुमार पृथूला ज्ञानोपदेश करतो. दहा प्रचेतसांचा जन्म. रुद्रगीत. पुरंजनोपाख्यान.

पंचम स्कंध – प्रियव्रताच्या वंशाचे वर्णन. ऋषभावतार. ऋषभचरित्र व त्याचा अग्निप्रवेश. भरताची कथा. भरतवंशाचे वर्णन. मेरू पर्वताचे वर्णन. भरत खंडाचे वर्णन व श्रेष्ठत्व. ग्रहांची गती. ज्योतिश्चक्र. पातालादी लोक; नरकगती, इत्यादींचे वर्णन.

षष्ठ स्कंध – अजामिलाचे आख्यान. त्याचे स्वर्गगमन. नारदाला दक्षाचा शाप. दक्षवंशात विश्वरूपाचा जन्म. बृहस्पतीने टाकलेले देव विश्वरूपाला पुरोहित म्हणून वरतात. इंद्रकृत विश्वरूपवध. वृत्रासुराची उत्पत्ती. इंद्र–वृत्रयुद्ध. दधीचीचा आत्मत्याग. त्याच्या अस्थींचे वज्र बनवून इंद्र वृत्रासुराला मारतो. इंद्राला ब्रह्महत्या लागते. इंद्राने आपले पुत्र मारले, हे पाहून दिती क्रुद्ध होते व कश्यपाकडे ‘ इंद्राचा वध करणारा पुत्र आपल्या पोटी जन्माला येवो ’ असा वर मागते. तिच्या पोटी मरुद्गण जन्माला येतात. ते इंद्राचे मित्र होतात.

सप्तम स्कंध – हिरण्यकश्यपूची कथा. ब्रह्मदेवाकडून त्याला वरदान. हिरण्यकश्यपू त्रैलोक्य जिंकून देवांना पीडा देऊ लागतो. तो विष्णूला आपला शत्रू मानतो. त्याचा पुत्र प्रल्हाद. तो विष्णूची भक्ती करतो. हिरण्यकश्यपू प्रल्हादाला मारण्याचे अनेक उपाय योजतो. मग त्याच्या रक्षणासाठी विष्णू नरसिंहरूपाने अवतारतो व हिरण्यकश्यपूला ठार मारतो. शिवकृत त्रिपुरवधाची कथा. आश्रमधर्मवर्णन. अवधूतांचा धर्म व त्यांची सिद्धावस्था यांचे वर्णन.

अष्टम स्कंध – यज्ञावतार. चार मन्वंतरांचे वर्णन. विष्णूने केलेल्या गजेंद्रमोक्षाची कथा. देव–दैत्यांकडून समुद्रमंथन. दैत्यांनी पळविलेले अमृत परत मिळविण्यासाठी विष्णूचा मोहिनीरूपाने अवतार. देव-दैत्यांचे युद्ध. बलिराजाची कथा. वामनाचा जन्म. बलीकडून वामनाला त्रिपादभूमीचे दान. नागपाशांनी बलिबंधन. बलीन्ची सुतलात स्थापना. विष्णू तिथे त्याचा द्वारपाल बनून राहतो. मत्स्यावतारकथा.

नवम स्कंध – सूर्य व सोम या वंशांचे वर्णन. पुरूरव्याची उत्पत्ती. मनूच्या दहा पुत्रांची कथा. शर्याती व सुकन्या यांचे आख्यान. अंबरीषाची कथा. मांधात्याचे आख्यान. हरिश्चंद्राची कथा. भगीरथकृत गंगावतरण. सगरपुत्रांचा उद्धार. संक्षेपाने रामावतारवर्णन. जनकादी राजांचे वर्णन. विश्वामित्राची कथा. परशुरामाने केलेले क्षत्रियसंहार. ययातीचे आख्यान. पुरुवंशकथन. दुष्यंतशकुंतला यचे आख्यान. दुष्यंतपुत्र भरताची कथा. दिवोदासवंशवर्णन.

दशम स्कंध – वसुदेव-देवकी यांचा विवाह. कंस त्या दोघांना बंदीत टाकतो. तिथे देवकीच्या उदरी कृष्णाचा जन्म. वसुदेव कृष्णाला गोकुळास नेतो. गोकुळात महोत्सव. कृष्णाच्या बाललीला. कृष्णकृत अनेक दैत्यांचा वध. कालियमर्दन. गोपीवस्त्रहरण. यज्ञपत्न्यांवर अनुग्रह. गोवर्धनमहोत्सव. कृष्णाची गोपींसह रासक्रीडा. अक्रूर कंसाच्या आज्ञेने गोकुळात येतो व रामकृष्णांना मथुरेत घेऊन जातो. तिथे कृष्ण प्रथम चाणूराचा व मग कंसाचा वध करतो. कंसपिता उग्रसेन याला राज्याभिषेक. श्रीकृष्णाचा गुरुगृहवास. उद्धवकृत गोपीसांत्वन. जरासंधाचे मथुरेवर आक्रमण. कृष्ण पश्चिम सागरात द्वारकेची निर्मिती करून सर्व यादवांना मथुरेहून तिथे नेतो. श्रीकृष्णाचे रुक्मिणी, सत्यभामा, इ. आठ कन्यांशी विवाह. भौमाचा वध करून त्याच्या बंदीत असलेल्या सोळा हजार कुमारिकांचे श्रीकृष्ण पाणिग्रहण करतो. उषा-अनिरुद्धविवाह. युधिष्ठिराला राजसूय यज्ञाचा आदेश. कृष्णाचे इंद्रप्रस्थात गमन. भीमाच्या हस्ते जरासंधाचा वध. राजसूयवर्णन. अग्रपूजेच्या प्रसंगाने शिशुपालाचा वध.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुदाम्याचे आख्यान. ग्रहणयात्रेच्या निमित्ताने कृष्ण यादवांसह कुरुक्षेत्रात जातो. तिथे नंद–यशोदा व गोप–गोपी यांची भेट. कृष्ण त्या सर्वांना आत्मज्ञानाचा उपदेश करतो.

सांगड घातली आहे. त्यात कर्माला हीन मानले नाही, नरदेह निंद्य गणला नाही, प्रपंच वर्ज्य मानला नाही. या पुराणात आचांडाल सर्वांना भक्तीचे अधिकारी बनविले आहे. गंभीर तत्त्वज्ञान

गोवर्धनधारी कृष्ण

एकादश स्कंध – ऋषींच्या शापाने यदुकुलाचा क्षय. नारदाकडून वसुदेवाला भागवत धर्माचा उपदेश. श्रीकृष्णाकडून उद्धवाला भक्तियोगाचा व आत्मज्ञानाचा उपदेश. श्रीकृष्णाचे निर्याण. वसुदेवादी मंडळीचा देहत्याग.

द्वादश स्कंध – भविष्यकालीन राजवर्णन. प्रलयवर्णन. व्यासकृत वेदत्रयशाखाविभाग. मार्कंडेयकथा. भागवतातल्या विषयांचे यथाक्रम संक्षेपाने वर्णन. अशा प्रकारे भागवत सांगून शुक परीक्षिताचा निरोप घेतो. परीक्षिताला तक्षकदंश. त्याचा मृत्यू. जनमेजयाचा सर्पयज्ञ. बृहस्पतीच्या उपदेशाने सर्पयज्ञाची समाप्ती.

भागवताचे महत्त्व—भागवत पुराण हे संस्कृत साहित्यातले एक अनमोल रत्न आहे. पुराणवाङ्मयात लोकप्रियतेच्या दृष्टीने ते अद्वितीय आहे. गीतेनंतर एवढा सर्वमान्य ग्रंथ संस्कृत भाषेत झाला नाही. गेली कित्येक शतके भारतीय जीवनावर प्रस्तुत पुराणाचा विलक्षण प्रभाव आहे. यात काव्य आहे, विविध कथा आहेत आणि तत्त्वज्ञानही आहे. बाल कृष्णाच्या बाललीला आणि प्रौढ कृष्णाच्या पराक्रमकथा यात आहेत. योगेश्वर कृष्णाने उद्धवाला केलेला तत्त्वोपदेशही आहे. भक्तीचे तर ते सारसर्वस्वच आहे. त्यात भक्तीची कर्म व ज्ञान यांच्याशी उत्तम

सांगत असूनही, हे पुराण रसभावफुली फुलून राहिले आहे म्हणूनच वल्लभाचार्यांनी त्याला व्यासांची समाधिभाषा असे म्हटले आहे. फर्कुहर नावाचा एक पाश्चात्य पंडित म्हणतो –

हा ग्रंथ फार मोलाचा आहे. पूर्वीच्या ग्रंथकरांनी सांगितलेल्या भक्तीपेक्षा नव्या प्रकारची भक्ती भागवतात आली आहे. काही विचार तर अध्यात्म आणि भक्ती यांच्या क्षेत्रात अत्यंत उच्च आहेत. भागवतातील अशा विचारांचा अभ्यास केला की वाटते, जिवंत धार्मिक अनुभवांचा तो आविष्कार आहे.

भागवतातच भागवताचे जे वर्णन आले आहे, ते अत्यंत काव्यमय आणि भावपूर्ण आहे. तो श्लोक (१·१·३) असा–

निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ।
पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः ।।

अर्थ– वेदरूप कल्पवृक्षाचे हे अमृतद्रवयुक्त असे फल शुकमुखातून खाली गळले आहे. भूमीवरचे रसिकहो, भाविकहो, तुम्ही याचा वारंवार जीवनाच्या अखेरीपर्यंत आस्वाद घ्या.

वेदान्तदृष्टयाही या पुराणाला फार महत्त्व आहे. याविषयी भागवतातलाच एक श्लोक असा (१२·१३·१५) –

सर्ववेदान्तसारं हि श्रीभागवतमिष्यते ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तद्रसामृततृप्तस्य नान्यत्र स्याद्रतिः क्वचित् ॥

अर्थ– श्रीभागवत हे सर्व वेदान्ताचे सार आहे, असे म्हणणे इष्ट आहे. त्याच्या रसामृताने जो तृप्त झाला, त्याला अन्यत्र (कोणत्याही ग्रंथाच्या ठिकाणी) प्रेम वाटणार नाही.

अध्यात्माचे प्रतिपादन करणारे ग्रंथ थोडेथोडके नाहीत. पण भागवतासारखा बहुजनसमाजाला गोडी लावणारा वेदान्त-प्रतिपादक ग्रंथ विरळाच! वेदान्त हा सामान्यजनांना रुक्ष वाटणारा विषय होय. पण तोच भागवतात अनेक कथानकांनी व कल्पनारम्य रूपकांनी अत्यंत मनोरम केलेला आहे. वेदान्तातली तत्त्वे समाजाने कशा रीतीने आचरणात आणावी, तो मार्गही या ग्रंथात दाखवलेला आहे. मोक्ष या परम पुरुषार्थाचे ध्येय क्षणभरही न विसरणारे जर कोणते पुराण असेल तर ते भागवत पुराण हेच होय. म्हणूनच पद्म पुराणात गौतम अंबरीषाला म्हणतो –

अम्बरीष शुकप्रोक्तं नित्यं भागवतं शृणु ।
पठस्व स्वमुखेनापि यदीच्छसि भवक्षयम् ॥

अर्थ – हे अंबरीषा,! शुकाचार्यांनी सांगितलेले भागवत तू नित्य श्रवण करीत जा. तुला भवबंधातून मुक्त व्हायचे असेल, तर स्वमुखाने त्याचा पाठ करीत जा.

भागवत संहिता भवपाशातून जीवांना मुक्त करण्यासाठीच निर्माण झाली, असे भागवतातही सांगितले आहे (१.७.६–७).

अनर्थोपशमं साक्षाद्भक्तियोगमधोक्षजे ।
लोकस्याजानतो विद्वांश्चक्रे सात्वतसंहिताम् ॥
यस्यां वै श्रूयमाणायां कृष्णे परमपूरुषे ।
भक्तिरुत्पद्यते पुंसः शोकमोहभयापहा ॥

अर्थ – प्रपंचाच्या पाशातून आपली सुटका कशी करून घ्यावी व श्रीहरीची भक्ती कशी प्राप्त करून घ्यावी, हे अज्ञानी लोकांना कळत नसल्यामुळे ते समजावून देण्यासाठी विद्वान व्यासांनी ही सात्वतसंहिता (भागवतसंहिता) निर्माण केली. या संहितेच्या श्रवणाने श्रीहरीच्या ठिकाणी भक्ती उत्पन्न होऊन संसारातील शोक, मोह व भय हे नाहीसे होतात.

भक्ती हे साधन आणि भगवंताशी अद्वैत हे साध्य यांवर सतत दृष्टी ठेवूनच भागवताने आपला प्रपंच केला आहे.

भागवत हे अद्वैत वेदान्ताचे शास्त्र आहे, हे वर सांगितले. भागवतातील हा सर्व वेदान्त सांख्यशास्त्राच्या पायावर उभारला गेला आहे. भागवतात जिथे जिथे परमेश्वराची स्तुती अथवा ज्ञानोपदेश असतो, तिथे तिथे सांख्यशास्त्रातील प्रमेयांचाच प्रमुखत्वाने निर्देश होत असतो. दुसऱ्या स्कंधात नारदाला जगदुत्पत्तीची प्रक्रिया सांगताना ब्रह्मदेवाने व परीक्षिताला ब्रह्मांडवर्णन ऐकवताना शुकाने सांख्यशास्त्राचाच आधार घेतला आहे. तिसऱ्या स्कंधात सांख्यशास्त्रकर्ता कपिल मुनी याच्या मुखानेच देवभूतीला या शास्त्राचा बोध करण्यात आलेला आहे (२५–३०). अकरावा स्कंध हा तर केवळ ज्ञानपर आहे. त्याच्या बावीस व चौवीस या दोन अध्यायांत सांख्यशास्त्र बऱ्याच विस्ताराने सांगितलेले आहे.

सांख्यशास्त्रात मायेला प्रकृती व आत्म्याला पुरुष म्हणतात. पंचेन्द्रिये, पंचतन्मात्रे, महत्, अहंकार, इ. परिभाषा सांख्यशास्त्रातलीच आहे. भागवतात सर्वत्र हीच परिभाषा वापरलेली आहे. (४.२४; ८.१६)

भागवत हे अद्वैतसिद्धान्ताचे प्रतिपादक आहे. पण भागवतावरच्या रामानुजपंथी व माध्वपंथी टीकांत भागवत हे विशिष्टाद्वैत व द्वैत सांगणारे आहे, असे प्रतिपादिले आहे. कोणत्याही टीकेचा आधार न घेता जो भागवत वाचील, त्याला मात्र त्या ग्रंथात केवळ अद्वैतच दिसून येईल, यात तिळमात्र संदेह नाही. भक्तीला द्वैताची आवश्यकता असते हे खरे; पण साधकदशेत भासत असलेले द्वैत सिद्धदशेत नाहीसे होते, हे लक्षात घेतले म्हणजे द्वैत-अद्वैत यांची संगती चांगली जुळते.

भूत, भविष्य आणि वर्तमान असे जे, ते सर्व पुरुषच होय, असे भागवतात म्हटले आहे (२६.१५). त्याचप्रमाणे चतुःश्लोकी भागवतही अद्वैतपरच आहे. 'सर्वं विष्णुमयं जगत्' हेच भागवतधर्माचे रहस्य आहे.

भागवतात विष्णू किंवा कृष्ण यांचे माहात्म्य प्राधान्याने वर्णिलेले असले, तरी इतर देवतांची निंदा केलेली नाही. इतकेच नव्हे; तर सर्व देवता या विष्णुमयच आहेत, त्यांच्यांत कोणी भेद करू नये, असे स्पष्ट म्हटले आहे (४.७.५०–५४).

आधुनिक पंडितांच्या मते मायावाद हा प्रथम शंकराचार्यांनी उपस्थित केला. अर्थात मायावादाला व्यवस्थित व विस्तृत स्वरूप देऊन त्याला वेदान्तशास्त्राचे प्रधान अंग बनवण्याचे श्रेय शंकराचार्यांनाच आहे. पण भागवतग्रंथ शंकराचार्यांच्याही आधी कित्येक शतके अस्तित्वात होता. त्याने मायावादाचा स्वीकार जेवढ्या व्यापक प्रमाणात केला आहे, तेवढा तो अन्य पुराणांतून केलेला नाही, हे लक्षात ठेवायला हवे. तिसऱ्या स्कंधातल्या सातव्या अध्यायात विदुर-मैत्रेय संवाद दिलेला असून, त्यात या मायावादाचे स्पष्ट विवेचन केलेले आहे. भगवंताला मायेचा संपर्क कसा होतो? अशी शंका विदुराने घेतली असता, मैत्रेय ऋषींनी पुरंजन राजाच्या कथेच्या रूपकाने मायेच्या स्वरूपाचे वर्णन करून त्याच्या शंकेचे समाधान केले आहे.

भागवतात जो धर्म सांगितला आहे, त्याला भागवतधर्म असे म्हणतात. भागवतधर्म हा भक्तिप्रधान आहे. भगवंताच्या प्राप्तीचा सुलभ उपाय म्हणून भागवतात भक्तीचा ऊहापोह केलेला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भक्तितत्त्वाचे निरूपण करणे, हेच भागवताचे उद्दिष्ट आहे. कित्येक ठिकाणी भक्तीचे हे महिमान साक्षात भगवंताच्या मुखानेच वदविले आहे (११·१४·२०)—

न साधयति मां योगो न साङ्ख्यं धर्म एव च ।
न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्तिर्ममोर्जिता ।।

अर्थ—(भगवान म्हणतो) माझी ऊर्जस्वल भक्ती जशी मला प्राप्त करून देते तशा योग, सांख्य, स्वाध्याय, तप, त्याग, धर्म या गोष्टी मला प्राप्त करून देणाऱ्या नाहीत.

दुसऱ्या एका श्लोकात (७·७·५१—५२) म्हटले आहे, ते असे—

प्रीणनाय मुकुन्दस्य न वृत्तं न बहुज्ञता ।
न दानं न तपो नेज्या न शौचं न व्रतानि च ।
प्रीयतेऽमलया भक्त्या हरिरन्यद् विडम्बनम् ।।

अर्थ— भगवंताला संतुष्ट करण्यासाठी शील, बहुज्ञता, दान, तप, यज्ञ, शौच, व्रत या गोष्टी उपयोगी पडत नाहीत. निर्मल भक्तीने भगवान संतुष्ट होतो. अन्य सारे विडंबन होय.

भागवताच्या एकादश स्कंधात भक्तिप्रधान भागवतधर्म विस्ताराने सांगितला आहे. अज्ञानी जीव मुक्त होऊन त्याला आत्मस्वरूपाची जाणीव व्हावी, यासाठी भगवंताने सांगितलेले सुलभ उपाय म्हणजे भागवतधर्म होय, अशी तिथे त्या धर्माची व्याख्या सांगितली आहे. (भागवतधर्म पाहा.)

होणारा अहंकार त्याला बाधत नाही. त्याला भक्ती, विरक्ती व भगवत्प्रबोध ही एकाच वेळी प्राप्त होतात. मृत्युलोकी त्याला कोणतेच भय उरत नाही. तो कधीच पतन पावत नाही. तो सर्वांशी समबुद्धीने वागतो आणि सर्वदा शांत असतो. या संदर्भात श्री. रं. कुलकर्णी म्हणतात—

सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी भगवद्‌भाव ठेवावा, हे मुख्य सूत्र सांगताना परतापहरण हे भगवद्‌भक्ताचे उद्दिष्ट असावे, या गोष्टीवर भागवतकारांनी विशेष भर दिला आहे. 'झाडाच्या मुळांना घातलेले पाणी शाखोपशाखांना पोचते, त्याप्रमाणे भूतमात्रांच्या तापहरणाने परमेश्वराचे पूजन घडते,' असे भागवतकार सांगतात. परमेश्वराविषयीचे आणि भूतमात्रांविषयीचे प्रेम ही परस्परपूरकच आहेत, असा भागवताचा निष्कर्ष आहे. प्रल्हादाने दैत्यपुत्रांस केलेल्या उपदेशातही 'तस्मात् सर्वेषु दयां कुरुत सौहृदम्' (भाग. पु. ७·६·२४) असे भागवतधर्माचे तात्पर्य सांगण्यात आले आहे. भूतमात्रांवरील प्रेमावर असलेला कटाक्ष, समाजविन्मुख पण परमेश्वरनिष्ठ असलेल्या भक्त अपूर्ण ठरतो, हेच दर्शवितो.

भागवताचा नायक — भगवान श्रीकृष्ण हा भागवताचा नायक आहे. भागवतात त्याला षड्‌गुणैश्वर्यसंपन्न, अखिल-ब्रह्मांडनायक व अघटितघटनापटू या स्वरूपात वर्णिले आहे



पार्थसारथी कृष्ण

भागवतधर्माचे आचरण करणाऱ्या भक्ताला संसारात राहूनही कर्मबंध जडत नाही. जन्म, वर्ण, इत्यादींच्या योगे उत्पन्न

श्रीकृष्णाची कमनीय मुखश्री, त्याचा सावळा रंग, त्याचा पीतांबर, त्याचा मोरमुकुट, त्याची विश्वमोहिनी मुरली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि त्याच्या अद्‌भुत लीला यांचे अत्यंत सुरस आणि प्रत्यय-कारी वर्णन भागवतात केलेले आहे. विष्णूचे हे अवतारी रूप गोकुळातल्या गोप-गोपींना जितके मधुर आणि विलोभनीय वाटले, तितकेच ते गेल्या हजारो वर्षांतल्या कवींनाही सुभग-सुंदर वाटले आहे. बाळकृष्णाचे हे अलौकिक लीलालावण्य भाग-वतात जसे विविध रंगांनी चित्रित केलेले, आहे तसेच ते पुढच्या सर्व कवींनीही रंगवले आहे. शरशय्येवर अखेरचे दिवस मोजीत पडलेल्या भीष्मपितामहांसारख्या इच्छामरणी तत्त्वज्ञ योग्या-लाही गोकुळात क्रीडा करणारे श्रीकृष्णाचे बालरूपच आठवले. भीष्म त्याच्या दिव्य सौंदर्याची स्तुती करताना म्हणतो–

त्रिभुवनकमनं तमालवर्णं रविकरगौरवराम्बरं दधाने ।
वपुरलककुलावृताननाब्जं विजयसखे रतिरस्तुमेऽ नवद्या ।।
ललितगतिविलासवल्गुहासप्रणयनिरीक्षणकल्पितोरुमाना : ।
कृतमनुकृतवत्य उन्मदान्धाः प्रकृतिमगन् किल यस्य गोपवध्व : ।।

(भाग. पु. १·९·३३·४०)

भावार्थ – श्रीकृष्णाचे शरीर त्रिभुवनसुंदर असून, त्याचा वर्ण तमालपत्रासारखा सावळा आहे. त्यावर त्याने सूर्यकिरणा-सारखा उत्तम पीतांबर परिधान केला आहे. त्याच्या कमल-मुखावर कुरळ्या केसांच्या बटा लोंबत राहिल्या आहेत. अशा अर्जुनसखा कृष्णाच्या ठिकाणी माझी निर्दोष प्रीती राहो. श्रीकृष्णाची चाल ललितसुंदर, चेष्टा हावभावयुक्त, हसणे विलोभनीय व दृष्टी प्रेमपूर्ण आहे. रासक्रीडेच्या प्रसंगी त्याने गोपींचा प्रणयस्निग्ध असा बहुमान केला. त्यामुळे त्यांना गर्व वाटला. ते जाणून श्रीकृष्ण त्या गोपीमंडलातून एकाएकी अंत-र्धान पावला. त्यामुळे त्या गोपवधू दु:खीकष्टी झाल्या. मग त्यांनी प्रेमोन्मत्त होऊन श्रीकृष्णाच्या वृंदावनातल्या लीलांचे अनुकरण करून अंशत: आपले समाधान करून घेतले. अशा त्या लीलाविहारी श्रीहरीच्या ठिकाणी माझे परम प्रेम राहो.

भागवताचा संपूर्ण दशम स्कंध कृष्णचरित्रवर्णनात सार्थकी लागला आहे. कृष्णाच्या जन्मापासून कंसवधापर्यंतची चरित्रकथा दशमस्कंधाच्या पूर्वार्धात आली आहे. इथवर सारे बालकृष्णाचे वर्णन आहे. उत्तरार्धात प्रौढ कृष्णाचे चरित्र वर्णिले आहे. द्वारकेचा निर्माता, पांडवांचा रक्षिता, रुक्मिणी-सत्यभामा, इ. स्त्रियांचा भर्ता, दुर्जनांचा संहर्ता, भक्तांचा उप-कर्ता आणि धर्माचा परित्राता, अशा अनेकविध स्वरूपांत श्रीकृष्णाचे दर्शन या उत्तरार्धात घडते.

काव्यसौंदर्य – भागवत हे महापुराण तर आहेच; त्याबरोबर ते एक महान काव्यही आहे. संस्कृतवाङ्मयाचे ते अलौकिक, रसमय प्रतिनिधी आहे. तत्त्वसंदर्भ या ग्रंथात जीवगोस्वामीने भागवतस्तुतीचा एक श्लोक उदधृत केला आहे, तो असा–

वेद: पुराणं काव्यं च प्रभुर्मित्रं प्रियेव च ।
बोधयन्तीति हि प्राहुस्त्रिवृद् भागवतं पुन: ।।

भावार्थ – वेद आणि राजा हे आज्ञा देतात, पुराणे आणि मित्र हे उपदेश करतात आणि कविता आणि प्रिया या मुग्ध बनवतात. एकटे भागवत मात्र या तीन्ही गोष्टी करते. म्हणून ते त्रिवृत् म्हणजे त्रिगुणसंपन्न आहे.

भागवताच्या कवितेत अद्‌भुत चमत्कार आहेत. गेली शेकडो वर्षे ते शब्दमाधुर्य आणि अर्थचातुर्य या गुणांनी वाच-कांना आकृष्ट करून राहिले आहे. हे आकर्षण आजही कमी झालेले नाही. मानवी मधुर भावनांना भरती आणण्यास भाग-वत हे समर्थ काव्य ठरले. स्थलवर्णनाच्या बाबतीत मथुरा व द्वारका यांची वर्णने कुतूहल जागृत करणारी व कल्पनांनी नटलेली आढळतात. नमुन्यादाखल द्वारकावर्णनाचा पुढील एकच श्लोक (१०·६९·१२) पुरेसा आहे–

रत्नप्रदीपनिकरद्युतिभिर्निरस्त–
ध्वान्तं विचित्रवलभीषु शिखण्डिनोऽङ्ग ।
नृत्यन्ति यत्र विहितागुरुधूपमक्षै–
र्निर्यान्तमीक्ष्य घनबुद्धय उन्नदन्त: ।।

भावार्थ – द्वारकेत रत्नांचा प्रकाश इतका विपुल होता, की तिथे दिवे लावण्याची गरजच नव्हती. तिथे दिवे लावलेले असत; पण ते शोभेसाठी. तिथे गवाक्षांच्या जवळ मुद्दाम ठेव-लेल्या वहालावर मोर येऊन बसत. महालातील अगरू–चंदनाचा धूर बाहेर येऊ लागला म्हणजे हा कृष्णमेघच आहे, असे सम-जून ते नाचू लागत.

मथुरेत श्रीकृष्ण आल्याची वार्ता ऐकताच प्रसाधन करीत बसलेल्या सुभग ललना ते अर्धवट असतानाच श्रीकृष्णाला पाहण्यासाठी गवाक्षात येऊन उभ्या राहिल्या, त्यांचे वर्णन अत्यंत लालित्यपूर्ण आहे. ऋतुवर्णनात आध्यात्मिकतेची झाक आहे. मुसळधार पावसाने मार दिला तरीही लवमात्र विचलित न होणाऱ्या पर्वतांची तुलना विपत्तीच्या प्रहाराने प्रक्षुब्ध न होणाऱ्या भक्ताशी केली आहे. कच्चा योगी विषयाच्या संप-र्कात आल्यानंतर त्याला जशी अभिलाषेची भरती येते, त्या-सारखाच नद्यांच्या समागमामुळे आणि वाऱ्या-वादळांनी उठ-लेल्या लाटांमुळे समुद्र खवळतो, असे म्हटले आहे. शरद ऋतूचे वर्णन करताना भागवतकाराला सात्त्विक योग्याची आठवण होते. तो श्लोक (भाग. पु. १०·२०·४३) असा–

खमशोभत निर्मेघं शरद्‌विमलतारकम् ।
सत्त्वयुक्तं यथा चित्तं शब्दब्रह्मार्थदर्शनम् ।।

अर्थ – शरद ऋतूतील मेघरहित, अतएव निर्मल व तारकांनी भरलेले, आकाश कसे शोभले, तर शब्दब्रह्माच्या द्वारे अर्थवि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दर्शन झाल्यावर योग्याचे सात्त्विक चित्त जसे विकसित होते, तसे.

भागवतातले काव्य रसमाधुरीच्या दृष्टीने परम कोटीला गेलेले आहे, ते गोपींच्या कृष्णप्रेमवर्णनात आणि त्यांच्या ललित-मधुर चित्रणात. गोपी या श्रीकृष्णचरणी सर्वभावे समर्पित झालेल्या एकनिष्ठ प्रेमिका होत्या. त्यांचा संयोगातील आनंद आणि वियोगातील दुःख ही दोन्ही एकांतिक होती. गोपींच्या या भावांचे वर्णन करण्यात भागवतकारांनी आपल्या गंभीर अनुभूतींचा आणि मनोविश्लेषणसामर्थ्याचा पूर्ण परिचय दिला आहे. दशम स्कंधातील वेणुगीत, गोपीगीत, युगुलगीत, महिषीगीत, इ. ललित प्रसंगांत व्यास महर्षींनी मनोरम रसभावांची जणू कारंजी उडविली आहेत. मुरलीमोहनाने आपल्या चित्ताचे विधान केल्याची गुजगोष्ट एका कुररीला संबोधून एक महिषी व्यक्त करते ती अशी (१०·९०·१५)–

कुररि विलपसि त्वं वीतनिद्रा न शेषे
स्वपिति जगति रात्र्यामीश्वरो गुप्तबोधः ।
वयमिव सखि कच्चिद् गाढनिर्भिन्नचेता
नलिननयनहासोदारलीलेक्षितेन ।।

भावार्थ – हे कुररी, विश्वात सर्वत्र शांती पसरली आहे. या वेळी स्वतः भगवान आपली अखंड जागृती छपवून झोपी गेला आहे; पण तुला कशी बरे झोप नाही ? सखी, कमलनयन भगवंताच्या मधुर हास्याने आणि प्रणयकटाक्षांनी तुझेही हृदय आमच्यासारखेच विंधून तर नाही गेले ?

दशम स्कंधातले वेणुगीतही तितकेच मधुर आहे. त्यात कृष्णाच्या मुरलीवादनाचा प्रभाव कसा विश्वव्यापी आहे, ते दाखविले आहे. श्रीकृष्णाच्या मुरलीचा प्रभाव केवळ सजीव प्राण्यांवरच नव्हे, तर भौतिक जगावरही कसा पडतो, ते वर्णिताना मुरलीचा स्वर ऐकून नद्यांची अवस्था कशी झाली व त्यांनी श्रीकृष्णाची जवळीक कशी केली, ते पुढील श्लोकात (भाग. पु. १०·२१·२५) सांगितले आहे

नद्यस्तदा तदुपधार्य मुकुन्दगीतमावर्तलक्षितमनोभवभग्नवेगाः ।
आलिङ्गनस्थगितमूर्मिभुजैर्मुरारेर्गृह्णन्ति पादयुगलं कमलोपहाराः

भावार्थ –अहो, निर्जीव पदार्थसुद्धा कृष्णाच्या मुरलीरवाने मोहित करून टाकले. या नद्याही पाहा. मुरलीचा मधुर स्वर ऐकून आपल्या भोवऱ्यांनी कृष्णावरचे प्रेम व्यक्त करीत आहेत. मदनबाधेने त्यांची गती मंद झाली आहे. कमलपुष्पांनी कृष्ण-चरणांची पूजा करून ऊर्मिरूप भुजांनी त्या जणू कृष्णाला आलिंगनच देत आहेत.

रासपंचाध्यायी हे भागवताचे रहस्य मानतात. त्या पाच अध्यायांत व्यासांनी कृष्णाने गोपींसह केलेल्या रासक्रीडेचे मधुमधुर वर्णन आहे. या पंचाध्यायीचे आध्यात्मिक महत्त्व जितके आहे, तितकेच तिचे वाङ्मयीन महत्त्वही आहे. रासक्रीडेतून कृष्ण एकाएकी अंतर्धान पावल्यानंतर गोपींचे चित्त विरह-व्याकुल झाले. त्यांच्या त्या व्याकुल मनोभावांचे चित्र व्यासांनी फारच सुरेख रंगविले आहे. त्यातील काही श्लोक असे.–

मधुरया गिरा वल्गुवाक्यया बुधमनोज्ञया पुष्करेक्षण ।
विधिकरीरिमा वीर मुह्यतीरधरसीधुनाऽऽप्यायस्व नः ।।
तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ।
श्रवणमङ्गलं श्रीमदाततं भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः ।।
प्रहसितं प्रिय प्रेमवीक्षणं विहरणं च ते ध्यानमङ्गलम् ।
रहसि संविदो या हृदिस्पृशः कुहक नो मनः क्षोभयन्ति हि ।।
(भाग. पु. १०. ३१. ८–१०)

अर्थ – हे कमलनयना, तुझी वाणी एकदा तरी आमच्या कानी पडू दे. ती आम्हांला फार मधुर लागते. मोठमोठे लोकही तिने मोहित होतात. तर तू आम्हांला दर्शन दे आणि तुझ्या अधरामृताचे प्राशन करवून आम्हां दासींना कृतार्थ कर. संसारतापाने तप्त झालेल्या जनांना तुझ्या कथामृताने शांती मिळते. ते सर्व पापांचा निरास करणारे आहे, असे मोठे लोक म्हणतात. त्याने कान पवित्र होतात, श्रीमंतीचा गर्व जातो. जे तुझ्या कथामृताचे प्राशन करतात, त्यांनी पूर्वजन्मी पुण्यसंचय केला होता, हे नक्की. तुझे मधुर हास्य, तुझे प्रेममय नेत्रकटाक्ष आणि इतर अनंत क्रीडा यांचे आम्हांला पदोपदी स्मरण होते. अमुक तमुक वेळी, अमक्या तमक्या ठिकाणी तू मला भेट, असे तू आमच्याशी अनेकदा संकेत केले होतेस. त्यांचे स्मरण होताच आम्ही बेचैन होतो.

दुसरे एक विरहगीत आहे, त्याला भ्रमरगीत असे म्हणतात. कृष्णाच्या विरहव्यथेत चूर होऊन बसलेल्या गोपींच्या मेळाव्यात एक भुंगा शिरतो. तो त्यांच्या भोवती रुंजी घालून त्यांच्या मुखमंडलाला स्पर्शही करतो. तो काळा अतएव काळ्या कृष्णाकडून आलेला दूत समजून गोपी त्याचा प्रथम उपालंभ करतात. त्यात श्रीकृष्णावर कपटयुक्त प्रेम केल्याचा आरोप करतात आणि मग दीन-आर्त होऊन त्याला कृष्णाचे कुशलही विचारतात. अवघ्या दहा श्लोकांच्या या विरहकाव्याने कित्येक कवींना मुग्ध करून सोडले आहे. या भागवती काव्याच्या प्रेरणेने पुढे संस्कृत व हिंदी भाषेत कित्येक भ्रमरगीते निर्माण झाली आहेत.

भागवतावरच्या टीका – भागवत हे सारगर्भ आणि प्रमेय-बहुल आहे. त्यातल्या ईश्वरस्तुती वेदन्ताच्या परिभाषेला अनुसरून केलेल्या आहेत. याशिवाय त्यातील अनेक उपदेशही दार्शनिक स्वरूपाचे आहेत. भागवताची भाषा प्रसन्न असली, तरी ती अनेक ठिकाणी अवघड आहे. टीकेविना भागवताचा अर्थ लागणे कठीण होते. ' विद्यावतां भागवते परीक्षा ' = विद्वानांची परीक्षा भागवतात होते, अशी म्हणच पडली आहे. म्हणून भाग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वतावर जितक्या टीका झाल्या आहेत, तितक्या अन्य कुठल्याही पुराणावर झाल्या नाहीत. त्यांपैकी काही टीका स्वतंत्र असून, काही सांप्रदायिक आहेत. स्वतंत्र टीका मूळ अर्थाचा मागोवा घेतात, तर सांप्रदायिक टीका भावतातल्या अद्वैतप्रधान प्रसंगांतून आपल्या संप्रदायांच्या मतांना अनुकूल असा अर्थ काढतात.

या सर्व टीकांत श्रीधरस्वामीची टीका सर्वांत उत्कृष्ट समजली जाते. श्रीधरस्वामी हा नरसिंहाचा उपासक. त्याला भागवताचा यथार्थ आशय नेमका समजला आहे, असे विद्वान लोक समजतात. त्या विषयीचा एक श्लोक असा —

व्यासो वेत्ति शुको वेत्ति राजा वेत्ति न वेत्ति वा ।
श्रीधरः सकलं वेत्ति श्रीनृसिंहप्रसादतः ॥

अर्थ — सगळे भागवत व्यास जाणतात, शुक जाणतो, (परीक्षिती) राजा जाणतो किंवा नाही याविषयी संदेह आहे. श्रीधर मात्र नरसिंहाच्या कृपेने सगळे जाणतो.

श्रीधरस्वामीने चित्सुखाचार्यविरचित भागवतव्याख्या या ग्रंथाचे अनेक ठिकाणी अनुसरण केले आहे. शुकपक्षीया ही सुदर्शनसूरिविरचित टीका व वीरराघवकृत भागवतचंद्रिका या दोन टीका विशिष्टाद्वैत मताच्या आहेत. विजयध्वजाची पदरत्नावली टीका द्वैत मताची आहे. वल्लभाचार्यांची सुबोधिनी टीका त्यांच्या शुद्धाद्वैत मताला अनुसरून आहे. शुकदेवाचार्यांची सिद्धान्तप्रदीप टीका निंबार्कमताला अनुसरून आहे. सनातन गोस्वामींची क्रमसंदर्भ व विश्वनाथ चक्रवर्तीची सारार्थदर्शिनी या टीका चैतन्यमताला अनुसरून आहेत. यांशिवाय अन्य काही अप्रसिद्ध टीका आहेत, त्या वेगळ्याच. श्रीहरी नामक एका भक्ताने भागवताच्या केवळ दशम स्कंधावर पद्यबद्ध अशी टीका लिहिली असून, तिचे ५००० श्लोक आहेत. याशिवाय निरनिराळ्या प्रादेशिक भाषांतही भागवताचे समग्र किंवा अंशात्मक अनुवाद झाले आहेत. मराठी भाषेत कृष्णदयार्णव यांची दशम स्कंधावरील हरिवरदा ही टीका व एकनाथमहाराजांची एकादश स्कंधावरील एकाकार टीका या दोन्ही टीका ओवीबद्ध आहेत.

भागवताचा देशकालनिर्णय — भागवत व्यासांनी निर्माण केले हे खरे असले, तरी बोपदेव नावाच्या एका पंडिताने भागवत रचले असाही एक प्रवाद आहे. हा बोपदेव हेमाद्रीचा आश्रित होता. याचा काल इ. स. चे १३ वे शतक हा आहे. भागवत त्याच्याही आधी कित्येक शतके निर्माण झाले आहे, असे दिसून येईल. मध्वाचार्यांनी भागवततात्पर्यनिर्णय नावाच्या आपल्या ग्रंथात हनूमत, चित्सुख, शंकराचार्य अशा सात–आठ भागवती टीकाकारांची नावे दिली आहेत. १२ व्या शतकात गौडपती लक्ष्मणसेन याने रचलेल्या अद्भुतसागर या ग्रंथात भागवतातले उतारे घेतलेले आहेत. श्रीधरस्वामीही त्याच काळातला होय. रामानुज यांचा कालही ११ व्या शतकातलाच आहे. त्यांनी आपल्या वेदान्तदत्तसारात एकादश स्कंधातले कित्येक श्लोक उद्धृत केले आहेत. शंकराचार्यांच्या प्रबोधसुधाकर या ग्रंथावर भागवताची छाया आहे. त्यांचा काल ८ वे शतक मानतात. शंकराचार्यांचे आजेगुरू गौडपादाचार्य यांनी आपल्या पंचीकरणव्याख्यानात व उत्तरगीतेच्या भाष्यात भागवताचा स्पष्ट नामनिर्देश केला आहे. गौडपादाचार्यांचा काल इ. स. चे ५ वे शतक हा मानला जातो. त्यामुळे भागवत बोपदेवकृत आहे, हा मुद्दा निर्मूल ठरतो. गर्गाचार्य, जैमिनी, शौनक, चाणक्य, या व्यक्ती इ. सना पूर्वीच्या आहेत. त्यांनाही भागवत ठाऊक असल्याचे उल्लेख मिळतात, त्यावरून भागवत पुराण सनपूर्व सुमारे ३०० वर्षे निर्माण झाले असावे, असा सिद्धान्त विद्वानांनी भागवताचे अंतरंग व बहिरंग परीक्षून मांडला आहे. भागवतात द. भारतातल्या तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य उ. भारतातल्या तीर्थक्षेत्राहून अधिक आहे. पयस्विनी, कृतमाला, ताम्रपर्णी, इ. तमिळनाडमधल्या नद्यांचे विशेष रूपाने उल्लेख आहेत. कलियुगात नारायणपरायण असे जन सर्वत्र उत्पन्न होतील; पण विशेषतः द्रविड देशात ते बहुसंख्य असतील, असेही म्हटले आहे. त्यावरून भागवत हे द. भारतात, विशेषतः तमिळनाडमध्ये निर्माण झाले असावे, असे वाटते. भागवताचे महत्त्व पद्म पुराणात सांगितले आहे, ते असे —

सदा सेव्या सदा सेव्या श्रीमद्भागवती कथा ।
यस्याः श्रवणमात्रेण हरिश्चित्तं समाश्रयेत् ।
पुराणेषु च सर्वेषु श्रीमद्भागवतं परम् ॥
यत्र प्रतिपदं विष्णुर्गीयते बहुधर्षिभिः ।
अर्थोऽयं ब्रह्मसूत्राणां भारतार्थविनिर्णयः ।
गायत्रीभाष्यरूपोऽसौ वेदार्थपरिबृंहितः ॥

अर्थ — भागवताची कथा सदा सेव्य, सदा सेव्य आहे. याच्या श्रवणमात्रे श्रीहरी चित्तामध्ये आश्रयाला येतो. सर्व पुराणांमध्ये भागवत पुराण श्रेष्ठ आहे. कारण त्याच्या प्रत्येक पदात ऋषींनी श्रीहरीची स्तुती केली आहे. हे ब्रह्मसूत्रांचा अर्थ सांगणारे, भारताच्या अर्थाचा निश्चित निर्णय सांगणारे व गायत्रीचे भाष्यरूप आहे. यात वेदार्थाचे परिबृंहण (विस्तार) झालेले आहे.

म्हणूनच वैष्णव संप्रदायात आणि चातुर्मास्य पुराणसत्रात भागवतसप्ताह करण्याची प्रथा भारतात सर्वत्र प्रचलित आहे.

[पु. नि.; श्रीमद्भागवतादर्श; पु. वि.; अ. पु. द.]

भागवतमेळानाटकम्

तमिळनाडमधील एक नृत्यनाट्यप्रकार. हा भरतनाट्यम्चाच एक प्रकार मानतात. भागवतमेळानाटकम् हे भक्तिरसप्रधान असून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भक्तीचा प्रसार करण्यासाठीच त्याचा जन्म झाला आहे. या नृत्यनाटचानेच तिकडील लोकांच्या मनात भक्तीची भावना खोल रुजविली. तीर्थनारायण यती हा तंजाऊर जिल्ह्यातील तेलुगू ब्राह्मण या नृत्यनाटचकलेचा जनक समजला जातो.

भागवतमेळचाची उत्पत्ती तंजाऊर जिल्ह्यातील मेलातुर या गावी झाली. त्या वेळी तंजाऊरमध्ये नायक राजवंशातील दुसरा राजा अच्युतप्पा नायक (इ. स. १५७७ ते १६१४) हा राज्य करीत होता. तो संगीत आणि नृत्य या कलांचा भोक्ता होता. या कलांची आपल्या राज्यात वाढ व्हावी असा त्याचा प्रयत्न होता.

या राजाविषयी एक दंतकथा आहे, ती अशी — एकदा त्याने चुकून डाव्या हाताने विडा तोंडात टाकला. त्या प्रमादाचे परिमार्जन करण्यासाठी त्याने पाचशे एक ब्राह्मण कुटुंबांना तंजाऊरपासून नऊ मैलांवर असलेले मेलातुर हे गाव दान दिले. त्या ब्राह्मणांनी कला व ज्ञान यांची वृद्धी आणि जोपासना करावी

श्री. बाळू भागवतर

अशी त्याने अट घातली होती. अच्युत नायकाच्या नावावरून त्या गावाला अच्युतपुरम असेही म्हणतात. याच गावात भागवतमेळानाटकाचा उगम आणि विकास झाला. नृत्यनाटचाची ती परंपरा तिथे आजतागायत टिकून आहे.

मेलातुर गावात वरदराज पेरुमलचे एक मंदिर आहे. दर वर्षी नरसिंहजयंतीला या देवाची जत्रा भरते. त्या वेळी भागवतमेळचाचे प्रयोग इथे होतात. तंजाऊरमधील इतर सहा गावांतही भागवतमेळचाचे प्रयोग पूर्वी होत असत. पण सांप्रत ते बंद पडले आहेत.

मेलातुर येथील भागवतमेळचाची परंपरा तीनशे वर्षांची आहे. पण सांप्रतची नृत्यनाटके दीडशे वर्षांपूर्वी व्यंकटराम शास्त्री नामक एका तेलुगू ब्राह्मणाने रचलेली आहेत. तो मेलातुर येथेच जन्मला. आणि इथेच त्याने आपले सर्व आयुष्य घालवले. तो सरफोजी आणि शिवाजी या दोन्ही राजांच्या कारकीर्दीत हयात होता. व्यंकटरामशास्त्री याने भागवतमेळचासाठी प्रल्हादचरित्रम, मार्कंडेय, उषापरिणयम, रुक्मांगद, गोल्लाभामा, सीताकल्याणम, रुक्मिणीकल्याणम, ध्रुवचरित्रम, कंसवध, हरिश्चंद्र, शिवरात्रिवैभवम व भस्मासुरवधम अशी बारा नृत्यनाटके लिहिली. ही सर्व नाटके तेलुगू भाषेत आहेत. नाटकांची भाषाशैली प्रासादिक असून, त्यांच्यांतून लेखकाच्या महान प्रतिभेची साक्ष पटते.

व्यंकटरामशास्त्री यांच्या कालापासून ही नाटके मेलातुरमध्ये नियमित होत असत. नटेश अय्यर हा भागवतमेळचातील गेल्या पिढीचा सर्वश्रेष्ठ कलावंत होय. त्याने या कलेला लोकप्रियता प्राप्त करून दिली. तो मोठा नट्टुवनार व नर्तक नट होता आणि तो स्त्रीभूमिका करीत असे. तो मोठा देवभक्तही होता. त्याने १९२४ साली मेलातुर येथील वरदराजाच्या देवालयाचे गोपुर बांधले. त्याचे मेलातुरमधील घर सांप्रत भागतवतमेळचाचे केंद्र बनले आहे.

दर वर्षी मेलातुर गावी नरसिंहजयंतीच्या वेळी भागवतमेळा नाटकाचे प्रयोग होतात. हा उत्सव दोन ते दहा दिवस चालतो. त्यासाठी वरदराजाच्या मंदिरासमोर सुमारे दीडशे फूट लांबीचा मंडप घालतात. त्याच्या एका टोकाला रंगमंच उभारतात. देवाला भागवतमेळचाचे कार्यक्रम पाहता यावेत, म्हणून देवळाचे दरवाजे उघडे ठेवतात. जत्रेच्या पहिल्या रात्री प्रल्हादचरित्रम हे नृत्यनाटच होते. कारण ते नरसिंहावर लिहिलेले आहे. नटेश अय्यरच्या हयातीत निदान दहा तरी नृत्यनाटचे होत असत. त्याच्या मृत्यूनंतर सतत वीस वर्षे भागवतमेळचाचे प्रयोग अजिबात बंद होते. पण १९३० साली ती प्रथा पुन्हा सुरू करण्यात आली. मेलातुरच्या हल्लीच्या कलावंतांनी १९३८ सालापासून नाटके करायला सुरवात केली. त्यांनी पहिली चार वर्षे दर वर्षी प्रल्हादचरित्रम आणि मार्कंडेय ही दोनच नृत्यनाटचे केली. १९४३ ते १९५१ या कालात त्यांनी रुक्मांगद आणि उषापरिणयम ही आणखी दोन नाटके करावला सुरवात केली. तेव्हा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पासून मेलातुरमध्ये दर वर्षी चार नृत्यनाट्ये होतात. सांप्रत भागवतमेळ्याचे नेतृत्व बालसुब्रह्मण्यम शास्त्री यांच्याकडे आहे.



हिरण्यकश्यपूचा प्रवेश – भागवतमेळा

ते तमिळ ब्राह्मण असून, साहित्य, संगीत आणि नृत्य या तीन्ही कलांत प्रवीण आहेत. बाळू भागवतर या नावाने ते ओळखले जातात. त्यांच्या संचातील सर्व कलावंत हुशार आणि आपापल्या कामात तरबेज आहेत. त्यांचे उपजीविकेचे व्यवसाय निरनिराळे असून, ते दर वर्षी नरसिंहजयंतीच्या उत्सवाच्या वेळी मेलातुरला येतात आणि विनावेतन भागवतमेळ्यात काम करतात. भागवतमेळ्यात फक्त पुरुषच काम करतात. स्त्रीभूमिकाही पुरुषांकडेच असतात. यातले गायक व वादक कलाकारही स्थानिक असतात.

पूर्वी या नाटकाच्या प्रयोगासाठी रंगमंच नसे. प्रयोगाच्या वेळी जिथे खेळ व्हायचा, त्याच्या दोन्ही बाजूंना केळींच्या खांबावर मातीच्या मोठ्या पणत्या पेटवून ठेवलेल्या असत. त्या काळी पडदेही नसत. पात्र रंगभूमीवर प्रवेश करताना दोन माणसे त्याच्या समोर एक पडदा धरीत.

सांप्रत या नाटकांना रंगमंच असतो व पडदेही असतात. प्रकाशासाठी शक्य तिथे विजेचे दिवेही असतात. पडदे आणि नेपथ्याने रंगमंच सजवलेला असतो. लोक वर्गणी करून हा नाटकाचा खर्च करतात.

नाटकाची सुरवात रात्री होते. प्रथम कोणंगी किंवा विदूषक रंगमंचावर प्रवेश करतो. तो थोडा वेळ नृत्य करून प्रेक्षकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतो आणि आत निघून जातो. त्यानंतर नट्टुवनार किंवा सूत्रधार आणि इतर गायक-वादक प्रवेश करतात. ते सर्वजण तोडयमंगलम गातात. मग गणपती येतो. गायक त्याच्या स्तुतिपर गीते गातात. तोही थोडे नृत्य करतो. त्याच्या नंतर कट्टियकारन प्रवेश करतो. गीत आणि अभिनय यांच्या साहाय्याने तो नाटकाच्या कथानकाची आणि पात्रांची ओळख करून देतो. त्यानंतर नाटकाला सुरवात होते.

गायक नृत्यनाटकांतील पद्ये गातात आणि पात्रे अभिनयाच्या द्वारे त्याचा अर्थ व्यक्त करतात. अशाच रीतीने कथानक पुढे चालू राहते. प्रत्येक पात्र आपला परिचय दारू नामक कथेतील गीताने करून देते. प्रत्येक पात्र आपले काम झाले, की रंगमंचावरून निघून जाते-किंवा रंगमंचावरच एका बाजूला पुन्हा आपले काम येईपर्यंत बसून राहते. या नाटकातील नृत्य व अभिनय भरतनाट्यम्च्या तंत्रानुसार असतो. तो मूळ पद्याला अनुसरून असतो. पण काही वेळा त्यात गद्य संवाद किंवा स्वगत असते. तसेच संधिवचने किंवा ग्रांथिकाने म्हणायच्या द्विपद्याही गद्यात असतात.

भागवतमेळानाटकाचे संगीत हे कर्नाटकी संगीत असते. त्याला मृदंग, सारंगी व बासरी यांची साथ असते.

नाटकाची नायिका रंगमंचावर प्रवेश करते, तेव्हा तिच्या समोर एक साडी पसरून धरतात. ती त्या पडद्याआड अलारिप्पू नृत्य करते आणि मग साडी दूर करतात.

भागवतमेळानाटकातील सध्याची वेषभूषा जुन्या व नव्या वेषभूषेचे मिश्रण आहे. स्त्रीपात्रे साडी व पोलके घालतात.

उषापरिणयममधील एक प्रसंग

काही स्त्रीपात्रे नर्तकीचा वेष करतात. पुरुष पात्रे पायजमा आणि सैल लांब कोट किंवा जाकीट घालतात. त्यांना दाढी व मिशाही लावतात. गणपती, नरसिंह, ब्रह्मा, राक्षस, इ. पात्रांना मुखवटे घालतात. प्रल्हादचरित्तम या नाटकातील नरसिंहाचा

CC0. In Public Domain. Jahgamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुखवटा फार पवित्र मानतात. मेलातुर येथील वरदराजाच्या मंदिरात एका पेटीत तो ठेवलेला असतो. हा मुखवटा घातलेला नरसिंहाचे काम करणारा नट शेवटी रागाच्या भरात बेभान होऊन मूर्च्छित पडतो. तो शुद्धीवर आल्यावर त्याला मिरवणुकीने वरदराजाच्या मंदिरात नेतात व तिथे त्याचा मुखवटा काढून तो समारंभपूर्वक तिथल्या पेटीत ठेवतात. एवढे झाल्यावर मगच लोक आपापल्या घरी जातात.

सांप्रत भागवतमेळानाटक हे फक्त मेलातुर या गावीच तग धरून आहे. काही वर्षांपूर्वी ई. कृष्ण अय्यर यांनी या प्रकाराविषयी लेखन करून, व्याख्याने देऊन आणि त्याचे नीटनेटके प्रयोग करून लोकांना त्याचा परिचय करून दिला आणि आता त्याला थोडी ऊर्जितावस्था प्राप्त झाली आहे. [श्री. मोहन खोकर– भागवतमेळा अँड कुचिपुडी, मार्ग, सप्टें. १९५७; दि मेलातुर भागवतमेला, इलस्. वीकली, फेब्रु. १९६७]

भागवताचार्य (इ. स. चे १६ वे शतक) एक हिंदी भक्तकवी. हा बंगालचा रहिवासी होता. रघुनाथ हे याचे मूळचे नाव होय. हा भागवत पुराणाचे पारायण अतिशय रसाळ पद्धतीने करीत असे. नीलाचलाला जाताना चैतन्य महाप्रभू एक दिवस याच्या घरी मुक्कामास होते. या वेळी रघुनाथाचे भागवतपारायण ऐकून ते फार प्रसन्न झाले आणि त्यांनी याला भागवताचार्य ही उपाधी दिली. चैतन्यभागवतात या घटनेचा उल्लेख आहे. हा चैतन्याचा अनुयायी असून, गदाधर पंडिताचा शिष्य होता. याचा कृष्णप्रेमतरंगिणी नामक ग्रंथ प्रसिद्ध आहे. [हि. वं. वै. क.]

भागुरि (१) शुभाशुभ शकुनांचा लेखक. हा सर्वांत जुना समजला जातो. याचा बृहत्संहितेत उल्लेख आहे.
(२) एक सामग आचार्य. या नावाचा एक गोत्रकारही आहे. तो वैयाकरणी होता, असे दिसते. [हि. ध.; तर्पण]

भाग्य चाक्षुष मन्वंतरातील एक देवगण. या गणात विजय, सुजय, मन, उद्यान, सुमती सुपरी आणि अर्थपती हे देव होते. [पु. इं.]

भाग्यऋक्ष द्वादशी एक काम्य व्रत. पूर्वाफल्गुनीला भाग्य असे म्हणतात. कारण भग ही या नक्षत्राची देवता आहे. हे पुरुषांचे व्रत आहे. या व्रतात पूर्वाफल्गुनी नक्षत्र असलेल्या द्वादशीला हरिहरांची पूजा करतात. फल – पुत्र व राज्य यांची प्राप्ती. [हि. ध.]

भाजे पुणे जिल्ह्यात, लोणावळ्याच्या पूर्वेला सुमारे पाच मैलांवर विसापूर गडाच्या पायथ्याशी हे गाव वसलेले आहे. तिथून जवळच एका डोंगराच्या कड्यामध्ये प्राचीन बौद्ध लेणी खोदलेली आहेत. ही लेणी सन–पूर्व दुसऱ्या व पहिल्या शतकांत निर्माण झालेली असावी. उत्तरेकडील पहिले लेणे म्हणजे एक नैसर्गिक गुहा असून, तिची लांबी ३० फूट आहे. त्यानंतर दहा साध्या खोल्या लागतात. बारावे लेणे हे एक चैत्यगृह असून, त्याची लांबी ५९ फूट व रुंदी २९ फूट आहे. चैत्यमंडपात २७ अष्टकोणी साधे खांब असून, त्यांच्यामुळे दोन्ही बाजूंना ३·५ फूट रुंदीच्या पडव्या तयार झाल्या आहेत. त्या खांबांवर बौद्ध प्रतीके कोरलेली दिसतात.

चैत्याची मागची बाजू अर्धवर्तुळाकार असून, तिथे घुमटाकृती छत आहे आणि त्याच्या खाली ६ फूट उंचीचा स्तूप आहे. त्या स्तूपाच्या माथ्यावर एक पेटी आहे. चैत्याचे संपूर्ण छत कमानीसारखे असून, दर्शनी भागातली कमान कोंडाणे येथील कमानीपेक्षा जास्त डौलदार आहे. मात्र ती कार्ले येथील चैत्याच्या कमानीपेक्षा पसरट व बोजड वाटते. कोंडाण्याच्या लेण्यातील स्तंभांप्रमाणेच इथले स्तंभही कलते असून, वास्तूच्या मानाने ते दुबळे वाटतात. ही लेणी वापरात होती तेव्हा ऊन व पाऊस यांपासून अंतर्भागांचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्या तोंडावर लाकडी फळ्यांच्या जवनिका (जाळीदार पडदे) बसवलेल्या असाव्या. भाजे येथील लेण्याच्या कमानीच्या कपाळपट्टीवर १७० खोबणी



चैत्यगृहाची दर्शनी कमान – भाजे

हारीने खोदलेल्या आहेत. लाकडी मेखा ठोकून पाठभिंतीत जवनिका पक्की करण्यासाठी त्या खोदलेल्या असाव्या, असा संशो-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

थकांचा अंदाज आहे. मात्र सांप्रत तिथे जवनिका किंवा आगाशी नसल्यामुळे तो चैत्य भकास दिसतो. चैत्यगृहाच्या उजव्या अंगाला, दुसरा मजला या स्वरूपात एक मोठा विहार खोदलेला आहे, त्यात शंभर माणसे सहज बसू शकतील. चैत्यगृहाच्या दारांतूनच वर चढण्यासाठी पायऱ्या केलेल्या आहेत.

या चैत्यलेण्याच्या दक्षिणेला आणखी पाच–सहा गुंफा असून, त्यांतील शेवटची, धबधब्याजवळची, सूर्यगुंफा म्हणून प्रसिद्ध आहे. या गुहेत एक सभामंडप, दोन खोल्या व पुढे एक पडवी आहे. पडवीतील स्तंभांवर कमलाकृती कोरलेल्या असून, एका जागी स्त्रीचे मुख व पशूचे शरीर अशी आकृती आढळते. तिथल्या भिंतीवर जे कोरीव शिल्पकाम आहे, त्यात एका बाजूला पुष्पमाला धारण करणारा एक पुरुष हत्तीवर आरूढ झालेला दिसतो. त्याच्या हातात अंकुश आहे व हाती पताका घेतलेला सेवक मागे बसलेला आहे. हत्तीने एक वृक्ष उपटून सोंडेत धर लेला आहे. ऐरावतारूढ इंद्राची ही प्रतिमा आहे, असे म्हणतात. दुसऱ्या बाजूला चार घोडे जोडलेला दुचाकी रथ असून, त्यावर एक राजपुरुष व त्याच्या दोन्ही बाजूंना दोन स्त्रिया छत्र व चवरी घेऊन उभ्या आहेत. रथाचे घोडे एका राक्षसीला तुडवीत आहेत. रथातील प्रतिमा सूर्याची आहे, असे म्हणतात. जॉनस्टन् यांच्या मते रथावर इंद्र असून, हत्तीवर बुद्धाचा शत्रू मार आहे. पण या शिल्पकामाचा बौद्धांशी काहीही संबंध नाही, असे फर्ग्युसन म्हणतो. हे लेणे सातवाहनांच्या काळात निर्माण झालेले असून, सातवाहन राजे सूर्याचे उपासक व वैदिक धर्माचे अनुयायी होते. अर्थात त्या प्रतिमा इंद्र व सूर्य यांच्याच असल्या पाहिजेत, असे जोगळेकरांचे मत आहे. श्री पं. वि. रानडे यांचे यांसंबंधी मत असे–

भाजे येथील विहारातील या दोन्ही प्रतिमा पौराणिक किंवा बौद्ध जातकांतील प्रसंगांचे चित्रण करणाऱ्या नसून, ही लेणी निर्माण करणाऱ्या सातवाहन राजपुरुषांच्या आहेत. हे चत्य आणि विहार सातवाहन वंशातील आद्य राजांच्या काळी निर्माण झालेले आहेत. त्यावरून या प्रतिमा पहिला सातकर्णी व त्याचा पुत्र कुमार सातवाहन यांच्या असाव्या.

श्री. जगदीशचंद्र यांच्या मते भाजे येथील विहारातील शिल्पकाम भरहूत व सांची येथील शिल्पकामाशी थोडेसे मिळते जुळते आहे. तीन्ही ठिकाणी तत्कालीन लोककलेचे दर्शन घडते. [म. धा. ती. १; पूना गॅझे; सह्याद्रि; पै. सा. रा.; क. प्रा. बु.]

भाट राजस्थानातील एक जात. संस्कृत भट्ट या शब्दावरून सांप्रतचा भाट हा शब्द बनलेला आहे, असे सांगतात. भाट शब्दाचाच बारहट असा एक अपभ्रंश रूढ आहे. वैदिक काळचे गाथागायक, महाभारतकाळचे सूत, तसेच नंतरच्या काळातील मागध, बंदी व ब्रह्मराव यांचे वंशज म्हणजेच आजचे भाट होत, असे संशोधकांचे मत आहे. भाटांच्या मते त्यांची उत्पत्ती कवी नामक एका ऋषीपासून झाली. ते स्वतःला ब्राह्मण समजून यज्ञोपवीत धारण करतात व स्वतःची वेदशाखाही सांगतात. काही समाजशास्त्रज्ञ त्यांना ब्राह्मण मानीत नाहीत, तर काही मानतात; पण क्षत्रियांकडे दीर्घ काळ राहिल्यामुळे भाट आपल्या ब्राह्मणी आचारापासून भ्रष्ट झाल्याचेही सांगतात. यांच्या उत्पत्तीविषयी एक लोककथा प्रसिद्ध आहे, ती अशी–

शिव आणि पार्वती कैलासावर राहणारी; पण शिव सदा समाधिमग्न. त्यामुळे पार्वतीला करमेना. म्हणून शिवाने तिच्या रंजनासाठी आपल्या निढळाच्या घामातून एक पुरुष निर्माण केला. परंतु तो पुरुष सदा शिवालाच प्रसन्न राखू लागला व त्याचेच स्तवन करू लागला. त्यामुळे पार्वती रागावली. तिने शिवाला त्या पुरुषाला शासन करण्यास सांगितले. मग शिवाने त्याला भूलोकावर ढकलून दिले. तोच भाटांचा मूळ पुरुष ठरला.

भाट आणि चारण हे दोन्ही एकच, अशी समजूत आहे; परंतु जातीने आणि वृत्तीनेही ते एक नाहीत. धन्याच्या वंशावळी ठेवणे व त्यांची स्तुती करणे, हा भाटांचा प्रधान व्यवसाय. तो पिढीजात चालतो. स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा मोठा गुण असल्यामुळे मातबर राजेरजवाडेही त्यांना वचकून वागत. राजपुतांचा शेकडो वर्षांचा इतिहास त्यांच्या बाडांतून आजही सुरक्षित आहे. राजपूत राजे त्यांना उच्चासनावर बसवीत, मानाने मिष्टान्नाचे जेवण देत, स्वतः उठून विडा समर्पण करीत व वाकून मुजरा करून आशीर्वाद मागत. यजमानाच्या घरच्या लग्नकार्यात त्यांना इनाम मिळत असे आणि अजूनही मिळते.

भाट– वेषभूषा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हातात उंच दांडयाचा भाला, अथवा तलवार, कमरेला कट्यार, छातीवर रुळणारी दाढी, मिशांचे कल्ले, अंगात लांब अंगरखा आणि डोक्याला फेटा, असा भाटांचा वेष असतो. केव्हाही आणि कुठेही आत्मत्याग करण्याची त्यांची तयारी असते. स्वतः प्राणत्याग करून, अगर प्राणत्यागाचा धाक दाखवून दुसऱ्यांना कुकर्मापासून वाचविणे, हा त्यांचा स्वभाव, अशी त्यांची कीर्ती सांगितली जाते. भाटांच्या अशा आत्मबलिदानाचे अनेक प्रसंग राजस्थानाच्या आणि सौराष्ट्राच्या इतिहासात नमूद आहेत. त्यांनी जिथे जिथे प्राण पाखडले, तिथे तिथे वीरशिळा उभारलेल्या दिसतात. त्यांना पाळिये अशी संज्ञा आहे. त्या शिळांवर त्या त्या भाटाच्या नावगावासह त्या प्रसंगाचा इतिहास खोदलेला असतो.

इ. स. च्या एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत राजस्थान आणि सौराष्ट्र या प्रदेशांत प्रत्येक महत्त्वाच्या दस्तऐवजावर भाटांची सही-साक्ष घेत.

यांच्यांत बरेचसे पोटभेद आहेत. त्यांतले ब्रह्मभाट हे श्रेष्ठ समजले जातात. राणीमंगा पोटजातीचे लोक जुन्या काळी राजमहिषींच्या वंशावळी ठेवून त्यांच्याकडून इनामे पटकावीत असत. प्रत्येक राजपूत ठाकोराचा एकेक कुळभाटही असतो. तो वर्षातून एकदा यजमानाच्या घरी येतो, त्याची कुळकथा त्याला ऐकवतो, त्या वर्षातली त्या घरात झालेली जन्म-मरणे नोंदून घेतो आणि बिदागी घेऊन निघून जातो. वाटी, चंद्रीसा, वूना, असनी, बोरवा, तुरी व केदारी असे यांचे आणखी पोटभेद आहेत.

बरेचसे भाट भीक मागण्याचाही धंदा करतात. ते दिवसभर गावात हिंडतात, गाणी म्हणतात, गोष्टी सांगतात आणि निर्वाह चालवतात. भाटांपैकी बरेचसे शाक्त आहेत; काही कबीरपंथाचे, तर काही रामानुज पंथाचेही आहेत. गौरीपती, बडे वीर आणि शारदा या त्यांच्या उपास्य देवता आहेत. [राजस्थान]

भाटिक एक कालसंज्ञा. जेसलमीरच्या राजांचा भट्टी किंवा भाटी या नावाचा एक पूर्वज होऊन गेला. त्याच्या नावावरून ही कालसंज्ञा प्रचलित झाली असावी, असा समज आहे. या कालाचे केवळ दोनच उल्लेख आणि तेही जेसलमीर या गावी अनुक्रमे वैष्णव व शैव मंदिरांत मिळाले आहेत. एका मंदिरात विक्रम संवत १४९४ च्या जोडीने ८१३ भाटिक आणि दुसऱ्या मंदिरात १६७३ या विक्रम संवताबरोबर ९९३ भाटिक आणि १५३८ शक असे दोन काल दिले आहेत. यावरून भाटिक वर्षात ६८० किंवा ६८१ मिळविल्याने विक्रमकाल येतो व ५४५ मिळवल्याने शककाल मिळतो; ६२३ किंवा ६२४ मिळविले तर इसवी सन येतो. [सं. मि.; म. ज्ञा. को.]

भाटिया एक व्यापारी जात. या लोकांची वस्ती मुख्यत्वे कच्छ, सौराष्ट्र, सिंध व मुंबई या भागांत आहे. याशिवाय, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश व टेहरी विभाग यांतही यांची थोडीफार वस्ती आहे. यांना भाटी, यादव, क्षत्रिय, यदुवंशी, कृष्णवंशी, वृष्णिवंशी, चंद्रवंशी व ठक्कर अशीही नावे आहेत. भाटिया स्वतःला यदुवंशातील भाटी राजपूत असे म्हणवतात. राजस्थानातील जेसलमीर येथे भाटियांनी काही काळ राज्य केले होते. भट म्हणजे योद्धा या संस्कृत शब्दावरून भाटिया हे नाव निघाले, असे कनिंगहॅम म्हणतो.

पंजाबमधील लाहोर आणि मुलतान हे जिल्हे हे भाटियांचे मूळ ठिकाण असावे. पंजाबी भाटिया हे आपले प्राचीन ठिकाण गजनीपूर होते, असे सांगतात. हे गजनीपूर रावळपिंडीजवळ होते, असे कनिंगहॅमचे मत आहे.

स्वतः भाटिया लोकांनी आपल्या कुलवृत्तांतात आपण मुळात इंद्रप्रस्थाहून निघून सुरपूर, मथुरा, प्रयाग, द्वारका, बहर, गजनी व सालपूर या मार्गे जेसलमीरला आलो, असे लिहिले आहे.

भाटिया लोक उंच, भरदार व चपळ असतात. त्यांच्या स्त्रिया सर्वसाधारणपणे गौरवर्णी व सुंदर असतात. त्यांचा पोशाख व दागिने वनिया स्त्रियांसारखे असतात.

हे लोक ज्या प्रदेशात राहतात, तिथली भाषा बोलतात. कच्छमधील भाटिया कच्छी, गुजरातमधील गुजराती व सिंधमधील भाटिया सिंधी इत्यादी.

पूर्वी भाटिया लोकांत दसा, दिवानी, पंचविसा, सिंधी व त्रागडी असे पोटभेद होते. त्यांच्यांत परस्परांत लग्ने होत नसत. सांप्रत त्यांच्यांत कच्छी हालाई व सिंधी असे दोन मुख्य भेद राहिले असून, त्यांच्यांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होत नाही. यांच्यांत चौऱ्यायंशी नुख (कुळे) आहेत. काहींच्या मते हे नुख भारद्वाजादी सात गोत्रांत विभागलेले आहेत.

उद्योगधंदे – बरेचसे भाटिया दुकानदार, व्यापारी, बँकर व ब्रोकर आहेत. व्यवसायानिमित्त पुष्कळसे भाटिया मुंबईत स्थायिक झाले आहेत. इराणचे आखात व तांबडा समुद्र यांतील बंदरे आणि झांझिबार, जावा, चीन, जपान, इ. देशांतही ते स्थायिक झाले आहेत. हे लोक अत्यंत सधन आहेत.

विवाहप्रथा – पूर्वी यांच्यांत विसा भाटिया मुलाने आपल्याच गावातील विसा भाटिया मुलीशी लग्न केले पाहिजे, असा नियम होता. पण गावात उपवर मुली नेहमी मिळू न शकल्याने ते अन्य प्रदेशातील भाटिया मुलींशी लग्न करू लागले. पण त्यासाठी वरपित्याने वधूपित्याला आठ ते दहा हजार रुपये देज द्यावे लागत असे. ज्यांना ही देजाची रक्कम परवडण्यासारखी नव्हती, ते भाटिया हरद्वार आणि टेहरी भागांतील यदुवंशी क्षत्रियांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुली करू लागले. त्याबद्दल त्यांना सुरुवातीच्या काळात जातिबहिष्कृतही व्हावे लागले.

सर्वसाधारणपणे मुलाकडील लोक मुलीला मागणी घालतात. लग्नापूर्वी साखरपुडा होतो व त्याची नोंद जातीच्या नोंदवहीत होते. वरपिता या वेळी काही रक्कम जातिनिधीला देतो. साखरपुड्यानंतर सात दिवस वधूचे आईवडील वरगृही रोज मिठाई पाठवतात. साखरपुड्यानंतर एकविसाव्या दिवशी वाङ्‌निश्चय होतो. लग्नाच्या आदल्या दिवशी दूधलक्ष्मी नामक एक विधी होतो. त्या वेळी वरपक्षाकडील सुवासिनी वधूगृही जाऊन, वधूला उंची वस्त्रे व दागिने देतात. नंतर वधू वरगृही जाते आणि वरपित्याच्या अंगावर पानाने सात वेळा दूध शिंपडते. त्यानंतर नवरामुलगा घोड्यावरून मिरवत वधूगृही जातो. तिथे दारात वधूची माता त्याला खेळातील नांगर, बाण व रवीया वस्तू देऊन त्याचे नाक ओढते. मग नवरामुलगा घरात जातो व ज्या भिंतीवर

भाटी राजपूत

कुलदेवतेची प्रतिमा रेखाटली असेल, त्या खोलीत वधू-वर शेजारी बसतात. त्या दोघांच्या मधे एक रंगीत कापड धरतात. दोघांनी कुलदेवतेची पूजा केल्यावर ती दोघे एकमेकांना ज्वारीची कणसे देतात. मग वधूच्या नातेवाईक स्त्रिया तिच्या कपाळावर सूतपुतळचा टाकतात आणि नवरामुलगा त्या बाजूला करतो. त्यानंतर वरपक्षातील स्त्रिया त्याच सूतपुतळ्या वराच्या मांडीवर टाकतात आणि वधू त्या बाजूला करते. नंतर वधू-वरांना मांडवात बोहल्यावर बसवतात. तिथे होम होतो. वधू-वर अग्नीभोवती चार प्रदक्षिणा घालतात आणि एकमेकांना मिठाईचे घास देतात. त्यानंतर वधू-वर वर-गृही येतात. तिथे ती दोघे एकमेकांना मूठभर तीळ देतात. नंतर वधू आपल्या सासू-सासऱ्यांनाही मूठभर तीळ देते. चांदीचे एक नाणे त्यांत ठेवून सासूसासरे वधूला ते तीळ परत देतात. पोकर्ण ब्राह्मण यांच्या लग्नात पौरोहित्य करतात.

प्रसूतिप्रथा – या लोकांत मूल जन्मल्यावर सहाव्या दिवशी सठीबरोबर घोड्याचीही पूजा करतात. जननाशौच चाळीस ते पंचेचाळीस दिवस पाळतात.

देवधर्म – भाटिया लोक शंकर, पार्वती, राम, सीता, हनुमान, कृष्ण, राधा, इ. देवदेवतांना भजतात. पुष्कळसे भाटिया वल्लभसंप्रदायी वैष्णव असून, ते बालकृष्णाला भजतात. काही भाटिया आर्यसमाजी, तर काही ब्राह्मसमाजीही झाले आहेत.

मर्तिकप्रथा – एखादा माणूस आसन्नमरण झाला, की शेणाने सारवलेल्या जमिनीवर दर्भ व जव अंथरून त्यावर त्याला झोपवतात. त्याच्या गळ्यातले जुने जानवे काढून त्याऐवजी नवे घालतात. हे लोक प्रेते जाळतात. एखादा माणूस बुडून मेला, तर त्याची प्रतिमा करून जाळतात. मृताशौच बारा दिवस पाळतात. अकराव्या दिवशी मृताला पिंड देतात आणि ते नदीत टाकतात. बाराव्या दिवशी श्राद्ध करतात. तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; रा. जा.; ट्रा. का. बॉं.]

भाटी राजवंश

जैसलमीर येथे राज्य करणारा एक वंश. हा वंश म्हणजे चंद्रवंशी यादवांची एक शाखा होती, असे म्हणतात. इ. स. च्या ७ व्या शतकात होऊन गेलेल्या भाटी राजावरून या वंशाला हे नाव मिळाले. पंजाबात यदु की डांग नावाचे एक स्थान आहे, त्याच्या आसमंतात या लोकांची वसाहत होती. इ. स. च्या ६ व्या शतकातील रज नामक राजापासून या वंशाचा इतिहास सुरू होतो. खुरासानचा बादशहा फरीदशाहा याने भारतावर स्वारी केली, तेव्हा याने त्याचा पराभव केला; पण हा स्वतः युद्धात मरण पावला. त्याचा पुत्र गज याचे राज्य पेशावरच्या आसपास होते. त्याने गजनीपूर नामक नगर वसवले. कर्नल टॉडच्या मते अफगणिस्तानातले गजनी ते हेच होय. पण कनिंगहॅमच्या मते गज राजाने वसवलेले नगर म्हणजे रावळपिंडीजवळचे गाजीपूर होय. खुरासानच्या बादशाहाने पुन्हा स्वारी केली, तेव्हा तो व गज राजा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दोघेही रणांगणावर मारले गेले व गजनीपूर मुसलमानांच्या ताब्यात गेले. गजाचा पुत्र शालिवाहन 'पंजाबच्या दक्षिण भागात आला व तिथे लाहोरजवळ त्याने शालभानपूर हे नगर वसवले. तेच सियालकोट होय असे कनिंगहॅम म्हणतो. हळूहळू शालिवाहन राजाने पंजाबवर सत्ता स्थापली व गाजीपूर परत जिंकून घेतले.

शालिवाहनाचा पुत्र बलंद व त्याचा पुत्र भाटी यांनी त्यानंतर पंजाबवर राज्य केले. भाटी इ. स. ६२३ च्या सुमारास गादीवर बसला. त्याने आपल्या नावाने भट्टिक संवत सुरू केला. त्यानेच पंजाबातील प्रसिद्ध नगर भटनेर वसवले व तिथे एक गडही बांधला, असे म्हणतात. सांप्रत त्याला हनुमानगड म्हणतात.

त्यानंतर मुसलमानांच्या आक्रमणामुळे या वंशाचे राज्य नष्ट झाले व तिथले बरेच लोक राजस्थानात पळून गेले. तिथे त्यांनी काही ठिकाणी नवी राज्ये स्थापली. त्यांतील तन्नू नामक राजा विशेष प्रसिद्ध होता. जेसलमीरपासून ७५ मैलांवर तन्नोट नामक किल्ला आहे, तो त्याच्या बापाने बांधला. तन्नूजीने विजनोरचा किल्ला बांधला व राजस्थानात भाटींची सत्ता प्रस्थापित केली. त्याच्या मागून भाटी वंशाची सत्ता नष्टप्राय झाली होती. ती देवराज याने पुन्हा प्रस्थापित केली. तो इ. स. ७५० च्या सुमारास राज्य करीत होता. त्याने स्वतःला महारावळ ही पदवी घेतली. ती नंतरच्या सर्व राजांनी चालू ठेवली. त्याचा नातू वत्सराज याने राजस्थान व पंजाब यांच्या सीमेवर बरेच प्रबळ राज्य निर्माण केले. वत्सराजाचा नातू जेसल याने जेसलमीरचा किल्ला बांधला व तिथे राजधानी नेली. त्याने राज्याचा बराच विस्तार केला. त्या काळी भाटी वंशाची गणना शूर राजपुतांत होऊ लागली. इ. स. १२७६ साली जैतसी नामक राजा गादीवर बसला. तो, त्याचा पुत्र मूलराज, नातू देवराज व पणतू हंमीर या पराक्रमी वीरांनी बराच राज्यविस्तार केला व अलाउद्दीन खिलजीचा खजिनाही लुटला. त्यामुळे त्याने जेसलमीरवर स्वारी केली. पण मूलराज व हंमीर यांनी गनिमी काव्याचा आश्रय करून शत्रूला खूप सतावल्यामुळे किल्ला जिंकायला त्याला ८–१० वर्षे लागली. शेवटी किल्ल्यावरील दाणावैरण व सैन्य संपत आल्यामुळे भाटींनी जोहार केला, तेव्हा किल्ला अलाउद्दिनाला मिळाला. या धुमश्चक्रीत जैतसीचे दोन नातू वचावले होते. त्यांनी आपले राज्य पुन्हा मिळवले. ते राज्य इ. स. च्या १६ व्या शतकाच्या मध्यापर्यंत स्वतंत्र होते व भाटी राजांनी मुलतानपर्यंतचा प्रदेश जिंकला होता. त्यानंतर भाटी राजे मोगलांचे मांडलिक बनले. १९ व्या शतकाच्या आरंभापर्यंत हे राज्य कसेतरी चालू होते व त्यानंतर ते इंग्रजांच्या ताब्यात गेले. [रा. रा. उ. न्हा; रा. इ.]

भाण संस्कृत साहित्यातील दश रूपकांपैकी एक. यात धूर्त, फसवे, शृंगारी, इ. व्यक्तींचे चरित्र असते. विट हा याचा नायक असतो आणि तो स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या साहसी कृत्यांचे वर्णन करतो. यात एक अंक व दोन संधी असतात. रंगभूमीवर एकच पात्र असते व ते इतर काल्पनिक पात्रांशी बोलत असते. म्हणजे भाणाचे कथानक आकाशभाषित उत्तरप्रत्युत्तराने पुढे जात असते. शृंगार आणि वीर हे भाणाचे दोन रस मानलेले आहेत. यातील वीर रस साहसात्मक असतो. चतुर्भाणी नामक ग्रंथात चार भाणांचा संग्रह केलेला आहे, त्यांची नावे अशी— वररुचिकृत उभयाभिसारिका, शूद्रककृत पद्मप्राभृतक, ईश्वरदत्तकृत धूर्तविटसंवाद आणि श्यामिलककृत पादताडितक. याशिवाय, वामनभट्टाचा शृंगारभूषण, काशीपती कविराजाचा मुकुंदानंद, कांचीच्या वरदाचार्याचा वसंततिलक, रामचंद्र दीक्षिताचा शृंगारतिलक, केरळच्या युवराजाचा रससदन, इ. भाण प्रसिद्ध आहेत.

भाणात सर्वसाधारणपणे प्रातःकाळचे वर्णन, एखाद्या ऋतूचे वर्णन तसेच बदमाष, गणिका, नागरक इत्यादींचे वर्णन, त्याचप्रमाणे मेंढे व कोंबडे यांची झुंज, कुस्ती, जुगार, जादू, इ. विषय येतात. त्यात कधी कधी पौराणिक, ज्योतिषी व भागवत यांची टवाळीही केलेली असते. यातला शृंगार पुष्कळदा अश्लील बनतो. भाणांतील वर्णने ठरीव व साचेबंद असतात. त्यामुळेच भाण हा प्रकार पुढे जनमानसातून उतरला. पूर्वी स्थानिक देवदेवतांच्या जत्रांच्या वेळी भाणांचे प्रयोग होत असत.

चतुर्भाणीचा उद्देश, तत्कालीन समाजातील लब्धप्रतिष्ठित लोकांच्या कामुकतेचे दर्शन घडवून त्यांची टिंगल टवाळी करणे, हा आहे, असे दिसते. [सं. ना. सौं.; सं. सा. इ.; शृंगारहाट]

भाणदास (१६९८–१७५५ इ. स.) गुजरात प्रदेशातील एक संतकवी. हा लोककवी म्हणूनही प्रसिद्ध होता. लोहाणा जातीत याचा जन्म झाला. हा कबीरपंथी होता, असे म्हणतात. याने सौराष्ट्र व गुजरात या भागात संचार करून धर्मजागृती करण्याचा खूप प्रयत्न केला. याने शंकराचार्यहस्तामलकसंवाद, प्रल्हाद-आख्यान, अजगर-अवधूतसंवाद, नृसिंहजीनी हमची, हनुमानजीनी हमची, बारहमासा, इ. काव्ये व गरब्याची अनेक पदे रचली आहेत. हा विशेषेकरून गरबी कवी म्हणूनच प्रसिद्ध होता. वेदान्ती कवी म्हणूनही लोक त्याला ओळखीत. याने जीवतसमाधी घेतली. [वि. मुं. रा. प.; गु. सा. इ.]

भाँत एक लोककला. प्राचीन काळापासून आजतागायत ही कला प्रचलित आहे. लहानपणीच मुली घरातल्या मोठ्या स्त्रियांकडून तिचे शिक्षण घेत असतात. या कलेचे स्वरूप असे—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एखादी आकृती मनात कल्पून त्या आकृतीप्रमाणे कापड चिमटीत पकडून ते दोरीने बांधतात. नंतर सर्व कापड रंगात बुडवतात. वाळल्यावर बांधलेला दोरा सोडतात. बांधलेली जागा रंगाने रंगत नाही आणि त्या ठिकाणी आकृती तयार होते. या आकृतीला प्राचीन संस्कृत शब्द भक्ती असा होता. त्यावरूनच हिंदीत भांत हा शब्द आला आहे. निरनिराळ्या आकृत्या असलेल्या चुनडीला जयपूर भागात भांतभतूल्या आणि मेरठच्या बोलीत भांतभतीली म्हणतात. या आकृतींना अनेक नावे आहेत. उदा०– हात पसरणाऱ्या स्त्रियांच्या आकृतीला मैत्रिणींची भांत व निरनिराळ्या पक्ष्यांच्या आकृतीला चिडीचुड़कले की भांत अशी नावे आहेत. अशा प्रकारे जुन्या काळी इंद्रधनुष्य, मोर, कमळ, बुट्टे, पानेफुले, इ. अनेक आकृत्या बांधणी पद्धतीन कपड्यांवर तयार करीत. काही वेळा कापड एकामागून एक असे अनेक रंगांत बुडवीत आणि दुसऱ्या वेळी रंगात बुडवताना पहिल्या आकृतीपेक्षा वेगळ्या ठिकाणी कापड बांधून नवीन भांत तयार करीत. निरनिराळ्या ऋतूंत व निरनिराळ्या प्रसंगी वापरायच्या वस्त्रांवर विशिष्ट आकृत्या काढीत. या परंपरागत आकृत्यांना स्त्रिया अभ्यास करीत. बाणाने हर्षचरितात अशा आकृत्या जाणणाऱ्या व त्याप्रमाणे कापडाला गाठी मारणाऱ्या वृद्ध स्त्रियांचा उल्लेख केला आहे. [ह. च. सां. अ.]

भात भारतातील एक प्रमुख धान्य. हे भारताच्या सर्व भागांत पिकते. पाहा – अक्षता; ओदन; चरू; तांदूळ.

भातखंडे, पं. विष्णू नारायण

(१८६०–१९३६ इ. स.) हिंदुस्थानी संगीताचे सर्वांगीण संशोधन करून त्याला अध्ययनपरिपाटी लावणारे एक पंडित व संगीतशास्त्रज्ञ. संगीत हे आपल्या राष्ट्रीय संस्कृतीचे एक बहुमोल अंग आहे ' हे ओळखून यांनी त्या कलेचा शास्त्रशुद्ध अभ्यास कसा करता येईल, त्याला श्रेष्ठ दर्जा कसा लाभेल आणि कलाकारांना ऊर्जितावस्था कशी प्राप्त होईल यांविषयी अहर्निश व शास्त्रीय दृष्टीने परिश्रम केले.

यांचा जन्म मुंबईत झाला. त्यांचे वडील नारायणराव हे मुंबईतील एका इस्टेटीचे वहिवाटदार व हिशेबतपासनीस होते. विष्णुपंतांना संगीताचे ज्ञान व गोडी लहानपणापासूनच होती. आपला अभ्यास सांभाळून ते संगीताचाही अभ्यास करीत. इ. स. १८८० साली एल्फिन्स्टन हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पुढच्या शिक्षणासाठी ते कॉलेजात गेले. इ. स. १८८५ साली बी. ए. व १८८७ साली एल्. एल्. बी. परीक्षा दिल्यावर काही काळपर्यंत त्यांनी वकिलीही केली. पण जन्मजात ओढा संगीतशास्त्राकडे असल्याने त्यांनी पुढे त्या शास्त्राचे सांगोपांग ज्ञान मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. संगीताचा शास्त्रीय अभ्यास पद्धतशीर व्हावा यासाठी त्यांनी संस्कृत, मराठी, गुजराती व हिंदी भाषांतील संगीतविषयक उपलब्ध साहित्याचे खूप परिशीलन केले. ते वीन व सतार ही वाद्ये चांगली वाजवीत. त्यांच्या वडिलांचे मत त्यांच्या या संगीताच्या छंदाबद्दल प्रथम प्रतिकूलच होते; पण जसजशी विष्णुपंतांची त्या कलेत प्रगती होऊ लागली, तसतसे त्यांचे मतही बदलले. ते मग मुलाचे कौतुक करू लागले. विष्णुपंत संगीताच्या मैफलींना नेहमी उपस्थित राहत. गायनोत्तेजक मंडळीचे सभासद झाल्याने त्यांना तानरसखां, इनायतहुसेनखां, नथ्थनखां, अलिहुसेनखां, यांच्यासारख्या कलावंतांचे गायनवादन ऐकण्याची संधी मिळाली. या काळात त्यांनी ध्रुपदे, होरी, ख्याल, तराणे, ठुमऱ्या वगैरे चिजांचा खूप संग्रह केला. अशा प्रकारे हिंदुस्तानी संगीताच्या परंपरेचे ज्ञान त्यांनी पुष्कळच मिळवले. मग त्यांना त्या शास्त्रात परिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता तीव्रपणे भासू लागली. केवळ भरताचे नाट्यशास्त्र किंवा संगीतरत्नाकर या ग्रंथांचा अभ्यास करून हे काम भागणारे नव्हते. त्यासाठी संगीशास्त्रात पारंगत अशी जी वेगवेगळी घराणी होती, त्यांतल्या नामवंत गायकांना भेटून त्या त्या घराण्यांची वैशिष्ट्ये समजून घेणेही आवश्यक होते. अर्थात हे कार्य तितकेच कठीणही होते. कारण आपली विद्या गुप्त राखण्याकडेच अशा घराणेवाल्या गायकांचा कटाक्ष असे. पण श्री. भातखंडे त्यासाठी बद्धपरिकर होऊन कामाला लागले. त्यांनी भारतभर भ्रमण करून हिंदुस्तानी संगीतकलाकारांच्या गाठीभेटी घेतल्या, त्यांचा अनुनय केला, त्यांचे मन वळवले व महत्प्रयासाने त्यांच्याकडून संगीताविषयी बारीकसारीक माहिती मिळवली. आशकअल्ली नावाच्या एका गायक कलाकाराकडून त्यांनी २५० ख्याल शिकून घेतले व ते स्वरलिपीत तालांच्या चिन्हांसहित मांडले. मग ते हळूहळू सगळ्याच संगीताची शास्त्रबद्ध मांडणी करण्याच्या कामाला लागले.

दक्षिण भारतात सर्व ठिकाणी हिंडून विष्णुपंत त्या भागातील गायक कलाकारांना व संगीतशास्त्रज्ञांनाही भेटले. तिकडील संगीतशास्त्रावरच्या ग्रंथांचाही त्यांनी अभ्यास केला. रामामात्य पंडिताचा स्वरमेलकलानिधी, तुळजेंद्राचा संगीतसारामृत व रागलक्षण हे ग्रंथ दक्षिणेत प्रमाण मानले जातात. भातखंडे यांनी त्यांच्या नकला करून घेतल्या. मग विद्यार्थ्यांना संगीतशास्त्राचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी बडोदे व ग्वाल्हेर येथील नरेशांच्या साहाय्याने बडोद्याला बडोदे संगीत विद्यालय व ग्वाल्हेरास माधव म्युझिक कॉलेज स्थापन केले. त्यांनी संगीत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिकविण्यासाठी हिंदुस्तानी संगीताची क्रमिक पुस्तकमालिकाही तयार केली. या पुस्तकांत बहुतेक सर्व प्रमुख रागांची शास्त्रीय लक्षणे, चीजा, स्वरलिपी वगैरे सर्व काही आहे.

पुढे त्यांनी संगीत परिषदा भरवून संगीत शास्त्रासंबंधी चर्चा घडवून आणल्या व त्या शास्त्राला एक सुबद्ध असे स्वरूप देण्याचा उपक्रम केला. त्याचे पर्यवसान लखनौ येथे मॉरिस कॉलेज ऑफ् हिंदुस्थानी म्युझिक या संस्थेची स्थापना होण्यात झाले. या कॉलेजमध्ये आखून दिलेली संगीतशिक्षणपद्धती सांप्रत सर्व संगीत विद्यालयांतून प्रचलित झाली आहे.

पं. भातखंडे यांनी संगीतशास्त्रावर पुढील पुस्तके लिहिली–
(१) हिंदुस्थानी संगीतपद्धती–भाग ४
(२) श्रीमल्लक्ष्यसंगीतम् (३) अभिनव रागमंजरी
(४) हिंदुस्थानी संगीतपद्धती क्रमिक पुस्तकमालिका
(५) गीतमालिका (६) पारिजातप्रवेशिका व
(७) राग-विबोध-प्रवेशिका.

याशिवाय त्यांनी इंग्रजी, हिंदी, इ. भाषांत संगीतविषयक पुष्कळ लेख लिहिले व कित्येक प्राचीन संगीत ग्रंथ छापून प्रकाशितही केले आहेत.

तानसेन घराण्यातील अनेक दुर्मिळ चिजा प्रसिद्ध करण्याची



पं. विष्णू नारायण भातखंडे

त्यांची इच्छा होती; पण ती पुरी होऊ शकली नाही. आयुष्यात त्यांना संसारसौख्य फारसे लाभले नाही. पण त्याबद्दल हळहळत न बसता त्यांनी आपले सर्व जीवन संगीतशास्त्राचे अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन यांत सार्थकी लावले. त्यांनी आपल्या दीर्घोद्योगाने १८१ राग व १८७५ चिजा यांचे स्वरलिपीसह संकलन करून संगीतक्षेत्रात महान कार्य केले. मात्र त्यांनी शिष्य-वर्ग असा फारसा तयार केला नाही. त्यांनी खास तयार केलेले दोन-तीनच शिष्य असून, त्यांत श्री. रातंजनकर (प्रि. मॉरिस म्यु. कॉ. लखनौ) व पं. राजाभैय्या पूंछवाले (प्रि. माधव म्यु. कॉलेज, ग्वाल्हेर) यांची प्रामुख्याने गणना होते. [सात स्वरश्री.; वि. ना. भातखंडे – श्री. रातंजनकर; हिं. वि. को.]

भाता बाण ठेवण्याचे साधन. भस्त्रा = कातड्याची पिशवी, या संस्कृत शब्दावरून भाता शब्द बनला आहे. भाते कातड्याचे बनवीत. ऋग्वेदात (६.७५.५) व अथर्ववेदात (२. ३३.२; ४.१०.६) इषुधी या शब्दाने भात्याचा उल्लेख येतो. जांभई देते वेळी जसा तोंडाचा आकार होतो, तसा भात्याच्या तोंडाचा आकार असे, म्हणून त्यास जंभ असेही म्हणत. प्राचीन काळी बैल किंवा इतर प्राणी यांच्या शिंगांचे किंवा धातूंचे भाते करीत व त्यांवर सोन्याची नक्षी काढीत. धनुर्धारी वीरासाठी भाता ही अत्यावश्यक वस्तू असे. भात्यांचे प्रकारही निरनिराळे असत. रथात ठेवण्याचे भाते फार मोठे असत, त्याला तूणीर असे म्हणत. एका तूणीरात दोनशे बाण बसत. कोदंडमंडन नामक ग्रंथात म्हटले आहे, की एका रथ्याजवळ चारशे साधे बाण असावे व ते दोन भात्यांत ठेवलेले असावे. बाणांची टोके खराब होऊ नयेत म्हणून भात्यात चंदनाचा बारीक भुसा भरीत. भाता उजव्या खांद्याला पाठीमागे बांधीत.

ज्यातले बाण कधीही संपत नाहीत अशा भात्याला अक्षय्य भाता म्हणत. अर्जुनाला अग्नीने दोन अक्षय्य भाते दिल्याची कथा महाभारतात आहे. [ऋ. द.; व्या. ज्ञा. को.; वे. इं.]

भादीमाय पूर्वास्पृश्यांचा एक उत्सव. भाद्रपद मासात हा उत्सव येतो. याचे स्वरूप महालक्ष्मीच्या सणासारखे असते. त्यांच्या वस्तीत एका ओट्यावर दोन-चार दगड मांडून त्यांना शेंदूर फासलेला असतो. हे आकारहीन तांदळे म्हणजेच भादीमाय होय. उत्सवाच्या प्रारंभी हे लोक 'भादी-माय, भादीमाय' असे ओरडत रस्त्याने हिंडतात. पहिल्या दिवशी भादीमायचे आगमन होते. दुसऱ्या दिवशी त्या जेवतात आणि तिसऱ्या दिवशी त्यांचे विसर्जन होते. या देवीच्या पूजेसाठी निरनिराळ्या कुटुंबांतून यथाशक्ति कणीक, गूळ, तेल हे पदार्थ ते लोक मागून आणतात. कणीक उकडून तिचे देव बनवितात. त्यांतील एक देव मोठा व चार लहान असतात. या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवांच्या माथ्यावर थोडा खळगा ठेवतात. या खळग्यात तेल घालून त्यात वात लावतात. या पाच देवांत मोठ्या देवाला बोवा आणि लहान देवांना वऱ्हाडी असे म्हणतात. हे सर्व देव भादीमायच्या पुढे ठेवतात. त्यांच्या नैवेद्यासाठी कानवले करतात. निरनिराळ्या घरची माणसे त्या नैवेद्याचा प्रसाद घेण्यासाठी एकमेकांच्या घरी जातात. या प्रसादभक्षणाने आपल्याला चांगले दिवस येतील, अशी त्यांची समजूत असते. तिसऱ्या दिवशी भादीमायचे विसर्जन करतात. विसर्जनानंतर ते कणकीचे गोळे गूळ-तेलाबरोबर खातात. प्रथम बोवाच्या उजव्या बाजूचा, मग मागचा व नंतर पुढचा, असा ते खाण्याचा क्रम असतो.

भादुली बंगाल प्रदेशातील एक लौकिक व्रत. हे स्त्रीव्रत आहे. समुद्रपूजेचाच तो एक प्रकार आहे. भाद्रपद मासाच्या पहिल्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. सबंध महिनाभर हे व्रत चालते. व्रतासाठी लागणाऱ्या पूजासाहित्यात प्रामुख्याने एक पेला पावसाचे पाणी, एक पेला नदीचे पाणी आणि केळीच्या सोपटापासून बनविलेली एक नाव असते. याशिवाय केळी, तांदूळ व इतर शिवासामग्रीही असते. व्रतकर्ती स्त्री पूर्वेला अथवा उत्तरेला तोंड करून बसते. प्रथम समुद्राचे प्रतीक म्हणून एक खड्डा खणते. या समुद्रात पूर्वेकडे भादुली देवीची स्थापना करते. देवीपुढे निरनिराळ्या रांगोळ्या काढते. मग ती नदीचे थोडे पाणी त्या खड्ड्यात ओतते आणि सोपटापासून तयार केलेली नाव त्यात सोडते. [इं. फो. लो.]

भादेपा (इ. स. चे ९ वे शतक) चौऱ्यायंशी सिद्धांपैकी एक. तिबेटी परंपरेनुसार हा श्रावस्तीचा रहिवासी असून, एका ब्राह्मण कुळात जन्मला होता. हा चित्रकार जातीचा होता, अशीही जनश्रुती आहे. याचे मल्हार रागातील एक पद उपलब्ध आहे. याने कण्हपाचे शिष्यत्व पत्करले होते. [ना. सं.; हिं. का. धा.; पु. त. नि.; हिं. सा. बि.]

भाद्रपद चैत्रादिगणनेतला सहावा मास. या महिन्यातील पौर्णिमेस किंवा तिच्या आगेमागे पूर्वाभाद्रपदा नक्षत्र येते, म्हणून याला हे नाव मिळाले आहे. याचे दुसरे नाव नभस्य असे आहे. या मासातली व्रतादी कृत्ये अशी–

शुद्ध तृतीयेस स्त्रिया हरितालिका व्रत करतात. त्या व्रतात सखीसह पार्वतीची पूजा करून फलाहारावर राहायचे असते. या दिवशी बायका अग्नीवर शिजवलेला कोणताही पदार्थ खात नाहीत. या तिथीला मधुश्रावणिका असेही नाव आहे.

शुद्ध चतुर्थीला वरदचतुर्थी म्हणतात. या दिवशी मृण्मय गणपती घरात आणून त्याची पूजा करावी, असे सांगितले आहे. महाराष्ट्रात चतुर्थीपासून अनंतचतुर्दशीपर्यंत दहा दिवस गणपतीचे सार्वजनिक उत्सव होत असतात. पंचमीला ऋषिपंचमी म्हणतात. या दिवशी स्त्रिया सप्तर्षींची पूजा करतात व बैलाने नांगरलेल्या भूमीतले शाकादी पदार्थ खात नाहीत. षष्ठीला सूर्यपूजन करावे व कार्तिकस्वामीचेही दर्शन घ्यावे, असे सांगितले आहे. सप्तमीला मुक्ताभरणव्रत करतात. अष्टमीला दूर्वाष्टमी म्हणतात. त्या दिवशी दूर्वेचे पूजन करतात. या व्रतात अग्निपक्व पदार्थ खात नाहीत. याच दिवशी ज्येष्ठा देवीची पूजा करतात. कित्येक वैष्णव देवस्थानांतून याच दिवशी भागवतपुराणाच्या सप्ताहाला प्रारंभ होत असतो. एकादशीला परिवर्तिनी एकादशी म्हणतात. त्या दिवशी विष्णूचा परिवर्तनोत्सव करतात. द्वादशीला वामनाची पूजा करतात. या द्वादशीला पयोव्रताचा संकल्प करून, महिना संपेपर्यंत दूध वर्ज्य करतात. चतुर्दशीला अनंत व्रत करतात.

भाद्रपद मासाचे सांकेतिक चित्र

याच मासात अगस्त्याचा उदय होतो. तो झाल्यावर सात दिवसपर्यंत रोज अगस्त्याला अर्घ्य देतात. पौर्णिमेस प्रौष्ठपदी म्हणतात. या दिवशी प्रपितामहाच्या पूर्वीच्या तीन पुरुषांना उद्देशून श्राद्ध करावे, असे सांगितले आहे.

प्रस्तुत मासाचा कृष्ण पक्ष हा पितृपक्ष समजला जातो. या पक्षात पित्याच्या मृत्युतिथीच्या दिवशी समस्त पितरांना उद्दे-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धून महालयश्राद्ध करतात. कृष्ण षष्ठीला चंद्रषष्ठी म्हणून त्या दिवशी उपोषण व चंद्रपूजा करतात. अष्टमीला महालक्ष्मीव्रत व नवमीला अन्वष्टका श्राद्ध करतात. या नवमीला अविधवा-नवमी असेही म्हणतात. या दिवशी, घरातली एखादी सुवासिनी मृत झाली असल्यास, तिचे श्राद्ध करतात. त्रयोदशीला पितृश्राद्ध करतात; मात्र ते पुत्रवान गृहस्थाने करू नये, असे सांगितले आहे. चतुर्दशीला अपघाती मृत्यू आलेल्या आप्तांसाठी श्राद्ध करतात. अमावास्येला गजच्छायापर्व आले असल्यास त्याही दिवशी श्राद्ध विहित आहे.

श्रीविष्णूच्या संतोषासाठी या महिन्यात मध व तूप घालून खीर, मीठ व गूळभात यांचे दान करावे, असे वामन पुराणात म्हटले आहे. याच मासात एकभुक्त राहिल्यास ऐश्वर्यप्राप्ती होते, असेही म्हटले आहे. [नि. सिं.; पु. चिं.]

भानुदास

(इ. स. १४४८–१५१३) महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध संत व कवी. हा एकनाथांचा पणजोबा होय. भानुदासाचा व्रतबंध झाल्यावर एके दिवशी त्याच्या वडिलांनी त्याची उनाडक्यांबद्दल कानउघाडणी केली. ती गोष्ट भानुदासाला लागली आणि तो घरातून निघून पैठणच्या बाहेर असलेल्या एका पडक्या देवळात गेला. या मंदिरात सात दिवस त्याने सूर्याची उपासना केली. भानुदासाच्या भक्तीमुळे सूर्यनारायण प्रसन्न झाला आणि त्याने भानुदासाला दूध पाजले, अशी आख्यायिका आहे.

मग भानुदासाच्या माता-पित्यांनी त्याचा शोध करून त्याला घरी नेले. जगरूढीप्रमाणे काही दिवसांनी त्याचा विवाहही झाला व त्याचा संसार फुली-फळी वहरून आला. त्यातच त्याने कापडाचा व्यापार करून खूप द्रव्य मिळविले. श्रीमंत होऊनही त्याचे चित्त परमार्थावरून ढळले नव्हते. तो नियमाने आषाढी-कार्तिकीला पंढरपुरची वारी करी.

त्या वेळी विजयनगर येथे कृष्णराय नावाचा राजा राज्य करीत होता. तो एकदा पंढरपुरी आला असता, त्याला तिथली विठ्ठलाची मूर्ती आवडली व ती त्याने उचलून हंपीला नेली. वारकरी वारीच्या वेळी पंढरीला जातात, तो मंदिरात मूर्ती नाही. त्यामुळे सर्वांचा जीव कासावीस झाला. भानुदासाला ते पाहवले नाही. तो तसाच पंढरीहून निघाला व हंपीला पोचला. त्याचा देव तिथे त्याला भेटला. त्याला तिथून उचलून परत आणण्याच्या प्रयत्नात भानुदासावर सुळी चढण्याचा प्रसंग आला; पण विठ्ठलाच्या कृपेमुळे तो टळला.

भानुदासाने विठ्ठलाची मूर्ती परत पंढरीला आणली, ही घटना अत्यंत महत्त्वाची समजली जाते.

कृष्णरायाने जिथे मूर्ती नेऊन ठेवली ते मंदिर आजही हंपीत पाहायला मिळते. या देवळालाच विजय विठ्ठलाचे मंदिर म्हणतात. या देवळात विठ्ठलाची मूर्ती नाही. काही वर्षांपूर्वी या मंदिराच्या परिसरात, जिच्या डाव्या कडेवर रुक्मिणीची सूक्ष्म आकृती आहे, अशी एक विठ्ठलमूर्ती भग्नावस्थेत पडलेली आपण पाहिली आहे, असे डॉ. सी. नारायण राव यांनी म्हटले आहे. या संदर्भात डॉ. शं. गो. तुळपुळे यांचे मत असे, की ही विठ्ठलमूर्ती मूळची पंढरपूरची असून, तिची एक प्रतिकृती रुक्मिणीविरहित तयार करून ती कृष्णरायाने भानुदासाला दिली असावी.

भानुदासाने वरेच अभंग रचले आहेत. या अभंगांची भाषा सोपी आहे. [म. सा.; म. वा. इ.; वि. स्मा. ग्रं; प्रा. म. सं. क.]

भानुमिश्र

(इ. स. चे १२ वे शतक) एक संस्कृत साहित्यशास्त्रज्ञ आणि पंडित. हा विहार प्रदेशाच्या दरभंगा जिल्ह्यातील इसहपूर या गावचा रहिवासी होता. याने रसमंजरी, अलंकार-तिलक, शृंगारदीपिका, रसतरंगिणी, रसकल्पतरू, मुहूर्तसार, इ. ग्रंथ रचले आहेत. यांतील बहुतेक सर्व ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. [बि. ज. स्मा. ग्रं.]

भानुव्रत

एक काम्य व्रत. कोणत्याही महिन्याच्या सप्तमीला याचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रताची देवता सूर्य. या व्रतात एकभुक्त करायचे असते. उद्यापनाच्या वेळी एक गाय व सुवर्ण दान देतात. फल – सूर्यलोकप्राप्ती. [हि. ध.]

भामटा

एक गुन्हेगार जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने महाराष्ट्र, म्हैसूर, मध्य प्रदेश, इ. राज्यांत आढळते यांना उचले, वडारी, कलवडरू, तुडुगवडरू, कामाठी, घंटीचोर, खिसेकातरू, टकारी, पाथरवट, गाठचोर, इ. नावे आहेत. या जातीचे बरेच लोक तेलुगू भाषा बोलतात. त्यावरून हे मूळचे तेलंगणातील असावे.

भामटे लोक खुजट, टणक व चपळ असतात. यांचा वर्ण काळा किंवा निमगोरा असतो. यांच्या स्त्रिया देखण्या असतात. त्या कपडालत्ता चांगला वापरतात. भामटिणी नथ घालतात. त्या उजव्या हातापेक्षा डाव्या हातावर अधिक गोंदवून घेतात. याशिवाय त्या तोंडावरही गोंदवून घेतात. त्यांचा पोशाख मराठा किंवा ब्राह्मण स्त्रीप्रमाणे असतो.

हे लोक मुसलमानांनादेखील आपल्या जातीत घेतात. जातीत घेतल्या जाणाऱ्या माणसाबरोबर एका थाळीत भोजन केले, की तो भामटा बनतो. इतर जातीच्या मुलांना हे लहानपणीच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या जातीत घेतात किंवा दत्तक घेतात. अशा मुलांना कोन्नड अगर गोल्यड आणि मुलींना कोन्नडी म्हणतात. कित्येक भामटे व्यभिचारिणी गर्भवतीला आसरा देऊन ती प्रसूत झाल्यावर तिचे मूल ठेवून घेतात आणि तिची रवानगी करतात. जाताना तिला लुगडे–चोळी व एक रुपया देतात.

विवाहप्रथा – यांची दोन कुळे आहेत. समान कुळांत विवाह होत नाहीत. हे मुलींची लग्ने बालवयातच करतात. चोरीत निष्णात ठरल्याशिवाय भामट्याला बायको मिळत नाही. कैकाडी लोकांशी यांचा लग्नसंबंध होतो. यांना विधवाविवाह व सोडचिठ्ठी मान्य आहे. विधवेच्या लग्नात तिच्या वडिलांना काही रक्कम द्यावी लागते. पंचायतीच्या परवानगीने पुनर्विवाहही होतात. धर्मविधी जातीतले जाणते करतात.

बहिरोबा, भवानी, यल्लम्म, इ. देवतांना हे भजतात. काही ठिकाणी पशुबलीचीही प्रथा आहे. अक्कलकोटजवळील कोनाळ गावी यांची देवी आहे. तिथे हे यात्रेसाठी जमतात.

चोरी, उचलेगिरी, घरफोडी, खिसे कापणे असल्या कामांत हे पटाईत असतात. या व्यवसायासाठी लोहमार्ग हे त्यांचे प्रमुख क्षेत्र असते. काही वेळा व्यवसायासाठी ते लांबलांबचे पल्ले गाठतात. त्यांच्या स्त्रिया त्यांना व्यवसायात मदत करतात; पण त्या फार दूर जात नाहीत. हे लोक धंद्यासाठी वेषांतरही करतात. त्यामुळे त्यांना बऱ्याच प्रसंगी प्रतिष्ठेने मिरवता येते.

भामटे लोक लहानपणीच मुलांना चोरीचे शिक्षण देतात. यांची मुले लहान मुलांच्या अंगावरील दागिने पळविण्यात तरबेज असतात. गुन्ह्यांसाठी हे चाकू, सुऱ्या, वाघनखे, आकडे, इ. हत्यारे बाळगतात. यांतील काही हत्यारे पुरुष तोंडात ठेवतात व स्त्रिया चोळीत ठेवतात. यांच्या टोळीच्या नायकाला रंगरेड असे म्हणतात. लुटीच्या मिळकतीत याचा वाटा मोठा असतो. घरात शिरून माल बाहेर काढणे हे त्याचे प्रमुख काम असते. रंगरेड पकडला जाणार अशी शंका आल्यास इतर साथीदार दगडाचा मारा करून त्याची सुटका करतात.

या व्यवसायाशिवाय शेती हे त्यांचे दर्शनी उपजीविकेचे साधन आहे. खेड्यातली अन्य कामेही हे करतात. हे दुकानदारी, सावकारी, इ. व्यवसायही करतात. स्वतःची जमीन हे बहुधा पाटलाकडे लावून देतात.

भामटे लोक गाईचे व डुकराचे मांस खात नाहीत. हे दारू पितात व मासे खातात.

यांची एक सांकेतिक भाषा आहे. त्याचप्रमाणे काही सांकेतिक खुणाही आहेत.

त्यांच्या प्रत्येक वस्तीत सर्वांत वडील भामटा हा त्यांचा नाईक असतो. त्याला पाटील, तालमड, तालदरू अगर कट्टिमनी म्हणतात. जातीचे तंटेबखेडे तो मिटवितो. प्रसंगी तो निरपराधित्वासाठी भामट्यांना निरनिराळ्या प्रकारची दिव्येही करायला लावतो.

मर्तिकप्रथा –हे मृतांना जाळतात अगर पुरतात; महालय करतात व त्या वेळी ज्ञातिभोजन घालतात. [गु. जा.]

भामह (इ. स. च्या ६व्या शतकाचा मध्य) एक काव्यशास्त्रज्ञ अलंकार संप्रदायाचा प्रवर्तक. हा काश्मीरचा रहिवासी होता. याच्या पित्याचे नाव रक्रिलगोमी असे होते. हे नाव बौद्ध वळणाचे वाटल्यावरून काही पंडितांनी भामहाला बौद्ध ठरवले आहे; पण या मताला काही प्रमाण आढळत नाही.

भामहाने काव्यालंकार नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये सहा परिच्छेद असून, त्यांत काव्याचे साधन, लक्षण, भेद, अलंकार, दोष, इ. गोष्टींचे विवेचन आहे. ४०० श्लोकांच्या या ग्रंथात भामहाने अलंकारशास्त्राचा ऊहापोह व्यवस्थित व मुद्देसूदपणे केला आहे.

भारतीय अलंकारशास्त्रात भामहाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्याच्या पूर्वी अलंकारशास्त्र हे भरतमुनीचा पालव धरून चालत होते. पण भामहाने अलंकार या विषयाला नाट्यशास्त्राच्या पारतंत्र्यातून मुक्त करून स्वतंत्र शास्त्र या रूपाने त्याची स्थापना केली. भामहाने विवेचिलेल्या अलंकारांची संख्या ३८ आहे. अलंकारांना काव्यात प्राधान्य देताना तो म्हणतो, 'ज्याप्रमाणे सुंदर स्त्रीची शोभा साजेशा वस्त्र–भूषणांवाचून चांगल्याप्रकारे उठून दिसत नाही, त्याप्रमाणे कवितारूपी रमणीची शोभाही अलंकारांवाचून प्रस्फुटित होत नाही. अलंकार हेच काव्यशोभेचे उत्पादक आहेत' भामहाची अलंकारकल्पना इतकी व्यापक आहे, की तो शृंगारादी रसांचा अंतर्भावही 'रसवत्' नावाच्या अलंकारातच करतो.

अलंकाराचे विवेचन करीत असताना तो काव्याविषयी इतरही अनेक गोष्टी सांगतो. त्याने काव्याचे लक्षण पुढीलप्रमाणे केले आहे. 'शब्दार्थौ सहितौ काव्यम्' = शब्द व अर्थ जोडीने असणे याला काव्य म्हणावे (२१.१६). अलंकारांचे सामान्य स्वरूप सांगताना त्याने वक्रोक्तीला प्राधान्य दिले आहे. ज्यात वक्रोक्ती नाही त्याला तो अलंकारच म्हणायला तयार नाही. तो म्हणतो. 'झळाळणारी रत्ने, फळभाराने वाकलेली झाडे आणि फुललेली फुले यांची काव्यात भरपूर पेरणी केली, की काव्य अलंकृत होते, अशी काहींची समजूत आहे. पण या गोष्टींनी अनुक्रमे दागिने, वागा आणि माळा अलंकृत होतात; काव्य नव्हे. काव्याचा अलंकार वक्रोक्ती हा होय' (५.६४–६६).

भामहाने काव्याचे गुण सांगितले आहेत. पण गौडी, वैदर्भी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ. रीतींचे वंड त्याला मान्य नाही. तो म्हणतो, 'वैदर्भी रीतीचे काव्य हे कितीही सुबोध आणि श्रवणमधुर असले, तरी ते अपुष्टार्थ आणि वक्रोक्तिरहित असेल, तर त्याज्यच होय; उलट अलंकारयुक्त, अर्थपुष्ट आणि निर्दोष असेल, तर गौडी रीतीचे काव्यही श्रेष्ठ ठरेल. केवळ ध्वनिमाधुर्याने श्रेष्ठ ठरायला काव्य हे काही संगीत नव्हे '(१.३१–३६) . भामहाने माधुर्य, ओज व प्रसाद हे तीनच काव्यगुण मानले आहेत. काव्यदोषांचे विवेचन त्याने बऱ्याच विस्ताराने केले आहे. काव्यमीमांसेत दोषविवेचनाला भामहाने जे महत्त्व दिले, ते प्रायः सर्व उत्तरकालीन काव्यमीमांसाग्रंथांत अबाधित राहिले आहे. तो म्हणतो–

सर्वथा पदमप्येकं न निगाद्यमवद्यवत् ।
विलक्ष्मणा हि काव्येन दुःसुतेनेव निन्द्यते ।।

अर्थ – सर्वथा निंद्य असे एकही पद काव्यामध्ये वापरू नये. कुपुत्र जन्माला घातल्यामुळे जशी बापाची निंदा होते, तशीच अवचिन्ह काव्यामुळे कवीची होते.

प्रसंगानुसार भामहाने काव्यशास्त्रातल्या इतरही विषयांचा परामर्श केला असून, आपली कुशाग्र बुद्धी प्रकट केली आहे. वैयाकरणांचा स्फोटवाद आणि बौद्धांचा अपोहवाद यांची त्याने मनसोक्त टवाळी केली आहे. [काव्यप्रकाश – प्रा. अर्जुनवाडकर व मंगरूळकर; भा. का. शा. प.; सं. सा. इ.; भा. सा. शा.]

भार एक जमात. या लोकांची वस्ती बंगाल, बिहार, छोटा नागपूर व उत्तर प्रदेशातील यमुनाकाठचा प्रदेश या ठिकाणी आढळते. वंशशास्त्रज्ञांच्या मते ही द्रविड जमात आहे. शेती किंवा शेतमजुरी हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. औध प्रदेशातली बरीचशी जमीन यांनीच लागवडीखाली आणली आहे. हे जंगले साफ करून तिथली जमीन लागवडीस आणतात आणि नंतर ती जमीन दुसऱ्याच्या हवाली करून आपण दुसरीकडे जातात. यावरून ही भटकी जमात असावी, असे वाटते. विहारमधले भार आपल्याला बंगालमधील भारांहून वेगळे समजतात. भार लोक एकाकाळी राज्यकर्ते होते, असे काहींचे म्हणणे आहे. यांच्यांत विधवाविवाह व घटस्फोट प्रचलित नव्हता. हे मृतांना जाळतात. [से. इं. १९५१; रे. क. इं.]

भारत एक देश. याला भरतखंड व हिंदुस्थान अशीही नावे आहेत. हा एक खंडप्राय देश असून, ते एक द्वीपकल्प आहे. इ. स. १९४७ साली या देशाची फाळणी झाली, तोपर्यंत या देशाला हिंदुस्थान अर्थात हिंदू लोकांचा देश असे नाव रूढ होते. त्यातून पाकिस्तान निराळे निघाल्यामुळे सांप्रत उरलेल्या भागाला भारत हे नाव दिले गेले आहे. हा देश विषुववृत्ताच्या उत्तरेस सुमारे ८° ते ३७° अक्षांश आणि ६८° ते ९७° पूर्व रेखांश यांच्या दरम्यान पसरला आहे. दक्षिण आशियाच्या तीन द्वीपकल्पांमध्ये याचे स्थान मध्यवर्ती आहे. जगातला हा सातव्या क्रमांकाचा विशाल देश ठरतो. याचे क्षेत्रफळ १२,६२,२७५ चौरस मैल किंवा ३२,६८,६९२ चौरस किलोमीटर एवढे आहे. १९६१ च्या जनगणनेप्रमाणे सिक्किमसह व पाकिस्तानव्याप्त काश्मीरचा भाग सोडून याची लोकसंख्या ४३,९२,३५,०८२ एवढी आहे. त्यानंतर आजपावेतो ती आणखी वाढली आहे. याहून अधिक जनसंख्या केवळ चीनमध्येच आढळते. याची उत्तर-दक्षिण लांबी २००० मैल व पूर्व-पश्चिम रुंदी १८५० मल आहे. भारताच्या उत्तरेस हिमालयाच्या पर्वतश्रेणी आणि दक्षिणेस हिंदी महासागर आहे. काश्मीरच्या उत्तर सीमेवर काराकोरम हा पहाड व पामीरचे पठार आहे. पूर्वेस ब्रह्मदेश व पूर्व पाकिस्तान हे देश आहेत, पण पूर्व पाकिस्तानच्या पूर्वेसही आसाम, नाग भूमी व त्रिपुरा हे भारतीय क्षेत्र आहे. याच्या वायव्य सीमेवर पश्चिम पाकिस्तान व त्यापुढे अफगाणिस्तान आहे. बंगालच्या उपसागरात अंदमान व निकोबार या नावाचा द्वीपसमूह आहे. हिमालयाच्या पूर्व भागात भूतान आहे. तो परराष्ट्रीय व्यवहारापुरता भारत सरकारच्या स्वाधीन असून, अन्य बाबतीत स्वतंत्र आहे. भूतानच्या पश्चिमेस सिक्किम प्रदेश असून, तो भारतसरकारच्या संरक्षणाखाली आहे.

नामकरण – या देशाला भारतवर्ष हे नाव पडण्यापूर्वी आणखी काही नावे होती. त्यांपैकी पहिले नाव अजनाभवर्ष हे आहे (भाग. पु. ५.७.३). श्री. बलदेव उपाध्याय यांनी अजनाभ शब्दाचा व्युत्पत्तिलभ्य अर्थ सांगितला आहे, तो असा– अज= अजन्मा (भगवान विष्णू) त्याच्या नाभिकमलावर हा देश स्थित असल्याचे मानलेले आहे. याचे तात्पर्य असे, की ब्रह्मदेवाने भगवंताच्या नाभिकमलात निवास करून प्रथम ज्या लोकाची निर्मिती केली तो लोक म्हणजे अजनाभ होय. भागवताच्या मते अजनाभवर्ष हेच मानवाच्या उत्पत्तीचे पहिले स्थान आहे. याला वायू पुराणात हैमवतवर्ष असे नाव दिले आहे (३५.५२). त्याचा हेतू हा, की या वर्षाचे सीमा विभाजन करणारा हिमालय पर्वत हाच प्रधान घटक आहे. आणि तो वर्षपर्वत आहे. तिसरे नाव कार्मुकसंस्थान असे आहे. कार्मुक म्हणजे धनुष्य होय. हे नाव देण्याचे कारण असे, की समग्र भारतवर्षाची भौगोलिक स्थिती धनुष्याकार आहे. याचे वर्णन डॉ. वासुदेवशरण अग्रवाल करतात ते असे– याचा समुद्राच्या आत घुसलेला दक्षिण दिशेचा भाग म्हणजे धनुष्याचा वाकलेला दंड असून हिमालय ही त्याच्यावरची खेचलेली प्रत्यंचा आहे. कूर्मसंस्थान हे चौथे नाव होय. मार्कंडेय पुराणात भारताची कूर्माकृती कल्पून त्याचे नऊ भाग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विस्ताराने सांगितले आहेत (अ. ५८). कूर्म म्हणजे कासव होय. या देशरूपी कासवाचे मुख पूर्वेला असून, बाकीचे अवयव त्याला अनुसरून कल्पिलेले आहेत. कूर्मसंस्थानावर आधारलेली जनपदसूची वराहमिहिराच्या बृहत्संहितेत (अ.१४), नरपति-जयचर्या या ग्रंथात व पराशरादी मुनींनी निर्मिलेल्या ज्योतिष-ग्रंथांत आढळते.

पुढे पुराणांतली वरील सर्व नावे मागे पडून या खंडप्राय देशाला भारत किंवा भारतवर्ष असे नाव पडले आणि तेच सर्वतोमुखी झाले. भरतावरून भारत असे ते नाव आहे. स्वायंभुव मनूला प्रियव्रत नावाचा पुत्र होता. त्याचा पुत्र नाभी व नाभीचा ऋषभ. त्या ऋषभाला १०० पुत्र झाले. त्यांतल्या जेष्ठ पुत्राचे नाव भरत होते. मोठा असल्यामुळे पित्याचे सिंहासन त्याला प्राप्त झाले. हा भरत महाभागवत व महापराक्रमी होता. याविषयी वायू पुराणात दोन श्लोक दिले आहेत, ते असे–

ऋषभात् भरतो जज्ञे वीरः पुत्रशताग्रजः ।
सोऽभिषिच्याथ भरतं पुत्रं प्राव्राज्यमास्थितः ।।
हिमाह्वं दक्षिणं वर्षं भरताय न्यवेदयत् ।
तस्मात्तद् भारतं वर्षं तस्य नाम्ना विदुर्बुधाः ।।
(वायू. पु. ३३.५१–५२)

अर्थ – ऋषभाला भरत नावाचा पुत्र झाला. तो शंभर पुत्रांत मोठा व वीर होता. ऋषभाने त्याला राज्याभिषेक करून स्वतः संन्यास घेतला. त्याने हैमवत नावाचे दक्षिणवर्ष भरताला राज्यकारभारासाठी दिले. पुढे ते हैमवतवर्ष भरताच्या नावावरून भारत म्हणून ओळखले जाऊ लागले.

भागवत (५.७.३) व मार्कंडेय पुराण (५३.३९:४०) यांतही वरील निरुक्तीला पुष्टी दिलेली आहे.

पण दुष्यंतपुत्र भरत याच्यावरून या देशाला भारत हे नाव मिळाले, अशी निरुक्ती महाभारतात दिली आहे. याविषयीचा श्लोक (आदि. ६९.४९) असा –

भरताद् भारतीः कीर्तियनेदं भारतं कुलम् ।
अपरे ये च पूर्वे च भारता इति विश्रुताः ।।

अर्थ – भरतामुळे भारतातल्या प्रजेची कीर्ती झाली. त्याच्या कुलाला भारतकुल म्हणू लागले आणि त्याच्या नंतरचे या देशातले सर्व लोक भारत म्हणून प्रसिद्धी पावले.

दुष्यंतांचा पुत्र भरत हा एक प्रतापी सार्वभौम सम्राट होता. त्याने या देशाच्या चारही दिशांच्या अंतापर्यंतची भूमी जिंकून या देशात आपले सार्वभौम राज्य प्रस्थापित केले आणि शंभराच्या वर अश्वमेघ यज्ञ केले, असे ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे (८.२३). त्यांपैकी ७८ यज्ञ यमुनेच्या तीरावर व ५५ यज्ञ गंगेच्या तटावर त्याने पार पाडले, असा त्यांचा तपशील शतपथ ब्राह्मणात (१३.५.४.११) सांगितलेला आहे.

त्या काळी यज्ञ हे संस्कृतीच्या प्रसाराचे महान साधन होते. पराक्रमी राजे राज्यविस्तारासाठीही अश्वमेघ यज्ञ करीत असत. कारण अश्वमेधात दिग्विजयाची कल्पना अभिप्रेत आहे. भरताच्या चतुरंग शासनात या भूमीला राजनैतिक एकता प्राप्त झाली आणि त्यामुळेच भरताचे नाव या भूमीच्या नावाशी जोडले गेले, असे म्हणता येते.

भारत या नावाची सांस्कृतिक निरुक्ती डॉ. वासुदेवशरण अग्रवाल सांगतात, ती अशी–

ऋग्वेदकाळात आर्यांची भरत या नावाची एक पराक्रमी शाखा होती. त्यांनी विपाशा व शुतुद्री या नद्या पार करून ज्या प्रदेशात आगमन केले आणि जिथे आपली वस्ती स्थापन केली, तिला भरत जनपद असे नाव मिळाले. मोठ्या प्रमाणात कुरू जनपदाचाच हा एक शासकीय प्रदेश होता. ब्राह्मणकालात भरतजनांचा अंतर्भाव कुरु-पांचालांच्या क्षत्रियांत झाला असला, तरी पाणिनीच्या कालापर्यंत भरत जनपदाची स्मृती शिल्लक होती. या भरत जनपदाचे राजकीय प्रभुत्व वैदिक काळात प्रस्थापित झाले होते. या जनपदातल्या प्रजेला भारतीय प्रजा म्हणत. यः भरत जनांच्या आधारावर देशाचा एक विशिष्ट भूभाग भारत म्हटला जाऊ लागला. पुढे या भरतजनांनी गंगायमुनेच्या अंतर्वेदीपर्यंत आपली सत्ता वाढवली. त्यामुळे भारत हे नावही सगळ्या व्याप्त प्रदेशाला लागू झाले आणि तेच पुढे समस्त देशाचे वाचक बनले.

भारत नावाची आणखीही एक निरुक्ती डॉ. अग्रवाल यांनी सुचविली आहे. ऋग्वेदात यज्ञाग्नीला भारत असे म्हटले आहे. भरतजनांनी या भूमीवर तो प्रथम प्रज्वलित केला, म्हणून या देशाला भारत हे नाव प्राप्त झाले (ऋ. ४.२५.४). ब्राह्मणांनीही अग्नीचे हे नाव उचलून धरले आणि त्याची वेगळी व्युत्पत्ती दिली, ती अशी– ‘अग्निर्वै भरतः स वै देवेभ्यो हव्यं भरति’ = अग्नीला भरत असे म्हणतात, कारण तो देवांना (देवांच्या घरी) यजमानाने दिलेले हविर्द्रव्य नेऊन भरतो (कौषी. ब्रा. ३.२). शतपथ ब्राह्मणातही अशीच निरुक्ती सांगितली आहे (१.४.२.२). ‘अग्नी भरत आहे; कारण तो प्रजांचे (पालन-पोषण) करतो,’ असे महाभारतातही म्हटले आहे. देशात जिथे जिथे यज्ञीय अग्नी गेला, तिथे तिथे प्रजांनी त्याचे अनुगमन करून तो तो प्रदेश वसाहतींनी भरून टाकला. पुढील श्लोकात हाच भाव आहे–

एवं त्वजनयद् धिष्ण्यान् वेदोक्तान् विविधान् बहून् ।
विचरन् विविधान् देशान् भ्रममाणस्तु तत्र वै ।।

अर्थ – अशा प्रकारे आपल्यासाठी विविध देशांत वेदोक्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विधीने यज्ञवेदी उभारीत उभारीत भरत अग्नी लोकात पसरला.

अशा प्रकारे राज्य, जन व संस्कृती या तीन धारांचा संगम होऊन देशाचे भारत हे नाव रूढ झाले.

बौद्ध ग्रंथांत कुठे कुठे भारताला जंबुद्वीप हे नाव दिलेले आढळते; पण जंबुद्वीप हा मोठा भूभाग असून, भारत हा त्याचा एक अवयव आहे. पुराणात भारताला कुमारीद्वीप असेही नाव आढळते. हे नाव भारताच्या दक्षिण टोकावरच्या कन्याकुमारी या देवीवरून पडलेले आहे. बृहत्तर भारतातले लोक मूळ भारताला कुमारीद्वीप या नावाने ओळखीत असावे, असे वाटते.

हिंदुस्थान हाही भारतवाचक शब्द आहे. हे नाव सिंधू नदावरून पडले आहे. सिंधूच्या अलिकडे राहणाऱ्या लोकांना इराणी लोक हिंदू म्हणत. इराणी भाषेत ‘ स ’च्या जागी ‘ ह ’ येऊन सिंधूचा हिंदू बनतो. पहलवी भाषेत सस्सानी राजांचा एक शिलालेख पैकुली नामक ठिकाणी मिळाला आहे. त्यातही भारतवर्षाला हिंदू म्हटले आहे. कालकाचार्य पारसदेशाला गेला आणि त्याने तिथल्या साही राजांना हिंदुग देशाला येण्याची विनंती केली, असे जैनांच्या निशीथचूर्णीत म्हटले आहे. प्राचीन ग्रीक भूगोललेखकांनी सनपूर्व ४ थ्या व ५ व्या शतकांत या देशाला सिंधु–हिंदुसमीकरणात्मक चालू प्रयोगाच्या आधारावर इंडोस असे म्हटले आहे. यातला शेवटचा ‘ स ’कार हा प्रथमेच्या एक वचनाचा प्रत्यय आहे. इंडिया व इंडिका ही नावे इंडोसवरूनच प्रचलित झाली. चिनी साहित्यात चिन्तू (देवांचा देश) या नावाने भारताचा उल्लेख मिळतो. शिन्तू हे सिंधूचे चिनी रूप आहे. या बाबतीत एक गोष्ट दिसून येते ती ही, की या देशातल्या लोकांनी भरत शब्दाची परंपरा स्वीकारली व विदेशी लेखकांनी सिंधू शब्दावरून बनलेल्या नावांचा उपयोग केला.

चतुःसीमा – विष्णू पुराणात (विष्णू पु. २·३·१) भारताच्या चतुःसीमा सांगणारा श्लोक दिला आहे, तो असा–

उत्तरं यत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् ।
वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र सन्ततिः ।।

अर्थ–समुद्राच्या उत्तरेस आणि हिमाचलाच्या दक्षिणेस वसलेले वर्ष ते भारतवर्ष होय. इथल्या प्रजेला भारती प्रजा असे म्हणतात.

वायू पुराणातही (४५·८१) या मताला मान्यता देऊन आणखी विशेष सांगितले आहेत, ते असे–

आयतो ह्याकुमारिक्यादागङ्गप्रभा वाच्च वै ।

अर्थ–कन्याकुमारीपासून गंगेच्या उगमस्रोतापर्यंत पसरलेला देश तो भारत होय.

गंगेच्या उगमस्रोतांतला सर्वांत उंच स्रोत जंस्कर पर्वतश्रेणीत आहे. म्हणजे भारताची उत्तरसीमा तिथवर जाते.

पुराणांच्या दृष्टीने भारत हा जंबुद्वीपाचा एक विभाग आहे व तो नवखंडांत विभागला आहे. ही नवखंडे अशी– (१) इंद्रद्वीप (अंदमान द्वीपसमूह) (२) कसेरू (मलयद्वीप) (३) ताम्रपर्ण (लंका) (४) गभस्तिमान (?) (५) नागद्वीप (निकोबार द्वीप) (६) सौम्य (?) (७) गंधर्व (?) (८) वारुण (बोर्निओ द्वीपे) व (९) कुमारी द्वीप (भारत)

गुप्तकालात पुराणांची वाढ झाली त्या काळात हे नवखंडात्मक विभाजन झाले आहे. गुप्तकालात भारतीय संस्कृती, भाषा साहित्य, धर्म व दर्शन यांचा पूर्वेच्या द्वीपपुंजात आश्चर्यजनक विस्तार झाला होता. पूर्वेची ही सगळी बेटे भारताच्या भौगोलिक क्षेत्राच्या अंतर्गत समजली जात होती.

भूमिपरिचय – देशात राहणाऱ्या लोकांचा परिचय होणे आणि त्या सर्वांनी त्या भूमीवर समान रूपाने प्रेम करणे, हा देशाच्या मौलिक एकतेचा सबल आधार होय. सुरुवातीला पृथक पृथक प्रदेशात वसलेल्या मानवांना केवळ आपल्या सीमेच्या अंतर्गत असेल तेवढ्याच भूमीचा परिचय होतो व ते तेवढ्याच भूमीला मातृभूमी मानून तिला आपली श्रद्धा अर्पण करतात; पण माणसांचा हा संकुचित दृष्टिकोण इतिहासाच्या वाटचालीत विस्तृत होतो. भारतवर्षातही हजारो वर्षांच्या ऐतिहासिक घडामोडींतून भारतीय मनुष्याला या संपूर्ण भूमीचा परिचय घडला आणि त्याचे फल म्हणून भारतीय माणसाचे मनोभाव प्रांतीय सीमा-रेषा मोडून समस्त भूमीशी एकजीव झाले.

प्रारंभी आर्य जातीला या समस्त देशाचा परिचय एकदम झाला नाही; पण प्रारंभापासूनच या भूमीला मातृभूमी या भावनेने त्यांनी पाहिले. गंगेपासून सिंधूपर्यंतचा प्रदेश ऋग्वेदकालीन भारतवर्षात अंतर्भूत होता. वेदोत्तर कालात आर्यांना त्या पुढच्या भूप्रदेशाचा परिचय झाला. शतपथ ब्राह्मणात या विषयी एक प्राचीन अनुश्रुती दिली आहे–तावत्कालपर्यंत विदेहमाधवाने गंगेच्या पलिकडे पूर्व दिशेला सदानीरेपर्यंत आपले क्षेत्र वाढवले. ही सदानीरा नदी कोसल व विदेह या दोन जनपदांच्या मधून वाहत होती. अशा प्रकारे देशविस्ताराच्या उत्तरोत्तर श्रेणी असाव्या. मनुस्मृतीत त्यांची झलक मिळते. प्रारंभी सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांच्या मधल्या भूभागालाच ब्रह्मावर्त म्हणत (मनु. २·१७). पुढे ब्रह्मावर्ताचा विस्तार ब्रह्मर्षी देशाच्या रूपात झाला. त्यात कुरुक्षेत्र, मत्स्य (जयपूर, अलवार, इ. प्रदेश), शूरसेन (मथुरा, आग्रा, अलीगड, इ. प्रदेश) व पंचाल (कनौज, फर्रुखाबाद, बरेली, इ.) हे जनपद सम्मीलित झाले. मनूच्या कालात मध्यदेश या नावाने हा प्रदेश अधिक विस्तृत झाला. उत्तरेस हिमालय, दक्षिणेस विंध्य, पश्चिमेस विनशन (उ. राजस्थान) व पूर्वेस प्रयाग या मध्यदेशाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सीमा होत्या. अशा प्रकारे पूर्व-पश्चिम या दोन्ही दिशांना जेव्हा आर्यांचे उपनिवेश वाढू लागले, तेव्हा ते पूर्वेच्या अंगाने गंगेचा पालव धरून पूर्वसमुद्रापर्यंत पसरले आणि पश्चिमेच्या अंगाने सौवीर (सिंध) व आनर्त (गुजरात, काठेवाड) इथपर्यंत वाढले. पाणिनीच्या काली वर उल्लेखलेल्या सर्व प्रदेशाला आर्यावर्त असे म्हणत. महाभारताच्या भीष्म पर्वात कौरवपांडवांच्या युद्धप्रसंगी धृतराष्ट्राने संजयाला विचारले, की कोणकोणत्या देशातून राजे-महाराजे या युद्धात भाग घेण्यासाठी आले आहेत? त्यावर संजयाने भारतवर्षाच्या भूगोलाचे विस्तारपूर्वक वर्णन धृतराष्ट्राला ऐकवले. त्यात मुख्यतः पर्वत, नद्या व जनपदे यांच्या नावांची सूची आहे. त्या तिहींचेही अध्ययन केल्यावर दिसून येते, की त्या काळापर्यंत हिमालयापासून दक्षिणमहासागरापर्यंतच्या सगळ्या भूप्रदेशाला हे नाव प्राप्त झाले होते व त्यांची वायव्यसीमा अफगाणिस्थान व मध्य आशियापर्यंत होती.

प्राचीन भौगोलिक परिभाषेनुसार पर्वत दोन प्रकारचे मानलेले आहेत –(१) वर्षपर्वत आणि (२) कुलपर्वत. पहिले पर्वत एका वर्षाला अर्थात फार मोठ्या भूखंडाला दुसऱ्या वर्षापासून अलग करतात. हिमवान, हेमकूट, निषध, मेरू, चैत्र, कर्णी व शृंगवान हे वर्षपर्वत होत. या सर्वांची ओळख आजमितीस पटत नाही. पण हेमकूट म्हणजे कैलास व मेरू म्हणजे पामीर हे बव्हंशी निश्चित झालेले आहे. हिमवान आणि मेरू हे भारताची उत्तर सीमा बनवतात आणि आशियाला दुसऱ्या प्रदेशापासून विलग करतात. यावरून एक सत्य प्रतीत होते ते हे, की प्राचीन भारतवासी कैलास व पामीर या प्रदेशांना भारताच्या भौगोलिक सीमांच्या अंतर्गत मानीत होते. वंक्षू नदी ही अफगाणिस्तानची उत्तर सीमा आहे. ती चंद्रगुप्ताच्या काळापासून औरंगजेबाच्या कालापर्यंत भारताची राजनैतिक सीमा बनून राहिली होती. अफगाणिस्तानच्या आसपासच्या प्रदेशाला कंबोज प्रदेश म्हणत असत. पुराणातल्या भुवनकोशाच्या सूचीत ही दोन्ही नावे आली आहेत.

ज्यांच्या वरून देशांतर्गत प्रदेशाच्या सीमा निश्चित होतात, अशा पर्वतांना कुलपर्वत म्हणतात. हेदेखील सात आहेत. महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान, ऋक्ष, विंध्य व पारियात्र अशी त्यांची नावे आहेत (म. भा. भीष्म.९.११).ओडिसापासून सुरू होणाऱ्या पूर्व घाटातल्या पर्वतश्रेणीला पुराणकाळी महेंद्र म्हणत. दक्षिण भारतातल्या पर्वतांना मलय हे नाव होते. या मलयात नल्लमलै, अन्नमलै व एलामलै ही कावेरीच्या दक्षिण भारतातली पर्वतशिखरे संमीलित होती. सह्याद्री हा भारताच्या पश्चिम भागात उत्तर दक्षिण पसरलेला पर्वत होय. सह्याद्रीच्या उत्तर टोकाच्या अलिकडे जी पूर्वेच्या बाजूने पर्वतांची रांग पसरली आहे, तिचे नाव शुक्तिमान होय. तापी नदीच्या उजव्या किनाऱ्यावर सातपुड्यापासूत महादेव पर्वतापर्यंत जी एक पर्वतशृंखला पसरली आहे, तिला ऋक्ष पर्वत असे म्हणत. विंध्य प्रसिद्धच आहे. अरवली पर्वतश्रेणीला पारियात्र नाव होते.

भारतात निरनिराळ्या पर्वतांतून उगम पावलेल्या १६० नद्यांची सूची महाभारतात दिली आहे. तिच्यावरून कळते, की कंदाहारमधील सुवास्तू नदी, आसामातील लौहित्य नदी, ओडिसामधील ऋषिकुल्या, दक्षिणेची तुंगभद्रा आणि पश्चिमेची बनास नदी या नद्यांच्या परिघातला समस्त भूखंड भारतीय भूगोलाचे अभिन्न अंग समजला जात होता. महाभारतात या नद्यांना विश्वमाता असे म्हटले आहे. राजाच्या अभिषेकसमयी या नद्यांचे पाणी आणले जात होते. या राज्याभिषेकाला प्रत्येक नदीच्या परिसरात वास्तव्य करणाऱ्या जनपदांची संमती आहे, असा त्याचा अर्थ होई.

भारतभूमीचा उत्तम परिचय तिच्यावर वसलेल्या जनपदांच्या रूपात होऊ शकतो. जनपद म्हणजे प्राचीन काळी समान संस्कृतीच्या लोकांनी स्थापलेल्या वसाहती होत. आजही त्या जनपदांची बरीचशी नावे अपभ्रष्ट स्वरूपात विद्यमान आहेत. प्राचीन भुवनकोशवर्णनात जनपदांचा प्रपंच कंबोज जनपदापासून सुरू होतो. त्याची राजधानी द्वारका होती, असे बौद्ध ग्रंथात म्हटले आहे. सांप्रत तिला दरवाज म्हणतात. द्वारका म्हणजे मध्य आशियातून वंक्षू नदी पार करून भारतात प्रवेश करण्याचा दरवाजाच होता. यास्काने आपल्या निरुक्तात व पतंजलीने आपल्या महाभाष्यात कंबोजाचा उल्लेख केला आहे. त्या प्रदेशाची भाषा आर्यकुलातली होती. वंक्षू नदीच्या उत्तर वळणाजवळ मुंजानी नावाचे कबिले वसले होते. त्यांना प्राचीन काळी मौंजायन म्हणत. पाणिनीनेही आपल्या गणपाठात त्यांचा समावेश केला आहे. वैदिक कालात प्रसिद्ध असलेला मूजवंत प्रदेश तो हाच होय (अथर्व. ५.२२.५). हिंदुकुश व वंक्षू यांच्या मधला प्रदेश बाल्हीक जनपद या नावाने ओळखला जाई. सांप्रत त्याला बल्ख म्हणतात. मुंजानीच्या उत्तरेस बदखशां हा प्रदेश आहे, त्याला पूर्वी द्व्यक्ष म्हणत. बाल्हीकहून एक मार्ग दक्षिणेस बाणियाँ पर्वतश्रेणीत उतरत होता. बाणियाँच्या पुढे कपिश जनपद होते. त्याला सांप्रत काफिरिस्तान म्हणतात. कपिशाला लागून गंधार होता. तो कुनड नदीपासून तक्षशिलेपर्यंत पसरला होता. कुनडच्या उत्तर भागात चित्र प्रदेश होता. चित्राल व पंजकोश या दोन नद्यांमधला प्रदेश द्वारावतीक म्हणून ओळखला जात होता. सांप्रत त्यालाच दीर म्हणतात. दीरच्या दक्षिणेस व काबुल नदीच्या उत्तरेस मोहं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मद नामक कबीले वास्तव्य करतात. पाणिनीने त्याला मधुमत म्हटले आहे (अष्टा ४.३.९३). मोहंमदांच्या शेजारी आफ्रिदी



लोक होते. त्यांचे प्राचीन संस्कृत नाव आप्रीत होते. त्यांच्या प्रदेशाला तीरा म्हणतात. त्यांचे संस्कृत नाव त्रिरावतिक. कुभा (काबुल), वरा (बारा) व सिंधू या तीन नद्यांच्या मध्ये हा प्रदेश येतो, म्हणून त्याला त्रिरावतीक म्हणत. काश्मीरच्या वायव्येस असलेला दर्दिस्तान हा प्रदेश पूर्वी दरद नावाने ओळखला जात असे. या जनपदात पैशाची बोली बोलली जात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होती. गुणाढ्याची वृहत्कथा याच बोलीत लिहिली होती. काश्मीर हा स्वतःच एक जनपद होता. सिंधच्या पूर्व किनाऱ्यापासून सतलजपर्यंतच्या प्रदेशाला पूर्वी वाहीक म्हणत. सिंध व जेहलम यांच्यामध्ये सिंधू वसले होते. सांप्रत ज्याला सिंध म्हणतात त्याचे पूर्वीचे नाव सौवीर होते. जेहलम व चिनाब या दोन नद्यांच्या मध्ये केकय जनपद होते. उत्तर पंजाबात मद्र जनपद असून, त्याची राजधानी शाकल (स्यालकोट) होती. मद्राचे पूर्वमद्र व अपरमद्र असे दोन भाग होते. रावी आणि चिनाब यांच्या मधल्या भागात उशीनर जनपद होते. रावीच्या पूर्वेस हिमालयापर्यंत त्रिगर्तदेश पसरला होता. पाणिनीने त्रिगर्ताच्या सहा गणराज्यांचा उल्लेख केला आहे. पूर्व पंजाबात सर्वांत मोठे कुरु जनपद होते. सरस्वतीपासून गंगेपर्यंतचा प्रदेश कुरू जनपदात समाविष्ट होता. हस्तिनापूर ही याची राजधानी होती. भारतीय इतिहासात या कुरु जनपदाचा सांस्कृतिक व राजनैतिक प्रभाव दीर्घ कालपर्यंत सर्वोपरी होता.

पंचाल (बरेलीपासून कनौजपर्यंत गंगेच्या दोन्ही तीरांचा प्रदेश), शूरसेन (मथुरा), शाल्व (अल्वारपासून बीकानेरपर्यंतचा उत्तर राजस्थानचा भाग), मत्स्य (जयपूर धरून आजूबाजूचा प्रदेश, किरात (संभवतः नेपाळ), काशी-कोसल (उत्तर प्रदेशाच्या मध्य व पूर्व भागातील अधिकांश प्रदेश) ही मध्य देशातली मुख्य जनपदे होती. प्राच्य जनपदात अंग, विदेह, मगध, पुंड्रवर्धन (उत्तर बंगाल), व मलद (माल्यह) ही जनपदे प्रमुख होती.

त्यानंतर गंगेच्या दक्षिणेसही आर्यांच्या वसाहती मांडल्या जाऊ लागल्या. या नव्या वसाहतींचे नाव त्यांनी वर्धमान ठेवले. वर्धमानच्या दक्षिणेस सोम जनपद होते. गंगा-सागरसंगमाचा भाग समतट या नावाने ओळखला जात असे. त्याच्या पूर्वेस जिथे गंगा व ब्रह्मपुत्रा यांचे प्रवाह समुद्राला मिळतात, त्याच्या पश्चिमेस वारिषेण (वारिसाल) व पूर्वेस सूरमस ही जनपदे होती. सूरमसचा उल्लेख पाणिनीने केला आहे (अष्टा. ४.७.१७०). त्यावरून असे कळते, की सनपूर्व ५०० वर्षांच्या आधी सुरमा नदीचे खोरे व पहाडी प्रदेश यांमध्ये आर्यांचा प्रवेश होऊन चुकला होता आणि आसामपासून पंजाबपर्यंतचा आडवा पट्टा भारतीय संस्कृतीचे एक अभिन्न अंग बनला होता.

भारताचा मधला विस्तृत भूप्रदेश विंध्य पर्वताच्या भूगोलाशी संबंधित आहे. ही भूमी मेखलेसारखी (कमरपट्टा) असल्याकारणाने संभवतः विंध्यपर्वतातील नर्मदा व शोण या नद्यांच्या उगमस्थानाच्या भागाला मेकल असे नाव पडले असावे. अवंती (मांळवा), चेदी (जबलपूरपासून ओंकारमांधातापर्यंतचा प्रदेश), कोसल (छत्तीसगढ), त्याच्या पूर्वेचा उत्कल ही महाजनपदे होती. या जनपदांनी भारतीय इतिहास घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मध्य भागातील छोट्या जनपदांत करुष (बघेलखंड), दशार्ण (विदिशा व तिच्या आसपासचा प्रदेश), निषध (नरवर किंवा नळपूर) भोज (चंबळ व बनास यांचे खोरे) व अनूप (माहिष्मती) यांची गणना होती.

शूर्पारक (सोपारा), नासिक्य, भृगुकच्छ, कच्छ, माहेय (मही नदीचा तीरप्रदेश), सुराष्ट्र (काठियावाड), सारस्वत (पाटनजवळचा सरस्वतीचा किनारा), आनर्त (उत्तर गुजरात) व अर्बुद (अबूचा पहाड) ही पश्चिमेची जनपदे होत.

भारताचा एक मोठा भूभाग दक्षिणापथ या नावाने प्रसिद्ध आहे. भारतीय जनपदांचा क्रमशः विस्तार होता होता, देशाच्या दक्षिण टोकास असलेल्या कन्याकुमारीपर्यंतचा समस्त भूखंड भारतीय संस्कृती व भूगोल यांचे अभिन्न अंग बनला. पूर्व सागराच्या तीराने अगस्त्य व पश्चिम सागराच्या तीराने परशुराम हे दोन महापुरुष दक्षिणेत टोकापर्यंत गेले आणि त्या दोघांनीही दक्षिणापथात वैदिक संस्कृतीचा विस्तार केला. पुढे दाशरथी रामाच्या कालात रामाने दक्षिणेतील जातीजमातींचे सहकार्य मिळवून लंकेवर चढाई केली आणि रावणाचा वध करून सीतेला परत आणले. अयोध्येत परत गेल्यावर रामाला राज्याभिषेक झाला आणि तो 'आसमुद्रक्षितीश' बनला. रामकालात दक्षिणापथाचे उत्तरापथाशी राजकीय व सांस्कृतिक ऐकात्म्य प्रस्थापित झाले आणि पुढच्या काळात ते कधीही खंडित झाले नाही.

गोदावरी, कृष्णा, तुंगभद्रा, कावेरी व ताम्रपर्णी या दक्षिणेतल्या मुख्य नद्या आणि त्यांच्या साहाय्यक नद्या यांची नावे प्रायः संस्कृतातूनच निघाली आहेत. ही नावे भौगोलिक एकतेबरोबरच सांस्कृतिक एकतेविषयीही संकेत करतात. भुवनकोशवर्णनानुसार पांड्य, केरल, चोल, वनवासक (बनवासी), महाराष्ट्र, माहिषक (हैद्राबादचा प्रदेश), शबर (गोदावरीची साहाय्यक नदी शबरी हिच्या काठचा प्रदेश), आटविक (संभवतः बस्तर), मूलक (औरंगाबादचा प्रदेश), अश्मक (खानदेश), विदर्भ, कुंतल आणि आंध्र ही दक्षिणेतली मुख्य जनपदे होत.

भारतीय देश – जनपदांच्या काळानंतर भारतातले विभिन्न भूभाग वेगवेगळे देश या स्वरूपात ओळखले जाऊ लागले. युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञाच्या निमित्ताने भीम, अर्जुन, नकुल व सहदेव या चार पांडवांनी चारही दिशांना दिग्विजय केला. या दिग्विजयात त्यांनी जे देश जिंकले, त्यांची नामावळी महाभारताच्या सभापर्वात दिलेली आहे. तिच्यावरून भारतातल्या अंतर्गत देशांची नावे कळून येतात, ती अशी– पुलिंद, कालकूट, आनर्त, शाकलद्वीप, आंतरगिरी, बहिर्गिरी, उपगिरी, कुलूक, पंचगण, काश्मीर, लोहित, त्रिगर्त, दार्व, कीकनद, कुरग, सिंह, चोल, बाल्हिक, कांबोज, दरद, लोह, परमकांबोज, ऋषिक,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किंपुरुष, थाटक, कुरू, पांचाल, विदेह, दशार्ण, चेदी, कोसल, गोपालकक्ष, उत्तरकोसल, मल्लराष्ट्र, फल्लाट, सुपार्श्व, मत्स्य, महावली, मलद, अनव, अभय, नेपाळ, मल्ल, शर्मक, वर्मक, शक, बर्बर, सुंह, कसुंह, मगध, डंडूक, वंग, करवट, लौहित्य, शूरसेन, निषाद, गोशृंग, नरराष्ट्र, सेक, अपरसेक, कुलिंद, पांड्य, सुराष्ट्र, केरल, वनवासी, करहाटक, द्रविड, उंड्र, आंध्र, तालवन, कलिंग, उष्ट्रकर्णिक, रमणीय, आखीपुरी, रोहीतक, मरुभूमी, शैरीषक, महोत्थ, शिबी, अंबठ, मालव, पंचकर्पट, माध्यमिक, वाटधाण, पंचनद, रामठ, खार, हूण, मद्र, म्लेंछ, पल्हव, किरात, यवन, शक, इत्यादी.

भारतीय नकाशावर दृष्टी टाकल्याने त्याच्या दक्षिणेस पसरलेल्या भारतीय महासागराकडे ध्यान आकृष्ट होते. भारताचे दक्षिण टोक जणू महासागराच्या अंगात घुसले आहे. भारताच्या पश्चिम अंगाला जो समुद्र आहे, त्याचे प्राचीन नाव रत्नाकर असे होते. कालिदासाने या नावाचा उल्लेख केला आहे (रघु. १३.१). पूर्वेच्या वंगालच्या उपसागराला महोदधी असे म्हणत. धनुष्कोटीच्या तीर्थावर जेव्हा यात्रेकरू स्नानसंकल्प करतात, तेव्हा 'मी रत्नाकर व महोदधी यांच्या संगमावर स्नान करीत आहे' असे म्हणतात. या दोन्ही समुद्रांच्या हजारो मैल पसरलेल्या तीरावर प्राचीन कालापासून अनेक जलपत्तने (बंदरांची शहरे) होती. शूर्पारक, भरुकच्छ (भडोच) ही रत्नाकरावरची प्राचीन मोठी बंदरे होत. कांवेरीपत्तन (कावेरीच्या मुखाजवळचे पुहार नगर), मसुलीपत्तन, विशाखापत्तन, कलिंगपत्तन, ताम्रलिप्ती ही महोदधीवरची प्राचीन बंदर नगरे होत. इथून भारताचा व्यापार देशोदेशी चालत होता.

एकंदरीत भारतीय भूगोलाचा चारही दिशांनी विचार केला असता काही सत्ये प्रचीतीस येतात, ती अशी— पुराणांतील व त्याच्याही पूर्वीच्या भूगोलवर्णनाप्रमाणे उत्तरेस बाल्हिक व कंबोज (वल्ख व मध्य आशिया) इथवर भारतभूमीचा विस्तार मानला जात होता. त्या वेळची भौगोलिक सीमा वंक्षू नदी ही होती. ही सीमा पश्चिमेच्या हारहूरक (अरगंदाब)ला धरून बलूचिस्तानच्या पारदप्रदेशा (हिंगुलाज) पर्यंत गेली होती. हिमालयात गंगेची सर्वांत उत्तरेची उगमधारा जंस्कर पर्वतात होती व ती भारताची उत्तर सीमा होती. आजही जवळजवळ तीच उत्तर सीमा आहे. कैलास व मानस सरोवर ही प्राचीन काळापासून भारतीय भूगोलात अंतर्भूत आहेत. राजशेखराने म्हटले आहे—

कुमारीपुरात् प्रभृति बिन्दुसरोवधि चक्रवर्तिक्षेत्रम् ।

(काव्यमीमांसा अ. १७)

अर्थ— कन्याकुमारीपासून बिंदुसरोवरापर्यंत (मानस सरोवर) भारताचे चक्रवर्तिक्षेत्र अर्थात राष्ट्राचा विस्तार आहे.

पूर्वेस लौहित्य–प्राग्ज्योतिषपर्यंत भारतीय सीमेचा विस्तार होता. त्याच्या पलिकडे ब्रह्मदेश, चीन व तिबेट या धनुष्याकार भागात किरातांची वस्ती होती, असे विष्णू पुराणात म्हटले आहे (२.३.८). दक्षिण दिशेस कन्याकुमारीपर्यंत भारतभूमीचा अखंड विस्तार होता. भारताच्या आग्नेयीचा द्वीपसमूहही भारतीय द्वीपसमूह या नावाने ओळखला जाई. एका काळी भारतभूमीचाच तो भाग होता.

लोक— श्री. रवींद्रनाथ ठाकूर यांनी भारताला महामानवेर सागर अर्थात मानवाचा महासागर असे म्हटले आहे. या सागरात कोणकोणत्या जातीजमाती एकत्र येऊन सागररूप बनल्या आहेत, त्याविषयी त्यांची एक कविता अशी—

हे मोर चित्त, पुण्यतीर्थे जागो रे धीरे
एई भारतेर महामानवेर सागर-तीरे ।
केह नाहि जाने, कार आव्हाने, कत मानुषेर धारा,
दुर्वार स्रोते एलो कोथा हते, समुद्रे हलो हारा ।
हेथाय आर्य, हेथाय अनार्य, हेथाय द्राविड चीन,
शक-हूण-दल, पाठान-मोगल एक देहे हलो लीन ।
रणधारा वाहि, जयगान गाहि, उन्माद कलरवे,
भेदि मरु-पथ, गिरि-पर्वत यारा एसेछिलो सबे ।
तारा मोर माझे सवाई विराजे केहो नहे नहे दूर,
आमार शोणिते रयेछे ध्वनित तारि विचित्र सूर ।

भावार्थ— भारतदेश महामानवतेचा सागर आहे. हे माझ्या हृदया! या पवित्र तीर्थाकडे श्रद्धेचे डोळे उघडून पाहा. कोणालाही ठाऊक नाही, की कोणाच्या आव्हानामुळे मानवतेच्या इतक्या अनेक धारा वेगाने वाहत वाहत कुठून कुठून इथे आल्या आणि या महासागरात विलीन होऊन स्वतःचे नाव गमावून बसल्या. इथे आर्य आहेत, अनार्य आहेत, द्रविड आहेत आणि चिनी वंशाचे लोकही आहेत. शक, हूण, पठाण, मोगल, इ. न जाणो किती जातींचे लोक या देशात आले आणि सर्वच्या सर्व एकाच शरीरात सामावून एक होऊन गेले. कधीकधी जे लोक रणधुमाळी करीत, उन्मादाचे व उत्साहाचे विजयगीत गात गात रेगिस्तान पार करून आणि पर्वत उल्लंघून या देशात आले, त्यांच्यांतल्या कोणाचेही वेगळे अस्तित्व सांप्रत जाणवत नाही. ते सर्व माझ्या आत विराजमान आहेत. माझ्यापासून कोणीही दूर नाही. माझ्या रक्तात सर्वांचा सूर ध्वनित होत आहे.

या कवितेचे रहस्य समजावून सांगत असताना श्री. रामधारीसिंह दिनकर लिहितात—

रवींद्रनाथांची ही महामानवतेची अनुभूती काल्पनिक नसून वास्तवपूर्ण आहे. जो देश अनेक जाती व अनेक वंश यांची मीलनभूमी बनला, त्यातला कोणीही माणूस असा दावा करू

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शकणार नाही, की आपल्या देहात कोण्या अन्य जातीचे रक्त-वाहत नाही. त्याचप्रमाणे आपण जो धर्म पाळतो, जी संस्कृती मानतो आणि ज्या विचारांना राष्ट्रीय विचार म्हणून अभिमानाने जोपासतो, त्यांच्या उगमाचेही कोणते एक निश्चित स्थान नाही. हिंदूंचा धर्म आणि त्यांची संस्कृती वेदांतून निघाली आहे, हा अभिनिवेशही व्यर्थ आहे. ज्या जाती सांप्रत वन्य समजल्या गेल्या आहेत आणि सवर्ण हिंदू समाज ज्यांना अजून हीन लेखतो, अशा या जातींकडून आपल्या पूर्वजांनी एखादा विचार, एखादा धर्म, एखादे उपकरण उधार घेतले असण्याचीही शक्यता आहे. आर्यांचे या देशात आगमन होण्यापूर्वी भारताला धर्म व संस्कृती नावाच्या वस्तूच माहीत नव्हत्या; आर्यांनी त्यांचा उच्चार व प्रचार केला, हा अहंकारही मिथ्या आहे. तसे पाहिले, तर सभ्यतेच्या बाबतीत द्रविड लोक आर्यांपेक्षा श्रेष्ठ होते. त्यांनी शारीरिक ताकदीत आर्यांकडून हार खाल्ली; पण त्यांच्या कित्येक संस्कारांनी आणि धर्मकल्पनांनी आर्यांना प्रभावित केले होते, यात शंका नाही.

आर्य लोक या देशाचे अंतिम विजेते होत, असे म्हणणेही चूक आहे. बुद्धाच्या पूर्वी भारताच्या ईशान्य कोपऱ्यातून मंगोल लोकांचे आगमन सुरू झाले. संस्कृत साहित्यात त्या लोकांनाच किरात म्हटले आहे. मौर्य राजवंशाच्या पतनानंतर भारताच्या वायव्य कोपऱ्यातून इतर लोकांचे आगमन भारतात सुरू झाले. पुढे याच मार्गाने युएची, शक व आभीर या लोकांच्या झुंडीच्या झुंडी भारतात आल्या आणि त्यांनी सिंध, पंजाब व मथुरा येथे आपली राज्येही स्थापली. गुप्त राजांच्या कारकिर्दीत आणि त्याच्याही पूर्वी काही काल इथे हूणांचे व त्यांच्या नंतर तुर्कांचे आक्रमण झाले. ते लोक त्या वेळी मुसलमान नव्हते. आज या साऱ्यांचे वेगळे अस्तित्व कुठेच प्रतीत होत नाही. ते सारे इथल्या विशाल मानवसरोवरात विलीन झाले.

या ज्या वेगवेगळ्या टोळ्या भारतात आल्या, त्यांपैकी प्रत्येकीची कोणती ना कोणती तरी भाषा होती; कोणता ना कोणता तरी धर्म होता. त्यांच्या कोणत्या ना कोणत्या जाती, रूढी व सवयी असतील. त्यांचे काही कथागाथात्मक मौखिक साहित्यही असेल. त्यांचे काही नृत्य-नाटकादी मनोविनोदनाचे प्रकारही असतील. पण यांपैकी कशाचेही आज वेगळे अस्तित्व नाही मुसलमानांच्या आगमनाच्या पूर्वी जे जे लोक इथे आले, ते ते सगळे हिंदू बनले, भारतीय बनले. त्यामुळे भारतीय जनता ही शुद्ध आर्य वंशाचीही नाही आणि शुद्ध द्रविड वंशाचीही नाही. ती वरील सर्व लोकांची संतती आहे. भिन्न जाती, भिन्नभाषाभाषी व भिन्न मतावलंबी यांच्यामध्ये रक्ताचे मिश्रण होणे ही गोष्ट अन्य काही देशांत उपलब्ध असली, तरी भारताइतकी ती व्यापक प्रमाणात झालेली नाही. गोरा, सावळा, काळा आणि पिवळा हे जगातील मानवांचे वर्ण होत. या चारही रंगांचे भरपूर मिश्रण भारतीय जनतेत झालेले आहे.

जगात ज्या ज्या म्हणून जाती अस्तित्वात आहेत, त्या सर्वांचा मूळ वंश कोणता हे भाषा व शरीरविज्ञान या साधनांच्या द्वारे ठरवण्याचा प्रयत्न मानववंशशास्त्रज्ञांनी केला आहे. मानववंश जाणण्याची पहिली कसोटी रंग ही आहे. शास्त्रज्ञांचे एक सामान्य मत असे, की गोऱ्या रंगाचे लोक आर्य वंशाचे आहेत व काळ्या रंगाचे लोक आर्येतर वंशाचे अथवा आर्य आणि आर्येतर जातींमध्ये विवाहामुळे जे रक्तमिश्रण झाले, त्यापासून बनलेले आहेत. डोक्याच्या कवटीची लांबी-रुंदी पाहूनही वंश ठरवतात. त्याचबरोबर नाकाची उंची, रुंदी, त्याचा उभटपणा किंवा चपटेपणा या गोष्टींवरूनही वंशाविषयी अनुमान करतात. त्याचप्रमाणे माणसाचे शरीर, घडण, त्याची उंची, त्याचा जवडा (लहान किंवा मोठा) या गोष्टीही वंश ओळखण्याच्या कामी उपयोगी पडतात. मानववंशशास्त्रज्ञांनी जगातल्या सर्व जाती मुख्यतः तीन वंशांत वाटल्या आहेत. पहिला वंश गोऱ्या लोकांचा. यांना कॉकेशिअन म्हणून ओळखले जाते. दुसरा वर्ण पिवळ्या लोकांचा. यांना मंगोल म्हटले जाते. तिसरा काळ्या लोकांचा. या लोकांना इथोपियन वंशाचे समजतात. बाकीचे रंग हे या तीन रंगांपैकी दोन रंगांच्या मिश्रणातून किंवा हवामानाच्या बदलातून निर्माण झाले आहेत, असे समजतात. भारतीय जनतेत या तीन्ही रंगांचे प्रतिनिधी विद्यमान आहेत. त्यामुळे रंगांच्या दृष्टीनेही भारतीय मानवता ही विश्वमानवतेचेच एक अद्भुत प्रतीक ठरते, असे श्री. रामधारीसिंह म्हणतात.

दुसऱ्या दृष्टीने विचार, केला तर भारतात पुढील चार प्रकारचे लोक आढळतात—

(१) आकृती ठेंगणी, रंग काळा, नाक रुंद व केस कुरळे. अशा वर्णनाचे लोक सामान्यपणे जंगलात राहतात. हे लोक आर्य व द्रविड यांच्याही पूर्वी या देशात येऊन वसले होते. वन्य जीवनाची शतकानुशतके सवय लागल्यामुळे आजही हे लोक जंगलात राहणे सुखाचे मानतात.

(२) शरीर ठेंगणे, रंग काळा, डोके लांबट, कपाळावरचे केस राठ, नाक उभट आणि फुललेले. हे लोक रंग व शरीररचना या दृष्टींनी आदिवासी लोकांशी आपले साम्य दाखवतात. पण ते आदिवासींहून सर्वथा भिन्न आहेत. विंध्य पर्वताच्या तळवटी आणि साऱ्या दक्षिण भारतात याच लोकांचे बैतुल्य आहे. हे द्रविड वंशाचे लोक असून, यांचे पूर्वज आर्यांच्याही आधी भारतात आले आणि त्यांनी पहिल्या प्रथम या देशात नागरी संस्कृतीचा पाया घातला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(३) शरीर उंच, वर्ण गव्हाळी किंवा गोरा, दाढीमिशी दाट, मस्तक लांब व नाक पातळ आणि उंच टोकदार. हे लोक आर्य वंशाचे समजतात. वैदिक आर्यांचे जे रंगरूप ऋग्वेदादी साहित्यात आढळते, त्या वर्णनाशी हे लोक पूर्णपणे जुळत नाहीत. इथल्या उष्णतेमुळे त्यांच्या रंगात काळी झाक आली आहे आणि त्याचबरोबर द्रविड व आदिवासी या जातीशी त्यांचे जे विवाहसंबंध घडून आले, त्यामुळेही त्यांचा वर्ण बदलला आहे.

(४) मस्तक रुंद, रंग पिवळसर काळा, शरीर चपटे, नाक पसरट आणि तोंडावर दाढी-मिशांची उगवण कमी. हे लोक मंगोल वंशाचे समजतात. आसाम, भूतान, नेपाळ, उत्तर प्रदेश, पंजाब, बंगाल आणि काश्मीरचा उत्तर भाग या ठिकाणी हे लोक आढळतात. हे लोक आर्यांच्या नंतर तिबेट व चीन या देशांतून भारतात आले आणि वसले.

अशा प्रकारे प्राचीन काळात आर्य, द्रविड, आदिवासी व मंगोल या मानववंशांनी या देशात येऊन भारतीय जनतेची रचना केली. आपण ज्यांना आदिवासी म्हणतो, त्यांच्यामध्ये निग्रो व आग्नेय नावाच्या दोन वंशांचे लोक सामील आहेत. या दोन जातींच्या मिश्रणाने बनलेले लोक मुंड किंवा शबर या नावाने ओळखले जातात.

भाषाविज्ञानाची कसोटी – भाषाविज्ञानाच्या दृष्टीने पाहिल्यास या देशात शे. ७६·४ आर्यभाषी, शे. २०·६ द्राविडभाषी व शे. ३ शबर–किरातीभाषी आहेत, असे श्री. जयचंद्र विद्यालंकार म्हणतात. मंगोलवंशाच्या लोकांची भाषा तिबेटी–चिनी परिवाराची भाषा आहे. या देशात आल्यावर त्यांच्यावर आर्यभाषांचाही बराच प्रभाव पडला. कन्नड, तेलुगू, तमिळ व मल्याळम या द्रविड परिवाराच्या भाषा होत. या भाषांचे क्षेत्र दक्षिणेपुरतेच मर्यादित आहे. या भाषांचे अनेक शब्द व प्रयोग आर्यभाषांमध्ये मिसळून गेले आहेत. विहारमधील उराँव जमात जी भाषा बोलते, ती द्राविड वळणाची आहे. हिंदी, उर्दू, बंगाली, मराठी, गुजराती, उडिया, पंजाबी, असमिया, इ. भाषा या आर्यभाषा असून, त्या संस्कृत प्रवाहातून उगम पावल्या आहेत. भारताच्या बाहेर आर्यभाषांचा संबंध-इंडो जर्मन भाषासमूहाशी आहे. इंडो–जर्मन परिवाराच्या भाषांमध्ये जी समानता आहे, तिच्यावरून असे अनुमान केलेले आहे, की भारतीय आर्य ज्या मूळ परिवारातले होते, त्याच परिवारातून समस्त युरोपीय लोक निघालेले आहेत. भारतात वसलेल्या मानववंशाचे विवेचन करीत असताना डॉ. सुनीतिकुमार चटर्जी म्हणतात –

भारतीय जनतेचे विभाजन ऑस्ट्रिक अथवा आग्नेय, द्रविड व इंडो-जर्मन या तीन भाषासमूहांमध्ये करता येते. निग्रोंपासून प्रारंभ होऊन आर्यांपर्यंत जे कोणी लोक या देशात आले, त्यांच्या भाषा वरील तीन भाषांमध्ये समाविष्ट आहेत. सामान्यपणे असे समजतात, की भारतात पहिले आगमन निग्रो मानवांचे झाले. ही जमात अरबस्तान व इराण यांच्या किनाऱ्या-किनाऱ्याने भारतात आली. आफ्रिकेतूनही आली असण्याची शक्यता आहे. निग्रोंची एक शाखा भारतातून निघून ऑस्ट्रेलियामध्ये गेली आणि आजतागायत ती तिथे विद्यमान आहे. भारतात मात्र निग्रो मानववंश जवळजवळ नामशेष झाला आहे. अनुमान असे आहे, की पाठीमागून आलेल्या आग्नेय लोकांनी त्यांचा संहार केला असेल किंवा ते लोक आग्नेय मानवसमूहात मिसळून गेल्यामुळे त्यांचे पृथक अस्तित्व नष्ट झाले असेल. सांप्रत त्यांची थोडीशी निशाणी दक्षिण भारतातल्या आदिवासी आणि आसाममधल्या अंगामी नागा जमातीत शिल्लक उरली आहे. जेव्हा आर्य या देशात आले, त्या काळी निग्रो जमात भारतातून नष्ट झालेली होती. भारतीय जनसंख्येतला बराच मोठा भाग आग्नेय जमातीतून विस्तारलेला आहे. या वंशाचे लोक विंध्य पर्वतश्रेणी धरून मादागास्कर व प्रशांत महासागरातील इस्टर द्वीपे इथवर पसरलेले आहेत. यांचे भारतात आगमन निग्रोंच्या नंतर झाले. भारतातले कोल व मुंड; ब्रह्मदेश व इंडोचीन यातील मोन्ख्मेर; निकोबारी, त्याचप्रमाणे इंडोनेशियन, मेलनेशियन व पॉलिनेशियन हे गडद काळे लोक याच आग्नेयवंशाची मिश्र संताने होत. आग्नेय जाती ही एखादी स्वतंत्र जाती होती किंवा ती द्रविडांच्याच कोणत्यातरी शाखेतून निघाली याविषयी काही मतभेद आहेत. श्री. रत्नस्वामी म्हणतात, की आग्नेय लोक द्रविडांचेच वंशज आहेत.

आर्यांच्या आगमनप्रसंगी आग्नेय लोक सिंधू नदीच्या खोऱ्यातही वसले होते. आर्यांनी त्यांना निषाद म्हटले आहे. सन पूर्व १५०० वर्षे या कालापूर्वीच पूर्व भारतातले बहुतेक लोक आर्यांच्या सांस्कृतिक चौकटीत दाखल झाले होते. आर्यांच्या आगमनकाली द्रविड व आग्नेय हे लोक शेजारधर्माने राहत होते.

नैसर्गिक विभाग – भौगोलिक रचनेच्या आधारावर भारताचे तीन भाग स्पष्टपणे पडतात, ते असे – (१) द्वीपकल्पीय विभाग (२) उत्तरेची विस्तीर्ण पर्वतमाला व (३) या दोहोंच्या मधले विशाल मैदान.

(१) **द्वीपकल्पीय विभाग** – हा भारताचा प्राचीनतम भूखंड आहे. याची निर्मिती पृथ्वीच्या अन्य प्राचीनतम भूखंडाप्रमाणे आद्य महाकल्पात झाल्याचे सांगतात. तेव्हापासून हा भूभाग स्थलप्रदेश म्हणूनच राहिला असून, तो कधीही समुद्राच्या पाण्याखाली गेला नाही. यामध्ये आढळणारे दगड मुख्यत्वे ग्रॅनाईट, नाइस व शिस्क आहेत. याचे दुसरे वशिष्टच हे, की अतिप्राचीन काळापासून हा प्रदेश धरणीकंपापासून मुक्त आहे. या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भागात भूकंपनिर्मित पर्वत आढळत नाहीत. जे आहेत ते अवशिष्ट किंवा घर्षित वर्गातले आहेत. अरवली पर्वतही एक अवशिष्ट पर्वतच आहे. याची निर्मिती अत्यंत प्राचीन काळी झाली असून, निर्माणसमयी त्याचा विस्तार हिमालयाच्या पर्वतश्रेणीप्रमाणेच होता. पण सांप्रत त्याचा केवळ एक अंश शिल्लक उरला आहे. पूर्वेचा व पश्चिमेचा घाट हेही अवशिष्ट पहाडांपैकीच आहेत. अत्यंत प्राचीन कालापासून स्थिर व स्थलभाग राहिल्यामुळे या पठाराच्या ठिकाणी अनावृत्तीकरणशक्ती निरंतर काम करीत राहिल्या आहेत. त्याचा परिणाम म्हणून याचा बराचसा भाग घासला गेला आहे. पोटातले प्राचीन खडक जमिनीच्या पृष्ठभागावर आले आहेत आणि नद्या खालच्या तळापर्यंत खाली पोचल्या आहेत.

हा भाग म्हणजे एक विस्तृत पठार आहे. हे पठार सर्वांत जुन्या स्थलखंडाचा अवशेष असून, मुख्यत्वे कठीण व दाणेदार रूपांतरित शिलाखंडांनी बनले आहे. हे तीन बाजूंनी पर्वतश्रेणींनी घेरलेले आहे. याच्या उत्तरेस विंध्य व सातपुडा हे पर्वत आहेत. नर्मदा नदी त्यातूनच पश्चिमेकडे वाहते. सातपुड्याच्या पर्वतश्रेणीने भारताचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग बनले आहेत. पूर्वेच्या अंगाने महादेव व मैकाल नामक पर्वतश्रेणी आहेत. पश्चिमेस पश्चिम घाट आहे. पूर्वेलाही असाच घाट असून, तो पश्चिम घाटापेक्षा उंचीला कमी आहे. पूर्वेचा घाट केवळ कमी उंचीचा आहे; एवढेच नव्हे, तर बंगालच्या खाडीत आत्मार्पण करणाऱ्या महानदी, गोदावरी, कृष्णा व कावेरी या नद्यांनी कित्येक ठिकाणी तो उभाच्या उभा कापलेला आहे. हे दोन घाट नीलगिरीच्या पहाडात एकत्र मिळतात. त्या ठिकाणी दोडुबेट नामक ८७०६ फूट उंचीचे पर्वतशिखर आहे. नीलगिरीच्या दक्षिणेस अन्नमलई व वेलची हे पर्वत आहेत. वायव्येस विंध्य व अरवली या पर्वतांच्या मध्ये माळव्याचे पठार असून, ते लाव्हारसापासून निर्माण झालेले आहे. अरवली पर्वतश्रेणी ही दक्षिणेत गुजरातपासून उत्तरेस दिल्लीपर्यंत कित्येक पर्वतांच्या रूपाने आढळून येते. या पर्वतात अबूचा पहाड हा मुख्य आहे व तो ५६५० फूट उंच आहे. ईशान्येस छोटा नागपूरचे पठार आहे. इथली राजमहल ही टेकडी द्वीपकल्पीय पठाराची ईशान्य सीमा बनते. पण आसामचे शिलाँग पठार हेही द्वीपकल्पीय पठाराचाच भाग असून, ते गंगेच्या मैदानाने मुख्य भागापासून अलग केलेले आहे. दख्खनच्या पठाराची सर्वसामान्य उंची १५०० फूट ते ३००० फूट आहे. त्याचा उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. पठाराच्या पूर्व–पश्चिम किनाऱ्यावर उपजाऊ मैदाने आहेत. पश्चिम किनाऱ्याचे मैदान संकीर्ण असून, त्याच्या उत्तर भागाला कोकण व दक्षिण भागाला मलबार म्हणतात. पूर्वेकडचे मैदान याहून थोडे रुंद आहे आणि उत्तरेस ओडिसापासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत पसरले आहे.

(२) हिमालयाच्या पर्वतश्रेणी – यांची भूगर्भीय रचना द्वीपकल्पीय प्रदेशाहून वेगळी आहे. जरी याच्या काही भागांत प्राचीन शिलाखंड आढळत असले, तरी बहुतांशी हा नव्या परतदार खडकांच्या द्वारे निर्मिलेला आहे. या पर्वतश्रेणींची निर्मिती भूकंपाच्या द्वारे झाली आहे. द्वीपकल्पीय भागात ज्या प्रमाणात अनावृत्तीकरणशक्ती काम करतात आणि परिवर्तन घडवून आणतात, त्याप्रमाणे ते या पर्वतश्रेणीत झालेले नाही. इथल्या नद्या अजून तरुण आहेत आणि त्या आपले पात्र निश्चित खोल खोल नेत चालल्या आहेत. त्यामुळे या पर्वतश्रेणींत खोल, संकीर्ण व सुळक्यांची दरीखोरी निर्माण झाली आहेत.

(३) उत्तरभारतीय मैदान – भूवैज्ञानिक दृष्टीने हे सर्वांत अलिकडचे आणि कमी महत्त्वाचे आहे. हिमालयपर्वतश्रेणीच्या निर्माणसमयी उत्तरेकडून धरणीकंपाची लाट आली आणि तिच्या धक्क्याने द्वीपकल्पाचा उत्तर किनारा खाली घसरला गेला आणि त्यामुळे एक विशाल खड्डा तयार झाला. पुढे हिमालयातून निघणाऱ्या नद्यांनी हा खड्डा भरण्याचे काम सुरू केले आणि कालांतराने ते एक विशाल मैदान बनले. अशा प्रकारे हे मैदान मुख्यतः हिमाचलातल्या नद्यांतून आलेल्या आणि पसरलेल्या गाळाने बनले आहे. यात वाळू आणि माती यांचे थर आढळतात. हे विस्तृत मैदान जवळजवळ समतल असून, उत्तर भारतातल्या गंगा, सिंधू व ब्रह्मपुत्रा या नद्या मंद गतीने समुद्राला भेटायला जातात.

आर्थिक दृष्टचा हा प्रदेश देशाच्या सर्वांत अधिक उपजाऊ व विकसित भाग आहे. प्राचीन कालापासून हे मैदान आर्य संस्कृतीचे केंद्र होऊन राहिले आहे. इथे शेतीव्यतिरिक्त अनेक उद्योगधंद्यांचे जाळे पसरलेले आहे. या भागात शहरे पुष्कळ असून, देशाची जवळजवळ दोन तृतीयांश लोकसंख्या या मैदानात वसलेली आहे.

भूरचना – भरतखंडाची भूरचना लक्षावधी वर्षांच्या काळात, निरनिराळ्या वेळी झाली आहे. त्याचा दक्षिण भाग ज्या काळात पृथ्वीचा पृष्ठभाग घट्ट झाला, त्या काळात बनलेला आहे. हा भूखंड पूर्वी एका महान खंडाचा भाग होता. त्या महान खंडाला गोंडवन असे नाव देण्यात आले आहे. ते खंड द. आफ्रिकेपासून द. अमेरिकेपर्यंत पसरले होते. त्याच्या मध्यभागी सह्यपर्वतराजी उभी होती. उत्तरेला अरवलीपर्वतश्रेणी असून, त्याच्या पलीकडे मध्य युरोपपासून ब्रह्मदेशापर्यंत एक विशाल महासागर होता. त्याला पाथोधी असे म्हणतात. कालांतराने भूगर्भातील प्रचंड उलथापालथीमुळे हिंदी महासागर निर्माण झाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

भारत हे द्वीपकल्प बनून वेगळे झाले. हा बहुतेक भूभाग अग्नि-जन्य खडकांचा बनलेला असून, त्यात भूकंपामुळे फारशी मोड-तोड झालेली नाही. या भागातील अरवली, सह्य व पूर्वघाट हे पर्वत अवशिष्ट किंवा घर्षित वर्गातले आहेत.

दीर्घ कालानंतर भूगर्भात पुन्हा प्रचंड उलथापालथ होऊन पाथोधीचा तळ वर आला. मात्र त्याचा काही भाग खूपच वर येऊन हिमालयपर्वतश्रेणी निर्माण झाली. त्यात काही खडक अत्यंत प्राचीन असले, तरी बहुतेक भाग थरयुक्त खडकांचा बनलेला आहे. हे थर प्रथम पाथोधी सागरात तयार झाले होते. भूकंपामुळे काही थरांत सुरकुत्या व घडंचा पडल्या, तर काही थर एकमेकांवर चढले. म्हणून हिमालयाला घडयांचा पर्वत म्हणतात. त्या पर्वतराजीच्या दक्षिणेला उथळ समुद्र राहिला. हिमालयात उगम पावलेल्या अनेक नद्या त्या समुद्रात पुष्कळ गाळ आणून टाकू लागल्या आणि त्या गाळामुळे उ. भारताचे मैदान तयार झाले. त्यानंतर दीर्घ कालाने भरतखंडात मानवाची उत्पत्ती झाली.



(श्री. पाटणकर व श्री. देवधर यांच्या स्पेशल भूगोल या पुस्तकावरून)

कै. कृ. वि. वझे, इंजिनीयर, यांनी पुराणांचा व आधुनिक शास्त्रांचा तौलनिक अभ्यास करून भरतखंडाच्या निर्मितीचा भूस्तरशास्त्रीय इतिहास लिहिला आहे, त्याचा सारांश असा –

शास्त्रकारांनी चार युगे मानली आहेत. (१) कृत – ज्यात सारख्या उलथापालथी होत असत, तो कालखंड. (२) त्रेता– ज्यात ज्वालामुखीचे पुष्कळ उद्रेक होत असत, असा कालखंड. (३) द्वापर– ज्यात पुष्कळ गाळ टाकला गेला, तो कालखंड व (४) कली – ज्यात फारशा घडामोडी होत नाहीत, असा झोपेचा कालखंड. हिमालयापासून विंध्य पर्वतापर्यंतचा भूभाग द्वापर युगात निर्माण झालेला असून, त्याला सात्त्विक, नागर किंवा सौम्य अशी नावे आहेत. विंध्य पर्वतापासून कृष्णा किंवा तुंगभद्रा नदीपर्यंतचा प्रदेश त्रेता युगात उत्पन्न झाला असून, त्याला द्राविड, राजस किंवा आग्नेय म्हणतात. दक्षिणेकडील रामेश्वरापर्यंतचा भूभाग कृतयुगात झाला असून, त्याला तामस किंवा वेसर म्हणतात. त्या प्रत्येक युगात तीन चक्रे व प्रत्येक चक्रात तीन वर्ण किंवा गुण होते. त्यामुळे भरतखंडाचे २७ भाग होतात; त्यांतील १६ भाग स्पष्ट व प्रमुख आहेत.

पृथ्वी स्वतःच्या आसाभोवती फिरत असल्यामुळे, ती द्रव स्थितीत असताना विषुववृत्ताकडे जास्त द्रव जमा होऊन तो भाग प्रथम घट्ट झाला. या भागात वरचेवर फार उलथापालथी झाल्यामुळे तिथले खडक वाकडे–तिकडे बनले, म्हणून त्यांना वेसर (= मेटॅमॉर्फिक = मूळ रूपात बदल झालेले) म्हणतात. कृत युगात बनलेले म्हणून या खडकांना प्रारंभिक (प्रायमरी) असेही म्हणतात. नीलगिरी, मद्रास, विजयवाडा, ओडिसा व बुंदेलखंड या प्रदेशांत असले खडक आहेत. या कृत युगात तीन चक्रे झाली. रत्नचक्र, हेमचक्र व अश्मचक्र अशी त्यांची नावे आहेत. पहिल्या चक्रात जे खडक तयार झाले, त्यांत रत्ने विपुल सापडतात. लंका, गोवळकोंडा हे प्रदेश अशा प्रकारचे आहेत. हेमचक्रात पृष्ठभागाला चिरा

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पडून त्यांत सुवर्ण, रजत, इ. धातूंचा रस येऊन बसला. त्यांचा जो थर बनला त्याला धारवाड थर म्हणतात. धारवाड, कोलार, म्हैसूर, नेलोर, बालाघाट, नागपूर, जबलपूर, बिहार, ओडिसा, हजारीबाग, रेवा, अरवली व शिलाँग, या प्रदेशांत हे थर सापडतात.

वेसर किंवा तामस खडकांवर पाऊस पडून त्यांचा मऊ भाग पाण्याबरोबर वाहून गेला व कठीण टोले उरले. खडकांना सुरकुत्या पडल्यामुळे ते टोले पुढे खोलगट भागात जाऊन बसले. ज्या काळात हे घडले त्याला अश्मचक्र म्हणतात. बल्लारी, रायचूर, कडाप्पा या भागात असले खडक आहेत. कृत युगातील खडकांची जाडी सुमारे २६,००० फूट असावी, असा अंदाज आहे. त्यानंतर पृथ्वी बरीच निवली व तिच्या पृष्ठभागावर नद्या निर्माण झाल्या. कावेरी व तापी अशा नद्या आहेत. म्हणूनच पुराणांत त्यांना सूर्यकन्या म्हटले आहे.

त्रेता युगात शंखचक्र, मत्स्यचक्र व वृक्षचक्र हे तीन कालखंड झाले. या कालखंडात सह्य व विंध्य हे पर्वत निर्माण झाले. ज्वालामुखीतून पाषाणरस बाहेर पडून त्याचे जे खडक बनले, त्यांना द्राविड किंवा आग्नेय म्हणतात. या खडकांत लोखंड, मँगनीज, तांबे, कथील हे धातू सापडतात. जबलपूर, मिदनापूर ते जयपूर, रामगड ते बालाघाट या प्रदेशांत असले खडक आहेत. त्रेता युगाच्या आरंभी ओडिसापासून अरबी समुद्रापर्यंत तापी नदी वाहत होती. तिच्या पाण्यात शंख असून, त्यांचे खडूचे खडक बनण्याचे काम चालू होते. त्या काळाला शंखचक्र म्हणतात. त्यानंतर पाण्यात हळूहळू मासे उत्पन्न झाले. त्या काळाला मत्स्यचक्र म्हणतात. त्यानंतरच्या काळात दंडकारण्य निर्माण झाले. त्याला वृक्षचक्र म्हणतात.

ज्वालामुखीच्या स्फोटांमुळे सह्य पर्वत बनला. तेव्हा पृथ्वीला सुरकुती पडून रत्नाकर (पश्चिम समुद्र) निर्माण झाला. त्यानंतर गोदावरी व कृष्णा या नद्या उत्पन्न झाल्या. विंध्य पर्वत वर आल्यानंतर नर्मदा नदी निर्माण झाली.

त्यानंतर द्वापर युगाच्या आरंभी हिमालय व विंध्य यांमधील भूमी वर आली. या भूमीत गाळाचे थर सुमारे २७,००० फूट आहेत. ते पाण्यात तयार झाले म्हणून त्यांना जलज किंवा सौम्य म्हणतात. ही जमीन सपाट आहे, म्हणून तिला नागर (= नगररचनेसाठी योग्य) असे नाव मिळाले. या भिन्न भिन्न थरांत भिन्न भिन्न प्राण्यांचे अवशेष सापडतात. द्वापर युगात प्रथम सर्पचक्र होते. त्या काळातील थरांत सरडे वगैरे प्राण्यांचे अवशेष आहेत. शृंगचक्रातील थरांत हरणे, बकरे, इ. पशूंचे अवशेष सापडतात. त्यानंतरच्या दंतयुगातील थरात गेंडा, हत्ती, जिराफ, उंट, घोडा, यांचे अवशेष आढळतात. याच युगात गंगा, यमुना वगैरे नद्या हिमालयात उगम पावून सखल प्रदेशातून वाहू लागल्या. पुढे राजस्थानातील समुद्र आटला व तिथे रेताड प्रदेश निर्माण झाला.

त्यानंतर कलियुग सुरू झाले. या काळात साबरमती, मही, नर्मदा व तापी यांच्या गाळाने गुजरातची भूमी तयार झाली. (महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष १ ले).

कृत, त्रेता, द्वापर व कली या चार युगांची मिळून ४३,२०,००० वर्षे मानलेली आहेत. त्यांत कृत युगाची १७,२८,००० वर्षे, त्रेता युगाची १२,९६,००० वर्षे व द्वापर युगाची ८,६४,००० वर्षे असल्यामुळे वरील विवेचनातील कालगणना भूगर्भशास्त्रातील कालगणनेशी स्थूलमानाने जुळणारी आहे.

हवापाणी – विस्तृत क्षेत्र आणि नैसर्गिक विभिन्नता, यांच्यामुळे भारताच्या भिन्न भिन्न भागांतले हवामान व पर्जन्यमान भिन्न भिन्न आहे. पण मोसमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे या हवामानाच्या भिन्नतेतही एक समानता निर्माण झाली आहे. हिमालयाच्या अत्युच्च पर्वतश्रेणी आशियातून येणाऱ्या थंडगार वाऱ्यांना अडवून भारताला सुरक्षित ठेवतात. भारत व पाकिस्तान यांचा सम्मीलित स्थलप्रदेश इतका विस्तृत आहे, की तो मध्य आशियापासून वेगळी अशी एक स्वतंत्र मोसमी वाऱ्यांची प्रणाली निर्माण करतो. तपमान व पर्जन्यमान यांच्यामध्ये प्रादेशिक विषमता असली, तरी सर्व ठिकाणी ऋतूंचा एकच क्रम आढळून येतो. काही मर्यादित क्षेत्र वगळल्यास भारतात सर्वत्र तीन चतुर्थांशाहून अधिक वृष्टी ग्रीष्म ऋतूतच होते. भारतात सामान्यपणे तीन ऋतू आढळून येतात.

(१) हिवाळा – हा ऋतू कार्तिक ते माघ या महिन्यांत सामान्यपणे असतो. या काळात सूर्य दक्षिण गोलार्धात असतो आणि त्याचे तपमान दक्षिणेकडून उत्तरेकडे कमी कमी होत जाते. हिवाळ्यात दक्षिण भारतापेक्षा उत्तर भारत तुलनेने अधिक थंड असतो. सर्वांत जास्त थंडी वायव्य भागात असते. वारे जमिनीवरून समुद्राकडे वाहतात, त्यामुळे ते शुष्क असतात व वृष्टी करीत नाहीत. वायव्य भागात आणि आग्नेय भागात थोडीबहुत वृष्टी होते, ती अपवादात्मक होय. वायव्येची वृष्टी चक्री वादळामुळे होते आणि ती एक-दोन इंचच होत असली तरी रब्बी हंगामासाठी अत्यंत लाभदायक ठरते. तमिळनाडूमध्ये पौष-माघ या महिन्यांत थोडाबहुत पाऊस पडतो. ईशान्येचे मोसमी वारे बंगाल खाडीतून वाफ घेतात आणि कर्नाटकाच्या पूर्व भागात वर्षाव करतात.

(२) उन्हाळा – हा सामान्यतः फाल्गुन ते ज्येष्ठ या चार महिन्यांत असतो. चैत्र व वैशाख या दोन महिन्यांत सूर्य भार-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

त्याच्या मध्य भागात, कर्कवृत्ताजवळच्या प्रदेशांत सरळ माथ्यावर तळपत असतो आणि उन्हाची तीव्रता वाढवतो. दक्षिण भारताचे पठार उंच असल्यामुळे तिथे उन्हाळा फारसा होत नाही, पण उत्तरेच्या मैदानात मात्र त्या दिवसांत, विशेषतः वैशाख महिन्यात तपमान ३४ सें. हून अधिक असते. नेहमीच दक्षिण भारतापेक्षा उत्तर भारत थंडीत अधिक थंड व उन्हाळ्यात अधिक ऊष्ण राहतो. या ऋतूत उ. भारतात प्रायः वादळे होतात आणि त्यामुळे बंगाल व आसाम या प्रदेशांत पाऊस पडतो. या पावसामुळे आसामच्या चहाच्या मळ्यांना व अन्य भागांत आमरायांना विशेष लाभ होतो.

(३) पावसाळा– हा आषाढापासून आश्विन महिन्यापर्यंत असतो. आषाढाच्या सुरवातीस उष्णता वाढत जाते. पण अर्ध्या आषाढात मोसम एकदम बदलतो. वारे नैर्ऋत्येकडून जोराने वाहू लागतात. आकाश ढगाळ होते आणि मेघगर्जनेसह पर्जन्यवृष्टी सुरू होते. दक्षिणी द्वीपकल्पामुळे या वाऱ्यांच्या दोन शाखा होतात. एक पश्चिम सागराची व दुसरी बंगालच्या उपसागराची. बंगालच्या उपसागरातून उत्तर भारतात वृष्टी होते; तर पश्चिम सागरातून दक्षिण भारतात वृष्टी होते. पश्चिम घाट आणि पश्चिम किनारा या ठिकाणी पाऊस अधिक पडतो. दख्खनच्या पठाराचा बराच भाग या वृष्टिसंस्थानात येतो. उत्तर भारतात वाऱ्यांची दिशा दक्षिण-पूर्व असते. बंगालच्या उपसागरातून गंगेच्या मैदानात पश्चिमेकडे पाऊस कमी कमी होत जातो. हिमालयाकडून दक्षिण दिशेला जातानाही पाऊस कमी कमी होत जातो. सर्वांत अधिक पाऊस आसामच्या आराकान व खासी पर्वतश्रेणींच्या मीलनक्षेत्रात होतो. जगातला सर्वांत अधिक पाऊस या ठिकाणी पडतो. वायव्येच्या खालच्या अंगाचे दाबाचे क्षेत्र वाऱ्यांना आकर्षित करून घेते, पण हे वारे पाऊस मात्र आणीत नाहीत. कच्छच्या भागापर्यंत पोचता पोचता त्यांनी बंगालच्या उपसागरातून आणलेली वाफ संपून जाते. पश्चिमी सागरातून निघणारे वारेही या प्रदेशात पाऊस आणीत नाहीत. त्यामुळे राजस्थान, दक्षिण व पश्चिम पंजाब या प्रदेशांत १० इंचांहूनही कमीच पाऊस पडतो. यद्यपि भारतात पाऊस मुख्यतः नैर्ऋत्येकडच्या मोसमी वाऱ्यामुळे पडतो, तथापि त्यामुळे पर्जन्यमान अनिश्चित व पर्जन्यकाल अनियमित राहतो. एखाद्या वर्षी पाऊस जरुरीपेक्षा अधिक पडतो, तर एखाद्या वर्षी कमी पडतो. कधी तो उशिरा सुरू होतो; तर कधी लवकर संपून जातो.



(श्री. पाटणकर व श्री. देवधर यांच्या स्पेशल भूगोल या पुस्तकावरून)

माती– भारतातील भूमीच्या मातीचे चार प्रधान वर्ग होतात–

(१) जलोढ किंवा गाळाची माती –उत्तरेच्या विस्तृत मैदानात त्याचप्रमाणे द्वीपकल्पीय प्रदेशाच्या तीरस्थ मैदानात ही सापडते. ही माती फार सुपीक असून, हिच्यावर भारताच्या अर्ध्याअधिक जनसंख्येची उपजीविका चालते. हिमालयातून निघालेल्या नद्या ही माती आणतात व खालच्या मैदानात पसरतात.

(२) काळी माती– ही माती लाव्हा रस सुकून व त्यावर अनेक प्रक्रिया घडून बनलेली आहे. महाराष्ट्र व बराचसा गुजरात, तसेच मध्य प्रदेशाचा पश्चिम भाग यांमध्ये ही माती आढळते. ही मातीही फार सुपीक असून, कपाशीच्या उत्पन्नासाठी

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फार उपयुक्त आहे. पाऊस कमी पडला, तरीही या मातीत पिके चांगली येतात.

(३) लाल माती – या वर्गाच्या मातीत अनेक प्रकारच्या मृत्तिका आढळतात. त्या पठाराच्या प्राचीन रवेदार शिलाखंडांच्या घर्षणातून बनलेल्या आहेत. या मातीत उपजाऊ शक्ती कमी असते; पण ती खालाटीच्या ठिकाणात किंवा नद्यांच्या उभय तीरांवरच्या प्रदेशात अधिक उपजाऊ बनते. तीरस्थ मैदाने व काळ्या मातीचे क्षेत्र सोडल्यास द्वीपकल्पीय भागाच्या अधिकांश भागात सर्वत्र लाल मातीच आढळते.

(४) लॅटेराईट माती– ही माती याच नावाच्या शिलाखंडांच्या फुटीतुटीतून बनलेली आहे. ही दिसायला लाल मातीसारखी खरी; पण सुपीकपणात तिच्याहून कमी भरते. उंच प्रदेशात ही प्रायः कंकरमिश्रित होते व शेतीला निरुपयोगी ठरते. मैदानी भागात मात्र तिच्यात शेती करतात. ही माती दख्खनचे पठार, राजमहल टेकड्या, छोटा नागपूरचे पठार आणि आसाम या भागात काही काही ठिकाणी आढळते.

शेती – भारत हा कृषिप्रधान देश आहे. इथले ७० टक्के लोक शेतीवर जगतात. शेतीच्या ८० टक्के भागात अन्नधान्य पिकवतात; पण तरीही देशात सुमारे १० टक्के अन्नधान्याची कमतरता राहतेच. ही कमतरता परदेशातून धान्य आयात करून भरून काढावी लागते. एकरी उत्पादन, चांगले बियाणे व खते यांचा वापर, सिंचनाची व्यवस्था, पशुपालन, इ. सर्व दृष्टींनी भारताची शेती अन्य देशांपेक्षा मागसलेली आहे. देशाच्या मोठ्या भागात पाऊस गरजेपेक्षा कमी व अनिश्चित असल्यामुळे तिथे सिंचनव्यवस्थेची गरज अधिक भासते. तिथे सुमारे ६००लाख एकर भूमी सिंचनव्यवस्थेखाली आहे; पण ती भारताच्या एकूण शेतीचा केवळ सहावा भागच आहे.

कालवे, तलाव आणि विहिरी ही पाण्याखालील शेतीची तीन मुख्य साधने होत. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अनेक नद्यांना धरणे बांधून कालवे खोदलेले आहेत आणि ते दूरदूरपर्यंत नेलेले आहेत. पंजाब, उत्तर भारत आणि बिहार या प्रदेशांत या कालव्यांखाली जमीन बरीच भिजते. आंध्र तमिळनाडू, म्हैसूर व छोटा नागपूर या भागांत मुख्यत्वे तलावातून कालवे खोदून जमीन भिजविली जाते. सुमारे पावणेदोन लाख एकर भूमी विहिरींच्या पाण्यावर पिकते. गेल्या काही वर्षांत अनेक प्रदेशांत नलिकाकूप खोदून त्यांतूनही पाणी वर खेचून त्यावर शेती केली जाते. नद्यांचे पाणी सांप्रत ९ टक्केच सिंचाईच्या कामासाठी उपयोगी पडते व बाकीचे ९१ टक्के वाहून वाया जाते. नद्यांच्या पाण्याचा उपयोग सिंचाई व वीजनिर्मिती अशा दोन्ही कारणांसाठी होऊ शकतो. त्या दृष्टीने भारत सरकारने कित्येक योजना कार्यान्वित केल्या आहेत.त्यांपैकी दामोदर घाटी योजना (बंगाल-बिहार), हिराकुंड धरण योजना (ओडिसा), कोसी योजना (बिहार), भाकडानंगल योजना (पंजाब-हरियाना), रिहंद धरण योजना (उ. प्रदेश), तुंगभद्रा योजना (आंध्र व म्हैसूर), कोयना धरण योजना (महाराष्ट्र), नागार्जुनसागर योजना (आंध्र प्रदेश), चंबळ योजना (मध्य प्रदेश व राजस्थान), गंडक योजना (बिहार), इ. योजना प्रमुख आहेत.

भारतात खरीप व रब्बी अशी दोन पिके आहेत. खरीप पिकांची पेरणी पावसाळ्याच्या प्रारंभी केली जाते व दिवाळीच्या आगेमागे तिची कापणी होते. या पिकांत तांदूळ ज्वारी, बाजरी, मका, कापूस, ताग, भुईमूग व कडधान्ये पिकवली जातात. रब्बी हंगाम पावसाळ्याच्या शेवटी सुरू होतो व फाल्गुन महिन्यात कापणी होते. रब्बी हंगामात मुख्यत्वे वाटाणा, हरभरा, गहू, जव, मसूर, सरसू, इ. पिके घेतली जातात. चहा, ऊस, तीळ, भुईमूग, सरसू, मिरची व काळी मिरी या वस्तूंच्या उत्पादनात भारताचा जगामध्ये क्रमांक पहिला, तांदूळ व ताग यांमध्ये दुसरा, तंबाखूच्या उत्पादनात तिसरा व कापसाच्या उत्पादनात चौथा लागतो. भारतात नाना प्रकारची फळे व भाजीपाल्याच्या जाती निर्माण होतात. बिहार, पश्चिम बंगाल व उत्तर प्रदेश यांत आंब्याचे उत्पन्न एकूण उत्पादनाच्या सुमारे तीन चतुर्थांश होते. दक्षिण भारतात आंबा मुख्यतः समुद्रतीरावरच्या प्रदेशात होतो. तमिळनाडू, केरळ, महाराष्ट्र व म्हैसूर हे आंब्याच्या उत्पन्नाचे प्रदेश आहेत. नागपूर विभाग, दार्जिलिंग व ब्रह्मपुत्रेचे खोरे या ठिकाणी संत्री पिकतात. प्रयागला पेरू व मुझफ्फरपूर येथे लीची ही फळे चांगली येतात. हिमाचल प्रदेशात बहुतेक सर्व फळे निर्माण होतात. काश्मीर व कुलू खोरे या प्रदेशांत उत्तम सफरचंदे पिकतात. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, पंजाब, महाराष्ट्र व म्हैसूर या प्रदेशांत बटाटा उत्तम निपजतो.

खनिज संपत्ती– क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केल्यास भारत देश खनिज संपत्तीने समृद्ध आहे, असे म्हणता येणार नाही. पण तरीही काही खनिजांच्या उत्पादनात व त्यांच्या साठ्यात भारताला जगात महत्त्वपूर्ण स्थान आहे. कोळसा, कच्चे लोखंड, मँगनीज, अभ्रक, बॉक्साइट, इल्मेनाइट, टिटॅनियम, थोरियम, कायनाइट व चुनखडी ही खनिजे भारतात विपुल प्रमाणात आढळतात. पण सोने, चांदी, जस्त, तांबे, शिसे, निकेल, गंधक व पेट्रोलियम यांसारखी महत्त्वपूर्ण खनिजे भारतात अल्प प्रमाणातच मिळतात. भारतातील अधिकांश खनिजे द्वीपकल्पीय पठारात, रूपांतरित शिलाखंडांत व गोंडवनयुगाच्या परतदार शिलाखंडांत सापडतात. छोटा नागपूरचे पठार त्या दृष्टीने सर्वांत समृद्ध आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शक्ती—दगडी कोळसा, पेट्रोल व पाणी ही शक्ती निर्माण करण्याची मुख्य साधनें होत. भारतात दगडी कोळसा विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. त्याचा उपयोग मुख्यतः कारखाने व आगगाडचा यांसाठी होतो. वीज-निर्मितीसाठीही पुष्कळ कोळसा वापरला जातो. इथे पेट्रोलची कमतरता आहे. ते मुख्यतः वाहनांसाठी उपयोगी पडते. अधिक उत्पादन झाले, तर कारखान्यांतही ते जास्त उपयुक्त ठरेल. भारतात विजेचे उत्पादन ६०% कोळशापासून, ३५% पाण्यापासून व ५% पेट्रोलियमपासून होते. भारतात जलशक्तीचे भांडार फार मोठे आहे. भारतातली संभाव्य जलशक्ती ४ कोटी १० लक्ष किलोवॅट आहे. तिच्यामधून केवळ ५% भाग सांप्रत विकसित होऊ शकला आहे. भारतात जलविद्युत् शक्तीच्या विकासाची दोन महत्त्वपूर्ण क्षेत्रे आहेत, ती अशी—(१) द्वीपकल्पीय भारताचा पश्चिम व दक्षिण भाग. यात महाराष्ट्र, तमिळनाडू, म्हैसूर व केरळ ही राज्ये अंतर्भूत आहेत. (२) वायव्य व उत्तर भारत. यात काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब व उत्तर प्रदेश ही राज्ये येतात. महाराष्ट्र हे जलविद्युत्-उत्पादनात सर्व राज्यांच्या अग्रभागी आहे.



(श्री. पाटणकर व श्री. देवघर यांच्या स्पेशल भूगोल या पुस्तकावरून)

उद्योगधंदे—भारत प्राचीन कालापासून विविध उद्योगधंद्यांसाठी प्रसिद्ध आहे. प्राचीन काळी भारतातून सुती व रेशमी कापड, धातू, लाकूडसामान व हस्तिदंताच्या वस्तू जगातल्या दूरदूरच्या देशांत निर्यात होत. या वस्तूंचे उत्पादन बहुतेक लहान प्रमाणात आणि कारागिरांच्या घरी होत असे. इंग्रजी राज्याची स्थापना झाल्यावर हे घरगुती उद्योगधंदे हळूहळू ऱ्हास पावू लागले. इंग्लंडमधून यंत्रनिर्मित वस्तू भारतात येऊ लागल्या त्या स्वस्त असल्यामुळे त्यांचा खप वाढला आणि इथले कारागीर बेकार झाले. भारतात नव्या पद्धतीचे मोठमोठे उद्योग मुख्यत्वे मुंबई व कलकत्ता या ठिकाणी सुरू झाले आणि उत्तरोत्तर त्यांची भरभराट होऊ लागली. असे असूनही भारत अजून औद्योगिक क्षेत्रात जगाच्या बराच पाठीमागे आहे. सांप्रतही औद्योगिक क्षेत्रात जे लोक काम करतात, त्यांची संख्या अल्प आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांमध्ये भारताच्या औद्योगिक व्यवसायावर बराच जोर दिला गेला आणि त्यामुळे आता औद्योगिक विकासाचा वेग शीघ्रगतीने वाढत चालला आहे. देशाच्या औद्योगिक विकासाची नवी नीती इ. स. १९५६ सालातल्या एका प्रस्तावाने निर्धारित केली गेली. त्या प्रस्तावामुळे लोखंड, पोलाद, कोळसा, काही महत्त्वाची खनिजे, पेट्रोलियम, विमानवाहतूक, जहाजवाहतूक, वीज, यंत्रसामान, परमाणुशक्ती, रेल्वे, इ. सतरा उद्योग सरकारी क्षेत्रात आले. आणखी बारा उद्योगांची सूची प्रस्तावात दिलेली आहे. त्यांतल्या उद्योगांचे हळूहळू राष्ट्रीयीकरण व्हायचे आहे. पण त्या कामी खाजगी क्षेत्रातल्या उद्योगांचे सहकार्यही अपेक्षित आहे. काही कालापूर्वी आयुर्विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झाले असून, काही महिन्यांपूर्वी भारतातल्या चौदा मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या बँकराष्ट्रीयीकरणाचा फायदा भारतातल्या छोट्या छोट्या उद्योगांना आता मिळू लागला आहे. बँकांमधले संचित भांडवल समाज-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तातल्या खालच्या थरापर्यंत आणि व्यक्तीपर्यंत शेती, कारखानदारी, इ. कारणांसाठी उपलब्ध व्हावे, त्यामुळे देशातली बेकारी कमी होऊन देश सर्वांगी समृद्ध व्हावा, हा या राष्ट्रीयीकरणामागचा उद्देश आहे.

सुती कापडाचा धंदा हा भारतातला एक महत्त्वपूर्ण उद्योग होय. महाराष्ट्र, गुजरात, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश ही क्षेत्रे सुती कापडाच्या निर्मितीच्या बाबतीत अग्रेसर आहेत. या सर्व सुती कापडांच्या गिरण्यांतून ९ लाखांहून अधिक मजूर काम करतात. भारतातल्या शे. ४० गिरण्या महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांत आहेत. तमिळनाडूमध्ये कोईमतूर, मदुरा, मद्रास व म्हैसूरमध्ये बेंगळूर ही शहरे सुती कापडाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर करतात. कानपूर, दिल्ली, इंदोर, उज्जैन, ग्वाल्हेर, भोपाळ ही शहरेही सुती कापडाच्या उद्योगात पुढारलेली आहेत. लोकरी कापडाच्या निर्मितीचे मुख्य केंद्र पंजाब हे आहे. रेशमी कापड मुख्यत्वे म्हैसूर, पश्चिम बंगाल व काश्मीर या प्रदेशांत बनते. तागाचा उद्योग मुख्यत्वे पश्चिम बंगालमध्ये चालतो.

छोटा नागपूर, पश्चिम बंगाल, ओडिसा व मध्य प्रदेश या प्रदेशांत लोखंड व पोलाद यांचे मोठमोठे कारखाने आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत रूरकेला, दुर्गापूर व भिलाई या ठिकाणी पोलाद–उत्पादनाचे मोठे कारखाने भारत सरकारने निर्माण केले आहेत. बिहारमधला बोकारो येथील पोलादकारखाना तर फार मोठा आहे. केरळ, प. बंगाल, बिहार, ओडिसा व उत्तर प्रदेश या प्रदेशांत ॲल्युमिनियमचे कारखाने आहेत. एंजिनीयरिंग यंत्रसामानांचे उत्पादन कलकत्ता, जमशेडपूर, रांची, झरिया व राणीगंज या ठिकाणी केंद्रित झाले आहे. देशाच्या अन्य भागांतही आता हळूहळू या व्यवसायाचा विकास होऊ लागला आहे.

वनसंपत्ती – भारतातील अरण्ये व त्यांत उगवून वाढणारे वृक्ष यांची स्थिती त्या भूमीचा आकार व तिथे पडणारा पाऊस यांवर अवलंबून असते. भारतातल्या वनांचे सामान्यतः सहा प्रकार कल्पिता येतात, ते असे–

(१) सदाबहार वन – ही वने ८० इंचांहून अधिक पाऊस पडणाऱ्या भूभागात निर्माण झाली आहेत. सह्याद्रीच्या पश्चिम उतारावर, पश्चिम बंगालमध्ये आणि हिमालयाच्या ३५०० फूट उंचीपर्यंतच्या उतारावर अशी वने आढळतात. ही वने घनदाट आहेत. पाऊस अधिक आणि उष्णताही अधिक; यामुळे अशा वनांतले वृक्ष १२० ते १५० फुटांपर्यंत वाढतात.

(२) पानगळीची जंगले – जिथे ४० ते ८० इंचांपर्यंत पाऊस पडतो, तिथे म्हणजे मुख्यतः पश्चिम घाटाचा पूर्व उतार, पूर्वघाट, छोटा नागपूर, मध्य प्रदेशाचा पूर्व भाग, ओडिसा व हिमालयाची तराई या भागांत ही वने आढळतात. वसंत ऋतूत यातील वृक्षांची पानगळ होते म्हणून यांना वरील नाव मिळाले आहे. सागवान, साखू, चंदन, शिसवी, महुवा, वड, पिंपळ, हिरडा, बेहडा, इ. वृक्ष यांत आढळतात. आर्थिक दृष्टचा महत्त्वपूर्ण अशी ही वने आहेत.

(३) शुष्क वन – जिथे २० ते ४० इंच पाऊस पडतो, अशा प्रदेशांत म्हणजेच राजस्थान, मध्य प्रदेशाचा पश्चिम भाग आणि उ. प्रदेश, महाराष्ट्र, म्हैसूर, आंध्र व तमिळनाडू या प्रदेशांचा काही भाग या ठिकाणी अशी जंगले आढळतात. यात काटेदार झाडे-झुडपे व कमी उंचीची झाडी आढळते. यात बाभूळ व तत्सम डिंक देणारे वृक्ष यांचे वैपुल्य असते.

(४) अर्धमरुत्स्थलीय वन – अशी वने २० इंचांहूनही कमी पाऊस पडतो, अशा भागात आढळतात. या वनात मोठे वृक्ष सहसा आढळत नाहीत. यांत बाभूळ, खजुरीची झाडे व झुडपे आढळतात. अशी वने राजस्थानचा पश्चिम भाग, पंजाब व दख्खनच्या पठाराचा कोरडा भाग यांमध्ये आढळतात.

(५) पर्वतीय वन – हिमालयाच्या प्रदेशात ही वने आढळतात. हिमालयाची उंची जसजशी वाढते आणि पावसाचे प्रमाणही जसजसे वाढते, तसतशा वेगवेगळ्या वृक्षांच्या राई अशा वनांतून आढळतात. हिमालयाच्या पूर्वभागात ३००० ते ६००० फूट उंचीच्या भागात ओक, चेस्टनट, इ. रुंद पानांच्या वृक्षांचे जंगल आढळते. त्याखाली कोणधारी व रुंद पानांचे मिश्रण आढळते. त्याखालच्या उंचीवर फर, चीड, भूर्ज, इ. वृक्ष आढळतात. सर्वांत खालच्या भागात साखू वृक्षांची राई व त्याही खाली ओक, कोणधारी देवदार, चीड, इ. वृक्षांचे वैपुल्य दिसते.

(६) तटस्थ वन – ही वने समुद्रकिनारी दलदलीच्या प्रदेशांत आढळतात. यांच्या वाढीला दलदल आणि खारे पाणी या दोहोंचीही आवश्यकता असते. अशा वनाचे सर्वांत विस्तृत क्षेत्र म्हणजे गंगेचा त्रिभुज प्रदेश होय. तो सुंदरवन म्हणून प्रसिद्ध आहे. कारण त्यात सुंदरी नावाचे वृक्ष सर्वांत अधिक वाढतात. गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या त्रिभुज प्रदेशांतही या प्रकारची जंगले आहेत.

भारतात अन्नधान्याच्या वृद्धीची मोहीम चालू असल्यामुळे सांप्रत मैदाने व समतल भूमी यांवरची जंगले तोडून साफ केली गेली आहेत. केवळ पर्वतीय प्रदेशातच सांप्रत जंगले शिल्लक आहेत. या जंगलांचे क्षेत्रफळ अंदाजे २ लक्ष चौरस मैल असून, हा वनप्रदेश देशाच्या भूमीचा शे. २२ इतका भरतो. भारतीय अरण्यांचा शे. ७९ टक्के एवढा भाग सर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कारी नियंत्रणाखाली आहे. त्यामध्ये काही वने सुरक्षित असून, त्यात गुरे चारणे व लाकूड-फाटा तोडणे या गोष्टींना मनाई आहे. सांप्रत जंगले वाढविण्याची मोहीमही सरकारने हाती घेतली आहे. प्रतिवर्षी होणारे वनमहोत्सव हे त्या उद्देशानेच केले जातात. त्यांतून लोकांना झाडे लावणे व ती वाढवणे यांची सक्रिय प्रेरणा दिली जाते.

ब्रिटिश राज्य – भारताशी व्यापार करण्यासाठी इंग्लंडमध्ये इ. स. १६०० साली ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. एलिझाबेथ राणीने त्या कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा पूर्ण मक्ता दिला होता. इ. स. १६०८ मध्ये कॅप्टन हॉकिन्स हा पहिला इंग्रज गृहस्थ मोगल बादशाहा जहांगीर याच्या दरबारी व्यापाराची परवानगी मागायला आला. पण तिथे पोर्तुगीजांचे वर्चस्व असल्यामुळे हॉकिन्सला तशी परवानगी लगेच मिळाली नाही. पुढे पोर्तुगीजांनी दांडगाई सुरू केली व मोगलांचे एक जहाज लुटले, तेव्हा बादशाहा फार संतापला. इ. स. १६१२ साली ब्रिटिश आरमाराने भारताच्या पश्चिम किनाऱ्याजवळ पोर्तुगीजांचा पराभव केल्यामुळे, पोर्तुगीजांना शह देण्यासाठी इंग्रजांचा उपयोग होईल, असे बादशाहाला वाटू लागले. इ. स. १६१५ मध्ये इंग्लंडचा राजा जेम्स याने सर टॉमस रो याला इंग्लंडचा वकील म्हणून नजराणा देऊन मोगलदरबारी पाठवले. तेव्हा ई. इं. कंपनीला भारताच्या किनाऱ्यावर व्यापार करण्याची परवानगी मिळाली.

त्यानंतर पुढील शंभर वर्षांत कंपनीने भारताच्या किनाऱ्यावर ठिकठिकाणी वसाहती स्थापल्या आणि व्यापारी वखारी उघडल्या. इ. स. १६१२ साली सुरत येथील वसाहत कायम झाली. इ. स. १६४० मध्ये फ्रान्सिस डे याने पूर्व किनाऱ्यावर सेंट जॉर्ज नावाचा किल्ला बांधला. तिथेच पुढे मद्रास शहराचा विस्तार झाला. इ. स. १६५० साली बंगालमध्ये हुगळी येथे वखार स्थापण्यात आली. इ. स. १६६१ मध्ये पोर्तुगालच्या राजाने इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस याला आपली मुलगी दिली, तेव्हा मुंबई बेट त्याला आंदण दिले. राजाने ते बेट इ. स. १६६७ त दरसाल १० पौंड भाड्याने कंपनीला देऊन टाकले. इ. स. १६८७ साली इंग्रजांनी सुरतेचे ठाणे मुंबईला नेले. या काळात कंपनीने व्यापाराखेरीज दुसरा उद्योग केला नाही. परंतु फौज बाळगणे, नाणी पाडणे, न्यायनिवाडा करणे, असले राजकीय स्वरूपाचे काही हक्क तिने इंग्लंडच्या राजाकडून मिळविले आणि भारतात त्यांचा उपयोग स्वतःपुरता राजरोस सुरू केला.

इ. स. १६८९ साली इंग्लंडमध्ये रक्तशून्य क्रांती झाली आणि राजाची सत्ता कमी होऊन लोकसभेचे वर्चस्व प्रस्थापित झाले. पुढे कंपनीचा पूर्वेकडील मक्ता काढून घेऊन तो व्यापार सर्वांना खुला करण्यात आला. तेव्हा भारताशी व्यापार करण्यासाठी दुसरी एक कंपनी निघाली. पण आपसातील चढाओढीमुळे दोन्ही कंपन्यांचा तोटा होऊ लागला. म्हणून त्या इ. स. १७०७ साली एक झाल्या व त्या कंपनीला दि युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी हे नाव मिळाले.

इ. स. १६६० साली फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. तिला प्रारंभापासूनच राजाश्रय असल्यामुळे तिची लवकर भरभराट झाली. तिने सुरत, मच्छलीपट्टण वगैरे ठिकाणी वसाहती स्थापन केल्या. इ. स. १६७४ साली मद्रासच्या दक्षिणेला पाँडेचरी येथे स्थापन झालेले फ्रेंच ठाणे सर्वांत महत्त्वाचे होते. इ. स. १६९३ मध्ये बंगालमध्ये हुगळी नदीवर चंद्रनगर येथे फ्रेंच वखार सुरू झाली.

दक्षिणेतील उलाढाली – इ. स. च्या १७ व्या शतकाच्या अखेरीस मोगल बादशाही दुर्बळ झाल्यानंतर इंग्रज व फ्रेंच व्यापाऱ्यांनी समुद्रकिनाऱ्यावर आपली सत्ता वाढवायला प्रारंभ केला. त्यांची ठाणी जवळ जवळ होती व व्यापारात मोठी चुरस होती. आपला पाय भारतात पक्का रोवला जावा म्हणून दोघेही राजकारणात पडू लागले. पाँडेचरीचा गव्हर्नर डुप्ले हा फार हुशार व धोरणी होता. त्याने कर्नाटकाच्या नवाबाशी आगाऊच वळणे बांधून ठेवली होती. युरोपात इंग्रज-फ्रेंचांचे युद्ध सुरू झाले, तेव्हा फ्रेंच सरकारने लाबरडोने नामक सरदाराला इ. स. १७४६ साली मोठ्या तयारीनिशी हिंदुस्थानात पाठविले. त्याने झपाट्याने मद्रास काबीज केले व लौकरच इतर ठाणीही घेतली. पण इ. स. १७४८ मध्ये दोन्ही राष्ट्रांचा तह झाला व इथले युद्धही थांबले. मग डुप्लेने त्याहून मोठे राजकारण हाती घेतले. हैदराबादचा निजाम व अर्काटचा नबाब यांच्या वारसांत गादीसाठी भांडणे सुरू झाली होती. त्या भांडणात फ्रेंच सैन्याच्या मदतीने चंदासाहेब हा अर्काटचा नबाब व मुजफ्फरजंग हा निजाम झाला. इ. स. १७५१ त मुजफ्फरजंग मारला गेला. पण सलाबतजंग हा फ्रेंचांच्या मदतीने गादीवर बसला. त्याने फ्रेंच कंपनीला पाँडेचरीजवळची काही गावे इनाम दिली व स्वतःच्या संरक्षणासाठी ठेवलेल्या फ्रेंच सैन्याच्या खर्चासाठी उत्तर सरकार प्रांत सोडून दिला.

मग चंदासाहेबाचा प्रतिस्पर्धी महंमदअल्ली याची बाजू घेऊन इंग्रजांनी फ्रेंचांशी युद्ध सुरू केले. त्यात रॉबर्ट क्लाइव्ह याने फ्रेंच सैन्याचा पराभव करून महंमदअल्लीला अर्काटचा नबाब केले.

इ. स. १७५६ साली युरोपात इंग्लंड व फ्रान्स यांचे पुन्हा युद्ध सुरू झाले. फ्रेंच सरकारने काउंट लाली याला मोठ्या आरमारासह भारतात पाठवले. त्याने फोर्ट सेंट डेव्हिड हा किल्ला घेतला व मद्रासवर हल्ला केला. पण ते शहर त्याला घेता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आले नाही. इ. स. १७६० मध्ये वांदिवॉशच्या लढाईत इंग्रजांचा सेनापती कूट याने लालीचा पूर्ण पराभव केला. त्याचा

रॉबर्ट क्लाइव्ह

पाठलाग करीत कूटने पाँडेचरीवर हल्ला करून ते ठिकाणही घेतले. पण इ. स. १७६३ च्या तहान्वये ते फ्रेंचांना परत मिळाले.

बंगाल—तिकडे बंगालमध्ये इंग्रज आपल्या राज्याचा पाया घालीत होते. बंगालचा नबाब अलिवर्दिखान हा इ. स. १७५६ त मरण पावल्यावर त्याचा नातू सिराजउद्दौला गादीवर बसला. त्याच्या प्रतिस्पर्ध्यांची कारस्थाने चालू होती. त्यांत इंग्रजांनी भाग घेतला व त्यांच्या साथीदारांना आश्रय दिला. त्यांनी आपल्या वखारीभोवती मजबूत तटबंदीही बांधली. त्यामुळे चिडून सिराजउद्दौल्याने इंग्रजांच्या ठाण्यावर चाल केली. तेव्हा तिथले अधिकारी पळून गेले. जे लोक उरले होते, त्यांना सिराजच्या अधिकाऱ्यांनी एका लहानशा खोलीत रात्री कोंडून ठेवले. सकाळपर्यंत त्यातले बरेच लोक मेले. ही घटना 'कलकत्त्याची अंधारकोठडी' या नावाने प्रसिद्ध आहे.

या पराभवाचा वचपा काढण्यासाठी ब्रिटिश सरकारने क्लाइव्हला पाठवले. प्रथम त्याने पश्चिम किनाऱ्यावर तुळाजी आंग्रे याचे आरमार बुडविण्याच्या कामी नानासाहेब पेशव्यांना मदत केली. मग त्याने कलकत्त्याचे ठाणे परत जिंकून घेतले; सिराजचा सेनापती मीर जाफर याला फितवले आणि इ. स. १७५७ साली प्लासी येथे सिराजचा पराभव केला. त्यानंतर इंग्रजांच्या कृपेने मीर जाफर हा बंगालचा नवाब झाला. पण कंपनीच्या लोभी अधिकाऱ्यांच्या वाढत्या मागण्या तो पुऱ्या करू शकला नाही, म्हणून त्यांनी इ. स. १७६० मध्ये त्याच्या जागी मीर कासीमला नवाब केले. त्याने धूर्तपणे वागून इंग्रजांच्या पकडीतून बंगालचे राज्य सोडवण्याचा खूप प्रयत्न केला. दिल्लीचा बादशाहा शहा अलम याचीही मदत त्याने मागवली. पण शेवटी इ. स. १७६४ साली बक्सारच्या लढाईत इंग्रजांनी त्याचा पूर्ण पराभव केला. त्यामुळे इंग्रज हे बंगालचे राज्यकर्ते बनले. क्लाइव्हने इ. स. १७६५ मध्ये शहा अलमकडून कंपनीच्या नावे बिहार-ओडिसा-बंगालच्या दिवाणीचा अधिकार मिळवला. कंपनीचे अधिकारी दुय्यम नवाबाच्या हस्ते प्रांताचा वसूल गोळा करीत व त्यातील काही भाग नबावाला देत. प्रांताचे संरक्षण कंपनीने करायचे; इतर कारभार मात्र नबावाने करायचा, अशी दुहेरी राज्यव्यवस्था सुरू झाली. त्या व्यवस्थेमुळे कंपनीचा खूप फायदा झाला, पण बंगाली जनतेची दुर्दशा झाली. कंपनीचे नोकर वसूल गोळा करताना जुलूम



वॉरन हेस्टिंग्ज

करीत आणि नबाबाला पुरेशी रक्कम देत नसत. व्यापारात मक्तेदारी सुरू झाली; देशी उद्योग बंद झाले. त्यातच इ. स

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१७६९ साली मोठा दुष्काळ पडला. कंपनीच्या व्यापारावरही त्याचा परिणाम होऊन, तिचे दिवाळे निघेल, असे वाटू लागले.

इ. स. १७७२ साली वॉरन हेस्टिंग्ज याची बंगालचा गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. त्याने दुहेरी राज्यव्यवस्था हळूहळू बंद करून, आपली एकतंत्री व्यवस्था सुरू केली. इ. स. १७७३ साली ब्रिटिश सरकारने रेग्युलेटिंग अॅक्ट पास करून, मुंबई, मद्रास व बंगाल येथील कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी गव्हर्नर जनरलची जागा निर्माण केली. वॉरन हेस्टिंग्ज हाच पहिला ग. जनरल झाला. त्याला मदत करण्यासाठी चार जणांचे कार्यकारी मंडळ नेमण्यात आले. त्या मंडळाला कायदे करण्याचा अधिकार होता. एका वरिष्ठ कोर्टाचीही स्थापना झाली.

हेस्टिंग्जच्या कामात अडचणी पुष्कळ आल्या. मुंबईच्या गव्हर्नरने राघोबाचा पक्ष घेऊन मराठ्यांशी युद्ध ओढवून घेतले आणि मद्रासच्या गव्हर्नरने हैदरशी युद्ध सुरू केले. त्यासाठी पैसा उभा करणे भाग होते. हेस्टिंग्जने काशीचा राजा व अयोध्येच्या बेगमा यांच्याकडून कित्येक लक्ष रुपये उकळले. त्याचा इंग्लंडमध्ये फार गवगवा झाला आणि कंपनीच्या राजकीय कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी बोर्ड ऑफ कंट्रोल नेमण्यात आले. इ. स. १७८५ मध्ये हेस्टिंग्ज परत गेला. भारतात इंग्रजी सत्तेचा पाया घालण्याचे श्रेय हेस्टिंग्जलाच दिले जाते. नंतर त्याच्या जागी लॉर्ड कॉर्नवॉलीस आला. त्याने प्रांताचे विभाग (जिल्हे) पाडून त्यावर कलेक्टर नेमले. न्यायखाते मात्र त्याने वेगळे ठेवले. त्यानेच कायमधाऱ्यांची जमीनदारी पद्धत सुरू केले. ती अशास्त्रीय व सदोष होती. त्यामुळे तिचा फायदा कुळांना न मिळता जमीनदारांनाच मिळाला. तिचे दूरगामी परिणाम जमीन कसणाऱ्या कुळांना भोगावे लागले. (बंगाल पाहा).

कॉर्नवॉलीसच्या कारकीर्दीत इंग्रजांचे म्हैसूरच्या टिपूशी युद्ध उद्भवले. इंग्रज, मराठे व निजाम यांची एकजूट झाल्यामुळे त्या युद्धात टिपूचा पराभव झाला (इ. स. १७९०–९२). पुढे लवकरच इंग्रजांनी केरळ प्रदेश जिंकला.

महाराष्ट्रात नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर जी अंदाधुंदी माजली होती, तिचा फायदा घेण्यासाठी इंग्रज टपलेलेच होते. राघोबादादाला बारभाईंनी बाजूला सारले, तेव्हा त्याने इंग्रजांची मदत घेऊन सत्ता परत मिळवण्याचा प्रयत्न केला. पण नाना फडणिसाने सर्व मराठे सरदारांची एकजूट करून इंग्रजांचा पराभव केला. नाना फडणीस होता तोपर्यंत इंग्रजांना मराठी राज्यात उलाढाल करता आली नाही. (पेशवाई पाहा).

साम्राज्य – कॉर्नवॉलीस इ. स. १७९३ साली परत गेला व त्याच्या जागी सर जॉन शोअर आला. त्याच्या जागी इ. स. १७९८ मध्ये लॉर्ड वेलस्ली आला. त्याने भारतातील ब्रिटिश साम्राज्याची उभारणी केली. त्यासाठी त्याने तैनाती फौजेची पद्धत सुरू केली. त्या काळी भारतात सर्वत्र यादवी चालू होती. प्रत्येक राजा व सरदार स्वतंत्रपणे सत्ता गाजवू पाहत होता, त्यासाठी त्याला इंग्रजांची मदत हवी होती. ती देऊन वेलस्लीने बहुतेकांवर आपले वर्चस्व स्थापले. त्याच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या – (१) संस्थानिकांनी स्वसंरक्षणार्थ ब्रिटिश फौज पदरी ठेवावी. (२) त्या फौजेच्या खर्चासाठी काही प्रदेश इंग्रजांना



लॉर्ड वेलस्ली

तोडून द्यावा. (३) ब्रिटिश रेसिडेंट त्यांच्या दरबारी राहावा. (४) इंग्रजांच्या मध्यस्थीशिवाय कोणाशी युद्ध किंवा तह करू नये. (५) इतर परकीय लोकांना आश्रय देऊ नये.

वेलस्लीने प्रथम निजामावर तैनाती फौज लादून, त्याला आपल्या वर्चस्वाखाली आणले. त्यानंतर लगेच त्याने टिपूशी युद्ध करून त्याचा पराभव केला (इ. स. १७९९). त्या युद्धात टिपू मारला गेला आणि म्हैसूरचे राज्य इंग्रजांना मिळाले. पण वेलस्लीने म्हैसूरच्या जुन्या राजवंशातील कृष्णराज याला वरील अटींवर राज्य देऊन त्याचा काही प्रदेश खालसा केला. त्याच सुमारास तमिळनाडू व आंध्र हे प्रदेशही इंग्रजांच्या ताब्यात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गेले. काही वर्षांनी त्यांनी ओडिसा प्रांतही जिंकून घेतला.

लवकरच वेलस्लीला मराठी राज्यात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली. कारण दुसरा बाजीराव पेशवा वसईला इंग्रजांकडे मदत मागायला गेला. इंग्रजांनी त्याला तैनाती तहाने बांधून घेतले व इ. स. १८०३ साली पुण्याला नेऊन पेशवाईच्या गादीवर पुन्हा बसवले. शिंदे, होळकर, गोखले यांनी पुष्कळ वर्षे इंग्रजांशी झुंज केली. पण इंग्रजांनी सर्वांचा पराभव केला व इ. स. १८१७ मध्ये पेशवाई नष्ट केली. इ. स. १८१६ साली इंग्रजांनी नेपाळचा पराभव केला व आपला रेसिडेंट नेपाळमध्ये ठेवला. त्यानंतर लवकरच अनेक लहान-मोठ्या संस्थानिकांनीही ब्रिटिशांची सार्वभौम सत्ता मान्य केली व त्यांच्याशी मांडलिकी करार करून घेतले.

इ. स. १८१८ ते १८५८ या कालखंडात इंग्रजांचे सरहद्दीवर आक्रमण चालू होते, तसेच अंतर्गत संस्थाने खालसा करण्याचे कामही चालू होते. इ. स. १८२८ ते ३५ या अवधीत लॉर्ड बेंटिंक-याने बंगालच्या पूर्वेकडील काचर व सिल्हट आणि म्हैसूरजवळचे कूर्ग ही राज्ये खालसा केली. १८४२–४४ या काळात लॉर्ड एलेनबरोने ग्वाल्हेरशी युद्ध करून शिंद्यांना मांडलिक बनवले. इ. स. १८४३ साली इंग्रजांनी सिंधवर आक्रमण करून तो प्रदेश ताब्यात घेतला. पुढे इ. स. १८४५ मध्ये पंजाबमधील शिखांशी त्यांचे पहिले युद्ध झाले. इ. स. १८३९ त रणजितसिंग मरण पावल्यानंतर राज्यकारभारात ढिलाई उत्पन्न झाली. ब्रिटिश सैन्य पंजाबवर स्वारी करण्याची तयारी करीत होते. पण शीख सैन्यानेच त्याच्यावर प्रथम चढाई केली. त्या युद्धात शिखांचा पराभव झाला आणि बियास व सतलज या नद्यांमधील प्रदेश इंग्रजांना मिळाला. मग त्यांनी आपला रेसिडेंट लाहोर येथे ठेवला. इ. स. १८४८ त शिखांनी पुन्हा एकदा उचल केली. पण इंग्रजांनी त्यांचा पराभव केला व पंजाब प्रांत खालसा केला. या घडामोडी चालू असताना इ. स. १८४६ मध्ये काश्मीरचे राज्यही इंग्रजांचे मांडलिक संस्थान बनले. इ. स. १८४८ ते १८५६ या काळात लॉर्ड डलहौसीने वऱ्हाड व अवध ही राज्ये खालसा केली. एखादा राजा निपुत्रिक मरण पावला की त्याचा दत्तक वारस नामंजूर करून, त्याचे राज्य खालसा करण्याचे धोरण त्याने सुरू केले आणि छत्रपतींचे सातारचे राज्य, झाशी, जैतपूर, संबळपूर, तंजाऊर व नागपूर ही राज्ये त्या कारणामुळे ताब्यात घेतली.

राज्यकारभार – एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात एकीकडे भारताचा अधिकाधिक प्रदेश आपल्या सत्तेखाली घेत असताना, इंग्रज जिंकलेल्या प्रदेशात राज्यकारभाराची घडी नीट बसवीत होते. इ. स. १७७४ च्या रेग्युलेटिंग ॲक्टमुळे सर्व कार्यकारी सत्ता गव्हर्नर जनरलच्या हाती आली होती. इ. स. १८३३ साली भारतात कायदे करण्याचा अधिकार ग. जनरलच्या कार्यकारी मंडळाकडे सोपवण्यात आला व

लॉर्ड डलहौसी
(श्री. वि. द. घाटे यांच्या भारताची कहाणी या पुस्तकावरून)

त्यासाठी लॉर्ड मेकॉले या प्रसिद्ध कायदेपंडिताची नेमणूक करण्यात आली. त्याने देशात चालू असलेल्या दिवाणी व फौजदारी कायद्यांचा अभ्यास करून त्यांत सुसूत्रता आणली. इ. स. १८५३ साली इंग्लंडमध्ये सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा सुरू झाली आणि भारताचा कारभार करण्यासाठी लायक अधिकारी निवडून पाठविण्यास सुरवात झाली. त्याचप्रमाणे सर्व खात्यांच्या कारभाराचे नियम तयार करण्यात आले. त्यामुळे एक कार्यक्षम शासनयंत्रणा निर्माण झाली. ज्यांनी आपल्या कर्तबगारीने राज्यकारभाराला उच्च दर्जा आणला, त्यांत मुंबईचा एल्फिन्स्टन, मद्रासचा मन्रो, मध्य भारतातला मालकम, राजपुतान्यातील मेटकाफ, आग्रा–अयोध्या प्रांतातील रॉबर्ट बर्ड व पंजाबातील लॉरेन्स बंधू हे अधिकारी विशेष प्रसिद्ध आहेत. एल्फिन्स्टन याने मुंबई प्रांतात व मन्रो याने मद्रास प्रांतात जमीन महसुलाच्या रयतवारी पद्धतीचा पाया घातला. ही पद्धती भारतीय परंपरेला धरूनच बसवलेली होती.

सामाजिक सुधारणेचा आरंभ – केवळ वसूल व न्याय याच क्षेत्रांत सुधारणा करून न थांबता, इंग्रज राज्यकर्त्यांनी सा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देशातील अनेक अनिष्ट चालीरीती बंद करण्याचे धोरण स्वीकारले. लॉर्ड विल्यम बेंटिंक याने इ. स. १८२९ साली सतीची चाल कायद्याने बंद केली. पुढे इ. स. १८५६ मध्ये विधवा-विवाहास कायद्याने मान्यता देण्यात आली. याच काळात बंगाल-मध्ये राजा राममोहन रॉय हे प्रसिद्ध समाजसुधारक होऊन गेले. त्यांनी सतीप्रथेला विरोध करून विधवाविवाह, स्त्री-

लॉर्ड बेंटिंक
(श्री. वि. द. घाटे यांच्या भारताची कहाणी या पुस्तकावरून)

शिक्षण व स्त्रियांचा वारसा हक्क यांसाठी हिंदू कोड बदलण्याची आवश्यकता प्रतिपादली. धर्माच्या क्षेत्रात त्यांचे विचार अत्यंत पुरोगामी होते.

सरकारचे शिक्षणविषयक धोरण याच काळात निश्चित झाले. हिंदी लोकांना इंग्रजी विद्येचे शिक्षण देऊन त्यांच्यांत नवी दृष्टी निर्माण करणे आवश्यक आहे, असे लॉर्ड मेकॉलेने प्रतिपादले. राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या लोकांनी त्याला पाठिंबा दिला. भारतात ब्रिटिश सरकारच्या कारभारासाठी इंग्रजी शिक्षण घेतलेल्या नोकरांची आवश्यकता होती. इंग्रजी भाषेच्या शिक्षणाबरोबरच भौतिक शास्त्रांचेही शिक्षण हिंदी लोकांना द्यावे, अशी मेकॉलेची कल्पना होती. थोड्याच काळात लोकांना इंग्रजी विद्येचे विलक्षण आकर्षण वाटू लागले. इतिहास, भूगोल, शास्त्रे यांचे ज्ञान मिळाल्यामुळे इंग्रजी शिकलेल्या लोकांपैकी काहीजण आपल्या पूर्वजांना मूर्ख मानू लागले. अल्प शिक्षण घेतलेल्या लोकांनाही सरकारी नोकऱ्या मिळाल्या. त्यांना सरकारदरबारी व समाजात बराच मान मिळू लागला. धार्मिक शिक्षण देण्याकडे इंग्रजांनी लक्ष न दिल्यामुळे त्या नवशिक्षितांचा स्वधर्मावरील विश्वास कमी होऊ लागला. त्या काळात ख्रिस्ती धर्माचा प्रसार वेगाने सुरू झाला. अनेक मिशनऱ्यांनी शाळा, कॉलेजे व धर्मार्थ रुग्णालये स्थापन केली आणि छापखाने काढून आपल्या धर्माचे वाङ्मय प्रसृत केले. ख्रिस्ती धर्माच्या परिचया-मुळे, आपल्या धर्मात सुधारणा केली पाहिजे, असे काही विद्वान लोकांना वाटू लागले. त्यातूनच ब्राह्म समाजाची स्थापना झाली.

लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दीत (इ. स. १८४८–५६) भारताची औद्योगिक पाहणी करण्यास प्रारंभ झाला. दगडी कोळसा व लोखंड कुठे सापडेल, कापूस व चहा कुठे पिकू शकेल, जंगलात कोणते पदार्थ मिळू शकतील, याची त्याने बारकाईने तपासणी केली. देशाच्या निरनिराळ्या भागांतील दळणवळण वाढावे, म्हणून रस्ते तयार करण्यासाठी त्याने सार्वजनिक बांध-कामखाते स्थापले. नद्यांना कालवे बांधण्याची योजना आखून तेही काम त्याने सुरू केले. डलहौसीने केलेली सर्वांत महत्त्वाची सुधारणा म्हणजे रेल्वे, टपाल व तारायंत्र सुरू करणे ही होय. ही सुधारणा करण्यात सैन्याची सोय हे त्याचे मुख्य उद्दिष्ट असले, तरी जनतेला तिचा फार उपयोग झाला. इ. स. १८५१ साली कापडाची पहिली गिरणी सुरू झाली. पण त्याच वेळी परदेशी वस्तूंची आयात सुरू झाल्यामुळे, देशी उद्योगधंदे बंद पडू लागले. त्यामुळे बेकारी वाढली. पैशाच्या विनिमयाने व्यवहार सुरू झाल्यामुळे आर्थिक मंदीही आली.

लढाया थांबल्यामुळे हजारो शिपाई निरुद्योगी होऊन बसले होते. सरदार, जमीनदार, शास्त्री, मौलवी यांना प्रतिष्ठा उरली नव्हती. इंग्रजी शिक्षण व ख्रिस्ती धर्म यांच्या प्रसारामुळे बरेच लोक बिथरले होते. त्यातच वरीलप्रमाणे निराशाजनक आर्थिक परिस्थिती उद्भवल्यामुळे सगळीकडे असंतोष पसरू लागला. त्याचे पर्यवसान १८५७ च्या उठावात झाले.

शिपायांचा उठाव इंग्रजांनी मोडून काढल्यानंतर ब्रिटिश प्रधानमंडळाने ईस्ट इंडिया कंपनीचा शेवट केला व भारताचा राज्यकारभार आपल्या हाती घेतला. बोर्ड ऑफ कंट्रोलच्या जागी ब्रिटिश मंत्रिमंडळात भारतमंत्री नेमण्यात आला. इ. स. १८५८ पासून भारताच्या गव्हर्नर जनरलला व्हाइसरॉय असा किताब मिळाला. लॉर्ड कॅनिंग हा भारताचा पहिला व्हाइसरॉय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होय. दि. १ नोव्हेंबर १८५८ रोजी अलाहाबाद येथे दरबार भरवून व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा वाचून दाखविण्यात आला. त्यात वतने व संस्थानिकांचे परंपरागत हक्क यांचे रक्षण होईल, प्रजेशी वागताना भेदभाव होणार नाही व धार्मिक तटस्थता पाळली जाईल अशी आश्वासने होती. मात्र त्यात प्रजेला कोणतेही राजकीय हक्क दिलेले नव्हते.

इ. स. १८५७ ची धामधूम चालू असतानाच मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन ठिकाणी विद्यापीठांची स्थापना झाली. त्यामुळे दुय्यम शिक्षणाला व्यवस्थित रूप प्राप्त झाले आणि उच्च शिक्षणाची चांगली सोय झाली.

लॉर्ड कॅनिंग याने घडवून आणलेली महत्त्वाची सुधारणा म्हणजे मुंबई व मद्रास येथे प्रांतिक कायदेमंडळांची स्थापना ही होय. सबंध भारतासाठी तोपर्यंत एकच कायदेमंडळ होते. इ. स. १८६१ मध्ये प्रांतिक कायदेमंडळे सुरू झाली व कलकत्ता येथील वरिष्ठ कायदेमंडळात आणखी बारा सभासद घेण्याचे ठरले. त्यांतील सहा सरकारी व सहा बिनसरकारी असावेत, असा संकेत ठरला.

कॅनिंगने बंगाल व आसाम या प्रांतांतील शेतकऱ्यांचे जमीनदारांपासून रक्षण करण्यासाठी कूळसंरक्षण कायदा केला.

लॉर्ड मेयोने (इ. स. १८६९–७२) प्रांतिक सरकारांना आर्थिक स्वायत्तता देण्याच्या मार्गावर पहिले पाऊल टाकले. तत्पूर्वी सर्व वसूल कलकत्त्याच्या खजिन्यात जमा होई व वरिष्ठ सरकारकडून प्रांतिक सरकारांना खर्चापुरता वाटला जाई. मेयोने अशी सुधारणा केली, की प्रांतिक सरकारला दरवर्षी ठराविक रक्कम द्यायची व प्रांतिक सरकारने काही खात्यांचा खर्च स्वतंत्रपणे करायचा. ही सुधारणा विकेंद्रीकरणाची पहिली पायरी म्हणून महत्त्वाची मानली जाते. मेयोने प्राप्तीकरात वाढ केली व मिठावर कर बसवला. महत्त्वाच्या शहरांत नगरपालिका स्थापून त्यांत अल्प प्रमाणात प्रतिष्ठित नागरिकांना संधी देण्यासही त्यानेच प्रारंभ केला.



इंग्रजांचे राज्य (इ. स. १८५४)
(श्री. वि. द. घाटे यांच्या भारताची कहाणी या पुस्तकावरून)

इ. स. १८६० पर्यंत भारतात आयात होणाऱ्या सर्व मालावर १० टक्के जकात होती, ती १८६४ साली ७.५ टक्के करण्यात आली. १८७१ मध्ये कापडावरील जकात ५ टक्के पर्यंत कमी करण्यात आली. तीही काढून टाकण्याची मागणी इंग्लंडमधील कापडकारखानदारांनी केली. शेवटी ती मान्य झाली. त्या वेळचा व्हाईसरॉय नॉर्थब्रुक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याला तसे करणे योग्य वाटत नव्हते, कारण त्यामुळे भारतातील कापडगिरण्यांचा तोटा झाला असता. पण त्याचे म्हणणे व्यर्थ गेले व त्याने राजीनामा दिला.

त्यानंतर आलेल्या लॉर्ड लिटनला भारतात वारंवार पडणाऱ्या दुष्काळाकडे तातडीने लक्ष द्यावे लागले. इ. स. १८७६–७७ साली दक्षिणेत फार मोठा दुष्काळ पडून त्यात एका वर्षात ५० लक्ष माणसे मरण पावली. दुष्काळनिवारणासाठी लिटनने एक कायम स्वरूपाची योजना आखली. सारासूट, दुष्काळी कामे, मोफत दवाखाने, इ. उपायांचा अवलंब सुरू झाला. दरसालच्या अंदाजपत्रकात दुष्काळासाठी दीड कोट रुपये ठेवण्याचे ठरले.

लॉर्ड लिटन हा साम्राज्यवादी होता. त्या वेळी इंग्लंडचा मुख्य प्रधान डिझरायली हासुद्धा साम्राज्यवादी होता. त्याने अफगाणिस्थानच्या अमिराशी चढाईचे धोरण ठेवले व इंग्लंडच्या राणीला 'भारताची महाराज्ञी' हा किताब दिला. लिटनने वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालणारा कायदाही केला. सरकारविषयी अप्रीती उत्पन्न करणारे किंवा जातीजातींत वैमनस्य वाढवणारे लेख प्रसिद्ध करणार नाही, असे वृत्तपत्रकारांनी लिहून द्यावे अशी अट त्यात होती. त्या निर्बंधाबद्दल पुष्कळ गवगवा झाल्यामुळे उदारमतवादी ग. जनरल लॉर्ड रिपन याने इ. स. १८८२ साली मुद्रणस्वातंत्र्यप्रतिबंधक कायदा रद्द केला.

लॉर्ड रिपन याने भारतात आल्याबरोबर अफगाणयुद्ध थांबवले आणि म्हैसूर संस्थानच्या वारसदाराला त्याचे संस्थान परत दिले. या संस्थानाचा कारभार इ. स. १८३१ मध्ये बेंटिकने आपल्या हाती घेतला होता. इ. स. १८८२ मध्ये त्याने हंटर-कमिशन नेमून भारतातील शिक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेतला व शिक्षणावरील सरकारी नियंत्रण कमी करून खाजगी संस्थांना उत्तेजन दिले. तत्कालीन ब्रिटिश मुत्सद्दी खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते असून, लॉर्ड रिपनही त्याच मताचा असल्यामुळे त्याने भारतात आयात होणाऱ्या मालावरील बऱ्याच जकाती रद्द केल्या.

त्या काळी हिंदी न्यायाधिशाला युरोपियन गुन्हेगारांची चौकशी करण्याचा अधिकार नव्हता. इ. स. १८८३ साली पास झालेल्या इलबर्ट बिलामुळे तो अधिकार हिंदी न्यायाधिशांना मिळाला. स्थानिक स्वराज्याची स्थापना हे रिपनचे सर्वांत महत्त्वाचे कार्य होय. आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, प्राथमिक शिक्षण, ही कामे करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड, तालुक्यासाठी तालुका लोकल बोर्ड व प्रत्येक शहरासाठी म्युनिसिपालिटी अशा संस्था स्थापण्यात आल्या. त्यांतील बरेच सभासद लोकांनी निवडलेले असावे, असे ठरले.

इ. स. १८८४ साली लॉर्ड रिपन परत गेला. इ. स. १८८५ साली इंग्लंडचा उदारमतवादी पंतप्रधान ग्लॅडस्टन याचा पराभव होऊन हुजूर पक्षाचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. त्याने साम्राज्यवादी धोरणाचा अवलंब केला. इ. स. १८६९ पासून सुएझमार्गे हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्ये दळणवळण सुरू झाले होते. पुढे इ. स. १८७२ मध्ये हे दोन देश तारायंत्राने जोडले गेले. त्यामुळे इंग्लंडच्या राजधानीतून हिंदुस्थानातील राज्यकारभारावर नियंत्रण ठेवणे सोपे झाले आणि साम्राज्यशाहीला मोठी मदत झाली.

इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे या देशातील लोक जागृत झाले होते. सरकारचे एखादे कृत्य लोकांना नापसंत असल्यास व त्यांनी संघटितपणे व सनदशीर मार्गाने आपले मत व्यक्त केल्यास सरकार लोकमताला थोडातरी मान देते, असे दिसून आले होते. त्याचा फायदा घेण्याच्या हेतूने हिंदी पुढाऱ्यांनी इ. स. १८८५ साली राष्ट्रीय सभेची स्थापना केली. जनतेतील ही जागृती लक्षात घेऊन सरकारने इ. स. १८९२ साली वरिष्ठ व प्रांतिक कायदेमंडळांची वाढ करणारा एक कायदा पास केला. त्याअन्वये प्रांतिक कायदेमंडळात वीसपर्यंत जादा सभासद व वरिष्ठ कायदेमंडळात सोळापर्यंत जादा सभासद लोकांचे प्रतिनिधी म्हणून घेण्याचे ठरले. त्यांना प्रश्न विचारायची व अंदाजपत्रकावर चर्चा करण्याची परवानगीही मिळाली.

बंगालमधील ब्राह्म समाजाच्या तत्त्वांवरच मुंबईत १८६७ साली प्रार्थनासमाजाची स्थापना झाली. न्या. रानडे व डॉ. भांडारकर हे त्याचे प्रमुख आधारस्तंभ होते. दयानंद सरस्वती यांनी १८७५ मध्ये मुंबईत आर्यसमाज स्थापला. त्यानंतर थिऑसॉफिकल सोसायटी व रामकृष्ण मिशन या संस्था सुरू झाल्या. प्रत्येक पंथाने आपापल्यापरी हिंदू धर्मातील भोळसर समजुतींवर हल्ला चढवून धर्म सुधारण्याचा प्रयत्न केला. निरनिराळ्या कारणांमुळे त्या पंथांची वाढ व्हावी तशी झाली नाही. तथापि त्यांच्या प्रचारामुळे हिंदू धर्मात थोडी सुधारणा मात्र घडून आली.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सुरू झालेल्या समाजसुधारणेला उत्तरार्धात पुष्कळ चालना मिळाली. लोकहितवादी, आगरकर, ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी कर्वे, न्या. रानडे, म. फुले, इ. पुरुषांनी स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, बालविवाह, जातिभेद, अस्पृश्यतानिवारण, वगैरे बाबतींत आपले पुरोगामी विचार लोकांत प्रसृत केले व त्या दृष्टीने कार्यही बरेच केले.

इ. स. १८५७ मधील उद्रेक शांत झाल्यानंतर ब्रिटिश सरकारने ई. इं. कंपनीकडून भारताचा कारभार काढून आपल्या हाती घेतला व असंतोष कमी करण्याच्या दृष्टीने संस्था-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निकांना व प्रजेला बरीच आश्वासने दिली. उदारमतवादी राज्यकर्त्यांनी काही चांगले कायदे केले; पण भारतातील इंग्रज अधिकारी व हिंदी लोक यांच्यांत जी एक दरी उत्पन्न झाली होती, ती द्वेषाने भरलेली होती. ब्रिटिश नोकरशाहीचा कारभार कार्यक्षम होता; पण अधिकाऱ्यांना हिंदी लोकांबद्दल सहानुभूती वाटत नव्हती. राणीने दिलेली आश्वासने कधीच पाळली गेली नाहीत. संस्थानिक व सरदार यांचे हक्क कमी करण्यात आले, जातिभेद व पक्षपात वाढला, अधिकारी कडकपणे वागू लागले आणि हिंदी लोकांची उन्नती करण्याचे घोरण लुप्त झाले.

ब्रिटिश सरकारच्या आर्थिक घोरणामुळेहि भारतात गरिबी व बेकारी वाढली. इंग्रज व्यापारी व कारखानदार यांना भारतात मोकळे रान मिळाले. त्यांनी हिंदी लोकांना पिळून काढले व भारतातली अगणित संपत्ती लुटून नेली.

भारतात ब्रिटिश राजवट सुरू झाली ही ईश्वरी कृपा होय, असे काही भारतीय विद्वानांना वाटत होते; कारण सर्वत्र माजलेले अराजक इंग्रजांनी नष्ट केले; ठग व पेंढारी यांचा पूर्ण बंदोवस्त करून देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली; राज्यकारभाराची नियमबद्ध व्यवस्था लावली; रस्ते, लोहमार्ग, तारायंत्र या सोयी केल्या, शिक्षणाचा प्रसार केला आणि त्यामुळे भारतात नवयुग निर्माण झाले. हे काही अंशी बरोबर असले, तरी हिंदी लोकांच्या सर्व आशा-आकांक्षा पुऱ्या झाल्या नाहीत; उलट इंग्रजी विद्येमुळे त्या वाढतच गेल्या. १९ व्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिश सरकारचे घोरण पूर्णपणे अनुदार व साम्राज्यवादी झाल्यामुळे हिंदी पुढाऱ्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला. त्यातच इ. स. १८९६ साली दक्षिणेत मोठा दुष्काळ पडला आणि त्याच्या जोडीला प्लेगचाही प्रादुर्भाव झाला. त्या वेळी सरकारी अधिकाऱ्यांनी लोकांवर असह्य अत्याचार केले. इ. स. १८९८ साली मुंबईत दंगे सुरू झाले. सरकारने दडपशाही करून ते मोडून काढले.

दि. १ जानेवारी १८९९ पासून लॉर्ड कर्झन याची कारकीर्द सुरू झाली. तो अत्यंत कर्तबगार व्हाईसरॉय गणला जातो. त्याने शासनाच्या प्रत्येक विभागात पुष्कळच सुधारणा केल्या. त्याच्या राजवटीत वायव्य सरहद्द प्रांत वेगळा करण्यात आला. त्याने निजामाकडून वऱ्हाड प्रांत काढून घेतला. व्यापार व उद्योग यांसाठी नवे खाते सुरू करणे, पुरातत्त्वविभागाची पुनर्घटना करणे, प्राचीन वास्तूंचे संरक्षण व्हावे म्हणून उपाय योजणे, मिठावरील कर व प्राप्तीवरील कर कमी करणे, इ. चांगली कामे त्याने केली. पण बंगालची फाळणी ही त्याने केलेली घोडचूक ठरली. पुढे सरसेनापती लॉर्ड किचनेर याच्याशी त्याचा मतभेद झाला आणि ब्रिटिश सरकारने किचनेरची बाजू उचलून धरली. त्यामुळे कर्झनने १९०५ मध्यें राजीनामा दिला. त्याची कारकीर्द दडपशाहीमुळेही गाजली. हिंदी लोकांच्या मनात त्याच्याविषयी तीव्र द्वेष उत्पन्न झाला.

लॉर्ड कर्झन
(श्री. वि. द. घाटे यांच्या भारताची कहाणी या पुस्तकावरून)

कर्झननंतर लॉर्ड मिंटो व्हाइसरॉय म्हणून आला. त्या वेळी ब्रिटनमध्ये उदारमतवादी पक्षाचे मंत्रिमंडळ सत्ताधीश झाले व मोर्ले हा सत्प्रवृत्त गृहस्थ भारतमंत्री झाला. मिंटोच्या कारकीर्दीत राष्ट्रीय चळवळीने जोर धरला आणि ती मोडण्यासाठी त्याने दडपशाही सुरू केली. त्यापूर्वी इतकी जुलमी राजवट झाली नव्हती. पुढे हिंदी लोकांना शांत करण्यासाठी १९०९ साली इंडियन कौन्सिल्स ॲक्ट पास करण्यात आला. तो मोर्ले-मिंटो सुधारणाकायदा म्हणून ओळखला जातो. त्या कायद्यान्वये सुप्रीम कौन्सिलमध्ये ६० जास्त सभासद घेण्याचे ठरले. त्यांतील २७ निवडलेले, २८ सरकारी अधिकारी व ५ ग. जनरलच्या मर्जीप्रमाणे नियुक्त केलेले होते. जे सभासद निवडून द्यायचे होते त्यांत मुसलमान, जमीनदार व चेम्बर ऑफ कॉमर्स यांना राखीव प्रतिनिधित्व होते. ग. जनरलच्या कार्यकारी मंडळात एक हिंदी गृहस्थही घ्यायचा असे ठरले. पण या मोर्ले-मिंटो सुधारणांमुळे कोणाचेच समाधान झाले नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ. स. १९१० साली मिंटोच्या जागी हार्डिज आला. त्याच्या कारकीर्दीत बंगालची फाळणी रद्द करण्यात आली व बंगालपासून बिहार-ओरिसा वेगळे करण्यात आले. कलकत्ता येथे राजधानी होती, ती दिल्लीला नेण्यात आली. ब्रिटनचे राजे पंचम जॉर्ज यांनी हिंदुस्थानात येऊन १२ डिसेंबर १९११ रोजी दिल्ली येथे आपला दरबार भरवला. हार्डिजने भारतीय स्वातंत्र्याची चळवळ दडपण्याचे खूप प्रयत्न केले. त्याने थोडे सौम्य धोरण स्वीकारले होते. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. उलट परिस्थिती अधिकच बिघडली. त्यानंतर होमरूल चळवळ सुरू झाली व सशस्त्र दहशतवादी लोकांनीही बळ बांधले.

इ. स. १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले आणि ब्रिटनबरोबर हिंदुस्थानही त्यात खेचला गेला. जी साम्राज्यसत्ता हिंदुस्थानाला कायम गुलामीत जखडून ठेवण्यासाठी धडपडत होती, त्याच सत्तेला अबाधित ठेवण्यासाठी हिंदी सैनिकांना निरनिराळ्या रणक्षेत्रात आपले प्राण द्यावे लागले.

हार्डिजच्या मागून १९१६ मध्ये लॉर्ड चेम्सफर्ड व्हाइसरॉय झाला. त्याची कारकीर्द होमरूल चळवळ, खिलाफत चळवळ, १९१९ चा सुधारणा कायदा, रौलट ॲक्ट, जालियनवाला बागेतील हत्याकांड या घटनांमुळे खूप गाजली. महायुद्धात हिंदी लोकांनी ब्रिटिश सरकारला जी मदत केली, तिच्या मोबदल्यात हिंदुस्थानला काही राजकीय हक्क मिळावे, अशी अपेक्षा निर्माण झाली आणि सर्व पक्षांनी जबाबदारीच्या स्वराज्याची मागणी केली. १९१७ मध्ये भारतमंत्री मॉंटेग्यू यांनी, हिंदुस्थानात क्रमाक्रमाने जबाबदारीची राज्यपद्धती प्रस्थापित केली जाईल, असे आश्वासन दिले आणि त्याप्रमाणे १९१९ साली मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा कायदा झाला. त्यात संस्थाने वगळून बाकीच्या भागाला ब्रिटिश इंडिया हे नाव मिळाले व त्याचे मुंबई, मद्रास, बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम, संयुक्त प्रांत, मध्य प्रांत व पंजाब हे नऊ समान दर्जाचे गव्हर्नरचे प्रांत ठरवण्यात आले. मध्यवर्ती सरकारात कौन्सिल ऑफ स्टेट व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली ही दोन सभागृहे स्थापण्यात आली. त्यात लोकनियुक्त प्रतिनिधी बरेच घेण्याचे ठरले.

प्रांतिक कायदे मंडळांच्या सभासदांच्या संख्येतही वाढ करण्यात आली आणि सोपी व राखीव असा दुहेरी कारभार सुरू झाला. प्रांतिक खात्यांपैकी काही खात्यांची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच कार्यकारी मंडळाने पाहायची असे ठरले. जमीनमहसूल, न्याय, पोलिस, तुरुंग ही राखीव खाती म्हणून सरकारच्या अखात्यारात ठेवली गेली आणि शिक्षण, आरोग्य, स्थानिक स्वराज्य, शेतकी व अबकारी या खात्यांची व्यवस्था, कायदे कौन्सिलात ज्या पक्षाचे बहुमत असेल त्याच्याकडे सोपविण्यात आली.

अशा प्रकारे हिंदुस्थानात संसदीय राज्यपद्धती सुरू झाली. पण तीत लोकशाही नव्हती व जबाबदारीही नव्हती. हा सुधारणा-कायदा कोणालाच समाधानकारक वाटला नाही. त्यावेळी म. गांधी सरकारशी सहकार्य करावे अशा मताचे होते.' परंतु सरकाच्या दडपशाहीमुळे ते त्यांचे धोरण टिकले नाही आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली असहकारितेची चळवळ सुरू झाली.

लॉर्ड रीडिंग एप्रिल १९२१ मध्ये व्हाइसरॉय म्हणून हिंदुस्थानात आला, त्या वेळी गांधीयुग सुरू झाले होते. रीडिंगने देशात उसळलेल्या आंदोलनाला मुत्सद्देगिरीने व खंबीरपणाने तोंड दिले. इ. स. १९१० चा प्रेस ॲक्ट आणि १९१९ चा रौलट ॲक्ट त्याने रद्द केला. त्याच्या कारकीर्दीत पास झालेल्या क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्टमुळे कायद्यातील जातीय पक्षपात पुष्कळ अंशी कमी झाला. इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा लंडनप्रमाणेच दिल्ली येथे सुरू करण्यात आली आणि हिंदी लोकांना उच्च श्रेणीच्या सरकारी नोकरीत इंग्लिश लोकांच्या बरोबरीने वाव देण्यात आला. सेनादलात हिंदी माणसांना अधिकाराच्या जागा देण्यास प्रारंभ झाला हिंदुस्थान सरकारला भारताची अर्थव्यवस्था ठरविण्याचा अधिकार याच काळात मिळाला आणि टॅरिफ बोर्डाची स्थापना करण्यात आली. तथापि कर्झनसारखाच रीडिंग हाही साम्राज्यवादी व अहंमन्य होता. तो १९२६ मध्ये परत गेला व त्याच्या जागी लॉर्ड आर्यविन आला. त्याच्या कारकीर्दीत सायमन कमिशनचा दौरा व पहिली गोलमेज परिषद या महत्त्वाच्या घटना घडल्या. कायदेभंगाची चळवळ त्याने निष्ठुरपणे दडपली; पण म. गांधीशी बरोबरीच्या नात्याने वाटाघाटी करून शेवटी करार करण्यात त्याची मुत्सद्देगिरी दिसून आली.

आर्यविननंतर १९३१ च्या एप्रिलमध्ये विलिंग्डन व्हाइसरॉय झाला. आर्यविनच्या उदार धोरणामुळे गांधी व इतर पुढारी दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेले. पण विलिंग्डनला गांधी-आयविन करार पसंत नव्हता व त्याने समेटाचे धोरण सोडून देऊन दडपशाही सुरू केली. पुन्हा उग्र आंदोलन सुरू झाले, पण सरकारने ते कडक उपायांनी थांबवले व शांतता प्रस्थापित केली. विलिंग्डनच्या कारकीर्दीतच १९३५ चा सुधारणाकायदा पास झाला होता. त्या कायद्यान्वये मध्यवर्ती सरकारला संयुक्त शासनाचे स्वरूप देण्याचे ठरले. त्यात संस्थानिकांचाही अंतर्भाव व्हायचा होता. प्रांतिक सरकारात सर्व खाती सोपीव असावी व लोकनियुक्त मंत्र्यांनी ती चालवावी, असे ठरले. मात्र लॉ व ऑर्डर पुरते गव्हर्नरला विशेष अधिकार देण्यात आले. मतदानाचा हक्क वयात आलेल्या व्यक्तींपैकी शेकडा २७ लोकांना मिळेल, इतका विस्तृत करण्यात आला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या वेळी ब्रह्मदेश भारतापासून वेगळा करण्यात आला आणि सिंध व ओरिसा हे दोन नवे प्रांत बनवण्यात आले.

इ.स. १९३६ च्या एप्रिलमध्ये विलिंग्डनच्या जागी लिन्लिथगो व्हाइसरॉय म्हणून आला. त्याने १९३५ च्या कायद्याप्रमाणे होणाऱ्या निवडणुकांत भाग घेण्यासाठी कॉंग्रेसच्या नेत्यांचे मन वळवले. त्या निवडणुका १९३७ च्या फेब्रुवारीत झाल्या आणि आठ प्रांतांत कॉंग्रेसला बहुमत मिळाले. दि. १ एप्रिल १९३७ पासून प्रांतिक राज्यकारभारात नवीन कायद्याचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाला. शेतकरी-कर्जनिवारण, दारूबंदी, सावकारी-नियंत्रण, औद्योगिक शिक्षण, साक्षरताप्रसार, पंचवार्षिक योजना असे अनेक विषय प्रांतिक सरकारांचे लक्ष वेधीत होते. पण तेवढ्यात १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. ब्रिटिश मुत्सद्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याच्या घोषणा केल्या. त्यामुळे इंग्लंडला युद्धात साहाय्य करावे, असे बहुतेक राजकीय पक्षांना वाटू लागले. मात्र तत्पूर्वी स्वातंत्र्याची पहिली पायरी म्हणून वसाहतीचे स्वराज्य निश्चित मुदतीत मिळण्याचे आश्वासन ब्रिटिश सरकारकडून मागण्यात आले. पण वसाहतीचे स्वराज्य हेच अंतिम फळ मिळेल अशी घोषणा लॉर्ड लिन्लिथगोने केल्यामुळे कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले आणि असहकाराची चळवळ पुन्हा सुरू झाली.

महायुद्धात प्रारंभी ब्रिटिशांना अपयश आले आणि जपानी सैन्य रंगूनपर्यंत पोचले. त्यामुळे हिंदी लोकांना स्वराज्यप्राप्तीची खात्री वाटू लागली. कॉंग्रेसचे पुढारी ताठर झाले व त्यांनी वसाहतीचा दर्जा देणारी क्रिप्सची योजना फेटाळून लावली. इ. स. १९४२ साली अभूतपूर्व आंदोलन झाले. पण ब्रिटिश सरकारने ते दडपले आणि पुन्हा कॉंग्रेस व सरकार यांच्यामध्ये समेट झाला.

लिन्लिथगोच्या कारकीर्दीच्या अखेरीस बंगालमध्ये भयानक दुष्काळ पडून लाखो माणसे मृत्युमुखी पडली. महायुद्धामुळे उत्पन्न झालेली टंचाई आणि नोकरशाहीचा निष्काळजी कारभार हीच त्याची कारणे होती. त्याच्या राजवटीत हिंदुस्थानच्या राजकारणात दोन विशेष बदल झाले. पहिला बदल हा की कॉंग्रेस वर्किंग कमिटीवरील म. गांधींचे वर्चस्व कमी झाले आणि दुसरा बदल हा की महंमद अली जिना यांनी मुसलमानांसाठी वेगळ्या राज्याची, पाकिस्तानची मागणी केली.

इ. स. १९४३ च्या ऑक्टोबरमध्ये लिन्लिथगो जाऊन वेव्हेल आला. तो उत्तम सेनापती असला, तरी धोरणी मुत्सद्दी नव्हता. महायुद्धात इंग्लंड विजयी झाले असले, तरी त्याच्या सामर्थ्याला जबर तडाखा बसला होता. सुभाषबाबूंनी मलायात आझाद हिंद सेना उभी केली होती. तिच्या चित्तथरारक कथा ऐकून हिंदी लोकांना वेगळाच आत्मविश्वास वाटू लागला. वेव्हेलने आझाद हिंद सेनेच्या पुढाऱ्यांना पकडून १९४५ साली त्यांच्यावर खटले भरले, ही फार मोठी चूक केली; कारण त्यामुळे सारा देश खवळून गेला. त्याच कारणामुळ १९४६ मध्ये आरमारातील हिंदी कामगारांना उठाव करण्याचे धैर्य लाभले आणि ब्रिटिश सत्तेला पुन्हा धक्का बसला. त्या वेळी इंग्लंडमध्ये मजूरपक्षाचे मंत्रिमंडळ सत्तारूढ झाले होते. त्याने भारतमंत्री पेथिक लॉरेन्स, सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स व मि. अलेक्झांडर यांचे शिष्टमंडळ हिंदुस्थानात पाठवले व हिंदी नेत्यांशी स्वतंत्रपणे वाटाघाटी सुरू केल्या. त्या शिष्टाईला फारसे यश आले नाही. तरी इंग्लंडने हिंदुस्थानचा संपूर्ण स्वातंत्र्याचा हक्क मान्य केला आणि संधिकालात राष्ट्रीय मध्यवर्ती सरकार स्थापण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे १९४६ च्या सप्टेंबर महिन्यात पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली हंगामी मध्यवर्ती सरकारचे प्रधानमंडळ बनविण्यात आले. डिसेंबरमध्ये घटनासमितीचे पहिले अधिवेशन दिल्ली येथे भरले. त्यात मुस्लिम लीगने भाग घेतला नाही. १९४७ च्या जानेवारीत घटनासमितीचे दुसरे अधिवेशन भरले, त्यातही मुस्लिम लीग नव्हती. फेब्रुवारी १९४७ मध्ये इंग्लंडचे मुख्य प्रधान ॲटली यांनी घोषणा केली, की जून १९४८ पर्यंत इंग्लंड आपली हिंदुस्थानातली सत्ता जबाबदार हिंदी प्रतिनिधींच्या हाती सोपवील. मार्चमध्ये वेव्हेलच्या जागी लॉर्ड माउंटबॅटन आला. त्याने ३ जूनला एक योजना जाहीर केली, तिचे स्वरूप असे होते – जून १९४८ मध्ये इंग्रजांनी हिंदुस्थानातून जावे. तत्पूर्वी १५ ऑगस्ट १९४७ पासून संक्रमण कालातील सरकार स्थापावे. त्याला वसाहतीचा दर्जा द्यावा. पाकिस्तान वेगळे राष्ट्र व्हावे. संस्थानांनी स्वतंत्र राहावे किंवा हिंदुस्थानात अगर पाकिस्तानात सामील व्हावे.

जुलै १९४७ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने ही योजना पास केली व हिंदुस्थानची फाळणी झाल्याचे जाहीर केले. १४ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्लंडची हिंदुस्थानवरील सत्ता संपली. १५ ऑगस्ट रोजी दोन भागांची दोन सरकारे स्थापन झाली. लॉर्ड माउंटबॅटन भारताचा पहिला गव्हर्नर जनरल झाला. १९४८ साली तो परत गेला आणि भारतात उरलेले अधिकारी व सैन्यही हा देश सोडून निघून गेले.

या देशावर इंग्रजांचे राज्य दीडशे वर्षेदेखील राहिले नाही; पण तेवढ्या कालावधीत देशाचा व लोकांचा पूर्ण कायापालट झाला. प्रारंभी इंग्रजांनी राज्यव्यवस्था केली ती स्वतःच्या हितासाठीच, यात संशय नाही. इंग्रजी शिक्षण, लोहमार्ग, टपाल, तारायंत्र या सर्व सुधारणा राज्य नीट राखता यावे म्हणूनच केल्या गेल्या, पण त्यांचा परिणाम हिंदी लोकांच्या जीवनावर खूप झाला. भारतात कधीही नव्हती अशी शांतता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व सुव्यवस्था इंग्रजांच्या राज्यात प्रस्थापित झाली. त्यांनी बहुतेक कायदे स्वतःच्या संरक्षणाच्या दृष्टीने केले असले, तरी प्रजेच्या हिताकडेही त्यांनी थोडेसे लक्ष दिले. १९ व्या शतकात इंग्रजांनी हिंदुस्थानातून विपुल संपत्ती लुटून नेली हे खरे; तथापि या देशात नीळ, चहा, कॉफी, ताग, कापूस, इ. पदार्थांचे उत्पन्न खूपच वाढले. परदेशी मालाची आयात वाढल्यामुळे देशी हस्तव्यवसाय नष्टप्राय झाले; पण काही नवे यांत्रिक उद्योग सुरू झाले.

बहुतेक इंग्रज राज्यकर्ते साम्राज्यवादी व कपटनीतीचा अवलंब करणारे होते. त्यांतले काही जुलमी व निष्ठुरही निघाले. पण काही व्हाइसरॉय व गव्हर्नर उदार मनाचे होते. त्यांच्यामुळे भारताला लोकशाहीचा परिचय झाला. त्यांनी हिंदी लोकांच्या उन्नतीसाठी पुष्कळ प्रयत्न केले, समाजसुधारणेला साहाय्यक असे कायदे केले व दुष्ट चालीरीती बंद केल्या. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे इथल्या लोकांची दृष्टी विकसित झाली आणि त्यांनीही समाजाची सर्वांगीण सुधारणा करण्याचा प्रयत्न आरंभला. त्यात त्यांना बरेचसे यशही लाभले. इंग्रजी भाषेतील ग्रंथांमुळे पाश्चात्य भौतिक शास्त्रांचा परिचय होऊन भारतात नवयुग सुरू झाले. मुद्रणकलेमुळे ज्ञानप्रसार सुलभ झाला. अनेक इंग्रज अधिकारी अभ्यासू वृत्तीचे असून, त्यांनी या देशाचा इतिहास व भूगोल यांचे संशोधन करून ग्रंथ लिहिले आणि जाती-जमातींची पाहणी करून त्यांची माहिती संकलित केली. विल्यम जोन्स, विल्सन, मॅक्स म्यूलर, मोनियर विल्यम्स, कीथ, कोलब्रुक, विंटरनिट्झ, कीलहॉर्न, फर्ग्युसन, प्रिन्सेप, मॅक्डोनेल, कनिंगहॅम, इ. पंडितांनी संस्कृत व प्राकृत भाषा, प्राचीन ग्रंथ, ताम्रपट, शिलालेख, नाणी वगैरे साधनांच्या साहाय्याने प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती यांवर खूपच प्रकाश पाडला. त्यांच्यामुळेच आपल्याला भारताच्या प्राचीन वैभवाविषयी विपुल ज्ञान प्राप्त झाले.

स्वातंत्र्यसंग्राम – भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाला नेमकी सुरुवात कधी झाली, हे नीटसे स्पष्ट करून सांगता येणार नाही. पेशवाईचा अस्त हाच भारतीय स्वातंत्र्याचा अस्त आणि इंग्रजी राज्याचा प्रारंभ मानला जातो. अखेर पेशवे जरी शरण गेले, तरी काही सरदारांनी व मुत्सद्यांनी युद्ध चालूच ठेवले आणि शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या स्वातंत्र्यरक्षणाचा आटोकाट प्रयत्न केला. यानंतर इंग्रजांनी आपल्या राज्याची घडी व्यवस्थित बसविण्याकडे सर्व लक्ष केंद्रित केले. तथापि याच वेळी आपल्या गेलेल्या स्वातंत्र्याविषयी खंत बाळगणारे व त्यामुळे आतल्या आत जळणारे राजे-रजवाडे, सरदार-सुभेदार इत्यादींच्या मनात पुन्हा एकदा एखादे युद्ध पुकारून त्यात इंग्रजी राजवटीचा पुरता नाश करावा, असे विचार घोळत होते. त्या माजी राज्यकर्त्यांच्या मनातले हे विचार आणि सैन्य व सामान्य जनता यांच्यांतही



झाशीची राणी लक्ष्मीबाई

विविध कारणांमुळे इंग्रजांविषयी धुमसत असलेला असंतोष या सर्वांचे दिवसेंदिवस एकत्रीकरण होत चालले.

प्रारंभी नानासाहेब पेशव्याने आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आपला वकील अझिमुल्ला याला इंग्लंडला पाठवले. त्या अगोदर सातारकर छत्रपतींचा विश्वासू सेवक रंगो बापूजी हाही तिथे जाऊन आला होता. तथापि या दोघांनाही त्यांच्या कार्यांत यशप्राप्ती झाली नाही. पुढे अझिमुल्ला, रंगो बापूजी, नानासाहेब पेशवे व त्यांचा सेनापती तात्या टोपे या चौघांची ब्रह्मावर्ताच्या पेशव्यांच्या वाड्यात बैठक झाली व तीत स्वातंत्र्ययुद्धाचे रणशिंग फुंकण्याचा विचार पक्का झाला. लौकरच त्यांच्या या योजनेत दिल्लीचा बादशाहा बहादुरशाहा, झांशीची राणी लक्ष्मीबाई, आयोध्येच्या बेगमा, बिहारचा कुंवरसिंह, मौलवी अहमदशाहा, इ. लहानमोठ्या देशभक्तांनी भाग घेतला व सर्वानुमते सैन्यात आणि सामान्य जनांत स्वातंत्र्ययुद्धाचा प्रचार करण्याच्या हालचालींना सुरुवात झाली. रक्तकमलाच्या साक्षीने भाकरीवर हात ठेवून शपथा घ्यायला प्रारंभ झाला. नानासाहेब, तात्या टोपे, रंगो बापूजी, इ. क्रांतिनेते जागोजाग भेटी देऊन लोकांना देशस्वातंत्र्यासाठी कटिबद्ध होण्याचा उपदेश देऊ लागले. इ. स. १८५७ सालच्या मे महिन्याचा एकतीस हा दिनांक अंतिम उठावणीचा म्हणून निश्चित केला गेला. सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

एवढ्यात दि. २९ मार्च १८५७ या दिवशी बराकपूरच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पलटणीत अनपेक्षितपणे संघर्षाची ठिणगी पडली. या संघर्षाचे कारण तसे पाहिले, तर क्षुल्लक होते. त्या वेळच्या बंदुकांच्या

तात्या टोपे

काडतुसांना गायीच्या व डुकराच्या चरबीचे लिंपण केलेले असे. एके दिवशी ही वार्ता सैनिकी गोटात पोचली आणि तेवढ्या-वरून सैनिक भडकले. कारण गाय हिंदूंना पवित्र आणि डुक्कर मुसलमानांना निषिद्ध. त्यामुळे हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांचे लोक एकमताने संतापून उठले.

मंगल पांडे हा या स्वातंत्र्यसमरातला विनीचा शिपाई होय. चरबीच्या काडतुसांची वार्ता कळल्यानंतर तो बेभान होऊन आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर चालून गेला. अल्पावधीतच इतर शिपायांनीही त्याचे अनुकरण केले व मग 'मारो फिरंगीको' असा एकच गदारोळ उठला. मंगल पांडेला अखेर पकडण्यात आले. लष्करी न्यायालयाने त्याला फाशीची शिक्षा दिली व ती तत्काळ अमलातही आणली गेली. यामुळे सैनिकांना दहशत बसेल, अशी इंग्रजी अधिकाऱ्यांची कल्पना होती; परंतु ती फोल ठरली. उलट मंगल पांडेच्या बलिदानाने ठिकठिकाणचे सैनिक प्रस्फुरित होऊन उठले व त्यांनी इंग्रजांची कापाकापी चालवली.

वस्तुतः नियोजित दिनांकापूर्वीच या संघर्षाला तोंड लागले असल्यामुळे दूरदूरच्या स्वातंत्र्यसैनिकांना एकदम सज्ज होणे मुष्किल झाले; परंतु हे वातावरणच एवढे प्रस्फोटक व स्फूर्ति-शाली होते, की हाती असलेल्या अपुऱ्या साधनांनिशीच जो तो इंग्रजी राजवटीवर निर्णायक प्रहार करायला निघाला.

प्रथम मिरतचे सैनिक दिल्लीला धावत गेले व त्यांनी तिथल्या शेकडो इंग्रजांना कंठस्नान घालून दिल्लीवर स्वामित्व प्रस्थापित केले. दिल्लीला तेव्हा राजधानी नव्हती; तथापि ते इंग्रजांचे एक महत्त्वाचे ठाणे होते. क्रांतिकारकांनी ते प्रारंभीच जिंकून घेतल्यामुळे इंग्रजांच्या तोंडचे पाणी पळाले. दिल्ली जिंकल्याबरोबर क्रांतिकारकांनी तिथे बहादुरशहाची स्थापना केली व ते अन्यत्र वळले. दिल्ली पाठोपाठ अलीगड, नसिराबाद, रोहिलखंड, अलाहाबाद असा हा स्वातंत्र्ययुद्धाचा वणवा भडकत चालला. पंजाबी लोकांनी मात्र या युद्धात क्रांतिकारकांच्या बाजूने भाग घ्यायचे नाकारले. उलट त्यांनी इंग्रजांना साहाय्य करून पंजाब ते पेशावर या पट्ट्यातले क्रांतियुद्ध मोडून काढले.

लौकरच कानपूर, लखनौ, झाशी, अयोध्या, ग्वाल्हेर, इ. ठिकाणी क्रांतियुद्धाच्या ज्वाळा पसरत गेल्या. जागोजाग उभय पक्षी तुमुल रणकंदन झाले. अनक ठिकाणी क्रांतिकारकांनी थोडा काळ का होईना, इंग्रजांचे प्रभुत्व झुगारून स्वातंत्र्य संपा-दन केले. तथापि त्यांचा आरंभीचा जोर पुढे मावळत चालला. ठिकठिकाणी त्यांना इंग्रजी सेनेच्या सामर्थ्यापुढे हार खावी लागली. जो जो क्रांतिकारकांचा पराभव होत चालला, तो तो इंग्रजी सैनिक व इंग्रजी अधिकारी अधिकाधिक शिरजोर होऊ लागले. त्यांनी दडपशाहीचे एकापेक्षा एक क्रूर व कठोर उपाय अमलात आणले. नुसत्या संशयावरून हजारो लोकांना फासावर लटकवण्यात आले. कित्येकांना तोफेच्या तोंडी देऊन, तर कित्ये-कांना खांबाला बांधून जाळून मारण्यात आले. प्रत्यक्ष क्रांति-युद्धात भाग घेतल्याच्या आरोपावरून जे पकडले गेले आणि ज्यांना फाशी, जन्मठेप अशा शिक्षा झाल्या, असे तर अगणित देशभक्त होते. याशिवाय धारातीर्थी पडले, ते वेगळेच.

क्रांतियुद्धाच्या नेत्यांवर इंग्रजांचा विशेष रोष होता आणि ते स्वाभाविक होते. कारण त्यांच्यामुळेच ही आग भडकली होती. त्यामुळे असा नेता हाती सापडल्यावर त्याला जास्तीत जास्त क्रूर शिक्षा देण्याकडे त्यांचा कल असे. जे सापडले नाहीत, त्यांचा पुढे अनेक वर्षे शोध चालू होता.

या सर्व नेत्यांमध्ये नानासाहेब पेशवा हा अत्यंत बुद्धिमान व तेजस्वी गणला जातो. चार्लस बॉल याने आपल्या 'इंडियन म्युटिनी' या ग्रंथात त्याचे सविस्तर वर्णन करून त्याच्या व्यक्ति-त्वावर प्रकाश पाडला आहे. बॉल लिहितो- श्रीमंत नाना हे सुविद्य असून, अत्यंत शिष्टाचारसंपन्न होते. राजकारण आणि राजकीय घडामोडी यांत ते फार लक्ष घालीत. क्षणोक्षणी बदलणाऱ्या मोठमोठ्या राष्ट्रांच्या राजनैतिक हालचाली ते फार बारकाव्याने अभ्यासीत आणि त्याकरिता टॉड नावाच्या इंग्रज माणसाकडून रोजची इंग्लिश वर्तमानपत्रेही वाचून घेत.'

या नानासाहेबामुळेच प्राधान्याने हा उठाव झाला, असा इं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जांचा समज असल्यामुळे त्यांनी त्याच्या शोधार्थ जंगजंग पछाडले. तथापि तो अखेरपर्यंत त्यांना सापडला नाही.

क्रांतियुद्धाचा दुसरा महान, मुत्सद्दी व रणकुशल असा नेता म्हणजे सेनापती तात्या टोपे हा होय. उत्तर भारतात क्रांतियुद्धाला अपयश आल्यावरही स्वतःची उमेद खचू न देता मध्यभारतात व अन्यत्र लहानमोठ्या अनेक लढाया खेळणारा असा हा बहादूर लढवय्या होता. त्याला पकडण्यासाठी इंग्रजांना शेवटी फितुरीचा आश्रय घ्यावा लागला. अखेर तो पकडला गेला. इंग्रजांनी त्याला फाशी दिले.

रंगो बापूजी हा या स्वातंत्र्यसमरातला आणखी एक देदीप्यमान तारा. आपले स्वामी सातारकर छत्रपती यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या निवारणार्थ थेट इंग्लंडपर्यंत जाऊन भांडणारा हा देशभक्त. इंग्लंडमध्ये हा चौदा वर्षे राहिला व इंग्रजी भाषा शिकून त्या भाषेत त्याने तिथल्या युरोपियन जनतेला आपल्यावरील अन्याय दूर होण्यासाठी साकडे घातले. तथापि शेवटी 'या इंग्रजांना सौजन्याची भाषा समजत नाही, तलवारीचीच समजते,' असे म्हणून नानासाहेब, अझिमुल्ला, तात्या टोपे यांच्या बरोबरच त्यानेही १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात उडी घेतली.

झाशीची राणी तर या स्वातंत्र्यसमराची साक्षात देवताच! जातीची अबला व वयाने लहान असूनही तिने एखाद्या कसलेल्या सेनानीसारखे हे समर झुंजत ठेवले व अखेर त्यात ती धारातीर्थी पतन पावली. ह्यू रोजसारख्या नामवंत इंग्लिश सेनानीनेही तिच्या शौर्याचे व पराक्रमाचे पोवाडे गायिले आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर तिच्याविषयी लिहितात—'साधी यःकश्चित् स्त्री, वयाने बावीस तेवीस वर्षांचीही असेल नसेल! पण गुलाबासारखी मृदुमोहक, चालण्यासवरण्यातही अतिशय गोड नि चारित्र्याने अतिशय विशुद्ध—अशा या एका अबलेने सहसा पुरुषामध्येही क्वचित दिसून येणारे संघटनाचातुर्य प्रकट करून आपल्या प्रजेची मने आकर्षून घेतली. स्वदेशाची प्रतिष्ठा निरवण्यात ती जशी अग्रेसर होती, तशी रणपांडित्यातही ती कुणाला हात धरू देणारी नव्हती.'

मंगल पांडे याच्या बलिदानाने सुरू झालेले हे स्वातंत्र्यसमर उणीपुरी दोन वर्षे कमी जास्त प्रमाणात भडकत राहून शेवटी सेनापती तात्या टोप्यांच्या हौतात्म्याने समाप्त झाले. या युद्धात भारतीय जनतेला आपले स्वातंत्र्यसंपादनाचे ईप्सित पुरे करता आले नाही हे खरे; तथापि स्वातंत्र्याच्या दिशेने एक पाऊल तरी प्रगती निश्चित झाली. हिंदु-मुस्लिम ऐक्याचा एक देदीप्यमान व प्रभावी आविष्कार याच युद्धाने प्रथम प्रकट झाला. दुसरा फायदा झाला तो हा, की हे भारतीय लोक आपण समजतो तसे नेभळे आणि दुबळे नाहीत, याची इंग्रजांना खात्री पटली. त्यामुळेच त्यांना आपल्या सत्तासंचालनात खांदेपालट करावा लागला. या युद्धाच्या परिसमाप्तीनंतर इंग्लंडच्या राणीला खास जाहीरनामा काढावा लागला. त्यात भारतीय जनतेचा राग शांत करण्यासाठी अनेक आश्वासने द्यावी लागलीं. इथली सत्ता यापुढे कंपनीसरकारकडून काढून इंग्लंडच्या राज्यकर्त्यांना स्वतःच्या हाती घ्यावी लागली. एतद्देशीय लोकांच्या धर्मभावना दुखावल्या जाणार नाहीत, राजे-रजवाड्यांना सन्मानपूर्वक वागविले जाईल, अशी ग्वाही द्यावी लागली. हे सारे फायदे केवळ प्रक्षुब्ध भारतीय जनतेने समशेर उपसल्यामुळेच तिला प्राप्त झाले.

यानंतर भारतात सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली; परंतु ती फार काळ टिकली नाही. इ. स. १८७२ साली पंजाबात वीर-गुरू रामसिंह कूका यांच्या अनुयायांनी इंग्रज राजवटीविरुद्ध एक उठावणी केली; तथापि लौकरच सरकारने ती मोडून काढली. (कूका पाहा.)

यानंतर पुन्हा कोठे थोडी उसंत मिळते न मिळते तोच महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडके यांनी क्रांतियुद्ध पुकारले. या क्रांतियुद्धासाठी त्यांनी सबंध महाराष्ट्रभर प्रवास केला, जागोजागी जाऊन लोकस्थिती पाहिली, गडकोट पालथे घातले, लोकांना देशभक्तीची शिकवण देण्यासाठी व्याख्याने दिली, शस्त्रास्त्र शिक्षणाचा वर्ग चालविला आणि स्वदेशी वस्तू वापरण्याची आवश्यकताही प्रतिपादन केली. परंतु एवढे करूनही आपल्याला पाहिजे



वासुदेव बळवंत फडके

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तसा प्रतिसाद लोकांकडून मिळत नाही, असे दिसून आल्यावर त्यांनी मांग-रामोशी यांसारख्या गुन्हेगार जमातींचे एक सैन्य उभारले. या सैन्याचा खर्च चालवण्यासाठी लागणारे द्रव्य समाजातील श्रेष्ठी-श्रीमंतांनी आपल्याला कर्जाऊ द्यावे, अशी त्यांनी मागणी केली; परंतु याही मागणीला अपेक्षित साद न मिळाल्यामुळे त्यांना शेवटी लूटमारीचा व दरोडेखोरीचा मार्ग अवलंबावा लागला. चार ते सहा महिने ते दरोडे घालीत व इंग्रजी शिपायांशी झुंज घेत लढले; पण शेवटी सरकारने त्यांना फितुरीचा आश्रय घेऊन पकडले. यानंतर इंग्रजी राज्याविरुद्ध युद्ध पुकारल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर खटला भरण्यात आला व त्यांना जन्मठेप काळ्यापाण्याची सजा देण्यात आली. न्यायालयात आपल्या उद्दिष्टांचे स्पष्टीकरण करीत असताना वासुदेव बळवंत म्हणाले—

"ज्या भूमीच्या पोटी आपण जन्मलो तिच्याच पोटी ही सारी लेकरे झाली. त्यांनी अन्नान्न करीत उपाशी मरावे, हा देश ब्रिटिशांची वसाहत व्हावा आणि आपण कुत्र्याप्रमाणे स्वतःचे पोट भरीत राहावे हे माझ्याच्याने पाहवले नाही ! आणि म्हणून मी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारले...पण शेवटी मला यश आले नाही. माझे प्रजासत्ताक राज्याचे उद्दिष्ट मी साध्य करू शकलो नाही."

त्यानंतर त्यांना जन्मठेप भोगण्यासाठी एडनला पाठविण्यात आले. दि. १७ फेब्रुवारी १८८३ या दिवशी तिथेच ते मरण पावले.

सत्तावन्नचे स्वातंत्र्यसमर, कूकांचे उत्थान व वासुदेव बळवंताचे क्रांतियुद्ध या आणि अन्य लहानमोठ्या उठावांमुळे आपले राज्ययंत्र वारंवार खिळखिळे होते, असे आढळून आल्यावर भारतीय असंतोषाला वाट करून देण्यासाठी एखादा नवा सनदशीर व सौम्य मार्ग शोधून काढला पाहिजे, असे इंग्रजी मुत्सद्यांना वाटू लागले. त्यासाठी त्यांच्यातील मि. ह्यूम, वेडरबर्न, कॉटन या नेत्यांनी न्या. रानडे, न्या. तेलंग, दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बानर्जी, इ. एतद्देशीय पुढाऱ्यांशी चर्चा करून व त्यांच्या सहकार्याने दि. २८ डिसेंबर १८८५ या दिवशी इंडियन नॅशनल कांग्रेस किंवा हिंदी राष्ट्रीय सभा या लोकपक्षाची मुंबई येथे स्थापना केली.

या नव्या लोकपक्षाच्या कार्याचे स्वरूप आरंभी अगदी सौम्य व सामान्य होते. सिव्हिल सर्व्हिस परीक्षेला बसणाऱ्या उमेदवाराचे वय २१च्या ऐवजी १९ असावे, फौजदारी न्यायदानात वर्णभेद नष्ट करावा, मुद्रणनियंत्रणाचा अन्याय्य कायदा रद्द करावा, इ. बारीकसारीक आणि कमी महत्त्वाचे परंतु लोकमत संघटित करणारे विषय घेऊनच प्रारंभीच्या या चळवळी होत. प्राधान्याने लोकांच्या अडचणी व तक्रारी सरकारी अधिकाऱ्यांपर्यंत पोचवण्यासाठी अर्ज-विनंत्या करण्याचे एक सामुदायिक ठिकाण एवढाच कांग्रेसच्या स्थापनेचा मर्यादित उद्देश होता. परंतु एवढ्याने भागत नाही, आपल्या अर्ज-विनंत्यांची दखल घेतली जात नाही, असे दिसून येताच हळूहळू कांग्रेसच्या चळवळींचे स्वरूपही बदलू लागले. आरंभी कडक व कणखर शब्दांतले ठराव, मग सभा, पुढे मिरवणुका, अशा एकेका पायरीने लोकांच्या चळवळी तीव्र होऊ लागल्या.

या सर्व पुढाऱ्यांमध्ये दादाभाई नौरोजी हे अग्रगण्य समजले जात. स्वातंत्र्यप्राप्तीचे जे जे उपाय त्यांना उपलब्ध झाले, त्या त्या सर्वांचा त्यांनी अवलंब करून पाहिला. अत्यंत साध्या अशा अर्ज-विनंत्यांच्या मार्गापासून शेवटी बंडाची भाषा उच्चारण्यापर्यंत त्यांनी मजल मारली होती. तथापि त्यांचे एकूण विचार सनदशीर स्वरूपाचेच असत. आमच्या राष्ट्राची लढाई पार्लमेंटच्या रणांगणावरच लढली पाहिजे, हे आपले ठाम मत असल्याचे ते वारंवार स्वकीयांना व परकीयांना बोलून दाखवीत. तथापि त्यांच्यासारख्या मवाळ वृत्तीच्या माणसालादेखील समजून घेण्याची इंग्रजी शासकांनी तयारी दाखवली नाही. त्यामुळे इ. स. १९०६ च्या कलकत्ता कांग्रेसमध्ये दादाभाई वैतागाने म्हणाले – 'माझ्यावर निराशेचे इतके प्रसंग आले आहेत, की माझे अंतःकरण फुटून जाऊन मी बंड उभारले, तरी त्यात मला

दादाभाई नौरोजी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आश्चर्य वाटणार नाही.'

दादाभाईंच्या मनात आकार घेणारे हे बंडाचे विचार त्यापूर्वीच वीस-पंचवीस वर्षे बंगालव महाराष्ट्रयाप्रदेशातील तरुणांच्या डोक्यांत थैमान घालीत होते व त्या दृष्टीने त्यांची पावलेही पडत होती. महाराष्ट्रात विष्णुशास्त्री चिपळूणकर व त्यांचे टिळक-आगरकरादी शिष्य-सहकारी, तसेच बंगालात सुरेंद्रनाथ बानर्जी यांसारख्या नेत्यांनी प्रथम लोकजागृतीच्या व नंतर प्रत्यक्ष चळवळीच्या दिशेने हे बंडाचे विचार सर्वत्र फैलावून दिले होते. विष्णुशास्त्र्यांची 'निबंधमाला' म्हणजे आत्मजागृतीचा उगमस्रोतच होय. राष्ट्रीय वर्तमानपत्रे व राष्ट्रीय शाळा ही दोन साधने लोकजागृतीला अत्यावश्यक असल्याचे चिपळूणकरांनी प्रतिपादिले. नेमके हेच विचार तिकडे बंगालात सुरेंद्रनाथ बानर्जीही मांडीत होते. त्यामुळे कॉंग्रेसच्या स्थापनेपूर्वीच महाराष्ट्रात केसरी व मराठा ही राष्ट्रीय वृत्तपत्रे व न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन महाविद्यालय या राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन झाल्या. याच वेळी बंगालमध्ये सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी तिथल्या 'बंगाली' वृत्तपत्राला राष्ट्रीय स्वरूप दिले व शाळा-कॉलेजांचीही स्थापना केली. अशा प्रकारे राष्ट्रीय उद्‌बोधनाला अग्रस्थान देऊन चिपळूणकर, टिळक, बानर्जी यांनी आपल्या स्वातंत्र्य आंदोलनाचा श्रीगणेशा केला. टिळकांनी याच वेळी लोकजागृतीसाठी शिवाजी व गणपती यांच्या उत्सवांना राष्ट्रीय स्वरूप देण्यास आरंभ केला. या दोन उत्सवांच्या रूपाने त्यांनी देशातील धार्मिक व राजकीय अशा उभय विचारप्रवाहांना एकत्र आणून चळवळीला गती दिली.

लो. बाळ गंगाधर टिळक

टिळकांनी केलेल्या या लोकजागृतीचे प्रत्यंतर पुढे लौकरच महाराष्ट्रावर कोसळलेल्या प्लेग व दुष्काळ या संकटांच्या काळात आले. दुष्काळनिवारणासाठी टिळकांनी शक्य ते सर्व उपाय केले; पण त्यांची खरी कसोटी लागली ती प्लेगप्रकरणात. त्या वेळीही त्यांनी लोकांना सर्व प्रकारचे साहाय्य केले. पुढे सरकारने प्लेगप्रतिबंधासाठी रँड नावाच्या एका उन्मत्त अधिकाऱ्याची नेमणूक केली. प्लेगप्रतिबंधाच्या निमित्ताने रँडसाहेबाने पुण्यात जो हैदोस घातला तो अगदी असह्य होता. त्या प्रकरणी टिळकांनी केसरीत लिहिले—

"हल्ली मोगलाई किंवा रँडशाही सुरू आहे, ती केव्हाही फार दिवस टिकणे शक्य नाही. लोक कितीही गरीब असले तरी हा त्रास ते एकसारखा सोसून घेतील असे आम्हांस वाटत नाही. प्लेगने मेलो तर मेलो; पण या त्रासातून आपली सुटका करून घेऊ, असे लोकांस वाटू देण्यापर्यंत लॉर्ड सँडर्स्ट यांनी त्यांचा अंत पाहू नये, अशी त्यांस आमची विनंती आहे."

आणि रँडसाहेबाच्या या आडदांडपणाला धडा शिकविण्यासाठी पुण्यातले काही तरुण पुढे सरसावले. त्यांच्यांतल्या अग्रगण्य नेत्याचे नाव होते दामोदर हरी चाफेकर.

त्यांनी आपल्या निवडक सहकाऱ्यांच्या मदतीने रँडसाहेबाला ठार मारण्याचे ठरविले. ज्युबिलीच्या उत्सवाचे निमित्त साधून दि. २२ जून १८९७ च्या रात्री दामोदरपंत आपले बंधू बाळकृष्ण यांसह गणेशखिंडीच्या रस्त्यावर झाडीत दडून बसले व त्यांनी रँड व आयर्स्ट या दोघा युरोपियनांना गोळ्या घालून ठार मारले.

या भीषण घटनेमुळे इंग्रज सरकार अगदी पिसाळून गेले. त्याने रँडच्या वधकर्त्यांचा शोध लावण्यासाठी झडत्या, जप्त्या, धरपकडी, ठोकाठोकी, इ. उपायांचे सत्रच सुरू केले. सरकारची ही दडपशाही इतकी भयानक होती, की लो. टिळकांनी आपल्या केसरीतून 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' अशा शब्दांत सरकारला खडसावले. सरकारला हे सहन होणे शक्य नव्हते. त्याने टिळकांना पकडले व त्यांच्यावर खटला भरून त्यांना अठरा महिन्यांची शिक्षा दिली. यानंतर थोड्याच दिवसांत सरकारने दामोदरपंत चाफेकरांनाही पकडले. त्यामागून त्यांचे दोन बंधू बाळकृष्ण व वासुदेव हे देखील पकडले गेले. यथाकाल त्या सर्वांवर खटले भरण्यात आले. न्यायालयात चाफेकर बंधूंनी इंग्रजी राजवटीविषयीचा आपला असंतोष प्रखर शब्दांत व्यक्त करून स्वदेशाच्या दास्यविमोचनाची आव-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्यकता प्रतिपादन केली. शेवटी सरकारने चाफेकर बंधू व त्यांचे सहकारी रानडे यांना फाशी दिले.

अशा प्रकारे चाफेकर प्रकरणावर पडदा टाकून सरकारने देशात पुनश्च शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, तरी चाफेकरांच्या बलिदानातून स्फूर्ती घेऊन देशभर अनेक लहान-मोठ्या क्रांतिसंस्था निर्माण झाल्या व त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामाचे हे यज्ञकुंड सातत्याने धगधगत ठेवले.

दि. १ जानेवारी १९०० या दिवशी नाशिक येथे सावरकरांनी मित्रमेळा नामक एका क्रांतिसंस्थेची स्थापना केली. या संस्थेतूनच पुढे अभिनव भारत ही विख्यात क्रांतिसंस्था निर्माण झाली व पुढे तिचा विस्तार सबंध भारतभर आणि नंतर विदेशांतही झाला.

बंगालमध्ये स्थापन झालेल्या क्रांतिसंस्थेचे चालक अरविंद व त्यांचे बंधू बारींद्र घोष हे होते. त्यांचेही स्फूर्तिस्थान चाफेकरबंधू हेच होते. अशा प्रकारे देशात सर्वत्र अशा गुप्त मंडळ्या निर्माण झाल्या. त्यांचे कार्य चालू असतानाच त्यांना आव्हान देण्याचे काम तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड कर्झनने केले. दि.२० जुलै १९०५ रोजी त्याने बंगालची फाळणी जाहीर केली. या फाळणीमागचा उद्देश केवळ हिंदू-मुसलमानांमध्ये फूट पडावी

बिपिनचंद्र पाल

हा होता. त्यामुळे कर्झनचा हा डाव मोडून काढण्यासाठी लो. टिळक, सुरेंद्रनाथ बानर्जी, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, इ. लोकनेत्यांनी एक प्रचंड प्रक्षोभक आंदोलन उभारण्याचे ठरविले. या आंदोलनाच्या निमित्ताने सबंध देशातले लोकमत संघटित करावे, अशा उद्देशाने देशभर सभा, मिरवणुका, व्याख्याने निदर्शने यांचे एक सत्रच सुरू करण्यात आले. याच काळात लो. टिळकांनी 'स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार व स्वराज्य' ही आपली सुप्रसिद्ध चतु:सूत्री देशापुढे मांडली.

भारतीय जनतेच्या या आंदोलनाने जसजसे रौद्र स्वरूप धारण केले, तसतसे सरकारनेही हे आंदोलन दडपून टाकण्यासाठी भल्याबुऱ्या उपायांचा अवलंब आरंभिला. पुढाऱ्यांची धरपकड करावी, अनुयायांना फटके मारावे, वृत्तपत्रांवर नानाविध निर्बंध लादावे, 'वंदे मातरम्' सारख्या घोषणांना बंदी करावी, सभा-मोर्च्यांवर लाठीमार-गोळीबार करावे, असे दमनचक्र सर्वत्र सुरू झाले. सरकारच्या दडपशाहीला लोकांनीही ठणकावून उत्तर द्यायला सुरुवात केली. क्रांतिकारकांनीही आपली चळवळ अधिकाधिक उग्र करायला प्रारंभ केला. इ. स. १९०६ साली कलकत्त्याला युगांतर समिती नामक एका नव्या क्रांतिसंस्थेची स्थापना झाली. याच सुमारास काँग्रेसमधील जहाल-मवाळांचा संघर्ष विकोपाला गेला व सुरतेच्या काँग्रेस अधिवेशनात मवाळांचा पराभव होऊन लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली जहालपक्ष विजयी झाला. यापुढचे काँग्रेसचे राजकारण केवळ जहालांच्याच कलाने पुढे वाटचाल करू लागले.

खुदिराम बसू

काँग्रेसमध्ये हे मन्वन्तर घडत असताना इकडे स्वातंत्र्यवीर सावरकर बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी लंडनला जाऊन पोचले व त्यांनी तिथे अभिनव भारताच्या क्रांतिसंस्थेचे जाळे विणायला प्रारंभ केला.

सुरतेच्या काँग्रेसनंतर पुढच्याच वर्षी बंगालमध्ये हिंदुस्थानातला पहिला बाँबस्फोट झाला. ही बाँबविद्या महाराष्ट्रातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक प्रसिद्ध क्रांतिकारक सेनापती बापट यांनी पॅरिसला जाऊन एका रशियन विदुषीकडून मिळविली होती. पुढे त्यांनी बाँब बनविण्याच्या कृतीची माहिती देणारी पुस्तके टंकित करून निरनिराळ्या क्रांतिसंस्थेकडे पाठविली. बंगालच्या युगांतर समितीने त्या पुस्तकातील माहितीवरून कलकत्त्याच्या माणिकतला बागेत बाँब बनविण्याचा एक कारखानाच काढला. या कारखान्यात बनविलेला एक बाँब खुदिराम बसूने मुझफ्फरपूर येथे कलकत्त्याचा मॅजिस्ट्रेट किंग्जफर्ड यांच्यावर टाकला. या बाँबस्फोटात किंग्जफर्ड मेला नाही. ऐन वेळी त्याच्या ऐवजी त्याच्या गाडीसारखीच दुसरी एक गाडी मधे आली व खुदिरामने फेकलेल्या बाँबमुळे त्या गाडीतील दोन निरपराधी स्त्रिया जागच्या जागी ठार झाल्या.

या भीषण घटनेमुळे सबंध भारतात बराच हलकल्लोळ झाला. इंग्रज सरकार तर चांगलेच हादरले. तथापि या घटनेने बिचकून न जाता दडपशाहीचे नवनवे मार्ग अमलात आणून हे आंदोलन पुरते मोडून टाकण्याचा सरकारने चंग बांधला. लाला लजपतरायांना हद्दपार करण्यात आले. खुदिरामला पकडून फाशी देण्यात आले व त्याच्या क्रांतिसंस्थेची पाळेमुळे खणून टाकण्यासाठी बंगालात जागोजाग छापे घालण्यास सुरुवात झाली. मा.णिकतला बागेवर छापा घालून सुमारे ४०–४५ क्रांतिकारकांना पकडण्यात आले. त्यात सर्वश्री अरविंद घोष, बारींद्र घोष, हेमचंद्र दास, सत्येंद्र बसू, कन्हय्यालाल दत्त, इ. प्रमुख क्रांतिकारक होते. लौकरच त्यांच्यावर खटले भरण्यात येऊन अरविंदांशिवाय अन्य क्रांतिकारकांना लहानमोठ्या मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. अरविंद घोष तेवढे निर्दोष सुटले. न्यायालयाचे कामकाज चालू असताना माफीचा साक्षीदार बनलेला नरेंद्र गोस्वामी याचा कन्हय्यालाल दत्त व सत्येंद्र बसू या दोघांनी वध केला. त्यामुळे त्या दोघांनाही फासावर चढवण्यात आले.

इकडे महाराष्ट्रात 'काळ'कर्ते शिवरामपंत परांजपे व 'केसरी'कार लो. टिळक यांना पकडण्यात आले. बंगालातल्या घटनांना उद्देशून केसरीत आलेल्या अग्रलेखांनी सरकार चिडले होते. या अग्रलेखांनी राजद्रोहाला व क्रांतिकारकांच्या प्रयत्नांना पाठिंबा मिळतो, असे सरकारचे म्हणणे होते. त्यामुळे टिळकांना सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा देऊन मंडालेला पाठविण्यात आले. (टिळक, लो. बाळ गंगाधर पाहा.)

टिळकांच्या शिक्षेनंतर देशात शांतता प्रस्थापित होईल, अशी सरकारची कल्पना होती. थोड्याफार अंशाने ती खरीही ठरली; परंतु पुन्हा वातावरण चिघळले. क्रांतिकारक लहान-मोठ्या चकमकी करीतच राहिले.

लंडनला गेलेल्या विनायकराव सावरकरांनी तिथे सत्तावनच्या क्रांतियुद्धाची अर्धशताब्दी साजरी केली. त्या निमित्ताने

मदनलाल धिंग्रा

काही तरुणांना संघटित करून क्रांतीची दीक्षा देण्यात आली. याच वेळी त्यांनी जोसेफ मॅझिनी, ५७ चे स्वातंत्र्यसमर, शिखांचा इतिहास, इ. पुस्तके लिहून भारतीय तरुणांमध्ये अभूतपूर्व जागृती केली. दि. १ जुलै १९०९ रोजी सावरकरांचा सहकारी मदनलाल धिंग्रा याने लंडन येथे कर्झन वायली व लालकाका या दोघांचा वध केला. धिंग्राला पकडून फाशी देण्यात आले; परंतु इतके होऊनही क्रांतिकारकांची कृत्ये थंडावली नाहीत.

नाशिक येथे मित्रमेळ्याची पद्यावली छापल्याबद्दल व अन्य किरकोळ कारणे दाखवून सरकारने सावरकरांचे थोरले बंधू गणेशपंत उपाख्य बाबाराव यांना जन्मठेप - काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली. त्याचा बदला म्हणून अनंत कान्हेरे याने नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याला ठार मारले. या प्रकरणी सरकारने पुष्कळशा क्रांतिकारकांना पकडून त्यांच्यावर खटले भरले. कान्हेरे, कर्वे व देशपांडे या तिघांना फाशी देण्यात आले व अनेकांना लहानमोठ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा देण्यात आल्या. याच वेळी स्वातंत्र्यवीर सावरकरांनाही इंग्लंडमध्ये पकडण्यात येऊन भारतात आणण्यात आले. वाटेत मार्सेल्स मुक्कामी त्यांनी समुद्रात उडी ठोकून स्वतःची मुक्तता करून घेण्याचा प्रयत्न केला; तथापि तो साधला नाही. पुढे त्यांना नाशिक कटाच्या खटल्यांत गोवून ५० वर्षे जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली व ती भोगण्यासाठी त्यांना लौकरच अंद-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मानला पाठवण्यात आले.

त्यानंतर युरोपातली भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अमे-

गणेशपंत (बाबाराव) सावरकर

रिका, रशिया, अफगाणिस्तान, तुर्कस्थान, इ. अन्य अनेक देशांत फैलावत राहिली.

लाला हरदयाळ

लौकरच पहिल्या महायुद्धाचे पडघम वाजले व या महायुद्धाचा लाभ घेऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी मोठी क्रांतिकारक उठावणी करावी या उद्देशाने देश-विदेशांतले भारतीय क्रांतिकारक एकत्र आले. या नव्या उठावणीचे सूत्रसंचालन लाला हरदयाळ व रासबिहारी बसू या दोघा क्रांतिनेत्यांकडे होते. ही उठावणी गदर आंदोलन म्हणून भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासात विख्यात आहे. इंग्रजांच्या सैन्यात असलेल्या भारतीय सैनिकांना स्वातंत्र्याच्या संग्रामासाठी प्रभावित करायचे व इंग्लंडच्या शत्रुराष्ट्राकडून त्यांना युद्धसाहाय्य पुरवून इंग्रजांविरुद्ध उठावणी करायची, असे या योजनेचे स्थूल स्वरूप होते. त्यासाठी गदर नावाचे एक वृत्तपत्रही चालू करण्यात आले होते. भारतातल्या सैन्याच्या पलटणीत स्वातंत्र्यचळवळीचा प्रचार करायला आलेल्या विष्णू गणेश पिंगळे या महाराष्ट्रीय क्रांतिकारकाला अनपेक्षितपणे विश्वासघाताने पकडण्यात आले व त्यानंतर लागत गेलेल्या धागयादोऱ्यांच्या साहाय्याने अन्य बऱ्याच क्रांतिकारकांची धरपकड झाली. पुढे त्यांच्यावर खटले भरले गेले व फाशी-जन्मठेपीसारख्या कठोर शिक्षा त्यांना ठोठावण्यात आल्या.

याच प्रकाराची पुनरावृत्ती लाहोर, वाराणसी, इ. अनेक ठिकाणी झाल्यामुळे तिथलेही अनेक क्रांतिकारक सरकारच्या हाती सापडले व शिक्षासत्रात भरडले गेले. तिकडे युरोपात ज्यांच्यावर विसंबून क्रांतिकारकांनी गदर आंदोलन उभारले, त्या जर्मनीसारख्य राष्ट्रांचा पराभव झाल्यामुळे तिथल्या क्रांतिकारकांचेही सारे मनोरथ धुळीला मिळाले. हरदयाळ व रासबिहारी यांनी सेना उभारली होती, सिंगापूरसारख्या ठिकाणी त्यांनी विजयही मिळविले होते. तथापि पुढे साऱ्याच घटना कल्पनेच्या उलट झाल्या व त्यामुळे हे गदर आंदोलन पूर्णपणे फसले.

भारताबाहेर या गोष्टी घडत असताना इकडे लो. टिळक मंडालेहून मुक्त होऊन भारतात परतले. त्यांच्या पाठोपाठ म. गांधीही द. आफ्रिकेतून हिंदुस्थानात आले. इ. स. १९१६ साली टिळक काँग्रेसमध्ये शिरले व त्यांनी पुनश्च नेतृत्वाची धुरा खांद्यावर घेतली. यानंतर त्यांनी होमरूलची (घरचे राज्य किंवा स्वराज्य) चळवळ उभारली व त्या निमित्ताने देशभर दौरे करून पुन्हा एकदा वातावरण स्वराज्याच्या महामंत्राने भारून टाकले. त्याचा परिणाम म्हणून सरकारने इ. स. १९१८ साली माँटेग्यू सुधारणा जाहीर केल्या. परंतु त्या अगदीच फुसक्या होत्या. टिळकांना व काँग्रेसला अपेक्षित असणाऱ्या स्वराज्याच्या कल्पनेचा त्या सुधारणांत मागमूसही नव्हता. त्यामुळे टिळकांची चळवळ चालूच राहिली.

याच वेळी रौलेट कमिटीने आपला अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात भारतातील प्रांतोप्रांती चालू असलेल्या राजद्रोही चळवळीचा आढावा घेतलेला होता. हा अहवाल प्रसिद्ध होताच त्यातील माहितीला अनुसरून अशा राजद्रोही चळवळी करणाऱ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यक्तींवर दडपशाहीचा वरवंटा फिरवणारे दोन नवे कायदे 'रौलेट ॲक्ट' या नावाने सरकारने पास करून घेतले. या कायद्यांमुळे सरकार वाटेल त्या व्यक्तीवर छलवलाचे प्रयोग करू शकणार होते. त्यामुळे हे कायदे पास होताच लोकमत एकदम प्रक्षुब्ध झाले. म. गांधींच्या नेतृत्वाखाली देशात सर्वत्र या काय-

रासबिहारी बसू

द्यांचा धिक्कार करण्यात आला. अमृतसरच्या जालियनवाला-बागेत अशीच एक धिक्कारसभा भरली असताना सरकारने तिथे बेगुमानपणे गोळीबार करून ४०० माणसे ठार मारली व हजारावर माणसे जबर जखमी केली. या हत्याकांडामुळे लोकांच्या संतापाचा कडेलोट झाला. या संतापाला कोणतेही अनुचित वळण लागू नये, यासाठी म. गांधी प्रदीर्घ परंतु शिस्तबद्ध नव्या आंदोलनाची आखणी करू लागले. एवढ्यात लो. टिळकांचे निधन झाले व भारताचे नेतृत्व म. गांधींच्या हाती आले.

इ. स. १९१५ साली म. गांधी भारतात आले, तेव्हा त्यांच्यापुढे भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या दृष्टीने पाच प्रश्न उभे होते, ते असे – (१) लोकांची नीतिमत्ता व धर्मबुद्धी यांची उंची वाढवणे, (२) सामाजिक सुधारणा करणे, (३) राजकारणात प्रतिकारासाठी वापरायची साधने निश्चित करणे, (४) क्रांतिवादाची किंवा शस्त्राचारी प्रवृत्तीची अनिष्टता लोकांना पटवून देणे, आणि (५) हिंदु-मुस्लिम ऐक्य दृढ करणे. या पाचही प्रश्नांची कार्यवाही करण्यासाठी त्यांच्या मनाने काही निश्चित योजना ठरवली. तथापि १९२० पर्यंत ते भारताचे सर्वमान्य पुढारी झाले नव्हते. यापूर्वी त्यांनी द. आफ्रिकेत सत्याग्रह व निःशस्त्र प्रतिकार या शस्त्रांचा प्रयोग यशस्वीपणे करून दाखविला होता; त्यामुळे भारतातील लोकांत त्यांच्याविषयी फक्त आदर व कुतूहल या दोनच भावना होत्या. त्यांच्या कर्तृत्वाचा अविष्कार अजून व्हायचा होता व तो होण्यासाठी संधीची आवश्यकता होती. रौलेट कायद्यांचा निषेध व पाठोपाठ घडून आलेले जालियनवालाबागेतील हत्याकांड या दोन प्रकरणात त्यांनी नेतृत्व स्वीकारून स्वतःच्या कर्तृत्वाचा प्रत्यय लोकांना आणून दिला व ते लोकांचे पुढारी बनले. त्यांच्या सत्याग्रहतंत्राची चुणूक लो. टिळकांच्या जीवनकालातच दिसून आली होती. टिळकांचे व त्यांचे या नव्या प्रतिकारमार्गाविषयी बोलणेही झाले होते आणि थोडाफार मतभेद वगळता गांधींचे ध्येयधोरण टिळकांना पसंत होते.

टिळक गेले त्या रात्रीच गांधींनी मुंबई येथे असहकाराचे रणशिंग फुंकले व देश एका नव्या ईर्षा-ऊर्मीने हालवून सोडला. गांधीजी एवढे करूनच थांबले नाहीत; त्यांनी स्वातंत्र्यलढ्याची व्याप्ती सर्वांगांनी वाढवली. स्वातंत्र्यसंपादन म्हणजे इंग्रजांची सत्ता जाऊन भारतीयांची सत्ता येणे, एवढाच मर्यादित अर्थ त्यांना अपेक्षित नव्हता. राजकीय स्वातंत्र्याबरोबर धार्मिक, आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, आध्यात्मिक, इ. अनेक बाबतींत देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच त्यांनी आंदोलनातील शुचिता व सौजन्य यांच्यावर भर दिला. शत्रूशी वागतानाही आपण असत्याने, अधर्माने व व अनीतीने वागता कामा नये, असा त्यांचा कटाक्ष होता. त्याचबरोबर इंग्रजांनी आपणास स्वातंत्र्य द्यावे, असे जर आपण म्हणतो, तर आपण त्या स्वातंत्र्याला सर्वस्वी योग्य असल्याचे आपण दाखवून दिले पाहिजे, असे त्यांचे मत होते. आपले दैन्य, दास्य व दारिद्र्य आपण झटकून टाकले पाहिजे व त्या जागी सतत स्वाभिमान व उद्योगशीलता यांची प्रस्थापना केली पाहिजे, असे ते म्हणत. भारतातले जातिभेद, पंथभेद, अस्पृश्यता, अज्ञान व अनीती यांचा प्रथम नायनाट केला पाहजे. हे होईल तेव्हाच आपल्याला स्वातंत्र्यलढ्यात यशःसिद्धी मिळेल, असे त्यांचे सांगणे असे. हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठी तर स्वजनांचा थोडा रोष ओढवून घेऊनही त्यांनी खिलाफत प्रकरणात मुसलमानांची बाजू घेतली आणि त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेण्याचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रयत्न केला. मात्र त्यात त्यांना फारसे यश लाभले नाही.

गांधीजींचे ध्येयधोरण पूर्वीच्या नेत्यांच्या ध्येयधोरणाहून पुष्कळसे वेगळे असल्यामुळे आरंभी भारतीय जनता त्यांच्याकडे आकर्षित होणे असंभवनीय होते; तथापि त्यांच्या वागण्यातले साधुत्व व सौजन्य, त्यांचा त्याग व तपस्या, त्यांचे बोलणे व त्यांच्या कामाचा झपाटा, इ. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणसमुच्चयाने त्यांनी लौकरच भारतीय जनतेवर आपला प्रभाव पाडला. लो. टिळकांनंतर त्यांच्याकडे अखिल भारतीय नेतृत्व आले, ते यामुळेच.

लो. टिळकांच्या निधनानंतर दि. ४ ते ९ सप्टें. १९२० या दिवसांत कलकत्त्याला काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्यात म. गांधींनी असहकारितेचा ठराव मांडला. या ठरावात पुढील बाबी

म. गांधी

समाविष्ट होत्या– (१) पदव्यांचा व स्थानिक संस्थांवरील सरकारनियुक्त जागांचा त्याग, (२) सरकारी समारंभ, दरबार, इत्यादींवर बहिष्कार, (३) सरकारी शाळा-महाविद्यालयांवर बहिष्कार घालून त्यांच्याऐवजी नव्या राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन करणे व त्यांत आपल्या मुला-मुलींना पाठवणे, (४) सरकारी कोर्टांवर वकिलांनी व अशिलांनी बहिष्कार टाकून आपले तंटे लवादामार्फत मिटविणे, (५) मेसापोटेमियामध्ये नोकरीकरिता जाण्यास लष्कर, कारकून व मजूर यांनी नकार देणे, (६) कायदेमंडळाच्या निवडणुकीस उभे न राहणे व मते न देणे आणि (७) ब्रिटिश मालावर बहिष्कार घालणे.

गांधीजींचा हा ठराव बरीच वादावादी होऊन अखेर पास झाला व त्यापाठोपाठ सर्वत्र त्याची कार्यवाहीही होऊ लागली. त्यामुळे इंग्रजांचे राज्ययंत्र हळूहळू खिळखिळे होऊ लागले. अर्थात अशा स्थितीत सरकार स्वस्थ राहणे शक्यच नव्हते. त्याने चळवळ दडपून टाकण्यासाठी मोठमोठ्या पुढाऱ्यांवर प्रांतबंदीचे व पर्यायाने संचारबंदीचे हुकूम बजावले. तथापि त्यामुळे चळवळ थंडावली नाही. आपण मांडलेल्या कार्यक्रमानुसार आंदोलन चालले, तर एका वर्षात स्वराज्य मिळेल, असे गांधीजींनी लोकांना जाहीरपणे सांगितले. त्यामुळे लोक एका आगळ्या उत्साहाने भारून जाऊन आंदोलन चालवू लागले. विजयवाडा येथे गांधीजींनी १ कोटी रुपयांचा टिळकस्वराज्य फंड जमविण्याचे, १ कोटी काँग्रेस सभासद नोंदण्याचे व २० लाख चरखे चालू करून खादी विणण्याचे जे आवाहन केले, त्याला लोकांतून भरघोस प्रतिसाद मिळाला. टिळक स्वराज्यफंड तर १ कोटीच्यावर आणखी १५ लाख रुपये इतका जमला. काँग्रेसचे सभासद संकल्पापेक्षा निम्मेच नोंदविले गेले; तथापि पूर्वीच्या संख्येपेक्षा ही संख्या वाढली होती. चरखे मात्र खरोखरच २० लाख चालू झाले. गांधीजींचे हे यश एवढे मोठे होते, की इंग्रजी राज्यकर्त्यांना त्यांचे भय वाटले व त्यामुळे गांधीजींचे पारिपत्य करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. तथापि गांधीजी मागे सरले नाहीत. त्यांनी लोकांना चरखे फिरवण्याचे, जातीय ऐक्य दृढ राखण्याचे, अहिंसावृत्ती पाळण्याचे व संघटित होऊन सरकारी अत्याचारापुढे न वाकण्याचे आवाहन एकसारखे चालविले होते. त्यामुळे हजारो लोकांना तुरुंगात डांबून ठेवून किंवा झडत्या, जप्त्या, मारपीट, दंडवसुली, इ. उपायांचे तांडव करूनहीं चळवळ मंदावली नाही. उलट दिवसेंदिवस तिने उग्र स्वरूप धारण केले. मध्यंतरी सरकार व जनता यांच्यांत समेट करून वातावरण शांत करावे, असा प्रयत्न काही सत्प्रवृत्त देशभक्तांनी केला; तथापि त्याचा काहीच उपयोग झाला नाही. मग गांधीजींनी सविनय कायदेभंगाचा लढा उभारण्याचे ठरविले व तसे व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांना कळवले. परंतु त्याच सुमारास उ. प्रदेशातील चौरीचुरा या गावी काही लोकांच्या प्रक्षुब्ध जमावाने तिथल्या पोलिसकचेरीवर हल्ला चढवून २१ पोलिस व फौजदार यांना जाळून टाकले. गांधीजींना असला हिंसात्मक प्रकार कधीच पसंत पडणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी आपला सविनय कायदेभंगाचा निर्धारित लढा अनपेक्षितपणे मागे घेतला; काँग्रेसच्या वर्किंग कमिटीत त्यामुळे मोठेच वादळ माजले; तथापि गांधीजी आपल्या निर्णयावर अढळ राहिले. कारण त्यांना आपल्या आंदोलनाचा पाया अत्याचारी प्रवृत्तींवर उभारायचा नव्हता. गांधीजींनी अनपेक्षितपणे लढा मागे घेतल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुळे लोकांचा जसा अवसानघात झाला, तसा सरकारचाही झाला. कारण चौरीचुऱ्याच्या अत्याचाराचे निमित्त करून सरकारला देशभर भीषण दडपशाहीचा नंगा नाच करता आला असता. उलट त्या दडपशाहीला चोख उत्तर देण्यासाठी लोकांचेही बाहू फुरफुरणार होते; परंतु गांधीजींनी या दोनही गोष्टी शिताफीने टाळल्या.

या प्रकरणामुळे गांधीजींची लोकप्रियता उतारास लागली आहे, असे समजून सरकारने त्यांना पकडले व दि. १८ मार्च १९२२ या दिवशी त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून खटला भरला. गांधीजींचे 'यंग इंडिया'तले लेख प्रक्षोभक असतात व त्यामुळे लोक अत्याचारी कृत्यांना प्रवृत्त होतात, असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले. तेव्हा गांधीजी कोर्टाला म्हणाले. 'राजद्रोह फैलावणे हे माझे कर्तव्य आहे आणि जर ते लेख कमी राजद्रोही असतील, तर तो माझ्या कच्च्या लेखणीचा दोष आहे. माझ्या श्वासोच्छ्वासातच राजद्रोह भरला आहे. त्यामुळे मला आपण जास्तीत जास्त शिक्षा द्या.'

यानंतर गांधीजींना सरकारने सहा वर्षांची शिक्षा फर्मावली. ती भोगण्यासाठी गांधीजी तुरुंगात गेल्यावर सरकारने जागोजाग दडपशाही करून उरलीसुरली चळवळ मोडून काढली.

मग उर्वरित नेत्यांनी गांधीजींच्या असहकारिता कार्यक्रमातील कौन्सिल-बहिष्काराचे तत्त्व सोडून देऊन कौन्सिलात जाण्याचे ठरविले. या मुद्यावरही काँग्रेसमध्ये वाद झाले व अखेर फेरवादी व नाफेरवादी असे काँग्रेसमध्ये दोन तट पडले. कौन्सिलप्रवेशाचा आग्रह धरणाऱ्या म्हणजे फेरवादी गटात चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, इ. लोक होते; तर त्यांच्या विरुद्ध गटात राजाजी, डॉ. अन्सारी वगैरे लोक होते. गया काँग्रेसच्या अधिवेशनात या कौन्सिलप्रवेशाच्या ठरावावर कडाक्याची चर्चा झाली व शेवटी फेरवाद्यांचा पराभव झाला. अशा रीतीने पुन्हा एकदा गांधी नसतानाही त्यांच्या मताचा विजय झाला.

यानंतर दासबाबू, मोतीलाल नेहरू, इ. नेत्यांनी स्वराज्यपक्ष काढला व पुढे निवडणुका लढवून मध्यवर्ती कायदेमंडळाच्या ४५ जागा जिंकल्या. या गोष्टीचा अन्य कार्यकर्त्यांच्या मनावर थोडाफार परिणाम झाला व कौन्सिलप्रवेशाचा आग्रह धरणाऱ्यांची संख्या वाढली. पुढे त्यासाठी काँग्रेसचे एक खास अधिवेशन भरवून कौन्सिलप्रवेश मागणाऱ्यांना तशी मुभा देण्यात आली व काँग्रेसमधील फूट सांधण्याचा प्रयत्न झाला. पण याच वेळी हिंदु-मुसलमानांतील ऐक्याला तडा गेला.

नंतर १२ फेब्रुवारी १९२४ रोजी म. गांधींना बंधमुक्त करण्यात आले. तुरुंगाबाहेर येताच चळवळ थंडावली असल्याचे त्यांच्या ध्यानी आले. स्वराज्यपक्षाने मात्र कायदेमंडळात लागोपाठ सरकारपक्षाचा पराभव करून लोकहिताचे काही ठराव पास करून घेतले, हेही त्यांना दिसून आले. म्हणून त्यांनी प्रथम स्वराज्यपक्षाच्या नेत्यांच्या भेटी घेतल्या, त्यांच्याशी विचारविनिमय करून व स्वतःच्या तत्त्वांपासून दोन पावले मागे येऊन, काँग्रेसमधील ऐक्य अभंग राखण्याचा प्रयत्न केला. त्याच वर्षाच्या शेवटी बेळगाव काँग्रेसमध्ये स्वराज्यपक्ष व काँग्रेसपक्ष यांचा पूर्णपणे समेट झाला.

इ. स. १९२५ च्या आरंभी काँग्रेसपक्षाची सर्व सूत्रे गांधींकडून स्वराज्यपक्षाकडे म्हणजे दासबाबू, मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल व लाला लजपतराय या प्रमुख नेत्यांकडे आली.

लाला लजपतराय

परंतु दि. १५ जून १९२५ ला दासबाबू वारले आणि उरलेल्या नेत्यांना स्वराज्यपक्षही सांभाळता आला नाही व काँग्रेसवर प्रभुत्वही संपादन करता आले नाही. त्यामुळे पुन्हा गांधीजीच सर्वमान्य नेते झाले.

गांधीजींच्या नेतृत्वावर नाखूष असणारे पुढारी काँग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी हिंदुमहासभेची स्थापना केली. गांधीजींच्या मुस्लिमधार्जिणेपणाला तसेच मुसलमानांच्या मुजोरीला पायबंद घालण्याचे या नव्या पक्षाचे धोरण होते. या पक्षात पं. मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय, तात्यासाहेब केळकर, डॉ. मुंजे, बॅ. जयकर, इ. नेते होते.

इ. स. १९२४ सालापासून पुढील चार-पाच वर्षे सातत्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिंदु-मुसलमानांचे दंगे होत राहिले. त्यामुळे स्वराज्याची चळवळ काही केल्या पुढे सरकेना. वारंवार केलेले समझोते वारंवार मोडले जाऊ लागले. सगळ्या देशातच एक प्रकारचे अराजक माजले. गांधीजींच्या प्रतापी नेतृत्वाखाली एकसारखे लढे लढवूनही इंग्रजांची देशावरची पकड जराही ढिली होत नाही, असे पाहिल्यावर प्रांतोप्रांतीच्या भारतीय क्रांतिकारकांनी पुन्हा एकदा सशस्त्र उठावांना प्रारंभ केला. या नव्या उठावाचे नेतृत्व सर्वश्री चंद्रशेखर आझाद, सरदार भगतसिंग, शचींद्रनाथ संन्याल, इ. तरुणांकडे होते. त्यांनी आगगाड्या उलथण्याचा, खजिने लुटण्याचा, बाँबस्फोट करण्याचा, तारा तोडण्याचा आणि इंग्रज अधिकाऱ्यांना ठार मारण्याचा सपाटा लावला.

चंद्रशेखर आझाद

दि. ३ फेब्रुवारी १९२८ या दिवशी सायमनसाहेबाच्या नेतृत्वाखाली एक कमिशन भारतात आले. त्यात एकही भारतीय माणूस नव्हता आणि तरीही हे कमिशन भारतीयांना कोणत्या सुधारणा मिळाव्या, याची पाहणी करण्यासाठी आले होते. त्यामुळे काँग्रेसने त्या कमिशनवर बहिष्कार घालण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे सायमन कमिशनचे सर्वत्र काळ्या निशाणांनी स्वागत झाले. मग सरकार चवताळले. त्याने निःशस्त्र लोकांच्या मिरवणुकांवर लाठीमार, गोळीबार केले व अश्रुधूर सोडले. लाहोरला लाला लजपतरायांवर झालेल्या जबर लाठीमारामुळे ते मरण पावले. त्याचा सूड सरदार भगतसिंगांनी सँढर्स्ट या युरोपियन अधिकाऱ्याला ठार मारून उगवला. त्यानंतर भगतसिंग व त्याचे सहकारी पकडले गेले व त्यांच्यावर खटला भरण्यात आला. शिक्षेनंतर भगतसिंग, सुखदेव व राजगुरू हे फाशी गेले व अन्य क्रांतिकारकांना तुरुंगात पाठविण्यात आले.

मध्यंतरीच्या काळात गुजरातमधील बार्डोली तालुक्यात सरकारने शेतसारा वाढविला. त्याच्या निषेधार्थ सारावंदीची चळवळ सुरू झाली. सरदार वल्लभभाईंनी या चळवळीचे नेतृत्व केले व तो लढा यशस्वी करून दाखवला. या व यासारख्या बारीक सारीक लढ्यांनी सर्वत्र पुन्हा नवचैतन्य दिसू लागले. याच वेळी नेहरूरिपोर्ट प्रसिद्ध झाला व त्यात म्हटल्याप्रमाणे 'वसाहतीचे स्वराज्य' हे काँग्रेसचे ध्येय ठरवण्यात आले. या 'वसाहतीच्या स्वराज्या'च्या कल्पनेला सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू, इ. तरुण नेत्यांचा प्रखर विरोध होता; तथापि त्या वेळी तो त्यांनी नुसताच बोलून दाखवला व आपल्या मताचे लोक वाढविण्याकडे आपली सर्व शक्ती केंद्रित केली.

दि. ३१ डिसेंबर १९२९ रोजी रात्री १२ वाजता लाहोरच्या काँग्रेसच्या व्यासपीठावरून पं. जवाहरलाल नेहरूंनी संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली व काँग्रेसने लढ्याचे रणशिंग फुंकले.

दि. २६ जानेवारी १९३० रोजी भारतात संपूर्ण स्वातंत्र्याच्या संग्रामाला प्रारंभ झाला. त्या दिवशी देशात सर्वत्र मिरवणुका निघाल्या व स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचे वाचन करण्यात आले. त्या प्रतिज्ञेचा सारांश असा–

"स्वातंत्र्य हा हिंदी लोकांचा, कोणीही हिरावून घेऊ न शकेल असा हक्क आहे. ब्रिटिशांनी आमचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे; एवढेच नव्हे तर त्यांनी आमचे शोषण करून आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व पौरुषाच्या दृष्टीने आमचा नाश केला आहे. म्हणून हिंदुस्थानने त्यांचा संबंध तोडला पाहिजे व पूर्ण स्वराज्य स्थापले पाहिजे.

आर्थिकदृष्ट्या आम्हांला इतके कंगाल केले गेले आहे, की आमचे रोजचे सरासरी माणशी उत्पन्न ७ पैसे आहे आणि सरकारी उत्पन्नापैकी वीस टक्के शेतसाऱ्याचे उत्पन्न आहे व तीन टक्के मिठावरील कराचे उत्पन्न आहे. हा कराचा बोजा गरीब लोकांवरच पडतो. सरकारने आमचे ग्रामीण उद्योगधंदे मारून टाकले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजकीय दृष्ट्या जगात आम्हांला किंमत नाही. आम्हांला राजकीय सत्तेकरता सुधारणा दिल्या जात नाहीत. आमची बुद्धिमत्ता मारून टाकली गेली आहे व आम्हांला पाटील, तलाठी आणि कारकून बनवले गेले आहे.

सांस्कृतिक दृष्ट्या आम्हांला दिले जाणारे शिक्षण गुलामगिरीवरच प्रेम करण्यास शिकवते.

पौरुषाच्या दृष्टीनें आम्हांला नि:शस्त्र करून भेकड व प्रतिकाराला असमर्थ केले आहे. त्यामुळे परकीय आक्रमणाचे तर राहोच, पण चोरा-दरवडेखोरांपासूनही आम्ही स्वत:चे रक्षण करू शकत नाही.

असे राज्य चालू देणे हा माणसाविरुद्ध व ईश्वराविरुद्ध गुन्हा आहे. आम्ही अहिंसेने या राज्याला प्रतिकार करणार आहो. संपूर्ण स्वातंत्र्य स्थापण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहो. त्याकरिता काँग्रेसचा आदेश आम्ही पाळू."

या प्रतिज्ञेतली भाषा इतकी सोपी पण इतकी ठाशीव होती, की तिचा अर्थ खेड्यापाड्यांतील अज्ञानी व अशिक्षित जनतेलाही समजला व त्यामुळे सारा भारत खडबडून उठला.

यानंतर गांधीजींनी कायदेभंगाचा लढा जाहीर केला व त्यानुसार प्रथम मिठावरील कर रद्द व्हावा, म्हणून 'मिठाचा सत्याग्रह' करण्याचे ठरविले. या योजनेत 'कोणीही देशभक्ताने समुद्रातल्या पाण्यापासून मीठ बनवावे व त्यासाठी सरकारने केलेल्या दडपशाहीला भीक घालू नये,' असा आदेश होता. गांधीजींनी स्वत: २ मार्च १९३० रोजी व्हाइसरॉय लॉर्ड आर्यविन यांना एक पत्र पाठवून कायदेभंगाच्या या लढ्याची सविस्तर योजना कळवली व १२ मार्च १९३० या दिवशी ते साबरमती आश्रमातून दांडीयात्रेला जाण्यासाठी बाहेर पडले. दि. ५ एप्रिलला गांधीजी आपल्या ७९ सहकाऱ्यांसह दांडी गावी पोचले व तिथे त्यांनी बेकायदेशीर रीत्या मीठ बनवण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या अनुकरणाने दुसऱ्या दिवसापासून देशात सर्वत्र मिठाचा सत्याग्रह सुरू झाला. या सत्याग्रहात गांधीजींना सरकारने पकडले नाही. मग लोकांनी जिथे मीठ बनत नाही, तिथली ताडीची झाडे तोडण्याचा उपक्रम सुरू केला. त्यामुळे लढा दिवसेंदिवस उग्र बनत चालला. शेवटी दि. ५ मे १९३० च्या रात्री सरकारने गांधीजींना पकडले व गुपचुपपणे येरवड्याच्या तुरुंगात पोचते केले.



जवाहरलाल नेहरू

गांधीजींच्या अटकेची वार्ता ऐकताच लोकांनी स्वयंस्फूर्तीने हरताळ पाळले व नंतर सर्वत्र सभा, मिरवणुका, सत्याग्रह यांची रणधुमाळी चालू झाली. याला उत्तर म्हणून सरकारनेही लाठीमार, गोळीबार, मारपीट, धरपकड, इ. उपाय जारी केले. त्यांतून काही ठिकाणी शस्त्राचारी चळवळीही उद्भवल्या. महाराष्ट्रात सोलापूर या गावी दडपशाहीमुळे चिडलेल्या लोकांचा एक जमाव खवळला आणि त्यांनी पोलिसचौकीत शिरून आतील पोलिसांना जाळून टाकले. त्यानंतर तिथे मार्शल लॉ पुकारण्यात आला आणि मल्लप्पा धनशेट्टी, सारडा, शिंदे व कुर्बान हुसेन या देशभक्तांना पकडून फासावर लटकावण्यात आले.

सुमारे अडीच-तीन महिनेपर्यंत हा कायदेभंगाचा लढा चालू होता. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातले हे ऊर्जस्वल पर्व होते. या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लढ्यात एकूण सव्वाशे लोक धारातीर्थी पडले, पाचशेच्या आसपास जखमी झाले व लाखाच्या वर तुरुंगात गेले. याशिवाय, गुन्हा करूनही न पकडले गेलेल्यांची संख्या याच्या वीसपट असावी. यावरून या लढ्याच्या अभूतपूर्वतेची कल्पना येईल.

काँग्रेसचे नेते तुरुंगात असतानाच १२ नोव्हेंबर १९३० रोजी लंडनला पहिली गोलमेज परिषद भरली. तिला ब्रिटिश हिंदुस्थानचे ५७, संस्थानिकांचे १६ व कायदेमंडळातील विविध पक्षांचे १३ असे एकूण ८६ सभासद उपस्थित राहिले. भारतातल्या प्रतिदिनी चिघळत जाणाऱ्या परिस्थितीवर तातडीचीं उपाययोजना म्हणून काय करता येईल व कोणत्या सुधारणा देऊन संघर्ष टाळता येईल, याचा विचार करणे, हा त्या परिषदेचा प्रमुख उद्देश होता. परंतु गांधीजींसह सारे काँग्रेसनेते तुरुंगात असल्यामुळे या परिषदेला विशेष महत्त्व नव्हते. तथापि पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी या परिषदेच्या समारोपाचे भाषण करताना सांगितले– ‘ हिंदुस्थानसरकारची जबाबदारी मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळे यांच्यावर सोपवावी. ती सोपवताना संक्रमणकाळात संरक्षण व विदेशव्यवहार ही खाती राखीव असावी. अल्पसंख्याकांना राजकीय स्वातंत्र्य व त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी ते मागतील ती ग्वाही द्यावी. संक्रमण काळात काही संरक्षणविभाग सरकारच्या हाती ठेवावे; पण ते प्रगतीला पोषक असावे. ’

वल्लभभाई पटेल

पंतप्रधानांचे हे भाषण म्हणजे गोलमेज परिषदेची फलश्रुती होती. त्यात बऱ्याच चांगल्या सुधारणा सूचित होत्या. अर्थात अल्पसंख्यांकांना खास स्थान देऊन पुन्हा फोडाझोडीची मेखही त्यात होतीच; तथापि योजनेचे एकूण स्वरूप विचारणीय होते. त्यामुळेच सप्रू व जयकर या प्रागतिक पुढाऱ्यांनी काँग्रेसनेत्यांना या योजनेचा विचार करण्याचे व कोणताही निर्णय घाईने न घेण्याचे आवाहन केले. काँग्रेसनेत्यांनी ते मानले नाही; परंतु दि. २१ जानेवारी १९३१ ला अलाहाबाद मुक्कामी काँग्रेस वर्किंग कमिटीने राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षतेखाली सभा भरवून या योजनेवर स्थूल मानाने विचार केला व २६ जानेवारी हा स्वातंत्र्य-दिन धूमधडाक्याने साजरा करण्याचा लोकांना आदेश दिला. त्यामुळे सरकारला प्रथम गांधीजींसह सर्व थोर नेत्यांच्या मुक्ततेची आज्ञा काढून वातावरण मोकळे करावे लागले.

दि. २६ जानेवारी १९३१ ला गांधीजी सुटले व ३१ जानेवारीला अलाहाबादच्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीला उपस्थित राहिले. तिथे कायदेभंग किंवा दारू व परदेशी कापड यांवरील निरोधने चालूच राहतील, असे जाहीर करण्यात आले. यानंतर गांधीजी दिल्लीला गेले. तिथे त्यांची लॉर्ड आयर्विनसाहेबांशी भेट झाली व उभयतांत गोलमेज परिषदेतील योजनांवर आधारित्त विषयासंबंधी करार झाला. त्यात एकूण २१ कलमे होती. गांधीजींनी कायदेभंग थांबवावा व सनदशीर राज्यपद्धती स्वीकारावी, एवढाच भाग त्यात महत्त्वाचा होता. गांधीजींनी त्याला मान्यता दिली. यानंतर पुन्हा भरणाऱ्या गोलमेज परिषदेला त्यांनी उपस्थित राहावे, असे ठरले. परंतु मध्यंतरीच्या काळात आर्यविन बदलून गेले व त्यांच्या जागी आलेल्या विलिंग्डनसाहेबांनी गांधी–आर्यविन करार मोडण्याचाच चंग बांधला. त्यामुळे पुन्हा लढा अपरिहार्य ठरला. तथापि शेवटचा प्रयत्न म्हणून गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेले; परंतु तिथे त्यांना म्हणण्यासारखे यश आले नाही व ‘लढा अटळ आहे’ असे म्हणत ते परत फिरले. इकडे सरकारने प्रांतोप्रांती दडपशाही चालूच ठेवली होती. गांधीजी भारतात आल्याबरोबर त्यांनी पुन्हा कायदेभंगाचा लढा पुकारला. त्यात त्यांनी करबंदीचाही समावेश केला. त्यामुळे लढ्याचे स्वरूप उग्र झाले. सरकार व लोक यांचे मुळी युद्धच जुंपले. सरकारने सारी शक्ती एकत्र करून चळवळ दडपून टाकण्यासाठी भीषण मार्गांची अंमलबजावणी आरंभली, तर उलट लोकांनीही त्वेषाने व आवेशाने लढा यशस्वी करण्याचा चंग बांधला.

दि. ४ जानेवारी १९३२ रोजी म. गांधींना पकडण्यात आले. त्यांच्या बंदिवासातच रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून चळवळीत फूट पाडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गांधीजींनी इतर सर्व गोष्टींवरून लक्ष काढून घेऊन या निवाड्याला विरोध केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले व येरवडा तुरुंगात डॉ. आंबेडकरांशी करारही केला. दि. ८ मे १९३३ रोजी म. गांधींची येरवड्यातून मुक्तता झाली; परंतु बाहेर येताच त्यांनी वैयक्तिक कायदेभंगाची चळवळ जाहीर केली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुळे त्यांना पुन्हा पकडण्यात आले. तुरुंगात त्यांनी उपास सुरू केला, त्यामुळे त्यांची प्रकृती विघडली आणि मग दि. २३ ऑगस्टला सरकारला त्यांना मुक्त करावे लागले.

यानंतरची २–४ वर्षे अत्यंत धामधुमीची गेली. सरकार व काँग्रेसनेते यांच्यांत एकाच वेळी राजनैतिक वाटाघाटी व लढा असे दुहेरी कार्यक्रम सुरू होते. लोकांची चळवळ व सरकारची दडपशाही चालूच होती. त्यातच हिंदु-मुस्लिम प्रश्न अधिकाधिक चिघळत चालला होता. युरोपात महायुद्धाचे ढग जमत होते आणि काँग्रेसमध्ये गांधी-सुभाष यांचे मतभेद विकोपाला जात होते. अशा धामधुमीच्या काळातच १९३७ च्या आरंभी प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या व सात प्रांतांत काँग्रेसची मंत्रीमंडळे अधिकारावर आली.

पुढे लौकरच दुसरे महायुद्ध सुरू झाले. सरकारने हिंदुस्थानात मोठ्या संख्येने लष्करभरती सुरू केली. तिला काँग्रेसने विरोध

स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर

केला. अगोदर स्वराज्य द्या, मग सैनिकी साहाय्य देतो, अशी काँग्रेसने भूमिका घेतली.

हिंदुमहासभेने मात्र स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नेतृत्वाखाली या लष्करभरतीला प्रतिसाद दिला. येन केन प्रकारेण हाती शस्त्रे घेऊन व सैनिकी शिक्षण मिळवून महायुद्धाच्या ऐन रंगात ब्रिटनशी सैनिकी युद्ध पुकारावे, अशी त्यामागची सावरकरांची कल्पना होती. त्यासाठीच ते पहिल्या महायुद्धातील क्रांतिकारकांचे अध्वर्यू रासविहारी वसू यांच्याशी एकसारखा संपर्क साधीत होते. लौकरच सुभाषबाबूंची व त्यांची भेट झाली. या भेटीत सावरकरांनी आपले मनोगत व लष्करभरतीला हिंदुसभा करीत असलेल्या मदतीचे रहस्य त्यांच्या कानी घातले. त्या योजनेला योग्य तो प्रतिसाद देण्यासाठी सुभाषबाबू १९४० च्या जानेवारीत एकाएकी अदृश्य झाले आणि त्यांनी काबूलमार्गे जर्मनीला जाऊन हिटलरशी संधान बांधले. हिटलर, मुसोलिनी व टोजो यांच्याशी क्रमाक्रमाने संपर्क जुळवीत शेवटी त्यांनी जपानमध्ये आपली नवी आझाद हिंद सेना उभारली. या कामी त्यांना रासबिहारी बसूंचे व ब्रिटिशांच्या सैन्यात भरती झालेल्या हिंदी सैनिकांचे साहाय्य मिळाले.

इकडे काँग्रेसनेही १९४२ च्या ऑगस्टमध्ये मुंबई मुक्कामी अंतिम स्वातंत्र्यसंग्रामाचे रणशिंग फुंकले. सबंध देशभर त्या वेळी एक अभूतपूर्व जागृती झाली होती व आंदोलन मोठ्या प्रमाणावर भडकणार असा रंग दिसत होता. त्यामुळे सरकारने ऑगस्ट क्रांतीचा ठराव होण्याच्या दिवशीच पहाटे सर्व उच्च श्रेणीच्या काँग्रेस नेत्यांना तुरुंगात डांबले. याचा परिणाम अत्यंत विपरीत झाला. मोठ्या नेत्यांचे मार्गदर्शन जनतेला न मिळाल्यामुळे दुय्यम नेते पुढे सरसावले व त्यांनी 'करेंगे या मरेंगे' अशी घोषणा देऊन चळवळीचा आगडोंब उसळू दिला. सत्याग्रह, निःशस्त्र प्रतिकार यांच्या बरोबर सशस्त्र आंदोलनालाही उधाण आले. सर्वत्र हरताळ, बहिष्कार, मोर्चे यांची धुमश्चक्री उडाली. सर्वश्री अच्युत पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, शिरूभाऊ लिमये, एस्. एम्. जोशी, इ. समाजवादी नेत्यांनी सरकारला 'दे माय धरणी ठाय' करून टाकले. माथेरानच्या डोंगरावर भाई कोतवालांनी सशस्त्र संग्रामाची परमावधी केली, तर सातारा जिल्ह्यात नाना पाटलांनी साक्षात प्रतिसरकार स्थापन केले. तारायंत्रे तोडणे, रेल्वे स्टेशन व पोस्ट ऑफिस लुटणे, सरकारी कार्यालय जाळणे, युरोपियन व्यक्तींवर हल्ले चढवणे, इ. कृत्यांना ऊत आला. सरकारने दडपशाहीचा कहर करूनही चळवळ रोखली जाईना. तिकडे युरोपातल्या युद्धात इंग्रज सरकारला हिटलरी सैन्यापुढे जबरदस्त मार खावा लागला. सुभाषबाबू तर जपानी सरकारच्या सहकार्याने भारताच्या पूर्व द्वारापर्यंत येऊन ठेपले व त्यांनी आपल्या सेनेला दिल्लीवर हल्ला चढवण्याचा आदेश दिला. आझाद सैनिकांची भारताच्या दिशेने आगेकूच सुरू झाली. (बोस, नेताजी सुभाष-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंद्र पाहा)

सुदैवाने या वेळी युरोपातल्या युद्धात दोस्त राष्ट्रांचा म्हणजे अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स यांचा विजय झाला व त्यामुळे इंग्रजांना

नेताजी सुभाषचंद्र बोस

थोडा श्वास घेण्याला फुरसद मिळाली. तथापि आता त्यांची मुजोरी ओसरली होती. वाटेल त्या परिस्थितीत भारताला स्वातंत्र्य दिलेच पाहिजे, अशी वेळ आली होती. म्हणून इंग्रजी मुत्सद्यांची पावले त्या दिशेने पडू लागली व त्यासाठी प्रथम सरकारने कॉंग्रेसनेत्यांची मुक्तता केली.

या वेळी बॅ. जीनांनी आपली पाकिस्तानची मागणी मोठ्या नेटाने पुढे आणली. त्यासाठी बंगालात व पंजाबात मोठ्या प्रमाणावर हिंदूंच्या कत्तलीही करवल्या. जीनांच्या या हट्टाग्रहातून मुक्त होण्यासाठी कॉंग्रेसनेत्यांनी गांधीजींचा विरोध असतानाही माउंटबॅटन साहेबांच्या भारतविभाजनाच्या योजनेला संमती दिली. आणि अखेर ३ जून १९४७ साली भारताच्या भूमीवर हिंदुस्थान व पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे उभारली गेल्याचे जाहीर झाले.

यानंतर या घोषणेची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाली. शेवटी पंजाब, बंगाल, बिहार, इ. भागात हिंदु-मुसलमानांच्या कत्तली होत असतानाच, त्या भीषण पार्श्वभूमीवर दि. १४ ऑगस्ट रोजी पाकिस्तान व १५ ऑगस्ट रोजी हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या जोखडातून स्वतंत्र झाला.

भारतीय राज्यघटना – इ. स. १९५० साली २६ जानेवारी रोजी भारताने आपल्या स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्राची राज्यघटना बनवून ती देशाला लागू केली. भारतीय नेत्यांना लोकशाही-प्रधान प्रजासत्ताक राज्य निर्माण करायचे होते. जात, वंश, लिंग, धर्म वगैरेंचा विचार न करता प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रीय जीवनात समान हक्क द्यायचे होते. त्यामुळे वयात आलेल्या प्रत्येक स्त्री–पुरुषाला मताचा हक्क, समान संधी, समान नोकऱ्या व समान पगार मिळण्याची घटनेत तरतूद केलेली आहे. रूढ धर्मांच्या अतीत असे एक राष्ट्र निर्माण करणे, हे या घटनेचे प्राणभूत तत्त्व आहे. या घटनेला जातिभेद व धर्मभेद मान्य नाहीत. अस्पृश्यतेचा तर तिने धिक्कारच केला आहे आणि घटनेत त्याविषयी नियमही बनविले आहेत. जगातील अनेक राष्ट्रांचे कायदे विचारात घेऊन आणि त्यांतील दोष व उणिवा काढून टाकून ही घटना तयार करण्यात आली आहे. घटनेच्या प्रारंभीच जो सरनामा उद्घोषित केला आहे, तो असा –

आम्ही भारताची जनता, भारताचे एक सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक (गण) राज्य निर्माण करण्याचे प्रतिज्ञापूर्वक ठरवून आणि भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय; विचार, उच्चार, समजुती, श्रद्धा आणि पूजा यांचे स्वातंत्र्य; दर्जा आणि संधी यांची समानता ही प्राप्त व्हावी म्हणून आणि राष्ट्राचे ऐक्य आणि व्यक्तीची प्रतिष्ठा यासंबंधी भरंवसा देऊन त्यांच्यामध्ये भ्रातृभाव वाढावा याकरिता आमच्या या घटनापरिषदेमध्ये सन १९४९ च्या नोव्हेंबर महिन्याच्या २६ तारखेस ही घटना मान्य करीत आहो व तत्संबंधी कायदा करून आपली म्हणून तिचा स्वीकार करीत आहो.

घटनेतील काही मूलभूत गोष्टी अशा – संघ आणि त्याचे प्रदेश या स्वरूपात घटनेमध्ये भारताची रचना केलेली आहे व त्यातली पुढील तीन कलमे महत्त्वाची आहेत –

(१) भारत हा राज्यांचा एक संघ होईल.

(२) या संघाची राज्ये आणि प्रदेश हे पहिल्या परिशिष्टात निर्दिष्ट केलेली राज्ये आणि प्रदेश असतील.

(३) भारताचे क्षेत्र पुढीलप्रमाणे असेल – (अ) राज्यांचे प्रदेश; (ब) पहिल्या परिशिष्टात निर्दिष्ट केलेले संघप्रदेश; आणि (क) जे प्रदेश संपादन केले जातील ते.

भारतीय नागरिकत्वाविषयी नियम केले आहेत, ते असे –

या घटनेच्या प्रारंभी ज्याचे भारतात वास्तव्य असेल आणि (अ) जो भारतात जन्माला आला असेल, किंवा (ब) ज्याच्या आईबापांपैकी एकजण भारतात जन्माला आला असेल, किंवा (क) ही घटना सुरू होण्याच्या पूर्वी निदान पाच वर्षे तरी जो सामान्यतः भारताचा रहिवासी असेल, तो भारताचा नागरिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समजला जाईल.

भारताच्या सर्व नागरिकांना पुढे नमूद केलेले हक्क असतील— (अ) भाषणाचे व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य, (ब) शांततेने व शस्त्राशिवाय एकत्र। जमणे, (क) संस्था व संघ बनविणे, (इ) भारताच्या प्रदेशात पूर्ण मोकळिकेने संचार करणे, (ई) भारताच्या प्रदेशात कुठेही राहणे अगर कायम वास्तव्य करणे, (फ) संपत्ती संपादन करणे, धारण करणे व तिची वासलात लावणे आणि (ग) कोणताही व्यवसाय करणे किंवा रोजगार, व्यापार अगर धंदा करणे.

धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क — याविषयी मुख्य नियम — सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता, स्वास्थ्य आणि या संबंधातील इतर तजविजी यांना बाधक नसणाऱ्या बाबतीत सर्व व्यक्तींना आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीप्रमाणे वागण्याचे समान हक्क आहेत आणि धर्माचा उच्चार, आचार आणि प्रचार अनिर्बंधपणे करण्याचा हक्क आहे.

राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या कार्यकारी सत्तेविषयी व निवडणुकीविषयी काही प्रमुख नियम असे —

(१) भारताचे एक राष्ट्रपती असतील.

(२) संघाची कार्यकारी सत्ता राष्ट्रपतींना देण्यात येईल. ते त्या सत्तेचा वापर या घटनेनुसार प्रत्यक्ष अगर त्यांना दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत करतील.

(३) राष्ट्रपतीची निवडणूक पुढील निवडणूक मंडळाच्या सभासदांकडून होईल —

(अ) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांचे निवडून आलेले सभासद व (ब) राज्यांच्या विधानसभेतील (असेंब्लीतील) निवडून आलेले सभासद.

राष्ट्रपतींचे मंत्रिमंडळ —

(१) राष्ट्रपतींना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी मुख्य प्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल.

(२) मुख्य प्रधानाची नेमणूक राष्ट्रपती करतील आणि इतर मंत्र्यांची नेमणूकही मुख्य प्रधानाच्या सल्ल्याने राष्ट्रपतीच करतील.

(३) राष्ट्रपतींची मर्जी असेतोपर्यंत हे मंत्री अधिकारपदावर राहतील.

(४) मंत्रिमंडळ हे संयुक्तपणे लोकसभागृहाला जबाबदार राहील.

संसद — ही पुढीलप्रमाणे बनेल — भारतीय संघराज्याला एक संसद (पार्लमेंट) असेल. त्यात राष्ट्रपती आणि राज्यसभा (कौन्सिल ऑफ् स्टेट्स) व लोकसभा (हाऊस ऑफ् दि पीपल) या नावाने संबोधलेली दोन सभागृहे असतील.

राज्यसभा पुढील सभासदांची असेल — (अ) राष्ट्रपतींनी नेमलेले बारा सभासद आणि (ब) २३८ पेक्षा जास्त नसलेले राज्यांचे व संघप्रदेशांचे प्रतिनिधी.

लोकसभा पुढीलप्रमाणे बनेल — (अ) राज्यांतील प्रादेशिक मतदारसंघांतून प्रत्यक्ष निवडणुकांनी निवडून आलेले ५०० पेक्षा जास्त नसलेले सभासद आणि (ब) संसद कायदा करून ठरवील त्याप्रमाणे संघप्रदेशांतून निवडलेले २० पेक्षा जास्त नसलेले सभासद.

भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभासद असतील.

न्यायखाते — भारताचे एक उच्चतम न्यायालय असेल. त्यात मुख्य न्यायाधीश आणि पार्लमेंटने अधिक संख्या ठरवीपर्यंत सातापेक्षा जास्त इतर न्यायाधीश नसतील.

राज्यांचे कार्यकारीमंडळ पुढीलप्रमाणे असेल —

(१) प्रत्येक राज्याला एक राज्यपाल असेल.

(२) राज्यपालांना त्यांच्या कार्यात सल्ला देण्यासाठी व मदत करण्यासाठी मुख्य मंत्र्याच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल. फक्त या घटनेने अगर या घटनेखाली जे कार्य अगर जी कार्ये स्वतःच्या विवेचक बुद्धीने त्याला करायची असतील, त्यांपुरता हा सल्ला व मदत घेतली जाणार नाही.

(३) मुख्य मंत्र्याची नेमणूक राज्यपाल करील आणि इतर मंत्र्यांची नेमणूक मुख्य मंत्र्यांच्या सल्ल्याने राज्यपाल करील. ते मंत्री राज्यपालाची मर्जी असेतोपर्यंत अधिकारावर राहतील.

प्रत्येक राज्याला एक विधिमंडळ असेल. काही मोठ्या राज्यांना विधान परिषद असेल.

प्रत्येक राज्याला एक उच्च न्यायालय असेल.

संघप्रदेश — पार्लमेंटने कायदा करून अन्यथा तरतूद केली नसल्यास प्रत्येक संघप्रदेश हा राष्ट्रपतीकडून अनुशासला जाईल. राष्ट्रपती हे त्यांनी स्वतः नेमलेल्या अनुशासकामार्फत त्यांना योग्य वाटेल त्या मर्यादेपर्यंत कारभार करतील. त्या अनुशासकाचा हुद्दा त्यांनीच निर्दिष्ट करायचा आहे.

भारतीय संघराज्याची भाषा देवनागरी लिपीतील हिंदी असेल. राज्याचे विधिमंडळ कायदा करून, राज्यात प्रचलित असलेल्या एका किंवा अधिक भाषांना किंवा हिंदीला त्या राज्याच्या सरकारी कामकाजाकरिता, भाषा किंवा अनेक भाषा म्हणून मान्यता देऊ शकेल.

आणीबाणीची परिस्थिती — युद्धामुळे किंवा बाहेरील आक्रमणामुळे किंवा अंतर्गत अशांततेमुळे भारताच्या किंवा भारतातील एखाद्या प्रदेशाच्या संरक्षणाला धोका आणणारी गंभीर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे, अशी राष्ट्रपतींची खात्री झाल्यास ते एक जाहीरनामा काढून त्या अर्थाच्या आणीबाणीची घोषणा करतील.

भारतीय राज्यघटना राष्ट्राला लागू करण्याच्या प्रसंगी घटनासमितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद व घटनेच्या मसुदासमितीचे अध्यक्ष डॉ. भीमराव आंबेडकर यांनी जी भाषणे केली, ती फार मोलाची व भारतीय जनतेला सदैव मार्गदर्शक ठरतील अशी आहेत. त्यांपैकी महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे–

डॉ. राजेंद्रप्रसाद – या घटनेचे मोठे आकर्षण म्हणजे प्रजाराज्याची प्राणप्रतिष्ठा. दोन हजार वर्षांपूर्वी या भारतवर्षात प्रजाराज्ये होती, पण ती छोटी छोटी होती. आता आपल्यापुढे जे प्रजाराज्य अवतीर्ण होत आहे, तसे पूर्वी केव्हाच नव्हते. या

डॉ. राजेंद्रप्रसाद

प्रजाराज्याचा अध्यक्ष लोकनियुक्त असेल. भारताच्या एवढ्या विशाल भागावर लोकनियुक्त प्रमुखाने कधीच शासन केले नाही. जगातील महाप्रबळ राष्ट्रांपैकी एक असे या भारतीय प्रजाराज्याचे स्वरूप आहे. त्यांतही विशेष हे, की भारतातील गरिबांतील गरीब आणि हलक्यातला हलक्या नागरिकालासुद्धा अध्यक्ष होण्याची संधी प्रथमच लाभत आहे.

सर्व देशाच्या कारभारात एकच एक भाषा असावी, असे आपण प्रथमच ठरवीत आहो. तीच राष्ट्रभाषा व्हावी आणि तिजबद्दल सर्वांना समान अभिमान वाटावा, अशी माझी इच्छा आहे. राष्ट्रभाषा व राज्यभाषा म्हणून हिंदीचा विकास झाला, तरी प्रत्येक विभागाला आपली परंपरा प्रतिबिंबित करणारी आपली विशिष्ट भाषा वाढीस लावण्याचे स्वातंत्र्य राहील. किंबहुना त्या कामी उत्तेजनही मिळेल.

ज्यांनी भूतकाळात राष्ट्राची सेवा केली, त्यांनी आता आपले काम संपले, आता फक्त आपल्या श्रमाची फळे चाखण्याचा काळ आलेला आहे, असे म्हणून स्वस्थ बसू नये. पूर्वीच्या स्वातंत्र्ययुद्धापेक्षाही अधिक बिकट कार्य आपल्यापुढे आहे. पूर्वी सत्तेसाठी भांडणे नव्हती, आता मोहाची व कलहाची स्थाने विपुल आहेत. ती टाळून आपण आपल्या स्वतंत्र मायभूमीची सेवा करण्यास पात्र ठरू या.

स्वातंत्र्यसंपादनाच्या कामी साधनांची शुद्धता ठेवण्यावर म. गांधींनी भर दिला होता. साधनशुद्धीचे महत्त्व पूर्वीइतकेच आताही आहे. आपल्या प्रजाराज्याचा कारभार आपण निष्ठेने, सत्याने, अहिंसेने, आत्मविश्वासाने आणि ईश्वरावरील श्रद्धेने चालवू या. जय हिंद.

डॉ. आंबेडकर – २६ जानेवारीपासून भारत लोकशाही प्रजासत्ताक होईल. म्हणजे त्या दिवसापासून जनतेसाठी, जनतेने केलेले, जनतेचे राज्य सुरू होईल. आपल्याला जर खरोखर लोकशाहीचे स्वरूप आणि तिचा गाभा हवा असेल, तर आपण आपली सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे साधण्यासाठी सनदशीर मार्गांनाच घट्ट चिकटून बसले पाहिजे. याचा अर्थ आपण क्रांतीचे हिंसात्मक मार्ग कटाक्षाने टाळले पाहिजेत. ज्या ठिकाणी सनदशीर मार्ग सर्वतोपरी खुले आहेत, त्या ठिकाणच्या बेसनदशीर मार्गांचे कोणत्याही प्रकारे समर्थन करता येणार नाही.

स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तीन तत्त्वे वेगवेगळी नाहीत. त्या तिघांची मिळून एक त्रिगुणात्मक मूर्ती आहे. स्वातंत्र्य समतेपासून वेगळे करता येणार नाही व समतेची स्वातंत्र्यापासून फारकत होऊ शकणार नाही. तसेच स्वातंत्र्य व समता यांची बंधुतेपासूनही ताटातूट करता येणार नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य, म्हणजे बहुसंख्याकांवर अल्पसंख्यांकांचे प्रभुत्व होय. स्वातंत्र्याशिवाय जर नुसतीच समता असेल, तर ती वैयक्तिक कर्तृत्वशक्ती नाहीशी करू शकेल आणि बंधुभाव नसेल, तर स्वातंत्र्य व समता यांचा नैसर्गिक विकास होऊ शकणार नाही.

हिंदुस्थानात हजारो जाती आहेत. या जाती राष्ट्रविरोधी आहेत. इतकेच नव्हे, तर त्या योगे सामाजिक जीवनात विघटना निर्माण होते. तसेच त्यामुळे जातीजातीत कलह व असूया उत्पन्न होते. आपणांला एक राष्ट्र व्हायचे असेल, तर आपण या अड-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्णांवर विजय मिळवला पाहिजे. जेव्हा एक राष्ट्र असेल, तेव्हाच बंधुत्वाच्या भावनेला खराखुरा अर्थ येईल.

राष्ट्रप्रतीक – सारनाथ येथील अशोकनिर्मित सिंहस्तंभाचे शीर्ष हे भारताने आपले राष्ट्रीय चिन्ह ठरवले आहे. राज्यघटनेबरोबरच भारत सरकारने हे चिन्ह स्वीकारले. या सिंहस्तंभावर चार सिंह आहेत. तीन दिसतात, पण चौथा मागच्या बाजूला असल्यामुळे दिसत नाही. या राष्ट्रीय चिन्हाच्या खाली देवनागरी लिपीत 'सत्यमेव जयते' हे मुंडकोपनिषदातील वाक्य (३·१·६) अंकित केलेले आहे.

राष्ट्रध्वज – भारताचा राष्ट्रध्वज तीन समांतर आयताकार पट्ट्यांचा बनवलेला आहे. त्यातली पहिली पट्टी केशरी रंगाची, मधील पट्टी पांढऱ्या रंगाची व खालची पट्टी गर्द हिरव्या रंगाची असते. या ध्वजाची लांबी रुंदी ३ व ८ या प्रमाणात असते. मधल्या शुभ्र पट्टीवर सिंहशीर्षस्तंभावरचे धर्मचक्र अंकित असते. त्याचा रंग निळा असतो. चक्राचा व्यास सामान्यपणे शुभ्रपट्टीच्या रुंदीइतका असतो. चक्राला २४ आरे असतात.

कविश्रेष्ठ रवींद्रनाथ ठाकूर यांनी लिहिलेल्या 'जनगणमन' या गीताचा पहिला अंश व वंकिमचंद्रांच्या 'वंदे मातरम्' या गीताचे पहिले कडवे ही दोन भारताची राष्ट्रगीते ठरवली गेली आहेत. सामान्यपणे सरकारी उत्सव-समारंभांच्या अखेरीस 'जनगणमन' हे गीत म्हटले जाते. सार्वजनीक समारोहात लोकांच्या इच्छेनुसार पहिले किंवा दुसरे राष्ट्रगीत म्हटले जाते.

भारतसरकारने संपूर्ण देशासाठी एक राष्ट्रीय पंचांग निर्माण केले असून, त्यात शालिवाहन शकाचा स्वीकार केला आहे. हे पंचांग सौरमानाला धरून बनवलेले आहे. ज्या दिवशी सूर्य मेष राशीत प्रवेश करतो ती पहिली तिथी कल्पून चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन असे बारा महिने सूर्यसंक्रांतीला धरून कल्पिलेले आहेत. सामान्यपणे वर्षाचे ३६५ दिवस मानलेले आहेत. धर्मकृत्यासाठी निर्माण केली जाणारी पंचांगे ही चांद्रमानाप्रमाणे बनवलेली असतात. त्यांत दर तीन वर्षांनंतर एक अधिक मास येत असतो. हा अधिक मास चांद्र व सौर या दोन्ही वर्षमानांचा मेळ घालण्यासाठी धरला जातो. राष्ट्रीय पंचांग हे इंग्रजी कॅलेंडर पद्धतीचे असल्यामुळे, त्यात अधिक मास धरावा लागत नाही. सांप्रत इंग्रजी कॅलेंडरच्या तारीख, मास व सन यांच्या बरोबर राष्ट्रीय पंचांगातले तिथी, मास व शक हे दिले जातात.

एकात्म भारत – भारतवर्ष हे अनेक प्रदेशांचे मिळून बनलेले एक महान राष्ट्र आहे. या राष्ट्रात अनेक भाषा बोलल्या जातात, अनेक प्रकारचे सांस्कृतिक आविष्कार दिसतात, अनेक प्रकारच्या सामाजिक प्रथा आढळतात. पण या विभक्तपणात समानतेचे, एकात्मतेचे एक बळकट सूत्र आहे. भारतभूमी ही आपली मातृभूमी हे ते सूत्र होय. मातृभूमीची ही भावना देशामध्ये राष्ट्रीय चैतन्य उत्पन्न करण्यास आणि राष्ट्रीय उद्बोधन करण्यास प्राचीन काळापासून कारणीभूत झालेली आहे. इथल्या भौतिक व सामाजिक विविधतेने राष्ट्रीय जीवन समृद्ध आणि संपन्न केले आहे. भारताच्या राष्ट्रनिर्मात्या पुरुषांनी या अनेकतेच्या मुळाशी असलेल्या एकतेला नेहमीच बळ दिले आहे. 'अविभक्तं विभक्तेषु' ही भावना सदैव जागृत ठेवली आहे. 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति' हा भारतीय संस्कृतीच्या समस्त विकासाचा मूलभूत विचार आहे.

भारतभूमीची ही मौलिक एकता, साहित्यात उपलब्ध होणाऱ्या देशाच्या नामकरणावरूनही सूचित होते. भारतवर्ष हे या देशाचे नाव ही गोष्ट सूचित करते, की हा सारा भूखंड एकाच वृष्टिसंस्थानाच्या अंतर्गत येतो. इथे उत्पन्न होणाऱ्या मेघमाला आणि वेगवेगळे वारे एकमेकांशी संबंधित असून, ते दक्षिणेचा समुद्र आणि उत्तरेचा हिमालय या दोहोंनी नियंत्रित होतात.

मातृभूमीला श्रेष्ठ देवता मानणे या भावनेने मानवजीवन उच्चतर व श्रेष्ठ बनविण्याचा भाव भारतीय साहित्यात प्राचीन कालापासून आढळून येतो. इथल्या धार्मिक साहित्यातल्या भूमिवंदनेमध्ये भारतभूमीला स्वर्ग व मोक्ष या दोहोंचे कारण मानले आहे, असे दिसून येते. अथर्ववेदातले पृथ्वीसूक्त (१२·१·१-६३) तर भारतभूमीचे राष्ट्रगीतच ठरेल. त्यामध्ये देशप्रेम व राष्ट्रीयता या दोन्ही गोष्टींची भारतीय दृष्टिकोणातून व्याख्या केलेली आहे. या सूक्तात विविधतेची जाणीव ठेवलेली असूनही, तिच्या मुळाशी व्यापून असलेल्या एकत्वाकडे ध्यान दिलेले आहे. भूमी आणि जन यांचा संबंध भौतिक तर आहेच; पण त्याहून काही अधिक म्हणजे आध्यात्मिक आहे.

भारतीय जनांच्या देशव्यापी संस्कृतीची अनेक रूपे आहेत; पण त्यांत भेदापेक्षा साम्यच अधिक आहे. हे साम्य किंवा ही एकता भारतीय संस्कृतीला जगातल्या अन्य संस्कृतींपासून अलग करते. भारतीय जीवनाच्या धर्म, साहित्य, लिपी, कला, वेद, पर्व, उत्सव, सणसुदिन, इ. प्रत्येक अंगावर भारतीयतेची एक विशिष्ट छाप आहे. भारतीय संस्कृतीने बाहेरच्या प्रभावांचे आणि प्रवाहांचे स्वागत करूनही आपले विशिष्ट रूप सुरक्षित राखले आहे. देशाच्या अंतर्गत अशा ज्या विविध जीवनपद्धती आहेत, त्यांचेही खुले आदानप्रदान या देशात झाले आहे. भारतीयत्व ही बलवान प्रक्रिया किंवा धारणा सूक्ष्म रूपाने सर्वांवर आपला प्रभाव घालून राहिली आहे. संस्कृतीच्या प्रत्येक नवीन रूपाला समवायाच्या साच्यात घालून त्याला आत्मसात करणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही भारताची मौलिक प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती हीच संस्कृतीची प्राणशक्ती होय.

प्राचीन कालापासून भारतीय शिक्षणपद्धतीत एक प्रकारची समानता सर्वत्र दिसून येते. वेदशास्त्रांच्या अध्ययन-अध्यापनात गुरु-शिष्यपद्धती जुन्या काळी देशभर सर्वत्र मान्य होती. समान पाठ्य ग्रंथांच्या द्वारे या पद्धतीतली एकता विशेषच उठून दिसते. पाणिनीची अष्टाध्यायी आणि पतंजलीचे महाभाष्य हे काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व्याकरणशिक्षणाचे प्रमुख ग्रंथ आहेत. त्यांच्यावरच्या टीकांनाही देशव्यापी मान्यता आहे. पंचमहाकाव्ये आणि पंचतंत्र हे ग्रंथ भारतात सर्वत्र शिकवले जात असूनं ते शिक्षणविषयक एकात्मतेची प्रतीकेच ठरले आहेत. काशी, तक्षशिला, मथुरा, नवद्वीप, कांची, उज्जयिनी, नालंदा, उदंतपुरी ही विद्यापीठे भारतात विशेष रूपाने गाजली. भारततले चारही दिशांचे विद्यार्थी या विद्यापीठांत शिक्षणासाठी एकत्र येत आणि एकत्र राहत. हेच विद्यार्थी पुढे ज्ञानाचे व संस्कृतीचे प्रवाह आपापल्या प्रदेशात घेऊन जात.

एकात्मतेचे हे सूत्र प्रत्यक्ष प्रमाणाने कला व स्थापत्य या दोन्ही गोष्टींतही दिसून येते. भारतातल्या मूर्तिनिर्माणात प्रायः सर्व प्रमुख देवतांचे एकच लक्षण व ध्यान सर्वत्र आढळते. ब्रह्मा, विष्णू, शिव, सूर्य, बुद्ध, तीर्थंकर, देवी, इत्यादींच्या प्रतिमा पाहून असे वाटते, की कोणत्यातरी देशव्यापी परिषदेने या मूर्तींना सर्वांसाठी लक्षणबद्ध केले आहे. कमल, कलश, स्वस्तिक, धर्मचक्र, कल्पवृक्ष, अष्टदल, इ. कलेतली अलंकरणे व प्रतीके सर्वत्र एकसारखीच आहेत. त्या सर्वांचा आशयही भारतीय आहे. पर्वतात खोदलेल्या गुहामंदिरांत आणि मैदानात निर्मिलेल्या पाषाणमंदिरांत वास्तुशैलीच्या दृष्टीने काही प्रांतिक वैशिष्ट्ये असली, तरी त्याबरोबरच एक अद्‌भुत अशी सार्वदेशीय समानताही आहे.

देशामध्ये सर्वत्र पसरलेली तीर्थस्थाने आणि पुण्यक्षेत्रे तर भारताच्या मौलिक एकात्मतेची प्रत्यक्ष प्रमाणेच होत. उत्तरेतील बदरीनाथ, कैलास, मानस यांच्यापासून दक्षिणेतील कन्याकुमारी व सेतुबंध रामेश्वर यांच्यापर्यंत, त्याचप्रमाणे पश्चिमेस हिंगुलादेवीपासून पूर्वेस कामाक्षीदेवीपर्यंत तीर्थस्थानांचे जणू जाळेच पसरले आहे. जनपदांचे पहिले प्रतीक तीर्थच होते. हीच तीर्थे पुढे संस्कृतीची वितरणकेन्द्रे बनली. या तीर्थांच्या द्वारे भूमीला देवत्व दिले गेले. शिव, विष्णू, देवी राम, कृष्ण, नाग, बुद्ध, महावीर हे सर्व देव; तसेच धर्मप्रवर्तक आणि अवतार यांचा या तीर्थांशी घनिष्ठ संबंध आहे. तीर्थयात्रा ही भारतीयांच्या वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनाची महत्त्वपूर्ण अशी प्रेरक शक्ती आहे. तिच्या साहाय्याने देशाचे भिन्न भिन्न भाग निकट परिचयात येतात आणि सन्मानित होतात. प्रादेशिक दूरता आणि पृथक्ता दूर करण्याच्या कामी तीर्थयात्रेमुळे सर्वांत अधिक मदत मिळाली आहे. कोटचवधी मनुष्यांच्या मनात देशाची एकता तीर्थांच्या रूपानेच प्रकट आणि दृढ झाली आहे.

धर्माच्या क्षेत्रातही भारताच्या एकतेचे दर्शन घडते. ब्रह्मा, विष्णू, महेश, उमा, रमा, सावित्री यांचे पार्श्वचर आणि त्यांची वाहने या सर्वांविषयी देशव्यापी समानता आहे. संस्कार, कर्मकांड, पारलौकिक श्रद्धा यांतही सर्वत्र एकवाक्यता आहे. जप, तप, व्रत, पूजा, उपवास यांचे आचरणही सर्वत्र सारखेच आहे. या सर्वांनाच सार्वदेशिक मान्यता आहे. साधू, संत, आचार्य, महात्मे या साऱ्यांनी प्रादेशिक सीमांचे उल्लंघन करून जनतेला मार्गदर्शन केले आहे. शंकर, रामानुज, मध्व, वल्लभ, नानक, चैतन्य, तुलसीदास, रामदास, ज्ञानेश्वर, इ. संत व धर्मोपदेशक यांना उभा भारत देश आपले मानीत आहे. त्यांच्या धार्मिक, नैतिक व आध्यात्मिक भाषेचे सर्वत्र स्वागत होत आहे.

भारताच्या दार्शनिक जगतात विचारांचे आदानप्रदान विस्तृत प्रमाणात झाले आहे. कर्म, भक्ती, उपासना, ज्ञान, इ. जितके दृष्टिकोण सहस्रावधी वर्षांत विकसित झाले, त्या सर्वांवर सारी भारतीय जनता आपला अधिकार सांगू शकते. हे दृष्टिकोण एकदेशीय नसून सार्वदेशीय आहेत. श्रुती, उपनिषदे, पुराणे, षड्दर्शने आणि संतांचे उपदेश यांनी समस्त राष्ट्राला युगायुगात चेतना मिळाली आहे. अद्वैत आणि भक्ती, ज्ञान आणि उपासना, जीव आणि ब्रह्म, माया आणि प्रकृती, बंध आणि मोक्ष या तत्त्वांच्या संबंधात सारा देश एकाच पद्धतीने विचार करीत आला आहे. या तत्त्वांच्या द्वारे लोकांच्या मनात एक गूढ एकात्मता भरून राहिली आहे. ज्याप्रमाणे लाकडात अग्नी किंवा दुधात लोणी सुप्त रूपात राहिलेले असते, त्याचप्रमाणे भारतीय मानसात धार्मिक व दार्शनिक विचारांची एकता व्याप्त आहे. निःपक्षपाती दृष्टीने विचार करणारे अनेक पाश्चिमात्य विद्वानही भारताच्या या मौलिक एकतेने प्रभावित झाले आहेत. ही एकता हेच भारतीय जीवनाचे पुरातन रहस्य आहे. ती आमच्या इतिहासाची पुण्य शोभा आहे. हिचा विपरीत विचार केल्यास राष्ट्रीय जीवनाचे तेज मंद पडेल व ते दूषितही होईल. असे होता कामा नये.

अशा या भारत देशाचे माहात्म्य भावपूर्ण शब्दांनी वर्णन करताना डॉ. वासुदेवशरण अग्रवाल लिहितात—

भारत राष्ट्र ही मानवी संस्कृतींची प्रयोगशाला आहे. इथला सर्वांत प्रभावशाली मंत्र समन्वय हा आहे. या मंत्रानेच भारतीय संस्कृतीचे सुंदर, सुखद व प्रीतियुक्त रूप विकसित झाले. भारतीय संस्कृतीची ही साधने भूतकालाबरोबरच समाप्त झालेली नाहीत. वर्तमानकालातही या संस्कृतीची एक प्रबल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आध्यात्मिक धारणा याच समन्वयसाधनेच्या दृष्टीने कार्य करीत राहिली आहे. ही विराट संस्कृती हा एक विश्वमानव्याचा चिरंतन चाललेला व आश्चर्यजनक असा प्रयोग आहे. संस्कृतीच्या भावमय गंगाजलाने इथे सर्व भेदोपभेद प्रोक्षित केले आहेत. आपले समस्त धार्मिक, राजनैतिक व सामाजिक प्रयत्न याच ध्येयाच्या सिद्धीच्या मार्गाने पुढे पुढे जात राहिले आणि अजूनही जात आहेत.

आज भारतवर्षाला विश्वमानवाच्या संपर्कात येण्याचा नवा अवसर प्राप्त झाला आहे. या विशाल क्षेत्रातही ऐक्य व समन्वय यांचे प्रयोग विस्तारत जातील. देशदेशांतरी भारतीय संस्कृतीचे हे समन्वयात्मक अंतर्यामी सूत्र विस्तृत होत जाईल. त्याच्या दिव्य सुगंधाने विश्वमानवाचे मन सुरभित होईल. अनेकतेमध्ये एकतेची उपलब्धी हीच विश्वमानवाची सर्वांत मोठी सिद्धी मानली जाईल. शमप्रधान नीतीनेच ही गोष्ट संभवनीय होईल. पूर्वकालीही भारताची आंतरराष्ट्रीय संबंध हाताळण्याची गुरुकिल्ली शम किंवा शांती हीच होती. भारतीय संस्कृतीच्या पुण्यशालेत शमाची ही अक्षयधारा आजवर झुळझुळत राहिली आहे. भविष्यकालातही भारतीय संस्कृतीची हीच प्रेरणा राहील आणि भारतीय प्रजेचा हाच महान लोकायत्त पंथ होईल.

भाषा व साहित्य या माणसाच्या उत्कृष्ट कृती होत. त्यांच्या द्वारे माणसांच्या अंतरातल्या भावनांचा व विचारांचा परिचय मिळतो. नानात्वातून एकत्वाचा शोध घेत घेत पुढे जाण्याचे जे प्रयत्न मानव जातीने केले आणि त्यांना ज्या प्रकारची सफलता प्राप्त झाली, त्या सर्वांचे स्पष्ट दर्शन भारतीय साहित्यात सुरक्षित आहे. भारतीय भाषा-साहित्यात देशाच्या मूलभूत एकत्वाविषयी बलवत्तर प्रमाणे उपलब्ध होतात. मातृभूमी आणि राष्ट्रीयता यांच्या संबंधात साहित्यरूपी साक्षीदार अनेक गोष्टी आपल्याला सांगून जातो.

भाषा ही नेहमीच धर्माच्या वर असते, हे ऐतिहासिक सत्य आहे. वैदिक कालापासून सूत्रे आणि स्मृती यांच्या युगापर्यंत संस्कृत ही भारताची साहित्यिक व धार्मिक भाषा होती. या काळात जेवढे साहित्य बनले, तेवढे सगळे संस्कृतामध्ये होते. बुद्ध व महावीर यांच्या काळात प्राकृत भाषांचा उदय झाला. बौद्धांचे त्रिपिटक साहित्य पालीमध्ये आणि जैनांचे अंगसाहित्य अर्धमागधीमध्ये निर्माण झाले. इ. स. च्या पहिल्या शतकात बौद्धांनी फिरून संस्कृत भाषा ही साहित्याची भाषा म्हणून स्वीकारली. पाली भाषेतल्या त्रिपिटक साहित्याचा गुप्तकालात संस्कृत अनुवाद केला गेला. त्या काळात मध्य आशियापासून दक्षिण भारतापर्यंतच्या सर्व भाषांत संस्कृत भाषा ही राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, धार्मिक व साहित्यिक भाषा बनली. गुप्तकालता संस्कृत भाषेने राष्ट्रीय विचारामध्ये एक अभूतपूर्व तेज निर्माण केले.

संस्कृताच्या ब्राह्मसरोवरातून अनेक प्रांतीय व प्रादेशिक भाषांच्या धारा बाहेर पडल्या. संस्कृत भाषा त्या सर्व भाषांची जननी आहे. ती भारतीय एकात्मतेचे मूल बीज आहे. उपनिषदांची संस्कृत भाषा ही भारतीय दर्शनांची जननी आहे. उपनिषदातले विचारकण भारतातल्या सर्व प्रादेशिक वाङ्मयात विखुरलेले दिसतात. संस्कृत भाषेच्या शब्दसामग्रीच्या आधारावर पाणिनीने आपल्या अष्टाध्यायीची म्हणजेच संस्कृत व्याकरणाची रचना केली. पाणिनीचे व्याकरण गेली अडीच हजार वर्षे देशाच्या एकतेचा उत्तुंग जयस्तंभ बनून राहिले आहे. या जयस्तंभाच्या शिखरावर प्रज्वलित झालेल्या तेजातून सर्व भारतीयांना प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतची विशाल भूमी पाणिनीय व्याकरणाची प्रचारभूमी आहे.

या देशाच्या भाषाविकासात प्रत्येक नवे युग आपल्या पूर्वयुगातल्या साहित्यिक व भाषिक परंपरा आत्मसात करूनच पुढे गेलेले आहे. वैदिक संस्कृत, लौकिक संस्कृत, पाली, अर्धमागधी, प्राकृत, महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश ही भाषा व साहित्य यांची विविध रूपे आपल्या देशात नांदून गेली आहेत. त्या सर्वांमध्ये व्याकरणाच्या बाह्य भेदांच्या तुलनेने शब्द व अर्थ यांचे मौलिक साम्यच अधिक आहे. वस्तुतः ही सारी एकाच वंशवृक्षाची संतती आहे. अपभ्रंशकालानंतर (इ. स. ८०० ते ११०० पर्यंत) लोकभाषांचा जन्म झाला. यामध्ये प्रादेशिक भेद अवश्य आहेत; पण संस्कृत व प्राकृत भाषांतील विचारांचा व अभिप्रायांचा वारसा या सर्व भाषांना लाभलेला आहे. काश्मीरी, नेपाळी, पंजाबी, सिंधी, गुजराती, मराठी, बंगाली, उडिया, हिंदी या सर्व आर्यपरिवारातल्या भाषा आहेत. त्यांची बरीचशी शब्दावली संस्कृत व प्राकृत भाषांतून आलेली असल्यामुळे या सर्व भाषा एकमेकींना जवळच्या ठरल्या आहेत.

दक्षिणेत तमिळ, तेलुगू, कन्नड व मलयाळम या भाषांचे साहित्य आणि शब्दावलीही बऱ्याच प्रमाणात संस्कृत भाषेशी संबंधित आहे. सांप्रत भारतवर्षाच्या राष्ट्रीय एकात्मतेची सिद्धी होण्यासाठी ज्या समान भाषेची आवश्यकता आहे, तिची सामग्री पूर्वीपासूनच विद्यमान आहे. प्रादेशिक भाषांमध्ये जो संस्कृताचा अंश आहे, तोच या एकतेचा पाया होय. देशामध्ये भाषांचेही अनेक भेद आहेत, हे आपल्या पूर्वजांना चांगल्या प्रकारे ठाऊक होते. वर्णरत्नाकर या ग्रंथात आदर्श चारण कसा असावा, हे सांगताना म्हटले आहे, की त्याला संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, पैशाची,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शौरसेनी व मागधी या सहा भाषांचे सखोल ज्ञान असले पाहिजे आणि त्याचबरोबर त्याला शकारी, आभीरी, चांडाली, शाबरी, द्राविडी, कौतकली या उपभाषांचाही परिचय असला पाहिजे.

अशा अनेक भाषा भारतात पूर्वीपासून प्रचलित होत्या; पण त्यांनी वैचारिक क्षेत्रात तटबंदी उभी केली नाही. भाषा भिन्न होत्या, पण त्यांनी प्रतिपादिलेले विचार आणि तत्त्वे मात्र सर्वत्र एकच होती. त्या त्या भाषांच्या आधारे उपनिषदांतले अध्यात्म सर्व प्रांतात झुळझुळू वाहत होते.

भारताच्या मौलिक एकतेचे दुसरे उदाहरण म्हणजे भारतातील लिप्या हे होय. भारतातल्या आर्य व द्रविड परिवारातल्या भाषांच्या लिपींचा उद्गम आणि विकास मूळच्या एकाच ब्राह्मी लिपीतून झाला आहे. भारताच्या विविध भागांत सापडलेले अशोकाचे शिलालेख हे ब्राह्मी लिपीतच आहेत. ब्राह्मीतूनच ज्या विविध लिपींचा विकास झाला, त्यात देवनागरी लिपी मुख्य आहे. तिच्यामध्ये ब्राह्मीचे सर्व गुण विद्यमान आहेत. दक्षिण भारततल्या चार लिप्याही मूळ ब्राह्मी लिपीतूनच निघाल्या आहेत.

वैदिक साहित्य हे देशाचे सर्वप्राचीन व सर्वोपरी साहित्य आहे. त्याच्या पठनपाठनाची परंपरा सर्वत्र एकाच पद्धतीची आहे. वैदिक मंत्रांचा स्वरपाठ काश्मीर, महाराष्ट्र, तमिळनाडू बंगाल, इ. प्रदेशांत एकसारखाच आहे. भारतातल्या वैदिक विद्वानांनी महान परिश्रम करून परंपरेने गेली हजारो वर्षे वेदाच्या सस्वर पाठाचे रक्षण केले आहे. आजपर्यंत वैदिक अक्षरांत एक मात्राही कमीअधिक झालेली नाही. विद्वानांची देशव्यापी संघटना आणि प्रातिशाख्यांच्या द्वारे शब्दांच्या आणि स्वरांच्या उच्चारणांचे बसवलेले नियम, यांना देशव्यापी मान्यता होती. श्रौतसूत्रांत प्रतिपादिलेले यागादिक कर्मकांड आणि द्विजांचे षोडश संस्कार, तीर्थक्षेत्रांतले विधी आणि व्रतवैकल्ये ही सर्व भारतात समान असल्यामुळे या गोष्टीही देशाच्या एकतेला समानभूत ठरल्या आहेत.

भारतीय दर्शनेही त्याच्या एकात्मतेची साधक ठरली आहेत. उपनिषदे, वेदान्त, सांख्य, योग, वैशेषिक, न्याय, मीमांसा त्याचप्रमाणे बौद्ध आणि जैन यांची दर्शने यांचे अध्ययन-अध्यापन साऱ्या देशात एकाच पद्धतीने चालू होते. देशातल्या विभिन्न भागांतले विद्वान आणि आचार्य आपापल्या प्रतिभेला अनुसरून दर्शनांच्या मूळ सूत्रग्रंथांवर भाष्ये व टीका रचीत आणि त्यांच्या आधारे मूळ ग्रंथ शिकवीत. या कामी वेदान्तसूत्रांचे एकच उदाहरण पुरेसे होईल. ब्रह्मप्रतिपादक उपनिषदे ही सर्वांना मान्य होती. त्यांचे मंथन करून काढलेले नवनीत म्हणजे ब्रह्मसूत्रे होत. बादरायण व्यासांनी रचलेली ही सूत्रे ज्ञानाकाशात इतकी उंच उठावली, की जणू पर्वतामध्ये हिमालय. या ब्रह्मसूत्रांवर शंकर, रामानुज, मध्व, निंबार्क आणि वल्लभ या आचार्यांनी देशाच्या विभिन्न भागांतून आपापली भाष्ये रचली आणि त्यांतून एकाच वेदान्ताच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. या सर्व शाखोपशाखांचे अध्ययन भारतात आजही सर्वत्र प्रचलित आहे.

या देशात केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक साहित्यच त्याच्या एकात्मतेचे कारण बनलेले नसून, भारताचे लौकिक साहित्यही या देशाला व्यापून उरलेले आहे. काव्य, अलंकार, कथा, आख्यायिका, छंद; तसेच नीती, अर्थ, काम, वास्तू, संगीत, आयुर्वेद, व्याकरण, ज्योतिष, इ. शास्त्रेही भारतात सर्वांना समान रूपाने परिचित आहेत आणि त्यांचे नियम सर्वत्र सारखेच आहेत. हे सर्व साहित्य जणू भारतवर्षाच्या चारही दिशांच्या अंतापर्यंत जाऊन भिडले आहे. कालिदासाची काव्ये समस्त भारतदेशाचा गौरव वाढविणारी ठरली आहेत. गेली दीड हजार वर्षे भारताच्या सर्व भागांतले रसिक आणि विद्वान कालिदासाच्या काव्यांना आपल्या मनीची ठेव मानतात. रघुवंशाच्या चौथ्या सर्गात कालिदासाने वंक्षू नदीपासून ताम्रपर्णी नदीपर्यंत आणि कोकणापासून कामरूपापर्यंत एवढ्या भूप्रदेशाच्या एकतेचे जे सजीव चित्र प्रस्तुत केले, ते भारतीय जनतेच्या मनात सर्व कालासाठी छाप बसल्याप्रमाणे उमटून राहिले. कालिदासाच्या मनात भारताचा हा भूभाग इतका दृढमूल झाला होता, की त्याच्याकडे वारंवार श्रोत्यांचे लक्ष आकर्षित करण्यात त्याला संकोच वाटत नाही.

गुप्तकाल हा कालिदासाचा काल मानतात. त्या काळात देशाचे विभिन्न भाग एका नव्या उभारीने एकमेकांकडे आकृष्ट झाले. त्यांचा परस्पर परिचय वाढला. साहित्य व संस्कृती यांचे नवे प्रवाह चारही दिशांतून खळाळत एकमेकांत मिसळू लागले आणि भाषा, साहित्य व कला यांची देशव्यापी एकता गुप्तयुगात जीवनाचे एक प्रबळ सत्य बनून गेली. कालिदासाची वर्णनशैली पुढील अनेक कवींना प्रेरक ठरली.

भारतवर्षातल्या कथासाहित्यातही देशाच्या एकतेची बीजे सापडतात. जातककथांची संख्या साडेपाचशे आहे. या कथा बौद्धांनी आपल्या प्रतिभेतून निर्माण केलेल्या नाहीत. त्या मुळात लोककथा होत्या व त्यांतल्या अनेक आजही जनपदांच्या बोलीमध्ये सुरक्षित आहेत. भारतीय नीतिकथाही अखिल भारतीय भूभागाला व्यापून उरल्या आहेत. व्रतकथाही अखिल भारतीय स्वरूपाच्या आहेत.

रामायण, महाभारत व भागवत हे भारताचे राष्ट्रीय ग्रंथ होत. पुराणे, प्रवचने, आख्याने, नाटके, इत्यादींच्या रूपाने त्यांचा प्रचार सर्व भारतभर झाला आहे. वरील तीन ग्रंथांचे लोकोत्तर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नायक म्हणजे दाशरथी राम व वासुदेव कृष्ण. या दोहोंवरही भारताच्या सर्व भागांत अनेक प्रकारचे साहित्य निर्माण झाले असून, हे दोन महापुरुष जणू भारताच्या एकात्मवृत्तीचे दोन महास्तंभ बनले आहेत.

भारतप्रशस्ती – पुराणांमध्ये अनेक ठिकाणी भारताची प्रशस्ती गायिलेली आहे. गुप्त साम्राज्याच्या काळात भारत भौतिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजनैतिक अशा सर्व क्षेत्रांत जगामध्य अग्रगण्य होता. त्या काळी चहू दिशांनी भारतात संपत्तीचे ओघ येत होते. भारतातले दर्यावर्दी खलाशी आणि सामुद्रिक व्यापारी समुद्रावरून देशांतरास जात होते आणि तिकडून भारतात संपत्ती आणीत होते. याच काळात जावा, सुमात्रा, बोर्निओ, फिलिपाइन्स, इ. देशांतही भारतातून अनेक विद्वान आणि पराक्रमी पुरुष जात होते आणि त्या द्वीपात आपल्या वसाहती स्थापीत होते; धर्म व संस्कृती यांचाही प्रसार करीत होते. त्या युगात भारतीयांच्या हृदयात अदम्य उत्साह खळाळत होता. त्यांच्या पराक्रमाला दशदिशा मोकळ्या झाल्या होत्या. अशा या काळात भारतामध्ये पुराणांची वाढ झाली आणि तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन पुराणकारांनी भारताचा महिमा मुक्तकंठाने गाइला. पुराणे म्हणतात –

पृथिव्यां भारतं वर्षं कर्मभूमिरुदाहृता ।

(ब्रह्म पु. २७. २)

अर्थ – समस्त पृथ्वीत भारतवर्ष हे कर्मभूमी मानलेले आहे.

जाम्बवे भारतं वर्षं तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम् ।
कर्मभूमिर्यतः पुत्र तस्मात् तीर्थं तदुच्यते ॥

(ब्रह्म पु. ७०·२१)

अर्थ – जंबुद्वीपात भारतवर्ष हे जगप्रसिद्ध तीर्थ आहे. त्याला तीर्थ म्हणण्याचे कारण हे पुत्रा, ती कर्मभूमी आहे.

देवानामपि विप्रर्षे सदा ह्येष मनोरथः ।
अपि मानुष्यमाप्स्यामो देवत्वात् प्रच्युताः क्षितौ ।
मनुष्यः कुरुते तत्तु यन्न शक्यं सुरासुरैः ॥

(मार्कं. पु. ५७·६३–६४)

अर्थ – हे विप्रर्षे ! देवांचाही हा मनोरथ असतो, की देवत्वापासून च्युत झाल्यावर आपल्याला भारतभूमीवर मनुष्यत्व प्राप्त व्हावे. (मनुष्याचा महिमा फार मोठा आहे) जे देवदैत्यांनाही शक्य होत नाही, ते मनुष्य करू शकतो.

[सं. वा. अ.; मा. मौ. ए.: हिं. वि. को.; सु. वि. को.; सत्तावन्न ते सुभाष – श्री. हरदास, १९५७; भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास – श्री. देवगिरीकर १९६८; लढा असा हा स्वातंत्र्याचा – श्री. काकतकर, १९६७; आधुनिक भारत – श्री. जावडेकर, १९३८; काँग्रेसचा इतिहास – डॉ. पट्टाभिसीतारामय्या, १९३६; भारतीय राज्यघटना – श्री. देवगिरीकर, १९६१; भा. सां. इ.; हि. क. इं. पी.; प्रा. भा. सं.]

भारत अत्री

एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातले २७ वे सूक्त याच्या नावावर आहे. हे सबंध सूक्त दानस्तुतीचे असून त्यात अरुण, त्र्यरुण व अश्वमेध या राजांनी त्याला दिलेल्या देणग्यांचे वर्णन आहे.

भारत, बृहत्तर

प्राचीन काळापासून भारताचा दूरदूरच्या देशांशी मोठा व्यापार चालू होता, या विषयी आता कोणाचे दुमत नाही. भारतातील विविध वस्तू व पदार्थ पूर्वेला चीनपर्यंत आणि पश्चिमेला रोमपर्यंत निर्यात केले जात. त्याचप्रमाणे भारतीय लोकांनी जगातील कित्येक देशांत जाऊन तिथे वसाहती केल्या होत्या, असेही सिद्ध झाले आहे. भरतभूमी हीच मानवी संस्कृतीची जन्मभूमी असून, इथूनच ती संस्कृती सर्वत्र पसरली, असे काही पंडितांचे मत आहे. या सिद्धान्ताचे समर्थन करण्यासाठी त्यांनी इजिप्त, इराण, पॅलेस्टाइन, आशिया मायनर, ग्रीस, इटली, जर्मनी, स्वीडन, इ. देशांची उदाहरणे दिली आहेत. नद्यांची व नगरांची नावे, चालीरीती, सामाजिक कल्पना, देवतांचे स्वरूप, धार्मिक विधी, भाषांतील काही शब्द, इ. बाबतींत त्या देशांचे भारताशी पुष्कळ साम्य आढळते. त्यावरून प्राचीन काळी भारतीय लोक त्या देशांत जाऊन वसले असावेत, असे त्या पंडितांचे म्हणणे आहे. कर्नल टॉड, कर्नल आल्कॉट, पोकॉक, स्पेक, हॉलिंग्सवर्थ प्रभृती ग्रंथकारांनी या संबंधी विस्तृत विवेचन केलेले आहे. अलिकडे निरनिराळ्या देशांत जे उत्खनन झाले, त्यातही काही ठिकाणी भारतीय संस्कृतीचे पुष्कळ अवशेष सापडले आहेत. त्यामुळे वरील सिद्धान्ताला पुष्टी मिळते. अशा भारतीय वसाहतींचा बृहत्तर भारतात समावेश होतो, त्यांची माहिती पुढे दिली आहे.

मध्य आशिया – हा सर्व प्रदेश सांप्रत ओसाड झालेला आहे. पण हजारबाराशे वर्षांपूर्वी तिथे पुष्कळ वसती होती. खोतानच्या आसपास अनेक जुन्या शहरांचे अवशेष वाळूच्या टेकड्यांखाली सापडले आहेत. त्यांत बौद्ध स्तूप, भित्तिचित्रे, देवतांच्या मूर्ती, संस्कृत व प्राकृत भाषांतील ग्रंथ, इ. सामग्री असल्यामुळे, तिथे सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी भारतीय लोकांच्या वसाहती असाव्या, असे अनुमान विद्वानांनी केले आहे. तिबेटी ग्रंथांवरून कळते, की त्या प्रदेशात अनेक वर्षे विजय वंशाचे राज्य होते. त्या काळात कित्येक बौद्ध भिक्षू भारतातून तिकडे गेले व त्यांनी आपल्या धर्माचा प्रसार केला. तिथे पुष्कळ विहारही बांधले गेले होते.

पश्चिम आशिया – अफगाणिस्तान, बलुचिस्तान, चिनी तुर्क-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्तान, हे प्रदेश प्राचीन काळी भारताचे भागच मानले जात होते. मौर्य साम्राज्यात त्यांचा अंतर्भाव होत असे. तिथल्या उत्खननात शेकडो स्तूप, बुद्धाच्या भव्य मूर्ती, खरोष्टी लिपीतील धम्मपदाची प्रत, अशा बहुमोल वस्तू संशोधकांना मिळाल्या आहेत. अफगाणिस्थानात बौद्ध लोकांनी हजारो लेणी खोदून ठेवली आहेत. कंदाहार (गांधार) व काबूल या भागात बौद्ध संस्कृतीचा खूपच प्रसार झाला होता. अफगाणिस्थानच्या पश्चिमेला जो बॅक्ट्रिया नावाचा प्रदेश आहे, त्यातही हजारो भारतीय लोक वसलेले होते. त्यांच्यांत बौद्ध भिक्षू, वैदिक ब्राह्मण, व्यापारी वगैरे विविध वर्गातले लोक होते. चिनी तुर्कस्तानातही भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला होता. तिथे सापडलेले भग्नावशेष, शिलालेख आणि वस्तू यांवरून तिथे बौद्ध व ब्राह्मण पंडित संस्कृत भाषेचे अध्यापन करीत होते, असे कळते. त्या प्रदेशात हिंदू राज्येही स्थापन झाली होती. काशगर, खोतान, कूची, करा ही भारतीय संस्कृतीची केंद्रे होती. तिथे बौद्ध विहार व संस्कृत पाठशाला होत्या. त्या ठिकाणी विविध विषयांवरचे संस्कृत ग्रंथ सापडले आहेत. कुबेर, त्रिमूर्ती, गणेश, यांच्या मूर्तीही गवसल्या आहेत.

आशिया मायनरमधील खाल्डियन लोक हे भारतातून तिकडे गेलेले ब्राह्मणच होत. तिथे अनेक भाषांत लेख खोदलेल्या जुन्या

भारतलक्ष्मीचे चित्र – आशिया मायनर

विटा उपलब्ध झाल्या आहेत. त्या लेखांत मित्र, वरुण, इंद्र, इ. वैदिक देवतांची नावे आणि एक, त्रि, पंच हे संख्यावाचक शब्द आढळतात. ते लेख सन पूर्व १४ व्या शतकातले आहेत. त्यावरून त्या काळी वैदिक संस्कृती तिथपर्यंत पसरली होती, असे दिसते.

आशिया मायनरच्या वायव्य भागात लम्प्सकस नामक एक प्राचीन स्थान होते, तिथे आज लप्स्की नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी चांदीचे एक प्राचीन तबक सापडले आहे; ते इ. स. च्या दुसऱ्या शतकातले असून, सध्या इस्तंबूलच्या संग्रहालयात ठेवलेले आहे. ते तबक फार सुंदर असून, त्यावर भारतलक्ष्मीचे सुरेख चित्र कोरलेले आहे. ते चित्र रोमन स्त्रीचे वाटते, पण तिची वेषभूषा भारतीय पद्धतीची आहे. ती हस्तिदंती आसनावर बसलेली असून, तिच्या दोन्ही बाजूंना जे पशुपक्षी कोरलेले आहेत, तेही भारतीय आहेत. अरबस्थानातही भारतीय संस्कृतीचे केंद्र निर्माण झाले होते. दोन हजार वर्षांपूर्वी तिथे बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता आणि विहारही बांधले गेले होते. खोरासानमधील बल्ख या प्रसिद्ध नगरात नौबहार नावाचा एक प्रचंड विहार होता. तिथल्या भिक्षूंना बरमक (परमक=प्रतिष्ठित) असे म्हणत. मुसलमानांनी बल्ख नगर जिंकल्यानंतर तो विहार उद्ध्वस्त केला आणि बरमकांना बाटवून मुसलमान केले. पुढे ते लोक बगदादला गेले. तिथे खलिफाच्या दरबात त्यांना बुद्धिमत्ता, शौर्य, इ. गुणांमुळे मानाचे स्थान मिळाले. काही जणांना मंत्रिपदही लाभले. मग त्यांनी भारतीय वैद्यक, ज्योतिष, गणित, इ. विषयांवरील संस्कृत ग्रंथांची अरबीत भाषांतरे करवून घेतली. त्यासाठी अनेक भारतीय पंडितांना त्यांनी तिकडे बोलावून नेले.

अमेरिका – प्राचीन काळी बहुतेक उत्तर अमेरिका खंड घनदाट अरण्यांनी व्यापलेले होते. पण मध्य व दक्षिण अमेरिकेची स्थिती तशी नव्हती. त्या भागात सुधारलेले लोक राहत होते. त्यांच्या संस्कृतीचे अगणित अवशेष संशोधकांना तिथे सापडले आहेत. त्यांतील शिल्पकामाचे अवशेष भारतातील शिल्पाशी पुष्कळसे जुळते आहेत. त्यांवरून प्राचीन काळी भारतीय लोकांनी त्या भागात वसाहती स्थापल्या असाव्या, असे अनुमान करता येते. आपल्या पुराणांत ज्याला पाताळ लोक म्हटलेले आहे, तो हाच प्रदेश असावा. पाताळ हा नागांचा प्रदेश, असे वर्णन केलेले आहे. मेक्सिकोत आजही सर्प खूप आढळतात. लंकेतील राक्षस व मेक्सिकोतील रहिवासी एकाच वंशाचे असावे, असे अनुमान चिं. वि. वैद्य यांनी केले आहे. स्पॅनिश लोकांनी तिथल्या मूळ रहिवाशांचा नायनाट केला, शहरे उद्ध्वस्त केली व ग्रंथ जाळून टाकले. तरी त्यांच्या संस्कृतीच्या पुष्कळ खुणा अजून तिथल्या लोकांच्या जीवनात आढळतात. अमेरिकेतल्या ताम्र भारतीय (रेड इंडियन) लोकांत प्रेतदहनाची व सतीची चाल होती. तिथले विद्यार्थी आपल्या गुरुकुलपद्धतीने गुरुगृही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

अध्ययन करीत. धरतीमातेची उपासना, प्रादपूजा, गणेश-पूजा, नागपूजा, युगकल्पना, पुनर्जन्म, राहूकेतूंनी चंद्रसूर्यांना ग्रासणे, पृथ्वीला कूर्माचा आधार या कल्पना, इ. बाबतींत भारतीय लोक व तिकडले लोक यांच्यांत पुष्कळ साधर्म्य आढळते. पेरू देशात रामलीलेचा उत्सव प्रचलित आहे. मध्य व दक्षिण अमेरिकेतील प्राचीन संस्कृतीच्या अवशेषांत इंद्र, शिव, विष्णू, हनुमान, गणेश, इ. भारतीय देवतांसारख्या पुष्कळ मूर्ती सापडल्या आहेत. त्यांच्या शिल्पात हत्तीच्या प्रतिमा सापडतात; तो हत्ती आफ्रिकेतील हत्तीसारखा नसून, भारतीय हत्तीच्या जातीचा आहे, असे म्हणतात. तिथल्या मंदिरात पद्म व चक्र ही प्रतिके ही जागोजागी आढळतात. तिथले पंचांग व सणदेखील भारतीय पंचांग व सण यांसारखे आहेत. हेविट, मॅकेंझी वगैरे पाश्चात्य संशोधकांनी जो पुरावा गोळा केला आहे, त्यावरून भारतीय लोकांनी फार प्राचीन काळी अमेरिकेत वसती केली असली पाहिजे आणि सांप्रत अमेरिकेमध्ये ताम्र भारतीय म्हणून ओळखले जाणारे लोक हे त्या प्राचीन भारतीयांचे वंशज असले पाहिजेत, असे अनुमान मेक्सिकोच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याने केले आहे.



बृहत्तर भारत – आग्नेय आशिया

चीन– इ. स. च्या प्रारंभापासून सुमारे दहा शतके भारतातून बौद्ध धर्मप्रसारक चीनमध्ये जात होते. त्यांची माहिती चिनी ग्रंथकारांनी लिहून ठेवली आहे. चीनच्या राजाच्या निमंत्रणावरून पहिला धाडसी धर्मोपदेशक काश्यप मातंग हा इ. स. च्या पहिल्या शतकात गांधार देशातून तिबेटमार्गे चीनला गेला. राजाने त्याचा सन्मान करून त्याला एक मठ बांधून दिला. तिथे राहून काश्यपाने चिनी भाषा आत्मसात केली व काही बौद्ध ग्रंथांचे चिनी भाषांतर केले. अनेक वर्षे बौद्ध धर्माचा प्रसार करून त्याने तिथेच देह ठेवला. त्याचा शिष्य धर्मरक्ष याने त्याचे कार्य तिथे पुढे चालवले. त्या दोघांनी बौद्ध धर्माचे मूळ चीनमध्ये पक्के केले. इ. स. च्या दुसऱ्या शतकात आर्यकाल, सुविनय, धर्मकाल, महाबल वगैरे प्रचारक तिकडे गेले. इ. स. च्या ४ थ्या शतकात तिकडे गेलेले कुमारजीव आणि गुणवर्मा हे विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांच्या नंतर धर्मरुची, रत्नमती, बुद्धशांत प्रभृती अनेक भिक्षू तिकडे गेले होते. त्याच कालखंडात काही धर्मोपदेशक कोरिया व जपान या देशांतही गेले आणि त्यांनी तिथे बौद्ध धर्माचा प्रसार केला. चीनमध्ये असंख्य संस्कृत हस्तलिखित लेख सापडले आहेत. कोरियाई संस्कृतीवरही भारतीय संस्कृतीचा बराच प्रभाव पडलेला दिसतो.

आग्नेय आशिया– भरतखंडाच्या पूर्वेला प्रथम ब्रह्मदेश लागतो. त्याच्या दक्षिणेला जे द्वीपकल्प आहे, त्यात पूर्वेस चंपा (अनाम), पश्चिमेस सयाम (थायलंड) व दक्षिणेस कंबुज (कंबोडिया) हे प्रदेश आहेत. सयामचे एक टोक दक्षिणेला समुद्रात लांबवर गेले आहे, त्याला मलाया द्वीपकल्प म्हणतात. त्याच्या पूर्वेला बोर्निओ व पश्चिमेला सुमात्रा ही मोठी बेटे असून, सुमात्राच्या जवळच लांबट चिंचोळे जावा व लहानसे बाली ही बेटे हिंदी महासागरात पसरलेली आहेत. या सर्व प्रदेशांत इ. स. च्या सुरवातीपासून हजार बाराशे वर्षे भारतीयांच्या वसाहती होत्या आणि काही ठिकाणी राज्येही होती. या बृहत्तर भारताचा उज्ज्वल इतिहास भारतीय साहित्यात सापडत नाही. पण चिनी ग्रंथांत त्यासंबंधी पुष्कळ माहिती उपलब्ध

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाली आहे. सांप्रत या सर्व भूमीचे हिंदनेशिया व हिंद-चीन असे दोन विभाग केलेले आहेत.

ब्रह्मदेश – इ. स. च्या ५ व्या शतकापासून या प्रदेशात भारतीय संस्कृतीचा प्रसार झाल्याचे पुरावे उपलब्ध झाले आहेत. त्या देशात प्यू व मॉन हे दोन भिन्न मानववंश वास्तव्य करीत होते. प्यू हे तिबेटी व मॉन हे भारतीय होत. थोतान व पेगू ही मॉन संस्कृतीची केंद्रे होती. तिथे केलेल्या उत्खननात प्राचीन स्तूप व पाली भाषेतील बौद्ध ग्रंथांची हस्तलिखिते सापडली आहेत. त्या सर्वांवरून ब्रह्मदेशाची राजधानी प्रोम येथे इ. स. च्या ६–८ या शतकांत विक्रमवंशाचे राज्य होते, ते भारतीय होते आणि तिथे भारतीय संस्कृती नांदत होती, हे समजते. त्या काळातली जी शिल्पे सापडली आहेत, ती गुप्त व पल्लव परंपरेच्या शिल्पकारांनी निर्माण केली आहेत, असे वाटते. त्यांत विष्णू, शिव, ब्रह्मा व गणेश यांच्या मूर्ती आहेत.

ब्रह्मदेशात इ. स. च्या ९ व्या शतकात पगान येथे नवे राज्य उदयाला आले. तिथे महायान बौद्धांचे वर्चस्व होते. इ. स. च्या ११ व्या शतकाला पगानचा राजा अनव्रथ हा बौद्ध होता. त्याच्या राज्यात असंख्य स्तूप व बौद्ध मंदिरे होती. अनव्रथाने अनेक पगोडे बांधले; त्यांतील श्वेझिगॉन् व श्वेसंडॉ हे विशेष प्रसिद्ध



श्वेसंडॉ येथील पगोडा – ब्रह्मदेश

आहेत. कारण त्यांत बुद्धाचे अनेक अवशेष ठेवलेले आहेत. नंतरच्या दोनतीन शतकांत तिथे बौद्ध धर्माचा खूप प्रसार झाला. इ. स. च्या ११ व्या शतकात पगानमध्ये बांधलेले आनंद-मंदिर अत्यंत प्रेक्षणीय आहे.

चंपा – हिंदचीनचा पूर्वेकडील भाग अनाम या नावाने ओळखला जातो. त्याला प्राचीन काळी चंपा असे नाव होते. या प्रदेशात इ. स. च्या दुसऱ्या शतकात हिंदुराज्य स्थापन झाले. श्रीमार नामक पुरुष त्याचा संस्थापक होता, असे म्हणतात. त्याच्या वंशजांच्या नावांच्या अंती वर्मन हा शब्द आहे.



आनंद मंदिर – पगान, ब्रह्मदेश

इ. स. ४०० च्या एका संस्कृत शिलालेखात श्रीभद्रवर्मन हे नाव आढळते. तो राजा फार पराक्रमी होता. त्याने मायसोन येथे भद्रेश्वरस्वामीचे मंदिर बांधले. इ. स. च्या ५ व्या शतकात गंगराज नामक राजा राज्यत्याग करून भारतात तपस्या करण्यासाठी गेला, असा उल्लेख एका संस्कृत शिलालेखात आहे. तो भद्रवर्मनचा पुत्र असावा. त्याचे वंशज मनोरथवर्मा, रुद्रवर्मा, शंभुवर्मा, कंदर्पधर्म, प्रकाशधर्म, इ. राजे कित्येक शतके तिथे राज्य करीत होते. त्या काळात चंपामध्ये शैव पंथाचा विशेष प्रसार झाला होता. शिव हाच परमेश्वर मानला जात होता. इ. स. च्या ८ व्या शतकात प्रकाशधर्म राजाने तिथे विष्णूचेही एक मंदिर बांधले.

इ. स. च्या ८ व्या शतकाच्या अखेरीस चंपावर पंडुरंग वंशाचे राज्य सुरू झाले. त्या वंशातील पृथ्वींद्रवर्मा, इंद्रवर्मा, हरिवर्मा, सत्यवर्मा, इ. राजांनी सुमारे शंभर वर्षे राज्य केले. त्यानंतर भृगू वंशातील इंद्रवर्मा, भद्रवर्मा, जय–इंद्रवर्मा, परमेश्वरवर्मा, जय–हरिवर्मा, इ. राजांनी इ. स. १६ व्या शतकापर्यंत चंपावर राज्य केले.

चंपामध्ये शिव, विष्णू, बुद्ध यांची मंदिरे व असंख्य मूर्ती आहेत. तिथल्या शिल्पकामावर भारतीय कलेची छाप स्पष्ट दिसते.

सयाम – चंपाच्या पश्चिमेला सयाम प्रदेश आहे. त्याला सांप्रत थायलँड म्हणतात. इ. स. च्या १ ल्या शतकापासून ६ व्या शतकापर्यंत या भागात बौद्ध लोकांच्या वसाहती असाव्या. तिथे अमरावती शैलीची तांब्याची बुद्धमूर्ती सापडली आहे. इ. स. च्या ७ व्या व ८ व्या शतकांतील द्वारावतीचे राज्य, ८–१२ या शतकांतील श्रीविजय राज्य, १२ व १३ या शतकांतील सुखोदय हे हरिपुंजय हे राज्य आणि १३–१६ या शतकांतील सुखोदय हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राज्य यांतील अनेक लेख उपलब्ध झाले आहेत. त्यांतील काही लेख संस्कृत व पाली भाषांतले असून, काही स्थानिक मॉनख्मेर



सयाममधील एक हिंदू मंदिर

भाषेतले आहेत. द्वारावतीचे सुखोदय राजे हीनयान पंथाचे होते. त्या काळातील बुद्धमूर्तीचे ध्यान अजंटा व सारनाथ येथील बुद्धमूर्तींसारखे आहे. हरिपुंजय राज्यात पुष्कळ मंदिरे व स्तूप आहेत. इ. स. च्या १०–१३ या शतकांत सयामवर कंबुजच्या राजांची सत्ता होती. त्या काळात तिथे वैदिक व बौद्ध या दोन्ही धर्मांचा प्रसार झाला.

कंबुज – चंपाच्या दक्षिणेला कंबुजदेश आहे, त्याला सांप्रत कंबोडिया म्हणतात. या देशातील फुनान नामक प्रदेशात इ. स. च्या १ ल्या शतकात कौंडिण्य नामक भारतीय ब्राह्मणाने राज्य स्थापले होते. तिथली नागवंशी राणी सोमा हिने कौंडिण्याला पुष्कळ प्रतिकार केला, पण त्याने तिला जिंकले व तिच्याशी विवाह केला. त्याच्या वंशाचे राज्य तिथे इ. स. च्या ३ ऱ्या शतकापर्यंत होते. ४ थ्या शतकात कौंडिण्य नावाचाच दुसरा पुरुष भारतातून फुनानला गेला व तिथला राजा झाला, असे चिनी ग्रंथांवरून कळते. तोपर्यंत तिथले लोक पुष्कळ सुधारले होते. कारण भारतीय लोक मोठ्या संख्येने तिथे जाऊन वसले होते आणि त्यांनी आपली संस्कृती त्या लोकांना शिकवली होती.

इ. स. च्या ५ व्या शतकाच्या उतरार्धात फुनानमध्ये कौंडिण्याचा वंशज जयवर्मा राज्य करीत होता. त्याचा पुत्र रुद्रवर्मा इ. स. ५१४ मध्ये गादीवर बसला. व्याधपूर ही त्या वंशाची राजधानी होती.

फुनानच्या उत्तरेला चेन-ला नावाचे राज्य होते. त्याचा राजा भववर्मा हा फुनानची अधिसत्ता मानीत होता. पण इ. स. च्या ६ व्या शतकात भववर्मनचा भाऊ चिनसेन व त्याचा पुत्र ईशानवर्मा यांनी फुनानची अधिसत्ता नष्ट केली व ते राज्यही जिंकले. सर्व कंबुज देशावर ईशानवर्माची सत्ता प्रस्थापित झाली. ईशानपूर हे नवे नगर त्यानेच वसवले. त्याचा पुत्र जयवर्मा याने इ. स. ६८१ पर्यंत राज्य केले. त्यानंतर कंबुज देशात अराजक होते. पण इ. स. ८०२ च्या सुमारास जयवर्मा (दुसरा) गादीवर बसला व त्याने राज्यात शांतता प्रस्थापित केली. इंद्रपूर ही त्याची राजधानी होती. त्याने देवराज पंथाची स्थापना केली. शिवकैवल्य नामक ब्राह्मण त्याचा गुरू होता. जयवर्मा याने हरिहरालय नामक नवी नगरी वसवून तिथे राजधानी स्थापली. त्याने इ. स. ८५० पर्यंत राज्य केले. त्याचा पुत्र जयवर्मा (तिसरा) याच्या नंतर कंबुज देशाचे सिंहासन इंद्रवर्मा नामक पुरुषाला मिळाले. तो निराळ्या वंशाचा होता. तो वंश व्याधपूर व शंभुपूर नामक प्राचीन राज्यांशी संबंधित होता.

इंद्रवर्माचा पुत्र यशोवर्मा हा अत्यंत शूर व विद्वान राजा होता. त्याने इ. स. ८८९–९१० पर्यंत राज्य केले. त्याने यशोधरपूर नामक नवे नगर वसवले आणि कित्येक मंदिरे, आश्रम व तलाव निर्माण केले. त्याच्या राजवटीत शिक्षणाचा, तसाच भारतीय संस्कृती व साहित्य यांचाही प्रसार झाला. त्याच्या नंतर त्याचा मेव्हणा जयवर्मा (चतुर्थ) हा इ. स. ९२८ मध्ये सिंहासनावर बसला. त्याच्या नंतर यशोवर्म्याच्या बहिणीचा पुत्र राजेंद्रवर्मा राजा झाला. त्याने यशोधरपूर येथे राजधानी स्थापली. हे नगर सांप्रत अंकोरथोम या नावाने प्रसिद्ध आहे. त्याने शिव, विष्णू, ब्रह्मा, पार्वती यांची मंदिरे बांधली. इ. स. ९६८ मध्ये त्याचा पुत्र जयवर्मा (पाचवा) राजा झाला. त्याने इ. स. १००१ पर्यंत राज्य केले. त्यानेही पुष्कळ शिवमंदिरे बांधली. कंबुज देशात हे भारतीय राज्य इ. स. च्या १४ व्या शतकापर्यंत चालू होते. १५ व्या शतकात सयामच्या ताय लोकांचे आक्रमण सुरू झाल्यामुळे त्या हिंदू राज्याचा ऱ्हास सुरू झाला.

कंबुज देशात शैवमत हा राजधर्म होता. मात्र त्यात राजा व पितर यांची उपासना समाविष्ट होती. म्हणून त्याला देवराज पंथ हे नाव मिळाले. विष्णू, गणेश, ब्रह्मा, दुर्गा, गंगा, गौरी, सरस्वती, इ. देवतांचीही उपासना तिथे चालू होती. त्या देशात यज्ञयागही केले जात; पण मुख्यतः भक्तिपंथ प्रचलित होता. बौद्ध पंथाचाही तिथे पुष्कळ प्रसार झाला होता. मात्र वैदिक धर्माशी त्याचा संघर्ष कधीच झाला नाही.

या देशातील प्राचीन मंदिरे व मूर्तिशिल्पे भारतीय पद्धतीची आहेत. इ. स. च्या ८ व्या शतकापासून मात्र त्या पद्धतीला वेगळे वळण मिळाले आणि ख्मेर कलेचा विकास सुरू झाला. दहावे शतक हा ख्मेर संस्कृतीचा उत्कर्षकाल होय. तथापि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या काळातील शिव, विष्णू, बुद्ध, इ. देवतांच्या ज्या असंख्य सुबक मूर्ती सापडल्या आहेत, त्यांवरही गुप्त, पल्लव आणि चालुक्य युगांतील शिल्पकलेची छाप दिसते. इ. स. च्या १२ व्या शतकात अंकोरथोम या नगराजवळ अंकोरवट हे प्रसिद्ध देवालय निर्माण झाले. ते ख्मेर संस्कृतीचे अमर स्मारक ठरले

अंकोरवटचे प्रवेशद्वार

आहे. त्याची भव्यता, त्याचे ऐश्वर्य, सौंदर्य व संवादित्व अवर्णनीय आहे. या देवालयाभोवती अडीच मैल लांबीचा एक खंदक आहे. तो ओलांडून जाण्यासाठी जो पूल आहे, त्याच्या कठड्यांवर फणाधारी नागांच्या आकृती कोरलेल्या आहेत. पुलावरून पलिकडे गेल्यावर प्रथम एक उंच चौथरा लागतो. त्या चौथऱ्याभोवती सज्जा असून, त्यात जागोजागी पौराणिक कथाप्रसंग कोरलेले दिसतात. त्या चौथऱ्यावर तसेच आणखी दोन चौथरे असून, त्यांच्या चारही कोपऱ्यांत मनोरे बांधलेले आहेत. प्रत्येक चौथऱ्याला सज्जा आहे. तिसऱ्या चौथऱ्याच्या मध्यभागी मुख्य मंदिर असून, त्याचे शिखर पृथ्वीतलापासून २२० फूट उंच आहे. या देवालयातील शिखरांची रचना विष्णूच्या करंड-मुकुटासारखी दिसते. पहिल्या सज्जात मागच्या बाजूला अप्सरांची सुमारे १७५० पूर्णाकृती शिल्पे खोदलेली दिसतात. तियले नक्षीकामही अप्रतिम आहे. या मंदिराचे संपूर्ण शिल्पकाम वालुकापाषाणाचे असून, त्यात कुठेही चुना वापरलेला नाही.

हे मंदिर सूर्यवर्मा (दुसरा) याने निर्माण केले. ते देवराजाचे मंदिर असून, त्यात सूर्यवर्म्याची विष्णुरूप मूर्ती आहे. कालांतराने त्याचे बौद्ध मंदिरात रूपांतर झाले.

अंकोरथोमच्या मध्यभागी लोकेश्वराचे एक मंदिर आहे, ते जयवर्मा (सातवा) याने इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस बांधले. त्यात असंख्य मनोरे असून, त्या प्रत्येकावर लोकेश्वराचे मुख कोरलेले दिसते. अंकोरथोमच्या ईशान्येला १९ मैलांवर एका जंगलात बन्ताई श्रीचे सुंदर शिवमंदिर आहे. तिथे द. भारतातील गोपुरांसारखी दोन गोपुरे आहेत आणि रामायण-महाभारतातील काही प्रसंगही कोरलेले आहेत. हे सर्व शिल्पकाम व नक्षीकाम अत्यंत सुरेख आहे. डांग्रेक डोंगरावरील प्रा विहारचे शिवमंदिरही प्रेक्षणीय आहे.

मलाया – या प्रदेशात भारतीय लोकांनी सर्वप्रथम प्रवेश केला, असे म्हणतात. भारतातून चीनकडे जाताना वाटेतच हे द्वीपकल्प लागते. त्यामुळे भारतीय लोकांनी तिथे वसाहती केल्या. इ. स. च्या ५ व्या शतकात तिथे हिंदू राज्ये होती, असे चिनी ग्रंथांवरून कळते. त्या प्रदेशात प्राचीन मंदिरांचे जे अवशेष मिळाले आहेत, ते भारतीय संस्कृतीचे निदर्शक आहेत. त्या व्यतिरिक्त अनेक ठिकाणी संस्कृत शिलालेखही सापडले आहेत. तिथे शिव, विष्णू, गणेश, दुर्गा, बुद्ध यांच्या पुष्कळ मूर्ती सापडल्या आहेत.

इ. स. च्या ७ व्या शतकापासून १२व्या शतकापर्यंत द. सयाम व मलाया हे प्रदेश श्रीविजय राज्याच्या वर्चस्वाखाली होते. शैलेंद्रांच्या काळात तर सर्व द्वीपकल्प एकछत्री सत्तेखाली होते.

सुमात्रा – इ. स. च्या ७ व्या शतकात या प्रदेशात श्रीविजय राज्य नांदत होते. त्यापूर्वी कित्येक शतके तिथे भारतीय लोकांनी वसाहती केल्या होत्या व राज्येही स्थापली होती. पण त्यांची निश्चित माहिती उपलब्ध नाही. सातव्या शतकापासूनचा श्रीविजय राज्याचा थोडासा इतिहास चिनी ग्रंथ व शिलालेख यांवरून समजतो. त्यात जयनाश नामक राजाचा उल्लेख आहे. तिथे बौद्ध धर्माचे केंद्र होते. त्या प्रदेशात शिव, विष्णू, बुद्ध, लोकेश्वर, मैत्रेय यांच्या मूर्ती सापडल्या असून, काही स्तूपांचाही उल्लेख आढळतो. तिथले काही शिलालेख संस्कृतात आहेत.

श्रीविजय म्हणजे सध्याचे पालेंबांग होय. इ. स. च्या ७ व्या शतकाच्या अखेरीस श्रीविजयच्या राजाने पश्चिम जावाचा काही भाग व मलायू हे प्रदेश जिंकले. ८ व्या शतकात श्रीविजयचे मोठे साम्राज्य झाले होते. इ. स. च्या ९ व्या शतकात तिथे जावाच्या शैलेंद्र वंशाची सत्ता सुरू झाली. ती सुमारे दोन शतके चालू होती. ११ व्या शतकात चोल राजा राजेंद्र याने ती नष्ट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केली. त्याने श्रीविजय, मलाया, कटाह, इ. प्रदेश जिंकले होते. पण तिथे त्याची सत्ता सुमारे ५० वर्षेच टिकली. त्यानंतर काही काळ तिथे स्वतंत्र राज्ये नांदत होती. पण त्यांचा फारसा इतिहास ज्ञात नाही. इ. स. च्या १४ व्या शतकात या राज्यांचा पूर्ण नाश झाला.

जावा – याचे प्राचीन नाव यवद्वीप असे होते. इ. स. च्या १ल्या शतकातच या प्रदेशात भारतीय वसाहती स्थापन झाल्या होत्या. दुसऱ्या शतकात तिथे देववर्मा नामक राजा राज्य करीत होता. पाचव्या शतकात तिथे ब्राह्मण धर्माचे वर्चस्व होते आणि



दुर्गेची पाषाणमूर्ती – पूर्व जावा

बौद्ध धर्म मुळीच नव्हता, असे फाहियान म्हणतो. पण त्यानंतर लवकरच तिथे बौद्ध धर्माचा प्रसार सुरू झाला.

या बेटात संस्कृत शिलालेख सापडले आहेत, त्यांत पूर्णवर्मन नामक सम्राटाचा उल्लेख आढळतो. तो राजा इ. स. च्या ४ थ्या किंवा ५ व्या शतकातला असावा. तिथे त्या काळी अनेक लहान लहान हिंदू राज्ये नांदत असावी.

इ. स. च्या ८ व्या शतकात जावामध्ये शैलेंद्र वंशाचे राज्य विशेष प्रबळ झाले. त्या वंशातील राजांनी हळूहळू सुमात्रा, मलाया, इ. प्रदेशांवर आपली सार्वभौम सत्ता प्रस्थापित केली. श्रीविजयचे राजे व जावातील शैलेंद्र राजे यांचे मित्रत्वाचे संबंध होते. त्या दोन सत्ता एकत्र होऊन त्यांनी कंबुज व चंपा या देशांवरही आपले वर्चस्व स्थापले. श्रीविजयचा राजा धर्मसेतू मृत्यू पावल्यावर, त्याचा नातू, शैलेंद्र वंशातला बालपुत्र हा श्रीविजयचा राजा झाला.

शैलेंद्र – साम्राज्यात महायान पंथाचे विशेष प्राबल्य होते. त्यामुळे त्या राजांनी संस्कृत साहित्यालाही प्रोत्साहन दिले व नागरी लिपीचा पुरस्कार केला. त्या काळात तिथे शिल्पकलेचाही खूप उत्कर्ष झाला. जावामधील बोरोबुदूरचा स्तूप विख्यात आहे. त्याच्या सर्व बाजूंवर बौद्ध ग्रंथांतील कथाप्रसंग कोरलेले दिसतात. हा स्तूप इ. स. च्या ८ व्या शतकातला आहे, असे म्हणतात.

इ. स. च्या ९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शैलेंद्र – साम्राज्य नष्ट झाले आणि शैलेंद्रांची जावामधील राजसत्ताही संपली. मात्र सुमात्रामध्ये त्या वंशाचे राज्य १० व्या शतकाच्या अखेरपर्यंत चालू होते.

इ. स. च्या ९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मध्य जावामध्ये मतराम येथे एक हिंदू राज्य होते. बालोत्तुंग हा राजा तिथे इ. स. ८९८–९१० राज्य करीत होता. तो शैव होता. त्याचे व त्याच्या वंशातील राजांचे बरेच शिलालेख सापडले आहेत. तिथल्या दक्षोत्तम राजाने मंदिरेही शेकड्यांनी बांधली. त्यांतले प्रांबाननजवळचे शिवमंदिर खूप मोठे आहे. या घराण्याचे राज्य इ. स. ९३८ पर्यंत चालू होते. त्यानंतर पूर्व जावामध्ये एक हिंदू राज्य अस्तित्वात आले, असे कळते.

भृकुटीची पाषाणमूर्ती – पूर्व जावा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust Funding by MoE-IKS

ते सिंदोक या राजाने स्थापले. त्या वंशाचे राज्य इ. स. १२२२ पर्यंत होते. त्यात अनेक स्त्रियांनीही राज्य केले. त्या वंशातील धर्मवंश नामक राजा फार पराक्रमी होता. त्याने श्रीविजय राज्यावर आक्रमण केले; पण त्यात त्याला यश आले नाही. पुढे त्याचा जावई ऐरलंग याने इ. स. १०१९ ते १०४५ पर्यंत राज्य केले. त्याच्या राजवटीत व्यापाराची भरभराट झाली, त्याचप्रमाणे वाङ्मय व कला यांचाही विकास झाला. शैव, वैष्णव, महायान हे सर्व पंथ त्याच्या राज्यात प्रचलित होते. ऐरलंग स्वतःला विष्णूचा अवतार मानीत असे. त्याच्या चंडी-मध्ये त्याची विष्णुरूपातली, गरुडावर विराजमान अशी मूर्ती आहे. येथील सर्व राजे देवराज पंथाचे असून, ते स्वतःच आपापली चंडी (= देवालय) बांधून ठेवीत.

या वंशाचे राज्य इ. स. १२२२ पर्यंत वैभवाने नांदले. त्यानंतर सिंघसरीचा राजा केन अंग्रोक याने ते राज्य जिंकून सबंध पूर्व जावावर आपली सत्ता स्थापली. या राज्यात शिव आणि बौद्ध एकरूप झालेले आढळतात. सिंघसरीचा शेवटचा राजा कृतनगर शिव-बुद्धाचा उपासक होता. इ. स. १२९२मध्ये जयखट्वांग नावाच्या राजाने त्याचा पराभव करून त्याचे राज्य जिंकले व कृतनगराला ठार मारले. पुढे इ. स. १२९३ मध्ये कृतनगराचा जावई विजय याने जयखट्वांगाचा पराभव करून सासऱ्याचे राज्य परत मिळवले. मग त्याने कृतराजस जयवर्धन हे नाव धारण करून मजपहित राज्याची स्थापना केली. हे

बोरोबुदूर येथील शिल्पकाम – बुद्धाच्या जीवनातील एक प्रसंग

जावातील शेवटचे मोठे हिंदू राज्य होय. कृतराजस याचा पुत्र जयनगर व कन्या त्रिभुवना यांनी इ. स. १३५० पर्यंत राज्य केले. पुढे त्यांचा मुख्य मंत्री गजमद हाच मजपहितचा अभिषिक्त राजा झाला. त्याने सुमात्रा, मलाया, बोर्निओ या प्रदेशांवरही आपले वर्चस्व स्थापले. तो चामुंडेचा उपासक होता. त्याने राज्यशासनाची व्यवस्था उत्तम लावली होती. त्याच्या मृत्यूनंतर बरीच वर्षे हे राज्य चालू होते. पण इ. स. च्या १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात ते नष्ट झाले.

या प्रदेशात इ. स. च्या ४ थ्या किंवा ५ व्या शतकातील, राजा मूलवर्मा याने उभारलेले तीन यूपस्तंभ सापडले आहेत. त्याचप्रमाणे रामायण, महाभारत, ब्रह्मांड पुराण, हरिवंश, नीतिसार, इ. अनेक संस्कृत ग्रंथही उपलब्ध झाले आहेत. जावात शिव, गणेश, विष्णू, दुर्गा, इ. देवतांच्या मूर्ती सापडल्या असून, त्यांच्या मंदिरांच्या भिंतींवर रामायणातील प्रसंग कोरलेले आहेत. तिथल्या एका नदीचे नाव चंद्रभागा आहे; तर नगरांची नावे अयोध्या, मथुरा, कांची अशी आहेत. या प्रदेशात अगस्त्य मुनींचे मंदिरही बांधलेले आहे.

जावामध्ये वर्णाश्रमधर्म प्रचलित होता आणि तिथले साहित्य भारतीय ग्रंथांवर आधारित होते.

जावामध्ये हिंदू व बौद्ध मंदिरे जागोजागी आढळतात. डीएंगच्या पठारावर आणि प्रांबाननच्या दरीत असंख्य हिंदू देवालये आहेत. ती भारतीय पद्धतीची असून, त्यांवर फुले, पशु, पक्षी व नक्षीकाम कोरलेले आहे, तेही भारतीय आहे. त्यात चंडी भीम, चंडी अर्जुन, इ. पांडवांची मंदिरेही आहेत. प्रांबाननच्या दरीत १५६ देवालयांचा एक समूह आहे, त्याला लारा-जोग्रांग असे नाव आहे. एका मंदिरात दुर्गेची सुंदर मूर्ती आहे. मुख्य मंदिरात शिव, विष्णू व ब्रह्मा यांच्या मूर्ती आहेत. ही सर्व देवालये इ. स. च्या १० व्या शतकातली आहेत.

प्रांबाननच्या आसपास काही बौद्ध मंदिरे आहेत. त्यांतील चंडी कलशन हे मंदिर तारेचे असून, ते इ. स. च्या ८ व्या शतकातले आहे. त्याच्या शिखरावर कोनाड्यांत बुद्ध, अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ, अमोघसिद्धी यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. जकार्ताच्या उत्तरेला २० मैल अंतरावर, केडूच्या सपाट भूमीवर बरीच भव्य मंदिरे निर्माण झाली होती. त्यांतील बोरोबुदूर, चंडी पवोन व चंडी मेंदोत ही विशेष प्रसिद्ध आहेत. चंडी मेंदोत हे मंदिर भग्न झालेले होते, पण ते पुन्हा बांधून काढले आहे. चंडी पवोन हे मंदिर फार प्रेक्षणीय आहे. त्याच्यावर सुंदर नक्षीकाम व मूर्ती कोरलेल्या आहेत. शिखराच्या चार कोपऱ्यांवर स्तूप आहेत. मध्यभागी मोठा स्तूप आहे. बोरोबुदूरचा स्तूप एका डोंगरावर एका खडकात खोदलेला आहे. त्याला एकावर एक असे नऊ सज्जे असून, शेवटच्या सज्ज्यावर मध्यभागी घंटेच्या आकाराचा स्तूप आहे. खालचे सहा सज्जे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चौकोनी असून, वरचे तीन गोलाकार आहेत. त्या सज्ज्यांवर लहान या स्तूप आहेत. सज्ज्यांच्या भिंतींवर विपुल नक्षीकाम असून,



गोल सज्ज्यावरील स्तूपमालिका – बोरोबुदूर

असंख्य मूर्तिशिल्पेही आहेत. त्यांत मनुष्य, राक्षस, मकर, हत्ती, स्तंभ; तसेच बुद्ध, अक्षोभ्य, रत्नसंभव, इ. बौद्ध देवता, अशा आकृती दिसतात. स्तूपाला कठडे असून, त्यांवरही पुष्कळ नक्षीकाम व मूर्ती आहेत. बोरोबुदूरचा प्रचंड स्तूप ही जावातील सर्वश्रेष्ठ शिल्पकृती आहे. मात्र अंकोरवाटच्या देवालयात जे चैतन्य आहे, ते बोरोबुदूरच्या शिल्पात आढळत नाही, असे म्हणतात.

बाली – जावाच्या उत्तरेला हे बेट आहे. तिथे आजही भारतीय संस्कृती नांदते. तिथे संस्कृत शिलालेख व ताम्रपट सापडले आहेत, त्यावरून इ. स. च्या ९ व्या शतकापासूनचा इतिहास कळतो. तिथल्या राजांची नावे उग्रसेन, इंद्रवर्मदेव, केशरीवर्मा महेंद्रदत्त, उदयन, जयशक्ती, अशी होती. रामायण, नारायण अथर्वशीर्ष, उपनिषदे, इ. संस्कृत ग्रंथही उपलब्ध झाले आहेत. ही भारतीय संस्कृती तिथे केव्हापासून अस्तित्वात आहे, ते समजत नाही. कारण तिथे प्राचीन अवशेष सापडलेले नाहीत. पण इ. स. च्या ६ व्या शतकापासून तिथे भारतीय लोकांच्या वसाहती असाव्या व बौद्ध धर्माचाही प्रसार झालेला असावा, असे चिनी ग्रंथांतील माहितीवरून वाटते.

बोर्निओ – बालीच्या उत्तरेला व मलायाच्या पूर्वेला हे बेट आहे. हे जावाच्या आठपट मोठे आहे. जावामधील शिलालेखांत याला तंजुनगर व बकुलपूर अशी नावे आहेत. इ. स. च्या १ ल्या शतकापासून तिथे हिंदूंच्या वसाहती असाव्या, असे दिसते. इ. स. च्या ४ थ्या शतकातील चार शिलालेख यज्ञ-स्तंभावर कोरलेले असून, त्यांत मूलवर्मा राजाचा उल्लेख आहे. त्याने बहुसुवर्णक नावाचा यज्ञ केला व २०,००० गायी ब्राह्मणांना दान केल्या असे कळते. एका गुहेमध्ये शिव, गणेश, ब्रह्मा, स्कंद, नंदीश्वर, महाकाल, इ. देवतांच्या मूर्ती आणि काही बौद्ध मूर्तीही सापडल्या आहेत. विष्णूची एक सुवर्णमूर्तीही मिळाली आहे. या मूर्ती चौथ्या पाचव्या शतकांतल्या आहेत.

फिलिपाईन – बोर्निओच्या उत्तरेला हा द्वीपसमूह आहे. या प्रदेशात २००० वर्षांपूर्वीच भारतीय संस्कृती पोचली असावी. हा प्रदेश काही काल सुमात्रातील श्रीविजयच्या राजांच्या सत्तेखाली होता, नंतर काही काल जावाच्या राजाच्या ताब्यात होता. पुढे तिथे इस्लाम व ख्रिस्ती धर्मांचे वर्चस्व झाले, तरी व्यवहारात भारतीय नावेच प्रचलित होती. सांप्रत तिथे प्रचलित असलेल्या तगलॉग भाषेत पुष्कळ संस्कृत शब्द आढळतात.

संस्कृत भाषा – भारताबाहेर भारतीय संस्कृतीचा प्रसार मुख्यत्वे संस्कृत भाषेच्या द्वारा झाला. फुनान, कंबुज, चंपा, ब्रह्मदेश, सयाम, मलाया, सुमात्रा, जावा व बोर्निओ या प्रदेशांत इ. स. च्या चौथ्या ते सातव्या शतकांत कोरलेले असंख्य संस्कृत शिलालेख सापडले आहेत. ते गद्यात व पद्यात असून, त्यांची भाषाशैली अत्यंत प्रगत अशी आहे. काही लेख खूप काव्यमय आहेत. हे लेख लिहिणाऱ्या व्यक्तींना संस्कृत भाषेचे चांगले ज्ञान होते आणि रामायण, महाभारत, पुराणे, इ. संस्कृत ग्रंथ व भारतीय तत्वज्ञान त्यांच्या पूर्ण परिचयाचे होते. पाणिनीचे व्याकरण व पतंजलीचे महाभाष्य त्यांना अवगत होते. मनू, वात्स्यायन, प्रवरसेन, गुणाढ्य, कालिदास यांचा उल्लेख त्या शिलालेखांत आढळतो. त्याचप्रमाणे वेद, स्मृती, दर्शने, धर्मशास्त्रे, बौद्ध व जैन ग्रंथ यांचाही उल्लेख आहे.

आग्नेय आशियातील द्वीपकल्पे आणि आसपासची बेटे या सर्व भागाला प्राचीन काळी सुवर्णद्वीप हे नाव होते. त्यांतील अनेक राज्यांना एका छत्राखाली आणण्याचा पराक्रम कलिंग देशातील शैलेंद्र राजवंशाने केला होता. त्याचे साम्राज्य इ. स. च्या ८ व्या व ९ व्या शतकांत चालू होते. त्यानंतर काही काल हा प्रदेश इस्लामी सत्तेखाली होता व नंतर युरोपातील राष्ट्रांची सत्ता तिथे प्रस्थापित झाली. पूर्वी तेथे भारतीय संस्कृती नांदत होती, याची कल्पना आपल्याला नव्हती. अलिकडच्या संशोधनामुळे ती गोष्ट सिद्ध झाली आहे.

संस्कृत वाङ्मयात समुद्रपर्यटणासंबंधी कितीतरी सरस कथा आहेत. त्यांतील बौद्ध जातके व जैन समराइच्चकहा या ग्रंथांत भारताचा सुवर्णद्वीपाशी व्यापारी संबंध कसा चालू होता, त्याचे वर्णन आहे. असंख्य भारतीय व्यापारी व्यवसायानिमित्त तिकडे गेले व तिथे स्थायिक झाले. त्यांच्या मागोमाग क्षत्रिय गेले; मग ब्राह्मण गेले. काही लोक नशीब काढण्यासाठी गेले, काही युद्धात पराभूत झाल्यामुळे गेले, तर काही भारतातून हाकलून दिल्यामुळे तिकडे गेले. तिथल्या समृद्धीचे वर्णन ऐकूनही भार-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तीय लोक मोठ्या संख्येने तिकडे जाऊ लागले. तिथले लोक संस्कृतिहीन होते, असे नाही. मात्र तिथली संस्कृती भारतीय संस्कृतीपेक्षा कनिष्ठ होती. भारतीयांच्या श्रेष्ठत्वामुळे स्थानिक लोक प्रभावित झाले व त्यांनी भारतीय संस्कृती स्वीकारली. तेथील लोकांची नावे, गावांची नावे, कायदे, भाषा, लिपी, सामाजिक व आर्थिक व्यवस्था, शासनपद्धती वगैरे सर्व भारतीय झाले. एवढेच नव्हे, तर भारतातील जातिव्यवस्थाही तिथे निर्माण झाली. वेद, वेदांगे, उपनिषदे, पुराणे, सूत्रे, इ. सर्व संस्कृत ग्रंथांचा तिथे प्रसार झाला. तेथील लोकांजवळ रामायण, महाभारत, भागवतादी पुराणे हे ग्रंथ अजूनही आढळतात. शैव, वैष्णव, बौद्ध, इ. पंथांचाही तिथे प्रसार झाला. तिथले वाङ्मय, विज्ञान, शिल्प, स्थापत्य यांवर भारतीय संस्कृतीचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. त्या प्रदेशांतील लोकांच्या पुष्कळ चालीरीती भारतीय लोकांच्या चालीरीतींशी मिळत्या जुळत्या आहेत. [बृहत्तर भारत – श्री. र. शं. गुप्ते, १९६०; सु. भा. सं. उ. इ.; संस्कृतिसंगम; भा. सं. वि.; क. सा. इ. ए.; हिं. वि. इ.; भा [illegible].; आजकल, वार्षिक अंक, डिसेंबर १९५६; मार्च ऑफ इंडिय[illegible]क्टो. १९५६ व मे १९५७]

भारत सावित्री

एक स्तोत्र. पुढील श्लोक भारत सावित्री या नावाने प्रातःस्मरणात दिलेले आहेत. त्यांतला पहिला श्लोक उपक्रमाचा असून, शेवटचा श्लोक फलश्रुती सांगणारा आहे –

महर्षिर्भगवान्व्यासः कृत्वेमां संहितां पुरा ।
श्लोकैश्चतुर्भिर्धर्मात्मा पुत्रमध्यापयच्छुकम् १
मातापितृसहस्राणि पुत्रदारशतानि च ।
संसारेष्वनुभूतानि यान्ति यास्यन्ति चापरे २
हर्षस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च ।
दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् ३
ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति मे ।
धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते ४
न जातु कामान्न भयान्न लोभाद्धर्मं त्यजेज्जीवितस्यापि हेतोः ।
धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये जीवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः ५
इमां भारतसावित्रीं प्रातरुत्थाय यः पठेत् ।
स भारतफलं प्राप्य परं ब्रह्माधिगच्छति ६

अर्थ – भगवान व्यास महर्षी यांनी पूर्वी भारत संहिता निर्माण केली आणि त्या धर्मात्म्याने (सारभूत अशी) चार श्लोकांत ती शुक नामक पुत्राला पढवली. हजारो आईबाप आणि शेकडो भार्या व पुत्र यांचा संसारात अनुभव घ्यावा लागतो. ते जातात जातील आणि नवे येतील. (संसारात) हर्षाची स्थाने हजारो आहेत व भयाची स्थाने शेकडो आहेत. ती प्रत्येक दिवशी मूढ मनुष्याला भावनावेग आणतात; पण पंडिताला मात्र आणत नाहीत. मी हा इथे बाहू उभारून आक्रोश करतो आहे; पण माझे कोणीच ऐकत नाही. धर्मापासून अर्थ व काम निष्पन्न होतात असा तो धर्म माणसे का बरे आचरीत नाहीत ? कोणत्याही कामाने, भयाने आणि लोभाने धर्माचा त्याग कधीही करू नये जीवितासाठीही धर्मत्याग करू नये. कारण धर्म हा नित्य असून सुखदुःखे अनित्य आहेत. जीव हा नित्य असून, त्याचा हेतू अनित्य आहे. सकाळी उठून या भारतसावित्रीचे जो पठन करील, त्याला भारताच्या श्रवणपठणाचे फल मिळून तो परब्रह्मपदाला जाईल.

भारती कृष्णतीर्थ

(इ. स. चे १४ वे शतक) शृंगेरी पीठाचे एक शंकराचार्य आणि विद्यारण्य स्वामींचे गुरू. यांना अद्वैतब्रह्मानंद असेही म्हणत. विद्यातीर्थ महेश्वर यांच्या नंतर हे शृंगेरी पीठाच्या आचार्यपदी आरूढ झाले (इ. स. १३३३). इ. स. १३४६ मध्ये विजयनगरसंस्थापक हरिहररायाने विजयप्राप्तीनिमित्त आपल्या पाचही बंधूंसह शृंगेरीची यात्रा केली, तेव्हा भारतीतीर्थंच शृंगेरीचे मठाधीश होते.

'सर्वेषां तु प्रथममुखदं भारतीतीर्थमाहुः' (सर्वांत प्रथम ज्यांनी मला वाणी दिली ते भारतीतीर्थ होत.) या शब्दांनी माधवाचार्यांनी (विद्यारण्यांनी) त्यांच्याविषयीची आपली श्रद्धा प्रकट केलेली आहे. माधवाचार्यांना त्यांच्या उत्तरायुष्यात भारतीतीर्थ स्वामींनीच संन्यासदीक्षा व विद्यारण्य हे अभिधान दिले.

भारतीतीर्थांच्या नंतर शृंगेरीच्या पीठावर विद्यारण्यांची नियुक्ती झाली. विद्यारण्यांचा अपूर्ण राहिलेला पंचदशी हा विख्यात ग्रंथ भारतीतीर्थांनी पूर्ण केला, असे म्हणतात.

भारतीतीर्थांचे वाक्यसुधा व वैयासिकन्यायमाला हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. वाक्यसुधा या ग्रंथाचेच दुसरे नाव दृग्दृश्यविवेक असे आहे. ब्रह्मानंद भारती आणि आनंदज्ञान (आनंदगिरी) यांच्या यांवरील टीका प्रकाशित झालेल्या आहेत. नावाप्रमाणेच या छोटयाशा ग्रंथात दृग् (= आत्मा) आणि दृश्य (= जगत्) यांचे मोठे मार्मिक विवेचन आहे.

ब्रह्मसूत्रांच्या सर्व अधिकरणांचा सारांश वैयासिकन्यायमाला या प्रसिद्ध ग्रंथात दिलेला आहे. साधारणतः प्रत्येक अधिकरणासाठी दोन श्लोक दिलेले आहेत. पहिल्यात पूर्वपक्षाचे उत्थापन व दुसऱ्यात सिन्द्धातनिरूपण असते. याच ग्रंथांचा आदर्श पुढे ठेवून माधवाचार्यांनी जैमिनीयन्यायमालेची रचना केली. काही टीकाकारांच्या मते वैयासिकन्यायमाला हीसुद्धा गुरुशिष्यांची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संयुक्त रचना आहे. वैयासिकन्यायमाला मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहे. [आ. सा. मा.; पु. छ. शि. – १]

भारतेंदू हरिश्चंद्र (१८५०–१८८५ इ. स.) आधुनिक हिंदी भाषेचे जनक आणि नवयुगप्रवर्तक साहित्यिक. यांचा जन्म काशी येथील एका संपन्न वैश्य कुळात झाला. बंगालमधील इतिहासप्रसिद्ध शेठ अमीचंद यांचे हे वंशज होत. यांच्या वडिलांचे नाव गोपालचंद्र व मातेचे नाव पार्वतीदेवी होते. गोपालचंद्र हे चांगले कवी असून, त्यांनी हिंदी व संस्कृत भाषांमध्ये विपुल काव्यरचना केली आहे.

भारतेंदू हरिश्चंद्र हे पाच वर्षांचे असताना त्यांची माता मरण पावली व ते नऊ वर्षांचे असताना त्यांचे वडील निवर्तले. त्यामुळे त्यांचे शालेय शिक्षण व्यवस्थितपणे झाले नाही. त्यांचा स्वभाव स्वच्छंदी होता. शालेय शिक्षणात त्यांचे मन फारसे रमले नाही. पण बुद्धी कुशाग्र व स्मरणशक्ती तीव्र असल्यामुळे ते नेहमी परीक्षेत उत्तीर्ण होत. काशी येथील राजा शिवप्रसाद यांच्याजवळ त्यांनी इंग्रजी भाषेचा विशेष अभ्यास केला. या व्यतिरिक्त त्यांनी मराठी, बंगाली, गुजराती, मारवाडी, पंजाबी, उर्दू इ. भाषांचा अभ्यासही स्वतंत्रपणे केला. स्वप्रयत्नाने त्यांनी पुष्कळ ज्ञान प्राप्त केले. बाळपणापासूनच त्यांना कविता करण्याचा नाद होता. प्रारंभी त्यांचा कल शृंगाररसाकडे होता.

तेराव्या वर्षी भारतेंदू हरिश्चंद्र यांचा विवाह काशीचे लाला गुलाबराय यांची कन्या मुन्नादेवी हिच्याशी झाला. पंधराव्या वर्षी ते सकुटुंब जगन्नाथपुरीच्या यात्रेला गेले. तेव्हापासून त्यांना यात्रा करण्याचाच नाद लागला. त्यांनी पुष्कळ प्रवास केला आणि सुंदर प्रवासवर्णनेही लिहिली.

इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व आणि आवश्यकता जाणून भारतेंदू यांनी प्रथम स्वतःच्या घरीच एक शाळा सुरू केली होती. ती पुढे वाढत जाऊन तिला इ. स. १८८५ मध्ये हरिश्चंद्र हायस्कूल हे नाव मिळाले.

भारतेंदू यांनी प्रथम कविवचनसुधा नामक एक मासिक इ. स. १८६८ साली सुरू केले. इ. स. १८७३ मध्ये त्यांनी हरिश्चंद्रचंद्रिका हे मासिक सुरू केले. या मासिकात लोकांना आधुनिक हिंदी भाषेचा प्रथम परिचय झाला. १८७४ मध्ये त्यांनी स्त्रियांकरिताही बालबोधिनी नावाचे मासिक काढले.

भारतेंदू यांनी समाजसुधारणेसाठी पुष्कळ प्रयत्न केले. बालविवाह व बहुपत्नीत्व यांना त्यांचा विरोध होता. स्त्री-शिक्षण, विधवा-विवाह, परदेशगमन यांचे त्यांनी समर्थन केले. त्यांनी अनेक सामाजिक संस्थांची स्थापना केली. इ. स. १८७३ मध्ये त्यांनी वैष्णव धर्माच्या प्रचारासाठी तदीय-समाज स्थापला.

भारतेंदू हे सदैव आपल्या देशाच्या व मातृभाषेच्या सेवेत निमग्न असत. सांसारिक पाशात ते फारसे गुंतून राहिले नाहीत. द्रव्यसंचयासाठीही त्यांनी सायास केले नाहीत. जी संपत्ती त्यांना वारसाहक्काने मिळाली होती, ती त्यांच्या उदार वृत्तीमुळे लवकरच संपून गेली. मासिक-पत्रिका चालवण्यासाठीही त्यांनी स्वत.चे पुष्कळ धन खर्च केले. त्यामुळे जीवनभर त्यांना कष्टच सोसावे लागले. त्यांच्या देशप्रेमामुळे त्यांना काही वेळा सरकारी रोषही सहन करावा लागला. तथापि तशा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी विपुल साहित्य निर्माण केले. ते प्रतिभाशाली कवी

भारतेन्दू हरिश्चंद्र

होते. राजे महाराजे, विद्वान लोक, सामान्य लोक आणि सरकारी अधिकारीदेखील त्यांना फार मान देत. ते अजातशत्रूच होते. ते राजकवी मानले जात होते. इ. स. १८८० मध्ये त्यांना भारतेंदू ही पदवी मिळाली आणि ती आता त्यांच्या नावातच समाविष्ट झाली आहे.

भारतेंदू यांचे शरीर सुडौल व व्यक्तित्व प्रभावी होते. त्यांचे मधुर भाषण, त्यांची नम्रता व त्यांचे सौजन्य यांमुळे लोकांना त्यांच्याविषयी आदर वाटे. ते स्वभावाने हळवे, दयाळू व सत्यप्रिय होते. या सत्यप्रियतेमुळे त्यांना जीवनात पुष्कळ त्रास सहन करावा लागला; पण त्यांनी आपली वृत्ती सोडली नाही. आपली ही सत्यप्रियता सत्यहरिश्चंद्र नाटकात त्यांनी हरिश्चंद्र राजाच्या मुखाने वदविली आहे, ती अशी –

चंद्र टरै सूरज टरै टरै जगतव्यवहार
पै दृढ श्री हरिश्चंद्रको टरै न सत्यविचार ।

अर्थ – चंद्र मावळेल, सूर्य अस्ताला जाईल. सर्व जगाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यवहार बंद पडेल, पण सत्य हे कधी टाळू नये, असे हरिश्चंद्राचे ठाम मत आहे.

अखेर विविध चिंता आणि कष्ट यांमुळे त्यांचे शरीर रोगजर्जर झाले आणि इ. स. १८८५ च्या जानेवारीत म्हणजे अवघ्या पस्तिसाव्या वर्षीच त्यांचा अंत झाला.

भारतेन्दू हरिश्चंद्रजींनी आपल्या अल्पायुष्यात साहित्यक्षेत्रात जे महान कार्य केले, ते दैवी शक्तीच्या प्रेरणेमुळेच त्यांना शक्य झाले, असे मानले जाते. विद्यासुंदर, रत्नावली, पाखंडविडंबन, सत्यहरिश्चंद्र, इ. अठरा नाटके; भक्तसर्वस्व, प्रेममालिका, कार्तिकस्नान, गीतगोविंद, मधुमुकुल, वर्षाविनोद, भारतभिक्षा, इ. साठ काव्यग्रंथ; अग्रवालोंकी की उत्पत्ति, चरितावली पुरावृत्तसंग्रह, कश्मीरकुसुम, बादशाहदर्पण, इ. चौदा इतिहासविषयक ग्रंथ; मार्गशीर्षमहिमा, भक्तिसूत्रवैजयंती, वैष्णवसर्वस्व, श्रीयुगुलसर्वस्व, उत्सवावली, इ. सोळा धार्मिक ग्रंथ; मदालसोपाख्यान, राजसिंह, स्वर्गमें विचारसभा, परिहासिनी, कृष्णभोग, हिंदी भाषा, इ. तेरा स्फुट रचनांचे संग्रह; याशिवाय अनेक लेख, निबंध, यात्राविवरण, वगैरे विपुल साहित्य यांनी निर्माण केले आहे. ते सिद्धहस्त लेखक होते. हिंदी भाषेच्या इतिहासात भारतेंदुयुग नामक एक कालखंड मानला जातो.

समाज आणि राष्ट्र यांच्या सेवेसाठी राष्ट्र संघटित व बलवान झाले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. त्यासाठी त्यांनी पुढील घोषणा दिली होती–

निज भाषा उन्नति अहै, सब उन्नति को मूल ।
बिनु निज भाषा ज्ञान के, मिटत न हिय को शूल ।।

अर्थ – आपल्या भाषेची उन्नती करणे, हे सर्व उन्नतीचे मूळ आहे. आपल्या भाषेचे ज्ञान झाल्याशिवाय हृदयाचे दुःख नाहीसे होणार नाही.

भारतेन्दू पुष्टिमार्गी वैष्णव होते. देशासाठी, राष्ट्रभाषेसाठी जिवाचा एवढा आटापिटा करत असतानाही, त्यांचे मन आपले उपास्य दैवत राधाकृष्ण यांच्या भक्तीने भारलेले असे. राधाकृष्णाची जोडी पाहून त्यांचे मन हरखून जाते. ते म्हणतात–

नैन भरि देखि लेहु यह जोरी ।
मनमोहन सुंदर नटनागर श्रीवृषभानुकिसोरी ।।
कहा कहूँ छबि कहि नहिं आवै, वे साँवर यह गोरी
ये नीलांबर सारी पहिने, उनको पीत पिछौरी ।।
एक रूप, एक बेस, एक वय, बरनि सकै कवि को री ।
'हरीचंद' दोउ कुंजन ठाढे, हँसत करत चितचोरी ।।

अर्थ – ही राधाकृष्णांची जोडी डोळे भरून पाहून घ्या. श्रीकृष्ण हा मनमोहक व सुंदर आहे. ही वृषभानूची कन्या राधा. हिचे रूप काय वर्णावे. तो सावळा तर ही गोरी आहे. ही निळी साडी नेसली आहे आणि तो पीतांबर नेसला आहे. या दोघांचे रूप, वेष, व वय एकमेकांना अनुरूप आहे. त्याचे वर्णन करता येत नाही. हरिश्चंद्र म्हणतो, की ती दोघे कुंजात उभी आहेत आणि हसत हसत एकमेकांचे चित्त आकर्षून घेत आहेत.

भारतेन्दू हरिश्चंद्रजींना भारताच्या प्राचीन इतिहासाचा अभिमान होता व पाश्चात्य विद्येच्या बळावर भारताची उन्नती होईल, अशी आशाही होती. त्यासाठी त्यांनी जुन्या, दुष्ट चालीरीतींवर कडक टीकाही केली आहे. [हिं. सा. को.; अ. च. को.; ना. प्र. प.–भारतेंदुजन्मशती अंक, १९५०]

भारद्वाजगृह्यसूत्र कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे एक सूत्र. चरणव्यूहामध्ये भारद्वाजी या नावाची एक शाखा निर्दिष्ट असली, तरी केवळ सूत्रभेदानेच शाखाभेद समजला जातो. या सूत्राची परंपरा दक्षिण भारतात असावी आणि ती परंपरा बऱ्याच जुन्या काळी लुप्त झाली असावी, असे मत या सूत्राच्या संपादिका श्री. हेन्रिट सालोमन्स यांनी प्रस्तावनेत मांडले आहे. परंतु भारद्वाजसूत्राच्या मूळ रचनास्थानासंबंधी डॉ. चिं. ग. काशीकर यांनी म्हटले आहे की, भारद्वाजसूत्राची रचना उ. भारतातील कुरुपांचाल देशात यमुनेच्या काठी झाली आहे. या गृह्यसूत्राचे तीन अध्याय असून, त्यामध्ये उपनयनादी सर्व संस्कार, सप्तपाकसंस्था, वैश्वदेव, नांदीश्राद्ध, अद्‌भुतप्रायश्चित्ते, इ. विषय आले आहेत. हे सूत्र आपस्तंब गृह्यसूत्राच्या अगोदरचे मानले जाते. आपस्तंब गृह्यसूत्र आणि हिरण्यकेशी गृह्यसूत्र यांच्याशी भारद्वाज गृह्यसूत्राचे पुष्कळ साम्य आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

भारद्वाजश्रौतसूत्र कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेच्या सहा सूत्रांपैकी एक. हिरण्यकेशी सूत्राचा टीकाकार महादेव याने आपल्या प्रस्तावनेत या सहा सूत्रांचा उल्लेख केला असून, त्यामध्ये बौधायनसूत्रानंतर भारद्वाजाचा उल्लेख आहे. आपस्तंबसूत्र व भारद्वाजसूत्र यांच्या तौलनिक अभ्यासावरून असे दिसते, की भारद्वाजसूत्र हे आपस्तंबसूत्राच्या आधी रचले गेले असावे. आपस्तंबसूत्रांचा चा रचनाकाळ सनपूर्व ६०० ५५० समजला जातो. त्यावरून भारद्वाज श्रौतसूत्र सनपूर्व ६०० च्या सुमाराचे ठरते.

या सूत्राचा अभ्यास फारसा झालेला नाही. इ. स. १९३५ साली डॉ. रघुवीर यांनी या श्रौतसूत्राचा काही भाग प्रकाशित केला आहे. परंतु साकल्याने अभ्यास करून आणि उपलब्ध सर्व सामग्री वापरून डॉ. चिं. ग. काशीकर यांनी भारद्वाजश्रौतसूत्राची चिकित्सित आवृत्ती इ. स. १९६४ साली प्रकाशित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केली आहे. या आवृत्तीच्या वेळीही संपूर्ण श्रौतसूत्र उपलब्ध होऊ शकले नाही. या सूत्रांचे अनुयायी आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्ह्यात असावे, असा एक तर्क आहे. परंतु या सूत्राची रचना उ. भारतात नर्मदेच्या काठी झाली असावी, असे डॉ. काशीकरांचे मत आहे.

उपलब्ध असलेल्या श्रौतसूत्राचे १४ अध्याय असून, त्यांमध्ये दर्शपूर्णमास, अग्न्याधान, निरूढपशुयाग, चातुर्मास्य, ज्योतिष्टोम इत्यादी विषयांसंबंधी विधाने आहेत. या श्रौतसूत्राला जोडूनच भारद्वाजपितृमेघसूत्राचे दोन अध्याय प्रकाशित आवृत्तीत आहेत. आपस्तंबपितृमेघसूत्र, हिरण्यकेशी पितृमेघसूत्र व भारद्वाजपितृमेघसूत्र यांमध्ये नव्याण्णव टक्के सादृश्य आहे. त्यामुळे ही सूत्रे मूलतः एकच असावी, असे मत डॉ. काशीकर यांनी मांडले आहे. यानंतर परिशेष सूत्र म्हणून परिशिष्टस्वरूप असा एक संकीर्ण भाग आहे. यावरून भारद्वाजश्रौतसूत्रामध्ये राजसूय, चयन इत्यादी विषयांसंबंधीची विधाने असली पाहिजेत, असे दिसते. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

भार राजवंश औधच्या राजघराण्याचे हे नाव आहे. हे घराणे इ. स. च्या तेराव्या शतकाच्या पूर्वी होऊन गेले. दाल, वाल, तिलोकी, बिलोकी व दल्की मल्की अशी या राजांची नावे मिळतात. या घराण्याच्या सहा पिढ्या झाल्या व त्याची सुरुवात इ. स. ११०० च्या सुमारास झाली. हे मूळचे गिरिजन होते. या लोकांचे जंगलावर व शिकारीवर प्रेम असे. हे वृत्तीने धार्मिक होते. जादूटोणा व चेटूक यांत हे विशेष प्रवीण असत. चांडाळभवर व भार हे एकच असावे, असे एक मत आहे. यांच्यापैकी एका टोळीप्रमुखाने कालंजर किल्ला जिंकून तिथे आपले राज्य स्थापन केले. माळवा, मिर्झापूर, फैजाबाद इथपर्यंत त्यांनी आपल्या राज्याचा विस्तार वाढवला होता. आपल्याला सवर्ण हिंदुसमाजात स्थान मिळावे, यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. परंतु राज्य जाताच ते पुन्हा पूर्वास्पृश्य समजले जाऊ लागले. [इं. अॅं.]

भारवी (इ. स. चे ६ वे शतक) एक महाकवी. हा कालिदासानंतर आणि माघ कवीच्या आधी होऊन गेला. या कालखंडातील काही पुराव्यांची छाननी करून त्याचा काल निश्चित केला गेला आहे. भारवीचे विश्वसनीय चरित्र उपलब्ध नाही. त्याने ते कुठे दिले नाही. इतकेच नव्हे, तर आपल्या किरातार्जुनीय महाकाव्यात स्वतःचा उल्लेखही केला नाही. पण इ. स. १९२४ मध्ये द. भारतात दंडीच्या अवंतिसुंदरीकथासार व अवंतिसुंदरीकथा या दोन कथांचा शोध लागला व त्यांतून भारवीची काही माहिती उपलब्ध झाली. दंडी हा भारवीचा नातू समजला जातो. अवंतिसुंदरीकथेमध्ये भारवीची माहिती मिळते, ती अशी–

भारताच्या वायव्य प्रदेशात आनंदपूर नावाचे एक नगर होते. तिथले एक कौशिकगोत्री ब्राह्मण कुटुंब तिथून निघून नासिक्य देशात अचलपूर या गावी आले. या कुटुंबातील नारायणस्वामी नावाच्या ब्राह्मणाला दामोदर नावाचा पुत्र होता. तोच पुढे भारवी या नावाने प्रसिद्ध झाला. इथे असता तिथल्या विष्णुवर्धन राजाशी भारवीचा स्नेह जडला. एके दिवशी राजाबरोबर शिकारीला गेला असता त्याला नाइलाजाने मांस खावे लागले. आपल्या हातून अभक्ष्यभक्षणाचे पातक घडले याबद्दल भारवीच्या मनाला रुखरुख लागली. त्यामुळे तो घरी न जाता परस्पर तीर्थयात्रेसाठी निघून गेला. प्रवासात गंगराज घराण्यातल्या दुर्विनीत राजाशी त्याचा परिचय झाला व काही काल त्याच्यापाशी तो राहिला. तिथे असताना त्याने कांची नगरीत सिंहविष्णू नामक पल्लव राजाच्या स्तुतिपर एक आर्या रचली. ती एका गायकाला मिळाली. त्याने ती सिंहविष्णूच्या दरबारात गायिली. ती ऐकून राजा खूष झाला. त्याने कवीचा नाव-पत्ता माहीत करून घेऊन भारवीला दुर्विनीत राजाकडून आपल्या दरबारी आणले व राजकवी म्हणून आश्रयाला ठेवले.

भारवीविषयी एक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी –

भारवी हा सदैव लेखनवाचनात निमग्न असे. तो द्रव्य मिळविण्यासाठी कसलाच उद्योग करीत नसे. त्यामुळे घरात अठराविश्वे दारिद्र्य. त्याची बायको बरेच दिवस दारिद्र्याशी झगडून शेवटी त्रासली व एके दिवशी त्याला म्हणाली. 'काय एवढे लिहिता वाचता त्याचे दिवे पाजळा एकदा. तुमचे कवित्व दाखवून एखाद्या राजाकडून चार पैसे मिळवून आणा.'

भारवीला ती गोष्ट लागली. तो घराबाहेर पडला व वाट फुटेल तिकडे चालू लागला. चालता चालता वाटेत एक तळे लागले. तिथे विसाव्यासाठी बसला असता त्याला एक श्लोक स्फुरला व त्याने तो एका कमलपत्रावर लिहून काढला. तो श्लोक असा होता (किराता. २·३)–

सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम् ।
वृणुते हि विमृश्यकारिणं गुणलुब्धाः स्वयमेव सम्पदः ।।

अर्थ – कोणतेही काम अविचाराने करू नये. कारण अविचार हे सर्व अनर्थांचे मूळ आहे. विवेकी पुरुषाच्या गुणांवर मोहित होऊन लक्ष्मी त्याला आपण होऊनच वरते.

त्याच वेळी जवळच्या राजधानीतून मृगयेसाठी आलेल्या एका राजाने भारवीला पाहिले. त्याला भारवीचा तो श्लोक आवडला. 'उद्या दरबारात ये म्हणजे मी तुझी योग्य ती संभावना करीन,'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे राजाने भारवीला सांगितले. दुसऱ्या दिवशी भारवी राजवाड्यावर गेला; पण त्याचे ते भिकारीपण पाहून द्वारपालाने त्याला आत सोडलेच नाही.

राजाने तो श्लोक सुवर्णाक्षरांनी लिहून घेऊन आपल्या शयनमंदिरात लावला. या गोष्टीला एक वर्ष लोटले. एके दिवशी राजा शिकारीसाठी म्हणून राजधानीतून बाहेर पडला, तो आठ दिवसांनंतर अपरात्री राजवाड्यात आला. पाहतो तर पलंगावर राणीला बिलगून एक तरुण झोपलेला. त्या दृश्याने राजाचा संताप अनावर झाला आणि त्या दोघांचाही शिरच्छेद करण्यासाठी त्याने तलवार उपसली. तेवढ्यात तो वरील श्लोक त्याच्या नजरेस पडला. लगेच त्याने तलवार आवरली व विवेकाने वागायचे ठरविले. त्याने राणीला जागे करून त्या तरुणाबद्दल खुलासा विचारला. राणी म्हणाली 'गेली २० वर्षे बेपत्ता असलेला आपला बाळ कालच परत आला. बघा कसा शांत झोपला आहे.' राजाला ही हकीकत ऐकून वाटले, की आपण अविवेकाने या दोघांना ठार केले असते, तर पत्नी आणि पुत्र या दोघांनाही मुकलो असतो. त्याने भारवीचे मनोमन आभार मानले; मग त्याचा शोध केला. राजाने दिलेल्या संभावनेने भारवीचे दैन्य फिटले.

या दंतकथेचा दुसरा पर्याय असा आहे, की भारवीने वरील श्लोक लिहून तो आपल्या बायकोकडे दिला व तिला सांगितले– 'हा श्लोक तू एक लाख मुद्रांना वीक आणि तुझे दैन्य फेडून घे.' भारवीची पत्नी तो श्लोक घेऊन नगरात गेली असता एका सावकाराला तो श्लोक आवडला व त्याने तो विकत घेऊन भारवीच्या पत्नीला एक लक्ष मुद्रा दिल्या.

किरातार्जुनीय हे एकच महाकाव्य लिहून भारवी हा महाकवी म्हणून अजरामर ठरला आहे. सदुक्तिकर्णामृतात त्याच्या वाणीला प्रकृतिमधुर म्हटले आहे. कालिदासाची जशी उपमा, दंडीचे जसे पदलालित्य, तसे भारवीचे अर्थगौरव प्रसिद्ध आहे.

पण या अर्थगौरवामुळेच भारवीची भाषा सरस असूनही कठीण बनली आहे. किरातार्जुनीयाच्या पहिल्या तीन सर्गांना पाषाणत्रय म्हणतात, ते या काठिण्यामुळेच. नारळ सोलण्याचे आणि त्याचे कठिण कवच फोडण्याचे श्रम घेतल्यानंतरच त्यातील मृदु-मधुर खोबरे हाती लागते, हे लक्षात घेऊन मल्लिनाथाने भारवीच्या काव्याला 'नारिकेलफलपाक' म्हटले आहे. पंधराव्या सर्गात त्याने अनेक कृत्रिम काव्यबंध साधले असून, तेही अर्थज्ञानाला अत्यंत किचकट ठरले आहेत.

साहित्य, व्याकरण, वेदान्त, न्याय, धर्म, काम या शास्त्रांचे भारवीने अध्ययन केले होते. राजनीतीत तर तो निपुणच होता. किरातार्जुनीयात राजनीतीचे कित्येक सिद्धान्त त्याने सुंदरपणे मांडले आहेत. याविषयी साक्ष देण्यास त्याचा पुढील एकच श्लोक (२.३७) पुरेसा आहे–

बलवानपि कोपजन्मनस्तमसो नाभिभवं रुणद्धि यः ।
क्षयपक्ष इवैन्दवीः कलाः सकला हन्ति स शक्तिसम्पदः ॥

भावार्थ – बलवान असलेल्या पुरुषालाही आपल्या शत्रूवर विजय मिळविण्यासाठी आधी क्रोधावर विजय मिळवावा लागतो. त्याने दूरवर विचार करून प्रभुशक्ती, मंत्रशक्ती आणि उत्साहशक्ती या शक्तित्रयाचा संचय करावा. जो पुरुष असे करणार नाही, त्याला कृष्णपक्षातल्या चंद्राला त्याच्या कला जशा सोडून जातात तशा वरील तीन्ही शक्ती सोडून जातील.

इहलोकीचे सुख, विषयांचा संयत उपभोग, राज्याचे स्थैर्य, राज्य व वैभव यांच्यासाठी आचरण्याचा प्रयत्नवाद, इ. ऐहिक गोष्टी भारवीला प्रिय होत्या. मोक्षासाठी, केवळ आत्म्याच्या कल्याणासाठी हे सगळे टाकून द्यायला तो तयार नव्हता. त्यासाठी त्याने ब्राह्मणवेषधारी इंद्र आणि अर्जुन यांच्यांतला एक कल्पित प्रसंग उभा करून अर्जुनाच्या मुखाने आपले इहवादी तत्त्वज्ञान सांगितले आहे. 'शस्त्रे काय मागतोस ? मोक्ष माग' असे सांगणाऱ्या इंद्राला अर्जुन सांगतो. 'मला क्षत्रियाला व विशेषतः अपमानदंशाने जळफळणाऱ्या क्षत्रियाला हा उपदेश करू नको. माझ्या शत्रूंना मारून मी आमची वंशकीर्ती स्थिर केली नाही तोपर्यंत तुझा तो मोक्ष (निर्वाण) मला मिळाला तरी माझ्या जयसिद्धीच्या मार्गात त्याची मला अडचणच वाटेल.'

संस्कृत महाकाव्यामध्ये भारवीने एका नव्या शैलीला व एका नव्या प्रवृत्तीला जन्म दिला, असे म्हणता येते. याच प्रवृत्तीला धरून कमीअधिक प्रमाणात माघ, रत्नाकर, भट्टी, कुमारदास, इ. कवींनी आपला कविमार्ग अनुसरला आहे. दंडी व भामह यांनी महाकाव्याची जी लक्षणे बसवली, ती भारवीच्या किरातार्जुनीयावरूनच बसवली असावी, असा संभव आहे. पाहा – किरातार्जुनीय. [सं. का. पं. प्रा.; सं. क. द.]

भारशिव उ. भारतातील एक प्राचीन नागवंश. इ. स. च्या १ल्या शतकात पद्मावती (ग्वाल्हेरजवळील पवाया) येथे एका नागवंशाचे राज्य होते. ते कुशाणांनी नष्ट केले, तेव्हा त्या राजवंशातील लोकांनी बुंदेलखंडातील घनदाट अरण्यात आश्रय घेतला. त्यानंतर इ. स. च्या २ ऱ्या शतकात त्या वंशातील काही पराक्रमी पुरुषांनी पद्मावतीचे राज्य पुन्हा जिंकून घेतले. पुढे त्यांच्यांतील एकाने कांतीपुरी (मुरैना जिल्ह्यातील कुतवार) येथे राज्य स्थापले. कुशाण राजा वासुदेव याच्या पश्चात वीरसेन नामक नागराजाने मथुरेवर स्वारी करून कुशाणांचा पराभव केला व तिथे आपली सत्ता स्थापली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुराणात या राजवंशाचा उल्लेख नवनाग या नावाने आलेला आहे. त्यालाच पुढे भारशिव हे नाव मिळाले. अनेक शिलालेखांत व ताम्रलेखांत या राजवंशाचा उल्लेख आहे. वाकाटक राजा प्रवरसेन (२ रा) याच्या एका ताम्रलेखात या वंशाचे वर्णन केलेले आहे, ते असे–

अंसभार-सन्निवेशित-शिवलिङ्गोद्वाहन- शिवसुपरितुष्ट-समुत्पादितराजवंशानां पराक्रम-अधिगत-भागीरथी-अमल-जलमूर्धाभिषिक्तानां दशाश्वमेध-अवभृथस्नातानां-भारशिवानाम् ।

अर्थ–ज्या राजवंशाचा प्रारंभ आपल्या स्कंधावर शिवलिंग वाहून शंकराला प्रसन्न केल्याने झाला, ज्या वंशातील राजांनी भागीरथीच्या तीरांवर आपली सत्ता स्थापली, तिच्याच पवित्र जलाने स्वत:ला राज्याभिषेक करून घेतले आणि दशाश्वमेध यज्ञ करून अवभृथ स्नान केले, त्या भारशिव राजवंशाच्या स्मरणार्थ...

इ. स. ८० ते ९० च्या दरम्यान कुशाणांनी पद्मावतीचे राज्य जिंकले. इ. स. १५० च्या सुमारास नवनागांनी ते परत घेतले आणि इ. स. १७५ च्या सुमारास वीरसेनाने मथुरा जिंकली. पद्मावती, कांतीपुरी व मथुरा या तीन्ही त्या वंशाच्या राजधान्या होत्या. त्या वंशात भीम, स्कंद, वृहस्पती, हय, त्रय, बर्हिन, भव, व्याघ्र, देव, गणपती, कीर्तिषेण, नागसेन, रुद्रसेन, इ. राजे होऊन गेले. त्यांची हजारो नाणी विदिशा, पद्मावती, कौशांबी, मथुरा, अहिच्छत्रा, इ. ठिकाणी सापडली आहेत. त्यावरून लाहोरपासून अहिच्छत्रा, मथुरा, कौशांबी व बुलंदशहर येथपर्यंत त्यांचे अधिराज्य होते, असे ध्यानात येते. ही नाणी म्हणजे तांब्याचे लहान चौकोनी तुकडे असून, त्यांवर एका बाजूला वर्तुळाकार ब्रीदवाक्य व त्रिशूळ आणि दुसऱ्या बाजूला नंदी असतो.

वीरसेनाच्या काही मुद्रांवर एका बाजूला ताडवृक्ष असून, दुसऱ्या बाजूला सिंहासनावर स्त्रीमूर्ती आहे. तिच्यावर नागछत्र आहे. ही मूर्ती गंगेची असून, नागछत्र हे वंशाचे प्रतीक आहे. ताडवृक्ष हे भारशिवांचे राजचिन्ह आहे. नागवंशाच्या काही मुद्रांवर मयूर, सिंह, चक्र, इ. आकृतीही आढळतात.

या नाग राजवंशाने कुशाणांची सत्ता नष्ट केली, त्या कामात त्याला तत्कालीन गणराज्यांचेही साहाय्य झाले असावे. मालव, यौधेय व कुणिंद ही जनपदे त्या काळी स्वतंत्र होती. या सर्वांचा एक प्रबळ संघ असून, भारशिवांनी त्याचे नेतृत्व केले, असे श्री. काशीप्रसाद जायसवाल यांनी प्रतिपादले आहे. बिहार, उत्तर प्रदेश, बुंदेलखंड, मध्य प्रदेश, माळवा, राजस्थान व पूर्व पंजाब एवढ्या विस्तृत प्रदेशात भारशिवांचे साम्राज्य पसरले होते. त्यांनी कुशाणांच्या हातून भारताला मुक्त केले आणि हिंदू संस्कृतीची पुन: प्रतिष्ठा केली. त्यांनी केलेल्या दहा अश्वमेध यज्ञांमुळेच काशीचा एक घाट दशाश्वमेध या नावाने प्रसिद्धी पावला, असे जायसवालांचे मत आहे. परकीयांच्या राज्यात बेसुमार गोहत्या चालू होती, ती भारशिवांनी बंद केली आणि नंदी व गायं यांना श्रेष्ठत्व प्राप्त झाले.

वाकाटक राजांच्या ताम्रपटांवरून समजते, की वाकाटक राजवंशातील प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र याचा विवाह भारशिव वंशातील भवनागाच्या कन्येशी झाला होता. त्यांचा पुत्र रुद्रसेन हाच प्रवरसेनानंतर सिंहासनावर बसला. त्याला भारशिवांचे राज्यही मिळाले होते, असे विष्णू, वायू, ब्रह्मांड, इ. पुराणांवरून समजते.

शिव ही भारशिवांची उपास्यदेवता होती. त्यांच्या राज्यात सर्वत्र शिवोपासना प्रचलित होती आणि त्यांनी आपले सर्व कर्तृत्व शिवाला अर्पण केले होते. त्या कालातील अनेक शिवमंदिरे अजून अस्तित्वात आहेत. हे नागवंशी राजे नागपूजक नसून, नाग हे त्यांचे प्रतीक होते. ते त्यांच्या मुद्रांवर व मूर्तिकलेत आढळते. काही नाग राजे विष्णुभक्त होते. त्यांच्या मुद्रांवर चक्र हे विष्णूचे प्रतीक आढळते. नागराजे गंगेलाही भजत. त्यांनी निर्माण केलेल्या गंगेच्या पुष्कळ मूर्ती सापडल्या आहेत.

मध्य प्रदेशात अनेक ठिकाणी नाग राजांच्या सुंदर मूर्ती आढळतात, त्या भारशिव वंशातील राजांच्याच असाव्या.

बघेलखंडातील भूमरा येथील शिवमंदिर नागर शैलीचे असून, ते भारशिव वंशाच्या काळातले आहे. नागर शैली हे नाव नाग या वंशनावावरूनच आले असावे, असे श्री. जायसवाल म्हणतात. त्यांच्या मते नागरी लिपी हे नावही नाग या शब्दावरूनच पडले आहे. [अं. यु. भा.; म. भा. इ.; श्री. अळतेकर, न्यू. इं. अँ., ऑगस्ट १९४३]

भाराहा मठ एक बौद्ध विहार. हा विहार बंगालमध्ये ताम्रलिप्ती या नगरात होता. इथे भिक्षू व भिक्षुणी यांचा निवास असे. पूर्व भारतातील हे एक महत्त्वाचे बौद्ध विद्याकेंद्र होते. इत्सिंग हा चिनी प्रवासी इथे राहूनच संस्कृत भाषा व शब्दविद्या शिकला. या विहारातली शिस्त फार कडक होती, असे त्याने लिहून ठेवले आहे. [बु. इ. ओ.]

भारुंड एक विचित्र पक्षी. प्राचीन भारतीय साहित्यात याचा उल्लेख पुष्कळ वेळा आलेला आहे; पण असा पक्षी सध्यातरी अस्तित्वात नाही. त्याला शरीर एकच, पण मस्तके दोन होती; तो प्रचंड असून, इतका बलवान होता, की एखाद्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माणसाला ती सहज उचलून उंच उडू शके. महाभारतात उत्तर कुरु प्रदेशाचे वर्णन असून, त्यात भारुंड पक्ष्याचा उल्लेख आहे–

भारुण्डा नाम शकुनास्तीक्ष्णतुण्डा महाबलाः ।
तान् निर्हरन्तीह मृतान् दरीषु प्रक्षिपन्ति च ।।
(म. भा. भीष्म ७·१२)

अर्थ – (तिथे) भारुंड नावाचे महाबलवान व तीक्ष्ण चोचीचे पक्षी आहेत. ते मृत माणसांची प्रेते उचलून नेतात आणि दरीत टाकून देतात.

पंचतंत्र, जैन आगम, पुष्पदंताचे महापुराण, चतुर्भुजदासाचे मधुमालती नामक प्रेमाख्यान, इ. ग्रंथांत त्याचा नामनिर्देश भिन्न भिन्न संदर्भात केलेला आहे. त्यावरून तो पक्षी फार लोकप्रिय होता, असे वाटते. त्याला गंडभेरुंड असेही नाव होते.

काही ग्रंथांत या पक्ष्याची चित्रेही आढळतात. ती चित्रे निर्माण झाली, तेव्हा हा पक्षी बहुधा अस्तित्वात नसावा. प्राचीन ग्रंथांतील वर्णनावरून त्याची काल्पनिक चित्रे काढली गेली असावी. तो केव्हा लुप्त झाला, हे मात्र सांगता येत नाही.

प्राकृत साहित्यातील काही कथांत भारुंड पक्षी ठळकपणे आलेला आहे. पंचतंत्रात त्याची एक कथा आहे.

या पक्ष्याला दोन चोची, तीन पाय व दोन आत्मे असतात, तो मनुष्यासारखी भाषा बोलतो, असेही वर्णन काही ठिकाणी आढळते. अप्रमादी जीवनचर्या असलेल्या मनुष्याला भारुंड पक्ष्याची उपमा दिली जाते. कल्पसूत्रांत भगवान महावीराला भारुंड पक्ष्याप्रमाणे अप्रमत्त म्हटले आहे. [श्री. अगरचन्द नाहटा – त्रिपथगा, जानेवारी १९६२]

भारूड लोकगीतांचा एक प्रकार. भारूड शब्दाची निश्चित उत्पत्ती सांगणे कठीण आहे. विविध पंडितांनी या संदर्भात जे तर्क केले आहेत, ते असे – बहुरूड गीत म्हणजे भारूड, असे पांगारकर म्हणतात. ज्यात भारलेले गूढ व्यक्त झाले आहे ते भारूड, अशी कल्पना आचार्य विनोबा भावे यांनी मांडली आहे. प्रा. नांदापूरकर यांनी भारुडाचा संबंध भारुंड या संस्कृत शब्दाशी जोडला आहे. भारुंड हा दोन तोंडाचा पक्षी होता. त्यांच्या मते भारूड हे द्विमुख असते. त्याची दोन तोंडे म्हणजे त्याचे दोन अर्थ होत. एक वाच्यार्थ व दुसरा लक्ष्यार्थ. एक व्यावहारिक आणि दुसरा पारमार्थिक. काहीं पंडितांनी कानडी शब्दाच्या आधाराने भारुडाची व्युत्पत्ती देण्याचा प्रयत्न केला आहे. हाडू हा गीतवाचक शब्द भार म्हणजे जनसमुदाय या शब्दापुढे लावून भार + हाडू = भाराडू हा शब्द तयार झाला व त्या वरून भारूड हा शब्द बनला. गारूड व भारूड यांत बरेच साम्य आहे, असेही म्हणतात. या सर्व तर्कांमध्ये श्री. पांगारकर व प्रा. नांदापूरकर यांचे तर्क लोकमान्य झाले आहेत.

भारुडांचे नाव घेताच आपल्यापुढे एकनाथांचे नाव येते. परंतु त्यांच्याही पूर्वी ज्ञानदेव, नामदेव यांनी भारुडे रचली होती. ज्ञानदेवाचा आंधळा, पांगळा किंवा नामदेवांचा खेळिया, बोबडा ही भारुडे प्रसिद्ध आहेत. त्यांतून त्यांनी आत्मानुभव निवेदन केला असून, समाजाला परमार्थाचा उपदेशही केला आहे. नाथपूर्व भारुडांची संख्या सुमारे पन्नासांवर आहे. नाथांच्या नंतर तुकाराम, रामदास यांनीही भारुडांची रचना केली आहे.

जनतेचा उद्धार व्हावा, सकळ जनांनी शहाणे व्हावे, जे आपल्याला अनुभवायला मिळाले त्याचा लाभ इतरांना घेता यावा, या सात्त्विक विचारांतून भारुडांचा जन्म झाला आहे.

एकट्या एकनाथांनी सुमारे सव्वाशे विषयांवर तीनशे भारुडे रचली आहेत. त्यांत जोहार, गोंधळ, गारुडी, डौर, पाईक ही प्रकरणे मोठी आहेत. जोशी, आंधळा, पांगळा, बहिरा, मुका, वासुदेव, बाळसंतोष, भांड अशा व्यक्ती त्यांत आहेत; जाते, दळण, कांडण, घाणा, डेरा, भूत या सारख्या सांसारिक गोष्टी आहेत; पशुसृष्टीतील कुत्रा, एडका, बैल, पोपट, विंचू, सर्प, इ. प्राणी आहेत; हमामा, हुतुतू, विटीदांडू, भोवरा, पिंगा, फुगडी, इ. खेळ आहेत; नवरा-नवरी, सासर-माहेर, सासुरवास, चट्टा, असले लोकरंजनात्मक विषयही आहेत.

भारुडांचे अंतरंग – देवतापर भारुडांत प्रामुख्याने महालक्ष्मी, गोंधळ, फुलवरा, इ. विषय येतात. महालक्ष्मीच्या भारुडात नाथ म्हणतात – या आद्य शक्तीनेच मत्स्यकूर्मादी दहा अवतार धारण केले. हिनेच रामरूपाने प्रकट होऊन रावण-कुंभकर्णांना मारले; कृष्णरूपाने कंस-शिशुपालादिकांचा वध केला. बिभीषण, मारुती, अर्जुन, इ. वीरभक्तांचे हिनेच रक्षण केले. प्रल्हादासाठी स्तंभातून प्रकटून हिरण्यकश्यपूचे पोट हिनेच फाडले. व्यक्तींत किंवा समाजांत दुर्गुणांची वाढ झाली आणि दुर्व्यसने माजली, म्हणजे संतसज्जन हिचीच आराधना करतात. नंतर ही बया म्हणजे आद्यशक्ती निर्गुणांची खोळ टाकून सगुणरूपाने व्यक्त होते आणि विश्वाचे संरक्षण करते. नाथांच्या या भारुडाचा काही भाग असा –

नमो निर्गुण निराकार । मूळ आदिमाया तू साकार ।
घेउनि दहा अवतार । करिसी दुष्टांचा संहार ।
बैसलीस क्षीरसागरीं । शेषाचे पलंगावरी ।
जयविजय द्वारीं । प्रेमदिवटे तिष्ठती ।। १ ।।
दार उघड बया । दार उघड ।।
दैत्यकुळीं हिरण्यकश्यपु जन्मला । तेणे तुझा भक्त गांजिला ।
तें न पाहवे तुजला । त्वां उग्र रूप धरिलें बया ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेव्हां कोपें स्तंभ फोडून । नारसिंहरूप धरून ।
दैत्यासी वधून । प्रल्हाद दिवटा रक्षिला बया ।। २ ।।
दार उघड बया । दार उघड ।।
सीतेचेनि कैवारें । रावण मारिला सपरिवारें ।
अठरापद्म वानरें । गोंधळ मांडिला लंकेसी ।।
कौरव पांडव मिळाले । कुरुक्षेत्रीं युद्ध मांडिले ।
अठरा अक्षौहिणी दिवटे भले । नाचती रणकल्लोळी ।। ३ ।।
दार उघड बया । दार उघड ।।
बौद्ध अवतार घेऊन । विटे समचरण ठेवून ।
पुंडलिक दिवटा पाहून । तयाचे द्वारीं गोंधळ मांडिला ।
आषाढी कार्तिकी गोंधळ मांडिला । उदो उदो शब्द जाला ।
कामक्रोधादिकां पळ सुटला । उदो उदो ऐकोनी बया ।। ४ ।।
दार उघड बया । दार उघड ।।

नाथांची गोंधळावर बारा भारुडे आहेत. या भारुडांमध्ये ते देवीला ज्ञान-वैराग्याचा फुलवरा बांधतात आणि सूर्यचंद्राचा पोत पाजळतात. या गोंधळासाठी त्यांनी स्वर्ग-मृत्यू-पाताळांचा मंडप घातला आहे. कधी ते अष्टधातूंचे देवालय रचून भीमेच्या काठावर विठ्ठलापुढे गोंधळ घालतात; त्यात अहंधूप जाळतात आणि त्रिगुणांच्या वातींनी देवीची आरती करतात. गोंधळाच्याप्रमाणे ते कधी पोतराज बनतात; तर कधी वासुदेव बनतात.

देव-देवतांच्या ठायी आपली भक्ती व्यक्त केल्यावर नाथांनी अनेक ठिकाणीं तिच्यातून उत्पन्न होणाऱ्या अनाचारांचा धिक्कार केला आहे. खंडोबाच्या उपासनेतील बगाडासारखे अघोरी उपासनाप्रकार त्यांना मान्य नाहीत.

संसार आणि सांसारिक या विषयांवर नाथांची काही भारुडे आहेत. 'फट गाढवाच्या लेका संसार गेला फुका' असे म्हणून त्यांनी संसाराचे वैयर्थ्य पटवून दिले आहे. संसार म्हणजे सासुरवास असे सांगून त्यांनी ते रूपक पुढीलप्रमाणे मांडले आहे – "विषय हे माझे सासर असून, दुश्चित्त माझ्या सांगाती आहे. भ्रांतीची बुंथी पांघरून मी इथे नांदते. अविवेक माझा पती असून, अहंकार हा सासरा आहे. काम, क्रोध हे माझे दीर असून, म्हातारा मोह मला इथे सदैव त्रास देतो. वरून भोळा सांब पण, आतून वाकडा असलेला दंभरूपी दीर मला वारंवार अडवतो. ममता व चिंता या माझ्या नणंदा माझा सदैव जाच करीत आहेत. संतहो, तुम्ही मूळ या. माझे माहेर पंढरीला आहे, तिथे मला नेऊन सोडा."

संसाराप्रमाणेच नाथांनी प्राणिसृष्टी व भूतसृष्टी यांचाही विचार केला असून, त्या मार्गाने जनतेस जागृतीचे धडे दिले आहेत. कामक्रोधांचा विंचू चावल्यावर तमाचा घाम येतो, अशा वेळी दंशाच्या जागेवर सत्त्वाचा अंगारा लावावा, असे त्यांचे सांगणे आहे. नाथ एका भारुडात सगुण-निर्गुण या दोन पाखरांचे वर्णन करतात. यातील सगुण पाखरू म्हणजे भगवान श्रीकृष्ण होय. त्याचे वर्णन असे –

कृष्णा एक पांखरू आहे, तें मुखावीण चारा खाय रे
डोळ नाही परि ते पाहे, वाचेवीण सोय गाय रे ।। १ ।।
सख्या त्याचे नाव कान्होबा, कृष्ण म्हणती सर्व रे
त्याचे वास्तव्य कोठें आहे ? पर नाहीं परी ते उडे रे ।। २ ।।

नाथांनी वर्णिलेले भूत इतर भूतांहून फार वेगळे आहे. हे भूत लागले म्हणजे संसाराचे येणे-जाणे उरत नाही. याचे वास्तव्य भीमातीरी पंढरपुरी आणि वैकुंठातही असते. हे भूत जसे अलौकिक आहे, तसे त्याला झाडण्याचे उपायही अलौकिक आहेत. या भुताचा अंगिकार करणे हाच त्याला झाडण्याचा सर्वांत मोठा उपाय होय. नाथांच्या घरची उलटी खूण ती हीच. नाथांचे हे भूतभारूड असे–

भूत जबर मोठे गडे बाई । झाली झडपण करूं गत काई ।।
आंत दिसे, बाहेर वसे । या भूताने लाविले पिसें ।।
भूत लागले ध्रुव बाळाला । उभा अरण्यात ठेला ।।
भूत बसले वाळवंटी । या पुंडलिकाच्या साठी ।।
एका जनार्दनी भूत । मागे पुढे सदोदित ।।

सर्वच संतांनी भारुडांतून स्वतःचा आध्यात्मिक अनुभव परोक्ष भाषेत मांडला आहे. सदाचार आणि नीती यांवर त्यांचा मोठा भर आहे. त्यामुळे समाजाला कळणारी भाषा व पेलणारे तत्त्वज्ञान त्यात आढळते. भारुडांत विषयवैचित्र्य तर खूपच आहे. साऱ्या जीवनाचे आलोडन आणि जीवनाचेच कवन त्यांतून व्यक्त झाले आहे. भारुडांच्या रचनेत अध्यात्म आहे, मनोरंजन आहे, दोष-दुर्गुणांचे भंजन आहे आणि गूढगुंजनही आहे. [ए. द. खंड १ ला; म. वा. इ.; म. सा.; विविधा.]

भार्गव देव हे सात आहेत. हे भूः, भुवः, स्वः या तीन लोकांमध्ये ७१ युगे वास करतात. मन्वंतराच्या शेवटी हे महर्लोकाला जातात. त्यामुळे हे तीन लोक निराधार होतात. त्या वेळी नक्षत्रे, ग्रह, इ. आपापल्या जागी नष्ट होऊन जातात. प्रलयाच्या वेळी हे जनलोकाला जातात. त्या वेळी सर्व प्राणिमात्र नष्ट होतात. त्यानंतर नवी सृष्टी उदयाला येते.

भार्गव ब्राह्मण यांची वस्ती मुख्यत्वे गुजरातेत आहे. भृगुकच्छाचा संस्थापक भृगू ऋषी याच्यापासून हे आपली उत्पत्ती सांगतात. यांचे दसा आणि विसा असे दोन भेद आहेत. त्यांच्यांत परस्पर लग्नसंबंध होत नाही. भडोच आणि सुरत या भागात राहणारे ते विसा आणि कामळेज

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भागात राहणारे ते दसा होत. विसा हे ब्राह्मणांची वृत्ती अनुसरतात, तर दसा हे शेती व मजुरी करतात. बरेचसे भार्गव ब्राह्मण हे यजुर्वेदी असून, काही आश्वलायन शाखेचे ऋग्वेदी आहेत. भार्गव ब्राह्मण रोज खंडोबाची पूजा करतात. त्यांना जेवणाच्या शेवटी ताक लागते. यावरून हे दक्षिणेकडून आले असावे, असे वाटते. [मुं. इ. जा.; वि. मुं. रा. प.]

भालण (इ. स. चे १५ वे शतक) एक गुजराती भक्तकवी. आस्पद त्रिवेदी हे याचे नाव असून, तो पाटण गावचा रहिवासी होता. तो मोढ ब्राह्मण होता. काही लोक त्याला श्रीमाळी ब्राह्मणही समजतात. श्रीपाल व ब्रह्मपियानंद असे याचे दोन गुरू होते. भालणचा संस्कृत व व्रज या भाषांचा अभ्यास चांगला होता. त्याने भागवत, कादंबरी, नैषधीयचरित व पुराणे यांचेही अध्ययन केले होते. अनेक संस्कृत ग्रंथांचा त्याने गुजरातीत अनुवाद केला आहे. द्रौपदीवस्त्रहरण, मृगीआख्यान, ध्रुवाख्यान, जालंधराख्यान, इ. बरीच आख्याने याने रचली आहेत. गुजराती साहित्यात आख्यानकवी म्हणून हा प्रसिद्ध आहे. सवैया, चौपाई, हरिगीत, इ. छंदांत त्याने काव्यरचना केली आहे.

बाणाच्या कादंबरीचा गुजराती पद्यानुवाद ही याची प्रमुख रचना होय. हा अनुवाद शब्दशः केलेला नसला, तरी त्यातील सर्व सौंदर्यस्थळे त्याने टिपली आहेत. याची एकूण पाच हजार पद्ये आहेत.

भालण रामभक्त होता, असे म्हणतात. याने रामभक्तिपर अनेक पदे रचली आहेत. याशिवाय याची कृष्ण व शिव यांची स्तुती गाणारी पदेही बरीच आहेत. [मा. गु. लि.; गु. सा. इ.]

भालदेवपूजा एक लौकिक व्रत. या व्रताचा प्रारंभ भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला करतात. हे व्रत तीन, सात, नऊ किंवा तेरा दिवस करण्याची प्रथा आहे. खानदेशात विशेषतः गवळी लोकांत हे व्रत प्रचलित आहे. भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपूर्वी सर्व घर साफ करतात आणि तो केर बाहेर न टाकता अंगणात साठवतात. त्यावर शेणसडा टाकतात. शुद्ध प्रतिपदेपासून व्रतसमाप्तीपर्यंत कोणत्याही प्रकारचे दुभते घरातून बाहेरच्या माणसाला देत नाहीत; तर इष्टमित्रांना घरी बोलावून त्यांना ते खायला देतात. इतके करूनही दुभते शिल्लक राहिल्यास ते नदीत नेऊन टाकतात. व्रतकालात भिक्षेकऱ्याला भिक्षाही वाढत नाहीत.

उद्यापनाच्या दिवशी नदीतली थोडी वाळू, सात खडे आणि ल्हाळोयेडे आणतात. घरातल्या घुसळखांबाजवळ ते सात खडे ठेवतात. तिथेच ती वाळूही पसरतात. पसरलेल्या वाळूवर शेणाची एक बाहुली ठेवतात. या बाहुलीभोवती लव्हाळे उभे करतात. मग त्या बाहुलीची पूजा करतात. सायंकाळी ती बाहुली, खडे, वाळू, लव्हाळे एकत्र करून नदीत विसर्जित करतात व अंगणातील केर बाहेर फेकून देतात. [सु. वि. को.]

भाला एक शस्त्र. नांगराच्या फाळाप्रमाणे टोकाला धार असलेले शस्त्र म्हणजे भाला, अशी कौटिल्याने याची व्याख्या दिली आहे. हे शस्त्र मुक्त व अमुक्त या दोन्ही प्रकारांत मोडते. याची सहा प्रात्यक्षिके धनुर्वेदात वर्णन केलेली आहेत. भाला लोखंडी असावा, त्याच्या अग्राला सहा तीक्ष्ण धारा असाव्या व त्याची लांबी दहा हात असावी, असे सांगितले आहे. कौटिल्याच्या मते या आयुधाचा दांडा काष्ठाचा व पाच ते सात हात लांबीचा असावा. कौटिल्याने याचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार सांगितले आहेत. त्याने सात हस्त प्रमाणाचा भाला उत्तम, सहा हस्त प्रमाणाचा मध्यम व पाच हस्त प्रमाणाचा कनिष्ठ असे, म्हटले आहे.



भाला

हे शस्त्र एकसंध किंवा संयुक्त असते. एकसंध शस्त्रात दांडा व फाळ हे विभक्त करता येत नाहीत. संयुक्त प्रकारात तसे करता येते. काही भाल्यांच्या दोन्ही बाजूंना फाळ असतात.

गजदळाचे व घोडदळाचे भाले पायदळी शिपायांच्या भाल्यापेक्षा लांब असतात. पायदळाचा भाला हा पाच हात असावा, असे सांगितले आहे. विश्वामित्राच्या धनुर्वेदात हे शस्त्र वैश्यांनी वापरावे, असें म्हटले आहे.

हे शस्त्र बरेच प्राचीन असावे. ऋग्वेदात याला 'सृक' असे म्हटले आहे (१·३२·१२). ते इंद्राचे शस्त्र होते. मोहेंजोदडो व हडाप्पा इथल्या उत्खननात भाल्याची पाती सापडली आहेत. महाभारतात भाल्याला शक्ती म्हटले आहे. शिवकालात या शस्त्राचा फार उपयोग होत असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

[वै. इं.; प्रा. यु. वि.; वे. रा. द.; प्रा. भा. सां.; क. हि. बा. पु.; प्रा. ऐ. श.; व्या. ज्ञा. को.]

भावकाई कोकणातील एक ग्रामदेवता. हिचे प्रतीक म्हणून एक अर्धवर्तुळाकार दगड मांडलेला असतो. हिचे पुजारी गावडे असतात. देवीपुढे कोंबडे-बकरे बळी देतात. श्रावण व मार्गशीर्ष मासांत शुद्ध प्रतिपदेला हिला लोक आपापल्या घरी महानैवेद्य दाखवितात. हा नैवेद्य गावड्याला मिळतो. ही देवी शूद्र अथवा ओवळी आहे, असे समजतात. कारण या देवीशेजारी शूद्रांचे स्मशान असते. काही लोक या देवीला नवस करतात व तिला कधी-कधी दारूचाही नैवेद्य दाखवितात. [चित्पावन]

भावनापंचमी व्रत एक जैन व्रत. या व्रतात उपवास करायचा असतो. उपवासाच्या दिवशी चैत्यालयाच्या प्रांगणात एका चबुतऱ्यावर चंदन व केशर चर्चून एक कुंभ अक्षतांच्या ढिगावर ठेवतात व त्यावर एक मोठी थाळी ठेवतात. या थाळीत मध्यभागी महावीराची मूर्ती ठेवून तिची अभिषेकपूर्वक पूजा करतात. [व्र. ति. नि.]

भावनोपनिषद् एक नव्य उपनिषद. हे अथर्ववेदाशी संबंधित आहे. यात मानवी शरीराच्या विविध अवयवांची श्रीचक्राच्या विविध अंगोपांगांशी संगती दाखवून, मानवशरीर म्हणजेच जणू श्रीचक्र अशी कल्पना केलेली आहे. त्यानंतर या श्रीचक्राची मानसपूजा सांगितली आहे. भावना म्हणजे अमूर्ताचे ध्यान होय. तांत्रिक आणि मानसिक अशा दोन्ही पूजांचा संगम झालेला या उपनिषदात दाखविला आहे. मानसपूजेचे चौवीस उपचारही यात सांगितले आहेत. कुंडलिनी शक्ती म्हणजेच दुर्गा. तिची भावनापूजा केल्याने शक्तीचा प्रसाद होतो म्हणजे ती भक्तांचे रक्षण करते. जो साधक या उपनिषदाचे सम्यक अध्ययन करतो आणि त्यातील गोष्टींचा साक्षात अनुभव घेतो, तो जीवन्मुक्त होतो, असेही यात म्हटले आहे. अशा साधकाला शिवयोगी म्हणतात. [श्री. सी. ग. देसाई.]

भावमिश्र (इ. स. चे १६ वे शतक) एक प्रसिद्ध वैद्यकशास्त्रज्ञ. हा कान्यकुब्ज (कनौज) प्रदेशातला असावा. याने अनेक वैद्यक ग्रंथांच्या आधारे भावप्रकाश नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. तत्पूर्वीच्या वैद्यांना ज्या वनस्पती व जे रोग माहीत नव्हते, त्यांचे वर्णन या ग्रंथात आढळते. त्यामुळे या पुस्तकातील निघंटूवर वैद्य लोक बराच विश्वास ठेवतात. बहुतेक वैद्यांजवळ भावप्रकाश असतोच. [सु. वि. को.]

भावविवेक गुप्तकालातील एक प्रसिद्ध माध्यमिक बौद्ध आचार्य. याला भव्य असेही नाव होते. चिनी लोकांनी याचे नाव भाविवेक असे लिहिले आहे. बौद्ध न्यायातील स्वातंत्र्य मताचा हा पुरस्कर्ता होता. माध्यमिक सिद्धान्तांची सत्ता स्वतंत्र प्रमाणे देऊन सिद्ध केली पाहिजे, असे याचे म्हणणे होते. याच्या नावावर माध्यमिक कारिकाव्याख्या, मध्यमहृदयकारिका, मध्यमार्थसंग्रह व हस्तरत्न किंवा करमणी असे चार ग्रंथ आहेत. याचे मूळ संस्कृत ग्रंथ उपलब्ध नाहीत; पण त्यांचे तिबेटी किंवा चिनी अनुवाद मात्र मिळतात. [गु. सा. इ.]

भावसार एक क्षत्रिय जात. या जातीचे लोक दक्षिण गुजरातेत व महाराष्ट्रात आढळतात. भावसार की बाहुसार याबद्दल या समाजात ५०–६० वर्षांपूर्वी वाद माजून राहिला होता. इ. स. १९११ साली धारवाड येथे भरलेल्या पहिल्या क्षत्रिय परिषदेपासून हा वाद सुरू झाला असे दिसते. तेव्हापासून काही व्यक्तींनी बाहुसार शब्द स्वतःला लावण्यास सुरुवात केली व शिवगंगा मठाच्या शंकराचार्यांकडून त्याला अनुमतीही मिळवली. पण भावसार हेच नाव बहुतेकांना मान्य दिसते.

भावसार जातीत रेवाकांठी, रामदेशी आणि तळवदा अशा तीन प्रमुख उपजाती आहेत. भावसार हे बहुसंख्य वाणी आहेत. भट्टि, चौहान, गोहील, परमार, राठोड अशी त्यांची आडनावे आहेत. यांच्यांत गुजराती भावसार आणि मराठा भावसार असेही भेद आहेत. यांच्यांत जैनही आहेत.

विवाहप्रथा – गुजराती व मराठी भावसारांच्या विवाहपद्धतीत थोडाफार फरक आहे, तो असा –

गुजराती भावसार– यांच्यांत आतेमामे भावंडांची लग्ने होत नाहीत. मेहुणीशी लग्न करता येते. ते पहिली पत्नी हयात असताना अथवा तिच्या निधनानंतरही करता येते. दोन भाऊ दोघा बहिणींशी विवाहबद्ध होऊ शकतात; पण थोरल्या भावाने थोरल्या बहिणीशी व धाकट्याने धाकट्या बहिणीशी लग्न करावे, असा दंडक आहे.

मुलामुलींची लग्ने लहानपणी करण्याची चाल पूर्वी होती. वरपित्याकडून मुलीला मागणी घातली जाते. मुलीचा बाप यथाशक्ति हुंडाही वराला देतो. एका काळी नियोगपद्धतीही रूढ होती असे कळते. विधवाविवाहाला मान्यता असते. विधवा बहुधा मृत पतीच्या धाकट्या भावाशी लग्न करते. प्रथम वराला विधवेशी लग्न करता येत नाही.

मराठा भावसार– हे मूळचे अहमदनगर भागातले. नंतर सर्व प्रदेशभर पसरले. बनछोड, लाले, लोखंडे, मोडगरे, पारपती अशी यांची आडनावे आढळतात. हे लोक मराठी भाषा बोल-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तात. मुलींची लग्ने पाळण्यात असतानाच लावण्याची चाल यांच्यात पूर्वी होती. मुलांची लग्ने १० ते २५ या वयापर्यंत होतात.

लुगड्यावर खडी काढणे, चिटे छापणे, कपडे रंगविणे, गावोगावी जाऊन कापड विकणे व शिवणे असे धंदे हे लोक करतात. छिपा, शिंपी, रंगारी, दर्जी, चिप्पिगा अशी नावे यांना धंद्यांवरून पडली आहेत. याशिवाय मेवामिठाई करणे, व भांडी विकणे हेही धंदे हे लोक करतात.

देवधर्म – हिंगलाज, बालाजी, अंबाजी या त्यांच्या उपास्य देवता होत. हे वर्षाचे सर्व सण पाळतात. व्रते व उपासही करतात. आपले सर्व धार्मिक विधी ब्राह्मणाकरवी करतात. पुरोहित ब्राह्मणांना त्यांच्या समाजात फार मान असतो. हे शाकाहारी आहेत.

मृतकप्रथा – मृतांना अग्निसंस्कार करतात. स्मशानात प्रेत ठेवल्यावर भुताखेतांसाठी सभोवार भाकरीचे तुकडे फेकतात. प्रेतदहनानंतर त्या ठिकाणी मातीचे तीन घडे भात, दूध-दही व मद्य यांनी भरून ठेवतात. मग स्नान करून परत घरी येतात दहाव्या दिवशी क्रियाकर्मांतर करतात.

जन भावसारांत मृतांना बसलेल्या स्थितीत पूर्वेकडे तोंड करून पुरण्याची चाल आहे. [भा. क्ष. इ.; म. लो. सं.; पूना गॅझेटियर; मै. ट्रा. का.; रज:कण; सु. वि. को.]

भावा गणेश

(इ. स. १५५० चा सुमार) सांख्यदर्शनाचा एक टीकाकार. याच्या पित्याचे नाव विश्वनाथ व मातेचे नाव भवानी होते. विज्ञानभिक्षू हा याचा गुरू होय. भावा गणेश या नावात भावा हे पद उपनाम म्हणून वापरले आहे. प्रबोधचंद्रोदयाच्या टीकेत याने तसा उल्लेखही केला आहे. याच्या नावावर पाच ग्रंथ मिळतात; त्यांची नावे अशी – कपिलसूत्रटीका, चिच्चन्द्रिका प्रबोधचंद्रोदयटीका, तत्त्वप्रबोधिनी तर्कभाषाटीका, तत्त्वसमासयाथार्थ्यदीपन व योगानुशासनसूत्रवृत्ती. हे पाचही टीकाग्रंथच आहेत. [सां. द. इ.]

भावार्थ रामायण

संत एकनाथकृत मराठी ओवीबद्ध रामायण. नाथांचा हा सर्वांत मोठा ग्रंथ होय. याची सात कांडे असून, अध्याय २९७ व ओवीसंख्या सुमारे ४०,००० आहे. मात्र हा समग्र ग्रंथ एकनाथांच्या हस्ते पुरा झालेला नाही. युद्धकांडाचे ४४ अध्याय संपल्यावर नाथांचे निर्याण झाले व उरलेला भाग त्यांचा शिष्य गावबा याने पुरा केला, अशी आख्यायिका श्री. पांगारकर यांनी दिली आहे. श्री. ज. स. करंदीकर ही आख्यायिका मान्य करतात, पण नाथांनी देहावसानापूर्वी युद्धकांड समग्र पुरे केले होते आणि उत्तरकांड हीच गावबाची कृती होय, असे सांगतात. आपले मत सिद्ध करण्यासाठी त्यांनी कित्येक पुरावेही दिले आहेत.

एकनाथांच्या सर्व ग्रंथांत भावार्थ रामायण हा अखेरचा ग्रंथ असून, त्यात नाथांच्या विद्वत्तेचे, कवित्वाचे आणि आत्मानुभवाचे सारसर्वस्व ओतलेले आहे. या ग्रंथाने मराठी भाषेला वैभवसंपन्न केले आणि तिचे स्वरूपही सुस्थिर केले. भावार्थ रामायणानंतर मराठी भाषा ही सर्वमान्य व व्यवहारसुलभ झाली. यात भक्तिरसाचे प्राचुर्य असले, तरी वीर आणि करुण हे रसही योग्य स्थळी आविर्भूत झाले आहेत. भक्तिपर काव्यात शृंगाराचे स्थान गौण असते. नाथांनी तितक्या मर्यादेतच त्या रसाची संभावना केली आहे.

नाथांनी कवित्वाच्या हौसेसाठी किंवा कीर्तीच्या लालसेसाठी हे रामायण लिहिले नाही. रामप्रभूने आपल्याला प्रेरणा दिली, इतकेच नव्हे तर जाग्रत, स्वप्न व सुषुप्ती या तीन्ही अवस्थांत रामायण लिही म्हणून रामानेच माझी पाठ पुरवली आणि त्याच्या या आग्रहास्तव रामकथा लिहिण्यास मी प्रवृत्त झालो, असे ते सांगतात. त्याविषयीच्या त्यांच्या काही ओव्या अशा–

जागृतीमाजी वर्तता । पुढे प्रकाशे रामकथा ॥
सुश्चितपणे ठेवो जाता । राम तत्त्वता रामायण दावी ॥
करू जाता फुकट गोष्टी । त्यामाजी रामकथा उठी ॥
रामे पुरविली पाठी । खिळली दृष्टी रामायणी ॥
ऐसियात न करी म्हणता । राम चढे मीपणाचे माथा ॥
मग तो आपलिये राजसत्ता । वदवी कथा बलात्कारे ॥
(बाल. ४.४४)

रामायणकथा ही मुख्यत्वे ऐतिहासिक आहे, तरी त्या कथेतही नाथांनी ठिकठिकाणी अध्यात्मरूपके योजण्याचा प्रयत्न केला आहे. समग्र रामकथेवरच त्यांचे मोठे रूपक आहे. अज म्हणजे परब्रह्म किंवा परमात्मा. त्यापासून दशरथ म्हणजे दशेंद्रिये उत्पन्न झाली. मूळचे अजत्व न ढवळिता राम म्हणजे अहमात्मा दशरथाचे पोटी आला. देवांची साकडी फेडायची व स्वधर्माची वाढ करायची हा अवतारांचा मुख्य हेतू. दशरथाच्या राण्या तीन. कौसल्या ती सद्विद्या, सुमित्रा ती शुद्धबुद्धी आणि कैकेयी ती अविद्या होय. कैकेयीची दासी मंथरा म्हणजे कुविद्या. आनंदविग्रही श्रीरामाचे बंधू तीन. लक्ष्मण तो आत्मप्रबोध, भरत तो भावार्थ आणि शत्रुघ्न तो निजनिर्धार होय. विश्वामित्र म्हणजे विवेक आणि वसिष्ठ म्हणजे विचार. त्या दोघांपाशी श्रीराम शस्त्रे व शास्त्रे शिकला. राम आणि सीता म्हणजे परमात्मा व त्याची चिच्छक्ती होय. त्यांची एकात्मता सहजच आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाथांनी या सर्व ग्रंथात भक्तिप्रधान अद्वैतदृष्टी कुठेही ढळू दिलेली नाही. नाममाहात्म्य, भक्तिमाहात्म्य, सर्वांभूती एकात्मता इ. तत्त्वांचे विवेचन त्यांनी ठायी ठायी केले आहे. त्यातही विशेष हे, की सगुण भक्तीला कुठेही धक्का न लावता त्यांनी अद्वैताचा बोध केला आहे. युद्धकांडाच्या एकसष्टाव्या अध्यायाचा उत्तरार्ध व पुढचा समग्र बासष्टावा अध्याय हे वेदान्तपर आहेत.

रसाळपणा हा नाथांच्या कवित्वाचा विशेष गुण होय. प्रसाद व भक्तिप्रेम हे गुण प्रस्तुत ग्रंथात ओथंबून राहिले आहेत. त्यांची भाषा सहजरम्य आहे. तिच्यात कुठे क्लिष्टता आढळणार नाही. एखाद्या गोष्टीचे वर्णन ते जसे तपशीलवार करतात; तसाच त्यात कल्पकतेचाही रंग भरतात. अरण्यकांडात सीतेला दिसलेल्या सुवर्णमृगाचे वर्णन ते पुढीलप्रमाणे करतात—

तनु मनोहर सोनसळी । रत्नबिंदू रोममुळी ।।
पृष्ठी शोभे मुक्ताफळी । नभोमंडळी जेवी तारा ।।
खुर आरक्त प्रवाळवर्णी । कळावया मरकतमणी ।।
पांच बिंदू उमटले श्रवणी । कर्णाभरणी अति शोभा ।।
शृंगाग्री मणी लखलखती । पुच्छ तळपे सिंदुराकृती ।।
शुभ्र उदर हंसस्थिति । विचित्राकृती मृगशोभा ।।
अंगीच्या तेजाची प्रगल्भा । लोपती रविचंद्राची प्रभा ।।
सोलीव लावण्याचा गाभा । मृग शोभा शोभत ।
ऐसा चमकत बिचकत । चकित दृष्टी चपळ पाहात ।।
काही चरत काही फडकत । आश्रमात स्वयें आला ।।
(अरण्य. १४·१२–१७)

रावणाने तेहतीस कोटी देव आपल्या बंदीत घातले होते. त्या प्रत्येकाला राज्यातली काही कामेही नेमून दिली होती. ही कामे कोणी कोणती करायची, याविषयी रावण अंगदापुढे आपली प्रौढी सांगतो, ती अशी—

रणी करोनिया दुर्धर मार । बंदी घातले सुरवर ।
कामार केले समग्र । तोहि प्रकार अवधारी ।।
पाचारोनि कुसुमाकर । विचित्र शेजा विचित्र हार ।
इंद्रे आणावे सत्वर । माल्यधर तो केला ।।
सूर्य जो का सहस्रकर । द्वारपाळ निरंतर ।
मळयानिळ चवरधर । चंद्रे छत्र धरावे ।।
वायूचा अधिकार जाण । बिदी झाडाव्या संपूर्ण ।
वरुण येऊन आपण । सडासंमार्जन करावे ।।
स्वये न लावता इंधन । फुंकिते रांधिते नसोन ।
अग्नि निपजवी अन्न पक्वान्न । सूप विधान शास्त्रार्थे ।।
[illegible] । स्वयें [illegible] ।
करावे वस्त्रक्षाळण । रंग राखोन सावध ।।

सवळ डाग बैसले पाठी । ते काढावे उठाउठी ।
जावो न द्यावी कनवटी । मळमळवटी फेडावी ।।
जळावाचून सकळ मळ । सबाह्य करावे निर्मळ ।
ऐसा क्षाळक कुशळ । अधिकारी प्रबळ नेमाचा ।।
विधि दळकांड करी । चंडी तराळी माझे नगरी ।
माझ्या सामर्थ्याची थोरी । घरोघरी पाहे पा ।।
बृहस्पति माझे कीर्तिचा भाट । ब्रह्मा नित्य जपे—
शांतिपाठ ।।
माझ्या सामर्थ्याचा लोट । अतिवरिष्ठ तिही लोकी ।।
(युद्ध. ८·५५–६४)

नाथांनी मूळ वाल्मिकी रामायणात नसलेल्या कितीतरी कथा प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट केल्या आहेत. अध्यात्म, अद्भुत, आनंद, शिव, सेतुबंध, इ. नांवांची रामायणे; भागवत, पद्म, स्कंद, अग्नी, नारद, ही पुराणे; तसेच महाभारत, योगवासिष्ठ, इ. ग्रंथांतून घेतलेल्या त्या कथा आहेत. उदा० काही कथा पुढीलप्रमाणे—

(१) एकदा राज्यात अवर्षण पडले म्हणून दशरथ इंद्रावर चाल करून गेला. त्या युद्धात इंद्राने दशरथाच्या रथाचा कणा मोडला असता दशरथाबरोबर असलेल्या कैकेयीने चाकाच्या नाभीत हात घालून तो रथ सावरला. दशरथ त्या तिच्या समयोचित वीर कृत्याने प्रसन्न झाला आणि त्याने तिला दोन वर देण्याचे कबूल केले.

(२) अग्नीने दिलेला पायस कैकेयीच्या हातातून एका घारीने पळविला. तो तिच्या चोचीतून अंजनीच्या ओंजळीत पडला. तो प्राशन केल्यामुळे तिच्या उदरी मारुती जन्माला आला. कैकेयीच्या पायसाचा वाटा हिरावला गेल्यामुळे ती दु:खी झाली. मग कौसल्या व सुमित्रा या दोघींनी आपापल्या पायसाचा अर्धा वाटा तिला दिला. त्यामुळे कैकेयीला दोन पुत्र झाले.

(३) वानर सीताशुद्धीसाठी निघाले असता एका विवरात शिरले. त्या विवरात हेमा नावाची एक अप्सरा तापसी रूपाने राहत होती. मयासुराला भुलवून तिथे आणण्यासाठी इंद्राने तिला तिथे पाठवले होते. ते काम तिने केले व इंद्राने मयासुराला मारले. मग इंद्र तिला म्हणाला. 'तू आता इथेच राहा. काही कालाने सीतेचा शोध करण्यासाठी निघालेले वानर इथे येतील. त्यांना तू फलाहार देऊन संतुष्ट कर आणि पुढची वाट दाखव. एवढे झाल्यावर मग स्वर्गलोकी ये.'

(४) मारुतीने लंकादहन केल्यावर समुद्रात आपले पुच्छ विझवले. त्या वेळी मारुतीचा घाम गळाला तो एका मगरीने प्राशन केला. त्यापासून तिला मकरध्वज नावाचा पुत्र झाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि त्याने पुढे अहिरावण-महिरावण वधाच्या प्रसंगात मारुतीला साहाय्य केले.

(५) राम-लक्ष्मण नागपाशात बद्ध झाले असता नारदाच्या सांगण्यावरून गरुड तिथे गेला व त्याने दोघांना सोडविले.

नाथांचे तत्कालीन परिस्थितीकडे पूर्ण लक्ष होते, हे भावार्थ रामायणातील अनेक उद्‌गारांवरून दिसून येते. अठरापगड जाती त्यांच्या दृष्टीतून सुटलेल्या नाहीत. ३०० वर्षांच्या मुसलमानी राजवटीमुळे भारतीय संस्कृती हादरून गेली होती. समाजातली धार्मिक, राजकीय व नैतिक बंधने पार शिथिल झाली होती. हिंदू समाज भय, अज्ञान व नैराश्य यांनी ग्रासलेला होता. या अधोगतीच्या मार्गाने घसरत चाललेल्या समाजाला उत्कर्षाच्या, नीतीच्या व विजयाच्या मार्गाकडे खेचून आणायचे, तर त्याच्यापुढे कोणतातरी उत्तुंग आदर्श उभा करणे आवश्यक आहे, असे नाथांना जाणवले. कोदंडधारी आणि दवबंधविमोचक रामप्रभू हाच त्या दृष्टीने भव्योत्तुंग आदर्श होता. म्हणून नाथांनी त्याचीच कथा विस्ताराने गायली. श्री. ज. स. करंदीकर यांनी प्रस्तुत ग्रंथाचे प्रयोजन आणि त्यामागची प्रेरणा सांगताना लिहिले आहे, ते असे–

नाथांनी एकनाथी भागवत या ग्रंथाची समाप्ती वाराणसी क्षेत्री इ. स. १५७३ या वर्षी केली. या काळात इकडे दक्षिणेत एक मोठा वज्राघात झाला होता. इस्लामी पंचशाह्यांनी एकजूट करून विजयनगरचे प्रबळ हिंदुराज्य नामशेष केले होते. त्यामुळे हिंदुधर्माचा त्राता कोणी राहिला नव्हता. अशा आपत्तीत पूर्वीच्या दंडकारण्यात वस्ती करून राहणाऱ्या महाराष्ट्रीयांना रामायणकालीन परिस्थिती आठवावी आणि श्रीरामचंद्राने, ज्याप्रमाणे दंडकारण्यातील खरदूषणादी राक्षसांचा निःपात करून, ती भूमी पुनश्च यज्ञभूमि व पुण्यभूमि केली तसा कोणी अवतारी पुरुष येऊन आपल्या धर्माचा पुनरुद्धार करील काय, अशी तळमळ साधुसंतांना लागून राहावी यात नवल काय? अशा तळमळीतूनच नाथांच्या भावार्थ रामायणाचा उद्‌गम झाला असावा. नाथांच्या पूर्वीच्या नृसिंहसरस्वती यांच्या चरित्रात म्लेच्छांची सेवा न करण्याविषयी आणि म्लेच्छ राज्यांत गोवधबंदी होण्याविषयी उल्लेख आहेत. दासोपंतांचा ग्रंथराज हा तर समर्थांच्या दासबोधाचा पूर्वावतार मानला जातो. तथापि नाथांप्रमाणे प्रत्यक्ष रामचरित्र लिहून ब्राह्मणांचे रक्षण करण्याविषयी आणि रावणादिकांचा वध करण्याविषयी रामाचा धावा कोणीही केला नव्हता. नाथांनी तो भावार्थ रामायणांत पर्यायोक्तीने केला. मुक्तेश्वराच्या काव्यातही हा आडपडदा कायमच होता. समर्थ रामदास स्वामींनी मात्र हा पडदा गुंडाळून ठेवून 'म्लेच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसां माजले बंड' असे छातीठोकपणे म्हणून म्लेच्छांचे बंड मोडून काढण्याविषयी जनतेच्या मनात उत्साह उत्पन्न केला. त्या उपदेशाचे बीज नाथांच्या भावार्थ रामायणात आढळून येते. [ए. द.]

भावीण रत्नागिरी, सावंतवाडी, गोवा, कारवार या भागांत राहणाऱ्या एका विशिष्ट जातीतील पुरुषाला देवळी अथवा नाईक आणि स्त्रीला भावीण किंवा नायकीण अशी नावे आहेत. मराठा आणि भंडारी या दोन जातींपासून भाविणींची जात उत्पन्न झाली असे समजतात. एखाद्या देवळातील नंदादीपातील तेल घेऊन ते एखाद्या स्त्रीच्या माथ्यावर थापले, की ती भावीण होते, अशी जुनी समजूत होती.

भावीण मुलगी वयात आली, की तिचा शेसविधी करण्याची पूर्वी प्रथा होती. हा विधी म्हणजे तिचे देवाशी लग्न होय. त्याचा विधी असा – नवरदेव म्हणून देवालयातील एक देव बाहेर आणीत. गुरवाकडून गणपतीपूजन व पुण्याहवाचन होई. गुरव आणि देवाचे इतर भक्त मुलीच्या घरी मिरवणुकीने जात. त्या वेळी त्यांच्या हाती एक कटचार आणि देवाचा मुखवटा असे. वराच्या जागी मुखवटा ठेवीत. मग त्या मुखवट्याशी भाविणीचे लग्न लावून होमादी कृत्ये करीत. मग भावीण वधू मिरवणुकीने देवालयात जाई व श्रीफल व साखरेचा पुडा देवापुढे ठेवून देवाला नमस्कार करी. तिला देवाची कृपा लाभावी म्हणून गुरव देवाला गाऱ्हाणे घाली.

भाविणींचा सामाजिक दर्जा कलावंतिणी किंवा नायकिणीपेक्षा कमी असतो. त्यांना देवापुढे किंवा समाजात नाचण्याला किंवा गाण्याला बंदी असते.

म्हाळसा, वेंकटरामन, रामनाथ, रवळनाथ, माहुली, मल्लिकार्जुन, निरंकार वगैरे देवांना भाविणी भजतात. त्या शृंगेरी मठाचे शंकराचार्य यांचा धार्मिक अधिकार मानतात.

देवस्थानची झाडलोट करणे, अंगण सारवणे, समया व दिवे घासणे, देवावर चवरी धरणे ही भाविणींची कामे असतात. देवळी लोक देवस्थानाचा चौघडा व उत्सवप्रसंगी शिंग, तुताऱ्या वाजवतात. त्याबद्दल त्यांना देवस्थानातून वार्षिक नेमणूक असते.

यांच्यांत मृतांना जाळतात किंवा पुरतात. पाहा – देवदासी.
[म. ज्ञा. को.; ट्रा. का. बॉ.; सु. वि. को.]

भावे देव व्यास (मृत्यू इ. स. १३७९) एक महानुभाव भक्त. याचे खरे नाव बाईदेवबास असे आहे. हा गोदावरीकाठच्या नेवासे भागातला रहिवासी होता. नागदेवाचार्य हा याचा दीक्षागुरू होय. नागदेवाच्या मृत्यूनंतर महानुभाव पंथाचे आचार्यपद बाईदेवबासाकडे आले. नागदेवाचार्यांनी आपल्यानंतर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला 'सर्वज्ञांचा सर्व व्यापार' चालविण्याची आज्ञा दिली आणि त्याला दंडवत घालण्याचा सर्व गुरुकुलाला आदेश दिला.

चक्रधर व गोविंदप्रभू यांच्यावर बाईदेववासाची आत्यंतिक निष्ठा होती. त्याला दोघांचे सान्निध्यही भरपूर लाभले होते. त्यामुळे त्यांच्या पश्चात त्यांच्या स्मृतींनी हा फारच दुःखी होत असे.

महानुभावकवि-काव्यसूचीत याच्या त्रिकाल पूजावसरे, पाचापुराचे मूर्तिज्ञान, नामाचे दहा ठायें, सठी प्रश्ने, इ. ग्रंथांची नोंद आहे. यांतला विशेष प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे पूजावसरे किंवा नित्यदिनी लीळा हा होय. या ग्रंथात चक्रधराच्या दिनचर्येचे सूक्ष्म वर्णन आहे. हा ग्रंथ प्राचीन मराठी गद्याचा आदर्श समजतात. [भा. बो.; म. म. वा.; प्रा. म. वा. इ.; म. सा.]

भावैय उत्तर गुजरातेतील एक जात. हे लोक भवाई नामक नृत्यनाट्य करतात, म्हणून त्यांना हे नाव मिळाले आहे. यांना तरगळ असेही म्हणतात. या लोकांच्या उत्पत्ती-विषयी पुढील कथा सांगतात–

असीद नावाचा एक औदीच्य ब्राह्मण होता. तो एका कणब्याच्या मुलीबरोबर जेवला. त्यामुळे लोकांनी त्याला वाळीत टाकले. पुढे त्याने त्या मुलीशी लग्न केले. तो चांगला गाणारा होता. म्हणून त्याने नृत्य-गायनावर आपली उपजीविका सुरू केली. त्याच्या वंशजांनीही तोच धंदा पुढे चालविला व आपली स्वतंत्र जात बनवली.

हे लोक पौराणिक नाटके व भवाई म्हणजे सामाजिक नाटके करीत गावोगाव फिरत असतात. काही लोक पावसाळ्यात शेती करतात. पंचमहाल प्रदेशात प्रत्येक मुलीच्या लग्नात एक रुपया वसूल करण्याचा त्यांना अधिकार आहे.

व्यास आणि भावैय असे त्यांचे दोन पोटभेद असून, त्यांच्यांत आपसांत रोटीबेटीव्यवहार होत नाही. त्यांच्यांत आईच्या बाजूकडून तीन ते सात पिढ्या सोडून त्यापलिकडच्या पिढीशी लग्न करायला हरकत नसते. औदीच्य ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात. हे मुलाची मुंज करतात. उमामाता व महादेव यांच्या मूर्ती यांच्या घरच्या देवांत असतात. बहुचरा देवीसमोर प्रथम खेळ करूनच हे आपल्या कार्यक्रमासाठी बाहेर पडतात. यांचे विवाहादी बहुतेक सर्व संस्कार कणबी लोकांप्रमाणेच असतात. पाहा – भवाई. [ट्रा. का. बाँ.; रज:कण]

भाषा–विज्ञान 'भाष् व्यक्तायां वाचि'= व्यक्त वाणीला भाषण म्हणावे. वाणी व्यक्त करणे, असा भाष् या धातूचा अर्थ आहे. भाष् या धातूवरून भाषा शब्द बनला आहे. 'ब्राह्मी तु भारती भाषा गीर्वाग्वाणी सरस्वती' अशी तिची पर्यायनामे अमरकोशात सांगितली आहेत. भाषेची काही लक्षणे विद्वानांनी सांगितली आहेत, ती अशी–

(१) ज्या ध्वनिचिन्हांच्या द्वारे मनुष्य परस्पर विचार-विनिमय करतो, त्या ध्वनिचिन्हांच्या समष्टिरूपाला भाषा असे म्हणतात. (श्री. बाबूराम सक्सेना)

(२) माणसे परस्परांत आपली वस्तुविषयक इच्छा व तत्संबंधी विचार यांचे आदानप्रदान करण्यासाठी ज्या ध्वनि-संकेतांचा व्यवहार करतात, त्या व्यवहाराला भाषा असे म्हणतात. (श्री. श्यामसुंदरदास)

(३) भाषेचे स्वरूप द्विविध आहे. ती समाजव्यवहाराचे साधन असल्यामुळे समाजातल्या व्यक्तींना आपले मनोगत एकमेकांना कळविण्यासाठी तिचा उपयोग करता येतो. समाजातल्या व्यक्तींना एकत्र आणण्याची संयोजनशक्ती तिच्यात आहे. कमीत कमी दोन तरी व्यक्तींना एकत्र आणणे हा भाषेचा मूलभूत हेतू आहे. आपल्या मनातला आशय कोणतीही व्यक्ती प्रत्यक्ष आणि जसाच्या तसा दुसऱ्याला देऊ शकत नाही. तो अप्रत्यक्षपणेच व्यक्त करता येतो. म्हणजे प्रत्यक्ष आशय दिला जात नसून त्या आशयाला व्यक्त स्वरूप देणारे इंद्रियगोचर संकेत दिले जातात. मूळ आशयाचे प्रतीक प्रत्यक्ष आशयाची जागा घेते आणि हे प्रतीक किंवा संकेत यांचा अभ्यास हा मनुष्याचा आशय व्यक्त करण्याच्या परंपरागत सवयीचा अभ्यास होय. मनुष्य आणि मनुष्येतर प्राणी यांच्यांतला सर्वांत महत्त्वाचा फरक हा, की मनुष्याला प्रतीक निर्माण करण्याची, नव्या परिस्थितीला अनुरूप असे नवे संकेत निर्माण करण्याची, शक्ती आहे; इतर प्राण्यांना ती नाही. कोणतीही वस्तू प्रत्यक्ष समोर नसता प्रतीकात्मक साधनाचा उपयोग करून मनुष्य तिच्यासंबंधीचा आपला आशय व्यक्त करू शकतो. तिचा अभाव किंवा दूरपणा यावर मनुष्याने हा विजय मिळविलेला आहे; आणि या प्रतीकशक्तीचा एक सामर्थ्यवान आविष्कार म्हणजेच भाषा हे ध्वनिरूप साधन. (डॉ. ना. गो. कालेलकर)

भाषा हे समाजव्यवहाराचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. हे साधन प्रतीकात्मक आहे. या प्रतीकात्मक तत्त्वाला धरून जे संकेत व्यवहारासाठी वापरण्यात येतात ते ध्वनिरूप असतात. हे संकेत आशय व्यक्त करणारे असले तरी कोणत्याही संकेताचा आणि त्याने व्यक्त होणाऱ्या आशयाचा कार्यकारणसंबंध नसतो. हे संकेत ठराविक नियमांना धरून भाषेत वापरले जातात म्हणजे ते वापरण्याची एक पद्धत आहे. तात्पर्य मूळ आशयाशी कार्य-कारणसंबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनलेली, समाजव्यवहाराला साह्यभूत अशी भाषा ही एक पद्धत आहे.

वर्णमाला – ध्वनिचिन्हांव्यतिरिक्त अन्यही काही चिन्हे विचार प्रकट करण्याच्या कामी उपयुक्त ठरतात. वर्णमाला हे त्यांपैकी एक प्रमुख होय. सांप्रत लिपिबद्ध वर्णांच्या द्वारेच प्राय:

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देशदेशांतरांत विचारांचे आदानप्रदान होत असते. ध्वनींचे क्षेत्र केवळ श्रुतीपुरतेच आणि म्हणूनच मर्यादित असते, तर लिपिबद्ध वर्णांचे त्याच्या तुलनेने कितीतरी विशाल असते. वाणीच्या या लिपिरूपाच्या द्वारेच भाषेला स्थिरता येते व तिचा विस्तारही होतो. लिपिबद्ध अक्षरांच्या रूपाने हजारो वर्षांपूर्वीचे रामायण-महाभारत हे ग्रंथ आपण आजही वाचू, ऐकू शकतो. तसेच परदेशांतल्या लेखकांच्या वाङ्मयकृती आणि त्यांचे ग्रंथ आपणांला आपल्या जागी जाणून घेता येतात. हे खरे असले तरी ती चक्षुर्ग्राह्य अक्षरेही ध्वनीवरच आधारलेली असल्यामुळे भाषेच्या क्षेत्रात ध्वनिचिन्हांच्या तुलनेने चक्षुर्ग्राह्य लिपीची सत्ता गौण ठरते. याचे तात्पर्य असे, की विचारांची अभिव्यक्ती प्रामुख्याने श्रोत्रग्राह्य ध्वनिचिन्हांनी आणि गौण रूपाने दृष्टी, संकेत व स्पर्श, यांच्या योगाने सिद्ध होते.

वैज्ञानिक दृष्टीने पाहिल्यास भाषा ही मनुष्याच्या विचार-विनिमयाचेच साधन नसून विचारांचेही साधन आहे. कोणीही मनुष्य भाषेची मदत घेतल्यावाचून विचार करूच शकत नाही. माणसाच्या मनात प्रथम जेव्हा विचाराचा तरंग उठला, तेव्हाच त्याला भाषेची गरज उत्पन्न झाली. विचाराची भाषेत परिणती कशी होते, याविषयी पाणिनीय शिक्षेत म्हटले आहे, ते असे–

आत्मा बुद्ध्या समेत्यार्थान् मनो युङ्क्ते विवक्षया
मनः कायाग्निमाहन्ति स प्रेरयति मारुतम् ।।
मारुतस्तूरसि चरन् मन्द्रं जनयति स्वरम् ।।

अर्थ – आत्मा बुद्धीशी संयुक्त होऊन अर्थ व्यक्त करण्यासाठी मनाला बोलण्याच्या इच्छेने प्रेरित करतो. मन शरीरस्थ अग्नी-वर (वाक्शक्ती) आघात करते. तो अग्नी वायूला प्रेरित करतो आणि हा वायू उरात संचार करून मंद्रध्वनी उत्पन्न करतो.

ध्वनिसंकेतांच्या व्यवहाराने भाषा निर्माण होते, हे खरे असले तरी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही, की ज्या ध्वनींनी एखाद्या प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो, त्या ध्वनीचा आणि तो प्राणी किंवा ती वस्तू यांचा नियत संबंध नाही. तो केवळ एक सामयिक व्यवहार असतो. जर या दोहोंत नियत संबंध असता, तर प्रत्येक कालात व प्रत्येक देशात गाय व कमल या ध्वनींनी आपण समजतो तोच अर्थ निष्पन्न झाला असता. तसे झाले असते, तर भाषाभिन्नत्वही निर्माण झाले नसते व भाषेत परिवर्तनही झाले नसते.

भाषेचा जन्म – विश्वात जो कोणी आदिमानव जन्माला आला असेल, त्याला प्रारंभी बोलणे अवगत नव्हते. आपले विचार, भाव आणि कल्पना दुसऱ्यांना कळविण्याचे त्याच्यापाशी काही साधनच नव्हते. एकाकी जीवन जगत असल्यामुळे त्याला तशी गरजही भासली नसेल. पण पुढे या आदिमानवांचा जेव्हा समूह बनला, तेव्हा त्यातल्या प्रत्येक मानवाला आपले भाव आणि विचार दुसऱ्याजवळ व्यक्त करण्याची आवश्यकता निर्माण झाली. प्रथम प्रथम तो हे अभिव्यक्तीचे काम अंगविक्षेपाने करीत असे. पुढे तो मुद्राभिनय करायला शिकला. हळूहळू पशु–पक्ष्यांच्या आवाजांची नक्कल करणे त्याला साध्य झाले. त्यातून त्याला ध्वनी गवसला. मग विशिष्ट वस्तूसाठी आणि व्यक्तीसाठी त्याने विशिष्ट ध्वनीचा उपयोग सुरू केला. त्या ध्वनीच्या सरावाने ध्वनी आणि वस्तू म्हणजेच अमुक वस्तूतीसाठी अमुक ध्वनी असा संबंध त्या आदिमानवाच्या मनात दृढ झाला. अशा प्रकारे हळूहळू त्याने भाषा निर्माण केली. भाषा म्हणजे बोलण्याची शक्ती. ही शक्ती ज्या क्षणी मानवाला लाभली, त्याच क्षणी तो पशु-पक्ष्यांहून आगळा व श्रेष्ठ ठरला.

याचा अर्थ असा, की मानवसृष्टीबरोबरच भाषेचीही सृष्टी झाली आणि ती अविच्छिन्न गतीने व प्रवाहरूपाने आजवर चालत आलेली आहे. या प्रवाहाचे आद्यंत केवळ कल्पनागम्य आहेत. मनुष्य प्रारंभापासून भाषा शिकत आला आहे आणि यावज्जीव तो तिच्या द्वारे व्यवहार करीत राहणार आहे. सांप्रत जगात शेकडो भाषा बोलल्या जातात. पण हे भाषाभेद किती प्राचीन आहेत, ते सांगणे अशक्य आहे. पृथ्वीवर मनुष्यप्राण्याची निर्मिती एकाच ठिकाणी झाली किंवा ती एकाच काली भिन्न भिन्न ठिकाणी झाली, हेही सांगणे कठीण आहे. जर एकाच ठिकाणी मानव निर्माण होऊन त्याचा समाज तिथेच बनला असेल, तर प्रारंभी माणसाची एकच भाषा राहिली असेल आणि जसजसा तो समाज आपल्या मूळ केंद्रातून चहू दिशांना पसरला असेल तसतशी त्याची भाषाही परिवर्तन पावता पावता भिन्न झाली असेल. जर प्रारंभीच भिन्न भिन्न स्थानी मानवसृष्टी निर्माण झाली असेल, तर मानवसमाजाच्या भाषा प्रारंभापासूनच भिन्न असतील. या बाबतीत भाषापंडितांना आजवर निश्चित उत्तर सांगणे शक्य झालेले नाही.

भाषापरिवर्तन– माणूस आपल्या पूर्वजांकडून भाषा शिकत असतो. भाषा शिकण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी स्वभावतःच असते. अशा प्रकारे भाषा ही शिकण्याची वस्तू असल्यामुळे तिच्यामध्ये विकार किंवा परिवर्तन होणे ही गोष्ट अपरिहार्य ठरते. ऐच्छिक व स्वाभाविक असे दोन प्रकारचे परिवर्तन भाषेमध्ये घडत असते. बदलत्या कालमानानुसार नवेनवे शब्द, वाक्प्रचार आणि संकेत उत्पन्न होऊन ते रूढ होणे हे परिस्थितिजन्य परिवर्तन अर्थात ऐच्छिक परिवर्तन होय. स्वाभाविक परिवर्तन मुख्यतः ध्वनिविषयक असते आणि ते इतर अनेक प्रकारची, विशेषतः; व्याकरणविषयक परिवर्तने घडवून आणते. काय बोलावे, परिवर्तनाची इतरही काही कारणे संभवतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जे बोलायचे ते किती उघडपणे बोलावे आणि काय बोलू नये यांविषयी प्रत्येक समाजात काही संकेत असतात. अमुक शब्द उच्चारणे अशुभ, अमुक शब्द विशिष्ट वेळी किंवा विशिष्ट प्रसंगी वापरणे अशुभ, अमुक शब्द स्त्रियांनी पुरुषांपुढे आणि पुरुषांनी स्त्रियांपुढे, मोठ्यांनी लहानांपुढे आणि लहानांनी मोठ्यांपुढे वापरणे अनुचित, अशा प्रकारचे हे संकेत असतात. ही सर्व बंधने पाळून इष्ट तो अर्थ व्यक्त करण्याच्या कामी भाषेत नवे शब्द येतात आणि त्यांना नवे अर्थही प्राप्त होतात.

यासंबंधी डॉ. ना. गो. कालेलकर लिहितात–

भाषा हा एक संस्कार आहे. भाषा म्हणजे काय हे समजण्यापूर्वीच मनुष्य अनुकरणाने आणि निरीक्षणाने ती आत्मसात करतो. आजूबाजूचे लोक जे आणि जसे बोलतात, तसेच संदर्भाला अनुसरून तो बोलत असतो. त्याची कारणमीमांसा तो करीत बसत नाही. त्याच्या बाबतीत भाषा ही एक रूढी असते. सर्व लोक जसे बोलतात, तसे आपण बोललो नाही तर समाजाशी आपला व्यवहार होणार नाही, याची त्याला जाणीव असते. या संस्काराची सवय पुढेपुढे त्याला इतकी होते, की त्या परिस्थितीत जे बोलायला हवे असेल, ते बिनचूक त्याच्या तोंडून बाहेर पडते. ज्या ध्वनींचा उच्चार करायला हवा असेल, त्यांना आवश्यक ती तोंडातल्या अवयवांची हालचाल घडून येते, शब्द वापरले जातात आणि ते योग्य क्रमाने मांडले जाऊनं वाक्यरचनाही तयार होते. हे सगळे काही स्वाभाविक होते.

भारतीय भाषापरिवार– भारतात आर्य भाषा आणि आर्येतर भाषा बोलणारे असे दोन मोठे परिवार आहेत. भारताचा बराच मोठा भाग, इराण, आर्मीनिया, बहुतेक सगळे युरोपखंड, सगळी अमेरिका, आफ्रिकेचा नैर्ऋत्य कोपरा आणि ऑस्ट्रेलिया यांमध्ये ज्या भाषा बोलल्या जातात, त्यांना आर्य भाषा म्हणतात. लोकसंख्या, क्षेत्रविस्तार आणि वाङ्मय या सर्व गोष्टींत या भाषापरिवाराला अग्रस्थान आहे. या परिवारातल्या अनेक भाषांच्या तुलनात्मक अभ्यासातूनच भाषाविज्ञान या शास्त्राचा जन्म झाला आहे.

भारतीय आर्यांची मूलभाषा संस्कृत होती. भारतात आर्य टोळ्याटोळ्यांनी येऊन वसले. इथे आपला जम बसविताना त्यांना द्रविड, मुंड, इ. मूळच्या लोकांशी संघर्ष करावा लागला. या संघर्षात आर्य विजयी ठरले; पण मूळच्या लोकांच्या प्रभावाने त्यांची भाषा व राहणी यांत मात्र परिवर्तन घडून आले. वैदिक आर्यांच्या प्राचीन भाषेचे सर्वोत्तम उदाहरण ऋग्वेदसंहितेत पाहायला मिळते. तिथून पुढे ब्राह्मणे, उपनिषदे व सूत्रे यांची भाषा क्रमशः विकास पावलेली दिसते. पाणिनीच्या काळापर्यंत वैदिक वाङ्मयाची भाषा (छंद) व साधारण सुशिक्षितांची भाषा (भाषा) यांमध्ये बरेच अंतर पडले. बुद्धाच्या कालापर्यंत संस्कृत भाषेत उदीच्य, प्राच्य व मध्यदेशीय असे तीन विभेद निर्माण झाले.

बुद्धोत्तर काळी ज्या नव्या भाषा निर्माण झाल्या, त्या संस्कृतोद्भव असून, त्यांवर संस्कृताचा बराच प्रभाव आहे. वैदिक काळात ज्या भाषिक परिवर्तनाला प्रारंभ झाला होता, ते मध्य युगात बरेच वाढले. त्यातून पुढील गोष्टी ठळकपणे परिवर्तित झालेल्या दिसतात–

द्विवचन व आत्मनेपद यांचा ऱ्हास, विभक्तीमध्ये षष्ठी व चतुर्थी यांचा एकीच्या स्थानी दुसरीचा प्रयोग, संख्यावाचक शब्दांत नपुंसकलिंगी रूपांना प्राधान्य, क्रियेच्या लकारात लुट् (अनद्यतनभविष्य) लङ् (अनद्यतन भूत), लिट् (परोक्ष भूत) आणि लृङ्, विधिलिङ् व आशीर्लिङ् यांचे एकीकरण, क्रियेच्या रूपांत गणभेद व संज्ञांच्या रूपांत व्यंजनान्त यांच्यामध्ये सोपेपणा, इत्यादी.

मध्ययुगाच्या प्रारंभी पाली व अशोकी प्राकृत या भाषा वाढू लागल्या. बुद्धाने पालीमध्ये आपल्या धर्माचा प्रचार केला. पालीमध्ये अशी काही लक्षणे आढळून येतात, की त्यांवरून तिचा विकास उत्तरकालीन संस्कृताच्या ऐवजी वैदिक संस्कृत व तत्कालीन बोली यांच्यावरून झाला आहे, असे दिसते. सम्राट अशोकाने भारतात ठिकठिकाणी जे धर्मलेख खोदवले, त्यांत आढळणाऱ्या भाषेला अशोकी प्राकृत असे म्हणतात. पालीनंतर शौरसेनीचा क्रमांक येतो. तिचे मुख्य लक्षण म्हणजे त, थ च्या जागी अनुक्रमे द, ध येणे आणि दोन स्वरांच्या मध्यभागी असलेल्या द, ध या ध्वनीत परिवर्तन न होणे. दुसरी गोष्ट म्हणजे अकारान्त शब्दाच्या विसर्गाच्या जागी ओकार येणे. उदा० जलदः > जलदो, क्रोधः > कोधो.

शौरसेनीच्या नंतर महाराष्ट्री येते. ही मुख्यत्वे गीतिकाव्याची भाषा आहे. हालकृत गाथासप्तशती व प्रवरसेनाचे सेतुबंध काव्यही महाराष्ट्रीत आहे. तिच्या दोन स्वरांच्या मध्ये येणाऱ्या अल्पप्राण स्पर्शवर्णाचा लोप होतो व महाप्राणाचा ह होतो. मागधी ही मगधात जन्मली. संस्कृत नाटकात नीच पात्रांच्या भाषणासाठी ही वापरली जाई.

शौरसेनी व मागधी यांच्या मध्ये अर्धमागधी येते. जैनांचे बरेच धार्मिक साहित्य या भाषेत आहे.

मध्ययुगानंतरच्या भाषेला सामान्यरूपाने अपभ्रंश म्हणतात. अपभ्रंश भाषेचे नागर, उपनागर व ब्राचड असे तीन विभाग होतात. या सर्व आर्य परिवारातल्या भाषा होत. सांप्रत भारतात बोलल्या जाणाऱ्या लहँदी, सिंधी, मराठी, उडिया, बिहारी, असमिया, बांगला, हिंदी, राजस्थानी, गुजराती, पंजाबी, भीली,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पहाडी या भाषा व त्यांच्या बोली या सर्व आर्य परिवारातल्याच भाषा होत.

आर्येतर भाषापरिवार – यात मुंड कुलातल्या, द्रविड कुलातल्या व तिबेटी चिनी कुलातल्या भाषांचा समावेश होतो. मुंड भाषा छोटा नागपूर, ओडिसा, मध्यप्रदेश, तमिळनाड व पश्चिम बंगाल यांचे काही जिल्हे, बिहारचा पहाडी व जंगली प्रदेश व हिमालयाची तराई या भागात बोलली जाते. तिची काही ठळक लक्षणे अशी– (१) क्रियारूपांचे बाहुल्य (२) उत्तम पुरुषवाचक सर्वनामाच्या बहुवचनाची दोन रूपे– मध्यमपुरुषाला सामील करून बोलले जाणारे व त्याला सामील न करता बोलले जाणारे. उदा० आम्ही निघून जाऊ (यात मध्यमपुरुषाचा समावेश नाही) व आपण निघून जाऊ. (यात मध्यमपुरुषाचा समावेश आहे. ((३) आर्य भाषांच्या तुलनेने महाप्राणांचा वापर अधिक असतो. (४) क, च, त, प, ही अर्धव्यंजने असून, त्यांचे उच्चार भिन्न आहेत. (५) संज्ञा, क्रिया, इ. शब्दविभाग नाही. (६) पुरुषाला अनुसरून क्रियेमध्ये फरक होत नाही. (७) अव्यये हे स्वतंत्र शब्द असतात. (८) गणना विसांची असते. उदा० एक विसा, दोन विसा इत्यादी.

द्राविड भाषांचे मुख्यत्वे चार वर्ग पडतात, ते असे–(१) द्राविड, (२) आंध्र, (३) मध्यवर्ती व (४) बहिरंग. तमिळ, मलयाळम, कन्नड आणि कर्नाटकाच्या तुळू व कोडगू या बोली द्राविड वर्गात येतात. या वर्गात तमिळ भाषा सर्वांत अधिक समृद्ध आहे. तिचे वाङ्मयही विशाल आहे. तिच्या प्रमाणित भाषेची शेन व कोडुन अशी दोन रूपे आढळतात. शेन रूप सभ्य समजले जाते. कोडुन प्रायः बोलचालीच्या स्वरूपात वावरते. तमिळच्या बोलींमध्ये फारसा भेद नसतो. मलयाळमला तमिळचीच एक शाखा समजतात. ही केरळ व लखदीव या भागात बोलली जाते. हिची शब्दावली संस्कृतप्रचुर आहे. ब्राह्मणांच्या प्रभावामुळे ती संस्कृतप्रचुर झाली आहे. कन्नड ही म्हैसूर राज्याची भाषा आहे.

आंध्रवर्गात तेलुगू ही एकच प्रमुख भाषा असून, तिच्या अनेक बोली आहेत. तिचे साहित्य तमिळ भाषेच्या बरोबरीचे आहे. ती श्रवणमधुर असून तिच्यात संस्कृतातले बरेचसे शब्द स्वाभाविक रीतीने आलेले आहेत. तेलुगूचा व्यवहार दक्षिणेत तमिळपेक्षाही अधिक होतो. या भाषेत सर्व शब्द स्वरान्त असतात.

मध्यवर्ती वर्गात गोंडी ही सर्वांत मोठी आहे. तेलुगू ही तिची शेजारी भाषा असली, तरी तिच्या तुलनेने द्राविड वर्गातल्या भाषांशी गोंडीचे अधिक साम्य आहे. चेदिकोशल हे तिचे केंद्र मानले जाते. ही भाषा बोलणारे लोक आंध्र, ओडिसा, विदर्भ, बुंदेलखंड, छत्तीसगड व माळव्याचा सीमाप्रदेश यात आढळतात. तिच्यात साहित्य नाही आणि तिची एखादी लिपीही नाही.

बहिरंग वर्गात ब्राहुई बोली येते. बलुचिस्तानामध्ये ही बोली बोलली जाते.

वरील द्राविड परिवारातील भाषांची काही लक्षणे अशी– उच्चारणात शब्दांच्या अंतिम व्यंजनांच्या नंतर एक अतिलघु आकार येतो. विशेषतः तमिळमध्ये अशी प्रवत्ती आहे, की कोणत्याही शब्दाच्या प्रारंभी सघोष व्यंजन यायचे नाही आणि शब्दाच्या मध्यात येणारे एकाकी व्यंजन सघोष असायचे. याच प्रवृत्तीमुळे संस्कृत दंत शब्द तमिळमध्ये तंदम् होतो. संयोग स्पष्ट असतो व प्रकृतीत विकार होत नाही. निर्जीव आणि निश्चेतन पदार्थ नपुसकलिंगी मानले जातात. अन्य शब्दांत पुं व स्त्री-सूचक पद जोडले जाते. अन्य पुरुषवाची सर्वनामांत स्त्रीपुरुष भेद आढळतो. नपुंसक संज्ञांना प्रायः बहुवचन असत नाही. वचने दोनच असतात. विभक्ती परसर्ग जोडून बनवतात विशेषणांना विभक्तिरूपे असत नाहीत. उत्तमपुरुषवाची सर्वनामात आम्ही व आपण ही दोन्ही रूपे आढळतात. पुष्कळसे शब्द संज्ञा व क्रिया असे दोन्ही असतात. निश्चित व अनिश्चित असे काल असतात. निश्चित भूत, निश्चित भविष्य, त्याचप्रमाणे अनिश्चित वर्तमान किंवा अनिश्चित भविष्य.

आर्यांच्या भाषांवर द्राविड भाषांचा प्रभाव बराच पडला आहे, असे संशोधक सांगतात. आर्य भाषांमध्ये मूधर्न्य ध्वनींचे अस्तित्व आणि र व ल यांचा व्यत्यय या गोष्टी द्राविडी प्रभावानेच घडल्या आहेत. आर्य भाषांच्या तुलनेने कृदन्त रूपांचे आधिक्य हे द्राविड प्रभावाचेच द्योतक आहे. ही प्रक्रिया उत्तरोत्तर वाढत गेली आहे आणि त्याचेही कारण द्राविड प्रभावच होय, असे विद्वान लोक मानतात.

तिबेटी–चिनी भाषा बोलणारे लोक ब्रह्मदेश, तिबेट आणि ओनाममध्ये राहतात. भारतात या शाखेच्या भाषा आसामच्या उत्तर व पूर्व या भागांत बोलल्या जातात.

सामान्यपणे भाषांचे दोन मुख्य प्रकार होतात, ते असे–(१) प्रत्ययी भाषा व (२) अप्रत्ययी भाषा. प्रत्ययी भाषेत प्रकृती व प्रत्यय यांच्यामुळे आणखी पोटभेद होतात. प्रत्यय सामान्यपणे शब्दांच्या पुढे लावण्याची रूढी आहे. परंतु तुर्की व अवेस्ता या भाषा एखाद्या वेळी शब्दांच्या मध्ये प्रत्यय घालतात. अशा भाषांना आगमप्रधान भाषा म्हणावे, असे श्री. कृ. पां. कुलकर्णी म्हणतात. आरंभी एखादा शब्द दोन प्रकारांनी ठेवला जातो. एक आगमाप्रमाणे व दुसरा उपसर्गाप्रमाणे. ज्याप्रमाणे प्रत्ययाने शब्दांत विकृती होते, त्याचप्रमाणे आगम व उपसर्ग यांनीही शब्दांत व त्यांच्या अर्थात विकृती होते, हे 'उपसर्गेण धात्वर्थो बलादन्यत्र नीयते' या वचनावरून सिद्ध होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अप्रत्ययी भाषांना सामासिक भाषा' असेही म्हणतात. पण त्या दोहोंत थोडासा फरक आहे.

सामासिक भाषेत समास करताना त्यांच्या मुळाशी प्रत्ययांची कल्पना असतेच. प्रत्ययांचा फक्त लोप केला जातो एवढेच. अप्रत्ययी भाषेत प्रत्ययांची कल्पना नसून शब्द नुसते एकमेकांपुढे ठेवले जातात. संस्कृत व प्राकृत या भाषांत समास करून बोलण्याच्या प्रवृत्तीचा प्रकर्ष झालेला दिसून येतो. सवयीने समस्त बोलणे हेच व्यस्त बोलण्यापेक्षा सुलभ होते.

भाषाविज्ञानाची अंगे – भाषेचे विश्लेषण करणे आणि त्याद्वारे काही सिद्धान्त प्रस्थापित करणे म्हणजे भाषाविज्ञान होय. भाषेची जडण-घडण, तिचे व्याकरण, कुल, अन्य भाषांशी साधर्म्य-वैधर्म्य, भाषेतून ऐतिहासिक व सामाजिक धागेदोरे शोधून काढणे, बोलींचे अभ्यास, त्यांचे वर्गीकरण, इ. गोष्टी भाषाविज्ञानात येतात. भाषेचे वैज्ञानिक अध्ययन करण्याची आकांक्षा भाषाभेदामुळे निर्माण होते. हा भाषाभेद कधी आंतरिक असतो तर कधी बाह्य असतो. आंतरिक भेद बोलीभेदातून उत्पन्न होतो, तर बा[illegible] भेद परकी भाषांच्या संपर्कात उत्पन्न होतो. त्यामुळे भाषा[illegible]नाचे क्षेत्र विस्तृत होते. भाषाविज्ञान हे आता केवळ भाषाशास्त्रापुरतेच मर्यादित राहिलेले नाही; तर अनेक शास्त्रांची मदत घेऊन सांप्रतचे भाषाशास्त्री भाषेचा अभ्यास करीत असतात. सांप्रत भाषाविज्ञानाला जी अन्य शास्त्रे उपकारक ठरली आहेत, ती अशी–

मनोविज्ञान – माणसाच्या सर्व क्रिया त्याच्या इच्छेतून प्रेरित होतात. भाषा ही त्यातच येते. ही इच्छा कशी उत्पन्न होते, त्याचे उत्तर मनोविज्ञानाच्या द्वारेच मिळू शकते. मनात विचार कसे येतात, मेंदूत त्यांचा संग्रह कसा होतो, कित्येक शब्दांचे अनेक अर्थ असूनही विशिष्ट प्रसंगी विशिष्ट अर्थच का उद्‌बोधित होतो, शब्दांचे अर्थ कसे व का बदलतात, इ. प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी भाषाविज्ञान मनोविज्ञानाची मदत घेते.

समाजशास्त्र – भा[illegible] हे विचारविनिमयाचे एक साधन आहे. विचारविनिमय समाजातच होत असतो आणि समाजच आपत्यातल्या प्रत्येक व्यक्तीवर भाषा लादीत असतो. माणसाला केवळ स्वतःच्या इच्छेने दुसऱ्या व्यक्तींच्या संमतीवाचून कोणताही नवा भाषिक संकेत रूढ करता येणार नाही. भारतीय स्त्री पतीला नावाने का हाक मारत नाही, गाय विते पण स्त्री वीत नसून प्रसूत होते किंवा बाळंतीण होते असे का? मूल वजनदार असल्यास बोलताना 'त्याची माती जड' असे का म्हणायचे? बारावा दिवस हा एकच अर्थ. पण जन्मलेल्या मुलाच्या बाबतीत त्याला बारसे का म्हणायचे? आणि मृताच्या बाबतीत त्याला बारावे का म्हणायचे? प्रेत जाळण्याच्या प्रसंगी ज्यांना गोवऱ्या, लाकडे म्हणतात, त्याना मंगल कार्यातल्या होमप्रसंगी अनुक्रमे शुद्धा व इंधने का म्हणायचे? या सर्व गोष्टींचा उलगडा सामाजिक संकेतांच्या आधारेच होऊ शकतो. भाषेत अनेक म्हणी व वाक्प्रचार रूढ असतात. त्यांपैकी बऱ्याच म्हणींचे व वाक्प्रचारांचे मूळ समाजशास्त्रातच शोधावे लागते.

इतिहास – भारतीय भाषांत अरबी, फारसी, इंग्रजी, इ. परकी भाषांतील शब्दांचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात आढळून येते. भारतीय भाषांतील परकीय शब्दसंपदा ही गेली हजार वर्षे भारताला भोगायला लागलेल्या गुलामगिरीचीच द्योतक ठरते. उत्तर प्रदेशातली हिंदी-उर्दू समस्या ही राजकीय इतिहासातच निर्माण झाली आहे. बंगाली, मराठी, इ. भाषांमध्ये जे ब्रज भाषेतले शब्द आढळतात, ते इ. स. च्या १६ व्या शतकात ब्रजमंडलात वाढलेल्या वैष्णव धर्माने सबंध देशावर आपला प्रभाव गाजवला होता, त्याचे निदर्शक आहेत.

भूगोल – पहाडी प्रदेश, मरुभूमी, सागरी प्रदेश, इ. ठिकाणी भाषेच्या प्रचाराला अनेक अडचणी उत्पन्न होताना दिसतात. मैदानी प्रदेशात बोलींची संख्या कमी असते आणि पहाडी प्रदेशात ती व्यापक दळणवळणाच्या अभावी अधिक असते. भाषेतले काही शब्द केवळ त्या त्या भौगोलिक परिस्थितीतूनच निर्माण झालेले असतात.

वाङ्मय – भाषा व वाङ्मय यांचा संबंध अविच्छेद्य आहे. वाङ्मयाच्या द्वारेच आपल्याला त्या भाषेच्या प्राचीन स्वरूपाचे ज्ञान होते. वाङ्मय ही एक व्यक्तिनिर्मित कला असते, तर भाषा हे एक समाजोपयोगी साधन असते. विनिमयाच्या द्वारे समाज सुरळीत चालावा या प्रयत्नातून भाषा अस्तित्वात येते. पण भाषा ही व्यवहाराच्या क्षणिक गरजा भागविण्यापुरतीच मर्यादित न ठेवता ती अधिक अर्थवाहक, आकर्षक व आशयपूर्ण बनविता येते. हा शोध जेव्हा माणसाला लागला त्याच वेळी भाषेत वाङ्मयाचे बीजारोपण झाले, असे म्हणता येईल. पण साहित्यकाराजवळ जी भाषिक सामग्री असते, तिला मर्यादा असते. त्या मर्यादेमुळे त्याच्या अभिव्यक्तीवर नियंत्रण पडत असते. पण हेच नियंत्रण साहित्यकाराला भाषेतून कोणत्या नव्या शक्ती शोधून काढता येतील, त्याची वाट दाखवीत असते. साहित्यकाराच्या अशा अभिव्यक्तीच्या धडपडीतूनच कोणतीही भाषा समृद्ध बनत जाते.

व्याकरण – व्याकरणाचे शब्दसाधन व वाक्यविचार असे दोन मुख्य भाग असतात. शब्दसाधनात अर्थ, काल, अवस्था, इ. कारणांमुळे शब्दांची जी रूपांतरे होतात, त्यांचे निदर्शन असते. संज्ञा, सर्वनाम, विशेषण व क्रियेची रूपे कशी बनतात,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांचा विचार यात येतो. वाक्यविचारात सिद्ध रूपांचे विवेचन असते. वाक्यविचारात वाक्ये आणि वाक्यांचे अंश यांच्यातून तशा प्रकारे अर्थाचे उद्‌बोधन होते आणि विभक्तींचा कुठे, कसा प्रयोग करावा यांचा विचार येतो. अशा प्रकारे अनेक भाषांचे तुलनात्मक व्याकरण हे तुलनात्मक भाषाविज्ञानाला उपकारक ठरते.

भाषा हा वाक्यांचा समूह असतो. वाक्यात वेगवेगळी पदे असतात. त्यांचे विशिष्ट ध्वनी असतात. वाक्यांना आणि पदांना काही अर्थ असतो. त्यामुळे भाषाविज्ञानाच्या पुढील चार शाखा होतात – (१) वाक्यविज्ञान, (२) पदविज्ञान, (३) ध्वनि-विज्ञान व (४) अर्थविज्ञान.

वाक्यविज्ञानात वाक्यांचा परस्पर संबंध, वाक्यातील पदांचा परस्पर संबंध, पदांची सापेक्षता, आकांक्षा व सांनिध्य इत्यादी गोष्टींचा विचार होतो. पदविज्ञानात पदांचा अर्थसूचक अंश कोणता, संबंधसूचक अर्थ कोणता; धातू, प्रत्यय, उपसर्ग, इत्यादींचा परस्पर संबंध काय; संज्ञा, क्रिया, विशेषण, इत्यादीं-मध्ये परस्पर भेद काय इ. गोष्टींचा विचार येतो. ध्वनिविज्ञानात ध्वनी, ध्वनियंत्र, ध्वनींचे विश्लेषण, तसेच त्यांच्या मात्रा, आघात, स्वर, ध्वनिविकार, इ. गोष्टींचा विचार येतो. अर्थ-विज्ञानात व्यक्ती, भाव, वस्तू, इत्यादींच्या वाचक संज्ञा कशा प्रकारे अर्थग्रहण करतात, धातूचा अर्थ एक; पण पदाचा दुस-राच काहीतरी असे का होते, ध्वनी व अर्थ यांचा परस्पर संबंध, अर्थामध्ये परिवर्तन; अर्थ संकुचित किंवा व्यापक होणे इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो.

भाषाविज्ञानाचा इतिहास – भाषाविज्ञानाच्या इतिहासाला भारतापासूनच प्रारंभ करावा लागतो. भारतात वेदमंत्रांना अद्वितीय महत्त्व आणि प्रामाण्य प्राचीन काळीच प्राप्त झाले. वेदवाणी ही दिव्य वाणी समजली गेली. त्या वाणीचे यथातथ्य रक्षण करणे आणि ती जशीच्या तशी पुढील पिढीला उपलब्ध करून देणे, हे काम वैदिकांनी आपले आद्य कर्तव्य मानले. या वेदरक्षणाच्या कामासाठीच वैदिकांना अनेक उपाय शोधून काढावे लागले. मंत्रांचा पदपाठ आणि क्रम, जटा, घन, इ. विकृती त्यासाठीच निर्माण झाल्या. वेदाचा पदपाठ करण्याची युक्ती शाकल्याने शोधून काढली. ब्राह्मणकालात भिन्न भिन्न चरण आणि भिन्न भिन्न शाखा यांत वैदिक संहितांचे अध्ययन चालू झाले. पदपाठांसाठी संधी, समास आणि उदात्तादी स्वर यांचा व्यवहार समजण्याची गरज होती. त्यासाठी शिक्षाग्रंथ आणि वैदिक भाषेचे व्याकरण निर्माण झाले. प्रातिशाख्यांनी नाम, आख्यात, उपसर्ग व निपात असे पदांचे चार विभाग कल्पिले आणि त्या प्रत्येकाचे विवेचन केले. निघंटू या नावाने शब्दांची सूचीही तयार केली गेली. अशा प्रकारे सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीच भारतात भाषाविज्ञानाचा पाया घातला गेला.

पुढे निरुक्तकार यास्क जन्माला आला. त्याचे निरुक्त ही निघंटूतल्या शब्दांची व्याख्या आहे. यास्काने वैदिक संहितांतून उतारे घेऊन निघंटूतल्या शब्दांचा अर्थ स्थापित करण्याचा प्रयत्न केला. अर्थ विज्ञानाच्या विषयात जगामधला हा सर्वांत पहिला प्रयत्न आहे. त्याने प्रत्येक नामाची व्युत्पत्ती कोणत्या ना कोणत्यातरी धातूवरून सांगितली आहे.

त्यापुढचा काल पाणिनीचा होय. त्याने व्याकरणसूत्रे रचली. त्यांना अष्टाध्यायी असे म्हणतात. पाणिनीने आपल्या चार हजार सूत्रांत साऱ्या संस्कृत भाषेला नियमबद्ध केले. धातुपाठ, गणपाठ, उणादिसूत्रांचा बराचसा भाग हे त्यानेच तयार केले. भाषाविज्ञानाच्या बाबतीत आजही जगातले भाषापंडित पाणि-नीला श्रेष्ठ मानतात. त्याने आपल्या माहेश्वरसूत्रांत स्थान आणि प्रयत्न यांच्या अनुसारे ध्वनींचे जे वर्गीकरण केले, त्याला ध्वनिविज्ञानात आजही मान्यता आहे. वैदिक व लौकिक संस्कृत भाषेचे त्याने तुलनात्मक विवेचनही केले आहे. अशा प्रकारे पाणिनीने ध्वनिविज्ञान, अर्थविज्ञान आणि तुलनात्मक व्याकरण यांना बरेच पुढे नेले.

कात्यायन आणि पतंजली हे त्यानंतरचे वैयाकरण होत. पाणिनीच्या कालापासून त्यांच्या कालापर्यंत भाषेमध्ये जी परिवर्तने झाली, ती कात्यायनाने आपल्या वार्तिकांच्या द्वारे दिग्दर्शित केली आहेत. ध्वनी म्हणजे काय, वाक्याचे भाग कोणकोणते होतात, ध्वनिसमूह आणि अर्थ यांच्या मध्ये काय संबंध आहे, इ. महत्त्वपूर्ण विषयांवर पतंजलीने आपल्या महा-भाष्यात सुंदर विवेचन केले आहे.

पतंजलीच्या काळापर्यंत वैदिक भाषेच्या अध्ययनाला थोडे-बहुत महत्त्व होते. पुढच्या कालात निर्माण झालेल्या व्याकरण-कारांनी आपले लक्ष लौकिक भाषांवरच केंद्रित केले आणि भाषांचे तुलनात्मक अध्ययन स्थगित झाले. हे अध्ययन प्राकृत भाषांच्या वैयाकरणांनी फिरून सुरू केले. त्यांनी संस्कृताला प्रकृती (आधार) मानून विविध प्राकृतांचे विवरण केले. वररुची हा अशा विद्वानांपैकी पहिला होय. त्याने आपल्या प्राकृतप्रकाशात महाराष्ट्री, शौरसेनी, पैशाची, मागधी, या भाषांचे विवेचन केले आहे. त्यापुढच्या काळात हेमचंद्राने शब्दानुशासन नामक व्याकरण लिहून त्यात वर दिलेल्या सर्व संस्कृतोद्‌भव भाषांचे विस्तृत विवेचन केले. मार्कंडेयाने आपल्या प्राकृतसर्वस्वात भाषा, विभाषा व अपभ्रंश असे भाषेचे तीन वर्ग स्थापित केले. वैयाकरणांव्यतिरिक्त साहित्यशास्त्रज्ञ व नैयायिक यांनीही भाषेचे विवेचन केले आहे. शब्दाच्या अभिधा, लक्षणा व व्यंजना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या तीन शक्ती, त्यांचे प्रयोजन, पदार्थ, वाक्यार्थ, स्फोट, इ. भाषाविषयक गोष्टींचे दार्शनिक विवेचन झालेले आहे.

युरोपातल्या विद्वानांचे भाषेच्या मूलभूत अभ्यासाकडे लक्ष गेले ते इ. स. च्या १८ व्या शतकात. संस्कृत भाषेच्या अध्ययनातूनच त्यांना ही प्रेरणा मिळाली. अठराव्या शतकाच्या अखेरीस कलकत्ता येथे श्री. विल्यम जोन्स यांनी रॉयल एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. जोन्स हा संस्कृत पंडित होता. त्याने संस्कृत भाषा ही ग्रीक व लॅटिन यांना फार जवळची आहे आणि तीन्ही भाषांचा मिळून एखादा आदिस्रोत असला पाहिजे, असा सिद्धान्त सांगितला. अठराव्या शतकाच्या प्रारंभी प्रसिद्ध जर्मन पंडित श्लेगेल याने भारतीय भाषा व ज्ञान या विषयावर एक महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित केला. संस्कृत व अन्य भाषा यांच्या उगमाच्या बाबतीत श्लेगेलचे मत असे होते, की भाषेची उत्पत्ती भिन्न भिन्न आधारावर झालेली असली पाहिजे. बॉप, ग्रिम व रेस्क हे इ. स. च्या १९ व्या शतकातले भाषावैज्ञानिक होत. रेस्कचे मत असे होते, की ग्रंथ नसले तरी एखादी जात किंवा राष्ट्र यांचा इतिहास केवळ त्याच्या भाषेवरून समजू शकतो. कालचक्राच्या फेऱ्यात धर्म व कला मोठ्या प्रमाणात बदलतात; पण त्या मानाने भाषा स्थिर असते. ग्रिमने प्रतिपादिले, की छोट्याछोट्या भाषाही ज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. बॉपने संस्कृत भाषेला विशेष महत्त्व दिले. त्याने धातुप्रक्रियेवर एक पुस्तक लिहिले आणि त्या पुस्तकानेच भाषांच्या तुलनात्मक अध्ययनाचा पाया घातला गेला. त्याने भाषेचे तीन वर्ग केले– (१) धातू व व्याकरणनियम यांनी रहित. उदा० चिनी भाषा. (२) एकाक्षर धातू असलेल्या. उदा० आर्य भाषा व (३) दोन अक्षरी धातू असलेल्या भाषा. उदा० सामी.

हंबोल्ट हा आणखी एक जर्मन भाषापंडित होय. त्याने सामान्य भाषाविज्ञान यावर सर्वांत पहिला महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. तो म्हणतो, की भाषा प्रवाहरूप असून तिचे लक्षण पूर्ववर्ती आणि परवर्ती अवस्थांच्या संबंधातच देता येते. प्रत्येक भाषेला एक स्वतंत्र व्यक्तित्व असते. भाषेतून ती बोलणाऱ्या जातीचे मनोभाव प्रकट होतात. जगातल्या भाषांची परस्पर विभिन्नता इतकी मोठी आहे, की त्यातून एखादे संतोषप्रद असे आकृतिमूलक वर्गीकरण बनवणे अशक्य आहे.

बॉप आणि ग्रिम यांच्या काळात (इ. स. १८५५ च्या सुमारास) भाषाविज्ञानाची बरीचशी सामग्री एकत्र झाली होती. तिच्यात आर्यपरिवाराचे वेगळे अस्तित्व निश्चित झाले होते. तोपर्यंत जे भाषाविज्ञानाचे संशोधन झाले, त्यात संस्कृत भाषेला विशेष महत्त्व होते. भाषांची तुलना करताना सामान्य लक्षणांवर विशेष जोर दिला गेला. समकालीन जिवंत भाषांपेक्षा मृत भाषांना अधिक महत्त्व प्राप्त झाले. जीवित भाषांच्या थोड्याबहुत विवेचनात केवळ त्यांच्या प्राचीनपणाचीच लक्षणे शोधली जात होती.

रैप हा ग्रिमच्या समकालीनच होता. त्याने ध्वनिसिद्धान्तावर अनेक ग्रंथ प्रकाशित केले. बॉप आणि ग्रिम यांनी भाषेच्या परिवर्तनाकडे मुळीच लक्ष दिले नव्हते. ब्रेड्स्फोर्डने इ. स. १८२१ साली एक ग्रंथ प्रकाशित करून विद्वानांचे त्या गोष्टीकडे लक्ष वेधले. रैप आणि ब्रेड्स्फोर्ड या दोघांनी एकूणच भाषाविज्ञानात नाविन्य आणले. पुढे माक्स म्यूलरने भाषाविज्ञानाला दर्शनपदवीला चढवले. त्याच्या कालापर्यंत भाषेचा उद्‌गम, विकास, विकासाची कारणे, वर्गीकरण, इ. विषयांवर विविध विद्वानांनी जे ज्ञान निर्माण केले होते, त्याचा त्याने संग्रह करून तो ग्रंथरूपाने जनतेला सादर केला. माक्स म्यूलरला एक मोठा टीकाकार भेटला तो व्हिटनी हा होय. त्याने अनेक बाबतींत माक्स म्यूलरला खोडून काढले आणि भाषाविज्ञानाचे सुंदर व तर्कशुद्ध विवेचन केले.

स्टाइन्थाल याने पूर्वेकडील भाषांचे अध्ययन करून सिद्धान्त मांडला, की भाषेचे अध्ययन मनोविज्ञानाची मदत घेतल्यावाचून करता येणार नाही.

जुन्या पिढीतले लोक भाषाविज्ञानात व्याकरणावर जरुरीपेक्षा अधिक भर देत होते. नव्या विद्वानांनी भाषेच्या बोलीरूपाला विशेष महत्त्व दिले. त्यांनी बोलींच्या मिश्रणाकडे विशेष लक्ष देऊन हे दाखवून दिले, की पदरचना किंवा ध्वनिनियम यांमधले पुष्कळसे अपवाद बोली व भाषा यांच्या शब्दांच्या परस्पर आदानप्रदानातून निर्माण होऊ शकतात. या नव्या विद्वानांनी वाक्यविज्ञान या शाखेवरही भर दिला. आजवर तिच्याकडे कुणी फारसे लक्ष दिले नव्हते. ब्रुगमन व डेलब्रुक या दोघांनी ही दिशा धरून पुष्कळसे काम केले. पाउलने सामान्य भाषाविज्ञानाच्या सिद्धान्तांचे मौलिक संशोधन करून अनेक ग्रंथ लिहिले. ब्रुगमनने आर्य परिवाराच्या भाषांतल्या पदरचनेवर कित्येक ग्रंथ प्रकाशित केले.

भारतीय भाषांच्या अभ्यासकांत डॉ. रा. गो. भांडारकरांचे नाव प्रथम येते. त्यांनी भारतीय भाषाशास्त्राची प्राचीन परंपरा न सोडता पाश्चात्य पंडितांच्या सिद्धान्तांचे अध्ययन केले आणि इ. स. १८७७ मध्ये विल्सन व्याख्यानमालेच्या रूपाने भारतीय भाषांचे शास्त्रीय विवेचन केले. त्याच वेळी ट्रम्प काल्डवेल, बीम्ज, होयर्नले इ. पाश्चात्य पंडितही भारतीय भाषांचा तुलनात्मक अभ्यास करू लागले.

भारतातील भाषाविज्ञानाचा पाया इ. स. च्या १९ व्या शतकात डॉ. ग्रियर्सन याने घातला. वयाच्या २३ व्या वर्षी तो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिव्हिल सर्व्हंट म्हणून सरकारी नोकरीत दाखल झाला. त्या वेळेपासून त्याने आपला फुरसतीचा वेळ भारतातील अनेक भाषा व लिप्या यांच्या अभ्यासात सार्थकी लावला. त्याने कित्येक ज्ञात व अज्ञात भाषांची व्याकरणेही लिहिली. लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया हा त्याचा भाषासर्वेक्षणाचा सुप्रसिद्ध ग्रंथ होय. या ग्रंथाचे वीस खंड आहेत. त्याने हिंदुस्थानातील भाषांच्या अभ्यासकांना पूर्वपरंपरा तर प्रकट करून दाखविलीच, शिवाय त्या त्या भाषेतील अनेक उतारे देऊन नवीन अभ्यासकांना सांगाडा निर्माण करून दिला. तसेच त्याने अनेक भाषांच्या घटनेचा अभ्यास करून, त्यांची वर्गवारी करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या या कार्यामुळे हिंदी विश्वविद्यालयांचे भाषाशास्त्राच्या शास्त्रीय अभ्यासाकडे लक्ष ओढले गेले. यापुढे प्रत्येक संशोधकावर त्याच्या या कार्याची छाप पडणे अपरिहार्य होऊन बसले आहे.

डॉ. ग्रियर्सन याच्या नंतर भारतात अनेक विद्वानांनी अनेक भाषांचा संशोधनपूर्वक अभ्यास केला असून, सांप्रतही अनेक विद्वान भाषासंशोधनाचे कार्य करीत राहिले आहेत. त्यांपैकी काही विद्वानांची नावे अशी – डॉ. सुनीतिकुमार चटर्जी (बंगाली व पिंगल), डॉ. ना. गो. कालेलकर (मराठी), प्रा. कृ. पां. कुलकर्णी (मराठी), सर्वश्री अ. का. प्रियोळकर व वि. बा. प्रभुदेसाई (कोकणी), भोलाशंकर व्यास (संस्कृत), डॉ. रघुवीर (संस्कृत व हिंदी), राहुल सांकृत्यायन (दख्खनी हिंदी), जगदीश प्रसाद (पिंगल), रामेश्वरप्रसाद अग्रवाल (बुंदेली), धीरेन्द्र वर्मा (व्रज), कैलाशचंद भाटिया (व्रज भाषा व खडीबोली) इत्यादी.

भाषा आणि पोटभाषा – भाषा ही अधिक व्यापक स्वरूपाची संज्ञा असून, पोटभाषा या संज्ञेने एखाद्या बोलीचे सूचन होते. ही बोली कोणत्या तरी भाषेची असते. अमुक ठिकाणची बोली किंवा अमुक वर्गाची बोली ही पोटभाषा आहे, असे केवळ म्हणून चालणार नाही. ती अमक्यातमक्या भाषेची पोटभाषा आहे, असे सांगावे लागते. पोटभाषा ही बोलण्यातच वापरली जाते आणि लेखनासाठी तिचा वापर होत नाही. त्या दृष्टीने ती गौण किंवा दुय्यम प्रतीची असते. पोटभाषा निर्माण होण्याची कारणे दोन संभवतात – (१) एका विस्तीर्ण प्रदेशात बोलली जाणारी व बऱ्याच प्रमाणात एकरूप असणारी बोली कालांतराने त्या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागांत कमीअधिक प्रमाणात बदलते. अशा स्वाभाविक परिवर्तनाने होणाऱ्या भाषेच्या वेगवेगळ्या रूपांना प्रादेशिक बोली किंवा पोटभाषा म्हणता येईल. या पोटभाषा एकमेकींपासून बऱ्याच दूर गेल्या किंवा त्यांच्यांतले भेद विशेष तीव्र झाले, तर या पोटभाषांतून संबंधित परंतु परस्पर भिन्न भाषा निर्माण होण्याची शक्यता असते. (२) मुळात जवळजवळ सारख्या स्वरूपाची एखादी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या टोळ्या एखाद्या विस्तृत प्रदेशावर आक्रमण करतात. आणि त्या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागांत स्थायिक होतात. पुष्कळदा मग त्यांचे परस्परांशी नीट दळणवळणही राहत नाही. त्यामुळे त्यांच्या बोली भिन्न मार्गाने परिवर्तन पावतात आणि अशा प्रकारे निर्माण झालेले स्थानिक भेद वैशिष्ट्यपूर्ण बनतात. त्या भागातील मूळ रहिवाशांचा संपर्क हाही त्या वैशिष्ट्याला कारणीभूत ठरतो.

पोटभाषानिर्मितीचा आणखी एक प्रकार डॉ. ना. गो. कालेलकर यांनी सांगितला आहे, तो असा–

पुष्कळदा काही कारणांमुळे एकमेकांच्या सान्निध्यात येऊन सहजीवनाच्या तत्त्वाचा स्वीकार कराव्या लागणाऱ्या दोन भिन्नभाषिक समाजांपैकी एक समाज स्वतःची भाषा टाकून आपल्या शेजारच्या समाजाची भाषा स्वीकारतो. स्वतःची मूळ भाषा आणि नंतर स्वीकारलेली नवी भाषा अशा दोन भाषा या समाजाला सुरुवातीच्या संक्रमणकाळात बोलाव्या लागतात. काही काळानंतर तो या नव्या भाषेचाच पूर्णपणे वापर करू लागतो. पुढील पिढीत तर ही नवी भाषाच मातृभाषा होते; पण असा स्वभाषेचा त्याग होण्यापूर्वी जुन्या पिढीच्या काही भाषिक सवयी या नव्याने आत्मसात केलेल्या भाषेत प्रवेश करतात आणि तिचे रूप काही बाबतीत बदलून टाकतात. त्यामुळे ज्यांची ती परंपरागत भाषा आहे, अशा समाजाच्या तोंडी असणारे तिचे रूप आणि ज्याने ती नव्याने स्वीकृत केली आहे, त्या समाजात झालेले तिचे रूप या दोहोंत एक ठळक अंतर निर्माण होते. या दुसऱ्या रूपाला मूळ रूपाची पोटभाषा असे म्हणता येईल. अशा रीतीने स्वभाषा टाकून परभाषा स्वीकारल्याची उदाहरणे इतिहासात पुष्कळ आहेत.

श्री. कृ. पां. कुलकर्णी पोटभाषेच्या व्याप्तीसंबंधी व तिच्या भेदासंबंधी लिहितात, ते असे–

पोटभाषेमुळे तिच्या मायभाषेला बिलकुल कमीपणा येत नाही. उलट पोटभाषा मायभाषेचे सत्त्व पोसते आणि योग्य अन्वर्थक शब्दांची ज्या वेळी मायभाषेला उणीव भासते, त्या वेळी पोटभाषा ती दूर करू शकते.

पोटभाषांनी किती क्षेत्र व्यापावे, त्याला काही मर्यादा घालता येत नाही. ती बोलणाऱ्यांची संख्याही अमुकच असली पाहिजे, असाही निर्बंध ठरविता येत नाही. नेपाळात व मणिपूरच्या आसपास पोटभाषांचा इतका बुजबुजाट आहे, की एकेका पोटभाषेचे क्षेत्र काही कुटुंबांपुरतेच राहिले आहे. पोटभाषांचे प्रांतिक, कालिक, गण, लिंग, वय, संस्कृती, इ. आणखी पोटभेद होतात. मराठीपुरते सांगायचे तर वऱ्हाडी, खानदेशी, कोकणी, कारवारी,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देशावरची, इ. प्रांतिक भेद होत. यादव, बहामनी, शिव, पेशवे किंवा वर्तमानकालीन भाषा हे कालिक भेद होत. लोहार, चांभार, महार, ब्राह्मण, मराठे, इ. गणांच्या भाषा हे गणभेद होत.

बोली – वर वर्णिलेल्या भारतीय भाषांत १९६१ च्या जनगणनेनुसार १६५२ बोली चार भाषाकुलांमध्ये वर्गीकृत केल्या गेल्या आहेत. त्यांची वर्गवार नावे अशी–

आग्नेय भाषापरिवाराच्या मोन-ख्मेर शाखेत ७ व मुंडा शाखेत ५८ मिळून ६५ बोली आहेत. खासी भाषेच्या जयंतिया व प्रार अशा दोन बोली आहेत. खेरवरी भाषेच्या अंतर्गत संथाली, मुंडारी, हो, भूमिज व गदब अशा बोली आहेत. मकारी, मिरघा, बइरी, लोढा, निकोबारी व कोल या बोलीही मुंडा शाखेच्याच आहेत. तिबेटी-चिनी भाषावर्गात २२६ बोली आहेत. तिबेटी-भोटिया वर्गात ३३ बोली असून, त्यांमध्ये भोटिया, बाल्टी, भूटानी, लाहुली, स्पीती व कागेती या प्रमुख आहेत. हिमालय वर्गातल्या २४ बोलीत मलानी, कंसी, कनौरी, राई, टामंग या प्रमुख आहेत. नेफा वर्गात २४ बोली असून, त्यांमध्ये आका, ह्रासो, दपका, अबोर, मीरी, मिश्मी या प्रमुख आहेत. आसाम-बर्मी शाखेच्या बोडो वंशात ४० बोली असून, त्यात कचारी, दिमासा, गारो, त्रिपुरी, मिकिर, राबूभा या प्रमुख आहेत. नागा वर्गामध्ये ४७ बोली असून, त्यात कोन्याक, आओ, अंगामी, सेमा, टांगखूल या प्रसिद्ध आहेत. कूकी–चिन वर्गात ६१ बोली असून, त्यात मणिपुरी, विशुनपुरिया, वैते, खोंगजई, हालम, कूकी या प्रमुख आहेत. बर्मा वर्गाची मोघ ही प्रमुख बोली त्रिपुरामध्ये बोलली जाते.

द्राविड भाषाकुलात १६१ बोली आहेत. त्यांमध्ये तमिळ-भाषेच्या येरुकुल, कैकाडी, खोखा, इरूला, पट्टापू या प्रमुख आहेत. तेलुगूच्या ३६ बोली असून, त्यांत वडारी, गोलरी, गोलिया, डोमरा, वदगा, सालेवारी, बेराडी या प्रमुख आहेत. कन्नडच्या ३२ बोली असून, त्यांमध्ये होलिया, मोंटाडेंत्यी, कोरवा या प्रमुख आहेत. मलयाळमच्या १४ बोली असून, त्यात येरवा, पनिया, नागरी, कोडगी, टोडा, कोटा या प्रमुख आहेत. याव्यतिरिक्त धांगरी, नागेसिया, सौरिया, गोंडी, कुई, गोंड, कोया, पार्जी, कोलामी, कोंडा, डोरली, भरिया, पेंगू, माने, नइकी, याही द्राविड समूहाच्याच बोली आहेत.

दरद वर्गातल्या शिना भाषेच्या गिलगिती, किस्टवारी, पोंगुली, गुज्वाली व सिराजी या बोली विशेष उल्लेखनीय आहेत.

सिंध क्षेत्रातल्या लहँदा भाषेच्या १४ बोली असून, त्यांत मुल्तानी, पुच्छी, कच्छी, या प्रमुख आहेत. मराठीच्या ६५ बोली आहेत. त्यांत कोंकणी, कुडुबी, हळबी, कामारी, कटीया, भंडारी, ठाकरी, नारहंडी, मिरगानी, भंडारी, दक्षिणी कोंकणी, उत्तर कोंकणी, वाणकोटी, दमणी, घाटी, मावळी, संगमेश्वरी, आगरी, धनगरी, कुणबी, कोळी, कातकरी, वारली, भिल्ली, चित्तपावनी, कुडाळी, वऱ्हाडी, रायपुरी, अहिराणी, डांगी, या प्रमुख बोली आहेत.

ओडिसाच्या २४ बोलींमध्ये भमी, भुइया, रेल्ली, पइडी, कटकी, गंजामी, संभलपुरी, इ. उल्लेखनीय आहेत. बंगाली भाषेच्या अंतर्गत १५ बोली असून, त्यांत चकमा, किसनगंजिया, राजवंशी, सराकी इ. प्रमुख आहेत.

हिंदी क्षेत्राच्या बिहारी वर्गात ३५ बोली असून, त्यांत भोजपुरी, मैथिली, मगही, सिराजपुरी, अवधी, छत्तीसगढी, बघेली, सरगुजिया, कोरिया, ग्वारो व लरिया या प्रमुख आहेत.

पश्चिमी हिंदी क्षेत्रात खडी बोली, बांगरू, ब्रज, कनौजी, बुंदेली, या प्रमुख आहेत. राजस्थानी भाषेच्या अंतर्गत ७१ बोली असून, त्यांत बगरी, वंजारी, ढूंढाढी, लमाणी, गोजरी, हाडौती, खैसरी, मालवा, मारवाडी, नेवाडी, शेखावाटी, निमाडी, इ. प्रमुख आहेत. भिल्ली भाषेच्या ३६ बोली असून, त्यांत बारेल, भिलाली, भिलोडी, गमती, गावित, कोकना, वागडी, पावरी, इ. प्रमुख आहेत. पहाडी वर्गाच्याअंतर्गत ८९ बोली असून, त्यांत भद्रावही, सिरमौरी, भरमौर, मंडेआली, चमेआली, सुरही, जौनसारी, कुलुई, नेपाळी, कुमाउनी व गढवाली या प्रमुख आहेत.

गुजरातीच्या २७ बोली असून त्यांत घिसाडी, कोलची, पारसी, सौराष्ट्री, गामडीया, चरोतरी व काठियावाडी या प्रमुख आहेत.

पंजाबीच्या २९ बोली असून, त्यांत बिलासपुरी, डोगरी, कांगडी, राठी, जालंधरी, फिरोजपुरी, पट्टियानी व मांझी या प्रमुख आहेत.

भाषा व संस्कृती – मनुष्य हा समूहजीवी प्राणी आहे. हे समूहजीवन यशस्वी होण्यासाठी त्याला काही नियम पाळणे आवश्यक असते. उदा० काही ठराविक बाबतीत सर्वांनी शक्यं तितक्या सारख्या रीतीने वागणे. अशी वागण्याची सवय प्रत्येक व्यक्तीत असल्यामुळे समाजातील सर्व व्यवहार सुरळीत चालू शकतात. अशा अनेक सवयी म्हणजे सामाजिक संस्था होत. या सर्वांतली एक प्रमुख संस्था म्हणजे भाषा. मागच्या पिढ्यांतले ज्ञान व अनुभव भाषेमुळे पुढच्या पिढीपर्यंत येऊन पोचतो आणि ते ज्ञान व ते अनुभव मिळविण्यासाठी पुन्हा प्रयत्न करण्याचे टाळता येणे शक्य होते. त्यामुळे पुढच्या पिढीला ज्ञानात नवी भर घालता येते. म्हणूनच भाषा हे मानवी प्रगतीचे एक सर्वश्रेष्ठ साधन मानले जाते.

अनुभव व्यक्त करणे, जुने ज्ञान नव्या पिढीपर्यंत पोचविणे, नवे ज्ञान शोधून त्याचा संचय करणे, या गोष्टी समाज-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जीवनाला आवश्यक आहेत. ज्ञानगंगेचा प्रवाह अखंड चालू ठेवण्याची आणि समाजजीवन प्रगतिशील बनविण्याची कामगिरी भाषेला पत्करावी लागते.

म्हणूनच जीवनातल्या व्यवस्थित, आवश्यक व सर्वांना मान्य अशा सवयींचा आविष्कार करणारी संस्कृती आणि मानवी जीवन व त्याची सर्व अंगे श्रुतिगोचर करणारी भाषा, या दोन गोष्टी अविभाज्य आहेत. संस्कृती ही परिवर्तनशील असते. सामाजिक मूल्ये बदलतात, जीवनाच्या सवयी बदलतात, जगणे कमी अधिक तीव्र होते आणि या व अशाच अनेक कारणांमुळे संस्कृतीत बदल होत असतो. हा बदल सामान्यपणे मंद गतीने होतो; पण युद्ध म्हणजे सत्तेचे वर्चस्व, स्थलांतर, निर्वासन, इ. गोष्टींमुळे संस्कृतीतला बदल झपाट्याने घडून येत असतो. या सर्व परिवर्तनाचे चित्र भाषेतून प्रकट होत असते. कारण जीवन आणि जीवनाचे विशिष्ट रंग आणि प्रवृत्ती यांना व्यक्त स्वरूप देण्याचे काम भाषेला करावे लागते. या दृष्टीने भाषा ही संस्कृतीची वाहक ठरते. एखाद्या समाजाविषयीची कितीही माहिती आपण मिळविली, त्याच्या जीवनाचे कितीही दीर्घ कालपर्यंत निरीक्षण केले, तरीही त्याची भाषा शिकून त्या समाजाच्या लोकांत अल्पकाळही मिसळल्याने जे ज्ञान आपल्याला होईल, त्याची किंमत कितीतरी पटीने मोठी असते.

स्वभाषेचा अभिमान ही फार स्वाभाविक गोष्ट आहे. विशेषत: ज्या लोकांची भाषा ही केवळ एक व्यवहारसाधन नसून समाजाच्या बौद्धिक आणि कलाविषयक प्रगतीचे प्रदर्शन घडविणारेही साधन असते, त्या लोकांना स्वभाषेवर होऊ पाहणारे आक्रमण, तिची हेळसांड आणि तिचे दैन्य मुळीच खपत नाही. कारण भाषेच्या ऱ्हासाबरोबर समाज म्हणून स्वत:ला असलेल्या स्वतंत्र अस्तित्वाचा आणि भाषेत साठवून ठेवलेल्या कलात्मक आणि बौद्धिक भांडाराचा नाश त्यांना समोर दिसत असतो.

कोणत्याही संस्कृतीचे स्वरूप कसकसे बदलत गेले, ते तिचे वाहन म्हणून वापरण्यात येणाऱ्या भाषेच्या इतिहासावरून कळून येते. विशेषत: कोणत्याही जीवनक्षेत्रातील शब्दसंपत्तीचा विकास अथवा ऱ्हास या बाबतीत मार्गदर्शक होऊ शकतो. कित्येकदा भाषेत नवे शब्द येतात. कित्येकदा जुन्या शब्दांना नवे अर्थ प्राप्त होतात. संलग्न कल्पना प्रचारातून गेल्यामुळे काही अर्थांचा लोपही होतो.

जीवनातले काही अनुभवही कायमचे नष्ट होतात. भाषा आणि साहित्य नसेल, तर हे कसे होते ते समजणार नाही. ऋग्वेद हे भाषिक साधन उपलब्ध आहे, म्हणूनच तत्कालीन वैदिक आर्यांचे सांस्कृतिक जीवन कसे होते, ते आपण जाणू शकतो. प्राचीन इतिहास किंवा जनजीवन जाणण्याच्या कामी प्राचीन उत्खनित अवशेषांचाही उपयोग होतो हे खरे; पण त्या अवशेषांचे अर्थ लावणे हे जरा कठीणच होते. त्या मानाने भाषिक पुरावा अधिक स्पष्ट व उपयुक्त असतो. भाषेचे अशा प्रकारे सांस्कृतिक महत्त्व सांगताना श्री. कालेलकर लिहितात–

वास्तव विश्व आणि व्यक्तिजीवन यांना ध्वनिरूप संकेतांनी पुन्हा साकार करणारी भाषा ही एक शक्ती आहे. ध्वनिरूप प्रतिसृष्टी निर्माण करणारी ही शक्ती विनिमयासाठी वापरता येते आणि अशा रीतीने ज्या साधनांच्या आणि संस्थांच्या आधारे समाजजीवन चालले आहे, त्यांचा एक प्रमुख घटक बनते. जीवनातल्या इंद्रियग्राह्य अनुभवांना श्रुतिगोचर रूप देता आल्यामुळे भिन्नभिन्न व्यक्तींमधले अंतर दूर करून भाषा त्यांना जवळ आणू शकते, एवढेच नव्हे तर त्यांना सहकार्यक्षम बनवू शकते. हे सहकार्यच समाजजीवनाचा पाया आहे. [सा. भा. वि.; म. भा. उ. वि.; भाषा आणि संस्कृति – श्री. ना. गो. कालेलकर, १९६२; भाषा : इतिहास आणि भूगोल, श्री. कालेलकर, १९६४; भाषा – विज्ञान, श्री. श्यामसुंदरदास, १९५७; भारतीय बोलियाँ– श्री. भगवानदीन मिश्र; अ. च. को.]

भाष्य

एक ग्रंथप्रकार. याची व्याख्या अशी– 'भाष्यते विवृत्तया वर्ण्यते इति' = (एखाद्या विषयाचे) विवरणपूर्वक वर्णन करणे म्हणजे भाष्य होय (श. क.). हेमचंद्राने निराळी एक व्याख्या दिली आहे, ती अशी– 'सूत्रोक्तार्थप्रपञ्चकम्' = सूत्रात सांगितलेला अर्थ विस्ताराने सांगणे म्हणजे भाष्य होय. भरताची श्लोकबद्ध व्याख्या अशी –

सूत्रार्थो वर्ण्यते यत्र वाक्यैः सूत्रानुसारिभिः ।
स्वपदानि च वर्ण्यन्ते भाष्यं भाष्यविदो विदुः ॥

अर्थ – सूत्रानुसारी वाक्यांनी जिथे सूत्राचा अर्थ स्पष्ट केला जातो आणि कर्ता ज्यात प्रत्येक पदाचे स्वत:चे स्पष्टीकरण करतो, त्याला भाष्यवेत्ते भाष्य असे म्हणतात.

तात्पर्य असे की सूत्रग्रंथात जो विषय प्रतिपादिलेला असेल, त्याचा परामर्श घेऊन त्याचा अर्थ व त्याची व्याप्ती सुस्पष्ट करणे. असा भाष्य शब्दाचा अर्थ होतो. सूत्रांत वर्णिलेल्या विषयाला धरून भाष्य करायचे असले, तरी कर्त्याला त्यात स्वत:चे विवरण व उदाहरणे देण्याचे स्वातंत्र्य असते. भाष्यामुळे सूत्रांचा संदिग्धपणा जातो, विषय स्पष्ट होतो आणि उदाहरणांनी त्यावर अधिक प्रकाश पडतो.

भाष्ये मुख्यत्वे सूत्रग्रंथांवर झालेली आहेत. सूत्रे तोकडी व संक्षिप्त असतात. त्यामुळे त्यांतला प्रतिपाद्य विषय अभ्यासकाला अनेक ठिकाणी दुर्बोध होतो. ही दुर्बोधता नष्ट होऊन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मूळ ग्रंथ अर्थाला सुलभ व्हावा, यासाठी भाष्ये निर्माण झाली. ग्रंथगत विषय, संशय, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष व सिद्धान्त अशा पाच प्रकारांनी भाष्याची मांडणी करायची असते. भाष्यवाङ्मयाचे मूळ वेदांगापर्यंत पोचते. यास्काचे निरुक्त हे वेदांगांतील निघंटू-तल्या पदांचे भाष्यच होय. पाणिनीच्या व्याकरणसूत्रांवर पतंजलीने केलेले भाष्य हे पहिले व अत्यंत महत्त्वाचे भाष्य समजले जाते. भाष्य कसे असावे, याचा तो एक आदर्शच आहे. म्हणूनच त्याला महाभाष्य ही गौरवाची संज्ञा लाभली आहे. तत्त्वज्ञानाच्या विभागात जैमिनीय सूत्रांवर शबरस्वामीचे भाष्य हे पहिले भाष्य होय. त्याला शाबर भाष्य म्हणतात. हे विवेचनाच्या दृष्टीने सुसंगत, पद्धतशीर व मुद्देसूद आहे. वर सांगितल्याप्रमाणे विषय, संशय, इ. पाचही प्रकारांनी त्यात विवरण केलेले आहे. इ. स. च्या ४थ्या शतकात दर्शनावरची आणखी तीन भाष्ये निर्माण झाली. वात्स्यायनाने गौतमसूत्रांवर विस्तृत भाष्य रचले. पक्षिलस्वामीने न्यायभाष्य लिहिले आणि प्रशस्तपादाने कणादसूत्रांवर भाष्य केले. सांख्यदर्शनावरील अधिकृत भाष्य म्हणजे गौडपादाचे भाष्य होय. हे ईश्वरकृष्णांच्या सांख्यकारिकांवर आहे. ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहिणारे पहिले भाष्यकार आद्य शंकराचार्य होत. त्यांच्या नंतर निंबार्क, मध्व, वल्लभ, रामानुज, ज्ञानभिक्षू, भास्कर, इ. भाष्यकार निर्माण झाले.

नवे स्मृतिग्रंथ निर्माण होण्याची परंपरा खंडित झाल्यानंतर काही शतकांत स्मार्त धर्माची जी विलक्षण वाढ झाली, ती ग्रंथनिविष्ट करण्याचे कार्य अनेक भाष्यकारांनी व निबंधकारांनी केले. त्यांनी मूळ ग्रंथांचे प्रामाण्य न डावलता धर्मसूत्रांतल्या आणि स्मृतिग्रंथांतल्या वचनांचा अर्थ तत्कालीन गरजांना अनुरूप असा लावला आहे. [इं. वे. क. सू.; ल. सं.; मेथडॉलॉजी]

भास (सनपूर्व ४ थे शतक) एक संस्कृत नाटककार. भासाचे जीवनचरित्र उपलब्ध होत नाही. तो जातीने ब्राह्मण होता, असे अनेकांनी मानले आहे. कारण त्याच्या नाटकांतून ब्राह्मणवर्ग व ब्राह्मणप्रणीत समाज या गोष्टींविषयी विशेष प्रेम दिसून येते. भास हे त्याचे व्यक्तिनाम की कुलनाम तेही समजायला मार्ग नाही. तो उत्तर भारतातला कुठलातरी असावा. कारण त्याच्या नाटकांत तिकडील देशनामे विपुल प्रमाणात आढळतात. त्याने उल्लेखलेल्या चालीरीतीही उत्तर-भारतीयच आहेत. उत्तर भारत त्याने प्रत्यक्ष पाहिलेला दिसतो. त्या मानाने त्याचे द. भारताचे ज्ञान तोकडे व रामायण-महाभारतापुरते मर्यादित आहे.

भासाचा अनेक राजकुलांशी घनिष्ठ परिचय असावा. कारण राजप्रासाद, अंतःपुरे, मंत्रिमंडळ, सैन्य, द्वंद्वयुद्ध, इत्यादींची वर्णने तो प्रत्यक्ष पाहिल्यासारखी तपशीलवार करतो. श्रीमंत व प्रतिष्ठित लोकांचा सहवासही त्याला मिळाला असावा, ही गोष्ट त्याच्या चारुदत्त नाटकावरून कळते. त्याच्या नाटकांच्या भरतवाक्यात ' राजसिंहः प्रशास्तु नः ' = राजसिंह आमचे रक्षण व पालन करो, असा एक चरण नेहमी असतो. यावरून कोण्या राजसिंह नामक राजाचा त्याला आश्रय असावा, असे वाटते. भास हा चतुरस्र विद्वान होता. वेद, इतिहास-पुराणे, कथा-गाथा; तसेच धर्म, अर्थ, राजकारण, साहित्य, इ. शास्त्रांचे त्याने बरेच अध्ययन केले होते. तो स्वभावाने नम्र आणि विनोदी होता. राम-कृष्णांवर त्याची प्रगाढ भक्ती दिसते, त्यावरून तो वैष्णव असावा, असे वाटते. त्याचे कौटुंबिक जीवनही सुखपूर्ण होते, असे समजायला हरकत नाही.

एकदा त्याची सर्व नाटके कोणीतरी अग्नीत टाकली. अग्नीने ती भस्मसात केली; पण स्वप्नवासवदत्त हे नाटक मात्र जाळले नाही. त्यावरून भासाला ज्वलनमित्र अशी उपाधी मिळाली होती.

भासनाटकचक्र – भासाने एकूण १३ नाटके लिहिली. भासनाटकचक्र या नावाने त्यांचा उल्लेख मिळत असे. पण त्याच्या प्रती मात्र उपलब्ध नव्हत्या. इ. स १९१० साली श्री. टी. गणपतिशास्त्री हे विद्वान संशोधक पूर्वीच्या त्रावणकोर संस्थानात ग्रंथांचे संशोधन करीत असता पद्मनाभपुराजवळच्या मनलिक्कर मठात त्यांना भासाची तेराही नाटके एकसमयावच्छेदे हस्तगत झाली. ही नाटके त्यांनी त्रिवेंद्रम संस्कृत ग्रंथमालेत छापून प्रसिद्धही केली. त्यांचा क्रमाने परिचय असा –

(१) प्रतिमा – यात रामवनवासापासून रावणवधापर्यंतची कथा वर्णित आहे. अयोध्येच्या मृत राजांच्या प्रतिमा देवकुलात स्थापित केल्या जात होत्या. मातुलगृहाहून अयोध्येला आलेल्या भरताला नगराच्या बाहेर देवकुलात दशरथाची प्रतिमा दिसली व त्यावरून आपला बाप मृत झाला, असे त्याला समजले. यावरूनच कवीने नाटकाचे नाव प्रतिमा असे ठेवले.

(२) अभिषेक – या नाटकात रामायणातल्या किष्किंधा, सुंदर व युद्ध या कांडांची कथा वर्णित आहे.

(३) बालचरित – यात श्रीकृष्णजन्मापासून कंसवधापर्यंतची कथा वर्णित आहे. भागवत पुराणाच्या आधारे कवीने हे नाटक लिहिले असावे.

(४) पंचरात्र – महाभारतातल्या काही व्यक्तींना धरून कवीने एक कल्पित कथा या नाटकात मांडली आहे. एका यज्ञ-प्रसंगी दुर्योधनाने द्रोणाचार्याला तो मागेल ते दान देण्याची प्रतिज्ञा केली. द्रोणाने पांडवांना अर्धे राज्य दे, असे दुर्योधनाला सांगितले. त्या वेळी पांडव वनवासात होते. दुर्योधनाने शकु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नीशी सल्लामसलत करून द्रोणाला अशी अट घातली, की जर पाच रात्रीत पांडवांचा पत्ता लागला, तर मी त्यांना अर्धे राज्य देईन. द्रोणाने प्रयत्न करून ठरल्या मुदतीत पांडवांचा पत्ता लावला आणि दुर्योधनाने त्यांना अर्धे राज्य दिले.

(५) मध्यमव्यायोग – बकासुराच्या तावडीतून भीमाने एका ब्राह्मण कुटुंबाला वाचवल्याची कथा महाभारतात आहे. त्याच धर्तीवर घटोत्कच नावाच्या राक्षसापासून भीमाने एका ब्राह्मण-पुत्राला वाचवले, असा कथाभाग या नाटकात वर्णित आहे. हिडिंबा ही भीमाची पत्नी. ती शेवटी भीमाला भेटते व तिचा पुत्र तो आपलाच पुत्र असे भीमाला कळून येते.

(६) दूतवाक्य – महाभारतातल्या कृष्णशिष्टाईवर हे नाटक आधारलेले आहे.

(७) दूतघटोत्कच – भारतीय युद्धात अभिमन्यूचा वध झाल्यावर श्रीकृष्ण घटोत्कचाला दूत बनवून धृतराष्ट्र व दुर्योधन यांच्याकडे पाठवतो, अशी कथा यात वर्णित आहे. अभिमन्यूच्या मरणाने पांडवांना जसा शोक झाला, तशीच अवस्था या युद्धात तुमचीही होईल, असा संदेश घटोत्कचाकरवी कृष्णाने त्यांच्याकडे पाठविला आहे.

(८) कर्णभार – ब्राह्मणरूप घेऊन इंद्र कर्णाकडे कवच-कुंडले मागायला आला व कर्णाने ती त्याला दिली, ही कथा यात वर्णित आहे.

(९) ऊरुभंग – दुर्योधनाच्या नाट्यमय मृत्यूवर आधारलेली ही एक एकांकिका असून, तिच्यात शेवटी दुर्योधनाची मृत्यूपूर्व पश्चात्तप्त अवस्था प्रभावीपणे चित्रित केली आहे.

(१०) स्वप्नवासवदत्त – याला स्वप्ननाटक असेही म्हणतात. हे नाटक कौशांबीचा राजा उदयन याच्या कथेवर आधारलेले आहे. यौगंधरायण नावाचा उदयनाचा मंत्री होता. राजाची राणी वासवदत्ता ही लावाणक वनात जळून मेली, अशी खोटी वार्ता यौगंधरायण प्रसृत करतो व तिला वेगळ्या वेषात मगध राजकन्येजवळ ठेवून देतो. पुढे यौगंधरायणाच्याच मुत्सद्देगिरीने मगधराज दर्शक याची बहीण पद्मावती हिच्याशी उदयनाचा विवाह होतो. पद्मावतीच्या शयनगृहात झोपी गेलेल्या उदयनाला स्वप्नामध्ये वासवदत्ता दिसते. ते स्वप्न लगेच प्रत्यक्षात उतरून वासवदत्तेची व उदयनाची भेट घडून येते. या नाटकात भासाने विशुद्ध प्रेमाचे सुंदर चित्र रेखाटले आहे.

(११) प्रतिज्ञायौगंधरायण – यातही उदयनकथेचा प्रपंच आहे. ही कथा स्वप्नवासवदत्तमधल्या कथेच्या पूर्वीची आहे. अवंतीचा राजा महासेन हा नकली हत्तीच्या साहाय्याने उदयनाला कैद करून आपल्या राज्यात नेतो. तिथे त्याला राजकुमारी वासवदत्ता हिचे दर्शन घडते. तो तिला वीणावादन शिकवू लागतो. त्यातून दोघांचे प्रेम जमते आणि मग यौगंधरायणाच्या मदतीने उदयन वासवदत्तेला घेऊन कैदेतून पळून जातो.

(१२) अविमारक – हे नाटक एका लोककथेवर आधारलेले आहे. अविमारक हा यातील नायक होय. त्याचे व कुंतिभोज राजाची कन्या कुरंगी हिचे परस्पर प्रेम, हा या नाटकाचा विषय आहे.

(१३) चारुदत्त – उज्जयिनीचा सार्थवाह चारुदत्त व वसंतसेना नावाची गणिका यांच्या प्रेमावर हे नाटक आधारलेले आहे. ही अमर कथा पुढे शूद्रकाने पल्लवित करून मृच्छकटिक नावाचे नाटक लिहिले.

ही नाटके भासाची नसून दुसऱ्या कोणातरी अनामिक कवीची आहेत, असे म्हणणाऱ्या विद्वानांचा एक पक्ष आहे; पण सर्व नाटकांचे अंतर्बाह्य परीक्षण करून ही नाटके भासाचीच आहेत, असे बहुतेक पंडितांनी ठरविले आहे.

भासकवी रसपरिपोष चांगल्या प्रकारे करतो. त्याचे संवादही खुसखुशीत व गतिमान असतात. जागोजागी तो निसर्ग-चित्रेही यथार्थपणे रंगवितो. निसर्गामधले रात्र, अंधार व चांदणे हे विषय त्याचे विशेष आवडते दिसतात. याविषयीची कल्पनारम्य वर्णने असलेले चारुदत्त नाटकातले पुढील दोन श्लोक उदाहरणादाखल सांगता येतील –

लिम्पतीव तमोऽङ्गानि वर्षतीवाञ्जनं नभः ।
असत्पुरुषसेवेव दृष्टिर्निष्फलतां गता ।।

(चारुदत्त १·१९)

अर्थ – जणू अंधकार अवयवांना लिंपून टाकीत आहे. आकाश जणू काजळ वर्षत आहे. अशा या प्रसंगी दृष्टी दुर्जनांच्या सेवेप्रमाणे निष्फल बनली आहे.

उदयति हि शशाङ्कः क्लिन्नखर्जूरपाण्डु-
र्युवतिजनसहायो राजमार्गप्रदीपः ।
तिमिरनिचयमध्ये रश्मयो यस्य गौराः
हृतजल इव पङ्के क्षीरधाराः पतन्ति ॥

(चारुदत्त १२·१)

अर्थ – भिजविलेल्या खजुराप्रमाणे पांडुर रंगाचा चंद्रमा उदयाला येत आहे. तो युवतींना साहाय्यक व राजमार्गाचा प्रकाशक होत आहे. अंधकाराच्या राशीत याचे शुभ्र किरण सुकलेल्या चिखलात दुग्धधारा बरसाव्या तसे दिसत आहेत.

भासाच्या नाटकात जागोजाग सुभाषितवजा श्लोक विखुरलेले दिसतात. ते त्रिविध पुरुषार्थांवर प्रकाशाची शलाका टाकून जातात. सुसंस्कृत जीवनाविषयी काही महत्त्वाचे सिद्धान्तही त्यांत आढतात. काही उदाहरणे अशी –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिक्षा क्षयं गच्छति कालपर्ययात् सुबद्धमूला निपतन्ति पादपाः ।
जलं जलस्थानगतं च शुष्यति हुतं च दत्तं च तथैव तिष्ठति ।।

(कर्णभार १.२२)

अर्थ – कालांतराने विद्याध्ययन क्षीण होते. मुळे खोल गेलेले वृक्षही (वाऱ्या-वादळाने) उन्मळून पडतात. पाणी तळ्यातल्या तळ्यातच सुकून जाते. (पण) अग्नीत हवन केलेले व (सत्पात्री) दान केलेले जे असेल, ते मात्र अक्षय्य राहते.

अकारणं रूपमकारणं कुलं महत्सु नीचेषु च कर्म शोभते ।।

(पंचरात्र २.३३)

अर्थ – रूप व कुल ही अप्रयोजक होत. मोठे असोत किंवा हीन दर्जाचे असोत; (सत्) कर्म हेच त्यांना शोभा देते.

मज्जमानमकार्येषु पुरुषं विषयेषु वै ।
निवारयति यः राजन् स मित्रं रिपुरन्यथा ।।

(अभिषेक ६.२२)

अर्थ – दुष्कृत्यात व विषयात बुडणाऱ्या पुरुषाला जो त्यातून बाजूला काढतो, त्याला मित्र म्हणावे. याच्या उलट करणारा शत्रू होय.

धर्मः प्रागेव चिन्त्यः सचिवमतिगतिः प्रेक्षितव्या स्वबुद्धया
प्रच्छाद्यौ रागरोषौ मृदुपरुषगुणौ कालयोगेन कार्यौं ।
ज्ञेयं लोकानुवृत्तं परचरनयनैर्मण्डलं प्रेक्षितव्यं
रक्ष्यो यत्नादिहात्मा रणशिरसि पुनः सोऽपि नावेक्षितव्यः ।।

(अविमारक १.१२)

अर्थ – (राज्य करणे म्हणजे मोठ्या जबाबदारीचे काम असते) प्रथम धर्माचा विचार करायचा. मंत्रिजनांची बुद्धी आणि चाल स्वतःच्या बुद्धीने पाहायची. प्रेम आणि रोष झाकून ठेवायचे. योग्य काळी मृदू किंवा कठोर व्हायचे. लोकवृत्त जाणून घ्यायचे. दुसऱ्यांच्या व हेरांच्या डोळ्यांनी आपल्या भोवतीचे राज्यमंडल (अनुकूल किंवा प्रतिकूल) पाहायचे. प्रयत्नाने आत्मरक्षण करायचे आणि युद्धाच्या आघाडीवर प्राणांचीही पर्वा करायची नाही.

काष्ठादग्निर्जायते मथ्यमानाद् भूमिस्तोयं खन्यमाना ददाति ।
सोत्साहानां नास्त्यसाध्यं नराणां मार्गारब्धाः सर्वयत्नाः फलन्ति ।।

(प्रतिज्ञायौगंधरायण १.१८)

अर्थ – मंथन केल्याने काष्ठातून अग्नी उत्पन्न होतो. भूमी खणल्याने पाणी लागते. जे उत्साही मनुष्य आहेत, त्यांना असाध्य असे काही नाही. योग्य मार्गाने आरंभलेले सर्व प्रयत्न फलद्रूप होतात.

भासाच्या नाटककृतींचे गुणदोषविवेचन करताना डॉ. वि. वा. करंबेळकर लिहितात –

नाटककार या दृष्टीने भासाची योग्यता फार मोठी आहे. त्याच्या नाटकांत विविधता, रचनासौंदर्य, क्रियाबाहुल्य व चैतन्य हे गुण आहेत. व्यक्तींचे स्वभावदर्शन घडविण्यात तो सिद्धहस्त आहे. त्याची कथावस्तू अगदी थोडकी व साधी असते. पण तिची घडण सुव्यवस्थित व क्रमशः उकललेली असते. हीच भासाची नाट्यनिपुणता. संस्कृत भाषेत यानेच प्रथम एकांकी नाटक सुरू केले. भासाचे काव्य सरळ, सोपे व प्रासादिक असते. क्वचित दीर्घसमासरचना, अनुप्रासादी अलंकार व कल्पनेची चमक आढळते. [सं. क. द.; सं. सा. सो. इ.; महाकवी भास – एक अध्ययन – श्री. बलदेव उपाध्याय, १९६४; भास ए स्टडी– श्री. पुसाळकर, १९६८; भास-समस्या–डॉ. चिं. त्र्यं. केंघे, १९६२]

भास्कर (१) (इ. स. चे ११वे शतक) एक वेदान्ताचार्य. याने ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहिले आहे. त्याला भास्कर-भाष्य असे नाव आहे. हा भेदाभेदवादी होता. भोवरे, बुडबुडे व लाटा या रूपाने जल भिन्न भिन्न दिसत असले, तरी समुद्ररूपाने ते एकच असते, तसेच ब्रह्माचे आहे, असे याचे मत आहे. याचे ब्रह्मविषयक विवेचन असे– ब्रह्म हे सगुण, सल्लक्षण, बोधलक्षण, सत्यज्ञानानंतलक्षण, चैतन्यसहित, रूपांतररहित व अद्वितीय आहे. प्रलयावस्थेत समस्त विकार ब्रह्मात लीन होतात. ब्रह्म हे कारणरूपात निराकार आणि कार्यरूपात जीवरूप व प्रपंचमय आहे. भोग्यशक्ती व भोक्तृशक्ती अशा ब्रह्माच्या दोन शक्ती आहेत. भोग्यशक्ती आकाशादी अचेतन जगद्रूपात परिणत होते; तर भोक्तृशक्ती चेतन जीवरूपात विद्यमान असते. ब्रह्माच्या या शक्ती पारमार्थिक आहेत. ब्रह्म हे स्वाभाविक रीत्या परिणाम पावते. सूर्य आपल्यातून किरणांचा विक्षेप करतो, त्याप्रमाणे ब्रह्म आपल्या अनंत व अचिंत्य शक्तींचा विक्षेप करते. परमात्म्याविषयीचा अनुराग मोक्षाला कारण आहे, तर विषयांसंबंधीचा अनुराग बंधाला कारणीभूत आहे. शुष्क ज्ञानाने मोक्षाचा उदय होत नाही; तर तो कर्मसंवलित ज्ञानाने होतो. त्यासाठी उपासना व योगाभ्यास यांचीही आवश्यकता असते. [भा. सं.; भा. द.]

(२) (इ. स. चे १७ वे शतक) एक महाराष्ट्रीय संशोधक. हा रघुनाथाचा शिष्य होता. एकनाथांनी ज्ञानेश्वरीचे शुद्धीकरण केल्यानंतर अवघ्या २६ वर्षांनी भास्करानेही तशाच प्रकारचे कार्य केले. याने आपल्या संशोधित ज्ञानेश्वरीत ४०० ओव्यांची पुरवणी जोडली आहे. या अधिक ओव्यांत भास्कराने ज्ञानदेवाला प्रार्थना, गीतेची महती व ज्ञानेश्वरीचा पाठ अशुद्ध का झाला याची कारणे; इ. गोष्टी दिल्या आहेत. तो म्हणतो. 'श्रीकृष्णाने उभारलेल्या या गीतारूप प्रासादात केवळ व्युत्पन्न पंडितानांच प्रवेश मिळे. म्हणून ज्ञानेश्वरांनी प्राकृतांसाठी त्या प्रासादापुढे हा मुक्तिमंडप उभारला आहे. [विविधा]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भास्करप्रिया सप्तमी एक तिथिव्रत. जेव्हा सूर्य शुद्ध सप्तमीला एका नक्षत्रातून दुसऱ्या नक्षत्रात जातो, तेव्हा त्या सप्तमीला महाजया म्हणतात. ही सप्तमी सूर्याला फार प्रिय असल्यामुळे तिला भास्करप्रिया असे नाव मिळाले आहे. या तिथीला स्नान करून सूर्यप्रीत्यर्थ जप व होमहवन करतात. या दिवशी देव-पितरांची पूजा करावी, असेही सांगितले आहे. फल – इष्टप्राप्ती. [हि. ध.]

भास्करभट्ट (इ. स. चे १५ वे शतक) एक भाष्यकार. याचे चरित्र उपलब्ध नाही. याने तैत्तिरीय संहितेवर ज्ञानयज्ञ या नावाने भाष्य लिहिले आहे. हा ग्रंथ अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला आहे. निरनिराळ्या भाष्यांबद्दल विद्वानांची मते सांगून त्यांवरही त्याने भाष्य केले आहे. यात वेदमंत्रांचा अर्थ यज्ञपर लावला आहे. शिवाय त्यांचा आध्यात्मिक अर्थही त्याने विशद केला आहे. भास्करभट्टाने या ग्रंथात पाणिनीची सूत्रे उद्धृत करून अनेक शब्दांच्या व्युत्पत्ती साधल्या आहेत. या व अशा अनेक गोष्टींमुळे वैदिक साहित्यात या ग्रंथाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. [वै. सा. सं.]

भास्करभट्ट बोरीकर (इ. स. चे १३ वे शतक) महानुभाव पंथाचा तिसरा आचार्य व कवी. भास्करभट्टाचे मूळ नाव भानुभट असे होते. तो परभणी जिल्ह्यातील कासार बोरी या गावचा रहिवासी होता. महानुभाव पंथाची दीक्षा घेण्यापूर्वी कलंकी मार्गातील आचार्य असलेल्या कोण्या एका केशवाचार्याचा हा शिष्य होता. केशवाचार्य एक वैदिक पंडित होता, असे डॉ. कोलते यांचे मत आहे. एके दिवशी भानुभटाला नागदेवाचे दर्शन घडले. त्यानंतर त्याने केशवाचार्यांचे अनुयायित्व सोडले व तो नागदेवाचा शिष्य झाला. पुढे भास्करभट्टाची व केशवाचार्यांची अचानक गाठ पडली. या भेटीत केशवाचार्य कुत्सितपणे भास्करभट्टाला म्हणाला. 'तू मला सोडून नागदेवाकडे गेलास; त्यामुळे काय तुला तिसरे सिंग फुटले?' त्यावर त्या दोघांत वाद झाला. अखेर केशवाचार्यही नागदेवाचा शिष्य बनला. काही दिवसांनी केशवाचार्याची श्रद्धा विचलित झाली आहे, असे पाहून नागदेवाने त्याला पंथातून घालवून दिले. भास्करभट्ट मात्र अखेरपर्यंत आपल्या गुरुकुळाशी एकनिष्ठ राहिला.

भास्कराची वाणी रसाळ होती. तो भागवतावर पुराण सांगत असे. तो वादपटू होता; तसाच तो शीघ्रकवीही होता. एकदा त्याने एक श्लोक दहा प्रकारांनी रचून दाखविला. त्याचे रूपलावण्यही अप्रतिम होते. भास्कराचे हे देखणेपण महानुभाव पंथाच्या पठडीत सोयीचे नव्हते; म्हणून नागदेवाने त्याला ठिगळाचे वस्त्र पांघरायला दिले होते.

याने आयुष्याचा अखेरचा काळ नगर जिल्ह्यातील अष्टी येथे घालवला असावा व तिथेच त्याचा अंत झाला असावा, असे प्रा. कोलते यांचे मत आहे.

भास्करभट्ट 'शृंगारीया कवी' म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या या बिरुदाची यथार्थता शिशुपालवध हे त्याचे काव्य वाचल्यानंतर पटते. पण भास्कराचे ग्रंथकर्तृत्व एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. त्याने संस्कृत पूजावसर, नरविलापस्तोत्र, चालीसाख्यस्तोत्र, इ. बारा ग्रंथ रचले आहेत.

आपल्या शिशुपालवध या काव्यासंबंधी तो म्हणतो–

म्हणौनि शिशुपालवधी कथा : जे भक्तिरसाची बमिपया
किं सोंनवें कैवल्यपथा : पाजळिली ।।
किं मुक्ति वनिकेची दूतिका : किं ज्ञानांजनाची साळांका
किं कैवल्य–मंदिराची पताका : झळाळीत दीसे ।।
ना तरि शांतरसें सींपता : सांसिनली ज्ञानलता
किं विवेकाची सौभाग्य-देवता : मूर्त जाली ।।

त्याची उद्धवगीता ही भागवताच्या दशमस्कंधावरील मराठीतील पहिली टीका होय. हा ग्रंथ श्रीकृष्ण आणि उद्धव यांच्या संवादातून विस्तारलेला असून, पूर्णपणे निवृत्तिपर आहे. भास्कराची अन्य कामगिरी त्याच्या काव्यांपेक्षाही पंथीय दृष्टीने अधिक महत्त्वाची आहे. खालसेयांच्या म्हणजे मुसलमानांच्या धाडीत पंथाच्या सर्व ग्रंथांची वाताहत झाली. त्यामुळे पंथावर मोठा बाका प्रसंग ओढवला. त्यातून नागदेवाचार्य, बाइदेवबास, केसोबास, इ. थोर मंडळी दिवंगत झाली. अशा परिस्थितीत याने आपल्या शिष्यांच्या साहाय्याने चरित्रग्रंथ व द्वादशप्रकरणे पुन्हा रचण्याचे महत्त्वाचे काम पार पाडले. भास्कराच्या या कामगिरीमुळे तो पंथाचा तारणहार ठरला आहे. [भा. बो.; म. म. वा.; म. सा.; प्रा. म. वा. इ.; स्मृतिस्थळ.]

भास्करराय (इ. स. चे १८ वे शतक) एक मीमांसक व तंत्रशास्त्रज्ञ. याला भासुरानन्द असेही म्हणत. याने मीमांसा व तंत्रशास्त्र यांवर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. वादकुतूहल व भाट्टजीविका हे दोन मीमांसाविषयक ग्रंथ असून, नित्याषोडशिकार्णव तंत्र यावरची सेतुबंध ही व्याख्या व सौभाग्यभास्कर नामक ललितासहस्रनामावरची व्याख्या, हे त्याचे तांत्रिक ग्रंथ आहेत. [मी. द.]

भास्करव्रत एक तिथिव्रत. सूर्य ही या व्रताची देवता आहे. यात षष्ठीला उपवास आणि सप्तमीला सूर्याची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूजा करायची असते. श्राद्धही विहित आहे. फल – रोगमुक्तता आणि स्वर्गप्राप्ती. [हि. ध.]

भास्कराचार्य (१) (११४४–१२२३ इ. स.) एक महान ज्योतिषशास्त्रज्ञ. हा सह्य पर्वताजवळील विज्जलवीड गावचा रहिवासी होता. हे गाव जळगाव जिल्ह्यातल्या चाळीसगावाच्या नैर्ऋत्येस १० मैलांवर वसलेल्या पाटण नामकं खेड्याच्या आसपास असावे, असा तर्क तिथल्या एका शिलालेखावरून डॉ. केतकरांनी केला आहे. श्री. वा. कृ. भावे यांच्या मते मात्र विज्जलवीड म्हणजे मराठवाड्यातले बीड होय. याचे गोत्र शांडिल्य होते. महेश्वर हा त्याचा पिता व गुरू होता. गणपती हे त्याचे उपास्य दैवत होते. भास्कराचार्यांच्या चरित्राविषयी विशेष माहिती मिळत नाही. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यांत सिद्धान्तशिरोमणी या नावाचा एक ग्रंथ असून, त्याच्या पहिल्या भागाचे नाव लीलावती असे आहे. या नावाविषयी एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी –

भास्कराचार्यांना लीलावती नामक एक कन्या होती. तिच्या लग्नाचा विचार सुरू झाल्यावर त्यांनी तिच्या जन्मपत्रिकेचे सूक्ष्म निरीक्षण केले आणि त्यात त्यांना आपल्या मुलीच्या दैवात वैधव्य योग आहे, असे आढळून आले. त्यामुळे ते अस्वस्थ झाले. अधिक वारकाईने विचार करता त्यांना एक उपाय सापडला. एका विशिष्ट मुहूर्तावर लीलावतीचे लग्न झाले, तर वैधव्य टळणे शक्य आहे, असे त्यांना वाटले. लग्न निश्चित झाले. तो विशिष्ट मुहूर्त साधण्याची योजनाही निश्चित झाली. लीलावती गौरीहराच्या पूजेस बसली. पण एकाएकी तिच्या मनात विचार आला, की घटिकापात्र पाण्यात नीट बुडते आहे की नाही ते पाहावे. ती कुतूहलाने त्या पात्राचे निरीक्षण करू लागली. पण इतक्यात तिच्या कपाळी कुंकवात माखलेल्या ज्या अक्षता चिकटलेल्या होत्या, त्यांतील एक दाणा घटिकापात्रात पडून थेट छिद्रावर जाऊन बसला. त्यामुळे घटिकापात्रात पाणी शिरून ते बुडायला विलंब लागला. त्यामुळे तो विशिष्ट मुहूर्तही टळला. शेवटी तिला वैधव्य आलेच. लीलावती पित्याच्या घरी परत आली. तिचे आयुष्य फुकट जाऊ नये, म्हणून मग भास्कराचार्यांनी तिला गणितशास्त्र शिकविले.

गणितविद्या लीलया म्हणजे सहजपणे समजावून देणारा ग्रंथ या अर्थाने भास्कराचार्यांनी आपल्या ग्रंथाचे ‘ लीलावती ’ असे काव्यमय नाव ठेवले आणि पुढे कालांतराने भास्कराचार्यांच्या ग्रंथावर टीका लिहिणाऱ्या पंडितांनी लीलावती हे नाव विशिष्टार्थक असल्याचे सांगण्यासाठी वरीलप्रमाणे आख्यायिका रचली असावी, असे म्हणतात.

सिद्धान्तशिरोमणीवर टीका लिहिणाऱ्या मुनीश्वर नावाच्या पंडिताने म्हटले आहे, की भास्कराचार्य हा याज्ञिकांचा अग्रणी, यजुःशाखियांचा उपाध्याय व काव्य, नाटक आणि अलंकार यांचा अध्यापक होता. पाटण येथील शिलालेखात भास्कराचार्यांची वंशपरंपरा दिली आहे. ती अशी – त्रिविक्रम > भास्करभट्ट > गोविंद > प्रभाकर > मनोरथ > महेश्वर > भास्कर > लक्ष्मीधर व चंगदेव. हा शेवटचा चंगदेव देवगिरीच्या सिंघण यादवाचा ज्योतिषी होता. त्याने ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनासाठी पाटण येथे एका मठाची स्थापना केली होती.

सिद्धान्तशिरोमणी आणि करणकुतूहल हे दोन भास्कराचार्यांचे ज्योतिर्गणितविषयक ग्रंथ आहेत. त्यांव्यतिरिक्त वासनाभाष्य हा सिद्धान्तशिरोमणीच्या ग्रहगणित व गोलाध्याय यांवरील स्वकृत टीकाग्रंथ आहे. भास्करव्यवहार व विवाहपटल हे ग्रंथ त्यांचेच असावे, असे अनुमान आहे. पहिला ग्रंथ त्यांनी आपल्या ३६ व्या वर्षी लिहिला व दुसरा ६९ व्या वर्षी लिहिला. सिद्धान्तशिरोमणी ग्रंथाचे लीलावती, बीजगणित, ग्रहगणित व गोल असे चार खंड असून, प्रत्येक खंड म्हणजे गणिताच्या त्या त्या शाखेवरचा स्वतंत्र ग्रंथच आहे. लीलावतीला पाटीगणित असेही म्हणतात. अंकगणित व महत्त्वमापन (क्षेत्रफळ, घनफळ) यांवरचा तो ग्रंथ आहे. त्यात अनेक कोष्टकेही आहेत. शून्य या अर्थी त्यांनी पूर्ण शब्द वापरलेला आहे. वैज्ञानिक जगात या ग्रंथाचा फार लौकिक आहे. हा ग्रंथ भास्कराचार्यांनंतर पाचशे वर्षे भारतीय शिक्षणक्रमात गणित विषयाचा पाठ्यग्रंथ म्हणून वापरला जात होता.

इ. स. १५८३ मध्ये अबुल फैजी याने लीलावतीचे फारसी भाषांतर केले. लिलावती ग्रंथाची हस्तलिखिते काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व भारतभर विखुरलेली आहेत. लीलावतीवर १७ ते २० टीका झालेल्या आहेत. लीलावतीत आजच्या दृष्टीने सारे अंकगणित आणि बीजगणित व रेखागणितातील काही भाग यांचा अंतर्भाव झालेला आहे. श्रेढी व्यवहार व अंकपाश ही प्रकरणे पाश्चात्य पद्धतीने बीजगणितात अंतर्भूत होतात आणि क्षेत्रव्यवहार हे भूमितिशास्त्राचे अंग समजतात.

दुसरा खंड बीजगणित होय. यात धनर्ण संख्यांची बेरीज, अव्यक्तांची बेरीज, करणी संख्यांची बेरीज, एकवर्ण समीकरण, अनेक वर्ण समीकरण, एकानेकवर्ण वर्गादी समीकरणे, इ. विषय आले आहेत. लीलावतीप्रमाणेच बीजगणितावरही अनेक टीका झालेल्या आहेत. शहाजहानच्या कारकीर्दीत अताउला रसीदी याने इ. स. १६३४ मध्ये त्याचे फारसी भाषांतर केले. भास्कराचार्यांच्या या विषयातील प्रावीण्याबद्दल पाश्चात्य पंडितांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. लाग्रांज या पाश्चात्य गणितशास्त्रज्ञा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूर्वी भास्कराचार्यांच्या योग्यतेचा दुसरा गणिती नव्हता, असे गणितशास्त्राचा इतिहास लिहिणाऱ्या पंडितांचे मत आहे.

पुढील गणिताध्याय व गोलाध्याय यांत ज्योतिषशास्त्र आहे. पहिल्यात ग्रहगणित हा विषय व पंचांग करण्यास लागणारे गणित आहे व दुसऱ्यात ग्रहगणिताध्यायातील सर्व विषयांची उपपत्ती, त्रैलोक्यसंस्थावर्णन, यंत्राध्याय, गोलीय त्रिकोणमिती, इ. विषय आहेत. सिद्धान्तशिरोमणी हा ग्रंथ इतका उत्कृष्ट आहे, की त्यावरून भारतीय ज्योतिषशास्त्रासंबंधी संपूर्ण माहिती कळते. त्या काळी त्याच्या अध्ययनाने विद्यार्थ्यांची गणिताच्या चारही शाखांतली उदाहरणे सोडविण्याची सोय होत असे.

भास्कराचार्यांच्या ग्रंथांचा प्रसार सर्व भारतभर झाला व इतर ग्रंथ मागे पडले. भास्कराचार्य ब्रह्मगुप्ताला आपला गुरू मानतात. पण सिद्धान्तशिरोमणीच्या सोयिस्कर पद्धतीमुळे ब्रह्मगुप्ताच्या ब्रह्मसिद्धान्ताचेदेखील अध्ययन लोकांना नकोसे झाले. भास्कराचार्यांच्या ग्रंथात सोप्या रीती व काही नवीन शोध आहेत. त्यांना क्षेत्रफळ काढण्याची रीत अवगत होती. इष्टदिक्छायासाधन व पातसाधन या दोन गोष्टींसंबंधी त्यांनी नवीन माहिती दिली आहे. शरासंबंधी पूर्वीच्या ग्रंथकारांची चुकीची समजूत खोडून काढून शर हा आयनिक वृत्तावर लंब असतो, असे त्यांनी स्पष्ट दाखवून दिले आहे.

भास्कराचार्यप्रभृती ज्योतिर्विदांना पृथ्वी वाटोळी आहे, ती आपल्याभोवती फिरते व तिला कशाचाही आधार नाही हे माहीत होते. प्रस्तुत शोध सूर्यसिद्धान्त ग्रंथात दिले आहेत. त्या काळी दुर्बिण वगैरे सूक्ष्म वेधसाधने उपलब्ध नव्हती. पण अशा साधनांच्या अभावीही वरील शोध त्यांनी लावले, यातच त्यांची कुशाग्र बुद्धी दिसून येते. भास्कराचार्यांना पृथ्वीच्या अक्षभ्रमणाची आणि कक्षाभ्रमणाचीही कल्पना होती. न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त सुमारे आठ शतकांपूर्वी भास्कराचार्यांनी मांडलेला आहे, तो असा –

आकृष्टशक्तिश्च मही तया यत् खस्थं गुरु स्वाभिमुखं स्वशक्त्या
आकृष्यते तत् पततीव भाति समे समन्तात् क्व पतत्विदम् ।।

अर्थ – पृथ्वीच्या ठिकाणी आकर्षणशक्ती आहे. या शक्तीने ती आकाशातील जड वस्तू आपल्याकडे खेचते. ती पडत आहे असे वाटते. पण ती पडत नाही सर्व बाजूंनी समान असणाऱ्या आकाशात ती कुठे जाणार ?

पृथ्वी गोल आहे, हे सिद्ध करताना भास्कराचार्यांनी म्हटले आहे ते असे –

यदि समा मुकुरोदरसन्निभा भगवती धरणी तरणिः क्षितेः ।
उपरि दूरगतोऽपि परिभ्रमन् किमु नरैरमरैरिव नेक्ष्यते ।।
समो यतः स्यात्परिधेः शतांशः पृथ्वी च पृथ्वी नितरां तनीयान् ।
नरस्य तत्पृष्ठगतस्य कृत्स्ना समेव तस्य प्रतिभात्यतः सा ॥

अर्थ – पृथ्वी जर आरशासारखी सपाट असती तर सूर्य दूर गेला तरी मनुष्यांना सतत दिसला असता. परंतु तसे घडून येत नाही. यावरून पृथ्वी सपाट नाही, तर गोलाकार आहे, अशी निश्चिती होते. मनुष्याला तिचा गोल आकार दिसून न येण्याचे कारण इतकेच की मनुष्य फार लहान असल्यामुळे त्याच्या दृष्टीला पृथ्वीचा फार थोडा भाग पडतो व वर्तुळ परिघाचा शंभरावा भागसुद्धा सपाट असतो. त्यामुळे पृथ्वीचा अगदी थोडा दृष्टीस पडणारा भाग सपाट आहे, असा भास होतो.

पृथ्वीच्या वातावरणाविषयी भास्कराचार्यांचे म्हणणे असे –

भूमेर्बहिर्द्वादश योजनानि भूवायुरत्राम्बुदविद्युदाद्यम् ॥

अर्थ – पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १२ योजने (म्हणजे ९६ मैल) पर्यंत भूवायू (वातावरण) आहे. त्या वातावरणात मेघ, विजा, इ. चमत्कार घडून येतात.

हर्षल, नॉर्मन, लाकियम, लार्डनर, इ. अर्वाचीन युरोपीय ज्योतिषी वातावरणाची उंची पृथ्वीच्या व्यासाच्या शंभराव्या भागाइतकी म्हणजे निदान ८० मैल आहे, असे मानतात. यावरून भास्कराचार्यांचे वातावरणाच्या उंचीविषयीचे मत अर्वाचीन काळी मोठमोठ्या व सूक्ष्म ज्ञान करून देणाऱ्या यंत्रांच्या सहाय्याने मिळालेल्या ज्ञानाशी पुष्कळ अंशी जमते ही गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे.

कोपर्निकस, टायकोब्राही, न्यूटन या आधुनिक शास्त्रज्ञांचे महत्त्वाचे सिद्धान्त भास्कराचार्यांनी पूर्वीच मांडले आहेत. सूर्यचंद्रांना राहुकेतू हे दैत्य ग्रासतात, ही ग्रहणाबद्दलची कल्पना त्यांना मान्य नव्हती. लोकांच्या श्रद्धेला गोंजारून घेऊन ग्रहणाचे शास्त्रीय ज्ञान सांगताना त्यांनी म्हटले आहे. 'लोकहो, राहू नावाचा राक्षस नाही. चंद्रबिंब ग्रहणात पृथ्वीच्या छायेत जाते. पण तुम्हाला राहू हवाच असेल, तर असे म्हणा, की राहूने पृथ्वीच्या छायेत शिरून चंद्राचा ग्रास केला.' चंद्र स्वयंप्रकाशित नाही हेही भास्कराचार्यांना माहीत होते.

भास्कराचार्यांनंतर ज्योतिषाचा अभ्यास पुष्कळच वाढला. मात्र भास्कराचार्यांच्या योग्यतेचा ज्योतिर्विद महाराष्ट्रात दुसरा झाला नाही. भास्कराचार्यांच्या ग्रंथांवर जितक्या टीका आहेत, तितक्या दुसऱ्या कोणत्याही ग्रंथावर नाहीत.

भास्कराचार्यांची विवेचनपद्धती तार्किक असूनही सोपी आहे; पण त्यातही प्राचीन पद्धतीप्रमाणे त्यांचे लेखन छंदोबद्ध आहे; पण त्यातही कवीची कल्पकता दृष्टीस पडते. काटकोन-त्रिकोण, गोलांचे क्षेत्रफळ, विमूलाचा सिद्धान्त व विमूलाची उदाहरणे सोडविण्याची पद्धती त्यांनी जगास दिली. त्याचप्रमाणे बीजगणितामध्ये कुट्टक, वर्गकुट्टक व मिश्रकुट्टके सोडविण्याच्या पद्धती त्यांनी ब

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वल्या. पाश्चात्यांनी त्याच पद्धती पुनः सतराव्या शतकात जगापुढे मांडल्या. $ax^2 + 1 = y^2$ याला जे 'प्रेलचे समीकरण' म्हणतात, त्याऐवजी भास्कराचार्यांचे समीकरण म्हणायला हवे, असे प्राध्यापक श्री. एल. व्ही. गुर्जर यांचे म्हणणे आहे.

भास्कराचार्यांनी जी सिद्धान्तसूत्रे मांडली आहेत, त्यांच्यात व आजच्या ज्योतिषशास्त्राच्या मांडणीत खूपच साम्य आढळते. [मु. पू. म.; म. ज्ञा. को.; भा. ज्यो. शा.; भास्कराचार्य व तत्कृत ज्योतिष – श्री. ज. वा. मोडक]

(२) (इ. स. १८०० चा सुमार) एक वैदिक कोशकार. वेदवाङ्मयात येणाऱ्या शब्दांचा कोश त्याने तयार केला असून, त्याचे सात प्रमुख भाग आहेत, ते असे–(१) नानापदात्मककांड, (२) एकपदिक, (३) भूम्यादिवर्ग, (४) कर्मादिवर्ग, (५) भवादिवर्ग, (६) जाहादिवर्ग आणि (७) आशुशुक्षण्यादिवर्ग.

हा वैदिक वाङ्मयाचा व धर्मशास्त्राचा गाढा पंडित होता. सांगली जिल्ह्यातील बीड गावचा तो रहिवासी होता. तो काही काळ पुण्यात राहिला आणि नंतर काशीला राहायला गेला. कोशाव्यतिरिक्त त्याने वरिवस्यारहस्य, कौलोपनिषद्व्याख्या, ललितासहस्रनामभाष्य, इ. पंधरा टीकाग्रंथ लिहिले आहेत. [डॉ. म. मं. पाटकर]

(३) एक तेलुगू कवी. कन्यकापरमेश्वरी ही आंध्रातील वैश्यांची आराध्य देवता आहे. तिचे पुराण प्रस्तुत लेखकाने लिहिले आहे. हा ग्रंथ वाङ्मयदृष्टचा लोकप्रिय नाही; पण त्यात वश्य जातीविषयी बरीच माहिती असल्यामुळे वैश्यांना तो आदरणीय वाटतो. [ते. सा. इ.]

भिंजिया ओडिसा प्रदेशातील एक मागसलेली जमात. ओडिसातील निरनिराळ्या टेकडयांतून या लोकांची वस्ती विखुरलेली आहे. असुर आणि अगारिया यांच्याशी या जमातीचा निकटचा संबंध आहे. शेती हा यांचा मुख्य व्यवसाय होय हे लोक सर्व सणवार पाळतात आणि ब्राह्मणांकरवी सगळे संस्कार करतात. हे विंध्यवासिनी, जगन्नाथ, चाद्री देवी, वगैरे देवतांना भजतात. पहाडातले लोक सूर्य व चंद्र यांची पूजा करतात. हे मृतांना जाळतात किंवा पुरतात. [से. इं. १९५१]

भिकारीदास (इ. स. चे १८ वे शतक) हिंदी साहित्यातील एक श्रेष्ठ दर्जाचा आचार्य, ग्रंथकार आणि कवी. प्रतापगढजवळ टोंग्या (टेंडगा) नावाच्या एका खेडयात याचा जन्म झाला. याच्या वडिलांचे नाव कृपालदास असे असून, हा कायस्थ होता. प्रतापगढचा राजा पृथ्वीपतीसिंह याचा धाकटा भाऊ हिंदुपतिसिंह याचा हा आश्रित होता. याचे प्रमुख काव्यग्रंथ असे – रससारांश, नामप्रकाश, छंदोर्णवपिंगल, काव्यनिर्णय, शृंगारनिर्णय, विष्णुपुराण, शतरंजशतिका, बागबहार, रागनिर्णय, इत्यादी. रससारांश आणि शृंगारनिर्णय या दोन ग्रंथांत नायक-नायिकाभेदांचे विस्तृत वर्णन आहे. नायिकाभेदानंतर सखी व दूती यांचेही त्यांत वर्णन आहे. काव्यनिर्णय या ग्रंथात २५ उल्लास व १२१० पद्ये आहेत. त्यात काव्याचे स्वरूप व शब्दसामर्थ्य यांचे वर्णन आहे. अलंकारनिरूपण या प्रकरणात त्याने अप्पय्य दीक्षित यांचा आधार घेतला आहे. हा काव्याचे प्रयोजन पुढीप्रमाणे सांगतो–

एक लहैं तप पुञ्जन्ह के फल ज्यों तुलसी अरु सूर गोसाईं।
एक लहैं बहु सम्पति केशव भूषन ज्यों बरवीर बडाई।
एकन्ह को जसही सों प्रयोजन है रसखानि रहीम की नाँई।
दास कवित्तन्ह की चरचा बुधिवन्तन को सुखदै सब ठाँई।।

भावार्थ – काव्यनिर्मितीचे प्रयोजन वेगवेगळे असते. काही कवी सूर आणि तुलसीदास यांच्याप्रमाणे तपश्चर्येचे फळ म्हणून काव्यनिर्मिती करतात, तर काही कवी केशवाप्रमाणे आपल्या शब्दसंपत्तीला भूषण मानून त्याचेच मोठेपण दाखवतात. काहींना रसखान व रहीम यांच्याप्रमाणे केवळ यशाचाच आनंद असतो. कविवरांसंबंधी केलेली ही चर्चा बुद्धिवंतांना सुखदायी होवो.

याच्या काव्यग्रंथात बुद्धिकौशल्य व प्रतिभाविलास या दोहोंचाही आढळ होतो. [हिं. सा. इ.; भा. का. शा. प.]

भित्तिचित्रे भिंतीवर चित्रे रंगविण्याची कला भारतात प्राचीन काळापासून विकास पावली आहे.

जगन्नाथपुरी येथील भित्तिचित्र

सिंघणपूर, होशंगाबाद, जोगीमार, बिल्लासुरगम, वायनाड,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घाटशिल्प, भलदरिया, इ. ठिकाणी प्राचीन गुहांमध्ये जी भित्तिचित्रे आढळतात, ती दोन हजार वर्षांपूर्वी काढलेली आहेत. अशा भित्तिचित्रांतूनच भारतीय चित्रकलेचा उगम झाला असावा. अजंटा येथील लेण्यांतील भित्तिचित्रे इ. स. च्या १ ते ८ या शतकांत निर्माण झालेली आहेत. अशा प्रकारची सुंदर भित्तिचित्रे मध्य प्रदेशातील बाघ आणि दक्षिणेतील बादामी व सित्तन्नवासल येथील गुहांमध्येही पाहायला मिळतात (चित्रकला पाहा).

त्यावरून समजते, की भित्तिचित्र काढण्यासाठी प्रथम भुसपिंड भिंतीवर थापून त्यावर मळलेल्या मातीचा लेप देत. मग त्यावर डिंकाचा पातळ थर लावीत आणि त्या पृष्ठभागावर पांढऱ्या रंगाचा एक हात देत. त्यानंतर पुन्हा भुसायुक्त गिलावा, नंतर मोहरीचे तेल व मेण यांचा पातळ थर आणि त्यावर खडूचा तांबडा रंग लावीत. प्रत्येक वेळी पृष्ठभाग हाताच्या तळव्याने घासून समतल करावा, असे बुद्धाने सांगितले आहे.



अजंटा येथील भित्तिचित्र

प्राचीन बौद्ध साहित्यात भित्तिचित्रांचे पुष्कळ उल्लेख आहेत. आम्रपालीच्या प्रासादात निरनिराळे राजे, व्यापारी व श्रेष्ठी यांची चित्रे काढलेली होती, असे विनयपिटकात म्हटले आहे. अशा चित्रांसाठी भिंतीचा पृष्ठभाग कसा तयार करावा, याविषयी बुद्ध व त्याचे शिष्य यांचा संवादही या ग्रंथात दिला आहे.

विष्णुधर्मोत्तर पुराण, समरांगणसूत्रधार, अपराजितपृच्छा, मानसोल्लास, अभिलषितार्थचिंतामणी, शिल्परत्न, इ. अनेक संस्कृत ग्रंथांत चित्रांसाठी गिलावा कसा करावा, ते वर्णिले आहे. विटांची भुकटी, माती, तेल, डिंक, मेण, काकवी, मुगाचे पीठ, हिरड्याची पूड, बेलाचा अर्क व थोडी वाळू हे पदार्थ पाण्यात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कालवून एक महिनाभर ठेवावे आणि ते मिश्रण सुकल्यानंतर भिंतीवर त्याचा लेप लावावा, असे विष्णुधर्मोत्तर पुराणात सांगितले आहे (३.४०.१–१०). समरांगणसूत्रधार या ग्रंथात वापी, कूप, तडाग, नदी यांच्या परिसरातली किंवा वृक्षाच्या बुंध्याजवळची मऊ माती घेऊन, तीत बारीक वाळू, तूस, नारळाची शेंडी आणि शाल्मली, कुकुभ, मधूक वगैरे वृक्षांचा रस मिसळून त्यांचा कल्क लिंपावा, असे म्हटले आहे.

सोमेश्वराच्या अभिलषितार्थचिंतामणी (३.१.१४१–१४९) मध्ये या लेपाविषयी माहिती दिली आहे, ती अशी –

ज्या भिंतीवर चित्रे काढायची असतील, तिला प्रथम सुधालेप (सुधा = चुना) लावावा. शंख जाळून तीत काकवी, शिजलेली मुगाची डाळ, बारीक वाळू, कच्ची केळी, इ. पदार्थ मिसळून ते मिश्रण दोन महिने ठेवावे. तो लगदा रोज ढवळावा. दोन महिन्यांनंतर तो पाट्यावर वाटून मऊ करावा. याला सुधालेप असे म्हणतात. मग त्यावर वज्रलेप लावावा. रेडा, बैल, शेळी किंवा बकरे यांचे कातडे पाण्यात उकळून त्याचा वज्रलेप करावा. त्यात पांढरी माती कालवून सुधालेपावर त्याचा एक थर लावावा. नंतर वज्रलेपात शंखचूर्ण मिसळून दुसरा हात द्यावा. मग कांडसाखर मिसळून त्याचा एक हात द्यावा आणि शेवटी श्वेत जस्तभस्म मिसळून एक हात द्यावा. अशा प्रकारे वज्रलेपाचे पातळ थर एकावर एक लावल्याने आरशासारखी चित्रभूमी तयार होते.

सुधालेपानंतर भिंतीला शुभ्र रंगाचा लेप देत, त्याला शिल्परत्नात वर्णलेपन असे म्हटले आहे. शंखचूर्ण व निंबाचा डिंक पाण्यात मिसळून हा रंग तयार करता येतो. या रंगाचे हात अत्यंत कौशल्याने द्यावे लागतात. कारण त्याच्या पातळ थरावर चित्रे काढायची असतात.

अभिलषितार्थचिंतामणीमध्ये भित्तिचित्रकलेच्या तंत्राचेही वर्णन केले आहे. तो ग्रंथ ज्या काळात रचला गेला, त्या काळातील अनेक भित्तिचित्रे द. भारतातील निरनिराळ्या मंदिरांत व प्रासादांत पाहायला मिळतात.

चुन्याचा गिलावा ओलसर असतानाच त्यांवर जलरंगाने जी चित्रे रंगवतात, त्याला फ्रेस्को चित्रे म्हणतात. गिलावा वाळेपर्यंत त्यात चित्राचा रंग भिनल्यामुळे, ते चित्र अधिक पक्के होते. त्यासाठी चुन्याचा लेप विशेष काळजीपूर्वक तयार करावा लागतो व त्याचे अनेक पातळ थर भिंतीवर चढवावे लागतात. अजंटा व बाघ येथील भित्तिचित्रे अशा प्रकारची आहेत की नाहीत, याविषयी मात्र तज्ञांमध्ये मतभेद आहेत.

इ. स. च्या ११–१२ शतकांत तंजाऊर येथील बृहदीश्वराच्या देवालयात असली भित्तिचित्रे रंगवलेली आढळतात. मोगल काळातील फ्रेस्को चित्रे जयपूरच्या आसपास व फत्तेपूर शिक्री येथे आहेत. मदुरेच्या मीनाक्षीमंदिरातही तसली चित्रे आढळतात.

प्राचीन काळी जी भित्तिचित्रे निरनिराळ्या ठिकाणी निर्माण झाली, त्यांतली पुष्कळ चित्रे अजून चांगल्या स्थितीत टिकून राहिली असून, त्यांचे रंगरूपही मोहक वाटते. त्यावरून ती चित्रे रंगवण्यासाठी वापरलेली सामग्री किती उत्कृष्ट होती, ते कळून येते. [वा. शा. २–हिं. कॅ. इ. पें.; कलासाधना.]

भिनकराम (इ. स. चे १८ वे शतक) एक हिंदी संतकवी. याचा जन्म विहार प्रदेशाच्या चंपारण्य जिल्ह्यातील सहोरवा गोनरवा या गावी झाला. याच गावी याची समाधी आहे. हा जातीने ततवा होता. कबीराच्या ४८४ शिष्यांच्या परंपरेत याला स्थान आहे, असे सांगतात. हा एक मोठा सिद्ध होता, अशी समजूत आहे. यासंबंधीच्या याच्या अनेक चमत्कारकथा सांगितल्या जातात.

भिनकराम सरभंग संप्रदायाचा अनुयायी होता. त्याने या संप्रदायातच आपल्या व्यक्तिमत्त्वाने एक उपसंप्रदाय निर्माण केला. 'भिनकपंथ' या नावाने तो प्रसिद्ध आहे. याची भोजपुरी भाषेतील थोडीफार कविता उपलब्ध आहे. त्याची गुरुभेटीविषयीची आर्तता व्यक्त करणारे एक पद पुढे दिले आहे –

आगि लागे बनवा जरे परबतवा,
मोरे लेखे हो साजन जरे नइहरवा।
आव ऽ आव ऽ बभना बइठु मोर अँगना,
सोचि देहु ना मोरा गुरू के अवनवा।
जिन्हि सोचिहें मोरा गुरु के अवनवा,
तिन्हे देबों ना साजन ग्यान के रतनवा।।
नैना भरि कजरा लिलार भरि सेनुरा,
मोरा लेखे सतगुरू भईले निरमोहिया।।
सिरि भिनकराम स्वामी गावले निरगुनवा,
धाई धरबों हो साधु लोग के सरनवा।।

अर्थ – वनात आग लागली आहे आणि पर्वत जळत आहेत. (संसाररूपी वनात वासनांचा आगडोंब उसळला आहे आणि त्यात मोठमोठ्या धैर्यशाली पुरुषांच्या आहुती पडत आहेत.) परंतु हे प्रियकरा, माझे माहेर जे ज्ञान-धाम ते जळत आहे. हे ब्राह्मणदेवा, इकडे ये आणि माझ्या अंगणात बस. नंतर माझे गुरू केव्हा येणार ते विचार करून सांग. अरे, जो मला माझ्या सद्गुरूच्या आगमनाची तिथी सांगेल, त्याला मी ज्ञानरत्न देईन. मी डोळे भरून काजळ घातले आहे आणि भांग भरला आहे. तरीही माझा सद्गुरु कठोरहृदयी दिसतो. तो माझी दखलही घेत नाही. स्वामी भिनकराम म्हणतो, की मी निर्गुणाचे गुणगान करीत असतानाच साधूंना शरण जातो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भिनकपंथाचे मठ चंपारण्य, पाटणा, शाहाबाद, बलिया, इ. जिल्ह्यांत आढळतात. [हिं. सा. वि.; भो. क. का.; सं. स. सं.]

भिमुलपिन्नू गोंड, बैगा, इ. आदिवासींचा एक देव. पाच पांडवांपैकी भीम तो हाच, अशी यांची समजूत आहे. सवर लोक याला आकाशाचा देव मानतात, मुडिया आपल्या लिंगो देवाच्या बरोबरीचा समजतात, तर कोंड पावसाचा देव मानतात.

कोंड लोक या देवासंबंधी एक कथा सांगतात, ती अशी– भिमेंजा (भिमुलपिन्नू) आणि लोहरेंजा हे दोघेजण एकाच वेळी सफगन्ना इथे जन्मले. भिमेंजाच्या असे ध्यानात आले, की पृथ्वीवरची माणसे गरीब आहेत. त्यांच्या जवळ भांडीकुंडी नाहीत व शेतीची अवजारेही नाहीत. मग भिमेंजाने लोहरेंजाला सांगितले, की 'तू इथे राहून नांगर, कोयते वगैरे अवजारे बनव. मी आकाशात जाऊन पाऊस पाडतो आणि बी-बियाणे टाकतो.' नंतर त्याने तसे केले. मग धरतीमातेने ते पीक मानव जातीला वाटून टाकले.

'आदिवासी लोक या देवाची चित्रे भिंतीवर आणि धान्यांच्या कणग्यांवर काढतात. प्रथम हा देव या लोकांच्या स्वप्नात येतो व नंतर स्वप्नात ज्याप्रमाणे तो दिसला असेल, त्याप्रमाणे त्याचे चित्र काढले जाते. दर तीन वर्षांनी याचा उत्सव होतो. उत्सवात बलिदानाचा कार्यक्रम असतो. [ट्रा. आ. मि. इं.]

भिलात मध्य प्रदेशातील एक ग्रामदेव. होशंगाबाद जिल्ह्यात हा देव प्रसिद्ध आहे. या देवाच्या निर्मितीची कथा सांगतात, ती अशी–

मैंदा नावाची एक गौळण होती. तिला मूल होत नव्हते. म्हणून तिने महादेवाच्या डोंगरावर असलेल्या पार्वतीची आराधना केली. पार्वतीने प्रसन्न होऊन तिला पुत्र होण्याचा वर दिला. मात्र त्या मुलाचे नाव भिलात असे ठेवायला सांगितले. तिने तसे केले. तिचा मुलगा घरात खेळू वाढू लागला. काही दिवसांनी शिवाने मैंदाची परीक्षा घेण्याचे ठरविले. शिव तिच्याकडे भिक्षाटनवेषात भिक्षा मागायला आला. 'आज अष्टमी आहे, म्हणून मी भिक्षा घालणार नाही,' असे तिने त्याला सांगितले. त्यामुळे शिव कोपला. त्याने भिलातला उचलून नेले. मैंदाने पुन्हा पार्वतीची करुणा भाकली. पार्वतीने तिला दुसरा मुलगा दिला. मैंदाने त्याचे नाव सिलात असे ठेवले. इकडे शिवाने भिलातचे पालन पोषण करून त्याला जादुविद्येत प्रवीण केले. भिलातने या विद्येत खूप नाव कमावले. त्याच्या या लौकिकामुळे त्याला पुढे देवपद प्राप्त झाले. [दे. को. ३]

भिलाल एक आदिवासी जमात. या लोकांची वस्ती प्राधान्याने सातपुडा व विंध्य या पर्वतांच्या परिसरात आढळते. हे लोक स्वतःला राजपूत मानतात. यांच्यासंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

पृथ्वीराज चौहानचा पाडाव झाल्यावर अनेक राजपूत चितोड व उदयपूरयेथे स्थायिक झाले. पण तिथेही अलाउद्दिनाचे आक्रमण झाल्यामुळे त्यांनी पुढे विंध्याचा आश्रय घेतला. तिथे त्यांनी भिल्ल स्त्रियांशी विवाह केले. त्यामुळे ते आपल्या मूळ जातीला मुकले.

यांचा सामाजिक दर्जा भिल्लांपेक्षा वरचा समजला जातो. मांधाता येथील राजा हा भिलालांचा प्रमुख पुरुष मानला जातो. शेती हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. काही लोक शेतमजुरीही करतात.

धोतर, कुडते व लाल पगडी हा यांच्यांतल्या पुरुषांचा पोषाख असतो. स्त्रियांचा पोषाख राजपूत स्त्रियांप्रमाणे असतो.

भिलालांचे वडी व छोटी असे दोन पोटभेद आहेत. याशिवाय भामगड, सेलानी व मांधाता अशा यांच्या तीन शाखा असून, बेचाळीस गोत्रे आहेत. पहिल्या दोन पोटभेदांत रेटी-बेटीव्यवहार होतात.

विवाहप्रथा – हे लोक सगोत्र विवाह करीत नाहीत. लग्नप्रसंगी हे एका बैलगाडीत दोन भांड्यांत पाणी ठेवतात, त्या भांड्यांना गंगा-यमुना समजतात व त्यांची पूजा करतात. लग्ने गोरज मुहूर्तावर होतात. याशिवाय प्रेमविवाह, राक्षसविवाह, घरजावई इ. विवाहांचे प्रकार रूढ आहेत.

प्रसूतिप्रथा – बाळंतिणीला बाराव्या दिवशी विहिरीवर नेतात आणि तिला जलपूजा करायला लावतात. या कृत्याला जलवाय असे नाव आहे. हा विधी एखाद्या समारंभासारखाच करतात.

देवधर्म – भिलाल लोक शिवोपासक आहेत. ओंकार मांधाता हा त्यांचा कुलदेव आहे. ते अन्य ग्रामदेवतांनाही भजतात. बाबा देव हा त्यांचा प्रमुख ग्रामदेव आहे. भूत-पिशाचांवर यांची श्रद्धा असते. कोणी आजारी पडले, की ते त्याला गंडेदोरे करतात. आपल्या पहाडातल्या इष्ट देवतेपुढे जाऊन ते लहान मुलांचे जावळ करतात. दसरा व होळी हे यांचे मुख्य सण होत. दसऱ्याच्या दिवशी यांच्या शक्ति-युक्तीच्या स्पर्धा होतात. होळीच्या वेळी तरुण-तरुणी एकत्र जमून क्रीडेसाठी जंगलात जातात. तिथे ते आपल्या इच्छेप्रमाणे आपला जोडीदार निवडतात. पुढे त्यांचे विवाह होतात. श्रावणाच्या प्रारंभी हे दिवासा नावाचा एक सण पाळतात. हा सण प्रामुख्याने मुलींचा आहे. या दिवशी मुली बाबा देवाची पूजा करतात. तो पावसाचा देव आहे, अशी त्यांची समजूत आहे. उत्सवाच्या दिवशी बाबा देवाला कोंबडा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इयाचा बळी देतात. या दिवशी कुमारिका लाह्या व गूळ वाटतात आणि रात्रभर नाच करतात. बाबा देवाच्या पुजाऱ्याला बडवा म्हणतात. या पुजाऱ्याच्या अंगी बाबा देवाच्या पुष्कळ शक्ती असतात. अशी त्यांची समजूत आहे.

एखाद्या सणाच्या दिवशी एखाद्या भिलालाचे मूल वारल्यास त्या दिवशी संबंध गाव सण करीत नाही. जर गावचा प्रमुख वारला, तर पुढे त्या सणाला ती तिथी वर्ज्य मानतात. तो सण अन्य दिवशी करतात.

हे लोक पंचायतीमार्फत आपले तंटे मिटवतात. पंचायतीच्या मुख्याला बार्करी असे म्हणतात.

मृतकप्रथा – भिलाल लोक मृताला पुरतात, त्यावर थडगे बांधतात आणि चैत्र महिन्यात थडग्याची पूजा करतात. सात दिवसानंतर जातिभोजन घालतात. [लोककला त्रै. श्री.– रमेशचंद्र गंगराडे; से. इं. १९३१; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

भिल्ल एक जात. या लोकांची वस्ती मुख्यत्वे गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि राजस्थान या भागांत आहे. हे लोक निरनिराळ्या राज्यांत राहत असले, तरी त्यांचे आचार-विचार व धर्म यांत फारसा फरक नाही.

भिल्लांच्या प्राचीन इतिहासाबद्दल काही माहिती मिळत नाही. प्राचीन काळी मध्यपूर्वेतून आलेल्या प्रोटो ऑस्ट्रलॉइड लोकांचे भिल्ल, कोळी व शबर हे वंशज होत, असे मानववंशशास्त्रज्ञांचे मत आहे. प्राचीन संस्कृत आणि नंतरच्या अपभ्रंश वाङ्मयात भिल्ल लोकांचे उल्लेख आलेले आहेत. पण तिथे भिल्ल शब्दाचा अर्थ कोणतीही रानटी जमात असा होतो.

काही तमिळ कवींनी उत्तर भारतातील काही रानटी आदिवासींना उद्देशून विल्लुवर (धनुर्धर) असा शब्द योजला आहे. सांप्रतच्या भिल्लांच्या पूर्वजांना उद्देशून त्यांनी हा शब्द वापरला असावा, असे केंब्रिज इतिहासकारांचे मत आहे. विल्लू किंवा बिल्लू या शब्दाचा, पुष्कळ द्रविडी भाषांत, धनुष्य असा अर्थ होतो आणि धनुष्य हे अजूनही भिल्लांचे शस्त्र आहे. विल्लुवर या शब्दाचेच अपभ्रष्ट रूप भिल्ल होय, असे काही म्हणतात.

मध्य भारतातील रानटी लोकांचा वैदिक वाङ्मयात निषाद असा उल्लेख केलेला आहे. सांप्रतच्या भिल्लांच्या पूर्वजांचाच तो निर्देश असावा, असे वाटते. ब्राह्मण पुरुष व शूद्र स्त्री यांच्या संततीला मनूने निषाद असे नाव दिले आहे. पराशर संहितेत, ब्राह्मण स्त्री व तिवर पुरुष यांच्या संततीला भिल्ल असे म्हटले आहे. भिल्ल हा शब्द गुणाढ्याच्या कथासरित्सागरातही आढळतो. तिथे एक भिल्ल नायक माळव्यातून जाणाऱ्या दुसऱ्या एका राजाचा प्रतिकार करतो, असा निर्देश आहे.

भिल्लांच्या उत्पत्तीविषयी पुराणात एक कथा दिली आहे, ती अशी – स्वायंभुव मनूला अंग नावाचा पुत्र होता अंगाचा पुत्र वेन हा निपुत्रिक होता. एकदा त्याने आपली मांडी चोळली आणि तिच्यातून जळक्या लाकडासारखा काळा, रुंद चेहऱ्याचा व ठेंगणा असा एक पुरुष उत्पन्न केला. वेनाने त्याला 'निषद' खाली बैस, असे सांगितले आणि त्यावरून त्याला निषाद असे नाव मिळाले. विंध्य पर्वतात राहाणारे निषाद म्हणजे भिल्ल हे त्याचेच वंशज होत.

या कथेचा दुसरा एक पर्याय आहे, तो असा—

एकदा वेनाला काही कारणाने पाप लागले. त्यानंतर त्याच्याकडे अंगिरादी काही ऋषी गेले असता, वेनाने त्यांना हातानेच जाण्याविषयी खूण केली. त्यामुळे रागावून अंगिरा ऋषीने त्याला शाप दिला आणि त्याच्या हाताचे दही घुसळायच्या रवीत रूपांतर झाले. त्या रवीने ऋषी घुसळू लागले असता तिच्यातून मुशहंतर, कोल्ल आणि विल्ल असे तीन पुरुष उत्पन्न झाले. तेच अनुक्रमे मुशहर, कोल्ल आणि भिल्ल यांचे पूर्वज होत.

भिल्लांची उत्पत्ती महादेवापासून झाली, अशीही एक कथा आहे. महादेवाचे एकदा एका वन्य कन्येवर मन जडले. त्याच्यापासून तिला पुष्कळ संतती झाली. तिच्यापैकी एक मुलगा अगदी कुरूप व दुष्ट होता. त्याने एकदा महादेवाचा आवडता नंदी मारला, म्हणून महादेवाने त्याला हाकलून दिले. त्याच्यापासून पुढे भिल्लांची उत्पत्ती झाली.

रामायणात शबरी नामक भिल्ल स्त्रीची कथा आहे. महाभारतात किराताचा म्हणजे भिल्लाचा वेष धारण करून शंकराने अर्जुनाशी युद्ध केले, अशी कथा आहे. श्रीकृष्णाच्या पायाच्या अंगठ्याला एका भिल्लाचा बाण लागून तो निजधामाला गेला. त्यामुळे धनुष्य ओढण्याच्या कामी उजव्या हाताच्या तर्जनीचा उपयोग करता येणार नाही, असा भिल्लांना शाप मिळाला, अशीही कथा आहे.

तमिळ प्रदेशात प्राचीन काळी विल्लवर आणि मीनावर नामक दोन जमाती राहत होत्या. नंतर त्या सर्व भारतभर पसरल्या. राजस्थान व गुजरात या भागांत अजूनही हे लोक मोठ्या संख्येने आढळतात. तिथे त्यांना भिल्ल आणि मीन अशी नावे मिळाली आहेत.

भिल्ल लोक गुजरात व राजस्थान या भागांतील मूळ रहिवासी आणि तिथल्या जमिनीचे मालक होते, हे राजपूत मान्य करतात, असे दिसते. कारण त्यांच्यापैकी काही राजपूत राजे गादीवर बसण्याच्या वेळी भिल्ल नायकाकडून त्याच्या रक्ताचा टिळा आपल्या कपाळी लावून घेत असत.

सुरुवातीला राजपूत आणि भिल्ल यांचे संबंध सलोख्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होते. भिल्ल नायकांच्या मुलींशी राजपूत लोक लग्नेही करीत.

भिल्ल तरुण

पुढे त्यांच्या संततीला भिलाल हे नाव मिळाले आणि ती एक नवीच जात निर्माण झाली. (भिलाल पाहा)

इ. स. च्या १५ व्या शतकात गुजरातमधील रेवाकांठा हा भाग मुसलमानांच्या ताब्यात गेला आणि इ. स. च्या १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत त्या भागात मुसलमानांचा अंमल चालू राहिला. या काळात अनेक भिल्लांनी मुसलमानी धर्म स्वीकारला. या मुसलमान भिल्लांना खानदेशात तडवी भिल्ल असे नाव आहे.

त्याच काळात भिल्लांचा स्थानिक राज्यकर्त्यांकडून खूप छळ झाला. त्यामुळे ते बंड करून उठले आणि ठिकठिकाणी लुटालूट करू लागले. याबद्दल अनेक भिल्लांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. तेव्हा अनेक भिल्ल डोंगरदऱ्यांचा आश्रय घेऊन राहिले आणि संधी मिळेल तेव्हा सपाटीवरच्या प्रदेशात येऊन लुटालूट करणे, सक्तीने पैसे वसूल करणे, गुरे पळवून नेणे, प्रवाशांना लुबाडणे किंवा मारणे, अशी कृत्ये करू लागले. तसेच ठिकठिकाणी त्यांनी बंडेही उभारली आणि मध्य भारतात धुमाकूळ घातला. पुढे इंग्रजांनी त्यांच्याशी सलोख्याचे संबंध जोडले, शरण आलेल्या भिल्लांना माफी दिली, त्यांना कसण्यासाठी जमिनी आणि बी-बियाणे व बैल घेण्यासाठी आगाऊ पैसेही दिले. जेम्स औट्राम याने त्यांची सैन्यात भरती केली आणि त्यांची वेगळी पथके उभारली. त्यायोगे त्यांच्या शौर्याला वाव मिळाला. सांप्रत भिल्ल हे बहुश: स्थायिक होऊन शेती करीत आहेत. पण त्यांच्यापैकी काही थोडे अजूनही चोरीमारी करताना आढळतात.

निरनिराळ्या भागांतील भिल्ल दिसण्यात निरनिराळे आहेत. गुजराती भिल्ल ठेंगणे, रुबाबदार व चपळ असतात. खानदेशातील भिल्ल मध्यम उंचीचे, काळे, रुंद नाकाचे, गालांची हाडे वर आलेले, चपळ आणि काटक असतात. राजस्थानातील भिल्ल उजळ रंगाचे असतात. सर्वसाधारणपणे सर्व भिल्ल स्त्रिया उजळ रंगाच्या, ठेंगण्या व बांधेसूद असतात.

सर्वसामान्यपणे भिल्ल हे आळशी, दारूबाज, बेफिकीर, उघळे, सच्चे आणि आनंदी असतात. त्यांचा विश्वास संपादन केला असता ते विश्वासाने वागतात.

प्रदेशपरत्वे भिल्लांच्या वेषभूषेत फरक असतो. स्थूल मानाने भिल्लांचे पोटिआवाल आणि लंगोटिया असे दोन भेद आहेत. साबरकांठा, राजस्थान आणि उत्तर पंचमहाल या भागांतील भिल्ल पोटिआवाल म्हणजे धोतर नेसणारे आहेत. ते गुडघ्यापर्यंत धोतर नेसतात; वर अर्ध्या बाह्यांचा सदरा घालतात आणि डोक्याला फेटा बांधतात. त्यांच्या स्त्रिया घागरा व उघड्या पाठीची चोळी असा वेष करतात. घरात किंवा शेतात काम करताना त्या चोळीऐवजी एक ओढणी डोक्यावरून घेतात. तिची टोके गुडघ्याखाली आलेली असतात.

पूर्व पंचमहाल, मध्य प्रदेश आणि खानदेश यांतील डोंगराळ भागांत राहणारे भिल्ल लंगोटिया आहेत. ते लंगोटी नेसतात व

अलंकार घातलेली भिल्ल स्त्री

मागेपुढे तिचे पदर सोडतात. ते अंगावर एक उत्तरीय घेतात व डोक्याला फेटा बांधतात. त्यांच्या स्त्रिया घागरा नेसतात; पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचा काचा मारतात. त्यांची चोळी जाडयाभरडया निळया किंवा लाल कापडाची असते.

द. भारतातील व गुजरातेतील काही भिल्ल स्त्रिया लुगडे–चोळी नेसतात. त्या साडीचा पदर डोक्यावरून घेतात. त्यामुळे त्यांच्या पोटऱ्या उघडया राहतात.

भिल्ल स्त्री-पुरुषांना दागिन्यांची खूप आवड असते. पुरुष कानांत बाळया व हातांत चांदीची कडी घालतात. स्त्रिया कानांत चांदीच्या किंवा कथलाच्या बाळया व वेल, नाकात नथ, गळयात काचमण्यांच्या, खडयांच्या किंवा शिंपांच्या माळा आणि हासळी नामक चांदीचा किंवा कथलाचा हार घालतात. या माळांनी त्यांचा सर्व उरोभाग झाकून जातो. तसेच त्या हातभर गोठ आणि पायभर वाळे घालतात. स्त्रिया हातावर पुष्कळ व छातीवर आणि तोंडावर थोडेसे गोंदून घेतात.

उद्योगधंदे – बरेचसे भिल्ल शेती, शेतकाम, जागलकी, सुतारकी व लोहारकी करतात. गुजरातच्या पंचमहालमधील भिल्ल एके ठिकाणी राहून शेती करतात. महीकांठामध्ये ते शेती करतात. काही जागल्याचेही काम करतात. भडोच भागात ते बहुतेक सर्वत्र असून, दक्षिणेकडील जंगलप्रदेशात ते झाडांची तोड करून कोळसा पाडणे, कात तयार करणे, लाकडे तोडणे, मजुरी व शेती हे धंदे करतात. खानदेशात ते शेती व मजुरी करतात आणि गवत, लाकडे, डिंक व मध गोळा करून विकतात.

मध्य प्रदेशातील रतनमाळ येथील भिल्ल शेतीशिवाय आणखीही काही व्यवसाय करतात. तिथल्या डोंगराळ प्रदेशात मोहाची खूप झाडे आहेत. त्यांची फुले गोळा करून ती वाळवणे हा एप्रिलअखेर तिथल्या लोकांचा प्रमुख उद्योग असतो. काहीजण त्या वेळी पंधरा ते वीस मण फुले गोळा करतात. या फुलांचा खाण्यासाठी आणि दारू करण्यासाठी उपयोग होतो. मोहाची फळे गोळा करणे, विडयांसाठी तिमरूची पाने तोडणे, चारोळया, लाख, मेण, मध गोळा करणे, इ. कामेही ते करतात. याशिवाय, लाकडे तोडून कोळशाच्या भट्टया लावणे हा दिवाळीनंतर इथल्या भिल्लांचा प्रमुख उद्योग असतो. कोळसा तयार करणे हे फार कठीण, जिकिरीचे आणि त्याचबरोबर कौशल्याचे काम असते. काही भिल्ल हिंवाळयात गुजरातच्या खेडा जिल्ह्यात कापूस, भुईमूग व तंबाकू यांच्या शेतांत मजुरीसाठी जातात. हे काम सुमारे तीन महिने चालते. त्या वेळी त्यांना जेवणखाण व साधारणपणे रोज दोन रुपये मजुरी मिळते.

प्रत्येक भिल्ल कुटुंबाकडे गुरे, बकरी व कोंबडया असतात. शिकार करणे व शिकारीचा माग काढणे, यांत हे लोक फार प्रवीण आहेत.

भिल्ल हे प्रामुख्याने शेती करीत असल्याने ते शेतात पिकवलेली बंटी, कोदो, मोरा, नागली, ज्वारी, मका, उडीद, तूर, इ. धान्ये खातात. सणासुदीला ते कोंबडी, अंडी, मांस, मटण खातात. मोहाच्या दारूची त्यांना फार आवड असते.

निरनिराळया प्रदेशांतील भिल्ल अनेक प्रकारच्या बोली बोलतात. त्या सर्वांना भिल्ली भाषा या नावाने ओळखतात. या बोलींच्या मूळ स्वरूपावर सांप्रत गुजराती, राजस्थानी, निमाडी व मराठी या भाषांचा पुष्कळ प्रभाव पडलेला आहे. भिल्लांच्या प्रदेशातही वीस-पंचवीस मैलांनंतर भिल्ली भाषेचे स्वरूप बरेच बदललेले असते आणि त्या ठिकाणी गेलेल्या भिल्लालाही ती बोली परकी वाटते. मुळात भिल्ली भाषा मुंडा भाषेपासून निघाली असावी, असे ग्रिअर्सनचे मत आहे.

गुजरातमधील भिल्लांची वस्ती सातपुडयाच्या डोंगराळ प्रदेशात वसलेली आहे. दूरदूर अंतरावर विखुरलेले झोपडयांचे अनेक समूह, असे भिल्लांच्या गावाचे स्वरूप असते. शेजारी एखादी चेटकी असेल या भीतीने व आगीच्या भयाने भिल्ल लोक आपल्या झोपडया दूरदूर अंतरावर उभारतात. कालांतराने घरातील कर्त्या पुरुषाच्या मुलांची व मुलींची लग्ने झाली, की मूळ झोपडीच्या आसपास मुले, जावई आपापल्या झोपडया बांधतात व अशा रीतीने नातेवाईक भिल्लांच्या झोपडयांचा एक समूह तिथे तयार होतो. सर्वसाधारणपणे भिल्ल सांप्रत नवीन गावे वसवीत नाहीत. पण काही वेळा गुरेढोरे वारंवार आजारी पडू लागली, तर ते राहते गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी राहायला जायचे ठरवतात. त्यासाठी ते झऱ्याजवळची जागा निवडतात आणि तिथल्या ग्रामदेवतेचा आपल्या निवासासाठी कौल आहे का नाही तेही बघतात.

गुजरातमधील भिल्लांची घरे जमिनीपासून दोन-तीन फूट उंचावर बांधलेली असतात. ती २० ते २५ हात लांब व १५ ते २० हात रुंद असतात. ती बांबू, माती व शेण यांची असतात. घराला पुढच्या बाजूने व काही वेळा मागच्याही बाजूने लहान दारे असतात. घराला खिडक्या नसतात. घरात बहुधा तीन खोल्या व दोन चुली असतात. घरात शेतीची अवजारे आणि झांजा, बासरी, तूर, ढोल, इ. अनेक वाद्ये असतात. घराच्या मागच्या बाजूला एका बांबूच्या तिवईवर पिण्याचे पाणी भरून ठेवलेले असते. कोणालाही ते लाकडी डावाने काढून ओंजळीने पिता येते. घराच्या पुढच्या बाजूला गुरांसाठी एक मांडव घातलेला असतो. वाघाच्या भीतीनें व कोणी ती पळवून नेईल या भीतीने गुरे घराजवळच बांधतात. घराच्या मागे किंवा पुढे परसू असते, त्यात ते मिरच्या, वांगी, टोमॅटो, इ. भाज्या लावतात. त्यांची शेते घरापासून बहुधा दूर अंतरावर असतात.

काही वाईट घटनांमुळे भिल्ल जेव्हा आपले घर सोडतात,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेव्हा ते फक्त घरातील मौल्यवान वस्तूच बरोबर नेतात आणि बाकी सर्व वस्तू तशाच टाकून जातात. तसेच मृताबरोबर ते त्याचे कपडे, दागिने, चटया, इ. वस्तू जाळतात किंवा पुरतात.

धनुष्य आणि बाण हे भिल्लांचे मुख्य शस्त्र आहे. नेम धरण्यात ते निष्णात आहेत.

बांबूचा त्यांना फार उपयोग होतो. त्याच्यापासून ते चटया, टोपल्या, धान्याच्या कणग्या, वगैरे वस्तू विणतात.

गुजरात आणि पश्चिम खानदेश या प्रदेशांत भिल्लांची खेडी अनेक सामाजिक व धार्मिक कार्यांत एकोप्याने काम करतात. घरदुरुस्ती व पिके कापणे, या वेळी खेड्यातील सर्व लोक आळीपाळीने एकेका कुटुंबाला मदत करतात. मासे धरण्यासाठी किंवा सरकारी रस्त्यांच्या कामावर सर्व लोक एकदम जातात. एखाद्याच्या घरी जेव्हा धार्मिक कारणासाठी जेवणावळ होते, तेव्हा तो सर्व गावाला निमंत्रण देतो. गावातील कुरणावर सर्व गावाची सामायिक मालकी असते. सरकारी अधिकारी हे सर्व गावाचे पाहुणे समजण्यात येतात.

गावाच्या मुख्याला वसावो असे म्हणतात. त्याची जागा वंशपरंपरा असते. गावातल्या लोकांची भांडणे मिटविणे, पतिपत्नींचे भांडण सोडविणे, साथीच्या वेळी देवतांना संतुष्ट करणे, ही कामे त्याची असतात. त्याबद्दल सरकारकडून त्याला वार्षिक पंधरा किंवा अठरा रुपये किंवा काही जमीन मिळते. त्याच्या पत्नीलाही समाजात मान असतो. गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नात एक मद्याची बाटली व आठ आणे हा तिचा हक्क असतो. वधूला नवे कपडे नेसवणे व मंडपात नेणे, हा तिचाच अधिकार असतो. वसावोच्या हाताखाली परधान नामक एक सरकारी नोकर असतो. वसावोचे हुकूम अंमलात आणण्यासाठी कोतवाल नावाचा आणखी एक नोकर असतो.

ग्रामदेवतांची व इतर देवतांची पूजा करण्यासाठी गावात पुंजारी असतो. तोच गावचा मांत्रिक व वैद्यही असतो.

भिल्लांच्या प्रत्येक गावात एक किंवा अधिक 'गोरी' कुटुंबे असतात. गावातील गुरे चारण्यासाठी जवळच्या रानात नेणे, हे गोरीचे काम असते. त्याबद्दल त्याला दर गुराच्या मागे दररोज ठराविक धान्य मिळते. त्याचे घर गावाच्या एका टोकाला असते.

प्रत्येक गावाची पंचायत असते. याशिवाय भिल्लांचे राजेही असतात. सागबरा, काठी, गंगठा, इ. ठिकाणचे भिल्ल राजे सांप्रत प्रसिद्ध आहेत.

मध्य प्रदेशातील भिल्लांच्या घराला मेडी असे नाव आहे. लाकडाच्या सांगाड्यावर, शेणामातीने सारवलेल्या बांबूच्या भिंती असे त्याचे स्वरूप असते. ते लाकडी चौथऱ्यावर बांधलेले असून दुमजली असते. वरच्या मजल्यावर लोक राहतात आणि खालच्या भागात रात्रीच्या वेळी गुरे बांधतात. या भागात गुरे वारंवार पळविली जातात, म्हणून ही खबरदारी घेतात. वरच्या मजल्यावर एकच खोली असते आणि तिच्यापुढे थोडा मोकळा भाग असतो. या भागाला शिडी लावलेली असते. घरातील स्त्रीच्या परवानगीशिवाय परक्याला या राहण्याच्या जागी जाता येत नाही.

गुजरातेतील भिल्लांचे अनेक पोटभेद आहेत. ते सत्तावीस असल्याचे श्री. प्रिस्कॉट सांगतो, तर श्री. वणीकर ते एकवेबासष्ट आहेत, असे म्हणतात. पंचमहाल आणि पश्चिम खानदेश या भागांत अंबुद, आर्थी, चोपडसा, देद्रिया, दैंडिया, डोगरिया, गोडसा, इ. छत्तीस पोटभेद आहेत, असे तिथले लोक मानतात.

भिल्ल कुटुंबात पिता प्रमुख असतो. वारसा मुलांकडे जातो. मोठ्या मुलाला सर्वांत जास्त वाटा व धाकट्याला सर्वांत कमी वाटा मिळतो. पित्याला कर्ज असल्यास, त्यातला अधिक भाग मोठा मुलगा फेडतो.

नवऱ्याला आपल्या पत्नीचे नाव उच्चारायला बंदी असते. स्त्री नवऱ्याचे, मोठ्या दिराचे व सासऱ्याचे नाव घेऊन हाक मारीत नाही.

विवाहप्रथा – मध्य प्रदेशातील रतनमाळ भागात समान टोळीत व समान गोत्रात विवाह होत नाही. मध्यस्थामार्फत विवाह ठरवतात. मुलगी लहान असेल, तर ती वयात आल्यावर लग्न होते. विवाह ठरल्यावर साखरपुडा होतो, त्या वेळी भावी सासरा वधूला कपडे वगैरे भेट देतो. मग मुलाकडील लोकांनी आणलेले खाद्यपदार्थ आणि दारू मुलीकडच्या लोकांना देतात. यानंतर काही दिवसांनी मुलगा वधूगृही जातो व मुलीच्या आईला काही पैसे भेट देतो. हे पैसे तिने स्वीकारले, की साखरपुड्याचा विधी पूर्ण झाला, असे समजतात.

लग्ने साधारणपणे उन्हाळी पिके हाती आल्यावर होतात. तोपर्यंत मुलाचे आईबाप देजाची रक्कम जमवीत असतात. तरी त्यांचे नातेवाईक लोकही त्यांना थोडीफार रक्कम देतात. तरीसुद्धा ही रक्कम फार मोठी असेल, तर ती जमत नाही आणि लग्नाच्या वेळी जमली तेवढी रक्कम देऊन बाकीची हप्त्यांनी काही वर्षे देत राहतात. देजाचा काही भाग गायीबैलांच्या स्वरूपातही देतात.

वरपक्षाकडील मंडळी सूर्यास्तापूर्वी एक-दोन तास वधूच्या गावी पोचतात. गावाच्या सीमेवर मुलीकडील मध्यस्थ त्यांचे स्वागत करतो आणि त्यांना त्यांच्यासाठी ठरविलेल्या ठिकाणी घेऊन जातो. तिथे मुलेमुली नृत्यगायनात दंग होतात आणि देज पुरुष देजाची रक्कम देण्यासाठी वधूच्या घरी जातात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिल्यावर सर्व वऱ्हाडाला लग्नमंडपात नेतात. वरपक्षाने देजाची संपूर्ण रक्कम नेलेली नसेल, तर वधूपक्षाकडून त्याला खूप अपमान सहन करावा लागतो. त्यांचा विवाहविधी अगदी साधा असतो व तो तासाभरात संपतो. वरपक्षाकडील मंडळीला वधूपक्षाने भोजन दिल्यावर वरपक्ष आपल्या गावी जायला निघतो. वधूपक्षाकडील मंडळी त्याला गावाच्या सीमेपर्यंत पोचवतात. तिथे दोन्ही पक्षातील लोक थोडा वेळ नृत्य करतात. दुसऱ्या दिवशी वधूपक्षाकडील काही लोक वधूला घेऊन वरगृही जातात.

संततीच्या किंवा अधिक संततीच्या इच्छेने किंवा कामासाठी हक्काचे माणूस मिळावे, म्हणून पुरुष काही वेळा एकापेक्षा अधिक बायका करतात. सर्वसाधारणपणे पहिल्या बायकोच्या बहिणीशी किंवा नात्यातील स्त्रीशी पुरुष विवाह करतो. त्यामुळे दोन बायकांचे फारसे भांडण होणार नाही, अशी अपेक्षा असते. दोन बायकांना स्वतंत्र घर मिळते; तरी ते एकच घर मानले जाते. मोठ्या पत्नीच्या आज्ञेत इतर स्त्रिया वागतात.

मध्य प्रदेशातील भिल्ल लोकांत बयव किंवा शादी, नत्र, उदल किंवा आइवरई, घरजमाई, भगोरिया, घिज्जिलय व झगडा असे विवाहाचे सहा प्रकार प्रचलित आहेत. त्यांची माहिती अशी—

बयव — मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यात हा प्रकार प्रचलित आहे. मुलगा लग्नाचा झाला, की त्याचा काका किंवा कोणी वडीलधारे माणूस मुलगी शोधायला निघतो. योग्य मुलगी आढळली की मुलाचा बाप एका मध्यस्थाला मुलीचे आईवडिलांकडे पाठवतो. त्यांनी मान्यता दिल्यास मुलाकडील लोक मुलीच्या घरी जातात व लग्न करायचे ठरल्यास तिच्या बापाला नारळ व पाच रुपये देतात. वधूमूल्य हजार ते पंचराशे रुपये द्यावे लागते. त्यानंतर साखरपुडा होतो व मूलगी लहान असल्यास किंवा वरपित्याला देज लगेच देणे शक्य नसल्यास पुढे दोन-चार वर्षांनी लग्न होते. लग्नाचा मुहूर्त ठरल्यावर वराकडील लोक एका फडक्यात हळकुंड बांधतात व लग्नाला जितके दिवस असतील, तितक्या गाठी त्या फडक्याला मारून ते वधूगृही पाठवतात. वधू रोज त्यांपैकी एक गाठ सोडते. लग्न वधूच्या घरी होते. वराकडील मंडळी गावातील एखाद्या झोपडीत किंवा मोकळ्या शेतात उतरतात. मुहूर्ताच्या वेळी नवरामुलगा जमिनीत एक काठी रोवतो, मग कोतवाल वधूवरांच्या उत्तरीयांची एक गाठ मारतो व ती दोघे त्या काठीभोवती सात फेरे मारतात. मग वरपक्षाकडील मंडळीला वधूपक्ष शिधा देतो व ते लोक आपला स्वयंपाक करून जेवतात.

रात्री वरपक्षाकडील मंडळी वधूला न घेता आपल्या गावी परततात. दुसऱ्या दिवशी वधूपक्षाकडील पाच लोक वधूसह वरगृही जातात. मग वधूची घरातल्या मंडळीशी ओळख करून देतात. दोन-तीन दिवसांनी वधू माहेरी जाते आणि नंतर वर तिच्या घरी जाऊन एक काठी रोवतो आणि तिला परत घेऊन येतो. नंतर ती दोघे आपले नवे घर उभारतात.

नत्र — नत्राचे कुंवारीनत्र आणि रंडीनत्र असे दोन भेद आहेत. ज्या मुलीचे लग्नापूर्वी एखाद्या मुलाशी लैंगिक संबंध असतात, अशा मुलीचे लग्न नत्रपद्धतीने होते. दुसऱ्या एखाद्या मुलाशी तिचा साखरपुडा होण्यापूर्वी जर तिचे संबंध उघडकीला आले, तर संबंधित मुलाशी तिचे लग्न लावतात. अशा वेळी देजही बरेच कमी द्यावे लागते. नत्र पद्धतीत लग्नाचा विधीही साधा असतो. लग्नाच्या आदल्या दिवशी वधूला हळद व मेंदी लावतात. नवे कपडे नेसवून तिला वरगृही नेतात. तिथे वधूचा भाऊ वधूवरांच्या भोवती एक कापड गुंडाळतो आणि ती दोघे मग गावाबाहेर जातात. मग वधूपिता वरपक्षाला जेवण देतो.

विधवा स्त्री तरुण असली, तर तिचाही विवाह याच पद्धतीने होतो. हा विधी नेहमी सूर्योदयापूर्वी करतात.

धार जिल्ह्यातील नल्छा प्रदेशात विवाहपूर्व लैंगिक संबंध ठेवलेल्या मुलाने संबंधित मुलीशी लग्न करायला नकार दिला, तर जातपंचायत त्याला शिक्षा करते.

भिल्ल तरुणी

आईवरई किंवा उदल — पित्याने जास्त देज मागितल्यामुळे ज्या मुलीला योग्य वर मिळत नाही, अशी मुलगी या प्रका-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राचा आश्रय करते. एखादा मुलगा ती हेरून ठेवते आणि संधी साधून त्याच्या घरात घुसते. आपली इच्छा ती त्या घरातल्या माणसांना सांगते आणि त्या घरात राहू लागते. मुलीच्या बापाला या गोष्टीचा पत्ता लागला, की तो काही गावकऱ्यांसह त्या घरी जातो आणि मुलाच्या वडिलांशी देजाबाबत बोलणी करतो. नेहमीच्या लग्नापेक्षा ते पुष्कळच कमी म्हणजे सुमारे पाचशे रुपये असते. आपल्या पसंतीच्या मुलाशी लग्न व्हावे, या हेतूने एखादी मुलगी संबंधित मुलाशी त्याप्रमाणे आधी संकेत करून मग त्याच्या घरात शिरते.

घरजमाई – ज्या मुलाला गरिबीमुळे वधूमूल्य देणे शक्य नसते, असा मुलगा आपल्या भावी सासऱ्याच्या घरी काही ठराविक मुदतीकरिता राहतो व त्याला शेतीच्या वगैरे कामात मदत करतो. लग्न होईपर्यंत मुलीला त्याच्याशी बोलता येत नाही. साधारण पाच वर्षे घरात राहिल्यावर त्याचे लग्न होते. मुदत संपल्यावर तो पत्नीसह वेगळे बिऱ्हाड करतो किंवा काही वेळा सासऱ्याच्याच घरात कायमचा राहतो.

ज्या माणसाला पुत्र नसेल, असा पुरुषही आपल्या एखाद्या मुलीच्या नवऱ्याला घरजावई करतो.

भगोरिया – होळीच्या सुमारास काही गावांत भगोरिया हाट म्हणजे बाजार किंवा जत्रा भरतात. त्या वेळी गावातील बहुतेक सर्व स्त्री-पुरुष ढोल आणि थाळी घेऊन बाजारात जातात. अशा वेळी मुली संधी साधून आपल्या प्रियकरांबरोबर पळून जातात व त्याच्या घरी राहतात. काही दिवसांनी त्यांचे लग्न होते.

घिज्जिलय – एखाद्या मुलाला रस्त्यात किंवा बाजारात एखादी मुलगी दिसली आणि ती त्याला आवडली, तर पुढच्या भगोरिया हाटाची वाट न पाहता तो जबरदस्तीने तिला आपल्या घरी घेऊन जातो. अशा वेळी या गोष्टीला मुलीची संमती असतेच असे नाही. मुलीचा पत्ता लागल्यावर तिचे आईबाप जातपंचायतीला ही गोष्ट कळवतात व मग ती दोन्ही पक्षांत समेट घडवून आणते.

झगडा – विवाहित स्त्री जेव्हा एखाद्या अविवाहित पुरुषाबरोबर पळून जाते आणि त्याच्या घरी राहू लागते, तेव्हा त्याला झगडा असे नाव आहे. त्या स्त्रीचा नवरा जातपंचायतीला ही गोष्ट कळवतो. नंतर तो आपल्या सासऱ्यासह पत्नीच्या शोधाला निघतो. तिचा ठावठिकाणा लागल्यावर बाप तिला पळून येण्याचे कारण विचारतो. ती काहीतरी उत्तर देते. नंतर गावाचा पटेल व चौकीदार तिच्या नवऱ्याला तो तिला परत न्यायला तयार आहे, का त्याला 'झगडा' मान्य आहे असे, विचारतात. जर तो पत्नीला न्यायला तयार असेल, तर त्याला नुकसान भरपाई म्हणून तीस रुपये मिळतात व त्याने तिला नव्या पुरुषाबरोबर राहायला परवानगी दिल्यास त्याला सुमारे तीनशे रुपये मिळतात.

खानदेशात मुलाचे आईबाप मुलीला मागणी घालतात. मुहूर्त पाहून साखरपुडा करण्याची यांच्यांत पद्धत आहे. लग्नापूर्वी पंधरा दिवस वधू-वरांना आपापल्या घरी रोज सकाळ संध्याकाळ हळद लावतात. लग्नाच्या दिवशी वर आप्तेष्टांसह घोड्यावरून वधूगृही जायला निघतो वाटेत सर्वजण मारुतीच्या मंदिरात जातात व तिथे एका घड्यातले पाणी पितात. संध्याकाळी वऱ्हाड वधूच्या गावाजवळ पोचले, की वरावर कांदे व फळे यांचा मारा करतात. नंतर तो घोड्यावरून उतरून मांडवात जातो. तिथे सात सुवासिनी पाण्याचे घडे घेऊन त्याच्या समोर येतात. तेव्हा तो प्रत्येकीच्या घड्यात तांब्याचे एकेक नाणे टाकतो, मग एक सुवासिनी त्याला आरती ओवाळते व तो तिला चोळखण देतो. नंतर तो मांडवात पूर्वेला तोंड करून बसतो. वधू त्याच्या समोर बसते. ब्राह्मण पुरोहित त्यांच्या भोवती सूत्रवेष्टन करतो. नंतर त्या दोघांच्या मधे अंतरपाट धरतो. अंतरपाटाखालून वधूचे जोडलेले हात वर आपल्या हातात धरतो. रात्री दोन्ही पक्ष गाण्यात व दारू पिण्यात वेळ घालवतात. दुसऱ्या दिवशी वधूवरांना स्नान घालतात. मग वधूला दागिने व नवे कपडे देतात. दोन किंवा तीन दिवसांनी वधूसह वरात वरगृही येते. तिथे त्यांची कंकणे सोडतात व जेवणावळ होते.

गुजरातेत मुलामुलींचे विवाह वडिलधारी माणसेच ठरवतात. लग्नात वधू-वरांचे हात जुळवतात व त्यांच्या वस्त्रांना गाठ मारतात. नंतर ती दोघे मांडवाच्या मध्यभागी असलेल्या शमीच्या फांदीभोवती बारा फेरे घालून एकमेकांना पाच घास देतात. एवढ्याने लग्नविधी संपतो.

गुजरातेतील पंचमहाल जिल्ह्यात मुलाचा बाप वधूपित्याला देज देतो. मग नऊ दिवसांनी लग्न होते. त्यासाठी नऊ नऊ गाठी मारलेले दोन दोरे तयार करतात व दोन्ही पक्षांना देतात. रोज त्यांतली एकेक गाठ सोडतात.

प्रसूतिप्रथा – गुजरातमधील पंचमहाल जिल्ह्यातील भिल्लांच्या गर्भिणी स्त्रीला व तिच्या पतीला काही नियम पाळावे लागतात. वाढत असणारे काहीही पुरुषाने कापायचे नाही, जमिनीत खांब पुरायचा नाही व कशाला गाठ मारायची नाही. स्त्रीने जुळे फळ खायचे नाही किंवा खिळा मारायचा नाही. ही बंधने पाळल्याने स्त्रीची प्रसूती सुलभ होते व मूल चांगले निपजते, अशी त्यांची समजूत आहे. गर्भिणीच्या सहाव्या महिन्यापासून तिचे मूल तीन महिन्यांचे होईपर्यंत पति-पत्नींचे वैवाहिक संबंध बंद असतात. स्त्रीला प्रसूतीसाठी वेगळी खोली तयार ठेवतात, तिच्यात बाज घालतात व झाडपाल्याची घरगुती औषधेही तयार ठेवतात. प्रसूतीसाठी सुईण बोलावतात. मुलाची नाळ बांबूच्या कामटीने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कापतात आणि ती एका टोपलीत घालून घराबाहेर एका खड्डयात पुरतात. हे करताना कोणी पाहायचे नसते. जन्मल्यावर मुलाला कोमट पाण्याने स्नान घालून स्तनपान देतात. मग सुईण रेहान्यो आणि दुध्यो या देवांना दूध व मद्य अर्पण करते. स्त्रीलाही गरम पाण्याने स्नान ालतात. घराबाहेर स्नानासाठी जाताना ती बाण, कोयता किंवा चाकू आपल्याबरोबर घेते. त्यामुळे तिला भूतपिशाचांची बाधा होत नाही.

जननाशौच चार दिवस असते. पाचव्या दिवशी बाळंतीण स्त्री सर्व घर शेणाने सारवते आणि सुईणीबरोबर जाऊन देवतांना शेंदूर व नारळ अर्पण करते. नंतर ती दुधाने किंवा दह्याने न्हाते आणि मुलासाठी प्रथमच झोळी टांगते व त्यात त्याला ठेवते. या दिवशी आप्तेष्ट स्त्रियांना बोलावून त्यांना दारू प्यायला देतात व पाच मुलांना खिचडी वाढतात. मग सुईण मुलाचे नाव ठेवते. पित्याचे किंवा आजोबांचे नाव मुलाला ठेवीत नाहीत.

खानदेशात काही ठिकाणी पाचव्या दिवशी माता घराच्या दारासमोर जमीन सारवते आणि तिच्यावर हळदीच्या रेघा ओढते. मग त्यांवर दिवा ठेवते आणि दिव्याभोवती पाच गारगोट्या व खोबऱ्याचे तुकडे मांडते. त्या सर्वांवर हळदकुंकू, ज्वारी व मद्य शिंपडते. त्यावेळी जमलेले लोक माता व बालक यांच्यावर ज्वारीचे दाणे टाकतात आणि घरात प्रवेश करतात. नंतर त्यांना जेवण देतात. त्या रात्री स्त्रिया दारू पिऊन गातात. बाराव्या दिवशी एका ताटात ज्वारी व डाळ यांची उसळ, बारा पोळ्या व दिवा ठेवतात. दुसऱ्या ताटात आरती ठेवतात आणि स्त्रिया नूतन मातेसह वाजतगाजत मिरवणुकीने नदीवर किंवा झऱ्यावर जातात. तिथे बारा दिवे व बारा पोळ्या ओळीने मांडतात. बाळंतीण जलदेवतेची पूजा करते. घरी आल्यावर सर्वांना खिचडीचे जेवण दिले जाते.

देवधर्म– महादेव, राम, कालिका, हनुमान आणि गणेश या देवतांना भिल्ल लोक भजतात. महादेव ही सर्वश्रेष्ठ देवता असून, पाऊस पाडणारा देव इंद्राज हा त्याचा मित्र आहे. दर वर्षी चैत्र शु. तृतीयेला ते महादेव व इंद्राज यांना बळी देऊन संतुष्ट राखतात. कालिका त्यांचे रानातील हिंस्र पशू व दुष्ट भुतेखेते यांच्यापासून रक्षण करते. होळीचा सण या देवतेच्या प्रीत्यर्थ असतो. त्यासाठी आधी महिनाभर तयारी चालू असते. तरुण मुले व मुली रात्री ढोलाच्या साथीवर कालिकेच्या स्तुतिपर गीते गातात व नाचतात.

सर्व आयुष्य सुखासमाधानात घालवून नैसर्गिक रीत्या मृत्यू पावलेले भिल्ल लोक उपकारी पिशाचांच्या रूपाने वावरत असतात आणि आपल्या वंशजांचे हित पाहत असतात, अशी भिल्लांची समजूत असते भगताच्या माध्यमातून ही भुतेखेते त्यांच्याशी संपर्क साधतात. आपल्या वंशजांनी आपली आठवण ठेवावी, अशी त्यांची अपेक्षा असते. जिवंतपणी त्या व्यक्ती ज्या ठिकाणी राहत होत्या, त्याच्या आसपास ही भुते घोटाळत असतात. मध्य प्रदेशातील रतनमाळ प्रदेशात प्रत्येक खेड्यात या भुतांना राहण्यासाठी एक वन राखलेले असते. त्याला 'देवांचे वन' असे नाव आहे. या वनात मृताच्या नावाने एक दगड उभारून त्याची स्मृती कायम ठेवतात. ही भुतेही त्यांना अन्नदान केले नाही किंवा त्यांच्या वनातील झाड कापले, जमीन नांगरली तर भिल्लांवर रागावतात.

गुजरात व खानदेश या प्रदेशांतील भिल्ल भुताखेतांना मातीचे घोडे, मातीची मडकी आणि मधाच्या पोळ्याच्या आकाराची भांडी अर्पण करतात. भिल्ल हे घोड्याला फार मान देतात. यांची एखादी प्रार्थना देवाने ऐकली, तरी ते मातीचे घोडे करून देवाच्या मूर्तीभोवती ठेवतात.

राजस्थानातील भिल्ल कुलदेवता, महादेव व हनुमान यांना भजतात. काहीजण ऋषभ देवालाही भजतात.

गुजरात व महाराष्ट्रातील भिल्ल डुंगऱ्यादेव (डोंगरदेव), शिवऱ्यादेव (सीमादेव), वाघदेव, नागदेव, म्हसोबा, खंडोबा, बहिरोबा, मरी, आसरा, इ. देवतांना भजतात. ते राजापंथ हा सर्वांत बलाढ्य देव मानतात. राणी पंढार ही त्याची पत्नी होय. हरगो, वरगो, डोमखल, देव रूपाल, देव कुपाल, इ. त्यांची कामे करतात. माता पंढारशी संबंधित असलेल्या देव मोगरा या ठिकाणी दर वर्षी मोठी जत्रा भरते. त्या वेळी लोक तिच्याकडे संतती व संपत्ती मागतात आणि तिला कोंबडे, बकरे व रेडा बळी देतात. याशिवाय, नंदरवो (धान्यदेवता), हिरकुल्यो (कृषिदेवता), मल्यो देव (भाजी–पाल्याची देवता), गोवलदेव (गुराख्यांचा देव), खेतरपाल (क्षेत्रपाल), वाघदेव, पइदेवी, इ. देवतांची पूजा करून ते त्यांना कोंबडे-बकरे अर्पण करतात.

निरनिराळ्या देवतांच्या प्रीत्यर्थ ते जत्रा भरवतात. त्या वेळी ते देवतांना भात, कोंबडे, दारू वगैरे अर्पण करतात आणि प्रत्येकाला देवतेचा प्रसाद वाटतात.

काही जत्रा दर वर्षी भरत नाहीत; त्या नैमित्तिक असतात. एखाद्या गावावर किंवा कुटुंबावर जर वारंवार संकटे येत असली, तर ग्रामप्रमुख किंवा कुटुंबप्रमुख नवस बोलतो, की 'सर्व संकटांचा परिहार झाल्यास मी इंद्राज देवाची जत्रा भरवीन व त्याला पुष्कळ बळी अर्पण करीन'. त्याप्रमाणे त्याचा नवस फळाला आला, की तोच जत्रेचा दिवस ठरवतो व आसपासच्या गावांतील लोकांना नाचगाण्यासाठी निमंत्रण धाडतो. त्या जत्रेत तो इंद्राज देवाला दोन पाडे, आठ किंवा बारा बकरी आणि अनेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोंबडी अर्पण करतो. कोणतीही जत्रा हे आबालवृद्धांचे आमोद-प्रमोदचे स्थान असते. त्या वेळी स्त्रिया गाणी गात मुक्तपणे नृत्य करतात.

राजस्थानातील मारवाड प्रदेशात भिल्लांची वस्ती जास्त आहे. त्यांच्यांत अनेक विभाग आहेत. हे लोक शाक्त असून, चामुंडा, महादेव व शीतला या देवतांना भजतात व पाबूजीलाही फार मान देतात. प्रत्येकाच्या घरात पाबूजीच्या नावाचे स्थान असते. हे लोक पाले उभारून त्यात राहतात. काही लोक लहान गोलाकार झोपड्याही उभारून त्यांत राहतात. घरात भिंतीवर देवाची आकृती काढलेली असते. ज्यांची पंचायत असते. तिच्यात ते आपले तंटेबखेडे सोडवतात. त्यांच्या प्रत्येक मोठ्या पालात एक भोप असतो आणि तो भूतबाधा नाहीशी करण्याचे काम करतो.

मृतिकप्रथा – राजस्थानातील भिल्ल प्रेत पालथे ठेवून जाळतात. लहान मुले, कुमारिका व देवींनी मृत्यू आलेल्यांना मात्र पुरतात. पण पुढे काही दिवस त्या घरात देवींनी कुणाचा मृत्यू झाला नाही, तर पुरलेले प्रेत उकरून ते जाळतात. मृत्यूनंतर दहा किंवा वीस दिवसांनी मृताचे नातेवाईक त्याच्या घरी जमतात. या वेळी मृताचा उत्तराधिकारी त्यांना दारू पाजतो व त्यांच्यासाठी जेवण तयार करतो. जेवण तयार होईपर्यंत जमलेले पुरुष एकमेकांची हजामत करतात व दारू पितात. नंतर प्रत्येकाला पळसाच्या पानावर अन्न वाढून देतात. ते घेऊन लोक घरी जातात.

गुजरातेतील भिल्ल लोक मृतांना जाळतात. माणसाला मृत्यू आला, की घरातले व शेजारपाजारचे लोक त्याच्या तोंडात थोडी दारू घालतात. नंतर गावातील एक वृद्ध विधवा स्त्री एक मोठे मडके पाण्याने भरून चुलीवर ठेवते. त्यात जमलेले सर्व लोक थोडेथोडे तांदूळ टाकतात. भात शिजल्यावर ती एक कोंबडे व वाळलेले मासेही शिजवते. त्याबद्दल तिला थोडे पैसे मिळतात. नंतर मृताच्या विधवेच्या किंवा मुलीच्या मांडीवर एक सूप व त्यात नवीन टोपली ठेवतात. शिजवलेले अन्न एका फडक्यात बांधून त्या टोपलीत ठेवतात. घराबाहेर तीन दगड मांडून वृद्ध स्त्री ते सूप त्यांच्यावर ठेवते. नंतर मृताची मुलगी किंवा दुसरी एखादी नातेवाईक स्त्री नदीवर जाऊन नव्या मडक्यात पाणी घेऊन येते. ते तापवून त्याने मृताला स्नान घालतात. मग मृताला नवे कपडे व त्याचे सर्व अलंकार घालतात. जमलेले लोक त्याच्या तोंडात काही पैसे ठेवतात व त्याच्या भोंवती एक धोतर गुंडाळतात. मग मृताची प्रथम पत्नी हयात असल्यास ती त्याच्या प्रेताजवळ थोडा वेळ झोपते. स्त्री मृत झाल्यास तिचा पती थोडा वेळ तिच्या प्रेताशेजारी झोपतो.

मग मृताची खाट चौघेजण उचलतात. त्यांच्या पुढे तलवार घेऊन एक माणूस चालतो. कोतवाल तूर वाद्य वाजवीत त्याच्या बरोबर चालतो. त्यांच्या मागे स्त्रिया व पुरुष चालतात. पाचशे पावले चालून गेल्यावर मृताची खाट खाली ठेवतात. तिथे वृद्ध स्त्री दोन कोहाळे व एक काळे मडके फोडते. मग पुरुष खाट उचलून स्मशानात जातात व स्त्रिया नदीवर जातात.

स्मशानात गेल्यावर मृताचे नातेवाईक वृद्ध माणसाकरवी त्याच्या तोंडात बरोबर नेलेले अन्न घालतात. त्या वेळी वृद्ध माणूस मृताला उद्देशून म्हणतो, की या अन्नदात्या माणसाला पुष्कळ धनदौलत दे. त्याला व त्याच्या गुरांना त्रास देऊ नको. त्यानंतर चितेला अग्नी देतात व सर्व पुरुष झऱ्यावर जाऊन स्नान करतात. दुसऱ्या दिवशी वृद्ध पुरुष आणखी दोघांसह लाकडाची मोळी घेऊन स्मशानात जातो. आणि प्रेत नीट जळले नसेल, तर पुन्हा थोडी लाकडे मांडून ती पेटवतो.

याच दिवशी मृताच्या घरी त्याचे नातेवाईक एका द्रोणात खिचडी व दही, दुसऱ्या द्रोणात पाणी व तिसऱ्यात पीठ ठेवून त्यांच्यावर एक टोपली पालथी घालतात. दुसऱ्या दिवशी टोपली काढून बघतात. जर त्या द्रोणात बोटांच्या किंवा इतर कसल्या



मृताचे दगडी स्मारक

खुणा दिसल्या, तर मृत पुनः त्या घरात आला, असे समजतात व ते अशुभ व आपत्तिसूचक मानतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिसऱ्या दिवशी कोतवाल स्मशानात जाऊन रक्षा गोळा करतो व त्या ढिगावर एक फूट उंचीचा मांडव घालतो. मांडवाखाली तो अन्नाचे तीन भाग करून त्यांच्यावर दूध व गोमूत्र शिंपडतो. त्याबद्दल कोतवालाला तीन रुपये मिळतात.

मृत व्यक्ती प्रतिष्ठित असेल, तर वर्ष-दोन वर्षांनी त्याच्या नावाने एक दगडी स्मारक गावाच्या देवस्थानात उभारतात. दगडावर हातात तलवार घेऊन घोड्यावर वसलेल्या माणसाची आकृती खोदलेली असते. लहान मुलास मृत्यू आल्यास, त्याला पुरतात.

खानदेशातील भिल्लांत, मनुष्य आसन्नमरण झाला, की त्याचे नातेवाईक त्याच्या नावे गोरगरिबांना दानधर्म करतात. मनुष्य मृत झाला, की प्रथम त्याला घोंगडीवर ठेवतात. मग स्नान घालून व नव्या पांढऱ्या वस्त्राने आच्छादून तिरडीवर ठेवतात. स्मशानाच्या अर्ध्या वाटेत तिरडी खाली ठेवून थोडा भात एका झुडपाच्या बुंध्याशी ठेवतात. नंतर स्मशानात पाच-सहा फूट खोल खड्डा खणून प्रेत त्यात ठेवतात. त्याच्या तोंडात भात व भाकरी घालतात, त्याच्या अंगावर पाणी शिंपडतात आणि खड्ड्यात माती लोटतात. अकराव्या दिवशी मृताचा उत्तराधिकारी पिठाची गाय करून ती पानावर ठेवतो व पाण्यात सोडतो. बाराव्या किंवा पंचेचाळिसाव्या दिवशी कुंभाराला बोलवून सात पायऱ्यांची शिडी भिंतीला लावतात. या शिडीच्या आधाराने मृतात्मा स्वर्गात जातो, अशी त्यांची समजूत आहे.

वर्तमान परिस्थिती – भिल्लांच्या भोवतालच्या बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा त्यांच्यावरही परिणाम झाला आहे. पूर्वी भिल्ल कमरेला एक लंगोटी व डोक्याला फेटा एवढाच पोषाख करीत. पण आता ते पँट, शर्ट, कोट, तलम धोतर, गांधी टोपी, कॅनव्हासचे जोडे किंवा चप्पल अशा वस्तू वापरू लागले आहेत. स्त्रियाही गिरणीच्या साड्या व तयार पोलकी घालू लागल्या आहेत. शोभेच्या प्लास्टिकच्या वस्तू, आरसे, निरनिराळी कर्णभूषणे, कुंकू, बांगड्या, साबण, वादल्या, सोडावॉटरच्या बाटल्या, कंदिल, मनिबॅग्ज, रजया, ब्लँकेट वगैरे वस्तूंनी आता त्यांच्या घरात प्रवेश मिळवला आहे. त्यांच्या काही घरांवर गवताच्या छपरांऐवजी कौले दिसू लागली आहेत व काही घरांच्या भिंती विटांनी बनवल्या जाऊ लागल्या आहेत. क्वचित घराशेजारी विहीर खणलेलीही दिसू लागली आहे.

बाहेरच्या जगाशी संपर्क आल्यामुळे पुष्कळ भिल्लांना गुजराती व हिंदुस्थानी या भाषा बोलता येऊ लागल्या आहेत.

भिल्लांच्या प्रदेशात अनेक प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यांत अनेक मुले शिक्षण घेत आहेत. पण शिकलेले व बाहेरच्या जगाशी संपर्क आलेले लोक भिल्लांच्या पारंपरिक नृत्यात किंवा गाण्यात भाग घेत नाहीत. त्यांना तो कमीपणा वाटतो. तसेच त्यांच्या परंपरागत समारंभांनाही ते नावे ठेवतात. त्यामुळे जीवनातील उत्साह व आनंद याला ते मुकले आहेत.

पूर्वी भिल्ल लोकांना मजुरी कमी मिळत असे. तसेच ते सावकाराच्या कर्जात बुडून गेलेले असत. पण भिल्ल सेवा मंडळ, भारत सेवक समाज, इ. संस्थानी त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी खूप प्रयत्न केले. धान्याच्या खरेदी-विक्रीसाठी त्यांनी भांडारे उघडली. फॉरेस्ट लेवरर्स को-ऑपरेटिव्ह सोसायट्या निघाल्यामुळे त्यांना लाकडे तोडणे, कोळशाच्या भट्ट्या लावणे यांसाठी योग्य मजुरी मिळू लागली आहे व त्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली आहे.

पुष्कळ भिल्लांना देजाची भरमसाठ रक्कम देण्यासाठी कर्ज काढावे लागत असे. एकदा का कर्ज काढले, की त्याचे व्याजही न देता आल्यामुळे ते त्या कर्जातून बहुधा आयुष्यात मुक्त होत नसत. यासाठी सुशिक्षित भिल्लांनी इ. स. १९५४ साली झालोद येथे आदिवासी भिल्ल पंच या नावाने एक परिषद भरविली आणि देजाची रक्कम पूर्वी ७०० ते १००० पर्यंत असायची ती ३२५ रुपये ठरविली. सर्वांनी हा नियम अमलात आणावा, असे त्यांनी आवाहन केले. पण लोकांकडून त्याला योग्य तो प्रतिसाद अजून मिळाला नाही. त्यांना वाजवी दराने कर्ज मिळावे, म्हणून को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायट्याही निघाल्या आहेत. [रा. जा.; गु. जा.; ट्रा. का. बाँ.; एन्सा. रि. ए.; से. इं. १९३१; दि भिल्स, अे स्टडी– श्री. टी. बी. नाईक, १९५६; भिल्स ऑफ रतनमाळ श्री. वाय. व्ही. एस्. नाथ, १९६०; इम्पॅक्ट ऑफ एज्युकेशन ऑन दि भिल्स– श्री. टी. बी. नाईक.]

भिल्लकेदार एक शिवस्थान. हिमालयाच्या इंद्रकील नामक शिखरावर हे स्थान आहे. इथे शिवगंगा नदीचा उगम होतो. अर्जुनाने पाशुपतास्त्रप्राप्तीसाठी तप सुरू केले असता अर्जुनाची परीक्षा पाहण्यासाठी भिल्लाच्या रूपात शिव इथे प्रकट झाला व एका डुकराच्या शिकारीवरून इथे त्या दोघांचे युद्ध झाले, अशी कथा आहे. इथल्या शिवलिंगालाच आता हे नाव पडले आहे. [तीर्थयात्राप्रबंध]

भिषग् आथर्वण एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ९७ वे सूक्त याच्या नावावर आहे. हे सारे सूक्त अनुष्टुभ छंदात असून, ओषधींची स्तुती हा त्याचा विषय आहे. त्याने सोमाला वनस्पतींचा राजा मानले आहे. त्या सूक्तातील एक ऋचा (ऋ. १०. ९७. २) अशी–

शतं वो अम्ब धामानि सहस्रमुत वो रुहः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अथा शतक्त्वो यूयमिमं मे अगदं कृत ।।

अर्थ – हे शतावधी मर्मस्थान आणि सहस्रावधी अंकुर यांनी युक्त, शतकार्यकारी, मातृभूत ओषधींनो, तुम्ही मला निरोगी करा.

याच सूक्तात ओषधी गोळा करणाऱ्या विप्राला राक्षसहंता व रोगविनाशक भिषग्वर अशी उपाधी प्राप्त होते, असे म्हटले आहे; त्याचप्रमाणे औषधींच्या साहाय्याने रोगमूळ नष्ट होते, असेही म्हटले आहे. [प्रा. च. को.; म. ज्ञा. को.; ऋ. म. भा.]

भिस्ती एक जात. या जातीचे लोक गुजरात, राजस्थान, पंजाब, महाराष्ट्र व कर्नाटक, या प्रदेशांत आढळतात. पखालीतून पाणी वाहणे हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. त्यावरून त्यांना पखाली असेही म्हणतात. पखालीला मश्क म्हणतात, म्हणून मुसलमान भिस्ती लोकांना काही प्रदेशांत मश्की असेही नाव आहे.

परशुरामाने क्षत्रियांचा संहार सुरू केला, तेव्हा त्यांच्यांतील काही जणांनी, आपण क्षत्रिय नसून पाणके आहोत, असे सांगून आपला बचाव केला आणि तेव्हांपासून आमचा हा पाणी वाहण्याचा व्यवसाय सुरू झाला, असे हे सांगतात. पण हे मुळात यादव राजपूत असून, आपत्काली त्यांनी पखालीतून पाणी वाहण्याचा धंदा सुरू केल्यामुळे त्यांची वेगळी जात बनली. ते स्वतःला काश्यप गोत्राचे मानतात. यांच्यांत चावडा, चव्हाण, परमार, सोळंकी, वाघेला, इ. नावांची घराणी आहेत.

देवधर्म – या जातीतले बहुतेक लोक हिंदू आहेत; काही थोडे मुसलमान आहेत. हिंदू भिस्ती माता देवीला भजतात. भाद्रपद शुद्ध चतुर्दशी व आश्विन शुद्ध अष्टमी, या दिवशी आणि लग्नसमारंभात देवीला मद्य-मांसाचा नैवेद्य दाखवतात. रोगाची साथ आली, की देवीला बोकड बळी देतात. हे लोक हिंदूंचे सर्व सण पाळतात व तीर्थयात्राही करतात. गोसावी लोकांना हे आपले गुरू मानतात. कयतिपा नावाचे खालच्या दर्जाचे ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात

विवाहप्रथा – या लोकांत आते, मामे किंवा मावस बहीण हिच्याशी विवाह करण्याची प्रथा नाही. दूरदूर वसलेल्या घराण्यांतही लग्नसंबंध करीत नाहीत. बहुपत्नीप्रथा आहे. पण पत्नी जिवंत असताना तिच्या बहिणीशी लग्न करता येत नाही. दोन भाऊ दोन बहिणींशी लग्ने करू शकतात.

पूर्वी हे लोक मुली वयात येण्यापूर्वीच त्यांची लग्ने करीत. यांच्या लग्नाची सुरवात मुलाला मागणी घालण्यापासून होते. लग्न ठरल्यावर वरपित्याने मुलीला दागिने व कपडे द्यायचे असतात. लग्नसमारंभाच्या सुरुवातीपासून अखेरीपर्यंत वर आपल्या हातात एक सुरा, चाकू किंवा कात्री धरतो आणि लग्न पुरे झाल्यावर ती वस्तू नदीत किंवा विहिरीत टाकतो. वधू-वरांनी एकमेकांचे हात धरणे, हा यांच्या लग्नातला मुख्य विधी असतो.

यांच्यांत पत्नीच्या दुर्वर्तनामुळे पतीला व पतीने छळ केला म्हणून पत्नीला काडीमोड घेता येते. पण काडीमोड फारसा रूढ नाही.

जातपंचायतीच्या संमतीने हे लोक पुनर्विवाह करू शकतात. विधवा विवाह फक्त रविवारी, मंगळवारी किंवा गुरुवारी होतो. त्या प्रसंगी सुवासिनी स्त्रियांनी तिथे उपस्थित राहायचे नसते. पुनर्विवाहविधीत प्रथम गणपतिपूजन झाल्यावर एक दिवा मडक्यात ठेवून त्यावर चाळण ठेवतात. मग चाळण काढून दोघेजण त्या दिव्याकडे पाहतात व एकमेकांवर अक्षता टाकतात. प्रथमवराला विधवेशी विवाह करायचा असेल, तर आधी त्याला शमीशी लग्न करावे लागते.

मुसलमान भिस्ती हे बाटलेले हिंदू भोई आहेत, असे म्हणतात. ते सुन्नी हनफी पंथाचे आहेत. दक्षिणेत ते हिंदूंचे पुष्कळ रीतिरिवाज व सण पाळतात व हिंदू देवतांना भजतात. बैलांच्या पाठीवर, पखालीतून पाणी वाहणे हाच धंदा तेही करतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांची प्रेते पुरतात किंवा जाळतात. पुरताना प्रेत बसलेल्या स्थितीत किंवा दक्षिणेकडे डोके करून आडवे ठेवतात. प्रेताचे दहन केल्यानंतर अस्थी व रक्षा समुद्रात किंवा नदीत टाकतात. मृताचे वार्षिक श्राद्ध व महालय करण्याची प्रथा यांच्यांत आहे. [ट्रा. का. बॉं.]

भिक्षा कोणत्याही प्रकारचा अर्थोत्पादक उद्योग न करता स्वतःच्या व कुटुंबियांच्या निर्वाहासाठी लोकांकडे अन्न, वस्त्र, पात्र, द्रव्य, इ. वस्तूंची याचना करणे याला भिक्षा मागणे, असे म्हणतात. धर्मशास्त्रात ब्रह्मचारी व संन्यासी यांना भिक्षा विहित म्हणून सांगितली असून, इतरांना ती निषिद्ध ठरवली आहे. कारण ब्रह्मचारी हा नित्य अध्ययनात निमग्न असतो आणि संन्यासी हा सर्वसंगपरित्याग करून सर्वत्र संचार करीत लोकांना धर्म आणि ज्ञान यांचा उपदेश करतो, म्हणून त्या दोघांना भिक्षा विहित होय. मात्र त्यांच्याही भिक्षेवर धर्मशास्त्राने बरेच निर्बंध घातले आहेत. आपस्तंबधर्मसूत्रानुसार स्नातकालाही गुरुदक्षिणा देण्यासाठी, विवाहासाठी, यज्ञासाठी व आईबापांच्या पोषणासाठी भिक्षा मागायला परवानगी आहे. वसिष्ठधर्मसूत्रानुसार एखाद्या माणसाने आपले दैन्य कायमचे दूर करण्यासाठी राजाजवळ किंवा धनिकाजवळ शेताचा तुकडा किंवा पशू यांची भिक्षा मागायला हरकत नाही (१२.२-३).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंगिरसाने रोगी, वृद्ध, दीन व पांथस्थ यांनाच केवळ प्रसंगविशेषी गरजेपुरतीच भिक्षा मागायला परवानगी दिली आहे. मनूने यज्ञासाठी भिक्षा मागायला अनुज्ञा दिली आहे; पण भिक्षेचे सर्वच्या सर्व द्रव्य यज्ञाच्या कामीच खर्ची पडले पाहिजे, असा निर्बंध घातला आहे (मनु. ४.१८८–१९०).

वैदिक काळात ब्रह्मचाऱ्याव्यतिरिक्त दुसरे कोणी भिक्षा मागत असत, असे दिसत नाही. महाभारतकाळातही ब्रह्मचाऱ्यालाच भिक्षावृत्ती विहित होती, हे कैकय राजाच्या पुढील वचनावरून कळते–

नाब्रह्मचारी भिक्षावान् भिक्षुर्वाऽब्रह्मचर्यवान् ।

अर्थ – माझ्या राज्यात ब्रह्मचारी नसलेला कोणीही भिक्षा मागत नाही आणि भिक्षा मागतो, तो ब्रह्मचर्याचे पालन करतो.

वैदिक ऋषी भिक्षा मागताना कुठे दिसत नाहीत. कित्येक ऋषींना वैदिक राजांनी मोठमोठी दाने दिलेली आहेत. पण ती त्या ऋषींची भिक्षा नव्हे. पुराणकालात मात्र बऱ्याच ब्राह्मणांनी भिक्षावृत्तीचा स्वीकार केलेला दिसतो. 'एक होता ब्राह्मण. तो गरीब होता. तो रोज भिक्षा मागून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवी.' अशा प्रकारच्या कथा पुराणांतून व लोकसाहित्यातून मोठ्या प्रमाणात आढळतात.

ब्राह्मणांच्या या भिक्षावृत्तीला काही अंशी आपले धर्मशास्त्रही कारणीभूत आहे. पुराणांच्या कालापासून आजपर्यंत ब्राह्मणांना दानधर्म करून पोसणे ही गोष्ट पुण्यकारक मानली गेली आहे. ज्या ब्राह्मणाला दान द्यायचे, तो विद्वान व सच्चरित्र असावा, असे धर्माचार्य सांगतात. पण कित्येक धर्माचार्यांनी ब्राह्मण आचारहीन असला, अविद्वान असला, तरी तो पूज्य व सत्पात्र ठरवला आहे. सामान्य लोकांना एखाद्या ब्राह्मणाचे ज्ञान व त्याचा आचार याची पारख कशी होणार ? ते ब्राह्मणाला दान द्यायचे, एवढेच घेऊन बसले. त्यामुळे आळशी ब्राह्मणांचे फावले व ते भिक्षेवरच जगू लागले.

भिक्षावृत्तीच्या वाढीला बौद्ध धर्मही बऱ्याच अंशी जबाबदार आहे. त्याने भिक्षावृत्तीला भलतेच उत्तेजन दिले. त्या धर्माची दीक्षा घेऊन भिक्षू बनण्यास सर्वांनाच मोकळीक होती. धनिकांच्या आणि गृहस्थांच्या औदार्यावर अशा भिक्षूंच्या चरितार्थाची सोय विनासायास होत असे. त्यामुळे बौद्ध भिक्षूंत आळशी व उद्योगपराङ्मुख अशा लोकांचा बराच भरणा झाला. बौद्ध धर्माच्या उत्कर्षकाली हजारो भिक्षू मोठमोठ्या विहारांतून राहत असत व ते सर्व जण भिक्षेवर जगत असत. पुढेपुढे ते भिक्षेसाठी समाजाला उपद्रवही देऊ लागले. त्यामुळे लोकांच्या मनातली भिक्षू विषयीची श्रद्धा कमीकमी होत गेली. कालवशात बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यावर या भिक्षेकऱ्यांचा समाजाला होणारा उपद्रवही कमी झाला. पण त्यानंतर काही शतकांनी भिक्षूंच्या जागी गोसावी, बैरागी, इ. पंथांचे लोक आले आणि त्यांनीही चरितार्थासाठी भिक्षेचाच सोपा मार्ग अनुसरला.

बुद्ध, महावीर, शंकराचार्य, रामदास, इ. महापुरुषांनी भिक्षावृत्तीचा गौरव केला आहे. समर्थ तर स्पष्टपणे प्रतिपादितात–

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।
ओं भवति या पक्षा । रक्षिले पाहिजे ।।
भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला ।
परिग्रहवेगळा जाला । भिक्षा मागतां ।।

(दास. १४.२.१–२)

अर्थात वरील महापुरुषांचा हा भिक्षागौरव सर्वांच्यासाठी नसून, तो परमार्थसाधकांच्यासाठी आहे, हे जाणले पाहिजे. परमार्थी माणसाने जीवनासाठी उद्योग न करता केवळ पोटापुरते समाजाकडे मागणे आणि जे मिळेल त्यात संतुष्ट राहणे, हे आपल्या संस्कृतीने निंद्य मानलेले नाही. अशा माणसाला यदृच्छालाभसंतुष्ट असे म्हटलेले आहे. ज्या कालखंडात ही प्रथा रूढ झाली किंवा अनिषिद्ध ठरली, त्या कालखंडात कदाचित तिची आवश्यकता असूही शकेल. पण सांप्रतच्या काळात परमार्थसाधकानेही भिक्षा मागून जीविका चालवणे हे अनुचित समजले जाते. यात त्या व्यक्तीची, तशीच समाजाचीही हानी आहे. सांप्रतही कित्येक वर्गच्या वर्ग भिक्षा हा आपल्या पेशाचा हक्क मानतात. पण ते यदृच्छालाभसंतुष्ट नसतात. उद्यमी, व्यवहारी माणसे जशा स्वतःला अनेक सुखसोयी उपलब्ध करून घेतात, तशाच त्या या साधु-बैराग्यांनाही हव्याशा वाटतात. भिक्षेतून भोग हा त्यांना अधर्म वाटत नाही. पण नैतिक अर्थाने खरोखर तो अधर्म ठरतो. अपरिग्रह हे भिक्षेचे पहिले तत्त्व आहे. भिक्षेचे लक्षणच मुळी 'ग्रासमात्रं भवेद् भिक्षा' = घासभर अन्न म्हणजे भिक्षा, असे आहे. काही संप्रदायांत भिक्षा ही पात्रात न घेता हातावर घ्यायची असा नियम आहे. अशा भिक्षेकऱ्याला करपात्री म्हणतात. या नियमात अपरिग्रहाचाच संकेत दिसतो.

पुष्कळदा एखादे वेगळेही उदाहरण दिसते. एखादा उद्योगी, सशक्त आणि सुशिक्षित असा मनुष्यही एखाद्या महत्त्वाच्या समाजकार्यासाठी किंवा देशाच्या आणि लोकांच्या उत्कर्षासाठी आपला उद्योगधंदा सोडून अकिंचन बनतो आणि आपल्या उद्दिष्ट कार्यातच अहोरात्र निमग्न राहतो. अशा वेळी त्याला उदरनिर्वाहासाठी साक्षात भिक्षा जरी मागावी लागली नाही, तरी चरितार्थासाठी इष्ट मित्रांचे न मागता मिळालेले साहाय्य घ्यावे लागते. ही अयाचित वृत्ती जरी भिक्षेतच जमा होत असली, तरी तिला निंद्य म्हणता येणार नाही. मात्र इष्ट ध्येय साध्य झाल्यावर त्याने ही वृत्ती सोडून उद्योग स्वीकारला पाहिजे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अन्नासाठी इतरांवर अवलंबून राहणे किंवा इतरांकडे भिक्षा मागणे यात अशा माणसाला भिंधेपणा येत असतो. दुसऱ्या अर्थाने ते आत्महननच असते. परमार्थ हा आत्म्याच्या मोक्षासाठी किंवा उद्धारासाठी असतो. तो आत्माच जर भिंधा, मलिन आणि परावलंबी झाला, तर त्याला मोक्ष कुठला !

भिक्षा व दान यांचा निकट संबंध आहे. दानाची स्तुती ऋग्वेदापासून चालत आलेली आहे. उपनिषदातही दानाला धर्माचा स्कंध म्हटले आहे. हे दान सत्पात्री द्यावे, असा नियम पुढे मनूने त्या बाबतीत घालून दिला. पण समाजातल्या कित्येक दात्यांना हा विवेक राहिला नाही आणि ते योग्य असो वा अयोग्य असो, सर्वांनाच दान देत सुटले. या ना त्या कारणाने जेव्हा समृद्ध लोकांकडून अशी दाने मिळू लागली, तेव्हा ही दानरूपी भिक्षा घेणे हे कित्येक ब्राह्मणांनी व्यवसाय म्हणूनच पत्करले. ब्राह्मण हा समाजाचे मुख आहे. त्यामुळे त्याच्यावर जबाबदारी मोठी असते. त्याचे वागणे आदर्शभूत असावे, असा मन्वादी स्मृतिकारांचा आग्रह आहे. त्यामुळे ब्राह्मणाने खुशाल भिक्षा मागत हिंडावे आणि आळशीपणाने आयुष्य घालवावे ही गोष्ट स्मृतिकारांना मुळीच मान्य नाही. पराशर म्हणतो, की गावात व्रतहीन व अध्ययन न करणारा ब्राह्मण नुसताच भिक्षा मागत हिंडत असेल, तर राजाने त्या सगळ्या गावाला दंड करावा. कारण ते गाव चोराला पोशीत असते (पराशर. १.६६).

ज्या समाजात भिक्षा मागणारे लोक फार आहेत, तो समाज व्यंग आहे, अविकसित आहे, असे समजावे. समाजातला धनिक वर्ग किंवा शासन यांनी जर लोकहित डोळ्यापुढे ठेवून उद्योगधंद्यांच्या द्वारे समाजाला श्रमाची प्रतिष्ठा पटवली नाही आणि समाजाचे दैन्य दूर करण्याचा प्रयत्न केला नाही, तर समाजातली भिक्षावृत्ती नष्ट होणार नाही आणि भिक्षावृत्ती नष्ट झाल्यावाचून समाज सर्वांगी विकसित झाला, असेही म्हणता येणार नाही. [प्रा. भा. सा. सां. भू.; म. यु. भा.; जीवनशोधन].

भिक्षाटनमूर्ती शिवमूर्तीचा एक प्रकार. या प्रकारात शिवाची मूर्ती नग्न असते. शिवाच्या या नग्नतेसंबंधी एक कथा लिंग पुराणात आहे, ती अशी–

एकदा दारुवनात काही स्त्रिया आणि मुले तपाचरण करू लागली. त्यांचे ऐहिक सुखाकडे लक्ष लागावे म्हणून शिवाने नग्न रूप धारण करून त्यांच्याकडे भिक्षा मागितली आणि त्यांचे लक्ष ऐहिक सुखोपभोगांकडे वळवले.

तंजाऊर इथे शिवाची भिक्षाटन मूर्ती आहे. ती त्रिनेत्र, नग्न आणि कटिसर्पाने युक्त अशी आहे. त्या मूर्तीचा उजवा पाय आखडलेला व डावा ताठ आहे. [मू. वि.]

भिक्षावळ मुंजीतला एक सोहळा. उपनयन संस्कारातील ब्रह्मचर्याश्रमासंबंधी आचारांचा उपदेश झाल्यावर ब्रह्मचारी हातात दंड व भिक्षापात्र घेऊन प्रथम मातेकडे जातो व भिक्षा मागतो. या वैदिक विधीतच पुढे लौकिक आचारांची भर पडून त्यातून भिक्षावळ हा सोहळा निर्माण झाला.

मुंज झाल्यावर सायंकाळी विविध खाद्यपदार्थांसह बटूची जी मिरवणूक क..तात, त्या मिरवणुकीला भिक्षावळ असे म्हणतात. ही मिरवणूक आप्तेष्टांसह गणपतीच्या देवळात जाते. बटूने देवाला नमस्कार केल्यावर मिरवणूक घरी परत येते. घरी आल्यावर डाव्या हातात पलाशदंड आणि उजव्या हातात रोवळी किंवा घटिकापात्र घेऊन बटू पाटावर उभा राहतो आणि 'ॐ भवति भिक्षां देहि' असे म्हणून रोवळी आईच्या पुढे करतो. मग आई सोन्याची साखळी बांधलेल्या पळीने थोड तांदूळ व पैसे बटूच्या रोवळीत घालते. नंतर इतर स्त्रिया बटूला लाडू-करंज्यांची व पैशांची भिक्षा घालतात. मग बटू ती रोवळी पुरोहिताकडे देतो, कारण पहिल्या भिक्षेवर पुरोहिताचा हक्क असतो. मग पुरोहित रोवळीतले थोडे खाद्य पदार्थ तिथे जमलेल्या मुलांना वाटून बाकीचे आपल्या घरी नेतो.

भिक्षुकोपनिषद् एक नव्य उपनिषद. हे यजुर्वेदाशी संबंधित असून संन्यासमार्गाचे वर्णन करणारे आहे. बहूदक, हंस, परमहंस असे संन्याशांचे प्रकार यात सांगितले आहेत. बहूदक हे शिखासूत्र ठेवतात आणि काषाय वस्त्रे, त्रिदंड व कमंडलू धारण करतात. हे ब्रह्मर्षींच्या घरचे फक्त आठ घास अन्न खाऊन मोक्षमार्गात निरत असतात. हंस हे चांद्रायण व्रताने अन्न ग्रहण करतात, गोमय आणि गोमूत्र यांचे सेवन करतात व खेड्यात एक रात्र, शहरात पाच रात्री व पवित्र क्षेत्री सात रात्री राहतात. ते याहून अधिक कुठेच राहत नाहीत. परमहंस हेही आठच घासांचे भोजन करतात. ते वस्त्रे परिधान करतात किंवा क्वचित दिगंबरही राहतात. ते झाडाखाली, रिकाम्या घरी किंवा स्मशानात राहतात. त्यांना कोणतेही विधि-निषेध नसतात. ते ब्रह्मात्म्यैक्य अवस्थेत सदैव निमग्न असतात. [श्री. सी. ग. देसाई.]

भिक्षु-भिक्षुणी सर्वसंगपरित्याग करून परिव्राजक बनलेल्या माणसाला भिक्षू किंवा संन्यासी म्हणतात. भिक्षू शब्द बहुतेक बौद्ध संन्याशांना लावण्याची रूढी आहे. धम्मपदात (२५.३) भिक्षूचे लक्षण सांगितले आहे, ते असे–

हत्थसञ्ञतो पादसञ्ञतो वाचाय सञ्ञतो सञ्ञतुत्तमो।
अज्झत्तरतो समाहितो एको सन्तुसितो तमाहु भिक्खुं॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – ज्याचा हात, पाय व वाणी यांच्या ठिकाणी संयम आहे, जो सर्वभावे श्रेष्ठ संयमी आहे, जो घटाच्या आत अर्थात अध्यात्माच्या ठिकाणी निरत आहे व जो समाधियुक्त, एकाकी आणि संतुष्ट आहे, त्याला भिक्षू म्हणतात.

भिक्षूंनी वर्षाचे आठ महिने भ्रमणशील असावे व वर्षाकाली चार महिने एका ठिकाणी राहावे, असा बुद्धाचा आदेश आहे. बौद्ध धर्मात जेव्हा भिक्षूंची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली, तेव्हा त्यांच्या वर्षाकालीन निवासासाठी काहीतरी सोय करणे क्रमप्राप्त झाले. म्हणून तत्कालीन राजांनी आणि धनिकांनी मग अशा भिक्षूंसाठी मोठमोठे आवास किंवा विहार बांधून दिले. हेच विहार पुढे अनेक संघांच्या रूपात विकसित झाले. वेसालिक, वाज्जपुत्तक, सावथ्य, इ. संघांची नावे बौद्ध साहित्यात आढळतात.

समानावासक व नानावासक अशा भिक्षूंच्या दोन श्रेणी होत्या. पहिल्या श्रेणीच्या लोकांना परिव्राजक म्हणत. कारण ते निरंतर फिरत राहत. दुसऱ्या श्रेणीच्या लोकांना भिक्षू म्हणत. ते एका ठिकाणी राहून आपले आवास संघटित करीत.

भिक्षुसंघात दाखल होताना इच्छुकाला उपसंपदा हा संस्कार करून घ्यावा लागे. यात मुंडन, पीतवस्त्रधारण, भिक्षुप्रणाम व त्रिशरणता या गोष्टी असत. उपसंपदा झाल्यावर इच्छुक संघप्रविष्ट होई. मग तिथल्या आचार्याच्या देखरेखीखाली त्याला सामान्यपणे दहा वर्षे शिक्षण घ्यावे लागे. विनय, गाथा, जातके, प्रार्थना, धर्माची मूलतत्त्वे आणि दर्शन हे भिक्षूंच्या अध्ययनाचे विषय असत. भिक्षूंच्या शिक्षणात कथांनाही महत्त्वाचे स्थान असे. वादविवाद, शास्त्रार्थ, खंडनमंडन या गोष्टींविषयी प्रत्येक भिक्षूला स्वातंत्र्य असे. त्याने तिसऱ्या प्रहरी एकदाच जेवायचे असे. संघातल्या सर्वांनी नियमित दिवशी उपोषण आणि त्या दिवशी एकत्र जमून धर्मग्रंथाचे पठण करायचे असे. भिक्षूच्या

प्रार्थनामग्न बौद्ध भिक्षू

हातून काही दुर्व्यवहार घडल्यास त्याला शिक्षा होई. अपराध मोठा असल्यास त्यास संघातून बहिष्कृतही व्हावे लागे.

प्रत्येक विहारात भिक्षूंना राहण्यासाठी अनेक परिवेण (कक्ष) असत. त्यांच्या सामूहिक उपयोगासाठी एक उदपान (विहीर), जंताघरसाला (स्नानागार), उपथ्थानकप्पियकुटी (भांडागार), कोथ्यक (कोठी), अग्गिसाला (पाकशाळा) या गोष्टी असत (चुल्लवग्ग ६.४.१०).

भिक्षूंच्या सर्व गरजा जनतेच्या दानातून होत असत. गृहस्थांनी भिक्षूंना भिक्षा वाढावी, असा बुद्धाचा उपदेश होता.

भिक्षुणी – भिक्षूंप्रमाणेच भिक्षुणींचेही संघ आणि आवास असत. स्त्रियांना भिक्षुणीदीक्षा देण्याला बुद्धाचा कडवा विरोध होता; पण आनंद या पट्टशिष्याने सतत आग्रह धरल्यामुळे बुद्धाला नाइलाजाने स्त्रियांना भिक्षुणीदीक्षा देण्याची अनुज्ञा द्यावी लागली. तदनुसार बुद्धाची मावशी महाप्रजापती ही पहिली भिक्षुणी झाली. तिच्याबरोबरच आणखी काही स्त्रियांनीही दीक्षा घेतली. अशा प्रकारे महाप्रजापतीचा पहिला भिक्षुणीसंघ निर्माण झाला. गौतमी, खेमा, उत्पलनर्णा, पटाचारा, धम्मदिन्ना, नंदा, सोणा, किसागौतमी, शृगालमाता, इ. भिक्षुणी बौद्ध संघात प्रसिद्ध आहेत.

बुद्धाने भिक्षुणींसाठी काही नियम वेगळे केले. त्यांचे विहार व संघही वेगळे ठेवले. त्यांच्या दीक्षेसाठी भिक्षुसभेची मान्यता आवश्यक ठरवली. कुमारिका असली, तर आईबापांची व विवाहित असल्यास पतीची परवानगी घेतली पाहिजे, असा नियम घालून दिला. वीस वर्षांखालच्या मुलीला, गर्भवतीला व लग्न होऊन बारा वर्षे न झालेल्या मुलीला दीक्षा देऊ नये, असे ठरवले. विधवेला मात्र कोणतीही अट ठेवली नाही. स्त्रीला संघात दाखल झाल्यावर दोन वर्षे शिक्षण घ्यावे लागे. तिला ठराविकच कपडे वापरावे लागत. कोणत्याही प्रकारचे प्रसाधन वर्ज्य असे. इतकेच नव्हे, तर तिला वपनही करावे लागे किंवा निदान केस बारीक तरी करावे लागत. पाहा – बौद्ध धर्म. [भा. सा. इ.; आजकल वार्षिक अंक, डिसेंबर १९५६]

भिक्षुसूत्रे

पाराशर्य ऋषीने ही सूत्रे रचली असून, त्यांत संन्यासदीक्षा घेतलेल्या भिक्षूंच्या आचाराचे नियम सांगितले आहेत. म्हणूनच यांना पाराशर्यसूत्रे असेही म्हणतात. ही सूत्रे जाणणाऱ्यांना किंवा त्यांचे अध्ययन करणाऱ्यांना 'पाराशरिणो भिक्षवः' असे म्हणत.

जैन आचारांगसूत्र व बौद्ध विनयपिटक हे दोन ग्रंथ पाराशर्य भिक्षुसूत्रांवर आधारलेले असावे, असे प्रा. का. वा. अभ्यंकर यांचे अनुमान आहे. [पा. का. भा.; पा. पा. व्या. सं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भिक्षू आंगिरस एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशे सतरावे सूक्त याच्या नावावर या सूक्तात अन्नदानाची प्रशंसा, अन्नदान न करणाऱ्या कृपणाची निंदा, अन्नदानाची फलश्रुती, तसेच धनसंग्रहाची आहे. विफलता यांविषयी विचार आले आहेत. आपण मिळविलेले अन्न दुसऱ्याला न देता आपण एकट्यानेच खाणाऱ्या व्यक्तीचा याने निषेध केला आहे. तो म्हणतो –

क्षुधिताला अन्नदानाने संतुष्ट केल्याने कोणाचीही संपत्ती नष्ट होत नाही. पण जो तसे करीत नाही, त्याला मात्र संकटकाळी किंवा परलोकी कोणीही उपयोगी पडणार नाही. क्षुधेने त्रस्त झालेला अन्नार्थी याचक दारी येऊन अन्न मागत असता, कठोर मनाने त्याच्या समक्ष जो कोणी स्वतःच भोजन करीत बसतो, त्याचा अधोगतीपासून उद्धार करणारा कोणीही भेटणार नाही.

त्याने अन्नदानाची प्रशंसा केली आहे, ती अशी –

स इद् भोजो यो गृहवे ददात्यन्नकामाय चरते कृशाय ।
अरमस्मै भवति यामहूता उतापरीषु कृणुते सखायम् ।।
(ऋ. १०. ११७. ३)

अर्थ – दाराशी आलेल्या क्षुधातुर आणि निर्धन अतिथीला अन्नदान करणाऱ्या दात्याचे शत्रू मित्र बनतात; आणि त्याला अन्नफल प्राप्त होते.

या सूक्तात सुभाषितवजा काही वाक्ये आहेत. [प्रा. च. को.]

भीखमराम (इ. स. च्या १८ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक हिंदी संतकवी. याचे मूळ नाव भीखा मिश्र असे होते. हा बिहार प्रदेशाच्या चंपारण्य जिल्ह्यातील माधवपूर नामक गावाचा रहिवासी होता. हा जातीने ब्राह्मण होता. घरची गरिबी; त्यामुळे त्याला शेतमजुरी करून निर्वाह करावा लागे. याला रामनेवाज मिश्र नावाचा एकुलता एक मुलगा होता. पण तोही साधू झाला होता. भीखमरामाने प्रीतमराव नावाच्या साधूचे शिष्यत्व पत्करले होते. पुढे काही दिवसांनी हा तीर्थयात्रेला निघाला. मुझफ्फरपूरच्या मुक्कामात, याने एका तेल्याच्या मृत पुत्राला जिवंत केले. त्यामुळे हा सिद्ध पुरुष आहे असे समजून लोक याला त्रास देऊ लागले. या त्रासाला कंटाळून याने माघ शुद्ध तृतीयेला जीवत्समाधी घेतली. माधवपूर येथे याची समाधी आहे. तिथे माघ शुद्ध तृतीयेला याच्या स्मृतिनिमित्त मोठी यात्रा भरते.

भीखमराम प्रथम वैष्णवमतानुयायी होता, असे म्हणतात. पण त्या संप्रदायाच्या तत्वज्ञानात त्याला शांती लाभली नाही, म्हणून नंतर तो सरभंग संप्रदायाचा अनुयायी झाला. तिथेही त्याचे समाधान न झाल्याने अखेर त्याने शैव दीक्षा घेतली.

भीखमरामाचा बीजक नावाचा एक ग्रंथ आहे. या ग्रंथात शिव, शक्ती व विष्णू यांना वंदना आहे. याचे एक पद असे –

हंसा करना नेवास अमरपुर में ।
चलै ना चरखा, बोलै ना तांँती
अमर चीर पेन्हैं बहु भांती ।। १ ।।
गगन ना गरजै, चुए ना पानी
अमृत जळवा सहज भरि आनी ।। २ ।।
भूख नाही लागे, ना लागे पियास
अमृत भोजन करे सुख बासा ।। ३ ।।
नाम भीखम गुरु सबद बिवेका
जो नर जपे सतगुरु उपदेसा ।। ४ ।।

अर्थ – हे हंसा (जीव); तू अमरपुरात निवास का नाही करीत ? तिथे (जीवनाचा) चरखा चालत नसतो आणि मृत्यूचीही गोष्ट नसते. तिथे तर सर्वंजणांनी अमरतेची वस्त्रे धारण केलेली असतात. हे हंसा, या अमरपुरात आकाश गर्जना करीत नाही, की मेघ वर्षाव करीत नाहीत. तिथे अमृतच भरून आणले जाते. हे हंसा, अमरपुरात भूक लागत नाही, की तहानेचा त्रास होत नाही. तिथे सकाळ-संध्याकाळ अमृताचे भोजन करावे आणि सुखाने निवास करावा. भीखमराम म्हणतो, की गुरूचा शब्द हाच विवेक व त्याचा जप करणे हाच उपदेश.

भीखमरामाची पदे भोजपुरी भाषेत आहेत. त्याची भाषा साधी, पण अर्थानुगामी आहे. [सं. स. सं.; हिं. सा. बि.; भो. क. का.]

भीखासाहब (१७१३–१७९१ इ. स.) एक हिंदी संतकवी. याचा जन्म उत्तर प्रदेशाच्या आजमगड जिल्ह्यातील खानापूर बोहना नामक गावी झाला. हा जातीचा ब्राह्मण होता. भीखानंद चौबे हे त्याचे मूळचे नाव होय. बालपणापासूनच याला सत्संगाची आवड होती. त्यामुळे त्याच्या अंगी लवकरच वैराग्य बाणले. असे सांगतात, की याचा विवाह निश्चित झाल्यावर साखरपुड्याच्या दिवशीच याने गृहत्याग केला. नंतर हा काशीला गेला; पण तिथे त्याचे मन रमले नाही. तिथून तो भुडकुडा गावी आला. इथे त्याची व गुलालसाहबाची गाठ पडली. तिथे गुलालसाहबाकडून त्याने दीक्षा घेतली. गुलालसाहबाच्या मृत्यूनंतर हा त्याच्या गादीवर बसला.

भुडकुडा गावीच याची समाधी आहे. त्याच्या स्मृतिनिमित्त विजयादशमीच्या दिवशी या गावी मोठी यात्रा भरते. हा बावरी पंथाचा अनुयायी होता. लोक त्याच्यासंबंधी अनेक चमत्कारकथा सांगतात.

भीखासाहब की बानी या नावाने याचा एक पदसंग्रह प्रसिद्ध आहे. याशिवाय याचे रामकुंडलियाँ, रामसहस्रनाम, रामसबद,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामराग, रामकवित्त आणि भगवंत वच्छावली असे सहा ग्रंथ आहेत. या सर्वांत रामसबद हा सर्वांत मोठा ग्रंथ होय. या ग्रंथात

भीखासाहब – एक सांकेतिक चित्र

अन्य संतांचीही पदे संग्रहीत आहेत. याच्या सर्व ग्रंथांत संसाराची असारता, नामस्मरण, दैन्य, प्रेमनिरूपण, गुरुमाहात्म्य, आत्म्याची व्यापकता आणि संसारी जीवांसाठी उद्‌बोधन, इ. विषय आढळतात. त्याच्या शैलीत सुबोधता असून, विचारांची स्पष्टताही आहे. [उ. भा. सं. प.; हिं. सं. बौ. प्र.; हिं. सा. को. २]

भीम (१) पांडवांतला दुसरा. युधिष्ठिराच्या जन्मानंतर पांडू कुंतीला म्हणाला. 'क्षत्रियांत बळाला प्राधान्य असते. तेव्हा तू महाबलशाली पुत्र मागून घे.' मग कुंतीने वायुदेवाचे ध्यान केले. वायू मृगावर आरूढ होऊन तिच्याकडे आला व त्याने तिला जो महाबलाढ्य पुत्र दिला, तोच भीम होय. रामायणात मारुती, तसा महाभारतात भीम हा महापराक्रमी ठरला आहे. जन्मतःच तो कुंतीच्या मांडीवरून खाली एका शिळेवर पडला; तर ती शिळाच फुटून चूर्ण झाली.

लहानपणी कौरवांबरोबर खेळत असता तो त्यांची वेळोवेळी खोड जिरवीत असे. तो मोठमोठे वृक्ष उपटू शकत असे. धावण्याच्या स्पर्धेत तो सर्वांच्या पुढे असे. तो खूप खात असे. एकचक्रा नगरीत पांडव ब्राह्मणरूपाने राहत असता उपजीविकेसाठी मधुकरी मागत. त्या वेळी कुंती सगळ्या मधुकरीतली अर्धी मधुकरी भीमाला वाढीत असे आणि अर्धीत आपल्यासह सगळ्यांचे भागवीत असे. त्याची पचनशक्ती इतकी दांडगी होती, की दुर्योधनाने अन्नातून चारलेले विषही त्याने पचवून टाकले.

पूर्ण वाढ झालेला भीम कसा दिसत असे, त्याचे वर्णन महाभारतात आहे, ते असे– त्याचे बाहू पुष्ट व दीर्घ होते. खांदे भरदार होते. त्याची कांती तप्त सुवर्णाप्रमाणे होती. त्याचे शरीर अत्यंत बांधेसूद असून, ते कसलेले व पीळदार होते. मदोन्मत्त गजेंद्राप्रमाणे त्याची चाल होती. तो चालू लागला, की जमीन हादरत असे व मोठमोठे वृक्ष कंपित होत असत. याहीपेक्षा त्याचे तपशीलवार वर्णन खुद्द धृतराष्ट्राने केले आहे, ते असे–

शूरस्तथाऽप्रतिबलो गौरस्ताल इवोन्नतः ।
प्रमाणतो भीमसेनः प्रादेशेनाधिकोऽर्जुनात् ॥
जवेन वाजिनोऽत्येति बलेनात्येति कुञ्जरान् ।
अव्यक्तजल्पी मध्वक्षो मध्यमः पाण्डवो बली ॥
गदां भ्रामयतस्तस्य भिन्दतो हस्तिमस्तकान् ।
सृक्किणी लेलिहानस्य बाष्पमुत्सृजतो मुहुः ॥
(म. भा. उद्योग. ५१·१९,२० व २९.)

अर्थ – भीम शूर असून त्याच्या योग्यतेचा बलवान दुसरा नाही. तो गौरवर्ण असून तालवृक्षाप्रमाणे उंच आहे. अर्जुनापेक्षा शरीराने तो धष्टपुष्ट असून, शरीरबळानेही तो अर्जुनापेक्षा श्रेष्ठ आहे. चपल अश्वाहून त्याचा वेग अधिक आहे. गजेंद्राहून तो अधिक बलवान आहे. या बलिष्ठ मध्यम पांडवाचे वर्णोच्चार अस्पष्ट असतात. त्याचे डोळे दारू पिऊन धुंद झाल्याप्रमाणे आरक्त दिसतात. (रणांगणात) गदेच्या तडाख्याने हत्तींची मस्तके फोडीत असता तो आपले ओठ चाटीत असतो आणि क्रोधामुळे त्याच्या डोळ्यातून वारंवार पाणी गळत असते.

खड्गयुद्ध, रथातून करायचे धनुष्यबाणांचे युद्ध आणि गदायुद्ध यांत तो अत्यंत निष्णात होता. बलरामाकडून त्याने गदायुद्धाचे खास शिक्षण घेतले होते. तो अप्रतिम मल्ल होता. हिडिंब, बक, किर्मीर, जीमूत, जरासंध, कीचक आणि अनुकीचक यांचा वध करणे हे त्याच्या अतिमानवी शक्तीचेच द्योतक होय. राजसूय यज्ञप्रसंगी धर्माने त्याला पूर्वदिशेचा दिग्विजय करण्यास पाठवले होते. त्या मोहिमेत त्याने पांचाल, विदेह, गंडक, दशार्ण, चेदी, कोसल, पुंड्र, वंग, लौहित्य, इ. देश जिंकले.

भीमाच्या प्रचंड सामर्थ्याला अनुरूप अशीच त्याची युयुत्सू वृत्ती होती. त्याचा आत्मप्रत्यय विलक्षण होता. क्षात्रधर्माचा त्याचा अभिमानही जाज्वल्य होता. पुरुषाने पराक्रम करून वैभव मिळवावे आणि धर्माला प्रतिकूल नसलेले सर्व सुखोपभोग घ्यावे, असे त्याला वाटे. विषाद आणि अकर्मण्यता या गोष्टी त्याला मुळीच मान्य नव्हत्या. राजसूय यज्ञाच्या वाटाघाटी चालू असता श्रीकृष्णाने जरासंधाचा पराक्रम व त्याचे अजेयत्व यांचे वर्णन केले आणि ते ऐकून युधिष्ठिराने थोडी कच खाल्ल्यासारखे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दाखविले. त्या वेळी भीम पुढे येऊन त्याला म्हणाला. 'जो दुबळा आणि अकर्मण्य असेल, तो वाळूप्रमाणे कोसळतो. शक्ती कमी असेल, तर युक्तीचा अवलंब केला पाहिजे. नीतीच्या कुशल प्रयोगाने दुर्बळालाही बलवंताशी सामना देता येतो. श्रीकृष्णाजवळ नीती, माझ्याजवळ बल आणि अर्जुनाजवळ विजय आहे. आम्ही तिघे मिळून जरासंधाचा काटा काढू.' आणि भीमाने एकट्यानेच जरासंधाला ठार केले.

भीमाचा रणोत्साह असा अपूर्व असे, की त्याला जरी कोणी मदत देऊ केली, तरी ती घेण्यात त्याला कमीपणा वाटून तो ती नाकारीत असे. हिडिंब व किर्मीर या राक्षसांच्या वधाच्या वेळी अर्जुनाने त्याला मदत देऊ केली; पण भीमाने ती मुळीच घेतली नाही.

ज्याला जगात मानाने जगायचे आहे, त्याने आपल्या हक्काचे असेल ते सांभाळण्यासाठी सदैव जागृत असले पाहिजे, असे त्याचे मत होते. दुष्टांनी आपल्या उदात्ततेचा फायदा घ्यावा आणि आपणांस दुःख भोगायला लावावे, याची त्याला अत्यंत चीड होती. या व्यवहारी जगात जशास तसे वागले पाहिजे, असे त्याचे रोखठोक मत होते. एका प्रसंगी तो धर्माला म्हणतो–

धर्म साधण्याच्या इच्छेने तू हे मोठे संकट स्वतःवर ओढवून घेतलेस आणि केवळ तुला बरे वाटावे म्हणून आम्ही सांप्रत विपत्ती सहन करीत आहो. तुझ्या शास्त्रनियमांनी आम्ही स्वतःला बांधून घेतले आहे. धर्म धर्म म्हणून भलत्याच कल्पना उराशी बाळगून आम्ही निराश मनाने एखाद्या षंढाप्रमाणे जगत आहो. त्यामुळे कौरव आपल्याला दुबळे समजतात. ही गोष्ट जितकी दुःखदायक आहे, तितके युद्धात मरणही दुःखदायक नाही. जो धर्म आपण व आपले मित्र यांना केवळ कष्टच देतो, तो धर्म नसून कुधर्म आहे. प्रयोजनाकडे न पाहता जो केवळ धर्म धर्म करीत बसतो, तो शहाणा नव्हे. अंधाला ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश कळत नाही, त्याचप्रमाणे त्याला धर्माचे रहस्य कळत नाही.

विलक्षण साहस व अपार सामर्थ्य त्याच्या अंगात होते. आगळीक करणाऱ्याला क्षमा हे त्याच्या स्वभावातच नव्हते. त्यामुळे ज्यांनी ज्यांनी भीमाला डिवचण्याचा प्रयत्न करून त्याचा आणि त्याच्या आप्तस्वजनांचा अपराध केला, त्या प्रत्येकाचा चित्तथरारक सूड त्याने घेतला आहे. याविषयी एकच उदाहरण पुरेसे आहे – अज्ञातवासात असता तो स्वयंपाकी म्हणून विराटाच्या राजवाड्यात राहिला होता. तिथेच द्रौपदी सैरंध्रीच्या रूपाने राहिली होती. विराटाचा मेहुणा कीचक हा एक उन्मत्त व विषयांध पुरुष होता. त्याने एक दिवस द्रौपदीवर हात टाकला. द्रौपदी कशीबशी त्याच्या तावडीतून सुटली. तिने त्या रात्री भीमाला घडलेला वृत्तांत सांगितला. भीमाने मग त्याचा कसा दारुण अंत केला, त्याचे वर्णन महाभारतात दिले आहे, ते असे –

कीचक थकला आहे असे पाहून, पशूला दोरीने बांधतात, त्याप्रमाणे भीमाने त्याला आपल्या बाहूंनी जखडून टाकले. गरगर फिरवून आणि त्याचे सर्व सांधे खिळखिळे करून त्याने त्याला खाली आपटले आणि शेवटी त्याचा गळा दावून त्याला बुकलून ठार मारले. तसे करीत असताना तो तोंडाने म्हणत होता, की 'आमच्या कुलस्त्रीची विटंबना करणाऱ्या या चांडाळाला ठार मारून मी आज कर्तव्यपूर्तीचे समाधान भोगीत आहे.' पण तेवढ्यानेही त्याचे समाधान झाले नाही. त्याने कीचकाचा तो मृतदेह यथेच्छ तुडवला व नंतर त्याचे हात-पाय, मस्तक-गळा, इ. सर्व अवयव त्याच्या देहात घुसवून त्याचा एक मोठा मांसाचा गोळाच बनवला.

वनवासाला जाताना त्याने प्रतिज्ञा केली होती, की ज्या दुःशासनाने द्रौपदीच्या निरीला हात घातला, त्याचे ऊन ऊन रक्त मी प्राशन करीन आणि ज्या दुर्योधनाने द्रौपदीला आपली मांडी उघडी करून दाखवली, त्याची ती मांडीच गदेने फोडून मी त्याला ठार करीन. भारतीय युद्धात त्याने ही उभयविध प्रतिज्ञा अत्यंत निर्दयपणे पुरी केली. भीमाला त्याबद्दल कधीही पश्चात्ताप वाटला नाही. 'तू दुःशासनाचे रक्त का प्यालास?' असे गांधारीने त्याला विचारले, तेव्हा तो म्हणाला.

न मामर्हसि गान्धारि दोषेण परिशङ्कितुम् ।
अनिगृह्य पुरा पुत्रानस्मास्वनपकारिषु ।
अधुना किं नु दोषेण परिशङ्कितुमर्हसि ॥
(म. भा. स्त्री. १५·२०)

अर्थ – हे गांधारी, तू मला दोष देऊ नकोस. पूर्वी तुझे पुत्र आमच्यावर अपकार करीत असता त्यांना तू आवरले नाहीस. त्याचा परिणाम भोगण्याची पाळी आल्यावर आता आम्हांला दोष देण्यात काय अर्थ आहे?

धृतराष्ट्राने केलेले अपकार भीम कधीही विसरू शकला नाही. तो नेहमीच आपले दंड थोपटून धृतराष्ट्राला ऐकू जाईल अशा बेताने म्हणे. 'आम्ही तुझ्या शंभर पुत्रांना ठार मारले.' एकदा मुलांच्या श्राद्धासाठी धृतराष्ट्राने धर्माकडे धन मागितले व धर्माने ते देऊही केले; पण ते भीमाला आवडले नाही. तो धर्माला म्हणाला–

तू या थेरड्याला धन मुळीच देऊ नकोस. त्या दुर्योधनादी कौरवांना वाईटातली वाईट गती मिळू दे. त्याच कुलांगारांनी सर्व पृथ्वीचा नाश केला. युधिष्ठिरा, बारा वर्षे चाललेले आपले अखंड वैर, अज्ञातवासातले ते कष्ट, त्यात द्रौपदीला भोगावे लागलेली दुःखे इतक्यातच तू विसरलास काय?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याने भीष्म आणि द्रोण यांचीही कधी गय केली नाही. त्या दोघांना पाहून तो म्हणे. 'या धर्मरक्षकांनीच नीच आणि नराधम अशा कौरवांच्या बाजूने आपले सामर्थ्य उभे केले. कौरवांनी द्रौपदीच्या अब्रूचे धिंडवडे काढले, त्याचेही या दोघांना काही वाटले नाही.'

त्याला एकच नियंत्रण होते आणि ते म्हणजे युधिष्ठिराचे. द्यूतप्रसंगी सर्वस्व हरल्यावर आणि कौरवांचे दास झाल्यावर दुर्योधनाने त्याला चिडवण्यासाठी औदार्याचा आव आणून म्हटले, 'भीमसेन जर युधिष्ठिराचा आपल्यावरील अधिकार अमान्य करील, तर मी त्याला दास्यमुक्त करीन.' त्यावर भीमाने उत्तर दिले –

यद्येष गुरुरस्माकं धर्मराजो महामनाः ।
न प्रभुः स्यात्कुलस्यास्य न वयं मर्षयेमहि ॥
ईशो नः पुण्यतपसां प्राणानामपि चेश्वरः ।
मन्यते जितमात्मानं यद्येष विजिता वयम् ॥

(सभा. ७०.१२ – १३)

अर्थ – जर हा महानुभाव धर्मराज आमचा गुरू व आमच्या कुलाचा प्रभू नसता, तर आम्ही चालू प्रकार कधीही सहन केले नसते. हा आमच्या पुण्याचा, तपाचा, इतकेच काय; पण प्राणांचाही ईश्वर आहे. हा जर स्वतःला जित समजतो, तर आम्हीही जित आहोत.

अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी युधिष्ठिराच्या आज्ञा व संकेत स्वतःला पटत नसतानाही त्याने निमूटपणे पाळले. तेरा वर्षे त्याने युधिष्ठिरासाठीच अपार दुःख सोसले. युधिष्ठिरानेही भीमाच्या क्रोधाला योग्य प्रसंगी वाट मोकळी करून दिली. भीमाविषयीचे युधिष्ठिराचे मत, कुंतीने बकासुराला मारण्यासाठी भीमाला पाठवायचे ठरवले, तेव्हा कळून आले. तो म्हणाला – 'ज्याच्या बाहूंच्या आश्रयावर आपण सुखाने निद्रा घेतो, ज्याच्या बळावर आपले अपहृत राज्य परत मिळविण्याची आशा करतो, ज्याच्या पराक्रमाच्या काळजीने शकुनीसह दुर्योधन रात्रीच्या रात्री जागून काढतो आणि ज्याच्यामुळे आपले आजवर अनेक आक्रमणांपासून संरक्षण झाले, अशा या भीमाला तू बकासुराकडे पाठवतेस हे योग्य नव्हे.'

पाचही पांडवांत द्रौपदीला भीम अधिक आवडत असे, असे दिसते. तोही तिची कोणतीही इच्छा पुरवण्यास तत्पर असे. एकदा द्रौपदीला वाऱ्याने वाहून आणलेले सहस्र पाकळ्यांचे एक कमळ दिसले. तिला ते फार आवडले. तिने तसली पुष्कळ कमळें आपल्याला आणून देण्याबद्दल भीमाला गळ घातली. भीम लगेच त्या कामगिरीवर निघाला. ती कमळे गंधमादन पर्वतावरच्या सौगंधिक वनातल्या सरोवरात होती आणि ते सरोवर कुबेराच्या ताब्यात होते. भीमाने तिथवर जाऊन कुबेराच्या रक्षकांशी युद्ध केले व ती कमळे तोडून द्रौपदीला आणून दिली. भीमाला द्रौपदीशिवाय हिडिंबा आणि काशिराजकन्या जलंधरा अशा आणखी दोन बायका होत्या. द्रौपदीचा सुतसोम, हिडिंबेचा घटोत्कच व जलंधरेचा सर्वत्रात असे त्याला तीन पुत्र होते.

वयाच्या एकशे साताव्या वर्षी महाप्रस्थान करून मेरुपर्वत चढत असता धर्माच्या आधी भीम पतन पावला. [म. भा. व्या.]

(२) एक जात. यांची वस्ती प्राधान्याने मध्य प्रदेशातील मंडला व शिवणी जिल्ह्यांत आढळते. गोंड लोकांकडे गायन, वादन व नृत्य करणे हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. ही जात म्हणजे गोंडांचीच एक पोटजात असावी, असे रसेलचे मत आहे. गोंडांच्या बुरादेव (वडादेव) नामक देवाला हे भजतात. यांच्यातील वृद्ध लोकच पौरोहित्याचे काम करतात. यांच्या स्त्रिया अलंकार न घालता, पायात घुंगरे बांधून नाच करतात. त्यांच्या नृत्याला तुम नावाच्या वाद्याची साथ असते. हे वाद्य भोपळ्यापासून तयार करतात. भोपळ्याला पोकळ बांबू जोडलेला असतो व त्यावर तारा असतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

भीमकवी (इ. स. च्या ११ व्या शतकाचा उत्तरार्ध व १२ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक तेलुगू कवी. याच्या जन्माच्या स्थळकाळासंबंधी मतभेद आहेत. एका बालविधवेच्या पोटी भीमेश्वराच्या कृपेने याचा जन्म झाला, म्हणून याचे भीमन्ना असे नाव ठेवले, अशी आख्यायिका सांगतात. भीमेश्वराच्या आशीर्वादाने हा त्रिकालज्ञ झाला होता, असेही म्हणतात तेलुगू पंडितांच्या मते आंध्रप्रदेशाच्या पूर्व गोदावरी जिल्ह्यातील वेमुलवाडा इथे याचा जन्म झाला.

भीमकवीसंबंधी अनेक चमत्कारकथा सांगितल्या जातात. हा अत्यंत शीघ्रकोपी होता. याचा कोणी आदर केला नःही तर हा तत्काळ त्याला शाप देत असे. त्याचे शाप फलद्रूपही होत. याच्या शापामुळेच कलिंगगंग वंशातील राजा चोडगंगदेव राज्यभ्रष्ट झाला व पुन्हा याने दिलेल्या उःशापामुळेच त्याला राज्यप्राप्ती झाली, अशी आख्यायिका आहे.

राघवपाण्डवीयम्, नृसिंहपुराण, शतकंध–रामायण, कविजनाश्रय, हरिविलास व सुमतिशतक हे ग्रंथ याने रचले आहेत. याने बसवपुराणाचा कन्नड अनुवाद केला, असेही सांगतात; पण बसवपुराणाचा अनुवादकर्ता भीम व हा भीम एकच होत, या गोष्टीला अजून मान्यता मिळालेली नाही.

भीमकवीची राघवपांडवीय रचना द्व्यर्थी होती, असे अप्पकवीने म्हटले आहे. परंतु नन्नय्यभट्टाने वरील दोषामुळे किंवा मत्सरामुळे ही कृती नष्ट केली, असेही म्हणतात. भीमकवीची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केवळ काही स्फुट पदे सांप्रत मिळतात. [ते. सा. इ.; ते. वा.]

भीमगोड हिमालयातील एक तीर्थस्थान. हरिद्वाराहून हृषीकेशाला जाताना वाटेत हे स्थान लागते. इथे हरिद्वाराला लागून असलेल्या पर्वताच्या कुशीत एक लहान मंदिर आहे. त्याच्या नजीक एक कुंड आहे. हे कुंड म्हणजेच भीमगोड होय. भीमाने या ठिकाणी आपला गुडघा टेकून तप केले, म्हणून या स्थानाला भीमगोड असे नाव पडले, अशी आख्यायिका आहे. दुसरी आख्यायिका अशी – भागीरथीचा प्रवाह योग्य दिशेने वाहत नव्हता. भीमाने आपल्या बाहुबलाने तो प्रवाह अडवला व त्याला योग्य ते वळण दिले आणि तेव्हापासून या कुंडाला हे नाव मिळाले.

या स्थानापासून थोड्याच अंतरावर चौवीस अवतारांच्या मूर्तींचे मंदिर आहे. तिथून जवळच सप्तस्रोत नावाचे तीर्थ लागते. गंगेने आपला प्रवाह इथे सात धारांत विभागला म्हणून या स्थानाला सप्तस्रोत असे नाव पडले, असे सांगतात. सप्तर्षींचे इथे वास्तव्य होते आणि त्यांच्या सोयीसाठीच गंगेने आपला प्रवाह सात धारांत विभक्त केला, अशीही जनश्रुती आहे. [हि. द.]

भीमताल एक प्राचीन तीर्थस्थान. हे स्थान हिमालयातील नैनीतालपासून ११-१२ मैलांवर आहे. हे एक मोठे सरोवर आहे. याच्या आसपास लहानमोठी साठ सरोवरे आहेत. भीमताल सरोवर एका डोंगराच्या पठारावर आहे. या सरोवरात मध्यभागी एक लहानशी टेकडी आहे. या सरोवराच्या काठावर भीमेश्वर नावाचे एक शिवमंदिर आहे आणि त्याच्या जवळच पुराणप्रसिद्ध कर्कोटक नागाचे वारूळ आहे. तिथे त्याच्या नावाचे एक शिखरही आहे. [कल्याण–तीर्थांक; हि. प्र.]

भीमद्वादशी एक काम्य व्रत. हे व्रत पांडवांपैकी भीमाला वासुदेवाने प्रथम सांगितले म्हणून त्याला भीमाचे नाव प्राप्त झाले. त्यापूर्वी या व्रताला 'कल्याणिनी' असे नाव होते. या व्रताचा विधी असा–

माघ शु. १० ला शरीराला तूप लावून स्नान. 'ॐ नमो नारायणाय' या मंत्राने विष्णूची पूजा. त्याबरोबरच गरुडाची व गणेशाची पूजा. एकादशीला पूर्ण उपवास. द्वादशीला नदीमध्ये स्नान करून घरापुढे मांडव घालायचा. एका तोरणाला पाण्याने भरलेले पात्र टांगायचे. त्या पात्राच्या तळाला एक लहान छिद्र पाडायचे. त्यातून झिरपणारे थेंब मस्तकावर घ्यायचे. नंतर ऋग्वेदी पुरोहितांकडून होम, यजुर्वेदी पुरोहितांकडून रुद्रावर्तन आणि सामवेदी पुरोहितांकडून सामगायन करवायचे. नंतर या पुरोहितांना वस्त्रालंकार देऊन त्यांचा सन्मान करायचा.

हे व्रत करणारा पापमुक्त होतो. या व्रताचे माहात्म्य वाजपेय आणि अतिरात्र या यागांपेक्षाही मोठे असल्याचे सांगितले आहे. फल– विष्णुलोकप्राप्ती. [हि. ध.]

भीमपलासी हिंदुस्थानी संगीतातील एक राग. याची जाती औडव-संपूर्ण आहे. वादी – मध्यम. संवादी – षड्ज. आरोह स्वर – सा, ग, म, प, नि, सा. अवरोह स्वर – सा, नि, ध, प, म, ग, रे, सा. गानसमय – दिवसाचा तिसरा प्रहर. [क. सं.]

भीमपूजा एक लौकिक पूजाप्रकार. ही पूजा केवळ गुजरात प्रदेशापुरतीच मर्यादित आहे. पाच पांडवांतील भीम याची ही पूजा असते. भीम खादाडपणाबद्दल प्रसिद्ध होता. तो फक्त वर्षातून एकच दिवस उपवास करी. तो दिवस म्हणजे ज्येष्ठ शुद्ध एकादशी होय. तिला गुजरातमध्ये भीम एकादशी असे म्हणतात. अजीर्णापासून उद्भवणारे सारे रोग बरे व्हावे, म्हणून सर्व लोक या दिवशी उपवास करतात आणि भीमाचे नाव घेऊन पोटावरून वारंवार हात फिरवितात. रात्री भीमाच्या मूर्तीची पंचामृताने पूजा करतात. पालिताणा या गावी भीमाची एक मोठी मूर्तीही आहे. [फो. को. गु.]

भीमरथी (१) सह्याद्रीत उगम पावणारी एक नदी. पाहा– भीमाशंकर.

(२) गांधार देशातील एक देवी. पाचशे यक्षपुत्रांची माता हारिती हीच पुढे गांधार देशात या नावाने प्रसिद्ध झाली, असा बौद्ध संकेत आहे. पंजाब प्रदेशातही या देवीची मंदिरे आहेत. तिथे तिचे उत्सवही होत असतात.

भीमभोई (इ. स. चे १९ वे शतक) एक साक्षात्कारी संत-कवी. याचा जन्म ओडिसा राज्याच्या संबळपूर जिल्ह्यातील रेढाखोल नामक गावी झाला. हा जातीने खोंड होता. बालपणीच देवी येऊन याची दृष्टी गेली. घरची गरिबी म्हणून हा मोलमजुरी करून निर्वाह करी. हाताने काम आणि मुखाने नाम, अशी याची वृत्ती होती. देव भेटावा, अशी त्याची तळमळ होती. त्यासाठी त्याने एकदा आत्महत्येचाही प्रयत्न केला. अखेर त्याला देवाची भेट घडली. मग तो कविता करू लागला. स्तुतिचिंतामणी, ब्रह्मनिरूपणगीता व चउतिसा ही याची काव्ये होत. याशिवाय याची अनेक भजनेही प्रसिद्ध आहेत. [उ. सा. हि.; हि. ओ. लि.; भ. बौ. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भीमसेन (१) एक देव. याला पांडवांपैकीच समजतात. मध्य प्रदेशात आणि उत्तर प्रदेशात तो एक ग्रामरक्षक देव ठरला आहे. याचे प्रतीक म्हणून एक लोखंडाचा तुकडा एखाद्या दगडात अथवा झाडात ठोकतात. काही लोक शेंदूर फासलेल्या दगडाला अथवा झाडाच्या बुंध्यालाही भीमसेन मानतात. काही ठिकाणी याची मूर्तीही असते. तिची उंची सात-आठ फूट असून, तिच्या एका हातात खंजीर व दुसऱ्या हातात भाला असतो. मंगळवार व शनिवार या दोन वारीं याची पूजा करतात. पूजेच्या वेळी याला कोंबडी, बकरी, डुक्कर व नारळ अर्पण करतात.

गोंड लोक भीमसेनाला पर्जन्यदेव मानतात आणि पावसाळ्याच्या अखेरीला याचा पाच दिवस उत्सव करतात. त्यासाठी ते थोड्या अंतरावर दोन वासे पुरतात. त्यांच्या डोक्यावर आडवी दोरी बांधतात. मग त्यांची मुले त्यांच्यावर चढतात आणि सरंदिशी खाली उतरतात. या उत्सवासाठी वर्गणी गोळा करतात. या वेळी भीमाचा पुजारी गावच्या पाटलाकडून सक्तीने एक गाय घेतो आणि तिला सर्वांसमक्ष भीमाला अर्पण करतो. रात्रीच्या वेळी सर्वजण ढोलकीच्या साथीवर नाचाचे कार्यक्रम करतात व मद्य पितात. ज्यांना या उत्सवात भाग घेता येत नाही, असे लोक आपल्या घरीच मोहाच्या झाडाखाली हा उत्सव साजरा करतात.

भूमक नावाचा आदिवासी याचा पुजारी असतो. भीमाच्या पूजेनंतर याच्या अंगात येते.

भीम हा आपल्या जातीचा मूळ पुरुष आहे, अशी भुइया लोकांची समजूत आहे. ते याला हनुमंताचा भाऊ मानतात. एकदा बर्फ पडत असलेल्या पर्वतावर गेल्यामुळे हा बेशुद्ध पडला आणि गोरक्षनाथाने त्याला शुद्धीवर आणून बऱ्याच मोठ्या प्रदेशाचा राजा बनविले, अशी आख्यायिका आहे. त्यांच्यांत नरबळीची चाल होती; पण भीमसेन व गोरक्षनाथ यांनी तिच्या ऐवजी रेड्याचा बळी देण्याची प्रथा सुरू केली, अशी समजूत आहे. [पॉ. रि. फो. नॉ. इं.]

(२) नेपाळमध्ये नेवारी जनता भीमसेनाला संपत्तीचा देव मानते. याचे स्थान मंदिरातील पहिल्या मजल्यावर असते. खालच्या वर्गातले लोक याचे पुजारी असतात. नेपाळमध्ये शिव व पार्वती यांच्यापेक्षाही भीमसेनाला महत्त्वाचे स्थान आहे. [दि नेवार्स–श्री. गोपालसिंह नेपाली, १९६५]

भीमस्वामी (१६४२ ते १७४१ इ. स.) समर्थ संप्रदायातील एक मराठी संतकवी. महाराष्ट्र प्रदेशाच्या सातारा जिल्ह्यातील कऱ्हाडजवळ शहापूर नावाचे एक गाव आहे. तिथे कमळाजीपंत आणि त्यांची पत्नी गंगाबाई हे राहत असत. भीम हा त्यांचा नातू होय. एकदा समर्थ रामदास यांच्या घरी आले असता त्यांनी या मुलाची हुशारी पाहून त्याला विचारले. "तू आमचा शिष्य होतोस का?" त्यावर भीमाने 'होय' म्हणून उत्तर दिले. मग भीमाची परीक्षा पाहण्यासाठी समर्थांनी त्याला नजिकच्या विहिरीत उडी मारायला सांगितली. भीमाने लगेच तसे केले. त्याचे हे धारिष्ट पाहून रामदासांनी त्याला आपल्या शिष्यमंडळात घेतले. पुढे याचे सारे शिक्षण समर्थांच्याच देखरेखेखाली झाले.

काही दिवसांनी भीमस्वामी समर्थांच्या आज्ञेने शिवाजीमहाराजांबरोबर तंजाऊरला गेला. तिथे व्यंकोजीने त्याला एक मठ बांधून दिला. आजतागायत या मठाची परंपरा चालू आहे. झोळिरामबाबा, गोविंदबाळस्वामी व अण्णाजीबाबा हे याचे शिष्य होते. यांचेही मठ तंजाऊर येथे आहेत. भीमस्वामीच्या मठात त्याच्या हातची दासबोधाची प्रत आहे. मठापासून दोन मैलांवर याची समाधी आहे.

समर्थांनी समाधी घेतल्यावर तीन दिवसांनी भीमस्वामी सज्जनगडावर गेला आणि समर्थांचे अंतकालीन दर्शन झाले नाही म्हणून तिथेच ठाण मांडून बसला. तेव्हा समर्थांनी समाधीतून प्रकट होऊन त्याला दर्शन दिले व एक अभंगही सांगितला, अशी आख्यायिका आहे. हल्ली समर्थांच्या समाधीला जी चीर पडलेली दिसते, ती याच वेळची म्हणून सांगतात.

भीमस्वामीने समर्थांचे लघुचरित्र लिहिले आहे. याशिवाय त्याची अनेक स्फुट पदेही आहेत. नमुन्यासाठी समर्थप्रेमाच्या एका पदातील काही भाग असा–

कैं मी पाहेन आता सद्‌गुरु समर्था।
निशिदिन चिंतन करिता धणी न पुरे या चित्ता ॥
तळमळ तळमळ जीव करित अति।
न धरत धीर पळ विकळ अवस्था ॥ ध्रु. ॥
तनमन धन गेहो कारण भाषा भावो।
स्वरूपी सकळही वावो भेटल्या सद्‌गुरुरावो ॥
चरणकमळी मस्तक वाहीन विलया जाइल जन्मकथा ॥
सज्जनगड जो वासी केव्हां जाईन त्या पासीं।
दुर्लभ पादुका दृष्टीसी अवलोकीन अहर्निशी ॥
निश्चय मज अंतरिचा परि प्रारब्ध कैसें न कळे पाहतां ॥

भीमस्वामींची पदे श्रवणीय आहेत. [म. सा.; म. वा. इ. खं. ३; समर्थांचा गाथा– श्री. अनंतदास रामदासी, १९२८]

भीमादुर्गा एक तांत्रिक देवता. हिचे वर्णन असे– कृष्णवर्ण, मस्तकी चंद्रकोर धारण करणारी, त्रिनेत्र, हातात शंख, शूल व खट्वांग धारण करणारी. [श्रीविद्यार्णवतंत्र]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भीमाशंकर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक क्षेत्र. हे क्षेत्र पुणे जिल्ह्यात आंबेगाव पेटा व खेड तालुका यांच्या सीमेवर सह्याद्रीत वसले आहे. इथल्या वनाला डाकिनी देवीचे



भीमाशंकराचे मंदिर

वन असे म्हणतात. इथले शिवमंदिर हेमाडपंती बांधणीचे आहे. त्याच्या गाभाऱ्याच्या जीर्णोद्धाराचे काम पेशवाईत नाना फडणिसांनी आरंभले व ते निवर्तल्यावर त्यांच्या पत्नीने ते पुरे केले. त्याच्या मंडपाचा जीर्णोद्धार अलिकडेच झाला आहे. या मंदिराच्या कटिबंधावर ब्रह्मा, वामन, परशुराम, गणपती, इ. देवतांच्या प्रमाणबद्ध मूर्तींची रांग आहे. दर्शनी भागाचे कोरीव कामही प्रेक्षणीय आहे. देवस्थानाला सरकारकडून वर्षासन असून काही जमीनही देवाच्या मालकीची आहे. देवस्थानाची सर्व व्यवस्था सहा वहिवाटदारांकडे वंशपरंपरेने चालत आलेली आहे. इथे देवळाच्या प्रांगणात एक मोठी घंटा टांगली आहे.

भीमाशंकर एका चमत्कारिक प्रसंगाने इथे प्रकट झाला. त्याविषयीची आख्यायिका अशी–

एकदा एका लाकुडतोड्याच्या कुऱ्हाडीचा घाव एका झाडाच्या मुळात बसला. त्यासरशी तिथून रक्त भळभळा वाहू लागले. तेव्हा लाकुडतोड्या भ्याला. मग त्याने एक दुभती गाय तिथे आणून उभी केली आणि रक्ताच्या ठिकाणी गायीच्या दुग्धधारा पिळल्या. त्यामुळे तावडतोब रक्त थांबले. लगेच तिथून एक शिवलिंग वर आले. तेच पुढे भीमाशंकर या नावाने प्रसिद्ध झाले.

भीमाशंकर क्षेत्राविषयी पुराणात एक कथा आहे, ती अशी–

त्रिपुरासुर नावाचा एक दैत्य होता. लोखंडाचे, रुप्याचे आणि सुवर्णाचे अशी त्याची तीन पुरे होती. ती पुरे गगनसंचारी होती. त्रिपुरासुर त्यात बसून मन मानेल तसा देवा-मानवांवर अग्निवर्षाव करी. त्याच्या या उत्पाती सामर्थ्यामुळे सगळे देव हतबल झाले आणि शिवाला शरण गेले. शिव त्या असुराच्या संहारासाठी सिद्ध झाला. डोंगराचाच रथ बनवून तो दैत्यावर चालून गेला; पण दैत्य काही केल्या आटोपेना. शेवटी शिवाने पाशुपत मंत्राने बाण अभिमंत्रित करून तो दैत्यावर सोडला आणि तीन्ही पुरांसह त्याला दग्ध करून टाकले. यामुळे शिवाला बरेच श्रम झाले आणि त्याच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. भीमक नावाचा एक राजा तिथे तप करीत होता, तो नेमका या प्रसंगी पुढे आला. शिवाने त्याला 'वर माग' असे म्हटले. भीमकाने वर मागितला. 'प्रभो, या घर्मधारांची पुण्यपावन नदी होऊ दे.'

भीमकराजामुळे ही नदी उत्पन्न झालेली असल्यामुळे या नदीला भीमा किंवा भीमरथी असे नाव मिळाले. मंदिराच्या डाव्या अंगाच्या टेकडीवर एका कुंडात भीमा नदीचा उगम झाला आहे. तिथून ती खाली येते, देवळाजवळच्या मोक्षकुंडात शिरते व तिथून पुढच्या प्रवासाला निघते. तिथून अर्ध्या कोसाच्या अंतरावर भीमेचा प्रवाह एका शिलाखंडावरून खालच्या खोल घळीत कोसळला आहे. पुढे तिला पिंपळगावाजवळ पहिली



भीमेच्या उगमाचे कुंड

नदी भेटते, ती भामा. तिथून पुढे तुळजापूरजवळ इंद्रायणी येऊन मिळते. त्यापुढे मुळामुठा, घोड, नीरा, इ. नद्या तिच्याशी संगम पावतात. पुढे ती म्हैसूर प्रदेशात शिरून रायचूर जिल्ह्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उत्तर सीमेवर कृष्णा नदीला आत्मसमर्पण करते.

भीमाशंकर या क्षेत्रात कमळजा नावाच्या देवीचे मंदिर आहे. दुर्धर्ष नावाच्या दैत्याला तिने एका मुष्टिप्रहाराने ठार केले व ब्रह्मदेवाने कृतज्ञ होऊन कमळांनी तिची पूजा बांधली, म्हणून लोक तिला कमळजा असे म्हणतात. याशिवाय इथे साक्षी विनायक व हनुमान यांचीही मंदिरे आहेत. इथल्या मोक्षकुंडाजवळच एक ज्ञानकुंडही आहे. यात्रेकरू या दोन्ही कुंडांत स्नान किंवा मार्जन करून मग भीमाशंकराच्या दर्शनाला जातात. यात्रेकरू इथे श्राद्धही करितात. महाशिवरात्रीला इथे मोठी यात्रा भरते. [ती. म.; तीर्थयात्राप्रबंध]

भीष्म कुरुकुलातला एक थोर, पराक्रमी व तत्त्वज्ञानी पुरुषश्रेष्ठ. याचे मूळचे नाव देवव्रत होते. महाभारतात हा पितामह म्हणून संबोधिला जातो. कारण कौरव–पांडवांचा तो चुलत आजोबा होता. शांतनूला गंगेच्या ठिकाणी हा पुत्र झाला. गंगा एकदा ब्रह्मदेवाच्या दर्शनासाठी ब्रह्मलोकी गेली असता त्या सभेत तिचा पदर वाऱ्याने उडाला. ते पाहून सर्व सभासदांनी माना खाली घातल्या; पण महाभिष नावाचा एक राजा मात्र तिच्या त्या अवस्थेकडे टक लावून पाहू लागला. ब्रह्मदेवाला ते आवडले नाही. त्याने महाभिषाला शाप दिला. 'तू पुनश्च मृत्युलोकी जन्म घे. तिथे ही गंगा पत्नी म्हणून तुला मिळेल. ती तुझे अप्रिय करील व त्याचा तुला राग आल्यावर तू शापमुक्त होऊन पुनश्च या लोकी येशील.'

त्याप्रमाणे महाभिष पृथ्वीवर शांतनू या नावाने जन्माला आला. त्याची पत्नी होण्यासाठी गंगा भूतलावर येत असता मार्गात तिची व अष्टवसूंची भेट झाली. वसिष्ठाचा काही अपराध केल्यामुळे त्याने त्यांना मृत्युलोकी जन्म घेण्याचा शाप दिला होता. ते गंगेला म्हणाले. 'आम्ही तुझ्या उदरी जन्म घेऊ. पण जन्मता क्षणी तू आम्हांला पाण्यात बुडवून टाक. कारण आम्हाला पृथ्वीवर राहण्याची इच्छा नाही.'

गंगेने त्यांचे म्हणणे मान्य केले; पण ती वसूंना म्हणाली. 'माझ्यासारखी पत्नी मिळून शांतनू राजा निपुत्रिक राहावा, ही गोष्ट मला उचित वाटत नाही. तरी तुम्हा सर्वांचा अंशभूत असा एक दीर्घायू पुत्र मी त्या राजाला द्यावा, हे तुम्ही मान्य केले पाहिजे.'

अष्टवसूंनी ते मान्य केले. त्याप्रमाणे गंगेने तिला झालेले सात पुत्र तात्काळ पाण्यात बुडवून मारून टाकले. शेवटचा आठवा देवव्रत, तोच भीष्म होय. त्या पुत्राला घेऊन गंगा शांतनूकडून निघून गेली. त्याचे पालन-पोषण करून व विद्याध्ययन पार पाडून तिने तो रूपसंपन्न कुमार परत आणून शांतनूच्या स्वाधीन केला. त्या वेळी गंगा शांतनूला त्याच्याविषयी म्हणाली– 'हा सर्व अस्त्रांचा ज्ञाता आहे; इंद्राप्रमाणे पराक्रमी आहे. देवगुरू बृहस्पती व दैत्यगुरू शुक्र यांना जे ज्ञान आहे, ते सर्व याला प्राप्त आहे. परशुरामासारखाच हा अस्त्रज्ञ आहे. मी हा मुलगा तुला देते.'

अशा प्रकारे भीष्म हस्तिनापुराच्या राजधानीत आला. शांतनूने त्याला यौवराज्याचा अभिषेकही केला. खरे तर त्याला हस्तिनापुराचे सिंहासन मिळायचे; पण एक विचित्र घटना घडली आणि तिच्यामुळे भीष्माला स्वमुखाने राज्यत्याग करावा लागला, ती अशी–

शांतनू भीष्माला युवराज करून निश्चित झाला होता. एके दिवशी तो यमुनेवर गेला असता त्याला तिथे सत्यवती नावाची एक धीवरकन्या दिसली. तिचे रूपलावण्य व तिच्या अंगाचा सुगंध यांनी शांतनूच्या मनाला भुरळ घातली. त्याने तिचा पिता दाशराज याच्या जवळ त्या कन्येला मागणी घातली. त्यावर धीवर दाशराज म्हणाला. 'एक अट आहे. हिला जो मुलगा होईल, तो जर तुझ्यानंतर कुरू राज्याचा वारस ठरणार असेल, तर मी माझी मुलगी तुला देईन.'

शांतनूला ही अट मान्य करावी, असे वाटले नाही. तो तसाच राजधानीत आला. मात्र सत्यवती त्याच्या मनातून काही केल्या जाईना. त्यामुळे तो अहर्निश चिंताक्रांत दिसू लागला. देवव्रताने पित्याचे ते दुःख जाणून घेतले व तो त्याचे ईप्सित साध्य करण्यासाठी सामंत मंडळींना बरोबर घेऊन दाशराजाकडे गेला. त्याने दाशराजाला पित्याचे मनोरथ पूर्ण करण्याबद्दल गळ घातली. दाशराजाने पुनश्च तीच अट सांगितली. त्यावर देवव्रत प्रतिज्ञावचन बोलला. 'हे दाशराजा, तुझ्या मुलीला जो पुत्र होईल, तोच हस्तिनापुराचा राजा होईल! मी माझा राज्यावरचा अधिकार सोडला.'

पण दाशराज मोठा दूरदर्शी होता. तो म्हणाला. 'माझ्या मुलीच्या पुत्राला तुझ्यापासून भय नाही, हे समजले; पण तुझ्या मुलांचा काय विश्वास सांगावा? त्यांनी माझ्या नातवाला राज्यभ्रष्ट केले तर?' त्यावर देवव्रताने दुसरी प्रतिज्ञा उच्चारली. 'मी राज्यत्याग तर केलाच आहे; पण आजपासून मी आमरण ब्रह्मचर्य पाळीन!'

देवव्रताची ही प्रतिज्ञा ऐकून देव आणि ऋषीही आश्चर्याने थक्क झाले. त्यांनी त्याच्यावर पुष्पवृष्टी करून त्याची प्रशंसा केली. ते एकमुखाने म्हणाले. 'हा भीष्म (भयंकर) आहे!'

त्या दिवसापासून देवव्रताचे भीष्म हे नाव रूढ झाले.

मग दाशराजाने सत्यवतीला भीष्माच्या स्वाधीन केले. तो तिला राजधानीला घेऊन आला व त्याने ती कन्या शांतनूला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्पण केली. मुलाच्या या पितृभक्तीचे शांतनूला फार कौतुक वाटले आणि त्याने भीष्माला वर दिला, की 'तू इच्छामरणी होशील.'

भीष्माच्या या घनघोर प्रतिज्ञेवर भाष्य करताना श्री. बाळशास्त्री हरदास म्हणतात–

राजर्षी भीष्मांनी ही जी प्रतिज्ञा केली ती ज्या धर्मशास्त्राच्या व जीवनमूल्यांच्या महानिधीचे ते प्रतिनिधी होते, त्याच्या दृष्टीने अत्यंत श्रेष्ठ होती. भारतीय संस्कृतीत पितृगौरव ही अत्यंत श्रेष्ठ गोष्ट असून, तिच्यासाठी हवा तो त्याग केलेल्या अनेक महापुरुषांची उदाहरणे येथे आढळून येतील. भगवान श्रीरामचंद्रांनी पित्यासाठी राज्यलक्ष्मीचा त्याग केला व देवव्रत भीष्मांनी राज्य व गृहस्थाश्रम पित्यासाठीच त्यागिला. पित्याच्या आनंदाप्रीत्यर्थ महानुभाव भीष्मांनी राज्याचा परित्याग करण्यात व संसाराचाही परित्याग करण्यात भारतीय आर्यांची त्यागाची महनीय परंपराच चालविली. पण त्यांनी राज्यावरचा अधिकार सोडून पूर्ण स्वातंत्र्य न पत्करता 'स नो राजा भविष्यति' = तो आमचा राजा होईल, असे म्हणण्यात स्वतःला सिंहासनाच्या अधिकाराच्या मर्यादेत गोवून घेतले. अर्थात राजनिष्ठ प्रजाजनांप्रमाणे ते कौरवांच्या राजसभेचे सामंत व मंत्री राहिले. राज्ययंत्रावर त्यांनी अधिकार गाजविणे नैतिक दृष्ट्या कितीही योग्य असले, तरी घटनात्मक दृष्टीने ते राज्ययंत्राचे वचनाने बांधलेले सेवक राहिले.

शांतनूला सत्यवतीच्या पोटी चित्रांगद व विचित्रवीर्य असे दोन पुत्र झाले. त्यांपैकी चित्रांगद गंधर्वाकडून मारला गेला. मग भीष्माने धाकट्या विचित्रवीर्याला राज्यावर बसवले. त्यानंतर भीष्माने विचित्रवीर्याचे लग्न करावयाचे ठरवले. त्याच सुमाराला काशिराजाच्या अंबा, अंबिका व अंबालिका या तीन मुलींचे स्वयंवर ठरल्याचे भीष्मांच्या कानी आले. भीष्म तिथे गेला आणि तिथे जमलेल्या क्षत्रिय राजांची दाणादाण करून त्याने तीन्ही कन्या विचित्रवीर्यासाठी पळवून आणल्या.

त्या तिघींपैकी अंबेचे लग्न शाल्व राजाशी ठरले होते. त्या दोघांनी एकमेकांना मनाने वरले होते. अंबेने ही गोष्ट भीष्माला सांगितली आणि ती ऐकून भीष्माने तिला शाल्वाकडे जाण्याची परवानगी दिली. अंबा शाल्वाकडे गेली; पण तो म्हणाला, की 'भीष्माने पळवून नेलेल्या तुझ्याशी मला लग्न कर्तव्य नाही.' तिने शाल्वाची पुष्कळ मनधरणी केली; पण ती सारी वाया गेली. शाल्वही नाही आणि विचित्रवीर्यही नाही, अशी ती अधांतरी पडली. या परिस्थितीला भीष्म कारणीभूत आहे, हे जाणून ती भीष्माचा द्वेष करू लागली. तिने त्याचा सूड घेण्याचा निश्चय केला. त्यासाठी तिने तपाचा मार्ग अनुसरला. पण ती अत्यंत सुस्वरूप असल्यामुळे ज्या आश्रमात तपाला बसली होती, तिथले ऋषी तिला तिथे राहू देईनात. एवढ्यात अंबेचा आजा म्हणजे तिच्या आईचा बाप योगायोगाने तिथे आला. नातीची हकीकत ऐकून तोही भीष्मावर संतापला आणि त्याने तिला परशुरामाकडे जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे ती परशुरामाकडे गेली. त्याने तिचा सारा वृत्तांत ऐकला. तो तिला घेऊन हस्तिनापुराजवळ सरस्वतीच्या तीरी आला आणि त्याने भीष्माला तेथे बोलावून घेतले. तो भीष्माला म्हणाला. 'या अंबेशी आता तूच लग्न कर. माझी तुला तशी आज्ञा आहे.' पण भीष्माने ती आज्ञा पाळण्याचे साफ नाकारले. तो म्हणाला. 'अंबा स्वखुषीने शाल्वाकडे गेली होती. त्याने तिचा स्वीकार केला नसल्यास मी त्या गोष्टीला जबाबदार नाही. जी मनाने दुसऱ्याची पत्नी झाली, तिचे मी माझ्या भावाशी लग्न लावणार नाही आणि मी आजन्म ब्रह्मचर्याची शपथ घेतली असल्यामुळे मीही तिला वरणार नाही.'

ते ऐकून परशुराम संतापला. त्याने भीष्माला युद्धाचे आव्हान दिले. दोघेही द्वंद्वयुद्धाला प्रवृत्त झाले. तेवीस दिवस घनघोर द्वंद्वयुद्ध झाले. अखेर नारद, देव, गंगा, इ. मंडळींनी तिथे येऊन त्या दोघांना युद्धापासून परावृत्त केले. मग परशुरामाचाही राग मावळला. तो भीष्माच्या शस्त्रास्त्रविद्येचे कौतुक करून आणि त्याला आशीर्वाद देऊन तिथून निघून गेला.

विचित्रवीर्याला अंबिका व अंबालिका या दोन बायका मिळाल्या आणि तो पुरता विषयासक्त बनला. त्यामुळे थोड्याच दिवसांत त्याला क्षयरोग जडला आणि एके दिवशी पुत्रहीन अवस्थेत तो मरण पावला. त्यामुळे राजकुलाचा निर्वंश झाला. सिंहासनाला कोणीही अधिकारी उरला नाही. सत्यवतीला या गोष्टीचे दुःख झाले. ती भीष्माकडे येऊन त्याला म्हणाली. 'आता तू लग्न करून कुरुवंशाची वृद्धी कर.' पण भीष्माने तसे करण्याचे नाकारले. तो आपल्या प्रतिज्ञेवर अढळ राहिला. सत्यवतीचा निरुपाय झाला. मग त्या दोघांनी विचारविनिमय करून नियोगपद्धतीने कुरुवंशात पुत्र उत्पन्न करण्याचे ठरविले. सत्यवतीच्या आज्ञेने व्यासांनी ते कार्य केले. विचित्रवीर्याच्या भार्यांना धृतराष्ट्र व पांडू असे दोन पुत्र झाले. एका दासीच्या पोटी विदुर झाला. भीष्माने त्या तीन्ही मुलांचा योग्य प्रतिपाळ करून तिघांनाही विद्यासंपन्न केले. धृतराष्ट्र आंधळा होता आणि विदुर दासीपुत्र होता. त्यांमुळे ते दोघेही राज्याला अपात्र होते. म्हणून भीष्माने पांडूला राज्यावर बसवले.

पांडूच्या मृत्यूनंतर राज्य धृतराष्ट्राच्या हाती आले. भीष्माने कुरू राष्ट्राच्या सिंहासनाची सेवा पत्करली होती, म्हणून तो त्या दरबारात मंत्री, सल्लागार, न्यायाधीश, सेनापती, अशा अनेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नात्यांनी काम करीत राहिला. कौरव हे पांडवांवर अन्याय करीत आहेत, हे त्याला कळत होते. तो अन्याय दूर करण्यासाठी त्याने अनेक प्रयत्न केले. अनेकदा त्याने धृतराष्ट्र, दुर्योधन, कर्ण, इत्यादींची निर्भीडपणे कानउघाडणीही केली; पण तिचा काहीही उपयोग झाला नाही. उलट कौरवांनी भीष्मावर फितुरीचा आरोप केला. कौरवांशी इमान राखून पांडवांचे जितके हित करता आले, तितके त्याने केले. अर्थात ही तारेवरची कसरत होती. कौरव आणि पांडव दोघेही त्याचे नातू होते. त्यांनी प्रेमाने एकत्र राहून राज्य करावे, अशी त्याची इच्छा होती; पण कौरवांनी त्याच्या त्या इच्छेला कधीच मान दिला नाही. अखेरीस कौरव-पांडवांमध्ये युद्धाचा प्रसंग येऊन ठेपला.

त्या युद्धात भीष्म हा पहिला सेनापती झाला. भीष्माने सेनापत्य स्वीकारून दहा दिवस घनघोर यद्ध केले. पांडवांच्या सैन्याचा धुव्वा उडू लागला. अर्जुनाचाही त्यामुळे धीर गळाला. श्रीकृष्णाला हे सहन झाले नाही. 'न धरी शस्त्र करी मी' ही श्रीकृष्णाची प्रतिज्ञा होती; पण श्रीकृष्ण ती विसरून भीष्मावर रथचक्र घेऊन धावला. भीष्माला त्याचे नवल वाटले. श्रीकृष्णाचे स्वागत करून तो म्हणाला. 'श्रीकृष्णा, ये. या युद्धात तुझ्या हातून माझा वध होऊ दे. मला मारण्यासाठी तुला धावून यावे लागले, हा मी माझा सन्मान समजतो!' एवढ्यात अर्जुन कृष्णाच्या मागे धावत गेला आणि त्याने कृष्णाला त्याच्या प्रतिज्ञेची आठवण करून देऊन मागे फिरविले.

भीष्म युद्धात आवरत नाही, असे पाहिल्यावर कृष्णाने त्याच्या सत्यवचनीपणाचा फायदा घ्यायचे ठरविले. त्याने भीष्माला त्याच्या वधाचा उपाय विचारला. आयुष्यभर दुसऱ्यासाठी कष्टत राहिलेला भीष्म अन्यायाचा आणि असत्याचा जोर वाढलेला पाहून, आपल्या जिवाला कंटाळला होता. आपण कौरवपक्षाला असलो, तरी आपल्या हातून पांडवांचा वध होऊ नये, असेही त्याला वाटत होते. त्यामुळे त्याने स्वतःच्या वधाचा उपाय कृष्णाला निःशंकपणे सांगितला. भीष्म म्हणाला. 'या रणभूमीवर शिखंडी नावाचा द्रुपदाचा पुत्र आहे. तो आधी स्त्री होता; नंतर पुरुष झाला आहे. मी त्याला अमंगलध्वज मानतो. अर्जुनाने त्याला पुढे करून माझ्यावर बाण सोडावे. मी प्रतिकार करणार नाही. अर्जुनाच्या बाणांनी माझा वध झाल्यावर पांडवांचा विजय निश्चित होईल.' मग अर्जुनाने तसे केले. त्याच्या बाणांनी भीष्म घायाळ होऊन रथातून खाली पडला. त्याच्या शरीरात अर्जुनाचे असंख्य बाण घुसले होते. ते बाण जमिनीला टेकले. आणि भीष्म त्या शरशय्येवर पडला. त्या वेळी दक्षिणायन चालू होते. तो काल मरणाला अशुभ असल्यामुळे भीष्माने उत्तरायण सुरू होईपर्यंत प्राण धारण करण्याचे ठरविले. त्या शरशय्येवर भीष्माचे मस्तक खाली लोंबकळत होते. त्याला आधार देण्यासाठी भीष्माने उशी मागितली आणि अर्जुनाने जमिनीत तीन बाण खोचून त्या बाणांचीच त्याला उशी करून दिली. भीष्माच्या अंगातील बाण काढून त्या जखमांवर औषधोपचार करण्यासाठी दुर्योधनाने अनेक वैद्य बोलावून आणले; पण भीष्माने अंगातले बाण काढून घेण्याचे नाकारले. तो म्हणाला. 'माझा मृत्यू झाल्यावर या बाणांसहित माझे दहन करा.

ते महायद्ध समाप्त झाल्यावर युधिष्ठिराला राज्य मिळाले; पण आपल्या हातून गोत्रहत्येचे पातक घडले, या भावनेने युधिष्ठिर उदास बनला. त्याला राज्यकारभारात रसच वाटेना. ही त्याची अवस्था नष्ट व्हावी आणि तो कर्तव्याला सन्मुख व्हावा, या उद्देशाने श्रीकृष्णाने युधिष्ठिराला भीष्माकडे नेले. भीष्माने त्या शरशय्येवरूनच शुद्ध ज्ञाननिष्ठ भूमिकेवरून त्याला कर्तव्याचा उपदेश केला; त्याला राजधर्म, आपद्धर्म, मोक्षधर्म, इ. धर्म समजावून सांगितले; त्याचे शोकमोह दूर केले. या त्याच्या उपदेशाविषयी श्री. बाळशास्त्री हरदास म्हणतात–

हिंदुधर्म व भारतीय संस्कृती अथवा जीवनाचे वैदिक तत्त्वज्ञान काय आहे, असे जर कोणी विचारले, तर भीष्मांच्या या उपदेशाकडे बोट दाखविता येईल. महाभारत ग्रंथाला कार्ष्ण्य वेद ही संज्ञा केवळ शांतिपर्व व अनुशासनपर्व या दोन पर्वांतील भीष्मांच्या उपदेशामुळेच प्राप्त झाली आहे. स्वतःच्या महान वाणीला वेदांचे महत्त्व प्राप्त करून द्यावयास ज्या महापुरुषाच्या वाणीचा कृष्णद्वैपायनांनी आश्रय केला, त्याचे मी पामराने काय वर्णन करावे! भीष्म संपले की ज्ञानसूर्य अस्तंगत झाला, हे भगवान् श्रीकृष्णांनी जे म्हटले, तेच खरे.

त्यानंतर काही दिवसांनी म्हणजे, भीष्म शरशय्येवर पडल्यापासून ५८ दिवस झाले तेव्हा, श्रीकृष्ण, पांडव, व्यास, नारद वगैरे मंडळी पुन्हा कुरुक्षेत्री भीष्माभोवती जमा झाली. त्या वेळी भीष्माने पांडवांना आणि तिथे जमलेल्या सर्वांना उपदेश केला, तो असा–

सत्येषु यतितव्यं वः सत्यं हि परमं बलम् ।
आनृशंस्यपरैर्भाव्यं सदैव नियतात्मभिः ।
ब्रह्मण्यधर्मशीलैश्च तपोनित्यैश्च भारताः ।

(म. भा. अनु. १६७.४९–५०)

अर्थ–हे भरतकुलोत्पन्नहो, तुम्ही नेहमी सत्यधर्माने वागा. सत्य हेच परम बल होय. तुमच्या अंतःकरणात कोमलता असू द्या. इंद्रिये सदैव स्वाधीन ठेवा. पवित्राचरणी व धर्मशील राहून आपले कर्तव्य करण्यात सदैव जागृत असा.

मग युधिष्ठिराला उद्देशून तो म्हणाला. 'तू विचक्षण व शहाण्या लोकांचा नेहमी सन्मान कर.' अखेरीस श्रीकृष्णाकडे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वळून तो बोलला. ' तू पांडवांची गती आहेस. तूच त्यांचे संरक्षण कर. मी आता तुझी अनुज्ञा घेऊन हा देह सोडतो. तू अनुज्ञा दिलीस, की मी परमगतीला जाईन. ' भीष्माची ही निरवानिरव ऐकून भगवान श्रीकृष्णही गहिवरला. तो भीष्माला म्हणाला–

अनुजानामि भीष्म त्वां वसून्प्राप्नुहि पार्थिव ।
न तेऽस्ति वृजिनं किञ्चिदिह लोके महाद्युते ।।
पितृभक्तोऽसि राजर्षे मार्कण्डेय इवापरः ।
तेन मृत्युस्तव वशे स्थितो भृत्य इवानतः ।।
(म. भा. अनु. १६७·४६–४७)

अर्थ – हे राजर्षे, मी तुला अनुज्ञा देतो. तू आपल्या वसुस्वरूपात विलीन हो. हे तेजोभास्करा, तुझ्या चारित्र्यात व जीवनात अणुमात्रही कलंक नाही. मार्कंडेयाप्रमाणे तू अत्यंत पितृभक्त आहेस. त्यामुळे एखाद्या दासाप्रमाणे मृत्यू तुझ्या अधीन आहे.

श्रीकृष्णाने अशी अनुज्ञा दिल्यावर भीष्माचा प्राण ब्रह्मरंध्राचा भेद करून ऊर्ध्व गतीने दिव्य लोकाला गेला.

भीष्म हा क्षात्रधर्माचा मूर्तिमंत आविष्कार होता. एकदा ध्येय ठरवल्यावर त्याच्याशी किती कठोर निष्ठेने राहिले पाहिजे, हे भीष्माने आपल्या चारित्र्याने दाखवून दिले आहे. दुसरे म्हणजे तो सत्यनिष्ठ होता, तसाच शास्त्रनिष्ठही होता. शास्त्राच्या विरुद्ध तो कोणत्याही प्रसंगी वागला नाही. [म. भा. व्या.; प्रा. च. को.]

भीष्मक–मणी एक मौल्यवान मणी. या मण्याचा रंग पांढरा सफेत असतो. हा मणी सोन्याच्या कोंदणात जडवून, गळ्यात अगर अंगठीत वसवून उपयोगात आणतात. हिमालयाच्या उत्तर प्रदेशात या मण्याची उत्पत्ती होते. हा मणी परिधान केल्याने हिंस्र पशू, कृमी, कीटक, यांपासून बाधा होत नाही व अमंगल घडत नाही, अशी समजूत आहे.

भीष्मपंचकव्रत एक काम्य व्रत. कार्तिक शुद्ध एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत पाच दिवस हे व्रत करतात. विष्णू ही या व्रताची प्रधान देवता असून, भीष्म ही गौण देवता आहे. व्रतविधी असा– घराच्या अंगणात अथवा नदीवर चार दरवाजांचा मांडव घालावा, सर्वतोभद्र मंडलाची वेदी बनवावी, तिच्यावर तिलयुक्त घटाची स्थापना करावी, पाच दिवसपर्यंत अखंड नंदादीप पाजळावे, ' ॐ नमो वासुदेवाय ' या मंत्राचा एकशे आठ वेळा जप करावा आणि नंतर होम करताना तीळ, तांदूळ व यव यांच्या एकशे आठ वेळा आहुती द्याव्या. आहुती देताना " ॐ नमो विष्णवे स्वाहा " हा षडक्षरी मंत्र म्हणावा. याप्रमाणे पाच दिवस करावे. उद्यापनाच्या दिवशी ब्राह्मणभोजन घालून यथाशक्ति दाने द्यावी. फल - पापनाश व विष्णुपदप्राप्ती.

या व्रताची कथा अशी– भारतीय युद्धानंतर भीष्म शरपंजरी पहुडले असता भगवान श्रीकृष्ण पाचही पांडवांसहित तिथे गेला. श्रीकृष्णाने धर्मराजाला उपदेश करण्याबद्दल भीष्माचार्यांना प्रार्थना केली. भीष्मांनी पाच दिवसपर्यंत राजधर्म, वर्णधर्म, मोक्षधर्म, इ. धर्मांचा धर्मराजाला उपदेश केला. त्यावर भगवान श्रीकृष्ण प्रसन्न झाला आणि भीष्माचार्यांना म्हणाला. ' तुमच्या स्मृतीसाठी आजपासून हे पाच दिवस मी भीष्मपंचकव्रत म्हणून प्रसिद्धीला आणीन. ' [हि. ध.; व्रतराज; हिं. व्र. प. त्यौ.]

भीष्मपूजा उ. भारतातील एक व्रत. हे व्रत कार्तिक महिन्यात पाच दिवस करतात. भीष्माने प्रसन्न होऊन भुतांखेतांपासून आपले संरक्षण करावे, हा या व्रताचा हेतू असतो. या व्रताचे स्वरूप असे –

स्त्रिया घरी दिवे तयार करून ते ब्राह्मणाकडे पाठवतात. हे दिवे ब्राह्मण स्त्रीने उत्सव संपेपर्यंत अखंड तेवत ठेवायचे असतात. दिवे पाठवणाऱ्या बायका रोज सायंकाळी त्या दिव्यांचे दर्शन घ्यायला जातात. या व्रतात स्त्रिया सूर्योदयापूर्वी स्नान करून एकभुक्त राहतात. पाचव्या दिवशी रात्री दीपाराधना करतात. काही स्त्रिया सायंकाळी नदीच्या प्रवाहातही दिवे सोडतात. या व्रताची कथा अशी–

एक राजा होता. त्याला बऱ्याच बायका होत्या. पण त्यांपैकी एकीलाही मूल होईना. एके दिवशी राजाने सर्व राण्यांना बजावले, की ' तुम्हांपैकी एकीला तरी मूल व्हायलाच हवे; ते न झाले तर मी तुम्हां सर्वांचा शिरच्छेद करीन. ' एका राणीजवळ एक मांजर होते. त्यालाच तिने पोटाशी धरले आणि आपल्याला मुलगी झाल्याचे वर्तमान राजाला कळविले. मात्र राजाने बारा वर्षेपर्यंत त्या मुलीला पाहता कामा नये, अशी अट घातली. बारा वर्षांनंतर राजा मुलीच्या लग्नाचा विचार करू लागला. राणी घाबरून गेली. एवढ्यात भीष्मपूजेचे दिवस आले. राणीने दिवा लावला. पण तो अखंड जळत राहतो की नाही याकडे मात्र तिचे लक्ष नव्हते. दिवा विझत आला की, ते मांजर दिव्याची वात पुढे सारी. यामुळे भीष्म त्या मांजरावर प्रसन्न झाला आणि त्याने तिचे एका सुंदर मुलीत रूपांतर केले. शेपूट मात्र कायम राहिले. लग्न झाल्यानंतर मुलीने पुन्हा भीष्माची प्रार्थना केली आणि नंतर तिचे शेपूटही गळून पडले.

माघ शुद्ध अष्टमी या दिवशी भीष्माचार्यांचा मृत्यू झाला, असे मानले जाते. गुजरातमध्ये त्या दिवशी लोक एका कागदावर भीष्माची प्रतिमा काढून तिची पूजा करतात. त्या वेळी केलेल्या अभिषेकाचे तीर्थ गरोदर स्त्रीला प्यायला दिले, तर तिची प्रसूती सुलभ होते, अशी त्यांची समजूत आहे. त्याच्या नावाने दंडात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होरा बांधल्यास शक्ती व बुद्धी प्राप्त होते, असेही समजतात. [नि. सिं.; फो. को. गु.; फो. लो. नॉ. इं.]

भीष्मशरशय्या उ. भारतातील एक प्राचीन तीर्थ. याला नरकांतरी असेही म्हणतात. कुरुक्षेत्राच्या परिसरात पेहवाकडे जाणाऱ्या मार्गावर उत्तरेकडे हे तीर्थ आहे. भारतीय युद्धानंतर भीष्म जिथे शरपंजरी पहुडले होते, ते हेच स्थान होय, अशी लोकांची समजूत आहे. या शरशय्येवरूनच भीष्मांनी युधिष्ठिराला विविध धर्मांचा उपदेश केला. हे सरोवर कुंडाप्रमाणे चारही बाजूंनी पक्के बांधलेले असून, यात्रेकरू त्यात स्नान करतात. [कल्याण–तीर्थांक]

भीष्माचार्य (इ. स. च्या १३ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक महानुभावी ग्रंथकार. महानुभाव संप्रदायात भीष्माचार्य नावाचे चार–पाच कवी आणि ग्रंथकार होऊन गेले. त्यांत प्रस्तुतचा भीष्माचार्य प्रमुख होय. हा वोपदेवाचा शिष्य असून, याने उपाध्य आम्नायातील हेतुस्थळकर्ता न्यायव्यास याच्याकडून दीक्षा घेतली होती.

संस्कृत आणि मराठी मिळून याने एकूण तीस-बत्तीस ग्रंथ लिहिले. दिनकरप्रबंध, दत्तात्रेयप्रबंध व धाराविबभाष्य हे त्यांतील प्रमुख होत. धनंजयकोश, अंताक्षरी व गीतगोविंद यांच्यावर याच्या टीका आहेत. याचा पंचवार्तिक हा ग्रंथ भाषाशास्त्रविषयक व नामविभक्ती हा ग्रंथ व्याकरणविषयक आहे. [सु. वि. को.; म. सा.; म. म. वा.; म. वा. इ.; प्रा. म. वा. स्व.]

भीष्माष्टमी माघ शुद्ध अष्टमीला हे नाव आहे. या दिवशी भीष्माचार्यांनी आपला देहत्याग केला, अशी समजूत आहे. भीष्म हा ब्रह्मचारी असल्यामुळे त्याचे तर्पण व श्राद्ध करायला कुणी नाही, म्हणून सर्वांनीच त्याला आपला मानून त्याचे या दिवशी तर्पण व श्राद्ध करायचे असते. याच्या तर्पणाचा मंत्र असा–

वैयाघ्रपद्यगोत्राय सांकृतिप्रवराय च ।
गङ्गापुत्राय भीष्माय प्रदास्येऽहं तिलोदकम् ।
अपुत्राय ददाम्येतत्सलिलं भीष्मवर्मणे ।

ज्याचा पिता हयात आहे त्यानेही भीष्मतर्पण करावे, असे पद्मपुराणात वचन आहे. हे तर्पण केल्याने संतती प्राप्त होते आणि न केल्याने माणसांचे एका वर्षातील पुण्य नष्ट होते, असेही सांगितले आहे. चारही वर्णांना हे तर्पण विहित आहे. या तर्पणाच्या निमित्ताने भीष्मासंबंधीची कृतज्ञता व्यक्त करावी हा यातील उद्देश असावा. [हि. ध.; नि. सिं.]

भुंजी एक जात. या लोकांची वस्ती मध्य प्रदेशातील रायपूर जिल्ह्यात आढळते. गोंड व हळबा यांच्या मिश्रणाने ही जात बनली असावी, असे म्हणतात. यांच्या चौखुटी व चिंद अशा दोन शाखा आहेत. अनौरस संततीला चौखुटी असे म्हणतात.

विवाहप्रथा– हे लोक मुलगी वयात आल्यावर तिचे लग्न करतात. लग्नाला विलंब लागल्यास प्रथम बाणाशी तिचे लग्न लावतात. लग्नासाठी वरपक्ष मागणी घालतो. लग्नाआधी मुलीला मातृत्व आल्यास तिला समाजातून बहिष्कृत करतात.

देवधर्म– भुंजी लोक अनेक देवतांना भजतात. सूर्य ही त्यांची कर्जनिवारक देवता आहे. ज्या वेळी त्यांचे कर्ज फिटते, त्या वेळी ते सूर्याला नारळ देतात. हे कासवालाही पूज्य मानतात.

यांना डुकराचे मांस चालते; पण माकडाचे चालत नाही. अपरिचित माणसाला भुंजी लोक आपल्या झोपडीत प्रवेश करू देत नाहीत. त्यांच्यासाठी यांच्या वस्तीत स्वतंत्र झोपडी बांधलेली असते. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

भुइनमाळी एक जमात. या लोकांची वस्ती प्राधान्याने पूर्व बंगालमधील काही जिल्ह्यांत आढळते. हे लोक आपण वैश्य असल्याचे सांगतात आणि त्याचबरोबर मल्ल हे आमचे पूर्वज असेही म्हणतात. श्री. लालमोहन विद्यानिधींच्या मते भुइनमाळींची उत्पत्ती पुनरी पुरुष आणि नापित स्त्री यांच्यापासून झाली आहे. रिस्लेने हे मूळचे हरी आदिवासी असल्याचे ठरविले आहे.

यांच्यांतील काही लोक घरकाम करतात, तर काही शेती करतात. शेती करणारे लोक प्रामुख्याने यांच्याच बराभगिया नामक पोटजातीचे आहेत. याशिवाय वाजंत्री वाजविणे, पालखी वाहणे, गवंडीकाम करणे, इ. कामेही हे लोक करतात. चितगाव व नौआखलीमधील लोक मृत जनावरे वाहण्याचे काम करतात.

भुइनमाळींचे पौरोहित्य पतित ब्राह्मण, धोबी आणि न्हावी लोक करतात. [से. इं. १९३१]

भुइया एक जमात. बंगाल, बिहार, ओडिसा, छोटा नागपूर, आसाम, उत्तर प्रदेश, इ. बऱ्याच भागांत या लोकांची वस्ती विखुरलेली आहे. पण ओडिसातील केओंझर, बोनाई आणि पाल लहेरा या भागात हे प्रामुख्याने राहतात. भूमी या शब्दापासून भुइया शब्दाची व्युत्पत्ती सांगतात.

या लोकांत देश भुइया, मार किंवा माल भुइया, प्रजा किंवा रौताली भुइया, बायुडी भुइया, सांतारी भुइया, राजकुळी भुइया, सावंतिया, खंडाइत, पवनवंश, हाके, डाके, मुसाहर, घाटवार, इ. अनेक पोटभेद आहेत. यांपैकी देश भुइया हे इतरां-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पेक्षा प्राचीन असावे. पावरी भुइया हे त्यांचे सांप्रतचे प्रतिनिधी होत. पावरी भुइया डोंगराळ भागात राहतात, तर पाइक किंवा खंडाइत हे सखल भागात राहतात. खंडाइत हे पूर्वी ओडिसा-तील संस्थानिकांच्या सैन्यात होते.

पूर्वीच्या ऋषिमुनींसारखे आपले पूर्वजही कंदमुळे व फळे यांवर राहत असत, असे भुइया सांगतात. काही लोक रिखमुन किंवा तुलसीबीर नामक पुरुष आपला पूर्वज होता, असे म्हणतात.

पावरी भुइया– हे लोक ओडिसातील केओंझर, बोनाई व पाल ल्हेरा या प्रदेशातील अत्यंत दुर्गम व जंगलांनी व्यापलेल्या डोंगराळ प्रदेशात राहतात. हे लोक मध्यम उंचीचे, सावळ्या किंवा काळ्या वर्णाचे व रुंद नाकाचे आहेत. यांचे ओठ जाड व डोक्यावरील केस काळे व दाट असतात. हे लोक चपळ व



भुइया पुरुष

काटक असून, न थांबता ते कित्येक मैल चालू शकतात. वृत्तीने ते आनंदी व खेळकर आहेत. परकी माणसाला मात्र ते बुजतात.

पावरी भुइया पुरुष सर्वसाधारणपणे आळशी असतात. त्यांच्या स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त काम करतात. डोक्यावर लाकडाच्या मोळ्या, गवताचे भारे किंवा मोहरी वगैरे वस्तूंच्या पाट्या घेऊन त्या रोज कित्येक मैल दूर असलेल्या बाजारात जातात व तिथे या वस्तू विकून त्यांच्या बदली मीठ, धान्य वगैरे वस्तू घेतात.

पावरी भुइयांच्या प्रत्येक गावात बारा ते चाळीस घरे अस-तात आणि प्रत्येक घर म्हणजे एकापासून चारापर्यंत झोपड्यांचा समूह असतो. यांच्या झोपड्या चौकोनी असून, दोन्ही बाजूंनी उतरत्या छपराच्या असतात. गावाच्या मध्यभागी एक प्रशस्त झोपडी असते. तिला मंडघर किंवा दरबारघर म्हणतात. गावा-तील अविवाहित तरुण–तरुणींचे ते सामुदायिक शयनगृह असते. अंगणाच्या एका बाजूला साडेतीन ते साडेचार फूट उंचीचा एक शुभ खुंट किंवा गाइश्री खुंट नामक एक खांब पुरलेला असतो. ग्रामदेवतेचा तो प्रतिनिधी असतो. नवे गाव वसवताना हा खांब प्रथम समारंभपूर्वक रोवतात. काही कारणाने हा खांब उन्म-ळून पडला, तर लोक आगामी संकटाच्या भीतीने गाव सोडून जातात. काही गावांत या खांबाला छत्रुखुंट असे म्हणतात. धार्मिक सणांच्या वेळी त्याच्यावर वीस ते तीस फूट उंचीचा एक बांबू बांधतात. त्याला ठाकुराणी–छत्र असे म्हणतात. ग्राम-देवतेच्या नैमित्तिक पूजेच्या वेळी तो खांब मिरवणुकीने तिच्या मंदिरात नेतात. मंडघराच्या जवळच ठाकुराणी देवतेची झोपडी असते. मंडघराला लागूनच ग्रामप्रमुख नाईक व पुरोहित दिहुरी यांची घरे असतात. इतरांची घरे त्यांच्या भोवती असतात. ते डोंगर उतारावर शेती करतात.

पावरींच्या घरात गाडगीमडकी, बांबूच्या चटया व टोपल्या, पाणी साठवण्यासाठी कोरलेले भोपळे, मासे पकडण्यासाठी बांबूचे सापळे, द्रोणपत्रावळी, इ. वस्तू आढळतात. दिहुरीचे घर म्हणजे चार झोपड्या असतात. त्यांपैकी मुख्य झोपडीचे दोन भाग केलेले असतात. एका भागात ते पितरांची उपासना करतात. पर-क्याला या भागात प्रवेश करता येत नाही. दुसऱ्या झोपडीला मेळाघर असे नाव असून, तिच्यात सरकारी अधिकारी गावात आले असता त्यांच्या जेवणाखाण्याची सोय करण्यासाठी धान्य व भांडीकुंडी ठेवलेली असतात. दुसऱ्या दोन झोपड्यांपैकी एकीत गोठा व दुसरीत कोंबडीचे खुराडे आणि तांदूळ सडण्या-साठी उखळ व मुसळ असते. अनेक गावात मंडघरातच पाहुण्या-साठी लागणारे धान्य वगैरे साठवलेले असते.

वेषभूषा – पावरी भुइया पुरुष घरात असताना कमरेभोवती एक लहानसे फडके गुंडाळतो. पण बाहेर जाताना तो लुंगी गुंडाळतो व वर उपरण्यासारखे दुसरे वस्त्र घेतो. स्त्रिया बारा हात लांबीचे लुगडे नेसतात. त्या प्रदेशात सापडणाऱ्या पिवळट मातीने स्त्री-पुरुष आपले कपडे रंगवतात. स्त्रिया व मुली हातात जाड पितळी गोठ, बांगड्या व अंगठ्या; पायांत जाड वाळे, कानात लोंबणारी कर्णफुले आणि गळ्यात मण्यांच्या माळा घालतात. तरुण मुलेही गळ्यात मण्यांच्या माळा घालतात.

उद्योगधंदे – हे लोक दाही व कोमान या पद्धतीने शेती कर-तात. दाही पद्धतीत डोंगरउतारावरची झाडे कापून ओंडके त्यांचे ढीग रचतात आणि ते वाळल्यावर जाळतात. नंतर जमीन नांगरून तिच्यात भात पेरतात. कोमान पद्धतीत डोंगरउतारा-वरील थोडी जमीन निवडून त्यांतील झुडपे व गवत गोळा करून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकेका वृक्षाच्या मुळाशी ठेवतात व त्याला आग लावतात. त्यामुळे वृक्षाच्या फांद्या व पाने जळून जाऊन फक्त खोड तेवढे शिल्लक राहते. मग ती राख सर्व जमिनीवर पसरतात आणि त्यात भात, मका, कांगू, इ. धान्ये पेरतात आणि झाडांच्या खोडांवर घेवडा, दुध्या वगैरे वेली सोडतात. पीक आल्यानंतर ते रानटी पशूंपासून व पक्ष्यांपासून राखण्यासाठी यांना फार मेहनत घ्यावी लागते.

गावातील दिहुरी व नाईक यांच्या जागा वंशपरंपरा असतात. सार्वजनिक पूजांच्या खर्चासाठी दिहुरीला काही जमीन दिलेली असते. गावाच्या पंचायतीचेही तेच मुख्य असतात. गावातील तंटेबखेडे सोडवण्याचे काम पंचायत करते. निरनिराळ्या गुन्ह्यांतील गुन्हेगार शोधून काढण्यासाठी ते शपथा घ्यायला किंवा दिव्ये करायला लावतात.

सामाजिक व राजकीय व्यवहारासाठी तीन ते बारा-पंधरा गावांचा एक गट केलेला असतो, त्याला बार असे म्हणतात. प्रत्येक बाराचा एक भांडारी किंवा न्हावी, जातीत नव्याने घेतलेल्या माणसाला किंवा गुन्हेगाराला शेणपाणी शिंपडून शुद्ध करून घेणारा बेहारा व एक धोबी असे तीन नोकर असतात. जातीत घेतलेल्या माणसाचे व आशौचानंतर एखाद्या कुटुंबाचे कपडे धुण्याचे काम धोब्याकडे असते. एखाद्याला जातीत घेणे व वारस नसलेल्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीची वाटणी करणे, ही कामे बारपंचायत करते.

विवाहप्रथा — एका गावातील माणसे ही एकाच कुटुंबातील समजली जातात. त्यामुळे लग्नसंबंध दुसऱ्या गावातील माणसांशी करतात. आते-मामे भावंडांत लग्न होते. यांच्यांत घरीपारा, झिका, फुलखोसी आणि मांगीबिभा असे चार विवाहप्रकार प्रचलित आहेत. ते असे —

घरीपारा — एका गावातील तरुण मुले संध्याकाळी नृत्यासाठी दुसऱ्या एखाद्या गावी जातात. तिथे गेल्यावर ते नृत्यांगणात जमतात आणि आपले पडघम वाजवतात. मग गावातील तरुणी तिथे येतात आणि रात्री उशिरापर्यंत त्यांचे नृत्य चालते. या नृत्याच्या वेळी गावातील कोणत्याही तरुण व प्रौढ पुरुषान तिथे हजर राहता कामा नये, असा नियम आहे. त्या नृत्याच्या वेळी काही तरुण-तरुणी एकमेकांवर अनुरक्त होतात. आपल्या प्रेमाची खूण म्हणून मुलगी आपल्या प्रियकराला मक्याचे कणीस देते आणि मुलगा तिला आपल्या गळ्यातील मण्यांची माळ देतो. तिने ती घेतल्यावर त्या दोघांचे लग्न ठरले, असे समजले जाते व दुसऱ्या कोणत्याही मुलाला तिच्यावर प्रेम करता येत नाही. चार-पाच दिवस त्या गावात राहून झाल्यावर निघाच्या दिवशी मुली त्यांना कोंबडीचे व मटणाचे जेवण वाढतात आणि गावाच्या वेशीपर्यंत पोचवायला जातात. तिथे ते तासभर थांबतात आणि आळीपाळीने प्रेमगीते गातात. मग एकमेकांना अभिवादन करून ते परततात. मग काही दिवसांनी मुली त्या तरुणांच्या गावात नृत्यासाठी जातात. त्या वेळी त्या गावातील मुली बाहेर दिसत नाहीत. नंतर पुन्हा एकदा पूर्वीचे तरुण त्या मुलींच्या गावात जातात. त्या वेळी पूर्वी लग्न ठरवलेला तरुण आपल्या प्रेयसीला घेऊन आपल्या गावी पळून जातो. मग त्याच्या घरी नातेवाईकांना बोलावतात व त्यांना नवीन मडक्यात केलेली खीर व इतर जेवण देतात. एवढे झाले, की ती दोघे पति-पत्नी होतात. या लग्नाच्या वेळी लगेच देज द्यावे लागत नाही. पहिले मूल जन्मल्यावर किंवा लग्नापासून बारा वर्षांच्या आत तीन बैल, अडीच मण साळी आणि दोन वस्त्रे एवढे देज वरपिता वधूपित्याला देतो.

झिका किंवा घिचा — संमिश्र नृत्याच्या वेळी एखाद्या तरुणाला एखादी मुलगी आवडली, तर तो तसे आपल्या आईवडिलांना सांगतो. त्यांना जर ठरलेले देज लग्नाच्या वेळी देता येणे शक्य नसेल, पण एका वर्षात ते देण्याची त्यांची तयारी असेल, तर ते कोणाला तरी मुलीला मागणी घालायला पाठवतात. मुलीचे आईबाप मागणीला बहुधा होकार देऊन सांगतात, की तिला पकडा आणि घेऊन जा. मग एक दिवस मुलगा आपल्या मित्रांसह वधूच्या गावाच्या सीमेवरील जंगलात जातो व तिच्या घरी आपण आल्याचा निरोप पाठवतो. मग तिचे आईबाप तिला इतर मुलींबरोबर लाकडे किंवा गवत आणायच्या मिषाने रानात पाठवतात. तिथे मुलगा वधूला पकडतो व घेऊन घरी येतो. मग रानात मुलाचे मित्र व मुलीच्या मैत्रिणी यांच्यांत लुटुपुटीची मारामारी होते. मुली नंतर वधूच्या घरी जाऊन सांगतात, की तिला वाघाने पळवली. वधूचे नातेवाईक मग तिला शोधण्यासाठी रानात जातात. ती सापडत नाही, म्हणून मग मुलाच्या गावी जातात आणि तिथे मुलाच्या घरच्या लोकांशी खोटेखोटे भांडण करतात. मुलाकडचे लोक त्यांची क्षमा मागतात व त्यांना जेवण देतात.

मुलगा मुलीला घेऊन घरी आल्यावर त्यांच्या कपाळी तेलहळद लावतात. जमलेल्या लोकांना जेवण देतात. यानंतर वधू-वर जुवावर उभे राहतात आणि स्त्रिया त्यांच्या डोक्यावर हळदीचे पाणी ओततात. मग त्यांच्या अंगाला वाहत्या झऱ्यातून आणलेली माती लावतात. एवढ्याने विवाहविधी पुरा होतो. एका वर्षाने वधूच्या आई-वडिलांना बोलावून देज देतात.

फुलखोसी — काही वेळा एखाद्या मुलाला एखादी मुलगी पसंत पडते. पण ती त्याच्या प्रेमाचा स्वीकार करीत नाही. अशा वेळी मुलगा संधी साधून तिच्या केसात विशिष्ट पांढऱ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किंवा तांबड्या फुलांचा तुरा खोवतो. त्यानंतर दुसऱ्या कोण-त्याही मुलाला तिच्याशी लग्न करता येत नाही. शेवटी मुलीच्या आईबापांना या लग्नाला तयार व्हावेच लागते. हे लग्न झिका पद्धतीने होते.

मांगीबिभा – काही थोडे सधन लोकच या पद्धतीने विवाह करतात. मुलाच्या घरची माणसे मुलगी शोधतात व ती मुलाला पसंत पडल्यावर मुलाचे नातेवाईक पुरुष एक मण तांदूळ, एक बकरा व पितळेची एक अंगठी घेऊन मध्यस्थासह मुलीच्या घरी लग्नाची बोलणी करण्यासाठी जायला निघतात. वाटेत जर काही अपशकुन झाला, तर ते परत फिरतात आणि ते लग्न होत नाही. काही ठिकाणी त्यानंतर तीनदा प्रयत्न करतात व प्रत्येक वेळी अपशकुन झाला, तर त्या स्थळाचा नाद सोडतात.

वराकडील पुरुष वधूगृही पोचल्यावर तिथे त्यांचे पाय धुतात, त्यांना विड्या ओढायला देतात आणि जेवण घालतात. मग वराकडचे लोक बरोबर आणलेले तांदूळ व बकरा मुलीच्या आईबापांना देतात आणि मुलीच्या हातात अंगठी घालतात. या लग्नात एक गाय, दोन बैल, दोन बकरे, पाच वस्त्रे, एक रुपया, अडीच मण साळी व अडीच मण तांदूळ एवढे देज द्यावे लागते.

त्यानंतर एके दिवशी वराकडील स्त्री-पुरुष वधूच्या गावी जाऊन वाजतगाजत तिला घेऊन येतात. तिच्याबरोबर तिचे नातेवाईकही असतात. त्यानंतर दिहुरी हा पितर, बसुमाता व घरमदेवता यांना तांदूळ व हळद अर्पण करतो आणि वधू-वरांच्या कपाळी हळद लावून त्यांच्यावर अक्षता टाकतो.

संध्याकाळी वधू-वर काही स्त्रियांसह झऱ्यावर जाऊन पाणी घेऊन येतात. त्यानंतर वधू-वर एका जुवासमोर बसतात. बायका त्यांना त्या पाण्याने स्नान घालतात त्यांनी पीतवस्त्रे परिधान केल्यावर त्यांच्या कपाळाला हळद लावतात. लग्नातील हाच प्रमुख विधी होय. त्यानंतर जेवणावळ आणि नाचगाणे होते.

विधवेला धाकट्या दिराशी लग्न करता येते. तिने दुसऱ्या कोणाशी लग्न केल्यास मुले पहिल्या नवऱ्याच्या नातेवाईकांकडे राहतात. स्त्री नीट वागत नसल्यास पुरुषाला घटस्फोट घेता येतो.

प्रसूतिप्रथा – प्रसूती अवघड वाटल्यास, ती सुलभ व्हावी, म्हणून घरमदेवता आणि बसुमाता यांना नवस बोलतात. काही ठिकाणी अशा वेळी मातीच्या भांड्यांची झाकणे काढतात व फेकून देतात. त्यामुळे प्रसूती लवकर होते, अशी त्यांची समजूत आहे. प्रसूतीनंतर मुलाला स्नान घालतात. मुलाचे नाव आठ ते तेरा या दिवसांत ठेवतात. नाव ठेवण्याच्या दिवशी घरातली स्वयंपाकाची गाडगीमडकी टाकून देऊन नवी घेतात. मुलगा झाल्यास चार महिन्यांनी आणि मुलगी झाल्यास पाच महि-न्यांनी बाळंतिणीचे आशौच संपते.

मुलाला नाव कोणते ठेवायचे ते ठरवण्यासाठी एक विधी करतात, तो असा–

हळदीच्या पाण्याने भरलेल्या एका भांड्यात एक तांदूळ व एक तीळ टाकतात आणि मुलाच्या आजोबाचे नाव उच्चारतात. दोन्ही दाणे तरले, तर मुलाला आजोबाचे नाव ठेवतात. जर तांदूळ बुडाला, तर मग दुसरा दाणा घेऊन आजोबाच्या भावांची नावे दाणा बुडेपर्यंत घेत राहतात. ज्या नावाच्या वेळी दाणा

भुइया स्त्री

बुडेल ते नाव मुलाला ठेवतात. मुलीच्या बाबतीत आजी, बापाच्या आत्या वगैरेंची नावे क्रमाने घेतात.

मुलीला प्रथम रजोदर्शन झाले म्हणजे व पुढेही मासिक पाळीच्या वेळी सात दिवस बाजूला बसवतात. आठव्या दिवशी झऱ्यावर जाऊन ती स्नान करते.

मुले आणि मुली सात-आठ वर्षांची झाली की ती त्यांच्यासाठी असलेल्या सामुदायिक शयनगृहात झोपायला जातात.

देवधर्म – या लोकांचा भुताखेतांवर फार विश्वास आहे. जीवनातील दुःखे व संकटे या भुताखेतांच्या कोपामुळे होतात, अशी यांची समजूत आहे. म्हणून ते त्यांना बळी अर्पण करून संतुष्ट राखतात. ते अनेक देवदेवतांनाही भजतात. धरमदेवता किंवा सूर्य ही त्यांची सर्वश्रेष्ठ देवता होय. त्या खालोखाल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धरतीमाता किंवा वसुमाता हिचे स्थान आहे. प्रत्येक धार्मिक सणाच्या व उत्सवाच्या वेळी या देवतांना पांढरा बकरा, अक्षता वगैरे अर्पण करतात.

पिके निघाल्यावर माघ महिन्यात त्यांची माघजत्रा भरते. त्यावेळी वस्तीच्या बाहेर एक लहान झोपडी उभारतात व दिहुरी घर्षणाने अग्नी उत्पन्न करून ती जाळतो. सर्व घरांतील जुना अग्नी या दिवशी विझवतात व घर्षणोत्पन्न अग्नीवरून घरात नवीन अग्नी पेटवतात. दुसऱ्या दिवशी झोपडी जळून झालेल्या राखेत दिहुरी मूठभर साळी पेरतो आणि दुसरे दोघे त्यावर नांगर फिरवतात. यानंतर सर्व लोकांना झाडे तोडणे, जाळणे, नांगरणी, पेरणी वगैरे शेतीची कामे करायला परवानगी असते.

चैत्र शु. तृतीयेला गावातील सर्व पुरुष धनुष्यबाण व कुऱ्हाडी घेऊन सामुदायिकपणे शिकारीला जातात. पहिले सावज मिळाल्यावर दिहुरी त्याचे थोडे रक्त बोराम आणि गाइश्री या देवतांना अर्पण करतो.

पौषात किंवा माघात आंब्याला मोहोर आल्यावर एक दिवस दिहुरी बोराम आणि गाइश्री यांची पूजा करतो आणि त्यांना तांदूळ, गूळ, आंब्याचा मोहोर वगैरे अर्पण करतो. ही पूजा झाल्याशिवाय कोणीही आंबा किंवा हंगामातील नवीन फळ खाऊ शकत नाही. अक्षय्य तृतीयेला सर्वजण आपापल्या जमिनीत भातपेरणीचा समारंभ करतात. याशिवाय ते इतरही अनेक सण व उत्सव साजरे करतात. प्रत्येक सणाच्या वेळी नाचगाण्याला ऊत येतो.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते पुरतात. माणूस मृत झाला, की त्याच्या मस्तकाला तेलहळद लावतात आणि त्याच्यावर नवे वस्त्र घालतात. सहा फूट लांब व तीन फूट खोल खड्डा खणून त्यात प्रेत ठेवतात व मृताचा मोठा मुलगा त्या खड्ड्यात मूठभर माती लोटतो. त्यानंतर त्याच्यावर तीन लाकडाचे ओंडके ठेवतात आणि खड्डा मातीने बुजवून त्यावर काटेरी झुडपे पसरतात.

वाघाने मारलेल्या माणसाला मात्र जाळतात. कारण त्याला पुरल्यास वाघ त्याचे शव पळवून नेईल आणि पुन्हा आणखी माणसांना मारील, अशी त्यांना भीती वाटते.

सपाट प्रदेशातील भुइयांना पाच साइया, पाइक, खंडाइत, इ. नावे आहेत. हे सर्व लोक स्वतःला पवनवंशी समजतात. ते मोठे रामभक्त आहेत. काही मानववंशशास्त्रज्ञांचे असे मत आहे, की रामचंद्राला लंकेवर स्वारी करताना ज्या वानरांनी मदत केली, ते वानर म्हणजे भुइया लोकच होत. हनुमान हा पवनपुत्र होता. तेव्हा हे पवनवंशी भुइया हनुमानाचे भाईबंद होते, असे मानायला जागा आहे.

सपाटीवरच्या भुइयांत नाग, गज, कच्छण, कबूतर, इ. देवके आहेत. समान देवकांच्या कुळांत विवाह होतो. त्यांनी शाहू, फोटकर, ठाकूर, सावंत, माझी, प्रधान, इ. आडनावे घेतली आहेत. या लोकांत मुलींचे विवाह त्या वयात येण्यापूर्वी करतात. विवाह मांगीबिभा पद्धतीने होतो आणि त्यात ब्राह्मण पौरोहित्य करतो. लग्नानंतर मुलगी सासरी थोडेच दिवस राहते आणि पुन्हा माहेरी जाते. ऋतुप्राप्तीनंतर ती सासरी परत येते. त्या वेळी ब्राह्मणाला बोलावून बंधन नावाचा विधी करतात.

सपाटीवरील भुइयांचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. त्यांच्यापैकी काही लोक मोठे जमीनदारही आहेत.

एके काळी पूर्व भारतात या लोकांचे राज्य होते. पण पश्चिमेकडून त्यांच्यावर आक्रमण झाले आणि त्यांचे राज्य खलास झाले, असे ते सांगतात. [इं. स्ट. पा. प्रे., जानेवारी १९६०; दि हिल भुइयाज् ऑफ् ओरिसा– श्री. शरच्चंद्र रॉय, १९३५]

भुईकहार महाराष्ट्र प्रदेशातील एक मागसलेली जात. या जातीचे लोक सर्वत्र पसरलेले आहेत. हे लोक हलक्या प्रतीची कामे करतात. यांचा प्रमुख धंदा पालखी, डोली आणि पाण्याच्या कावडी वाहणे हा आहे. सामान वाहून नेण्याचेही काम हे लोक करतात.

कोळी लोकांशी यांचे थोडे साम्य आहे. हे मूळचे आदिवासी असावे. हे लोक उद्योगी आहेत. [इं. अँ.]

भुईहार एक जमात. या लोकांची वस्ती बिहारमधील पालामाऊ जिल्ह्यात आणि झारपूरमध्ये आहे. त्याचप्रमाणे राजस्थानातील पूर्वीच्या उदयपूर संस्थानाच्या परिसरातही यांची वस्ती आहे. बिहारमधील भुईहार स्वतःला ब्राह्मण म्हणवून घेतात. त्यांचे म्हणणे असे, की आम्ही शेतीचा व्यवसाय सुरू केल्यानंतर यज्ञयागादी कृत्यांकडे आमचे दुर्लक्ष झाले व आम्ही ब्राह्मण्यापासून च्युत झालो. पण भुईहारांची ही कैफियत वंशशास्त्रज्ञ मान्य करीत नाहीत. त्यांच्या मते हे मूळचे राजपूत असावेत. वाराणसीचे महाराज हे भुईहार होते. यावरून हे उच्चवर्णीय असावे, हे मात्र सिद्ध होते.

भुईहारांचा वर्ण काळा आहे. डोके लांबट गोल, तोंडाचा जबडा मोठा व ओठ पुढे आलेले, नाक बसके, डोळे बारीक, शरीर मोठे व हातपाय लहान अशी यांची शरीररचना असते. यांच्या स्नायूंची वाढ पुरी होत नाही. उंचीही पाच फुटांपेक्षा कमीच असते. त्वचाही रोगट वाटते. यांची राहणी अस्वच्छ व कपडेही अपुरे असतात.

पालामाऊमधील भुईहार हे जमीनदार शेतकरी आहेत. पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शेतकऱ्यांपेक्षाही हे उत्तम शेतमजूर आहेत. यांचे विचार एकंदरीत मागसलेले आहेत. स्वातंत्र्यापेक्षा एखाद्याच्या गुलामगिरीत राहणे यांना सुखाचे वाटते.

राजस्थानमधील भुईहार इतर भुईहारांशी आपला कोणताच संबंध नाही, असे सांगतात. यांच्यांत खुरिया, मुंडा व सोंजारा असे पोटभेद आहेत. या तिघांमध्येही रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. यांची नऊ देवके आहेत.

नवखात हा यांचा प्रमुख सण आहे. या सणात हे पूर्वजांची पूजा करतात. हे चंद्र-सूर्यांनाही भजतात. देवीच्या साथीत हे लोक शीतळादेवीची पूजा करतात. यांच्या बायका हातापायांवर गोंदून घेतात.

मृतकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात. पुरताना प्रेताचे डोके उत्तरेकडे करतात. खुरिया भुईहारांमध्ये पुरुषांना उताणे आणि स्त्रियांना पालथे पुरतात. जंगली श्वापदांनी प्रेतांचे खड्डे उकरू नयेत म्हणून त्या खड्ड्यांवर दगड आणि लाकडाचे ओंडके रचतात. [से इं. १९३१.; इं. स्ट. पा. प्रे., जानेवारी १९६०]

भुजंगासन

एक योगासन. घेरंड संहितेत (२·४१) याची प्रक्रिया सांगितलेली आहे, ती अशी –

अङ्गुष्ठनाभिपर्यन्तमधो भूमौ विनिन्यसेत् ।
करतलाभ्यां धरां धृत्वा ऊर्ध्वं शीर्षं फणीव हि ।

अर्थ – पालथे झोपावे. कंबरेपासून खालचा भाग पायांसह जमिनीवर सारखा टेकवावा. दोन्ही तळहात बेंबीजवळ भुईस टेकवावे व छाती नागाच्या फणीसारखी वर उचलून धरावी.

हे आसन सुरू केल्यानंतर पहिले पाच दिवस चार वेळा,

भुजंगासन

नंतर सहा ते अकरा दिवसांपर्यंत सहा वेळा, बारा ते एकवीस दिवसांपर्यंत आठ वेळा करावे, असे सांगितले आहे. हे योगासन श्रमसाध्य आहे. याच्या सतत अभ्यासाने कंठनलिका साफ होते, डोळ्यांचे तेज वाढते, जठराग्नीची वाढ होते व सर्व रोगांचा नाश होऊन कुंडलिनीही जागृत होते. [उ. यो. द.; यो. सो. पू.]

भुजिष्या

दासींचा एक प्रकार. मित्रमिश्राने हिची माहिती दिली आहे ती अशी –

भुजिष्या च स्वमित्रपुरुषान्तरोपभोगविषयः ।
स्वपरिचर्याकारिणी ।

अर्थ – भुजिष्या ही धन्याची उपभोग्य दासी असते; पण त्याचे मित्र आणि इतर काही पुरुष यांनाही ती उपभोग्य असते.

यासंबंधी मिताक्षरेत वेगळे म्हटले आहे – 'पुरुषनियतपरिग्रहा भुजिष्या ' = काही ठराविक पुरुषांनाच जी उपभोग्य असते, ती भुजिष्या होय. [हि. ध.]

भुत्ये

महाराष्ट्रातील देवीच्या उपासकांचा एक वर्ग. भृत्य या शब्दापासून भुत्या व भूपपासून भोप्या, अशी या शब्दांची व्युत्पत्ती सांगतात. देवीच्या भक्तगणांत भृत्य म्हणजे सेवक व भूप म्हणजे त्यांचे राजे होते. कालांतराने सगळे भिक्षेकरी बनले. माहूरची रेणुका, तुळजापूरची भवानी व कोल्हापूरची अंबाबाई या देवतांना ते आईजगदंबा म्हणून भजतात. हे मंगळवारी व शुक्रवारी पाच घरी जोगवा (भिक्षा) मागतात. पायात विजार, अंगात डौर (झगा), डोक्याला उंच शंकूच्या आकाराची व कवड्या गुंफलेली टोपी, गळ्यात व कमरेला कवड्यांचा पट्टा, डाव्या खांद्यावरून लोंबणारी तेलाची बुंधली, उजव्या काखेत झोळी, छातीवर देवीचा मोठा पितळी टाक, गळ्यात लोंबणारी हळद-कुंकवाची पिशवी व कवड्यांच्या माळा, एका हाती चिंध्यांचा मोठा पोत व दुसऱ्या हाती तुणतुणे असा भुत्याचा वेष असतो. सर्व कपडे तेलकट व काळे झालेले असतात. लोक त्याच्या हातातील जळत्या पोतावर तेल ओततात व थोडे त्याच्या बुधलीतही घालतात. मग भुत्या जगदंबेचे गाणे म्हणत पोताची ज्योत देवीच्या टाकाला आणि आपल्या हातांना व खांद्याला लावतो. लोक त्याला पैसा, धान्य, जुना कपडा वगैरे देतात. मग तो पोताचा अंगारा सर्वांच्या कपाळी लावून व देवीचा आशीर्वाद देऊन निघून जातो.

देवीच्या नवरात्रात भुत्ये गावोगावी हिंडतात. घटातले पैसे त्यांनाच द्यायचे असतात, म्हणून लोक त्यांची वाट पाहतात.

भुत्या, भोप्या व आराधी ही नावे एकाच अर्थाची आहेत. भुत्ये किंवा भोप्ये मुख्यतः पुणे, सातारा, कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांत आढळतात. या पंथात फक्त मराठे व ब्राह्मण यांनाच प्रवेश मिळतो. मराठा भुत्यांची एक स्वतंत्र जात बनली आहे. मात्र त्यांचे रीतिरिवाज मराठ्यांप्रमाणेच आहेत. ब्राह्मण भुत्ये देशस्थ असतात.

भुत्या होण्यासाठी एक दीक्षाविधी करावा लागतो. हा विधी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुळजापूरचे भोपे कदम पाटील करतात. ज्याला भुत्या व्हायचे असेल त्याला पाटावर चौक भरून त्यावर बसवतात. मग

भुत्या

त्याच्या डोक्यावर तांदूळ टाकतात. त्या वेळी देवीची नावे उच्चारतात. त्याच्या हातात पोत व तोंडात पेटलेली वात देतात. जन्मभर लग्न न करता भुत्या होऊन राहायचे असेल, तर कांबळ्यावर चौक भरावा लागतो. एरवी बारा वर्षें झाल्यावर लग्न करता येते. काही लोक नवसाने भुत्ये होतात.

गोंधळ्यांप्रमाणे हे देखील गोंधळ घालतात. भुत्यांना तुळजापूरच्या भवानीच्या उपासनेत विशेष मान असतो. देवीच्या छबिन्याच्या वेळी देवालयात जिकडे तिकडे भुत्ये पोत घेऊन नाचत असलेले, व देवीची गाणी म्हणत असलेले दिसतात. एखाद्या भुत्याच्या अंगात देवीचा संचार होतो. मग तिथे जमलेले लोक त्याला आपापली गाऱ्हाणी सांगतात.

नवसाने भुत्ये झालेले लोक मंगळवार, शुक्रवार व नवरात्राचे दिवस सोडून इतर दिवशी सर्वसाधारण गृहस्थाप्रमाणेच आपापले व्यवसाय करतात. [म. लो. उ.; मुं. इ. जा.]

भुरूला एक खेळ. हा बायकांचा खेळ आहे. डोईवरच्या पदराचे उजव्या बाजूचे टोक चांगले ओढून चिमटीत धरायचे आणि डावा हात कमरेवर ठेवून उजवा हात पदरासह डोक्याभोवती फिरवीत तोंडाने पक्वा घालायचा, असा याचा प्रकार आहे. याच वेळी स्वतःभोवतीही फिरायचे असते. हा खेळ फार कसरतीचा आणि प्रेक्षणीय असतो. खेळताना बायका विविध गाणी म्हणतात. त्यांतील एका गाण्याचा काही भाग असा—

माझा पिंगा कीं जातो वेशीं की जातो वेशीं
आणतो म्हशी कीं माझा पिंगा की माझा पिंगा
माझा पिंगा कीं जातो म्हमई की जातो म्हमई
आणतो समई कीं माझा पिंगा कीं माझा पिंगा

अशी ही गाणी व पक्वा या गोष्टी खूप वेळ चालतात.

भुलाबाई महाराष्ट्रातील एक देवी. भिल्लिणीचा वेष घेऊन भिल्लरूपी शंकराला भुलवायला आलेल्या पार्वतीला भुलाबाई हे नाव पडले आहे. ती भुलाबाई झाली म्हणून शंकराला भुलोबा म्हणू लागले. खानदेशात व विदर्भात भुलाबाईचा विशेष प्रचार आहे. भाद्रपद पौर्णिमेला घरोघरी भुलोबा व भुलाबाई या दोघांच्या मातीच्या मूर्ती करून त्या सजवलेल्या मखरात किंवा कोनाड्यात बसवतात आणि कोजागिरी पौर्णिमेला रात्रभर जागवून वद्य प्रतिपदेला त्यांचे पाण्यात विसर्जन करतात. दररोज संध्याकाळी मुली भुलाबाईपुढे फेर धरून गाणी म्हणतात व कुसलीतरी खिरापत करून तिचा तिला नैवेद्य दाखवतात. यांच्या पूजेला शिव-शक्तींची पूजा म्हटले जाते. भुलाबाईचा हा सोहळा भोंडल्याप्रमाणेच सोळा दिवस चालतो व तो आश्विन मासातच होतो. या वेळी वाढत्या दिवसाप्रमाणे गाण्यांचा व खिरापतींचा वाढता क्रम असतो. भुलाबाईची गाणी हादग्याच्या गाण्यांसारखीच असतात. त्यांचा एक नमुना असा—

पहिली ग भुलाबाई देवा देवा साजे
घातिला मंडपा खेळ खेळ खंडोबा
खंडोबाच्या नारी बाई वणी वणी अवसनं
अवसनेचं पाणी तस गंगेचं पाणी
गंगेच्या पाण्याने वैरिला भात
जेविला कंथ लोकिला रांघ
हनुमंत बाळाचे लांब लांब झोके
भुलाबाई झोके अवस्नर फुगे
भाऊ भाऊ केकती माया फुलें झळकती
झळकतीचं एकच पान दुरून भुलाबाई नमस्कार

हा एक लोकोत्सव असून, त्याचा संबंध पर्जन्य व अन्नधान्याची समृद्धी यांच्याशी असावा, असे वाटते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भुलिया मध्य प्रदेशातील विणकरांची एक जमात. यांची भाषा हिंदी आहे. या जमातीत कालाहंडी ही एक पोटशाखा आहे. नाग व कच्छप ही भुलियांची देवके होत. हे एकाच देवकात विवाह निषिद्ध मानतात. विवाहसमयी वराने वधूला टोपलीत घालून तिच्यासह अग्नीला सात प्रदक्षिणा करायच्या असतात. पूर्वी सोनपूर भागात वराने विवाहासाठी राजाची परवानगी घेतली पाहिजे, असा दंडक होता.

धर्मकार्ये व उत्सव या प्रसंगी हे लोक ब्राह्मणाला बोलावतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

भुवन आप्त एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशे सत्तावन्नावे सूक्त याच्या नावावर आहे. हेच सूक्त साधन भौवन याच्या नावावरही दिसते. कदाचित ही दोन्ही नावे एकाचीच असावी. विश्वेदेवांची स्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. त्याबरोबरच त्याने इंद्राचीही स्तुती केली असून, त्याच्याकडून साहाय्याची अपेक्षा केली आहे. पहिल्या ऋचेतच याने जग जिंकण्याची आकांक्षा बोलून दाखविली आहे.

इमा नु कं भुवना सीषधामेन्द्रश्च विश्वे च देवाः ।।

अर्थ – इंद्र आणि विश्वेदेव आम्हाला जग जिंकण्याच्या कामी साहाय्य करोत.

कवीने या ऋचेत श्लेषार्थाने आपले नाव गोवले आहे, असे वाटते. [ऋ. म. भा.]

भुवनभयंकरी एक तांत्रिक देवता. हिचे वर्णन असे– कृष्णवर्ण, सिंहारूढ क्वचित गजारूढ. कृष्णवस्त्र व खट्वांग धारण करणारी. [श्रीविद्यार्णवतंत्र]

भुवनेश्वर पूर्व भारतातील एक तीर्थक्षेत्र. हे स्थान ओडिसा राज्यात पुरी जिल्ह्यातील खुर्दा विभागात, कटक-पुरी लोहमार्गावर, कटकपासून १८ मैलांवर आहे. मौर्य सम्राट अशोक याने कलिंग देश जिंकला तेव्हाचा प्रसिद्ध संग्राम याच ठिकाणी झाला, असे म्हणतात. कलिंगचक्रवर्ती खारवेल याची राजधानी इथेच होती. मध्य युगात कटक ही ओडिसाची राजधानी झाली होती. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर ही राजधानी कटकहून हलवून भुवनेश्वर येथे स्थापण्यात आली आहे. या स्थळासंबंधी एक पौराणिक कथा आहे, ती अशी–

प्राचीन काळी हे विष्णूचे चक्रतीर्थ होते. तिथल्या वनात एकच आम्रवृक्ष असल्यामुळे त्याला एकाम्रकानन असे नाव होते. शंकराला एकांतवासाची इच्छा झाली, तेव्हा त्याने नारदमुनीच्या सांगण्यावरून त्या वनात काही काळ निवास करण्यासाठी विष्णूची अनुमती मागितली. विष्णूने शंकराला तिथे कायम वास्तव्य करण्याची विनंती केली.

एकदा शंकराने पार्वतीजवळ या रम्य स्थानाचे सुरस वर्णन केले. ते ऐकून पार्वती स्तिमित झाली आणि गौळणीच्या रूपाने तिथे जाऊन शिवोपासना करू लागली. त्या वनात कृत्ती आणि वास या नावांचे दोन राक्षस राहत होते. ते त्या गौळणीच्या अलौकिक सौंदर्याने मोहित झाले. पण तिने त्यांचा नाश केला. त्या कृत्यामुळे ती श्रांत व तृषित झाली. तिची तृषा शमविण्यासाठी मग शिवाने एक सरोवर तिथे निर्माण केले. ते बिंदुसागर या नावानें प्रसिद्ध झाले.

या सरोवराची लांबी १४०० फूट व रुंदी ११०० फूट आहे. यात्रिकाने प्रथम या तीर्थात स्नान करून मगच शिवदर्शनाला जायचे असते. भाविक यात्रेकरू तिथे श्राद्धतर्पणादी धर्मकृत्येही करतात. ग्रहणे, संक्रांत, इ. पर्वकाळी बिंदुसागरातील स्नानाचा महिमा विशेष मानला जातो. वैशाख मासात तिथे चंदनयात्रा (जलविहार) नामक उत्सव होतो. हे स्थान स्वर्णाद्री या नावानेही प्रसिद्ध होते.

भुवनेश्वरचा महिमा जगन्नाथपुरीपेक्षा अधिक आहे. पुरीला जाण्यापूर्वी भुवनेश्वराचे दर्शन घेतले पाहिजे, असा संकेत आहे. उत्कलखंडात याविषयी अशी कथा आहे, की मालवाधिपती इंद्रद्युम्न याने प्रथम एकाम्रकाननात शिवाची उपासना केली व त्याच्या कृपाप्रसादामुळेच राजाला पुरीच्या जगन्नाथाचे दर्शन घडले. त्यावरून जगन्नाथाच्या दर्शनापूर्वी भुवनेश्वराचे दर्शन घेतले पाहिजे, असा संकेत रूढ झाला. या संकेतामुळेच भुवनेश्वर हे मूलक्षेत्र किंवा आदिक्षेत्र मानले जाते.

एकाम्रपुराण व स्वर्णाद्रिमहोदय या ग्रंथांत भुवनेश्वराचे क्षेत्रमाहात्म्य वर्णिले असून, यात्राक्रमही विस्ताराने सांगितला आहे. यात्रेकरूने इथे तीन दिवस व तीन रात्री राहिले पाहिजे, असा नियम आहे. प्रथम बिंदुसागरात स्नान करून क्षेत्रपती अनंतवासुदेवाचे दर्शन घ्यायचे. मग पापहरा देवीचे दर्शन घेऊन, भुवनेश्वरमंदिराच्या सिंहद्वारात जाऊन नमस्कार करायचा. त्यानंतर क्रमाने गणेश, गोपालिनी, कार्तिकेय, नंदी, चंडेश्वर, कल्पतरू व सावित्री यांचे दर्शन घेऊन, शेवटी लिंगराजाचे दर्शन घ्यायचे, अशी प्रथा आहे.

मंदिरनगरी– भुवनेश्वर ही मंदिरांची नगरी आहे. एका काळी बिंदुसागराच्या आसमंतात सहा ते सात हजार मंदिरे निर्माण झाली होती, असे म्हणतात. त्यांतील सुमारे ५०० मंदिरांचे अवशेष आता तिथे उरलेले आहेत. सुमारे १०० मंदिरे चांगल्या स्थितीत आहेत. त्यांपैकी काहींचे वर्णन असे–

लिंगराजाचे मंदिर – या क्षेत्रातील मंदिरांच्या संभारात हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंदिर मुख्य, भव्य आणि सुंदर आहे. त्यातील त्रिभुवनेश्वर लिंगराजामुळेच या क्षेत्राला भुवनेश्वर हे नाव मिळाले. हे मंदिर



लिंगराजमंदिर– भुवनेश्वर

इ. स. च्या ११ व्या शतकात, केसरी वंशाच्या राजवटीत निर्माण झाले. याच्या भोवती विस्तीर्ण प्रांगण व प्राकार असून, त्याला पूर्व, उत्तर व दक्षिण या दिशांना प्रवेशद्वारे आहेत. त्यांतून आत जाताच प्रथम गणेशमंदिर, मग नंदिस्तंभ आणि त्यानंतर भोगमंडप लागतो. भोगमंडपानंतर नृत्यमंदिर, जगमोहन व गर्भगृह आहे. गर्भगृहावर १२७ फूट उंचीचे विमान आहे. इतर ठिकाणच्या मंदिरांप्रमाणे ते निमुळते झालेले नसून, शिखराजवळ थोडेसेच लहान झालेले आहे. विमानाच्या माथ्यावर मोठी आमलकशिला, त्यावर छत्राकार घुमटी आणि शेवटी कळस आहे. या उत्तुंग शिखरामुळे हे मंदिर केवळ प्राकारातील मंदिरसमूहातच नव्हे, तर साऱ्या परिसरात उठून दिसते. जगमोहन म्हणजे सभामंडप सुमारे १०० फूट उंच असून, त्याची रचनाही आकर्षक आहे.

लिंगराजमंदिराच्या गाभाऱ्यातच तीन बाजूंना गणेश, पार्वती व कार्तिकेय यांची लहान लहान मंदिरे असून, त्यांतील मूर्ती अत्यंत सुंदर आहेत. गाभाऱ्यात स्वयंभू शिवलिंग आहे. हे लिंग म्हणजे सुमारे आठ फूट व्यासाची व आठ इंच उंच अशी प्रचंड गोल शिळा होय. त्याच्या भोवती, उत्तरेकडे निमुळती होत गेलेली काळ्या पाषाणाची शाळुंका आहे. या लिंगाच्या विस्तारामुळे त्याला लिंगराज म्हणतात. याच्या बुद्‌बुदाकारामुळे त्याला बुद्‌बुद लिंग असेही म्हणतात. चक्राकारामुळे हे लिंग हरिहरात्मक मानले जाते. काही लोक त्याचा आकार त्रिभुजात्मक समजून त्याला हरगौर्यात्मक लिंग मानतात; तर काहीं त्याच्या दीर्घतेमुळे त्याला कालरुद्रात्मक लिंग म्हणतात. इथले वैशिष्ट्य असे की दर्शनेच्छू यात्रिक स्वतः गाभाऱ्यात जाऊन शिवलिंगाची पूजा करू शकतो. त्याला मध्यस्थ लागत नाही.

लिंगराजमंदिराच्या प्राकारात महाकालेश्वर, लक्ष्मी-नृसिंह, यमेश्वर, विश्वकर्मा, भुवनेश्वरी, गोपालिनी पार्वती, इ. देवदेवतांची मंदिरे आहेत. त्यांतील भुवनेश्वरी ही त्रिभुवनेश्वर लिंगराजाची शक्ती होय. इथे नंदीची प्रचंड मूर्ती आहे.

राजराणीमंदिर – मुख्य मंदिराच्या ईशान्येला हे सुरेख मंदिर उभे आहे. सांप्रत त्यात कसलीही मूर्ती नाही. पण त्याच्या द्वारावरील चंड-प्रचंड हे द्वारपाल आणि भिंतीवरील नटराज, लिंगपूजा, शिव-पार्वतीविवाह, इ. शिल्पे पाहता हे शिवमंदिरच आहे, असे निश्चित वाटते. हे मंदिर ज्या पिवळसर वालुकापाषाणाचे बांधलेले आहे, त्याला स्थानिक लोक राजराणिया असे म्हणतात. त्यावरून मंदिराला राजराणी हे नाव मिळाले असावे. पूर्वी त्याचे नाव इंद्रेश्वर होते.

या मंदिराचे शिल्पकाम अत्यंत रेखीव असून, त्यातील सौंदर्य



राजराणीमंदिर– भुवनेश्वर

व कोवळीक अजूनही टवटवीत वाटते. ओडिसाची शिल्पकला इथे प्रकर्षाला पोचली आहे. येथील मूर्तिशिल्पे व शिल्पकलांश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही निःसंशय कलेची कमनीय लेणी आहेत. मात्र या मंदिरात ज्या आलसकन्या जागोजाग कोरल्या आहेत, त्यांचे नितंबभाग काहीसे अवास्तव वाटतात. येथील काही मूर्ती शृंगारिक असल्या, तरी त्या जगन्नाथमंदिरातील मूर्तींप्रमाणे बीभत्स नाहीत.

मुक्तेश्वरमंदिर – भारतातील काही अत्युत्कृष्ट मंदिरांमध्ये याची गणना केली जाते. हे मंदिर आसपासच्या मंदिरांपेक्षा बरेच लहान असले, तरी त्याच्या रचनेत सुबकता व मार्दव आहे आणि ते खालपासून वरपर्यंत शिल्पसौंदर्याने नटलेले आहे. त्याचे तोरणद्वारही सुंदर आहे. या शिवमंदिराच्या अंतर्भागात उंदीर व मोर ही गणेश व कार्तिकेय यांची वाहने आणि सप्त-मातृकांचा मूर्तिपट आहे. याच्या बाह्यांगावरही अनेक प्रेक्षणीय



मुक्तेश्वरमंदिर– भुवनेश्वर

मूर्तिशिल्पे पाहायला मिळतात. नागर शिल्पशैलीच्या कलिंग संप्रदायाचे हे एक उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. याची निर्मिती इ. स. च्या १० व्या शतकात झाली.

परशुरामेश्वरमंदिर – हे मंदिर इ. स. च्या ७ व्या किंवा ८ व्या शतकात निर्माण झालेले असून, त्याची रचना अगदी साधी आहे. मात्र याच नमुन्याप्रमाणे ओडिसामधली नंतरची मंदिरे बांधलेली आहेत. या मंदिराच्या भिंतींवर रामायण व महाभारत यांतील अनेक प्रसंग सुरेख कोरलेले असून, अन्य मूर्तीही सुंदर आहेत.

शत्रुघ्नेश्वर आणि स्वर्णजालेश्वर – ही मंदिरे परशुरामेश्वरासारखीच असून, त्याच काळात निर्माण झाली असावी. ती त्रिरथ पद्धतीची आहेत.

केदारेश्वर – हे इ. स. ११०० च्या सुमारास निर्माण झालेले मंदिर आणि त्याच्या जवळचे प्रेममंदिर म्हणजे उत्कलमधील एका प्रेमी युगुलाच्या प्रीतीचे स्मारक आहे. एका राजकन्येचे एका सामान्य युवकावर प्रेम बसले. पण राजाला ते पसंत पडले नाही. त्याने एक क्रूर कारस्थान रचून त्या दोघांचा वध केला. पुढे कृतकर्माचा पश्चात्ताप झाल्यावर राजाने हे मंदिर-युग्म निर्माण केले. हे पंचरथ पद्धतीचे आहे.

अनंतवासुदेवमंदिर – हे मंदिर बिंदू सरोवराच्या पूर्व तीरावर आहे. इतर मंदिरांपेक्षा याची रचना पुष्कळ वेगळी वाटते. मुख्य मंदिर एका चौथऱ्यावर उभे असून, त्याला जोडून पुढे जगमोहन, नृत्यमंदिर व भोगमंडप हे भाग आहेत. हे सप्तरथ-पद्धतीचे मंदिर असून, त्याच्या स्तंभांवरील कोनाड्यात वैष्णव मूर्ती आढळतात. मुख्य गर्भगृहात श्रीकृष्ण व बलराम यांच्या मूर्ती आहेत.

वैताल – हे मंदिर इ. स. च्या ८ व्या शतकातले असून, अगदी वेगळ्या पद्धतीचे आहे. याचे रूप बौद्ध चैत्यगृहासारखे दिसते. मात्र याच्या जगमोहनाच्या चारही कोपऱ्यांवर चार लहान शिखर–मंदिरे दिसतात. हे कापालिकांचे मंदिर असून, ते वेताळाच्या साहाय्याने सिद्धी मिळवीत. म्हणून या मंदिराला वैताल हे नाव मिळाले आहे.

याव्यतिरिक्त ब्रह्मेश्वर, वाकेश्वर, यमेश्वर, कपिलेश्वर, कुक्कुटेश्वर, मेघेश्वर, शिशिरेश्वर, पापनाशिनी, सिद्धेश्वर, इ. अनेक मंदिरे इथे आहेत. उत्कल भूमीतील कलावंतांचे शिव-पूजन या शिल्पवैभवाच्या रूपाने अमर झाले आहे.

भुवनेश्वराच्या परिसरात एकूण नऊ जलतीर्थे आहेत. त्यांची नावे अशी– (१) बिंदुसरोवर, (२) पापविनाशी तीर्थ, (३) गंगा-यमुनातीर्थ, (४) कोटितीर्थ, (५) देवीपापहरतीर्थ, (६) मेघतीर्थ, (७) अलाबुतीर्थ, (८) अशोककुंड (रामह्रद) व (९) ब्रह्मकुंड.

शिल्पशैली – भुवनेश्वराची ही मंदिरे नागर शिल्पशैलीची, पण कलिंग संप्रदायाची आहेत. त्यांची शिखरे एकदम निमुळती न होता हळूहळू लहान होत जाणारी व शेवटी बाकदार असतात. त्यांचे अनेक आडवे भाग पाडलेले दिसतात. शिखराच्या वर जो आत गेलेला भाग असतो, त्याला कंठ म्हणतात आणि त्याच्यावर मस्तक असते. त्यात प्रथम आमलकशिला, त्यावर छत्री, त्यावर कळस आणि शेवटी ध्वज व आयुध असते. या मंदिरांचे गर्भगृह व शिखर चौकोनी असले, तरी मस्तक गोलाकार असते.

गाभारा व जगमोहन यांच्या बाह्य अंगी भिंतींचा काही भाग थोडा पुढे आलेला दिसतो. त्यामुळे भिंतीचे तीन भाग होतात, तेव्हा ते मंदिर त्रिरथ पद्धतीचे समजले जाते. भिंत दोन जागी पुढे आल्यामुळे तिचे पाच भाग पडतात, तेव्हा ते पंचरथ मंदिर होते. भिंत तीन जागी पुढे येऊन तिचे सात भाग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होतात, तेव्हा ते सप्तरथ मंदिर होते. या प्रकारच्या मंदिरांत सुटे स्तंभ आढळत नाहीत, तर भित्तिस्तंभ असतात.

गंग वंशाची राजवट सुरू होण्यापूर्वी ओडिसात शैव, वैष्णव, शाक्त, सौर, इ. भिन्न संप्रदाय स्वतंत्रपणे नांदत होते आणि प्रत्येक पंथाची वेगळी मंदिरे निर्माण झाली होती. पण गंग राजवटीत या सर्व पंथांच्या समन्वयाची प्रवृत्ती सुरू झाली. त्यातूनच जगन्नाथसंप्रदाय उगम पावला. भुवनेश्वरातील लिंगराज मंदिरात याचा प्रत्यय येतो. तिथल्या शिवपूजापद्धतीत काहीं वैष्णव प्रथांचा अंतर्भाव झाला आहे. तिथले शिवपूजक लिंगराजाला हरिहर मानतात आणि त्याला बिल्वपत्रे व तुळशीपत्रे दोन्ही वाहतात. गंग राजवटीत या मंदिराला नृत्यमंडप व भोगमंडप जोडले गेले. तिथल्या वृषस्तंभावर नंदी व गरुड या दोन्ही मूर्ती आहेत. पूर्वी या मंदिरांवर केवळ त्रिशूळ होता, त्याजागी सांप्रत अर्धचक्रसहित त्रिशूळ आहे. नृत्यमंडपाच्या द्वारावर आता जय–विजय हे द्वारपाल दिसतात. लिंगराजाच्या प्रदक्षिणामार्गावरच जगन्नाथ व लक्ष्मीनारायण यांची लहान मंदिरे दिसतात. लिंगराज शिवाचे पुजारी शूद्र आहेत. पुरीच्या जगन्नाथाच्या महाप्रसादाप्रमाणेच लिंगराजाचा महाप्रसाद म्हणून शिजवलेला भात वाटला जातो आणि मंदिराच्या अंतर्भागात जाऊन तो कोणालाही ग्रहण करता येतो. तिथे जातिभेद आड येत नाही.



वरुण– राजराणीमंदिर

शिव, विष्णू, शक्ती व सूर्य या सर्व देवता एकच असून, हरि-हरांमध्ये भेद नाही; भुवनेश्वर म्हणजे परब्रह्मच असून, त्याचा प्रसाद सर्वांनी भक्षण करावा, असे एकाम्रपुराणात सांगितले आहे.

इतर स्थाने – भुवनेश्वराच्या परिसरात अनेक प्राचीन ऐतिहासिक स्थाने आहेत. लिंगराज मंदिरापासून सुमारे एका मैलावर शिशुपालगड नामक गडकोटाचे भग्नावशेष तिथे केलेल्या उत्खननात सापडले आहेत. त्या जागी अशोकाच्या काळातली तोसली नगरी वसलेली होती, असे काही पंडिताचे मत आहे. (तोसली पाहा)

शिशुपालगडाच्या दक्षिणेला सुमारे चार मैलांवर धौली नावाची टेकडी आहे. तिथे एका शिलाखंडावर अशोकाचे शिलालेख आहेत. त्या शिलाखंडाच्या माथ्यावर एक प्रचंड हत्ती खोदलेला आहे. हे शिलालेख सनपूर्व २५७ मध्ये कोरलेले आहेत. काही पंडितांच्या मते इथेच तोसली नगरी होती. टेकडीच्या पायथ्याजवळ नंतरच्या काळातील काही मंदिरे असून, तिथे भौम राजा शांतिकरदेव याचा आलेख आहे.

भुवनेश्वरापासून सुमारे सहा मैलांवर उदयगिरी व खंडगिरी या प्रसिद्ध टेकड्या आहेत. तिथे जैनांची प्राचीन लेणी असून, त्यांतील एका गुहेत सम्राट खारवेल याचा शिलालेख आहे (उदयगिरी–खंडगिरी पाहा). खंडगिरीवरील काही गुहा बौद्धांच्या आहेत, असे दिसते; कारण अनंतगुहेच्या मागच्या भिंतीवर बुद्धाची आकृती खोदलेली आहे. बोधिवृक्षाच्या पूजेची दृश्येही तिथे कोरलेली आढळतात. [त्रिभुवनेश्वर लिंगराज– आनंदयात्री, १९६१; स. भा. प्र. व.; हि. जॉ. ए. इं.; आ. रि. भु.; हि. क. इं. पी. ५]

भुवनेश्वरी जगदंबेचे एक रूप. प्रलयजलात भगवान विष्णू निजलेला असताना त्याच्या देहातून ही देवी बाहेर आली, असे देवी भागवतात म्हटले आहे. ही देवी म्हणजे ब्रह्ममयी महामायेचेच एक स्वरूप असून, तिचे वर्णन भारतीय प्रतीकविद्या या ग्रंथात केले आहे, ते असे –

उगवत्या सूर्याप्रमाणे तेजस्वी, चंद्रमुकुट धारण करणारी, पुष्ट स्तन असलेली, त्रिनेत्री, सुस्मिता, कांतिमती, चतुर्भुज, पाशांकुश धारण करणारी, वरद व अभया मुद्रा दाखवणारी.

भुवनेश्वरी ही एक तांत्रिक देवता म्हणून प्रसिद्ध आहे. श्रीविद्यार्णव तंत्रात तिचे रूपध्यान वर्णिले आहे, ते असे –

त्रिलोचना, चंद्रकलाधारिणी, द्विभुज किंवा चतुर्भुज. द्विभुज अवस्थेमध्ये डाव्या हातात रत्नखचित पेला व उजव्या हातात कमलपुष्प, चतुर्भुज अवस्थेत उजवा खालचा हात वरदमुद्रेत, वरच्या हातात कमल, डाव्या हातात रत्नखचित पेला, डाव्या खालच्या हाताची अभयमुद्रा. रक्त कमलाच्या आसनावर अधिष्ठित.

पंढरपूर क्षेत्रात भुवनेश्वरी आहे. तिथे तिची मूर्ती विष्णूने स्थापन केली, असे सांगतात. ज्येष्ठ वद्य अष्टमीस हिचे दर्शन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विशेष पुण्यकारक आहे, असे पंढरीमाहात्म्यात सांगितले आहे.

भुवनेश्वरीचे एक यंत्र आहे; त्या यंत्रावर तिची स्थापना करून मग तिची पूजा करतात. ही देवी त्रिभुवनांवर सत्ता चालवणारी आहे, म्हणून तिला भुवनेश्वरी हे नाव मिळाले आहे. ती दर्शनमात्रे इच्छित फल देते, अशी तिची प्रसिद्धी आहे. कवच, हृदय, शतनाम, सहस्रनाम, इ. भुवनेश्वरीची स्तोत्रे तंत्रग्रंथांत दिलेली आहेत. महाराष्ट्रात औदुंबरक्षेत्राच्या नजीक कृष्णेच्या पैलतीरी भुवनेश्वरीचे मंदिर आहे. [दे. को. ३; भुवनेश्वरीनित्यार्चन.; भा. प्र. वि.]

भुवनेश्वरीशांती

वधूच्या प्रथम रजोदर्शनकाली मासतिथि-नक्षत्रादी प्रतिकूल असल्यास त्यापासून उत्पन्न होणाऱ्या अरिष्टांच्या निरसनासाठी भुवनेश्वरीशांती करतात. प्रथम गणपतिपूजनापासून नांदीश्राद्धापर्यंत कृत्ये करून आचार्यवरण करतात. मग आचार्य साळीच्या तीन राशींवर तीन जलपूर्ण कुंभांची स्थापना करतो; त्यांत रत्न, पल्लव, औषधी इत्यादी वस्तू टाकतो; मग त्यांतील मध्यम कुंभावर भुवनेश्वरीच्या मूर्तीची अग्न्युत्तारणपूर्वक स्थापना करतो. गायत्रीमंत्र हाच भुवनेश्वरीमंत्र आहे. नंतर तिच्या दोही अंगी अधिदेवता–प्रत्यधिदेवता म्हणून इंद्र व इंद्राणी यांच्या प्रतिमा स्थापून आचार्य त्यांची षोडशोपचारे पूजा करतो; मग मध्यम कुंभावर आठ हजार किंवा आठशे गायत्रीमंत्राचा जप करून श्रीसूक्त म्हणतो; मग एका स्थंडिलावर वरद नामक अग्नीची स्थापना करून समग्र अग्निमुख करतो; नंतर ग्रहयज्ञ झाल्यावर भुवनेश्वरी देवीसाठी दूर्वा, तीळ, गहू, पायस व आज्य यांचे आठ हजार किंवा आठशे हवन करतो; मग स्विष्टकृतापासून प्रायश्चित्त-होमापर्यंत सर्व कृत्ये करून यजमानाकडून भूवनेश्वरी, इंद्रादी लोकपाल, नवग्रह व क्षेत्रपाल यांच्यासाठी बलिदान करतो; नंतर स्थापित कलशातील जल घेऊन यजमानदंपतीला विविध मंत्रांनी व सूक्तांनी अभिषेक करतो. मग यजमान अग्निपूजा व आचार्यपूजा करून आचार्याला गोप्रदान व पीठदान करतो; आचार्याला व ऋत्विजांना दक्षिणा देतो. एवढे झाल्यावर शांतिकृत्य समाप्त होते. मग जमलेले ब्राह्मण शांतिपाठ म्हणतात. यजमान शांतीच्या सांगतेसाठी ब्राह्मणभोजन घालतो. ही शांती झाल्यानंतर मग गर्भाधान संस्कार करतात. [ऋ. ब्र. स.]

भुवर्लोक

भूरादी सप्त लोकांतील दुसरा लोक. वायू ही भुवर्लोकाची अधिष्ठात्री देवता आहे. याचे वर्णन असे–

भूमिसूर्यान्तरं यच्च सिद्धादिमुनिसेवितम् ।
भुवर्लोकस्तु सोऽप्युक्तो द्वितीयो मुनिसत्तम ॥ (विष्णू पु. २.७)

अर्थ – भूमी आणि सूर्य यांच्यामध्ये भूवर्लोक आहे. त्यात सिद्ध, मुनी, इ. वास्तव्य करतात. हे मुने हा, दुसरा लोक आहे.

मरुत, मातरिश्वा, रुद्र, आदित्य, साध्य, पितर, इ. इथले रहिवाशी सोमपान आणि घृतपान करतात. प्रलयकाली रुद्राच्या ज्वालेने हा लोक दग्ध होतो. [श. क.; पु. इं.]

भुवान

एक देव. ओडिसा प्रदेशात हा देव पिकांचा संरक्षक मानला जातो. या देवाला काकवी व अफू यांचा नैवेद्य दाखवितात. आपली पूजा न करणाऱ्याला तो शासन करतो, भिववितो व दगड मारतो, असे समजतात. त्यामुळे प्रत्येक शेतकरी आपल्या शेतात याची स्थापना करतो. [स्ट. ओ. फो.]

भुशुंडी रामायण

रसिक संप्रदायाचा एक मान्य ग्रंथ. हे एक गौण रामायण आहे. भुशुंडी हा या ग्रंथाचा वक्ता आहे, म्हणून याला भुशुंडीरामायण असे म्हणतात. योगवासिष्ठात भुशुंडीचे चरित्र सांगितले आहे, ते असे–

अलंबुषा नामक देवीचे वाहन असलेला चंड नावाचा काक हा याचा पिता होय. ब्राह्मीच्या रथाची वाहन असलेली हंसी ही याची आई. पित्याच्या आज्ञेनुसार भुशुंडी आणि त्याचे भाऊ सुमेरू पर्वतावर राहायला गेले असता, भुशुंडीव्यतिरिक्त अन्य सर्व बंधू मारले गेले. हा काकाचा मुलगा म्हणून याला काक भुशुंडी असे म्हणत.

तुलसीदासाने रामचरितमानसाच्या उत्तर कांडात याच्या पूर्वजन्मीची कथा दिली आहे. तिचा सारांश असा–

कलियुगाच्या पूर्वकल्पात अयोध्येमध्ये हा एक शूद्र म्हणून राहत होता. याने एकदा गुरूचा सत्कार केला नाही, म्हणून याला शाप मिळाला व हा सर्प बनला. नंतर याने गुरूची व शिवाची क्षमायाचना केली. त्यामुळे शिवकृपेने हा रामभक्त ब्राह्मण बनला. पुढे लोमश ऋषीच्या शापाने याला काकयोनी प्राप्त झाली.

रामचरितमानसाच्या उत्तर कांडात स्वतः भुशुंडीने गरुडाला सांगितले आहे, की बाल राम हा माझा इष्टदेव आहे. एकदा भुशुंडीच्या मनात रामाच्या देवत्वासंबंधीच शंका उत्पन्न झाली. त्यामुळे राम याला पकडायला निघाला. भुशुंडी आकाशात उडाला; पण रामाचे हात तिथपर्यंत पोचल्यामुळे हा रामाला शरण आला व त्याचा अनन्यभक्त बनला.

भुशुंडी रामायणाला मूलरामायण व आदिरामायण अशी दोन नावे आहेत. परंतु प्रकाशित मूलरामायण म्हणजे वाल्मीकिकृत रामायणाचा प्रथम सर्ग होय, असे श्री. कामिल बुल्के यांचे मत आहे. ते पुढे म्हणतात, की महारामायण नावाचे रामायण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व भुशुंडी रामायण ही अभिन्न असावी.

या ग्रंथावर भागवताचा खूप प्रभाव असून, तुलसीदासाने या रामायणाचा बराच उपयोग करून घेतला आहे. या रामायणात

काकभुशुंडी

राधेला जानकीचा अंश आणि कृष्णाला रामाचा अंशावतार मानले आहे. भुशुंडी रामायणाचे पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर असे चार खंड असून, त्यांत छत्तीस हजार श्लोक आहेत. भुशुंडीचे एक ब्रह्मरामायणही आहे; त्यात राम-रासलीलेचे वर्णन केलेले आहे. [रामकथा; रा. भ. शा.]

भुसुकपा (इ. स. च्या ८ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक नाथसिद्ध. याची भुसू, भुसुकुपा व शांतिदेव अशी अन्यही नावे मिळतात. याने स्वत:ला एके ठिकाणी राउत (राजकुमार) असे म्हणवून घेतलेले आहे. याला भुसुक हे नाव का मिळाले या संबंधाने एक आख्यायिका सांगतात, ती अशी—

एकदा मगधनरेश देवपाल याने याची अस्ताव्यस्त वेषभूषा पाहिली आणि त्याने त्याला भुसुक असे म्हटले. तेव्हापासून हा भुसुकपा म्हणून ओळखला जाऊ लागला.

श्री. हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या मते हा गुहेत राहत असे म्हणून याला भुसुकपा हे नाव मिळाले.

याचा जन्म सौराष्ट्रात अथवा महाराष्ट्रात झाला असावा. काहींच्या मते बंगाल हे याचे जन्मस्थान आहे. श्री. राहुल सांकृत्यायन यांनी नालंदाच्या परिसरात याचा जन्म झाला असावा, असे म्हटले आहे.

याने बरेच दिवस मगध देशात नालंदा या ठिकाणी राहून आपले शिक्षण पुरे केले. मंजुवज्र हा त्याचा विद्यागुरू होय. याच्या गुरुसहवासासंबंधानेही अनेक आख्यायिका सांगतात.

भुसुकपाने सुमारे दहा ग्रंथ रचले आहेत. यांतील सहा ग्रंथांची नाममुद्रा शांतिदेव आणि शेष ग्रंथांची भुसुक अशी आहे. यांतील काही ग्रंथ दार्शनिक आहेत; तर काही तांत्रिक आहेत. तंजूरच्या ग्रंथालयात हे ग्रंथ पाहायला मिळतात. [हिं. सा. बि ; सि. सा.; हिं. का. धा.]

भूकंप एक नैसर्गिक प्रकोप. यात भूपृष्ठभाग हादरतो, त्याला भेगा किंवा लहानमोठी खिंडारे पडतात, त्यांतून वाळू माती, पाणी, वायू, इ. पदार्थ वेगाने बाहेर येतात आणि कित्येकदा पृष्ठभाग वर येऊन टेकड्या निर्माण होतात. अशा प्रसंगी काही वेळा पृथ्वीच्या अंतर्भागातून गडगडाटही ऐकू येतो. समुद्राच्या तळाशी अशी उलथापालथ झाली, तर समुद्रात प्रचंड लाटा उसळतात व किनाऱ्यावर जलप्रलय होतो. भूकंपाचा धक्का जेव्हा सौम्य असतो, तेव्हा फक्त जमीन थरथरल्याची जाणीव थोडा वेळ होते. पण धक्का तीव्र असतो, तेव्हा कडे कोसळतात, नद्यांचे प्रवाह बदलतात, नवे तलाव तयार होतात, मोठाली शहरे उद्‌ध्वस्त होतात किंवा संपूर्ण गावे जमिनीत गाडली जातात. मानवाने शेकडो वर्षांच्या परिश्रमांनी निर्माण केलेली संस्कृती अशा प्रकोपामुळे एका क्षणात नष्ट होते.

प्राचीन काळापासून भूकंप हा एक दैवी प्रकोप मानला गेला आहे. मानवांनी केलेल्या पापांचा भार पृथ्वीला असह्य होऊन ती थरथरू लागते किंवा मानवांना शिक्षा करण्याच्या उद्देशाने परमेश्वर भूकंप उत्पन्न करतो, अशी पुष्कळ लोकांची श्रद्धा आहे. अनंत किंवा शेषनाग आपल्या फणेवर भूगोल धारण करतो आणि काही कारणाने तो हालू लागला, की भूकंप होतो, ही कल्पना पुराणांत सर्वत्र आढळते. ब्रह्म पुराणातील पुढील (२१. २३.) श्लोकात ती व्यक्त झालेली आहे—

यदा विजृम्भतेऽनन्तो मदघूर्णितलोचनः ।
तदा चलति भूरेषा साद्रितोयाधिकानना ॥

अर्थ—जेव्हा मदामुळे डोळे गरगर फिरवून अनंत (नाग) जांभई देतो, तेव्हा ही भूमी पर्वत, जलाशय, अरण्ये या सर्वां-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सह कंपित होते.

वराहमिहिराने आपल्या बृहत्संहितेत, त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या काही आचार्यांची भूकंपाविषयीची मते उद्‌धृत केली आहेत, ती अशी – काश्यपाच्या मते महासागरातील विशालकाय जलचरांच्या हालचालींमुळे भूमी थरथरते. पृथ्वीला आधार देणारे अष्ट दिग्गज हे दमल्यामुळे जे दीर्घ निःश्वास सोडतात, त्यांमुळे भूकंप होतात, असे गर्ग म्हणतो. आकाशात वारे एकमेकांवर आदळून भूमीवर पडल्यामुळे ती कंप पावते, असे वसिष्ठ मानतो. वृद्धगर्गादी आचार्यांची धारणा अशी आहे, की अदृष्टामुळे म्हणजे लोकांच्या पापांमुळे भूकंप निर्माण होतात. इंद्र, अग्नी, वरुण व वायू यांच्या प्रभावामुळे जे धरणीकंप होतात ते केव्हा, कुठे व कोणत्या नक्षत्रांत होतात आणि त्यासाठी कोणती शांती करणे आवश्यक असते, तेही बृहत्संहितेत सांगितले आहे (३२. ८–२२).

क़ाही काही जमातींची कल्पना अशी असते, की बैल, कासव, साप, मांजर, डुक्कर, राक्षस, यांपैकी कोणी तरी पृथ्वीचा आधार आहे व त्याच्या हालचालींमुळे भूकंप होतो.

भूगर्भशास्त्रज्ञांनी भूकंपाची याहून वेगळी काही कारणे सांगितली आहेत, ती अशी– (१) पृथ्वीचा अंतर्भाग अजून अत्यंत उष्ण व द्रवावस्थेत असून, तो थंड व घन होतो, तेव्हा आकुंचन पावतो. त्यामुळे त्याच्या वरचा घन थर कमीजास्त प्रमाणात खचतो आणि भूकवचातील काही खडकांचा आधार नाहीसा होऊन त्यांत ताण उत्पन्न होतो. हा ताण जेव्हा अमर्याद होतो, तेव्हा खडक भंगतात व भूकंप होतो. (२) पृथ्वीच्या अंतर्भागात वायूंचा स्फोट झाल्यामुळे पृष्ठभाग हादरतो. (३) वारा, पाणी, रसायने व जीवजंतू यांच्या प्रभावाने पृथ्वीच्या पृष्ठभागात खोलवर सतत काही तरी प्रक्रिया चालू असतात. जमीन झिजत असते. त्यामुळे तयार होणारी वाळू-माती पाण्याबरोबर वाहत जाऊन सखल जमिनीवर किंवा समुद्राच्या तळावर साचते व तिथे दाब वाढत जातो. अशा प्रकारे भूकवचाचा समतोल बिघडतो आणि तो पुनः प्रस्थापित करण्यासाठी भूकवचातील खडक घसरतात आणि त्यामुळे भूकंप होतात. (४) भूकवचात विविध नैसर्गिक कारणांमुळे किंवा खोल खाणी खणल्यामुळे जी पोकळी निर्माण होते, तिच्यावरील खडक खचल्यामुळेही भोवतालच्या भूपृष्ठाला हादरे बसतात. (५) ज्वालामुखीच्या उद्रेकामुळेही भूकंप होतात. मात्र पोकळीमुळे व ज्वालामुखीमुळे उत्पन्न होणारे भूकंप अगदी मर्यादित क्षेत्रातच जाणवतात.

पृथ्वीच्या विशिष्ट भागात इतर भागांपेक्षा अधिक भूकंप होतात, असे दिसून आले आहे. असे दोन विभाग आहेत– (१) प्रशांत महासागराच्या भोवतालचे भूखंड व (२) भूमध्य समुद्राच्या दोन्ही बाजूंचे भूभाग. आल्प्स, हिमालय, अँडीज वगैरे पर्वतांच्या रांगा भूकवचाला घड्या पडून निर्माण झाल्या आहेत. हे भूभाग तुलनेने नवनिर्मित असून, त्यांतील थर अजून स्थिर झालेले नाहीत: अशा भागांत अद्याप खडक खचणे, घसरणे, उचलले जाणे, इ. घडामोडी चालू आहेत. त्यामुळे खडकांच्या थरांत ताण निर्माण होतो. हा ताण वाढत जाऊन असह्य झाला, की खडकांचे थर फाटून खालीवर घसरू लागतात आणि त्यामुळे भूकंपाचे तरंग उत्पन्न होऊन सर्वत्र पसरतात. हे भूकंप-केंद्र पृष्ठभागापासून खूप खोल असेल; तर तिथे उत्पन्न झालेले तरंग पृष्ठभागी येईपर्यंत कमजोर होतात. आजपर्यंत झालेल्या भूकंपांमधील सर्वांत खोल केंद्र भूपृष्ठाखाली ४४० मैलांवर असल्याची नोंद झाली आहे.

अशा प्रकारे अस्थिर भूकवचात निर्माण होणाऱ्या भूकंपांना विवर्तनिक भूकंप म्हणतात. उ. भारतातील बहुतेक सर्व भूकंप या प्रकारचे होते. हिमालय प्रदेशात पुष्कळ भूकंप होतात. १९३४ साली बिहारमध्ये झालेला भूकंप फारच भयानक होता. १९५६ मध्ये कच्छमधील अंजार नामक गाव भूकंपामुळे संपूर्ण उद्‌ध्वस्त झाले. १८१९ सालीही कच्छमध्ये असाच जबरदस्त भूकंप झाला होता, त्यामुळे भूजनगर उद्‌ध्वस्त होऊन त्या परिसरातील सुमारे २००० लोक ठार झाले, असे म्हणतात. आसाम, नेपाळ, पंजाब व बलुचिस्तान या प्रदेशांत मधून मधून भूकंपाचे धक्के बसतात व पुष्कळ हानी होते.

ज्या प्रदेशांत भूकवच स्थिर व भक्कम असते, तिथे भूकंप सहसा होत नाहीत. द. भारतीय द्वीपकल्पाचे भूकवच अग्निजन्य खडकांचे बनलेले असून, ते अत्यंत स्थिर, बळकट व अभेद्य आहे. त्यामुळे हा भाग भूकंपाच्या उत्पातापासून बराच सुरक्षित मानला जातो. तथापि १९६७ च्या डिसेंबरात कोयनानगरला व भोवतालच्या विस्तृत प्रदेशाला भूकंपाचा जो ज़बरदस्त तडाखा बसला, त्यामुळे महाराष्ट्राची अपरिमित हानी झाली आणि त्यानंतरही सतत भूकंपाचे लहानमोठे हादरे बसत राहिल्यामुळे भूकंपग्रस्त प्रदेशातले लोक भयभीत झालेले आहेत.

यापूर्वी दख्खन विभागात झालेल्या भूकंपांची ऐतिहासिक नोंद डॉ. बा. मो. कानिटकर यांनी शोधून काढली आहे. तारखानी खलेफा नामक पुस्तकात इ. स. ८९३ च्या डिसेंबर महिन्यात झालेल्या भूकंपाची माहिती दिलेली आहे. त्यावे केंद्र हिंदी महासागरात होते. त्या वेळी दालबूल या नावाचे गाव संपूर्ण उद्‌ध्वस्त झाले आणि सुमारे दीड लक्ष लोक मरण पावले. पुणे विभागाऽही त्या भूकंपाचा हादरा बसल्याची नोंद आहे. इ. सः १८१९ मध्ये कच्छमध्ये दोन सौम्य धक्के

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घसले होते. अहमदाबाद, सुरत, भडोच, पुणे येथे-ते जाणवले होते. इ. स. १८४३ साली मार्च व एप्रिल या महिन्यांत दक्षिणेत जो भूकंप झाला, त्याचे केंद्र कर्नाटकात बेल्लारी येथे असून, कुर्नूल, बेळगाव वगैरे भागाला त्याची खूप झळ पोचली. महाराष्ट्रातही त्याचे **धक्के जाणवले. इ.स.१९७०च्या मार्च** महिन्यात **गुजरातमध्ये जो भूकंप झाला, त्यानेही** तिथल्या जीवितवित्ताची बरीच हानी झाली.

भूकंपांमुळे मानवाची जीवित-वित्तहानी बेसुमार होते. त्यांची पूर्वचिन्हे ओळखून, संकटप्रतिबंधक उपाय योजण्याचे कोणतेही साधन शास्त्रज्ञांना अद्याप सापडलेले नाही. मात्र पृथ्वीच्या अंतर्भागासंबंधी माहिती मिळविण्याच्या कामी शास्त्रज्ञाना भूकंपांचा मोठा उपयोग होत आहे. [हि. घ.; हि. वि. को.; प्रा. कोगेंकर– केसरी; २१ डिसेंबर १९६७; श्री. केळकर–नवभारत, मे १९६८]

भूखी माता उ. भारतातली एक देवी. ही दुष्काळाची देवता मानली जाते. गावातले लोक वर्षातून एक दिवस गावाच्या सीमेवर जाऊन तिथे एक कमान उभारतात आणि त्या ठिकाणी देवीला बलिदान करतात. [फो. लो. नॉ. इं.]

भूगोल एक शास्त्र. पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांतील सागर, नद्या, पर्वत, वने, रस्ते, नगरे, पिके, खनिजे, उद्योगधंदे, हवामान, पशुपक्षी इत्यादींचे वर्णन शास्त्रीय पद्धतीने करणे, हे भूगोलाचे उद्दिष्ट असते. भारतीय साहित्यात भारताच्या भूपृष्ठाविषयी शास्त्रीय विवेचन नसले, तरी भरतखंडाचे विस्तृत वर्णन केलेले आढळते. ब्राह्मणे, उपनिषदे, धर्मसूत्रे व धर्मशास्त्रे या ग्रंथांपेक्षा महाभारत व पुराणे यांत प्राचीन भारताची भौगोलिक माहिती विपुल आहे. रामायणाचे किष्किंधाकांड, बृहत्संहिता, पराशरतंत्र, अथर्वपरिशिष्ट, पाणिनीची अष्टाध्यायी, पतंजलीचे महाभाष्य, कौटिलीय अर्थशास्त्र व योगिनीतंत्र यांतही पुष्कळ उपयुक्त माहिती मिळते. निरनिराळ्या तीर्थमाहात्म्यांत भारतातील तीर्थक्षेत्रांची माहिती आहे. काव्यमीमांसा हा राजशेखराचा ग्रंथ, तसेच रघुवंश, मेघदूत, नैषधीयचरित, दशकुमारचरित, हर्षचरित, इ. संस्कृत ग्रंथ यांतदेखील अशी माहिती आढळते.

स. पूर्व १–६ शतकांतील भरतखंडाच्या माहितीसाठी पाली बौद्ध साहित्याला अत्यंत महत्व आहे. त्यांतील ऐतिहासिक व भौगोलिक माहिती विश्वसनीय वाटते. अंगुत्तरनिकाय, विनयपिटक, सुत्तपिटक, मिलिन्दपन्ह, दीपवंस, महावंस, इ. ग्रंथांतून सोळा महाजनपदे, मध्यदेश व लंका यांसंबंधी पुष्कळ ज्ञान प्राप्त होते. आचारांगसुत्त, भगवती विवाहपन्नत्ती, नायाधम्मकहाओ, उवासगदसाओ, अनुत्तरववाइयादसाओ, विवाग–सुत्त, रायपसेनइयसुत्त, पण्णवणा, उत्तराज्झयनसुत्त, जंबुद्वीपपण्णत्ती, आवश्यकसुत्त, इ. जैन ग्रंथांतही पुष्कळ भौगोलिक ज्ञान विखुरलेले आढळते. जंबुद्वीपपण्णत्तीमध्ये जंबुद्वीप व भारतवर्ष यांचे वर्णन आहे. जिनप्रभसूरीचा विविधतीर्थकल्पही या दृष्टीने उपयुक्त आहे. अशोकाचे शिलालेख आणि उदयगिरी–खंडगिरी येथील शिलालेख यांतही काही माहिती मिळते.

परदेशी प्रवासी व ग्रंथकार यांपैकी हिकॅटियस (सन पूर्व ५४९–४८६) व हिरोडोटस (सन पूर्व ४८४–४३१) यांनी भारताविषयी थोडीशी माहिती आपल्या ग्रंथांत दिलेली आहे. त्यानंतर शिकंदराने आपल्याबरोबर काही लेखकांना आणले होते आणि त्यांनी भारताविषयी पुष्कळ माहिती लिहिली होती. त्यांचे मूळ लेख आता नष्ट झालेले असले, तरी त्यांतली माहिती स्ट्राबो, प्लिनी व एरियन यांनी उद्धृत केली आहे. डिओडोरस, कर्टियस व जस्टिनस यांनी त्या ज्ञानात भर घातली आहे.

चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात दीर्घ काळ राहिलेल्या मेगॅस्थिनीसने भारताविषयी पुष्कळ माहिती लिहून ठेवली आहे. एरियनच्या इंडिकामध्ये दिलेली माहिती मेगॅस्थिनीस व एराटोस्थिनीस यांच्या वृत्तांतांवर आधारलेली आहे. प्लिनीच्या इतिहासातील काही खंड भूगोलविषयक असून, त्यांत भारताची पुष्कळ माहिती आहे. पेरिप्लस हा ग्रंथ व्यापारमार्गदर्शक असून, त्यात भारतीय बंदरे, व्यापारी केंद्रे आणि मोठ्या नद्या यांबद्दल बरीच माहिती मिळते.

टॉलेमीचा भूगोलविषयक ग्रंथ भारताच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. कारण त्यात उत्तर भारतातील सिंधू व गंगा या नद्यांच्या तीरावरील प्रदेश, त्यांतील गावे व पर्वत यांचे चांगले वर्णन केलेले आहे.

बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी अनेक चिनी प्रवासी भारतात येऊन राहिले, फिरले आणि त्यांनी विस्तृत वृत्तांत लिहून ठेवले. इ. स. च्या ४ थ्या शतकात आलेला फाहियान, ७ व्या शतकात आलेले युआन च्वांग, इत्सिंग व वांग-हियुएन-त्से यांच्या वृत्तांतांमुळे भारताची पुष्कळच माहिती प्राप्त झाली आहे. मुस्लिम ग्रंथकारांनीही त्या ज्ञानात बरीच भर घातली आहे. त्यांपैकी अल्बिरूनीचा ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहे.

प्राचीन भारतीय लोकांना भरतखंडाच्या आकारमानाची अचूक माहिती होती. भारताचा आकार समभुज त्रिकोणासारखा आहे, असे महाभारतात म्हटले आहे. गझनीपासून आसाममधील सदियापर्यंत भारताचा विस्तार मानला व कन्याकुमारी हे तिसरे टोक मानले, तर ही कल्पना बरोबर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे, असे कनिंगहॅमचे मत आहे. भरतखंड उत्तरेला खूप रुंद व दक्षिणेकडे निमुळता होत गेला आहे, हे ज्ञान प्राचीन बौद्ध साहित्यातही सापडते. भारताचे नवखंडात्मक विभाजन प्रथम पराशर व वराहमिहिर यांच्या ग्रंथात आढळते. ते विभाजन नंतर काही पुराणांनी स्वीकारलेले दिसते.

पुराणातील भुवनकोशात व राजशेखराच्या काव्यमीमांसा या ग्रंथातील भुवनकोशात भारताचे मध्यदेश, उदीच्य (उत्तरापथ), प्राच्य, दक्षिणापथ व अपरांत असे पाच विभाग सांगितलेले आहेत. पृथूदकाच्या पश्चिमेकडील प्रदेशाला उत्तरापथ हे नाव होते. त्यात संपूर्ण सिंधुप्रदेशाचा अंतर्भाव होता. अपरांत म्हणजे कोकणपट्टी होय. गौतमी बलश्रीच्या नासिक येथील आलेखात अपरांताचा उल्लेख आहे. माहिष्मतीच्या दक्षिणेकडील प्रदेश म्हणजे दक्षिणापथ, असे काव्यमीमांसेत म्हटले आहे. धर्मसूत्रांमध्ये पारियात्र पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेशाला दक्षिणापथ म्हटले आहे. बौद्ध साहित्यात दक्षिणापथाची व्याख्या थोडीफार अशीच आहे. मध्यदेशाच्या पूर्वेकडील प्रदेशाला प्राच्य हे नाव होते. मात्र या दोन विभागांतील सीमारेषा हळूहळू पूर्वेकडे सरकत गेलेली दिसते.

प्राचीन भारताच्या भूगोलाचे संशोधन कनिंगहॅम याने सुरू केले. त्याने युआन् च्वांगच्या प्रवासवर्णनांमधून भारताची भौगोलिक माहिती संकलित करून तिची नीट मांडणी केली. गुप्तकालीन भारताविषयीचे बिनचूक ज्ञान मिळवण्यासाठी तो संग्रह अत्यंत उपयुक्त ठरला आहे. त्यानंतर प्राचीन ग्रीक लेखकांच्या लिखाणातून भारतासंबंधी विपुल भौगोलिक ज्ञान गोळा करून अनेक ग्रंथ लिहिणाऱ्या मॅक्क्रिंडलचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. फ्लीट, लेवी, ॲबट, पार्जिटर या संशोधकांनी बृहत्संहिता, रामायण, भागवत, इ. ग्रंथांतून अशीच माहिती जमवून लेख लिहिले आहेत. त्याव्यतिरिक्त स्टायन, ग्लॉसन, इ. संशोधकांनीही भारताविषयी काही लेख लिहिले आहेत. जर्मन पंडित किर्फेल याने तर सबंध आयुष्यभर पुराणांचा अभ्यास करून भारताच्या भूगोलाविषयी अनेक ग्रंथ लिहिले. त्याचे काम फारच प्रचंड आहे.

श्री. नंदलाल डे यांचा प्राचीन व मध्ययुगीन भारताचा भौगोलिक कोश हा इंग्रजी ग्रंथ फारच उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे डॉ. बी. सी. लॉ यांचा हिस्टॉरिकल जॉग्रफी ऑफ एन्शंट इंडिया हादेखील एक उत्कृष्ट संदर्भग्रंथ आहे. त्यांचे या विषयावरील इतर अनेक ग्रंथ व लेखही उल्लेखनीय आहेत.

पं. जयचंद्र विद्यालंकार यांनी भारतीय भूगोलाचा सखोल अभ्यास करून लिहिलेल्या भारतभूमी और उसके निवासी नामक ग्रंथाची अनेक विद्वानांनी खूप प्रशंसा केली आहे. कारण त्या ग्रंथात प्राचीन भारतीय भूगोलाची शास्त्रीय चिकित्सा केलेली आहे.

पुराणांतील भुवनकोश या विभागासंबंधी अनेक विद्वानांनी ग्रंथ लिहिलेले असून, ते आपापल्या परीने उपयुक्त आहेत. राय कृष्णदास यांनी आपल्या पौराणिक भूगोल या लेखात चतुर्द्वीपी भूगोल व सप्तद्वीपी भूगोल या दोन कल्पनांचे जे सम्यक विश्लेषण केले आहे, ते अतिशय महत्त्वाचे आहे (पुराणम्, फेब्रुवारी १९६०).

डॉ. रमेशचंद्र मजुमदार यांनी क्लासिकल अकौंटस ऑफ इंडिया या नावाचा एक ग्रंथ संपादित केला आहे. त्यात बहुतेक सर्व विदेशी लेखकांचे लिखाण समाविष्ट केलेले आहे. भारतीय भूगोलाच्या अभ्यासकांच्या दृष्टीने हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरला आहे. अगदी अलिकडे श्री. एस. मुझफर अली नावाच्या गृहस्थांनी जॉग्रफी ऑफ दि पुराणाज् या नावाचा एक ग्रंथ लिहिला असून, तोही विविध माहितीने परिपूर्ण आहे. पाहा- पुराणे. [हि. जॉ. ए. इं.; रि. इं. रि.]

भूचरी एक यौगिक मुद्रा ही समाधी अंगाची मुद्रा असून, तिचे स्थान नासिकेत आहे. नासिकेच्या पुढे चार अंगुळे एका बिंदूवर दोन्ही नेत्रांतील दृष्टी केंद्रित करणे, असे हिचे स्वरूप आहे. या मुद्रेने प्राण व अपान हे दोन वायू एकत्र होतात. [हिं. सा. को.; गा. म. वि.]

भूतडामर बौद्धांचा एक देव. हा अक्षोभ्यापासून उत्पन्न झालेला आहे. याचे मूर्तिध्यान पुढीलप्रमाणे- कृष्णवर्ण. चतुर्भुज. वज्र आणि तर्जनी धारण करणारा. याला लांब सुळे असतात. याच्या देहातून अग्निज्वाला उफाळत असतात. याच्या गळयात सर्पालंकार असल्यामुळे हा भयानक दिसतो. याच्या मुकुटावर कपालमाला असते. हा प्रत्यालीढ आसनात उभा राहून अपराजित नामक देवाला पायाने तुडवतो, असे दाखवलेले असते. [इं. बु. इ.]

भूतत्ताळवार (इ. स. च्या ४–५ व्या शतकाचा सुमार) तमिळनाडुमधल्या आळवार संतांपैकी एक. आळवारांच्या परंपरेत पहिल्या तीन आळवारांना मुदलाळवार असे म्हणतात. यातच भूतत्ताळवार याची दुसऱ्या क्रमांकाने गणना होते.

गुरुपरंपरा या ग्रंथातील माहितीनुसार याचा जन्म तिरुकडलमळ्ळ (आजचे महाबलिपुरम) इथे झाला. याला विष्णूच्या गदेचा अवतार मानतात. याच्या चरित्राची यापेक्षा अधिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माहिती मिळत नाही. श्रुतिपरंपरेने असे सांगतात, की बालपणापासूनच हा साधुवृत्तीचा होता. याचे ज्ञान अगाध होते. पोयगैआळवाराप्रमाणेच ठिकठिकाणी हिंडून याने भगवद्भक्तीचा प्रचार केला. तत्कालीन लोक याला सिद्ध महात्मा असे म्हणत. नम्माळवाराने याची खूप स्तुती केली आहे.

भूतत्ताळवाराची पद्ये प्रबंधम्‌मध्ये संग्रहीत केलेली आहेत. ती पद्ये तिरुवंतादी छंदांत आहेत. कवीच्या जीवनातील श्रेष्ठ अनुभव या पद्यांतून व्यक्त झाला आहे. याने भक्तीचा महिमा गायिला आहे, विष्णूच्या अवतारांचे स्मरण केले आहे, तशीच अनेक वैष्णव मंदिरांचीही स्तुती केली आहे. [त. प्र. हिं. क्.]

भूतत्रासन यंत्र भूत, प्रेत, पिशाच, डाकिनी, ब्रह्मराक्षस यांची बाधा झाली असता, ती नष्ट करण्यासाठी या यंत्राचा प्रयोग करतात. याची कृती अशी –

एका नव्या खापराच्या तुकड्यावर आडव्या चार व उभ्या चार रेषांनी बनणारा बारा कोष्टकांचा एक चौकोन काढतात. प्रत्येक कोष्टकात ऱ्हीं हे बीजाक्षर लिहितात. नंतर त्या यंत्राची यथाविधि पूजा करतात. मग खापरीवर धूळ भरून ती विस्तवावर ठेवतात. खाली खैराची लाकडे जाळून खापरी तापवितात. त्यामुळे पिशाचे थरथर कापू लागतात, रडतात व धरलेल्या व्यक्तीला तावडतोब सोडून जातात, असे सांगितले आहे. [यं. चिं.]

भूतनाथ एक क्षुद्र दैवत. हा वेताळाच्या वर्गातला देव आहे. गोमंतकात याची देवस्थाने आहेत. याला वर्षातून ठराविक दिवशी कोंबड्या-बकऱ्याचे बलिदान होते. क्वचित त्याची वार्षिक जत्राही भरते [गोमंतकातील देवालये].

भूतनृत्य एक धार्मिक लोकनृत्य. हे नृत्य भूत-पिशाचांना व राक्षसांना प्रसन्न करण्यासाठी आणि भूतबाधा नष्ट करण्यासाठी असते. या नृत्याचे कार्यक्रम भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर, वायव्य सरहद्द प्रांतात आणि प्राधान्याने दक्षिणेत होतात. या नृत्याला तुताऱ्या, नगारे, तासे यांची साथ असते. या वाद्यांमुळे भीतिदायक वातावरण तयार होते. नृत्यप्रसंगी काही नर्तक पायांत तर काही गुडघ्यांवर किंवा कमरेलाही घुंगरे बांधतात आणि भयानक स्वरूपाचे जंगली प्राण्यांचे मुखवटे धारण करतात. या नृत्यात बहुतेक उड्याच असतात.

कर्नाटकातले लोक असुर देवतांच्या वार्षिक पूजोत्सवांच्या प्रसंगी हे नृत्य करतात. या देवता भय उत्पन्न करणाऱ्या असतात. म्हणून नर्तकांची वेषभूषाही भीतिदायक ठेवतात. या प्रसंगी पुजाऱ्याच्या बायका असुर देवतांच्या कथा सांगतात. आणि पुजाऱ्याने नर्तकाला तलवार आणून दिली, की नृत्यास बेहोषी येते. देवस्थानाच्या समोरील पटांगणातच हे नृत्य होते. [ए. हो. रा.; डि. सा. इं. म्यु, म्यु.]

भूतमातामहोत्सव भूतमाता ही एक देवता असून, ती आणि तिचे सहचर यांची उत्पत्ती पार्वतीपासून झाली असे समजतात. प्राचीन काळी हिचा सार्वत्रिक उत्सव होत असे. हा एक अर्धलौकिक स्वरूपाचा उत्सव होता. वैशाख कृष्ण प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत तो चालत असे. इ. स. च्या ७ व्या शतकापासून १३ व्या शतकापर्यंत या उत्सवाचा बराच बोलबाला होता. यात पहिले चार दिवस भूतमातेची पूजा आणि अमावास्येच्या दिवशी मिरवणुकीने तिचे विसर्जन होत असे. उत्सवकाळात रोज रात्री देवीपुढे नाटके व ललिते करीत. गाणे, नाचणे, सोंगे घेणे, अंगाला चिखल माखणे, धुळीत लोळणे, अभद्र व अश्लील बोलणे अशा गोष्टी या उत्सवात मोठ्या हौसेने चालत. सांप्रतच्या शिमग्यासारखेच याचे स्वरूप होते, असे म्हणायला हरकत नाही. या उत्सवामुळे वर्षभर भूतबाधा होत नाही, अशी लोकांची समजूत होती. काही लोक ज्येष्ठ मासातही हा उत्सव करीत. [म. लो. उ.]

भूतयज्ञ पंचमहायज्ञांपैकी एक. यात प्राणिमात्रासाठी भाताचे बलिदान सांगितलेले असते. पाहा – पंचमहायज्ञ.

भूतरजस रैवत मन्वंतरातील देवगण. यात तेरा देवांचा समावेश आहे, असे भागवतात म्हटले आहे (८·५·३). याशिवाय याचा उल्लेख ब्रह्म पुराण (२·३६·५१,५६) व विष्णू पुराण (३·१·२१) यांतही आढळतो. [पु. इं.; प्रा. च. को.]

भूतराँसा भुताच्या उद्धारासाठी सांगितलेली किंवा गाइलेली करुण कथा. गढवालमधला, भुताला शांत करण्याचा हा एक विधी आहे. या कामासाठी घड्याल नावाच्या माणसाला बोलावतात. ज्या घरातले भूत शांत करायचे, त्या घरची नातेवाईक माणसे त्या प्रसंगी एकत्र जमतात. घड्याल प्रथम जवांनी भरलेले एक भांडे पुढे ठेवतो आणि भुताच्या नावाने दिवा प्रज्वलित करतो. मग तो ढोलके आणि कासाळू या वाद्यांच्या साथीवर गीते गाऊन भुताला आवाहन करतो. मग ते भूत तिथे जमलेल्या लोकांपैकी विशेषतः एखाद्या नातेवाईकापैकी, कोणाच्या तरी अंगात संचार करते. ती व्यक्ती मग मोठमोठ्याने रडू लागते. घड्याल त्याला न रडण्याबद्दल बजावतो. त्यासंबंधीचे एक गीत असे –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सागर को पाणी सागर ऽ ही समांद ऽ।
नि रोणु भुला धावडी लगैंक ऽ।
केक ऽ अब तू जिकूडी जलौंदी।
दुनियां मां क्वी भी अम्मर ऽ नी रये ।।

अर्थ – हे भूत झालेल्या माणसा, तू धीर धर. समुद्राप्रमाणे आपल्या दुःखाचा आवेग आपल्यातच सामावून घे. जोरजोराने रडू नकोस. स्वतःच्या अंतःकरणाला जाळू नकोस. संसारात कोणालाही अमर होता येत नाही.

मग त्या भुताने पछाडलेली व्यक्ती आपल्या गतजन्मीच्या नातेवाईकांना मिठ्या मारते आणि काही तरी सांगू लागते. भूत जोवर शांत होत नाही, तोवर दिवसभर राँसाचा कार्यक्रम चालू राहतो. काही काही वेळा अकरा दिवसपर्यंत ते भूत नाचत राहते आणि शेवटी आपली इच्छा सांगून व इच्छापूर्ती करून घेऊन शांत होते.

भूत पुरुषाचे असेल, तर त्याला पराक्रमी वीरांच्या आणि भूत स्त्रीचे असेल, तर त्याला सती, महाराणी, देवी व अप्सरा यांच्या कथा ऐकवल्या जातात. गढवालमध्ये राँसाच्या अशा अनेक कथागाथा प्रचलित आहेत. मात्र सांप्रत अशा राँसा गाणाऱ्या लोकांचा वर्ग हळूहळू ऱ्हास पावत आहे.

राँसाचा हा प्रकार बऱ्याच अंशी कोकणातल्या डाक नावाच्या प्रकारासारखा आहे. पाहा – डाक. [श्री. पुरुषोत्तम डोभाल – पर्वतीय संस्कृती, मे १९६२]

भूतविद्या

भूत या शब्दाचे प्राणी, वस्तू, वस्तुतत्त्व, देव, भक्त, पिशाच, इ. विविध अर्थ आहेत. पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही पाच तत्त्वे पंचमहाभूते म्हणून प्रसिद्ध आहेत. छांदोग्य उपनिषदात भूतविद्या हा शब्द ब्रह्मज्ञान या अर्थाने वापरलेला आहे. शंकराचार्यांनी भूतविद्येला भूततंत्र म्हणजे जीवनशास्त्र असे म्हटले आहे. रंगरामानुजाचार्यांच्या मते भूतविद्या म्हणजे वशीकरणविद्या होय. मात्र सामान्यपणे माणसांना उपद्रव देणाऱ्या भुताखेतांचा बंदोबस्त करण्यासाठी जे मंत्रतंत्रादी उपाय वापरले जातात, त्यांचा भूतविद्येत समावेश होतो. तिला पिशाचविद्या असेही म्हणतात. पाहा – पंचमहाभूते; पिशाच. [सु. वि. को.]

भूतशुद्धी

ब्रह्मतत्त्वाशी संयोग पावून शरीररूपात परिणत झालेल्या पंचमहाभूतांना मंत्रांनी शुद्ध करणे, याला भूतशुद्धी असे म्हणतात. चित्तशुद्धीसाठी करायच्या सर्व कर्मांत भूतशुद्धीचे स्थान पहिले आहे. ती न करता जप, पूजा, इ. केलेली सर्व कृत्ये निरर्थक होतात, असे वसिष्ठसंहितेत म्हटले आहे. पाहा – आसनविधी. [योगविद्या; कल्याण साधनांक]

भूतान

हिमालयाच्या कुशीतील एक स्वतंत्र राष्ट्र. उत्तरेला तिबेट, दक्षिणेला व पूर्वेला भारत आणि पश्चिमेला सिक्कीम अशा याच्या चतुःसीमा आहेत. याचे क्षेत्रफळ सुमारे १८,००० चौरस मैल आणि लोकसंख्या साडेआठ लाख आहे.

नैसर्गिक विभाग – भौगोलिक दृष्ट्या भूतानचे पूर्व भूतान आणि पश्चिम भूतान असे दोन भाग पडतात. या दोन भागांच्या मधली हद्द काळे पर्वत या नावाने प्रसिद्ध असलेल्या पर्वतश्रेणींनी बनली आहे. पूर्व भागाला टोंगसाझोंग असे नाव असून, त्यातील लोक मुख्यत्वे आसामी आहेत. पश्चिम भागाला पारझोंग असे म्हणतात व त्यात प्रामुख्याने तिबेटी वंशाचे लोक राहतात. हिमालयाच्या पायथ्याजवळच्या याच्या भागाला दुआर असे नाव आहे. यात पाऊस फार पडतो. त्यामुळे इथे दाट जंगले असून, त्यांत हिंस्र पशूंची वस्ती आहे. हा भाग अत्यंत दुर्गम असून, इथली हवा फार दमट व रोगट आहे.

याशिवाय भूतानचे उत्तर, मध्य व दक्षिण असेही तीन स्वाभाविक विभाग मानण्याची पद्धत आहे. उत्तर भूतानमधील खोरी समुद्रसपाटीपासून बारा ते अठरा हजार फूट उंचीवर आहेत. या भागात हिमाच्छादित पर्वत असून, काही ठिकाणी थोडे गवत उगवते. त्यामुळे या भागात वस्ती फार थोडी आहे. मध्य भूतान भागाची रुंदी सुमारे चाळीस मैल आहे. यात वर्षाला चाळीस ते साठ इंच पाऊस पडतो. याच भागात पारो व पुनाखा या नद्यांची खोरी असून, भूतानची दाट लोकवस्ती याच भागात आहे. दक्षिण भूतान या भागाची रुंदी सुमारे तीस मैल आहे. यात हिमालयाच्या पायथ्याच्या टेकड्या येतात. इथे पाऊस दोनशे ते तीनशे इंच पडतो. त्यामुळे इथली जंगले घनदाट आहेत.

इतिहास – भूतानच्या पूर्वेतिहासाविषयी फारशी माहिती मिळत नाही. इ. स. च्या नवव्या शतकात तिबेटी सैन्य भूतानमध्ये घुसले, त्याने तिथे लहान लहान राज्ये स्थापून बसलेल्या भारतीय राजांना हाकलून दिले आणि भूतानवर आपली सत्ता स्थापन केली. तिबेटी सत्तेपाठोपाठ तिबेटातील लामा तिथे आले. इ. स. १५०० च्या सुमारास त्यांनी तिथे आपले प्रचंड मठ उभारले. तिबेटी सेनाधिकाऱ्यांनी व सरदारांनी तिथे किल्लेही बांधले. या मठांच्या आणि किल्ल्यांच्या भोवती जी वस्ती वाढली, तिच्यातून भूतानमधील गावांची उभारणी झाली. पुनाखा हे गाव इ. स. १५२७ च्या सुमारास व वांगडू फोड्रांग हे इ. स. १५७८ च्या सुमारास अस्तित्वात आले.

इथले लोक फार धर्मभोळे असल्यामुळे धर्मगुरूच पुढे तिथले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सत्ताधीश झाले. सुमारे तीनशे वर्षांपूर्वी शेपटून ला फा नामक एका लामाने स्वतःला भूतानचा राजा म्हणवून घ्यायला सुरुवात केली. त्याने आपल्याला धर्मराज ही पदवी घेतली. त्या वेळच्या भूतानमधे सांप्रत भारतात असलेले दार्जिलिंग आणि जलपैगुडी हे परगणे मोडत होते. ला फा याच्या नंतर दूपगाईन शेपटून हा गादीवर आला. त्याने युंगपेन म्हणजे दुर्गाधिपती आणि पेनलोप म्हणजे प्रांताधिपती असे दोन नवे अधिकारी नेमले. दूपगाईनने राज्यकारभार आणि धर्माधिकार हे दोन्ही आपल्याच हातांत ठेवले होते. पण त्याच्या नंतर गादीवर आलेल्या धर्मराजाने राज्यकारभार पाहण्यासाठी एका दिवाणाची नेमणूक केली. त्यालाच पुढे देवराज असे म्हणू लागले.

धर्मराजपदावर आरूढ होणारी व्यक्ती एकच असते, अशी भूतानी लोकांची समजूत आहे. धर्मराज हा बुद्धाचा अवतार असतो, असे ते मानतात. तो मृत्यू पावला, की तो पुन्हा काही ठराविक घराण्यांतच जन्म घेतो, अशीही समजूत आहे. त्यामुळे पूर्वी धर्मराजाची गादी रिकामी झाली, की अशा कुटुंबांतील धर्मराजपदेच्छू मुलांना एकत्र बोलावीत. जो मुलगा जुन्या धर्मराजाच्या स्मरणी, पोथ्या इ. वस्तू अचूक ओळखील, त्याच्या रूपाने धर्मराजाने अवतार घेतला, असे समजत आणि त्याची धर्मराजपदावर नेमणूक करीत. इ. स. १८८५ नंतर बुद्धाने नवा अवतार धारण करायचा नाही, असे ठरवले आणि तेव्हापासून धर्मराजाची गादी रिकामी राहिली आहे.

देवराजाची निवड मात्र पेनलोप आणि युंगपेन यांचे संयुक्त मंडळ करीत असे. पेनलोप आणि युंगपेन यांची नियुक्तीही हेच मंडळ करीत असे. पारो आणि टोंगसा येथील पेनलोप हे अधिक सामर्थ्यशाली असल्यामुळे दोन-तीनशे वर्षे तेच आलटून पालटून देवराज होत असत.

इ. स. १९०७ मध्ये टोंगसाचे पेनलोप हे ग्यालपो म्हणजे राजे झाले आणि राजेपद त्या घराण्यात वंशपरंपरा सुरू झाले सध्याचे राजे जिग्मे दोरजी वांगचुक हे तिसऱ्या पिढीतील राजे आहेत.



पूर्वी भूतानी लोक मधूनमधून जवळच्या भारतीय प्रदेशावर हल्ले करून तिथली संपत्ती लुटून नेत असत. इ. स. १७७२ मध्ये भूतानी लोकांनी कुचबिहारच्या राजाला पकडून नेले. कुचबिहारचे संरक्षण करण्यासाठी इंग्रज लोक कराराने बांधले गेले होते. म्हणून इंग्रजी सत्तेचा प्रतिनिधी वॉरन हेस्टिंग्ज याने भूतानवर स्वारी केली. त्या वेळी भूतान आणि इंग्रज यांच्यामध्ये तह होऊन कुचबिहारची सरहद्द मानण्याचे भूतानी लोकांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मान्य केले. नंतरच्या काळातही भूतानी आणि इंग्रज यांच्यामध्ये तंटे निर्माण झाले. त्यामुळे इ. स. १८६३ नंतर इंग्रजांनी भूतानवर पुन्हा एकदा स्वारी केली. त्या वेळी भूतानने शरणागती पत्करली आणि अठरा दुआर म्हणजे हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या टेकड्या व बावीस मैल रुंद आणि दोनशे पंधरा मैल लांब असा भूपट्टा भारताला दिला. याचा मोबदला म्हणून या प्रदेशाच्या उत्पन्नापैकी काही उत्पन्न दर वर्षी भूतानला द्यावे, असे ठरले. यानंतर इ. स. १९१० साली पुन्हा एक तह होऊन त्यात परराष्ट्रीय संबंधांच्या बाबतींत भूतानने इंग्रजांचा सल्ला मानावा, असे ठरले. या तहान्वये सर्वांत महत्त्वाची गोष्ट साधली, ती म्हणजे चीनच्या सार्वभौमत्वापासून भूतानची सुटका झाली. इ. स. १९४९ मध्ये भारताने भूतानशी आणखी एक तह करून भूतानला दर साल देण्याची रक्कम वाढवून ती पाच लाख रुपये करून दिली. सांप्रत भूतानच्या संरक्षणाची जबाबदारी भारतावर आहे आणि भूतानचे परराष्ट्रीय धोरण भारताच्या सल्ल्यानुसार ठरत असते.

भूतानचे सध्याचे राजे जिग्मे दोरजी वांगचुक व त्यांची

भूतानी नर्तकाचा एक मुखवटा

भूतानी स्त्री व पुरुष

राणी यांना आपला देश सुधारावा, अशी तळमळ आहे आणि त्या दृष्टीने त्यांचे पुष्कळ प्रयत्न चालू आहेत. भूतानमध्ये मर्यादित प्रमाणात लोकशाही आहे. राजाला राज्यकारभारात सल्ला देण्यासाठी १३० सभासदांचे एक विधिमंडळ आहे. ही लोकशाही सांप्रतच्या राजेसाहेबांनीच आणली आहे. त्यांनी देशात अनेक शाळा काढल्या आणि गुलामगिरीची प्रथा बंद केली. त्यामुळे राज्यातले पाच हजार गुलाम स्वतंत्र झाले. राजांनी त्यांच्या वसनासाठी त्यांना सरकारी जमीन दिली. कोणाही व्यक्तीला भूतानात तीस एकरांपेक्षा जास्त जमीन कायद्याने ठेवता येत नाही. देशात उद्योगधंद्यांची भरभराट व्हावी म्हणून त्यांनी भारताशी करार केला आहे. त्याअन्वये जलटाका नदीला धरण बांधून तिथे विजेची निर्मिती करण्याच्या उद्योगात ते आहेत. आणखीही काही विकासयोजना भारताच्या मदतीने ते अमलात आणीत आहेत.

लोक – भोत लोकांच्या हाती इथली सर्व सत्ता आहे. या लोकांना भूतिया असेही म्हणतात. भूतान हे नाव भोतान्त म्हणजे भोत किंवा तिबेटी लोकांचा अंत, यावरून पडले आहे असे म्हणतात. ते मंगोलियन वंशाचे आहेत. त्यांचे तोंड चपटे, डोळे बारीक, जिवणी रुंद व नाक आखूड असते. स्त्रिया आपले केस डोक्यावर आणून त्यांचा अंबाडा बांधतात. अंबाड्याभोवती साखळ्या असलेली चांदीची पट्टी बांधतात. हे लोक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्नान क्वचितच करतात. एकदा अंगात चढवलेले कपडे फाटेपर्यंत ते बहुधा काढीत नाहीत. हे लोक तिबेटी भाषेची एक बोली बोलतात. त्यांचा धर्मही तिबेटी बौद्ध धर्मच आहे.

या लोकांनी जरी बौद्ध धर्म स्वीकारला असला, तरी त्यांनी आपला मूळ निसर्गधर्म अद्याप पूर्णपणे सोडलेला नाही. सर्वसामान्य भूतिया लोक अनेक भुताखेतांना भजतात आणि त्यांना फुले व चिंध्या अर्पण करतात.

घरे बांधण्याच्या कलेत हे लोक बरेच पुढारलेले आहेत. दगड आणि माती यांच्यापासून ते दोन, तीन आणि प्रसंगी चार मजल्यांच्या इमारतीही बांधतात. घरांच्या दोन्ही बाजूंनी व्हरांडे असतात. ते कोरीव आणि रंगीत लाकडांनी सजवलेले असतात. त्यांची कलाकुसर वाखाणण्यासारखी असते. दिहा नावाच्या झाडाच्या सालीपासून कागद बनविण्याची कलाही त्यांना अवगत आहे. त्यांना दारूचे फार व्यसन असून, तांदूळ, कडधान्ये वगैरेंपासून ते दारू बनवितात. या लोकांना घोडदौड फार आवडते. ते घोड्यांच्या शर्यतींतही भाग घेतात.

पूर्वेकडील आसामी वंशाच्या लोकांचा धर्म बौद्ध असला, तरी त्यांच्यावर हिंदू धर्माचा बराच प्रभाव आहे. दक्षिण भागातील नेपाळी लोक हिंदू आहेत. या लोकांना भूतानी लोक कमी प्रतीचे मानतात. नेपाळी लोकांना मध्य भूतानमध्ये जायला मनाई आहे. अनेक भूतिया स्त्रीपुरुष भिक्षुणी व लामा बनतात. भूतानात शेकडो लामा मठांत राहतात. लामा डाव्या खांद्यावरून एक लोकरीची शाल अंगावर टाकतात. त्यांचा उजवा खांदा उघडाच असतो. लामा आणि इतर लोकही 'ओं मणिपद्मे हुम्' या मंत्राचा जप करतात. जपमाळांशिवाय या मंत्राचा जप करण्याची यंत्रेही असतात.

लामा – भूतानमध्ये बौद्ध धर्माला राजाश्रय आहे. त्यामुळे तोच भूतानचा राष्ट्रधर्म आहे. भूतानात चार हजारांपेक्षा जास्त लामा म्हणजे धर्मगुरू असून, त्यांचा सर्व खर्च सरकारमार्फत होतो. इथल्या लामांचे आठ मुख्य मठ आहेत. त्यांच्यासाठी देशाच्या उत्पन्नापैकी जवळ जवळ पाव हिस्सा खर्ची पडतो. या खर्चात कपात करण्याचा प्रयत्न अलिकडे चालू आहे. धर्मगुरूंच्या रिकाम्या झालेल्या जागा भरायच्या नाहीत, असे सरकारचे नवे धोरण आहे. भुतेखेते, जादूटोणा व नवसाला पावणाऱ्या अनेक देवदेवतांची उपासना असे तिथल्या सर्वसामान्य लोकांच्या धर्माचे स्वरूप आहे.

सर्वसाधारणपणे भूतानी लोकांना लिहिता वाचता येत नाही. पण गेल्या काही वर्षांत भूतानी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषा शिकवणाऱ्या अनेक सरकारी शाळा भूतानमध्ये निघाल्या आहेत. या शाळांत विद्यार्थ्यांची राहण्याची सोय केलेली असते. आईबाप विद्यार्थ्यांना शिधा पुरवतात आणि आळीपाळीने स्वयंपाक करून वाढतात. उच्च शिक्षणासाठी भूतानी लोक भारतात येतात.

उद्योगधंदे – शेती आणि पशुपालन हे इथल्या लोकांचे प्रमुख उद्योगधंदे आहेत. भात हे येथील मुख्य पीक होय. डोंगरउतारावर मुख्यतः इथली शेती होते. लांबून लांबून पाणी आणून ते दगडांत बांधून काढलेल्या पाटांतून निरनिराळ्या शेतांत खेळवले जाते. याशिवाय गहू, मका, जव, वेलदोडे, अक्रोड, संत्री, भाजीपाला, इ. पिकेही तिथे होतात. बहुधा प्रत्येक कुटुंबाची स्वतःच्या मालकीची जमीन असते. तिच्यात खपून ते पीक काढतात. स्वतःचा कपडाही ते स्वतःच विणतात. त्याशिवाय, काही लोक लाकडावर कोरीव काम करतात आणि लोखंडाच्या तलवारी, खंजीर वगैरे हत्यारेही बनवतात.

भूतानमधे शहरे नाहीतच आणि खेडीसुद्धा थोडीच आहेत. एखाद्या सरदाराने बांधलेला किल्ला (झोंग) आणि त्याच्या भोवती पाचदहा घरे, असे तिथल्या गावाचे स्वरूप असते. नव्याने तयार झालेली राजधानी थिंबू हीसुद्धा दहा-वीस घरांचा समूह आहे. पारो या शीतकालीन राजधानीचे स्वरूपही

भूतानी मुले

एका किल्ल्याभोवतीची चार घरे असेच आहे. भूतानमध्ये दुकाने अशी नाहीतच. इथला व्यापार वस्तुविनिमय या रूपात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चालतो. भूतानची मालवाहतूक खेचरे व याक यांच्या पाठीवरून होते. कारण भूतानमध्ये दळणवळणाचे मार्ग जवळजवळ नाहीतच. भारतातून पारो येथे जाण्यासाठी इ. स. १९६१ पर्यंत नीट रस्ताच नव्हता. डोंगरातून वेड्यावाकड्या वाटेने खेचरांवरूनहा प्रवास करावा लागे आणि त्यासाठी पाचसहा दिवस तरी लागत. सांप्रत जीपने दहा तासांत हा प्रवास करता येतो. चीनने तिबेट गिळंकृत केल्यापासून भूतानचा तिबेटशी असलेला व्यापार थांबला आणि त्याला भारताशी व्यापार करण्याची गरज उत्पन्न झाली. भारताने भूतानमधील रस्ते बांधण्यासाठी आर्थिक मदत दिली, यंत्रज्ञ पुरवले आणि आठशे मैल लांबीचे नवे रस्तेही बांधून दिले.

भूतानमधील लोकांची घरे बहुधा तीन मजली असतात. खालच्या मजल्यात ते गुरेढोरे बांधतात व धान्य साठवतात. दुसऱ्या दोन मजल्यांवर ते राहतात. प्रत्येक घरात एक देवघर असते. त्यात अनेक देवदेवतांच्या मूर्ती असतात आणि त्यांच्या पुढे मेणबत्त्या जळत असतात. भुताखेतांवर फार विश्वास असल्यामुळे हे लोक सदैव त्यांना प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करतात. सर्व भूतानमध्ये अनेक ठिकाणी ध्वज फडफडत असलेले दिसतात. त्यांवर प्रार्थना लिहिलेल्या असतात. त्यांच्यामुळे भुताखेतांचे निवारण होते, अशी त्यांची समजूत आहे.

विवाहप्रथा – पूर्वी यांच्यांत एका स्त्रीने अनेक पती करायची चाल होती; पण आता कायद्याने ती बंद करण्यात आली आहे. मुले-मुली बहुधा आपला जोडीदार आपणच निवडतात आणि आपला लग्न करण्याचा मनोदय आईवडिलांना कळवतात. त्यांच्यांत लग्नविधी असा नसतोच. लामाने वधू-वरांना आशीर्वाद दिला, की लग्न झाले, असे समजतात.

विवाहाच्या वेळी वधू निदान सोळा वर्षांची व वर एकवीस वर्षांचा असला पाहिजे, असा नियम आहे. प्रथम पत्नी हयात असताना जर पुरुषाला पुन्हा लग्न करायचे असेल, तर त्यासाठी त्याला प्रथम पत्नीची संमती घ्यावी लागते किंवा तिची इच्छा असल्यास तिला घटस्फोट द्यावा लागतो. पोटगीही द्यावी लागते.

सांस्कृतिक जीवन – भूतानमधील लोकांचे जीवन कष्टमय असले, तरी ते आनंदी असतात. ते चांगले खातात व चांगले कपडे घालतात. बहुतेक कुटुंबांची दोन घरे असतात. हिवाळ्यात ते सखल खोऱ्यातील घरात राहतात आणि उन्हाळ्यात उंच डोंगरावरील घरात राहतात. हे लोक बहुधा अनवाणी चालतात.

दर वर्षी थिंबू येथे त्यांच्या नेमबाजीच्या स्पर्धा होतात. रंगीबेरंगी कपडे घालून धनुर्धर भूतानी त्यांत भाग घेतात. धनुर्धरांच्या निरनिराळ्या गटांबरोबर त्यांना उत्तेजन देण्यासाठी उंची पोषाख केलेल्या नर्तकी मुली असतात. स्पर्धेच्या वेळी मधूनमधून नर्तक लाल रंगाच्या किनखापाचा अंगरखा घालून आणि वेगवेगळ्या पशुपक्ष्यांचे मुखवटे चढवून नृत्य करतात. नृत्याला ढोल आणि तुतारी यांची साथ असते.

भूतानी नृत्य

भूतानमध्ये अनेक मठ आहेत, त्यांपैकी टोंगसा झोंग व वांगडू फोड्रांग झोंग हे फार मोठे आहेत. मठांची रचना दलाई लामाच्या ल्हासा येथील पोटाला राजवाड्यासारखी असते. त्यांच्या भिंती मातीच्या व दगडाच्या असून त्या पांढऱ्या चुन्याने रंगवलेल्या असतात. खिडक्यांवर कोरीव काम केलेले असते आणि छपरांना सोन्याचे पाणी दिलेले असते. छपराच्या कोपऱ्यांवर ड्रॅगनची मुखे असतात. प्रत्येक झोंगमध्ये प्रार्थनेसाठी अनेक खोल्या असतात. त्यांत भिंतींवर अनेक चित्रे रंगवलेली असतात आणि त्यांत अनेक देवदेवतांच्या मूर्ती असतात. काही झोंगमधील मूर्ती फारच भव्य असतात.

तक्टशांग येथील मठ एका डोंगरकड्यावर अवघड जागी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उभारलेला आहे. त्याला घाचे घरटे असे नाव आहे. ज्या भारतीय साधूने भूतानमध्ये प्रथम बौद्ध धर्म आणला, तो



तक्टशांग येथील मठ– भूतान

उडणाऱ्या वाघावर बसून इथे उतरला होता, असे भूतानी लोक समजतात. पूर्वी प्रत्येक कुटुंबांतील एक मुलगा मठाला अर्पण करण्याची चाल होती. पण आता ती कायद्याने बंद करण्यात आली आहे.

मृतकप्रथा – एखाद्याचा मृत्यू झाला असता लामा तिथे येऊन प्रार्थना म्हणतात. मोठ्या माणसांना जाळतात. प्रेत वाहून नेण्याची वेळ ज्योतिषी सांगतो. लहान मुलांची प्रेते खोल पाण्यात टाकतात किंवा उंच डोंगरावर गिधाडांना खाण्यासाठी ठेवतात. [हिं. वि. को.; भा. शे. ने.; नॅशनल जिऑग्राफिक, सप्टेंबर १९६१; इं. स्ट. पा. प्रे., जाने. १९६०]

भूतांश काश्यप एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशे सहावे सूक्त याच्या नावावर आहे. परंपरेने याला कश्यपपुत्र असे म्हटले आहे. सदर सूक्ताच्या शेवटच्या ऋचेत याचा उल्लेख केला आहे. परंतु एवढ्यावरून तो कश्यपपुत्र अथवा काश्यपकुलातील होता, असे म्हणता येत नाही, असे विद्वानांचे मत आहे. भूतांश काश्यपाने संततीच्या प्राप्तीसाठी या सूक्ताची रचना केली असे बृहद्देवतेत (८-११-२१). म्हटले आहे.

अश्विनौची स्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. हे सूक्त गूढसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. निरुक्तमते या सूक्तातील सहावी ऋचा हा आध्यात्मिक अर्थाचा मंत्र आहे. यातील नमुन्याची एक ऋचा (१०.१०६.४ अशी—

आपी वो अस्मे पितरेव पुत्रोग्रेव रुचा नृपतीव तुर्ये
इर्येव पुष्ट्यै किरणेव भुज्यै श्रुष्टीवानेव हवमा गमिष्टम् ॥

अर्थ – पितृसदृश प्रेमवर्षाव करणाऱ्या, चंद्रसूर्यांप्रमाणे तेजस्वी, सम्राटाप्रमाणे कार्यप्रेरक, धनिकाप्रमाणे पोषक आणि प्रकाशाप्रमाणे उपभोग्य अशा अश्वींनो, तुम्ही अश्वासारख्या द्रुत गतीने आमच्याकडे या.

यात जर्भरी, तुर्फरी, फर्फरी, मदेरु, इ. जे शब्द आले आहेत, त्यांचा अर्थ कोण्याही भाष्यकाराला नीट लागलेला नाही. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.; म. ज्ञा. को.; सी. ऋ.]

भूतिराज (इ. स. च्या १० व्या शतकाचा सुमार) एक शैव आचार्य. हा अभिनवगुप्ताचा गुरू होता. अभिनवगुप्त याला शिवाचा अवतार समजत असे. द्वैतशैवागम, ब्रह्मविद्या, क्रमदर्शन यांचा अभ्यास अभिनवगुप्ताने भूतिराजाजवळ केला. याने शिकविलेल्या ब्रह्मविद्येच्या तीन अक्षरी मंत्रात अशी शक्ती होती, की मृत्युशय्येवरील माणूसही निरंजनी अवस्था प्राप्त करून घेत असे, असे सांगतात. तंत्रालोक, तंत्रसार, मालिनी विजयवार्तिक, महारथ मंजरी, इ. अनेक ग्रंथांत भूतिराजाचा सादर उल्लेख आहे. [अभिनवगुप्त]

भूतेश्वर काश्मीरमधले एक शिवस्थान. याला आता बुथीसेर किंवा बूतसेर असे म्हणतात. काश्मीरात प्राचीन काळापासून भूतेश्वर शिवाचे खूपच माहात्म्य होते. राजा शचीनराने यवनांचा उपद्रव दूर होण्यासाठी या शिवापुढे घोर तपश्चर्या केली होती, असे राजतरंगिणीत म्हटले आहे. नीलमत पुराणात या शिवाचे वर्णन आहे (५५.१०९०). धर्मशास्त्राने या स्थानाची नंदिक्षेत्रात गणना केली आहे. [हिं. ध.]

भूतोद्वासन पूजा व अग्निमुख यांतील एक अंग. ज्या ठिकाणी वरील कृत्ये करायची असतील, त्या भूमीवरची भुतेखेते तिथून पळून जावी, म्हणून त्या जागी पुढील मंत्राने मोहऱ्या फेकतात व तीनदा टाळी वाजवतात—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अपसर्पन्तु ते भूता ये भूता भूमिसंस्थिताः ।
ये भूता विघ्नकर्तारस्ते नश्यन्तु शिवाज्ञया ।।

अर्थ – जी भूत-पिशाचे या जागी राहून कर्मात विघ्न करतात ती सर्व शिवाच्या आज्ञेने नाश पावोत. [आचारेंदु]

भूथम् तमिळनाडमधील एक नृत्य. हे नृत्य पूरवी आट्टम् या नृत्यासारखेच आहे. पण यात त्यापेक्षा साधेपणा अधिक असतो. नाचासाठी विविध प्रकारच्या मानवाकृती केलेल्या असतात. या आकृती बांबू व कागदाचा लगदा यांच्या असतात. त्यांना फुगीर वस्त्रे नेसवितात. या वस्त्रांच्या आत नाचणारी मुले उभी राहतात व ढोलाच्या तालावर नाचतात. हे नृत्य नेहमी जोडीने करतात. त्यात राजा-राणी, सावकार-सावकारीण अशी पात्रे असतात. [श्री. मोहन खोकर – मार्च ऑफ इंडिया, सप्टेंबर १९६२]

भूधरदास (इ. स. च्या १८ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक जैन भक्तकवी. याला भूधरमल असेही म्हणत. हा आग्रा येथील रहिवासी असून, खंडेलवाल जातीचा होता.

याने विपुल साहित्य निर्माण केले आहे. त्यात महाकाव्य आहे व स्फुट काव्येही आहेत. पार्श्वपुराण हे त्याचे महाकाव्य होय. ते पार्श्वनाथाच्या जीवनावर असून, मध्यकालीन हिंदी साहित्यात त्याला बरीच प्रतिष्ठा मिळाली आहे. त्या काव्यात सौंदर्य व प्रसाद हे गुण जागोजागी आढळतात. स्फुट काव्यात भूधरविलास, पदसंग्रह, जखडी, विनतियाँ, बारह भावनाएँ, बाईस परिषद आणि स्तोत्रे यांचा समावेश आहे.

भूधरदासाचे काही ग्रंथ नव्याने मिळाले आहेत. त्यांत प्रामुख्याने गजभावना, पंचमेरुपूजा, वज्रनाभी, चक्रवर्तिकी, वैराग्यभावना यांची गणना होते. या कवीच्या अभिव्यक्तीत स्वाभाविकता आहे. [हिं. नी. वि.; हिं. जै. भ. क.; म. ज्ञा. को.]

भूधर मिश्र (इ. स. चे १९ वे शतक) एक जैन ग्रंथकार व कवी. हा आग्र्याच्या जवळ असलेल्या शाहगंज गावचा निवासी होता. पूर्ववयात हा ब्राह्मण होता. पुरुषार्थ-सिद्धयुपाय या ग्रंथातील अहिंसा तत्त्वाच्या विवेचनाचा याच्या मनावर परिणाम झाला आणि याने जैन धर्माचा अंगीकार केला. भूधर मिश्राने त्या ग्रंथावर एक टीकाही लिहिली आहे. रंगनाथ नावाचा एक पंडित याचा गुरू होता. त्याच्याजवळच याने जैन धर्माचे अध्ययन केले. चर्चासमाधान नावाचा याचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथामुळे याला उत्तम कवी म्हणूनही प्रसिद्धी मिळाली होती. [म. ज्ञा. को.]

भूप (१) हिंदुस्थानी संगीतातील एक राग. याची जाती औडव-औडव असून, यात मध्यम व निषाद हे स्वर वर्ज्य आहेत. वादी - गंधार. संवादी - धैवत. आरोह – सा, रे, ग, प, ध, सा. अवरोह – सा, ध, प, ग, रे, सा. गानसमय - रात्रीचा पहिला प्रहर. याला उत्तर हिंदुस्थानातील गायक-वादक भूपाली या नावाने ओळखतात. [सु. वि. को.; क. सं.]

(२) एक प्राचीन जात. वैश्य पुरुष व क्षत्रिय स्त्री यांच्या संकराने उत्पन्न झालेल्या संततीला हे नाव आहे, असे यमाचे मत कृत्यकल्पतरूत दिले आहे. [हि. ध.]

भूपरीक्षा नवीन वसाहत करण्यासाठी किंवा नवीन घर बांधण्यासाठी जमिनीचे गुणधर्म पाहतात, त्याला भूपरीक्षा असे म्हणतात. या परीक्षेत भूमीचे रंग, रूप, वास, चव, स्पर्श, आकार, चढउतार, तिथल्या वनस्पती, इ. गोष्टींचा समावेश असतो. अर्थशास्त्र, अपराजितपृच्छा, मानसार, इ. ग्रंथांच्या मते नदीच्या संगमावर नवीन गावाची वसाहत करावी. संगम नसल्यास डोंगराच्या पायथ्याला नगर वसवावे. महाभारतकारांच्या मते नदीकिनाऱ्यावर किंवा पर्वताच्या पायथ्याला राहणाऱ्या लोकांचे जीवन अधिक सुखी आणि मंगलमय असते (म. भा. शांति. ८७). शुक्रनीतीमध्ये याच गुणांना मान्यता दिली आहे. परंतु समरांगणसूत्रधार या ग्रंथात हे गुण मान्य करून आणखी असे म्हटले आहे, की जिथे खनिज पदार्थ मुबलक प्रमाणात मिळतात, ती भूमी उत्तम होय.

कोणत्या भूमीत कोणत्या लोकांनी घरे बांधावी या संबंधानेही विपुल माहिती मिळते. युक्तिकल्पतरू व अपराजितपृच्छा या ग्रंथांन्वये पांढऱ्या रंगाची, तांबडी, पिवळसर व काळी भूमी अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या लोकांच्या गृहरचनेसाठी योग्य होय. वर्णावरून जसे भूमीचे बरेवाईट लक्षण ठरवतात, तसे तिच्या गंधावरूनही ठरवतात. ज्या भूमीचा उतार पूर्वेकडे असतो ती भूमी उत्तम. कारण त्यामुळे आरोग्याला उपकारक अशा प्रकाश, ऊन, इ. गोष्टी भरपूर प्रमाणात मिळण्याची शक्यता असते.

भुसभुशीत, फार कोरडी, वाळू असलेली किंवा गवताळ अशी भूमी घरासाठी निवडू नये. अशा प्रकारची भूमी बांधकामाला अयोग्य असते. ती व्याघ्रमुखी म्हणजे पुढे रुंद व मागे अरुंद नसावी; तर गोमुखी म्हणजे पुढे अरुंद व मागे रुंद असावी, असाही संकेत आहे. ज्या भूमीच्या परिसरात लहान प्राणीदेखील मोठ्या प्राण्यांवर आक्रमण करायला प्रवृत्त होतात, अशी भूमी राजप्रासादाला योग्य असते, असाही संकेत आहे. पुण्याच्या शनिवारवाड्याची वास्तू याच संकेताने प्राप्त झालेल्या जागेवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बांधली आहे, असे म्हणतात. [प्रा. भा. न. न. जी.; एन्सा. हिं. आ.]

भूपाळी पहाटेच्या वेळी भूप रागात परमेश्वराला आळविण्यासाठी म्हटले जाणारे गीत. अशा गीतांतून मुख्यतः परमेश्वरास विनम्र भावाने जागे करण्याची कल्पना असते. यशोदा व कौसल्या या कृष्ण व राम या आपल्या मुलांना पहाटेच्या वेळी जागे करताना अशी गीते म्हणत असल्याची कल्पना रामदास, होनाजी, इ. कवींनी आपल्या भूपाळ्यांतून व्यक्त केली आहे. या गीतांतून ईश्वराचे स्तवन व रूपगुणांचे वर्णन तर असतेच; शिवाय 'प्रभात समय झाला आहे, तेव्हा हे भगवंता, आता जागे होऊन जगाच्या उद्धारास प्रवृत्त व्हा,' असा उद्‌बोधक विचारही असतो. भूपाळीचा एक नमुना असा—

ऊठिं गोपालजी जाइं धेनूकडे । पाहती सौंगडे वाट तूझी ।।धृ.।।
लोपली हे निशी मंद झाला शशी । मुनि-जन मानसीं तूज ध्याती ।।
भानु-उदयाचळीं तेज पुंजाळलें । फुललीं कमळें ऊदकीं हीं ।।
धेनु-वत्सें तुला पाहती माधवा । ऊठिं गा यादवा उशीर झाला ।।
ऊठिं पुरुषोत्तमा वाट पाहे रमा । दावी मुख-चंद्रमा सकळिकां ।।
कनक-पात्रांतरीं दीप-रत्नें वरीं । ओवाळिते सुंदरी तूजलागीं ।।

प्राचीन मराठीच्या गीतभांडारात भूपाळी वाङ्मयाला एक महत्त्वाचे स्थान आहे. [सार्थ तुकारामगाथा २; नवनीत]

भूभाजनव्रत एक काम्य व्रत. हे संवत्सर व्रत आहे. या व्रतात व्रतवारी व्यक्तीने प्रथम पितरांना अन्न अर्पण करून, मग ते भूमीवर वाढून घेऊन खायचे असते. व्रतावधी एक वर्ष. फल– राज्यप्राप्ती. [हि. ध.]

भूमरा-मंदिर वघेलखंडातल्या नागौद संस्थानातील एक शिवमंदिर. श्री. राखालदास बानर्जी यांनी या मंदिराचा शोध लावला. त्यांच्या मते हे मंदिर इ. स. च्या ५ व्या शतकातले आहे. परंतु ते भारशिव वंशातील राजाने निर्माण केलेले असून, इ. स. १५०–२०० या काळातले आहे, असे श्री. जायस्वालांचे मत आहे. भूमरा हे स्थान भरहूतपासून वीस मैल अंतरावर असून, तिथून सुमारे दीड मैल अंतरावर मझगवा नामक गावाजवळ हे शिवमंदिर आहे. त्यात एक चतुर्मुख शिवलिंग स्थापन केलेले होते. पण सांप्रत तिथे एकमुख लिंगच आहे. स्थानिक लोक त्याला भाकुल देव म्हणतात. भारकुल देव म्हणजे भारशिवांचा देव असे त्याचे मूळचे नाव असावे.

या मंदिरात अनेक ताडवृक्ष कोरलेले असून, काही स्तंभच पूर्णपणे ताड वृक्षासारखे बनवले आहेत. ताड वृक्ष हे नागांचे राजचिन्ह होय. इथे ज्या मानवमूर्ती कोरलेल्या आहेत, त्या अत्यंत सुंदर व आदर्शभूत वाटतात. त्यांचे मथुरेतील मूर्तींशी बरेच साम्य आहे. ही मूर्तिकला भरहूतच्या कलेतूनच उगम पावली आहे. [अं. यु. भा.]

भूमविद्या उपनिषदांतील एक विद्या. भूम म्हणजे ब्रह्म होय. ते ब्रह्म जाणण्याची जी विद्या, तिला भूमविद्या म्हणावे. ही विद्या नारदाला सनत्कुमारांकडून प्राप्त झाली. सत्ता, चैतन्य व सुख असे ब्रह्माचे तीन स्वभाव आहेत. यांतील सुख हे प्रत्येक माणसाला हवे असते. मानवाच्या सर्व धडपडींचा प्रधान हेतू सुखप्राप्ती व्हावी हा असतो. पण बहुतेकांना खऱ्या सुखाची कल्पनाच नसते. सुख, सुख म्हणून ते अल्प व क्षणभंगुर अशा वस्तूंच्या मागे धावत असतात. जे जे म्हणून अल्प व नाशवंत पदार्थ आहेत, ते ते कोणत्या ना कोणत्यातरी रूपात दुःखमयच असतात. म्हणून छांदोग्य उपनिषदात सुखाची व्याख्या करताना स्पष्ट सांगितले आहे, ते असे (७·२३·१)–

यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति
भूमैव सुखं भूमा त्वेव विजिज्ञासितव्यः ।

अर्थ – जो भूमा म्हणजे सर्वांत मोठा म्हणजेच ब्रह्म ते सुख होय. अल्प वस्तूच्या ठिकाणी सुख नाही. भूमा हेच सुख होय. (म्हणून) भूमाच जाणून घेण्याची इच्छा करावी.

हाच सिद्धान्त दुसऱ्या एका पद्धतीने पुढच्या वचनात सांगितला आहे (छांदोग्य. ७·२४·१)–

यत्र नान्यत्पश्यति नान्यच्छृणोति नान्यद्विजानाति स भूमा ।
अथ यत्रान्यत्पश्यत्यन्यच्छृणोत्यन्यद्विजानाति तदल्पम् ।
यो वै भूमा तदमृतमथ यदल्पं तन्मर्त्यम् ।।

अर्थ – ज्या अवस्थेत एक दुसऱ्याला पाहू शकत नाही, दुसऱ्याचे ऐकू शकत नाही, दुसऱ्याला जाणू शकत नाही (म्हणजेच दुसरा नावाची जिथे वस्तूच शिल्लक उरत नाही, अशी अद्वैतावस्था) हेच भूम होय. जिथे एक दुसऱ्याला पाहतो, ऐकतो व जाणू शकतो, त्याला अल्प म्हणावे. जे भूम ते अमर व जे अल्प ते मर्त्य होय.

जगात खाणारे, पिणारे, पाहणारे, ऐकणारे असे पुष्कळ लोक आहेत. परंतु त्यांची तृप्ती कधीच होत नाही. याचे कारण म्हणजे जगातल्या यच्चयावत वस्तू परिमित आहेत, अल्प आहेत. परब्रह्म तेवढे महान असून ते असीम आहे. त्याच्याशी तादात्म्य झाल्यावर दुसऱ्या कोणत्याही वस्तूची इच्छाच होत नाही.

असत् पदार्थांची उपेक्षा करावी. निर्गुण ब्रह्माच्या ध्यानात चित्तैकाग्र्य झाल्यावर त्यात ब्रह्मविद्या स्थिर होते व सच्चिदानंद हे ब्रह्माचे तीन्ही स्वभाव अखंड एकरूपाने भासतात. योगाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि ज्ञानाने उपाधींचा परिहार झाल्यावर स्वयंप्रकाश व निरुपाधिक असे ब्रह्मतत्त्व साक्षात अनुभवाला येते. मग त्रिपुटीचा अभाव होतो. यालाच भूमानंद म्हणतात.

ही भूमविद्या ज्याला ज्ञात होते, त्याला व्याधी, मृत्यू, इ. कशाचेच भय नसते. [बत्तीस विद्या; कल्याण– साधनांक]

भूमिग्राम एक जैन स्थान. हे ठिकाण उ. प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्यात आहे. याला भीमग्राम व भोगग्राम अशीही नावे होती. महाभारतकाली हे गाव प्रसिद्ध होते. महाभारतात वर्णिलेली काम्यक व भोगवन ही वने याच्या जवळच होती, असे म्हणतात. जनश्रुती अशी आहे, की हे द्रौपदीचे भोगवन असून, द्रुपदाने इथे तिच्यासाठी एक दुर्ग निर्माण केला होता. इथे त्या दुर्गाचेच अवशेष आहेत, असे म्हणतात.

हे जैन धर्माचे एक प्रसिद्ध केन्द्र असून, इथे मध्ययुगात जैन सिद्धान्तांचे नियमित रूपाने अध्ययन-अध्यापन होत असे. इथे जैन विद्वान आणि कवी यांची परंपरा चालत आलेली होती.

आणखी एक आख्यायिका आहे, ती अशी – ज्या वेळी महंमद घोरीचे आक्रमण या गावी झाले, तेव्हा गावातले सगळे वीर पुरुष त्याच्याशी लढताना कामी आले आणि गावातल्या सर्व स्त्रियांनी जोहार केला. त्याचा परिणाम असा झाला, की प्रस्तुत गाव उद्ध्वस्त झाले. पुढे काही कालाने मोगल बादशाहाने हे गाव पुन्हा वसवले. इथे त्यांचा मुख्य न्यायाधीश (काजी उलकुजात) राहत असे.

या गावात दोन जिनमंदिरे आहेत. पहिले गावाच्या उत्तर भागात एका उंच टेकडीवर आहे व दुसरे गावात आहे. दोन्ही मंदिरांत अनेक जिनमूर्ती आहेत. कित्येक मूर्तींच्या आसनावर प्रदीर्घ शिलालेखही आहेत. [भा. सं. जै. यो.]

भूमिज एक आदिवासी जमात. या लोकांची वस्ती प्राधान्याने बिहार प्रदेशाच्या सिंगभूम व मानभूम या जिल्ह्यांत आणि पश्चिम बंगालमध्ये आढळते. वंशशास्त्रज्ञांच्या मते हे लोक मुंड वंशातले आहेत. छोटा नागपूरकडील भूमिज आपणाला मुंड लोकांपेक्षा वेगळे समजत नाहीत. त्यांचे रोटीबेटी व्यवहारही होतात. काही भूमिज स्वतःला राजपूत म्हणवून घेतात. पण कुलीन राजपूत मात्र यांना राजपूत मानीत नाहीत. ज्या प्रदेशात राहतात, त्याच प्रदेशाची भाषा ते बोलतात. मूळची त्यांची मुंडारी भाषा ते आता विसरले आहेत.

हे लोक बुटके असतात; पण त्यांचा बांधा पुष्ट व पिळदार असतो. यांच्यातील काही लोक वर्णाने काळे, तर काही उजळ असतात. यांची चेहरेपट्टी छोटा नागपूरमधील मुंडांसारखी असते.

भूमिज लोकांमध्ये अनेक पोटजाती आहेत. भूमिजांची आडनावे ते जिथून आले त्या ठिकाणांवरून पडली आहेत. त्यांच्या कुलांची विभागणी देवकांवरून झालेली आहे. मुंड कुलांच्या विभागणीशी यांचे बरेच साम्य आहे.

विवाहप्रथा – यांच्यांत समान देवकांत विवाह होत नाहीत. प्रौढ विवाहाची चाल आहे; पण काही सधन लोक मुलींची लग्ने बालवयातच करतात. एखादी मुलगी कुमारी दशेत गरोदर राहिल्यास तिच्या प्रियकराबरोबर तिचे लग्न लावून देतात. मुलीचे देज घेण्याची पद्धत आहे. देजाची रक्कम तीन रुपयांपासून बारा रुपयापर्यंत असते. विवाहसमारंभ मुख्यतः वधूच्या घरी होतो. मांडवाच्या मध्यभागी मोह आणि सिद्ध या झाडांच्या डहाळ्या रोवलेल्या असतात. त्यांना शिंपली व हळकुंडे बांधतात. बोहल्याच्या चार बाजूंना चार कलश ठेवतात. त्यांना सूत गुंडाळून त्यात थोडेथोडे धान्य घालतात. वर पणत्या ठेवतात. वधूला वराच्या जवळ बसविताना वधूकडील स्त्रिया तिला अडवून धरतात. अहेर मिळाला, की मग त्या वधूला सोडतात. लग्नात पौरोहित्याचे काम बंगाली ब्राह्मण करतो. पुरोहिताने मंत्र म्हटल्यावर कलशांवरील पणत्या पेटवितात. मग वधू त्या पणत्या विझवून टाकते. हा प्रकार तीन, पाच किंवा सात वेळा होतो. नंतर वधूला वराच्या हवाली करतात. विवाहातला अखेरचा विधी म्हणजे सिंदूरदान होय. त्यात वर वधूच्या कपाळाला शेंदूर लावतो. मग नवरा-नवरीच्या उत्तरीय वस्त्रांना गाठ मारतात. ही गाठ तीन, पाच किंवा सात दिवसांनी सोडतात. दरम्यानच्या काळात वधू-वर एकमेकांना हळद लावतात. एवढे झाल्यावर विवाहविधी पुरा होतो.

यांच्यांत विधवाविवाह रूढ आहे. विधवेला धाकट्या दिराबरोबर किंवा चुलत दिराबरोबर लग्न करता येते. पण तिने जर नवऱ्याच्या कुटुंबाबाहेर विवाह केला, तर तिला नवऱ्याच्या उत्पन्नातला वाटा मिळत नाही. पूर्वाश्रमीच्या मुलांवरही तिचा अधिकार राहत नाही. विधवाविवाहानंतर झालेल्या अपत्यांचा विवाह होणे कठीण पडते. मग अशा संततीची एक स्वतंत्र जमातच बनते.

भूमिज लोकांत घटस्फोट मिळविणे फार कठीण असते. स्त्रीचा गुन्हा उघडकीला आला, तरच घटस्फोट मिळतो. या वेळी तिचा नवरा तिच्या हातातील लोखंडाची आंगठी काढून घेतो, स्वतः क्षौर करतो आणि इष्टमित्रांना भोजन घालतो.

यांच्यांत मालमत्तेची विभागणी करताना थोरल्या मुलाला थोडा अधिक वाटा देतात. एखादा माणूस निपुत्रिक वारला, तर त्याची पत्नी संपत्तीची वारस बनते.

देवधर्म – भूमिज लोकांचा धर्म त्यांच्या सामाजिक दर्जावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि प्रादेशिक विभागावर अवलंबून असतो. धनिक लोक आपल्या धर्मकृत्यासाठी ब्राह्मण पुरोहिताला बोलावतात. बहुसंख्य भूमिज सूर्याला भजतात. त्याला ते सिनबोंगा किंवा धर्म म्हणतात. याशिवाय यांचे अनेक देव आहेत. जहिरबुरू, कारा-काता, बाघूत किंवा बाघ-भूत अशी त्यांची नावे आहेत. जहिर बुरू हा गावच्या पवित्र वनात असतो. फाल्गुन आणि वैशाख या महिन्यांत त्याची पूजा करतात. याला कोंबडी, बकरी, भात आणि तूप यांचा नैवेद्य दाखवितात. हा त्यांचा रागीट देव आहे. बाघ-भूत ही हिंस्र प्राण्यांपासून रक्षण करणारी देवता आहे. करम हा भूमिजांचा एक लोकप्रिय सण आहे. (करम-पूजा, करमा नृत्य पाहा)

भूमिजांचे पुरोहित लाया नावाचे असतात. शिवाय ते ब्राह्मणांनाही पौरोहित्यासाठी बोलावतात. जो ब्राह्मण धनिक भूमिजाचा पुरोहित असतो, त्याचा सामाजिक दर्जा मोठा समजतात. सामान्य भूमिजांचे पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मणांना मात्र विशेष असा मान नसतो. कुलीन ब्राह्मण हे श्रीमंत भूमिजांचे व पतित ब्राह्मण इतरांचे पौरोहित्य करतात.

मर्तिकप्रथा– हे लोक मृतांना जाळतात. जाळताना मृताचे तोंड दक्षिणेकडे करतात. मयताचा मुलगा चितेला अग्नी देतो. तो नसल्यास जवळचे नातेवाईक चितेला अग्नी देतात. प्रेताबरोबर गेलेले सर्व लोक घरी आले, की मयताची पत्नी, मुलगी किंवा अन्य नातेवाईक स्त्री पाण्याने भरलेले भांडे घेऊन स्मशानात जाते. चिता पूर्ण जळेपर्यंत ती तिथे थांबते; नंतर चितेवर पाणी टाकून अस्थी गोळा करते. त्या घरी आणून त्यांतील काही अस्थी तुळशीवृंदावनापाशी पुरतात. बाकीची हाडे घराण्याच्या स्मशानात नेऊन मडक्यात घालून पुरतात. हे मडके तीन दगडांवर ठेवलेले असते. मडके पुरलेल्या ठिकाणी सपाट दगड ठेवतात आणि मृताला शांती मिळावी, म्हणून त्या दगडावर एक कोंबडा बळी देतात. यापूर्वी स्मशानात अनेकांची हाडे पुरलेली असतात. त्या सर्वांना उद्देशून असे सांगतात, की 'तुमच्यामध्ये आणखी एकाची भर पडली आहे. तेव्हा तुम्ही न भांडता गुण्यागोविंदाने राहा.' [इं. स्ट. पा. प्रे., एप्रिल १९६०].

भूमिती गणितशास्त्राची एक शाखा. बिंदू, रेषा, कोन, एखाद्या आकृतीच्या किंवा वस्तूच्या बाजू, बाजूंचे क्षेत्रफळ, वस्तूचे घनफळ इत्यादींच्या संबंधांविषयी नियम सिद्ध करणे, हा या शास्त्राचा उद्देश होय. भारतात या शाखेचा विकास यज्ञसंस्थेच्या अनुषंगाने झालेला असून, शुल्बसूत्रांमध्ये यज्ञीय भूमितीची पुष्कळ माहिती दिलेली आहे. यज्ञसंस्थेत यज्ञकुंडांना जे आकार द्यायचे, ते प्रमाणशीर असत. त्याकरिता अध्वर्यूला कर्तव्यभूमिती अभ्यासावी लागे व तिचा उपयोग करून वक्रपक्षश्येनचितीसारख्या अवघड चिती उभाराव्या लागत. त्यासाठी तत्पूर्वी त्रिकोणी, चौकोनी प्रमाणबद्ध विटा तयार कराव्या लागत. त्यानंतर यज्ञभूमीवर दोरीने चितीचा आकार सूत्रानुसार काढून, त्यावर विटांचे प्रस्तर सशास्त्र बसवावे लागत. त्यासाठीच शुल्बसूत्रे निर्माण झाली.

हल्ली इंच हे लांबी मापण्याचे लहान परिमाण आहे, त्याप्रमाणे शुल्बात अंगुल हे परिमाण आहे. अंगुलापेक्षा लहान दृश्य परिमाण तिल किंवा अणू हे होय. प्रादेश, पद, युग, जानू, बाहू, प्रक्रम, इ. मापे अंगुल व पुरुष (= १२० अंगुले) यांच्या मधली आहेत.

दिशासाधन, समभुज चौकोन व दीर्घ चौकोन काढणे याच्या रीती शुल्बसूत्रांत दिल्या आहेत. एका रेषेवर दुसरी लंबरेषा काढली, की चौकोन तयार करता येतो. चौकोनाचा कर्ण व बाजू यांचे प्रमाणही दिलेले आहे. दोन चौकोनांच्या क्षेत्रफळांच्या बेरजेच्या किंवा वजाबाकीच्या क्षेत्रफळाचा चौकोन करणे, चौकोनाचा दीर्घचौकोन, त्रिकोण, द्वि–त्रिकोण, वर्तुळ बनवणे, वर्तुळाचा चौकोन करणे, इ. कर्तव्यभूमितीतले सिद्धांत वेदी तयार करण्यासाठी लागतात, ते या शुल्बसूत्रांत सापडतात. त्यानंतर वेदी कशा रचाव्या तेही सांगितले आहे.

आहवनीय व गार्हपत्य अग्नींपासून दक्षिणाग्नीची जागा निश्चित करताना अनुमानावर भागत नसे, तर त्याला गणिताचे ठोकताळे लागत आणि ते २–३ प्रकारांनी सांगितले आहेत.

काटकोन त्रिकोणाच्या कर्णावरील चौरसाचे क्षेत्रफळ त्याच त्रिकोणाच्या इतर दोन बाजूंवरील चौरसाच्या क्षेत्रफळांच्या बेरजेबरोबर असते, हा सिद्धांत पायथॅगोरस याच्या नावाने प्रसिद्ध आहे. पण वास्तविक तो सिद्धांत शुल्बसूत्रांत व शतपथ ब्राह्मणात वापरलेला आहे. वर्ग, आयत इत्यादींचे नियम तैत्ति. संहिता, ब्राह्मणे, इ. प्राचीन ग्रंथांतही आढळतात. हे सर्व ग्रंथ पायथॅगोरसच्या पूर्वी रचलेले आहेत.

सूत्रकालानंतरच्या प्राचीन पंडितांत आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त व भास्कराचार्य हे ज्योतिर्विद व गणिती विशेष प्रसिद्ध आहेत. आर्यभट्ट इ. स. च्या ५ व्या शतकात होऊन गेला. त्याच्या दशगीतिकपाद नामक ग्रंथातील गणितपादात अंकगणित, बीजगणित, भूमिती व त्रिकोणमिती हे विषय आहेत. त्रिभुज, वृत्त. इत्यादिकांची क्षेत्रफळे, तसेच घन व गोल यांची घनफळे हे भूमितीचे विषयही त्यात आले आहेत. वृत्ताचा व्यास व परिघी यांचे गुणोत्तर आर्यभट्टाने १:३·१४१६ इतके सूक्ष्म दिलेले आहे.

आर्यभट्टाने ज्यासरणी, वृत्त, त्रिकोण व चौकोन बनवण्याच्या रीती, समतलाची परीक्षा, शंकू व छाया, त्रिकोणाच्या बाजूंचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्ग, वृत्तखंड, इ. विविध विषयांचे विवेचन आपल्या ग्रंथात केलेले आहे. ब्रह्मगुप्ताच्या ब्राह्मस्फुटसिन्द्धात नामक ग्रंथातील एका अध्यायात त्रिकोणमितीची माहिती आहे. सूर्यसिन्द्धाता-मध्ये त्रिकोणमितीचा विकास झालेला होता आणि ज्या भौमितिक प्रमेयावर त्रिकोणमिती आधारलेली होती, ते प्रमेय युरोपातील तत्कालीन शास्त्रज्ञांना अज्ञात होते. त्या ग्रंथात क्षेत्रव्यवहार, वृत्तक्षेत्र, इ. विषयांचे विवेचन केलेले आहे.

भास्कराचार्यांच्या लीलावती नामक ग्रंथात भूमितीमधील क्षेत्रव्यवहार, खातव्यवहार, चितिव्यवहार, क्रकचव्यवहार, राशिव्यवहार व छायाव्यवहार यांची माहिती आहे. क्षेत्रव्यवहारात काटकोनत्रिकोणाच्या कोणत्याही दोन बाजू दिल्या असता तिसरी बाजू काढण्याची रीत दिली आहे. त्याचप्रमाणे त्रिकोणाच्या बाजू दिल्या असता लंब, आबाधा व क्षेत्रफळ कसे काढावे, हे सांगितले आहे. वृत्तस्थ चतुरस्राचे क्षेत्रफळ काढून त्याच्या व त्रिकोणाच्या क्षेत्रफळाच्या सूत्रामधील साम्य दर्शविले आहे. वर्तुळाचा व्यास व क्षेत्रफळ यांमधील परस्पर संबंध सांगून गोल पदार्थांचे घनफळ काढण्याची रीत दिली आहे. वर्तुळात काढलेल्या कोणत्याही समभुजाकृतीच्या भुजांची लांबी काढण्याची रीतही दिली आहे. पुढच्या भागात खळग्याचे घनफळ, धान्याच्या राशीच्या उंचीचे व परिघीचे गुणोत्तर, वगैरे विषय आहेत.

भास्कराचार्यांनंतर मात्र भारतात या शास्त्राचा विकास खुंटला. [म. ज्ञा. को.; वै. वि. भा. प.; प्रा. भा. सा. सां. भू.]

भूमिदान

एक महादान. हे निवर्तनमात्र असावे, असे सांगितले आहे. दहा हात लांबीच्या काठीने ज्याची परिमिती किंवा परीघ ३० काठ्या होईल, एवढ्या क्षेत्राला निवर्तन असे म्हटले आहे. एवढ्या भूमीचे दान संकल्पपूर्वक सत्पात्र ब्राह्मणाला करावे, असे दानचंद्रिकेत सांगितले आहे. या दानाचा मंत्र असा –

सर्वेषामाश्रये देवि वराहेण समुद्धृता।
अनन्तसस्यफलदा अतः शान्तिं प्रयच्छ मे ।।
यस्यां रोहन्ति बीजानि काले चैव महीतले।
त्वत्प्रसादाच्च सफला मम सन्तु मनोरथाः ।।

अर्थ – हे भूमिदेवी, तू वराहाने समुद्धृत, सर्वांना आश्रयभूत व विपुल धान्यफल देणारी आहेस. म्हणून मला शांती दे. तुझ्या पृष्ठभागावर योग्य काली बीजे अंकुरित होतात. तुझ्या प्रसादामुळे माझे मनोरथ सफल होवोत.

मध्ययुगात ब्राह्मणांना जी दाने दिली जात, त्यांत भूमिदानाला विशेष महत्त्व होते. सातवाहनांपासून यादवांपर्यंतचे शेकडो शिलालेख व ताम्रपट मिळाले असून, त्यांत त्या राजांनी केलेल्या भूमिदानाचे उल्लेख आहेत. भूमी ही स्थावर संपत्ती असते. ती एकदा एखाद्याला मिळाली म्हणजे पुत्र-पौत्र परंपरेने त्याच्या वंशात चालते. दान करणारा राजा निवर्तला किंवा पदच्युत झाला, तरी दानाची भूमी ज्याची त्याच्याकडेच राहते. ही दाने मुख्यत्वे ग्रहण, संक्रांती, इ. पर्वप्रसंगी करीत. मत्स्य पुराणात भूमीबरोबर पाच नांगरही द्यावे, असे सांगितले असून, अशा दानाला पंचलांगलक असे म्हटले आहे.

सांप्रतच्या काळात आचार्य विनोबा भावे यांनी ज्याच्या जवळ भूमी आहे, त्याने तिच्यातला काही भाग भूमिहीनांना द्यावा, अशा प्रकारचे आंदोलन प्रचलित केले असून, त्याला सर्वोदयाचा एक भाग मानले आहे. त्यांच्या प्रभावाने भारतातल्या भूमिहीनांना सांप्रत लाखो एकर भूमी मिळाली असून, या चळवळीचे लोण भारताच्या सर्व राज्यांत पोचलेले आहे. पाहा – सर्वोदय. [दानचंद्रिका; ऋ. ब्र. स.]

भूमिदेवता

बोधिसत्त्वाला बुद्धत्व आणि सर्वज्ञता प्राप्त होण्यापूर्वी अनेक आध्यात्मिक मंडलांतून प्रवास करावा लागतो. या मंडलांना भूमी असे म्हणतात. मुळात या भूमींची संख्या दहा होती; परंतु वज्रयान पंथाने यात भर घालून बारा भूमी व त्यांच्या बारा भूमिदेवता निर्माण केल्या आणि त्यांना मूर्तिरूप देऊन त्यांची पूजा-अर्चा सुरू केली. या सर्व देवता द्विभुज असून, त्यांच्या उजव्या हातात वज्र आणि डाव्या हातात स्वतःचे चिन्ह असते. [इं. बु. इ.]

भूमिदेवी

भूमीची अधिष्ठात्री देवता. ही विष्णूची द्वितीय पत्नी होय. हिची द्विभुज मूर्ती आढळते. हिच्या एका हातात कमल असते आणि दुसरा हात मोकळा असतो. हिचा केशसंभार मोकळा असून, तो तिच्या पायांपर्यंत लोंबत असतो. बहुधा ही कमळावर उभी असलेली दाखवितात. ही देवी म्हणजे सहनशीलतेची मूर्तीच होय, अशी समजूत आहे. पूर्वी एकदा शिवाने यमाचा वध केला, तेव्हाच फक्त तिने परमेश्वराकडे गाऱ्हाणे नेले, की आता मला माणसांचा भार असह्य होईल. पाहा – पृथ्वी; पृथ्वीपूजा. [सा. इं. गॉ.]

भूमिया

बैगा लोकांचा एक पोटभेद. मध्य प्रदेशातील मंडला जिल्ह्यात व रेवा प्रदेशात या लोकांची वस्ती आहे. हे लोक या प्रदेशात फार प्राचीन काळापासून राहत आले आहेत. प्राचीन काळी इथली सर्व जमीन त्यांच्या मालकीची होती. त्यामुळे त्यांना भूमिया म्हणजे भूमिपुत्र असे नाव मिळाले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भूमिया लोक मध्यम उंचीचे, वळकट, काटक आणि सहनशील आहेत. दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशातून डोक्यावर ओझे घेऊन ते कितीतरी मैल न थांबता जलद चालतात. हे लोक गोंडवनी किंवा मंडलाहा नामक हिंदीची एक बोली बोलतात.

यांची घरे म्हणजे दोन ते पाच झोपड्यांचा समूह असतो. कारण लग्न झालेले मुलगे व क्वचित जावई यांच्याही वेगळ्या झोपड्या मुख्य घराशेजारी असतात. एका चौकोनी अंगणाच्या भोवती तीन बाजूंना या झोपड्या बांधलेल्या असतात. अंगणाची चौथी बाजू कुंपण घालून व दार ठेवून बंदिस्त केलेली असते. मुख्य घर साधारणपणे अकरा हात लांब व आठ हात रुंद असते. हे घर एखाद्या झऱ्याच्या जवळपास असते.

घर बांधण्यासाठी जागा पसंत केल्यावर कुटुंबप्रमुख तिच्या चारही कोपऱ्यांवर तीन तीन दगडांची उतरंड रचतो. दुसऱ्या दिवशी ती न विस्कटता तशीच राहिली, तर ती जागा घर बांधायला अनुकूल आहे, असे समजतात.

घर बांधताना चार कोपऱ्यांवर चार खांब उभारल्यावर त्यांच्या भोवती थोडी दारू ओततात. बांबूच्या व खैराच्या कापट्या, बांबूच्या तट्ट्या, माती, गवत, इ. सामानाने झोपड्या उभारतात. झोपडीच्या पुढे पडवी असते. झोपडीला खिडक्या नसतात. घराच्या दर्शनी भिंतीवर स्त्रिया काही आकृती काढतात. घरात राहायला जाण्यापूर्वी हे लोक आपले घर नारायणदेवाला अर्पण करतात. त्यासाठी घराच्या उंबऱ्याची थोडी जागा सारवतात. त्याच्यावर थोडे कोदो नावाचे धान्य टाकतात. कोंबडीच्या एका पिल्लाला ते धान्य खायला देतात व त्याला सोडून देतात. पुढे एका वर्षाने त्याला मारतात. उंबऱ्यावर थोडी दारू शिंपडतात आणि नारायणदेवाची प्रार्थना करतात. त्या दिवसापासून नारायणदेव त्या घरात वास्तव्य करतो, अशी समजूत आहे. यांची घरे नीटनेटकी व स्वच्छ असतात. अंगणाच्या एका बाजूला गोठा असतो.

भूमियांची एक झोपडी म्हणजे बहुधा एकच खोली असते. त्यात एका बाजूला धान्याची कोठी असते. घरात गाडगीमडकी, काही पितळेची भांडी, पाणी भरण्यासाठी भोपळे, कुऱ्हाड, फाळ व इतर काही हत्यारे, इरले, इ. सामान असते.

वेषभूषा–भूमिया पुरुष एक लंगोटी नेसतो. काहीजण आता गुडघ्यांपर्यंत पंचा नेसतात व सदरा घालतात. बहुतेक पुरुष एक उत्तरीय अंगावर घेतात. बाहेर जाताना ते डोक्याला पागोटे गुंडाळतात. पावसाळ्यात व थंडीच्या दिवसांत अंगावर घोंगडी घेतात. त्यांच्या स्त्रिया गुडघ्यांपर्यंत लुगडे नेसतात. स्त्री-पुरुष दोघेही वहाणा घालीत नाहीत.

पूर्वी भूमिया पुरुष लांब केस ठेवीत असत. पण सांप्रत ते घेरा व शेंडी ठेवतात. स्त्रिया केसांचा अंबाडा बांधतात व त्यावर फुलासारखा गोंडा बांधतात. वयात येईपर्यंत मुलगी आईचीच फणी वापरते. ती मोठी झाली आणि एखाद्या मुलाच्या प्रेमात पडली, की तो तिला घेऊन बाजारात जातो आणि दोघे एकमेकांसाठी फण्या विकत घेतात. दर चार दिवसांनी ते आपल्या फण्यांची अदलाबदल करतात.

पुरुष हातात कथलाचे किंवा चांदीचे कडे घालतात आणि कानात तीन ठिकाणी वलये घालतात. याशिवाय, पुरुष रंगीबेरंगी काचमण्यांची अनेकपदरी माळ गळ्यात घालतात. तिचा

भूमिया स्त्री

आकार सापासारखा असतो. स्त्रियाही अशीच माळ, हसळी, रुपयाच्या किंवा अधेलीच्या नाण्यांची माळ व आणखीही काही माळा गळ्यात घालतात. त्या हातांत काचेच्या किंवा चांदीच्या बांगड्या, दंडात वाक्या, पायात जोडवी आणि कानात कर्णफुले घालतात व अंगावर खूप ठिकाणी गोंदून घेतात.

कोदो आणि कुटकी या धान्यांची पेज व भात हे यांचे मुख्य अन्न होय. तांदुळांचा भात हे त्यांचे सणासुदीचे पक्वान्न. ज्वारी,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मका व त्याच्या जोडीला परसातला भाजीपाला, मोहाची फुले व फळे, इतर कंदमुळे व फळे, क्वचित मांस, मासे व अंडी असा त्यांचा आहार असतो. मोहाची दारू ही त्यांच्या सामाजिक व धार्मिक समारंभातील एक अत्यावश्यक बाब असते.

उद्योगधंदे – बहुतेक भूमिया शेती व काही शेतमजुरी करतात. घराच्या मागच्या परसात ते मका पेरतात. याशिवाय, त्यांच्या शेतात ते मुख्यत्वे कोदो, कुटकी, उडीद व भात ही धान्ये पिकवतात. नांगराला बैल जुंपायची यांना बंदी आहे. म्हणून ते फक्त ओझी वाहून नेण्यासाठी बैलांचा उपयोग करतात. गाईबैलांशिवाय ते डुकरे व कोंबडचाही पाळतात.

हे लोक मधून मधून वन्य श्वापदांची शिकार करतात. मासे पकडणे हा त्यांचा आवडीचा उद्योग आहे.

भूमिया लोकांत अनेक खेर आणि गोत्रे आहेत. एकाच खेरात व एकाच गोत्रात विवाह होत नाही. खेर म्हणजे विशिष्ट प्रदेश. एका प्रदेशात राहणारे लोक मुळात एकमेकांचे नातेवाईक असावे आणि त्यामुळे समान खेरांत लग्न न करण्याची पद्धत पडली असावी.

या लोकांत समारंभपूर्वक मैत्री करण्याची पद्धत आहे. ही मैत्री दोन समानलिंगी व समान वयाच्या लोकांत होते. उदा० विवाहित पुरुष किंवा विवाहित स्त्रिया, दोन मुली किंवा दोन मुलगे. अशी मैत्री केलेल्यांनी एकमेकांना मदत करणे, बिन-व्याजी थोडे पैसे देणे, एकमेकांना भेटीदाखल वस्तू देणे आणि जत्रा किंवा इतर उत्सव यांच्या निमित्ताने एकमेकांच्या घरी जाणे, अशी त्यांची पद्धत आहे.

जेव्हा एखाद्या पुरुषाला दुसऱ्या पुरुषाशी जन्माची दोस्ती करायची असेल, तेव्हा तो दोन बाटल्या दारू घेऊन त्याच्या घरी जातो. मग ते दोघे दारू पितात आणि दुसरा पुरुष त्याला एखादे वासरू बक्षीस देतो. या मैत्रीला बोहनाई किंवा मिथन असे नाव आहे. याशिवाय दोस्ती, संघी, जवर, भजली, सखी, झोरी, इ. मैत्रीचे काही प्रकार आहेत, ते वेगळेच. दोन गावांतल्या लोकांनाही आपसांत मैत्री जोडता येते, तिला सखी असे नाव आहे.

गावाच्या प्रमुखाला मुकद्दम किंवा पटेल म्हणतात. तोच बहुधा जातिप्रमुखही असतो. पण काही वेळा, दुसऱ्या एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीलाही जातिप्रमुख बनवतात. गावात एक पुरोहित असतो, त्याला देवर असे म्हणतात. गावातील प्रत्येक जातीच्या प्रमुखांची मिळून पंचायत बनते.

भूमिया लोक स्वतःला उच्च जातीचे समजतात.

मुलीला प्रथम रजोदर्शन झाले असता, त्यानिमित्त काही विधी करीत नाहीत. तसेच त्या वेळी तिचा स्पर्शदोषही मानीत नाहीत. तिला फक्त त्या दिवसांत अन्नाला स्पर्श करायची बंदी असते.

प्रसूतिप्रथा – स्त्रीला प्रसूतीच्या वेळी सुईण मदत करते. क्वचित प्रसूती अवघड वाटल्यास बंदुकीची गोळी पाण्यात बुडवून ते पाणी आसन्नप्रसवा स्त्रीला प्यायला देतात. बंदुकीतून जशी गोळी बाहेर पडते, तसे योनिमार्गातून मूल बाहेर यावे, अशी त्यामागची कल्पना आहे. याचाही काही उपयोग झाला नाही, तर मांत्रिकाला बोलावून देवतेला बळी देतात.

मूल जन्माला आल्यावर सुपात कोदो धान्य पसरून, त्यावर मुलाला ठेवतात. ते धान्य मग सुईणीला देतात. ती ते धुवून पुढच्या उन्हाळचात पेरण्यासाठी ठेवून देते.

गरम पाण्यात औषधी वनस्पतींची पूड टाकून त्याने मुलाला व मातेला स्नान घालतात. वाळचाचे गवत पसरून बाळंतिणीचे अंथरूण तयार करतात. मुलाची नाळ पडेपर्यंत पाच-सहा दिवस स्त्रीने मुलासह घरातच रांहिले पाहिजे, असा नियम आहे. भुताखेतांची बाधा होऊ नये, म्हणून ती अंथरुणाखाली कोयती ठेवते.

मुलाचे नाव ठेवण्याचा दिवस ठरलेला नसतो. जन्मल्यानंतर केव्हाही मुलाचे नाव ठेवतात. बहुधा जन्मलेल्या दिवशीच आई किंवा बाप मुलाचे नाव ठेवतात. हे नाव सरकारी दप्तरासाठी असते. त्यानंतर पुन्हा एकदा मुलाचे नाव ठेवतात आणि त्या नावाने सर्व लोक मुलाला हाक मारतात.

वांझपणा हा शारीरिक दोष नसून, तो भुताखेतांमुळे येतो, असा या लोकांचा समज आहे. त्यासाठी मांत्रिकाला बोलावून उपाययोजना करतात.

मुलगा झाला असल्यास स्त्रीचे आशौच चाळीस दिवसांनी व मुलगी झाली असल्यास दोन महिन्यांनी संपते.

विवाहप्रथा – जातीतच लग्न केले पाहिजे, असा यांच्यांत नियम आहे. मुलाचे लग्न बारा ते पंधरा या वयात व मुलीचे दहा-बारा वर्षांच्या दरम्यान करतात. लग्न आईबाप ठरवतात. ते साधारणपणे नात्यातल्या किंवा चांगल्या माहितीतल्या मुलीशी ठरवतात. साखरपुडा करण्याची पद्धत आहे. तो सर्व-साधारणपणे माघ महिन्यात करतात. त्या वेळी वरपिता आपल्याबरोबर पाच सुपाऱ्या, पाने, लवंगा, तंबाकू, विडचा व दारूच्या काही बाटल्या घेऊन मुलीच्या घरी जातो. तिथे गेल्या-वर तो वधूपित्याला विडा करून देतो व द्रोणात दारू प्यायला देतो. वधूपिताही त्याला विडा व दारू देतो. जमलेल्या सर्व लोकांनाही नंतर विडे व दारू देतात. जेवण झाल्यावर लग्नाचा मुहूर्त ठरवतात. देज सात रुपये असते. याशिवाय वरपित्याने लग्नाच्या जेवणावळीसाठी लागणारे सामान, वधूला लुगडे व वराचा पोषाख द्यायचा असतो.

लग्ने बहुधा वैशाख, आषाढ व माघ या महिन्यांत होतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लग्नाच्या दिवशी एक कोरे मडके घेऊन त्याच्या मानेवर व मध्यावर शेणाचे इंचभर जाड व अर्धा इंच रुंद असे पट्टे ओढतात आणि त्यांवर यव किंवा तांदूळ चिकटवतात. याला कलश असे म्हणतात. मग नवरा मुलगा त्यात तीन मुठी कोदो घालतो. त्यानंतर त्याचे इतर नातेवाईक कलश भरेपर्यंत त्यात धान्य टाकतात. मग त्यात पणती पेटवून ठेवतात. एवढे झाल्यावर वराच्या हातात एक अडकित्ता देतात. लग्नविधी संपेपर्यंत तो त्याने धरून ठेवायचा असतो.

यानंतर गोठ्यात लगुन नामक एक विधी करतात. एका पाटावर गेरूने वर्तुळामध्ये एक स्वस्तिक काढून त्यावर पैसा व पैशावर निवणे ठेवतात. त्यावर पाणी भरलेला पितळी लोटा ठेवतात. दोसी नामक पुरोहित दोन्ही हातांच्या चिमटीत दोन दोन तांदळाचे दाणे धरून ते लोटच्यात टाकतो. दोन दाणे जर एकत्र आले, तर देवांना हे लग्न मान्य आहे, असे समजतात. दाणे एकत्र आले नाहीत, तर ते एकत्र येईपर्यंत दोसी तसे करीत राहतो. वधूच्या व वराच्या दोन्ही घरी हा विधी करतात. मग ते दाणे गोळा करून परस्परांच्या घरी पाठवतात व वधू-वरांच्या अंगावरच्या कपडचात बांधतात. मग दोसी त्या

ढोल वाजवणारा भूमिया पुरुष

लोटयावर पणती पेटवून ठेवतो व त्याच्या गळ्यात चांदीची व मोत्यांची अशा माळा घालतो. मग तेच दागिने काढून वराच्या गळ्यात घालतात. ह्या सर्व विधी झाल्यावर संध्याकाळपर्यंत नवरा मुलगा गोठ्यातच थांबतो.

यानंतर मंगलमट्टी नावाचा एक समारंभ होतो. दोसी वराला घेऊन घराजवळच्या एका मातीच्या खड्ड्याजवळ जातो. तिथे तो स्वस्तिक काढतो व त्याच्या मध्यभागी दोन पैसे ठेवतो. ठाकूरदेवाच्या नावाने होम करून तो त्याला दोन वडचांचा नैवेद्य दाखवतो. मग त्या खड्डचाजवळ वरमाय पाय पसरून बसते व वर तिच्या मांडीवर बसतो. वरमाय आपल्या लुगडचाचा थोडा भाग जमिनीवर पसरते. मग दोसी स्वस्तिकातल्या पैशांवर मुसळाने मोठा घाव घालतो. त्यामुळे पैसा व थोडी माती वराच्या आईच्या पसरलेल्या लुगडचावर पडते. वरमाय ती गोळा करून अंगणात आणून ठेवते. दोसीही तिथली थोडी माती आणून अंगणात ठेवतो.

त्यानंतर दोसी वस्तीतील पुरुषांसह लग्नमंडपाचे खांब आणण्यासाठी रानात जातो. साल्हेन नामक एका वृक्षाजवळ पोचल्यावर तो होम करतो. झाडाभोवती हळदीने रंगवलेले कोरे सूत बांधतो आणि त्याच्या जवळ कोदोच्या भाकऱ्यांचे तुकडे व दारू शिंपडतो. मग तो झाडावर चढून एक जाड फांदी तोडतो आणि तिचा खांब तयार करतो. मांडवासाठी लागणारे इतर खांब उंबराचे तोडतात.

नंतर सर्वजण मिळून मांडव उभारतात. त्यात मध्यभागी साल्हेन वृक्षाचा खांब रोवतात. सर्वसाधारणपणे, रविवारी नवऱ्या मुलाच्या घरचा व सोमवारी नवऱ्या मुलीच्या घरचा मांडव घालतात.

त्या दिवशी संध्याकाळी नवऱ्या मुलाला त्याचे आप्तेष्ट पुरुष भरवतात. कारण त्याने स्वतः आपले हात वापरायचे नसतात. यानंतर त्याला हळद लावतात. नंतर आणखी तीनदा त्याला हळद लावतात. वधूलाही तिच्या घरी हळद लावतात.

लग्नाच्या दिवशी वराकडील मंडळी वाजत-गाजत वधूगृही जायला निघतात. वधूच्या गावाजवळ पोचल्यावर ते एका झाडाखाली थांबतात. तिथे लोक गातात व नाचतात. वधूपक्षाचे लोकही त्यांना गात व नाचत सामोरे येतात. या नृत्यासाठी ते तलवारी, कुऱ्हाडी व काठ्या घेतात. त्यामुळे त्याला युद्धनृत्याचे स्वरूप येते. काही वेळा दोन्ही पक्षांत प्रत्यक्ष चकमकही उडते. अशा वेळी वयस्क पुरुष मध्ये घोंगडी पसरतात आणि तिच्यावर शस्त्रे ठेवण्याची दोन्ही पक्षांना विनंती करतात.

नृत्याचा हा गोंधळ चालू असताना एक पुरुष वराला पाठीवर घेऊन वधूच्या मांडवात आणतो. तिथे वर लग्नखांबाला स्पर्श करतो.

इकडे वधूपिता व वरपिता प्रथम एकमेकांना दारू देतात व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मग ती इतरांनाही देतात. वरपक्षाकडील लोक जानवशात उतरतात. त्या वेळी भिस्ती स्वयंपाकी वधूगृही स्वयंपाक करून त्यांना जेवण आणून वाढतो.

त्यानंतर वर एका परळात मूठभर मक्याचे दाणे घालून ते विस्तवावर ठेवतो आणि विस्तवाला तीनदा वारा घालतो. जर ते दाणे तेवढ्यात भाजले, तर तो शुभ शकुन समजतात आणि ते भाजले नाहीत, तरी तो मोठासा अपशकुन मानीत नाहीत. मग ते दाणे त्याच्या वस्त्रात बांधतात. नंतर तो तीन घरी जाऊन भिक्षा मागतो. वधूही तीन घरी अशीच धान्याची भिक्षा मागते ती परत आल्यावर वरपक्षाकडील मंडळी वधूच्या दारात येऊन थांबतात.

नंतर दोन्ही पक्षांकडील दोन दोन लोक पाच वारांच्या अंतरावर दोन अंतरपाट धरून उभे राहतात. एका बाजूला वर व दुसऱ्या बाजूला वधू उभी राहते. मग वर अंतरपाटाखालून जाऊन वधूच्या अंतरपाटासमोर उभा राहतो आणि तिथून वधूच्या मस्तकावर भिक्षा मागून मिळालेले धान्य टाकतो आणि पळत आपल्या जागी येऊन उभा राहतो. वधूही तसेच करते. असे दोनदा झाल्यावर तिसऱ्या वेळी वर वधूच्या जवळ जातो. त्या वेळी ती घरात पळून जाण्याचा प्रयत्न करते. त्या आधी जर त्याने तिला धरले, तर तो तिच्या खांद्यावर हात ठेवून तिला आपल्या लोकांकडे घेऊन येतो आणि ती घरात शिरली, तरी दार अडवलेल्या स्त्रियांना चार आणे देऊन तो तिला बाहेर आणतो.

त्यानंतर वधू-वरांना हळद लावतात, स्नान घालतात आणि विवाहवेष घालायला देतात. मग विवाहखांबाभोवती सुवासिनी स्त्री कोदो धान्य पसरते. नंतर वधूपिता, वरपिता व बाकीचे लोक मांडवात थोडे धान्य पसरतात. आणि पुरोहित वधू–वरांना त्या खांबाभोवती तीनदा प्रदक्षिणा घालायला लावतो. विवाहातील हा प्रमुख विधी असतो.

यानंतर जमलेल्या सर्व आबालवृद्ध लोकांना दारू वाटतात. मग तरुण मुले व मुली गातात व नाचतात.

विवाहानंतर वधू आपल्या घरात जाऊन वसते. तिच्या मैत्रिणी तिला मुलाचा वेष देतात किंवा तिला वेगळाच वेष देतात. त्यामुळे दुसऱ्या दिवशी आपल्या घरी जाण्याच्या वेळी सगळ्या मुलींच्या घोळक्यातून वराला आपली वधू शोधताना फार त्रास पडतो. त्याला जर ती ओळखता आली नाही, तर त्याबद्दल दंड द्यावा लागतो. घरी निघताना तो वधूच्या गावच्या मंडळीलाही आपल्याबरोबर येण्याचे निमंत्रण देतो.

घरी आल्यावर वरमाता वधू–वरांचे पाय धुते आणि त्यांना जेवायला वाढते. त्या प्रसंगी ती स्वतः त्या दोघांना त्यातील काही घास भरवते. त्यानंतर सर्व लोकांना दारू वाटतात.

वधू वयाने लहान असल्यास, काही वेळा वयात येईपर्यंत ती माहेरी राहते. काही वेळा ऐपत नसल्यास मुलगा मुलीच्या घरी राहून काही वर्षे काम करतो आणि त्या मोबदल्यात वायको मिळवतो. लग्नापूर्वी त्या दोघांना एकमेकांशी बोलायची बंदी असते.

याशिवाय, आपल्या आवडत्या मुलीला पळवून नेऊन विवाह करणे, साटेलोटे करणे, मुलीने प्रियकराच्या घरात घुसून तिथे राहणे किंवा प्रियकराबरोबर पळून जाणे, अशा प्रकारानेही लग्ने होतात.

श्रीमंत लोक एकापेक्षा अधिक बायका करतात. दुसऱ्या पत्नीच्या वेळी पुरुषाला जास्त देज द्यावे लागते. विधवेला धाकट्या दिराशी लग्न करता येते. या लोकांत फक्त पुरुषालाच घटस्फोट घेता येतो.

देवधर्म – हे लोक अनेक देवतांना भजतात. भगवान हा विश्वाचा कर्ता व स्वामी आहे, असे ते मानतात; पण त्याची पूजा-प्रार्थना मात्र करीत नाहीत. ठाकूरदेवाला ते मोठा देव

भूमियांचा श्रेष्ठ देव

मानतात, पुष्कळ वेळा त्याची पूजा करतात आणि त्याला बळी अर्पण करतात. प्रत्येक गावात एका झाडात त्याचे वास्तव्य असते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे समजतात. रोगराई आणि आपत्ती यांपासून तो गावाचे रक्षण करतो आणि चांगले पीक यावे, म्हणून त्यांना मदत करतो, अशी समजूत आहे. याशिवाय ते नारायणदेव, दुल्हादेव, रतमाई, हे धरातील देव; मेरोदेव, हरदुलालबाबा, खेरदेव, इ. ग्रामदेवता; अलोहादेव, बाघेसुरपाट, इ. क्षेत्रदेवता; हुलेरादेव, मुतुवादेव, इ. पशुदेवता व मर्कीदेव, धनोदेव, इ. पितृदेवता यांना भजतात.

प्रत्येक भूमिया कुटुंबप्रमुखाने दर नऊ किंवा बारा वर्षांनी नारायणदेवाप्रीत्यर्थ डुकर बळी दिला पाहिजे, असा नियम आहे. या विधीला लारूकाज असे नाव आहे. हे बलिविधान फार मोठे व जटिल असते.

भूमिया लोकांना अनेक रोगांवर झाडपाल्याची औषधे माहीत असतात. त्यांचा ते आजारपणात उपयोग करतात. पण पुष्कळदा भुताखेतांच्या कोपामुळे आजार उद्‌भवतो, अशी त्यांची समजूत असल्यामुळे ते त्यांनाही संतुष्ट करतात.

भूमिया लोक अनेक सण व उत्सव साजरे करतात. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे—

पौष अमावास्येला प्रत्येक वस्तीवरची मुले एकत्र जमून टोळ्याटोळ्यांनी प्रत्येक घरी जाऊन, जमिनीवर काठी आपटतात व धान्यभिक्षा मागतात. नंतर सर्वजण नदीकिनारी जाऊन मिळालेल्या धान्याची खिचडी करतात. मग एका मुलाला कावळा बनवतात आणि त्याच्यासाठी एका पानावर लाह्या ठेवतात. कावळा त्या खाण्यासाठी आला, की त्याला जळक्या लाकडाने मारतात. पण संधी साधून कावळा ते पान पळवतो. मग सर्व मुले खिचडी खातात.

माघ महिन्यात ते गणपतीची पूजा करतात. त्या दिवशी दिवसभर उपास करतात व रात्री गणेशपूजन करून तांदुळाच्या वड्यांचे भोजन करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी मूर्तीचे नदीत विसर्जन करतात.

फाल्गुन पौर्णिमेला ते होळीचा सण साजरा करतात. त्यापूर्वी पाच दिवस होळीच्या जागी एक खांब पुरतात. त्याच्या समोर एक खड्डा खणून त्यात पैसा, अंडे व तांब्याचे वलय पुरतात. पुरलेल्या जागी कोंबडे बळी देतात व ते तिथेच शिजवून खातात. तिथे सावरीची एक काठी रोवतात आणि त्या दोन खांबांभोवती लाकडे रचून ठेवतात. होळीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी होळी पेटवतात व सर्वजण तिच्या भोवती ढोल व झांजा यांच्या साथीवर गातात व नाचतात. देवर होळीतील राख घेऊन सर्वांवर शिंपडतो. मग सर्वजण एकमेकांवर रंग उडवतात. लोक नांगर, विळे वगैरे आयुधे होळीत टाकतात. होळी पुरती विझल्यावर शेतातील पिकलेला गहू, तूर व मसूर तोडून आणून सर्व जण तिच्या भोवती बसून खातात.

आश्विनातील नवरात्रात किंवा होळीनंतर दहा दिवसांनी गावचा मांत्रिक मरीमाता देवीला नैवेद्य करतो. या उत्सवाला जवर असे नाव आहे. देवीचे भक्त मांत्रिकासह वाजत-गाजत शेतात जाऊन थोडी माती घेतात व ती टोपल्यात, मडक्यात व परळात ठेवतात. त्यात गहू आणि जव पेरतात. मांत्रिक रोज पाणी घालून ती रोपे वाढवतो. आठ दिवसांनी त्याची पत्नी देवीला पुऱ्यांचा नैवेद्य दाखवते. त्या दिवशी सर्व लोक मंदिरासमोर जमतात व ढोलाच्या साथीवर गातात, बेभान होऊन नाचतात आणि मग मंदिरातल्या पुऱ्यांवर ताव मारतात. दुसऱ्या दिवशी मांत्रिक देवीला बकरा बळी देतो व तो शिजवून त्याचे जेवण भक्तांना वाढतो.

पावसाळ्यात कोणत्या महिन्यात पाऊस जास्त पडेल, ते समजून घेण्यासाठी ते धैला नामक एक विधी करतात. ग्रामप्रमुख पाण्याने भरलेले एक मडके शेतात मातीच्या पाच ढेकळांवर ठेवतो व त्यांना ज्येष्ठ ते कार्तिक या महिन्यांची नावे देतो. दुसऱ्या दिवशी जी ढेकळे मडक्यांतून झिरपणाऱ्या पाण्याने विरघळलेली आढळतील, त्या महिन्यांत पाऊस जास्त पडेल, असे समजतात आणि त्याप्रमाणे मका, भात, कोदो यांपैकी काय आणि केव्हा पेरायचे ते ठरवतात.

दर वर्षी पेरणीच्या हंगामाच्या आरंभी ठाकूरदेवाला उद्देशून ते बळी देतात आणि पीकपाणी चांगले यावे व संकटे येऊ नयेत, यासाठी त्याची प्रार्थना करतात.

याशिवाय हे लोक नागपंचमी, दसरा, दिवाळी, इ. सणही साजरे करतात.

मृतकप्रथा — म्हातारा माणूस आजारी पडला असता, तो बरा होईल अशी आशा वाटते, तोपर्यंत घरातील लोक त्याची शुश्रूषा व त्याला औषधपाणी करतात आणि तो बरा होणार नाही, असे ठरले, की त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. एखाद्या निराळ्या झोपडीत त्याला ठेवून, त्याच्या जवळ रोज पेज व पाणी नेऊन ठेवतात. म्हाताऱ्या माणसांनी जगण्याची इच्छा धरून इतरांना भारभूत होऊ नये, अशी त्यांची त्यामागची कल्पना आहे.

माणूस आसन्नमरण झाला, की त्याला सोन्याचा व चांदीचा तुकडा टाकून पेज प्यायला देतात. दुसऱ्या जगात गेल्यावर त्याच्याजवळ काही द्रव्य असावे, म्हणून ही तरतूद असते. मग त्याच्या सर्व नातेवाइकांना बोलावणे पाठवतात.

मृताला स्नान घालून हळद लावतात व नवे कपडे घालतात. मग त्याला खाटल्यावर किंवा तिरडीवर ठेवून स्मशानात नेतात. विवाहित प्रौढ माणसाला जाळतात. त्याच्या चितेत विळा, कुऱ्हाड, हातातील वलय व नाण्यांच्या माळेचा दोरा टाकतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लहान मुले, साथीच्या रोगाने मेलेले, अपघातात मरण आलेले, इत्यादींना पुरतात. त्यासाठी हातभर खोल खड्डा खणतात. प्रेत कपड्यांसहित खड्ड्यात ठेवतात व त्याच्या छातीवर पावशेर तूप व तिळेल ओततात. नंतर सर्व लोक थडग्याभोवती बसून हातांनी त्यात माती लोटतात. मग सर्व लोक मृताच्या घरी जातात. तिथे त्यांना दारू व जेवण मिळते.

दहाव्या दिवशी सर्व नातेवाईकांना व जातीला जेवण देतात. त्या आधी मृताच नातेवाईक त्याच्या घरातली जुनी गाडकी-मडकी फेकून देतात, नवी चूल घालतात व घर सारवून त्याला रंग देतात. दहाव्या दिवशी मृताचे पुरुष आप्त स्मशानात जाऊन अस्थी व रक्षा गोळा करून त्यांवर दगड ठेवतात. मृताचा भाचा त्यांचे नदीत विसर्जन करतो. मग सर्वजण हजामत करून नदीवर स्नान करतात.

काही वेळा मृत्यूनंतर वर्षभरात केव्हातरी गावजेवण देतात. गरीब लोक त्यासाठी कर्जही काढतात. [दि गोंड अँड भूमिया ऑफ ईस्टर्न मंडला – श्री. स्टेफेन फुच्, १९६०]

भूमिस्पर्शमुद्रा बौद्ध देवतांची एक हस्तमुद्रा. देवता वज्रा पर्यंकासनात बसलेली असते. तिचा उजव-हात उजव्या गुडघ्यासमोर खाली सोडलेला असतो. तळवा आत वळवून बोटे पसरलेली असतात व बोटांची टोके भूमीला स्पर्श करीत असतात. कधी कधी हात गुडघ्यावर टेकलेला असतो. मार नामक दैत्याने बुद्धाच्या समाधीत व्यत्यय आणण्यासाठी आपल्या कामक्रोधादी गणांसह बुद्धावर हल्ला केला, तेव्हा बुद्धाने भूमीला स्पर्श करून स्वसंरक्षणार्थ भूदेवीची प्रार्थना केली, त्या प्रसंगाचे हे प्रतीक मानले जाते. [इं. बु. इ; इ. ब्रॉं.]

भूमिहार ब्राह्मण एक जात. या लोकांची वस्ती बिहार प्रदेशाच्या उत्तर भागात आणि उत्तर प्रदेशामधील काही जिल्ह्यांत आढळते. परशुरामाने क्षत्रियांचा नि:पात केल्यावर त्यांची भू-संपत्ती ज्यांनी घेतली, ते भूमिहार ब्राह्मण होत. तेव्हापासून यांनी ब्राह्मणकर्माचा त्याग केला आणि क्षत्रिय धर्माचा स्वीकार केला, अशी आख्यायिका आहे. यांतील काही लोकांच्या पदव्या अजूनही उत्तर भारतातील ब्राह्मणांसारख्याच आहेत. परंतु काहींनी मात्र सिंह, शाही, चौधरी, राय अशा राजपूत वळणाच्या पदव्या स्वीकारल्या आहेत.

या जातीत जैथरिया, मनछिया, सोन पखरिया, सोन भदरिया, बजोछिया, जलैवार, परसरिया, चकवार, दोनवार, इ. पोटभेद आहेत.

हे कान्यकुब्जांच्या चौथ्या शाखेत निर्माण झाले, असे काहींचे मत आहे; तर हे लोक मिथिला शाखेचे आहेत, असे इतर काही विद्वानांचे मत आहे. [भा. ब्रा. जा. प्र.]

भूरिदक्षिणा दक्षिणेचा एक प्रकार. यज्ञकर्माच्या प्रसंगी आचार्याशिवाय अन्य उपस्थित ब्राह्मणांना जी यथाशक्ति दक्षिणा देण्यात येते, तिला भूरिदक्षिणा असे म्हणतात. युवनाश्वपुत्र मांधाता याने अनेक अश्वमेध यज्ञ केले आणि त्यांचे वैशिष्ट्य भूरिदक्षिणेत होते, असे म्हटले आहे. आजही विवाहाच्या प्रसंगी अशी दक्षिणा देण्यात येते. [भा. सा.]

भूर्जकंठ एक प्राचीन जात. व्रात्य ब्राह्मणाला व्रात्य स्त्रीपासून झालेल्या संततीला हे नाव आहे, असे मनू म्हणतो. निरनिराळ्या देशांत यांना आवंत्य किंवा वाटधान, पुष्पध किंवा सैरव अशी नावे मिळालेली आहेत. [हि. ध.]

भूर्जपत्र लेखनाचे एक प्राचीन साधन. भूर्जपत्र म्हणजे भूर्ज नावाच्या झाडाची साल. ही साल कागदापेक्षा अधिक टिकाऊ असते, असा समज आहे. भारतात ही झाडे हिमालयात सापडतात. लेखनासाठी या सालींचा उपयोग करण्यापूर्वी त्या सुकवीत असत. नंतर पाण्यात उकळून पुन्हा वाळवून त्यांवर शंख किंवा कवड्या घोटून ती साल गुळगुळीत करीत असत. मग हव्या असलेल्या आकाराचे तुकडे करून त्यावर खास पद्धतीने तयार केलेल्या शाईने लिहीत असत.

अनेक प्राचीन ग्रंथ या पत्रांवर लिहिलेले आढळतात. काश्मीर प्रदेशात ते अद्यापही पाहायला मिळतात. या पत्रांवर लिहिलेला आणि उपलब्ध असलेला ग्रंथ म्हणजे धम्मपद हा होय. हा ग्रंथ दुसऱ्या शतकात नकललेला असून, त्याची लिपी खरोष्ठी आहे. चौथ्या शतकातील हा संस्कृत ग्रंथही भूर्जपत्रांवरच आहे.

सर्प, विंचू इत्यादिकांच्या दंशांवरील औषधी मंत्रांच्या लेखनासाठीही भूर्जपत्रांचा वापर करण्यास सांगितले आहे.

पेशावर जिल्ह्याच्या मर्दान तालुक्यातील वक्षाली गावी सत्तर भूर्जपत्रे सापडली आहेत. या पत्रांचा काळ इ. स. चे १२ वे शतक असल्याचे समजतात. या पत्रांवरची लिपी शारदा असून, भाषा संस्कृत–प्राकृत मिश्र अशी आहे. या पत्रांवर त्रैराशिक, नफातोटा, रेखात्मक समीकरणे, वर्गसमीकरणे, वर्गमूळ, सोन्याचा हिणकसपणा काढण्याची रीत, इ. उदाहरणे आहेत. ही सर्व पत्रे ऑक्सफर्ड येथील एका ग्रंथालयात आहेत. या पत्रांचे संपादनही झालेले आहे. वक्षाली नावाच्या गावी ही भूर्जपत्रे सापडली म्हणून ती संशोधनक्षेत्रात वक्षालीची भूर्जपत्रे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणूनच प्रसिद्ध आहेत. फ्रेजर नामक पाश्चात्य पंडिताला मिळालेली भूर्जपत्रे ही इ. स. च्या सहाव्या शतकातली आहेत, आणि ती त्याच्याच नावाने प्रसिद्ध आहेत. पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळातही भूर्जपत्रे आहेत. त्यांवर सप्तशती हा ग्रंथ लिहिलेला आहे. तिथल्या एका भूर्जपत्रावर एका यंत्रामध्ये सप्तशतीतील श्लोक लिहिलेले आहेत. या पत्राचा आकार सुमारे १ फूट रुंद व १ फूट लांब असा आहे. भारतातल्या इतरही काही संग्रहालयांमध्ये भूर्जपत्रांवरचे ग्रंथ पाहायला मिळतात. [म. ज्ञा. को.; हिं. सा. इ.; ओ. नि. सं.]

भूलिया एक जात. या लोकांची वस्ती ओडिसा प्रदेशात आढळते. हे विणकर आहेत. हे स्वतःला पाटणच्या चौहान राजांचे वंशज म्हणवितात. कोरिया म्हणून कोष्टी लोकांचा एक वर्ग आहे, त्यांचे हे संबंधित असावे, असे एक मत आहे. क्वचित ठिकाणी हे लोक आपणाला देवांग अथवा देवांगण म्हणवितात. नाग व कच्छप अशी त्यांची दोन कुळे आहेत. यांच्यांत समान कुळांत लग्ने होत नाहीत. [म. ज्ञा. को.]

भूषण (इ. स. चे १७ वे शतक) एक हिंदी कवी. याच्या चरित्राविषयी पुरेशी व निश्चित माहिती उपलब्ध होत नाही. जी होते, तिच्याविषयी विद्वानांत एकमत नाही. तथापि त्याने लिहिलेले काव्यग्रंथ व इतरत्र विखुरलेल्या दंतकथा यांच्या साहाय्याने याचे चरित्र मिळते, ते असे –

भूषण हा कानपूर जिल्ह्यातील, यमुनातीरावर वसलेल्या तिकवांपूर किंवा त्रिविक्रमपूर या गावाचा रहिवासी. हा काश्यपगोत्री कान्यकुब्ज ब्राह्मण होता. याचा पिता रत्नाकर त्रिपाठी हा विद्वान असून, प्रतिभावान कवी होता. भूषणाला आणखी तीन भाऊ असून, चिंतामणी, मतिराम व नीलकंठ अशी त्यांची नावे होती. वडिलांचा कवित्वाचा वारसा या चारही भावांना कमीअधिक प्रमाणात मिळाला होता.

लहानपणी भूषण अत्यंत हूड, उनाड व खोडकर होता. वयाच्या चौदाव्या वर्षांपर्यंत तो शाळेतही गेला नाही. एकदा जेवायला बसला असता भाजीत मीठ कमी पडल्यामुळे किंवा मुळीच न घातले गेल्यामुळे त्याचे त्याच्या भावजयीशी भांडण झाले. त्या वेळी त्याची भावजय त्याला म्हणाली. 'एवढी मिजास करतोस, तर स्वतः काही मिळवीत का नाहीस?' भूषणाला हे बोलणे लागले व तो भरल्या ताटावरून तिरीमिरीने उठला व 'मी स्वतः मिळवून आणीन, तेव्हाच घरात येईन,' अशी प्रतिज्ञा करून बाहेर पडला.

पुढे तो चित्रकूट, कुमाऊँ, गढवाल, रीवाँ, जयपूर, बुंदी, दिल्ली, इ. ठिकाणच्या अनेक राजा-महाराजांच्या दरबारी कवी म्हणून राहिला व त्याने विपुल कीर्ती आणि संपत्ती मिळवली.

याच्या काव्यसामर्थ्याविषयी अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत, त्यांपैकी एक अशी –

एकदा भूषण औरंगजेबाच्या दरबारी असता औरंगजेब त्याला म्हणाला, 'हे कविलोक नुसते तोंडपुजे असतात. ते खरे बोलत नाहीत, कारण त्यांची तशी हिंमत नसते.' भूषणाला औरंगजेबाने केलेला हा साऱ्या कविजनांचा अपमान सहन झाला नाही. तो तात्काळ गरजला. 'अभय द्या. तुमचे सारे चरित्र खरे खरे वर्णन करतो.' औरंगजेब या गोष्टीला तयार झाला. मग भूषणाने औरंगजेबाची सर्व पापे आपल्या कवनांतून दरबारापुढे मांडली. भूषण जसजशी कवने गाऊ लागला, तसतसा औरंगजेबाच्या रागाचा पारा चढत गेला व शेवटी त्याने भूषणाचा शिरच्छेद करण्यासाठी समशेर उपसली. त्या क्षणी भूषणाने आपले काव्यगायन थांबवले व तो तिथून चालता झाला.

यानंतर भूषण शिवाजीमहाराजांच्या दरबारी गेला व त्याने त्यांच्या गुणगौरवार्थ शिवराजभूषण व शिवाबावनी ही दोन काव्ये रचली, असे सांगतात. काहींच्या मते भूषणाची व शिवाजीची भेटच झाली नाही; त्याने शिवगौरवाची जी काव्ये लिहिली, ती शिवाजीचा नातू शाहू याच्या दरबारी राहून. तथापि एक गोष्ट खरी, की शिवाजीच्या कर्तृत्वामुळे भूषण विलक्षण भारावून गेला होता. शिवाजीचे वर्णन करताना एके ठिकाणी तो म्हणतो–

इंद्र जिमि जंभ पर बाड़व सुअंभपर
रावन सदंभपर रघुकुलराज हैं ।
पौन बारिवाहपर संभु रतिनाहपर,
ज्यों सहस्रबाहुपर राम द्विजराज हैं ।
दावा द्रुमदंडपर चीता मृगझुंडपर,
'भूषण' वितुंडपर जैसे मृगराज हैं ।
तेज तमअंसपर कान्ह जिमि कंसपर,
त्यों मलेच्छ बंसपर सेर सिवराज हैं ।

(शिवराजभूषण ५६)

भावार्थ – जृंभासुराला इंद्र, समुद्राला वडवानल, गर्विष्ठ रावणाला राम, ढगांना वारा, मदनाला शिव, सहस्रार्जुनाला परशुराम, वृक्षांना दावाग्नी, मृगझुंडीला चित्ता, अंधाराला प्रकाश, कंसाला कृष्ण तसा (आक्रमक) म्लेच्छांना शिवाजी आहे.

भूषणाच्या नावावर आज एकूण तीन रचना उपलब्ध आहेत, त्या अशा– शिवराजभूषण, शिवाबावनी आणि छत्रसालदशक. याशिवाय त्याची काही स्फुट कविताही उपलब्ध आहे.

शिवराजभूषण हा अलंकारशास्त्रावरचा ग्रंथ आहे. त्यात एकूण ४०७ छंद आहेत. शिवाबावनीत शिवाजीमहाराजांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विषयी केलेली ५२ कवने आहेत. छत्रसालदशकात छत्रसाल-बुंदेल्याच्या गौरवाचे १० छंद संकलित आहेत. या तीनही काव्यांची भाषा सरसमधुर व तेजस्वी आहे. त्यांतील वर्णने व शब्दचित्रे प्रत्ययकारी आहेत. उदा० रायगडच्या वर्णनातील पुढील ओळी पाहा–

जा पर साहि तनै सिवराज सुरेस कि ऐसि सभा सुभ साजै ।
यों कवि भूषन जंपत है लखि संपति को, अलकापति लाजै ।।
जा मधि तीनिहु लोक कि दीपति ऐसो बडो गढराय बिराजै ।
वारि पताल सी माची मही अमरावति की छबिऊपर छाजै ।।

भावार्थ–ज्या रायगडावरील शिवाजीचा दरबार केवळ इंद्राच्या दरबाराशीच तुलना करता येईल असा आहे, जिथली दौलत पाहून साक्षात कुबेरालाही हेवा वाटतो, ज्याचे वैभव पाहून तीन्ही लोक दिपतात, असा हा रायगड. त्याचे खंदक पाताळा-सारखे, माची पृथ्वीसारखी व त्यावरचा प्रदेश हा साक्षात स्वर्ग असा आहे.

भूषणाचे वैशिष्ट्य हे, की त्याच्या आधीचे आणि त्याच्या काळातले पुष्कळसे कवी शृंगारिक गीते लिहून तत्कालीन राजामहाराजांचे मनोविनोदन करण्यात व त्यांची भाटगिरी करण्यात गुंग झाले असता, भूषणाने शिवाजी आणि छत्रसाल या पुण्यश्लोक पुरुषोत्तमांची चरित्रे गायिली व स्वतःच्या वाणी-लेखणीद्वारा सर्वत्र स्वाभिमान जागवला. [महाकवि भूषण–श्री. भगीरथ प्रसाद दीक्षित, १९५३; मराठी शिवराजभूषण–श्री. दु. आ. तिवारी, १९३१; हिं. प्रा. क.; प्रा. क. का.]

भृंगराज

(१) पितृगणातील एक गण. घरे, राजप्रासाद, इत्यादी बांधण्यापूर्वी याचे पूजन करावे, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे. [पु. इं.]

(२) एक वनस्पती. मराठीत याला माका असे म्हणतात. श्राद्धात पितरांसाठी तुळशीपत्राऐवजी याची पाने वापरतात. देवपूजेतल्या पत्रीतही याचा समावेश आहे.

भृंगीश

शिवगणांतला प्रमुख गण. याला भृंगीरिटी असेही नाव आहे. हा केवळ शिवाचा भक्त होता आणि पार्वतीला मानीत नव्हता. शिवाला सतत प्रदक्षिणा घालणे हे याचे तप होते. एक दिवस शिवाने याची परीक्षा घ्यायची म्हणून स्वतः अर्धनारीरूप धारण केले. त्यामुळे तरी त्याला पार्वतीची दखल घेणे भाग पडेल, असे शिवाला वाटले. पण भृंगीश गोंध-ळला नाही. त्याने भुंग्याचे रूप घेतले आणि अर्धनारीरूपाच्या मध्यावर नेमके छिद्र पाडून तो त्यातून एकट्या शिवालाच प्रद-क्षिणा घालीत राहिला. त्यामुळे पार्वती भृंगीशावर रागावली व तिने त्याला 'तू क्षयी होशील' असा शाप दिला. त्या शापा-मुळे भृंगी हळूहळू रोडावू लागला. त्याला स्वतःच्या पायावर उभे राहणेही अशक्य झाले. त्या वेळी शिवाने प्रसन्न होऊन त्याला तिसरा पाय दिला.

म्हणून याची मूर्ती तीन पायांची करतात. याच्या एका हाती दंड व दुसऱ्या हाती माळ असते. हाही त्रिनेत्र असून, याचे तीन्ही डोळे शिवाकडे लागलेले असतात. [सा. इं. इ. गॉ. गॉ.]

भृकुटी

(१) जैन दैवतसमूहातला एक यक्ष. हा नेमिनाथाचा सेवक आहे. याचे वर्णन असे –

सुवर्णकांती. त्रिनेत्र. चतुर्मुख. वृषभारूढ. अष्टभुज. याच्या हातात महाळुंग, भाला, मुद्गर, मुंगूस, पशुमाला व वज्र या वस्तू असतात. त्याचा एक हात अभय मुद्रेत असतो. (दिगंबरमतें ढाल, खड्ग, धनुष्य, बाण, अंकुश, कमलचक्र आणि वरद मुद्रा धारण करणारा.)

याला नंदिग असे दुसरे नाव आहे. यावरून शिवाच्या नंदीशी याचे नाते सूचित होते. त्यानेही एकदा भृकुटीचा आकार धारण केला होता. [जै. इ.]

बौद्ध देवता भृकुटी

(२) जैन दैवतसमूहातली एक यक्षिणी. ही चंद्रप्रभ तीर्थं-कराची सेविका आहे. (दिगंबरमते ही ज्वालामालिनी किंवा ज्वालिनी होय). हिचे वर्णन असे –

पीतवर्ण. वृषभारूढ. (दिगंबरमते महिषारूढ). चतुर्भुज.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(दिगंबरमते अष्टभुज), खड्ग, मुद्गर, फल आणि परशू धारण करणारी. (दिगंबरमते चक्र, बाण, पाश, ढाल, त्रिशूल, खड्ग, धनुष्य, वज्र व कांडे धारण करणारी.)

हिची अष्टभुज मूर्ती ग्वाल्हेरच्या शिल्पात आढळते. हंस हे हिचे चिन्ह आहे. [जै. इ.]

(३) बौद्धांची एक प्रमुख देवता. ही अमिताभापासून उत्पन्न झाली, असे समजतात. हिचे रूप शांत आहे. साधनमालेत हिचे वर्णन आहे, ते असे – ही चतुर्भुज, एकमुख, पीतवर्ण, त्रिनेत्र, नवयौवना असून, तिच्या डाव्या हातांत त्रिदंड व कमंडलू आहे आणि एका उजव्या हातात माला असून, दुसरा वरदमुद्रा दर्शवतो आहे. ती पद्मचंद्रासनस्थ असून, तिच्या मस्तकी अमिताभाची प्रतिमा आहे. हिच्या मूर्ती दुर्मिळ आहेत; पण तिबेटात व चीनमध्ये काही मूर्ती आढळतात.

हिची मूर्ती कधीकधी अवलोकितेश्वर खसर्पण याच्या परिवारात दुय्यम देवता म्हणून असते. [इं. बु. इ.]

भृकुटी तारा एक बौद्ध देवता. ढाका जिल्ह्यातील भवानीपूर इथे हिची मूर्ती सापडली आहे. सांप्रत ही मूर्ती ढाका साहित्य परिषदेच्या संग्रही आहे. ही पद्मासनस्थ असून, त्रिमुखी व अष्टभुज आहे. हिच्या आसनाखाली दोन सिंह गर्जना करीत असल्याचे दाखविले आहे. हिच्या हातात तलवार, त्रिशूळ, वज्र, सोटा, कुऱ्हाड, इ. आयुधे दिसतात. हिचे काही हात भंगलेले आहेत. या देवीचे समोरील मुख सौम्य आणि बाजूची दोन मुखे उग्र आहेत. डाव्या बाजूच्या मुखातून दात बाहेर आलेले आहेत. उजवीकडील मुखाची दंतपंक्ती हास्यामुळे स्पष्ट दिसत आहे. चेहऱ्यावर आठ्या आहेत. याशिवाय या शिल्पाचे एक वैशिष्ट्य असे, की गणेशाची एक रांगती मूर्ती हिच्या आसनाखाली दाखविली आहे. हिच्या मुकुटावर ध्यानी बुद्धाची आकृती कोरलेली आहे. [दे. को. ३]

भृगुआश्रम एक प्राचीन आश्रम. महाभारतात याला भृगुतीर्थ असे म्हटले आहे. हा आश्रम उत्तर प्रदेशात गंगा व शरयू या नद्यांच्या संगमावर असलेल्या बालिया इथे होता, असे म्हणतात. वीतहव्य नामक राजाने संकटकाळी या आश्रमाचा आश्रय घेतला होता, असे म्हणतात. भृगुऋषीच्या कृपेने वीतहव्य राजा ब्राह्मणही झाला होता. [हि. जॉ. ए. इं.]

भृगुकच्छ एक प्राचीन नगर. याला भृगुपूर, भृगुतीर्थ, भरुकच्छ अशी अन्य नावेही होती. सांप्रत हे भडोच या नावाने ओळखले जाते. हे नगर भडोच जिल्ह्याचे मुख्य स्थान असून, नर्मदेच्या उत्तर तीरावर समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे ३० मैलांवर, एका टेकडीवर वसलेले आहे. जातके, महाभारत, पुराणे, बृहत्संहिता, टॉलेमीचा भूगोल, पेरिप्लस, इ. ग्रंथांत या नगराविषयी पुष्कळ माहिती मिळते. परदेशी लोक याला बरुगाझा किंवा बरीग असे म्हणत.

या स्थानी भृगू ऋषीने तप केले होते व इथे त्याचा आश्रम होता, म्हणून लोक याला भृगुतीर्थ मानू लागले. बळी राजाने इथेच अश्वमेध यज्ञ केले आणि वामनरूपी विष्णूला आपले सर्व राज्य दान दिले, असे म्हणतात. त्यामुळे या स्थानाचे माहात्म्य अधिकच वाढले. नासिक येथील एका गुहेत इ. स. च्या पहिल्या शतकातला लेख आहे. त्यावरून समजते, की शकक्षत्रप नहपानाचा जावई उषवदात याने भृगुकच्छ येथे यात्रेकरूंसाठी एक धर्मशाळा आणि वापीकूपतडाग निर्माण केले होते.

प्राचीन काळी भृगुपूर हे व्यापाराचे मोठे केंद्र होते. मौर्य, सातवाहन व गुप्त साम्राज्यांत भारतातील दूरदूरच्या नगरांपासून या नगरापर्यंत मोठाले रस्ते बांधलेले असून, युरोप, इजिप्त, इराण, सुवर्णद्वीप, इ. देशांशी भारताचा आयात-निर्यात व्यापार या केंद्रातून चालत असे. जातकांमध्ये भरुकच्छ नगरातून समुद्रपर्यटनाला जाणारे व्यापारी व धर्मप्रचारक यांच्या कथा आहेत, त्यावरून मौर्यपूर्व काळीदेखील हे नगर व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध होते, असे वाटते. मात्र हे बंदर नौकानयनाच्या दृष्टीने सोयीचे नव्हते, असे पेरिप्लस या ग्रंथात म्हटले आहे. नर्मदेच्या मुखाजवळ गाळ व वाळू साचून तिचे पात्र तोपर्यंत उथळ झाले होते.

इ. स.च्या ७ व्या शतकात भृगुकच्छ नगरी एका स्थानिक राजवंशाची राजधानी होती. त्या शतकात युआन च्वांगने या नगरीला भेट दिली, तेव्हा तिथे दहा बौद्ध मठ होते व त्यांत ३०० भिक्षू राहत होते. युआन च्वांगने त्या नगरीच्या वैभवाचे पुष्कळ वर्णन केले आहे. त्या वेळी नगरीभोवती एक उंच प्राकार बांधलेला होता.

अणहिलवाडच्या राजपूत राजांच्या वेळी हे व्यापारी केंद्र व समृद्ध नगर होते. इ. स. च्या ११ व्या शतकात इथे लाट देशाची राजधानी होती. इ. स. १५७२ पर्यंत या नगरावर अहमदाबादच्या सुलतानाची सत्ता होती. इ. स. १५७३ साली अकबराने ते जिंकून घेतले. त्या शतकात पोर्तुगीजांनी हे नगर दोनदा लुटले. इ. स. १६१४ साली त्यांनी ते तिसऱ्यांदा लुटले. इ. स. १६१६ मध्ये इंग्रजांनी इथे एक वखार स्थापली आणि १६१७ मध्ये डच वखार सुरू झाली. इ. स. १६६० साली औरंगजेबाच्या हुकुमावरून शहराची काही तटबंदी जमीनदोस्त करण्यात आली. इ. स. १६७७ व १६८६ मध्ये मराठे सरदारांनी हे शहर त्यानंतर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लुटले. त्यानंतर औरंगजेबाने शहराची तटवंदी पुन्हा बांधून घेतली व त्याला सुखाबाद हे नाव दिले. इ. स. १७३६ साली निजाम-उल्मुल्काने भडोचच्या अधिकाऱ्याला नबाब केले. तेव्हापासून तो तिथे जवळजवळ स्वतंत्रपणे कारभार करू लागला. पण इ. स. १७७२ साली इंग्रजांनी ते शहर घेतले. अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत भडोचमध्ये कापूस व कापड यांचा खूप व्यापार चालत होता. पण त्यानंतर मात्र त्याचे व्यापारी महत्त्व हळूहळू कमी होऊ लागले.

या नगरात नर्मदेच्या तीरावर पुष्कळ मंदिरे आहेत. त्यांतील भृगू ऋषीचे स्थान हे सर्वांत प्राचीन होय. तिथे एका लहानशा देवळात १७ शिवलिंगे आहेत. भूतनाथ महादेव हे स्थानही फार प्राचीन आहे. तिथे तळघरात एक शिवलिंग आहे. तिथले देऊळ मात्र फार जुने नाही. इ. स. १८५७ मध्ये त्याचा जीर्णोद्धार झाला आहे. भृगुभास्करेश्वराचे मंदिर पेशवाईत बांधलेले आहे. लक्ष्मी-नारायणमंदिर, रणछोडरायमंदिर, इ. मंदिरे १५०–२०० वर्षांपूर्वी बांधलेली आहेत. विष्णूने बळिराजाला जिथे भूमीत दडपले, त्या जागी सोमनाथाचे मंदिर आहे, ते बरेच जुने आहे.

भडोच येथील मद्रेसा मशिद इ. स. १०१८ मध्ये बांधलेली असून, तिच्या दरवाज्यावर व खांबांवर सुंदर नक्षी कोरलेली आहे. जामा मशीद खूप मोठी असून, तिचे बांधकाम जुन्या देवळांचे खांब वापरून केलेले दिसते. या मशिदीत एकूण ८८ खांब असून, त्यांवर तीन मोठे व दहा लहान घुमट बांधलेले आहेत. हे खांब, घुमट व छत यांवर जैन पद्धतीची सुंदर नक्षी, देवता, हत्ती, घोडे, इ. कोरलेले आहेत. एका घुमटावर इ. स. १३२१ मधला फारसी आलेख आढळतो. दरवाजाच्या खाली दोन गोमुखे दिसतात आणि दरवाज्याभोवती संगमरवरी पाषाणावर भिन्न पशूंच्या आकृती कोरलेल्या आहेत. १००० वर्षांपूर्वी बांधलेला हा जैन विहार होता, असे जैन लोक मानतात.

शापुरजी ब्रोचाची अग्यारी पूर्वी दस्तुरकंथा या नावाने प्रसिद्ध होती. तिथे ८०० वर्षांपूर्वीचे अग्निमंदिर आहे. नदीकाठी बहारकोट येथे डूंगाजीची अग्यारी आहे, ती इ. स. १६७६ साली बांधलेली आहे. इ. स. १७०० साली बांधलेली डच वखारीची इमारत भडोचमध्ये अजून उभी आहे. तिथे सध्या एक शाळा चालते. शहराभोवतालचा तट आता बहुतेक ढासळलेला आहे. नदीच्या तीरावर जो तट अजून उभा आहे, त्यात काही दरवाजे आढळतात. [प्रा. भा. न. न. जी.; भडोच गॅझे.]

भृगुगण भृगूंचा समुदाय. यात दोन प्रकार आहेत. एक जामदग्न्य व दुसरा जामदग्न्येतर. जामदग्न्य भृगूंचे वत्स व विद किंवा बिद असे दोन भेद आहेत. जामदग्न्येतर भृगूंचेही आर्ष्टिषेण, यास्क, मित्रयू, वैन्य आणि शुनक असे पाच भेद आहेत. यांना केवळ भृगू असेही म्हणतात. या प्रत्येक विभागात अनेक गोत्रे आहेत. जामदग्न्य वत्साचे प्रवरऋषी पाच आहेत, असे बौधायन म्हणतो. पण कात्यायनाच्या मते ते तीनच आहेत. विद आणि आर्ष्टिषेण यांचे प्रवरही पाच आहेत. वत्स, विद व आर्ष्टिषेण यांना पंचावत्ती असे म्हणतात. यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाही. जामदग्न्येतर भृगूंच्या अनेक उपशाखा आहेत. कात्यायनाच्या मते त्या बारा आहेत. पाहा– भृगू. [हि. ध.]

भृगुतीर्थ नर्मदा नदीच्या तीरावरील एक प्राचीन स्थान. भेडाघाट येथील धुंवाधार जलप्रपाताजवळ हे स्थान आहे, असे संशोधकांचे मत आहे. या तीर्थाचे उल्लेख मत्स्य, पद्म, कूर्म, इ. अनेक पुराणांत आहेत. मत्स्य पुराणात (१९२. २३–६१) याच्या निर्मितीसंबंधी एक कथा आहे, ती अशी–

भृगू ऋषी एकदा नर्मदेच्या तीरावरील या जागी तप करीत असता त्याच्या देहावर एक वारूळ वाढले. तेव्हा तपाने त्याचा क्रोध नष्ट झाला की नाही, त्याची परीक्षा पाहण्यासाठी शंकराने नंदीला ते वारूळ नष्ट करण्याची आज्ञा केली. नंदी तिथे जाताच भृगूने त्याला शाप दिला. पण मग त्याच्या लक्षात आले, की शिवाच्या आज्ञेनेच नंदी वारूळ नष्ट करण्यास प्रवृत्त झाला होता. तेव्हा भृगूला पश्चात्ताप झाला व त्याने करुणाभ्युदय नामक स्तोत्र रचून शिवाची करुणा भाकली. त्यामुळे शिव प्रसन्न झाला आणि ‘ नर्मदातीरी तुझ्या नावाचे तीर्थस्थान निर्माण होईल ’ असा वर त्याने भृगूला दिला.

दाशरथी रामाने परशुरामाची शक्ती नष्ट केली होती, ती परशुरामाने या ठिकाणी तप करून पुन्हा प्राप्त करून घेतली, असे म्हणतात. या स्थानाजवळच एका टेकडीवर चौसष्ट योगिनींचे मंदिर आहे. [हि. ध.; पु. इं.]

भृगुविद्या बत्तीस विद्यांपैकी एक. वरुणाने भृगूला शिकविली म्हणून हिला वारुणीविद्या असेही नाव आहे. भृगुविद्या म्हणजे पर्यायाने ब्रह्मविद्याच होय. भृगू हा वरुणाचा पुत्र. तो एके दिवशी वरुणाकडे जाऊन म्हणाला, की ‘ मला ब्रह्म म्हणजे काय ते सांगा. ’ त्यावर वरुण म्हणाला, की ‘ ज्याच्यापासून सर्व प्राणी उत्पन्न होतात, उत्पन्न झाल्यावर ज्याच्या सत्तेने जगतात आणि मेल्यानंतर ज्याच्यामध्ये विलीन होतात, ते ब्रह्म होय. ’

भृगूने त्या ब्रह्माच्या ज्ञानासाठी तप केले. त्यात त्याला अन्न हेच ब्रह्म असल्याचे ज्ञान झाले. कारण वर सांगितलेले ब्रह्मलक्षण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अन्नाला लागू पडत होते. पण तरीही त्याचे समाधान झाले नाही. त्याने पुनश्च अधिक तप केले. त्यात त्याला प्राण, मन, विज्ञान ही क्रमाने ब्रह्म असल्याचे ज्ञान झाले. पण तेवढ्यानेही त्याचे समाधान झाले नाही. मग त्याने अधिक तप केले. त्या तपाने भृगूला आनंद हे ब्रह्म असल्याचे ज्ञान झाले. त्या ज्ञानाने त्याला समाधान झाले.

या विद्येचे फल सांगताना तैत्तिरीय उपनिषदात (३·६) म्हटले आहे ते असे –

सैषा भार्गवी वारुणी विद्या । परमे व्योमन् प्रतिष्ठिता ।
य एवं वेद प्रतितिष्ठति । अन्नवानन्नादो भवति ।
महान् भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान् कीर्त्या ।।

अर्थ – अशी ही वरुणाने सांगितलेली व भृगूने जाणलेली विद्या आहे. ही अत्यंत सूक्ष्म अशा हृदयाकाशामध्ये स्थित आहे. जो कोणी भृगूप्रमाणे तप आचरून आनंदाचा अनुभव घेतो तो ब्रह्माच्या ठिकाणी स्थित होतो, म्हणजे ब्रह्मरूप होतो. तसेच तो अन्नाने समृद्ध होतो, अन्नाचा उपभोग घेऊ शकतो. प्रजा, पशू आणि ब्रह्मतेज यांमुळे थोर बनतो. कीर्तीनेही श्रेष्ठ होतो.

सारांश अन्न, प्राण, मन, विज्ञान आणि आनंद ही पाच मानवाची प्राप्तव्ये आहेत. आणि या सर्वांत निर्भेळ शाश्वत आनंद हेच मुख्य प्राप्तव्य आहे. हा शाश्वत आनंद म्हणजेच ब्रह्मानंद होय. तो परावलंबी नसून, अद्वैत भावनेने व कामत्यागाने उत्पन्न होणारा, अतएव स्वाधीन असा आनंद आहे. [बत्तीस विद्या; उ. अ.; उ. र.; उपनिषदर्थव्याख्या]

भृगुव्रत एक तिथिव्रत. मार्गशीर्ष वद्य द्वादशीला या व्रताचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. भृगू नावाच्या बारा देवांची पूजा आणि हवन हा यातील प्रमुख विधी आहे. प्रत्येक महिन्याच्या वद्य द्वादशीला हे व्रत करायचे असते. उद्यापनाच्या वेळी एक गाय दान देतात. [हि. ध.]

भृगुसंहिता एक भविष्यविषयक ग्रंथ. भृगुऋषीने आपल्या त्रिकालज्ञानाच्या बळावर पुढच्या अनेक पिढ्यांचे भूत-भविष्य यात लिहून ठेवले आहे. भृगू आणि त्याचा पुत्र शुक्र यांच्या संवादातून यात जिज्ञासूला आपले भूतभविष्य कळू शकते. त्यासाठी आपली जन्मकुंडली ग्रंथातून शोधून काढायची आणि तिच्याखालील भूत-भविष्य वाचायचे. प्रत्येक मनुष्याचे भूत-भविष्य या ग्रंथात मिळते. ते कधी विस्ताराने दिलेले असते, तर कधी जिज्ञासूच्या एखाद्या प्रश्नापुरतेच असते.

अलिकडे भृगुसंहिता या नावाचे छापील ग्रंथही मिळतात. पण हे छापील ग्रंथ विश्वसनीय नाहीत आणि त्यांतून मिळणारे भूत-भविष्यही अनुभवाला येत नाही. खऱ्या प्रमाणित भृगुसंहितेच्या प्रती मेरठ, पंजाबातले दुवली, होशियापूर, काश्मीर, बरनाला, दिल्ली, हरिद्वार, देवप्रयाग, अशा मोजक्या ठिकाणीच आढळतात. भृगुसंहितेतल्या कुंडल्या आणि त्यांची वर्णने एका अत्यंत जुनाट कागदावर पोथीच्या रूपात लिहिलेली असतात. त्यात पत्रिकेचे वर्णन संस्कृत भाषेत श्लोकबद्ध असते. भाषा मात्र सदोष असते. भूर्जपत्रे, ताम्रपत्रे व कळकाच्या पट्टचा यांवरही भृगुसंहितेचे लेखन केलेले आढळते. काही काही प्रतींची पत्रे रुंद असतात, तर काहींची लहान असतात. यातील वर्षांची संख्या शब्दांनी घोषित होणाऱ्या अंकानी दिलेली असते. उदा० चंद्र = १; नेत्र = २; वसू = ८; दंत = ३२; इत्यादी.

यातील वर्णनांचे काही नमुने श्री. शांताराम आठवले यांनी दिलेले आहेत, ते असे –

(१) एक आय्. ए. एस्. अधिकारी १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर आयकर खात्यात आले. ते जेव्हा आपले भविष्य पाहण्यासाठी भृगुज्योतिषाकडे गेले, तेव्हा त्या ग्रंथात त्यांचे भविष्य मिळाले, ते असे –

स्वदेशोदय यदा जायेत् तदा भाग्योदयम् महत् ।
राज्यद्वारे अधिकार महत् निश्चित्तप्राप्त जायते ।
सहस्राधिक श्वेतमुद्रा प्रतिमासे भविष्यति ।
उत्तमं वाहनम् गेहे नमंति बहवो जनाः ।
राज्यकोषस्य वृद्ध्यर्थे अहर्निश कार्य साधयेत् ।
क्रय-विक्रयविनिमये कार्ये निपुणो सूक्ष्मावलोकने ।

अर्थ – देश स्वतंत्र झाल्यावर या गृहस्थाचा मोठा भाग्योदय होईल. हा सरकारात मोठ्या अधिकारावर चढेल. प्रत्येक महिन्याला हजाराहून अधिक रुपये मिळवील. घरी उत्तम वाहन असेल. पुष्कळ लोक त्याच्याशी नमून वागतील. राज्याचा कोश वाढावा म्हणून हा अहर्निश प्रयत्न करील. क्रय-विक्रय-विनिमय कार्यातले सूक्ष्मावलोकन करण्याच्या कामी हा निपुण असेल.

(२) एका कंत्राटदाराचे भविष्य पुढीलप्रमाणे –

भूमिगृहस्य रचनायाम् विविधाकृतिसमन्वितः ।
सुरम्य रचनाकार्ये तदङ्गभूतपदार्थस्य क्रयविक्रयधनोदयम् ।।

अर्थ – हा गृहस्थ विविध आकृतींची घरे वगैरे बांधील. याच्या गृहरचना सुरम्य असतील. तदंगभूत अशा पदार्थाच्या क्रय-विक्रयातून याला धनलाभ होईल.

(३) भृगुशास्त्री दीक्षित यांनी काही निवडक मित्रांसमोर कै. लालबहादूर शास्त्रींचे भृगुसंहितेतील भविष्य वाचले होते आणि ते संहितेतल्या मजकुराच्या ठशासह अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझीनच्या एप्रिल १९६६ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. ते भविष्य श्री. शांताराम आठवले यांनी पुढीलप्रमाणे दिले आहे –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या जातकीचा स्वभाव साधा व नम्र असेल. तो मितभाषी; पण तितकाच निर्भय स्पष्टवक्ता व सद्‌गुणसंपन्न असेल. सहृदयता हा याचा स्वभावधर्म असेल. श्रीमंत-गरीब, उच्च-नीच हा भेदाभेद तो करणार नाही.

याच्या सौभाग्यवतीचे नाव ललिता असेल. तिच्यासह हा आपला गृहस्थधर्म पाळील. गरिबी व संकटे यांना धैर्याने व समाधानाने तोंड देत हा कालक्रमणा करील. राजकारणात भाग घेऊन अनेक सन्मानाच्या जागा भूषवील; पण अहंकार किंवा उद्धटपणा यांपासून हा अलिप्त राहील.

मातृभूमीसाठी वाटेल तो त्याग करील आणि इतरांना आदर्श ठरेल. चार पुत्र, दोन कन्या, हे त्याचे संततिधन राहील.

हा कृतिशील व धैर्यधर असला, तरी प्रकृतिदौर्बल्यामुळे त्याचा निरुपाय होईल.

वयाच्या ६०व्या वर्षी हा आपल्या देशाचा प्रधानमंत्री होईल. आपल्या कारकीर्दीत अल्पावकाशातच देशाला फार मोठा मान व महत्त्व हा प्राप्त करून देईल. अत्यंत धीमेपणाने, धैर्याने, परकीय आक्रमणाच्या संकटाला तोंड देईल आणि आपल्या मायभूमीचा मान राखील व परकीय आक्रमणांना परतवून देशाला विजयी करील. वयाचे ६२ वे वर्ष प्रकृतीच्या दृष्टीने फार वाईट, आणिबाणीचे आहे.

हे भविष्य वाचले जात असताना पौष शुद्ध पौर्णिमा ते माघ शुद्ध पौर्णिमा हा कालखंड अत्यंत चिंतेचा आहे, असे आढळले. या काळात या जातकीवर कोसळणाऱ्या प्राणान्तिक संकटातून त्याला कोणी वाचवू शकेल, असा विधिसंकेत दिसत नाही, असे भृगूने म्हटले आहे.

त्यानंतर भृगू ऋषी म्हणतो, की जातकीच्या हृदयव्यथेने जे घडणार आहे, त्याचे चित्र डोळ्यांपुढे उभे राहून माझेच डोळे पाणावले आहेत. हा अध्याय मला साश्रुनयनांनी समाप्त करणे भाग पडत आहे.

कै. शास्त्रींचे हे भृगुसंहितेतील भविष्य किती तंतोतंत खरे उतरले, तो इतिहास लोकांच्या मनात अजूनही ताजा आहे.

भृगुसंहितेत एखाद्या व्यक्तीचे भविष्य वाचले जात असता त्या ओघात कित्येकदा विषयांतर करूनही इतर संबंधित व्यक्तींची किंवा कित्येकदा राष्ट्रीय स्वरूपाची महत्त्वाची भविष्ये भृगू व शुक्र यांच्या मार्मिक संवादांतून प्रकट होतात. ऐकणाऱ्यांना प्रारंभी हे विषयांतर कशासाठी ते कळत नाही. पण शेवटी ज्या वेळी भृगू ऋषींचा हेतू ध्यानी येतो, तेव्हा श्रोते आश्चर्यचकित होतात.

भृगुसंहितेप्रमाणेच आणखी कांही संहिता द. भारतात प्रचलित आहेत. त्यांना नाडीग्रंथ म्हणतात. त्यांची भाषा बहुधा तमिळ, तेलुगू किंवा क्वचित मलयाळम असते. हे ग्रंथ भूर्जपत्रांवर किंवा ताडपत्रांवर लिहिलेले आढळतात. पत्रांची लांबी सुमारे ७ ते ८ इंच आणि रुंदी सुमारे २ ते २॥ इंच असते. हे ग्रंथ फार प्राचीन आहेत. वराहमिहिराने आपल्या ग्रंथांत ध्रुवनाडीचा उल्लेख केला आहे. त्यावरून हे ग्रंथ इ. स. च्याही पूर्वीचे असावे, असे म्हणावे लागते. आतापर्यंत जे नाडीग्रंथ उपलब्ध झाले आहेत आणि विद्वानांनी पारखून मान्य केले आहेत. त्यांची नावे अशी – (१) काका भुजंदरनाडी (२) ध्रुव अथवा सप्तर्षीनाडी, (३) सत्यसंहिता, (४) नंदीनाडी, (५) कौशिकनाडी, (६) शुक्रनाडी, (७) सूर्यसंहिता, (८) चंद्रनाडी, (९) अरुणनाडी, (१०) भीमनाडी, (११) भृगुसंहिता, (१२) अगंस्त्यनाडी. (१३) नारदसंहिता.

या नाडीग्रंथांतून पृच्छकाची इष्ट कुंडली शोधून भविष्य सांगणे हे बरेच जिकिरीचे काम असते. नंदीनाडी व सप्तर्षिनाडी या ग्रंथांत पृच्छकाच्या तळहातावरील काही रेखांवरून एक सांकेतिक आकडा ठरवून घेतला जातो. अशा आकड्याला रेखा म्हणतात. एकदा रेखा ठरली म्हणजे पृच्छकाचे भविष्य असलेले भूर्जपत्र नेमके बाहेर काढता येते. नाडीग्रंथात पृच्छकाला जातकी म्हणतात. हे ग्रंथ प्रथम जातकीच्या कुंडलीतील बारा घरांच्या द्वादश भावांचे स्थूल भविष्य सांगतात आणि दुसऱ्या कर्मकांड नावाच्या विभागावरून जातकीच्या पूर्वजन्मातील कृत्ये व त्यांच्या परिहारासाठी जपतपादिविधी सांगतात. श्री. कन्हैयालाल मुन्शी यांनी आपल्या 'भवन्स जर्नल'-मध्ये नाडीग्रंथाबद्दल त्यांना मिळालेल्या अनुभवांचे विशदीकरण करणारा एक लेख लिहिला आहे. त्यातले एक उदाहरण असे-

एकदा एका नाडीग्रंथातील त्यांच्याबद्दलचे भविष्य वाचले जात होते. कथनाच्या ओघात असे निर्देशिले होते, की काही बाबींचा विशेष खुलासा होण्यासाठी दहाव्या खंडातील मजकूर मुद्दाम वाचावा. दहावा खंड वाचायला घेण्यापूर्वी श्री. मुन्शी यांचा चिटणीस त्या ठिकाणी आला. एका महत्त्वाच्या पत्रव्यवहाराबद्दल त्याला काही जरुरीची विचारणा करायची होती. चिटणीस आपले काम करून बाहेर गेला. वाचन पुढे चालू झाले. पुढचाच श्लोक असा होता– 'खंड १०वा वाचण्यापूर्वी जातकीचा चिटणीस भविष्यवाचनाच्या जागी येईल आणि जातकीस कुंकुम (काश्मीर) देशाच्या प्रमुखाला लिहावयाच्या एका महत्त्वाच्या पत्रासंबंधी स्मरण देईल. असे घडले तरच खंड १० वाचायला घ्यावा.

या सर्व नाडीग्रंथांत काका भुजंदरनाडी हा ग्रंथ तर अद्‌भुतच आहे. त्यात जागतिक घडामोडींची अचूक वर्णने आढळतात. मोठमोठ्या युद्धांचे काळ, युगपुरुषांचे अवतार, त्यांची कार्ये,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शास्त्रीय शोधांतील प्रगती, स्पुटनिक, अणू, कृत्रिम चंद्र, अवकाशातील मानवाचे भ्रमण, इतर ग्रहगोलांवर तो जाण्याची शक्यता या गोष्टींची वर्णने काका भुजंदराने दोन हजार वर्षांपूर्वी लिपिबद्ध करून ठेवली आहेत. त्यात आगगाड्या, विमाने, डाक व तारखाते, वीज, आकाशवाणी, इ. आधुनिक गोष्टींविषयीही वर्णने आढळतात. त्याचप्रमाणे युद्धे व त्यांचे परिणाम, धूमकेतू व त्यांची फळे, सूर्यावरचे डाग व त्यामुळे सृष्टिक्रमात होणारे बदल, भारताचे स्वातंत्र्य, शेजारच्या नव्या राष्ट्राची निर्मिती, संस्थानांचे विलिनीकरण, इ. गोष्टींचेही आश्चर्यकारक उल्लेख काका भुजंदरनाडीत आहेत. पुढे होणाऱ्या काही अतर्क्य घटनांचे भविष्य देताना कालांतराने हिमालय पर्वत नाहीसा होईल, असेही एक चकित करून सोडणारे भाकित त्याने लिहून ठेवले आहे. [नाडीग्रंथ – एक अभ्यास – श्री. शांताराम आठवले]

भृगू (१) एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या नवव्या मंडलातील ६५ वे सूक्त भृगू आणि जमदग्नी या दोघांनी व दहाव्या मंडलातील १९ वे सूक्त भृगू, मथित आणि च्यवन या तिघांनी मिळून रचलेले आहे. भृगू हा वरुणाचा पुत्र आहे. वेदांच्या रचनेला भृगुकुलातील पुरुषांनी बराच हातभार लावलेला आहे. वैदिक काळाच्या प्रारंभी भृगू ही प्राचीन व्यक्ती मानली जाऊ लागली होती. तो वरुणाचा पुत्र असल्याचे जे सांगितले आहे, ते त्याचेच द्योतक होय. ऋग्वेदात १८ वेळा भृगूचा उल्लेख आलेला आहे आणि त्यापैकी १७ वेळा तो बहुवचनात आहे.

भृगूच्या जन्माविषयी भिन्न भिन्न मते आढळतात. आदित्य व अंगिरा यांच्याबरोबरच भृगूची उत्पत्ती झाली व ती प्रजापतीच्या वीर्यापासून झाली, असे ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे (३.३४). गोपथ ब्राह्मणात दुसरी कथा दिली आहे, ती अशी – एकदा ब्रह्मदेव तपश्चर्या करीत असता, त्याच्या शरीरातून काही घर्मबिंदू गळाले. त्यांत त्याला स्वतःच्या सुंदर शरीराचे प्रतिबिंब दिसले आणि त्यामुळे त्याचे वीर्यस्खलन झाले. लगोलग त्या वीर्याचे दोन भाग झाले. त्यांतला एक भाग स्निग्ध होता. त्यातून भृगूचा जन्म झाला. दुसरा भाग रुक्ष होता. त्यातून अंगिरा जन्मला. भृगूने जे शब्द उच्चारले त्यांवरून त्याला अथर्वा ही संज्ञा प्राप्त झाली. अथर्व ऋषीपासून ब्रह्मदेवाला जे मंत्र दृष्ट झाले, त्या मंत्रांचा आथर्वणवेद बनला. अंगिरा ऋषीपासून दृष्ट झालेल्या मंत्रांचा आंगिरसवेद बनला. इंद्राच्या रेतापासून त्याचा जन्म झाला, असे तै. ब्राह्मणात म्हटले आहे. महाभारतात एका ठिकाणी त्याचा जन्म ब्रह्म्याच्या हृदयातून व दुसऱ्या ठिकाणी अग्नीत पडलेल्या प्रजापतीच्या वीर्यापासून झाला, असे म्हटले आहे. मनुस्मृतीतही त्याला

अग्निज म्हटले आहे. भागवतात त्यांची उत्पत्ती ब्रह्म्याच्या त्वचेपासून मानलेली आहे (४.५.१७–१९). पुराणात अन्यत्र त्याला ब्रह्म्याच्या नऊ मानसपुत्रांपैकी एक मानले आहे. भृगू ऋषी वेदालाही प्राचीन असल्यामुळे त्याच्या जन्माची व मातापित्यांची खरी माहिती लोक विसरून गेले असावे आणि त्यामुळे त्याच्या जन्माविषयी अशा भिन्न भिन्न कथा निर्माण झाल्या असाव्या.

भृगू शब्दाची व्युत्पत्ती भृज् = भाजणे या धातूपासून आहे. यास्काने ती भ्रस्ज् = भाजणे यावरून मानलीआहे. महाभारतात भृगू हा शब्द भृक् म्हणजे ज्वाला या शब्दाशी संबंधित मानलेला आहे. बर्गेनने भृगू म्हणजे अग्नी असे म्हटले आहे; तर कुन्ह आणि दार्थ यांनी भृगू म्हणजे वीज असे म्हटले आहे. यावरून भृगूचा अग्नीशी संबंध आहे, हे कळून येईल. भृगूने मानवांसाठी अग्नी शोधून काढला, असे ऋग्वेद सांगतो. तसेच मातरिश्व्याने अग्नीचा शोध लावला, असेही तो सांगतो. याची संगती अशी लावता येईल, की मातरिश्व्याने पदार्थविज्ञानशास्त्राच्या दृष्टीने अग्नीचा शोध लावला, तर भृगूने यज्ञयागासाठी त्याचा प्रथम उपयोग केला. काही वेळा, मातरिश्व्याला अग्नी प्रज्वलित रूपात दिसला, तर भृगूने तो मंथन करून निर्माण केला, असाही त्याचा अर्थ लावतात. मातरिश्व्याने लपलेला अग्नी शोधून काढून तो भृगूसाठी प्रज्वलित केला, असेही एका ठिकाणी म्हटले आहे. मंथन करून उत्पन्न केलेला अग्नीच यज्ञीय कर्मासाठी उपयोगात आणतात, हे प्रसिद्धच आहे. ऋग्वेदातही याच कल्पनेला दुजोरा दिलेला आढळतो. ऋग्वेदातील अग्निसूक्तांत बारा वेळा भृगूचा उल्लेख आहे. भृगुकुलातील अनेक पुरुषांनी यज्ञयाग केले. पाण्यात दडून बसलेल्या अग्नीला भृगूंनी शोधले, असेही एका ठिकाणी म्हटले आहे. भृगू हे अग्निचयन व हविर्भाग तयार करण्यात तरबेज होते. ते रथकारही होते.

भृगुकुल – भृगू हे मानवांचे प्राचीन पूर्वज आहेत. भृगू हे अग्निपूजेचे प्रवर्तक असल्यामुळे ऋग्वेदात त्यांचा अंगिरस, नवग्व आणि अथर्वण यांच्याशी संबंध जोडलेला आहे. यज्ञ केल्यामुळे भृगू स्वर्गात गेले, असे अथर्ववेदात सांगितले आहे (४.१४.३). भृगू हे अंगिरसांप्रमाणे आथर्वण धर्माचे प्रणेते होते. म्हणूनच अथर्ववेदाला भृग्वांगिरसवेद असे नाव मिळाले आहे.

श्री. पद्मनाभय्य भृगूंविषयी म्हणतात, ते असे – कुशद्वीप, शाल्मलिद्वीप आणि क्रौंचद्वीप हे भृगूंचे कार्यक्षेत्र होय. तिथून ते भारतात आले. कश्यपाने परशुरामाकडून सर्व पृथ्वी दानरूपात घेतली, ही घटना सनपूर्व २४०० ची आहे. भृगू हे द्रविड असून, ते प्रथमच समुद्रमार्गाने द. भारतात आले.

या कुलात भृगू, कवी, च्यवन, शुक्र, और्व, प्रमती, ऋचीक, रुरू, जमदग्नी, परशुराम, शुनक, शौनक, इ. प्रसिद्ध व्यक्ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होऊन गेल्या. या सर्वांना भार्गव म्हटले आहे. महाभारतात भार्गवांबद्दल अनेक आख्याने व उपाख्याने आलेली आहेत.

भार्गवांचा इतर ब्राह्मण कुलांपेक्षा क्षत्रियांशी अधिक जवळचा संबंध होता. उदा० च्यवनाने शर्याती राजाची मुलगी सुकन्या हिच्याशी विवाह केला होता. ऋचीकाने गाधी राजाच्या सत्यवती नामक कन्येचे पाणिग्रहण केले होते. जमदग्नीने प्रसेनजित राजाची कन्या रेणुका हिला वरले होते. शुक्राचार्यांची कन्या देवयानी ही ययाती राजाची भार्या झाली होती. एका भार्गवाने वीतहव्य राजाला दत्तक घेतले व त्याचे वंशज भार्गव म्हणून ओळखले जाऊ लागले. त्याचबरोबर काही भार्गवांचे क्षत्रियांशी चांगलेच वैर होते असे दिसते. उदा० परशुरामाची कथा व म. भा. च्या आदिपर्वतले और्वाचे आख्यान.

श्री. सुखठणकर यांनी भृगूंविषयीच्या एका निबंधात भृगूंचे स्वभावविशेष व त्यांची वाङ्मयीन क्षेत्रातली कर्तबगारी या गोष्टींवर प्रकाश पाडला आहे, तो असा –

भृगू हे शीघ्रकोपी व सूडबुद्धी धारण करणारे होते. तपःसामर्थ्यामुळे ते सर्वज्ञ व शक्तिमान बनले होते. त्याला भूमीवरचे देव म्हटले आहे. कित्येकदा ते देवांपेक्षाही वरचढ असल्याचे सांगितले आहे. भृगूंनी अग्नीला शाप दिला होता व इंद्रपद मिळविणाऱ्या नहुषाला पदभ्रष्ट केले होते. च्यवनाने इंद्राचा एक बाहू लुळा केला होता. परशुराम हा त्याच कुळातला. त्याने सर्व पृथ्वी एकट्याच्या सामर्थ्याने जिंकली आणि शेवटी कश्यपाच्या हातावर तिचे उदक सोडले.

म. भा. मधले पौलोम हे उपपर्व आणि पौष्य उपपर्वाचा बराचसा भाग भार्गवांच्या कथांनी भरलेला आहे. या कथा अनेकदा पुनरावृत्तही झाल्या आहेत. म. भा. च्या प्रसाराच्या कामीही भार्गवांनी बराच हातभार लावलेला आहे.

म. भा. मध्ये भृगुकुलातील व्यक्तींना एवढे महत्त्व का दिले आहे, त्याची कारणे अंदाजाने शोधावी लागतात. व्यासांच्या चोवीस हजार श्लोकांच्या भारतात भार्गवांची उपाख्याने आढळत नाहीत. व्यासशिष्य वैशंपायनाने ती अंतर्भूत केली असतील, असेही दिसत नाही. त्यानंतरच्या काळात उग्रश्रवा सूत याने जेव्हा भार्गव शौनकाच्या द्वादशवार्षिक सत्रात महाभारताचे प्रवचन केले, तेव्हा भृगुकुलातील व्यक्तींच्या उपाख्यानांचा त्यात समावेश झालेला दिसतो. बहुधा भार्गवानीच ही उपाख्याने म. भा.मध्ये समाविष्ट केली असावी.

नवीन भर घालून तयार केलेले हे महाभारत भार्गवांनी बराच काळपर्यंत आपल्या ताब्यात ठेवून त्याचा प्रसार केला असावा. भार्गव हे धर्म आणि नीती या विषयांचे फार मोठे अधिकारी होते. भार्गव शुक्राची म. भा. मधली नीती प्रसिद्धच आहे. अशा प्रकारे कौरव-पांडव-युद्ध हा मूळचा भारताचा गाभा बदलून भार्गवांनी त्याचे स्वरूप नैतिक व धार्मिक शिक्षण देणारा ग्रंथराज असे बनवले व तेच आजतागायत रूढ आहे. म. भा. प्रमाणेच मनुस्मृतीही भृगुसंहिताच मानलेली आहे.

पुराणांतही भृगूंच्या अनेक कथा आढळतात. भृगूच्या मनापासून पुष्कळ पुत्र झाले व ते सर्व आकाशसंचारी होऊन देवांची विमाने वाहू लागले. दक्षकन्या ख्याती ही भृगूची पत्नी होय. भृगूला संजीवनी विद्या अवगत होती. भृगूने एकदा विष्णूच्या हृदयावर लाथ मारली व दुसऱ्या वेळी त्याला 'तुला गर्भवासजन्य दुःख भोगावे लागून पृथ्वीवर अवतार घ्यावा लागेल' असा शाप दिला. त्याने शंकराला 'तू लिंगरूप होशील' आणि ब्रह्मदेवाला 'तुझी पूजा कोणी करणार नाही' असे शाप दिले. भृगूला दिव्या नामक स्त्रीपासून बारा देव झाले. भृगू व आंगिरस यांचा निकटतम संबंध वैदिक साहित्यात दिसून येतो. त्यांच्याविषयी श्री. चित्रावशास्त्री पुढील विवेचन करतात –

प्रथम भृगू व आंगिरस भिन्न असून त्यांचे ग्रंथही भिन्न होते. पण पुढे दोनही एक होऊन भृग्वंगिरस् किंवा अथर्वांगिरस या नावाने त्याला सध्याच्या अथर्वसंहितेचे रूप देण्यात आले. असे एकरूप देण्यात आले, तरी मूळचे वेदमार्गी भृगू व अंगिरस व मंत्रतंत्र करणारे अथर्वन् व अंगिरस् यांची भिन्नता प्रवर-विचारावरून अद्यापि अनुमानिता येते. सध्या विवाहप्रसंगी गोत्रप्रवरांचा विचार करताना प्रवरसाम्य असूनही विवाह होतो, अशी ही दोन गोत्रे आहेत. केवळ भृगुगणातील गोत्रांत व केवळ अंगिरस गणातील गोत्रांत अनुक्रमे भृगू व अंगिरा हे प्रवर असूनही त्यांच्यांत परस्पर विवाह होतात. इतर कोणत्याही गोत्रात समान प्रवर असताना विवाह होत नाही. भृगूमध्ये केवल भृगू व जामदग्न्य भृगू असे भेद आहेत. तसेच अंगिरसामध्येही अंगिरस, भरद्वाजांगिरस व गौतमांगिरस असे भेद आहेत. यात भृगू व अंगिरा ही दोन नावे सारखी असली, तरी मूळ व्यक्ती भिन्न असल्यामुळे विवाह होण्यास हरकत धरीत नसावे. परंतु मूळ व्यक्तींची भिन्नता पौराणिक वाङ्मयात स्पष्टपणे वेगळी दाखविता येत नसली, तरी स्वायंभुव भृगू व वारुणी भृगू असा हा फरक असावा. अंगिरसासंबंधीही असेच म्हणावे लागते. पण अथर्ववेदाचे जारणमारणात्मक स्वरूप जाऊन त्याला त्रयी विद्येत स्थान मिळाल्यावर या वंशात दाखविणे अशक्य झाले. [सी. ऋ.; श्री. वि. स. सुखटणकर – अॅ. भां. ओ. रि. इं., ऑक्टोबर १९३६; प्रा. च. को.]

(२) एक धर्मशास्त्रकार. त्याच्या नावावर पुढील ग्रंथ आढळतात – भृगुस्मृती, भृगुगीता, भृगुसंहिता व भृगुसूत्र. मत्स्य पुराणायरून समजते भृगूने वास्तुशास्त्रावरही एक ग्रंथ लिहिला होता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भृशुंडी गजाननस्वरूप झालेला एक ऋषी. हा जातीने कोळी व मुद्‌गल ऋषीचा शिष्य होता. याची कथा अशी– दंडकारण्याशेजारी नंदन नावाच्या नगरात दुष्ट नावाचा एक कोळी राहात असे. गावातल्या लोकांना त्याने अगदी हैराण केले होते. तेव्हा सर्व लोकांनी मिळून त्याला गावाबाहेर हाकून दिले. मग तो दंडकारण्यात जाऊन वाटमारी करून आपला चरितार्थ चालवू लागला.

एकदा या अरण्यातून मुद्‌गल ऋषी चालला असता या धीवराने त्याला अडवले. पण मुद्‌गल ऋषीचा हस्तस्पर्श होताच त्याची बुद्धी पालटली. मग मुद्‌गलाने त्याला गणेशमंत्राचा उपदेश केला. पुढे तिथेच राहून भृशुंडीने बरीच वर्षे तप केले. कालांतराने याला भुवयांमध्ये सोंड फुटली व तो गजाननस्वरूप झाला. त्यामुळे मुद्‌गलाने त्याचे नाव भृशुंडी असे ठेवले. भृशुंडीने मग तिथेच आश्रम स्थापला. एकदा साक्षात इंद्र याच्या दर्शनाला आला होता, असे गणेश पुराणात म्हटले आहे.

भृशुंडीची ही कथा म्हणजे, अनार्य लोकांनी आर्य जातीत प्रवेश व मानमान्यता मिळविल्याची द्योतक असावी, असे जाणकारांचे मत आहे. [प्रा. च. को.; मंगलमूर्ति श्रीगणेश]

भेक बारा पंथ नाथपंथात विविध भेदांवर आधारलेले बारा उपपंथ आहेत. या सर्व उपपंथांमध्ये सुसूत्रता राहावी, म्हणून त्यांवर नियंत्रण करणारी एक मध्यवर्ती संघटना आहे. या संघटनेला भेक बारा पंथ असे म्हणतात. या संघटनेच्या प्रमुखाला जोगेश्वर असे नाव आहे. याची बारा वर्षांनी एकदा म्हणजे ज्या वर्षी हरद्वारला कुंभमेळा भरतो, त्या वर्षी निवड करतात. [इं. सा.]

भेडाघाट नर्मदेच्या तीरावरील एका रमणीय स्थान. हे जबलपूर शहरापासून सुमारे १३ मैलांवर आहे. या ठिकाणी नर्मदा नदी ३० फूट उंचीच्या खडकावरून खाली कोसळते. हा धबधबा धुंवादार या नावाने प्रसिद्ध आहे. त्याच्या खाली नदीचा प्रवाह अरुंद झालेला असून, त्याच्या दोन्ही अंगीं शुभ्र संगमरवरी पाषाणाच्या उंच दरडी उभ्या आहेत. हे पाषाण चमकदार असून, त्यांत मधून मधून निळ्या, पिवळ्या व गुलाबी रंगछटाही दिसतात. दरडींची उंची ५० ते १०० फूट आहे. नदीचे पात्र एका जागी इतके अरुंद झाले आहे, की माकड एका दरडीवरून पलिकडे सहज उडी मारू शकेल. त्यावरून त्या जागेला बंदरकुदनी हेच नाव मिळाले आहे. निसर्गदत्त सौंदर्यामुळे धुंवाधार देशी-विदेशी प्रवाशांचे आकर्षण ठरला आहे.

नदीच्या पात्रात एक शिवलिंग आहे, ते राणी अहिल्यादेवीने स्थापलेले आहे. एका बाजूच्या खडकात दत्तात्रेयाची गुहा आहे. या ठिकाणी भृगू ऋषीने तपश्चर्या केली, म्हणून याला भृगुतीर्थ म्हणतात, असे पुराणांत सांगितले आहे.

इथे जवळच शिव नामक टेकडी असून, तिच्यावर चौसष्ट योगिनींचे मंदिर आहे. हे मंदिर गौरीशंकरमंदिर म्हणूनही प्रसिद्ध आहे. कलचुरी नृपती प्रथम युवराज देव याच्या कारकीर्दीत (इ. स. चे ११ वे शतक) हे मंदिर निर्माण झाले, असें म्हणतात. हे देवालय वर्तुळाकार असून, त्यावर छप्पर नाही. त्यातील ६४ योगिनींपैकी पाच मूर्ती इ. स. च्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकांतील आहेत. पण बाकीच्या सर्व मूर्ती त्यांच्या पादपीठांवरील अक्षरवटिकेवरून युवराज देवाच्या काळातील वाटतात. या सर्व मूर्तींत गौरीशंकरांची मूर्ती प्रमुख आहे. ती दोघेही नंदीवर स्वार झालेली आहेत. शिवाच्या हातात त्रिशूल आणि पार्वतीच्या हातात दर्पण आहे. इथे गणेशाची एक स्त्रीमूर्ती आहे. बहुधा ती गणेशानीची असावी. याशिवाय काही शृंगारप्रधान मूर्तीही इथे आहेत; पण त्यांत कामुकतेची छटा मात्र दिसत नाही.

या टेकडीजवळ एक शैव मठ आहे. या टेकडीचा आकार गोल असल्यामुळे त्या शैव मठाला गोलकी मठ असे नाव पडले आहे. (गोलकी मठ पाहा)

भेडाघाटापासून सुमारे ९ मैलांवर एका टेकडीवर गोंड राजांचा गड आहे, त्याला मदनमहाल म्हणतात. त्याचा काही भाग तिथे अजून उभा आहे. [खं. वै.; क. नृ. का.; म. प्र.]

भेदिक लावणीचा एक आध्यात्मिक प्रकार. भेद म्हणजे रहस्य. ज्या लावण्यांत आध्यात्मिक कूट प्रश्न असतात, त्यांना भेदिक असे नाव आहे. लोकनाट्याची परंपरा या ग्रंथातला भेदिक लावणीचा एक नमुना असा–

माया थोर का ब्रह्म थोर तुम्ही ऐका तयाचा सिद्धान्त ।
महान महान साधुसंत बोलले व्यासादि शुक वेदान्त ।।
'नेति नेति' बोलिल्या श्रुती त्या अनाम शाश्वत अक्षयी ।
हेंच मूळ तत्त्वाचे जन्मले शिव आणि शक्ति त्या ठायी ।।
जीव बोलतो जीव चालतो शक्तिकडून जीव काम करी ।
चलनवलन हा व्याप शक्तिचा जीव तयावरी अधिकारी ।।
होता सद्‌गुरुची कृपा पहावी आत्मतत्त्व बोधांत ।
रामचन्द्र कवि म्हणे लाभ काय शिव-शक्तिचे वादात ।।

भेदिकात भाग घेणारे लोक पुराणांतल्या रहस्यांची पदे, लावण्या, पोवाडे आणि एकनाथ, तुकाराम, रामदास, इ. संतांनी रचलेले कूटांचे व टोणप्यांचे अभंगही म्हणतात. भेदिकाची चाल ठराविक असते. गाण्यापेक्षा त्यात अर्थाकडे अधिक लक्ष असते. पाहा–कलगी–तुरा. [म. जी.; लो. ना. प.; म. लो. त.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भेरू गुरू माच या नाटयप्रकाराचा निर्माता व एका गटाचा प्रवर्तक. याने बारा माच रचले आहेत, त्यांपैकी काहींची नावे अशी–(१) गोपीचंद, (२) राजा विक्रमाजीत, (३) पूरणमल, (४) हीर-रांझा, (५) कुंवर केसरी. उज्जयिनीमध्ये याची परंपरा अद्यापि चालू आहे. प्रतिवर्षी नवापुरा या गल्लीत त्याचे पाच माच खेळले जातात. [लो. ध. ना. प.]

भेल आयुर्वेदाचा एक आचार्य. हा भेद या नावानेही प्रसिद्ध आहे. पुनर्वसू अथवा कृष्ण आत्रेय हा याचा गुरू होय. कृष्ण आत्रेयानेच प्रथम आयुर्वेद पृथ्वीवर आणला, असे महाभारतात म्हटले आहे (शांति. २१०-२१). यानेच भेलादी सहा शिष्यांना प्रथम आयुर्वेद शिकविला, असे चरकसंहितेत सांगितले आहे.

भेलाने रचलेले आयुर्वेदाचे एक तंत्र भेलतंत्र या नावाने प्रसिद्ध आहे. हे तंत्र कायाचिकित्साप्रधान आहे. याची एक हस्तलिखित प्रत तंजाऊरच्या ग्रंथालयात असून, तिची लिपी तेलुगू आहे. कलकत्ता विश्वविद्यालयाने हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. [आ. इ.]

भेलोफरी सुंदरबनात राहणाऱ्या उरांव लोकांचा एक धार्मिक उत्सव. भुताखेतांपासून संरक्षण व्हावे, म्हणून हा उत्सव करतात. गावचा पुरोहित म्हणजे ओझा हा या समारंभाचे पौरोहित्य करतो. तो अंडी, बाभळीची फांदी, सूप, तांदुळाची पिठी, बुक्का, भस्म, इ. पूजासाहित्य त्यासाठी जमा करतो. ओझा प्रथम तांदुळाच्या पिठीने देवाची आकृती काढतो. त्यावर बुक्का व भस्म यांची रांगोळी घालतो. मधोमध थोडे तांदूळ व त्यावर एक अंडे ठेवतो. मग बाभळीची फांदी तोडून तिचे सहा तुकडे करतो आणि त्या तुकड्यांचा त्रिकोण बनवून अंड्यावर ठेवतो. त्याला तांदुळाच्या दारूचा नैवेद्य दाखवितो. नैवेद्यानंतर पूजेतले अंडे फोडून त्यातला बलक तळण्यासाठी देतो, अंड्याच्या रिकाम्या कवचात पाणी भरतो आणि थोडे तांदूळ सुपावर घालून काही मंत्र म्हणतो. मंत्र झाल्यावर तो बाभळीच्या लाकडाचा एक तुकडा घराच्या वळचणीत खुपसतो आणि छपराचे थोडे गवत व लाकडाचा एक तुकडा घेऊन तिथून परत येतो. लाकडाचा हा तुकडा तो घराबाहेर फेकतो. मग ते तळलेले अंडे तो स्वतः खातो. [फो. लो., फेब्रुवारी १९६४]

भैनासुर अहीर गवळ्यांचा देव. हे लोक दिवाळीच्या सणात त्याला डुकराचा बळी देतात. बळी दिला नाही, तर भैनासुर म्हशींचे दूध उडवतो आणि रोगराई निर्माण करतो, अशी त्यांची समजूत आहे. डुकराला बळी देण्याची एक विशिष्ट पद्धत आहे, ती अशी– एक रेडा आणतात व डुकराला आकाशात फेकतात. रेडा त्याला आपल्या शिंगांवर घेऊन शिंगे त्याच्या पोटात घुसवतो. त्यामुळे डुकर लगेच मरतो. या वेळी भैनासुर रेड्याच्या अंगात संचार करतो, असे हे समजतात. [दि परधान्स ऑफ दि अपर नर्मदा व्हॅली– श्री. शामराव हिवाळे, १९४६]

भैमी एकादशी एक तिथिव्रत. माघ शुद्ध एकादशीला सामान्यपणे चंद्र मृगशीर्ष नक्षत्रात असतो. या दिवशी उपवास करायचा असतो आणि द्वादशीच्या दिवशी षट्‌तिली व्हायचे असते. षट्‌तिलाचे प्रकार असे– पाण्यात तीळ घालून स्नान करणे, तीळ वाटून अंगाला लावणे, तिळाच्या आहुती देणे, तिलमिश्र पाणी पिणे, तिलदान करणे आणि तीळ खाणे. फल– विष्णुलोकाची प्राप्ती. [हि. ध.]

भैया भगवतीदास (इ. स. चे १८ वे शतक) एक हिंदी जैन कवी. हा ओसवाल कुळात जन्मला. दशरथ हे याच्या पित्याचे नाव आणि भैया हे याचे उपनाम होय. हा आगरा येथे राहत असे. भगवतीदासाची काव्यरचना ब्रह्मविलास या नावाने प्रकाशित झाली आहे. त्यात अध्यात्म, नीती, वैराग्य, इ. विषय आहेत. या ग्रंथातील पंचेंद्रिय – संवाद, दृष्टांत–पच्चीसी, मन-बत्तीसी, बाईस परीक्षा, इ. स्फुट प्रकरणे विशेष उल्लेखनीय मानतात. [हिं. सा.; हिं. नी. वि.]

भैरव (१) शैव परिवारातील एक देव. याला कोणी शिवाचेच एक रूप मानतात. शैव आगमात भैरवांचे चौसष्ट प्रकार सांगितले आहेत. आठ भैरवांचा एक, असे त्यांचे आठ वर्ग होतात. या आठ वर्गांचे प्रमुख भैरव अष्टभैरव या नावाने प्रसिद्ध आहेत. याशिवाय कालभैरव, बटुकभैरव ही भैरवनामेही प्रसिद्ध आहेत. तंत्रग्रंथांत चौसष्ट भैरवांना चौसष्ट योगिनींचे स्वामी मानले असून, शक्तीचा व भैरवाचा निकट संबंध दाखविला आहे. भैरव हा प्रत्येक शक्तिपीठाचे संरक्षण करीत असतो, असे म्हटले आहे. शाक्तांमध्ये शक्तिश्रेष्ठता असली, तरी भैरवाला प्राधान्य आहे. कौलज्ञाननिर्णय या ग्रंथात भैरवच शाक्त उपासनेचे महत्त्व देवीला समजावून देत आहे. भैरवाला वगळून केलेली शक्तीची पूजा ही निष्फळ होते, असे महापीठनिरूपण या ग्रंथात म्हटले आहे.

पंजाबात मृत्यूला भिवविणारा देव म्हणून भैरवाची पूजा होते. महाराष्ट्रात सामान्यतः ग्रामदेवता म्हणून भैरव पूजला जातो. त्याला भैरोबा किंवा बहिरोबा म्हणतात. बहुधा प्रत्येक खेड्यात या देवाचे ठाणे असते. कधी त्याची मूर्ती असते, तर कधी तांदळा असतो. मूर्ती असली, तर ती उभी असते. तिच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उजव्या हातात डमरू आणि डाव्या हातात त्रिशूल असतो. कटीला सर्पाचे वेष्टन असते. कुत्रा हे याचे वाहन होय. कालभैरव आहे, तसाच एक बालभैरवही आहे. त्याच्या नावाने एखाद्या दगडाला शेंदूर फासलेला असतो. शेंदूर आणि तूप दिले असता बालभैरव संतुष्ट होतो, असे म्हणतात. पेरणी व कापणी करण्यापूर्वी गावकरी भैरवाची पूजा करतात. रामदासांनी तर भैरवाला क्षेत्रपाळ कल्पून त्याची आरती रचली आहे, ती अशी–

जय जय भैरवा रे । तुझे भजन लागे सदैवा रे ॥ धृ. ॥
काळभैरव बाळाभैरव । टोळाभैरव बटुभैरव ॥
नाना प्रकारींचे विरखार । तयाचा करितसे भैरी संहार ॥
काळ काळाचाही काळ । माहाकाळाचाही काळ ।
दास म्हणे तो हा क्षेत्रपाळ ॥

भूतबाधा किंवा सर्पदंश झाल्यास भैरवाची आराधना करतात. अंगीकृत कार्याचे यशापयश तो सांगतो, अशीही समजूत आहे. काहीजण याला शिवाची कृपा असलेला वेताळ मानतात. परंतु भैरवाचा दर्जा वेताळापेक्षा वरचा असतो. रात्री हा जेव्हा घोड्यावर बसून फेरी घालायला निघतो, तेव्हा त्याच्या बरोबर काळा कुत्रा असतो, असे म्हणतात.

राजस्थानात भैरवाचे विशेष महत्त्व आहे. राजस्थानातल्या प्रत्येक गावात शमीवृक्षाखाली भैरवाची मूर्ती किंवा तांदळा असतो. तिथे तो काळा भैरव व गोरा भैरव अशा दोन नावांनी आढळतो. दुर्गापूजेच्या वेळी प्रथम कुत्र्यासहित भैरवाची पूजा होते. याच्या कृपेने पुत्रप्राप्ती झाल्यास राजस्थानी लोक मुलांची नावे भैरूदान, भैरूबक्श, इ. ठेवतात. राजस्थानात मालसीच्या भैरवाचे स्थान सर्वांत मोठे आहे. याचा नवजात बालकांवर प्रभाव असतो, अशी समजूत आहे. जे लोक या भैरवाचा अनादर करतात त्यांच्या मुलांच्या माना हा मुरगाळतो, असे म्हणतात. कुमारिकांना त्याच्या मंदिरात जाऊ देत नाहीत. भैरव ही स्मशानदेवता आहे, अशी राजस्थानी लोकांची धारणा आहे. इथले भोपे भिक्षेला निघण्यापूर्वी स्मशानात जाऊन भैरवाची प्रार्थना करतात व तिथले भस्म अंगाला लावतात.

जैन आणि मुसलमान लोकही भैरवाला भजतात. जैन लोक भैरवाला मांसाचा नैवेद्य न दाखविता फळांचा व मिठाईचा दाखवितात. मुसलमान लोक यतीभैरव म्हणून याची उपासना करतात.

भैरवमूर्ती– महाराष्ट्रातल्या भैरवमूर्ती सामान्यतः नग्न असतात. त्यांच्या कंबरेला सर्पाचा कडदोरा असून, गळ्यात नरमुंडमाला असते. चेहरा भयानक, नाकपुड्या रुंद आणि तोंडाच्या दोन्ही बाजूंना सोंडेसारखा पुढे आलेला भाग असतो. भैरवांना चार, आठ, बारा किंवा त्याहून अधिकही हात असतात. या हातांतून विविध शस्त्रे असतात. डाव्या बाजूच्या खालच्या हातात नरमुंड असते व त्यातून रक्त ठिबकत असते. हे ठिबकणारे रक्त



भैरवमूर्ती – ओडिसा

कुत्री चाटीत असतात. हे तुटलेले मस्तक ब्रह्मदेवाचे असावे. ओडिसामध्ये दोन प्रकारच्या मूर्ती आढळतात. त्यांपैकी एक विश्वपद्मावर उभा असतो व त्यात त्याला तीन नेत्र व ओठावर मिशा असतात. दुसऱ्या मूर्तीला तिसरा डोळा व मिशा नसतात. पण तिच्याभोवती उपायन घेतलेल्या स्त्रिया असतात.

पाहा– अष्टभैरव, कालभैरव, कालभैरवाष्टमी, पाचलीभैरव, बटुकभैरव, मार्तंडभैरव. [मू. वि.; फो. लो. नों. इं.; सह्याद्रि; प्रा. च. को.; एन्सा. रि. ए.; डे. हिं. ए.; पॉ. रि. फो. नॉ. इं.; समर्थांचा गाथा; गा. दै.; श्री. पां. देसाई–नवभारत, नोव्हें. १९५७; मरु–भारती, ऑक्टो. १९६४]

(२) (१४१०–१४६० इ. स.) तेलुगू भाषेचा एक कवी व वैय्याकरण. श्रीरंगमहात्म्यमु, रत्नशास्त्रमु व कविराज गजां-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुशमु हे तीन ग्रंथ याने रचले आहेत. या ग्रंथांमुळे त्याला बरीच प्रसिद्धी मिळाली. श्रीरंगमहात्म्यमु हे काव्य पाच आश्वासांमध्ये विभागले असून, त्यात अनेक तीर्थांची माहात्म्ये वर्णिली आहेत. हे काव्य त्याने राघवामात्य याच्या प्रेरणेने रचले, असे म्हणतात. रत्नशास्त्रमु या ग्रंथात नवरत्नांची लक्षणे सांगितली असून, तिसरा ग्रंथ पिंगलशास्त्रासंबंधी आहे. [ते. सा. इ.; ते. वा.]

(३) हिंदुस्थानी संगीतातील एक राग. याचे आरोहावरोह सातही स्वरांनी होत असल्यामुळे याची जाती संपूर्ण-संपूर्ण आहे. वादी स्वर धैवत असून, संवादी स्वर ऋषभ आहे. गानसमय— प्रातःकाळ. [सु. वि. को.]

भैरवजयंतीव्रत एक काम्य व्रत. कार्तिक वद्य अष्टमीला या व्रताचा प्रारंभ करतात. ही तिथी कालाष्टमी म्हणूनही प्रसिद्ध आहे. भैरव ही या व्रताची देवता होय. या तिथीला उपवास व जागर करावा, सायंकाळी किंवा रात्रीच्या चौथ्या प्रहरी भैरवाची पूजा करावी आणि जागराच्या वेळी शिवकथा श्रवण किंवा कथन करावी, असे सांगितले आहे. भैरवाचा जन्म रात्रीच्या चौथ्या प्रहरी झाला म्हणून या व्रतात त्याची त्या वेळी पूजा करतात. काशीमध्ये राहणाऱ्या लोकांनी हे व्रत अवश्य करावे, असे सांगितले आहे. फल—पापनाश आणि शिवकृपेची प्राप्ती [हि. ध.; व्रतराज]

भैरवी (१) पार्वतीचे एक रूप. जेव्हा शिव भैरव होतो, तेव्हा पार्वती भैरवी होते, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे. तंत्रशास्त्रात भैरवीला खूप महत्त्व असून, दश महाविद्यांमध्ये तिला स्थान आहे. धन्वंतरितंत्रशिक्षा या ग्रंथात भैरवीचे जे ध्यान दिले आहे, ते असे—

उद्यद्भानुसहस्रकान्तिमरुणक्षौमां शिरोमालिकां
रक्तालिप्तपयोधरां जपवटीं विद्यामभीतिं वरम् ।
हस्ताब्जैर्दधतीं त्रिनेत्रविलसद्वक्त्रारविन्दश्रियं
देवीं बद्धहिमांशुरत्नमुकुटां वन्दे समन्दस्मिताम् ।।

अर्थ — सहस्र बालसूर्यांप्रमाणे तांबूस कांतीची, रक्तवस्त्र परिधान करणारी, गळ्यात मुंडमाला धारण करणारी, जिचे स्तन रक्ताने माखले आहेत, जिच्या दोन हातांत जपमाळ व पुस्तक आहे, आणि इतर हात अभयवर मुद्रेत आहेत, त्रिनेत्रामुळे जिचे मुखकमल रक्तकमलाप्रमाणे सुशोभित झाले आहे, जिच्या मुकुटात रत्नाप्रमाणे शोभणारा चंद्र आहे आणि जिच्या मुखावर मंद स्मित आहे, अशा भैरवी देवीला मी हात जोडून नमस्कार करतो.

भैरवीचे एक पूजायंत्रही आहे. त्याचे वर्णन धन्वंतरितंत्रशिक्षा या ग्रंथात केलेले आहे. तिथे तिचे कवचही दिले आहे. भैरवीची पूजा, जप, इ. गोष्टी पुढील मंत्राने करतात—

हसरैं हसकलरीं हसरौं ।

भैरवीतंत्र हा भैरवीसंबंधीचा एक प्राचीन ग्रंथ आहे. याशिवाय भैरवीरहस्य, भैरवीसपर्याविधी, भैरवीयामल, इ. ग्रंथही मिळतात.

भैरवीचे अनेक भेद आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे—सिद्ध, त्रिपुरा, चैतन्य, भुवनेश्वरी, कामेश्वरी, षट्कुटा, नित्या, नवकूटा, अन्नपूर्णा, रुद्र, भद्र, इत्यादी. सिद्धभैरवी ही उत्तरान्वय पीठाची, त्रिपुरा भैरवी ही ऊर्ध्वान्वियाची व नित्या ही पश्चिमान्वयाची देवता होय. भद्रभैरवी ही विष्णूची उपासिका असून, सिंहासनारूढ असते. त्रिपुरा भैरवी चतुर्भुज आहे. [तं. फि. ऑ. सी.; भा. प्र. वि.; श. क.; ध. तं. शि.]

(२) हिंदुस्थानी संगीतातील एक रागिणी. हिचे आरोहावरोह सातही स्वरांनी होत असल्यामुळे जाती संपूर्ण-संपूर्ण आहे. वादी स्वर धैवत असून, संवादी स्वर गंधार आहे. गानसमय—



भैरवी रागिणीचे एक सांकेतिक चित्र

दिवसाचा दुसरा प्रहर. भैरवीपुढे कोणत्याही अन्य रागाची रंगत जमत नसल्यामुळे गायनाची मैफल भैरवी गाऊन समाप्त करण्याची प्रथा आहे. [सु. वि. को.; क. सं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भोंडवे हरिबुवा (१७०८–१७७७ इ. स.) एक मराठी संत-कवी. याचा जन्म नगर जिल्ह्यातील पारनेर या गावी, नामदेव शिंपी जातीत झाला. याच्या वडिलांचे नाव केरेश्वर आणि आईचे नाव बचाई असे होते.

हरिबुवाचे घराणे मूळचे बिदरचे. नंतर गुलबर्गा, कल्याणी असे स्थानांतर करीत हे घराणे पारनेरला स्थायिक झाले. या घराण्यात पंढरीच्या विठ्ठलाची उपासना होती. आणि घरचा शिवण्या-टिपण्याचा व कापड-विक्रीचा व्यवसाय होता. हा व्यवसाय सांभाळून हे लोक निष्ठेने पंढरीची वारी करीत.

बालपणी हरिबुवाच्या मनावर शाहिरी वाङ्मयाचा प्रभाव होता. थोड्याच कालात या प्रभावातून हरिबुवा मुक्त झाला आणि तोही पंढरीची वारी करू लागला. बुवाचे वडील बालपणीच वारल्याने संसाराचा भार बुवावर पडला. परंतु बुवाने नेटकेपणाने संसार सांभाळला.

या संसाराच्या सफलतेत याच्या पत्नीचा, गौडाईचा, वाटा मोठा आहे. हरिबुवाने मोठ्या मनाने वारंवार ही कृतज्ञता व्यक्त केली आहे. चिंतनासाठी हरिबुवा पारनेरजवळच्या पारशर नामक डोंगरावर जाऊन वसत असे. तीन तीन दिवस बुवा तिथेच मुक्काम करी. अशा वेळी हरिबुवाच्या खाण्यापिण्याची काळजी घेण्यापासून तो त्याच्या अनुभवाशी संवाद साधण्यापर्यंत ती समरस होत असे. पतीच्या परमार्थात सर्वार्थाने सहयोग देणाऱ्या या स्त्रीने पतीबरोबरच सहगमन केले.

हरिबुवा विठ्ठलाचा उपासक असला तरी, त्याला गुरुबोधाचा लाभ झाला तो समर्थसंप्रदायातील शिवरामस्वामीकडून. गुरुबोधानंतर पंढरीची वारी, सत्संग, सद्ग्रंथवाचन, नामस्मरण आणि हरिकीर्तन हा बुवाचा नित्यक्रम बनला. बुवाच्या कीर्तनाचा प्रभाव जनमानसावर खूप पडत असे. इतकेच नव्हे; तर एका महाभुजंगाची वृत्ती त्यामुळे पालटली अशी आख्यायिका आहे. हा भुजंग ज्ञानसागर या ग्रंथाच्या लेखन–वाचनाच्या वेळी बुवासमोर वेटोळे घालून शांतपणे बसत असे. पारनेरहून हरिबुवा नारायणगावी राहायला आला, तेव्हा हा भुजंगही त्याच्या बरोबर तिथे आला व तिथेच मरण पावला.

हरिबुवाचा नारायणगावचा निवास अल्प काल होता. तिथेच त्याने समाधी घेतली. मीना नदीच्या तीरावर याचे समाधिमंदिर आहे. या मंदिरात आजही बुवाच्या बंधूचे वंशज राहतात व ते समाधीची नित्यनैमित्तिक सेवा करतात.

हरिबुवाची ग्रंथसंपदा प्रचंड आहे. सुमारे दोन हजार ओव्यांचा हरिबोध, अठरा हजार ओव्यांचा ज्ञानसागर, हजारो अभंग आणि पंचीकरण, संसारतोडा, स्वरोदय ही प्रकरणे एवढी ग्रंथरचना याने केली. मानवी जीवनाचा मोठेपणा बाह्य अवडंवरात नसून आत्मसाक्षात्कारात आहे, हा सिद्धान्त हरिबुवाने वारंवार प्रतिपादला आहे. निरुपचारी प्रेम हाच संतपणाचा निकष होय, असे त्याचे मत होते. त्यामुळे ढोंगी साधूंच्या बाबतीत याने तुकारामाप्रमाणेच फटकळपणा दाखवला आहे.

हरिबुवाची भाषा बहुजन समाजाला समजणारी आहे. याच्या अभंगाचा एक नमुना असा –

काय तें करावे। राज्य आणि संपत्ती।
माझ्या पंढरीनाथा। वांचूनियां ॥
काय तें करावे। सोवळें वोवळें।
अंतरीचा मळ। गेला नाही ॥
काय तें करावे। उत्तम कुळ जाति।
जोंवरी भगवंती। न लागतां ॥
पठोनिया गेला वेद। न तुटेचि भेद।
नाहीं झाले शुद्ध। अंतर ते ॥
काय तें करावे। जपतप साधन।
नाहीं झालें मन। निश्चळ ते ॥
जोंवरी आपणां। नाहीं ओळखिले।
केले तितुके गेले। व्यर्थ वायां ॥
हरि म्हणे एके। गुरुकृपेवांचून।
नव्हे समाधान। कदा काळीं ॥

हरिबुवाच्या वाणीवर तुकाराम, व रामदास यांची स्पष्ट छाप आहे. याशिवाय शेखमहंमदासारख्या संतांचे संस्कारही तिथे पाहायला मिळतात. [मीनांजली, जुलै १९६३; प्रसाद, मे १९६५; महाराष्ट्रकविचरित्र, भाग २– श्री. ज. र. आजगांवकर]

भोंडारी एक जात. हे लोक ओडिसातील गंजाम जिल्ह्यात राहतात. हे लोक व्यवसायाने न्हावी आहेत. भोंडारी हा शब्द भांडार या शब्दावरून निघाला आहे. पूर्वी जमीनदार लोकांनी आपल्या संपत्तीचे रक्षण करण्याचे काम यांच्याकडे सोपविले होते आणि त्यांचे हेच काम न्हाव्याच्या व्यवसायापेक्षा महत्त्वाचे मानले जात असे.

गंजाम जिल्ह्यात हे घरगडी, हमाल व गाडीवान म्हणून काम करतात. काहीजण ठाकुराणीच्या मंदिरात पुजारी म्हणूनही राहतात. लग्नसमारंभाच्या वेळी वधूवरांचे दागिने व कपडे सांभाळणे हे काम त्यांच्याकडे असते.

यांच्या गोडोमलिया, ओडिसी आणि बेज्जो अशा तीन शाखा असून, त्यांच्यांत परस्पर विवाहसंबंध होत नाहीत. भोंडारी लोकांत मोहिरो (मयूर), दीप्पो (दीप), ओप्पोमार्गो (अपामार्ग = आघाडा), नागशिर, इ. देवके असून, त्यांच्यांतही परस्पर विवाह होत नाहीत. ओप्पोमार्गो देवकाचे लोक आषा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ड्याच्या मुळीने दात घाशीत नाहीत. दीप्पो गोत्राचे लोक फुंकर घालून दिवा विझवीत नाहीत व सोवळे नेसल्याशिवाय दिवा पेटवीत नाहीत.

हे जातीच्या प्रमुखाला बेहर म्हणतात. त्याची नेमणूक वंशपरंपरेने असते. त्याच्या मदतीला भोलोभाय नामक एक अधिकारी असतो.

हे चैतन्यमतानुयायी असून, त्यांना परमार्थी असे नाव आहे. ते गळ्यात तुळशीची माळ घातल्याशिवाय पूजा करीत नाहीत व जेवतही नाहीत. ते जगन्नाथ व ठाकुराणी यांना भजतात.

विवाहप्रथा – या लोकांत आते किंवा मामेबहिणीशी लग्न होत नाही. मुलींची लग्ने त्या वयात येण्यापूर्वी झाली पाहिजेत, असा नियम आहे. जर एखाद्या मुलीचे तसे लग्न झाले नाही, तर तिचा एका विशिष्ट वृक्षाशी धर्मविवाह लावतात. पुढे जन्मभर तिने त्या वृक्षाला स्पर्श करायचा नसतो. काही वेळेला मुलीचे तिच्या आजोबाशी किंवा मोठ्या बहिणीच्या नवऱ्याशी लग्न लावतात व लगेच विवाहविच्छेदही करून टाकतात. काही वेळा धनुष्यबाणाशीही तिचे लग्न करतात.

त्यांचा विवाहसमारंभ सात दिवस चालतो. लग्नाच्या आदल्या दिवशी मातीची काही मडकी एका स्वच्छ जागी ठेवतात व सुवासिनी त्यांच्यावर एका विशिष्ट झाडाची पाने व अक्षता टाकतात. तसे करताना तोंडाने उलू, उलू असा आवाज करतात. नंतर कुंभाराच्या चाकाची पूजा करतात. नवरा मुलगा रात्रीपर्यंत उपास करतो. रात्री त्याची हजामत केल्यावर तो पाटावर उभा राहून स्नान करतो. त्या वेळी काही स्त्रिया जात्यावर विशिष्ट धान्य दळतात व तोंडाने उलू उलू असा आवाज करतात. नवरा मुलगा मग बोहल्यावर बसतो. त्याच्या मस्तकावर एक सुपारी ठेवतात व अनेक सुवासिनी वरवंट्याने तिला स्पर्श करतात. संध्याकाळी नवरा मुलगा मिरवणुकीने देवळात जातो. त्या वेळी दुसऱ्या दिवशी लागणाऱ्या जानवे, कपडे, दागिने, मुकूट वगैरे वस्तू बरोबर नेतात. पूजा करून परत येताना सात घरांतून पाणी मागतात व ते एका भांड्यात गोळा करतात. दुसऱ्या दिवशी त्या पाण्याने नवरा मुलगा स्नान करतो. वधूच्या घरीही असाच विधी त्या दिवशी करतात. लग्नाच्या दिवशी नवरा मुलगा पालखीतून वधूगृही जायला निघतो, तेव्हा त्याची भावजय त्याला अडवते. त्या वेळी तिला तो कापड देतो. वाटेत वधूपिता त्याला सामोरा येतो व वधूचा भाऊ त्याचे पाय धुतो. घरी पोचल्यावर वधूमाता त्याला हात धरून घरात नेते. तो मग बोहल्यावर बसतो. वधू अंतरपाटाच्या आडून त्याच्या मस्तकावर मीठ टाकते व नंतर त्याच्या शेजारी बसते. होमहवन झाल्यावर ब्राह्मण पुरोहित त्या दोघांचे हात दर्भाने बांधतो. लग्नातील हा आवश्यक विधी असतो. त्यानंतर त्या दोघांच्या अंगावर दोन नवी वस्त्रे टाकतात व त्यांच्या पदरात एकवीस कवड्या, एक नाणे व काही पाने ठेवून त्यांची गाठ मारतात. वधूचा भाऊ मग वराला एक ठोसा लगावतो व त्याबद्दल त्याला कापड मिळते. नंतर लोक वधू-वरांना आहेर करतात. मग ती दोघे कवड्या खेळतात. गूळ व दही मिसळलेला भात खातात. एवढ्याने लग्नाच्या दिवशीचा विधी समाप्त होतो. पुढचे दोन दिवस लग्नात मिळालेली नवी वस्त्रे नेसून ती दोघे कवड्या खेळतात. चौथ्या दिवशी वधू थोडेसे अन्न शिजवते व ती दोघे मिळून जेवतात. या विधीने ती वराच्या गोत्रात येते. संध्याकाळी बोहल्याच्या खांबाभोवती हळदीने रंगविलेला दोरा सात वेळा गुंडाळतात. वर तो दोरा तोडतो व वधूसह बोहल्यावर उभा राहतो. त्यांच्या मस्तकावर चार माणसे कापडाचे छत धरतात आणि लोक त्यांच्यावर अक्षता टाकतात. पाचव्या दिवशी वधू-वर आणि त्यांचे नातेवाईक एकमेकांच्या अंगावर हळदीचे पाणी टाकतात. सहाव्या दिवशी सकाळी बोहल्यावर ठेवलेले एक मडके नवरा मुलगा फोडतो आणि रागावल्याचा बहाणा करून एका नातेवाइकाच्या घरी निघून जातो. संध्याकाळी त्याचा मेहुणा त्याला समजावून परत घेऊन येतो. मग तो वधूबरोबर कवड्या खेळतो. सातव्या दिवशी वर जानवे, कंकण व मुकूट काढून टाकतो. एवढे झाल्यावर लग्नसमारंभ संपतो.

विधवेने धाकट्या दिराशी लग्न करावे, असा संकेत आहे.

मर्तिकप्रथा – हे मृतांना जाळतात. माणूस आसन्नमरण झाला असता, त्याच्या मुखात पुरीच्या जगन्नाथाचा थोडा प्रसाद घालतात. प्रेताला स्नान घालून, नव्या वस्त्रात गुंडाळून ते तिरडीवर ठेवतात. मग त्याच्यावर नवे लाल कापड घालतात. मृताच्या घराचे छप्पर गवती असेल, तर त्याचे थोडे गवत काढून मृताच्या डोक्याशी ठेवतात. स्मशानात प्रेत चितेजवळ ठेवतात. मृताचा मुलगा त्याच्या मुखात लाह्या घालतो व डोळ्यांवर अक्षता टाकतो. मग गवत पेटवून ते तीनदा त्याच्या भोवती ओवाळतो व त्याच्या तोंडावर टाकतो. मग प्रेताला चितेभोवती तीनदा फिरवतात व चितेवर ठेवतात. प्रेतदहन झाल्यावर पुत्र स्नान करून ओल्या अंगाने घरी जातो. दुसऱ्या दिवशी मृताच्या दोन अस्थी मडक्यात घालून ठेवतात व रक्षेच्या ढिगासमोर काठीने एक आकृती काढून तिला अन्न अर्पण करतात. दहाव्या दिवशी मृताचे नातेवाईक क्षौर करतात व एका तळ्याकाठी उभारलेल्या आडोशाखाली मातीच्या नव्या मडक्यात भात शिजवतात. मग मडक्याचे दहा तुकडे करून त्यांवर तो भात मृतासाठी ठेवतात. मृताचा पुत्र एकेक तुकडा तळ्यात नेतो व प्रत्येक वेळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Y73(P15):1k
155M2J.6

स्नान करतो. अस्थींचे मडके प्रथम जवळच्या एखाद्या पिंपळाखाली पुरतात. मग तिथून ते काढून नेऊन घराजवळ पुरतात. अकराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात.

एखादी प्रतिष्ठित वृद्ध व्यक्ती मृत झाली असता, दहाव्या दिवशी रात्री जोला जोला हंडी नामक एक विधी करतात. त्यासाठी दोन दारे असलेल्या एका खोलीत रेती पसरतात व तिचा पृष्ठभाग फळीने एकसारखा करतात. तिच्यावर एक दिवा लावून ठेवतात व शेजारी एक सुपारी ठेवतात. मग दिव्यावर एक मडके पालथे घालतात व दोघेजण एक सच्छिद्र मडके काठीला टांगून खोलीच्या बाहेर जातात. लगेच खोलीची दारे बंद करतात. दोघेजण ते मडके तळ्यात नेऊन टाकतात. त्या वेळी मडक्याचे वजन वाढले आहे, असे त्यांना वाटते. परत आल्यावर सर्वजण मृताच्या काही पाऊलखुणा रेतीवर उमटल्या आहेत का, ते पाहतात. त्या मांजराच्या, कुत्र्याच्या पावलांसारख्या दिसल्या, तर मृतात्मा त्या रूपाने बाहेर गेला, असे समजतात. [का. ट्रा. स. इं.]

भोई (१) एक जात. या लोकांची वस्ती महाराष्ट्र, गुजरात, कारवार, आंध्र, इ. प्रदेशांत आहे. मेणे व पालख्या वाहणे, हा पूर्वी यांचा धंदा होता. त्यामुळे हा व्यवसाय करणाऱ्या इतरही अनेक जातीच्या लोकांना हे नाव मिळाले आहे. उदा० काही महार व कहार लोक आपल्याला भोई म्हणवून घेतात. भोई लोक मासेमारी करीत असल्यामुळे त्यांना काही वेळा कोळी असेही म्हणतात. मुळात, कोळी व तत्सम लोकांपैकी काहींना मेणे व पालख्या वाहून नेण्यासाठी निवडण्यात आले होते, असे यावरून दिसते.

जातिविवेक या ग्रंथात भोयांना पौष्टिक असे नाव दिले असून, ब्राह्मण पिता व पराशर माता यांची ही संतती असल्याचे सांगितले आहे.

महाराष्ट्रातील भोयांची राहणी मराठा कुणब्यांसारखी आहे. खानदेशातील भोयांत आंबा, उंबर, आपटा, शमी, जांभूळ, इ. देवके आहेत. रत्नागिरी येथील भोयांना राजभोई असे म्हणतात. त्यांच्यांत आंबा, कळंब, मोरपीस, कुऱ्हाड, इ. देवके आहेत; तर मराठा भोयांत पंच पालवी ही देवके आहेत. समान देवकांत लग्नसंबंध होत नाहीत.

प्रदेशपरत्वे भोयांचे पुढील भेद आहेत—(१) मराठा, (२) खानदेशी, (३) कर्नाटकातले, (४) कानडातले व (५) गुजराती. या सर्वांच्या चालीरीतींत पुष्कळच फरक आहे. मुसलमान भोयांना झिंगा भोई असे म्हणतात.

मराठा भोई — हे महाराष्ट्रात राहतात. पुणे जिल्ह्यातील भोयांत शुद्ध, वराधी आणि कडू असे तीन भेद आहेत. त्यांच्यांत रोटीव्यवहार होतो; पण बेटी व्यवहार होत नाही. वराधी लाह्या भाजतात. ठाणे जिल्ह्यातील भोयांचे खारे आणि गोडे असे भेद आहेत. त्यांच्यांतही रोटीबेटीव्यवहार होत नाही.

पूर्वी हे लोक मेणे व पालख्या वाहण्याचे काम करीत. सांप्रत ते मासेमारी, दुकानदारी, निरोप पोचवणे, इ. कामे करतात. यांच्यापैकी काहींना कोल्हापूर व सांगलीच्या राजांकडून इनामे मिळाली आहेत.

मराठा भोई मराठी भाषा बोलतात. त्यांची जातपंचायत आहे. भोकरे, चव्हाण, घोलप, घुमे, कांबळे, जाधव, मुसळे, शिंदे, इ. आडनावे यांच्यांत असून, एकाच आडनावात लग्ने होत नाहीत.

विवाहप्रथा — मुलांची लग्ने सोळा ते पंचवीस व मुलींची दहा ते चौदा या वयात करतात. पण काही वेळा स्थळ चांगले असल्यास मुलीचे लग्न पाळण्यातही लावतात. मुलीला कोणी पालक नसेल किंवा तिचा बाप गरीब असेल, तर सोळाव्या वर्षी, जातपंचायत वर्गणी जमवून तिचे योग्य मुलाशी लग्न लावून देते.

मुलाचे वडील मुलीला मागणी घालतात. साखरपुड्याची पद्धत आहे. त्या वेळी वधू गणपती व वरुण यांची पूजा करते. वरपिता त्या वेळी वधूला हिरवी साडीचोळी देतो. नंतर ब्राह्मण पुरोहित मुहूर्त काढून निमंत्रणपत्रिका लिहितो.

लग्नाच्या आधी चार-पाच दिवस वधू-वरांना आपापल्या घरी हळद लावतात. वधूपक्षाकडील व वरपक्षाकडील एकेक दांपत्य, वेगवेगळ्या वेळी आपापले देवक घेऊन मारुतीच्या मंदिरात जाते व त्याच्यापुढे पानसुपारी ठेवते आणि देवक पांढऱ्या वस्त्राने झाकून डोक्यावरून घरी आणते. मग ते देवक लग्नमंडपाच्या पहिल्या खांबाला बांधतात. संध्याकाळी नवरा मुलगा वाजत-गाजत घोड्यावर बसून आप्तेष्टांसह वधूच्या गावी जातो व तिथल्या मारुतीच्या मंदिरात थांबतो. नंतर वधूचा एक अविवाहित भाऊ घोड्यावर बसून मिरवीत त्या देवळात येतो. त्या वेळी लोक त्याच्यावर कांदे फेकतात. तो नवऱ्या मुलाला नवी वस्त्रे देऊन बाशिंग बांधतो. मग नवरा मुलगा घोड्यावर बसून मिरवणुकीने वधूगृही जातो. मंगलाष्टके, कन्यादान, इ. विधी होतात. दुसऱ्या दिवशी वरपक्षाकडील मंडळी शिधा घेऊन वधूगृही जातात व वरपिता वधूला नवी वस्त्रे व दागिने देतो. नंतर झालीचा विधी होतो.

प्रसूतिप्रथा — मूल जन्मल्यावर पाचव्या दिवशी दाराशी कोळशाच्या सात रेघा काढतात. संध्याकाळी पाच विवाहित पुरुषांना जेवायला बोलावतात आणि मासेमारीचे जाळे बाळंतिणीच्या बाजेभोवती पसरतात. त्यामुळे भुताखेतांपासून रक्षण होते, अशी या लोकांची समजूत आहे. जननाशौच दहा दिवस असते. मुलाचे नाव बाराव्या दिवशी ठेवतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे लोक महादेव, मारुती आणि विठोबा यांना भजतात. जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी, बहिरोबा आणि म्हसोबा या त्यांच्या कुलदेवता आहेत.

कानफाटे गोसावी हे त्यांचे धार्मिक गुरू असतात. मंत्रतंत्र, जादूटोणा व भुतेखेते यांवर त्यांचा विश्वास असून, भुताखेतांची पीडा घालविण्यासाठी ते देवऋषीला बोलावतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात. पण ज्यांना हा खर्च परवडत नाही, ते मृताला बसलेल्या स्थितीत पुरतात. लहान मुलांनाही पुरतात. अश्मा दहा दिवस घरात ठेवतात. तिसऱ्या दिवशी अस्थींचे जलाशयात विसर्जन करतात. दहाव्या दिवशी अश्मा पाण्यात बुडवतात व मृताला पिंड देतात. तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. महालय करतात.

खानदेशी भोई – हे लोक अहिराणी भाषा बोलतात. त्यांच्यांत महर्यलं व तरक्षी असे दोन भेद आहेत.

विवाहप्रथा – एकाच कुलात व आडनावात विवाह होत नाही. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. देज पाच ते पन्नास रुपये द्यावे लागते. साखरपुड्याच्या वेळी ब्राह्मण पुरोहित वधूच्या कपाळी कुंकू लावतो. आंबा, जांभूळ, इ. वृक्षांच्या फांद्यांनी लग्नाचा मांडव घालतात. ब्राह्मणाने निवडलेले एक दांपत्य वधू-वरांना हळद लावते. लग्नाच्या दिवशी संध्याकाळी पाच सुवासिनी घरातील देवांवर बांबूचे शिप्तर धरतात व गीते गातात. एक सवाष्ण वराच्या हातात कंकण बांधते. वधूच्या घरीही तिला कंकण बांधण्याचा कार्यक्रम होतो. लग्नाच्या आदल्या दिवशी दुपारी वरगृही व वधूगृही आपापल्या देवक वृक्षाच्या फांद्या आणून मांडवाला बांधतात. वर घोड्यावरून आप्तेष्टांसह वधूच्या गावी जायला निघतो. वाटेत तो तिच्या गावातील मारुतीच्या मंदिरात थांबतो. तिथे सीमांतपूजन होते. मग मंगलाष्टकांपासून विवाहहोमापर्यंत सर्व विधी होतात. दुसऱ्या दिवशी झाल, झेंडा, इ. सोपस्कार करतात.

विधवाविवाह पौष आणि भाद्रपद हे महिने वगळून कोणत्याही महिन्यांच्या वद्य पक्षात रात्री होतो. घटस्फोटही प्रचलित आहे.

खानदेशी भोयांचा परंपरागत व्यवसाय मासे मारणे आणि मेणे व पालख्या वाहणे, हा आहे. याशिवाय, ते लाह्या भाजतात, नदीकिनारी कलिंगडे, खरबुजे, टरबुजे लावतात आणि काहीजण गाढवे पाळून त्यांच्या पाठीवरून धान्याची ने-आण करतात. काही भोयांकडे थोडी जमीन आहे, तर काही शेतमजुरी करतात.

मोरसाई, चावडमाता, मनसाई, रेणुका, एकवीरा, इ. त्यांच्या कुलदेवता असून, श्रावणी व चैत्री पौर्णिमा, दसरा, मंगलकार्य या वेळी त्यांची पूजा करतात. गोसावी हे त्यांचे धर्मगुरू होत.

मर्तिकप्रथा – हे मृतांना जाळतात किंवा पुरतात. अविवाहित मृतांना पुरतात. श्राद्ध व महालय करतात.

कर्नाटकातले भोई – बेळगावात यांचे कोळी, कार, मसंदे व परतगी असे चार भेद असून, त्यांच्यांत फक्त रोटीव्यवहार होतो. कार हे कहार असावे. मसंदे मासे पकडतात; पण पालख्या वाहत नाहीत. परतगी सिमेंट तयार करतात. धारवाडातल्या भोयांचे बेस्त, गंगी, सदर आणि कर्व असे भेद आहेत. बेस्त हे म्हैसूरमधून आलेले असून, ते लिंग धारण करतात. कर्नाटक भोई मुलींची लग्ने लहान वयात करतात. देज देण्याची पद्धत आहे. लग्नात ब्राह्मण पौरोहित्य करतो. मृतांना पुरतात व दहा दिवस आशौच पाळतात. अंत्यक्रिया गोसावी करतो.

कानडातले भोई – हे लोक घरात कानडी बोलतात. पण त्यांना कोकणीही बोलता येते. या लोकांत आडनावे व कुलदेवता नाहीत. ते ग्रामदेवतांना भजतात मंत्रतंत्र व जादूटोणा यांवर त्यांचा फार विश्वास आहे. कर्नाटक, कऱ्हाडे व हविक ब्राह्मण त्यांचे अनुक्रमे जन्म, विवाह व मृत्यू या वेळचे पौरोहित्य करतात. उत्तर अर्काट जिल्ह्यातील गोविंदराजपट्टण येथील मठातील तात्तिआचारी हा रामानुज ब्राह्मण त्यांचा धर्मगुरू आहे. मासेमारी व पालखी वाहणे, याशिवाय काही लोक देवळात मशालजी म्हणून व काही लग्नप्रसंगी छत्रधारी म्हणून काम करतात.

गुजराती भोई – हे लोक आपण लखनौ येथील राजपूत असल्याचे सांगतात. यांच्यांत बकोरिया, भडवा, गधेडिया, गुडिया, कार, धीमर किंवा मच्छी, माळी, इ. नऊ भेद आहेत.

बहुतेक सर्वजण गुजराती भाषा बोलतात. मच्छीमारी, शेती, शेतमजुरी, शिंगाडे लावणे, शेळ्या-मेंढ्या पाळणे, गवत विकणे, इ. व्यवसाय ते करतात.

मातेला जननाशौच पंधरा ते वीस दिवस असते. फक्त थोडेच लोक नाव ठेवण्याचा समारंभ करतात. गुजराती भोयांचे विवाह, मृत्यू, इ. प्रसंगांचे विधी कणब्यांप्रमाणे असतात. बरेचसे लोक मातृदेवतांना भजतात. यांच्यापैकी काही बीजमार्गी, रामानंदी, वल्लभाचारी व शैव आहेत. दिवसो, गोकुळाष्टामी व नवरात्र हे त्यांचे प्रमुख सण आहेत. मोढ आणि औदीच्य ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात.

गुजरातमधील काही भोई मुसलमान आहेत, त्यांना झिंगा भोई म्हणतात. [ट्रा. का. बाँ.; पूना गॅझे.]

(२) आसाममधील एक जमात. खासी व जैंतिया डोंगरांच्या उत्तरेला व ईशान्येला असणाऱ्या टेकड्यांत या लोकांची वस्ती आहे. हे लोक पीतवर्णी आहेत. टेकड्यांच्या उतारावर बांबू उभारून त्यांवर ते आपली घरे बांधतात. घरे बांबूचीच असतात. घरात चढण्यासाठी खाचा पाडलेला एक खांब रोवलेला असतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांचे गाव जंगलाजवळ वसलेले असते. ते झूम पद्धतीने शेती करतात. भात हे त्यांचे मुख्य पीक असते. तांदुळाची दारू पिण्याची यांना सवय आहे. हे मोठ्या प्रमाणावर लाख तयार करतात. कापड विणण्याची व रंगवण्याची कला त्यांना अवगत आहे. यांच्यांत पितृसत्ताक पद्धती आहे. वारसाहक्क फक्त पुरुषांना असतो. [दि खासीज्– मे. गुर्डोन, १९०७]

भोक्तामेळा आदिवासी व मागसलेल्या लोकांचा एक उत्सव. बिहार प्रदेशाच्या हजारीबाग, रांची व सिंगभूम या जिल्ह्यांत हा उत्सव साजरा करतात. हा शिव-भक्तांचा उत्सव आहे. सामान्यत: ज्येष्ठ व आषाढ महिन्यांत कोणत्याही तिथीला हा उत्सव होतो. दर पाच-दहा मैलांच्या परिसरातील लोक ठिकठिकाणी याची योजना करतात. उत्सवाची तिथी पंधरा-वीस दिवस आधी घोषित करतात.

या उत्सवाच्या पुरोहिताला गोसावी असे म्हणतात. त्याच्या जोडीला गावातील एक प्रतिष्ठित नागरिक असतो. त्याला कठभोक्ता असे नाव आहे. उत्सवाची तिथी व इतर कार्यक्रम हाच ठरवितो.

यात भाग घेणारे लोक आपल्या शारीरिक व मानसिक कुवतीनुसार उपवास करतात. एक दिवसापासून एक महिन्यापर्यंत उपवास करणारेही लोक असतात. उत्सवाच्या आदल्या दिवशी उपवास करून मध्यरात्रीनंतर खीर खाणे, असाही पर्याय आहे. या दिवशी दिवस व रात्र मिळून तीन-चार वेळा स्नान आणि शिवमंदिरात पूजापाठ करावा लागतो. प्रत्यक्ष उत्सवाच्या म्हणजे पूर्णाहुतीच्या दिवशी मात्र पूर्ण उपवास आणि पाच वेळा स्नान करायचे असते.

या उत्सवात नवस करणारे लोक देवापुढे उलटे टांगून घेतात आणि त्या वेळी खालून धुरी घेतात. काही लोक जळत्या निखाऱ्यांवरून चालतात. यात पुरुषांवरोबर स्त्रियाही भाग घेतात.

दुसऱ्या दिवशी कठभोक्ताला शिवालयापाशी आणतात. आणि एका खांबावर टांगून गरगर फिरवितात. या वेळी कठभोक्ता पुष्पवृष्टी करतो. खालचे लोक ती फुले प्रसाद म्हणून वरच्यावर झेलतात. याशिवाय अन्यही काही कायक्लेशाचे प्रकार असतात. ते केल्याने शिव-पार्वतींची कृपा होते, असे समजतात. [श्री. बलराम खलखो– सा. धर्मयुग, ४ डिसेंबर १९६६]

भोगसंक्रांतिव्रत एक काम्य व्रत. संक्रांतीच्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. या दिवशी दंपतीभोजन घालतात. सुवासिनी स्त्रियांना केशर, काजळ, हिंगुळ, फुले, अत्तर, तांबूल, कापूर व फळे देतात. उद्यापनाच्या वेळी सूर्याची पूजा करून सपत्नीक ब्राह्मणाला एक गाय दान देतात. फल – सुखप्राप्ती. [हि. ध.; व्र. प.; व्रतराज]

भोगावाप्तिव्रत एक काम्य व्रत. ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेपासून तीन दिवस हे व्रत करतात. यात विष्णूची पूजा करायची असते. उद्यापनाच्या वेळी एक पलंग दान देतात. फल– सुख व स्वर्ग यांची प्राप्ती. [हि. ध.]

भोगी मकर संक्रांतीच्या आदल्या दिवसाला भोगी असे म्हणतात. भोगी म्हणजे उपभोगाचा सण होय. या दिवशी स्त्रिया अभ्यंगस्नान व विशेष प्रसाधन करतात. तीळ लावलेल्या बाजरीच्या भाकरी, लोणी, खिचडी, इ. पदार्थांचा देवाला नैवेद्य दाखवितात. या दिवशी शक्य असल्यास सासरी असलेल्या मुलीला माहेरी जेवायला बोलावतात.

तमिळनाडमध्ये मकरसंक्रांतीच्या आधी तीन दिवस पोंगळ नावाचा एक उत्सव साजरा करतात. त्यांतल्या पहिल्या दिवसाला भोगी पोंगळ असे नाव आहे. पाहा – पोंगळ.

भोगोपभोगपरिमाणव्रत एक जैन व्रत. भोग्य व उपभोग्य वस्तूंचे प्रमाण करणे हा या शब्दाचा अर्थ होय. अन्नपानादी, पुष्पफलादी भोग्य वस्तू आणि दागिने, घर, अश्वादी उपभोग्य वस्तू, यांचे प्रमाण करून ते परिमित प्रमाणात उपयोगात आणणे, हा या व्रताचा मूळ हेतू आहे. या व्रतात कंदमुळे, लोणी व लिंबाची फुले खाऊ नयेत, असाही नियम आहे. हे एक शिक्षाव्रत आहे. [जै. ध.; जैनधर्मामृत]

भोज (१) प्राचीन काळचे लोक. ब्राह्मणग्रंथांत यांचा उल्लेख केलेला आहे. हे द. भारतातील सात्वत लोकांचे राजे होते, असे ऐ. ब्राह्मणात (८·१४) म्हटले आहे. मात्र कालांतराने ते गंगायमुनांच्या तीरांवरील प्रदेशांत जाऊन वसले, असे शतपथ ब्राह्मणातील (१३·५·४·११) उल्लेखावरून कळते. महाभारतात यांना चंद्रवंशातील सम्राट ययातीचा पुत्र द्रुह्य याचे वंशज मानले आहे. ययातीने द्रुह्यूचे यौवन स्वत:साठी मागितले असता, द्रुह्यूने ते त्याला देण्यास नकार दिला. तेव्हा ययातीने त्याला शाप दिला, की 'तू एखाद्या दुर्गम प्रदेशाचा राजा होशील आणि तुझ्या कुळाला भोज हे नाव मिळेल' (आदि. ८४·२०-२२). त्याप्रमाणे द्रुह्यूच्या संततीला भोज हे नामाभिधान प्राप्त झाले (आदि. ८५·३४). तथापि ययातीचा दुसरा पुत्र पुरू याचे वंशज पौरव आणि द्रुह्यूचे वंशज भोज यांचे चांगले सख्य होते. अर्जुन जेव्हा तीर्थयात्रेसाठी द्वारकेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गेला तेव्हा भोज, वृष्णी व अंधक जमातींतील तरुणांनी त्याचा सत्कार केला. भोज, अंधक, वृष्णी व यादव यांनी स्वसंरक्षण व शत्रूवर आक्रमण करण्यासाठी एक प्रबळ संघटना स्थापली होती, असे महाभारतात पुष्कळ जागी सांगितलेले आहे. भारतीय युद्धानंतर यादवांनी आपसांत लढून जो सर्वनाश केला, त्याचे वर्णन मौसल पर्वात केलेले आहे. त्या संघर्षात भोज, अंधक व वृष्णी यांनीही भाग घेतला होता (मौसल. ३४·३७, ३८).

भोजांनी मध्यदेशात मथुरेजवळ राज्ये स्थापून पुष्कळ वैभव मिळवले होते. पण जरासंधाच्या आक्रमणांमुळे त्यांनाही तो प्रदेश सोडून पश्चिम व दक्षिण भारतात जावे लागले. विदर्भात भोजकट नावाचे नगर होते. तिथे भोज राजा भीष्मक राज्य करीत होता. त्याची कन्या रुक्मिणी ही कृष्णाची प्रथम पत्नी होय. भीष्मक हा जरासंधाचा सामंत होता. कृष्णाने जेव्हा रुक्मिणीचे हरण केले, तेव्हा तिचा पराक्रमी भाऊ रुक्मी याने प्रतिज्ञा केली, की कृष्णाचा पराभव केल्यावाचून मी कुंडिनपूरला परतणार नाही. पण रुक्मीने कृष्णाचा पराभव करण्याऐवजी कृष्णानेच त्याचा पराभव केला. मग रुक्मीने त्या रणक्षेत्रावरच नवीन नगर वसवले व त्याला भोजकट हे नाव दिले. रुक्मी हा शस्त्रविद्येत अत्यंत कुशल व महापराक्रमी होता हे खरे; पण तो फार गर्विष्ठ असल्यामुळे त्याचे कौरव किंवा पांडव यांपैकी कोणाशीच पटले नाही. त्यामुळे त्याने भारतीय युद्धात भाग घेतला नाही.

कृष्णाचा मामा कंस हा भोजच होता आणि कंसाच्या जुलमामुळे त्रासून गेलेल्या भोज लोकांनीच कृष्णाला त्याचा वध करण्यास उद्युक्त केले होते (म. भा. सभा. ६२·८).

पूर्वी सात्वत लोकांमध्ये त्यांच्या राजकुळाला भोज असे म्हणत. पण कालांतराने सर्व सात्वत लोकांनाच ते नाव मिळाले असावे. महाभारतात भोज व सात्वत ही नावे पुष्कळदा एकाच व्यक्तीला उद्देशून वापरलेली आहेत. उदा० कृतवर्मा याला ही दोन्ही नावे लावलेली आहेत.

सात्वत व भोज हे लोक यदुवंशाचे होते, असे पुराणात सांगितले आहे (मत्स्य पु. ४३·४८; वायू पु. ९४·५२). महाभोजाचा पुत्र सात्वत व त्याचे वंशज ते भोज, असे भाग. पुराणात (९·२४) व कूर्म पुराणात (२४·४०) म्हटले आहे. भोज लोक सदाचरणी, विद्वान, सत्यवादी, पराक्रमी व उदार होते, असे मत्स्य पुराणावरून कळते. काही पुराणांत भोजांना हैहयांची एक शाखा मानलेले आहे (मत्स्य पु. ४३·४८,४९; अग्नी पु. २७५·१०; वायू पु. ९४). भोजांचा विदर्भाशी घनिष्ठ संबंध होता, याबद्दल अनेक पुराणांत उल्लेख आहेत. वाकाटक राजा प्रवरसेन (दुसरा) याच्या चम्मक येथील ताम्रपटावरून समजते, की भोजकट हे नगर सध्याच्या एलिचपूर जिल्ह्यात होते. कालिदासाने रघुवंशात विदर्भनृपतीला भोज म्हटले आहे. मात्र अर्थशास्त्रात एका दांडक्य भोजाचा उल्लेख आहे, त्यावरून असे दिसते, की दंडकारण्यातही भोजांचे एक राज्य असावे. भारतीय युद्धात त्यांचे सैन्य कौरवांच्या बाजूला होते.

भोजांची एक शाखा गोमंतकात राज्य करीत होती, असेही दिसते. कारण इ. स. च्या ४ थ्या शतकातील भोज राजा देवराज याचा एक ताम्रपट शिरोडे येथे सापडला आहे. तसेच पहिला भोज पृथ्वीमल्लवर्मा याचे दोन ताम्रपट बांदिवडे येथे सापडले आहेत.

जैन व बौद्ध वाङ्मयातही भोज कुळांचा उल्लेख अनेकदा आला आहे. [ए. इं. ट्रा.; प. का. भा.; म. ज्ञा. को.; गो. सां. घ.]

(२) एक प्राचीन जनपद. चंबळ व बनास या नद्यांच्या खोऱ्यांत हे जनपद होते. उदयपूरपासून सुमारे ८० मैलांवर असलेले भिलवाडा हे नगर या प्रदेशाच्या केंद्रस्थानी आहे. भोज नामक जनपद विंध्य पर्वतराजीत वसलेले होते, असे ब्रह्मांड (२·१६·६४) व वायू (४५·१३२) या पुराणांत म्हटले आहे. [जॉ. पु.; पु. वि. अ.]

(३) (इ. स. च्या ११ व्या शतकाचा पूर्वार्ध). माळव्याचा परमार वंशातला राजा. धारानगरी ही त्याची राजधानी होती. वाक्पतिराज मुंज याचा धाकटा भाऊ सिंधुराज किंवा सिंधुल हा भोजाचा पिता होय. भोज सिंहासनावर बसला तेव्हा त्याचे वय १५–२० वर्षांचे असावे. त्यानंतर लगेच त्याने दिग्विजयाचे प्रस्थान ठेवले. त्याने बरेच देश जिंकून आपले राज्य खूप वाढवले (परमार राजवंश पाहा). उदयपूरप्रशस्ती या शिलालेखात म्हटले आहे, की कैलासापासून मलय पर्वतापर्यंत भोजाचे राज्य विस्तारले होते. तिथे भोजाची आणखी प्रशस्ती पुढीलप्रमाणे केली आहे –

साधितं विहितं दत्तं ज्ञातं तद् यन्न केनचित् ।
किमन्यत्कविराजस्य श्रीभोजस्य प्रशस्यते ।।

अर्थ – दुसऱ्या कोणीही जे साधले नाही, जाणले नाही, दिले नाही, ज्ञात केले नाही, ते भोजराजाने केले. भोजाची याहून आणखी काय प्रशंसा करावी.

भोजराजाने जसे राज्य मोठे केले, तसेच विपुल निर्माणही केले. भोपाळजवळ त्याने एक प्रचंड तलाव निर्माण केला. सांप्रत त्याचे अवशेष दिसतात. हा तलाव माळव्याचा सुलतान होशंगशहा याने ढासळून टाकला. वेत्रवतीच्या तीरावर आणि चितोड येथे त्याने देवालये बांधली. धार येथे भोजशाला, राजमार्तंड नामक राजमहाल, जयस्तंभ, सरस्वतीसदन नावाची पाठशाला व एक अप्रतिम सरस्वतीची मूर्ती त्याने बनवली. केदार, रामेश्वर, सोमनाथ, सुंडीर (हे बंगालचे सुंदरवन असावे), काल (उज्जयिनीचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाकाल), अनल व रुद्र यांची त्यानेच मंदिरे बांधली. राजतरंगिणीत (७.१९०–९३) त्याची आणखी एक निर्मिती सांगितली आहे–काश्मीरच्या पद्मराज नामक तांबोळचाने भोजराजाकडे काही सोने पाठवले. त्या सोन्याचा विनियोग करून भोजाने काश्मीरातच कपटेश्वर येथे एक पापसूदन नावाचे कुंड बांधले. भोजाचा नियम होता, की त्या कुंडातल्या पाण्यानेच रोज तोंड धुवायचे. काचेच्या कुप्यांतून धारानगरीत पाणी पाठवून भोजाचा हा नेम चालवण्यास वरील तांबोळचानेच मदत केली.

भोजाचे अनेक शिलालेख व ताम्रपट उपलब्ध आहेत. यांविषयी एक श्लोक प्रसिद्ध आहे, तो असा –

अस्य श्रीभोजराजस्य द्वयमेव सुदुर्लभम् ।
शत्रूणां शासनैर्लोहं ताम्रं शासनपत्रकैः ।।

अर्थ – या श्रीभोजराजाच्या राज्यात दोन वस्तूंची टंचाई निर्माण झाली आहे. शत्रूंना शृंखलाबद्ध करण्यात लोखंड संपले व ताम्रपत्रे लिहविण्यात तांबे संपले.

भोज हा कर्णासारखाच दाता होता. त्याच्या दातृत्वाविषयी भोजप्रबंधात खूपच लिहिले आहे. त्याने ओंजळी भरभरून दिले. कवीच्या प्रत्येक अक्षराला लक्ष मुद्रा भोज राजा देत असे, असे त्याच्याविषयी म्हटले आहे. यात अतिशयोक्ती आहे हे निश्चित; पण भोजाच्या अपार दातृत्वातूनच ती निर्माण झाली आहे. भोज हा अनेक कवींचा आश्रयदाता होता. त्याच्या दरबारात कवींची नवरत्ने होती, असे म्हटले आहे. त्यांत एक कालिदास नावाचाही पंडितकवी होता. मात्र हा सुप्रसिद्ध कालिदास नसून त्याच नावाचा दुसरा कोणीतरी कवी असावा, असे विद्वानांचे मत आहे.

भोजराजाची विद्वत्ता सर्वतोमुखी होती. बऱ्याच शास्त्रांत त्याला खूप गम्य होते. म्हणूनच विद्वत्परिषदेचा अध्यक्ष म्हणून एकदा सर्व पंडितांनी त्याची निवड केली होती. राज्यकारभार करीत असतानाच त्याने अनेक शास्त्रांवर अनेक ग्रंथ लिहिले. त्याने लिहिलेल्या ग्रंथांची सूची अशी–

ज्योतिष– राजमार्तंड, राजमृगांककरण, विद्वज्जनवल्लभप्रश्नतान व आदित्यप्रतापसिद्धान्त.

योग– पतंजलीच्या योगसूत्रांवर टीका.

धर्मशास्त्र– पूर्तमार्तंड, दंडनीती, व्यवहारसमुच्चय, चारुचर्या.

शिल्पशास्त्र– समरांगणसूत्रधार, युक्तिकल्पतरू.

काव्य– चंपूरामायण (पहिली पाच कांडे), महाकाली–विजय, विद्याविनोद, शृंगारमंजरी, सरस्वतीकंठाभरण, रसप्रकाश, कूर्मशतक, कोदंडकाव्य व खड्गकाव्य.

वैद्यक– विश्रांतविद्याविनोद, आयुर्वेदसर्वस्व व राजमृगांक

कोश– नाममाला. **व्याकरण**– संस्कृत व प्राकृत व्याकरण.

शैवमत– तत्त्वप्रकाश, शिवतत्त्वरत्नकलिका.

संगीत– संगीतरत्नाकार. **अश्वशास्त्र**– शालिहोत्र.

भोजराजाची सर्व धर्मांविषयी समान व उदार दृष्टी होती. त्याने ब्राह्मणपंडिताना जसा आश्रय दिला, तसाच उवट, शुभचंद्र, नेमिचंद्र चक्रवती, प्रभाचंद्र व निचुल या जैन पंडितांनाही दिला. धारानगरीतले सरस्वतीभवन हे त्याने एक मोठे विद्याकेंद्रच बनवले.

भोजराजाविषयी अनेक लोकोक्ती, उपाख्याने आणि कथा निर्माण झाल्या आहेत. भोजराजा–कालिदास या नावाच्या कितीतरी कथा सुप्रसिद्ध आहेत. त्या कथांतून कालिदासाचे कवित्व आणि भोजराजाचे शौर्य, धैर्य, दातृत्व, इ. गुणविशेष प्रकट होतात. भोजप्रबंधात त्याविषयी दिलेली एक कथा अशी–

एके दिवशी भोजराजाने कालिदासाला म्हटले, “तुम्ही अनेक प्रकारच्या कविता करता, त्यातून माझी प्रशस्तीही गाता. मग आता तुम्ही माझ्या मृत्यूविषयी एक कविता लिहा.” कालिदासाचे भोजराजावर नितांत प्रेम होते. राजाचे ते बोलणे कालिदासाला आवडले नाही. तो राजावर क्रुद्ध झाला आणि धारानगरी सोडून चालता झाला. एकशिला नामक नगरीत जाऊन त्याने गुप्तपणे वास्तव्य केले. इकडे कालिदासाच्या वियोगाने राजा व्याकुळ झाला. तो योग्याचा वेष घेऊन कालिदासाला शोधण्यासाठी बाहेर पडला. कालिदासानेही वेषपरिवर्तन केले होते. जेव्हा त्या दोघांची भेट झाली, तेव्हा त्यांनी परस्परांना ओळखले नाही. कालिदासाने योग्याला विचारले.

“योगिराज, तुम्ही कुठल्या देशात राहणारे ?”

“मी धारानगरीचा रहिवासी आहे.” योग्याने उत्तर दिले

“धारानगरीची हालहवाल काय ?”

“कसली हालहवाल सांगायची? सगळे संपले. भोज राजा मृत्यू पावला.”

ती वार्ता ऐकताच कालिदास एकदम शोकविह्वल झाला. त्याच्या मुखातून तात्काळ एक श्लोक बाहेर पडला–

अद्य धारा निराधारा निरालम्बा सरस्वती ।
पण्डिताः खण्डिताः सर्वे भोजराजे दिवं गते ।।

अर्थ – आज भोजराजा दिवंगत झाला, आणि धारानगरी निराधार बनली. सरस्वती निराश्रित झाली आणि सर्व पंडित निष्प्रभ झाले.

तो श्लोक ऐकताच हाच कालिदास आहे, अशी भोजराजाची खात्री पटली. राजा त्याला म्हणाला. “तुम्ही कालिदास आहा आणि मी भोजराजा योग्याच्या वेषाने तुमच्यापुढे उभा आहे.”

त्या क्षणी कालिदासाची मुद्रा प्रफुल्लित झाली. लगेच त्याच्या मुखातून वरचाच श्लोक वेगळ्या प्रकारे बाहेर पडला–

अद्य धारा सदाधारा सदालम्बा सरस्वती ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पण्डिता मण्डिताः सर्वे भोजराजे भुवं गते ॥

अर्थ – सांप्रत भोजराजा पृथ्वीवर राज्य करीत असता धारा ही उत्तम आधारयुक्त झाली. सरस्वतीला चांगला आश्रय मिळाला आणि पंडित सुशोभित झाले.

नंतर भोजराजाने कालिदासाला आलिंगन दिले आणि त्याला घेऊन तो धारानगरीला आला.

भोजराजाचे जीवन संपन्न व गौरवशाली झाले, तशीच त्याला अखेर वीरगतीही मिळाली. गुजरातचा भीमदेव सोळंकी (पहिला) व चेदिराज गांगेयदेवाचा पुत्र कर्ण या दोघांनी मिळून धारानगरीवर आक्रमण केले असता, भोजराजा त्या युद्धात धारातीर्थी पडला. भोजराजा जड देहाने गेला; पण शिलालेख, मंदिरे आणि कलाशिल्पे अशा सांस्कृतिक चिन्हांच्या रूपाने तो अजरामर झाला आहे. [भोजप्रबंध; वि. स्मृ. ग्रं.; हि. ध.; म. च. को.]

(४) (इ. स. ८३६–८८५) प्रतीहार वंशातील सम्राट. पाल व राष्ट्रकूट या वंशांतील राजांचा पराभव करून याने उत्तर भारतात विशाल साम्राज्य निर्माण केले. कनौज ही त्याची राजधानी होती. पाहा – गुर्जर–प्रतीहार.

भोजकी

पंजाबमधील एक जात. मंदिरातून देवपूजा करणे हा या लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. असे असले तरी हे ब्राह्मण नव्हेत. मात्र हे लोक स्वतःला सारस्वत ब्राह्मण म्हणवून घेतात व जानवे घालतात.

काशीतल्या गंगापुत्रांसमान यांचा सामाजिक दर्जा आहे, असे सांगतात. हे लोक खरे जोगीच असावे; परंतु पुजारीपण करीत असल्यामुळे यांना जरा वरच्या थराचे मानले असावे.

यांचे विवाह आपापसांत होतात किंवा रोधा पंडित नावाचा जोगींचा एक वर्ग आहे, त्यांच्याशी होतात.

हे लोक भांडकुदळ व दुर्व्यसनी म्हणून प्रसिद्ध आहेत. यांना मद्य-मांस चालते व नैतिक बंधनांची विशेष पर्वा नसते. [पं. का.]

भोजन

अन्नसेवन. मानवप्राणी उत्पन्न झाला तेव्हापासून उदरभरण हे त्याच्या मागे अनिवार्यपणे लागले आहे. प्राचीन कालापासून तो जे निरनिराळे पदार्थ अन्न म्हणून खात आला आहे, त्या पदार्थांचे विभाजन पुढील तीन प्रकारांत करता येईल– (१) वनस्पतिज– कंदमुळे, फळे, फुले, देठ, पाने, भाज्या, तेल, गूळ, साखर, खडीसाखर, मसाले, इत्यादी. (२) प्राणिज– मांस, दूध, तूप, लोणी, वसा, अंडी, मध, इत्यादी. आणि (३) भूगर्भज व जलज – लवण, मासे, इत्यादी. याच पदार्थांपासून भोज्य, भक्ष्य, चोष्य, लेह्य व पेय असा पंचविध आहार बनतो. मानवी संस्कृतीचा जसजसा विकास होत गेला, तसतशी मनुष्याच्या आहारासाठी योग्य पदार्थांची विविधता वाढू लागली.

उपलब्ध खाद्यपदार्थांतून स्वाद आणि शरीरस्वास्थ्य या दृष्टींनी मनुष्य पदार्थांची निवड करीत असे. याशिवाय, सात्त्विकतेची वाढ होण्यासाठी आणि धार्मिक दृष्टीनेही मनुष्य आपल्या आहाराची निवड करीत असे. कारण छांदोग्य उपनिषदात सांगितले आहे (७.२६.२) —

आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः।
स्मृतिलम्भे सर्वग्रन्थीनां विप्रमोक्षः ॥

अर्थ – आहार शुद्ध असेल, तर सत्त्वशुद्धी असते. सत्त्वशुद्धी असेल, तर स्मृती अढळ राहते आणि स्मृती अढळ राहिल्यावर सर्व ग्रंथींचा मोक्ष होतो.

सात्त्विक मनुष्याला रसयुक्त, स्निग्ध, स्थिर व हृद्य आहार प्रिय असतो. अशा आहारामुळे आयुष्य, सात्त्विक वृत्ती, बल, आरोग्य व सुख वृद्धिगत होते. कडू, अतितिखट, रुक्ष व तिखट-मिठाचे पदार्थ राजस वृत्तीच्या लोकांना आवडतात. अशा अन्नामुळे दुःख व रोग उत्पन्न होतात आणि शिळे, बेचव, उष्टे व अपवित्र भोजन तामस मनुष्याला प्रिय असते, असे गीतेत सांगितले आहे (१७.८–१०).

सिंधुसंस्कृतीच्या काळात जे अन्नधान्य लोक पिकवीत असत, त्यांत यव, गहू, तांदूळ, तीळ, वाटाणा, इ. धान्ये प्रमुख होती. त्यांचेच खाद्य पदार्थ बनवून ते लोक खात असत. त्याचप्रमाणे ते गायी पाळीत असल्यामुळे दूध आणि दुधाचे पदार्थही त्यांच्या भोजनात असत.

ऋग्वेदाच्या काळापासून लोकांना बल, वीर्य व सात्त्विक वृत्ती यांचे संवर्धन करणारे पदार्थ कोणते, ते माहीत होते. क्षीरपाकओदन (म्हणजे दुधात शिजवलेला तांदुळाचा भात) हा पदार्थ त्यासाठी सर्वोत्तम मानलेला होता. तसेच इतरही अनेक पदार्थ मिसळून ते ओदन म्हणजे भात शिजवीत असत. क्षीरौदन, दध्योदन, मुद्गौदन, तिलौदन, मांसौदन, घृतौदन, पंचौदन अशी त्यांची नावे वाङ्मयात आढळतात. दही, दूध आणि दुधाचे अन्य पदार्थ त्यांच्या भोजनात असत. पण आर्यांचा मुख्य आहार म्हणजे करंभ, अपूप, पुरोडाश व लाह्या असा होता. ऋग्वेदकाळापासून सर्वसाधारण लोकांचा आहार सातूचाच असावा, असे वाटते. सातूमध्ये इतर पदार्थ मिसळून त्याचे पदार्थ करीत. तांदूळ व तीळ यांपासून बनवलेला कृसर, तांदूळ भाजून केलेला परिवाप, वाजिन म्हणजे रायते या पदार्थांची नावेही वैदिक वाङ्मयात आढळतात. याशिवाय काही फळे, भाज्या व निरनिराळ्या पशूंचे मांस ते खात असत. पदार्थ चविष्ट बनविण्यासाठी त्यात मीठ घालण्याची पद्धत बहुधा याच कालापासून सुरू झाली असावी. सोम आणि सुरा ही वैदिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कालातील आर्य लोकांची मुख्य पेये होती.

जातकयुगात सर्वसाधारण लोकांचा भात आणि मूग, तिळ, यवागू यांचे पदार्थ हा आहार असे. मांसही लोकांना फार आवडत असे. घोरपडीचे मांस त्यांना फार प्रिय होते. ते तूप, दही व इतर पदार्थ घालून शिजवीत. हंस, मोर व क्रौंच या पक्ष्यांचे मांसही ते खात असत. पदार्थ चवदार होण्यासाठी ते तेल, मीठ व पिंपळी यांचा उपयोग करीत असत.

बौद्ध साहित्यात क्षीरौदनाची फार प्रशंसा केलेली आढळते. क्षीरौदनाने आयुष्य, बल व बुद्धी वाढते, रंग उजळतो, तहानभूक शमते, वात, कफ व पित्त या त्रिदोषांचे शमन होते आणि पचनशक्ती वाढते, असे गौतम बुद्धाने म्हटले आहे.

भिक्षूंनी भोजन कसे करावे, याबद्दल बौद्ध साहित्यात काही नियम दिलेले आहेत. भोजन सत्कारपूर्वक ग्रहण करावे व सत्कारपूर्वक खावे, पानाकडे लक्ष ठेवून भोजन करावे, घास मोठा घेऊ नये, सर्व हात तोंडात घालू नये, तोंडात घास असताना बोलू नये, चावताना आवाज करू नये, हात किंवा पान चाटू नये, हे त्यांपैकी काही होत.

रामायणकालात लोक विविध प्रकारचे चविष्ट पदार्थ बनवीत असत. तांदूळ, यव व गहू ही धान्ये त्यांच्या आहारात प्रमुख होती. त्याचबरोबर मूग, हरभरा, कुळीथ व उडीद ही कडधान्येही त्यांच्या वापरात होती. त्यांच्या खाद्य पदार्थांच्या चार श्रेणी होत्या–(१) भक्ष्य – वडे किंवा पोळी यांसारखे चावून खायचे पदार्थ (२) भोज्य – भातासारखे फार चावावे न लागणारे पदार्थ (३) चोष्य – उसासारखे चोखून खायचे पदार्थ व (४) लेह्य – मधासारखे चाटून खायचे पदार्थ.

जेवणात भात मुख्य असे. तांदुळापासून पायस, घारगे, लाडू, हविष्यान्न, इ. पदार्थ बनवीत असत. रायती, सूप, तसेच दूध, दही, ताक, आटीव दूध, हे पदार्थ विपुल असत. विविध प्रकारचे मांस शिजवून ते खात असत. त्यांच्या आहारात फळांनाही स्थान होते. आंबा, ऊस, केळे, खजूर, जांभूळ, डाळिंब, नारळ, फणस व बोरे या फळांचा उल्लेख रामायणात आहे.

स्वयंपाक करणाऱ्याला सूद किंवा सूपकार असे म्हणत. तो विविध प्रकारचे सामिष व निरामिष पदार्थ बनविण्यात कुशल असे. षड्रसयुक्त पदार्थ बनविल्यामुळे प्रत्येकाला आपापल्या आवडीचे पदार्थ मिळत असत. त्या काळच्या राजकुमारांनाही पाकविद्या अवगत होती, असे दिसून येते. लक्ष्मण स्वतः एक कुशल सूद होता. मांस आणि मासे यांचे स्वादिष्ट पदार्थ तो बनवीत असे. वनवासात असताना तोच रामसीता यांच्यासाठी भोजन तयार करीत असे, असे रामायणात सांगितले आहे.

भोजन वाढताना सूद सुंदर वस्त्रे व अलंकार परिधान करीत असे. दशरथाच्या अश्वमेध यज्ञाच्या वेळी अलंकृत पुरुषांनी ब्राह्मणांना भोजन वाढले होते, असा उल्लेख आहे.

त्या काळी पाणी, दूध, मठ्ठा, आसव, फळांचे रस, मध व मदिरा ही मुख्य पेये होती. प्राचीन आर्यांच्या दृष्टीने भोजन हे केवळ रसनेची तृप्ती करण्याचे साधन नसून, ते एक पवित्र कर्म होते. देवतांना नैवेद्य दाखवून मग अतिथी, मित्र व परिवार यांसह ते भोजन करीत असत. त्या काळातील वानर हे शाकाहारी होते, तर राक्षस मुख्यत्वे मांसाहारी होते. राक्षसांच्या भोजनात विविध प्रकारच्या मांसाचे पदार्थ, गोडाचे, तिखटमिठाचे व आंबट पदार्थ आणि फळे असत. त्यांच्या भोजनशालेला पानभूमी असे नाव होते.

महाभारतकाळीही अनेक प्रकारचे स्वादिष्ट पदार्थ लोक बनवीत असत. वडे, विविध प्रकारच्या भाज्या, गोड पदार्थ, षाडव, रसयोग, फळेमुळे, सूकर व हरिण यांचे मांस, खीर, खिचडी, मोदक, करंज्या, इ. पदार्थ यांचा त्यांच्या भोजनात समावेश असे. विविध पशूंचे व पक्ष्यांचे मांसही लोक खात असत. युधिष्ठिराच्या राजसूय व अश्वमेध यज्ञांच्या वेळी आणि अभिमन्यूच्या लग्नाच्या वेळी मांसाचे ढीग लागले होते, असा उल्लेख आहे.

सर्वसाधारण कुटुंबांत स्त्रिया स्वयंपाक करीत असल्या, तरी मोठ्या घरांतून पुरुष स्वयंपाकी नेमण्याची प्रथा होती.

सर्वसाधारण लोक काशाच्या पात्रात व श्रीमंत आणि राजे लोक सोन्याचांदीच्या पात्रांत भोजन करीत.

भारतीय भोजनात प्राचीन कालापासून फळांना स्थान मिळाले आहे. कारण भारतात प्राचीन कालापासून अनेक प्रकारची फळे निर्माण होत आहेत. काही फळे वनात तयार होत, तर काही फलवृक्षांच्या शास्त्रीय पद्धतीने लावलेल्या बागांतून तयार होत. काही वेळा इतर प्रदेशांतूनही फळे मागवीत असत. डाळिंब, बोर, सफरचंद, कवठ, महाळुंग, फणस, कदंब, चिंच, संत्रे, जांभूळ, काकडी, ताडफळे, नारळ, केळे, काजू, खजूर, अक्रोड, बदाम, पिस्ता, जायफळ, लवंग, वेलची, इत्यादी फळांचा ते आहारात उपयोग करीत. फळांचे रस काढून पिण्याचीही पद्धत होती.

भोजनाचे शास्त्र त्या काळात प्रतिष्ठा पावलेले होते. अनेक राजकुमार व राजकुमारी पाकसिद्धी करण्यात निष्णात असत. पांडवांपैकी भीमाला पाककला अवगत होती. अज्ञातवासाच्या काळात तो विराट राजाकडे बल्लव (स्वयंपाकी) म्हणूनच राहिला होता. नल राजाही पाककलेत आणि विशेषतः मांसाचे पदार्थ बनविण्यात विशेष निपुण होता. त्याच्या हातचे मांसपदार्थ खाल्ल्यावर दमयंतीने त्याला लगेच ओळखले, असे महाभारतात सांगितले आहे. अर्जुनाने द्रौपदीला स्वयंवरात जिंकून आणल्यावर, कुंतीच्या सांगण्यावरून तिने त्या दिवशी स्वयंपाक करून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्वांना जेवायला वाढले, असाही उल्लेख महाभारतात आहे.

राजांच्या पाकशालेत अनेक नोकर असत व त्यांच्यावर एक सर्वोच्च अधिकारी असे. त्या काळी साधारणपणे लोक रोज तीनदा आहार घेत असत. सकाळी प्रातराश, दुपारी संपूर्ण जेवण आणि रात्रीच्या पहिल्या प्रहरी तिसरे भोजन होत असे.

पाकसिद्धीची कला उत्तरोत्तर विकसित होत गेली आणि तिच्यात असंख्य नवनवीन पदार्थांची भर पडली. खाद्यांबरोबर पेयांचेही अनेक नवीन प्रकार अस्तित्वात आले आणि अजूनही खाद्यपेयांचे नवीन नवीन प्रकार लोक शोधून काढीतच आहेत.

प्रत्येक प्रदेशाचे भोजनपदार्थ वेगवेगळे असतात. ज्या प्रदेशात जे धान्य प्रामुख्याने निपजते, तेच त्या प्रदेशाचे मुख्य अन्न असते. त्याच मुख्य धान्याचे माध्यम धरून भोज्य पदार्थांच्या वेगवेगळ्या परी केल्या जातात. दक्षिणेत तांदूळ तर उत्तरेत गहू हा मुख्य भोज्य पदार्थ आहे. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, उडीद, हरभरा, तूर या धान्यांचे आणि कडधान्यांचेच वेगवेगळे प्रकार भारतभर बनवले जातात. सांप्रत विज्ञानाने भोजनप्रवंधात शास्त्रीयता आणली आहे आणि कित्येक जुन्या समजुती खोट्या ठरवल्या आहेत. प्रथिने, पिष्ट, क्षार, इ. तत्त्वांच्या न्यूनाधिक्याचा विचार करून, भोजनात समतोल कसा आणावा, ते विज्ञानाने सांगितले आहे. कोणत्या पदार्थात कोणती जीवनसत्त्वे किती प्रमाणात असतात, ते विज्ञानाने शोधून काढून आहाराची नवी दिशा दाखवली आहे. पूर्वी भोजननिर्मितीत सोवळ्या-ओवळ्याचे व खरकट्या-निर्लेपाचे बरेच प्रस्थ होते. त्याविषयीचे बरेच संकेतात्मक विधी-निषेध ठरलेले होते. त्यांत काही चुकले, की ते अन्न त्याज्य समजले जाई. आजचे विधी-निषेध हे वैज्ञानिक आहेत. वैद्यकशास्त्राच्या आधारे ते ठरवले जातात व सुशिक्षित लोक ते मानतात. [प्रा. भा. सा. सां. भू.; म. भा. स.; रा. का. सं.; वे. का. स.; बु.ध. उ.]

भोजनविधी भोजन कसे करावे, त्यासंबंधी धर्मशास्त्रात काही विधिनिषेध सांगितले आहेत. त्यांपैकी काही पुढे दिले आहेत– भोजनाला बसण्यापूर्वी हातपाय स्वच्छ धुवावे. सोन्या-चांदीच्या पात्रांत किंवा पत्रावळीवर भोजन करणे प्रशस्त होय. केळ, कुडा, फणस, आंबा, जांभूळ, चाफा, मोह, उंबर या झाडांची पाने भोजनाला प्रशस्त आहेत. पूर्वेकडे तोंड करून पाटावर जेवण्यासाठी बसावे. चौकोनी मंडल करून त्यावर धुतलेले पात्र ठेवावे. वाढून झाल्यावर गायत्रीमंत्राने अन्नप्रोक्षण करावे. मग 'सत्यं त्वा ऋतेन परिषिञ्चामि' या मंत्राने दुपारी व 'ऋतं त्वा सत्येन परिषिञ्चामि' या मंत्राने रात्री पात्राच्या भोवती जलसिंचन करावे. पात्राच्या उजव्या हाताच्या भूमीवर चित्र, चित्रगुप्त, यम, यमवर्म व सर्व भूते यांच्या नावाने पाच आहुती द्याव्या. नंतर तळहातावर उदक घेऊन 'अहं वैश्वानरो भूत्वा०' हा मंत्र म्हणून झाल्यावर, पुढील मंत्राने अन्नाची प्रार्थना करावी.

ॐ अन्नपते ऽ न्नस्य नो देह्यनमीवस्य शुष्मिणः ।
प्रप्रदातारं तारिष ऊर्जं नो देहि द्विपदे चतुष्पदे ।।

त्यानंतर 'अमृतोपस्तरणमसि' या मंत्राने ते प्राशन करावे. मग स्वमुखात तूपभाताच्या पाच प्राणाहुती द्याव्या. जेवताना प्रथम मधुर, मध्ये खारट-तुरट आणि अंती कटू पदार्थांचे सेवन करावे. जेवताना मौन पाळावे किंवा गोविंद, गोविंद असे म्हणावे. भोजन झाल्यावर तळहातावर उदक घेऊन 'अमृतापिधानमसि' या मंत्राने त्यातले अर्धे प्राशन करावे व अर्धे भूमीवर टाकावे. मग उच्छिष्टशेष अन्न घेऊन 'रौरवे पूयनिलये०' या मंत्राने ते सर्व प्राण्यांसाठी द्यावे. मग हातपाय व तोंड धुवून आचमन करावे आणि मग तांबूलभक्षण करावे.

नंतर शतपावली करून आसनावर बसावे आणि 'अगस्ति कुम्भकर्णं च.०' आणि 'वातापी भक्षितो येन०' या मंत्रांनी उदरावर हात फिरवावा. अशा प्रकारे नित्य भोजनविधी केल्याने, या आत्मयागाचे फळ म्हणून अंती ब्रह्मपदप्राप्ती होते, असे सांगितले आहे.

नैमित्तिक धर्मकार्यप्रसंगी अनेक लोक एकत्र जेवायला जमले असताना, भोजनाला सुरुवात करण्यापूर्वी पुढील मंत्र म्हणतात.

यन्तु नदयो वर्षन्तु पर्जन्याः । सुप्पिपला ओषधयो भवन्तु । अन्नवतामोदनवतामामिक्षवताम् । एषां राजा भूयासम् । ओदनमुद्ब्रुवते । परमेष्ठी वा एषः । यदोदनः । परमामेवैनं श्रियं गमयति ।

महाराष्ट्रात जेवायला बसण्यापूर्वी पुढील श्लोक म्हणण्याचा पुष्कळ ठिकाणी परिपाठ आहे–

वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे ।
सहज हवन होते नाम घेता फुकाचे ।
जिवन करि जिवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म ।
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ।।

आरोग्याच्या दृष्टीने उदराचे दोन भाग अन्नाने व एक भाग पाण्याने भरावा आणि एक भाग वायूच्या संचारासाठी मोकळा ठेवावा; जेवणाच्या सुरुवातीला आले व मीठ चावून खाणे पथ्यकर होय; प्रथम घृतयुक्त, नंतर कठीण व त्यानंतर मृदू पदार्थ भक्षण करावे, असे राजनिघंटात सांगितले आहे.

भोजन करण्याची जागा स्वच्छ असावी; भोजन एकांतात घ्यावे; त्यामुळे लक्ष्मी प्राप्त होते; पण कुटुंबियांसह एकत्र भोजन करण्यास हरकत नाही, असे सांगितले आहे. चंद्र-सूर्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ग्रहणाच्या वेळी भोजन करू नये, दिवसातून दोनदाच जेवावे; भोजनाच्या वेळी अंगावर उत्तरीय वस्त्र घ्यावे, खडावा घालून भोजन करू नये; भोजन झाल्यावर तीन वेळा तोंड धुवावे व दोन वेळा गुळण्या कराव्या, असे भोजनासंबंधीचे काही नियम आहेत. [ध. सिं.; हि. ध.; श. क.; आचारेन्दु:; पूजामार्गप्रदीप]

भोजपुरी भाषा व साहित्य

बिहारमधल्या भोजपूर या परगाण्याच्या नावावरून तिथल्या भाषेला भोजपुरी असे नाव मिळाले आहे.

भोजपुरी भाषेच्या संबंधाने श्री. ग्रियर्सन लिहितात–

भोजपुरी भाषा भोजपुराच्या सीमाप्रदेशाच्या बाहेर दूरवर बोलली जाते. उत्तरेस ती गंगा पार करून नेपाळची सीमा, हिमालयाच्या खालच्या पर्वतश्रेणी, चंपारण्य जिल्हा, हे क्षेत्र धरून वस्तीपर्यंत पसरली आहे. दक्षिणेस ती शोणनद पार करून छोटा नागपूरच्या पठारापर्यंत पसरली आहे. मानभूम जिल्ह्याच्या टोकाला तिचा बंगालीशी आणि सिंगभूम जिल्ह्याच्या टोकावर ओडिया भाषेशी संपर्क झाला आहे. अशा प्रकारे भोजपुरीचा विस्तार सुमारे ५० हजार चौरस मैल आहे. उ. प्रदेशाचे पूर्वेकडील जिल्हे आणि बिहारमधले पश्चिमेकडील जिल्हे हे तिचे प्रधान क्षेत्र आहे.

भोजपुरी भाषेच्या आदर्श भोजपुरी, पश्चिमी भोजपुरी व नागपुरिया अशा प्रमुख तीन बोली आहेत. याशिवाय मधेसी व थारू अशा दोन उपबोलीही आहेत.

भोजपुरीचे व्याकरण – भोजपुरीच्या व्याकरणविषयक काही गोष्टी अशा–

संज्ञा– भोजपुरीत प्रत्येक संज्ञापदाची लघू, दीर्घ व प्लुत अशी तीन रूपे होतात. उदा० घोडा, घोडवा व घोडउअवा; बेटा, बेटवा व बेटउअवा. यांतले पहिले रूप कोशात आढळते. पुढची दोन रूपे लोकांच्या बोलण्यात प्रचलित आहेत. त्यातला वा हा स्वार्थी प्रत्यय आहे. बहुवचनासाठी एकवचनी पदाला नि, न्ह किंवा न हे आगम होतात. कधी कधी लोग व सभ या शब्दांनी समूहसूचक बहुवचन बनवले जाते. कारक विभक्ती बनविण्यासाठी अनेक प्रत्यय जोडण्याची व्यवस्था आहे. उदा० के (कर्म); से, ते, सेंते किंवा कर्ते (करण); खातिर, लाग, किंवा ला (संप्रदान); से किंवा ले (अपादान); क, के किंवा क इ (संबंध) व में किंवा मों (अधिकरण). याव्यतिरिक्त कर्म व अधिकरण यांच्यासाठी एँ व एं हे शुद्ध प्रत्यय आहेत. त्यांच्या पहिल्या आकाराचा लोप होतो आणि अंतिम इ किंवा उ ऱ्हस्व बनतात.

क्रिया – उत्तम पुरुषाचा एकवचनी प्रयोग काव्य सोडल्यास बोलचालीत फार कमी आढळतो. त्याच्या जागी नेहमी बहुवचनाचाच प्रयोग होतो. त्याचप्रमाणे मध्यम पुरुषाच्या एकवचनी प्रयोगही तिरस्कार सूचित करणारा असल्यामुळे त्याचाही बहुवचनीय प्रयोग होतो. आदर सुचविण्यासाठी 'रउरा' हा शब्द जोडून मध्यम पुरुषाच्या जागी उत्तम पुरुषाचा प्रयोग केला जातो.

साहाय्यक क्रियेसाठी किंवा सत्ता दाखविण्यासाठी भोजपुरी भाषेत दोन धातू आहेत– बाड, बाडी किंवा बानी आणि हवीं. यांची वर्तमानकालीन रूपे पुढीलप्रमाणे होतात–

	ए. व.	ब. व.	ए. व.	ब. व.
उत्तम पु.	(बाडो)	बाड़ी, बानी	(हवों)	हवीं
मध्यम पु.	बाड, बाडे	बाड़	हवे	हव
प्रथम पु.	बा, बाडे	बाड़न	हा, हवे	हवन

भूतकालीन रूपे अशी–

उत्तम पु.	रहलों	रहली	×	रहल्यूं
मध्यम पु.	रहले, रहलस	रहल	रहली, रहलिस	रहलुं
प्रथम पु.	रहल, रहले.	रहलम	रहली	रहलिन

मुख्य क्रियापदांची रूपे साध्या पद्धतीने तयार होतात. वर्तमान काल दोन प्रकारचा होतो. एक साधारण धातूपासून बनतो व दुसरा ल प्रत्यय लावून होतो. प्रथम पुरुषाची साधारण वर्तमानकालीन रूपे देखे–देखसि, देखसु किंवा देखस (ए. व.) देखन किंवा देखनी (ब. व.) अशी होतात; तर दुसरी रूपे देखला–देखेला (ए. व.) देखले-देखलन-देखलनी किंवा देखेले-देखेलन-देखेलनि (ब. व.) अशी होतात. भूतकालासाठी ल प्रत्यय जोडला जातो. उद. देखले-देखलस किंवा देखलसि = त्याने पाहिले; देखलन किंवा देखलनि = त्यांनी पाहिले. भविष्यकाळसूचक 'ब' प्रत्यय उत्तम व मध्यम पुरुषांसाठी आणि 'ह' प्रत्यय प्रथम पुरुषांसाठी लागतो. भूतकालातील क्रियापदांची काही परिवर्तने अनियमितही होतात. उदा०–

करल (करणे) . . . . . करल किंवा कइल;
मर (मरणे) . . . . . मरल किंवा मूअल;
जाईल (जाणे) . . . . . गइल;
देल (देणे) . . . . . दिहल, देल;
होऊल (होणे) . . . . . भइल.

भोजपुरी साहित्याचा क्रमबद्ध इतिहास सांगणे, ही कठीण गोष्ट आहे. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी म्हणतात, की काही लोकगीते व लोकगाथा सोडल्यास भोजपुरीमध्ये प्रयत्नपूर्वक एखाद्या साहित्याची सृष्टी झालेली नाही. डॉ. हार्नली व डॉ. ग्रियर्सन यांचेही मत असेच आहे. अनेक संतकवींनी भोजपुरीत काव्यरचना केलेली असली, तरी तिचे अधिकांश साहित्य लिखिता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ऐवजी मौखिकच आहे. मात्र हे मौखिक साहित्य विपुल आहे. उपलब्ध भोजपुरी साहित्याची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल– संतसाहित्य, लोकसाहित्य व आधुनिक साहित्य. या तीन्ही प्रकारांचे संक्षिप्त विवरण असे–

(१) **संतसाहित्य**– सर्वांत प्रथम संत कबिराच्या काही कविता भोजपुरीत उपलब्ध होतात. त्यांपैकी एक नमुना असा–

कनवा फराय जोगी जटवा बढ़वलें,
दाढी बढाय जोगी होई गइलें बकरा।
कहहिं कबीर सुनो भाई साधो,
जम दरवजवा बान्हल जैबे पकरा।

भावार्थ– कानफाटे बनून जोगी व्हा. जटा-दाढी वाढवून बकऱ्यासारखे व्हा. कबीर म्हणतो, की यम तुम्हांला पकडून आपल्या दरवाज्यात बांधल्यावाचून राहणार नाही.

जायसीचीही काही कविता भोजपुरीत आढळते. त्याची भाषा अवधी असली, तरी तिच्यावर भोजपुरीची छाप निश्चित आहे. तुलसीदासाच्या रामायणातही भोजपुरीचे काही प्रयोग आढळतात. कबिराचा शिष्य धर्मदास, त्याचप्रमाणे शिवनारायण, धरनीदास, लक्ष्मीसखी, बुलाकीदास, इ. कवींनी भोजपुरीमध्ये बरीच पद्यरचना केली आहे. कबीरपुत्र कमाल याचीही काही काव्यरचना भोजपुरीत आहे, तिच्यातला एक नमुना–

समझ बूझ दिल खोज पिआरे। आसिक हो के सोना का ।।
जिन नयनों से नींद गँवावल। तकिया लेप बिछवन का ।।
रूखा सूखा राम के टुकडा। चिकना अबर सलोना का ।।
कहत कमाल प्रेम के मारग। सीस देइ फिर रोना का ।।

भावार्थ– हे प्रिय माणसा, जाणीव धरून आपल्या अंतरात शोध घे. एकदा प्रेमात पागल झाल्यानंतर आता झोपणे कशाचे? तुझे डोळे झोपेला विसरले. आता तुला अंथरूण, पांघरूण आणि उशी कशासाठी हवी? रामाने दिलेला ओला-कोरडा तुकडाच जर खायचा, तर मीठ आणि तूप यांची गरज काय? कमाल म्हणतो, की अरे भाई, प्रेमाच्या मार्गात एकदा शिर दिलेस मग आता रडणे कशासाठी?

(२) **लोकसाहित्य**– भोजपुरी लोकसाहित्य प्रामुख्याने चार भागांमध्ये विभक्त केले जाते. त्यांची नांवे– लोकगीत, लोकगाथा, लोककथा व प्रकीर्ण.

लोकगीत– याचेही सामान्यपणे पाच विभाग होतात–(१) संस्कारगीते (२) ऋतुगीते (३) जातिगीते (५) व्रतगीते व (५) क्रियागीते. संस्कार गीते म्हणजे पुत्रजन्म, मुंडण, यज्ञोपवीत (उपनयन), विवाह व गवना (द्विरागमन) याप्रसंगीं गायिली जाणारी गीते होत.

पुत्रजन्माच्या वेळी गायिल्या जाणाऱ्या गीतांना सोहर, सोहिलो किंवा मंगल म्हणतात. सोहरगीते प्राय: स्त्रियांनी रचलेली असतात. त्यांपैकी एक नमुना असा–

सासु जे भेजेलि नउनिया, तननदि बरिनिया हूरे।
ललना गोतिनि अपने प्रभु जाई, गोतिनिया हमही पाइच रे ।।
सासु जे आवेलि गवइत, ननदि बजवइत रे।
ललना गोतिनि आवेलि बिसाधल, गोतिनि के घर मे सोहर रे ।।
सासु लुटावेलि रुपैया, तननदि मोहरवा रे।
ललना गोतिनि लुटावेलि बनउखा, गोतिनिया फेरिहें पाइच रे ।।
सासु के डासलि खटियवा, ननदि के मचियवा हूरे।
ललना गोतिनि के पलंग रेसमिया, गोतिनिया फेरिहें पाइच रे ।।
सासु के दिहलि चुनरिया, त ननदि पियरिया हूरे।
गोतिनि के लहरा पटोरवा, गोतिनिया फेरिहें पाइच रे ।।

भावार्थ– सासूने न्हाव्याच्या स्त्रीला पाठविले, तर नणंदेने वारी (द्रोण–पत्रावळी लावणारा)च्या स्त्रीला पाठविले. पण दायादाची स्त्री स्वत: आली. हे प्रियकरा, मला हे सर्वांचे ऋण फेडले पाहिजे. सासू गात गात येते आहे. नणंद बाजा वाजवीत वाजवीत येते आहे. पण दायादाची स्त्री रागावून येते आहे. कारण माझ्या घरी सोहर गीते गायिली जात आहेत. हा मंगल प्रसंग पाहून ती मत्सराने जळते आहे. या पुत्रजन्मोत्सवाच्या वेळी सासू रुपये लुटवीत आहे, नणंद मोहरा लुटवीत आहे; पण दायादाची बायको कापसाच्या बिया लुटवीत आहे. खरे तर, या वेळी तिने माझे पूर्वीचे उसने वाण फेडायला हवे होते. शिशूच्या मातेने सासूसाठी खाट मांडली, नणंदेसाठी मंचक ठेवला; पण दायाद स्त्रीसाठी तिने रेशमाचा पलंग पुढे केला. कसेही असो; तिला आपल्या दायाद स्त्रीचे ऋण फेडायचे होते. तिने सासूला चुनडी दिली, नणंदेला पियरी दिली; पण दायाद स्त्रीला रेशमी साडी नेसवली. अशा प्रकारे शिशूच्या मातेने उपकार करणाऱ्यांचे तर ऋण फेडलेच; पण अपकार करणाऱ्याविषयीही आपली सद्‌बुद्धी व्यक्त केली.

विवाहगीतांपैकी एक गीत असे–

कोठा उपर कोठरी रचि महला उठाओ
ताहि पइसि सुतेले कवन बाबा सुख नीनि रे ।।
आओ धनि बेनिया डोलाओ, पइसि जगावेली कवन बेटी,
बाबा नीन भल आयो, राजा दुआरे भइले ठाढ़ रे ।।
राउर नगर छेकइले, पहिन कवन बाबा रे धोतिया;
करू ना समधिया से मिनती जिनि अपने से आयो रे ।।
बाबु नयो भइया नयो हम कबही ना नयो;
बेटी हो कवन बेटी, कारने सीस आजु नवायो रे ।।

भावार्थ– दालनाच्या वर आपल्या महालात एक पुरुष सुखनिद्रा घेत आहे. तो आपल्या पत्नीला म्हणतो, की 'पंखा चालव.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एवढ्यात त्याची मलगी येऊन त्याला जागवते आणि म्हणते, "बाबा तुम्हांला झोप कशी येते ? दारात वरातीचे लोक येऊन उभे आहेत. त्यांनी आपले घर घेरून टाकले आहे. तुम्ही धोतर नेसून आपल्या व्याह्याकडे जा आणि त्या मंडळींना शांत राहण्याविषयी प्रार्थना करा." यावर बाप म्हणतो. "मुली, माझा मुलगा त्यांची प्रार्थना करील. मी आजवर कोणापुढे मस्तक नमविले नाही. पण मुली, तुझ्यामुळे मला आज मान वाकवावी लागणार आहे."

ऋतुगीतांमध्ये कजली, होरी, चैता, बारहमासा, इ. गीते येतात. चैता गीते ही बरीचशी शृंगारिक असतात; तर बारहमासा गीते विरहप्रधान असतात.

जातिगीतात काही जातिविशिष्ट गीते येतात. अहीर लोक मुख्यत्वे विरहागीते गातात. ते पावसाळ्याच्या दिवसांत व लग्नकार्यादी शुभप्रसंगी विरहा गीते गाऊन श्रोत्यांचे भरपूर मनोरंजन करतात. त्यांच्या गीतांपैकी एक नमुना असा—

पुरइन बिनवेलि एकल राम के; दहवा में परलीं अकेलि ।
पतवा तूरि तूरि जाला भोज-सखा; फूल चढे तेकर महादेव ।।

अर्थ – कमालिनी रामाला प्रार्थना करते, की मी तलावात एकटी पडले आहे. रामाने तिची प्रार्थना ऐकली. (त्या दिवसापासून) कमलपत्र हे भोजनासाठी पवित्र समजले जाऊ लागले आणि कमलपुष्प शंकराच्या मस्तकावर वाहिले जाऊ लागले.

अहिरांप्रमाणे दोसाध लोक (पूर्वास्पृश्य) पचरा गीते गातात. चांभार लोक डफरा व पिपीहरी गीते गातात. कहार, कहरुवा, तेली कुल्हू व धोबी हुडुक गीते गातात.

व्रतगीते ही निरनिराळ्या व्रतांच्या प्रसंगीं गायिली जातात. उदा० भाद्रपदातले बहुला व्रत, कार्तिकातले षष्ठीमातेचे व्रत, शीतला व्रत, नागपंचमी व्रत, पिडिया व्रत, सूर्यषष्ठी व्रत इत्यादी.

क्रियागीते म्हणजे शेतीतील कष्ट हलके करणारी गीते होत. दळताना गायिल्या जाणाऱ्या गीतांना जँतसार गीत, लावणीच्या गीतांना रोपनी गीत व निंदणी-खुरपणीच्या गीतांना सोहनी गीत असे म्हणतात.

लोकगाथा – ज्यातली कथा प्रदीर्घ असते, त्या कथानकाला लोकगाथा म्हणतात. भोजपुरी भाषेत लोरकी, विजयमल, नयकवा बनजारा, भरथरी, गोपीचंद, सोरठी आणि आल्हा या लोकगाथा प्रसिद्ध आहेत. या सर्वांत आल्हाची लोकप्रियता विशेष आहे.

लोककथा – उपदेशकथा, हास्यकथा, व्रतकथा, प्रेमकथा आणि सामान्यकथा अशा वर्गवारीने शेकडो लोककथा भोजपुरी भाषेत मौखिक परंपरेने चालत आल्या आहेत. यांची कथनपद्धती चंपूसारखी गद्य-पद्यमिश्रित असते. अशा बहुतेक कथांचे मूलरूप संस्कृत कथासाहित्यात आढळते.

प्रकीर्ण – प्रकीर्ण साहित्यात लोकोक्ती, म्हणी, सुभाषिते; तसेच घाघ व भड्डुरी यांच्या उक्ती व म्हणी. अशा प्रकारचे वाङ्मय येते. भोजपुरीतले काही वाक्प्रचार पुढीलप्रमाणे आहेत –

१ पाताल खिलना = फार दूर निघून जाणे.
२ फिरहिरी होना = एखाद्या कार्यात निमग्न होणे.
३ तरवट में आग लगना = क्रोधाने लालबुंद होणे.
४ हाथें दही जामना = कोणी मारले तरी न रागावता चूप बसणे.
५ बुढऊ के खाईल अवरु नाव के भराइल = म्हाताऱ्याचे खाणे व नावेचे बुडणे दोन्ही सारखी.

(३) आधुनिक साहित्य – भोजपुरी साहित्यात आजही गद्यापेक्षा पद्याचाच भाग अधिक आहे. गद्य अजून प्रारंभिक अवस्थेतच आहे. सांप्रत अनेक कवी भोजपुरी भाषेत काव्य रचीत आहेत. त्यांमध्ये बिसराम यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी पुष्कळ विरहा गीते लिहिली आहेत. बाबू रामकृष्ण वर्मा यांनी विरहा-नायिकाभेद नावाचे काव्य लिहिले आहे. दूधनाथ उपाध्याय यांचे भरती के गीत, भूकंपपचीसी व गोविलापछंदावली या नावांचे तीन काव्यग्रंथ प्रसिद्ध आहेत. पं. महेंद्र मिश्र यांनी जी हजारो गीते रचली, ती पूर्वी या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांमध्ये महेंद्रमंगल हे विशेष लोकप्रिय झाले आहे. श्री. रघुवीरशरण यांनी बटोहिया नावाची गीते रचली असून, त्यांचा भोजपुरी प्रदेशात खूप प्रचार आहे. श्री. रामविचार पांडेय हे भोजपुरी प्रदेशातले ग्रामीण कवी आहेत. त्यांचा एक कवितासंग्रह विनिया व बिचिया या नावाने प्रसिद्ध झाला आहे. श्री. शामविहारी तिवारी हे शृंगारपूर्ण कविता लिहिण्यात सिद्धहस्त आहेत. देहाती दुलती या नावाने त्याचे तीन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. श्री. चंचरीक यांची ग्रामगीतांजली उल्लेखनीय आहे. भोजपुरी समाजात विवाहप्रसंगी वरपित्याला आणि वरपक्षाला काव्यरूप शिव्या देण्याची पद्धती आहे. चंचरीक यांना ही रूढी बंद व्हावी, असे वाटून त्यांनी त्याच प्रसंगी गाण्यासाठी राष्ट्रीय गीते रचिली आहेत. कवी अशांत यांची कविता भोजपुरी पत्रिकेत प्रकाशित होत असते. श्री. रामनाथ पाठक यांना भोजपुरी कवींमध्ये एक विशेष स्थान आहे. त्यांच्या कवितेत नव्या युगाची चेतना दिसते.

श्री. अवधविहारी सुमन हे भोजपुरीतले आद्य लघुकथालेखक समजले जातात. त्यांनी बऱ्याच कथा लिहिल्या असून, त्या लोकप्रिय झाल्या आहेत. कथाक्षेत्रातले दुसरे नाव श्री. राधिकादेवी श्रीवास्तव हे होय. भोजपुरीत नाटक लिहिण्याचा पहिला मान पं. रविदत्त शुक्ल यांना आहे. त्यांचे देवाक्षरचरित्र नामक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाटक प्रहसनवजा असून, त्यात लोकरंजनाचा भाग बराच आहे. श्री. राहुल सांकृत्यायन यांनी भोजपुरीत आठ नाटके लिहून त्यांच्या द्वारे समाजवादी सिद्धांतांचा प्रचार केला आहे. पं. गोरखनाथ चौबे यांनी उलटाजमाना नामक नाटक लिहून समाजातल्या उच्छृंखलपणावर टीका केली आहे. श्री. वीरेन्द्र किशोरसिंह यांनीही एकांकी नाटके लिहिण्यात बरेच यश मिळविले आहे. [भो. उ. सा.; भो. क. का.; भो. ग्रा. गी.]

भोजपूर (१) बिहार राज्यातील शाहाबाद जिल्ह्यातील एक गाव. प्राचीन काळातील पुराना भोजपूर व नंतरच्या काळातील नया भोजपूर या दोन्ही जवळजवळ असलेल्या गावांना मिळून सांप्रत भोजपूर असे म्हणतात. पूर्वी या गावाजवळून गंगा नदी वाहत होती. परंतु आता ती उत्तरेला आठ-नऊ मैल दूर हटली आहे. एका काळी हे गाव फार भरभराटलेले होते.ते चौदा कोस पसरलेले होते. 'बावन गली, तिरपन बजार, दिया जले छप्पन हजार' ही उक्ती आजही तिथल्या लोकांच्या मुखी आहे. या उक्तीनुसार या गावात त्रेपन्न मोठ्या सडका होत्या, बावन्न गल्ल्या होत्या आणि त्यात छप्पन्न हजार कुटुंबे राहत होती.

भोजपूर हे नाव माळव्याचा राजा भोज याच्या नावावरून पडले आहे. राजा भोजाने राजपुतांच्या साहाय्याने या प्रदेशावर आक्रमण केले व इथल्या चेरो आदिवासींना पराभूत करून तिथे आपले राज्य स्थापन केले, असे सांगतात.

इथे भोजाने बांधलेले मंदिर, महाल, नाट्यगृह, सरोवर, महाराज विक्रमादित्याचा महाल, सिंहासनबत्तिशीत सांगितलेली सिंहासन पुरलेली जागा, विक्रमादित्याच्या नवरत्नांचे सभागृह, इ. स्थाने अजून इथले वृद्ध लोक दाखवतात.

पुराना भोजपूर या गावाचा याहून एक वेगळा इतिहास आहे, तो असा– माळव्यातील धारानगरीचा परमारवंशी राजा भोजदेव (इ. स. १००५ ते १०५५) याने पूर्वेकडील प्रदेश जिंकले होते. या विजयाप्रीत्यर्थ त्याने गंगेच्या तीरावर हे गाव वसवले होते. त्याच्या वंशातील अर्जुनवर्मा (इ.स. १२२३) याच्या कारकीर्दीपर्यंत परमारांच्या पूर्वेकडील प्रदेशाची राजधानी इथे होती. पुढे इ. स. च्या १६ व्या शतकापासून इ. स. १७४५ पर्यंत इथे डुमरांव राजवंशाची राजधानी होती. डुमरांवचे राजे हे परमारवंशाचे प्रतिनिधी समजले जातात. या राजांची सत्ता या भागावर इ. स. १८५७ पर्यंत अक्षुण्ण होती. त्या काळी कुंवरसिंह नावाच्या वीरपुरुषाने इंग्रजांविरुद्ध बंड उभे केले. पण अखेर त्यात कुंवरसिंहाचा पराभव झाला आणि त्या भागावर इंग्रजांची सत्ता स्थापित झाली. [भो. क. का.]

(२) भोपाळपासून जवळच कलियासोत नदीच्या काठी हे लहानसे गाव वसलेले आहे. तिथे एका टेकडीवर एक शिवमंदिर आहे. त्याचे प्रवेशद्वार सुमारे ५० फूट उंच व १५ फूट रुंद आहे. त्याच्या दोन्ही अंगांना चवरी धारण करणाऱ्या स्त्रियांच्या आकृती कोरलेल्या आहेत.

हे मंदिर जमिनीत खोल बांधलेले असून, गाभाऱ्यात जाण्यासाठी खाली उतरावे लागते. आत गेल्यावर एका विशाल चबुतऱ्यावर मोठे शिवलिंग दिसते. त्याची उंची साडेसात फूट आहे. त्याचा पृष्ठभाग चांगला चमकदार आहे. हे मंदिर इ. स. च्या ११ व्या शतकात भोजराजाने बांधले असावे.

भोजा भगत (१७८५–१८५० इ. स.) एक गुजराती संतकवी. हा मूळचा काठियावाडमध्ये राहणारा असून, जातीने कुणबी होता. शिक्षणाचे कोणतेही संस्कार नसतानाही याने आपले अनुभव योगाच्या परिभाषेत व्यक्त केले आहेत. बालपणीच एका सिद्ध पुरुषाकडून याला ज्ञानदीक्षा मिळाली. मग याने बरीच वर्षे तप केले. याच्या अंगी खरे साधुत्व बाणले आहे की नाही, हे पाहण्यासाठी विठोबा दिवाणजी नावाच्या एका अधिकाऱ्याने याचा अतोनात छळ केला, असे सांगतात.

भोजाची सलैयाख्यान, भक्तमाल, होरी, चाबखा व स्फुटपदे ही काव्यरचना आहे. याचे चाबखा उर्फ उपदेशपर फटके हे फार प्रसिद्ध आहेत. याची भाषा रांगडी असून, कर्णकठोर आहे. पण तिच्यात मर्मभेद करण्याची शक्ती आहे. [भा. यु. लि.; गुज. सा. इ.; म. ज्ञा. को.]

भोटताल एक लोकनृत्य. आसाम व भूतान प्रदेशातील डोंगराळ भागात राहणारे भूतिया लोक हे नृत्य करतात. हे गंभीर असते. याला ढोल व झांजा यांची साथ असते. नृत्यात एक स्त्री व दोन पुरुष भाग घेतात. गुडघ्यापर्यंत मांडचोळणा घालून नर्तकी नृत्याला प्रारंभ करते. नर्तकीच्या दोन्ही बाजूंना दोन पुरुष उभे असतात. त्यांतील एक मानवी वेषात, तर दुसरा दानवी वेषात असतो. दानवी वेषातल्या व्यक्तीच्या वस्त्रांना पंख असतात. नर्तकीच्या डोक्यावर कुंडलयुक्त मुकुट असतो. कुंडलांना तारा लावलेल्या असतात. या दोन तारांना धरून नर्तकी नृत्य करते. दोन्ही पुरुष आपल्या जागीच उभे राहून विविध व विचित्र अंगविक्षेप करीत राहतात. [भा. लो. नृ.]

भोमियाँ राजस्थानातील एक ग्रामदेव. याला भय्याजी असेही म्हणतात. भूस्वामी अथवा भूमिप या शब्दावरून भोमियाँ हा शब्द बनला असावा. कारण भोमियाँ हे लोक पूर्वी त्या त्या प्रादेशिक विभागाचे स्वामी म्हणून ओळखले जात असत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कदाचित एखाद्या प्रजाहितदक्ष भोमियाँच्या मृत्यूनंतर त्याला हे देवपद प्राप्त झाले असावे. वद्य षष्ठी आणि चतुर्दशी या दोन तिथींना भोमियाँची सर्वत्र पूजा होते. त्यावेळी रात्री जागर करतात. [मरु–भारती, ऑक्टोबर १९५५]

भोराई एक देवता. हिचे स्थान महाराष्ट्र प्रदेशाच्या कुलाबा जिल्ह्यातील सुधागड नामक किल्ल्यात आहे. ही देवी म्हणजे विंध्यवासिनी होय, अशी अनेकांची श्रद्धा आहे. त्यांमुळे या स्थानाला महत्त्व प्राप्त झाले आहे. या देवीसंबंधी एक दंतकथा सांगतात, ती अशी–

सावर्णी मन्वंतरात देवीने महिषासुराचा वध केल्यावर, ती श्रमनिवारणसाठी सप्तशृंगाकडे निघाली असता वाटेत काही काळ तिने इथे मुक्काम केला. इथेच भृगुऋषी तपश्चर्या करीत होता. देवी पुढे निघाली, असे पाहून भृगूने तिची इथे प्रतिष्ठापना केली. भृगूने जिथे तप केले ती गुहा तिथे आजही दाखवितात. [पुरुषार्थ, डिसेंबर १९६३; म. जि.–कुलाबा]

भोलानाथ उत्तर प्रदेशातील एक ग्रामदेव. तिथल्या डोंगराळ भागात याची ठाणी असतात. याच्या नावाने झोपडीच्या एका कोपऱ्यात त्रिशूल ठेवलेला असतो. इथले लोक, विशेषत: माळी, एखादे संकट गुदरले असता याची पूजा करतात. याच्या देवत्वासंबंधी एक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी–

अलमोड्याच्या राजाचा हा मुलगा. ज्ञानचंद्र नावाचा त्याला एक भाऊ होता. ज्ञानचंद्राने याला व याच्या गरोदर पत्नीला विश्वासघाताने एका माळ्याकरवी ठार मारले. त्यानंतर ते दांपत्य भूतयोनीत गेले व माळ्यांना छळू लागले. पुढे त्या लोकांनी भोलानाथाची पूजा करायला प्रारंभ केला आणि त्यामुळे त्याला देवत्व प्राप्त झाले. [पॉ. रि. फो. नॉ. इं.]

भोवरा दोरी गुंडाळून भूमीवर गरगर फिरविण्याचा एक लाकडी निमुळता गोळा म्हणजे भोवरा होय. हा शब्द भ्रमरक या संस्कृत शब्दावरून बनला आहे. भोवरे दोन प्रकारचे असतात. एक साधा व दुसरा जंगी. साध्या भोवऱ्याचा आकार शंखाप्रमाणे म्हणजे वर जाड आणि खाली निमुळता होत गेलेला असतो. याच्या निमुळत्या टोकाला लोखंडाचा एक लहानसा खिळा मारलेला असतो. त्याला आरी असे म्हणतात. आरीपासून वर जाळी (दोरी) गुंडाळीत नेऊन भोवरा एका विशिष्ट प्रकाराने जमिनीवर फेकला म्हणजे तो फिरू लागतो. भोवऱ्याला गुंडाळलेली जाळी निसटून पडू नये म्हणून त्याला खाची केलेल्या असतात. आरीप्रमाणेच भोवऱ्याच्या डोक्यावर एक बोंड केलेले असते, त्याला मोगरी म्हणतात. मोगरीपासून खाचीपर्यंत भोवऱ्याला निरनिराळे रंग दिलेले असतात. या साध्या भोवऱ्याने निरनिराळे खेळ खेळले जातात. त्यात गुच्चापाणी, नादानादी, इ. विविध प्रकार आहेत.

जंगी भोवऱ्याला मध्ये भोपळ्याप्रमाणे लहान गोल असतो, गोलावर दांडी असते. दांडीवर कडी असते. गोलाच्या खाली थोडा निमुळता भाग असतो. हा निमुळता भागच जमिनीवर फिरतो. दांडीवर गुंडाळलेली जाळी घसरू नये, म्हणून दांडीला वळ पाडलेले असतात.

या भोवऱ्याचा मधला गोल सामान्यपणे पोकळ असतो. त्यामुळे फिरताना त्यातून आवाज निघत असतो. तो जितका अधिक पोकळ तितका त्यापासून निघणारा आवाज अधिक असतो. जंगी भोवऱ्यातही अनेक प्रकार असतात.

हा भोवरा उलटा म्हणजे दांडीकडील बाजूने फिरविला की त्याला गौळण असे म्हणतात. याच प्रकारात हा फिरत असताना त्याची गती मंदावली म्हणजे तो सरपटू लागतो. त्याच्या या, फिरण्यास सारवणे असे म्हणतात.

प्राचीन मराठी वाङ्मयात भोवऱ्याच्या खेळावर अनेक रूपके आढळतात. त्यांपैकी एकनाथांचे एक रूपक आहे–

> **खेळे भोंवरा गे बाई भोंवरा । राधिकेचा नवरा ।।ध्रु०।।**
> **माझ्या भोंवऱ्याची अरी । सप्तपाताळे त्यावरी ।**
> **फिरे गरगरा ।।**
> **भोंवरा बनला निर्गुणीं । त्यावर चंद्र सूर्य दोनी ।**
> **जाळी शंकर गवरा ।।**
> **एकाजनार्दनी खेळिया । भोंवरा खेळून पाहे चेलिया ।**
> **नाद देतो हरिहरा ।।**

प्राचीन वाङ्मयाप्रमाणेच अर्वाचीन मराठी वाङ्मयातही भोवऱ्यावर अनेक कविता रचल्या गेल्या आहेत. [ज्ञा. ज्ञा. को.]

भोसले राजवंश महाराष्ट्रात राज्य करणारा एक क्षत्रिय राजवंश. हा राजवंश राजस्थानातील शिसोदिया वंशातूनच उगम पावला, असे निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. अलाउद्दीन खिलजीने इ. स. १३०३ मध्ये चितोडगड जिंकला, त्या वेळी तिथला राजा सिसोदिया घराण्यातील राणा लक्ष्मणसिंह मारला गेला. त्याचा पुत्र अजयसिंह याला सज्जनसिंह व क्षेमसिंह नावाचे दोन पुत्र होते. इ. स. १३२० साली सज्जनसिंह दक्षिणेत आला. त्याने बहमनी राज्याचा संस्थापक हसन गंगू याला मदत केली. त्याबद्दल हसन गंगूने त्याला देवगिरी प्रांतात जहागिरी दिली. सज्जनसिंहाचा पुत्र राणा दिलीपसिंह याने विजयनगरशी झालेल्या युद्धात बहमनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुलतानांना साह्य केले व पराक्रम गाजवला, म्हणून त्यालाही जहागिरी मिळाली. दिलीपसिंहाचा नातू भैरोजी यानेही स्वपराक्रमाने मुधोळ व त्याच्या आसपासची ८४ गावे एवढी जहागिरी मिळवली. त्याला भोसाजी असेही म्हणत. त्यावरूनच भोसले हे कुलनाम प्रचलित झाले. भोसाजीचा नातू उग्रसेन याला दोन पुत्र होते. इ. स. १४६० पासून मोठा भाऊ करणसिंग मुधोळची जहागिरी व धाकटा भाऊ शुभकृष्ण देवगिरीची जहागिरी सांभाळू लागला. तेव्हापासून या घराण्याच्या दोन शाखा झाल्या. पुढे मुधोळचे घराणे स्वतःला घोरपडे म्हणवून घेऊ लागले. देवगिरीच्या धाकट्या पातीचे भोसले हेच नाव चालू राहिले.

या भोसले घराण्यातील पुष्कळ पुरुष नशीब काढण्यासाठी निजामशाहीत आले. त्यांच्यापैकी काहीजणांना दौंडजवळ हिंगणी, बेरडी, देऊळगाव, इ. गावांच्या पाटीलक्या मिळाल्या, तर काही जणांनी स्वपराक्रमाने जहागिरी मिळवल्या. शिवाजीमहाराजांचा पणजा बाबाजी हा भीमेच्या काठी असलेल्या पांडेपेडगावचा जहागिरदार होता. त्याचा पुत्र मालोजी याचा जन्म इ. स. १५५० मध्ये झाला. तो पराक्रमी असल्यामुळे निजामशहाने त्याला आपल्या पदरी ठेवले व बरीच गावे दिली. लवकरच तो मोठा मातबर सरदार झाला. त्याचा भाऊ विठोजीदेखील पराक्रमी निघाला.

शहाजी – इ. स. १५९४ मध्ये मालोजीला एक पुत्र झाला. त्याचे नाव शहाजी. त्याच्या दुसऱ्या पुत्राचे नाव शरीफजी होते. शहाजी १३ वर्षांचा असताना मालोजी निजामशाहाच्या बाजूने आदिलशहाशी लढत असता इ. स. १६०७ मध्ये इंदारपूर येथे मरण पावला. त्याची बायको उमा ही फलटणच्या निंबाळकर घराण्यातली मुलगी होती. तीच शहाजीची आई होय. मालोजीच्या मृत्यूनंतर शहाजीचे संगोपन उमाबाई व चुलता विठोजी यांनी केले. त्या वेळी निजामशाहीत लखुजी जाधव नावाचा एक प्रतिष्ठित सरदार होता. त्याची मुलगी जिजाऊ हिच्याशी शहाजीचे लग्न इ. स. १६१० साली झाले. तो सुमारे १८ वर्षांचा झाला, तेव्हा निजामशाहाने त्याला मालोजीची जहागिरी दिली. इ. स. १६२०–१६२४ या काळात शहाजीने निजामशाहीचा आधारस्तंभ मलिकंबर याच्या हाता खाली नोकरी केली. इ. स. १६२४ मध्ये मोगल व विजापूरकर यांनी मिळून निजामशाहीवर स्वारी केली. त्या वेळी भातवडीच्या लढाईत शहाजीच्या पराक्रमामुळे निजामशाहीचा जय झाला. पण शहाजीचा भाऊ शरीफजी त्या लढाईत मारला गेला.

पुढे शहाजीचे मलिकंबरशी बिनसल्यामुळे शहाजी विजापूरला गेला. आदिलशहाने त्याचे चांगले स्वागत केले आणि त्याला सरलष्कर बनवून पातशाही कारभार त्याच्यावर सोपवला. शहाजीने पुणे परगणा व पाटसकडील मुलूख निजामशाहीकडून जिंकून घेतला आणि मलिकंबरचाही पराभव केला.

शहाजी भोसले

मुधोजी फलटणकर याची विजापूरवरील स्वारी त्याने परतवली आणि दक्षिणेत केरळपर्यंत मोहीम काढून पुष्कळ लूट मिळवून आणली. पण लवकरच इब्राहिम आदिलशाहा मरण पावला आणि विजापूरच्या दरबारात कडव्या मुसलमानांचे वर्चस्व झाले. तेवढ्यात निजामशाहीवर मोगलांची स्वारी येणार अशी वार्ता आली. मलिकंबर इ. स. १६२६ त मरण पावला होता. म्हणून निजामशाहाने शहाजीला आपल्या रक्षणासाठी बोलावले. इ. स. १६२८ साली तो तिकडे गेला. त्याच सुमारास त्याचा सासरा लखुजी जाधव मोगलांकडून निजामशाहीत परत आला होता. पण इ. स. १६२९ मध्ये त्याचा खून झाला. त्यामुळे शहाजी संतापला आणि इ. स. १६३० मध्ये मोगलांचा मनसबदार बनला. मोगल बादशाहाकडून त्याला पाच हजारी मनसब, मानाचा पोषाख, रत्नजडित खंजीर, निशाण, घोडा, हत्ती व दोन लक्ष रुपये (खर्चासाठी) मिळाले आणि जुन्नर-संगमनेरकडील निजामशाही मुलूख घेण्याची कामगिरीही मिळाली. पण लवकरच शहाजीचे मोगलांशी बिनसले आणि त्याने अनेक सरदारांचे साहाय्य घेऊन निजामशाही वाचवण्याचा प्रयत्न सुरू केला. गोदावरी, प्रवरा, नीरा व भीमा या नद्यांच्या परिसरातील मोठ्या प्रदेशावर त्याची सत्ता होती. त्याने ५–७ वर्षे निजामशाहीच्या संरक्षणासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण मोगलांच्या प्रचंड सैन्यापुढे त्याचे काही चालले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाही व इ. स. १६३६ त निजामशाही बुडाली. मग शहाजी पुन्हा विजापूरच्या दरबारात गेला.

जिजाबाईच्या पोटी शहाजीला सहा पुत्र झाले, असे शिवभारतात म्हटले आहे. त्यांपैकी संभाजी व शिवाजी हे दोघेच मोठे झाले. संभाजीचा जन्म इ. स. १६१९ साली दौलताबाद येथे झाला आणि इ. स. १६३० मध्ये शिवनेरी किल्ल्यावर शिवाजीचा जन्म झाला. शहाजीची दुसरी बायको तुकाबाई हिला इ. स. १६२९ साली एक पुत्र झाला, त्याचे नाव एकोजी.

शहाजीला विजापूरच्या दरबारी नोकरी मिळाली तरी इंदापूर, सुपे, पुणे व चाकण या परगण्यांची जहागिरी त्याच्याकडेच राहिली. आदिलशहाने शहाजीला कर्नाटकात बंदोबस्तासाठी पाठवले, तेव्हा त्याने दादाजी कोंडदेव या विश्वासू माणसावर इथला कारभार सोपवला. कर्नाटकात गेल्यावर शहाजीने तिकडल्या बहुतेक पाळेगारांवर स्वाऱ्या करून त्यांचा मुलूख जिंकला. जिंकलेल्या प्रदेशात त्याने वसुलाची उत्तम व्यवस्था लावून दिली. तो स्वतः बंगळूरला राहत असे. त्याचा थोरला मुलगा संभाजीही त्याच्या जवळ होता. आदिलशहाला शहाजीच्या वाढत्या सामर्थ्याची भीती वाटू लागली. त्याच वेळी पुणे प्रांतात शिवाजीने उठावणी सुरू केली होती. त्याला शहाजीची फूस असावी, असा संशय आदिलशहाला येऊ लागला. म्हणून त्याने मुस्ताफाखान नामक सरदाराच्या मदतीने शहाजीला इ. स. १६४८ मध्ये कपटाने कैद केले. तेव्हा संभाजीने मुस्ताफाखानावर हल्ले करून त्याला जर्जर केले. आदिलशहाने मुसेखान नामक सरदाराला शिवाजीच्या बंदोबस्तासाठी पाठविले; पण पुरंदरनजीक खळदबेलसर येथे मराठ्यांची व त्याची हातघाईची लढाई झाली, तीत मुसेखान मारला गेला. पुढील वर्षी आदिलशहाने शहाजीला मुक्त केले, पण त्याला आपल्या जवळच ठेवून घेतले. पुढे गोवळकोंड्याचा सरदार मीरजुम्ला याने कर्नाटकावर स्वारी केली, तेव्हा आदिलशहाने शहाजीला पुन्हा तिकडे पाठवले. शहाजीने मीरजुम्ला याचा पराभव केला व तो कर्नाटकात स्वतंत्रपणे राहू लागला. तो आदिलशहाचे स्वामित्व नावालाच मानीत होता. इ. स. १६५४ मध्ये शहाजीचा मुलगा संभाजी याचे विजापूरचा सरदार अफजलखान याच्याशी भांडण झाले व पुढे तो लवकरच मृत्यू पावला.

छत्रपती शिवाजीमहाराज

इ. स. १६५७ मध्ये शहाजीने संद्रपट्टण येथील डचांचे ठाणे ताब्यात घेतले. इ. स. १६६१ मध्ये त्याने इंग्रजांचे पोर्टोनोव्हो हे बंदरही घेतले. आदिलशहाच्या पदरी असताना शहाजीने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दक्षिणेत शिरे, बाळापूर, होस्कोटे; जिंजी, वेलोर, अर्नी, तंजाऊर, इ. जहागिरी मिळवल्या होत्या. इ. स. १६६४ च्या जानेवारीत शहाजी कर्नाटकात होदेगिरी येथे घोड्यावरून पडून मरण पावला.

शहाजीने निजामशाहीत व आदिलशाहीत जी कामगिरी केली व जो पराक्रम गाजवला, त्यामुळे शहाजहान बादशहालाही त्याची धास्ती वाटू लागली. पुढे कर्नाटकात शहाजीने आपले वर्चस्व स्थापले. तो विलक्षण कर्तबगार होता, यात शंका नाही. पण त्याचे कर्तृत्व परकीय सत्ता टिकवण्यातच खर्ची पडले. स्वतंत्र राज्य स्थापण्याचे कार्य त्याला जमले नाही. ते कार्य त्याचा पुत्र शिवाजी याने केले.

शिवाजी–इ. स. १६४५ साली रोहिडा किल्ला घेऊन शिवाजीने स्वराज्य-स्थापनेला प्रारंभ केला. मावळातील मराठा तरुणांची संघटना करून त्याने अनेक किल्ले घेतले आणि आदिलशाहाच्या अनेक सरदारांचा पराभव करून आपले राज्य वाढवले. पुढे औरंगजेबाने शाइस्तखान, दिलेरखान, जयसिंग यांच्या सारख्या मातबर सरदारांना मोठ्या फौजेनिशी शिवाजीचा बंदोबस्त करायला पाठवले. त्यांच्यापुढे शिवाजीला काही काळ हार खावी लागली. काही महिने त्याला आग्रा येथे मोगलांच्या कैदखान्यातही काढावे लागले. पण तिथून त्याने युक्तीने सुटका करून घेतली. त्यानंतर त्याने आपले बळ वाढवून मोगल व विजापूरकर यांचा बराच मुलूख काबीज केला आणि इ. स. १६७४ मध्ये रायगडावर स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला.

त्यानंतर छत्रपती शिवाजीमहाराजांनी आपले मोर्चे कर्नाटकाकडे वळवले. तो प्रदेश विजापूरकरांच्या ताब्यात होता. मात्र शहाजीराजे मरण पावल्यावर त्यांचा तिसरा पुत्र एकोजी किंवा व्यंकोजी त्याचा कारभार पाहत असे. इ. स. १६७५ मध्ये तो तंजाऊरला जाऊन राहिला व तिथून सर्व कारभार पाहू लागला. शिवाजीमहाराजांनी एकोजीला, विजापूरकरांची ताबेदारी झुगारून स्वराज्याच्या उद्योगात सामील होण्याची विनंती केली, पण त्याने ती मानली नाही. मग महाराजांनी कर्नाटकावर स्वारी करून तो मुलूख जिंकला. पुढे एकोजीनेही त्यांच्याशी सलोखा केला. त्यांनी एकोजीलाच तंजाऊरची जहागिरी बहाल केली.

एवढ्यात औरंगजेबाने आपले सैन्य विजापुरावर पाठवले. तेथील वजीर सिद्दी मसाऊद याने शिवाजीमहाराजांची मदत मागितली. त्याच सुमारास त्यांचा थोरला मुलगा संभाजी बंड करून मोगलांकडे गेला होता. पण लवकरच तो परत आला व महाराजांनी त्याला पन्हाळगडावर कैदेत ठेवले. मग त्यांनी औरंगाबाद, जालना या भागात स्वारी करून मोगलांना सतावून सोडले. त्यामुळे औरंगजेबाचा सेनापती दिलेरखान याला विजापूरकरांशी तह करून परत जावे लागले.

शिवाजीमहाराज इ. स. १६८० मध्ये मृत्यू पावले. त्या वेळी त्यांच्या ताब्यात दमणपासून गोव्यापर्यंत पश्चिम किनारा आणि पूर्वेकडे पन्हाळगड, सातारा, इंदापूर, चाकण, इ. ठिकाणांवरून जाणारी वाकडी-तिकडी रेषा यांनी मर्यादित असा प्रदेश होता. त्याव्यतिरिक्त कर्नाटकातील कोपळ, बल्लारी, वेरोळ, जिंजी इ. प्रदेशही त्यांच्या ताब्यात होते. (शिवाजीमहाराज पाहा.)

व्यंकोजी–मदुरा व तंजाऊर येथील नायक राजांचे वैर दीर्घ काल चालू होते. तंजाऊरच्या कारभाऱ्याने विजापूरची मदत मागितली तेव्हा विजापूरकरांनी शहाजीचा मुलगा व्यंकोजी बंगलूरच्या जहागिरीवर होता, त्याला बंदोबस्तासाठी तंजाऊरकडे पाठवले. त्याने तंजाऊरला जाऊन सगळाच कारभार आपल्या हाती घेतला. तिथल्या जाणत्या लोकांनी त्यालाच राजा बनवले (इ. स. १६७५). आदिलशाहाने त्याला तंजाऊरची जहागीर वंशपरंपरेने दिल्याची सनद पाठवली. व्यंकोजीने तिथे शांतता व सुव्यवस्था स्थापली. रघुनाथपंत हणमंते हा त्या कामात प्रमुख होता. पुढे एकोजीचे व त्याचे बिनसले, तेव्हा रघुनाथपंत शिवाजीमहाराजांकडे गेला व त्याने महाराजांना दक्षिणेत राज्य वाढवण्यास उद्युक्त केले. पुढे एकोजीने विजापूरची ताबेदारी सोडून दिली व शिवाजीमहाराजांच्या वतीने तो तंजाऊर येथे कारभार पाहू लागला. तो शूर व मानी होता. त्याने तंजाऊरला चांगले राज्य केले. त्याची बायको दीपाबाई ही फार चतुर होती. तिनेच एकोजीचे मन वळवून त्याला शिवाजीराजांशी सलोखा करायला लावले. तिच्या पोटी एकोजीला शहाजी, सरफोजी व तुकोजी असे तीन पुत्र झाले. एकोजी इ. स. १६८२ साली मरण पावल्यावर त्या तिघांनीही तंजाऊरला एकामागून एक असे राज्य केले.

संभाजी–शिवाजीमहाराज मृत्यू पावले, तेव्हा संभाजी पन्हाळगडावर कैदेत होता. त्याची आई सईबाई ही निंबाळकर घराण्यातली असून, महाराजांची सर्वांत मोठी बायको होती. संभाजीचा जन्म इ. स. १६५७ त झाला. शिवाजीमहाराजांची दुसरी बायको पुतळा सती गेली. तिसरी बायको सोयराबाई शिर्के कुळातली होती. तिचा मुलगा राजाराम इ. स. १६६१ त जन्मला. सोयराबाईने अष्ट प्रधानांपैकी काहींच्या मदतीने राजारामाला गादीवर बसवण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात संभाजी सुटून आला व सेनापती हंबीरराव मोहिते याच्या मदतीने राजारामाला आणि त्याच्या बाजूचे बाळाजी आवजी व अण्णाजी दत्तो यांना त्याने तुरुंगात टाकले. लवकरच संभाजीने त्यांना सोडले; पण त्यांनी पुन्हा संभाजीविरुद्ध कारस्थाने सुरू केली, तेव्हा तो अतिशय संतापला आणि त्याने बहुतेक सर्व जुन्या मुत्सद्यांना ठार मारले. मग इ. स. १६८१ च्या फेब्रुवारी महिन्यात त्याने स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. संभाजी धाडसी व शूर होता; पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तितकाच अविचारी होता. कविकुलेश नावाच्या एका कनोजी ब्राह्मणावर सर्व विश्वास टाकून तो त्याच्या तंत्राने राज्यकारभार करीत असे. कविकुलेश हा कलुशा या नावाने प्रसिद्ध आहे.

त्या वेळी सिद्दी, पोर्तुगीज व मोगल हे संभाजीचे मुख्य शत्रू होते. औरंगजेब बादशाहा स्वतः मोठी फौज घेऊन दक्षिणेत आला होता. संभाजीने प्रथम सिद्दी व पोर्तुगीज यांच्यावर हल्ले सुरू केले. जंजिरा किल्ला व उंदेरी बेट ही सिद्द्याची ठाणी त्याला सर करता आली नाहीत. पोर्तुगीजांची बरीच ठाणी त्याने उद्ध्वस्त केली. पण पाठीमागून मोगल सैन्य कोकणात शिरल्यामुळे संभाजीला ती मोहीम सोडून परत यावे लागले. त्याने इ. स. १६८४ मध्ये मोगल सैन्याचा पराभव केला. मग औरंगजेबाने विजापूर व गोवळकोंडा या राज्यांकडे मोर्चा वळवला. इ. स. १६८५ ते १६८७ या तीन वर्षांत बादशाहाने ती दोन्ही राज्ये बुडवली व इ. स. १६८८ मध्ये तो पुन्हा मराठ्यांचा नाश करण्यासाठी इकडे आला. त्या मधल्या काळात संभाजी, शिर्के वगैरे सरदारांचा पाडाव करण्यात गुंतला होता.

छत्रपती संभाजी

संगमेश्वर येथे त्याचा तळ पडला असता, औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने अचानक हल्ला करून त्याला बेसावध स्थितीत गाठले व पकडून बादशाहाकडे नेले. त्या वेळी बादशाहाच्या आज्ञेवरून खानाने संभाजी व कलुशा यांची खूप विटंबना केली व त्यांची धिंडही काढली. बादशाहाने संभाजीला असे आश्वासन दिले, की मराठ्यांचा खजिना कुठे आहे ते त्याने सांगितले, त्याला सामील असलेल्या बादशाही सरदारांची नावे सांगितली व इस्लामचा स्वीकार केला, तर त्याला जीवदान मिळेल. संभाजीने ते साफ नाकारल्यावर बादशाहाने त्याचा खूप छळ केला व हाल हाल करून त्याला ठार मारले. कलुशाचीही तीच गत झाली.

राजकारणातली मुत्सद्देगिरी संभाजीजवळ नव्हती. औरंगजेबाचा मुलगा अकबर व मारवाडातील एक राजपूत सरदार दुर्गादास हे औरंगजेबाविरुद्ध संभाजीला मदत करण्यासाठी महाराष्ट्रात येऊन पुष्कळ वर्षे राहिले; पण संभाजीने त्यांचा उपयोग करून घेतला नाही. व्यसने व विलास यांमळे त्याचा पराक्रमही झाकळला होता. कलुशा कबजी हा मंत्र-तंत्र व जादूटोणा करणारा असून, संभाजीच्या विकारवश मनावर त्याने जबरदस्त पगडा बसवला होता. त्याच्या सल्ल्याने वागून संभाजीने सर्वनाश करून घेतला. शेवटी मात्र त्याने विलक्षण बाणेदारपणा व स्वधर्माभिमान दाखवला आणि अत्यंत निर्घृण असे मरण पत्करले. त्याच्या अमानुष वधामुळे सर्व मराठे खवळून उठले आणि सूडाच्या भावनेने शत्रूवर तुटून पडले.

राजाराम – मंभाजीची बायको येसूबाई चतुर व धोरणी होती. संभाजी असतानाच त्याच्या कृत्यांमुळे दुखावलेल्या अनेक मुत्सद्दी मंडळींना परत बोलावून तिने स्वतः राज्यकारभारात लक्ष घातले. तिला ७–८ वर्षांचा मुलगा होता. त्याचे नाव शिवाजी किंवा शाहू असे होते. संभाजीचा वध झाला तेव्हा राजाराम कैदेत होता. त्याला तिने मुक्त करून गादीवर बसवले. संताजी घोरपडे, धनाजी जाधव, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ, रामचंद्रपंत अमात्य, इ. मंडळी त्याच्या भोवती जमा झाली आणि त्यांनी गनिमी काव्याची योजना आखली. मोगलांनी चहूबाजूंनी हल्ले करून प्रतापगड, सिंहगड, पुरंदर वगैरे बहुतेक किल्ले घेतले. त्या वेळी पुष्कळ वतनदार मोगलांना जाऊन मिळाले. शेवटी फितुरीमुळे रायगडही त्यांच्या ताब्यात गेला आणि येसूबाई व शाहू यांना कैद करून बादशाहाकडे नेण्यात आले. त्याने शाहूला सात हजारी सरदार बनवले, पण आपल्या जवळच नजरकैदेत ठेवून दिले.

स्वराज्यात निभाव लागत नाही, असे पाहून राजाराम निवडक मंडळींसह जिंजीला गेला. तिथे गेल्यावर राजारामाने आपल्याला राज्याभिषेक करून घेतला. प्रल्हाद निराजी याला त्याने पंत प्रतिनिधी असा किताब दिला. निळो मोरेश्वर याला प्रमुख प्रधान व संताजीला सेनापती केले. स्वराज्यासाठी सैन्यबळ व द्रव्यबळ गोळा करण्याचे काम त्याने तिथे सुरू केले. महाराष्ट्रात रामचंद्रपंत अमात्य राहिला होता. त्याने सर्व वतनदारांना आश्वासन दिले, की जे वतनदार स्वामिनिष्ठ राहतील त्यांची वतने पूर्ववत चालू राहतील. संताजी-धनाजी यांनी मग मोगल सैन्यावर चौफेर हल्ले सुरू केले. मराठे मोगलांशी समोरासमोर लढत नव्हते. बेसावध फौजेवर हल्ला करून लगेच पांगून जायचे असे त्यांचे तंत्र होते. त्यांनी मोगलांची पुष्कळ रसद मारली. त्यामुळे औरंगजेब त्रासून गेला. मग त्याने झुल्फिकारखानाला जिंजीला पाठवले. त्याने इ. स. १६९१ मध्ये जिंजीला वेढा दिला. पण त्याचे काम सात वर्षे रेंगाळले. शेवटी राजाराम व त्याची मंडळी तिथून निसटून गेल्यावर इ. स. १६९८ मध्ये

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खानाने किल्ला काबीज केला. त्यापूर्वी इ. स. १६९७ साली संताजी व धनाजी यांच्यांतील वैरापायी संताजीचा खून झाला.

महाराष्ट्रात परत आल्यावर राजारामाने सातारा येथे आपली राजधानी स्थापली व धनाजीला सेनापती नेमले. मग त्याने खानदेश, वऱ्हाड या प्रदेशांत मोहिमा सुरू केल्या. परसोजी भोसले याला वऱ्हाड, नेमाजी शिंदे याला खानदेश, खंडेराव दाभाडे याला बागलाण व निंबाळकराला गोदाकाठ असे प्रदेश नेमून दिले. त्याने येसूबाई व शाहू यांना सोडवण्याचा प्रयत्न केला, पण त्याला ते जमले नाही. इ. स. १७०० मध्ये सिंहगडावर तो मरण पावला. त्या वेळी तो ३९ वर्षांचा होता. स्वराज्यरक्षणाची फार मोठी जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली होती. ती त्याने चांगली पार पाडली. त्याला दोन बायका होत्या. त्यांपैकी एक हंबीरराव मोहिते याची मुलगी ताराबाई होती. तिला शिवाजी नावाचा १० वर्षांचा मुलगा होता. दुसरी घाटगे कुळातील राजसबाई. तिला संभाजी नावाचा ३ वर्षांचा मुलगा होता.

राजारामाच्या मृत्यूनंतर संभाजीचा पुत्र शाहू औरंगजेबाच्या कैदेत असल्यामुळे ताराबाईचा पुत्र शिवाजी याला गादीवर बसवण्यात आले. लवकरच औरंगजेबाने वसंतगड, साताऱ्याजवळचा अजिंक्यतारा, पन्हाळा, वर्धनगड, खेळणा, सिंहगड, तोरणा, राजगड, वगैरे किल्ले एकामागून एक सर केले. पण इ. स. १७०५ साली विजापूर प्रांतात वाकिनखेडे येथे पिऱ्या नाईक याने मोठी धामधूम सुरू केली व औरंगजेबाला स्वत: तिकडे जावे लागले. तेवढ्यात इकडे ताराबाईच्या मराठे सरदारांनी बरेच किल्ले परत जिंकून घेतले. त्यामुळे औरंगजेब वैतागला व त्याचे कित्येक सरदार जिकिरीला आले. इ. स. १७०६ साली बादशाहा आजारी पडून अहमदनगर येथे जाऊन राहिला आणि पुढील वर्षी तिथेच मरण पावला.

शाहू – छत्रपती संभाजीचा पुत्र. याचा जन्म इ. स. १६८२ साली कोकणात गांगवली येथे झाला. इ. स. १६८९ पासून तो औरंगजेब बादशाहाच्या कैदेत असून, त्याच्या छावणीबरोबर सबंध महाराष्ट्रात भ्रमण करीत राहिला. त्या काळात त्याचे व मातोश्री येसूबाईचे पुष्कळ हाल झाले. इ. स. १७०३ साली बादशाहाने शाहूला मुसलमान करण्याचे ठरवले होते. पण झीनतुन्निसा बगमेने रदबदली केल्यामुळे तो प्रसंग टळला. त्याच वर्षी बादशाहाने शाहूची दोन लग्ने लावून दिली.

औरंगजेबाच्या मृत्युसमयी त्याचा एक मुलगा आजमशाहा त्याच्या जवळ होता. तो अहमदनगर येथेच तख्तनशीन झाला आणि वडील भाऊ मुअज्जम काबूलहून दिल्लीकडे येत आहे, असे कळताच आसदखान व झुल्पिकारखान यांसह तिकडे निघाला. शाहू वगैरे मंडळी त्यांच्या बरोबरच होती. इकडे ताराबाईच्या सरदारांनी मोगलांच्या ताब्यातील किल्ले व इतर ठाणी जिंकून घेण्यास सुरुवात केली. तेव्हा झुल्पिकारखानाच्या सल्यावरून आजमशाहाने शाहूला सोडून दिले. पण त्याने शाहूकडून मोगलांची तावेदारी मानण्याचे वचन घेतले व त्याला दक्षिणच्या सहा सुभ्यांत चौथाई-सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क दिला. येसूबाई व संभाजीचा दासीपुत्र मदनसिंग यांना मात्र त्याने आपल्याबरोबर नेले.

शाहू माळव्यातून परत फिरला तो नर्मदा नदी पार करून सातपुड्यातून दक्षिणेत निघाला. वाटेत त्याला बिजागडचा राजपूत राजा मोहनसिंग रावळ याने सैन्य व द्रव्य देऊन पुष्कळ साह्य केले. ते घेऊन शाहू तापीच्या काठी आला. तिथे त्याला अमृतराव कदमबांडे, परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर, चिमणाजी मोघे, वगैरे सरदार येऊन मिळाले. त्यांनी शाहूलाच मराठ्यांच्या गादीचा वारस मानले. तिथून पुढे येऊन शाहू अहमदनगर येथे थांबला व त्याने ताराबाईशी वाटाघाटी सुरू केल्या. तोपर्यंत पुरंदरे, पिंगळे, वाकनीस, हणमंते, प्रभू, बोकील वगैरे कित्येक सरदार त्याच्या पक्षात जमा झाले होते.

ताराबाई महत्त्वाकांक्षी होती. तिला आपल्या मुलाच्या नावाने राज्य करायचे होते. तिने प्रथम शाहूला तोतया ठरवण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. कारण त्याला खरा मानणारे पुष्कळ लोक होते. मग तिने शाहूचा राज्यावर हक्क नाही, असे जाहीर केले. संभाजीने राज्य घालवले, ते राजारामाने व तिने परत मिळवले, म्हणून तिचा मुलगा शिवाजी हाच खरा वारस होय. असे तिचे म्हणणे होते. धनाजी जाधव, प्रतिनिधी वगैरे काही सरदार तिच्या बाजूला होते. त्यांना तिने शाहूशी लढायला पाठवले.

भीमेच्या काठी खेड येथे लढाई होऊन तीत शाहूचा जय झाला. धनाजी शाहूला मिळाला व त्याचा सेनापती झाला. खंडो बल्लाळही त्याला मिळाला. मग शाहूने साताऱ्यावर चाल केली आणि तो काबीज करून तिथे १२ जानेवारी इ. स. १७०८ रोजी स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला.

भाऊबंदकी विकोपास जाऊ नये म्हणून शाहूने वारणा नदीच्या दक्षिणेकडील मुलुखावर ताराबाईचे स्वामित्व मान्य करण्याची तयारी दाखवली. पण तिला ते रुचले नाही. तिने रामचंद्रपंत अमात्य, वाडीचे सावंत व कान्होजी आंग्रे यांच्या मदतीने झगडा चालूच ठेवला. ताराबाई पन्हाळगडावर होती म्हणून शाहू तिकडे गेला, तेव्हा ती रांगण्यावर गेली. शाहूने रांगण्यास वेढा घातला, तेव्हा ती कोल्हापुरास गेली. मग शाहू

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साताऱ्यास परत गेला. त्याच वेळी जुन्नरच्या बाजूला मोगलांचे सरदार लोदीखान व करीमखान यांनी गडबड सुरू केली. शाहूने धनाजी जाधव व बाळाजी विश्वनाथ यांना तिकडे पाठविले. त्यांनी मोगलांचा पराभव केला व पुणे प्रांत मोगलांच्या हातून सोडवला. परत येताना वाटेत धनाजी जाधव मरण पावला (इ. स. १७०८). त्यानंतर शाहूने धनाजीचा मुलगा चंद्रसेन जाधव याला सेनापती केले.

औरंगजेबाचा वडील मुलगा मुअज्जम हा आग्याला येऊन तख्तावर बसला व त्याने बहादूरशहा हे नाव धारण केले. ८ जून १७०७ रोजी त्याची व आजमशहाची लढाई होऊन आजमशहा मारला गेला. तिसरा भाऊ कामबक्ष दक्षिणेत होता. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी बहादुरशहा लगेच दक्षिणेत आला. इ. स. १७०९ साली हैदराबादजवळ त्यांची लढाई होऊन कामबक्ष मारला गेला. काही मराठे सरदारांनी बहादुरशहाला मदत करून लाभ मिळवला. रायभानजी भोसले व मदनसिंग हे शाहूचे प्रतिनिधी बादशहाकडे गेले व त्यांनी सरदेशमुखीची सनद मागितली. पण त्याच वेळी ताराबाईचाही वकील तीच सनद मागण्यासाठी तिथ गेला. तेव्हा दोघांनी आपसांत लढून तंटा मिटवावा; मग विजयी पक्षाला सनदा देण्यात



येतील, असे बादशहाने त्यांना सांगितले आणि त्याप्रमाणे दोन्ही पक्षांचा संग्राम अनेक वर्षे चालला. थोरात, जाधव, निंबाळकर वगैरे सरदार प्रसंग पडेल तशी धरसोड करू लागले, तेव्हा त्यांच्यावर विसंबून राहणे धोक्याचे वाटून शाहूने बाळाजी विश्वनाथ याला सेनाकर्ते हे पद दिले व सैन्याची जमवजमव करण्यास सांगितले. त्याचे वैषम्य वाटून चंद्रसेन जाधव ताराबाईच्या पक्षाला मिळाला. मात्र मोगल सरदार दाऊदखान पन्नी याच्याशी त्याने कारस्थान चालूच ठेवले. पुढे बाळाजी विश्वनाथ, पिलाजी जाधव, पुरंदरे, निंबाळकर यांच्या साहाने शाहूने चंद्रसेनाचे कारस्थान मोडून काढले आणि कर्नाटकात व उत्तरेला नर्मदेपर्यंत आपले वर्चस्व स्थापण्यास प्रारंभ केला. इ. स. १७१३ साली निजामउल्मुल्क दक्षिणेत आला, त्यामुळे शाहूचे संकट दुणावले. त्याच वर्षी शाहूने बाळाजी विश्वनाथ याला पेशवेपद दिले. त्याने लगेच आंग्र्यावर स्वारी करून त्याला शाहूच्या बाजूला आणले.

जाधव, खटावकर, थोरात, चव्हाण, इ. सरदारांचा बंदोबस्त शाहूने केल्यामुळे ताराबाई निराधार झाली. तेव्हा गिरजोजी यादव, अंताजी मिसाळ, तुळाजी शितोळे, इ. सरदारांनी ती व तिचा पुत्र शिवाजी यांना कैद करून राजारामाची दुसरी बायको

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजसबाई हिचा पुत्र संभाजी याला पन्हाळगडावर गादीवर बसवले. ही घटना इ. स. १७१४ च्या जुलै ते ऑक्टोबर या महिन्यांत घडली. संभाजी पुढे कोल्हापूरहून राज्य करू लागला. ताराबाईचा पुत्र शिवाजी इ. स. १७२७ साली मरण पावला.

रामचंद्रपंत अमात्य ताराबाईच्या पक्षात होता. त्याने शेवटी संभाजीला गादीवर आणण्यात पुढाकार घेतला असावा, असे वाटते. त्या कामी त्याने निजामाची मदतही घेतली असावी. त्याचे 'आज्ञापत्र' संभाजीला उद्देशून लिहिलेले आहे. मराठे सरदारांतील यादवीचा फायदा घ्यायला निजाम टपलेलाच होता. त्याने चंद्रसेन जाधव व रंभाजी निंबाळकर यांना फितवले आणि कोल्हापूरच्या संभाजीशीही संधान बांधले.

इ. स. १७१५ मध्ये निजामाच्या जागी सय्यद हुसेनअली

छत्रपती शाहूमहाराज

याची नेमणूक झाली. तो इकडे येत असता त्याची व दाऊदखान पन्नी याची लढाई होऊन पन्नी मारला गेला. इ. स. १७१६ साली थोरात बंधू हुसेनअलीकडे गेले व मोगलांचे सेवक बनले. त्यांच्या मदतीने मोगलांनी इ. स. १७१६ च्या डिसेंबरमध्ये शाहूविरुद्ध प्रचंड मोहीम सुरू केली. पण शाहूच्या सरदारांनी अतुल पराक्रम करून ती मोहीम परतवून लावली. सय्यद हुसेन अलीने गुजरातेत खंडेराव दाभाडे याच्याशीही युद्ध सुरू केले. पण त्यात त्याला यश आले नाही.

त्यानंतरच्या दोन-तीन वर्षांत बाळाजीने दक्षिणेत मराठ्यांची सत्ता बरीच दृढ केली. सय्यद बंधू त्याला अनुकूल होते. बादशाहाशी त्यांचा तंटा सुरू झाला, तेव्हा सय्यद हुसेन याने मराठ्यांशी करार केला व बाळाजीला घेऊन तो दिल्लीकडे निघाला. बाळाजीची ती मोहीम यशस्वी झाली. त्याने बादशाहाकडून सनदा आणल्या आणि येसूबाईचीही सुटका केली. तिला घेऊन तो इ. स. १७१९ मध्ये सातार्‍याला परत आला.

इ. स. १७२० मध्ये बाळाजी विश्वनाथ मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र बाजीराव याला शाहूमहाराजांनी पेशवेपद दिले. त्याच वर्षी निजामउल्मुल्क पुन्हा दक्षिणचा सुभेदार झाला. त्याने कोल्हापूरच्या संभाजीला फूस देऊन पुन्हा बखेडा माजवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा इ. स. १७२८ त बाजीरावाने पालखेड येथील लढाईत निजामाचा पराभव केला. त्याच वेळी बाजीरावाने निजामाचा पुरता बंदोबस्त केला असता; पण शाहूचे सौम्य धोरण आड आले. मग संभाजी व शाहू यांचा तह झाला. त्याला वारणेचा तह (इ. स. १७३१) म्हणतात. त्या तहान्वये संभाजीला वारणा व तुंगभद्रा या दोन नद्यांमधील मुलूख मिळाला व त्याचे वेगळे राज्य सुरू झाले.

बाजीराव पेशव्याने निजाम, सिद्दी, पोर्तुगीज वगैरे शत्रूंचा बंदोबस्त करून इ. स. १७३७ साली दिल्लीवर स्वारी केली. पण शाहूला दिल्लीची बादशाही नष्ट करण्याची इच्छा नसल्यामुळे, बाजीराव दिल्ली न घेताच परत आला.

इ. स. १७४० मध्ये बाजीराव मरण पावला व त्याचा पुत्र नानासाहेब याला पेशवेपद मिळाले. कारण तो अत्यंत लायक होता आणि शाहूची त्याच्यावर मर्जी होती. ७-८ वर्षांत नानासाहेबाने दक्षिणेत व उत्तरेत सर्वत्र मराठ्यांची सत्ता दृढ केली. इ. स. १७४९ च्या डिसेंबरमध्ये शाहू मृत्यू पावला.

रघूजी भोसले यास आपला वारस नेमावे असे प्रथम शाहूच्या मनात होते. त्याच वेळी सातारा व कोल्हापूर या गाद्या एक करून शाहूनंतर संभाजीला गादीवर बसवावे, असे पेशव्याच्या मनात होते. पण ते शाहूला मान्य नव्हते. ताराबाईचा पुत्र शिवाजी याला एक पुत्र झाला होता. ताराबाईने त्याला गुप्तपणे वाढवले होते, त्याचे नाव रामराजा. त्यालाच छत्रपतींच्या गादीवर बसवावे असे ठरले. पेशव्यांनी सर्व राजमंडळात श्रेष्ठ अधिकार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चालवावा असे शाहूने लिहून ठेवले होते. त्याप्रमाणे रामराजा छत्रपती झाला व पेशवे सर्वाधिकारी झाले. ताराबाईने अनेक सरदारांना फितवून पेशव्यांना त्रास देणे सुरू केले. त्या सर्वांचा बंदोबस्त करण्यात नानासाहेबाला ३-४ वर्षे घालवावी लागली.

ताराबाईचे रामराजावर चांगलेच वर्चस्व होते. इतकेच नव्हे, तर तो पेशव्यांचे ऐकतो म्हणून तिने त्याला कैदेत ठेवले. नानासाहेबाने त्याला सोडवण्याचा प्रयत्न केला; पण तो फसला. इ. स. १७६३ मध्ये ताराबाई मरण पावली, तेव्हा तो मुक्त झाला. त्यानंतर तो पेशव्यांच्या तंत्रानेच वागला. इ. स. १७७७ मध्ये तो मरण पावला. त्याला पुत्र नसल्यामुळे त्याच्या राणीने वावीकर भोसल्यांपैकी विठोजी नावाच्या मुलाला दत्तक घेतला. तो शाहू (दुसरा) या नावाने ओळखला जातो. त्याने कोल्हापूरकर भोसल्यांच्या मदतीने इ. स. १७९८ साली पेशव्यांविरुद्ध उठावणी केली. पण परशुरामभाऊ पटवर्धन यांनी ती मोडून काढली. पुढे इ. स. १८०८ पर्यंत त्याने राज्य केले. त्याच्यानंतर त्याचा थोरला मुलगा प्रतापसिंह गादीवर बसला.

दुसरा बाजीराव पेशवा याने पळ काढल्यानंतर इंग्रजांनी प्रतापसिंहाला मराठी साम्राज्याचा वारस म्हणून फक्त १२ लक्षांचा मुलूख दिला. त्याला आपल्या थोर क्षत्रिय कुळाचा फार अभिमान होता व ब्राह्मण वर्गाचे धार्मिक वर्चस्व मान्य नव्हते. त्याच्या कारकीर्दीतच ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद प्रथम सुरू झाला. इंग्रजांचे वर्चस्व व अपमानकारक अटी असह्य होऊन काही बाबतीत कंपनी सरकारला जुमानायचे नाही, असे त्याने ठरवले. तेव्हा, त्याने सैन्यात फितुरी केली व बंडाचा प्रयत्न केला, असे आरोप त्याच्यावर करून त्याला इंग्रजांनी पदच्युत केले व काशीला नेऊन ठेवले (इ. स. १८३९). तिथेच तो विपन्नावस्थेत मरण पावला. त्याच्या मागून त्याचा धाकटा भाऊ शाहजी गादीवर बसला. तो इ. स. १८४८ त मरण पावल्यानंतर इंग्रजांनी साताऱ्याचे राज्य खालसा केले.

कोल्हापूरचे राज्य – इ. स. १७१४ ते १७६० या काळात संभाजीने राज्य केले. १७६० मध्ये तो निपुत्रिक मरण पावल्यावर त्याची राणी जिजाबाई हिने भोसले घराण्यातील एका अल्पवयी मुलाला दत्तक घेतले. तो तिसरा शिवाजी या नावाने इ. स. १८१२ पर्यंत राज्य करीत होता. जिजाबाई मोठी कारस्थानी होती. तिने निजामाशी संधान बांधले, तेव्हा माधवराव पेशव्याने तिच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी मिरज येथे पटवर्धनांची नेमणूक केली.

त्या वेळी कोल्हापूरचे राज्य पश्चिम समुद्रापर्यंत असून, मालवणचा सिंधुदुर्ग त्या राज्यात होता. इ. स. १७६५ मध्ये इंग्रजांनी मालवण घेतले. पण लवकरच त्यांनी कोल्हापूरकरांशी सलोख्याचा तह केला. इ. स. १७७२ त जिजाबाई मरण पावली. तेव्हा पटवर्धन व औंधचे प्रतिनिधी यांनी कोल्हापूरवर हल्ले सुरू केले. त्या वेळी कोल्हापूरदरबारात यशवंतराव शिंदे नावाचा सरदार होता, त्याने हैदरअलीशी संधान बांधले. तेव्हा बारभाईंनी महादजी शिंदे याला तिकडे पाठवले. त्याने कोल्हापूरकरांचा पराभव करून त्यांनी जिंकलेला प्रदेश परत घेतला. इ. स. १७८२ मध्ये यशवंतराव मरण पावला. तेव्हा काही जहागीरदारांनी उठाव केला; पण कोल्हापूरच्या सैन्याने तो मोडून काढला. पुढे इ. स. १७९२ मध्ये इंग्रजांनी कोल्हापूरकरांना शह देऊन तह करायला लावले. त्या तहान्वये इंग्रजांना मालवण व कोल्हापूर येथे व्यापारी वखारी उघडण्याची परवानगी मिळाली.

इ. स. १७९८ मध्ये सातारकर भोसले व कोल्हापूरकर भोसले यांनी पेशव्यांविरुद्ध संगनमत करून थोडी धडपड केली; पण पटवर्धनांनी ते बंड मोडून काढले.

इंग्रजांचे मराठ्यांशी युद्ध चालू असताना कोल्हापूरकर तटस्थ राहिले. पुढे इ. स. १८१२ साली इंग्रज व कोल्हापूरकर यांचा तह होऊन भोसले इंग्रजांचे मांडलिक बनले. मालवण व सिंधुदुर्ग इंग्रजांना मिळाले. त्याच वर्षी तिसरा शिवाजी मरण पावला आणि त्याचा पुत्र शंभूजी गादीवर बसला. त्याने इ. स. १८२१ पर्यंत राज्य केले. त्या अवधीत इंग्रजांनी कोल्हापूरकरांचा समुद्रकाठचा सर्व प्रदेश ताब्यात घेतला. कोल्हापूर संस्थान मात्र त्यांनी कायम ठेवले.

नागपूरकर भोसले – बादशाही कैदेतून सुटून शाहू दक्षिणेत आला, तेव्हा त्याला छत्रपतिपद मिळण्याच्या कामी परसोजी भोसले याची मोठी मदत झाली. हा परसोजी भोसले शिवाजीमहाराजांच्या सैन्यात अधिकारी होता. तो वऱ्हाड, गोंडवन, इ. प्रांतांवर स्वाऱ्या करून खंडणी वसूल करीत असे. पुढे त्याने त्या प्रदेशात मराठ्यांची सत्ता स्थापल्यामुळे राजारामाने इ. स. १६९९ साली त्याला सेना-साहेबसुभा हा किताब देऊन वऱ्हाडात पाठवले. तिकडे त्याने वणी तालुक्यात भाम येथे आपले मुख्य लष्करी ठाणे वसवले. हे भोसले घराणे शिवाजीमहाराजांच्या घराण्याप्रमाणेच शिसोदिया वंशाचे होते, असे म्हणतात.

इ. स. १७१० मध्ये परसोजी मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा कान्होजी याला सेना-साहेबसुभा हा किताब मिळाला. त्याने वऱ्हाडात आपली सत्ता स्थापून गोंडवन व ओडिसा या प्रांतांवर स्वाऱ्या केल्या. इ. स. १७१७ साली त्याला वऱ्हाड, खानदेश, नेमाड, हंडया, माळवा, भागानगर या प्रदेशाचा मोकासा म्हणजे चौथाई-सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळाला. त्याने देवगडचे गोंडांचे राज्य जिंकले. कान्होजी शूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता; पण तो छत्रपती व पेशवे या दोघांनाही जुमानीत नसे. पुढे कान्होजी व बाजीराव यांचे वितुष्ट येऊन कान्होजी निजामाकडे गेला. तेव्हा शाहूने रघूजी भोसले याला त्याच्यावर पाठवले. त्याने कान्होजीला इ. स. १७३० साली पकडून आणले व साताऱ्या किल्ल्यावर कैदेत ठेवले. तिथेच तो सात वर्षांनी मरण पावला.

कान्होजीचा चुलतभाऊ बिंबाजी याचा पुत्र रघूजी. त्याला मग शाहूने सेना-साहेबसुभा हे पद दिले. तो शूर व धर्त होता. त्याने सबंध गोंडवन जिंकले व इ. स. १७४३ मध्ये नागपूर येथे राजधानी स्थापली. मग त्याने बंगालवर अनक स्वाऱ्या

रघूजी भोसले (पहिला)

करून तिथल्या नवाबाकडून पुष्कळ खंडणी घेतली. ओडिसा प्रांतही त्याने जिंकला. रघूजी भोसले इ. स. १७५५ मध्ये मरण पावला, तेव्हा त्याचे राज्य वऱ्हाडपासून पूर्व समुद्रापर्यंत आणि गढमंडलापासून चंद्रपुरापर्यंत पसरले होते. तो छत्रपतींशी व पेशव्यांशी फटकूनच वागत होता.

रघूजीनंतर त्याचा पुत्र जानोजी याला सेना-साहेबसुभा ही पदवी मिळाली. पेशवे व भोसले यांचे सख्य नव्हते. शाहू होता तोपर्यंत त्यांचे अंतर्वैर दबून होते एवढेच. रघूजी हा शाहूलाही प्रसंगी जुमानीत नसे. ठरलेला वसूल त्याने शाहूला कधीही वेळेवर पाठवला नाही. जानोजी सेना-साहेबसुभा झाल्यावर त्याचा सावत्र भाऊ मुधोजी त्याच्याविरुद्ध उठला. तेव्हा पेशव्यांनी दोघांमध्ये वाटणी करून दिली. तरीही वाद मिटला नाही. मग पेशव्यांनी मुधोजीचा पक्ष घेऊन नागपूरवर स्वारी केली व ते शहर लुटले. पुढे जानोजी व पेशवे यांचा तह होऊन जानोजीने खंडणी देण्याचे व पेशव्यांच्या आज्ञेत वागण्याचे मान्य केले. तथापि नागपूरकरांनी पेशव्यांना कधीही साहाय्य केले नाही; उलट निजाम व इंग्रज या मराठ्यांच्या शत्रूंशी संगनमतच केले.

इ. स. १७७२ त जानोजी वारला. त्याने मुधोजीचा पुत्र रघूजी याला दत्तक घेतले होते, तो जानोजीच्या जागी आला. त्याच्या कारकीर्दीत इंग्रजांचा प्रवेश नागपूर राज्यात झाला. मुधोजीने हेस्टिंग्जशी कारस्थान सुरू केले. इ. स. १७८८ साली मुधोजी मरण पावला. त्यानंतर रघूजीने स्वतः राज्य चालवले. तो इंग्रजांवर जळफळत होता. त्याने इ. स. १७९५ मध्ये खडर्याच्या लढाईत निजामाविरुद्ध पेशव्यांना मदत केली. पुढे दौलतराव शिंदे व रघूजी भोसले यांनी इंग्रजांशी युद्ध केले. त्यात मराठ्यांचा पराभव झाला व आडगावच्या तहाने रघूजीने ओडिसा व वऱ्हाडचा बहुतेक भाग इंग्रजांना दिला. त्याने तैनाती फौजेचा फास मात्र आपल्या गळ्याला लावून घेतला नाही. इ. स. १८१६ मध्ये रघूजी मरण पावला. त्याचा पुतण्या मुधोजी ऊर्फ आप्पासाहेब याने इंग्रजांशी तैनाती तह केला. त्यानंतर लवकरच नागपूरचे राज्य बुडाले.

तंजाऊरचे भोसले – छत्रपती शिवाजीमहाराजांचा सावत्र भाऊ व्यंकोजी याच्या नंतर इ. स. १६८२ मध्ये त्याचा मोठा मुलगा शहाजी गादीवर आला. त्याने काही पाळेगारांचा पराभव करून आपले राज्य थोडेसे वाढवले. आपली आई दीपाबाई व दोघे भाऊ यांच्या सल्लामसलतीने याने पुष्कळ वर्षे राज्य केले. इ. स. १६८७ साली औरंगजेबाने बंगलूर प्रांत जिंकला. पुढे छत्रपती राजाराम जिंजीला गेला, तेव्हा याने त्याला पुष्कळ मदत केली. पण त्यामुळे झुल्पिकारखानाने तंजाऊरवर स्वारी केली आणि शहाजीला औरंगजेबाची ताबेदारी पत्करावी लागली (१६९६). त्यानंतर शहाजीने इ. स. १७११ पर्यंत शांतपणे राज्य केले. तो निपुत्रिक मरण पावल्यामुळे त्याचा भाऊ सरफोजी गादीवर बसला. त्याने इ. स. १७२८ पर्यंत राज्य केले. त्या राजवटीत विशेष घडामोडी झाल्या नाहीत. तो मरण पावल्यावर त्याचा भाऊ तुकोजी याने इ. स. १७३५ पर्यंत राज्य केले. हा राजकारणी, हुशार व विद्याभिलाषी होता. त्याला संस्कृत, तमिळ, मराठी व फारसी या भाषा अवगत असून, त्याने अनेक विद्वानांना आश्रय दिला होता. निजाम, इंग्रज, फ्रेंच या सर्वांपासून त्याने आपल्या राज्याचे रक्षण केले. तो इ. स. १७३५ त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मरण पावला. त्याचा मोठा मुलगा येकोजी याने एकच वर्ष राज्य केले. तो अकाली मरण पावला. त्याची राणी सुजानबाई ही फार दक्ष व हुशार होती. स्वामिनिष्ठ सरदारांनी तिच्याच नावाने द्वाही फिरवली. तिने तीन वर्षे राज्य केले. ती उदार व सद्‌गुणी असल्यामुळे दरबारी मंडळींवर तिचे वजन राहिले.

सुजानबाईच्या कारकीर्दीत गादीवर हक्क सांगणारे अनेकजण पुढे आले; पण त्यांचे काही चालले नाही. मात्र इ. स. १७३९ साली सवाई शहाजी या नावाने एका तोतयाने कोजाजी घाटग्याच्या मदतीने फितुरी करून तंजाऊरचा किल्ला घेतला व गादी बळकावली; पण लवकरच त्याचे खरे रूप उघडकीला आले व दरबारी मंडळींनी तुकोजीचा दुसरा पुत्र सयाजी याला गादीवर बसवले. लवकरच तो नामधारी राजा बनला व तंजाऊरचा किल्लेदार सय्यदखान कारभार पाहू लागला. त्यामुळे राज्यात बेबंदशाही माजली. तेव्हा जुन्या सरदारांनी सयाजीला पदच्युत करून तुकोजीचा दासीपुत्र प्रतापसिंह याला इ. स. १७४० त गादीवर बसवले. त्याने इ. स. १७६३ पर्यंत राज्य केले. प्रारंभी सय्यदखान व त्याचा भाऊ कासम यांनी लष्कराच्या जोरावर राज्यात खूप अत्याचार केले. त्यांनी अर्काटच्या चंदासाहेबाची मदत घेतली. प्रतापसिंहाने सय्यदखानाला पकडून ठार मारले, तेव्हा चंदासाहेबाने तंजाऊरला वेढा घातला. मग प्रतापसिंहाने छत्रपती शाहूकडे मदत मागितली. शाहूने फत्तेसिंग, रघूजी भोसले आणि मुराररराव घोरपडे यांना तिकडे पाठविले. त्यांनी प्रथम अर्काट घेऊन तंजाऊरकडे मोर्चा फिरवला. तेव्हा चंदासाहेब तंजाऊरचा वेढा उठवून त्रिचनापल्लीकडे निघून गेला. मराठ्यांनी मग त्रिचनापल्ली काबीज करून चंदासाहेबाला कैद केले. पुढे अर्काटचा नवाब अन्वरुद्दीन याने त्रिचनापल्ली घेऊन तंजाऊरवर स्वारी केली; पण प्रतापसिंहाने त्याचा पराभव केला. इ. स. १७४९ मध्ये इंग्रजांनी देवीकोटा बंदर व आसपासचा काही प्रदेश घेतला.

त्यानंतरची १०–१२ वर्षे इंग्रज, फ्रेंच व महमदअली यांनी तंजाऊरचे राज्य बळकावण्याचा खूप प्रयत्न केला. पण सेनापती मानाजी जगताप याने खूप पराक्रम करून राज्य राखले.

इ. स. १७६३ साली प्रतापसिंह मरण पावल्यावर त्याचा पुत्र तुळजाराजा गादीवर आला. हा दुबळा होता व मुत्सद्दी नव्हता. त्याने दानधर्म, देवळे व मशिदी बांधणे, लग्नसमारंभ आणि तीर्थयात्रा यांत अतोनात पैसा उधळला. त्यामुळे सैन्याचा पगार थकला. जुने सरदार जाऊन नवीन लोकांच्या हाती कारभार आला. त्यांनी अत्याचार केले. त्यामुळे प्रजा विटली. पुढे महंमदअलीने तंजाऊरवर स्वारी करून फितुरीने तिथला किल्ला घेतला व पुष्कळ लूट नेली. त्यानंतर दोन वर्षे राजा त्याच्या कैदेत होता मग इंग्रजांच्या मदतीने त्याने आपले राज्य परत मिळवले; पण तो इंग्रजांचा मांडलिक बनला. मग इंग्रजांनी त्याच्याशी तैनाती करार केला.

तुळजाराजा इ. स. १७६८ मध्ये मरण पावला. त्याचे तीन मुलगे लहानपणीच वारले व दोन मुलीही त्याच्या देखत मरण पावल्या. तेव्हा त्याने मुंगीकर भोसल्यांपैकी एका मुलाला दत्तक घेऊन त्याचे नाव सरफोजी ठेवले. पण तुळजाचा सावत्र भाऊ, म्हणजे प्रतापसिंहाचा दासीपुत्र अमरसिंह याने इंग्रजांच्या मदतीने गादी बळकावली. त्याने इ स. १७९८ पर्यंत राज्य केले. पण त्या अवधीत इंग्रजांनी त्याला खूप लुबाडले व शेवटी पदच्युत करून सरफोजीला गादीवर बसवले. अर्थात इंग्रजांनी सर्व राज्य आपल्या ताब्यात घेऊन सरफोजीला सालिना साडेतीन लाखांची नेमणूक करून दिली. त्याच्या ३४ वर्षांच्या कारकीर्दीत तंजाऊरमध्ये शांतता होती. त्याने आपला वेळ ग्रंथसंग्रह, विद्याव्यासंग व विद्याप्रसार यांत घालवला. त्याला इंग्रजी भाषा चांगली येत होती. त्याने काव्ये, नाटके वगैरे अनेक ग्रंथ विद्वानांकडून तयार करवले. राजवाड्यात सरस्वतिमंदिर स्थापून तिथे त्याने विविध विषयांवरील प्राचीन ग्रंथ, ताडपत्रे, भूर्जपत्रे व ताम्रपट यांचा मोठा संग्रह केला. त्याने तंजाऊरच्या बृहदीश्वर-देवालयात आपल्या घराण्याचा संपूर्ण इतिहास कोरवून ठेवला आहे. सरफोजीला संगीत, शिल्प, वैद्यक व ज्योतिष या विषयांची आवड होती व त्यांना त्याने खूप उत्तेजन दिले.

असा हा थोर पुरुष इ. स. १८३२ त मरण पावला. त्याचा मुलगा शिवाजी याने इ. स. १८५५ पर्यंत पित्याचे वैभव उपभोगले. त्याला विद्येची आवड नव्हती; पण तो उदार असल्यामुळे कर्ण म्हणून प्रसिद्धी पावला. तो मरण पावल्यावर, त्याला औरस संतती नसल्यामुळे डलहौसीने इ. स. १८५५ साली तंजाऊरचे संस्थान खालसा केले. पाहा – पेशवाई; शिवाजीमहाराज. [म. सो. इ.; पु. छ. शि. १-२.; मराठी रियासत; ना. सां. इ.; ये. इ. घ.; म. ज्ञा. को.]

भौज्य

वैदिक कालातील एक राज्यप्रकार. अन्य देशांपासून नैसर्गिक सीमांनी अलग असलेले राज्य ते भौज्य होय. भारत हे एक भौज्य म्हणून ओळखले जात होते. कारण तीन बाजूंनी समुद्र आणि उत्तरेस हिमाचल अशा याच्या प्राकृतिक चतुःसीमा आहेत. भौज्य प्रदेशातल्या राजाने अन्य देशांवर आक्रमण करू नये, असा वैदिक काळात एक संकेत होता. भारतीय नृपतींनी अन्य देश पादाक्रांत केले; पण तो त्यांचा धर्मविजय होता. त्यांनी त्या देशातल्या प्रजेला आपल्या अधिसत्तेखाली आणण्याची इच्छा धरली नाही. [वै. सा.; म. ज्ञा. को.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भौत्य चौदावा मनू. हा भूती ऋषीचा पुत्र होता, म्हणून याला हे नाव मिळाले आहे. भूतीला मुलगा व्हावा म्हणून त्याचा शिष्य शांती याने अग्नीपासून वर मिळवला होता, असे मार्कंडेय पुराणात म्हटले आहे. भौत्याला इंद्रसावर्णी व चंद्रसावर्णी अशीही दोन नावे होती. हा अखेरचा मनू असल्यामुळे याच्या मन्वंतरानंतर प्रलय होऊन, हा विष्णूच्या नाभिकमलात योगनिद्रा घेईल, असे म्हटले आहे. पाहा – इंद्रसावर्णी. [पु.इं.; प्रा.च. को.]

भौमयोग एक शुभ योग. हा पुढीलप्रमाणे होतो– कार्तिक वद्य चतुर्दशी मंगळवारी असून, त्या दिवशी चित्रा नक्षत्र असेल, तर त्याला भौमयोग म्हणतात. या योगावर शंकराची पूजा केली असता शिवलोक प्राप्त होतो. [पु. चिं.]

भौम राजवंश (इ. स. ७४० – ९४०) ओडिसा प्रदेशात राज्य करणारा एक राजवंश. याला कर राजवंश असेही नाव होते. इ. स. ७४० च्या सुमारास या वंशाने आपला शक सुरू केला होता, असे त्या वंशातील राजांच्या ताम्रपटांवरून ध्यानात येते. लक्ष्मींकर हा या वंशातील पहिला राजा होय. त्यानंतर या वंशातील बारा पुरुष व सहा स्त्रिया यांनी ओडिसावर राज्य केले. या वंशाच्या राजवटीत ओडिसात सुवर्णयुग नांदत होते. त्या काळात धर्म, तत्त्वज्ञान, कला, भाषा व साहित्य या सर्व क्षेत्रांत ओडिसाचा खूप उत्कर्ष झाला होता. पाहा – ओडिसा; कर राजवंश. [हि. ओ.]

भौमवार व्रत एक काम्य व्रत. भौमवार म्हणजे मंगळवार. मंगळ हा पृथ्वीचा पुत्र आहे आणि दिसण्यात सुंदर आहे. प्रत्येक मंगळवारी हे व्रत करतात. यात तांब्याच्या भांड्यात गूळ भरून ते ब्राह्मणाला दान देतात. असे वर्षभर करून उद्यापनाच्या वेळी गाय दान देतात. फल – सौंदर्य व संपत्ती यांची प्राप्ती. [हि. ध.]

भौमव्रत एक काम्य व्रत. नवग्रहांपैकी मंगळाला अनुलक्षून हे व्रत करायचे असते. या व्रताचा आरंभ वैशाख अथवा मार्गशीर्ष महिन्यातील कोणत्याही मंगळवारी करतात. एकवीस मंगळवारी किंवा वर्षभर प्रत्येक मंगळवारी अथवा संकल्प केला असेल तितक्या मंगळवारी हे व्रत करतात.

त्रिकोणाकृती ताम्रपत्रावर त्रिकोणाकृती एकवीस घरे पाडलेल्या यंत्रावर मंगळाची स्थापना करून पूजा त्याची करणे, हे या व्रत-विधीचे वैशिष्ट्य आहे. पूजेनंतर मंगलकवच म्हणायचे असते. उद्यापनाच्या वेळी एकवीस ब्राह्मणांना भोजन घालतात व एकवीस कुंभ दान देतात. या व्रताची कथा अशी–

सुनंद नावाचा एक वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण होता. त्याची भार्या सुनंदा अत्यंत लोभी होती. तिला अपत्य नव्हते; म्हणून तिने दुसऱ्याची एक मुलगी सांभाळली होती. सुदैवाने या मुलीने पूर्वजन्मी हे व्रत केलेले होते. त्यामुळे तिच्या अष्टांगांतून सुवर्ण वाहत असे. योग्य वेळी तिचे लग्न झाले. एकदा ती आपल्या पतीबरोबर जात असताना तिच्या पालक मातेच्या मनात तिच्याविषयी असूया उत्पन्न झाली आणि तिने आपल्या जावयाचा खून केला. पत्नीन सती जाण्याचे ठरवून अग्नीत प्रवेश केला. त्या वेळी 'तू अग्निप्रवेश करू नको. तुला हवा तो वर माग.' असे भौम तिला म्हणाला. तेव्हा तिने पतीचे प्राण परत मागितले. मग तिचा पती जिवंत झाला.

तांब्याच्या भांड्यात मंगळाची सोन्याची मूर्ती, ठेवून तिची पूजा करावी व ती मूर्ती दान द्यावी, असाही या व्रताचा पर्याय आहे. फल – पुरुषार्थसाधन, धनधान्यसमृद्धी व पुत्रप्राप्ती. [व्रतराज]

भ्रमरांबा एक शक्तिपीठ. आंध्र प्रदेशातील श्रीशैल्य पर्वतावर हे स्थान आहे. पीठनिर्णयाप्रमाणे येथील शक्तीला सुंदरी असे नाव आहे. आद्य शंकराचार्यांनी या देवीच्या स्तुतिपर एक अष्टक रचले आहे, त्यापैकी एक श्लोक असा–

गायत्रीं गरुडध्वजां गगनगां गान्धर्वगानप्रियां
गम्भीरां गजगामिनीं गिरिसुतां गन्धाक्षतालङ्कृताम्।
गङ्गागौतमगर्गसंनुतपदां गां गौतमीं गोमतीं
श्रीशैल्यस्थलवासिनीं भगवतीं श्रीमातरं भावये ॥

अर्थ – गायत्री, गरुडध्वज, गगनगामिनी, गंधर्वांचे गायन प्रिय असलेली, गंभीर, गजगती, पर्वतकन्या, गंधाक्षतांनी अलंकृत; गंगा, गौतम व गर्ग यांनी जिच्या चरणांना वंदन केले आहे अशी, पृथ्वीरूप, गौतमी, गोमती व श्रीशैल्य पर्वतावर विराजमान असलेली, अशा भगवती मातेचे मी स्तवन करतो.

प्रत्येक पौर्णिमेला या ठिकाणी तिचे भ्रमण होते, म्हणून तिला भ्रमरांबा असे नाव पडले असावे. श्रीमल्लिकार्जुनाच्या मंदिरामागेच हिचे भव्य देवालय आहे. श्रीभ्रमरांबा देवीच्या या स्थानासंबंधी एक कथा आहे, ती अशी–

दुर्गादेवीच्या रूपाने पार्वतीचे महिषासुराशी युद्ध चालू होते. पण त्याचा निःपात होईना. शेवटी दुर्गादेवीने अनेक भुंग्यांचे रूप धारण करून त्याला ठार केले. नंतर देवीला असे दिसून आले, की त्या असुराच्या अपवित्र रक्ताचे साऱ्या पृथ्वीवर सिंचन झाले आहे. फक्त श्रीशैल्य तेवढा कोरडा आहे. म्हणून देवीने हे स्थान पसंत करून इथेच कायमचे वास्तव्य केले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे स्थान उंचावर असून, देवीचे दर्शन घेण्यासाठी पन्नास-साठ पायऱ्या चढून जावे लागते. देवीची मूर्ती काळ्या पाषाणाची आहे. भ्रमरांबेच्या दर्शनाशिवाय श्रीशैल्याची यात्रा संपूर्ण होत नाही. आद्य शंकराचार्य व अर्वाचीन काळात छत्रपती शिवाजी-

भ्रमरांबा देवी

महाराज, क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके प्रभृतींनी या देवीचे दर्शन घेऊन तिथून स्फूर्ती मिळवली होती. याच देवीने छत्रपती शिवाजीमहाराजांना प्रसाद म्हणून तलवार दिली, असे एक चित्र त्या ठिकाणी कोरलेले आहे. पाहा – श्रीशैल्य. [दे. को. २]

भ्रूणहत्या भ्रूण म्हणजे गर्भ आणि भ्रूणहत्या म्हणजे गर्भपात होय. हे एक महापाप मानलेले आहे. मैत्रायणी संहिता, काठक संहिता, कपिष्ठल संहिता, तैत्तिरीय संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण यांत त्याचा वारंवार निषेध केलेला आहे. त्यानंतरच्या साहित्यातही या पापाविषयी तिरस्कार दर्शविलेला आहे. या पापापासून मुक्त होण्यासाठी शुभसप्तमी व्रत करावे, असे सांगितले आहे. हे पाप कलियुगात वाढेल, असे मत्स्य पुराणात सांगितले आहे. [पु. इं.]

भंकर (इ. स. चे १६ वे शतक) आसाम प्रदेशातील एक लोककवी. मनसा गीतांची रचना करणारा आसामातील हा पहिला लोककवी असावा, असे विद्वानांचे मत आहे. हा गीते रची व ती स्वतःच गात फिरे. याची भाषा प्रवाही असून, याच्या गीतांत कल्पकता अधिक आहे. याच्या काव्यात उथळ विनोद व ग्राम्य वर्णनेही आढळतात. त्याच्या रचनेवरा इस्लामी काव्याचा प्रभावही जाणवतो. [आ. अ. आ. लि.]

मंख (इ. स. ११२०–११७०) एक संस्कृत महाकवी. हा काश्मीरचा रहिवासी होता. मंखक या नावानेही हा प्रसिद्ध आहे. याच्या वडिलांचे नाव विश्ववर्त (विश्वव्रत ?) असे होते. काश्मीरचा राजा जयसिंह (इ. स. ११२७–११४९) याचा तो संधिविग्रहिक मंत्री होता, असे राजतरंगिणीवरून कळते. मंख आपल्याप्रमाणेच कवी आहे, असे कल्हणाने लिहून ठेवले आहे. प्रसिद्ध आलंकारिक रुय्यक हा त्याचा गुरू होय. गुरूच्या आदेशावरूनच त्याने श्रीकंठचरित हा प्रसिद्ध ग्रंथ रचला. त्याचे २५ सर्ग आहेत. या ग्रंथात शंकरकृत त्रिपुरासुरवधाचे कथानक आलेले आहे. त्याच्या काव्यावर अलंकारमताची स्पष्ट छाप दिसते.

मंखकवीचा बंधू मंत्री अलंकार याच्या घरी विद्वत्सभा भरत असे, तिचे तपशीलवार वर्णन प्रस्तुत ग्रंथाच्या २५व्या सर्गात मंखाने दिले आहे. त्याच सर्गात मंखाने त्या सभेतील तीस काश्मिरी विद्वद्रत्ने व त्यांचे नाना शास्त्रांतील प्रावीण्य यांविषयी थोडक्यात पण रोचक वर्णन केले आहे. हाच या काव्याचा महत्त्वाचा भाग होय. आनंद, कल्याण, गर्ग, गोविंद, जल्हण, पटू, पद्मराज, भुट्ठ, लोष्ठदेव, वागीश्वर, श्रीगर्भ व श्रीवत्स या कवींचे नामोल्लेख त्यात आहेत.

लांब लांब वर्णनांनी हे काव्य काहीसे नीरस बनले असले, तरी त्यात अलंकारांचे वैभव व भाषेवरील प्रभुत्व दिसून येते. सुंदर पदविन्यास, मनोहर अर्थकल्पना व रसभक्ति ही त्याच्या काव्याची वैशिष्टचे होत.

दुसऱ्या सर्गात (२.९) मंखाने कवी आणि काव्य यांची मार्मिक समीक्षा केलेली आहे. तो म्हणतो–

सूक्तौ शुचावेव परे कवीनां सद्यः प्रमादस्खलितं लभन्ते ।
अधौतवस्त्रे चतुरं कथं वा विभाव्यते कज्जलबिन्दुपातः ।।

अर्थ– रमणीय उक्तीमध्ये दोषाचा पत्ता लगेच मिळतो; ज्याप्रमाणे धूत वस्त्रात थोडासाही असलेला डाग दिसून यावा तसा.

एका ठिकाणी तो अंधकाराचे मार्मिक वर्णन करतो, ते असे–

किन्तु कालगणनापतेर्मसीभाण्डमयंमवपुर्हिरण्मयम् ।
तत्र यद्विपरिवर्तिताननें लिम्पति स्म धरणीं तमो मसी ।।

अर्थ – सायंकाळचा सूर्य म्हणजे जगताच्या कालाची गणना करणाऱ्या भगवंताचे सोन्याचे मसीपात्र होय. संध्याकाळी जेव्हा सूर्य उलटे तोंड करून (खाली) पडतो, तेव्हा काळी शाई त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पात्रातून बाहेर पडून साऱ्या जगात अंधकाररूपाने पसरते.

याव्यतिरिक्त मंखाने मंखकोश म्हणून एक शब्दकोशही लिहिलेला असून, त्याचा उल्लेख हेमचंद्राने आपल्या कोशात केला आहे. हा कोश काश्मीरमध्ये प्रचलित आहे.

मंखाचे वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या विशिष्ट शब्दाचा उपयोग विशद करताना तो अभिजात संस्कृत वाङ्मयातील अवतरणे उद्धृत करतो. [सं. सा. सो. इ.; अ. हि. क. का.; दि हिस्टरी ऑफ संस्कृत लेक्झिकॉग्राफी– डॉ. म. मं. पाटकर; म. ज्ञा. को.; योजना, जानेवारी १९६०; राजतरंगिणी; सं. सा. इ.]

मंखली गोशाल

एक नियतवादी तत्त्वज्ञ आणि महावीराचा समकालीन. याला मक्खली गोसाल असेही म्हणतात. मंखली किंवा मक्खली हा शब्द संस्कृत मस्करीवरून आला आहे. मस्कर म्हणजे वेळुदंड होय. तो धारण करणारा तो मक्खली. हा शब्द परिव्राजक या अर्थी पाणिनीने सांगितला आहे. मस्करी लोक काम्य कर्मांचा परित्याग करण्याचा उपदेश करीत फिरत असत. त्यावरून मस्करी शब्दाचा व्युत्पत्तिलभ्य अर्थ काम न करणारा (माकरणशील:), अकर्मण्यतावादी किंवा नियतवादी असा होतो. बौद्ध निकायांवरून या अर्थाला पुरेशी पुष्टी मिळते. मस्करी लोकांचा उपदेश असा होता– 'नत्थि कम्म, नत्थि किरियं, नत्थि विरियं' (कर्म नाही. क्रिया नाही, वीर्य नाही.) पाणिनीच्या पूर्वी बराच काल आणि बुद्धानंतरही बराच काळ भारतात या संप्रदायाचे अस्तित्व होते. जैन ग्रंथावरून मस्करींविषयी कळते, ते असे–

हे लोक कठोर तपस्वी असत. ते हठयोगाची कठीण साधना करून आपला देह कृश करीत, पंचाग्नितप करीत, शरीरावर भस्म चोपडीत आणि जटादाढी वाढवीत.

मंखली गोशाल हा अशा लोकांपैकीच एक होता. तो मगधाचा निवासी असून, तीर्थंकर महावीराचा पहिला शिष्य आणि मोठा भक्त होता. महावीराची त्याच्यावर मोठी कृपा होती. एकदा वेश्यायन नामक एका बाल तपस्व्याने गोशालाकडून अपमानित झाल्याकारणाने गोशालावर तेजोलेश्या नावाची शक्ती सोडली होती. त्या वेळी महावीराने शीतलेश्या नामक शक्तीचा प्रयोग करून गोशालाचा जीव वाचवला होता.

गोशाल नंगा राही, उकिडवा बसे आणि पंचाग्निसाधन करी. बुद्ध त्याला नास्तिक आणि आपला शत्रू मानी. गोशाल अत्यंत बुद्धिमान होता, तर्ककर्कश होता. महावीराच्या संगतीत तो सहा वर्षे राहिला; पण त्यानंतर महावीराची मते त्याला पटेनाशी झाली आणि त्यामुळे तो त्याच्यापासून विभक्त झाला. कालांतराने ते दोघे एकमेकांचे कठोर टीकाकार व प्रतिस्पर्धीच बनले. गोशालाने पुढे श्रावस्ती हे आपल्या पंथाचे केंद्र बनवले. तो प्रथम जैन होता. नंतर तो आजीवक बनला. त्याला सहा शिष्य मिळाले. ज्ञान, कलंद, कर्णिकार, अच्छिद्र, अग्निवैश्यायन व गोमायुपुत्र अर्जुन अशी त्यांची नावे आहेत. या सर्वांनी गुरूच्या चरित्राचे व तत्त्वज्ञानाचे अनुशीलन करून अष्टचरमवाद स्थापित केला. गोशाल आणि त्याचे हे सहा शिष्य यांनीच आजीवक संप्रदायाची भारतात अभिवृद्धी केली. जैन मताप्रमाणे महावीर हा शेवटचा तीर्थंकर होय. पण गोशाल स्वत:ला शेवटचा तीर्थंकर मानी. तत्कालीन धर्माचार्यांत आणि तत्त्वज्ञ पुरुषांत गोशालाची गणना होई. महावीराच्या पूर्वी १६ वर्षे त्याने इहलोक सोडला, असा उल्लेख मिळतो. गोशालाचे तत्त्वज्ञान त्रिपिटक व जैनांचे अंग ग्रंथ यांत अनेक ठिकाणी उद्धृत झालेले आहे. दीघनिकाय या बौद्ध ग्रंथात त्याचे तत्त्वज्ञान थोडक्यात दिले आहे, ते असे–

माणसांच्या क्लेशांना कोणता हेतू नसतो किंवा प्रत्ययही नसतो. कारणावाचून आणि प्रत्ययावाचून प्राणी क्लेश पावतात आणि शुद्धही होतात. प्राणी आपल्या शक्तीच्या आधारावर काहीही करू शकत नाहीत. दुसऱ्याची मदत घेऊनही त्यांना कार्य करता येत नाही. प्राण्याच्या ठिकाणी बल नाही, वीर्य नाही आणि पराक्रमही नाही. सर्व सत्त्व, सर्व प्राणी, सर्व भूत आणि सर्व जीव, हे पराधीन, निर्मल आणि निर्वीर्य आहेत. ते भाग्य आणि संयोग यांच्या फेऱ्यात पडून सुख-दु:खे भोगतात. जगात वधघट किंवा उत्कर्ष-अपकर्ष काहीही नाही. सुताची गुंडी फेकल्यावर उलगडते आणि गळून पडते, त्याप्रमाणे पंडित आणि मूर्ख जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात पडून आणि चौऱ्यांशी लक्ष योनी फिरून शेवटी दु:खमुक्त होणार आहेत.

जें व्हायचे नसेल ते होणार नाही, व्हायचे असेल ते टळणार नाही. दैवात नसेल, तर हातात आलेली वस्तूही नष्ट होईल. सारे काही शुभाशुभ नियतीच्याच बळावर घडत असते आणि जे घडायचे असेल, त्याला माणसाचे प्रयत्न टाळू शकत नाहीत. पाहा–आजीवक. [बौ. द. मी.; बौ. सा. सां. झ.]

मंगन

एक जात. या लोकांची वस्ती छत्तीसगढ व संबळपूर या भागात आढळते. मंगन या शब्दाचा अर्थ भिकारी असा आहे. हे लोक स्वत:ला घसिया असे म्हणतात. परंतु घसिया मात्र यांना स्वत:पैकी मानीत नाहीत. घसिया जातीतल्या वेश्यांची अन्य जातीतल्या पुरुषापासून झालेली ही संतती आहे, असे ते मानतात. घुंगरू हे या जातीचे प्रतीक आहे. हा एक ढोल असतो. घासियांच्या लग्नसमारंभात मंगनांकडे घुंगरू वाजविण्याचे काम असते. याशिवाय हे घसियांच्या वंशावळीही जतन करून ठेवतात. कधीकधी हे लोक झाडूवाल्याचेही काम करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांची पाच देवके आहेत, त्यांची नावे अशी– सोने, शेंदूर, म्हैस, महानदी व वाघ. ज्या कुळांची ही देवके आहेत, त्यांची नावे अनुक्रमे सुनानी, सेंदरिया, भैंसा, महानदिया आणि वाघ अशी आहेत. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मंगम्म द. भारतातील एक ग्रामदेवता. ही सती देवता म्हणून प्रसिद्ध आहे. कोणी एक पतिव्रता स्त्री सती गेल्यानंतर काही दिवसांनी त्या गावाच्या उत्तरेला एक दगड उत्पन्न झाला. पुढे तो सतीचा दगड म्हणून लोक त्याला भजू लागले. या देवतेच्या मूर्ती असत नाहीत व मंदिरेही आढळत नाहीत. लोक एखाद्या पाषाणालाच शेंदूर फासतात व त्याला देवी समजून भजतात. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

मंगल हा एक शिष्टाचार आहे. याला मंगलाचरण असेही म्हणतात. त्याच्या दोन व्याख्या अशा– 'विघ्नविनाशनानुकूलव्यापारविशिष्टत्वं मङ्गलम्' = विघ्नविनाशनाला अनुकूल असा विशिष्ट व्यापार म्हणजे मंगल होय. आणि 'समाप्तिप्रतिबन्धकीभूतदुरितविशेषविघातकत्वम्' = कार्यसमाप्तीला प्रतिबंधक होणारे जे विशिष्ट पाप, त्याचा विघात करते ते मंगल होय. (न्या. को.) सांप्रत लग्नादी मंगल कार्यात गणपतिपूजन व पुण्याहवाचन करतात, तोही मंगलाचाच प्रकार आहे. कार्याच्या आरंभी व अंती कोणतेतरी शुभ अनुष्ठान करणे, अशी प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. ग्रंथांच्या प्रारंभी काही देवता, विशेषेकरून गणपती, शारदा व सद्गुरू यांच्या नमनाचे श्लोक, ओव्या किंवा छंद असतात, ते त्या ग्रंथाचे मंगलाचरण होय. जुन्या नाटकांच्या प्रारंभीही सूत्रधार प्रथम ईशस्तुतीचे एक पद म्हणत असे, त्याचाही हेतू नाटक निर्विघ्नपणे पार पडावे असाच आहे. तमाशात प्रारंभी गण-गौळण गाण्याचा प्रघात आहे. गण म्हणजे गणपती व गौळण म्हणजे गोपींची मथुरेची वाट अडवणारा कृष्ण होय. या गण-गौळणीचा हेतूही मंगलाचाच असतो. बहुतेक जुन्या संस्कृत, प्राकृत व देशी भाषा यांमधील ग्रंथांच्या प्रारंभी असे मंगलाचरण बहुधा असतेच. कालिदासाने रघुवंशाच्या प्रारंभी पार्वतीपरमेश्वरांच्या नमनाचा श्लोक घालून ग्रंथाचे मंगल केले आहे, ते असे–

वागर्थाविव सम्पृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ।।

अर्थ – शब्द व त्याचा अर्थ यांचे सम्यक ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून शब्द व त्याचा अर्थ यांच्याप्रमाणे एकमेकांशी निगडित असलेल्या व अखिल जगताचे मायबाप असलेल्या शंकर-पार्वतींना किंवा पार्वतीप = शंकर, रमेश्वर -- विष्णू यांना मी प्रणाम करतो.

भाषापरिच्छेद या न्यायग्रंथाचे मंगल कृष्णस्तवनपर असून, तो श्लोक पुढीलप्रमाणे आहे–

नूतनजलधररुचये गोपवधूटीदुकूलचौराय ।
तस्मै कृष्णाय नमः संसारमहीरुहस्य बीजाय ।।

अर्थ – नवमेघाप्रमाणे कांतिमान, गोपस्त्रियांची वस्त्रे चोरणारा आणि संसाररूपी वृक्षाचा बीजभूत अशा त्या कृष्णाला नमस्कार असो.

ज्ञानेश्वरांनी आपल्या भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) या ग्रंथाच्या प्रारंभी आत्मरूप परब्रह्माला नमस्कार करून मंगल केले आहे, ती ओवी अशी–

ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।

जैनांनी मंगल शब्दाच्या व्याख्या थोड्या वेगळ्या केल्या आहेत. त्यांपैकी दोन अशा–(१) 'मलं गालयतीति मङ्गलम्' = मलाला दूर करणारे ते मंगल होय. (२) 'मं पापं गालयतीती मङ्गलम्' = मं म्हणजे पाप; ते नष्ट करते ते मंगल होय. याचे स्पष्टीकरण करताना आचार्य विद्यानंदी लिहितो– श्रेयोमार्गातल्या सिद्धीमध्ये विघ्न उत्पन्न करणारे पाप म्हणजे मल होय. हा मल परमेष्ठीच्या गुणस्तवनाने गळून जातो म्हणून अशा स्तवनाला मंगल म्हणावे (आप्तपरीक्षा).

शास्त्राच्या प्रारंभी मंगल केल्याने शिष्य त्या शास्त्रात पारंगत होतो. शास्त्राच्या मध्यभागी मंगल केल्याने विद्या निर्विघ्नपणे प्राप्त होते आणि अंती मंगलाचरण केल्याने विद्येचे फल मिळते, असे आचार्य यतिवृषभ याने सांगितले आहे. आचार्य पूज्यपादाने आपल्या सर्वार्थसिद्धी या ग्रंथाच्या प्रारंभी मंगलाचरण केले आहे, ते असे–

मोक्षमार्गस्य नेतारं भेत्तारं कर्मभूभृताम् ।
ज्ञातारं विश्वतत्त्वानां वन्दे तद्गुणलब्धये ।।

अर्थ – मोक्षमार्गाचा नेता, कर्मरूपी पर्वतांचा भेद करणारा आणि विश्वतत्त्वांचा ज्ञाता असा जो (भगवान महावीर) त्याला, त्याच्या गुणांची प्राप्ती व्हावी म्हणून मी वंदन करतो.

जैनांनी मंगलाचे सहा भेद मानले आहेत, ते असे– (१) नाम, (२) स्थापना, (३) द्रव्य, (४) क्षेत्र, (५) काल व (६) भाव. यांतले शेवटचे सर्वश्रेष्ठ होय.

ज्या ग्रंथांच्या प्रारंभी मंगल असते, ते ग्रंथ प्रसिद्ध होतात आणि त्यांचे अध्ययन करणारे विद्यार्थी आयुष्मान व सफलमनोरथ होतात, अशी प्राचीनांची धारणा होती. सिद्ध, वृद्धी, अर्थ, इ. शब्दही मंगलसूचक मानले जात. पाणिनीने पहिल्या सूत्रात वृद्धी, वार्तिककाराने पहिल्या वार्तिकात सिद्ध व पतंजलीने आपल्या महाभाष्याच्या प्रारंभी अर्थ शब्दाचा प्रयोग केला आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंगलगिरी आठ महाक्षेत्रांपैकी एक पवित्र क्षेत्र. आंध्र प्रदेशातील विजयवाड्यापासून आठ मैलांवर हे ठिकाण आहे. हा एक लहानसा पर्वत आहे. याच्या शिखरावर नृसिंहस्वामीच्या अवतारातील नारायणाचे मंदिर आहे. या मंदिराला पनकल नृसिंहस्वामीमंदिर असे म्हणतात. इथल्या मंदिरात गुळाचे पाणी देवाला वाहण्याची पद्धत आहे. या पाण्याला पनक असे म्हणतात. हे पाणी शंखाने देवाच्या मुखात घातल्यावर नारायण आपले समाधान झाले, असे दर्शवितो आणि मुखात घातलेले अर्धे पाणी बाहेर काढतो. मग हे पाणी तीर्थ म्हणून सर्वांना देतात. देव पाणी पीत असताना घटघट असा आवाज येतो, हे इथले वैशिष्टय होय. प्रत्येक यात्रेकरू देवाच्या मुखात हा पाणी घालण्याचा विधी करतो. यावरूनच या मंदिराला पनकल नृसिंहस्वामीमंदिर असे नाव मिळाले आहे.

ब्रह्मवैवर्त पुराणात या देवालयाचा इतिहास सांगितला आहे, तो असा– पारियात्र नावाचा एक राजा होता. त्याला ह्रस्वशृंगी नावाचा, शारीरिक व्यंग असलेला एक मुलगा झाला. आपले व्यंग घालवावे म्हणून ह्रस्वशृंगीने अनेक तीर्थयात्रा केल्या आणि कशाचाच काही उपयोग होत नाही, असे पाहून अखेरीस तो या पर्वतावर आला. इथे त्याने तीन वर्षे उग्र तप केले. त्यामुळे पारियात्र बेचैन झाला. इथे येऊन त्याने मुलाला तपापासून निवृत्त होण्याचा आग्रह सुरू केला. ह्रस्वशृंगीला वडिलांची विनंती मोडवेना आणि तपही सोडवेना. शेवटी या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी ह्रस्वशृंगीने हत्तीच्या आकाराचे पर्वतरूप धारण केले. त्याच्या या कृत्याने नरसिंह प्रसन्न झाला. तेव्हापासून हे स्थान पवित्र क्षेत्र ठरले.

चैतन्य महाप्रभूने मंगलगिरीवर जाऊन नारायणाचे दर्शन घेतले होते, असे सांगतात. विजयनगरच्या कृष्णदेवरायाचा एक शिलालेख या ठिकाणी आहे. ब्रह्मोत्सव हा इथला महत्त्वाचा उत्सव होय. [टें. ली. आं. प्र.]

मंगलचंडी देवीचे एक रूप. हिला मंगलचंडी असे नाव का मिळाले, याविषयी एक श्लोक आहे, तो असा–

सृष्टौ मङ्गलरूपा च संहारे कोपरूपिणी ।
तेन मङ्गलचण्डी सा पण्डितैः परिकीर्तिता ।

अर्थ – सृष्टीच्या वेळी मंगल रूप आणि कल्पान्ती क्रुद्ध रूप धारण करीत असल्यामुळे पंडितांनी या देवीला मंगलचंडी असे म्हटले आहे.

हिचे रूपध्यान कालिका पुराणात सांगितले आहे, ते असे–

यैषा ललितकान्ताख्या देवी मङ्गलचण्डिका ।
वरदाभयहस्ता च द्विभुजा गौरदेहिका ।।
रक्तपद्मासनस्था च रक्तकुण्डलमण्डिता ।
रक्तकौशेयवस्त्रा च स्मितवक्त्रा शुभानना ।।
नवयौवनसम्पन्ना चार्वङ्गी ललितप्रभा ।

अर्थ – या देवीला ललितकांता असे दुसरे नाव आहे. ही द्विभुज असून, हिचे दोन हात वरद व अभय या मुद्रेत असतात. ही गौरवर्ण, रक्त कमळावर बसणारी, रक्त कुंडल धारण करणारी, लाल रेशमी वस्त्र परिधान करणारी, स्मितमुखी, सुंदर मुखाची, सर्व अवयव सुंदर असणारी, जिची प्रभा मनोहर आहे, अशी आणि नवयौवनयुक्त आहे.

अष्टमी व नवमी या तिथींना एका वस्त्राच्या तुकड्यावर हिचे चित्र रेखून त्याची किंवा मूर्तीची पूजा करावी, असे सांगितले आहे. मंगळवारी हिची पूजा विशेष फलप्रद असते. ही मंगळ या ग्रहाची इष्टदेवता आहे. हिचा मंत्र असा –

ॐ ऱ्हीं श्रीं क्लीं हे सर्वपूज्ये देवि हे मङ्गलचण्डिके हुं हुं फट् स्वाहा ।

देवी भागवतात हिचे आख्यान, व्रत व स्तोत्र दिले आहे. त्रिपुरवधाच्या प्रसंगी प्रथम शंकराने हिची पूजा केली, त्यानंतर मंगळ ग्रहाने, नंतर मंगलराजाने, मग सुंदर स्त्रियांनी व शेवटी कल्याणेच्छू सर्व पुरुषांनी तिची पूजा केली, असे तिथे सांगितले आहे.

बंगालमध्ये मंगलचंडी ही एक लोकप्रिय देवता आहे. तिची पूजा सर्वत्र केली जाते. त्या भागात मंगलचंडीच्या दोन कथा प्रचलित आहेत. एक कालकेतूची कथा व दुसरी धनपतीची कथा. पैकी धनपतीची कथा अशी –

उज्जयिनी नगरीत धनपती नावाचा एक धनाढ्य व्यापारी राहत असे. त्याची पहिली बायको लहाना नावाची होती. तिला मूल होईना, म्हणून त्याने खुल्लना नावाची दुसरी बायको केली. त्या दोघी सवती घरात स्नेहाने वागू लागल्या. त्यांनी पुत्रप्राप्तीसाठी मंगलचंडीची आराधना सुरू केली. थोड्याच दिवसांत धाकट्या खुल्लनेला गर्भ राहिला. ती गर्भवती असताना धनपती व्यापारासाठी लंकेत गेला. योग्य काळी खुल्लनेला पुत्र झाला. दोघी मातांनी त्याचे नाव श्रीमंत असे ठेवले. पुढे तो मोठा होऊन शाळेत शिकू लागला. एके दिवशी बापावरून इतर मुलांनी त्याची चेष्टा केली. त्यामुळे तो रडत घरी आला. त्याने लहानेला विचारले की, ' माझी खरी आई कोण व माझे वडील कुठे आहेत ?' त्यावर लहाना त्याला म्हणाली. ' तुझी खरी आई खुल्लना असून, मी सावत्र आई आहे. तुझे वडील चौदा वर्षांपूर्वी व्यापारासाठी लंकेत गेले, ते अद्याप परत आले नाहीत. तिथल्या शालिवाहन राजाने त्यांना कैदेत ठेवले आहे, अशी बातमी आली आहे. '

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ती हकीकत ऐकून श्रीमंत आपल्या बापाला सोडवण्यासाठी लंकेत जायला निघाला. 'प्रसंग पडेल तेव्हा मंगलचंडीची प्रार्थना कर,' असे आयांनी त्याला सांगितले. श्रीमंताने जहाजात बसून लंकेचा मार्ग धरला. वाटेत मोठे वादळ झाले; पण त्याने मंगलचंडीची प्रार्थना करताच ते शमले. पुढे प्रवासात त्याला समुद्रावर कमळात बसलेली एक देवी दिसली. ती मंगलचंडीच होती. तिच्या मांडीवर एक हत्ती होता. ती त्या हत्तीची सोंड तोंडात घेऊन त्याला गिळीत होती आणि पुन्हा बाहेर टाकीत होती. श्रीमंताला त्या गोष्टीचे फार आश्चर्य वाटले.

लंकेत गेल्यावर शालिवाहन राजाने त्याचे स्वागत केले व त्याला प्रवासाचा वृत्तांत विचारला. श्रीमंताने त्या हत्ती गिळणाऱ्या देवीची गोष्ट सांगितली. राजाला ती गोष्ट खोटी वाटली. त्याने रागावून श्रीमंताला कैदेत ठेवण्याची नोकरांना आज्ञा केली. पण श्रीमंत गयावया करू लागला. तेव्हा राजा त्याला म्हणाला- 'चल, मला तू ती स्त्री दाखव म्हणजे मी खरे मानीन.' मग ते दोघे समुद्रप्रवासाला निघाले. पण ती हत्ती गिळणारी स्त्री मात्र त्यांना कुठेच दिसली नाही. त्यामुळे राजाचा क्रोध अनावर झाला आणि त्याने श्रीमंताला वधदंडाची शिक्षा दिली. राजदूत त्याला घेऊन वधस्थानी गेले. तेव्हा श्रीमंताने तिथे देवीची प्रार्थना केली. त्या क्षणी देवी प्रकट झाली. तिने श्रीमंताला आपल्या मांडीवर घेतले. लगोलग मारेकऱ्यांच्या तलवारीही तुकडे होऊन खाली पडल्या. त्यांनी राजाकडे जाऊन ही हकीकत सांगितली. मग राजा स्वतः तिथे आला. श्रीमंताला मांडीवर घेणारी ती स्त्री राजाला वृद्ध व अक्राळविक्राळ दिसली. राजाने प्रार्थना केल्यावर ती त्याला म्हणाली. 'समुद्रावर कमळात बसलेली देवी ती मीच होय. मी तुला दिसले नाही, याचे कारण तू पापी आहेस. तू या मुलाचा अकारण छळ केलास व याच्या बापाला विनाकारण कैदेत टाकून त्याची मालमत्ता हरण केलीस. तुला जर तुझे कल्याण हवे असेल, तर तू या पितापुत्रांची क्षमा माग, याच्या बापाची धनदौलत चौपट करून परत दे आणि तुझी सुशीला नावाची कन्या या श्रीमंताला देऊन तू त्याला जावई करून घे.'

राजाने ती गोष्ट मानली व देवीचे मूळ रूपात दर्शन व्हावे म्हणून प्रार्थना केली. तेव्हा देवीने त्याची इच्छा पूर्ण केली. मग त्याने देवीच्या आज्ञेप्रमाणे केले. धनपती आपला मुलगा, सून आणि अपार द्रव्य यांच्यासह सुखरूप घरी आला.

मध्यंतरीच्या काळात व्यापाऱ्याच्या दोन्ही बायकांनी आपल्या पतिपुत्रांच्या सुखरूप पुनरागमनासाठी मंगलचंडीची आराधना चालू ठेवली होती. त्यांची ती मनकामना पूर्ण झाली व त्यांनी जन्मभर मंगलचंडीचे व्रत आचरले. [हि. ध.; श. क.]

मंगलनीराजन ब्राह्म मुहूर्ती विष्णूची जी आरती करतात, तिला हे नाव आहे. याविषयी हरिभक्तिविलासात सांगितले आहे, ते असे– पहाटे उठून व शुचिर्भूत होऊन प्रभूची आरती करावी. या आरतीच्या प्रकाशात प्रभूचे श्रीमुख न्याहाळावे. असे केल्याने दैन्य–दारिद्र्य दूर होते, पाप नष्ट होते व सर्व मनकामना पूर्ण होतात.

षोडशोपचार पूजेत देवाला नैवेद्य दाखवल्यानंतर जी आरती ओवाळतात, तिलाही मंगलनीराजन असे नाव आहे.

मंगल फेरे लग्नातला एक विधी. हा प्रामुख्याने गुजरात प्रदेशात रूढ आहे. वधू पुढे आणि वर मागे या क्रमाने वधू-वर अग्निभोवती तीन प्रदक्षिणा घालतात, त्यांना हे नाव आहे. एक फेरी पुरी झाली, की पुरोहित वधूच्या पित्याला पहिले मंगल झाले, असे मोठ्याने सांगतो. याप्रमाणेच दुसरे व तिसरे मंगल पुरे होते. प्रत्येक मंगलाच्या अखेरीला पिता मुलीला काहीतरी दान देत असतो. [ल. वि. सो.]

मंगल रामायण एक मराठी रामकाव्य. गिरिधर कवी हा याचा कर्ता आहे. हा इ. स. च्या सतराव्या शतकात होऊन गेला. तो समर्थसंप्रदायातला होता. त्याने एकूण सात रामायणे लिहिली असे सांगतात. मंगल रामायण हे त्यांपैकीच एक होय. याला मंगल हे विशेषण देण्याचे कारण असे, की यातल्या प्रत्येक श्लोकाच्या शेवटी पुढील चरण पालुपदासारखा आलेला आहे–

कुर्यात् मंगल राघवं विजयते रामायणं मंगलम् ।।

हे सारे रामायण शार्दूलविक्रीडितात आहे. याची पहिली सहा कांडे उपलब्ध आहेत. बालकांड १७४, अयोध्याकांड १२३, अरण्यकांड १२१, विष्णुपुराणकांड १२६, सुंदरकांड १०७ व युद्धकांड ९१५ अशी याची श्लोकसंख्या आहे. उत्तरकांडाचे सूचन आहे; पण ते उपलब्ध नाही. रामावताराचे रहस्य कवीने युद्धकांडातच सांगितले आहे. काही स्थळे मार्मिक, सरस व चातुर्ययुक्त असली, तरी एकूण हे काव्य सामान्यच म्हणावे लागेल. व्याकरणाचे दोष, शब्दांची ओढाताण, यतिभंग, गणभंग, असे अनेक दोष यात ठायीठायी दिसून येतात. प्रस्तुत काव्यातले, लंकेत वानरांनी घातलेल्या धुमाकुळाचे वर्णन असे–

पूर्व उत्तर पश्चमेसि कपिच्या भारे धरा डाटली ।
केले ते प्रतिमल्ल राक्षस पुढे कल्पांतवेळा भली ।।
पारश्वादि प्रहस्त अंकपन हे आज्ञापिले रावणे । कुर्यात्० ।।
अतिकाया त्रिशिरा नरांतक खरा देवांतकांची ढळे ।
मकराक्षादि विशाळ अक्ष सबळे धूम्राक्षकांची कुळे ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अठराक्षोण तुरे समस्त अतुरे येकत्र ते बाजिली । कुर्यात्० ।।
ऊभा रावण गोपुरी पाहातसे लंकाप्रदेशी कसे ।
दावाग्नि वडवानळि त्रिकुट हे व्यापूनि आले जसे ।।
षष्टीयोजन दुर्ग वेढुनि कपी अधोर्ध्व झेंपावले । कुर्यात्० ।।
केले ते प्रतिमल्ल दैत्य अवघे युद्धासि ते पातले ।
रामे ही प्रतिमल्ल वानर पुढे युद्धासि जे घातले ।।
लंका पालथि घालिती विर असे झेंपावले सर्वही । कुर्यात्० ।।
लंकेचा भडमार होत वरुनी भांडी विशाळे मुखे ।
काळाची वदने विशाळ सदने नाना ग्रहांची मुखे ।।
सिंदूरे बहु चर्चिली डवरली जाळीत आली दळे । कुर्यात्० ।।
पाहा– गिरिधर. [मंगलरामायण – श्री. देव, १९३९]

मंगलव्रत एक काम्य व्रत. आश्विन, माघ, चैत्र किंवा श्रावण महिन्यातील वद्य अष्टमीला या व्रताला प्रारंभ करतात आणि पुढच्या शुद्ध अष्टमीपर्यंत व्रत चालू ठेवतात. यात अष्टमीच्या दिवशी एकभुक्त करतात आणि कुमारिकांना, देवीच्या भक्तांना भोजन देतात. पुढे नवमीला नक्त भोजन, दशमीला अयाचित व एकादशीला उपवास करतात. प्रत्येक दिवशी होम, जप, पूजा, दान आणि कुमारिकांना भोजन हा विधी आवश्यक असतो. होमाच्या वेळी पशुबळी देतात. रात्री नृत्यनाटयादी करून जागर करतात. फल – सौभाग्यप्राप्ती. [हि. ध.]

मंगलादेवी एक देवता. जगन्नाथपुरीपासून ३९ मैलांवर काकापूर नावाचे एक गाव आहे. तिथे प्राची नदीच्या काठी या देवीचे मंदिर आहे. या देवीच्या स्थानाची एकावन्न शक्तिपीठांत गणना करतात. हे शक्तिपीठ जगन्नाथ मंदिराचे एक अंगभूत मानतात. या देवीच्या मंदिरात वीणायंत्र नावाचे एक यंत्र आहे, असे म्हणतात. पण ते कोणालाही दाखविले जात नाही. शारदीय नवरात्रात इथे मोठा उत्सव होतो. वासंतिक नवरात्रात होणाऱ्या उत्सवात या देवीचे भक्त अग्नीवरून चालण्याचे दिव्य करतात. या देवीच्या समोर प्राचीच्या पैलतीरावर विश्वामित्राचा आश्रम होता, असे सांगतात. [कल्याण–तीर्थांक]

मंगलाष्टक विवाहकृत्यात आशीर्वादपर असे आठ श्लोक म्हणतात, त्यांना मंगलाष्टक अशी संज्ञा आहे. वराची मधुपर्क पूजा झाल्यावर त्याला मांडवात एका तांदुळाच्या पुंजीवर पूर्वाभिमुख उभा करतात. त्याच्या समोर पश्चिमाभिमुख वधूला उभी करतात. दोघांच्या मध्ये अंतरपाट धरतात आणि मग ब्राह्मण काही संस्कृत व प्राकृत श्लोक म्हणतात. या श्लोकांच्या शेवटच्या चरणात शेवटी 'कुर्यात् सदा मङ्गलम्' असे पालुपद असते. पालुपदानंतर 'शुभमङ्गल सावधान' असा उद्घोष असतो. या उद्घोषाबरोबरच जमलेली सर्व मंडळी वधू-वरांच्या मस्तकावर अक्षता टाकतात.

मंगलाष्टकांचे श्लोक शार्दूलविक्रीडित वृत्तात असतात. या वृत्तातला कोणताही ईशस्तुतिपर श्लोक मंगलाष्टक म्हणून चालतो. मुंजीच्या वेळीही बटू आणि मुंज लावणारा यांच्या मध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टक म्हणण्याची प्रथा आहे. त्या वेळी श्लोकाच्या अखेरीस 'कुर्यात् बटोर्मङ्गलम्' असे म्हणतात.

सामान्यपणे सर्वत्र म्हटले जाणारे मंगलाष्टकाचे श्लोक –
स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं
लेण्याद्रौगिरिजात्मकं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरम् ।।
बल्लाळं मुरुडं विनायकमढं चिन्तामणिस्थेवरं
ग्रामो रांजणसंस्थितो गणपतिः कुर्यात्सदा मङ्गलम् ।। १ ।।
नत्वा स्वां कुलदेवतां च कमलां विघ्नेश्वरं शारदां
वक्ष्ये कृष्णविवाहकौतुकमिदं चेतोहरं शृण्वताम् ।।
स्वस्यैवान्यगुणानुवर्णनपरिश्रान्तस्य विश्रान्तये
नित्यं स्वोदरपूर्तये कुहकवत् कुर्यात्सदा मङ्गलम् ।। २ ।।
यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै-
र्वेदैः साङ्गपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ।।
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणाः कुर्यात्सदा मङ्गलम् ।। ३ ।।
गङ्गा सिन्धु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा
कावेरी शरयू महेन्द्रतनया चर्मण्वती वेदिका ।।
क्षिप्रा वेत्रवती महासुरनदी ख्याता च या गण्डकी
पूर्णाः पूर्णजलैः समुद्रसहिताः कुर्यात्सदा मङ्गलम् ।। ४ ।।
लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वन्तरिश्चन्द्रमा
गावः कामदुघाः सुरेश्वरगजो रम्भादिदेवाङ्गनाः ।।
अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शङ्खोऽमृतं चाम्बुधेः
रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्यात्सदा मङ्गलम् ।। ५ ।।
भास्वान् काश्यपगोत्रजोऽरुणरुचिर्यो सिंहराशीश्वरो
षट्त्रिस्थो दश शोभनो गुरुशशी भौमेषु मित्रः सदा ।।
शुक्रो मन्दरिपुः कलिङ्गजनितश्चाग्नीश्वरौ देवते
मध्ये वर्तुलपूर्वदिग्दिनकरः कुर्यात्सदा मङ्गलम् ।। ६ ।।
चंद्रः कर्कटकप्रभुः सितनभश्चात्रेयगोत्रोद्भवः-
श्चाग्नेय्यां चतुरस्रवारुणमुखश्चापोप्युमाधीश्वरः ।।
षट्सप्ताग्निदशैकशोभनफलो नोरिर्बुधार्कप्रियः
स्वामी यामुनदेशजो हिमकरः कुर्यात्सदा मङ्गलम् ।। ७ ।।
ईशानो गिरिशो मृडः पशुपतिः शूली शिवः शङ्करो
भूतेशः प्रमथाधिपः स्मरहरो मृत्युञ्जयो धूर्जटिः ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीकण्ठो वृषभध्वजो हरभवौ गङ्गाधरस्त्र्यम्बको
श्रीरुद्रः सुरवृन्दवन्दितपदः कुर्यात्सदा मङ्गलम् ॥८॥

विद्वानांच्या मते लग्नात मंगलाष्टक म्हणण्याची पद्धत फारशी प्राचीन नसावी. ऋग्वेदीय ब्रह्मकर्मात वधू-वरांमध्ये अंतरपाट धरल्या वेळी 'सत्येनोत्तभिता भूमिः' हे विवाहसूक्त म्हणावे, असे सांगितले आहे. पाहा – विवाहप्रयोग.

मंगलेश्वर एक शिवस्थान. हे स्थान उज्जयिनी नगरात क्षिप्रा नदीच्या काठी आहे. नवग्रहांपैकी मंगळाचा जन्म या स्थानाजवळच झाला, अशी कथा आहे. या स्थानासंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी –

वीरमंगल नावाचा राजाश्रित ज्योतिषी होता. तो सात वर्षे केवळ दुधावर राहून ज्ञानदेवांची मार्गप्रतीक्षा करीत राहिला होता. पुढे तीर्थयात्रेच्या वेळी ज्ञानदेव इथे आले, तेव्हा त्यांनी एक दिवस वीरमंगलाच्या घरी मुक्कामही केला. त्या प्रसंगी वीरमंगलाने ज्ञानदेवांचा यथोचित सत्कार केला आणि आपला देह त्यांच्या चरणी समर्पिला. मग ज्ञानदेवांनी स्वहस्ते त्याला इथे समाधी दिली आणि त्या स्थळी शिवलिंगाची स्थापना केली. तोच हा मंगलेश्वर होय.

ही आख्यायिका मंगलेश्वराच्या जवळच असलेल्या उत्तरेश्वरासंबंधीही सांगतात. हा उत्तरेश्वर शिवलिंगांच्या गणनेत चव्वेचाळीसावे शिवलिंग म्हणून प्रसिद्ध आहे. [मा. प्रा. रा.]

मंगसुळी खंडोबाचे म्हैसूर राज्यातील एक स्थान. हे ठिकाण अथणी तालुक्यात आहे. गावाच्या पश्चिमेला थोड्या अंतराळावर एका माळावर खंडोबाचे देऊळ आहे. प्रथम हे मंदिर लहान होते. नंतर वडार लोकांनी ते मोठे केले. देवळाच्या आसमंतात बरीच मोकळी जागा असून, भोवती तटबंदी व आत भक्तांनी बांधलेल्या ओवऱ्या आहेत.

खंडोबाच्या उत्तर अंगाला हेगडे प्रधानाचे देऊळ आहे. देवळाच्या चारी कोपऱ्यांवर लहान मनोरे आहेत. त्यामुळे मंदिराचे एकूण बांधकाम मशिदीप्रमाणे दिसते. मुसलमानांच्या आक्रमक नजरेतून सुटण्यासाठी केलेली ही क्लृप्ती असावी. खंडोबा व हेगडे प्रधान यांच्या मंदिरावरील कळसांचे काम कोणी संगय्या लिंगय्या नामक माणसाने इ. स. १७३१ साली केले असे म्हणतात.

इथे चैत्र शुद्ध दशमी व आश्विन शुद्ध दशमी या दिवशीं मोठी यात्रा भरते. या वेळी लंगर तोडण्याचा कार्यक्रम होतो. या यात्रेशिवाय प्रत्येक पौर्णिमेला व अमावास्येला अनेक लोक इथे दर्शनाला येतात. या मंदिरात स्त्रिया देवाला स्पर्श करीत नाहीत. [पुरुषार्थ, जून-जुलै १९६३.]

मंगळ नवग्रहांतला तिसरा व सूर्यकुलातला चवथा ग्रह. याला भौम, कुज, अंगारक अशी अन्यही नावे आहेत. ज्योतिषशास्त्रात याला दुष्टग्रह मानले आहे. हा रक्तवर्ण, दक्षिण दिशेचा स्वामी, तमोगुणी व अवंती देशाचा अधिपतीं आहे. त्याचे रूपध्यान असे – मेषवाहन, चतुरंगुलप्रमाण, रक्त वस्त्र व रक्त पुष्पे धारण करणारा, चतुर्भुज, दोन हातांत शक्ती व गदा धारण करणारा, दोन हातांची अभय व वरद मुद्रा दाखवणारा आणि सूर्याभिमुख.

याचा जन्म आषाढात झाला असून, संपत वसू नावाच्या सूर्यकिरणाने याचे पोषण होते. कार्तिकेय ही याची अधिदेवता व पृथ्वी ही प्रत्यधिदेवता आहे. काव वगैरे धातू, चतुष्पाद प्राणी व स्वर्णकार यांच्यावर याचे स्वामित्व असते. फलज्योतिषात याला युद्धाची देवता मानले आहे. या ग्रहाकडे पराक्रम, उद्योग, साहस, अपघात, उत्पात, अग्निप्रलय, साथीचे रोग, धरणीकंप, बंडाळ्या, मारामाऱ्या, दंगेधोपे, रक्तपात व वादळे यांचे कारकत्व आहे. तो ऋणकर्ता आहे, तसाच ऋणहर्ताही आहे. तो वृष्टिकर्ता तसाच वृष्टिहर्ताही आहे.

मंगळ ग्रह

हा मेष व वृश्चिक या राशींचा स्वामी आहे. मकर राशी हे त्याचे उच्च स्थान असून, कर्क राशी हे नीच स्थान आहे. सूर्य, चंद्र व गुरू हे याचे मित्रग्रह असून, बुध हा शत्रुग्रह आहे. जन्मकुंडलीत जन्मलग्नापासून तिसऱ्या, दहाव्या किंवा अकराव्या स्थानी, तसेच स्वगृहीचा व उच्चीचा असता सदर मनुष्य शूर, धाडशी, अंतःस्फूर्तीचा व प्रामाणिक बनतो. तो ज्या स्थानी असेल व ज्या स्थानावर दृष्टी ठेवीत असेल, त्या स्थानांच्या फळांत न्यूनत्व किंवा विपरीतपणा आणतो.

जन्मलग्नकुंडलीत मंगळ बारा, एक, चार, सात व आठ या स्थानी असता, ती पत्रिका मंगळाची आहे असे समजतात. वधूवरांचे घटित जमवताना मंगळाचा विचार करतात. मंगळ असला, तर तो दोघांच्याही कुंडलीत असावा आणि नसला तर दोघांच्याही कुंडलीत नसावा, असे फलज्योतिष सांगते. मंगळाची दृष्टी चार, सात व आठ या स्थानांवर असते; असे सांगितले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. मंगळ अनिष्ट असता सुवर्ण, प्रवाळ, रक्तवस्त्र, रक्तवृषभ गूळ, इ. वस्तूंचे दान करावे, 'अग्निर्मूर्धादिव:' या मंत्राचा दहा हजार जप करावा व पोवळे अंगावर धारण करावे, असे ज्योतिषशास्त्रात सांगितले आहे.

उत्पत्तिकथा – पुराणांत सांगितलेल्या मंगळाच्या काही उत्पत्तिकथा अशा –

(१) एकदा विष्णूचे सुंदर रूप पाहून पृथ्वी कामातुर झाली व त्याच्याकडे गेली. तिचा भाव जाणून विष्णूने तिची इच्छा पूर्ण केली. वीर्याधान होताच तिला मूर्छा आली. विष्णू तिथून निघून गेला. थोड्या वेळाने उर्वशी तिथे आली आणि तिने पृथ्वीला सावध केले. जागी झाल्यावर विष्णूचे ते वीर्य पृथ्वीला सहन होईना. म्हणून तिने ते एका पोवळ्याच्या खाणीत टाकून दिले. त्यातून पुढे एक सूर्यासारखा तेजस्वी पुत्र उत्पन्न झाला. तोच हा मंगळ होय. (ब्रह्म वै. पु. ८).

(२) एकदा विष्णू भ्रमण करीत असता त्याच्या अंगावरून घर्मबिंदू गळाला. त्यातूनच एक पुत्र उत्पन्न झाला. तो रक्तवर्ण होता. पृथ्वीने त्याला प्रेमाने वाढवले. नंतर तो तपश्चर्या करून ब्रह्मदेवाच्या वराने आकाशात ग्रह झाला. (पद्म पु. स्वर्ग ११).

(३) शिव हा दक्षाचा जावई; पण त्या दोघांचे वैर होते. दक्षाने एकदा यज्ञ केला आणि यज्ञात शिवाला पाचारण केले नाही. त्यामुळे शिवाला क्रोध आला. त्याने आपल्या जटेतून वीरभद्र नावाचा एक पुरुष उत्पन्न केला व त्याच्या करवी दक्षयज्ञाचा विध्वंस केला. यज्ञविध्वंस केल्यावर वीरभद्र जग जाळीत सुटला. मग शिवाने त्याला आवरले, शांत केले आणि ग्रहमंडलात स्थापले. तोच हा मंगळ होय. (मत्स्य पु. ७१).

(४) अवंती नगरात भारद्वाज नावाचा एक ब्राह्मण असून, तो वेदशास्त्रसंपन्न होता. एके दिवशी तो क्षिप्रा नदीच्या काठी अनुष्ठानाला बसला असता, एक सुंदर स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. त्यामुळे अनुष्ठानावरचे त्याचे लक्ष उडाले आणि वीर्यस्खलनही झाले. पण तेवढ्यात ती स्त्री अदृश्य झाली. हा काय चमत्कार असे तो म्हणत आहे तोच त्याच्याजवळ भूमीतून एक बालक वर आले आणि त्याच क्षणी 'भारद्वाजा, हा तुझा पुत्र आहे; तू याचे पालन कर' अशी आकाशवाणी झाली. भारद्वाजाने त्या मुलाला आश्रमात आणले व त्याचे मंगल असे नाव ठेवले (अवंतीमाहात्म्य).

मंगळाची वैज्ञानिक माहिती – मंगळ दिसायला तांबूस व तेजस्वी असल्यामुळे तारामंडळातून त्याला शोधून काढणे कठीण नाही. तो पृथ्वी व सूर्य यांच्या मधे नसून बाहेर आहे. म्हणून त्याला बहिर्ग्रह म्हणतात. सूर्यापासून पृथ्वी जितकी दूर आहे, त्याच्या दीड पटीने मंगळ दूर आहे. सूर्यापासून त्याचे अंतर चौदा कोटी सात लक्ष मैल आहे. याला सूर्याभोवती प्रदक्षिणा करण्यास ६८७ दिवस लागतात. दर सेकंदाला सुमारे १५ मैल या वेगाने तो ही सूर्यप्रदक्षिणा करीत असतो. याला स्वत:भोवती प्रदक्षिणा करण्यास २४ तास ३७ मिनिटे लागतात. म्हणजे पृथ्वी व मंगळ या दोहोंचेही अक्षभ्रमण जवळजवळ सारखेच आहे. ज्या वेळी तो षड्भांतरी (पृथ्वीच्या एका बाजूला सूर्य आणि दुसऱ्या बाजूला मंगळ) येतो, त्या वेळी तो पृथ्वीला खूप जवळ येत असल्याने, विशेष चकाकित दिसतो. ही स्थिती मंगळाचे वेध घेण्यास अनुकूल असते. इ. स. १९०९ साली मंगळ षड्भांतरी असताना प्रथमच त्याची छायाचित्रे यशस्वीपणे घेतली गेली.

मंगळाचा मार्ग बराच विवृत्ताकृती आहे. पृथ्वीच्या आयनिक वृत्ताशी मंगळाची कक्षा १° ५१' चा कोन करते. मंगळाचा सरासरी व्यास ४२५० मैल आहे. मंगळ हा अनेकदा वक्री होत असतो. वक्री झाल्यानंतर दोन महिन्यांनी तो मार्गी होतो. त्यानंतर दहा महिन्यांनी त्याचा पश्चिमेस लोप होतो. त्यानंतर चार महिन्यांनी पूर्वेस तो दिसू लागतो. दर्शन झाल्यावर दहा महिन्यांनी तो पुनश्च वक्री होतो. असा साधारण क्रम आहे. सामान्यपणे त्याचा वक्री होण्याचा काळ २७ महिन्यांचा आहे. रवी व मंगळ यांच्या मध्ये १६ विषुवांश अंतर आले असता त्याचा लोप होतो. तो बहिर्ग्रह असल्यामुळे शुक्राप्रमाणे क्षयवृद्धी पावत नाही.

इ. स. च्या १७ व्या शतकात दुर्बिणीने प्रथम मंगळाचे वेध घेतले गेले. त्या वेळी त्याच्या पृष्ठभागावर ओळख ठेवता येण्याजोग्या काही कायम खाणाखुणा असाव्या असे कळले. मंगळाच्या दक्षिणोत्तर ध्रुवांच्या प्रदेशात दुर्बिणीमधून पांढुरके प्रदेश दिसतात व ऋतुपरत्वे त्या प्रदेशांचा संकोच व विस्तारही होतो. मंगळाच्या एखाद्या रेखांशावर सूर्योदय होऊ लागतो, त्या वेळी त्या भागावर विरळ धुक्यासारखा पांढरा पट्टा दिसतो. शास्त्रज्ञ हे मंगळावर वातावरणाच्या अस्तित्वाचे गमक मानतात.

मंगळ लालकरडा दिसतो हे प्रत्यक्ष आहे. हा लालसर दिसणारा मंगळावरचा भाग बहुधा वालुकामय असावा व करडा दिसतो तो भाग जलमय असावा अशी कल्पना आहे. काहींच्या मते हा करडा भाग जलमय नसून, वनश्रीने भरलेला असावा. मंगळावर प्राणवायू नसावा असे शास्त्रज्ञ मानतात. मंगळाच्या छायाचित्रात एकमेकींनां छेदणाऱ्या करड्या सरळ रेषांचे जाळे दिसून येते. यातल्या बऱ्याच रेषा म्हणजे मोठ्या वृत्तांचे परिघीच असावे. जिथे या रेषा एकमेकींना छेदतात, तिथे मोठे पाणवठे किंवा तलाव असावे. शिया परेली या शास्त्रज्ञाने सतत नऊ वर्षे मंगळाचे वेध घेऊन त्याच्या वरच्या या काळ्या रेषा ओढे किंवा कालवे असावे असे मानले आहे. हे कालवे रुंदीला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सामान्यपणे सहा मैल असून, लांबीला शेकडो मैल असावे. अमेरिकेतील डॉ. लोवेल या शास्त्रज्ञाने हे कालवे मनुष्यनिर्मित असावे आणि आज नसली, तरी कोण्यातरी अति प्राचीन काळी मंगळाच्या विपुव प्रदेशात मानववस्ती असावी असे म्हटले आहे. पण बऱ्याच शास्त्रज्ञांना हे मत मान्य नाही. काही शास्त्रज्ञ एवढे मान्य करतात, की मंगळाच्या पृष्ठावर जे रंगाचे फेरफार आढळतात, तो प्रकार उद्भिज्ज सृष्टीतील फेरफारासारखा भासतो. त्या अर्थी तिथे कदाचित विशिष्ट अवस्थेतील उद्भिज्जे असू शकतील.

मंगळाला दोन लहान उपग्रह आहेत. त्यांचा शोध असफ हॉल नावाच्या एका अमेरिकन शास्त्रज्ञाने लावला. त्याने एकाचे नाव फोबास व दुसऱ्याचे डीमॉस असे ठेवले आहे. त्यांपैकी फोबास हा अवघा दहा मैल व्यासाचा असून, तो मंगळाच्या केंद्रापासून ५,८०० मैलांवर आहे. मंगळाभोवती प्रदक्षिणा करण्यास त्याला ७ तास ३९ मिनिटे लागतात. डीमॉस हा फारच लहान असून त्याचा व्यास अवघा पाच मैल आहे. मंगळापासूनचे त्याचे अंतर १४,६०० मैल आहे. मंगळाभोवती फेरी घालण्यास त्याला ३८ तास १८ मिनिटे लागतात. हे दोन्ही उपग्रह मंगळाभोवती त्याच्या विषुवपातळीतच फेऱ्या घालीत असतात. त्यांचा मार्ग जवळजवळ वृत्ताकृती आहे. मंगळाच्या विषुवभागाला जो बराचसा फुगवटा आहे, त्याच्या आकर्षणामुळे हे दोन्ही उपग्रह मंगळाच्या विपुव पातळीतच नेहमी खेचून ठेवले जातात.

मंगळाची अधिक सूक्ष्म माहिती थोड्याच दिवसांत आपल्याला मिळू शकेल, असे वाटते. कारण अनेक उपकरणांनी युक्त अशी अंतराळयाने मंगळाकडे पाठवण्याचा आणि त्या उपकरणांच्या करवी मंगळाची छायाचित्रे घेऊन त्याची तपशीलवार माहिती मिळवण्याचा संकल्प अमेरिकेने केलेला आहे. [श. क.; सूर्यकुल; ज्यो, सा. ज्यो. र.]

मंगळवार सप्ताहातला तिसरा वार. या दिवशी सूर्योदयाच्या वेळी मंगळाचा होरा असतो म्हणून याला मंगळवार म्हणतात. हा दिवस घातपाताचा समजतात. अभिचारादी क्रूर कर्मांस हा विहित मानला आहे. या दिवशी प्रवासाला जात नाहीत व पैशाची देवघेव करीत नाहीत. बायका या वारी चोळी शिवीत नाहीत व नवे वस्त्र परिधान करीत नाहीत; पुरुष श्मश्रू करीत नाहीत. देवी व गणपती यांच्या उपासनेचा हा वार मानतात. या दिवशी बायका देवीच्या दर्शनार्थ जातात. मंगळवारी संकष्टी चतुर्थी असल्यास तिला अंगारकी म्हणतात. तो दिवस गणपतीच्या उपासनेसाठी विशेष फलप्रद मानतात. मंगळ अनिष्ट असल्यास या वारी रक्त पुष्पांनी व गुडमिश्रित नैवेद्याने त्याची पूजा करतात. पत्रिकेत मंगळ दूषित असत संतानोत्पत्तीला बाधा येते. त्यासाठी एकवीस मंगळवारी मंगळाची विधियुक्त पूजा करावी, असे सांगितले आहे.

मंगळवेढे एक प्राचीन नगर. हे नगर महाराष्ट्रातल्या सोलापूर जिल्ह्यात असून, पंढरपूरपासून चौदा मैलांवर आहे. या गावाचे हे नाव पूर्व चालुक्यांपैकी पाचवा राजा मंगलीश याच्या नावावरून पडले असावे. मंगलाने वेष्टित असा जो देश तो मंगलवेष्टित किंवा मंगलवेष्टक होय. याचेच पुढे मंगळवेढे झाले असावे. यापूर्वी इथे मंगलाई नावाची देवी होती असे सांगतात. कदाचित तिच्या नावावरूनही हे नाव पडले असेल.

दक्षिणेतील कलचुरी राजा जोगम याचा पुत्र पेरमाडी उर्फ हेमाडी हा चालुक्य सम्राट सोमेश्वर (तिसरा) याचा मांडलिक होता. हेमाडीचा मुलगा बिज्जल (दुसरा) याने चालुक्यांचे राज्य हस्तगत केले. सातारा जिल्ह्यात म्हसवड इथे इ. स. ११४७ मधील एक शिलालेख सापडला असून, त्यात मंगळवेड हे कलचुरी बिज्जलाचे स्थिर शिबिर असल्याचा निर्देश आहे. बिज्जलानंतर रायमुरारी सोयीदेव उर्फ सोमेश्वर व सोमेश्वरानंतर संकम राजा झाला. या संकमाच्या शके १०९५ मधील एक कानडी शिलालेख आहे. त्यातही मंगळवाड हे कळचुरी सोयीदेव याचे स्थिर शिबिरस्थान असल्याचे म्हटले आहे.

बिज्जलानंतर मंगळवेढे बहामनी राज्यात सामील झाले. या काळातच प्रसिद्ध संत दामाजी याने मंगळवेढ्यातली ज्वारीची पेवे लुटल्याची हकीकत घडली. नंतर मोगल सरदार बहादुर जिलाणी याने मंगळवेढे व त्याच्या आसपासचा प्रदेश जिंकून तो मोगल अमलाखाली आणला (इ. स. १४६७–१४७५). नंतर बिदरचा बादशहा महबूबशा याने बहादुर जिलाणीचा पराभव करून मंगळवेढे पुन्हा बहामनी राज्यात सामील केले (इ. स. १४९४). या काळातच इथला भुईकोट किल्ला बांधला गेला. यानंतर विजापूरच्या आदिलशहाने हा गाव जिंकून आपल्या राज्यात सामील केला (इ. स. १४८९).

इ. स. च्या १७ व्या शतकात मंगळवेढे एक प्रमुख लष्करी ठाणे म्हणून प्रसिद्धी पावले. अकबराचा सरदार मीर जियाउद्दीन मुस्ताफाखान मंगळवेढ्याला राहत होता. इथल्या किल्ल्यावर कब्जा मिळविण्यासाठी वारंवार लढाया होत असत. विजापूरचा सरदार सर्जाखान व मोगल सरदार राजे जयसिंग यांची लढाई याच किल्ल्याच्या स्वामित्वासाठी झाली होती. या वेळी छत्रपती शिवाजीमहाराजांनी जयसिंगाला मदत केली होती. याच किल्ल्यात छत्रपती शिवाजीमहाराज व राजे जयसिंग यांची भेट झाली होती अशी नोंद आहे. नेताजी पालकराने हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किल्ला हस्तगत केला होता; पण पुन्हा विजापूरकरांनी तो जिंकून घेतला व त्यानंतर पुनश्च तो शिवाजीमहाराजांच्या अधिकारात आला. इ. स. १८७६ पर्यंत हा किल्ला चांगल्या स्थितीत होता. पुढे ब्रिटिश सत्ता आल्यावर कॅप्टन वेस्ट याने या किल्ल्याचे दरवाजे पाडले आणि मेजर वॉलरने याचा तट पाडला. आज केवळ किल्ल्याची चौबुर्जी तेवढी शिल्लक आहे. या किल्ल्याच्या पश्चिम दरवाज्याला दामाजी दरवाजा म्हणतात.

या गावची आध्यात्मिक परंपरा मोठी आहे. संत चोखामेळयाची ही कर्मभूमी होय. कान्होपात्रा ही संतीण याच गावची. जयतीर्थ हे माध्व आचार्यही याच गावचे. मंगळवेढे ही तर दामाजीची नगरी म्हणूनच ओळखतात. याशिवाय लतीफशाह, गैबीसाहेब, अक्कलकोटकरस्वामी, मौनीबुवा, शिवदासमहाराज वाखरीकर, सितारामममहाराज खर्डीकर, गोविंदबुवा, इ. संतांचा मंगळवेढ्याशी घनिष्ठ संबंध होता.

मंगळवेढ्यात ज्या ठिकाणी चोखोबाला मृत्यू आला त्या जागेवर एक घुमटी बांधली आहे. संत दामाजींचे इथे मंदिर आहे. दामाजीने दुष्काळात जी पेवे लुटली, ती गंगा-जमुना पेवांची जागा लोक दाखवतात. त्या जागेवर आता तळे आहे. वैशाख महिन्यात शुद्ध एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत संत दामाजीचा पुण्यतिथी-उत्सव इथे साजरा होतो.

याशिवाय या गावात ब्रह्मा, उमामहेश्वर, विष्णू, गणपती, महिषासुरमर्दिनी, भैरव, तीर्थंकर, यांच्या प्राचीन मूर्ती पाहायला मिळतात. इथली ब्रह्मदेवाची मूर्ती प्रसिद्ध असून, ती एका विहिरीत आहे. [श्री संत दामाजीपंतांचे मंगळवेढे, श्री. रा. ग. करंदीकर, १९६४; मु. पू. म.; ब. रा. इ.; प्रा. म. को. ले.; वि. मुं. रा. पं.; महाराष्ट्राच्या काही प्राचीन राजधान्या – श्री. दि. वि. काळे, सह्याद्रि, डिसेंबर, १९५२; मंगळवेढे–श्री. का. रा. मायदेव–स्वराज्य, १५ ऑगस्ट १९५३.]

मंगळसूत्र

महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांतील सुवासिनींचा प्रमुख सौभाग्यालंकार. मंगळसूत्रासाठी काचेचे काळे मणी दोन पदरी दोऱ्यात ओवतात व मध्यभागी सोन्याचे चार गोल मणी व सोन्याच्या दोन लहान वाट्या बसवतात. मंगळसूत्र बांधण्याचा विधी वैदिक विवाहप्रयोगात नाही. ही पद्धत अलिकडल्या काळातली असून, ती दक्षिणेतून वर आली आहे. तमिळनाड व केरळ या प्रदेशांत सर्व जातीजमातींत ताळी नावाचा एक सौभाग्यालंकार वधूच्या गळयात बांधण्याचा प्रघात आहे. त्यावरून मंगळसूत्र बांधण्याची प्रथा सुरू झाली असावी. उत्तर भारतात मंगळसूत्र प्रचारात नाही.

विवाहविधीत वर आपल्या हातांनी मंगळसूत्र वधूच्या गळयात बांधतो. त्या वेळी तो पुढील मंत्र म्हणतो–

माङ्गल्यतन्तुनानेन भर्तृजीवनहेतुना ।
कण्ठे बध्नामि सुभगे सा जीव शरदां शतम् ॥

अर्थ – हे सुभगे, पतीच्या जीवनाला कारणीभूत असे हे मंगलसूत्र मी तुझ्या गळयात बांधीत आहे. तुला शंभर वर्षे आयुष्य मिळू दे.

मंगळसूत्र सोन्याच्या तारेत गुंफून त्याचे निरनिराळे प्रकार करण्याचीही पद्धत आहे. [संस्कृति-संगम]

मंगळागौर

एक सौभाग्यदात्री देवता. हिची पूजा हे नवोढा मुलींचे नित्य व्रत आहे. लग्न झाल्यानंतर पुढे पाच किंवा सात वर्षे नवोढा मुली श्रावणातल्या प्रत्येक मंगळवारी हे व्रत करतात. या व्रतात शिव आणि गणपती यांच्यासह गौरीची पूजा करायची असते. या व्रतासाठी पुढीलप्रमाणे साहित्य लागते – दूर्वा, आघाड्याची पाने, तांदूळ, चण्याची डाळ, सोळा परींची पत्री, पाटापुटा (पाटा वरवंटा) व सोळा दिवे.

मंगळागौरीच्या पूजेसाठी चौरंग मांडतात. त्याला कर्दळीचे खुंट बांधून मखर करतात. ते लतापल्लवांनी सुशोभित करतात. चौरंगावर गौरीची मूर्ती स्थापतात. जवळ पाटापुटा ठेवतात. व्रतकर्ती स्त्री स्नान करून व धूत वस्त्र नेसून प्रथम दिवा लावते. मग पूजेला बसून पुढीलप्रमाणे संकल्प करते–

मम पुत्रपौत्रादिवृद्धये अवैधव्यभर्तुरारोग्यादि सकलकामनासिद्धिद्वारा श्रीशिवमङ्गलागौरीप्रीत्यर्थं पञ्च-वर्षात्मकं मङ्गलागौरीव्रतं करिष्ये ।

मग षोडशोपचारे पूजा करतात. पूजेत अंगपूजा, पत्रीपूजा, पुष्पपूजा अशा अंगभूत पूजा असतात. पूजेचा मंत्र असा–

पुत्रान् देहि धनं देहि सौभाग्यं देहि मङ्गले ।
अन्यांश्च सर्वकामांश्च देहि देवि नमोऽस्तु ते ॥

पूजा झाल्यावर पुरोहिताला सौभाग्यवायन देतात; सोळा वातींची मंगलारती करतात; मग हातात थोडे तांदूळ घेऊन बसतात व मंगळागौरीची पुढील कहाणी ऐकतात–

आटपाट नगर होते. तिथे धनपाल नावाचा एक वाणी होता. त्याला संतान नव्हते. त्याच्या दारी रोज एक गोसावी येई व अल्लख म्हणून पुकारी. वाण्याची बायको भिक्षा आणी; पण निपुत्रिकाच्या हातची भिक्षा घेत नाही म्हणून तो पुढे चालता होई. ही गोष्ट तिने नवऱ्याला सांगितली. नवरा म्हणाला, 'लपून बस आणि भिक्षा घाल.' तिने तसे केले. गोसावी रागावला व त्याने शाप दिला. बाई त्याच्या हातापाया पडली. तेव्हा तो तिला म्हणाला, 'नवऱ्याला सांग. निळा पोशाख घालून निळया घोड्यावर बसून वनात जा. जिथे घोडा अडेल तिथे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खण.' वाण्याने तसे केले. त्याला जमीन खणल्यावर एक देऊळ लागले. त्या देवळात पार्वतीची मूर्ती होती. वाण्याने तिची प्रार्थना केली. तिच्याकडे संतान मागितले. देवी म्हणाली. 'तुला एक पुत्र देईन; पण एक अट आहे. सुपुत्र हवा असेल, तर तो अल्पायुषी होईल. दीर्घायुषी हवा असेल, तर आंधळा होईल.' वाण्याने देवीकडे गुणवान सुपुत्रच मागितला. देवी म्हणाली, 'मागच्या अंगाला आंब्याच्या झाडाखाली गणपती आहे. त्याच्या दोंदावर पाय देऊन झाडावर चढ. एक आंबा तोड. घरी नेऊन तो बायकोला खायला दे. म्हणजे तुला मुलगा होईल.'

वाणी झाडावर चढला. त्याने पोटभर आंबे खाल्ले. मोटभर घरी नेण्याकरिता तोडले. खाली उतरून पाहतो तो एकच. असे चार-पाचदा झाले. मग गणपती रागावून बोलला. 'तुझ्या नशिबी एकच पुत्र आहे. तेव्हा अधिक आंब्यांचा मोह धरू नकोस.'

वाणी घरी आला आणि त्याने बायकोला तो आंबा खायला दिला. यथाकाल ती गर्भवती झाली. नवमासांनी प्रसवली. तिला पुत्र झाला. आईबापांनी शिव असे त्याचे नाव ठेवले. योग्य काळी वाण्याने त्याची मुंज केली. तो दहा वर्षांचा होताच त्याला मुली सांगून येऊ लागल्या. पण तो अल्पायुषी आहे हे ठाऊक असल्यामुळे आईबाप त्याचे लग्न करायला तयार होईनात. 'आम्ही मुलाला विद्या शिकण्यासाठी काशीला पाठवणार आहो. तो शिकून आला म्हणजे लग्नाचे बघू.' असे आईबाप लोकांना सांगत. मग त्यांनी काही दिवसांनी शिवाला मामाबरोवर यात्रेला पाठवले. मामा-भाचे काशीच्या मार्गाला लागले.

जाताना वाटेत एक नगर लागले. तिथे एका बागेत काही मुली खेळत होत्या. त्यांतल्या एकीचे नाव सुशीला होते. त्या मुलींची काही बाचाबाची झाली आणि त्यांतली एक सुशीलेला 'रांड' म्हणाली. त्यावर सुशीलेने म्हटले. 'माझ्या आईने गौरीचे व्रत केले आहे. मी तिची मुलगी. तुझी शिवी मला लागणार नाही. मी विधवा होणार नाही.'

शेजारच्या वाटेने जाणाऱ्या मामा-भाच्यांपैकी मामाने ही गोष्ट ऐकली. त्याला वाटले, ही मुलगी आपल्या भाच्याला मिळाली तर त्याचे आयुष्य वाढेल. तो भाच्याला घेऊन सुशीलेच्या मागोमाग गेला आणि तिच्या शेजारच्या घरी राहू लागला. थोड्याच दिवसांत सुशीलेच्या बापाने तिचे लग्न ठरवले; पण आयत्या वेळी नियोजित वर आजारी पडला. बापाला वाटले, की कोणीतरी आयत्या वेळी उभा करून तात्पुरते लग्न उरकून घ्यावे. ठरलेला मुलगा बरा झाला म्हणजे मग मुलगी त्याला द्यावी. त्यासाठी शिवाला बोलावून आणून त्याने त्याच्याशी सुशीलेचे लग्न लावले. रात्रौ उभयतांना गौरीहरापाशी निजवले. त्या रात्री मंगळागौर तिच्या आईच्या रूपाने स्वप्नात येऊन तिला म्हणाली. 'मुली, रात्री तुझ्या नवऱ्याला दंश करायला सर्प येईल. त्याला पिण्याकरिता दूध ठेव. एक मातीचा कोरा घडा जवळ ठेव. दूध पिऊन सर्प घड्यात शिरेल. तू अंगातल्या चोळीने त्या घड्याचे तोंड बांधून टाक. सकाळी उठून त्या घड्याचे वाण आईला दे.' मग दृष्टांताप्रमाणे सर्व काही घडून आले. काही वेळाने शिव उठला. भूक लागली म्हणू लागला. सुशीलेने त्याला एका ताटात लाडू दिले. भूक भागल्यावर शिवाने तिला आपली आंगठी दिली. मग शिव ते ताट उचलून तिथून निघाला. एका गुप्त स्थळी त्याने ते लाडवांचे ताट पुरले. मग तो मामाकडे आला. मामा-भाचे सकाळी उठून पुढच्या मार्गाला लागले. सकाळी उठून सुशीलेने घड्याचे झाकण उघडले. आत सापाच्या जागी हार निघाला. तिने त्याचे आईला वाण दिले. आईने तो हार सुशीलेच्या गळ्यात घातला.

एवढ्यात तिचा नियोजित वर मांडवात आला. आईबापांनी सुशीलेला त्याच्याशी खेळायला आणले. सुशीला म्हणाली. 'हा माझा नवरा नव्हे. मी याच्याशी खेळणार नाही.' त्यामुळे आईबापांना पंचाईत पडली.

इकडे मामा-भाचे काशीला पोचले. त्यांनी सगळ्या काशीची यात्रा केली, पुष्कळ दानधर्म केला; व ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले. तेवढ्यात एके दिवशी शिवाचे आयुष्य संपले. त्याला मूर्च्छा आली. यमदूत त्याचे प्राण न्यायला आले. त्यासरशी मंगळागौर त्यांना आडवी आली. तिने यमदूतांना पिटाळून लावले. मंगळागौर अदृश्य झाली. शिव जागा झाला. 'मला असे स्वप्न पडले' म्हणून मामाला सांगू लागला. मामा म्हणाला, 'तुझ्यावरचे गंडांतर टळले. आता तुझ्या आयुष्याला धोका नाही. आता आपण घरी जाऊ.' मामा-भाचे परतीच्या वाटेला लागले. परत येताना सुशीलेच्या गावावरूनच आले.

इकडे सुशीलेच्या बापाने तिच्या नवऱ्याचा शोध घेण्यासाठी अन्नसत्र सुरू केले शेकडो लोक सत्रात येऊन जेवू लागले. पण त्या लोकांत सुशीलेला तिचा नवरा काही सापडेना. मामा-भाचे गावच्या तळ्यावर स्वयंपाक करीत होते. एक दासी तिथे गेली आणि तिने त्यांना 'अन्नसत्रात जेवायला जा' असे सांगितले. ते जाईनात. तिला शंका आली. तिने जाऊन सुशीलेच्या आईला सांगितले. सुशीलेच्या आईने त्यांच्यासाठी पालखी पाठवली. मामा-भाच्यांना घरी आणले. पाय धुताना सुशीलेने नवऱ्याला ओळखले. सुशीलेच्या आईने शिवाला विचारले, 'तुझ्याजवळ खूण काय आहे?' त्याने पुरून ठेवलेले ताट दाखवले. सर्वांची खात्री पटली. सर्वांना आनंद झाला. आईबापांनी सुशीलेच्या नवऱ्याला चार दिवस ठेवून घेतले. मग मुलीसह त्याची पाठवणी केली. सुशीलेसह शिव आपल्या घरी आला. आपला मुलगा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दीर्घायुषी होऊन परत आला, याबद्दल वाण्याला आणि त्याच्या बायकोला आनंद झाला. सासूने पुढे होऊन सुनेचे पाय धरले. सुशीला म्हणाली, 'ही सारी मंगळागौरीची कृपा.' त्यांना मंगळागौर प्रसन्न झाली, तशी तुम्हां-आम्हां सर्वांना होवो. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

कहाणी ऐकून झाल्यावर मुली हातातले तांदूळ देवीला वाहतात. दुपारी मौन धरून जेवतात. रात्री हविष्यान्न खातात. पाच वर्षे व्रत केल्यानंतर त्याचे उद्यापन करतात. त्याही वेळी मंगळागौरीची पूजा करतात. गव्हाच्या कणकीचा दिवा करून त्यात तूपवात घालून तो तेवत ठेवतात. सोळा प्रकारची फुले, तांदूळ, धने, चण्याची डाळ, जिरे यांचे सोळा-सोळा दाणे, सोळा परीची पत्री व पाच बिल्वदळे देवीला वाहतात. सोळा दिव्यांनी ओवाळतात. रात्री जागरण करतात. दुसऱ्या दिवशी अग्नि-स्थापना करून तिल, घृत व पायस यांचा होम करतात. सुपात खण-लुगडे, पक्वान्ने व फळे घालून आईला किंवा तिच्या अभावी माहेरकडच्या मोठ्या सुवासिनीला वायन देतात. आठ दंपतींना भोजन घालतात. मग गौरीचे विसर्जन करतात.

महाराष्ट्रातल्या दक्षिणी ब्राह्मणांत या व्रताचा प्रघात आहे. नववधू पहिली मंगळागौर बहुधा माहेरी पुजते. या पूजेसाठी इतरही काही नववधूंना बोलावतात. त्यांना वसोळ्या किंवा वशेऱ्या म्हणतात. सर्वजणी एकत्र बसून पूजा करतात. पूजा झाल्यावर देवीच्या मूर्तीवर फूलपत्रींची रास करतात. त्या रात्री रात्रभर जागतात. रात्री जागरण हे या व्रताचे विशेष विधान आहे. त्या जागरणासाठी आप्तेष्ट बायका आणि शेजार-पाजारच्या बायका यांना बोलावतात. मग मुली झिम्मा-फुगडया खेळतात, उखाण्यासह नवऱ्याचे नाव घेतात, गाणी म्हणतात. एखादी वशेळी झोपली, तर तपेलीच्या गळ्याला दोरीचा फास लावून तिचे दुसरे टोक तिच्या पदराला बांधतात. मग 'तपेलीची लांब दोरी, तपेली संभाळ पोरी' असे म्हणून तिला जागवतात. दुसऱ्या दिवशी सकाळी पंचोपचार पूजा करून गौरीचे विसर्जन करतात. तिच्यावरची फूल-पत्री नदीत किंवा विहिरीत सोडून मग मुली आपापल्या घरी जातात. श्रावणातल्या प्रत्येक मंगळवारी अशी मंगळागौर वसतात. [व्रतराज]

मंगेश गोमंतकातील एक मोठे दैवत. अंतरुज महालातील प्रियोळ गावाच्या एका वाडयावर याचे मंदिर असून, त्याला मंगेशी असे नाव आहे. हे स्थान अत्यंत रमणीय आहे. देवस्थानाच्या प्रवेशद्वारापासून प्राकाराच्या दरवाज्यापर्यंत दोन्ही बाजूंना कठडा बांधून पक्का रस्ता केलेला आहे. प्राकाराच्या पूर्वेकडे उंच तट असून, त्याच्यावर मघोमघ चौघडयाची दुमजली इमारत आहे. या तटाच्या पूर्वेला तलाव असून, त्यात मध्यभागी तुळशीवृंदावन आहे. प्राकारात तीन बाजूंना भव्य दुमजली अग्रशाळा आणि मधोमध मंगेशाचे देवालय आहे. देवालयासमोर दीपस्तंभ आहे.

देवालयाच्या गाभाऱ्यात मुख्य स्थानी मंगेश, पुढे चौकावर नंदिकेश्वर, त्याच्या जवळ ग्रामपुरुष देवशर्मा आणि चौकावरील दरवाज्याच्या उजवीकडे गणपती आणि डावीकडे भगवती आहे. तसेच प्राकारात भूलकेश्वर, लक्ष्मीनारायण, सूर्य, गरुड, सांतेरी, कालभैरव, ग्रामपुरुष शिवशर्मा, इ. दवते आहेत.

मुळात मंगेशाचे नाव मांगिरीश असे आहे. त्याचे अपभ्रष्ट रूप मांगीश आणि मंगेश असे झाले आहे. यांविषयी स्कंद पुराणात एक कथा दिली आहे, ती अशी–

एकदा शंकर आणि पार्वती कैलासावर सारीपाट खेळत होते. त्यात शंकर हरला. तेव्हा पार्वती त्याला थट्टेने काही टोचून

श्रीमंगेश – प्रियोळ

बोलली. शंकराला त्याचा राग आला आणि तो तीर्थाटनासाठी निघून गेला. नंतर तो गोमंतकातील अघनाशिनी नदीच्या तीरावरील कुशस्थळी क्षेत्रात आला आणि नदीच्या जलात राहिला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुढे पार्वती शंकराला शोधीत कुशस्थळीला पोचली. तिथल्या वनप्रदेशात ती तप करू लागली आणि शंकराची स्तुतिस्तोत्रे गाऊ लागली. शंकर तिच्या स्तुतीने प्रसन्न झाला आणि तिची थोडी गंमत करावी, या हेतूने व्याघ्ररूपाने तिच्या समोर प्रकट झाला. वाघ समोर पाहून पार्वतीची बोबडी वळली आणि 'त्रां गिरीश त्राहि' असे म्हणण्याऐवजी ती 'मांगीश त्राहि' असे बोलून गेली. मग शंकराने निजरूप प्रकट केले व तिला वर मागण्यास सांगितले. तेव्हा तिने मांगीश या नावानेच लोकांनी तुम्हांला ओळखावे, असा वर मागितला. तेव्हापासून मांगीश हेच नाव रूढ झाले. त्याचेच पुढे मंगेश असे रूपांतर झाले.

पूर्वी मंगेश हे दैवत सासष्टीतील कुठ्ठाळ (कुशस्थळी) या गावी होते. पोर्तुगीज लोकांच्या वाटवावाटवीच्या प्रकरणात तेथल्या लोकांनी आपले देव घेऊन अंतरुज महालात पलायन केले आणि तिथेच जंगलात मंगेशाची स्थापना करून ते राहिले. सांप्रत हे देवस्थान मोठ्या वैभवात नांदत आहे.

वत्स व कौंडिन्य गोत्राचे सारस्वत ब्राह्मण हे मंगेशाचे मूळ महाजन असून, त्यांची आडनावे चौवीस आहेत. त्यांना वांगड अशी संज्ञा आहे.

देवस्थानात सतत बाराही महिने अभिषेक, लघुरुद्र, महारुद्रादी देवकृत्ये आणि शिविकोत्सव, लालकी उत्सव, रथोत्सव, समाराधनार्पण वगैरे उत्सव होत असतात. यांपैकी माघी पौर्णिमेचा उत्सव फार महत्त्वाचा असतो. दर सोमवारी देवाची पालखी निघते. [सा. भू.; गो. गौ. ब्रा. कु.]

मंगैयर्करशी (इ. स. चे ७ वे शतक). दक्षिणेतील चौसष्ट नायन्मारांपैकी एक. ही चोळ घराण्यातील राजकन्या व मदुरेची राणी होती. मदुरेचा पांडच राजा अरिकेसरी परांकुश मारवर्मन हा जैन होता; पण त्याची राणी मंगैयर्करशी आणि मुख्य प्रधान कुलच्छिरै ही दोघे शिवभक्त होती. पांडच घराण्याचे कुलदैवत सुंदरेश; पण त्याच्या पूजेकडे राजाने दुर्लक्ष केले. त्यामुळे या दोघांना फार वाईट वाटले. त्यांनी तिरुज्ञानसंबंदर या शैव संताला मदुरेला बोलावून घेऊन त्याच्याकरवी राजाचे मतपरिवर्तन घडवले. नंतर राजा शिवभक्त बनला. राणीला आनंद झाला. संबंदराच्या पदात या राणीच्या शील-गुणांचे वर्णन आले आहे. [ग्रे. वी. इं]

मंच प्राचीन काळचे एक आसन. पलंग, खुर्ची, सिंहासन, व्यासपीठ किंवा चौथरा, इतके याचे अर्थ मानसार ग्रंथात दिलेले आहेत. विनयपिटकात मंचाचे वर्णन व प्रकार दिलेले आहेत, ते असे- मंचाला पाय व चौकट असे. जेव्हा चौकट पायांत बसविलेली असे, तेव्हा त्याला मसारक मंच असे म्हणत. याचा नमुना मथुराकलेत पाहायला मिळतो. जेव्हा चौकटीला भोके पाडून त्यांत पायांची वरची बाजू बसवलेली असे, तेव्हा त्याला आहच्चपादक असे म्हणत. जेव्हा चौकट व पाय खिळे ठोकून जोडीत, तेव्हा त्याला बुंदिकाबद्ध असे म्हणत.

मंचाला मागे टेकण्याकरिता पाठ असे. काही मंच फार ठेंगणे आणि वेताचे किंवा बांबूचे बनवलेले असत. त्यांना वेत्रासन म्हणत. साधुसंत किंवा ब्राह्मण यांना बसण्यासाठी त्याचा उपयोग करीत. अमरावतीच्या शिल्पात अशा मंचांवर ब्राह्मण मंत्री बसलेले दाखवलेले आहेत. काही मंच गोलाकारही असत. [एन्सा. हिं. आ.; मै. गु. अ. ग्रं.]

मंचकारोहण एक शिशुविषयक कृत्य. याविषयी ज्योतिषसारात सांगितले आहे, ते असे-

मृग, अश्विनी, धनिष्ठा, रेवती, पुष्य, चित्रा, शततारका, अनुराधा, स्वाती व हस्त या नक्षत्रांवर बुध, गुरू व शुक्र या वारी आणि तूळ, कुंभ व वृश्चिक या लग्नांवर पूर्वेकडे डोके करून शिशूला पलंगावर प्रथम निजवावे.

मंचना (इ. स. १३०० चा सुमार). एक तेलुगू कवी. केयूरबाहु-चरित्र ही याची रचना होय. राजशेखराचे विद्धशालभंजिका नावाचे नाटक हा या काव्याचा मूलाधार असावा, असे विद्वानांचे मत आहे. मंचनाने या नाटकाची कथावस्तू घेऊन तिच्यात काही ठिकाणी आवश्यक ते फेरफारही केले आहेत. हे काव्य शृंगारप्रधान असून, त्यात काही नीतिकथाही आहेत. त्यांना पंचतंत्राचा आधार आहे. शिवाय, अनेक चमत्कारकथाही त्यात आहेत. केयूरबाहु-चरित्र चार आश्वासांत विभागलेले असून, त्यांत सातशे साठ पदे आहेत. काव्याची भाषा गद्य-पद्यमिश्रित, सरळ व साधी आहे. त्यात म्हणींचा वापर विपुल आहे. निसर्गवर्णने गद्यात आहेत. [ते. सा. इ.]

मंचित (इ. स. च्या १८ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक रीतिकालीन हिंदी भक्तकवी. याचा जन्म एका ब्राह्मणकुळात झाला. हा मध्य प्रदेशातील मऊ गावचा रहिवासी होता. याने कृष्णचरित्रासंबंधी सुरभी-दानलीला आणि कृष्णायन नावाचे दोन ग्रंथ रचले आहेत. पहिल्या ग्रंथात कृष्णाची बाळलीला, यमलार्जुन-पतन आणि दानलीला, इ. विषय सार छंदात आहेत. कृष्णायन हे तुलसीदासाच्या रामचरितमानसाच्या अनुकरणातून निर्माण झाले आहे. हा ग्रंथ व्रजभाषेत असून, त्यात अनुप्रासांची विपुलता आहे. पंडितांच्या मते कृष्णा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यनापेक्षा सुरभी-दानलीला ग्रंथ अधिक सरस आहे. [हिं. सा. इ.]

मंजुकुमार एक बोधिसत्त्व. हा मंजुश्रीचा एक प्रकार आहे. पाच ध्यानी बुद्धांपासून हा उत्पन्न झाला, असे मानतात. याचे मूर्तिध्यान असे – त्रिमुख, षड्भुज, रक्त, नील व गौर वर्ण. पशूवर आरूढ. एक हात वरद मुद्रेत. प्रज्ञापारमिता, कमल, धनुष्य, खड्ग व बाण ही आयुधे. [इं. बु. इ.]

मंजुघोष (१) एक भैरव. याची सात्त्विक, राजस व तामस अशी तीन रूपे आहेत. याचे मूर्तिध्यान असे –

श्वेतवर्ण, कुमार, पाच शेंडया असलेला, द्विभुज, एका हाती खड्ग व दुसऱ्या हाती पुस्तक, सभोवती अष्टभैरव, यक्ष, यक्षिणी इत्यादी.

हा तांत्रिक देव आहे. विविध तंत्रांत याची विविध रूपे व आयुधे कल्पिलेली आहेत. कुक्कुटेश्वर तंत्राप्रमाणे याला कोंबडयाचे डोके असून, विवस्त्र अवस्थेत तो बैलाच्या डोक्यावर बसलेला असतो. [श्रीविद्यार्णवतंत्र]

(२) एक बोधिसत्त्व. हा मंजुश्रीचा एक प्रकार आहे. साधनमालेत याचे रूपध्यान वर्णिले आहे, ते असे –

सिंहारूढ, कनकगौरवर्ण, सर्वालंकारांनी सुशोभित, व्याख्यानमुद्रा दर्शवणारा, डाव्या हाती उत्पल, मस्तकी अक्षोभ्याची प्रतिमा; उजव्या अंगी सुधनकुमार व डाव्या अंगी यमांतक. 'ॐ वागीश्वर मूः' हा त्याचा मंत्र आहे. [इं. बु. इ.]

मंजुल रामायण एक संस्कृत रामायण. हे रामायण अप्राप्य आहे, असे श्री. कामिल बुल्के यांनी म्हटले आहे. श्री. रामदास गौड यांनी या रामायणाची दिलेली माहिती अशी– यात एक लाख वीस हजार श्लोक आहेत. सुतीक्ष्ण नामक ऋषीने स्वारोचिष मन्वंतराच्या चौदाव्या त्रेतामध्ये याची रचना केली असून, ते सात सोपानांत निबद्ध आहे. भानुप्रताप अरिमर्दनाची कथा हा यातील विशेष भाग होय. याशिवाय हनुमान व सीता यांचा अशोक वनातील संवाद, हनुमंताला सांगितलेली भक्ति-व्याख्या, शबरीला सांगितलेली नवविधा भक्ती, इ. विषय यात आलेले आहेत. [हिंदुत्व; राम-कथा; रा. भ. शा.]

मंजुवज्र एक बोधिसत्त्व. हा मंजुश्रीचा एक प्रकार आहे. पाच ध्यानी बुद्धांपासून हा उत्पन्न झाला. याचे मूर्तिध्यान असे– त्रिमुख. तांबडे, निळे व पांढरे असे तीन मुखवर्ण. सहा हात. दोन हातांनी स्वभा–प्रज्ञा हिला आलिंगन. अन्य चार हातांत खड्ग, धनुष्य, बाण व कमल. चंद्रमंडलावर वज्रासन घालून बसलेला. तांत्रिक बौद्ध पंथात हा लोकप्रिय आहे. [इं. बु. इ.]

मंजुवर एक बोधिसत्त्व. हा मंजुश्रीचा एक प्रकार आहे. पाच ध्यानी बुद्धांपासून हा उत्पन्न झाला, असे मानतात. याचे मूर्तिध्यान असे – तप्त सुवर्णाप्रमाणे कांती, शृंगारभावयुक्त मुख, धर्मचक्र मुद्रा, प्रज्ञापारमितायुक्त, नीलकमल धारण करणारा आणि सिंहावर अर्धपर्यंकासनात आरूढ.

याच्या पुष्कळ मूर्ती आढळतात. एका मूर्तीत याच्या दोन्ही अंगी केशिनी आणि उपकेशिनी या मंजुश्रीच्या दोन भार्या आढळतात. हा तिबेटात प्रसिद्ध आहे. [इं. बु. इ.]

मंजुश्री एक बोधिसत्त्व. ज्ञानाची देवता. महायानी बौद्ध याला अवलोकितेश्वराच्या खालोखाल मान देऊन त्याची उपासना करतात. निष्पन्नयोगावलीत याचे रूपध्यान वर्णिले आहे, ते असे– त्रिमुख, षड्भुज, तीन मुखांचे, पीत, नील व श्वेत असे वर्ण, उजव्या दोन हातीं खड्ग व बाण. अज्ञानाचा नाश करणे हा त्या शस्त्रांचा उपयोग. तिसरा हात वरद मुद्रेत. डाव्या तीन हातांत प्रज्ञापारमिता हे पुस्तक, नील कमल व धनुष्य. त्याच ग्रंथात एके ठिकाणी उजव्या हाताची वरद मुद्रा व डाव्या हाती कमलावर खड्ग आणि अन्य काही ठिकाणी दोन हातांची धर्मचक्रमुद्रा, खांद्यावर कमलाधिष्ठित खड्ग व डाव्या हाती कमलावर प्रज्ञापारमिता हे पुस्तक, असे त्याचे रूप दिले आहे. अक्षोभ्य या ध्यानी बुद्धापासून याचा जन्म झाला, असेही सांगितले आहे. यमारी ही मंजुश्रीची शक्ती होय. ती नेहमी त्याच्या जवळ असते. सुघनकुमार नावाचा एक पुरुषही शेजारी असतो. साधनमालेत मंजुश्रीची ३९ साधने व ४० ध्याने दिलेली आहेत.

मंजुश्री

याच्या उपासनेने धारणा, धर्मग्रंथांचे ज्ञान व वक्तृत्व लाभते असे म्हटले आहे. याच्या उपासनेचे अनेक मंत्र आणि अनेक प्रकार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. बौद्ध संप्रदायात याचा केव्हा समावेश झाला, ते सांगणे कठीण आहे. गांधार व मथुरा येथील शिल्पसंभारात याच्या मूर्ती आढळत नाहीत. अश्वघोष, नागार्जुन व आर्यदेव हे बौद्ध विद्वान मंजुश्रीचा नामोल्लेख करीत नाहीत. याचा सर्वप्रथम उल्लेख मिळतो, तो सुखवतीव्यूह या ग्रंथात. इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस या ग्रंथाचे चिनी भाषेत भाषांतर झाले आहे. त्या कालापासून पुढे बौद्ध वाङ्मयात मंजुश्रीचे अनेक उल्लेख मिळतात. स्वयंभू पुराणात याची कथा दिली आहे. ती अशी –

मंजुश्री हा एक साधुपुरुष चीन देशातल्या पंचशिरस या पर्वतावर राहत होता. त्याला अनेक शिष्य होते. त्यांत चीनचा राजा धर्माकर हाही होता. मंजुश्री एक दिवस ध्यानस्थ असता, स्वयंभू आदिबुद्ध हा नेपाळमधल्या काली-ह्रद या सरोवरात एका प्रफुल्ल कमळातून अग्निज्वालेच्या रूपाने प्रगट झाला आहे, असे त्याला दिसले. त्या साक्षात्कारानंतर मंजुश्री आपले शिष्य, आपल्या दोन भार्या व धर्माकर राजा यांच्यासह नेपाळात आदिबुद्धाच्या दर्शनासाठी प्राप्त झाला. तिथे येऊन पाहतो तर, विशाल जलाशयात मधोमध उमललेल्या कमलातून ती ज्वाला वर उफाळत आहे, असे त्याला दिसले. ते तळे उंचावर होते आणि सभोवती त्याला टेकड्यांचा वेढा होता. मंजुश्री त्या ज्वालेच्या निकटदर्शनाचा उपाय शोधीत तळ्याभोवती हिंडत असता, त्याला तळ्याची दक्षिण बाजू साधारण कच्ची दिसली. तिथला तळ्याचा बांध अरुंद होता, त्यावर त्याने आपल्या खड्गाचा घाव घातला. त्यासरशी तो बांध फुटला आणि तळ्यातले पाणी त्या स्रोत्यांतून धो धो वाहू लागले.

मंजुवर

थोड्याच वेळात तळे कोरडे पडले आणि मग लोकांना त्या ज्वालारूप आदिबुद्धाचे दर्शन कायमचे सुकर झाले.

आजही विशाल सरोवच्यारा त्या फोडलेल्या बांधामधून पाणी वाहते; त्याला बाघमती नदीचा उगम मानतात.

ते स्थान कोरडे झाल्यावर मंजुश्रीने तिथे त्या स्वयंभू आदिबुद्धाचे मंदिर बांधले आणि जवळच स्वतःसाठी एक विहारही बांधला. आज मितीस तो विहार नेपाळात मंजुश्रीपट्टन या नावाने प्रसिद्ध आहे. चीनमधून बरोबर आलेल्या धर्माकर राजाला त्याने नेपाळचे राज्य देऊन त्याला तिथे बसवले. त्यानंतर मंजुश्री चीन देशात परत गेला आणि देहत्यागानंतर तो दिव्य बोधिसत्त्व झाला.

या गोष्टीवरून मंजुश्रीने चीनमधून नेपाळात बौद्ध संस्कृती आणली व तो मोठा स्थपती आणि शिल्पकार होता, असे कळून येते. याचा काळ इ. स. च्या तिसऱ्या शतकातला असावा. तो बौद्ध जगात सर्वत्र ज्ञात आणि पूज्य आहे.

मंजुश्रीची उपासना जरी मुळात भारतीय असली, तरी चीनमध्ये तिचा वेगळ्या प्रकारे विकास झाला. अवलोकितेश्वर पुढे येण्याच्या पूर्वी प्रथम श्रेणीचा बोधिसत्त्व म्हणून मंजुश्रीच ओळखला जात असे. तो पूर्वीपासूनच ज्ञान आणि चातुर्य यांची देवता ठरला आहे. प्रज्ञापारमिता या ग्रंथाचा आविष्कारही त्यानेच केला, अशी आख्यायिका आहे.

मंजुकुमार

वज्रराग, धर्मधातुवागीश्वर, मंजुघोष, सिद्धैकवीर, वज्रानंग, नामसंगीती, वागीश्वर, मंजुवर, मंजुवज्र, मंजुकुमार, अरपचन, स्थिरचक्र आणि वादिराट ही मंजुश्रीची निरनिराळी रूपे असून, त्यांची मूर्तिध्याने भिन्न आहेत. त्यांची माहिती त्या त्या नावाने या कोशात दिली आहे.

तिबेटी तांत्रिक बौद्धधर्मात मंजुश्रीला असामान्य महत्त्व आहे. तिकडील बऱ्याच तंत्रांना त्याची नावे दिली आहेत. तिबेटी साधनेच्या क्रियेमध्ये जी मंडले असतात, त्यांच्या मध्यभागी पुष्कळदा मंजुश्री प्रतिष्ठित असतो. पुष्कळदा अवलोकितेश्वराचे शिवाशी आणि मंजुश्रीचे ब्रह्मदेवाशी सादृश्य दाखविले जाते. [इं. बु. इ.]

मंडन

(इ. स. चे १५ वे शतक). एक शिल्पशास्त्रज्ञ. याच्या पित्याचे नाव क्षेत्र असे असून, तो मेवाड प्रांताचा रहिवासी होता. तो भारद्वाजगोत्री आणि भंगोरा जातीचा होता. मेवाडचा राणा कुंभ याच्या दरबारी हा शिल्पकार म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राहिला होता. मेवाडचा कुंभलगड हा प्रचंड किल्ला राणा कुंभाच्या आदेशावरून मंडनाने आपल्या देखरेखीखाली बांधून घेतला, असे इतिहासकार सांगतात. याने एक विष्णुमंदिरही उभारले होते, असे कळते. मंडनाने शिल्प आणि वास्तुविज्ञान-विषयक अनेक ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिले आहेत. त्यांपैकी काहींची नावे अशी– रूपमंडन, राजवल्लभ, देवतामूर्तिप्रकरण, प्रासादमंडन, वास्तुमंडन, वास्तुशास्त्र, वास्तुसार व रूपावतार.

मंडनाचा पुत्र गोविंद हाही शिल्पशास्त्रज्ञ होता आणि कुंभाचा पुत्र रायमल्ल याच्याकडे तो शिल्पशास्त्रज्ञ म्हणून होता.

मंडन हा त्या काळातील एक कुशल स्थपती व शिल्पकार होता. राजस्थान व गुजरात या राज्यांतील वास्तुशास्त्रज्ञ आजही मोठ्या गौरवाने मंडनाचे नाव सांगतात. [श्री. रत्नचंद्र अग्रवाल – संमेलन पत्रिका, कला अंक, इ. स. १९५८.]

मंडनमिश्र (इ. स. च्या ७ व्या शतकाची अखेर). एक प्रकांड पंडित आणि मीमांसापारंगत. त्याचे मूळ नांव विश्वरूप होते; पण तो मंडनमिश्र या नावानेच ओळखला जात असे. कदाचित पंडित समाजाला मंडनभूत झाल्यामुळे त्याला मंडन हे नाव मिळाले असावे. त्याच्या पित्याचे नाव हिममित्र होते. आनंदगिरीने त्याला कुमारिलभट्टाच्या बहिणीचा नवरा मानले आहे (शंकरविजय). मात्र काही पंडितांनी या नात्याविषयी शंका व्यक्त केली आहे. मंडनमिश्र हा शुक्ल यजुर्वेदी काण्वशाखीय ब्राह्मण होता.

मंडनमिश्राची जन्मभूमी कोणती याविषयी अजूनही विद्वानांत मतभेद आहेत. मिथिलेतल्या पंडितांचे सांगणे असे, की मंडनमिश्र हा मिथिलेचा रहिवासी होता. शंकराचार्य व मंडनमिश्र यांचा शास्त्रार्थ या ठिकाणी झाला, असे म्हणून ते लोक दरभंग्याजवळ एक ठिकाण दाखवतात. माधवाने शंकरदिग्विजयात त्याला माहिष्मती नगरीचा निवासी म्हटले आहे. हे ठिकाण मध्य प्रदेशात नर्मदेच्या काठी महेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे. माहिष्मती नावाची नदी या ठिकाणी नर्मदेला मिळते. या संगमावरच मंडनमिश्राचा भव्य प्रासाद होता. सांप्रत तिथे त्याचे भग्नावशेषही आढळतात. तिथे थोडीशी जमीन खोदली, तरी सगळीकडे भस्ममिश्रित माती मिळते. त्यावरून त्या ठिकाणी अनेक मोठमोठे याग संपन्न झाले असावे, असा तर्क करता येतो. श्री. बलदेव उपाध्याय म्हणतात – कदाचित अशी शक्यता आहे, की मंडनमिश्राचा जन्म मिथिलेत झाला असावा आणि माहिष्मती नगरी हे पवित्र क्षेत्र समजून किंवा तिथे एखाद्या राजाचा आश्रय मिळवून मंडनमिश्राने माहिष्मतीला आपले कर्मक्षेत्र बनवले असावे.

मंडनमिश्राच्या भार्येचे नाव अंबा किंवा उंबा असे होते. तीही विख्यात विदुषी होती. त्यामुळे तिला लोक भारती या नावानेच ओळखीत. शोण नदाच्या तीरावर राहणाऱ्या विष्णुमित्र नामक ब्राह्मण पंडिताची ती कन्या होती. तिचे मंडनमिश्राशी लग्न झाल्यावर लोक त्या दोघांना ब्रह्मदेव आणि सरस्वती यांचे अवतार समजू लागले. मंडनमिश्राच्या घरी लक्ष्मी व सरस्वती यांचा सलोखा होता. त्याचा वाडा वैभवसंपन्न होता. तो आतबाहेर नक्षीकामाने सुशोभित होता. वाड्यात विविध देवतांची मनोहर चित्रे होती. कामासाठी दासदासी होत्या. त्याचे हे ऐश्वर्य पाहुन लोक त्याला महागृही म्हणत.

मंडनमिश्र हा वैदिक कर्मकांडाचा एकनिष्ठ उपासक होता. वेद हे अपौरुषेय असून, ते स्वयमेव प्रमाण आहेत आणि वेदोक्त धर्म हाच मनुष्याला अभ्युदय-निःश्रेयस साधून देणारा धर्म आहे, अशी त्याची दृढ श्रद्धा होती. निवृत्तिमार्गाविषयी त्याला बिलकुल आदर नव्हता. उपनिषदांतल्या अध्यात्मचर्चेला तो विशेषसे प्राधान्य देत नसे. भारतातल्या सर्व कर्मकांडी मीमांसक पंडितांचा तो मुकुटमणीच होता. त्यामुळे कुठेही गेला, तरी विद्वत्सभेत त्याला अग्रमान मिळत असे.

शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रांवर अद्वैतपर भाष्य लिहिले होते. आचार्य व कुमारिलभट्ट यांची भेट झाली असता कुमारिलभट्टाने ते भाष्य पाहिले व आचार्यांना म्हटले. ‘तुम्ही आपले हे भाष्य मंडनमिश्राला दाखवा. त्याला जर तुमचा अद्वैतसिद्धान्त पटला आणि त्याने जर तुमच्या भाष्याला मान्यता दिली, तर ते मग जगन्मान्य व्हायला अडचण पडणार नाही.’

शंकराचार्यांनी तो आदेश मानला आणि त्यांनी आपल्या शिष्यमंडळींसह माहिष्मतीचे प्रस्थान काढले. तिथे पोचल्यावर त्यांनी आपल्या शिष्यांना एका शिवालयात ठेवले आणि ते एकटेच मंडनमिश्राच्या वाड्याकडे जायला निघाले. तो वाडा कुठे आहे ते आचार्यांना माहीत नव्हते. एवढ्यात त्यांना नदीवर पाण्याला जाणारी एक बाई दिसली. आचार्यांना कल्पना नव्हती; पण ती मंडनमिश्राच्या घरची दासीच होती. आचार्यांनी तिला मंडनमिश्राच्या घराचा पत्ता विचारताच ती म्हणाली. ‘मंडनमिश्रासारख्या महापंडिताचे घर तुम्हांला माहीत नाही, त्या अर्थी तुम्ही या गावात नवखे दिसता. असेच सरळ चला. मी तुम्हांला खूण सांगते.’ ती म्हणली –

जगद् ध्रुवं स्याज्जगदध्रुवं स्यात् कीराङ्गना यत्र गिरं गिरन्ति।
द्वारस्थनीडान्तरसन्निरुद्धा जानीहि तन्मण्डनपण्डितौकः ॥

अर्थ– जग हे शाश्वत आहे का अशाश्वत (मीमांसकांच्या मते जग शाश्वत आणि वेदान्त्यांच्या मते ते कल्पित) अशी चर्चा ज्याच्या दारातल्या पिंजऱ्यात असणाऱ्या मैना करतात, ते मंडनपंडिताचे घर, असे तुम्ही समजा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या खुणेनुसार आचार्य त्याच्या वाड्यापर्यंत पोचले. त्याच्या देवडीवर रक्षक होता आणि ठराविक कालापर्यंत कोणालाही आंत सोडायचे नाही, अशी त्या रक्षकाला सक्त आज्ञा होती. त्यामुळे आचार्यांना त्याने रोखले. पण आचार्य योगसिद्ध असल्यामुळे त्यांनी सूक्ष्म रूपाने मंडनमिश्राच्या घरात प्रवेश केला. मंडनमिश्र त्या वेळी आपल्या वडिलांचे श्राद्ध करीत होता. व्यास आणि जैमिनी क्षणाला बसले होते. श्राद्धाच्या वेळी यतिदर्शन निषिद्ध मानलेले आहे. त्यामुळे मंडनमिश्र आचार्यांना तिथे पाहून एकदम खवळला. मग त्या दोघांमध्ये खूप शाब्दिक चकमक उडाली. त्यांत दिसून आलेले आचार्यांचे वादपटुत्व आणि विश्लेषप्रभुत्व पाहून व्यास मंडनमिश्रांना म्हणाले. हा कोणीतरी प्रज्ञावंत यती असावा. तू याचा अपमान करू नकोस. तू सन्मानपूर्वक त्याला भिक्षा वाढ.' नाइलाजाने का होईना, पण मंडनमिश्र त्या गोष्टीला कबूल झाला. त्यावर शंकराचार्य म्हणाले. 'मला अन्नभिक्षा नको; वादभिक्षा हवी.' मंडनमिश्र त्याही गोष्टीला कबूल झाला. दुसऱ्या दिवशी शास्त्रार्थ चालू करावा, असे ठरले. वादातला जयपराजय सांगणारी मध्यस्थ म्हणून व्यास-जैमिनींनी मंडनपत्नी भारती हिचीच नियुक्ती केली. शंकराचार्य तिच्या मध्यस्थीला कबूल झाले.

दुसऱ्या दिवशी आचार्य व मंडनमिश्र शास्त्रार्थ करण्यासाठी समोरासमोर आसनस्थ झाले. ते शास्त्रार्थाला प्रवृत्त झाले होते; भांडणाला नव्हे. त्यामुळे दोघांच्याही मुद्रा प्रसन्न होत्या आणि दोघांनाही परस्परांसंबंधी आदर निर्माण झाला होता. शास्त्रार्थासाठी शंकराचार्यांनी पुढीलप्रमाणे आपला सिद्धान्त मांडला–

ब्रह्मैकं परमार्थसच्चिदमलं विश्वप्रपञ्चात्मना
शुक्तौ रूप्यपरात्मनेव बहलाज्ञानावृतं भासते ॥
तज्ज्ञानान्निखिलप्रपञ्चनिलयात् स्वात्मव्यवस्थापरं
निर्वाणं जनिमुक्तमभ्युपगतं मानं श्रुतेर्मस्तकम् ॥

अर्थ – या जगात ब्रह्म ही एकच सत्, चित्, निर्मल व यथार्थ अशी वस्तू आहे. ते ब्रह्म स्वतःच जगत्‌रूपाने अशा प्रकारे भासते, की जसे शिंपेच्या ठिकाणी रुपे. शिंपल्यातले रुपे जसे मिथ्या तसेच हे जगही मिथ्या आहे. म्हणून ब्रह्माचेच ज्ञान करून घेतले पाहिजे. त्या ज्ञानानेच या प्रपंचाचा नाश होऊन मनुष्य जगाच्या बाह्य पसाऱ्यातून सुटेल व आपल्या विशुद्ध रूपात प्रतिष्ठित होईल. त्यामुळेच तो जन्ममरणाच्या चक्रातून म्हणजेच संसारातून (ही) मुक्त होईल. असा हा माझा अद्वैताचा सिद्धान्त आहे. आणि याला श्रुती प्रमाण आहे.

त्यानंतर ते म्हणाले. 'या शास्त्रार्थात जर मी पराजित झालो, तर ही अंगावरची काषाय वस्त्रे टाकून गृहस्थाची शुभ्र वस्त्रे धारण करीन, अशी प्रतिज्ञा मी करतो.'

यावर मंडनमिश्राने आपला सिद्धान्त मांडला, तो असा–

वेदान्ता न प्रमाणं चिति वपुषि पदे तत्र सङ्गत्ययोगात्
पूर्वो भागः प्रमाणं पदचयगमिते कार्यवस्तुन्यशेषे ।
शब्दानां कार्यमात्रं प्रति समधिगता शक्तिरभ्युन्नतानां
कर्मभ्यो मुक्तिरिष्टा तदिह तनुभृता माऽऽयुषः स्यात् समाप्तेः ॥

अर्थ – वेदाचा कर्मकांड हाच भाग प्रमाण आहे. वेदान्ताला मी प्रमाण मानीत नाही. कारण तो भाग चैतन्यस्वरूप ब्रह्माचे प्रतिपादन करून सिद्धवस्तूचे वर्णन करणारा आहे. वेदाचे तात्पर्य हे आहे, की विधीचे प्रतिपादन करावे. पण उपनिषदे विधीचे वर्णन न करता केवळ ब्रह्मस्वरूपाचेच प्रतिपादन करतात. म्हणून ती प्रमाणकोटीत येऊ शकत नाहीत. शब्दांची शक्ती कार्यमात्राचे प्रकटन करण्यात आहे; आणि दुःखातून मुक्ती ही कर्मांच्या द्वारेच होते. म्हणून प्रत्येक मनुष्याला आयुष्यभर कर्माचे अनुष्ठान करीत राहिले पाहिजे. हा माझा वेदोक्त सिद्धान्त आहे.

नंतर तो म्हणाला. 'या सिद्धान्तात माझा पराजय झाला, तर मी गृहस्थाश्रमाचा त्याग करून संन्यासधर्म स्वीकारीन, अशी माझी प्रतिज्ञा आहे.'

त्यानंतर पूर्व पक्ष, उत्तर पक्ष सुरू झाले. दोघांनीही आपापली प्रमाणे पणाला लावली. दोघांनीही आपल्या तर्कबुद्धीला भरपूर ताण दिला. पण शंकराचार्यांच्या अलौकिक प्रतिभेपुढे आणि अगाध ज्ञानापुढे मंडनमिश्राचा निभाव लागला नाही. तो निरुत्तर झाला. शंकराचार्य आपले तत्त्वमस्यादी महावाक्यप्रणीत अद्वैत सिद्ध करून विजयी झाले. भारतीनेच त्यांचा विजय उद्‌घोषित केला. पण ती आचार्यांना म्हणाली. 'तुम्ही माझ्या यजमानांना एकट्यांना जिंकून त्यांचा पूर्ण पराभव केला, असे होणार नाही. मी त्यांची अर्धांगी आहे. आता मी तुम्हांला वादाचे आव्हान देते. शास्त्रार्थात तुम्ही माझाही पराजय करायला हवा.'

शंकराचार्य त्या गोष्टीला तयार झाले. त्या दोघांचा वादविवाद सुरू झाला. शारदेने वादाच्या रानात शिरता शिरता शंकराचार्यांना कामशास्त्रविषयक काही प्रश्न विचारले. बालपणीच संन्यास घेतल्यामुळे ते त्या विषयात अनभिज्ञ होते. त्यांनी उत्तरासाठी एक महिन्याचा अवधी मागून घेतला आणि परकायाप्रवेश करून कामशास्त्रविषयक ज्ञान मिळवले. परत येऊन त्यांनी भारतीला त्याही शास्त्रात पराभूत केले.

अशा प्रकारे आचार्यांनी मंडनमिश्राचा दोहीं अंगीं पराभव केला. मंडनमिश्रांच्या पराभवाने मीमांसकांचा आधारस्तंभच कोसळला. मग मंडनमिश्राने आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे संन्यासग्रहणाची सिद्धता केली. प्रथम त्याने विश्वजित नावाचा यज्ञ करून ब्राह्मणांना मुक्तहस्ताने दक्षिणा दिली. उरलेली संपत्ती आपल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नातलगांना वाटून टाकली. मंडनमिश्र अशा प्रकारे निष्कांचन होऊन शंकराचार्यांना शरण गेला. शंकराचार्यांनी त्याला दीक्षा दिली व संन्यासाश्रमातले त्याचे नाव सुरेश्वराचार्य ठेवले.

पुढे शंकराचार्य सुरेश्वराचार्यादी शिष्यमंडळीसह दक्षिण दिग्विजयाला गेले. अनेक पंथोपपंथांच्या पंडितांशी शास्त्रार्थ करून त्यांनी आपल्या अद्वैतसिद्धान्ताचा ध्वज फडकावला. पुढे दक्षिणेतले शृंगेरी हे ठिकाण त्यांनी आपले कार्यक्षेत्र बनवले. तिथल्या शारदा मठावर आचार्यांनी सुरेश्वरांची पीठाधिपती म्हणून नेमणूक केली. आपल्या पतीच्या मागे भारतीही शृंगेरीला गेली व तिथे तिने तुंगा नदीत जलसमाधी घेतली.

पुढे शंकराचार्यांना आपले ब्रह्मसूत्रभाष्य लोकप्रिय आणि सुलभ करण्यासाठी त्यावर आपल्या शिष्यांपैकी कोणीतरी वार्तिकरचना करावी, असे वाटले. हे काम करायला सुरेश्वराचार्य अत्यंत लायक असल्यामुळे, आचार्यांनी सुरेश्वरांनाच ते कार्य सांगितले. पण त्यांच्या इतर शिष्यांनी त्या गोष्टीला विरोध केला. ते म्हणाले. ‘ हे काम सुरेश्वरांच्या हातून योग्य प्रकारे होणार नाही. कारण पूर्वाश्रमी ते गृहस्थ होते आणि कर्मकांडाचे आग्रही प्रचारक होते. त्यांचा तो संस्कार अजून पुसला गेला नसेल. त्यांनी संन्यास ग्रहण केला, तो काही अद्वैत पटले म्हणून नव्हे; तर वादात पराभव झाला म्हणून. ’

हे ऐकून सुरेश्वरांना दुःख झाले. पण त्यांनीही तितक्याच जोरदारपणे आपली बाजू मांडली. ‘ होय, पूर्वाश्रमी मी गृहस्थ होतो. पण संन्यास घेतल्यावर माझ्यामध्ये गृहस्थाची तीच कर्मासक्ती कायम आहे, असे कोण म्हणू शकेल ? बाल्यानंतर यौवन येते. पण बाल्यकालातली चपलता यौवनकालात कायम टिकून राहत नाही. खरी गोष्ट ही आहे, की जी अवस्था एकदा गेली ती गेली. ’

सुरेश्वरांच्या या भाषणाने शंकराचार्यांवर खूप प्रभाव पडला; पण शिष्यांचा आग्रह काही सुटला नाही. त्यांच्या आग्रहासाठी आचार्यांनी सुरेश्वरांना ब्रह्मसूत्रभाष्यावर वार्तिके लिहिण्याच्या आधी तैत्तिरीय उपनिषद्भाष्य व बृहदारण्यक उपनिषद्भाष्य यांवर वार्तिके लिहिण्याची आज्ञा केली. ते कार्य सुरेश्वरांनी चोख रीतीने पार पाडून आपले बुद्धिवैभव दाखवले. आणि त्यामुळेच ते वार्तिककार म्हणून अजरामर झाले.

कर्मकांडी असल्यामुळे मंडनमिश्र हा द्वैत मानणारा होता, तर शंकराचार्य अद्वैताचे समर्थक होते. म्हणजे द्वैत विरुद्ध अद्वैत असा त्या दोघांचा शास्त्रार्थ झाला, असे शंकरदिग्विजयाच्या प्रचलित वर्णनावरून कळते. पण ऐतिहासिक दृष्ट्या विचार करून श्री. बलदेव उपाध्याय यांनी या वादातील रहस्यावर एक निराळाच प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात –

मंडनमिश्राने लिहिलेला ब्रह्मसिद्धी नावाचा एक ग्रंथ नुकताच प्रकाशित झाला आहे. त्याचे अध्ययन केल्यावर कळते, की मंडनमिश्र शंकराचार्यांकडून पराजित होण्यापूर्वीही अद्वैतवादीच होता. मग प्रश्न असा येतो, की दोघेही जर अद्वैती तर त्यांच्यामध्ये असा अटीतटीचा वादसंग्राम का झाला ? विचार केल्याअंती असे दिसते, की मंडनमिश्र हा शंकराचार्यांचा प्रतिस्पर्धी असा अद्वैती दार्शनिक होता. दोघांचाही अद्वैतवादच; पण त्यांच्या मांडणीत भिन्नता होती. त्यांची काही मतेही वेगळी होती.

शंकराचार्यांचा अद्वैतवाद उपनिषदांवर आधारलेला होता; तर मंडनमिश्राचा तो तसा नव्हता. त्यामुळे शंकराचार्य मंडनमिश्राच्या अद्वैतवादाला उपनिषद्विरुद्ध समजत होते व त्यामुळेच त्याला आपला एक प्रबल प्रतिस्पर्धी मानीत होते. जोवर मंडनमिश्राच्या मताचे खंडन होत नाही, तोवर आपल्या सिद्धान्ताचा प्रचार करणे कठीण आहे, असे त्यांना वाटत होते. म्हणूनच मंडनमिश्राचा पराभव करण्याच्या कामी त्यांनी इतका आग्रह धरला असण्याची शक्यता आहे.

ग्रंथरचना – मंडनमिश्राने मीमांसेवर पुढील विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिले आहेत–

(१) विधिविवेक – या ग्रंथात त्याने विध्यर्थाचा अनेक अंगांनी विचार केला आहे.

(२) भावनाविवेक – या ग्रंथात मंडनमिश्राने आर्थी भावनेची मीमांसा विस्तारपूर्वक केली आहे.

(३) विभ्रमविवेक – या ग्रंथात पाच सुप्रसिद्ध ख्यातींचे विवरण केलेले आहे.

(४) मीमांसासूत्रानुक्रमणी – या ग्रंथात मीमांसासूत्रांचे संक्षिप्त श्लोकबद्ध व्याख्यान केलेले आहे.

या ग्रंथांना मीमांसादर्शनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. ब्रह्मसिद्धीप्रमाणेच स्फोटसिद्धी नावाचा त्याचा एक वेदान्तपर ग्रंथ आहे. या ग्रंथांत मांडलेल्या अद्वैत तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्तामुळे शांकरमताच्या आचार्यांत मंडनमिश्राला सर्वाधिक श्रेष्ठत्व लाभले आहे.

मंडनमिश्राची लेखनशैली सरळ, स्वाभाविक आणि मधुर आहे. गद्य व पद्य या दोन्ही क्षेत्रांत ती समान दिसते. जरी त्याच्या लेखनात प्राचीनतम शब्दांचा समावेश असला आणि जरी त्याचा वर्ण्य विषय अतिगंभीर असला, तरी त्याच्या शैलीने रोचकता आणि सुस्पष्टता कुठेही सोडलेली नाही. उदाहरणार्थ पुढील दोन श्लोक पाहा –

इदमित्येव बाह्येऽर्थे ह्ययमित्येव बोद्धरि ।
द्वयं दृष्टं यतो देहे तेनायं मुह्यते जनः ॥

अर्थ – संसारातल्या दृष्ट पदार्थांच्या ठिकाणी ‘ इदम् ’ व ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जाणणाऱ्याच्या ठिकाणी 'अग्रम्' अशी भेदबुद्धी मनुष्य पाहतो. याच कारणामुळे तो सांसारिक मोहपाशात अडकतो.

नेहात्मविदन्यो ऽस्ति न मत्तोऽज्ञोऽस्ति कश्चन ।
इत्यजानन् विजानाति यः स ब्रह्मविदुत्तमः ।।

अर्थ – इथे कोणी (माझ्याहून) दुसरा आत्मज्ञानी नाही आणि माझ्याहून दुसरा कोणी मूर्ख नाही, असा दोन्ही प्रकारच्या बुद्धीला दूर ठेवून जो जाणतो, तोच उत्तम ब्रह्मवेत्ता होय.

मंडनमिश्राचे वर्ण्य विषय जसे प्रौढ, तशीच त्याची भाषाही प्रौढ आहे. त्याचे सिद्धान्त स्पष्ट आहेत. त्याच्या मांडणीत कुठेही संदिग्धता नाही. खरे सांगायचे, तर त्याची विद्या आणि त्याचा व्यवहार ही दोन्हीही एकजीव आहेत. आयुष्याच्या बऱ्याच मोठ्या काळात तो नुसता मीमांसक नव्हता; तर मीमांसाज्ञान व्यवहारात उतरवणारा विशुद्ध कर्मयोगी होता. उत्तरायुष्यात तो शंकराचार्यांच्या प्रेरणेने वेदान्ती बनला आणि तो वेदान्तही त्याने आपल्या जीवनात पुरेपूर उतरविला. त्याचे सिद्धान्त ग्रंथापुरतेच मर्यादित नाहीत, तर त्याचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर प्रत्यक्ष प्रभाव पडला आहे.

मंडनमिश्र हाच संन्यास घेतल्यावर सुरेश्वराचार्य या नावाने ओळखला जाऊ लागला, असे वर सांगितले; पण काही पंडितांच्या मते त्या दोन भिन्न व्यक्ती आहेत. पाहा – शंकराचार्य. [हिंदुत्व; शंकराचार्य – श्री. बलदेव उपाध्याय, १९५०]

मंडप एक वास्तुरचना. याला जनाश्रय असा प्रतिशब्द आहे. सभेसाठी किंवा लोकांना निवारा म्हणून आश्रय घेण्यासाठी जी रचना उभी करतात, तिला मंडप असे म्हणतात. याची व्युत्पत्ती अशी – 'मण्डं पातीति मण्डपः' = मण्ड म्हणजे शिरोभूषण, त्याचे अर्थात पर्यायाने डोक्याचे ऊन-पावसापासून रक्षण करतो, तो मंडप होय.

तात्पुरते मंडप व कायमचे मंडप असे उभयविध मंडप असतात. तात्पुरते मंडप विशिष्ट कारणासाठी तेवढ्यापुरते घालतात व कार्य झाल्यावर ते काढून टाकतात. कायमचे मंडप हे दगडी असतात. मध्य युगात देवमंदिरांच्या अनुषंगाने अशा दगडी मंडपाची उभारणी झालेली दिसते. द. भारतात या गोष्टीची जागोजाग साक्ष पटते.

प्राचीन काळी नालंदा, तक्षशिला अशासारख्या विद्यापीठांतून जे शिष्य विद्वान होऊन बाहेर पडत, त्यांपैकी काही महत्त्वाकांक्षी असत. ते दिग्विजयासाठी सर्वत्र हिंडत. निरनिराळ्या राज्यांत जाऊन तिथल्या पंडितांशी ते वाद करीत. त्या प्रसंगी श्रोत्यांना त्यांचा वाद बसून ऐकता येईल अशी जागा हवी असे. त्यासाठी तिथल्या देवालयांच्या पुढे किंवा बाजूस प्रशस्त अशी स्वतंत्र जागा बांधीत. अशा जागांना सभामंडप असे म्हणत.

मंडपाचे खांब कोरून किंवा रंगवून शृंगारण्यात त्या काळचे शिल्पकार आपले सारे कसब पणाला लावीत. कारण त्या मंडपात सर्व प्रांतांतले विद्वान, कलावान व रसिक एकत्र जमायचे असत. या सर्वांकडून आपल्या कलेचे व कारागिरीचे कौतुक व्हावे, अशी त्या शिल्पकारांची मनीषा असे.

मंडपाचे खांब हे जणू समुद्रातून उगवतात व वरचे छप्पर किंवा शिखर म्हणजे पृथ्वी हिला ते आपल्या शिरावर तोलून धरतात, अशी शिल्पकारांची समजूत असे.

अशा प्रकारचे मंडप उभारण्यात मध्य युगातील राजेरजवाडे यांनी कसलीही काटकसर केली नाही. इ. स. च्या सातव्या शतकात कांचीच्या पल्लव राजांनी मोठमोठे डोंगर खोदून मंडप बनवले. पुढे खांबावर आधारलेले मोठे दालन व मागे पूजोपासनेसाठी एक-दोन खोल्या अशी त्यांची रचना असे. त्या वंशातल्या महेंद्रवर्मा (प्रथम) याने गुंतूरपासून त्रिचनापल्लीपर्यंत सोळा



नाटचमंडप, सूर्यमंदिर – मोढेरा

मंडप बनवले. त्या वंशातल्या अन्य राजांनीही मंडपकलेचा खूप विकास केला. विजयनगरच्या राजांनीही अनेक भव्य मंडप बांधले. मदुरा येथे मीनाक्षीच्या प्राकारात नायक राजांनी उभारलेले अनेक भव्य मंडप आजही प्रेक्षकांना स्तिमित करतात. मंडपरचनेला अशा प्रकारे राजाश्रय मिळाल्यामुळे त्या कलेत तरबेज असे अनेक प्रतिभावंत कलाकार या देशात निर्माण झाले. पुष्कळ देवालयांत नृत्यमंडप, भोगमंडप, नाटचमंडप, इ. विविध प्रकारचे मंडप बांधलेले आढळतात.

विविध उत्सवांच्या प्रसंगीं देवस्थानातील उत्सवमूर्ती नेऊन बसवण्याची जागा, असाही मंडप शब्दाचा अर्थ आहे. अशा मंडपात देवाला बसवल्यावर त्याच्या पुढे विविध कार्यक्रम होतात.

मंडप व सभागृह यांत फरक असा, की मंडपाला एकपाखी छप्पर असते आणि सभागृहाला कळसासारखे शिखर असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री. हॅवेल म्हणतो, की पुष्कळदा प्राचीन देवालये हीच राजांची निवासस्थाने असत. या देवालयांच्या अलंकृत सभामंडपात राजांचा दरबार भरत असे. वेरूळचे कैलास लेणे हाही एक मंडपच आहे. राजाचे शरीररक्षक व इतर दरबारी सैनिक यांच्या निवासाच्या सोयी मंडपातच केलेल्या असत. मंडप कुठे निर्माण करावे, याविषयी मयमत या ग्रंथात सांगितले आहे, ते असे –

प्रासादाभिमुखे पुण्यक्षेत्रे वाऽऽरामके शुभे ।
ग्रामादिवास्तुमध्ये च चतुर्दिक्षु विदिक्ष्वपि ।।
बाह्याभ्यन्तरतो वापि गृहाणां मध्यमे मुखे ।
तत्तद्योग्यं यथा युक्त्या मण्डपं प्रविधीयते ।।

अर्थ – प्रासादाच्या समोर, पुण्यक्षेत्राच्या ठिकाणी, चांगल्या (मोठ्या) बागेत, गावाच्या मधोमध, गावाच्या वेशीपाशी, चारही दिशांना व उपदिशांना, गावांत व बाहेर, घराच्या आत व दरवाजापाशी, त्या त्या ठिकाणी करायच्या कामाला योग्य असा मंडप घालावा.

मंडप कुठे व कसा घालावा ते मत्स्य पुराणातील पुढील श्लोकात सांगितले आहे–

प्रासादस्योत्तरे वापि पूर्वे वा मण्डपो भवेत् ।
चतुर्भिस्तोरणैर्युक्तो मण्डपः स्याच्चतुर्मुखः ।

अर्थ – देवप्रासादाच्या उत्तरेस किंवा पूर्वेस मंडप बांधावा. त्याला चार तोरणे आणि चार मुखे असावी.

दोन दर्शनी बाजू असलेल्या मंडपाला दंडक, तीन दर्शनी बाजू असलेल्याला स्वस्तिक, चार बाजूंच्या मंडपाला चतुर्मुख, पाच बाजूंच्या मंडपाला सर्वतोभद्र व सहा बाजू असलेल्या मंडपाला मौलिक म्हणत. मंडप ६४, ६२ किंवा ६० खांबांचा असावा, असेही सांगितले आहे.

प्रासाद किंवा देवालय यांच्यापुढे कित्येकदा सात मंडप उभारलेले असत. त्यांची पारिभाषिक नावे अशी होती – हिमज, निषदज, विजय, माल्यज, पारियात्र, गंधमादन व हेमकूट. यांच्या भिंती, छपरे, जमीन, सज्जे, प्रांगणे, दरवाजे, खिडक्या, खांब, इ. गोष्टी कशा असाव्या, यांचे सविस्तर वर्णन शिल्पशास्त्राच्या ग्रंथांतून दिलेले आहे. मंडपांची मुख्य सोळा नावे व त्यांचा उपयोग सांगितला आहे, तो असा–

(१) मेरुज – लोकांनी विसाव्यासाठी बसावे किंवा ग्रंथांचा संग्रह करावा, यासाठी बनवलेला.
(२) विजय – यज्ञासाठी घातलेला.
(३) सिद्ध – राज्याभिषेकांच्या उत्सवासाठी घातलेला.
(४) पद्मक – नृत्यासाठी घातलेला.
(५) भद्रक – लग्नासाठी घातलेला.
(६) शिव – राजांच्या परस्पर मैत्रीसाठी उभारलेला.
(७) वेद – मौंजीबंधनाचा विधी करण्यासाठी घातलेला.
(८) अलंकृत – प्रदर्शन मांडण्यासाठी केलेला.
(९) दर्भ – मल्लयुद्धादी स्पर्धांसाठी बनविलेला.
(१०) कौशिक – तडजोड किंवा पंचायतीची बैठक यांच्यासाठी घातलेला.
(११) कुलधारी – तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी यात्रेकरूंना क्षौर करण्यासाठी बनवलेला.
(१२) सुखांग – जेवणासाठी घातलेला.
(१३) सौख्यक – कारखान्याची कामे करण्यासाठी घातलेला.
(१४) गर्भ – नाटकादी करमणुकीसाठी घातलेला.
(१५) मान्य – सन्माननीयांच्या सन्मानासाठी घातलेला.
(१६) माल्याद्भुत – प्रतिनिधी निवडण्यासाठी उभारलेला.

दुसरी एक यादी सत्तावीस मंडपांची असून, त्यांची नावे व विविध उपयोगही सांगितले आहेत.

स्मार्त कर्मासाठी विशेष प्रसंगी विधिपूर्वक मंडप तयार करून त्यांमध्ये देवतास्थापन व अग्निस्थापन करावे, असे कुंडार्क या ग्रंथात सांगितले आहे. दहा हात रुंद व बारा हात लांब किंवा सोळा हात रुंद व अठरा हात लांब असे मंडप असावे, असे वरील ग्रंथातच सांगितले आहे. हवन ज्याप्रमाणे लहान मोठे असेल त्याप्रमाणे हे मंडप उभारावे लागतात. मंडपाची जेवढी जागा सांगितली असेल, तिचे सारखे नऊ भाग करायचे असतात. त्यांपैकी मधल्या चौरसात मुख्य देवतेची स्थापना करतात. उरलेल्या चौरसांच्या कोपऱ्यावर एक एक, याप्रमाणे पाच हात उंचीचे आठ खांब व मध्यभागी मुख्य देवतेसाठी केलेल्या वेदीच्या कोपऱ्यावरचे आठ खांब असे एकूण सोळा खांब उभारतात. त्यांवर बत्तीस लाकडे बसवतात. चारही दिशांना दरवाजे ठेवतात. मंडपांना पताका, पुष्पमाला, इ. साधनांनी सुशोभित केल्यावर दरवाजासमोर तोरणे व निरनिराळ्या देवतांचे ध्वज उभारतात. दरवाजाच्या दोन्ही बाजूंना आणि मंडपाच्या कोपऱ्यांवर कलश स्थापून त्यांवर निरनिराळ्या देवता मांडतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे; एन्सा. हिं. आ.; पु. इं.; म. ज्ञा. को.]

मंडपदेवताप्रतिष्ठा लग्न, मुंज इ. मंगल कार्यांच्या आधी, कार्य निर्विघ्न तडीला जावे म्हणून, मांडवाच्या चारही दिशांना देवतांची स्थापना करतात, त्या विधीला हे नाव आहे. पाहा – देवक बसवणे.

मंडपाक पार्वतीश्वर (१८३३ ते १८९७ इ. स.) एक तेलुगू ग्रंथकार. याच्या आईचे नाव जोगम्मा आणि वडिलांचे नाव कामकवी होते. याचा जन्म विशाखापट्टण-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नजिकच्या पालतेरू गावी झाला. संस्कृत आणि तेलुगू या भाषांवर याचे प्रभुत्व होते. हा बोब्बिल राजाच्या दरबारी विद्वत्कवी म्हणून आश्रयाला होता. याचे संस्कृत व तेलुगू या भाषांतील एंशी ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांत काही गद्यरूप व काही पद्यरूप आहेत. तेलुगू काव्यग्रंथांत राधाकृष्णसंवादम, कांची-माहात्म्यमु, अमरुक काव्य आणि उमा-संहिता हे ग्रंथ विद्वन्मान्य झाले आहेत. गद्यग्रंथांत यात्रा-चरित्र, गुरु-चित्र, कथलघु, चित्रकथ आणि बोब्बिलिमहाराजवंशावली, हे ग्रंथ आहेत. याच्या संस्कृत रचनांची काही नावे अशी– कविता-विनोद-कोशम्, सीता-नेतृस्तुती, काशीश्वराष्टकम्, श्रीवेंकटगिरीप्रभुद्वर्थिश्लोक कदंब, इत्यादी. याच्या काव्यग्रंथाची भाषा सहजसुलभ व प्रवाही आहे. [ते. सा. इ.; ते. उ. सा.]

मंडपेश्वर एका लेण्याचे नाव. हे लेणे मुंबईजवळच्या बोरिवली गावात आहे. हे ब्राह्मणी लेणे असून, मुंबई-घटात याचा समावेश करतात. हे डोंगर पोखरून तयार केलेले नाही, तर भुयाराप्रमाणे जमिनीत खोदलेले आहे. ते पूर्वाभिमुख आहे. याचा मंडप पाच मोठ्या खणांचा आहे. कदाचित यावरूनच इथल्या शिवाला मंडपेश्वर हे नाव मिळाले असावे. या मंडपाची लांबी ५१ फूट व रुंदी २१ फूट भरते. इ. स. च्या आठव्या शतकात हे लेणे खोदले गेले. इथे महायोगी शिव, गरुडवाहन विष्णू, पार्वती, गणपती, इंद्र, त्रिमूर्ती यांच्या मूर्ती होत्या, असे उल्लेख आहेत. प्रत्यक्षात मात्र आज तिथे काही नाही. मंडपाच्या बाहेर विहिरीसारखे खोल टाके आहे. इथून जवळच असलेल्या कान्हेरीच्या टाक्यात टाकलेले भांडे या टाक्यात निघते, अशी दंतकथा सांगतात.

बाटवाबाटीच्या काळात (इ. स.चे सोळावे शतक) पोर्तुगीज लोकांनी या लेण्याचे परिवर्तन रोमन कॅथॉलिक चर्चमध्ये केले. त्यामुळे वरसाल इथे ख्रिस्ती लोकांची यात्रा भरते. यात्रा नऊ दिवस चालते.

बोरिवली हे गाव ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. इथून जवळ असलेल्या अकुर्ली गावाच्या टेकाडावर पाली भाषेतले शिलालेख कोरलेले आढळतात. एकसर गावातल्या आंबराईत सहा मोठे वीरगळ आहेत. इ. स. च्या अकरा-बाराव्या शतकांतील लढायांत वीरगतीला गेलेल्या योद्ध्यांची ती स्मारके असावी असे इतिहासकार म्हणतात. [मु. पू. म. २; म. प.; सह्याद्रि]

मंडल वर्तुळ किंवा चौकोन काढून त्यात त्रिकोण, चतुष्कोण, छोटी वर्तुळे, स्वस्तिक, पद्म, इ. प्रतीके काढलेल्या आकृतीला मंडल म्हणतात. मंडल हे देवपूजेत आणि तांत्रिक उपासनेत महत्त्वपूर्ण ठरले आहे. याची व्याख्या अशी–

परमेश्वरस्वरूप ओळखण्यास सुलभ व्हावे म्हणून अंतःस्फूर्ती व दिव्य भावना यांनी जी एक आकृती निर्माण केली जाते, ते मंडल होय.

मंडल म्हणजे वर्तुळच असले पाहिजे असे नाही. पुष्कळदा ते चौरसही असते. ठराविक मापाने त्या चौकोनात त्रिकोण, वर्तुळे, इ. काढून व त्यांत निरनिराळे रंग भरून ते शोभिवंत



मंडलाचा एक प्रकार

केले म्हणजे त्यातून भव्य-दिव्य दर्शन होत राहते, असे म्हणतात. मंडलाचे ध्यान हे चित्त एकाग्र करण्यासाठी उपयुक्त ठरते, असा साधकांचा अनुभव आहे.

मंडलाचा अंतर्बाह्य विकास बौद्ध, शैव, शाक्त, इ. तंत्रांतून झाला आहे. तांत्रिकांनी तिबेटी संस्कृतीतून मंडलकल्पना उचलली हे खरे; पण त्याही पूर्वी वैदिक व पौराणिक काळांत मंडलकल्पना ठाऊक होती. किंबहुना वैदिक संस्कृतीतूनच मंडलाचा अन्य संप्रदायांत प्रवेश झाला, असे म्हटले पाहिजे. बृहदारण्यकात एका मंत्रात (५.५.२) मंडलाचा उल्लेख आला आहे.

मनुस्मृती, पुराणे, कालिदासाची काव्ये यांत सूर्यचंद्रांच्या बिंबांना मंडल असे म्हटले आहे. श्रीचक्र हे पौराणिक हिंदू संस्कृतीतले प्रमुख मंडल होय. श्रीचक्राला साक्षात दिव्य शक्तीचे स्वरूप मानतात. मंडलाच्या ठिकाणी देवतेचा किंवा देवतांचा निवास असतो. ते त्यांचे अभ्यासनच असते. भोजनाच्या वेळी पात्राच्या खाली मंडल काढतात. त्या मंडलाचे कार्य व त्यात वास्तव्य करणाऱ्या देवता यांचा निर्देश वह्नी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुराणातील पुढील श्लोकात केला आहे–

यातुधानाः पिशाचाश्च असुरा राक्षसास्तथा ।
घ्नन्ति केवलमन्नस्यमण्डलस्य विवर्जनात् ।
आदित्या वसवो रुद्रा ब्रह्मा चैव पितामहः ।
मण्डलान्युपजीवन्ति तस्मात् कुर्वन्ति मण्डलम् ।।

अर्थ–यातुधान, पिशाच, असुर आणि राक्षस हे मंडलविरहित अन्नाचा केवळ नाश करतात. बारा आदित्य, अष्टवसू, एकादश रुद्र आणि पितामह ब्रह्मा हे मंडलाच्या ठिकाणी प्रविष्ट होऊन राहतात. म्हणून मंडल करतात.

मंडलमान जसे धरले असेल, त्या मानाने मंडलाचे उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ असे जे भेद होतात, ते पुढील श्लोकात सांगितले आहेत–

उत्तमाख्यं चतुर्भिः स्यान्मण्डलं चतुरस्रकम् ।
हस्तैर्हस्तद्वयेन स्यान्मध्यमं हस्तमात्रकम् ।
कनिष्ठं हस्तमात्रं तु पूर्वयोगे प्रहास्यते ।।

अर्थ–(कोणत्याही व्रताचे उद्यापन करायचे असता देवता मांडण्यासाठी जे सर्वतोभद्र, लिंगतोभद्र, इ. मंडल करतात ते) चार हात लांब-रुंद, चौरसचौरस असे मंडल उत्तम होय. दोन हात चौरस असेल, तर ते मध्यम व एक हात चौरस असेल तर ते कनिष्ठ समजावे. त्यापेक्षा कमी प्रमाणाने मंडल करायचे नसते.

कोणतेही मंडल चार हातांच्या पुढे १०० हात लांबीरुंदीचे करायला हरकत नाही. याहून अधिक मान मात्र असू नये. मंडले एकूण बारा प्रकारची आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे–

विमलं विजयं भद्रं विमानं शुभदं शिवम् ।
वर्धमानं च देवं च लताक्षं कामदायकम् ।
रुचकं स्वस्तिकाख्यं च द्विदशं इति मण्डलाः ।।

ऋग्वेदीय ब्रह्मकर्मात मंडलांचे याहून वेगळे प्रकार सांगितले असून, त्यांची चित्रेही काढून छापलेली आहेत.

तंत्रमार्गात मंडलांना विशेष महत्त्व आहे. मंडल निर्माण करण्यासाठी तांत्रिकांनी बरेच विधिनिषेध निर्माण केले आहेत. शुचिर्भूत होऊन प्रथम भूमी सारवणे, तिचे समंत्रक प्रोक्षण करणे, मग तिच्यावर विविध प्रकारच्या रांगोळ्यांनी विविध रेखा, आकृत्या काढणे, प्रत्येक रेखाकृती काढताना विशिष्ट मंत्र म्हणणे, मंडल निर्माण झाल्यावर त्याचे ध्यान-पूजन करणे, असा तांत्रिकांच्या मंडलनिर्मितीचा विधी आहे. बौद्ध तंत्रात व मंजुश्रीकल्पात अशा अनेक मंडलांची तपशीलवार माहिती असून, त्यांतील प्रत्येक बारीक सारीक रेषेचा, त्रिकोणाचा, वर्तुळाचा, बिंदूचा व बाह्य परिधीचा तांत्रिक अर्थ सांगितला आहे. त्या प्रत्येकाची देवता आणि फलश्रुतीही सांगितली आहे. [गॉ. नॉ. बृ.; श. क.; हि. ध.; व्रतराज; का. ए. सां. अ.; दि थिअरी ॲण्ड प्रॅक्टिस ऑफ दि मंडल–ए. एच्. ब्रॉड्रिक, १९६१]

मंडलब्राह्मणोपनिषद

एक यजुर्वेदीय उपनिषद. याचे पाच भाग असून, त्या प्रत्येकाला ब्राह्मण असे नाव आहे. यातील सबंध विवरण गद्यातच असून, सूर्य-नारायणाने याज्ञवल्क्यमुनीला हे उपनिषद सांगितले आहे.

पहिल्या ब्राह्मणात अष्टांग योग हे आत्मप्राप्तीचे साधन आहे, असे सांगितले आहे. चतुर्विध यम, नवविध नियम, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा आणि समाधी या सर्वांचे ज्ञानयुक्त रूप म्हणजे अष्टांग योग होय. त्या सर्व अंगांचे थोडक्यात वर्णन करून, शरीराच्या काम, क्रोध, निःश्वास, भय व निद्रा या पंच दोषांचे वर्णन केले आहे. ब्रह्म ही तारक अशी नाव आहे. दोन भृकुटींच्या मध्यभागी अथवा नासिकाग्रावर दृष्टी रोखून साधकाने ज्योतिर्मय अशा त्या ब्रह्माचे अवलोकन करावे, असे सांगून पूर्वतारक व उत्तरतारक या ब्रह्मरूपांचे वर्णन करून, शांभवी मुद्रेची माहिती दिली आहे.

अंतर्लक्ष्यादिक आदित्यमंडलाचे सविस्तर वर्णन प्रथम ब्राह्मणात केल्यावर, दुसऱ्या ब्राह्मणात शांभवी मुद्रेचे सविस्तर वर्णन केले आहे. साक्षात्कार-अनुभवात कोणकोणती दृश्ये कोणत्या क्रमाने दिसत जातात त्याचे विस्तृत वर्णन यात आहे. प्रणव-प्राप्ती म्हणजे शांभवी मुद्रा. प्रणवाचे ज्ञान झाल्यावर कर्मे बंधन-कारक होत नाहीत. उन्मनी अवस्थेत गेल्यावर जी पूजा घडते त्यातील आणि षोडशोपचार पूजेतील सोळा अंगांचे अतिशय हृद्य वर्णन हाही ह्या ब्राह्मणाचा आणखी एक विशेष होय.

निश्चिन्ता ध्यानम् । सर्वकर्मनिराकरणं आवाहनम् । निश्चय-ज्ञानं आसनम् । उन्मनीभावः पाद्यम् । सदा अमनस्कं अर्घ्यम् । सदादीप्तिपारामृतवृत्तिः स्नानम् । सर्वत्र भावना गन्धः । दृक्स्वरूपावस्थानं अक्षताः । चिदाप्तिः पुष्पम् । चिदग्निस्वरूपं धूपः । चिदादित्यस्वरूपं दीपः । परिपूर्णचन्द्रामृतरसस्यैकीकरणं नैवेद्यम् । निश्चलत्वं प्रदक्षिणम् । सोऽहं भावः नमस्कारः । मौनं स्तुतिः । सर्वसन्तोषः विसर्जनम् । इति य एवं वेद ।।

अर्थ– चिंताराहित्य हे ध्यान. सर्व कर्मांचे निराकरण हे आवाहन. निश्चयाने ज्ञान हे आसन. उन्मनी अवस्था हे पाद्य. सदैव अम-नस्क स्थिती हे अर्घ्य. नेहमी सदादीप्तिपारामृतवृत्ती हे स्नान. सर्वत्र भावना म्हणजे गंध. दृश्य स्वरूपातस्थिती, या अक्षता. चैतन्य प्राप्ती हे पुष्प. अग्निस्वरूप चैतन्य हा धूप. आदित्यस्वरूप चैतन्य हा दीप. परिपूर्ण अशा चंद्राच्या अमृतरसाचे एकीकरण हा नैवेद्य. निश्चलता ही प्रदक्षिणा. सोऽहंभाव हा नमस्कार. मौन हीच स्तुती. सर्वांचा संतोष हे विसर्जन. हे जो जाणतो, तोच खरे जाणतो.

आत्मपूजेनंतर कैवल्यस्थितीचे वर्णन त्यात केले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिसऱ्या ब्राह्मणात अमनस्क स्थिती आणि शांभवी मुद्रा यांचा संबंध विशद केला आहे.

चौथ्या ब्राह्मणाच्या प्रारंभी पंच आकाशांचा निर्देश आहे. आकाश, पराकाश, महाकाश, सूर्याकाश आणि परमाकाश या सर्व प्रकारच्या आकाशांचे संक्षिप्त वर्णनही या ब्राह्मणात पुढे दिले आहे. सरतेशेवटी राजयोगसाधनांचे संक्षिप्त विवरण आहे.

शेवटच्या म्हणजे पाचव्या ब्राह्मणात बंधन आणि मुक्ती यांची त्रोटक व्याख्या आहे, ती अशी– 'सविषयं मनो बन्धाय, निर्विषयं मुक्तये भवति ।'

'तन्मनो विलयं याति तद्विष्णोः परमं पदम्' = मनाचा लय होतो ते विष्णूचे परम पद. अमनस्क समाधीच्या साहाय्याने ब्रह्मस्थिती प्राप्त होते, त्यानंतर योग्याला अवधूत अवस्थेचा लाभ होतो. अशा अवधूताच्या सेवेने अज्ञही मुक्त होतो आणि त्या अवधूताच्या १०१ पिढ्यांचा उद्धार होतो, असा अर्थवाद उपनिषदाच्या शेवटी आहे. [श्री. सी. ग. देसाई.]

मंडली एक समूहवाचक जन संज्ञा. श्रमणकांच्या भोजन, निवास इत्यादींची सोय करणे सुलभ जावे म्हणून त्यांचे गट करण्यात येतात. या प्रत्येक गटाचा दैनंदिन कार्यक्रम ठरलेला असतो. या कार्यक्रमाला समाचरी म्हणतात. अशा प्रकारे एकत्र भोजन करणारे आणि एकाच समाचरीचे पालन करणारे श्रमणक, मंडली या समुच्चयवाचक नावाने ओळखले जातात. [हि. जैं. मो.]

मंडी हिमाचल प्रदेशातील एक प्राचीन नगरी. इथे मांडव्य ऋषींचा आश्रम होता, असे सांगतात. हिमाचल प्रदेशातील सर्वांत मोठे नगर म्हणून याची प्रसिद्धी आहे. इथल्या व्यास व सुकेती या नद्यांच्या संगमावर पंजवस्त्र नावाचे एक प्रसिद्ध मंदिर आहे. या मंदिरातील शिल्प उत्कृष्ट दर्जाचे आहे. या मंदिराशिवाय इथे सुमारे पंचवीस मंदिरे आहेत. त्यांत श्यामकाली, शिव, भूतनाथ, माधोराव, यांची मंदिरे दर्शनीय आहेत. शिल्पकामाचे उत्तम नमुने इथे पाहायला मिळतात. [श्री. हरवंससिंह सेठी—धर्मयुग, १० जानेवारी १९५४.]

मंडूक भारतम् एक नृत्य. मंडूक म्हणजे बेडूक. त्यांच्या भावभावना या नृत्यात व्यक्त केलेल्या असतात. विजयानगरम संस्थानचे अधिपती आनंद गजपतीमहाराज यांच्या कारकीर्दीत या नृत्याची रचना झाली. आकाशात कृष्ण मेघांचे दर्शन झाले, की बेडकांना आनंद होतो. ती भावना या नृत्याच्या सुरवातीला व्यक्त करतात. नंतर मेघांचा गडगडाट आणि वादळी हवा यांचे थैमान दाखवतात व शेवटी पर्जन्यधारा कोसळल्यामुळे बेडूक आनंदित होतात, ते दाखवतात [श्री. नटराज रामकृष्ण – मार्च ऑफ इंडिया, डिसें. १९५७.]

मंडोर मध्य युगातली एक राजधानी. हे गाव राजस्थानातील जोधपुरापासून ५ मैल उत्तरेस आहे. याचे प्राचीन नाव मांडव्यपुर किंवा मंडोदर असे होते. याविषयी एक आख्यायिका अशी, की हे नगर मांडव्य ऋषीने वसवले आणि दुसरी आख्यायिका अशी, की हे नगर मयासुराने निर्माण केले. याच्या जवळून नागाद्री नावाची नदी वाहते. तिच्यापासून थोड्या अंतरावर अहिशैल नावाची एक टेकडी आहे. या दोन्ही नावांवरून या नगराचा संबंध नागवंशीय राजांशी जोडलेला आहे. गुप्तांच्या पूर्वी तिथे नागांचे राज्य असावे.

इ. स. च्या सातव्या आठव्या शतकात इथे चावडा व गुर्जर शासकांचे आधिपत्य होते. सातव्या शतकाच्या सुमारास प्रतिहारवंशी हरिश्चंद्र राजाच्या पुत्रांनी मंडोर जिंकले व बाराव्या शतकापर्यंत ते त्यांच्या अधिकारात राहिले. यथील कोट या प्रतिहारांनीच बांधलेला आहे. त्यानंतर या नगरावर अनेक हिंदू व मुस्लिम सत्ता आल्या व गेल्या.

नगरात प्रवेश करताना महाराजा अभयसिंह याने निर्माण केलेल्या एका महाद्वाराचे दर्शन घडते. आत प्रवेश करताच महाराजा उम्मेदसिंह याने बनवलेले प्रशस्त उद्यान लागते. तिथून पुढे गेल्यावर एका ओळीत जोधपूर-नरेशांची समाधिमंदिरे दिसतात. त्यांना देवल म्हणतात. ही देवले कारागिरीच्या दृष्टीने समृद्ध आहेत. इथे वीरभवन नावाचे एक ३३ कोटी देवतांचे स्थानही पाहण्याजोगे आहे. त्यात एकाच दगडात चामुंडा, कंकाली, रावमल्लिनाथ, पाबूजी, इ. मोठमोठ्या सोळा मूर्ती कोरलेल्या आहेत.

मंडोरच्या कोटात ब्राह्मणी व जैन देवालयांचे भग्नावशेष आढळतात. गुप्तकालात इथे विष्णुपूजेला महत्त्व प्राप्त झाले. इथे पाषाणाच्या तोरणस्तंभावर कृष्णलीला सुरेख कोरलेल्या आहेत. इथली एकूण कारागिरी उच्च दर्जाची वाटते. मंडोर गावात उत्खनन केल्यास मोठमोठी मातीची भांडी सापडतात. एका उत्खननात पद्मपाणी बुद्धाची मूर्तीही सापडली आहे. जवळच्या एका टेकडीवर ताडकेश्वराची मूर्ती आहे. तिला हे नाव दिलेले असले, तरी ती सूर्यमूर्ती असावी, असे वाटते. मयासुराने आपली कन्या मंडोदरी ही रावणाला दिली व ते लग्न मंडोर येथेच झाले, अशी आख्यायिका आहे. तिथे 'रावणाची चवरी' नामक एक स्थान आजही दाखवतात. [श्री. यज्ञेंद्रसिंह–साप्ताहिक हिंदुस्थान, १० डिसेंबर १९६७.; श्री. रत्नचंद्र अग्रवाल–धर्मयुग १४ फेब्रुवारी १९५४.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंत्र इष्टसाधक आणि अनिष्टनिवारक वर्णसमूह. मंत्रि = गुह्यभाषणे, या धातूवरून हा शब्द बनला आहे. गुह्य गोष्ट साधणे, गुह्य अर्थ प्राप्त करून घेणे, विशिष्ट कार्यासाठी देवतेचे आवाहन करणे, असे याचे अनेक अर्थ होतात. ज्याच्या मननाने सर्व जगाचे अर्थात जीव, ब्रह्म व ब्रह्मांड यांच्या ऐक्याचे ज्ञान होते, संसारबंधातून जीवाला मुक्ती मिळते व इहलोकी धर्म, अर्थ व काम हे साध्य होतात, तो मंत्र होय, असाही त्याचा तात्त्विक अर्थ आहे.

मंत्र शब्दाच्या काही व्याख्या अशा –

मकरो मननं प्राह त्रकारस्त्राणमुच्यते ।
मननत्राणसंयुक्तो मंत्र इत्यभिधीयते ।।

अर्थ–मंत्र शब्दातला मकार म्हणजे मनन, त्रकार म्हणजे त्राण, अर्थात संरक्षण. त्यावरून मनन व संरक्षण यांनी जो युक्त त्याला मंत्र म्हणतात.

ब्रह्मज्ञा ब्राह्मणाः पूर्वं जलवाय्वादिस्तम्भनैः ।
शक्तेरुत्पादनं चक्रुस्तन्मन्त्रमिति गद्यते ।।

अर्थ – पूर्वी ब्रह्मवेत्ते ब्राह्मण (ज्या वर्णसमूहाच्या साधनाने) जल, वायू इत्यादींचे स्तंभन करून शक्तीचे उत्पादन करते झाले, त्याला मंत्र म्हणतात.

मननाद्वस्तुशक्तीनां त्राणात् सङ्कटसागरात् ।
मन्त्ररूपा भवेच्छक्तिर्मननत्राणधर्मिणी ।।

अर्थ – वस्तुशक्तीच्या मननातून संकटरूपी सागराच्या त्राणासाठी जी मनन व त्राण हे धर्म असलेली शक्ती निर्माण होते, ती मंत्ररूप होय.

'मंत्राः मननात्' = जो मनन केला जातो, ज्याच्यापासून यज्ञ, देव आणि आत्मा यांचे ज्ञान होते, त्याला मंत्र म्हणावे. (निरुक्त ७·१२)

मंत्रातल्या अनेकविध वर्णयोजना अनेक प्रकारची इष्ट फळे देतात. मंत्रातील गूढ शक्ती प्रकाशात आणणे, हा मंत्रसाधनेचा उद्देश असतो. कोणत्या मंत्राने कोणते फल प्राप्त होते, ते ऋषीमुनींनी व सिद्ध पुरुषांनी सांगितलेले असते. मंत्र म्हणजे नुसतेच एकत्र केलेले वर्ण नव्हेत. ते वर्णसमूह अंतर्गत शक्तीचे प्रतीकरूप असतात. मंत्रांमुळे साधकाच्या अंतरातली शक्ती जागृत होऊन त्याला मोठे सामर्थ्य प्राप्त होते. मंत्रातल्या स्थूल शब्दसमूहापेक्षा त्यातील चैतन्य श्रेष्ठ असते. विधानपूर्वक व अचूक मंत्रपुरश्चरण केल्यास त्यातील प्रभावी शक्तीचा प्रत्यय येतो आणि सामान्य लोभनिवृत्तिपासून महान आत्मज्ञानासारख्या महत्फलापर्यंत कोणतीही गोष्ट मंत्राने साध्य होते, असा अनुभव आहे.

शब्दब्रह्मापासून मंत्रशास्त्र उत्पन्न झाले आहे. मंत्राचे सामर्थ्य त्याच्या उच्चारात असते. मंत्रातून बाहेर पडणाऱ्या स्वरलहरींपासून वातावरणात जे कंपन निर्माण होते, त्या कंपनातून ते सामर्थ्य प्रकट होते. मंत्र हा तेजोरूप आहे. त्यात सुसंगत अर्थ नसला, तरी देवतेच्या प्रकटीकरणाचे सामर्थ्य त्याच्यात भरलेले आहे, असे मत श्री. वुड्राफ या तंत्रशास्त्रज्ञाने व्यक्त केले आहे.

न्यायरत्न श्री. विनोद यांनी मंत्राविषयी पुढील विवेचन केलेले आहे–

जगातल्या सर्व मानववंशांत मंत्र-तंत्राचा आढळ होतो. भारतवर्ष तर या विद्येचे माहेरघरच आहे. मंत्रशास्त्र हे अभ्युदयाचे कारक, सामर्थ्याचे निष्पादक व सौभाग्याचे प्रापक आहे. मंत्र म्हणजे देवतांचे आवाहन. ते इष्टसिद्धी व अनिष्टनिवारण यांच्यासाठी असते. मंत्रातली शक्ती देवतांच्या सान्निध्याने ते कार्य करते. मंत्रविद्येचे अधिष्ठान बौद्धिक आहे. मुळात मंत्रविद्या ही बौद्धिक व शास्त्रीय भूमिकेवरच आधारलेली होती. पण यावनी संस्कृतीशी आपला संसर्ग झाल्यापासून तिची बौद्धिक भूमिका ढासळली. वेगवेगळे मंत्र ही वेगवेगळ्या देवतांची प्रतीके असतात. ही प्रतीके म्हणजे अतीन्द्रिय शक्तीची प्रारण यंत्रेच होत. मंत्रशक्तीने मानसिक परिणाम होणे हे नैसर्गिक आहे. एकाग्रता, व्यवस्थिती, स्वसंयोजन, इ. फले मंत्रशक्तीने उपलब्ध होतात. अलौकिक प्रत्यक्ष हे मंत्रविद्येचे आद्य गृहीत कृत्य आहे. अलौकिक प्रत्यक्ष म्हणजे सामान्य लोकांना अशक्य असलेला इंद्रिय–अनुभव होय. याचे चार विभाग पडतात– (१) आर्ष ज्ञान (२) योगी प्रत्यक्ष (३) सिद्धदर्शन व (४) प्रातिभ ज्ञान. यांच्या सीमारेषा अस्पष्ट आहेत. आर्षज्ञान म्हणजे ऋषींचा अनुभव. तो तपस्येने उत्पन्न होतो. योगी प्रत्यक्ष हा योगाने व ध्यानाने उत्पन्न होतो. ज्ञानकर्मेंद्रिये सूक्ष्म झाल्याने सिद्धदर्शन अनुभविता येते. चौथे प्रातिभ ज्ञान हे पहिल्या व दुसऱ्या प्रकारासारखेच असते. ते विद्युल्लतेसारखे चमकून नष्ट होते. मंत्रशक्ती ही आर्ष प्रत्यक्षाचा व ऋषींच्या अनुभवांचा साक्षात्कार आहे. ही शक्ती तपाने सिद्ध होते व ती मानसजन्य असते.

मंत्रातील सामर्थ्य प्रकट होण्यासाठी मंत्राचा जप करावा लागतो. जप म्हणजे आवर्तन होय. मात्र हे आवर्तन केवळ मंत्रातील शब्दांचे असून चालत नाही. त्यातील अर्थाचेही आवर्तन झाले पाहिजे. तेच अधिक महत्त्वाचे आहे. त्यासाठी मनाची एकाग्रता आवश्यक असते. मन पांगलेले असेल, तर मंत्रात आणि साधकाच्या अंतरात शक्तिसंक्रमण होऊ शकणार नाही. म्हणून मंत्रात केवळ उच्चारण हे अभिप्रेत नसून, तदर्थभावन हे अभिप्रेत आहे. याच मुद्याचे स्पष्टीकरण श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर पुढीलप्रमाणे करतात –

मंत्राचे सामर्थ्य म्हणजेच मनाचे सामर्थ्य आणि मनाचे सामर्थ्य म्हणजेच मनात चालणाऱ्या विचारांचे सामर्थ्य होय. शब्दावाचून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जे विचार, ते सूक्ष्म विचार. विचार शब्दाच्या आधीन आले म्हणजे ते स्थूल झाले. अर्थातच स्थूलामध्ये सूक्ष्मापेक्षा शक्ती कमी असते, हे ओघानेच आले. शब्दस्वरूप मंत्राच्या उच्चारापेक्षाही अर्थस्वरूप अथवा विचारस्वरूप मंत्रात सामर्थ्य नेहमीच अधिक असते. विचारांचे प्रचंड सामर्थ्य लक्षात आणूनच भारतीय तत्त्ववेत्त्यांनीं वाईट शब्दापेक्षा वाईट विचार अधिक धोकादायक आहेत, असा विस्मयजनक सिद्धान्त पाच सहस्र वर्षांपूर्वी मांडला आहे. माणसाने सदैव चांगले विचार करावे, याचे कारण हेच, की विचारांचे, सतत चाललेल्या चिंतनाचे केव्हा ना केव्हा तरी आचारात वा उच्चारात पर्यवसान झाल्यावाचून राहत नाही. उत्कृष्ट विचारांचे सामर्थ्य कोटयवधी अणुबाँब किंवा हायड्रोजन बाँबपेक्षा अधिक आहे, हे आता पाश्चात्य वैज्ञानिक मान्य करू लागले आहेत.

सर्व मंत्रांत वैदिक मंत्र श्रेष्ठ होत. वेदांचा संहिताविभाग हा मंत्ररूपच मानलेला आहे. ऋग्वेदातला गायत्री मंत्र विश्वमित्राने दृष्ट असून, तो सर्वश्रेष्ठ मानलेला आहे. ऋग्वेदातील मंत्राचा विनियोग यज्ञकर्मात होत असतो. त्यातील मंत्रांचे विधान कसे करावे, यासाठी ऋग्विधान नावाचा ग्रंथ निर्माण झाला आहे. त्यात पौष्टिक व आभिचारिक अशी दोन्ही प्रकारची कर्मे सांगून, त्यासाठी जपहोमादी विधाने दिली आहेत. दीर्घायुष्य, स्वर्गप्राप्ती, धन, प्रजा, पशू, शत्रुनाश, रोगनाश, अपमृत्युनिवारण, इ. अनेक कामनांचे मंत्र ऋग्वेदात असून, त्यांची अनुष्ठाने ऋग्विधानात दिली आहेत. अथर्ववेद हाही नानाविध मंत्रांचे आगरच आहे. मनुष्य सुखात राहावा, त्याला सुखाने जगता यावे; रोगराई, विषारी प्राणी, शत्रू, भूतपिशाच, इ. संहारक शक्तींनी त्याचे जीवन दुःखमय होऊ नये, यासाठी मंत्रांचे हजारो विनियोग अथर्ववेदात सांगितले आहेत.

वेदाप्रमाणेच तंत्रग्रंथांतही हजारो मंत्र दिलेले आहेत. त्यांचाही उद्देश उभयविध म्हणजे ऐहिक उत्कर्ष व आध्यात्मिक उन्नती असा आहे. याशिवाय हजारो शाबरमंत्रही आहेत. त्यांना पैशाचिक मंत्र असेही म्हणतात. हे मंत्र पुष्कळदा अर्थशून्य असतात. त्यांत अर्थाला प्राधान्य नसून ध्वनीला प्राधान्य असते. हे मंत्र कनिष्ठ दर्जाचे होत. कारण त्यांच्याद्वारे साधकाचा देवतांशी संबंध येत नाही, तर भूतप्रेतपिशाचांशी येतो.

मंत्रांच्या जाती – बीजमंत्र, मूलमंत्र व मालामंत्र अशा मंत्रांच्या तीन जाती आहेत. बीजमंत्र म्हणजे अं, यं, रं, लं, ऱ्हाम्, ऱ्हीम्, ऱ्हूम्, इ. एकवर्णात्मक मंत्र होत (बीजमंत्र पाहा.) वेदाचा बीजमंत्र ऐं हा आहे. चारही वेदांच्या प्रारंभस्वरांनी हे बीज तयार झाले आहे. प्रत्येक देवतेचे बीजमंत्र निराळे आहेत. उदा० गं– गणपती. ऱ्हीं– माया. श्रीं– लक्ष्मी क्लीं–काली, इत्यादी. दहा अक्षरापर्यंतच्या मंत्राला मूल मंत्र म्हणतात. ज्या मंत्राचा जप मालेच्या साहाय्याने केला जातो, त्याला मालामंत्र म्हणतात.

मंत्रांतही पुं, स्त्री व नपुंसक असे प्रकार आहेत. त्याविषयीचा एक श्लोक असा–

वषडन्ताः फडन्ताश्च पुमांसो मनवः स्मृताः ।
वौषट्स्वाहान्तिका नार्यो हुं नमोऽन्ता नपुंसकाः ।।

अर्थ–ज्या मंत्रांच्या शेवटी वषट् आणि फट् असे शब्द उच्चारले जातात, त्यांना पुरुषमंत्र; वौषट् आणि स्वाहा हे शब्द ज्यांच्या अंती असतात, ते स्त्री मंत्र व ज्यांच्या शेवटी पुं आणि नमः असे शब्द असतात, ते नपुंसक मंत्र होत.

मंत्रशुद्धी – कोणताही मंत्र सिद्ध करण्यासाठी तो आधी शुद्ध करून घ्यावा लागतो. या मंत्रशुद्धीचे सात उपाय गौतमीय तंत्रात सांगितले आहेत, ते असे –

भ्रामणं रोधनं वश्यं पीडनं शोषपोषणे ।
दहनान्तं क्रमात् कुर्यात् ततः सिद्धिर्भवेन्न तु ।।

याचे संक्षेपात दिग्दर्शन असे –

(१) भ्रामण – य या वायुबीजाने मंत्राच्या सर्व वर्णांना गुंफावे. (२) रोधन – ॐ बीजाने मंत्र संपुटित करून जपावा. (३) वशीकरण – आळता, रक्तचंदन, हळद, धोतऱ्याचे बी किंवा मनशीळ यांपैकी कशाचे तरी गंध तयार करून त्याने भूर्जपत्रावर मंत्र लिहावा. (४) पीडन – क्षीरवृक्षाच्या दुधाने मंत्र लिहून तो पायाखाली दाबावा. (५) शोषण – वं या वरुणबीजाने संपुटित करून मंत्र जपावा. (६) पोषण – गुरूपदिष्ट तीन बीजांनी मंत्र संपुटित करून जप करावा आणि गाईचे दूध किंवा मध यांनी मंत्र लिहावा. (७) दहन – मंत्राचा आदी, मध्य व शेवट यांच्यामध्ये रं हे अग्निबीज सोडून जप करावा व पळसाच्या बियांच्या तेलाने मंत्र लिहावा.

शापविमोचन – काही मंत्रांना निरनिराळ्या ऋषींनी शाप दिलेले आहेत. शंकराने सात कोटी महामंत्रांना शाप दिलेला आहे. गायत्री मंत्राला तर वसिष्ठ, विश्वामित्र, ब्रह्मदेव आणि वरुण या चौघांचा शाप आहे. तेव्हा मंत्रसिद्धीसाठी त्यांचे शापविमोचन करावे लागते. काही मंत्र मलिन असतात. त्यांना बीजाक्षरांनी जागृत केले, की त्यांचे उत्कीलन होते. शापामुळे मृतप्राय झालेल्या मंत्रांना सजीव करण्यासाठी संजीवन नावाचा विधी करावा लागतो. या सर्व तांत्रिक गोष्टी तंत्रशास्त्रात विस्ताराने दिलेल्या आहेत.

कित्येकदा मंत्राशी मैत्रीही करावी लागते. ही मैत्री क्रियात्मक असते. मंत्र ज्या कारणासाठी सिद्ध व्हायला हवा असेल, ती कारणे ज्या मानाने शुद्ध, अशुद्ध, सौम्य, क्रूर, मंगल, अमंगल, साहाय्यक किंवा घातक असतील, त्या मानाने त्या त्या मंत्रावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काही क्रिया कराव्या लागतात. त्या करतेवेळी वापरायची आसने, माला, यंत्रे व यंत्रांचे आधार निरनिराळे असतात.

काही मंत्र मात्र स्वतःसिद्ध असतात. त्यांच्या सिद्धीसाठी कोणतेही संस्कार करावे लागत नाहीत. चारही वेदांतले मंत्र हे स्वतःसिद्ध व स्वयंप्रकाशी मानलेले आहेत. कुलपरंपरेने आलेला मंत्रही स्वतःसिद्ध असतो. तंत्रशास्त्रात जे हजारो मंत्र आहेत, त्यांतही काही सिद्ध मंत्र आहेत. त्यांची नावे अशी –

एकार्णस्त्र्यक्षरोऽनुष्टुबिति त्रेधा नृकेसरी ।
एकाक्षरोऽनुष्टुब् द्विविधस्तुरगाननः ।।
चिन्तामणिः क्षेत्रपालो भैरवो यक्षनायकः ।
गोपालो गजवक्त्रश्च चण्डिका यक्षिणी तथा ।।
मातङ्गी सुन्दरी श्यामा तारा कर्णपिशाचिनी ।
शबर्येकजरा रामः कालिनीलसरस्वती ।।
त्रिपुरा कालरात्रिश्च कलौ सिद्धिप्रदा इमे ।

वरील नावांचे मंत्र हे कलियुगात सिद्धिप्रद आहेत.

मंत्रांचे उच्चारण – मंत्र हा गुरुमुखातूनच घ्यावा लागतो आणि तो मात्राविज्ञानानुसार जपावा लागतो. शब्दांच्या ध्वनींचे प्रमाण ज्याच्या योगाने कळते अथवा ठरवले जाते, त्याला मात्रा असे म्हणतात. मंत्राच्या बाबतीत मात्राविज्ञानाला म्हणजेच स्वरांच्या आरोह-अवरोहांना; तसेच उदात्त, अनुदात्त, स्वरित, प्रचय, इ. स्वरांच्या योग्य उच्चारणाला फार महत्त्व आहे. त्यांत जर चूक झाली, तर मंत्राचा केवढा मोठा दुष्परिणाम होतो, ते पाणिनीय शिक्षेत उदाहरणासह सांगितले आहे –

मन्त्रो हीनः स्वरतो वर्णतो वा मिथ्याप्रयुक्तो न तमर्थमाह ।
स वाग्वज्रो यजमानं हिनस्ति यथेन्द्रशत्रुः स्वरतोऽपराधात् ।।

अर्थ – स्वर व वर्ण यांनी हीन असलेला मंत्र म्हणजेच चुकीच्या पद्धतीने उच्चारलेला मंत्र मिथ्या प्रयुक्त होतो आणि तो अभिप्रेत अर्थ सूचित करीत नाही. तो वाग्वज्र बनून यजमानाचाच घात करतो. उदा० इंद्रशत्रू या शब्दात स्वराची चूक झाल्यामुळे जसे घडले तसे.

वरील इंद्रशत्रू या शब्दाने एक कथा सूचित होते आणि ती तैत्तिरीय संहितेत पुढीलप्रमाणे आढळते –

विश्वरूप नावाचा एक ब्राह्मण होता. तो असुरांचा भाचा असून, देवांचा पुरोहित होता. देवांनी आरंभिलेल्या एका यज्ञात त्याच्याकडे पौरोहित्य होते. त्या यज्ञात देवांना प्रकटपणे सोमपान मिळत असे. पण विश्वरूपाचा असुरांकडे ओढा असल्यामुळे, तो त्याच यज्ञात चोरून असुरांनाही सोमपान करवीत असे. विश्वरूपाचे हे कपट इंद्राच्या लक्षात आले आणि त्याने आपल्या वज्राने विश्वरूपाचा वध केला.

त्वष्टा हा विश्वरूपाचा बाप. आपल्या पुत्राचा वध झाल्याचे कळून त्याला क्रोध आला आणि त्याने इंद्राचा सूड घेण्यासाठी एक यज्ञ सुरू केला. त्या यज्ञात त्याने अवशिष्ट सोमरस 'इंद्रशत्रुर्वर्धस्व' (मला तुझ्या कृपेने इंद्राचा नाश करू शकेल असा पुत्र होवो) या शब्दांनी अग्नीला अर्पण केला.

त्वष्टयाचे शब्द बरोबर होते; पण त्याचे उच्चारण चुकीचे होते. इंद्रशत्रू या सामासिक शब्दाचे अर्थ दोन होऊ शकतात – इंद्राचा शत्रू (इंद्राला मारणारा) हा तत्पुरुष समासातून निघालेला एक अर्थ आणि इंद्र आहे शत्रू ज्याचा (इंद्राकडून मारला जाणारा) असा बहुव्रीही समासातून निघणारा दुसरा अर्थ. त्वष्टयाला पहिला अर्थ अभिप्रेत असल्यामुळे त्याने त्यासाठी समस्त शब्दाच्या शेवटच्या अक्षराचा स्वर उदात्त ठेवायला हवा होता. पण त्याऐवजी त्याने समासातल्या पहिल्या शब्दाच्या शेवटच्या अक्षराचा स्वर उदात्त उच्चारला. त्याचा परिणाम असा झाला, की इंद्राला मारणारा पुत्र न जन्मता इंद्राकडून मारला जाणारा असा वृत्र नावाचा पुत्र त्याच्या पोटी जन्माला आला (तै. सं. २·५·१–२).

पाणिनीय शिक्षेत त्यापुढे सांगितले आहे, ते असे –

अनक्षरं हतायुष्यं विस्वरं व्याधिपीडितम् ।
अक्षता शस्त्ररूपेण वज्रं पतति मस्तके ।।

अर्थ – मंत्रातली अक्षरे गाळली गेली तर ती आयुष्याचा नाश करतात; स्वर चुकल्यास व्याधी उत्पन्न होतात. (अक्षरच्युती आणि विस्वर मंत्राने अभिमंत्रित केलेल्या) अक्षता यजमानाच्या मस्तकावर वज्र म्हणून पडतात.

अधिकारी गुरूने प्रसन्न होऊन दिलेला, स्वप्नात प्राप्त झालेला, ध्यनावस्थेत देवतेकडून मिळालेला किंवा अन्य योग्य विधानाने घेतलेला, शापोत्कीलनादी कर्मे करून सिद्ध केलेला, शुद्ध आणि योग्य स्वराघातासह उच्चारलेला व शास्त्रोक्त विधि–निषेध पाळून जपलेला मंत्रच सिद्ध होऊ शकतो आणि इष्ट फलही देऊ शकतो. पुस्तकातून मंत्र उतरवून घेऊन त्याचा जप करणे आणि अनधिकारी माणसाकडून मंत्र घेणे या गोष्टी निरर्थक तर आहेतच; शिवाय त्या अनर्थकारकही आहेत. याविषयी मंत्रमहोदधी, शक्तिसंगमतंत्र, सांख्यायनतंत्र, तंत्रराज, प्रपंचसार, षट्कर्मदीपिका, कुलार्णव, रुद्रयामल, सरस्वतीतंत्र, दत्तात्रेयसंहिता, इ. मंत्रशास्त्रावरच्या ग्रंथांत साधकांना स्पष्ट व तपशीलवार अशा अनेक सूचना केलेल्या आहेत. केवळ विशिष्ट कामनेसाठी मंत्रानुष्ठान करणे हे गौण होय, असे म्हटले आहे. कामनिक अनुष्ठानाने केवळ तेवढी कामनाच फलद्रूप होईल; पण निष्कामपणे मंत्रानुष्ठान केल्यास त्याहून मोठा लाभ घडेल. याविषयी मंत्रमहोदधीत उपदेश केला आहे, तो असा –

काम्यकर्मप्रसक्तानां तावन्मात्रं फलं भवेत् ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निष्कामं भजतां पुंसामखिलाभीष्टसम्पदः ।।
कथिताः सर्व मन्त्राणां ये प्रयोगाः सुखाय वै ।
तदासक्तिं निहायैव निष्कामो देवतां भजेत् ।।
वेदोदितं कर्म कुर्वन् उपासीत च देवताः ।
शुद्धान्तःकरणस्तेन लभते ज्ञानमुत्तमम् ।।
लब्धज्ञानकृतार्थः स्यात् परत्रेह च मानवः ।

अर्थ – जे साधक काम्यकर्मात प्रसक्त असतात, त्यांना तेवढेच फल मिळते. पण निष्काम साधना करणारे जे पुरुष आहेत, त्यांना तोच मंत्र सर्वसिद्धिप्रद होतो. मानवी सुखासाठी सर्व मंत्रांचे जे प्रयोग सांगितले आहेत, त्यांची आसक्ती धरू नये; तर निष्काम होऊन देवतेची उपासना करावी. वेदोक्तकर्म आचरून देवता उपासाव्या. त्यामुळे अंतःकरण शुद्ध होते, त्याने उत्तम ज्ञान लाभते आणि त्या ज्ञानाने मनुष्य इह आणि परत्र कृतार्थ होतो.

मंत्राचे फल प्राप्त होण्यासाठी त्याचे पुरश्चरण करावे लागते. जप, होम, तर्पण व ब्राह्मणभोजन ही पुरश्चरणाची अंगे होत. एकूण मंत्रोपासना ही अनेक विधि–निषेधांनी बांधलेली असल्यामुळे ती कष्टप्रदच आहे. सर्वविषयी सावध आणि शुचिर्भूत राहून मंत्रानुष्ठान केले, तरच त्याचे फल मिळू शकते. पाहा – जप; पुरश्चरण; माला. [देवीकोश २; श्रीगुरुदत्तयोग; योगविद्या; मंत्रशास्त्र (प्रस्तावना); हि. ध.; गा. वि. उ.; कल्याण – साधनांक; श. शा.]

मंत्रतंत्र मंत्र देवतेनुरूप वेगवेगळे असतात. मंत्रात त्या त्या देवतेचे शक्तिसर्वस्व साठवलेले असते. मंत्रावाचून ध्यानस फल होत नाही. तंत्र हे मंत्राला उपकारक असते. एखादा त्रिकोण, चतुष्कोण, चक्र, इ. आकृती म्हणजे यंत्र कागदावर काढून किंवा तांब्याच्या पत्र्यावर कोरून घेऊन त्या यंत्राची पूजा करणे, हे तंत्र होय. देवतेच्या मंत्राने तंत्रविधी केल्यास फलप्राप्ती लवकर होते, अशी समजूत आहे. [उपनिषद्रहस्य]

मंत्रदीक्षा गुरुमुखातून इष्ट देवतेच्या मंत्राचे ग्रहण करणे, याला मंत्रदीक्षा असे म्हणतात. मंत्रदीक्षा देणारा गुरु ज्ञानवान्, शांतचित्त व ब्रह्मनिष्ठ असावा, असे शक्तियामल तंत्रात सांगितले आहे. पतीने पत्नीला, पित्याने कन्यापुत्रांना व भावाने भावाला मंत्रदीक्षा देऊ नये, असे रुद्रयामलात सांगितले आहे. त्याचप्रमाणे बापाचा, आईच्या बापाचा, कनिष्ठ बंधूचा व शत्रुपक्षात असणाऱ्याचा मंत्र घेऊ नये, असे योगिनीतंत्रात सांगितले आहे. उत्तम तीर्थात, चंद्रसूर्यग्रहणांच्या वेळी व श्रावणी पौर्णिमेला दीक्षा घेण्यासाठी तिथिनक्षत्रादिकांचीशुद्धी पाहावी लागत नाही, असे सारसंग्रहात म्हटले आहे. अन्यत्र दीक्षाग्रहणाला शुभ मुहूर्त पाहण्याची गरज असते. तंत्रशास्त्रात मंत्रदीक्षेचा विधी बराच जटिल केलेला आहे. सामान्यपणे योग्य गुरूला शरण जाऊन त्याची पूजा करणे, गुरूने शिष्याच्या कानात मंत्र सांगून त्याच्याविषयीचे विधिनिषेध सांगणे, याला मंत्रदीक्षा म्हणतात. दीक्षा घेतल्यावाचून जप व पुरश्चरण केला जाणारा मंत्र निष्फल होतो, असे स्पष्ट सांगितले आहे.

मंत्रपुष्प देवाच्या षोडशोपचार पूजेतील शेवटचा उपचार. देवाची आरती करून झाल्यावर देवे नामक मंत्र म्हणतात. त्यांत पुढील मंत्र येतात–

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमा नः सचन्तः पूर्वे साध्याः सन्ति देवाः ।।

अर्थ – देवांनी यज्ञाच्या द्वारे यज्ञरूप प्रजापतीचे पूजन केले, तीच कृत्ये जगदुद्धार करणारी झाली. ज्या ठिकाणी जगाच्या उत्पत्तीला साधक असणारे देव असतात, ते स्वर्गरूपी स्थान त्यांची उपासना करणाऱ्यांना प्राप्त होते.

या मंत्रानंतर पुढील राष्ट्रीय प्रार्थनामंत्र म्हणतात–

ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः ।

ॐ स्वस्ति । साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं, माहाराज्यमाधिपत्यमयं समन्तपर्यायी स्यात् सार्वभौमः सार्वायुषः आंतादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति । तदप्येषः श्लोकोऽभिगीतः ।

मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे ।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

अर्थ – सर्वशक्तिमान राजाधिराज व उपासकांची प्रार्थना ऐकून घेणाऱ्या प्रभूला आम्ही सर्व उपासक नमस्कार करतो. तो आमची मनकामना पूर्ण करो. त्या राजाधिराज महाराजाला आम्ही प्रणिपात करतो. आम्हां सर्वांचे कल्याण होवो. आमचे साम्राज्य चहूकडे पसरून, त्यात सर्व उपभोगांचे पदार्थ उत्पन्न होवोत. त्या साम्राज्यात प्रजातंत्राने चालणारी राज्यपद्धती असो. तिथे सर्व जगतापेक्षा सर्व बाजूंनी उत्तम व्यवस्था असो. सर्व लोक परमात्मनिष्ठ होऊन मुक्तिसुखाचे अधिकारी बनोत. आम्हांला त्या साम्राज्यात विशेष अधिकार असोत. आमच्या साम्राज्यात पुष्कळ अधिकारी असोत व हे सर्वमिळून होणारे राज्य चारही बाजूंनी समुद्रापर्यंत व्यापणाऱ्या पृथ्वीवर पसरलेले असो. जो अशा साम्राज्याचा सार्वभौम राजा होईल, तो दीर्घायू होवो व हे साम्राज्य या सृष्टीच्या अंतापर्यंत परार्ध-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कालाच्या समाप्तीपर्यंत एकसारखे नांदत राहो.

वरील मंत्र म्हणून झाल्यावर गंधाक्षतायुक्त फुले ओंजळीने देवाला अर्पण करतात. [धा. सं. नि.; पूजामार्गप्रदीप.]

मंत्रयान एक बौद्ध उपपंथ. प्रारंभी बौद्धांच्या श्रावकयानातून जे फुटून निघाले, त्यांनी महायान पंथ निर्माण केला. पण पुढे महायानातही फूट पडली व त्यातून जे फुटून निघाले, त्यांनी मंत्रयान या नावाने आपला उपपंथ चालू केला.

या पंथात मंत्र व योग यांना महत्त्व दिलेले आहे. महायान पंथात गौतम बुद्धाला देवत्व मिळाले व त्याच्या अनेक उपदेशांनाही असाधारण महत्त्व प्राप्त झाले. महायानी लोकांत उपलब्ध बुद्धवचनांविषयी श्रद्धा वाढली आणि ते त्यांचा पाठ करणे हे आपले कर्तव्य समजू लागले. पण हे पाठ सामान्यतः दीर्घ होते. त्यामुळे ते मुखोद्गत करायला कठी[illegible]. त्यासाठी मग त्यांच्या आधारावर छोटया छोटया सूत्रांची रचना झाली. त्या सूत्रांचाही पुढे संक्षेप झाला आणि त्या संक्षेपांना मंत्र ही संज्ञा लाभली. हे मंत्र सामान्यतः दोन अक्षरांचे असत. या मंत्रांच्या जपाने आणि आणि पठनाने अलौकिक सिद्धी प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी दृढ केला. अशा प्रकारे इ. स. च्या ५ व्या शतकाच्या सुमारास मंत्रयान पंथ उदयाला आला.

या पंथाचा प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे मंजुश्रीमूलकल्प हा होय. इ. स. च्या सहाव्या शतकात त्याची रचना झाली. या ग्रंथात अनेक प्रकारच्या मुद्रा, मंडले, मंत्र, क्रिया व चर्या यांचे विवरण आहे. शीलपालन, व्रतग्रहण, शौचाचार, नियम, होम, जप व ध्यान या गोष्टी व्यवस्थितपणे आचरल्यानंतरच हा मंत्रमार्ग फलदायी होतो, असे त्या ग्रंथात सांगितले आहे. मंत्रपूजा सत्वर फलदायी व्हावी, यासाठी ती करण्यास योग्य अशा पवित्र स्थानांची नावनिशी या ग्रंथात दिलेली असून, सर्व पवित्र स्थानांत श्रीशैल पर्वत हे सर्वोत्कृष्ट स्थान मानले आहे. बुद्ध, बोधिसत्त्व व अन्य देवता यांच्या पूजेविषयीचे विधी, संस्कार, मंत्र व त्यांचे उच्चार या ग्रंथात प्रामुख्याने सांगितले आहेत.

मंत्रयानात अधिकारवादाला प्राधान्य आहे. मंत्रयानाच्या साधनेत उच्चाधिकार प्राप्त झालेली व्यक्तीच प्रवेश करू शकते. म्हणूनच अद्वयवज्राने मंत्रयानाला तीक्ष्णेंद्रिय–अधिकारसाध्य मानले आहे. श्रीपर्वताच्या मल्लिकार्जुन क्षेत्रातल्या धान्यकटक या गावी बुद्धाने तृतीय धर्मचक्रप्रवर्तन करून मंत्रमार्गाचे प्रचलन केले, असा मंत्रयानी लोकांचा विश्वास आहे.

मंत्रयानात मंत्राबरोबरच योगालाही महत्त्व दिलेले आहे. मात्र यातली योगसिद्धी जटिल आहे. तिच्यासाठी साधकाला क्रमशः ध्यानाभ्यास व विमोक्षलाभ करण्याची आवश्यकता असते. शून्यता, अनिमित्त, अप्रणिहित व अनभिसंस्कार असे त्यांनी चार विमोक्ष मानलेले आहेत. विशुद्धियोग, धर्मयोग, मंत्रयोग व संस्थानयोग असे योगही चार प्रकारचे ठरवले आहेत. या चार योगांनी अनुक्रमे तुरीय, सुषुप्ती, स्वप्न व जाग्रत् या अवस्थांचा क्षय होतो. पूर्ण निर्मलत्व किंवा स्वच्छत्व प्राप्त होणे हे या योगाचे मुख्य फल आहे.

मंत्रयान प[illegible] वाढता वाढता त्याच्या अनुयायांत अनेक प्रकारचे दुराचार शिरले. त्याचे अनुयायी कमालीचे भोगलोलुप बनले. हे भोग आणि दुराचार झाकले जाण्यासाठी लोकांच्या तोंडावर फेकायला किंवा लोकांना बनवायला पंथाला काही तत्त्वज्ञान हवे होते. सुखवाद या नावाने त्यांनी ते निर्माण केले. पुढे विज्ञानवाद्यांच्या शून्यवादात हा सुखवाद येऊन मिळाला. [उ. भा. सं. प.; तां. बौ. सा. सा.; बौ. द. मि.; बौ. ध. द.]

मंत्रयुद्ध युद्धाचा एक प्रकार. मंत्रशक्तीचा वापर करून केलेले युद्ध. प्राचीन काळी अस्त्रांना काही वेळा मंत्रांची जोड देऊन त्यांचा युद्धात वापर करीत. परशुरामाने मंत्रशक्ती शोधून काढली होती. अस्त्रांच्या अनेक प्रकारांत मंत्रमुक्त नामक एक प्रकार सांगितलेला आहे. मंत्रमुक्त अस्त्र फेकताना हाताला कष्ट पडत नाहीत, तर नैसर्गिक शक्तीच्या योगाने ते फेकले जाते. ब्राह्म, वैष्णव, प्राजापत्य, ऐंद्र, वायव्य, वारुण व आग्नेय, असे मंत्रमुक्त अस्त्रांचे सात प्रकार जमदग्नीने सांगितले आहेत. त्यांपैकी स्फोट होऊन उष्णतेच्या जोराने उडविले जाते, ते आग्नेयास्त्र होय व पाण्याच्या ज़ोराने फेकले जाते, ते वारुणास्त्र होय. ही अस्त्रे गुरूकडून समजावून घेऊन मगच वापरायची असत.

बाणांचे नाराच व शर असे दोन भेद आहेत. त्यांपैकी भरीव नाराच बाणांना शक्ती व पोकळ नाराच बाणांना नालीक असे म्हणत. नाराच व नालीक या दोन बाणांना मंत्रशक्ती जोडीत असत. निरनिराळ्या मंत्रविद्येचे डबे किंवा गोळे योद्धे आपल्याजवळ बाळगीत आणि ते जरुरीप्रमाणे बाणांना जोडून शत्रूवर फेकीत. या क्रियेला अस्त्राचे आवाहन असे नाव होते. रावणाला मारण्याच्या वेळी रामचंद्राने अगस्त्याने दिलेल्या अस्त्राचा असाच उपयोग केला होता. भारतीय युद्धातही अशा अस्त्रांचा अनेक वेळा प्रयोग केला गेला होता, असे दिसते.

काही अस्त्रे सोपसंहार असत, तर काही उपसंहाररहित असत. वैशंपायनधनुर्वेदात दंडचक्र, धर्मचक्र, कालचक्र, एंद्रचक्र, शूलवर, ब्रह्मशीर्ष, मोदकी, शिखरी, धर्मपाश, वरुणपाश, पैनाकास्त्र, वायव्य, शुष्क, आर्द्र, शिखरास्त्र, क्रौंचास्त्र, हयशीर्ष, विद्यास्त्र, अविद्यास्त्र, गंधर्वास्त्र, नंदनास्त्र, वर्षण, शोषण, प्रस्वापन, प्रशमन, संतापन, विलपन, मथन, मानवास्त्र, शमन, तामस, संवर्त,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मौसल, सत्य, सौर, मायास्त्र, त्वाष्ट्र, सोमास्त्र, संहार, मानस, नागास्त्र, गरुडास्त्र, शैलास्त्र व ईषिकास्त्र, अशा चव्वेचाळीस सोपसंहार अस्त्रांची नावे दिली आहेत. या अस्त्रांना उतारा आहे.

विष्णुचक्र, वज्रास्त्र, ब्रह्मास्त्र, कालपाश, नारायणास्त्र व पाशुपतास्त्र ही अस्त्रे पुष्कळ दिवसांची जुनी असली, तरी खराब होत नसत. त्यामुळे या अस्त्रांचे महत्त्व फार असून, ती एकदा सिद्ध करून ठेवली, की त्यांचा पाहिजे तेव्हा उपयोग करता येत असे. अर्जुनाने निवातकवचांवर पाशुपतास्त्र सोडले होते. संशप्तकांवरही त्याने अशाच अस्त्रांचा प्रयोग केला होता. [प्रा. यु. वि]

मंत्ररामायण एक गौण रामायण. रामायण हे वेदमूलक आहे, हे सांगणे हा या रामायणाचा मुख्य उद्देश आहे. नीलकंठ हा याचा कर्ता आहे. याच्या सुरुवातीला रामरक्षास्तोत्र उद्धृत केले आहे. वेदातच रामकथा निहित आहे, अशा आशयाचा एक श्लोक प्रसिद्ध आहे, तो असा–

वेदवेद्ये परे पुंसि जाते दशरथात्मजे।
वेदः प्राचेतसादासीत् साक्षाद् रामायणात्मना ॥

अर्थ– वेदवेद्य व नरश्रेष्ठ दशरथपुत्र रामचंद्र प्रकट झाला, त्याच वेळी वेदही प्राचेतसाकडून रामायण–रूपाने प्रकट झाला.

या रामायणाचा पाठ करण्यापूर्वी भक्तगण प्रथम हा श्लोक म्हणतात.

नीलकंठाने मंत्ररामायणात काही वैदिक मंत्र दिले असून, त्यांतून समग्र रामकथा सूचित होते, असे त्याने दाखविले आहे. ऋग्वेदातील १०.९९ हे वम्रकृत सूक्त इंद्रस्तुतिपर आहे. इथे वम्र म्हणजे वाल्मीकी, इंद्र म्हणजे राम आणि रुद्रगण म्हणजे हनुमान व त्याचे साहाय्यक होत, असे त्याने म्हटले आहे.

या रामायणाच्या पहिल्या श्लोकात रामायणाच्या गायत्रीस्वरूपाचा उल्लेख केला आहे. [राम–कथा]

मंत्राचमन संध्येतला एक विधी. तळहाताच्या खळग्यात पाणी घेऊन, 'सूर्यश्च मा मन्युश्च' या मंत्राने सकाळी व 'अग्निश्च मा मन्युश्च' या मंत्राने सायंकाळी ते अभिमंत्रून प्राशन करतात आणि पुनश्च मार्जन करतात.

मंत्रिकोपनिषद् एक यजुर्वेदीय उपनिषद. हे अत्यंत छोटे आहे. त्यात केवळ एकोणीस श्लोक आहेत. मन्त्रोपनिषद भृगूत्तम भार्गवांनी गायिले आहे.

जीवात्म्याला अष्टपादयुक्त त्रिशिर अविनाशी हंसाचे ज्ञान नसते. प्राणिजाताच्या निर्मितीचे कारण एक त्रिवर्णात्मिका गाय असून, ती संकल्परूपी दूध देते. तिचीही अष्टविध रूपे असून, अज्ञ मुले तिचे स्तनपान करतात. हंस लोक मात्र सुवर्ण पिप्पलाची फळे खातात.

मूळ तत्त्वात्मक पुरुष २६ तत्त्वांनी युक्त आहे, असे काहींना वाटते, तर तो २७ तत्त्वांचा आहे, असे दुसरे मानतात. सांख्य आणि आथर्वशिरस म्हणतात, की पुरुष निर्गुण आहे. त्यांच्या मते दृश्य आणि अदृश्य २४ तत्त्वे असून, द्वैत आणि अद्वैत अशा त्रिविध किंवा पंचविध दृष्टींनी ते त्यांचे वर्णन करतात. उपनिषदाच्या शेवटी ज्ञानचक्षू लोक ब्रह्मादी स्थावरान्त जग सत्यार्थाने पाहतात, असे सांगून, एकदा ब्रह्माचे ज्ञान झाले, की ते ब्राह्मण त्या ब्रह्मरूपातच लय पावतात, अव्यक्तशाली होऊन त्यांतच लीन होतात, असे म्हटले आहे. [श्री. सी. ग. देसाई.]

मंत्रिपरिषद राजाला राज्यकारभारात सल्ला देणारी मंत्र्यांची संस्था. मंत्र्यांनी राजाला योग्य तो सल्ला देण्यावरच राज्याचे स्थैर्य अवलंबून असते. महाभारतात भीष्माने मंत्र्यांची संख्या सदतीस असावी, असे सांगितले आहे. त्यांपैकी चार ब्राह्मण, आठ क्षत्रिय, एकवीस वैश्य, तीन शूद्र व एक सूत असावा, असे त्याने सांगितले आहे. ब्राह्मण सदस्यांसाठी वेदज्ञान, उच्च शिक्षण व पवित्र आचरण हे निकष त्याने ठरवले आहेत. क्षत्रिय सदस्य शस्त्र धारण करता येण्याची क्षमता असलेले व बलवान असावे, वैश्य सदस्य धनवान आणि शूद्र सदस्य कर्तव्यपरायण, पवित्र आचरणाचे व नम्र असावे, असे सांगितलेले आहे.

इतकी मोठी संख्या असलेल्या मंत्रिपरिषदेत सल्लामसलत गुप्त राहणे जरा अवघड असे. म्हणून यांतून आठ मंत्र्यांची अंतरंगसमिती व तीन मंत्र्यांची परमअंतरंगसमिती निवडावी, असे भीष्माने महाभारतात सांगितले आहे.

मंत्रिपरिषदेत किती सदस्य असावे, याबद्दल राज्यशास्त्राच्या आचार्यांत मतभेद आहेत. मनूने ही संख्या बारा, बृहस्पतीच्या अनुयायांनी सोळा आणि उशनसाच्या अनुयायांनी वीस असावी, असे सांगितले आहे.

मंत्रिपरिषदेचा एक अध्यक्ष असे आणि त्याच्या अध्यक्षतेखाली मंत्रिपरिषदेच्या सभा होत. राज्यांच्या अठरा तीर्थांत कौटिल्याने या अध्यक्षाची गणना केली आहे.

मंत्रिपरिषदेतील निर्णय बहुमताने घेतले जात. काही विशेष कार्य उपस्थित झाले, की राजा मंत्रिपरिषद बोलावीत असे. पाहा – अमात्य. [भा. रा. प्र.]

मंत्रेश्वर शिवाच्या सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान या पाच रूपांशी ज्यांचा संबंध असतो, अशा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवतांना मंत्रेश्वर असे म्हणतात. शैव आगमांमध्ये, तसेच तैत्ति. आरण्यकात (१०.४३-४७) यांचे वर्णन आहे. [डे. हिं. इ.]

मंथ वैदिक कालातील एक पेय. द्रव पदार्थात घन पदार्थ मिसळून मंथ तयार करीत, असे ऋग्वेद (१०. ८६.१५) व अथर्ववेद (२.२९.६) यांत सांगितले आहे. भाजलेले यव दुधात मिसळून ते तयार करीत असावे, असे शतपथ ब्राह्मणातील (४.२.१.२) उल्लेखावरून वाटते. [वे. इं.]

मंथविद्या साधकावस्थेत असलेल्या माणसाला साधना चालू ठेवण्यासाठी धनाची आवश्यकता असते. त्यासाठी मंथ नामक यज्ञकर्म करतात. त्या वेळी 'हे अग्निस्वरूप देवा, सर्व देवता माझ्याविरुद्ध होऊन माझ्या इच्छा सफल होऊ देत नाहीत म्हणून त्यांच्या तृप्तीसाठी मी आहुती देतो,' अशी प्रार्थना करतात.

काही साधक सुमुहूर्तावर नुसत्या दुधावर राहतात व कुशकंडिका करून औषधी आणि फळे यांचे हवन करतात. त्या वेळी 'ज्येष्ठाय स्वाहा, श्रेष्ठाय स्वाहा,' इ. मंत्रांनी आहुती देतात. या मंथविद्येने धनप्राप्ती होते, असे सांगितले आहे.

मंथा मंथन करून अग्नी उत्पन्न करण्यासाठी रवीच्या आकाराची एक दांडी बनवतात, तिला मंथा असे नाव आहे. ती खैराच्या लाकडाची केलेली असते. मंथेला वर धरण्यासाठी एक आडवे खैराचे लाकूड बसवलेले असते, त्याला उपमंथा



मंथा

म्हणतात. अग्निमंथनाच्या वेळी मंथेमध्ये उत्तरारणीचा तुकडा बसवून दोरीने मंथा फिरवतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

मंथिपात्र एक यज्ञीय पात्र. सोमरसाचे हवन करण्यासाठी हे पात्र वापरायचे असते. म्हणून त्याला ग्रहपात्र असेही म्हणतात. हे पात्र वेकळीच्या लाकडाचे केलेले असते. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

मंदर एक पर्वत. समुद्रमंथनाच्या वेळी देव-दैत्यांनी याचा रवीसारखा उपयोग केला होता. अनेक पुराणांत या पर्वताचे वर्णन आले आहे. देव आणि असुर यांनी मोठ्या प्रयासाने हा पर्वत उचलला, पण त्यांना तो समुद्रापर्यंत नेता येईना. तेव्हा विष्णूने गरुडाला तो आपल्या पाठीवरून समुद्रापर्यंत न्यायला सांगितले आणि गरुडाने त्याप्रमाणे केले. मंदर पर्वत पाण्यात बुडू नये, म्हणून विष्णूने कूर्माचे रूप घेऊन त्याला आधार दिला (ब्रह्म पु. ४. ९. ५१, ५६, ६०; भाग. पु. १. ३. १६; विष्णू पु. १. ९. ७७, ८४).

हा कुशद्वीपातील एक पर्वत असून, मंदस नामक जलाशयातून तो निर्माण झाला; तसेच मेरू हा त्याचा पिता होय, असे वायू पुराणात (३६.१९; ४२.१४; ३०.३३) सांगितले आहे. विष्णू आणि मार्कंडेय या पुराणांत मंदराला मेरूच्या विष्कंभगिरींपैकी एक मानले असून, त्याचे स्थान मेरूच्या उत्तरेला सांगितले आहे. देव या पर्वतावर राहिले होते. शिवाला हा पर्वत अत्यंत प्रिय असून, पार्वतीशी विवाह केल्यानंतर तिच्यासह काही काळ त्याने या पर्वतावर वास्तव्य केले होते. हिरण्यकश्यपूने याच पर्वताच्या गुहेत तप केले होते. अगस्त्य ऋषीचा आश्रमही याच्यावरच होता.

महाभारतात मंदराचे स्थान हिमालयशृंखलेत मानले असून, बदरिकाश्रमाच्या उत्तरेला व गंधमादनाच्या पूर्वेला त्याची स्थिती सांगितली आहे (वन. १६२, १६४).

कालिदासानेही मंदर पर्वत हिमालयश्रेणीत असल्याचे सांगितले आहे (कुमारसंभव ८.२३, २९).

सांप्रत बिहारमधील भागलपूर शहराच्या दक्षिणेला सुमारे तीस मैलांवर सातशे फूट उंचीची टेकडी आहे, तिला मंदर पर्वत असे म्हणतात. तिच्या माथ्यावर बरीच झाडी आहे. टेकडीच्या माथ्याजवळ दोन मंदिरे असून, वर जाण्यासाठी खडकातून पायऱ्या खोदलेल्या आहेत.

पर्वताच्या पायथ्याशी पापहारिणी नामक एक पुष्करिणी असून, तिथून तीन रस्ते पर्वतमाथ्यावर जातात. या पुष्करिणीविषयी आख्यायिका अशी – चोळ वंशातील एका राजाने मकरसंक्रांतीच्या दिवशी या पुष्करिणीत स्नान केले आणि वर जाऊन मधुसूदन या देवाची पूजा केली. त्यामुळे तो रोगमुक्त झाला आणि त्या पुष्करिणीला हे नाव मिळाले.

पायऱ्यांच्या वाटेने पर्वतावर चढताना वाटेत काली, सूर्य, महाकाल, भैरव, गणेश, सरस्वती, इ. मूर्ती आढळतात. त्यांपैकी कालीच्या मूर्तीचे मस्तक तोडलेले आहे. या पर्वताच्या सभोवती दोन समांतर जाड रेखा आहेत. त्या दोन रेखांत सहा फुटांचे अंतर आहे. त्या मानवनिर्मित असतील, असे वाटत नाही. समुद्रमंथनाच्या वेळी या पर्वताची रवी व वासुकीची दोरी करण्यांत आली होती, त्या वेळी पडलेल्या या खुणा आहेत, अशी त्यासंबंधी समजूत आहे, असे सांगतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाकाल भैरवाच्या मूर्तीजवळून पुढे गेल्यावर सरस्वतीची एक मूर्ती आहे. जवळच सुमारे पाचशे फूट लांब आणि शंभर फूट रुंद असे सीताकुंड नामक तळे आहे. तसेच नरसिंहाचे एक गुहामंदिर आणि एक आश्रमही पर्वतावर आहे. पर्वताच्या शिखरावर दोन हिंदूंची व दोन जैनांची मंदिरे आहेत. हिंदूंच्या दोन देवळांपैकी एक मधुसूदन विष्णूचे आहे. विष्णूने मधु — कटभ या राक्षसांना ठार मारल्यावर त्यांच्या उरावर हा पर्वत ठेवला होता, अशी कथा आहे. दुसऱ्या देवळात विष्णू, सरस्वती आणि लक्ष्मी यांची पदचिन्हे आहेत, अशी समजूत आहे.

प्राचीन काळापासून मंदर पर्वत हे यात्रेचे ठिकाण आहे. हिंदू आणि जैन लोकांची अनेक मंदिरे तिथे शेजारी शेजारी होती; पण काला पहाडाने ती उद्ध्वस्त केली आणि आता त्यांचे अवशेष तेवढे तिथे दृष्टीला पडतात. त्या वेळी एका भक्ताने पर्वतावरील मधुसूदनाची मूर्ती उचलली आणि वंशी येथील मंदिरात नेऊन ठेवली. दर वर्षी मकरसंक्रांतीच्या वेळी जेव्हा इथे मोठी यात्रा भरते, तेव्हा ही मूर्ती मंदर पर्वतावर नेतात आणि पूजा झाल्यावर परत वंशी येथे नेऊन ठेवतात.

या पर्वताच्या पायथ्याच्या परिसरात अनेक इमारती, तलाव, विहिरी, पाषाणमूर्ती यांचे अवशेष विखुरलेले आढळतात. त्यावरून इथे प्राचीन काळी एक मोठे नगर वसलेले होते, असे कळते. या नगरात बाव्वन बाजार, त्रेप्पन रस्ते आणि अठ्ठयाऐंशी तलाव होते, अशी दंतकथा आहे. दिवाळीच्या रात्री प्रत्येक घरातून एक दिवा इथे आणला जाऊन एका मोठ्या इमारतीवर ठेवला जाई. अशी हजारो दिव्यांची रोषणाई तिथे होत असे, असे इथले लोक सांगतात. [पु. इं.; हि. ध.; कल्याण — तीर्थांक; का. भा. १; टॅ. ली. बि.; जै. ध.]

मंदाकिनी

भारतवर्षातील एक पवित्र नदी. हिच्या उगमासंबंधी भिन्न भिन्न मते आहेत. ही नदी ऋक्ष पर्वतात उगम पावून चित्रकूट पर्वताजवळून वाहते, असे महाभारतात म्हटले आहे (वन. ८५·५८). मत्स्यपुराणान्वये ती कैलासाच्या पायथ्याजवळील मंदोदक सरोवरातून उगम पावते (१२१·४). मंदाकिनी मूलतः भागीरथीचीच एक शाखा आहे. पुराणांच्या कालात हिचा संबंध स्वर्गाशी जोडला गेला. गढवालमधील केदार पर्वतात उगम पावणाऱ्या एका नदीचे नाव मंदाकिनी असेच असून, ती अलकनंदेची साहाय्यक नदी आहे. रुद्रप्रयाग येथे त्या दोघींचा संगम होतो.

कालिदासाने आपल्या बहुतेक काव्य-नाटकांतून मंदाकिनीचा उल्लेख केलेला आहे. श्री. भगवतशरण उपाध्याय म्हणतात, की पर्वतातून खाली उतरण्याच्या पूर्वी अलकनंदेची मंदागिन या नावाने प्रसिद्ध असलेली शाखा म्हणजेच मंदाकिनी होय. रघुवंशातली मंदाकिनी मात्र चित्रकूटामधून वाहणाऱ्या पैसुनी (पयस्विनी) नदीची साहाय्यक नदी मंदाकिन ही आहे. मालविकाग्निमित्रामधील मंदाकिनी निःसंदेह एक तिसरीच नदी आहे. कदाचित ती नर्मदाही असू शकेल. मालविकाग्निमित्राच्या निर्णयसागरी प्रतीत 'मंदइणीदीरे'च्या ऐवजी 'णम्मदातीरे' असा पाठ मिळतो.

हिमाचलकन्या पार्वती मंदाकिनीच्या तीरी वाळूचे चौथरे बनवून मैत्रिणींसह खेळत होती, असे कुमारसंभवात म्हटले आहे. पुराणात हिला देवलोकातली गंगा असे म्हटले आहे (भाग. पु. ५·१९·१८). ही कैलास पर्वतावरून वाहणारी नदी आहे. हिच्या तीरावर एल व उर्वशी हे जोडपे काही काळ राहिले होते (मत्स्य पु. १२१·४). या नदीला पितरांनी पवित्र मानले आहे. देवतांना स्नान घालण्यात हिच्या जलाचा उपयोग करावा, असे म्हटले आहे. [पु. इं.; का. भा. १]

मंदादन चेट्टी

द. भारतातील एक जात. यांची वस्ती मलबार, नीलगिरी, या भागात आढळते. हे शैवपंथी असून, यांच्यांत पितृसत्ताक वारसा पद्धती आहे. हे मुलींची लग्ने त्या वयात आल्यावर करतात. लग्नासाठी एखाद्या मध्यस्थाची आवश्यकता असते. विधवाविवाह, घटस्फोट, इ. चाली यांच्यांत आहेत. हे लोक मृतांना पुरतात. पण मृत्यू जर अपघाताने अथवा साथीच्या रोगाने झाला असेल, तर मृताला जाळतात. [का. ट्रा. स. इं.]

मंदार

स्वर्गातील पाच देववृक्षांपैकी एक. हे एक सरळ पसरणारे आणि बरीच वर्षे तगणारे झुडूप असून, ते उष्ण कटिबंधात सापडते. भारतात हे बंगाल, आसाम आणि दक्षिण भारत यात विशेष आढळते. याचे फूल गणपतीला प्रिय आहे. सप्तमी तिथी जर शुक्रवारी असेल, तर त्या रात्री तिसऱ्या प्रहरी राजश्यामला या देवाची सहस्र मंदार पुष्पांनी पूजा केल्यास देवतासारूप्य प्राप्त होते, असे सांगितले आहे.

मेघदूतात (उ. १५) याचा पुढीलप्रमाणे उल्लेख आहे —

तत्रागारं धनपतिगृहानुत्तरेणास्मदीयं
दूराल्लक्ष्यं सुरपतिधनुश्चारुणा तोरणेन।
यस्योपान्ते कृतकतनयः कान्तया वर्धितो मे
हस्तप्राप्यस्तबकनमितो बालमन्दारवृक्षः॥

अर्थ— धनपती कुबेराच्या प्रासादाच्या उत्तरेस आमचे निवासस्थान आहे. दूर अंतरावरूनही इंद्रधनुष्याप्रमाणे सुंदर दिसणाऱ्या कमानदार प्रवेशद्वारामुळे ते सहज ओळखता येते. त्या द्वाराजवळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सहज गवसता येतील अशा फुलांच्या गुच्छांनी बहरलेला कोवळा मंदार वृक्ष आहे. माझ्या प्रियेने याच वृक्षावर अपत्यवत प्रेम केले. [क्रि. स्ट. ले. उ.; मेघदूत]

मंदारषष्ठी एक काम्य व्रत. माघ शु. षष्ठीला हे व्रत करतात. व्रतावधी एक वर्ष. पंचमीला हलके अन्न खाणे, षष्ठीला उपवास करून मंदार वृक्षाची प्रार्थना करणे, सप्तमीला त्या वृक्षाला केशर लावणे, तांब्याच्या पात्रात काळ्या तिळांचे अष्टदल कमल काढणे व त्यावर सूर्याची स्थापना करून मंदार पुष्पांनी त्याची पूजा करणे, असा याचा विधी आहे. उद्यापनाच्या वेळी सूर्यप्रतिमेचे दान करतात. [हि. ध.]

मंदारसप्तमी एक काम्यव्रत. माघ शुद्ध सप्तमीला या व्रताला प्रारंभ करतात. यात पंचमीला अल्प भोजन, षष्ठीला उपवास आणि त्याच दिवशी रात्री मंदार पुष्पे भक्षण करतात. सप्तमीला आठ ब्राह्मणांना आठ मंदार पुष्पे देतात. सूर्य ही या व्रताची देवता असून, व्रतविधी मंदारषष्ठी व्रताप्रमाणेच आहे. फल – इच्छातृप्ती. [हि. ध.]

मंदुला द. भारतातील एक भटकी जमात. या लोकांची वस्ती प्राधान्याने आंध्र प्रदेशात आढळते. हे वैदूपणा करीत खेडोपाडी भटकत असतात. कधी कधी ते भीक मागायला आणि चोऱ्या करायलाही कमी करीत नाहीत. दरवर्षी मच्छलीपट्टम इथे भरणाऱ्या मोठ्या जत्रेत हे सर्व जमतात. या जत्रेत देवाला डुक्कर आणि बकरे देतात. [का. ट्रा. स. इं.]

मंदेह राक्षसांचा एक वर्ग. यांची संख्या साडेतीन कोटी आहे. यांच्या संबंधीची माहिती अशी–

तिस्रः कोटयोऽर्धकोटी च मन्देहा नाम राक्षसाः
उदयन्तं सहस्रांशुमभियुध्यन्ति ते सदा ॥
गायत्र्या चाभिमन्त्र्योर्ध्वं जलं त्रिः सन्ध्योः क्षिपेत् ।
तेन शाम्यन्ति ते दैत्या वज्रीभूतेन वारिणा ॥

अर्थ– मंदेह नावाचे साडेतीन कोटी राक्षस आहेत. ते नेहमी उगवत्या सूर्याचा ग्रास करण्यासाठी त्याच्यावर हल्ला करतात. म्हणून उदयापूर्वी सूर्याला गायत्री मंत्राने तीन अर्घ्य द्यावे; ते अर्घ्यंजल वज्रासारखे कठीण होऊन त्या दैत्यांना ठार करते.

देवांनी संध्या केल्यामुळे आणि ब्राह्मणांनी गायत्रीमंत्राचा जप केल्यामुळे हे राक्षस हतबल होतात, असे ब्रह्म पुराण (२.२१.११०) व वायू पुराण (५०.१६३) यांत सांगितले आहे.

मंदेह राक्षस लोहित सागरात राहतात. हे नित्य सूर्योदयाच्या वेळी ऊर्ध्वमुख होऊन सूर्याबरोबर लढतात, पण सूर्याच्या तेजाने खाली समुद्रात पडतात. तिथे पडल्यावर त्यांना पुन्हा जीवदान मिळते. हा क्रम नित्य चालू असतो, असे रामायणात म्हटले आहे (४.४०.३९-४०). [वा. रा. को.; पु. इं.]

मंदोदक कैलास पर्वताजवळचे एक सरोवर. याचे पाणी दह्यासारखे आहे. इंद्राचे नंदनवन याच्या काठावर असून, मंदाकिनी नदी या सरोवरातूनच उगम पावते. [पु. इं.]

म देवनागरी वर्णमालेतील पंचविसावे व्यंजन व प वर्गातील पाचवा वर्ण. या वर्णाच्या मुख्य चार अवस्था असून, पहिली अशोकाच्या गिरनार येथील लेखात, दुसरी महाक्षत्रप शोडास (सनपूर्व सुमारे पहिले शतक) याच्या वेळच्या मथुरा

मच्या रूपाचा विकासक्रम

येथील जैन लेखात, तिसरी समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभावर व चौथी यशोवर्मा राजाच्या वेळच्या (इ. स. ५३२) मंदसोर लेखात आढळते. याचे स्वरूप असे –

मकारं शृणु चार्वङ्गि स्वयं परमकुण्डली ।
तरुणादित्यसङ्काशं चतुर्वर्गप्रदायकम् ॥
पञ्चदेवमयं वर्णं पञ्चप्राणमयं सदा ।

अर्थ – हे चारुगात्री, ऐक. मकार हा परमकुंडली, मध्याह्नीच्या सूर्याप्रमाणे तेजस्वी, चतुर्वर्गदायक, सदैव पंचदेवमय आणि पंचप्राणमय असा वर्ण आहे.

कृष्णवर्ण, दशभुज, भयंकर, पीत व रक्त नयन असलेल्या, कृष्ण वस्त्र परिधान केलेल्या, नित्य, त्याचप्रमाणे धर्म, काम, अर्थ व मोक्ष देणाऱ्या, अशा मकाराचे ध्यान करून त्याच्या मंत्राचा दहा वेळा जप करावा, असे वर्णोद्धार तंत्रात सांगितले आहे.

ओष्ठ हे याचे उच्चारणस्थान आहे. [म. ज्ञा. को.; श. क.]

मकबरा मुसलमान राजे, राजपुत्र, सरदार, फकीर अशांसारख्या थोर व्यक्तींच्या कबरी ज्या ठिकाणी असतात, त्या स्थानाला मकबरा म्हणतात. वर्षातून एकदा भाविक मुसलमान व काही हिंदूही अशा मकबऱ्याचे दर्शन घेण्यासाठी जमतात व कबरीपुढे द्रव्य व मिठाई ठेवतात. अनेक स्त्रीपुरुष आपापल्या लहान मुलांना तिथे नेऊन मकबऱ्यातल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मस्तकावर घालतात आणि त्यांचे कल्याण व्हावे, अशी प्रार्थना करतात. ताजमहाल हा एक मकबराच आहे. औरंगाबाद शहरात बिबीका मकबरा ही वास्तू प्रसिद्ध आहे. हा मकबरा म्हणजे ताजमहालाची नक्कलच आहे. औरंगजेबाने आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ ही इमारत उभी केली आहे. [डि. इ.; मु. इं.]

मकर बारा राशींतली दहावी राशी. उत्तराषाढाचे तीन पाद, श्रवण व धनिष्ठांचे अर्ध मिळून मकर राशी बनते. आकाशात ही रास धनिष्ठांच्या दक्षिणेस एक लांबट व पूर्व-पश्चिम पसरलेली मंद ताऱ्यांची ओळ या स्वरूपात दिसते. ही पृथ्वीतत्त्वाची राशी असून, ती स्त्रीलिंगी, चर व जलचर आहे. शरीरातील हाडे, गुडघे व सांधे यांवर आणि निसर्गातील नद्या, सरोवरे, अरण्ये, दलदलीच्या जागा व गुहा यांवर या राशीचा अंमल चालतो. ही राशी शनीचे स्वगृह असून, मंगळाचे उच्च स्थान व गुरूचे नीच स्थान आहे. रवी व चंद्र या राशीत दुर्बल असतात. राशिचक्रातली ही दुर्बल राशी मानतात. ही राशी अवशब्दकर, पृष्ठोदय, दक्षिण दिशेची स्वामी, व पिंगलवर्ण आहे. या राशीत रवि-चंद्र असता किंवा ही राशी लग्नकेंद्री उदय पावत असता जन्मणारा मनुष्य आत्मविश्वासी, महत्त्वाकांक्षी, दीर्घोद्योगी, काटकसरी, आपमतलबी, लोभी व लहरी असतो, असे सांगितले आहे. या राशीत बलवान ग्रहस्थिती असता पुष्कळ लोक सामान्यपणे वयाच्या पस्तिशीनंतर नावारूपाला आलेले आढळतात. हे लोक आपल्या दीर्घोद्योगाने मानसन्मान, कीर्ती व अधिकार प्राप्त करून घेतात, असेही दिसून येते.

मकरंद (इ. स. चे १५ वे शतक) एक ज्योतिषी. याच्या चरित्रासबंधी फारशी माहिती मिळत नाही. हा काशीचा रहिवासी होता, एवढेच समजते. मकरंद या नावाचाच याचा एक ग्रंथ आहे. हा ग्रंथ एक सारिणीग्रंथ आहे. यावरून पंचांगसाधन फार सुलभ रीतीने करता येते, असे श्री. शं. बा. दीक्षित यांचे मत आहे. हा ग्रंथ सूर्यसिद्धान्तानुसार रचलेला असून, यावरून जी तिथ्यादींची घटिपळे निघतात, ती प्राधान्याने काशीची असतात. मकरंद याने आपल्या ग्रंथात सूर्य सिद्धांताला बीजसंस्कार दिला आहे. या ग्रंथाचा आरंभ शके १४०० मध्ये झाला, असे त्यात लिहिले आहे.

सांप्रत हा ग्रंथ प्रमाण धरून उत्तर भारत, मध्य प्रदेश, इ. ठिकाणी पंचांगे तयार करतात. या ग्रंथावर मकरंदविवरण नावाची दिवाकराची एक टीका आहे. ही टीका शके १५४० च्या सुमाराची असावी. शके १६८८ मध्ये गोकुळनाथ दैवज्ञाने यातील सारण्यांची उपपत्ती लिहिलेली आहे. [भा. ज्यो. शा.]

मकरमुख वास्तुकलेतील एक रचना. पूर्वी मंदिरे किंवा महाल यांमध्ये हस्तिदंती मगरीचे मुख जलमार्गाच्या तोंडावर बसवीत. शिल्पसंभारात मोठमोठ्या दगडांची मकरमुखे आढळतात. पाहा– कीर्तिमुख. [ह. च. सां. अ.]

मकरव्यूह प्राचीन युद्धशास्त्रातली एक व्यूहरचना. यात एक मकराकृती कल्पून तिच्या शिर, नेत्र, मान, पृष्ठ, डावे–उजवे पक्ष, पाय आणि पुच्छ या स्थानांवर सैनिक उभे करीत आणि हा व्यूहच्या व्यूह शत्रूवर आक्रमण करी किंवा आत्मरक्षण करी. [प्रा. भा. सां.]

मकरसंक्रान्ती सूर्य ज्या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो, त्या दिवसाला हे नाव आहे. ही संक्रांती पौष मासात येते. जुन्या ग्रहलाघवी पंचांगाप्रमाणे मकरसंक्रांती १४ जानेवारीला येते, तर शुद्ध निरयन (टिळक) पंचांगाप्रमाणे ती १० जानेवारीला येते. हा चार दिवसांचा फरक अयनांश कमीजास्त मानण्यावरून झाला आहे. एक सण व एक पुण्यपर्व या दोन्ही दृष्टींनी या दिवसाला महत्त्व आहे. हा उत्तरायणाचा आरंभदिवस असतो, म्हणून या संक्रांतीला अयनसंक्रांती असेही म्हणतात.

या संक्रांतीचा पुण्यकाल, ती दिवसा असेल, तर पुढील ४० घटका व रात्री असेल, तर दुसऱ्या दिवशी असतो. त्या काळात समुद्रस्नान किंवा गंगादी नद्यांचे स्नान व दान विशेष पुण्यप्रद असते. या दिवशी काय करावे, हे सांगताना हेमाद्रीने पुढील श्लोक लिहिला आहे –

धेनुं तिलमयीं राजन् दद्याद्यश्चोत्तरायणे ।
सर्वान्कामानवाप्नोति विन्दते परमं सुखम् ॥

अर्थ – जो मनुष्य उत्तरायणात (मकरसंक्रांतीच्या दिवशी) तिलमय धेनूचे दान करतो, त्याला सर्व काम प्राप्त होतात व तो परम सुख पावतो.

शिवरहस्यात त्यासाठी पुढील विधी सांगितला आहे –

तस्यां कृष्णतिलैः स्नानं कार्यं चोद्वर्तनं शुभैः ।
तिला देयाश्च विप्रेभ्यः सर्वदैवोत्तरायणे ॥
तिलतैलेन दीपाश्च देयाः शिवगृहे शुभाः ॥

अर्थ – मकरसंक्रांतीच्या दिवशी काळ्या तिळांचा कल्क लावून तिलयुक्त उदकाने स्नान करावे, उत्तरायणात नेहमी ब्राह्मणांना तिलदान द्यावे व शिवमंदिरात तिळाच्या तेलाचे दिवे लावावे.

या दिवशी पितृश्राद्ध करावे, असेही सांगितले आहे. संक्रांतीच्या दानादी कृत्यांची महती देवीपुराणात वर्णिली आहे, ती अशी–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सङ्क्रान्तौ यानि दत्तानि हव्यकव्यानि मानवैः ।
तानि नित्यं ददात्यर्कः पुनर्जन्मनि जन्मनि ।।

अर्थ – मकरसंक्रांतीच्या दिवशी माणसे जी दाने देतात व हव्यकव्ये करतात, त्या त्या वस्तू सूर्य त्यांना प्रत्येक जन्मात देत असतो.

मकर संक्रांती हा सण बहुतेक सर्व भारतात पाळला जातो. या दिवशी घरच्या व गावच्या देवाला तीळ-तांदूळ वाहतात. सौभाग्यवती स्त्रिया ब्राह्मणाला सुगड (सुघट) दान देतात. या सुगडात गहू, उसाचे तुकडे, हळकुंडे, कापूस, द्रव्य, इ. वस्तू घालतात. नववधूच्या पहिल्या वर्षी तिच्याकडून तेल, जिरे, मीठ व कापूस हे जिन्नस सुवासिनींना देववितात. या दिवशी नववधूला हलव्याचे दागिने करून घालणे आणि जावयाला तिळगुळ आणि आहेर पाठवणे, अशी चाल महाराष्ट्रात आहे. कोकणात सुवासिनी स्त्रिया दुसऱ्याच्या घरच्या आधणात आपले घरचे तांदूळ नेऊन वैरतात. दुसऱ्या घरी उंबरठ्याच्याआत खेळणा-रांगणा म्हणून असोला नारळ सोडतात. या संक्रांतीला तळलेले पक्वान्न करायचे नाही, असा संकेत आहे. म्हणून कोकणात त्या दिवशी इडली व तिच्या जोडीला गूळ घालून नारळाचा रस हे पक्वान्न करतात. देशावर गुळाच्या पोळ्या करण्याची पद्धत आहे. या दिवसासाठी तिळांवर साखरेचा पाक चढवून हलवा करण्याची पद्धत आहे. बायका त्या दिवशी नटून थटून हळदीकुंकू करतात व सुवासिनींना तिळगुळ वाटतात. कित्येक स्त्रिया या हळदीकुंकवाच्या प्रसंगी एखादा पदार्थ लुटवतात. पुरुष मंडळी आप्तेष्टांना तिळगुळ देण्यासाठी घरोघरी जातात. तिळगुळ मोठ्यांनी लहानांना द्यायचा असा संकेत आहे. हा तिळगुळ देताना 'तिळगुळ घ्या गोड बोला' असे म्हणतात. त्या दृष्टीने जुनी भांडणे किंवा किल्मिषें संपवून पुनश्च स्नेह किंवा गोडी निर्माण करणे, यासाठी या सणाचा उपयोग केलेला आहे. दक्षिणेत या दिवशी खीर करतात. उत्तरेत खिचडी बनवितात. त्या प्रदेशात या दिवशी भावजय आपल्या नणदेला वस्त्र, फल, मिष्टान्न, तिळ, डाळ व तांदूळ उपहार म्हणून पाठवते. लोकभाषेत या उपहाराला संकरात देना असे म्हणतात. हिमालयाच्या सखल भागात या दिवशी पिठाचे पक्षी करून ते तुपात तळतात व लहान मुलांच्या गळ्यात बांधतात. दुसऱ्या दिवशी ते कावळ्यांना खाऊ घालतात.

बंगालमध्ये या दिवशी काकवीत तीळ घालून तिळुवा नावाचा पदार्थ तयार करतात व तो इष्टमित्रांना देतात. याशिवाय तांदुळाच्या पिठात तूप-साखर मिसळून पिष्टक नावाचे खाद्य तयार करतात व तेही वाटतात.

या दिवशी गंगास्नानासाठी प्रयाग येथे मोठी यात्रा भरते. दक्षिणेतही तिन्नेवेल्ली जिल्ह्यातून वाहणाऱ्या ताम्रपर्णी नदीत स्नान करण्यासाठी व वेदारण्यम येथे समुद्रस्नानासाठी मोठी यात्रा भरते.

कुंभकोणम येथे हेम ऋषीने तप केले असता शारंगपाणी या देवाने त्याला मकर संक्रांतीच्या दिवशीच दर्शन दिले. मदुरा येथे सुंदरेश्वर देवाने जादुगाराचे रूप घेऊन एका हत्तीच्या पाषाणमूर्तीला ऊस खाऊ घातला. या कथांमुळे वरील दोन्ही क्षेत्रांत संक्रांतीच्या दिवसाला महत्त्व आले आहे.

संक्रांतीचा सण अत्यंत प्राचीन आहे. आर्य लोक ध्रुवप्रदेशात वास्तव्य करीत होते, तेव्हापासून हा सण प्रचारात असावा, असा तर्क करता येतो. त्या प्रदेशात सहा महिने रात्र व सहा महिने दिवस, अशी वर्षाची विभागणी असे. ही सहा महिन्यांची प्रदीर्घ रात्र संपून उत्तरायणाच्या प्रारंभदिवशी जेव्हा सूर्याचे किरण पृथ्वीवर पडत, तेव्हा त्यांना आनंदाचे व उत्साहाचे भरते येत असे. मग त्याप्रीत्यर्थ ते तो दिवस सण म्हणून साजरा करीत. तेव्हापासून हा सण प्रचारात आहे. काही विद्वानांच्या मते उत्तरायणाचा आरंभ हाच पूर्वकालीन वर्षारंभाचा दिवस असावा. कारण याच दिवसांत शिशिर ऋतूचा प्रारंभ होतो. महाभारतात 'ऋतवः शिशिरादयः' (अश्वमेधपर्व ४) असे म्हटले आहे. याचा अर्थ शिशिर ऋतूत नव्या वर्षाचा प्रारंभ होतो, असा आहे. कालांतराने अनेक कारणांमुळे कालगणनेत बदल झाला आणि वसंतादी ऋतू मानले जाऊ लागले, म्हणजेच वसंत ऋतू हा वर्षाचा पहिला ऋतू ठरला.

संक्रांतीला देवता मानून तिचे चित्र प्रत्येक पंचांगात दिलेले असते. तिचे स्वरूप सांगितले आहे, ते असे –

षष्टियोजनविस्तीर्णा लम्बोष्ठी दीर्घनासिका ।
एकवक्त्रा नवभुजा सङ्क्रान्तिः पुरुषाकृतिः ।।

अर्थ – साठ योजने पसरलेली, लांब ओठ, दीर्घ नासिका, एक तोंड व नऊ हात असलेली संक्रांती ही पुरुषाच्या आकृतीसारखी आहे.

प्रत्येक वर्षी तिचे वाहन, आयुध, तिलक, ज्योती, वय, अवस्था, भूषण, भक्षण, भोजनपात्र व नाव वेगवेगळे असते. ती कोणत्यातरी दिशेने येते, कोणत्यातरी दिशेला जाते व कोणत्यातरी दिशेला पाहते. संक्रांती ज्या वस्तूंचा स्वीकार करते, त्या वस्तूंचा नाश तरी होतो किंवा त्या महाग तरी होतात, असे सांगितलेले असते. ती ज्या दिशेकडून येते त्या दिशेला समृद्धी होते व ज्या दिशेला जाते व पाहते त्या दिशेला उत्पात करते असेही सांगितले आहे.

संक्रांतीने संकरासुर या दैत्याचा वध करून सर्व लोकांना सुखी केले, अशी कथा आहे. संक्रांतीच्या दुसऱ्या दिवसाला किंक्रांत म्हणतात. त्या दिवशी देवीने किंकरासुराचा वध केला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा दिवस पंचांगात करिदिन म्हणून दाखविलेला असतो. या दिवशी प्रयाण निषिद्ध मानले आहे. संक्रांतीची दुसरी कथा अशी – द्रोणाचार्यांची पत्नी कृपी हिला दुर्वास मुनींनी या संक्रांतीचे विधान सांगितले व ते तिने आचरल्यावर तिला पुत्र व ऐश्वर्य ही प्राप्त झाली.

यावरून संक्रांतिव्रत पुत्रप्रद व्रत आहे, असेही मानले जाते.

हा सण म्हणजे स्नेहवर्धनाचा सण होय. लोकांतही या सणाविषयी तशीच भावना असते. दुसऱ्याच्या आघणात तांदूळ ओतणे, दुसऱ्याच्या घरात नारळ सोडणे, इ. गोष्टींत शेजारसंबंध सुधारण्याची भावना स्पष्ट दिसते. 'तिळगुळ घ्या गोड बोला' हा मंत्रही सामाजिक स्नेहवृत्तीची इच्छाच सुचवितो. जातीजमाती, धर्म आणि पंथ यांच्यांत जवळीक निर्माण करून परस्पर परिचय वाढविणे आणि त्या द्वारे देशात सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे, या दृष्टीने या सणाचा चांगला उपयोग करून घेता येईल, असे वाटते. [नि. सिं.; पू. मा. प्र.; ब्रा. स. प्रा. अ. इ.; हिं. व्र. प. त्यौ.]

मकवाना एक मुसलमान जात. मुळात हे मकवाना राजपूत किंवा कोळी होते. या लोकांची वस्ती प्रामुख्याने गुजरात प्रदेशात आढळते. हे लोक सुन्नी पंथाचे आहेत. शेतकी व नोकरी हे यांचे प्रमुख व्यवसाय होत. हे आपल्या मुलांची लग्ने राजपूत व कोळी या जातीतल्या मुलींशी करतात; पण मुली मात्र स्वजातीत अथवा पठाण जातीत देतात. त्यांच्या लग्नाचे पौरोहित्य ब्राह्मण करतो. [मुं. इ. जा.]

मक्का अरबस्तानाची राजधानी व मुसलमानांचे सर्वांत पवित्र क्षेत्र. मुहंमद पैगंबराचे जन्मस्थान व काबा नामक वास्तू यांच्यामुळे याची कीर्ती झाली आहे. मुहंमद पैगंबर याविषयी म्हणतो – परमेश्वरामुळेच मक्केला पावित्र्य आले आहे. मक्केविषयी आदर बाळगणाऱ्यांना केव्हाही धोका नाही (मिश्कात पु. ४० प्र. १५).

सौदी अरेबियाच्या पश्चिम किनाऱ्यावरील जेद्दा नामक बंदरापासून मक्का सुमारे ४५ मैल आहे. एका रुक्ष वालुकामय, अरुंद दरीत हे शहर वसलेले आहे. इथली घरे दगडी व भव्य आहेत. मात्र तिथे पाण्याचे दुर्भिक्ष असते. तिथल्या मशिदीत ज़मज़म नावाची जी विहीर आहे, तिच्यात मुबलक पाणी आहे; पण ते वेचव आहे. त्यामुळे अरफा डोंगरातून नळाने शहरात पाणी आणावे लागले आहे. ते घेणाऱ्यांना कर द्यावा लागतो.

या शहराचे मूळचे नाव महाकाय होते, असे काहींचे मत आहे. मशीद बनण्यापूर्वी तिथे महादेवाचे मंदिर होते आणि त्यात ३६० शिवलिंगे होती. मुहंमदाच्या अनुयायांनी ही सर्व शिवलिंगे फोडली. आजही तिथे ५ फूट उंचीचे एक शिवलिंग आहे. ते इतके जड आहे, की ते तियून हलवायला चार हत्तींचे बळ लागेल. मुसलमान लोक आजही त्याचे चुंबन घेतात आणि तसे केल्यानंतरच त्यांची यात्रा सफल होते.

मक्केतील काबा हे मुसलमानांचे प्रमुख धार्मिक आकर्षण होय. हा एक ३५ फूट लांब व ३० फूट रुंद असा चौकोनी चबुतरा आहे. तो मोठमोठ्या दगडांनी बांधलेला असून, हाज यात्रेच्या मोसमात तो काळ्या रेशमी कापडाने अंतर्बाह्य वेढतात. या काळ्या कापडावर कुराणातल्या काव्यपंक्ती लिहिलेल्या असतात. काबाला आत शिरायला एकच दरवाजा आहे, तो जमिनीपासून ६ फूट उंचीवर आणि सोन्याने मढवलेला आहे. हाज यात्रेत तो एक-दोनदाच उघडतात. आत केवळ खांब आहेत; दुसरे काही नाही. काबा ज्या मशिदीत आहे, ती मशीद भव्य आणि विस्तृत आहे. ती चौकोनी असून, तिच्यावर उंचच उंच मनोरे आहेत. यात्रेत या मशिदीवर सर्वत्र रोषणाई करतात; पण काबावर मात्र रोषणाई करीत नाहीत.

मशिदीत गेल्यानंतर प्रत्येक यात्रेकरू अनवाणी पावलांनी व कुराणातील वचने म्हणत काबाभोवती सात प्रदक्षिणा घालतो. त्याला तवाफ असे म्हणतात. काबापासून १०० कदमांवर एक विहीर असून, तिच्यात जिवंत झऱ्याचे पाणी आहे. यात्रेकरू ते पवित्र मानून आपापल्या गावी नेतात.

यात्रेकरू त्यानंतर मक्केपासून पाच मैलांवरच्या मुन्ना या टेकडीवर एक रात्र काढतात; पहाटेस उठून आरफातच्या मैदानात जातात; तिथे दिवसभर प्रार्थना करतात. आरफातच्या वाळवंटात एक टेकडी आहे. तिला जाब्ल-एर-रेहमान (दयेचा पर्वत) म्हणतात. हाज यात्रेचे धर्मप्रवचन त्याच टेकडीवरून होते. सूर्यास्तानंतर सर्व यात्रेकरू आरफातमधून मजदालाफाकडे जातात व तिथे रात्र काढतात; तियून मक्केस परतल्यावर पुनश्च काबाला सात प्रदक्षिणा घालतात. एवढे केल्यावर मक्केची यात्रा पुरी होते.

शरीफ नावाचा एक अधिकारी मक्केचा कारभार पाहतो. तो सैय्यद घराण्यातला असतो. मक्केमध्ये मुसलमानांनाच प्रवेश करण्याचा अधिकार आहे, असे मुसलमान लोक समजतात. [डि. इ.; पांचजन्य, ७ नोव्हेंबर, १९६०; अ. श्र. स्था.]

मग एक जात. यांना भोजक किंवा शाकद्वीपी ब्राह्मण असेही म्हणतात. बृहत्संहितेच्या ६० व्या अध्यायाच्या १९ व्या श्लोकात मग शब्द आला आहे. त्यात विष्णूचे उपासक ते भागवत व सूर्याचे उपासक ते मग होत, असे सांगितले असून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सूर्याची पूजोपासनादी क्रिया मगांनी करावी, असे सांगितले आहे. भविष्य पुराणातल्या ब्राह्मपर्वांत (१३९·७२–७७) मगांची विस्तृत माहिती दिली आहे, ती अशी –

जंबूद्वीपात्परं यस्माच्छाकद्वीप इति स्मृतः ।
तत्र पुण्या जनपदाश्चतुर्वर्णसमन्विताः ॥
मगाश्च मगगाश्चैव गानगा मन्दगास्तथा ।
मगा ब्राह्मणभूयिष्ठा मगगाः क्षत्रियाः स्मृताः ॥
वैश्यास्तु गानगा ज्ञेयाः शूद्रास्तेषां तु मन्दगाः ।
न तेषां सङ्करः कश्चिद्धर्माश्रयकृते क्वचित् ॥
तेभ्यो वेदास्तु चत्वारः सरहस्या मयोदिताः ।
मामेव ते च ध्यायन्ते यजन्ते मां च नित्यशः ॥

भावार्थ – जंबुद्वीपाच्या पलिकडे शाकद्वीप नावाचा एक देश आहे. तिथले लोक पुण्यकर्म करणारे व चातुर्वर्ण्ययुक्त आहेत. मग, मगग, गानग व मंदग अशी त्या वर्णांची नावे होत. मगांमध्ये ब्राह्मण पुष्कळ आहेत. मगग हे क्षत्रिय, गानग हे वैश्य व मंदग हे शूद्र होत. ते धर्माचा आश्रय करून राहणारे असल्यामुळे त्यांच्यांत संकर क्वचितच झाला आहे. (सूर्य म्हणतो) त्यांना सरहस्य चार वेद मी सांगितले आहेत. ते माझेच ध्यान करतात आणि नित्य माझेच यजन करतात.

यावरून शाकद्वीपी लोकांत चातुर्वर्ण्य संस्था होती आणि वेदही होते, हे कळून येते. श्री. राजवाडे म्हणतात, की हे शाकद्वीपी मग हे शक लोकच होते. त्यांची भाषा संस्कृत भाषेहून किंचित निराळी परंतु तत्सदृश होती.

मग ही मिडियन लोकांपैकी एक जात होती. मग लोक इराणातील आर्यन साम्राज्याच्या अमदानीत लोकांचे पुढारी होते. त्यांचा दर्जा हिंदू ब्राह्मणांच्या तोडीचा होता. त्यांनी इराणवरचे आर्यांचे वर्चस्व झुगारून देण्याचा प्रयत्न केला; पण त्यात त्यांना यश आले नाही. पुढे ते स्वतःला इराणी लोकांचे धर्मगुरू समजू लागले. स्वतःच्या धर्माचे आर्य धर्माशी साम्य दाखवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्या कामी आर्य धर्मातील सूर्य व अग्नी यांची उपासना त्यांना उपयोगी पडली.

मग लोक स्वप्नांचे अर्थ सांगत व भविष्येही वर्तवीत. त्यांना मंत्रतंत्र, जादूटोणाही अवगत असे. इंग्रजीत जादूला मॅजिक म्हणतात, तो शब्द मगांच्या वरूनच आला असावा, असे डॉ. केतकर म्हणतात.

मगांतल्या क्षत्रिय जाती कालांतराने शूद्रत्वाला गेल्या, असे भृगू संहितेत म्हटले आहे. हा काळ म्हणजे सगर राजाचा काळ होय. भारतीय युद्धापासून सगराची ५५ वी पिढी होती. हाच काल मगांच्या वृषलीभवनाचा काल मानता येतो.

श्रीकृष्णाचा पुत्र सांब याने या मगांपैकी १८ पुरुषांना सूर्योपासनेची माहिती घेण्यासाठी भारतात आणले. सांबाला कृष्णशापाने रक्तपितीचा रोग जडला होता. सूर्योपासना केल्याने तो रोग दूर होईल, असे नारदान सांगितल्यावरून व त्या कामी मग लोक परंपरागत तज्ज्ञ असल्याचेही त्यानेच सांगितल्यावरून सांबाने त्यांना भारतात आणवले. हे १८ लोक तरुण व अविवाहित होते. सांबाने त्यांना १८ भोजक कन्या दिल्या. त्यांच्यापासून जी संतती निर्माण झाली, तिला मग संज्ञेबरोबरच भोजक ही संज्ञाही प्राप्त झाली.

मगांना मुली देणारे हे भोजक ब्राह्मण नसून क्षत्रिय होते. ते द्वारकेच्या परिसरात राहणारे, तसेच श्रीकृष्णाच्या बांधवांपैकी व प्रजाजनांपैकी होते. कच्छमध्ये जे भुज नावाचे शहर आहे, त्याचे नाव या भोजकांवरूनच पडले असावे, असे श्री. राजवाडे म्हणतात.

डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी प्राचीन महाराष्ट्र या ग्रंथात मगांच्या विषयी बरेच विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा –

भारतात वैदिक आर्यांच्या पूर्वीच मगांचे आगमन झालेले होते. भारतात त्यांची वस्ती वेदपूर्वकाली प्रतिष्ठित झाली होती. वैदिक आर्यांना हे लोक भिन्न संस्कृतीचे वाटले. पण मग हे अगोदर भिन्न संस्कृतीचे असले तरी, पुढे ते वैदिक संस्कृतीतच समाविष्ट झाले. भारतात मगांचे अस्तित्व फार प्राचीन आहे. या विषयी वेदातही पुरावे आढळतात. मगांच्या मूळ देशाला म्हणजेच मगधाला कीकट असे नाव होते. विश्वामित्र या कीकटांविषयी अर्थात मगांविषयी बोलताना इंद्राला प्रार्थितो (ऋ. ३·५३·१४)

किं ते कृण्वन्ति कीकटेषु गावो नाशिरं दुह्रे न तपन्ति घर्मम् ।
आ नो भर प्रमगन्दस्य वेदो नैचाशाखं मघवन् रन्धया नः ॥

अर्थ – हे मघवन इंद्रा, सोमरसार्थ दूध न देणाऱ्या, तसेच पायस न शिजवणाऱ्या अनार्य कीकट लोकांमधे तुझ्या गायी तू सोडू नको. व्याजवट्टयाचा धंदा करणाऱ्या पणी लोकांचे तसेच हीनकुलीन नैचाशाख लोकांचे धन तू आम्हांला दे.

वेदपूर्वकालीच समुद्रमार्गाने वंगालच्या उपसागरातून बरेच शक, मग व सेमेटिक लोक भारतात आले असावे आणि भारताच्या पूर्व भागात वसाहती करून राहिले असावे. हे आगमन तेवढ्यावरच थांबले नाही. त्यानंतरही त्यांची वेगवेगळ्या काळी आगमने झाली असली पाहिजेत. पूर्वेकडील मगधाप्रमाणे वायव्येकडील पंजाबमध्ये रावीच्या तीरीही त्यांनी वसाहत केली. मुलतान येथे तर त्यांचा मोठा अड्डाच असावा. तिथले सूर्यमंदिर हे मगांच्याच हातचे असल्याचे पुराणे सांगतात.

वैदिक वाङ्मयात व्रात्यस्तोम नावाचा विधी निर्माण झाला आहे, तो बहुधा मगधांना म्हणजेच मगांना चातुर्वर्ण्यांत गमा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विष्ट करण्यासाठीच असावा, असे म्हणतात.

हे मग लोक अव्यंग धारण करीत. हे अव्यंग म्हणजे पारशांच्या कस्तीसारखेच असणे शक्य आहे. जे लोक अव्यंग धारण करीत नाहीत, ते सूर्यपूजेला अपात्र समजावे, असे भविष्यपुराणात सांगितले आहे. अव्यंग शब्दाचा अर्थ सर्पाची कात असा आहे. म्हणज हे वस्त्र तत्सदृश कसले तरी असावे. मगांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ते कंचुक (चोगा) धारण करीत. त्यांनी निर्मिलेल्या सूर्यमूर्तींवरून हा कंचुक गुडघ्याच्या खालपर्यंत जाई, असे दिसते. शिवाय ते अग्निहोत्र धारण करणारे होते. त्यांच्या आचारात मौनाला प्राधान्य होते. ते अनेकदा मौन धारण करीत व मौन धरूनच जेवीत.

मगांना सौरब्राह्मण असेही म्हणतात. त्यांचे मग, भोजक, होमक असे तीन भेद आहेत. मगांना कोणत्यातरी भारतीय परंपरेशी स्वतःला जोडून घेणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी उद्दालक आरुणी याच्या स्मार्त संप्रदायाशी जुळवून घेतले असेल. आरुणी हा अश्वपतीचा पुरोहित होता आणि अश्वपती कैकेय हा एक इराणी राजा होता.

उत्तम मग कोणता याविषयी पुढील वर्णन आढळते – जे डोक्याचे मुंडण करतात, अव्यंग वापरतात, शंख वाजवतात, एकभुक्त राहतात, रात्री भोजन करीत नाहीत, आई-बापांचे प्रतिवार्षिक श्राद्ध करतात, रविवार पाळतात व षष्ठी तिथी पाळतात, ते श्रेष्ठ मग होत.

प्राचीन यादवांचा आणि मगांचा निकट संबंध आला होता, यात शंका नाही. मुलतान येथे त्यांनी सूर्यमंदिर स्थापिले, असे नगेंद्रनाथ बसू समजतात, ते अशक्य वाटत नाही. मुलतान येथे सूर्याची सुवर्णमूर्ती पाहिल्याचे युआन च्वांगही सांगतो. मुलतानहून हे लोक मथुरा व ओडिसा या भागात गेले, तसेच गुजरातेतही प्रवेशले. प्राचीन काळी हे लोक गणक किंवा मूर्तिकार या नात्याने सर्व भारतभर पसरल्याचे दिसते. मग लोक नाचगाण्यामध्येही प्रवीण होते. या कला सूर्याला आवडतात म्हणून ते त्यांचा अभ्यास करीत. [म. ज्ञा. को.; प्रा. म.; रा. ले. सं.]

मगध पूर्व भारतातील एक प्राचीन देश. अंगुत्तरनिकायात सांगितले आहे, की बुद्धाच्या काळी देशात जी १६ महाजनपदे होती त्यांतले एक मगध हे होते.

ऋग्वेदामध्ये मगध शब्द आढळत नाही. तिथे त्याला कीकट देश म्हटले आहे. 'कीकट देशात गाई भरपूर दूध देत नाहीत आणि त्यांचे दूध सोमरसात मिसळले जात नाही,' असे तिथे म्हटले आहे (ऋ. ३·५३·१४). यावरून वैदिक आर्यांच्या काळात मगधामध्ये यज्ञयाग होत नसून, तो प्रदेश वैदिक संस्कृतीच्या कक्षेबाहेर होता, असे कळते.

अथर्ववेदात मात्र मगधाचा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु तो आदरार्थी नसून अनादरार्थी आहे. तो मंत्र (५·२२·१४) असा –

> गन्धारिभ्यो मूजवद्भ्योऽङ्गेभ्यो मगधेभ्यः ।
> प्रैष्यन् जनमिव शेवधिं तक्मानं परिदद्मसि ।।

अर्थ – हे देवा, गांधार देशात, मूजवंत पर्वतात अंग, देशात व मगधात राहणाऱ्या लोकांकडे तू, तक्मा म्हणजे ज्वर अशा प्रकारे पाठवून दे, की ज्या प्रकारे एखाद्या व्यक्तीला किंवा कोशाला एका स्थानावरून दुसऱ्या स्थानी पाठवावे.

ऱ्हिस डेव्हिस यांनी बौद्ध साहित्याच्या परिशीलनातून मगधाच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत – पूर्वेस अंग देश, पश्चिमेस शोण नद, उत्तरेस गंगा व दक्षिणेस छोटा नागपूरचे पठार.

मगध नावाची व्युत्पत्ती श्री. राजवाडे पुढीलप्रमाणे देतात– 'मगान् दधाति इति मगधः' = मग लोकांना धारण करतो तो मगध देश होय. या व्युत्पत्तीचे स्पष्टीकरण त्यांनी पुढीलप्रमाणे दिले आहे –

मग म्हणजे शाकद्वीपातील (मध्य आशिया) ब्राह्मण. ते ज्या देशात येऊन राहिले तो मगध देश. ते त्या देशात राहू लागण्यापूर्वी त्या देशाला काय म्हणत असत, ते सांगण्यास काही साधन मला उपलब्ध नाही. मगध देशात बुद्धाचा उदय (व कदाचित जन्म) झाला. बुद्ध हा शाक्य उर्फ शाकवंशीय होता. बुद्धाला शक म्हणत नाहीत, शाक्य म्हणतात व त्याच्या कुळालाही शाक्य म्हणतात. याचा अर्थ इतकाच की मगध म्हणून जो देश प्रसिद्ध होता, त्यात शाकद्वीपातील शक लोक ब्राह्मण, क्षत्रिय आदी करून येऊन वसाहत करते झाले व त्या शक लोकांतील मग ब्राह्मणांवरून त्या देशाला मगध हे नाव मिळाले.

जैन ग्रंथांत मगधाला पवित्र जनपद मानले आहे. मगधामध्ये जैन ज्ञान व जैनाचार यांचे रक्षण चांगल्या प्रकारे होऊ शकेल, असे महावीराने म्हटले आहे (निशीथसूत्र).

अथर्ववेदात पूर्व दिशा हे व्रात्यांचे प्रियधाम आहे, असे म्हटले आहे (१५·२–४). इथे प्राची दिशेने मगधाचा संकेत आहे. श्रमणसंस्कृतीत व्रत धारण करणाऱ्या श्रमणांना व्रात्य म्हणतात. जैन निर्ग्रंथ हे व्रात्य होते. ते वेदप्रामाण्य मानीत नव्हते आणि यज्ञातल्या पशुहिंसेला विरोध करीत होते. जैनांच्या २४ तीर्थंकरांपैकी विसांचे निर्वाण मगधातच झाले.

शतपथ ब्राह्मणावरूनही कळते, की केवळ मगधच नव्हे; तर कोसल व विदेह हे देशही प्राचीन काळी पूर्ण रूपाने वैदिक संस्कृतीत आले नव्हते. भारतवर्षाच्या पूर्व भागात वैदिक आर्यांना पुरते बळ प्राप्त झाले नसल्यामुळे त्या भागात निर्ग्रंथ, यती, इ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वैदिकेतर पंथांचा जोर होता. जैन व बौद्ध श्रमणांची साधना व तपस्या विशेष रूपाने मगधातच झाली. या ऐतिहासिक कारणांमुळे मगध ही व्रात्यांची पुण्यभूमी ठरली आणि त्यामुळेच वैदिक ब्राह्मणांसाठी ती पापभूमी ठरली. शब्दकल्पद्रुमात मग शब्दाचा अर्थ दोष अथवा पाप असाच दिला आहे. यावरून वैदिकांची मगधाकडे पाहण्याची दृष्टी कळून येते.

मगधातले पहिले राज्य – पुराणांन्वये जन्हूच्या चौथ्या किंवा पाचव्या पिढीत अमूर्तरया नावाचा एक पुरुष झाला. त्याने किंवा त्याचा पुत्र गय याने गया नावाचे एक राज्य स्थापिले. त्यालाच पुढे मगधराज्य म्हणू लागले. त्यानंतर बऱ्याच कालाने कुरूच्या पाचव्या पिढीत वसू नावाचा एक प्रतापी राजा झाला. त्याला उपरिचर वसू असेही म्हणतात. त्याने मत्स्य देशापासून मगधापर्यंतचा सारा भारतवर्ष जिंकून घेतला. त्याने चक्रवर्तिपदसुद्धा धारण केले होते. त्याचे राज्य पाच पुत्रांत वाटले गेले. त्यांत बृहद्रथ हा मगधाचा राजा झाला. त्यानेच मगधात बार्हद्रथ वंशाचा पाया घातला. याच वंशात जरासंध जन्मला. तो महत्त्वाकांक्षी होता. त्याला भारतवर्षाचे साम्राज्य मिळवावे असे वाटत होते; पण श्रीकृष्णाच्या मुत्सद्दीपणामुळे त्याचा तो बेत फसला व त्याला मल्लयुद्धात भीमाच्या हातून मरण पत्करावे लागले. त्याच्या मागून त्याचा पुत्र सहदेव मगधाच्या गादीवर बसला. काही विद्वानांच्या मते रिपुंजय हा बार्हद्रथ वंशाचा अंतिम राजा होय. पुलिक नावाचा त्याचा एक अमात्य होता. त्याने कारस्थान करून रिपुंजयाला मारले व आपल्या पुत्राला राज्यावर बसविले. पण त्याचे शासन काही सैनिकी संघटनांना आवडले नाही. भट्टिय नामक एका सरदाराने त्याच्याविरुद्ध बंड पुकारून त्याचा वध केला. भट्टिक स्वतः राज्यावर बसला नाही; पण त्याने आपला पुत्र बिंबिसार याला सिंहासनावर बसवले.

इथूनच मगधावर नागवंशी राजांचे शासन सुरू होते. बिंबिसार हा हर्यंक नामक नाग वंशाच्याच एका शाखेत जन्मला होता. मगधात नाग क्षत्रियांची बरीच वस्ती होती. त्यामुळे तिथे नागांचे आधिपत्य निर्माण होणे स्वाभाविक होते.

बिंबिसाराच्या कारकीर्दीचे महत्त्व राजनैतिक दृष्टीपेक्षा सांस्कृत दृष्टीने विशेष आहे. नाग क्षत्रिय हे व्रात्य होते व वैदिक कर्मकांडापासून दूर होते. याच कुळात जन्मलेल्या पार्श्वनाथाने चातुर्याम धर्माची स्थापना केली. मगध, अंग आणि वज्जिसंघ या प्रदेशांत चातुर्यामाला मोठ्या संख्येने अनुयायी मिळाले. त्या काळी मगध हे प्राचीन रूढींचे खंडन करणारे आणि नवीन विचारांचे प्रवर्तन करणारे फार मोठे केंद्र बनले होते. बौद्ध ग्रंथांत सहा सामर्थ्यसंपन्न विचारवंतांचा उल्लेख येतो. अजित केशकंबली, मंखली गोसाल, पूर्ण कश्यप, प्रक्रुध कात्यायन, संजय वेलट्ठिपुत्त व निग्रंथनाथपुत्त (महावीर) हे ते सहा विचारवंत होत. हे सगळे मगधाचे मूल निवासी नसले, तरी या सर्वांची साधनाभूमी मगधच होती. हे सर्व पुरुष वैदिक विचारसरणीच्या विरुद्ध होते. या कालात मगधामध्ये आणखी एक क्रांती झाली, ती म्हणजे भाषेची. बुद्ध-महावीरांनी वर्णाश्रमधर्मालाच विरोध केला नाही, तर तो धर्म ज्या संस्कृत भाषेत होता, त्या भाषेचाही त्याग केला. संस्कृतऐवजी त्यांनी आपल्या धर्माच्या प्रसारासाठी पाली व मागधी या लोकभाषांचा स्वीकार केला. त्या भाषा सामान्य जनांच्या बोलभाषा असल्याने त्यांच्या द्वारे केलेला उपदेश लोकांना सहजपणे समजला, त्यांच्या हृदयात ठसला आणि हजारो लोक बुद्ध व महावीर यांच्या धर्मात दाखल झाले.

मगध साम्राज्य – बिंबिसाराचा पुत्र अजातशत्रू. तो मोठा साम्राज्यवादी होता. त्याने बापाला कैद करून राज्य मिळवले व जवळच्या दुर्जेय अशा वज्जिसंघात फूट पाडून त्याचाही पराभव केला. पुढे काशी, कोसल व अवंती इथपर्यंतचा प्रदेश जिंकून त्याने मगध राज्याला एका साम्राज्याचे स्वरूप दिले. अजातशत्रू बौद्ध होता; पण जैन धर्माविषयीही त्याच्या मनात द्वेषभाव नव्हता. त्याच्याच कालात राजगृह येथील सप्तपर्णी गुहेत बौद्ध धर्माची प्रथम संगीती भरली. त्या धर्मपरिषदेत सर्व प्रसिद्ध बौद्ध भिक्षू एकत्र आले होते. बुद्धाच्या उपदेशांचे पहिले संकलन या संगीतीत झाले. त्याच्या कारकीर्दीत जैन आणि बौद्ध हे दोन्ही धर्म खूप वाढले.

अजातशत्रूला त्याचा पुत्र उदायी याने कारस्थान करून ठार मारले. उदायीने पाटलिग्राम नामक स्थानी एक मोठे नगर वसवले. त्यालाच पुढे पाटलिपुत्र म्हणू लागले. सांप्रत याला पाटणा म्हणतात. उदायीने आपली राजधानी राजगृहातून काढून पाटलिपुत्रात आणली. उदायीचा अंतही कारस्थानातूनच झाला. अशा प्रकारे हर्यंक वंशी नागराजांचे मगधावरचे स्वामित्व समाप्त झाले.

तिथून पुढे मगधावर शिशुनाग वंशाची सत्ता आली; पण त्याही वंशाला तिथे फार काळ राज्य करता आले नाही. त्यानंतर मगधावर नंद वंशाचे राज्य आले.

नंद वंश हा शूद्र वंश होता. त्या वंशातील महापद्म नंद याने अनेक राज्ये जिंकून आपले एकछत्री साम्राज्य उभे केले. इतिहासातला हा पहिला महासम्राट होय.

मगधावर नंदांची सत्ता येणे ही गोष्ट क्रांतिकारक होती. ती एक प्रकारे सामाजिक क्रांती होती. श्री. वैजनाथसिंह विनोद म्हणतात – ब्रह्मक्षत्रांच्या चिरकाल चाललेल्या परस्पर संघर्षातून तिसराच एक शासकवर्ग त्या काळी पुढे आला. हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिसरा वर्ग म्हणजे उपेक्षित असा शूद्र वर्ग होय.

नंद राजांचा कल जैन धर्माकडे होता व त्यांचे मंत्री जैन होते, असे आवश्यकसूत्र या ग्रंथात म्हटले आहे. याच नंदकुलाचा निःपात करून मौर्य चंद्रगुप्त मगधाच्या सिंहासनावर आला. त्याच्या राज्याची घडी बसविण्यासाठी आर्य चाणक्याने त्याचे महाअमात्यपद स्वीकारले. चाणक्याच्या मार्गदर्शनाखाली चंद्रगुप्ताने नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व भारत एकछत्री सत्तेखाली आणला. त्याने साम्राज्यातील केंद्रे व नगरे अनेक रस्ते बांधून जोडून दिली; धर्मशाळा, पाटबंधारे आणि चिकित्सालये निर्माण केली; शिक्षणाचीही चांगली सोय केली. चंद्रगुप्ताचा नातू सम्राट अशोक हा होय. त्याला महान अशोक असे म्हणतात. कलिंगयुद्धात जो अगणित मानवसंहार झाला, तो पुढे त्याच्या उपरतीला कारणीभूत ठरला. त्या उपरतीच्या झटक्यात त्याने आपल्या खड्गाचा त्याग करून प्रतिज्ञा केली, ती ही — 'देवानां प्रिय अशोक युद्धद्वारा विजय मिळवणार नाही. तो प्रेमाच्या द्वारे दिग्विजय व धर्मविजय मिळवील.' आपल्या प्रतिज्ञेनुसार तो जन्मभर वागला. त्याने बौद्ध धर्म स्वीकारला होता. त्याच्या कारकीर्दीत तिसरी बौद्ध संगीती पाटलिपुत्र येथे भरली होती. अशोकानंतर जे मगधाच्या गादीवर आले, ते सगळे खुजे, दुबळे, पण प्रजापीडक ठरले. त्यामुळे साम्राज्यातला एकेक प्रदेश, साम्राज्यसत्ता झुगारून देऊन अलग होऊ लागला. त्याचा परिणाम देशाच्या भवितव्यावर झाल्यावाचून राहिला नाही. भारत देश हा परकीय आक्रमकांना मुक्तद्वार बनला.

देशावरचे हे विदेशी आक्रमण मोडून काढण्यास पुढे सरसावला तो पुष्यमित्र शुंग होय. हा भारद्वाजगोत्री ब्राह्मण होता. त्याने तत्कालीन मौर्य राजा बृहद्रथ याचा वध करून मगधाचे राज्य मिळविले आणि मगधावर स्वारी करायला आलेला ग्रीक राजा मिनेंडर याच्यावर चाल करून त्याचे पूर्ण पारिपत्यही केले. त्याला त्याने पार सिंधूपलिकडे हाकलून दिले. या घटकेचे सामाजिक दृष्ट्या विश्लेषण करताना श्री. बैजनाथसिंह विनोद म्हणतात – 'ब्राह्मणी दंभ आणि कमजोरी यांच्यापासून समाजाचे रक्षण करण्याचा ज्या जैन-बौद्धांनी विडा उचलला होता, ते जैन-बौद्ध स्वतःच दांभिक आणि कमजोर झाले. पुष्यमित्राच्या कालात जैन-बौद्धांच्या आचरणाने प्रजा त्रस्त झाली होती. देशावर परकीयांचे आक्रमण आले, त्याचेही या लोकांना काही वाटले नाही. त्याच्या प्रतिकाराला उभे राहण्याऐवजी त्यांनी या विदेशी आक्रमकांचे समर्थनच सुरू केले. त्यामुळे लोकांत त्यांच्याविषयी कमालीची नाराजी उत्पन्न झाली. ब्राह्मणांना ही संधी मिळाली. ती साधून त्यानी देशावरचे धार्मिक प्रभुत्व पुनश्च मिळविण्यासाठी पतंजलीच्या नेतृत्वाने जैन-बौद्धांविरुद्ध आघाडी उघडली. त्यां काळी बृहद्रथ मौर्य हा मगधाच्या गादीवर होता आणि तो बौद्ध होता. त्यामुळे ब्राह्मणांच्या या चळवळीने राजकीय स्वरूप धारण केले. पुष्यमित्र हा बृहद्रथाचा एक सेनापती होता. मगधाचे सारे सैन्यबळ त्याच्या पाठीशी होते. शत्रू मगधाच्या वेशीवर येऊन धडका मारीत होता आणि बृहद्रथ आपला नेभळटपणा सोडायला तयार नव्हता. हा सर्व विचार करून पुष्यमित्राने एक दिवस भर दिवसा बृहद्रथाचा वध करून राज्यसत्ता हाती घेतली. ही गोष्ट एकाएकी घडली नसावी. तिच्या पाठीमागे विचारपूर्वक एखादी संघटना उभी असावी. कदाचित या राजकीय संघटनेच्या केंद्रस्थानी पतंजली हा महावैयाकरण असण्याची शक्यता आहे. भर दिवसा सेना आणि प्रजा यांच्या डोळ्यादेखत पुष्यमित्र राजाचा वध करतो आणि सर्व सैनिक व लोक चूप बसतात, त्याला कसलाही विरोध करीत नाहीत, याचा अर्थ हाच असला पाहिजे, की मगधातली समस्त प्रजा ढोंगी, दुर्बळ आणि कातर अशा मौर्य शासनापासून मुक्त होऊ इच्छित होती.

सन पूर्व ८०० वर्षांच्या पूर्वीच मगधात श्रमणसंस्कृतीचा विकास झाला. श्रमणसंस्कृतीची ही परंपरा पार्श्वनाथाच्या आधीपासून सुरू होते. पार्श्वनाथाच्या परंपरेतच महावीर निर्माण झाला. बुद्धही श्रमणसंस्कृतीचेच एक विकसित पुष्प होता. मगध साम्राज्याचा उदय बिंबिसारापासून झाला. काही लोक त्याला जैन म्हणतात; पण बुद्धाविषयीही त्याला श्रद्धा होती. त्याचा पुत्र अजातशत्रू याने मगध साम्राज्याचा विस्तार केला. त्यानंतरचे नंदराजे जैन होते. त्यांपैकी महापद्म नावाच्या नंदाने स्वतःला सर्वक्षत्रांतक असे बिरुद लावले होते. त्याला पुराणांनी परशुरामाचा अवतार म्हटले आहे. याच्या राक्षस नामक ब्राह्मण मंत्र्यानेच जाणून बुजून नंदांची राजनीती सर्वक्षत्रांतक बनवली आणि त्या शूद्र राजांच्या हस्ते वेदविरोधी क्षत्रियांचा नाश करवला असे एक मत आहे. पण राक्षसाची ही नीती मर्यादेचे अतिक्रमण करून पुढे गेली. पुढे चाणक्य हा दुसरा एक राजकारणी ब्राह्मण मुत्सद्दी पुढे आला. त्याने एका क्षत्रिय युवकालाच जवळ करून सर्वक्षत्रांतक शूद्र नंदांचा नाश केला आणि मगधात मौर्य क्षत्रियांचे साम्राज्य स्थापिले. चाणक्याने वेदनिंदक नंदांचा नाश केला; पण जैन-बौद्धांच्या विरुद्ध त्याने कोणतीही उक्ती किंवा कृती केली नाही. अशी शक्यता आहे, की त्या काळाचे जैन-बौद्ध धर्म सामाजिक दृष्ट्या पतित झाले नव्हते. मगधात श्रमणपरंपरेला वातावरण अनुकूल होते व त्याचा प्रभाव चंद्रगुप्तावरही पडला होता. जै. साहित्यावरून समजते, की आयुष्याच्या अखेरच्या काळात चंद्रगुप्त जैन झाला होता; पण चाणक्याने त्याला जैन धर्म हा राष्ट्रधर्म

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बनवू दिला नाही. त्याच वंशातील अशोकाने मात्र बौद्ध धर्माला राष्ट्रधर्माच्या पदवीवर चढविले. अशोकाच्या मंत्र्यांना ही गोष्ट आवडली नाही. पण त्यांच्यामध्ये कोणी चाणक्यासारखा सामर्थ्यवान नव्हता. त्यामुळे शस्त्रसंन्यास करून प्रेम आणि अहिंसा यांच्या द्वारे धर्मविजयाची द्वाही मिरवणाऱ्या अशोकाला त्याच्या या दुष्परिणामी निर्णयापासून कोणीही निवारू शकला नाही. त्याच्या हयातीत कसेबसे साम्राज्य टिकले; पण त्या वंशात पुढे कुणीही समर्थ असा राजा निर्माण झाला नाही आणि सैन्याची कोणीही योग्य प्रकारे काळजी घेतली नाही. सगळेच अहिंसेची भलावण करीत राहिले. अशा परिस्थितीत मौर्यांचे साम्राज्य निकालात निघाले नसते तरच नवल !

मौर्य क्षत्रियांना जवळ करून त्यांना सम्राट्पदावर चढवणारा चाणक्य जसा ब्राह्मण, तसाच दुर्बल आणि ढोंगी मौर्यांचा उच्छेद करणारा पुष्यमित्रही ब्राह्मणच निघाला. चाणक्याने दिग्विजय केले; पण अश्वमेध केला नाही. पुष्यमित्राने अश्वमेधाची परंपरा पुनरुज्जीवित केली. जनमेजयाच्या नंतर बंद झालेला वैदिक अश्वमेध पुष्यमित्राने प्रथम केला. त्या यज्ञात पतंजली हा एक ऋत्विज झाला होता. त्या काळात विदेशी आक्रमकांशी जैन-बौद्धांनी संगनमत केले होते आणि त्यांना मार्गदर्शन केले होते. या धरमेद्यांना कडक शासन घडविले पाहिजे या निश्चयाने मिनँडरच्या राजधानीत पोचल्यावर पुष्यमित्राने घोषणा केली, की 'जो कोणी श्रमणाचे मस्तक तोडून आणून देईल त्याला मी १०० दिनार देईन.' चाणक्याच्या काली सांप्रदायिक विद्वेष राष्ट्रीय थरावर येऊन पोचले नव्हते; म्हणून चाणक्य त्याविषयी सावधान पण चूप राहिला. पण पतंजलीच्या कालात सांप्रदायिक वैराने जणू शीग गाठली. सांप्रदायिक वैराने पेटलेल्या या लोकांना आपण विदेशी आक्रमकांशी संगनमत करून देशाचा घात करीत आहो, याचीही जाणीव राहिली नाही. त्यामुळेच पतंजलीला आपल्या महाभाष्यात ब्राह्मण व श्रमण यांच्या मधला द्वेष हा शाश्वत आहे, असे सांगावे लागले. इतकेच नव्हे; तर ज्या अंग, वंग, कलिंग, मगध व सौराष्ट्र या देशांत बौद्ध-जैनांचे प्राधान्य होते, ते देश पतित देश आहेत, असे घोषित करावे लागले. पुष्यमित्राच्याच काळात मनुस्मृतीचे संपादन झाले. त्या मनुस्मृतीत तीर्थयात्रेवाचून अन्य कारणांसाठी वरील देशांत गमन करणाऱ्या माणसाला प्रायश्चित्त सांगितले आहे, त्याचे कारणही हेच होय.

मगध देश हा सांप्रत बिहार राज्यात मोडतो. पुष्यमित्रानंतरचा मगधाचा इतिहास हा बिहारच्या अनुषंगाने वाचणे श्रेयस्कर होय. पाहा – बिहार. [मगध – श्री. बैजनाथसिंह 'विनोद,' १९५४; पा. क.; प्रा. मौ. बि.; रा. ले. सं.]

मगनीराम (१७९९ ते १८७४ इ. स.) एक राजस्थानी संतकवी. याचा जन्म मारवाडातील बालोतरा गावी झाला. मूलचंद नामक एका भाविकाला मूलबाळ नसल्यामुळे त्याने मगनीरामाला दत्तक घेतले. मूलचंद त्याला आपल्याबरोबर कथाकीर्तनाला व साधुसंतांच्या भेटीला नेत असे. मगनीरामाने लहान वयातच रामायण-महाभारतादी ग्रंथांचे अध्ययन केले. थोड्याच काळात त्याची विद्वान व म्हणून ख्याती झाली. पुढे त्याची कीर्ती जोधपूरचा भक्त राजा मानसिंह याच्याही कानावर गेली आणि त्याने याला पाली गावी बोलावून त्याचे प्रवचन व भजन करवले.

मगनीराम हा डिंगल व पिंगल या दोन्ही भाषांत प्रवीण होता. दोन्ही भाषांत त्याने काव्यरचना करून निरंजनी संप्रदायाच्या साहित्यात भर घातली आहे. त्याच्या काही रचना अशा–

(१) **मगनसतसई** – ही याची सर्वांत मोठी रचना आहे. भक्ती आणि नीती या विषयांवर यांत सहाशे दोहे आहेत. हा ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाही.

(२) **श्रीसंतमहिमा** – निरंजनी संप्रदायाचा प्रवर्तक स्वामी हरिदास याचे माहात्म्य, त्याची शिष्यपरंपरा, त्याची भक्ती, त्याच्या पुण्यतिथीचा उत्सव, इत्यादींचे वर्णन या ग्रंथात आहे.

(३) **हरिनामबत्तिसी** – यात परमेश्वराची वेगवेगळी नावे दिली आहेत.

याशिवाय, त्याने अनेक फुटकळ गीते व पदेही रचली आहेत. त्यांपैकी काही अनेकांच्या तोंडी आहेत. त्यांतले एक पद असे –

दुष्ट दरन संकट हरन, करन सकल सुभ काज ।
विश्वभरन, गिरिवर धरन, मोहिं दरशन दीजो राज ॥
पतित उधारन बिरुद तुम, मैं हूं पतित निलाज ।
ऐसो बिरुद बिचारी कै दरशन दीजो राज ॥
त्रिविध ताप भव रोग को, और न कहूं इलाज ।
हैं भेषज हरिनाम को मोहिं दरशन दीजो राज ॥

अर्थ – हे विश्वंभरा, गिरिधारी, तू दुष्टांचे पारिपत्य करतोस. भक्तांच्या संकटांचे हरण करतोस. सर्व शुभ कार्ये पार पाडतोस. तू मला दर्शन दे. पतितांचा उद्धारक हे बिरुद तू मिरवतोस. मी पतित आहे; तेव्हा तू मला दर्शन दे. त्रिविध तापांनी तप्त झालेल्या भवरोगाला हरिनामाशिवाय दुसरा इलाज नाही. तू मला दर्शन दे.

सूरदास व मीराबाई यांच्या पदांप्रमाणे मगनीरामाच्या पदांतही विरहवेदना व पश्चातापाची भावना आढळते.

ब्रजभाषा व डिंगल भाषा यांतही याची बरीच फुटकळ रचना प्रसिद्ध आहे. त्यांतली काही पदे चमत्कृतिपूर्ण आहेत.

[श्री. भूपतिराम साकरिया, वरदा, जानेवारी १९६५]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक लढाऊ जमात. या लोकांची वस्ती प्रामुख्याने **मगर** नेपाळच्या पश्चिम भागात आढळते. यांच्या बोहरा, शेका, चौहान, झांक्री, कोनवार व उपहाई अशा सहा प्रमुख टोळ्या आहेत. मूळ मगर जमातीचे लोक ज्या सहा टोळ्यांमध्ये आढळतात, त्यांची नावे अशी – आले, बुऱ्हाठोकी, घरती, पुण, राणा व थापा. या सर्व टोळ्यांमध्ये रोटी-बेटी व्यवहार होतात. यांच्या चालीरीती व पेहराव जवळजवळ सारखेच असतात. हे लोक मंगोलियन वंशाचे आहेत. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे.

विवाहप्रथा – मगर लोक समान कुळात लग्न करीत नाहीत. त्याचप्रमाणे हे आपली मुलगी सहसा मातुलकुळात देत नाहीत. यांच्या लग्नाला ब्राह्मण पुरोहित लागतो. विवाहविधीमध्ये जनती नावाचा एक समारंभ असतो. हा समारंभ वधूच्या घरी होतो. त्यासाठी वर आणि वराकडील मंडळी मध्यान्हीच्या नंतर वधूच्या घरी जातात. तिथे त्यांच्यावर प्रथम भाताच्या मुदींचा वर्षाव करतात. नंतर भोजनसमारंभ होतो. लग्न रात्री लावतात. लग्नविधीत फेरे म्हणजे अग्नीला प्रदक्षिणा आणि आंचलगाठ म्हणजे वधू-वरांच्या वस्त्रांची गाठ या गोष्टी महत्त्वाच्या असतात. घटस्फोटाला पति-पत्नींची संमती लागते.

मगर लोक धर्मभोळे आहेत. जीवनातल्या मामुली गोष्टींसाठीही हे दैवी उपायांवर विसंबून असतात. राक्षसांमुळे अपशकुन होतात, अशी त्यांची समजूत आहे. ते होऊ नयेत म्हणून हे दिओराई व चंडी या देवींना भजतात. रोगराई, दुष्काळ, इ. आपत्ती देवीच्या कोपामुळे होतात, असे हे मानतात.

विवाहापूर्वी कोणताही मगर माणूस विविध जमातींबरोबर सहभोजन करू शकतो, पण विवाहानंतर त्याला तशी परवानगी मिळत नाही. संशोधकांच्या मते राजपुतांच्या अनेक चालीरीती मगरांनी उचलल्या आहेत. त्यांच्या संबंधामुळेच मगर जमातीत सूर्यवंशी व चंद्रवंशी अशा पदव्याही आल्या आहेत. कोणत्याही उत्सवाच्या प्रसंगी लोकगीते गाण्याची यांना फार आवड असते.

मृतकप्रथा – हे मृतांना पुरतात. मर्तिकानंतर ज्ञातीला मद्यपान व भोजन देतात. [गुरखाज; नेपाळ.]

मगही बिहारी भाषेची एक उपभाषा. बिहारमधील गया व पटना हे दोन जिल्हे म्हणजे या भाषेचे केंद्र होय. याशिवाय हजारीबाग, पालामाऊ, मुंगेर व भागलपूर या जिल्ह्यांचा बराचसा भाग, छोटा नागपूरचा उत्तर भाग आणि रांचीच्या पठाराचा उत्तर, पूर्व व दक्षिण भाग यांतही ही बोलली जाते. मगही भाषेच्या लेखनासाठी कैथी लिपीचा उपयोग करतात. या भाषेत प्राचीन लिखित साहित्य नाही.

पाली आणि मगही या दोन भाषांत बरेच साम्य आहे. ध्वनिविकासाच्या दृष्टीने मगही पालीला निकट आहे. तसेच मगहीतील शेकडा पन्नास शब्द पालीतील आहेत. मगहीचा अर्धमागधीशीही जवळचा संबंध आहे. आधुनिक मगहीचे मूळ, उत्स सरहपादाच्या रचनांत आढळते. शब्दकोश, ध्वनी, म्हणी, वाक्प्रचार, छंद, भाषेचे रचनात्मक स्वरूप, इ. बाबतींत सिद्धांचे साहित्य हे मगहीचे पूर्व रूप म्हणता येईल. सिद्धसाहित्याचा काल इ. स. ८०० ते १२०० एवढा मानलेला आहे.

मगही भाषेत काही लोककथा व लोकगीते छापलेली आहेत. [भा. भा. स.; हिं. सा. बृ. इ.; मगही उद्‌गम तथा विकास– श्रीसरयूप्रसाद, परिषद्‌पत्रिका, एप्रिल १९६६]

मगी वर्षगणना बंगालच्या चितगाव जिल्ह्यात हिचा प्रचार आहे. मगी सनात ६३८ किंवा ६३९ मिळविले की इसवी सन येतो. या सनाला हे नाव का मिळाले आणि हा सन कोणी सुरू केला, याचा इतिहास उपलब्ध नाही. पण इ. स. च्या ९ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत चितगाव भागाच्या आसपास आराकानी किंवा मगी राजांचा अंमल होता. त्यामुळे कदाचित त्या लोकांवरूनच या सनाला मगी हे नाव प्राप्त झाले असावे.

मगी सनाचा वर्षारंभ मेष संक्रांतीपासून होतो. सूर्य ज्या दिवशी दुसऱ्या राशीत प्रवेश करतो, तो नवीन महिन्याचा प्रारंभ दिवस असे समजले जाते. [सं. मि.; सु. वि. को.]

मगे परब मुंडा लोकांचा एक सण. पौष पौर्णिमेला हा सण येतो. या वेळी खळ्यातले धान्य घरच्या कोठारात आलेले असते. त्यामुळे हा एक प्रकारचा धान्योत्सवच असतो. सणाच्या आदल्या दिवशी घरातला कर्ता पुरुष उपवास करतो आणि दुसऱ्या दिवशी स्नान करून गृहदेवतांची म्हणजे मृत पितरांच्या आत्म्यांची पूजा करतो. पूजा झाल्यावर आयुरारोग्य, विपुल धान्य व गोधन यांची मागणी करतो. नंतर घरातले सगळे लोक आणि नोकर एकत्र बसून तांदुळाची भाकरी, पोहे, गूळ, इ. पदार्थांचे भोजन करतात. [एन्सा. मुंडा.]

मघइया डोंब डोंबांची एक पोटजात. या लोकांची वस्ती पश्चिम बंगालमधील बरद्वान, बिरभूम, बांकुरा व मिदनापूर या जिल्ह्यांत आढळते. मुळात हे मगध प्रदेशातील असल्यामुळे यांना मघइया किंवा मघैया हे नाव मिळाले असावे. यांच्यासंबंधी एक दंतकथा सांगतात, ती अशी–

एकदा महादेव व पार्वती यांनी सर्व जातीच्या लोकांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जेवायला बोलावले. त्यांत डोंबांचा पूर्वज सुप… भक्त हा उशिरा जेवायला गेला. त्याला फार भूक लागली होती. म्हणून त्याने लोकांचे उष्टे अन्न एकत्रित करून खाल्ले. त्याच्या त्या वर्तना-बद्दल लोकांनी त्याच्या वंशजांचा तिरस्कार केला आणि तेव्हा-पासून इतरांचे उष्टे अन्न खाऊन हे जगू लागले.

हे लोक आपल्याला कालू डोंब व लक्ष्मी डोंबी यांचे वंशज मानतात. कालू हा एका चांडाळ स्त्रीचा पुत्र होता, असे म्हण-तात. याला प्राणबीर, मनबीर, धनबीर व शानबीर असे चार मुलगे होते. यांच्यापासून अंकुरिया, बिसदेलिया, बजुमिया व मघइया या जाती उत्पन्न झाल्या, अशी त्यांची समजूत आहे. सांप्रत बिहार प्रदेशातील मघइयांचा आणि यांचा संबंध राहि-लेला नाही.

हे लोक मध्यम बांध्याचे, काळया वर्णाचे व चमकदार डोळयांचे असतात. हे आपल्या केसांची निगा […] नाहीत.

बंगालमध्ये हे लोक झाडूवाल्याचे काम करतात, तसेच मैला व प्रेते वाहून नेतात. काही लोक टोपल्या, चटया वगैरे विण-तात, तर काही शेती व शेतमजुरी करतात. कालिंदी डोंब व मघइया डोंब यांच्या चालीरीतींत बरेच साम्य असून, त्यांचा सामाजिक दर्जाही सारखाच आहे. [को. क. वे. बें.]

मघा

अश्विन्यादी गणनेतील दहावे नक्षत्र. हे सिंह राशीत येते. हा पाच तारकांचा एक पुंज असून, तो आयनिक वृत्ताच्या उत्तरेला, त्या वृत्ताला लागूनच आहे. त्यातली मघली ठळक तारका हाच त्यातला योगतारा होय. हिचे वैदिक नाव अघा आहे. भारतीय संकेतानुसार मघापुंज नांगराच्या आकृतीचा कल्पिलेला आहे. कोणी त्याची विळयाची आकृतीही मानतात. हे नक्षत्र उग्र असून, अभिचारादी कर्मासाठी योग्य मानलेले आहे. याला अधोमुख, मध्याक्ष व स्त्रीनक्षत्र मानतात.

पितर ही मघांची देवता आहे. मघा नक्षत्रात पितरांना बोला-वले, तर ते मनोवेगाने खाली येतात आणि यजमानाने दिलेला हविर्भाग ग्रहण करतात, अशी वैदिक धारणा आहे. याविषयी तैत्ति. ब्राह्मणात (३·१·१) पुढील मंत्र आहे–

ये अग्निदग्धा येऽनग्निदग्धाः येऽमुं लोकं पितरः क्षियन्ति ।
यांश्च विद्म यॉं उ च न प्रविद्म । मघासु यज्ञं सुकृतं जुषन्ताम् ।।

भावार्थ– जे अग्निदग्ध किंवा अनग्निदग्ध असतील, जे ज्ञात किंवा अज्ञात असतील आणि जे याच लोकी भूतपिशाच योनीत भ्रमत असतील, त्या सर्वांसाठी आम्ही मघा नक्षत्रावर यजन करीत आहो. त्यांनी यावे आणि स्वधाकाराने तृप्त व्हावे.

मघातील रेग्युलस ही मुख्य तारका त्रिगुणित तारका आहे. एक पहिल्या प्रतीची, दुसरी आठव्या प्रतीची व तिसरी तेराव्या प्रतीची, अशा तीन तारका मिळून ती बनली आहे. प्रतिवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या १३ ते १५ या तारखांना मघातून उल्का बाहेर पडताना दिसतात. त्यांना मघोल्का अशी संज्ञा आहे.

मघात्रयोदशी

प्रौष्ठपदीनंतर मघानक्षत्रयुक्त त्रयोदशी हा योग श्राद्धासाठी उत्तम मानलेला आहे. त्या दिवशी मध आणि पायस यांनी केलेले श्राद्ध अक्षय्य होते, असे विष्णुधर्मोत्तर पुराणात सांगितले आहे. मघायुक्त त्रयोदशीच्या दिवशी जर गजच्छाया योग असेल, तर त्या दिवशी पितर श्राद्धाची इच्छा करतात. [श. क.; म. भा. स.]

मच्छिंद्रनाथ

नवनाथांपैकी पहिला नाथ. याला नाथसंप्र-दायाचा प्रवर्तक मानतात. मच्छिंदर, मच्छंदर, मच्छघ्नपाद, मच्छेंद्रपाद, मीनपाद, मीननाथ, मत्स्येंद्र असे याच्या नावाचे पर्याय आहेत. स्कंद पुराण, नारद पुराण, शंकर-दिग्विजय, नाथलीलामृत, भक्तिविजय, इ. ग्रंथांत मच्छिंद्राची कथा वर्णिलेली आहे. मच्छिंद्राच्या काही कथांवरून तो भृगु-वंशी ब्राह्मण असावा असे वाटते, तर मच्छघ्नपाद या त्याच्या नावावरून तो कैवर्त (कोळी) कुलातला असावा, असे वाटते.

शिवाला आदिनाथ म्हणतात. त्याचा हा शिष्य होय. या विषयीचा एक प्रसिद्ध श्लोक असा–

आदिनाथो गुरुर्यस्य गोरक्षस्य च यो गुरुः ।
मत्स्येन्द्रं तमहं वन्दे महासिद्धं जगद्गुरुम् ।।

अर्थ – आदिनाथ ज्याचा गुरू आहे आणि जो गोरक्षाचा गुरू आहे अशा त्या महासिद्ध जगद्गुरू मत्स्येंद्राला मी वंदन करतो.

भारतीय लोकमानसात मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ या गुरु-शिष्यांविषयी कमालीचा आदर आहे. एक महान योगी अशी मच्छिंद्राची ख्याती आहे. त्याच्या विषयीचा आदर आणि त्याच्या योगसिद्धींविषयीच्या कल्पना यांतून जे दंतकथांचे व पुराणकथांचे जाळे निर्माण झाले आहे, त्यांतून त्याचे निश्चित चरित्र निवडून काढणे कठीण आहे. मच्छिंद्रनाथाविषयीच्या काही आख्यायिका व कथा अशा–

(१) एकदा एका द्वीपात बसून आदिनाथ शिव गिरिजेला एकांतात योगाचा उपदेश करीत होता. जवळच पाणी होते. त्या पाण्यातल्या एका मत्स्याने तो उपदेश ऐकला. त्या योगे माशाच्या मनाची एकाग्रता होऊन तो निश्चल बनला. त्याची ती अवस्था पाहून आदिनाथाला समजले, की या माशाने आपला उपदेश ऐकला आहे. मग कृपाळू होऊन आदिनाथाने त्याच्यावर जलप्रोक्षण केले. त्यासरशी मत्स्याचा मच्छिंद्रनाथ बनला.

(२) एके दिवशी नारदाकडून पार्वतीला एक रहस्य कळले,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

की शिवाने धारण केलेल्या मुंडमालेतली मुंडकी त्याच्या पूर्वजन्माची आहेत. शिवाची ही पूर्वजन्मकथा आपण जाणावी, असे पार्वतीला वाटले. तिने त्याविषयी शिवाला आग्रह केला. शिवानें त्यासाठी समुद्रात एकांत स्थान पाहिले. दुसरीकडे कविनारायण मच्छिंद्रनाथाच्या रूपात एका भृगुवंशी ब्राह्मणाच्या घरी अवतरला होता; पण गंडांतर योगावर जन्मल्याने ब्राह्मणाने त्याला समुद्रात फेकून दिले होते. एका मासोळीने त्याला गिळले होते व बारा वर्षे आपल्या पोटात वाढवले होते. पार्वतीला शिव जी कथा ऐकवीत होता, ती मासोळीच्या पोटातून या बालकाने ऐकली. ही गोष्ट शिवाला समजल्यावर त्याने त्याच्यावर कृपा केली आणि तिच्या योगे तो महासिद्ध बनून मासोळीच्या पोटातून बाहेर आला.

(३) या बालकाने जन्मताच आपल्या अपूर्व सिद्धीने हनुमान, वीरवेताळ, वीरभद्र, भद्रकाली व चामुंडा या देवतांचा पराभव केला.

(४) मच्छिंद्रनाथ व गोरखनाथ हे गुरुशिष्य एकदा प्रयागात आले असता तिथला राजा मृत्यू पावला. त्याच्या मृत्यूने सर्व प्रजाजन शोकमग्न झाले. गोरखनाथाला त्या शोकमग्न प्रजेची दया आली. त्याने मच्छिंद्राला प्रार्थिले, की 'तुम्ही त्या राजाच्या मृत शरीरात प्रवेश करून लोकांना सुखी करा. तुमचे शरीर मी येथे राखतो.' मच्छिंद्राने तसे केले. सलग १२ वर्षे तो राजवैभवाची आणि गृहस्थाश्रमाची सुखे भोगीत राहिला. योगायोगाने त्याचे हे रहस्य राण्यांना समजले. त्यांनी मच्छिंद्राचे मृत शरीर मिळवून त्याचे तुकडे केले व ते रानोमाळ फेकून दिले. शिवाला ही गोष्ट समजताच त्याने वीरभद्राला ते तुकडे गोळा करण्यासाठी पाठविले. वीरभद्राने ते काम चोख बजावले. ही गोष्ट गोरक्षनाथाला समजली. त्याने वीरभद्राकडे जाऊन ते देहखंड मागितले; पण वीरभद्र ते देईना. तेव्हा वीरभद्राचा आणि त्याच्या संरक्षणार्थ आलेल्या अनेक देवांचा पराभव करून गोरखनाथाने ते खंडप्राय गुरुशरीर हस्तगत केले व संजीवनी विद्येने त्याला पुनरच मूळचा आकार दिला. मग त्याने गुरूला तिरोप पाठवून बोलवून घेतले. तेव्हा मच्छिंद्रनाथ राजशरीराचा त्याग करून मूळ शरीरात प्रविष्ट झाला.

(५) त्रियादेश अर्थात सिंहलदेश यावर एक राणी राज्य करीत होती. तिचा पती रुग्ण व क्षीण होता. तो तिची कामवासना तृप्त करू शकत नसे. त्यामुळे तिने हनुमंताला गाठून आपला काम पूर्ण करण्याची विनंती केली. ब्रह्मचारी असल्यामुळे हनुमंताने तिची विनंती अमान्य केली, पण 'तुला मी योग्य पुरुष भेटवीन' असे सांगून मच्छिंद्रनाथाला तिच्यापुढे आणून उभे केले. मच्छिंद्रनाथाने त्या राणीची कामना पूर्ण केली आणि नंतर तो तिच्यासह विलाससुखे उपभोगीत राहिला. राणीला माहीत होते की, त्याचा एक सामर्थ्यवान असा शिष्य आहे. म्हणून तिने कोणत्याही योग्याला किंवा बुवा-गोसाव्याला आपल्या राज्यात येण्याची बंदी केली. गुरूचा शोध करीत सिंहलदेशापर्यंत पोचलेल्या गोरखनाथाला हनुमंताने आत येण्यास मज्जाव केला. मग गोरख बालवेषाने राज्यात शिरला व दरबारात पोचला. त्या वेळी कलिंगा नावाची एक गणिका मच्छिंद्रनाथाच्या अंतःपुरात नाचण्यासाठी निघाली होती. गोरखनाथाने तिच्याशी संधान बांधले. त्याने स्त्रीवेष धारण केला व पखवाजी या नात्याने तिच्याबरोबर अंतःपुरात प्रवेश मिळविला. कलिंगा जेव्हा नाचू लागली, तेव्हा तिला [illegible] करता करता गोरखनाथाने आपल्या मृदंगातून 'चलो मच्छिंदर गोरख आया' असे बोल उमटवायला सुरुवात केली. मच्छिंद्राने ते ऐकले. तो सावध झाला आणि राणीचा परोपरीचा आग्रह मोडून गोरखनाथाबरोबर सिंहलदेशाच्या बाहेर पडला.

अशा अनेक कथा व आख्यायिका यांच्या परिशीलनातून डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांनी काही निष्कर्ष काढले आहेत, ते असे—

मच्छिंद्रनाथ योगमार्गाचे प्रवर्तक खरे, पण दैववशात अशा

मच्छिंद्रनाथ

एका वामाचारी साधनेत ते प्रविष्ट झाले, की ज्या साधनेत निराबाध स्त्रीसंसर्ग निषिद्ध नसून विहित होता. ललिताभैरवी ही मच्छिंद्राची शक्ती होती. मच्छिंद्राच्या आख्यायिकांतून चंद्रद्वीपाचा उल्लेख येतो. काहींच्या मते ते कलकत्त्याच्या दक्षिणेचे सुंदरबन असावे, तर काहींच्या मते ते आसामच्या पहाडी प्रदेशात असावे. आसामला पूर्वी कामरूप म्हणत आणि या कामरूपातच मच्छिंद्राने आपली योगसाधना केली होती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मच्छिंद्रनाथाच्या कालाबद्दलही मतभेद आहेत. अनेक संशोधकांनी त्याला इ. स. च्या आठव्या किंवा नवव्या शतकातला ठरवला आहे. श्री. रा. चिं. ढेरे यांनी मच्छिंद्रनाथ हा इ. स. च्या दहाव्या शतकात होऊन गेला, असे सिद्ध केले आहे.

मच्छिंद्राचे ग्रंथ – मच्छिंद्राच्या ग्रंथांचे दोन विभाग करावे लागतात. (१) कौलमताचे ग्रंथ व (२) नाथमताचे ग्रंथ. पहिल्या विभागात कौलज्ञाननिर्णय, अकुलवीरतंत्र, कुलानंदतंत्र व ज्ञान कलिका हे ग्रंथ येतात. याशिवाय कामाख्यगुह्यसिद्धी, अकुलागमतंत्र, कुलार्णवतंत्र, कौलोपनिषद, कौलावलीनिर्णय, इ. आणखीही काही ग्रंथ मच्छिंद्राच्या नावावर आहेत. दुसऱ्या विभागात योगविषयक ग्रंथांचा व काही स्फुटांचा समावेश होतो. पहिल्या विभागातले सर्व ग्रंथ नेपाळच्या शासकीय ग्रंथालयातून उपलब्ध झाले आहेत.

मच्छिंद्राला सर्व भारतात आदराचे स्थान आहे; पण नेपाळमधले नेवार लोक त्याला विशेष मानतात. नेवारांच्या प्रमुख उत्सवात मच्छिंद्रनाथाचा उत्सव सर्वांत मोठा असतो. नेवारांचा तो कृषिदेव आहे. त्याच्या कृपेमुळेच पाऊस पडतो व पीक भरपूर येते, असे ते मानतात. लाल रंगाचा एक लाकडी ठोकळा या स्वरूपात ते त्याची पूजा करतात. नेपाळमध्ये मच्छिंद्राला काहीसा बौद्ध रंग चढला आहे. तिथे तो अवलोकितेश्वराचा अवतार समजला जातो. पाटण येथे मच्छिंद्राचे एक मंदिर आहे. उत्सवापूर्वी सहा महिने हा त्या मंदिरात असतो व उत्सवानंतर बाघमतीच्या तीरावर असलेल्या दुसऱ्या मंदिरात राहतो. तेच त्याचे मुख्य घर होय. एकदा नेपाळात दुष्काळ पडला असता गोरखनाथाने त्याला तिकडे नेले व त्याच्या तिथे जाण्यानेच दुष्काळ दूर झाला, अशी कथा नेपाळात प्रचलित आहेत. नेवारांप्रमाणेच गुरख्यांचाही तो उपास्य देव आहे. पाहा– गोरखनाथ.
[गो. च. प.; ना. सं.; नवनाथकथासार; सि. सि. प.; मि. म.]

मज्झिमनिकाय

बौद्ध धर्मग्रंथ. हा त्रिपिटकाच्या सुत्तपिटक या दुसऱ्या पिटकातील एक भाग आहे. याला मज्झिमनिकाय म्हणण्याचे कारण यात मध्यम आकाराची सूत्रे आहेत. सूत्रांची संख्या १५२ आहे. मूल परियाय, सीहनाद, ओपम्म, महायमक, चूलयमक, गहपती, भिक्खू, परिब्बाजक, राज, ब्राह्मण, देवदह, अनुपद, सुञ्ञता, विभंग व सळायतन अशा पंधरा वर्गांत मज्झिमनिकायाची विभागणी केलेली आहे.

श्री. राहुल सांकृत्यायन यांनी या ग्रंथाला बुद्धवचनामृत असे म्हटले आहे. पहिल्या मूल परियाय वर्गात बुद्धाने अनात्मवाद आणि अनासक्तिवाद यांचा उपदेश केला आहे. सीहनाद वर्गात बुद्धाने स्वतःच्या तपस्येचे वर्णन केले आहे. याशिवाय आर्यसत्ये, नरदेहाची असारता, निर्वाणप्राप्तीतील अडथळे, ब्रह्मचर्याचे उद्देश, महाभिनिष्क्रमण, संबोधी व धर्मचक्रप्रवर्तन यांचे वर्णन; तसेच भिक्षूंची कर्तव्ये, आर्य अष्टांगिक मार्ग, बुद्धाचा राहुलाला उपदेश, बुद्धाच्या एका पूर्वजन्माची कथा, गृहत्यागापासून बोधिप्राप्तीपर्यंतच्या जीवनाचे बुद्धाने स्वमुखाने केलेले वर्णन, महापुरुषलक्षणे, आत्मपीडानिंदा, अनात्मवाद, तृष्णा व दुःख यांचे निरूपण, इ. विषय यात आलेले आहेत.

सनपूर्व ६ व्या व ५ व्या शतकातील भारतातील लोकांचे सर्वसाधारण जीवन कसे होते, याची कल्पना मज्झिमनिकायावरून येते. तसेच त्या काळातील थोडी ऐतिहासिक व भौगोलिक माहितीही मिळते. बुद्धकालीन भारतातील धार्मिक वातावरणाचे चित्रही मज्झिमनिकायात पाहायला मिळते. ब्राह्मणांचे जीवन, कर्मकांड, त्यांचे सिद्धान्त, ब्रह्मायू, शैल, आश्वलायन, घोटमुख, चंकी, भारद्वाज, इ. ब्राह्मण दार्शनिकांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची मते, बौद्ध धर्माशी त्यांचा संबंध, इत्यादींविषयीची माहितीही त्यावरून कळते. तत्कालीन परिव्राजकांचे जीवन आणि दीघनख, संदक, सकुलादायी, इ. परिव्राजकांबरोबरचा बुद्धाचा संवाद हे यातले विषय महत्त्वाचे आहेत. तत्कालीन राजांचेही थोडे वर्णन त्यात आलेले आहे. मागंदिय सुत्तात आयुर्वेदाचे, वाहीतिय सुत्तात सुंदर कपडे बनविण्याचे आणि उपाली सुत्तात रंगविण्याच्या कलेचे थोडे वर्णन आहे. [पा. सा. इ.; भ. बु. द.]

मझवार

एक आदिवासी जमात. उ. प्रदेश, बंगाल, आसाम, मध्य प्रदेश व विदर्भ या भागांत या लोकांची वस्ती आहे. वांशिक दृष्टीने हे लोक गोंड व खरवार यांना जवळचे आहेत. यांच्यांत अनेक देवके असून, त्यांना वृक्ष, पशू, पक्षी त्यांची नावे असतात. समान देवके असलेल्या कुळांत परस्पर लग्नसंबंध होत नाहीत. यांच्या पूर्वजांना एका कासवाने वाचवले होते, अशी आख्यायिका ते सांगतात. त्यामुळे ते कासवाची हत्या करीत नाहीत.

आत्मा अमर आहे, असे हे लोक मानतात. काही आत्मे आपल्या पूर्वजन्मीच्या कुळातच पुन्हा जन्म घेतात किंवा कालवडीचा जन्म घेतात. म्हणून हे लोक कालवडींना फार मानतात व त्यांची खूप काळजी घेतात.

काही मझवार अजून जंगली जीवन जगत आहेत. पण पुष्कळ जण हिंदूंच्या संपर्कामुळे सुधारले आहेत. ते आपल्या बडा देवाला महादेव म्हणू लागले आहेत. दुल्हादेव हा यांचा खास देव आहे. दिहू व देव्हारीण या मझवारांच्या ग्रामदेवता होत. साल वृक्षाखाली दगडांचा एक ढीग असतो, तेच देव्हारिणीचे प्रतीक होय. तिथे एका भांड्यात पाणी व त्यावर झेंडा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फडकत असतो. देवीची बैठक मातीची असून, तिच्यावर तिला अर्पण केलेल्या वस्तू ठेवतात, कापूर व उदबत्ती लावतात. तिथेच होमही केला जातो. सर्व विधी बैगाच्या द्वारा करतात. देवीला पशुबळी देण्याची चाल आहे. हे लोक नागपूजक आहेत.

हे लोक करम वृक्षाचीही पूजा करतात. त्या वृक्षाची एक फांदी विधिपूर्वक कापून आणून गावात पुरतात व सर्व जण तिच्याभोवती नाचतात. त्या पूजेचा पावसाशी व सुबत्तेशी संबंध आहे.

यांच्यांत पितरपूजाही प्रचलित आहे. पितरांना पशुबळी देत नाहीत. मात्र स्वयंपाकघरात पितरांचे स्थान असते, तिथे मांसाचा नैवेद्य ठेवतात. विवाहसमारंभात पितरांना दारूचा नैवेद्य दाखवतात.

मझवार लोक वेताळ वगैरे भूतपिशाचांनाही भजतात. जो मनुष्य अपघाताने मरण पावतो, तो भूत बनतो व नातेवाइकांना त्रास देतो, अशी यांची समजूत आहे. अशा प्रकारे मेलेल्या माणसांचे आत्मे भूत बनून परत येऊ नयेत म्हणून काही प्रतिबंधक उपायही योजण्यात येतात. बर्वत नावाचा वेताळ सर्व भुतांचा राजा मानला जातो. गावातील देवळात एक पवित्र साखळी टांगलेली असते. ज्या तरुण मुलींना भूतबाधा होते त्यांना त्या साखळीने तडाखे दिले असता भूत पळून जाते, अशी या लोकांची समजूत आहे. जादूटोणा, दृष्टबाधा, शकुन यांवर या लोकांचा विश्वास असतो.

पतारी किंवा बैगा हे यांचे पुरोहित असतात. हिंदूंच्या संपर्कामुळे काही लोक धार्मिक विधींसाठी ब्राह्मणांना पुरोहित म्हणून बोलावतात.

बडा देवाच्या पूजेच्या वेळी स्त्रिया उपस्थित राहू शकतात; पण ग्रामदेवतांच्या पूजेला मात्र त्यांना जाता येत नाही. जेवणाच्या वेळी हे लोक भूमातेसाठी जमिनीवर थोडे अन्न टाकतात. [एन्सा. रि. ए.]

मटकीतरंग एक वाद्य. मातीच्या घटाला मटकी असे नाव आहे. वाद्य म्हणून मटकीचा उपयोग अनेक प्रांतांत करतात. मटकीच्या तोंडावर चामडे मढवून ते तबला, ढोलक किंवा मृदंग यांच्या ऐवजी वाजवतात. वाजाच्या पेटीच्या स्वरांशी मिळते जुळते स्वर ज्यांतून निघतात, अशी काही मटकी निवडून ती अर्धवर्तुळाकार मांडतात व लाकडाच्या हलक्या हातोडीने वाजवतात. वाजवताना मटकी हालू नयेत म्हणून त्यांच्या खाली धातूची कडी ठेवतात. सर्वसाधारणपणे मटक्यांची संख्या चौदा असते. पण रागाच्या अनुरोधाने ती कमी-जास्ती करतात. तसेच स्वरांत आवश्यक ते फरक करण्यासाठी त्यांत वाळू किंवा माती घालतात किंवा त्यांच्या गळ्याभोवती दोरीचे तुकडे बांधतात. मटकीतरंगाचा आवाज मधुर येतो. [श्री गणेशदत्त 'इन्द्र'– संगीत (वाद्यसंगीत अंक), जाने. १९५१]

मटन काश्मीरमधील एक तीर्थस्थान. श्रीनगरहून ४० मैलांवर पहेलगामी जाणाऱ्या मार्गात मटनगाव आहे. इथे एक प्रसिद्ध तळे आहे. याला स्थानिक लोक सूर्यदेवतेचे तळे मानतात. अबुलफज़लने ऐने अकबरीत या तीर्थाचे रसभरित वर्णन केले आहे. त्याच्या मते या तीर्थस्थानाचे एका मोठ्या तलावात रूपांतर केले गेले आहे. हा तलाव एका डोंगरावर आहे. यातील मासे पकडायला बंदी आहे. [म. क.]

मटिया मत एक पंथ. गुजरातमध्ये या पंथाचे अनुयायी आहेत. अहमदाबादपासून चौदा मैल दूर असलेल्या पिराना या गावी पंथाची प्रधान गादी आहे. हिंदूंप्रमाणेच मुसलमानही या पंथाचे अनुयायी आहेत. त्यातही कच्छमधील मोमिन लोकांचा या पंथात विशेष भरणा आहे.

पिराना गावी या पंथाचा दर्गा आहे. दर्ग्याला शिखर असून, त्यावर सोनेरी कळस आहे. दर्ग्यात तीन आत व एक बाहेर अशी चार थडगी आहेत. दर्ग्यावर पांढरा ध्वज असतो. सायंकाळी धूप फिरवून नगारा वाजवतात आणि प्रार्थना करतात. दर गुरुवारी रात्री मटिया मताची कथा वाचली जाते. या वेळी अन्य मतानुयायी लोकांना इथे प्रवेश नसतो.

या पंथाचा प्रमुख सामान्यतः हिंदू असतो. तो भगवा रुमाल व पांढरे वस्त्र वापरतो. हा महंत राजेशाही थाटात फिरतो. त्याच्या संचाराच्या वेळी वाद्ये वाजवली जातात. [भा. म. द.]

मटुकधारी उ. भारतातील एक वैष्णव संप्रदाय. या संप्रदायाचे अनुयायी मटुक नावाचा मुकुट धारण करतात, म्हणून यांना मटुकधारी असे म्हणतात. हे भिक्षेसाठी दारोदार जात नाहीत; तर ठराविक ठिकाणी उभे राहून, रामकृष्ण हा मंत्र म्हणत भिक्षा मागतात. [वै. शै. म. व.]

मठ साधू, संन्यासी व बैरागी यांच्या निवासस्थानाला मठ अशी संज्ञा आहे. आद्य शंकराचार्यांचे मठ भारताच्या चारही दिशांना आहेत. द. भारतात शैव व वैष्णव स्वामींचे आणि आचार्यांचे अनेक मठ आहेत. हे मठ कित्येकदा मंदिरांना लागून असतात किंवा कित्येकदा मंदिरे मठांना जोडलेली असतात. उदा० येवूरचा मठ स्वयंभू सोमनाथाच्या देवळाला जोडलेला आहे, तर त्र्यंकापूरच्या मठाला कदंबेश्वराचे मंदिर जोड-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लेले आहे. अशा मठांतून साधू, सत्पुरुष, महंत हे राहत असत व ते आल्यागेल्या पांथस्थाचा परामर्श घेत. जुन्या काळी प्रवाशांना अनोळखी ठिकाणी धर्मशाळेप्रमाणे मठ हेदेखील आश्रयस्थान होत असे. त्यामुळेच मठ बांधणे व लोकांसाठी पाणी मिळण्याची व्यवस्था करणे, ही कामे पुण्यकारक मानलेली आहेत.

जुन्या काळी अशा मठांतून विद्यार्थ्यांना विद्यादान होत असे. कित्येक मठांत अन्नसत्रे असत. विद्यार्थी व संन्यासी यांना तिथे विनामूल्य भोजन मिळे. राजेरजवाडे अशा मठांना उदार हस्ताने द्रव्यसाहाय्य करीत व जमिनीही इनाम देत.

ग्राशिवाय, जैन व बौद्ध यांचेही अनेक मठ होते व आहेत. बौद्धांच्या मठांना विहार म्हणतात. बुद्धाच्या काळातच असे अनेक विहार बांधले गेले होते. त्यानंतरच्या काळातही पुष्कळच विहार बांधले गेले व त्यांत हजारो भिक्षू राहू लागले. बौद्ध मठांत विद्यादानाचे कार्य मोठ्या प्रमाणावर चालत असे.

समर्थ रामदासस्वामी यांनी धर्मसंस्थापनेच्या हेतूने अकराशे विद्यामठ स्थापन केले होते, असे म्हणतात. पण सांप्रत त्यांपैकी एकशेदहा मठांचीच माहिती मिळते. वऱ्हाडापासून रामेश्वरापर्यंतच्या प्रदेशात हे मठ पसरलेले आहेत. पूर्वीच्या साधुसंतांच्या संस्कृत व प्राकृत ग्रंथांचा संग्रह या मठांत असे व त्यांचा तिथे अभ्यासही होत असे. या मठांच्या नेतृत्वाखाली रामनवमी व हनुमानजयंती हे उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होत असत. या मठांची योजना प्राचीन गुरुकुलांप्रमाणे होती.

सांप्रतही अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी निरनिराळ्या पंथांच्या स्वामींचे मठ दिसतात. [मु. पू. म.; प. सु.; ए. सि. ए. हिं.]

मठकोडका एक समारंभ. बिहारमध्ये लग्न ठरल्यानंतर प्रथम वधूची आई व काही सुवासिनी गाणी गात एकत्र विहिरीजवळ जातात, तिथे विहिरीतले पाणी काढतात आणि त्या पाण्याने जवळची थोडी जमीन सारवतात. नंतर त्या जागेवरची तांबडी माती खणून एका टोपलीत भरतात. ही टोपली एका स्त्रीच्या डोक्यावर देऊन त्या सर्वजणी घरी येतात. घरी आल्यावर अंगणात एक केळीचा खुंट व खुंटा पुरतात. मग त्याच्या जवळ वरील मातीची चूल घालतात. या साऱ्या कार्यक्रमाला मठकोडका असे म्हणतात. [बि. पे. ला.]

मठदान एक दान. शयनासनयुक्त मठ बांधून त्यावर तृणाचे आच्छादन करावे. आतील बाजूला वेदिका तयार करावी. मग पुण्यकाली ब्राह्मणाला किंवा यतीला हा मठ दान द्यावा. या दानाने सर्व मनोरथ पूर्ण होतात आणि मोक्ष मिळतो, असे स्कंदपुराणात म्हटले आहे. [दा. चं.]

मठाम्नायोपनिषद शंकराचार्यकृत एक गद्य उपनिषद. आचार्यांनी स्थापन केलेल्या पश्चिमेकडील शारदामठ, पूर्वेकडील गोवर्धनमठ, उत्तरेकडील ज्योतिर्मठ, दक्षिणेकडील शृंगेरीमठ, ऊर्ध्व दिशेला सुमेरुमठ, अधर दिशेला आत्माम्नाय मठ आणि जंबुद्वीपातील मठ या विविध मठांचे रूपकात्मक वर्णन हा या उपनिषदाचा विषय आहे. गुरु चैतन्याला वंदन करून उपनिषदाचा आरंभ केलेला आहे. पहिल्या पाच मठांत अनुक्रमे तत्त्वमसि, प्रज्ञानं आनन्दं ब्रह्म, अयमात्मा ब्रह्म, अहं ब्रह्मास्मि व संज्ञानं अनन्तं ब्रह्म या उपनिषद्महावाक्यांचा विचार होतो, असे यात सांगितले आहे. तसेच पहिले सात मठ अनुक्रमे कीटवारी, भोगवारी, आनंदवारी, भूरिवारी, काशी व सत्य या संप्रदायांचे अनुयायी असून, 'ॐ नमो नारायणाय' हा मंत्र मात्र सर्व मठांत सारखाच आहे, असे यात म्हटले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

मणिकर्ण हिमाचल प्रदेशातील एक सरोवर. शिवाच्या कानातील एक मणी या सरोवरात गळून पडला, म्हणून त्याला मणिकर्ण असे नाव मिळाले, अशी आख्यायिका आहे. हे उष्ण पाण्याचे सरोवर आहे. या पाण्यात यात्रेकरू तांदुळांची पुरचुंडी टाकतात. पाण्याच्या उष्णतेमुळें काही वेळाने त्या तांदुळांचा भात बनतो. यात्रेकरू या तीर्थात स्नान न करता गंगा-मणी संगमावर स्नान करतात. [पं. जी. सा.]

मणिकार एक प्राचीन जात. उशनसच्या मते क्षत्रिय पुरुष व वैश्य स्त्री यांची विवाहबाह्य संतती म्हणजे ही जात होय. परंतु या संदर्भात एकवाक्यता दिसत नाही. सूतसंहितेवरून कळते, की वैश्य पुरुष व वैश्य स्त्री यांची ही विवाहबाह्य संतती आहे. हे लोक मण्यांचे काम करतात, मोत्यांना वेजे पाडतात आणि शंख, पोवळी विकतात. तैत्तिरीय ब्राह्मणात अन्य व्यावसायिकांच्या बरोबर यांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे जातक ग्रंथातही मणिकारांचा उल्लेख आढळतो. विद्यापती, सूरदास, इ. मध्ययुगीन संतकवींनी मणिकारांचे उल्लेख केले आहेत. [हि. ध.; भा. सा. इ.; म. कृ. सा. जी. अ.]

मणिक्कवाचकर (इ. स. चे ४ थे शतक) त्रेसष्ट नायन्मारांपैकी एक. त्यांतही जे तिथे प्रमुख, त्यांतला हा एक आहे. हा तमिळनाडमधल्या तिरुवादऊर या गावचा रहिवासी होता. बालपणापासूनच याला शिवभक्तीचा नाद होता. पुढे हा संस्कृत व तमिळ या उभय भाषांचा पंडित बनला. त्याचे पांडित्य व चातुर्य पाहून मदुरेच्या अरिमर्दन पांड्य राजाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला आपला प्रधान नेमले; परंतु राजकाजात त्याचे मन रमेना. जन्मतःच जडलेल्या शिवभक्तीपुढे त्याला अन्य सर्व गोष्टी तुच्छ वाटू लागल्या. परिणामी त्याच्या हातून आपल्या अंगीकृत कार्यात चुका होऊ लागल्या. एकदा राजाज्ञेवरून तो काही अरबी घोडे खरेदी करायला जात असता, मार्गात त्याची एका शिवभक्ताशी गाठ पडली. एक शिवमंदिर उभारावे अशी त्या शिवभक्ताची इच्छा होती तथापि त्याच्या जवळ पुरेसा पैसा नसल्यामुळे तो चिंताक्रांत होता. मणिक्कवाचकराने तत्काळ अश्व खरेदीसाठी घेतलेले

मणिक्कवाचकर

आपल्या जवळचे सर्व पैसे त्या शिवभक्ताच्या स्वाधीन केले. ही वार्ता राजाला कळताच त्याला मणिक्कवाचकराचा राग आला आणि त्याने त्याला तुरुंगात टाकले. परंतु शिवाला आपल्या भक्ताची काळजी होतीच. त्याने काही चमत्कार करून मणिक्कवाचकरला बंधमुक्त केले. तुरुंगातून मुक्त होताच मणिक्कवाचकराने राजाच्या नोकरीचा त्याग करून तीर्थयात्रेचे प्रस्थान ठेवले.

मणिक्कवाचकर हा एक श्रेष्ठ तमिळ कवी असून, त्याची सर्व कविता तिरुवाचकम या संग्रहात संकलित केलेली आहे. त्याची भाषा सोपी, रचना सरळ व रसाळ आहे. पाहा—तमिळ भाषा व साहित्य. [तमिळनाडू]

मणिपुरी नृत्ये मणिपुरात प्राचीन काळापासून परंपरेने काही नृत्ये प्रचलित आहेत. ती वेषभूषेने संपन्न व विदग्ध वृत्तीची असतात. लाइहरोबा, खबक (टाळ्या वाजवून करायचे), इशरिचोलम् (गीतांच्या साथीवर करायचे), औग्रिहेंगल (यात्राप्रसंगी बाल-बालिकांनी संयुक्तपणे करायचे) व रासलीला (कृष्णचरित्रावर आधारित), ही मणिपूरमधली प्रमुख नृत्ये होत.

या सर्वांत लाइहरोबा हे नृत्य प्राचीन आहे. या नृत्याच्या उत्पत्तीविषयी एक लोककथा प्रचलित आहे. ती अशी –

एकदा दिव्यलोकी श्रीकृष्णाची गोपींसह रासक्रीडा चालली होती. शिवाला ते नृत्य पाहण्याची इच्छा झाली व त्याने श्रीकृष्णाला त्याविषयी अनुमती विचारली. त्यावर कृष्ण म्हणाला, ' हे नृत्य तुला पाहता येणार नाही. तू पाठ करून उभा राहा व त्यातले ताल, लय आणि पदाघात तेवढे ऐक. ' शिवाने त्याप्रमाणे केले; पण नृत्य ऐन रंगात आलेले ऐकताना त्याचे भान सुटले व त्याने नकळत नृत्याकडे तोंड केले. त्याच क्षणी ते नृत्य बंद झाले.

पण शिवाला त्यातला ताल सापडला होता; लय व संगीतही मिळाले होते. त्या आधारावर त्याने एका नव्या नृत्याची रचना करायचे ठरवले. पार्वतीसह तो ते नृत्य करणार होता. नृत्याची योजना मनात पूर्ण झाल्यावर त्याला त्यासाठी अनुकूल अशी भूमी हवी होती. ती शोधण्यासाठी तो पार्वतीसह कैलासावरून खाली उतरला. पर्वतश्रेणीतल्या एका दरीतली जागा त्याला आवडली; पण ती दरी पाण्याने भरलेली होती. शिवाने तत्काळ आपला त्रिशूळ त्या रोखाने फेकला. त्यासरशी पर्वत दुभंगला, आतले सारे पाणी निचरून गेले आणि तिथे एक प्रशस्त मैदान तयार झाले. मग पार्वतीसह शिवाने तिथे नृत्य केले. त्या नृत्याच्या वेळी शंकराच्या गळ्यातल्या शेषनागाने आपल्या फणेतल्या मण्याचा सर्वत्र प्रकाश केला. त्यावरूनच पुढे त्या प्रशस्त पठारी भूमीला मणिपूर म्हणू लागले.

हे नृत्य नंतर मानवांनी आत्मसात केले व त्याला लाइहरोबा हे नाव दिले. लाइहरोबा याचा अर्थ देव-देवतांबरोबर आनंद अनुभवणे असा आहे. कृषिदेवतांच्या प्रसादासाठी ते केले जाते. शेत-लावणीच्या पूर्वी एक महिना लाइहरोबाचा नृत्योत्सव होतो. हा उत्सव पाच ते दहा दिवस असतो. या कृषिदेवतांच्या पुजाऱ्यांना मैबा व पुजारिणींना मैबी म्हणतात. लाइहरोबाच्या विकासात मैबा-मैबींचा बराच हात आहे.

या नृत्यासाठी देवालयापुढे तरुण-तरुणी एकत्र जमतात. प्रत्येक तरुण नृत्यासाठी आपली तरुण मैत्रीण निवडतो. मग ही युगुले देवतेला फल-पुष्पांची ओंजळ समर्पून नृत्य सुरू करतात. मैबा-मैबी त्या नृत्याचे संचालन करतात.

याचे बारा प्रकार आहेत. हे विश्व देवाने कसे निर्माण केले व ते कोणकोणत्या तत्त्वांनी भरलेले आहे, ते भावभंगिमा, हस्तमुद्रा व अंगचालन या प्रकारांनी त्यात दाखवावयाचे असते. नृत्याचा आशय आध्यात्मिक असतो. शिवाय त्यात सृष्टिकर्त्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बद्दल कृतज्ञताही व्यक्त करायची असते.

नृत्य एका विशिष्ट अवस्थेला आले, की त्यांत खंबा आणि थोइबी यांचा प्रवेश होतो. हे मणिपुरातले एक प्राचीन प्रेमी युगुल होय. त्यांतला खंबा हा गरीब पण वीर युवक होता. थोइबी ही राजकुमारी होती. ती दोघे परस्परांवर अनुरक्त झाली; पण त्यांच्या मीलनमार्गात अनेक विघ्ने उपस्थित झाली. अखेरीस मात्र देवतांच्या कृपेने त्यांचे मीलन झाले.

या नृत्याला खोल, बासरी, घंटा, मंजीर व पेना यांची साथ असते. यांपैकी खोल हा मातीचा, मृदंगासारखा बनविलेला असतो. पेना हे चिकाऱ्यासारखे तंतुवाद्य असते.

नृत्याची वेषभूषा – नृत्यात भाग घेणाऱ्या स्त्रियांची वेषभूषा पुढीलप्रमाणे असते – कमरेला साडी, तिची चमकती किनार. साडीचा एक पदर कटिबंध म्हणून बांधलेला. हिरव्या खणाची चोळी. केस मखमलीने बांधलेले. हार, कंकणे, बाजूबंद, आंगठ्या, इत्यादी विपुल अलंकार. या अलंकारांना विलक्षण झळाळी असते. नर्तकाची वेषभूषा अशी – रेशमी धोतर. शरीराचा वरचा भाग उघडा. त्याच्याही अंगावर हार, बाजूबंद, इत्यादी दागिने असतात.

इ. स. च्या १५ व्या शतकात मणिपूरमध्ये चैतन्य मताच्या अनुषंगाने वैष्णव धर्म प्रविष्ट झाला. त्याचा परिणाम जसा कलेच्या इतर अंगांवर झाला, तसाच तो नृत्यावरही झाला.

नामकीर्तन नृत्य

मणिपुरी रासनर्तकी

त्यातून नामकीर्तन व रास ही दोन नृत्ये मणिपूरच्या भूमीवर अवतरली. त्यांपैकी नामकीर्तन हे पुरुषी नृत्य आहे. धार्मिक सणासुदीला त्याचे आयोजन होते. नर्तक धोतर नेसतो, अंगावर उत्तरीय घेतो, डोक्याला पगडी बांधतो, गळ्यात खोल अडकवतो आणि अर्धवर्तुळात किंवा वर्तुळात नाचतो. छातीशी आडवा खोल घेऊन पायाकडे झुकणे आणि पाठीमागे वाकणे, त्याचप्रमाणे एखाद्या सुकुमार वेलीप्रमाणे शरीर डौलदार वळवणे हे या नृत्याचे वैशिष्ट्य असते. हे नृत्य जोमदार असते व त्याला मंजीर, करताल, इ. वाद्यांची साथ असते.

वैष्णव धर्म प्रभावी झाल्या कारणाने साहजिकच मणिपूरच्या नृत्यकलेत राधा-कृष्णांना प्राधान्य मिळाले. राधा-कृष्णांच्या विलासात रासलीला प्रमुख होय. मणिपुरात प्रत्येक गावी राधा-कृष्ण किंवा कृष्ण-बलराम किंवा कृष्ण-चैतन्य यांची मंदिरे असतात. मंदिराला लागून रंगशाला असते. त्या ठिकाणी विविध प्रसंगी राधा-कृष्णांची नृत्ये होतात.

इ. स. च्या १८ व्या शतकाच्या अंतिम चरणात जयसिंह नावाचा महाराजा होऊन गेला. त्याला भाग्यचंद्र अशी उपाधी होती. तो नृत्यकलेचा भोक्ता असल्याने त्याने त्या कलेला बराच आश्रय दिला. त्याने गोविंदजीचे मंदिर बांधले. त्याच्या महाभिषेकप्रसंगी महारासलीला आयोजित केली. त्या नृत्यात राजकुमारी सीजालैरोइबी हिने राधेची भूमिका केली. ती त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवशी अशी काही नाचली, की त्यामुळे तिला रासेश्वरी ही पदवी मिळाली.

भाग्यचंद्राच्या पूर्वी मणिपूरमधली नृत्यें शैव प्रकृतीची होती. त्यांत लास्य व तांडव संमिश्र होते; पण भाग्यचंद्राने वैष्णव धर्म स्वीकारल्यावर या शिव-पार्वती नृत्यांचे राधा-कृष्ण नृत्यात परिवर्तन केले. त्याने वैष्णव परिवर्तनात लाइहरोबाचे पाच भाग पाडले, ते असे– (१) भंगी परेंग (२) वृंदावनी परेंग (३) खुरुम परेंग (हे तीन लास्य प्रकार) (४) गोष्ठभंगी व (५) वृंदावली (हे दोन तांडव प्रकार). मणिपुरात रासनृत्याचेही वसंतरास, कुंजरास, महारास व नित्यरास असे चार प्रकार असून, त्यांचे मासही निश्चित केलेले आहेत. वसंतरास वैशाखात होतो. त्यात कृष्णकृत राधेचा अनुनय व राधेने त्याला केलेली क्षमा, हे भाव दर्शविले जातात. कुंजरास आश्विनात होतो. त्यात राधा-कृष्णांचा संयोग शृंगार दाखवितात. विविध कुंजांमध्ये विविध रूपांत राधा-कृष्णांचा विहार दाखविणे, हे त्याचे वैशिष्टय असते. महारास कार्तिक महिन्यात होतो. त्यात विप्रलंभ शृंगार प्रामुख्याने असतो. कृष्ण राधेला टाकून जातो, ती विरहाने तळमळू लागते, कृष्णाविना जीवन असह्य झाल्याने ती प्राणत्यागाला उद्युक्त होते आणि मग कृष्णाला तिची दया येऊन तो पुन्हा तिला भेटतो, असे त्यात दाखवले जाते. नित्यरासाला मासाचे नियमन नाही. तो केव्हाही आयोजित करावा. त्यात विरह आणि मीलन यांचे छायाप्रकाश दाखवले जातात. ते जिवाशिवांचे नृत्य असते. जीवात्मा परमात्म्याच्या वियोगाने तळमळतो, त्याला चोहोकडे शोधू लागतो व शेवटी त्याच्याशी संयुक्त होतो, हा आशय नित्यरासात दाखवायचा असतो.

कृष्णचरित्राविषयी अनुरागात्मक भावना हा मणिपुरी रासलीलेचा प्राण आहे. हे नृत्य सहा-सात तास चालते. त्यात अधूनमधून संवाद असतात; पण नृत्याला प्राधान्य असते. रासलीलेत एखादा दहा-बारा वर्षांचा मुलगा कृष्णाचे काम करतो. याहून अधिक वयाच्या कुमाराला रासलीलेत स्त्रियांच्या बरोबर नाचण्याला परवानगी नसते.

रासनर्तकींचा पेहराव पुढीलप्रमाणे असतो– गोल, लाल रेशमाचा लहंगा. तो एकाच दिशेला फिरावा या दृष्टीने त्याच्या खालच्या अंगाला वेताच्या काडया लावून तो बंदिस्त केलेला असतो. त्यावर अर्धा लहंगा झाकला जाईल असे वस्त्र लपेटलेले असते. त्याला छोटे आरसे आणि अभ्रकाचे तुकडे जडवलेले असतात. अंगात तंग चोळी असते. तिचा रंगही भडक असतो. तिच्यावर चांदी जडवविलेली असते. सर्वांगावर अनेक झळाळते अलंकार असतात. केसांचा जटाजूट असतो. तो कधी मागे, कधी डोक्यावर, तर कधी डावी-उजवीकडे कलता असतो.

मुखावर सुगंधी द्रव्यांचा लेप असतो. या सर्वांगभूषित तनुलतेवर एक झिरझिरीत ओढणी असते. ती नर्तकीचे मुखही झाकून टाकते.

पीतांबर, मोरमुकुट, मुरली आणि वैजयंतीमाला अशी कृष्णाची वेषभूषा असते.

रासनृत्यांसाठी मंडप उभारतात. त्यात नृत्यासाठी जी जागा राखून ठेवलेली असते, तिला रासमंडल म्हणतात. नृत्यात भाग घेण्यासाठी विशिष्ट गायकांना निमंत्रण देतात. महारास असेल, तर अनेक नृत्यमंडळचा तिथे एकत्र जमतात. रासात चांगल्या प्रकारे भाग घेता यावा, म्हणून अनेक घरंदाज तरुणी नृत्याचे पद्धतशीर शिक्षण घेतात. रासलीलेत भाग घेणे म्हणजे उत्तम परलोकाची साधना करणे, अशी तिथल्या लोकांची श्रद्धा असते.

रासलीलेचा प्रारंभ कीर्तनाने होतो. प्रथम गीतगोविंदातल्या अष्टपद्या व गोविंदलीलामृताचा काही अंश यांचा पाठ होतो. मग सूत्रधार रासलीलेचा उपक्रम करतो. पाठोपाठ कृष्ण प्रवेशतो. थोडा वेळ त्याचे नृत्य होते. मग पार्श्वगीत सुरू होते. ते राधेच्या आगमनाची सूचना देते. राधेच्या मागून तिची वृन्दा नावाची सखी प्रवेशते. ती राधा-कृष्णांचे मीलन घडवून आणते.



मणिपुरी रासनृत्य

पाठोपाठ अनेक गोपी प्रवेश करतात. नृत्य हळूहळू गतिमान होते. नृत्य मध्यावर आले, की त्यात तुकडया-तुकडयांची भावनृत्ये होतात. त्यांना भंगी नृत्ये असे नाव आहे. त्यांत रुसवे, फुगवे, अनुनय, इ. भाव दर्शविले जातात. शेवटी अबीरखेल नृत्य होते. त्यात गोपी एकमेकींवर अबीर-गुलाल फेकतात व शेवटी कृष्णाची प्रार्थना करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मणिपुरी नृत्याची लोकप्रियता वाढवण्यात गुरुदेव रवींद्रनाथांना मोठेच श्रेय आहे. त्यांनी शांतिनिकेतनात मणिपुरी शैलीलाच नृत्य-शिक्षेचे माध्यम बनवले. त्यांनी त्या नृत्याला स्वतःच्या कल्पनेने नवे रूप आणि नवा आशय देण्याचा प्रयत्न केला. या नवरचनेत नृत्याचे अस्सल स्वरूप काही अंशी लुप्त झाले हे खरे; पण मणिपुरी नृत्याची तीच ती ठराविक चाकोरी पाहून पाहून कंटाळलेल्या रसिकांना त्यातून नवा रस आणि नवा आनंद मिळू लागला.

इ. स. च्या १६ व्या शतकात कछार, आसाम, त्रिपुरा एवढ्या भागांत मणिपुरी नृत्याचा प्रसार झाला. त्यानंतर ते सिल्हटमध्ये गेले. त्या प्रदेशात ललितमोहन कविराज, कृष्णदास स्वामी, इ. नृत्यपंडित निर्माण झाले. मणिपूरमध्ये चंद्रसिंह पंडित अचउवा, प्रिय गोपालसिंह नटराज, अमूदोनशर्मा व बिपिनसिंह हे नृत्याचार्य म्हणून प्रसिद्धी पावले. त्रिपुरामध्ये बुद्धिमंत सिंह, नवकुमारसिंह ठाकूर व वैकुंठसिंहनाथ ठाकूर हे नृत्याचार्य म्हणून गाजले. नवकुमारसिंहांनी मणिपुरी नृत्याचा ताफा घेऊन परदेशांचाही दौरा केला.

गौरीदेवी, मृदुला, लीना, नयना झवेरी या मणिपुरी शैलीच्या प्रसिद्ध नर्तिका होत.

मणिपुरी नृत्याची स्वभावगत वैशिष्टचे श्रीमती सरला सहगल यांनी सांगितली आहेत, ती अशी –

मणिपुरी लोक स्वभावतःच नृत्यप्रिय आहेत. तिथले स्त्रीपुरुष आणि मुले केवळ नाचण्यासाठी म्हणूनच नाचत असतात. त्या नृत्यांतून त्यांचे उत्साही, निरागस आणि अद्‌भुतप्रिय मन प्रकट होत असते. मणिपुरी नृत्य हे सर्वसामान्य लोकांचे नृत्य आहे. शास्त्रापेक्षा भावना आणि कल्पना यांच्याशी त्याचा जवळचा संबंध आहे. ते मूठभर धंदेवाईक लोकांची मक्तेदारी बनलेले नाही.

मणिपुरी नृत्यांची रचना पाश्चात्यांच्या ऑपेरा किंवा बॅले नृत्यासारखी आहे. या नृत्याचे तंत्र साधे आहे. इतर भारतीय अभिजात नृत्यांत तंत्र आणि पदन्यास यांना महत्त्व असते; पण मणिपुरी नृत्यात त्यांचा बडेजाव नाही. हातांच्या हालचालीही केवळ नृत्याचे सौंदर्य वाढवण्यासाठीच असतात. त्यामुळे ही नृत्ये आत्मसात करायला फार वेळ लागत नाही.

मणिपुरी नृत्यात काव्यात्मक सौंदर्य, नाजूक आविर्भाव आणि रंगीत झगमगती वेषभूषा यांवर अधिक भर असतो. तसे पाहिले तर मणिपुरी नृत्य हे भारतीय नृत्यशास्त्रात बसत नाही. नृत्यशास्त्रात नृत्ताला महत्त्व दिलेले असते; पण मणिपुरी शैलीत नृत्त हा प्रकारच नाही. त्यात शरीराची डौलदार वक्रता नाही, मोठ्या उड्या नाहीत आणि चपल गतिमानताही नाही. त्यातल्या सगळ्या हालचाली लहरत्या लाटांसारख्या असतात. ते सांघिक नृत्य असते. काही नागा लोकांची युद्ध-नृत्ये सोडल्यास मणिपुरी नृत्ये ही बायकी स्वभावाची आहेत. [मार्च ऑफ इंडिया, फेब्रु. १९५८; धर्मयुग, ३० ऑगस्ट १९६४; डा. इं.; संमेलन-पत्रिका, लोकसंस्कृति अंक, १९५४]

मणिपुरी भाषा व साहित्य

मणिपूर प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषेला मणिपुरी असे नाव आहे. हिला मैतैरोल असेही म्हणतात.

मणिपुरी भाषेची उत्पत्ती केव्हा झाली व ती किती प्राचीन आहे, याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. पण त्याविषयी एक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी –

हरिचकमधे (सत्ययुगात) अतिया गुरुशिदवाने (शिवाने) मणिपूरच्या भूमीची निर्मिती करून ती आपली क्रीडाभूमी बनवली. नंतर त्याने सनामही व पाखंग-बा या आपल्या दोन पुत्रांना मणिपुरी भाषेत शिक्षण दिले. तसेच, शिवाने आपल्या शिष्यांना शिबिगा (शिवाज्ञा) नामक धर्मग्रंथ शिकवला. प्रथम त्याने जे अक्षर शिष्यांना शिकवले, त्याचे नाव शिवाखर (शिवाचे अक्षर) असे होते. शिवाने आपल्या शिष्यांना व पुत्रांना असा वर दिला, की या अक्षराचे ज्ञान झाल्याबरोबर त्यांना सर्व साहित्य ज्ञात होईल. हाच मणिपुरी भाषेचा व लिपीचा जन्मकाल होय.

प्राचीन मणिपुरी भाषेला लेखनपद्धती नव्हती व तिच्यात प्रार्थनांशिवाय अन्य काही साहित्य नव्हते, असे काही विद्वान सांगतात. मणिपुरी भाषेला लिखित रूप प्राप्त झाले, ते पाखंग-बा राजाच्या काळात. इ. स. ३३ च्या सुमारास पारवंग-बा मणिपूरचा राजा झाला. याच्या काळात प्रथमच मणिपुरी भाषेत कविता व कथा लिहिल्या गेल्या. त्यानंतर इ. स. ६६३मध्ये नाओथिखोंग राजाच्या काळात लांगोन कुरुंबा नामक एक कवी होऊन गेला. त्याच्या चकपा-रोल या काव्यात युगनिर्मितीची कथा दिलेली आहे. इ. स. ७६५मधे खोंगतेकचा याने ताम्रपटावर लिहिलेला शिबबू फंग-नवा लाइरिक (शिवप्राप्तीचा ग्रंथ) नामक एक धार्मिक ग्रंथ उपलब्ध आहे. 'ओ ३ म श्रीं खोगा असिरमा रिं स्वाहा' या मंत्राच्या उच्चारणाने शिवाची प्राप्ती होते, असे यात सांगितले आहे.

यानंतर इ. स. १०७४ पर्यंत मणिपुरी साहित्यात काही भर पडली नाही. त्यानंतर ११९५ पर्यंत खंबा थोईबी व नुरा नहा ही दोन काव्ये, मैते पुया (मणिपुरी पुराण) व राज्यकारभारासंबंधी काही ग्रंथ एवढे साहित्य मणिपुरीत निर्माण झाले. यानंतरच्या कालात मणिपुरी भाषा व साहित्य यांवर संस्कृतचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रभाव पडायला सुरवात झाली. इ. स. १४७१ ते १६८८ या कालात मणिपूर प्रदेशात ब्राह्मणधर्माने प्रवेश केला, तेव्हापासून तिथे धार्मिक वाङमय निर्माण होऊ लागले. इ. स. १४७१मधे कुमाबा नामक मणिपूरच्या इतिहासलेखनाला प्रारंभ झाला.

इ. स. १७३२मधे मणिपूरमधे एक धर्मयुद्ध झाले. त्या वेळी सिल्हेटहून शांतिदास शर्मा नावाचा एक पंडित मणिपुरात गेला. तो रामानंदी पंथाचा प्रचारक होता. त्या वेळचा राजा गरीब निवाज याने त्याचे स्वागत केले व त्याला आश्रय दिला. राजाने रामानंदी पंथाचा स्वतः स्वीकार केला व प्रजेनेही तो स्वीकारावा, अशी इच्छा प्रकट केली. पण त्या वेळच्या मूळ धर्मगुरूने या नव्या पंथाला विरोध केला. 'आपल्या धर्मापेक्षा हा काही वेगळा धर्म नाही. तेव्हा लोकांनी त्याचा स्वीकार करण्याची गरज नाही.' असे त्याने सांगितले. बहुसंख्य लोकांनी त्याचे म्हणणे मानले. त्यामुळे राजा नाराज झाला. राजा आणि प्रजा यांच्यामधे धर्मयुद्ध झाले. शांतिदासाच्या प्रेरणेने राजाने मणिपुरी भाषेतील सर्व प्राचीन व तत्कालीन ग्रंथ जाळून टाकले. याशिवाय राजाने असाही हुकूम काढला, की लोकांनी मणिपुरी भाषेत गीते गाता कामा नयेत व भजन-कीर्तनही करता कामा नये. तसे केल्यास पाप लागेल. लोकांनी त्यामुळे मणिपुरी भाषेतील गीते गाणे सोडून दिले.

या राजाच्या कालात मणिपूर, मणिपुरी भाषा व मणिपुरी जाती यांचे इतिहास लिहिले गेले. तसेच याच कालात अङोम कवीने मणिपुरी भाषेत रामायण व महाभारत यांचे अनुवाद केले. कवितेचाही विकास याच्या काळात झाला. या काळात गायिली जाणारी काही लोकगीते अद्यापही लाइहरोबा नृत्याच्या वेळी म्हटली जातात. त्यांतील एक गीत असे —

> चींग - दा शातपा इडेलले,
> चिननदना केनखिबा,
> कल्लक्इबा कल्लक्इ ।
> ऐना केनगे केनदेदो,
> मालंग - बना हुमबगी,
> केनबनि, हा केनबनिदे ।
> मालंग - ब ऐसु कँदौदे,
> लैरांग - ना लैखोक लोईबगी,
> केनबनि हा केलबनिदे ।

भावार्थ — हे डोंगरांत उगवलेल्या फुला, तोडून तुझा उपयोग केल्याशिवाय तू आपण होऊन गळून पडलेस आणि तुझा नाश झाला, हे पाहून मला दुःख होत आहे. यावर फूल म्हणते, की मी काही माझ्या इच्छेने नाही गळून पडले. वाऱ्याच्या जोराने माझ्या पाकळ्या गळून पडल्या. फुलाचे बोलणे ऐकून वारा म्हणतो, की शिळे झाल्यामुळे फूल आपोआप गळून पडले.

इ. स. १७५९ ते १८११ या कालात मणिपुरी साहित्यात पूर्ण परिवर्तन झाले. संस्कृत आणि बंगाली या भाषांशिवाय मणिपुरी भाषेत ब्रज व हिंदी या भाषांतील शब्दही येऊ लागले. या काळातील राजांनां बंगाली भाषेबद्दल फार आकर्षण वाटू लागले आणि ते मणिपुरी साहित्य बंगाली लिपीत लिहू लागले. पण इ. स. १८९१ ते १९२० या कालात ही स्थिती पालटली आणि मणिपुरी साहित्याचा पुन्हा विकास सुरू झाला. त्या वेळचा मणिपूरचा महाराजा चूडाचांद सिंह हा मातृभाषेचा भक्त होता. त्यामुळे या वेळचे लेखकही मणिपुरीत लेखन करू लागले. अनेक प्रतिभाशाली कवी, कथाकार, नाटककार, निबंधकार व कादंबरीकार मणिपुरीत निर्माण झाले. श्री. हिजम अङाहल सिंह, ख्वाइराकपम चाउबा सिंह, डॉ. कमल सिंह, अंरांबम दरेंद्र सिंह, इ. कवी हे या काळातील प्रमुख कवी होत. श्री. कमल सिंह यांनी मणिपुरी भाषेत प्रथमच माधवी नामक कादंबरी व देवयानी नामक नाटक लिहिले. ख्वाइराकपम चाउबा सिंह व राजकुमार शीतलजीत सिंह हे दोघे आधुनिक मणिपुरी भाषेतील प्रसिद्ध कादंबरीकार आहेत. नाटककारांत श्री. ललित सिंह यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे; तर कथाकारांत राजकुमार शीतलजीत सिंह, रजनीकांत सिंह व एलांग बम हे उल्लेखनीय आहेत. मणिपुरी भाषेत सांप्रत व्याकरणग्रंथ व शब्दकोशही तयार झाले आहेत. [कवि — श्री माला - मणिपुरी, श्री. छत्रध्वज शर्मा, १९६२]

मणिपूर आसाम व ब्रह्मदेश यांच्यामध्ये असलेला एक केंद्रशासित प्रदेश. पूर्वी याचा विस्तार बराच मोठा होता, असे म्हणतात. पण सध्या याचे क्षेत्रफळ सुमारे ८,५०० चौरस मैल आहे. याचा नऊ-दशांश भाग डोंगराळ असून, सर्व प्रदेश अत्यंत रमणीय आहे. याला पूर्वी मेकलाय, कासी, मकेली, मागली, मोगलन, इ. अनेक नावे होती. महाभारतात मणिपूरचा उल्लेख आहे. तेथील राजकन्या चित्रांगदा हिचा अर्जुनाशी विवाह झाला होता. तिला अर्जुनापासून एक पुत्र झाला, त्याचे नाव बभ्रुवाहन. पुढे त्याने एका युद्धात अर्जुनाचा पराभवही केला. मात्र महाभारतातील मणिपूर आणि आसामजवळील मणिपूर भिन्न आहेत, असे अनेक पंडितांचे मत आहे. पूर्व भारतातील मणिपूरविषयी पुराणात कथा आहे, ती अशी —

फार प्राचीन काळी या जागी समुद्र होता. पुढे अनेक देवतांनी त्या समुद्रात माती टाकून हा भूभाग निर्माण केला. नंतर शंकर-पार्वती रास—नृत्य करण्यासाठी तिथे अवतरले; पण त्यांना कोरडा, सपाट प्रदेश कुठे सापडेना. म्हणून शंकराने आपल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्रिशूळाने डोंगर फोडून सर्व पाण्याचा निचरा केला. त्यामुळे तिथे वसाहतीला योग्य अशी भूमी तयार झाली.

भारतात आर्यांनी वसाहती केल्या, त्यांच्या पूर्वीच मणिपूरमध्ये एक स्वतंत्र, सुसंस्कृत राज्य नांदत होते, असा पुरावा उपलब्ध झाला आहे. परंतु इ. स. च्या ८ व्या शतकापर्यंतचा मणिपूरचा इतिहास अगदी अज्ञात आहे. त्या काळातील काही पौराणिक कथा प्रसिद्ध आहेत. पृथ्वीची उत्पत्ती, शंकराचे रासनृत्य, गुरू व पुरोहित यांचे आगमन, देवादिकांचे संग्राम हे त्यांचे विषय आहेत. गुरू व पुरोहित म्हणजे भारतातून तिकडे गेलेले आर्य संस्कृतीचे प्रसारक असावे. त्या काळी मणिपुरी लोकांना फक्त नऊ देव परिचित होते. त्यांतील शिव-पार्वती यांना विशेष मान होता. पुढे पुराणांच्या प्रभावामुळे देवतांची संख्या वाढली आणि हरी हा देव सर्वश्रेष्ठ मानला जाऊ लागला.

इ. स. च्या ८ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंतच्या काळात मणिपूरमध्ये ३६ राजे होऊन गेले, असे म्हणतात. पण त्या काळात भोवतालच्या नाग व इतर अनार्य टोळ्यांनी मणिपूरवर आक्रमणे केली आणि त्यामुळे तिथली आर्य संस्कृती बहुतेक लुप्त झाली. इ. स. च्या १३ व्या शतकात एका चिनी सेनादलाने मणिपूरवर आक्रमण केले होते; पण ते पराभूत झाले. त्या सर्व सैनिकांना कैद करण्यात आले व त्यांची एक वसाहत स्थापण्यात आली. त्याच लोकांनी रेशमी वस्त्रे विणण्याची कला व विटांची घरे बांधण्याचे शास्त्र मणिपुरी लोकांना शिकविले, असे म्हणतात.

इ. स. च्या अठराव्या शतकाच्या प्रारंभी पाम्हैबा नावाचा राजा मणिपूरच्या गादीवर बसला. त्याचा जन्म राजघराण्यात झाला होता. पण त्याचे बाळपण एका नाग सरदाराच्या घरी गेले होते. तो फार पराक्रमी होता. त्याने ब्रह्मदेशाच्या राजधानीपर्यंत स्वारी करून विजय मिळविला होता. तो गरिबांचा वाली होता, म्हणून त्याला गरीबनिवाज हे नाव मिळाले होते. त्याच्या कारकीर्दीत महंत शांतिदास नावाचा एक वैष्णव साधू भारतातून मणिपूरमध्ये गेला. त्याच्या उपदेशाचा राजाच्या मनावर परिणाम झाला व त्याने वैष्णव धर्माला राजधर्म म्हणून मान्यता दिली. प्रारंभी त्या पंथाचे नाव रामानंदी असे होते. त्याने राम व हनुमान यांची मंदिरे बांधली. अशा प्रकारे भारतीय संस्कृतीचा प्रभाव मणिपूरवर पुन्हा पडू लागला.

मणिपूरमध्ये आर्य, द्रविड, मंगोल, शान, अनार्य, इ. सर्व लोकांनी वसाहती केल्या. पण कालांतराने हे सर्व लोक एकमेकांत मिसळून गेले. इथले सर्व लोक आता मइतेइ या नावाने ओळखले जातात. ते बहुतेक सर्व क्षत्रिय आहेत. भारताच्या इतर भागातून जे ब्राह्मण तिकडे गेले, ते अजून आपले उच्च स्थान संभाळून राहिले आहेत. पूर्वी त्यांचे व क्षत्रियांचे विवाहसंबंध होत असत; पण आता ते बंद झाले आहेत. कालांतराने जे मुसलमान तिकडे गेले, त्यांची वेषभूषा व त्यांच्या चालीरीती मात्र वेगळ्या दिसून येतात.

बहुतेक लोक खेड्यात राहून शेतीचा व्यवसाय करतात. सूत काढून कापड विणणे हा त्यांचा मुख्य ग्रामोद्योग होय. त्यात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने भाग घेतात. खरेदी-विक्रीचा उद्योगही बहुतेक स्त्रियाच करतात. तिथल्या स्त्रिया उद्योगी व हुशार असून, त्यांना समाजात बराच मान असतो. त्यांना पतीची निवड करण्याचे स्वातंत्र्य असते. मात्र समाजात स्त्रियांची संख्या अधिक असल्यामुळे एका पुरुषाला अनेक बायका असतात. तरुण व तरुणी आपापले विवाह स्वतःच सहजपणे ठरवतात. हुंडा घेण्याची चाल नाही. लग्नसमारंभ विशेष गाजावाजा न करता पार पडतात. त्यांच्यांत घटस्फोट व विधवाविवाह प्रचलित आहेत.

मणिपुरी लोक कलाप्रिय असून, त्यांना फुलांची आवड आहे. ते अत्यंत स्वच्छ राहतात. त्यांची घरे स्वच्छ व शोभिवंत असतात. ते शाकाहारी आहेत. त्यांचा पोपाख साधा असतो. अंगाला चंदन लावण्याची त्यांना आवड आहे.

इ. स. च्या सतराव्या शतकात होऊन गेलेल्या खागेंबा नामक राजाने अशी आज्ञा काढली, की १६ वर्षांहून जास्त वयाच्या प्रत्येक पुरुषाने ४० दिवसांत १० दिवस सरकारी कार्यालयात विनामूल्य काम केले पाहिजे. त्या पद्धतीला लल्लुप म्हणत. इ. सं. १८९२ मध्ये चूडाचांद सिंह नामक राजाने ती प्रथा बंद केली.

पूर्वी मणिपूरमध्ये शिक्षणाची अगदी अनास्था होती. इ. स. १८५५ पर्यंत तिथे एकही शाळा नव्हती. ब्राह्मणांव्यतिरिक्त कोणीही विद्यार्जन करीत नसे.

मणिपूरचे रहिवासी बहुतेक शिवभक्त आहेत. वैष्णव पंथाचा प्रसार झाल्यानंतरही तिथला शैव पंथ नष्ट झाला नाही. विश्वाचा जनक जो परमेश्वर त्याला मणिपुरी लोक गुरू म्हणतात. त्याचा पुत्र पाखेंबा हा सर्पाच्या रूपात वावरतो, तोच सर्व लोकांचे रक्षण करतो व त्याच्यापासून तिथला राजवंश उत्पन्न झाला, अशी समजूत रूढ आहे. पांथइबी, नूंगशाबा, सानमाही, इमुंग्लाइ, इ. देवतांचे भजन-पूजनही काही लोक करतात.

इ. स. च्या अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पाम्हैबाचा नातू भाग्यचंद्र याच्या राजवटीत बंगालमधील वैष्णव पंथाच्या लोकांनी श्री. प्रेमानंद ठाकुर यांच्या नेतृत्वाखाली मणिपूरमध्ये गौडीय वैष्णव पंथाचा प्रसार केला. तेव्हापासून रामानंदी पंथ मागे पडला. गौडीय वैष्णव पंथाचे धर्मग्रंथ व कथा-कीर्तने बंगाली भाषेत असल्यामुळे त्या भाषेचाही तिथे प्रसार झाला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मणिपुरी लोक मैतैरोल नावाची भाषा बोलतात. ती साधी व मधुर आहे. ग्रियर्सनच्या मते ती भाषा कुकी-चिन भाषा समूहातली आहे. त्या भाषेची वेगळी लिपी होती; पण ती आता लुप्त झाली आहे.

राजा भाग्यचंद्र हा ललितकलांचा भोक्ता होता. त्याने साहित्य व संस्कृती यांच्या विकासाला पुष्कळ उत्तेजन दिले. त्यानेच लाइहरोबा या प्राचीन शैव प्रकृतीच्या लोकनृत्याला वैष्णव रासलीलांचे स्वरूप दिले.

मणिपुरी स्त्रिया विणकामात अत्यंत कुशल आहेत. प्रत्येक स्त्रीला सूत कातून कापड विणता येते. कपड्यांवर सुरेख कशिदा काढण्यातही त्या कुशल आहेत. प्रत्येक स्त्री पानेक नावाची चादर राष्ट्रीय वस्त्र म्हणून वापरते. तिचा रंग गर्द निळा-तांबडा असतो. तरुण स्त्रिया उघड्या खांद्यावर अत्यंत तलम असा दुपट्टा गुंडाळतात.

मणिपुरी लोकजीवनात नृत्याला विशेष स्थान आहे. मणिपुरी नृत्ये फारच प्रेक्षणीय आणि प्रसिद्ध आहेत. लोकनृत्यांपैकी थांबल चंग्बा हे नृत्य अत्यंत लोकप्रिय आहे. वसंत ऋतूत सर्व तरुणतरुणी आनंदाने बेहोष होऊन रात्री, चांदण्यात हा नाच करतात. वैशाखात प्रत्येक गावात लाइहरोबा नामक नृत्य केले जाते.

मणिपूरमध्ये यौशांग दलजत्रा हा सण सर्वांत महत्त्वाचा मानला जातो. दुर्गापूजा, दिवाळी, इ. उत्सवही साजरे केले जातात. बहुतेक कुटुंबांत राधागोविंदांच्या मूर्ती असून, त्यांची रोज पूजा केली जाते. लाइहरोबा व चैरोबा हे जुने उत्सवही अजून चालू आहेत. त्यांत नृत्यालाच प्राधान्य असते.

पोलो या खेळाचा उगम मणिपूरमध्ये इ. स. च्या सोळाव्या शतकात झाला. इतरत्र हा श्रीमंत लोकांचा खेळ मानला जातो; पण मणिपूरमध्ये मात्र साधा खेडूतही आपल्या तट्टावर बसून हा खेळ खेळताना दिसतो. [हिस्टरी ऑफ मणिपूर– श्री. ज्योतिर्मय राय, १९५८; फोकलोअर, जुलै–ऑगस्ट १९६१; लौ. नी.; मार्च ऑफ इंडिया, जुलै १९५६; आजकल, सप्टें. १९६१]

मणिपूरचक्र योगविद्येतील एक चक्र. हे नाभीजवळ मेरुदंडात असते. तेज हे याचे तत्त्व असल्यामुळे, ते रत्नाप्रमाणे चमकते, म्हणन याला मणिपूर हे नाव मिळाले आहे. याचे अग्नि-बीज रं हे रक्तवर्ण असून, ते मेषारूढ आहे. याचे स्थान त्रिकोणी असून, रुद्र ही याची देवता व लाकिनी ही शक्ती आहे. मणिपूर चक्राचे ग्रंथोक्त वर्णन असे –

तस्योर्ध्वे नाभिमूले दशदललसिते पूर्णमेघप्रकाशे
नीलाम्भोजप्रकाशैरुपहितजठरे डादिफान्तैः सचन्द्रैः ।
ध्यायेद्वैश्वानरस्यारुणमिहिरसमं मण्डलं तत् त्रिकोणं
तद्बाह्ये स्वस्तिकाख्यैस्त्रिभिरभिलसितं तत्र वह्नेः स्वबीजम् ।

अर्थ – स्वाधिष्ठान चक्राच्या वर, नाभीच्या मुळाशी, कृष्णवर्ण, दहा पाकळ्या असलेले कमळ आहे. त्या पाकळ्यांवर अर्धचंद्रयुक्त अशी ड ते फ ही दहा अक्षरे आहेत. अशा प्रकारच्या कमळावर बालसूर्याप्रमाणे तेजस्वी अशा अग्नीच्या त्रिकोणात मंडलाचे ध्यान करावे. त्या मंडलाच्या बाहेर तीन स्वस्तिके आणि मंडलाच्या आत अग्नीचे बीज असते.

पूषा व अलंबुषा या नावाच्या दोन नाड्या इथूनच निघतात. या नाड्या कानापर्यंत पोचलेल्या आहेत. शब्दग्रहणासाठी यांचा उपयोग होतो. शुक्ला नावाची आणखी एक नाडी



मणिपूरचक्र

इथूनच निघून भ्रूमध्यप्रदेशापर्यंत जाते. नाभिमंडलात्मक नाडीचक्रापासून उत्पन्न झालेल्या तीनही नाड्या अधोमुख असून राका, सिनीवाली व कुहू अशी त्यांची नावे आहेत. राका नाडी शुक्रविमोचन करते.

मणिपूरचक्रापासून आणखी एक महत्त्वाची नाडी उगम पावते, तिला शंखिनी म्हणतात. ही नाडी अन्नरसाचे ओजोधातूपेक्षाही उत्तम असलेले सार डोक्याच्या कवटीपर्यंत वाहून नेते. [योगविद्या; स. पॉ.; सुबोध स्तोत्रसंग्रह]

मणिभद्र एक यक्ष. रजतनाभ आणि भद्रा यांचा पुत्र. हा यक्षांचा सेनापती मानला जातो. याचे निवासस्थान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुठे आणि कसे आहे, याविषयी वायू पुराणात माहिती दिली आहे, ती अशी– कैलासाच्या ईशान्येस दिव्यसत्त्व आणि औषधी यांनी युक्त, देवोचित धातूंनी मंडित आणि विचित्र अशा सुवर्णपर्वताच्या सन्निध चंद्रप्रभ नावाचा एक पर्वत असून त्याच्यावर मणिभद्र आपल्या अनुचरांसह निवास करतो. त्याचा निवास मंदरगिरीवर असल्याचे महाभारतात म्हटले आहे. डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांच्या मते सांप्रत माणा नावाने ओळखले जाणारे बदरीनाथाजवळचे शिखर हेच मणिभद्राचे निवासस्थान असावे.

यक्षमंडलात कुबेराच्या खालोखाल याला महत्त्व असून, बृहत्कथामंजरीत त्याला कुबेराचा भाऊ म्हटले आहे. त्याच्या पत्नीचे नाव मदनमंजरी असे होते. शिवाचे जालंधर दैत्याशी जे युद्ध झाले, त्यात मणिभद्राने वीरभद्राच्या तोडीचे शौर्य गाजवले होते (पद्म पु. उत्तर. १३·५५).

महाभारतात मणिभद्राचे उल्लेख कमी प्रमाणात आढळत असले, तरी त्या ठिकाणी त्याला दिलेले धनद हे विशेषण महत्त्वाचे आहे. त्याच्या धनद या स्वरूपावर प्रकाश टाकणारी एक कथा शांतिपर्वात (२७१) दिली आहे, ती अशी –

एका दरिद्री ब्राह्मणाने यज्ञासाठी द्रव्य मिळावे म्हणून कुंडधार नावाच्या एका मेघाची देव म्हणून उपासना आरंभली. कुंडधार ब्राह्मणावर प्रसन्न झाला. त्याच्या कृपेने ब्राह्मणाला दिव्य दृष्टी लाभली. त्या दृष्टीने त्याला मणिभद्राचे दर्शन घडले. कुंडधाराच्या विनंतीवरून मणिभद्र त्या ब्राह्मणाला द्रव्य देण्यास तयार झाला. पण ब्राह्मणाला द्रव्य नको होते; तर धर्मबुद्धी हवी होती. मणिभद्राला त्याबद्दल आश्चर्य वाटले; पण त्याने ब्राह्मणाच्या इच्छेनुसार त्याला धर्मबुद्धी दिली.

धनद या स्वरूपामुळेच मणिभद्र हा महाभारतकालापासून वणिग्जनांचा व सार्थवाहांचा आराध्य देव ठरला होता. भक्तांना धन व राज्य देणारा, गुप्त धनाचे रक्षण करणारा, वैश्य वर्गाची वाणिज्यवृद्धी करणारा आणि सेवेत अंतर पडल्यास तशा प्रमादी लोकांना संकटात पाडणारा म्हणून मणिभद्राची महाभारतकालापासून ख्याती आहे.

जैनांचा तो परमश्रद्धेय देव आहे. जैनांतल्या वैश्य वर्गाने त्याची अनेक स्थाने निर्माण केली होती. वर्धमानपुरात आणि मिथिला नगरीत त्याच्या नावाचे चैत्य होते, असे जैनांच्या आगमग्रंथांवरून कळते. मथुरेप्रमाणे पद्मावती (ग्वाल्हेरजवळील पवाया) हेही मणिभद्राच्या उपासनेचे मोठे केंद्र असावे. तिथे मिळालेली मणिभद्रमूर्ती सांप्रत ग्वाल्हेरच्या संग्रहालयात असून, मथुरेच्या परखम गावाजवळ मिळालेली मूर्ती मथुरेच्या संग्रहालयात आहे. या दोन्ही मूर्ती महाकाय आहेत. कमरेला धोतर, त्यावर पट्टा, खांद्यावर यज्ञोपवीत, डाव्या हाती कुंडपात्र (बहुधा तो निधी असावा) आणि मस्तकी मागे कलणारा मुकुट असे त्याचे मूर्तिध्यान असते. या कलत्या मुकुटाच्या मागे एक कथा आहे, ती अशी –

एकदा मणिभद्राचे रावणाशी युद्ध झाले. या युद्धात रावणाने मणिभद्राच्या मुकुटावर प्रहार केला. त्यामुळे मुकुट मागे कलला. तेव्हापासून मणिभद्र खरोखरच आपला मुकुट मागे कलता ठेवू लागला (वा. रा. उत्तर. १५·१५).

मणिभद्रमूर्तींच्या स्वरूपातूनच पुढे विष्णुमूर्ती व बोधिसत्त्वमूर्ती उत्क्रांत झाल्या, असे मूर्तिशास्त्रज्ञांचे मत आहे.

प्राचीन काळी फार लोकप्रिय असलेली मणिभद्राची उपासना आजही वेगवेगळ्या नावांनी व वेगवेगळ्या स्वरूपांत अवशिष्ट आहे. बावन वीर या नावाने ज्या लोकदेवांची पूजा होते, त्यात मणिभद्राचा समावेश आहे. बंगालमध्ये तो माणिकवीर या नावाने पूजला जातो. पाहा – यक्ष. [श्री. रा. चिं. ढेरे – सह्याद्रि, मार्च १९७०; डे. हिं. इ.; पु. इं]

मणिमेखला तमिळ भाषेतल्या पंचमहाकाव्यांपैकी एक. महाकवी शीत्तनार हा याचा कर्ता होय. शीत्तनार हा मदुरा येथील तिसऱ्या संगम्‌चा प्रमुख सदस्य होता. घटनाक्रमाच्या दृष्टीने हे काव्य शिलप्पधिकारम् या महाकाव्याचा उत्तरार्ध ठरते. शिलप्पधिकारमचा नायक कोवलन व गौण नायिका माधवी या दोघांची कन्या मणिमेखला ही या महाकाव्याची नायिका आहे. विधात्याच्या या सृष्टीत जन्म घेणाऱ्या प्राण्यांना जे अन्नदान करतात, ते जणू त्यांना जीवदानच देतात, हा महामंत्र चरितार्थ करण्यासाठी कवीने हे महाकाव्य रचले आहे. याचे तीस सर्ग आहेत. संक्षेपात त्याची कथा अशी–

प्राचीन काळात चोळ देशामध्ये शैंबियन नावाचा एक राजा होता. कावेरीपट्टनम ही त्याची राजधानी होती. एके दिवशी अगस्त्यमुनी त्याच्याकडे गेला आणि त्याने २८ दिवसांचा इंद्रोत्सव त्याच्या राजधानीत साजरा करण्याची अनुज्ञा मागितली. राजाने ती दिली. मोठ्या थाटात उत्सव सुरू झाला. माधवी ही त्या राज्यातली राजनर्तिका. तिची मुलगी मणिमेखला. त्या दोघींना उत्सवातल्या नृत्यासाठी पाचारण झाले; पण त्या दोघीही आल्या नाहीत. कोवलन हा माधवीचा प्रियकर होता. त्याला नाहक वधदंड दिला गेल्यापासून माधवी विरक्त बनली होती. तिने नाचगाणे वर्ज्य केले होते. तिचे एक सोडा; पण तिची मुलगी मणिमेखला नृत्याला गेली नाही, हे तिच्या सखीला आवडले नाही. तिने तसे माधवीला सांगितले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यावर माधवीने म्हटले. 'मणिमेखलेला निंद्य अशा वेश्याजीवनात ढकलण्याचा आग्रह तू मला करू नकोस. तिने तपस्येच्या मार्गाने जाऊन आत्मकल्याण साधावे अशी माझी इच्छा आहे. थोड्या वेळापूर्वी मी अरवण वडिगळ या बौद्धाचार्यांच्या दर्शनाला गेले होते. त्याला मी माझी कर्मकथा सांगितली. त्यावर तो म्हणाला –

पिरन्दो रुरवदु पॅरुगिय तुन्वम् पिरवा रुरवदु पॅरुपे रिन्वम्
पट्रिन् वरुवदु मुन्नदु पिन्नदु अट्रो रुरवदु अरिग ।

अर्थ – जे जन्म घेतात, त्यांना सारखी दुःखे भोगावी लागतात. या दुःखातून मुक्त व्हायचे तर जन्मचक्रातून मुक्त झाले पाहिजे. दुःखाची उत्पत्ती तृष्णेतून होते. जे लोक तृष्णेपासून विमुक्त होतात, त्यांना दुःख निवारण्याचा मार्ग समजतो.'

विचारी मणिमेखलेची सखी ! ती माधवीच्या या उक्तीने आणि कृतीने निराश झाली.

शॅवियन राजाचा उदयकुमार नावाचा एक पुत्र होता. तो तरुण होता. त्याने एके दिवशी सहज मणिमेखलेला पाहिले आणि तो तिच्या दिव्य रूपावर भाळला. तेव्हापासून तो सारखा तिला शोधीत फिरत असे आणि ती त्याला टाळण्याचा प्रयत्न करीत असे.

एके दिवशी नगरातल्या राजोद्यानात आपली सखी सुधामती हिच्यासह मणिमेखला पुष्पे गुंफीत बसली असता रथध्वनी तिच्या कानी पडला. तो ऐकून मणिमेखला म्हणाली. 'नक्कीच हा राजपुत्राचा रथ आहे. तो माझाच शोध करीत इकडे येत आहे. सखी, मी आता काय करू ग ?'

त्यावर सुधामतीने तिचा बचाव करण्याचे ठरविले. त्या उद्यानात एक स्फटिक–शिळेची खोली होती. सुधामतीने मणिमेखलेला त्या खोलीत लपविले. थोड्याच वेळात उदयकुमार तिथे आला. त्याने सुधामतीला ओळखले आणि विचारले. "तू एकटीच कशी इथे ? तुझी मैत्रीण कुठे गेली ?'

त्यावर सुधामती त्याला हात जोडून म्हणाली. 'तुम्ही मणिमेखलेवर प्रेम करण्याचे सोडून द्या. तिला पापकर्दमात रुतून बसायचे नाही. तिचा मार्ग शारीरिक सुखाचा नाही; तर तो आत्मकल्याणाचा आहे.'

राजकुमार तसले काही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. शोधता शोधता त्याला स्फटिकशिळेच्या पारदर्शक भिंतीतून दिसले, की मणिमेखला त्या खोलीत आहे. लगेच तो तिला पकडण्यासाठी स्फटिकगृहाकडे जाऊ लागला. त्या वेळी सुधामतीने त्याला अडवले आणि म्हटले.

'तुम्ही असा आततायीपणा करू नका. मणिमेखला तपस्विनी आहे. ती तुम्हांला शाप देऊन भस्म करील.'

राजकुमार कचरला. 'ठीक आहे. पाहून घेईन.' असे म्हणून तो चडफडत माघारा गेला. हिचे रक्षण कसे करावे, ही सुधामतीची चिंता मात्र कायम राहिली. पण ही चिंता केवळ एकट्या सुधामतीलाच नव्हती; तर ती मणिमेखला याच नावाच्या एका देवीलाही होती. इंद्राने तिला काही द्वीपांचे रक्षण करण्यासाठी नियुक्त केले होते. कोवलनची तर ती कुलदेवीच होती. ती एका जादुगारिणीच्या रूपात तिथे आली. तिने ताबडतोब मणिमेखलेला नीज आणली आणि तिला घेऊन ती आकाशमार्गाने मणिपल्लव नामक एका द्वीपात गेली. तिला तिथे समुद्रतीरावरच्या पुळणीत निजवून ती देवी तिथून अदृश्य झाली. मणिमेखलेला जेव्हा जाग आली, तेव्हा आपण कुठे आहो आणि इथे कशा आलो, ते तिला कळेना. प्रदेश वेगळा आणि सभोवार कोणी नाही, असे पाहून तिला महाभय वाटले आणि ती रडू लागली. एवढ्यात तिला समोर एक बुद्धपीठिका दिसली, तिचे वर्णन असे -

विरिन्दिलं गविरॉळि शिरन्दुकदिर् परप्पि,
उरॅपॅरु मुम्मुळं निलमिशै ओंगि,
तिशैदॉरुं ऑन्बान् मुळ निलं अगन्रु,
विदिमा णाडियिन् वट्टं कुयिन्रु,
पदुम चदुर नीमिशै विलंगि अखोर कमॅन्द,
आशन् मॅन्रे, नरुमल, रल्लदु पिरदरं शॉरियदु,
परवॅयु मुदिर्शिरै पांगुशॅन् रदिरादु, तेवर्लोन्
इट्ट मामणिपपीडिकै पिरप्पुविलं जाविरॉलि
अरुतगॅ आशनम् ।

भावार्थ – सर्वत्र पसरलेल्या देदीप्यमान प्रकाशासह ती पीठिका जमिनीपासून तीन हात उंच होती. प्रत्येक दिशेला तिची रुंदी नऊ हात होती. तिची परिघी स्फटिकमय व गोलाकार होती. त्या पद्मवेदीवर बुद्धदेवासाठी आसन बसवले होते. तिच्या सभोवती कित्येक वृक्ष होते आणि त्यांवर सुगंधी फुले फुलली होती. ही मणिपीठिका देवेंद्राने बनविली होती. तिचे दर्शन होताच माणसाला पूर्वजन्माचे ज्ञान होत असे.

त्या दर्शनाने मणिमेखला आपले एकलेपण विसरली. तिने त्या पीठिकेला वंदन केले. एवढ्यात ती मणिमेखला देवी आकाशातून तिच्यापुढे उतरली. तिने मणिमेखलेला संबोधून म्हटले, 'मी तुला एक मंत्र देते. त्या मंत्राच्या सामर्थ्याने तुला कोणतेही रूप घेता येईल आणि आकाशमार्गाने फिरता येईल. तू आता तुझ्या घरी जा.'

मग ती आकाशमार्गाने कावेरीपट्टनम्ला आपल्या घरी आली. तिची आई माधवी आणि मैत्रिण सुधामती या दोघींना तिच्या भेटीमुळे परमानंद झाला. मग त्या तिघी मिळून अरवण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वडिगळच्या दर्शनाला गेल्या. त्याने मणिमेखलेला एक अक्षय-सुरभिपात्र देऊन सांगितले.

" या लोकातला सर्वश्रेष्ठ धर्म म्हणजे भुकेल्याला अन्नदान. तेव्हा या पात्रात जे अन्न तू शिजवशील ते अक्षय्य होईल. या अक्षय्य पात्राने तू सर्वांची क्षुधा शमव. "

मणिमेखलेने ती आज्ञा मानली. मग ती एका धर्मशाळेत जाऊन राहिली. तिने भिक्षुणीचा वेष परिधान केला व आल्या-गेल्याला ती अन्नदान करू लागली.

ही बातमी उदयकुमारला कळली. तो लागलीच मणिमेखले-कडे आला. त्याने कष्टी मनाने तिला विचारले. ' तू हा भिक्षुणीचा वेष का बरे परिधान केलास ? केवढे तुझे अलौकिक सौंदर्य ! पण तू माती केलीस त्याची. ' त्यावर तिने राज-कुमाराला म्हटले. ' हे शरीर जन्म, जरा, रोग आणि मरण यांनी ग्रासलेले आहे. म्हणून मी शरीरसुखाकडे पाठ फिरवून धर्ममार्ग स्वीकारला आहे. '

पण हे तिचे बोलणे उदयकुमाराला रुचले नाही. तो तसाच तिच्याकडे बघत राहिला. पण त्याची कीव न करता मणि-मेखला जवळच्या चक्रवालमंदिरात गेली आणि तिथून काय-चंडिकेचे रूप घेऊन बाहेर पडली. राजकुमाराला हे काय घडले त्याचा पत्ताच लागला नाही. तो बराच वेळ ताटकळत राहिला आणि निराश होऊन परत गेला. मणिमेखला काय-चंडिकेच्या स्वरूपातच अन्नदान करीत राहिली.

अशी बारा वर्षे लोटली. कांचन नावाचा एक पुरुष होता. त्याची बायको हरवली होती. तिला शोधीत तो तिथे पोचला. कायचंडिकेचा वेष धारण करणाऱ्या मणिमेखलेलाच आपली पत्नी समजून तो तिच्याशी प्रेमळ वार्तालाप करू लागला. हा भलताच कुणीतरी कायचंडिकेशी लगट करतो आहे, हे राज-कुमाराला आवडले नाही. दोघेही त्या रात्री अंधारात लपत छपत तिथे आले. राजकुमार समोर येताच कांचनाने त्याचे एक घाव दोन तुकडे करून टाकले. नंतर तो कायचंडिकेला घेऊन आकाशमार्गाने जाण्यास प्रवृत्त झाला. एवढ्यात तिथली एक दगडाची मूर्ती त्याला म्हणाली. ' अरे कांचना, ही तुझी पत्नी नाही. ही कायचंडिकेच्या रूपात वावरणारी मणिमेखला आहे. ' ते ऐकून कांचन पस्तावला आणि तिथून निघून गेला. उदयकुमार तिथे मरून पडलेला पाहून मणिमेखलेला दुःख झाले. ती जरी विरक्त होती, तरी उदयकुमाराविषयी तिच्या हृदयाच्या अंतर्भागात कुठेतरी प्रेमाचा अंश होता. त्या दगडी मूर्तीने ते जाणले. तिने मणिमेखलेला बजावले. ' आता तुला प्रेमाच्या जंजाळातून मुक्त झाले पाहिजे. '

इकडे राजाला आपल्या पुत्राची मृत्युवार्ता समजली. राजाने मणिमेखलेला पकडून आणले. राणीच्या पुत्रशोकाने तर सूडाची भावना धारण केली. मणिमेखलेला तिने आपल्या महालात ठेवून तिचा नाना प्रकारे छळ केला. ही गोष्ट अरवण वडिगळला समजली. तो राजवाड्यात आला. त्याने राणीला तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने त्या घटनेचा अर्थ सांगून काही उपदेश केला. त्यामुळे राणीचे मन निर्मळ झाले. तिने मणिमेखलेला मुक्त केले. ती लगेच आकाशमार्गाने वंजिनगरला गेली. तिथल्या कण्णकीच्या मंदिरात जाऊन तिने आपल्या पित्याचे आणि सावत्र मातेचे दर्शन घेतले. मग नगरातल्या प्रसिद्ध दार्शनिकांशी चर्चा करून ज्ञान प्राप्त केले. पुढे ती दुष्काळग्रस्तांच्या सेवेसाठी कांची नग-रीला गेली. तिथे तिने एक बुद्धपीठिका स्थापन केली. त्या पीठिकेवर अमृतसुरभी नावाचे आपले अक्षयपात्र ठेवून ती त्यातल्या अन्नाने हजारो लोकांना भोजन वाढू लागली. दुष्काळ संपल्यावर ती अरवण वडिगळला शरण गेली. त्याने तिला त्रिशरणांचा उच्चार करायला लावून बौद्ध धर्माची दीक्षा दिली. [त. सा. सं.; नवनीत (हिंदी), जानेवारी १९५४]

मणियार

एक मुसलमान जात. या लोकांची वस्ती मध्य प्रदेश, महाराष्ट्र व पंजाब या प्रदेशांमध्ये आढळते. यांना शिशगारं असेही म्हणतात. औरंगजेबाने यांना बाटवून मुसलमान बनविले, असे म्हणतात. काचेच्या बांगड्या, मणी, इ. काचसामान तयार करणे हा यांचा धंदा आहे. पंजाबात किर-कोळ लोखंडी सामान विकणाऱ्यांनाही मणियार असेच म्हणतात. झेलम व रावळपिंडी भागातले मणियार शेतीही करतात.

यांच्यांत दोन पोटभेद आहेत. हे हनफी पंथाचे सुन्नी असून अन्य मुसलमानांशी लग्नव्यवहार करतात.

मध्य प्रदेशातील मणियार हे फेरीवाले असून, लहान आरसे, डब्या, सुया, इ. किरकोळ वस्तूंचा व्यापार करतात. उत्तर प्रदेशा-तील हे लोक प्रामुख्याने काचेच्या बांगड्या बनवितात.

यांचा विवाहसमारंभ निकाह पद्धतीने होतो. पतिनिधनानंतर यांच्या स्त्रिया हातातील बांगड्या वाढवितात (फोडतात).

हे लोक मांसाहारी आहेत, पण यांना गाईचे व डुकराचे मांस चालत नाही. हे मद्यप्राशन करीत नाहीत. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; मुं. इ. जा.; पं. का.]

मणिरत्न रामायण

एक रामायण. यात छत्तीस हजार श्लोक आहेत. तामस मन्वंतराच्या चौदाव्या त्रेतामध्ये याची रचना झाली असून, ते वसिष्ठ-अरुंधती-संवादात्मक आहे. हे रामायण सात सोपानांमध्ये विभागले आहे. त्यांत पंचवटीची उत्पत्ती, गोदावरीची उत्पत्ती, चित्रकूट-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महत्त्व, वाल्मीकि-आश्रम, स्त्रीधर्म, इ. विषय आहेत. शिवाय निरनिराळ्या उत्सवांची वर्णनेही आढळतात. वेदस्तुती, शिवस्तुती; तसेच इंद्र, ब्रह्मा, गंगा यांची स्तुती, इ. स्तोत्रे यांत असून गुरुगीता, देवगीता, भक्तिगीता, ज्ञानगीता, कर्मगीता, शिवगीता व वेदगीता या सप्तगीता या रामायणात आहेत. [हिंदुत्व]

मणिराम (इ. स. १८ वे शतक) एक ज्योतिषशास्त्रज्ञ. हा भारद्वाजगोत्री यजुर्वेदी ब्राह्मण होता. लालमणी हे याच्या वडिलांचे नाव असून, काश्यपगोत्री वत्सराज हा याचा गुरू होय. मणिराम हा गुजराती असावा, असे एक मत आहे. 'ग्रहगणित चिंतामणी' हा याचा ग्रंथ आहे. या ग्रंथात शके १६९६ चैत्र शुद्ध प्रतिपदा (दि. १३–३–१७७४) रविवार, प्रातःकालचे क्षेपक दिले आहेत. ग्रहलाघवग्रंथात अहर्गण वाढू न देण्याची जी युक्ती आहे, तीच यात आहे. म्हणजे अकरा वर्षांचे चक्र करून व त्या काळाची ग्रहगती चक्रशुद्ध करून तिला ध्रुव अशी संज्ञा दिली आहे. ध्रुवांक ग्रहलाघवाहून सूक्ष्म आहेत.

मणिराम सूर्यसिद्धान्तानुयायी आहे. तरीही त्याने सूर्यसिद्धान्तावरून येणारे सर्व ग्रह घेतलेले नाहीत. तसेच या ग्रंथाची पद्धती बव्हंशी ग्रहलाघवासारखी आहे. परंतु ग्रहलाघवावरून येणारेही ग्रह याने घेतलेले नाहीत. मणिरामाने ग्रंथाच्या उपसंहारात असे म्हटले आहे, की 'मी वेध घेऊन ग्रंथ तयार केला आहे; सुज्ञांनी यंत्रांनी अनुभव घेऊन पाहावा.' यावरून ग्रंथकाराने स्वतः वेध घेऊन ग्रहक्षेपक तयार केले असावे, असे दिसते.

या ग्रंथात मध्यम ग्रहाला रेखांतर संस्कार आणि भुजांतर व चर संस्कारही सांगितला आहे. [भा. ज्यो. शा.]

मणिसिद्धी निरनिराळी रत्ने जवळ ठेवल्याने प्राप्त होणाऱ्या सिद्धीला मणिसिद्धी असे म्हणतात. मोती, पोवळे, हिरा, नीळ, इ. रत्ने जवळ ठेवली, की विविध रोग बरे होतात व निरनिराळ्या पीडा दूर होतात, अशी समजूत आहे. परंतु ही मणिरत्ने मात्र कुंडलीतील महत्त्वाच्या ग्रहांचे बलाबल लक्षात घेऊन वापरली पाहिजेत, असे फलज्योतिषशास्त्रात सांगितले आहे. जुन्या काळापासून रत्नकिरणांनी शारीरिक रोगांवर उपचार केले जात असत. बडोद्याचे डॉ. वेणीतोष भट्टाचार्य यांनी 'दि सायन्स ऑफ कॉस्मिक थीरपी' या ग्रंथात रत्नांपासून उत्पन्न होणाऱ्या किरणांच्या द्वारा अनेक रोग बरे करता येतात, असे प्रतिपादन केले आहे. निरनिराळ्या रत्नांपासून कोणत्या प्रकारचे लाभ होतात, याचेही थोडेसे विवेचन या ग्रंथात आहे. [योगविद्या]

मणी सूत्रात ओवून माळ बनवण्यासाठी छिद्र पाडलेली एक वस्तू. लाकूड, काच, इत्यादी पदार्थांपासून मणी बनवितात. ते सामान्यपणे गोल किंवा लंबगोल असतात. यांच्या माळा करून त्या अलंकार म्हणून वापरण्याची पद्धत प्राथमिक अवस्थेतील मानवांमध्येही होती. मण्यांच्या माळा मुख्यत्वे गळ्यात घालतात. आदिवासी स्त्रिया तर मण्यांच्या माळांचे ओझेच गळ्यात वागवतात.

प्रथम निसर्गतःच छिद्रे असलेले दगड, फळांच्या बिया किंवा पोकळ लाकडाचे तुकडे यांचा उपयोग मणी म्हणून केला जात असावा. कालांतराने त्यात प्रगती होत गेली आणि घासून गुळगुळीत केलेले व मुद्दाम छिद्र पाडलेले मणी वापरात आले. बऱ्याच काळाने काचेचे मणी प्रचारात आले.

पुढे मण्यांच्या माळांचा उपयोग जसा अलंकार म्हणून तसाच परमेश्वराच्या नामस्मरणासाठी जपमाळ म्हणूनही होऊ लागला. जपमाळेसाठी प्राधान्याने तुळशीच्या काष्ठाचे मणी आणि रुद्राक्ष वापरतात. कधी कधी पोवळ्यांचीही माळ वापरतात.

निरनिराळ्या ठिकाणी झालेल्या उत्खननात विपुल मणी सापडले आहेत. सातवाहनकालीन मणी कऱ्हाड इथे मिळाले आहेत, ते मातीचे आहेत. अकीकच्या मण्यांवर रासायनिक क्रियेने नक्षी काढतात. ही कला फार प्राचीन असावी, असे वाटते. पौर्वात्य राष्ट्रांत ही कला बरीच प्रगत झाली होती. मोहेंजोदडो, हरप्पा, तक्षशिला, अहिच्छत्रा, राजघाट, सांबर, पाटणा, उज्जयिनी, पैठण, कोल्हापूर वगैरे ठिकाणी निरनिराळ्या प्रकारचे अम्लखात मणी सापडले आहेत.

मणी हे एक राजचिन्हही मानले गेले आहे. राजे लोक आपल्या बाहूंवर विशिष्ट मणी वापरीत असत. राजदरबारातील अधिकारी लोक राजा सिंहासनावर बसल्यानंतर त्याला पळसाच्या काष्ठाचा एक मणी देत असत, असा उल्लेख आहे.

अथर्ववेदात पर्णमणी (३·५), जंगिड मणी (२·४), शंखमणी (४·१०), प्रतिसर मणी (८·५), अशी मण्यांची विविध नावे दिली आहेत. मणिबंधन नावाचे एक स्वतंत्र सूक्तच अथर्ववेदात आहे (१०·६). या मण्यांमुळे दीर्घ जीवन लाभते, स्पर्शजन्य रोग दूर होतात व बल प्राप्त होते, असे म्हटले आहे. मण्याच्या साहाय्यानेच इंद्राने वृत्राला मारले, असे अथर्ववेदात म्हटले असून (८·५·३), मणिनिर्मितीच्या कलेला कश्यपाने प्रारंभ केला असेही म्हटले आहे (८·५·१४). सूर्यकांत मणी ठिणगी पाडतो; चंद्रकांत मणी चांदण्यात पाझरतो; स्फटिक मणी पारदर्शक असतो; स्पर्शमणी (परीस) लोखंडाचे सोने बनवतो, असेही म्हटले जाते. [सु. वि. को.; हिं. रा. तं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मतंग : एक प्राचीन संगीतशास्त्रकार. हा इ.स. च्या पाचव्या शतकानंतर व तेराव्या शतकापूर्वी कधीतरी होऊन गेला. याच्या चरित्रासंबंधीची माहिती उपलब्ध नाही. याने बृहद्देशी नावाचा संगीतशास्त्रावरील एक प्रख्यात ग्रंथ रचला. हा ग्रंथ संस्कृत भाषेत आहे. संगीतशास्त्रावरील सर्वमान्य ग्रंथांत या ग्रंथाचा क्रमांक बराच वर लागतो, असे या शास्त्रातील पंडितांचे मत आहे. आपल्या वेळी श्रुतीचे माप कोणते होते, ते मतंगाने या ग्रंथात सांगितले आहे. शिवाय याच्या वेळी दोन ग्रामांचे गाणे प्रचारात होते. षड्ज व पंचम हे स्वर याच्या वेळी विकृत होते व गायक या दोन ग्रामांत गात असत. त्या काळात कवितांचे छंदही गायिले जात. [सं. शा. क. इ.]

मतिया • एक जात. या लोकांची वस्ती प्रामुख्याने गुजरात प्रदेशातील बडोदे जिल्ह्यात आढळते. या जातीत हिंदू व मुसलमान असे दोन्ही धर्मांचे अनुयायी आहेत. मुसलमान मतियांच्या आडनावांवरून हे मूळचे हिंदू लेवा-कणबी असावे, असे वाटते. हे लोक मुसलमान कसे झाले, यासंबंधीची एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

सुमारे तीन-चारशे वर्षांपूर्वी लेवा-कणब्यांची एक टोळी काशीयात्रेला निघाली. वाटेत अहमदाबादनजीक गरमठ नावाच्या गावी त्यांचा मुक्काम पडला. तिथे इमामशहा नावाचा एक फकीर होता. त्याने या टोळीला बसल्या जागीच काशीचे दर्शन घडविले. त्याच्या या चमत्कारदर्शनामुळे काही यात्रेकरूंनी इमामशहाचे शिष्यत्व पत्करले आणि पुढे ते मुसलमान बनले.

हल्ली मतिया लोकांमध्ये वैष्णव मतियांनी रामानंदी व दादू हे दोन पंथ स्वीकारले आहेत. ते उपास-तापास, यात्रा वगैरे करतात. वैष्णव मतिया लेवा-कणब्यांप्रमाणे वागत असले, तरी लेवा–कणबी मात्र त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत.

पिरान मतिया लोकांची भाषा व पोषाख लेवांप्रमाणे असतो. यांच्यांत विधवा धाकट्या दिराबरोबर लग्न करू शकते, प्रथम-वराला जर विधवेबरोबर अथवा घटस्फोटित स्त्रीबरोबर लग्न करायचे असेल, तर त्याला प्रथम शमीच्या झाडाबरोबर लग्न करावे लागते. मोढ ब्राह्मण यांच्या लग्नात पौरोहित्य करतात.

प्रसूतिप्रथा – मतिया स्त्री प्रसूत झाल्यावर बाराव्या दिवशी ती जवळच्याच एका विहिरीची पूजा करते आणि विहिरीजवळ दोन गोवऱ्या एका दोरीला बांधून ठेवते. बाळंतीण चाळीस दिवस घरातील कोणत्याही वस्तूला स्पर्श करीत नाही. चाळिसाव्या दिवशी तिच्या खोलीतील जमीनसुद्धा खरवडून काढतात व त्याच दिवशी मुलाचे नाव ठेवतात.

वैष्णव मतिया हे अथर्ववेदी असून, आपणांला सत्पंथी म्हणवितात. हे कांदा-लसूण व मद्य-मांस निषिद्ध मानतात. पिरान मतिया पिरांची पूजा करतात. इमामशहा याचा शिक्षापत्री हा ग्रंथ ते प्रमाण मानतात. हा ग्रंथ ज्यांना पाठ म्हणता येतो, त्यांना काका अशी संज्ञा आहे. हे काका या लोकांची सर्व धार्मिक कृत्ये करतात. यांच्यांत पंचिआ (सुरभाईचे अनुयायी), सतिआ (महंमदाचे अनुयायी) आणि अठिया (बाकर अलीचे अनुयायी) असे तीन भेद आहेत. पापनाशासाठी हे लोक लाहे-उतारणी नावाचा एक विधी करतात. प्रत्येक मतिया शेतकरी काकांच्या मध्यस्थीने आपल्या गुरूला दर नांगरटीमागे अर्धा मण धान्य व एक रुपया देतो.

मर्तिकप्रथा – मतिया लोक प्रेते पुरतात. नंतर ते देवाची प्रार्थना करतात. दहा दिवस सुतक पाळतात. तेराव्या दिवशी मृताचा निकटचा नातेवाईक त्यांच्या पंथाच्या प्रमुख पिरांना काही भेटी पाठवितो. [म. ज्ञा. को.; रजःकण]

मतिराम (१६१७–१७१६ इ. स.) एक हिंदी कवी. सुप्रसिद्ध हिंदी कवी भूषण याचा हा भाऊ होय. याच्या वडिलांचे नाव रत्नाकर व आडनाव त्रिपाठी. हा काश्यपगोत्री कान्यकुब्ज ब्राह्मण असून, तिकवाँपूर या गावचा रहिवासी होता. बूंदीनरेश भावसिंह, कुमाऊँनरेश उद्योतसिंह, शंभूनाथ सोळंकी, इ. राजांच्या दरबारी कवी म्हणून हा राहिला. या काळात त्याने ललितललाम, रसराज, छंदसार, साहित्यसार, लक्षण-शृंगार, इ. ग्रंथ लिहिले. शृंगारपर रचना करण्यात हा विशेष प्रवीण होता. बिहारी सतसईच्या धर्तीवर याने मतिराम सतसई या ग्रंथाची रचना केली असून, ती विशेष प्रसिद्ध आहे. [क. कौ.; हिं. सा. इ.; हिं. सा. को. २; हिं. सा. २]

मत्तमयूर शैव पंथ शैव संप्रदायाची एक शाखा. हिला सिद्धान्तमत असेही नाव आहे. या पंथाच्या आचार्यांना सैद्धान्तिक म्हणत. या मताची एक शाखा इ. स. च्या ९ व्या शतकात मध्य भारतात स्थापन झाली व तिला मत्तमयूर असे नाव मिळाले. कालांतराने तिचा पुष्कळ विस्तार झाला आणि विंध्यप्रदेश, मध्य प्रदेश, ओडिशा, आंध्र, कोकण, इ. दूरदूरच्या प्रदेशांत तिच्या उपशाखा पसरल्या. या शाखेचे आचार्य केवळ धर्मगुरू नव्हते; तर ते राजगुरूही होते. त्यामुळे तत्कालीन राजकारणावरही त्यांचा प्रभाव पडत असे.

या शाखेचे सर्वांत प्राचीन लेख ग्वाल्हेर जिल्ह्यात सापडले आहेत. रणोद (प्राचीन रणिप्रद) नामक एका गावातील एका प्रासादसदृश प्राचीन मठात एका विशाल शिलेवर कोरलेला लेख, प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ कॅनिंगहॅम याला आढळला. तो पुढे डॉ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कीलहॉर्न याने प्रसिद्ध केला. या लेखात मत्तमयूरवंशाच्या स्थापनेची हकीकत दिली आहे, ती पुढीलप्रमाणे—

पूर्वी दारुवनामधे यज्ञानुष्ठान करून भक्तीने आपणाकडे आलेल्या ब्रह्मदेवावर शंकराने अनुग्रह केला. त्याच्यापासून हा लोकोत्तर विशाल शाखांचा मुनिवंश उत्पन्न झाला. या वंशात कदंबगुहाधिवासी, नंतर त्याचा शिष्य शंखमठिकाधिपती, त्यानंतर तेरंबिपाल व त्याचा शिष्य आमर्दकतीर्थनाथ असे आचार्य होऊन गेले. आमर्दकतीर्थनाथाचा शिष्य पुरंदर नामक होता. तो उपेंद्रपुरात तपश्चर्या करीत असता त्याची कीर्ती अवंतिवर्मा नामक राजाच्या कानावर गेली, तेव्हा तो राजा स्वतः उपेंद्रपुरास गेला व त्या आचार्याची सेवाशुश्रूषा करून त्याने त्याला मोठ्या प्रयत्नाने आपल्या राज्यात आणले. तिथे त्याच्याकडून शैव पंथाची दीक्षा घेऊन त्याने त्याला गुरुदक्षिणा म्हणून आपले सर्व राज्यैश्वर्य अर्पण केले. त्या मुनीने राजाकडून मत्तमयूरनगरात एक मेरुसदृश सुसमृद्ध असा मठ बांधविला. दुसरा एक मठ रणिप्रद येथे तपोवनात बांधवून त्याने त्याला मोठ्या प्रतिष्ठेप्रत पोचविले.

अवंतिवर्म्याची राजधानी मत्तमयूर ही कुठे होती, हे अद्याप निश्चित झालेले नाही. ग्वाल्हेर जिल्ह्यातील कद्‌वाहा हे गाव प्राचीन देवालयांबद्दल विशेष प्रसिद्ध आहे. तिथे अजूनही चौदा-पंधरा देवालयांचे अवशेष दृष्टीस पडतात. या देवालयांचे स्थापत्य व शिल्पकाम अत्युत्कृष्ट आहे. तेव्हा कद्‌वाहा हे प्राचीन मत्तमयूरनगर असण्याचा संभव आहे.

मत्तमयूरवंशातील आचार्यांचे काही लेख विंध्यप्रदेशातील गुर्गी व चंदेहे या प्रदेशात सापडले आहेत. त्यांत प्रभावशिव, प्रशांतशिव, ईशानशंभू व प्रबोधशिव या आचार्यांचे चारित्र्य, तपश्चर्या, विद्वत्ता, इत्यादींचे वर्णन असून, त्यांनी बांधलेली देवालये, त्यांतील मूर्ती व देवालयांना जोडलेले मठ यांचेही सविस्तर वर्णन आले आहे.

कलचुरी राजांनी मत्तमयूर पंथाच्या आचार्यांच्या तपश्चर्येकरिता प्रशांत स्थळी मठ बांधून दिले होते.

मत्तमयूरवंशाचे उल्लेख मध्य भारत, विंध्यप्रदेश, मध्य प्रदेश, कोकण, ओडिसा, इ. प्रदेशांतील कोरीव लेखांत काही ठिकाणी आढळतात. त्यांवरून या वंशाचे आचार्य मध्य भारतातील आपल्या मूळ पीठापासून शेकडो मैल दूर जाऊन मठ व देवालये बांधीत व आपल्या धार्मिक मतांचा प्रचार करीत, असे दिसते. मधुमती नावाचे त्यांचे एक प्रसिद्ध पीठ होते. त्याला कलचुरींच्या लेखात सैद्धांतिकांचे धाम असे म्हटले आहे.

प्रत्यक्ष शंकराने या पंथाचे सिद्धान्त ब्रह्मदेवाला शिकवले, असे या पंथाचे अनुयायी मानतात.

या मतात पती (ईश्वर), पशू (जीव) व पाश (बंधन) अशी तीन मुख्य तत्त्वे आहेत. या मताचे चार पाद आहेत. पहिला पाद विद्या किंवा सम्यग ज्ञान हा आहे. पशू, पाश व पशुपती यांच्या सम्यग ज्ञानाला विद्यापाद म्हणतात. भगवान शंकर हा सर्वज्ञ व सर्वशक्तिमान असून, जगताची उत्पत्ती, स्थिती व लय करण्याच्या कामी स्वतंत्र आहे. जीवांच्या कर्मानुसार तो त्यांना फल देतो. दुसऱ्या क्रियापादात सांग दीक्षेचा अंतर्भाव होतो. तिसऱ्या योगपादात जप, ध्यान, इ. येतात. चौथ्या चर्यापादात शास्त्रविहित कर्मांचे आचरण व निषिद्ध कर्मांचे वर्जन येते. या पादांच्या साधनेने सिद्धी किंवा मोक्ष प्राप्त होतो. अशा मुक्त जीवांना सिद्ध म्हणावे.

मत्तमयूर पंथाचे मूळ ठिकाण कदंबगुहा, या ठिकाणी सिद्धांची परंपरा होऊन गेली, असे कलचुरींच्या लेखात म्हटले आहे. या पंथाच्या काही आचार्यांनी उत्कृष्ट ग्रंथरचना केली आहे. [प्रा. वा. वि. मिराशी, नवभारत, जानेवारी १९५५]

मत्तीय पूर्व भारतातील एक जात. या लोकांची वस्ती ओडिसा प्रदेशात आढळते. मध्य प्रदेश ही यांची मूळ भूमी असून, ते गोंडांच्या एका पोटजातीपैकी आहेत, असे सांगतात. यांच्यांतील काही लोक जानवी घालतात. यांच्यांत आतेबहिणीबरोबर लग्न करता येते. विधवाविवाह मान्य आहे.

काही मत्तीय लोक विशाखापट्टमच्या डोंगरावर शेती करतात. गंजाम जिल्ह्यातील हे लोक कुंभाराचे काम करतात.

यांच्यांत मृतांना जाळतात आणि आठ दिवस सुतक पाळतात. प्रेत जाळलेल्या जागी एक बांबू रोवून त्याला मृताचे एखादे जुनेपाने वस्त्र अडकवतात. [का. ट्रा. स. इं.]

मत्स्य लोक व देश. मत्स्यदेश हे भारतातील एक प्राचीन महाजनपद होते. त्यात राहणाऱ्या लोकांना मत्स्य असे म्हणत. मत्स्य लोकांचे उल्लेख ऋग्वेद (७.१८.६), कौषीतकी उपनिषद (४.१), गोपथ ब्राह्मण (२.९), शतपथ ब्राह्मण (१३.४.५.९), मनुस्मृती (७.१९३) व महाभारत या ग्रंथांत आहेत. बौद्ध वाङ्मयातही मच्छ नावाने यांचा निर्देश आढळतो.

मत्स्य ही एक प्रमुख क्षत्रिय जात होती. या लोकांचे राज्य इंद्रप्रस्थाच्या दक्षिणेला होते. ऋग्वेदात उल्लेख आहे, की तुर्वश राजाने यज्ञार्थ धन मिळवण्यासाठी त्यांच्यावर आक्रमण केले होते. यावरून मत्स्य लोक बरेच धनवान होते, असे दिसते. कौषीतकी उपनिषदात मत्स्यांचा उल्लेख उशीनर, कुरु, पांचाल, इत्यादींबरोबर आला आहे.

मत्स्य राजा द्वैतवन याने अश्वमेध यज्ञ केला होता, असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे. त्याच्याच नावावरून त्या राज्यातल्या एका सरोवराला द्वैतवन व तिथल्या अरण्यालाही द्वैतवन असे नाव मिळाले होते. त्या अरण्याच्या सीमेवर पांचाल व दशार्ण या प्रदेशांच्या मधे मत्स्य देश होता, असे महाभारतात सांगितले आहे. मत्स्य लोक गोपालक होते. त्यांचा राजा विराट याच्याकडे अपार गोधन होते. या धनाच्या संरक्षणासाठी मत्स्य लोकांना नित्य संग्राम करावे लागत. त्यामुळेच ते चांगले लढवय्ये बनले होते. त्रिगर्ताचा राजा सुशर्मा आणि विराटाचा सेनापती कीचक यांची वारंवार युद्धे चालू असत. पांडव अज्ञातवासात असताना विराटनगरीत राहिले होते. त्या अवधीत भीमाने कीचकाचा वध केल्यानंतर सुशर्म्याने कौरवांचे साहाय्य घेऊन विराटावर स्वारी केली आणि त्याचे गोधन हिरावून नेले. पण नंतर विराटाचा पुत्र उत्तर याचा सारथी होऊन अर्जुनाने सुशर्म्याचा पराभव केला व सर्व गोधन परत आणले. ही घटना मत्स्य देशातच घडली.

मनुस्मृतीत मत्स्यदेश हा ब्रह्मर्षिदेशाचा एक भाग होता, असे म्हटले आहे. त्यात पतियाळा संस्थानचा पूर्व भाग, पंजाबमधील दिल्ली विभाग, अलवार संस्थान व त्यालगतचा राजस्थानातील प्रदेश, गंगा-यमुनांच्या मधील प्रदेश आणि मथुरा जिल्हा एवढ्या विस्तृत प्रदेशाचा समावेश होता. मत्स्यनगर ही त्याची राजधानी होती. नंतर त्याला विराटनगर म्हणू लागले. दिल्लीपासून सुमारे १०५ मैलांवर आजही विराट नावाचे गाव आहे.

पूर्वीच्या राजपुतान्यातील मेवात भागात राहणारे मीन लोक, म्हणजेच प्राचीन काळातील मत्स्य लोक होत.

कौटिल्याने या लोकांचा उल्लेख केलेला नाही. मौर्यांच्या काळातली त्यांच्याविषयीची माहितीही मिळत नाही. नंतर तो प्रदेश सातवाहनांच्या साम्राज्यात विलीन झाला असावा, असे वाटते. गुप्तकाळातही हे लोक अज्ञात होते. पण इ. स. च्या सातव्या शतकात भारतात आलेल्या युआन च्वांग या चिनी प्रवाशाने मत्स्य देशाचे वर्णन केले आहे. शतद्रू नदी व मथुरा यांच्या मध्ये हा प्रदेश होता. तिथे पशुधन विपुल होते; पण फळे व फुले कमी होती, असे त्याने लिहून ठेवले आहे. सांप्रतचा जयपूर व वैराट भाग असाच आहे.

पुढे इ. स च्या आठव्या शतकात मत्स्य लोकांना पुन्हा राजकीय महत्त्व प्राप्त झाले, असे दिसते. कारण पाल राजा धर्मपालदेव याच्या एका आलेखात मत्स्यांचा इतर राज्यांबरोबर उल्लेख आहे. त्यानंतर नवव्या शतकाच्या आरंभी गुर्जरप्रतीहार राजा नागभट्ट (दुसरा) याने कनौजवर स्वारी करून आजूबाजूची जी राज्ये जिंकली, त्यांत मत्स्यांचेही राज्य होते. पुढे गझनीच्या महंमदानेव हा देश जिंकला व तिथल्या राजाकडून मोठी खंडणी वसूल केली. तेव्हापासून हे मत्स्य लोक हतवल झाले. पुढे त्यांच्यापैकी काही लोक लुटारू बनले. त्यानंतर ते मेवाती या नावाने ओळखले जाऊ लागले. पुढे पुढे त्यांचे हल्ले फार वाढले आणि ते दिल्लीपर्यंतही पोचले. तेव्हा दिल्लीचा सुलतान घियासउद्दीन याने फौज पाठवून हजारो मेवाती लुटारूंना ठार मारले व तिथले जंगल तोडून त्यांचे आश्रयस्थान नष्ट केले (इ. स. १२६५). तथापि त्यांचा पूर्ण बीमोड मात्र झाला नाही. इ. स. च्या पंधराव्या शतकातही त्यांनी दिल्लीच्या फिरूजशाहाला हैराण केले होते. पुढे त्यानेही त्यांचा बंदोबस्त केला.

हेच मेवाती लोक पुढे मराठ्यांच्या काळी मवासी या नावाने प्रसिद्ध झाले. इ. स. १७६१ साली झालेल्या पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर या लोकांनी वडनगर, विसनगर, पालनपूर, गुजरात, इ. भागांत लूटमार सुरू केली. महादजी शिंदे यांची सत्ता उत्तर हिंदुस्थानात स्थापन झाली, तेव्हा या लोकांनी मराठ्यांच्या सैन्याला फार हैराण केले. महादजीने त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी बरेच प्रयत्न केले; पण त्यात त्याला विशेषसे यश आले नाही. शेवटी इ. स. १८५८ च्या सुमारास इंग्रजांनी मात्र त्यांचा पुरा मोड केला. [हि. जॉ. ए. इं.; ट्रा. ए. इं.; वे. का. इ.; श्री. सालेटोर, न्यू इं. अँ., सप्टेंबर १९३९; भा. वृ. इ.]

मत्स्य अवतार

विष्णूच्या दशावतारांपैकी पहिला अवतार. हा विष्णूचा लीलावतार होय. याची वैदिक कथा शतपथ ब्राह्मणात दिलेली आहे (१·८·१·१), ती अशी–

एकदा मनू नदीच्या तीरावर अवनेजन (प्रक्षालन) करीत असता, त्याच्या हातात एक लहान मासा आला. तो मनूला म्हणाला, की तू माझे पालन-पोषण कर; मी तुला पार करीन. त्यावर मनूने आश्चर्यचकित होऊन विचारले. ' तू मला कशातून पार करशील ? ' तेव्हा मासा म्हणाला. ' काही वर्षांनी मोठा जलप्रलय होणार आहे. त्यात सर्व सृष्टी वाहून जाईल. त्यापासून मी तुझा बचाव करीन. त्यासाठी तू एक नाव तयार कर, तीत सर्व अन्नधान्यांची बीजे ठेवून माझे ध्यान करीत राहा आणि प्रलयाच्या वेळी नावेत चढून बस. मग मनूने माशाला प्रथम घड्यात ठेवले. तिथे तो वाढला आणि घड्यात मावेनासा झाला, तेव्हा मनूने त्याला तळ्यात सोडले. तेही त्याला अपुरे पडले म्हणून शेवटी मनूने त्याला समुद्रात टाकले. तिथे त्याने विशाल रूप धारण केले.

मग माशाच्या सांगण्याप्रमाणे मनूने सर्व अन्नधान्यांचे बी नावेत सुरक्षित ठेवले. ठरल्याप्रमाणे प्रलय आला. प्रलयकाळी मासा मनूच्या नावेजवळ आला. मनूने ती नाव पाशाने माशाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिंगाला बांधली. माशाने ती उत्तरगिरीवर नेली आणि तिथे एका वृक्षाला बांधून ठेवली. पाणी जसजसे उतरू लागले, तसतशी नाव खाली उतरू लागली. या मार्गाला मनूचे अवसर्पण असे नाव आहे.

प्रलयानंतर मनूने पुन्हा यज्ञ केला आणि सुरक्षित ठेवलेल्या बीजांपासून पुन्हा सर्व पदार्थ उत्पन्न केले.

मत्स्य पुराणात या अवताराची कथा विस्ताराने दिलेली आहे. तिचा सारांश असा—

प्राचीन काळी मनू नावाचा एक दयाळू व क्षमाशील राजा होऊन गेला. बरीच वर्षे राज्य केल्यावर मनूने आपले राज्य आपल्या मुलाच्या स्वाधीन केले आणि योगाभ्यास व तप करण्यासाठी तो मलयाचलावर निघून गेला. लाखो वर्षे तप केल्यावर ब्रह्मा त्याच्यावर प्रसन्न झाला आणि त्याला ‘ वर माग ’ म्हणाला. त्यावर मनू म्हणाला, की ‘ जेव्हा प्रलय होईल, तेव्हा स्थावर आणि जंगम अशा सर्व सृष्टीचे मला रक्षण करता यावे. ’ ब्रह्मदेवाने ‘ तथास्तु ’ म्हटले आणि तो अंतर्धान पावला.

काही काळानंतर एक दिवस मनू आपल्या आश्रमात पितरांना अर्घ्य देत असता कमंडलूतल्या पाण्याबरोबर एक लहान मासा त्याच्या ओंजळीत व ओंजळीतून खाली जमिनीवर पडला. जमिनीवर तो तडफडतो आहे, असे पाहून मनूने त्याला उचलून पुन्हा कमंडलूत ठेवले. दुसऱ्या दिवशी तो मासा सोळा अंगुळे लांब झाला आणि त्याला कमंडलूत नीट फिरता येईना. तेव्हा त्याने मनूला आपले रक्षण करण्यांची विनंती केली. मनूने त्याला तिथून काढून एका मातीच्या घड्यात ठेवले. पण तिथेही दुसऱ्या दिवशी तो तीन हात मोठा होऊन त्यात मावेनासा झाला. तेव्हा माशाने मनूला पुन्हा आपल्या रक्षणासाठी विनंती केली. अशा रीतीने मनूने त्याला क्रमाने विहिरीत, तलावात, गंगेत व शेवटी समुद्रात नेऊन सोडले. पण थोड्याच दिवसांत त्याने समुद्रही व्यापला. तेव्हा मनू त्याला म्हणाला, की ‘ तू एकतर महाराक्षस आहेस किंवा स्वतः विष्णू तरी आहेस. कारण तुझ्याशिवाय कोणालाही एवढे प्रचंड रूप धारण करता येणार नाही. ’ तेव्हा आपले सत्य स्वरूप मनूने ओळखल्याचे भगवान विष्णूने मान्य केले आणि त्याला सांगितले. ‘ थोड्याच दिवसांत मोठा प्रलय होणार आहे आणि ही पृथ्वी त्यात बुडून जाणार आहे. तेव्हा सर्व देवतांनी मिळून बनवलेली ही नौका घे आणि प्रलयकाळी तिच्यात सृष्टीतील सर्व स्वेदज, अंडज, उद्भिज्ज व जरायुज जीवांना बसवून त्यांचे रक्षण कर. प्रलयकाळी नाव डगमगू लागली, की एका दोरीने ती माझ्या शिंगाला बांध. प्रलय नाहीसा झाल्यावर जेव्हा पुन्हा सर्व सृष्टी उत्पन्न होईल, तेव्हा सत्ययुगाच्या प्रारंभी तू या चराचर सृष्टीचा प्रजापती होशील आणि मन्वंतरांचा अधिपती होऊन देवांनाही पूज्य ठरशील. ’

पुढे ठरल्याप्रमाणे प्रलयाच्या वेळी विष्णूने शिंग असलेल्या माशाचे रूप घेतले आणि तो मनूच्या जवळ आला. दोरीच्या रूपाने एक सापही तिथे आला. मनूने आपल्या योगबलाने सर्व प्राण्यांना नावेत बसविले आणि ती नाव माशाच्या शिंगाला बांधली. मग विष्णूला नमस्कार करून तो नावेत बसला.

भागवताच्या आठव्या स्कंधातील चौविसाव्या अध्यायातही मत्स्यावताराची कथा सांगितली आहे. ती मत्स्य पुराणातील कथेपेक्षा थोडी वेगळी आहे. तसेच शतपथ ब्राह्मणांतील कथा हिमालयाच्या प्रदेशात घडली आहे, तर भागवत पुराणातील कथा द्रविड देशातील कृतमाला नदी आणि तिथला राजा सत्यव्रत यांच्या बाबतीत घडली आहे.

जलप्रलय नाहीसा झाल्यावर मत्स्याने हयग्रीवासुराला ठार मारून त्याने चोरलेले वेद परत आणले, असेही भागवत पुराणात सांगितले आहे.

शतपथ ब्राह्मण आणि तैत्तिरीय संहिता या प्राचीन ग्रंथांत प्रजापतीने सृष्टीचा विकास आणि सुखशांती यांसाठी निरनिराळ्या वेळी मत्स्य, कूर्म व वराह हे अवतार घेतले, असे सांगितले आहे. प्रजापतीने मत्स्यावतार कार्तिक पौर्णिमेला घेतला होता. मत्स्याच्या अवतारतिथीसंबंधाने विविध पुराणांत विविध मते आढळतात. मत्स्य पुराणाप्रमाणे चैत्र शु. तृतीया आणि वराह पुराणानुसार आषाढ शु. एकादशी या दिवशी मत्स्यावतार झाला.



मत्स्य अवतार

विष्णूचा महिमा वर्णन करणाऱ्या विष्णू पुराणात (इ. स. चे ४ थे शतक) मत्स्यावताराची कथा आलेली नाही. नंतरच्या काळात वासुदेव, विष्णू किंवा नारायण या देवतेच्या भक्तांनी मूळ प्रजापतीचे हे अवतार आपल्या देवाचे ठरवले. मत्स्यावतारात देवाने हयग्रीवापासून वेदांचे रक्षण आणि प्रलयाच्या वेळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्वबीजाचे रक्षण अशी दोन कृत्ये केली. स्कंद पुराणात हयग्रीवाऐवजी शंखासुराचे नाव आहे.

मत्स्यावताराची प्रतिमा दोन प्रकारे केलेली आढळते. एक प्रतिमा केवळ मत्स्यरूप असते; तर दुसरी खालचा भाग प्राणि-रूपात आणि वरचा भाग मानवी रूपात, अशी असते. मानवी रूपाला चार हात व त्यांत विष्णूची आयुधे असतात.

मत्स्यावताराची कल्पना ही पूर्णपणे वैदिक आहे. ती केवळ पुराणांची कल्पना नाही. जलप्रलयाची कथा तर जगातील बहुतेक सर्व लोकांत आढळते. [पु. वि.; पु. इं.; म. सा. अ.; डे. हिं. इ.; हिं. कृ. पु. प्र.; नि. सि.]

मत्स्यजयंती चैत्र शुद्ध प्रतिपदेला दोन प्रहरी मत्स्यावतार झाला असे मानतात. यानिमित्त जो उत्सव करतात, त्याला मत्स्यजयंती म्हणतात.

मत्स्यजयंती या नावाचे एक व्रत आहे. चैत्र शुद्ध पंचमीला हे व्रत करतात. मत्स्यावतारी विष्णूच्या मूर्तीची पूजा हा या व्रताचा प्रमुख विधी आहे. या तिथीला हयपंचमी असेही म्हणतात. फल – संकटनिवारण. [व्रतराज.; हिं. धं.]

मत्स्यद्वादशी एक तिथिव्रत. मार्गशीर्ष शुद्ध द्वादशीला हे व्रत करतात. या व्रतात नारायणाची पूजा करतात. पाण्याने भरलेली चार पात्रे घेऊन त्यांवर फुले वाहतात. त्यांवर तिळाने भरलेले ताट ठेवतात. ही चार पात्रे म्हणजे चार सागर आहेत असे मानतात. मग मत्स्यावतारी विष्णूची एक सुवर्णमूर्ती करून तिची पूजा करतात. रात्री जागर करतात.नंतर चार पात्रांसहित वरील सर्व वस्तू दान देतात. फल –पापनाश.

या व्रताचा आणखी एक पर्याय आहे, तो असा– मार्गशीर्ष दशमीला सुरुवात करून एकादशीला उपवास करतात. द्वादशीला थोडी चिकण माती आणून ती आदित्याला अर्पण करतात. नंतर ती माती अंगाला लावून स्नान करतात. [हि. ध.]

मत्स्य पुराण अठरा महापुराणांपैकी एक. मत्स्य, नारद, विष्णू, भागवत, इ. पुराणांत इतर पुराणांच्या याद्या व श्लोकसंख्या दिलेल्या आहेत, त्यांत या पुराणाचा क्रम सोळावा आहे. याची श्लोकसंख्या १४-१५ हजार आहे. भगवान विष्णूने वैवस्वत मनूला मत्स्यरूपाने दर्शन दिले व हे पुराण सांगितले, ही कथा पहिल्या अध्यायात दिली आहे, ती अशी–

एकदा मनू आश्रमात पितरांचे तर्पण करीत असता, एक लहान मासा त्याच्या हातात पडला. मनूला त्याची दया येऊन त्याने त्याला कमंडलूत ठेवले. तिथे तो अहोरात्र सोळा अंगुळे वाढला आणि राजाला म्हणाला, की 'माझे रक्षण कर.' मग राजाने त्याला रांजणात ठेवले. पण तिथेही त्याचा आकार वाढला. तिथून विहिरीत, तिथून सरोवरात आणि तिथून समुद्रात टाकल्यावरही तो मासा वाढतच गेला. मग हा सामान्य मत्स्य नव्हे असे जाणून मनूने त्याला नमस्कार केला व 'तू कोण' असे विचारले. त्यावर मत्स्य म्हणाला. 'मी विष्णू आहे आणि तुला भविष्याची सूचना देण्यासाठी आलो आहे. थोड्याच काळात जलप्रलय होऊन ही सृष्टी नामशेष होणार आहे. त्या वेळी तू सर्व जीवसृष्टीतील नर-मादींच्या जोड्या घेऊन एका नौकेत बस. ती नौका माझ्या शिंगाला बांध. म्हणजे त्या प्रलय-सागरात मी तुझे रक्षण करीन.'

मग मनूने त्याच्या सांगण्याप्रमाणे केले. प्रलयसागरातून संचार करीत असता मत्स्यरूपी विष्णूने जे पुराण त्याला ऐकवले, ते मत्स्य पुराण या नावाने प्रसिद्ध झाले. याविषयी मत्स्य पुराणातच (५३·५०) सांगितले आहे, ते असे–

श्रुतीनां यत्र कल्पादौ प्रवृत्त्यर्थं जनार्दनः ।
मत्स्यरूपेण मनवे नरसिंहस्य वर्णनम् ।।
अधिकृत्याब्रवीत् सप्तकल्पवृत्तं मुनीश्वराः ।
तन्मात्स्यमिति जानीध्वं सहस्राणि चतुर्दश ।।

अर्थ – ज्या पुराणात कल्पाच्या प्रारंभी प्रवृत्तीसाठी मत्स्यरूपी जनार्दनाने मनूला नरसिंहवर्णनप्रसंगी सप्त कल्पांचा विषय वर्णन करून सांगितला, ते १४,००० श्लोकांचे मत्स्य पुराण, असे हे श्रेष्ठ मुनींनो, तुम्ही जाणा.

देवी भागवतात मात्र या पुराणाची श्लोकसंख्या १९,००० सांगितली आहे. या पुराणाचे २९१ अध्याय आहेत. यांत स्कंध, कांड, पर्व इ. विभाग नाहीत. याचा प्रारंभ–श्लोक असा–

प्रचण्डताण्डवाटोपे प्रक्षिप्ता येन दिग्गजाः ।
भवन्तु विघ्नभङ्गाय भवस्य चरणाम्बुजाः ।।

अर्थ – प्रचंडतांडवाच्या भरात ज्याने (अष्ट) दिग्गजांना त्यांच्या स्थानावरून फेकून दिले, अशा त्या शंकराची चरणकमले विघ्नांचा नाश करोत.

प्रस्तुत पुराणाच्या प्रारंभी मन्वंतरांचे सामान्य वर्णन केल्यावर पितृवंश विशेष विस्ताराने सांगितले आहेत. तेराव्या अध्यायात वैराज, चौदाव्यात अग्निष्वात्त व पंधराव्यात बर्हिषद या पितरांचे वंश दिलेले आहेत. १६ ते २३ पर्यंत श्राद्धकल्पाचे विवेचन आहे. पुढे ययातीच्या चरित्राला धरून सोमवंशाचे सविस्तर वर्णन आहे. ५५ ते १०२ या अध्यायांत अनेक व्रतांची माहिती आहे. त्यापुढील १० अध्यायांत प्रयागमाहात्म्य सांगितले आहे. काशीचे माहात्म्यही पाच अध्यायांत विशद केले आहे. त्यापुढचे आठ अध्याय नर्मदा-माहात्म्यासाठी खर्ची पडले आहेत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यात काही गोष्टी विशेष महत्त्वाच्या आहेत, त्या अशा –

(१) त्रेपन्नाव्या अध्यायात समस्त पुराणांची विषयानुक्रमणी दिलेली आहे. तिच्यावरून पुराणांचा क्रमवद्ध विकास कसा झाला, याची कल्पना येऊ शकते.

(२) प्रवर ऋषींच्या वंशांचे वर्णन–यांत भृगू, अंगिरा, अत्री, विश्वामित्र, कश्यप, वसिष्ठ, पराशर व अगस्त्य या ऋषींच्या वंशांचे वर्णन विस्ताराने दिलेले आहे (१९५–२०२).

(३) राजधर्मवर्णन – यासाठी २९ अध्याय (२१५ ते २४३) खर्ची पडले आहेत. यात दैव, पुरुषप्रयत्न, साम, दान, दंड, भेद, दुर्ग, यात्रा, साहाय्यसंपत्ती, इ. राजधर्माच्या गोष्टी तपशीलवार सांगितल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत पुराणाला राजनैतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

(४) प्रतिमालक्षण – भिन्न भिन्न देवतांच्या प्रतिमा कशा कराव्या, त्यांची मापे काय असावी, त्यांचे प्रतिष्ठापीठ कसे असावे, ताल–मान किती धरावे, इ. विषयांचे वर्णन विस्तारपूर्वक दिले आहे (२५७–२७०).

या पुराणाच्या ११७, ११८ व १७६ या तीन अध्यायांत हिमालयाचे सुरेख वर्णन आहे. कालिदासाने कुमारसंभव लिहितेवेळी या पुराणातल्या वर्णनांचा आणि कथानकांचा आधार घेतला असावा, असे अनुमान निघते. श्री. व्ही. राघवन यांनी अशी काही साम्यस्थळेही दाखविली आहेत

अध्याय १८० मध्ये भक्तीची महती व कर्मयोगाची श्रेष्ठता प्रतिपादिली आहे. आत्मज्ञानी पुरुषालाही कर्म सोडता येत नाही, हा विचार जनांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न तिथे दिसतो. यात धर्मशास्त्रीय विषयांना पुष्कळ अवकाश मिळाला आहे. मनू व याज्ञवल्क्य यांच्या स्मृतींतील कित्येक श्लोक प्रस्तुत पुराणात घेतलेले आहेत. हरि–हरांचे वर्णन पक्षपात न करता केले आहे. हरिहरांच्या अवतारांचे वर्णनही समान भावाने केले आहे. ज्यांच्याविषयी आपले ज्ञान अत्यल्प आहे, अशा वैदिक व संस्कृत साहित्यातल्या अनेक ग्रंथांचा व ग्रंथकारांचा निर्देश मत्स्य पुराणात मिळतो. प्रक्षेपहीन आणि सर्वथा सुरक्षित अशा पुराणांत मत्स्य पुराणाचे स्थान निःसंदेह वरच्या दर्जाचे आहे, असे श्री. बलदेव उपाध्याय म्हणतात.

मत्स्य पुराणात इतर पुराणांची त्रोटक सूची आहे, ही गोष्ट नारद पुराणकाराला माहीत होती. महाभारतातही या पुराणाचा उल्लेख आला आहे. इतकेच नव्हे, तर मत्स्य पुराणातील २५ ते ४२ या अध्यायांतले ५०६ श्लोक आदिपर्वातल्या ययातीच्या उपाख्यानात (७६ ते ९३) जसेच्या तसे आलेले आहेत. या गोष्टींवरून हे पुराण इ. स. २०० ते ३०० या कालावधीत आजच्या स्वरूपात तयार झाले असावे, असे श्री. काळे यांचे मत आहे. तथापि यातला बराचसा भाग याहून प्राचीन असावा, असे पार्गिटरने म्हटले आहे. आपस्तंब सूत्रांत मत्स्य पुराणातला एक उताराच्या उतारा आधार म्हणून घेतला आहे. या सूत्रांचा काळ सन पूर्व ६०० ते ३०० असा मानलेला आहे. त्या अर्थी हे पुराण त्याच्याही आधीचे असले पाहिजे. सांप्रतचे मत्स्य पुराण मात्र सनपूर्व ३०० ते इ. स. २०० या काळात तयार झाले असावे. श्री. बलदेव उपाध्याय मात्र इ. स. २०० ते ४०० हा त्याचा कालखंड मानतात.

मत्स्य पुराणाच्या उत्पत्तिस्थलाविषयीही बरेच मतभेद आहेत. श्री. दीक्षितार, ते दक्षिण भारतात रचले गेले, असे म्हणतात. पार्गिटर आंध्र प्रदेशाचे नाव सांगतो. श्री. हाजरा नासिक भागात ते रचले गेल्याचे सांगतात. पण या सर्व मतांत श्री. कंटावाला यांचे मत तर्कशुद्ध वाटते. नर्मदेच्या तीरावर कुठेतरी त्याची रचना झाल्याचे ते सांगतात. श्री. बलदेव उपाध्याय हेही या मताला पुष्टी देतात. हे मत तर्कसिद्ध मानण्याची काही कारणे आहेत, ती अशी– मत्स्य पुराणात सर्व नद्यांमध्ये नर्मदेची प्रतिष्ठा आणि यशोगाथा आपलेपणाने गायिलेली आहे. प्रलयकाली समस्त वस्तूंचा नाश झाला, तरी ज्या वस्तू अवशिष्ट राहतात, त्यात नर्मदा ही एक मानलेली आहे. याविषयीचा श्लोक असा–

> एकः स्थास्यसि देवेषु दग्धेष्वपि परन्तप ।
> सोमसूर्यावहं ब्रह्मा चतुर्लोकसमन्वितः ।।
> नर्मदा च नदी पुण्या मार्कण्डेयो महानृषिः ।।
>
> (मत्स्य पु. २·१२–१४)

अर्थ – (मत्स्य म्हणतो) हे राजा, (आगामी प्रलयात) सर्व देव दग्ध झाले, तरी तू एकटा राहशील. तसेच चंद्र, सूर्य, मी, चतुर्लोकसमन्वित ब्रह्मा, पुण्यप्रद नर्मदा नदी आणि महर्षी मार्कंडेय एवढे शिल्लक राहतील.

मत्स्य पुराणाचा लेखक नर्मदा–तीरावरच्या छोट्या छोट्या स्थानांचीही ओळख करून देतो. दूरस्थ माणसाला हे शक्य झाले नसते. त्याने नर्मदा व कावेरी यांच्या संगमाचे वर्णन करताना एक पूर्ण अध्याय खर्ची घातला आहे. मात्र ही कावेरी म्हणजे दक्षिण भारतातली प्रसिद्ध नदी नव्हे. ती आहे ओंकारेश्वराजवळ नर्मदेला मिळणारी एक क्षुद्र नदी. लेखकाने हा संगम गंगायमुनासंगमाप्रमाणेच पवित्र आणि स्वर्गप्रद मानला आहे. यातला दशाश्वमेध घाट हा भडोच येथील नर्मदेवरचा एक घाट आहे. भारभूती हे एक तीर्थ असून, ते नर्मदेच्या उत्तर तीरावर भडोचपासून आठ मैलांच्या अंतरावर आहे. सांप्रत त्याला भाडभूत म्हणतात.

मत्स्य पुराणात सुभाषितवजा आणि उपदेशवजा वचने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुष्कळ आहेत. त्यातील काही खाली दिली आहेत–

यस्मिन्कर्मणि यस्य स्याद्विशेषेण च कौशलम् ।
तस्मिन्कर्मणि तं राजा परीक्ष्य विनिवेशयेत् ।।

अर्थ – ज्याचे ज्या कर्मात विशेष कौशल्य आहे, त्याची राजाने परीक्षा करून त्या कर्मात त्याची योजना करावी.

तथा च रागप्रभवा हि लक्ष्मीः राज्ञां मता भास्करवंशचन्द्र ।
तस्मात्प्रयत्नेन नरेन्द्रमुख्य कार्योऽनुरागो भुवि मानवेषु ।।

अर्थ – हे सूर्यकुलभूषणा राजा, राजाची लक्ष्मी प्रजेच्या प्रेमामुळे वाढते. म्हणून राजाने प्रजेच्या सुखाकरिता नेहमी प्रयत्नशील असावे.

त्यक्त्वाऽलसान् दैवपरान्मनुष्या–
नुत्थानयुक्तान् पुरुषान् हि लक्ष्मीः ।
अन्विष्य यत्नाद् वृणुयान्नृपेन्द्र
तस्मात्सदोत्थानवता हि भाव्यम् ।।

अर्थ – आळशी आणि दैवावर हवाला ठेवून राहणारा यांना सोडून लक्ष्मी उद्योग करणाऱ्या माणसाचा शोध करीत फिरते व त्याच्याकडे जाते. म्हणून माणसाने सदैव उद्योगी असावे.

कर्मयोगोद्‌भवं ज्ञानं तस्मात्तत्परमं पदम् ।
कर्मज्ञानोद्‌भवं ब्रह्म न च ज्ञानमकर्मणः ।।

अर्थ – कर्मयोगापासून ज्ञान प्राप्त होते व कर्म आणि ज्ञान यांपासून ब्रह्मप्राप्ती होते. कर्मावाचून ज्ञान मिळत नाही.

मत्स्य पुराणाला साहित्यिक दृष्टयाही महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीनतेच्या दृष्टीने आणि विषयांच्या व्यापकतेच्या दृष्टीने मत्स्य पुराण सर्वश्रेष्ठ आहे, असे वामन पुराणात म्हटले आहे. [पु. नि.; अ. पु. द.; पु. वि.; पुराणम्, जानेवारी व जुलै १९६१; श्री. बा. मो. कानिटकर–सा. स्वराज्य, १२ नोव्हेंबर १९६६]

मत्स्यासन

एक श्रमसाध्य आसन. याची प्रक्रिया घेरंड संहितेत (२·२१) सांगितली आहे, ती अशी –



मत्स्यासन

मुक्तपद्मासनं कृत्वा उत्तानशयनं चरेत् ।
कूर्पराभ्यां शिरो वेष्ट्य मत्स्यासनं तु रोगहा ।।

अर्थ – बद्धपद्मासनाचे हात सोडून मांडी कायम ठेवावी आणि उताणे निजावे. डोक्यावरून दोन्ही हात घेऊन डाव्या हाताने उजवा व उजव्या हाताने डावा दंड धरावा. याला मत्स्यासन म्हणतात. हे सर्व रोगांचा नाश करते.

पद्मासन करून बसल्यानंतर जमिनीवर उताणे पडावे. पडते वेळी हातांचा आधार घ्यावा आणि पडून कंबर, पाठ, गुडघे व डोक्याचा भाग जमिनीस टेकवावा. श्वासोच्छ्वास चालू ठेवावा.

या आसनाचा अभ्यास सर्व स्त्री-पुरुष करू शकतात. याचा प्रमुख फायदा म्हणजे मासे ज्याप्रमाणे पोहतात, त्याप्रमाणे हे आसन करून तासन्‌तास पाण्यात पडून राहता येते. याने मणक्याचे रोग नष्ट होतात. [उ. यो. द.; यो. सो. पू.]

मत्स्येंद्रासन

एक योगासन. याच्या अभ्यासाने कुंडलिनी जागृत होते आणि मस्तकातील अमृत स्थिर होते, असे सांगितले आहे. याची प्रक्रिया अशी–

वामोरुमूलार्पितदक्षपादं जानोर्बहिर्वेष्टितवामपादम् ।
प्रगृह्य तिष्ठेत्परिवर्तिताङ्गः श्रीमत्स्यनाथोदितमासनं स्यात् ।।

भावार्थ – डाव्या पायाच्या मुळाशी (जांघेत) उजव्या पायाचा पंजा असा उताणा ठेवावा, की त्याची टाच बेंबीवर येईल आणि बोटे मांडीच्या बाहेर न जातील. मग डावा पाय उजव्या गुडघ्याजवळ उभा करावा. असे करताना पंजा भुईला टेकावा. नंतर उजवा हात डाव्या गुडघ्याच्या बाहेरून उताणा घेऊन डाव्या पायाचा अंगठा उजव्या हाताच्या चिमटीत धरावा. मग डाव्या पायाचा पंजा उजव्या गुडघ्याच्या बाहेर ठेवावा आणि डावा हात पाठीमागून फिरवून त्याने उजव्या पायाची टाच धरावी. मुख व अंग मागे फिरवून दृष्टी नासाग्री ठेवावी. याला मत्स्येंद्रासन म्हणतात.

या आसनाने जठराग्नी प्रदीप्त होतो, वीर्यदोष नष्ट होतात आणि सर्व अवयव सुदृढ व कार्यक्षम होतात. हे आसन म्हणजे विविध रोगांविरुद्ध केवळ अस्त्रच आहे, असे म्हणतात. या आसनाचे अनेक प्रकार आहेत. [यो. सो. पू.; उ. यो. द.]

मथम्म

द. भारतातील एक ग्रामदेवता. सात बहिणींपैकी ही एक आहे, असे मानले जाते. ही खास मादिगांची देवता आहे. हिची एखाद्या खोपटात सामान्यशी मूर्ती असते. मथम्माचाच मातंगी ही दुसरा अवतार आहे. ही मातंगी प्रथम एक मादिगा स्त्रीच होती, असे म्हणतात. [ब्र. गॉं. मॉ. हिं.]

मथित यामायन

एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकोणिसावे सूक्त याच्या नावावर आहे. हेच सूक्त भृगू, च्यवन यांच्याही नावावर आहे. मथित हा यमाचा पाचवा मुलगा होय. म्हणूनच याला मथित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यामायन असे म्हणतात. परंतु ऋग्वेदात मात्र तसा उल्लेख नाही.

ऋग्वेदातील हे सूक्त गोसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. आपले नष्ट झालेले गोधन परत आणण्यासाठी केलेली प्रार्थना या सूक्तात आहे. त्यातील एक ऋचा अशी–

नि वर्तध्वं मानु गाताऽस्मान्त्सिषक्त रेवतीः।
अग्नीषोमा पुनर्वसू अस्मे धारयतं रयिम् ॥

अर्थ – हे संपत्तिसंपन्न, भक्त पाचारित धेनूंनो, आमच्याशिवाय अन्य कुठेही न जाता, तुम्ही आमच्या उपयोगी पडा. हे साहाय्यकारी अग्निषोमांनो, तुम्ही आम्हांला धन द्या.

या सूक्तात धेनूसंबंधीच्या अनेक पारिभाषिक संज्ञांचा निर्देश आढळतो. उदा० गोप (गुराखी); नियान (गोठा); न्ययन (चरायला नेणे); निवर्तन. (परत आणणे) संज्ञान (ओळख).

या सूक्तातील पहिल्या ऋचेत रेवती आणि पुनर्वसू या संज्ञा आल्या आहेत. परंतु नक्षत्र या अर्थाने त्यांचा प्रयोग केला गेला आहे, असे वाटत नाही. [प्रा. च. को.; ऋ. म. मा.; सी. ऋ]

मथुरा एक पुण्यक्षेत्र. सप्तपुऱ्यांमधले एक. हे शहर उत्तर प्रदेशात आहे. भारताच्या इतिहासात मथुरेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. प्राचीन कालापासून आजवर हे नगर भारतीय संस्कृतीचे एक प्रमुख केंद्र बनून राहिले आहे. धर्म, दर्शन, कला, भाषा व साहित्य यांच्या विकासात मथुरेला बरेच श्रेय आहे.

मथुरेच्या आसपासच्या प्रदेशाला व्रजमंडल म्हणतात. प्राचीन काळी हा प्रदेश शूरसेन जनपद या नावाने ओळखला जात असे. या प्रदेशाला शूरसेन हे नाव शत्रुघ्नाचा पुत्र शूरसेन याच्या



मथुरेचे प्रवेशद्वार

वरून पडले असावे. कारण शूरसेनाने या प्रदेशावर काही काळ राज्य केले होते. मथुरा ही त्या जनपदाची राजधानी होती.

मथुरेचे प्राचीन नाव मधुरा असेही सापडते. मधुपूर, मधुपुरी, मधूपिका, मधूपघ्ना अशीही अन्य नावे आढळतात.

मधुरा हे नाव मधू नामक दैत्यावरून पडलेले आहे. मधुपुरीही तसेच. याचे कारण हे नगर मधूने वसवले होते. त्याच्या जवळच एक निबिड अरण्य होते. त्याला मधुवन म्हणत (वा. रा. उ. ६२.१७). सांप्रतचे महोली गाव म्हणजेच मधुपुरी, असे समजतात. हे गाव मथुरेपासून साडेतीन मैल नैर्ऋत्येस आहे.

हरिवंशावरून कळते, की प्राचीन मथुरा यमुनेच्या तटावर वसली होती व तिचा आकार अर्धचंद्रासारखा होता. यमुनेचा प्रवाह प्राचीन कालापासून बदलत आला आहे. सांप्रत ज्या गावाला महोली म्हणतात, त्याच्या जवळून यमुना वाहत असावी. म्हणूनच रामायणात मधुपुरीला यमुनातटस्थित म्हटले आहे. वर्तमान मथुरा व महोली यांच्यामध्ये बऱ्याचशा प्राचीन टेकड्या दिसतात. त्या टेकड्यांच्या पोटातून प्राचीन अवशेष मोठ्या संख्येने प्राप्त झाले आहेत. त्यांवरून त्या टेकड्यांच्या प्रदेशात प्राचीन काळी वस्ती होती, असे कळते.

रामचंद्राचा बंधू शत्रुघ्न याने मधुपुत्र लवण याला जिंकून त्या भागावर आधिपत्य मिळवले आणि मधुपुरीजवळचे मधुवन तोडून त्या ठिकाणी नवी मथुरा वसवली. त्यानंतर अनेक वेळा मथुरेच्या वस्तीत परिवर्तने झाली असण्याची शक्यता आहे.

एक वैभवशाली आणि वाजती-गाजती नगरी म्हणून मथुरेचे वर्णन हरिवंशामध्ये आहे (१.५४. ५७–६२). इथले व्यापारी आपल्या नौकेत माल भरून विक्रीसाठी पाटलिपुत्र नगराला जात. तिथूनही मथुरेला माल आणीत. या दोन नगरांचा व्यापारी संबंध घनिष्ठ होता. इंद्रप्रस्थ, श्रावस्ती, कौशांबी, वैशाली, इ. नगरांशीही मथुरेचा व्यापारी संबंध होता.

मथुरेवर सूर्य व सोम या दोन्ही वंशांनी राज्य केले आहे. यादव वंश हा सोमवंशीच होता. त्याची सत्ता मथुरेवर बराच काल नांदत होती. मधूला दैत्य म्हटले असले, तरी तोही यादवांमधलाच एक प्रतापशाली राजा होता. त्याचा पुत्र लवणही पराक्रमात बापासारखाच होता. लवणाने आपल्या राज्याची कक्षा खूप वाढवली होती. पण तो उन्मत्त झाला, प्रजापीडक बनला व सज्जनांचा छळ करू लागला. म्हणूनच रामाच्या आज्ञेने शत्रुघ्न त्याच्यावर चालून गेला आणि त्याने लवणाला युद्धात ठार केले. तेव्हापासून मथुरा सूर्य वंशाच्या अधीन झाली. पण कालांतराने भीमसात्वत या यादवाने पुनश्च मथुरेवर अधिकार मिळवला. याच वंशात श्रीकृष्ण जन्मला. त्याने कंसाचा वध करून मथुरेला पुन: एकदा प्रजापीडक राजाच्या तावडीतून मुक्त केले.

कंस हा मगधसम्राट जरासंध याचा जावई होता. त्याने कंसवधाचा सूड घेण्यासाठी मथुरेवर १८ वेळा स्वारी केली. त्यांपैकी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१७ वेळा त्याला पराजित होऊन परत जावे लागले. अठराव्या खेपेस मात्र कालयवन त्याच्या जोडीला मिळाला आणि त्या दोघांच्या संयुक्त सामर्थ्यापुढे टिकाव न लागून यादवांना मथुरा सोडावी लागली. कृष्णाने त्यांना पश्चिम समुद्राच्या काठी द्वारका नावाची नगरी निर्माण करून तिथे वसते केले.

इतिहास—बुद्धाच्या काळात अवंतिपुत्र नावाचा राजा मथुरेवर राज्य करीत होता. पुढे हा प्रदेश मौर्यांच्या सत्तेखाली गेला. मौर्यांनंतर शुंग वंशाला मथुरेचे आधिपत्य मिळाले. या शुंगांच्या कालातच यवनांनी मथुरेवर आक्रमण केल्याचे दाखले तत्कालीन साहित्यात मिळतात.

त्यापुढचा काल शक-कुशाणांचा होय. त्यांचे अभिलेख व अनेक मुद्रा मथुरेत मिळाल्या आहेत. राजुल व शोडास अशी नावे त्या मुद्रांवर मिळतात. मथुरेला एक सिंहशीर्ष स्तंभ मिळाला असून, त्यावर लिहिले आहे, की राजुलच्या कारकीर्दीत मथुरेत एक स्तूप व एक संघाराम निर्माण केला गेला. शोडासच्या शिलालेखात त्याच्या कोशाध्यक्षाने मथुरेत पुष्करणी, कूप व आराम निर्माण केल्याचे लिहिले आहे. त्यापुढे मथुरा नागवंशी नरेशांच्या सत्तेत आली. मथुरेतले कित्येक नाग राजे आपल्या नावापुढे 'दत्त' शब्द लावीत. अशा दत्तनामान्त मुद्रा तिथे कितीतरी सापडल्या आहेत. नागांच्या सत्ताकालात मथुरेत शैव पंथाची विशेष उन्नती झाली. त्याच कालात श्वेतांबर जैनांनी स्कंदिल नामक आचार्यांच्या अध्यक्षतेखाली एक मोठी विद्वत्सभा भरवली. त्या सभेत जैनांच्या कित्येक ग्रंथांचे शुद्ध पाठ ठरवले गेले, या पाठशुद्धीला माथुरीवाचना असे नाव दिलेले आहे.

पुढे मथुरेवर गुप्तांची सत्ता प्रस्थापित झाली. गुप्तकालात इथे बौद्ध धर्माने आपला बराच जम बसविला. फाहियानने या बौद्ध प्रभावाचे वर्णन केले असून, तिथल्या नागरिकांच्या सभ्यतेची व समृद्धीची तोंडभर प्रशंसा केली आहे. पुढच्या कालातील मथुरेच्या नागरिकांचे वर्णन युआन च्वांग याने केले असून, त्यांची विद्वत्ता, गुणग्राहकता, सभ्यता, इ. गुणांचा गौरव केला आहे. टॉलेमी व अल् बिरूनी यांनी मथुरेला देवतांचे नगर म्हटले असून, तिथे प्रामुख्याने वासुदेव-कृष्णाची पूजा होते, असे सांगितले आहे.

इ. स. च्या पाचव्या शतकात भारताचा पश्चिम भाग व मध्यदेश यांवर हूणांचे आक्रमण झाले. त्यांत मथुरेवरही त्यांची सत्ता आली. त्या काळी मथुरानगर फार श्रीमंत होते. इथे अनेक बौद्ध स्तूप, संघाराम, जिनालये व हिंदूंची देवालये वैभवाने नांदत होती. हूणांनी त्या सर्वांचा विध्वंस केला आणि मथुरेचीही जाळपोळ केली. चंद्रगुप्त विक्रमादित्याने कृष्णाच्या जन्मस्थानी मंदिर बांधले होते, तेही हूणांच्या भक्ष्यस्थानी पडले. त्यानंतर सातव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत हर्षवर्धन, वर्म, गुर्जरप्रतीहार व गाहडवाल या वंशांनी मथुरेवर सत्ता गाजवली.

इ. स. १०१७ साली मथुरेवर गझनीच्या महमुदाने आक्रमण केले. त्यानेही तिथल्या बहुतेक मूर्तींचा आणि मंदिरांचा उच्छेद केला. सतत वीस दिवस त्याने मथुरा लुटली. या लुटीत त्याला बहुमूल्य माणकांनी जडवलेल्या पाच मोठ्या सुवर्णमूर्ती मिळाल्या. त्यांतल्या एका मूर्तीचेच वजन १४ मण होते. चांदीच्या मूर्ती तर असंख्य होत्या. त्या सर्वांची लुटालूट करून त्याने ती संपदा १०० उंटांवर लादली आणि गझनीला नेली. इ. स. ११९३ साली मुहंमद घोरी याने कनोजच्या राज्यावर चढाई केली. जयचंदाने त्याच्याशी घनघोर मुकावला केला. पण शेवटी जयचंदाला युद्धात पराजित होऊन मृत्युदंड भोगावा लागला. तेव्हापासून मथुरा मुसलमानी सत्तेखाली गेली. त्यानंतर मथुरेवर काही काल मराठ्यांनी राज्य केले; पण इ. स. १८०३ साली मराठ्यांचा पराभव होऊन मथुरेवर इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाली.

मथुरागौरव—मथुरा हे महान पुण्यक्षेत्र मानले गेले आहे. भिन्न भिन्न धार्मिक संप्रदाय मथुरेत वाढले आणि पोसले. त्यांच्या बरोबरच मथुरेचेही माहात्म्य वृद्धिगत झाले. मथुरेत राहणाऱ्या लोकांचा गौरव वराह पुराणात पुढीलप्रमाणे केला आहे–

मथुरायां महापुर्यां ये वसन्ति शुचिव्रताः ।
बलिभिक्षाप्रदातारो देवास्ते नरविग्रहाः ।।

अर्थ—महापुरी मथुरेत जे लोक शुचिर्भूतपणे राहतात व याचकांना अन्न व भिक्षा देतात, ते मानव देहधारी देव होत.

मथुरेत श्राद्धाचेही विशेष महत्त्व आहे. त्याविषयी वराह पुराणातला श्लोक असा –

मथुरामण्डलं प्राप्य श्राद्धं कृत्वा यथाविधि ।
तृप्तिं प्रयान्ति पितरो यावत्स्थित्यग्रजन्मनः ।।

अर्थ—यात्रिकाने मथुरेत आल्यावर यथाविधि श्राद्ध करावे. त्यामुळे पुढचा जन्म मिळेपर्यंत पितर तृप्त राहतात.

कलांचा विकास—मथुरेत ललितकलांचा जो विकास झाला, त्याचा इतिहास प्रदीर्घ आहे. प्राचीन कालापासून मथुरा हे एक धार्मिक केंद्र असल्यामुळे, सनपूर्व कित्येक शतके इथे स्थापत्य व मूर्तिकला यांचा प्रारंभ झाला होता. इराणी व ग्रीक संस्कृतींचा भारतीय संस्कृतीशी जो समन्वय झाला, त्याचे मूर्त रूप मथुरेच्या प्राचीन कलेत पाहायला मिळते. शक-कुशाणांच्या कालात मथुरेची मूर्तिकला खूप विकसित झाली. त्या कालापासून वैदिक, जैन व बौद्ध या तीन्ही धर्मांना इथे सहिष्णुतापूर्ण वातावरणात एकसमयावच्छेदाने वाढायला अवसर मिळाला. गुप्तकालाच्या अखेरीपर्यंतचे वरील तिन्ही धर्मांचे कलावशेष इथे मोठ्या संख्येने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मिळाले आहेत. गुप्तकालानंतरही कित्येक शतके इथे मूर्तिकला व वास्तुकला यांचा उत्कर्ष चालू राहिला. मात्र त्यात गुप्तकालीन सौष्ठव राहिले नाही.

मथुरेत सापडलेले बौद्ध स्तूप, विटा व दगड यांचे बनवलेले होते. त्यांच्या खाली एक चौथरा असे. रचना अंडाकृती लंबगोल असे. शिखरावर छत्र असे. स्तूपाचा बाह्य भाग कोरीव नक्षीने सुशोभित केलेला असे. प्रदक्षिणेसाठी वेदिका असे. वेदिकेचे सर्व दगड मूर्ती व अलंकरणे यांनी सुशोभित केलेले असत. आत प्रवेश करण्यासाठी चारही दिशांना चार तोरण दरवाजे असत.

हिंदूंच्या मंदिरांची रचना याहून वेगळी असे. त्यांची मंदिरे शिखरयुक्त असत. त्यांचा बाह्य भाग देव, यक्ष, किन्नर, अप्सरा, इत्यादींच्या प्रतिमांनी सजविलेला असे. गुप्तकालात अशी मंदिरे मोठ्या संख्येने निर्माण झाली. पण मुसलमानी आक्रमणात त्यांपैकी बहुतेकांचा विध्वंस झाला. अकबर व जहांगीर यांच्या काळात मथुरा–वृंदावनामध्ये पुनश्च मंदिरनिर्मिती झाली.

मथुरेतल्या कंकाली टेकड्यांवर व तिच्या आसपास जैनधर्मसंबंधित विपुल शिल्पसामग्री मिळाली आहे. त्यात कित्येक मूर्तीही आहेत. पण इथल्या मूर्तिसंभारात हिंदू मूर्तींचे वैशिष्ट्य उठावदारपणे दिसते. इथेच सर्वप्रथम अनेक देवप्रतिमांची निर्मिती झाली. ब्रह्मा, विष्णू, शिव, कृष्ण, बलराम, कार्तिकेय, गणेश, इंद्र, अग्नी, नवग्रह, सूर्य, कामदेव, हनुमान, लक्ष्मी, सरस्वती, पार्वती, महिषमर्दिनी, सिंहवाहिनी, सप्तमातृका, गंगा, यमुना, इ. इथल्या पौराणिक मूर्ती रचना, सौष्ठव, नाजूकपणा, प्रमाणबद्धता, इ. दृष्टींनी उल्लेखनीय आहेत. शिवाच्या ध्यानमग्न मूर्ती अनेक ठिकाणी आढळतात. पण इथे विष्णूचीही ध्यानमग्न मूर्ती मिळाली आहे. जैन मूर्तींत तीर्थंकर, अंबिका, चक्रेश्वरी, इ. मूर्ती अप्रतिम आहेत. जैनांचे कित्येक कलापूर्ण आयागपट्टही इथे मिळाले आहेत. बौद्ध मूर्तींत बुद्ध, बोधिसत्त्व, यक्ष, इ. मूर्ती सापडल्या आहेत. यातल्या काही मूर्ती उभ्या, तर काही पद्मासनावर अधिष्ठित आहेत. यक्षांमध्ये कुबेर व त्याची स्त्री हारीती यांना विशेष महत्त्व आहे. संगीत, नृत्य व सुरापान या गोष्टी त्यांना अतीव प्रिय आहेत. कुबेराच्या अशा आनंदरूप जीवनाची अभिवृद्धी व्यक्त करणाऱ्या कित्येक मूर्ती इथे मिळाल्या आहेत. नागांच्या मूर्तीत पुरुषाकार व सर्पाकार अशी दोन्ही रूपे आढळतात. शेषाचा अवतार या स्वरूपात बलरामाच्या ज्या मूर्ती मिळाल्या आहेत, त्यांच्या गळ्यात वैजयंतीमाला व देहावर अनेक अलंकार असतात. त्यांच्या एका हाती मुसळ व दुसऱ्या हाती मदिरापात्र असते. बहुतेक नागमूर्ती कुशाणकालीन आहेत. या सर्व मूर्ती लाल वालुकामय दगडापासून बनविलेल्या आहेत. असे दगड कलाकारांना मथुरेजवळ तांतपूर, फत्तेपूर सिकरी, रूपवास, इ. ठिकाणी मिळाले व मूर्तींची घडण करण्याच्या कामी ते मुलायम ठरले.

मथुरेच्या उत्खननात बऱ्याच मृण्मय मूर्तीही सापडल्या आहेत. त्या जरी देव-देवतांच्या असल्या, तरी त्यांचा संबंध लोकजीवन आणि लौकिक समजुती यांच्याशी अधिक आहे. त्या नागरीक व ग्रामीण लोकजीवनावर प्रकाश टाकण्याच्या कामी समर्थ ठरल्या आहेत. पंखा घेतलेली स्त्री, रथयात्रेला निघालेला राजकुमार, हवेत उडणाऱ्या किन्नर-किन्नरी, बाळाला मांडीवर घेऊन बसलेली माता, शुकक्रीडा, असे त्या मृण्मय मूर्तींचे विषय आहेत.

मथुरेच्या कलासंभारात भारतीय इतिहास, संस्कृती आणि मूर्तिविज्ञान यांच्या अध्ययनासाठी खूपच सामग्री उपलब्ध आहे. पाहा –वृंदावन. [मथुरा – कृष्णदत्त वाजपेयी.; प्रा. भा. न. न. जी. ; ब्र. सां. इ.; एन्सा. रि. ए.; हि. जॉ. ए. इं.; प्रा. भा. सां. कें.]

मथुरानाथ

(इ. स. चे १९ वे शतक) एक ज्योतिषशास्त्रज्ञ. हा मालवीय ब्राह्मण होता. याच्या वडिलांचे नाव सदानंद असून, हा मूळचा पाटण्याचा रहिवासी होता. पुढे हा काशीला राहू लागला. काशीच्या संस्कृत पाठशाळेत हा काम करीत असे. याला फारसी भाषा चांगली येत होती. काशीचा राजा शिवप्रसाद याचा आजा दयालुचंद्र. त्याचा मथुरानाथाला आश्रय होता.

यंत्रराजघटना व ज्योतिःसिद्धान्तसार हे दोन ग्रंथ याने रचले आहेत. यंत्रराजघटना या ग्रंथात याने काही ताऱ्यांचे शरभोग शके १७०४ च्या वेधाने काढून दिले आहेत. यंत्रराज या नावाचे एक वेधोपयोगी यंत्र आहे. ज्योतिःसिद्धान्तसार हा ग्रंथ आठ अध्यायांत विभागला आहे. [भा. ज्यो. शा.]

मदनचतुर्दशी

एक तिथिव्रत. चैत्र शुद्ध चतुर्दशीला मदनचतुर्दशी म्हणतात. हिला मदनभंजी असेही एक नाव आहे. या दिवशी मदनाची पूजा करतात व मदनाला संतुष्ट करण्यासाठी गायन, वादन आणि कामोत्तेजक बोलणे, असले प्रकार करतात. फल – इच्छाप्राप्ती. [हि. ध.]

मदनद्वादशी

एक तिथिव्रत. चैत्र शुद्ध द्वादशीला हे व्रत करतात. व्रतविधी असा – पाण्याने भरलेले एक भांडे घेतात. त्यात थोडे तांदूळ व फळे घालतात. नंतर त्या पात्रावर तांब्याचे तबक ठेवतात. तबकात गूळ, खाद्यपदार्थ आणि सोने घालतात. याच तबकावर काम आणि रती यांच्या मूर्ती (चित्रे) काढतात. त्यांच्यापुढे नैवेद्य म्हणून खाद्यपदार्थ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठेवतात. नंतर गीतगायन करतात. दुसऱ्या दिवशी ते जलपूर्ण पात्र दान देऊन ब्राह्मणांना भोजन घालतात. सांगतेच्या वेळी पुढील मंत्राने मदनाची प्रार्थना करतात –

प्रीयतामत्र भगवान् कामरूपी जनार्दनः ।
हृदये सर्वभूतानां य आनन्दोऽभिधीयते ।।

अर्थ – कामस्वरूपी जनार्दन सर्वांच्या हृदयांमध्ये आनंदरूपाने राहतो तो (या व्रताने) संतुष्ट होवो.

या वेळी व्रतधारी व्यक्तीने अळणी भोजन करायचे असते.

या व्रताचा दुसरा पर्याय असा – चैत्र शुद्ध द्वादशीला रात्री केवळ एक फळ खाऊन उघड्या जमिनीवर झोपायचे. दुसऱ्या दिवशी उपवास करून विष्णूची पूजा करायची. याप्रमाणे एक वर्ष व्रत केल्यावर उद्यापनाच्या वेळी एक गाय व काही वस्त्रे दान द्यायची. तिळाचे हवन करायचे. दितीने पुत्रप्राप्तीसाठी हे व्रत केले होते, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे (७.७.२६). फल – पापनिवृत्ती आणि धन व पुत्र यांची प्राप्ती. [हि. ध.; पु. इं.]

मदनमहोत्सव एक तिथिव्रत. चैत्र शुद्ध त्रयोदशीला हे व्रत करतात. यात कामदेवाच्या मूर्तीची किंवा त्याच्या चित्राची समंत्रक पूजा करातात. नंतर दोन गायी दान देतात. त्याच दिवशी पत्नी आपल्या पतीला कामदेव मानून त्याची पूजा करते. रात्री नृत्य-नाट्य करून जागर करतात. फल– दुःख व रोग यांतून मुक्ती आणि कीर्ती व संपत्ती यांचा लाभ. या व्रताचा कालावधी अनेक वर्षे आहे. या तिथीलाच मदनाचा पुनर्जन्म झाला, अशी कथा आहे. [हि. ध.]

मदारी धंद्यावरून बनलेली एक जात. या जातीत मुसलमानांचा भरणा आहे. हे सापाचा खेळ करतात; त्याचप्रमाणे हातचलाखीचे अथवा जादूचेही खेळ करतात. हे टोळीने न फिरता एकटे आपल्या बायकामुलांसह फिरतात; घरोघर भिक्षाही मागतात. गंडे, ताईत, इ. गोष्टी तयार करून त्या विकतात. पाहा– गारुडी. [म. ग्रा. स.; गां. गा.]

मदुरा तमिळनाडमधले एक महत्त्वाचे शहर व पुण्यक्षेत्र. हे मद्रासच्या खालोखाल मोठे असून, याची लोकवस्ती चार लाखांच्या वर आहे. हे शहर वैगाई नदीच्या तीरावर वसले आहे. याच्या पूर्व, पश्चिम व उत्तर या तीन्ही दिशांना जमीन उंच उंच होत गेलेली असून, दक्षिण दिशेला ती उतरती आहे. दक्षिण बाजूस मोठमोठ्या नारळीच्या बागा आहेत.

मदुरेचे प्रामुख्याने तीन भाग पडतात– (१) जुने शहर (२) टेप्पाकुलम तलावाकडील बागांनी व उन्हाळी बंगल्यांनी व्यापलेला भाग व (३) वैगाई नदीच्या पलिकडे वसलेली नवी पेठ. जुने शहर किल्ल्याच्या सभोवार वसलेले असून, त्याच्या मध्यभागी मीनाक्षीचे मंदिर आहे. मंदिराच्या चारही बाजूंना, मंदिराच्या तटाशी समांतर असे अनेक रस्ते आहेत. प्राचीन काळी या शहराभोवती उंच तट होता. त्याच्या चारही अंगांना उतरता भूभाग असून, त्याच्या चौफेर मोठा खंदक खणलेला होता. तटाला ७२ बुरुज होते. तटाच्या चारही दिशांना व वैगाई नदीच्या अंगाने नगरप्रवेशासाठी भव्य दरवाजे होते. हा तट



मीनाक्षी-मंदिराचे विमान

विश्वनाथ नायक याने इ. स. १५५९ साली बांधला. सांप्रत मात्र तो अस्तित्वात नाही. क्वचित त्याचे अवशेष तेवढे दिसतात.

प्राचीन काळापासून हे शहर निरनिराळ्या राजघराण्यांची राजधानी म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे इथे अनेक भव्य प्रासाद निर्माण झालेले होते. पांड्य राजे व नायक राजे इतिहासात प्रसिद्ध आहेत. रामायण कालापासून इथे पांड्य वंश नांदत असल्याचा इतिहास मिळतो. नायक घराणे हे त्यांच्या नंतरचे. या दोन्ही राजकुलांत पराक्रमी व महत्त्वाकांक्षी पुरुष निर्माण झाले. विजयनगर येथील राजांच्या पुरस्कारामुळे नायक वंश उदयाला आला. या नायकांनी मदुरेत खूप सुधारणा केल्या. इथले मीनाक्षीचे मंदिरही त्यांनीच बांधले. इ. स. १७३६ च्या सुमारास या नायक घराण्याची इथली सत्ता संपुष्टात आली. त्यानंतर कर्नाटकाचा नबाब, हैदरअल्ली, मराठे अशा निरनिराळ्या लोकांनी मदुरेवर आक्रमणे केल्यामुळे काही काळ तिथे अंदाधुंदी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माजली होती. इ. स. च्या १८ व्या शतकाच्या अखेरीस इंग्रजांनी मदुरेवर सत्ता मिळविली आणि ही अंदाधुंदी थांबली.

मदुरा हे मोठे व्यापारी शहर असून, प्राचीन काळापासून त्याचा युरोपातील देशांशी व्यापार चालत असल्याचे दाखले मिळतात, ग्रीक व रोमन लोकांचे मदुरेशी दळणवळण होते. इथे त्यांची बरीच नाणी सापडतात. युरोपातले लोक या शहराला भारताचे अथेन्स म्हणत. मदुरेचे व्यापारी महत्त्व आजही टिकून आहे. इथे हातमागाचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. सुमारे लाखभर कोष्टी या धंद्यावर उपजीविका करतात. इथे बऱ्याच कापडगिरण्या व औद्यागिक कारखानेही आहेत. शिवाय रंगकाम, नक्षीकाम, हस्तिदंतावरील कोरकाम, सोनारकाम, ओतीव मूर्ती बनवण्याचे काम अशी बरीच कामे इथे चालतात. इथले सोनेरी व रुपेरी जरीचे कापड विशेष प्रसिद्ध आहे.

प्राचीन काळापासून मदुरा हे मोठे विद्याकेंद्र होते. तमिळसंघम नावाचा, कवी, पंडित व आचार्य यांचा तिसरा समुदाय मदुरेतच निर्माण झाला होता. या संघमचा प्रभाव एवढा भारी होता, की त्याने मान्यता दिल्यावाचून कोणताही ग्रंथ राजमान्य व अध्यापनयोग्य समजला जात नसे. वल्लुवर हा कवी आपला तिरुकुरळ हा ग्रंथ विद्वन्मान्यतेसाठी इथेच घेऊन आला होता. तमिळ भाषेची अभिवृद्धी करण्यात या नगराचा मोठा हात आहे. सांप्रतही इथे अनेक प्रकारची विद्यालये व महाविद्यालये चालू आहेत. औद्योगिक शिक्षणाच्याही शाळा आहेत.

मीनाक्षीमंदिर – मीनाक्षी ही या नगराची देवता असून, तिचे



अष्टशक्तिमंडप–मीनाक्षीमंदिर, मदुरा

मंदिरही भव्य, विस्तृत आणि कलामंडित असे आहे. इतके सुंदर कलापूर्ण मंदिर भारतात अन्यत्र नाही.

या मंदिराने १४ एकर जागा व्यापलेली आहे. याच्या सभोवती चिरेबंदी व उंच तट असून, त्याच्या चारही दिशांना दरवाजे आहेत. तटाची उंची २५ फूट असून, त्यावर लहानमोठी २७ गोपुरे आहेत. सर्वांत उंच गोपुर दक्षिणेचे असून, सर्वांत सुंदर पश्चिमेचे आहे. तटाच्या आतल्या अंगाला अनेक मठ, सभामंडप, छोटी छोटी देव-मंदिरे, तलाव, इ. वास्तू आहेत. त्याच्या आत दुसरा तट असून, त्याला ठिकठिकाणी अनेक दरवाजे असल्यामुळे आतल्या मीनाक्षीमंदिराकडे कोणत्याही दरवाज्याने जाता येते. यात्रेकरू बहुधा अष्टशक्ती मंडपातून मंदिरात प्रवेश करतात. मीनाक्षीच्या मंदिरात पोचेपर्यंत यात्रेकरूंना अनेक सभामंडप ओलांडावे लागतात. त्यांतला एक मंडप सहस्रस्तंभ मंडप या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्यक्षात मात्र त्याला ८२५ च खांब आहेत. त्यांतल्या त्यांत पुदुमंडपम या मंडपाची कलाकुसर अप्रतिम आहे. या मंडपात नटराजाची नृत्याच्या पवित्र्यात उभी असलेली मूर्ती असून, ती प्रेक्षणीय आहे. तिथेच एक स्वरस्तंभ आहे. त्यातल्या उपस्तंभावर आघात केला, की क्रमाने सा, रे, ग, म, इ. सप्तस्वर निघतात. तिरुमल नायकाने देवीला उन्हाळयात आरामशीरपणे राहता यावे म्हणून हा मंडप बांधला आणि त्यातील हवा थंडगार राहण्यासाठी भोवताली पाटातून पाणी वाहत राहण्याची योजना केली. या मंडपाच्या दर्शनी भागावर घोडेस्वारांची सुंदर व मनमोहक चित्रे खोदलेली आहेत.

हे सगळे सभामंडप मल्या मोठ्या एकसंघ शिळांनी उभारलेले असून, त्यांवर देवादिकांच्या, संतांच्या व आचार्यांच्या मूर्ती सुबकपणे कोरलेल्या आहेत. त्यामुळे या मंडपाना एक असाधारण सौंदर्य प्राप्त झाले आहे. या मंडपांच्या मध्येच एक तलाव लागतो. त्याला सुवर्णपद्म तलाव म्हणतात. या तलावात यात्रेकरूनें स्नान करायचे असते.

मीनाक्षीच्या मंदिराचे शिखर सोन्याचे आहे. समोर ध्वजासाठी सुवर्णस्तंभ आहे. तिच्या पुढच्या सभामंडपाच्या दक्षिणेस तिचे शयनमंदिर आहे. प्रदक्षिणेच्या मार्गात ज्ञान, क्रिया, बल, इ. शक्तींच्या, अनेक देवदेवतांच्या, तसेच तिरुमल नायक व त्याच्या दोन राण्या यांच्या मूर्ती आहेत. मंदिराचे वैभव डोळयांत न मावण्याइतके भव्य आहे.

मीनाक्षीची मूर्ती द्विभुज आणि उभी आहे. ती काळ्या पाषाणाची असून पूर्वाभिमुख आहे. तिचे पाय कमळात आहेत. डावा हात खाली सोडलेला असून, उजव्या हाती लहान अशा चवरीवर पोपट आहे. तिच्या डाव्या-उजव्या अंगी गणपती व सरस्वती आहेत. मेहरपीवर किन्नरगण कोरलेले आहेत. श्री शंकराचार्यांनी एका श्लोकात मीनाक्षीचे स्तवन केले आहे, ते असे –

नानायोगिमुनीन्द्रहृन्निवसतीं नानार्थसिद्धिप्रदां
नानापुष्पविराजिताङ्घ्रियुगलां नारायणेनार्चिताम् ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नादब्रह्ममयीं परात्परतरां नानार्थतत्त्वात्मिकां
मीनाक्षीं प्रणतोऽस्मि सन्ततमहं कारुण्यवारां निधिम् ।।

अर्थ – नाना योगी व मुनिश्रेष्ठ यांच्या हृदयात निवास करणारी, नाना अर्थ व सिद्धी देणारी, नाना पुष्पांनी जिची चरणकमले विराजित आहेत अशी, नारायणाने पूजिलेली, नादब्रह्ममयी, परात्परतर, नाना अर्थ व तत्त्वे यांचा आत्माच असलेली आणि करुणासागर अशा मीनाक्षीला मी सतत नमस्कार करतो.

याच आवारात मीनाक्षीमंदिराच्या उत्तर बाजूला सुंदरेश्वराचे मंदिर आहे. या मंदिरात अनेक शैव संतांच्या मूर्ती आहेत. शिवाय तिथे एका जुनाट कदंब वृक्षाचा बुंधा आहे. पूर्वी या जागी कदंबवन होते, असे सांगतात. त्यामुळेच मीनाक्षीचे दुसरे नाव कदंबवनवासिनी असे आहे. या मंदिराच्या प्रदक्षिणामार्गात दुतर्फा दगडी स्तंभ उभे केलेले असून, त्यावर शिलांचेच आच्छादन घातलेले आहे. मंदिराच्या दक्षिण बाजूस एक मंडप आहे, त्याला कल्याणमंडप असे म्हणतात. त्यातच दरवर्षी सुंदरेश्वर व मीनाक्षी यांचा विवाहसोहळा होतो.

या सुंदरेश्वराचे मूळ द्राविड नाव छोक्कलिंगम असे होते. तो द्रविडलोकांचा उपास्य देव होता. आर्य-द्रविड संस्कृतिसमन्वयाच्या आंदोलनात आर्यांनी त्याला शिवाचा अवतार मानून, त्याचे सुंदरेश्वर असे नाव ठेवले. मीनाक्षी ही तशीच द्राविड शक्तिदेवता होय. ती उग्र आणि भयंकर होती. आर्यांनी तिला पार्वतीचा अवतार मानले आणि सुंदरेश्वर शिवाशी तिचे लग्न लावून दिले. अशा प्रकारे मूळच्या या स्थानिक देवता शैव धर्मात प्रतिष्ठित झाल्या. त्यांचा हा लग्नसोहळा दरवर्षी चैत्र महिन्यात तिथे साजरा होतो.

मीनाक्षी देवी–मदुरा

हे लग्न लावण्यामागे एक उदात्त हेतू आहे. तो म्हणजे शैव, शाक्त व वैष्णव या संप्रदायांना एकत्र आणण्याचा व त्यांच्या मधली परस्पर कटुता कमी करण्याचा होय. मदुरेचा राजा तिरुमल नायक याने ही प्रथा पाडली.

तिरुमल नायक हा शैव नसून वैष्णव होता. त्याच्या काळी शैव व वैष्णव यांच्या मधून विस्तव जात नसे. मदुरेपासून सहा कोसांवर अलगर नावाचा एक देव होता. वैष्णव त्याला विष्णूचा अवतार मानून त्याची उपासना करीत. तो मीनाक्षीचा भाऊ मानला जात असे. तिरुमल नायकाने योजना केली, ती अशी– या अलगरने मीनाक्षीचे कन्यादान करण्यासाठी दर वर्षी समारंभाने मदुरेकडे येण्यासाठी निघावे; पण ते दोन दिवस उशिरा. वैगाई नदी उतरून पुढे येण्यापूर्वी त्याला कळावे, की मीनाक्षीने त्याची वाट पाहून स्वतःच आपला लग्नसोहळा उरकून घेतला. ही प्रथा अजूनही तिथे चालू आहे. अलगर नदीपलिकडे आला, की तिथले शैव आणि वैष्णव जमून त्याच्या दर्शनाला जातात आणि त्याने रागावून जाऊ नये म्हणून त्याला विविध पूजोपचार समर्पितात.



स्वरस्तंभ–मीनाक्षीमंदिर, मदुरा

मीनाक्षीची कथा– मीनाक्षी ही मलयध्वज पांड्याची कन्या. जन्मापासूनच ती पुरुषी वळणाची होती. वयात येण्यापूर्वीच तिने शस्त्रविद्या अवगत करून घेतली होती. बापामागून तीच पांड्य देशाची राणी झाली. ती वयात येताच तिच्या छातीवर दोहोंच्या मध्ये तिसरा एक स्तन निर्माण झाला. तिची आई तिला लग्नाचा आग्रह करू लागली, तेव्हा ती निग्रहाने म्हणाली. 'मला योग्य असा पती मी युद्धात पारखून घेईन.' मग तिने सैन्य जमा करून दिग्विजयाचे प्रस्थान ठेवले. एकामागून एक देश जिंकीत ती हिमालयाच्या पायथ्याशी जाऊन पोचली. तिने पुढे कैलासावर चाल करण्याचा मनसुबा रचला. ही वार्ता नारदाने शिवाला सांगितली. शिव एकाएकी तिच्या पुढे प्रकट झाला. ते देदीप्यमान पुरुषत्व पाहून मीनाक्षीला प्रथमच लज्जा उत्पन्न झाली. त्यासरशी तिचा मधला स्तनही अदृश्य झाला. मग शिव तिला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणाला, 'तू मदुरेला परत जा आणि लग्नाची तयारी कर. मी सोमवारी येऊन तुझे पाणिग्रहण करीन.' मीनाक्षीने शिवाची आज्ञा मानली. तिचे शिवाशी लग्न झाले. विष्णूने त्या दोघांची हातमिळवणी केली.

तिरुमल नायकाचा महाल – हा राजप्रासाद हे मदुरेचे आणखी एक भूषण आहे. हा भव्य प्रासाद इ. स. च्या १७ व्या शतकात बांधला गेला. या महालाचे छत, गोलघुमट, कमानी, इ. सर्व गोष्टी वास्तुशास्त्राच्या दृष्टीने अद्‌भुत आहेत. या महालाच्या दर्शनी भागाला स्वर्णविलासम असे नाव आहे. विटा आणि चुना यांनी बांधलेल्या या वास्तूला मध्ये एकही खांब नाही व एकही तुळई नाही. सांप्रत या महालात सरकारी कचेऱ्या आहेत. [मदुरा गॅझे.; द्र. गॉ. मॉ. हिं.]

मदुवण द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती केरळात त्रिवांकुरच्या डोंगराळ भागात आढळते. हे एका ठिकाणी स्थायिक राहत नाहीत. जी जमीन एकदा नांगरली व जिच्यातून एकदा पीक काढले, ती ज़मीन ते पीकासाठी पुन्हा उपयोगात आणीत नाहीत. दुसऱ्या वर्षी ते दुसरीकडे जातात. त्यांच्या या भटक्या जीवनामुळे त्यांची घरे म्हणजे लहान लहान झोपड्या असतात. त्यांना एकच दरवाजा असतो. हे लोक म्हशी पाळतात. यांच्या कमरेभोवती एक फडके गुंडाळलेले असते. खांद्यावर घोंगडी व डोक्याला पागोटे असते. कानात विगबाळी, अनामिकेत अंगठी व दंडात कडे असते.

यांच्यांत सामाजिक नीतिनियमांचे निर्बंध फार कडक असतात. अविवाहित तरुणांचे वर्तन चोख असले पाहिजे, असे ते समजतात. दहा वर्षांवरील सर्व अविवाहित मुलगे एका सामुदायिक शयनगृहात झोपतात. अविवाहित मुलींचीही वेगळी शयनगृहे असतात. त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी एक वृद्ध स्त्री नेमलेली असते.

विवाहप्रथा – हे लोक मामेबहिणीशी व आतेबहिणीशीही लग्न करतात. लग्ने गोरज मुहूर्तावर आणि मुलीच्या घरी होतात. नवरदेवाला मुलीच्या घरी नेण्यासाठी मुलीकडील एक कुमारिका येते. लग्नाच्या वेळी मुलीचे आईबाप तिथे नसतात. त्यांनी मुलीचे लग्न पाहू नये, अशी समजूत आहे. मुलाकडून मुलीला काचेच्या बांगड्या, साड्या, फणी व कर्णफुले मिळतात. त्यांत असणारी फणी बांबूची असते. ती नवरदेवानेच बनवावी लागते. ही फणी नवऱ्यामुलीने आपल्या वेणीत सौभाग्यचिन्ह म्हणून ठेवायची असते.

मुलीला पळवून नेऊन तिच्याबरोबर लग्न करण्याची प्रथाही यांच्यांत आहे. एक पुरुष अनेक बायका करू शकतो, पण दुसऱ्या बायकोने पहिलीच्या आज्ञेत वागले पाहिजे, असा नियम असतो. पाट लावण्याची प्रथा आहे; पण तो दिराबरोबरच लावला पाहिजे, असे बंधन नाही.

प्रसूतिप्रथा – प्रथम ऋतुप्राप्ती झालेल्या मुलीला तीन दिवस निराळ्या झोपडीत ठेवतात. बाळंतिणीसाठी स्वतंत्र झोपडी असते. सुवेर तीन दिवस असतो. गावातील सर्व विवाहित स्त्रिया बाळंतिणीच्या मदतीला येतात. मुलाला मामाचे अथवा आईच्या वडिलांचे नाव ठेवतात.

मदुवण लोकांमध्ये संपत्तीचा वारसा मुलाकडे न जाता, तो बहिणीच्या मुलाकडे जातो. हे लोक कोट्टलस्वामी व वडगनाथ स्वामी या वनदेवांची पूजा करतात. याशिवाय ते सूर्य, करुप्पू, मरिअम्म आणि काली यांनाही भजतात.

हे माकड, सांबर व बकरे यांचे मांस खातात. [रजःकण]

मद्गू एक प्राचीन जात. या जातीसंबंधी मनू म्हणतो, की हे लोक वन्य पशूंची शिकार करून आपली उपजीविका करतात (१०·४८). मनूच्या या श्लोकावर टीका लिहिताना कुल्लूक सांगतो, की बौधायनाच्या मते ब्राह्मण पुरुष व बंदिन स्त्री यांची ही संतती होय. वैखानस म्हणतो, की क्षत्रिय पुरुष व वैश्य स्त्री यांची ही संतती आहे (१०·१२). [हि. ब.]

मद्यपान मद्य म्हणजे एक प्रकारचे मादक पेय होय. प्राचीन काळापासून भारतीय लोक असे काही तरी मादक पेय पीत असत. मद्यनिर्मितीची कला भारतीय लोकांना प्राचीन काळापासून अवगत होती आणि समाजाच्या सर्व थरांत मद्यपानाची प्रथा होती, असे दाखले मिळतात. वेदांच्या काळात सोम व सुरा अशा दोन मादक पेयांचा उपयोग करण्यात येत असे. वैदिक आर्य यज्ञाच्या वेळी देवतांना सोमरस अर्पण करीत आणि आपण स्वतःही पीत. याशिवाय ते विक्रीसाठीही सोमरस तयार करीत. सोमरसात दूध, दही व यवही घालीत. सोमरसाच्या सुगंधाची व स्वादाची वैदिक ऋषींनी स्तुती केली असून, सोम हा स्वास्थ्यवर्धक आहे, असेही म्हटले आहे (ऋ. १०·७१·१०). अंगात तरतरी व मद येण्यासाठी, युद्धात वीरश्री अंगात संचरण्यासाठी, प्रतिभेच्या विकासासाठी व वक्तृत्वाला भरती येण्यासाठी सोमाचा उपयोग होतो, असे ऋग्वेदात सांगितले आहे.

सोमरसाचा विक्रय करणारे लोकच सुरेचीही विक्री करीत असत. सुरा धान्यांपासून आणि विशेषतः यव व तांदूळ यांपासून तयार करीत. यजुर्वेदात सोम-सुरा असा जोड उल्लेख येतो. यज्ञप्रसंगी ऋत्विज सोम व सुरा यांचे मिश्रण करीत, असे शुक्ल यजुर्वेदात सांगितले आहे (१९·१; १९·५). सोम हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुरांचे व सुरा हे मानवांचे पेय आहे आणि सोम हा पती असून, सुरा त्याची पत्नी आहे, अशी वचने तैत्तिरीय ब्राह्मणात आढळतात (१·३·२·२). सोमाचा उपयोग मुख्यत्वे यज्ञप्रसंगी,

मद्यपान करणारा कुबेर, मथुरा-शिल्प

निमंत्रित व वरिष्ठ समाजात मित प्रमाणात होत असावा आणि व्यसनासाठी सुरा बहुजनसमाजात प्रिय असावी. म्हणूनच ऋग्वेदात सोमपानाला उत्तेजन दिलेले असून, सुरापानाचा निषेध केलेला आहे (ऋ. ७·८६·६).

वैदिक युगातील लोकांना सुरेच्या गुणावगुणांची माहिती होती. मनोरंजनासाठी पुष्कळ लोक एकत्र जमत, तेव्हा ते सुरा पिऊन भांडणे करीत, असे वैदिक वाङ्मयातच उल्लेख आहेत (ऋ. ८·२·१२; ८·२१·१४; काठक संहिता १४·६; मैत्रायणी संहिता २·४·२). वाजपेय आणि सौत्रामणी या यज्ञांमध्ये सुरा तयार करण्यास सांगितले आहे. सुरेचे हवन करून उरलेली सुरा प्राशन करावी असेही तिथे म्हटले आहे. सुरा तयार करण्याची तपशिलवार माहिती काही श्रौतसूत्रांत दिलेली आहे.

रामायणकाली आर्य व अनार्य असे सर्व लोक सुरा पीत असत. सुरेला त्या काळी चांगलीच प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. सुरेचे अनेक प्रकार त्या काळी लोकांना माहीत होते. सुरा गाळण्याची कलाही त्यांना ज्ञात होती. गाळलेल्या सुरेला ते कृतसुरा म्हणत. सुगंधी किंवा मसालेदार मद्याला मैरेय असे नाव होते. सीधू नावाचे मद्य गुळापासून बनवीत. सौवीरक हे एक साधारण प्रतीचे मद्य होते. ते बोरांपासून बनवीत. वारुणी हे कडक मद्य होते. खजुराच्या रसात काही विशेष वनस्पतींचा रस मिसळून वारुणी तयार करीत. याशिवाय फळे, फुले व साखर यांपासूनही मद्य बनवीत. उत्तम प्रतीच्या मद्याला सुराग्र्य म्हणत. भरद्वाजाच्या आश्रमात भरताच्या सैनिकांना असे श्रेष्ठ मद्य दिले गेले होते, असा उल्लेख रामायणात आहे. त्या काळी स्त्रियाही मद्य पीत असत. वनवासाला जाताना गंगा व यमुना या नद्या सीतेला पार कराव्या लागल्या. त्या वेळी सीतेने या नदीदेवतांची प्रार्थना करून त्यांना सांगितले होते, की 'चौदा वर्षांचा वनवास संपवून परत आल्यावर मी तुम्हांला सुरेचे सहस्र घट आणि मांसमिश्रित भात अर्पण करीन.' जे पदार्थ आपण सेवन करतो तेच आपण देवतांना अर्पण करतो. त्यावरून स्त्रिया त्या काळात मद्य पीत असत, हे कळते. तसेच रामचंद्राने सीतेला आपल्या हाताने मधु-मैरेय सुरा पाजली होती, असेही रामायणात सांगितले आहे (७·४२·१८). मदिरापानाने धुंद झालेल्या नृत्यगीतकुशल अप्सरा, नागकन्या व किन्नरी त्या दोघांचे मनोरंजन करीत असेही म्हटले आहे. रावणाच्या अंतःपुरातील स्त्रियाही मद्यासक्त होत्या.

त्या काळात अनेक सार्वजनिक मदिरागृहे असत. त्यांना पानभूमी म्हणत. पानभूमीत सामान्यपणे खालच्या वर्गातील लोक जमत व त्यांना मातीच्या परळातून मद्य देण्यात येई. मद्यप्यांसाठी तिथे मनोरंजनाची विविध साधनेही ठेवलेली असत.

लंकेतील अशा एका पानभूमीचे वाल्मीकीने वर्णन केले आहे, ते असे – या पानभूमीत काही खोल्या होत्या. त्यांत सामिष व निरामिष असे दोन्ही प्रकारचे पदार्थ ठेवलेले होते. तिथे निरनिराळ्या प्रकारची स्वच्छ मद्ये सजवून निरनिराळी ठेवली होती. मद्यप्यांसाठी सुवर्णाचे कलश आणि स्फटिक व रत्ने यांची पात्रे ठेवलेली होती. यांपैकी काही पात्रे पूर्ण भरलेली, काही अर्धी भरलेली तर काही रिकामी होती. कुठेकुठे मद्याची पात्रे, हार, नूपुर, फुले व फळे अस्ताव्यस्त पडली होती. सुवर्ण व रत्ने यांनी अलंकृत असे पलंग आणि बसण्यासाठी अनेक आसने जिकडेतिकडे ठेवली होती.

रामायणातच अनेक ठिकाणी मद्यपानाची निंदा आणि सुरात्यागाची प्रशंसा केलेली असून, सुरा न पिणे हे सात्त्विक जीवनाचे लक्षण मानलेले आहे. धर्म आणि अर्थ यांच्या सिद्धीसाठी सुरापान आवश्यक नाही. उलट सुरापानामुळे धर्म, अर्थ व काम भ्रष्ट होतात, असे वाल्मीकीने म्हटले आहे.

महाभारतकाळीही लोक मद्यपान करीत असत. या कामी यादव लोक फार पुढारलेले होते. द्वारकेत मद्यपानाचा बराच प्रसार होता. वृष्णी आणि यादव हे अतिरिक्त मद्यपान करून आपसांत भांडले आणि नाश पावले. हे विश्रुतच आहे. बलराम अतिशय मद्यपी होता. श्रीकृष्णही मद्यपान करीत असे. युधिष्ठिराच्या अश्वमेधप्रसंगी सुरा व मैरेय यांचे जणू सागरच उसळले होते. त्या काळी लढाईला जाण्यापूर्वी योद्धे मद्यपान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करीत असत. बायकाही मद्य पीत. एकदा द्रौपदी व सुभद्रा इतर स्त्रियांसह वनभोजनाला गेल्या असता, मद्यपान करून बेहोष झाल्याचे वर्णन महाभारतात आहे. पण महाभारताच्या काळात ब्राह्मणांना मात्र सुरा वर्ज्य ठरली होती. ब्राह्मणांचे ब्राह्मण्यच सुरापानाने नष्ट होते, अशी त्या काळची धारणा होती. ब्राह्मणांतले हे व्यसन शुक्राचार्यांने महाभारताच्या काळापूर्वी बंद केले असले पाहिजे. मद्य, मांस, सुरा व आसव हे पिशाचान्न असून, ब्राह्मणांनी ते वर्ज्य करावे, असे महाभारतात म्हटले आहे.

आर्यांच्या वसाहतीचे क्षेत्र वाढले, तसतसे आर्येतरांशी त्यांचे संघटन वाढू लागले आणि त्याबरोबरच मद्याचाही प्रचार वाढला. परदेशांतूनही जल व स्थल या दोन्ही मार्गांनी आक्रमक व व्यापारी लोक भारतात येऊन स्थायिक झाले आणि त्यांच्या मार्फत कडक, रुचकर व सुगंधी मद्ये तयार करण्याच्या पद्धती इकडे प्रचारात आल्या. रोमन लोकांशी संपर्क आल्यावर तिकडून भारतात मद्यकुंभही येऊ लागले. अंफोरा नामक एक मद्यकुंभ चार फूट उंच असून, फार जड असतो. हे मद्यकुंभ लोखंडी तिवईवर ठेवून जहाजातून भारतात आणीत. असे मद्यकुंभ महाराष्ट्रातील उत्खननात मिळाले आहेत. मद्यार्क गाळण्याची प्रक्रिया वाजसनेयी संहितेतही उल्लेखिलेली आहे. ही पद्धत परशुरामाच्या काळात हैहय राजांच्या कारकीर्दीत सुरू झाली असावी. या प्रक्रियेमुळे मद्यनिर्मितीत क्रांती झाली आणि तिचा सामाजिक व आर्थिक परिणाम म्हणून सोम व सुरा यांचे निर्मिति व विक्रेते विभक्त झाले. या विभक्तीकरणाचा पहिला उल्लेख याज्ञवल्क्य स्मृतीत आढळतो (१·१६४-५; ३·३६-४०). मद्याची ने-आण करण्यासाठी कातडी पखाली व बुधले वापरण्याची प्रथा होती. पखालीच्या सोंडेसारख्या मुखातून मद्य सुरईत ओतीत असावे. सोंड म्हणजे शुंडा. मद्याचा व्यवसाय करणाऱ्यांना शौंडिक ही संज्ञा त्यातूनच आली असावी. त्यानंतरच्या काळात कलालाला ध्वजवान ही संज्ञा मिळाली. दारूच्या दुकानदाराने आपल्या दुकानावर विशिष्ट ध्वज लावला पाहिजे, असा कायदा होता. या ध्वजांवरील चिन्हे सुरापात्रांची असावी, असे मनुस्मृतीतल्या एका उल्लेखावरून वाटते (९·३७).



रोमहून आलेला मद्यकुंभ

कालिदासाच्या काळातही स्त्री-पुरुष मद्यपान करीत. त्या काळच्या स्त्रिया कधी कामोत्तेजक व सौंदर्यवर्धक, तर कधी शिष्टाचार किंवा प्रियजनांचा आग्रह म्हणून मद्य पीत (रघु. ७·११; ऋतुसं. ५·१०). अज इंदुमतीला स्वमुखातल्या मद्याचा घोट पाजतो, असे रघुवंशात सांगितले आहे (४·४२). अग्निमित्राची राणी इरावती मद्यपानाने झिंगल्याचे वर्णन मालविकाग्निमित्रात आहे. वरिष्ठ वर्गातले लोक मद्यपानासाठी स्वतंत्र पानभूमी तयार करीत व स्त्रियांसह तिथे जाऊन चैन करीत.

मद्यनिषेध – असे असले तरी वैदिक कालापासूनच सुरापानाचा निषेध आढळतो. कारण सुरापानामुळे माणसाच्या वाईट प्रवृत्तींना उत्तेजन मिळते. उपनिषत्कालातील एक राजा आपल्या राज्यात एकही मद्यपी नाही, ही गोष्ट गौरवाची मानतो. धर्मसूत्रांत तर सुरापान हे पाच महापातकांपैकी एक मानलेले आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांपैकी कोणीही मद्यपान करू नये, असे मनूने सांगितले आहे (मनु. ११·९४). स्मृतिकारांनी मद्यपानाबद्दल कडक शासनेही सांगितली होती. पण राजसत्तेने या अनधिकृत कायद्यांचा कधी पुरस्कार केला नाही आणि बहुसंख्य जनतेची मान्यता त्या निषेधांना कधीच मिळाली नाही. युद्धावर निघताना सर्व सैनिक मदिरापान करून धुंद होत व मग शत्रूवर तुटून पडत, असे इ. स. च्या ७ व्या शतकात युआन च्वांगने महाराष्ट्रवर्णनात लिहून ठेवले आहे.

अशा रीतीने मद्यपानाची प्रथा प्राचीन काळापासून आज तागायत बऱ्याच प्रमाणात भारतात सर्वत्र प्रचलित आहे. आदिवासी लोकांत तर मद्यपान धार्मिक विधीचाच एक भाग बनले आहे. मूल जन्मल्यावर त्याला पाळण्यात घालताना त्याच्या तोंडात ते ताडीचे किंवा दारूचे चार थेंब टाकतात. मृताला शेवटी ताडी किंवा दारू पाजतात. लग्नसभारंभात तर पदोपदी ताडी किंवा दारू त्यांना वाटावी लागते. पंचांना ताडी पाजल्याशिवाय भांडणे मिटवता येत नाहीत. पाहुण्यांचा पाहुणचारही त्यांना ताडी दिल्याशिवाय पुरा होत नाही. अशा रीतीने ताडी किंवा दारू हे आदिवासींच्या धार्मिक व सामाजिक जीवनाचे अविभाज्य अंग होऊन बसले आहे.

सांप्रत भारतातील काही राज्यांत मद्यपानाला कायद्याने बंदी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केलेली आहे; पण ही बंदी यशस्वी झाली नाही; उलट गावठी दारूचा खप वाढला आहे, असा अनुभव आहे. [रा. का. सं.; म. भा. उ.; प्रा. भा. सा. सां. भू.; गा. स.; म. आ. प्र.]

मद्रदेश भारतातील एक प्राचीन राज्य. सांप्रतच्या पंजाबातील सतलज आणि रावी या नद्यांच्या आसपासचा आणि सियालकोटजवळचा प्रदेश म्हणजे प्राचीन मद्रदेश होय. शिबी औशीनराचा पुत्र मद्रक याने हा देश वसविला, म्हणून त्याला मद्र किंवा मद्रक असे नाव मिळाले होते.

शतद्रू व विपाशा या नद्या पार केल्यानंतर त्यांच्या उत्तरेला मद्रदेशाची सीमा सुरू होते, असे नीलमत पुराणात सांगितले आहे (१७५-१७६). देविका नदी मद्रदेशातून वाहते. ती सियालकोटजवळून कुजरांवाला जिल्ह्याच्या सीमेवरून आणि टपियाला गावाजवळून वाहत जाते. या नदीला सांप्रत द्योका म्हणतात. यावरून वर्तमान सियालकोटपासून लाहोर किंवा अमृतसरपर्यंत मद्रदेश पसरला होता, असे दिसते. अमृतसरमध्ये आजही मद्रांची एक गल्ली आहे.

पाणिनीच्या काळी मद्रदेशाचे पूर्वमद्र व अपरमद्र असे दोन भाग होते. ऐतरेय ब्राह्मणात हिमवानाच्या पलिकडे असलेल्या उत्तरमद्राचा उल्लेख आहे; पण तो या मद्राहून वेगळा असावा, असे वाटते. पाणिनीच्या काळी देविका नदीच्या तीरावर होणारा तांदूळ फार प्रसिद्ध होता.

शाकल ही मद्रदेशाची राजधानी होती. कोणी सियालकोटला तर कोणी सांगलाला शाकल म्हणतात. शाकल ही मोठी व्यापारी पेठ होती. इथे शेकडो दानगृहे होती. या नगराचा परीघ सुमारे वीस ली होता. हीनयान पंथाचे शंभर भिक्षू इथल्या बौद्ध मठात राहत होते आणि मठाच्या वायव्येला अशोकाने बांधलेला दोनशे फूट उंचीचा एक स्तंभ होता, असे युआन च्वांगने म्हटले आहे. शाकल नगराच्या वैभवाचे वर्णन बौद्ध ग्रंथांत आणि विशेषत: मिलिंदप्रश्न या ग्रंथात सापडते.

मद्रदेशात एक मुख्य राजा होता आणि त्याच्या आधिपत्याखाली काही गणराज्ये होती. मद्रसम्राट शल्य आणि त्याचा पुत्र रुक्मरथ यांनी भारतीय युद्धात भाग घेतला होता. पांडूची दुसरी भार्या माद्री ही मद्रकन्या होती. दुसरा एक मद्रराजा याची कन्या विजया, हिचा विवाह पांडवांतल्या सहदेवाशी झाला होता.

मद्रदेशातील लोक, मोठे लढवय्ये होते. तसेच तिथे याजुष चरक शाखेचे अध्ययन करणारे ब्राह्मण राहत होते.

काही लोक मद्र आणि वाहीक हे दोन्ही देश एकच होते, असे मानतात. पण महाभारताच्या कर्णपर्वात मद्रक आणि वाहीक हे दोन भिन्न प्रदेश, मानलेले आहेत असे दिसते.

सनपूर्व ३२६ मध्ये शाकल नगर शिकंदराच्या ताब्यात गेले. इ.स. ७८ च्या सुमारास ग्रीक राजा मिनांडर (पाली – मिलिंद) याने शाकलावर राज्य केले. इ. स. च्या चौथ्या शतकात ते गुप्तसाम्राज्यात समाविष्ट झाले. मद्रांनी समुद्रगुप्ताला खंडणी दिली होती, असे उल्लेख आढळतात. [ट्रा. ए. इं.; गु. सा. इ.; वे. का. इ.; भा. बृ. इ.]

मध एक मधुर पदार्थ. विशिष्ट जातीच्या मक्षिका फुलातील मकरंद कण कण गोळा करून तो आपल्या पोळयात साठवतात. आणि त्यांची ती पोळी माणसे हस्तगत करतात. मक्षिका मध निर्माण करतात, म्हणून त्याला माक्षिक असेही म्हणतात. ऋग्वेदात सारघ हा शब्द मधासाठी आलेला आहे (८. ४. ८). मधू हा शब्दही मधासाठी वापरतात; पण वेदकाळात कुठे कुठे हा शब्द कोणताही गोड खाद्यपदार्थ किंवा पेय म्हणून आलेला आहे (ऋ. १. ९०. ६; ३. १. ८.; वाज. संहिता ६. ३८. १०; अथर्व. ६. ६९. १.). काही ठिकाणी याचा अर्थ सोम किंवा दूध असाही होतो (ऋ. १. १९. ९; २.१९. २; वाज. संहिता ६. २). क्वचित मध या अर्थानेही हा शब्दवापरलेला आहे (ऋ. ८. ४. ८.; अथर्व. ९. १.१७.; ऐ. ब्रा. ७. १५.; श. ब्रा. १. ६. २. १). पण यानंतरच्या साहित्यात मात्र या शब्दाला मध हाच अर्थ प्राप्त झाला.

अनेक धार्मिक विधींत मधाचा उपयोग करतात. विविध देवतांना मध अर्पण करावा, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे(२०४. ५–७.; २६६. ५१–५५). मूर्तीच्या अभिषेक-पूजाप्रसंगी मध वापरला जातो. मध पंचामृतापैकी एक आहे. नैवेद्या साठीही तो वापरतात. श्राद्धप्रसंगी भोजनात मधाची आवश्यकता असते. गयेत पिंडदानासाठी मध लागतो, असे वायू पुराणात सांगितले आहे (३०.१५१; ५६.१२; १७५.३५). यामुळे मधाला एक प्रकारचे पावित्र्य प्राप्त झालेले आहे. स्नातक वराची पूजा मधुपर्क नामक विधीने केली जाते. तिच्यातही दह्याबरोबर मध घेतात. पण असे असले तरी जैमिनीय उपनिषद ब्राह्मणात (१. ५५. २) स्त्रियांसाठी आणि शतपथ ब्राह्मणात (११. ५. ४. १८) छात्रांसाठी मध निषिद्ध म्हणून सांगितला आहे.

प्राचीन काळी ऋषि-मुनी अन्नातील एक भाग म्हणून मधाचे सेवन करीत असत. ते कोणताही पदार्थ गोड करण्यासाठी मधाचा वापर करीत असावे.

लोकसंस्कृतीतही मधाला श्रेष्ठ स्थान मिळाले आहे. याच्या योगाने समृद्धी लाभते, असे मानतात. वर्षप्रतिपदेला सर्वांना मध द्यावा अशी समजूत आहे. कोणी मध दिला असता, तो नाकारणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे पाप समजतात. परंतु घरात मधाचे पोळे असणे ही घटना मात्र अशुभ मानतात. ते घडल्यास मधुमक्षिकाशांती करायला सांगितली आहे.

पूर्वी मध गोळा करणे हा खेडेगावांतील लोकांचा एक व्यवसाय होता. अजूनही कित्येक आदिवासी जमाती हा व्यवसाय करतात. हे लोक मधाच्या पोळयाखाली अग्नी पेटवून तिथल्या माश्या हुसकून लावतात आणि मग मधाचे पोळे काढतात. अलिकडे मधनिर्मितीच्या विविध पद्धती निर्माण झाल्या आहेत.

मध हे एक योगवाही अनुपान द्रव्यही आहे. एखादे रसायन मधातून दिल्यास ते त्वरित रक्तात मिसळते, असे वैद्यक शास्त्रात सांगितले आहे. [वे. इं.; सु. वि. को.]

मधुकर शाह (इ. स. चे १६ वे शतक) एक भक्तकवी. ओरछाधिपती भारतीचंद्र याचा हा धाकटा भाऊ होय. भारतीचंद्राला मूलबाळ नव्हते. त्यामुळे त्याच्या मागून मधुकर हाच ओरछाचा राजा झाला. परंतु याने आपले सारे आयुष्य भगवद्भक्ती आणि संतसेवा यांत वेचले. हा कृष्णभक्त होता आणि याची पत्नी गणेशदेवी ही रामभक्त होती. त्यांच्या या भिन्न भक्तीमुळे ओरछा गावाला एकाच वेळी वृंदावन व अयोध्या यांची प्रतिष्ठा मिळाली होती, असे म्हणतात.

मधुकर शाहासंबंधी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्यांतील एक अशी – एकदा सम्राट अकबराने असा फतवा काढला, की जो कोणी गळयात माळ आणि कपाळी गंधतिलक धारण करून दरबारात येईल, त्याचा शिरच्छेद केला जाईल. त्यामुळे प्राणभयाने अनेक हिंदू माळ न घालता व गंध न लावता दरबारात उपस्थित राहू लागले. परंतु मधुकर शाह मात्र नेहमीपेक्षा मोठे आणि ठळक असे गंध लावून व माळ घालून दरबारात गेला. मधुकर शाहाच्या या कृत्याने अकबर रागावला; पण राग न दाखवता त्याने त्याच्या साहसाची व भक्तीची तारीफ केली.

समकालीन संतमंडळात याचे स्थान बरेच वरचे होते. अनेक लोक याला सिद्धसंत मानीत. याने आपल्या हयातीतच आपला ज्येष्ठ पुत्र रामशाह याला गादीवर बसविले आणि स्वतः उर्वरित आयुष्य भगवद्भक्तीत वेचले.

मधुकर शाहाची अनेक स्फुट पदे उपलब्ध आहेत. कृष्णभक्ती हा त्या पदांचा विषय आहे. [अजंता – जाने. १९५७]

मधुच्छंदा एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील पहिली दहा सूक्ते आणि नवव्या मंडलातील पहिले सूक्त ही याची रचना आहे. ऐतरेय ब्राह्मणात हा विश्वामित्राचा एकावन्नावा मुलगा म्हणून गणला गेला आहे (७·१८). शुनःशेपाचे ज्येष्ठ भ्रातृत्व पहिल्या पन्नास भावांनी मान्य केले नाही; पण पुढच्या पन्नास भावांनी मान्य केले. म्हणून त्या धाकट्या पन्नास भावांचा मधुच्छंदा हा मुख्य ठरला. त्यामुळे विश्वामित्र त्याच्यावर प्रसन्न झाला. याच्या प्रउगशस्त्राचा उल्लेख शतपथ ब्राह्मणात आहे (१३·५·१·८). प्रउगशस्त्र म्हणजे प्रातःसवनाच्या वेळी म्हणायचे मंत्र होत.

हा शर्यातीचा पुरोहित होता. याला धर्मराजाने राजसूय यज्ञाकरिता निमंत्रण दिले होते, असे भागवतात (१०·७४·९) व वायू पुराणात (९१·९६) म्हटले आहे. जेता व अघमर्षण हे याचे दोन पुत्र होत.

मंत्रद्रष्ट्या ऋषींहून निराळ्या अशा गाथागायक ऋषींचा हा उल्लेख करतो (१·७·१). मित्रावरुण हे देव सद्धर्मानेच आपले कर्तृत्व विभूषित करीत असतात असे हा सांगतो (१·२·८). याने मुष्टियुद्धाचाही उल्लेख केला आहे (१·८·२).

अथर्ववेद आणि ऋग्वेद यांच्यांतला हा दुवा आहे असे मानले जाते. याचे कारण असे, की याच्या पित्याने अथर्ववेदासाठी आणि याने ऋग्वेदासाठी ऋचा रचल्या. म्हणजे पिता अथर्ववेदी आणि मुलगा ऋग्वेदी असा त्याचा अर्थ होतो. [प्रा. च. को.; म. ज्ञा. को.; सी. ऋ.; ऋ. म. भा.]

मधुधेनुदान एक दान. दशधेनुदानात याची गणना होते. एका कुंभात मध भरतात आणि त्याला धेनू समजतात. त्याच्या चतुर्थांश आकाराच्या दुसऱ्या कुंभाला वासरू समजतात. ही मधुधेनू विशोकद्वादशी व्रतात दान द्यावी, असे मत्स्य पुराणात सांगितले आहे (८२·१९). [दा. चं.; पु. इं.]

मधुपर्कपूजा एक विशिष्ट पूजाप्रकार. ज्यात मधुपर्क हातावर घालतात किंवा शिंपडतात तो विधी, असा त्या शब्दाचा अर्थ आहे. जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण व निरुक्त यांत हा शब्द आलेला आहे. मधुपर्कपूजा कोणाची करावी यांविषयी वचन आहे, ते असे (आश्व. गृ. सू. २४·१·४)–

ऋत्विजो वृत्वा मधुपर्कमाहरेत् । स्नातकायोपस्थिताय ।
राज्ञे च । आचार्यश्वशुरपितृव्यमातुलानां च ।

अर्थ – यज्ञात निवडलेले ऋत्विज, स्नातक, राजा, आचार्य, श्वशुर, चुलता व मामा यांची, ते घरी आले असता मधुपर्कपूजा करावी.

लग्नात नवरदेवाची मधुपर्कपूजा केली जाते, ती स्नातक या नात्याने होय. काही सूत्रकारांनी वरील यादीत प्रिय व्यक्ती आणि अतिथी यांचाही समावेश केला आहे. एकदा एखाद्याची मधुपर्कपूजा केल्यानंतर पुन्हा वर्ष संपण्यापूर्वी ती करायची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नसते. नवरदेव आणि ऋत्विज यांचा मात्र याला अपवाद आहे. ज्याची पूजा करायची ती त्याच्या शाखेला अनुसरून करावी, असे गृह्य परिशिष्टात सांगितले आहे.

विष्टर (साग्र दर्भांचे आसन), पाद्य, अर्घ्य, आचमन, मधुपर्क (दह्यात मध किंवा आज्य घालून कालवलेला पदार्थ) व गाय हे प्रस्तुत पूजेतले उपचार होत. यातला प्रत्येक उपचार तीन वेळा उच्चारून पूज्य व्यक्तीला द्यायचा असतो. याचा विधी आश्वलायन गृह्यसूत्रात सांगितला आहे, तो असा –

प्रथम विष्टर द्यावा. नंतर यजमानपत्नीने पूज्य व्यक्तीच्या पायांवर पाणी घालावे आणि यजमानाने ते धुवावे व पुसावे. नंतर पूज्याच्या ओंजळीत अर्घ्य घालावे. त्याने ते ताम्हनात सोडल्यावर पूज्याला आचमनासाठी जल द्यावे. 'अमृतोपस्तरणमसि' या मंत्राने पूज्याने त्याचे आचमन करावे. नंतर पूज्याने मधुपर्कपात्र ओंजळीत घ्यावे. प्रथम त्या पात्राकडे पाहून मग त्यातले मिश्रण आंगठा व अनामिका एकत्र जुळवून त्यांनी कालवावे. नंतर ते चारही दिशांना समंत्रक शिंपडावे. मग 'विराजो दोहोसि', 'विराजो दोहमसीय' व 'मयि दोहःपद्यायै विराजः' या तीन मंत्रांनी तीनदा हातावर घेऊन प्राशन करावे. उरलेला मधुपर्क उत्तरेकडील ब्राह्मणाला द्यावा. तो नसल्यास पाण्यात टाकावा किंवा सर्वच्या सर्व प्राशन करावा. नंतर 'अमृतापिधानमसि' या मंत्राने आचमन करावे.

मग यजमानाने गाय पुढे आणावी. मधुपर्कात गायीला मारून तिचे मांस पूज्य व्यक्तीला द्यायचे असते. पण पूज्याने जर गायीला मारू नका असे सांगितले, तर तिला सोडून देण्यात येते. त्या विधीला 'गोरुत्सर्जन' असे म्हणतात. 'माता रुद्राणां दुहिता वसूनां' हा त्याचा मंत्र असतो. गायीची हत्या न करता तिला सोडून दिल्यास मधुपर्कासाठी बकऱ्याचे किंवा अन्य प्राण्याचे मांस घ्यावे; पण मधुपर्कात मांस अवश्य असावे, असे मानवगृह्यसूत्रात सांगितले आहे. 'नामांसो मधुपर्को भवति'= मांसविरहित मधुपर्क होत नाही, असे आश्वलायनानेही म्हटले आहे. मांसाशन निषिद्ध मानले गेल्यानंतरच्या काळात मांसाची जागा पायसाने घेतली.

काही गृह्यसूत्रांनी मधुपर्क हा लग्नातला, तर काहींनी तो समावर्तनातला एक विधी सांगितला आहे. मधुपर्कातील द्रव्यांबद्दलही मतभेद आहेत.

वरील मधुपर्क हा दही व मध यांचा आहे. पण दही, मध, तूप, पाणी व सातूचे पीठ असा पाच पदार्थांचा मधुपर्कही काहींनी सांगितला आहे. कौशिकसूत्रांत तर नऊ पदार्थांचा मधुपर्क सांगितला आहे. ब्राह्म मधुपर्क (दही आणि मध यांचे मिश्रण), ऐंद्र मधुपर्क (दुधात तांदूळ शिजवून केलेला पायस), सौम्य मधुपर्क (तूप व मध एकत्र मिसळून बनवलेला), पौष्ण मधुपर्क (मंथ व तूप एकत्र मिसळून तयार केलेला), मौसल मधुपर्क (सुरा व आज्य), वारुण मधुपर्क (पाणी व तूप), श्रावण मधुपर्क (तूप व तिळांचे तेल) व पारिव्राजक मधुपर्क (तिळांचे तेल व भाताचा पिंड) असे मधुपर्कांचे अनेक प्रकार सांगितले आहेत. विशिष्ट प्रसंगी विशिष्ट व्यक्तींसाठी हे मधुपर्क करतात. उदा. मौसल मधुपर्क सौत्रामणी व राजसूय यज्ञामध्ये वापरतात. [इं. वे. क. सू.; सं. कौ.; हि. ध.]

मधुमती ऋचा

ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील ९० व्या सूक्तातील ६ ते ८ या ऋचा 'मधु' शब्दाने सुरू होतात, म्हणून त्यांना मधुमती असे म्हणतात. या ऋचा पुढीलप्रमाणे आहेत–

मधु वाता ऋतायते मधु क्षरन्ति सिन्धवः ।
माध्वीर्नः सन्त्वोषधीः ॥
मधु नक्तमुतोषसो मधुमत् पार्थिवं रजः ।
मधु द्यौरस्तु नः पिता ॥
मधुमान्नो वनस्पतिर्मधुमाँ अस्तु सूर्यः ।
माध्वीर्गावो भवन्तु नः ॥

अर्थ – आम्हा नियतमार्गी उपासकांसाठी सुखकारक वायू आणि मधुर रसपूर्ण नद्या वाहोत. तसेच औषधी सुमधुर होवोत. आम्हा उपासकांप्रीत्यर्थ रात्र आणि उषा, पृथ्वी आणि अंतरिक्ष; तसेच आम्हा सर्वांचा पिता द्यौ हा सुखकर होवो. आम्हा उपासकांप्रीत्यर्थ वृक्ष, तसेच सूर्य आणि गायी सुखकर (मधुर) होवोत.

या ऋचा मधुपर्कपूजेत म्हणतात. पारस्कर व मानव या गृह्यसूत्रांतही त्यांचा अंतर्भाव केलेला आहे. श्राद्धप्रयोगातही 'मधुमतीः श्रावयिष्ये' म्हणून या ऋचा श्राद्धासाठी बोलविलेल्या ब्राह्मणांना ऐकवितात. [हि. ध.]

मधुमती विद्या

तंत्रमार्गांत 'श्रीमधुमति दिशः स्थावरजङ्गमाः सागरपुररत्नानि सर्वेषां कर्षिणी ठं ठं स्वाहा' हा मंत्र मधुमतीविद्या म्हणून प्रसिद्ध आहे. रोज १०८ वेळा याप्रमाणे या मंत्राचा एक वर्ष नित्य जप केल्याने ती सिद्ध होते, असे सांगितले आहे. ही विद्या सर्वज्ञानप्रकाशिनी आहे. ही सिद्ध झाल्यास पुरुषाला सुमेरू, दिशा, सागर, नदी, रत्ने, पुरी, स्त्री, शैल, वनस्पती, अलभ्य वस्तू, राजे, शत्रूकडील वृत्तांत, इ. गोष्टींचे ज्ञान होते. त्रैलोक्याला आकर्षित करण्याची शक्ती या विद्येत आहे. विद्या सिद्ध झाली असता, रात्रीच्या वेळी बिछान्यावर बसून या मंत्राचा शंभर वेळा जप केल्याने इष्टसिद्धी होते. [योगिनीतंत्र]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मधुमक्षिकाशांती मधमाश्यांनी जर घरात पोळे बांधले, तर त्या घराच्या मालकाने ही शांती करायची असते. ज्या दिवशी शांती करायची, त्या दिवशी यजमानाने उपवास करून दही, मध व तूप यांनी युक्त १०८ उंबरांच्या समिधांनी हवन करायचे असते. 'मा नस्तोके तनये' आणि 'उप ते स्तोमान्' हे दोन हवनाचे मंत्र होत (ऋ. १·११४. ८-९). नंतर 'शं न इंद्राग्नी भवतामवोभिः' या मंत्राने प्रारंभ होणाऱ्या सूक्ताचा जप करतात (ऋ. ७·३५). [हि. व.]

मधुरकवी द. भारतातील आळवार संतांपैकी एक प्रमुख संत. याचा आवाज अत्यंत मधुर होता, म्हणून याला मधुरकवी म्हणू लागले. याच्या मूळ नावाची माहिती मिळत नाही. याचा जन्म तमिळनाडमधील तिरुनेलवेल्ली जिल्ह्यात असलेल्या तिरुकोइलूर या गावी, एका अग्रशिखी ब्राह्मण कुळात झाला. वैष्णव संप्रदायात मधुरकवीला विष्णुवाहन गरुडाचा अवतार समजतात. याने बालपणीच वेदांचा व निरनिराळ्या शास्त्रांचा सखोल अभ्यास करून पांडित्य प्राप्त केले होते. संस्कृतप्रमाणे तमिळ भाषेवरही याचे प्रभुत्व होते.

मधुरकवी श्रेष्ठ भक्त होता. ज्ञानाबरोबरच याने प्रेम व भक्ती यांनाही महत्त्व दिले होते. साधु-संतांच्या संगतीत हा आपला काळ घालवीत असे. पुढे त्याने गुरूच्या शोधार्थ भ्रमंतीला प्रारंभ केला. उत्तर भारतातील तीर्थयात्रा करीत हा अयोध्येत गेला. तिथे दक्षिण दिशेला असलेला एक ज्योतिःपुंज आपल्याला खुणावीत आहे, असा याला भास झाला. त्यामुळे तो त्या ज्योतिःपुंजाच्या दिशेने चालू लागला व शेवटी ताम्रपर्णी नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या एका वृक्षासन्निध येऊन पोचला. ती ज्योत तिथे समाधिस्थ असलेल्या नम्माळवाराच्या शरीरातून निघत आहे, असे त्याला दिसले. मग नम्माळवाराचा समाधिभंग करण्यासाठी त्याने एक दगड तिकडे फेकला. त्याबरोबर नम्माळवाराची समाधी उतरली. नंतर उभयतांत अध्यात्मचर्चा झाली. मधुरकवी या चर्चेने खूप प्रभावित झाला आणि त्याने नम्माळवाराचे शिष्यत्व पत्करले. मधुरकवीने त्याच्या सेवेत आपला बराच काळ घालवला. त्याच्या मुखातून निघणाऱ्या अनेक भक्तिपर पदांना मधुरकवीने लिपिबद्ध केले. नम्माळवाराच्या निर्याणानंतर साऱ्या दक्षिणेत त्याच्या वाणीचा प्रसार करण्याचे कार्य मधुरकवीने केले. तमिळसंघात जाऊनही त्याने गुरूच्या पदांतील गूढार्थ उकलून दाखवला.

याची 'कण्णिनुळ चिसतांबु' ही एकमेव रचना दिव्य प्रबंधात संग्रहित आहे. तिच्यात अकरा पदे आहेत. गुरुमहिमा हा या पदांचा वर्ण्य विषय असला, तरी त्यातून श्रेष्ठ गुरूची आवश्यकता, गुरुलक्षणे, भक्तीची श्रेष्ठता, इ. विषयांची चर्चा आढळते. कवी कंबराने शठकोपरन्तादी नावाचा नम्माळवाराच्या प्रशस्तीचा ग्रंथ रचला आहे. या ग्रंथाची प्रेरणा कवीला मधुरकवीच्या पद्यांतून मिळाली, असे सांगतात.

हा संत आपल्याला नम्माळवाराचा दास समजत असल्याने नम्माळवाराच्या पादुकांनाच मधुरकवी हे नाव पुढे प्राप्त झाले. [त. प्र. हिं. कृ.; भा. द.; भा. सं.; आ. सें.]

मधुरवाणी (इ. स. चे १७ वे शतक) एक तेलुगू कवयित्री. तंजाऊरचा राजा रघुनाथ नायक याची ही पत्नी होती, असे म्हणतात. पण काहींच्या मते त्याच्या दरबारातली ही कवयित्री होती. संस्कृत, तेलुगू आणि प्राकृत या भाषांवर तिचे असामान्य प्रभुत्व होते. या तिहींपैकी कोणत्याही भाषेत ती लीलया कविता रचीत असे. काव्याप्रमाणेच व्याकरण व छंदःशास्त्र या विषयांतही तिची गती होती. समस्यापूर्ती करण्यात ही फार प्रवीण होती, असे म्हणतात. संगीतकलाही तिला अवगत होती. ती वीणाही उत्तम वाजवीत असे; त्यावरूनच तिला मधुरवाणी अशी उपाधी मिळाली, असे म्हणतात.

मधुरवाणीसंबंधी अनेक दंतकथा प्रचलित आहेत, त्यांपैकी एक अशी – एकदा रघुनाथाच्या दरबारी त्याने रचलेल्या तेलुगू रामायणाचा पाठ चालला होता. त्यासाठी तिथे उपस्थित असलेल्या कवयित्रींना रघुनाथाने विचारले, की 'तुम्हांपैकी कोणी याचे संस्कृत रूपांतर करू शकेल काय?' राजाला यावर उत्तर मिळाले नाही. परंतु रात्री त्याला स्वप्नदृष्टांत झाला आणि त्यात 'मधुरवाणीकडून तू याचे संस्कृत रूपांतर करून घे' असा आदेश मिळाला. पुढे राजाज्ञेने मधुरवाणी त्या कार्याला लागली. प्रस्तुत रूपांतराची सुंदरकांडापर्यंतची रचना उपलब्ध आहे. ती रचना कलापूर्ण असून, क्वचित तिने कालिदासाचे अनुकरण केल्यासारखे वाटते. [ग्रे. वी. ई.; ते. सा. इ.]

मधुरांतक द. भारतातील एक तीर्थक्षेत्र. हे स्थान मद्रास शहरापासून सुमारे ५० मैल दूर आहे. बकुलारण्य व विभांडकाश्रम अशी याची पौराणिक नावे आहेत. इथून जी नदी वाहते तिला किळियारू किंवा कल्लारू म्हणतात. किळी = शुक आणि आरू = नदी. हा तमिळ शब्द आहे. शुक महर्षींचा इथे निवास होता, असे म्हणतात. त्यांच्या नावावरूनच या नदीला वरील नाव प्राप्त झाल्याची कथा सांगतात.

प्रभू रामचंद्र वनवासात असताना विभांडक मुनींच्या दर्शनासाठी इथे आला होता, अशी कथा आहे. रावणविजयानंतरही राम इथे उतरला होता, असे लोक समजतात. इथल्या राममंदि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रात कोदंडधारी रामाची मूर्ती आहे. ही मूर्ती म्हणजे शिल्पशास्त्राचा एक उत्तम नमुना आहे. दक्षिणेतील तिल्लैपिळागम नामक गावातील रामचंद्राची मूर्ती सोडली, तर साऱ्या भारतात अशी मूर्ती नाही, असे शिल्पशास्त्रज्ञांचे मत आहे. या मूर्तीवर सर्व प्रकारची आभूषणे कोरलेली आहेत.

या क्षेत्रात रामाचे दोन उत्सव साजरे करतात. पहिला उत्सव रामनवमीला होतो आणि दुसरा उत्सव ज्येष्ठी पौर्णिमेला होतो. [श्री. राघवाचार्य–दक्षिणदर्शन, मद्रास, जानेवारी १९६१]

मधुरा भक्ती भक्तीचा एक प्रकार. परमेश्वराची कृपा संपादन करण्यासाठी भक्त अनेक मार्गांनी त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतात. कारण भक्तीचे खरे सुख भगवंताशी आत्यंतिक जवळीक साधल्यानेच मिळू शकते. भक्त देवाला माता मानून पुत्रभावाने त्याच्या जवळ जातो. कोणी त्याला बंधू म्हणून, तर कोणी सखा म्हणून जवळ करतो. पण काही म्हटले तरी या सर्व नात्यांत थोडाबहुत दुरावा राहतोच. पण देवाला पत्नी किंवा प्रियकर मानून त्याच्याशी पत्नीभावाने किंवा प्रेयसीभावाने त्याच्या जवळ जाणे, यातले अद्वैत काही आगळेच आणि मधुर आहे. या नात्यात प्रणय, अनुराग, मान, रुसवा, उत्कंठा, असोशी आणि आत्यंतिक सुख हे सर्व काही असते. म्हणून काही भक्तांनी देवाशी हे पति-पत्नींचे नाते स्वीकारले आणि त्यातले सोलीव सुख मिळवले. या नात्याला त्यांनी मधुरा भक्ती असे नाव दिले.

या भक्तीतले माधुर्य उज्ज्वल असल्यामुळे तिला उज्ज्वल भक्ती असे दुसरे नावही मिळाले आहे. हे नाते शृंगारमूलक असले तरी त्याची परिणती मात्र उज्ज्वल भक्तीत होत असते. गोकुळातल्या गोपी कामभावाने श्रीकृष्णाला अनुसरल्या आणि उद्धरून गेल्या, ही भागवत पुराणातली कथा वाचून काही भक्तांना या भक्तीची कल्पना सुचली आणि त्यांनी गोपींनाच आपला आदर्श मानले. नारदाने आपल्या भक्ति-सूत्रांत उत्कट प्रेमाला कांतासक्ती असे नाव दिले आहे आणि त्याचे उदाहरण म्हणून 'यथा व्रजगोपिकानाम्' या सूत्राने गोपींचा उल्लेख केला आहे. मधुर भक्तांना नारदाचा हा शास्त्रीय आधारही आयता मिळाला.

चैतन्यचरितामृत या बंगाली ग्रंथात गोपींच्या कृष्णप्रेमाचे मार्मिक वर्णन केले असून, काम व प्रेम यांमधला फरक पुढीलप्रमाणे सांगितला आहे–

> **कामेर तात्पर्य निजसंभोग केवल**
> **कृष्णसुख तात्पर्य प्रेम तो प्रबल**
> **अत एव काम प्रेमे बहुत अंतर**
> **काम अंधतम प्रेम निर्मल भास्कर**

भावार्थ – कामाचा उद्देश निजसंभोग अर्थात स्वतःची इंद्रियतृप्ती हा असतो. पण प्रेमाचा उद्देश आपल्या अंगसंगाने कृष्णाला सुख लाभावे, हा असतो. म्हणून काम व प्रेम यांत बहुत अंतर आहे. काम हा अंधकार असून, प्रेम निर्मळ सूर्य आहे.

मधुरा भक्ती ही मधुर रसावर अधिष्ठित आहे. रूपगोस्वामींनी आपल्या भक्तिरसामृतसिंधू या ग्रंथाच्या पहिल्याच श्लोकात या रसाची व्याख्या दिली आहे, ती अशी–

> **आत्मोचितैर्विभावाद्यैः पुष्टिं नीता सतां हृदि ।**
> **मधुराख्यो भवेद् भक्तिरसोऽसौ मधुरा रतिः ।**

अर्थ – स्वतःला उचित अशा विभावादिकांनी सज्जनांच्या (ज्यांच्या चित्तात कांतासक्तीचा उदय झाला आहे अशांच्या) हृदयात जी पोसली जाते, तिला मधुरा रती म्हणतात. तोच मधुर नावाचा भक्तिरस होय.

या मधुर रसाची मांडणी अशी– कृष्णरती हा त्याचा स्थायीभाव. श्रीकृष्ण हा त्याचा आलंबन विभाव. कारण त्याचे रूप, हास्य, भाषण, धैर्य, चातुर्य इतकेच नव्हे; तर 'मधुराधिपतेरखिलं मधुरम्' = कृष्णाचे सर्वच काही मधुर आहे. या आलंबनविभावाचे दुसरे अंग म्हणजे राधा. ती अतिसुंदर, अतिमधुर आणि श्रीकृष्णाची सर्वेश्वरी. ती श्रीकृष्णाशी सर्व काळ अभिन्न; पण केवळ त्याच्याशी लीला आणि क्रीडा करण्यासाठी त्याच्यापासून वेगळी झाली आहे. कृष्णाच्या मुरलीचा स्वर आणि त्याचे सवंगडी हे या रसाचे उद्दीपन विभाव होत. रोमांच, स्वेद, अश्रू, स्वरभंग, कंप, इ. याचे अनुभाव आणि हर्ष, निर्वेद, इ. त्याचे व्यभिचारी भाव होत.

शृंगार आणि शृंगाराभास हे दोन्ही मधुर रसात अंतर्भूत आहेत. शृंगारातले संयोग आणि वियोगही या भक्तीत स्वीकारलेले आहेत. मनोविज्ञानाच्या दृष्टीने पाहिल्यास शृंगार व मधुर यांत फारसे अंतर नाही. शृंगारातले प्रेम तन, मन व इंद्रिये यांच्या तृप्तीपुरते म्हणजेच पार्थिव असते. हेच प्रेम जेव्हा अपार्थिव होते म्हणजेच इंद्रियसुखनिरपेक्ष बनते, तेव्हा ते दिव्य अशा भगवद्भावाला प्राप्त होते. इंद्रियसुखाकडे आकृष्ट होणाऱ्या मनोवृत्तीला तिथून मागे खेचून भगवंताकडे नेण्याचा प्रयत्न मधुरा भक्तीत असतो. मधुर भक्तांचे असे सांगणे असते, की एखाद्या प्रिय व्यक्तीच्या संपर्काने इंद्रियांना जे सुख प्राप्त होते, त्याचा उगमही भगवंताच्या ठिकाणीच असतो. 'सर्वसुखाचेआगर' तोच असतो.

श्रीकृष्ण हा विश्वातला एकमेव पुरुष असून, बाकीचे सर्व पुरुष या स्त्रिया आहेत; अशा स्थितीत भक्ताला कांताभावाने त्याला सर्वस्व समर्पण करण्याखेरीज अन्य मार्गच नाही, असे मधुर आचार्यांचे मत आहे. नुसत्या मानसिक कांताभावावरच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांचे समाधान नाही. पुरुष भक्ताने स्त्रीवेष धारण करूनच भक्तिसाधना केली पाहिजे, असा त्यांनी नियम केला आहे.

चैतन्य महाप्रभू हे मधुराभक्तीचे अध्वर्यू किंवा प्रणेते होत. त्यांनीच बंगालमध्ये हा भक्तिसंप्रदाय निर्माण केला. ते स्त्रीवेष घेऊन राधा बनत आणि कृष्णाची उपासना करीत. कृष्णापासून राधेला मिळणाऱ्या मधुर सुखाचा आस्वाद घेण्यासाठी भक्ताने राधाच बनले पाहिजे, असे चैतन्यांचे मत होते. म्हणून ते स्वत: राधा बनले. ते राधा झाल्यावर साहजिकच त्यांचे अनुयायी गोपी ठरले. पुढे चैतन्यांच्या जीवनात राधा भाव प्रकट झाल्यावर ते राधेचा अवतार समजले जाऊ लागले. दुसरे अलिकडचे प्रसिद्ध उदाहरण श्रीगुलाबराव महाराजांचे. तेही मधुरभक्त होते. ते स्वत:ला ज्ञानेश्वरकन्या व श्रीकृष्णकांता समजत व पुष्कळदा स्त्रीवेषात राहत.

रूपगोस्वामी, जीवगोस्वामी, सनातनगोस्वामी, गोपालभट्ट, इ. अनेक विद्वान शिष्य चैतन्य प्रभूंना लाभले. त्यांनी आपल्या गुरूंच्या राधाभावाला आणि त्यांच्या विचारांना अनुसरून मधुरा भक्तीचे एक शास्त्रच निर्माण केले. भक्तिरसामृतसिंधू, उज्ज्वलनीलमणी, चैतन्यचरितामृत व हरिभक्तिविलास हे त्यांनी रचलेले मधुरा भक्तीचे प्रमाणभूत ग्रंथ होत. प्रस्तुत ग्रंथांतून प्रतिपादलेले मधुरशास्त्र थोडक्यात असे –

शांत, दास्य, सख्य, वात्सल्य आणि माधुर्य हे भक्तीचे पाच प्रकार असून, माधुर्य अर्थात मधुरा भक्ती ही त्यांत श्रेष्ठ आहे. मधुरा भक्तीत भक्ताने स्त्रीच बनले पाहिजे. ' वामा भूत्वा यजेत् परम् ' = स्त्री होऊन परमेश्वराचे यजन करावे, असा सिद्धांत आहे. या विश्वाचे आदितत्त्व म्हणजे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण. त्याला अनंत शक्ती आहेत. त्यांत चित् शक्ती ही प्रमुख होय. ल्हादिनी (आल्हाद देणारी) हे या शक्तीचे स्वभाव-वैशिष्ट्य आणि प्रेम हे व्यक्त स्वरूप आहे. कृष्ण, राधा आणि गोपी यांची वृंदावनात नित्य रासलीला चालते. या क्रीडेत राधेची सखी या नात्याने उपस्थित राहणे आणि त्या रास-लीलेचा आस्वाद घेणे ही मानवी जीवनाची इतिकर्तव्यता होय.

महाराष्ट्रात मधुरा भक्तीचा पुरस्कार करणारे गुलाबराव महाराज होऊन गेले. संप्रदायसुरतरू, अलौकिक व्याख्यानमाला, भागवत रहस्य, इ. ग्रंथांत त्यांनी मधुराभक्तीचे तत्त्वज्ञान विव-रून सांगितले आहे. पुढचा एकच अभंगांश त्यांच्या मधुरा भक्तीची साक्ष देण्यास पुरेसा आहे –

ठाऊक मी तुम्हा आंधळी गौळिणी । येता वृंदावनी मज न ये ।
षडशा कामिनी बहु नारायणा । तुम्ही वृंदावनीं स्वये नेता ॥
माझी काय तुम्हावरी नाही सत्ता । ऐसे नंदसुता स्वये सांगा ।
पित्याने माझ्या केले कन्यादान । फळ त्याचे जाण ऐसे कैसे ॥

मधुरा भक्तीच्या या संप्रदायाचा उगम कुठून आणि कसा झाला, त्याचे विवेचन प्रा. स. रा. गाडगीळ यांनी केले आहे, त्याचा सारांश असा –

भारतीय भक्तिसाधनेच्या इतिहासात एका अत्यंत विलक्षण भक्तिपंथाची वाढ बंगालमध्ये १६ व्या शतकात झाली. या भक्तीचे नाव मधुरा भक्ती. चैतन्यानंतर बंगालमध्ये विकसित झालेला वैष्णव धर्म आणि वज्रयान बौद्ध पंथातून उत्पन्न झालेला सहजीय पंथ यांनी मधुरा भक्तिसंप्रदायाचा विकास घडवून आणला. भक्ताने स्त्री बनून परमेश्वराची उपासना करण्याची ही साधना चैतन्यपूर्व काळात बंगालमध्ये वेगळ्या तत्त्वज्ञानाच्या आश्रयाने सुरू झाली होती आणि हे तत्त्वज्ञान बौद्ध धर्माश्रित होते.

इ. स. च्या ५ व्या शतकानंतर बौद्ध धर्माला तंत्रधर्माचे स्वरूप प्राप्त झाले. हळूहळू बुद्धाच्या धर्मात बुद्धाचेच माहात्म्य कमी होत जाऊन, त्याच्या जागी तारा या देवतेची प्रतिष्ठापना झाली. त्यातून महासुखाची प्राप्ती करून देणाऱ्या स्त्रीप्रधान योगप्रक्रियेला प्रारंभ झाला. अंतिम सत्याची अनुभूती घेण्या-साठी महामुद्रेच्या (परकीया स्त्री) आलिंगनसुखाचा आस्वाद घेणे आवश्यक आहे, असा सिद्धान्त प्रस्थापित झाला. प्रज्ञा (स्त्रीतत्त्व) आणि उपाय (पुरुषतत्त्व) यांच्या संयोगातून निर्वाणप्राप्ती होते, असे मानले गेले; त्याला प्रज्ञोपायविधी असे म्हटले गेले. त्यातून सहजयान पंथ निर्माण झाला. या पंथात देहवादाला फार महत्त्व आहे. 'पूजामस्यैव कायस्य कुर्यान्नित्यं समाहितः' स्वस्थ चित्ताने या देहाचीच नित्य पूजा करावी, असा त्या पंथाचा सिद्धांत आहे. इ. स. च्या ९ व्या शतकाच्या सुमारास बौद्ध धर्माचे हे विकृत स्वरूप बंगालमध्ये तंत्रधर्माच्या रूपाने अवतरले. या तंत्रधर्माने एक सर्वधर्मव्यापी अशी विकृत संस्कृती निर्माण केली. त्यातूनच अनेक धर्मपंथ निर्माण झाले.

तंत्रसाधनेत अभिचार आणि वामाचार यांना महत्त्व आहे. वामाचारात सृष्टीचे आदितत्त्व स्त्री असल्याचे मानून तिच्या पूजेला प्राधान्य दिलेले आहे. ज्या काळी आणि ज्या ज्या ठिकाणी मातृप्रधान संस्कृती अस्तित्वात होती आणि शेतीला महत्त्व होते, त्या काळात आणि त्या त्या ठिकाणी स्त्रीपूजेची प्रथा दिसून येते. ही पूजाही स्त्रियांनीच करायची असे. मातृसत्ताक पद्धतीतील या स्त्रीप्रधान उपासनापद्धतीशी तंत्राचा संबंध असावा, असे काही तज्ज्ञांचे मत आहे.

पुढे स्त्रीउपाध्यायांची अगर उपासकांची जागा पुरुषांनी घेतली हे खरे; पण त्या उपासकांनाही पूजेसाठी पुढे येताना स्त्री बनून म्हणजे स्त्रीवेष घेऊन यावे लागले. अजूनही देवीचे काही पुजारी उदा० भुत्ये, कडक लक्ष्मीवाले वगैरे देवीभक्त स्त्रीवेषात तिची उपासना करताना दिसतात. स्त्री होऊन देवाची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूजा करावी, हा वामाचारी सिद्धान्त या मातृप्रधान संस्कृतीतल्या स्त्रीपूजेतूनच मधुरा भक्तीत प्रविष्ट झाला. तंत्रयोगातही पुरुषाच्या देहातील स्त्रीतत्त्वाच्या जागृतीलाच महत्त्व दिलेले आहे. सहजिया साधूंचे म्हणणे असते, की 'तुझ्यातला पुरुष टाकून दे आणि तू स्त्री (प्रकृती) बन.' स्त्री बनल्याशिवाय पुरुषाला आध्यात्मिक साधना करता येणार नाही आणि खऱ्या प्रेमाचा अनुभवही घडणार नाही, असे सहजयानी सिद्ध ठामपणे सांगतात.

हिंदु-बौद्धांच्या तंत्रधर्माला अशा प्रकारचे स्वरूप प्राप्त झाल्यावर त्याच पार्श्वभूमीवर भागवत व ब्रह्मवैवर्त पुराणांतून राधा-कृष्णसंप्रदाय बंगालमध्ये अवतरला. जयदेव व चंडीदास हे दोघेही सहजीय होते. जयदेवाला तर सहजीय आपला आदिगुरूच मानतात. हा सहजीय पंथच पुढे वैष्णव धर्मात परिणत झाला. सहजीयतंत्र (आचार) व वैष्णव तत्त्वज्ञान यांच्या संयोगातून मधुरा भक्तीचा संप्रदाय निर्माण झाला आणि त्याने स्त्रीवेषात राधा-भावाने कृष्णाची आराधना करणे हे आपले परम साधन मानले.

केवळ राधा-कृष्णसंप्रदायामुळे बंगालमधील वैष्णव धर्माचा अधःपात होणे शक्य नव्हते. ते काम सहजीय वैष्णवांनी केले. त्यांनी मधुरा रतीला जे वेगळे वळण लावले, त्यात पुढील विकृतीची बीजे पडली. दास्य, सख्य, वात्सल्य, माधुर्य हे सगळे भक्तिप्रकार वैष्णवांना मान्य आहेत; पण सहजीय वैष्णवांनी फक्त माधुर्यभक्तीलाच सर्वाधिक महत्त्व दिले. त्यातही स्त्रीची पूजा करायची ती स्वकीयेची (स्वस्त्री) न करता परकीयेची (परस्त्री) करावी, असाही मतवाद पुढे आणला. रूपगोस्वामीने राधेला कृष्णपत्नी बनवले; पण सहजीय वैष्णवांच्या मते ती कृष्णाची पत्नी नसून परकीया आहे. या मतातूनच या पंथात परस्त्रीचे आध्यात्मिक महत्त्व वाढले. इ. स. १७१७ मध्ये मुर्शिदाबादचा नवाब जाफरअल्ली याच्या समोर जो स्वकीया-परकीया मतवाद्यांचा वाद झाला त्यात परकीयावादाचा विजय झाला. म्हणजे पत्नीभावापेक्षा प्रेयसीभाव श्रेष्ठ ठरला. [म. सा. म. भ.; म. र. स्व. वि.; हिं. कृ. मा.; नवभारत, ऑगस्ट १९६२]

मधुविद्या उपनिषदांतील एक विद्या. मधू म्हणजे ब्रह्म. म्हणून ब्रह्मविषयक जे ज्ञान त्याचे नाव मधुविद्या होय. जगातील प्रत्येक वस्तूत आत्मतत्त्व कसे पाहावे, ते या विद्येत सांगितले आहे –

इयं पृथिवी सर्वेषां भूतानां मधु । अस्यै पृथिव्यै सर्वाणि भूतानि मधु । यश्चायमस्यां पृथिव्यां तेजोमयोऽमृतमयः पुरुषः यश्चायमध्यात्मं शारीरस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषः । अयमेव सः । योऽयमात्मा । इदममृतं इदं ब्रह्म इदं सर्वम् ।

अर्थ – ही पृथिवी सर्व भूतांचे मधू आहे. पृथ्वीच्या अंतवर्ती जो तेजोरूप अमृतमय पुरुष आहे. तोच या पांचभौतिक देहात तेजस्वी अमृतमय पुरुष आहे. तोच आत्मा. तेच ब्रह्म. तेच हे सर्व.

पृथ्वी, सर्व भूतें, पार्थिव पुरुष आणि शारीर आत्मा हे सर्व वास्तविक ब्रह्मच आहेत. त्याचप्रमाणे, जल, अग्नी, वायू, आदित्य, दिशा, चंद्र, विद्युत, मेघगर्जना, धर्म, सत्य, मानव्य ही सर्व एकाच आत्मतत्त्वाने ग्रथित आहेत. परमात्म्याने व्यापली नाही, अशी कोणतीही वस्तू या जगात नाही. हे आत्मतत्त्व अमर असून, त्याचे ज्ञान झाले असता, अमर तत्त्व प्राप्त होते.

मधमाश्या ज्याप्रमाणे प्रत्येक फुलाजवळ जाऊन त्यातील मध गोळा करतात व त्याचे पोळे बनवतात, त्याप्रमाणे ज्ञानी मनुष्यही जगातील वस्तूपासून ब्रह्मज्ञान संपादन करतो. मध जसा फुलातील सारभूत अंश, तसे ब्रह्म हे जगाचा सारांश होय. मधाने जशी रसनेंद्रियाची तृप्ती होते, त्याप्रमाणे ब्रह्मज्ञानाने आत्म्याची तृप्ती होते. फुलातला रस मधरूपाने परिणत होतो. वृक्षांचे आदिकारणही पृथ्वीचा रस हेच आहे. वृक्षाचे मूळ तोडले तर ते वाळून जाते. ब्रह्म या सर्व जगताचे रसरूप आहे. ब्रह्मरस नसता, तर हे जग सजीव राहिले नसते. इंद्राला हाच प्रत्यक्ष अनुभव आला. मधुचिंतनानेच त्याला हे ब्रह्मज्ञान झाले.

या मधुविद्येविषयी शाट्यायन व वाजसनेय ब्राह्मणांत एक आख्यायिका दिली आहे ती अशी –

इंद्राने अधिकारी अशा दधीची ऋषीला ही मधुविद्या म्हणजे ब्रह्मविद्या शिकविली आणि 'ही विद्या तू कोणाला शिकवू नकोस, शिकवल्यास तुझे मस्तक उडवीन.' असे त्याला बजावले. पण ही विद्या दधीची ऋषीकडून आपल्याला मिळावी, अशी अश्विनीकुमारांची इच्छा होती आणि दधीचीने ही विद्या आपल्याला शिकविल्यास इंद्र त्याचे मस्तक उडवील, ही त्यांची खात्री होती. म्हणून त्यांनी आधीच दधीची ऋषीचे मस्तक तोडून ते सुरक्षित स्थळी ठेवले व त्या जागी घोड्याचे मस्तक लावून त्या अश्वमुखातून मधुविद्या शिकून घेतली. इंद्राने आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे दधीचीचे ते लावलेले मस्तक तोडले. तेव्हा अश्विनीकुमारांनी दधीचीचे मूळचे मस्तक पुन्हा त्याच्या धडाला जोडले.

मधुश्रावणी बिहार प्रदेशातील एक लोकोत्सव. हा उत्सव केवळ नवविवाहित स्त्रियांचा असून, तो श्रावण शुद्ध तृतीयेला साजरा करतात. नवविवाहित मुलगी चिरकाल सौभाग्यवती राहील की नाही, हे पाहण्यासाठी या उत्सवात तिच्या हातावर वनस्पतीची काडी जाळून तिने चटके देतात. त्यामुळे तिच्या अंगावर मोठमोठे फोड आले तर ते उत्तम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सौभाग्याचे चिन्ह मानतात. या उत्सवासंबंधी तिकडच्या लोकांची विलक्षण श्रद्धा आहे. ही श्रद्धा मैथिली लोकगीतांमधून अनेकवार व्यक्त झालेली आहे. त्यासंबंधीचे एक गीत असे –

लहु लहु धर सखि वाती धडकए कोमल छाती
लहु लहु पान पसारह लहु लहु हग दुहुँ झाँपह
मधुर मधुर उठ दाहे मधुर मधुर अवगाहे
कुमर करह विधि आजे मधुश्रावणी भल काजे

भावार्थ – हे सखी, मला हळूहळू डाग दे. माझी नाजूक छाती धडधडू लागली आहे. माझे दोन्ही डोळे हळूहळू बंद करा. ही अग्निशिखा हळूहळू मंद होईल आणि मग मी तीमध्ये अवगाहन करीन. कवी कुँवर म्हणतो, हे नवविवाहित स्त्रिये, आज मधुश्रावणीचा पवित्र सण आहे. यासाठी अनुष्ठानपूर्वक हा विधी कर.

मधुश्रावणी या सणावर शाक्तांचा प्रभाव आहे, असे पंडितांचे मत आहे. [हिं. सा. बृ. इ.; मै. लो. अ.; मै. लो.]

मधुसूदनदास (इ. स. चे १८ वे शतक) एक रीतिकालीन हिंदी संतकवी. माथुर चौबे जातीत याचा जन्म झाला. याने गोविंददास नामक कोण्या व्यक्तीच्या आग्रहावरून रामाश्वमेध नावाचे एक प्रबंधकाव्य रचले. तुलसीदासाचे रामचरितमानस हा या ग्रंथाचा आदर्श आहे. रामचरितमानसाचे एखादे परिशिष्ट ठरावे, इतके साम्य या दोन ग्रंथांत आहे. पद्मपुराण हा रामाश्वमेधाचा मूलाधार होय. या ग्रंथात अश्वमेध यज्ञाचे अनुष्ठान, अश्वामुळे निर्माण झालेला लव-कुशांबरोबरचा युद्धप्रसंग आणि अखेर पुत्रांबरोबर सीतेचे अयोध्येत आगमन, इ. विषय आहेत. कवीने दोहे, चौपाई, गीतिका, इ. छंदांचा उपयोग केला आहे. प्रबंधकौशल्य, कवित्वशक्ती आणि भाषा या सर्व दृष्टींनी हा ग्रंथ उच्च दर्जाचा मानला जातो. [हिं. सा. इ.]

मधुसूदनपूजा एक काम्य व्रत. वैशाख शुद्ध द्वादशीला हे व्रत करतात. विष्णूची पूजा हा या व्रताचा प्रमुख विधी होय. या दिवशी गुरू आणि मंगळ सिंह राशीत, सूर्य मेष राशीत आणि हस्त नक्षत्र व व्यतिपात असेल, तर तो दिवस विशेष शुभ मानला जातो. या सुयोगावर अन्न, वस्त्र, सुवर्ण, गाय आणि पृथ्वी यांचे दान देतात. या दानांमुळे देवपद, इंद्रपद, राजपद व आरोग्य प्राप्त होते; शिवाय अग्निष्टोमाचे फल आणि चंद्रलोकप्राप्ती होते. [हि. ध.; व्र. प.]

मधुसूदन सरस्वती (इ. स. चे १६ वे शतक) एक प्रगाढ वेदान्ती, रससिद्ध कवी आणि महान भगवद्भक्त. हे बंगालमधील फरीदपूर जिल्ह्यातील कोटालपाडा गावाचे रहिवासी होते. हे ब्राह्मण असून यांच्या पित्याचे नाव प्रमोदन पुरंदर असे होते. यांचे बालपणातील नाव कमलजनयन असे होते. लहानपणीच नवद्वीपात जाऊन त्यांनी हरिराम तर्कवागीश यांच्याकडे न्यायाचे आणि माधव सरस्वती यांच्याकडे वेदान्तादी दर्शनांचे अध्ययन केले. अध्ययन पुरे झाल्यावर ते काशीला गेले आणि तिथल्या अनेक पंडितांना त्यांनी शास्त्रार्थात पराजित केले. नंतर त्यांनी विश्वेश्वर सरस्वतींकडून संन्यास ग्रहण केला.

मधुसूदन सरस्वती हे अद्वैत वेदान्ताचे महारथी होते. अद्वैतसिद्धी हा त्यांचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ होय. त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या आचार्यांनी आपल्या सिद्धान्ताच्या स्थापनेसाठी श्रुतींच्या प्रमाणावर अधिक भर दिला होता. तर यांनी प्राधान्याने अनुमान प्रमाणाच्या आधारानेच आपला सिद्धान्त स्थापित केला आहे. अद्वैत वेदान्तावर यांनी सिद्धान्तबिंदू किंवा सिद्धान्ततत्त्वबिंदू, वेदान्तकल्पलतिका, संक्षेपशारीरकव्याख्या, अद्वैतसिद्धी, अद्वैतरत्नरक्षण व प्रस्थानभेद हे ग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय त्यांनी गीतेवर गूढार्थदीपिका नामक व्याख्या लिहिली आहे.

मधुसूदन सरस्वती हे जसे ज्ञानी होते, तसे मोठे भगवद्भक्तही होते. त्यांना श्रीकृष्णाने दर्शन दिले होते, असेही सांगतात. कृष्णभक्तीपुढे त्यांना सर्व गोष्टी तुच्छ वाटत असत. या बाबतीत त्यांनी म्हटले आहे, ते असे–

ध्यानाभ्यासवशीकृतेन मनसा तन्निर्गुणं निष्क्रियं
ज्योतिः किञ्चन योगिनो यदि परं पश्यन्ति पश्यन्तु ते ।
अस्माकं तु तदेव लोचनचमत्काराय भूयाच्चिरं
कालिन्दीपुलिनोदरे किमपि यन्नीलं महो धावति ।।

अर्थ – ध्यानाच्या अभ्यासामुळे ज्यांचे मन वशीभूत झाले आहे, अशा योग्यांना जर त्या निर्गुण व निष्क्रिय अशा परम ज्योतीचे दर्शन होत असेल, तर होऊ दे. आमच्या नेत्रांना मात्र कालिंदीच्या तीरावर धावणारे असे श्यामल तेज (श्रीकृष्णाचे बालरूपच) सुख देते.

भक्तिरसावर त्यांनी भक्तिरसायन नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यात भक्तिरसाचे सर्वांगीण सोपपत्तिक विवेचन आहे. यात त्यांनी भक्ती किंवा भगवदाकारता हा मोक्षाहून स्वतंत्र असा पाचवा पुरुषार्थ मानलेला आहे. महिम्नःस्तोत्राची त्यांनी शिवपर व विष्णुपर अशी उभयविध व्याख्या करून, त्यांच्यांत अभेद दाखवला आहे. यांनी भागवतावरही टीका लिहिली आहे. [हिंदुत्व; सिद्धान्तबिंदु; भा. सा.]

मधूकतृतीया एक काम्य व्रत. हे मुख्यत्वे स्त्रियांचे व्रत आहे. फाल्गुन शुद्ध तृतीयेला या व्रताला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रारंभ करून, त्या दिवशी उपवास करतात. दुसऱ्या दिवशी प्रथम 'भूमिकायै, देवभूषायै, उमायै, तपोवनरतायै, गौर्यै नमः' या पाच मंत्रांचा उच्चार करून क्रमशः गंध, पुष्प, धूप, दीप आणि नैवेद्य या पंचोपचारांनी मधूक वृक्षावर उमेची पूजा करतात. पूजेनंतर 'दौर्भाग्यं मे शमयतु सुप्रसन्नं मनः सदा' या मंत्राने तिची प्रार्थना करतात. मग सुवासिनींना हळदकुंकू देतात. फल– धन व सौभाग्य यांचा लाभ. [व्र. प.; हिं. ध.]

मधेसी एक बोली. उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यात आणि थोडी आसपास ही बोली बोलली जाते. मधेसी ही भोजपुरी भाषेची एक बोली आहे. मधेसी हा शब्द 'मध्य-देश' या संस्कृत शब्दापासून बनला आहे. तिरहुत व गोरखपूर यांच्या मध्य भागात या बोलीचा वापर होतो, म्हणून या बोलीला मधेसी अशी संज्ञा मिळाली. या बोलीवर बराचसा भोज-पुरी व थोड्या प्रमाणात मैथिली या भाषांचा प्रभाव आढळतो. या भाषेचा सांगाडा भोजपुरी भाषेप्रमाणे आहे.

मधेसी भाषेत मैथिली भाषेप्रमाणेच मूर्धन्य 'ड' चा उच्चार 'र' असा करतात. उदा० पडल > परल, कोढी > कोरही, बडका > बरका, इत्यादी. गोरखपूर जिल्ह्यातील अठरा ते वीस हजार लोक ही बोली बोलतात. [चंपा. गॅझे.; भो. भा. सा.]

मध्यदेश आर्यावर्ताचा मध्य भाग. या प्रदेशात आर्य संस्कृतीचे प्राचीनतम केंद्र होते. वैदिक संहिता, ब्राह्मणे व उपनिषदे या ग्रंथांची रचना याच प्रदेशात झाली. रामायण व महाभारत या महाकाव्यांतील घटना याच भागात घडल्या. सूर्यवंशाचा मूळ पुरुष मनू व चंद्रवंशाचा मूळ पुरुष पुरूरवा यांची राजधानी प्रतिष्ठानपुरी ही मध्यदेशात होती. याच केंद्रातून आर्य संस्कृतीचा प्रसार सर्व भारतात झाला.

मध्यदेशाचा स्पष्ट उल्लेख प्रथम मनुस्मृतीत (२.१९,२१) आढळतो तो असा –

> **कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पाञ्चालाः शूरसेनकाः।**
> **एष ब्रह्मर्षिदेशो वै ब्रह्मावर्तादनन्तरः॥**
> **हिमवद्विन्ध्ययोर्मध्यं यत्प्राग् विनशनादपि।**
> **प्रत्यगेव प्रयागाच्च मध्यदेशः प्रकीर्तितः॥**

अर्थ – ब्रह्मावर्तानंतर ब्रह्मर्षिदेश लागतो. त्यात कुरुक्षेत्र, मत्स्य, पांचाल व शूरसेन यांचा समावेश होतो. हिमालय व विंध्य या पर्वतांच्या मध्ये हा प्रदेश असून, त्याच्या पश्चिम सीमेवर विनशन (जिथे सरस्वती नदी लुप्त झाली ते स्थान) आहे व पूर्व सीमा प्रयागाजवळ आहे.

बृहत्संहिता व त्रिकांडशेष या ग्रंथांतही मध्यदेशाच्या याच सीमा सांगितलेल्या आहेत. बृहत्संहितेत कुरू, पंचाल, शूरसेन, मत्स्य आणि वत्स या जनपदांचा समावेश मध्यदेशात केला आहे. राजशेखराच्या काव्यमीमांसेत मनुस्मृतीप्रमाणेच मध्यदेशाच्या सीमा सांगितल्या आहेत.

विनयपिटकात मध्यदेशाच्या सीमा दिलेल्या आहेत, त्यांत पूर्वेकडील मगधाचा समावेश केलेला आहे.

अल्बिरुनीने कनौजच्या भोवतालच्या प्रदेशाला मध्यदेश म्हटले आहे. त्याने या प्रदेशाच्या सीमा दिल्या नाहीत, पण त्याचे विस्तृत वर्णन केले आहे. त्यात ग्वाल्हेर, कालंजर, विदिशा, इ. स्थानांचा अंतर्भाव होतो.

मध्यदेशात सामान्यतः ज्या जनपदांचा समावेश होतो, त्यांची नावे आणि त्यांत सांप्रत प्रचलित असलेल्या बोलभाषांची नावे अशी –(१) कुरू – खडीबोली, (२) पंचाल – कन्नौजी (३) शूरसेन – व्रज, (४) कोसल – अवधी, (५) काशी– भोजपुरी (६) विदेह – मैथिली, (७) मगध – मगही, (८) अंग, (९) दक्षिण कोसल – छत्तीसगडी, (१०) वत्स – बघेली, (११) चेदी– बुंदेली (१२) अवंती– मालवी व (१३) मत्स्य – जयपुरी.

गेल्या दोन-अडीच हजार वर्षांतील ऐतिहासिक घडामोडीं-मुळे या जनपदांचे स्वतंत्र अस्तित्व राहिले नसले, तरी भाषा, संस्कृती व सामाजिक जीवन या बाबतींत त्यांचा वेगळेपणा आजही दिसून येतो. या सर्व जनपदांतील लोक आर्य होते. इथूनच आर्य संस्कृतीचा प्रसार सर्व भारतात झाला. त्यामुळे मध्यदेश म्हणजे भारताचे हृदयस्थान मानले जाते. मध्ययुगात मुसल-मानांनी या प्रदेशाला हिंदुस्थान हे नाव दिले आणि त्यातील भाषा हिंदी किंवा हिंदुस्थानी या नावाने ओळखली जाऊ लागली. [मध्यदेश– धीरेंद्र वर्मा, १९५५; म. भा. इ.]

मध्य प्रदेश भारतीय संघराज्यातील सर्वांत मोठे राज्य. उत्तर प्रदेश, बिहार, ओडिसा, आंध्र, महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान या सात राज्यांनी घेरलेला हा प्रदेश भारताच्या मध्यभागी, चंबळ नदीपासून गोदावरीपर्यंत पसरला आहे. याचे क्षेत्रफळ १,७१,०५२ चौ. मैल असून, १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे लोकसंख्या ३,२३,९४,३७५ आहे.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर पूर्वीच्या मध्यप्रांतालाच मध्य प्रदेश हे नाव देण्यात आले होते. त्या वेळी मध्य भारत व विंध्य प्रदेश ही दोन वेगळी राज्ये निर्माण करण्यात आली होती. भोपाळ संस्थानचा प्रदेशही वेगळा, केंद्रशासित ठेवण्यात आला होता. पण १९५६ मध्ये राज्यांची पुनर्घटना करण्यात आली. त्या वेळी मध्य भारत, भोपाळ, विंध्य प्रदेश, मध्य प्रांतातील १७ हिंदी–भाषी जिल्हे आणि राजस्थानातील सिरोंज तालुका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या सर्व भूभागांचे मिळून एक राज्य बनवून, त्याला मध्य प्रदेश हे नाव देण्यात आले. मध्य प्रांतातले नागपूर, चांदा वगैरे मराठी जिल्हे महाराष्ट्राला जोडले गेले. मध्य भारत या राज्यात ग्वाल्हेर, इंदौर, धार, देवास, जावरा, रतलाम, बडवानी,



विधानसभा–भवन, भोपाळ

राजगढ, झाबुआ, नरसिंहगढ, इ. वीस जुनी संस्थाने आणि तेराशे जहागिरी समाविष्ट होत्या. विंध्य प्रदेशात बुंदेलखंड व बघेलखंड यांचा समावेश होता. सांप्रत मध्य प्रदेशाचे सात विभाग केलेले असून, त्यांतील जिल्ह्यांची नावे अशी –

(१) भोपाळ विभाग– सीहोर, रायसेन, विदिशा, होशंगाबाद, बैतुल, राजगढ व शाजापूर.

(२) विलासपूर विभाग – रायगढ, विलासपूर व सरगुजा.

(३) ग्वाल्हेर–गिर्द, भिंड, मुरैना, शिवपुरी, गुणा व दतिया.

(४) इंदौर– इंदौर, रतलाम, उज्जैन, मंदसोर, देवास, धार, झाबुआ, पूर्व निमाड व पश्चिम निमाड

(५) जबलपूर – जबलपूर, बालाघाट, छिंदवाडा, शिवणी, सागर, मंडला, दमोह व नरसिंहपूर.

(६) रायपूर– रायपूर, दुर्ग व बस्तर.

(७) रीवा– रीवा, सीधी, सतना, पन्ना, छतरपूर, टीकमगढ व शहडोल.

नैसर्गिक विभाग – या राज्याचे पुढील पाच प्रमुख नैसर्गिक विभाग झालेले आहेत –

(१) उत्तरेकडील सखल प्रदेश – यात ग्वाल्हेर व त्याच्या आसपासचा भूभाग येतो.

(२) माळव्याचे पठार – या विस्तृत सपाट प्रदेशाची सरासरी उंची १६०० फूट व क्षेत्रफळ ३४,६०० चौ. मैल आहे.

(३) नर्मदेचे खोरे– विंध्य व सातपुडा पर्वतराजींच्या मधे असलेला अरुंद भूभाग. जबलपूरपासून हंडियापर्यंत पसरलेल्या या प्रदेशाची लांबी सुमारे २०० मैल व रुंदी फक्त २० मैल आहे.

(४) सातपुडा पर्वतश्रेणी – अमरकंटकपासून बालाघाट जिल्ह्यातील साले टेकडीपर्यंत १०० मैल लांब अशी मुख्य रांग असून, तिच्या दोन शाखा पश्चिमेकडे सुमारे ४०० मैलांपावेतो पसरलेल्या आहेत. या पर्वतश्रेणीची उंची सामान्यपणे २००० फूट असून, काही शिखरे ३५०० फुटांहून उंच आहेत.

(५) छत्तीसगढ मैदान – सातपुडा पर्वतराजीच्या पूर्वेला पसरलेला समतल प्रदेश.

चंबळ, वेतवा, सोम, नर्मदा, तापी, महानदी व इंद्रावती या मध्य प्रदेशातल्या मुख्य नद्या असून, त्यांतील नर्मदा व तापी पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. उत्तरेकडील भागात सुमारे ३०″ पाऊस पडतो; तिथले हवामान विषम आहे. माळव्याच्या पठारावर ३०″–४०″ पाऊस पडतो; तिथले हवामान समशीतोष्ण आहे. छत्तीसगढ भागात पाऊस ६०″ पडतो; तिथले हवामान दमट आहे. भोपाळमध्ये ३०″–५०″ पाऊस पडतो; तर विंध्य प्रदेशात ३०″–३५″ पडतो.

या प्रदेशात सर्व प्रकारची जमीन आढळते. माळव्यात चांगली काळी माती आहे, तर उत्तरेकडील भागातली जमीन हलकी व रेतीमिश्रित आहे. नर्मदेच्या खोऱ्यातली माती अत्यंत सुपीक आहे, तर छत्तीसगडमधली माती पिवळी व रेताड आहे. गहू, तांदूळ व ज्वारी ही राज्यातली मुख्य पिके असून; कापूस, ऊस व तीळ ही पिकेही भरपूर येतात. हा प्रदेश शेतीप्रधान आहे. याचा ⅓ भाग जंगलमय असून, त्यात साल, साजा, साग सलाई, करघई, अंजन, पळस, तेंदू, बाभुळ, खैर, मोह व बांबू वगैरे झाडे विपुल प्रमाणात आढळतात.

हा प्रदेश खनिज संपत्तीने समृद्ध आहे. यात कोळसा, लोखंड व मँगॅनीज या पदार्थांचा साठा भरपूर आहे. उत्तरेकडील भागात हिरे, सिलिमनाइट व ओखर हे पदार्थ मिळतात, तर पठारावर चुनखडी मिळते. अशा परिस्थितीत इथे उद्योगधंद्यांची झपाट्याने वाढ होणे साहजिक आहे. त्याप्रमाणे इंदोर, ग्वाल्हेर, उज्जैन, देवास, महेश्वर व बऱ्हाणपूर येथे कापडाच्या गिरण्या निघाल्या आहेत. कटणीजवळ कैमूर येथे भारतातील सर्वांत मोठा सीमेंटचा कारखाना आहे. निमाड जिल्ह्यात चांदणी येथे कागदाची गिरणी आहे. भिलईचा पोलादाचा कारखाना प्रसिद्धच आहे. भोपाळ येथे अवजड विद्युत् यंत्रे निर्माण करण्याचा फार मोठा कारखाना शासकीय क्षेत्रात चालू आहे. नागदा, ग्वाल्हेर, उज्जैन व इंदोर येथे नकली रेशमाची निर्मिती होते. साखरेचे कारखाने पुष्कळ ठिकाणी निघाले आहेत. ग्वाल्हेर येथे काचेच्या व मातीच्या वस्तू निर्माण होतात. तिथे यंत्रसामग्रीचेही उत्पादन होते. इंदोरला डीझेल इंजिनांचा कारखाना निघाला आहे. मोठी धरणे बांधून जलशक्तीच्या साह्याने वीज-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उत्पादनही मोठ्या प्रमाणावर अनेक जागी सुरू झाले आहे.

लोक—नर्मदेचे खोरे व त्याच्या उत्तरेकडील प्रदेशात मुख्यत्वे आर्य वंशाचे लोक आढळतात; तर दक्षिण व पूर्व भागांत आदिवासी व द्रविड वंशाचे लोक दिसतात. आदिवासी लोकांत मुडिया, माडिया, परजा, भतरा, पांडो, कोरवा, उराँव, मुंड, कोरकू, गोंड, बैगा, झाबुआ, भिल्ल, भिलाल, इ. जमातींचा समावेश होतो.

नावावरूनच अवन्ती जनपदाची स्थापना झाली असावी. हैहया-नंतर प्रद्योत वंशाचे राज्य झाले. त्यातला चंद्र प्रद्योत हा फार पराक्रमी होता. त्याच्या वेळी उज्जैन नगरीचे महत्त्व वाढले, असे म्हणतात. त्यानंतर मगध, शिशुनाग व नंद या वंशांनी मध्य प्रदेशावर साम्राज्यसत्ता स्थापली.

इतिहास—चंद्रगुप्त मौर्य याचे साम्राज्य विशाल होते आणि मध्य प्रदेश हा त्याचा एक भाग होता. युवराज अशोक हा

हिंदी ही या प्रदेशातली मुख्य भाषा होय. माळव्यात माळवी, बुंदेलखंडात बुंदेलखंडी, बघेलखंडात बघेलखंडी आणि छत्तीसगडमध्ये छत्तीसगडी अशा हिंदीच्या बोली प्रचलित आहेत. आदिवासी लोक हळबी, गोंडी, भिलाई, इ. बोली वापरतात.

प्राचीन काळ—प्रागैतिहासिक काली यदुवंशाच्या हैहय शाखेचे राज्य मध्य प्रदेशात होते. माहिष्मती ही त्याची राजधानी होती. त्याच्या एका पुत्राचे नाव अवन्ती असे होते. त्याच्या

उज्जैनचा प्रशासक होता. त्या वेळी त्याने सांची येथील प्रचंड स्तूपाचा पाया घातला. मौर्य वंशानंतर शुंग वंशाची सत्ता मध्य प्रदेशावर सुरू झाली. पुष्यमित्र शुंग याचा पुत्र अग्निमित्र हा विदिशेचा शासक (राज्यपाल) होता.

त्यानंतर सातवाहन राजांनी मध्य प्रदेशावर सत्ता स्थापली, असे दिसते, कारण त्यांची नाणी माळव्यात सापडली आहेत. त्यानंतर कुशाण वंशातील राजा कनिष्क याची साम्राज्य-सत्ता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मध्य प्रदेशावर आली. त्याच्या मृत्यूनंतर तिथले क्षत्रप स्वतंत्र झाले. इ. स. च्या दुसऱ्या शतकात सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने शक क्षत्रप नहपान याच्याकडून माळवा प्रदेश घेतला होता. पण चष्टन व रुद्रदामन यांनी पुन्हा तिथे आपली सत्ता स्थापली. गुप्त वंशाच्या उदयापर्यंत तिथे शकांचेच राज्य होते, असे दिसते.

त्याच काळात कांतिपुरी (कुतवाल), पद्मावती (पवाया) व विदिशा येथे भारशिवांचे राज्य चालू होते. इ. स. च्या ४ थ्या शतकात मगधात गुप्त वंशाचे राज्य सुरू झाले आणि त्या वंशातील राजांनी मध्य भारतातील नागांचे राज्य घेतले. त्या वेळी पंजाबातून परागंदा झालेले मालव लोक दशपूर (मंदसोर) येथे राज्य स्थापण्याच्या प्रयत्नात होते. पण समुद्रगुप्ताने त्यांना पराभूत केले. चंद्रगुप्त (द्वितीय) याने शकांचा पराभव केल्यानंतर सारा मध्य भारत गुप्त साम्राज्याचा एक भाग बनला.

इ. स. ५०० पर्यंत गुप्त वंशाची सत्ता अबाधित राहिली. मात्र माळव्यातील मालव लोक काहीसे स्वतंत्रपणे राज्य करू लागले होते. त्यानंतर हूणांनी ग्वाल्हेर व माळवा या प्रदेशांवर आक्रमण करून तिथे आपले राज्य स्थापले. पण मालव देशाचा महापराक्रमी राजा यशोधर्मा याने हूण राजा मिहिरकुल याचा पराभव करून संपूर्ण दक्षिण मध्य भारतावर मालवांचे राज्य स्थापले. त्यामुळेच त्या प्रदेशाला माळवा हे नाव मिळाले.

गुप्त वंशाचे साम्राज्य ऱ्हास पावल्यानंतर इ. स. च्या सातव्या शतकात हर्षवर्धन याचे राज्य सुरू झाले आणि त्यानंतर गुर्जर-प्रतीहारांचे. त्यानंतरच्या दोन शतकांत तर प्रतीहारांनी उ. भारतात विशाल साम्राज्यच निर्माण केले. मध्य प्रदेशात निरनिराळ्या भागांत परमार, कलचुरी, चंदेल यांची मांडलिक राज्ये होती. इ. स. च्या दहाव्या शतकात माळव्यात परमारांचे राज्य स्थापन झाले, ते इ. स. १३०० पर्यंत चालू होते. इ. स. १३०५ मध्ये अलाउद्दीन खिलजीने तो प्रदेश जिंकून आपल्या राज्यात समाविष्ट केला.

इ. स. च्या आठव्या शतकात जेजाकभुक्ती (बुंदेलखंड) या प्रदेशात चंदेल वंशाचे राज्य सुरू झाले. पण इ. स. ९५० पर्यंत ते प्रतीहारांचे मांडलिक होते. त्यानंतर धंगदेवाने प्रतीहारांचे स्वामित्व अमान्य केले. एवढेच नव्हे, तर तिथे स्वतःचे साम्राज्य स्थापले. चंदेलांचे राज्यही अलाउद्दीन खिलजीने इ. स. च्या चौदाव्या शतकाच्या आरंभी जिंकले.

इ. स. च्या सहाव्या शतकापासून माहिष्मती येथे राज्य करणाऱ्या कलचुरी वंशाने हळूहळू बघेलखंडावर आपली सत्ता स्थापली. बुंदेलखंड व बघेलखंड या सर्व प्रदेशाला त्या काळी चेदी देश म्हणत. इ. स. च्या अकराव्या शतकात त्या वंशातील कर्णदेव याने संबंध उ. भारतावर आपली सार्वभौम सत्ता प्रस्थापित केली होती. पण अकराव्या शतकानंतर त्या वंशाची सत्ता संपली. मात्र द. कोसलावर त्या वंशाच्या एका शाखेचे राज्य इ. स. च्या अठराव्या शतकापर्यंत चालू राहिले.

इ. स. च्या दहाव्या शतकात ग्वाल्हेर येथे कछवाह या वंशाचे राज्य उदयाला आले. इ. स. १०२० च्या सुमारास गझनीच्या मुहंमदाने ग्वाल्हेरवर हल्ला करून कछवाहांचा पराभव केला. पण त्यानंतरही इ. स. ११९६ पर्यंत त्यांचे राज्य तिथे

राणी लक्ष्मीबाईची समाधी – ग्वाल्हेर

चालू होते. त्यानंतर तिथे मुसलमानांची सत्ता सुरू झाली. तिथे मोगलांचे राज्य सुरू होण्यापूर्वी सुमारे तीनशे वर्षे राजपूत राजे व दिल्लीचे सुलतान यांची सत्तास्पर्धा चालू होती. इ. स. च्या पंधराव्या शतकात काही काळ तिथे तोमर या हिंदू वंशाचे राज्य होते.

इ. स. च्या चौदाव्या शतकात माळवा हा दिल्लीच्या सुलतानांच्या सत्तेखाली होता. पण इ. स. १४०१ मध्ये तिथला सुभेदार दिलावरखान गोरी याने ती सत्ता झुगारून स्वातंत्र्य पुकारले. धार येथे त्याची राजधानी होती. त्याच्या मागून इ. स. १४०५ साली अलफखान हा होशंगशहा या नावाने गादीवर बसला. त्याने मांडू येथे आपली राजधानी नेली. त्याच्या राज्याचा विस्तार उत्तरेला काल्पीपासून पश्चिमेला गुजरातमधील खेरलापर्यंत झाला होता. मांडूचा शेवटचा सुलतान बाजबहादुर व राणी रूपमती यांची कथा प्रसिद्ध आहे. इ. स. १५६१ मध्ये माळवा मोगलांच्या साम्राज्यात समाविष्ट झाला. इ. स. १७२८ साली चिमाजी अप्पाने मोगलांच्या सुभेदाराचा पराभव करून माळव्यात मराठ्यांचे वर्चस्व स्थापले.

इ. स. च्या सोळाव्या व सतराव्या शतकांत बुंदेलखंडावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुंदेले राजपुतांचे व वघेलखंडानर वाघेल राजपुतांचे राज्य होते. अठराव्या शतकात पेशव्यांनी त्या प्रदेशातही मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केली. अशा प्रकारे संपूर्ण मध्य भारत मराठी साम्राज्यात समाविष्ट झाला.

औरंगजेबाच्या कारकीर्दीत दोस्त महंमदखान नावाचा माळव्याचा सुभेदार होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याने भोपाळ येथे स्वतंत्र राज्य स्थापले. मध्य भारतावर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतरही ते मांडलिक राज्य चालू होते. तेच पुढे ब्रिटिश साम्राज्यातले एक मोठे संस्थान बनले.

बस्तरचे राज्य इ. स. च्या चौदाव्या शतकाच्या आरंभी स्थापन झाले. मराठ्यांच्या काळात ते स्वतंत्र होते. पुढे ते इंग्रजांचे मांडलिक संस्थान झाले.

पेशवाई नष्ट झाल्यानंतर या भागातली ग्वाल्हेर, इंदौर, धार, देवास, जावरा, रतलाम, भोपाळ, राजगढ, झाबुआ, बस्तर, पिपलोदा, रीवा, सरजुगा, पन्ना, इ. राज्ये ब्रिटिश साम्राज्यातील मांडलिक संस्थाने म्हणून चालू राहिली आणि भारत स्वतंत्र झाल्यानंतर ती भारतीय संघराज्यात विलीन झाली.

शिल्पकला – मध्य प्रदेशात अशोकाच्या काळापासून शिल्पकलेचा विकास झाला आहे. सांची व भरहूत येथील स्तूप त्या काळातील शिल्पकामाचे उत्कृष्ट नमुने आहेत. त्यांची तोरणद्वारे व कठडे यांवरील कोरीव नक्षीकाम अत्यंत सुंदर आहे. ते सर्व सनपूर्व ३ ते १ या शतकांत निर्माण झाले. त्यानंतरच्या ३–४ शतकांतले शिल्पकाम कुठे आढळत नाही. पुढे गुप्तवंशाच्या राजवटीत कलांचे सुवर्णयुग अवतरले व सर्वच कलांना बहर आला. त्या काळातील बाघ येथील बौद्ध लेणी आणि उदयगिरी येथील जैन व हिंदू लेणी अतिशय प्रेक्षणीय स्वरूपात निर्माण झाली.

मंदिरांच्या रचनेत त्यानंतर बराच विकास झाला. उंच, निमुळती होत गेलेली शिखरे, अलंकृत द्वारे, सुशोभित मंडप व मंदिरांच्या बाह्यांगांवरील कोरीव काम यांमुळे तिकडच्या मंदिरांची शोभा पुष्कळच वाढली. इ. स. च्या आठव्या ते बाराव्या शतकांत मध्य प्रदेशात जागोजागी पुष्कळ मंदिरे निर्माण झाली. त्यांतील उदयपूर, खजुराहो व ग्वाल्हेरचा किल्ला येथील मंदिरे उत्कृष्ट आहेत.

त्यानंतर इ. स. च्या चौदाव्या शतकात मुस्लिम सुभेदारांच्या काळी ज्या वास्तू निर्माण झाल्या, त्या फारशा सुशोभित नसल्या तरी, भव्य व सुंदर आहेत. मांडू येथील होशंगशहाची कबर व जामा मशीद ही मुस्लिम शिल्पकामाची उत्तम उदाहरणे मानली जातात.

इ. स. च्या १५ व्या शतकात ग्वाल्हेरच्या किल्ल्यात तोमर राजा मानसिंग याने बांधलेले मानमंदिर व गुजरीमहाल हे प्रासाद अत्यंत प्रेक्षणीय आहेत. मांडूच्या सुलतानांनी बांधलेले जहाजमहाल व हिंदोलामहाल हे पठाणांच्या शिल्पकामाचे उत्कृष्ट नमुने



उदयेश्वराचे मंदिर – उदयपूर

म्हणता येतील. त्यानंतरच्या राजपूत राजांनी मध्य प्रदेशात अनेक ठिकाणी डोंगरावर गडकोट व राजवाडे बांधून ठेवलेले आहेत.

चित्रकला – बाघ गुंफांमधील भित्तिचित्रे आणि मानमंदिरातील भित्तिचित्रे उत्कृष्ट आहेत. मांडूमधील भग्नावशेषांतही अशी काही चित्रे पाहायला मिळतात. नरवर, सबळगड, काशीपूर व शिवपूर येथे राजपूत शैलीची काही चित्रे आढळतात.

मध्य प्रदेशातील साहित्याची परंपरा कालिदास व भवभूती यांच्या काव्यांपासून सुरू झाली, ती आजतागायत चालू आहे. वराहमिहिर, मंडनमिश्र, गंगाधर हे पुरुष याच प्रदेशात होऊन गेले. हिंदी साहित्यिकांत केशवदास, विहारी, कुंभनदास, हरिदास स्वामी, छत्रसाल, इ. नावे विशेष उल्लेखनीय आहेत.

मध्य प्रदेशातील अनेक ठिकाणे तिथल्या हस्तकलाकौशल्यासाठी प्रसिद्ध आहेत. महेश्वर व चंदेरी येथील तलम साड्या भारतात सर्वत्र लोकप्रिय ठरल्या आहेत. मंदसौर येथील रग व ग्वाल्हेरचे गालिचे फार चांगले असतात. ग्वाल्हेरची मातीची भांडी परदेशातही नावाजली गेली आहेत. भोपाळ येथे जरीकाम केलेल्या सुंदर पिशव्या तयार होतात. जबलपूरला स्थानिक पाषाणाच्या विविध सुंदर वस्तू बनवल्या जातात. बालाघाट व छिंदवाडा येथे पितळेची सुरेख भांडी आणि शिवगांव येथे लाखेच्या सुबक वस्तू तयार होतात.

संगीत – मध्य प्रदेशातील संगीताची परंपरा उज्ज्वल आहे. उदयन, नायक गोपाल, बैजू, मानसिंह, तानसेन, बाजबहादुर, इ. संगीतज्ञांमुळे या प्रदेशाची कीर्ती दूरवर पसरली आहे. त्यांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निर्माण केलेल्या गायन-पद्धती आणि विविध राग सर्वमान्य व लोकप्रिय आहेत. ग्वाल्हेरचे घराणे या क्षेत्रात विशेष प्रसिद्ध आहे.

सण-उत्सव – मध्य प्रदेशातील बहुतेक लोक हिंदू असून, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, इ. अन्यधर्मियांची संख्या थोडी आहे. हिंदूंच्या सणांतील काही महत्त्वाचे सण असे –

वसंतपंचमी – माघ शुद्ध पंचमीला हा सण येतो. त्या दिवशी पुष्कळ लग्नसमारंभ साजरे केले जातात. वसंत ऋतूला प्रारंभ होऊन मोहरीची पिवळी धमक फुले फुललेली दिसतात. त्याच रंगाचे कपडे परिधान करून सर्व स्त्रीपुरुष बाहेर पडतात.

महाशिवरात्री – माघ व. १३ ला सर्व शिवभक्त उपवास करतात. ओंकारमांधाता येथे त्या दिवशी हजारो यात्रेकरू जमा होऊन शिवपूजन करतात.

होळी – कामदहनाचा हा उत्सव फाल्गुन पौर्णिमेला साजरा केला जातो. त्यात गुलाल व रंग उडवून मौज करण्यात सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुष भाग घेतात.

जन्माष्टमी – श्रावण वद्य अष्टमीला कृष्णजन्मानिमित्त हा उत्सव साजरा केला जातो. त्यात उपवास व कथाकीर्तने यांना महत्त्व असते.

दसरा – आश्विन शुद्ध दशमीला हा विजयोत्सव असतो. देवीने महिषासुराला मारले, त्यानिमित्त कोणी हा सण करतात; तर कोणी रामाने रावणाचा वध केला, त्याप्रीत्यर्थ करतात. त्यात दहा दिवस रामायणातील प्रसंगांवर नाटके केली जातात. शेवटच्या दिवशी रावणाचा कागदी पुतळा जाळतात.

दीपावली – श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला म्हणून हा आनंदोत्सव केला जातो. त्यानिमित्त ४–५ दिवस दिव्यांची रोषणाई केली जाते.

धर्मपंथ – मध्य प्रदेशात शैव पंथाचा प्रसार सर्वांत अधिक झाला होता आणि त्यामुळे शैव मंदिरे पुष्कळ निर्माण झाली. उज्जैन येथील महाकालमंदिर सुप्रसिद्ध आहे. बेसनगर, उदयगिरी, पठारी, मंदसौर, महुआ, तिराही, कोटा, उदयपूर, नेमावर, कदवाहा, ऊन, बदनावर, नरेसर, खजुराहो, अमरकंटक, ओंकारजी, कसरावद येथील शैव मंदिरे व मूर्ती शैव प्रभावाची साक्ष देतात. वैष्णव पंथाचा प्रसार या प्रदेशात त्या मानाने कमी झालेला दिसतो. त्या पंथाची काही मंदिरे विदिशा, उदयगिरी, ग्वाल्हेर, पठारी, इंदोर, इ. ठिकाणी आढळतात. जैन मंदिरे व मूर्ती मध्य प्रदेशात सर्वत्र आहेत. इ. स. च्या आठव्या ते बाराव्या शतकांत या भागात जैन धर्माचा प्रसार विशेष झाला असावा. सांप्रतदेखील या राज्यात जैन लोकांची संख्या पुष्कळ आहे. मध्य प्रदेशात प्राचीन बौद्ध स्मारके पुष्कळ आहेत, त्यावरून तिथे त्या धर्माचा प्रसार खूप झाला असला पाहिजे, असे वाटते. इ. स. च्या चौदाव्या शतकात या भागात इस्लामचा प्रवेश झाला. मुसलमान सुलतानांचे राज्य इथे दीर्घ काल चालू होते. त्यामुळे साहजिकच

सिंहनादाची मूर्ती – महोबा

जागोजागी मशिदी, मकबरे व दर्गे निर्माण झालेले दिसतात. मात्र मुसलमानांची लोकसंख्या या प्रदेशात त्या मानाने थोडी आहे.

प्रेक्षणीय स्थळे व तीर्थस्थाने – मध्य प्रदेशात ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक दृष्टीने महत्त्वाची अशी असंख्य स्थाने आहेत. त्यांतील काहींची संक्षिप्त माहिती खाली दिली आहे –

ग्वाल्हेर – हे शहर दिल्लीपासून १९८ मैलांवर द. इ. इथे शिंद्यांची राजधानी होती. मध्य भारताची राजधानीही हीच होती. शहराजवळ असलेला दुर्ग इतिहासात फार प्रसिद्ध आहे. कछवाहा राजपुतांच्या राजवटीत या दुर्गावर अनेक मंदिरे निर्माण झाली. तोमर वंशातील राजा मानसिंह यानेही या दुर्गाचे वैभव वाढवले. हा दुर्ग एका ३०० फूट उंच डोंगरावर बांधलेला असून, त्याची दक्षिणोत्तर लांबी दीड मैल आहे. इ. स. १७८४ मध्ये महादजी शिंदे याने तिथे आपली राजधानी स्थापली. हे शहर उत्तम मातीच्या भांड्यांविषयी प्रसिद्ध आहे (ग्वाल्हेर पाहा).

भोपाळ – मध्य प्रदेशाची राजधानी. हे शहर दिल्लीपासून सुमारे ४४० मैलांवर आहे. प्राचीन काळी या स्थानाचे नाव भोजपाल असे होते; त्याचेच रूपांतर भोपाळ झाले आहे, असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणतात. भोज राजाने हे नगर इ. स. च्या ११ व्या शतकात वसवले होते.

इ. स. च्या १८ व्या शतकात दोस्त महंमदखान याने हे नगर जिंकून तिथे फत्तेगड बांधला. तेव्हापासून त्याच्या वंशाचे राज्य आसपासच्या प्रदेशावर सुरू झाले. तेच पुढे ब्रिटिश साम्राज्यातले भोपाळ संस्थान झाले. नोव्हेंबर १९५६ मध्ये नवीन मध्य प्रदेश हे राज्य निर्माण होऊन, भोपाळ ही त्याची राजधानी ठरली.



मनियादेवाचे मंदिर – महोबा

या नगराजवळ दोन सुंदर तलाव आहेत. त्यांतील मोठ्या तलावाचे क्षेत्रफळ सुमारे सव्वादोन चौरस मैल आहे. नगरात तीन सुंदर मशिदी आहेत.

उज्जैन – भोपाळपासून ११३ मैलांवर ही नगरी आहे. प्राचीन काळापासून हे अतिशय पुण्यप्रद तीर्थक्षेत्र मानले जाते. बारा ज्योतिर्लिंगांपैकी महाकाल हें ज्योतिर्लिंग इथे असून, हे एक शक्तिपीठही आहे. बारा वर्षांतून एकदा इथे कुंभपर्वाचा उत्सव होतो. दरवर्षी लाखो यात्रेकरू या नगरीत जाऊन व क्षिप्रा नदीत स्नान करून पावन होतात. ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने ही नगरी फार प्रसिद्ध आहे. (उज्जैन पाहा).

इंदोर – उज्जैनपासून ३३ मैलांवर हे शहर आहे. अहल्याबाई होळकर हिने याची स्थापना केली. ते सरस्वती नदीच्या तीरावर वसलेले आहे. होळकरांच्या इंदोर संस्थानाची ही राजधानी होती. छत्रीबागेत होळकर वंशातील राजांच्या छत्र्या आहेत. तिथे अहल्याबाईंची छत्री आहे.

या शहरात काचमंदिर नावाचे दिगंबर जैनांचे मंदिर आहे. याच्या भिंती, छत व जमिनी शिंपले, काचा व रंगीबेरंगी मणी वसवून सुशोभित केलेल्या आहेत. भिंतीवर नरकयातनांची मोठाली चित्रे लावलेली आहेत. गर्भगृहात तीर्थंकरांच्या ब्रांझच्या तीन मूर्ती असून, गर्भगृहासमोर चांदीच्या चौथऱ्यांवर त्याच तीर्थंकरांच्या संगमरवरी मूर्ती आहेत.

सांची – हे ठिकाण झाशी-भोपाळ लोहमार्गावर, भोपाळपासून २८ मैलांवर आहे. तिथल्या मौर्यकालीन स्तूपांमुळे ते विश्वविख्यात झाले आहे. बौद्ध लोकांचे ते अत्यंत पवित्र असे यात्राकेंद्र असून, तिथले शिल्पकामही फार प्रेक्षणीय आहे. तिथे अशोकाने ४२ फूट उंचीचा एक स्तंभही उभारला होता; पण सांप्रत त्याचे भग्नावशेषच आढळतात. (सांची पाहा).

सांचीच्या पंचक्रोशीत अनेक प्रेक्षणीय स्थाने आहेत. त्यांतील सोनारी, शतधारा, पिपलिया, विदिशा, उदयगिरी ही विशेष उल्लेखनीय आहेत. (विदिशा, उदयगिरी पाहा).

खजुराहो – झाशीपासून सुमारे ११५ मैलांवर हे गाव आहे. मध्ययुगात इथे एक मोठे वैभवशाली नगर होते. त्याचे भग्नावशेष तिथे आढळतात. इ. स. च्या १० ते १२ या शतकांत चंदेल वंशाच्या राजवटीत इथे जी असंख्य मंदिरे निर्माण झाली, त्यांतील काही अजून चांगल्या स्थितीत असून, त्यांचे शिल्पकाम फारच सुंदर आहे. या मंदिरांमुळेच जगातले प्रवासी खजुराहोकडे आकर्षित होतात. (खजुराहो पाहा).

महोबा – हमीरपुर जिल्ह्यात खजुराहोपासून ४० मैलांवर हे शहर आहे. इथे चंदेल वंशाची राजधानी होती. या शहरात त्या राजांनी बांधलेले पुष्कळ तलाव आहेत. त्यांतील मदनसागर व किरातसागर हे खूप मोठे असून, त्यांच्या दगडी भिंती अजून भक्कम आहेत. शहराच्या उत्तरेला एक जुना,



रामकुंड – महोबा

मोडतोड झालेला किल्ला आहे. शहराच्या परिसरात चंदेलकालातील शिल्पांचे पुष्कळ भग्नावशेष विखुरलेले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांत मनियादेवाचे एक मंदिर असून, त्याच्या समोर एका पाषाणस्तंभावर इ. स. च्या ११ व्या शतकातला एक शिलालेख आहे. मदनसागराजवळ दुसरा पाषाणस्तंभ आहे, तो राजपूत वीर अल्हाच्या नावाचा आहे. इथेही मोडतोड झालेली पुष्कळ मंदिरे आणि खडकात खोदलेल्या भव्य मूर्ती आढळतात. मदनसागराच्या तीरावर एका टेकडीवर चौवीस तीर्थंकरांच्या प्रतिमा खडकात कोरलेल्या दिसतात. किरातसागराच्या जवळच जमिनीत काही बौद्ध मूर्ती सापडल्या आहेत. त्यांतील सिंहनाद अवलोकितेश्वराची मूर्ती अत्यंत सुंदर आहे. पीर मुबारक शहा नावाचा एक मुस्लिम साधू होता, त्याचा दर्गा तिथे आहे. मुसलमानांप्रमाणे हिंदूही त्याला मान देतात. चंदेल वंशाचा मूळ पुरुष ननुक हा ज्या जागी मृत्यू पावला, तिथे त्याचे स्मारक म्हणून रामकुंड बांधलेले आहे.

बाघगुंफा – धारपासून ६० मैलांवर एका डोंगरात ही बौद्ध लेणी आहेत. तिथून सुमारे ४ मैलांवर बाघ नावाचे खेडे आहे, त्यावरून या लेण्यांना हे नाव मिळालेले आहे. मात्र स्थानिक लोक त्यांना पांडवगुंफा या नावाने ओळखतात. ही लेणी तिथल्या उत्कृष्ट भित्तिचित्रांबद्दल प्रसिद्ध आहेत. लेण्यांच्या बाहेर यक्षराजाची एक प्रचंड मूर्ती उभी आहे. (बाघगुंफा पाहा)

मांडू – धारपासून सुमारे २२ मैलांवर विंध्य पर्वतराजीतील २००० फूट उंचीच्या एका पठारावर हे सुंदर शहर वसलेले आहे. इथला किल्ला मांडवगड या नावाने प्रसिद्ध आहे.



जहाजमहाल – मांडू

माळव्याच्या परमारवंशी राजांच्या राजवटीत या शहराची स्थापना झाली. इ. स. च्या १५ व्या शतकात माळव्याच्या मुसलमान सुभेदारांची राजधानी इथे होती. त्या काळातच या शहरात पुष्कळ सुंदर व भव्य वास्तू निर्माण झाल्या. शेवटचा सुलतान बाजबहादुर व त्याची राणी रूपमती यांच्यामुळे या स्थानाची कीर्ती झाली. (मांडवगड पाहा)

जानापाव – इंदोर जिल्ह्यात विंध्य पर्वतावर हे स्थान आहे. इथे चंबळ, गंभीर, कारम, चोरल, मोरल, चामडा, तारामती, झुजेश्वरी, इ. बारा नद्या उगम पावतात. ही परशुरामाची जन्मभूमी व जमदग्नी ऋषीची तपोभूमी होती, असे म्हणतात.

राजगढ – हे माही नदीच्या तीरावर वसलेले असून, तिथे एक मोठे जैन मंदिर आहे. ते संपूर्ण काचेचे आहे. त्यातील मूर्तीही सुंदर आहे. तिथून पाच मैलांवर शांतिनाथाचे भव्य मंदिर आहे. त्यातील मूर्ती बारा फूट उंच आहे. इथे तीन दिवस मोठी जत्रा भरते.

कसरावद – निमाड जिल्ह्यातील एक स्थान. इथून जवळच उत्खनन करण्यात आले, तेव्हा ३००० वर्षांपूर्वीची सोन्याची नाणी व पुष्कळ प्राचीन वस्तू सापडल्या. काही अंतरावर कैलासकुंड आहे; त्यात शीत व उष्ण पाण्याचे झरे आहेत. जवळच कालेश्वर व भवानी यांची प्राचीन मंदिरे आहेत. डोंगरावर मंगलेश्वराचें मंदिर आहे. इथून तीन मैलांवर नावडातोडी नामक स्थान आहे. इथे उत्खनन झाले असून, त्यात अनेक प्राचीन वस्तू मिळाल्या आहेत. तिथे सातवाहनांचे एक मंदिर आहे. नर्मदा व वेदवती या नद्यांच्या संगमावर मार्कंडेय ऋषीचे स्थान, एक प्राचीन मंदिर व धर्मशाळा आहे.

धरमपुरी – निमाड जिल्ह्यात नर्मदेच्या तीरावर हे नगर वसलेले आहे. जवळच कुब्जा नदीचा संगम आहे. तिथे विष्णूच्या तीन भव्य मूर्ती आहेत. नर्मदेच्या पात्रात धर्मपुरी नामक लहानसे बेट असून, त्यावर बिल्वामृतेश्वर महादेवाचे मंदिर आहे. तिथेच दधीची ऋषीचे निवासस्थान होते, असे म्हणतात.

बावनगजा – निमाड जिल्ह्यात बडवानीपासून ४ मैलांवर सातपुडा पर्वताचे चूलगिरी नामक एक उंच शिखर आहे. तिथे एक भव्य व सुंदर जैन मंदिर आहे. त्याच्या खालच्या भागात पहाडात खोदलेली प्रचंड जिनमूर्ती आहे. तिची उंची सुमारे ८४ फूट आहे. तीर्थंकर सुव्रतनाथ याला इथेच मोक्षप्राप्ती झाली, असे म्हणतात.

खरगोन – निमाड जिल्ह्याचे हे केंद्रस्थान असून, कुंदा नदीच्या तीरावर वसलेले आहे. इथे एक जुना किल्ला आहे व त्यात बरेच दर्गे आहेत. नदीच्या काठी एक नवग्रहमंदिर असून, तिथे अहल्याबाईने बांधलेला एक सुंदर घाट आहे. तिथे दर वर्षी पौष महिन्यात नवग्रहांची यात्रा जमते.

ऊन – खरगोनपासून ११ मैलांवर हे गाव आहे. हे जैनांचे सिद्धक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. इथे नीलकंठेश्वराचे सुंदर मंदिर आहे. त्याचे शिखर मात्र मोडून पडलेले आहे. त्याच्या गाभाऱ्यात एक शिवलिंग आणि पार्वती, विष्णू व सूर्य यांच्या मूर्ती आहेत. जवळच ३० फूट खोल तळघरात गुप्तेश्वर शिवलिंग आहे आणि कालेश्वर व बल्लाळेश्वर नामक मंदिरेही आहेत. खरगोन – ऊन रस्ता व चौपारा डेरा यांच्यामधे एक मोठे व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुंदर जैनमंदिर आहे. त्याचे शिखर पडलेले आहे, पण समोरचा चौकोनी मंडप उभा आहे. त्या मंडपाच्या मधल्या आठ स्तंभांवर एक गोल घुमट आहे. मंडपात तीर्थंकर शांतिनाथाची मोठी प्रतिमा आहे. तिच्या आसनावर कोरलेल्या आलेखावरून कळते, की वि. स. १२४२ माघ शु. सप्तमीला तिची स्थापना झाली. ऊन हे जैनांचे पवित्र तीर्थस्थान आहे. तिथून वाहणाऱ्या नदीला वेलना म्हणता. तिच्या तीरावर कित्येक जैन मुनींना मोक्ष मिळाला आहे.

नरवर – शिवपुरीपासून उत्तरेला १२ मैलांवर हे स्थान आहे. पुराणांतील नल राजाची राजधानी इथेच होती, असे म्हणतात. कछवाहा राजपुतांची एक शाखा इथे राज्य करीत होती. इ. स. च्या १५ व्या शतकात इथे तोमर वंशाची सत्ता होती. इथला किल्ला ग्वाल्हेरच्या किल्ल्यासारखाच महत्त्वपूर्ण आहे. त्यात पुष्कळ मंदिरे होती, पण त्यांची मोडतोड झालेली आहे.

चंदेरी – हे गाव एका डोंगरावर वसलेले असून, त्याच्या दक्षिण भागात २०० फूट उंचीवर एक दुर्ग बांधलेला आहे. त्या दुर्गात एक सुंदर तलाव आहे. इ. स. १५२९ मध्ये बाबराने या किल्ल्यावर हल्ला केला, तेव्हा कित्येक राजपूत स्त्रियांनी तिथे जोहार केला, असे म्हणतात. आसपासच्या डोंगरांत अनेक जैन मूर्ती खोदलेल्या आहेत. त्यांतली एक तर २५ फूट उंच आहे. इ. स. च्या १८ व्या शतकात इथे बुंदेला राजपुतांचे राज्य होते. त्या राजांनी इथे अनेक मंदिरे व तलाव बांधले. त्यांतील नागेश्वरी देवी, नृसिंह व लक्ष्मण यांची मंदिरे उल्लेखनीय आहेत. सांप्रत इथे निर्माण होणारी रेशमी व जरतारी वस्त्रे सर्व भारतात फार प्रसिद्ध आहेत.

मध्य प्रदेशातील आदिवासी स्त्रिया

भिंड – एक प्राचीन नगर. सांप्रत हे भिंड जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे. फार प्राचीन काळी इथे भिंड ऋषीचा आश्रम होता, असे म्हणतात. परशुरामाची जन्मभूमी इथून ८ मैलांवर जमदारा या गावी आहे, असे म्हणतात. इथे रेणुकेचे मंदिर आहे. भिंड येथे भदावर जनपदाची राजधानी होती. मोगल कालात भदोरिया राजपुतांचे भदावरवर राज्य होते. त्यांनी राजधानीभोवती कोट बांधला व तिथे एक किल्लाही बांधला. इथला गौरी तलाव फारच सुंदर आहे. इथून एका मैलावर पंचपेडे येथे एक महादेवाचे प्रसिद्ध मंदिर आहे. त्यात अनेक सुंदर मूर्ती आहेत.

या स्थानाविषयी एक दंतकथा प्रचलित आहे, की पृथ्वीराज चव्हाण याला स्वप्नात दृष्टांत झाल्यावरून त्याने इथे शोध केला; तेव्हा त्याला एक भूमिगत शिवलिंग सापडले. तेच वनखंडेश्वर या नावाने प्रसिद्ध झाले. त्याचा बराच भाग अजून भूमीतच आहे. इथे शिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

भांडेर – प्राचीन काली या स्थानाला ब्रह्मांडपुरी असे नाव होते, त्याचे कालांतराने विभांडकपुरी असे रूपांतर झाले. द्वापर युगात इथे यौवनाश्व राजा राज्य करीत होता. त्याच्या राणीचे नाव भद्रा असे होते. त्यावरून या नगरीला भद्रावती हे नाव देण्यात आले. तिथेच सांप्रत भांडेर हे गाव आहे. ते झाशीपासून सुमारे ३४ मैलांवर, पहुज नदीच्या काठी वसलेले आहे. इथे प्राचीन काळातले यज्ञकुंड आहे, त्याला सोनभद्र कुंड म्हणतात. तिथे जवळच एक शिवमंदिर होते, पण त्याची मशीद झाली आहे. इथे दरगे, मशिदी, विहिरी वगैरे ऐतिहासिक वास्तू प्रेक्षणीय आहेत. वसंतपंचमीपासून फाल्गुन शुद्ध पंचमीपर्यंत इथे मोठी जत्रा भरते. इथून चार मैलांवर भरोली गावात एक प्राचीन शिवमंदिर आहे. ही शृंगी ऋषीची तपोभूमी होती, असे म्हणतात. तिथून पूर्वेला दोन मैलांवर शितळादेवीचे मंदिर आहे. त्यातली मूर्ती श्रीशंकराचार्यांनी स्थापन केली, अशी आख्यायिका आहे. जवळच एका मैलावर कालीचे मंदिर आहे.

याव्यतिरिक्त मध्य प्रदेशात पद्मावती, देवास, धार, मंदसौर, पंचमढी, भेडाघाट, मदनमहल, शिवणी, दंतेश्वरी, शिवपुरी, चित्रकूट, मुक्तागिरी, महू, इ. कित्येक उल्लेखनीय स्थाने आहेत. [मध्य प्रदेश – एक परिचय, सूचना तथा प्रकाशन, भोपाल, १९६३; म. प्र.; म. ज. अ. ग्रं.]

मध्यमिका एक प्राचीन नगर. हे नगर राजस्थानमध्ये अरवली पर्वताच्या आग्नेयीस चितोडपासून आठ मैलांवर आहे. आज नगरी या नावाने हे स्थान प्रसिद्ध आहे. प्राचीन काळी हा भाग शिबी जनपद या नावाने ओळखला जात होता. पतंजलीच्या महाभाष्यात मध्यमिका नगरीचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उल्लेख आढळतो. या नगरावर यवनांनी आक्रमण केले होते, अशीही महाभाष्यात नोंद आहे.

भागवत धर्माचे एक मोठे केंद्र म्हणून या स्थानाला महत्त्व आहे. नगरीजवळ घोसुंडी नावाचे एक गाव आहे. तिथे ब्राह्मी लिपीतला एक शिलालेख सापडला आहे. त्या शिलालेखावरून असे सिद्ध झाले आहे, की अश्वमेध यज्ञ करणारा भागवतधर्मीय राजा सर्वतात गाजायन याने मध्यमिका नगरात नारायण वाटक या नावाने एक मोठे मंदिर उभारले होते. या मंदिरात राजाने वासुदेवाच्या पूजेसाठी एका पूजाशिलेचीही प्रतिष्ठापना केली होती. [ब्र. ध. इ.; ना. प्र. प. १९५७; प. का. भा.]

मध्यार्जुन द. भारतातील एक क्षेत्र. हे स्थान तमिळनाड-मधील तंजाऊर जिल्ह्यात, कुंभकोणमपासून ५ मैलांवर आहे. आज याला तिरु वदमरुडुर असे म्हणतात. या क्षेत्राच्या थोडे पूर्वेला अग्नीश्वर शिवाचे मंदिर आहे. भविष्योत्तर पुराणात अग्नीश्वर-माहात्म्य म्हणून या क्षेत्राचे वर्णन आले आहे. इथल्या महादेवासंबंधी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. आद्य शंकराचार्यांचा मध्यार्जुन क्षेत्राशी संबंध आला होता, असे म्हणतात. त्याविषयी एक आख्यायिका सांगतात, ती अशी – शंकराचार्यांनी या महादेवाची विधिवत पूजा करून त्याला विचारले, की द्वैत आणि अद्वैत या दोहोंपैकी सत्य कोणते? आचार्यांचा प्रश्न ऐकून शिव पिंडीतून प्रकटला आणि त्याने आचार्यांना त्रिवार सांगितले, की अद्वैत हे सत्य आहे.

यासारख्याच अनेक दंतकथा इथे प्रसिद्ध आहेत. इथल्या शिवाला महालिंगस्वामी असेही नाव आहे. या प्रसिद्ध क्षेत्रातच शैव दार्शनिक हरदत्ताचार्य यांचा जन्म झाला. [शंकराचार्य]

मध्वमुनीश्वर (इ. स. चे १७–१८ वे शतक) एक मराठी संत-कवी. हा नासिकचा रहिवासी होता. याच्या वडिलांचे नाव नारायण व आईचे द्वारावती होते. याचे मूळ नाव त्रिंबक असून, हा देशस्थ ऋग्वेदी माध्वसंप्रदायी ब्राह्मण होता. याच्या आई-वडिलांना बरेच दिवस संतान नव्हते. पुढे त्यांनी त्र्यंबकेश्वरी अनुष्ठान केल्यावर शिवप्रसादाने त्यांना मुलगा झाला. म्हणूनच त्याचे नाव त्रिंबक असे ठेवण्यात आले. आई-वडिलांच्या छत्राखाली प्राथमिक शिक्षण पुरे केल्यावर याने ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी सप्तशृंगीच्या देवीपुढे तप आरंभिले. मग देवी प्रसन्न झाली व तिने त्रिंबकाला दृष्टान्त देऊन सांगितले, की 'माझ्या प्रदक्षिणामार्गावर जो कोणी तुला भेटेल, त्याला तू गुरू कर.' त्रिंबक त्याप्रमाणे प्रदक्षिणेला निघाला, तेव्हा त्याला शुकाचार्यांनी व्याघ्ररूपाने दर्शन दिले. त्रिंबकाने तत्काळ त्या वाघापुढे साष्टांग नमस्कार घातला. तो उठून उभा राहिला तेव्हा साक्षात शुकाचार्य समोर उभे. त्रिंबकाने मग त्यांच्याकडे गुरुमंत्र मागितला व तो त्यांनी आनंदाने दिला.

मध्वमुनीश्वराचे लग्न झाले होते. पण गुरुकृपेनंतर त्याचे मन संसारात रमेना. तो स्वच्छंद व उन्मुक्त वागू लागला, म्हणून वैष्णव मंडळींनी त्याच्या विरुद्ध मध्वाचार्यांकडे तक्रार करून त्याला शिक्षा करावी, अशी विनंती केली. तदनुसार त्रिंबकाची चौकशी करण्यासाठी मध्वाचार्य नासिकला आले. प्रत्यक्ष भेटीत त्यांना त्रिंबकाची योग्यता पटली व त्यामुळे त्यांनी त्याला 'मध्वमुनीश्वर' म्हणून नमस्कार केला. यानंतर मध्वमुनीश्वर तीर्थाटनास निघाला. मार्गात त्याने अनेक ठिकाणी देवदेवतांच्या मूर्ती स्थापन केल्या व लोकांना अनेक चमत्कार दाखविले.

यात्रेहून परत आल्यावर मध्वमुनीश्वराने आपले उर्वरित आयुष्य देवादिकांचे उत्सव साजरे करण्यात व भगवच्चिन्तनात घालविले.

मध्वमुनीश्वर उत्तम कीर्तनकार होता. त्याने कीर्तनासाठी बरीच गीतरचना केली आहे. आज त्याच्या नावावर सुमारे सातशे पदे असून, ती 'मध्वमुनीश्वरांची कविता' या नावाने संकलित आहेत. याच्या कवितेचा एक नमुना असा–

श्रीरामाचे स्वरूप आधी चिंती । तेणेकरूनी कामादिक वैरी जिंती ।
हेचि पुण्य कामासी येईल अंती । हाच पूर्वी उपाय केला संती ।।
ऐके ऐके सावध हरिकथा । वय जाऊ देऊ नको वृथा ।
येणे तुजी हरेल भवव्यथा । क्षणभरी आठवी रघुनाथा ।।
गर्भवासी सोशिले बहु क्लेश । विषयामध्ये कैचा तो सौख्यलेश ।
मूढा तुज करितों उपदेश । मध्वनाथ न सोडी जगदीश ।।

त्याची भाषा रसाळ व रचना गानयोग्य असते. त्याचे दृष्टान्त सोपे आणि नित्य परिचयातले असतात. [मध्वमुनीश्वरांची कविता– संपा. श्री. प्र. व्यं. गुब्बी, १९३३]

मध्वाचार्य (११९९–१२९४ इ. स.) एक तत्त्वज्ञ, आचार्य व पंथसंस्थापक. यांना माध्वमताचे लोक वायुदेवाचा अवतार मानतात. याविषयीचा श्लोक असा—

प्रथमो हनुमान्नाम द्वितीयो भीम एव च ।
पूर्णप्रज्ञस्तृतीयस्तु भगवत्कार्यसाधकः ।।

अर्थ– (वायुदेवाचा) पहिला अवतार हनुमान, दुसरा भीम व तिसरा भगवत्कार्य साधणारा पूर्णप्रज्ञ (मध्वाचार्य) होय.

पाजक नामक क्षेत्रात आश्विन शुद्ध दशमीच्या दिवशी, बुधवारी मध्यान्हकाली यांचा जन्म झाला. पाजक हे ठिकाण उडुपीपासून आठ मैलांवर आहे. यांच्या वडिलांचे नाव मध्यगेहभट्ट असे होते. मात्र काही पंडितांनी ते नारायणाचार्य अस-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचेही सांगितले आहे. त्यांच्या मातेचे नाव वेदवती असे होते.

मध्वाचार्यांच्या अगोदर मध्यगेहभट्टांना दोन मुलगे व एक मुलगी अशी तीन अपत्ये झाली होती. त्यांतले दोन्ही मुलगे बालवयातच निवर्तले. मग मध्यगेहभट्टांनी आपल्याला एक सुपुत्र व्हावा म्हणून उडुपी येथे अनंतेश्वराची उपासना केली. पुढे त्यांना जो पुत्र झाला, त्याचे नाव त्यांनी वासुदेव असे ठेवले.

वासुदेवाच्या बुद्धीची चमक लहापणापासूनच दिसू लागली. त्याचे व्युत्पत्तिकौशल्य आश्चर्य करण्याजोगे होते. या कौशल्याच्या बळावर तो अनेक श्लोकांचा आणि शब्दांचा वेगळाच अर्थ लावी आणि भल्याभल्यांना चकित करी.

योग्य काळी मध्वाचार्यांचे उपनयन झाले. त्यानंतर त्यांचे वेदाध्ययन व शास्त्राध्ययन सुरू झाले. थोडयाच कालात आपले अध्ययन संपवून ते परत आई-वडिलांकडे आले. मग आई-वडिलांनी त्यांच्या लग्नाचा विचार सुरू केला. पण मध्वाचार्यांच्या मनात निराळेच विचार घोळत होते. आपण ज्या

मध्वाचार्य

वैष्णवभक्तीच्या प्रचारासाठी जन्म घेतला आहे, ते कार्य गृहस्थाश्रम स्वीकारून करता येणार नाही आणि त्यासाठी आपल्याला संन्यासच घेतला पाहिजे, असे त्यांच्या मनाने घेतले.

संन्यासग्रहणाची ही कल्पना दिवसेंदिवस त्यांच्या मनात बळावतच चालली. एके दिवशी त्यांना कळले, की उडुपीला अच्युतप्रेक्ष नावाचे एक विद्वान यती येऊन राहिले आहेत. ती बातमी समजताच घरात कोणालाही न कळवता ते बाहेर पडले आणि उडुपीला गेले. त्यांनी अच्युतप्रेक्षांना विनंती केली, की 'आपण मला संन्यासदीक्षा द्यावी.' यतींनी त्यांना लगेच दीक्षा दिली नाही, पण आपल्याजवळ ठेवून मात्र घेतले. एवढ्यात मध्वाचार्यांचे आई-वडील त्यांचा शोध करीत तिथे गेले. त्यांनी मुलाच्या संन्यासग्रहणाला विरोध केला. 'तू आम्हांला सोडून जाऊ नकोस; संन्यास घेऊन आम्हांला पुत्रसुखापासून वंचित करू नकोस' अशी परोपरीने त्यांनी मध्वाचार्यांना गळ घातली. पण त्यांचा निर्धार ढळला नाही. मात्र या पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी आपल्या माता-पित्यांना सांगितले. "तुम्हाला या वयातही एक सुलक्षणी पुत्र होईल. तोवर मी संन्यास न घेता तुमच्या जवळ राहीन."

मग आई-वडील मध्वाचार्यांना घेऊन आपल्या घरी आले. थोडयाच कालात त्यांची माता गर्भवती राहिली. यथाकाल तिला एक पुत्र झाला. ती गोष्ट घडल्यावर मध्वाचार्य पुन्हा उडुपीला आले आणि त्यांनी ताबडतोब संन्यास घेतला. अच्युतप्रेक्ष यतींनी त्यांचे चतुर्थाश्रमातले नाव पूर्णप्रज्ञतीर्थ असे ठेवले. पण लोक त्यांना मध्वाचार्य या नावानेच ओळखू लागले.

अच्युतप्रेक्ष यती हे अद्वैती होते आणि मध्वाचार्य हे द्वैती होते. त्यामुळे या गुरु-शिष्यांत अनेकदा शास्त्रार्थ होत. गुरूंनी त्यांना विचारस्वातंत्र्य दिले होते. म्हणून त्यांनी आपल्या द्वैत मताच्या प्रचारासाठी पुढे उडुपी येथे प्रवचने सुरू केली. बिनतोड कोटिक्रम, अमोघ वक्तृत्व, वाणीचे माधुर्य आणि संशयांचे निराकरण करण्याची हातोटी, इ. गुणांमुळे मध्वाचार्यांनी तिथल्या लोकांवर आपली छाप बसवली. हळूहळू त्यांची कीर्ती चोहोकडे पसरू लागली. लोक त्यांना अलौकिक विभूती समजून त्यांच्या भजनी लागले. पुढे अच्युतप्रेक्ष यतींनी त्यांना आपल्या मठाचे उत्तराधिकारी बनवले. त्यानिमित्त त्यांना शंखाभिषेक करून आनंदतीर्थ असे त्यांचे दुसरे नाव ठेवले. पुढे त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी देशसंचार करण्याचे ठरवले. ते उडुपीतून आपल्या गुरूसह बाहेर पडले. या यात्रेत त्यांनी दक्षिणेतल्या मंगळूर, विष्णुमंगलम, त्रिवेंद्रम, रामेश्वरम, श्रीरंगम इ. क्षेत्रांत जाऊन तिथल्या अद्वैती आचार्यांशी वादविवाद केले. दक्षिणेतील यात्रा संपवून उडुपीला परत आल्यावर त्यांनी द्वैत मताला अनुसरून गीतेवर भाष्य लिहिले.

त्यानंतर काही कालाने ते उत्तर भारताच्या यात्रेला निघाले. या यात्रेत त्यांचे अनेक शिष्य त्यांच्या समवेत होते. गंगास्नान करून नंतर ते हिमालयात बद्रिकाश्रमी गेले. तिथे त्यांनी बदरीनारायणापुढे स्वकृत गीताभाष्य वाचून दाखविले. तियून पुढे ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यासाश्रमाकडे निघाले. तिथे त्यांना वेदव्यासांनी दर्शन देऊन अनुगृहीत केले व तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. 'गीतेवर जसे लिहिले तसेच ब्रह्मसूत्रांवरही भाष्य लिहून त्याच्या द्वारे आपल्या मताचा प्रसार कर' अशी व्यासांनी त्यांना आज्ञा केली. पुढे परतीच्या प्रवासातच मध्वाचार्यांनी ब्रह्मसूत्रांवरचे आपले भाष्य निर्माण केले. असे सांगतात की वेदव्यासांनी प्रसन्न होऊन मध्वाचार्यांना तीन शालिग्राममूर्ती दिल्या. त्या त्यांनी सुब्रह्मण्यम, उडुपी व मध्यतल या गावी स्थापन केल्या.

या प्रवासात त्यांनी अनेक नैयायिक, मीमांसक, वेदान्ती, बौद्ध, इ. पंडितांशी वादविवाद केले. ज्यांना मध्वाचार्यांची मते पटली, त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. गोदावरीच्या तीरी त्यांना शोभनभट्ट व शामशास्त्री असे दोन नवे शिष्य मिळाले. हे दोघेही विद्वान आणि व्यासंगी होते. त्यांपैकी शोभनभट्ट हे पद्मनाभतीर्थ या नावाने व शामशास्त्री हे नरहरीतीर्थ या नावाने माध्व परंपरेत प्रसिद्धी पावले.

मध्वाचार्यांनी एकूण तीन वेळा बदरीनाथाची यात्रा केली, असे त्यांच्या चरित्रात दिले आहे. उडुपी येथे परत आल्यावर एके दिवशी मध्वाचार्यांना एक श्रीकृष्णाची मूर्ती मिळाली. द्वारकेचा एक व्यापारी माल भरून समुद्रमार्गे निघाला होता. त्याचे ते जहाज उडुपीजवळ वाळूत रुतून बसले. मध्वाचार्यांनी आपल्या आत्मिक बळावर ते जहाज वर काढले. व्यापाऱ्याला



मध्वाचार्यांचे निवासस्थान – उडुपी

तो चमत्कार वाटला. गोपीचंदनलिप्त अशी बालकृष्णाची एक मूर्ती त्याच्याजवळ होती, ती त्या व्यापाऱ्याने मध्वाचार्यांना भेट म्हणून दिली. आचार्यांनी देवालय बांधून त्यात तिची स्थापना केली. आचार्य स्वतः त्या श्रीकृष्णाची नित्य पूजा करीत. पुढे आपल्या अनुपस्थितीत पूजा-अर्चा चालवण्यासाठी त्यांनी आठ शिष्य निवडून काढले आणि प्रत्येक शिष्याने दोन-दोन महिने देवाची पूजा करावी, असा नेम ठरवून दिला.

मध्वाचार्यांच्या शिष्यपरिवारात पद्मनाभतीर्थ, नरहरीतीर्थ, माधवतीर्थ व अक्षोभ्यतीर्थ असे चार प्रमुख शिष्य होते. त्रिविक्रमभट्ट हा त्यांचा आणखी एक विख्यात शिष्य होय. तो आधी गृहस्थ होता. त्याने मध्वाचार्यांच्या भाष्यावर तत्त्वप्रदीप नामक ग्रंथ लिहिला आहे. त्याचा पुत्र नारायण पंडित. त्याने मध्वाचार्यांच्या जीवनचरित्रावर मध्वविजय व मणिमंजरी नामक दोन विख्यात ग्रंथ लिहिले. आचार्यांनी ज्या एका मठाची स्थापना केली, त्याचे आधिपत्य पद्मनाभतीर्थापासून अक्षोभ्यतीर्थापर्यंत परंपरेने चालत आले. या मठाला उत्तरादिमठ असे नाव आहे. मध्वाचार्यांचे बंधू यांनीही पुढे संन्यास घेतला होता. त्यांच्यापासून स्वादिमठ व सुब्रह्मण्यमठ अशा दोन परंपरा निर्माण झाल्या. उडुपीतल्या श्रीकृष्णाची पूजा करण्यासाठी आचार्यांनी जे शिष्य निवडले, त्यांचेही आठ मठ निर्माण झाले आहेत.

मध्वाचार्यांनी आपल्या द्वैत मताच्या सिद्ध्यर्थ पुढील ग्रंथ लिहिले– १. गीताभाष्य, २. गीतातात्पर्य, ३. सूत्रभाष्य, ४. अणुभाष्य, ५. महाभारततात्पर्यनिर्णय, ६. भागवततात्पर्य, ७. नखस्तुती, ८. यमकभारत, ९. द्वादशस्तोत्र, १०. तंत्रसार, ११. सदाचारस्मृती, १२. यतिप्रणवकल्प, १३. जयंतीनिर्णय, १४. ऋग्भाष्य, १५. प्रणयलक्षण, १६. कथालक्षण, १८. तत्त्वसंख्यान, १८. तत्त्वविवेक, १९. मायावादखंडन, २०. उपाधिखंडन, २१. प्रपंचमिथ्यात्वानुमानखंडन २२. तत्त्वोद्योत, २३. विष्णुतत्त्वनिर्णय, २४–३३ दशोपनिषद्-भाष्ये, ३४. अनुव्याख्यान, ३५. संन्यासविवरण, ३६. कृष्णामृतमहार्णव, ३७ कर्मनिर्णय.

यांतले काही ग्रंथ स्वमताच्या मंडनार्थ असून, काही ग्रंथ अद्वैतवादाच्या, विशेषतः मायावादाच्या खंडनासाठी आहेत.

मध्वाचार्यांच्या द्वैत मताचे सार पुढीलप्रमाणे सांगता येईल.

(१) हरिः परतर : – विष्णू हे सर्वोच्च तत्त्व आहे. परमात्मा अनंत गुणांनी परिपूर्ण आहे. त्याचा प्रत्येक गुण निरवधी आणि निरतिशय आहे. उत्पत्ती, स्थिती, संहार, नियमन, ज्ञान, आवरण, बंध व मोक्ष या आठांचा कर्ता विष्णूच आहे. तो जड प्रकृती आणि चेतन जीव यांच्याहून सर्वथा विलक्षण आहे. तो सर्वज्ञत्व, अनंतशक्तिमत्त्व, इ. गुणांचे निधान आहे.

(२) सत्यं जगत् – जगत सत्य आहे. स्वतःप्रामाण्यवाद ईश्वराला सत्यसंकल्प म्हणतो. भगवंताची कोणतीही कल्पना अथवा इच्छा मिथ्या होऊ शकत नाही. त्यामुळे तत्कृत जगतही असत्य नसून सत्यच आहे.

(३) तत्त्वतो भेदः– भेद वास्तविक आहे. त्याचे पाच प्रकार होतात ते असे – (१) ईश्वराचा जीवाशी भेद, (२) ईश्वराचा जडाशी भेद, (३) जीवाचा जडाशी भेद, (४) एका जीवाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुसऱ्या जीवाशी भेद आणि (५) एका जड पदार्थाचा दुसऱ्या जड पदार्थाशी भेद. या पंचविध भेदांचे ज्ञान मुक्तीला साधक होते.

(४) जीवगणा हरेरनुचराः – समस्त जीव श्रीहरीचे अनुचर आहेत. अर्थात जीवांचे सकल सामर्थ्य भगवंताच्या अधीन आहे. जीव स्वभावतः अल्पशक्ती व अल्पज्ञ आहेत. भगवंताला टाळून स्वतः एखादे कार्य संपूर्ण करण्याची क्षमता त्यांच्या ठिकाणी नाही. अल्पज्ञ जीव सर्वज्ञ विष्णूच्या अधीन राहूनच आपापली कार्ये करीत असतात.

(५) नीचोच्चभावं गताः –जीवामध्ये तारतम्य असते. केवळ सांसारिक दशेतच नव्हे; तर मोक्षदशेतही ते विद्यमान असते. जीवांचे मुख्यत्वे तीन भेद होतात ते, असे – (१) मुक्तियोग्य, (२) नित्यसंसारी व (३) तमोयोग्य किंवा (१) उत्तम मानुष (२) मध्यम मानुष व (३) अधम मानुष. या तीहींपैकी शेवटच्या दोन जीवांना मुक्ती कधीही मिळत नाही. मुक्तियोग्य व्यक्तींमध्ये देव, ऋषी, पितर, चक्रवर्ती व उत्तम मानुष यांचा समावेश आहे. हे जीव गुणांची भिन्नता असल्यामुळे मुक्त दशेतही परस्पर भिन्न राहतात.

(६) मुक्तिर्नैजसुखानुभूतिः – आपल्या वास्तव सुखाची अनुभूती म्हणजेच मुक्ती होय. ती परमानंदस्वरूप असते. मोक्ष चार प्रकारचा असतो – (१) कर्मक्षय, (२) उत्क्रांती, (३) अर्चिरादिमार्ग व (४) भोग. शेवटच्या भोगाचेही सालोक्य, सामीप्य, सारूप्य व सायुज्य असे चार प्रकार होतात. यात सायुज्यमुक्ती ही सर्वश्रेष्ठ होय. भगवंताच्या ठिकाणी प्रवेश करून त्याच्या शरीरानेच आनंदाचा उपभोग घेणे, हे सायुज्यमुक्तीचे लक्षण आहे.

(७) अमला भक्तिः – मुक्तीचा सर्वश्रेष्ठ उपाय म्हणजे मलरहित निर्दोष भक्ती होय. स्वार्थाची भावना हा भक्तीतला सर्वांत मोठा दोष आहे. अशा स्वार्थप्रेरित भक्तीला हैतुकी भक्ती म्हणत असून, तिचे स्थान पुष्कळच नीच आहे. अहैतुकी भक्ती हीच उच्चतम होय. तिलाच अनन्या भक्ती असे म्हणतात.

(८) अक्षादित्रिप्रमाणम् – प्रत्यक्ष, अनुमान व शब्द ही तीनच प्रमाणे आहेत. या तिहींच्या आधारावर समस्त प्रमेयांची सिद्धी होऊ शकते.

(९) आम्नायवेद्यो हरिः – वेदांचे समस्त तात्पर्य विष्णू हेच आहे. वेद आपल्या अंगोपांगांच्या द्वारे विष्णूचेच नाना प्रकारे वर्णन करतो. वेदांत नाना देवतांच्या स्तुती उपलब्ध होतात; पण त्या नाना देवताही त्या एकाच परब्रह्म श्रीहरीची अवस्थानुसारी स्वरूपे आहेत.

मध्वाचार्यांच्या निर्याणाबद्दल विशेष काही सांगितलेले नाही. माघ शुद्ध नवमीला ते एकाएकी अदृश्य झाले आणि बदरिकाश्रमी वेदव्यासांच्या सन्निध गेले, एवढेच म्हटलेले आहे. सांप्रतही ते तिथे विद्यमान आहेत, अशी सांप्रदायिकांची धारणा आहे. पाहा – द्वैतदर्शन; माध्वसंप्रदाय. [मध्वाचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान – श्री. रा. बा. अवधानी, १९४९; भा. सं.]

मन अंतःकरण किंवा अकरावे इंद्रिय. याची व्युत्पत्ती अशी– 'मन्यते अनेन इति' = ज्याच्या योगाने मनन केले जाते, ते मन होय. याचा विशदार्थ असा– 'मनः सर्वेन्द्रियप्रवर्तकम्, आन्तरेन्द्रियं स्वसंयोगेन बाह्येन्द्रियानुग्राहकं अत एव सर्वोपलब्ध्युपकारणम्' =मन हे सर्वेंद्रियांचे प्रवर्तक असे आंतरेंद्रिय आहे. ते स्वतःच्या संयोगाने बाह्येंद्रियांवर अनुग्रह करणारे असून, सर्वांच्या उपलब्धीला कारण आहे. (न्या. को.).

मन डोळ्यांना दिसत नाही किंवा स्पर्शाला कळत नाही. मग त्याच्या अस्तित्वाविषयी प्रमाण काय, असा प्रश्न येतो. याचे उत्तर असे, की अनुमान हे त्याच्या अस्तित्वाला प्रमाण आहे. सुखदुःखादिकांचा साक्षात्कार मनामुळेच घडत असतो. शब्द आणि कान, तसेच वस्तू आणि डोळे यांचा संयोग होऊनही शब्द ऐकू येत नाही, किंवा वस्तू दिसत नाही, असा अनुभव येतो. त्यावरून असे अनुमान करता येते, की त्या त्या इंद्रियांशी संयोग करणारे आणि सहकारी असे निराळे काहीतरी कारण असले पाहिजे. तेच मन होय. त्याचे सान्निध्य नसेल, तर इंद्रियांना विषयज्ञान होत नाही आणि ते असले, तरच ज्ञान होते.

मनाची आणखी एक व्याख्या अशी– 'सङ्कल्पविकल्पात्मकवृत्तिमदन्तःकरणं मनः' = संकल्प आणि विकल्प एतदात्मक वृत्ती ज्याच्या ठिकाणी आहे, असे अंतःकरण म्हणजे मन होय. याविषयी श्रुतीचे प्रमाण असे – 'कामः सङ्कल्पो विचिकित्सा श्रद्धा अश्रद्धा धृतिरधृतिर्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वं मन एव' = इच्छा, संकल्प, विचिकित्सा, श्रद्धा, अश्रद्धा, धैर्य, अधैर्य, लज्जा, बुद्धी, भीती हे सर्व मनच आहे (बृहदा. १.५.३).

ऋग्वेदातला विचार – ऋग्वेदात मनाविषयी कुठे कुठे त्रुटित उल्लेख आले आहेत आणि त्याच्या स्वभावाविषयीही एखाददुसरे वाक्य आले आहे. त्याचा सारांश असा –

मानवी जीवनात मन सुरक्षित असेल, तरच त्याला ज्ञान, योजकता, कौशल्य आणि जीवनसत्त्व असलेला प्राण यांचा उपभोग घेता येईल. मन सुरक्षित असेल, तर संतती आणि संपत्ती यांचा लाभ घेता येईल (ऋ. १०.५७.४-६).

मानवी शरीरातून प्राण निघून जातो, तेव्हा मन हे यम वैवस्वताकडे जाते आणि विश्वातल्या इतर पदार्थांमध्येही भ्रमण करीत राहते (ऋ. १०.५८.१).

या कल्पनेत एक रहस्य आहे. ते म्हणजे मृत्यूनंतर मनुष्याच्या भौतिक शरीराचा त्याग होतो; पण त्याचे सूक्ष्म

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शरीर तसेच राहते आणि स्थूल देहातून बाहेर पडताना त्याच्या-वर पूर्वसंस्कारांची दाट पुटे चढलेली असतात.

मानवी जीवनात मन हे इच्छा करते, ज्ञान मिळविते, परमेश्वराची भक्ती करते किंवा या सर्वांची घृणा करते आणि काही वेळा तर ते राक्षसी वृत्तीला धार्जिण होते. कधी ते भयाने थरथरते, विचारमग्न होते, चिकित्सक किंवा प्रशंसक बनते, तर काही वेळा भयंकर बनून घोर कृत्ये करण्यासही प्रवृत्त होते. असे असले, तरी परिस्थितीचे योग्य आकलन मनच करू शकते किंवा पूजा – उपासनेच्या वेळी ते एकाग्रही होऊ शकते. मनुष्याला मनावर ताबा मिळविता येतो किंवा त्याला दानासाठी प्रवृत्त करता येते.

देवांच्या बाबतीत मन हे कधी अश्व होऊन रथ ओढते, तर कधी रथाचे सारथ्य करते. सूर्या या देवतेने आपल्या रथाला मनच जोडले व ती पतीला भेटायला गेली. स्त्रियांना आपले मन स्वाधीन ठेवणे फार कठीण जाते. वरुणाचे मन क्रोधाविष्ट असले, तरी ते स्तोत्रांनी द्रवते आणि मृदू होते. मित्रावरुणांचे मन हे मोहाला बळी पडणारे नसते. द्यावा-पृथिवींचे मन कणखर, अग्नीचे घृतासक्त, सोमाचे कौशल्ययुक्त आणि पणींचे मन दुष्ट असते. देवांचे मन मानवी मनापेक्षा समृद्ध असते. मानवी हृदयात भक्ती, श्रद्धा व प्रेम यांचा प्रादुर्भाव केव्हा आणि कसा होतो, याचे आकलन देवांना होऊ शकते.

वैदिक ऋषींनी मन व हृदय यांत फरक केला आहे. मन हे विचार, तर्क व विवेचक बुद्धी यांचे अधिष्ठान आहे, तर हृदय हे भावना, अंतःप्रेरणा आणि नैसर्गिक प्रवृत्ती यांचे अधिष्ठान आहे. हृदयात उद्‌भवलेल्या भावनांना मुरड घालण्याचे किंवा दृढ करण्याचे कार्य मनाला करावे लागते.

यजुर्वेदातील विचार – शुक्ल यजुर्वेदात मनाविषयी एक सूक्त आहे. त्यातील काही ऋचा अशा (३४.१-३)–

यज्जाग्रतो दूरमुदेति दैवं तदु सुप्तस्य तथैवैति ।
दूरंगमं ज्योतिषां ज्योतिरेकं तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ॥
येन कर्माण्यपसो मनीषिणो यज्ञे कृण्वन्ति विदथेषु धीराः ।
यदपूर्वं यक्षमन्तः प्रजानां तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ॥
यत्प्रज्ञानमुत चेतो धृतिश्च यज्ज्योतिरन्तरमृतं प्रजासु ।
यस्मान्न ऋते किंचन कर्म क्रियते तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ॥

अर्थ – जे माझे मन मी जागत असताना दूर दूर जाते आणि तेच मन मी झोपलेला असतानाही त्याच प्रकारे दूर जाते. हे दूर जाणारे माझे मन प्रकाश देणाऱ्यांनाही प्रकाशित करते. हे माझे मन शिवसंकल्प करणारे असो.

ज्या मनाने मननशील व कर्मकुशल विद्वान यज्ञांत, युद्धांत व सभांमध्ये नाना प्रकारची कार्ये करतात, जे मन सर्व प्रजाजनांमध्ये अपूर्व शक्तीने युक्त आहे, असे ते माझे मन शिवसंकल्प करणारे होवो.

जे मन मनुष्यांना ज्ञान, चिंतनशक्ती व धैर्य देते, जे प्रजाजनांमध्ये अमर ज्योतिसमान प्रकाशरूप असते आणि ज्याच्यावाचून मनुष्य काहीही करू शकत नाही, ते माझे मन शिवसंकल्प करणारे होवो.

वरील सूक्ताच्या आधारे वैदिक ऋषींच्या मनोविषयक विचारांचे विवेचन श्री. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनी पुढीलप्रमाणे केले आहे –

मनुष्याला मनुष्य ही संज्ञा मनावरून प्राप्त झाली आहे. मानवाच्या सर्व अंगांवर आणि अवयवांवर मनाचे प्रभुत्व आहे. जागृत अवस्थेत मन दूर दूर भटकत राहते, हा अनुभव प्रत्येक मनुष्याला आहे. हा अनुभवच वरील मंत्रात सांगितला आहे. माणसाच्या झोपेतही त्याचे मन इतस्ततः भटकत राहते. झोपेत स्वप्ने पडतात, त्यांत नाना प्रकारची दृश्ये दिसतात. ही दृश्ये मनच निर्माण करते. सुषुप्तीतही मन दूर दूर जाते याचे ज्ञान फार थोड्या लोकांना असते; पण ती गोष्ट सत्य आहे. मनाचा दुसरा एक भाग सुषुप्तीत जागृत होऊन उठतो आणि तो जागृतीतल्या मनापेक्षाही अधिक प्रभावी असतो.

मन जसे जवळ राहून कार्य करते, तसेच दूर जाऊनही करते. मनाच्या ठिकाणची ही जी शक्ती आहे, तिच्यामुळे एखाद्या माणसाच्या आरोग्यासाठी मानसिक विचारप्रवाहांना दूरस्थ रुग्णालयाकडे पाठवून त्याला आरोग्य प्राप्त करून देता येते. प्रार्थना, मंत्र, तंत्र इत्यादिकांवर विश्वास ठेवणाऱ्या माणसांना जो लाभ होतो, तो मानसशक्तीच्या सामर्थ्याचा प्रभाव होय. ज्योतींनाही प्रकाश देणारी एकमात्र ज्योती मनच आहे. विश्वाचा साक्षात्कार याच प्रकाशमय मनापासून मनुष्याला होत असतो.

ज्ञान, चिंतन व धैर्य ही मनामुळेच प्राप्त होतात. ज्याप्रमाणे प्रकाश हा अंधकार दूर करून सरळ मार्ग दाखवतो, त्याचप्रमाणे मन दुःख, रोग आणि मृत्यू यांचे भय दूर करून निरामय, दीर्घ जीवन प्राप्त करून देते. जर मन 'मी क्षीण आहे, दुबळा आहे, निकामी आहे, रोगी आहे,' असे मानू लागेल, तर मनुष्य तसाच बनेल. याच्या उलट जर मन 'मी पूर्ण आहे, सबल आहे, समर्थ आहे, निरोगी आहे, सुखी आहे,' असे मानू लागेल, तरी तो तसाच बनेल. आपल्या मनातली ही अद्‌भुत शक्ती माणसाने जाणली पाहिजे.

भूत, वर्तमान, भविष्य यांच्यासह संपूर्ण विश्व मनाने आपल्यामध्ये धारण केले आहे. विश्वाचे अस्तित्व मनाने सिद्ध केले आहे. मनाला जिचा पत्ता नाही, अशी वस्तू विद्यमान आहे, असे कोण आणि कशा प्रकारे सांगू शकेल? मनामध्ये चिंतनशक्ती ओत-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रोत भरून राहिली आहे. मनाचे हेच महत्त्व आहे. मानवशरीर हे रथ असून, त्याला इंद्रियरूपी घोडे जोडलेले आहेत. बुद्धी या रथाचे सारथ्य करते आणि मन त्या अश्वांना लगाम लावते.

वरील सूक्तद्रष्टा ऋषी म्हणतो, की अशा प्रकारचे माझे हे मन शुभ संकल्प करणारे होवो. कारण शरीर आणि इंद्रियें मनाच्या अधीन असतात. मन जर शुभ संकल्प करणारे असेल, तर मनुष्याच्या हातून शुभ कर्मे होतील आणि अशुभ संकल्प करणारे असेल तर तसे घडेल. शक्तिमान वस्तूला जर योग्य मार्ग दाखविला नाही, तर ती वस्तू उच्छृंखल होऊन विध्वंसही करू शकते. मन हे शक्तिशाली असल्यामुळे त्याला शिवसंकल्पानेच युक्त करणे, हे मनुष्याच्या उन्नतीच्या दृष्टीने श्रेयस्कर आहे.

उपनिषदांतला विचार – उपनिषत्कारांनी मनासंबंधी पुष्कळच विचार केला आहे. त्यांच्या मानसविषयक विचारांचे आधिभौतिक व आध्यात्मिक असे, दोन भाग पाडता येतील.

आधिभौतिक विचार – मन बनते कसे, हा यांतला पहिला प्रश्न होय. छांदोग्यात 'अन्नमयं हि सौम्य मनः' असे म्हटले आहे (६.५.४). याचे स्पष्टीकरण असे – मन हे अन्नमय असून, ते अन्नापासूनच उत्पन्न झाले आहे. मनुष्य जे अन्न खातो त्याचे तीन प्रकारे रूपांतर होते. घट्ट भागाची विष्ठा बनते, मध्यम घट्ट भागाचे मांस बनते व सूक्ष्म भागापासून मन बनते. दही घुसळल्यावर लोणी वर यावे, त्याप्रमाणे खाल्लेल्या अन्नाच्या मंथनातून सूक्ष्म अंश वर येतो. तेच मन होय. मनोधर्म हे विशिष्ट अन्नाच्या सेवनाने उत्पन्न होतात, असे मानल्यानंतर मनाच्या शुद्धीसाठी सात्त्विक आहार सेवन करणे हे योग्य, असे प्रतिपादन नीतिशास्त्रदृष्ट्या ओघानेच आले. म्हणूनच पवित्र अन्नाने मन आपोआप पवित्र बनून ज्ञानप्राप्तीला ते साधक होते, असे म्हटले आहे.

मन एखाद्या गोष्टीत गुंतले म्हणजे श्वसनक्रिया अवरुद्ध होते, असे उपनिषदांतल्या ऋषींना आढळून आले. दुसरा त्यांचा शोध असा, की भीती हा मनाचाच एक धर्म आहे. मन हे संकल्पात्मक आहे, असे म्हटल्यावर त्यातून एक नवा प्रश्न निर्माण झाला, की संकल्प श्रेष्ठ का चित्त श्रेष्ठ? छांदोग्योपनिषद हे संकल्पवादी आहे. ते म्हणते – जगातल्या सर्व वस्तूंचे केंद्रस्थान संकल्प असून, सर्व वस्तू संकल्पातच प्रतिष्ठित आहेत. द्यावापृथिवींच्या संकल्पाने पाऊस पडतो. पर्जन्यामुळे अन्नसंकल्प, अन्नामुळे प्राणसंकल्प, अशा संकल्पमालिकेतून शेवटी विश्वातल्या सर्व वस्तूंचा संकल्प होतो. संकल्प हा सर्वव्यापी आहे. म्हणून त्याचीच उपासना करावी. कारण चित्तात अगोदर विचार आल्यावर मगच मनुष्याला संकल्प करता येतो. सर्व वस्तू चित्तमय असून, चित्तामुळेच त्या जिवंत राहतात. चित्त हे सर्वाधार आहे. 'चित्तमात्मा चित्तं प्रतिष्ठा चित्तमुपास्व' = चित्त म्हणजे आत्मा, चित्त म्हणजेच प्रतिष्ठा. म्हणून चित्ताची उपासना करावी (छांदो. ७.५.१).

ऐ. उपनिषदात चित्तवादी विचारपद्धतीची परिसीमा झाली आहे. चित्त हे विविध वृत्तींचे मूळ आहे, असे गृहीत धरून त्या उपनिषदात सर्व मनोव्यापारांचे वर्गीकरण केले आहे. संज्ञान, अज्ञान, विज्ञान, प्रज्ञान, मेधा, दृष्टी, धृती, मती, मनीषा, स्मृती, संकल्प, ऋतू, प्राण, जीवनाची आशा, काम व आत्मसंयमन ही सर्व चित्ताचीच निरनिराळी नावे आहेत, असे तिथे म्हटले आहे.

आध्यात्मिक विचार – यांतला पहिला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आत्मा हा शरीराच्या कोणत्या विशिष्ट भागात राहतो, हा होय. या प्रश्नाचे उत्तर आत्मा हृत्कोशात राहतो, असेच बहुतेक सर्व उपनिषदांत दिलेले आहे. आत्मा हृदयात म्हणजे शरीरात राहतो, तेव्हा त्याला काही मानसिक अवस्थांचा अनुभव येत असावा, असे मानणे प्राप्त आहे. शरीरात राहणाऱ्या आत्म्याला चार अवस्थांची प्रतीती येऊ शकते. त्या अवस्था म्हणजे जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती व या तिहींच्या पलिकडची तुरीय (चौथी) म्हणजे प्रज्ञातीत या होत. ही चार अवस्थांची कल्पना पुढे सुसंघटित होऊन वेदान्तशास्त्रात महत्त्व पावली. पंचकोशांची कल्पनाही या चार अवस्थांच्या अनुषंगानेच मांडली गेली आहे. (पंचकोश पाहा)

दर्शनांतला विचार – निरनिराळ्या दर्शनांत मानसविषयक विचार व्यक्त झाले आहेत ते असे –

चार्वाक दर्शनात आकाश आणि प्राण यांच्या बरोबर मनालाही जगातल्या पदार्थांतील एक मानलेले आहे. काही उपनिषदांच्या मते प्राण आणि मन हे भौतिक पदार्थ आहेत. चार्वाकाने प्रायः मनाच्या भौतिकत्वामुळेच त्याचा पदार्थ म्हणून स्वीकार केला असावा. बौद्ध दर्शनाच्या विज्ञानवादी परंपरेत चित्ताचीच प्रवृत्ती व मुक्ती होते, असे म्हटले आहे. चित्त उत्पन्न होते आणि चित्ताचाच निरोध होतो. चित्त हे एकमात्र तत्त्व आहे. अन्य सर्व वस्तू चित्ताचे विकल्प असतात. विज्ञानासाठी चित्त हे ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या रूपांत उपस्थित राहते.

विज्ञानवादात चित्त शब्दाने मुख्यत्वे आलयविज्ञानाचे ग्रहण होते. आलय म्हणजे घर अर्थात चित्त. यात जीवाच्या कायिक, वाचिक व मानसिक अशा सर्व विज्ञानांची वासनारूप बीजे एकरूप राहतात. ही बीजे आलयविज्ञानरूप चित्तात एकत्र होतात आणि तिथे शांत भावाने पडून राहतात. ती पुढे योग्य काळी व्यावहारिक रूपात जगतामध्ये प्रगट होतात आणि शेवटी पुनः आलयातच लीन होतात.

मीमांसेच्या भाट्ट मतात मन हे आत्म्याप्रमाणेच विभू मान-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लेले आहे. मन हे अंतरेंद्रिय असून, ते भौतिकही आहे. हे मन स्वतंत्र रूपाने आत्मा व त्याचे गुण यांचे ग्राहक आहे. वाह्य वस्तूंचे ज्ञान बाह्य इंद्रियांच्या द्वारे, मन आणि आत्मा यांच्या संयोगामुळे होते.

द्वैत दर्शनात मन हे तत्त्वरूप आणि तत्त्वभिन्न मानले आहे. तत्त्वरूप मनाची उत्पत्ती वैकारिक अहंकारापासून होते. रुद्र, गरुड, शेष, काम, इंद्र, अनिरुद्ध, ब्रह्मा, सरस्वती, वायू व चंद्रमा यांची मनस्तत्त्व ही अधिष्ठात्री देवता आहे.

तत्त्वभिन्न मन हे इंद्रिय आहे. नित्य व अनित्य असे ते उभय-विध आहे. नित्य हे परमात्मा, लक्ष्मी, ब्रह्मा, इ. सर्व जीवांचे स्वरूपभूत आहे. त्याला साक्षी म्हणतात. म्हणूनच ते चैतन्य-स्वरूप आहे. बद्ध जीवांचे मन चेतन व अचेतन असते, तर मुक्तांचे मन केवल चेतन असते. अनित्य इंद्रिय हे बाह्य पदार्थ असून, ते ब्रह्मादी सर्व जीवांमध्ये राहते. मन, बुद्धी, अहंकार चित्त व चेतना असे त्याचे पाच प्रकार आहेत.

शुद्धाद्वैत दर्शनात मन हे एक इंद्रिय व संकल्पविकल्पात्मक मानले आहे. कामाची उत्पत्ती मनाच्याच अधीन आहे. ते अणु-परिमाण असून, बाह्य व आंतर अशी दोन्ही प्रकारची कार्ये करते. सुख, दुःख, प्रयत्न, द्वेष, अदृष्ट, स्नेह, इ. या मनाचेच गुण होत.

न्यायदर्शनात मनाला अंतरेंद्रिय म्हटले आहे. सुख, दुःख, इच्छा, द्वेष, इ. आत्म्याच्या गुणांचे ज्ञान मनाच्याच द्वारे होते. ते अणुपरिमाण आहे, म्हणूनच ते एका वेळी, एकाच ठिकाणी राहते. आत्मा व इंद्रिये यांचा मनाशी संबंध आल्यावाचून ज्ञान उत्पन्न होत नाही. मन नित्य आहे. एका शरीरात एकच मन राहते. मृत्यूच्या वेळी ते शरीराच्या बाहेर निघून जाते. मनाच्या निघून जाण्यालाच मरण म्हणतात. हे निघालेले मन दुसऱ्या शरीरात प्रवेश करते. मोक्षदशेतही जीवात्म्याबरोबर एक मन राहते. हेच मन मोक्षावस्थेत एका आत्म्याला दुसऱ्या आत्म्या-पासून वेगळे राखते. याच कारणामुळे जीवात्मा आणि परमात्मा हे वेगवेगळे राहतात.

योगदर्शनात केवळ बौद्धिक विषयांचा विचार आहे. विचारा-साठी एकमात्र तत्त्व चित्त हे आहे. चित्ताच्या वृत्तींचा निरोध म्हणजे योग होय. योग म्हणजे समाधी. हा चित्ताचाच एक स्वाभाविक धर्म आहे. क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र व निरुद्ध अशा चित्ताच्या पाच अवस्था आहेत. त्यांना चित्तभूमी म्हण-तात. त्यांचे संक्षेपात दिग्दर्शन असे—

(१) रजोगुणाच्या प्रभावाने चित्त चंचल होऊन सांसारिक विषयांत इकडे तिकडे भटकत राहते. अशा चित्ताला क्षिप्त म्हणतात. उदा० दैत्य, दानव किंवा मदोन्मत्त लोकांचे चित्त.

(२) तमोगुणाच्या उद्रेकाने चित्त मूढ होते. मादक द्रव्यामुळे उन्मत्त झालेल्या किंवा निद्रामग्न पुरुषांचे चित्त मूढ असते.

(३) देवता व क्षिप्त भूमीत स्थित असलेल्या जिज्ञासूचे चित्त विक्षिप्त असते. क्षिप्त अवस्थेहून या अवस्थेचे वैशिष्ट्य असे, की राजस वृत्ती असूनही सत्त्वाधिक्यामुळे या भूमीत कधी कधी स्थिरता येत असते.

(४) विशुद्ध सत्त्वाच्या उद्रेकामुळे एकाच विषयाच्या ठिकाणी लागलेले चित्त एकाग्र म्हटले जाते. हे निर्वातीच्या दीपशिखेसारखे असते.

(५) चित्ताच्या सर्व वृत्तींचा निरोध झाल्यावरही त्या वृत्तींचे संस्कार चित्तात अवशिष्ट राहतात. अशा संस्कारयुक्त चित्ताला निरुद्ध म्हणतात. ही निरुद्ध अवस्था म्हणजेच योग होय (योगसूत्र १०२).

वेदान्तशास्त्रात मनाचा बराच विचार केला आहे. त्या सर्व विचारांचे सार विद्यारण्यांच्या पंचदशीत आलेले आहे. मन हे पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये यांना प्रेरणा देणारे असून, त्याचे स्थान व कर्म कोणते ते पुढील श्लोकात सांगितले आहे—

मनो दशेन्द्रियाध्यक्षं हृत्पद्मगोलके स्थितम् ।
तच्चान्तःकरणं बाह्येष्वस्वातन्त्र्याद्विनेन्द्रियैः ।।

(पंच. २. १२)

अर्थ — मन हे दहा इंद्रियांचे अध्यक्ष असून, ते हृदयकमलरूप गोलकात असते. इंद्रियांच्या साहाय्यावाचून त्याला स्वतंत्रपणे बाह्य विषयांचा अनुभव घेता येत नसल्यामुळे, त्याला अंतःकरण असे म्हणतात.

अक्षेष्वर्थार्पितेष्वेतद् गुणदोषविचारकम् ।
सत्त्वं रजस्तमश्चास्य गुणा विक्रियते हि तैः ।।

(पंच. २. १३)

अर्थ — इंद्रिये विषयांशी संयुक्त झाली असता हे मन त्यांच्या गुणदोषांचा विचार करते. सत्त्व, रज व तम असे मनाचे तीन गुण आहेत. त्यांच्या योगाने मन विकार पावते.

मन स्वभावतःच चंचल आहे. ते एकाच विषयात राहू शकत नाही. आणि ते आत्म्यामध्ये स्थिर झाल्यावाचून परमार्थसिद्धीही नाही. त्यासाठी मनावर सतत लक्ष ठेवून त्याला आवरीत राहावे. ते ज्या ज्या विषयाच्या उद्देशाने वृत्तींच्या द्वारे बाहेर पडत असेल, त्या त्या विषयातले दोष दाखवून त्याला मागे फिरवावे आणि आत्म्याच्या स्वाधीन करावे. त्यासाठी दृढ अभ्यास हवा. अभ्या-साच्या योगाने मोहादी क्लेश नष्ट होतात आणि त्यामुळे मन शांत होते. या मनाच्या शांत अवस्थेत त्या साधकाचे सर्व पाप-कर्म नष्ट होऊन त्याला ब्रह्मसुखाचा लाभ होतो. ब्रह्मानंद प्राप्त झाला असता चित्त निश्चल होते आणि साधक त्या आनंदातच गढून जातो. मनाची सतत समजूत घालून त्याच्या चंचलपणाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जर आळा घातला आणि आत्मतत्त्वाच्याच ठिकाणी त्याला स्थिर केले, तर त्याहून दुसरा कोणताही लाभ नाही. मनाचा निग्रह झाला, की मग सर्व इंद्रियसमुदायांचाही निरोध करता येतो. मग ते मन अहोरात्र एकाग्र करता येते. यासाठी दीर्घ अभ्यासाची गरज असते व कंटाळा न करता तो अभ्यास केल्यास आज ना उद्या किंवा कालांतराने त्याला आत्मलाभ होतोच. अशा या अभ्यासालाच योग म्हणतात.

वरील विचार गीतेच्या आधारे सांगून विद्यारण्यस्वामी पुढे म्हणतात (पंच. ११. ११६-१७)-

मनो हि द्विविधं प्रोक्तं शुद्धं चाशुद्धमेव च ।
अशुद्धं कामसम्पर्काच्छुद्धं कामविवर्जितम् ।।
मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ।
बन्धाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम् ।।

अर्थ – मन हे शुद्ध व अशुद्ध असे उभयविध असल्याचे सांगितले आहे. कामाशी संबंध झाल्यामुळे ते अशुद्ध बनते व कामरहित असले की शुद्ध होते. मनुष्यांच्या बंधमोक्षांना मनच कारण आहे. ते विषयासक्त झाले असता बंधाला व विषयरहित झाले असता मुक्तीला कारण होते, असे सांगितले आहे.

योगवासिष्ठ हा ग्रंथ अद्वैत वेदान्ताला अनुसरणारा आहे. वसिष्ठाने आपल्या या ग्रंथात मन व मनाच्या अवस्था यांचा बारकाईने शोध घेतला आहे. त्याने मनाचे नैसर्गिक धर्म, त्याचे व्यापार, हालचालींचे नियम इ. अनेक विषयांचा अभ्यास करून असे ठरवले आहे, की हा सारा संसार म्हणजे केवळ मनाने निर्माण केलेली माया आहे. या संसारातील लहान मोठ्या सर्व गोष्टींचे बीजकारण म्हणजे मानवी मनाचे व्यापार होत. सर्व प्रपंच मनच निर्माण करीत असते.

चित्तं नाभिः किलास्येह मायाचक्रस्य सर्वतः ।।
(यो. वा. ५. ४९.४०)

अर्थ – सर्वत्र भ्रमण करणाऱ्या मायाचक्राचे मन हे तुंबा किंवा मध्य आहे.

माणसाने आपले बुद्धिसर्वस्व खर्च करून दीर्घ प्रयत्नाने जर या तुंब्याची गती बंद पाडली, तर या मायाचक्राची गती आपोआप बंद पडेल. विविध कल्पनांच्या योगाने मन मोहात पडते, ते मरते व तेच उत्पन्न होते. शुभाशुभ कर्मांचे फल हे मनच भोगीत असते. शरीराला बाह्यतः प्राप्त होणारी सुखदुःखे ही मनापासूनच उद्‌भवतात. कारण चित्त व्याधींनी क्षुब्ध झाले, की त्याच्या मागोमाग देह क्षुब्ध होऊन त्याला व्याधी जडतात. काही तरी संकल्प, संकेत, इच्छा व निश्चय करावा; तसेच पुन्हा संशय घ्यावा, विकल्पात पडावे, विकार पावावे, असा मनाचा व्यापार संतत चाललेला असतो. मन हे देहात राहते; पण नेहमी देहाबाहेरच भटकत असते. त्याला कल्पनाशक्ती असते. म्हणून ते देहात राहूनच कल्पनेच्या साहाय्याने एका क्षणात ब्रह्मलोकापर्यंत दूर जाऊ शकते. दुसऱ्या दृष्टीने इष्ट वस्तू साध्य करून देणारे मनासारखे दुसरे साधन नाही. प्रत्येक विचार, प्रत्येक कल्पना म्हणजे सारे मनाचेच निरनिराळे आविष्कार होत.

मन हे एक सावयव, अनित्य आणि अनेक प्रकारच्या परिणामांस योग्य असणारे द्रव्य आहे. ज्या घटकद्रव्यापासून मन उत्पन्न होते, ते द्रव्य अत्यंत सूक्ष्म आहे. हे अतिसूक्ष्म द्रव्यच मनोरूपाने घट्ट होते व मनाचा आकार घेऊन मनोद्वाराने विषयांची उत्पत्ती करते. विषयाला विषयत्व प्राप्त होण्याचा जो संभव किंवा असंभव उत्पन्न होतो, तो मनाच्या योगानेच होय. मनच नसेल, तर विषयाविषयी संकल्प-विकल्पच होणार नाही.

इंद्रियादिकांना जे विषयसंवेदन होते, ते आत्मप्रकाशानेच होते. याहून आणखी निराळे मन मानण्याची वास्तविक गरज नाही; पण सर्व तऱ्हेची व्यवहारसिद्धी होण्याकरता आणि मुमुक्षूंना व्यतिरेकाने स्वात्मबोध करून देण्याकरिता मनाचे अस्तित्व मानावे लागते. मध्यस्थ वस्तूला जसे वास्तविक रूप, जाती, रंग, आकृती, सत्ता वगैरे काहीच नसते, त्याप्रमाणेच मनालाही कोणतेच रूप, जाती, आकृती, सत्ता वगैरे काहीच नसते. म्हणून मन हे शरीराच्या आतही नाही व बाहेरही नाही. आतबाहेर ही कल्पना मनानेच ठरवली आहे. सर्व शरीरच जर मनःकल्पित आहे, तर मन शरीराच्या आत असते किंवा बाहेर असते हा प्रश्न निरर्थक आहे. मन केवळ भावनामात्र असते. जो जशी भावना करील, तसेच त्या मनाचे रूप होय. मनाचे स्वरूप व्यावहारिक दृष्ट्या अनिर्वाच्य आहे. कारण मनाचे स्वरूप ठरवणारेही मनच व ऐकणारेही मनच.

मनाची प्रक्रिया काय हे योगवासिष्ठातील विचारांचे मंथन करून श्री. य. वि. परांजपे यांनी पुढीलप्रमाणे सांगितली आहे –

(१) अनंत सर्वशक्तिमान ब्रह्मापासून प्रथम निष्पन्न झालेल्या संकल्पशक्तिरूपालाच मन म्हणतात.

(२) चित्तच संकल्पविकल्पामुळे मन बनते. संकल्प म्हणजेच मन. संकल्पाहून मन निराळे नाही.

(३) परम पुरुषाचे संकल्पमय होणे याचेच नाव चित्त. चित्ताचा स्पंद मलिन असतो व त्याचे अंतरंग मात्र आवरण आणि कलंक यांनी रहित असते.

(४) मन जडही नाही आणि चेतनही नाही.

(५) चिदात्मरूप जीव उपाधीच्या मलिनतेमुळे जेव्हा संसारदशेमध्ये पडतो, तेव्हा त्याला मन असे म्हणतात.

(६) चैतन्याने चेत्याची म्हणजे विषयाची कल्पना करणे हेच मनाचे स्वरूप समजावे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(७) मन हे भावनामात्र आहे आणि भावना म्हणजे अनुभव घेतलेल्या पदार्थाची कल्पना करणे होय.

अंतःसृष्टी व बाह्य सृष्टी यांच्यामध्ये मन हे सतत निरनिराळ्या कार्यांमध्ये व्यग्र असते. या निरनिराळ्या कार्यांनुसार वसिष्ठाने त्याला अठरा नावे दिली आहेत, ती अशी – (१) मन (२) बुद्धी (३) चित्त (४) अहंकार (५) कल्पना (६) स्मृती (७) वासना (८) कर्म (९) अविद्या (१०) मल (११) माया (१२) प्रकृती (१३) जीव (१४) ब्रह्म, विराट, सनातन, नारायण, किंवा ईश (१५) अतिवाहिक देह (१६) इंद्रिय (१७) पुर्यष्टक व (१८) देह.

मनाच्या या अठरा अवस्थांचे स्थूल वर्गीकरण होऊ शकते, ते असे – (१) मानसिक (२) धार्मिक किंवा नैतिक (३) आध्यात्मिक व (४) आधिभौतिक.

(१) पहिल्या वर्गात मन, बुद्धी, चित्त व अहंकार ही तत्त्वे येतात. या चौघांना मिळून अंतःकरणचतुष्टय म्हणतात. मनुष्याला जे ज्ञान, सुख, दुःख वगैरे होते, ते सर्व या अंतःकरणचतुष्टयावरच्या लाटांप्रमाणे असते.

यानंतरची तीन तत्त्वे पाच ते सात या मानसिक क्रिया आहेत. कल्पना करणे हा मनाचा धर्म आहे. कल्पना करीत असता मी अमूकतमूक पदार्थ पूर्वी पाहिला आहे, असा मनाचा निश्चय होतो, त्याला स्मृती म्हणतात. अशा प्रकारे पहिली सात तत्त्वे मानसिक क्रियेत मोडतात.

(२) मनुष्याचे नैतिक व धार्मिक जीवन मनोविकारांवर अवलंबून असते. मनाचा व्यापार प्रथम व धर्माधर्माचे आचरण त्यानंतर, असा क्रम असल्यामुळे कर्माच्या बाबतीत मनच मुख्य व श्रेष्ठ आहे. अविद्या व मल ही मनाच्या मिथ्या विकल्पामुळे उत्पन्न होतात. मन हे कर्ममय असल्यामुळे पूर्वजन्मात केलेल्या बऱ्यावाईट कर्मांचे फल त्याच्या उत्पत्तीस कारणीभूत होते. ब्रह्मज्ञान मिळविण्यासाठी प्रथम चित्तशुद्धी आवश्यक असते. विहित कर्माने ती झाल्यावर अविद्या म्हणजे दृश्यभ्रांती व मल म्हणजे मिथ्या विकल्प यांचा नाश होतो.

(३) अकरा ते पंधरा ही पाच तत्त्वे आध्यात्मिकात येतात. मन हे आत्मा अथवा ब्रह्म यांच्याहून निराळे तत्त्व नाही. अव्यक्त मनाचे व्यक्त स्वरूप म्हणजे जग होय. जग आणि मन ही आत्म्याच्या स्पंदशक्तीची स्पष्ट स्वरूपे आहेत. त्यामुळे आत्म्याप्रमाणे मनही सर्व ठिकाणी आहे. वरील पाच तत्त्वे म्हणजे सर्व ब्रह्माचे अथवा मनाचे विकार होत.

(४) सोळा ते अठरा ही तीन तत्त्वे आधिभौतिक अथवा शारीरिक या सदरात येतात. मन हे सर्व शरीर–व्यापाराचे नियमन करणारे स्वतंत्र तत्त्व आहे. त्याचा परिणाम शरीरव्यापारावर व शरीरव्यापाराचा मनावर होतो.

मन हे चल व दुर्निग्रह आहे, हे मान्य करून, ते आटोक्यात कसे आणावे, याविषयी ज्ञानेश्वरमहाराजांनी पुढील ओव्या लिहिल्या आहेत –

परी वैराग्याचेनि आधारें । जरी लाविले अभ्यासाचिये मोहरे ।
तरी केतुलेनि एकें अवसरें । स्थिरावेल ।।
कां जें यया मनाचें एक निकें । जे हे देखिलें गोडीचिया ठाया सोके ।
म्हणोनि अनुभव सुखची कवतिकें । दावीत जाइजे ।।

(ज्ञाने. ६. ४१९–२०)

आधुनिक मानसशास्त्र – मनुष्य समूह करून राहू लागल्यावर समाजाची व संस्कृतीची निर्मिती झाली. या संस्कृतीबरोबरच अनेक शास्त्रांचा पाया घातला गेला व संस्कृतीच्या विकासाबरोबरच त्यांचाही विकास झाला. मनुष्य आपसांत देवघेव करू लागला, तेव्हा त्याला वस्तूंच्या मोजमापाची आवश्यकता भासू लागली व गणितशास्त्र अस्तित्वात आले. त्याचप्रमाणे दुसरा मनुष्य कसा वागेल याचा अंदाज घेऊन जेव्हा मनुष्य आपल्या वर्तनात अनुरूप बदल करू लागला, तेव्हा मानसशास्त्राचा उगम झाला. अनुभवांचे जतन करून सामान्य विधाने मांडणे हे या शास्त्राचे काम आज कित्येक शतके म्हणी व सुभाषिते करीतच आहेत. त्यांनाच बाल्यावस्थेतील मानसशास्त्र म्हणावे लागेल.

पाश्चात्य संस्कृतीत सर्व शास्त्रांचा उगम ॲरिस्टॉटलच्या ग्रंथांत आहे, असे मानतात. सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल या गुरुशिष्यांनी राजकारण, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, टीकाशास्त्र वगैरे विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले. त्यांच्यातच इतर शास्त्रांच्या बीजांप्रमाणे पाश्चात्य मानसशास्त्राची बीजेही सापडतात. पण या बीजांपासून आधुनिक मानसशास्त्राचा जो वृक्ष फोफावला आहे, त्याची निर्मिती मात्र इ. स. १८७९ साली, विलहेल्म वुंट याने लायप्झिक येथे प्रयोगशाळा स्थापन करून मानसशास्त्रीय अभ्यासाला प्रारंभ केला, तेव्हा झाली. वुंट, वेबर व फाकनर यांनी प्रयोगाद्वारे आधुनिक मानसशास्त्राचा पाया घातला.

मानसशास्त्र म्हणजे मनाचा अभ्यास करणारे शास्त्र, ही साधी व सुटसुटीत व्याख्या कुणालाही मान्य होण्यासारखी आहे. मन हे अगोचर असल्यामुळे त्याच्या अस्तित्वाबद्दलच शंका घेणारे काही मानसशास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या मताप्रमाणे मन अस्तित्वात नसल्यामुळे तो अभ्यासविषय होऊच शकत नाही. मनुष्याचे बाह्य वर्तन दृष्टिगोचर असते. त्यामुळे त्याचा अभ्यास करणे शक्य आहे व अशा वर्तनाचा अभ्यास म्हणजेच मानसशास्त्र, असे यांचे म्हणणे आहे. या पंथाच्या मानसशास्त्राला वर्तनवादी मानसशास्त्र म्हणतात. मनाचे अस्तित्व न मानणारा व मनुष्याला एक गुंतागुंतीचे यंत्र मानणारा आणखी एक पंथ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. त्याच्या मते पदार्थविज्ञान व रसायन या दोन शास्त्रांच्या मदतीनेच मानसशास्त्राचे सर्व प्रश्न सुटण्यासारखे असल्याने, त्यासाठी निराळ्या शास्त्राची जरुरी नाही. तिसरा आणि सर्वांत महत्त्वाचा, हेत्वर्थक मानसशास्त्राचा पंथ सर्वत्र मान्यता पावलेला आहे. या पंथाच्या मानसशास्त्रज्ञांचे सिद्धान्त, कल्पना व विचार यांनीच आधुनिक मानसशास्त्राचा बराचसा भाग व्यापलेला आहे. याशिवाय केवळ अनुभवावर मानसशास्त्राची उभारणी करणारा केवलानुभवी पंथ; मनाचे अस्तित्व गृहीत धरून व त्याच्या काही शक्ती आहेत, असे मानून अभ्यास करणारा शक्तिपंथ; मनाची एक विशिष्ट रचना असून, ते कोणत्या पद्धतीने कार्य करते, त्याचा अभ्यास करणारे रचनावादी व कार्यवादी पंथ; मनोव्याधी दूर करण्यासाठी, मनाचे जाणीव व नेणीव असे दोन भाग कल्पून, हेतूचे पृथक्करण करणारा मनोविश्लेषणवादी पंथ आणि याच्या अगदी उलट मनांतील हेतूचे व वर्तनाचे पृथक्करण न करता एकदम सर्वच रचनाकृती लक्षात घेणारा नक्षत्रवाद किंवा पूर्णतावाद, असे अनेक पंथ लहानसहान भेदांमुळे मानसशास्त्रात निर्माण झालेले आहेत. त्यांपैकी वर्तनवाद, हेत्वर्थक मानसशास्त्रीय पंथ व विश्लेषणवादी पंथ हे तीनच विशेष महत्त्वाचे आहेत. याला कारण मानसशास्त्रीय ज्ञानात त्यांनी घातलेली असामान्य भर हेच होय.

वरील प्रत्येक पंथाने एकेक कल्पना मान्य करून वाटचाल केलेली आहे. या अनेक कल्पनांपैकी कोणती खरी आहे, हे सांगणे अवघड आहे. सर्वच खोटचा असून, मानसशास्त्र हे भोंदूगिरीचे शास्त्र आहे, असे कित्येकांना वाटते. या शास्त्राच्या आधाराने मनुष्याच्या वर्तनासंबंधी निश्चित अनुमाने काढता येत नाहीत; पदार्थविज्ञान, रसायन किंवा गणित या शास्त्रांप्रमाणे याचे नियम निश्चित व काटेकोर नाहीत; तर मग हे शास्त्र कसले, असाही प्रश्न आहे.

तथापि मनुष्याच्या व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रात या नव्यानेच प्रतिष्ठा पावलेल्या शास्त्राने खूपच प्रभाव पाडला आहे. या प्रत्येक क्षेत्रातील अनुभवाशी या शास्त्राच्या अनिश्चित विधानांची युती होऊन नवीन शास्त्रे बनत आहेत. शैक्षणिक मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र, बालमानसशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, मनोविकृतिशास्त्र अशा मानसशास्त्राच्या अनेक शाखा झाल्या आहेत व त्या उपयुक्त कार्य करीत आहेत. मनुष्याच्या व्यवहारात प्रत्येक शास्त्रात मार्गदर्शन करणारे हे शास्त्र भोंदूगिरी आहे, असे मुळीच म्हणता येणार नाही. फार तर, ते अजून अविकसित आहे असे म्हणावे लागेल. हे सारे श्रेय निरनिराळ्या कल्पना गृहीत धरून विविध मानसशास्त्रीय पंथांनी केलेल्या वाटचालीलाच दिले पाहिजे.

या सर्व पंथांत सर्वांत दूरचा पल्ला गाठला आहे हेत्वर्थक प्रवृत्तिमूलक मानसशास्त्राने. या मानसशास्त्राचा उगम टी. पर्सी नन यांच्या लेखनात सापडत असल्याने, त्यांनाच या मानसशास्त्रीय पंथाचे जनक मानण्यात येते. आदिचैतन्य व संस्मृती या दोन प्रमुख तत्त्वांवर त्यांनी आपले मानसशास्त्र आधारले आहे. प्रत्येक सजीव प्राण्यात आदिचैतन्यशक्ती म्हणजे कृतिप्रवणता असते, त्यामुळेच त्याला कोणतेही वर्तन करता येते. संस्मृतीने या आदिचैतन्याला दिशा दाखविली जाते. याचाच अर्थ संस्मृतीमुळे हेतूची निश्चिती होते. मानवेतर सजीव प्राणी केवळ उपजत बुद्धीच्या म्हणजे या संस्मृतीच्या जोरावरच क्रिया करीत असतात. कारण त्यांना संस्मृतीला वळण लावणाऱ्या विचार, बुद्धी व कल्पना ह्या मानसिक शक्ती अगदी अल्प प्रमाणात असतात.

हीच कल्पना डॉ. फ्रॉइड यांचे पट्टशिष्य युंग यांनी आपली वंशस्मृतीची कल्पना मांडून अधिक स्पष्ट केली. आदिचैतन्याला कृती करायला लावण्यासाठी बाह्य जगातील एखादे प्रेरक लागतेच; पण त्या प्रेरकाची जाणीव झाल्यावर काय क्रिया करायची, हे संस्मृतीने, म्हणजेच युंग यांच्या वंशस्मृतीने, ठरविले जाते. दूध पिणे लहान मुलाला शिकावे लागत नाही; आईच्या स्तनासारखी बाह्य जगातील वस्तू जवळ आल्यावर ठराविक प्रतिक्रिया आज हजारो वर्षे नवजात बालके करीत आहेत. याचे कारण हजारो वर्षे ठराविक प्रेरकाला उद्देशून ठराविक प्रतिक्रिया करणाऱ्या प्राण्यांच्या मेंदूंच्या रचनेत कायमचा अनुरूप बदल झालेला आहे.

फ्रॉइड यांनी मनुष्याच्या आत्मप्रवृत्ती व लिंगप्रवृत्ती या दोन प्रवृत्ती मानून, त्यांच्यावर आपले मनोविश्लेषणशास्त्र रचले. आत्मप्रवृत्तीमुळे मनुष्य स्वतःचे रक्षण करण्यास धडपडत असतो व लिंगप्रवृत्तीमुळे वंशसातत्य राखण्याचा यत्न करीत असतो. मनुष्याच्या प्रत्येक कृतीच्या मुळाशी या दोन प्रवृत्ती असतात. त्यांच्या मताप्रमाणे लिंगप्रवृत्तीला बाध आला म्हणजे अनेक गंड निर्माण होतात व मनोविकृती उत्पन्न होते. फ्रॉइड यांनी जसा लिंगप्रवृत्तीवर भर दिला, तसा त्यांचे शिष्य ॲडलर यांनी आत्मप्रवृत्तीवर भर देऊन मनुष्याच्या वर्तणुकीचे स्पष्टीकरण करण्याचा यत्न केला. मनोविश्लेषणाच्या दिशेने फ्रॉइड व त्यांचे हे दोन शिष्य यांनी अनन्यसाधारण कामगिरी केली आहे.

मनुष्याच्या वर्तनाला हेतू व निश्चित दिशा असली व वर्तनाला प्रेरक म्हणून बाह्य वस्तूची गरज असली, तरी हेतू मनातच निर्माण होतो. वर्तनाची दिशा मनातच ठरते. म्हणून हेत्वर्थक प्रवृत्तिवादी मानसशास्त्रज्ञांनी मनाची कल्पना मान्य केली आहे. यंत्राला कृतिप्रवण करणारा मनुष्य त्याला हेतू देतो, तसे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सजीव प्राण्याचे नसते. म्हणून रसायन व पदार्थविज्ञान या दोन शास्त्रांच्या नियमांत मनुष्याचे वर्तन बसणार नाही.

अशा तऱ्हेने सजीव व निर्जीव असा स्पष्ट भेद कल्पून हेत्वर्थक मानसशास्त्रज्ञांनी आपले मानसशास्त्रीय सिद्धान्त मांडले. या मानसशास्त्रज्ञांत अग्रस्थान दिले पाहिजे ते विल्यम मॅकडुगल यांना. बुद्धी, विचार, भावना व कल्पना या बाबतींतील त्यांच्या विचारांवरच आधुनिक मानसशास्त्र आधारलेले आहे. मॅकडुगल यांनी मनुष्याच्या चौदा प्रमुख प्रवृत्ती कल्पिलेल्या आहेत. या चौदा प्रवृत्तींशी निगडित अशा चौदा भावना असतात. या चौदा प्रवृत्तींमुळे प्रेरकाची जाणीव झाल्याबरोबर अनुरूप भावना निर्माण होते व मनुष्य कृती करतो. अशा तऱ्हेने आकलन, चालना व भावना ही कृतीची तीन प्रमुख अंगे आहेत. ती प्रत्येक कृतीत असतातच. पण कृतीच्या कमीअधिक महत्त्वाप्रमाणे तिच्यात आकलनाला, चालनेला की भावनेला प्राधान्य द्यायचे हे ठरते. कृतीच्या या तीन अंगांची अधिक छाननी करता करता जेम्स व लँज या दोन मानसशास्त्रज्ञांनी एकदमच आपला आश्चर्यकारक सिद्धान्त मांडला व त्याच्यावर मानसशास्त्रज्ञांत रणे माजली. त्यांच्या मताप्रमाणे प्रेरकाची जाणीव झाल्याबरोबर प्राण्याला चालना मिळते व मग भावना निर्माण होते. सामान्यतः आपण 'वाघ दिसला, भीती वाटली व मी पळालो' असे समजतो. पण या शास्त्रज्ञांच्या मते वाघ दिसला, की आपण पळतो व मग भीती वाटते. त्यांचा हा सिद्धान्त पटण्यासारखा नसला, तरी त्यात पुष्कळ तथ्य आहे, असे अनेकांनी मान्य केले आहे. निदान उपजत बुद्धीच्या जोरावर मनुष्य ज्या क्रिया करतो त्या क्रियांना तरी हा सिद्धांत लागू पडतो. परंतु मनुष्याची परिस्थिती व प्रेरके सतत बदलणारी असल्यामुळे मनुष्याच्या वर्तनाच्या बाबतीत आकलन, भावना व चालना हा क्रम मान्य करावा लागतो. काही काही कृतींच्या बाबतींत ही सर्व अंगे एकदमच प्रकट होत असल्यामुळे आधी कोणते व मग कोणते हे ठरविणे कठीण असते. सजीव व निर्जीव यांच्यांतील भेद मान्य केल्यावर, मानसशास्त्राचा अभ्यासविषय झालेले जे मानवी वर्तन, त्याच्याबद्दल निश्चित कल्पना मॅकडुगल यांनी मांडली व आपल्या सात वर्तनचिन्हांचा सिद्धात मांडला. यंत्राची कार्य करण्याची पद्धती व मानवी वर्तन यांच्यांतील भेद या सात वर्तनचिन्हांनी त्यांनी स्पष्ट केला आहे. मनुष्याच्या प्रत्येक कृतीच्या मागे हेतू असतो. यंत्राच्या कृतीतील हेतू यंत्र चालविणारा मनुष्य त्याला देतो. हेतू साध्य झाला, की वर्तन थांबते. हेतू साध्य झाला, की यंत्र बंद करावे लागते. हेतू साध्य होण्यात काही अडथळा आला, तर कृतीची दिशा बदलणे व अडथळा नाहीसा होईपर्यंत थांबणे, या गोष्टी यंत्र करीत नाही. ठराविक परिस्थिती व ठराविक प्रेरक असेल, तर यंत्र एक निश्चित प्रकारची कृती करील. मनुष्याच्या वर्तनात अशी निश्चितता नाही. अशा तऱ्हेची ही सात वर्तनचिन्हे आहेत. मॅकडुगल यांचे सारे मानसशास्त्र प्रवृत्तीभोवती घोटाळत असल्याने त्यांनी दिलेल्या चौदा प्रवृत्तींपैकी ज्या विशेष महत्त्वाच्या आहेत, त्यांचा त्यांनी क्रम लावण्याचा प्रयत्न केला आणि उंदीर व कुत्रा यांच्यासारख्या प्राण्यांवर अनेक प्रयोग केले. त्यांच्या मते पहिल्या दर्जाची मानसिक प्रवृत्ती तृषा, मग क्षुधा, नंतर लिंगप्रवृत्ती व संशोधन असा तो क्रम लागतो. पण प्राण्यांमधील हा क्रम मनुष्याच्या बाबतीत मात्र कायम राहतो असे नाही. संशोधनप्रवृत्तीला अग्रक्रम देऊन इतर प्रवृत्तींचे उदात्तीकरण करणारीही माणसे आढळतात. एखाद्या प्रेरकाला उद्देशून कायम स्वरूपाची भावना निर्माण झाली व तिला अनुसरून त्या प्रेरकाच्या संदर्भात वर्तन घडू लागले, म्हणजे स्थायीभाव निर्माण झाला असे म्हणतात. अशा अनेक प्रकारच्या स्थायीभावाने वर्तनाची दिशा कायमची ठरते व स्वभाव किंवा शील यांची निर्मिती होते. या स्थायीभावांतसुद्धा सर्वांत अधिक महत्त्व कशाला द्यायचे, त्यांचा क्रम कसा लावायचा, हे ठरल्यानंतर स्वत्वाची निर्मिती होते व व्यक्तिमत्त्व सिद्ध होते.

मनुष्याचे वर्तन सहजप्रवृत्तिमूलक हेतूंशी निगडित असते; पण कधीकधी दोन हेतूंत संघर्ष उत्पन्न होऊन हेतुविग्रह होतो व काही हेतू नाकारले जातात. हे नाकारलेले हेतू मनातून साफ आणि कायमचे निघून जात नाहीत; तर ते फक्त जाणिवेतून नेणिवेत टाकले जातात. त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. तरीही त्यांचा मनुष्याच्या वर्तनावर नकळत परिणाम होत असतो. फ्रॉइड याचे मनोविश्लेषणशास्त्र या नाकारलेल्या हेतूंनाच जाणिवेत आणण्याचे शास्त्र आहे. हे नाकारलेले हेतू जाणिवेत आले म्हणजे त्यांची गुप्तपणे कार्य करण्याची पद्धती नष्ट होते व उद्भवलेल्या गंडांचे व मनोविकृतीचे निर्मूलन होते. आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी फ्रॉइड यांनी मनाचे जाणीव व नेणीव हे दोन प्रमुख भाग व त्यांच्या मधला म्हणजे धड जाणीव नाही व धड नेणीव नाही, असा भाग कल्पिला आहे. जाणिवेपेक्षा नेणिवेचा भाग खूपच मोठा असून, तो गुप्तपणे मनुष्याच्या वर्तनावर नियंत्रण ठेवीत असतो. हे नेणिवेतील हेतू शोधून काढण्यासाठी त्यांनी स्वप्ने, विस्मरण वगैरे गोष्टींचा आधार घेतला आहे. मनुष्याच्या इतर वर्तनाप्रमाणे स्वप्नांना सुद्धा प्रेरक लागतेच. ही प्रेरके मनातली व बाहेरची अशी दोन प्रकारची असतात. अंगावर पाणी पडणे, काहीतरी टोचणे, मूत्रपिंडावर दाब येणे वगैरे प्रेरकांमुळे ठराविक प्रकारची स्वप्ने पडतात. त्यांची मीमांसा करणे सोपे असते; पण मनातील प्रेरकामुळे पडलेल्या स्वप्नांची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मीमांसा जीवनात घडलेल्या घटनांच्या अनुरोधाने केल्यास गंडांचे निर्मूलन होते व मनोविकृती दूर होते. याशिवाय मोहनिद्रेचा व रोग्याला जीवनेतिहास सांगण्यास लावून किंवा प्रश्नोत्तरपद्धती अवलंबून विकृतीचे कारण शोधून काढण्याचा यत्न फ्रॉइडने केला. या पद्धतीमुळे एक महत्त्वाची गोष्ट निदर्शनास आली ती ही, की पुष्कळ शारीरिक व्याधींचा उगम मानसिक विकृतीत असतो व ती नाहीशी झाली म्हणजे व्याधीही नष्ट होतात. उदाहरणार्थ पोटदुखी किंवा पोटात होणारी गळवे मानसिक ताणामुळे व चिंतेने होतात, असे आढळून आले आहे. यावरून मन व शरीर यांच्यामध्ये फार निकटचा संबंध आहे, हे मान्य करावे लागते.

गंडनिर्मिती, जाणीव व नेणीव या कल्पना व स्वप्नमीमांसा यांच्या अनुरोधाने फ्रॉइडनी मानसशास्त्रात संशोधनाचे एक नवीनच दालन उघडले. तथापि लिंग-प्रवृत्तीवर त्यांनी अवास्तव भर दिल्याकारणाने त्यांचा उपहासही पुष्कळच झाला. मॅकडुगलनी त्यांना, सर्वत्र लिंगाचा साक्षात्कार होणारे, असे म्हटले असले, तरी त्यांनाही नाकारलेले हेतू, नेणीव व जाणीव या कल्पना स्वीकाराव्याच लागल्या. मनोविश्लेषणशास्त्राने मानसशास्त्र, विशेषतः प्रवृत्तिवादी मानसशास्त्र प्रयोगक्षम आहे, असे दाखवून दिले; अनेक प्रयोग करून मनुष्याच्या मनातील गूढे उकलण्याचा यत्न केला. या पंथाच्या इतर मानसशास्त्रज्ञांनी निरीक्षण व विचार यांच्या आधाराने मानसशास्त्राची गूढे उकलण्याचा यत्न केला असला, तरी त्यासाठी अगदी साध्या प्रयोगांचीही मदत घेतली. प्राणी कसा शिकतो हे शोधून काढण्यासाठी मॅकडुगलने आपल्या कुत्र्यावर व थॉर्नडाइकने आपल्या मांजरावर केलेले प्रयोग सुप्रसिद्धच आहेत. शिवाय मॅकडुगलने, एकाने संपादिलेले ज्ञान आनुवंशिकतेने पुढच्या पिढीत जाते की नाही, यासंबंधी केलेला प्रयोग तर आनुवंशिकतेवर चांगलाच प्रकाश टाकणारा आहे. अशा प्रकारे अधून मधून हे प्रवृत्तिवादी मानसशास्त्रज्ञ प्रयोगांचे साहाय्य घेत असले, तरी त्यांचा भर मुख्यत्वे निरीक्षण, विशेषतः आत्मनिरीक्षण व विचार यांच्यावरच आहे. या पद्धतीत दोष आहेत, हे नाकारून चालणार नाही. ज्या भावनांचा विचार आपण आत्मनिरीक्षणपद्धतीने करण्याचे ठरवितो, त्या भावना विचार करायला लागण्यापूर्वीच नष्ट झालेल्या असतात. शिवाय आपले काही पूर्वग्रहही बनलेले असतात. आत्मनिरीक्षणात प्रयोग करणारा, प्रयोग ज्याच्यावर करायचा तो व प्रयोगशाळा सर्व एकच असतात; म्हणून समतोल विचाराने प्रयोगांचे उत्तर बिनचूक येण्याची शक्यता कमी. भावनाविचारांच्या गुंतागुंतीवर प्रयोग करणे कित्येक वेळा नीतिशास्त्रदृष्ट्या योग्य ठरत नाही. एकच परिस्थिती कृत्रिमपणे पुनःपुन्हा प्रयोग करतेवेळी निर्माण करता येत नाही. कारण प्रयोग ज्याच्यावर करायचा व ज्याने करायचा त्यांच्या मानसिक अवस्था प्रत्येक वेळी भिन्न असणार. शिवाय ज्याच्यावर प्रयोग करायचा तो दुराग्रहाने किंवा खोडसाळपणाने प्रयोगकर्त्याची दिशाभूल करणेही शक्य आहे. तेव्हा मानसशास्त्रात प्रयोगांचे क्षेत्र फारच मर्यादित आहे; निरीक्षणावर व आत्मनिरीक्षणावर भर देणे अधिक अगत्याचे आहे.

वर्तनवादी मानसशास्त्रज्ञांनी मात्र मुख्यत्वे प्रायोगिक पद्धतीनेच वाटचाल केलेली आहे. अंतराळात प्रथम प्रवास करणारी रशियन कुत्री लायका, पॅव्हलॉव्हचे प्रयोग यशस्वी करून दाखविणारा त्याचा कुत्रा, मॅकडुगलचा कुत्रा, थॉर्नडाइकचे मांजर हे प्राणी विज्ञानशास्त्राच्या इतिहासात अजरामर झाले आहेत. घंटा वाजवली की आपल्या कुत्र्याला अन्न द्यायचे, असा क्रम पॅव्हलॉव्हने बरेच दिवस चालू ठेवला होता. घंटा वाजवली, की अन्नाच्या अपेक्षेने त्याच्या तोंडातून लाळ गळू लागे. ती त्याने एका भांड्यात धरण्याची व्यवस्था केली. पुढे नुसती घंटा वाजवली व अन्न दिले नाही, तरी लाळ सुटत राहिली. अन्नाच्या अपेक्षेने सहज घडणाऱ्या क्रियेला त्याने अनुबद्ध प्रतिक्षिप्त क्रिया असे नाव दिले. जेव्हा शरीरातील स्नायू किंवा ग्रंथी एखाद्या प्रेरकाला उद्देशून आपोआप प्रतिक्रिया करतात, तेव्हा त्या क्रियेला प्रतिक्षिप्त क्रिया म्हणतात. वरील प्रयोगात घंटा वाजण्याच्या क्रियेशी लाळ सुटण्याची क्रिया अनुबद्ध असल्याने तिला अनुबद्ध प्रतिक्षिप्त क्रिया म्हटले. सवयी लावणे व मोडणे या दृष्टीने या प्रयोगाचे महत्त्व आहे, हे जरी खरे असले, तरी मनुष्याच्या अनेक मानसिक हालचालींवर प्रतिक्षिप्त क्रियांचे हे तत्त्वज्ञान प्रकाश पाडू शकत नाही. तथापि पॅव्हलॉव्हने मानसशास्त्रात अधिक प्रायोगिकता आणली हे नाकारता येणार नाही. त्याचाच कित्ता गिरवून पुढे बुद्धी, विचार, कल्पना व भावना यांच्या बाबतीतील ठोकळेबाज सिद्धान्तांना भरीवपणा आणण्यासाठी अनेक प्रयोग करण्यात आले. अशा तऱ्हेने पॅव्हलॉव्हने मानसशास्त्रात प्रयोगांचे युग सुरू केले.

बुद्धीच्या अनेक व्याख्या मानसशास्त्रज्ञांनी केल्या आहेत. त्यांच्या मध्ये ‘ ज्या शक्तीच्या जोरावर परिस्थितीशी मनुष्य यशस्वीपणे झगडू शकतो, ती शक्ती म्हणजे बुद्धी ’ ही व्याख्या साधी व सहज पटण्यासारखी आहे. बुद्धीची व्याख्या एकदा निश्चित झाल्यावर प्राण्यांना बुद्धी आहे की नाही, हे पटण्यासाठी प्रयोग करण्यात आले व त्यांना अल्प प्रमाणात बुद्धी असते, हे सिद्ध झाले. मनुष्याच्या बुद्धीचा विकास वयाच्या पंधरा वर्षापर्यंतच होतो. पुढे बुद्धी वाढत नाही, तर ज्ञानसंग्रह वाढतो, हेही निश्चित करण्यात आले. बौद्धिक वय ठरविण्याची व बुद्ध्यंक मोजण्याची कल्पना बीने या फ्रेंच शास्त्रज्ञाने काढली. बौद्धिक वय ठरविण्यासाठी अनेकांनी अनेक प्रश्नावलि-कसोट्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काढल्या. त्या बिनचूक सोडवण्यावरून बौद्धिक वय ठरविण्यात येते. हे बौद्धिक वय निश्चित झाले म्हणजे,

$$\frac{\text{बौद्धिक वय}}{\text{कालमानाप्रमाणे वय}} \times १००$$

या सूत्राने त्या माणसाचा बुद्ध्यंक ठरविला जातो. यापुढे मनुष्य शिकतो कसा, यासंबंधी बरेच संशोधन करण्यात आले. ज्या प्रक्रियेने विविध प्रतिक्रिया सुसंघटित होऊन नवीन वर्तन-प्रकार निर्मिला जातो, त्या प्रक्रियेला शिकण्याची प्रक्रिया म्हणतात. शिकण्याची प्रक्रिया सहबंधनावर आधारलेली आहे. (१) सादृश्य किंवा सारखेपणा. (२) विरोध किंवा वेगळेपणा, (३) कालसान्निध्य, (४) व स्थलसांनिध्य, असे सहबंधनाचे चार नियम आहेत. या चार सहबंधनांच्या नियमांवर शिकण्याची प्रक्रिया अवलंबून असली, तरी मनुष्य पुष्कळशा गोष्टी 'चुका व शिका' या पद्धतीनेच शिकत असतो. प्रतिक्रियेत चूक होऊन हेतू विफल झाला, की मनुष्य प्रतिक्रियेत थोडासा अनुरूप बदल करतो. असे बदल करीत करीत, चुका नाहीशा करून ठराविक प्रतिक्रिया निश्चित झाली म्हणजे शिकण्याची क्रिया संपली. या शिकण्याच्या प्रक्रियेसंबंधी थॉर्नडाइकने मांडलेला परिणामांचा नियम अतिशय महत्त्वाचा आहे. जी कृती करीत असताना सुखप्रद अनुभूती मिळते, ती कृती ठसविली जाते व जी कृती करीत असताना दुःखद अनुभूती मिळते, ती ठसविली जात नाही. सुखद हेतुस्फूर्ती मिळाली, की प्रतिक्रिया दृढ होतात व दुःखद हेतुस्फूर्ती निर्माण झाली, की त्या नष्ट होतात. हे खरे असल्यामुळेच शिक्षणात पारितोषिक व शिक्षा या मार्गांचा अवलंब करावा लागतो. तथापि कोणतीही गोष्ट केवळ निरीक्षणाने किंवा झालेल्या यदृच्छया प्रतिक्रियांमुळे नीट शिकली जात नाही, तर ती शिकताना जेव्हा मर्मदृष्टीचा लाभ होतो, तेव्हाच ती चांगली शिकली जाते. मर्मदृष्टी असल्यास शिकण्याची प्रक्रिया जलद होते. 'चुका व शिका' या पद्धतीने प्रयोग करीत बसावे लागत नाही. एखाद्या गोष्टीचा सांगोपांग विचार केल्यावर, इच्छित गोष्ट साध्य होण्यास अमुक केले पाहिजे हे जेव्हा कळते, तेव्हा मर्मदृष्टी प्राप्त होते. मर्मदृष्टी येऊन शिकलेली गोष्ट परिपाठाने जलद व कौशल्याने करता येते.

याच्या पुढे, एखादी गोष्ट शिकली, तर तिचा फायदा दुसरी गोष्ट शिकताना होतो की नाही, असा प्रश्न निघाला व अनेक प्रयोगांनंतर, दोन गोष्टी एकमेकींशी संलग्न असतील, तर एक शिकल्यावर त्या शिक्षणाचा फायदा दुसरी शिकण्याकडे होतो, असे सिद्ध झाले. शिकण्याच्या या क्रियेत स्मृती महत्त्वाची आहे. स्मृतीची चार अंगे आहेत –(१) आरोपण, (२) धारणा, (३) पुनरुच्चारण व (४) पुनराकलन. स्मृतीच्या बाबतीत पूर्वोत्तर संगतीच्या नियमाला फार महत्त्व आहे. आपण एखादी गोष्ट आठवतो, तेव्हा कालदृष्ट्या प्रथम घडलेली गोष्ट अगोदर व नंतर घडलेली गोष्ट नंतर आठवते. यालाच पूर्वोत्तर संगतीचा नियम म्हणतात. यावरून मॅकडुगल यांचे, मनाची ठेवण भविष्याभिमुख असते, हे म्हणणे खरे ठरते. स्मृती वाढविता येत नाही. पण ज्या गोष्टीची अभिरुची आहे किंवा ज्या गोष्टीचा मनावर चांगला ठसा उमटला आहे, ती चांगली लक्षात राहते. तथापि एखादी गोष्ट लक्षात ठेवायची असेल, तर स्मृतिसूत्रांसारख्या यांत्रिक पद्धतींचा उपयोग होऊ शकतो.

स्मृतीनंतर विचार म्हणजे काय, या गोष्टीचाही मानसशास्त्राने विचार केलेला आहे. विचार करताना आपल्याला भाषेची मदत लागते; पण भाषेची उत्पत्ती होण्यापूर्वी मनुष्य विचार कसा करीत असेल ? प्रत्यक्ष वस्तूच्या अभावी वस्तूचे जे आकलन होते, ती कल्पना होय. या कल्पनेमुळेच मनात प्रतिमा किंवा कल्पनाचित्रें उमटतात. अशा कल्पनाचित्रांच्या मदतीने भाषेच्या अभावी मनुष्य विचार करीत असावा. या संदर्भात कल्पनागति-सिद्धान्त नावाचा एक महत्त्वाचा सिद्धान्त मांडण्यात आला. प्रत्येक कल्पनेबरोबर तिला अनुसरून स्नायूंची अस्पष्ट हालचाल होते, हा तो सिद्धान्त होय. विचार करीत असताना आपण प्रत्यक्ष शब्द उच्चारीत नसलो, तरी स्वरयंत्राची किंचित हालचाल होत असते. या प्रतिमांचे दृक्-प्रतिमा, श्रुति-प्रतिमा, रस-प्रतिमा व गंध-प्रतिमा असे प्रकार आहेत. जेव्हा एखाद्या दृश्याचे हुबेहूब चित्र डोळ्यापुढे उभे राहते, तेव्हा अशा प्रतिमेला सम्यक्-प्रतिमा म्हणतात. विचारात सामान्यीकरण व विभक्तीकरण यांचे साहाय्य घ्यावे लागते. याच तत्त्वांच्या साहाय्याने एखाद्या गोष्टीचा विचार करून मनुष्य निष्कर्ष काढतो. जॉन डयुई यांनी तर्कसरणीच्या सोपानाच्या पाच पायऱ्या मानल्या आहेत, त्या अशा – (१) समन्वयाचा अभाव, (२) समस्येचे विभक्तीकरणाने निदान करणे, (३) सिद्धान्तकल्पना, (४) निगमन व (५) परीक्षण. शिवाय नवनिर्मिती करताना अनुभवांचा संचय, अंतर्विकसन किंवा पोषण, स्फूर्ती व परीक्षण असे टप्पे असतात.

मनाचे व मनोरचनेचे विविध अंगांनी परीक्षण केले तरी मन असलेल्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व कसे सिद्ध होते, हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न शिल्लक राहिलाच. व्यक्तिमत्त्वात ईश्वरदत्त देणगी व तिचा विकास अशा दोन गोष्टी येतात. व्यक्तिमत्त्वात आनुवंशिकतेचा भाग किती व परिस्थितीचा भाग किती हा वादग्रस्त प्रश्न आहे. व्यक्तिमत्त्व घडविण्यात आनुवंशिकतेचा अगदी अल्प वाटा असून, परिस्थितीचा मोठा भाग असतो, असे म्हणणाऱ्यांना चोख उत्तर आनुवंशिकतेचा नियम शोधून काढ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

णाऱ्या मेंडेल या जर्मन शास्त्रज्ञाने दिले आहे. आनुवंशिकतेने काही शारीरिक गुणदोष पुढल्या पिढ्यांत निश्चितपणाने जात असल्याचे आकडेवारीने सिद्ध झाले, तरी मानसिक गुणावगुण आनुवंशिकतेने पुढील पिढ्यांत जातात, की नाही, हे ठरविण्यासाठी ज्यांची आनुवंशिकता निश्चितपणे एक आहे, अशा जुळ्या मुलांचे निरीक्षण व अभ्यास करण्यात आला. एकरूप जुळ्या भावंडांत मानसिक व शारीरिक गुणांत आश्चर्यकारक साम्य असते. मात्र समरूप जुळ्या भावंडांत, सख्ख्या भावंडांत सर्वसाधारणपणे जेवढे साम्य आढळते, तेवढेच आढळते. याच कारणासाठी अनेक कुटुंबांचा पिढ्यान्‌पिढ्यांचा इतिहास अभ्यासण्यात आला व व्यक्तिमत्त्वात आनुवंशिकतेला निश्चित स्थान असल्याचे दिसून आले. यानंतर प्रयत्नपूर्वक एखादी विद्या किंवा कला एखाद्याने हस्तगत केली असेल, तर तिचा उपयोग पुढील पिढीला होऊन, तो गुण संपादणे सोपे जाते किंवा कसे, हा प्रश्न उद्‌भवला. संपादित गुण आनुवंशिकतेने पुढील पिढीत जातात की नाही हे ठरविण्यासाठी वाइजमान यांनी उंदरांवर अनेक प्रयोग केले.

व्यक्तिमत्त्वात इच्छाशक्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या इच्छाशक्तीच्या जोरावरच मनुष्य अनेक संकटांशी झुंज देतो. कृतिप्रवण झालेला स्वभाव म्हणजे इच्छाशक्ती, अशी इच्छाशक्तीची मॅक्डुगल यांनी व्याख्या केली आहे. मनुष्याच्या स्वभावात त्याच्या सर्व गुणावगुणांचा समावेश होतो व त्यांच्यावरच इच्छाशक्ती अवलंबून असते. नुसती एखादी गोष्ट हवीशी वाटणे म्हणजे इच्छाशक्तीची निर्मिती नव्हे; तर ती हवीशी वाटण्याच्या जोराच्या हेतुस्फूर्तीबरोबर ती मिळविण्यासाठी जेव्हा कृती केली जाते, तेव्हा तिला इच्छाशक्ती म्हणावे. या इच्छाशक्तीचे महत्त्व व सामर्थ्य फार मोठे आहे. मोठमोठ्या डॉक्टरांनी ज्याच्या जीविताची आशा सोडली आहे, असा एखादा मृत्युपंथाला लागलेला रोगीही या इच्छाशक्तीच्या जोरावर रोगमुक्त झालेला कधी कधी आढळतो; तर याच्या उलट शरीरात तसा काही फारसा बिघाड झालेला नसताही, निराश होऊन जीवनाची ज्याची इच्छा नाहीशी झाली आहे, असा एखादा मनुष्य दगावलेलाही दिसतो. यावरून इच्छाशक्ती कशी तारक किंवा मारक आहे, हे कळून येते.

शरीर हे एक यंत्र समजून पदार्थविज्ञान व रसायन यांच्या द्वारे मनुष्याचा अभ्यास करणाऱ्यांना हे अगदी चोख उत्तर आहे. तथापि या पंथाच्या शास्त्रज्ञांनी अगदीच काही संशोधन केले नाही असे नाही. या संदर्भात प्रामुख्याने ग्रंथिशास्त्रज्ञांचा उल्लेख करायला हवा. शीर्षस्थ ग्रंथी, कंठस्थ ग्रंथी, लिंगग्रंथी, अशा काही ग्रंथी शरीरात असतात. शरीरामध्ये ज्या नलिकाविरहित ग्रंथी आहेत, त्यांचा स्राव प्रत्यक्ष रक्तप्रवाहात होत असतो. व्यक्तिपरत्वे याचे प्रमाण भिन्न असते. या भिन्नतेमुळेच व्यक्तीच्या स्वभावातही भिन्नता आढळून येते. कृत्रिम तऱ्हेने या ग्रंथींचा स्राव कमीअधिक केल्यास मनुष्याच्या स्वभावात फरक पडतो, या ग्रंथिशास्त्रज्ञांच्या म्हणण्यात सत्यांश आहे, हे कबूल करायलाच हवे. कारण रोगी व अशक्त मनुष्य चिरचिरा बनतो व निरोगी आणि सशक्त मनुष्य आनंदी व उत्साही असतो, हे आपण नेहमी पाहतोच. पण यावरून सर्वच व्यक्तींच्या सर्वच वर्तनाला ग्रंथिस्रावांचा कमीअधिकपणा कारणीभूत असतो, असे म्हणता येणार नाही. ग्रंथिस्रावाचा परिणाम मनुष्याच्या वर्तनावर किती होतो, हे पाहण्यासाठी तुरुंगातील कैद्यांची व सुधारणा-गृहातील बिघडलेल्या मुलांची या दृष्टीने शारीरिक पाहणी करण्यात आली, तेव्हा बऱ्याचशा कद्यांत ग्रंथी आपले काम योग्य प्रकारे करीत नव्हत्या, असे आढळून आले. याच कारणासाठी जेव्हा बिघडलेल्या मुलांची तपासणी करण्यात आली, तेव्हा एक हजार मुलांपैकी दोनशे पन्नास मुलांत ग्रंथींची विकृती दिसून आली. यावरून ग्रंथींच्या विकृतीचे कारण काही मुलांना लागू पडत असले, तरी बाकीच्या मुलांच्या गैरवर्तणुकीचे कारण त्यांची परिस्थिती, आनुवंशिकता किंवा दुसरे काही शारीरिक व मानसिक दोष होते, असे म्हणावे लागेल. याचाच अर्थ असा, की मनाची कल्पना गृहीत धरून मनुष्याच्या वर्तनाचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला काय किंवा मनुष्याला एक गुंतागुंतीचे यंत्र समजून पदार्थविज्ञान व रसायन या शास्त्रांच्या नियमांच्या चौकटीत बसविण्याचा यत्न केला काय; मनुष्याच्या मनाचे व वर्तनाचे कोडे अगम्यच राहते.

याचा अर्थ असा नव्हे, की मनुष्याच्या वर्तनाचे कोडे सोडविण्याचे जे यत्न अनेक दिशांनी झाले आहेत, ते निष्फळ व निरुपयोगी आहेत. शिक्षणशास्त्रात, औद्योगिक क्षेत्रात व राजकारणात मानसशास्त्रीय सिद्धान्तांचा जो उपयोग करून घेण्यात येत आहे, त्यावरून असे सिद्ध होते, की ते निरुपयोगी नाहीत व निष्फळही नाहीत. शारीरिक व मानसिक व्याधी नष्ट करण्यात तर मानसशास्त्राने चांगलाच हातभार लावलेला आहे. पण अजून पुष्कळच वाटचाल व्हावयाची आहे. प्रवासाचा अंत कुठे व कसा होईल, हे निश्चित सांगता येणार नाही. कदाचित शरीर व मन ही दोन्ही अविभाज्य ठरतील. कदाचित शरीराचे मनावर किंवा मनाचे शरीरावर प्रभुत्व चालते, असेही ठरेल. एवढे मात्र खरे, की या आधुनिक युगात मानसशास्त्रीय अभ्यासाचा जो विलक्षण छंद शास्त्रज्ञांना लागला आहे, तो आत्मज्ञानात निश्चितपणे थोडी तरी भर घालील. आणि सर्व ज्ञानात आत्मज्ञान हे श्रेष्ठ ज्ञान आहे, हे सर्वमान्यच आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मानसशास्त्राचा व्यक्तीला आणि समाजाला उपयोग काय, हे सांगताना स्वामी विवेकानंद म्हणतात–

सदोदित भटकंत असणाऱ्या आपल्या मनाच्या वृत्ती आपल्या ताब्यात कशा आणाव्या, हे मानसशास्त्र आपणांस शिकविते. आपल्या इच्छाशक्तीच्या बाहेर आपल्या मनाने जाऊ नये आणि आपणांवर अंमल गाजवू नये, हे कसे साध्य करता येईल, हे शिकविण्याचे काम मानसशास्त्राचे आहे. आपल्या मनाच्या ताब्यातून आपणांस सोडवून घ्यावयाचे आहे; आणि ह्यावरच आपल्या भावी कल्याणाची सारी इमारत उभी आहे. हे कार्य कसे साधावे, हे शिकविणारे मानसशास्त्र सर्व शास्त्रांत श्रेष्ठ आहे, असे म्हणण्याचेही कारण हेच. ह्या शास्त्राच्या ज्ञानावाचून इतर सारी शास्त्रे पंगू बनतात. ह्या शास्त्रज्ञानाचा अभाव असल्यास बाकीच्या साऱ्या शास्त्रांचे ज्ञानही शून्यवत होते.

मनाच्या ताब्यात पूर्णपणे सापडणे म्हणजे अधोगतीला आमंत्रण करणेच होय. मनाचा ताबा आपल्यावर पूर्ण असेल, तर दिवसेंदिवस आपणांस ते खाली खाली ढकलल्यावाचून राहणार नाही. सदोदित ते आपले वाभाडे काढीत राहील आणि अखेरीस आपणांस जीवे मारील. उलटपक्षी तेच मन आपल्या ताब्यात आले आणि आपण म्हणू तसे वागू लागले, तर तेच आपणांस मुक्त करील. यासाठीच कसेही करून आपण त्याच्यावर ताबा मिळविलाच पाहिजे. हा मार्ग आपणांस मानसशास्त्र दाखवील.

कोणत्याही भौतिक शास्त्राचा अभ्यास करावयाचा झाला, तर त्याची सारी माहिती आपण प्रथम गोळा करतो. त्यांतील पदार्थांचे घटक तपासून, त्यांचे पृथक्करण आपण करतो. अशा रीतीने त्या शास्त्राच्या वस्तुस्वरूपाचा निश्चय आपण करीत असतो. अशाच रीतीने सारी शास्त्रे आपल्या आजच्या स्थितीला प्राप्त झाली आहेत. मानसशास्त्राच्या अभ्यासात बाहेरची काही मदत मिळविण्याचा संभव आपणांस नसतो. बाह्य सृष्टीतील कोणत्याही पदार्थाचे पृथक्करण आपल्या कामी पडत नाही. बाहेरची कोणतीही वस्तुस्थिती आपणांस मदत करू शकत नाही. मनानेच मनाचा अभ्यास आपणांस करावा लागतो. मनानेच मनाचे पृथक्करण करावयाचे; मनानेच मनाचे परीक्षण करावयाचे; आणि मनानेच मानसिक प्रमेयांचा निश्चय करावयाचा. यामुळेच हे शास्त्र सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. [भा. द.; उ. र.; यो. उ. सि.; यो. सं. वा.; अ. सु. अ; श्री. वेलणकर – ऑं. इं. ओ. कॉं. २२ गौहत्ती, जाने. १९६५; स्वा. वि. स. ग्रं. २१; आधुनिक मानसशास्त्र – सौ. सरोजिनी शारंगपाणी, पुणे]

मनकंजर तमिळनाडमधील त्रेसष्ट नायन्मारांपैकी एक. याने आपली मुलगी एका संतश्रेष्ठाला द्यायचे ठरवले असता, शिवाने याची परीक्षा घेतली. शिव ब्राह्मणवेषाने याच्याकडे आला आणि त्याने मनकंजराजवळ त्या मुलीचे सुंदर केस मागितले. मनकंजराने लगेच त्याला ते दिले. त्यामुळे वधू विरूप झाली. मुलीचे केशविहीन मस्तक पाहून नवऱ्या मुलाकडील माणसे लग्न मोडायला निघाली. तेवढ्यात आकाशवाणी झाली आणि त्या मुलीला पुनश्च तिचे केस प्राप्त झाले. [पे. पु.]

मनबोध (इ. स. चे १८ वे शतक) एक हिंदी संतकवी. याला भोलन असे दुसरे नाव होते. याच्या जन्मस्थानाबद्दल वाद आहे. कोणी बिहारच्या दरभंगा जिल्ह्यातील जसमस हे गाव, कोणी मँगरौनी हे गाव, तर कोणी भराम हे त्याचे जन्मग्राम मानतात. हा विवाहित होता; परंतु याला मूलबाळ नव्हते, असे ग्रियर्सन सांगतो.

मनबोधाने संपूर्ण हरिवंशाचा मैथिली भाषेत अनुवाद केला आहे. या अनुवादातील काही भाग उत्तर मिथिलेत अत्यंत लोकप्रिय आहे. तिथल्या अनेक लोकांच्या कंठांत याचे काव्य असते. याची अनेक स्फुट पदेही उपलब्ध आहेत. त्यांत हरिलीलेचे सुंदर वर्णन केलेले आहे. [हिं. सा. बि.]

मनसा बंगाल व आसाम या प्रदेशांतील एक सर्पदेवता. ही वासुकीची बहीण, जरत्कारू ऋषीची पत्नी व आस्तिकाची माता असल्याचे म्हटले आहे. देवीभागवतात हिला कश्यपाची मानसकन्या मानले आहे (९.४८). हिच्याविषयी बंगालमध्ये विपुल कथा व गीते प्रचलित असून, त्यांपैकी एक कथा अशी –

एकदा शिवाच्या मनी कामोद्भव होऊन त्याचे वीर्य कमलपुष्पात पडले. त्यामुळे त्या कमलातून एक स्त्री निर्माण झाली. तिचे नाव कमला, पद्मा किंवा मनसा. मनसेचे पालनपोषण वासुकीच्या मातेने केले. मोठेपणी तिला नागांनी आपली राणी मानले. पुढे एकदा मनसा सरोवरात स्नान करीत असता शिवाने तिला पाहिले व तो तिच्यावर भाळला. तेव्हा मनसेने त्याला आपण त्याचीच कन्या असल्याचे सांगितले आणि त्याच्याबरोबर त्याच्या घरी येण्याची इच्छा प्रकट केली. मग शिवाने तिला कैलासावर आपल्या घरी नेले; पण तिला पाहून चंडी (पार्वती) रागावली. त्यातून मनसेचे व चंडीचे भांडण झाले आणि त्यात मनसेचा डोळा फुटला. म्हणून मग शिवाने मनसेला जंगलात नेऊन सोडले. तिथे मनसेला झोप लागलेली पाहून शिव परत फिरला. निरोप घेताना त्याच्या डोळ्यांत अश्रू आले व त्यांतला एक अश्रू मनसेच्या डोळ्यात पडला. त्याबरोबर त्या डोळ्यातून एक स्त्री निर्माण झाली. तिचे नाव नेत्रा किंवा नेता. शिवाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिला मनसेची सखी होऊन तिला सांभाळायला सांगितले.

याच वेळी देवलोकी अरिष्ट ओढवले. तिथल्या कपिला गाईला एक वासरू झाले व जन्मताच त्याला भुकेने ग्रासले. कपिला त्याला पुरेसे दूध देऊ शकली नाही. तेव्हा वासराने देव-

कमलजा मनसा

स्त्रियांच्या वापरासाठी असणारे बल्लुका नामक नदीतील सर्व पाणी पिऊन टाकले. त्यामुळे देवस्त्रिया रागावल्या. मग शिवाने कपिलेची प्रार्थना केली. कपिला प्रसन्न झाली व तिने आपल्या दुधाने बल्लुका नदी भरून टाकली. परंतु त्याच वेळी एक पोपट आपल्या चोचीत चिंच धरून त्या नदीवरून उडत चालला होता. त्याच्या चोचीतली ती चिंच त्या नदीत पडून त्यातले दूध नासले. मग सुरासुरांनी त्या नासलेल्या दुधाचे मंथन केले, तेव्हा त्यातून आरंभी वेगवेगळी रत्ने व शेवटी हालाहल नामक विष बाहेर आले. रत्ने वेगवेगळ्या देवांनी घेतली व हालाहल शिवाने प्राशन केले. त्यामुळे त्याच्या सर्वांगाचा दाह होऊ लागला. मग त्या विषहरणासाठी मनसेला बोलावणे गेले. मनसा आली आणि तिने पित्याला विषमुक्त केले. त्यामुळे चंडीसह सर्व देवता तिच्यावर प्रसन्न झाल्या व त्यांनी तिचा अधिकार मान्य केला.

पुढे मनसेचा जरत्कारू मुनीशी विवाह झाला. त्यांच्या पोटी आस्तिकाचा जन्म झाला. जनमेजयाने सर्पसत्र आरंभले. त्या वेळी सारे सर्प मनसेला शरण गेले. मग मनसेने आस्तिकाला सांगून त्याच्याकरवी सर्पांचे दहन थांबवले.

अशा प्रकारे स्वर्गात सर्वत्र मनसेचे माहात्म्य वाढत असता, मनसेला मनुष्यलोकीही प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची इच्छा झाली व ती नेत्रेसह पृथ्वीवर उतरली. प्रथम ती गवळी लोकांकडे ब्राह्मणीच्या रूपाने आली. अनपेक्षित आलेल्या या स्त्रीला पाहून गवळ्यांना ती डाकीण वाटली. त्यामुळे त्यांनी तिच्यावर दगडधोंडे टाकायला सुरुवात केली. मग मनसा चिडली व तिने गवळ्यांच्या गुरांना एका खोल डोहात लोटून दिले. त्यामुळे गवळी मनसेला शरण गेले. मनसा प्रसन्न झाली व तिने गुरांना डोहातून सुखरूप वर आणले. मग ती म्हणाली, 'मला दूध प्यायला द्या.' गवळी म्हणाले, 'ठीक आहे; तू भांडे आण.' मनसेने आपल्याजवळची वेताची टोपली पुढे केली. ते पाहून गवळ्यांना मनसेची थट्टा करण्याची लहर आली व त्यांनी एका वांझ गाईचे त्या टोपलीत दोहन करण्यास प्रारंभ केला. पण काय आश्चर्य ! अनपेक्षित त्या वांझ गाईला पान्हा फुटला व तिच्या दुधाने टोपली काठोकाठ भरून गेली. मनसा ते दूध घटघटा प्याली. हा चमत्कार पाहिल्यावर मात्र गवळ्यांना मनसेचे माहात्म्य पुरेपूर पटले. याच प्रकारे मनसेने निरनिराळ्या जातीजमातींना आपले माहात्म्य पटवून सर्वत्र आपली पूजाअर्चा रूढ केली.

बंगाल, आसाम, बिहार, इ. प्रदेशांत व त्यांच्या सीमेवरील अन्य प्रांतांच्या लहानमोठ्या खेड्यांतून सर्वत्र मनसेची पूजाअर्चा रूढ आहे. या पूजेसाठी अथवा व्रतोपवासाठी विविध प्रदेशांत विविध दिवस निश्चित केलेले आहेत. सामान्यपणे ज्येष्ठापासून भाद्रपदापर्यंत म्हणजे वर्षाऋतूचे चार महिने या प्रदेशांतून मनसेचा पूजोत्सव चालतो. कुठे तो ज्येष्ठ शुद्ध नवमी किंवा दशमीला होतो, तर कुठे आषाढ वद्य पंचमी, श्रावण शुद्ध पंचमी, श्रावण वद्य पंचमी, एकादशी या तिथींना होतो.

या दिवशी व्रतकर्ता उपवास करतो व मनसामातेची मातीची मूर्ती किंवा मातीचा कुंभ, केळीचा खुंट, स्नुही किंवा सिज वृक्षाची डहाळी, मनसामंगलाची पोथी यांपैकी कोणत्याही एका रूपात मनसेची षोडशोपचारे पूजा करतो. मनसेच्या नैवेद्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साठी दूध किंवा तूप हे पदार्थ आवश्यक म्हणून सांगितले आहेत. पूजनोत्तर व्रतकर्त्यांनें कडुनिंबाची पाने स्वतः खावी आणि ब्राह्मणांना ही खायला द्यावीत, असे म्हटले आहे.

नागफणांकित मनसा

सामान्यपणे हीं पूजा सामूहिक रीत्या करण्याची प्रथा आहे. त्या वेळी मनसेपुढे रेडा, शेळी, कबूतर, वदक यांसारख्या प्राण्यांचे बलिदानही केले जाते. मग नृत्य व मनसागीते गाण्याचा कार्यक्रम होतो. मनसेच्या कृपेने गावातील रोगराई नष्ट होते व मनातली इच्छा पुरी होते, अशी लोकांची श्रद्धा आहे.

मागे नागफणा आणि पुढे मानवी मुखवटा अशा स्वरूपात मनसेच्या मूर्ती पाहायला मिळतात.

मनसामंगलकाव्ये – सुमारे दोनशे वर्षे निरनिराळ्या कवींनी आपापल्या काळात मनसेचे माहात्म्य वर्णन करणारे काव्यग्रंथ लिहिले. त्यांत काणाहरिदत्त, विजयगुप्त, विप्रदास पिपिलाई, नारायणदेव, गंगादास सेन, द्विज वंशीदास, कालिदास, क्षेमानंद, इ. कवींची मनसामंगलकाव्ये विशेष प्रसिद्ध आहेत. याशिवाय, अन्यही अनेक कवींनी या विषयावर काव्ये लिहिली आहेत. या सर्व काव्यांची भाषा बहुशः सोपी व रचना सरळ आणि गेय असल्यामुळे ही काव्ये अल्पावधीत सर्वतोमुखी झाली. या काव्यांचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे जवळजवळ सर्व काव्यांत आलेले चांद बेहुला नावाचे एक करुणरसप्रधान कथानक. चांदचा बाप मूळचा शिवभक्त. तो मनसेसारख्या निम्न स्तरातील देवतेचे पूजन अधर्म्य मानी. परंतु पुढे त्याचे सर्व मुलगे समुद्रात बुडून मरण पावले. एकटा चांद तेवढा उरला. त्यालाही मनसेने डंख केला. परंतु चांदची पत्नी बेहुला हिने आपल्या पुण्याईच्या व निष्ठेच्या बळावर मनसेला प्रसन्न करून घेतले आणि आपल्या पतीला पुनश्च जीवित केले. मग चांदचा पिताही मनसेला शरण जाऊन तिची पूजा करू लागला. असा हा कथाभाग आहे. सर्व बंगालात व मनसापूजेच्या अन्यही प्रदेशांत या कथेविषयीचे आकर्षण मोठे आहे. तिथले अनेक साईगोसाई आजही ही कथागीते आपल्या भावपूर्ण वाणीने गाऊन लोकांना मनसा-माहात्म्य ऐकवतात. [बं. सा. क.; बं. सा. सं. इ.; हि. ध.; फोकलोअर, जाने. १९६४; हि. हॉ. से.]

मनस्वती मंत्र मनोविषयक मंत्र. या मंत्रांतून मनाविषयी काही कामना व्यक्त केलेली असते. ऋग्वेदातील (१०.५७.३-५) आणि तैत्तिरीय संहितेतील (१.८.५.२-३) या मंत्रांत मनस् शब्द वारंवार आलेला असल्यामुळे या मंत्रांना मनस्वती मंत्र, असे नाव मिळाले आहे. [हि. ध.]

मनाली हिमालयातील एक पुण्यक्षेत्र. कुलू खोऱ्यात रोहटांगच्या मार्गावर हे स्थान आहे. पठाणकोट पासून कुलू सुमारे १७६ मैलांवर आहे. तिथून मनाली २३ मैल दूर आहे. मनालीला जायला बस मिळते. मनालीजवळूनच बियास नदी वाहते. मनालीच्या परिसरातच व्यासमुनी तपासाठी येत असत, असे सांगतात. पांडवांनी आपल्या अज्ञातवासातील काही काळ इथे काढला, अशी दंतकथा आहे.

इथे डुंगरीचे एक देवालय आहे. या देवालयासंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी –

पांडव या अरण्यात निवास करीत असताना त्यांचा शोध लावून देण्याचा विडा डुंगरीच्या बंधूंनी उचलला. पण डुंगरीने पांडवांना आपल्या भावांच्या षड्यंत्रातून वाचविले. म्हणून मग तिच्या स्मरणार्थ हे देवालय बांधले गेले.

मनालीजवळच वसिष्ठ नावाचा एक झरा आहे. या झऱ्याकाठी वसिष्ठ मुनी तप करीत होते, असे सांगतात. हा झरा गंधकयुक्त आहे. [अ. श्र. स्था.]

मनियार सिंह (इ. स. चे १८ वे शतक) एक रीतिकालीन हिंदी संतकवी. हा काशीचा रहिवासी असून, क्षत्रिय होता. हा केवळ शुक्ल पक्षातच काव्यरचना करीत असे. महिम्नभाषा, सौंदर्यलहरी, हनुमतछब्बीसी व सुंदरकांड हे ग्रंथ याने रचले आहेत. सौंदर्यलहरी या ग्रंथात देवीची स्तुती आहे. कवीची भाषा सानुप्रास आणि कसलेली आहे. ओज हा त्याच्या भाषेचा विशेष गुण आहे. [हिं. सा. इ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मनुचरित्रमु एक तेलुगू महाकाव्य. अल्लसानी पेद्दन्ना हा या महाकाव्याचा कर्ता होय. हे महाकाव्य म्हणजे तेलुगू साहित्याचे एक लेणे आहे. या काव्याची कथा अशी –

आर्यावर्तात वरुणा नदीच्या तीरावर अरुणास्पद नामक एक नगर होते. तिथे प्रवर नावाचा एक सुंदर व विद्वान ब्राह्मण राहत होता. सरस्वतीबरोबरच लक्ष्मीचीही त्याच्यावर कृपा होती. आपल्या पत्नीसह तो आपल्या मातापित्यांची सेवा करीत असे.

एक दिवस एक तपस्वी प्रवर ब्राह्मणाच्या घरी आला. प्रवराने त्याचे यथोचित स्वागत केले आणि त्याला विचारले. ' महाराज, आपण कोणकोणत्या देशांत भ्रमण केले आहे आणि कोणकोणती तीर्थे पाहिली आहेत, ते कृपा करून मला सांगा. '

तपस्व्याच्या तोंडून अनेक स्थळांची वर्णने ऐकून प्रवरालाही ती स्थळे पाहावी, अशी इच्छा उत्पन्न झाली. म्हणून थोडयाशा काळात आपल्याला ही स्थळे पाहता यावी, यासाठी त्याने तपस्व्याला उपाय विचारला. तपस्व्याजवळ एक लेप होता. तो पायांना लावला असता मनुष्य कुठेही जाऊ शकत असे. तो त्याने प्रवराला दिला. तपस्वी निघून गेल्यावर त्या लेपाच्या प्रभावाने प्रवर हिमालयात पोचला. तिथले अपूर्व सौंदर्य पाहून तो चकित झाला. हिमालयात बऱ्याच ठिकाणी हिंडून झाल्यावर त्याला घरी परतावे, असे वाटू लागले. पण बर्फामुळे त्याच्या पायांचा लेप पुसला गेला होता. कुठे रस्ता दिसतो, की काय ते पाहण्यासाठी तो इकडे तिकडे फिरू लागला. तेव्हा त्याला एक गुहा दिसली. गुहेत एखादा ऋषी असेल, तर त्याला परतीचा मार्ग विचारावा या उद्देशाने तो गुहेत शिरला. तिथले दृश्य बघून तो आश्चर्यचकित झाला. ती गुहा अशी होती –

तावुल् केवल जल्लु चेंगलुकेदारंबु तीरंबुनन्
मावुल् कोवुलु नल्लि बिल्लि गोनु कातारंबुनंदंदव
प्रावाकल्पितकायमान जटिल द्राक्षागुळुच्छंबुलं
बूबुंदीवेल नोप्पु नोक्क भवनंबुन् गारुडोत्कीर्णमुन्

अर्थ – आम्रवृक्षांच्या वनात चंद्रकांत पाषाणांनी बनवलेली एक झोपडी होती. तिच्या भोवती द्राक्षवेली आणि फुलवेली होत्या. द्राक्षवेलींवर द्राक्षांचे घोस लटकत होते. कमळांचा आणि इतरही वन्य फुलांचा सुवास वातावरणात दरवळत होता. जवळच एक नवरत्नखचित असे सुंदर भवन होते.

तसाच तो पुढे गेला, तर त्याला एक सुंदर युवती वीणा वाजवीत बसलेली दिसली. तिचे नाव वरूथिनी असे होते. प्रवराचे सुंदर रूप पाहून ती त्याच्यावर मोहित झाली. प्रवराने तिला आपल्या घरी जायचा रस्ता विचारला. त्यावर ती म्हणाली –

एक्कडियूर ? काल निलुव किंटिकि बोयेद नंचु बल्के दी वक्कट ? श्रीकुटीर निलयंबुलकुलन् सरि राकपोयेने यिक्कडि रत्नकंदरमु लिक्कडि नंदन चंदनोत्करं बिक्कडि गांग सैकतमु लिक्कडि यीलवलीनिकुंजमुल्

अर्थ – हे ब्राह्मणा, गावाची आणि घराची आठवण तू वारंवार का काढतोस ? तुझे गाव इतके का श्रेष्ठ आहे ? इथल्या रत्नांनी भरलेल्या गुहा, सुगंधित वृक्षांनी नटलेली उद्याने, गंगा नदीचे वाळवंट, लतांनी वेष्टिलेल्या पर्णशाला, हे सर्व तुझ्या झोपडीपेक्षा कमी आहे काय ?

मी तुझ्यावर मोहित झाले आहे; तेव्हा तू इथे राहून मला सुख दे, अशी विनवणीही तिने केली.

पण प्रवराने तिची विनंती मानली नाही. त्याने आपल्याला घरी पोचवण्याबद्दल अग्नीची प्रार्थना केली. तेव्हा अग्नीने त्याच्या शरीरात प्रवेश केला आणि अग्नीच्या रूपाने प्रवर लगेच आपल्या घरी पोचला.

प्रवराने वरूथिनीचे प्रेम झिडकारले होते; तरी ती त्याच्यावर प्रेम करीत राहिली होती. दिवसेंदिवस तिचा प्रेमभाव वाढतच होता. प्रवराच्या वियोगामुळे ती अगदी कृश झाली होती. वरूथिनीला प्रवर भेटण्याच्या आधी काही काळ एका गंधर्वकुमाराने तिच्या प्रेमाची याचना केली होती. पण तिने ती नाकारली होती. वरूथिनी प्रवरावर अनुरक्त झाली आहे, हे त्या गंधर्वकुमाराला योगबलाने समजले. त्याने मग प्रवराचे रूप धारण केले आणि तो वरूथिनीजवळ गेला. त्याला पाहून वरूथिनीला फार आनंद झाला. खरा प्रवरच आला आहे, असे तिला वाटले. मग दोघेही आनंदाने राहू लागली. कालांतराने वरूथिनीला दिवस गेले. गंधर्वकुमाराला वाटले, की केव्हातरी आपले कपट उघडकीस येईल. म्हणून तो काहीतरी निमित्त काढून तिथून निघून गेला.

यथाकाल वरूथिनी प्रसूत झाली आणि तिला पुत्र झाला. त्याचे नाव तिने स्वरोची असे ठेवले. मोठा झाल्यावर महर्षींनी त्याला राजोचित विद्यांचे शिक्षण दिले. योग्य समयी तो मंथर पर्वतावर राज्य करू लागला. एक दिवस तो शिकार करण्यासाठी अरण्यात गेला असता, त्याला ' त्राहि माम्, त्राहि माम्' असे कोण्या स्त्रीचे शब्द ऐकू आले.

पाठोपाठ एक रूपवती तरुणी धावत धावत त्याच्या जवळ आली. राजाकडे तिने अभय मागितले आणि त्याला म्हटले. ' माझे नाव मनोरमा. मी इंदीवराक्ष गंधर्वराजाची कन्या. आहे. एक दिवस मी माझ्या कलावती आणि विभावरी या दोन सख्यांसह रजत पर्वतावर फुले तोडण्यासाठी गेले होते. तिथे समाधिस्थ असलेल्या एका मुनीचे केस मी ओढले. त्यामुळे त्याची समाधी भंग पावली आणि त्याने मला शाप दिला, की ' तू राक्षसाचे भक्ष्य बनशील. ' त्यावर माझ्या सख्या त्याला काहीबाही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बोलल्या. तेव्हा त्याने त्या दोघींनाही 'तुम्ही क्षयी व्हाल' असा शाप दिला. तेव्हापासून त्या दोघींना क्षयरोगाने पछाडले आहे. तसेच गेले तीन दिवस एक राक्षस माझा पाठलाग करतो आहे. हे राजा, मी तुला अस्त्रहृदय नामक विद्या देते. तू या राक्षसापासून माझे रक्षण कर.'

स्वरोचीने तिला धीर दिला आणि तिच्याकडून ती विद्या ग्रहण केली. नंतर थोडचाच वेळात तो राक्षस तिथे आला. त्याची व स्वरोचीची लढाई जुंपली. शेवटी स्वरोचीने राक्षसाला ठार मारले. तेव्हा त्याच्या शरीरातून एक ज्योती निघाली आणि आकाशात गेली. तिने गंधर्वाचे रूप धारण केले. गंधर्व मग खाली आला आणि स्वरोचीला म्हणाला. 'मी इंदीवराक्ष नावाचा गंधर्व आहे. मनोरमा ही माझी मुलगी आहे. एक दिवस एक मुनी आपल्या शिष्यांना आयुर्वेद शिकवीत असलेला मी पाहिला. मलाही आयुर्वेद शिकवा, असे मी त्या मुनीला सांगितले. पण त्याने त्या गोष्टीला नकार दिला. तेव्हा मी गुप्त रूपाने तिथे राहिलो आणि आठ महिन्यांत सारे ज्ञान मिळवले. नंतर त्या मुनीला मी हे सर्व सांगितले. तेव्हा तो रागावला आणि त्याने मला तू राक्षस होशील, असा शाप दिला. मग मी त्याच्या पाया पडलो. तेव्हा त्याने शापातून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला. आणि त्याप्रमाणे मी आज मुक्त झालो आहे. तुझ्या या उपकाराबद्दल मी माझी कन्या मनोरमा तुला देतो. तिचा तू स्वीकार कर.'

त्यानंतर इंदीवराक्षाने स्वरोचीला आयुर्वेद शिकविला. मग स्वरोची व मनोरमा यांचा विवाह झाला. स्वरोचीने पुढे तिच्या मैत्रिणींचा क्षय बरा केला आणि त्यांच्याशीही विवाह केला.

एक दिवस राजा शिकारीसाठी जंगलात गेला आणि त्याने एका रानडुकरावर नेम धरला. एवढचात एक हरिणी राजाजवळ आली आणि त्याला म्हणाली. 'राजा, त्या डुकराला कशाला उगीच मारतोस? त्याच्या ऐवजी मला मार.' राजाला ते ऐकून फार आश्चर्य वाटले. त्याने त्याचे कारण विचारले, तेव्हा तिने उत्तर दिले. 'परपुरुषाची अभिलाषा धरण्यापेक्षा मेलेले काय वाईट?' त्यावर राजाने म्हटले. 'तू कोणाची अभिलाषा धरलीस?' तेव्हा हरिणी म्हणाली. 'मी तुझ्यावर प्रेम करते आहे. मला तू स्पर्शसुख दे.' राजाने तसे करताच तिचे एका सुंदर तरुणीत रूपांतर झाले. ती वनदेवी होती आणि देवतांच्या इच्छेनुसार त्याच्याशी विवाह करून ती एका तेजस्वी बालकाला जन्म देणार होती. तो मुलगा पुढे मनू या नावाने प्रसिद्ध होणार होता. स्वरोचीने तिचे पाणिग्रहण केले. वनदेवीने पुढे एका पुत्राला जन्म दिला. त्याला स्वारोचिष मनू असे नाव मिळाले. त्याने विष्णूकडून अनेक वर मिळविले. त्याने अनेक वर्षे राज्य केले आणि त्याला दुसरा मनू असे म्हणू लागले.
[पंचामृत; नवनीत, डिसेंबर १९५७]

मनुष्ययज्ञ अतिथीचा आदरसत्कार करणे, म्हणजे मनुष्ययज्ञ होय. पाहा – अतिथी; पंचमहायज्ञ.

मनुस्मृती धर्मशास्त्रावरचा एक प्रमुख ग्रंथ. सर्व स्मृतींमध्ये मनुस्मृतीला विशेष प्रामाण्य आहे. वेदांच्या खालोखाल भारतीय हिंदूंचा हा अत्यंत पूज्य आणि प्रमाणभूत ग्रंथ आहे. तो आपल्या संस्कृतीचा, आचाराचा आणि व्यवहाराचा आधारस्तंभ ठरला आहे. भारताच्या ऐहिक व पारलौकिक जीवनाचे नियमन शतकानुशतके हा ग्रंथच करीत आला आहे. म्हणूनच तैत्तिरीय संहितेत म्हटले आहे, की 'यद्वै किञ्च मनुरवदत् तद् भेषजम्' = जे काही मनूने सांगितले ते (मानवजातीला) औषधासारखे (हित व पथ्यकर) आहे (२. १०.२). आजही कोटचवधी हिंदू ज्या निबंधान्वये आपले जीवन आणि व्यवहार चालवीत आहेत, ते निबंध तत्त्वतः तरी मनुस्मृतीवरच आधारलेले आहेत. मनुस्मृती हीच आजही तत्त्वतः हिंदू आचारसंहिता आहे. मूळ ते; इतर स्मृती, सदाचार व रूढी हा त्याचाच विस्तार आहे. मनुस्मृतीला एवढे प्रामाण्य का आले, हे सांगताना स्मृतिकार बृहस्पती म्हणतो –

वेदार्थोपनिबद्धत्वात्प्राधान्यं हि मनोः स्मृतेः ।
मन्वर्थविपरीता तु या स्मृतिः सा न शस्यते ।

अर्थ – वेदांच्या अर्थाचे उपनिबंधन करीत असल्याने मनूच्या स्मृतीला प्राधान्य आले आहे. मनूच्या अर्थाला विपरीत अशी जी स्मृती ती प्रशस्त नव्हे.

पुराणकारांच्या मताप्रमाणे मनू हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र व धर्मशास्त्राचा आदिप्रणेता आहे. ब्रह्मदेवाने सृष्टिनिर्मितीच्या प्रसंगी मनूला धर्मशास्त्रविषयक सांगोपांग ज्ञान दिले. मनूने लोककल्याणाच्या उद्देशाने त्या ज्ञानावरून एक धर्मशास्त्र निर्माण केले व ते मरीच्यादी ऋषींना दिले. हे धर्मशास्त्र वरील ऋषींकडून भृगूने मिळविले व ते समकालीन मुनींना उपदेशिले.

वरील कथेत इतिहासाचा धागा दिसतो, तो असा – मनूचे धर्मशास्त्र प्रारंभी गुरु-शिष्यपरंपरेने ऋषिमुनींच्या मध्ये चालू होते. मनूच्या त्या उपदेशांचे संकलन सर्वप्रथम भृगूने केले. तेच पुढे मनुस्मृती या नावाने लोकप्रसिद्ध झाले. पुढे देश, काल आणि परिस्थिती यांना अनुसरून आणि तत्कालीन समाजाच्या गरजा लक्षात घेऊन मनूच्या या धर्मशास्त्रात वेळोवेळी संशोधन आणि परिवर्तन होत राहिले. अशा प्रकारे मानवधर्मशास्त्राची अनेक संस्करणे झाली. सांप्रतची मनुस्मृती ही अशा अनेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संस्करणांपैकी एक आहे, असे काही विद्वानांचे मत आहे.

सांप्रतच्या मनुस्मृतीचे १२ अध्याय असून, श्लोकसंख्या २६८४ आहे. प्रस्तुत ग्रंथात आलेल्या विषयांचे दिग्दर्शन पुढीलप्रमाणे –

अ. १ ला – ब्रह्मदेवाची उत्पत्ती. स्वर्ग, भूमी, इ. सृष्टी. महदादी क्रमानें जगाची उत्पत्ती. स्थूल-सूक्ष्मादिकांची उत्पत्ती. ब्राह्मणादी वर्णांची सृष्टी; तसेच स्त्री-पुरुषसृष्टी. याविषयी मनू म्हणतो (१.३२) –

द्विधा कृत्वात्मनो देहमर्धेन पुरुषोऽभवत् ।
अर्धेन नारी तस्यां स विराजमसृजत्प्रभुः ।।

अर्थ – ब्रह्म्याने निजदेहाचे दोन भाग केले. तो अर्ध्याने पुरुष व अर्ध्याने स्त्री झाला. नंतर त्याने मैथुन धर्माने स्त्रीच्या ठिकाणी विराटसंज्ञक विश्वाची उत्पत्ती केली.

पुढे मन्वंतर-कथन, चतुर्युगप्रमाण, आयुःप्रमाण, चारही वर्णांची कर्मे, इत्यादी.

अ. २ रा – धर्माचे सामान्य लक्षण. हे चतुर्विध आहे, असे सांगताना मनू म्हणतो (२.१२) –

वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ।।

अर्थ – वेद, स्मृती, सज्जनांचा आचार आणि स्वतःच्या आत्म्याचा संतोष हे धर्माचे चतुर्विध असे साक्षात लक्षण सांगितले आहे.

ब्रह्मावर्त हा देश धर्मानुष्ठानाला योग्य होय, असे सांगून मनू म्हणतो (२.२०) –

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ।।

अर्थ – या ब्रह्मावर्त देशात जन्मलेल्या ब्राह्मणाकडून पृथ्वीवरच्या सर्व मानवांनी आपला आचार शिकून घ्यावा.

त्यापुढे गर्भाधानादी संस्कार, वेदाध्ययनविधी, प्रणवप्रशंसा, आचार्य, उपाध्याय, गुरु, ऋत्विज व अध्यापक यांची प्रशंसा, वाणी व मन यांचा संयम. याविषयी मनू म्हणतो (२.१६०)–

यस्य वाङ्मनसी शुद्धे सम्यग्गुप्ते च सर्वदा ।
स वै सर्वमवाप्नोति वेदान्तोपगतं फलम् ।।

अर्थ – ज्या मनुष्याची वाणी व मन ही शुद्ध आहेत आणि निषिद्ध विषयांत ती प्रवेश करणार नाहीत, अशा प्रकारे सार्वकाल सुरक्षित आहेत, त्याला वेदान्तात सांगितलेली, सर्वज्ञत्व, सर्वेशित्व, इ. सर्व फले प्राप्त होतात.

त्यापुढे गुरुशुश्रूषा, त्रिवर्ग, मातृ-पितृसेवा इत्यादी.

अ. ३ रा – गृहस्थाश्रम, कन्यालक्षण, सवर्ण स्त्री प्रशस्त, हीनजातिविवाहनिषेध, अष्टविध विवाहप्रकार, कन्याविक्रय-दोष, सालंकृतकन्यादान, गृहस्थाचे पंचमहायज्ञ, गृहस्थाश्रम-प्रशंसा, नित्यश्राद्ध, आतिथ्य, पितृप्रशंसा, इत्यादी.

अ. ४ था – जीवनोपाय, संतोषप्रशंसा, सोमादियाग, दिनकृत्ये, स्वाध्याय, अनध्याय, आत्मावमाननिषेध. याविषयी मनू म्हणतो (४.१३७)–

नात्मानमवमन्येत पूर्वाभिरसमृद्धिभिः ।
आमृत्योः श्रियमन्विच्छेन्नैनां मन्येत दुर्लभाम् ।।

अर्थ – प्रथम समृद्धीच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करूनही तिची प्राप्ती झाली नाही तर 'मी दुर्भागीच आहे' असा आत्म्याचा अवमान करू नये; तर आमरण ऐश्वर्यसिद्धीसाठी प्रयत्न करीत राहावे आणि लक्ष्मी दुर्लभ आहे, असे कधी मानू नये.

पुढे आचारप्रशंसा, पराधीन कर्माचा त्याग, सुखदुःखलक्षण. हे सांगताना मनू म्हणतो (४.१६०)–

सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ।
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ।।

अर्थ – जे जे पराधीन ते ते दुःख व जे जे स्वाधीन ते ते सुख होय. संक्षेपात सुख-दुःखांचे हे लक्षण मानावे.

सुखप्राप्तीविषयी मनू म्हणतो (४.७०)–

अधार्मिको नरो यो हि यस्य चाप्यनृतं धनम् ।
हिंसारतश्च यो नित्यं नेहासौ सुखमेधते ।।

अर्थ– जो मनुष्य अधर्माने व्यवहार करतो, ज्याचे धन खोटेपणातून मिळविलेले असते आणि जो सदैव या ना त्या प्रकारे हिंसा करण्यात आनंद मानतो, अशा पुरुषाला इहलोकी कधीही सुख लागणार नाही.

पुढे अभोज्य अन्नदानादींचे फल, भिक्षाविचार, इत्यादी.

अ. ५ वा – मांसाविषयी भक्ष्याभक्ष, सापिंड्य, आशौचविचार, द्वादश मल, स्त्रीधर्म, पातिव्रत्य, इत्यादी.

अ. ६ वा – वानप्रस्थ, फलमूलांनी पंचयज्ञ, अतिथिचर्या, परिव्राजक व त्याचे नियम, ध्यानयोग, मोक्षसाधक कर्मे, दशलक्षण-धर्म, इत्यादी.

अ. ७ वा – राजधर्म, राजप्रशंसा, दंडप्रशंसा, राजकृत्ये, सचिव, दौत्य, सेनापत्य, दुर्ग, पुरोहित, करग्रहण, संधि-विग्रहादि-कर्तव्ये, शत्रू, मित्र व उदासीन यांचे गुण इत्यादी.

अ. ८ वा – व्यवहार, १८ प्रकारचे विवाद, साक्षीदार, सत्य-प्रशंसा, असत्यकथनदोष, शपथ, सीमाविवाद, वाक्पारुष्यदंड, विक्रेय वस्तूंचा व्यवहार, १७ प्रकारचे दास, आय-व्ययनिरीक्षण इत्यादी.

अ. ९ वा – स्त्रीरक्षण, स्त्रीस्वभाव, स्त्रीप्रशंसा, स्त्रीधर्म, नियोगनिंदा, वधू-वरांचे वय, दायभाग, स्त्रीधन, अविभक्त अर्जित धन, विविध अपराधांसाठी विविध दंड व ब्रह्मक्षत्रांचे परस्पर सहकार्य. यांविषयी मनू म्हणतो (९.३२२)–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाब्रह्म क्षत्रमृध्नोति नाक्षत्रं ब्रह्म वर्धते ।
ब्रह्मक्षत्रं च सम्पृक्तमिह चामुत्र वर्धते ।।

अर्थ – ब्रह्मविरहित क्षत्र वृद्धी पावत नाही. क्षत्रविरहित ब्रह्महो वाढत नाही. ब्रह्म-क्षत्र (ब्राह्मण-क्षत्रिय) परस्पर संबद्ध होतात, तेव्हा ते इहलोकी आणि परलोकी वृद्धी पावतात.

अ. १० वा – वर्णसंकर, व्रात्य, दस्यू, चंडाल, त्रैवर्णिकांची कर्तव्ये, आपद्धर्म, परधर्माने जीविका चालविण्याचा निषेध, सात धनागम, दहा जीवनहेतू, राजांचे आपद्धर्म, शूद्राचे आपद्धर्म, इत्यादी.

अ. ११ वा – स्नातकाचे प्रकार, सोमयागाचे अधिकारी, देवा-ब्राह्मणांचे वित्तहरण, प्रायश्चित्तकरण, पंचमहापातके, सुरापान-प्रायश्चित्त, विविध प्रायश्चित्ते, पतितसंसर्ग, प्राजापत्यादी व्रते, पापाविषयी पश्चात्ताप, इत्यादी.

अ. १२ वा – शुभाशुभ कर्मांचे फल, त्रिविध मानस कर्मे, चतुर्विध वाचिक कर्मे, त्रिविध शारीर कर्मे, क्षेत्रज्ञ, जीवात्मा, त्रिगुण-लक्षणे, मोक्षोपाय सहा कर्मे. ती अशी (१२.८३)–

वेदाभ्यासस्तपो ज्ञानमिन्द्रियाणां च संयमः ।
अहिंसा गुरुसेवा च निःश्रेयसकरं परम् ।।

अर्थ – वेदाभ्यास, तप, ज्ञान, इंद्रियनिग्रह, अहिंसा व गुरुसेवा ही सहा श्रेष्ठ मोक्षसाधने होत.

पुढे प्रत्यक्षादी प्रमाणे, धर्मज्ञलक्षणे, शिष्टलक्षणे, इ. सांगून ग्रंथाचा उपसंहार करताना मनू म्हणतो (१२.११८–११९)–

सर्वमात्मनि संपश्येत्सच्चासच्च समाहितः ।
सर्वं ह्यात्मनि संपश्यन्नाधर्मे कुरुते मनः ।।
आत्मैव देवताः सर्वाः सर्वमात्मन्यवस्थितम् ।
आत्मा हि जनयत्येषां कर्मयोगं शरीरिणाम् ।।

अर्थ– मनुष्याने समाहित होऊन सद्भाव आणि असद्भाव हे सर्व आत्म्याच्या ठिकाणी पाहावे. हे सर्व आत्म्याचे ठिकाणी आहे असा ज्याला ध्यानयोगाने साक्षात्कार होतो, त्याचे मन अधर्माकडे झुकणार नाही. इंद्रादी सर्व देवता परमात्मरूपच आहेत. हे सर्व जगत आत्म्याच्या ठिकाणी अवस्थित आहे. हा आत्माच या शरीरधारी मनुष्यांचा कर्मसंबंध उत्पन्न करतो.

सर्व धर्म हे मनुष्याच्या मोक्षासाठी आहेत. सर्वत्र परमात्मदर्शन हे धर्माचे ध्येय आहे (१२.१२५) –

एवं यः सर्वभूतेषु पश्यत्यात्मानमात्मना ।
स सर्वसमतामेत्य ब्रह्माभ्येति परं पदम् ।।

अर्थ – अशा प्रकारे जो मनुष्य सर्व भूतांच्या ठिकाणी आत्म्याला आत्म्याच्या योगाने पाहतो, तो सर्वत्र समतेचा अनुभव घेऊन परमपद अशा ब्रह्माला प्राप्त होतो, म्हणजेच मुक्त होतो.

मनूचे राजनैतिक विचार – मनूला राज्याच्या अवयवनिष्ठ स्वरूपाविषयी आस्था आहे. त्याने प्रतिपादिलेले राज्य सप्तांग आहे. स्वामी, अमात्य, पुर, राष्ट्र, कोश, दंड आणि सुहृद ही ती सात अंगे होत. मनूने यांना प्रकृती म्हटले आहे. राज्याची ही सात अंगे परस्पर सहकार्याने राज्याला स्थिर राखतात (९.२९६). यांमध्ये कोणतेही अंग छोटे किंवा मोठे नाही.

राज्याच्या उत्पत्तीचे अनेक सिद्धान्त आहेत, पण मनू त्याची दैवी उत्पत्ती मानतो. तो राजतंत्रवादी आहे. राजा हा इंद्र, वायू, यम, सूर्य, अग्नी, वरुण, चंद्र व कुबेर या देवतांचा अंशभूत आहे (७.४): तो दंडाचे प्रतीक आहे. प्राणिमात्राच्या संरक्षणासाठी तो निर्माण झाल्यामुळे त्याचे पद परम पावन आहे. म्हणून राजा तरुण असो वा बालक असो; त्याचा प्रजेने कधीही अनादर करता कामा नये. प्रजेने राजाला आदर्श मानावे आणि त्याच्या आज्ञेत वागावे, असे मनू सांगतो. मात्र असे सांगताना राजाला विधिविरुद्ध वागण्याचा काहीही अधिकार नाही, असेही त्याने सांगितले आहे. राजाने धर्माला अनुसरूनच दंडादी कार्ये केली पाहिजेत. कारण राज्यात पहिले स्थान धर्माचे व त्याच्या नंतर राजाचे, असे त्याने सांगितले आहे.

मनूने दंडाची बरीच तरफदारी केली आहे. मनुष्याच्या स्वभावात दैवी व आसुरी असे दोन्ही अंश असतात. दैवी अंश कल्याणकारक आणि आसुरी अंश विनाशकारक असतो. आसुरी वृत्ती वाढल्याने मनुष्य विकारी बनतो आणि धर्माचरणाच्या बाबतीत त्याच्या हातून प्रमाद घडू लागतात. अशा वेळी त्याला धर्मपालनाविषयी बाध्य करण्यासाठी राजाने दंडाचा प्रयोग करायचा असतो. दंड हा प्राणिमात्राचा रक्षक, ब्रह्मतेजोमय, धर्मपुत्र व ईश्वरनिर्मित आहे (७.१४). दंडाचा अभाव असेल, तर लोक सर्रास दुष्टाचरण करू लागतील आणि समाजातल्या साऱ्या मर्यादा नष्ट होतील.

मात्र या दंडाचा प्रयोग विचारपूर्वक झाला पाहिजे. अपराध्याला त्याच्या अपराधाच्या प्रमाणातच दंड मिळायला हवा. याउलट झाल्यास समाजात राजाविषयी असंतोष उत्पन्न होईल व तो शांती आणि सुरक्षा यांचा नाश करील.

राजाही उच्छृंखल किंवा स्वेच्छाचारी बनू शकतो. त्याला आणि त्याच्या धर्मविरुद्ध आचरणाला लगाम बसावा आणि राज्य व्यवस्थित चालावे, यासाठी मनूने, राजाला मंत्रिपरिषद असली पाहिजे, असे सांगितले आहे. राज्यातली कार्ये व्यापक, मोठी, आणि बहुरूप असल्यामुळे एकट्या राजाला ती निभावून नेणे अशक्य आहे. त्यासाठी त्याला वेळोवेळी सल्ला–मसलतीची गरज लागेल. वेगवेगळी राजकारणे त्या त्या योग्य आणि अधिकारी व्यक्तीकडूनच त्याने साधून घ्यायची असतात. या मंत्रिपरिषदेत सात किंवा आठ मंत्री असावे. त्यांतला एक विशिष्ट गुणांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुरुष मुख्यमंत्री असावा. प्रत्येक मंत्र्याचा बौद्धिक, मानसिक आणि आत्मिक स्तर सामान्य मनुष्याहून बराच उच्च असावा. मंत्रिमंडळात घेण्यापूर्वी राजाने त्यांची विविध अंगांनी परीक्षा घ्यावी. मंत्र्यांच्या अनेक गुणांत शौर्य हा गुण अवश्य असावा. सामान्य व्यक्ती संकटकाळ उपस्थित झाल्यास किंकर्तव्यविमूढ होते आणि हातपाय गाळून बसते. जो पुरुष शौर्यसंपन्न असतो, तो अशा परिस्थितीत न घाबरता दृढ राहतो आणि संकटातून तरून जाण्याचा मार्ग शोधून काढतो (७.५४). मंत्री कसे असावे आणि राजाने त्यांच्याशी सल्लामसलत कशी करावी, याविषयी मनूचे पुढील चार श्लोक महत्त्वाचे आहेत. (७.५४–५७)

मौलाञ्छास्त्रविदः शूराँल्लब्धलक्षान्कुलोद्‌भवान् ।
सचिवान्सप्त चाष्टौ वा प्रकुर्वीत परीक्षितान् ॥
अपि यत्सुकरं कर्म तदप्येकेन दुष्करम् ।
विशेषतोऽसहायेन किं नु राज्यं महोदयम् ॥
तैः सार्धं चिन्तयेन्नित्यं सामान्यं संधिविग्रहम् ।
स्थानं समुदयं गुप्तिं लब्धप्रशमनानि च ॥
तेषां स्वं स्वमभिप्रायमुपलभ्य पृथक् पृथक् ।
समस्तानां च कार्येषु विदध्याद्धितमात्मनः ॥

अर्थ – परंपरेने सेवक असलेले, शास्त्रवेत्ते, शूर, शस्त्रवेत्ते व कुलीन अशा सात किंवा आठ पुरुषांची योग्य परीक्षा करून त्यांना मंत्री करावे. एखादी सुकर गोष्टही एकट्या माणसाला दुष्कर ठरते. मग महाफल देणारे राज्य, मंत्री साहाय्यक नसताना राजा कसे चालवू शकेल ? म्हणून त्यांच्याशी संधी, विग्रह पुर-राष्ट्रात्मक स्थान, राज्याची संपत्ती वाढविण्याचे उपाय, राष्ट्राचे व स्वतःचे संरक्षण व उपलब्ध झालेल्या धनाचा सत्पात्री आणि सत्कार्यी विनियोग याविषयी राजाने मंत्र्यांशी नित्य विचारविनिमय करावा. त्यांपैकी एकेकाला एकांती बोलावून त्यांचा पृथक पृथक अभिप्रायही जाणून घ्यावा.

मनूने राज्यातील न्यायव्यवस्थेविषयीही लिहिले आहे. न्यायालयात चालणाऱ्या विवादांच्या कार्याला मनू व्यवहार म्हणतो. हा व्यवहार अठरा विषयांसंबंधी असतो, असे त्याने सांगितले आहे. हे अठरा विषय असे –

(१) ऋण घेऊन ते परत न करणे किंवा ऋण न देता त्याची मागणी करणे, (२) ठेव, (३) मालकी नसताना एखाद्या वस्तूचा विक्रय, (४) भागीदारीतला व्यापार व व्यवहार, (५) दिलेले दान परत घेणे, (६) ठरलेले वेतन न देणे, (७) प्रतिज्ञाभंग, (८) क्रयविक्रयविषयक विवाद, (९) पशुविषयक विवाद, (१०) सीमाविवाद, (११) कठोरवचन, (१२) मारपीट, (१३) चोरी, (१४) दरोडा, (१५) परस्त्रीचा अपहार, (१६) स्त्रीपुरुषधर्म, (१७) दायभाग, व (१८) धन (८.४–७).

मनूच्या मताप्रमाणे राज्यातले सर्वांत मोठे न्यायालय म्हणजे धर्मसभा होय. राजाने या धर्मसभेत बसावे आणि विद्वान ब्राह्मण व न्यायकुशल असे मंत्री यांच्या विचाराने विवादग्रस्त विषयांचा निर्णय द्यावा. राजा जेव्हा न्यायाधीशाच्या जागी बसतो, त्या वेळी त्याला धर्माध्यक्ष म्हणावे. या धर्मसभेत प्राड्‌विवाक नावाचा एक अधिकारी असावा. वादी, प्रतिवादी आणि साक्षी यांचे प्रस्तुत वादातले मत त्याने योग्य प्रकारे जाणून घ्यावे. तसेच त्यातले खरेखोटेपणही समजावून घ्यावे.

एखाद्या विवादग्रस्त विषयाचा निर्णय करण्याच्या कामी तीन प्रमाणे अत्यावश्यक समजावी. लेख, साक्ष्य व भोग ही तीन प्रमाणे होत. पहिले महत्त्व लेखाला, दुसरे साक्षीला आणि तिसरे वस्तू कबजात असण्याला. विवादग्रस्त घटना ज्याने समक्ष पाहिली आहे किंवा स्वतःच्या कानाने ऐकली आहे, अशा व्यक्तीचे साक्ष्य महत्त्वाचे होय (८.७–४). साक्षीदाराच्या पात्रापात्रतेसंबंधी मनूने अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. मित्र, सेवक, शत्रू, रोगी, महापातकी, खोटी साक्ष देणारा अशी ज्याची प्रसिद्धी आहे असा मनुष्य, नट, ब्रह्मचारी, संन्यासी, मद्यपी, वेडा, इ. अनेक व्यक्तींना मनूने साक्ष देण्यास अपात्र ठरविले आहे. खोटी साक्ष देणाऱ्याला दंड करावा, असेही मनूने सांगितले आहे (८.११९–१२३).

माणसाच्या अपराधानुसार त्याला द्यायच्या दंडाचे अनेक प्रकार मनूने सांगितले आहेत. वाग्दंड, धिग्दंड, धनदंड, कायदंड, वधदंड, जातिबहिष्कारदंड, प्रायश्चित्तदंड, निर्वासनदंड, इ. त्यांची नावे आहेत. मनूने दंडाची पुढील दहा स्थाने सांगितली आहेत– लिंग, उदर, जिव्हा, हात, पाय, डोळे, नाक, कान, धन व देह. अपराधाची लघुता किंवा गुरुता विचारात घेऊन त्याला अनुरूप असा दंड करावा. अधर्म दंड कधीही करू नये. दंडयोग्य व्यक्तींना शासन न करणे आणि निरपराधी व्यक्तींना दंड करणे, या गोष्टींनी राजाची अपकीर्ती होते व त्याला नरकात जावे लागते (८.१२८).

राज्य चालविणे हे एक महान कार्य असते. त्यासाठी विपुल धनाची आवश्यकता असते, म्हणून राजाने आपला खजिना वाढवावा. त्यासाठी प्रजेकडून कर घ्यावा. राजाने प्रजेकडून कर अशा प्रकारे वसूल करावा, की जो देताना प्रजेला क्लेश होणार नाहीत. पशुपालकांकडून त्यांच्या लाभाचा पन्नासावा भाग कर म्हणून घ्यावा. श्रमजीवी आणि कारागीर यांच्याकडून महिन्यातून एक दिवस विनावेतन काम करून घ्यावे. क्रयविक्रयाच्या स्थानातून आणि विक्रेत्यांकडून कर वसूल करावा. व्यापाऱ्यांना होणाऱ्या लाभावरही कर घ्यावा. कररूप धनाचा उपयोग प्रजेच्या हितासाठीच करावा. मनू म्हणतो (८.३०७)–

योऽरक्षन्बलिमादत्ते करं शुल्कं च पार्थिवः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रीतिभागं च दण्डं च स सद्यो नरकं व्रजेत् ।।

अर्थ – जो राजा प्रजेचे रक्षण न करता केवळ (स्वतःच्या चैनीसाठी) कर, शुल्क, उपायन आणि दंड या रूपांनी द्रव्य जमवतो, तो तावडतोब नरकाला जातो.

राजकीय व सामाजिक परिस्थिती – मनुस्मृती ही बुद्धयुगानंतरची रचना आहे. यासंबंधीच्या सूचना पुढील उल्लेखांतून मिळतात – कंबोज, यवन, शक, पारद, पल्हव, चीन, किरात, दरद, खश, औड्र आणि द्रविड या ऐतिहासिक जातींना मनूने पतित क्षत्रिय म्हटले आहे (१०.४४). शूद्र राजांचे अस्तित्व सांगून ते शास्त्रमर्यादेचे उल्लंघन करतात, असे सांगितले आहे (४.६१ ८७). त्या काळी स्त्रिया श्रमणी किंवा भिक्षुणी होऊ लागल्या होत्या. बौद्ध लोक वेद व देवता यांची निंदा करीत होते. चैत्यवृक्षावर भूत, यक्ष, इत्यादींचा निवास मानला जात होता. वेदबाह्य स्मृती व दार्शनिक मते प्रचलित झाली होती.

मनूने स्वराष्ट्र, परराष्ट्र, मित्रराष्ट्र, शत्रुराष्ट्र, व मंडलराष्ट्र यांचा उल्लेख केला आहे. यांमधली काही राष्ट्रे परस्परांशी मैत्रीने बांधलेली असत. काही उदासीन किंवा तटस्थ व काही विजिगीषू असत (९.३१२). यावरून मनूने ज्या आर्यावर्तचे चित्र रेखाटले आहे, तो आर्यावर्त अनेक जनपदांमध्ये विभागला होता आणि तो राजकीय दृष्ट्या एकछत्री नव्हता, हे कळते. सामंतसंस्था अस्तित्वात होती आणि हे सामंत राजाला साहाय्य देत असत (९.२७२). गाव हा सर्वांत लहान घटक होता. गावाच्या प्रबंधकाला ग्रामणी म्हणत. दहा गावांच्या समूहांवर अधिकार गाजविणाऱ्याला दशी, वीस गावांवर अधिकार गाजविणाऱ्याला विंशी, शंभर गावांवर अधिकार चालविणाऱ्याला शतेश आणि हजार गावांवर प्रशासन करणाऱ्याला सहस्रेश म्हणत. या सर्व अधिकाऱ्यांना नगद वेतन दिले जात नसे, तर वृत्ती दिली जात असे. ग्रामणीला अन्नपाणी, शाकभाजी आणि जळण एवढे मिळे. दशीला एका कुटुंबाचे पोषण होईल एवढी भूमी, विंशीला पाच कुटुंबांना पुरेशी जमीन, शतेशाला पुऱ्या गावाचा वसूल व सहस्रेशाला एका नगराचा पुरा वसूल मिळे (७.११९).

नगरशासन विशेष अधिकाऱ्यांच्या अधीन असे (७.१२१). अशा अधिकाऱ्यांना रक्षिपुरुष, गुप्तचर व विषयपती अशी नावे होती. मोठ्या नगरात सभेची जागा, पाणपोई, भोजनालय, पानगृह, नाट्यगृह, कारागिरांचे निवासस्थान, कोष्ठागार, आयुधागार, इ. संस्था असत. गावाचे शासन ग्रामसंस्था करीत.

राजाला सर्वाधिकार प्राप्त असले, तरी प्रजेला राज्यांतर्गत स्वायत्त शासन चालविण्याचे स्वातंत्र्य असे. प्रजा आपल्या संघसंस्थांच्या द्वारे स्वतःसाठी नियम बनवू शकत असे. राज्यात कुल, जाती, श्रेणी व जनपद अशा प्रकारच्या स्वायत्त संस्था असत. धर्मविषयक निर्णय करण्यासाठी शिष्टांची एक परिषद असे. परिषदेत तीन वेदांचे तीन, तीन आश्रमांचे तीन, एक तार्किक, एक मीमांसक, एक नैरुक्त व एक धर्मपाठक असे सभासद असत. समाजातला पहिला भेद आर्य व अनार्य असा होता (१०.६६–६७). अनार्यांना दस्यू आणि म्लेच्छ म्हणत. दस्यू शब्द चंडाल, श्वपाक व इतर तत्सम जातींना लागू होता. अशा जातींना रात्री गावात यायला बंदी होती. दिवसा आले, तरी त्यांना आपल्या जातीचे चिन्ह धारण करून यावे लागे. त्यांना संपत्ती बाळगण्याचा अधिकार नव्हता. न्यायालयात त्यांची साक्ष मानली जात नसे (८.६६; ११.१८).

मनूच्या काळी चातुर्वर्ण्य प्रतिष्ठित झाले होते. व्यभिचार, असवर्ण किंवा निषिद्ध विवाह व जातीय कर्मांचे उल्लंघन यांमुळे काही मिश्र जाती निर्माण झाल्या होत्या (१०.२४). या जातींमधल्या आंतरजातीय विवाहांमुळे अनेक संकर जातीही बनल्या होत्या. एक सर्वसामान्यपणे नियम असा होता, की आर्य पुरुषापासून अनार्य स्त्रीच्या ठिकाणी होणारी संतती गुणकर्मानुसार आर्य समजली जाई (१०.६७). कारू-नारू हे शूद्र समजले जात; पण जन्मजात शूद्रांपेक्षा त्यांचे स्थान उच्च समजले जाई. सामाजिक जीवन वर्णाश्रमाधिष्ठित असे. ब्राह्मणांचे स्थान सर्वांत उच्च होते (१.१००); पण ते धनसंपत्तीवर आधारलेले नसून, चरित्र, तप, सर्व भूतांच्या ठिकाणी मैत्रीभाव, ब्रह्मज्ञानाविषयी निष्ठा, इ. गुणांवर अवलंबून असे. ब्राह्मणाला वधदंड दिला जात नसे. भोजन व प्रतिग्रह यांविषयीच्या नियमांचे उल्लंघन करणारा, निंदित कर्म करणारा, निषिद्ध व्यवसाय चालविणारा आणि केवळ जातिब्राह्मण हा पतित मानला जाई. क्षत्रियाला शस्त्राभ्यास व सैनिकी पेशा आवश्यक मानला जाई. वैश्याला समुद्रयात्रेची अनुज्ञा असे. त्रैवर्णिकांची सेवा हे शूद्राच्या उपजीविकेचे साधन असे. त्याला संस्कारांचा आणि धर्मग्रंथांच्या अध्ययनाचा अधिकार नसे; मात्र तरीही काही शूद्र व्याकरणादी शास्त्रे शिकत आणि काही शूद्र गुरू ती शिकवीत, असेही मनुस्मृतीवरून कळून येते (३.१५६).

दाससंस्था अस्तित्वात होती. सात प्रकारचे दास मनूने सांगितले आहेत. स्त्रीला वेदाध्ययनाचा अधिकार नव्हता. तिला स्वातंत्र्यही नव्हते. कायद्याच्या दृष्टीने तिला स्त्रीधनाव्यतिरिक्त पतीच्या संपत्तीत वारसाहक्क मिळत नसे. गृहसंस्था चालविणे हे तिचे कर्तव्य मानले जाई.

काल – मनुस्मृतीचा काल कोणता असावा, हे निश्चितपणे सांगणे अवघड आहे. त्यासंबंधी जी बाह्य व आंतर प्रमाणे उपलब्ध होतात, त्यांवरून सांप्रतची भृगुप्रोक्त मनुस्मृती सन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूर्व २ रे शतक आणि इ. स. चे २ रे शतक यांमधल्या काळात केव्हातरी निर्माण झाली असावी, असे विद्वानांनी ठरवले आहे.

ज्या मूळच्या ग्रंथावरून सांप्रतची मनुस्मृती तयार झाली, तो मूळ ग्रंथ कोणत्या काळात तयार झाला हे ठरवणे फार अवघड आहे. या प्रश्नांचा संबंध महाभारत व मनुस्मृती यांच्या परस्परसंबंधाशी निगडित आहे व तो संबंध फार गुंतागुंतीचा आहे. श्री. मंडलिक यांचे मत असे, की मनुस्मृतीने महाभारताकडून उसनवारी केली आहे. याउलट श्री. बुल्हर म्हणतो, की महाभारताची शांती व अनुशासन ही पर्वे रचणाऱ्याला मानवधर्मशास्त्र माहीत असले पाहिजे. श्री. हॉपकिन्स याचेही मत असेच आहे. तो म्हणतो, की अनुशासनपर्व रचणाऱ्याला सांप्रतची मनुस्मृतीच ज्ञात असली पाहिजे. महाभारताच्या बहुतेक सर्व पर्वांमध्ये 'मनुरब्रवीत्, मनोः राजधर्माः, मनोः शास्त्रम्' इ. शब्दप्रयोग आलेले असून, मनुस्मृतीतले उतारेही आले आहेत. बुल्हरने वन, शांती व अनुशासन या तीन पर्वांत मनुस्मृतीतले संपूर्ण किंवा अंशतः २६० श्लोक असल्याचे सांगितले आहे.

मनुस्मृती व महाभारत यांच्या संबंधाबाबत म. म. काणे यांनी मत व्यक्त केले आहे, ते असे– सनपूर्व चौथ्या शतकाच्या फार पूर्वी स्वायंभुव मनुकृत एक धर्मशास्त्राचा ग्रंथ अस्तित्वात होता. हा ग्रंथ बहुधा श्लोकबद्ध असावा. तसेच प्राचेतस मनूचा राजधर्म नावाचा एक ग्रंथ असावा व तोही सन पूर्व चौथ्या शतकाच्या पूर्वीचा असावा. कदाचित असेही असेल, की वरीलप्रमाणे दोन निरनिराळे ग्रंथ नसून, धर्म व राजनीती या दोन्ही विषयांचा एकच विस्तृत ग्रंथ असावा. महाभारताच्या अनुशासन पर्वात एक वचन आहे, ते असे– 'प्राचेतसस्य वचनं कीर्तयन्ति पुराविदः' = पुरातत्त्ववेत्ते प्राचेतसाचे वचन प्रशंसेने सांगतात (४६·१). यास्क, गौतम, बौधायन आणि कौटिल्य यांनी मनूची मते किंवा मानवाची मते असे शब्दप्रयोग केले आहेत, ते बहुधा प्रस्तुत प्राचीन ग्रंथाविषयी असावेत आणि हा प्राचीन ग्रंथच सांप्रतच्या मनुस्मृतीचा गाभा असावा. चालू मनुस्मृतीत पूर्वीच्या ग्रंथातल्या काही भागाचा संक्षेप आणि काही भागाचा विस्तार केलेला असला पाहिजे. म्हणूनच प्राचीन मनूच्या रचनेतील कित्येक श्लोक सांप्रतच्या मनुस्मृतीत आहेत आणि कित्येक नाहीत. त्यावरून असे वाटते, की सांप्रतचे महाभारत सांप्रतच्या मनुस्मृतीनंतरचे आहे. नारद म्हणतो, की सुमतिभार्गवाने मनूचा अवाढव्य ग्रंथ ४००० श्लोकांमध्ये संक्षिप्त केला. नारदाचे हे मत काहीसे सत्य दिसते. सांप्रतच्या मनुस्मृतीत २६८४ श्लोक आहेत. नारदाने ४००० श्लोकसंख्या दिली, याचे कारण वृद्धमनू व बृहन्मनू यांच्या श्लोकांचा समावेशही त्याने त्या संख्येत केलेला असेल. विश्वरूप, मिताक्षरा, स्मृतिचंद्रिका आणि पराशरमाधवीय या ग्रंथांत वृद्धमनू व बृहन्मनू यांचे श्लोक दिलेले आहेत. प्रस्तुत दोन्ही मनूंचे स्वतंत्र ग्रंथ अद्याप उपलब्ध झालेले नाहीत. जर ते कधीकाळी उपलब्ध झाले, तर ते मनूच्या नंतरचे आहेत, असे समजून येईल.

मनुगौरव – मनूविषयी अनेक पौर्वात्य व पाश्चात्य पंडितांनी आणि विचारवंतांनी अनेक ठिकाणी गौरवून लिहिले आहे. श्री. केवल मोटवानी यांनी अलिकडेच मनुधर्मशास्त्र नावाचा एक मोठा ग्रंथ लिहिला असून, मनुस्मृतीबद्दल सर्वांगीण विवेचन केले आहे. त्यात मनुस्मृतीच्या असामान्यत्वाविषयी ते लिहितात–

मनुप्रणीत धर्मामुळे मूळच्या गोंधळ, गडबड आणि अस्ताव्यस्त स्वरूपातल्या मानवी जीवनात क्रांती झाली आणि त्या जीवनाला व्यवस्थितपणा प्राप्त झाला. मनुष्याला मूळच्या रानटी अवस्थेतून मनूनेच बाहेर काढले. त्याला नैतिक, मानसिक व आध्यामिक विकासाचा मार्ग मनूनेच प्रशस्त करून दिला. मनूच्या कायद्याचे हे वडिलार्जित धन जगातल्या प्रत्येक राष्ट्राला वारसाहक्काने प्राप्त झाले आहे. आपल्या धर्मशास्त्राच्या द्वारे मनूने प्रत्येक राष्ट्राच्या जीवनात प्रवेश केला आहे.

आधुनिक काळात विद्वान, अध्यापक, टीकाकार, कायदेपंडित, न्यायाधीश, वकील, समाजसुधारक, शिक्षणशास्त्रज्ञ, इ. अनेकांनी आपापल्या कार्यक्षेत्रात या ना त्या कारणाने मनुस्मृतीचा उपयोग केलेला आहे. अशा काही विद्वानांची मनुविषयक मते नमूद करणे आवश्यक वाटते. त्यावरून मनू व त्याचे धर्मशास्त्र यांची योग्यता समजण्यास मदत होईल.

नीत्शे हा एक जर्मन पंडित आणि तत्त्ववेत्ता होता. मनूचा त्याच्यावर विलक्षण प्रभाव आहे. मनूने त्याच्या मतांना विशिष्ट वळण लावून त्याला समाधान प्राप्त करून दिले. मानव आत्मप्रयत्नाने आपल्या दैवाचा शिल्पकार बनू शकतो, हा मनूचा विचार त्याला एकदम पटला. बायबलपासून जी स्फूर्ती त्याला मिळू शकली नाही, ती स्फूर्ती त्याला मनूकडून मिळाली. तो जाहीरपणाने प्रतिपादन करू लागला, की 'बायबल बंद करा आणि मनुस्मृती उघडा.'

एका ग्रंथात तो लिहितो – या ग्रंथात जीवनाबद्दल महान आदर्श दर्शविला आहे. प्रजोत्पादन, स्त्री, विवाह, इ. ज्या गोष्टींचा विचार ख्रिस्ती धर्म गांवढळपणे दडपून टाकतो, त्या सर्वांचे मनुस्मृतीत गंभीरपणे विवेचन करण्यात आले आहे. मला तर मनूच्या ग्रंथावाचून दुसरा ग्रंथच माहीत नाही, की ज्यात स्त्रीविषयी प्रेमपूर्ण व दाक्षिण्ययुक्त अशी इतकी विपुल वचने सापडतील.

मॉरिस मेटरलिंक हा बेल्जिअन पंडित आपल्या 'दि ग्रेट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्रीकेट ' या ग्रंथात लिहितो – मनूच्या नीतिशास्त्राच्या संबंधात आश्चर्याची गोष्ट ही आहे, की त्याने प्रतिपादलेले नीतिनियम आध्यात्मिक स्वरूपाचे आहेत. या नियमांच्या पालनाला बक्षीस आणि उल्लंघनाला शिक्षा स्वतःच्या अंतःकरणातच मिळते. देहत्यागानंतर जीवात्म्याचा न्याय करणारा कोणी न्यायाधीश नाही. त्याचा स्वतःचा आत्मा हाच त्याचा न्यायाधीश, स्वर्ग किंवा नरक असतो. सुख किंवा दुःख हे स्वनिर्मित असते. आत्म्याला संतोष देणारा किंवा भीती दाखविणारा ईश्वर म्हणून कोणी निराळा नाही.

ऑस्पेन्स्की नावाचा एक अलिकडील पाश्चात्य पंडित ' अ न्यू मॉडेल ऑफ् दि युनिव्हर्स ' या ग्रंथात मनूच्या श्रेष्ठ विचारशक्तीबद्दल लिहिताना म्हणतो – मनूचे विवाहविषयक नियम फार महत्त्वाचे आहेत. ज्या जातींचे स्वभावधर्म मूलतःच भिन्न आहेत, अशा जातींच्या वधू-वरांचे मिश्र विवाह झाल्यास त्यांचे बरेवाईट काय परिणाम होतात, ते मनूने निःसंदिग्धपणे सांगितलेले आहेत. विवाह तुल्यगुणी वधू-वरांचा झाला पाहिजे. असमान गुणाच्या वधू-वरांचा संयोग झाल्यास त्या दांपत्याची उन्नती न होता अवनतीच होते व त्यांची संतती निकृष्ट दर्जाची निपजते. अशा मिश्र विवाहाचे दुष्परिणाम विशेषतः स्त्रियांना व त्यांच्या संततीला भोगावे लागतात.

परदेशात मनुस्मृती – भारताच्या आग्नेय दिशेकडील बेटांमध्ये मनुस्मृतीचा प्रचार झाला होता, असे कळते. कंबोज येथील एका शिलालेखात मनुस्मृतीचे दोन श्लोक कोरलेले आहेत. ब्रह्मी लोकांचा राज्यकारभार मनुप्रणीत धर्मशास्त्राप्रमाणेच चालत असे. यवद्वीपातील लोक मनुस्मृतीवर आधारलेला कायदेविषयक ग्रंथ स्वीकारून राज्यकारभार करीत असत. बलिद्वीपामध्ये अद्यापही तोच कायदेग्रंथ प्रचलित आहे.

मनूचे टीकाकार – मेधातिथी, गोविंदराज, कुल्लूक, नारायण, राघवानंद, नंदन, रामचंद्र, असहाय भागुरी, भोजदेव आणि धरणीधर हे मनुस्मृतीचे टीकाकार होत. [हि. ध.; म. ध. शा.; भा. रा. प्र.; हिंदुत्व; स. सं.; प्रा. भा. सा. सां. भू.]

मनू वैवस्वत

एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील २७ ते ३१ पर्यंतची सूक्ते याच्या नावावर आहेत. विश्वेदेवस्तुती हा या सर्व सूक्तांचा विषय आहे. नमुन्याची एक ऋचा (८.२७.१६) अशी –

प्र स क्षयं तिरते वि महीरिषो यो वो वराय दाशति ।
प्र प्रजाभिर्जायते धर्मणस्पर्यरिष्टः सर्व एधते ।

अर्थ – हे संपत्तिदात्या, हविर्दत्त मरुतादी देवांनो, सदाचारी भक्तांच्या गृहसंपत्तीचा उत्कर्ष करून तुम्ही त्याला अन्न आणि संरक्षण प्रदान करता.

या सूक्तांमधील एकोणतिसावे सूक्त कूटसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामधील दहा ऋचांच्या दहा स्वतंत्र देवता आहेत. या देवतांचा स्पष्ट निर्देश करण्याऐवजी त्या त्या देवतेच्या निदर्शक ठळक चिन्हांचा कूटसदृश उल्लेख सूक्तद्रष्ट्याने केला आहे. ही देवताचिन्हे पुढीलप्रमाणे आहेत – (१) बभ्र (सोम); (२) योनी (अग्नी); (३) वाशी (त्वष्टा); (४) वज्र (इंद्र); (५) जलाषभेषज (रुद्र); (६) पथ (पूषा); (७) उरू वनू (विष्णू); (८) सहप्रवासी (अश्विनीकुमार); (९) सम्राट (मित्रावरुण); (१०) सूर्यप्रकाशक (अत्री अथवा सूर्य).

या सूक्तांपैकी तिसाव्या सूक्ताची देवता अश्विनौ आहे. एकतिसावे सूक्त आशीर्वादसूक्त आहे. या सूक्तात यजमानप्रशंसा, दंपतीप्रशंसा व दंपतीला आशीर्वाद असे विषय आहेत.

ऋग्वेदात मनू वैवस्वतालाच मनू सावर्णी असे म्हटले आहे (८.५१.१). वैवस्वत हे त्याचे पैतृक नाव असून, सावर्णी हे मातृवंशसूचक नाव आहे, असे म्हणतात. हा सवर्णेचा मुलगा म्हणून सावर्णी होय. मनू सावर्णी मोठा दानशूर राजा होता. पृथ्वीव्यापक, नदीसदृश, चतुर्दिशाव्याप्त, दक्षिणादात्या, सूर्यतेजःसदृश मनू सावर्णी राजाच्या दातृत्वाची बरोबरी कोणीही करू शकणार नाही, असे त्याच्याबद्दल म्हटले आहे (१०.६२.८–९).

यदू आणि तुर्वश हे राजे मनू सावर्णीचे मांडलिक होते आणि ते मनूला त्याच्या भोजनार्थ नित्य निवडक पशू पाठवीत, असा एका सूक्तात उल्लेख आहे (१०.६२.१०). यावरून हे सर्व लोक समकालीन असावे, असे पंडितांचे मत आहे. हा मनुराजा इंद्राचा कृपापात्र होता (१०.५२.१). शतपथ ब्राह्मणानुसार जलप्रलयापासून जगाला तारणारा मनू तो हाच होय. (१.८.१.१). [प्रा. च. को.; ऋ. म. भा.; सी. ऋ.; वै. सा. सं.]

मनोरंजन

मानवी जीवनात मनोरंजनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कष्ट केल्यामुळे शरीर थकले किंवा कोणत्याही कारणामुळे मन त्रासले की, अशा वेळी मनुष्याला कसल्या तरी करमणुकीची फार आवश्यकता भासते. मन प्रफुल्ल व्हावे, उत्साह वाढावा आणि शीण नष्ट व्हावा या हेतूने तो खेळ, नाटक, संगीत, इ. कार्यक्रमांत मन गुंतवतो. मनावरील ताण कमी झाला, की शरीरालाही आराम मिळतो आणि पुन्हा कष्ट करण्यासाठी मनुष्याला उत्साह प्राप्त होतो.

सुसंस्कृत, असंस्कृत, श्रीमंत, गरीब, लहान, थोर, सर्वच माणसांना मनोरंजन हवे असते. निरुद्योगी माणसालाही कंटाळा येतच असतो. मग तो वेळ घालवण्यासाठी करमणुकीची साधने शोधू लागतो. कष्टकरी मनुष्याप्रमाणेच सुस्थितीत असलेल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माणसालाही त्यांची जरुरी वाटते. समाजात समृद्धी नांदत असते, तेव्हा पुष्कळ लोकांना पुष्कळ वेळ मोकळा मिळतो आणि ते स्वतःच्या व इतरांच्या मनोरंजनासाठी निरनिराळे उपाय शोधून काढतात. मनुष्याची संस्कृती, परिस्थिती, बुद्धी यांच्या मानाने त्याचे करमणुकीचे प्रकार वेगवेगळे असतात. कोणाला नृत्य-नाटक पाहणे आवडते, तर कोणाचे मन संगीतात रमते. कोणाला कोंबड्यांची झुंज पाहण्यात मौज वाटते, तर कोणाला घोडदौड करण्यात आनंद वाटतो. कोणाला शिकारीचा, कोणाला पोहण्याचा, तर कोणाला कंदुक-क्रीडेचा छंद असतो. कोणाला पत्ते-सोंगट्या खेळण्याची, कोणाला बुद्धिबळांची, तर कोणाला खोखो, आट्यापाट्या, इ. मर्दानी खेळांची आवड असते. कोणी काव्य-शास्त्रविनोदात रस घेतो, तर कोणी कथा-कीर्तनांत रमतो. जंगली जमातीही नाच-गाणे, शिकार, जुगार, यांचा मनोरंजनासाठी उपयोग करतात.

प्राचीन काल – सिंधु-संस्कृतीचे जे अवशेष निरनिराळ्या ठिकाणी सापडले आहेत, त्यांवरून त्या काळातले लोक नृत्य, वाद्य, संगीत, मृगया, द्यूत या गोष्टींचा उपयोग मनोरंजनासाठी करीत असावे, असे अनुमान करता येते. वैदिक संस्कृतीपेक्षा सिंधुसंस्कृती अधिक प्रगत होती, असे म्हणतात.

वैदिक साहित्यात त्या काळातील विविध मनोरंजनाच्या प्रकारांची माहिती मिळते. रथारोहण, अश्वारोहण, द्यूत, जत्रा, नृत्य, संगीत, कथाश्रवण, मृगया ही आर्य लोकांची करमणुकीची साधने होती. त्यांचे समन इ. उत्सवही या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. वैदिक साहित्यात गाथांचे अनेक उल्लेख आहेत. गद्यात्मक आख्यानाच्या मध्ये मध्ये त्या गाथा गाण्याची प्रथा होती. अशा त्या मनोरंजक आख्यानांतूनच राम व कृष्ण यांच्या कथा उगम पावल्या, असे म्हणतात.

रामायणकाली आर्यावर्तात अतिशय समृद्धी नांदत होती आणि ऐहिक सुखोपभोग विपुल प्रमाणात उपलब्ध होते. त्यामुळे त्या काळात मनोरंजनाचे विविध प्रकार विकास पावले. द्यूत, नृत्य, संगीत, मृगया, यांव्यतिरिक्त नाटक, कंदुकक्रीडा, उद्यान-वन-विहार, जलक्रीडा, गजारोहण, पक्षी पाळणे, बुद्धिबळ, इंद्रजाल, इ. नवीन प्रकार त्या काळी सुरू झाले. सामाजिक उत्सव-समारंभांनाही बहर आला. प्रत्येक नगरात अशा मनोरंजक कार्यक्रमांसाठी वेगळी स्थाने किंवा सभागृहे निर्माण झाली. त्यांना समाज हे नाव होते. कथा-श्रवण हेदेखील मनोरंजनाचे एक साधन त्या काळी पुष्कळ प्रचलित होते. मल्लविद्या भारतात प्राचीन काळीच विकास पावली. तिचाही मनोरंजनासाठी बराच उपयोग होत असे. जंगली पशूंबरोबर कुस्ती खेळून त्यांना नामोहरम करणे, हा खेळही फार लोकप्रिय होता.

त्या काळी सुखसमृद्धीमुळे लोकांना विविध कलांचा विकास करायला पुष्कळ वेळ मोकळा मिळत असे. दैनिक जीवनाप्रमाणेच सण-संस्कार व उत्सव-समारंभ यांत निरनिराळे कलात्मक कार्यक्रम केले जात. संस्कृतीच्या प्रगतीबरोबर मनोविनोदासाठी नित्य नवीन साधनांचा शोध केला जाई. राजेमहाराजे व श्रीमान लोक नागरिकांच्या मनोरंजनासाठी विविध योजना आखून त्या कार्यान्वित करीत. लोकही सार्वजनिक मनोरंजनाप्रीत्यर्थ आपले धन वेचणे, हे पुण्यकर्म मानीत. शिव, गणेश, कृष्ण, सरस्वती, पार्वती, इ. देवतांनी नृत्य-संगीतादी कलांचा पुरस्कार केल्याच्या कथा पुराणांनी निर्माण केल्या. त्यामुळे अशा कलांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आणि समाजाच्या सर्व थरांत त्यांचा प्रसार झाला. जैन व बौद्ध पंथांच्या प्रचारासाठीही नाटकांचे आयोजन केले जात असे. व्यक्तित्वाच्या विकासासाठीही अभिनय, नृत्य, संगीत, काव्य, इ. कलांचे ज्ञान आवश्यक मानले जाई. सर्व धार्मिक समारंभांत नृत्यगायनाला मानाचे स्थान मिळत असे.

कौटिल्याचे अर्थशास्त्र आणि बौद्ध साहित्य यांत त्या काळातील मनोरंजनाच्या विविध प्रकारांचे पुष्कळ वर्णन आढळते. पुढे गुप्तकालात भारतात सुवर्णयुग सुरू झाले. त्यामुळ तेव्हा मनोरंजनाच्या साधनांचा खूपच विकास झाला.

मध्ययुग –त्यानंतरच्या काळात अश्वक्रीडा सुरू झाली. घोड्यावर बसून नाना प्रकारच्या कसरती केल्या जात. घोड्यावर स्वार होऊन व हाती लांब दंड घेऊन जो चेंडूचा खेळ मध्ययुगात प्रचलित होता, त्याचे वर्णन मानसोल्लासात केलेले आहे. राष्ट्रकूट राजा इंद्र (चौथा) हा खेळ खेळत असे. तो खेळ आधुनिक पोलोसारखा होता. त्या काळी धाडसी पुरुषांना शिकारीचा फार नाद होता. घोड्यावर बसून धनुष्य-बाण, भाला, तलवार, इ. आयुधांनी वाघ, रानडुक्कर, हत्ती, इ. जंगली पशूंची शिकार करण्यात पुष्कळ लोक तरबेज होते. कोंबडे, मेंढे, रेडे, बैल, हत्ती यांच्या झुंजी लावून राजेलोक व सरदार आपल्या प्रजाजनांना त्या दाखवीत असत. बैलगाड्यांच्या शर्यतीही प्रचारात होत्या. मल्लयुद्ध पाहण्यासाठीही हजारो लोक जमत. जलविहार, नौकाविहार, झुला, यांत स्त्रिया व पुरुष मिळून भाग घेत असत. सोंगट्या, पत्ते, फासे, गंजीफा, या खेळांचा खूपच प्रसार झाला होता. निरनिराळ्या उत्सवांच्या निमित्ताने गावोगावी जत्रा भरत. त्या जागी कळसूत्री बाहुल्या, डोंबाऱ्यांच्या कसरती, कोल्हाट्यांचे नाच, जादूचे प्रयोग, बहुरूप्यांची सोंगे, गारुड्यांचे खेळ, तमाशे, गोंधळ, भारुडे, ललित, पोवाडे, इ. विविध कार्यक्रम पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोक जमत असत. विटीदांडू, रानभेरी, गोफण-गुंडा, चेंडू, लगोरी, हुतूतू, खोखो, शिवाशिवी, सूरपारंब्या, पतंग, कबुतरे उडवणे, भिंगरी, भोवरा, हे मुलांचे खेळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि लपंडाव, फुगडी, खांबखांबोळी, छप्पापाणी, इ. मुलींचे खेळ त्या काळी फार लोकप्रिय होते.

आधुनिक काल–पूर्वीसारखी समृद्धी व स्वस्थता आता राहिली नाही. सध्याचे जीवन धकाधकीचे, संघर्षमय व जिकिरीचे झाले आहे. गरीब, श्रीमंत, सगळेच नाना प्रकारच्या चिंतांनी ग्रस्त झालेले असतात. त्यामुळे जीवन सुसह्य करण्यासाठी त्यांना मनोरंजनाची फारच आवश्यकता भासते. त्या आवश्यकतेमधूनच करमणुकीचे अनेक नवे प्रकार उत्पन्न झाले आहेत. सर्कस, सिनेमा, पत्त्यांचे विविध डाव, चेंडूचे निरनिराळे खेळ, जुगाराचे नवे प्रकार, हे त्यांतील प्रमुख होत. नृत्य, नाटक, संगीत, इ. कलांचा आता खूप विकास झाला आहे आणि जुने मैदानी खेळही अधिक उत्साहाने खेळले जात आहेत. एकंदरीत मनुष्याने या क्षेत्रात विलक्षण प्रगती केली आहे यात शंका नाही. [वे. का. स.; रा. का. सं.; भा. प्रा. सं.; प्रा. भा. सा. सां. भू.; म. भा. स.; या. का. भ.; लो. सा. वि.; भों. रा. हिं. क.; हि. सा. इं.]

मनोरथचतुर्थी फाल्गुन शुद्ध चतुर्थीचे नाव. एक काम्य व्रत. फाल्गुन शुद्ध चतुर्थीला या व्रताचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रतविधी असा – गणपतीची सुवर्णमूर्ती करून तिची पूजा. नक्तभोजन. प्रत्येक महिन्याच्या शुद्ध चतुर्थीला अशा प्रकारे पूजा करणे. उद्यापनाच्या वेळी गणेशमूर्तीचे दान. फल – मनोरथपूर्ती. [व्र. प.]

मनोरथतृतीया चैत्र शु. तृतीयेचे नाव. एक काम्य व्रत. स्त्री किंवा पुरुष यांपैकी कोणालाही हे व्रत करता येते. चैत्र शुद्ध तृतीयेला या व्रताचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. यात प्रत्येक महिन्याच्या शुद्ध तृतीयेला वीस भुजांच्या गौरीची पूजा करायची असते. मात्र प्रत्येक पूजेच्या वेळी दंतधावनासाठी भिन्न भिन्न दंतकाष्ठे, तसेच भिन्न प्रकारची तेले आणि फुले लागतात. प्रत्येक पूजेचा नैवेद्यही निराळा असतो. ज्या अन्नाचा गौरीला नैवेद्य असतो, तेच अन्न व्रतधारी व्यक्तीने संध्याकाळी खायचे असते. फाल्गुन शुद्ध तृतीयेला या व्रताचे उद्यापन करतात. उद्यापनाच्या वेळी सायंकाळी अग्निस्थापना करून तीळ व तूप यांचा होम करतात. नंतर पलंग, गादी, उशी, आरसा, इ. वस्तू आचार्याला दान देतात. चतुर्थीच्या दिवशी चार कुमार आणि बारा कुमारिका यांना भोजन घालतात. फल – मनःकामनासिद्धी.

पुलोमा दानवाची मुलगी पुलोमजा हिने शिवाची मनोभावे पूजा केल्यामुळे शिव तिला प्रसन्न झाला आणि त्याने पुलोमजेला हे व्रत सांगितले, अशी कथा आहे. [हि. ध.; व्रतराज]

मनोरथद्वादशी फाल्गुन शुद्ध द्वादशीला हे नाव आहे. एक काम्य व्रत. यात फाल्गुन शुद्ध एकादशीला उपवास करून द्वादशीला विष्णूची पूजा करतात. नंतर होम करतात. व्रतावधी एक वर्ष. यात एका वर्षाचे तीन भाग करतात. प्रत्येक भागामध्ये निरनिराळी फुले, निरनिराळी सुगंधी द्रव्ये व निरनिराळे नैवेद्य असतात. उद्यापनाच्या वेळी विष्णूची सुवर्णमूर्ती दान देतात, बारा ब्राह्मणांना भोजन घालतात आणि बारा भांडी दान देतात. [हि. ध.]

मनोरथद्वितीया एक तिथिव्रत. कोणत्याही शुद्ध द्वितीयेला मनोरथद्वितीया असे म्हणतात. या दिवशी वासुदेवाची पूजा करतात आणि सायंकाळी चंद्रकोरीला अर्घ्य देतात. चंद्र मावळण्यापूर्वी नक्त भोजन करतात. [हि. ध.]

मनोरथपौर्णिमा एक काम्य व्रत. कार्तिक पौर्णिमेला या व्रताचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. यात प्रत्येक पौर्णिमेला उगवत्या चंद्राची पूजा करून नक्त भोजन करतात. पूजेसाठी मिठाची चंद्रमूर्ती करून ती वर्तुळात ठेवतात. नंतर तिची पूजा करतात. मग सौभाग्यवती स्त्रियांना वायने देतात. उद्यापनाच्या वेळी कुसुंबी रंग दिलेले वस्त्र दान देतात. फल – सौंदर्य, संपत्ती आणि स्वर्ग यांची प्राप्ती. [हि. ध.]

मनोरथसंक्रांती एक काम्य व्रत. मकर संक्रांतीला या व्रताचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. सूर्य ही या व्रताची देवता होय. व्रतविधी असा – संक्रांतीच्या दिवशी स्नानानंतर प्रथम सूर्याचे ध्यान करतात. मग कुंकवाचे अष्टदल काढून त्याच्या प्रत्येक पानावर पूर्वादिक्रमाने भास्कर, रवी, विवस्वान, पूषा, आदित्य, तपन, मार्तंड, भानू आणि कर्णिकेवर विश्वात्मा यांची स्थापना व पूजा करतात. मग अर्घ्य देतात. नंतर सूर्याचे ध्यान करून उदकुंभ, गूळ आणि वस्त्रे यांचे ब्राह्मणाला दान देतात. उद्यापनाच्या वेळी सूर्याची सुवर्णप्रतिमा करून ती दान देतात. फल – इच्छाप्राप्ती, पापनिवृत्ती आणि सूर्यलोकवास. [व्रतराज; हि. ध.]

मनोहरदास (१६४८–१६७१ इ. स.) एक संतकवी. याचा जन्म खंडेलवाल जातीत सोनी गोत्रात झाला. हा राजस्थानातील जयपूरजवळच्या सांगानेर या गावचा रहिवासी होता. पुढे तो उत्तर प्रदेशाच्या बिजनौर भागातील धामपुरीला राहायला गेला. तिथे आसू नामक कोण्या धनिकाने त्याला आपल्या घरी आश्रय दिला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मनोहरदास विद्वान असून कवीही होता. याने धर्मपरीक्षा, ज्ञानचिंतामणी, चिंतामणिमान बावनी, गुणठाणा गीत, इ. लहान-मोठे पद्यग्रंथ रचले आहेत. या ग्रंथांमधून त्याने दोहा, सोरठा, सवैया, छप्पय आदी छंदांचा वापर केला आहे. परब्रह्माची उपासना, गुरुमाहात्म्य, संसारविरक्ती, इ. विषय याच्या काव्यात दिसतात. [हिं. जै. भ. क.]

मन्नान केरळातील एक जात. क्विलॉन, कोट्टायम आणि पालघाट या जिल्ह्यांतल्या डोंगरी प्रदेशात या लोकांचे वास्तव्य आहे. मन्नान शब्दाचा अर्थ भूमिपुत्र असा आहे. हे लोक मध्यम उंचीचे असून, काळेसावळे असतात. पूर्वी हे लोक उघडेच राहत असत. पण हल्ली ते धोतर, सदरा वगैरे कपडे घालू लागले आहेत. त्यांच्या स्त्रिया अंगात पोलके घालतात व साडी नेसतात. त्या हातांत बांगड्या, नाकात नथ, कानांत अनेक वलये घालतात आणि केसांत कंगवे खोवतात. त्या नाकावर आणि कपाळावर गोंदून घेतात. तमिळ आणि मलयाळम या दोन भाषांचे मिश्रण असलेली बोली ते बोलतात. हे लोक सर्वसाधारणपणे आनंदी आणि समाधानी वृत्तीचे आहेत. ते रेड्याचे मांस खातात; पण गायीचे खात नाहीत. मद्य पितात. नारळ खाल्ल्यास वाघ आणि हत्ती आपल्यावर हल्ला करतील, अशी त्यांच्यापैकी काहींची समजूत असते.

मन्नान स्त्री

पूर्वी हे लोक मदुरेच्या राजाची रयत होते. पण त्याच्याविरुद्ध बंड करून, ते त्याला सोडून पूंजतच्या प्रमुखाकडे गेले, अशी यांच्याविषयी आख्यायिका सांगतात.

पार्वतीने मातीचा जो हत्ती बनवला होता, त्याची संतती म्हणजे हे मन्नान लोक होत, अशी दंतकथा प्रचलित आहे.

यांच्यांत अनेक टोळ्या असून, त्यांपैकी काहींची नावे त्यांच्या राहण्याच्या ठिकाणांवरून पडली आहेत. यांच्यांत वारसा स्त्रीकडून चालतो.

यांच्या झोपड्या म्हणजे एकच मोठी खोली असून, त्यांना खिडकी नसते. हत्ती असलेल्या प्रदेशात हे लोक रात्रीच्या वेळी झाडावर मचाण बांधून त्यावर झोपतात.

शेती, शेतमजुरी आणि रानातील मध, डिंक, वगैरे गोळा करून विकणे, हे त्यांचे मुख्य व्यवसाय आहेत. ते शिकारही करतात.

यांच्या ग्रामप्रमुखाला कणी किंवा कणिकारन असे म्हणतात. त्यांच्या मदतीला मंत्री नावाचा एक अधिकारी असतो. तसेच रोगराईवर इलाज करण्यासाठी एक मांत्रिकही असतो.

विवाहप्रथा – मुलींची लग्ने त्या वयात आल्यावर करतात. आईबाप लग्न ठरवतात. बहुधा लग्नाआधी थोडे दिवस मुलगा भावी सासऱ्याच्या घरी कामासाठी राहतो. लग्न सर्वसाधारणपणे मुलीच्या घरी होते. लग्नाचा खर्च दोन्ही पक्ष अर्धा अर्धा वाटून घेतात. मुलीला कंगवा देणे, वधू-वरांनी एकमेकांना पानसुपारी देणे आणि वराच्या बहिणीने वधूच्या गळ्यात ताळी बांधणे हे लग्नातील आवश्यक असे लौकिक विधी होत.


मन्नान पुरुष

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात. प्रथम मृताची हजामत करून त्याला स्नान घालतात. मग त्याला फुलांनी सजवतात, नव्या वस्त्राने झाकतात आणि चटईवर ठेवतात. त्यानंतर प्रेत स्मशानात नेऊन चटईसह त्याला खड्डयात ठेवतात व त्यावर तात्पुरता मांडव घालतात. भाचा हा मृताचा उत्तराधिकारी असतो. हे लोक मृताशौच सात दिवस पाळतात. [ट्रा. के.]

मन्नारदास (इ. स. चे १७ वे शतक) एक तेलुगू कवी. याला मन्नारदेव असेही म्हणतात. याच्या वडिलांचे नाव विजयराघव असे होते. तो तंजाऊरच्या नायक घराण्यातला राजा होता. मन्नारदास आपल्या वडिलांच्या दरबारी राजकवी म्हणून राहिला होता. हा जसा कवी होता, तसाच मोठा योद्धाही होता. इ. स. १६७३ साली झालेल्या एका युद्धात हा मरण पावला. याच्या नंतर आंध्रचा नायक राजवंशही संपुष्टात आला, असे म्हणतात.

मन्नारदासाने विजयराघवाभ्युदय व हेमाब्ज-नायिकास्वयंवर असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकी पहिला ग्रंथ सांप्रत उपलब्ध

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाही. या ग्रंथात कवीने आपल्या पित्याची दिनचर्या वर्णिली आहे. दुसऱ्या ग्रंथात लक्ष्मी-नारायणांच्या स्वयंवराचे वर्णन आहे. या काव्यात समुद्रमंथन, अमृतप्राप्ती, इ. विषय आले असून, थोडा इतिहासही आहे. परंतु त्याहीपेक्षा तत्कालीन समाजचित्रण त्यात अधिक आहे. [ते. सा. इ.]

मन्नेवार एक तेलुगू जात. हैद्राबाद ही या लोकांची मूल भूमी असून, तिथे त्यांनी एके काळी राज्य केले होते, असे म्हणतात. आता विदर्भातील चंद्रपूर (चांदा) जिल्हयाच्या दक्षिण भागात यांची वस्ती आढळते. मन्नेम = अरण्य, या तेलगू शब्दापासून मन्नेवार म्हणजे अरण्यात राहणारे लोक, अशी त्या शब्दाची व्युत्पत्ती असावी.

मन्नेवार लोकांच्या कुळांचे तीन पोटभेद आहेत. त्यांच्यांत परस्पर रोटीबेटी व्यवहार होतात. समान कुळांत लग्नसंबंध होत नाहीत. या तीन पोटभेदांपैकी पहिले नलुगू वेल्पुलू हे चार देवांची पूजा करतात. दुसरे आर्यंडू वेल्पुलू हे पाच देवांची आणि तिसरे अनू वेल्पुलू हे सहा देवांची पूजा करतात.

विवाहप्रथा – यांचा विवाहविधी कनिष्ठ तेलुगू जातीतल्या लोकांप्रमाणेच असतो. वधू-वरांना नांगराच्या जोखडावर बसवितात आणि त्यांच्यावर अक्षता टाकतात. वर वधूच्या गळयात ताळी बांधतो. यांच्यांत पुर्नविवाह रूढ आहे. घटस्फोट सहज मिळू शकतो. परंतु तो मागणाऱ्याला दहापासून सत्तावीस रुपयांपर्यंत दंड भरावा लागतो.

देवधर्म – हे लोक गणेशचतुर्थीला नांगराच्या फाळाची पूजा करून त्याला कोंबडी व दारू देतात. बुर्री नावाचा त्यांचा एक उत्सव आहे. हा उत्सव म्हणजे मोहाची फुले गोळा करून त्यांपासून दारू तयार करणे आणि त्यातली थोडी दारू मोहाच्या वृक्षाला वाहणे असा असतो. ही दारू वृक्षातळी शिंपडताना कोंबडी व बकरी यांचा बळी देतात. होळीच्या दिवशी हे कामदेव व रती यांच्या आकृती तयार करतात. त्यापैकी कामदेवाची मूर्ती होळीत टाकून तिचे दहन करतात. या दहनाच्या वेळी कोंबडीचे पिल्लू किंवा अंडेही होळीत टाकतात.

यांच्या धार्मिक विधींना ब्राह्मण पुरोहित लागत नाही. गोमांस सोडून इतर सर्व प्रकारचे मांस हे खातात.

हे लोक मृतांना पुरतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मन्महेश उ. भारतातील एक तीर्थस्थान. हे स्थान हिमाचल प्रदेशात आहे. पठाणकोटहून मोटारमार्गाने चंबा शहरावरून मन्महेशला जावे लागते. चंबापासून मन्महेश ६८ मैल दूर आहे. हा भाग डोंगराळ असल्याने शेवटी काही मैल पायी यात्रा करावी लागते. इथे एक मोठे सरोवर आहे. त्याच्या काठी शिवाची श्वेत लिंगमूर्ती आहे. सरोवरात स्नान करून शिवदर्शन करणे हा इथला यात्राविधी होय. भाद्रपद शुद्ध अष्टमीला इथे मोठी जत्रा भरते. [कल्याण-तीर्थांक; पं. जी. सा.]

मन्यू तापस एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ८३ व ८४ ही दोन सूक्ते याच्या नावावर आहेत. ही दोन्ही सूक्ते मन्युसूक्ते म्हणूनच प्रसिद्ध आहेत. या दोन्ही सूक्तांत रणोत्साह देणाऱ्या क्रोधदेवतेचे स्तवन आढळते. नमुन्याची एक ऋचा अशी (१०.८४.२)

अग्निरिव मन्यो त्विषितः सहस्व सेनानीर्नः सहुरे हूत एधि ।
हत्वाय शत्रून् वि भजस्व वेद ओजो मिमानो वि मृधो नुदस्व ।।

अर्थ – हे अग्निशिखासदृश, तेजस्वी, शत्रुसंहारक, युद्धपाचारित आणि बलदात्या मन्युदेवा, आमचा सेनापती बनून तू आम्हांला विपुल धन दे.

ही दोन्ही सूक्ते अथर्ववेदातही आली आहेत (४.३१-३२). [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

मन्वंतर एक कालमान. कृत, त्रेता, द्वापर व कली या चार युगांची १२,००० दिव्य वर्षे मानलेली आहेत. त्यांना चतुर्युग, महायुग किंवा दिव्ययुग असे म्हणतात. अशी १००० चतुर्युगे झाली, की ब्रह्मदेवाचा एक दिवस (सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत) होतो. त्याला कल्प म्हणतात. त्या कालावधीत १४ मनू असतात. म्हणून सुमारे ७१ चतुर्युगे एवढा प्रत्येक मनूचा कालखंड होय. त्यालाच मन्वंतर असे नाव आहे. एक मनू संपून दुसरा मनू सुरू होईपर्यंतच्या कालखंडाला संधिकाल म्हणतात. एका कल्पात असे १५ संधिकाल असून, त्यांचे कालमान ६ दिव्य युगांइतके असते. ७१ × १४ = ९९४ दिव्य युगे हा १४ मन्वंतरांचा कालावधी. त्यात ही ६ दिव्य युगे मिळवली, की १००० दिव्य युगे=१ कल्प होतो.

ब्रह्मदेवाच्या १०० ब्राह्म वर्षांच्या आयुर्मानातील ५० ब्राह्म वर्षे संपून, ५१ व्या वर्षातला पहिला श्वेतवाराह नामक कल्प सांप्रत सुरू आहे. त्याच्या प्रारंभी सृष्टी पुन्हा उत्पन्न झाली, तेव्हापासून आजपर्यंत सहा मन्वंतरे पुरी झाली असून, सातवे वैवस्वत नामक मन्वंतर चालू आहे. कल्पारंभापासून लोटलेल्या कालखंडाची १,९७,२९,४९,००० मानवी वर्षे होतात.

पुराणांमध्ये १४ मन्वंतरांची नावे दिलेली आहेत, ती अशी – स्वायंभुव, स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णी, दक्षसावर्णी, ब्रह्मसावर्णी, धर्मसावर्णी, रुद्रसावर्णी, देवसावर्णी व इंद्रसावर्णी. [पु. वि.: म. ध. शा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मन्वादी तिथी वर्षातल्या चौदा तिथींना निरनिराळ्या मन्वंतरांचा प्रारंभ झाल्यामुळे त्यांना मन्वादी तिथी असे म्हणतात. त्यांची नावे अशी—

आश्वयुक् शुक्लनवमी कार्तिक्या द्वादशी सिता ।
तृतीया चैत्रमासस्य तथा भाद्रपदस्य च ।।
फाल्गुनस्य त्वमावास्या पुष्यस्यैकादशी सिता ।
आषाढस्यापि दशमी माघमासस्य सप्तमी ।।
श्रावणस्याष्टमी कृष्णा आषाढस्यापि पौर्णिमा ।
कार्तिकी फाल्गुनी चैत्री ज्येष्ठी पञ्चदशी सिता ।।

अर्थ — आश्विन शुद्ध नवमी, कार्तिक शुद्ध द्वादशी, चैत्र व भाद्रपद तृतीया, फाल्गुन अमावास्या, पौष शुद्ध एकादशी, आषाढ शुद्ध दशमी, माघ शुद्ध सप्तमी, श्रावण वद्य अष्टमी, आषाढ, कार्तिक, फाल्गुन, चैत्र व ज्येष्ठ पौर्णिमा या मन्वादी तिथी होत.

या तिथींस पितरांचे श्राद्ध करावे, असे सांगतात. [हि. ध.]

मम्मट (इ. स. ११४० चा सुमार) एक आलंकारिक. काव्यप्रकाश या ग्रंथाचा कर्ता. काव्यप्रकाशावर सुधासागर नामक व्याख्या लिहिणाऱ्या भीमसेन दीक्षिताने आपल्या व्याख्येच्या आरंभी मम्मटाविषयी पुढील माहिती दिली आहे— शाश्वत शब्दब्रह्माचा शास्त्रांनी कोणाला साक्षात्कार झाला नाही. हे पाहून तो स्वतः करून देण्याच्या हेतूने देवी सरस्वती काश्मीर देशात पुरुषरूपाने प्रकट झाली व ती श्रीमान जैयटाच्या पत्नीच्या उदरी मम्मट या नावाने जन्माला आली.

हा मम्मट, मुळात सर्व शास्त्रे अवगत असताही, जनरीत म्हणून काशीला जाऊन शास्त्रे शिकला. मग लोकांवर अनुग्रह करण्यासाठी त्याने काव्यप्रकाश हा ग्रंथ लिहिला. पुढे काव्यप्रकाशातील सूत्रांवर त्याने वृत्ती लिहिली. त्याचे कनिष्ठ भ्राते कैयट आणि औवट यांनी मम्मटाजवळ शास्त्राध्ययन केले व अनुक्रमे महाभाष्य आणि वेद यांवर व्याख्या लिहिल्या.

पण औवटाने आपल्या पित्याचे नाव वज्रट असे दिल्यामुळे, तो मम्मटाचा भाऊ होता की नाही, याबद्दल काही विद्वानांनी शंका व्यक्त केली आहे.

मम्मट हा काश्मीरनिवासी होता आणि त्याला राजानक अशी उपाधी होती. तो शैव आगमाचा अनुयायी होता. त्याने काव्यप्रकाशाशिवाय शब्दव्यापारविचार व संगीतरत्नावली हे दोन ग्रंथ लिहिले आहेत. पण काव्यप्रकाश हा त्याचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ होय. या ग्रंथाचे दहा उल्लास असून, त्यांत काव्यप्रयोजन, काव्यलक्षण, काव्यशास्त्रातील शब्दार्थविचार, ध्वनिप्रकार, रसपरिभाषा, रससूत्राची व्याख्याने, रसादिध्वनीचा प्रपंच, गुणीभूतव्यंग्यप्रकार, ध्वनिमीमांसा, व्यंजना, पद, वाक्य व अर्थ यांचे दोष, गुण आणि अलंकार, शब्दालंकार, अर्थालंकार, इ. विषय आलेले आहेत. मम्मटाने दोषनिरूपण बरेच सविस्तर केले आहे. याबद्दल त्याच्या चाहत्यांकडून त्याला व्युत्पन्नशिरोमणी व द्वेष्ट्यांकडून कविता-कुलांगनेची फरपट काढणारा धटिंगण अशी विरुदे मिळाली आहेत. काव्यप्रकाशाचे अध्ययन गेली आठ-नऊ शतके अखिल भारतात होत आले असून, देशाच्या बहुधा सर्व भागांतील व्यासंगी विद्वानांनी या ग्रंथावर व्याख्या लिहिल्या आहेत. त्यांची संख्या सत्तरच्या आसपास आहे. त्यावरून या ग्रंथाची योग्यता कळून येईल.

ग्रंथकार या नात्याने मम्मटाचे प्रतिपादन सर्वस्पर्शी, सुसंगत आणि निर्णायक असे असून, त्याचे निबंधन संक्षिप्त, अर्थघन, प्रायः अन्वयमुखी, सुसंवादी, हिशेबी, सावधान, तर्कशुद्ध, प्रमाणशरण, खंडनात सौम्य पण स्पष्ट व निर्भीड असे आहे.

काव्यप्रकाश हा ग्रंथ एकट्या मम्मटाच्या नावावर प्रसिद्ध असला, तरी दहाव्या उल्लासातील परिकर या अलंकारानंतरचा ग्रंथ अल्लट नामक ग्रंथकाराने पुरा केला आहे, अशी परंपरा काव्यप्रकाशाच्या व्याख्याकारांमधे फार पूर्वीपासून प्रचलित आहे. [काव्यप्रकाश — संपा. श्री. अर्जुनवाडकर, श्री. मंगरूळकर]

मय (१) एक असुर. हा वास्तुविशारद व ज्योतिषी होता. कश्यप आणि दनू यांचा हा मुलगा होय. परंतु रामायणात याला दितिपुत्र म्हटले आहे. रामायणातील हे विधान चूक आहे, असे श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचे मत आहे. याला नमुची नावाचा एक थोरला भाऊ होता.

हेमा नावाची अप्सरा ही मयाची पत्नी असून, ती याला देवांनी दिली होती (वा. रा. उत्तर. १२). हेमा ही मयाजवळ तेरा वर्षे होती. तिच्यापासून याला मायावी, दुंदुभी व मंदोदरी अशी तीन अपत्ये झाली. मंदोदरी त्याने रावणाला दिली आणि त्याचबरोबर एक अमोघ शक्तीही दिली. हीच शक्ती रावणाने लक्ष्मणावर फेकली होती.

मत्स्यपुराणानुसार याला मंदोदरी, कुहू व उपदानवी अशा तीन मुली होत्या. पण त्या मुली कोणापासून झाल्या याचा तिथे उल्लेख नाही. कुहू ही धात्याची पत्नी होती (६.१८) व उपदानवी ही वैश्वानर दानवाची कन्या होती (६.६), असे भागवतात उल्लेख आहेत.

मयासुराला रंभा नावाची आणखी एक पत्नी होती. रंभेपासून याला सहा अपत्ये झाली.

मयासुर शिल्पशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहे. मयाने हजारो वर्षे तप करून ब्रह्मदेवाकडून एक वर मिळवला. त्या वराने उशना ऋषीने निर्माण केलेले सर्व शिल्पशास्त्र याला मिळाले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(वा. रा. ४.५१). या वराच्या सामर्थ्यावर याने विंध्य पर्वताजवळ ऋक्षबिल नामक विवरात एक मोठे आणि समृद्ध वन तयार केले व तो त्यात काही काळ राहिला. (वा. रा. ४.४३).

मयासुराने वृषपर्वा दैत्याला एक सभा तयार करून दिली. या सभेत वृषपर्व्याने एक सत्र केले. ही सभा कैलास पर्वताच्या उत्तरेला मैनाक गिरीपाशी बिंदू सरोवराजवळ होती. सभा बांधून झाल्यावर राहिलेले सामान याने तिथेच ठेवले होते. कृष्णार्जुनांनी जेव्हा अग्नीला खांडव वन जाळायला दिले तेव्हा हा त्या वनात होता. वनातून हा बाहेर पडत असता कृष्णाने याला पाहिले. कृष्ण आपल्याला मारील या भयाने तो अर्जुनाला शरण गेला. अर्जुनाने त्याचे प्राण वाचवले. या उपकाराच्या फेडीसाठी मयाने कृष्णाच्या सांगण्यावरून पांडवाना एक सभा बांधून दिली. या सभेसाठी लागणारे सर्व सामान मयाने वृषपर्व्याच्या कोशागारातून आणवले होते. ही सभा फारच सुंदर होती. मयासुराने याच वेळी वृषपर्व्याच्या कोशातील गदा भीमाला दिली आणि त्या ठिकाणी असलेला वरुणाचा देवदत्त नावाचा शंख अर्जुनाला दिला. याने युद्धसामग्रीसह त्रिपुरें निर्माण केली होती. प्रसिद्ध सौभ विमानाचा निर्माताही हाच आहे.

कलियुग लागल्यानंतर सत्तावीसशे वर्षांनी बलीने याला भूलोकी पाठवले. भूलोकी याला शाक्यसिंहगुरू व गौतमाचार्य अशी नावे मिळाली.

याने वास्तुशास्त्रावर, तसेच शिल्प व ज्योतिष या शास्त्रांवरही ग्रंथ लिहिले आहेत. [प्रा. च. को.; भा. प्रा. ऐ. को.; वा. रा. को.; हिं. वि. को.]

(२) द. भारतातला एक शिल्पशास्त्रज्ञ. दक्षिणेतील प्रसिद्ध शिल्पशास्त्रज्ञ अगस्त्य व कश्यप यांच्या नंतर हा होऊन गेला असावा, असे पंडितांचे मत आहे. याच्या नावावर मयमत, मयशिल्प, मयशिल्पशतिका व शिल्पशास्त्रविधान असे चार ग्रंथ आहेत. शेवटचा ग्रंथ पाच प्रकरणांचा असून, त्यात मूर्तीच्या रचनेचा ऊहापोह केलेला आहे. नासिक येथील काळ्या रामाचे मंदिर श्री. ओढेकर यांनी मयसंहितेप्रमाणे बांधले आहे, असे श्री. कृ. वि. वझे यांनी म्हटले आहे. [म. ज्ञा. को.; हिं. शि.]

मयणल्ला (इ. स. चे. ११-१२ वें शतक) एक कर्तबगार राणी. मीनलदेवी या नावाने ही लोकप्रिय होती. कर्नाटकातील कदंब राजवंशातील जयकेशी राजाची ही मुलगी असून, गुजरातचा पहिला कर्ण याची पत्नी होती. चालुक्य राजा सिद्धराज जयसिंह हा हिचा मुलगा होय. तो अल्पवयी होता, तेव्हा हिने उत्तम राज्यकारभार केला व नंतरही त्याला चांगले मार्गदर्शन केले. ती अत्यंत न्यायी व प्रजावत्सल होती.

मीनालदेवीने अनेक सामजिक कामे केली. तिने बांधलेले दोन तलाव अद्याप अस्तित्वात आहेत. त्यांतील पहिला तलाव म्हणजे विरमंगावनजीकचा मुनसर आणि दुसरा धोल्का गावातला मलाव नामक तलाव होय. मीनलदेवीच्या अगोदर सोमनाथाला जाणाऱ्या यात्रेकरूंना कर द्यावा लागे. हा कर वसूल करताना अधिकारी यात्रेकरूंचा छळही करीत. त्यामुळे तो कर हिने बंद केला. या कराची वसुली बहात्तर लक्ष रुपये होती, असे प्रबंधचिंतामणीत म्हटले आहे. [ग्रे. वी. इं.]

मयू उत्सव बंगालमधील तोतोपारा नावाच्या भागात राहणाऱ्या तोतो लोकांचा एक उत्सव. हा उत्सव चैत्र मासातील अखेरच्या पाच दिवसांत साजरा करतात. उत्सवाच्या पहिल्या दिवशी देवाची पूजा करून त्याला मद्य अर्पण करतात. मग ढोलाच्या साथीवर देवाची गाणी म्हणतात. नंतर बतंगवेई व ओरंगवेई या तोतोंच्या दोन पोटजमातींत एक लाक्षणिक लग्नसमारंभ होतो. यातील मुलगा म्हणजे मोठा ढोल असतो आणि मुलगी म्हणजे लहान ढोलकी असते. दोन्ही जातींसाठी स्वतंत्र मंडप असतात. समारंभासाठी सर्व लोक आपापल्या घरची हरिया नावाची दारू आणतात. ही दारू समारंभस्थळी एकत्रित करतात. लग्न समारंभ उरकला म्हणजे लोक ढोलकी वाजवून ती दारू पितात आणि डुकराचे मांस खातात; रात्रभर निरनिराळ्या प्रकारचे नाच करतात. प्रत्येक दिवसाची पूजा निरनिराळ्या पोटजातींकडे असते.

हे लोक आपली ढोलकी उत्तम स्थितीत ठेवतात. त्यांतून बदसूर निघू लागला तर गावावर संकट येणार अशी यांची समजूत असते. [इं. फो. लो.]

मयूखी एक प्राचीन शस्त्र. या शस्त्राची गणना अमुक्त वर्गात करतात. महाभारतात याचा उल्लेख आलेला आहे. हे शस्त्र म्हणजे एक प्रकारचा दंड होय. या दंडाला मूठ असून, याची लांबी सुमारे सहा फूट असते. या दंडाला लहान घंटा बसवीत. मयूखीने करायच्या युद्धात ढालीचा उपयोग करावा लागे. [वे. रा. द. –उत्तरार्ध]

मयूरभट्ट (१) (इ. स. चे ७ वे शतक) एक संस्कृत कवी. हा काशीच्या पूर्वेला राहत होता. गोरखपूर जिल्ह्यातील काही प्रतिष्ठित ब्राह्मण लोक स्वतःला मयूरभट्टाचे वंशज मानतात. हा बाणाप्रमाणेच श्रीहर्षाच्या दरबारात होता.

बाण आणि मयूर यांच्यासंबंधी एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी– मयूरकवीची बहीण बाणभट्टाला दिलेली होती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकदा बाणाची पत्नी व बाण यांच्यांत काही प्रेमकलह होऊन ती रुसून बसली. सकाळ होत आली, तरी तिने रुसवा सोडला नाही. तेव्हा बाणाने तिला प्रसन्न करण्यासाठी एक श्लोक रचून म्हटला–

गतप्राया रात्रिः कृशतनु शशी शीर्यत इव
प्रदीपोऽयं निद्रावशमुपगतो घूर्णत इव।
प्रणामान्तो मानस्त्यजसि न तथापि क्रुधमहो

अर्थ – हे कृशांगी रात्र जवळ जवळ संपत आली आहे. चंद्र फिकट झाला आहे. हा दिवाही निद्रावश होऊन विझायला आला आहे. पती पाया पडल्यांवर (पत्नीचा) ताठा नाहीसा होतो. पण तू मात्र अजूनही रुसवा सोडलेला नाहीस.

बाणाने म्हटलेल्या या तीन ओळी, तेवढ्यात तिथे आलेल्या मयूराने ऐकल्या. त्यावर त्याने पुढील चरण रचून म्हटला –

कुचप्रत्यासत्त्या हृदयमपि ते चण्डि कठिनम्।

अर्थ – हे चंडी, कठीण स्तनांच्या जवळ असल्यामुळे तुझे हृदयही कठीण झाले आहे.

हा चरण ऐकून बाणाला फार राग आला आणि त्याने मयूराला 'तू कुष्ठी होशील' असा शाप दिला. मयूराला तो शाप भोवला. तेव्हा त्याने सूर्यस्तुतिपर शंभर पद्ये रचली. त्यामुळे त्याच्यावर सूर्यकृपा झाली व त्याची त्या रोगातून मुक्तता झाली. पण ही आख्यायिका खरी नसावी असे वाटते. कारण सूर्यशतकाच्या शेवटी मयूराने लिहिले आहे, की हे काव्य मी लोकांच्या कल्याणासाठी रचले आहे. भक्तिपूर्वक जो कोणी हे काव्य एकदा तरी वाचील, त्याची सर्व पापे व रोग सूर्याच्या प्रभावामुळे नष्ट होतील.

सूर्यशतक हे स्रग्धरा वृत्तात रचलेले असून, त्याची भाषा प्रौढ आहे. यात सूर्याचे किरण, अश्व, सारथी, रथ व सूर्यमंडल यांची स्तुती केलेली आहे. [सं. सा. इ.]

(२) (इ. स. चे १२ वे१३ वे शतक) एक बंगाली कवी याच्या चरित्रासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. बौद्ध धर्माचा भारतात ऱ्हास सुरू झाल्यानंतर बुद्धाची धर्मठाकूर या नावाने पूजा सुरू झाली. बौद्धांनी या देवतेसंबंधी बरीच काव्य-रचना केली आहे. कालांतराने या देवतेचे व त्याच्या काव्याचे पौराणिक पद्धतीत् रूपांतर झाले. अशा प्रकारच्या धर्मठाकूरविषयक काव्यरचनेत पहिला कवी म्हणून मयूरभट्टाची ख्याती आहे. याच्या नंतरच्या अनेक कवींनी मयूरभट्टाचा मोठ्या गौरवाने उल्लेख केला आहे. [हि. बें. लॅं. लि.]

मयूरासन एक योगासन. मोर ज्याप्रमाणे विष पचवितो, त्याप्रमाणे या आसनाने माणसालाही विष पचवण्याचे सामर्थ्य प्राप्त होते, असे म्हणतात. याशिवाय याने पोटाचे सर्व रोग नष्ट होतात. या आसनाची प्रक्रिया अशी–

धरामवष्टभ्य करद्वयेन तत्कूर्परस्थापितनाभिपार्श्वः।
उच्चासनो दण्डवदुत्थितः स्यान्मयूरमेतत्प्रवदन्ति पीठम् ॥

अर्थ – दोन्ही हात जमिनीवर पुरते टेकून दोन्ही कोपर बेंबीच्या बाजूंना लावावे. शरीर आडव्या काठीप्रमाणे हातावर भार ठेवून वर उठवावे. याला मयूरासन असे म्हणतात.



मयूरासन

ज्या स्त्रियांना रजोदोषामुळे किंवा अन्य कारणांनी गर्भधारणा होत नसेल त्यांनी या आसनाचे प्रयोग करावे आणि पौरुषहीन पुरुषांनीही या आसनाचा अभ्यास करावा, असे सांगितले आहे. [उ. यो. द.; यो. सो. पू.; घेरंडसंहिता]

मरक्कायर तमिळनाडमधील एक मुसलमान जात. हिंदू व मुसलमान यांच्या मिश्रणातून ही जात निर्माण झाली आहे. हे लोक व्यापारी असून, स्वतःच्या नावा घेऊन सिलोन व इतर देशांशी व्यापार करीत असत. मुळात हे लोक अरबस्तानातून भारतात आलेले आहेत. अरबी भाषेतील मरकव म्हणजे बोट या शब्दावरून त्यांना मरक्कायर हे नाव मिळाले.

खरे मुसलमान लोक यांना कमी प्रतीचे मानतात व यांच्याशी बेटीव्यवहार करीत नाहीत.

हे लोक नावा घेऊन समुद्रावर जाताना व समुद्रप्रवासाहून सुखरूप आल्यावर मालुमियर नामक एका मुसलमान संताच्या दर्गासमोर काही पैसे ठेवतात. पूर्वी या संताच्या मालकीच्या दहा-बारा नावा होत्या आणि तो एकाच वेळी त्या सर्वांवर ताबा ठेवीत असे, अशी त्याच्यावद्दल आख्यायिका सांगतात. समुद्रावर संकटात सापडलेल्या खलाशांना व व्यापाऱ्यांना तो सोडवतो, अशी त्याच्याबद्दल लोकांची श्रद्धा आहे.

यांच्या लग्नविधींपैकी एक लग्नविधी चार दिवस चालतो. पहिल्या दिवशी मेहेर म्हणजे वधूशुल्क ठरवतात आणि काझी निका हा विधी करतो. मग निका खुतबा वाचतात. त्या वेळी वराची बहीण वधूच्या गळ्यात काळी पोत बांधते. नंतर वधू पडद्यामागे उभी राहते आणि वडीलधारे पुरुष वधू-वरांचे हात जुळवतात. दुसऱ्या दिवशी वधू-वर स्त्रियांच्या घोळक्यात बसतात आणि वर वधूच्या गळ्यात सोन्याची ताळी बांधतो. तिसऱ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किंवा चौथ्या दिवशी पापारक्कोलम नामक एक विधी करतात. त्या वेळी वधू ब्राह्मण स्त्रीसारखा पोषाख करते आणि एका हातात पितळेचे भांडे व दुसऱ्या हातात एक काठी घेऊन वराजवळ जाते. हातातल्या काठीने ती त्याला हळूच मारते आणि म्हणते, मी तुला ताक आणि दही दिले होते. त्याचे पैसे मला दे. तेव्हा नवरा आधी तिच्या भांड्यात चिंचोके टाकतो. पण वधू पैसे मागते आणि पुन्हा त्याला काठीने मारते. तेव्हा तो तिच्या भांड्यात तांबे, चांदी व सोने यांची नाणी टाकतो. मग वधू खूष होऊन परत जाते.

हे अरबीमिश्रित तमिळ भाषा बोलतात. [का. ट्रा. स. इं.]

मरवन द. भारतातील एक द्रविड जात. यांची वस्ती प्रामुख्याने मदुरा आणि तिनेवेल्ली या जिल्ह्यांत आढळते. या लोकांना मरवन हे नाव का प्राप्त झाले, या संबंधात अनेक दंतकथा सांगितल्या जातात. त्यांतील एक अशी – रामाने रावणाबरोबर युद्ध केले. या युद्धात मरवन लोकांनी रामाला खूप मदत केली. त्यामुळे कृतज्ञताबुद्धीने रामाने यांना मरवेन म्हणजे मी तुम्हांला कधीही विसरणार नाही, असे म्हटले. यावरून यांना हे नाव मिळाले. काही लोक मरवन शब्दाचा मरम् या शब्दाशी संबंध जोडतात. मरम् म्हणजे क्रौर्य किंवा शौर्य. यावरून यांची लढाऊ प्रवृत्ती प्रतीत होते. मरणी म्हणजे पापकर्म. या शब्दापासून मरवन शब्द व्युत्पादावा, असेही काही म्हणतात. निष्ठुरपणाने कोणाही जीवाची हत्या करणारा तो मरवन, असा अर्थ त्यातून ध्वनित होतो.

मरवन लोक दिसायला धिप्पाड आणि क्रूर दिसतात. यांचे केस काळे व कुरळे असतात.

सांप्रत मरवन लोक शेतीचा व्यवसाय करीत असले, तरी त्यांच्यांत गुन्हेगार लोकांचा भरणा फार आहे. नगररक्षकांना यांचा फार उपद्रव होतो. गुरे पळविणे हा त्यांच्या गुन्ह्यांतील प्रमुख भाग होय. अनेक वेळा ग्रामरक्षकाची भूमिका वठवून हे लोकांकडून पैसेही उकळतात.

यांच्यांत सात पोटजाती आहेत. त्यांची नावें अशी – सेंबुनात्तू, कोंडयंकोट्टई, अप्पनुर्नत्तू, अगत्थ, ओरुनात्तू, उपुकत्ती व कुरीचिकत्तू. या सर्व पोटजातींमध्ये सेंबुनात्तू ही श्रेष्ठ मानली जाते.

विवाहप्रथा – मरवन लोकांत विवाहाच्या अनेक पद्धती आहेत. एका पद्धतीत वरपक्षाकडील लोक एका शुभ मुहूर्तावर पाच नारळ, केळ्यांचे पाच घड, पाच हळकुंडे, विड्याची पाने, सुपाऱ्या व फुले घेऊन वधूच्या घरी जातात. या वेळी त्यांच्याबरोबर हळदीने माखलेली ताळी असते. तिथे गेल्यावर वधूला पूर्वेकडे तोंड करून एका आसनावर बसवितात. नंतर वराची बहीण वधूच्या गळ्यातील पूर्वीची काळ्या मण्यांची दूड काढते व तिला ताळी बांधते. ताळी बांधली जात असताना शंख वाजवतात. मग वधूला वराच्या घरी नेतात. तिथे प्रथम त्यांची दृष्ट काढून नंतर त्यांना दुधाने माखतात. मग मेजवानी होते.

दुसऱ्या पद्धतीत वरपिता आपल्या इष्टमित्रांसह विड्याची पाने, सुपारी, तांदूळ, नारळ, हळकुंडे, चंदनाचे गंध व फुले घेऊन वधूच्या घरी जातो. या सर्व वस्तू वधूपित्याला दिल्या जातात. नंतर चार दिवसांनी लग्न होते. लग्नाच्या दिवशी गृहदेवतेला पोंगळ (खीर) अर्पण करतात. मग वराला पालखीतून वधूच्या घरी नेतात. तिथे वधूपिता किंवा वधूबंधू वराला विड्याचे पान देतो. नंतर वधूचा मामा तिचे डोळे झाकून, तिला उचलून वराजवळ नेतो. मग या दांपत्याभोवती चार स्त्रिया उभ्या राहतात आणि त्या थाळीत नारळाचे एक बक्कल व भाकरी ठेवून ती थाळी वधू-वरांभोवती तीन वेळा ओवाळतात. नंतर शंख वाजवतात. शंखवादन चालू असताना वधू-वर त्या थाळीत थुंकतात. मग मामा त्यांचे हात एकत्र बांधतो आणि वराची बहीण वधूच्या गळ्यात ताळी बांधते. ही ताळी म्हणजे काळ्या रेशमी दोऱ्यात बांधलेली आंगठी असते. ताळीबंधनानंतर वधूवरांना आशीर्वाद देतात. एवढे झाल्यावर लग्नविधी संपतो. मग ताळीऐवजी वधूच्या गळ्यात सोन्याचा एक सर बांधतात.

लग्नात एखादी अडचण आली, तर वधूच्या घरी ताळी पाठवून तिला वराच्या घरी आणतात. नंतर काही दिवसांनी सर्व विधी करतात. कधी कधी वराऐवजी त्याचा प्रतिनिधी म्हणून वराच्या जागी एक दंड (काठी) उभा करतात आणि वराकडील कोणीतरी वधूच्या गळ्यात ताळी बांधतो.

मरवन लोकांत सेंबुनात्तू या पोटजातीखेरीज इतर पोटजातींत विधवाविवाहाची चाल आहे.

सण-उत्सव – हे लोक पलय नावाचा एक सण गावानजीकच्या मैदानात साजरा करतात. या वेळी नाचाचे कार्यक्रम होतात. सण चार दिवस चालतो. याशिवाय मरवन लोक जल्लीकट्टू नावाचा बैलांचा एक विशिष्ट खेळ करतात. हा खेळ वर्षातून एकदाच होतो. खेळासाठी नदीकाठचे किंवा तळ्याकाठचे मैदान पसंत करतात. मग बैलांना सजवून खेळाच्या जागी आणतात. एका वेळी सुमारे दोनशे-तीनशे बैल खेळात भाग घेतात. ही एक प्रकारची स्पर्धाच असते.

मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती होते, त्यावेळी धोबी ती वार्ता इतरांना कळवतो. पंधरा दिवस मुलगी बाजूला बसते आणि सोळाव्या दिवशी स्नान करते. तिचे जर लग्न ठरलेले असेल, तर तिची भावी नणंद, ती स्नान करून घराच्या उंबरठ्यात आली, की तिच्यावरून विड्याची पाने, नारळ, केळी, पाण्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भरलेला तांब्या व तांदळाने भरलेले लोखंडी माप ओवाळून टाकते. मापात एक शलाका खोचलेली असते. तिने ती मुलगी घरात शिरत असताना तिला मारते. नंतर जमलेल्या लोकांना मामाच्या खर्चाने मेजवानी दिली जाते.

देवधर्म – मरवन लोक शैव असून, काली, करुप्पन, मथुराइ, वीरन, अय्यनार, मुतुस्वामी, इ. देवतांनाही भजतात.

मर्तिकप्रथा– या लोकांमध्ये प्रेते जाळतात किंवा पुरतात. अग्मुदैयन लोक सेंबुनाटू लोकांच्या प्रेताला स्नान घालतात आणि अग्नी असलेले मडके स्मशानभूमीत नेतात. प्रेत पुरायचे असल्यास खड्डा खणून त्यात मीठ, विटांची भुकटी व भस्म टाकून प्रेताला बसलेल्या स्थितीत पुरतात.

कोंडयंकोट्टई या पोटजातीचे लोक प्रेताचे दहन करतात. प्रेताला स्मशानात नेताना प्रेतवाहक पायघड्यांवरून चालत जातात. प्रेत पुरले असेल, तर तिथल्या मातीची व ते जाळले असेल, तर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी राखेची लिंगे करतात. नंतर त्या लिंगांना आणि कावळ्याला पिंडदान करतात. सोळाव्या दिवशी दफनभूमीवर किंवा दहनभूमीवर नऊ प्रकारचे धान्य ठेवतात. नंतर पाच कलशांची पूजा करतात. मग पिठाचा दिवा एका मडक्यात ठेवून पेटवितात. हे मडके मृताचा पुत्र डोक्यावर घेऊन तिल्लयरच्या (गणेश) मंदिरात जातो. त्या वेळी देवासमोर पडदा धरतात. मग तो पुत्र चार पावले मागे येतो. मग पडदा दूर करून तो देवाची पूजा करतो. मुलगा देवाकडे पाठ न करता घरी परत येतो.

कोंडयंकोट्टई लोक प्रेताला कुशीवर वळवून त्याच्या पायात चपला घालून ते आडव्या स्थितीत स्मशानात नेतात. या वेळी प्रेताच्या तोंडात तांदूळ घालतात आणि छातीवर त्याच्या आप्तेष्टांनी दिलेली नाणी घातलेले एक भांडे ठेवतात. उत्तरक्रिया करणारा पाण्याने भरलेले मडके घेऊन प्रेताभोवती तीन प्रदक्षिणा घालतो. त्या वेळी या मडक्याला दोन किंवा तीन भोके पाडतात. मडक्यातले थोडे पाणी प्रेतावर टाकतात. नंतर ते मडके मृताच्या डोक्यापाशी फोडतात. मग लगेच क्षौर करतात. न्हावी चिता पेटवितो. क्रिया करणारा घरी आल्यावर दिव्याला नमस्कार करतो. तो या दिवशी अल्पभुक्त राहतो. दुसऱ्या दिवशी स्मशानात जाऊन अस्थी गोळा करून एका टोपलीत भरतो. नंतर काही दिवसांनी त्या अस्थी तीर्थात नेऊन टाकतो. अकराव्या किंवा बाराव्या दिवशी नव्या फोडलेल्या मडक्यात धान्य पेरतात आणि सोळाव्या दिवशी धान्य उपटून पाण्यात नेऊन टाकतात. नंतर मृताचे नातेवाईक स्नान करतात. मग क्रिया करणारा त्यांना जेवणावळ घालतो. भोजन झाल्यावर क्रिया करणाऱ्याला त्याचा सासरा अहेर करतो. सतराव्या दिवशी ब्राह्मण उपाध्याय शुद्धीकरणविधी करतो. या विधीनंतर क्रिया करणाऱ्याला अभ्यंग स्नान घालतात. [का.ट्रा. स. इं.; मदुरा. गॅझे]

मरसवक्कलिग द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती म्हैसूर प्रदेशातील नेलमंगल, दोड्डाबळ्ळापूर, देवंड-हळ्ळी, चिकबल्लपूर, गुम्मनायकनपाल्य, मालूर, होसकोट, कोलार व बंगलोर या भागांत आढळते. हे लोक अत्यंत कष्टाळू आहेत. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे.

या लोकांमध्ये एक विचित्र धार्मिक प्रथा आहे. यांच्या स्त्रिया कायाक्लेश म्हणून किंवा देवाला बळी म्हणून आपल्या उजव्या हाताचा आंगठा सोडून इतर चार बोटे वाहतात. ही बोटे कापण्याचे काम गावचा सुतार करतो. हा कायाक्लेश भैरवलिंग अथवा भंडी देवरू या देवासाठी केला जातो. या प्रथेमागची कथा पिचिगुंटडवरू नावाचे भटके भिकारी सांगतात, ती अशी–

भस्मासुर नावाचा एक दैत्य होता. आपण अजिंक्य व्हावे अशी इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली. या इच्छापूर्तीसाठी त्याने तप करून शिवाला प्रसन्न करून घेतले. शिवाने आपला तृतीय नेत्र आपल्या उजव्या हातावर ठेवावा, असा भस्मासुराने वर मागितला. शिवाने तसे केले. हा असुर ज्याच्या डोक्यावर हात ठेवील तो जळून भस्म होऊ लागला. मग भस्मासुराने वरदात्यावरच हा प्रयोग करण्याचे ठरविले. ही गोष्ट शिवाच्या लक्षात आली आणि तो कैलासावरून पळत सुटला. असुराने त्याचा पाठलाग सुरू केला. अखेर शिव लिंगतोंड नावाच्या झुडुपात लपला. तिथे मरस वक्कलिग शेतकरी काम करीत होता. असुराने त्याच्याजवळ शिवाची चौकशी केली. शिव ज्या झुडुपात लपला होता, तिकडे त्याने बोट दाखविले. असुर तिथे गेला आणि शिवाच्या डोक्यावर हात ठेवण्याचा प्रयत्न करू लागला. एवढ्यात शिवाला वाचविण्यासाठी विष्णूने मोहिनीरूप घेऊन त्याला युक्तीने ठार केले. त्यामुळे शिव विष्णूवर प्रसन्न झाला. शिवाने त्याला आलिंगन दिले. त्याचा परिणाम म्हणून तिथे तीन लिंगांची निर्मिती झाली. ही तीन लिंगे म्हणजे जिन्नेलिंग, कल्लेलिंग व भैरवलिंग होत. यांतील पहिले लिंग शिवाने जैनांना, दुसरे कुरुबांना आणि तिसरे मरस वक्कलिग यांना दिले. शेतकऱ्याने विश्वासघात करून आपला ठावठिकाणा असुराला दाखवला म्हणून त्याला शिक्षा करण्यासाठी शिवाने त्याच्या आंगठ्याजवळचे बोट कापायला सांगितले. ही शिक्षा ऐकताच शेतकऱ्याची बायको तिथे आली. तिने शिवाला प्रार्थिले, की पतीच्या बोटाऐवजी माझी बोटे मी तुम्हांला देते. पतीचे बोट तुटले, तर आम्ही उपाशी मरू. शिवाने तिचे म्हणणे मान्य केले आणि तेव्हापासून या लोकांत स्त्रियांनी आपली बोटे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कापण्याची प्रथा पडली.

बोटे कापण्याच्या प्रथेवरून या लोकांचे तीन वर्ग पडले आहेत, ते असे –

(१) ज्यांच्या स्त्रिया हे दिव्य करतात.

(२) ज्या स्त्रिया हाताची बोटे कापण्याऐवजी सोन्याची बोटे करून ती कापतात. व

(३) ज्या स्त्रिया यांपैकी कोणतेच दिव्य करीत नाहीत.

मराठवाडा सांप्रतच्या महाराष्ट्र राज्याचा एक भाग. यात औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड व उस्मानाबाद हे पाच जिल्हे येतात.

भूरचना – भूस्तरशास्त्राच्या दृष्टीने हा भाग तृतीय युगापासून वनलेला एकजिनसी कृष्णप्रस्तर आहे. त्याची जाडी क्वचित चार हजार फूटही भरते. मराठवाड्याचा काही भाग गोदावरी आणि इतर नद्या यांच्या वालुकामय थरांनी बनलेला



स्त्रीला मूल झाले, की हा बोटे तोडण्याचा समारंभ करतात. त्यासाठी एखादा शुभ दिवस निवडतात. हा दिवस चैत्र पौर्णिमेच्या जवळपासचा असतो. स्त्रीची तोडलेली बोटे मुंग्यांच्या वारुळात टाकतात. नंतर बोटांना चिंध्या बांधून त्यांवर तिळाचे गरम तेल ओततात. बोटे कापणाऱ्या सुताराला व त्या स्त्रीला अहेर करतात. [इं. अं. – व्ही. एन्. नरसिम्मियेंगर]

आहे. या भागाला उत्क्रांततृतीययुगीन असे नाव आहे. यातील बराच प्रदेश कारी (बॅसॉल्ट) व कालथरी (डॉलराइट) या कृष्ण पाषाणांनी बनलेला आहे.

मराठवाड्याचे दक्षिण पठार समुद्रसपाटीपासून सरासरी १,२५० फूट उंच आहे. क्वचित ही उंची ३,५०० फुटांपर्यंत जाते. पश्चिमेकडून पूर्वेकडे असा या पठाराचा उतार आहे. पर्व-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ताच्या रांगा मुख्यतः सह्याद्रीशी संबद्ध आहेत. पूर्व भागातील बालाघाटच्या डोंगरांची रांग सुमारे दोनशे मैल लांब आणि साडेचार मैल रुंद आहे.

नद्या – गोदावरी, मांजरा आणि पूर्णा या मराठवाड्यातील मुख्य नद्या आहेत. त्र्यंबकेश्वर येथे उगम पावलेली गोदावरी नदी पुणतांबे गावाजवळ मराठवाड्यात प्रवेश करते. नांदेडजवळ या नदीची नाभी मानून सिंहस्थात दक्षिणेतील लोक हिची प्रदक्षिणा करतात. पूर्णा व मांजरा या दोन्ही नद्या गोदावरीला मिळतात.

मराठवाड्याचे हवामान किंचित उष्ण व कोरडे आहे.

इतिहास – मराठवाड्याचा इतिहास प्राग्‌ऐतिहासिक काळापासून उपलब्ध होण्यासारखा आहे. इतिहासपूर्वकाळी इथे मानव राहत होता, हे स्पष्ट दिसते. परळी, गंगाखेड या भागांत नवाश्मयुगातली कुऱ्हाडीच्या डोक्यासारखी उपकरणी आढळली आहेत. प्रभू रामचंद्र दंडकारण्यात गोदातीरावर राहत होता, हे प्रसिद्धच आहे. ऐतिहासिक काळात सम्राट अशोक याला पैठणकर लोक माहीत होते, असे त्याच्या शासनातील पेत्तनिक आणि रट्टिक या शब्दांवरून कळते. हा काल सनपूर्व २३० असा आहे. आंध्रभृत्य राजांनी नासिक आणि मराठवाडा या भागावर राज्य केले. या वंशातील सातकर्णी (सनपूर्व १६८), हाल (सनपूर्व २४ ते २०) व गौतमीपुत्र (इ. स. ८० ते १०४) हे राजे प्रसिद्ध आहेत. विदर्भातल्या वाकाटकांनीही या भागावर काही दिवस राज्य केले. अजंटाच्या सोळा क्रमांकाच्या लेण्यात वाकाटकांची वंशावळ आहे. यानंतर या भागावर चालुक्यांची राजवट सुरू झाली (इ. स.५५० ते ७५०). वातापी ही त्यांची राजधानी होती. या वंशातील पुलकेशी दुसरा हा फार पराक्रमी राजा होता (इ. स. ६११ ते ६४२). त्यानंतर इ.स. ७५० ते ९७३ पर्यंत इथे राष्ट्रकूटांनी राज्य केले. या वंशातील कृष्ण राजाने इ. स. ७७३ मधे वेरूळ येथील लेणी खोदविली.

यानंतर यादव वंशाचे राज्य आले. यादव हे यदुवंशी असून, गुजरातमधून महाराष्ट्रात आले. भिल्लम हा या वंशाचा संस्थापक होता. भिल्लम (पाचवा) याने इ. स. ११८७ ते ११९१ या कालात देवगिरी शहर वसवले व तियला किल्ला बांधला. त्याचा पुत्र जैतुगी ऊर्फ जैत्रपाळ (पहिला) (इ. स. ११९१-१२१०) हा मोठा पराक्रमी होता. ज्योतिषी भास्कराचार्यांचा मुलगा लक्ष्मीधर हा त्याच्या दरबारातील मुख्य पंडित होता. जैत्रपाळाचा पुत्र सिंघण (इ. स. १२१०–१२४७) हाही फार पराक्रमी होता. त्याने गुजरात व कुंतल हे देश जिंकून घेतले. खोलेश्वर हा याचा सेनापती फार शूर होता. सिंघणाचा पराक्रमी व विद्वान मुलगा जैत्रपाळ (दुसरा) हा सिंघणाच्या आधीच मरण पावल्याने, सिंघणाचा नातू कृष्णदेव हा राजा झाला (इ. स. १२४७–१२६०). याने गुजरातवर स्वाऱ्या केल्या व अनेक यज्ञही केले. याचा मंत्री जल्हण हा फार विद्वान होता. याच्या नंतर याचा धाकटा भाऊ महादेव हा गादीवर आला (इ. स. १२६०–१२७१). याने तेलंगण, गुजरात व कोकण या प्रदेशांवर स्वाऱ्या केल्या. ठाणे येथील सोमेश्वर शिलाहार या राजाला त्याने नाविक युद्धात ठार केले व उत्तर कोकण आपल्या राज्याला जोडले. हेमाडपंत हा याचा करणाधिप होता. महादेवानंतर कृष्ण देवाचा मुलगा रामदेव हा गादीवर आला (इ. स. १२७१ ते १३०९). याचाही प्रधान हेमाडपंतच होता. रामदेव हाच महाराष्ट्रातील शेवटचा वैभवशाली राजा होय. याच्या वेळी अलाउद्दीन खिलजीने दक्षिणेत स्वारी करून याचा पराभव केला.

यानंतर मराठवाड्यावर आणि सर्व दक्षिणेतच इस्लामचे प्रचंड आक्रमण झाले. गुलबर्ग्याच्या बहमनी राज्याचा विस्तार जवळजवळ सर्व महाराष्ट्रभर झाला होता. इ. स. १५३८ मधे बहमनी राज्याची पाच शाह्यांत विभागणी झाली. तोपर्यंत मराठवाड्यावर मुसलमानांची सत्ता होती. पुढेही अहमदनगरची निजामशाही आणि विजापूरची आदिलशाही यांनी वेळोवेळी मराठवाड्यावर स्वाऱ्या केल्या. त्यानंतर हा प्रदेश हैद्राबादच्या निजामाच्या वर्चस्वाखाली राहिला. मराठे व निजाम यांच्यांतील सिंदखेड (इ. स. १७५७), उदगीर (इ. स. १७६०), राक्षसभुवन (इ. स. १७६३) व खर्डा (इ. स. १७९५) या लढाया मराठवाड्यातच झाल्या. या प्रत्येक लढाईत निजामाचा पराभव झाला; पण तह करताना मात्र मराठ्यांपेक्षा निजामाचे डावपेच प्रभावी ठरले. यानंतरची मराठवाड्यातील महत्त्वाची घटना म्हणजे असई गावी झालेली इंग्रज व मराठे यांची लढाई. या लढाईत इंग्रजांचा जय झाला. इंग्रजांच्याच कृपाछत्राखाली निजाम आपले राज्य करू लागला. मराठवाडा हा त्याच्याच अखत्यारीत राहिला. राज्यकर्ते इस्लामी धर्माचे असल्यामुळे राज्यकारभारात मुसलमानांचा वरचष्मा होता. भाषा व धर्म या बाबतींतही हिंदू लोकांवर अन्याय होत असे. आपली सत्ता निरंकुश राहावी म्हणून इंग्रजांनी जबरदस्तीने आपल्यावर निजामी राजवट लादली, ही चीड मराठवाड्यातील लोकांच्या मनात सलत होती. त्यामुळे प्रथम निजामी राजवट आणि नंतर इंग्रजी सत्ता उखडून टाकण्याचे कट मराठवाड्यात नेहमी होत असत. निजाम ते निर्दयपणे मोडून काढी. राज्याच्या इतर भागांतील लोकांना ज्या सवलती मिळत होत्या, त्याही निजामी राजवटीने मराठवाड्याला दिल्या नाहीत.

मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण तेवढे मातृभाषेतून मिळे व पाचव्या इयत्तेपासून पुढे विद्यापीठातही उर्दू माध्यमातून शिकावे लागे. तसेच नागरिक स्वातंत्र्याचे सार्वे हक्कही नसल्यामुळे इथल्या लोकांना राजकीय, सामाजिक व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शैक्षणिक सभा-संमेलने राज्याच्या बाहेर जाऊन भरवावी लागत आणि बऱ्याच वेळा, धार्मिक कार्यक्रमाच्या नावाखाली राजकीय कार्यक्रम पार पाडावे लागत.



अजंटा येथील लेणे

इ. स. १९४६ मध्ये क्रिप्स कमिशन भारतात आले होते. त्या वेळी मराठवाड्यातील महाराष्ट्र परिषदेने क्रिप्स कमिशन-कडे एक निवेदन पाठवले व त्यात हिंदुस्थान स्वतंत्र होताना हैद्राबाद संस्थानचे तीन तुकडे करून ते लगतच्या भाषिक प्रदेशात सामील करावे, अशी स्पष्ट मागणी केली. या वेळे-पासूनच मराठवाडा महाराष्ट्राला जोडावा, अशी निकडीची मागणी पुढे येऊ लागली.

पुढे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारत सरकारशीही निजामी राजवटीने आक्रमक धोरण धरले. रझाकारसंघटना हिंदूंवर जुलूमजबरदस्ती करू लागली. हिंदूंचे जीवित व मालमत्ता धोक्यात आली. तेव्हा भारत सरकारने पोलिसकारवाई करून निजामाला शरण आणले व निजामी राज्य भारतीय संघराज्यात समाविष्ट केले. पुढे १ नोव्हेंबर १९५६ रोजी मराठवाडा द्विभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट केला गेला. त्यानंतर ते द्विभाषिक राज्यही मोडले आणि १ मे १९६० रोजी मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र यांचे एक घटक राज्य महाराष्ट्र या नावाने अस्तित्वात आले.

प्रेक्षणीय स्थळे – मराठवाड्यात प्रेक्षणीय स्थळे वरीच आहेत. त्यांपैकी काही अशी–

अजंटा – हे स्थान लेण्यांबद्दल प्रसिद्ध आहे. इथे २९ लेणी असून, त्यात २४ विहार आणि ५ चैत्य आहेत. येथील भित्ति-चित्रेही अप्रतिम आहेत. वास्तू, शिल्प आणि चित्र या तीन्ही कलांचा उत्कर्ष इथे दिसून येतो. औरंगाबादपासून ५६ मैलांवर अजंटा आहे.

वेरूळ – येथील लेणी प्रसिद्ध आहेत. त्यांची संख्या ३४ असून, त्यात १२ बौद्धांची, १७ हिंदूंची व ५ जैनांची आहेत. ही लेणी डोंगराच्या उतारावर खोदलेली आहेत. यांतील कैलास लेणे हे अप्रतिम आहे. प्रचंड शिवमंदिर, त्याच्या भोवतालच्या ओवऱ्या, प्रदक्षिणामार्ग, ध्वजस्तंभ, सभामंडप, गर्भगृह, शिखर हे सर्व एकसंघ डोंगरात खोदून निर्माण केलेले आहे. भोवतालचे अंगण २७०×१५० फूट एवढे विस्तीर्ण आहे.



कैलास लेणे – वेरूळ

लेण्यापासून सुमारे दीड मैल अंतरावर घृष्णेश्वराचे मंदिर आहे. हे एक ज्योतिर्लिंग आहे. त्याचा सभामंडप अहल्याबाई होळकर यांनी बांधला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

औरंगाबाद – या शहराचे मूळचे नाव खडकी असे होते. इ. स. १६१० मध्ये मलिकंबरने ते वसवले. पुढे इ. स. १६५३ मध्ये औरंगजेबाने त्याचे खडकी हे नाव बदलून औरंगाबाद असे त्याचे नामकरण केले. पूर्वी या शहराला तटबंदी होती. इथे बिबीका मकबरा ही ताजमहालच्या धर्तीवर बांधलेली इमारत

बिबीका मकबरा – औरंगाबाद

प्रेक्षणीय आहे. औरंगजेबाच्या राबिया दुराणी या पत्नीची ही क़बर आहे. शहराच्या उत्तरेला काही लेणी आहेत. इथले हिमरू व किनखाब हे कापड प्रसिद्ध आहे. पूर्वी मुहंमद तुघलुकाने आपल्याबरोबर हे कापड निर्माण करणारे कलावंत इथे आणले होते. इथून जवळच देवगिरी हा प्रसिद्ध किल्ला आहे.

पैठण – गोदावरीच्या तीरावरचे हे एक क्षेत्र आहे. पूर्वी इथे सातवाहनांची राजधानी होती. एकनाथांची ही जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी यांनी इ. स. ११६८ मध्ये इथेच संन्यास घेतला. पूर्वी ही मोठी बाजारपेठ होती. इथले रेशमी व जरीचे कापड प्रसिद्ध होते. घरंदाज स्त्रिया अंगावर घेत असत, ती भरजरी पैठणी इथेच तयार होत असे.

बीड – हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे. पूर्वी या शहराला दुर्गावती व चंपावती अशी नावे होती. इथे कनकेश्वराचे प्रसिद्ध मंदिर असून, ते एका तळ्यात आहे. तळ्याचे क्षेत्रफळ २७८×२५२ फूट आहे. मंदिराच्या दोन्ही बाजूंना प्रचंड दीपमाळा आहेत. बीड येथील गुंफा प्रसिद्ध आहेत. सिद्धान्तशिरोमणी या ग्रंथाचे कर्ते भास्कराचार्य इथेच होऊन गेले.

बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई किंवा मोमिनाबाद येथे योगेश्वरी देवीचे मंदिर आहे. गीतार्णवकर्ते कवी दासोपंत इथेच राहत होते. परळी वैद्यनाथ येथे ज्योतिर्लिंग आहे. परभणी जिल्ह्यात औंढ्या नागनाथ इथेही आणखी एक ज्योतिर्लिंग आहे. इथले मंदिर हे वास्तुशास्त्राच्या दृष्टीने उत्कृष्ट आहे. इथे नामदेवाची समाधी आहे. समर्थांचे जन्मस्थान जांब हे परभणी जिल्ह्यातच आहे. इथे समर्थांचे एक सुंदर मंदिर बांधलेले आहे. नांदेड येथे गुरू गोविंदसिंग याची समाधी आहे. तिचे दर्शन घेण्यासाठी हजारो शीख लोक इथे येत असतात. उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर येथे भवानी देवीचे आदिपीठ आहे. नळदुर्ग व परंडा येथे किल्ले आहेत. माहूर हे रेणुका देवीचे स्थान आहे. याशिवाय आपेगाव (ज्ञानेश्वरांची जन्मभूमी), कुलपाक (जैन क्षेत्र), बामणी (सरस्वती व पूर्णा या देवतांची मंदिरे), उनकेश्वर (शिवालय व उष्ण पाण्याचे झरे), इ. ठिकाणे प्रसिद्ध आहेत.

अनेक कवींची व संतांची मराठवाडा ही जन्मभूमी व कर्मभूमी आहे. आदिकवी मुकुंदराज, महाकवी दासोपंत व शिवकल्याण कवी हे आंबेजोगाई येथे होऊन गेले. चतुर्वर्गचिंतामणिकार हेमाद्री, नाथांचे गुरू जनार्दनस्वामी; तसेच रमावल्लभदास हे दौलताबाद येथे राहत असत. महानुभाव कवी भास्करभट्ट बोरीकर व हंसराज यांचे वास्तव्य परभणीला होते. संत नामदेव व विसोबा खेचर हे औंढ्या नागनाथाचे. भानुदास, एकनाथ, मुक्तेश्वर, बहिरापिसा आणि कृष्णदास हे कवी पैठणचे. जांब ही समर्थांची जन्मभूमी. याशिवाय, गंगाखेड येथील जनाबाई, परळीचा जगमित्र नागा, तेरढोकीचा गोरा कुंभार व हरिनारायण, बीदरचा सेना न्हावी, महागावचा शिवरामस्वामी, बीड येथील जनीजनार्दन व विठ्ठल, औरंगाबादचे गोपाळनाथ, मध्वमुनी व अमृतराय आणि धारूरचे उद्धव चिद्घन हे मराठवाड्यातले संत व कवी प्रसिद्ध आहेत.
[वि. मुं. रा. प.; मराठवाडापरिचय– मालेगाव, १९६०]

मराठा महाराष्ट्रातील एक मोठी जात. प्राचीन काळी महाराष्ट्राला प्राकृतात महारठ्ठ असे नाव होते. सातवाहनांच्या काळातले म्हणजेच सनपूर्व २ ऱ्या शतकातले शिलालेख नाणेघाट, भाजे, कार्ले, बेडसे, कान्हेरी येथील लेण्यांत सापडले आहेत. त्यांत महारठि हा लोकवाचक शब्द वापरलेला आढळतो. मोगलीपुत्त तिस्स याने सनपूर्व ३ ऱ्या शतकात वनवासी, अपरांतक, महारठ्ठ, इ. प्रदेशांत धर्मोपदेशक पाठवले होते. त्यावरून त्या काळापासून महारठ्ठ हे नाव रूढ असले पाहिजे, असे श्री. पां. वा. काणे यांचे मत आहे. सम्राट अशोकाच्या काळी दक्षिण भारतात रठ्ठ नामक लोक होते. तेच कालांतराने आपल्याला महारठ्ठ म्हणवू लागले. त्याचेच रूपांतर होऊन मराठा हे नाव रूढ झाले.

या जातीचे अस्सल मराठा, कुणबी व इतर असे तीन वर्ग आहेत. अस्सल मराठे स्वतःला क्षत्रिय मानतात. राजे, सरदार,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जमीनदार व लढवय्ये लोक यांचा या वर्गात समावेश होतो. कुणबी म्हणजे शेतकरी मराठे. यांनाच कुळवाडी असे म्हणतात.

श्री. बा. ग. जगताप

तिसऱ्या वर्गात भंडारी, गवंडी, कुंभार, लोहार, माळी, चित्रकथी, न्हावी, परीट, सुतार, तेली, इ. पोटजातींचा अंतर्भाव होतो.

अस्सल मराठे राजपूत वंशाचे असून त्यांच्या सूर्य, सोम, ब्रह्म व शेष अशा चार शाखा आहेत व त्यांच्यांत ९६ कुळे आहेत, अशी समजूत आहे. त्यांतील काही कुळांची नावे अशी – अहिराव, आंग्रे, भागवत, भालेराव, भिसे, भोइटे, भोसले, चाळके, दाभाडे, दळवी, डफळे, देवराव, ढमढेरे, ढवळे, धुमाळ, गायकवाड, गवळी, घाटे, घोरपडे, गुजर, हिरवे, जगदाळे, जाधव, जगताप, कदम, काळे, कानडे, खंडागळे, खांडेकर, क्षीरसागर, महाडिक, मालुसरे, माने, मोहिते, चव्हाण, मोरे, नलवडे, निंबाळकर, पानसरे, पाटणकर, पाठारे, फाळके, पिंगळे, पिसाळ, रन्नवरे, राऊत, राणे, साळुंके, सावंत, शेलार, शेळके, शिंदे, शिर्के, शितोळे, सुर्वे, थोरात, वाघ, वाळके, यादव, इत्यादी.

सांप्रत मराठ्यांत हजारो आडनावे आढळून येतात. पण त्या सर्वांचा समावेश बहुधा शहाण्णव कुळांत होतो. मात्र त्यांतील फक्त ५०–६० कुळेच सध्या माहीत आहेत. त्यांतील पाच किंवा सात कुळांचे गटही केलेले आढळतात. अशा कुळांचा पूर्वज एक असावा. चालुक्य, यादव, कदंब, शिलाहार, मौर्य, नल, मानव्य, कलचुरी, मल्लसूर, गुर्जर, पल्लव, परमार, शालिवाहन, इ. इतिहासप्रसिद्ध संस्कृत नावांवरूनच चाळके, जाधव, कदम, शेलार, मोरे, नलवडे, माने, कलचुरे (कचरे), मालुसरे, गुजर, पालव, पवार, साळवी, इ. नावे उगम पावली आहेत. त्यावरून ही सर्व घराणी क्षत्रिय ठरतात. प्राचीन काळी त्यांनी राज्ये केली आणि मध्ययुगात मोठे पराक्रमही गाजवले.

यासंबंधी चिं. वि. वैद्य यांचे मत असे – मराठे हे आर्य क्षत्रिय आणि नागवंशी यांच्या मिश्रणाचे महाराष्ट्रातील लोक होत. नागवंश हा आर्य आहे की काय, हा प्रश्न आपण बाजूस ठेवू. पण हे नागवंशी लोक द्रविड वंशाच्या लोकांहून भिन्न आणि विशेष कर्तृत्ववान व शूर असे दिसतात. याची साक्ष दक्षिणेकडील तमिळ लेख देतात; इतकेच नव्हे, तर महाभारतही देत आहे. महाभारतात दिलेली नाग – कुळांची नावे आणि मराठ्यांच्या कुळांची नावे पुष्कळ जुळतात. त्यांचे सूर्यवंशी व चंद्रवंशी यांच्याशी मिश्रण होऊन हल्लीचे मराठे बनले. अस्सल मराठा कुळे कमी संस्कृतीची व कमी बुद्धीची मुळीच नाहीत. एकंदर शूर जातींत मराठेच जास्त राजधोरणी आहेत, असे समजले जाते. चालुक्य, राष्ट्रकूट, यादव या वंशांना मी अस्सल मराठे क्षत्रिय समजतो. डॉ. भांडारकर यांनीही हे मत मान्य केले आहे. उत्तरेकडील आर्य सन पूर्व ६०० च्या सुमारास महाराष्ट्रात वसाहत करण्यास आले आणि मराठे बनले. अशा क्षत्रिय वंशांपैकीच चालुक्य, राष्ट्रकूट व यादव ही ऐतिहासिक घराणी होती आणि हल्लीची शिर्के, शेलार, महाडिक, गुजर वगैरे मराठे घराणी प्राचीन क्षत्रिय मराठे घराणी आहेत.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड

देवके– मराठ्यांची पुष्कळ देवके आहेत. त्यांत झाडे, पशू, पक्षी, आणि विविध वस्तू यांचा समावेश होतो. उदा० आंबा, अघाडा,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपटा, आवळा, बाभुळ, बेहेडा, बेल, बोर, चिंच, घोडा, हळद, जांभुळ, कदंब, कमळ, हरिण, कासव, केवडा, खैर, कोल्हा, कोया, कुऱ्हाड, रुईचे फूल, म्हैस, मोर, मोरपीस, नाग, नागवेल, नारळ, निरगुडी, पळस, पांगारा, पाणकणिस, फणस, पिंपळ, राजहंस, रुद्राक्ष, साग, साळुंखीचा पंख, शमी, शंख, शेळी, शिशाची गोळी, सोने, सूर्यफूल, ताड, तांबे, तरवड, तरवार, उंबर, वड, वेळ, वेत, इत्यादी. विवाहाच्या प्रसंगी या देवकांची पूजा केली जाते. समान देवक असलेल्या कुळांत लग्नसंबंध करीत नाहीत. नवीन घरात प्रवेश करताना व खळे तयार करतानाही देवकांची पूजा करतात.

ब्राह्मणांप्रमाणे मराठे कुळांचीही गोत्रे आहेत. त्यांची नावे अशी – अगस्ती, अंगिरा, अत्री, कौंडिण्य, कौशिक, माल्यवंत, भारद्वाज, दाल्भ्य, गर्ग, गौतम, जमदग्नी, कपिल, काश्यप, पराशर, शांडिल्य, वैरुण्य, वसिष्ठ, वेद आणि विश्वामित्र. पण पुष्कळ कुळांना स्वतःचे गोत्र माहीत नसते. कुळगोत्रांच्या याद्या आहेत, त्यांतही एकवाक्यता नसते. मोरे कुळाचे गोत्र गौतम किंवा भारद्वाज सांगितलेले आहे; चव्हाणांचे कपिल किंवा वसिष्ठ; तर पवारांचे वसिष्ठ किंवा गर्ग गोत्र आहे.

वेशभूषा – मराठे लोक मध्यम उंचीचे, सुदृढ बांध्याचे व नाकीडोळी नीटस असतात; काही थोडे देखणेही असतात. कुणबी लोकांपेक्षा हे वर्णाने उजळ असून, त्यांच्या बऱ्याच स्त्रिया गोऱ्या व सुंदर असतात. इतिहासकाळी पुरुष हजामत करून, मोठाल्या मिशा ठेवीत. डोक्याला पागोटे किंवा पटका, कमरेला चोळणा किंवा धोतर, अंगात बाराबंदी किंवा सदरा व त्यावर उपरणे आणि पायांत वहाणा किंवा चढाव असा त्यांचा पोशाख असे. मराठा स्त्रिया अंगात खणाची चोळी घालीत व नऊ वारी लुगडे नेसत. डोक्यावरून पदर घेण्याची चाल अजूनही त्यांच्यांत आहे. खानदानी घराण्यात तोच पदर तोंडावरही घेण्याची प्रथा होती.

मराठा स्त्री

श्रीमंत मराठ्यांत पडद्याची चाल फार आहे. त्या कपाळावर कुंकू लावतात आणि तोंडावर व हातापायांवर गोंदवून घेतात. त्यांचे केस नीट विंचरलेले असून, मागे अंबाडा बांधलेला किंवा वेणी घातलेली असते. त्यांना अंगभर सोन्याचे दागिने घालण्याची फार हौस असते.

अस्सल मराठ्यांतही तीन पोटभेद आहेत–

(१) कुलीन – प्राचीन काळातील, थोर घराण्यांतील, शुद्ध रक्ताचे लोक. इतर हलक्या जातींशी लग्नसंबंध करीत नसल्यामुळे हे उच्च दर्जाचे मानले जातात. त्यांच्यांतील पुरुष जानवे घालतात व स्त्रिया पडदा पाळतात. त्यांच्यांत विधवा-विवाह रूढ नाही.

(२) लेकावळे – मराठा स्त्रीपुरुषांची विवाहबाह्य संबंधामुळे उत्पन्न झालेली प्रजा.

(३) अकरमासे – मराठा पुरुष किंवा स्त्री आणि इतर जातीची स्त्री किंवा पुरुष यांची प्रजा. लेकावळे व अकरमासे यांचे आपसांत लग्नसंबंध होतात. त्यांच्या चालीरीती मराठा कुणबी लोकांप्रमाणेच आहेत.

विवाहप्रथा – या लोकांत सगोत्र विवाह निषिद्ध मानला जात नाही. मात्र समान देवक असलेल्या कुलांचा लग्नसंबंध होत नाही. मामेबहिणीशी लग्न करतात, पण आते किंवा मावस बहिणीशी करीत नाहीत. मृत पत्नीच्या बहिणीशी लग्न करता येते. दोघे भाऊ दोघी बहिणींशी लग्न करू शकतात. पूर्वी मुलांची लग्ने १२–२५ या वयात होत आणि मुलींची लग्ने त्या वयात येण्यापूर्वीच करीत. राजे व जहागिरदार आपल्या मुलींची लग्ने केव्हा केव्हा योग्य वर मिळेपर्यंत लांबवीत. श्रीमंत व मध्यम वर्गातील मराठ्यांमध्ये हुंड्याची चाल आहे; गरीब मराठ्यांत मुलीबद्दल वरपक्षाकडून पैसे घेण्याची

मराठा शेतकरी – सांकेतिक चित्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चाल आहे. पुष्कळ पुरुष अनेक बायका करीत. विधवाविवाह व काडीमोड निषिद्ध मानीत.

आईबाप आपल्या मुलामुलींची लग्ने ठरवतात. सामान्यतः मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. पत्रिका पाहण्याची प्रथा आहे; पण ती जमलीच पाहिजे असे नाही. देण्याघेण्याचे जमले की लेखी करार केला जातो. मग हळदी व लग्न यांसाठी मुहूर्त पाहून समारंभ ठरवतात. त्यानंतर साखरपुडा हा कार्यक्रम होतो. वराकडील मंडळी वाजतगाजत वधूकडे जातात. तिथे गणपती व वरुण यांची पूजा करतात. वराचा पिता वधूला कुंकू लावून वस्त्रालंकार देतो व तिच्या तोंडात साखर घालतो. जमलेल्या माणसांना पानसुपारी व पेढे वाटतात. अशाच प्रकारचा कार्यक्रम वधूकडील मंडळी वराकडे जाऊन करतात, त्याला तिळ म्हणतात.

पत्रिकापूजन, अक्षत, घाणा, हळदी, तेलवण, देवक बसवणे, वाग्दान, सीमांतपूजन, गौरीहरपूजन,हे विधी मुख्य विवाहविधी-पूर्वी केले जातात. हळदीसमारंभासाठी मुहूर्त ठरवलेला असतो. त्या वेळी वराकडील काही सुवासिनी हळद व वस्त्रे घेऊन वाजत गाजत वधूच्या घरी जातात. तिथे प्रथम परटीण वधूला तेल लावते. मग वराकडील स्त्रिया तिच्या अंगाला हळद लावून



छ. शाहूमहाराज – कोल्हापूर

तिला स्नान घालतात, पिवळी साडी चोळी नेसवतात व दागिने घालतात. उरलेली हळद परत नेऊन वराला लावतात व त्याला स्नान घालतात. वधूपिता त्या वेळी वराला पिवळे कपडे देतो. स्त्रियांना हळद-कुंकू दिल्यावर मेजवानी होते.



मराठा जहागिरदार – सांकेतिक चित्र

मुख्य समारंभ वधूच्या घरी उभारलेल्या मंडपात होतो. प्रथम वधूपिता मुहूर्त-पत्रिकेची पूजा करतो. त्यानंतर वधू-वरांना समोरासमोर उभे करून त्यांच्यामध्ये अंतरपाट धरतात. त्या वेळी वधू-वरांचे मामा त्यांच्या मागे, हातांत तरवारी घेऊन उभे राहतात व त्या वधू-वरांच्या मस्तकांवरून एकमेकींना भिडवतात. मग मंगलाष्टके म्हणून वधूवरांवर अक्षता टाकतात. अंतरपाट दूर झाल्यावर वध-वर आपल्या हातांतले तांदूळ, जिरे व साखर यांचे मिश्रण परस्परांच्या मस्तकांवर थोडे थोडे असे पाच वेळा टाकतात. त्या वेळी भटजी मंत्र म्हणतात आणि शिंग-तुताऱ्या व इतर वाद्यांचा गजर होतो.

त्यानंतर मधुपर्क, कन्यादान, विवाहहोम व सप्तपदी हे विधी होतात. निमंत्रितांना पानसुपारी, फुले व अत्तराचा फाया देतात.

त्यानंतर कंकणबंधन, आंबवण, रुखवत, ध्रुवदर्शन, सुनमुख-दर्शन, ऐरणी (झाल), वरात, लक्ष्मीपूजन, तोंड धुणे, रास-न्हाणी, इ. कार्यक्रम होतात. शेवटी देवकोत्थापन करून लग्न-समारंभ पूर्ण करतात.

लग्नसमारंभात आपल्या शक्तीबाहेर खर्च करण्याची प्रवृत्ती या समाजात आहे. कित्येक ठिकाणी कलावंतिणीचा नाच किंवा गाणे करतात.

गर्भाधान – लग्नानंतर वधूला रजोदर्शन होताच सजवून मखरात बसवतात. चौथ्या दिवशी तिला तेलहळद लावून न्हाऊ घालतात आणि नंतर एकदोन दिवसांत मुहूर्त पाहून गर्भाधान-विधी करतात. त्या दिवशी सकाळी दोघांना तेलहळद लावून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्नान घालतात. नंतर होमहवन केले जाते. दोघे देवांना आणि मोठ्या माणसांना वंदन करतात. दुपारी मोठी मेजवानी असते. संध्याकाळी मुलीची ओटी भरतात. दोघांना वस्त्रालंकार देतात. मुलीचा बाप त्यांना शय्या, दिवे, भांडीकुंडी वगैरे देतो. त्या रात्री दोघांचा समागम होतो.

प्रसूतिप्रथा – स्त्रीचे पहिले बाळंतपण तिच्या माहेरी होते. त्या वेळी गावातली सुईण तिला मदत करते. नाळ कापणे, बाळबाळंतिणींना आंघोळ घालणें, शेक देणे ही सर्व कामे ती व्यवस्थितपणे पार पाडते. मुलगा जन्माला आला, तर ती आनंदाची वार्ता सर्व नातेवाइकांना कळवून साखर वाटतात. दहा दिवस सुवेर पाळतात. त्या काळात रात्रभर दिवा तेवत ठेवतात. शांतिपाठही करतात. पाचव्या व सहाव्या दिवशी पाचवीची व सटवाईची पूजा करतात. कारण ते दिवस मुलाला धोक्याचे असतात, अशी समजूत असते. त्या दिवशी बाळंतिणीच्या खोलीत एक विड्याचे पान व विळा ठेवून, फुले, चंदन, धूप, इ. उपचारांनी देवीला पूजतात व अन्नाचा नैवेद्य दाखवतात. आप्तेष्टांना भोजनही घालतात. अकराव्या दिवशी सर्वजण स्नान करून सुवेरातून शुद्ध होतात. बाराव्या दिवशी बारसे करतात.

देवधर्म – मराठा लोक शिवाचे व देवीचे उपासक आहेत. खंडोबा, भैरव, रवळोबा, रोकडोबा, इ. भिन्न रूपांत ते शिवाची पूजा करतात; अंबा, भवानी, दुर्गा, शितळा, लक्ष्मी, जोगाई, बोलाई, इ. रूपांत देवीची पूजा करतात. याव्यतिरिक्त ते राम, मारुती, विठोबा, गणपती व ग्रामदेवता यांनाही भजतात.

दसरा, दिवाळी, होळी, संक्रांत, नागपंचमी, गणेशचतुर्थी, इ. सर्व सण हे लोक साजरे करतात आणि एकादशी, शिवरात्र, चतुर्थी, सोमवार, शनिवार, इ. उपवास पाळतात.

व्यवसाय–अस्सल मराठे पूर्वी सरदार, जहागिरदार किंवा देशमुख होते. त्यांची वतने वंशपरंपरेने चालणारी असल्यामुळे शहाण्णव कुळांतले मराठे जमीनदारी करू लागले. सधन शेतकरी म्हणून ते मोठ्या मानाने व वैभवाने राहत होते.

से. नानासाहेब शिंदे, वडोदे

त्यांच्यांतल्या काहींनी पाटिलकी पत्करली. कारण त्या जागेला गावात पुष्कळ मान होता. पुष्कळ लोक सैन्यात शिरले. काहींनी मोठे हुद्दे मिळवले. परिस्थितीमुळे ज्यांची शेती गेली ते व्यापारधंदा किंवा सरकारी नोकरी करू लागले.

गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, डाळ हे या लोकांचे मुख्य अन्न होय. मात्र सधन लोकच गहू व तांदूळ खाऊ शकतात. कांदाभाकर हेच गरिबांचे अन्न असते. मांसमच्छर सर्वजण खातात.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात. मनुष्य मेल्यानंतर त्याला स्नान घालून प्रेत पांढऱ्या कापडात गुंडाळतात व तिरडीवर बांधून स्मशानात नेतात. त्या वेळी प्रेतावर फुले, पाने व गुलाल उधळतात. मोठ्या घराण्यातील मनुष्य मेला असेल, तर त्याच्या तिरडीपुढे महार वाजंत्री वाजवीत जातात. दहनभूमीत गेल्यावर तिथे प्रेताला पुन्हा आंघोळ घालून मग त्याचे दहन करतात. नंतर सर्वजण नदीत स्नान करून घरी परततात. दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी रक्षा व अस्थी गोळा करतात. त्यांतील काही भाग तीर्थक्षेत्रात नेऊन नदीत टाकतात आणि बाकीचा भाग दहनाच्या जागेजवळच पुरतात. दहाव्या दिवशी पिंडदान करतात. अकराव्या दिवशी सुतक संपवण्यासाठी पंचगव्य प्राशन करतात आणि ब्राह्मणांना विविध वस्तू दान देतात. बाराव्या दिवशी पुन्हा पिंडदान करतात. तेराव्या दिवशी श्राद्ध करतात आणि आप्तेष्टांना भोजन घालतात. चौदाव्या दिवशी पक्वान्नाची मेजवानी होते. मासिक व वार्षिक श्राद्धाची आणि महालय श्राद्ध करण्याची प्रथा यांच्यांत आहे.

महाराष्ट्राबाहेरचे मराठे – शहाजीराजांनी दक्षिणेत राज्य स्थापन केल्यामुळे त्या भागात पुष्कळ मराठे लोक जाऊन राहिले. कानडा, तंजाऊर, सेलम व बेल्लारी या जिल्ह्यांत मराठ्यांची वसती पुष्कळ आहे. त्यांच्यांतली काही घराणी खानदानी अस्सल मराठा असतील. पण बहुसंख्य लोक इतर वर्गांतले आहेत. त्यांचे व्यवसाय व त्यांच्या चालीरीती अस्सल मराठ्यांप्रमाणे नसून, इतर मराठ्यांप्रमाणे आहेत. पेशवाईच्या

मराठा सरदार – सांकेतिक चित्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काळी उत्तर हिंदुस्थानात मराठे सरदारांनी कित्येक राज्ये स्थापली. त्यामुळे तिकडेही पुष्कळ मराठे स्थायिक झाले. त्यांत अस्सल मराठ्यांची पुष्कळ कुळे आहेत. पण इतर मराठ्यांची संख्याही मोठी आहे. दीर्घ काल परप्रांतांत वसती केल्यामुळे त्यांच्या राहणीवर व चालीरीतींवर स्थानिक संस्कृतीचा प्रभाव पडला आहे.

मराठी संस्कृती – याविषयी इरावती कर्वे यांनी लिहिले आहे, ते असे – मराठा ही महाराष्ट्रातील एक बहुसंख्य जात आहे. या जातीची कुटुंबव्यवस्था, दैवते, संप्रदाय व गुणावगुण यांचा महाराष्ट्राचे सांस्कृतिक व सामाजिक जीवन या दोन्हीं-वरही परिणाम झालेला आहे. जमिनीची प्रीती व कुळीचा अभिमान हे मराठ्यांचे दोन प्रमुख गुण होत. मराठा समाजात कित्येक कुळे आहेत व त्यांतून पंचकुळीचे, सात कुळीचे, शहाण्णव कुळीचे मराठे व इतर मराठे अशा श्रेणी आहेत. पाच कुळीचे मराठे शक्यतर आपल्या आपल्यांतच लग्ने करतात. कुळीच्या मराठ्यांची कुठल्या ना कुठल्या गावची पाटिलकी असते. मराठ्यांना पाटिलकी व देशमुखी या वतनांचा अतोनात अभिमान असतो. ती वतने मिळवण्यासाठी व टिकवण्यासाठी ते वाटेल ते करावयास मागेपुढे पाहत नसत. कुळीचा अभिमान राजपुतांतही दिसून येतो. हा कुळीचा अभिमान व एकमेकांचा मत्सर यांमुळे मराठा समाज इतका विस्कळित होता, की या अहंमन्य लोकांना एकत्र आणण्याचे अपूर्व कार्य शिवाजीराजांना

वतनदार देशमुख – सांकेतिक चित्र

प्रथम हाती घ्यावे लागले. ही कुळी-देशमुखीची कोंडी फोडून मराठा समाज एकसंघ करण्याचे प्रयत्न अनेक थोर पुढाऱ्यांनी केले. मराठ्यांना शिक्षण दिले म्हणजे ही प्रथा मोडेल अशा आशेने कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी व बडोद्याच्या सयाजी-



श्री. यशवंतराव चव्हाण

महाराजांनी शिक्षणाची पाणपोई उघडली. पण त्यांच्या प्रयत्नांना यावे तसे यश आले नाही.

ऐतिहासिक काळात मराठा जातीत भोसले, शिर्के, तानाजी मालुसरे, प्रतापराव गुजर, जेधे, मोहिते, मोरे, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शिंदे, पवार, घाटगे, इ. बरेच थोर पुरुष व शूर वीर निपजले या सर्वांनी स्वराज्य मिळवणे व ते वाढवणे यांसाठी मर्दुमकी गाजवली. गांधीयुगातल्या स्वातंत्र्यआंदोलनातही मराठे आघाडीवर राहिले. श्री. केशवराव जेधे यांच्या नेतृत्वाखाली ते इंग्रजांच्या गुलामगिरीविरुद्ध नेटाने झगडले. इतर क्षेत्रांतही मराठा मंडळींची कामगिरी डोळ्यात भरण्याजोगी आहे. बडोद्याचे श्रीमंत सयाजीरावमहाराज व कोल्हापूरचे छत्रपती शाहूमहाराज हे संस्थानिक उत्तम राज्यव्यवस्थेबद्दल प्रसिद्ध होते. त्यांनी शिक्षणाचा प्रसार व समाजसुधारणा यांसाठी पुष्कळ प्रयत्न केले, विद्वान व कलावंत यांना खूप मदत केली. बडोद्याचे सेनापती नानासाहेब शिंदे आणि लेफ्ट. जनरल थोरात युद्धाच्या क्षेत्रात नावाजले गेले. विठ्ठल रामजी शिंदे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या विद्वत्तेमुळे व त्यागामुळे महर्षिपदाला चढले. भास्करराव जाधव हेदेखील मोठे चिकित्सक विद्वान गृहस्थ होते. गुरुवर्य बाबुराव जगताप एक आदर्श शिक्षक व समाजसेवक म्हणून ओळखले जातात. शिक्षणक्षेत्रातील मोठी कामगिरी व विशुद्ध चारित्र्य यांमुळे त्यांना समाजात मोठा मान आहे. शिक्षणक्षेत्रात श्री. आप्पासाहेब पवार यांची कामगिरीही उल्लेखनीय आहे. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणात खूप मोठे स्थान मिळवले आहे. ते जसे मुत्सद्दी आहेत, तसेच विचारवंतही आहेत. सर्वश्री पंजाबराव देशमुख, माधवराव बागल, अण्णासाहेब शिंदे, शंकरराव मोरे, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते, वसंतरावदादा पाटील, आनंदराव चव्हाण, इ. नेत्यांनीही आपापल्या कर्तबगारीने नाव मिळवले आहे. सर्वश्री कवी दत्त, वि. द. घाटे, आनंदीबाई शिर्के, आनंदराव यादव, रणजित देसाई, शिवाजीराव सावंत, म. भा. भोसले, इ. मंडळींनी साहित्यक्षेत्रात मोठेच यश मिळवले आहे. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे नाव त्यांच्या विद्वत्तेमुळे व अमोघ वक्तृत्वामुळे सर्वतोमुखी झाले आहे. अशा प्रकारे मराठ्यांची ही परंपरा अनेक शतके अबाधितपणे चालू आहे. [ट्रा. का. बाँ.; क्ष. त्यां. अ.; प्रा. म.; सह्याद्रि; म. लो. सं.; म. यु. मा.]

मराठी भाषा व साहित्य

मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. ती भारतीय भाषांमधली एक समृद्ध भाषा आहे. कथा, कादंबरी, चरित्र, निबंध, नाटक, इतिहास, काव्य, संतवाङ्मय, लोकसाहित्य, कोशवाङ्मय, विज्ञान, इ. लेखनप्रकारांनी तिला संपन्नता लाभली आहे. इ. स. च्या बाराव्या शतकापासून तिच्यामध्ये सतत वाङ्मयनिर्मिती होत राहिलेली आहे. ही संस्कृतोद्‌भव आर्यभाषा आहे. मात्र हिचे जनकत्व थेट संस्कृत भाषेला देता येत नाही. नक्की कोणत्या भाषेतून मराठी उगम पावली, याविषयी विद्वानांत मतभेद आहेत. संस्कृत → महाराष्ट्री प्राकृत → मराठी अशी परंपरा अनेक विद्वानांनी सांगितली आहे.

महाराष्ट्री प्राकृतापासून मराठी भाषा जन्मली, असे मत रूढ होते. पण अलिकडे महाराष्ट्री अपभ्रंश किंवा जैन अपभ्रंश हा मराठीच्या उगमाचा मधला एक दुवा सापडला आहे. महाराष्ट्री प्राकृताचा हा अपभ्रंश इ. स. ४०० च्या सुमारास प्रचलित झाला. मात्र एक गोष्ट निश्चित आहे ती अशी, की मराठी हा जैन अपभ्रंशाचा अपभ्रंश नसून, संस्कृत भाषेचा संस्कार झालेला उत्क्रांत स्वरूपातील अपभ्रंश आहे. मूळच्या अपभ्रंशातले उच्चारदौर्बल्य दूर करून मराठीने त्या जागी ठसठशीत उच्चार रूढ केले. मराठीतल्या तत्सम शब्दांचे प्रमाण पाहिल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल. इ. स. आठशेच्या सुमारास जैन-बौद्धांच्या मतांचा समाजातला प्रसार कमी झाला व वैदिक धर्माला पुनश्च उजळा मिळाला. त्यामुळे संस्कृत भाषेचे माहात्म्य वाढले व तिची छाया लौकिक प्राकृतावर म्हणजेच मराठीवर पडून ती सुसंस्कृत झाली, असे डॉ. तुळपुळे यांनी म्हटले आहे.

इ. स. ७७८ मध्ये कुवलयमाला नावाचा एक ग्रंथ उद्योतनसूरीने लिहिला असून, त्यात अठरा देशी भाषांचा उल्लेख आहे. त्यात मराठी माणसांचे वैशिष्ट्य व त्यांच्या भाषेतील ठळक अशी लकब सांगताना मराठी लोक ' दिण्णले ' ' गहिल्ले, ' असे उच्चार करतात, असे त्याने सांगितले आहे.

त्यानंतर इ. स. ११२९ मध्ये सोमेश्वराने लिहिलेला मानसोल्लास किंवा अभिलषितार्थचिंतामणी या नावाचा एक ग्रंथ उपलब्ध आहे. या ग्रंथात मराठी रूपे व मराठी शब्द तर ठिकठिकाणी दिलेले आहेतच; पण त्याच्या एका भागात काही मराठी पद्येही दिलेली आहेत. त्यांतले एक पद्य असे—

> **जेणे रसातळ उणु मत्स्यरूपे वेद आणियले,**
> **मनु शिवक वाणियले तौ, संसार सायर तारण मोहंतो**
> **रावो नारायणु जो गीची**

अर्थ—ज्याने मत्स्यरूपाने रसातळातून वेद आणले, मनू व शिव यांनी ज्याचे वर्णन केले आहे असा, संसाररूपी सागर तरून नेणारा, मोह नाहीसा करणारा असा जो राजनारायण त्याचे गाणे गा.

शिलालेख व ताम्रपट— मराठीचा उत्पत्तिकाल ठरवण्याच्या कामी शिलालेख व ताम्रपट यांचा थोडाफार उपयोग होऊ शकतो. इ. स. ९८३ चा एक शिलालेख श्रवणबेळगोळ येथे गोमटेश्वराच्या पायापाशी पाहायला मिळतो. ' श्री चावुण्डराजें करवियलें ' असे एक वाक्य त्यावर आहे. हे वाक्य मराठी वळणाचे निश्चित आहे.

यानंतरचा महत्त्वाचा शिलालेख इ. स. १२०८ सालचा. हा शिलालेख २६ ओळींचा असून, त्यांपैकी शेवटच्या पाच ओळी मराठीत आहेत. त्या पाच ओळींचा उतारा बर्जेस व फ्लीट यांच्या प्राचीन लेखसंग्रहात दिलेला आहे. या शिलालेखाचे वाचन असे—

२१. स्वस्ति श्री शके ११२८ प्रथमसंवत्सरे श्रावणमासे पौर्णमास्यां चंद्रग्रहणसमये श्री सोईदेवेन सर्वजनसंनिद्धौ हस्तोदकपूर्व्वकं निजगुरुरचितमठायस्थानं।
२२. दत्तं ॥ तद्यथा ॥ इयां पाटणीं जें केणें उघटे तेहाचा अस्ति आऊं जो राऊला होता ग्राहकापासी तो मढा दीन्हला ॥ ब्राह्मणां जें विकनेयापासीं ब्रह्मोत्तर ते ब्राह्मणी दिन्हले ॥ ग्राह
२३. कापासीं दामाचा वीसोवा आसूपाठी गनरें दीन्हला ॥ तुल-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दाइयां बैला सिद्धवै ।। वाहीरिला आसूपाठी गिधवें ग्राहकापासीं । पांच पोफली ग्राहकापासीं ।। पहि

२४. लेआ घाणे आदाणाची लोटि मठा दीन्हली ।। जेती घाणे वांहति तेतीयां प्रति पली पली तेला ।। एथ जे मविजे तें मढीचेन मापें मवावें मापाउ मढा अर्ध्द ।। अर्ध्द



खानदेशातील पाटण येथील शिलालेखाचा काही भाग

२५. मापहारी । रूपाचें सूंक। तथा भूमिः ।। चतुराघाट विशुद्ध ॐ डुग्रामु पषड बालेआ कामता मध्यें चहवंटा ।। एकल वंटा ।। पंडितांचा कामतु ।। श्रीतेग्रा ।।

२६. मीं चाउरा ।। धामोजीचीअ सोंढिआं ।।

या शिलालेखामध्ये आलेल्या मराठी वाक्यांचा आजच्या मराठी भाषेत पुढीलप्रमाणे तर्जुमा होतो–

२१. श्री शके ११२८ मध्ये प्रभव-संवत्सरी श्रावण महिन्यात पौर्णिमेच्या तिथीस चंद्रग्रहणसमयी श्री सोईदेवाने सर्वजनांसमक्ष हस्तोदकपूर्वक आपल्या गुरूने स्थापिलेल्या मठास

२२. दिले ते असे की, या पाटणात जे द्रव्य उत्पन्न होईल, त्यावरील राजाने घ्यावयाचा जो कर तो मठास दिला. माल विकणाऱ्यापासून जे ब्रह्मोत्तर घ्यावयाचे तेही ब्राह्मणांनी मठास दिले। गिन्हा-

२३. इकांपासून म्हणजे माल घेणाऱ्यापासून, दर आसूमागे (आसू = सोन्याचे नाणे) दामाचा विसावा भाग नगराने (घ्यावयाचा तो नगरातर्फे) मठास दिला. पाण्याचे बैल तयार ठेवावे. (नगरातल्या बाजारा-) बाहेरल्या दर घोड्यामागे गिऱ्हाइकापासून पांच सुपाऱ्या. पहि–

२४. ल्या घाण्याला (तेलाच्या) घाण्याची (एक) लोटी मठाला दिली. नंतर जितके घाणे निघतील तितक्या प्रत्येका-बद्दल (एक-एक) पळी पळी तेल इथे जे मापावयाचे ते मठाच्या मापाने मापावे. मापाऊ म्हणजे (मापण्याबद्दल व मापपात्रा-बद्दलचे घेणे ते) अर्धे मठाचे व अर्धे

२५. मापाऱ्याचे. (या पुढील अक्षरे ठशावर नीट लागत नाहीत; व इतरांनी जी लाविली आहेत, त्यांपासून काढलेला अर्थ नीट पटत नाही.) कामत् = कामछा = बसण्याचे ठिकाण, उदा० लोहार – कामठा. सुतार – कामठा.

मराठी भाषेच्या निश्चित खुणा ज्यांमध्ये सापडतील अशा इ. स. ९८३ ते इ. स. १२८९ या काळातल्या एकूण २८ शिला-लेखांची यादी महाराष्ट्र सारस्वत–पुरवणीमध्ये दिलेली आहे.

आद्यग्रंथ – मराठीचा आद्य ग्रंथकार होण्याचा मान मुकुंद-राजाला मिळाला आहे. त्याने इ. स. ११८८ मध्ये विवेकसिंधू नावांचा मराठी ओवीबद्ध ग्रंथ लिहिला. विवेकसिंधूसारखे ग्रंथ ही भाषेच्या प्रारंभाची चिन्हे नसून, ती तिची परिणत अवस्था होय. या दृष्टीने पाहता मुकुंदराजापूर्वी काही शतके तरी मराठी भाषेत ग्रंथरचना होत असावी, असे महाराष्ट्र सारस्वतकार म्हणतात. हे मत मान्य होण्याजोगे असले, तरी दुर्दैवाने विवेक-सिंधूच्या पूर्वीचे वाङमय अद्यापि सापडलेले नाही. विवेकसिंधू हा परमार्थनिरूपण करणारा ग्रंथ असून, वेदशास्त्रे आणि उपनिषदे यांचा मथितार्थ मुकुंदराजाने मराठीत सांगितलेला आहे. या ग्रंथातले कवित्व अलंकारयोजनेच्या रूपाने प्रकट झालेले आहे. ही अलंकारयोजना सौंदर्यदृष्टीतून स्फुरलेली नाही. प्रतिपाद्य विषयाचे स्पष्टीकरण हे तिचे प्रधान लक्ष्य आहे. त्यातल्या काही ओव्या अशा–

नदी उगवी स्थिरावती । तरि तेचि समुद्र होती ।
आहो आधारु का न होती । आणिका नदियांसी ।।
तैसा आपुला उगवू । जरि न सांडिता हा जीवु ।
तरि अंगासि येता थोरावु । परब्रह्मीचा ।।
आदीं अंतीं साळी देखिली । मत्थें त्रुणाकारे वीरूढली ।
परि सर्व साळी येणे शब्दे बोलिली । विबुधजनीं ।।
तैसे आदी अंतो ब्रह्मचि असे । मत्थें प्रपंचाकार भासे ।
परि सर्वहि ब्रह्मचि होय यैसें । वेदे बोलिलें ।।

डॉ. अ. ना. देशपांडे यांनी विवेकसिंधूचे सार पुढील शब्दांत सांगितले आहे – आत्मसाक्षात्कार आणि आत्मानात्मविवक. पहिले साध्य; दुसरे साधन. ग्रंथाची एकूण प्रकरणे १८ आहेत. पहिल्या सात प्रकरणांचा पूर्वार्ध व उरलेल्यांचा उत्तरार्ध. पूर्वा-र्धातील प्रमुख विषय या सृष्टीची, या संसाराची उभारणी कशी झाली हा आहे. त्यात पंचीकरणाची प्रक्रिया उलगडून दाखवलेली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. उत्तरार्धात स्थूलदेह, सूक्ष्मदेह, कारणदेह, महाकारणदेह, इत्यादी प्रपंच – कारणांचा निरास करणाऱ्या महावाक्यांचे विवरण केले आहे.

महानुभावी ग्रंथरचना – इ. स. चे १२ वे शतक हा महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधर याच्या अवतारकार्याचा काळ होय. चक्रधर व त्याचे शिष्यप्रशिष्य यांनी महाराष्ट्रावर अपार प्रेम केले व मराठीचा जाज्वल्य अभिमान बाळगला. संस्कृत भाषेला दूर ठेवून केवळ मराठी भाषेतूनच त्यांनी पंथाचा प्रचार व ग्रंथनिर्मिती केली. मुकुंदराजाने जरी आपला ग्रंथ मराठीत लिहिला असला, तरी तो त्याने आपद्धर्म मानला आहे. ज्यांच्या जवळ तर्कशक्ती व शास्त्रज्ञान नाही, अशा अडाणी लोकांसाठी मी मराठीत ग्रंथरचना केली, असे तो म्हणतो. यावरून त्याचा मराठीचा अभिमान दुबळा वाटतो. महानुभावांचे तसे नाही. ते मराठीच्या प्रेमादराने ग्रंथरचनेसाठी बद्धपरिकर झाले आहेत.

इ. स. १२७८ च्या सुमारास महेंद्र ऊर्फ माहिंभट्ट नावाच्या महानुभाव पुरुषाने लीळाचरित्र नामक एक ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ गद्यात्मक आहे. त्यामुळे मराठीचा पहिला गद्य ग्रंथकार होण्याचा मान या माहिंभट्टाला मिळाला आहे. माहिंभट्ट चक्रधराचा शिष्य होता. त्यामुळे चक्रधराची वचने आणि त्याच्या जीवनातील प्रसंग (लीळा) या चक्रधराच्या शिष्यशिष्यिणींपासून मिळवून त्याने त्यांचा हा संग्रह तयार केला आहे. त्यातली एक लीळा पुढे दिली आहे. तिच्यात चक्रधराने एके प्रसंगी एका ब्राह्मणाची गुरे राखली तो प्रसंग वर्णिला आहे –

गांवीं एकीं पाणिपात्रासि बीजें केलें : ब्राह्मणा एकाचेया घरासि : तेणें म्हणितलें : कोण्हाचीं गोरुवें राखा कां : सर्वज्ञें म्हणितलें : यासि कव्हणी राखों नेदी : तेणें म्हणितलें : आम्ही देऊनि : आमचीं राखा : सर्वज्ञें म्हणितलें हें राखैल : परि दोहे ना : सोडील परि बांधेना : तेणें म्हणितलें : आम्ही बांधौनि : आम्ही दोहौनि : मग गोसावीं मानिलें : उदीयांचि तियें गोसावियासि मोट घालीति : गोसावी गाई सोडीति : राना चरावेया नेति : गोसावीं मोटेचें अन्न आरोगण करिती : सुडा घुति : श्री मुकुटावरि घालीति : सीळातळावरि बैसति : गाई श्रीमूर्ति अवलोकीत : बैसलिया असति :

बाइदेवबास हा महानुभाव पंथातला एक प्रमुख पुरुष होय. नागदेवाच्या मृत्यूनंतर महानुभाव पंथाचे आचार्यपद त्याच्याकडे आले. त्याने पूजावसर किंवा नित्यदिनीलीळा नावाचा ग्रंथ लिहिला असून, त्यात चक्रधराच्या दिनचर्येचे बारकाईने वर्णन केले आहे. प्राचीन मराठी गद्याचा हा आदर्शच म्हटला पाहिजे. त्याच्या ग्रंथातला एक नमुना असा–

बाइसें : भीतरीला ॐटेआंवरी : आसनु रचीती : आड कानवडा लावीती : ताट करीती : गोसावीं भीतरीं बीजें करीति : आसनी उपविष्ट होती : बाइसे निंबलोणु करीती : तंवं सर्वज्ञां आरोगणा होअे : पौळी तर चौतकोरू : मांडा तर दीढ : पुरी तर अेकि : तुप भातु कढी : दोंनि शाकवतिआ : पहितु घृतु : पाठी तक्रभातु सी : सर्वज्ञांची श्रीमंत सकुमारू आरोगणा होअे : मग गोसाविआसी गुळणा होअे : श्रीकरप्रक्षालन होअे : आन सर्वज्ञाचां श्रीकरीं चंदन ओळगवीती : चंदनें दोंनि श्रीकरें उलळीती : श्रीकरीं सपूरदाटवा ॐळगवीती : श्रीकर परमार्जीती : श्रीमुख परमार्जीती :

लीळाचरित्रातून आलेले चक्रधराच्या तोंडचे सूत्रबद्ध सिद्धान्त पुढे नागदेवाचार्यांच्या अनुज्ञेने केसोबासाने एकत्र केले. या संकलनाला त्याने दृष्टान्तपाठ असे नाव दिले. दृष्टान्तपाठ हे चक्रधराच्या सिद्धान्तांवरचे जणू उपनिषदच असून, त्यात केसोबासाने चक्रधराचे तत्त्वज्ञान शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडले आहे. चक्रधराची वाणी मुळातच हृदयाचा ठाव घेणारी होती. त्याच्या श्रोतृवर्गात समाजातल्या सर्व थरांचे प्रतिनिधी असत. त्या सर्वांना आपले निरूपण समजावे म्हणून चक्रधर ते व्यावहारिक दृष्टान्तांनी सुगम करीत. असे हे एकूण ११४ दृष्टान्त आहेत. केसोबासाने हा ग्रंथ इ. स. १२८० च्या सुमारास तयार केला.

महानुभाव पंथात साती ग्रंथ या नावाने सात ग्रंथ प्रसिद्ध आहेत. इ. स. १२७८ ते इ. स. १३६३ एवढ्या कालखंडात हे ग्रंथ निर्माण झाले. त्यांची नावे व कर्ते पुढीलप्रमाणे–

१. वच्छहरण – दामोदर पंडित.
२. रुक्मिणीस्वयंवर – नरेन्द्र
३. शिशुपालवध – भास्कर
४. उद्धवगीता – भास्कर
५. ज्ञानप्रबोध – विश्वनाथ बाळापूरकर
६. सैह्याद्रिवर्णन – रवळो व्यास
७. ऋद्धिपूरवर्णन – नारो व्यास पहाडिये.

वरील सर्व काव्ये ओवीबद्ध असून, पहिली चार कृष्णचरित्रपर, पाचवे तात्त्विक व शेवटची दोन वर्णनपर आहेत. या सातही ग्रंथांची गणना महानुभावांच्या आद्यग्रंथांत होते.

मराठीच्या या प्रारंभकालात महानुभाव कवींचे कर्तृत्व डोळ्यात भरेल इतके मोठे आहे. त्यांनी मराठीवर मातृतुल्य प्रेम तर केलेच; शिवाय त्या भाषेला स्थिर करण्यासाठी त्यांनी तिच्या व्याकरणाकडेही लक्ष पुरवले. भीष्माचार्य नामक महानुभावाने पंचवार्तिक नावाचा व्याकरणग्रंथ रचला.

महानुभाव पंथात ग्रंथरचनेची परंपरा इ. स. च्या १७ व्या शतकापर्यंत अविच्छिन्न चालू राहिली. पण कालक्रमानुसार नवे चैतन्य देणाऱ्या नव्या प्रेरणा या पंथात पुढे उत्पन्न झाल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाहीत. त्यामुळे पुढील वाङ्मय पंचकृष्णांची चरित्रे, आद्य ग्रंथांची भाष्ये, स्पष्टीकरणे, तात्त्विक विवेचने अशासारखेच निर्माण झाले. महानुभावांचा ग्रंथसंभार तसा विपुल आहे; पण तो पंथाच्या अनुयायांपुरताच मर्यादित राहिला. इ. स. च्या १४ व्या शतकाच्या उत्तरार्धात महानुभावांनी सांकेतिक लिपी निर्माण केली आणि आपले सर्व ग्रंथ त्या लिपीत लिहून ते इतरेजनांपासून गुप्त राखले.

ज्ञानेश्वर आणि त्यांची प्रभावळ – चक्रधरानंतर थोड्याच कालात ज्ञानेश्वर निर्माण झाले (इ. स. १२७५–१२९६). त्यांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला आणि मराठी भाषेत गीतार्थाचे सुंदर व प्रत्ययकारी निरूपण केले. ज्ञानेश्वरांच्या या अवतारकार्याची पूर्वपीठिका सांगताना श्री. बनहट्टी म्हणतात–

ज्ञानेश्वरांच्या काळी नाना तऱ्हांचे बिकट आचार आणि एकांगी विचार यांचे अनुशासन घालून देणाऱ्या, ऐहिकनिरपेक्ष परमार्थाच्या मागे लागणाऱ्या अनेक पंथांची गर्दी झाली होती आणि समाजाचे धार्मिक नेतृत्व करणारा वर्ग आपल्या जातिश्रेष्ठतेच्या तोऱ्यात कर्मकांड आणि व्रतवैकल्ये यांचे स्तोम माजवून त्यावर परिपुष्ट होण्यात इतिकर्तव्यता मानीत होता. अशा त्या काळात सर्व समाजाला प्रेमाचा, समतेचा आणि भक्तिभावाचा उपदेश गीताटीकेच्या द्वारा करण्याचा उपक्रम या महापुरुषाने केला. गीता आणि भागवत हे ग्रंथ जुनेच होते. पण त्यांच्या आधारे ऐहिक व पारलौकिक यांचा संवाद साधणारा आणि विषमतेचा निरास करणाऱ्या प्रेमधर्माचे प्रस्थापन करणारा असा नवीन जीवनमार्ग मराठी जनतेमध्ये ज्ञानदेवांनी अवतरविला. मराठी जन आणि मराठी मन घडविणारा पहिला क्रांतिकारी नेता ज्ञानदेव होय.

ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका या नावाने गीतेवर सुमारे ९००० ओव्यांची टीका लिहिली. तिलाच ज्ञानेश्वरी म्हणतात. या ग्रंथात ज्ञानदेवांनी भगवंताचा आशय उपमादृष्टान्तांच्या आधारे सुलभ करून सांगितला. प्रारंभीच ते म्हणतात–

या मेजवानीच्या प्रसंगी अर्जुनाच्या पंक्तीला बसायला योग्य असतील, अशा संतांनी कृपा करून कथेकडे अवधान द्यावे. संतहो, मी हे सारस्वताचे गोड झाड लावतो आहे. तुम्ही त्याची फळे प्रेमाने तोडून घ्या. कृष्णार्जुनांच्या संवादातल्या प्रमेयांची उद्याने 'इये मराठीचियें नगरी' लावून मी इथे ब्रह्मविद्येचा सुकाळ करीन. संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांना मी एकाच सिंहासनावर बसवीन. इतकेच नव्हे; तर

माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुके । परी अमृतातेंही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ॥

ज्ञानेश्वरांच्या या प्रतिज्ञेचा अनुभव त्यांच्या या ग्रंथात पदोपदी घडतो. आध्यात्मिक विषयाचे काव्यपूर्ण विवेचन या दृष्टीने हा ग्रंथ त्या काळातल्या सर्व भाषांच्या वाङ्मयात लोकोत्तर ठरतो. मौलिक स्वरूपाचे तत्त्वज्ञान आणि अव्वल दर्जाचे काव्य या दोहोंचा इतका मनोहर संगम तत्कालीन दुसऱ्या कोणत्याही भाषेत आढळणार नाही. ज्ञानेश्वर हे अनुभूतिवादी संत होते. मूळ ग्रंथातला आशय समरसतेने विशद करून आपल्या आध्यात्मिक अनुभवाला व्यक्त रूप देण्यावर त्यांचा भर होता. म्हणून त्यांनी महानुभाव पंडितांप्रमाणे संस्कृत भाष्यकारांच्या तर्ककर्कश व विद्वज्जड शैलीचे अनुकरण न करता, पौराणिक शैलीचा अवलंब केला. त्यांच्या शैलीचे आणि विवेचनाचे सर्व गुण ज्यात प्रकर्षाने दिसून येतात, असा ज्ञानेश्वरीतला एक उतारा (ज्ञाने. १६) पुढे दिला आहे.

मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु ।
अद्वयाब्जिनीविकाशु । वंदूं आतां ॥ १ ॥
जो अविद्या राती रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञान चांदणियां ।
जो सुदिनु करी ज्ञानियां । स्वबोधाचा ॥ २ ॥
जेणें विवळतियें सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे ।
सांडिती देहाहंतेचीं अविसाळें । जीवपक्षी ॥ ३ ॥
लिंगदेहकमळाचा । पोटीं वेंचतया चिद्भ्रमराचा ।
बंदिमोक्षु जयाचा । उदैला होय ॥ ४ ॥
शब्दाचिया आसकडीं । भेदनदीचा दोहीं थडीं ।
आरडति विरहवेडी । बुद्धिबोधु ॥ ५ ॥
तया चक्रवाकांचे मिथुन । सामरस्याचे समाधान ।
भोगवी जो चिद्गगन । भुवनदिवा ॥ ६ ॥
जेणें पाहालिये पाहांटे । भेदाची चोरवी फिटे ।
रिघती आत्मानुभववाटे । पांथिक योगी ॥ ७ ॥
जयाचेनि विवेक किरणसंगें । उन्मेखसूर्यकांत फुणगें ।
दीपले जाळिती दांगें । संसाराचीं ॥ ८ ॥
जयाचा रश्मिपुंजु निबरु । होतां स्वरूप उरवरी स्थिरु ।
ये महासिद्धीचा पूरु । मृगजळाचा तें ॥ ९ ॥
जो प्रत्यग्बोधाचिया माथया । सोहंतेचां मध्यान्हीं आलिया ।
लपे आत्मभ्रांतिछाया । आपणपां तळीं ॥ १० ॥
तेव्हां विश्वस्वप्नासहितें । कोण अन्यथामतिनिद्रेतें ।
सांभाळी नुरेचि जेथें । मायाराती ॥ ११ ॥
म्हणौनि अद्वयबोधपाटणी । तेथ महानंदाची दाटणी ।
मग सुखानुभूतीची देणीं घेणीं । मंदावो लागती ॥ १२ ॥

नामदेव हा ज्ञानेश्वरांचा समकालीन संत होय. ज्ञानेश्वरांचा सहवासही त्याला लाभला होता. त्याचे वास्तव्य पंढरीसच होते. ज्ञानेश्वरांनी मुक्तीची गवांदी घातली; तर नामदेवाने वैष्णवांना नामामृताची गोडी चाखायला लावली. तो ज्ञानमार्ग,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

योगमार्ग, इ. साधनसंभाराच्या खटाटोपात न पडता नाममाहात्म्यावरच वाढला, पोसला. त्याने विठोबाचे प्रेमसुख दिले, घेतले. वारकरी संप्रदायाचा प्रभावी प्रचारक नामदेवच होय. पंढरीचे माहात्म्य व ज्ञानेश्वरादी संतमंडळींचे वैभव नामदेवानेच वाढवले. सर्वांना सुलभ असा नामसंकीर्तनाचा मार्ग त्याने दाखविला आणि पुरस्कारिला. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर थेट पंजाबापर्यंत जाऊन त्याने आपल्या विठ्ठलाचे नाव भव्य केले. अभंगवाणीचा प्रवर्तकही नामदेवच होय. नामदेवाने शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा केली होती. यातला शतकोटी हा शब्द वाच्यार्थाने न घेता विपुल या अर्थाने घ्यायचा आहे. नामदेवाच्या छापील गाथ्यात सुमारे २५०० अभंग आढळतात. त्यांपैकी प्रस्तुत नामदेवाचे निश्चितपणे ठरतील असे अभंग ५०० ते ६०० च भरतील. इतर सर्व अभंग त्याच नावाच्या दुसऱ्या कवींचे आहेत. नामदेवाच्या अभंगांतून उत्कटता आणि आर्तता हे गुण दिसून येतात. विठ्ठलाला अनन्यभावे शरण जाण्याची ओढ त्यांमध्ये पदोपदी दिसते. या त्याच्या वृत्तीचा प्रत्यय पुढील अभंगात येतो–

वाढवेळ कां लाविला । कोण्या भक्तानें गोंविला ।। १ ।।
झडकर ये बा विठ्ठला । कंठ आळवितां शोकला ।। २ ।।
वाट पाहे दाही दिशा । जिवीं धरोनि भरंवसा ।। ३ ।।
प्राण केव्हा येईल माझा । आलिंगीन चतुर्भुजा ।। ४ ।।
नामा गहिंवरें दाटला । देह धरणिये लोटला ।। ५ ।।

त्याने आपल्या अभंगांतून विठ्ठलाशी सुखसंवाद केला आहे, जनांना उपदेश केला आहे आणि भक्तिमार्गाला विरोधी असलेल्या लोकांबद्दल तिटकाराही दाखवला आहे. नामदेवाच्या कवितेत कल्पनेच्या उत्तुंग भराऱ्या नाहीत; पण हरिप्रेम अथांग आहे. त्याचे सर्व काव्य भावमधुर आणि आत्मनिष्ठ आहे.

इ. स. १०५० ते १३५० हा काळ मराठी वाङ्मयाचा आद्यकाल असे समजायला हरकत नाही. महानुभाव व वारकरी हे दोन पंथ या कालखंडात उदयाला आले व त्यांनी आपल्या धार्मिक कामगिरीने व सामाजिक कर्तृत्वाने मराठी समाजाच्या सर्व थरांत जागृतीची एक नवी लाट उठवून दिली. त्यासाठी दोन्ही पंथांनी विपुल वाङ्मयही निर्माण केले. पण इ. स. १३४७ च्या सुमारास महाराष्ट्रातल्या लोकजागृतीची ही पहिली लाट ओसरली. महानुभाव पंथातला नागदेवाचार्य व वारकरी पंथातला नामदेव यांच्या मृत्यूनंतर काही शतके मराठी वाङ्मयनिर्मितीत काहीसा खंड पडला.

ज्ञानेश्वर, निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई व चांगदेव मिळून ज्ञानेश्वरपंचक बनते. नामदेव, सावता माळी, चोखामेळा, गोरा कुंभार, नरहरी सोनार, जोगा परमानंद, इ. संत ही ज्ञानेश्वरांची प्रभावळ होय. यांतल्या प्रत्येक व्यक्तीने थोडीफार अभंगरचना केलेली आहे.

इस्लामी आक्रमण – ज्ञानेश्वरांची ही प्रभावळ अस्तंगत झाल्यानंतर महाराष्ट्रावर इस्लामी आक्रमणाचा प्रचंड आघात झाला आणि हा देश मुळापासून हादरून गेला. या आघाताला इ. स. च्या १३ व्या शतकातच प्रारंभ झाला होता; पण त्याचे परिणाम १४ व्या शतकात पूर्ण रूपाने दिसू लागले. लागोपाठ झालेल्या मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळे देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य लयाला गेले. दक्षिणेतील बहुतेक सारी हिंदू राज्ये नष्ट होऊन, ज्ञानेश्वरांच्या पश्चात अवघ्या २५ वर्षांच्या अवधीत महाराष्ट्र मुसलमानांच्या सत्तेखाली गेला. इ. स. १३४७ पासून महाराष्ट्रात बहमनी वंशाची राजवट सुरू झाली. त्याच्या आधी १० वर्षे विजयनगर येथे एका हिंदू राज्याची स्थापना झाली होती. विजयनगर व बहमनी या दोन राज्यांमध्ये सतत २०० वर्षे कटकटी सुरू होत्या. त्यांच्यामधल्या लढाया व लागोपाठ पडलेले मोठाले दु[illegible]ांमुळे तत्कालीन महाराष्ट्रीय समाज अस्ताव्यस्त होऊन ग[illegible]. त्याचा परिणाम केवळ भाषेवरच नव्हे; तर महाराष्ट्राच्या समग्र जीवनावरच झाला. मुसलमानांनी आपला धर्म, भाषा व रीतिरिवाज जबरदस्तीने लोकांवर लादण्याचे काम सुरू केले. जिकडे तिकडे त्यांची दांडगाईच माजली. अशा परिस्थितीत पुढील शे–दीडशे वर्षांच्या अवधीत राजकीय वा सांस्कृतिक क्षेत्रांतील जुने पंथ आणि परंपरा कशाबशा तग धरून राहिल्या एवढेच !

दत्तसंप्रदाय – महाराष्ट्रात दत्तभक्तीचा प्रसार मुख्यतः सरस्वती गंगाधराच्या गुरुचरित्राने केला. हा ग्रंथ म्हणजे दत्तसंप्रदायांचा वेदच आहे. या ग्रंथातील शब्दाशब्दाला मंत्राची योग्यता आहे, असे मानतात. गुरुचरित्राचा काळ इ. स. १५५८ मानला जातो. सरस्वती गंगाधराची मातृभाषा कानडी होती. 'भाषा न ये महाराष्ट्र' असे तो म्हणतो; परंतु असे असूनही श्रीगुरूंच्या बहुसंख्य मराठी भक्तांच्या उपयोगासाठी त्याने हा ग्रंथ मराठीत लिहिला. या ग्रंथाचे ५१ अध्याय असून ओवीसंख्या ७४९१ इतकी आहे. गुरुभक्ती आणि प्रसाद हे या ग्रंथाचे दोन प्रमुख विशेष आहेत. तत्कालीन महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे प्रतिबिंबही त्यात पडले आहे.

पुढच्या कालात दत्तसंप्रदायाच्या परंपरेतच एक महान ग्रंथकार होऊन गेला. त्याचे नाव दासोपंत होय (इ. स. १५५१ ते १६१५). हा आंबेजोगाई येथे विरक्त वृत्तीने राहत असे. त्याने अनेक भाषांत लेखन केले आहे. त्याच्या सर्व वाङ्मयनिर्मितीत गीतार्णव हा मराठी भाषेतला ओवीबद्ध ग्रंथ 'भाषामुकुट' ठरला आहे. सुमारे सव्वा लाख ओव्यांचा हा ग्रंथ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राज आहे. गीतार्णवाएवढा प्रचंड ग्रंथ मराठीत दुसरा नाहीच. इतकी विस्तृत व सुबोध दुसरी गीताटीकाही कुठे आढळणार नाही. प्रतिपाद्य विषयाचे सविस्तर सांगोपांग विवरण हाच दासोपंताच्या लेखनशैलीचा प्रधान धर्म होय. परकीय सत्तेच्या काळात आपण प्रस्तुत ग्रंथाचा प्रपंच करीत आहो, याचे भान त्याला सदैव होते. म्हणूनच त्या पडत्या काळात स्वधर्माची ज्योत तेवत ठेवण्याचा स्पष्ट इशारा त्याने वारंवार जनतेला दिला आहे. तो म्हणतो–

स्वधर्मी केवळ आसक्तु । सिद्धि असिद्धि सम जाणतु ।
तो योगी कर्मी भक्तु । कैसा तो अवधारी ।।
करिता ईश्वर आराधन । वरि पडो एखादें विघ्न ।
परि भक्तिपासोन मन । न चळे जयाचे ।।

इ. स. च्या सोळाव्या शतकात महाराष्ट्रियांची भौतिक परिस्थिती पुष्कळच सावरली. या परिस्थितीचे चित्र श्री. शेणोलीकर यांनी पुढीलप्रमाणे काढले आहे–

बहमनी राजवटीची पाच छकले झाल्यावर निजामशाही, आदिलशाही वगैरे पाच शाह्यांची आपसांतील चुरस आणि भांडणे सारखी वाढतच गेली. त्यांत दक्षिणी व परदेशी (उत्तर भारतीय) यांच्यांतील सत्तास्पर्धेने भरच घातली. त्यामुळे प्रत्येक पक्षाला आपले वर्चस्व कायम राखण्यासाठी एतद्देशीय मराठा जहागिरदारांची व मुत्सद्यांची गरज पडू लागली. त्यामुळे या मुस्लिम शाह्यांत घाटगे, निंबाळकर, डफळे, माने, सावंत, शिर्के, मोरे, भोसले इ. अनेक मराठा घराणी उत्कर्षास चढली. मराठ्यांच्या नैसर्गिक गुणांना व कर्तृत्वाला अधिकाधिक वाव मिळू लागताच मराठी सेनानींची व मुत्सद्यांची एक थोर परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली. नाथांचे पैठण ज्या निजामशाहीत होते, त्या निजामशाहीच्या दरबारी नाथांच्या जन्माच्या वेळी नरसोपंडित, कंवरसेन, संभाजी चिटणवीस, इत्यादी हिंदू मुत्सद्दी महत्त्वाच्या हुद्यांवर नेमलेले होते. नाथांचे गुरू जनार्दनस्वामी दौलताबादच्या किल्ल्याचे प्रमुख अधिकारी होते. अशा प्रकारच्या राजकीय मानमरातबाबरोबर सरकारी तैनाती, जहागिरी, जमिनी वगैरेंच्या द्वारा ब्राह्मण-मराठ्यांना आर्थिक सुस्थितीही प्राप्त होऊ लागली. भौतिक जीवनातील या प्रगतीचे पडसाद धर्म, भाषा, साहित्य, इत्यादी सांस्कृतिक क्षेत्रांतही उमटू लागले आणि महाराष्ट्रात लोकजागृतीची दुसरी प्रभावी लाट सोळाव्या–सतराव्या शतकांत उसळली.

भाषिक व सांस्कृतिक पुनरुत्थान – एकनाथ हे या सांस्कृतिक पुनरुत्थानाचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी होत (इ. स. १५३३ ते १५९९). एकनाथांच्या व्यक्तिमत्त्वात दत्तसंप्रदाय, वारकरी पंथ व पैठणची पंडितपरंपरा यांच्यांतील वैशिष्ट्यांचा उत्कृष्ट मिलाफ झाला आहे. त्यांचे वाङ्मयीन कार्यही फार मोठे आणि बहुरंगी आहे. परकीय अशा इस्लामी राजवटीला न दुखवता हिंदू धर्म व मराठी भाषा यांची जपणूक जेणेकरून होईल, अशी विचारसरणी वाढवण्याची नाजक कामगिरी एकनाथांच्या पुढे उभी होती आणि ती त्यांनी मोठ्या कौशल्याने सांभाळली.

एकनाथांचे घराणे पंडिती वळणाचे होते. त्यांच्या काळात संस्कृत पंडित मराठीचा उपहास करीत होते; तर परकीयांची उर्दू भाषा लोकजीवनाची क्षेत्रे अधिकाधिक व्यापू लागली होती. अशा स्थितीत बहुजनसमाजाला योग्य वळण लावायचे तर योग्य असतील ते विचार लोकांच्या भाषेतूनच सांगितले पाहिजेत, हे त्यांनी जाणले आणि काव्यासाठी मराठीचा स्वीकार केला. मराठी भाषेचे त्यांना केवळ प्रेमच नव्हते, तर अभिमानही होता. त्यांनी तिचे जागोजाग समर्थन केले आहे. संस्कृत वाणी देवांनी केली आणि प्राकृत (मराठी) काय चोरांपासून निपजली, असा त्यांचा सवाल आहे. ज्ञान हे कोणत्याही भाषेत ज्ञानच. भागवताच्या १३ व्या अध्यायात ते बजाबून सांगतात –

तेवि सनकादिकांचे जे ज्ञान । तेंचि मराठी भाषेमाजीं जाण ।
येथे ठेऊं जाता दूषण । दोषी आपण होईजे ।।
जेवि कां गुळाचें कारलें केलें । परि ते कडुपणा नाही आलें ।
तेवि हंसगीत मराठी झालें । नाहीं पालटलें चिन्मात्र ।।

एकनाथांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आणखी एक विशेष श्री. द. के. केळकर सांगतात, तो असा –

परकीय आक्रमणाच्या झगड्यांत मायबोलीच्या पुरस्काराबरोबर विठाई माउलीच्या मूर्तिपूजेचा पुरस्कारही अवश्य होता. एकनाथांच्या काळात दक्षिणेतील महंमदी सुभेदारांत मूर्तिभंजनाचा उत्साह थोडा मंद झाला असला, तरी काझीबहादुरांच्या कडव्या स्वभावाची धार बोथटलेली नव्हती. तिला बुद्धिवादाचे तडाखे देत राहणे आवश्यक होते. तसे तडाखे देण्याची संधी एकनाथ कधीही वाया जाऊ देत नसत आणि तीही शेलक्या शब्दांत. याच कालात महानुभावांनी मूर्तीची जागा ओट्याला दिली व दत्तपंथाने मूर्ती सोडून तिच्या पादुकाच तेवढ्या मंदिरात ठेवल्या. पण एकनाथांनी मात्र सगुणापेक्षा निर्गुणाला महत्त्व देणाऱ्यांना उघड उघड मूर्ख म्हणून टोला मारला आहे. भागवताच्या एकादश स्कंधाच्या अकराव्या अध्यायात नाथ सांगतात –

निर्गुणाहूनि सगुणा न्यून । म्हणे तो केवळ मूर्ख जाण ।।
सगुण निर्गुण दोन्ही समान । न्यून पूर्ण असेना ।।

एकनाथांची वाङ्मयसेवा बहुविध आहे. त्यांची एकूण कविता पाऊण लाख भरेल. ओवीबद्ध ग्रंथांची ओवीसंख्याच साठ हजाराच्या वर आहे. या सर्व वाङ्मयात एकनाथी भागवत आणि भावार्थ रामायण हे दोन मोठे आणि महत्त्वाचे ग्रंथ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होत. भागवतात त्यांनी भागवतधर्माचे विस्तृत, विद्वत्तापूर्ण व रसाळ वर्णन केले आहे. प्रस्तुत ग्रंथ भागवतधर्माच्या मंदिराचा आधारस्तंभच म्हणायला हवा.

भावार्थ रामायण नाथांनी ज्या विशिष्ट उद्देशाने लिहिले, तो उद्देश म्हणजे तत्कालीन राजकारण हा होय. याचे स्पष्टीकरण करताना श्री. शेणोलीकर लिहितात –

देशकालपरिस्थितीनुसार अगदी योग्य वेळी एका विशिष्ट सामाजिक हेतूने ही रामकथा त्या वेळच्या लोकांपुढे नाथांनी ठेवली, असे दिसते. तो हेतू राष्ट्रीय स्वरूपाचा आहे. एकनाथ मोठे चतुरस्र गृहस्थ होते. तत्कालीन देशस्थितीचे त्यांनी सूक्ष्म अवलोकन केले होते. भोवती काय घडत आहे व काय घडले पाहिजे, याची स्पष्ट जाणीव नाथांना होती. म्हणूनच या रामायणात ध्वन्यर्थाने का होईना; पण राजकारण आले आहे, असे म्हणावे लागेल. रामचरित्राचे खरे रहस्य देवांच्या बंध-मोचनांत आहे ही गोष्ट पुनःपुन्हा सांगून मुकाटपणे पारतंत्र्यात दिवस काढणाऱ्या हिंदू लोकांच्या मनावर स्वातंत्र्याचे महत्त्व नाथांनी बिंबविले असावे. पारतंत्र्यात यवनसेवारत झालेल्या हिंदू बांधवांपुढे त्यागी व पराक्रमी, स्वाभिमानी व सहिष्णू अशा रामचंद्राचा धीरोदात्त आदर्श त्यांनी ठेवला. शिवाजीमहाराजांच्या कार्याला पुढे उपयोगी पडलेल्या त्याग-तपस्या, प्रभुत्व-पराक्रम, स्वामिनिष्ठा व धर्मनिष्ठा इत्यादी अलौकिक गुणांची ओळख एकनाथांच्या रामातेच प्रथम महाराष्ट्राला करून दिली. या दृष्टीने त्या काळात रामकथेची निवड करण्यात नाथांची समयज्ञता व समाजप्रवणताच दिसून येते.

एकनाथ, दासोपंत, रामाजनार्दन, जनीजनार्दन व विठा रेणुकानंदन या पाचांना मिळून नाथपंचायतन म्हणतात. या सर्वांनी मराठीत ग्रंथरचना केली आहे. विष्णुदासनामा, महालिंगदास, त्र्यंबकराज, शिवकल्याण, रमावल्लभदास, कृष्णदास मुद्गल, लोलिंबराज हे एकनाथकालीन आणखी काही मराठी कवी होत. कृष्ण याज्ञवल्की व मधुकर हेही त्याच काळातले. या दोघांनी मिळून कथाकल्पतरू हा ३९००० ओव्यांचा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी पुराणे, उपपुराणे, रामायण, भारत, भागवत, इ. ग्रंथांत विखुरलेल्या अनेक कथा मराठीत आणल्या.

ख्रिस्त्यांची मराठीसेवा– ख्रिस्तीधर्मीय कवींची मराठी वाङ्मयनिर्मिती हा या कालखंडातला आणखी एक उल्लेखनीय विशेष होय. त्यामध्ये फादर स्टीफन्स (इ. स. १५४९–१६१९) याच्या क्रिस्तपुराणाला अग्रस्थान दिले पाहिजे. हिंदुस्थानात आलेला हा पहिला परकीय मिशनरी होय. धर्मप्रसाराच्या प्रेरणेने हा हिंदुस्थानात आला आणि तब्बल ४० वर्षे गोव्यात राहिला. या काळात त्याने कोकणी व मराठी या भाषांवर प्रभुत्व मिळवले, ज्ञानेश्वरादी संतांच्या वाङ्मयाचा व्यासंगही केला आणि मग बाटवलेल्या नवख्रिस्त्यांसाठी त्याने ओवीबद्ध क्रिस्तपुराण लिहिले. एखाद्या हिंदू पुराणाच्या थाटात तो आपल्या ग्रंथाचा प्रारंभ असा करतो–

> **वो नमो विस्वभारिता । देवबापा सर्वसमरथा ।**
> **परमेश्वरा सत्यवंता । स्वर्ग पृथुविचेया रचणारा ।।**
> **तू रिद्धिसिद्धीचा दातारु । कृपानिधि करुणाकरु ।**
> **तू सर्व सुखाचा सागरु । आदि अंतु नातोडे ।।**
> **स्वर्गसृष्टि तुवां हेळामात्रे । केला चन्द्र सूर्युनख्यत्रे ।**
> **तुजेनि येके सब्दे पवित्रे । केली सर्वरचना ।।**

स्टीफन्सच्या अनुकरणाने इतरही जेझुएट कवींनी त्या वेळी मराठीत ग्रंथरचना केली. त्यांपैकी फादर क्रुवा या फ्रेंच पाद्र्याने सेंट पीटरच्या चरित्रावर रचलेले महापुराण विशेष उल्लेखनीय आहे. त्यात कित्येक प्रसंग निर्माण करून त्याने हिंदूंच्या दैवतांची व आचारांची यथेच्छ निंदा केली आहे.

मुसलमान मराठी संतकवी – एकनाथ–तुकारामांच्या काळात आणि त्यानंतरही मुसलमान संतांनी जी मराठीची सेवा केली, ती उपेक्षणीय नाही. इ. स. च्या पंधराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत असे मुसलमान संत कवी आढळतात. त्यांमधला सुरुवातीचा आणि गुणांनीही अग्रगण्य असा कवी म्हणजे शहा मुंतोजी ब्रह्मणी हा होय. हा मृत्युंजय या नावाने प्रसिद्ध आहे. तो बहमनी राजघराण्यातला होता, असे अनुमान आहे. त्याला सहजानंद स्वामींचा गुरूपदेश मिळाला होता. तो कल्याणी व नारायणपूर या ठिकाणी राहिला. नारायणपूर येथे त्याची समाधी आहे. त्याने सिद्धसंकेतप्रबंध, अनुभवसार, अद्वैतप्रकाश, इ. नऊ ग्रंथ लिहिले. याशिवाय त्याने काही पदे व अभंगही रचले.

सिद्धसंकेतप्रबंध हा त्याचा सर्वांत मोठा ग्रंथ असून, त्याच्या दोन हजार ओव्या आहेत. त्यातल्या दुसऱ्या प्रकरणाला रामजानकीसंवाद असे नाव आहे. त्यातील काही निवडक ओव्या अशा– (२.४८–५२) (राम जानकीला सांगतो)

> **मन–नयनां येकांत करावा । प्रेमभाव हृदयीं धरावा ।।**
> **सत्य विश्वास मानावा । निश्चयेंसी ।।**
> **दिसेल इंदु-भास्करांचे परी । तोचि उभय दृष्टी धरीं ।**
> **त्यांत तूं प्रवेश करीं । निश्चय मनें ।।**
> **मयोरपत्रावरील डोळे । तैसी दिसती जे वतुळें ।**
> **तयांमध्ये जे नीळे । ते रूप माझें ।।**
> **तयांत खोवोनि दृष्टी । ते अंजन सुवावे नेत्रपुटीं ।**
> **मग उघडेल पेटी । ब्रह्मतेजाची ।।**
> **ध्यानीं चित्त स्थिरावेल । तया अखंड तेज प्रकाशेल ।**
> **मन तदाकार होईल । विसरलेनि देहातें ।।**

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या कवीबद्दल श्री. रा. चिं. ढेरे म्हणतात–

असा हा थोर परंपरेतील थोर संतकवी केवळ मुसलमान मराठी संतकवींतच नव्हे, तर अखिल मराठी संतमंडळात मानाचे स्थान पावणारा आहे. उत्तरकालिनांनी 'महायोगी' म्हणून त्याला गौरविले आहे, ते यथार्थ आहे.

यानंतरच्या काळात इ. स. च्या अठराव्या शतकापर्यंत अंबर-हुसेन, शेख सुलतान, शेख महंमद, शहामुनी, इ. अनेक मुसलमान मराठी कवी महाराष्ट्रात होऊन गेले.

मुसलमानांनी मराठीत संतकाव्याशिवाय आणखीही अनेक प्रकारची रचना केली आहे. ज्याप्रमाणे बहमनी वंशातील मुंतोजीने मराठीत वेदान्तावर स्वानुभवसंपन्न ग्रंथ लिहिला, त्याचप्रमाणे खलजी वंशातील एका मुंतोजीने मराठीत संगीत व ज्योतिष या विषयांवर पांडित्यपूर्ण ग्रंथरचना केली. हा मुंतोजी कोण-कुठला ते निश्चयाने सांगता येत नाही. परंतु तो स्वतःला 'वजिरुल्मुक' या बिरुदाने उल्लेखितो, आपल्या पित्याचे नाव जिया दौलतखान असे देतो आणि आपणांस 'खळचिवंशवर्धन' म्हणवितो. त्याने 'संगीतमकरंदा' वर मराठी ओवीबद्ध टीका लिहिली असून, विजयभैरव नामक ज्योतिषविषयक ग्रंथ मराठी गद्यात लिहिला आहे.

मुक्तेश्वरी परंपरा – कलात्मक दृष्टीने कथा निवेदन करणे हा या कालखंडाचा आणखी एक विशेष होय. या प्रवृत्तीचा अग्रगण्य कवी म्हणजे मुक्तेश्वर. तो एकनाथांचा मुलीकडून नातू होता. आजोबांच्या भक्तिसंप्रदायातून त्याने स्फूर्ती घेतली; पण तो भक्तीपेक्षा भुक्तीतच अधिक रंगला. त्याची कल्पनाशक्ती तरल होती आणि वर्णन करण्याची शैली प्रभावपूर्ण होती. काव्यानंदाच्या हेतूने कलाविलासात रंगून जाणारा म्हणून मुक्तेश्वर हा महाराष्ट्रकविमालिकेत अग्रगण्य आहे. 'महाराष्ट्रकवींत कवी ही संज्ञा एका मुक्तेश्वरालाच मात्र बरोबर लागते,' असे श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी म्हटले आहे.

मुक्तेश्वराची एकूण उपलब्ध कविता सरासरीने १७,००० इतकी भरेल. त्याने अनेक ग्रंथ लिहिले, त्यांत त्याच्या महाभारताला अग्रस्थान आहे. त्याच्या भारताची आदी, सभा, वन व विराट आणि शेवटचे सौप्तिक अशी पाचच पर्वे उपलब्ध आहेत. मुक्तेश्वराची वाणी नवरसांची मंदाकिनी आहे. ती प्रसंगानुरूप कोमल, कठोर, प्रक्षुब्ध, प्रसन्न, लडिवाळ, गंभीर, इ. विविध रूपे समरसतेने धारण करते. ज्ञानेश्वरादी संतांच्या काव्यात शांतरसाला आणि भक्तिरसाला प्राधान्य होते; पण मुक्तेश्वराने रसराज शृंगाराला प्राधान्य देऊन तो रस परोपरीने आळविला आहे. शृंगाररसाचा परिपोष करताना क्वचित त्याने सभ्यतेच्या मर्यादाही ओलांडल्या आहेत. त्याने ठिकठिकाणी मदनशरांनी विद्ध झालेल्या युवकांची आणि मंदहासिनी मन्मथ पुतळ्यांची, तसेच त्यांच्या लीलांची केलेली वर्णने वाचताना वाचकांच्या मनाला गुदगुल्या झाल्यावाचून राहणार नाहीत. निसर्गवर्णनातही त्याचा हातखंडा आहे. त्याने केलेले प्रातःकालाच्या शोभेचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे –

शेष वेचतां अठरा घटिका । पूर्व दिशेने क्षाळिले मुखा ।
कुंकुम रेखिले त्या तिलका । अरुणोदय बोलिजे ।।
भार्गवाचार्य उदया येत । तंव अपार क्रमुनिया पंथ ।
पुढे जान्हवीजळाचा वात । शीतळ, मंद पातला ।।
कुक्कुट रव करितां का का । भयें पळ सूटला उलुका ।
भोग द्यावया चक्रवाका । चक्रवाकी चालिल्या ।।
गाढालिंगने पडली गांठी । सोडिता दंपत्ये होती कष्टी ।
वस्त्रें वेढिती परी पोटी । अपूर्ण कामें जळजळ ।।
स्वैरिणी सांडोनि स्वसख्यांते । दूतीसहित त्वरें बहुतें ।
गृहा येऊनी स्वकर्मातें । संपादिती लौकिका ।।
घेवोनि अंधकाराची बुंथी । चंद्रस्वैच्छा भोगी जगती ।
प्रकाश वेढोनी सूर्याप्रती । म्हणे 'मी शुद्ध प्रतिव्रता' ।।
भोग भोगोनि सांडिले राजे । नूतनातें उपजवी बोजें ।
भ्रम घालोनि म्हणे माझें । असे ऐश्वर्य अक्षयी ।।
गगनसमुद्री मुक्ताफळें । अरुणचंचुनें कनकमराळें ।
वेंचोनि घेता कळाकुशळें । नाहींच केलीं नक्षत्रें ।।
कीं व्योमनर्मदेमाजी थोर । कार्तवीर्य सहस्रकर ।
ताराबाणलिंगांचा भार । निवटोनि करी परौता ।।

तुका झालासे कळस – ज्ञानेश्वरादी संतमंडळींनी उभारलेल्या भागवतधर्माच्या मंदिरावर कळस चढवण्याची कामगिरी याच कालखंडात देहूच्या तुकारामाने पार पाडली. ज्ञानेश्वरांनी स्त्री-शूद्रादिकांच्या आध्यात्मिक उन्नतीचे जे ध्येय आपल्यापुढे ठेवले होते, ते तुकोबाच्या रूपाने जणू प्रत्यक्षात अवतरले. 'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा' असे ठासून सांगण्याचा अधिकार प्राप्त करून घेऊन एका शूद्राने आत्मोन्नतीचा खरोखर कळसच गाठला. तुकोबाचे सुमारे साडेचार हजार अभंग सांप्रत उपलब्ध आहेत. त्याच्या जीवनचरित्राला व वाङ्मयीन कर्तृत्वाला सामाजिक अधिष्ठानही आहे. साधकावस्थेतील मनाची मोहवशता व लब्धप्रतिष्ठितांचा विरोध या दोन्ही आघाड्यांवर रात्रंदिवस झगडून त्याला आपली आध्यात्मिक प्रगती करून घ्यावी लागली. तत्कालीन शूद्रातिशूद्रांच्या वर्गीय सुखदुःखांचा आविष्कारही त्याच्या अभंगवाणीत झालेला आहे. तो वैश्य व शूद्र वर्णांचा प्रतिनिधीच होता, असे समीक्षक म्हणतात. त्यामुळे वैश्य व शूद्र वर्णांच्या प्रगतीला अडथळे आणणाऱ्या जन्मसिद्ध उच्चनीच भावांवर, तसेच धार्मिक व सामाजिक क्षेत्रांतील उच्चवर्णीयांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मिरासदारीवर त्याने अनेकदा हल्ला चढविला आहे. त्याचबरोबर धर्माभिमान, नीतीचे श्रेष्ठत्व, इ. उच्चतर जीवनमूल्यांची ओळखही त्याने सामान्य जनतेला करून दिली आहे. 'दुर्जनासी पंचानन । तुका रजरेणु संतांचा ' किंवा ' दया तिचे नाव भूतांचे पालन । आणिक निर्दळण कंटकांचे ' या तुकोबाच्या उक्तींवरून त्याच्या सामाजिक कामगिरीचे उभयविध स्वरूप व्यक्त होते. मनाच्या उदारतेबरोबर वृत्तीतला झुंझारपणा, न्यायनिष्ठुरता आणि निर्वैरबुद्धीबरोबरच दुष्ट प्रवृत्तीवर प्रहार करण्याची कठोरता, इ. गुणविशेषांनी तुकोबाचे व्यक्तिमत्त्व दुधारी बनले आहे. त्याच्या या व्यक्तिमत्त्वाचे स्पष्ट प्रतिबिंब त्याच्या भिन्न भिन्न प्रकारच्या अभंगांत उमटले आहे. त्याच्या करुणापर व आत्मस्थितिपर अभंगांत अंतःकरणाचा कळवळा व भाषेचा मवाळपणा दृष्टीस पडतो, तर त्याच्या उपदेशपर अभंगांत वृत्तीचा जहालपणा व भाषेचा तिखटपणा पाहायला मिळतो. उदाहरणार्थ त्याचे पुढील दोन अभंग असे –

(१) जीवनावांचूनि तळमळी मासा ।
प्रकार हा तैसा होतो जीवा ।। १ ।।
न सांपडे जाले भूमिगत धन ।
चरफडी मन तयापरी ।। २ ।।
मातेचा वियोग जालिया हो बाळा ।
तो कळवळा जाणा देवा ।। ३ ।।
सांगावे ते किती तुम्हांसी प्रकार ।
सकळांचें सार पाय दावीं ।। ४ ।।
येची चिंते माझा करपला भीतर ।
कां नेणो विसर पडिला माझा ।। ५ ।।
तुका म्हणे तू हें जाणसी सकळ ।
यावरि कृपाळ होईं देवा ।। ६ ।।

(२) भुंकती तीं द्यावीं भुंको । आपण त्यांचें नये शिको ।। १ ।।
भाविकांनीं दुर्जनाचें । मानूं नये कांहीं साचें ।। २ ।।
होईल तैसें बळ । फजीत करावें तें खळ ।। ३ ।।
तुका म्हणे त्यांचें । पाप नाहीं ताडणाचें ।। ४ ।।

तुकोबांच्या आध्यात्मिक अधिकाराविषयी श्री. शेणोलीकर लिहितात, ते असे–

उपनिषदे, गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, नाथभागवत या ग्रंथांतील सारे तत्त्वज्ञान त्यांच्या अभंगांत सामावले आहे. त्यावरून तुकारामांचा अधिकार स्पष्ट होतो. ज्ञानेशादिकांनी स्त्रीशूद्रांच्या आवाक्यात आणून ठेवलेले तत्त्वज्ञान अभ्यासून, पचवून, जीवनाच्या झगड्यात प्रत्यक्ष अनुभवून, लोकांना उपदेश करण्याची पात्रता तुकारामांनी सिद्ध केली, यामुळेच ' तुका झालासे कळस ' हे त्यांच्या संबंधीचे धन्योद्गार सार्थ ठरले आहेत.

आनंदभुवनाचा द्रष्टा– समर्थ रामदासस्वामी हे सामान्यपणे तुकोबांच्या समकालीन होत. त्यांनी इ. स. १६४४ त कृष्णातीरी कोदंडधारी राम व रामभक्त हनुमान या दैवतांच्या उपासनेचा स्वतंत्र पंथ उभारून महाराष्ट्राला बलोपासनेची दीक्षा दिली. पारमार्थिक बोधावर लक्ष ठेवूनही नेटका प्रपंच करण्याची आवश्यकता त्यांनी लोकांना पटवली. करंटा दैववाद किंवा निष्क्रिय उदासीनता यांच्या विरुद्ध त्यांनी आघाडी उघडली; अज्ञान, भोळसटपणा, परधार्जिणेपणा, इ. दुर्गुणांचा तिटकारा करायला शिकवले. ' घटासी आणावा घट । उद्धटासी पाहिजे उद्धट ' किंवा ' मारिता मारिता मरावे ' अशी प्रतिकाराची शिकवण त्यांनी लोकांच्या चित्तात ठसवली. ते म्हणतात–

उत्कट भव्य तेंचि घ्यावे । मिळमिळित अवघेंचि टाकावे ।
निःस्पृहपणे विख्यात व्हावे । भूमंडळी ।।
(दास.११.६.१५)

शिवकालीन प्रवृत्तीशी आणि आकांक्षांशी पूर्णतया समरस झालेले असे संतकवी म्हणजे रामदास हेच होत. मोगली सत्तेचा पाडाव करून शिवाजीमहाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ते पाहून त्यांनी उद्गार काढले ते असे–

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंचि होतसे ।
कल्पांत मांडिला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडवावया
कैपक्ष घेतला देवी । आनंदवनभूवनीं ।।
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संव्हार जाहला ।
मोडली मांडली छेत्रें । आनंदवनभूवनीं ।।
उदंड जाहले पाणी । स्नान-संध्या करावया ।
जप तप अनुष्ठानें । आनंदवनभूवनीं ।।

रामदासांनी विविध प्रकारची काव्यरचना केली आहे; पण या सर्वांत त्यांची वाङ्मयी मूर्ती ठरावी असा ग्रंथ म्हणजे वीस दशकांचा दासबोध हा होय.

समर्थांची भाषा ओबड धोबड; पण विचार सकस, उत्कट, ओजस्वी आणि भेदक आहेत. त्यामुळे त्यांच्या कित्येक ओव्यांना किंवा ओवीच्या अंशांना सुभाषितांचा दर्जा प्राप्त झाला आहे. खालील अवतरणे याची साक्ष देतील–

' आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थविवेका ' ।।
' मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पहातो ' ।।
' समजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष जाले ' ।।
' जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ' ।।
' उदंडांचे उदंड आइकावे । परी ते प्रत्ययें पहावे ' ।।
' वेष धरावा बावळा । अंतरी असाव्या नाना कळा ' ।।
' राखावी बहुतांची अंतरें । भाग्य येतें तदनंतरें ' ।।
' भक्तिहीन जे कवित्व । तेंचि जाणावे ठोंबे मत ' ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'वृंदावरी विसंबला । त्याचा कार्यभाग नासला ' ।।
' जें जें काही आपणासी ठावे । तें तें इतरासी शिकवावें ' ।।
' शहाणे करून सोडावे । सकळ जन ' ।।
' येत्न तो देव जाणावा ' ।।

जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, आनंदमूर्ती, केशवस्वामी व रामदास मिळून रामदासपंचायतन होते. या सर्वांनी काही ना काही ग्रंथरचना किंवा पद्यरचना केली आहे. दिनकर, गिरिधर, मेरुस्वामी व भीमस्वामी हे रामदासांचे प्रमुख शिष्य आणि वेगवेगळ्या मठांचे अधिपती होत. दिनकराचा स्वानुभवदिनकर, गिरिधराचा समर्थप्रताप, मेरुस्वामीचा रामसोहळा व भीमस्वामीचे समर्थचरित्र अशी त्यांची ग्रंथरचना आहे.

तुकारामाची शिष्या बहिणाबाई व रामदासाची शिष्या वेणाबाई. बहिणाबाई ही अंगी अध्यात्म मुरवलेली अशी स्त्री होती. तिने आपल्या तेरा पूर्वजन्मांची हकीकत सांगितली आहे. भक्ती व अद्वैत हे तिच्या अभंगांचे प्रतिपाद्य विषय होत. वेणाबाईने सीता-स्वयंवर हे आख्यान-काव्य लिहिले आहे. ते सुमारे दीड हजार ओव्यांचे आहे. सहजरम्य भाषा व चित्तवेधक वर्णने हे तिच्या कवित्वाचे गुण होत.

पंडित कवी – यापुढचा काळ पंडित कवींचा आहे. त्यात वामन पंडित आणि मोरोपंत हे अग्रभागी झळकतात. वामन पंडिताने एकनाथांची टीकात्मक व आख्यानपर लेखनाची परंपरा चालवली. त्याने पुष्कळशी स्फुट काव्येही लिहिली. ती स्फुट काव्ये रासक्रीडा, राधाविलास, वनसुधा, वेणुसुधा, नामसुधा, नीतिशतक, इ. आहेत. ही त्याची रचना प्रसादपूर्ण व मनोहर आहे. कृष्णासंगे गाई चारायला गेलेल्या गोपवाळांचे वर्णन करताना तोलिहि तो –

वनी खेळती बाळ ते बल्लवांचे । तुरे खोंविती मस्तकी पल्लवांचे ।
फुलांचे गळा घालिती दिव्य हार । स्वनाथासवे ते करिती विहार ।।
स्वकौशल्य ज्या गुंजमाळांत नाना ।
गळां घालिती ते करीती तनाना ।
शिरीं बांधिती मोरपत्रे विचित्रें ।
शरीरावरी रेखिती दिव्य चित्रें ।।

कुंजवनात देहुडा चरणी उभा राहून मुरली वाजवणाऱ्या श्रीकृष्णाचे चित्र तो पुढीलप्रमाणे रेखाटतो--

अंग वक्र अधरीं धरि पांवा । गोपवेष हरि तोच जपावा ।।
वामबाहुवरि गालहि डावा । तो ठसा स्वहृदयांत पडावा ।।
मल्लवेष रचिला अभिराम । श्रीधरप्रभु सवें बलराम ।।
मोरपत्र मुकुटी तरुपत्रें । नेत्र सुंदर जशीं शतपत्रें ।।

वामनपंडिताचा प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे यथार्थदीपिका. ही गीतेवरची टीका आहे. भगवंताचा आशय मीच यथार्थपणे सांगू शकतो, अशा अभिनिवेशाने तो ग्रंथलेखनाला प्रवृत्त झाला आहे. त्याचा हा ग्रंथ २२००० ओव्यांचा आहे. या ग्रंथात त्याची स्वतंत्र प्रज्ञा, निःस्पृहता, पांडित्य व भाषाप्रभुत्व हे गुण प्रकर्षाने दिसून येतात. त्यातील काही ओव्या (६. १०७१ – १०७६) अशा–

या द्विविधा ज्ञानिया योगियांत । एक सेविती सगुण भगवंत ।
एक निर्गुणोपासक ते अत्यंत । क्लेशें देवकृत विघ्नें परिहरिती ।।
'क्लेशोऽधिकतरस्तेषां ' म्हणोनि । द्वादशाध्यायांत या भावे करूनी ।
श्रीकृष्ण बोलले त्या वचनीं । समजावा हा अर्थ ।।
जे ज्ञानी होऊनि सगुणाची । कांस न सोडिती त्यांची ।
देवकृत विघ्नें हरूनी योगाची । सिद्धी अनायासें ईश्वर देतसे ।।
'तेषामहं समुद्धर्ता ' म्हणोनि । द्वादशाध्यायांत या भावे करूनी ।
श्रीकृष्ण बोलले कीं सकळ विघ्नें हरूनी । मी उद्धरणार भक्तातें ।।
हाचि अर्थ भागवतीं । पुनः पुनः स्कंधस्कंधाप्रती ।
निरूपिला तीं प्रमाणें किती । वाखाणावी ये स्थळी ।।
ग्रंथ वाढेल फार । म्हणूनी दाविजे अनुकार ।
एवं देवकृत विघ्नें परिहार । अनायासें भगवद्भक्ता ज्ञानियांच ।।

अत्यंत अल्प काव्यरचना करून मराठी साहित्यात अमरपद मिळविणारा कवी म्हणजे रघुनाथपंडित होय (१७ वे शतक). याचे दमयंतीस्वयंवर हे आख्यान रसिकप्रिय ठरले आहे. अनेक वृत्तांमध्ये श्लेष, उपमा, रूपक, इ. अलंकारांचा आश्रय करून त्याने आपले काव्य सजवले आहे. त्यातील काही श्लोक पुढीलप्रमाणे–

पुण्यश्लोक नृपावळीत पहिला होवोनि जो राहिला ।
तो राजा असतां समस्त महिला विश्रांति शेषाहिला ।।
व्यासोक्ते अवगाहिला बुध-जनीं नाना गुणीं गायिला ।
जो नामे नळ तत्कथौघ लिहिला तो पाहिजे पाहिला ।।१।।
इंद्रादिक वर असता, कशी नल-सतीच होय दमयंती ।
सुंदर सकल वधूंते कशी न लसतीच होय दम-यंती ।।२।।
कथा बोलूं हे मधुर सुधा-धारा ।
होय शृंगारा करुण रसा थारा ।
निषध-राजा नळ-नामधेय होता ।
वीरसेनाचा तनय महा होता ।।३।।
चौगुणीही जरि पूर्ण शीत भानु ।
नळा ऐसा तरि कला-निधी वानूं ।
प्रतापाचा जो न मालवे भानू ।
तयासमान कोण दुजा मानूं ।।४।।
चंद्रासि लागति कळा उपराग येतो ।
गंगेशि भंग बहु पाणउतार होतो ।
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला ।
नाहीं समान नळराज-महायशाला ।।५।।

सामराजाचे रुक्मिणीहरणही असेच लोकप्रिय आहे (१७ वे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शतक). संस्कृत काव्याच्या धर्तीवर या काव्याची सर्गात्मक मांडणी असून, त्याचे आठ सर्ग आहेत. माझी कृष्णकथा अरसिकालाही रसिक बनवील, असे सांगताना तो म्हणतो–

साहित्यस्वारस्य समस्त वेचें । शब्दोदधीचे निवडून वेंचे ।
पवित्र हे कृष्णकथा रसाला । जे नित्य आणी रस नीरसाला ।।

कृष्णदयार्णव हा भागवताच्या दशम स्कंधावर टीका लिहिणारा कवी त्याच शतकातला. या टीकेचे नाव हरिवरदा असे असून, हा ग्रंथ ४२००० ओव्यांचा आहे. हा नाथपरंपरेतला कवी होय. त्याची शैली गंभीर पण प्रसादपूर्ण आहे. उषेला अनिरुद्धाचे स्वप्न कसे पडले, त्याविषयीच्या त्याच्या काही ओव्या अशा–

उषा पहुडता शेजेवरी । निद्रा लागली घटिका चारी ।
स्वप्न देखिले तिये माझारीं । परमेश्वरी वरदानें ।।
श्याम सुंदर पंकजाक्ष । लावण्य तरुण सगुण दक्ष ।
दिव्याभरणी नर प्रत्यक्ष । देखिला वक्षःसंलग्न ।।
वामकरतळे धरूनि वेणी । वदन चुंबी अधरपानीं ।
कंचुकीग्रंथि विसर्जूनी । कुचमर्दनी प्रवर्ते ।।
स्मरमदगजाचे कुंभस्थळी । कामाङ्कुशाची क्षतें केलीं ।
गाढालिंगनें हृदयीं कवळीं । नीवीमोक्षण करूनियां ।।
प्रथम संगमीं साशंकित । सकंप अवयव आकुंचित ।
नरकरस्पर्शा निराकरित । चिन्हें लक्षित चित्रलेखा ।।
आलिंगनाच्या आवेशे । तरळ बाहुयुगल दिसे ।
मन्मथसदनाच्या विकाशे । उत्तानवर्ष्मी चंचळता ।।
ओष्ट चावूनि कुसकुसी मुखें । स्पंदित अष्टांग मन्मथसुखें ।
जननीं स्मरूनी अव्यक्त वाक्यें । अंग मोडूनि वदतसे ।।
करणीं उदेला रजोद्गम । लोहिवलांछित दुकूलोत्तम ।
स्वेदें पुलकित वदनपद्म । भासे विराम स्मरचिन्हां ।।
इतुका देखे चमत्कार । तंव झळकला प्रजागर ।
म्हणे, केउता गेला चोर । स्मरमंदिर उघडूनी ।।

कृष्णदयार्णवाबद्दल श्री. रा. चिं. ढेरे म्हणतात–

तत्त्वज्ञानाच्या सर्व प्रणालींशी कवीचा उत्तम परिचय आहे. सारा भारतवर्ष त्याने उघडया डोळयांनी पाहिला आहे. अनेक व्यथावेदना, भलेबुरे अनुभव त्याने आपल्या संग्रही साठविले आहेत. त्याचमुळे या ग्रंथात ग्रंथकाराच्या साधनेचे, सखोल अध्ययनाचे आणि व्यापक अनुभवाचे दर्शन घडते.

कृष्णदयार्णवापेक्षा त्याचा समकालीन श्रीधरस्वामी नाझरेकर किंवा श्रीधर हा अधिक लोकप्रिय ग्रंथकार होय. त्याच्याविषयी श्री. शेणोलीकर लिहितात –

लहानांपासून थोरांपर्यंत अठरापगड जातींमध्ये सर्व स्त्री-पुरुषांचा आवडता झालेला असा श्रीधराखेरीज दुसरा ग्रंथकार मिळणार नाही. मुक्तेश्वरांची पौराणिक धाटणी डोळयांपुढे ठेवून रामायण, भारत, भागवत व इतर पुराणे वगैरे ग्रंथांतील कथांचे संक्षिप्त, सुबोध आणि रसाळ असे ओवीबद्ध अनुवाद कथाप्रिय अशा वाचकांपुढे श्रीधरांनी ठेवले. त्यामुळे श्रीधरांचे ग्रंथ त्यांच्या हयातीतच गावोगावी पसरले. घरोघरी त्यांची पारायणे होऊ लागली. श्रीधरांनी हरिविजय (इ. स. १७०२), रामविजय (इ. स. १७०३), वेदान्तसूर्य, पांडवप्रताप (इ. स. १७१२), पंढरिमाहात्म्य, व्यंकटेशमाहात्म्य, मल्हारीविजय व ज्ञानेश्वरचरित्र इतके ग्रंथ लिहिले.

श्रीधरांच्या काव्याचा नमुना म्हणून हरिविजयातल्या काही ओव्या पुढे दिल्या आहेत –

अंगणीं असोन श्रीहरी । परी न दिसे तिच्या नेत्रीं ।
जन भुलले याचपरी । नाना साधनें भजती हो ।।
जवळीं असोन जगज्जीवन । कां सेविती घोर विपिन ।
निराहार पंचाग्निसाधन । नाना यज्ञ करिती एक ।।
एक घेती वायु आहार । एक नग्न मौनी जटाधार ।
एक हिंडती दिगंबर । परी श्रीवर न सांपडे ।।
शम दम अष्टांगसाधन । नाना व्रताचरण तीर्थाटण ।
एक वेदाभ्यासीं शास्त्रीं निपुण । परी तें निधान न सांपडे ।।
हरिप्राप्तीवीण कोरडे ज्ञान । तयाचें नांव अज्ञान ।
भगवत्प्राप्तीवीण दावी भजन । तें सोंग जाण नटाचें ।।

ज्यांनी आर्यावृत्तावर आपली अमिट नाममुद्रा उमटवली ते मोरोपंत १७ व्या शतकातच होऊन गेले. ते भागवतधर्मी संतांच्या शिकवणीत मुरलेले आणि सर्वभूती भगवद्भाव धारण करणारे साधुपुरुष होते. त्यांनी काव्यरचनेचा जो प्रचंड उद्योग केला, तो मनाला थक्क करून सोडणारा आहे. महाभारत, भागवत आणि रामायण यांचे आर्याबद्ध अनुवाद, भागवताच्या दशम स्कंधावर कृष्णविजय आणि शिवचरित्रावर ब्रह्मोत्तरखंड, इ. विस्तृत काव्ये, १०८ रामायणे, अनेक आख्याने, स्तोत्रे, केकावली ही सर्व मिळून मोरोपंतांची ग्रंथरचना साठ हजारांच्या वर भरते.

आत्मोन्नतीसाठी देवांची आणि संतसज्जनांची परम पवित्र चरित्रे गावी हा त्यांच्या काव्यरचनेचा हेतू. त्यांच्या सर्व रचनेत आर्याभारत हा ग्रंथ मोठा आहे. त्यांच्या कवित्वशक्तीचे सारे चांगले गुण आर्याभारताच्या रचनेत एकवटले आहेत. रसिकांना ते आश्वासन देतात –

त्या श्री व्यासप्रभुला वंदुनि मी भारतेतिहासरस ।
पाजीन तुम्हां श्रोत्यां अमृतरसाहून फार हा सरस ।

आर्याभारतात विविध रसांच्या सरिता वाहत असल्या, तरी त्यांतला मूर्धन्यरस मात्र वीररस आहे. त्या दृष्टीने त्यांची सगळी युद्धपर्वे सरस उतरली आहेत. त्यांतले कर्णपर्व म्हणजे तर पंतांच्या साऱ्या काव्यगुणांची घोटीव मूर्तीच होय. कर्णार्जुनयुद्धाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रसंगी शल्याने कर्णाचा तेजोभंग कसा केला, त्याचे वर्णन पंतांनी केले आहे, ते असे –

शल्य म्हणे, "राधेया जेव्हा तुझिया स्मरोनि कर्माते ।
अर्जुन तीव्र शरांनी समरीं भेदील सर्व मर्माते ॥
तेव्हां पश्चात्तापा बापा, तूं पावशील पापानें ।
सापानें धरिला प्लव न जगे बडबडसि तूं जसा पानें ॥
तूं विजयासि वधाया वांछिसी हें कोण जाणतां साहे ।
अंबांक-स्थित शिशु शशि-मंडळ कवळावया जसा पाहे ॥
शव-मांस-मत्त जंबुक तूं, गज मुक्ताश सिंह तो जिष्णु ।
तूं शशक, पार्थ गज-पति, कीं दानव तू सिताश्व तो विष्णु ॥
स्व-बिल-स्थ कृष्ण-सर्पा काष्ठें टोचोनि खवळिशी कां गा ।
तीव्र त्रिशूळ-वदनें तूं खाजवितोसि आपुल्या आंगा ॥
पार्थ-पयोधर गर्जे, स्पर्धा मंडूक तूं वृथा धरिशी ।
त्याच्यापुढे डुरडुरू टरॉंटरॉं शब्द हे किती करिशी ॥
श्वान-स्वपोषकाच्या सदनाच्या आश्रयें उभा राहे ।
जिकडे वनांत गर्जे शार्दूल तया दिशेकडे पाहे ॥
भुंके बळें यथेष्ट, व्यथित करी निकट-वर्ति-जन-कर्णा ।
अर्जुनदृष्टि न पडली तोंचि तसा भुंकतोसि तूं कर्णा ॥
शश-मंडळांत कोल्हा म्हणतो, 'मी सिंह' वल्गना करितो ।
'जोंवरि न पाहिला गज-गंड-स्थळ-कवळ-भक्षिता हरि तो ॥

पंतांना यमकानुप्रासांचा विलक्षण हव्यास होता. त्यामुळेच कित्येक ठिकाणी त्यांची आर्या दुर्बोध होते. मोरोपंत हे श्रेष्ठ दर्जाचे नीतिशिक्षक असल्याचा प्रत्यय या ग्रंथांवरून सहज येतो. महाभारतातले नीतिपर विभाग मोरोपंतांनी त्रुटित स्वरूपात लिहिले असले, तरी त्यांतील अध्यात्मबोध व नीत्युपदेश सर्व ग्रंथभर त्यांनी विखुरला आहे. त्यांची व्यक्तिचित्रणे मूळ महाभारताइतकीच जिवंत आणि ठसठशीत आहेत. या गुणांमुळे त्यांचे भारत त्याच्या रचनाकालीच लोकप्रिय झाले.

पंतांच्या सर्व रामायणांत मंत्ररामायण हे मोठे व सरस आहे. त्यातील युद्धकांड विशेष उल्लेखनीय होय. त्यांची केकावली हे उत्तम प्रकारचे ध्वनिकाव्य असून, ती परिणतप्रज्ञाची वाणी आहे. प्रेम, प्रतिभा व प्रसाद हे गुण तिच्यात परिपूर्ण आहेत, असे श्री. पांगारकर म्हणतात. त्या काव्यातील दोन केका अशा –

कृतांत-कटकामल-ध्वज-जरा दिसों लागली ।
पुरःसर गदांसवें प्रगडतां तनू भागली ।
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा ।
न हो जरि उतावळा, स्वरिपु कापितो हा गळा ॥
अगा प्रणतवत्सला, म्हणति त्या जनां पावलां ।
म्हणोनि तुमच्याच मी स्मरतसें सदा पावलां ।
करूं बरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला ।
असें मनिं धरा, खरा भरंवसा मला आपला ॥

नाभाजी, उद्धवचिद्घन, दासो दिगंबर असे काही चरित्रकार याच काळात होऊन गेले. पण महिपतीशी तुलना करता त्यांची कामगिरी गौण ठरते. महिपतीने भक्तिविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत व संतविजय (अपूर्ण) असे चार ग्रंथ लिहिले. पण त्याच्या चरित्रग्रंथांना विश्वसनीयता बेताचीच आहे. विभूतिपूजक वृत्तीनें तो सर्व संतांचे माहात्म्य सारख्याच भक्तिभावाने वर्णितो; चमत्कारांचे भारूड सांगून त्यात त्या व्यक्तीभोवती दैवी वलय निर्माण करतो. स्थलकालपरिस्थितीसंबंधीचा बारकावा महानुभावांच्या चरित्रग्रंथांत आढळतो, तसा तो महिपतीच्या ग्रंथांत आढळत नाही. त्याच्या लेखनशैलीचा भक्तलीलामृतातील एक नमुना असा –

ऐका श्रोते भाविक प्रेमळ । कृपेने विलोकितां दीन-दयाळ ।
मुके होऊनि वाचाळ । वदतसे सकळ शास्त्रार्थ ॥
श्रीहरिचेनि कृपाबळें । महापर्वत उल्लंघी पांगुळ ।
बरड गोटे जे केवळ । प रिस तत्काळ ते होती ॥
खैर बाभुळीचा तरु । तोही होईल कल्पतरु ।
जरी कृपा करितां जगद्गुरु । होईल संसार सुखाचा ॥
महाविष प्राशितांच जाण । तें होईल अमृतासमान ।
खडे होतील चिंतामण । करुणाघन तुष्टल्या ॥
मारितां वैरि जो दुर्धर । तोहि होईल लोभापर ।
पळोनि जातील यमकिंकर । शार्ङ्गधर रक्षी जया ॥
बुद्धिहीन मतिहीन निश्चितीं । ऐसें सर्वत्र लोक जाणती ॥
आणि ग्रंथ वदवितो मूढ हातीं । लाघवी श्रीपती म्हणोनिया ॥
(भक्तलीलामृत अ. ७)

शाहिरी वाङ्मय – यानंतरचा काळ म्हणजे पोवाडा आणि लावणी यांचा. पोवाड्यांची रचना शिवकालापासून सुरू झालेली दिसते. अफजलखानाच्या वधावरचा अज्ञानदासाचा पोवाडा हा सर्वांत जुना पोवाडा होय (इ. स. १६५९). त्याची ती रचना सरळ, गद्यप्राय पण परिणामकारक आहे. दुसरा पोवाडा तानाजीवरचा. तो तुळशीदासाने लिहिला आणि गाइला. तानाजी-उदयभान यांचा समरप्रसंग आणि तानाजीला लाभलेले वीरमरण यांचे रसरशीत वर्णन करून तो म्हणतो, 'शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दानें ऐकावा.'

सुमारे तीनशे पोवाडे सांप्रत उपलब्ध आहेत. त्यांपैकी चार शिवकालीन, तीन शाहूकालीन, दीडशे पेशवेकालीन व बाकीचे अव्वल इंग्रजीतील आहेत, असे श्री. शेणोलीकर म्हणतात. या शाहिरांची दृष्टी वस्तुनिष्ठ होती. वर्ण्य विषयाची चित्रे त्यांनी तन्मयतेने रेखाटली आणि लोकभावनेकडे पुरेपूर लक्ष दिले. पोवाड्यांतून इतिहासाचे दर्शन घडते; पण त्यांत अतिशयोक्ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भरपूर असते. तुळशीदासाच्या पोवाड्यातील अतिशयोक्तिपूर्ण वर्णनाच्या काही पंक्ती अशा –

उदेभान तेथुन निघाला । आला पिराच्या दरग्याला ।।
फोडल्या कापसाच्या उदी । ओतले तेलाचे बुधले ।।
ज्याने आग जी लावली । ज्यानें उजेड तो केला ।।
गलीम किती मोजून पाहिला । पन्नास माणूस ह्याच्या
आले हिशेबाला ।।
उदेभान माणूस पाहून । त्याच्या भुजा ज्या थरारल्या ।।
पन्नास माणूस । मारी आंबाडीची भाजी ।।
मोगल मार्गे परतला । गेला आखाडखान्यामधीं ।।
पायीं तुमानी सुरवारा घातल्या । अठरा खंडीचे किनखाप
त्यानें अंगांत घातलें ।।
बारा आतबडीचा जोडा । त्याने पायांमधीं घातला ।।
ज्यानें वाघनखें चढविलीं । जिरेटोप डोईस घातला ।।
अठरा जागी बिच्या । हरोहारीनें उभ्या केल्या ।।
सळ पठ्याचा सोडिला । अठरा बिच्यांची खांडें केली ।।
आसुदाचा टिला त्याला । गामणी गाई जो काटली ।।

मराठ्यांच्या उत्कर्षापकर्षाशी आणि तज्जन्य सुखदुःखांशी शाहीर तादात्म्य पावलेले दिसतात. खर्ड्याच्या लढाईतल्या विजयाचे उन्मादाने वर्णन करणारा शाहीर अनंत फंदी हा पानिपतावरील अपयशाबद्दल अश्रू ढाळताना दिसतो. इंग्रजी अमदानीवरील पोवाड्यांत दुःख, वैताग, भयचकितपणा आणि कौतुक अशा संमिश्र भावना आढळतात.

पोवाड्याची रचनापद्धती गोंधळ्यांच्या कथानिवेदनासारखी असते. प्रथम साऱ्या देवतांना आवाहन आणि मग मुख्य कथा सांगणे, ही दोघांची रीत सारखीच आहे.

पोवाड्यापाठोपाठ जन्मलेली लावणी अधिक नाट्यमय आहे. तमाशासारख्या नाट्यप्रकारातच ती अधिक खुलते. ती सुस्वर पण साभिनय म्हणावी लागते. तमाशाच्या थाटात शृंगारिक लावणी जशी रंगते, तसे इतर काही रंगू शकत नाही. म्हणूनच लावणीतील इतर रस हळूहळू मागे पडून केवळ शृंगार ह्याच तिचा स्थायीभाव होऊन राहिला. मराठी राज्याचे साम्राज्य होताच पराक्रमाबरोबर सरदार, सेनापती, अधिकारी अशा मंडळीत राजविलास व ख्यालीखुशाली वाढली. त्यामुळे अशा लोकांच्या शृंगारप्रवृत्तींना खुलविण्यासाठी पूर्वपेशवाईत लावणीचा जन्म झाला आणि उत्तरपेशवाईत ती 'पणा'त आली. रामजोशी, प्रभाकर, होनाजी, इत्यादी लावणीकारांनी राधाकृष्ण-प्रेम व गोप-गोपींचे विलास या विषयांवर पुष्कळ लावण्या लिहिल्या आहेत. परशुरामाच्या लावण्यांत राधाकृष्णविलास-वर्णनाबरोबर त्या प्रसंगाचा अध्यात्मपर अर्थ लावण्याचा पंडिती प्रयत्नही दिसून येतो. प्रभाकराच्या वीसपंचवीस लावण्यांचा नायक बाजीराव आहे. त्याचे विलास वर्णन करताना प्रभाकराने बाजीरावालाच कृष्ण बनविले आहे.

विवाह, न्हाणवली, पति–पत्नींचे प्रेम, शिपाई गड्याचा शृंगार, युद्धाला जाणाऱ्या पतीला निरोप, विरहकाळातील मदन-बाधा, व्यभिचारी प्रणय, जारिणीची तळमळ, गर्भवतीचे डोहाळे, निपुत्रिक स्त्रीची दुःखे, पुत्रजन्म, इ. सांसारिक किंवा कौटुंबिक घटना हे लावणीचे विषय होत. प्रमुख लावणीकारांच्या लावण्यांतील काही पंक्ती अशा–

रामजोशी –

सुंदरा मनामधिं भरलि जरा नाही ठरली ।
हवेलित शिरलि मोत्याचा भांग ।।
रे गड्या हौस नांहि पुरलि म्हणोनी विरलि ।
पुन्हा नांहि फिरलि कुणाची सांग ।। ध्रु. ।।
जशि कळी सोनचाफ्याचि न पडुं पाप्याचि ।
दृष्टि सोप्याचि नसल ती नार ।।
अति नाजुक तन देखणी गुणाची खणी ।
उभी नवखणीं चढुन सुकुमार ।।
जशि मन्मथरति धाकटी सिंहसम कटी ।
उभी एकटी गळ्यामधिं हार ।।
अंगि तारुण्याचा बहर ज्वानिचा कहर ।
मारिते लहर मदनतल्वार ।।
पायिं पैंजण झुबकेदार कुणाची दार ।
कोण सरदार हिचा भरतार ।।
कुलविद्याजडावटिकाल मनामधिं टिकलि ।
नांहि हटकली तेज अनिवार ।।
नाकामध्यें बुलाख सुरति चांदणी वरति ।
चमकती परति हिच्यापुढें फार ।।

होनाजी –

राधा म्हणे श्रीहरी तुम्ही रात्रीं होतां कोणे ठाईं ।।
तें सांगा मजप्रती आता सत्वर भूधरशाई ।। ध्रु ।।
नूतन वधु देखण्या गोकुळामध्ये गोवळबाळीं ।।
नित्य तुम्हाला हवी नविन एक हृदयीं कवटाळीं ।।
चार प्रहर कंमिली निशी कोणें घरी वनमाळी ।।
आला नेत्र पुशीत उठून येवढें प्रातःकाळीं ।।
सुरस ग्रंथ केशरी टिळक वर कस्तुरी भाळी ।।
घर्मानें पुसिला भोगिली कोणीतरी वेल्हाळी ।।
दिसती नेत्र आरक्त मुखावर तेज क्वचित् नाही ।।

प्रभाकर –

नका जाऊं दूर देशीं घरी काय धनद्रव्याला कमी ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आलि हो वर्षाची नागपंचमी ।। ध्रु. ।।
झिर मिर झिर मिर पर्जन्य वरसे भर महिना श्रावण ।
कठिण लष्करची हवा दारुण ।।
महोत्सव नगरांत, मिळाले देशावरील ब्राह्मण ।
पाहूं सुख सोहळा दोघेजण ।।
नका जाऊं टाकून करा घरीं नागपंचमी सण ।
किती नित आठवूं तुमचे गुण ।।
रहाण्याचा निश्चय करा हो । तुम्ही राजहंस पाखरा ।।
नवनिध गौरिशंकरा हो । मम प्राणसख्या प्रियकरा ।।
सर्वांत स्वरुपसुंदरा हो । निष्कपट सगणमंदिरा ।।
पसरिते केव्हांची पदर । काही पोक्त करा तरी नदर ।।
दूर जाणे न सोसे सदर ।।
आदरें करून विनवितां कदर । का कठिण करितां तुम्हीं ।।

पठ्ठे बापूराव –
तुझ्या कृष्णानें ग आमची राधा भुलविली खरी ।
कपाळाला काजळ ल्याली । कंचुकी उलटी घाली ।
वही घेऊनी तुपाचा डेरा हवाला करी ।।
माजपट्टा घाली । बाजुबंद पायांत वेळा ।।
ठुशा टीका तन्मणि बांधें कंबरेच्या वरी ।।
धार काढी पालथा घडा । गाईखाली सोडी रेडा ।
म्हशीखाली गाईचा पाडा पाजी लवकरी ।।
शहाणी असुनी झाली वेडी । ज्याला त्याला डोळे मोडी ।
पठ्ठे बापूरावच्या कविची खडी चाकरी ।।

मराठी जैन साहित्य – जैन धर्म भारतातल्या प्राचीन धर्मांपैकी एक आहे. एके काळी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत या धर्माने वैभवाचे दिवस पाहिले होते. भारताच्या सर्व भागांत जैनांची इतिहाससाधने विखुरलेली आहेत. जैनांनी अर्धमागधी ही धर्मभाषा म्हणून स्वीकारली होती. त्या भाषेत त्यांचे विपुल साहित्य उपलब्ध आहे. याशिवाय संस्कृत व इतर सर्व भारतीय भाषा यांमध्येही जैनांनी साहित्यनिर्मिती केली आहे.

मराठी भाषा ही मुख्यत: महाराष्ट्री अपभ्रंशातून जन्माला आली, हे सांप्रत मान्य ठरले आहे. महाराष्ट्री प्राकृतानंतर महाराष्ट्री अपभ्रंशाचा काळ येतो. 'जैन सूरींनी वाङमयाचा असा कोणताही प्रकार अपभ्रंश भाषेत गुंफण्याचा ठेवला नाही' असे कृ. पां. कुलकर्णी लिहितात.

पुष्पदंत हा या भाषेतला सर्वश्रेष्ठ कवी होय. त्याचा काळ इ. स. चे दहावे शतक हा आहे. महापुराण, णायकुमारचरिउ व जसहरचरिउ हे त्याचे तीन महत्त्वाचे ग्रंथ होत. त्यांना अपभ्रंशांची रत्नत्रयी असे म्हणतात. दहाव्या शतकानंतर अपभ्रंशाचा काळ संपला असला, तरी चौदाव्या शतकापर्यंत महाराष्ट्री अपभ्रंशातून थोडीबहुत ग्रंथरचना होत राहिलेली दिसते.

महाराष्ट्राशी जैन धर्माचा संबंध नक्की कोणत्या काळी आला हे समजणे कठीण आहे. पण सनपूर्व चौथ्या शतकात महाराष्ट्रामध्ये उत्तरेतून जैनांचे आगमन फार मोठ्या प्रमाणात झाले, असे सामान्यपणे समजतात. राष्ट्रकूटांच्या काळात जैन पंडितांना राजाश्रयही मिळाला होता. जिनसेन हा अमोघवर्ष या राष्ट्रकूट राजाचा गुरूच होता. महाराष्ट्रातला जैन समाज प्रामुख्याने दिगंबरपंथीच असला, तरी काही प्रमुख शहरांत व्यापाराच्या निमित्ताने श्वेतांबर जैनही स्थायिक झाले आहेत.

इ. स. च्या चौदाव्या शतकानंतर जैन ग्रंथकार मराठीत ग्रंथरचना करू लागलेले दिसतात. आज उपलब्ध झालेल्या माहितीप्रमाणे गुणदास हा पहिला जैन मराठी ग्रंथकार होय (इ. स. १४५० चा सुमार). हा कवी ब्रह्मगुणदास या नावाने प्रसिद्ध आहे. श्रेणिकचरित्र हे त्याचे मोठे काव्य असून, त्याची ओवीसंख्या तीन हजार आहे. इतरही काही फुटकळ काव्ये त्याने लिहिली आहेत.

गुणकीर्ती हा त्याचाच समकालीन होय. याचा धर्मामृत हा ग्रंथ त्याच्या सर्व उपलब्ध ग्रंथांत महत्त्वाचा आहे. आदर्श गृहस्थाचे आचरण कसे असावे, हे त्या ग्रंथात मुख्यत्वे सांगितले आहे. हा ग्रंथ गद्य स्वरूपात आहे. पद्मपुराण हा त्याचा मोठा काव्यग्रंथ असून, त्याची ओवीसंख्या १५,००० आहे. या ग्रंथाचे एकंदर ४३ अध्याय आहेत. हा संपूर्ण ग्रंथ गुणकीर्तीच्या हातून पुरा होऊ शकला नाही. त्यातले पहिले २८ अध्याय गुणकीर्तीचे आहेत, त्यानंतरचे ७ अध्याय ब्रह्मचिंतामणीचे आहेत आणि शेवटचे ८ अध्याय ब्रह्मपुण्यसागर याचे आहेत. अशा प्रकारे हा ग्रंथ तीन कवींच्या हातून पुरा झाला आहे.

जिनदास इ. स. च्या पंधराव्या शतकात देवगिरी येथे होऊन गेला. विद्वत्त्व व कवित्व या दोन्ही दृष्टींनी हा ग्रंथकार श्रेष्ठ दर्जाचा आहे. श्रीकृष्ण व नेमिनाथ या दोघांच्या चरित्रांवर त्याने हरिवंश पुराणाची रचना केली आहे.

पंडित मेघा किंवा मेघराज हा सोळाव्या शतकाच्या प्रारंभीचा कवी होय. त्याचा ११६४ ओव्यांचा जसोधररास हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात नागोआया याने यशोधरचरित्र व उत्तरार्धात गुणनंदीने यशोधरपुराण या नावाचे ग्रंथ लिहिले. पहिल्याच्या २९२ ओव्या व दुसऱ्याच्या १३३६ आहेत.

सोळाव्या शतकात विदर्भातील कारंजा येथे भट्टारकपीठाचे धार्मिक दृष्ट्या प्राबल्य होते. पीठावरचे भट्टारक हे धर्मगुरू म्हणून मानले जात होते. विदर्भ व मराठवाडा या विभागांतील भट्टारकपीठांचा हा वैभवकाल होता. पूजा, प्रतिष्ठा, मूर्तिस्थापना, इ. धार्मिक गोष्टी त्या काळात बऱ्याच प्रमाणात चालू झाल्या.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यामुळे त्यांच्यासाठी आवश्यक अशा साहित्याची मागणीही वाढली. ती पुरी करण्यासाठी व्रते, व्रतकथा, पूजा, आरती, स्तोत्र इ. वाङ्मय त्या काळापासून पुढे विपुल प्रमाणात निर्माण झाले.,

सतराव्या शतकातील जैन कवींत वीरदास याचे स्थान असामान्य आहे. तो कवी तर होताच; शिवाय औरंगाबाद येथील भट्टारकपीठाचा आचार्यही होता. सुदर्शनचरित्र हा त्याचा सर्वांत मोठा काव्यग्रंथ असून, त्याचे २५ अध्याय आहेत.

सतराव्या शतकात दामा पंडिताने जंबूस्वामीचरित्र आणि दानशीलतपभावना हे दोन ग्रंथ लिहिले. पहिल्याची ओवीसंख्या २६२१ असून, दुसऱ्याची ४६८ आहे. भानकीर्ती हा औरंगाबाद-पीठाचा दुसरा भट्टारक होय. त्यानेही काही किरकोळ ग्रंथरचना केली आहे. त्याच शतकात दयासागराने सम्यक्त्वकौमुदी, भविष्यदत्तबंधुदत्त पुराण व धर्मामृतपुराण असे तीन ग्रंथ लिहिले. पहिल्याची ओवीसंख्या २३८० असून, त्यात अनेक अद्‌भुत कथा दिलेल्या आहेत. दुसऱ्याची ओवीसंख्या १३८९ असून, तिसऱ्याचे दहा अध्याय आहेत.

सतराव्या शतकाच्या अखेरीस महीचंद्राने आदिनाथपुराण, नंदीश्वरकथा, नेमिनाथभवांतर, इ. बरीच काव्यरचना केली.

देवेंद्रकीर्ती हा इ. स. च्या अठराव्या शतकातला जैन ग्रंथकार होय. त्याचा कालिकापुराण हा ग्रंथ अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. त्यात अनेक पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक कथागाथांचे एकत्रीकरण केलेले आहे. त्याची ओवीसंख्या ७०००च्या वर आहे. हे पुराण म्हणजे मध्ययुगीन जैन समाजाच्या स्थित्यंतराचा इतिहासच समजला पाहिजे, असे डॉ. अक्कोळे म्हणतात. दक्षिणेत सोमवंशी कासारबोगार या समाजाची उत्पत्ती आणि त्याची स्थित्यंतरे, तसेच मुसलमानांच्या हल्ल्यापासून जैन व हिंदू या सर्वांनाच त्या काळी कसा त्रास भोगावा लागला, त्याची वर्णने या पुराणात आहेत.

जिनसागर हा अठराव्या शतकातील आणखी एक महत्त्वाचा ग्रंथकार होय. त्याने मराठीमध्ये विपुल ग्रंथरचना केली असून, जीवंधरपुराण, व्रतकथा, स्तोत्रे, आरत्या, इ. तिचे प्रकार आहेत. जनार्दन या ग्रंथकाराने अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात श्रेणिकचरित्र या नावाचा ४० अध्यायांचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्याची ही रचना श्रेष्ठ दर्जाची मानली जाते. याच काळात महतीसागर नावाचा आणखी एक ग्रंथकार होऊन गेला. महतीकाव्यकुंज या नावाने त्याच्या रचनांचे संकलन झालेले आहे. एकोणिसाव्या शतकात जिनसेनाने जंबूस्वामीपुराण, उपदेशरत्नमाला व पुण्यास्रवपुराण असे तीन ग्रंथ लिहिले. याशिवाय इतरही अनेक ग्रंथकारांनी बरीच ग्रंथसंपदा निर्माण केली आहे.

या सर्व जैन साहित्यकारांनी कथा, चरित्रे, व्रते, इ. साहित्याच्या द्वारे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, शांती, संयम, दान, त्याग, इ. गुणांचा समाजाला उपदेश केला आहे.

अर्वाचीन काव्य – यानंतर आपण अव्वल इंग्रजीच्या काळात दाखल होतो. हा कालखंड इ. स. १८७५ ते १९२० असा आहे. या कालखंडाला मराठी भाषेचा क्रांतिकाल असे म्हणतात. या काळात जे काव्य निर्माण झाले, त्याचा चेहरा-मोहरा बराचसा भिन्न आहे. या काळात नवनीतकार आणि काव्यसंग्रहकार यांनी प्राचीन कवितेचा सुशिक्षितांना परिचय करून दिला. त्याच जुन्या वळणावर बापूसाहेब कुरुंदवाडकर, शिवराम रामकृष्ण नित्सुरे,

केशवसुत (कृष्णाजी केशव दामले)

पु. बा. जोशी, गो. वा. कानिटकर, वासुदेव वामनशास्त्री खरे, वि. भ. लेंभे, इ. कवींनी आपली काव्यरचना केली. दुसरे काही कवी इंग्रजी कवितेच्या भाषांतराकडे वळले. म. गो. कोल्हटकर, ब. रा. प्रधान, डॉ. कीर्तिकर, वि. मो. महाजनी, म. मो. कुंटे, वि. कों. ओक, इ. रुवींनी इंग्रजी कवितेच्या आधारे कविता रचली. स्फुट कविता, सृष्टिवर्णनपर कविता, प्रेमविषयक कविता, भावगीत, विलापिका अशा स्वरूपाची ही कविता होती. नीतिबोध आणि उपदेश हे उद्दिष्ट याही कवींनी आपल्या डोळ्यांपुढे ठेविले. मात्र त्याचे स्वरूप बदलले. नीतीचे व बोधाचे प्रत्यक्ष पाठ न देता कवींनी ते अप्रत्यक्षपणे द्यायला सुरुवात केली. काव्याच्या वृत्तादिकांत फारसा बदल झाला नाही. अक्षरवृत्ते, आर्या, साक्या, ओव्या, अभंग, दिंडया, इ. वृत्तांतच या काळात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कविता रचण्यात आली. केशवसुतांनी प्रथम त्यात बदल केला. कवितारचनेत उद्देश, वृत्ते, आशय, इ. सर्व प्रकारे परिवर्तन केले ते केशवसुतांनी (इ. स. १८६६ ते १९०५). म्हणूनच केशवसुतांना नव्या काव्ययुगाचे अग्रदूत समजतात.

नव्या कवितेचे म्हणून समजले जाणारे सर्व विशेष केशवसुतांच्या काव्यात उत्कटपणे प्रतीत झाले आहेत. ज्या काळात चिपळूणकर, टिळक, आगरकर, लोकहितवादी, म. फुले, न्या. रानडे, इ. लोकाग्रणी आपले सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक विचार लोकांत प्रसृत करीत होते, त्याच काळात केशवसुतांनी आपल्या काव्यरचनेला प्रारंभ केला. त्यांच्या कवितेत त्यांच्या कालाचे चित्र पाहायला मिळते.

नियमन मनुजासाठी, मानव नसे नियमनासाठी जाणा।

आत्मपर आणि प्रेमविषयक कविता हेही केशवसुतांचे आणखी एक वैशिष्टच समजले जाते. आत्मपर प्रेमगीतांचा पायंडा केशवसुतांनी पाडला, असे श्री. वि. पां. दांडेकर म्हणतात. त्यांच्या निसर्गविषयक कविताही उल्लेखनीय आहेत. निसर्गात अढळ सौंदर्य आहे, प्रीती, चारुता, आनंद आहे; तो चिरतरुण व चिररुचिर आहे आणि त्याचा विकास मानवासाठी आहे, अशा प्रकारचे विचार केशवसुतांनी आपल्या निसर्गविषयक काव्यातून व्यक्त केले आहेत. झपूर्झा, म्हातारी, हरपले श्रेय, कोणीकडून कोणीकडे या त्यांच्या गूढगुंजनात्मक कविता होत.

हे झाले आशयाच्या दृष्टीने; पण केशवसुत तेवढ्यापुरतेच



ना. वा. टिळक

विनायक जनार्दन करंदीकर

बालकवी ठोमरे

समाजाभिमुखता हा केशवसुतांच्या काव्याचा पहिला विशेष होय. तुतारी, नवा शिपाई, स्फूर्ती, गोफण, मूर्तिभंजन, इ. कवितांतून केशवसुतांचे सामाजिक विचार प्रामुख्याने प्रकट झाले आहेत. समता, बंधुता आणि स्वातंत्र्य यांचा उद्घोष आणि प्रचार केशवसुतांनी कसा ओजस्वी भाषेत केला, ते त्यांच्या तुतारीमधील पुढील पंक्तींवरून कळून येईल—

जुने जाउ द्या मरणालागुनि, जाळुनि किंवा पुरुनी टाका ।
आप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा ।
अटक कशाची बसला घालुनी, पूर्वज वदले त्यां गमलें ते ।
ऐका खुशाल सादर चित्ते । परंतु सरका विशंक पुढते ।
हल्ला करण्या तर दंभावर, तर बंडावर ।
शूरांनो या त्वरा करा रे, समतेचा ध्वज उंच धरा रे ।

इतरांहून निराळे नाहीत. त्यांनी मात्रावृत्तांत कविता लिहून आणि त्यातही बरेच स्वातंत्र्य घेऊन कवितेचा चेहरा-मोहराच बदलून टाकला. १४ ओळींचे सुनीत हा इंग्रजी धर्तीचा नवा काव्यप्रकार त्यांनीच मराठी काव्यसृष्टीत आणला.

रे. नारायण वामन टिळक हेही याच काळातले कवी होत. समाजाविषयी त्यांनाही केशवसुतांप्रमाणे तळमळ वाटे. टिळक हे सश्रद्ध व प्रेमळ होते. त्यामुळे त्यांना प्रेममूलक अशा ख्रिस्ती धर्माचे आकर्षण वाटून त्यांनी धर्मांतरही केले. ख्रिस्ती धर्मावरले त्यांचे प्रेम भजनसंग्रह, अभंगांजली व ख्रिस्तायन या काव्यांत प्रकट झाले आहे. टिळकांनी फुलांवर व मुलांवर अनेक सरस कविता लिहिल्या आहेत. त्यांच्या संग्रहाचे नाव बालोद्यान. त्यामुळे ते फुलां-मुलांचे कवी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'मूल तें मूल' या कवितेतल्या काही पंक्ती अशा—

तुला म्हणावें फूल जरी - फूल जरी ।
फुलाहुनी तूं अधिक तरी ।
फुल विकसती, सुगंध देती ।
परिस्थिती जों दिसे बरी – असे बरी ।
तुझें हास्य हें नित्य परी ।
तुला म्हणावें रत्न जरी - रत्न जरी ।
रत्नाहुनि तूं अधिक तरी ।
रत्न कठिण तें, अपणांपुरतें
तेज तुझें वितरे इतरीं – हे इतरीं ।
तामस अवघें दूर करी ।।

'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ' असा ओजस्वी आणि आशावादी संदेश देणारे कवी विनायक हे याच काळात होऊन गेले (इ. १८७२ ते १९०९). या कवीचे सर्व काव्य पूर्वजांच्या पराक्रमगीतांनी व स्वाभिमानी गीतांनी काठोकाठ भरले आहे. पद्मा, पद्मिनी, राणी दुर्गावती, संयोगिता, कृष्णा-कुमारी, वीरमती, इ. काव्यांत त्यांनी राजपूत रमणींच्या परा-क्रमगाथा ओजस्वी वाणीने गायिल्या आहेत. त्यांचे देशप्रेम उत्कट आहे. त्यामुळेच ते आधुनिक राष्ट्रीय कवितेचे प्रणेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या वीरमती या काव्यातल्या काही पंक्ती अशा—

पतिरणविन्मुखतेची दुर्वार्ता आयकून वीरमती
रागेजे; त्याविषयीं होय तिची तेधवां विषण्ण मती
मान्य न वीरमतीला अयशाचें मळमळीत सौभाग्य
येते वैधव्य यशें तिज गमते साच उघडिले भाग्य
करिती गजर जयाचा, जर नाथ तिचा रणीं लढत मरता
परि तापद होय तिला वार्ता जीवंत तो फिरे परता
समरास पुरुष म्याला सत्य तिथे स्वयश मळविले धवल
मुख झाले ते काळे दूर बरे; अशुभ मज नको जवळ
चिंतून मनी ऐसे शीघ्र तिने बंद करविली वेस
पाठविला जसवंता दूताकरवी सखेद संदेश

डॉ. काशिनाथ हरी मोडक (माधवानुज) हे केशवसुतांचे समकालीन कवी होते. त्यांचीही वृत्ती चिंतनशील व साध्या विषयात मोठा आशय शोधणारी अशी होती. त्यांनी अनेक बाबतींत केशवसुतांचे अनुकरण केले आहे. त्यांची कविता साधी, सरळ, सुबोध व भावपूर्ण आहे.

त्याच काळातले कवी दत्त (दत्तात्रय कोंडो घाटे इ. स. १८७५–१८९९) यांची रचना थोडीच, पण अत्यंत भावपूर्ण व लालित्यपूर्ण असून, आधुनिक कवितेची बहुतेक लक्षणे त्यांच्या काव्यात आढळतात. त्यांनी प्रेमविषयक, राष्ट्रीय, भाव-गीतात्मक, सृष्टिवर्णनपर अशी विविध प्रकारची कविता रचली आहे. त्यांच्या प्रभात या कवितेतील काही पंक्ती अशा—

प्रभात झाला रवी उदेला ऊठ उशिर झाला;
प्रेमळ भावे सरळ मनाने वंदि जगत्पाला ।
तरुवर उठले, प्रफुल्ल झाले, आनंदे डुलती;
तन्मय होउनि मानसपूजा जणु का हे करिती.
खळखळ वाहत लगबग येती तटिनी गिरिवरुनी,
देवदर्शना जणू निघाल्या भाविक त्या तरुणी.
तरुवसनावृत तुंग पुरातन पर्वत हे दिसती;
वल्कलधारी आद्य ऋषी जणु ध्यान धरुनि बसती.
जिकडे तिकडे मंगलमय हे भूमंडल दिसते;
ऊठ मानवा ! आळवि प्रभुला जाइ शरण त्याते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी एक महान प्रतिभावंत कवी काव्यसृष्टीत अवतरला; तो म्हणजे गोविंदाग्रज किंवा राम गणेश गडकरी (इ. स. १८८५ ते १९१९) हा होय. भाषा प्रभुत्व आणि तरल प्रतिभा यांनी रसिकांना मंत्रमुग्ध बनविणारा गोविंदाग्रजांसारखा कवी विरळाच म्हटला पाहिजे. त्यांनीच आपल्या कवितेविषयी म्हटले आहे, ते असे—

नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी ।
नाचत डोलत करि शिणलेली मने पुन्हा ताजी ।।

राजहंस, मुरली, विरामचिन्हे, गुलाबी कोडे, पहिले चुंबन, इ. त्यांच्या कविता अजरामर ठरल्या आहेत. मोरोपंत, केशव-सुत, बायरन व शेले यांच्या कवित्वाचा त्यांच्यावर बराच प्रभाव होता. त्यांच्या प्रेमविषयक कवितांमध्ये निराशा व औदासीन्यच विशेषत्वाने जाणवते. मात्र त्या कवितांत विलक्षण जिव्हाळा आहे. त्यांचे प्रेम केवळ पार्थिव नसून, ते दिव्य आणि आध्या-त्मिकही आहे. म्हणूनच ते प्रेमाचे शाहीर म्हणून ओळखले जातात. त्यांनीच स्वतः म्हटले आहे—'हृदयशारदे हृदयी राहुनि करि मज प्रेमकवी.'

केशवसुतांच्या धर्तीवर गोविंदाग्रजांनीही फुटकी तपेली, कलगीचे गाणे, प्रेमाचा प्रलयकाळ, मनातली पाल, इ. गूढ-गुंजनात्मक कविता लिहिल्या आहेत. उत्कट भाव हे गोविंदा-ग्रजांचे ठळक वैशिष्ट्य होय. त्यांच्या प्रेमाचा प्रलयकाळ या कवितेतील काही पंक्ती अशा —

पूर लोटला प्रेमाचा । प्रळयकाळ हा विश्वाचा
लोट सारखा उचंबळे । आता कसला ओघ खळे
स्वार्थाचे तट हे फुटले । चहूंकडे पाणी सुटले
फुटकी होडी । टाका उपडी
सोडुनि साऱ्या मोहाला । चला मिळू या ओघाला ।।
अलोट प्रेमाचा पूर । धरणे करि सारी चूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्व बुडाले पाण्यात । या प्रळयाच्या लाटांत
अथांग पाण्याचा अंत । जाणि एक तो भगवंत
पाणी इकडे । पाणी तिकडे
पाणी पाणी चहूंकडे । आता लपता कुणीकडे ।।

रेंदाळकर (इ. स. १८८७ ते १९२०) हे एक ध्येयवादी कवी होते. श्री. वि. पां. दांडेकर त्यांच्याविषयी म्हणतात – सुंदर विश्वाची त्यांना स्वप्ने पडत. परंतु सभोवतालच्या समाजाविषयी त्यांचा काही चांगला ग्रह नव्हता. त्यात त्यांना अनेक उणिवा आढळत. धिक्कार त्यांना असो, या कवितेत त्यांनी दांभिक लोकांवर, धनाढ्यांवर व लांगूलचालन करणाऱ्यांवर सडकून टीका केली आहे. ते म्हणतात–

त्यांचे दर्शनही नको, त्यजुनिया संबंध त्यांचा त्वरे ।
मी जाईन सुखे लतातरुगणी व्यापून गेल्या वनी ।

कवी आणि जग या कवितेत जगाविषयी त्यांचा तिटकारा फारच तीव्र स्वरूपाचा आढळतो.

बालकवी म्हणजे त्र्यंबक बापूजी ठोमरे (१८९०–१९१८) हे खरेखुरे निसर्गाचे कवी होत. निसर्गाच्या विविध रूपांवर त्यांनी काव्यरचना केली असून, तिच्यात सूक्ष्मता, सौंदर्य व माधुर्य भरपूर आहे. अरुण, निर्झर, यामिनी, संध्यारजनी, फुलराणी, तारका, श्रावणमास, पारवा, दर्वांबिंदू अशा अनेक निसर्गपर कविता त्यांनी आत्मीयतेने निर्माण केल्या आहेत. निसर्गाचा जवळून अभ्यास केल्यासारखे, निसर्गाशी तन्मय झाल्यासारखे व निसर्गाच्या सौंदर्यावर भाळल्यासारखे बालकवींचे सृष्टिविषयक काव्य आहे, असे श्री. दांडेकर सांगतात. बालकवी स्वतःही आपले निसर्गाशी एकरूपत्व पुढील पंक्तींत व्यक्त करतात–

सृष्टि हासवी मला फुलांनी तारांनी नभ तसे ।
सदाचे मंगल मज देतसे ।
जिकडे तिकडे दिव्य सांठले रत झाले गायनी ।
पहावा जनी मनी की वनी ।
त्या सहजी क्रीडा प्रेमच माझे खरे ।
ही क्रीडा म्हणजे जीवित माझे बरे ।
या दिव्यासह सखि कवितेशी जिणे वेचिले जरी ।
खरी मज मा.ती मुक्ती तरी ।

'निर्झर' या कवितेतल्या पुढील पंक्ती त्यांच्या लाडिक निसर्गप्रीतीची आणि खेळकर रचनेची साक्ष देतील –

गिरिशिखरे वनमाला ही । दरी दरी घुमवित येई ।
कड्यावरुनि घेऊन उड्या । खेळ लतावलरी फुगड्या ।
घे लोळण खडकावरती । फिर गरगर अंगाभवती ।
जा हळुहळु वळसे घेत । लपत छपत हिरवाळीत ।
पाचूंची हिरवी राने । झुलव गडे झुळुझुळु गाने ।

कवी 'बी' अर्थात नारायण मुरलीधर गुप्ते (इ. स. १८७२ ते १९४७). यांच्या कविता थोडक्यात पुष्कळ अर्थ सांगणाऱ्या, विचारपरिप्लुत व भावपूर्ण आहेत. त्यांचे कमळा हे काव्य कथानककाव्याचा एक अभिजात नमुना आहे. त्यातली व्यक्तिचित्रे बहारीची आहेत. त्यात त्यांनी भारताच्याच नव्हे; तरं विश्वस्वातंत्र्याचा उद्घोष केला आहे –

ते स्वातंत्र्य खरे न फक्त अपुली जे तोडिते बंधने ।
अन्यांच्या पदशृंखलांस बघते निष्कंप ऐशा मने ।।



बी कवी – ना. मु. गुप्ते

चंद्रशेखर म्हणजेच चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे (१८७१ ते १९३७). यांचे काव्यलेखन केशवसुतांच्या काव्यलेखनानंतर दहा वर्षांनी सुरू होऊन, ते १९३६ पर्यंत चालू होते. त्यांनी आजन्म शारीरिक व मानसिक श्रम सोसून आपली भाषा कमावली होती. आपल्या कवितारती या काव्यात ते कवितेलाच उद्देशून म्हणतात –

तुझ्यास्तव उपेक्षिल्या बहुविधा सुविद्याकला ।
तुझ्यास्तव न ती पदे, उपपदे मिळाली मला ।
तुझ्यास्तव न लोभता विभवमार्ग मी टाळले ।
तुझ्यास्तव सखे ! मला स्वजन तेहि कंटाळले ।।

चंद्रशेखरांच्या काव्यकर्तृत्वाला खरा बहर आला आहे, तो त्यांच्या रूपांतरित कथाकाव्यात. रंगराव हर्षे, चिंतोपंत उदास व काय हो चमत्कार ही ती काव्ये होत. काय हो चमत्कार या काव्याविषयी डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काय हो चमत्कारची गोडी तर अवीट आहे. आधुनिक मराठीतले हे एक अभिजात कथाकाव्य आहे. मृत्यूवर मात करणाऱ्या दिव्य प्रेमाची, जानपद जीवनातली ही करुणरम्य कथा तिच्यातील भावपूर्ण आणि हृदयस्पर्शी चित्रणामुळे चिरंजीव झालेली आहे.

चंद्रशेखरांनी गंगालहरीच्या धर्तीवर गोदागौरव नावाचे भावकाव्य लिहिले आहे, त्याच्या प्रारंभीचे दोन श्लोक असे –

तुज हृदयंगम रव विहंगम भाट सकाळी आळविती
तरु तीरींचे तुजवर वल्लीपल्लवचामर चाळविती
तुझ्या प्रवाहीं कुंकुम वाही बालरवी जणुं अरुणकरीं
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे भवताप हरी ।। १ ।।
अवयव भिजले शरीर थिजले उठले रोम तृणांकुरसे

चंद्रशेखर गोऱ्हे

भा. रा. तांबे

राष्ट्रीय कवी गोविंद

सद्गद कंठीं बुदबुद करिते वचन घटोन्मुख नीर जसे
अधर थरारे अश्रुमलिनमुख हो मतिसंकर मवंतरी
जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे भवताप हरी ।।२।।

भा. रा. तांबे हेदेखील याच कालातील कवी होत (इ. स. १८७४ ते १९४१). आधुनिक काव्यातील अग्रेसरत्वाचा मान तांब्यांच्या कडे जातो, असे श्री. वि. पां. दांडेकर म्हणतात. केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज, इ. कवींच्या काव्यांत जो सामाजिक सुधारणांचा पुरस्कार आढळतो, तो तांब्यांच्या काव्यात आढळत नाही. जीवनात अनुभवलेली सुखदुःखेच त्यांनी उत्कटत्वाने आपल्या काव्यात वर्णिली आहेत. इतरांच्या अंतःकरणातील भाव जाणून घेण्याचे सामर्थ्यही त्यांच्या ठिकाणी होते. त्यांनी आपल्या नाटचगीतांतून इतरांच्याही भावना बोलक्या केल्या आहेत. विधवेचे स्वप्न, बघुनि तया मज होत कसेसें, हिंदू विधवेचे मन, नदीतीरी उभी ती, इ. त्यांच्या नाटचगीतांतून अनेक दुर्दैवी जीवांच्या प्रेमभावनेची विविध चित्रे अत्यंत सरलतेने रेखाटली गेली आहेत.

तांब्यांच्या कवितेची गोडी त्यांच्या प्रेमगीतांत आहे. प्रेमाच्या विविध छटा त्यांनी हृदयंगम रीतीने आणि हळुवारपणे व्यक्त केल्या आहेत. सुखी संसाराची आणि तृप्त प्रेमाची चित्रे त्यांच्या प्रेमगीतांत जागोजागी आढळतील. आपल्या पत्नीच्या स्मित हास्याचे माहात्म्य वर्णिताना ते सहजपणे लिहून जातात –

एकवार बघ हसून । उमळेल सिंहासन ।।
तळमळतिल मनि सुरगण । हास्यास्तव खास ते ।।

तांब्यांच्या प्रेमगीतांत मुग्ध शृंगाराची आणि क्वचित उत्तान शृंगाराचीही बहारदार वर्णने येतात. या प्रेमगीतांकरिता त्यांनी योजलेली भाषा नादमधुर व भावमधुर अशीच आहे. पुढील कविता या गोष्टीचे उदाहरण म्हणून सांगता येईल –

ते दूध तुझ्या त्या घटांतले का अधिक गोड लागे न कळे ।।ध्रु।।
साईहुनि मउमउ बोटें ती । झुरमुरु झुरमुरु धार काढिती,
रुणुझुणु कंकण करिती गाती ।
का गान मनांतिल त्यांत मिळे ? ।। १ ।।
अंधुक शामल वेळ, टेकडी । झरा, शेत, तरु, मधे झोपडी,
त्यांची देवी धारहि काढी ।
का स्वप्नभूमि बिंबुनि मिसळे ? ।। २ ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या दृश्याचा मोह अनावर । प्राय ओढुनी आणी सत्वर,
जाड येथची पसरे मजवर । का द्रूष गोडही त्याचमुळे ।। ३ ।।

अदम्य आशावाद हे तांब्यांचे आणखी एक वैशिष्टच आहे. त्यांचे सबंध जीवनच आशावादाने उजळून निघाले आहे. घन तमीं शुक्र बघ राज्य करी, मरणांत खरोखर जग जगतें या दोनच कवितांवरून त्यांच्या आशावादाची साक्ष पटू शकेल.

आत्मपर व प्रणयप्रधान अशा काव्यनिर्मितीच्या काळात काही राष्ट्रीय कविताही उत्पन्न झाली. अशा राष्ट्रीय कवींमध्ये कवी गोविंद, तिवारी, माधव, साने गुरुजी, स्वा. सावरकर यांची गणना होते. पोवाडे व पदे अशा प्रकारची ही कविता आहे.

तत्कालीन गणेशोत्सवाच्या मेळयांत आणि शिवजयंतीच्या उत्सवात म्हणण्यासाठी या राष्ट्रीय कवितेची निर्मिती होत असे. अशा राष्ट्रीय काव्यरचनेत कवी गोविंद यांनी बरेच यश मिळविले. शब्दचमत्कृती व नादमाधुर्य त्यांच्या काव्यात भरपूर आहे. स्वा. सावरकरांच्या मित्र-मेळयात सामील झाल्यावर त्यांच्या कवितेला क्रांतीची धार चढली. रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले या स्फूर्तिदायक काव्यामुळे त्या काळात त्यांचे नाव महाराष्ट्रात दुमदुमले. सुंदर मी होणार हे त्यांचे मृत्युविषयक काव्यही आशावादानें रसरसलेले असे आहे. त्यातल्या काही पंक्ती अशा –

हृद्रोगाच्या ज्वाला विझुनी सुख माझे निवणार ।
माझा मृत्यू माझा सारा अश्रुपूर गिळणार ।।
कंटक-पंजर तनु-पीडेचा पिचूनिया फुटणार ।
बंदिवान मम आत्मा चातक सुखेनैव सुटणार ।।
जुनी इंद्रियें, जुना पसारा, सर्व सर्व झडणार ।
नव्या तनूचे नव्या शक्तिचे पंख मला फुटणार ।।
त्या पंखांनी कर्तृत्वाच्या व्योमी मी घुसणार ।
देशहिताच्या पवनसागरी पोहाया सजणार ।।
प्रतिभासंपन्न नवबुद्धीची, चंचु मला येणार ।
चंचुरूप मुरलीने प्रभुचे, काव्यगान गाणार ।।
मम हृदयांतरि ज्ञानफुलांचा फुलबगिचा फुलणार ।
फुलांत झुलुनी आत्मदेव मम नवानंद लुटणार ।।
नवें ओज मज, नवें तेज मज, सर्व नवे मिळणार ।
जीर्ण जुन्यास्तव कोण अवास्तव सुज्ञ झुरत बसणार ।।

दुर्गाप्रसाद तिवारी यांना मराठ्यांच्या स्फूर्तिप्रद इतिहासाचे आकर्षण वाटले .आणि तो इतिहास त्यांनी मराठ्यांची संग्रामगीते, झाशीची संग्रामदेवता, शिवप्रताप, इ. काव्यांतून समर्थपणे उभा केला.

श्री. तिवारी यांची सर्वांत गाजलेली काव्यकृती म्हणजे 'मराठ्यांची संग्रामगीते.' शिवाजीचे पारिपत्य करण्यासाठी विजापुराहून निघालेल्या सरदार अफजलखानाच्या स्वारीची वार्ता अगोदर रामदासस्वामींच्या शिष्यांना कळते व त्यांपकी एक शिष्य शिवाजीला ती वार्ता कळवण्यासाठी रानावनातून धावतो आहे. या घटनेचे वर्णन करताना श्री. तिवारी लिहितात–

जोमात निघाला खान सरदार विजापुरवाला
शिवनेरीच्या शिर्वासहा हो सावध झुंजायाला
भिडव तो मराठी भाला नाचत्या चंद्रकोरीला
या वार्ता पोचविणारे
भगव्या वस्त्रे फिरणारे
शिष्य जे मठाचे प्यारे
ते घोषत होते मंत्र 'जय जय रघुवीर समर्थ !'

त्यांची मातृभाषा हिंदी असूनही त्यांनी मराठीत विपुल व ओजस्वी काव्यरचना केली आहे.

राष्ट्रीय कवितेच्या क्षेत्रात सोलापूरचे ह. गु. सलगरकर ऊर्फ कवी कुंजविहारी यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. त्यांचा गीतगुंजारव नामक एक काव्यसंग्रह प्रसिद्ध असून, त्यातील मुळशीचा पाळणा, भेटेन नऊ महिन्यांनी, मराठा गडी यशाचा धनी, इ. कविता गाजलेल्या आहेत. त्यांची भाषा ओजस्वी व आवेशयुक्त आहे. त्यांच्या 'मराठा गडी यशाचा धनी' या कवितेतील काही काव्यपंक्ती अशा –

जिजामाउली म्हणे, "शिवाजी, कोंडाण्यावरते
कुणाचे निशाण फडफडते
यश अस्मानी दुष्मानाचे डुलते डौलाने दरारा तुझा मनी नेणें
सर करुनी गड कोंडाणा देशील कधी मज बाळा
मी दिला मुलाचा मान तानाजी मालुसऱ्याला
यशवंत वीर नरसिंह ही सांग कामगिरी त्याला"
कोंडाण्याचे सुतकी वैभव बघवेना नयनी
मराठा गडी यशाचा धनी ।।

अज्ञातवासी (दि. गं. केळकर) यांची कविता मुख्यत: राष्ट्रीय वृत्तीची आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील काही उज्ज्वल प्रसंगांची चित्रे त्यांच्या प्रतिभेने अत्यंत सरसतेने रंगवली आहेत. त्यांच्या काव्यात वात्सल्यभावही आढळतो.

राष्ट्रीय व ऐतिहासिक काव्याच्या क्षेत्रात माधव केशव काटदरे यांचे स्थान बरेच वरचे आहे. त्यांची सर्वच रचना सरस व सौष्ठवसंपन्न वाटते. गोकलखां (बापू गोखले) या त्यांच्या काव्यातील काही पंक्ती अशा –

हा कोण इथे पडलेला ? गोकलखां लढनेवाला !
स्वातंत्र्यसूर्य अस्ताला पावता महाराष्ट्राचा,
अर्घ्य त्यास अर्पुनि ज्याने–आपुल्या उष्ण रुधिराचा
चढविला रक्तिमा रम्य–तद्‌बिंबावरती साचा
शत्रूंवर पडला तुटून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शौर्याची शर्थ करून
समरात वेचले प्राण
विदित तो नसे कोणाला–गोकलखां लढनेवाला

तारापूरचा संग्राम, सवाई माधवरावांचा मृत्यू, गोकलखां लढनेवाला, इ. ओजस्वी व स्फूर्तिदायक कविता कवी माधवांनी रचिल्या.

राष्ट्रीय कवितेपुरतेच नव्हे, तर एकंदर काव्यसृष्टीतच स्वा. सावरकर यांचे स्थान बरेच उच्च, श्रेष्ठ आणि भव्य आहे. सावरकरांना बालपणीच काव्यस्फूर्ती झाली आणि पुढे ती राष्ट्राभिमानाने प्रज्वलित झाली. संस्कृत, इंग्रजी आणि मराठी भाषांच्या अध्ययनाने त्यांच्या काव्यकलेला वैभव चढले. त्यांच्याविषयी डॉ. अ. ना. देशपांडे लिहितात –

सावरकरांच्या व्यक्तित्वात असामान्य कोटीतले कवित्व आणि अनन्यसाधारण स्वरूपाची देशभक्ती यांचा अत्यंत मनोज्ञ संगम घडून आलेला आहे. त्यांच्या अंगच्या मूळच्याच कल्पकतापूर्ण कवित्वामुळे त्यांच्या स्वातंत्र्याकांक्षी देशभक्तीच्या उत्कट भावनेच्या आविष्कारास सौंदर्य प्राप्त झालेले आहे आणि चाफेकरांच्या हौतात्म्यापासून नैमित्तिक स्फूर्ती पावलेल्या आणि दारुण बंदिवासाच्या भयंकर दिव्यातून तावून सुलाखून निघालेल्या स्वातंत्र्यभक्तीमुळे आणि राष्ट्रनिष्ठेमुळे त्यांचे कवित्व सामर्थ्यसंप झालेले आहे.

गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी)

दु. आ. तिवारी

माधव केशव काटदरे

सावरकरांचे सारे जीवितच काव्यमय आहे. त्यांचे जीवन म्हणजेच वीर, करुण, अद्भुतादी रसांचा उदात्त साक्षात्कार घडविणारे एक ओजस्वी महाकाव्य आहे. त्यांची जवळजवळ प्रत्येक कविता अत्यंत उत्कट आणि अत्यंत नाट्यमय जीवनानुभूतीतून उगम पावलेली आहे. सागरास या कवितेत ते इंग्लंडमधील ब्रायटनच्या समुद्रतीरावरून म्हणतात –

ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला।

वडील बंधू गणेशपंत यांना जन्मठेपेची शिक्षा झाल्याचे समजताच ते आपल्या येसूवहिनींचे सांत्वन करताना म्हणतात –

धन्य धन्य अपुला वंश । सुनिश्चये ईश्वरी अंश ।
अमर होय ती वंशलता । निर्वंश जिचा देवाकरिता ।

अंदमानच्या कारागारातील एका खोलीतून रात्रीच्या वेळी चंद्रकोर दिसताच ते 'चांदोबा, चांदोबा भागलास का' म्हणून पूर्वायुष्याच्या मधुर स्मृतींना हृदयंगम उजळा देतात.

त्यांच्या पुष्कळ कवितांतून राष्ट्रभक्तीच्या अभिवृद्धीला विशेष प्राधान्य मिळाले आहे. ते म्हणतात –

हे मातृभूमि । तुजला मन वाहियेलें ।
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें ।
तूंतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला ।
लेखांप्रती विषय तूंचि अनन्य झाला ।।

पण असे असले तरीही ज्यात सावरकरांची प्रचारकाची व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राष्ट्रभक्ताची भूमिका सर्वस्वी बाजूला राहून त्यांच्यांतला कवीच तेवढा जागृत राहिला आहे, अशा काही कविता त्यांनी लिहिल्या आहेत. तारकांस पाहून व जगन्नाथाचा रथोत्सव या कविता वरील विधानाची साक्ष देतील. तारकांस पाहून या कवितेत त्यांनी आपल्या चित्तवेधक कल्पना मुक्तहस्ताने उधळल्या आहेत. उदाहरणार्थ पुढील काव्यपंक्ती पाहा –

सुवर्णहारा गौरी श्रीहर लीलारत झाले ।
थाप पडे तो द्वारी श्रीहरि भेटाया आले ।
नग्ना लगबग गिरिजा धावे सावरु शालूला ।
हिसका बसुनी हार गळ्यातिल तटकन तो तुटला ।
त्या हारातिल मोती सैरावैरा ओघळले ।
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले ।।

जगन्नाथाचा रथोत्सव या कवितेत सावरकरांच्या परिणत प्रज्ञेला आणि वैनायक प्रतिभेला विश्वात्मकतेचा भव्य-दिव्य साक्षात्कार झाला आहे. सावरकरांनी अनेक भावगीते लिहिली आहेत; पण सावरकरांची प्रतिभा ही महाकाव्यनिर्मितीला जास्त अनुकूल आहे. कमला आणि गोमांतक ही दोन काव्ये त्यांच्या महाकाव्यानुकूल शक्तीचे उदात्त दर्शन घडवितात. अंदमानच्या अंधारकोठडीत जन्माला आलेली कमला ही कविता तर आधुनिक मराठी काव्याच्या नभांगणात अक्षय्य तेजाने आणि सौंदर्याने तळपणारी तारकाच आहे. तिच्यातील उद्यानवर्णनाच्या काही पंक्ती अशा –

दलें सुलोल हीं सारीं दाटता मिसळोनि, ते
अव्यवस्थितशी शोभा बघुनि मनि भासते ।
कालिंदीपुलिनामाजी जयांही उपभोगिला
यथेच्छ वनमालीसी, पूर्त, तृप्त, सुशीतला,
भुक्तकामा, रतिश्रान्ता, आत्मा एक जयां हरी
सखी म्हणूनी या–जाता वल्लभ त्याच का
अशा शून्यमना मार्गी उभ्या ह्या व्रजगोपिका
कंठांत एकमेकींच्या घालुनी करपल्लवा
जाताही हरि तैशाचि कुड्मलांजलि, अन्य वा
लोल कोमल पंख्यांसी कुणी पालविता करीं
गाला गालासि लावोनी मागली पुढती वरीं
हेमगौरमुखी कोणी सनाल आपुल्या सखी–
स्कंधी सखोचिया ठेवी पाठिसी लगटूनि की ।।
शेवंती ही; हरी गेला चढाई करुनी तदा
कुसुमाकर ही कल्पी ढाल की कुसुमायुधा ।

कमला हा एका अपूर्ण राहिलेल्या संकल्पित महाकाव्याचा केवळ एक सर्ग असूनही तो स्वयंपूर्ण आणि रसोत्कट आहे. सावरकरांची काव्यकला या काव्यात परमोच्च बिंदू गाठते.

साने गुरुजी अर्थात पां. स. साने (इ. स. १८९९–१९५०) यांची एक त्यागमर्ती राष्ट्रसेवक या स्वरूपात सर्वांना ओळख आहे. त्यांचे अंतःकरण अत्यंत संवेदनाशील होते; किंबहुना ते मातृहृदय होते. ईश्वरभक्तिपर आणि देशभक्तिपर अशी उभयविध कविता त्यांनी लिहिली. अंतःकरणाची आर्तता, उत्कट भक्ती आणि अभिजात शालीनता त्यांच्या देशभक्तिपर कवितांतून स्पष्टपणे अभिव्यक्त झाली आहे. त्याचबरोबर मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्राण पणाला लावून झुंझण्याची जिद्दही अभिव्यक्त झाली आहे. याविषयीच्या त्यांच्या काही पंक्ती अशा –

बहु भाग्याने बहु पुण्याने झालो तव संतान ।
तव सेवा मम हातुन होता हरपो माझा प्राण ।। १ ।।
आम्ही मांडू निर्भय ठाण । देऊं हो प्राण ।।
स्वातंत्र्यसुधेचे निजजननीला घडवू मंगल पान ।। २ ।।
स्वार्थाची करुनी होळी । छातीवर झेलू गोळी ।
करु मृत्यूशी खेळीमेळी ।
मातृभूमिच्यासाठी मोदे करु सारे बलिदान ।। ३ ।।

सत्याग्रही या नावाचे त्यांचे एक खंडकाव्यही आहे. त्यांची बरीचशी कविता तुरुंगामध्ये जन्माला आलेली आहे.

ज्यांच्या काव्यावर केशवसुतांच्या काव्याचा विशेष प्रभाव पडलेला आहे, असे आणखी दोन कवी म्हणजे श्री. न. शं. रहाळकर व श्री. नागेश नवरे हे होत. दोघांनीही प्रेमविषयक, आत्मपर, सृष्टिविषयक, सामाजिक व स्फुट अशी रचना केली आहे. कवी राधारमण (कृ. पां. लिमये इ. स. १८७७–१९२२) यांनी स्फुट व खंडकाव्यात्मक विपुल रचना केली आहे. त्यांची काही दीर्घ काव्ये राष्ट्रीय बाण्याची व ओजस्वी आहेत. लेंभे यांनीही स्फुट व खंडकाव्यात्मक रचना केली आहे. त्यांची भाषा प्रौढ, संस्कृतप्रचुर व मधुर आहे. त्यांच्या शोकावर्त या विलापिकेत जिव्हाळा व करुणरस आढळतो.

आनंदराव टेकाडे यांच्या काव्यात मुख्यतः राधाकृष्णांची शृंगारिक गीते व देशभक्तिपर वीरश्रीयुक्त गीते बरीच आहेत. राधाकृष्णांच्या गीतांत विविध प्रसंगांचे आकर्षक वर्णन असल्यामुळे ती हृदयंगम झाली आहेत. त्यांच्या देशभक्तिपर काव्यात भारताचे प्राचीन वैभव व थोर संस्कृती यांचे वर्णन आहे. त्याचप्रमाणे त्यांनी सद्यःपरिस्थितीवर पोवाडे रचलेले आहेत. आनंद कंद ऐसा । हा हिंद देश माझा । हे त्यांचे गीत बरेच गाजले. त्यांचे बहुतेक काव्य गेय असून, त्यात आवेश आहे.

त्याच काळातले आणखी एक उल्लेखनीय कवी म्हणजे गोविंदराव हिंगणेकर. पावनखिंड व दरूखनचा वीर ही त्यांची दोन खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत. त्यांत काल्पनिक भाग अगदी थोडा आहे. त्यांनी बरीच विनोदी कविताही रचली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रविकिरण मंडळ – केशवसुतांनी मराठी कवितेला दिलेले वळण गोविंदाग्रजांपर्यंत चालू राहिले. इ. स. १९२० पर्यंत बालकवी, रे. टिळक, रेंदाळकर व जुन्या परंपरेतील बरेच कवी दिवंगत झाले. १९२०पासून मराठीत नव्या युगाचा प्रारंभ झाला, असे समजतात. त्यानंतर थोड्याच कालात रविकिरण मंडळ नावाचे एक मंडळ यदृच्छया निर्माण झाले. रविवारी एकत्र येऊन काव्यचर्चा करणाऱ्या मंडळींचे हे मंडळ होते. त्याचे सात सभासद होते, म्हणून त्याला त्यांनी रविकिरण मंडळ असे नाव दिले. केशवसुतांनी आत्मपर, सृष्टिवर्णनपर, ऐहिक, त्रुटित अशा सामाजिक काव्याची जी परंपरा सुरू केली होती, तीच रविकिरण मंडळाने नेटाने पुढे चालविली. काव्यात नव्या विचारांपेक्षा नव्या तऱ्हा रविकिरण मंडळाने सुरू केल्या व काव्य अधिक कलापूर्ण आणि आकर्षक बनवले. त्याच्या सभासदांची थोडक्यात माहिती अशी –

माधव ज्युलियन अर्थात डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन (इ. स. १८९४ ते १९३९). हे रविकिरण मंडळातले एक महत्त्वाचे कवी होत. त्यांच्या ठिकाणी विद्वत्त्व व कवित्व यांचा संगम आढळतो. ते झुंझार वृत्तीचे कवी होते. कणखरपणाबरोबरच वात्सल्याच्या कोमल भावनेचेही हृद्य दर्शन त्यांच्या कवितांतून घडते. त्यांनी आपली सर्व कविता माधव ज्युलियन या नावाने लिहिली. त्याबद्दल आणि त्यांच्या काही प्रेमविषयक कवितांबद्दल तत्कालीन समाजात त्यांच्यावर टीकाही झाली. स्फुटकाव्य आणि खंडकाव्य अशी त्यांची दुहेरी काव्यरचना आहे. त्यांची गज्जलांजली ही मराठीतली एक अभिनव रचना आहे. त्या गज्जलांमधून कवीने आपले यौवनातील प्रेम व्यक्त केले आहे. प्रणयपंढरीचा वारकरी ही पदवी निंदकांनी त्यांना बहाल केली, ती गज्जलांजलीतल्या गज्जलांमुळेच होय. आधुनिक

कवी दत्त

साने गुरुजी

स्वा. विनायकराव सावरकर

पद्धतीच्या प्रणयाचे उदात्त, रमणीय आणि प्रौढ असे गंभीर चित्रण त्यांनी विरहतरंग या आपल्या भावकाव्यात केले आहे. कथानकरचना, स्वभावपरिपोष, शब्दचित्रे, अलंकार या सर्वच दृष्टींनी हे काव्य सरस व मनोज्ञ झाले आहे. त्यातील काही काव्यपंक्ती अशा –

> तू माझी ध्रुवतारका, जरि न मी दिव्यर्षि कोणी ऋतु।
> नाही बिल्हण मी, जणू नृपसुता काश्मीरदेशीय तूं।
> झालों मी अनुरक्त तूजवर हे केले परी साहस।
> लक्षी प्रीति न भेद; चुंबकमणी तूं, वस्तू मी आयस।
> घाली घार नभात, उंच घिरट्या, भूमीवरी ती बघे।
> खाली मी, वर तूं, परी तुजकडे मत्प्रीति ही धाव घे।
> कोठे ज्योति, कुठे पतंग, परि तो ज्योतीवरी घे उडी।
> सायुज्यांतच एक मीलन दिसे, जावो जळूनी कुडी ।।

सुधारक या काव्यात त्यांनी सर्वस्वी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारला असून, जगातील ढोंग, दंभ व शिष्टपणा या दुर्गुणांवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रखर टीका केली आहे. नकुलालंकार हे खंडकाव्यही असेच उपहासात्मक टीकेने भरलेले आहे.

गिरीश अर्थात श्री. शंकर केशव कानेटकर हे रविकिरण मंडळातले दुसरे कवी होत. स्फुट व खंडकाव्यात्मक अशी दुहेरी काव्यरचना त्यांनी केली आहे. त्यांचे सारे काव्य नादमधुर, गेय, तालयुक्त व सफाईदार आहे. कल्पनेची भव्यता किंवा

माधव ज्युलियन

राजकवी यशवंत

कवी गिरीश

भावनांची अत्युत्कटता या गोष्टी त्यांच्या काव्यात नसल्या तरी, कलेला अत्यावश्यक असा संयम हा गुण त्यात पदोपदी आदळतो, असे वि. पां. दांडेकर म्हणतात. अभागी कमल, कला व आंबराई अशी त्यांची तीन खंडकाव्ये आहेत. पहिल्यात एका विधवेची करुण कहाणी निवेदिलेली आहे. दुसऱ्यात एका असफल प्रीतीची शोकपर्यवसायी कथा आहे. तिसरे ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर आहे. त्यात एका शेतकऱ्याची कथा सांगितलेली आहे. त्यांच्या आंबराई या खंडकाव्याचा प्रारंभ असा –

वर्षर्तूच्या सरी थाम्बुनी गढूळलेले पाणी
खळखळ वाहत होते आता शुभ्र स्फटिकावाणी
त्या पाण्याच्या तुषारमाळा घालुनि वेली काही
आनन्दाने पुलकित झाल्या रानी ठायी ठायी
शिवारातली हिरवी धाटे डोलुनि वाऱ्यासङ्गे
शरदागमनी सळसळ करिती आपुल्या अङ्गविसङ्गे
हिरवळीचे बान्ध थाटले शेताच्या बाजूंनी
रानफुलांचे तुरे तयांतुन बघती डोकावुनी
ओढ्याकाठी कुठे उतरणीवरती अम्बेओळ
पाय पसरुनी अडवित होती जलवन्तीचा घोळ
नवीन थण्डी नुकती कोठे फिरू लागली रानी
शरदृतूचे ओठ हालले मन्द जळी लहरींनी

मराठी साहित्यात सामाजिक खंडकाव्याचा नवा पायंडा गिरीशांनी पाडला व त्या प्रकाराला प्रतिष्ठा व लोकप्रियता मिळवून दिली.

यशवंत अर्थात श्री. यशवंत दिनकर पेंढरकर हे सर्वांत अधिक लोकप्रियता लाभलेले रविकिरण मंडळातले एक प्रमुख कवी होत. यशवंतांनी शेकडो भावगीते लिहिली आहेत. जयमंगला, बंदीशाळा व काव्यकिरीट अशी तीन खंडकाव्येही त्यांनी लिहिली आहेत.

यशवंतांची प्रतिभा कमालीची आत्मपर आहे. आणि त्यांची बहुतांश स्फुट कविता या आत्मपरतेतून उत्स्फूर्त झालेली आहे. शिवाय ही आत्मपरता एक प्रकारच्या कडवट निराशेने ग्रासून टाकलेली आहे. त्यांच्या यशोधनाचे परीक्षण करताना श्री. मराठे लिहितात – काव्यरचनेला प्रतिकूल वातावरण, दुर्जनांचा जाच, दैन्याची आच या त्रिविध तापांमुळे असो अथवा स्वाभाविक प्रवृत्तीमुळे असो, यशवंतांची कविता नैराश्यवादाकडेच झुकते. पुढील उदाहरणे वरील विधानाची साक्ष देतील–

राबलो वृथा संसारसौख्यविभ्रमीं ।
ने प्रभो आपुल्या धामीं, जाहलो सर्वथा श्रमी ।
धृति, मति, श्रुति पांगल्या,
ह्या नसा क्षीण जाहल्या ।
एकेक तुटू लागल्या, न त्यांची हमी ।

जयमंगला हे यशवंतांचे पहिले खंडकाव्य. ते बिल्हणाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चौरपंचाशिका या काव्याच्या आधारे लिहिलेले आहे. त्यात एक राजकन्या व तिचा कवी शिक्षक यांच्या सफल प्रीतीची कथा रंगविलेली आहे. बंदिशाळा या दुसऱ्या खंडकाव्यात बंदिशाळेत येऊन पडलेल्या संजीव नामक मुलाची आणि त्याच्या दुर्दैवी मातेची करुण कथा चित्रित केलेली आहे. काव्यकिरीट हे खंडकाव्य बडोदानरेश प्रतापसिंह यांच्या राज्यारोहणप्रसंगावर आधारून लिहिलेले आहे.

अलिकडेच त्यांनी छत्रपती शिवराय नामक एका महाकाव्याची निर्मिती केली असून, ते महाकाव्य छत्रपती शिवाजीमहाराजांच्या जीवनप्रसंगावर रचलेले आहे.

प्रस्तुत महाकाव्यातील शिवाजीमहाराज राज्याभिषेकासाठी सभामंडपाकडे निघाले त्या प्रसंगातील काही पंक्ती अशा –

निघाले महाराज ! आले महाराज ! झाला पुकारा सभामंडपी
उभे राहिले लोक ताजीम द्याया विदेशी मुतालीक, योद्धे, तपी
कुणी नेत्र विस्फारिती उंच टाचा करोनी, पहाया नृपाचे मुख
पहातां पहाता तयां प्राप्त झाले अपूर्वाईचे धन्यतेचे सुख
सुखांचे उरी भावकल्लोळ दाटून ओलावल्या लोचनांच्या कडा
धनी छत्रसिंहासनाचा मराठा अहो होतसे आज हा एव्हढा
पदे धीर-गंभीर टाकीत आले महाराज सिंहासनासन्मुख
उपाध्ये म्हणू लागले वेदमंत्रा, करू लागले गान वैतालिक
सभोवार सिंहासनाच्या उभे स्तंभ जे अष्टकोनांवरी शोभले
अमात्यादि ते अष्टमंत्री नियुक्तीपरी तेथ येऊनिया ठाकले
'करावे महाराज आरोहणाते' अशी सूचना होइ मंत्रांतुनी
'पदस्पर्श कैंचा करू राज्यलक्ष्मीस' राजांचिया तोच येई मनी
हरिश्चंद्र पुण्यप्रतापी, विदेही, शिबी आदि राजे पुराणान्तरी
होऊन गेले तयांची अकस्मात् उदेली स्मृती ह्यांचिया अन्तरी
'गुणश्रेष्ठता त्यांचिया सारखी ती हवी, त्याग–चारित्र्यसंपन्नता
स्वसौख्या विसर्जून ठेवीत आले सदा जे प्रजारंजनी दक्षता
उरी राज्यकर्त्यांचिया अंश काही असे त्यांचिया थोरवीचा जरी
तयानेच उद्युक्त व्हावे चढायास सिंहासनाची तरी पायरी'
चकाकून चित्ती तरंगावली ही, सभोवार राजे जरा पाहती
स्थिती जाणुनी ही तयांच्या मनीची, पुन्हा मंत्र आचार्य उच्चारिती
"महाराज व्हावे पुढे; आपुल्या हे पहा स्वागता सज्ज सिंहासन
जणू बाहु पैसावुनी वांछिते ते तुम्हा द्यावया गाढ आलिंगन"
ऐशीच भाषा जनांच्याहि नेत्री दिसोनी नृपाळास आली तिथे–
"सन्मान निःशंक सिंहासनाचा करावा नरश्रेष्ठ पृथ्वीपते !"
प्रवर्तोन राजे, पदस्पर्श टाळून, आरूढ तो होति सिंहासनी
विद्युल्लतांनी कडाडून टाळी मुदे वाजवीली नभःप्रांगणी

रविकिरण मंडळातील इतर सदस्यांविषयी डॉ. अ. ना. देशपांडे लिहितात, ते असे –

रविकिरण मंडळातील जणू वसिष्ठ-अरुंधती असलेले प्रा. श्री. बा. रानडे व त्यांच्या पत्नी सौ. मनोरमाबाई रानडे यांच्या कवितांचा 'श्री- मनोरमा' नावाचा संग्रह प्रसिद्ध आहे. दोघांचीही कविता एकंदरीने सामान्य प्रतीची आहे. कॉलऱ्याने आजारी असतानां आपल्या मनात कोणकोणते विचारतरंग आले त्यांचे वर्णन करणारे असे श्रीधरपंतानी लिहिलेले, काळाच्या दाढेतून हे दीर्घ काव्य मात्र मनोरम आहे. मनोरमाबाईंची सगळीच कविता स्फुट स्वरूपाची आहे. त्यांपैकी बऱ्याच कविता

सौ. मनोरमाबाई रानडे

आत्मपर असून, त्यांचा मुख्य विषय पतिप्रेम हा आहे. दोघांच्यांही कवितालेखनात रचनाविषयक साक्षेपाचा अभाव आहे.

श्री. वि. द. घाटे, श्री. द. ल. गोखले आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे रविकिरणमंडळातले उरलेले तीन कवी होत. मधुमाधव नामक संग्रहात पटवर्धनांच्या बरोबर घाटयांच्याही कविता आहेत. घाटयांचे काव्यलेखन अत्यल्प असून, त्यांचे 'नवलाख दिवे हे तुझ्या घरी' हे मातृभूमीविषयी पूज्यभाव व्यक्त करणारे गीत रसिकांस विशेष परिचित आहे. द. ल. गोखले यांची कविता अगदीच तुटपुंजी आहे. तीच गोष्ट माडखोलकरांच्या बाबतीतही खरी आहे.

याच काळातील इतर कविमंडळे व त्यांचे कार्य याविषयी श्री. वि. पां. दांडेकर यांनी संक्षेपात सांगितले आहे, ते असे –

रविकिरण मंडळाच्या यशामुळे अनुकरणाच्या भावनेने बरीच कविमंडळे इ. स. १९२० ते १९३५ पर्यंत निघून, जिकडे तिकडे काव्यालाप ऐकू येऊ लागले. पुण्याचे भ्रमरमंडळ, दादरचे कविमित्रमंडळ, नाशिकचे वाङ्मयविहारमंडळ, साताऱ्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अजिंक्यतारामंडळ, औंधचे साहित्यसरोजमंडळ, कोल्हापूरचे साहित्यस्नेहमंडळ व भारतकविमंडळ, सोलापूरचे कविरायमंडळ, बेळगावचा सारस्वत सेवासंघ, इत्यादींनी या काळात आपल्या सदस्यांच्या कविता एकत्र करून त्यांचे बरेच संग्रह प्रसिद्ध केले. 'विदर्भ-वीणा' या संग्रहात विदर्भातील छोटचा-मोठचा कवींच्या कविता आल्या, तर मालविका या संग्रहात माळव्यातील कवींच्या कविता आल्या; बडोद्यातील कवींनी 'करभार' तयार केला; तर नागपूरस्थ कवींच्या कविता 'ओहळ' नावाच्या संग्रहात प्रसिद्ध झाल्या. मोंगलाईतील कवींच्या कविता महाजनकृत कवि-संमेलन यात आल्या, तर गोदाकाठच्या कवींनी 'माधवी' व 'गोदाकाठचा गुंजारव' प्रसिद्ध केला. औंध संस्थानच्या कवींनी 'भावलेखा' तयार केली; तर कऱ्हाड-क्षेत्रस्थ कवींचा 'फुलोरा' तयार झाला. 'नऱ्हाळी' (१९५९) हा विदर्भातील कवींचा अलीकडचा प्रातिनिधिक संग्रह असून, तो प्रा. भाऊ मांडवकर यांनी संपादित केला आहे.

श्री. ग. ल. ठोकळ

याच कालखंडात गोमंतकीय कवी श्री. दामोदर अच्युत कारे यांचा नंदादीप हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. या नंदादीपाचे तेज सौम्य व सात्त्विक आहे. अकृत्रिम निसर्गभक्तीमुळे त्यात जशी रुचिरता आली आहे, तसेच अध्यात्माच्या अनुषंगाने त्याला एक प्रकारचे पावित्र्यही लाभले आहे. 'निःस्तब्ध रहा क्षणिं या प्रणया' हे त्यांचे भावगीत विशेष उल्लेखनीय आहे. त्यातील काही ओळी अशा --

निःस्तब्ध रहा क्षणिं या, प्रणया ।
मानांत बोलु दे निज हृदयां ॥
पुसट दूर गिरि क्षितिजी दिसती ।
तरुतळिं छाया अचल पहुडती ॥
खुले सृष्टिची अस्फुट नवती । चांदण्यांत एकांतामधिं या ॥

श्री. कारे यांनी काव्यरचना थांबवली, त्याला बरीच वर्षे झाली. त्यांच्या पिढीतले श्री. शंकर रामाणी अजूनही कविता लिहीत आहेत.

श्री. बोवडे (इ. स. १८९९–१९३४) या कवीची काव्य-निर्मिती रविकिरणमंडळाच्या आधीच्या काळातच झालेली आहे. त्यांची प्रतिभा मुख्यत्वे संस्कृत काव्य आणि शाहिरी वाङ्मय यांच्यावर पोसलेली आहे. अनेक रसांचा उत्कट आस्वाद त्यांनी आपल्या कवितेच्या द्वारे रसिकांना दिला आहे. त्यांच्या काही काव्यपंक्ती अशा--

आनंदी आनंद साजणी ! आनंदी आनंद
दिशादिशातुनि शतधारांनी सांद्र गळत मकरंद
नंदनवन चौफेर साजणी ! नंदनवन चौफेर
फुलाफुलांच्या पायघड्यांवर भृंगगणांचा घेर

श्री. वामन नारायण देशपांडे यांचे आराधना व अनामिका हे दोन संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. केशवसुतांनंतर वृत्तरचनेत नवनवे प्रयोग करून पाहण्याची प्रवृत्ती त्यांच्या मध्येच आढळून येते. उदात्त कल्पकता आणि उदात्त वैचारिकता हे त्यांच्या काव्याचे ठळक गुण होत. त्यांनी गोरकू नावाचे एक खंडकाव्यही लिहिले आहे.

श्री. वा. भा. पाठक यांचे काव्य आत्मपर असूनही विचार-प्रधान आहे. प्रवासी व मानवता ही पाठकांची दोन दीर्घकाव्ये. पहिल्यात अंतःसृष्टीतला प्रवास वर्णिलेला असून, दुसऱ्यात जीवनाचा व्यापक आणि गंभीर विचार केलेला आहे.

श्री. ना. घ. देशपांडे हे त्यांच्या शीळ या कवितेने विशेष प्रसिद्ध झाले. त्यांच्या काव्यात प्रेमाच्या सूक्ष्म मधुर लहरींचे रम्य दर्शन घडते. आपण प्रमयोगी कवी असल्याचे त्यांनी स्वतःच सांगितले आहे. त्यांच्या प्रेमगीतांतले प्रेम हे जगाचा आणि समाजाचा दुःस्वास करणारे आहे, असे डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात. त्यांच्या वाणीत कधी कधी प्रखर आवेशाचाही संचार होतो. मुकाटयाने अन्याय सहन करणाऱ्याला ते मृत म्हणतात आणि सांगतात --

कुजबुजतो आहे विकृत । मुकाच बसतो तो आहे मृत
भिऊ नको रे । तूच भिला तर । बुडेल लवकर हें जग सारे ।
हे होतीलच विजयी दुर्जन । आणिक सज्जन अगतिक सारे ।

श्री. वा. गो. मायदेव हे शिशुगीतांचे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी स्फुट व खंडकाव्यात्मकही काव्यरचना केली आहे. काव्यविहारी अर्थात् धोंडो वासुदेव गद्रे हे कवी केशवसुतांचे अनुयायी आहेत. निरलंकृत, सहजसुबोध व कधी कधी गद्यसदृश अशा भाषेत ते आपले विचार मोठ्या आवेशाने मांडतात. बोधवादी कवींत यांची गणना होते. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तीन तत्त्वांचा पुरस्कार त्यांनी आपल्या काव्यातून केला आहे. जगाचा न्याय या त्यांच्या कवितेतील काही पंक्ती अशा--

हा न्याय असे जगताचा ॥
रात्रंदिन ज्यांनी श्यावे, पदतळी चुरडुनी जावे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांच्याच कपाळी यावे
उन्मत्त करुनि अन्याय उरावरि खुशाल नाचायाचा ॥

श्री. अनंत काणेकर

श्री. भ. श्री. पंडितही त्यांच्या शिशुगीतामुळेच लोकप्रिय झाले आहेत. चित्रणातला रेखीवपणा आणि नादमधुर शब्दयोजना हे त्यांचे गुण, पिचलेला पावा व उन्मेष आणि उद्रेक या काव्य-खंडात प्रत्ययाला येतात.

श्री. या. मु. पाठक यांचे शशिमोहन हे खंडकाव्य कथानक व स्वभावपरिपोष या दोन्ही दृष्टींनी सरस उतरले आहे.

श्री. अनंत काणेकर यांचा 'चांदरात व इतर कविता' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. श्री. माधवराव पटवर्धन यांनी म्हटल्याप्रमाणे त्यात आशेचे उद्‌गार आहेत, निराशेचे निःश्वास आहेत, विनोदाचा विलास आहे, विडंबनाचाही विहार आहे, चांदरातीचा चमत्कार आहे, दिवसाढवळ्या मिरविणाऱ्या कायदेशीर अन्यायाचा अधिक्षेप आहे. त्यांची विडंबनगीतेही खुसखुशीत, हृद्य व मार्मिक असतात. 'कवने' या त्यांच्या कवितेतल्या पुढील ओळी त्यांच्या अंतःकरणातला सामाजिक आशय व्यक्त करण्यास पुरेशा ठरतील—

नक्षत्रांची फुलाफळांची । कृष्णसख्याच्या व्यभिचाराची ।
आणिक झुरत्या युवयुवतींची । खूप जाहली हो रडगाणी ॥
धनी जनांशी झुंज खेळनी । क्षणभर ज्यांना आली ग्लानी ।
त्यांना आम्ही गाऊ गाणी । ऐकुनि जी चवताळुनि लढतिल ।
आणि स्थापितिल सत्ता अपुली ॥

श्री. ग. ल. ठोकळ हे ग्रामीण जीवनाचा आविष्कार करीत काव्यक्षेत्रात उदयास आले. मीठभाकर या नावाने त्यांच्या कविता संग्रहित झाल्या आहेत. भोळ्या ग्रामजनांची भावपूर्ण चित्रे ते रेखाटतात व थोडक्यात पुष्कळ अर्थ व्यक्त करतात. अभिनव उपमा, नादमधुर शब्दयोजना आणि ठाकठिकीची रचना यांमुळे ठोकळांच्या काव्याला गोडी आली आहे. गरिबीचा पाहुणचार या त्यांच्या कवितेतील काही पंक्ती अशा—

या बसा पाव्हनं असं, राम राम घ्या
कोनच्या तुम्ही गांवाचं ? गाठुडं तिठं राहूं द्या !
घोंगडी टाकिली इठं बसा तीवर
अनमान करू नका आता, हे समजा आपलं घर.
वाढूळ चालता जनू, लई भागला
हे पगा काढलंय् पाणी, आंघूळ कराया चला
आटपा बिगीनं जरा, ताट वाढलं
पाव्हनं, चला या आता, हे पगा पिढं टाकलं
वाढली पगा ज्वारिची जाड भाकरी
निचितीनं जेवा अता जायचं ना शेतावरी

काव्यकेतकी, अनुपमा, सोपानदेवी हे श्री. सोपानदेव चौधरी यांचे कवितासंग्रह आहेत. यांची कविता संगीतानुकूल असल्याने ती गेय असते. कुठल्याही विशिष्ट सामाजिक वा राजकीय विचारांचा त्यांच्या कवितेत प्रचार नसतो. ते भावकवी आहेत.

श्री. सोपानदेव चौधरी

आधुनिक नवकवितेविषयी त्यांना तिरस्कार आहे. ते काही नवकवींच्या कवितांची उपहासात्मक विडंबनेही चांगली करतात. त्यांच्या एका कवितेचा उपहासगर्भ नमुना असा—

एका अंधाऱ्या खोलीत । काही साहित्यिक बंधू

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

"जो तो स्वतःला समजे । धरित्रीचा मध्यबिंदू !
आणि सहाजिक होई । त्यांना ऐसा बुद्धि-भ्रंश
माझ्यापासूनीच होती । सुरू अक्षांश-रेखांश !
जड ऐशा डोक्यावरी । अहंकारांचे डोंगर
ऐसा शीण दुणावता । होई धरणीला भार !
ह्यांच्या वितंडवादाने । भ्रम होई स्थिरांचरां
तेव्हापासूनीया पृथ्वी । फिरू लागे गरागरा ! !

या काळात काही भाषांतरित कविताही निर्माण झाली. प्रस्तुत कालखंडात जी काही भाषांतरे झाली, ती मुख्यत्वे इंग्रजी व संस्कृत काव्यांची आहेत. ग. रा. हवालदार यांनी इलियडला मराठी वेष चढविला. द. रा. बापट व वि. ह. देशपांडे यांनी बायरनचा अनुवाद केला. गो. न. नातू यांनी टेनिसनच्या व चंद्रशेखरांनी मिल्टनच्या काव्याचे अनुवाद केले. या सर्व अनुवादांत डॉ. रा. चिं. श्रीखंडे यांचे नाव प्रामुख्याने झळकते. गीतगोविंद, कुमारसंभव, मेघदूत, तुलसीरामायण, इ. ग्रंथांचे काव्यरूप अनुवाद डॉ. श्रीखंडे यांनी सुरस आणि प्रसादयुक्त केले आहेत. तुलसीदासाच्या रामायणात भगवान शंकर पार्वतीला रामचरितकथा सांगायला प्रवृत्त झाला आहे. त्या प्रसंगाचे काही अनुवादश्लोक असे –

श्रीरामचंद्रगुणनामकथांबुराशी ।
ज्या पार ना परि यथामति वर्णु त्यासी ।।
तूं आवडों परिस गे गिरिराजबाले ।
श्रीरामरम्यचरिते मन हो निवालें ।।
हरिचरित्र विशुद्ध मनोहर । श्रवण तू गिरिजे कर सादर ।।
स्तविति ज्या निगमागम पावन । प्रभुयशे तुज तीं करुं वर्णन ।।
अवतरे प्रभु ज्यास्तव भूवरी । जगि अतर्क्यचि ते कवणा जरी ।।
गमत राम अगम्य वचा मना । परिस तू परि सन्मतिकामना ।।
तरि पुराण मुनिश्रुति साधु ते । जशि यथामति वर्णिति या कथे ।।
कळुनि ये मज ज्यापरि ते, तुला । सकल मी अजि वर्णिन हे तुला ।।
जेव्हां जेव्हां छळित जगता घोर सद्धर्मनाश ।
वाढू लागे असुरकरणी नष्ट नीती विशेष ।।
गो-विप्रांना सुरधरणिना त्रास होत प्रचंड ।
तेव्हां तेव्हां प्रभु अवतरे रक्षणीं आत्तदंड ।।
(सुश्लोक मानस, बा. कां. २३.११–१५)

अलिकडच्या काळात श्री. वा. शि. कोल्हटकर यांनी अभंग भारत व अभंग भागवत या नावांनी भारत-भागवतांचे अभंगरूप अनुवाद करून ते प्रकाशित केले आहेत.

आधुनिक मराठी कविता ही मुख्यतः लौकिक जीवन आणि मानसिक अनुभूती यांच्या आविष्कारानेच व्यापलेली आहे. अध्यात्म, परमात्म किंवा भक्तिमार्ग यांच्याकडे तिचा ओढा फार

कमी आहे. असे असले तरी या आधुनिक प्रवाहाशी समांतर असा भक्तिमार्गी कवितेचा प्रवाहही काही व्यक्तींनी आजतागायत वाहता ठेवला आहे. या गोष्टीचे श्रेय अनेकांना असले, तरी विष्णुदास, दासगणू व तुकडोजी या तीन संतकवींची नावे या बाबतीत अग्रगण्य ठरतील. विष्णुदास म्हणजे श्री. नरहर सदाशिव जोशी. भक्तिरसाने उचंबळलेली अनेक गोड पदे त्यांनी लिहिली. दासगणूंनी भक्तिलीलामृत, संतकथामृत, भक्तिसारामृत, गुरुचरित्र-सारामृत, श्रीमत् शंकराचार्यचरित्र, ज्ञानेश्वरचरित्र; अनेक कीर्तनोपयोगी आख्याने; अमृतानुभव ग्रंथावरील टीका; पौराणिक खंडकाव्ये, अनेक पदे अशी विपुल काव्यसंपदा निर्माण केली. प्राचीन मराठी संतकवींची परंपरा विसाव्या शतकापर्यंत जिवंत ठेवण्याच्या श्रेयात त्यांचा वाटा मोठा आहे.

संत तुकडोजीमहाराज

संत तुकडोजीमहाराज हे याच महान परंपरेतले एक श्रेष्ठ कवी होत. अनुभवसागर भजनावली, दिव्यदर्शन भजनावली व अनुभवामृत अभंगावली हे त्यांचे अभंगसंग्रह आहेत. तुकडोजींचे लिहिणे साधे, सरळ पण हृदयस्पर्शी आहे. त्यात विलक्षण तळमळही आहे. त्यांचा एक अभंग असा –

आम्ही पक्षियाप्रमाणे । नित्य नवे अमुचे जिणे ।।
उडो मनाचिया मागे । जिकडे नेई तिकडे वेगें ।।
स्थिर न होयच क्षणी । चित्त भ्रमें हें भ्रमणी ।।
तुकड्या म्हणे तूं घरटें । होय तेव्हां पांग फिटे ।।

इ. स. १९३५ च्या सुमारास मराठी कविता संकुचित आणि स्वयंकेंद्रित बनली. त्या काळात होऊन गेलेल्या स्वातंत्र्याच्या राष्ट्रव्यापी आंदोलनापासूनही ती दूर आणि अलिप्त राहिली. पुढे पुढे तर थिल्लर आणि उथळ प्रकृतीच्या प्रेमगीतांनी आणि ग्रामगीतांनी ती अधिकच खालच्या पातळीवर गेली. ही परि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्थिती बदलण्यास आणि कवितेला समाजाभिमुख करण्यास एक कवी पुढे आले. त्यांचे नाव अनिल अर्थात आत्माराम रावजी देशपांडे. फुलवात, भग्नमूर्ती, निर्वासित चिनी मुलास व पेर्ते व्हा हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. फुलवातीतील कविता प्राधान्याने प्रेमविषयक व व्यक्तिगत आहे. भग्नमूर्ती हे त्यांचे खंडकाव्य होय. त्यात कवीच्या प्रतिभेची परिणत अवस्था दृष्टिगोचर होते. रामटेक येथील एका भग्नमूर्तीचे दर्शन घडताच त्यांचे कविमन व्यथित झाले. ते भग्नशिल्प त्या अवस्थेला का आले, याची कारणे शोधता शोधता ते बोलू लागतात—

आधि पोखरली जाते संस्कृती । तिच्यातिल तेज नाहिसे होते ।
लयाला जाते विचारसामर्थ्य । बनतात विद्या तात्त्विक केवळ ।
निरुपयोगी चैतन्यहीन । विसंगतच लोकजीवनाशी ।

आणि शेवटी—

हळूहळू मग नाहीसे होते । सामर्थ्यदेखील स्वसंरक्षणाचे ॥

पुढे त्यांनी आपल्या राष्ट्राला कोणत्या अवगुणांमुळे अशी अवकळा प्राप्त झाली, त्याचे हृदयभेदक वर्णन केले आहे. शेवटी ती भग्नमूर्ती भारतीय लोकांना संदेश देते, तो असा—

असलात जरी आज वामन । वाढ खुंटलेले खुजटलेले ।
दबले दाबले चारी बाजूंनी । तरीही धरा त्रिविक्रमरूप ।
दाबा पायाखाली बळी काळाला ॥

निर्वासित चिनी मुलास हेही त्यांचे खंडकाव्य आहे. भग्नमूर्तीत मांडलेला आदर्श हा राष्ट्रीय संस्कृतीच्या पुनःसंस्थापनेचा आहे; तर या काव्याची भूमिका अधिक व्यापक म्हणजे शुद्ध आंतरराष्ट्रीय स्वरूपाची व मानवहितवादी आहे, असे डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात. एका असहाय्य चिनी बालकाला पाहून कवीचे हळुवार मन कंपित व संतप्तही झाले आणि अशा निरपराध जीवांचा निर्दय छळ करणाऱ्या या जीर्ण जगाचा व अमानुष संस्कृतीचा निःशेष अंत होवो अशी अपेक्षा त्याने केली. कवी म्हणतो—

त्या जीर्ण जगाच्या चितेतूनच । उडणार आहे अमर-पक्षी ।
नव्या स्थितीच्या नव व्यवस्थेच्या । नव आदेशाचा नवाकांक्षांचा ।
घेत जगदंड स्वपक्षाखाली ॥

मराठीत मुक्तछंदाची चर्चा प्रथम अनिलांनीच केली आणि सध्याचा रूढ मुक्तछंदही त्यांनीच मराठीला मिळवून दिला. इतकेच नव्हे; तर त्या मुक्तछंदाच्या द्वारे पुरोगामी आशय अभिव्यक्त करण्यासाठी त्यांनीच विशेष पुढाकार घेतला.

रविकिरण मंडळाने उत्पन्न केलेली व्यक्तिवादाची कोंडी फोडून तिला समाजाभिमुख व राष्ट्रीय आकांक्षेने प्रेरित करणारे दुसरे श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकर हे होत. जीवनलहरी, विशाखा, किनारा हे त्यांचे कवितासंग्रह आहेत. पहिल्या संग्रहातच त्यांची क्रांतिवादी वृत्ती प्रकट झाली व दुसऱ्या कवितासंग्रहात त्यांच्या कवित्वशक्तीचा परमोत्कर्ष झाला. गोविंदाग्रजांनंतर समृद्ध आणि रम्योज्ज्वल कल्पकतेची देणगी लाभलेला कुसुमाग्रजांखेरीज आधुनिक मराठी कवींत दुसरा कवी सापडणे कठिण आहे, असे डॉ. देशपांडे लिहितात. एका लहानशा उदाहरणावरून त्यांच्या कल्पकतेची चुणुक ध्यानी येईल.



श्री. वा. रा. कांत

कवी अनिल

सौ. संजीवनी मराठे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एका सळसळत येणाऱ्या नागाचे वर्णन करतांना ते लिहितात–

कधि लवचिक पातें खड्गाचें लवलवते ।
कधि वज्र धरेवर गगनांतुनि फडफडते ।
कधि गर्भरेशमी पोत मधें जरतार ।
प्रमदेचे मादक वस्त्र जणू सळसळते ।।

गरिबांविषयी, पददलितांविषयी कुसुमाग्रजांना अपार सहानुभूती वाटते. हिमलाट, आगगाडी व जमीन, बळी, लिलाव, इ. कवितांतून त्यांनी पददलितांची दुःखे परिणामकारक भाषेत व्यक्त केली आहेत. म्हणूनच श्री. खांडेकर त्यांना 'मानवतेचे कवी' या उपाधीने गौरवितात. पुढील काव्यपंक्तींवरून ही उपाधी सार्थ ठरते.

आकाशापरि उदार माझी गाढ गहन प्रीती ।
दास्य अनीती सहानुभूती हीच मला नीती ।।
जुमानितों ना जातिवर्ण मी कर्मबंधने वा ।
एक मानतो मी मानवता योग्य तिची सेवा ।।

ते मानवतावादी आहेत म्हणूनच ते क्रांतिवादी आहेत. क्रांतीचा जयजयकार, बलिदान, आवाहन, इ. कवितांतून त्यांनी क्रांतिमार्गाचा ओजस्वी पुरस्कार केला आहे. निरपराध आणि असहाय मानवतेच्या दुःखाचे अत्यंत हृदयविदारक आणि उपरोधिक चित्रण फेरीवाला या कवितेत त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे–

हा घट देखा, यांतिल शोणित । मेले तरी अद्याप उधाणत ।
उमद्या युवकांचे हो जीवित ।
रणांगणावर पिळून त्याचा घट हा ताजा भरला !
आला आला फेरीवाला ।।
कुपीत या भरले जल कोमल । अगणित अबलांच्या नेत्रांतिल ।
मौज बघा, घ्या नुसती चाहुल ।
थरथरती हे थेंब भयाने । स्वभाव अजुनी उरला !
आला आला फेरीवाला ।।
मंजुषेत या राख मनोहर । उदात्त सोज्ज्वल नैतिक नागर ।
आग बरसता सुखी घरांवर ।
मिठ्या मारुनी गळ्यात जळले । त्यांचा मिश्रित काला ।
आला आला फेरीवाला ।।

श्री. वा. रा. कांत हे कुसुमाग्रजांच्याच प्रकृतीचे आहेत. दोघांनाही अभिजात कल्पकतेचे देणे लाभले असून, दोघेही क्रांतीचे उद्गाते आहेत. फरक सांगायचा तर तो हा, की कुसुमाग्रजांची प्रतिभा भव्य-विशाल आहे, तर कांतांची प्रतिभा उग्र-दाहक आहे. रुद्रवीणा हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. रुद्राने आता तृतीय नेत्र उघडायची वेळ आली आहे, असे सुचवून कवी म्हणतो –

नेत्रानली करनी त्रैलोक्याची होळी ।
अन्याय, असमता रगडत पायाखाली ।
कर तांडव रुद्रा विराट विश्वचितेत ।

मानवाला पंगू बनविणाऱ्या मूर्ती कवीला नको असून, त्याला क्रांती हवी आहे. कवी म्हणतो –

क्रांतिदेवी ये विद्युच्चरणी ।
तव नयनीची ठिणगी उडवुनी ।
असंतोष पेटवी जनमनी ।

नवे वर्ष, आशिया, गाशिल का हे गान, यांसारख्या काही कवितांतून कवीने, सांप्रत मानव्याची जी विटंबना चालली आहे, तिच्याबद्दल त्वेष व्यक्त केला आहे. कांतांनी काही बहारीची प्रेमगीतेही लिहिली असून, ती वेचक अर्थवाही आणि नादमधुर शब्दांनी नटलेली आहेत. उदाने आपले मोहक केस सुगंधित करणाऱ्या सुंदरीला उद्देशून कांत म्हणतात –

सळसळतीं नागीणपिले हीं ।
नयननीलिमा प्याली कांहीं ।
धूर पाजुनि कशास करिशी
अधिक धुंद विखार ।

अग्निपथ आणि आशिया ही कांतांची दोन खंडकाव्ये होत. त्यांपैकी पहिले पौराणिक कथेवर आधारलेले असून, दुसऱ्यात भारतीय नेत्यांची भव्य स्वप्ने चितारलेली आहेत. शततारका हा त्यांच्या रुबायांचा संग्रह आहे.

श्री. बा. भ. बोरकर हे सौंदर्याचे उपासक आणि त्याच्या आस्वादात रमणारे कवी आहेत. संतवाङ्मयाचे आणि गोमंतकातील लोकगीतांचे संस्कार त्यांच्या प्रतिभेवर झाले आहेत. त्यांनी तांब्यांच्या गेय कवित्वापासून प्रेरणा घेतल्याचे दिसते. गेयता, कोमलता, लालित्य, माधुर्य आणि अध्यात्म यांतून त्यांच्या काव्याची मूर्त साकारली आहे. त्यांची प्रणयगीते जशी आत्मपर आहेत, तशीच ती धुंद उन्मादकही आहेत. उदा० –

तव नयनांचे दल हललें ग ।
पानांवरच्या दवबिंदूपरी त्रिभुवन हें डळमळलें ग ।

बोरकरांची निसर्गगीतेही प्रभावी असून, त्यांतल्या प्रतिमा रेखीव आणि समृद्ध आहेत. त्यांच्या कित्येक निसर्गगीतांतून निसर्गवैभवाचे मनोज्ञ दर्शन घडते. आकाशमाउलीचे वर्णन करताना ते लिहितात –

कोर बिलोरी तुझ्या कपाळीं शिरिं मोत्यांची जाळी ग ।
तुझ्या लोचनीं मुक्तात्म्यांची शाश्वत नित्य दिवाळी ग ।
हरिकांतीचें वस्त्र तनूवर त्यावर ज्योतिश्चित्रें ग ।
स्रवती ज्यांतुन परम पवित्रें अलिखित संतचरित्रें ग ।।

जुन्या आध्यात्मिक वाङ्मयाच्या परिचयाचा निदर्शक असा आध्यात्मिक सूरही त्यांच्या काही कवितांतून ऐकू येतो. उदा०–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्व हें अनंत गान । जीवन तव एक तान ।
अनुभवी तदीय स्थान, रंगभावजाळीं ।
एक राशि विविध रंगि । एकच जळ हृत्तरंगि ।
एकच स्वर पालटून या अनंत चाली ।।

श्री. श्रीकृष्ण पोवळे हेही एक क्रांतिवादी कवी आहेत. अग्निपराग आणि जळमाती असे त्यांचे कवितासंग्रह आहेत. त्यांच्या कविता बेफिकीर व कलंदर वृत्तीच्या असतात. उदा० –

मी तर मस्त मवाली ।
इहपरलोकावरची माझी श्रद्धा पार उडाली ।
झाकुन डोळे फिरवी श्रद्धा घरकाच्या भवताली ।
चालतसे मी नीति धर्म हे तुडवित पायाखाली ।।

राजकवी श्री. रा. अ. काळेले हे प्रकाशपूजक कवी आहेत. वाग्वसंत, हिमअंगार, गीतनिर्वाण, रूपमति, भावपूर्णा आणि ओळखीचे सूर असे त्यांचे कवितासंग्रह आहेत. वाग्वसंतातील बहुतेक कविता शृंगारप्रधान आहेत. निर्व्याज प्रेमाचे वर्णन करताना त्यांचे तादात्म्य झालेले दिसून येते. विविध अलंकार व कल्पना यांमुळे त्यांच्या कविता सरस झाल्या आहेत. त्यांच्या प्रारंभीच्या कवितांवर रविकिरण मंडळाचा प्रभाव असला, तरी अलिकडे

तेथें होऊं द्या हो, रिती । माझी अश्रूंची ओंजळ ।।
मानव्याच्या संरक्षणी । चाले जेथें घोर रण ।
तेथें माझे ओवाळून । टाकूं द्या हो पंचप्राण ।।

विसर्जन, पहाटवारा आणि कमळवेल या कवितासंग्रहांच्या रूपाने श्री. वि. म. कुलकर्णी हे रसिकांना ज्ञात आहेत. कवीची वृत्ती प्राधान्याने सौंदर्यलक्षी असून, त्यांच्या प्रतिभेला व्यापक सुखदुःखांच्या जाणिवेचा स्पर्श झालेला दिसतो. त्यांच्या कवितांतून वास्तवतेचेही पडसाद उमटलेले आहेत. जीवनातले साधे प्रसंग त्यांनी भावपूर्ण शब्दांत रंगवले आहेत. अलिकडेच त्यांनी प्रसादरामायण हे काव्य लिहिले आहे. ग्रामीण जीवनावरही त्यांनी सुंदर कविता रचल्या आहेत. त्यांची निसर्गवर्णनशैली जिवंत वाटते. नवे पाणी या कवितेतील काही ओळी अशा–

आले नवे नवे पाणी
उसळत, घुसळत, फेसाळत जळ धावे दाहि दिशांनी ।
हे नवजीवन हे संजीवन ये इहलोकात
नवतिची नवी ऋचा गात ।

श्री. ना. ग. जोशी हे काव्यपरीक्षक म्हणून प्रसिद्ध असले, तरी विचारवंत कवी म्हणूनही त्यांचे कर्तृत्व आहे. कविता या नावाचा

श्री. कृ. ब. निकुंब

श्री. वि. म. कुलकर्णी

श्री. बा. सी. मर्ढेकर

त्यांच्या कवितेत दलितांच्या उद्धाराची तळमळ दिसून येते.

श्री. कृ. ब. निकुंब यांनी प्रसादचिन्हे व उज्ज्वला या काव्यसंग्रहांतून सृष्टीचे शांत, रम्य, उदास आणि उदात्त स्वरूप रंगविण्यात यश मिळविले आहे. मानवतेच्या कल्याणाची त्यांना तळमळ असून, ती ते पुढील शब्दांत व्यक्त करतात –

जेथें वाळू–रणी झाले । जीव तृषार्त व्याकुळ ।

स्फुटसंग्रह, जीवनयोग हे खंडकाव्य आणि विश्वमानव हे दीर्घकाव्य अशी त्यांची निर्मिती आहे.

श्री. पु. शि. रेगे यांचे साधना आणि इतर कविता, फुलोरा, हिमसेक आणि दोला हे कवितासंग्रह आहेत. रेगे हे जसे तत्त्वचिंतक तसे सौंदर्यशोधकही आहेत. त्यांच्याबद्दल श्री. वा. ल. कुलकर्णी लिहितात –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्त्रीच्या उठण्यावसण्यात, तिने केलेल्या अंगविक्षेपांत, तिच्या नेत्रकटाक्षांत, तिने दिलेल्या आळोख्यापिळोख्यांत, तिच्या अवयवांच्या एकंदर संगतीत, तिच्या पोषाखांत, एवढेच नव्हे तर तिच्या पदविन्यासात जे सौंदर्य आपणां सर्वांसच अनेकदा प्रतीत होऊन जाते, त्या थरथरत्या सौंदर्यानुभूतीस आपल्या शब्दांत पकडण्यात रेगे मोठे कुशल आहेत.

पण असे असले, तरी ते अनेकदा सदभिरुचीच्या मर्यादा ओलांडून जातात. स्त्रियांविषयीची रेगे यांची वृत्ती प्रतिगामी, मध्ययुगीन व स्त्रीत्वाला कमीपणा आणणारी आहे, असे डॉ. अ. ना. देशपांडे यांचे म्हणणे आहे.

विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगांवकर ही

फोडित धरणे नी बंधारे, भिजवित माती काळी, गोरी,
पहा धावते अखिल जगावर जीवननौका नाचे त्यावर
स्वेदाची ही अखंड गंगा दिवसां, रात्रीं, सांज सकाळीं,
जशी हिवाळीं तशी उन्हाळीं वाहत होती; वाहत राहे
उफाळलेली नागिण जशी जो जो तुडवी त्याला दंशी

कवीच्या यथार्थ व उपहासगर्भ वर्णनसामर्थ्याची प्रतीती पटवून द्यायला त्यांची कीर्तन ही कविता समर्थ आहे. करंदीकरांनी अलिकडे बरीच शिशुगीते लिहिली असून, ती चमत्कृतिजनक आणि मुलांच्या जिज्ञासेला चालना देणारी आहेत.

वसंत बापट यांच्या काव्याची मुख्य शक्ती त्यांच्या समाजाभिमुखतेत आहे. देशातल्या राजकीय व सामाजिक घटनांसंबंधीची

श्री. बा. भ. बोरकर

श्री. विंदा करंदीकर

श्री. मंगेश पाडगावकर

कवित्रयी कवी आणि काव्यवाचक म्हणून रसिकांना सुपरिचित आहे. विंदा करंदीकरांचा थाट गंभीर आणि अभिव्यक्ती मौलिक आहे. त्यांचे ध्रुपद, मृद्‌गंध, जातक, स्वेदगंगा, इ. काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्याबद्दल डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात – स्वेदगंगेसारखी रसरशीत व कल्पकतापूर्ण कविता वाचताना कोणत्याही चोखंदळ व जागरूक वाचकाला केशवसुतांच्या 'तुतारी' ची आठवण न होणे अशक्य आहे. तिच्यातल्या काही पंक्ती अशा–

स्वेदाची ही अखंड गंगा धापा टाकित वाहत आहे
अनंतातुनी अनंताकडे खडकावरतीं हाणित डोकें,
कडे कपारी फोडित सान्या, दरीदरींतुन मारि भरान्या
स्वेदाची ही अखंड गंगा देश, धर्म, रक्ताचे सारे

भावनात्मक प्रतिक्रिया त्यांनी प्रगतिशील भूमिकेवरून अनेक कवितांतून व्यक्त केली आहे. देशाच्या विभाजनावर आधारलेल्या 'झेलमचे अश्रू' या त्यांच्या कवितेत वरील विधानाचा प्रत्यय येईल. तिच्यातल्या काही पंक्ती अशा–

ती ही झेलम् औदार्याची मूर्ती
ती ही झेलम् ऋग्वेदाची स्फूर्ती
दिसते देखा आतां केविलवाणी
कामदुहा ती देवेंद्राची दूती
किती लढाया झाल्या हो तिजपुढती
चेंगिस नादिर अनेक येती जाती
आज मला परि दिसते झेलम् जैशी
उदास, तैशी कधींच दिसली नव्हती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तीरांवरती सैन्यें लढली, मेलीं
परस्परांची हानी भलती झाली !
शांत अशा परि नागरिकांची
अशी न फिरलीं मायीं कुठल्या कालीं
आज ! अरेरे ! झेलम हो शरमिंदी
तिच्या तरंगीं रक्त मिळे जास्वंदी !
या झेलमच्या स्तन्यावर जे पुष्ट
त्या पुत्रांतच व्हावी अंदाधुंदी ! !

मंगेश पाडगावकर हे कवीही दलितांची, पतितांची, श्रमिकांची आणि व्यथितांची म्हणजेच पर्यायाने मानवतेची जाणीव ठेवणारे कवी होत. जीवन–जीवन, अजाण–अजाण, अश्रू, माती, इ. काही कवितांतून त्यांचा दीन–दलितांविषयीचा जिव्हाळा जाणवतो. आपण सुधारत असलो, तरी ते बाह्यात्कारी. त्याचबरोबर आपला जीवनक्रमही उथळ होत चालला आहे. दिव्य, भव्य, उदात्त अशा गोष्टींचे आपले आकर्षण कमी कमी होत असून, आपण क्षुद्र आणि क्षणभंगुर गोष्टींच्या मागे लागलो आहो, असे त्यांना वाटते. कवीच्या मनाची ही खंत त्याने, अहो जग पुढे गेले या कवितेत व्यक्त केली आहे. तिच्यातल्या काही पंक्ती अशा-

घराघरात घुमले तेव्हा तुक्याचे अभंग
निजलेल्या मनातला प्रगटला पांडुरंग
अमृताते पैजा जिंकी अशी ज्ञानेशाची ओवी
होती आणीत मनात नवी अमृत पालवी !
आता सारे बदलले, अहो जग पुढे गेले !
विसरा तो जुना घोष ' रखुमाईवरा बापा '
आतां ओठाओठांवरः ' लारीलप्पा लारीलप्पा '
आहे फार जुनी कथा पाहूनिया क्रौंचवध
वाल्मीकीच्या करुणेत फुले अनुष्टुभ छंद...
जुन्या गोष्टी कशासाठी ! काव्य विसरा हो राव
सध्या रहस्यकथेला आहे बाजारात भाव !
आता सारे बदलले, अहो जग पुढे गेले !

मात्र वास्तव समाजदर्शनापेक्षाही निसर्गदर्शनात पाडगावकरांची प्रतिभा अधिक रंगते. त्यातही पुन्हा तिला वर्षाऋतूचे, जलधारांचे, वादळ-वाऱ्याचे विशेष आकर्षण आहे. तृण, तृणफूल, तृणपर्ण यांवर तर कवीचा विशेष लोभ दिसतो. निसर्गप्रतिमांच्या साहाय्यानेच ते आपली विशुद्ध प्रेमभावना व्यक्त करतात.

श्री. ग. दि. माडगूळकर यांनी काव्यक्षेत्रात मोलाची आणि भरीव कामगिरी केली आहे. गद्य आणि पद्य या दोन्ही क्षेत्रांत ते सव्यसाची व सिद्धहस्त आहेत. ते चित्रपटकवी आहेत, तसेच भावकवीही आहेत. संतकाव्य आणि शाहिरी काव्य या दोहोंचा अर्क त्यांच्या वाणीत उतरला आहे. त्यांची शब्दकळा प्रसन्न आणि हृदयंगम आहे. रामजोश्याच्या वळणावर ते सहजपण सरस अशी लावणी लिहून जातात. एक नमुना असा –

श्री. ग. दि. माडगूळकर

माझ्यासाठी दिली राहुटी । इतरांना मज्जाव ।
तुम्हि माझे बाजिराव ।। ध्रु० ।।
मी मस्तानी हिंदुस्तानी बुंदेली पहराव ।
झिरझिरवाणी निळी ओढणी वाळ्याचा शिडकाव ।।
तुम्ही मराठे नव्हे छाकटे अगदी सरळ स्वभाव ।
शूर शिपाई तुमची द्वाही चारी मुलखी नाव ।।
उभी अंगलट तांबुस फिक्कट नयनिं दाटला भाव ।
बोलाबाचुन घ्या जी वाचुन अर्जी आविर्भाव ।।
काल दुपारी भरदरबारी उरी लागला घाव ।
या पायांशी मज दासीसी मिळल का कधि वाव ।।

सुगंधी वीणा, जोगिया, चैत्रबन, इ. त्यांचे कवितासंग्रह आहेत. नवकाव्याच्या जमान्यात त्यांचे काव्य म्हणजे रणात हिरवळीसारखे प्रसन्न वाटते, असे श्री. वि. पां. दांडेकर म्हणतात. गीत-रामायण ही त्यांची पद्यात्मक रामकथा आज सर्वतोमुखी झाली आहे. त्या काव्यावरूनच त्यांना आधुनिक वाल्मीकी असे म्हणतात. विविध चालींवर आणि विविध पद्यांत त्यांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संपूर्ण रामकथा गायिली आहे. त्या काव्याच्या प्रस्तावनेत श्री. बा. भ. बोरकर लिहितात — माडगुळकरांनी वाल्मीकीच्या काव्यसृष्टीतले वेचीव सौंदर्य आपल्या स्वयंभू प्रतिभेने बिनचूकपणे निवडले आहे आणि अवघ्या छप्पन गीतांत आपली सजीव आणि चलित चित्रकथा तुमच्या आमच्यासमोर मूर्तिमंत उभी केली आहे.

मारुती अशोकवनात गेला आणि त्याने रामाची मुद्रिका जानकीच्या ओंजळीत टाकली. त्या वेळी तिने मारुतीला जे प्रश्न केले, त्या गीतातल्या काही पंक्ती अशा —

मुद्रिका अचुक मी ओळखिली ही त्यांची
मज सांग अवस्था दूता, रघुनाथांची ।। ध्रु० ।।
हातांत धनू तें, अक्षय भाता पृष्ठीं
विरहात काय ते राघव झाले कष्टी ?
कां श्यामल वलयें, नयनतळीं चिंतांची ?
बसलेत काय ते लावुन कर कर्मातें ?
विसरले काय ते दुःखें निज-धर्मातें ?
करतात अजुन ना कर्तव्यें नृपतींची ?
सोडिलें नाहि ना अजुन तयांनी धीरा ?
कां शौर्याचाहि विसर पडे त्या वीरा ?
साह्यार्थ असति ना सैन्यें सन्मित्रांची ?
इच्छिती विजय ना त्यांचा अवघे राजे ?
कां लोकप्रीतिला मुकले प्रियकर माझे ?
विसरले थोरवी काय प्रभू यत्नांची ?

गीतगोपाल हे त्याच धर्तीचे त्यांचे आख्यानकाव्य होय. गोकुळवृंदावनातल्या श्रीकृष्णाच्या लीला त्यात वर्णिल्या आहेत.

कवी सुधांशू अर्थात ह. न. जोशी यांनी माडगुळकरांच्या गीतरामायणाच्या धर्तीवर गीतदत्तात्रेय नावाचे आख्यानकाव्य लिहिले असून, त्यात श्रीनृसिंहसरस्वतींचे चरित्र वर्णिलेले आहे. त्यातील एक नमुना असा —

जन्मुनी अंबामाधवघरी दत्त तो संन्यासाश्रम वरी ।
शिवपूजक ती असे दंपती शांनप्रदोषव्रत आचरती
त्यांच्या सदनीं अयोनिसंभव अवतरले श्रीहरी ।।
नाम नरहरी सार्थ ठेविले ज्योतिर्विद शुभ भविष्य वदले
गायतात हर्षोत्सव करिती, स्वर्ग फुले भूवनी ।।
मुका परि हा बाळ न बोले परी अलौकिक करितो चाळे
लोह स्पर्शिता सुवर्ण होई, चकित करंजापुरी ।।
उपनयनी त्या फुटुनी वाणी चार वेद उद्‌घोषी वदनी
पाहुनि अद्‌भुत बालककरणी स्तिमित सुजन अंतरी ।।

याच धर्तीवर श्री. मधुकर जोशी यांनी गीतशिवायन लिहिले आहे. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या चरित्रातले अनेक तेजस्वी प्रसंग त्यांनी त्यात वर्णिले आहेत. वीर, करुण, रौद्र, अशा नानाविध रसांनी त्यांचे गीतशिवायन श्रवणीय व वाचनीय झाले आहे.

श्री. स. अ. शुक्ल यांनी कुमुदबांधव या टोपण नावाने काव्यसृष्टीत प्रवेश केला. हे मुख्यत्वे गीतकार आहेत. लालित्य व प्रसाद यांनी संपन्न अशी त्यांची रचना असते. त्यांच्या गीतांचे अनेक संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. 'रमला कुठे ग कान्हा,' 'चल रानात सजणा,' 'नाजुक ही फुलवेल,' इ. त्यांची गीते एका काळी कमालीची लोकप्रिय होती.

श्री. शांताराम आठवले हे गूढगंभीर प्रवृत्तीचे कवी आहेत. त्यांनी प्राधान्याने प्रभात चित्रपट कंपनीसाठी गीते लिहिली असून त्यांचे तुकाराम बोलपटातील पुढील गीत लोकप्रिय ठरले आहे —

आधीं बीज एकले । बीज अंकुरले । रोप वाढले ।
एका बीजापोटीं । तरु कोटी कोटी । जन्म घेती ।
सुमने फळे । व्यापूनि जगता तूहि अनंता ।
बहुविध रूपे घेसी घेसी । परी अंती ब्रह्म एकले ।।

श्री. राजा बढे हे एक सुप्रसिद्ध गीतकार आहेत. शृंगार आणि प्रणय यांच्या नाजुक छटा ते मधुर आणि अर्थवाहक शब्दांनी व्यक्त करतात. 'करवंदीमागे' या कवितेत त्यांनी एका लाजऱ्या पोरीचे मनोहारी चित्रण केले आहे, ते असे —

हा अवखळ वारा जन्माचा छळवादी
प्रणयाचे भरतो सूर भावसंवादी
चाहूल तुझी ऐकिली लतावेलींनी
कुजबुजती कलिका परस्परांच्या कानीं
थरकांप जिवाचा असा नाच नयनांचा
पावलोपावलीं गडे फुलांच्या ठेचा
बसवेल कुठवरी उगे मुखर नुपुरांना
हळूहळू गुंजली मधुशब्दांची वीणा

श्री. जगदीश खेबुडकर हे उत्तम शब्दकळा लाभलेले सिद्धहस्त कवी आणि गीतकार आहेत. मराठी बोलपटांतली त्यांची कित्येक गाणी रसिकांच्या जिव्हाग्री आहेत. त्यांनीही माडगूळकरांच्या गीतरामायणाच्या धर्तीवर रामदर्शन या नावाने रामकथा गायली आहे. त्यातील विरहिणी सीतेचे उद्‌गार —

अशोकवनि या, सीतेचा कां, मांडियला उच्छाद,
राघवा, काय असे अपराध ?
सहज मनाला आस लागली,
मृगाजिनाची ल्यावी चोळी,
मृगयेसाठी तुम्हा धाडिले, घडला काय प्रमाद ?
फूल मागता मिळती काटे,
धर्म शोधिता अधर्म भेटे,
पूर लोचनी माझ्या दाटे, घालू कसा मी बांध ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिकडे काया, इकडे छाया,
चाक घेउनी या रघुराया,
या हाकेवर दिशादिशांतुन, उठेल का पडसाद ?

अमरशेख हे देशप्रेमाने भारलेले एक शाहीर कवी होते आपल्या कवनाकवनांतून त्यांनी आपला मराठी बाणा अभिव्यक्त केला आहे. त्यांची वृत्ती क्रांतिकारकाची आणि कविता राष्ट्रीय भावनेने थरारलेली आहे. शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या मेळाव्यात उभे राहून आणि उजवा हात हवेत उंच उभारून जेव्हा ते आपल्या कवनाचे पालुपद आर्त, कंपित आणि तारस्वरात फेकीत, तेव्हा प्रत्येकाच्या अंगावर रोमांच उभे राहत. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या श्रेयात अमरशेखांचा वाटा मोठा आहे. अंगार फुलविणे हे त्यांचे कार्य. याविषयी ते स्वतःच म्हणतात —

होय तोच आहे अंगार । आग ओकणे मला प्यार ।
आग आगिची फुलवावी । सर्व चांगले ठेवावे ।
सगळे वाइट जाळावे । आता नाही हा मरणार ।
नाही हो आता विझणार ।

दुसऱ्या एका कवितेत स्वतःच्या शाहिरीबद्दल ते म्हणतात —

कवन आपुलें स्वैर गायचें । पैशावारी ना विकायचे ।
मोकाटपणे गात राहायचे । आपुन कलेचे सेवक सच्चे ।
आडवायला येतिल जी जी ती बंधने रोक ।
सिंहगर्जना ठोक, शाहिरा ! गाउ लाग बिनधोक ॥

डॉ. वसंत अवसरे हे जीवनातल्या भव्यतेची आणि उदासतेची ओढ असलेले कवी आहेत. त्यांची कविता कधी गंभीर होते, कधी नाजुक प्रेमाचे पदर उलगडते; तर कधी उपरोधिकही होते. त्यांच्या कवितेचा एक नमुना असा —

करूं कसा मी स्वातंत्र्याचा असल्या जयजयकार ?
अजुनि शंखलाबद्ध करींची लेखणी अन् तलवार !
स्वतंत्रतेस्तव लढलों ज्या मी
मृत्युसवेंही झुंज घेउनी
ती न लाभली मजला अजुनी
करूं कुणाचा आणि कशास्तव मी मग जयजयकार ?
धनवन्तांच्या लहरीसंगे
जनतेचें तें जीवन रंगे
मानवता ही धुळीत भंगे
परि सत्तेची न्यायदेवता लोळतसे लाचार !

श्री. ना. रा. मोरे हे अठरा हजार ओळींचे गीतशिवायन लिहून महाकवी ठरले आहेत. त्यांच्या कवितेत शृंगार, वीर, करुण आणि शांत या रसांचा चांगला परिपोष झालेला आहे. शिवाजीमहाराजांचे सईबाईशी लग्न झाले, तो सोहळा वर्णिताना त्यांनी पुढील पंक्ती लिहिल्या आहेत —

तोरण चढले मंगल मंगल लाल महालाला
पिवळी पिवळी हळद लागली राजस शिवबाला
स्मितें जियेच्या कमलविकसना उणेपणा आला
सई अहा ! ती शिवबाकंठी घाली वरमाला
अहा ! सईची अन् शिवबाची दृष्टिभेट झाली
त्याच क्षणीं ती परस्परांची होउनिया गेली
गौर वदन आरक्त सईचें लज्जेने झालें
पदकमलावर खिळून गेली नेत्रांची कमळे
मधुर मोहमय कवन काय हे परमेशें रचिलें
लाजुनि या सौंदर्य चांदण्या रात्रीचे गेले

मनमोहन नातू हे स्वतःला लोककवी समजतात. अफाट आणि स्तिमित करणारी कल्पनाशक्ती हे मनमोहनांचे वैशिष्ट्य होय. त्यांचे तीन विनोदी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. स्पृश्यास्पृश्य विवाहावर त्यांनी खंडकाव्य लिहिले आहे. युगायुगांचे सहप्रवासी हे हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या प्रश्नावर आधारलेले काव्य आहे. प्रतिपाद्य विषय आणि प्रतिपादनशैली या दोन्ही दृष्टींनी हे काव्य यशस्वी ठरले आहे. त्यांच्या एका कवितेतील काही ओळी अशा —

राम बोलो भाई राम । जीवन हे निष्काम ॥ ध्रु ।
जीवन म्हणजे फेस साबुचा जीवन म्हणजे माठ जलाचा ।
क्षणाक्षणाला झिरपायाचा, त्याचे गार व्हायचे काम ॥

श्री. ना. धों. महानोर हे अगदी अलिकडचे कवी आहेत. रानातल्या कविता हा त्यांचा प्रकाशित कवितासंग्रह आहे. त्यांच्याविषयी विजया राजाध्यक्ष लिहितात — शेतरान हे महानोरांचे एक विसाव्याचे स्थान आहे. त्यांचे रानावर आणि रानाचे त्यांच्यावर प्रेम आहे. ते रानाशी सुखदुःखांच्या गोष्टी बोलतात आणि एकदा रानापाशी ही मनोगते सांगितल्यानंतर ती इतरांना सांगण्याची आवश्यकताच उरत नाही... त्यांचे रानाशी झालेले सायुज्य शारीरिक आणि भावनिक अशा दोन्ही स्वरूपांचे आहे. तोच महानोरांचा संपूर्ण अनुभव आहे.

ते आपल्या एका कवितेत निसर्गाचे नाट्य पुढीलप्रमाणे शब्दबद्ध करतात —

हिर्व्या पानांत पानांत काही चावळ चालते
भर ज्वानीतली ज्वार अंग मोडीत बोलते
शेत गव्हाचे पिवळे जरा नशेत झुलते
आणि साळीचे उगाच अंग शहारून येते
पोटऱ्यांतल्या गव्हाचे हसू ओंब्यांत दाटते
केळ कातीव रूपाची छाया पाण्यांत शोधते

स्त्रियांचे काव्य — महाराष्ट्रीय स्त्रियांची काव्यरचना महानु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाव कवयित्री महदंबा हिच्यापासून आजतागायत अव्याहत सुरू आहे; पण त्यांना आधुनिक अर्थाने काव्य म्हणण्यापेक्षा स्त्रियांनी रचलेली गीते असेच म्हणावे लागेल. जुन्या काळची स्त्री ही चूल व मूल यांत गढून गेलेली, एकत्र कुटुंबात राहणारी, कुटुंबासाठी कष्ट उपसणारी, सासुरवास सहन करणारी आणि पतीला देव मानणारी अशी होती. शालेय शिक्षण सोडाच; पण अक्षरओळखीचा संस्कारही तिच्यावर झालेला नव्हता. तिचे वावरण्याचे क्षेत्रही मर्यादित होते. असे असूनही कित्येक नामिक –अनामिक स्त्रियांनी कवितादेवीची उपासना केलेली दिसते. मात्र जुन्या काळातील स्त्रीची कविता ही सण व संस्कार यांना उपयुक्त ठरतील, अशा गीतांची आहे. वामनजन्म, राम–कृष्णांचा जन्म, गौरीस्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर, राधा–कृष्णांच्या शृंगारलीला, हादगा, नागपंचमी, भाऊबीज अशी ती गीते आहेत. देहावरचे गाणे, भक्तिपर भजने, अशांसारखी आध्यात्मिक गाणीही स्त्रियांनी रचली आहेत. जात्यावर दळताना किंवा झोपाळयावर झोके घेताना स्त्रियांनी ओवीवाङ्मयही बरेच निर्माण केले आहे. श्री. साने गुरुजी, सौ. मालतीबाई दांडेकर, सौ. अनुताई लिमये, इ. काव्यसंकलकांनी अशा ग्रामीण ओव्यांचे संकलन केले आहे. या ओव्यांतून पती व कन्यापुत्र यांचे प्रेम, सासरमाहेराविषयी कल्पना, देवादिकांची भक्ती, गोधनावरचे प्रेम, सासुरवासाच्या वेदना, इ. भाव प्रकट झाले आहेत. पांढरपेशा आणि ग्रामीण स्त्रियांचेही कौटुंबिक जीवन ज्यात व्यक्त झाले आहे, अशा काही ओव्या पुढीलप्रमाणे–

सासरचे बोल जसे कारल्याचे वेल
गोड कधी का होईल काही केल्या
सासरचे बोल कडु विषाचे ग प्याले
तुझ्यासाठी गोड केले मायबाई
माझे ग मायबाई नको करूं माझा घोर
रत्न दिलेंस तूं थोर लेकी हातीं
स्त्रियांचा हा जन्म नको घालूं सख्या हरी
परक्याची तावेदारी जन्मवेरी
सकाळी उठून काय म्यां काम केलें
वृंदावन सारविलें तुळशीचें
होवो माझे कांहीं मला नाही त्याची पर्वा
माझा कंथ ग रहावा आनंदात
पावसांवाचून पीक नाही जमिनीला
कंथा ग वांचून सुख नाहीं कामिनीला
देई देवा मज संततीला सोनें
विश्रांतीला बाळ तान्हें मांडीवरी

× × ×

नवस करं गेले इहि िवाई तूं सुन्दरी
जतन कर माझं चार बैल मोठकरी
शेताला जाते कुरी सव्वा मनाचा पेरा झाला
बैल वेशीत डरकला, धनी मनात हरखला
बारा बैलांचा नांगूर, शेत काजळाची वडी
घरधनी ग राबती, संग घरच बारा गडी
लगीन व्हाई, मूळ कशाच मला आलं
माझ्या बंधुजीचं गुऱ्हाळ चालू झालं
रंगीत काढन्या बैल रस्त्यानं झुकतो
माझा बंधुराय लिंब उतार फेकीतो
बैल अंजिऱ्याची शिंग सोनियाची
दृष्ट मी काढते, बैलासंगट धनियाची
गाईंनीं भरला गोठा म्हशींनीं भरला वाडा
आला गवळी माझा, त्याला वाट सोडा

पण आधुनिक अर्थाने आपल्या स्वतःच्या मनाचा, भाव-भावनांचा आणि विचारांचा निर्भयपणे आविष्कार करीत आधुनिक काव्यक्षेत्रात उतरल्या त्या लक्ष्मीबाई टिळक. लक्ष्मीबाईंनी स्त्री-गीतांचे अंतर्बाह्य स्वरूप पार बदलून टाकले. लक्ष्मीबाईंनी राष्ट्रीय, अध्यात्मपर, सामाजिक, प्रासंगिक, ईश्वरभक्तिपर अशी विविध प्रकारची कविता लिहिली. कित्येक शिशुगीतेही त्यांनी लिहिली. रे. टिळक यांचे अपुरे राहिलेले ख्रिस्तायन त्यांनी पुरे केले. त्या जरी ख्रिस्ती झाल्या असल्या, तरी बालपणापासूनचे त्यांच्यावरचे हिंदुत्वाचे संस्कार कधीच पुसले गेले नाहीत. त्यांनी कित्येक प्रेमकाव्येही लिहिली आहेत. पति-पत्नी ही एकाच संसाररथाची दोन चाके असून, एकावाचून दुसऱ्याचे जीवन अपुरे व व्यर्थ आहे, हा एकमेव आशय त्यांच्या प्रेमकाव्यातून प्रकट होतो. पतीला देव मानण्याची कल्पना स्त्रियांच्या मनात पूर्वापार घर करून राहिली आहे; पण पतीला मित्र म्हणण्याचा निःसंकोचपणा लक्ष्मीबाईंनीच प्रथम दाखविला. 'मी तुझी मावशी, तुला न्यावया आले' ही त्यांची अत्यंत भावपूर्ण कविता आहे. कोणत्याही मातापित्यांच्या हृदयाला चटका लावण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. तिचे पहिले कडवे असे –

ही भरली घागर तुझ्या शिरावर बाळे ।
तू उभी ? लागले कुठें कुठें तव डोळे ?
ही गाडी वाजे खड खड खड खड दूर,
हें इकडे उडते धड धड तवही ऊर !
तूं प्रसन्न आतां, क्षणें खिन्न तूं होशी
मेघांत गवसला चंद्रच दुसरा दिसशी !
तूं अल्लड साधी पोर ! लाडके,
गुरुजनें कल्पिली थोर ! लाडके,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुज कशास हा संसार ? लाडके.
हा दोन दिवस तरि टळो म्हणोनी झालें
मन अधीर गेलें माहेरा तव गेलें !

बहिणाबाई चौधरी आणि लक्ष्मीबाई टिळक या एकमेकींना बहिणी मानीत असत; आणि काव्यगुणांत लक्ष्मीबाईंच्या थोरल्या भगिनी ठराव्या असाच बहिणाबाईंच्या प्रतिभेचा अधिकार आहे. जिच्या मनावर कधी धुळपाटीचाही संस्कार झाला नाही अशा, एका शेतकरी कुटुंबातल्या स्त्रीने इतके सहजसुंदर आणि आशयघन असे काव्य निर्माण करावे, हा एक मोठा चमत्कारच म्हणावा लागेल. चूल, मूल, तवा, जाते, फुंकणी, कापणी, मळणी, उपळणी, वारी, पोळा, दिवाळी, सासर, माहेर या वस्तूंतूनच त्यांनी आपले सुंदर विश्वकाव्य उभे केले आहे. त्यांच्या जीवनात, तसाच कवनांत रडकेपणाला कुठेच थारा नाही.

किल्ल्या राह्यल्या ठिकानीं । जेव्हा तिजोऱ्या फोडल्या ॥
तेव्हां याच मानसानं । बेड्या लोखंडी घडल्या ॥

'मानसा मानसा । कधी व्हशील मानुस ।' अशी त्यांची तळमळ आहे. आचार्य अत्रे म्हणतात, की जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल असे त्यांच्या कवितेचे तेज आहे.

सौ. संजीवनी मराठे या 'मराठी साहित्यातील काव्यकोकिळा' या उपाधीने गौरविल्या गेल्या आहेत. प्रेमपर, वात्सल्यपर, ईश्वरपर असे त्यांच्या कवितांचे तीन मुख्य प्रकार आहेत. प्रतीक्षा, संकोच, मीलन, लटका रुसवा, अशा प्रणयाच्या विविध छटा त्यांनी रंगविल्या आहेत. सत्य-शिव-सुंदराची पूजा संजीवनीबाईंना विशेष प्रिय आहे. जीवनातील सौंदर्य टिपावे आणि त्याच्या दर्शनाने इतरांनाही सुखवावे अशी तळमळ त्यांना असते, असे प्रा. मालती किर्लोस्कर म्हणतात. संजीवनीचे

लक्ष्मीबाई टिळक

बहिणाबाई चौधरी



इंदिरा संत

अरे संसार, संसार ! नहि रडनं कुढनं !
येड्या गयांतला हार । म्हनु नको रे लोढनं !

अशी त्यांची संसारदृष्टी आहे. मार्मिकता हा तर त्यांच्या विचारपद्धतीचा स्थायी धर्मच आहे. एकदा त्यांनी छापखाना पाहिला आणि लगेच त्यांच्या डोक्यात विचार चमकला –

मानसापरि मानुस । राहतो रे येडजाना ।
अरे व्हतो छापीसनी । कोरा कागद शाहाना !

कोणत्या वस्तू का व केव्हा घडविल्या गेल्या त्यासंबंधीच्या त्यांच्या मार्मिक कल्पना पाहा –

जेव्हा इमान सचोटी । पापामंदी रे बुडले ।
तेव्हा याच मानसानं । किल्ल्या कुलूप घडले ॥

काव्य म्हणजे तिच्या जीवनावरील टीका नाही, ते तिचे प्रत्यक्ष जीवनच आहे. कदाचित तिचे खरेखुरे जीवन काव्यातच प्रकट झाले असेल, असें श्री. वि. द. घाटे म्हणतात. आला स्वप्नांचा मधुमास ही त्यांची कविता पुढे दिली आहे –

आला स्वप्नांचा मधुमास, उमलवीत उरिंचा उल्हास
निद्रेच्या भूमीवर फुलल्या, स्वप्नसुमांच्या कळया कोवळ्या
मूक मनीषा अंतरांतल्या, उधळिति स्वैर सुवास
ही नटवी प्रीतीची कलिका, घडि घडि दावी अनंतरूपा
धुन्द करी अर्पुनि मनमधुपा, अद्‌भुत प्रणयविलास
टवटवलीं मृदु शैशवसुमने, लेवुनि ते मधुमंगल लेणे
अनिबंध मन गुंगत जाणें, भोगी छंदसुखास

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जागृतींत जे जे वांछियले, ते ते या स्वर्भूमींध सजले
रसरंगें अंतरंग नटले, नाचत जीवनरास

इंदिरा संत यांच्या काव्याचा विषयही प्राधान्याने प्रेम हाच आहे. त्यात विविधता, मुग्धता, रसिकता व संयमी वृत्ती आहे. त्यांच्या कवितेतील भावतरंग जितके सूक्ष्म तितकेच आर्त व कोमल आहेत. प्रेमळ व कलाभिज्ञ पतीविषयी अंतःकरणात उठणाऱ्या अनेकविध सूक्ष्म लहरी आणि त्या निमित्ताने जागृत झालेले सूक्ष्म तरंग, असे इंदिराबाईंच्या कवितांचे स्वरूप आहे,

कुसुमाग्रज

वसंत बापट

शांता शेळके

असे डॉ. अ. ना. देशपांडे सांगतात. जीवनातील विविध अनुभवांच्या भट्टीतून त्यांचे मन तावून-सुलाखून निघाले आहे आणि त्याचा परिणाम अपरिहार्यपणे त्यांच्या कवितेवर झाला आहे. मात्र त्यांची कविता साधी आणि अकृत्रिम आहे. त्यांना विविध रंग आणि रंगछटा यांचे विशेष आकर्षण आहे. त्या दृष्टीने त्यांच्या 'ही निळी पांढरी' या कवितेतील पुढील तीन कडवी उल्लेखनीय ठरतील. त्या कवितेत त्यांनी शरदातील दुपारचे यथातथ्य चित्र काव्यात्मक रीतीने रेखाटले आहे, ते असे –

ही निळी पांढरी शरदांतील दुपार
तापल्या दुधापरि ऊन हिचें हळुवार
दाटली साय कीं स्निग्ध शुभ्र आकाशीं
फिरतात तशा या शुभ्र ढगांच्या राशी
त्या ऊन दुधाचे घुटके घेत खुशाल
सुस्तींत लोळतो हिरवा खालीं माळ
अन् बसल्या तेथें गायी करित रवंथ
वारीत शेपट्या, कोणी चरती संथ
सांचल्या तळ्याचें पाणी लाल गढूळ
उमटलें त्यामधे दुपारचें आभाळ

ती झाडी उलटी धुंद हलेना पान
नजिकच्या पुलाची उलटी भव्य कमान

× × ×

दिस भरलेली ही काय तरी गर्भार
टाकीत पावले चाले रम्य दुपार।

शांता शेळके या आणखी एक विद्यमान प्रथितयश कवयित्री होत. सहज, सुश्लिष्ट व प्रसन्न रचना हा त्यांच्या कवितेचा डोळ्यात भरण्याजोगा गुण होय. शांताबाईंची कविता बऱ्याच अंशी स्वप्नाळू आहे. पुस्तकी जगातच वावरल्याने जीवनातल्या कोमल सौंदर्याला आपण मुकलो म्हणून वाटणारी हळहळ त्यांनी

काव्यातील जीवनी रंगले, जीवनातल्या काव्या मुकले

म्हणून व्यक्त केली आहे. काव्य हे जीवनदर्शनातूनच निर्माण होते, याची जाणीव ठेवून त्या म्हणतात –

अफाट जीवन पसरे भवती
काव्याक्षरे त्यांतुन पाझरती
तयांत होवो विलीन वृत्ति।

त्यांच्या प्रेमविषयक कवितांतून निराशेचे आणि विफलतेचे सूर ऐकायला येतात. शारीरिक सुखाशिवाय खऱ्या प्रेमाची तृप्ती होत नसल्याचा विचारही त्यांत अनेकवार दिसतो. कुठेतरी आत खोलवर एकलेपणाची जाणीव त्यांना सलत असावी, असे वाटते. 'सदाच मी एकली जीवनीं सदाच मी एकली' असे आर्ततेचे उद्‌गार त्यांच्या वाणीतून बाहेर पडतात. मात्र निसर्गाशी जेव्हा त्या मुग्ध नाते जोडतात, तेव्हा त्यांच्या एकलेपणाच्या दुःखाची तीव्रता कमी झाल्याचे दिसून येते.

पद्मा गोळे यांचे प्रीतिपथावर, नीहार, इ. कवितांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. स्त्रीच्या अंतरातील प्रेमाच्या विविध पैलूंची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांनी सरस विपुल चित्रे रेखाटली आहेत. त्यांच्या काव्यांतून आधुनिक काळातल्या स्त्रीच्या कौटुंबिक जीवनातील विविध पदरांचे हृद्य दर्शन घडते. नव्या युगातील ध्येयवादी स्त्रीच्या तेजस्वी आशाआकांक्षाही पद्माबाईंनी अभिव्यक्त केलेल्या आहेत. 'मी ना सत्ययुगीन आर्य महिला' असे या नव्या स्त्रीने चक्क सांगून टाकले आहे. स्वतःची पुरोगामी जीवनदृष्टी सांगताना त्या म्हणतात –

हवे मला प्रिय गृहमंदिर मम, नको परी ती बंदीशाला
प्रेमळ पती मम देव खरोखर, नव्हे परि तो राखणवाला

त्यांच्या कित्येक कविता चिंतनशील व स्फोटक आहेत. 'मी माणूस' या कवितेतील काही काव्यपंक्ती अशा –

स्त्री देवी हें तर खोटं स्त्री सखी हेंही खोटं
स्त्री सुंदर चलनी हुंडी स्त्री म्हणजे नुसती कुंडी
स्त्री म्हणजे केवळ मांस शिकाऱ्यांच्या हातात फास
बाकी सारे मोहक भास चीरफाड अन् तपास !
तरिहि चीड फुटत नाहीं कुजकी भीड तुटत नाहीं
नटवी लाज सुटत नाहीं हिशेब कांहीं मिटत नाहीं
सगळं खरं मानीत नाच प्रेतावरी आपुल्याच

वर उल्लेखिलेल्या कवयित्रींच्या पुढल्या पिढीत पद्मा लोकूर, निर्मला देशपांडे, सरिता पदकी, वृंदा लिमये, अनुराधा पोतदार, वंदना विटणकर, शांताबाई दंडिगे, उषा लिमये, इ. कवयित्री काव्योपासना करताना दिसतात.

विडंबनकाव्य – सुमारे ४० वर्षांपूर्वी मराठी काव्यसृष्टीत विडंबनकाव्याची एक नवी लाट उसळली. मात्र ती अल्पजीवी ठरली. कारण विडंबनकाव्यासाठी लागणारा बुद्धीचा वकूब फारच थोडया कवींमध्ये होता. विडंबन हे एखाद्या कवितेचे असते, एखाद्या कवीच्या शैलीचें असते किंवा एखाद्या विषयाचेही असते. विडंबनकाव्य म्हटले, की पहिल्या प्रथम स्मरण होते केशवकुमार अर्थात प्रल्हाद केशव अत्रे यांचे. त्यांचा झेंडूची फुले हा काव्यसंग्रह विडंबनात्मक आहे. ही झेंडूची फुले पाहताच सर्वांच्या डोळ्यांत भरली. त्यांचा वास गुंगी आणणारा नव्हता. त्याने फक्त थोडयाशा झिणझिण्या आणल्या आणि वाचकांना काव्याकडे सुबुद्धपणे आणि चिकित्सकपणे पाहायला शिकवले.

या विडंबनकाव्याचे स्वरूप स्पष्ट करताना प्र. के. अत्रे यांनी पुढील परिच्छेद लिहिला आहे –

काहीतरी अर्वाच्य विषय घेऊन अद्वातद्वा रचना केली म्हणजे विडंबनकाव्य होते, अशीच बहुतेकांची समजूत दिसते. काव्यरचनेच्या तंत्रावर प्रभुत्व असल्यावाचून आणि काव्याच्या बारीकसारीक मक्ख्यांचे मार्मिक ज्ञान असल्याखेरीज विडंबनकाव्य लिहिता येणे अशक्य आहे. सर्कशीमध्ये विदूषक घोड्यावर बसण्याचे विडंबन करून जो हशा पिकवितो, त्याचे एकच कारण असते; ते म्हणजे तो स्वतः पट्टीचा घोडेस्वार असतो... विडंबनकाव्य हा एक वाङ्मयीन टीकेचा अत्यंत सुसंस्कृत आणि प्रभावी प्रकार आहे. एखाद्या कवीचे विडंबन करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे त्याच्याविषयी आदर व्यक्त करण्यासारखेच आहे.

कवी केशवकुमार

केशवकुमारांनी अनेक कवींचे आणि त्यांच्या शैलींचे विडंबन केले आहे. 'पांखरा, येशिल कां परतून' ही रे. टिळकांची कविता, 'परिटा, येशिल कधि परतून' हे तिचे विडंबन. बालकवींनी अरुण नावाची कविता लिहिली. अरुण म्हणजे प्रभातकालीन पूर्व दिशेचा लाल रंग, हे वास्तव सत्य आहे. गोविंदाग्रजांनी त्यावर अधिक उत्प्रेक्षांचा साज चढवून सवाई अरुण लिहिला आणि त्यावरही अत्र्यांनी विनोदी उत्प्रेक्षांची माळच्या माळ तयार करून आपला अतिभयंकर अरुण निर्माण केला. त्यातल्या काही पंक्ती अशा –

अरुण कशाचा बालकवीचा हा पट्टेवाला
किनखापीचा चढवुनि येई लालभडक डगला
जाण्याच्या घाईंत घसरुनी बालरवी पडला
तोंडावरती आणि घोळणा हा त्याचा फुटला
की रजनीशी दंगामस्ती करी अंशुमाली,
तिने तयाच्या संतापुन ही श्रीमुखात दिधली
क्षणोक्षणी स्वर्गात मारिती कवी फेरफटका
धोक्याचा टांगला तयास्तव द्वारी कंदिल का ?

अत्र्यांनी रामदासांच्या मनाच्या श्लोकांचेही विडंबन केलें आहे. त्यांतले काही श्लोक असे –

तिऱ्हाईत कोणी जरी जाय पंथें
तरी रोखुनी पाहणें त्याकडे तें
अहा, अंगना त्यांतुनी ती असेल
वळोनी तरी पाहि मागें खुशाल.
कुणाच्या विड्या नित्य ओढीत जाव्या
तशा आगपेट्याही लंबे कराव्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चहा होतसे केधवां पैं कुणाचा
अरे मन्न, घेई सुगावा तयाचा.
कडी लागलेली दिसे आंत जेथें
मना सद्गृहस्था, तू त्वरे जाय तेथें
जरी पाहसी आत ना काक अक्षें
कशाला तरी त्या फटी अन गवाक्षें ?

अत्र्यांच्या नंतर श्री. ज. के. उपाध्ये यांनी चालचलाऊ भगवद्गीता लिहिली. श्री. गो. गं. लिमये यांनी मेघदूताच्या धर्तीवर बल्लवदूत लिहिले. अलिकडे आपल्या काव्यवाचनाने लोकप्रिय झालेले वसंत बापट, विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर यांची फुंकर, तेच ते आणि विडी या शीर्षकांनी श्री. शां. शं. रेगे यांनी यशस्वी विडंबने केली आहेत. मात्र हे काहीं असले तरी विडंबनकाव्यांनी मराठी काव्यसृष्टीत मूळ धरले नाही हे खरे.

लक्षी बुद्धी सोज्ज्वळ आणि मोहक रूप घेऊन प्रकट झाली आहे उदाहरणार्थ –

शुभ्रतिमिर–मोहक वसना । मर्मर-रव-चर्चित नयना ।
संथ तरल येई रजनी । विश्वांतुन जपुनी जपुनी ।
मंद मंद ज्योतिःकणही । खोवुनिया मुकुटीं पाही ।
पापणींत टिपुनी घेई । क्षणकणिका ओल्या काही ।
सांवरीत कचभारातें । वेचित ये मंगल हातें ।
जीवांचे हलके झेले । जागृतात अंथरलेले ।

मर्ढेकर हे अश्रद्ध आहेत, असा काही टीकाकारांचा समज आहे; पण तो निराधार आहे. त्यांना संतांबद्दल आदर आहे आणि ईश्वराबद्दल प्रेमही आहे.

आशयाचा तूच स्वामी । शब्द वाही मी भिकारी ।
मागण्याला अंत नाही । आणि देणारा तू मुरारी ।

श्री. रा. अ. काळेले

कवी सुधांशू

श्री. राजा बढे

नवकाव्य – इ. स. १९५० च्या सुमारास काव्यक्षेत्रात एक विलक्षण वादळ सुरू झाले. नवा उत्साह, अभिव्यक्तीचा एक नवा प्रकार, वेगळ्या पद्धतीचे चिंतन, वेगळी प्रतिमाने, असे काही वेगळेच, क्षणभर स्तिमित करणारे, कधी बीभत्स, कधी ओंगळ, तर कधी विफलतेच्या भावनेने ग्रासलेले, असे काही कवित्व नव्या हिरीरीने पुढे येऊ लागले. या नव्या वाटेचा पहिला पथिक म्हणून बा. सी. मर्ढेकर यांचे नाव अग्रगण्य ठरले आहे. मर्ढेकरांच्या काव्यकर्तृत्वाची अपूर्वता जितकी लोकविलक्षण तितकीच त्यांच्या त्या कर्तृत्वचंद्राने उठविलेली टीकेची वादळेही अनन्यसाधारण, असे प्रा. अ. ना. देशपांडे लिहितात. मर्ढेकरांचे 'काही कविता' व 'आणखी काही कविता' असे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. या संग्रहांतील काही कवितांमध्ये मर्ढेकरांची सौंदर्य-

हासडल्या तुज शिव्या तरीही ।
तुझ्याच पायी आलो लोळत

अशा शब्दांत त्यांनी ईश्वराचे अस्तित्व मान्य केले आहे.

पोरसवदा होतीस । कालपरवापावेतो
थांब उद्याचे माऊली । तीर्थ पायाचे घेईतो

या पंक्तींत त्यांनी मंगल मातृत्वाचा गौरव केला आहे.

मर्ढेकरांची कविता बदलली ती दुसऱ्या महायुद्धानंतर. त्या काळात मानवतेची जी दारुण व निर्दय विटंबना झाली, ती पाहून त्यांच्या प्रामाणिक व भावनाशील मनाला उद्वेग उत्पन्न झाला. त्यातच यंत्रयुग अवतरले. त्या पोटी सामान्य माणसाच्या जीवनात घाईगर्दी निर्माण झाली. त्याच्या जीवनाला नीरसता, नियंत्रितता व कृत्रिमता आली. हे सर्व पाहून मर्ढेकरांच्या कवि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मनाला वाटू लागले, की माणूस हा माणूस राहिला नाही; तो जणू जिता मुडदा बनला आहे.

जगायची पण सक्ती आहे, मरायची पण सक्ती आहे

अशा अवस्थेमधील हा मानव मर्ढेकरांना एक मुंगी वाटला किंवा पिपात मेलेल्या ओल्या उंदरासारखाही वाटला. सगळीकडे विषमता, कुठे सहानुभूती नाही आणि त्याहीवर मानवतेची मूल्येच तुडविली गेली, ही आणि अशासारखीच सभोवतालची दृश्ये पाहून मर्ढेकरांच्या जीवनात आणि काव्यातही विफलता दाटून आली. तीच त्यांनी कधी उपहास करून, तर कधी विडंबन करून काव्यात व्यक्त केली. विश्वचक्राचे संचालन करणाऱ्या शक्तीच्या अपरंपार सामर्थ्यापुढे मानवाने आपला तोरा मिरविणे आणि सामर्थ्याचा डंका पिटणे, हे कसे व्यर्थ आहे, हे सांगताना मर्ढेकर म्हणतात –

नळीतले जग नळीत जगते । उगाच रुसवा रसायनाचा ।
उगाच दावा मानवतेचा । आणिक डंका सामर्थ्याचा ।

मर्ढेकर हे आपल्या अशा प्रकारच्या कवितांमुळे त्या काळी कित्येक रसिकांच्या टीकेला आणि अनादराला पात्र झाले. ते माणूसघाणे आणि केवळ लिंगवादी कवी असल्याचाही त्यांच्यावर आरोप करण्यात आला. पण डॉ. अ. ना. देशपांडे लिहितात –

मर्ढेकरांनी लिंगवादाच्या पुरस्काराकरिता लेखणी हाती घेतली नाही, तर पिचलेल्या व निष्ठाशून्य मानवाच्या लैंगिक आसक्तीतील दुबळेपणावर कोरडे ओढण्यासाठीच त्यांनी ती वापरली. हेवा वाटण्याइतकी भाषेवरील हुकमत, भाषा व आशय यांचा उत्कृष्ट संवाद, परंपरागत व सांकेतिक उपमाने व प्रतिमा यांच्याऐवजी यथार्थ अभिव्यक्तीला उपकारक ठरतील अशा नव्या उपमांचा व प्रतिमांचा वापर, अनुभवांशी राखलेले इमान, ही मर्ढेकरांच्या काव्याची खास वैशिष्ट्ये होत. त्यांची वेदना तीव्र आहे आणि तिची पाळेमुळे खोलवर गेलेली आहेत.

मर्ढेकरी वळण ज्यांनी स्वीकारले असे, त्यांच्या नंतरचे कवी मुख्यत्वे य. द. भावे आणि शरच्चंद्र मुक्तिबोध हे होत. आर्द्रा व हळवे भिंग असे भाव्यांचे दोन कवितासंग्रह आहेत. भाव्यांनीही नव्या प्रतिमा वापरल्या आहेत. विवस्त्र पांचाली, चोयटचा, आर्द्रा या त्यांच्या कवितांवरून ही गोष्ट कळून येईल. प्रतीकांचा सूचक वापर हे भाव्यांचे वैशिष्ट्य आहे. मात्र ही प्रतीके कधी कधी दुर्बोध असतात, तर कधी ती आशयाच्या अभिव्यक्तीला थिटी पडतात.

नवी मळवाट हा मुक्तिबोधांचा कवितासंग्रह आहे. मानवतेचा जिव्हाळा त्यांनाही आहे; पण त्यांच्या अभिव्यक्तीत एक प्रकारची उत्तान दाहकता आहे. ही दाहकता हेच त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य होय. ते 'नवी कविता' या कवितेत म्हणतात –

क्रुद्ध प्रचंड नवा मार्तंड उराउरांत पेटला आहे ।
महाप्रखर त्याचा प्रकाश माझ्या उरात कोंदला आहे ।
प्रकाशाचिया सागरावरी कोसळतात काळे पहाड ।
नभघुमट साठवीतसे ब्रह्मांडभेदी ध्वनि धडाड ।
त्याच ध्वनींनी प्रतिध्वनींनी प्रकाशगीत नाचरे आता ।
उरी जन्मते नवी कविता ।
आज हृदयी धगधग करी नवी सविता ।।

मात्र शरच्चंद्र मुक्तिबोध हे केवळ विफलतावादी नाहीत. क्रांतीतून उगवणाऱ्या नव्या सुंदर आणि समृद्ध जीवनाविषयी त्यांच्या मनात दुर्दम्य आशावाद आहे.

या नवकवितेची विशिष्टता आणि पृथगात्मता कशात आहे, ते सांगताना मुक्तिबोध लिहितात –

समाजप्रवण, समाजास बदलू पाहणारी वैचारिक बैठक, प्रतिमांचा उपयोग केवळ अलंकरणासाठी न करता, वास्तवतेचे (आजच्या व उद्याच्या) प्रकटीकरण करण्यासाठी प्रतिमांचा उपयोग करण्यावर भर आणि नवछंद ही नवकाव्याची हळूहळू पुष्ट होत गेलेली ठोकळ वैशिष्ट्ये आहेत.

दुसरा एक नवकवी अशा कवितेचे स्पष्टीकरण पुढील गद्यात्मक कवितेत देतो –

झोपेवाचून तळमळणाऱ्या, भारावलेल्या दिनयामिनींची, हिसळलेल्या मूक दुःखाची, अर्धवलये, पूर्णवलये आढळतात मनकाठावर; रिते करतात आपुले ओझे, माझ्या भावनांच्या विरल्या झोळांत, अर्धगाइल्या डोहाळ्यांचे गीत, फेकते बाहेर उरली मूकता, अधू झालेल्या गर्भाशयातून अपुऱ्या दिसांचे जसे बालक.

पण यावर प्रा. रा. श्री. जोग यांचा आक्षेप आहे, तो असा –

कवीच्या मनात त्याच्या दुःखाच्या अनुभूती काही तरंग उठवितात, पण त्याच्या भावकोषात त्यांना अर्धवट आकार मिळतो न मिळतो तोच, ती कविता तिची सर्वांगे पूर्णाकार घेण्याच्या आधीच बाहेर येते – असा या कवितेचा अर्थ असावा. आणि मग ते विचारतात की, असेच व्हायला पाहिजे काय ? संपूर्ण दिवस झाल्यावर मिळणाऱ्या सुटकेचे समाधान मिळविण्याचा प्रयत्न कवीने का करू नये ? अर्धवट साकारलेली बालके लोकांपुढे का मांडावीत ? अशी कोणती निकड आहे की, अशी अर्भकची निर्मिती झालीच पाहिजे ?

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे व डॉ. रा. शं. वाळिंबे यांनीही नवकाव्यावर आणि त्यातल्या प्रवृत्तींवर समर्पक टीका केली आहे. नवकवींची ही परंपरा आजही खंडित झालेली नाही. दिलीप चित्रे, आरती प्रभू, इ. कवी नवकाव्याची सृष्टी करताना दिसतात. विश्वविद्यालयांतल्या युवक-युवतींपर्यंतही हे नवकाव्याचे लोण पोचलेले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिलीप पुरुषोत्तम चित्रे हे आजच्या नवकवींपैकी एक प्रमुख कवी होत. मर्ढेकरांचा आणि विंदा करंदीकरांचा असा उभयविध ठसा त्यांच्या कवितेवर आहे. त्यांच्याविषयी विजया राजाध्यक्ष लिहितात – " कवी कधी स्वरांनी चकित होतो, कधी स्वर हरवून बसण्याइतका उत्कट होतो, तर कधी त्याला स्वरांकरवी एखादा साक्षात्कार होतो, किंवा व्हावा अशी ओढ लागते. चित्र्यांना स्वरांचे एवढे आकर्षण का ? शब्दांचे अपुरेपण त्यांनी जाणले आहे, स्वर हे शब्दांच्या पलिकडले काही तरी सांगू शकतात, अशी त्यांची भावना आहे, हेच या प्रश्नाचे उत्तर असावे."

आशयसंपन्न प्रतिमांद्वारे घडते. त्यांची एक कविता अशी –

घालीन मी सान्या । ब्रह्मांडास पाठी ।
सोडवीन गाठी । दिक्कालांच्या ।।
विश्वाचे गोकुळ । खेळे माझ्या दारीं ।
सूर्याची लगोरी । टिचवीन ।।
ढगांचा गा हत्ती । बांधीन मी दारी ।
भरीन घागरी । अमृतानें ।।

कवी प्रफुल्लदत्त यांच्यावर रवींद्रनाथ टागोरांच्या कवितेचा प्रभाव आहे. त्यांच्या कवितेत प्रसाद हा गुण विशेषत्वाने जाणवतो. लाटा आणि लहरी या त्यांच्या संग्रहांतल्या कविता रुबायांच्या धर्तीवर असून, त्यांत प्रेम, विरह, निराशा, इ. भावना बोलक्या झाल्या आहेत. त्यांच्या काही काव्यपंक्ती अशा –

स. अ शुक्ल

आरती प्रभू (श्री. खानोलकर)

शाहीर अमरशेख

त्यांच्या वेगवेगळ्या कवितांतल्या काही पंक्ती अशा –

कधी स्वरांच्या लहरी व्हाव्या आणि आंत विराव्या
विरता विरता वृत्ती सान्या शून्याला स्पर्शाव्या
....
घन घन दाटुन आले स्तब्ध अलौकिकता ही
पाऊस पडण्यापूर्वी स्थिरचर उत्कट झाले
माझे पण स्वर गळले.
....
हळूच गेले उठत उठत स्वर मिटून डोळे गहिरे झाले
मंद जाहली वेळ कोवळी नंतर मनही बहिरे झाले

श्री. नारायण सुर्वे हे कामगारजीवन साक्षात अनुभवलेले कवी होत. त्यांच्याविषयी म. वा. धोंड आणि सदा कऱ्हाडे लिहितात, की त्यांची कविता लढाऊ वृत्तीची, समाजक्रांतीची उपासना करणारी, नव्या आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहणारी आहे. प्रामाणिकपणा आणि उत्कट मानसिक अनुभव हे सुर्व्यांचे दोन महत्त्वाचे विशेष. कटोर वास्तवतेचे सत्यदर्शन त्यांच्या काव्यातील

जें कणाकणांतुनि जळतें, तें हिरवळते
जें दलादलांतुनि फुलतें, तें दरवळतें
डोळ्यात ध्यास, कंठात प्यास, उरीं आस
जें जागवि, त्यास्तव दिगंतही हळहळतें
भवताल विसरतो माझ्यासह जेव्हा मी
मम भाव-विवशता गुंजे अंतर्यामीं
अन् घटका घटका रंगुनि काव्य-विलासीं
शून्यात हरपले स्वप्न शोधित व्योमीं

श्री. सदानंद रेगे हे नवकवितेच्या काळात काव्य लिहू लागले; पण त्यांच्यावर मर्ढेकरांच्यापेक्षा कुसुमाग्रजांची छाप विशेष दिसते. कुसुमाग्रज जसे रूपक–उत्प्रेक्षांच्या भाषेत बोलतात, तसेच रेगेही. अक्षरवेल, आयुष्याची सतार, ज्वालांचे पांघरूण, आकाशाचा मृदंग, विजेचा त्रिताल, चांदण्यांच्या वेण्या,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ. त्यांची आवडती रूपके होत. त्यांची विलक्षण कल्पनाशक्ती पुढील काव्यपंक्तींत व्यक्त होते –

आषाढानें खालीं लवून दिलें पालवीला आलिंगन
अन् विजेच्या ओठांनीं तो लागला घेऊं क्षितिजाचें जांभळे चुंबन
जेव्हा वावळाच्या कवेत वितळलेली मातीही झाली लाजेनं हिरवी
अन् दरवळले तिच्या वक्षांवर श्रावणाचें कोवळे चंदन

आरती प्रभू हे स्वतःच स्वतःमध्ये हरवलेले; कशाचाच निश्चय नसणारे; असावे मिळावे तरीही नको, असू नये मिळू नये तरीही नको, अशा वृत्तीत वावरणारे एक नवकवी होत. त्यांची कविता कोड्यासारखी वाटते. तिच्यातून अर्थ गवसणे कठीण जाते. त्यांतल्या त्यात ज्या कवितेचा अर्थ समजणे शक्य होते, अशा एका कवितेतील काही काव्यपंक्ती अशा –

उन्हे पिकणार आतां यायचींत पाखरं
हुरहुर पाहूं लागलीं तुझ्या डोळ्यांचीं कोकरं
वारा वहातीय कसा धारोष्ण शीतळ
उघडं पडून चकाकेल गवताचं ग पितळ
पाननपान कोमट झालंय वाजतायत् वेळू
लागतीलसुद्धा श्वासोच्छ्वास आपसूकच बोलूं
हीच वेळ गाण्याची...दूर डोंगरची रेघ
खोलवर चकाकतेय, वर एक किरमिजी मेघ

ग्रेस हे आजच्या नवकवींपैकी आणखी एक कविवर्य होत. हा कवी सामान्यत्वे दुःखवादी आहे. त्याचे कविमन एकाकी भटकते आहे. स्थिरचरावर एक अनामिक, तरल दुःख पसरले आहे, असे त्याला वाटते. आश्चर्य हे, की या कवीला मरणाचेही आकर्षण आहे. त्याची फुले ही कविता पुढे दिली आहे –

श्वासांतुन माझ्या गेलीं हीं फुलें दूर रानाला
मार्गांत नदीचें पाणी आरक्त कुसुंबी वेळा
वेळूंची व्याकुळ रानें चांदणे जिथे ये बहरा
अन् फुलें धराया माझीं अंधार जाहला गोरा...
सर्वत्र पेरलें होतें आकाश उगवलें भवतीं
माझींच फुलें गहिवरलीं या शून्य दुरस्थावरती
शृंगार लगडला येथें एकांत कुणी सजवावा
ही फुलें न माझीं तुझीं कोरला न मी देखावा
मी तरी रान धरलें हें की फुले इथें मावळलीं
वाटेनें कुठल्या गेली रामाची मिथिला ओली

यांव्यतिरिक्त ग. ह. पाटील, गोपीनाथ तळवळकर, ना. ना. हूड, ह. स. गोखले, र. लु. जोशी, गोविंद जोशी, संजीव, पी. सावळाराम, रवींद्र भट, भालचंद्र खांडेकर, बाबुराव गोखले, योगेश्वर अभ्यंकर, दत्तप्रसन्न कारखानीस, वसंत चिंघडे, वसंत वैद्य, श्रीनिवास पाटणकर, सूर्यकांत खांडेकर, गंगाधर महांबरे, योगिनी जोगळेकर, सतीश काळसेकर, बी. रघुनाथ (कुलकर्णी), मधुकर केचे, इ. कवींनीही काव्यरचना करून मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे.

(अपूर्ण)

● ● ●

S.J.V.J. PRATISHTHAN LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No. 6

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 8417

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जगात ज्या मोठमोठ्या शक्ती काम करीत आहेत, त्यांचे यथातथ्य आकलन आपणांस न होणें ही गोष्ट शक्य आहे. पण एवढे तरी आपण समजून घेणे अगत्याचे आहे, की भारत म्हणजे काय आहे व त्याने आपल्या सामाजिक व्यक्तिमत्वाचा विकास कशा प्रकारे करून घेतला आहे, भारताच्या विभिन्नत्वाचे पैलू कोणते आणि त्याची सुदृढता कुठे सुगुप्त आहे, या मुलभूत गोष्टी आहेत. त्यांचे ज्ञान जर आपण मिळवले नाही, तर आपण भारत काय आहे ते जाणण्यास असमर्थ ठरू आणि जर आपण भारताला जाणू शकलो नाही, तर आमचे भाव, आमचे विचार, आमची कार्ये या सर्व गोष्टी अपूर्ण राहतील व आपण भारताची सर्वांगीण आणि प्रभावपूर्ण अशी सेवा करू शकणार नाही.

– पं. जवाहरलाल नेहरू
('संस्कृति के चार अध्याय' प्रस्तावना)

भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi